1314

॥ श्रीराम ॥

श्रीमद्गोस्वामी तुलसीदासविरचित

# श्रीरामचरितमानस

[ मराठी अर्थासहित ]



टीकाकार—**हनुमानप्रसाद पोद्दार**

अनुवादक—
**डॉ. गो. रा. कुलकर्णी,** एम. ए., पी. एच्. डी., डी. लिट्

संपादक—
**श्री. वि. गो. देसाई,** एम. ए., बी. एड्. काव्यतीर्थ

**मराठी आवृत्ती**

**मूल्य**—

॥ श्रीहरि: ॥

# निवेदन

श्रीरामचरितमानस या ग्रंथाचे स्थान हिंदी साहित्यातच नव्हे, तर विश्व-साहित्यामध्ये आगळे-वेगळे आहे. याच्या तोडीचा असाच सर्वांग-सुंदर, उत्तम काव्य-लक्षणांनी युक्त, साहित्यातील सर्व रसांचा आस्वाद देणारा, काव्यकलेच्या दृष्टीनेसुद्धा सर्वोच्च कोटीचा तसेच आदर्श गार्हस्थ्य-जीवन, आदर्श राजधर्म, कौटुंबिक जीवन, आदर्श पातिव्रत्य धर्म, आदर्श भ्रातृधर्माबरोबर सर्वोच्च भक्ती, ज्ञान, त्याग, वैराग्य तसेच सदाचाराची शिकवण देणारा, आबालवृद्ध, स्त्री-पुरुषांना, सारखाच उपयोगी आणि सगुण साकार भगवानांची आदर्श मानव-लीला व त्यांचे गुण, प्रभाव, रहस्य आणि प्रेमाचे गहन तत्त्व अत्यंत सरळ, मनोहर आणि ओजस्वी शब्दांमध्ये व्यक्त करणारा दुसरा ग्रंथ हिंदी भाषेमध्येच नव्हे, तर कदाचित जगातील कोणत्याही भाषेत आजपर्यंत लिहिलेला नसावा. याच कारणामुळे जितक्या आवडीने गरीब-श्रीमंत, शिक्षित-अशिक्षित, गृहस्थ-संन्यासी, स्त्री-पुरुष, बालक-वृद्ध इत्यादी सर्व वर्गांतील लोक हा ग्रंथराज वाचतात, तितक्या आवडीने अन्य कोणताही ग्रंथ वाचत नसावेत. भक्ती, ज्ञान, नीती, सदाचार यांचा जितका प्रचार या ग्रंथामुळे जनतेत झालेला आहे, तेवढा कदाचित इतर कोणत्याही ग्रंथाने झालेला नाही. मॉरिशस, फिजी इत्यादी परदेशातही या ग्रंथाचा प्रचार आहे.

ज्या ग्रंथाचा जगात इतका मान आहे, त्याच्या अनेक आवृत्त्या छापल्या जाणे व त्यावर अनेक टीका लिहिल्या जाणे हेही स्वाभाविकच आहे. म्हणूनच श्रीरामचरितमानसाच्या आजपर्यंत शेकडो आवृत्त्या छापल्या गेल्या आहेत. यावर शेकडो टीकासुद्धा लिहिल्या गेल्या आहेत. याच्या पाठासंबंधीही रामायणाच्या विद्वानांमध्ये खूप मतभेद आहेत. इतकेच काय, कित्येक ठिकाणी प्रत्येक चौपाईमध्ये एक ना एक पाठभेदही विभिन्न आवृत्त्यांमध्ये दिसून येतात. जितके पाठ-भेद या ग्रंथामध्ये दिसून येतात, तितके कदाचित इतर कोणत्याही प्राचीन ग्रंथामध्ये दिसून येत नाहीत. यावरून या ग्रंथाची विशेष लोकप्रियतासिद्ध होते.

याशिवाय रामचरितमानस हा एक आशीर्वादात्मक ग्रंथ आहे. श्रद्धाळू लोक यामधील पद्यांचा मंत्रवत आदर करतात आणि याच्या पाठाने लौकिक आणि पारमार्थिक अनेक कार्ये सिद्ध करून घेतात. इतकेच काय, याचे श्रद्धेने पारायण केल्याने आणि यात असलेल्या उपदेशांचे विचारपूर्वक मनन केल्याने, तसेच त्यानुसार आचरण केल्याने व यात वर्णन केलेल्या भगवंतांच्या मधुर लीलांचे चिंतन आणि कीर्तन केल्याने मोक्षरूप परम पुरुषार्थ व त्यापेक्षाही अधिक भगवत्प्रेमाचा लाभ सहजरीत्या मिळू शकतो. ज्या ग्रंथाची रचना गोस्वामी तुलसीदास यांच्यासारख्या अनन्य भगवद्भक्ताकडून झालेली आहे, त्यांनी भगवान श्रीसीताराम यांच्या कृपेने भगवंतांच्या दिव्य लीलांचा प्रत्यक्ष अनुभव घेऊनच यथार्थ वर्णन केले आहे. प्रत्यक्ष भगवान श्रीगौरीशंकर यांच्या आज्ञेने ज्याची रचना झाली आहे, त्या ग्रंथाचा अशा प्रकारचा अलौकिक प्रभाव असणे, यात

आश्चर्य ते काय? अशा अवस्थेमध्ये या अलौकिक ग्रंथाचा जितका प्रचार केला जाईल, त्याचे जितके अधिक पठन-पाठन आणि मनन-अनुशीलन होईल, तितके जगाचे कल्याण होईल, यात जरासुद्धा संदेह नाही. जगामध्ये सुखशांती व प्रेम यांचा प्रसार करण्यासाठी आणि भगवत्कृपेचा जीवनात अनुभव घेण्यासाठी रामचरितमानसाचे पठन व अनुशीलन करणे आवश्यक आहे.

या दृष्टीने गीतेप्रमाणेच मानस या ग्रंथाच्या कित्येक लहान-मोठ्या आणि शक्य तो शुद्ध, प्रामाणिक, स्वस्त, सचित्र व सटीक आवृत्त्या काढण्याची व्यवस्था गीताप्रेसकडून केली जात आहे. तसेच विविध भाषांमध्ये अनुवादही प्रकाशित झाले आहेत. मानसाचा हा मराठी अनुवाद त्याचाच एक भाग आहे.

पाठ व अर्थ यांमधील त्रुटींबद्दल आम्ही आपल्या विद्वान वाचकांची क्षमा मागतो, आणि ही भगवंतांची वस्तू विनम्र भावनेने भगवंतांच्याच चरणी अर्पण करतो.

विनीत—

**प्रकाशक**

# श्रीराम-स्तुति

**श्रीरामचन्द्र कृपालु भजु मन हरण भवभव दारुणं।**
**नवकंज-लोचन, कंज-मुख, कर-कंज पद कंजारुणं॥**
**कंदर्प अगणित अमित छबि, नवनील-नीरद सुंदरं।**
**पट पीत मानहु तड़ित रुचि शुचि नौमि जनक सुतावरं॥**
**भजु दीनबंधु दिनेश दानव-दैत्यवंश-निकंदनं।**
**रघुनंद आनँदकंद कोशलचंद दशरथ-नंदनं॥**
**सिर मुकुट कुंडल तिलक चारु उदारु अंग विभूषणं।**
**आजानुभुज शर-चाप-धर, संग्राम-जित-खरदूषणं॥**
**इति वदति तुलसीदास शंकर-शेष-मुनि-मन-रंजनं।**
**मम हृदय-कंज निवास कुरु, कामादि खलदल-गंजनं॥**
**मनु जाहिं राचेउ मिलिहि सो बरु सहज सुंदर साँवरो।**
**करुना निधान सुजान सीलु सनेहु जानत रावरो॥**
**एहि भाँति गौरि असीस सुनि सिय सहित हियँ हरषीं अली।**
**तुलसी भवानिहि पूजि पुनि पुनि मुदित मन मंदिर चली॥**
सो०—जानि गौरि अनुकूल सिय हिय हरषु न जाइ कहि।
मंजुल मंगल मूल बाम अंग फरकन लगे॥

~~०~~

॥ श्रीहरि: ॥

# श्रीरामचरितमानसची

# विषय-सूची


| अ०नं० | विषय | पृष्ठ-संख्या |
|---|---|---|
| १ | नवाह्न पारायणाचे विश्राम स्थान | २४ |
| २ | मास पारायणाचे विश्राम स्थान | २४ |
| ३ | पारायण-विधी | २५ |
| | **बालकाण्ड** | |
| ४ | मंगलाचरण | १५ |
| ५ | गुरु-वंदन | १७ |
| ६ | ब्राह्मण-संत-वंदन | १८ |
| ७ | खल-वंदन | २० |
| ८ | संत-असंत-वंदना | २१ |
| ९ | रामरूप सर्व-जीव-वंदन | २५ |
| १० | भक्तिमय कवितेचा महिमा | २५ |
| ११ | कवि-वंदन | ३२ |
| १२ | वाल्मीकी, वेद, ब्रह्मदेव, देवता, शिव, पार्वती इत्यादींना वंदन | ३३ |
| १३ | श्रीसीताराम-धामवंदन | ३५ |
| १४ | नाममहिमा | ३८ |
| १५ | श्रीरामचरित महिमा | ४६ |
| १६ | मानस-रचनेची तिथी | ५३ |
| १७ | मानसचे रूप व माहात्म्य | ५४ |
| १८ | याज्ञवल्क्य-भरद्वाज-संवाद | ६२ |
| १९ | सतीचा भ्रम आणि खेद | ६५ |
| २० | शिवांकडून सतीचा त्याग, | ७३ |
| २१ | सतीचे दक्ष-यज्ञात जाणे | ७६ |
| २२ | सतीचा देहत्याग | ७९ |
| २३ | पार्वतीचा जन्म आणि तप | ७९ |
| २४ | श्रीरामांची शिवांना विनंती | ८८ |
| २५ | सप्तर्षींकडून सतीची परीक्षा | ८९ |
| २६ | कामदेवाचे भस्म होणे | ९३ |
| २७ | रतीला वरदान | ९८ |
| २८ | देवांची शिवांना विनंती | ९९ |
| २९ | शिवांच्या विवाहाची तयारी | १०१ |
| ३० | शिवांचा विवाह | ११० |
| ३१ | शिव-पार्वती-संवाद | ११६ |
| ३२ | अवताराचे हेतू | ११७ |
| ३३ | नारदाचा अभिमान | १३१ |
| ३४ | विश्वमोहिनीचे स्वयंवर | १३५ |
| ३५ | मनु-शतरूपा यांना वरदान | १४४ |
| ३६ | प्रतापभानूची कथा | १५२ |
| ३७ | रावण इत्यादींकडून अत्याचार | १७० |
| ३८ | देवांचा करुण धावा | १७८ |
| ३९ | भगवानांचे वरदान | १८२ |
| ४० | दशरथांचा पुत्रेष्टि-यज्ञ | १८२ |
| ४१ | श्रीभगवंतांची बाल-लीला | १८५ |
| ४२ | विश्वामित्रांचे राम-लक्ष्मणांना नेणे | १९७ |
| ४३ | विश्वामित्रांच्या यज्ञाचे रक्षण | २०० |
| ४४ | अहल्या-उद्धार | २०१ |
| ४५ | श्रीराम-लक्ष्मणांचा जनकपुर प्रवेश | २०४ |
| ४६ | जनकाची प्रेम-मुग्धता | २०४ |
| ४७ | श्रीराम-लक्ष्मणांचे जनकपूर दर्शन | २०९ |
| ४८ | श्रीसीता व राम यांचे परस्पर दर्शन | २१५ |
| ४९ | श्रीसीतेचे पार्वती-पूजन | २२२ |
| ५० | श्रीराम-लक्ष्मणांचा यज्ञशाळेत प्रवेश | २२६ |
| ५१ | सीतेचा यज्ञशाळेत प्रवेश | २३२ |
| ५२ | जनक-प्रतिज्ञेची घोषणा | २३५ |
| ५३ | जनकांची निराशाजनक वाणी | २३६ |
| ५४ | श्रीलक्ष्मणाचा क्रोध | २३७ |
| ५५ | धनुष्यभंग | २४४ |
| ५६ | जयमाला घालणे | २४६ |

| अ०नं० | विषय | पृष्ठ-संख्या |
|---|---|---|
| ५७ | श्रीराम-लक्ष्मण आणि परशुराम-संवाद | २५० |
| ५८ | दशरथांकडे दूत पाठवणे | २६५ |
| ५९ | मिथिलेला वऱ्हाड येणे | २७९ |
| ६० | श्रीसीता-राम-विवाह | २८८ |
| ६१ | अयोध्येत आनंदोत्सव | ३१० |
| ६२ | श्रीरामचरित्र-महिमा | ३३२ |
| | **अयोध्याकाण्ड** | |
| ६३ | मंगलाचरण | ३३३ |
| ६४ | रामराज्याभिषेकाची तयारी | ३३४ |
| ६५ | मंथरेचा बुद्धिभ्रंश | ३४३ |
| ६६ | कैकेयीचा कोप | ३५२ |
| ६७ | दशरथ-कैकेयी-संवाद | ३५३ |
| ६८ | श्रीराम-कैकेयी-संवाद | ३६६ |
| ६९ | श्रीराम-दशरथ-संवाद | ३६९ |
| ७० | श्रीराम-कौसल्या-संवाद | ३७६ |
| ७१ | श्रीसीता-राम-संवाद | ३८३ |
| ७२ | श्रीराम-कौसल्या-सीता-संवाद | ३८६ |
| ७३ | श्रीराम-लक्ष्मण-संवाद | ३९० |
| ७४ | श्रीलक्ष्मण-सुमित्रा-संवाद | ३९२ |
| ७५ | दशरथांचा निरोप घेणे | ३९५ |
| ७६ | श्रीरामांचे वनगमन | ३९८ |
| ७७ | श्रीरामांचे शृंगवेरपुराला पोहोचणे | ४०४ |
| ७८ | लक्ष्मण-निषाद-संवाद | ४०६ |
| ७९ | केवटाचे प्रेम | ४१४ |
| ८० | श्रीराम-भरद्वाज संवाद | ४१८ |
| ८१ | तापस-प्रकरण | ४२३ |
| ८२ | वनवासींचे प्रेम | ४२४ |
| ८३ | श्रीराम-वाल्मीकि -संवाद | ४३४ |
| ८४ | चित्रकूटामध्ये निवास | ४४१ |
| ८५ | सुमंत्राचे अयोध्येला परतणे | ४४९ |
| ८६ | दशरथ-सुमंत्र-संवाद | ४५४ |
| ८७ | भरताकडे दूत पाठविणे | ४५६ |
| ८८ | भरताचे आगमन व शोक | ४६२ |
| ८९ | भरत-कौसल्या-संवाद | ४६६ |

| अ०नं० | विषय | पृष्ठ-संख्या |
|---|---|---|
| ९० | वसिष्ठ-भरत-संवाद | ४७२ |
| ९१ | भरत-शत्रुघ्नांचे वनगमन | ४८३ |
| ९२ | निषादाची शंका | ४८६ |
| ९३ | भरत-निषाद भेट व संवाद | ४८९ |
| ९४ | भरत-भरद्वाज-संवाद | ४९८ |
| ९५ | भरद्वाजांकडून भरताचा सत्कार | ५०६ |
| ९६ | इंद्र-बृहस्पती-संवाद | ५१० |
| ९७ | भरत चित्रकूटाच्या मार्गावर | ५१३ |
| ९८ | सीतेचे स्वप्न | ५१७ |
| ९९ | श्रीरामांकडून भरतमहिमावर्णन | ५२१ |
| १०० | भरतादी सर्वांची परस्पर भेट | ५२३ |
| १०१ | कैकेयीचा पश्चात्ताप | ५३६ |
| १०२ | श्रीवसिष्ठांचे भाषण | ५४० |
| १०३ | श्रीराम-भरतादींचा संवाद | ५४५ |
| १०४ | जनकांचे आगमन | ५५३ |
| १०५ | कौसल्या-सुनयना-संवाद | ५६२ |
| १०६ | जनक-सुनयना संवाद | ५६८ |
| १०७ | जनक-वसिष्ठादि-संवाद | ५७१ |
| १०८ | श्रीराम-भरत संवाद | ५७६ |
| १०९ | भरताने तीर्थ-जल स्थापणे | ५८६ |
| ११० | श्रीरामांकडून भरताला निरोप | ५८८ |
| १११ | भरताचे अयोध्येस परतणे | ५९९ |
| | **अरण्यकाण्ड** | |
| ११२ | मंगलाचरण | ६०१ |
| ११३ | जयंताचा दुष्टपणा आणि त्याचा परिणाम | ६०२ |
| ११४ | अत्रि-मिलन स्तुती | ६०४ |
| ११५ | सीता-अनसूया-मिलन | ६०७ |
| ११६ | विराध-वध, शरभंग-प्रसंग | ६१० |
| ११७ | राक्षस-वधाची प्रतिज्ञा | ६१२ |
| ११८ | सुतीक्ष्णाचे प्रेम, अगस्त्य संवाद, दंडक-वनात प्रवेश, जटायूची भेट | ६१२ |
| ११९ | पंचवटी-निवास | ६२० |
| १२० | शूर्पणखाख्यान, खर-दूषणादींचा वध | ६२३ |
| १२१ | शूर्पणखा-रावण भेट, माया-सीता | ६३० |

| अ०नं० | विषय | पृष्ठ-संख्या |
|---|---|---|
| १२२ | मारीच प्रसंग | ६३४ |
| १२३ | श्रीसीताहरण | ६३९ |
| १२४ | जटायु-रावण युद्ध | ६४० |
| १२५ | श्रीरामांचा विलाप, जटायूचा प्रसंग | ६४१ |
| १२६ | कबंधाचा उद्धार | ६४५ |
| १२७ | शबरीवर कृपा | ६४६ |
| १२८ | नारद-राम संवाद | ६५४ |
| १२९ | संतांची लक्षणे | ६५७ |

## किष्किन्धाकाण्ड

| अ०नं० | विषय | पृष्ठ-संख्या |
|---|---|---|
| १३० | मंगलाचरण | ६६० |
| १३१ | श्रीराम-सुग्रीव-मैत्री | ६६२ |
| १३२ | सुग्रीवाचे दुःख, वालीवधाची प्रतिज्ञा | ६६६ |
| १३३ | सुग्रीवाचे वैराग्य | ६६९ |
| १३४ | वाली-सुग्रीव-युद्ध, वाली-उद्धार | ६७० |
| १३५ | तारेला श्रीरामांचा उपदेश, सुग्रीवाचा राज्याभिषेक आणि अंगदाला युवराजपद | ६७३ |
| १३६ | वर्षा-ऋतु-वर्णन | ६७५ |
| १३७ | शरद्-ऋतु-वर्णन | ६७८ |
| १३८ | लक्ष्मणाचा कोप | ६८० |
| १३९ | सुग्रीव-राम संवाद व सीता शोधासाठी वानरांचे प्रस्थान | ६८२ |
| १४० | गुहेमध्ये तपस्विनीचे दर्शन | ६८५ |
| १४१ | वानरांचे समुद्रतटी येणे, संपातीशी भेट आणि संभाषण | ६८६ |
| १४२ | समुद्र ओलांडण्याचा सल्ला, जांबवानाकडून हनुमान प्रशंसा | ६९० |
| १४३ | श्रीरामगुणांचे माहात्म्य | ६९१ |

## सुन्दरकाण्ड

| अ०नं० | विषय | पृष्ठ-संख्या |
|---|---|---|
| १४४ | मंगलाचरण | ६९३ |
| १४५ | हनुमानाचे लंकेला प्रयाण, सुरसेची भेट | ६९४ |
| १४६ | लंकावर्णन, लंकिनीवर प्रहार, लंकेत प्रवेश | ६९६ |
| १४७ | हनुमान-बिभीषण-संवाद | ६९९ |
| १४८ | सीतेला पाहून हनुमान दुःखी, रावणाने सीतेला भीती दाखविणे | ७०१ |
| १४९ | सीता-त्रिजटा-संवाद | ७०४ |
| १५० | सीता-हनुमान-संवाद | ७०५ |
| १५१ | अशोक-वाटिका विध्वंस, अक्षकुमार वध | ७१० |
| १५२ | हनुमान-रावण-संवाद | ७१२ |
| १५३ | लंका-दहन | ७१६ |
| १५४ | हनुमानाने सीतेकडून चूडामणी घेणे | ७१८ |
| १५५ | सुग्रीव-भेट, श्रीराम-हनुमान भेट | ७१९ |
| १५६ | श्रीरामांचे समुद्रतीरी आगमन | ७२४ |
| १५७ | मंदोदरी-रावण-संवाद | ७२६ |
| १५८ | बिभीषणाचा रावणाला उपदेश | ७२८ |
| १५९ | बिभीषण श्रीरामांना शरण | ७३१ |
| १६० | रावण-दूत शुक येणे | ७३८ |
| १६१ | दूताकडून रावणाला लक्ष्मणाचे पत्र | ७४१ |
| १६२ | श्रीरामांचा समुद्रावर क्रोध आणि समुद्राकडून प्रार्थना | ७४५ |
| १६३ | श्रीराम-गुणगानाचा महिमा | ७४७ |

## लंकाकाण्ड

| अ०नं० | विषय | पृष्ठ-संख्या |
|---|---|---|
| १६४ | मंगलाचरण | ७४९ |
| १६५ | नल-नीलांकडून सेतुबंधन | ७५१ |
| १६६ | श्रीरामांचा सेनेसह सुवेळ पर्वतावर निवास | ७५४ |
| १६७ | रावणाला मंदोदरीचा उपदेश, रावण-प्रहस्त-संवाद | ७५५ |
| १६८ | सुवेळ पर्वतावर श्रीरामांचे दर्शन | ७५९ |
| १६९ | श्रीरामबाणाने रावणाचा मुकुट इत्यादी पडणे | ७६२ |
| १७० | मंदोदरीकडून राममहिमा-वर्णन | ७६३ |
| १७१ | सभेमध्ये अंगद-रावण-संवाद | ७६५ |
| १७२ | रावणाला पुन्हा मंदोदरीचा उपदेश | ७८४ |
| १७३ | अंगद-राम-संवाद | ७८६ |
| १७४ | युद्धारंभ | ७८८ |
| १७५ | माल्यवानाचा रावणाला उपदेश | ७९५ |
| १७६ | लक्ष्मण-मेघनाद-युद्ध, लक्ष्मण-मूर्च्छा | ७९७ |
| १७७ | हनुमानाचे संजीवनी आणण्यासाठी जाणे, कालनेमि-रावण-संवाद, मकरी-उद्धार, कालनेमि-उद्धार | ८०२ |

| अ०नं० | विषय | पृष्ठ-संख्या |
|---|---|---|
| १७८ | भरत-हनुमान संवाद | ८०४ |
| १७९ | लक्ष्मण सावध | ८०६ |
| १८० | कुंभकर्णाचा रावणाला उपदेश, बिभीषण-कुंभकर्ण-संवाद | ८०८ |
| १८१ | राम-कुंभकर्ण युद्ध | ८११ |
| १८२ | मेघनादाचे युद्ध, श्रीराम नागपाशात बद्ध | ८१८ |
| १८३ | मेघनाद-यज्ञ-विध्वंस, युद्ध, मेघनादाचा उद्धार | ८२२ |
| १८४ | रावणाचे युद्धासाठी प्रस्थान, वानर-राक्षस-युद्ध | ८२४ |
| १८५ | लक्ष्मण-रावण-युद्ध | ८३० |
| १८६ | रावणाला मूर्च्छा, रावण-यज्ञ-विध्वंस, राम-रावण-युद्ध | ८३२ |
| १८७ | इंद्राने रथ पाठविणे, राम-रावण-युद्ध | ८३७ |
| १८८ | बिभीषण-रावण-युद्ध | ८४३ |
| १८९ | रावण-हनुमान-युद्ध, रावणाची माया, रामांकडून मायेचा नाश | ८४४ |
| १९० | घोर युद्ध, रावणाला मूर्च्छा | ८४७ |
| १९१ | त्रिजटा-सीता-संवाद | ८४९ |
| १९२ | राम-रावण-युद्ध, रावण-उद्धार | ८५१ |
| १९३ | मंदोदरी-विलाप, रावणाची अंत्येष्टिक्रिया | ८५७ |
| १९४ | बिभीषणाला राज्याभिषेक | ८५९ |
| १९५ | सीतेला कुशल वर्तमान | ८६० |
| १९६ | देवतांकडून स्तुती, इंद्राकडून अमृत-वर्षाव | ८६४ |
| १९७ | बिभीषणाची प्रार्थना, श्रीराम त्वरित अयोध्येला जाण्यास उत्सुक | ८७१ |
| १९८ | बिभीषणाकडून वस्त्राभूषणांचा वर्षाव | ८७३ |
| १९९ | पुष्पक विमानातून सीतारामांचे अयोध्येला प्रस्थान | ८७४ |
| २०० | श्रीरामचरिताचा महिमा | ८७८ |


## उत्तरकाण्ड


| अ०नं० | विषय | पृष्ठ-संख्या |
|---|---|---|
| २०१ | मंगलाचरण | ८७९ |
| २०२ | भरत-हनुमान भेट, अयोध्येत आनंद | ८८० |
| २०३ | श्रीरामांचे स्वागत, भरत-भेट | ८८६ |
| २०४ | राज्याभिषेक, वेदस्तुती, शिवस्तुती | ८९२ |
| २०५ | वानरांना व निषादाला निरोप | ८९९ |
| २०६ | रामराज्याचे वर्णन | ९०४ |
| २०७ | पुत्रोत्पत्ती, अयोध्येची रमणीयता, सनकादिकांचे आगमन | ९०८ |
| २०८ | श्रीरामांचा भरताला उपदेश | ९१८ |
| २०९ | श्रीरामांचा प्रजेला उपदेश | ९२४ |
| २१० | श्रीराम-वसिष्ठ-संवाद | ९२८ |
| २११ | नारदांचे आगमन आणि स्तुती करून ब्रह्मलोकी जाणे | ९३० |
| २१२ | शिवपार्वती-संवाद, गरुडाचा मोह, काकभुशुंडीकडून गरुडाला रामकथाकथन | ९३१ |
| २१३ | काकभुशुंडीची पूर्वजन्म-कथा व कलिमहिमा | ९५१ |
| २१४ | गुरूंचा अपमान आणि शिवांच्या शापाची गोष्ट | ९८२ |
| २१५ | रुद्राष्टक | ९८३ |
| २१६ | गुरूंच्याकडून शिवांची क्षमा मागणे | ९८५ |
| २१७ | काकभुशुंडीचे लोमशाकडे जाणे आणि शाप व अनुग्रह मिळविणे | ९८८ |
| २१८ | ज्ञान-भक्ति-निरूपण | ९९६ |
| २१९ | गरुडाचे प्रश्न व काकभुशुंडीची उत्तरे | १००४ |
| २२० | भजन-महिमा | १००९ |
| २२१ | रामायण-माहात्म्य, तुलसीविनय आणि फलश्रुति | १०१८ |
| २२२ | रामायणाची आरती | १०१९ |
| २२३ | गोस्वामी तुलसीदासांचे संक्षिप्त जीवन | १०२२ |
| २२४ | श्रीरामशलाका-प्रश्नावली | १०२४ |

# नवाह्नपारायणाचे विश्रामस्थान


| | | | | पृष्ठ | | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पहिला | विश्राम | .... | .... | १२७ | सहावा | विश्राम | .... | .... | ६४१ |
| दुसरा | ,, | .... | .... | २२६ | सातवा | ,, | .... | .... | ७६१ |
| तिसरा | ,, | .... | .... | ३२९ | आठवा | ,, | .... | .... | ८९२ |
| चौथा | ,, | .... | .... | ४२८ | नववा | ,, | .... | .... | १०१८ |
| पाचवा | ,, | .... | .... | ५२६ | | | | | |


# मासपारायणाचे विश्रामस्थान


| | | | | पृष्ठ | | | | | पृष्ठ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पहिला | विश्राम | .... | .... | ४४ | सोळावा | विश्राम | .... | .... | ४२८ |
| दुसरा | ,, | .... | .... | ७२ | सतरावा | ,, | .... | .... | ४४२ |
| तिसरा | ,, | .... | .... | ९९ | अठरावा | ,, | .... | .... | ४७६ |
| चौथा | ,, | .... | .... | १२७ | एकोणिसावा | ,, | .... | .... | ५०८ |
| पाचवा | ,, | .... | .... | १५२ | विसावा | ,, | .... | .... | ५२६ |
| सहावा | ,, | .... | .... | १७७ | एकविसावा | ,, | .... | .... | ५९९ |
| सातवा | ,, | .... | .... | २०३ | बाविसावा | ,, | .... | .... | ६५९ |
| आठवा | ,, | .... | .... | २२६ | तेविसावा | ,, | .... | .... | ६९२ |
| नववा | ,, | .... | .... | २५२ | चोविसावा | ,, | .... | .... | ७४७ |
| दहावा | ,, | .... | .... | २७९ | पंचविसावा | ,, | .... | .... | ७९६ |
| अकरावा | ,, | .... | .... | ३०३ | सव्विसावा | ,, | .... | .... | ८४९ |
| बारावा | ,, | .... | .... | ३३२ | सत्ताविसावा | ,, | .... | .... | ८७८ |
| तेरावा | ,, | .... | .... | ३५६ | अठ्ठाविसावा | ,, | .... | .... | ९४० |
| चौदावा | ,, | .... | .... | ३८३ | एकोणतिसावा | ,, | .... | .... | ९९५ |
| पंधरावा | ,, | .... | .... | ४०९ | तिसावा | ,, | .... | .... | १०१८ |

॥ श्रीहरिः ॥

# पारायण–विधिः

श्रीरामचरितमानसाचे विधिपूर्वक पारायण करणाऱ्या भक्तांनी पारायणापूर्वी श्रीतुलसीदास, श्रीवाल्मीकी, श्रीशिव आणि श्रीहनुमान यांचे आवाहन व पूजन केल्यावर तिन्ही भावांसह श्रीसीताराम यांचे आवाहन, षोडशोपचार पूजन आणि ध्यान करावे. त्यानंतर पाठ करण्यास प्रारंभ करावा. त्या सर्वांचे पूजन व ध्यान यांचे मंत्र क्रमशः खाली दिले आहेत.

## अथ आवाहनमन्त्रः

**तुलसीक नमस्तुभ्यमिहागच्छ शुचिव्रत।**
**नैर्ऋत्य उपविश्येदं पूजनं प्रतिगृह्यताम्॥ १॥**

ॐ तुलसीदासाय नमः।

**श्रीवाल्मीक नमस्तुभ्यमिहागच्छ शुभप्रद।**
**उत्तरपूर्वयोर्मध्ये तिष्ठ गृह्णीष्व मेऽर्चनम्॥ २॥**

ॐ वाल्मीकाय नमः।

**गौरीपते नमस्तुभ्यमिहागच्छ महेश्वर।**
**पूर्वदक्षिणयोर्मध्ये तिष्ठ पूजां गृहाण मे॥ ३॥**

ॐ गौरीपतये नमः।

**श्रीलक्ष्मण नमस्तुभ्यमिहागच्छ सहप्रियः।**
**याम्यभागे समातिष्ठ पूजनं संगृहाण मे॥ ४॥**

ॐ सपत्नीकाय लक्ष्मणाय नमः।

**श्रीशत्रुघ्न नमस्तुभ्यमिहागच्छ सहप्रियः।**
**पीठस्य पश्चिमे भागे पूजनं स्वीकुरुष्व मे॥ ५॥**

ॐ सपत्नीकाय शत्रुघ्नाय नमः।

**श्रीभरत नमस्तुभ्यमिहागच्छ सहप्रियः।**
**पीठकस्योत्तरे भागे तिष्ठ पूजां गृहाण मे॥ ६॥**

ॐ सपत्नीकाय भरताय नमः।

**श्रीहनुमन्नमस्तुभ्यमिहागच्छ कृपानिधे।**
**पूर्वभागे समातिष्ठ पूजनं स्वीकुरु प्रभो॥ ७॥**

ॐ हनुमते नमः।

**अथ प्रधानपूजा च कर्तव्या विधिपूर्वकम्।**
**पुष्पाञ्जलिं गृहीत्वा तु ध्यानं कुर्यात्परस्य च॥ ८॥**

**रक्ताम्भोजदलाभिरामनयनं पीताम्बरालङ्कृतं**
**श्यामाङ्गं द्विभुजं प्रसन्नवदनं श्रीसीतया शोभितम्।**
**कारुण्यामृतसागरं प्रियगणैर्भ्रात्रादिभिर्भावितं**
**वन्दे विष्णुशिवादिसेव्यमनिशं भक्तेष्टसिद्धिप्रदम्॥ ९ ॥**
**आगच्छ जानकीनाथ जानक्या सह राघव।**
**गृहाण मम पूजां च वायुपुत्रादिभिर्युतः॥ १०॥**

इत्यावाहनम्

**सुवर्णरचितं राम दिव्यास्तरणशोभितम्।**
**आसनं हि मया दत्तं गृहाण मणिचित्रितम्॥ ११॥**

इति षोडशोपचारैः पूजयेत्

ॐ अस्य श्रीमन्मानसरामायणश्रीरामचरितस्य श्रीशिवकाकभुशुण्डियाज्ञवल्क्यगोस्वामितुलसीदासा ऋषयः। श्रीसीतारामो देवता। श्रीरामनाम बीजं। भवरोगहरी भक्तिः शक्तिः। मम नियन्त्रिताशेषविघ्नतया श्रीसीतारामप्रीतिपूर्वकसकलमनोरथसिद्ध्यर्थं पाठे विनियोगः।

## अथ आचमनम्

**श्रीसीतारामाभ्यां नमः। श्रीरामचन्द्राय नमः। श्रीरामभद्राय नमः।**
**इति मन्त्रत्रितयेन आचमनं कुर्यात् । श्रीयुगलबीजमन्त्रेण प्राणायामं कुर्यात्॥**

## अथ करन्यासः

**जग मंगल गुन ग्राम राम के। दानि मुकुति धन धरम धाम के॥**
अङ्गुष्ठाभ्यां नमः।
**राम राम कहि जे जमुहाहीं। तिन्हहि न पापपुंज समुहाहीं॥**
तर्जनीभ्यां नमः।
**राम सकल नामन्ह ते अधिका। होउ नाथ अघ खग गन बधिका॥**
मध्यमाभ्यां नमः।
**उमा दारु जोषित की नाईं। सबहि नचावत रामु गोसाईं॥**
अनामिकाभ्यां नमः।
**सनमुख होइ जीव मोहि जबहीं। जन्म कोटि अघ नासहिं तबहीं॥**
कनिष्ठिकाभ्यां नमः।
**मामभिरक्षय रघुकुलनायक। धृत बर चाप रुचिर कर सायक॥**
करतलकरपृष्ठाभ्यां नमः।

इति करन्यासः

## अथ हृदयादिन्यासः

**जग मंगल गुन ग्राम राम के। दानि मुकुति धन धरम धाम के॥**

हृदयाय नमः।

**राम राम कहि जे जमुहाहीं। तिन्हहि न पापपुंज समुहाहीं॥**

शिरसे स्वाहा।

**राम सकल नामन्ह ते अधिका। होउ नाथ अघ खग गन बधिका॥**

शिखायै वषट्।

**उमा दारु जोषित की नाईं। सबहि नचावत रामु गोसाईं॥**

कवचाय हुम्।

**सनमुख होइ जीव मोहि जबहीं। जन्म कोटि अघ नासहिं तबहीं॥**

नेत्राभ्यां वौषट्।

**मामभिरक्षय रघुकुलनायक। धृत बर चाप रुचिर कर सायक॥**

अस्त्राय फट्।

इति हृदयादिन्यासः

## अथ ध्यानम्

**मामवलोकय पंकजलोचन। कृपा बिलोकनि सोच बिमोचन॥**
**नील तामरस स्याम काम अरि। हृदय कंज मकरंद मधुप हरि॥**
**जातुधान बरूथ बल भंजन। मुनि सज्जन रंजन अघ गंजन॥**
**भूसुर ससि नव बृंद बलाहक। असरन सरन दीन जन गाहक॥**
**भुजबल बिपुल भार महि खंडित। खर दूषन बिराध बध पंडित॥**
**रावनारि सुखरूप भूपबर। जय दसरथ कुल कुमुद सुधाकर॥**
**सुजस पुरान बिदित निगमागम। गावत सुर मुनि संत समागम॥**
**कारुनीक ब्यलीक मद खंडन। सब बिधि कुसल कोसला मंडन॥**
**कलि मल मथन नाम ममताहन। तुलसिदास प्रभु पाहि प्रनत जन॥**

इति ध्यानम्

# भगवान् श्रीजानकीनाथकी आरती

ॐ जय जानकिनाथा, हो प्रभु जय श्री रघुनाथा।
दोऊ कर जोड़े विनवौं, प्रभु मेरी सुनो बाता॥ ॐ॥

तुम रघुनाथ हमारे, प्राण पिता माता।
तुम हो सजन सँगाती, भक्ति मुक्ति दाता॥ ॐ॥

चौरासी प्रभु फन्द छुड़ाओ, मेटो यम त्रासा।
निश दिन प्रभु मोहि राखो, अपने संग साथा॥ ॐ॥

सीताराम लक्ष्मण भरत शत्रुहन, संग चारौं भैया।
जगमग ज्योति विराजत, शोभा अति लहिया॥ ॐ॥

हनुमत नाद बजावत, नेवर ठुमकाता।
कंचन थाल आरती, करत कौशल्या माता॥ ॐ॥

किरिट मुकुट कर धनुष विराजत, शोभा अति भारी।
मनीराम दरशन कर, तुलसिदास दरशन कर, पल-पल बलिहारी॥ ॐ॥

जय जानकिनाथा, हो प्रभु जय श्री रघुनाथा।
हो प्रभु जय सीता माता, हो प्रभु जय लक्ष्मण भ्राता॥ ॐ॥

हो प्रभु जय चारौं भ्राता, हो प्रभु जय हनुमत दासा।
दोऊ कर जोड़े विनवौं, प्रभु मेरी सुनो बाता॥ ॐ॥






सीता-स्वयंवर

॥ श्रीगणेशाय नमः ॥

॥ श्रीजानकीवल्लभो विजयते ॥

# श्रीरामचरितमानस

## प्रथम सोपान

## बालकाण्ड

श्लोक

**वर्णानामर्थसंघानां रसानां छन्दसामपि।**
**मङ्गलानां च कर्त्तारौ वन्दे वाणीविनायकौ॥ १॥**

अक्षरे, अर्थसमूह, रस, छंद आणि मंगल यांची निर्मिती करणाऱ्या श्रीसरस्वती व श्रीगणेश यांना मी वंदन करतो.॥ १॥

**भवानीशङ्करौ वन्दे श्रद्धाविश्वासरूपिणौ।**
**याभ्यां विना न पश्यन्ति सिद्धाः स्वान्तःस्थमीश्वरम्॥ २॥**

ज्यांच्याशिवाय सिद्धजन अंत:करणात असलेल्या ईश्वराला पाहू शकत नाहीत, अशा श्रद्धा व विश्वासस्वरूप असलेल्या पार्वती व शंकर यांना मी वंदन करतो.॥ २॥

**वन्दे बोधमयं नित्यं गुरुं शङ्कररूपिणम्।**
**यमाश्रितो हि वक्रोऽपि चन्द्रः सर्वत्र वन्द्यते॥ ३॥**

ज्यांचा आश्रित असल्यामुळे वाकडा चंद्रसुद्धा सर्वत्र वंदनीय ठरतो, अशा ज्ञानमय, शंकररूपी गुरूंना मी नित्य वंदन करतो.॥ ३॥

**सीतारामगुणग्रामपुण्यारण्यविहारिणौ।**
**वन्दे विशुद्धविज्ञानौ कवीश्वरकपीश्वरौ॥ ४॥**

श्रीसीतारामांच्या गुणसमूहरूपी पवित्र वनात विहार करणाऱ्या, विशुद्ध विज्ञानसंपन्न असणाऱ्या कवीश्वर वाल्मीकी व कपीश्वर हनुमान यांना मी वंदन करतो.॥ ४॥

**उद्भवस्थितिसंहारकारिणीं क्लेशहारिणीम्।**
**सर्वश्रेयस्करीं सीतां नतोऽहं रामवल्लभाम्॥ ५॥**

जी उत्पत्ती, स्थिती आणि संहार करते, क्लेश हरण करते, तसेच संपूर्ण कल्याण करते, त्या श्रीरामचंद्रांची प्रियतमा असलेल्या श्रीसीता-देवींना मी नमस्कार करतो.॥ ५॥

**यन्मायावशवर्त्ति विश्वमखिलं ब्रह्मादिदेवासुरा**
**यत्सत्त्वादमृषैव भाति सकलं रज्जौ यथाहेर्भ्रमः।**
**यत्पादप्लवमेकमेव हि भवाम्भोधेस्तितीर्षावतां**
**वन्देऽहं तमशेषकारणपरं रामाख्यमीशं हरिम्॥ ६॥**

संपूर्ण विश्व, ब्रह्मादी देव आणि असुर हे ज्यांच्या मायेच्या अधीन आहेत, दोरीवर साप असल्याचा भास होतो, त्याप्रमाणे ज्यांच्या सत्तेमुळे हे संपूर्ण दृश्य जग सत्यच वाटते आणि ज्यांचे केवळ चरण हेच भवसागरातून तरून जाऊ इच्छिणाऱ्यांसाठी एकमात्र नौका आहेत, अशा संपूर्ण कारणांचेही श्रेष्ठ कारण असलेल्या आणि ज्यांना श्रीराम म्हटले जाते, त्या भगवान श्रीहरींना मी वंदन करतो.॥ ६॥

**नानापुराणनिगमागमसम्मतं यद्**
**रामायणे निगदितं क्वचिदन्यतोऽपि।**
**स्वान्तःसुखाय तुलसी रघुनाथगाथा-**
**भाषानिबन्धमतिमञ्जुलमातनोति ॥ ७॥**

अनेक पुराणे, वेद आणि तंत्रशास्त्र यांना संमत असलेले जे वर्णन रामायणात आले आहे ते, तसेच श्रीरघुनाथांच्या इतरत्र उपलब्ध असलेल्या कथा यांचा तुलसीदास स्वतःच्या आनंदासाठी अत्यंत मनोहर अशा लोकभाषेमध्ये विस्तार करीत आहे.॥ ७॥

**सो०—जो सुमिरत सिधि होइ गन नायक करिबर बदन।**
**करउ अनुग्रह सोइ बुद्धि रासि सुभ गुन सदन॥ १॥**

ज्याच्या स्मरणाने सर्व कार्ये सिद्ध होतात, जो गणांचा स्वामी, सुंदर गजमुख, बुद्धीचे भांडार व पवित्र गुणांचा आश्रय आहे, असा श्रीगजानन माझ्यावर कृपा करो.॥ १॥

**मूक होइ बाचाल पंगु चढ़इ गिरिबर गहन।**
**जासु कृपाँ सो दयाल द्रवउ सकल कलि मल दहन॥ २॥**

ज्यांच्या कृपा-प्रसादामुळे मुका बोलू लागतो आणि लंगडा दुर्गम पर्वतावर चढतो, असे ते कलियुगातील सर्व पापे जाळून टाकणारे दयाळू भगवान माझ्यावर कृपा करोत.॥

**नील सरोरुह स्याम तरुन अरुन बारिज नयन।**
**करउ सो मम उर धाम सदा छीरसागर सयन॥ ३॥**

ज्यांचा वर्ण निळ्या कमळासारखा सावळा आहे, ज्यांचे नेत्र फुललेल्या लाल कमळासारखे आहेत आणि जे नेहमी क्षीरसागरामध्ये शयन करतात, ते भगवान नारायण माझ्या हृदयात निवास करोत.॥ ३॥

**कुंद इंदु सम देह उमा रमन करुना अयन।**
**जाहि दीन पर नेह करउ कृपा मर्दन मयन॥ ४॥**

ज्यांचे अंग कुंदपुष्पाप्रमाणे व चंद्राप्रमाणे गौर वर्णाचे आहे, जे पार्वतीचे प्रियतम आणि दयेचा सागर आहेत, ज्यांचे दीनांवर प्रेम आहे व जे कामदेवाला भस्म करणारे आहेत, अशा शंकरांनी माझ्यावर कृपा करावी.॥ ४॥

**बंदउँ गुरु पद कंज कृपा सिंधु नररूप हरि।**
**महामोह तम पुंज जासु बचन रबि कर निकर॥ ५॥**

जे कृपा-सागर असून नर-रूपामध्ये प्रत्यक्ष श्रीहरीच आहेत व ज्यांचे वचन हे महामोहरूपी घनदाट अंधाराचा नाश करणारा सूर्यकिरणांचा झोत आहे, त्या सद्‌गुरूंच्या चरणांना मी वंदन करतो.॥ ५॥

**बंदउँ गुरु पद पदुम परागा। सुरुचि सुबास सरस अनुरागा॥**
**अमिअ मूरिमय चूरन चारू। समन सकल भव रुज परिवारू॥**

जे सुंदर स्वाद, सुगंध आणि प्रेमरसाने परिपूर्ण आहे, जे संजीवनी-मुळाचे सुंदर चूर्ण आहे, जे भवरोगाच्या संपूर्ण परिवाराचा नाश करणारे आहे, त्या श्रीगुरुमहाराजांच्या चरण-कमल-परागाला मी वंदन करतो.॥ १॥

**सुकृति संभु तन बिमल बिभूती। मंजुल मंगल मोद प्रसूती॥**
**जन मन मंजु मुकुर मल हरनी। किएँ तिलक गुन गन बस करनी॥**

जे परागकण शंकरांच्या शरीराला सुशोभित करणाऱ्या निर्मळ विभूतीप्रमाणे पुण्यवानाला सुशोभित करतात, जे सुंदर कल्याण व आनंद यांची जननी आहेत, भक्तांच्या मनरूपी सुंदर आरशावरील मळ नाहीसा करणारे आहेत, तसेच जे कपाळावर धारण केल्यास गुणांचा समूह प्राप्त करून देणारे आहेत.॥ २॥

**श्रीगुर पद नख मनि गन जोती। सुमिरत दिब्य दृष्टि हियँ होती॥**
**दलन मोह तम सो सप्रकासू। बड़े भाग उर आवइ जासू॥**

श्रीगुरूंच्या नखांची ज्योती रत्नांच्या तेजासारखी आहे, तिचे स्मरण करताच हृदयामध्ये दिव्य

दृष्टी उत्पन्न होते. तो प्रकाश अज्ञानरूपी अंधाराचा नाश करणारा आहे. ज्याच्या हृदयात तो प्रकट होतो, तो मोठा भाग्यवान होय. ॥ ३ ॥

**उघरहिं बिमल बिलोचन ही के । मिटहिं दोष दुख भव रजनी के ॥**
**सूझहिं राम चरित मनि मानिक । गुपुत प्रगट जहँ जो जेहि खानिक ॥**

तो प्रकाश हृदयात प्रकट होताच निर्मळ दृष्टी प्राप्त होते आणि संसाररूपी रात्रीमधील दोष व दुःख नाहीसे होते. तसेच श्रीरामचरित्ररूपी रत्ने, माणिके, गुप्त किंवा प्रकट जिथे कुठे खाणीत असतात, ती सर्व दिसू लागतात. ॥ ४ ॥

दो०—**जथा सुअंजन अंजि दृग साधक सिद्ध सुजान।**
**कौतुक देखत सैल बन भूतल भूरि निधान॥ १ ॥**

ज्याप्रमाणे साधक, सिद्ध व सुजाण लोक डोळ्यांमध्ये सिद्धांजन घालून पर्वत, वने व पृथ्वी यांमधील पुष्कळशा खाणी सहजपणे पाहात असतात. ॥ १ ॥

**गुरु पद रज मृदु मंजुल अंजन । नयन अमिअ दृग दोष बिभंजन ॥**
**तेहिं करि बिमल बिबेक बिलोचन । बरनउँ राम चरित भव मोचन ॥**

श्रीगुरूंच्या चरणांची धूळ ही फार कोमल आणि सुंदर असे डोळ्यांना अमृताप्रमाणे असणारे अंजन होय. ती नेत्रांतील दोषांचा नाश करणारी आहे. त्या अंजनाने विवेकरूपी नेत्रांना निर्मळ करून संसाररूपी बंधनांतून मुक्त करणाऱ्या श्रीरामचरित्राचे मी वर्णन करतो. ॥ २ ॥

**बंदउँ प्रथम महीसुर चरना । मोह जनित संसय सब हरना ॥**
**सुजन समाज सकल गुन खानी । करउँ प्रनाम सप्रेम सुबानी ॥**

सर्वांत प्रथम मी ब्राह्मणांच्या चरणांना वंदन करतो. कारण ते अज्ञानामुळे उत्पन्न होणाऱ्या सर्व संशयांचे निराकरण करतात. त्यानंतर मी सर्व गुणांची खाण असलेल्या संत-समाजाला प्रेमाने व सुंदर वाणीने प्रणाम करतो. ॥ २ ॥

**साधु चरित सुभ चरित कपासू । निरस बिसद गुनमय फल जासू ॥**
**जो सहि दुख परछिद्र दुरावा । बंदनीय जेहिं जग जस पावा ॥**

संतांचे चरित्र हे कापसासारखे कल्याणकारक असते. कारण कापसाचे बोंड हे नीरस, स्वच्छ व गुणमय असते. तसेच संतांचे जीवन हे विषयासक्तिरहित असल्याने नीरस असते, कापूस हा पांढरा असतो, त्यासारखे संतांचे हृदयही अज्ञान व पापरूपी अंधकाराने रहित असते, म्हणून ते उजळ असते. कापसात गुण (तंतू) असतात, तसे संतांच्या हृदयात सद्‌गुणांचे भांडार असते, म्हणून ते गुणमय असते. (ज्याप्रमाणे कापसाचा धागा स्वतःला अर्पण करून सुईचे छिद्र झाकून टाकतो किंवा ज्याप्रमाणे कापूस हा पिंजणे, सूत कातणे आणि विणणे यांचे कष्ट सहन करून वस्त्राच्या रूपात परिणत होतो आणि दुसऱ्यांची गुह्ये झाकून टाकतो, त्याप्रमाणे) संत स्वतः दुःख सहन करून दुसऱ्यांची छिद्रे (दोष) झाकून टाकतो, त्यामुळे तो जगामध्ये वंदनीय कीर्ती प्राप्त करतो. ॥ ३ ॥

**मुद मंगलमय संत समाजू। जो जग जंगम तीरथराजू॥**
**राम भक्ति जहँ सुरसरि धारा। सरसइ ब्रह्म बिचार प्रचारा॥**

संतांचा समुदाय हा आनंदमय आणि कल्याणमय होय. तो जगातील चालता-फिरता तीर्थराज प्रयागच होय. कारण तेथे राम-भक्तिरूपी गंगेचा प्रवाह आणि ब्रह्मविचाराच्या प्रचाराची सरस्वती असते. ॥ ४ ॥

**बिधि निषेधमय कलिमल हरनी। करम कथा रबिनंदनि बरनी॥**
**हरि हर कथा बिराजति बेनी। सुनत सकल मुद मंगल देनी॥**

तसेच तेथे विधि-निषेधरूपी कर्मांची कहाणी ही कलियुगातील पापांचे हरण करणारी यमुना नदी असते आणि हरिहरांच्या कथा त्रिवेणी रूपाने शोभत असतात. ज्या ऐकताच संपूर्ण आनंद देऊन कल्याण करणाऱ्या असतात. ॥ ५ ॥

**बटु बिस्वास अचल निज धरमा। तीरथराज समाज सुकरमा॥**
**सबहि सुलभ सब दिन सब देसा। सेवत सादर समन कलेसा॥**

(त्या संत-समाजरूपी तीर्थराज प्रयागावर) आपल्या धर्मावरील अढळ विश्वासरूप अक्षय वट आहे आणि शुभ-कर्मे हाच त्या तीर्थराजाचा परिवार होय. तो सर्व देशांमध्ये आणि सर्व काळांमध्ये सर्वांना सहज प्राप्त होऊ शकतो. त्याचे आदराने सेवन केल्यास तो सर्व क्लेशांचा नाश करणारा आहे. ॥ ६ ॥

**अकथ अलौकिक तीरथराऊ। देइ सद्य फल प्रगट प्रभाऊ॥**

तो तीर्थराज हा अलौकिक आणि अवर्णनीय असून, तत्काळ फळ देणारा आहे. हा त्याचा प्रभाव प्रत्यक्ष दिसतो. ॥ ७ ॥

दो०—**सुनि समुझहिं जन मुदित मन मज्जहिं अति अनुराग।**
**लहहिं चारि फल अछत तनु साधु समाज प्रयाग॥ २॥**

जी माणसे या संत-समाजरूपी तीर्थराजाचा प्रभाव आनंदित मनाने ऐकून व समजून घेतात, तसेच त्यात प्रेमाने मग्न होतात, ते या मनुष्य देहात असतानाच धर्म, अर्थ, काम, मोक्ष—हे चारही पुरुषार्थ प्राप्त करतात. ॥ २ ॥

**मज्जन फल पेखिअ ततकाला। काक होहिं पिक बकउ मराला॥**
**सुनि आचरज करै जनि कोई। सतसंगति महिमा नहिं गोई॥**

या तीर्थराजातील स्नानाचे तत्काळ फळ म्हणजे त्यायोगे कावळे कोकीळ बनतात आणि बगळे हंस बनतात. हे ऐकून कोणीही आश्चर्य करू नये; कारण सत्संगतीची महती कधी लपून राहात नाही. ॥ १ ॥

**बालमीक नारद घट जोनी। निज निज मुखनि कही निज होनी॥**
**जलचर थलचर नभचर नाना। जे जड़ चेतन जीव जहाना॥**

(याला पुरावा म्हणजे स्वत:) वाल्मीकी, नारद आणि अगस्त्य यांनी स्वत:च्या मुखाने आपला

जीवन–वृत्तांत सांगितलेला आहे. या जगात जे जलचर, स्थलचर, गगनचर तसेच नाना प्रकारचे जड–चेतन असे जीव आहेत, ॥ २ ॥

**मति कीरति गति भूति भलाई । जब जेहिं जतन जहाँ जेहिं पाई ॥**
**सो जानब सतसंग प्रभाऊ । लोकहुँ बेद न आन उपाऊ ॥**

त्यांपैकी ज्यांनी, ज्या वेळी, जेथे, ज्या प्रयत्नाने, बुद्धी, कीर्ती, सद्‌गती, विभूती (ऐश्वर्य) आणि मोठेपणा मिळविला आहे, तो सर्वच सत्संगाचा प्रभाव समजला पाहिजे. वेदांमध्ये आणि या लोकामध्ये हे सर्व प्राप्त होण्यासाठी सत्संगाशिवाय दुसरा कोणताही उपाय सापडत नाही. ॥ ३ ॥

**बिनु सतसंग बिबेक न होई । राम कृपा बिनु सुलभ न सोई ॥**
**सतसंगत मुद मंगल मूला । सोइ फल सिधि सब साधन फूला ॥**

सत्संगाशिवाय विवेक येत नाही आणि श्रीरामांच्या कृपेशिवाय सत्संग सहजपणे मिळत नाही. सत्संगती ही आनंद आणि कल्याणाचे मूळ आहे. सत्संगाची प्राप्ती हेच फळ असून सर्व साधने ही फुले होत. ॥ ४ ॥

**सठ सुधरहिं सतसंगति पाई । पारस परस कुधात सुहाई ॥**
**बिधि बस सुजन कुसंगत परहीं । फनि मनि सम निज गुन अनुसरहीं ॥**

ज्याप्रमाणे परिसाच्या स्पर्शाने लोखंड हे सुंदर सोने बनते, त्याप्रमाणे दुष्ट लोकही सत्संगती मिळाल्यावर सुधारतात. दैवयोगाने जर कधी सज्जन मनुष्य वाईट संगतीत पडले तर तेथेही ते सर्पाच्या मण्याप्रमाणे आपल्या गुणांचेच अनुसरण करतात. (अर्थात् ज्याप्रमाणे सापाची संगत असूनही मणी त्याचे विष घेत नाही आणि तो आपला सहज गुण असलेला प्रकाश सोडत नाही, त्याप्रमाणे साधू पुरुष दुष्टांच्या संगतीत राहूनही दुसऱ्यांना प्रेम देतात. त्यांच्यावर दुष्टांचा कोणताही दुष्परिणाम होत नाही.) ॥ ५ ॥

**बिधि हरि हर कबि कोबिद बानी । कहत साधु महिमा सकुचानी ॥**
**सो मो सन कहि जात न कैसें । साक बनिक मनि गुन गन जैसें ॥**

ब्रह्मदेव, विष्णू, शिव, कवी व पंडित यांची वाणीसुद्धा संत–महिमा गाताना कुंठित होते, मग मला त्या संतांच्या महिम्याचे वर्णन कसे करता येणार? भाजीपाला विकणारा रत्नांच्या गुणांचे वर्णन काय करणार? ॥ ६ ॥

दो०—**बंदउँ संत समान चित हित अनहित नहिं कोइ ।**
**अंजलि गत सुभ सुमन जिमि सम सुगंध कर दोइ ॥ ३ ( क ) ॥**

ज्यांच्या मनात समता असते, ज्यांचा कोणी मित्र नसतो, की शत्रू नसतो, त्या संतांना मी प्रणाम करतो. ओंजळीत ठेवलेली फुले (ज्या हाताने फुले तोडली आणि आणि ज्या हातात ती ठेवली त्या) दोन्हीही हातांना सारखीच सुगंधित करतात. (त्याप्रमाणेच संत हे शत्रू व मित्र दोघांचेही सारखेच कल्याण करतात.) ॥ ३ (क) ॥

**संत सरल चित जगत हित जानि सुभाउ सनेहु।**
**बालबिनय सुनि करि कृपा राम चरन रति देहु॥ ३ ( ख )॥**

संत हे सरळ मनाचे आणि जगाचे हित करणारे असतात, त्यांचा हा स्वभाव व स्नेह जाणून मी त्यांना प्रार्थना करतो की, मज बालकाची प्रार्थना ऐकून व कृपा करून त्यांनी श्रीरामांच्या चरणी मला प्रेम द्यावे.॥ ३ (ख)॥

**बहुरि बंदि खल गन सतिभाएँ। जे बिनु काज दाहिनेहु बाएँ॥**
**पर हित हानि लाभ जिन्ह केरें। उजरें हरष बिषाद बसेरें॥**

आता मी चांगल्या भावनेने दुष्टांना वंदन करतो. जे विनाकारण आपले हित करणाऱ्यांशीसुद्धा प्रतिकूल वर्तन करतात. त्यांच्या दृष्टीने दुसऱ्यांच्या हिताची हानी हाच लाभ असतो. दुसऱ्यांचा सर्वनाश झाल्याने त्यांना आनंद होतो आणि दुसऱ्यांचा उत्कर्ष झाल्याने विषाद वाटतो.॥ १॥

**हरि हर जस राकेस राहु से। पर अकाज भट सहसबाहु से॥**
**जे पर दोष लखहिं सहसाखी। पर हित घृत जिन्ह के मन माखी॥**

जे (दुष्ट) हरी आणि हर यांच्या कीर्तिरूपी पौर्णिमेच्या चंद्रासाठी राहूसारखे आहेत, (अर्थात जेथे कुठे भगवान विष्णू किंवा शिव यांच्या कीर्तीचे वर्णन चालते, तेथे ते विघ्न आणतात.) आणि दुसऱ्याची निंदा करण्यामध्ये सहस्रबाहूसारखे शूर असतात, ते दुसऱ्यांचे दोष हजार डोळ्यांनी पाहतात आणि दुसऱ्यांच्या हितरूपी तुपामधील माशीसारखे असतात. (अर्थात माशी तुपात पडून ते खराब करून टाकते व स्वतःही मरून जाते. त्याप्रमाणे दुष्ट लोक स्वतःचे नुकसान झाले तरी दुसऱ्याने केलेले काम बिघडवून टाकतात.)॥ २॥

**तेज कृसानु रोष महिषेसा। अघ अवगुन धन धनी धनेसा॥**
**उदय केत सम हित सब ही के। कुंभकरन सम सोवत नीके॥**

जे तेजामध्ये अग्निप्रमाणे (प्रखर) वा क्रोधामध्ये यमाप्रमाणे असतात. जे पापरूपी आणि अवगुणरूपी धनामध्ये कुबेराप्रमाणे संपन्न असतात, ज्यांचा उत्कर्ष हा सर्वांच्या हिताचा नाश करण्यासाठी धूमकेतू-सारखा असतो, ते दुष्ट लोक कुंभकर्णाप्रमाणे झोपी जाण्यामध्येच जगाचे कल्याण आहे.॥ ३॥

**पर अकाजु लगि तनु परिहरहीं। जिमि हिम उपल कृषी दलि गरहीं॥**
**बंदउँ खल जस सेष सरोषा। सहस बदन बरनइ पर दोषा॥**

ज्याप्रमाणे गारा या पिकाची नासाडी करून मग स्वतःही (विरघळून) नाश पावतात, त्याप्रमाणे दुष्ट लोक दुसऱ्याच्या कामात विघ्न आणण्यासाठी आपल्या देहाचाही त्याग करतात. त्या दुष्टांना मी (हजार मुखे असणाऱ्या) शेषाप्रमाणे मानून वंदन करतो. कारण ते दुसऱ्यांची निंदा मोठ्या रागाने हजारो मुखांनी करीत असतात.॥ ४॥

**पुनि प्रनवउँ पृथुराज समाना। पर अघ सुनइ सहस दस काना॥**
**बहुरि सक्र सम बिनवउँ तेही। संतत सुरानीक हित जेही॥**

यानंतर मी त्यांना राजा पृथूसारखे (ज्याने भगवंतांची कीर्ती ऐकण्यासाठी दहा हजार कान मागितले होते) मानून मी प्रणाम करतो. ज्यांना मद्य हे चांगले व हितकारक वाटते, अशा त्यांना मी इंद्राप्रमाणे मानून वंदन करतो. कारण इंद्राला सुरानीक म्हणजे देवांची सेना हितकारक वाटते. ॥ ५ ॥

**बचन बज्र जेहि सदा पिआरा । सहस नयन पर दोष निहारा॥**

त्यांना कठोर वचनरूपी वज्र नेहमी आवडते आणि ते हजारो डोळ्यांनी दुसऱ्यांचे दोष पाहात असतात. (इंद्राच्या हातात वज्र असते व त्याला हजार डोळे आहेत.) ॥ ६ ॥

दो०—**उदासीन अरि मीत हित सुनत जरहिं खल रीति।**
**जानि पानि जुग जोरि जन बिनती करइ सप्रीति॥ ४॥**

दुष्टांची ही रीतच असते की, ते तटस्थ, शत्रू किंवा मित्र या कोणाचेही भले झालेले ऐकून चरफडत असतात. हे जाणून मी त्यांना हात जोडून प्रेमाने विनंती करतो. ॥ ४॥

**मैं अपनी दिसि कीन्ह निहोरा । तिन्ह निज ओर न लाउब भोरा॥**
**बायस पलिअहिं अति अनुरागा । होहिं निरामिष कबहुँ कि कागा॥**

मी विनंती केली तरी ते आपल्याकडून वाईट करण्यात कधीही चुकणार नाहीत. कावळ्यांना कितीही प्रेमाने पाळले, तरी ते मांस खाणे सोडतील काय? ॥ १ ॥

**बंदउँ संत असज्जन चरना । दुखप्रद उभय बीच कछु बरना॥**
**बिछुरत एक प्रान हरि लेहीं । मिलत एक दुख दारुन देहीं॥**

(आता) मी संत व दुष्ट दोघांच्या चरणांना वंदन करतो. दोघेही दुःख देणारे आहेत. परंतु त्यांच्यामध्ये मोठा फरक आहे. तो असा की, संत वियोगाने प्राणहरणाचे दुःख देतात आणि दुष्ट भेटण्याने दारुण दुःख देतात. ॥ २ ॥

**उपजहिं एक संग जग माहीं । जलज जोंक जिमि गुन बिलगाहीं॥**
**सुधा सुरा सम साधु असाधू । जनक एक जग जलधि अगाधू॥**

जगामध्ये दोघेही बरोबरच उत्पन्न होतात. परंतु एकाच जागी उत्पन्न होणाऱ्या कमळ व जळूप्रमाणे त्यांचे गुण भिन्न असतात. (कमळ हे दर्शनाने व स्पर्शाने सुख देते, तर जळू स्पर्श होताच रक्त शोषू लागते.) साधू हा अमृतासारखा (मृत्युरूपी संसारातून उद्धार करणारा) असतो, तर दुष्ट मदिरेसारखा (मोह, प्रमाद आणि जडता उत्पन्न करणारा) असतो. दोघांना उत्पन्न करणारा जगरूपी अगाध समुद्र एकच आहे. (जसे एकाच समुद्रातून अमृत आणि मदिरा दोन्हींची उत्पत्ती झाली आहे.) ॥ ३ ॥

**भल अनभल निज निज करतूती । लहत सुजस अपलोक बिभूती॥**
**सुधा सुधाकर सुरसरि साधू । गरल अनल कलिमल सरि ब्याधू॥**

**गुन अवगुन जानत सब कोई। जो जेहि भाव नीक तेहि सोई॥**

चांगले व वाईट हे आपापल्या करणीप्रमाणे सुंदर कीर्ती किंवा अपकीर्तीची जोड करतात. साधूंचा स्वभाव अमृत, चंद्र व गंगा यांच्याप्रमाणे असतो तर दुष्टांचा स्वभाव विष, अग्नी व कर्मनाशा (या कलियुगातील पापांच्या) नदीप्रमाणे असतो. यांचे गुण-अवगुण सर्वजण जाणतात. परंतु ज्याला जे आवडते, त्याला तेच बरे वाटते.॥४-५॥

दो०—**भलो भलाइहि पै लहइ लहइ निचाइहि नीचु।**
**सुधा सराहिअ अमरताँ गरल सराहिअ मीचु॥५॥**

चांगला माणूस चांगलेच घेतो आणि नीच माणूस वाईटच ग्रहण करतो. अमृताची थोरवी अमर करण्यामध्ये असते, तर विषाची मारून टाकण्यामध्ये.॥५॥

**खल अघ अगुन साधु गुन गाहा। उभय अपार उदधि अवगाहा॥**
**तेहि तें कछु गुन दोष बखाने। संग्रह त्याग न बिनु पहिचाने॥**

दुष्ट लोकांच्या पापांच्या व अवगुणांच्या कथा तसेच साधूंच्या गुणांच्या कथा या दोन्ही अपार व अथांग समुद्राप्रमाणे आहेत. त्यामुळे (येथे) काही गुणांचे वा दोषांचे वर्णन केलेले आहे. कारण ते ओळखून घेतल्याशिवाय गुणांचे ग्रहण करता येत नाही किंवा दोषांचा त्यागही करता येत नाही.॥१॥

**भलेउ पोच सब बिधि उपजाए। गनि गुन दोष बेद बिलगाए॥**
**कहहिं बेद इतिहास पुराना। बिधि प्रपंचु गुन अवगुन साना॥**

चांगले-वाईट हे सर्वच ब्रह्मदेवाने उत्पन्न केलेले आहे, परंतु गुण आणि दोषांचा विचार करून वेदांनी त्यांना वेगवेगळे केले आहे. वेद, इतिहास व पुराणे असे म्हणतात की, ही सृष्टी गुण-अवगुणांनी भरलेली आहे.॥२॥

**दुख सुख पाप पुन्य दिन राती। साधु असाधु सुजाति कुजाती॥**
**दानव देव ऊँच अरु नीचू। अमिअ सुजीवनु माहुरु मीचू॥**
**माया ब्रह्म जीव जगदीसा। लच्छि अलच्छि रंक अवनीसा॥**
**कासी मग सुरसरि क्रमनासा। मरु मारव महिदेव गवासा॥**
**सरग नरक अनुराग बिरागा। निगमागम गुन दोष बिभागा॥**

सुख-दुःख, पाप-पुण्य, दिवस-रात्र, साधू-असाधू, सुजाति-कुजाती, देव-दानव, उच्च-नीच, अमृत-विष, जीवन-मरण, माया-ब्रह्म, जीव-ईश्वर, संपत्ति-दारिद्र्य, रंक-राजा, काशी-मगध, गंगा-कर्मनाशा (पापनदी), मारवाड-माळवा, ब्राह्मण-कसाई, स्वर्ग-नरक, अनुराग-वैराग्य या सर्व गोष्टी ब्रह्मदेवाच्या सृष्टीत आहेत. वेद-शास्त्रांनी गुण-दोषांनुसार त्यांचे विभाग केले आहेत.॥३-५॥

दो०—**जड़ चेतन गुन दोषमय बिस्व कीन्ह करतार।**
**संत हंस गुन गहहिं पय परिहरि बारि बिकार॥६॥**

विधात्याने या जड-चेतन सृष्टीला गुण-दोषमय बनविले आहे. परंतु संतरूपी हंस हे दोषरूपी पाणी टाळून त्यातील गुणरूपी दूधच ग्रहण करतात. ॥ ६ ॥

**अस बिबेक जब देइ बिधाता । तब तजि दोष गुनहिं मनु राता ॥**
**काल सुभाउ करम बरिआईं । भलेउ प्रकृति बस चुकइ भलाईं ॥**

विधाता जेव्हा हंसासारखा विवेक देतो, तेव्हा दोष सोडून देऊन मन गुणांमध्ये अनुरक्त होते. काळाचा स्वभाव व कर्माच्या प्राबल्यामुळे कधी कधी थोर लोकसुद्धा मायेमुळे चांगुलपणापासून दूर जातात. ॥ १ ॥

**सो सुधारि हरिजन जिमि लेहीं । दलि दुख दोष बिमल जसु देहीं ॥**
**खलउ करहिं भल पाइ सुसंगू । मिटइ न मलिन सुभाउ अभंगू ॥**

भगवंताचे भक्त ही चूक सुधारून आणि दुःख-दोष नाहीसे करून निर्मळ कीर्ती प्राप्त करतात; तसेच दुष्ट लोकसुद्धा कधी कधी उत्तम संगत लाभल्यावरही चांगले कार्य करतात, परंतु त्यांचा कधीही नाहीसा न होणारा मलिन स्वभाव नष्ट होत नाही. ॥ २ ॥

**लखि सुबेष जग बंचक जेऊ । बेष प्रताप पूजिअहिं तेऊ ॥**
**उघरहिं अंत न होइ निबाहू । कालनेमि जिमि रावन राहू ॥**

जे मूलतः ठक आहेत, पण साधूसारखा वेष धारण करतात, त्यांच्या वरवर सोज्ज्वळ दिसणाऱ्या वेषामुळे जग त्यांची पूजा करते; परंतु केव्हा ना केव्हा ते उघडे पडतात. त्यांचे कपट शेवटपर्यंत टिकत नाही. जसे, कालनेमी, रावण आणि राहू यांचे झाले. ॥ ३ ॥

**किएहुँ कुबेषु साधु सनमानू । जिमि जग जामवंत हनुमानू ॥**
**हानि कुसंग सुसंगति लाहू । लोकहुँ बेद बिदित सब काहू ॥**

वाईट वेष धारण केला, तरीही साधू-पुरुषाचा सन्मानच होतो, जसे जांबवान आणि हनुमानाचे झाले. वाईट संगतीमुळे नुकसान, तर चांगल्या संगतीमुळे लाभ होतो, ही गोष्ट जगामध्ये व वेदामध्ये सांगितली आहे आणि सर्वजण ती जाणतात. ॥ ४ ॥

**गगन चढ़इ रज पवन प्रसंगा । कीचहिं मिलइ नीच जल संगा ॥**
**साधु असाधु सदन सुक सारीं । सुमिरहिं राम देहिं गनि गारीं ॥**

वाऱ्याच्या संगतीने धूळ उंच आकाशात पोहोचते आणि तीच नीच (खाली वाहात जाणाऱ्या) पाण्याच्या संगतीमुळे चिखल बनते. साधू पुरुषाच्या घरातील पोपट-मैना या 'राम-राम' असे स्मरण करतात, तर दुष्टाच्या घरातील पोपट-मैना मोजून शिव्या देतात. ॥ ५ ॥

**धूम कुसंगति कारिख होई । लिखिअ पुरान मंजु मसि सोई ॥**
**सोइ जल अनल अनिल संघाता । होइ जलद जग जीवन दाता ॥**

वाईट संगतीमुळे धुराला काजळी म्हणतात, परंतु तोच धूर (सुसंगतीमुळे) सुंदर शाई होतो व पुराण लिहिण्यासाठी त्याचा उपयोग होतो. आणि तोच धूर पाणी, अग्नि आणि वायू यांच्या संगतीने ढग बनून जगाला जीवन देणारा ठरतो. ॥ ६ ॥

दो०—**ग्रह भेषज जल पवन पट पाइ कुजोग सुजोग।**
**होहिं कुबस्तु सुबस्तु जग लखहिं सुलच्छन लोग॥ ७ ( क )॥**

ग्रह, औषध, पाणी, वायू आणि वस्त्र—हे सर्वच कुसंग आणि सुसंग लाभल्यामुळे वाईट व चांगले बनतात. विचारी पुरुषच ही गोष्ट जाणू शकतात.॥ ७ (क)॥

**सम प्रकास तम पाख दुहुँ नाम भेद बिधि कीन्ह।**
**ससि सोषक पोषक समुझि जग जस अपजस दीन्ह॥ ७ ( ख )॥**

महिन्याच्या दोन्ही पंधरवड्यात प्रकाश आणि अंधार दोन्हीही सारखेच असतात. परंतु विधात्याने यांच्या नावात फरक केला आहे. (एकाचे नाव शुक्लपक्ष आणि दुसऱ्याचे नाव कृष्णपक्ष असे ठेवले.) एक पक्ष चंद्राला वाढविणारा आणि दुसरा चंद्राला घटविणारा समजून जगाने एकाला सुकीर्ती व दुसऱ्याला अपकीर्ती दिली आहे.॥ ७ (ख)॥

**जड़ चेतन जग जीव जत सकल राममय जानि।**
**बंदउँ सब के पद कमल सदा जोरि जुग पानि॥ ७ ( ग )॥**

जगामध्ये जितके जड व चेतन जीव आहेत, त्या सर्वांना राममय मानून मी त्या सर्वांच्या चरणी दोन्ही हात जोडून वंदन करतो.॥ ७ (ग)॥

**देव दनुज नर नाग खग प्रेत पितर गंधर्ब।**
**बंदउँ किंनर रजनिचर कृपा करहु अब सर्ब॥ ७ ( घ )॥**

देव, दैत्य, मनुष्य, नाग, पक्षी, प्रेत, पितर, गंधर्व, किन्नर आणि निशाचर या सर्वांना मी प्रणाम करतो. या सर्वांनी माझ्यावर कृपा करावी.॥ ७ (घ)॥

**आकर चारि लाख चौरासी। जाति जीव जल थल नभ बासी॥**
**सीय राममय सब जग जानी। करउँ प्रनाम जोरि जुग पानी॥**

चौऱ्याऐंशी लाख योनींमध्ये चार प्रकारचे (स्वेदज, अंडज, उद्भिज्ज, जरायुज) जीव आहेत, ते जल, पृथ्वी आणि आकाशात राहातात. त्या सर्वांनी भरलेले संपूर्ण जग हे श्रीसीताराममय आहे, असे मानून मी दोन्ही हात जोडून त्याला प्रणाम करतो.॥ १ ॥

**जानि कृपाकर किंकर मोहू। सब मिलि करहु छाड़ि छल छोहू॥**
**निज बुधि बल भरोस मोहि नाहीं। तातें बिनय करउँ सब पाहीं॥**

मला आपला सेवक मानून सर्व कृपेची खाण असलेल्या तुम्ही लोकांनी निष्कपट भावनेने माझ्यावर कृपा करावी. माझा माझ्या बुद्धि-बलावर विश्वास नाही, म्हणून मी तुम्हा सर्वांना ही विनंती करतो॥ २ ॥

**करन चहउँ रघुपति गुन गाहा। लघु मति मोरि चरित अवगाहा॥**
**सूझ न एकउ अंग उपाऊ। मन मति रंक मनोरथ राऊ॥**

मी श्रीरघुनाथांच्या गुणांचे वर्णन करू इच्छितो, परंतु माझी बुद्धी अल्प आहे आणि श्रीरामचंद्रांचे चरित्र हे अथांग आहे. म्हणून या वर्णनासाठी मला कोणताही उपाय सुचत नाही. माझे मन आणि बुद्धी कंगाल आहे, मात्र मनोरथ हा राजा आहे.॥ ३॥

**मति अति नीच ऊँचि रुचि आछी। चहिअ अमिअ जग जुरइ न छाछी॥**
**छमिहहिं सज्जन मोरि ढिठाई। सुनिहहिं बालबचन मन लाई॥**

माझी बुद्धी अत्यंत हीन आहे आणि इच्छा मात्र फार मोठी आहे. माझी इच्छा अमृत मिळविण्याची आहे, परंतु या जगात मला ताकही मिळत नाही. सज्जन लोक माझ्या धृष्टतेबद्दल क्षमा करतील आणि माझे हे बाल-वचन (प्रेमाने) ऐकतील (अशी आशा आहे.)॥ ४॥

**जौं बालक कह तोतरि बाता। सुनहिं मुदित मन पितु अरु माता॥**
**हँसिहहिं कूर कुटिल कुबिचारी। जे पर दूषन भूषनधारी॥**

ज्याप्रमाणे बालक बोबडे बोल बोलते, तेव्हा त्याचे आई-वडील ते प्रसन्न मनाने ऐकतात. परंतु जी क्रूर, कुटिल आणि वाईट विचारांची माणसे असतात, ती दुसऱ्यांच्या दोषांनाच भूषण मानून धारण करतात (अर्थात ज्यांना दुसऱ्यांचे दोषच दिसतात) ती हसतील. (हसेनात का?)॥ ५॥

**निज कबित्त केहि लाग न नीका। सरस होउ अथवा अति फीका॥**
**जे पर भनिति सुनत हरषाहीं। ते बर पुरुष बहुत जग नाहीं॥**

रसपूर्ण असो की नीरस, आपली कविता कुणाला आवडत नाही? परंतु जे दुसऱ्याची कविता ऐकून आनंदित होतात, असे उत्तम रसिक पुरुष जगात फार नसतात.॥ ६॥

**जग बहु नर सर सरि सम भाई। जे निज बाढ़ि बढ़हिं जल पाई॥**
**सज्जन सकृत सिंधु सम कोई। देखि पूर बिधु बाढ़इ जोई॥**

असे पाहा की, जगामध्ये तलाव व नद्यांसारखी माणसेच फार आहेत. तलाव, नद्या पाण्याने भरल्या की स्वतःच्या वाढीने फुगून जातात. (तशी ही माणसे गर्विष्ठ होतात.) मात्र समुद्राप्रमाणे एखादा विरळाच सज्जन असतो, जसा समुद्र पूर्ण चंद्राला पाहून (तसा हा दुसऱ्याचा उत्कर्ष पाहून) आनंदाने उसळू लागतो.॥ ७॥

दो०—**भाग छोट अभिलाषु बड़ करउँ एक बिस्वास।**
**पैहहिं सुख सुनि सुजन सब खल करिहहिं उपहास॥ ८॥**

माझे भाग्य छोटे आहे आणि इच्छा मात्र मोठी आहे. पण माझी खात्री आहे की, ही कथा ऐकून सज्जन लोक सुखी होतील व दुष्ट लोक चेष्टा करतील.॥ ८॥

**खल परिहास होइ हित मोरा। काक कहहिं कलकंठ कठोरा॥**
**हंसहिं बक दादुर चातकही। हँसहिं मलिन खल बिमल बतकही॥**

परंतु दुष्ट हसल्यामुळे माझे हितच होईल. मधुर कंठाच्या कोकिळेला कावळे कर्कशच म्हणतात. बगळे जसे हंसाला व बेडूक जसे चातकाला हसतात, तसेच वाईट मनाचे दुष्ट लोक निर्मळ वाणीला हसतात. ॥ १ ॥

**कबित रसिक न राम पद नेहू । तिन्ह कहँ सुखद हास रस एहू ॥**
**भाषा भनिति भोरि मति मोरी । हँसिबे जोग हँसें नहिं खोरी ॥**

जे काव्याचे रसिकही नाहीत आणि ज्यांना प्रभू रामचंद्रांच्या चरणी प्रेमही नाही, त्यांनासुद्धा हे काव्य सुखद हास्य-रसाचे वाटेल. अगोदर ही प्राकृत भाषेतील (अवधीभाषेतील) कृती आहे. दुसरे म्हणजे माझी बुद्धी भोळी भाबडी आहे. म्हणून ही रचना हसण्यासारखीच आहे. हसण्यामध्ये त्यांचा काही दोष नाही. ॥ २ ॥

**प्रभु पद प्रीति न सामुझि नीकी । तिन्हहि कथा सुनि लागिहि फीकी ॥**
**हरि हर पद रति मति न कुतरकी । तिन्ह कहुँ मधुर कथा रघुबर की ॥**

ज्यांना प्रभू श्रीरामांच्या चरणी प्रेम नाही व चांगली समजही नाही, त्यांना ही कथा ऐकताना नीरस वाटेल. ज्यांना श्रीहरिहरांच्या चरणी प्रेम आहे तसेच ज्यांची बुद्धी कुतर्क करणारी नाही, त्यांना श्रीरघुनाथांची ही कथा (खात्रीने) गोड वाटेल. ॥ ३ ॥

**राम भगति भूषित जियँ जानी । सुनिहहिं सुजन सराहि सुबानी ॥**
**कबि न होउँ नहिं बचन प्रबीनू । सकल कला सब बिद्या हीनू ॥**

सज्जन लोक ही कथा आपल्या मनात श्रीरामांच्या भक्तीने सुशोभित मानून सुंदर वाणीने कौतुक करीत ऐकतील. मी काही कवी नाही, वाक्य-रचनेमध्येही कुशल नाही. मी तर सर्व कला व सर्व विद्यांनी रहित आहे. ॥ ४ ॥

**आखर अरथ अलंकृति नाना । छंद प्रबंध अनेक बिधाना ॥**
**भाव भेद रस भेद अपारा । कबित दोष गुन बिबिध प्रकारा ॥**

नाना प्रकारची अक्षरे, अर्थ, अलंकार, अनेक प्रकारची छंदरचना, भाव आणि रसांचे अपार भेद असतात आणि कवितेमध्ये तऱ्हेतऱ्हेचे गुण-दोष असतात. ॥ ५ ॥

**कबित बिबेक एक नहिं मोरें । सत्य कहउँ लिखि कागद कोरें ॥**

यांपैकी काव्याविषयीच्या एकाही गोष्टीचे ज्ञान मला नाही, हे मी कोऱ्या कागदावर लिहून शपथेवर खरे-खरे सांगतो. ॥ ६ ॥

**दो०—भनिति मोरि सब गुन रहित बिस्व बिदित गुन एक ।**
**सो बिचारि सुनिहहिं सुमति जिन्ह कें बिमल बिबेक ॥ ९ ॥**

माझी ही कृती सर्व गुणांनी रहित आहे. पण यात फक्त एक जगप्रसिद्ध गुण आहे. त्याचा विचार करून चांगल्या बुद्धीचे व निर्मळ ज्ञानाचे लोक ही कथा ऐकतील. ॥ ९ ॥

**एहि महँ रघुपति नाम उदारा। अति पावन पुरान श्रुति सारा॥**
**मंगल भवन अमंगल हारी। उमा सहित जेहि जपत पुरारी॥**

या कृतीमध्ये श्रीरघुनाथांचे उदार नाम आहे, जे अत्यंत पवित्र आहे, ते वेद-पुराणांचे सार आहे, कल्याणाचे धाम आहे आणि अमंगलाचे हरण करणारे आहे. पार्वतीसह भगवान शंकर सदैव त्याचा जप करतात.॥ १॥

**भनिति बिचित्र सुकबि कृतजोऊ। राम नाम बिनु सोह न सोऊ॥**
**बिधुबदनी सब भाँति सँवारी। सोह न बसन बिना बर नारी॥**

एखाद्या चांगल्या कवीने रचलेली अप्रतिम कवितासुद्धा राम-नामाशिवाय शोभत नाही. ज्याप्रमाणे चंद्रासारख्या सुंदर मुखाची स्त्री सर्व प्रकारे विभूषित असली, तरी ती वस्त्राशिवाय शोभत नाही.॥ २॥

**सब गुन रहित कुकबि कृत बानी। राम नाम जस अंकित जानी॥**
**सादर कहहिं सुनहिं बुध ताही। मधुकर सरिस संत गुनग्राही॥**

याउलट, कुकवीने रचलेली व सर्व गुणांनी रहित अशी कवितासुद्धा श्रीरामांचे नाव व कीर्ती यांनी अंकित झालेली असेल, तर बुद्धिमान लोक ती आदरपूर्वक सांगतात आणि ऐकतात. कारण संतजन भ्रमराप्रमाणे गुणांचेच ग्रहण करतात.॥ ३॥

**जदपि कबित रस एकउ नाहीं। राम प्रताप प्रगट एहि माहीं॥**
**सोइ भरोस मोरें मन आवा। केहिं न सुसंग बड़प्पनु पावा॥**

जरी माझ्या या रचनेमध्ये कवितेमधील एकही रस नसला, तरी यामध्ये श्रीरामांचा प्रताप प्रकट झालेला आहे. माझ्या मनात हाच एक विश्वास आहे. चांगल्याच्या संगतीमुळे कुणाला मोठेपणा मिळत नाही बरे?॥ ४॥

**धूमउ तजइ सहज करुआई। अगरु प्रसंग सुगंध बसाई॥**
**भनिति भदेस बस्तु भलि बरनी। राम कथा जग मंगल करनी॥**

धूरसुद्धा धुपाच्या संगतीमुळे सुगंधित बनून आपला स्वाभाविक कडवटपणा सोडून देतो. माझी कविता नक्की वाईट आहे, परंतु हिच्यामध्येच जगाचे कल्याण करणाऱ्या रामकथारूपी उत्तम वस्तूचे वर्णन केलले आहे. (म्हणून हिलाही चांगलेच मानले जाईल.)॥ ५॥

छं०—**मंगल करनि कलिमल हरनि तुलसी कथा रघुनाथ की।**
**गति कूर कबिता सरित की ज्यों सरित पावन पाथ की॥**
**प्रभु सुजस संगति भनिति भलि होइहि सुजन मन भावनी।**
**भव अंग भूति मसान की सुमिरत सुहावनि पावनी॥**

तुलसीदास म्हणतात की, श्रीरघुनाथांची कथा कल्याण करणारी आणि कलियुगाच्या पापांचे हरण करणारी आहे. माझ्या या नीरस कवितारूपी नदीची चाल पवित्र जलाच्या (गंगेच्या)

चालीप्रमाणे वेडीवाकडी आहे. प्रभू श्रीरामांच्या सुंदर कीर्तीच्या संगतीमुळे ही कविता सुंदर व सज्जन लोकांच्या मनाला आवडणारी होईल. स्मशानातली अपवित्र राखसुद्धा श्रीमहादेवांच्या अंगाच्या संगतीमुळे सुशोभित वाटते आणि स्मरण करताच ती पवित्र करणारी बनते.

**दो०—प्रिय लागिहि अति सबहि मम भनिति राम जस संग।**
**दारु बिचारु कि करइ कोउ बंदिअ मलय प्रसंग॥ १० ( क )॥**

श्रीरामांच्या कीर्तीच्या संगतीमुळे माझी कविता सर्वांना अत्यंत आवडेल. ज्याप्रमाणे मलय पर्वताच्या सहवासामुळे कोणतेही लाकूड (चंदन बनून) वंदनीय ठरते, मग कोणी लाकूड म्हणून ते तुच्छ मानील काय?॥

**स्याम सुरभि पय बिसद अति गुनद करहिं सब पान।**
**गिरा ग्राम्य सिय राम जस गावहिं सुनहिं सुजान॥ १० ( ख )॥**

गाय जरी काळी असली तरी तिचे दूध शुभ्र व गुणकारी असते, असे समजून सर्व लोक ते पितात. त्याप्रमाणे लोकभाषेत असली तरी श्रीसीता-रामांची कीर्ती बुद्धिमान लोक मोठ्या आवडीने गातील व ऐकतील.॥

**मनि मानिक मुकुता छबि जैसी। अहि गिरि गज सिर सोह न तैसी॥**
**नृप किरीट तरुनी तनु पाई। लहहिं सकल सोभा अधिकाई॥**

मणी, माणिक आणि मोती ही जशी राजाच्या मुकुटावर व नवयुवतीच्या अंगावर शोभतात, तशी साप, पर्वत व हत्तीच्या मस्तकावर शोभत नाहीत.॥ १॥

**तैसेहिं सुकबि कबित बुध कहहीं। उपजहिं अनत अनत छबि लहहीं॥**
**भगति हेतु बिधि भवन बिहाई। सुमिरत सारद आवति धाई॥**

त्याचप्रमाणे सुकवीची कवितासुद्धा कुठेतरी उत्पन्न होते आणि इतर कुठेतरी तिला शोभा प्राप्त होते. (अर्थात कवीच्या वाणीतून उत्पन्न झालेली कविता जेथे तिचा विचार, प्रचार आणि त्यात सांगितलेले आदर्श ग्रहण केले जातात व त्यांचे अनुसरण केले जाते तेथेच ती शोभते.) कवीने स्मरण करताच त्याच्या भक्तीमुळे देवी सरस्वतीसुद्धा ब्रह्मलोक सोडून धावत येते.॥ २॥

**राम चरित सर बिनु अन्हवाएँ। सो श्रम जाइ न कोटि उपाएँ॥**
**कबि कोबिद अस हृदयँ बिचारी। गावहिं हरि जस कलि मल हारी॥**

धावत आल्यामुळे सरस्वतीदेवीला आलेला थकवा, रामचरितरूपी सरोवरामध्ये स्नान केल्याशिवाय इतर कोट्यवधी उपाय केले तरी दूर होत नाही. कवी आणि पंडित आपल्या मनात असा विचार करून कलियुगातील पापांचे हरण करणाऱ्या श्रीहरीच्या कीर्तीचेच गायन करतात.॥ ३॥

**कीन्हें प्राकृत जन गुन गाना। सिर धुनि गिरा लगत पछिताना॥**
**हृदय सिंधु मति सीप समाना। स्वाति सारदा कहहिं सुजाना॥**

संसारी मनुष्यांचे गुणगान केल्यामुळे देवी सरस्वती डोके बडवून घेऊन पश्चात्ताप करू लागते (तिला वाटते की, कवीच्या बोलावण्यावर मी कोठून आले?) बुद्धिमान मनुष्य हृदयाला समुद्र, बुद्धीला शिंपला आणि सरस्वतीला स्वाती नक्षत्रासारखे मानतात. ॥ ४ ॥

**जौं बरषइ बर बारि बिचारू। होहिं कबित मुकुतामनि चारू॥**

या प्रसंगी जर श्रेष्ठ विचाररूपी जलाचा वर्षाव झाला, तर कविता मोत्यासारखी सुंदर बनते. ॥ ५ ॥

दो०—**जुगुति बेधि पुनि पोहिअहिं रामचरित बर ताग।**
**पहिरहिं सज्जन बिमल उर सोभा अति अनुराग॥ ११ ॥**

त्या कवितारूपी मोत्यांना युक्तीने छिद्र पाडून तसेच त्यांना रामचरित्ररूपी सुंदर धाग्यामध्ये ओवून सज्जन लोक आपल्या निर्मळ हृदयात धारण करतात, त्यामुळे अत्यंत अनुरागाची शोभा उजळते. (त्यांना अतिशय प्रेम लाभते.) ॥ ११ ॥

**जे जनमे कलिकाल कराला। करतब बायस बेष मराला॥**
**चलत कुपंथ बेद मग छाँड़े। कपट कलेवर कलि मल भाँड़े॥**

जे घोर कलियुगात जन्मले आहेत, ज्यांची कर्मे कावळ्यासारखी आहेत. परंतु वेष हंसासारखा सोज्ज्वळ आहे, असे ढोंगी आहेत, जे वेदविहित मार्ग सोडून कुमार्गावर चालतात, जे कपटाची मूर्ती आहेत व कलियुगातील पापांची (भरलेली) भांडी आहेत. ॥ १ ॥

**बंचक भगत कहाइ राम के। किंकर कंचन कोह काम के॥**
**तिन्ह महँ प्रथम रेख जग मोरी। धींग धरमध्वज धंधक धोरी॥**

ते लोक आपणास श्रीरामांचे भक्त म्हणवून घेऊन लोकांना फसवितात, जे धनलोभ, क्रोध आणि कामाचे गुलाम आहेत, जे धांगडधिंगा घालणारे, धर्माचा मिथ्या झेंडा फडकविणारे ढोंगी आणि कपटी धंद्याचा भार वाहणारे आहेत, जगातील अशा लोकांमध्ये सर्वांत प्रथम माझी गणना होणार आहे. ॥ २ ॥

**जौं अपने अवगुन सब कहऊँ। बाढ़इ कथा पार नहिं लहऊँ॥**
**ताते मैं अति अलप बखाने। थोरे महुँ जानिहहिं सयाने॥**

जर मी आपल्या सर्व अवगुणांचा पाढा वाचू लागलो, तर कथा फार वाढेल आणि मला पलीकडे पोहोचताही येणार नाही. म्हणून मी फारच थोड्या अवगुणांचे वर्णन केले आहे. यावरून शहाणी माणसे थोडक्यात जाणून घेतील. ॥ ३ ॥

**समुझि बिबिधि बिधि बिनती मोरी। कोउ न कथा सुनि देइहि खोरी॥**
**एतेहु पर करिहहिं जे असंका। मोहि ते अधिक ते जड़ मति रंका॥**

माझी अनेक प्रकारची विनंती समजून घेऊन कोणीही ही (राम) कथा ऐकून मला दोष देणार नाही. यावरही जे शंका घेतील, ते तर माझ्यापेक्षा जास्त मूर्ख आणि बुद्धीने दरिद्री होत. ॥ ४ ॥

**कबि न होउँ नहिं चतुर कहावउँ । मति अनुरूप राम गुन गावउँ ॥**
**कहँ रघुपति के चरित अपारा । कहँ मति मोरि निरत संसारा ॥**

मी तर कवी नाही आणि चतुरही म्हणविला जात नाही. केवळ आपल्या बुद्धीनुसार मी श्रीरामांचे गुण गात आहे. कुठे श्रीरामांचे अपार चरित्र आणि कुठे माझी संसारामध्ये आसक्त असलेली बुद्धी! ॥ ५ ॥

**जेहिं मारुत गिरि मेरु उड़ाहीं । कहहु तूल केहि लेखे माहीं ॥**
**समुझत अमित राम प्रभुताई । करत कथा मन अति कदराई ॥**

ज्या वाऱ्यामुळे सुमेरूसारखे पर्वत उडून जातात, तिच्या समोर कापसाची गणती ती काय? सांगा बरे? श्रीरामांची अनंत प्रभुता जाणल्यामुळे कथेची रचना करण्यास माझे मन कचरत आहे. ॥ ६ ॥

दो०—**सारद सेस महेस बिधि आगम निगम पुरान ।**
**नेति नेति कहि जासु गुन करहिं निरंतर गान ॥ १२ ॥**

सरस्वती, शेष, शिव, ब्रह्मदेव, शास्त्रे, वेद आणि पुराण—हे सर्व 'नेति नेति' (थांग न लागल्यामुळे 'हे नाही,' 'हे नाही' असे म्हणून) नित्य ज्यांचे गुणगान करत असतात. ॥ १२ ॥

**सब जानत प्रभु प्रभुता सोई । तदपि कहें बिनु रहा न कोई ॥**
**तहाँ बेद अस कारन राखा । भजन प्रभाउ भाँति बहु भाषा ॥**

जरी प्रभू श्रीरामचंद्राची प्रभुता अशी (अवर्णनीय) आहे, हे सर्वजण जाणतात, तरीही ती सांगितल्याशिवाय कोणी राहिला नाही. यासंबंधी वेदाने याचे असे कारण सांगितले आहे की, भजनाचा प्रभाव पुष्कळ तऱ्हेने वर्णन केला गेला आहे. (भगवंतांचा महिमा पूर्णपणे कोणी वर्णन करू शकत नाही, परंतु ज्याला जितके शक्य होईल, तितके त्याने भगवंतांचे गुणगान केले पाहिजे; कारण भगवंतांच्या गुणगानरूपी भजनाचा प्रभाव मोठा विलक्षण आहे, त्याचे वर्णन शास्त्रांमध्ये नाना प्रकारे आलेले आहे. थोडेसेही भगवद्‌भजन मनुष्याला सहजपणे भवसागरातून तारून नेते.) ॥ १ ॥

**एक अनीह अरूप अनामा । अज सच्चिदानंद पर धामा ॥**
**ब्यापक बिस्वरूप भगवाना । तेहिं धरि देह चरित कृत नाना ॥**

जो परमेश्वर एक आहे, ज्याला कोणतीही इच्छा नाही, ज्याला कोणतेही रूप आणि नाम नाही, जो अजन्मा, सच्चिदानंद आणि परमधाम आहे, जो सर्वांमध्ये व्यापक व विश्वरूप आहे, त्याच भगवंतांनी दिव्य शरीर धारण करून नाना प्रकारची लीला केली आहे. ॥ २ ॥

**सो केवल भगतन हित लागी । परम कृपाल प्रनत अनुरागी ॥**
**जेहि जन पर ममता अति छोहू । जेहिं करुना करि कीन्ह न कोहू ॥**

ती लीला फक्त भक्तांच्या कल्याणासाठीच आहे, कारण भगवंत परम दयाळू आहेत आणि शरणागतांवर फार प्रेम करणारे आहेत. त्यांची भक्तांवर मोठी माया आणि कृपा आहे. त्यांनी एकदा ज्याच्यावर कृपा केली, त्याच्यावर मग कधी राग धरला नाही. ॥ ३ ॥

**गई बहोर गरीब नेवाजू। सरल सबल साहिब रघुराजू॥**
**बुध बरनहिं हरि जस अस जानी। करहिं पुनीत सुफल निज बानी॥**

ते प्रभू श्रीराम गेलेली वस्तू पुन्हा मिळवून देणारे, दीनबंधू, सरळ स्वभावाचे, सर्व शक्तिमान व सर्वांचे स्वामी आहेत, असे मानून बुद्धिमान लोक त्या श्रीहरीच्या कीर्तीचे वर्णन करून आपली वाणी पवित्र आणि उत्तम फल (मोक्ष आणि दुर्लभ भगवत्प्रेम) देणारी बनवितात.॥ ४॥

**तेहिं बल मैं रघुपति गुन गाथा। कहिहउँ नाइ राम पद माथा॥**
**मुनिन्ह प्रथम हरि कीरति गाई। तेहिं मग चलत सुगम मोहि भाई॥**

त्याच आधारे (नव्हे, तर भजन हे महान फल देणारे समजून भगवत्कृपेच्या बळावरच) मी श्रीरामचंद्रांच्या चरणी मस्तक ठेवून त्यांच्या गुणांची कथा सांगत आहे. शिवाय (वाल्मीकी, व्यास इत्यादी) मुनींनी श्रीहरींची कीर्ती पूर्वी गाइली असल्यामुळे मला त्या मार्गाने जाणे सुलभ होईल.॥ ५॥

दो०—**अति अपार जे सरित बर जौं नृप सेतु कराहिं।**
**चढ़ि पिपीलिकउ परम लघु बिनु श्रम पारहि जाहिं॥ १३॥**

ज्या अत्यंत मोठ्या नद्या आहेत, त्यांच्यावर जर राजाने पूल बांधला, तर अत्यंत छोट्या मुंग्यादेखील त्यावर चढून विनासायास पलीकडे जातात. (तसाच मीसुद्धा मुनींच्या वर्णनाच्या आधारे श्रीरामचरित्राचे वर्णन सहजपणे करू शकेन.)॥ १३॥

**एहि प्रकार बल मनहि देखाई। करिहउँ रघुपति कथा सुहाई॥**
**ब्यास आदि कबि पुंगव नाना। जिन्ह सादर हरि सुजस बखाना॥**

अशाप्रकारे मनाला धीर देत मी श्रीरघुनाथांच्या सुंदर कथेची रचना करीन. व्यास इत्यादी जे अनेक श्रेष्ठ कवी होऊन गेले आहेत, त्यांनी मोठ्या आदराने श्रीहरींच्या कीर्तीचे वर्णन केलेले आहे.॥ १॥

**चरन कमल बंदउँ तिन्ह केरे। पुरवहुँ सकल मनोरथ मेरे॥**
**कलि के कबिन्ह करउँ परनामा। जिन्ह बरने रघुपति गुन ग्रामा॥**

मी त्या सर्व श्रेष्ठ कवींच्या चरणी प्रणाम करतो. त्यांनी माझे मनोरथ पूर्ण करावेत. कलियुगातील ज्या कवींनी श्रीरामांच्या गुणांचे वर्णन केले आहे, त्यांनाही मी प्रणाम करतो.॥ २॥

**जे प्राकृत कबि परम सयाने। भाषाँ जिन्ह हरि चरित बखाने॥**
**भए जे अहहिं जे होइहहिं आगें। प्रनवउँ सबहि कपट सब त्यागें॥**

तसेच जे मोठे बुद्धिमान प्राकृत कवी आहेत, ज्यांनी आपापल्या मातृभाषेमध्ये हरि-चरित्र वर्णिले आहे. त्यांना आणि जे कवी पूर्वी होऊन गेले आहेत, हल्ली जे आहेत व पुढे जे होणार आहेत, त्या सर्वांना अत्यंत निष्कपट भावनेने मी प्रणाम करतो.॥ ३॥

**होहु प्रसन्न देहु बरदानू। साधु समाज भनिति सनमानू॥**
**जो प्रबंध बुध नहिं आदरहीं। सो श्रम बादि बाल कबि करहीं॥**

तुम्ही सर्व कवींनी प्रसन्न होऊन मला असा वर द्यावा की, साधु-समाजामध्ये माझ्या या काव्याचा सन्मान होईल. कारण बुद्धिमान लोक ज्या काव्याचा आदर करीत नाहीत, अशा काव्याची रचना करण्याचा व्यर्थ खटाटोप मूर्ख कवीच करतात. ॥ ४ ॥

**कीरति भनिति भूति भलि सोई। सुरसरि सम सब कहँ हित होई॥**
**राम सुकीरति भनिति भदेसा। असमंजस अस मोहि अँदेसा॥**

गंगेप्रमाणे सर्वांचे कल्याण साधणारी कीर्ती, कविता आणि संपत्ती हीच उत्तम होय. श्रीरामांची कीर्ती मोठी सुंदर (सर्वांचे अनंत कल्याण करणारी) आहे, परंतु माझी कविता तशी सुंदर नाही, असे अंतर असल्यामुळे (या दोन्हींचा मेळ बसत नाही,) याचीच मला काळजी वाटते. ॥ ५ ॥

**तुम्हरी कृपाँ सुलभ सोउ मोरे। सिअनि सुहावनि टाट पटोरे॥**

परंतु तुम्हा कवींच्या कृपेने ही गोष्ट मला सुलभ होईल. रेशमाची शिलाई तरटावरसुद्धा शोभून दिसते. ॥ ६ ॥

दो०—**सरल कबित कीरति बिमल सोइ आदरहिं सुजान।**
**सहज बयर बिसराइ रिपु जो सुनि करहिं बखान॥ १४ ( क )॥**

जी कविता सरळ असून जिच्यामध्ये निर्मळ चरित्राचे वर्णन असते आणि जी ऐकल्यावर शत्रूसुद्धा स्वाभाविक वैर सोडून प्रशंसा करू लागतो, त्याच कवितेचा आदर चतुर लोक करतात. ॥ १४ (क) ॥

**सो न होइ बिनु बिमल मति मोहि मति बल अति थोर।**
**करहु कृपा हरि जस कहउँ पुनि पुनि करउँ निहोर॥ १४ ( ख )॥**

अशी कविता निर्मळ बुद्धीविना निपजत नाही आणि माझ्या बुद्धीचे बळ तर नगण्यच आहे. म्हणून हे कवींनो, मी वारंवार विनवणी करतो की, तुम्ही माझ्यावर कृपा करा की, त्यामुळे मी श्रीहरींच्या कीर्तीचे वर्णन करू शकेन. ॥ १४ (ख) ॥

**कबि कोबिद रघुबर चरित मानस मंजु मराल।**
**बालबिनय सुनि सुरुचि लखि मो पर होहु कृपाल॥ १४ ( ग )॥**

कवींनो व पंडितांनो! तुम्ही या रामचरित्ररूपी मानस सरोवरातील सुंदर हंस आहात. मज बालकाची विनवणी ऐकून व माझी रामचरित्रा-विषयीची अत्यंत आवड पाहून माझ्यावर कृपा करा. ॥ १४ (ग) ॥

सो०—**बंदउँ मुनि पद कंजु रामायन जेहिं निरमयउ।**
**सखर सुकोमल मंजु दोष रहित दूषन सहित॥ १४ ( घ )॥**

ज्यांनी रामायण रचले, त्या वाल्मीकी मुनींच्या चरणकमलांना मी वंदन करतो. त्यांची ही रचना खर (राक्षस) सहित असली, तरी ती खर (कठोर) नसून कोमल व सुंदर आहे. तसेच ती दूषण (राक्षस) सहित असली तरी दूषण (दोष) रहित आहे. ॥ १४ (घ) ॥

**बंदउँ चारिउ बेद भव बारिधि बोहित सरिस।**
**जिन्हहि न सपनेहुँ खेद बरनत रघुबर बिसद जसु॥ १४ ( ङ )॥**

जे संसारसागरातून पैलतीराला जाण्यासाठी नावेसारखे आहेत, त्या चारही वेदांना मी वंदन करतो. या वेदांना श्रीरामांच्या निर्मल यशाचे वर्णन करता करता आपण थकून जाऊ, असे स्वप्नातही वाटत नाही. (त्या वर्णनात वेद नेहमीच उत्साही असतात.) ॥ १४ (ङ) ॥

**बंदउँ बिधि पद रेनु भव सागर जेहिं कीन्ह जहँ।**
**संत सुधा ससि धेनु प्रगटे खल बिष बारुनी॥ १४ ( च )॥**

ज्यांनी हा भव-सागर बनविला, ज्याच्या एका बाजूला संतरूपी अमृत, चंद्रमा व कामधेनू निघाले आणि दुसऱ्या बाजूला दुष्ट मनुष्यरूपी विष आणि मदिरा उत्पन्न झाली, त्या ब्रह्मदेवांच्या चरण धुळीला मी वंदन करतो. ॥

दो०—**बिबुध बिप्र बुध ग्रह चरन बंदि कहउँ कर जोरि।**
**होइ प्रसन्न पुरवहु सकल मंजु मनोरथ मोरि॥ १४ ( छ )॥**

देव, ब्राह्मण, पंडित व ग्रह या सर्वांच्या चरणी वंदन करून, हात जोडून मी विनवितो की, तुम्ही सर्वांनी प्रसन्न होऊन माझे सर्व उत्तम मनोरथ पूर्ण करा. ॥ १४ (छ) ॥

**पुनि बंदउँ सारद सुरसरिता। जुगल पुनीत मनोहर चरिता॥**
**मज्जन पान पाप हर एका। कहत सुनत एक हर अबिबेका॥**

त्यानंतर मी सरस्वती व गंगा यांना वंदन करतो. दोघीही पवित्र व मनोहर चरित्राच्या आहेत. एक (गंगा) स्नान केल्याने व पाणी प्याल्याने पापांचे हरण करते, तर दुसरी (सरस्वती) हिचे गुण व कीर्ती कथन केल्याने आणि श्रवण केल्याने अज्ञानाचा नाश करते. ॥ १ ॥

**गुर पितु मातु महेस भवानी। प्रनवउँ दीनबंधु दिन दानी॥**
**सेवक स्वामि सखा सिय पी के। हित निरुपधि सब बिधि तुलसी के॥**

श्रीमहेश व पार्वतीला मी प्रणाम करतो. ते माझे गुरू व माता-पिता आहेत, ते दीनबंधू व नित्य दान करणारे आहेत. ते सीतापती श्रीरामचंद्रांचे सेवक, स्वामी व सखा आहेत. तसेच मज तुलसीदासाचे सर्व प्रकारे खरे हित करणारे आहेत. ॥ २ ॥

**कलि बिलोकि जग हित हर गिरिजा। साबर मंत्र जाल जिन्ह सिरिजा॥**
**अनमिल आखर अरथ न जापू। प्रगट प्रभाउ महेस प्रतापू॥**

ज्यांनी कलियुगाचा प्रभाव पाहून जगाच्या हितासाठी शाबर-मंत्रसमूह रचले, ज्या मंत्रांच्या अक्षरांचा मेळ बसत नाही, नीट अर्थ लागत नाही व जपसुद्धा होत नाही, परंतु श्रीशिवांच्या प्रभावाने त्यांचा प्रत्यक्ष परिणाम मात्र दिसून येतो. ॥ ३ ॥

**सो उमेस मोहि पर अनुकूला। करिहिं कथा मुद मंगल मूला॥**
**सुमिरि सिवा सिव पाइ पसाऊ। बरनउँ रामचरित चित चाऊ॥**

ते उमेश माझ्यावर प्रसन्न होऊन, (श्रीरामांची) ही कथा आनंद आणि मंगल यांचे मूळ बनवितील. अशा प्रकारे पार्वती आणि शिव या दोघांचे स्मरण करून आणि त्यांचा प्रसाद मिळवून मी मोठ्या आवडीने श्रीरामचरित्राचे वर्णन करतो. ॥ ४ ॥

**भनिति मोरि सिव कृपाँ बिभाती। ससि समाज मिलि मनहुँ सुराती॥**
**जे एहि कथहि सनेह समेता। कहिहहिं सुनिहहिं समुझि सचेता॥**
**होइहहिं राम चरन अनुरागी। कलि मल रहित सुमंगल भागी॥**

ज्याप्रमाणे तारागणांसह चंद्राबरोबर रात्र शोभते, त्याप्रमाणे माझी कविता श्रीशंकरांच्या कृपेमुळे शोभून दिसेल. जे ही कथा प्रेमाने व एकाग्रतेने समजून-उमजून वर्णन करतील किंवा ऐकतील, ते कलियुगाच्या पापांनी रहित होतील आणि सुंदर कल्याणाची प्राप्ती करून श्रीरामांच्या चरणांचे भक्त बनतील. ॥ ५-६ ॥

दो०—**सपनेहुँ साचेहुँ मोहि पर जौं हर गौरि पसाउ।**
**तौ फुर होउ जो कहेउँ सब भाषा भनिति प्रभाउ॥ १५॥**

जर माझ्यावर श्रीशिव-पार्वती यांची स्वप्नातही खरोखर प्रसन्नता झाली, तर मी या प्राकृत भाषेतील कवितेचा जो प्रभाव सांगितला आहे, तो सर्व खरा होईल. ॥ १५ ॥

**बंदउँ अवध पुरी अति पावनि। सरजू सरि कलि कलुष नसावनि॥**
**प्रनवउँ पुर नर नारि बहोरी। ममता जिन्ह पर प्रभुहि न थोरी॥**

मी अत्यंत पवित्र अशा अयोध्यापुरीला आणि कलियुगातील पापांचा नाश करणाऱ्या शरयूनदीला वंदन करतो. नंतर मी ज्यांच्यावर प्रभू श्रीरामांनी अपरंपार ममता केली, त्या अयोध्येतील नरनारींना मी वंदन करतो. ॥ १ ॥

**सिय निंदक अघ ओघ नसाए। लोक बिसोक बनाइ बसाए॥**
**बंदउँ कौसल्या दिसि प्राची। कीरति जासु सकल जग माची॥**

श्रीरामांनी सीतामाईंची निंदा करणाऱ्यांच्याही पाप-राशींचा नाश करून, त्यांना शोकरहित केले व त्यांना आपल्या लोकी नेले. तसेच जिची कीर्ती संपूर्ण जगात पसरली आहे, अशा कौसल्यारूपी पूर्व दिशेला मी वंदन करतो. ॥ २ ॥

**प्रगटेउ जहँ रघुपति ससि चारू। बिस्व सुखद खल कमल तुसारू॥**
**दसरथ राउ सहित सब रानी। सुकृत सुमंगल मूरति मानी॥**
**करउँ प्रनाम करम मन बानी। करहु कृपा सुत सेवक जानी॥**
**जिन्हहि बिरचि बड़ भयउ बिधाता। महिमा अवधि राम पितु माता॥**

जेथून (कौसल्यारूपी पूर्व दिशेतून) विश्वाला सुख देणारा आणि दुष्टरूपी कमळांचा कडाक्याच्या थंडीप्रमाणे नाश करणारा श्रीरामचंद्ररूपी सुंदर चंद्र उगवला, त्या सर्व राण्यांसह राजा दशरथांना पुण्य व सुंदर कल्याणाची मूर्ती मानून मी काया-वाचा-मनाने प्रणाम करतो. त्यांनी आपल्या पुत्राचा सेवक समजून मजवर कृपा करावी. त्यांना निर्माण करून ब्रह्मदेवाने मोठेपणा मिळवला. ते श्रीरामांचे माता-पिता असल्याने त्यांचा महिमा अगाध आहे. ॥ ३-४ ॥

सो०—**बंदउँ अवध भुआल सत्य प्रेम जेहि राम पद।**
**बिछुरत दीनदयाल प्रिय तनु तृन इव परिहरेउ॥ १६ ॥**

मी अयोध्येचा राजा दशरथ यांना वंदन करतो, ज्यांचे श्रीरामांच्या चरणी खरेखुरे प्रेम होते. इतके की, दीनदयाळू श्रीरामांचा वियोग होताच त्यांनी आपले प्रिय शरीर तुच्छ कस्पटाप्रमाणे फेकून दिले. ॥

**प्रनवउँ परिजन सहित बिदेहू। जाहि राम पद गूढ़ सनेहू॥**
**जोग भोग महँ राखेउ गोई। राम बिलोकत प्रगटेउ सोई॥**

कुटुंबासह राजा जनकांनाही मी प्रणाम करतो. त्यांच्या मनात श्रीरामांच्या चरणी गूढ प्रेम भरले होते. पण त्यांनी ते योग व भोग यांमध्ये दडवून ठेवले होते, परंतु श्रीरामांना पाहताच ते उचंबळून आले. ॥ १ ॥

**प्रनवउँ प्रथम भरत के चरना। जासु नेम ब्रत जाइ न बरना॥**
**राम चरन पंकज मन जासू। लुबुध मधुप इव तजइ न पासू॥**

सर्वांत प्रथम मी भरताच्या चरणी प्रणाम करतो. कारण त्याचे नियम व व्रते यांचे वर्णनही करता येणार नाही. शिवाय श्रीरामांच्या चरणकमलांमध्ये भ्रमराप्रमाणे लुब्ध झालेले त्याचे मन त्यांच्यापासून दूर जात नसे. ॥ २ ॥

**बंदउँ लछिमन पद जलजाता। सीतल सुभग भगत सुखदाता॥**
**रघुपति कीरति बिमल पताका। दंड समान भयउ जस जाका॥**

नंतर मी लक्ष्मणाच्या चरण-कमलांना वंदन करतो, जी चरण-कमले शीतल, सुंदर व भक्तांना सुखदायी आहेत. श्रीरघुनाथांच्या कीर्तीरूपी विमल ध्वजामध्ये ज्यांची कीर्ती ही (ध्वज उंच फडकविणाऱ्या) दंडासारखी आहे. ॥ ३ ॥

**सेष सहस्रसीस जग कारन। जो अवतरेउ भूमि भय टारन॥**
**सदा सो सानुकूल रह मो पर। कृपासिंधु सौमित्रि गुनाकर॥**

सहस्र शिरे असणारा जो शेष जगाचे कारण आहे व ज्याने पृथ्वीचे भय नाहीसे करण्यासाठी अवतार घेतला, तो गुणांची खाण असलेला कृपासिंधू सुमित्रानंदन लक्ष्मण माझ्यावर नेहमी प्रसन्न राहो. ॥ ४ ॥

**रिपुसूदन पद कमल नमामी। सूर सुसील भरत अनुगामी॥**
**महाबीर बिनवउँ हनुमाना। राम जासु जस आप बखाना॥**

त्यानंतर मी शत्रुघ्नाच्या चरण-कमलांना प्रणाम करतो. तो महान वीर, सुशील आणि भरताचा अनुयायी आहे. मी त्या महावीर हनुमानालाही विनंती करतो की, ज्याच्या कीर्तीचे वर्णन स्वत: श्रीरामचंद्रांनी (आपल्या मुखाने) केलेले आहे.॥ ५॥

**सो०—प्रनवउँ पवनकुमार खल बन पावक ग्यान घन।**
**जासु हृदय आगार बसहिं राम सर चाप धर॥ १७॥**

त्या वायुसुत श्रीहनुमानालाही प्रणाम मी करतो, जो दुष्टरूपी वनाला भस्म करणारा अग्नी आहे. तसेच जो ज्ञानघन असून ज्याच्या हृदयमंदिरात धनुष्य-बाण धारण केलेले श्रीराम निवास करतात.॥ १७॥

**कपिपति रीछ निसाचर राजा। अंगदादि जे कीस समाजा॥**
**बंदउँ सब के चरन सुहाए। अधम सरीर राम जिन्ह पाए॥**

वानरांचा राजा सुग्रीव, अस्वलांचा राजा जांबवान, राक्षसांचा राजा बिभीषण आणि अंगद इत्यादी जितका म्हणून वानरांचा समाज आहे, ज्यांनी अधम (पशू आणि राक्षस इत्यादी) शरीरामध्ये जन्मूनही श्रीरामांना प्राप्त करून घेतले, त्या सर्वांच्या चरणांना मी वंदन करतो.॥ १॥

**रघुपति चरन उपासक जेते। खग मृग सुर नर असुर समेते॥**
**बंदउँ पद सरोज सब केरे। जे बिनु काम राम के चेरे॥**

पशू, पक्षी, देव, मनुष्य, असुर यांच्यासह जितके म्हणून श्रीरामांच्या चरणांचे उपासक व निष्काम सेवक आहेत, त्या सर्वांच्या चरण-कमलांना मी वंदन करतो.॥ २॥

**सुक सनकादि भगत मुनि नारद। जे मुनिबर बिग्यान बिसारद॥**
**प्रनवउँ सबहि धरनि धरि सीसा। करहु कृपा जन जानि मुनीसा॥**

शुकदेव, सनकादी, नारदमुनी इत्यादी जितके भक्त आणि परमज्ञानी श्रेष्ठ मुनी आहेत, त्या सर्वांना मी भूमीवर मस्तक टेकून प्रणाम करतो. हे मुनीश्वरांनो! तुम्ही सर्वजण मला आपला दास समजून माझ्यावर कृपा करा.॥ ३॥

**जनकसुता जग जननि जानकी। अतिसय प्रिय करुनानिधान की॥**
**ताके जुग पद कमल मनावउँ। जासु कृपाँ निरमल मति पावउँ॥**

राजा जनकांची कन्या, जगन्माता आणि करुणानिधान श्रीरामांची प्रियतमा असलेल्या जानकीमातेच्या दोन्ही चरण-कमलांना मी आळवितो की, त्यांच्या कृपेमुळे निर्मळ बुद्धी मला मिळावी.॥ ४॥

**पुनि मन बचन कर्म रघुनायक। चरन कमल बंदउँ सब लायक॥**
**राजिवनयन धरें धनु सायक। भगत बिपति भंजन सुखदायक॥**

त्यानंतर मी कमलनयन, धनुष्य-बाण धारण करणाऱ्या, भक्तांची संकटे दूर करणाऱ्या व सर्वांना सुख देणाऱ्या श्रीरामांच्या सर्वसमर्थ चरणकमलांना कायावाचामनाने वंदन करतो. ॥ ५ ॥

**दो०—गिरा अरथ जल बीचि सम कहिअत भिन्न न भिन्न।**
**बंदउँ सीता राम पद जिन्हहि परम प्रिय खिन्न॥ १८॥**

जसे वाणी व तिचा अर्थ, तसेच जल व तरंग यांच्यासारखे सांगण्यापुरते भिन्न आहेत, परंतु वास्तविक एकरूप आहेत, तसेच जे दीनदयाळू आहेत, त्या श्रीसीतारामांच्या चरणांना मी वंदन करतो. ॥ १८ ॥

**बंदउँ नाम राम रघुबर को। हेतु कृसानु भानु हिमकर को॥**
**बिधि हरि हरमय बेद प्रान सो। अगुन अनूपम गुन निधान सो॥**

मी रघुनाथांच्या 'राम' नावाला वंदन करतो. जे अग्नी, सूर्य आणि चंद्र यांचे ('र', 'आ' व 'म' रूपाने) बीज आहे, तसेच जे ब्रह्मदेव, विष्णू आणि शिवरूप आहे, जे वेदांचा प्राण आहे, जे उपमारहित आहे, आणि निर्गुण असून गुणांचे भांडार आहे. ॥ १ ॥

**महामंत्र जोइ जपत महेसू। कासीं मुकुति हेतु उपदेसू॥**
**महिमा जासु जान गनराऊ। प्रथम पूजिअत नाम प्रभाऊ॥**

'राम' हे नाम महामंत्र आहे, स्वतः महेश्वर त्याचा जप करतात. ज्याचा उपदेश काशीमध्ये मुक्तीचे कारण होतो, त्याचा महिमा श्रीगजाननही जाणतो. 'राम' या नामाच्या प्रभावामुळे श्री गजाननाची सर्वांत प्रथम पूजा होते. ॥ २ ॥

**जान आदिकबि नाम प्रतापू। भयउ सुद्ध करि उलटा जापू॥**
**सहस नाम सम सुनि सिव बानी। जपि जेईं पिय संग भवानी॥**

आदिकवी श्रीवाल्मीकींना रामनामाचा प्रताप कळला. कारण ते नाम उलटे ('मरा', 'मरा') जपूनही ते पवित्र झाले. एक राम-नाम हे (इतर) सहस्र नामांएवढे आहे, असे शिवांचे वचन ऐकल्यावर पार्वतीही नेहमी आपल्या पतीबरोबर राम-नामाचा जप करीत असते. ॥ ३ ॥

**हरषे हेतु हेरि हर ही को। किय भूषन तिय भूषन ती को॥**
**नाम प्रभाउ जान सिव नीको। कालकूट फलु दीन्ह अमी को॥**

राम-नामाबद्दल पार्वतीच्या मनात इतके प्रेम आहे, असे पाहून शंकरांना हर्ष झाला. त्यांनी स्त्रियांमध्ये भूषण असलेल्या पार्वतीला आपले भूषण-आपले अर्धे अंग-बनविले. नामाचा प्रभाव शिवांना पुरता माहीत आहे. त्यामुळेच कालकूट विषाने त्यांना अमृताचे फल दिले. ॥ ४ ॥

**दो०—बरषा रितु रघुपति भगति तुलसी सालि सुदास।**
**राम नाम बर बरन जुग सावन भादव मास॥ १९॥**

तुलसीदास म्हणतात की, श्रीरामांची भक्ती हा वर्षा ऋतू आहे. उत्तम भक्त हे धान्य आहेत

आणि 'राम' या नामातील दोन अक्षरे श्रावण-भाद्रपद मास आहेत. (श्रावण-भाद्रपदातील पावसाने पीक उत्तम यावे, तसे रामनामजपाने रामभक्ती करून भक्त भक्तिसंपन्न होतात.) ॥ १९ ॥

**आखर मधुर मनोहर दोऊ । बरन बिलोचन जन जिय जोऊ ॥**
**सुमिरत सुलभ सुखद सब काहू । लोक लाहु परलोक निबाहू ॥**

ही दोन अक्षरे मधुर व मनोहर आहेत. ती वर्णमालारूपी शरीराचे दोन नेत्र आहेत, ती (अक्षरे) भक्तांचे जीवन आहेत आणि स्मरण करण्यासाठी सर्वांना सुलभ व आनंदप्रद आहेत. तसेच ती इहलोकी लाभ देतात आणि परलोकी सांभाळ करतात. (अर्थात ती भगवंतांच्या दिव्य धामामध्ये दिव्य देहाने नित्य भगवत्सेवेमध्ये ठेवतात.) ॥ १ ॥

**कहत सुनत सुमिरत सुठि नीके । राम लखन सम प्रिय तुलसी के ॥**
**बरनत बरन प्रीति बिलगाती । ब्रह्म जीव सम सहज सँघाती ॥**

ही अक्षरे उच्चारण्यास, ऐकण्यास व स्मरण करण्यास फारच सुंदर आहेत. तुलसीदासांना तर ती राम-लक्ष्मणासारखी प्रिय आहेत. त्यांतील 'र' व 'म' यांचे वेगवेगळे वर्णन केल्याने परस्पर प्रेम दिसून येते. ही जीव व ब्रह्म यांच्यासारखी स्वभावतःच नित्य बरोबर राहातात. ॥ २ ॥

**नर नारायन सरिस सुभ्राता । जग पालक बिसेषि जन त्राता ॥**
**भगति सुतिय कल करन बिभूषन । जग हित हेतु बिमल बिधु पूषन ॥**

दोन्ही अक्षरे ही नर-नारायणाप्रमाणे प्रेमळ भाऊ आहेत. ही जगाचे पालन आणि विशेषतः भक्तांचे रक्षण करणारी आहेत. ही अक्षरे भक्तिरूपी सुंदर स्त्रीच्या कानांतील सुंदर कर्णफुले आहेत आणि जगाचे हित करणारे तेजस्वी चंद्र-सूर्य आहेत. ॥ ३ ॥

**स्वाद तोष सम सुगति सुधा के । कमठ सेष सम धर बसुधा के ॥**
**जन मन मंजु कंज मधुकर से । जीह जसोमति हरि हलधर से ॥**

ही मोक्षरूप अमृताच्या गोडीसारखी व तृप्तीसारखी आहेत. ती कूर्म व शेषाप्रमाणे पृथ्वीला धारण करणारी आहेत. भक्तांच्या मनरूपी सुंदर कमळात विहार करणाऱ्या भ्रमरांप्रमाणे आहेत. जीभरूपी यशोदेला श्रीकृष्ण आणि बलराम यांच्यासारखी (आनंद देणारी) आहेत. ॥ ४ ॥

**दो०—एकु छत्रु एकु मुकुटमनि सब बरननि पर जोउ ।**
**तुलसी रघुबर नाम के बरन बिराजत दोउ ॥ २० ॥**

तुलसीदास म्हणतात की, श्रीरघुनाथांच्या नावातील दोन्ही अक्षरे अत्यंत श्रेष्ठ आहेत. त्यांतील एक (र कार) छत्ररूपाने रेफ ( र्‍ ) आणि दुसरा (मकार) ही मुकुटमणी अनुस्वार ( ं ) रूपाने सर्व अक्षरांच्या डोक्यावर राहतात. ॥ २० ॥

**समुझत सरिस नाम अरु नामी। प्रीति परसपर प्रभु अनुगामी॥**
**नाम रूप दुइ ईस उपाधी। अकथ अनादि सुसामुझि साधी॥**

तसे पाहिले तर, नाम आणि नामी दोन्ही एकरूपच आहेत, परंतु दोघांमध्ये स्वामी आणि सेवक यांच्याप्रमाणे प्रेम आहे. स्वामीच्या मागे सेवक चालतो, त्याच-प्रमाणे नामामागे नामी चालतो. प्रभू श्रीराम 'राम' हे नाम घेताच तेथे येतात. नाम आणि रूप या दोन्ही ईश्वराच्या उपाधी आहेत. ही दोन्ही अनिर्वचनीय आहेत, अनादी आहेत आणि शुद्ध भक्तीने युक्त बुद्धीनेच यांचे स्वरूप जाणता जाते. ॥ १ ॥

**को बड़ छोट कहत अपराधू। सुनि गुन भेदु समुझिहहिं साधू॥**
**देखिअहिं रूप नाम आधीना। रूप ग्यान नहिं नाम बिहीना॥**

यांपैकी कोण मोठे व कोण लहान, हे सांगणे हा अपराध आहे. यांच्या गुणांचे तारतम्य (कमी-जास्तपणा) साधु-पुरुष स्वतःच जाणतात. रूप हे नामाच्या अधीन दिसून येते आणि नामाशिवाय रूपाचे ज्ञान होऊ शकत नाही. ॥ २ ॥

**रूप बिसेष नाम बिनु जानें। करतल गत न परहिं पहिचानें॥**
**सुमिरिअ नाम रूप बिनु देखें। आवत हृदयँ सनेह बिसेषें॥**

कोणतेही विशिष्ट रूप हे त्याचे नाम जाणल्याविना अगदी तळहातावर ठेवले तरी ओळखता येणे शक्य नाही आणि रूप पाहिल्याशिवायही नामाचे स्मरण केल्यास विशेष प्रेमासह ते रूप हृदयात प्रकट होते. ॥ ३ ॥

**नाम रूप गति अकथ कहानी। समुझत सुखद न परति बखानी॥**
**अगुन सगुन बिच नाम सुसाखी। उभय प्रबोधक चतुर दुभाषी॥**

नाम व रूप यांच्यातील संबंध सांगता येण्याजोगा नाही. ते समजण्यास सुखदायक आहे, परंतु त्याचे वर्णन करता येत नाही. भगवंतांच्या निर्गुण व सगुण रूपांच्या मध्ये नाम हे सुंदर साक्षीदार आहे आणि दोन्हींचे यथार्थ ज्ञान करविणारे चतुर दुभाषी आहे. ॥ ४ ॥

**दो०—राम नाम मनिदीप धरु जीह देहरीं द्वार।**
**तुलसी भीतर बाहेरहुँ जौं चाहसि उजिआर॥ २१॥**

तुलसीदास म्हणतात की, जर तुम्हांला आत व बाहेर प्रकाश हवा असेल तर तुम्ही मुखरूपी दाराच्या जीभरूपी उंबरठ्यावर रामनामरूपी रत्नदीप ठेवा. ॥ २१ ॥

**नाम जीहँ जपि जागहिं जोगी। बिरति बिरंचि प्रपंच बियोगी॥**
**ब्रह्मसुखहि अनुभवहिं अनूपा। अकथ अनामय नाम न रूपा॥**

ब्रह्मदेवाने बनविलेल्या प्रपंचामधून पूर्णपणे सुटलेले वैराग्यवान, मुक्त योगी पुरुष हे नाव जिभेने जपत (तत्त्वज्ञानरूपी दिवसामध्ये) जागतात आणि नाम-रूपाने रहित असे अनुपम, अनिर्वचनीय, अनामय ब्रह्मसुख अनुभवतात.॥ १॥

**जाना चहहिं गूढ़ गति जेऊ। नाम जीहँ जपि जानहिं तेऊ॥**
**साधक नाम जपहिं लय लाएँ। होहिं सिद्ध अनिमादिक पाएँ॥**

जे परमात्म्याचा यथार्थ महिमा जाणू इच्छितात, ते सुद्धा जिभेने नामाचा जप करून ते जाणून घेतात. (लौकिक सिद्धी प्राप्त करू इच्छिणारे अर्थार्थी) साधक मन लावून नामाचा जप करतात आणि अणिमादी (अष्ट) सिद्धी प्राप्त करून सिद्ध बनतात.॥ २॥

**जपहिं नामु जन आरत भारी। मिटहिं कुसंकट होहिं सुखारी॥**
**राम भगत जग चारि प्रकारा। सुकृती चारिउ अनघ उदारा॥**

आर्त (संकटग्रस्त) भक्त नामजप करतात, तेव्हा त्यांची मोठ-मोठी संकटे नाहीशी होतात आणि ते सुखी होतात. जगात चार प्रकारचे [(१) अर्थार्थी—द्रव्यादीच्या इच्छेने भजणारे, (२) आर्त—संकटातून सुटका करून घेण्यासाठी भजणारे, (३) जिज्ञासू—भगवंतांना जाणून घेण्याच्या इच्छेने भजणारे, (४) ज्ञानी—भगवंतांना तत्त्वतः जाणून स्वाभाविक प्रेमाने भजणारे] रामभक्त आहेत आणि हे चारी पुण्यात्मे, पापरहित आणि उदार आहेत.॥ ३॥

**चहू चतुर कहुँ नाम अधारा। ग्यानी प्रभुहि बिसेषि पिआरा॥**
**चहुँ जुग चहुँ श्रुति नाम प्रभाऊ। कलि बिसेषि नहिं आन उपाऊ॥**

चारही चतुर भक्तांना नामाचाच आधार आहे. यांपैकी ज्ञानी भक्त हा प्रभूला विशेष आवडतो. तसे पाहिले तर चारी युगांमध्ये आणि चारी वेदांमध्ये नामाचा प्रभाव आहे, परंतु कलियुगामध्ये तो विशेष आहे. या युगामध्ये नामाशिवाय दुसरा कोणताही उपाय नाही.॥ ४॥

दो०—**सकल कामना हीन जे राम भगति रस लीन।**
**नाम सुप्रेम पियूष ह्रद तिन्हहुँ किए मन मीन॥ २२॥**

जे सर्व प्रकारच्या (भोग व मोक्षाच्यासुद्धा) कामनांनी रहित असतात व श्रीरामभक्तीच्या रसामध्ये मग्न असतात, त्यांनी सुद्धा नामाच्या सुंदर प्रेमरूपी अमृत-सरोवरात आपले मन मासा बनवून ठेवले आहे. (अर्थात ते नामरूपी अमृतापासून क्षणभरही दूर होऊ इच्छित नाहीत.)॥ २२॥

**अगुन सगुन दुइ ब्रह्म सरूपा। अकथ अगाध अनादि अनूपा॥**
**मोरें मत बड़ नामु दुहू तें। किए जेहिं जुग निज बस निज बूतें॥**

निर्गुण व सगुण ही ब्रह्माची दोन स्वरूपे आहेत. दोन्हीही सांगता न येणारी, अथांग, अनादी व अनुपम आहेत. माझ्या मते 'नाम' हे दोन्ही रूपांपेक्षा मोठे आहे. कारण त्याने आपल्या शक्तीने (सगुण-निर्गुण) दोघांनाही आपल्या अधीन करून ठेवले आहे.॥ १॥

**प्रौढ़ि सुजन जनि जानहिं जन की । कहउँ प्रतीति प्रीति रुचि मन की ॥**
**एकु दारुगत देखिअ एकू । पावक सम जुग ब्रह्म बिबेकू ॥**
**उभय अगम जुग सुगम नाम तें । कहेउँ नामु बड़ ब्रह्म राम तें ॥**
**ब्यापकु एकु ब्रह्म अबिनासी । सत चेतन घन आनँद रासी ॥**

सज्जनांनी या गोष्टीला मज दासाचे धार्ष्ट्य किंवा निव्वळ काव्योक्ती समजू नये. मी माझ्या मनातील विश्वास, प्रेम आणि आवडीची गोष्ट सांगत आहे. (निर्गुण व सगुण) या दोन्ही प्रकारच्या ब्रह्माचे ज्ञान हे अग्निप्रमाणे आहे. निर्गुण ह्या काष्ठामधील अग्निप्रमाणे न दिसणारे आणि सगुण हे प्रत्यक्ष दिसणाऱ्या अग्निप्रमाणे आहे. दोन्हीही जाणण्यास कठीण आहेत, परंतु नामामुळे ती सुगम बनतात. म्हणूनच मी नामाला (निर्गुण) ब्रह्मापेक्षा आणि (सगुण) रामापेक्षा मोठे असे म्हटले आहे. ब्रह्म हे व्यापक, एक, अविनाशी व सच्चिदानंदघन आहे. ॥ २-३ ॥

**अस प्रभु हृदयँ अछत अबिकारी । सकल जीव जग दीन दुखारी ॥**
**नाम निरूपन नाम जतन तें । सोउ प्रगटत जिमि मोल रतन तें ॥**

असे विकाररहित प्रभू हृदयात राहात असूनही जगातील सर्व जीव हे दीन आणि दुःखी आहेत. नामाचे यथार्थ स्वरूप, महिमा, रहस्य व प्रभाव जाणून श्रद्धेने नामजपरूपी साधन केल्यामुळे ज्याप्रमाणे रत्न जाणण्यामुळे त्याचे मूल्य कळते, तसेच ब्रह्म ज्ञात होते. ॥ ४ ॥

दो०—**निरगुन तें एहि भाँति बड़ नाम प्रभाउ अपार ।**
**कहउँ नामु बड़ राम तें निज बिचार अनुसार ॥ २३ ॥**

अशारीतीने निर्गुणापेक्षा नामाचा प्रभाव फार मोठा आहे. आता मी माझे मत सांगतो की, नाम हे (सगुण) रामापेक्षाही मोठे आहे. ॥ २३ ॥

**राम भगत हित नर तनु धारी । सहि संकट किए साधु सुखारी ॥**
**नामु सप्रेम जपत अनयासा । भगत होहिं मुद मंगल बासा ॥**

श्रीरामांनी भक्तांच्या कल्याणासाठी मनुष्यशरीर धारण करून व स्वतः कष्ट सहन करून साधूंना सुखी केले, परंतु भक्तजन प्रेमाने त्यांच्या नामाचा जप करीत सहजपणे आनंद आणि कल्याण यांचे निवासस्थान बनून जातात. ॥ १ ॥

**राम एक तापस तिय तारी । नाम कोटि खल कुमति सुधारी ॥**
**रिषि हित राम सुकेतुसुता की । सहित सेन सुत कीन्हि बिबाकी ॥**
**सहित दोष दुख दास दुरासा । दलइ नामु जिमि रबि निसि नासा ॥**
**भंजेउ राम आपु भव चापू । भव भय भंजन नाम प्रतापू ॥**

(हेच पाहाना!) श्रीरामांनी केवळ एका मुनीच्या पत्नीचा (अहल्येचा) उद्धार केला, परंतु नामाने कोट्यवधी दुष्टांची बिघडलेली बुद्धी सुधारली. श्रीरामांनी विश्वामित्र ऋषींच्यासाठी सुकेतू यक्षाची कन्या ताडका हिचा, सेना आणि तिचा पुत्र (सुबाहू) यांच्यासह नाश केला. परंतु नाम हे आपल्या भक्तांचे दोष, दु:ख आणि दुष्ट वासना यांचा असा नाश करते, जसा सूर्य रात्रीचा नाश करतो. श्रीरामांनी स्वत: (एक) शिव-धनुष्य मोडून टाकले, परंतु नामाचा प्रतापच संसारातील सर्व भयांचा नाश करणारा आहे. ॥ २-३ ॥

**दंडक बनु प्रभु कीन्ह सुहावन। जन मन अमित नाम किए पावन॥**
**निसिचर निकर दले रघुनंदन। नामु सकल कलि कलुष निकंदन॥**

प्रभू श्रीरामांनी (भयानक) दंडकवन शोभिवंत करून टाकले, परंतु नामाने असंख्य मनुष्यांची मने पवित्र केली. श्रीरघुनाथांनी राक्षसांच्या सेना मारून टाकल्या, परंतु नाम तर कलियुगातील सर्व पापांचे मूळच उपटून टाकणारे आहे. ॥ ४ ॥

दो०—**सबरी गीध सुसेवकनि सुगति दीन्हि रघुनाथ।**
**नाम उधारे अमित खल बेद बिदित गुन गाथ॥ २४॥**

श्रीरघुनाथांनी शबरी, जटायू इत्यादी उत्तम सेवकांनाच मुक्ती दिली, परंतु नामाने असंख्य दुष्टांचा उद्धार केला. नामाच्या गुणांच्या कथा वेदांमध्ये प्रसिद्ध आहेत. ॥ २४ ॥

**राम सुकंठ बिभीषन दोऊ। राखे सरन जान सबु कोऊ॥**
**नाम गरीब अनेक नेवाजे। लोक बेद बर बिरिद बिराजे॥**

श्रीरामांनी सुग्रीव, बिभीषण या दोघांनाच आपला आश्रय दिला, हे सर्वजणांना ठाऊक आहे, परंतु नामाने अनेक गरिबांच्यावर कृपा केली आहे. नामाचे सुंदर माहात्म्य लोकांमध्ये आणि वेदांमध्ये खूप प्रसिद्ध आहे. ॥ १ ॥

**राम भालु कपि कटकु बटोरा। सेतु हेतु श्रमु कीन्ह न थोरा॥**
**नामु लेत भवसिंधु सुखाहीं। करहु बिचारु सुजन मन माहीं॥**

श्रीरामांनी अस्वले आणि वानर यांची सेना एकत्र केली आणि समुद्रावर पूल बांधण्यासाठी काही कमी कष्ट घेतले नाहीत, परंतु नाम घेताच भवसागर आटून जातो. सज्जनांनो, मनात विचार करा. (की, दोघांमध्ये कोण मोठे आहे.) ॥ २ ॥

**राम सकुल रन रावनु मारा। सीय सहित निज पुर पगु धारा॥**
**राजा रामु अवध रजधानी। गावत गुन सुर मुनि बर बानी॥**
**सेवक सुमिरत नामु सप्रीती। बिनु श्रम प्रबल मोह दलु जीती॥**
**फिरत सनेहँ मगन सुख अपनें। नाम प्रसाद सोच नहिं सपनें॥**

श्रीरामांनी युद्धामध्ये रावणाला परिवारासह मारले. नंतर सीतेसह आपल्या नगरात प्रवेश केला.

प्रभू राम हे राजा झाले, अयोध्या ही त्यांची राजधानी झाली. देव आणि मुनी सुंदर वाणीने त्यांचे गुण गातात. परंतु सेवक (भक्त) प्रेमाने नामाचे फक्त स्मरण करताच, विनासायास मोहाच्या प्रबळ सेनेला जिंकून व प्रेमात मग्न होऊन आत्म-सुखात रममाण होतात. नामाच्या प्रसादामुळे त्यांना स्वप्नातही कोणती काळजी सतावीत नाही.॥ ३-४॥

**दो०—ब्रह्म राम तें नामु बड़ बर दायक बर दानि।**
**रामचरित सत कोटि महँ लिय महेस जियँ जानि॥ २५॥**

अशाप्रकारे नाम हे निर्गुण ब्रह्म आणि सगुण श्रीराम यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहे. हे नाम वरदान देणाऱ्यांनाही वर देणारे आहे. श्रीशंकरांनी आपल्या मनात हे जाणून शतकोटी रामचरित्रांमधून या 'राम' नामाला (साररूपाने निवडून) ग्रहण केले आहे.॥ २५॥

## मासपारायण, पहिला विश्राम

**नाम प्रसाद संभु अबिनासी। साजु अमंगल मंगल रासी॥**
**सुक सनकादि सिद्ध मुनि जोगी। नाम प्रसाद ब्रह्मसुख भोगी॥**

नामाच्या कृपेमुळे शंकर अविनाशी आहेत आणि त्यांनी अमंगल वेश धारण केला असला, तरी ते मंगलाची खाण आहेत. शुकदेव व सनकादिक सिद्ध, मुनी आणि योगीजन हे नामाच्या प्रसादाने ब्रह्मानंदाचा अनुभव घेत आहेत.॥ १॥

**नारद जानेउ नाम प्रतापू। जग प्रिय हरि हरि हर प्रिय आपू॥**
**नामु जपत प्रभु कीन्ह प्रसादू। भगत सिरोमनि भे प्रहलादू॥**

नारद मुनी हे नामाचा प्रताप जाणतात. सर्व जगाला हरी प्रिय आहेत. (तर हरीला हर प्रिय आहेत.) आणि (नामजपामुळे) नारद हरि-हर या दोघांनाही प्रिय आहेत. नाम जपल्यामुळे भगवंताने कृपा केली, त्यामुळे प्रह्लाद भक्तशिरोमणी झाला.॥ २॥

**ध्रुवँ सगलानि जपेउ हरि नाऊँ। पायउ अचल अनूपम ठाऊँ॥**
**सुमिरि पवनसुत पावन नामू। अपने बस करि राखे रामू॥**

ध्रुवाने सावत्र आईच्या बोलण्यामुळे दु:खी होऊन सकाम भावनेने हरीचे नाम जपले. त्याच्या भावामुळे त्याला अढळ व अजोड स्थान (ध्रुवलोक) मिळाले. हनुमानाने पवित्र नामाचे स्मरण करून श्रीरामांना आपल्या अधीन करून ठेवले.॥ ३॥

**अपतु अजामिलु गजु गनिकाऊ। भए मुकुत हरि नाम प्रभाऊ॥**
**कहौं कहाँ लगि नाम बड़ाई। रामु न सकहिं नाम गुन गाई॥**

नीच अजामिळ, गजेंद्र, वेश्या हे सुद्धा श्रीहरीच्या नामप्रभावाने मुक्त झाले. मी नामाचे माहात्म्य किती सांगू? श्रीराम स्वत:सुद्धा नामाचे गुण वर्णन करू शकत नाहीत.॥ ४॥

**दो०—नामु राम को कलपतरु कलि कल्यान निवासु।**
**जो सुमिरत भयो भाँग तें तुलसी तुलसीदासु॥ २६॥**

कलियुगामध्ये श्रीरामांचे नाम हे मनोवांछित पदार्थ देणारे आणि कल्याणाचा निवास आहे. त्याचे स्मरण केल्याने भांगेप्रमाणे (निकृष्ट) असलेला तुलसीदास तुळशीप्रमाणे (पवित्र) झाला. ॥ २६ ॥

**चहुँ जुग तीनि काल तिहुँ लोका । भए नाम जपि जीव बिसोका ॥**
**बेद पुरान संत मत एहू । सकल सुकृत फल राम सनेहू ॥**

चारी युगांमध्ये, तिन्ही कालांमध्ये आणि तिन्ही लोकांमध्ये नामाचा जप करून जीव शोकमुक्त झाले आहेत. वेद, पुराणे व संत यांचे मत हेच आहे की, सर्व पुण्याचे फळ श्रीरामांवर प्रेम उत्पन्न होण्यातच आहे. ॥ १ ॥

**ध्यानु प्रथम जुग मख बिधि दूजें । द्वापर परितोषत प्रभु पूजें ॥**
**कलि केवल मल मूल मलीना । पाप पयोनिधि जन मन मीना ॥**

सत्ययुगात ध्यानाने, त्रेतायुगात यज्ञाने आणि द्वापरयुगात पूजनाने भगवान प्रसन्न होत असत. परंतु कलियुग हे फक्त पापाचे मूळ आणि मलिन आहे. यामध्ये मनुष्याचे मन पापरूपी समुद्रातील मासा बनले आहे. ॥ २ ॥

**नाम कामतरु काल कराला । सुमिरत समन सकल जग जाला ॥**
**राम नाम कलि अभिमत दाता । हित परलोक लोक पितु माता ॥**

अशा घोर कलियुगामध्ये नाम हाच कल्पतरू आहे. त्याचे स्मरण करताच ते संसारातील सर्व दगदग नाहीशी करून टाकणारे आहे. कलियुगात हे रामनाम मनोवांछित फळ देणारे आहे. ते परलोकीचे परम कल्याण करणारे असून या लोकीचे माता-पिता आहे. ॥ ३ ॥

**नहिं कलि करम न भगति बिबेकू । राम नाम अवलंबन एकू ॥**
**कालनेमि कलि कपट निधानू । नाम सुमति समरथ हनुमानू ॥**

कलियुगामध्ये कर्म, भक्ती किंवा ज्ञानही नाही. रामनामाचाच एकमात्र आधार आहे. कपटाची खाण असलेल्या कलियुगरूपी कालनेमीला (ठार मारण्यासाठी) रामनाम हेच बुद्धिमान आणि समर्थ असा हनुमान आहे. ॥ ४ ॥

**दो०—राम नाम नरकेसरी कनककसिपु कलिकाल ।**
**जापक जन प्रहलाद जिमि पालिहि दलि सुरसाल ॥ २७ ॥**

रामनाम हे भगवान नृसिंह आहे, कलियुग हे हिरण्यकशिपू आहे आणि नामाचा जप करणारे लोक प्रह्लादाप्रमाणे आहेत. हे रामनाम देवांचा शत्रू असलेल्या (कलियुगरूपी) दैत्याला मारून जप करणाऱ्यांचे रक्षण करील. ॥ २७ ॥

**भायँ कुभायँ अनख आलसहूँ। नाम जपत मंगल दिसि दसहूँ॥**
**सुमिरि सो नाम राम गुन गाथा। करउँ नाइ रघुनाथहि माथा॥**

प्रेमाने, वैराने, क्रोधाने किंवा आळसाने, कशाही प्रकारे नाम जपल्यामुळे दाही दिशांना कल्याणच होते. त्याच रामनामाचे स्मरण करून आणि श्रीरघुनाथांसमोर मस्तक नम्र करून मी त्यांच्या गुणांचे वर्णन करतो.॥ १॥

**मोरि सुधारिहि सो सब भाँती। जासु कृपा नहिं कृपाँ अघाती॥**
**राम सुस्वामि कुसेवकु मोसो। निज दिसि देखि दयानिधि पोसो॥**

ते माझे चुकलेले सर्व प्रकारे सुधारून घेतील. त्यांची कृपा ही कृपा करून करून कधी तृप्त होत नाही. श्रीराम हे उत्तम स्वामी आहेत आणि माझ्यासारखा वाईट सेवक कोणी नाही. तरीही दयानिधी श्रीरामांनी आपल्या ब्रीदाचा विचार करून माझे पालन केले.॥ २॥

**लोकहुँ बेद सुसाहिब रीती। बिनय सुनत पहिचानत प्रीती॥**
**गनी गरीब ग्राम नर नागर। पंडित मूढ़ मलीन उजागर॥**

या जगामध्ये व वेदामध्ये चांगल्या स्वामीची हीच रीत प्रसिद्ध आहे की, विनंती ऐकताच तो प्रेम ओळखतो. गरीब-श्रीमंत, खेडूत-नागरिक, पंडित-मूर्ख, कुप्रसिद्ध-सुप्रसिद्ध,॥ ३॥

**सुकबि कुकबि निज मति अनुहारी। नृपहि सराहत सब नर नारी॥**
**साधु सुजान सुसील नृपाला। ईस अंस भव परम कृपाला॥**

सुकवी-कुकवी व सर्व स्त्री-पुरुष हे आपापल्या बुद्धीप्रमाणे राजाची स्तुती करतात आणि साधु, बुद्धिमान, सुशील, ईश्वरी अंशाने उत्पन्न राजा हा,॥ ४॥

**सुनि सनमानहिं सबहि सुबानी। भनिति भगति नति गति पहिचानी॥**
**यह प्राकृत महिपाल सुभाऊ। जान सिरोमनि कोसलराऊ॥**

त्या सर्वांचे ऐकून घेऊन आणि त्यांची वाणी, भक्ती, विनय आणि वर्तणूक ओळखून गोड वाणीने त्या सर्वांचा यथायोग्य सन्मान करतो. हा स्वभाव लौकिक राजांचा असतो. कोसलनाथ श्रीराम तर महान ज्ञानी आहेत.॥ ५॥

**रीझत राम सनेह निसोतें। को जग मंद मलिनमति मोतें॥**

श्रीराम हे खरे तर शुद्ध प्रेमाने प्रसन्न होतात, परंतु या जगात माझ्यापेक्षा मूर्ख आणि मलिन बुद्धीचा दुसरा कोण असणार?॥ ६॥

दो०—**सठ सेवक की प्रीति रुचि रखिहहिं राम कृपालु।**
**उपल किए जलजान जेहिं सचिव सुमति कपि भालु॥ २८ ( क )॥**

परंतु कृपाळू श्रीराम माझ्यासारख्या दुष्ट सेवकाचेही प्रेम आणि आवड नक्कीच स्वीकारतील. त्यांनी पाषाणांना तरणारे जहाज (सेतू) आणि वानर-अस्वलांना बुद्धिमान मंत्री बनविले.॥ २८ (क)॥

**हौंहु कहावत सबु कहत राम सहत उपहास।**
**साहिब सीतानाथ सो सेवक तुलसीदास॥ २८ ( ख )॥**

सर्व लोक मला श्रीरामांचा सेवक म्हणतात आणि मीसुद्धा (लाज न बाळगता) तसे म्हणवून घेतो. कृपाळू श्रीरामही ही निंदा सहन करून घेतात की, सीतानाथांसारख्या स्वामींचा तुलसीदासासारखा (यःकश्चित) सेवक आहे. ॥ २८ (ख) ॥

**अति बड़ि मोरि ढिठाई खोरी । सुनि अघ नरकहुँ नाक सकोरी ॥**
**समुझि सहम मोहि अपडर अपनें । सो सुधि राम कीन्हि नहिं सपनें ॥**

हे माझे मोठे धाडस आणि दोष आहे. माझे पाप ऐकून नरकानेही नाक मुरडले. या विचाराने कल्पित भयामुळे मला भीती वाटत आहे, परंतु भगवान श्रीरामांनी स्वप्नातही माझ्या या दोषांकडे लक्ष दिले नाही. ॥ १ ॥

**सुनि अवलोकि सुचित चख चाही । भगति मोरि मति स्वामि सराही ॥**
**कहत नसाइ होइ हियँ नीकी । रीझत राम जानि जन जी की ॥**

उलट, माझे प्रभू श्रीरामचंद्रांनी ही गोष्ट ऐकून, पाहून आणि आपल्या सुचित्तरूपी चक्षूंनी निरीक्षण करून माझ्या भक्तीचे व बुद्धीचे कौतुक केले. कारण बोलण्यात जरी चूक असली (अर्थात मी स्वतःला भगवंताचा सेवक म्हणत-म्हणवीत असलो) तरी हृदयात चांगुलपणा असला पाहिजे. (मनात मी स्वतःला त्यांचा सेवक बनण्यास योग्य न मानता पापी आणि दीन आहे, असेच मानतो, हा चांगुलपणा.) श्रीरामसुद्धा या आपल्या दासाच्या मनाची स्थिती चांगल्या प्रकारे जाणून प्रसन्न होतात. ॥ २ ॥

**रहति न प्रभु चित चूक किए की । करत सुरति सय बार हिए की ॥**
**जेहिं अघ बधेउ ब्याध जिमि बाली । फिरि सुकंठ सोइ कीन्हि कुचाली ॥**

प्रभू रामांच्या मनात आपल्या भक्तांची चूक-भूल राहात नाही (ते ती विसरून जातात) आणि त्यांच्या मनाची चांगली भावना शंभर वेळा आठवीत असतात. ज्या पापासाठी त्यांनी व्याधाप्रमाणे वालीला ठार मारले, त्याचप्रमाणे नंतर सुग्रीवसुद्धा वाईट वागला. ॥ ३ ॥

**सोइ करतूति बिभीषन केरी । सपनेहुँ सो न राम हियँ हेरी ॥**
**ते भरतहि भेंटत सनमाने । राजसभाँ रघुबीर बखाने ॥**

तशीच कृती बिभीषणाचीही होती, परंतु श्रीरामांनी ती स्वप्नातसुद्धा मनात धरली नाही. उलट भरताची भेट झाली, तेव्हा श्रीरघुनाथांनी बिभीषणाचा सन्मान केला आणि राजसभेमध्ये त्याच्या गुणांची वाखाणणी केली. ॥ ४ ॥

दो०—**प्रभु तरु तर कपि डार पर ते किए आपु समान।**
**तुलसी कहूँ न राम से साहिब सीलनिधान॥ २९ ( क )॥**

प्रभू श्रीराम हे वृक्षाखाली आणि वानर झाडांच्या फांदीवरचे. (अर्थात कुठे मर्यादापुरुषोत्तम श्रीराम आणि कुठे फांद्यांवर उड्या मारणारे वानर.) परंतु त्यांनी अशा वानरांना आपल्यासारखे बनविले. तुलसीदास म्हणतात की, श्रीरामांच्यासारखे शीलनिधान स्वामी कुठेही मिळणार नाहीत.॥

**राम निकाईं रावरी है सबही को नीक।**
**जौं यह साँची है सदा तौ नीको तुलसीक॥ २९ ( ख )॥**

हे प्रभू श्रीराम, तुमच्या चांगुलपणामुळेच सर्वांचे कल्याण आहे. (अर्थात तुमचा कल्याणमय स्वभाव सर्वांचे भले करणारा आहे.) ही गोष्ट खरी असेल, तर तुलसीदासाचे सुद्धा कल्याण होईल.॥

**एहि बिधि निज गुन दोष कहि सबहि बहुरि सिरु नाइ।**
**बरनउँ रघुबर बिसद जसु सुनि कलि कलुष नसाइ॥ २९ ( ग )॥**

अशाप्रकारे आपले गुण–दोष सांगून आणि सर्वांना नमस्कार करून मी श्रीरघुनाथांच्या निर्मळ कीर्तीचे वर्णन करतो. ते ऐकल्याने कलियुगातील पापे नाहीशी होतात.॥ २९ (ग)॥

**जागबलिक जो कथा सुहाई। भरद्वाज मुनिबरहि सुनाई॥**
**कहिहउँ सोइ संबाद बखानी। सुनहुँ सकल सज्जन सुखु मानी॥**

याज्ञवल्क्य मुनींनी जी मधुर कथा मुनिश्रेष्ठ भरद्वाजांना ऐकविली होती, तोच संवाद मी वर्णन करून सांगत आहे. तो सर्व सज्जनांनी सुखाने ऐकावा.॥ १॥

**संभु कीन्ह यह चरित सुहावा। बहुरि कृपा करि उमहि सुनावा॥**
**सोइ सिव कागभुसुंडिहि दीन्हा। राम भगत अधिकारी चीन्हा॥**

प्रथम भगवान शिवांनी हे सुंदर चरित्र रचले आणि नंतर कृपा करून ते पार्वतीला ऐकविले. शंकरांनी काकभुशुंडी हे रामभक्त असल्याचे पाहून व त्यांचा अधिकार ओळखून तेच चरित्र त्यांना दिले.॥ २॥

**तेहि सन जागबलिक पुनि पावा। तिन्ह पुनि भरद्वाज प्रति गावा॥**
**ते श्रोता बकता समसीला। सवँदरसी जानहिं हरिलीला॥**

काकभुशुंडींकडून नंतर ते याज्ञवल्क्यांना मिळाले. त्यानंतर त्यांनी ते भरद्वाज मुनींना ऐकविले. ते दोघे वक्ता आणि श्रोता (याज्ञवल्क्य आणि भरद्वाज) समानशील, समदर्शी आणि हरीची लीला जाणणारे आहेत.॥ ३॥

**जानहिं तीनि काल निज ग्याना। करतल गत आमलक समाना॥**
**औरउ जे हरिभगत सुजाना। कहहिं सुनहिं समुझहिं बिधि नाना॥**

ते दोघे आपल्या ज्ञानाने तिन्ही काळांतील घटना तळहातावर ठेवलेल्या आवळ्याप्रमाणे (प्रत्यक्ष) जाणतात आणि जे भगवंतांच्या लीलांचे रहस्य जाणणारे हरिभक्त आहेत, ते हे चरित्र नानाप्रकारे सांगतात, ऐकतात व समजून घेतात.॥ ४॥

**दो०—मैं पुनि निज गुर सन सुनी कथा सो सूकरखेत।**
**समुझी नहिं तसि बालपन तब अति रहेउँ अचेत॥ ३० ( क )॥**

नंतर मी तीच कथा वाराह-क्षेत्रामध्ये आपल्या गुरुजींच्याकडून ऐकली. परंतु त्यावेळी बालपणामुळे मला विशेष समज नव्हती, त्यामुळे ते चरित्र मला चांगल्या प्रकारे समजले नाही. ॥ ३० (क) ॥

**श्रोता बकता ग्याननिधि कथा राम कै गूढ़।**
**किमि समुझौं मैं जीव जड़ कलि मल ग्रसित बिमूढ़॥ ३० ( ख )॥**

श्रीरामांच्या गूढ कथेचा वक्ता व श्रोता हे दोघे ज्ञानाचे भांडार असतात. कलियुगातील पापांनी ग्रासलेला मी महामूर्ख जड जीव ती कशी समजू शकणार बरे ?॥ ३० (ख) ॥

**तदपि कही गुर बारहिं बारा। समुझि परी कछु मति अनुसारा॥**
**भाषाबद्ध करबि मैं सोई। मोरें मन प्रबोध जेहिं होई॥**

तरीही गुरुजींनी जेव्हा वारंवार ती कथा सांगितली, तेव्हा माझ्या बुद्धीप्रमाणे मला काहीशी समजली. आता तीच मी माझ्या मनाला समाधान मिळण्यासाठी लौकिक भाषेत लिहीत आहे. ॥ १ ॥

**जस कछु बुधि बिबेक बल मेरें। तस कहिहउँ हियँ हरि के प्रेरें॥**
**निज संदेह मोह भ्रम हरनी। करउँ कथा भव सरिता तरनी॥**

माझ्यामध्ये जे काही थोडे बुद्धी व विवेकाचे बळ आहे, त्यानुसार मी हरीच्या प्रेरणेने ही कथा सांगेन. मी स्वतःच्या संशय, अज्ञान व भ्रम यांचे हरण करणाऱ्या कथेची रचना करीत आहे. कारण ती संसाररूपी नदी तरून जाण्यासाठी नाव आहे. ॥ २ ॥

**बुध बिश्राम सकल जन रंजनि। रामकथा कलि कलुष बिभंजनि॥**
**रामकथा कलि पंनग भरनी। पुनि बिबेक पावक कहुँ अरनी॥**

रामकथा ही पंडितांना विसावा देणारी, सर्व मनुष्यांना प्रसन्न करणारी आणि कलियुगातील पापांचा नाश करणारी आहे. रामकथा कलियुगरूपी सर्पांसाठी मोर आहे आणि विवेकरूपी अग्नी प्रकट करण्यासाठी अरणी (अग्निमंथन करण्याचे काष्ठ) आहे. ॥ ३ ॥

**रामकथा कलि कामद गाई। सुजन सजीवनि मूरि सुहाई॥**
**सोइ बसुधातल सुधा तरंगिनि। भय भंजनि भ्रम भेक भुअंगिनि॥**

रामकथा ही कलियुगामध्ये सर्व मनोरथ पूर्ण करणारी कामधेनू आहे आणि सज्जन लोकांसाठी संजीवनी आहे. पृथ्वीवर हीच अमृताची नदी आहे. जन्म-मरणरूपी भयाचा नाश करणारी आहे आणि भ्रमरूपी बेडकांना खाऊन टाकणारी सर्पीण आहे. ॥ ४ ॥

**असुर सेन सम नरक निकंदिनि । साधु बिबुध कुल हित गिरिनंदिनि ॥**
**संत समाज पयोधि रमा सी । बिस्व भार भर अचल छमा सी ॥**

रामकथा ही असुरांच्या सेनेप्रमाणे असणाऱ्या (भयंकर) नरकांचा नाश करणारी आणि साधुरूप देवांच्या कुलाचे हित करणारी पार्वती आहे. संत-समाजरूपी क्षीरसमुद्रासाठी लक्ष्मीसारखी आहे आणि संपूर्ण विश्वाचा भार उचलून धरण्यासाठी अचल पृथ्वीसारखी आहे. ॥ ५ ॥

**जम गन मुहँ मसि जग जमुना सी । जीवन मुकुति हेतु जनु कासी ॥**
**रामहि प्रिय पावनि तुलसी सी । तुलसिदास हित हियँ हुलसी सी ॥**

रामकथा ही यमदूतांच्या तोंडाला काळोखी फासणाऱ्या या जगातील यमुनेप्रमाणे आहे आणि जीवांना मुक्ती देण्यासाठी जणू काशीच आहे. ही कथा श्रीरामांना पवित्र तुळशीप्रमाणे आवडते आणि तुलसीदासाचे (तुलसीदासांची आई) हुलसी प्रमाणे मनापासून हित करणारी आहे. ॥ ६ ॥

**सिवप्रिय मेकल सैल सुता सी । सकल सिद्धि सुख संपति रासी ॥**
**सदगुन सुरगन अंब अदिति सी । रघुबर भगति प्रेम परमिति सी ॥**

ही रामकथा शंकरांना नर्मदेप्रमाणे आवडणारी आहे. ही सर्व सिद्धींची आणि सुख-संपत्तीची खाण आहे. ही सद्‌गुणरूपी देवांना उत्पन्न करून त्यांचे पालन-पोषण करणाऱ्या माता अदितीसारखी आहे. ही जणू श्रीरघुनाथांच्या भक्ती व प्रेमाच्या परम सीमेसारखी आहे. ॥ ७ ॥

दो०—**रामकथा मंदाकिनी चित्रकूट चित चारु ।**
**तुलसी सुभग सनेह बन सिय रघुबीर बिहारु ॥ ३१ ॥**

तुलसीदास म्हणतात की, रामकथा ही मंदाकिनी नदी होय, निर्मळ चित्त चित्रकूट होय आणि सुंदर स्नेह हेच वन होय. त्यामध्ये श्रीसीताराम विहार करतात. ॥ ३१ ॥

**रामचरित चिंतामनि चारू । संत सुमति तिय सुभग सिंगारू ॥**
**जग मंगल गुनग्राम राम के । दानि मुकुति धन धरम धाम के ॥**

श्रीरामांचे चरित्र हा सुंदर चिंतामणी आहे आणि संतांच्या सुबुद्धिरूपी स्त्रीचा सुंदर शृंगार आहे. श्रीरामांचे गुण-समूह हे जगाचे कल्याण करणारे आणि मुक्ती, धन, धर्म आणि परमधामाची प्राप्ती करून देणारे आहेत. ॥ १ ॥

**सदगुर ग्यान बिराग जोग के । बिबुध बैद भव भीम रोग के ॥**
**जननि जनक सिय राम प्रेम के । बीज सकल ब्रत धरम नेम के ॥**

(ते गुणसमूह) ज्ञान, वैराग्य आणि योग यांसाठी सद्‌गुरू आहेत आणि संसाररूपी भयंकर रोगाचा नाश करण्यासाठी देवांचे वैद्य (अश्विनीकुमार) यांच्याप्रमाणे आहेत. ते श्रीसीतारामांविषयी प्रेम उत्पन्न करणारे माता-पिता आहेत आणि व्रते, धर्म आणि नियम यांचे बीज आहेत. ॥ २ ॥

**समन पाप संताप सोक के । प्रिय पालक परलोक लोक के॥**
**सचिव सुभट भूपति बिचार के । कुंभज लोभ उदधि अपार के॥**

पाप, दु:ख व शोक यांचा नाश करणारे, तसेच इह-परलोकाचे प्रेमाने पालन करणारे आहेत. विचार (ज्ञान) रूपी राजाचे शूरवीर मंत्री व लोभरूपी अपार समुद्र शोषून टाकणारे अगस्त्य मुनी आहेत.॥ ३॥

**काम कोह कलिमल करिगन के । केहरि सावक जन मन बन के॥**
**अतिथि पूज्य प्रियतम पुरारि के । कामद घन दारिद दवारि के॥**

भक्तांच्या मनरूपी वनामध्ये राहणाऱ्या काम, क्रोध आणि कलियुगातील पापरूपी हत्तींना ठार मारणारे सिंहाचे छावे आहेत आणि भगवान शिवांचे पूज्य व आवडते अतिथी आहेत. तसेच दारिद्र्यरूपी दावानल विझवून टाकण्याची कामना पूर्ण करणारे मेघ आहेत.॥ ४॥

**मंत्र महामनि बिषय ब्याल के । मेटत कठिन कुअंक भाल के॥**
**हरन मोह तम दिनकर कर से । सेवक सालि पाल जलधर से॥**

ते विषयरूपी सापाचे विष उतरविण्यासाठी मंत्र व महामणी आहेत. (माणसाच्या) ललाटावर लिहिलेले व नष्ट होण्यास कठीण असलेले वाईट लेख (वाईट प्रारब्ध) नष्ट करणारे आहेत. अज्ञानरूपी अंधकाराचे हरण करण्याच्या बाबतीत सूर्यकिरणांसमान आणि सेवकरूपी भात-पिकाचे पालन करण्यासाठी मेघाप्रमाणे आहेत.॥ ५॥

**अभिमत दानि देवतरु बर से । सेवत सुलभ सुखद हरि हर से॥**
**सुकबि सरद नभ मन उडगन से । रामभगत जन जीवन धन से॥**

मनोवांछित वस्तू देणाऱ्या श्रेष्ठ कल्पवृक्षाप्रमाणे आहेत आणि सेवा करण्यास हरि-हराप्रमाणे सुलभ व सुख देणारे आहेत. सुकविरूपी शरदऋतूचे मनरूपी आकाश सुशोभित करणाऱ्या तारागणांप्रमाणे आणि श्रीरामांच्या भक्तांचे तर जीवनधनच आहेत.॥ ६॥

**सकल सुकृत फल भूरि भोग से । जग हित निरुपधि साधु लोग से॥**
**सेवक मन मानस मराल से । पावन गंग तरंग माल से॥**

हे संपूर्ण पुण्याच्या फलाच्या महान भोगांसमान आहेत. जगाचे वास्तविक हित करण्यासाठी साधु-संतांसमान आहेत. सेवकांच्या मनरूपी सरोवरासाठी हंसासमान आणि पवित्र करण्यासाठी गंगेच्या तरंगांसमान आहेत.॥ ७॥

दो०—**कुपथ कुतरक कुचालि कलि कपट दंभ पाषंड।**
**दहन राम गुन ग्राम जिमि इंधन अनल प्रचंड॥ ३२ (क)॥**

श्रीरामांचे गुण-समूह हे कुमार्ग, कुतर्क, दुराचरण आणि कलियुगातील कपट, दंभ आणि पाखंड जाळून टाकण्यासाठी इंधनास नष्ट करून टाकणाऱ्या प्रचंड अग्नीप्रमाणे आहेत.॥ ३२ (क)॥

**रामचरित राकेस कर सरिस सुखद सब काहु।**
**सज्जन कुमुद चकोर चित हित बिसेषि बड़ लाहु॥ ३२ (ख)॥**

रामचरित्र हे पौर्णिमेच्या चंद्राच्या किरणांप्रमाणे सर्वांना सुख देणारे आहे, परंतु सज्जनरूपी कुमुदिनी आणि चकोराच्या चित्तासाठी ते विशेष हितकारक आणि फार लाभदायक आहे. ॥ ३२ (ख) ॥

**कीन्हि प्रस्न जेहि भाँति भवानी । जेहि बिधि संकर कहा बखानी ॥**
**सो सब हेतु कहब मैं गाई । कथा प्रबंध बिचित्र बनाई ॥**

पार्वतीने शंकरांना जे प्रश्न विचारले आणि त्यांनी त्यांची विस्ताराने जी उत्तरे दिली, ती सर्व मी विशेष प्रकारे कथेची रचना करून सांगेन. ॥ १ ॥

**जेहिं यह कथा सुनी नहिं होई । जनि आचरजु करै सुनि सोई ॥**
**कथा अलौकिक सुनहिं जे ग्यानी । नहिं आचरजु करहिं अस जानी ॥**
**रामकथा कै मिति जग नाहीं । असि प्रतीति तिन्ह के मन माहीं ॥**
**नाना भाँति राम अवतारा । रामायन सत कोटि अपारा ॥**

ज्याने पूर्वी ही कथा ऐकली नसेल, त्याने ही ऐकून आश्चर्य करू नये. जे ज्ञानी लोक ही विलक्षण कथा ऐकतात, ते जाणत असूनही आश्चर्य करीत नाहीत. कारण जगामध्ये रामकथेला काही मर्यादा नाही, असा विश्वास त्यांच्या मनात असतो. श्रीरामांचे नाना प्रकारचे अवतार झाले आहेत आणि शंभर कोटी व अपार रामायणे आहेत. ॥ २-३ ॥

**कलपभेद हरिचरित सुहाए । भाँति अनेक मुनीसन्ह गाए ॥**
**करिअ न संसय अस उर आनी । सुनिअ कथा सादर रति मानी ॥**

मुनीश्वरांनी श्रीहरीची सुंदर चरित्रे कल्प-भेदानुसार अनेक प्रकारे गाइली आहेत, असा विचार करून मनात संशय आणू नका आणि आदरपूर्वक प्रेमाने ही कथा ऐका. ॥ ४ ॥

दो०—**राम अनंत अनंत गुन अमित कथा बिस्तार ।**
**सुनि आचरजु न मानिहहिं जिन्ह कें बिमल बिचार ॥ ३३ ॥**

श्रीराम अनंत आहेत, त्यांचे गुणसुद्धा अनंत आहेत. त्यांच्या कथांचा विस्तारही अनंत आहे. म्हणून ज्यांचे विचार शुद्ध आहेत, त्यांना ही कथा ऐकून आश्चर्य वाटणार नाही. ॥ ३३ ॥

**एहि बिधि सब संसय करि दूरी । सिर धरि गुर पद पंकज धूरी ॥**
**पुनि सबही बिनवउँ कर जोरी । करत कथा जेहिं लाग न खोरी ॥**

अशा प्रकारे सर्व संदेह दूर करून आणि श्रीगुरूंच्या चरण-कमलांची धूळ मस्तकी धारण करून मी पुन्हा हात जोडून सर्वांना विनंती करतो. त्यामुळे कथेच्या रचनेमध्ये कोणत्याही दोषाचा स्पर्श होणार नाही. ॥ १ ॥

**सादर सिवहि नाइ अब माथा । बरनउँ बिसद राम गुन गाथा ॥**
**संबत सोरह सै एकतीसा । करउँ कथा हरि पद धरि सीसा ॥**

आता मी आदराने श्री शिवांना मस्तक नमवून श्रीरामांच्या गुणांची पवित्र कथा सांगतो. श्रीहरींच्या चरणांवर मस्तक ठेवून विक्रम संवत १६३१ मध्ये ही कथा प्रारंभ करीत आहे. ॥ २ ॥

**नौमी भौम बार मधुमासा । अवधपुरी यह चरित प्रकासा ॥**
**जेहि दिन राम जनम श्रुति गावहिं । तीरथ सकल तहाँ चलि आवहिं ॥**

चैत्र मासातील नवमी तिथी, मंगळवार या दिवशी अयोध्येमध्ये हे चरित्र प्रकाशित झाले. ज्या दिवशी श्रीरामांचा जन्म असतो, त्या दिवशी सर्व तीर्थे तेथे येतात, असे वेद सांगतात. ॥ ३ ॥

**असुर नाग खग नर मुनि देवा । आइ करहिं रघुनायक सेवा ॥**
**जन्म महोत्सव रचहिं सुजाना । करहिं राम कल कीरति गाना ॥**

असुर, नाग, पक्षी, मनुष्य, मुनी व देव हे सर्वजण अयोध्येमध्ये येऊन श्रीरघुनाथांची सेवा करतात. बुद्धिमान माणसे जन्मोत्सव साजरा करतात आणि श्रीरामांच्या सुंदर कीर्तीचे गायन करतात. ॥ ४ ॥

दो०—**मज्जहिं सज्जन बृंद बहु पावन सरजू नीर।**
**जपहिं राम धरि ध्यान उर सुंदर स्याम सरीर॥ ३४ ॥**

त्या दिवशी सज्जन लोकांचे अनेक समूह शरयू नदीच्या पवित्र जळामध्ये स्नान करतात आणि हृदयामध्ये सुंदर श्यामल शरीर असलेल्या श्रीरघुनाथांचे ध्यान करीत त्यांच्या नामाचा जप करतात. ॥ ३४ ॥

**दरस परस मज्जन अरु पाना । हरइ पाप कह बेद पुराना ॥**
**नदी पुनीत अमित महिमा अति । कहि न सकइ सारदा बिमल मति ॥**

शरयू नदीचे दर्शन, स्पर्श, स्नान, आणि जल-प्राशन या गोष्टी पापांचे हरण करतात, असे वेद-पुराणे सांगतात. ही नदी मोठी पवित्र आहे. हिचा महिमा अनंत आहे. तिचे माहात्म्य अत्यंत बुद्धिमती सरस्वतीसुद्धा वर्णन करू शकत नाही. ॥ १ ॥

**राम धामदा पुरी सुहावनि । लोक समस्त बिदित अति पावनि ॥**
**चारि खानि जग जीव अपारा । अवध तजें तनु नहिं संसारा ॥**

ही शोभायमान अयोध्यापुरी श्रीरामचंद्रांचे परमधाम प्राप्त करून देणारी आहे. ही सर्व लोकांमध्ये प्रसिद्ध आहे आणि अत्यंत पवित्र आहे. जगामध्ये (अंडज, स्वेदज, उद्भिज्ज आणि जरायुज) या चार योनींतील अनंत जीव आहेत. यांपैकी जे जीव अयोध्येमध्ये शरीर-त्याग करतात, ते पुन्हा संसारात येत नाहीत. (जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून सुटून भगवंतांच्या परमधामामध्ये निवास करतात.) ॥ २ ॥

**सब बिधि पुरी मनोहर जानी । सकल सिद्धिप्रद मंगल खानी ॥**
**बिमल कथा कर कीन्ह अरंभा । सुनत नसाहिं काम मद दंभा ॥**

ही अयोध्यापुरी सर्व प्रकारे मनोहर, सर्व सिद्धी देणारी आणि कल्याणाची खाण आहे, असे समजून मी या निर्मल कथेचा आरंभ येथे केला. ही ऐकल्यावर काम, मद आणि दंभ नष्ट होतात. ॥ ३ ॥

**रामचरितमानस एहि नामा। सुनत श्रवन पाइअ बिश्रामा॥**
**मन करि बिषय अनल बन जरई। होइ सुखी जौं एहिं सर परई॥**

याचे नाव रामचरितमानस, असे आहे. हे कानांनी ऐकताच मनःशांती मिळते. विषयरूपी दावानलामध्ये जळत असलेला मनरूपी हत्ती जर या रामचरितमानसरूपी सरोवरात पडला, तर सुखी होईल. ॥ ४ ॥

**रामचरितमानस मुनि भावन। बिरचेउ संभु सुहावन पावन॥**
**त्रिबिध दोष दुख दारिद दावन। कलि कुचालि कुलि कलुष नसावन॥**

हे रामचरितमानस मुनिजनांना प्रिय आहे. या सुंदर व पवित्र अशा मानसाची रचना श्रीशिवांनी केली. तिन्ही प्रकारचे दोष, दुःख आणि दारिद्र्य, कलियुगातील दुष्ट वर्तन व सर्व पापांचा नाश करणारे हे आहे. ॥ ५ ॥

**रचि महेस निज मानस राखा। पाइ सुसमउ सिवा सन भाषा॥**
**तातें रामचरितमानस बर। धरेउ नाम हियँ हेरि हरषि हर॥**

श्रीमहादेवांनी हे रचून आपल्या मनात ठेवले होते आणि योग्य वेळ येताच पार्वतीला सांगितले. यामुळे शंकरांनी हे आपल्या मनात वसलेले पाहून आणि प्रसन्न होऊन याला 'रामचरितमानस' असे सुंदर नाव ठेवले. ॥ ६ ॥

**कहउँ कथा सोइ सुखद सुहाई। सादर सुनहु सुजन मन लाई॥**

मी तीच सुखदायक व सुंदर रामकथा सांगत आहे. हे सज्जनांनो, आदराने मनःपूर्वक हिचे श्रवण करा. ॥ ७ ॥

दो०—**जस मानस जेहि बिधि भयउ जग प्रचार जेहि हेतु।**
**अब सोइ कहउँ प्रसंग सब सुमिरि उमा बृषकेतु॥ ३५॥**

हे रामचरितमानस जसे आहे तसे, ज्याप्रकारे हे बनले आणि ज्या हेतूने जगामध्ये याचा प्रचार झाला, ती सर्व कथा आता मी उमा-महेश्वर यांचे स्मरण करून सांगतो. ॥ ३५ ॥

**संभु प्रसाद सुमति हियँ हुलसी। रामचरितमानस कबि तुलसी॥**
**करइ मनोहर मति अनुहारी। सुजन सुचित सुनि लेहु सुधारी॥**

श्रीशिवांच्या कृपेने तुलसीदासाच्या हृदयात सुंदर बुद्धीचा विकास झाला, त्यामुळे हा तुलसीदास या रामचरितमानसाचा कवी झाला. आपल्या बुद्धीनुसार तो हे मनोहरच बनवीत आहे. तरीही हे सज्जनांनो, शुद्ध चित्ताने ऐकून हे सुधारून घ्या. ॥ १ ॥

**सुमति भूमि थल हृदय अगाधू। बेद पुरान उदधि घन साधू॥**
**बरषहिं राम सुजस बर बारी। मधुर मनोहर मंगलकारी॥**

सुंदर (सात्त्विक) बुद्धी ही भूमी आहे. हृदय हे तिच्यामधील गंभीर (महत्त्वाचे) स्थान आहे. वेद-पुराणे हे समुद्र आहेत आणि साधू-संत मेघ आहेत. ते श्रीरामांच्या सुयशरूपी सुंदर, मधुर, मंगलकारी अशा जलाचा वर्षाव करतात. ॥ २ ॥

**लीला सगुन जो कहहिं बखानी। सोइ स्वच्छता करइ मल हानी॥**
**प्रेम भगति जो बरनि न जाई। सोइ मधुरता सुसीतलताई॥**

सगुण लीलेचे जे विस्ताराने वर्णन केले जाते, तीच राम-सुकीर्तिरूपी जलाची निर्मलता होय. ती मलाचा नाश करते. ज्या प्रेमभक्तीचे वर्णनही करता येत नाही, ती (भक्ती) म्हणजे या जलाची मधुरता आणि सुंदर शीतलता होय. ॥ ३ ॥

**सो जल सुकृत सालि हित होई। राम भगत जन जीवन सोई॥**
**मेधा महि गत सो जल पावन। सकिलि श्रवन मग चलेउ सुहावन॥**
**भरेउ सुमानस सुथल थिराना। सुखद सीत रुचि चारु चिराना॥**

ते (राम-कीर्तिरूपी) जल सत्कर्मरूपी भातपिकासाठी हितकारक आहे आणि श्रीरामांच्या भक्तांचे तर जीवनच आहे. ते पवित्र जल बुद्धिरूपी पृथ्वीवर पडले आणि एकत्र होऊन सुंदर कानरूपी मार्गाने प्रवाहित झाले व मानस (हृदय) रूपी श्रेष्ठ स्थानामध्ये भरले जाऊन तेथे स्थिर झाले. स्थिर झाल्यावर काही कालाने सुंदर, रुचिकर, शीतल आणि सुखदायक झाले. ॥ ४-५ ॥

दो०—**सुठि सुंदर संबाद बर बिरचे बुद्धि बिचारि।**
**तेइ एहि पावन सुभग सर घाट मनोहर चारि॥ ३६॥**

या कथेमध्ये विचारपूर्वक जे चार अत्यंत सुंदर (भुशुंडी-गरुड, शिव-पार्वती, याज्ञवल्क्य-भरद्वाज आणि तुलसीदास संत यांचे ) संवाद रचलेले आहेत, तेच या पवित्र व सुंदर सरोवराचे चार मनोहर घाट आहेत. ॥ ३६ ॥

**सप्त प्रबंध सुभग सोपाना। ग्यान नयन निरखत मन माना॥**
**रघुपति महिमा अगुन अबाधा। बरनब सोइ बर बारि अगाधा॥**

यातील सात कांडे हीच या मानस-सरोवराच्या सात सुंदर पायऱ्या आहेत. ज्ञानरूपी नेत्रांनी त्या पाहताच मन प्रसन्न होऊन जाते. श्रीरघुनाथांच्या (प्राकृतिक गुणांच्या पलीकडील आणि एकरस) अशा महिम्याचे जे वर्णन केले जाईल, तेच या सुंदर जलाची अथांग खोली होय. ॥ १ ॥

**राम सीय जस सलिल सुधासम। उपमा बीचि बिलास मनोरम॥**
**पुरइनि सघन चारु चौपाई। जुगुति मंजु मनि सीप सुहाई॥**

श्रीराम आणि सीता यांची कीर्ती ही (या सरोवरातील) अमृतासारखे जल आहे. यामध्ये ज्या उपमा दिलेल्या आहेत, त्याच यातील तरंगांचा मनोहारी विलास होय. यातील सुंदर चौपाया याच यामध्ये दाट पसरलेल्या कमलिनी आहेत आणि काव्यातील युक्त्या या सुंदर मोती उत्पन्न करणारे शोभिवंत शिंपले आहेत. ॥ २ ॥

**छंद सोरठा सुंदर दोहा। सोइ बहुरंग कमल कुल सोहा॥**
**अरथ अनूप सुभाव सुभासा। सोइ पराग मकरंद सुबासा॥**

यामध्ये सुंदर छंद, सोरठे व दोहे आहेत, तेच यामधील रंगीबेरंगी कमळांचे सुशोभित ताटवे आहेत. अनुपम अर्थ, उच्च भाव आणि सुंदर भाषा हेच पराग, मकरंद आणि सुगंध होत.॥ ३॥

**सुकृत पुंज मंजुल अलि माला। ग्यान बिराग बिचार मराला॥**
**धुनि अवरेब कबित गुन जाती। मीन मनोहर ते बहुभाँती॥**

पुण्याचे समूह हे भ्रमरांचे सुंदर थवे होत. ज्ञान, वैराग्य आणि विचार हे हंस होत. कवितेतील ध्वनी, वक्रोक्ती, गुण आणि जाती हेच अनेक प्रकारचे मनोहर मासे आहेत.॥ ४॥

**अरथ धरम कामादिक चारी। कहब ग्यान बिग्यान बिचारी॥**
**नव रस जप तप जोग बिरागा। ते सब जलचर चारु तड़ागा॥**

धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार म्हणजे ज्ञानविज्ञानविषयक विचार सांगणे, काव्यातील नवरस, जप, तप, योग आणि वैराग्याचे प्रसंग, हे सर्व या सरोवरातील सुंदर जलचर प्राणी होत.॥ ५॥

**सुकृती साधु नाम गुन गाना। ते बिचित्र जलबिहग समाना॥**
**संतसभा चहुँ दिसि अवँराई। श्रद्धा रितु बसंत सम गाई॥**

पुण्यात्मे साधू आणि रामनाम यांचे गुणगान हेच निरनिराळ्या जल-पक्ष्यांप्रमाणे होत. संतांचा मेळावा हाच या सरोवराच्या सभोवतालची आमराई होय आणि श्रद्धा वसंत-ऋतूप्रमाणे आहे.॥ ६॥

**भगति निरूपन बिबिध बिधाना। छमा दया दम लता बिताना॥**
**सम जम नियम फूल फल ग्याना। हरि पद रति रस बेद बखाना॥**

नाना प्रकारे केलेले भक्तीचे निरूपण आणि क्षमा, दया व इंद्रियनिग्रह हे लता-मंडप होत. मनाचा निग्रह, यम (अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह), नियम (शौच, संतोष, तप, स्वाध्याय आणि ईश्वरप्रणिधान) हीच फुले आहेत, ज्ञान फल आहे आणि श्रीहरीच्या चरणीचे प्रेम हेच या ज्ञानरूपी फलाचा रस होय, असे वेदांनी सांगितले आहे.॥ ७॥

**औरउ कथा अनेक प्रसंगा। तेइ सुक पिक बहुबरन बिहंगा॥**

या रामचरितमानसामध्ये आणखीही ज्या अनेक कथा आहेत, त्याच यातील पोपट, कोकिळा इत्यादी रंगी-बेरंगी पक्षी होत.॥ ८॥

दो०—**पुलक बाटिका बाग बन सुख सुबिहंग बिहारु।**
**माली सुमन सनेह जल सींचत लोचन चारु॥ ३७॥**

या कथेच्या श्रवणामुळे जे रोमांच येतात, तेच वाटिका, बागा व वने होत आणि सुख प्राप्त

होते, ते म्हणजे सुंदर पक्ष्यांचा विहार होय. निर्मळ मन हाच माळी होय. तो प्रेमरूपी जलाचे सुंदर नेत्रांद्वारे सिंचन करतो. ॥ ३७ ॥

**जे गावहिं यह चरित सँभारे। तेइ एहि ताल चतुर रखवारे॥**
**सदा सुनहिं सादर नर नारी। तेइ सुरबर मानस अधिकारी॥**

जे लोक हे चरित्र लक्षपूर्वक गातात, तेच या तलावाचे चतुर रखवाल-दार आहेत आणि जे स्त्री-पुरुष याचे आदराने श्रवण करतात, तेच या सुंदर मानसाचे अधिकारी असलेले श्रेष्ठ देव होत. ॥ १ ॥

**अति खल जे बिषई बग कागा। एहि सर निकट न जाहिं अभागा॥**
**संबुक भेक सेवार समाना। इहाँ न बिषय कथा रस नाना॥**

जे अत्यंत दुष्ट व विषयी आहेत, ते दुर्दैवी बगळे व कावळे आहेत. ते या सरोवराजवळ फिरकत नाहीत. कारण या मानस सरोवरासारख्या कथेमध्ये गोगल गायी, बेडूक आणि शेवाळे यांसारख्या विषय-रसाच्या नाना गोष्टी नाहीत. ॥ २ ॥

**तेहि कारन आवत हियँ हारे। कामी काक बलाक बिचारे॥**
**आवत एहिं सर अति कठिनाई। राम कृपा बिनु आइ न जाई॥**

यामुळे बिचारे कावळे आणि बगळेरूपी विषयी लोक येथे येताना मनाने खचून जातात. कारण, या सरोवरापर्यंत येण्यामध्ये अडचणी खूप आहेत. श्रीरामांची कृपा झाल्याविना येथे येता येत नाही. ॥ ३ ॥

**कठिन कुसंग कुपंथ कराला। तिन्ह के बचन बाघ हरि ब्याला॥**
**गृह कारज नाना जंजाला। ते अति दुर्गम सैल बिसाला॥**

घोर कुसंगतीच भयानक मार्ग आहे. त्या दुष्ट संगतीवाल्या लोकांची वचने हीच वाघ, सिंह आणि साप आहेत. घरचे व्यवहार आणि प्रपंचाचे उपद्‌व्याप हेच अत्यंत दुर्गम असे मोठ-मोठे डोंगर आहेत. ॥ ४ ॥

**बन बहु बिषम मोह मद माना। नदीं कुतर्क भयंकर नाना॥**

मोह, मद आणि मान हीच बिकट अरण्ये आहेत आणि नाना प्रकारचे कुतर्क ह्याच भयानक नद्या आहेत. ॥ ५ ॥

**दो०—जे श्रद्धा संबल रहित नहिं संतन्ह कर साथ।**
**तिन्ह कहुँ मानस अगम अति जिन्हहि न प्रिय रघुनाथ॥ ३८॥**

ज्यांच्याजवळ श्रद्धारूपी वाट-खर्च नाही, ज्यांना संतांची साथ नाही आणि ज्यांना श्रीराम प्रिय नाहीत, त्यांना हे ‘मानस’ प्राप्त होणारे नाही. ॥ ३८ ॥

**जौं करि कष्ट जाइ पुनि कोई। जातहिं नीद जुड़ाई होई॥**
**जड़ता जाड़ बिषम उर लागा। गएहुँ न मज्जन पाव अभागा॥**

जरी कोणी मनुष्य कष्ट सहन करीत तेथपर्यंत पोहोचला, तरी तेथे जाताच त्याला निद्रारूपी हिवताप भरतो, हृदयामध्ये मूर्खतारूपी कडाक्याची थंडी वाजू लागते. त्यामुळे तेथे जाऊनही तो अभागी स्नान करू शकत नाही.॥ १॥

**करि न जाइ सर मज्जन पाना। फिरि आवइ समेत अभिमाना॥**
**जौं बहोरि कोउ पूछन आवा। सर निंदा करि ताहि बुझावा॥**

त्याला त्या सरोवरात स्नान करता येत नाही आणि पाणीही पिता येत नाही. तो आपल्या अभिमानासह परत येतो. नंतर जर कोणी त्याला तेथील परिस्थिती विचारायला आला, तर तो (आपल्या दुर्भाग्याची गोष्ट न सांगता) सरोवराची निंदा करणाऱ्या गोष्टी त्याला सांगू लागतो.॥ २॥

**सकल बिघ्न ब्यापहिं नहिं तेही। राम सुकृपाँ बिलोकहिं जेही॥**
**सोइ सादर सर मज्जनु करई। महा घोर त्रयताप न जरई॥**

ज्याला श्रीराम सुंदर कृपा-दृष्टीने पाहतात, त्यांना ही विघ्ने बाधत नाहीत. तोच आदराने या सरोवरात स्नान करतो आणि महाभयानक (आध्यात्मिक, आधिदैविक, आधिभौतिक) तापांनी होरपळून जात नाही.॥ ३॥

**ते नर यह सर तजहिं न काऊ। जिन्ह कें राम चरन भल भाऊ॥**
**जो नहाइ चह एहिं सर भाई। सो सतसंग करउ मन लाई॥**

ज्यांच्या मनामध्ये श्रीरामांच्या चरणी सुंदर प्रेम आहे, ते हे सरोवर कधी सोडून जात नाहीत. हे बंधो, ज्याला या सरोवरात स्नान करण्याची इच्छा आहे, त्याने मन:पूर्वक सत्संग करायला हवा.॥ ४॥

**अस मानस मानस चख चाही। भइ कबि बुद्धि बिमल अवगाही॥**
**भयउ हृदयँ आनंद उछाहू। उमगेउ प्रेम प्रमोद प्रबाहू॥**

असे (श्रीरामचरित) मानस-सरोवर हृदयाच्या नेत्रांनी पाहून आणि त्यामध्ये बुडी मारून कवीची बुद्धी निर्मळ झाली, हृदयात आनंद व उत्साह भरून आला आणि प्रेम व आनंदाचा प्रवाह वाहू लागला.॥ ५॥

**चली सुभग कबिता सरिता सो। राम बिमल जस जल भरिता सो॥**
**सरजू नाम सुमंगल मूला। लोक बेद मत मंजुल कूला॥**

त्या श्रीरामांच्या निर्मळ कीर्तिरूपी पाण्याने भरलेली कवितारूपी नदी प्रवाहित झाली. या (कवितारूपी) नदीचे नाव शरयू आहे. जी सर्व मंगलांचे मूळ आहे. या नदीला लोक-मत आणि वेद-मत असे दोन सुंदर तट आहेत.॥ ६॥

**नदी पुनीत सुमानस नंदिनि। कलिमल तृन तरु मूल निकंदिनि॥**

या सुंदर मानस-सरोवराची ही कन्या शरयू नदी मोठी पवित्र आहे आणि कलियुगातील पापरूपी गवताला व वृक्षांना मुळासह उखडून टाकणारी आहे. ॥ ७ ॥

**दो०—श्रोता त्रिबिध समाज पुर ग्राम नगर दुहुँ कूल।**
**संतसभा अनुपम अवध सकल सुमंगल मूल॥ ३९ ॥**

तीन प्रकारच्या श्रोत्यांचा समाज हाच या नदीच्या दोन्ही तटांवर वसलेल्या वाड्या, गावे आणि नगर आहे आणि संतांची सभा हीच सर्व सुंदर मंगलांचे मूळ असलेली अनुपम अयोध्या आहे. ॥ ३९ ॥

**रामभगति सुरसरितहि जाई। मिली सुकीरति सरजु सुहाई॥**
**सानुज राम समर जसु पावन। मिलेउ महानदु सोन सुहावन॥**

सुंदर कीर्तिरूपी शरयू ही रामभक्तिरूपी गंगेला जाऊन मिळाली. धाकटा भाऊ लक्ष्मणासह श्रीरामांनी केलेल्या युद्धाचा पवित्र कीर्तिरूपी सुशोभित महानद शोण हाही तिच्यामध्ये मिळाला. ॥ १ ॥

**जुग बिच भगति देवधुनि धारा। सोहति सहित सुबिरति बिचारा॥**
**त्रिबिध ताप त्रासक तिमुहानी। राम सरूप सिंधु समुहानी॥**

दोन्ही प्रवाहांच्यामध्ये भक्तिरूपी गंगेचा प्रवाह हा ज्ञान व वैराग्य यांच्यासह शोभून दिसत आहे. अशी ही त्रितापांना भयभीत करणारी त्रिमुखी प्रयागरूप नदी श्रीरामस्वरूपरूपी समुद्राकडे जात आहे. ॥ २ ॥

**मानस मूल मिली सुरसरिही। सुनत सुजन मन पावन करिही॥**
**बिच बिच कथा बिचित्र बिभागा। जनु सरि तीर तीर बन बागा॥**

कीर्तिरूपी शरयूचे मूळ (श्रीरामचरित्र) 'मानस' आहे आणि ही (रामभक्तिरूपी) गंगेस मिळाली आहे. म्हणून ही श्रवण करणाऱ्या सज्जनांच्या मनास पवित्र करील. मधून-मधून ज्या वेगवेगळ्या प्रकारच्या सुंदर कथा आलेल्या आहेत, त्या जणू नदीतटाच्या आजूबाजूची वने व बागा आहेत. ॥ ३ ॥

**उमा महेस बिबाह बराती। ते जलचर अगनित बहुभाँती॥**
**रघुबर जनम अनंद बधाई। भवँर तरंग मनोहरताई॥**

पार्वती व शिव यांच्या विवाहातील वऱ्हाडी हे या नदीतील अनेक प्रकारचे असंख्य जलचर प्राणी आहेत. श्रीरामांच्या जन्माच्यावेळी आनंदाने केलेली अभिनंदने हीच या नदीतील भोवरे आणि तरंग यांची मनोहरता आहे. ॥ ४ ॥

**दो०—बालचरित चहु बंधु के बनज बिपुल बहुरंग।**
**नृप रानी परिजन सुकृत मधुकर बारि बिहंग॥ ४० ॥**

चारही भावांची जी बालचरित्रे आहेत, तीच यातील रंगीबेरंगी विपुल कमल-पुष्पे आहेत. महाराज दशरथ व त्यांच्या राण्यांची आणि कुटुंबियांची सत्कर्मे हेच भ्रमर व जल-पक्षी आहेत. ॥ ४० ॥

**सीय स्वयंबर कथा सुहाई। सरित सुहावनि सो छबि छाई॥**
**नदी नाव पटु प्रस्न अनेका। केवट कुसल उतर सबिबेका॥**

सीतेच्या स्वयंवराची जी सुंदर कथा आहे, तीच या नदीची सुंदर पसरलेली शोभा आहे. अनेक सुंदर विचारपूर्ण प्रश्न हेच नदीतील नौका आहेत आणि त्या प्रश्नांची विवेकयुक्त उत्तरे हे चतुर नावाडी होत. ॥ १ ॥

**सुनि अनुकथन परस्पर होई। पथिक समाज सोह सरि सोई॥**
**घोर धार भृगुनाथ रिसानी। घाट सुबद्ध राम बर बानी॥**

ही कथा श्रवण केल्यावर जी परस्पर चर्चा होते, ती म्हणजे या कडेकडेने चाललेल्या यात्रेकरूंचा समाज शोभून दिसत आहे. परशुरामांचा क्रोध या नदीमधील भयानक धार आहे आणि श्रीरामांची श्रेष्ठ वचने हे बांधलेले सुंदर घाट आहेत. ॥ २ ॥

**सानुज राम बिबाह उछाहू। सो सुभ उमग सुखद सब काहू॥**
**कहत सुनत हरषहिं पुलकाहीं। ते सुकृती मन मुदित नहाहीं॥**

भावांच्यासह श्रीरामचंद्रांच्या विवाहाचा उत्साह हाच या कथा-सरितेतील कल्याणकारक पूर आहे. तो सर्वांना सुख देणारा आहे. याचे कथन व श्रवण केल्याने जे हर्षित व पुलकित होतात, तेच पुण्यात्मे होत. तेच प्रसन्न चित्ताने या नदीमध्ये स्नान करतात. ॥ ३ ॥

**राम तिलक हित मंगल साजा। परब जोग जनु जुरे समाजा॥**
**काई कुमति केकई केरी। परी जासु फल बिपति घनेरी॥**

श्रीरामचंद्रांच्या राजतिलकासाठी जी सजावट केली होती, ती जणू पर्वाच्या प्रसंगी या नदीवर जमलेली यात्रेकरूंची गर्दी होय. कैकेयीची कुबुद्धी ही या नदीतील साचलेले शेवाळ होय. त्यामुळे फार मोठे संकट कोसळले. ॥ ४ ॥

**दो०—समन अमित उतपात सब भरतचरित जपजाग।**
**कलि अघ खल अवगुन कथन ते जलमल बग काग॥ ४१ ॥**

सर्व असंख्य उत्पातांना शांत करणारे भरताचे चरित्र हा नदीतटावर केला जाणारा जप-यज्ञ होय. कलियुगातील पापांचे आणि दुष्टांच्या अवगुणांचे जे वर्णन आहे, तेच या नदीच्या जलातील चिखल आणि बगळे-कावळे होत. ॥ ४१ ॥

**कीरति सरित छहूँ रितु रूरी। समय सुहावनि पावनि भूरी॥**
**हिम हिमसैलसुता सिव ब्याहू। सिसिर सुखद प्रभु जनम उछाहू॥**

ही कीर्तिरूपी नदी सहाही ऋतूंमध्ये सुंदर असते. सर्व काळी ही परम शोभिवंत आणि अत्यंत पवित्र असते. यातील शिव-पार्वतीचा विवाह हा हेमंत ऋतू आहे. श्रीरामचंद्रांच्या जन्माचा उत्सव हा सुखदायक शिशिर-ऋतू आहे. ॥ १ ॥

**बरनब राम बिबाह समाजू। सो मुद मंगलमय रितुराजू॥**
**ग्रीषम दुसह राम बनगवनू। पंथकथा खर आतप पवनू॥**

श्रीरामचंद्रांच्या विवाहाप्रसंगी जमलेला समाज हाच आनंदमय व मंगलमय ऋतुराज वसंत आहे. श्रीरामांचे वनगमन हा असह्य ग्रीष्म ऋतू आहे आणि वनमार्गातील कथा हीच कडक ऊन व गरम हवा आहे. ॥ २ ॥

**बरषा घोर निसाचर रारी। सुरकुल सालि सुमंगलकारी॥**
**राम राज सुख बिनय बड़ाई। बिसद सुखद सोइ सरद सुहाई॥**

राक्षसांबरोबर झालेले घोर युद्ध हाच वर्षा ऋतू आहे. तो देवकुलरूपी पिकासाठी सुंदर कल्याण करणारा आहे. श्रीरामांच्या राज्यकाळातील जे सुख, विनम्रता आणि महिमा आहे, तोच निर्मळ सुख देणारा सुशोभित शरद ऋतू होय. ॥ ३ ॥

**सती सिरोमनि सिय गुन गाथा। सोइ गुन अमल अनूपम पाथा॥**
**भरत सुभाउ सुसीतलताई। सदा एकरस बरनि न जाई॥**

पतिव्रता-शिरोमणी सीतेच्या गुणांची जी कथा आहे, तेच या जलाचा निर्मळ व अनुपमेय गुण आहे. भरताचा स्वभाव ही या नदीची सुंदर शीतलता आहे, ती नित्य एकसारखी असते आणि तिचे वर्णन करता येत नाही. ॥ ४ ॥

दो०—**अवलोकनि बोलनि मिलनि प्रीति परसपर हास।**
**भायप भलि चहु बंधु की जल माधुरी सुबास॥ ४२॥**

चारी भावांनी परस्परांना पाहणे, बोलणे, भेटणे, एकमेकांवर प्रेम करणे, हसणे आणि त्यांचा सुंदर बंधु-भाव हे या जलाची गोडी आणि सुगंध होत. ॥ ४२ ॥

**आरति बिनय दीनता मोरी। लघुता ललित सुबारि न थोरी॥**
**अदभुत सलिल सुनत गुनकारी। आस पिआस मनोमल हारी॥**

माझा आर्तभाव, विनय आणि दीनता हा या सुंदर व निर्मळ जळाचा काही कमी हलकेपणा नाही! हे जल मोठे विलक्षण आहे. त्याचे (माहात्म्य) ऐकल्यानेच त्याचा गुण येतो आणि आशारूपी तहान व मनाची मलिनता ते दूर करते. ॥ १ ॥

**राम सुप्रेमहि पोषत पानी। हरत सकल कलि कलुष गलानी॥**
**भव श्रम सोषक तोषक तोषा। समन दुरित दुख दारिद दोषा॥**

हे जल श्रीरामचंद्रांचे सुंदर प्रेम पुष्ट करते, कलियुगातील सर्व पापे आणि त्यापासून होणारी पीडा हरण करते. ते संसाराचे (जन्म-मृत्यू) श्रम शोषून टाकते. संतोषालाही ते संतुष्ट करते आणि पाप, ताप, दारिद्र्य व दोष यांना नष्ट करते. ॥ २ ॥

**काम कोह मद मोह नसावन। बिमल बिबेक बिराग बढ़ावन॥**
**सादर मज्जन पान किए तें। मिटहिं पाप परिताप हिए तें॥**

हे जल काम, क्रोध, मद आणि मोह यांचा नाश करणारे आणि निर्मल ज्ञान व वैराग्य वृद्धिंगत

करणारे आहे. आदराने यामध्ये स्नान केल्याने आणि हे जल प्राशन केल्याने मनातील सर्व पाप-ताप नाहीसे होतात. ॥ ३ ॥

**जिन्ह एहिं बारि न मानस धोए। ते कायर कलिकाल बिगोए॥**
**तृषित निरखि रबि कर भव बारी। फिरिहहिं मृग जिमि जीव दुखारी॥**

ज्यांनी या (रामकीर्तिरूपी) जलाने आपले हृदय धुतले नाही, त्या भित्र्या लोकांना कलिकाळाने ठकविले. ज्याप्रमाणे तहानेने व्याकूळ झालेले हरीण हे सूर्यकिरणे वाळूवर पडल्यामुळे भासणाऱ्या खोट्या पाण्याला खरे जल समजून पाणी पिण्यासाठी धावत जाते आणि पाणी न मिळाल्यामुळे दुःखी होते, त्याप्रमाणे ते (कलिकाळाद्वारे ठकविलेले) जीवसुद्धा (विषयांच्या मागे भटकून) दुःखी होतील. ॥ ४ ॥

दो०—**मति अनुहारि सुबारि गुन गन गनि मन अन्हवाइ।**
**सुमिरि भवानी संकरहि कह कबि कथा सुहाइ॥ ४३ (क)॥**

आपल्या बुद्धीनुसार या सुंदर जलाच्या गुणांचा विचार करून, त्याने आपल्या मनास स्नान घालून आणि भवानी-शंकर यांचे स्मरण करून कवी (तुलसीदास) ही सुंदर कथा सांगत आहे. ॥ ४३ (क) ॥

**अब रघुपति पद पंकरुह हियँ धरि पाइ प्रसाद।**
**कहउँ जुगल मुनिबर्य कर मिलन सुभग संबाद॥ ४३ (ख)॥**

मी आता श्रीरघुनाथांच्या चरण-कमलांना हृदयी धारण करून आणि त्यांचा प्रसाद मिळवून दोन्ही श्रेष्ठ मुनींच्या भेटीतील सुंदर संवाद वर्णन करीत आहे. ॥ ४३ (ख) ॥

**भरद्वाज मुनि बसहिं प्रयागा। तिन्हहि राम पद अति अनुरागा॥**
**तापस सम दम दया निधाना। परमारथ पथ परम सुजाना॥**

भरद्वाज मुनी प्रयाग क्षेत्री राहात होते. त्यांची श्रीरामांच्या चरणी अत्यंत भक्ती होती. ते तपस्वी, मनोनिग्रही, जितेंद्रिय, दयेचे निधान आणि परमार्थ मार्गामध्ये अत्यंत निष्णात होते. ॥ १ ॥

**माघ मकरगत रबि जब होई। तीरथपतिहिं आव सब कोई॥**
**देव दनुज किंनर नर श्रेनीं। सादर मज्जहिं सकल त्रिबेनीं॥**

माघ महिन्यात सूर्य जेव्हा मकर राशीत येतो, तेव्हा असंख्य लोक तीर्थराज प्रयाग क्षेत्री येत असत. देव, दैत्य, किन्नर आणि मानव हे सर्वजण येऊन आदराने त्रिवेणीमध्ये स्नान करीत असत. ॥ २ ॥

**पूजहिं माधव पद जलजाता। परसि अखय बटु हरषहिं गाता॥**
**भरद्वाज आश्रम अति पावन। परम रम्य मुनिबर मन भावन॥**

ते श्रीवेणीमाधवाचे पूजन करीत आणि अक्षयवटाला स्पर्श करीत. त्यामुळे त्यांचे शरीर रोमांचित होत असे. भरद्वाज मुनींचा आश्रम फारच पवित्र, अत्यंत रमणीय आणि थोर मुनींच्या मनाला आवडणारा होता. ॥ ३ ॥

**तहाँ होइ मुनि रिषय समाजा। जाहिं जे मज्जन तीरथ राजा॥**
**मज्जहिं प्रात समेत उछाहा। कहहिं परसपर हरि गुन गाहा॥**

त्या आश्रमात प्रयाग तीर्थात स्नान करणाऱ्या ऋषि-मुनींचा मेळावा भरत असे. प्रात:काळी सर्वजण उत्साहाने स्नान करीत आणि मग हरींच्या गुणांचे कथन परस्परांना करीत. ॥ ४ ॥

दो०—**ब्रह्म निरूपन धरम बिधि बरनहिं तत्त्व बिभाग।**
**कहहिं भगति भगवंत कै संजुत ग्यान बिराग॥ ४४॥**

ते सर्वजण ब्रह्म-निरूपण, धर्माचे विधान आणि तत्त्वांचे विभाग यांचे वर्णन, विवेचन करीत व ज्ञान-वैराग्ययुक्त भगवद्भक्ती सांगत. ॥

**एहि प्रकार भरि माघ नहाहीं। पुनि सब निज निज आश्रम जाहीं॥**
**प्रति संबत अति होइ अनंदा। मकर मज्जि गवनहिं मुनिबृंदा॥**

अशाप्रकारे माघ महिनाभर सर्वजण स्नान करीत आणि आपापल्या आश्रमाकडे परतत. प्रत्येकवर्षी तेथे असा आनंदोत्सव चाले. मकर-संक्रांतीत स्नान करून सर्वजण परत जात. ॥ १ ॥

**एक बार भरि मकर नहाए। सब मुनीस आश्रमन्ह सिधाए॥**
**जागबलिक मुनि परम बिबेकी। भरद्वाज राखे पद टेकी॥**

एकदा पूर्ण मकर-संक्रांतीच्या पर्वातील स्नाने झाल्यावर सर्व मुनी आपआपल्या आश्रमाकडे परतले. मात्र भरद्वाजांनी परमज्ञानी याज्ञवल्क्यांचे चरण धरून मोठ्या आग्रहाने त्यांना ठेवून घेतले. ॥ २ ॥

**सादर चरन सरोज पखारे। अति पुनीत आसन बैठारे॥**
**करि पूजा मुनि सुजसु बखानी। बोले अति पुनीत मृदु बानी॥**

त्यांनी आदराने त्यांची पाद्य-पूजा केली आणि त्यांना पवित्र आसन दिले. पूजा केल्यावर त्यांनी याज्ञवल्क्य मुनींच्या कीर्तीची वाखाणणी केली आणि अत्यंत पवित्र व गोड शब्दांत भरद्वाज मुनी त्यांना म्हणाले, ॥ ३ ॥

**नाथ एक संसउ बड़ मोरें। करगत बेदतत्त्व सबु तोरें॥**
**कहत सो मोहि लागत भय लाजा। जौं न कहउँ बड़ होइ अकाजा॥**

महाराज! माझ्या मनात एक मोठा संशय आहे. वेदांची सर्व तत्त्वे आपल्याला करतलामलकवत आहेत. पण मनातला हा संशय आपणापुढे सांगताना मला भय आणि लाज वाटते. (तुम्हांला असे वाटू नये की, मी तुमची परीक्षा घेत आहे, म्हणून भय वाटते आणि इतके आयुष्य सरले तरी ज्ञान झाले नाही, म्हणून लाज वाटते.) मी जर विचारले नाही, तर माझे मोठे नुकसान होईल. (कारण मी अज्ञानीच राहीन.) ॥ ४ ॥

**दो०—संत कहहिं असि नीति प्रभु श्रुति पुरान मुनि गाव।**
**होइ न बिमल बिबेक उर गुर सन किएँ दुराव॥ ४५॥**

हे प्रभो! संत, वेद, पुराणे आणि मुनिजन असा उपदेश करतात की, गुरूपासून मनातले लपविले तर हृदयात सत्य ज्ञान प्रकट होत नाही.॥ ४५॥

**अस बिचारि प्रगटउँ निज मोहू। हरहु नाथ करि जन पर छोहू॥**
**राम नाम कर अमित प्रभावा। संत पुरान उपनिषद गावा॥**

हाच विचार करून मी आपले अज्ञान आपल्यासमोर मांडत आहे. आपण या सेवकावर कृपा करून त्याचे निरसन करावे. रामनामाचा अपार प्रभाव आहे, असे संत, पुराणे, उपनिषदे यांनी म्हटले आहे.॥ १॥

**संतत जपत संभु अबिनासी। सिव भगवान ग्यान गुन रासी॥**
**आकर चारि जीव जग अहहीं। कासीं मरत परम पद लहहीं॥**

कल्याणस्वरूपी ज्ञान आणि गुण यांचे भांडार असलेले अविनाशी भगवान शंकर हे रामनामाचा निरंतर जप करीत असतात. जगात चार प्रकारचे जीव आहेत. त्यातील जे जीव काशीत मृत्यू पावतात, त्यांना मोक्षाचीच प्राप्ती होते.॥ २॥

**सोपि राम महिमा मुनिराया। सिव उपदेसु करत करि दाया॥**
**रामु कवन प्रभु पूछउँ तोही। कहिअ बुझाइ कृपानिधि मोही॥**

हे मुनिराज! हाही रामनामाचाच महिमा आहे. कारण भगवान शंकर हे (काशीमध्ये मरणाऱ्याला) दया करून रामनामाचा उपदेश करीत असतात. (त्यामुळे त्यांना परमपद मिळते.) तेव्हा हे महाराज, मला विचारावेसे वाटते की, हे राम कोण आहेत? हे कृपानिधान, हे मला समजावून सांगा.॥ ३॥

**एक राम अवधेस कुमारा। तिन्ह कर चरित बिदित संसारा॥**
**नारि बिरहँ दुखु लहेउ अपारा। भयउ रोषु रन रावनु मारा॥**

एक अयोध्यापती दशरथाचे पुत्र राम आहेत. त्यांचे चरित्र सर्व जगाला माहीत आहे. पत्नीच्या विरहामुळे त्यांनी अपार दुःख सहन केले आणि संतप्त झाल्यावर युद्धात रावणाला ठार मारले.॥ ४॥

**दो०—प्रभु सोइ राम कि अपर कोउ जाहि जपत त्रिपुरारि।**
**सत्यधाम सर्बग्य तुम्ह कहहु बिबेकु बिचारि॥ ४६॥**

शंकर ज्यांचा निरंतर जप करतात, तेच हे राम की, अन्य कोणी आहेत? आपण सत्याचे निवासस्थान आहात आणि सर्वज्ञ आहात. तेव्हा याविषयी मला सांगा.॥ ४६॥

**जैसें मिटै मोर भ्रम भारी। कहहु सो कथा नाथ बिस्तारी॥**
**जागबलिक बोले मुसुकाई। तुम्हहि बिदित रघुपति प्रभुताई॥**

माझ्या मनातील भ्रम नष्ट होईल अशारीतीने पूर्ण कथा, हे महाराज, मला विस्ताराने सांगा. त्यावर याज्ञवल्क्य हसून म्हणाले, तुम्ही श्रीरघुनाथांचा प्रभाव जाणता. ॥ १ ॥

**रामभगत तुम्ह मन क्रम बानी। चतुराई तुम्हारि मैं जानी॥**
**चाहहु सुनै राम गुन गूढ़ा। कीन्हिहु प्रस्न मनहुँ अति मूढ़ा॥**

काया-वाचा-मने करून तुम्ही रामभक्तच आहात. तुमचे हे चातुर्य माझ्या लक्षात आले आहे. श्रीरामांचे गूढ गुण तुम्हांला जाणून घेण्याची इच्छा आहे. म्हणून अजाणतेपण स्वत:कडे घेऊन तुम्ही असे विचारले आहे. ॥ २ ॥

**तात सुनहु सादर मनु लाई। कहउँ राम कै कथा सुहाई॥**
**महामोहु महिषेसु बिसाला। रामकथा कालिका कराला॥**

ठीक आहे. आता मी श्रीरामांची सुंदर कथा सांगतो, ती तुम्ही आदरपूर्वक मन लावून ऐका. महामोह हा एक महिषासुरच होय आणि राम-कथा ही (त्याला नष्ट करणारी) भयंकर कालीमाता आहे. ॥ ३ ॥

**रामकथा ससि किरन समाना। संत चकोर करहिं जेहि पाना॥**
**ऐसेइ संसय कीन्ह भवानी। महादेव तब कहा बखानी॥**

रामकथा ही चंद्रकिरणांसारखी आहे आणि संतजन हे चकोर होत. ते तिचे अखंड पान करतात. अशीच शंका पार्वतीला आली होती, तेव्हा भगवान शंकरांनी तिचे निरसन केले. ॥ ४ ॥

दो०—**कहउँ सो मति अनुहारि अब उमा संभु संबाद।**
**भयउ समय जेहि हेतु जेहि सुनु मुनि मिटिहि बिषाद॥ ४७॥**

आता मी माझ्या बुद्धीप्रमाणे शिवपार्वतींचा संवाद सांगतो. हे मुने! तो जेव्हा व ज्या कारणाने झाला, तो तुम्ही ऐका. त्यामुळे तुमचे दु:ख दूर होईल. ॥ ४७ ॥

**एक बार त्रेता जुग माहीं। संभु गए कुंभज रिषि पाहीं॥**
**संग सती जगजननि भवानी। पूजे रिषि अखिलेस्वर जानी॥**

त्रेता युगात भगवान शंकर हे अगस्त्य ऋषींना भेटण्यास गेले. त्यांच्याबरोबर जगज्जननी भवानी सतीसुद्धा होती. ऋषींनी शंकरांची संपूर्ण जगाचे ईश्वर समजून पूजा केली. ॥ १ ॥

**रामकथा मुनिबर्ज बखानी। सुनी महेस परम सुखु मानी॥**
**रिषि पूछी हरिभगति सुहाई। कही संभु अधिकारी पाई॥**

ऋषींनी त्यांना रामकथा विस्ताराने सांगितली. ती ऐकून शंकर संतुष्ट झाले. त्यानंतर ऋषींनी त्यांना हरिभक्तीविषयी सुंदर प्रश्न विचारला. त्यावेळी शंकरांनी अगस्त्य ऋषी हे अधिकारी आहेत, असे समजून त्यांना भक्तीचे रहस्य समजावून सांगितले. ॥ २ ॥

**कहत सुनत रघुपति गुन गाथा। कछु दिन तहाँ रहे गिरिनाथा॥**
**मुनि सन बिदा मागि त्रिपुरारी। चले भवन सँग दच्छकुमारी॥**

त्या प्रसंगी शंकर हे श्रीरामांच्या गुणांच्या कथा सांगत-ऐकत काही दिवस तेथे राहिले. मग ऋषींचा निरोप घेऊन शंकर सतीबरोबर आपल्या निवासस्थानी (कैलास पर्वताकडे) निघाले.॥ ३॥

**तेहि अवसर भंजन महिभारा। हरि रघुबंस लीन्ह अवतारा॥**
**पिता बचन तजि राजु उदासी। दंडक बन बिचरत अबिनासी॥**

त्याकाळी पृथ्वीचा भार नाहीसा करण्यासाठी श्रीहरींनी रघुवंशामध्ये अवतार घेतला होता. ते अविनाशी भगवान राम हे पित्याच्या आज्ञेनुसार राज्य-त्याग करून तपस्वी साधूच्या वेषात दंडकारण्यातून चालले होते.॥ ४॥

दो०—**हृदयँ बिचारत जात हर केहि बिधि दरसनु होइ।**
**गुप्त रूप अवतरेउ प्रभु गएँ जान सबु कोइ॥ ४८ (क)॥**

श्रीशिव हे मनात विचार करीत होते की, भगवंतांचे दर्शन मला कसे लाभेल? प्रभू श्रीरामांनी गुप्तपणे अवतार घेतलेला आहे. मी गेलो तर सर्व लोकांना ते कळेल.॥ ४८ (क)॥

सो०—**संकर उर अति छोभु सती न जानहिं मरमु सोइ।**
**तुलसी दरसन लोभु मन डरु लोचन लालची॥ ४८ (ख)॥**

श्रीशंकरांच्या मनात या विचाराने अस्वस्थता उत्पन्न झाली, परंतु सतीला हे रहस्य माहीत नव्हते. तुलसीदास म्हणतात की, शंकरांना मनात (रहस्य उघड होण्याचे) भय वाटत होते, परंतु दर्शनासाठी त्यांचे नेत्र आसुसले होते.॥ ४८ (ख)॥

**रावन मरन मनुज कर जाचा। प्रभु बिधि बचनु कीन्ह चह साचा॥**
**जौं नहिं जाउँ रहइ पछितावा। करत बिचारु न बनत बनावा॥**

रावणाने (ब्रह्मदेवांना) आपले मरण मनुष्याच्या हातून मिळावे, असे मागितले होते. प्रभू श्रीराम हे ब्रह्मदेवांचे वचन खरे करू इच्छित होते. मी जर आता त्यांच्याजवळ गेलो नाही, तर नंतर मला पश्चात्ताप करावा लागेल. असा विचार श्रीशिवांच्या मनात येत होता, परंतु कोणतीही नेमकी युक्ती सुचत नव्हती.॥ १॥

**एहि बिधि भए सोचबस ईसा। तेही समय जाइ दससीसा॥**
**लीन्ह नीच मारीचहि संगा। भयउ तुरत सोइ कपट कुरंगा॥**

अशाप्रकारे श्रीशंकर काळजीत पडले. त्याचवेळी नीच रावणाने जाऊन मारीचाला आपल्या सोबत घेतले आणि तो (मारीच) लगेच खोटा हरीण झाला.॥ २॥

**करि छलु मूढ़ हरी बैदेही। प्रभु प्रभाउ तस बिदित न तेही॥**
**मृग बधि बंधु सहित हरि आए। आश्रमु देखि नयन जल छाए॥**

मूर्ख (रावणाने) कपट करून सीतेचे हरण केले. त्याला श्रीरामांचा खरा प्रभाव ठाऊक नव्हता. श्रीहरी हरिणाला मारून लक्ष्मणासह आश्रमात आले आणि तेथे सीता न दिसल्याने त्यांचे डोळे पाण्याने भरले. ॥ ३ ॥

**बिरह बिकल नर इव रघुराई। खोजत बिपिन फिरत दोउ भाई॥**
**कबहूँ जोग बियोग न जाकें। देखा प्रगट बिरह दुखु ताकें॥**

श्रीराम हे माणसाप्रमाणे विरहाने व्याकूळ झाले आणि दोघे भाऊ सीतेला शोधत वनात फिरू लागले. ज्यांना कधी संयोग-वियोग होत नाही, त्यांच्यामध्ये प्रत्यक्ष विरहाचे दुःख दिसत होते. ॥ ४ ॥

**दो०—अति बिचित्र रघुपति चरित जानहिं परम सुजान।**
**जे मतिमंद बिमोह बस हृदयँ धरहिं कछु आन॥ ४९॥**

श्रीरघुनाथांचे चरित्र मोठे विचित्र आहे. ते सिद्ध ज्ञानीजनच जाणतात. जे मंदबुद्धीचे आहेत, ते मोहाला बळी पडून मनात काही विपरीतच समजतात. ॥ ४९ ॥

**संभु समय तेहि रामहि देखा। उपजा हियँ अति हरषु बिसेषा॥**
**भरि लोचन छबिसिंधु निहारी। कुसमय जानि न कीन्हि चिन्हारी॥**

त्यावेळी श्रीशंकरांनी श्रीरामांना पाहिले. त्यांना पाहून त्यांच्या मनात फार आनंद झाला. अतिशय सुंदर श्रीरामांना श्रीशंकरांनी डोळे भरून पाहिले, परंतु अप्रासंगिक होईल, म्हणून त्यांना ओळख दिली नाही. ॥ १ ॥

**जय सच्चिदानंद जग पावन। अस कहि चलेउ मनोज नसावन॥**
**चले जात सिव सती समेता। पुनि पुनि पुलकत कृपानिकेता॥**

'जगाला पवित्र करणाऱ्या सच्चिदानंदांचा विजय असो' असे म्हणत कामदेवाचा नाश करणारे श्रीशंकर पुढे चालू लागले. कृपानिधान श्रीशंकर आनंदाने रोमांचित होऊन सतीबरोबर जात होते. ॥ २ ॥

**सतीं सो दसा संभु कै देखी। उर उपजा संदेहु बिसेषी॥**
**संकरु जगतबंद्य जगदीसा। सुर नर मुनि सब नावत सीसा॥**

सतीने श्रीशंकरांची ती अवस्था पाहिली. तिच्या मनात मोठा संदेह उत्पन्न झाला. (ती मनात म्हणू लागली,) शंकरांना सर्व जग वंदन करते, ते जगदीश्वर आहेत. देव, मनुष्य, मुनी, हे सर्वजण त्यांच्यापुढे मस्तक नम्र करतात. ॥ ३ ॥

**तिन्ह नृपसुतहि कीन्ह परनामा। कहि सच्चिदानंद परधामा॥**
**भए मगन छबि तासु बिलोकी। अजहुँ प्रीति उर रहति न रोकी॥**

त्यांनी एका राजपुत्राला सच्चिदानंद परमधाम म्हणून प्रणाम केला आणि त्यांचे सौंदर्य पाहून ते त्यांच्या प्रेमात इतके बुडून गेले की, अजूनही त्यांच्या मनातील प्रेम त्यांना आवरत नाही. ॥ ४ ॥

दो०—**ब्रह्म जो ब्यापक बिरज अज अकल अनीह अभेद।**
**सो कि देह धरि होइ नर जाहि न जानत बेद॥ ५०॥**

जे ब्रह्म सर्वव्यापक, मायारहित, जन्मरहित, अगोचर, इच्छारहित व भेदरहित आहे, ज्याला वेदही जाणत नाहीत, ते देह धारण करून मनुष्य कसे होऊ शकेल?॥ ५०॥

**बिष्नु जो सुर हित नरतनु धारी। सोउ सर्बग्य जथा त्रिपुरारी॥**
**खोजइ सो कि अग्य इव नारी। ग्यानधाम श्रीपति असुरारी॥**

देवांच्या हितासाठी मनुष्यशरीर धारण करणारे जे भगवान विष्णू आहेत, तेसुद्धा शंकरांच्यासारखे सर्वज्ञ आहेत. ज्ञानभांडार, लक्ष्मीपती, असुरांचे शत्रू असलेले भगवान विष्णू काय अज्ञान्याप्रमाणे स्त्रीचा शोध घेत फिरतील?॥ १॥

**संभुगिरा पुनि मृषा न होई। सिव सर्बग्य जान सबु कोई॥**
**अस संसय मन भयउ अपारा। होइ न हृदयँ प्रबोध प्रचारा॥**

परंतु शंकरांचे वचनही खोटे असू शकणार नाही. शंकर हे सर्वज्ञ आहेत, हे सर्वांना माहीत आहे. सतीच्या मनात अशा प्रकारे संदेहाचे काहूर उठले. कशाही प्रकारे तिच्या मनात ज्ञानाचा प्रकाश पडत नव्हता.॥ २॥

**जद्यपि प्रगट न कहेउ भवानी। हर अंतरजामी सब जानी॥**
**सुनहि सती तव नारि सुभाऊ। संसय अस न धरिअ उर काऊ॥**

भवानी जरी काही बोलली नाही, तरी अंतर्यामी शंकरांनी सर्व जाणले. ते म्हणाले, 'हे सती! माझे ऐक. तुझा स्त्रीस्वभाव आहे. असा संशय मनात आणू नकोस.॥ ३॥

**जासु कथा कुंभज रिषि गाई। भगति जासु मैं मुनिहि सुनाई॥**
**सोइ मम इष्टदेव रघुबीरा। सेवत जाहि सदा मुनि धीरा॥**

जी कथा अगस्त्य ऋषींनी गाइली आणि ज्यांची भक्ती मुनींना मी सांगितली, ते हेच माझे इष्टदेव श्रीराम आहेत. त्यांची सेवा ज्ञानी, मुनी नित्य करीत असतात.॥ ४॥

छं०—**मुनि धीर जोगी सिद्ध संतत बिमल मन जेहि ध्यावहीं।**
**कहि नेति निगम पुरान आगम जासु कीरति गावहीं॥**
**सोइ रामु ब्यापक ब्रह्म भुवन निकाय पति माया धनी।**
**अवतरेउ अपने भगत हित निजतंत्र नित रघुकुलमनी॥**

ज्ञानी, मुनी, योगी आणि सिद्ध पुरुष हे निर्मल मनाने निरंतर ज्यांचे ध्यान करतात आणि वेद,

पुराणे व शास्त्रे 'नेति नेति' असे म्हणत ज्यांचे यशोगान करतात, तेच सर्वव्यापक, संपूर्ण ब्रह्मांडांचे स्वामी, मायापती, नित्य परम स्वतंत्र परब्रह्म असलेल्या भगवान श्रीरामांनी आपल्या भक्तांच्या कल्याणासाठी रघुकुल-भूषण म्हणून अवतार घेतला आहे.'

**सो०—लाग न उर उपदेसु जदपि कहेउ सिवँ बार बहु।**
**बोले बिहसि महेसु हरिमाया बलु जानि जियँ॥ ५१॥**

अशाप्रकारे श्रीशिवांनी अनेकवार सांगितले, परंतु सतीच्या मनाला तो उपदेश मानवला नाही. तेव्हा श्रीशिव मनात भगवंतांच्या मायेचा हा प्रभाव समजून हसत म्हणाले,॥ ५१॥

**जौं तुम्हरें मन अति संदेहू। तौ किन जाइ परीछा लेहू॥**
**तब लगि बैठ अहउँ बटछाहीं। जब लगि तुम्ह ऐहहु मोहि पाहीं॥**

'जर तुझ्या मनात फार मोठा संदेह आहे, तर तू जाऊन परीक्षा का घेत नाहीस? तू परत येईपर्यंत मी या वटवृक्षाच्या सावलीत बसतो.॥ १॥

**जैसें जाइ मोह भ्रम भारी। करेहु सो जतनु बिबेक बिचारी॥**
**चलीं सती सिव आयसु पाई। करहिं बिचारु करौं का भाई॥**

ज्यामुळे तुझा अज्ञानजनित भ्रम दूर होईल, ते तू योग्य प्रकारे विवेकपूर्वक पूर्ण विचारांती कर.' शिवांची आज्ञा मिळताच सती निघाली आणि मनात विचार करू लागली की, 'आता काय करू?' (कशी परीक्षा घेऊ?)॥ २॥

**इहाँ संभु अस मन अनुमाना। दच्छसुता कहुँ नहिं कल्याना॥**
**मोरेहु कहें न संसय जाहीं। बिधि बिपरीत भलाई नाहीं॥**

इकडे श्रीशिवांनी मनोमन ताडले की, 'दक्षकन्या सतीचे काही खरे नाही. जर मी समजावून सांगूनही तिचा संदेह दूर होत नाही, तर तिचे दैवच फिरले आहे. आता सतीची धडगत नाही.॥ ३॥

**होइहि सोइ जो राम रचि राखा। को करि तर्क बढ़ावै साखा॥**
**अस कहि लगे जपन हरिनामा। गईं सती जहँ प्रभु सुखधामा॥**

श्रीरामांनी जे योजले आहे, तेच होणार. तर्काचे फाटे फोडून काय उपयोग?' असे म्हणत भगवान श्रीशिव भगवान श्रीहरीच्या नामाचा जप करू लागले आणि जेथे सुख-धाम प्रभू श्रीराम होते, तेथे ती गेली.॥ ४॥

**दो०—पुनि पुनि हृदयँ बिचारु करि धरि सीता कर रूप।**
**आगें होइ चलि पंथ तेहिं जेहिं आवत नरभूप॥ ५२॥**

सतीने पुष्कळ विचारांती सीतेचे रूप धारण केले आणि नराधिप श्रीराम ज्या वाटेने येत होते, त्या वाटेने ती निघाली.॥ ५२॥

**लछिमन दीख उमाकृत बेषा। चकित भए भ्रम हृदयँ बिसेषा॥**
**कहि न सकत कछु अति गंभीरा। प्रभु प्रभाउ जानत मतिधीरा॥**

सतीचे हे वेषांतर पाहून लक्ष्मण चकित झाला. त्याचे मन चक्रावून गेले. तो फार गंभीर झाला, त्याला बोलणे सुधरेना. धीरबुद्धीचा लक्ष्मण प्रभू रामांचा प्रभाव जाणत होता.॥ १॥

**सती कपटु जानेउ सुरस्वामी। सबदरसी सब अंतरजामी॥**
**सुमिरत जाहि मिटइ अग्याना। सोइ सरबग्य रामु भगवाना॥**

सर्व काही पाहणारे आणि सर्वांचे हृदय जाणणारे असे देवांचे स्वामी श्रीरामांनी सतीचे कपट ओळखले. ज्यांचे स्मरण होताच अज्ञानाचा नाश होतो, तेच ते सर्वज्ञ भगवान श्रीराम होते.॥ २॥

**सती कीन्ह चह तहँहुँ दुराऊ। देखहु नारि सुभाव प्रभाऊ॥**
**निज माया बलु हृदयँ बखानी। बोले बिहसि रामु मृदु बानी॥**

स्त्रीस्वभावाचा नमुना पाहा. सतीला तेथे (सर्वज्ञ श्रीरामांच्यासमोरही) कपट करण्याची इच्छा झाली. आपल्या माया-बलाचे मनात स्मरण करून श्रीरामचंद्र हसून कोमल वाणीने म्हणाले.॥ ३॥

**जोरि पानि प्रभु कीन्ह प्रनामू। पिता समेत लीन्ह निज नामू॥**
**कहेउ बहोरि कहाँ बृषकेतू। बिपिन अकेलि फिरहु केहि हेतू॥**

प्रभूंनी दोन्ही हात जोडून सतीला म्हटले, 'मी दशरथपुत्र राम तुम्हांला प्रणाम करीत आहे. नंतर विचारले की, भगवान शिव कोठे आहेत? तुम्ही येथे वनात एकट्याच का फिरत आहात?'॥ ४॥

दो०—**राम बचन मृदु गूढ़ सुनि उपजा अति संकोचु।**
**सती सभीत महेस पहिं चलीं हृदयँ बड़ सोचु॥ ५३॥**

श्रीरामांचे कोमल व गूढ बोलणे ऐकून सती ओशाळून गेली. ती घाबरून गप्पपणे शिवांच्या जवळ परतू लागली. तिला आता काळजी लागून राहिली.॥ ५३॥

**मैं संकर कर कहा न माना। निज अग्यानु राम पर आना॥**
**जाइ उतरु अब देहउँ काहा। उर उपजा अति दारुन दाहा॥**

'आपण शंकरांचे म्हणणे मानले नाही आणि आपल्या अज्ञानाचा आरोप श्रीरामांच्यावर केला. आता मी परत जाऊन शंकरांना काय उत्तर देऊ?' (असा विचार करता करता) सतीचे मन फारच उद्विग्न झाले.॥ १॥

**जाना राम सतीं दुखु पावा। निज प्रभाउ कछु प्रगटि जनावा॥**
**सतीं दीख कौतुकु मग जाता। आगें रामु सहित श्री भ्राता॥**

सतीला दुःख झाले आहे, हे श्रीरामांनी ओळखले. तेव्हा त्यांनी आपला प्रभाव दाखविला. सती

वाटेने जात असता, तिला चमत्कार दिसला की, श्रीरामचंद्र हे सीता व लक्ष्मण यांचेसह समोरून जात आहेत. (या प्रसंगी श्रीरामांनी सतीला सीता दाखविली. कारण, तिने श्रीरामांचे सच्चिदानंद रूप पाहावे, वियोग व दुःखाची जी कल्पना तिच्या मनात आली होती, ती दूर व्हावी आणि तिने पहिल्यासारखे व्हावे.) ॥ २ ॥

**फिरि चितवा पाछें प्रभु देखा। सहित बंधु सिय सुंदर बेषा॥**
**जहँ चितवहिं तहँ प्रभु आसीना। सेवहिं सिद्ध मुनीस प्रबीना॥**

मग सतीने मागे वळून पाहिले, तेव्हा तेथेही बंधू लक्ष्मण आणि सीतेसह श्रीराम सुंदर वेषात दिसून आले. जिकडे पाहावे तिकडे प्रभू श्रीराम विराजमान आहेत आणि चतुर सिद्ध मुनीश्वर त्यांची सेवा करीत आहेत. ॥ ३ ॥

**देखे सिव बिधि बिष्नु अनेका। अमित प्रभाउ एक तें एका॥**
**बंदत चरन करत प्रभु सेवा। बिबिध बेष देखे सब देवा॥**

सतीने तेथे अनेक शिव, विष्णू, ब्रह्मदेव पाहिले. ते एकापेक्षा एक प्रभावी होते. तऱ्हेतऱ्हेची वेशभूषा करून सर्व देव श्रीरामांची चरण-वंदना करीत सेवा करीत होते. ॥ ४ ॥

दो०—**सती बिधात्री इंदिरा देखीं अमित अनूप।**
**जेहिं जेहिं बेष अजादि सुर तेहि तेहि तन अनुरूप॥ ५४॥**

तिला अनेक अनुपम सती, सावित्री, लक्ष्मी दिसत होत्या. ज्या रूपांमध्ये ब्रह्मदेव इत्यादी देव होते, त्यांना शोभतील अशा रूपात (त्यांच्या) या सर्व शक्तीसुद्धा होत्या. ॥ ५४ ॥

**देखे जहँ तहँ रघुपति जेते। सक्तिन्ह सहित सकल सुर तेते॥**
**जीव चराचर जो संसारा। देखे सकल अनेक प्रकारा॥**

सतीने जिकडे-तिकडे जितके श्रीराम पाहिले, तितकेच देवही आपल्या शक्तींसह तिला दिसले. जगात जितके चराचर जीव आहेत, तेसुद्धा अनेक प्रकारचे दिसून आले. ॥ १ ॥

**पूजहिं प्रभुहि देव बहु बेषा। राम रूप दूसर नहिं देखा॥**
**अवलोके रघुपति बहुतेरे। सीता सहित न बेष घनेरे॥**

(तिला दिसले की,) अनेक वेष धारण केलेले देव हे प्रभू श्रीरामांची पूजा करीत आहेत. परंतु श्रीरामांचे दुसरे रूप कुठे दिसले नाही. सीतेसह अनेक श्रीराम दिसले, परंतु त्यांचे अनेक वेष नव्हते. ॥ २ ॥

**सोइ रघुबर सोइ लछिमनु सीता। देखि सती अति भई सभीता॥**
**हृदय कंप तन सुधि कछु नाहीं। नयन मूदि बैठीं मग माहीं॥**

(सर्व ठिकाणी) तेच रघुनाथ, तेच लक्ष्मण आणि तीच सीता- हे पाहून सती घाबरून गेली.

तिच्या मनाचा थरकाप उडाला आणि देहाची शुद्ध हरपली. तेव्हा ती डोळे मिटून वाटेतच बसली. ॥ ३ ॥

**बहुरि बिलोकेउ नयन उघारी। कछु न दीख तहँ दच्छकुमारी॥**
**पुनि पुनि नाइ राम पद सीसा। चलीं तहाँ जहँ रहे गिरीसा॥**

तिने डोळे उघडून बघितले, तर सतीला तेथे काहीच दिसले नाही. तेव्हा तिने श्रीरामांच्या चरणी वारंवार मस्तक नम्र केले आणि जेथे शिव बसले होते, तेथे ती परत गेली. ॥ ४ ॥

दो०—**गईं समीप महेस तब हँसि पूछी कुसलात।**
**लीन्हि परीछा कवन बिधि कहहु सत्य सब बात॥ ५५॥**

जेव्हा ती शिवांच्याजवळ गेली, तेव्हा त्यांनी हसून विचारले की, 'तू श्रीरामांची परीक्षा कशी घेतलीस, ते खरे खरे सांग.' ॥ ५५ ॥

## मासपारायण, दुसरा विश्राम

**सतीं समुझि रघुबीर प्रभाऊ। भय बस सिव सन कीन्ह दुराऊ॥**
**कछु न परीछा लीन्हि गोसाईं। कीन्ह प्रनामु तुम्हारिहि नाईं॥**

सतीने श्रीरामांचा प्रभाव पाहिला होता, म्हणून भीतीमुळे तिने लपवाछपवी केली आणि ती म्हणाली, 'हे स्वामी, मी कोणतीच परीक्षा घेतली नाही. (तेथे जाऊन) तुमच्याप्रमाणेच प्रणाम केला. ॥ १ ॥

**जो तुम्ह कहा सो मृषा न होई। मोरें मन प्रतीति अति सोई॥**
**तब संकर देखेउ धरि ध्याना। सतीं जो कीन्ह चरित सबु जाना॥**

तुम्ही जे सांगितले ते काही खोटे ठरणार नाही, याची मला खात्री होती.' तेव्हा श्रीशिवांनी ध्यानामध्ये पाहिले आणि सतीने जे केले होते, ते सर्व जाणले. ॥ २ ॥

**बहुरि राममायहि सिरु नावा। प्रेरि सतिहि जेहिं झूँठ कहावा॥**
**हरि इच्छा भावी बलवाना। हृदयँ बिचारत संभु सुजाना॥**

नंतर त्यांनी श्रीरामांच्या मायेला मस्तक नमविले, जिच्या प्रेरणेमुळे सतीच्या तोंडूनही असत्य बाहेर पडले. ज्ञानी शिवांनी मनात विचार केला की, हरीच्या इच्छेमुळे पुढे होणारे अटळ आहे. ॥ ३ ॥

**सतीं कीन्ह सीता कर बेषा। सिव उर भयउ बिषाद बिसेषा॥**
**जौं अब करउँ सती सन प्रीती। मिटइ भगति पथु होइ अनीती॥**

सतीने सीतेचा वेष धारण केला, हे समजल्यामुळे श्रीशिवांच्या मनास मोठा विषाद वाटला. त्यांनी विचार केला की, 'आता जर मी सतीवर प्रेम केले, तर भक्तिमार्ग उध्वस्त होईल आणि मोठा अन्याय घडेल. ॥ ४ ॥

दो०—**परम पुनीत न जाइ तजि किएँ प्रेम बड़ पापु।**
**प्रगटि न कहत महेसु कछु हृदयँ अधिक संतापु॥ ५६॥**

सती ही परम पवित्र आहे. या महासाध्वीचा त्यागही करता येत नाही आणि तिच्यावर प्रेम करण्यामध्ये मोठे पाप आहे.' श्रीशिवांनी उघडपणे काही सांगितले नाही, परंतु त्यांच्या मनाचा भडका उडाला होता. ॥ ५६ ॥

**तब संकर प्रभु पद सिरु नावा। सुमिरत रामु हृदयँ अस आवा॥**
**एहिं तन सतिहि भेट मोहि नाहीं। सिव संकल्पु कीन्ह मन माहीं॥**

तेव्हा शिवांनी श्रीरामांच्या चरणी मस्तक नम्र केले आणि श्रीरामांचे स्मरण करताच त्यांच्या मनात आले की, सती या देहामध्ये असताना तिची माझी (पति-पत्नी या नात्याने) भेट होणे योग्य नाही, मग त्यांनी आपल्या मनात संकल्प केला. ॥ १ ॥

**अस बिचारि संकरु मतिधीरा। चले भवन सुमिरत रघुबीरा॥**
**चलत गगन भै गिरा सुहाई। जय महेस भलि भगति दृढ़ाई॥**

दृढनिश्चयी श्रीशंकर असा विचार करून श्रीरामांचे स्मरण करीत आपल्या स्थानी (कैलासाला) निघाले. जाताना सुंदर आकाशवाणी झाली की, 'हे महेशा, तुमचा विजय असो. तुम्ही भक्तीचा चांगल्याप्रकारे दृढनिश्चय दाखविला. ॥ २ ॥

**अस पन तुम्ह बिनु करइ को आना। रामभगत समरथ भगवाना॥**
**सुनि नभगिरा सती उर सोचा। पूछा सिवहि समेत सकोचा॥**

तुमच्याशिवाय दुसरा कोण अशी प्रतिज्ञा करणार? तुम्ही श्रीरामांचे भक्त आहात, सर्व प्रकारे समर्थ आहात आणि भगवान आहात.' ही आकाशवाणी ऐकून सतीच्या मनात चिंता उत्पन्न झाली. तिने संकोचाने शिवांना विचारले की, ॥ ३ ॥

**कीन्ह कवन पन कहहु कृपाला। सत्यधाम प्रभु दीनदयाला॥**
**जदपि सतीं पूछा बहु भाँती। तदपि न कहेउ त्रिपुर आराती॥**

'हे कृपाळू, तुम्ही कोणती प्रतिज्ञा केली आहे, ते सांगा. हे प्रभो, तुम्ही सत्य-धाम आहात आणि दीनदयाळू आहात.' जरी सतीने पुष्कळ तऱ्हेने विचारले, तरी श्रीशिव काही बोलले नाहीत. ॥ ४ ॥

दो०—**सतीं हृदयँ अनुमान किय सबु जानेउ सर्बग्य।**
**कीन्ह कपटु मैं संभु सन नारि सहज जड़ अग्य॥ ५७ ( क )॥**

सतीला मनात अंदाज आला की, सर्वज्ञ शिवांनी सर्व जाणले आहे. मी एका अर्थी शिवांशी कपट केले. स्त्री ही स्वभावतः मूर्ख आणि अज्ञानी असते. ॥ ५७ (क) ॥

सो०—**जलु पय सरिस बिकाइ देखहु प्रीति कि रीति भलि।**
**बिलग होइ रसु जाइ कपट खटाई परत पुनि॥ ५७ ( ख )॥**

प्रेमाची रीत कशी आहे पाहा! पाणीसुद्धा (दुधात मिसळल्यावर) दुधाच्या भावानेच विकले जाते. दुधात कपटाचा आंबटपणा पडला की, पाणी वेगळे होते. (दूध नासते) आणि त्याची गोडी नाहीशी होते.॥ ५७ (ख)॥

**हृदयँ सोचु समुझत निज करनी। चिंता अमित जाइ नहिं बरनी॥**
**कृपासिंधु सिव परम अगाधा। प्रगट न कहेउ मोर अपराधा॥**

आपल्या कृत्यामुळे सतीला घोर लागला. तिला इतकी चिंता लागून राहिली की सांगता येत नाही. (तिला उमजले की) शिव हे कृपेचे अथांग सागर आहेत. म्हणून त्यांनी उघडपणे माझा अपराध बोलून दाखविला नाही.॥ १॥

**संकर रुख अवलोकि भवानी। प्रभु मोहि तजेउ हृदयँ अकुलानी॥**
**निज अघ समुझि न कछु कहि जाई। तपइ अवाँ इव उर अधिकाई॥**

शिवांचा कल पाहून सतीला उमजले की, स्वामींनी माझा त्याग केलेला आहे. ती मनात फार व्याकूळ झाली. आपले पाप समजून आल्यामुळे काही बोलता येत नव्हते, परंतु हृदय कुंभाराच्या आव्यासारखे पोळून निघत होते.॥ २॥

**सतिहि ससोच जानि बृषकेतू। कहीं कथा सुंदर सुखहेतू॥**
**बरनत पंथ बिबिध इतिहासा। बिस्वनाथ पहुँचे कैलासा॥**

श्रीशिवांनी पाहिले की, सती चिंतित झाली आहे, तेव्हा तिला प्रसन्न करण्यासाठी त्यांनी वाटेने जाताना सुंदर कथा सांगितल्या. वेगवेगळ्या ऐतिहासिक गोष्टी सांगितल्या आणि ते कैलासावर पोहोचले.॥ ३॥

**तहँ पुनि संभु समुझि पन आपन। बैठे बट तर करि कमलासन॥**
**संकर सहज सरूपु सम्हारा। लागि समाधि अखंड अपारा॥**

नंतर शिवांना आपली प्रतिज्ञा आठवली. ते वटवृक्षाखाली पद्मासन घालून बसले. ते स्व-स्वरूपात मग्न होऊन गेले. त्यांना अखंड व अपार अशी समाधी लागली.॥ ४॥

दो०—**सती बसहिं कैलास तब अधिक सोचु मन माहिं।**
**मरमु न कोऊ जान कछु जुग सम दिवस सिराहिं॥ ५८॥**

तेव्हा सती कैलासावर राहू लागली. तिच्या मनात फार मोठे दुःख भरलेले होते. हे रहस्य कोणीही जाणत नव्हते. तिचा एक एक दिवस एक एक युगाप्रमाणे जात होता.॥ ५८॥

**नित नव सोचु सती उर भारा। कब जैहउँ दुख सागर पारा॥**
**मैं जो कीन्ह रघुपति अपमाना। पुनि पतिबचनु मृषा करि जाना॥**

सतीच्या मनावर नित्य चिंतेचे ओझे वाढत होते. या दु:ख–सागरातून मी केव्हा एकदा पार पडेन, (असे तिला झाले होते.) मी श्रीरामांचा अपमान केला आणि पतीचे म्हणणे खोटे मानले. ॥ १ ॥

**सो फलु मोहि बिधाताँ दीन्हा । जो कछु उचित रहा सोइ कीन्हा ॥**
**अब बिधि अस बूझिअ नहिं तोही । संकर बिमुख जिआवसि मोही ॥**

त्याचे फळ मला दैवाने दिले. दैवाने जे योग्य होते, तेच केले, परंतु हे दैवा, श्रीशंकर विन्मुख झाल्यावर मला जिवंत तरी का ठेवतोस? ॥ २ ॥

**कहि न जाइ कछु हृदय गलानी । मन महुँ रामहि सुमिर सयानी ॥**
**जौं प्रभु दीनदयालु कहावा । आरति हरन बेद जसु गावा ॥**

सतीच्या मनातील ही वेदना काही सांगता येणे शक्य नव्हती. शहाण्या सतीने मनात श्रीरामांचे स्मरण करून म्हटले, ‘हे प्रभू, तुम्हांला दीनदयाळू असे म्हणतात आणि तुम्ही दु:ख हरण करणारे आहात, अशी तुमची कीर्ती वेदांनी गाइली आहे. ॥ ३ ॥

**तौ मैं बिनय करउँ कर जोरी । छूटउ बेगि देह यह मोरी ॥**
**जौं मोरें सिव चरन सनेहू । मन क्रम बचन सत्य ब्रतु एहू ॥**

तेव्हा मी हात जोडून विनंती करते की, माझे हे शरीर लवकर पडावे. जर माझे शिवांचे चरणी प्रेम असेल आणि माझे हे (प्रेमाचे) व्रत कायावाचामनाने सत्य असेल, ॥ ४ ॥

दो०—**तौ सबदरसी सुनिअ प्रभु करउ सो बेगि उपाइ ।**
**होइ मरनु जेहिं बिनहिं श्रम दुसह बिपत्ति बिहाइ ॥ ५९ ॥**

तर हे सर्वदर्शी प्रभो, ऐका आणि माझे मरण लवकर यावे, असा काही उपाय करा. मग विनासायास हे (पति–परित्यागरूपी) असह्य दु:ख नाहीसे होईल. ॥ ५९ ॥

**एहि बिधि दुखित प्रजेसकुमारी । अकथनीय दारुन दुखु भारी ॥**
**बीतें संबत सहस सतासी । तजी समाधि संभु अबिनासी ॥**

अशाप्रकारे दक्षकन्या सती ही फार दु:खी होती. तिला इतके भयंकर दु:ख होते की, त्याचे वर्णन करता येत नाही. सत्त्याऐंशी हजार वर्षानंतर अविनाशी शिवांनी समाधी उतरविली. ॥ १ ॥

**राम नाम सिव सुमिरन लागे । जानेउ सतीं जगतपति जागे ॥**
**जाइ संभु पद बंदनु कीन्हा । सनमुख संकर आसनु दीन्हा ॥**

श्रीशंकर रामनामाचे स्मरण करू लागले, तेव्हा जगाचे स्वामी (शंकर) जागे झाले आहेत, हे सतीला कळले. तिने जाऊन त्यांच्या चरणी प्रणाम केला. शिवांनी तिला बसण्यासाठी समोर आसन दिले. ॥ २ ॥

**लगे कहन हरिकथा रसाला। दच्छ प्रजेस भए तेहि काला॥**
**देखा बिधि बिचारि सब लायक। दच्छहि कीन्ह प्रजापति नायक॥**

श्रीशंकर तिला श्रीहरींच्या रसाळ कथा सांगू लागले. त्याचवेळी दक्ष हा प्रजापती झाला. ब्रह्मदेवाने सर्वप्रकारे योग्य समजून प्रजापतींचा नायक म्हणून त्याला निवडले. ॥ ३ ॥

**बड़ अधिकार दच्छ जब पावा। अति अभिमानु हृदयँ तब आवा॥**
**नहिं कोउ अस जनमा जग माहीं। प्रभुता पाइ जाहि मद नाहीं॥**

दक्षाला जेव्हा मोठा अधिकार प्राप्त झाला, तेव्हा त्याच्या मनात अभिमान जागा झाला. सत्ता मिळाल्यावर मद चढत नाही, असा जगात कोणी झालेला नाही. ॥ ४ ॥

दो०—**दच्छ लिए मुनि बोलि सब करन लगे बड़ जाग।**
**नेवते सादर सकल सुर जे पावत मख भाग॥ ६०॥**

दक्षाने सर्व मुनींना बोलावले आणि तो मोठा यज्ञ करू लागला. हविर्भागाचा ज्यांना अधिकार होता, त्या सर्व देवांना दक्षाने आदराने निमंत्रित केले. ॥ ६० ॥

**किंनर नाग सिद्ध गंधर्बा। बधुन्ह समेत चले सुर सर्बा॥**
**बिष्नु बिरंचि महेसु बिहाई। चले सकल सुर जान बनाई॥**

(दक्षाचे निमंत्रण मिळाल्यावर) किन्नर, नाग, सिद्ध, गंधर्व आणि सर्व देव हे आपापल्या स्त्रियांसह निघाले. विष्णू, ब्रह्मदेव आणि महादेव हे सोडून सर्व देव आपापली विमाने सजवून निघाले. ॥ १ ॥

**सतीं बिलोके ब्योम बिमाना। जात चले सुंदर बिधि नाना॥**
**सुर सुंदरी करहिं कल गाना। सुनत श्रवन छूटहिं मुनि ध्याना॥**

अनेक प्रकारची सुंदर विमाने आकाशमार्गाने जात असल्याचे सतीने पाहिले. अप्सरा मधुर गीत गात होत्या. ते ऐकून मुनींचे ध्यानही विचलित होत होते. ॥ २ ॥

**पूछेउ तब सिवँ कहेउ बखानी। पिता जग्य सुनि कछु हरषानी॥**
**जौं महेसु मोहि आयसु देहीं। कछु दिन जाइ रहौं मिस एहीं॥**

विमानातून देव का जात आहेत, म्हणून सतीने विचारले, तेव्हा श्रीशिवांनी सर्व हकीगत सांगितली. वडील यज्ञ करीत आहेत, हे ऐकून सती काहीशी प्रसन्न झाली आणि विचार करू लागली की श्रीशंकरांनी जर मला आज्ञा दिली, तर या निमित्ताने काही दिवस माहेरी जाऊन राहता येईल. ॥ ३ ॥

**पति परित्याग हृदयँ दुखु भारी। कहइ न निज अपराध बिचारी॥**
**बोली सती मनोहर बानी। भय संकोच प्रेम रस सानी॥**

कारण, पतीने त्याग केल्याचे मोठे शल्य तिच्या मनात होते. परंतु आपल्याकडूनच अपराध झाला, म्हणून ती काही बोलत नव्हती. शेवटी ती भय, संकोच आणि प्रेमाने भरलेल्या अशा मनोहर वाणीने म्हणाली, ॥ ४ ॥

**दो०—पिता भवन उत्सव परम जौं प्रभु आयसु होइ।**
**तौ मैं जाउँ कृपायतन सादर देखन सोइ॥ ६१॥**

'हे प्रभो, माझ्या पित्याच्या घरी फार मोठा उत्सव आहे. तो पाहाण्याची मला उत्सुकता आहे. हे कृपानिधान! जर तुमची आज्ञा असेल तर मी तो पाहाण्यास जाऊ काय?'॥ ६१ ॥

**कहेहु नीक मोरेहुँ मन भावा। यह अनुचित नहिं नेवत पठावा॥**
**दच्छ सकल निज सुता बोलाईं। हमरें बयर तुम्हउ बिसराईं॥**

श्रीशिव म्हणाले, 'तू म्हणतेस ते ठीक आहे. मलाही ते पटते, पण त्यांनी निमंत्रण पाठविले नाही, हे योग्य नव्हे. दक्षाने सर्व मुलींना बोलावले आहे, परंतु आमच्याशी वैर असल्यामुळे ते तुलाही विसरले. ॥ १ ॥

**ब्रह्मसभाँ हम सन दुखु माना। तेहि तें अजहुँ करहिं अपमाना॥**
**जौं बिनु बोलें जाहु भवानी। रहइ न सीलु सनेहु न कानी॥**

एकदा ब्रह्मदेवाच्या सभेमध्ये ते आमच्यावर नाराज झाले होते. त्यामुळे अजूनही ते आमचा अपमान करतात. हे भवानी, निमंत्रण नसताना तू गेलीस, तर त्यात शील, प्रेम किंवा मान-मर्यादा असणार नाही. ॥ २ ॥

**जदपि मित्र प्रभु पितु गुर गेहा। जाइअ बिनु बोलेहुँ न सँदेहा॥**
**तदपि बिरोध मान जहँ कोई। तहाँ गएँ कल्यानु न होई॥**

मित्र, स्वामी, पिता आणि गुरू यांच्या घरी न बोलावताही जावे, यात काही शंका नाही. तरीही जिथे कोणी वैर करत असेल, तिथे जाण्याने कल्याण होणार नाही.'॥ ३ ॥

**भाँति अनेक संभु समुझावा। भावी बस न ग्यानु उर आवा॥**
**कह प्रभु जाहु जो बिनहिं बोलाएँ। नहिं भलि बात हमारे भाएँ॥**

शिवांनी अनेक प्रकारे समजावून सांगितले, परंतु पुढे होणाऱ्या अटळ गोष्टीमुळे सतीला ते पटले नाही. तेव्हा शिव म्हणाले की, 'जर न बोलाविता गेलीस, तर आमच्या मते ती चांगली गोष्ट होणार नाही. ॥ ४ ॥

**दो०—कहि देखा हर जतन बहु रहइ न दच्छकुमारि।**
**दिए मुख्य गन संग तब बिदा कीन्ह त्रिपुरारि॥ ६२॥**

शिवांनी पुष्कळ सांगून पाहिले, परंतु सती काही ऐकेना, तेव्हा महादेवांनी आपले मुख्य गण सोबत देऊन तिला पाठवून दिले. ॥ ६२ ॥

**पिता भवन जब गईं भवानी । दच्छ त्रास काहुँ न सनमानी ॥**
**सादर भलेहिं मिली एक माता । भगिनीं मिलीं बहुत मुसुकाता ॥**

भवानी जेव्हा आपल्या वडिलांच्या घरी गेली, तेव्हा दक्षाच्या भीतीमुळे कुणीही तिचे स्वागत केले नाही, फक्त आई तेवढी आदराने तिला भेटली. बहिणी भेटल्या पण त्यांनी सतीला पाहून नाके मुरडली. ॥ १ ॥

**दच्छ न कछु पूछी कुसलाता । सतिहि बिलोकि जरे सब गाता ॥**
**सतीं जाइ देखेउ तब जागा । कतहुँ न दीख संभु कर भागा ॥**

स्वतः दक्षाने विचारपूस केली नाही. सतीला पाहून दक्षाच्या अंगाची लाही लाही झाली. जेव्हा सतीने जाऊन यज्ञ पाहिला, तेव्हा तिथे कुठे शिवांचा भाग ठेवलेला तिला दिसला नाही. ॥ २ ॥

**तब चित चढ़ेउ जो संकर कहेऊ । प्रभु अपमानु समुझि उर दहेऊ ॥**
**पाछिल दुखु न हृदयँ अस ब्यापा । जस यह भयउ महा परितापा ॥**

शंकरांनी जे सांगितले होते, ते सतीला आठवले. आपल्या पतीच्या अपमानामुळे सतीचे मन दुःखी झाले. पूर्वी त्यागामुळे तिचे मन इतके कष्टी झाले नव्हते, परंतु यावेळी मात्र (पतीच्या अपमानामुळे) तिचे काळीज पेटून उठले. ॥ ३ ॥

**जद्यपि जग दारुन दुख नाना । सब तें कठिन जाति अवमाना ॥**
**समुझि सो सतिहि भयउ अति क्रोधा । बहु बिधि जननीं कीन्ह प्रबोधा ॥**

जरी जगामध्ये अनेक प्रकारची घोर दुःखे असली, तरी स्वजनांकडून होणारा अपमान हा फार भयंकर असतो. तो पाहून सतीच्या अंगाचा तिळपापड झाला. आईने तिला पुष्कळ समजावण्याचा प्रयत्न केला. ॥ ४ ॥

दो०—**सिव अपमानु न जाइ सहि हृदयँ न होइ प्रबोध।**
**सकल सभहि हठि हटकि तब बोलीं बचन सक्रोध॥ ६३ ॥**

सतीला शिवांचा अपमान सहन झाला नाही. तिला दुसरा विचारच सुचेना. तेव्हा भरसभेत आवेशाने फटकारून ती रागारागाने बोलू लागली, ॥ ६३ ॥

**सुनहु सभासद सकल मुनिंदा । कही सुनी जिन्ह संकर निंदा ॥**
**सो फलु तुरत लहब सब काहूँ । भली भाँति पछिताब पिताहूँ ॥**

''सभासदांनो व सर्व मुनीश्वरांनो, ऐका. ज्या लोकांनी शिवांची निंदा केली आहे किंवा ऐकली आहे, त्या सर्वांना त्याचे फळ ताबडतोब मिळणार आहे. आणि माझे वडील दक्ष यांनाही चांगलाच पश्चात्ताप करावा लागेल. ॥ १ ॥

**संत संभु श्रीपति अपबादा। सुनिअ जहाँ तहँ असि मरजादा॥**
**काटिअ तासु जीभ जो बसाई। श्रवन मूदि न त चलिअ पराई॥**

जेथे संतांची, शिवांची किंवा भगवान विष्णूंची निंदा कानी पडते, तेथे असा नियम आहे की, शक्य असेल तर निंदा करणाऱ्याची जीभ छाटावी आणि नसेल तर कान बंद करून तेथून निघून जावे. ॥ २ ॥

**जगदातमा महेसु पुरारी। जगत जनक सब के हितकारी॥**
**पिता मंदमति निंदत तेही। दच्छ सुक्र संभव यह देही॥**

त्रिपुरासुराला मारणारे भगवान महेश्वर हे संपूर्ण जगाचे आत्मा आहेत. ते जगत्पिता आहेत आणि सर्वांचे कल्याण करणारे आहेत. माझा मूर्ख पिता त्यांची निंदा करीत आहे आणि माझा हा देह दक्षाच्याच वीर्यापासून बनला आहे. ॥ ३ ॥

**तजिहउँ तुरत देह तेहि हेतू। उर धरि चंद्रमौलि बृषकेतू॥**
**अस कहि जोग अगिनि तनु जारा। भयउ सकल मख हाहाकारा॥**

म्हणून मी आपल्या भाळी चंद्रमा धारण करणाऱ्या वृषध्वज शिवांचे मनात स्मरण करून हे माझे शरीर विसर्जित करते.'' असे म्हणत सतीने योगाग्नीने आपले शरीर भस्म करून टाकले. संपूर्ण यज्ञशाळेत हाहाकार माजला. ॥ ४ ॥

दो०—**सती मरनु सुनि संभु गन लगे करन मख खीस।**
**जग्य बिधंस बिलोकि भृगु रच्छा कीन्हि मुनीस॥ ६४॥**

सतीचा देहत्याग ऐकून शिवांचे गण यज्ञाचा विध्वंस करू लागले, तेव्हा भृगू ऋषींनी यज्ञाचे रक्षण केले. ॥ ६४ ॥

**समाचार सब संकर पाए। बीरभद्रु करि कोप पठाए॥**
**जग्य बिधंस जाइ तिन्ह कीन्हा। सकल सुरन्ह बिधिवत फलु दीन्हा॥**

ही वार्ता शिवांना कळली, तेव्हा त्यांनी रागारागाने वीरभद्राला पाठविले. त्याने जाऊन यज्ञाचा विध्वंस केला आणि सर्व देवांना यथोचित प्रायश्चित्त दिले. ॥ १ ॥

**भै जगबिदित दच्छ गति सोई। जसि कछु संभु बिमुख कै होई॥**
**यह इतिहास सकल जग जानी। ताते मैं संछेप बखानी॥**

शिव-द्रोह्याची जी गती होते, ती दक्षाच्या वाट्याला आली. हा इतिहास सर्व जगाला ठाऊक आहे, म्हणून मी तो येथे थोडक्यात सांगितला आहे. ॥ २ ॥

**सतीं मरत हरि सन बरु मागा। जनम जनम सिव पद अनुरागा॥**
**तेहि कारन हिमगिरि गृह जाई। जनमीं पारबती तनु पाई॥**

सतीने मरतेवेळी भगवान श्रीहरींजवळ वर मागितला की, ‘जन्मोजन्मी माझे शिवांच्या चरणी प्रेम राहो.’ म्हणून ती हिमालयाच्या घरी पार्वतीच्या रूपाने जन्मास आली. ॥ ३ ॥

**जब तें उमा सैल गृह जाईं । सकल सिद्धि संपति तहँ छाईं ॥**
**जहँ तहँ मुनिन्ह सुआश्रम कीन्हे । उचित बास हिम भूधर दीन्हे ॥**

सती जेव्हा हिमालयाच्या घरी उमेच्या रूपाने जन्माला आली, तेव्हा तो प्रदेश सर्व सिद्धींनी व संपत्तीने भरून गेला. मुनींनी जिकडे तिकडे सुंदर आश्रम बनविले आणि हिमालयाने त्यांना योग्य अशी स्थाने दिली. ॥ ४ ॥

दो०—**सदा सुमन फल सहित सब द्रुम नव नाना जाति।**
**प्रगटीं सुंदर सैल पर मनि आकर बहु भाँति॥ ६५ ॥**

त्या सुंदर पर्वतावर अनेक प्रकारचे नवनवीन वृक्ष नित्य फुलू-फळू लागले आणि तेथे अनेक तऱ्हेच्या रत्नांच्या खाणी प्रगट झाल्या. ॥ ६५ ॥

**सरिता सब पुनीत जलु बहहीं । खग मृग मधुप सुखी सब रहहीं ॥**
**सहज बयरु सब जीवन्ह त्यागा । गिरि पर सकल करहिं अनुरागा ॥**

सर्व नद्यांमधून पवित्र जल वाहू लागले आणि पक्षी, पशू, भ्रमर सर्व सुखाने राहू लागले. सर्व जीवांनी आपले स्वाभाविक वैर सोडून दिले आणि हिमालयात सर्वजण परस्परांवर प्रेम करू लागले. ॥ १ ॥

**सोह सैल गिरिजा गृह आएँ । जिमि जनु रामभगति के पाएँ ॥**
**नित नूतन मंगल गृह तासू । ब्रह्मादिक गावहिं जसु जासू ॥**

पार्वती घरी आल्यामुळे हिमालय असा शोभिवंत झाला की, रामभक्ती लाभताच जसा भक्त सुशोभित होतो. त्या पर्वतराजाच्या घरी नित्य नवनवीन मंगलोत्सव साजरे होऊ लागले. ब्रह्मादिक देवसुद्धा त्यांची कीर्ती गाऊ लागले. ॥ २ ॥

**नारद समाचार सब पाए । कौतुकहीं गिरि गेह सिधाए ॥**
**सैलराज बड़ आदर कीन्हा । पद पखारि बर आसनु दीन्हा ॥**

जेव्हा नारदांना हे वर्तमान समजले, तेव्हा कौतुकाने ते हिमालयाच्या घरी आले. पर्वतराजाने त्यांचा मोठा आदर-सत्कार केला. त्यांचे पाद-प्रक्षालन करून त्यांना बसायला उत्तम आसन दिले. ॥ ३ ॥

**नारि सहित मुनि पद सिरु नावा । चरन सलिल सबु भवनु सिंचावा ॥**
**निज सौभाग्य बहुत गिरि बरना । सुता बोलि मेली मुनि चरना ॥**

नंतर आपल्या पत्नीसह त्याने मुनींच्या चरणी मस्तक ठेवले आणि त्यांचे चरणोदक घरभर शिंपडले. आपल्या भाग्याची त्याने वाखाणणी केली आणि मुलीला बोलावून मुनींच्या चरणी घातले. ॥ ४ ॥

दो०—**त्रिकालग्य सर्बग्य तुम्ह गति सर्बत्र तुम्हारि।**
**कहहु सुता के दोष गुन मुनिबर हृदयँ बिचारि॥ ६६॥**

(तो म्हणाला) 'हे मुनीश्वर, तुम्ही त्रिकालज्ञ आणि सर्वज्ञ आहात. आपला सर्वत्र संचार असतो. म्हणून आपण विचार करून मुलीचे गुण-दोष सांगा.'॥ ६६॥

**कह मुनि बिहसि गूढ़ मृदु बानी। सुता तुम्हारि सकल गुन खानी॥**
**सुंदर सहज सुसील सयानी। नाम उमा अंबिका भवानी॥**

नारदमुनींनी हसून रहस्यपूर्ण कोमल वाणीने म्हटले की, तुमची कन्या सर्व गुणांची खाण आहे. ही स्वभावानेही सुंदर, सुशील आणि समजुतदार आहे. उमा, अंबिका आणि भवानी अशी हिची नावे आहेत.॥ १॥

**सब लच्छन संपन्न कुमारी। होइहि संतत पियहि पिआरी॥**
**सदा अचल एहि कर अहिवाता। एहि तें जसु पैहहिं पितु माता॥**

ही कन्या सर्व सुलक्षणांनी संपन्न आहे. ही आपल्या पतीला सदा प्रिय असेल. हिचे सौभाग्य सदा अढळ राहील आणि हिच्यामुळे हिच्या माता-पित्यांना कीर्ती लाभेल.॥ २॥

**होइहि पूज्य सकल जग माहीं। एहि सेवत कछु दुर्लभ नाहीं॥**
**एहि कर नामु सुमिरि संसारा। त्रिय चढ़िहहिं पतिब्रत असिधारा॥**

ही संपूर्ण जगामध्ये पूज्य होईल आणि हिची सेवा केल्याने दुर्लभ असे काहीही असणार नाही. जगातील स्त्रिया हिचे नाम-स्मरण करीत पातिव्रत्याचे असिधाराव्रत सहजपणे पार पाडू शकतील.॥ ३॥

**सैल सुलच्छन सुता तुम्हारी। सुनहु जे अब अवगुन दुइ चारी॥**
**अगुन अमान मातु पितु हीना। उदासीन सब संसय छीना॥**

पर्वतराज, तुमची कन्या सुलक्षणी आहे. आता हिचे दोन-चार अवगुण आहेत, तेही ऐकून ठेवा. गुणहीन, मानहीन, माता-पिताविहीन, उदासीन,॥ ४॥

दो०—**जोगी जटिल अकाम मन नगन अमंगल बेष।**
**अस स्वामी एहि कहँ मिलिहि परी हस्त असि रेख॥ ६७॥**

संशयरहित, योगी, जटाधारी, निष्कामहृदय, नग्न व अमंगल वेषधारी असा पती हिला मिळेल. हिच्या हातावरील रेषा अशाच आहेत.॥ ६७॥

**सुनि मुनि गिरा सत्य जियँ जानी। दुख दंपतिहि उमा हरषानी॥**
**नारदहूँ यह भेदु न जाना। दसा एक समुझब बिलगाना॥**

नारद मुनींची वाणी ऐकून आणि ती खरी वाटून पति-पत्नी (हिमवान आणि मैना) या दोघांना वाईट वाटले. परंतु पार्वती आनंदित झाली. नारदांनाही त्याचे रहस्य उमजले नाही. कारण, सर्वांची बाह्य दशा एकसारखी असली, तरी आंतरिक भाव भिन्न होते.॥ १॥

**सकल सखीं गिरिजा गिरि मैना। पुलक सरीर भरे जल नैना॥**
**होइ न मृषा देवरिषि भाषा। उमा सो बचनु हृदयँ धरि राखा॥**

सर्व सख्या, पार्वती, पर्वतराज हिमवान आणि मैना या सर्वांचे अंग पुलकित झाले आणि सर्वांचे नेत्र सजल झाले. देवर्षींचे वचन असत्य होणार नाही, (हा विचार करून) पार्वतीने ते वचन आपल्या मनात कोरून ठेवले.॥ २॥

**उपजेउ सिव पद कमल सनेहू। मिलन कठिन मन भा संदेहू॥**
**जानि कुअवसरु प्रीति दुराई। सखी उछँग बैठी पुनि जाई॥**

तिला शंकरांच्या चरणी प्रेम उपजले, परंतु मनात संशय वाटत होता की, ते भेटणे कठीण आहे. वेळ–काळ पाहून उमेने आपले प्रेम लपवून ठेवले आणि ती सखीच्या मांडीवर जाऊन बसली.॥ ३॥

**झूठि न होइ देवरिषि बानी। सोचहिं दंपति सखीं सयानी॥**
**उर धरि धीर कहइ गिरिराऊ। कहहु नाथ का करिअ उपाऊ॥**

देवर्षींची वाणी खोटी ठरणार नाही या विचाराने हिमवान, मैना आणि सर्व चतुर सख्यांना काळजी पडली. मग धीर धरून पर्वतराजाने म्हटले की, 'हे नाथ, यावर उपाय काय करावा, ते सांगा.'॥ ४॥

दो०—**कह मुनीस हिमवंत सुनु जो बिधि लिखा लिलार।**
**देव दनुज नर नाग मुनि कोउ न मेटनिहार॥ ६८॥**

मुनीश्वर नारद म्हणाले, 'हे हिमवाना! ऐक. ब्रह्मदेवाने ललाटावर जे लिहिले आहे, ते देव, दानव, मनुष्य, नाग किंवा मुनी कोणीही पुसून टाकू शकत नाही.॥ ६८॥

**तदपि एक मैं कहउँ उपाई। होइ करै जौं दैउ सहाई॥**
**जस बरु मैं बरनेउँ तुम्ह पाहीं। मिलिहि उमहि तस संसय नाहीं॥**

तरीही मी एक उपाय सांगतो. दैवाची साथ मिळाली तर यश येईल. तुझ्यासमोर मी जसे वर्णन केले आहे, तसाच वर उमेला नक्की मिळेल.॥ १॥

**जे जे बर के दोष बखाने। ते सब सिव पहिं मैं अनुमाने॥**
**जौं बिबाहु संकर सन होई। दोषउ गुन सम कह सबु कोई॥**

मी जे वराचे दोष सांगितले, ते सर्व माझ्या अंदाजाप्रमाणे श्रीशिवांमध्ये आहेत. जर शिवांच्याबरोबर लग्न झाले, तर लोक दोषांनाच गुणांप्रमाणे मानतील.॥ २॥

**जौं अहि सेज सयन हरि करहीं। बुध कछु तिन्ह कर दोषु न धरहीं॥**
**भानु कृसानु सर्ब रस खाहीं। तिन्ह कहँ मंद कहत कोउ नाहीं॥**

ज्याप्रमाणे भगवान विष्णू हे शेषनागाच्या शय्येवर शयन करतात, तरीही पंडित त्यांना काही

दोष देत नाहीत. सूर्य व अग्निदेव बऱ्या-वाईट सर्व रसांचे सेवन करतात, म्हणून त्यांना कोणी वाईट म्हणत नाही. ॥ ३ ॥

**सुभ अरु असुभ सलिल सब बहई । सुरसरि कोउ अपुनीत न कहई ॥**
**समरथ कहुँ नहिं दोषु गोसाईं । रबि पावक सुरसरि की नाईं ॥**

गंगेमध्ये शुद्ध व अशुद्ध, सर्व पाणी वाहाते, परंतु गंगेला कोणी अपवित्र म्हणत नाही. सूर्य, अग्नी आणि गंगा यांच्याप्रमाणे समर्थाला कोणताही दोष लागत नाही. ॥ ४ ॥

दो०—**जौं अस हिसिषा करहिं नर जड़ बिबेक अभिमान।**
**परहिं कलप भरि नरक महुँ जीव कि ईस समान॥ ६९ ॥**

जेव्हा मूर्ख माणसे ज्ञानाच्या घमेंडीमुळे अशा प्रकारचे वर्तन करतात, तेव्हा ती कल्पांतापर्यंत नरकात पडतात. जीव हा ईश्वरासारखा (सर्वथा स्वतंत्र) होऊ शकेल काय?॥ ६९ ॥

**सुरसरि जल कृत बारुनि जाना । कबहुँ न संत करहिं तेहि पाना ॥**
**सुरसरि मिलें सो पावन जैसें । ईस अनीसहि अंतरु तैसें ॥**

गंगेच्या पाण्यापासून बनविलेली मदिरा असते, तरी संतजन काही ती पीत नाहीत. पण तीच (मदिरा) गंगेच्या प्रवाहात मिसळल्यावर पवित्र बनते. ईश्वर व जीव यांच्यामध्ये असाच फरक आहे. ॥ १ ॥

**संभु सहज समरथ भगवाना । एहि बिबाहँ सब बिधि कल्याना ॥**
**दुराराध्य पै अहहिं महेसू । आसुतोष पुनि किएँ कलेसू ॥**

शिव हे स्वभावतःच समर्थ आहेत, कारण ते भगवान आहेत. म्हणून या विवाहामध्ये सर्व प्रकारे कल्याण आहे. महादेवांची आराधना करणे मोठे कठीण आहे, तरीही तपाचे क्लेश सहन केल्यावर ते लगेच संतुष्ट होतात. ॥ २ ॥

**जौं तपु करै कुमारि तुम्हारी । भाविउ मेटि सकहिं त्रिपुरारी ॥**
**जद्यपि बर अनेक जग माहीं । एहि कहँ सिव तजि दूसर नाहीं ॥**

जर तुमच्या कन्येने तप केले, तर महादेव अनिष्ट प्रारब्ध नष्ट करू शकतील. जगात जरी अनेक वर असले, तरी हिच्यासाठी शिवांखेरीज दुसरा वर नाही. ॥ ३ ॥

**बर दायक प्रनतारति भंजन । कृपासिंधु सेवक मन रंजन ॥**
**इच्छित फल बिनु सिव अवराधें । लहिअ न कोटि जोग जप साधें ॥**

शिव हे वरदान देणारे, शरणागतांची दुःखे नाहीशी करणारे, कृपासागर आणि सेवकांचे मन प्रसन्न करणारे आहेत. शिवांची आराधना केल्याविना कोट्यवधी योग आणि जप करूनही इच्छित फल मिळत नाही'॥ ४ ॥

दो०—**अस कहि नारद सुमिरि हरि गिरिजहि दीन्हि असीस।**
**होइहि यह कल्यान अब संसय तजहु गिरीस॥ ७० ॥**

असे म्हणून भगवंतांचे स्मरण करीत नारदांनी पार्वतीला आशीर्वाद दिला. (आणि ते म्हणाले,) 'हे पर्वतराज, तुम्ही मनातला संशय काढून टाका. आता हे कल्याणच होईल.'॥ ७०॥

**कहि अस ब्रह्मभवन मुनि गयऊ। आगिल चरित सुनहु जस भयऊ॥**
**पतिहि एकांत पाइ कह मैना। नाथ न मैं समुझे मुनि बैना॥**

असे म्हणून नारदमुनी ब्रह्मलोकी निघून गेले. आता पुढे जे झाले, ते ऐका. एकांत मिळाल्यावर मैनाने पतीला म्हटले, हे नाथा, मुनींच्या वचनांचा अर्थ मला कळला नाही.॥ १॥

**जौं घरु बरु कुलु होइ अनूपा। करिअ बिबाहु सुता अनुरूपा॥**
**न त कन्या बरु रहउ कुआरी। कंत उमा मम प्रानपिआरी॥**

जर आपल्या मुलीसाठी अनुकूल घर, वर व कुळ उत्तम असेल तर विवाह करा. नाहीतर मुलगी कुमारी राहिली तरी चालेल. (अयोग्य वराशी तिचा विवाह करण्याची माझी इच्छा नाही), कारण हे स्वामी! पार्वती मला प्राणासारखी आवडती आहे.॥ २॥

**जौं न मिलिहि बरु गिरिजहि जोगू। गिरि जड़ सहज कहिहि सबु लोगू॥**
**सोइ बिचारि पति करेहु बिबाहू। जेहिं न बहोरि होइ उर दाहू॥**

जर पार्वतीला योग्य वर मिळाला नाही तर सर्व लोक म्हणतील की, पर्वत स्वभावतः जड (मूर्ख) असतात. हे स्वामी! या गोष्टीचा पूर्ण विचार करून विवाह करा. नंतर मनात पश्चात्ताप व्हायला नको.॥ ३॥

**अस कहि परी चरन धरि सीसा। बोले सहित सनेह गिरीसा॥**
**बरु पावक प्रगटै ससि माहीं। नारद बचनु अन्यथा नाहीं॥**

असे म्हणत मैनाने पतीच्या चरणी लोळण घेतली. तेव्हा हिमवानाने प्रेमाने म्हटले, 'चंद्रामधून एखादे वेळी अग्नी प्रकट होईल, पण नारदांचे वचन खोटे ठरणार नाही.॥ ४॥

दो०—**प्रिया सोचु परिहरहु सबु सुमिरहु श्रीभगवान।**
**पारबतिहि निरमयउ जेहिं सोइ करिहि कल्यान॥ ७१॥**

हे प्रिये, सर्व काळजी सोडून भगवंतांचे स्मरण कर. ज्यांनी पार्वतीला निर्मिले आहे, तेच तिचे कल्याण करतील.॥ ७१॥

**अब जौं तुम्हहि सुता पर नेहू। तौ अस जाइ सिखावनु देहू॥**
**करै सो तपु जेहिं मिलहिं महेसू। आन उपायँ न मिटिहि कलेसू॥**

तुझे कन्येवर प्रेम आहे, तेव्हा जाऊन तिला उपदेश कर की, शिव मिळतील, असे तप कर. दुसऱ्या कोणत्याही उपायाने हे क्लेश दूर होणार नाहीत.॥ १॥

**नारद बचन सगर्भ सहेतू। सुंदर सब गुन निधि बृषकेतू॥**
**अस बिचारि तुम्ह तजहु असंका। सबहि भाँति संकरु अकलंका॥**

नारदांचे बोलणे रहस्यपूर्ण आणि सकारण आहे. भगवान शिव हे सर्व गुणांचे भांडार आहेत. असा विचार करून तू (मिथ्या) संशय टाकून दे. शिव हे सर्वप्रकारे निष्कलंक आहेत.'॥ २॥

**सुनि पति बचन हरषि मन माहीं । गई तुरत उठि गिरिजा पाहीं ॥**
**उमहि बिलोकि नयन भरे बारी । सहित सनेह गोद बैठारी ॥**

पतीचे बोलणे ऐकून मैना प्रसन्न झाली आणि उठून लगेच पार्वतीजवळ गेली. पार्वतीला पाहून तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. तिने तिला आपल्या मांडीवर प्रेमाने बसविले. ॥ ३॥

**बारहिं बार लेति उर लाई । गदगद कंठ न कछु कहि जाई ॥**
**जगत मातु सर्बग्य भवानी । मातु सुखद बोलीं मृदु बानी ॥**

मग वारंवार ती पार्वतीला हृदयाशी कवटाळू लागली. प्रेमामुळे मैनेचा गळा भरून आला, त्यामुळे तिला काही बोलता येत नव्हते. जगज्जननी भवानी ही तर सर्वज्ञ होती. (आईच्या मनाची स्थिती ओळखून) ती आईला सुख देणाऱ्या कोमल वाणीने म्हणाली, ॥ ४॥

दो०—**सुनहि मातु मैं दीख अस सपन सुनावउँ तोहि।**
**सुंदर गौर सुबिप्रबर अस उपदेसेउ मोहि॥ ७२ ॥**

आई, ऐक. मी तुला सांगते की, मी एक स्वप्न पाहिले. मला एका सुंदर गौरवर्ण श्रेष्ठ ब्राह्मणाने असा उपदेश दिला आहे, ॥ ७२ ॥

**करहि जाइ तपु सैलकुमारी । नारद कहा सो सत्य बिचारी ॥**
**मातु पितहि पुनि यह मत भावा । तपु सुखप्रद दुख दोष नसावा ॥**

'हे पार्वती, नारदांनी जे सांगितले आहे, ते खरे मानून तू जाऊन तप कर. शिवाय ही गोष्ट तुझ्या माता-पित्यालाही आवडली आहे. तप हे सुख देणारे आणि दुःख-दोषांचा नाश करणारे आहे. ॥ १ ॥

**तपबल रचइ प्रपंचु बिधाता । तपबल बिष्नु सकल जग त्राता ॥**
**तपबल संभु करहिं संघारा । तपबल सेषु धरइ महिभारा ॥**

तपाच्या बळानेच ब्रह्मदेव सृष्टीची रचना करतात. तपाच्या बळावरच विष्णू सर्व जगाचे पालन करतात, तपाच्या बळानेच शंभू (रुद्ररूपाने जगाचा) संहार करतात आणि तपानेच शेष पृथ्वीचा भार धारण करतो. ॥ २ ॥

**तप अधार सब सृष्टि भवानी । करहि जाइ तपु अस जियँ जानी ॥**
**सुनत बचन बिसमित महतारी । सपन सुनायउ गिरिहि हँकारी ॥**

हे भवानी, संपूर्ण सृष्टी ही तपाच्या आधारे उभी आहे, हे मनात ओळखून तू जाऊन तप कर.' ही गोष्ट ऐकून माता मैनेला आश्चर्य वाटले आणि तिने हिमवानास बोलावून ते स्वप्न सांगितले. ॥ ३ ॥

**मातु पितहि बहुबिधि समुझाई। चलीं उमा तप हित हरषाई॥**
**प्रिय परिवार पिता अरु माता। भए बिकल मुख आव न बाता॥**

माता-पित्यांना पुष्कळ प्रकारे समजावून मोठ्या आनंदाने पार्वती तप करण्यास निघाली. प्रिय कुटुंबीय, पिता आणि माता सर्व व्याकूळ झाले. कोणाच्याही तोंडून शब्द फुटेना.॥ ४॥

दो०—**बेदसिरा मुनि आइ तब सबहि कहा समुझाइ।**
**पारबती महिमा सुनत रहे प्रबोधहि पाइ॥ ७३॥**

त्यावेळी वेदशिरा मुनींनी येऊन सर्वांना समजावले. पार्वतीचा महिमा ऐकल्यावर सर्वांना समाधान वाटले.॥ ७३॥

**उर धरि उमा प्रानपति चरना। जाइ बिपिन लागीं तपु करना॥**
**अति सुकुमार न तनु तप जोगू। पति पद सुमिरि तजेउ सबु भोगू॥**

पार्वती प्राणप्रिय पतीचे चरण हृदयामध्ये धारण करून वनामध्ये जाऊन तप करू लागली. पार्वतीचे अत्यंत सुकुमार शरीर तपासाठी योग्य नव्हते, तरीही पतीच्या चरणांचे स्मरण करीत, तिने सर्व भोग सोडून दिले.॥ १॥

**नित नव चरन उपज अनुरागा। बिसरी देह तपहिं मनु लागा॥**
**संबत सहस मूल फल खाए। सागु खाइ सत बरष गवाँए॥**

(तिच्या मनात) पतीच्या चरणी नित्य नवे प्रेम उपजू लागले आणि तपामध्ये तिचे मन असे गुंतले की, ती देहभान विसरून गेली. एक हजार वर्षे तिने कंदमुळे व फळे खाल्ली आणि नंतर शंभर वर्षे तिने भाजीपाला खाऊन घालविली.॥ २॥

**कछु दिन भोजनु बारि बतासा। किए कठिन कछु दिन उपबासा॥**
**बेल पाती महि परइ सुखाई। तीनि सहस संबत सोइ खाई॥**

काही दिवस तिने जल आणि वायूचे सेवन केले. नंतर काही दिवस कठोर उपवास केला. बेलाची पाने सुकून जी जमिनीवर पडत, ती तिने तीन हजार वर्षे भक्षण केली.॥ ३॥

**पुनि परिहरे सुखानेउ परना। उमहि नामु तब भयउ अपरना॥**
**देखि उमहि तप खीन सरीरा। ब्रह्मगिरा भै गगन गभीरा॥**

नंतर सुकलेली पानेसुद्धा खाणे तिने सोडून दिली. त्यामुळे पार्वतीचे नाव 'अपर्णा' पडले. तपामुळे उमेचे शरीर क्षीण झाल्याचे पाहून आकाशातून गंभीर ब्रह्मवाणी झाली.॥ ४॥

दो०—**भयउ मनोरथ सुफल तव सुनु गिरिराजकुमारि।**
**परिहरु दुसह कलेस सब अब मिलिहहिं त्रिपुरारि॥ ७४॥**

'हे पर्वतराज-कुमारी, ऐक. तुझे मनोरथ पूर्ण झाले. आता तू सर्व कठीण तपाचे क्लेश सोडून दे. आता तुला शिव भेटतील.॥ ७४॥

**अस तपु काहुँ न कीन्ह भवानी। भए अनेक धीर मुनि ग्यानी॥**
**अब उर धरहु ब्रह्म बर बानी। सत्य सदा संतत सुचि जानी॥**

हे भवानी, धैर्यवान मुनी आणि ज्ञानी पुष्कळ होऊन गेले, परंतु असे (कठोर) तप कुणी केले नाही. आता तू या श्रेष्ठ ब्रह्मदेवाची वाणी सदा सत्य व निरंतर पवित्र मानून आपल्या मनात बाळग.॥ १॥

**आवै पिता बोलावन जबहीं। हठ परिहरि घर जाएहु तबहीं॥**
**मिलहिं तुम्हहि जब सप्त रिषीसा। जानेहु तब प्रमान बागीसा॥**

जेव्हा तुझे वडील तुला बोलवायला येतील, तेव्हा हट्ट सोडून घरी जा. जेव्हा तुला सप्तर्षी भेटतील. तेव्हा ही वाणी खरी समज'॥ २॥

**सुनत गिरा बिधि गगन बखानी। पुलक गात गिरिजा हरषानी॥**
**उमा चरित सुंदर मैं गावा। सुनहु संभु कर चरित सुहावा॥**

आकाशातून सांगितली गेलेली ही ब्रह्मदेवांची वाणी ऐकून पार्वती प्रसन्न झाली आणि हर्षामुळे तिचे शरीर रोमांचित झाले. (याज्ञवल्क्य मुनी भरद्वाज मुनींना म्हणाले की,) मी पार्वतीचे सुंदर चरित्र ऐकविले. आता श्रीशिवांचे सुंदर चरित्र ऐका.॥ ३॥

**जब तें सतीं जाइ तनु त्यागा। तब तें सिव मन भयउ बिरागा॥**
**जपहिं सदा रघुनायक नामा। जहँ तहँ सुनहिं राम गुन ग्रामा॥**

जेव्हा सतीने (दक्षाच्या यज्ञात) जाऊन शरीर-त्याग केला, तेव्हापासून श्रीशिवांच्या मनात वैराग्य उत्पन्न झाले होते. ते नेहमी श्रीरामांचे नाम जपू लागले आणि जिकडे-तिकडे जाऊन श्रीरामांच्या गुणांच्या कथा श्रवण करू लागले.॥ ४॥

दो०—**चिदानंद सुखधाम सिव बिगत मोह मद काम।**
**बिचरहिं महि धरि हृदयँ हरि सकल लोक अभिराम॥ ७५॥**

चिदानंद, सुख-धाम, मोह-मद-कामरहित भगवान शंकर सर्व लोकांना आनंद देणाऱ्या भगवान श्रीरामांना हृदयामध्ये धारण करून (ध्यानमग्न अवस्थेत) पृथ्वीवर संचार करू लागले.॥ ७५॥

**कतहुँ मुनिन्ह उपदेसहिं ग्याना। कतहुँ राम गुन करहिं बखाना॥**
**जदपि अकाम तदपि भगवाना। भगत बिरह दुख दुखित सुजाना॥**

कुठे ते मुनींना ज्ञानाचा उपदेश करीत, तर कुठे श्रीरामांच्या गुणांचे वर्णन करीत होते. जरी ज्ञानी शिव हे निष्काम आहेत, तरीही ते आपल्या भक्ताला (सतीला) झालेल्या वियोगाच्या दुःखामुळे दुःखी होते.॥ १॥

**एहि बिधि गयउ कालु बहु बीती। नित नै होइ राम पद प्रीती॥**
**नेमु प्रेमु संकर कर देखा। अबिचल हृदयँ भगति कै रेखा॥**

अशा रीतीने बराच काळ लोटला. श्रीरामचरणांवरील प्रेम दिवसेंदिवस वाढत होते. श्रीशंकरांचे कठोर नियम, अनन्य प्रेम व अंत:करणातील अढळ भक्ती जेव्हा श्रीरामांनी पाहिली,॥ २॥

**प्रगटे रामु कृतग्य कृपाला। रूप सील निधि तेज बिसाला॥**
**बहु प्रकार संकरहि सराहा। तुम्ह बिनु अस ब्रतु को निरबाहा॥**

तेव्हा कृतज्ञ, कृपाळू, रूप-शीलाचे भांडार, अत्यंत तेज:पुंज भगवान श्रीराम प्रकट झाले. त्यांनी पुष्कळ प्रकारे श्रीशिवांची वाखाणणी केली आणि म्हटले, 'तुमच्याशिवाय असे (कठीण) व्रत कोण करू शकणार?'॥ ३॥

**बहुबिधि राम सिवहि समुझावा। पारबती कर जन्मु सुनावा॥**
**अति पुनीत गिरिजा कै करनी। बिस्तर सहित कृपानिधि बरनी॥**

श्रीरामांनी अनेक प्रकारे शिवांचे सांत्वन केले आणि पार्वतीच्या जन्माची वार्ता सांगितली. कृपानिधान श्रीरामांनी पार्वतीच्या अत्यंत पवित्र कृतीचे विस्ताराने वर्णन केले.॥ ४॥

दो०—**अब बिनती मम सुनहु सिव जौं मो पर निज नेहु।**
**जाइ बिबाहहु सैलजहि यह मोहि मागें देहु॥ ७६॥**

नंतर ते शिवांना म्हणाले, 'हे शंकरा, जर तुमचे माझ्यावर (खरेच) प्रेम असेल तर आता माझी विनंती ऐका. माझी इच्छा आहे की, तुम्ही जाऊन पार्वतीचे पाणिग्रहण करावे!'॥ ७६॥

**कह सिव जदपि उचित अस नाहीं। नाथ बचन पुनि मेटि न जाहीं॥**
**सिर धरि आयसु करिअ तुम्हारा। परम धरमु यह नाथ हमारा॥**

शिव म्हणाले, 'जरी हे योग्य नाही, तरी स्वामींचे म्हणणे मला टाळता येणार नाही. हे नाथ! तुमची आज्ञा शिरसामान्य करणे, हाच माझा परम धर्म आहे.॥ १॥

**मातु पिता गुर प्रभु कै बानी। बिनहिं बिचार करिअ सुभ जानी॥**
**तुम्ह सब भाँति परम हितकारी। अग्या सिर पर नाथ तुम्हारी॥**

माता, पिता, गुरू आणि स्वामी यांचे सांगणे काहीही विचार न करता कल्याणकारक समजून मान्य करायला हवे. शिवाय तुम्ही तर माझे परम हितकारी आहात. म्हणून हे नाथ! तुमची आज्ञा मला शिरसावंद्य आहे.॥ २॥

**प्रभु तोषेउ सुनि संकर बचना। भक्ति बिबेक धर्म जुत रचना॥**
**कह प्रभु हर तुम्हार पन रहेऊ। अब उर राखेहु जो हम कहेऊ॥**

शंकरांची भक्ती, ज्ञान व धर्म यांनी युक्त असे बोलणे ऐकून श्रीराम प्रसन्न झाले. प्रभू म्हणाले, 'हे हरा, तुमची प्रतिज्ञा पूर्ण झाली. आता मी जे सांगितले आहे, ते लक्षात ठेवा.'॥ ३ ॥

**अंतरधान भए अस भाषी। संकर सोइ मूरति उर राखी॥**
**तबहिं सप्तरिषि सिव पहिं आए। बोले प्रभु अति बचन सुहाए॥**

असे म्हणून श्रीराम अंतर्धान पावले. शिवांनी त्यांची ती मूर्ती आपल्या हृदयात धारण करून ठेवली. त्याच वेळी सप्तर्षी शिवांच्याकडे आले. प्रभू महादेवांनी त्यांना गोड शब्दात सांगितले, ॥ ४ ॥

दो०—**पारबती पहिं जाइ तुम्ह प्रेम परिच्छा लेहु।**
**गिरिहि प्रेरि पठएहु भवन दूरि करेहु संदेहु॥ ७७॥**

तुम्ही पार्वतीकडे जाऊन तिच्या प्रेमाची पारख करून घ्या आणि हिमाचलाला सांगून (त्यांना पार्वतीस आणण्यास पाठवा व) पार्वतीला घरी पाठवून द्या आणि त्यांच्या मनातील संशय दूर करा. ॥ ७७ ॥

**रिषिन्ह गौरि देखी तहँ कैसी। मूरतिमंत तपस्या जैसी॥**
**बोले मुनि सुनु सैलकुमारी। करहु कवन कारन तपु भारी॥**

सप्तर्षींनी (तेथे जाऊन पाहिले) तर पार्वती जणू मूर्तिमंत तपस्याच होती. मुनी म्हणाले, हे शैलकुमारी, ऐक. तू कशासाठी इतके कठोर तप करीत आहेस?॥ १ ॥

**केहि अवराधहु का तुम्ह चहहू। हम सन सत्य मरमु किन कहहू॥**
**कहत बचन मनु अति सकुचाई। हँसिहहु सुनि हमारि जड़ताई॥**

तू कोणाची आराधना करीत आहेस आणि तुझी इच्छा काय आहे? आम्हांला आपले गुपित खरे खरे का सांगत नाहीस? (पार्वती म्हणाली,) 'सांगताना मनात मोठा संकोच वाटतो. तुम्ही माझा मूर्खपणा ऐकून हसाल. ॥ २ ॥

**मनु हठ परा न सुनइ सिखावा। चहत बारि पर भीति उठावा॥**
**नारद कहा सत्य सोइ जाना। बिनु पंखन्ह हम चहहिं उड़ाना॥**

माझ्या मनाने हट्ट धरला आहे, काही केल्या ते ऐकत नाही आणि पाण्यावर भिंत उभी करावी, असे त्याला वाटते. नारदांनी जे सांगितले होते, ते खरे मानून मी पंखाविना उडू इच्छिते. ॥ ३ ॥

**देखहु मुनि अबिबेकु हमारा। चाहिअ सदा सिवहि भरतारा॥**

मुनींनो, तुम्ही माझा वेडेपणा पाहा की, शिवांना आपला पती बनविण्याची माझी कामना आहे.'॥ ४ ॥

दो०—**सुनत बचन बिहसे रिषय गिरिसंभव तव देह।**
**नारद कर उपदेसु सुनि कहहु बसेउ किसु गेह॥ ७८॥**

पार्वतीचे बोलणे ऐकून ऋषी हसले आणि म्हणाले, 'तुझा देह पर्वतापासून उत्पन्न झाला आहे, (म्हणूनच तू अशी मंदबुद्धी आहेस.) सांग, नारदांचा उपदेश ऐकून आजवर कुणाचे घर नांदले आहे बरे?॥ १॥

**दच्छसुतन्ह उपदेसेन्हि जाई। तिन्ह फिरि भवनु न देखा आई॥**
**चित्रकेतु कर घरु उन घाला। कनककसिपु कर पुनि अस हाला॥**

त्यांनी जाऊन दक्षाच्या मुलांना उपदेश दिला होता, त्यामुळे पुन्हा कधी परत येऊन त्यांनी घराचे तोंडही पाहिले नाही. चित्रकेतूचे घर नारदानेच उध्वस्त केले. नंतर हीच परिस्थिती हिरण्यकशिपूची झाली.॥ १॥

**नारद सिख जे सुनहिं नर नारी। अवसि होहिं तजि भवनु भिखारी॥**
**मन कपटी तन सज्जन चीन्हा। आपु सरिस सबही चह कीन्हा॥**

जे स्त्री-पुरुष नारदांचे म्हणणे ऐकतात, ते घरदार सोडून नक्कीच भिकारी होतात. त्यांचे मन कपटी आहे, मात्र शरीरावर सज्जनपणाची चिन्हे ते मिरवतात. ते सर्वांना आपल्यासारखे बनवू इच्छितात.॥ २॥

**तेहि कें बचन मानि बिस्वासा। तुम्ह चाहहु पति सहज उदासा॥**
**निर्गुन निलज कुबेष कपाली। अकुल अगेह दिगंबर ब्याली॥**

त्यांच्या (नारदांच्या) बोलण्यावर विश्वास ठेवून तुला असा पती हवासा वाटला की जो स्वभावाने उदासीन, गुणहीन, निर्लज्ज, अशोभनीय वेश धारण करणारा, नर-कपालांची माला धारण करणारा, कुलहीन, घर-दार नसलेला, नग्न आणि शरीरावर साप लपेटून घेणारा आहे.॥ ३॥

**कहहु कवन सुखु अस बरु पाएँ। भल भूलिहु ठग के बौराएँ॥**
**पंच कहें सिवँ सती बिबाही। पुनि अवडेरि मराएन्हि ताही॥**

असा वर मिळाल्यावर तुला सुख मिळेल काय, ते सांग. तू त्या लबाडाच्या (नारदाच्या) बहकावण्यावर चांगलीच फसलीस. पूर्वी पंचांनी सांगितल्यामुळे शिवांनी सतीशी विवाह केला, परंतु नंतर तिला त्याग करून मारून टाकले.॥ ४॥

दो०—**अब सुख सोवत सोचु नहिं भीख मागि भव खाहिं।**
**सहज एकाकिन्ह के भवन कबहुँ कि नारि खटाहिं॥ ७९॥**

आता शिवांना काही काळजी उरली नाही. भीक मागून खातात, आणि सुखाने झोपतात. अशा स्वभावाच्या एकट्या राहाणाऱ्यांच्या घरात कधी कुणी स्त्री टिकेल काय बरे?॥ ७९॥

**अजहूँ मानहु कहा हमारा। हम तुम्ह कहुँ बरु नीक बिचारा॥**
**अति सुंदर सुचि सुखद सुसीला। गावहिं बेद जासु जस लीला॥**

अजुनी आमचे म्हणणे मान. आम्ही तुझ्यासाठी चांगला वर पाहिला आहे. तो फारच सुंदर, पवित्र, सुखदायक आणि सुशील आहे. त्याचे यशोगान व लीलागान वेद करतात.॥ १॥

**दूषन रहित सकल गुन रासी। श्रीपति पुर बैकुंठ निवासी॥**
**अस बरु तुम्हहि मिलाउब आनी। सुनत बिहसि कह बचन भवानी॥**

तो दोषरहित आहे, सर्व गुणांचे भांडार आहे, लक्ष्मीचा स्वामी आहे आणि वैकुंठपुरात राहाणारा आहे. आम्ही अशा वराशी तुझी भेट घालून देतो.' हे ऐकताच पार्वती हसून म्हणाली,॥ २॥

**सत्य कहेहु गिरिभव तनु एहा। हठ न छूट छूटै बरु देहा॥**
**कनकउ पुनि पषान तें होई। जारेहुँ सहजु न परिहर सोई॥**

'माझे शरीर पर्वतापासून उत्पन्न झाले आहे, हे तुम्ही बरोबरच सांगितले आहे. म्हणून शरीर सुटले तरी माझा हट्ट सुटणार नाही. सोने हे सुद्धा पाषाणापासून बनते. म्हणूनच ते जाळल्यावर देखील आपला स्वभाव (उजळपणा) सोडत नाही.॥ ३॥

**नारद बचन न मैं परिहरऊँ। बसउ भवनु उजरउ नहिं डरऊँ॥**
**गुर कें बचन प्रतीति न जेही। सपनेहुँ सुगम न सुख सिधि तेही॥**

म्हणून नारदांचे वचन मी मोडणार नाही. मग घर नांदो अगर उध्वस्त होवो, त्याला मी भीत नाही. ज्याचा गुरूंच्या वचनांवर विश्वास नसतो, त्याला सुख व सिद्धी स्वप्नातही लाभत नाही.॥ ४॥

दो०—**महादेव अवगुन भवन बिष्नु सकल गुन धाम।**
**जेहि कर मनु रम जाहि सन तेहि तेही सन काम॥ ८०॥**

महादेव अवगुणांचे माहेर आहेत आणि विष्णू सर्व सद्‌गुणांचे धाम आहेत, असे जरी मानले, तरी ज्याचे मन ज्याच्या ठिकाणी रमते, त्याला त्याच्याशीच कर्तव्य असते.॥ ८०॥

**जौं तुम्ह मिलतेहु प्रथम मुनीसा। सुनतिउँ सिख तुम्हारि धरि सीसा॥**
**अब मैं जन्मु संभु हित हारा। को गुन दूषन करै बिचारा॥**

हे मुनीश्वरांनो, तुम्ही जर मला पूर्वी भेटला असता, तर मी तुमचा उपदेश (कदाचित) शिरोधार्य मानला असता. परंतु आता मी आपला जन्म शिवांना अर्पण केलेला आहे. मग गुण-दोषांचा विचार कोण करणार?॥ १॥

**जौं तुम्हरे हठ हृदयँ बिसेषी। रहि न जाइ बिनु किएँ बरेषी॥**
**तौ कौतुकिअन्ह आलसु नाहीं। बर कन्या अनेक जग माहीं॥**

जर तुमचा फारच हट्ट असेल आणि विवाहाविषयी बोलण्याविना तुम्हांला चैन पडत नसेल, तर जगात वर व कन्या पुष्कळ आहेत. गंमत करणाऱ्यांना आळस नसतो. (म्हणून ही गंमत आणखी कुठेतरी जाऊन करा.)॥ २॥

**जन्म कोटि लगि रगर हमारी। बरउँ संभु न त रहउँ कुआरी॥**
**तजउँ न नारद कर उपदेसू। आपु कहहिं सत बार महेसू॥**

वरायचे तर श्रीशिवांनाच वरीन, हाच माझा कोट्यवधी जन्मांपर्यंत आग्रह राहील. नाहीतर मी कुमारीच राहीन. स्वत: शिवांनी शंभर वेळा जरी मला सांगितले, तरी मी नारदांचा उपदेश सोडून देणार नाही.'॥ ३॥

**मैं पा परउँ कहइ जगदंबा। तुम्ह गृह गवनहु भयउ बिलंबा॥**
**देखि प्रेमु बोले मुनि ग्यानी। जय जय जगदंबिके भवानी॥**

जगज्जननी पार्वती पुढे म्हणाली की, 'मी तुमच्या पाया पडते. तुम्ही आपल्या घरी परत जा. खूप उशीर झाला आहे.' (शिवांच्याविषयी पार्वतीचे असे) अढळ प्रेम पाहून ज्ञानी मुनी म्हणाले की, 'हे जगज्जननी, हे भवानी, तुझा विजय असो, विजय असो.॥ ४॥

**दो०—तुम्ह माया भगवान सिव सकल जगत पितु मातु।**
**नाइ चरन सिर मुनि चले पुनि पुनि हरषत गातु॥ ८१॥**

तू माया असून शिव हे परमात्मा आहेत. तुम्ही दोघे संपूर्ण विश्वाचे माता-पिता आहात.' (असे म्हणून) मुनी पार्वतीच्या पाया पडून निघाले. (पार्वतीचा भाव पाहून) त्यांचे देह वारंवार रोमांचित होत होते.॥ ८१॥

**जाइ मुनिन्ह हिमवंतु पठाए। करि बिनती गिरजहिं गृह ल्याए॥**
**बहुरि सप्तरिषि सिव पहिं जाई। कथा उमा कै सकल सुनाई॥**

मुनींनी जाऊन हिमवानाला पार्वतीकडे पाठविले आणि त्याला सांगितले की, पार्वतीची समजूत घालून तिला घरी घेऊन या. नंतर सप्तर्षी शंकरांच्याजवळ गेले आणि त्यांनी पार्वतीची सगळी कथा त्यांना सांगितली.॥ १॥

**भए मगन सिव सुनत सनेहा। हरषि सप्तरिषि गवने गेहा॥**
**मनु थिर करि तब संभु सुजाना। लगे करन रघुनायक ध्याना॥**

पार्वतीचे प्रेम ऐकून शिव आनंदमग्न झाले. सप्तर्षी प्रसन्न होऊन आपल्या घरी ब्रह्मलोकी गेले. तेव्हा ज्ञानी भगवान शिव मन स्थिर करून श्रीरामांचे ध्यान करू लागले.॥ २॥

**तारकु असुर भयउ तेहि काला। भुज प्रताप बल तेज बिसाला॥**
**तेहिं सब लोक लोकपति जीते। भए देव सुख संपति रीते॥**

त्याच सुमारास तारकासुर उत्पन्न झाला होता. त्याचे बाहुबल, प्रताप व तेज प्रचंड होते. त्याने सर्व लोक आणि लोकपालांना जिंकले. त्यामुळे सर्व देव सुख-संपत्तिहीन झाले.॥ ३॥

**अजर अमर सो जीति न जाई। हारे सुर करि बिबिध लराई॥**
**तब बिरंचि सन जाइ पुकारे। देखे बिधि सब देव दुखारे॥**

तारकासुर अजरामर होता, म्हणून त्याला कोणीही जिंकू शकत नव्हते. देवांनी त्याच्याबरोबर

पुष्कळ युद्धे केली, पण ते पराभूत झाले. तेव्हा ते ब्रह्मदेवांपाशी जाऊन गाऱ्हाणे सांगू लागले. ब्रह्मदेवांनी सर्व देवांचे दु:ख प्रत्यक्ष पाहिले.॥ ४॥

**दो०—सब सन कहा बुझाइ बिधि दनुज निधन तब होइ।**
**संभु सुक्र संभूत सुत एहि जीतइ रन सोइ॥ ८२॥**

ब्रह्मदेवांनी सर्वांना समजावून सांगितले की, 'भगवान शिवांच्या तेजापासून जेव्हा पुत्र जन्माला येईल, तेव्हा तो या दैत्याला युद्धात जिंकेल व त्यात त्याचा मृत्यू होईल.॥ ८२॥

**मोर कहा सुनि करहु उपाई। होइहि ईस्वर करिहि सहाई॥**
**सतीं जो तजी दच्छ मख देहा। जनमी जाइ हिमाचल गेहा॥**

मी सांगतो, तो उपाय करा. ईश्वराचे साहाय्य लाभेल व तुमचे काम होईल. सतीने दक्षाच्या यज्ञात देहत्याग केला होता, तिनेच आता हिमालयाच्या घरी जन्म घेतला आहे.॥ १॥

**तेहिं तपु कीन्ह संभु पति लागी। सिव समाधि बैठे सबु त्यागी॥**
**जदपि अहइ असमंजस भारी। तदपि बात एक सुनहु हमारी॥**

तिने भगवान शिव पती व्हावे, म्हणून तप केले आहे आणि इकडे शिव हे सर्व काही सोडून देऊन समाधी लावून बसले आहेत. ही मोठी घोटाळ्याची स्थिती आहे, परंतु मी सांगतो ते ऐका.॥ २॥

**पठवहु कामु जाइ सिव पाहीं। करै छोभु संकर मन माहीं॥**
**तब हम जाइ सिवहि सिर नाई। करवाउब बिबाहु बरिआई॥**

तुम्ही जाऊन कामदेवाला शिवांच्याकडे पाठवून द्या. तो शिवांच्या मनात क्षोभ उत्पन्न करील. (त्यांची समाधी भंग करील.) तेव्हा आपण जाऊन शिवांच्या चरणी मस्तक ठेवू आणि हट्ट धरून (त्यांना लग्नासाठी प्रवृत्त करून) त्यांचे लग्न करू.'॥ ३॥

**एहि बिधि भलेहिं देवहित होई। मत अति नीक कहइ सबु कोई॥**
**अस्तुति सुरन्ह कीन्हि अति हेतू। प्रगटेउ बिषमबान झषकेतू॥**

असे झाले तरच देवांचे कल्याण होईल. सर्वजण म्हणाले, 'हा विचार चांगला आहे.' नंतर देवांनी मोठ्या प्रेमाने कामदेवाची स्तुती केली, तेव्हा माशाचा ध्वज असणारा पंचबाण कामदेव प्रकट झाला.॥ ४॥

**दो०—सुरन्ह कही निज बिपति सब सुनि मन कीन्ह बिचार।**
**संभु बिरोध न कुसल मोहि बिहसि कहेउ अस मार॥ ८३॥**

देवांनी आपले संकट कामदेवाला सांगितले. ते ऐकून कामदेवाने विचार केला आणि हसत म्हटले, 'शिवांशी विरोध करण्यामध्ये माझे काही खरे नाही.॥ ८३॥

**तदपि करब मैं काजु तुम्हारा। श्रुति कह परम धरम उपकारा॥**
**पर हित लागि तजइ जो देही। संतत संत प्रसंसहिं तेही॥**

तरीही तुमचे काम मी करीन, कारण वेद दुसऱ्यावर केलेल्या उपकारास परमधर्म म्हणतात. जो दुसऱ्याच्या हितासाठी आपल्या शरीराचाही त्याग करतो, त्याचीच संत प्रशंसा करतात.'॥ १॥

**अस कहि चलेउ सबहि सिरु नाई। सुमन धनुष कर सहित सहाई॥**
**चलत मार अस हृदयँ बिचारा। सिव बिरोध ध्रुव मरनु हमारा॥**

असे म्हणून आणि सर्वांना नमस्कार करून कामदेव आपले पुष्प-धनुष्य हाती घेऊन वसंतादी सहायकांबरोबर निघाला. जात असताना कामदेवाच्या मनात विचार आला की, शिवांशी विरोध केल्याने माझे मरण नक्की ओढवणार आहे.॥ २॥

**तब आपन प्रभाउ बिस्तारा। निज बस कीन्ह सकल संसारा॥**
**कोपेउ जबहिं बारिचरकेतू। छन महुँ मिटे सकल श्रुति सेतू॥**

तेव्हा त्याने आपला प्रभाव टाकला आणि संपूर्ण जगाला आपल्या अधीन बनविले. ज्यावेळी कामदेव संतापला, तेव्हा एका क्षणात वेदांची सर्व मर्यादा धुळीला मिळाली.॥ ३॥

**ब्रह्मचर्ज ब्रत संजम नाना। धीरज धरम ग्यान बिग्याना॥**
**सदाचार जप जोग बिरागा। सभय बिबेक कटकु सबु भागा॥**

ब्रह्मचर्य, व्रत, नाना प्रकारचे संयम, धैर्य, धर्म, ज्ञान, विज्ञान, सदाचार, जप, योग, वैराग्य इत्यादी विवेकाची संपूर्ण सेना घाबरून पळून गेली.॥ ४॥

छं०—**भागेउ बिबेकु सहाय सहित सो सुभट संजुग महि मुरे।**
**सदग्रंथ पर्बत कंदरन्हि महुँ जाइ तेहि अवसर दुरे॥**
**होनिहार का करतार को रखवार जग खरभरु परा।**
**दुइ माथ केहि रतिनाथ जेहि कहुँ कोपि कर धनु सरु धरा॥**

विवेक आपल्या सहाय्यकांच्यासह पळून गेला. त्याचे योद्धे युद्ध-भूमीवरून पाठ फिरवून निघाले. त्यावेळी ते सर्व सद्ग्रंथरूपी पर्वतांच्या कडे-कपाऱ्यात जाऊन लपून बसले. (अर्थात ज्ञान, वैराग्य, संयम, नियम, सदाचार इत्यादी फक्त ग्रंथांमध्ये उरले, त्यांचे आचरण संपले.) संपूर्ण जगात खळबळ माजली. (सर्वजण म्हणू लागले,) हे विधात्या! आता काय होणार? आमचे रक्षण कोण करणार? असा दोन शिरांचा कोण आहे की, ज्याच्यासाठी रतीचा पती कामदेव याने कोप धरून हातामध्ये धनुष्यबाण उचलला आहे?

दो०—**जे सजीव जग अचर चर नारि पुरुष अस नाम।**
**ते निज निज मरजाद तजि भए सकल बस काम॥ ८४॥**

जगामध्ये जे स्त्री-पुरुषरूप जितके चराचर प्राणी होते, ते सर्व आपापली मर्यादा सोडून कामवश झाले. ॥ ८४ ॥

**सब के हृदयँ मदन अभिलाषा । लता निहारि नवहिं तरु साखा ॥**
**नदीं उमगि अंबुधि कहुँ धाईं । संगम करहिं तलाव तलाईं ॥**

सर्वांच्या मनात कामाची इच्छा उत्पन्न झाली. लतांना पाहून वृक्षांच्या फांद्या झुकू लागल्या. नद्या चेकाळून समद्राकडे धावू लागल्या आणि तलाव व तळ्या परस्परांशी संगम करू लागल्या. ॥ १ ॥

**जहँ असि दसा जड़न्ह कै बरनी । को कहि सकइ सचेतन करनी ॥**
**पसु पच्छी नभ जल थल चारी । भए कामबस समय बिसारी ॥**

जर अचेतन (वृक्ष, नदी इत्यादी) पदार्थांची अशी अवस्था झाली तर मग चेतन जीवांबद्दल काय सांगायचे ? आकाश, जल आणि पृथ्वीवर संचार करणारे सर्व पशु-पक्षी (आपल्या संयोगाचा) काळ विसरून काम-वश झाले. ॥ २ ॥

**मदन अंध ब्याकुल सब लोका । निसि दिनु नहिं अवलोकहिं कोका ॥**
**देव दनुज नर किंनर ब्याला । प्रेत पिसाच भूत बेताला ॥**

सर्वजण कामांध होऊन व्याकूळ झाले. चक्रवाक पक्षी व पक्षिणी यांनी रात्र-दिवस पाहिला नाही. देव, दैत्य, मनुष्य, किन्नर, सर्प, प्रेत, पिशाच, भूत, वेताल, ॥ ३ ॥

**इन्ह कै दसा न कहेउँ बखानी । सदा काम के चेरे जानी ॥**
**सिद्ध बिरक्त महामुनि जोगी । तेपि कामबस भए बियोगी ॥**

हे सर्वजण नेहमीच कामाचे गुलाम असतात. म्हणून मी त्यांच्या अवस्थेचे वर्णन केलेले नाही. सिद्ध, विरक्त, महामुनी आणि महान योगी हे सुद्धा कामवश झाल्यामुळे योगापासून ढळले आणि स्त्रीच्या विरहाने पीडित झाले. ॥ ४ ॥

**छं०—भए कामबस जोगीस तापस पावँरन्हि की को कहै ।**
**देखहिं चराचर नारिमय जे ब्रह्ममय देखत रहे ॥**
**अबला बिलोकहिं पुरुषमय जगु पुरुष सब अबलामयं ।**
**दुइ दंड भरि ब्रह्मांड भीतर कामकृत कौतुक अयं ॥**

जेव्हा योगीश्वर व तपस्वीसुद्धा कामाला वश झाले, मग बिचाऱ्या मनुष्यांबद्दल काय सांगायचे ? ज्या लोकांना संपूर्ण चराचर सृष्टी ब्रह्ममय दिसत होती, त्यांना आता सर्व जग स्त्रीमय दिसू लागले. स्त्रियांना सर्व जग पुरुषमय दिसू लागले, तर पुरुषांना ते स्त्रीमय दिसू लागले. दोन घटिका संपूर्ण ब्रह्मांडात कामदेवाने मांडलेले हे कौतुक दिसून आले.

**सो०—धरी न काहूँ धीर सब के मन मनसिज हरे।**
**जे राखे रघुबीर ते उबरे तेहि काल महुँ॥ ८५॥**

कुणालाही मन आवरता येईना. कामदेवाने सर्वांचे मन हरण केले. श्रीरामांनी ज्यांचे रक्षण केले, फक्त तेवढेच भक्त (कामदेवाच्या प्रभावापासून) त्यावेळी वाचले.॥ ८५॥

**उभय घरी अस कौतुक भयऊ। जौ लगि कामु संभु पहिं गयऊ॥**
**सिवहि बिलोकि ससंकेउ मारू। भयउ जथाथिति सबु संसारू॥**

दोन घटिका असा तमाशा झाला, तोपर्यंत कामदेव श्रीशिवांच्या जवळ पोहोचला. त्यांना पाहून कामदेव चपापला, तेव्हा संपूर्ण जग पूर्वीप्रमाणे स्थिर झाले.॥ १॥

**भए तुरत सब जीव सुखारे। जिमि मद उतरि गएँ मतवारे॥**
**रुद्रहि देखि मदन भय माना। दुराधरष दुर्गम भगवाना॥**

ज्याप्रमाणे नशा उतरताच दारुडे लोक शांत होतात, त्याप्रमाणे सर्व जीव शांत झाले. अजिंक्य व अनाकलनीय अशा भगवान रुद्रांना पाहून कामदेव भ्याला.॥ २॥

**फिरत लाज कछु करि नहिं जाई। मरनु ठानि मन रचेसि उपाई॥**
**प्रगटेसि तुरत रुचिर रितुराजा। कुसुमित नव तरु राजि बिराजा॥**

त्याला परत फिरण्याची लाज वाटत होती आणि काही करताही येत नव्हते. शेवटी त्याने मरायचे ठरवून एक उपाय योजला. त्याने लगेच सुंदर ऋतुराज वसंत प्रकट केला. फुललेल्या वृक्षांच्या रांगा शोभून दिसू लागल्या.॥ ३॥

**बन उपबन बापिका तड़ागा। परम सुभग सब दिसा बिभागा॥**
**जहँ तहँ जनु उमगत अनुरागा। देखि मुएहुँ मन मनसिज जागा॥**

वने-उपवने, विहिरी-तलाव आणि सर्व दिशांचे प्रदेश रमणीय दिसू लागले. जिकडे-तिकडे जणू प्रेम उसळू लागले. ते पाहून मेलेल्या मनांमध्येही कामदेव जागा झाला.॥ ४॥

**छं०—जागइ मनोभव मुएहुँ मन बन सुभगता न परै कही।**
**सीतल सुगंध सुमंद मारुत मदन अनल सखा सही॥**
**बिकसे सरन्हि बहु कंज गुंजत पुंज मंजुल मधुकरा।**
**कलहंस पिक सुक सरस रव करि गान नाचहिं अपछरा॥**

मेलेल्या मनातही कामदेव जागा झाला, वनाचे सौंदर्य तर सांगण्यापलीकडचे होते. कामरूपी अग्नीचा सच्चा मित्र शीतल-मंद-सुगंधित पवन वाहू लागला. सरोवरात पुष्कळ कमळे उमलली व

त्यांवर भ्रमरसमूह मधुर गुंजारव करू लागले. राजहंस, कोकिळा आणि पोपट हे मधुर बोल बोलू लागले आणि अप्सरा गात-गात नाचू लागल्या.

**दो०—सकल कला करि कोटि बिधि हारेउ सेन समेत।**
**चली न अचल समाधि सिव कोपेउ हृदयनिकेत॥ ८६ ॥**

कामदेवाने आपल्या सर्व सेनेसह कोट्यवधी कळा दाखवूनही तो हरला. कारण श्रीशिवांची अढळ समाधी भंग पावली नाही. तेव्हा कामदेव संतापला. ॥ ८६ ॥

**देखि रसाल बिटप बर साखा। तेहि पर चढ़ेउ मदनु मन माखा॥**
**सुमन चाप निज सर संधाने। अति रिस ताकि श्रवन लगि ताने॥**

त्याने आम्रवृक्षाची एक सुंदर फांदी पाहिली आणि मनात चिडलेला मदन तिच्यावर चढला. त्याने पुष्प-धनुष्यावर आपले पाचही बाण चढविले आणि मोठ्या त्वेषाने लक्ष्य पाहून धनुष्य आकर्ण ताणले. ॥ १ ॥

**छाड़े बिषम बिसिख उर लागे। छूटि समाधि संभु तब जागे॥**
**भयउ ईस मन छोभु बिसेषी। नयन उघारि सकल दिसि देखी॥**

आणि कामदेवाने तीक्ष्ण बाण सोडले, ते शिवांच्या हृदयाला लागले. त्यांची समाधी भंगली आणि ते जागे झाले. शिवांचे मन प्रक्षुब्ध झाले. त्यांनी डोळे उघडून इकडे तिकडे पाहिले. ॥ २ ॥

**सौरभ पल्लव मदनु बिलोका। भयउ कोपु कंपेउ त्रैलोका॥**
**तब सिवँ तीसर नयन उघारा। चितवत कामु भयउ जरि छारा॥**

आंब्याच्या पानात दडलेल्या कामदेवाला पाहून त्यांना अतिशय क्रोध आला, त्यामुळे त्रैलोक्याचा थरकाप उडाला. तेव्हा शिवांनी तिसरा नेत्र उघडला आणि त्यांनी पाहताच कामदेव भस्म होऊन गेला. ॥ ३ ॥

**हाहाकार भयउ जग भारी। डरपे सुर भए असुर सुखारी॥**
**समुझि कामसुखु सोचहिं भोगी। भए अकंटक साधक जोगी॥**

जगामध्ये मोठा हाहाकार उडाला. देव घाबरून गेले तर दैत्य आनंदित झाले. भोगी लोक कामसुखाची आठवण करीत काळजीत पडले आणि साधक योगी यांचा मार्ग निष्कंटक झाला. ॥ ४ ॥

**छं०—जोगी अकंटक भए पति गति सुनत रति मुरुछित भई।**
**रोदति बदति बहु भाँति करुना करति संकर पहिं गई॥**
**अति प्रेम करि बिनती बिबिध बिधि जोरि कर सन्मुख रही।**
**प्रभु आसुतोष कृपाल सिव अबला निरखि बोले सही॥**

योगी लोक निर्भय झाले, परंतु कामदेवाची पत्नी रती ही पतीची दशा ऐकून मूर्च्छित झाली. ती आक्रोश करीत करुणा भाकीत भगवान शिवांच्याजवळ गेली. अत्यंत प्रेमाने अनेक प्रकारे विनंती करीत हात जोडून ती समोर उभी राहिली. त्या अबलेला पाहून आशुतोष कृपाळू शिव सांत्वन करीत बोलले.

**दो०—अब तें रति तव नाथ कर होइहि नामु अनंगु।**
**बिनु बपु ब्यापिहि सबहि पुनि सुनु निज मिलन प्रसंगु॥ ८७॥**

'हे रती, यापुढे तुझ्या पतीचे नाव अनंग होईल. तो शरीराविना सर्वांना व्यापून टाकील. आता तू आपल्या पतीच्या भेटीविषयी ऐक.॥ ८७॥

**जब जदुबंस कृष्न अवतारा। होइहि हरन महा महिभारा॥**
**कृष्न तनय होइहि पति तोरा। बचनु अन्यथा होइ न मोरा॥**

जेव्हा पृथ्वीचा प्रचंड भार हरण करण्यासाठी यदुवंशात श्रीकृष्णांचा अवतार होईल, तेव्हा तुझा पती कृष्णांचा पुत्र प्रद्युम्न म्हणून जन्म घेईल. हे माझे वचन असत्य होणार नाही.'॥ १॥

**रति गवनी सुनि संकर बानी। कथा अपर अब कहउँ बखानी॥**
**देवन्ह समाचार सब पाए। ब्रह्मादिक बैकुंठ सिधाए॥**

शिवांचे वचन ऐकून रती निघून गेली. आता दुसरी कथा विस्ताराने वर्णन करून सांगतो. ब्रह्मादी देवांनी ही वार्ता ऐकली, तेव्हा ते वैकुंठाला गेले.॥ २॥

**सब सुर बिष्नु बिरंचि समेता। गए जहाँ सिव कृपानिकेता॥**
**पृथक पृथक तिन्ह कीन्हि प्रसंसा। भए प्रसन्न चंद्र अवतंसा॥**

नंतर तेथून विष्णू आणि ब्रह्मदेव यांच्यासह सर्व देव कृपासागर शिवांच्याकडे गेले. त्या सर्वांनी शिवांची वेगवेगळी स्तुती केली, तेव्हा शशिभूषण शिव प्रसन्न झाले.॥ ३॥

**बोले कृपासिंधु बृषकेतू। कहहु अमर आए केहि हेतू॥**
**कह बिधि तुम्ह प्रभु अंतरजामी। तदपि भगति बस बिनवउँ स्वामी॥**

कृपासागर शिव म्हणाले, 'हे देवांनो, बोला. तुम्ही कशासाठी आला आहात?' ब्रह्मदेव म्हणाले, 'हे प्रभो, तुम्ही अंतर्यामी आहात, तरीही हे स्वामी, भक्तिपूर्वक मी विनंती करतो.॥ ४॥

**दो०—सकल सुरन्ह के हृदयँ अस संकर परम उछाहु।**
**निज नयनन्हि देखा चहहिं नाथ तुम्हार बिबाहु॥ ८८॥**

हे भगवान शंकर, आपल्या डोळ्यांनी तुमचा विवाह पाहावा, अशी खूप इच्छा सर्व देवांच्या मनात आहे.॥ ८८॥

**यह उत्सव देखिअ भरि लोचन। सोइ कछु करहु मदन मद मोचन॥**
**कामु जारि रति कहुँ बरु दीन्हा। कृपासिंधु यह अति भल कीन्हा॥**

हे कामदेवाचा मद नष्ट करणारे प्रभू, सर्वजणांना असा उत्सव डोळे भरून पाहाता यावा, असे काही करा. हे कृपासागर, कामदेवाला भस्म करून रतीला वरदान दिलेत ते फारच चांगले झाले. ॥ १ ॥

**सासति करि पुनि करहिं पसाऊ। नाथ प्रभुन्ह कर सहज सुभाऊ॥**
**पारबतीं तपु कीन्ह अपारा। करहु तासु अब अंगीकारा॥**

हे नाथा, श्रेष्ठ स्वामींचा असा सहज स्वभावच असतो की, ते प्रथम शासन करतात आणि नंतर कृपा करतात. पार्वतीने अपार तप केलेले आहे, तेव्हा आता तिचा अंगीकार करा.'॥ २ ॥

**सुनि बिधि बिनय समुझि प्रभु बानी। ऐसेइ होउ कहा सुखु मानी॥**
**तब देवन्ह दुंदुभीं बजाईं। बरषि सुमन जय जय सुर साईं॥**

ब्रह्मदेवांची ही प्रार्थना ऐकून आणि प्रभू रामचंद्रांची वाणी स्मरण करून शिवांनी प्रसन्नतेने म्हटले की, 'ठीक आहे. मग देवांनी नगारे वाजविले आणि फुलांचा वर्षाव करीत ते म्हणू लागले, 'विजय असो, देवाधिदेवांचा विजय असो.'॥ ३ ॥

**अवसरु जानि सप्तरिषि आए। तुरतहिं बिधि गिरिभवन पठाए॥**
**प्रथम गए जहँ रहीं भवानी। बोले मधुर बचन छल सानी॥**

योग्यवेळ साधून सप्तर्षी आले आणि ब्रह्मदेवांनी लगेच त्यांना हिमालयाच्या घरी पाठविले. सप्तर्षी प्रथम पार्वतीकडे गेले आणि तिची थट्टा करीत म्हणाले- ॥ ४ ॥

दो०—**कहा हमार न सुनेहु तब नारद कें उपदेस।**
**अब भा झूठ तुम्हार पन जारेउ कामु महेस॥ ८९॥**

'नारदांच्या उपदेशामुळे तेव्हा तू आमचे म्हणणे ऐकले नाहीस, आता मात्र तुझी प्रतिज्ञा खोटी ठरली. कारण महादेवांनी कामदेवाला भस्म करून टाकले.'॥ ८९ ॥

## मासपारायण, तिसरा विश्राम

**सुनि बोलीं मुसुकाइ भवानी। उचित कहेहु मुनिबर बिग्यानी॥**
**तुम्हरें जान कामु अब जारा। अब लगि संभु रहे सबिकारा॥**

ते ऐकून पार्वती थट्टेने हसत म्हणाली, 'हे ज्ञानी मुनिवरांनो, छान बोललात! शिवांनी कामदेवाला आता जाळून टाकले, म्हणजे आतापर्यंत ते विकारयुक्त (कामी) होते, असे तुम्हाला वाटले ना?॥ १ ॥

**हमरें जान सदा सिव जोगी। अज अनवद्य अकाम अभोगी॥**
**जौं मैं सिव सेये अस जानी। प्रीति समेत कर्म मन बानी॥**

परंतु मला माहीत आहे की, श्रीशिव हे नेहमी योगी, अजन्मा, अनिंद्य, कामरहित व भोगहीन आहेत आणि मी शिवांना असेच समजून कायावाचामनाने प्रेमपूर्वक त्यांची उपासना केली आहे.॥ २॥

**तौ हमार पन सुनहु मुनीसा। करिहहिं सत्य कृपानिधि ईसा॥**
**तुम्ह जो कहा हर जारेउ मारा। सोइ अति बड़ अबिबेकु तुम्हारा॥**

तेव्हा हे मुनीश्वरांनो, ऐका, ते कृपानिधान भगवान शंकर माझी प्रतिज्ञा खरी करतील. तुम्ही म्हणता की, शिवांनी कामदेवाला भस्म करून टाकले, परंतु तेच तुमचे घोर अज्ञान आहे.॥ ३॥

**तात अनल कर सहज सुभाऊ। हिम तेहि निकट जाइ नहिं काऊ॥**
**गएँ समीप सो अवसि नसाई। असि मन्मथ महेस की नाई॥**

महाराज, अग्नीचा असा स्वभावच आहे की, हिम त्याच्याजवळ जाऊच शकत नाही आणि जर गेलेच तर ते नष्ट होते. महेश आणि मन्मथ यांचा संबंध असाच आहे.'॥ ४॥

दो०—**हियँ हरषे मुनि बचन सुनि देखि प्रीति बिस्वास।**
**चले भवानिहि नाइ सिर गए हिमाचल पास॥ ९०॥**

पार्वतीचे हे बोलणे ऐकून व तिचे प्रेम आणि विश्वास पाहून सप्तर्षी मनातून खूष झाले. ते भवानीला वंदन करून निघाले आणि हिमवानाकडे गेले.॥ ९०॥

**सबु प्रसंगु गिरिपतिहि सुनावा। मदन दहन सुनि अति दुखु पावा॥**
**बहुरि कहेउ रति कर बरदाना। सुनि हिमवंत बहुत सुखु माना॥**

त्यांनी पर्वतराज हिमालयाला सर्व वृत्तांत सांगितला. कामदेव भस्म झाल्याचे ऐकून हिमालय दु:खी झाला. नंतर मुनींनी रतीला वरदानाची गोष्ट सांगितली. तेव्हा हिमाचलाला आनंद झाला.॥ १॥

**हृदयँ बिचारि संभु प्रभुताई। सादर मुनिबर लिए बोलाई॥**
**सुदिनु सुनखतु सुघरी सोचाई। बेगि बेदबिधि लगन धराई॥**

हिमाचलाने शिवांचा मोठेपणा जाणून श्रेष्ठ मुनींना आदराने बोलावून घेतले आणि त्यांच्याकडून शुभ दिवस, शुभ नक्षत्र व शुभ घटिका शोधून वेदविधिपूर्वक विवाह शीघ्र निश्चित करून लग्नपत्रिका तयार केली.॥ २॥

**पत्री सप्तरिषिन्ह सोइ दीन्ही । गहि पद बिनय हिमाचल कीन्ही ॥**
**जाइ बिधिहि तिन्ह दीन्हि सो पाती । बाचत प्रीति न हृदयँ समाती ॥**

नंतर हिमालयाने ती लग्नपत्रिका सप्तऋषींकडे दिली आणि त्यांच्या पाया पडून त्यांना ती ब्रह्मदेवांना देण्याची विनंती केली. त्यांनी जाऊन ती लग्नपत्रिका ब्रह्मदेवांना दिली. ती वाचून त्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला. ॥ ३ ॥

**लगन बाचि अज सबहि सुनाई । हरषे मुनि सब सुर समुदाई ॥**
**सुमन बृष्टि नभ बाजन बाजे । मंगल कलस दसहुँ दिसि साजे ॥**

ब्रह्मदेवांनी ती लग्नपत्रिका सर्वांना वाचून दाखविली. ती ऐकून सर्व मुनी व देव आनंदित झाले. आकाशातून पुष्पवर्षा होऊ लागली, वाद्ये वाजू लागली आणि दश दिशांना मंगल कलश सजविले गेले. ॥ ४ ॥

दो०—**लगे सँवारन सकल सुर बाहन बिबिध बिमान।**
**होहिं सगुन मंगल सुभद करहिं अपछरा गान॥ ९१ ॥**

सर्व देव आपापली तऱ्हेतऱ्हेची वाहने आणि विमाने सजवू लागले. शुभ शकुन होऊ लागले आणि अप्सरा गाणी गाऊ लागल्या. ॥ ९१ ॥

**सिवहि संभु गन करहिं सिंगारा । जटा मुकुट अहि मौरु सँवारा ॥**
**कुंडल कंकन पहिरे ब्याला । तन बिभूति पट केहरि छाला ॥**

शिवगण शिवांना सजवू लागले. जटांचा मुकुट बनवून त्यावर सर्पांचा मोर जडविला. शिवांनी सापांची कुंडले आणि कंकण धारण केले. शरीरावर भस्मलेपन केले आणि वस्त्राऐवजी व्याघ्रांबर नेसले. ॥ १ ॥

**ससि ललाट सुंदर सिर गंगा । नयन तीनि उपबीत भुजंगा ॥**
**गरल कंठ उर नर सिर माला । असिव बेष सिवधाम कृपाला ॥**

शिवांच्या सुंदर मस्तकावर चंद्रमा, गंगा, त्रिनेत्र, सापाचे यज्ञोपवीत, कंठात विष आणि छातीवर नरमुंडमाळा होत्या. अशाप्रकारे त्यांचा वेष अशुभ असूनही ते कल्याणाचे निधान आणि कृपाळू होते. ॥ २ ॥

**कर त्रिसूल अरु डमरु बिराजा । चले बसहँ चढ़ि बाजहिं बाजा ॥**
**देखि सिवहि सुरत्रिय मुसुकाहीं । बर लायक दुलहिनि जग नाहीं ॥**

त्यांच्या एका हातात त्रिशूळ आणि दुसऱ्या हातात डमरू शोभत होता. शिव नंदीवर आरूढ झाले. वाद्ये वाजू लागली. शिवांना पाहून देवांगना हसू लागल्या. (त्या म्हणू लागल्या की,) या वराला योग्य अशी नवरी साऱ्या जगात सापडणार नाही. ॥ ३ ॥

**बिष्नु बिरंचि आदि सुरब्राता । चढ़ि चढ़ि बाहन चले बराता ॥**
**सुर समाज सब भाँति अनूपा । नहिं बरात दूलह अनुरूपा ॥**

विष्णू, ब्रह्मदेव इत्यादी देव-समाज आपापल्या वाहनात बसून वऱ्हाडातून निघाले. देवांचा समुदाय सर्व प्रकारे अनुपम होता, परंतु ते वऱ्हाड वराला शोभेसे नव्हते. ॥ ४ ॥

दो०—**बिष्नु कहा अस बिहसि तब बोलि सकल दिसिराज।**
**बिलग बिलग होइ चलहु सब निज निज सहित समाज॥ ९२ ॥**

तेव्हा भगवान विष्णूंनी सर्व दिक्पालांना बोलावून हसत सांगितले की, 'सर्वजण आपापल्या परिवारासह वेगवेगळे चला. ॥ ९२ ॥

**बर अनुहारि बरात न भाई। हँसी करैहहु पर पुर जाई॥**
**बिष्नु बचन सुनि सुर मुसुकाने। निज निज सेन सहित बिलगाने॥**

अरे बाबांनो, आपले हे वऱ्हाड वराच्या योग्यतेचे नाही. परक्या ठिकाणी गेल्यावर आपले हसे करून घेणार काय?' भगवान विष्णूंचे बोलणे ऐकून देव हसले आणि आपापला लवाजमा घेऊन वेगवेगळे चालू लागले. ॥ १ ॥

**मनहीं मन महेसु मुसुकाहीं। हरि के बिंग्य बचन नहिं जाहीं॥**
**अति प्रिय बचन सुनत प्रिय केरे। भृंगिहि प्रेरि सकल गन टेरे॥**

(हे पाहून) महादेव मनात हसून म्हणाले की, 'भगवान विष्णूंची थट्टेची सवय सुटायची नाही.' आपल्या आवडत्या भगवान विष्णूंचे बोलणे ऐकून शंकरांनी भृंगीला पाठवून आपल्या सर्व गणांना बोलावून घेतले. ॥ २ ॥

**सिव अनुसासन सुनि सब आए। प्रभु पद जलज सीस तिन्ह नाए॥**
**नाना बाहन नाना बेषा। बिहसे सिव समाज निज देखा॥**

शिवांची आज्ञा मिळताच सर्व गण आले आणि त्यांनी स्वामींच्या चरणी मस्तक ठेवले. तऱ्हेतऱ्हेची वाहने आणि तऱ्हेतऱ्हेचा वेष केलेला आपला परिवार पाहून शिवांना हसू आले. ॥ ३ ॥

**कोउ मुखहीन बिपुल मुख काहू। बिनु पद कर कोउ बहु पद बाहू॥**
**बिपुल नयन कोउ नयन बिहीना। रिष्टपुष्ट कोउ अति तनखीना॥**

त्यामध्ये कोणी विना तोंडाचा, कोणाला अनेक तोंडे, कोणी हाता-पायांविना, तर कोणी अनेक हाता-पायांचा. कुणाला अनेक डोळे, तर कुणाला एकही डोळा नाही. कुणी गलेलठ्ठ तर कुणी फारच किडकिडीत. ॥ ४ ॥

छं०—**तन खीन कोउ अति पीन पावन कोउ अपावन गति धरें।**
**भूषन कराल कपाल कर सब सद्य सोनित तन भरें॥**
**खर स्वान सुअर सृकाल मुख गन बेष अगनित को गनै।**
**बहु जिनस प्रेत पिसाच जोगि जमात बरनत नहिं बनै॥**

कोणी अस्थिपंजर तर कुणी गुबगुबीत, कुणी पवित्र तर कुणी अपवित्र वेष धारण केलेला. कुणी भयंकर दागिने घालून हातामध्ये नरकपाल घेतलेले व शरीराला ताजे रक्त माखलेले. कुणाची तोंडे गाढवासारखी, कुणाची कुत्र्यासारखी, कुणाची डुकराची तर कुणाची कोल्ह्यांची. गणांचे अगणित वेष होते. त्यांची गणना कोण करणार? अनेक प्रकारची भुते, पिशाच आणि योगिनींचे समुदाय होते. त्यांचे तर वर्णन करणेही अशक्य.

**सो०—नाचहिं गावहिं गीत परम तरंगी भूत सब।**
**देखत अति बिपरीत बोलहिं बचन बिचित्र बिधि॥ ९३॥**

भूत-प्रेते नाचत आहेत, गात आहेत. ते सर्वजण मोठ्या मजेत आहेत. दिसायला फार विचित्र वाटत आहेत आणि अचकट-विचकट बोलत आहेत.॥ ९३॥

**जस दूलहु तसि बनी बराता। कौतुक बिबिध होहिं मग जाता॥**
**इहाँ हिमाचल रचेउ बिताना। अति बिचित्र नहिं जाइ बखाना॥**

जसा नवरदेव तसे त्याचे व्हाड. वाटेने जाताना तऱ्हेतऱ्हेची मजा चालली होती. इकडे हिमाचलाने असा विलक्षण मंडप केला होता की, त्याचे वर्णन करता येत नाही.॥ १॥

**सैल सकल जहँ लगि जग माहीं। लघु बिसाल नहिं बरनि सिराहीं॥**
**बन सागर सब नदीं तलावा। हिमगिरि सब कहुँ नेवत पठावा॥**

जगामध्ये जितके लहान-मोठे पर्वत होते की, ज्यांचे वर्णन करून संपणार नाही, तसेच जितकी वने, समुद्र, नद्या व तलाव होते, त्या सर्वांना हिमालयाने लग्नाचे निमंत्रण पाठविले.॥ २॥

**कामरूप सुंदर तन धारी। सहित समाज सहित बर नारी॥**
**गए सकल तुहिनाचल गेहा। गावहिं मंगल सहित सनेहा॥**

ते सर्व आपापल्या इच्छेप्रमाणे सुंदर रूपे धारण करून आपल्या सुंदर स्त्रिया आणि परिवाराला बरोबर घेऊन हिमालयाच्या घरी आले. सर्वांनी मोठ्या प्रेमाने मंगल गीते गाईली.॥ ३॥

**प्रथमहिं गिरि बहु गृह सँवराए। जथाजोगु तहँ तहँ सब छाए॥**
**पुर सोभा अवलोकि सुहाई। लागइ लघु बिरंचि निपुनाई॥**

हिमालयाने प्रारंभीच पुष्कळशी घरे सुसज्ज करून ठेवली होती. त्या ठिकाणी ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे सर्वजण उतरले. नगराची सुंदर शोभा पाहून ब्रह्मदेवाचे रचनाचातुर्य तुच्छ वाटत होते.॥ ४॥

**छं०—लघु लाग बिधि की निपुनता अवलोकि पुर सोभा सही।**
**बन बाग कूप तड़ाग सरिता सुभग सब सक को कही॥**
**मंगल बिपुल तोरन पताका केतु गृह गृह सोहहीं।**
**बनिता पुरुष सुंदर चतुर छबि देखि मुनि मन मोहहीं॥**

नगराची शोभा पाहून ब्रह्मदेवाचे नैपुण्य खरोखरच तुच्छ वाटत होते. वन, बागा, विहिरी, तलाव, नद्या सर्व काही सुंदर होते. त्यांचे वर्णन कोण करू शकेल? घरोघरी अत्यंत मंगलमय तोरणे, ध्वज-पताका शोभत होत्या. तेथील सुंदर व चतुर स्त्री-पुरुषांचे सौंदर्य पाहून मुनींचेहि मन मोहित होत होते.

**दो०—जगदंबा जहँ अवतरी सो पुरु बरनि कि जाइ।**
**रिद्धि सिद्धि संपत्ति सुख नित नूतन अधिकाइ॥ ९४॥**

ज्या नगरीत प्रत्यक्ष जगदंबेने अवतार घेतला होता, त्या नगरीचे वर्णन करता येईल काय? तेथे ऋद्धी, सिद्धी, संपत्ती आणि सुख हे नित्य नवीन वाढतच जात असते.॥ ९४॥

**नगर निकट बरात सुनि आई। पुर खरभरु सोभा अधिकाई॥**
**करि बनाव सजि बाहन नाना। चले लेन सादर अगवाना॥**

वऱ्हाड नगराजवळ आले, हे ऐकून नगरामध्ये धावपळ सुरू झाली. त्यामुळे त्याची शोभा आणखी वाढली. स्वागत करणारे लोक नटून-थटून आणि नाना प्रकारची वाहने सजवून मोठ्या आदराने वऱ्हाडास आणण्यास गेले.॥ १॥

**हियँ हरषे सुर सेन निहारी। हरिहि देखि अति भए सुखारी॥**
**सिव समाज जब देखन लागे। बिडरि चले बाहन सब भागे॥**

देवांचा समुदाय पाहून सर्वांना आनंद झाला आणि विष्णूंना पाहून सर्व अत्यंत प्रसन्न झाले. परंतु लोक जेव्हा श्रीशिवांच्याकडची मंडळी पाहू लागले, तेव्हा त्यांची सर्व वाहने (हत्ती, घोडे, रथाचे बैल इत्यादी) घाबरून पळू लागली.॥ २॥

**धरि धीरजु तहँ रहे सयाने। बालक सब लै जीव पराने॥**
**गएँ भवन पूछहिं पितु माता। कहहिं बचन भय कंपित गाता॥**

काही प्रौढ वयाची समजुतदार माणसे धीराने तेथे ठाम उभी राहिली. सर्व मुले तर जीव घेऊन पळाली. घरी गेल्यावर आई-वडिलांनी जेव्हा त्यांना विचारले, तेव्हा ती भीतीने थरथरत म्हणाली,॥ ३॥

**कहिअ काह कहि जाइ न बाता। जम कर धार किधौं बरिआता॥**
**बरु बौराह बसहँ असवारा। ब्याल कपाल बिभूषन छारा॥**

काय सांगायचे? काहीही सांगता येत नाही. हे वऱ्हाड आहे की यमराजाची सेना? नवरा वेडा आहे आणि बैलावर बसला आहे. साप, नरकपाल आणि राख ही त्याची भूषणे आहेत.॥ ४॥

**छं०—तन छार ब्याल कपाल भूषन नगन जटिल भयंकरा।**
**सँग भूत प्रेत पिसाच जोगिनि बिकट मुख रजनीचरा॥**

**जो जिअत रहिहि बरात देखत पुन्य बड़ तेहि कर सही।**
**देखिहि सो उमा बिबाहु घर घर बात असि लरिकन्ह कही॥**

नवऱ्याच्या अंगाला राख फासलेली आहे. साप व नरकपालाचे अलंकार आहेत. तो निर्वस्त्र, जटाधारी व भयंकर आहे. त्याच्या सोबत भयानक तोंडाची भुते, प्रेत, पिशाच, योगिनी आणि राक्षस आहेत. हे वऱ्हाड पाहून जे जिवंत राहतील ते खरोखर भाग्यवान होत आणि त्यांनाच पार्वतीचा विवाह पाहायला मिळेल. मुलांनी घरोघरी हेच सांगितले.

दो०—**समुझि महेस समाज सब जननि जनक मुसुकाहिं।**
**बाल बुझाए बिबिध बिधि निडर होहु डरु नाहिं॥ ९५॥**

शिवांच्या वऱ्हाडाचा हा परिवार पाहून सर्व मुलांचे आई-बाप हसू लागले. त्यांनी परोपरीने समजावून सांगितले की, 'भिऊ नका, घाबरायचे काही कारण नाही.'॥ ९५॥

**लै अगवान बरातहि आए। दिए सबहि जनवास सुहाए॥**
**मैनाँ सुभ आरती सँवारी। संग सुमंगल गावहिं नारी॥**

स्वागतासाठी सामोरे गेलेले लोक वऱ्हाडाला घेऊन आले. त्यांनी सर्वांना सुंदर जानवश्यांमध्ये उतरविले. (पार्वतीची आई) मैनेने मंगलारती सजविली आणि तिच्या सोबतच्या स्त्रिया मंगलगीते गाऊ लागल्या.॥ १॥

**कंचन थार सोह बर पानी। परिछन चली हरहि हरषानी॥**
**बिकट बेष रुद्रहि जब देखा। अबलन्ह उर भय भयउ बिसेषा॥**

मैनेच्या सुंदर हातांमध्ये सोन्याचे तबक शोभत होते. अशाप्रकारे ती मोठ्या आनंदाने श्रीशिवांना ओवाळण्यासाठी निघाली. जेव्हा महादेवांचा भयंकर वेष पाहिला, तेव्हा स्त्रिया मनात भयभीत झाल्या.॥ २॥

**भागि भवन पैठीं अति त्रासा। गए महेसु जहाँ जनवासा॥**
**मैना हृदयँ भयउ दुखु भारी। लीन्ही बोलि गिरीसकुमारी॥**

भयंकर भीतीमुळे त्या घरात पळाल्या. जेथे जानवसा होता, तेथे श्रीशिव गेले. मैनेला फार वाईट वाटले. तिने पार्वतीला आपल्या-जवळ बोलावले.॥ ३॥

**अधिक सनेहँ गोद बैठारी। स्याम सरोज नयन भरे बारी॥**
**जेहिं बिधि तुम्हहि रूपु अस दीन्हा। तेहिं जड़ बरु बाउर कस कीन्हा॥**

मोठ्या प्रेमाने तिला आपल्याजवळ बसवून घेऊन ती निळ्या कमळांसारख्या नेत्रांतून अश्रू ढाळत म्हणाली, 'ज्या विधात्याने तुला असे सुंदर रूप दिले आहे, त्या मूर्खाने तुझ्या नवऱ्याला वेंधळा कसा बनविला?॥ ४॥

छं०—**कस कीन्ह बरु बौराह बिधि जेहिं तुम्हहि सुंदरता दई।**
**जो फलु चहिअ सुरतरुहिं सो बरबस बबूरहिं लागई॥**
**तुम्ह सहित गिरि तें गिरौं पावक जरौं जलनिधि महुँ परौं।**
**घरु जाउ अपजसु होउ जग जीवत बिबाहु न हौं करौं॥**

ज्या विधात्याने तुला सौंदर्य दिले, त्याने तुझ्यासाठी बावळट नवरा कसा बनविला? जे फळ कल्पवृक्षाला लागायला हवे, ते हट्टाने बाभळीला कसे लावले? मी तुला घेऊन पर्वतावरून उडी मारीन, आगीत जळून जाईन किंवा समुद्रात उडी घेईन. घर उध्वस्त झाले आणि जगात नाचक्की झाली, तरी मी जिवंतपणी या वेड्याशी तुझे लग्न लावणार नाही.'

दो०—**भईं बिकल अबला सकल दुखित देखि गिरिनारि।**
**करि बिलापु रोदति बदति सुता सनेहु सँभारि॥ ९६॥**

हिमालयाची पत्नी (मैना) दु:खी झाल्याचे पाहून सर्व स्त्रिया व्याकूळ होऊन गेल्या. मैना आपल्या मुलीचे प्रेम आठवून विलाप करीत होती आणि रडत-रडत म्हणत होती,॥ ९६॥

**नारद कर मैं काह बिगारा। भवनु मोर जिन्ह बसत उजारा॥**
**अस उपदेसु उमहि जिन्ह दीन्हा। बौरे बरहि लागि तपु कीन्हा॥**

'मी नारदांचे असे काय वाकडे केले होते, म्हणून त्यांनी माझे नांदते घर उजाड केले आणि पार्वतीला असला सल्ला दिला! त्यामुळेच तिने या बावळट वरासाठी तप केले.॥ १॥

**साचेहुँ उन्ह कें मोह न माया। उदासीन धनु धामु न जाया॥**
**पर घर घालक लाज न भीरा। बाँझ कि जान प्रसव कै पीरा॥**

नारदांना खरोखरच कुणाचा मोह नाही, माया नाही, धन, घर किंवा स्त्री या सर्वांपासून ते उदासीन आहेत. म्हणूनच दुसऱ्याचे घर उजाड करताना त्यांना कुणाची लाज वाटत नाही की भय वाटत नाही. वांझ स्त्रीला प्रसूतिवेदना कशा कळणार बरे?'॥ २॥

**जननिहि बिकल बिलोकि भवानी। बोली जुत बिबेक मृदु बानी॥**
**अस बिचारि सोचहि मति माता। सो न टरइ जो रचइ बिधाता॥**

आईला व्याकूळ झालेली पाहून पार्वती विवेकपूर्ण कोमल वाणीने म्हणाली, 'आई, जे विधात्याने नशिबात लिहिले आहे, ते टळत नाही, असा विचार करून तू काळजी करू नकोस.॥ ३॥

**करम लिखा जौं बाउर नाहू। तौ कत दोसु लगाइअ काहू॥**
**तुम्ह सन मिटहिं कि बिधि के अंका। मातु ब्यर्थ जनि लेहु कलंका॥**

माझ्या नशिबी बावळट नवराच लिहिला असेल, तर कुणाला दोष का द्यायचा? हे माते, विधात्याचे लिखित तुला पुसता येईल काय? उगीच निंदेला पात्र होऊ नकोस. ॥ ४ ॥

**छं०—जनि लेहु मातु कलंकु करुना परिहरहु अवसर नहीं।**
**दुखु सुखु जो लिखा लिलार हमरें जाब जहँ पाउब तहीं॥**
**सुनि उमा बचन बिनीत कोमल सकल अबला सोचहीं।**
**बहु भाँति बिधिहि लगाइ दूषन नयन बारि बिमोचहीं॥**

अग आई! उगीच ठपका ठेवून घेऊ नकोस. रडणे सोडून दे. ही वेळ दुःख करायची नव्हे. माझ्या भाग्यात जे सुख-दुःख लिहिले आहे, ते जेथे जाईन तेथे माझ्याबरोबर येणार.' पार्वतीचे हे नम्र कोमल वचन ऐकून सर्व स्त्रिया हेलावून गेल्या आणि हर तऱ्हेने विधात्याला दोष लावीत अश्रू ढाळू लागल्या.

**दो०—तेहि अवसर नारद सहित अरु रिषि सप्त समेत।**
**समाचार सुनि तुहिनगिरि गवने तुरत निकेत॥ ९७॥**

हे वर्तमान ऐकताच हिमाचल नारदांना व सप्तर्षींना बरोबर घेऊन तत्काळ घरी आले. ॥ ९७ ॥

**तब नारद सबही समुझावा। पूरुब कथाप्रसंगु सुनावा॥**
**मयना सत्य सुनहु मम बानी। जगदंबा तव सुता भवानी॥**

तेव्हा नारदांनी पूर्वजन्मीची कथा सांगून सर्वांना समजावले. ते म्हणाले, 'हे मैने, तुला खरे सांगतो ते ऐक. तुझी मुलगी साक्षात जगज्जननी भवानी आहे. ॥ १ ॥

**अजा अनादि सक्ति अबिनासिनि। सदा संभु अरधंग निवासिनि॥**
**जग संभव पालन लय कारिनि। निज इच्छा लीला बपु धारिनि॥**

ही जन्मरहित, अनादी व अविनाशिनी शक्ती आहे. श्रीशिवांच्या अर्धांगामध्ये ती नेहमी राहाते. ही जगाची उत्पत्ती, पालन व संहार करणारी आहे आणि आपल्या इच्छेनेच लीला-शरीर धारण करते. ॥ २ ॥

**जनमीं प्रथम दच्छ गृह जाई। नामु सती सुंदर तनु पाई॥**
**तहँहुँ सती संकरहि बिबाहीं। कथा प्रसिद्ध सकल जग माहीं॥**

पूर्वी ही दक्षाच्या घरी जन्मली होती, तेव्हा हिचे नाव सती होते. तिला फार सुंदर देह लाभला होता. तेथेही सतीचे शंकरांशीच लग्न झाले होते. ही कथा जगप्रसिद्ध आहे. ॥ ३ ॥

**एक बार आवत सिव संगा। देखेउ रघुकुल कमल पतंगा॥**
**भयउ मोहु सिव कहा न कीन्हा। भ्रम बस बेषु सीय कर लीन्हा॥**

एकदा हिने शिवांच्याबरोबर येताना वाटेत रघुकुलरूपी कमलाचे सूर्य असलेल्या श्रीरामचंद्रांना पाहिले, तेव्हा तिला शंका आली आणि तिने शिवांचे सांगणे न ऐकता त्यांची परीक्षा पाहण्यासाठी भ्रमाने सीतेचा वेष घेतला. ॥ ४ ॥

**छं०—सिय बेषु सतीं जो कीन्ह तेहिं अपराध संकर परिहरीं।**
**हर बिरहँ जाइ बहोरि पितु कें जग्य जोगानल जरीं॥**
**अब जनमि तुम्हरे भवन निज पति लागि दारुन तपु किया।**
**अस जानि संसय तजहु गिरिजा सर्बदा संकरप्रिया॥**

सतीने (मातृसदृश) सीतेचा वेष धारण केला, या अपराधामुळे शंकरांनी तिचा (माता मानून) त्याग केला. मग ती शिवांच्या वियोगामुळे आपल्या पित्याने केलेल्या यज्ञात जाऊन तेथे योगाग्नीने स्वतः भस्म झाली. आता हिने तुमच्या घरी जन्म घेऊन आपल्या पतीसाठी कठोर तप केले आहे. हे समजून घेऊन मनातील शंका काढून टाक. पार्वती ही तर नेहमीच शिवांची प्रिया (अर्धांगिनी) आहे.'

**दो०—सुनि नारद के बचन तब सब कर मिटा बिषाद।**
**छन महुँ ब्यापेउ सकल पुर घर घर यह संबाद॥ ९८॥**

नारदांचे हे बोलणे ऐकून सर्वांच्या मनातील विषाद दूर झाला आणि एका क्षणात ही वार्ता संपूर्ण नगरात पसरली. ॥ ९८ ॥

**तब मयना हिमवंतु अनंदे। पुनि पुनि पारबती पद बंदे॥**
**नारि पुरुष सिसु जुबा सयाने। नगर लोग सब अति हरषाने॥**

मग मैना व हिमाचल दोघेही आनंदून गेले आणि ते वारंवार पार्वतीच्या पाया पडले. नगरातील स्त्री-पुरुष, मुले, तरुण आणि वृद्ध हे सारेच फार प्रसन्न झाले. ॥ १ ॥

**लगे होन पुर मंगल गाना। सजे सबहिं हाटक घट नाना॥**
**भाँति अनेक भई जेवनारा। सूपसास्त्र जस कछु ब्यवहारा॥**

नगरामध्ये मंगल गीते गाईली जाऊ लागली आणि सर्वांनी तऱ्हेतऱ्हेचे सुवर्ण कलश सजविले. पाकशास्त्रातील पद्धतीप्रमाणे अनेक प्रकारचे भोजन-पदार्थ बनविले गेले. ॥ २ ॥

**सो जेवनार कि जाइ बखानी। बसहिं भवन जेहिं मातु भवानी॥**
**सादर बोले सकल बराती। बिष्नु बिरंचि देव सब जाती॥**

ज्या घरी माता भवानी राहते, तेथील भोजनपदार्थांचे वर्णन कसे करता येईल? हिमालयाने आदराने सर्व वऱ्हाडी मंडळींना-विष्णू, ब्रह्मदेव आणि सर्व जातीच्या देवांना बोलाविले. ॥ ३ ॥

**बिबिधि पाँति बैठी जेवनारा। लागे परुसन निपुन सुआरा॥**
**नारिबृंद सुर जेवँत जानी। लगीं देन गारीं मृदु बानी॥**

भोजनाच्या अनेक पंक्ती बसल्या. चतुर वाढपी वाढत होते. स्त्रियांची मंडळे भोजन करीत असलेल्या देवांची कोमल वाणीने चेष्टामस्करी करू लागली. ॥ ४ ॥

छं०—**गारीं मधुर स्वर देहिं सुंदरि बिंग्य बचन सुनावहीं।**
**भोजनु करहिं सुर अति बिलंबु बिनोदु सुनि सचु पावहीं॥**
**जेवँत जो बढ़्यो अनंदु सो मुख कोटिहूँ न परै कह्यो।**
**अचवाँइ दीन्हे पान गवने बास जहँ जाको रह्यो॥**

सर्व सुंदर स्त्रिया गोड स्वरात टोमणे मारू लागल्या व थट्टा करू लागल्या. सर्व देव तो हास्यविनोद ऐकत खूप आनंदित होत होते, म्हणून भोजन करताना वेळ लावत होते. भोजन-प्रसंगी जो आनंद वाढला, त्याचे वर्णन कोट्यवधी मुखांनीही सांगता येणार नाही. जेवण झाले. आचवल्यानंतर सर्वांना विडे दिले गेले. नंतर सर्वजण आपापल्या निवासात गेले.

दो०—**बहुरि मुनिन्ह हिमवंत कहुँ लगन सुनाई आइ।**
**समय बिलोकि बिबाह कर पठए देव बोलाइ॥ ९९॥**

त्यानंतर मुनींनी परत येऊन हिमवानाला लग्नपत्रिका वाचून दाखविली आणि विवाहाची वेळ पाहून देवांना बोलावणे पाठविले. ॥ ९९ ॥

**बोलि सकल सुर सादर लीन्हे। सबहि जथोचित आसन दीन्हे॥**
**बेदी बेद बिधान सँवारी। सुभग सुमंगल गावहिं नारी॥**

सर्व देवांना आदरपूर्वक बोलावले व आल्यावर बसायला आसने दिली. वैदिक पद्धतीने विवाह-वेदी सजविली गेली आणि स्त्रिया सुंदर मंगलगाणी गाऊ लागल्या. ॥ १ ॥

**सिंघासनु अति दिब्य सुहावा। जाइ न बरनि बिरंचि बनावा॥**
**बैठे सिव बिप्रन्ह सिरु नाई। हृदयँ सुमिरि निज प्रभु रघुराई॥**

वेदिकेवर एक अत्यंत सुंदर दिव्य सिंहासन होते. त्याचे वर्णन करता येणे शक्य नाही, कारण ते स्वतः ब्रह्मदेवांनी बनविले होते. ब्राह्मणांना नमस्कार करून आणि मनात स्वामी श्रीरघुनाथांचे स्मरण करून भगवान शिव त्या सिंहासनावर आरूढ झाले. ॥ २ ॥

**बहुरि मुनीसन्ह उमा बोलाईं। करि सिंगारु सखीं लै आईं॥**
**देखत रूपु सकल सुर मोहे। बरनै छबि अस जग कबि को है॥**

मग मुनीश्वरांनी पार्वतीला बोलावून घेतले. तिचा शृंगार करून सख्या तिला घेऊन आल्या.

पार्वतीचे रूप पाहताच सर्व देव मोहून गेले. त्या सौंदर्याचे वर्णन करू शकेल, असा कवी जगात कोण आहे? ॥ ३ ॥

**जगदंबिका जानि भव भामा। सुरन्ह मनहिं मन कीन्ह प्रनामा॥**
**सुंदरता मरजाद भवानी। जाइ न कोटिहुँ बदन बखानी॥**

पार्वती ही जगदंबा आणि भगवान शिवांची पत्नी आहे, हे जाणून देवांनी मनातल्या मनात तिला प्रणाम केला. भवानी ही सौंदर्याची परिसीमा आहे. कोट्यवधी मुखांनीही तिची शोभा वर्णन करता येणार नाही. ॥ ४ ॥

छं०—**कोटिहुँ बदन नहिं बनै बरनत जग जननि सोभा महा।**
**सकुचहिं कहत श्रुति सेष सारद मंदमति तुलसी कहा॥**
**छबिखानि मातु भवानि गवनीं मध्य मंडप सिव जहाँ।**
**अवलोकि सकहिं न सकुच पति पद कमल मनु मधुकरु तहाँ॥**

जगज्जननी पार्वतीच्या महान शोभेचे वर्णन कोट्यवधी मुखांनी केले तरी अपुरेच राहील. वेद, शेष आणि सरस्वती यांना तिचे वर्णन करताना संकोच वाटतो, मग मंदबुद्धीच्या तुलसीदासाची काय कथा? मंडपामध्ये जेथे शिव होते, तेथे सौंदर्य व लावण्याची खाण असलेली भवानी माता गेली. संकोचामुळे ती पतीचे चरणकमल पाहू शकत नव्हती, परंतु तिचा मनरूपी भ्रमर तेथेच (रसपान करीत) होता.

दो०—**मुनि अनुसासन गनपतिहि पूजेउ संभु भवानि।**
**कोउ सुनि संसय करै जनि सुर अनादि जियँ जानि॥ १०० ॥**

मुनींच्या आज्ञेने शिवांनी आणि पार्वतीने श्रीगणेशाचे पूजन केले. देव हे अनादी आहेत. तेव्हा कुणी मनात शंका धरू नये (की गणेश हा शिव-पार्वतीचा पुत्र आहे. मग विवाहापूर्वी तो कसा आला?) ॥ १०० ॥

**जसि बिबाह कै बिधि श्रुति गाई। महामुनिन्ह सो सब करवाई॥**
**गहि गिरीस कुस कन्या पानी। भवहि समरपीं जानि भवानी॥**

वेदांमध्ये विवाहाची जी रीत सांगितली आहे, ती यथासांग महामुनींनी करविली. पर्वतराज हिमाचलाने हातामध्ये कुश घेऊन व कन्येचा हात धरून तिला भवानी (शिवपत्नी) समजूनच शिवांना अर्पण केली. ॥ १ ॥

**पानिग्रहन जब कीन्ह महेसा। हियँ हरषे तब सकल सुरेसा॥**
**बेदमंत्र मुनिबर उच्चरहीं। जय जय जय संकर सुर करहीं॥**

महेश्वरांनी पार्वतीचे पाणिग्रहण केले, तेव्हा सर्व देवांना मनात फार आनंद झाला. श्रेष्ठ मुनिगण वेदमंत्रांचा उच्चार करू लागले आणि देवगण भगवान शिवांचा जयजयकार करू लागले. ॥ २ ॥

**बाजहिं बाजन बिबिध बिधाना। सुमनबृष्टि नभ भै बिधि नाना॥**
**हर गिरिजा कर भयउ बिबाहू। सकल भुवन भरि रहा उछाहू॥**

अनेक प्रकारची वाद्ये वाजू लागली. आकाशातून नाना प्रकारच्या पुष्पांचा वर्षाव झाला. शिव-पार्वतीचा विवाह झाला. तेव्हा संपूर्ण ब्रह्मांड आनंदाने भरून गेले.॥ ३॥

**दासीं दास तुरग रथ नागा। धेनु बसन मनि बस्तु बिभागा॥**
**अन्न कनकभाजन भरि जाना। दाइज दीन्ह न जाइ बखाना॥**

हुंडा म्हणून दासी, दास, रथ, घोडे, हत्ती, गाई, वस्त्रे, रत्ने इत्यादी अनेक प्रकारच्या वस्तू, अन्न व सोन्याची भांडी गाड्या भरभरून दिली गेली. त्यांचे वर्णन करणे कठीण.॥ ४॥

छं०—**दाइज दियो बहु भाँति पुनि कर जोरि हिमभूधर कह्यो।**
**का देउँ पूरनकाम संकर चरन पंकज गहि रह्यो॥**
**सिवँ कृपासागर ससुर कर संतोषु सब भाँतिहिं कियो।**
**पुनि गहे पद पाथोज मयनाँ प्रेम परिपूरन हियो॥**

पुष्कळ प्रकारचा हुंडा दिल्यावर हिमाचल हात जोडून म्हणाला 'हे शंकर, तुम्ही पूर्णकाम आहात. तेव्हा मी तुम्हांला काय देणार?' (असे म्हणून) त्याने शिवांची चरणकमले धरली. तेव्हा कृपा-सागर शिवांनी आपल्या सासऱ्याचे सर्व प्रकारे समाधान केले. नंतर प्रेमाने मन भरून येऊन मैनेने शिवांची चरणकमले धरली (आणि म्हटले,)॥

दो०—**नाथ उमा मम प्रान सम गृहकिंकरी करेहु।**
**छमेहु सकल अपराध अब होइ प्रसन्न बरु देहु॥ १०१॥**

'हे नाथ, ही उमा मला प्राणाहून प्रिय आहे. तुम्ही हिला आपली दासी म्हणून स्वीकारा आणि हिच्या सर्व अपराधांना क्षमा करा. प्रसन्न होऊन आता मला हाच एक वर द्या.'॥ १०१॥

**बहु बिधि संभु सासु समुझाई। गवनी भवन चरन सिरु नाई॥**
**जननीं उमा बोलि तब लीन्ही। लै उछंग सुंदर सिख दीन्ही॥**

भगवान शिवांनी अनेक प्रकारे आपल्या सासूचे समाधान केले, तेव्हा ती शिवांच्या पाया पडून घरी गेली. नंतर तिने पार्वतीला जवळ बोलावले आणि मांडीवर बसवून उपदेश दिला.॥ १॥

**करेहु सदा संकर पद पूजा। नारिधरमु पति देउ न दूजा॥**
**बचन कहत भरे लोचन बारी। बहुरि लाइ उर लीन्हि कुमारी॥**

'हे पार्वती, तू नेहमी शिवांच्या चरणांची सेवा कर. स्त्रियांचा हाच धर्म आहे. स्त्रियांना पती हाच परमेश्वर आहे; इतर कोणताही नाही.' अशा प्रकारे बोलता बोलता तिचे डोळे पाणावले आणि तिने उमेला घट्ट छातीशी धरले.॥ २॥

**कत बिधि सृजीं नारि जग माहीं। पराधीन सपनेहुँ सुखु नाहीं॥**
**भै अति प्रेम बिकल महतारी। धीरजु कीन्ह कुसमय बिचारी॥**

(नंतर ती म्हणाली,) 'विधात्याने जगात स्त्रीजातीला जन्मास का घातले? पराधीन असलेल्याला स्वप्नातही सुख लाभत नाही.' असे म्हणत माता मैना व्याकूळ झाली. परंतु ही दु:ख करण्याची वेळ नव्हे, हे लक्षात येऊन तिने स्वत:ला सावरले. ॥ ३ ॥

**पुनि पुनि मिलति परति गहि चरना। परम प्रेमु कछु जाइ न बरना॥**
**सब नारिन्ह मिलि भेटि भवानी। जाइ जननि उर पुनि लपटानी॥**

मैना पार्वतीला वारंवार अलिंगन देऊन तिचे पाय धरून विव्हळ होऊन पडत होती. तिच्या अपरिमित प्रेमाचे वर्णन करता येत नाही. भवानी सर्व स्त्रियांना भेटून झाल्यावर पुन्हा मातेला बिलगली. ॥ ४ ॥

छं०—**जननिहि बहुरि मिलि चली उचित असीस सब काहूँ दईं।**
**फिरि फिरि बिलोकति मातु तन तब सखीं लै सिव पहिं गईं॥**
**जाचक सकल संतोषि संकरु उमा सहित भवन चले।**
**सब अमर हरषे सुमन बरषि निसान नभ बाजे भले॥**

आईला पुन्हा एकवार भेटून पार्वती निघाली. सर्वांनी तिला यथोचित आशीर्वाद दिले. पार्वती आईकडे वारंवार पाहात होती. नंतर सख्या तिला घेऊन शिवांच्याकडे गेल्या. महादेवांनी सर्व याचकांना संतुष्ट केले व ते पार्वतीबरोबर घरी (कैलासाला) निघाले. सर्व देव आनंदाने पुष्प-वर्षाव करू लागले आणि आकाशात सुंदर नगारे दुमदुमू लागले.

दो०—**चले संग हिमवंतु तब पहुँचावन अति हेतु।**
**बिबिध भाँति परितोषु करि बिदा कीन्ह बृषकेतु॥ १०२॥**

नंतर हिमवान अत्यंत प्रेमाने शिवांना निरोप देण्यासाठी निघाला. शिवांनी अनेक प्रकारे त्याचे समाधान करून त्याला निरोप दिला. ॥ १०२ ॥

**तुरत भवन आए गिरिराई। सकल सैल सर लिए बोलाई॥**
**आदर दान बिनय बहुमाना। सब कर बिदा कीन्ह हिमवाना॥**

पर्वतराज हिमवान त्वरित घरी आला आणि त्याने सर्व पर्वत व सरोवरे यांना बोलाविले. त्यांना आदराने, विनयपूर्वक अहेर देऊन सन्मानाने निरोप दिला. ॥ १ ॥

**जबहिं संभु कैलासहिं आए। सुर सब निज निज लोक सिधाए॥**
**जगत मातु पितु संभु भवानी। तेहिं सिंगारु न कहउँ बखानी॥**

जेव्हा शिव कैलास पर्वतावर पोहोचले, तेव्हा सर्व देव आपापल्या लोकी गेले. (तुलसीदास म्हणतात की,) पार्वती व शिव हे जगाचे माता-पिता आहेत, म्हणून मी त्यांच्या शृंगाराचे वर्णन करीत नाही. ॥ २ ॥

**करहिं बिबिध बिधि भोग बिलासा । गनन्ह समेत बसहिं कैलासा ॥**
**हर गिरिजा बिहार नित नयऊ । एहि बिधि बिपुल काल चलि गयऊ ॥**

शिव-पार्वती विविध प्रकारचे भोग-विलास करीत आपल्या गणांसोबत कैलासावर राहू लागले. ते नित्य विहार करीत होते. अशाप्रकारे बराच कालावधी लोटला. ॥ ३ ॥

**तब जनमेउ षटबदन कुमारा । तारकु असुरु समर जेहिं मारा ॥**
**आगम निगम प्रसिद्ध पुराना । षन्मुख जन्मु सकल जग जाना ॥**

नंतर सहा मुखांचा पुत्र-स्वामी कार्तिकेययाचा जन्म झाला. त्याने मोठा झाल्यावर तारकासुराला युद्धात ठार केले. वेद, शास्त्रे, पुराणे यांमध्ये कार्तिक स्वामीच्या जन्माची प्रसिद्ध कथा येते आणि सर्व जग ती जाणते. ॥ ४ ॥

छं०—**जगु जान षन्मुख जन्मु कर्मु प्रतापु पुरुषारथु महा।**
**तेहि हेतु मैं बृषकेतु सुत कर चरित संछेपहिं कहा॥**
**यह उमा संभु बिबाहु जे नर नारि कहहिं जे गावहीं।**
**कल्यान काज बिबाह मंगल सर्बदा सुखु पावहीं॥**

कार्तिक स्वामीचा जन्म, कर्म, प्रताप व महान पुरुषार्थ हे सर्व जग जाणते. म्हणून मी शिवांचा पुत्र कार्तिकेय याचे चरित्र संक्षिप्तपणेच सांगितले आहे. शिव-पार्वतीच्या विवाहाची ही कथा जे स्त्री-पुरुष वर्णन करतील व गायन करतील, त्यांना कल्याणाची कार्ये व विवाहादी मंगल कार्ये यांमध्ये नित्य सुख-समाधान लाभेल.

दो०—**चरित सिंधु गिरिजा रमन बेद न पावहिं पारु।**
**बरनै तुलसीदासु किमि अति मतिमंद गवाँरु॥ १०३॥**

गिरिजापती महादेव यांचे चरित्र समुद्राप्रमाणे (अपार) आहे. त्याचा थांग वेदांनाही लागत नाही. मग अत्यंत मंदबुद्धीचा व अडाणी तुलसीदास त्याचे वर्णन कसे करू शकेल? ॥ १०३ ॥

**संभु चरित सुनि सरस सुहावा । भरद्वाज मुनि अति सुखु पावा ॥**
**बहु लालसा कथा पर बाढ़ी । नयनन्हि नीरु रोमावलि ठाढ़ी ॥**

शिवांचे सुरस व सुंदर चरित्र ऐकून मुनी भारद्वाजांना फार आनंद झाला. ती कथा ऐकण्याची लालसा त्यांच्या मनात वाढली. नेत्रांमध्ये प्रेमाश्रू उचंबळले आणि शरीर रोमांचित झाले. ॥ १ ॥

**प्रेम बिबस मुख आव न बानी । दसा देखि हरषे मुनि ग्यानी ॥**
**अहो धन्य तव जन्मु मुनीसा । तुम्हहि प्रान सम प्रिय गौरीसा ॥**

भारद्वाज मुनी प्रेमात मग्न होऊन गेले. त्यांच्या तोंडून शब्द फुटेना. त्यांची ही दशा पाहून ज्ञानी

याज्ञवल्क्यांना फार आनंद वाटला. (ते म्हणाले,) ‘हे मुनीश्वर! अहाहा, तुमचा जन्म धन्य होय. तुम्हांला गौरीपती शिव हे प्राणांसमान प्रिय आहेत. ॥ २ ॥

**सिव पद कमल जिन्हहि रति नाहीं। रामहि ते सपनेहुँ न सोहाहीं॥**
**बिनु छल बिस्वनाथ पद नेहू। राम भगत कर लच्छन एहू॥**

भगवान शिवांच्या चरणकमली ज्यांना प्रेम नाही, ते लोक श्रीरामचंद्रांना स्वप्नातही आवडत नाहीत. विश्वनाथ श्रीशिवांच्या चरणी शुद्ध प्रेम असणे, हेच रामभक्ताचे लक्षण आहे. ॥ ३ ॥

**सिव सम को रघुपति ब्रतधारी। बिनु अघ तजी सती असि नारी॥**
**पनु करि रघुपति भगति देखाई। को सिव सम रामहि प्रिय भाई॥**

भगवान शिवांच्यासारखा श्रीरामांच्या भक्तीचे व्रत धारण करणारा कोण आहे? त्यांनी कोणताही दोष नसताना सतीसारख्या स्त्रीचा त्याग केला आणि प्रतिज्ञा करून श्रीरामांची भक्ती दाखवून दिली. श्रीरामांनाही शिवांसारखा दुसरा कोण प्रिय आहे?॥ ४ ॥

दो०—**प्रथमहिं मैं कहि सिव चरित बूझा मरमु तुम्हार।**
**सुचि सेवक तुम्ह राम के रहित समस्त बिकार॥ १०४॥**

मी प्रथमतःच शिवांचे चरित्र सांगून तुमचे रहस्य जाणून घेतले आहे. तुम्ही श्रीरामांचे पवित्र सेवक आहात आणि सर्व दोषांनी रहित आहात. ॥ १०४ ॥

**मैं जाना तुम्हार गुन सीला। कहउँ सुनहु अब रघुपति लीला॥**
**सुनु मुनि आजु समागम तोरें। कहि न जाइ जस सुखु मन मोरें॥**

मी तुमचे गुण व शील जाणले आहे. आता मी श्रीरघुनाथांची लीला सांगतो. हे मुनी, ऐका. आज तुमची भेट झाल्यामुळे माझ्या मनाला जो आनंद वाटत आहे, तो काही सांगता येत नाही. ॥ १ ॥

**राम चरित अति अमित मुनीसा। कहि न सकहिं सत कोटि अहीसा॥**
**तदपि जथाश्रुत कहउँ बखानी। सुमिरि गिरापति प्रभु धनुपानी॥**

हे मुनीश्वरा, रामचरित्र हे अत्यंत अपार आहे. शंभर कोटी शेषसुद्धा ते सांगू शकणार नाहीत. तरीही मी जसे ऐकले आहे, तसे वाणीचे स्वामी (प्रेरक) आणि हाती धनुष्य धारण केलेल्या प्रभू श्रीरामचंद्रांचे स्मरण करून त्यांचे चरित्र सांगणार आहे. ॥ २ ॥

**सारद दारुनारि सम स्वामी। रामु सूत्रधर अंतरजामी॥**
**जेहि पर कृपा करहिं जनु जानी। कबि उर अजिर नचावहिं बानी॥**

देवी सरस्वती ही कळसूत्री बाहुली आहे आणि अंतर्यामी स्वामी श्रीरामचंद्र हे (दोरी धरून कळसूत्री बाहुलीला नाचविणारे) सूत्रधार आहेत. आपला भक्त जाणून ते ज्या कवीवर कृपा करतात, त्याच्या अंतःकरणाच्या अंगणात ते सरस्वतीला नाचवीत असतात. ॥ ३ ॥

**प्रनवउँ सोइ कृपाल रघुनाथा। बरनउँ बिसद तासु गुन गाथा॥**
**परम रम्य गिरिबरु कैलासू। सदा जहाँ सिव उमा निवासू॥**

त्याच कृपाळू श्रीरघुनाथांना मी प्रणाम करतो आणि त्यांच्या निर्मल गुणांची कथा सांगतो. कैलास हा पर्वतांमध्ये श्रेष्ठ आणि अत्यंत रमणीय आहे, तेथे शिव-पार्वती हे नित्य निवास करतात.॥ ४॥

दो०—**सिद्ध तपोधन जोगिजन सुर किंनर मुनिबृंद।**
**बसहिं तहाँ सुकृती सकल सेवहिं सिव सुखकंद॥ १०५॥**

सिद्ध, तपस्वी, योगीगण, देव, किन्नर व मुनींचे समुदाय त्या पर्वतावर राहातात. ते सर्व मोठे पुण्यात्मा असून आनंदकंद श्रीमहादेवांची सेवा करीत असतात.॥ १०५॥

**हरि हर बिमुख धर्म रति नाहीं। ते नर तहँ सपनेहुँ नहिं जाहीं॥**
**तेहि गिरि पर बट बिटप बिसाला। नित नूतन सुंदर सब काला॥**

जे भगवान विष्णू व महादेव यांना विन्मुख असतात आणि ज्यांना धर्माबद्दल प्रेम नसते, ते लोक स्वप्नातही तेथे पोहोचू शकत नाहीत. त्या पर्वतावर एक विशाल वटवृक्ष आहे. तो नित्य ताजा आणि सहाही ऋतूंमध्ये सौंदर्याने नटलेला असतो.॥ १॥

**त्रिबिध समीर सुसीतलि छाया। सिव बिश्राम बिटप श्रुति गाया॥**
**एक बार तेहि तर प्रभु गयऊ। तरु बिलोकि उर अति सुखु भयऊ॥**

तेथे तिन्ही प्रकारची (शीतल, मंद, सुगंधी) हवा वाहात असते आणि तेथे अतिशय शीतल सावली असते. तो शिवांच्या विश्रांतीचा वृक्ष आहे, असे त्याला वेदांनी म्हटले आहे. एकदा प्रभू शिव त्या वृक्षाखाली गेले आणि त्यांना मनातून खूप आनंद झाला.॥ २॥

**निज कर डासि नागरिपु छाला। बैठे सहजहिं संभु कृपाला॥**
**कुंद इंदु दर गौर सरीरा। भुज प्रलंब परिधन मुनिचीरा॥**

कृपाळू शिवांनी स्वत: आपल्या हाताने तेथे व्याघ्रांबर अंथरले आणि सहजपणे ते तेथे बसले. कुंद-पुष्प, चंद्रमा आणि शंखासारखे त्यांचे शरीर गौर होते. लांबसडक बाहू होते आणि त्यांनी मुनींसारखे वल्कल वस्त्र परिधान केले होते.॥ ३॥

**तरुन अरुन अंबुज सम चरना। नख दुति भगत हृदय तम हरना॥**
**भुजग भूति भूषन त्रिपुरारी। आननु सरद चंद छबि हारी॥**

त्यांचे चरण पूर्ण उमललेल्या लाल कमळासारखे होते. नखांची ज्योती भक्तांच्या हृदयांतील अंधकार नाहीसा करणारी होती. साप व भस्म हीच त्यांची भूषणे होती आणि त्या त्रिपुरारी शिवांचे मुख शरदाच्या चंद्राची शोभाही हरण करणारे होते.॥ ४॥

दो०—**जटा मुकुट सुरसरित सिर लोचन नलिन बिसाल।**
**नीलकंठ लावन्यनिधि सोह बालबिधु भाल॥ १०६॥**

त्यांच्या मस्तकावर जटांचा मुकुट आणि गंगा शोभत होती. कमळासारखे विशाल नेत्र होते. त्यांचा कंठ निळा होता आणि ते सौंदर्याचे भांडार होते. त्यांच्या मस्तकावर द्वितीयेचा चंद्र शोभून दिसत होता. ॥ १०६ ॥

**बैठे सोह कामरिपु कैसें। धरें सरीरु सांतरसु जैसें॥**
**पारबती भल अवसरु जानी। गईं संभु पहिं मातु भवानी॥**

कामदेवाचे शत्रू शिव तेथे बसल्यावर असे शोभत होते की, जणू शांतरसच साकार होऊन बसला आहे. योग्य संधी पाहून पार्वतीमाता त्यांच्याजवळ गेली. ॥ १ ॥

**जानि प्रिया आदरु अति कीन्हा। बाम भाग आसनु हर दीन्हा॥**
**बैठीं सिव समीप हरषाई। पूरुब जन्म कथा चित आई॥**

आपल्या प्रिय पत्नीला पाहून शिवांनी तिचा खूप आदर-सत्कार केला आणि आपल्या डाव्या बाजूस तिला आसन दिले. पार्वती प्रसन्न होऊन शिवांच्या शेजारी बसली. तिला पूर्वजन्माची कथा आठवली. ॥ २ ॥

**पति हियँ हेतु अधिक अनुमानी। बिहसि उमा बोलीं प्रिय बानी॥**
**कथा जो सकल लोक हितकारी। सोइ पूछन चह सैलकुमारी॥**

आपल्या स्वामींच्या मनात (आपल्यावर पूर्वीपेक्षा) अधिक प्रेम असल्याचे पाहून पार्वती हसून गोड शब्दांत म्हणाली, (याज्ञवल्क्य सांगतात,) जी कथा सर्व लोकांसाठी हितकारक आहे, तीच पार्वती विचारू इच्छिते. ॥ ३ ॥

**बिस्वनाथ मम नाथ पुरारी। त्रिभुवन महिमा बिदित तुम्हारी॥**
**चर अरु अचर नाग नर देवा। सकल करहिं पद पंकज सेवा॥**

(पार्वती म्हणाली,) 'हे विश्वनाथा, हे माझे नाथ, हे त्रिपुरारी, तुमचा महिमा त्रैलोक्यात प्रसिद्ध आहे. चर, अचर, नाग, मनुष्य आणि देव, सर्वजण तुमच्या चरणांची सेवा करतात. ॥ ४ ॥

दो०—**प्रभु समरथ सर्बग्य सिव सकल कला गुन धाम।**
**जोग ग्यान बैराग्य निधि प्रनत कलपतरु नाम॥ १०७॥**

हे प्रभो! तुम्ही समर्थ, सर्वज्ञ आणि कल्याणस्वरूप आहात. सर्व कला आणि गुणांचे निधान आहात. तसेच योग, ज्ञान आणि वैराग्याचे भांडार आहात. तुमचे नाव हे शरणागतांसाठी कल्पवृक्ष आहे. ॥ १०७ ॥

**जौं मो पर प्रसन्न सुखरासी। जानिअ सत्य मोहि निज दासी॥**
**तौ प्रभु हरहु मोर अग्याना। कहि रघुनाथ कथा बिधि नाना॥**

हे सुखराशी, जर तुम्ही माझ्यावर प्रसन्न असाल आणि मला आपली दासी मानीत असाल, तर हे प्रभो, तुम्ही श्रीरामांच्या नाना प्रकारच्या कथा सांगून माझे अज्ञान दूर करा.॥ १॥

**जासु भवनु सुरतरु तर होई। सहि कि दरिद्र जनित दुखु सोई॥**
**ससिभूषन अस हृदयँ बिचारी। हरहु नाथ मम मति भ्रम भारी॥**

ज्याचे घर कल्पवृक्षाखाली असेल, त्याने दारिद्र्याचे दुःख का बरे सोसावे? हे शशिभूषण, हे नाथ, असा विचार करून माझ्या बुद्धीचा मोठा भ्रम दूर करा.॥ २॥

**प्रभु जे मुनि परमारथबादी। कहहिं राम कहुँ ब्रह्म अनादी॥**
**सेस सारदा बेद पुराना। सकल करहिं रघुपति गुन गाना॥**

हे प्रभो! जे ब्रह्माचे ज्ञाते आणि वक्ते असलेले मुनी आहेत, ते श्रीरघुनाथांना अनादी ब्रह्म म्हणतात आणि शेष, सरस्वती, वेद आणि पुराणे, हे सर्व श्रीरघुनाथांचे गुणगान करतात.॥ ३॥

**तुम्ह पुनि राम राम दिन राती। सादर जपहु अनँग आराती॥**
**रामु सो अवध नृपति सुत सोई। की अज अगुन अलखगति कोई॥**

आणि हे कामदेवाचे शत्रू, तुम्हीसुद्धा रात्रंदिवस आदराने राम-राम असे जपत असता. हे राम म्हणजेच तेच अयोध्येच्या राजाचे पुत्र आहेत काय? किंवा अजन्मा, निर्गुण आणि अगोचर कोणी दुसरेच राम आहेत?॥ ४॥

दो०—**जौं नृप तनय त ब्रह्म किमि नारि बिरहँ मति भोरि।**
**देखि चरित महिमा सुनत भ्रमति बुद्धि अति मोरि॥ १०८॥**

जर ते राजपुत्र असतील तर मग ब्रह्म कसे? (जर ते ब्रह्म असतील तर) स्त्रीच्या विरहामुळे त्यांची बुद्धी भ्रमित कशी झाली? एकीकडे त्यांचे असे चरित्र पाहून आणि दुसरीकडे त्यांचा महिमा ऐकून माझी बुद्धी पार बावचळून गेली आहे.॥ १०८॥

**जौं अनीह ब्यापक बिभु कोऊ। कहहु बुझाइ नाथ मोहि सोऊ॥**
**अग्य जानि रिस उर जनि धरहू। जेहि बिधि मोह मिटै सोइ करहू॥**

जर इच्छारहित, व्यापक, समर्थ ब्रह्म दुसरे कोणी असेल, तर हे नाथ, मला समजावून सांगा. मला अज्ञानी समजून राग धरू नका. ज्यामुळे माझा मोह दूर होईल, असे करा.॥ १॥

**मैं बन दीखि राम प्रभुताई। अति भय बिकल न तुम्हहि सुनाई॥**
**तदपि मलिन मन बोधु न आवा। सो फलु भली भाँति हम पावा॥**

मी (मागील जन्मात) वनामध्ये श्रीरामांची महती पाहिली होती, परंतु फार घाबरून गेल्यामुळे मी ती गोष्ट तुम्हांला सांगितली नव्हती. तरीही माझ्या अज्ञानी मनास काही बोध झाला नाही. त्याचे पुरते फळही मला मिळाले.॥ २॥

**अजहूँ कछु संसउ मन मोरें। करहु कृपा बिनवउँ कर जोरें॥**
**प्रभु तब मोहि बहु भाँति प्रबोधा। नाथ सो समुझि करहु जनि क्रोधा॥**

अजूनही माझ्या मनात काही संशय उरला आहे. तुम्ही कृपा करा. मी हात जोडून विनंती करते. हे प्रभो, त्यावेळी तुम्ही मला पुष्कळ तऱ्हेने समजावले होते. (तरीही माझा संशय दूर झाला नाही.) हे नाथ, असे समजून माझ्यावर राग धरू नका.॥ ३॥

**तब कर अस बिमोह अब नाहीं। रामकथा पर रुचि मन माहीं॥**
**कहहु पुनीत राम गुन गाथा। भुजगराज भूषन सुरनाथा॥**

आता मला पूर्वीसारखा मोह राहिलेला नाही. आता माझ्या मनात रामकथा ऐकण्याची आवड उत्पन्न झाली आहे. शेषनागाचे भूषण धारण करणाऱ्या हे देवांच्या नाथा, तुम्ही श्रीरामांच्या गुणांची पवित्र कथा मला सांगा.॥ ४॥

दो०—**बंदउँ पद धरि धरनि सिरु बिनय करउँ कर जोरि।**
**बरनहु रघुबर बिसद जसु श्रुति सिद्धांत निचोरि॥ १०९॥**

मी भूमीवर डोके ठेवून तुमच्या चरणांना वंदन करते आणि हात जोडून विनंती करते. तुम्ही वेद-सिद्धांताचे सार काढून श्रीरघुनाथांच्या निर्मल कीर्तीचे वर्णन करा.॥ १०९॥

**जदपि जोषिता नहिं अधिकारी। दासी मन क्रम बचन तुम्हारी॥**
**गूढ़उ तत्त्व न साधु दुरावहिं। आरत अधिकारी जहँ पावहिं॥**

जरी मी स्त्री असल्यामुळे ते ऐकण्याची अधिकारी नाही, तरी मी काया-वाचामनाने तुमचीच दासी आहे. संतजनांना जेव्हा तळमळ असलेला अधिकारी दिसतो, तेव्हा ते गूढ तत्त्वसुद्धा त्याच्यापासून लपवून ठेवीत नाहीत.॥ १॥

**अति आरति पूछउँ सुरराया। रघुपति कथा कहहु करि दाया॥**
**प्रथम सो कारन कहहु बिचारी। निर्गुन ब्रह्म सगुन बपु धारी॥**

हे देवांच्या स्वामी, मी मोठ्या काकुळतीने विचारते. तेव्हा तुम्ही माझ्यावर दया करून श्रीरघुनाथांची कथा सांगा. निर्गुण ब्रह्म हे सगुण रूप का धारण करते? ते कारण प्रथम सांगा.॥ २॥

**पुनि प्रभु कहहु राम अवतारा। बालचरित पुनि कहहु उदारा॥**
**कहहु जथा जानकी बिबाहीं। राज तजा सो दूषन काहीं॥**

हे प्रभू, नंतर श्रीरामचंद्रांच्या अवताराची कथा सांगा. तसेच त्यांचे उदार बालचरित्र सांगा. त्यानंतर त्यांनी जानकीशी कशाप्रकारे विवाह केला, ती कथा सांगा आणि त्यांना कोणत्या दोषामुळे राज्य सोडावे लागले, ते सांगा.॥ ३॥

**बन बसि कीन्हे चरित अपारा। कहहु नाथ जिमि रावन मारा॥**
**राज बैठि कीन्हीं बहु लीला। सकल कहहु संकर सुखसीला॥**

हे नाथ, त्यानंतर त्यांनी वनवासात राहून कोणते अपार चरित्र केले आणि रावणाला कशाप्रकारे मारले, ते सांगा. हे सुखस्वरूप शंकर, नंतर त्यांनी राज्यावर बसल्यावर ज्या लीला केल्या, त्या सर्व सांगा.॥ ४॥

दो०—**बहुरि कहहु करुनायतन कीन्ह जो अचरज राम।**
**प्रजा सहित रघुबंसमनि किमि गवने निज धाम॥ ११०॥**

हे कृपाधाम, श्रीरामचंद्रांनी जे अद्‌भुत चरित्र केले ते सांगा. ते रघुकुलशिरोमणी प्रजेसह कशाप्रकारे आपल्या परमधामास गेले?॥ ११०॥

**पुनि प्रभु कहहु सो तत्त्व बखानी। जेहिं बिग्यान मगन मुनि ग्यानी॥**
**भगति ग्यान बिग्यान बिरागा। पुनि सब बरनहु सहित बिभागा॥**

हे प्रभो, ज्या अनुभूतीमध्ये ज्ञानी मुनिगण नित्य मग्न राहातात, ते तत्त्व तुम्ही समजावून सांगा. त्यानंतर भक्ती, ज्ञान, विज्ञान आणि वैराग्य यांचे विभागांसह वर्णन करून सांगा.॥ १॥

**औरउ राम रहस्य अनेका। कहहु नाथ अति बिमल बिबेका॥**
**जो प्रभु मैं पूछा नहिं होई। सोउ दयाल राखहु जनि गोई॥**

(याशिवाय) श्रीरामचंद्रांच्या ज्या इतर अनेक रहस्यमय गोष्टी असतील, त्या सांगा. हे नाथ, तुमचे ज्ञान अत्यंत निर्मल आहे. हे प्रभो, हे दयाळू, जी गोष्ट मी विचारली नसेल, तीसुद्धा लपवून न ठेवता सांगा.॥ २॥

**तुम्ह त्रिभुवन गुर बेद बखाना। आन जीव पाँवर का जाना॥**
**प्रस्न उमा कै सहज सुहाई। छल बिहीन सुनि सिव मन भाई॥**

वेदांनी तुम्हांला तिन्ही लोकांचा गुरू म्हटले आहे. इतर पामर जीव हे रहस्य कसे जाणणार!' पार्वतीचे हे सहज-सुंदर व निष्कपट प्रश्न ऐकून शिवांच्या मनास फार बरे वाटले.॥ ३॥

**हर हियँ रामचरित सब आए। प्रेम पुलक लोचन जल छाए॥**
**श्रीरघुनाथ रूप उर आवा। परमानंद अमित सुख पावा॥**

श्रीमहादेवांच्या मनात सर्व रामचरित्र आले. प्रेमाने त्यांचे शरीर पुलकित झाले आणि नेत्रांमध्ये पाणी आले. श्रीरघुनाथांचे रूप त्यांच्या मनात प्रकट झाले, त्यामुळे प्रत्यक्ष परमानंदस्वरूप शिवांनाही अपार सुख झाले.॥ ४॥

दो०—**मगन ध्यान रस दंड जुग पुनि मन बाहेर कीन्ह।**
**रघुपति चरित महेस तब हरषित बरनै लीन्ह॥ १११॥**

शिव दोन घटका ध्यानाच्या आनंद-रसात मग्न झाले, नंतर त्यांनी बळेच मन आवरले आणि ते प्रसन्न चित्ताने श्रीरघुनाथांचे चरित्र वर्णन करू लागले. ॥ १११ ॥

**झूठेउ सत्य जाहि बिनु जानें। जिमि भुजंग बिनु रजु पहिचानें॥**
**जेहि जानें जग जाइ हेराई। जागें जथा सपन भ्रम जाई॥**

'जे जाणल्याविना खोटेसुद्धा खरे वाटते, जसा दोरीवर सापाचा भ्रम होतो आणि जे जाणल्यावर जगताचा लोप होतो, जसे जागे झाल्यावर स्वप्नाचा भ्रम नाहीसा होतो, ॥ १ ॥

**बंदउँ बालरूप सोइ रामू। सब सिधि सुलभ जपत जिसु नामू॥**
**मंगल भवन अमंगल हारी। द्रवउ सो दसरथ अजिर बिहारी॥**

त्या श्रीरामचंद्रांच्या बालरूपाला मी वंदन करतो. त्यांचे नाव जपल्यामुळे सर्व सिद्धी सहजपणे प्राप्त होतात. मंगलाचे धाम असणारे, अमंगलाचे हरण करणारे आणि दशरथाच्या अंगणामध्ये खेळणारे ते बालरूप असलेले श्रीराम माझ्यावर कृपा करोत.' ॥ २ ॥

**करि प्रनाम रामहि त्रिपुरारी। हरषि सुधा सम गिरा उचारी॥**
**धन्य धन्य गिरिराजकुमारी। तुम्ह समान नहिं कोउ उपकारी॥**

त्रिपुरासुराचा वध करणारे शिव श्रीरामांना प्रणाम करून आनंदाने अमृतमय वाणीने म्हणाले, 'हे गिरिराजकुमारी! तू धन्य आहेस. खरेच धन्य आहेस. तुझ्यासारखा उपकार करणारा कोणीही नाही. ॥ ३ ॥

**पूँछेहु रघुपति कथा प्रसंगा। सकल लोक जग पावनि गंगा॥**
**तुम्ह रघुबीर चरन अनुरागी। कीन्हिहु प्रस्न जगत हित लागी॥**

तू श्रीरामांची कथा विचारलीस. ती कथा जगाला पावन करणाऱ्या गंगेसमान सर्व लोकांना पावन करणारी आहे. श्रीरामांच्या चरणी तुझे प्रेम आहे. त्यामुळे तू जगाच्या कल्याणासाठीच प्रश्न विचारले आहेस. ॥ ४ ॥

**दो०—राम कृपा तें पारबति सपनेहुँ तव मन माहिं।**
**सोक मोह संदेह भ्रम मम बिचार कछु नाहिं॥ ११२॥**

हे पार्वती, श्रीरामांच्या कृपेमुळे तुझ्या मनात स्वप्नातही शोक, मोह, संदेह आणि भ्रम काहीही नाही, असे मला वाटते. ॥ ११२ ॥

**तदपि असंका कीन्हिहु सोई। कहत सुनत सब कर हित होई॥**
**जिन्ह हरिकथा सुनी नहिं काना। श्रवन रंध्र अहिभवन समाना॥**

तरीही तू तीच पूर्वीची शंका उपस्थित केलीस. हा प्रसंग सांगण्याने-ऐकण्याने सर्वांचे कल्याण होईल. ज्यांनी आपल्या कानांनी भगवंतांची कथा ऐकली नाही, त्यांची कानांची भोके सापाच्या बिळाप्रमाणे आहेत. ॥ १ ॥

**नयनन्हि संत दरस नहिं देखा। लोचन मोरपंख कर लेखा॥**
**ते सिर कटु तुंबरि समतूला। जे न नमत हरि गुर पद मूला॥**

ज्यांनी आपल्या डोळ्यांनी संतांचे दर्शन घेतले नाही, त्यांचे डोळे मोराच्या पंखांवर दिसणाऱ्या नकली डोळ्यांच्या श्रेणीत येतात. जे मस्तक श्रीहरींच्या आणि श्रीगुरूंच्या चरणी झुकत नाही, ते कडू भोपळ्यासमान होय.॥ २॥

**जिन्ह हरिभगति हृदयँ नहिं आनी। जीवत सव समान तेइ प्रानी॥**
**जो नहिं करइ राम गुन गाना। जीह सो दादुर जीह समाना॥**

ज्यांच्या हृदयात भगवंतांच्या भक्तीला स्थान नाही, ते प्राणी जिवंत मुडद्याप्रमाणे होत. जी जीभ श्रीरामांच्या गुणांचे गायन करीत नाही, ती बेडकाच्या जिभेप्रमाणे होय.॥ ३॥

**कुलिस कठोर निठुर सोइ छाती। सुनि हरिचरित न जो हरषाती॥**
**गिरिजा सुनहु राम कै लीला। सुर हित दनुज बिमोहनसीला॥**

भगवंतांचे चरित्र ऐकून आनंदित होत नाही, ते हृदय वज्रासारखे कठोर व निष्ठुर होय, हे पार्वती, श्रीरामचंद्रांची लीला ऐक. ती देवांचे कल्याण करणारी आणि विशेषत: दैत्यांना मोहित करणारी आहे.॥ ४॥

दो०—**रामकथा सुरधेनु सम सेवत सब सुख दानि।**
**सतसमाज सुरलोक सब को न सुनै अस जानि॥ ११३॥**

कामधेनू ही सेवा केल्यावर सर्व सुखे प्राप्त करून देते, तशी ही रामकथा आहे आणि सत्पुरुषांचा समुदाय हाच सर्व देवांचा लोक होय. असे पाहिल्यावर कोण बरे ही कथा ऐकणार नाही ?॥ ११३॥

**रामकथा सुंदर कर तारी। संसय बिहग उड़ावनिहारी॥**
**रामकथा कलि बिटप कुठारी। सादर सुनु गिरिराजकुमारी॥**

संदेहरूपी पक्ष्यांना हुसकून लावणाऱ्या टाळीप्रमाणे श्रीरामांची कथा हातांची सुंदर टाळी आहे. रामकथा ही कलियुगरूपी वृक्षाला तोडणारी कुऱ्हाड आहे. हे गिरिराजकुमारी! तू ही कथा आदराने ऐक.॥ १॥

**राम नाम गुन चरित सुहाए। जनम करम अगनित श्रुति गाए॥**
**जथा अनंत राम भगवाना। तथा कथा कीरति गुन नाना॥**

श्रीरामचंद्रांची सुंदर नामे, गुण, चरित्र, जन्म आणि कर्म हे सर्व अगणित असल्याचे वेदांनी प्रतिपादित केले आहे. ज्याप्रमाणे भगवान श्रीराम हे अनंत आहेत, त्याप्रमाणे त्यांच्या कथा, कीर्ती आणि गुण हे सुद्धा अनंत आहेत.॥ २॥

**तदपि जथा श्रुत जसि मति मोरी। कहिहउँ देखि प्रीति अति तोरी॥**
**उमा प्रस्न तव सहज सुहाई। सुखद संतसंमत मोहि भाई॥**

तरीही तुझे (त्याविषयी) अत्यंत प्रेम पाहून जे काही मी ऐकले आहे आणि जशी माझी बुद्धी आहे, त्यानुसार मी तुला सांगतो. हे पार्वती, तुझा प्रश्न स्वभावतः सुंदर, सुखदायक आणि संतसंमत आहे व मलाही तो फार आवडला. ॥ ३ ॥

**एक बात नहिं मोहि सोहानी । जदपि मोह बस कहेहु भवानी ॥**
**तुम्ह जो कहा राम कोउ आना । जेहि श्रुति गाव धरहिं मुनि ध्याना ॥**

परंतु हे पार्वती, एक गोष्ट मात्र मला आवडली नाही. जरी ती तू मोहामुळे म्हणालीस. तू असे म्हणालीस की, वेद ज्यांचे गुणगान करतात आणि मुनिजन ज्यांचे ध्यान करतात, ते राम कुणी दुसरे आहेत काय ? ॥ ४ ॥

दो०—**कहहिं सुनहिं अस अधम नर ग्रसे जे मोह पिसाच।**
**पाषंडी हरि पद बिमुख जानहिं झूठ न साच ॥ ११४ ॥**

जे मोहरूपी पिशाचाने झपाटले आहेत, नास्तिक आहेत, भगवंतांच्या चरणांशी विन्मुख आहेत आणि खरे-खोटे ज्यांना मुळीच माहीत नाही, असे अधम मनुष्यच अशाप्रकारे सांगत-ऐकत असतात. ॥ ११४ ॥

**अग्य अकोबिद अंध अभागी । काई बिषय मुकुर मन लागी ॥**
**लंपट कपटी कुटिल बिसेषी । सपनेहुँ संतसभा नहिं देखी ॥**

जे अज्ञानी, मूर्ख, आंधळे आणि भाग्यहीन आहेत, ज्यांच्या मनोरूपी आरशावर विषयरूपी मळ साचला आहे, जे व्यभिचारी, कपटी व मोठे दुष्ट आहेत आणि ज्यांनी कधी स्वप्नातही संतांचे दर्शन घेतले नाही; ॥ १ ॥

**कहहिं ते बेद असंमत बानी । जिन्ह कें सूझ लाभु नहिं हानी ॥**
**मुकुर मलिन अरु नयन बिहीना । राम रूप देखहिं किमि दीना ॥**

ज्यांना आपली लाभ-हानी कळत नाही, तेच लोक असे वेदविरोधी बोलत असतात. ज्यांचा हृदयरूपी आरसा मलिन आहे आणि जे नेत्रहीन आहेत, ते बिचारे श्रीरामांचे रूप कसे पाहणार ? ॥ २ ॥

**जिन्ह कें अगुन न सगुन बिबेका । जल्पहिं कल्पित बचन अनेका ॥**
**हरिमाया बस जगत भ्रमाहीं । तिन्हहि कहत कछु अघटित नाहीं ॥**

ज्यांना निर्गुण-सगुण याचा काहीही विवेक नाही. जे अनेक कपोलकल्पित गोष्टी बडबडत असतात, जे श्रीहरींच्या मायेला वश होऊन जन्म-मृत्यूच्या फेऱ्यात भटकत असतात, त्यांना काहीही बरळणे अशक्य नाही. ॥ ३ ॥

**बातुल भूत बिबस मतवारे । ते नहिं बोलहिं बचन बिचारे ॥**
**जिन्ह कृत महामोह मद पाना । तिन्ह कर कहा करिअ नहिं काना ॥**

ज्यांना (सन्निपात, उन्माद इत्यादी) वायुरोगाने झपाटले आहे, ज्यांना भुताने पछाडले आहे

आणि ज्यांनी नशापाणी केले आहे, असे लोक काही विचार करून बोलत नाहीत. ज्यांनी महामोहरूपी मदिरा ढोसली आहे, त्यांचे काहीही ऐकू नये.॥ ४॥

**सो०—अस निज हृदयँ बिचारि तजु संसय भजु राम पद।**
**सुनु गिरिराज कुमारि भ्रम तम रबि कर बचन मम॥ ११५॥**

मनात असा विचार करून संशय सोडून दे आणि श्रीरामचंद्रांच्या चरणांची सेवा कर. हे पार्वती, भ्रमरूपी अंधकाराचा नाश करण्यासाठी सूर्याच्या किरणांप्रमाणे असणारे माझे हे बोल ऐक.॥ ११५॥

**सगुनहि अगुनहि नहिं कछु भेदा। गावहिं मुनि पुरान बुध बेदा॥**
**अगुन अरूप अलख अज जोई। भगत प्रेम बस सगुन सो होई॥**

मुनी, पुराणे, पंडित आणि वेद हे सर्व सांगतात की, सगुण आणि निर्गुण यांच्यामध्ये कोणताही भेद नाही. जो निर्गुण, निराकार, अव्यक्त आणि अजन्मा आहे, तोच भक्तांच्या प्रेमाला वश होऊन सगुण बनतो.॥ १॥

**जो गुन रहित सगुन सोइ कैसें। जलु हिम उपल बिलग नहिं जैसें॥**
**जासु नाम भ्रम तिमिर पतंगा। तेहि किमि कहिअ बिमोह प्रसंगा॥**

जो निर्गुण तोच सगुण कसा, हे समजून घे. ज्याप्रमाणे पाणी व पाण्याची गार यांत भेद नाही. भ्रमरूपी अंधकार नष्ट करण्यासाठी ज्यांचे नाव सूर्य आहे, त्यांच्याबाबतीत मोह कसा उद्‌भवू शकेल?॥ २॥

**राम सच्चिदानंद दिनेसा। नहिं तहँ मोह निसा लवलेसा॥**
**सहज प्रकासरूप भगवाना। नहिं तहँ पुनि बिग्यान बिहाना॥**

श्रीरामचंद्र हे सच्चिदानंदस्वरूप सूर्य आहेत. तेथे मोहरूपी रात्रीचा लवलेशही नाही. ते स्वभावतःच प्रकाशरूप आणि षड्गुणैश्वर्ययुक्त भगवान आहेत, तेथे तर विज्ञानरूपी प्रातःकालही होत नाही. (अज्ञानरूपी रात्र असेल तरच विज्ञानरूपी प्रातःकाल होणार. भगवान तर नित्य ज्ञानस्वरूप आहेत.)॥ ३॥

**हरष बिषाद ग्यान अग्याना। जीव धर्म अहमिति अभिमाना॥**
**राम ब्रह्म ब्यापक जग जाना। परमानंद परेस पुराना॥**

हर्ष, शोक, ज्ञान, अज्ञान, अहंता आणि अभिमान या सर्व बाबी जीवाचे स्वभाव आहेत. श्रीरामचंद्र हे तर व्यापक ब्रह्म, परमानंदस्वरूप, परात्पर प्रभू आणि पुराणपुरुष आहेत, ही गोष्ट साऱ्या जगाला ठाऊक आहे.॥ ४॥

**दो०—पुरुष प्रसिद्ध प्रकास निधि प्रगट परावर नाथ।**
**रघुकुलमनि मम स्वामि सोइ कहि सिवँ नायउ माथ॥ ११६॥**

जे प्रसिद्ध पुराणपुरुष आहेत, जे प्रकाशाचे भांडार आहेत, सर्व रूपांमध्ये जे व्यक्त आहेत,

जीव, माया आणि जगत यांचे स्वामी आहेत, तेच रघुकुलमणी श्रीरामचंद्र हे माझे स्वामी आहेत' असे म्हणून शिवांनी त्यांना नमन केले. ॥ ११६ ॥

**निज भ्रम नहिं समुझहिं अग्यानी । प्रभु पर मोह धरहिं जड़ प्रानी ॥**
**जथा गगन घन पटल निहारी । झाँपेउ भानु कहहिं कुबिचारी ॥**

'अज्ञानी माणसांना स्वत:चा भ्रम कळत नाही आणि मग ते मूर्ख, प्रभू श्रीरामचंद्रांच्यावर आपल्या भ्रमाचा आरोप करतात. ज्याप्रमाणे आकाशातील ढगांचे आच्छादन पाहून अज्ञानी लोक म्हणतात की, ढगांनी सूर्याला झाकून टाकले. ॥ १ ॥

**चितव जो लोचन अंगुलि लाएँ । प्रगट जुगल ससि तेहि के भाएँ ॥**
**उमा राम बिषइक अस मोहा । नभ तम धूम धूरि जिमि सोहा ॥**

जो माणूस डोळ्यांत बोट घालून पाहतो, त्याला दोन चंद्र दिसतात. हे पार्वती, श्रीरामचंद्रांच्या बाबतीत अशा प्रकारच्या मोहाची कल्पना करणे म्हणजे आकाशात अंधकार, धूर आणि धूळ पाहणे होय. (आकाश हे निर्मळ व निर्लेप आहे, त्याला कोणी मलिन किंवा स्पर्श करू शकत नाही. त्याप्रमाणे भगवान श्रीरामचंद्र हे नित्य निर्मळ व निर्लेप आहेत.) ॥ २ ॥

**बिषय करन सुर जीव समेता । सकल एक तें एक सचेता ॥**
**सब कर परम प्रकासक जोई । राम अनादि अवधपति सोई ॥**

विषय, इंद्रिये, इंद्रियांचे देव आणि जीवात्मा—हे सर्व एकमेकांच्या साहाय्यामुळे चेतन असतात. (अर्थात विषयांचे अस्तित्व इंद्रियांमुळे, इंद्रियांचे सामर्थ्य देवांमुळे आणि देवांचा प्रकाश चेतन जीवात्म्यामुळे असतो.) या सर्वांचा जो प्रकाशक आहे तोच अनादी परमात्मा म्हणजे अयोध्यानरेश श्रीरामचंद्र होत. ॥ ३ ॥

**जगत प्रकास्य प्रकासक रामू । मायाधीस ग्यान गुन धामू ॥**
**जासु सत्यता तें जड़ माया । भास सत्य इव मोह सहाया ॥**

हे जग प्रकाश्य आहे आणि श्रीराम हे प्रकाशक आहेत. ते मायेचे स्वामी आणि ज्ञान आणि गुणांचे निधान आहेत. त्यांच्या सत्तेमुळे जड माया ही मोहाच्या मदतीने सत्य असल्यासारखी भासते. ॥ ४ ॥

दो०—**रजत सीप महुँ भास जिमि जथा भानु कर बारि ।**
**जदपि मृषा तिहुँ काल सोइ भ्रम न सकइ कोउ टारि ॥ ११७ ॥**

ज्याप्रमाणे शिंपल्यावर चांदीची आणि सूर्याच्या किरणांवर पाण्याची प्रचीती येते. जरी ही प्रचीती तिन्ही काळांत खोटी असली, तरीही कुणीही हा भ्रम हटवू शकत नाही. ॥ ११७ ॥

**एहि बिधि जग हरि आश्रित रहई । जदपि असत्य देत दुख अहई ॥**
**जौं सपनें सिर काटै कोई । बिनु जागें न दूरि दुख होई ॥**

याचप्रमाणे हा संसार भगवंतांच्या आश्रयावर अवलंबून असतो. तो जरी असत्य आहे, तरीही तो दुःख देतोच. ज्याप्रमाणे स्वप्नात कुणी मुंडके कापून टाकले, तर त्याचे दुःख जागे झाल्याशिवाय काही दूर होत नाही. ॥ १ ॥

**जासु कृपाँ अस भ्रम मिटि जाई। गिरिजा सोइ कृपाल रघुराई॥**
**आदि अंत कोउ जासु न पावा। मति अनुमानि निगम अस गावा॥**

हे पार्वती, ज्यांच्या कृपेमुळे अशा प्रकारचा भ्रम नाहीसा होतो, ते कृपाळू श्रीरघुनाथ होत. त्यांचा आदी आणि अंत कुणालाही कळला नाही. वेदांनी आपल्या बुद्धीनुसार अनुमान करून असे वर्णन केले आहे, ॥ २ ॥

**बिनु पद चलइ सुनइ बिनु काना। कर बिनु करम करइ बिधि नाना॥**
**आनन रहित सकल रस भोगी। बिनु बानी बकता बड़ जोगी॥**

ते (ब्रह्म) पायाविना चालते, कानाविना ऐकते, हाताविनाच अनेक प्रकारची कामे करते, मुखाविनाच सर्व रसांचा आस्वाद घेते आणि वाणीविनाच ते उत्कृष्ट वक्ता आहे. ॥ ३ ॥

**तन बिनु परस नयन बिनु देखा। ग्रहइ घ्रान बिनु बास असेषा॥**
**असि सब भाँति अलौकिक करनी। महिमा जासु जाइ नहिं बरनी॥**

ते शरीराविनाच स्पर्शानुभव करते, डोळ्यांविना पाहते आणि नाकाविनाच सर्व प्रकारचा गंध घेते. त्या ब्रह्माची सर्व करणी सर्व प्रकारे अशी अलौकिक आहे. त्याचा महिमा सांगता येत नाही. ॥ ४ ॥

दो०—**जेहि इमि गावहिं बेद बुध जाहि धरहिं मुनि ध्यान।**
**सोइ दसरथ सुत भगत हित कोसलपति भगवान॥ ११८॥**

वेद आणि पंडित ज्यांचे अशाप्रकारे वर्णन करतात आणि मुनी ज्यांचे ध्यान करतात, तेच दशरथनंदन, भक्त-हितकारी, अयोध्यापती, भगवान श्रीरामचंद्र होत. ॥ ११८ ॥

**कासीं मरत जंतु अवलोकी। जासु नाम बल करउँ बिसोकी॥**
**सोइ प्रभु मोर चराचर स्वामी। रघुबर सब उर अंतरजामी॥**

(हे पार्वती,) ज्यांच्या नामाच्या प्रतापामुळे मी काशीत मृत्यू पावणाऱ्या प्राण्यास पाहून त्याला राममंत्र देऊन मुक्ती देतो. तेच माझे प्रभू रघुश्रेष्ठ श्रीरामचंद्र हे जड-चेतनाचे स्वामी आणि सर्वांतर्यामी आहेत. ॥ १ ॥

**बिबसहुँ जासु नाम नर कहहीं। जनम अनेक रचित अघ दहहीं॥**
**सादर सुमिरन जे नर करहीं। भव बारिधि गोपद इव तरहीं॥**

इच्छा नसतानाही ज्यांचे नाम घेतल्यामुळे अनेक जन्मांमध्ये केलेली पापे जळून जातात, त्यांचे जी माणसे आदराने स्मरण करतात, ते संसाररूपी (दुस्तर) समुद्रास गाईच्या खुरामुळे बनलेल्या खड्ड्याप्रमाणे (सहजपणे) ओलांडून जातात. ॥ २ ॥

**राम सो परमातमा भवानी । तहँ भ्रम अति अबिहित तव बानी ॥**
**अस संसय आनत उर माहीं । ग्यान बिराग सकल गुन जाहीं ॥**

हे पार्वती, ते परमात्मा म्हणजे श्रीरामचंद्रच होत. त्यांच्या ठिकाणी भ्रमाचा आरोप करणारे बोलणे हे अत्यंत अयोग्य आहे. अशाप्रकारचा संदेह मनात आणल्यामुळे मनुष्याचे ज्ञान, वैराग्य इत्यादी सर्व सद्‌गुण नाहीसे होतात.'॥ ३ ॥

**सुनि सिव के भ्रम भंजन बचना । मिटि गै सब कुतरक कै रचना ॥**
**भइ रघुपति पद प्रीति प्रतीती । दारुन असंभावना बीती ॥**

भगवान शिवांचे हे भ्रम दूर करणारे बोल ऐकून पार्वतीचे सर्व कुतर्क नाहीसे झाले. श्रीरघुनाथांच्या चरणी तिला प्रेम व विश्वास वाटू लागला आणि त्यांच्याविषयीचा तिचा फार मोठा गैरसमज दूर झाला. ॥ ४ ॥

दो०—**पुनि पुनि प्रभु पद कमल गहि जोरि पंकरुह पानि।**
**बोलीं गिरिजा बचन बर मनहुँ प्रेम रस सानि॥ ११९ ॥**

पार्वती वारंवार शिवांच्या चरणकमलांना कवळून व कमलांसारखे कर जोडून जणू प्रेमरसामध्ये ओथंबलेल्या सुंदर वाणीने बोलली. ॥ ११९ ॥

**ससि कर सम सुनि गिरा तुम्हारी । मिटा मोह सरदातप भारी ॥**
**तुम्ह कृपाल सबु संसउ हरेऊ । राम स्वरूप जानि मोहि परेऊ ॥**

'तुमची चंद्र-किरणांसमान शीतल वाणी ऐकून माझ्या अज्ञानरूपी शरदऋतूतील कडक उन्हाचा ताप नाहीसा झाला. हे कृपाळू, तुम्ही माझा संपूर्ण संदेह हरण केला. आता श्रीरामांचे वास्तविक स्वरूप मला समजून आले. ॥ १ ॥

**नाथ कृपाँ अब गयउ बिषादा । सुखी भयउँ प्रभु चरन प्रसादा ॥**
**अब मोहि आपनि किंकरि जानी । जदपि सहज जड़ नारि अयानी ॥**

हे नाथ, तुमच्या कृपेने आता माझा विषाद निघून गेला आणि तुमच्या चरणांच्या कृपेने मी सुखी झाले. मी स्त्री असल्यामुळे स्वभावतः मूर्ख आणि अज्ञानी आहे. तरीही आता तुम्ही मला आपली दासी मानून, ॥ २ ॥

**प्रथम जो मैं पूछा सोइ कहहू । जौं मो पर प्रसन्न प्रभु अहहू ॥**
**राम ब्रह्म चिनमय अबिनासी । सर्ब रहित सब उर पुर बासी ॥**

हे प्रभो, जर तुम्ही माझ्यावर प्रसन्न असाल, तर जी गोष्ट मी तुम्हांला प्रथम विचारली होती, ती सांगा. (हे सत्य आहे की,) श्रीरामचंद्र ब्रह्म आहेत, चिन्मय (ज्ञानस्वरूप) आहेत, अविनाशी आहेत, सर्वांहून रहित आणि सर्वांच्या हृदयरूपी नगरीमध्ये निवास करणारे आहेत. ॥ ३ ॥

**नाथ धरेउ नरतनु केहि हेतू। मोहि समुझाइ कहहु बृषकेतू॥**
**उमा बचन सुनि परम बिनीता। रामकथा पर प्रीति पुनीता॥**

मग हे नाथ, त्यांनी मनुष्य-शरीर कशासाठी धारण केले? हे धर्म-ध्वज धारण करणाऱ्या प्रभो, हे मला समजावून द्या. पार्वतीचे नम्र बोल ऐकून आणि श्रीरामांच्या कथेविषयी तिचे विशुद्ध प्रेम पाहून॥ ४॥

दो०—**हियँ हरषे कामारि तब संकर सहज सुजान।**
**बहु बिधि उमहि प्रसंसि पुनि बोले कृपानिधान॥ १२० (क)॥**

कामदेवाचे शत्रू, स्वभावतः ज्ञानी व कृपानिधान भगवान शिव मनात फार प्रसन्न झाले आणि अनेक प्रकारे पार्वतीची प्रशंसा करीत म्हणाले.॥ १२० (क)॥

## नवाह्न पारायण, पहिला विश्राम

## मासपारायण, चौथा विश्राम

सो०—**सुनु सुभ कथा भवानि रामचरितमानस बिमल।**
**कहा भुसुंडि बखानि सुना बिहग नायक गरुड़॥ १२० (ख)॥**

'हे पार्वती, निर्मल 'रामचरितमानस'ची मंगलमय कथा ऐक. ही काकभुशुंडींनी विस्तारपूर्वक पक्षिराज गरुडाला सांगितली होती.॥ १२० (ख)॥

**सो संबाद उदार जेहि बिधि भा आगें कहब।**
**सुनहु राम अवतार चरित परम सुंदर अनघ॥ १२० (ग)॥**

तो श्रेष्ठ संवाद कशाप्रकारे झाला, ते मी पुढे सांगतो. आता तू श्रीरामचंद्रांच्या अवताराचे परम सुंदर व पापनाशक चरित्र ऐक.॥ १२० (ग)॥

**हरि गुन नाम अपार कथा रूप अगनित अमित।**
**मैं निज मति अनुसार कहउँ उमा सादर सुनहु॥ १२० (घ)॥**

श्रीहरींचे गुण, नाम, कथा व रूप-हे सर्व अपार, अगणित आणि अनंत आहेत. तरीही हे पार्वती, मी आपल्या बुद्धीनुसार सांगतो, ते आदराने ऐक.॥ १२० (घ)॥

**सुनु गिरिजा हरिचरित सुहाए। बिपुल बिसद निगमागम गाए॥**
**हरि अवतार हेतु जेहि होई। इदमित्थं कहि जाइ न सोई॥**

हे पार्वती, ऐक. वेद-शास्त्रांनी श्रीहरींच्या सुंदर, विस्तृत आणि निर्मल चरित्रांचे वर्णन केलेले आहे. ज्या कारणामुळे श्रीहरींचा अवतार होतो, तो 'फक्त यासाठीच' असे खात्रीने म्हणता येत नाही.॥ १॥

**राम अतर्क्य बुद्धि मन बानी। मत हमार अस सुनहि सयानी॥**
**तदपि संत मुनि बेद पुराना। जस कछु कहहिं स्वमति अनुमाना॥**

हे बुद्धिमती! ऐक. माझ्या मते बुद्धी, मन व वाणीने श्रीरामचंद्रांविषयी तर्क करता येत नाही. तथापि संत, मुनी, वेद आणि पुराणे–हे आपापल्या बुद्धीनुसार जसे काही सांगतात,॥ २॥

**तस मैं सुमुखि सुनावउँ तोही। समुझि परइ जस कारन मोही॥**
**जब जब होइ धरम कै हानी। बाढ़हिं असुर अधम अभिमानी॥**

आणि जसे मला समजले आहे, हे सुमुखी, तेच अवताराचे कारण मी सांगतो. जेव्हा जेव्हा धर्माचा ऱ्हास होतो आणि नीच अभिमानी राक्षस वाढतात,॥ ३॥

**करहिं अनीति जाइ नहिं बरनी। सीदहिं बिप्र धेनु सुर धरनी॥**
**तब तब प्रभु धरि बिबिध सरीरा। हरहिं कृपानिधि सज्जन पीरा॥**

आणि ते, वर्णन करता येत नाही, असा अन्याय करतात. तसेच ब्राह्मण, गाई, देव आणि पृथ्वी यांना असह्य यातना होतात, तेव्हा तेव्हा ते कृपानिधान प्रभू दिव्य देह धारण करून सज्जनांचे दु:ख दूर करतात.॥ ४॥

दो०—**असुर मारि थापहिं सुरन्ह राखहिं निज श्रुति सेतु।**
**जग बिस्तारहिं बिसद जस राम जन्म कर हेतु॥ १२१॥**

ते असुरांना ठार मारून देवांची स्थापना करतात, आपल्या (श्वासरूप असलेल्या) वेदांच्या मर्यादेचे रक्षण करतात आणि जगामध्ये आपली उज्ज्वल कीर्ती पसरवितात. श्रीरामचंद्रांच्या अवताराचे हे कारण आहे.॥ १२१॥

**सोइ जस गाइ भगत भव तरहीं। कृपासिंधु जन हित तनु धरहीं॥**
**राम जनम के हेतु अनेका। परम बिचित्र एक तें एका॥**

ते यशोगान कर-करून भक्तजन भवसागर तरून जातात. कृपासागर भगवान भक्तांच्या हितासाठी देह धारण करतात. श्रीरामचंद्रांनी जन्म घेण्याची अनेक कारणे आहेत. ती एकाहून एक विलक्षण आहेत.॥ १॥

**जनम एक दुइ कहउँ बखानी। सावधान सुनु सुमति भवानी॥**
**द्वारपाल हरि के प्रिय दोऊ। जय अरु बिजय जान सब कोऊ॥**

हे बुद्धिमती भवानी, त्यांपैकी एक–दोन जन्मांचे वर्णन मी विस्ताराने करतो. तू लक्षपूर्वक ऐक. श्रीहरींचे जय व विजय नावाचे दोन प्रिय द्वारपाल आहेत. त्यांना सर्वजण जाणतात.॥ २॥

**बिप्र श्राप तें दूनउ भाई। तामस असुर देह तिन्ह पाई॥**
**कनककसिपु अरु हाटकलोचन। जगत बिदित सुरपति मद मोचन॥**

त्या दोन भावांना सनकादिकांच्या शापाने असुरांचे तामसी देह मिळाले. एकाचे नाव होते हिरण्यकशिपू आणि दुसऱ्याचे हिरण्याक्ष. त्यांनी इंद्राची गुर्मी उतरविली होती, हे सर्व जगाला ठाऊक आहे.॥ ३॥

**बिजई समर बीर बिख्याता। धरि बराह बपु एक निपाता॥**
**होइ नरहरि दूसर पुनि मारा। जन प्रहलाद सुजस बिस्तारा॥**

युद्धामध्ये विजय मिळविणारे ते विख्यात वीर होते. यांपैकी हिरण्याक्षाला भगवंतांनी वराहाचे शरीर धारण करून मारले. नंतर हिरण्यकशिपूचा नरसिंह रूप धारण करून वध केला आणि आपला भक्त प्रल्हाद याची उत्तम कीर्ती पसरविली.॥ ४॥

**दो०—भए निसाचर जाइ तेइ महाबीर बलवान।**
**कुंभकरन रावन सुभट सुर बिजई जग जान॥ १२२॥**

पुढे ते (दोघे) देवांना जिंकणारे आणि बडे योद्धे असलेले रावण व कुंभकर्ण नावाचे मोठे बलवान व महावीर राक्षस झाले. त्यांना संपूर्ण जग जाणते.॥ १२२॥

**मुकुत न भए हते भगवाना। तीनि जनम द्विज बचन प्रवाना॥**
**एक बार तिन्ह के हित लागी। धरेउ सरीर भगत अनुरागी॥**

भगवंतांकडून मारले गेल्यावरही ते दोघे (हिरण्याक्ष व हिरण्यकशिपू) मुक्त झाले नाहीत. कारण ब्राह्मणांच्या शापाचा परिणाम तीन जन्मांचा होता, म्हणून ते मुक्त झाले नाहीत. त्यांना तीन जन्म घ्यावे लागले. तेव्हा भक्तप्रेमी भगवंतांनी त्यांच्या कल्याणासाठी पुन्हा एकदा अवतार घेतला.॥ १॥

**कस्यप अदिति तहाँ पितु माता। दसरथ कौसल्या बिख्याता॥**
**एक कलप एहि बिधि अवतारा। चरित पवित्र किए संसारा॥**

त्या अवतारामध्ये कश्यप आणि अदिती हे त्यांचे माता-पिता होते. तेच पुढे दशरथ व कौसल्या या नावाने प्रसिद्ध झाले. एका कल्पात अशाप्रकारे त्यांनी अवतार घेऊन जगामध्ये पवित्र लीला केल्या.॥ २॥

**एक कलप सुर देखि दुखारे। समर जलंधर सन सब हारे॥**
**संभु कीन्ह संग्राम अपारा। दनुज महाबल मरइ न मारा॥**

एका कल्पात जलंधर दैत्याकडून पराजित झाल्यामुळे सर्व देव दुःखी झालेले पाहून शिवांनी त्याच्याशी घनघोर युद्ध केले, परंतु तो महाबली दैत्य मारूनही मरत नव्हता.॥ ३॥

**परम सती असुराधिप नारी। तेहिं बल ताहि न जितहिं पुरारी॥**

त्या दैत्यराजाची पत्नी मोठी पतिव्रता होती. तिच्या प्रतापामुळे त्रिपुरासुरासारख्या अजेय शत्रूचा नाश करणारे शिवसुद्धा त्याला जिंकू शकले नाहीत.॥ ४॥

**दो०—छल करि टारेउ तासु ब्रत प्रभु सुर कारज कीन्ह।**
**जब तेहिं जानेउ मरम तब श्राप कोप करि दीन्ह॥ १२३॥**

तेव्हा प्रभूने कपटाने तिच्या पातिव्रत्याचा भंग करून देवांचे काम फत्ते केले. जेव्हा तिला हे रहस्य समजले, तेव्हा तिने रागाने भगवंतांना शाप दिला. ॥ १२३ ॥

**तासु श्राप हरि दीन्ह प्रमाना । कौतुकनिधि कृपाल भगवाना ॥**
**तहाँ जलंधर रावन भयऊ । रन हति राम परम पद दयऊ ॥**

लीलाधर कृपाळू हरींनी त्या स्त्रीचा शाप प्रमाण मानून स्वीकारला. तोच जलंधर त्या कल्पामध्ये रावण झाला. त्याला श्रीरामचंद्रांनी युद्धात मारून परमपद दिले. ॥ १ ॥

**एक जनम कर कारन एहा । जेहि लगि राम धरी नरदेहा ॥**
**प्रति अवतार कथा प्रभु केरी । सुनु मुनि बरनी कबिन्ह घनेरी ॥**

एका जन्माचे हे कारण होते. त्यासाठी श्रीरामांनी मनुष्यदेह धारण केला. हे भरद्वाज मुनी, ऐका. प्रभूंच्या प्रत्येक अवताराची कथा कवींनी नानाप्रकारे वर्णन केलेली आहे. ॥ २ ॥

**नारद श्राप दीन्ह एक बारा । कलप एक तेहि लगि अवतारा ॥**
**गिरिजा चकित भईं सुनि बानी । नारद बिष्नुभगत पुनि ग्यानी ॥**

एकदा नारदांनी शाप दिला, म्हणून त्यासाठी एका कल्पात भगवंतांचा अवतार झाला.' ही गोष्ट ऐकून पार्वती मोठी चकित झाली. (आणि ती म्हणाली) 'नारद तर विष्णुभक्त आणि ज्ञानी आहेत. ॥ ३ ॥

**कारन कवन श्राप मुनि दीन्हा । का अपराध रमापति कीन्हा ॥**
**यह प्रसंग मोहि कहहु पुरारी । मुनि मन मोह आचरज भारी ॥**

मग नारद मुनींनी भगवंतांना का शाप दिला? लक्ष्मीपती भगवंतांनी त्यांचा काय अपराध केला होता? हे नाथ! ती कथा मला सांगा. नारदमुनींच्या मनातही मोह उत्पन्न झाला, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे!' ॥ ४ ॥

दो०—**बोले बिहसि महेस तब ग्यानी मूढ़ न कोइ ।**
**जेहि जस रघुपति करहिं जब सो तस तेहि छन होइ ॥ १२४ ( क ) ॥**

तेव्हा महादेव हसत-हसत म्हणाले, 'कोणी ज्ञानी नाही, आणि मूर्खही नाही. श्रीरघुनाथ ज्याला जसे बनवितात, त्याक्षणी तो तसा बनतो.' ॥ १२४ (क) ॥

सो०—**कहउँ राम गुन गाथ भरद्वाज सादर सुनहु ।**
**भव भंजन रघुनाथ भजु तुलसी तजि मान मद ॥ १२४ ( ख ) ॥**

(याज्ञवल्क्य म्हणतात-) 'हे भरद्वाज, मी श्रीरामचंद्रांच्या गुणांची कथा सांगतो, ती तुम्ही आदराने ऐका.' तुलसीदास म्हणतात, 'मान व मद सोडून जन्म-मृत्यूचा नाश करणाऱ्या श्रीरामांना भजा.' ॥ १२४ (ख) ॥

**हिमगिरि गुहा एक अति पावनि । बह समीप सुरसरी सुहावनि ॥**
**आश्रम परम पुनीत सुहावा । देखि देवरिषि मन अति भावा ॥**

हिमालय पर्वतामध्ये एक मोठी पवित्र गुहा होती. तिच्या जवळूनच सुंदर गंगा वाहात होती. तो परम पवित्र आश्रम पाहून नारदांच्या मनाला अतिशय आनंद झाला. ॥ १ ॥

**निरखि सैल सरि बिपिन बिभागा । भयउ रमापति पद अनुरागा ॥**
**सुमिरत हरिहि श्राप गति बाधी । सहज बिमल मन लागि समाधी ॥**

पर्वत, नदी आणि वनाचे (सुंदर) विभाग पाहून नारदांना लक्ष्मीकांत भगवंतांविषयी प्रेम वाटू लागले. भगवंतांचे स्मरण करताच त्यांच्या (नारदांच्या) शापाची गती (दक्ष प्रजापतीने नारदांना शाप दिला होता, म्हणून ते एका जागी थांबू शकत नव्हते.) थांबली आणि त्यांचे मन स्वभावतःच निर्मळ असल्यामुळे त्यांची समाधी लागली. ॥ २ ॥

**मुनि गति देखि सुरेस डेराना । कामहि बोलि कीन्ह सनमाना ॥**
**सहित सहाय जाहु मम हेतू । चलेउ हरषि हियँ जलचरकेतू ॥**

नारदांची स्थिती पाहून देवराज इंद्र घाबरला. त्याने कामदेवाला बोलावून त्याचा आदर-सत्कार केला, (आणि म्हटले) 'माझ्या कल्याणासाठी तू आपल्या साहाय्यकांच्यासह (नारदांची समाधी भंग करण्यास) जा.' (हे ऐकून) कामदेव मनात प्रसन्न होऊन निघाला. ॥ ३ ॥

**सुनासीर मन महुँ असि त्रासा । चहत देवरिषि मम पुर बासा ॥**
**जे कामी लोलुप जग माहीं । कुटिल काक इव सबहि डेराहीं ॥**

इंद्राच्या मनात भीती वाटत होती की, देवर्षी नारदांना माझ्या पुरी (अमरावती) चे राज्य हवे आहे. जगामध्ये जे कामी व लोभी असतात, ते दुष्ट कावळ्याप्रमाणे सर्वांना घाबरतात. ॥ ४ ॥

दो०—**सूख हाड़ लै भाग सठ स्वान निरखि मृगराज।**
**छीनि लेइ जनि जान जड़ तिमि सुरपतिहि न लाज॥ १२५ ॥**

ज्याप्रमाणे मूर्ख कुत्रा सिंहाला पाहून वाळलेले हाड तोंडात धरून पळत सुटते. त्या मूर्खाला वाटते की, आपले हाडूक सिंह पळवून नेईल, त्याप्रमाणे इंद्राला (नारद आपले राज्य हिरावून घेतील, असा विचार करताना) लाज वाटली नाही. ॥ १२५ ॥

**तेहि आश्रमहिं मदन जब गयऊ । निज मायाँ बसंत निरमयऊ ॥**
**कुसुमित बिबिध बिटप बहुरंगा । कूजहिं कोकिल गुंजहिं भृंगा ॥**

जेव्हा कामदेव त्या आश्रमात गेला, तेव्हा त्याने आपल्या मायेने तेथे वसंतऋतू उत्पन्न केला. त्यामुळे नानात-हेच्या वृक्षांवर रंगीबेरंगी फुले उमलली. त्यांच्यावर बसून कोकिळा कुहूकुहू करू लागल्या आणि भ्रमर गुंजारव करू लागले. ॥ १ ॥

**चली सुहावनि त्रिबिध बयारी। काम कृसानु बढ़ावनिहारी॥**
**रंभादिक सुरनारि नबीना। सकल असमसर कला प्रबीना॥**

कामाग्नी भडकविणाऱ्या तीन प्रकारच्या (शीतल, मंद व सुगंधी) हवेच्या लहरी वाहू लागल्या. रंभा इत्यादी कामकलेमध्ये निपुण असलेल्या सर्व नवयौवना देवांगना-॥ २॥

**करहिं गान बहु तान तरंगा। बहुबिधि क्रीड़हिं पानि पतंगा॥**
**देखि सहाय मदन हरषाना। कीन्हेसि पुनि प्रपंच बिधि नाना॥**

अनेक प्रकारच्या ताना घेत गाऊ लागल्या आणि हातात चेंडू घेऊन नाना प्रकारचे खेळ खेळू लागल्या. कामदेव आपल्या या साहाय्यकांना पाहून प्रसन्न झाला आणि त्याने नाना प्रकारचे माया-जाल पसरले.॥ ३॥

**काम कला कछु मुनिहि न ब्यापी। निज भयँ डरेउ मनोभव पापी॥**
**सीम कि चाँपि सकइ कोउ तासू। बड़ रखवार रमापति जासू॥**

परंतु कामदेवाची कोणतीही कला मुनींवर प्रभाव टाकू शकली नाही. तेव्हा तो पापी कामदेव स्वत:च्या नाशाच्या भीतीने घाबरून गेला. लक्ष्मीपती भगवंत ज्याचे रक्षक असतील त्याची धर्ममर्यादा कोण भंग करू शकेल बरे?॥ ४॥

दो०—**सहित सहाय सभीत अति मानि हारि मन मैन।**
**गहेसि जाइ मुनि चरन तब कहि सुठि आरत बैन॥ १२६॥**

तेव्हा कामदेवाने फार घाबरून व मनात पराजय मान्य करून आपल्या सहकाऱ्यांसह मोठ्या दीनतेने मुनींचे पाय धरले.॥ १२६॥

**भयउ न नारद मन कछु रोषा। कहि प्रिय बचन काम परितोषा॥**
**नाइ चरन सिरु आयसु पाई। गयउ मदन तब सहित सहाई॥**

नारदांना मुळीच राग आला नाही. त्यांनी गोड शब्दांत कामदेवाचे समाधान केले. तेव्हा मुनींच्या चरणी मस्तक ठेवून व त्यांची आज्ञा घेऊन आपल्या सहकाऱ्यांसह तो परत गेला.॥ १॥

**मुनि सुसीलता आपनि करनी। सुरपति सभाँ जाइ सब बरनी॥**
**सुनि सब कें मन अचरजु आवा। मुनिहि प्रसंसि हरिहि सिरु नावा॥**

देवराज इंद्राच्या सभेत जाऊन त्याने मुनींचे शील आणि आपले कर्तृत्व सांगितले. ते ऐकून सर्वांना आश्चर्य वाटले आणि त्यांनी मुनींची प्रशंसा करीत श्रीहरींना नमन केले.॥ २॥

**तब नारद गवने सिव पाहीं। जिता काम अहमिति मन माहीं॥**
**मार चरित संकरहि सुनाए। अतिप्रिय जानि महेस सिखाए॥**

मग नारद श्रीशिवांच्याकडे गेले. त्यांच्या मनात अहंकार उत्पन्न झाला की, मी कामदेवाला

जिंकले. त्यांनी शिवांना कामदेवाची करणी सांगितली. शिवांनी त्यांना आपला आवडता समजून असा उपदेश दिला,॥ ३॥

**बार बार बिनवउँ मुनि तोही। जिमि यह कथा सुनायहु मोही॥**
**तिमि जनि हरिहि सुनावहु कबहूँ। चलेहुँ प्रसंग दुराएहु तबहूँ॥**

'हे मुनी, मी तुम्हांला वारंवार विनंती करतो की, ही कथा तुम्ही मला जशी सांगितली, तशी भगवान श्रीहरींना कधी सांगू नका. बोलण्याच्या ओघात विषय आला तरीही लपवून ठेवा.'॥ ४॥

दो०—**संभु दीन्ह उपदेस हित नहिं नारदहि सोहान।**
**भरद्वाज कौतुक सुनहु हरि इच्छा बलवान॥ १२७॥**

श्रीशिवांनी हा त्यांच्या भल्याचा उपदेश केला, परंतु नारदांना तो पटला नाही. हे भरद्वाज, आता गंमत ऐका. श्रीहरींची इच्छा मोठी बलवान आहे.॥ १२७॥

**राम कीन्ह चाहहिं सोइ होई। करै अन्यथा अस नहिं कोई॥**
**संभु बचन मुनि मन नहिं भाए। तब बिरंचि के लोक सिधाए॥**

श्रीरामचंद्रांना जे करायचे असते, तेच होते. त्याविरुद्ध करू शकेल, असा कोणीही नाही. शिवांचे बोलणे नारदांना रुचले नाही, तेव्हा ते तेथून ब्रह्मलोकी गेले.॥ १॥

**एक बार करतल बर बीना। गावत हरि गुन गान प्रबीना॥**
**छीरसिंधु गवने मुनिनाथा। जहँ बस श्रीनिवास श्रुतिमाथा॥**

एकदा गानविद्येत कुशल असलेले मुनिनाथ नारद हाती सुंदर वीणा घेऊन हरिगुण गात-गात क्षीरसागरात गेले. तेथे मूर्तिमंत वेदान्ततत्त्व असलेले लक्ष्मीनिवास भगवान नारायण राहातात.॥ २॥

**हरषि मिले उठि रमानिकेता। बैठे आसन रिषिहि समेता॥**
**बोले बिहसि चराचर राया। बहुते दिनन कीन्हि मुनि दाया॥**

भगवान लक्ष्मीकांत उभे राहून नारदांना आनंदाने भेटले आणि ते ऋषी नारदांसोबत आसनावर बसले. चराचराचे स्वामी भगवान हसून म्हणाले-'हे मुनी, आज बऱ्याच दिवसांनी (येण्याची) दया केली.'॥ ३॥

**काम चरित नारद सब भाषे। जद्यपि प्रथम बरजि सिवँ राखे॥**
**अति प्रचंड रघुपति कै माया। जेहि न मोह अस को जग जाया॥**

जरी श्रीशिवांनी नारदांना पूर्वीच 'हे सांगू नका,' अशी सूचना केली होती, तरीही त्यांनी कामदेवाची सर्व करणी भगवंतांना सांगितली. श्रीरघुनाथांची माया मोठी प्रबळ असते. ती मोहित करू शकणार नाही, असा या जगात कोण जन्मला आहे?॥ ४॥

दो०—**रूख बदन करि बचन मृदु बोले श्रीभगवान।**
**तुम्हरे सुमिरन तें मिटहिं मोह मार मद मान॥ १२८॥**

भगवान तटस्थपणे वरवर कोमल स्वरात म्हणाले की, 'हे मुनिराज, तुमचे स्मरण केल्यानेही इतरांचे मोह, काम, मद व अभिमान हे नाहीसे होतात. (मग तुमच्याबद्दल काय बोलायचे?)॥

**सुनु मुनि मोह होइ मन ताकें। ग्यान बिराग हृदय नहिं जाकें॥**
**ब्रह्मचरज ब्रत रत मतिधीरा। तुम्हहि कि करइ मनोभव पीरा॥**

हे मुनी, ज्याच्या हृदयात ज्ञान-वैराग्य नसते, त्याच्या मनात मोह येतो. तुम्ही तर ब्रह्मचर्यव्रता-मध्ये तत्पर आणि मोठ्या धीरबुद्धीचे आहात. तुम्हांला कामदेव कधी त्रास देऊ शकेल काय?'॥ १॥

**नारद कहेउ सहित अभिमाना। कृपा तुम्हारि सकल भगवाना॥**
**करुनानिधि मन दीख बिचारी। उर अंकुरेउ गरब तरु भारी॥**

नारदांनी मोठ्या अभिमानाने म्हटले की, 'भगवन! ही सर्व तुमची कृपा आहे.' करुणानिधान भगवंतांनी मनात विचार करून पाहिले की, यांच्या मनात प्रचंड गर्वाच्या वृक्षाचा अंकुर उत्पन्न झाला आहे.॥ २॥

**बेगि सो मैं डारिहउँ उखारी। पन हमार सेवक हितकारी॥**
**मुनि कर हित मम कौतुक होई। अवसि उपाय करबि मैं सोई॥**

सेवकांचे हित करणे हे माझे ब्रीद आहे. तेव्हा मी तो अंकुर ताबडतोब उपटून टाकतो. मुनींचे कल्याण आणि माझा गंमतीचा खेळ होईल, असा उपाय आपण अवश्य करावा.॥ ३॥

**तब नारद हरि पद सिर नाई। चले हृदयँ अहमिति अधिकाई॥**
**श्रीपति निज माया तब प्रेरी। सुनहु कठिन करनी तेहि केरी॥**

तेव्हा नारद भगवंतांच्या चरणी मस्तक ठेवून निघाले. त्यांच्या मनात अभिमान अधिकच वाढला होता. तेव्हा लक्ष्मीपती भगवंतांनी आपल्या मायेला प्रेरित केले. तिची करणी किती दुस्तर असते ते पाहा.॥ ४॥

दो०—**बिरचेउ मग महुँ नगर तेहिं सत जोजन बिस्तार।**
**श्रीनिवासपुर तें अधिक रचना बिबिध प्रकार॥ १२९॥**

तिने (हरिमायेने) वाटेत शंभर योजनांचे (चारशे कोसाचे) नगर रचले. त्या नगरातील विविध रचना विष्णूंच्या वैकुंठापेक्षाही अधिक सुंदर होत्या.॥ १२९॥

**बसहिं नगर सुंदर नर नारी। जनु बहु मनसिज रति तनुधारी॥**
**तेहिं पुर बसइ सीलनिधि राजा। अगनित हय गय सेन समाजा॥**

त्या नगरीत इतके सुंदर स्त्री-पुरुष राहात होते की, जणू कामदेव व रती हेच मानवदेह धारण केलेले असावेत. त्या नगरीत शीलनिधी नावाचा राजा राहात होता. त्याच्याकडे असंख्य घोडे, हत्ती व सैन्याची दले होती. ॥ १ ॥

**सत सुरेस सम बिभव बिलासा। रूप तेज बल नीति निवासा॥**
**बिस्वमोहनी तासु कुमारी। श्री बिमोह जिसु रूपु निहारी॥**

त्याचे वैभव आणि विलास शंभर इंद्रांसमान होते. तो स्वतः रूप, तेज, बल आणि नीतीचे घर होता. त्याला विश्वमोहिनी नावाची एक रूपवती कन्या होती, तिचे रूप पाहून लक्ष्मीनेसुद्धा मोहित व्हावे. ॥ २ ॥

**सोइ हरिमाया सब गुन खानी। सोभा तासु कि जाइ बखानी॥**
**करइ स्वयंबर सो नृपबाला। आए तहँ अगनित महिपाला॥**

ती सर्व गुणांची खाण भगवंतांची मायाच होती. तिच्या शोभेचे वर्णन कसे करता येईल? ती राजकुमारी स्वयंवर करू इच्छित होती. त्यासाठी तेथे अगणित राजे आले होते. ॥ ३ ॥

**मुनि कौतुकी नगर तेहिं गयऊ। पुरबासिन्ह सब पूछत भयऊ॥**
**सुनि सब चरित भूपगृहँ आए। करि पूजा नृप मुनि बैठाए॥**

नारद मुनी कुतूहलाने त्या नगरीत गेले आणि नगरवासींयाच्याकडे त्यांनी विचारपूस केली. सर्व वार्ता ऐकल्यावर ते राजाच्या महालात आले. राजाने त्यांची पूजा करून त्यांना आसनावर बसविले. ॥ ४ ॥

दो०—**आनि देखाई नारदहि भूपति राजकुमारि।**
**कहहु नाथ गुन दोष सब एहि के हृदयँ बिचारि॥ १३०॥**

नंतर राजाने राजकुमारीला आणून नारदांना दाखविले. (आणि विचारले) 'हे नाथ, तुम्ही विचार करून हिचे सर्व गुण-दोष सांगा.'॥ १३० ॥

**देखि रूप मुनि बिरति बिसारी। बड़ी बार लगि रहे निहारी॥**
**लच्छन तासु बिलोकि भुलाने। हृदयँ हरष नहिं प्रगट बखाने॥**

तिचे रूप पाहून नारद मुनी वैराग्य विसरून गेले आणि बराच वेळ तिच्याकडे बघतच राहिले. तिची लक्षणे पाहून मुनी स्वतःला विसरून गेले आणि मनात हर्षित झाले. परंतु प्रकटपणे त्यांनी लक्षणे सांगितली नाहीत. ॥ १ ॥

**जो एहि बरइ अमर सोइ होई। समरभूमि तेहि जीत न कोई॥**
**सेवहिं सकल चराचर ताही। बरइ सीलनिधि कन्या जाही॥**

(त्या लक्षणांचा विचार करून ते मनात म्हणाले-) जो हिच्याशी विवाह करील, तो अमर होईल

आणि रणभूमीमध्ये त्याला कोणी जिंकू शकणार नाही. ही शीलनिधीची कन्या ज्याला वरील, सर्व चराचर त्याची सेवा करील. ॥ २ ॥

**लच्छन सब बिचारि उर राखे। कछुक बनाइ भूप सन भाषे॥**
**सुता सुलच्छन कहि नृप पाहीं। नारद चले सोच मन माहीं॥**

ती सर्व लक्षणे मुनींनी मनात ठेवली आणि राजाला त्यांनी आपल्या मनाने काही लक्षणे सांगितली. राजाला मुलीची सुलक्षणे सांगून नारद निघून गेले. परंतु त्यांच्या मनात असे आले की, ॥ ३ ॥

**करौं जाइ सोइ जतन बिचारी। जेहि प्रकार मोहि बरै कुमारी॥**
**जप तप कछु न होइ तेहि काला। हे बिधि मिलइ कवन बिधि बाला॥**

आता जाऊन आपण असा उपाय करावा की, ही कन्या मलाच मिळेल. यावेळी जप तप करून काही होणार नाही. हे विधात्या, ही कन्या मला कशी बरे मिळेल? ॥ ४ ॥

दो०—**एहि अवसर चाहिअ परम सोभा रूप बिसाल।**
**जो बिलोकि रीझै कुअँरि तब मेलै जयमाल॥ १३१ ॥**

या वेळी मला खूप लावण्य आणि अत्यंत सुंदर रूप हवे. ते पाहून राजकुमारी माझ्यावर भाळून जाईल आणि वरमाला मला घालील. ॥ १३१ ॥

**हरि सन मागौं सुंदरताई। होइहि जात गहरु अति भाई॥**
**मोरें हित हरि सम नहिं कोऊ। एहि अवसर सहाय सोइ होऊ॥**

(आता असे करावे.) भगवंतांकडे सौंदर्य मागावे. परंतु त्यांच्याकडे जाण्यास फार वेळ होईल. परंतु श्रीहरींच्याशिवाय माझा हितचिंतक कोणी नाही, म्हणून या वेळी तेच मला साह्य करोत म्हणजे झाले. ॥ १ ॥

**बहुबिधि बिनय कीन्हि तेहि काला। प्रगटेउ प्रभु कौतुकी कृपाला॥**
**प्रभु बिलोकि मुनि नयन जुड़ाने। होइहि काजु हिएँ हरषाने॥**

त्यावेळी नारदांनी भगवंतांना पुष्कळ प्रार्थना केली, तेव्हा लीलामय कृपाळू प्रभू तेथे प्रगट झाले. स्वामींना पाहाताच नारदांचे नेत्र प्रफुल्लित झाले आणि ते मनात आनंदित होऊन म्हणाले की, आता काम झालेच. ॥ २ ॥

**अति आरति कहि कथा सुनाई। करहु कृपा करि होहु सहाई॥**
**आपन रूप देहु प्रभु मोही। आन भाँति नहिं पावौं ओही॥**

नारदांनी काकुळतीला येऊन सर्व कथा सांगितली (आणि प्रार्थना केली की,) कृपा करा आणि मला मदत करा. हे प्रभो, तुम्ही मला आपले रूप द्या. याखेरीज दुसऱ्या कशामुळेही मी त्या राजकन्येस मिळवू शकणार नाही. ॥ ३ ॥

**जेहि बिधि नाथ होइ हित मोरा। करहु सो बेगि दास मैं तोरा॥**
**निज माया बल देखि बिसाला। हियँ हँसि बोले दीनदयाला॥**

हे नाथ, माझे कल्याण होईल, असे लवकर करा. मी तुमचा दास आहे.' आपल्या मायेचे प्रचंड बळ पाहून दीनदयाळू भगवान मनात हसत म्हणाले,॥ ४॥

**दो०—जेहि बिधि होइहि परम हित नारद सुनहु तुम्हार।**
**सोइ हम करब न आन कछु बचन न मृषा हमार॥ १३२॥**

'हे नारद, ज्यामुळे तुमचे परम हित होईल, तेच आम्ही करू. दुसरे काही नाही. आमचे वचन असत्य ठरत नसते.॥ १३२॥

**कुपथ माग रुज ब्याकुल रोगी। बैद न देइ सुनहु मुनि जोगी॥**
**एहि बिधि हित तुम्हार मैं ठयऊ। कहि अस अंतरहित प्रभु भयऊ॥**

हे योगी मुनी, ऐका. रोगाने व्याकूळ झालेल्या रोग्याने कुपथ्य मागितले, तरी वैद्य ते देत नाही. तशा प्रकारे मीही तुमचे कल्याण करण्याचा निश्चय केलेला आहे.' असे म्हणून भगवंत अंतर्धान पावले.॥ १॥

**माया बिबस भए मुनि मूढ़ा। समुझी नहिं हरि गिरा निगूढ़ा॥**
**गवने तुरत तहाँ रिषिराई। जहाँ स्वयंबर भूमि बनाई॥**

(भगवंतांच्या) मायेच्या अधीन झालेले मुनी इतके बुद्धिहीन झाले होते की, ते भगवंतांची रहस्यमय वाणी समजू शकले नाहीत. ऋषिराज नारद स्वयंवरासाठी बनविलेल्या मंडपाकडे गेले.॥ २॥

**निज निज आसन बैठे राजा। बहु बनाव करि सहित समाजा॥**
**मुनि मन हरष रूप अति मोरें। मोहि तजि आनहि बरिहि न भोरें॥**

राजे मोठे नटून-थटून आपल्या परिवारासह आपापल्या आसनावर बसले होते. नारद मुनी मनातून आनंदित होते की, माझे रूप फार सुंदर आहे. राजकन्या मला सोडून दुसऱ्या कुणालाही वरणार नाही.॥ ३॥

**मुनि हित कारन कृपानिधाना। दीन्ह कुरूप न जाइ बखाना॥**
**सो चरित्र लखि काहुँ न पावा। नारद जानि सबहिं सिर नावा॥**

कृपानिधान भगवंतांनी मुनींच्या कल्याणासाठी त्यांना इतके कुरूप बनविले होते की, सांगून सोय नाही. परंतु भगवंतांची ही लीला कुणाला कळू शकली नाही. त्यांना नारद समजूनच सर्वांनी प्रणाम केला.॥ ४॥

**दो०—रहे तहाँ दुइ रुद्र गन ते जानहिं सब भेउ।**
**बिप्रबेष देखत फिरहिं परम कौतुकी तेउ॥ १३३॥**

तेथे शिवांचे दोन गण होते. त्यांना सर्व रहस्य समजले होते. ते ब्राह्मणांचा वेष धारण करून सर्व लीला पाहात फिरत होते. तेही मोठे थट्टेखोर होते. ॥ १३३ ॥

**जेहिं समाज बैठे मुनि जाई। हृदयँ रूप अहमिति अधिकाई॥**
**तहँ बैठे महेस गन दोऊ। बिप्रबेष गति लखइ न कोऊ॥**

नारद आपल्या मनात रूपाचा मोठा अभिमान बाळगून ज्या समुदायात बसले होते, तेथेच ते दोन्ही गणही बसले होते. ब्राह्मणवेषात असल्यामुळे त्यांचे हे कपट कुणाच्याही लक्षात आले नाही. ॥ १ ॥

**करहिं कूटि नारदहि सुनाई। नीकि दीन्हि हरि सुंदरताई॥**
**रीझिहि राजकुअँरि छबि देखी। इन्हहि बरिहि हरि जानि बिसेषी॥**

ते नारदांना ऐकू जाईल, अशा तऱ्हेने नारदांची टर उडवू लागले, ''भगवंतांनी यांना काय सौंदर्य बहाल केले आहे. यांची शोभा पाहून राजकुमारी भाळून जाईल आणि 'हरी' (वानर) समजून यांनाच वरेल'॥ २ ॥

**मुनिहि मोह मन हाथ पराएँ। हँसहिं संभु गन अति सचु पाएँ॥**
**जदपि सुनहिं मुनि अटपटि बानी। समुझि न परइ बुद्धि भ्रम सानी॥**

नारदांना मोह झाला होता, कारण त्यांचे मन मायेच्या अधीन झाले होते. शिवांचे गण ते पाहून मोठ्या आनंदाने हसत होते. त्यांची टवाळी मुनी ऐकत होते, परंतु बुद्धी भ्रमात पडल्यामुळे ती त्यांना समजत नव्हती. (त्या गोष्टी त्यांना स्वत:च्या प्रशंसेच्या वाटत होत्या.) ॥ ३ ॥

**काहुँ न लखा सो चरित बिसेषा। सो सरूप नृपकन्याँ देखा॥**
**मर्कट बदन भयंकर देही। देखत हृदयँ क्रोध भा तेही॥**

ही बाब इतर कुणालाही समजली नाही. फक्त राजकन्येने नारदांचे ते रूप पाहिले. त्यांचे तोंड माकडासारखे होते आणि ते भयंकर शरीर पाहताच राजकन्येला राग आला. ॥ ४ ॥

दो०—**सखीं संग लै कुअँरि तब चलि जनु राजमराल।**
**देखत फिरइ महीप सब कर सरोज जयमाल॥ १३४॥**

मग राजकुमारी सख्यांबरोबर जणू राजहंसीसारखी चालत निघाली. ती आपल्या कर-कमलांमध्ये जयमाला घेऊन सर्व राजे लोकांना पाहात फिरू लागली. ॥ १३४ ॥

**जेहि दिसि बैठे नारद फूली। सो दिसि तेहिं न बिलोकी भूली॥**
**पुनि पुनि मुनि उकसहिं अकुलाहीं। देखि दसा हर गन मुसुकाहीं॥**

जिकडे नारद (रूपाच्या घमेंडीमध्ये) फुगून बसले होते, तिकडे तिने चुकूनही बघितले नाही. नारदमुनी वारंवार मान उंचावून बघत होते आणि चरफडत होते. त्यांची ती दशा पाहून शिवगण हसत होते. ॥ १ ॥

**धरि नृपतनु तहँ गयउ कृपाला । कुअँरि हरषि मेलेउ जयमाला ॥**
**दुलहिनि लै गे लच्छिनिवासा । नृपसमाज सब भयउ निरासा ॥**

कृपाळू भगवंतही राजाचे शरीर धारण करून तेथे जाऊन पोहोचले. राजकुमारीने आनंदित होऊन त्यांच्या गळ्यात जयमाला घातली. लक्ष्मीनिवास भगवंत नवरीला घेऊन गेले. सर्व राजे मंडळी निराश झाली. ॥ २ ॥

**मुनि अति बिकल मोहँ मति नाठी । मनि गिरि गई छूटि जनु गाँठी ॥**
**तब हर गन बोले मुसुकाई । निज मुख मुकुर बिलोकहु जाई ॥**

मोहामुळे नारद मुनींची बुद्धी नष्ट झाली होती. त्यामुळे ते (राजकुमारी गेल्याचे पाहून) खट्टू झाले, जणू गाठीतील रत्न हरवले होते. तेव्हा शिवांचे गण हसून म्हणाले की, 'जाऊन आरशात आपले तोंड तर बघा.' ॥ ३ ॥

**अस कहि दोउ भागे भयँ भारी । बदन दीख मुनि बारि निहारी ॥**
**बेषु बिलोकि क्रोध अति बाढ़ा । तिन्हहि सराप दीन्ह अति गाढ़ा ॥**

असे म्हणून ते दोघे घाबरून पळून गेले. मुनींनी पाण्यामध्ये डोकावून आपले तोंड पाहिले. आपले रूप पाहून त्यांना फार राग आला. त्यांनी शिवांच्या त्या गणांना कठोर शाप दिला. ॥ ४ ॥

दो०—**होहु निसाचर जाइ तुम्ह कपटी पापी दोउ।**
**हँसेहु हमहि सो लेहु फल बहुरि हँसेहु मुनि कोउ॥ १३५ ॥**

'तुम्ही दोघे कपटी आणि पापी राक्षस व्हाल. तुम्ही माझे हसे केले, त्याचे फळ भोगा. यापुढे कोणा मुनीची फजिती कराल?' ॥ १३५ ॥

**पुनि जल दीख रूप निज पावा । तदपि हृदयँ संतोष न आवा ॥**
**फरकत अधर कोप मन माहीं । सपदि चले कमलापति पाहीं ॥**

मुनींनी पुन्हा पाण्यात पाहिले, तर त्यांना आपले (खरे) रूप प्राप्त झाले. तरीही त्यांचे समाधान झाले नाही. त्यांचे ओठ फडफडत होते, मनात राग भरला होता. त्वरित ते भगवान कमलापतींच्याकडे गेले. ॥ १ ॥

**देहउँ श्राप कि मरिहउँ जाई । जगत मोरि उपहास कराई ॥**
**बीचहिं पंथ मिले दनुजारी । संग रमा सोइ राजकुमारी ॥**

(मनात विचार चालला होता की,) 'जाऊन आता शाप तरी द्यावा किंवा प्राण तरी द्यावा. त्यांनी जगात माझे हसे केले.' त्यांना दैत्यांचे शत्रू भगवान श्रीहरी वाटेतच भेटले. त्यांच्या सोबत लक्ष्मी आणि तीच राजकुमारी होती. ॥ २ ॥

**बोले मधुर बचन सुरसाईं । मुनि कहँ चले बिकल की नाईं ॥**
**सुनत बचन उपजा अति क्रोधा । माया बस न रहा मन बोधा ॥**

देवांचे स्वामी भगवंतांनी गोड वाणीने विचारले, 'हे मुनी, व्याकूळ झाल्यासारखे कुठे निघालात?' हे शब्द ऐकताच नारदांना फार राग आला. मायेच्या अधीन झाल्यामुळे मनाला विवेकाचा विसर पडला. ॥ ३ ॥

**पर संपदा सकहु नहिं देखी। तुम्हरें इरिषा कपट बिसेषी॥**
**मथत सिंधु रुद्रहि बौरायहु। सुरन्ह प्रेरि बिष पान करायहु॥**

(मुनी म्हणाले,) 'तुम्हांला दुसऱ्याचे बरे झालेले पाहवत नाही. तुमच्यामध्ये ईर्ष्या आणि कपट आहे. समुद्रमंथन करताना तुम्ही शिवांना बावळट बनविले आणि देवांना प्रेरित करून त्यांना विष-प्राशन करायला लावले. ॥ ४ ॥

दो०—**असुर सुरा बिष संकरहि आपु रमा मनि चारु।**
**स्वारथ साधक कुटिल तुम्ह सदा कपट ब्यवहारु॥ १३६॥**

असुरांना मदिरा आणि शिवांना विष देऊन तुम्ही स्वतः मात्र लक्ष्मी आणि सुंदर कौस्तुभ मणी घेतलात. तुम्ही धोकेबाज आणि स्वार्थी आहात. नेहमी कपटी व्यवहार करता. ॥ १३६ ॥

**परम स्वतंत्र न सिर पर कोई। भावइ मनहि करहु तुम्ह सोई॥**
**भलेहि मंद मंदेहि भल करहू। बिसमय हरष न हियँ कछु धरहू॥**

तुम्ही पूर्ण स्वतंत्र आहात. तुमच्यावर अंकुश ठेवणारा कोणी नाही, म्हणून मनाला येईल तसे करता. चांगल्याला वाईट आणि वाईटाला चांगले करता. मनात हर्ष-विषाद काहीही आणत नाही. ॥ १ ॥

**डहकि डहकि परिचेहु सब काहू। अति असंक मन सदा उछाहू॥**
**करम सुभासुभ तुम्हहि न बाधा। अब लगि तुम्हहि न काहूँ साधा॥**

सर्वांना ठकवून ठकवून सोकावला आहात आणि फार बेफिकीर झाला आहात. म्हणून (ठकविण्याच्या बाबतीत) तुमच्या मनात नेहमी उत्साह असतो. शुभ-अशुभ कर्मांची तुम्हांला बाधा नसते. आजपर्यंत तुम्हांला कुणी सरळ केलेले नाही. ॥ २ ॥

**भले भवन अब बायन दीन्हा। पावहुगे फल आपन कीन्हा॥**
**बंचेहु मोहि जवनि धरि देहा। सोइ तनु धरहु श्राप मम एहा॥**

या वेळी तुम्ही चांगल्या घरी वाण दिले आहे. (माझ्यासारख्या भारी व्यक्तीला डिवचले आहे.) म्हणून स्वतःच्या कर्माचे फळ नक्की मिळेल. जे राजाचे शरीर धारण करून तुम्ही मला ठकविले आहे, तेच शरीर तुम्ही धारण कराल, हा माझा शाप आहे. ॥ ३ ॥

**कपि आकृति तुम्ह कीन्हि हमारी। करिहहिं कीस सहाय तुम्हारी॥**
**मम अपकार कीन्ह तुम्ह भारी। नारि बिरहँ तुम्ह होब दुखारी॥**

तुम्ही माझे रूप माकडासारखे बनविले होते, म्हणून माकडेच तुम्हांला मदत करतील. (मला

ज्या स्त्रीची इच्छा होती, तिच्याशी माझा वियोग करून) तुम्ही माझे मोठे अहित केले आहे. म्हणून तुम्हीसुद्धा स्त्रीच्या वियोगाने दु:खी व्हाल.॥ ४॥

**दो०—श्राप सीस धरि हरषि हियँ प्रभु बहु बिनती कीन्हि।**
**निज माया कै प्रबलता करषि कृपानिधि लीन्हि॥ १३७॥**

प्रभूंनी तो शाप मोठ्या आनंदाने शिरोधार्य मानून नारदांचे सांत्वन केले आणि कृपानिधान भगवंतांनी आपली प्रबळ माया काढून घेतली.॥ १३७॥

**जब हरि माया दूरि निवारी। नहिं तहँ रमा न राजकुमारी॥**
**तब मुनि अति सभीत हरि चरना। गहे पाहि प्रनतारति हरना॥**

जेव्हा भगवंतांनी आपली माया दूर सारली, तेव्हा तेथे लक्ष्मी राहिली नाही आणि राजकुमारीही राहिली नाही. तेव्हा मुनींनी अत्यंत घाबरून श्रीहरींचे चरण धरले आणि म्हटले, ‘हे शरणागतांची दु:खे हरण करणारे प्रभो, माझे रक्षण करा.॥ १॥

**मृषा होउ मम श्राप कृपाला। मम इच्छा कह दीनदयाला॥**
**मैं दुर्बचन कहे बहुतेरे। कह मुनि पाप मिटिहिं किमि मेरे॥**

हे कृपाळू, माझा शाप खोटा ठरू दे.’ तेव्हा दीनांवर दया करणारे भगवान म्हणाले, ‘हे सर्व माझ्या इच्छेने घडले आहे.’ तेव्हा नारद म्हणाले, ‘मी तुम्हांला अत्यंत वाईट साईट बोललो. माझे पाप कसे नाहीसे होईल?’॥ २॥

**जपहु जाइ संकर सत नामा। होइहि हृदयँ तुरत बिश्रामा॥**
**कोउ नहिं सिव समान प्रिय मोरें। असि परतीति तजहु जनि भोरें॥**

(भगवंतांनी म्हटले,) ‘जाऊन शंकरांच्या शतनाम स्तोत्राचा जप करा, त्यामुळे मनाला शांतता लाभेल. शिवांसारखा दुसरा कोणीही मला प्रिय नाही, याची खात्री बाळगा.॥ ३॥

**जेहि पर कृपा न करहिं पुरारी। सो न पाव मुनि भगति हमारी॥**
**अस उर धरि महि बिचरहु जाई। अब न तुम्हहि माया निअराई॥**

हे मुनी, शिव ज्याच्यावर कृपा करीत नाहीत, त्याला माझी भक्ती लाभत नाही. मनात असा दृढ विश्वास बाळगून पृथ्वीवर जाऊन संचार करा. आता माझी माया तुमच्याजवळ फिरकणार नाही.’॥ ४॥

**दो०—बहुबिधि मुनिहि प्रबोधि प्रभु तब भए अंतरधान।**
**सत्यलोक नारद चले करत राम गुन गान॥ १३८॥**

अशा रीतीने पुष्कळ प्रकारे मुनींना समजावून सांगून प्रभू अंतर्धान पावले आणि नारद श्रीरामचंद्रांचे गुण-गान करीत सत्यलोकी निघाले.॥ १३८॥

**हर गन मुनिहि जात पथ देखी । बिगत मोह मन हरष बिसेषी ॥**
**अति सभीत नारद पहिं आए । गहि पद आरत बचन सुनाए ॥**

शिवांच्या (त्या दोन्ही) गणांनी मुनींना जेव्हा मोहरहित व प्रसन्न मनाने वाटेने जाताना पाहिले, तेव्हा ते अत्यंत घाबरून नारदांच्याजवळ आले आणि त्यांचे चरण धरून दीनपणे म्हणाले, ॥ १ ॥

**हर गन हम न बिप्र मुनिराया । बड़ अपराध कीन्ह फल पाया ॥**
**श्राप अनुग्रह करहु कृपाला । बोले नारद दीनदयाला ॥**

'हे मुनिराज, आम्ही ब्राह्मण नसून शिवांचे गण आहोत. आम्ही मोठा अपराध केला, त्याचे फळ आम्हांला मिळाले. हे कृपाळू, आता शाप दूर करण्याची कृपा करा.' दीनांच्यावर दया करणारे नारद म्हणाले, ॥ २ ॥

**निसिचर जाइ होहु तुम्ह दोऊ । बैभव बिपुल तेज बल होऊ ॥**
**भुजबल बिस्व जितब तुम्ह जहिआ । धरिहहिं बिष्नु मनुज तनु तहिआ ॥**

'तुम्ही दोघेजण राक्षस बना, तुम्हांला महान ऐश्वर्य, तेज आणि बल मिळो. तुम्ही आपल्या बाहुबलाने जेव्हा संपूर्ण जग जिंकून घ्याल, तेव्हा भगवान विष्णू मनुष्य-शरीर धारण करतील. ॥ ३ ॥

**समर मरन हरि हाथ तुम्हारा । होइहहु मुकुत न पुनि संसारा ॥**
**चले जुगल मुनि पद सिर नाई । भए निसाचर कालहि पाई ॥**

युद्धामध्ये श्रीहरींच्या हातून तुमचा मृत्यू होईल, त्यामुळे तुम्ही मुक्त व्हाल आणि पुन्हा संसारात जन्म घेणार नाही.' ते दोघे मुनींच्या चरणी नमन करून निघाले आणि पुढे योग्य वेळी राक्षस झाले. ॥ ४ ॥

दो०—**एक कलप एहि हेतु प्रभु लीन्ह मनुज अवतार।**
**सुर रंजन सज्जन सुखद हरि भंजन भुबि भार॥ १३९ ॥**

देवांना प्रसन्न करणाऱ्या, सज्जनांना सुख देणाऱ्या आणि पृथ्वीचा भार हरण करणाऱ्या भगवंतांनी एका कल्पामध्ये त्यासाठीच मनुष्य-अवतार धारण केला होता. ॥ १३९ ॥

**एहि बिधि जनम करम हरि केरे । सुंदर सुखद बिचित्र घनेरे ॥**
**कलप कलप प्रति प्रभु अवतरहीं । चारु चरित नानाबिधि करहीं ॥**

अशाप्रकारे भगवंतांचे अनेक सुंदर, सुखदायक आणि अलौकिक जन्म आणि कर्मे आहेत. प्रत्येक कल्पामध्ये जेव्हा जेव्हा भगवान अवतार घेतात आणि नाना प्रकारच्या सुंदर लीला करतात, ॥ १ ॥

**तब तब कथा मुनीसन्ह गाई । परम पुनीत प्रबंध बनाई ॥**
**बिबिध प्रसंग अनूप बखाने । करहिं न सुनि आचरजु सयाने ॥**

तेव्हा तेव्हा मुनीश्वरांनी परम पवित्र काव्यरचना करून त्यांच्या कथांचे गायन केलेले आहे आणि वेगवेगळ्या अनुपम प्रसंगांचे वर्णन केलेले आहे. ते ऐकल्यावर विचारी लोक आश्चर्य करीत नाहीत. ॥ २ ॥

**हरि अनंत हरिकथा अनंता। कहहिं सुनहिं बहुबिधि सब संता॥**
**रामचंद्र के चरित सुहाए। कलप कोटि लगि जाहिं न गाए॥**

श्रीहरि अनंत आहेत, त्यांच्या कथाही अनंत आहेत. सर्व संत त्या नाना प्रकारे सांगतात व ऐकतात. श्रीरामांचे सुंदर चरित्र कोट्यवधी कल्पांमध्येही गाता येत नाही. ॥ ३ ॥

**यह प्रसंग मैं कहा भवानी। हरिमायाँ मोहहिं मुनि ग्यानी॥**
**प्रभु कौतुकी प्रनत हितकारी। सेवत सुलभ सकल दुखहारी॥**

(शिव म्हणतात) 'हे पार्वती, मी हा प्रसंग एवढ्यासाठी सांगितला की, ज्ञानी मुनीसुद्धा भगवंतांच्या मायेमुळे मोहित होतात. प्रभूंची ही कौतुकमय लीला आहे आणि शरणागताचे हित करणारी आहे. ते प्रभू सेवा करण्यास फार सुलभ आणि सर्व दुःखे हरण करणारे आहेत. ॥ ४ ॥

**सो०—सुर नर मुनि कोउ नाहिं जेहि न मोह माया प्रबल।**
**अस बिचारि मन माहिं भजिअ महामाया पतिहि॥ १४० ॥**

देव, मनुष्य आणि मुनी यांच्यापैकी असा कोणीही नाही की त्याला भगवंतांची महान प्रबळ माया मोहित करीत नाही, मनात असा विचार करून त्या महामायेचे स्वामी असणाऱ्या श्री भगवंतांचे भजन करायला हवे. ॥ १४० ॥

**अपर हेतु सुनु सैलकुमारी। कहउँ बिचित्र कथा बिस्तारी॥**
**जेहि कारन अज अगुन अरूपा। ब्रह्म भयउ कोसलपुर भूपा॥**

हे गिरिराजकुमारी, आता भगवंतांच्या अवताराचे दुसरे कारण ऐक. मी त्याची मनोहर कथा विस्ताराने सांगतो. ज्यामुळे जन्मरहित, निर्गुण व रूपरहित (अव्यक्त सच्चिदानंद) ब्रह्म अयोध्यापुरीचे राजे झाले. ॥ १ ॥

**जो प्रभु बिपिन फिरत तुम्ह देखा। बंधु समेत धरें मुनिबेषा॥**
**जासु चरित अवलोकि भवानी। सती सरीर रहिहु बौरानी॥**

ज्या प्रभू श्रीरामांना तू बंधू लक्ष्मणासोबत मुनींसारखा वेष धारण करून वनात फिरताना पाहिले होतेस आणि हे भवानी, ज्यांची लीला पाहून सतीच्या शरीरात असताना तू अशी भ्रमित झाली होतीस की, ॥ २ ॥

**अजहुँ न छाया मिटति तुम्हारी। तासु चरित सुनु भ्रम रुज हारी॥**
**लीला कीन्हि जो तेहिं अवतारा। सो सब कहिहउँ मति अनुसारा॥**

अजूनही तुझ्या त्या भ्रमाचे पटल दूर झालेले नाही. त्या भ्रमरूपी रोगाचे हरण करणारे त्यांचे चरित्र श्रवण कर. त्या अवतारात भगवंतांनी ज्या ज्या लीला केल्या, त्या सर्व मी आपल्या बुद्धीप्रमाणे तुला सांगतो.'॥ ३ ॥

**भरद्वाज सुनि संकर बानी। सकुचि सप्रेम उमा मुसुकानी॥**
**लगे बहुरि बरनै बृषकेतू। सो अवतार भयउ जेहि हेतू॥**

(याज्ञवल्क्य म्हणाले-) 'हे भरद्वाज, शंकरांचे वचन ऐकून पार्वती संकोचाने प्रेमपूर्वक हसली. नंतर ज्या कारणाने भगवंतांचा तो अवतार झाला होता, त्याचे वर्णन शिव करू लागले.॥ ४ ॥

दो०—**सो मैं तुम्ह सन कहउँ सबु सुनु मुनीस मन लाइ।**
**राम कथा कलि मल हरनि मंगल करनि सुहाइ॥ १४१॥**

हे मुनीश्वर भरद्वाज, मी ते सर्व तुम्हांला सांगतो. लक्ष देऊन ऐका. श्रीरामांची कथा ही कलियुगातील पापांचे हरण करणारी, कल्याण करणारी आणि फार सुंदर आहे.॥ १४१ ॥

**स्वायंभू मनु अरु सतरूपा। जिन्ह तें भै नरसृष्टि अनूपा॥**
**दंपति धरम आचरन नीका। अजहुँ गाव श्रुति जिन्ह कै लीका॥**

स्वायंभुव मनू आणि त्यांची पत्नी शतरूपा, यांच्यापासून मनुष्यांची ही अनुपम सृष्टी निर्माण झाली. या दोघा पति-पत्नींचे धर्म व आचरण हे फार चांगले होते. वेद आजसुद्धा त्यांची प्रशंसा करतात.॥ १ ॥

**नृप उत्तानपाद सुत तासू। ध्रुव हरिभगत भयउ सुत जासू॥**
**लघु सुत नाम प्रियब्रत ताही। बेद पुरान प्रसंसहिं जाही॥**

राजा उत्तानपाद त्यांचा पुत्र होता. त्यांचाच पुत्र प्रसिद्ध हरिभक्त ध्रुव झाला. त्या मनूच्या धाकट्या मुलाचे नाव प्रियव्रत होते. त्याची प्रशंसा वेद आणि पुराणे यांनी केली आहे.॥ २ ॥

**देवहूति पुनि तासु कुमारी। जो मुनि कर्दम कै प्रिय नारी॥**
**आदिदेव प्रभु दीनदयाला। जठर धरेउ जेहिं कपिल कृपाला॥**

तसेच देवहूती ही त्या मनूची कन्या होती. ती कर्दम मुनींची आवडती पत्नी होती. तिने आदिदेव, दीनांवर दया करणारे समर्थ व कृपाळू भगवान कपिल यांना गर्भात धारण केले.॥ ३ ॥

**सांख्य सास्त्र जिन्ह प्रगट बखाना। तत्त्व बिचार निपुन भगवाना॥**
**तेहिं मनु राज कीन्ह बहु काला। प्रभु आयसु सब बिधि प्रतिपाला॥**

तत्त्वांचा विचार करण्यामध्ये अत्यंत निपुण असलेल्या भगवान कपिल मुनींनी सांख्यशास्त्राचे प्रकट वर्णन केले. स्वायंभुव मनूंनी बराच काळ राज्य केले आणि सर्व प्रकारे भगवंतांच्या आज्ञारूप शास्त्रांच्या मर्यादेचे पालन केले.॥ ४ ॥

सो०—**होइ न बिषय बिराग भवन बसत भा चौथपन।**
**हृदयँ बहुत दुख लाग जनम गयउ हरिभगति बिनु॥ १४२॥**

राजप्रासादात राहाता-राहाता म्हातारपण आले, परंतु विषयांबद्दल वैराग्य येत नव्हते. (असा विचार करून) त्यांच्या मनात अतिशय दुःख झाले की, श्रीहरींच्या भक्तीविना जन्म फुकट गेला. ॥ १४२ ॥

**बरबस राज सुतहि तब दीन्हा। नारि समेत गवन बन कीन्हा॥**
**तीरथ बर नैमिष बिख्याता। अति पुनीत साधक सिधि दाता॥**

तेव्हा मनूंनी आपल्या मुलाला आग्रहाने राज्य दिले आणि स्वतः पत्नीसह वनगमन केले. अत्यंत पवित्र व साधकांना सिद्धी देणाऱ्या तीर्थांमध्ये श्रेष्ठ असलेले नैमिषारण्य प्रसिद्ध आहे. ॥ १ ॥

**बसहिं तहाँ मुनि सिद्ध समाजा। तहँ हियँ हरषि चलेउ मनु राजा॥**
**पंथ जात सोहहिं मतिधीरा। ग्यान भगति जनु धरें सरीरा॥**

तेथे मुनींचे व सिद्धांचे समुदाय राहातात. राजा मनू आनंदित मनाने तेथे गेला. ते धीर बुद्धीचे राजा-राणी वाटेने जाताना असे शोभत होते की, जणू ज्ञान आणि भक्ती शरीर धारण करून निघाले आहेत. ॥ २ ॥

**पहुँचे जाइ धेनुमति तीरा। हरषि नहाने निरमल नीरा॥**
**आए मिलन सिद्ध मुनि ग्यानी। धरम धुरंधर नृपरिषि जानी॥**

(जाता-जाता) ते गोमतीच्या किनारी पोहोचले. त्यांनी आनंदाने निर्मल जळात स्नान केले. त्यांना धर्मधुरंधर राजर्षी समजून सिद्ध व ज्ञानी मुनी त्यांना भेटण्यास आले. ॥ ३ ॥

**जहँ जहँ तीरथ रहे सुहाए। मुनिन्ह सकल सादर करवाए॥**
**कृस सरीर मुनिपट परिधाना। सत समाज नित सुनहिं पुराना॥**

जेथे जेथे सुंदर तीर्थे होती ती सर्व तीर्थे मुनींनी मोठ्या आदराने मनूंना घडविली. त्यांचे शरीर दुर्बल झाले होते. ते मुनींच्यासारखी वल्कले धारण करीत आणि संत मंडळीत बसून नित्य पुराणश्रवण करीत होते. ॥ ४ ॥

दो०—**द्वादस अच्छर मंत्र पुनि जपहिं सहित अनुराग।**
**बासुदेव पद पंकरुह दंपति मन अति लाग॥ १४३॥**

तसेच द्वादशाक्षरी मंत्र '**ॐ नमो भगवते वासुदेवाय**' याचा अत्यंत भक्तिभावाने जप करीत असत. भगवान वासुदेवांच्या चरणकमली राजा-राणीचे मन खूप रमले होते. ॥ १४३ ॥

**करहिं अहार साक फल कंदा। सुमिरहिं ब्रह्म सच्चिदानंदा॥**
**पुनि हरि हेतु करन तप लागे। बारि अधार मूल फल त्यागे॥**

ते पालेभाज्या, फळे व कंदमुळे यांचा आहार घेत आणि सच्चिदानंद ब्रह्माचे स्मरण करीत असत. नंतर ते श्रीहरींसाठी तप करू लागले आणि मुळे-फळे यांचा त्याग करून फक्त पाण्यावर राहू लागले. ॥ १ ॥

**उर अभिलाष निरंतर होई। देखिअ नयन परम प्रभु सोई॥**
**अगुन अखंड अनंत अनादी। जेहि चिंतहिं परमारथबादी॥**

जे निर्गुण, अखंड, अनादी आहेत आणि ब्रह्मज्ञानी लोक ज्यांचे चिंतन करतात, त्या परम प्रभूंचे आपल्या डोळ्यांनी दर्शन घ्यावे, हीच अभिलाषा त्यांच्या मनात निरंतर होती. ॥ २ ॥

**नेति नेति जेहि बेद निरूपा। निजानंद निरुपाधि अनूपा॥**
**संभु बिरंचि बिष्नु भगवाना। उपजहिं जासु अंस तें नाना॥**

वेद ज्यांचे 'नेति नेति' (हेही नाही, तेही नाही) असे म्हणून निरूपण करतात, जे आनंदस्वरूप, उपाधिरहित आणि अनुपम आहेत, आणि ज्यांच्या अंशाने अनेक शिव, ब्रह्मदेव व भगवान विष्णू प्रकट होतात. ॥ ३ ॥

**ऐसेउ प्रभु सेवक बस अहई। भगत हेतु लीलातनु गहई॥**
**जौं यह बचन सत्य श्रुति भाषा। तौ हमार पूजिहि अभिलाषा॥**

असे महान प्रभू हे सुद्धा सेवकाच्या अधीन आहेत व भक्तांसाठी (दिव्य) लीला-विग्रह धारण करतात. हे जर वेदांनी सत्य प्रतिपादन केले असेल, तर आमची अभिलाषा नक्की पूर्ण होईल.' ॥ ४ ॥

दो०—**एहि बिधि बीते बरष षट सहस बारि आहार।**
**संबत सप्त सहस्र पुनि रहे समीर अधार॥ १४४॥**

अशाप्रकारे जलाचा आहार घेत सहा हजार वर्षे निघून गेली. नंतर सात हजार वर्षे ते वायुभक्षण करून राहिले. ॥ १४४ ॥

**बरष सहस दस त्यागेउ सोऊ। ठाढ़े रहे एक पद दोऊ॥**
**बिधि हरि हर तप देखि अपारा। मनु समीप आए बहु बारा॥**

त्यानंतर दहा हजार वर्षे त्यांनी वायूचा आहारही सोडला आणि दोघे एका पायावर उभे राहिले. त्यांचे अपार तप पाहून ब्रह्मदेव, विष्णू व शिव हे अनेक वेळा मनूजवळ आले. ॥ १ ॥

**मागहु बर बहु भाँति लोभाए। परम धीर नहिं चलहिं चलाए॥**
**अस्थिमात्र होइ रहे सरीरा। तदपि मनाग मनहिं नहिं पीरा॥**

त्यांनी त्या दोघांना अनेक प्रकारे प्रलोभन दाखविले आणि वर मागण्यास सांगितले. परंतु ते परम धैर्यवान राजा-राणी आपल्या तपापासून विचलित झाले नाहीत. त्यांचे शरीर हाडांचा सापळाच उरले होते, तरीही त्यांना जराही दु:ख नव्हते. ॥ २ ॥

**प्रभु सर्बग्य दास निज जानी। गति अनन्य तापस नृप रानी॥**
**मागु मागु बरु भै नभ बानी। परम गभीर कृपामृत सानी॥**

सर्वज्ञ प्रभूंनी अनन्य गती (आश्रय) असणाऱ्या त्या तपस्वी राजा-राणी यांना 'निजदास' असल्याचे ओळखले. तेव्हा परम गंभीर आणि कृपारूपी अमृताने भरलेली आकाशवाणी झाली की, 'वर मागा.'॥ ३॥

**मृतक जिआवनि गिरा सुहाई। श्रवन रंध्र होइ उर जब आई॥**
**हृष्ट पुष्ट तन भए सुहाए। मानहुँ अबहिं भवन ते आए॥**

प्रेतालाही जिवंत करणारी ती सुंदर वाणी कानांच्या छिद्रांतून जेव्हा हृदयात पोहोचली, तेव्हा राजा-राणी यांची शरीरे इतकी सुंदर व हृष्ट-पुष्ट झाली की, जणू नुकतेच ते घरून आले आहेत.॥ ४॥

**दो०—श्रवन सुधा सम बचन सुनि पुलक प्रफुल्लित गात।**
**बोले मनु करि दंडवत प्रेम न हृदयँ समात॥ १४५॥**

कानांमध्ये अमृतासमान वाटणारे ते शब्द ऐकून त्यांचे शरीर पुलकित आणि प्रफुल्लित झाले. त्यांच्या मनात प्रेम सामावत नव्हते. तेव्हा मनूंनी दंडवत घालून म्हटले,॥ १४५॥

**सुनु सेवक सुरतरु सुरधेनू। बिधि हरि हर बंदित पद रेनू॥**
**सेवत सुलभ सकल सुखदायक। प्रनतपाल सचराचर नायक॥**

हे प्रभो, ऐका. तुम्ही सेवकांच्यासाठी कल्पवृक्ष आणि कामधेनू आहात. तुमच्या चरण धुळीला ब्रह्मा, विष्णू व शिव हे सुद्धा वंदन करतात. तुमची सेवा करण्यास सुलभ असून तुम्ही सर्वांना सुख देणारे आहात. तुम्ही शरणागताचे रक्षक आणि चराचराचे स्वामी आहात.॥ १॥

**जौं अनाथ हित हम पर नेहू। तौ प्रसन्न होइ यह बर देहू॥**
**जो सरूप बस सिव मन माहीं। जेहिं कारन मुनि जतन कराहीं॥**

हे अनाथांचे कल्याण करणाऱ्या प्रभो, जर आम्हांवर तुमचे प्रेम असेल, तर प्रसन्न होऊन असा वर द्या की, तुमचे जे स्वरूप शिवांच्या मनात वसते आणि ज्याच्या प्राप्तीसाठी मुनिजन प्रयत्न करीत असतात,॥ २॥

**जो भुसुंडि मन मानस हंसा। सगुन अगुन जेहि निगम प्रसंसा॥**
**देखहिं हम सो रूप भरि लोचन। कृपा करहु प्रनतारति मोचन॥**

जे काकभुशुंडी ऋषींच्या मनरूपी मानस सरोवरात विहार करणारे हंस आहेत. सगुण आणि निर्गुण म्हणून वेद ज्यांची प्रशंसा करतात, हे शरणागताचे दुःख दूर करणारे प्रभू, ते रूप आम्ही डोळे भरून पाहावे, अशी कृपा करा.॥ ३॥

**दंपति बचन परम प्रिय लागे। मृदुल बिनीत प्रेम रस पागे॥**
**भगत बछल प्रभु कृपानिधाना। बिस्वबास प्रगटे भगवाना॥**

राजा-राणीचे हे कोमल, विनययुक्त, प्रेमरसाने ओथंबलेले वचन भगवंतांना फारच आवडले. त्यामुळे भक्तवत्सल, कृपानिधान, संपूर्ण विश्वाचे निवासस्थान सर्वसमर्थ भगवान प्रगट झाले. ॥ ४ ॥

**दो०—नील सरोरुह नील मनि नील नीरधर स्याम।**
**लाजहिं तन सोभा निरखि कोटि कोटि सत काम॥ १४६ ॥**

भगवंतांचे नीलकमल, नीलमणी आणि जलयुक्त निळ्या मेघांप्रमाणे (कोमल, प्रकाशमय आणि सरस) श्यामवर्ण (चिन्मय) शरीराचे सौंदर्य पाहून कोट्यवधी कामदेवसुद्धा लज्जित होत. ॥ १४६ ॥

**सरद मयंक बदन छबि सींवा। चारु कपोल चिबुक दर ग्रीवा॥**
**अधर अरुन रद सुंदर नासा। बिधु कर निकर बिनिंदक हासा॥**

त्यांचे मुख शरदातील पौर्णिमेच्या चंद्रासारखे सौंदर्याची परिसीमा होते. गाल आणि हनुवटी फार सुंदर होते. गळा शंखासारखा त्रिरेखायुक्त-(चढ-उतार असणारा) होता. लाल ओठ, दात आणि नाक फारच सुंदर होते. त्यांचे हास्य चंद्र-किरणांना लाजविणारे होते. ॥ १ ॥

**नव अंबुज अंबक छबि नीकी। चितवनि ललित भावँती जी की॥**
**भृकुटि मनोज चाप छबि हारी। तिलक ललाट पटल दुतिकारी॥**

नेत्रांचे सौंदर्य ताज्या कमळाप्रमाणे होते. मनोहर दृष्टी अत्यंत सुंदर वाटत होती. कमानदार भुवया कामदेवाच्या धनुष्याची शोभा हरण करणाऱ्या होत्या. ललाटावर प्रकाशमय तिलक होता. ॥ २ ॥

**कुंडल मकर मुकुट सिर भ्राजा। कुटिल केस जनु मधुप समाजा॥**
**उर श्रीबत्स रुचिर बनमाला। पदिक हार भूषन मनिजाला॥**

कानांमध्ये मकराकृती कुंडले आणि शिरावर मुकुट शोभत होता. कुरळे व काळे केस असे दाट होते की, जणू भ्रमरांच्या झुंडी असाव्यात. हृदयावर श्रीवत्स, सुंदर वनमाला, रत्नजडित हार आणि रत्नांची आभूषणे शोभून दिसत होती. ॥ ३ ॥

**केहरि कंधर चारु जनेऊ। बाहु बिभूषन सुंदर तेऊ॥**
**करि कर सरिस सुभग भुजदंडा। कटि निषंग कर सर कोदंडा॥**

सिंहासारखी मान होती, सुंदर यज्ञोपवीत होते. भुजांमध्ये घातलेले दागिनेही सुंदर होते. हत्तीच्या सोंडेप्रमाणे सुंदर बाहू होते. कमरेला भाता आणि हातात धनुष्य-बाण शोभत होते. ॥ ४ ॥

**दो०—तड़ित बिनिंदक पीत पट उदर रेख बर तीनि।**
**नाभि मनोहर लेति जनु जमुन भवँर छबि छीनि॥ १४७ ॥**

सुवर्ण वर्णाचा प्रकाशमय पीतांबर विद्युल्लतेला लाजविणारा होता. उदरावर सुंदर तीन वळ्या होत्या. यमुनेतील भोवऱ्याचे सौंदर्य हिरावून घेणारी नाभी होती. ॥ १४७ ॥

**पद राजीव बरनि नहिं जाहीं। मुनि मन मधुप बसहिं जेन्ह माहीं॥**
**बाम भाग सोभति अनुकूला। आदिसक्ति छबिनिधि जगमूला॥**

मुनींचे मनरूपी भ्रमर जिथे रमतात, त्या भगवंतांच्या चरण-कमलांचे वर्णन करता येणे कठीण होते. भगवंतांच्या डाव्या बाजूस, त्यांना नित्य अनुकूल असणारी, शोभेची खाण अशी, जगाची मूलकारणरूप आदिशक्ती जानकी शोभत होती. ॥ १ ॥

**जासु अंस उपजहिं गुनखानी। अगनित लच्छि उमा ब्रह्मानी॥**
**भृकुटि बिलास जासु जग होई। राम बाम दिसि सीता सोई॥**

जिच्या अंशाने गुणांची खाण असलेल्या अगणित लक्ष्मी, पार्वती आणि ब्रह्माणी (त्रिदेवांच्या शक्ती) उत्पन्न होतात, तसेच जिच्या भुवयांच्या विलासानेच जगताची रचना होते, तीच (भगवंतांची स्वरूपशक्ती) श्रीसीता श्रीरामांच्या वामांगी होती. ॥ २ ॥

**छबिसमुद्र हरि रूप बिलोकी। एकटक रहे नयन पट रोकी॥**
**चितवहिं सादर रूप अनूपा। तृप्ति न मानहिं मनु सतरूपा॥**

सौंदर्याचे सागर असलेल्या श्रीहरींचे रूप पाहून मनू व शतरूपा यांच्या पापण्या स्तब्ध होऊन एकटक पाहात राहिल्या. ते मोठ्या आदराने ते अनुपम सौंदर्य पाहात होते आणि पाहून त्यांचे मन तृप्त होत नव्हते. ॥ ३ ॥

**हरष बिबस तन दसा भुलानी। परे दंड इव गहि पद पानी॥**
**सिर परसे प्रभु निज कर कंजा। तुरत उठाए करुनापुंजा॥**

आनंदाच्या अतिरेकामुळे ती दोघे देहभान विसरून गेली. आपल्या हातांनी भगवंतांचे चरण धरून त्यांनी दंडवत लोटांगण घातले. कृपा-राशी प्रभूंनी आपल्या करकमलांनी त्यांच्या मस्तकाला स्पर्श केला आणि त्यांना त्वरित वर उठविले. ॥ ४ ॥

दो०—**बोले कृपानिधान पुनि अति प्रसन्न मोहि जानि।**
**मागहु बर जोइ भाव मन महादानि अनुमानि॥ १४८ ॥**

नंतर कृपानिधान भगवान म्हणाले, 'मी मोठा उदार असून अत्यंत प्रसन्न झालो आहे, म्हणून तुमच्या मनाला वाटेल ते मागा.' ॥ १४८ ॥

**सुनि प्रभु बचन जोरि जुग पानी। धरि धीरजु बोली मृदु बानी॥**
**नाथ देखि पद कमल तुम्हारे। अब पूरे सब काम हमारे॥**

प्रभूंचे बोलणे ऐकून राजा दोन्ही हात जोडून धैर्यपूर्वक कोमल वाणीने म्हणाला, 'हे नाथ! तुमच्या चरण-कमलांच्या दर्शनाने आता आमचे सर्व मनोरथ पूर्ण झाले आहेत. ॥ १ ॥

**एक लालसा बड़ि उर माहीं। सुगम अगम कहि जाति सो नाहीं॥**
**तुम्हहि देत अति सुगम गोसाईं। अगम लाग मोहि निज कृपनाईं॥**

तरीही मनात एक मोठी लालसा आहे. ती पूर्ण होणे सोपीही आहे आणि कठीणही आहे, त्यामुळे बोलून दाखविता येत नाही. हे स्वामी, ती पूर्ण करणे तुम्हांला सहज शक्य आहे, परंतु मला स्वत:च्या दैन्यामुळे ती फार कठीण वाटते.॥ २॥

**जथा दरिद्र बिबुधतरु पाई। बहु संपति मागत सकुचाई॥**
**तासु प्रभाउ जान नहिं सोई। तथा हृदयँ मम संसय होई॥**

ज्याप्रमाणे एखादा दरिद्री कल्पवृक्ष मिळाल्यावरही अधिक द्रव्य मागण्यास संकोच करतो, कारण तो कल्पवृक्षाचा प्रभाव जाणत नाही, त्याप्रमाणेच माझ्या मनात संशय येत आहे.॥ ३॥

**सो तुम्ह जानहु अंतरजामी। पुरवहु मोर मनोरथ स्वामी॥**
**सकुच बिहाइ मागु नृप मोही। मोरें नहिं अदेय कछु तोही॥**

हे स्वामी, तुम्ही अंतर्यामी आहात, म्हणून तुम्ही माझे मनोगत जाणताच. तरी ते पूर्ण करा.' (भगवान म्हणाले,) 'हे राजा, नि:संकोचपणे माझ्याकडे माग. तुला देता येणार नाही, असे काहीही माझ्यापाशी नाही.'॥ ४॥

दो०—**दानि सिरोमनि कृपानिधि नाथ कहउँ सतिभाउ।**
**चाहउँ तुम्हहि समान सुत प्रभु सन कवन दुराउ॥ १४९॥**

(राजा म्हणाला,) 'हे दानशूर शिरोमणी, हे कृपानिधान! हे नाथा, मी मनातले खरेखुरे सांगतो की, मला तुमच्यासारखा पुत्र हवा. आपल्यापासून काय लपवायचे?'॥ १४९॥

**देखि प्रीति सुनि बचन अमोले। एवमस्तु करुनानिधि बोले॥**
**आपु सरिस खोजौं कहँ जाई। नृप तव तनय होब मैं आई॥**

राजाचे प्रेम पाहून आणि त्याचे अमोल बोल ऐकून करुणानिधान भगवान म्हणाले, 'ठीक आहे. हे राजन, मी स्वत:सारखा दुसरा कुठे जाऊन शोधू? म्हणून मी स्वत:च तुमचा पुत्र होईन.'॥ १॥

**सतरूपहि बिलोकि कर जोरें। देबि मागु बरु जो रुचि तोरें॥**
**जो बरु नाथ चतुर नृप मागा। सोइ कृपाल मोहि अति प्रिय लागा॥**

शतरूपेने हात जोडलेले पाहून भगवंत म्हणाले, 'हे देवी, तुझी जी इच्छा असेल ती मागून घे.' शतरूपा म्हणाली, 'हे नाथा, चतुर राजांनी जो वर मागितला आहे, हे कृपाळू, तोच मला अतिशय आवडला.॥ २॥

**प्रभु परंतु सुठि होति ढिठाई। जदपि भगत हित तुम्हहि सोहाई॥**
**तुम्ह ब्रह्मादि जनक जग स्वामी। ब्रह्म सकल उर अंतरजामी॥**

परंतु हे प्रभू, (आमच्याकडून) थोडा अतिरेक होत आहे. तरीही भक्तांचे हित करणारे हे प्रभू, तुम्हांला हे आमचे धाष्ट्र्य बरेच वाटत आहे. तुम्ही ब्रह्मदेव इत्यादींचे पिता, जगाचे स्वामी आणि सर्वांचे मन जाणणारे ब्रह्म आहात. ॥ ३ ॥

**अस समुझत मन संसय होई। कहा जो प्रभु प्रवान पुनि सोई॥**
**जे निज भगत नाथ तव अहहीं। जो सुख पावहिं जो गति लहहीं॥**

असे असल्यामुळे मनात संदेह येतो, तरीही प्रभूंनी जे म्हटले तेच प्रमाण होय. (मी तर असे मागते की,) हे नाथ, तुमचे जे भक्त आहेत, ते जे (अलौकिक) अखंड सुख प्राप्त करतात आणि त्यांना जी परम गती मिळते, ॥ ४ ॥

दो०—**सोइ सुख सोइ गति सोइ भगति सोइ निज चरन सनेहु।**
**सोइ बिबेक सोइ रहनि प्रभु हमहि कृपा करि देहु॥ १५०॥**

हे प्रभो, तेच सुख, तीच गती, तीच भक्ती, तुमच्या चरणीचे तेच प्रेम, तेच ज्ञान आणि तीच राहाणी कृपा करून आम्हांला द्या.'॥ १५० ॥

**सुनि मृदु गूढ़ रुचिर बर रचना। कृपासिंधु बोले मृदु बचना॥**
**जो कछु रुचि तुम्हरे मन माहीं। मैं सो दीन्ह सब संसय नाहीं॥**

(राणीची) कोमल, गूढ आणि मनोहर अशी उत्कृष्ट वाणी ऐकून कृपासागर भगवान कोमल शब्दांत म्हणाले, 'तुझ्या मनात जी काही इच्छा आहे, ती सर्व मी पूर्ण केली, यात कोणताही संशय बाळगू नकोस. ॥ १ ॥

**मातु बिबेक अलौकिक तोरें। कबहुँ न मिटिहि अनुग्रह मोरें॥**
**बंदि चरन मनु कहेउ बहोरी। अवर एक बिनती प्रभु मोरी॥**

हे माते, माझ्या कृपेने तुझे अलौकिक ज्ञान कधी नष्ट होणार नाही.' तेव्हा मनूने भगवंतांच्या चरणांना वंदन करून म्हटले, 'हे प्रभो, माझी आणखी एक विनंती आहे. ॥ २ ॥

**सुत बिषइक तव पद रति होऊ। मोहि बड़ मूढ़ कहै किन कोऊ॥**
**मनि बिनु फनि जिमि जल बिनु मीना। मम जीवन तिमि तुम्हहि अधीना॥**

जसे पुत्रावर पित्याचे प्रेम असते, तसेच माझे तुमच्या चरणी प्रेम राहो. (याबद्दल) मला कोणीही कितीही मूर्ख समजेना का! ज्याप्रमाणे मण्याविना साप व पाण्याविना मासोळी (राहू शकत नाही) त्याप्रमाणे माझे जीवन तुमच्या विना न राहो.'॥ ३ ॥

**अस बरु मागि चरन गहि रहेऊ। एवमस्तु करुनानिधि कहेऊ॥**
**अब तुम्ह मम अनुसासन मानी। बसहु जाइ सुरपति रजधानी॥**

असा वर मागून राजाने भगवंतांचे चरण धरले. तेव्हा दयानिधान भगवंत म्हणाले, 'असेच होवो. आता तुम्ही माझ्या आज्ञेने देवराज इंद्राच्या राजधानीत (अमरावतीत) जाऊन राहा. ॥ ४ ॥

**सो०—तहँ करि भोग बिसाल तात गएँ कछु काल पुनि।**
**होइहहु अवध भुआल तब मैं होब तुम्हार सुत॥ १५१॥**

हे राजा, तेथे स्वर्गात पुष्कळसे भोग भोगल्यावर व काही काळ लोटल्यावर तू अयोध्येचा राजा होशील, तेव्हा मी तुझा पुत्र होईन.॥ १५१॥

**इच्छामय नरबेष सँवारें। होइहउँ प्रगट निकेत तुम्हारें॥**
**अंसन्ह सहित देह धरि ताता। करिहउँ चरित भगत सुखदाता॥**

स्वेच्छानिर्मित मनुष्यरूप घेऊन मी तुझ्या घरी प्रकट होईन. हे राजा, मी आपल्या अंशांसह देह धरून भक्तांना सुख देणारी लीला करीन.॥ १॥

**जे सुनि सादर नर बड़भागी। भव तरिहहिं ममता मद त्यागी॥**
**आदिसक्ति जेहिं जग उपजाया। सोउ अवतरिहि मोरि यह माया॥**

मोठे भाग्यशाली मनुष्य आदराने जी चरित्रे ऐकून ममता आणि मद यांचा त्याग करून भवसागर तरून जातील. जग उत्पन्न करणारी आदिशक्ती ही माझी (स्वरूपभूत) मायासुद्धा अवतार घेईल.॥ २॥

**पुरउब मैं अभिलाष तुम्हारा। सत्य सत्य पन सत्य हमारा॥**
**पुनि पुनि अस कहि कृपानिधाना। अंतरधान भए भगवाना॥**

अशा प्रकारे मी तुझी अभिलाषा पूर्ण करीन. हे माझे वचन त्रिवार सत्य आहे', असे म्हणून कृपानिधान भगवान अंतर्धान पावले.॥ ३॥

**दंपति उर धरि भगत कृपाला। तेहिं आश्रम निवसे कछु काला॥**
**समय पाइ तनु तजि अनयासा। जाइ कीन्ह अमरावति बासा॥**

ते राजा-राणी भक्तांवर कृपा करणाऱ्या भगवंतांना हृदयात धारण करून काही काळ आश्रमात राहिले. नंतर यथासमय त्यांनी सहजपणे यातनेविना शरीर सोडले आणि इंद्राच्या अमरावतीत जाऊन वास केला.॥ ४॥

**दो०—यह इतिहास पुनीत अति उमहि कही बृषकेतु।**
**भरद्वाज सुनु अपर पुनि राम जनम कर हेतु॥ १५२॥**

(याज्ञवल्क्य म्हणतात—) 'हे भरद्वाज, हा अत्यंत पवित्र इतिहास शिवांनी पार्वतीला सांगितला होता. आता श्रीरामांनी अवतार घेण्याचे दुसरे कारण ऐका.॥ १५२॥

## मासपारायण, पाचवा विश्राम

**सुनु मुनि कथा पुनीत पुरानी। जो गिरिजा प्रति संभु बखानी॥**
**बिस्व बिदित एक कैकय देसू। सत्यकेतु तहँ बसइ नरेसू॥**

हे मुनी, ही पवित्र व प्राचीन कथा ऐका. ही शिवांनी पार्वतीला सांगितली होती. जगात कैकय नावाचा एक प्रसिद्ध देश आहे. तेथे सत्यकेतू नावाचा राजा राज्य करीत होता. ॥ १ ॥

**धरम धुरंधर नीति निधाना। तेज प्रताप सील बलवाना॥**
**तेहि कें भए जुगल सुत बीरा। सब गुन धाम महा रनधीरा॥**

तो धर्मधुरीण, नीतीची खाण, तेजस्वी, प्रतापी, सुशील आणि बलवान होता. त्याचे दोन वीर पुत्र होते. ते सर्व गुणांचे भांडार व मोठे रणधुरंधर होते. ॥ २ ॥

**राज धनी जो जेठ सुत आही। नाम प्रतापभानु अस ताही॥**
**अपर सुतहि अरिमर्दन नामा। भुजबल अतुल अचल संग्रामा॥**

राज्याचा उत्तराधिकारी असणाऱ्या मोठ्या मुलाचे नाव प्रतापभानू होते. दुसऱ्या मुलाचे नाव अरिमर्दन असे होते. त्याच्या बाहूंमध्ये अपार बळ होते आणि युद्धामध्ये तो पर्वताप्रमाणे निश्चळ राहात असे. ॥ ३ ॥

**भाइहि भाइहि परम समीती। सकल दोष छल बरजित प्रीती॥**
**जेठे सुतहि राज नृप दीन्हा। हरि हित आपु गवन बन कीन्हा॥**

दोघा भावांमध्ये परस्परात सर्व प्रकारच्या दोषांपासून व कपटापासून रहित असे खरेखुरे प्रेम होते. राजाने ज्येष्ठ पुत्राला राज्य दिले आणि आपण भगवंतांचे भजन करण्यासाठी तो वनात निघून गेला. ॥ ४ ॥

दो०—**जब प्रतापरबि भयउ नृप फिरी दोहाई देस।**
**प्रजा पाल अति बेदबिधि कतहुँ नहीं अघ लेस॥ १५३॥**

जेव्हा प्रतापभानू राजा झाला, तेव्हा देशामध्ये त्याच्या नावाने द्वाही फिरवली गेली. वेदात सांगितलेल्या नियमांप्रमाणे उत्तम रीतीने तो प्रजेचे पालन करू लागला. त्याच्या राज्यात पापाचा लवलेश उरला नाही. ॥ १५३ ॥

**नृप हितकारक सचिव सयाना। नाम धरमरुचि सुक्र समाना॥**
**सचिव सयान बंधु बलबीरा। आपु प्रतापपुंज रनधीरा॥**

धर्मरुची नावाचा त्याचा मंत्री राजाचे हित करणारा आणि शुक्राचार्यासारखा बुद्धिमान होता. अशाप्रकारचा बुद्धिमान मंत्री व बलवान आणि वीर भावाप्रमाणेच स्वतः राजाही मोठा प्रतापी व रणधीर होता. ॥ १ ॥

**सेन संग चतुरंग अपारा। अमित सुभट सब समर जुझारा॥**
**सेन बिलोकि राउ हरषाना। अरु बाजे गहगहे निसाना॥**

त्याच्याजवळ अपार चतुरंग सेना होती. तिच्यामध्ये असंख्य योद्धे होते. ते सर्व रणांगणामध्ये झुंज देताना प्राणांची बाजी लावणारे होते. आपली सेना पाहून राजा खूष झाला आणि दुंदुभी वाजू लागल्या. ॥ २ ॥

**बिजय हेतु कटकई बनाई। सुदिन साधि नृप चलेउ बजाई॥**
**जहँ तहँ परीं अनेक लराईं। जीते सकल भूप बरिआईं॥**

राजा एका शुभ मुहूर्तावर दिग्विजयासाठी सेना सज्ज करून रणभेरी वाजवत निघाला. जिकडे तिकडे पुष्कळशा लढाया झाल्या. त्यांमध्ये सर्व राजांना त्याने पराक्रमाने जिंकून घेतले. ॥ ३ ॥

**सप्त दीप भुजबल बस कीन्हे। लै लै दंड छाड़ि नृप दीन्हे॥**
**सकल अवनि मंडल तेहि काला। एक प्रतापभानु महिपाला॥**

त्याने आपल्या बाहुबलाने सप्तद्वीप अधीन केले आणि राजांकडून खंडणी घेऊन त्यांना सोडून दिले. प्रतापभानू त्या काळी संपूर्ण पृथ्वीचा एकमात्र चक्रवर्ती राजा होता. ॥ ४ ॥

दो०—**स्वबस बिस्व करि बाहुबल निज पुर कीन्ह प्रबेसु।**
**अरथ धरम कामादि सुख सेवइ समयँ नरेसु॥ १५४॥**

संपूर्ण पृथ्वीला आपल्या बाहुबलाने अधीन करून राजाने आपल्या नगरात प्रवेश केला. राजा धर्म, अर्थ आणि काम इत्यादी सुखांचा काळानुसार उपभोग घेत राहिला. ॥ १५४ ॥

**भूप प्रतापभानु बल पाई। कामधेनु भै भूमि सुहाई॥**
**सब दुख बरजित प्रजा सुखारी। धरमसील सुंदर नर नारी॥**

राजा प्रतापभानूच्या पराक्रमामुळे भूमी सुंदर कामधेनू बनली. त्याच्या राज्यात प्रजा सर्व दुःखांनी रहित व सुखी झाली. सर्व स्त्री-पुरुष सुंदर धर्मात्मे होते. ॥ १ ॥

**सचिव धरमरुचि हरि पद प्रीती। नृप हित हेतु सिखव नित नीती॥**
**गुर सुर संत पितर महिदेवा। करइ सदा नृप सब कै सेवा॥**

धर्मरुची मंत्र्याची श्रीहरींच्या चरणी भक्ती होती. तो राजाच्या हितासाठी नेहमी त्याला नीतीचा उपदेश करीत असे. राजा गुरू, देव, संत, पितर व ब्राह्मण या सर्वांची नित्य सेवा करीत असे. ॥ २ ॥

**भूप धरम जे बेद बखाने। सकल करइ सादर सुख माने॥**
**दिन प्रति देइ बिबिध बिधि दाना। सुनइ सास्त्र बर बेद पुराना॥**

वेदांमध्ये राजांची जी कर्तव्ये सांगितली आहेत, त्या सर्वांचे पालन राजा नेहमी आदराने व आनंदाने करीत असे. प्रत्येक दिवशी तो नाना प्रकारची दाने देत असे आणि उत्तम शास्त्रे, वेद व पुराणांचे श्रवण करीत असे. ॥ ३ ॥

**नाना बापीं कूप तड़ागा। सुमन बाटिका सुंदर बागा॥**
**बिप्रभवन सुरभवन सुहाए। सब तीरथन्ह बिचित्र बनाए॥**

त्याने पुष्कळ आड, विहिरी, तलाव, फुलबागा, सुंदर बागा, ब्राह्मणांसाठी घरे आणि देवांसाठी सुंदर मंदिरे सर्व तीर्थ क्षेत्रांमध्ये बनविली. ॥ ४ ॥

दो०—**जहँ लगि कहे पुरान श्रुति एक एक सब जाग।**
**बार सहस्त्र सहस्त्र नृप किए सहित अनुराग॥ १५५॥**

वेद आणि पुराणांमध्ये जितक्या प्रकारचे यज्ञ सांगितले आहेत, ते सर्व एक-एक करून राजाने मोठ्या श्रद्धेने हजार-हजार वेळा केले. ॥ १५५ ॥

**हृदयँ न कछु फल अनुसंधाना। भूप बिबेकी परम सुजाना॥**
**करइ जे धरम करम मन बानी। बासुदेव अर्पित नृप ग्यानी॥**

राजाच्या मनात कोणत्याही फळाची इच्छा नव्हती. राजा हा मोठा बुद्धिमान आणि ज्ञानी होता. तो ज्ञानी राजा कर्म, मन आणि वाणी यांनी जो काही धर्म करीत होता, तो सर्व भगवान वासुदेवांना अर्पण करीत असे. ॥ १ ॥

**चढ़ि बर बाजि बार एक राजा। मृगया कर सब साजि समाजा॥**
**बिंध्याचल गभीर बन गयऊ। मृग पुनीत बहु मारत भयऊ॥**

एकदा तो राजा एका वेगवान घोड्यावर बसून शिकारीचे साहित्य घेऊन विंध्याचलाच्या दाट जंगलात गेला आणि तेथे त्याने पुष्कळ उत्तम उत्तम हरणे मारली. ॥ २ ॥

**फिरत बिपिन नृप दीख बराहू। जनु बन दुरेउ ससिहि ग्रसि राहू॥**
**बड़ बिधु नहिं समात मुख माहीं। मनहुँ क्रोध बस उगिलत नाहीं॥**

राजाने वनात फिरताना एक डुक्कर पाहिले. (दातांमुळे ते असे दिसत होते की) जणू चंद्राला ग्रासून राहू वनात येऊन लपला आहे. चंद्र मोठा असल्यामुळे त्याच्या तोंडात मावत नव्हता आणि जणू क्रोधाने तो त्याला बाहेर टाकूही शकत नव्हता. ॥ ३ ॥

**कोल कराल दसन छबि गाई। तनु बिसाल पीवर अधिकाई॥**
**घुरुघुरात हय आरौ पाएँ। चकित बिलोकत कान उठाएँ॥**

ही झाली डुक्कराच्या भयानक दातांची गोष्ट. त्याचे शरीरही मोठे व गलेलठ्ठ होते. घोड्याची चाहूल लागल्यामुळे ते गुरगुरत कान टवकारून सावधपणे पाहात होते. ॥ ४ ॥

दो०—**नील महीधर सिखर सम देखि बिसाल बराहु।**
**चपरि चलेउ हय सुटुकि नृप हाँकि न होइ निबाहु॥ १५६॥**

नील पर्वताच्या शिखराप्रमाणे ते प्रचंड डुक्कर पाहून राजा घोड्याला चाबूक मारून वेगाने निघाला. त्याने (मनात) डुकराला म्हटले की, आता तुझी धडगत नाही. ॥ १५६ ॥

**आवत देखि अधिक रव बाजी। चलेउ बराह मरुत गति भाजी॥**
**तुरत कीन्ह नृप सर संधाना। महि मिलि गयउ बिलोकत बाना॥**

जोराचा आवाज करीत घोडा (आपल्याकडे) येत असल्याचे पाहून डुक्कर वायुवेगाने पळाले. राजाने लागलीच बाण धनुष्याला लावला. बाण पाहताच डुक्कर जमिनीत दडून बसले. ॥ १ ॥

**तकि तकि तीर महीस चलावा। करि छल सुअर सरीर बचावा॥**
**प्रगटत दुरत जाइ मृग भागा। रिस बस भूप चलेउ सँग लागा॥**

राजा नेम धरून बाण मारत होता, परंतु डुक्कर फसवून आपले शरीर वाचवीत होते. तो पशू कधी दिसायचा तर कधी लपत पळून जायचा. राजाही रागाने त्याच्या मागे लागला होता. ॥ २ ॥

**गयउ दूरि घन गहन बराहू। जहँ नाहिन गज बाजि निबाहू॥**
**अति अकेल बन बिपुल कलेसू। तदपि न मृग मग तजइ नरेसू॥**

डुक्कर फार दूरच्या दाट जंगलात शिरले. तेथे हत्ती-घोड्यांचा निभाव लागत नव्हता. राजा अगदी एकटा होता आणि जंगलात त्रास फार होता, परंतु राजाने त्या पशूचा पिच्छा सोडला नाही. ॥ ३ ॥

**कोल बिलोकि भूप बड़ धीरा। भागि पैठ गिरिगुहाँ गभीरा॥**
**अगम देखि नृप अति पछिताई। फिरेउ महाबन परेउ भुलाई॥**

राजा मोठा धीराचा आहे, असे पाहून डुक्कर पळून पर्वतातील एका खोल गुहेत घुसले. त्यात शिरणे कठीण आहे, असे पाहून राजाला निराशेने परत फिरावे लागले. परंतु त्या घोर वनात तो रस्ता चुकला. ॥ ४ ॥

दो०—**खेद खिन्न छुद्धित तृषित राजा बाजि समेत।**
**खोजत ब्याकुल सरित सर जल बिनु भयउ अचेत॥ १५७॥**

फार श्रम झाल्यामुळे थकलेला आणि घोड्यासह तहान-भुकेने व्याकूळ झालेला राजा नदी-तलाव शोधत पाण्याविना तळमळू लागला. ॥ १५७ ॥

**फिरत बिपिन आश्रम एक देखा। तहँ बस नृपति कपट मुनिबेषा॥**
**जासु देस नृप लीन्ह छड़ाई। समर सेन तजि गयउ पराई॥**

वनात फिरता-फिरता त्याला एक आश्रम दिसला. तेथे एक कपटी राजा मुनीच्या वेषात राहात होता. त्याचे राज्य प्रतापभानू नावाच्या राजाने हिरावून घेतले होते आणि पराजित झाल्यामुळे तो सैन्य सोडून वनात पळून आला होता. ॥ १ ॥

**समय प्रतापभानु कर जानी। आपन अति असमय अनुमानी॥**
**गयउ न गृह मन बहुत गलानी। मिला न राजहि नृप अभिमानी॥**

प्रतापभानूची वेळ चांगली आहे व आपले दिवस वाईट आहेत, असे पाहून राजाच्या मनास खूप दुःख झाले. त्यामुळे तो घरी गेला नाही आणि अभिमानी असल्यामुळे त्याने प्रतापभानूशी सख्यही केले नाही. ॥ २ ॥

**रिस उर मारि रंक जिमि राजा । बिपिन बसइ तापस कें साजा ॥**
**तासु समीप गवन नृप कीन्हा । यह प्रतापरबि तेहिं तब चीन्हा ॥**

दरिद्री मनुष्याप्रमाणे मनातील राग दाबून टाकून तो राजा तपस्व्याच्या वेषात वनात राहात होता. राजा प्रतापभानू त्याच्याचजवळ गेला. कपटी राजाने ओळखले की, हा प्रतापभानू आहे. ॥ ३ ॥

**राउ तृषित नहिं सो पहिचाना । देखि सुबेष महामुनि जाना ॥**
**उतरि तुरग तें कीन्ह प्रनामा । परम चतुर न कहेउ निज नामा ॥**

राजा प्रतापभानू तहानेने व्याकूळ असल्यामुळे त्या कपट्याला मात्र ओळखू शकला नाही. त्याचा तो सुंदर मुनि-वेष पाहून राजाला तो महामुनी वाटला आणि घोड्यावरून उतरून त्याने त्याला प्रणाम केला. परंतु अतिशय चतुर असल्यामुळे राजाने त्याला आपले नाव मात्र सांगितले नाही. ॥ ४ ॥

दो०—**भूपति तृषित बिलोकि तेहिं सरबरु दीन्ह देखाइ।**
**मज्जन पान समेत हय कीन्ह नृपति हरषाइ॥ १५८ ॥**

राजाला तहानलेला पाहून मुनीने त्याला सरोवर दाखविले. प्रतापभानूने आनंदाने घोड्यासह त्यात स्नान करून पाणी पिऊन घेतले. ॥ १५८ ॥

**गै श्रम सकल सुखी नृप भयऊ । निज आश्रम तापस लै गयऊ ॥**
**आसन दीन्ह अस्त रबि जानी । पुनि तापस बोलेउ मृदु बानी ॥**

त्याचा थकवा दूर झाला, त्याला बरे वाटले. मग तो तपस्वी त्याला आपल्या आश्रमात घेऊन गेला. सूर्यास्ताची वेळ झाल्याचे पाहून राजाला बसण्यास आसन देऊन तपस्व्याने कोमल शब्दांत त्याला विचारले, ॥ १ ॥

**को तुम्ह कस बन फिरहु अकेलें । सुंदर जुबा जीव परहेलें ॥**
**चक्रबर्ति के लच्छन तोरें । देखत दया लागि अति मोरें ॥**

'तुम्ही कोण आहात? सुंदर तरुण असताना जिवाची पर्वा न करता वनात एकटे का फिरत आहात? तुमच्या ठिकाणी चक्रवर्ती राजाची लक्षणे पाहून मला तुमची कीव येते.' ॥ २ ॥

**नाम प्रतापभानु अवनीसा । तासु सचिव मैं सुनहु मुनीसा ॥**
**फिरत अहेरें परेउँ भुलाई । बड़ें भाग देखेउँ पद आई ॥**

राजा म्हणाला, 'हे मुनीश्वरा, ऐका. प्रतापभानू नावाचा एक राजा आहे, त्याचा मी मंत्री आहे. शिकारीसाठी फिरताना वाट चुकलो आहे. सुदैवाने येथे आल्यामुळे तुमच्या चरणांचे दर्शन घडले. ॥ ३ ॥

**हम कहँ दुर्लभ दरस तुम्हारा । जानत हौं कछु भल होनिहारा ॥**
**कह मुनि तात भयउ अँधिआरा । जोजन सत्तरि नगरु तुम्हारा ॥**

मला तुमचे दुर्लभ दर्शन झाल्याने असे वाटते की, आता काही चांगले घडणार आहे.' मुनी म्हणाला, 'अरे बाबा, अंधार झालेला आहे. तुझे नगर येथून सत्तर योजने दूर आहे.॥ ४॥

**दो०—निसा घोर गंभीर बन पंथ न सुनहु सुजान।**
**बसहु आजु अस जानि तुम्ह जाएहु होत बिहान॥ १५९ ( क )॥**

हे शहाण्या गृहस्था! माझे ऐक. घोर अंधारी रात्र आहे, जंगल घनदाट आहे, वाट नाही, म्हणून तू आज येथेच थांब. सकाळ झाल्यावर जा.'॥ १५९ (क)॥

**तुलसी जसि भवतब्यता तैसी मिलइ सहाइ।**
**आपुनु आवइ ताहि पहिं ताहि तहाँ लै जाइ॥ १५९ ( ख )॥**

तुलसीदास म्हणतात की, 'नशिबात जसे घडणार असते, तशीच घटना घडते. एक तर तुम्ही आपणाहून तिच्याजवळ जाता, किंवा ती तुम्हांला तेथे घेऊन जाते.॥ १५९ (ख)॥

**भलेहिं नाथ आयसु धरि सीसा। बाँधि तुरग तरु बैठ महीसा॥**
**नृप बहु भाँति प्रसंसेउ ताही। चरन बंदि निज भाग्य सराही॥**

(राजा म्हणाला), 'हे स्वामी! फार छान.' असे म्हणून त्याची आज्ञा मानून राजाने घोड्याला एका झाडाला बांधले आणि तो बसला. राजाने त्या मुनीची खूप प्रशंसा केली आणि त्याच्या चरणी वंदन करून तो आपल्या भाग्याची वाखाणणी करू लागला.॥ १॥

**पुनि बोलेउ मृदु गिरा सुहाई। जानि पिता प्रभु करउँ ढिठाई॥**
**मोहि मुनीस सुत सेवक जानी। नाथ नाम निज कहहु बखानी॥**

नंतर तो गोड वाणीने म्हणाला की, 'हे प्रभो, मी तुम्हांला पित्याप्रमाणे समजून हे साहस करतो. हे मुनीश्वर, मला आपला पुत्र आणि सेवक समजून आपले नाव, गाव सविस्तर सांगा.'॥ २॥

**तेहि न जान नृप नृपहि सो जाना। भूप सुहृद सो कपट सयाना॥**
**बैरी पुनि छत्री पुनि राजा। छल बल कीन्ह चहइ निज काजा॥**

राजाने त्या कपटी मुनीला ओळखले नाही, परंतु त्याने राजाला ओळखले होते. राजाचे मन सरळ होते आणि तो मुनी कपट करण्यात चतुर होता. एकतर तो वैरी होता, त्यातून क्षत्रिय जातीचा. शिवाय राजा. तो कपटाने आपले काम करू पाहात होता.॥ ३॥

**समुझि राजसुख दुखित अराती। अवाँ अनल इव सुलगइ छाती॥**
**सरल बचन नृप के सुनि काना। बयर सँभारि हृदयँ हरषाना॥**

तो (मुनिवेषधारी) शत्रू आपल्या राज्यसुखाची आठवण करीत दुःखी होता. त्याचे मन कुंभाराच्या आव्याप्रमाणे आतून भाजून निघत होते. राजाचे साधे-भोळे शब्द ऐकून आणि आपले वैर मनात धरून तो आनंदात होता.॥ ४॥

दो०—**कपट बोरि बानी मृदुल बोलेउ जुगुति समेत।**
**नाम हमार भिखारि अब निर्धन रहित निकेत॥ १६०॥**

तो कपटाने मोठ्या युक्तीने कोमल वाणीने म्हणाला, 'आता आमचे नाव 'भिकारी' आहे, कारण आम्ही निर्धन व घर-दार नसलेले आहोत.'॥ १६०॥

**कह नृप जे बिग्यान निधाना। तुम्ह सारिखे गलित अभिमाना॥**
**सदा रहहिं अपनपौ दुराएँ। सब बिधि कुसल कुबेष बनाएँ॥**

राजा म्हणाला, 'तुमच्यासारखे जे विज्ञानी व निरभिमानी असतात, ते आपले खरे स्वरूप नेहमी लपवून ठेवतात. कारण दीन वेष धारण करून राहण्यातच सर्व प्रकारचे कल्याण आहे. (प्रकटपणे संतवेष असल्यास मान-सन्मान होण्याची शक्यता असते आणि मानामुळे पतन घडण्याची)॥ १॥

**तेहि तें कहहिं संत श्रुति टेरें। परम अकिंचन प्रिय हरि केरें॥**
**तुम्ह सम अधन भिखारि अगेहा। होत बिरंचि सिवहि संदेहा॥**

यामुळेच संत व वेद उच्च स्वराने म्हणतात की, परम अकिंचन (पूर्णपणे अहंकार, ममता व मानरहित) लोकच भगवंतांना आवडतात. तुमच्यासारखे निर्धन, भिकारी आणि गृहहीन लोक पाहून ब्रह्मदेव व शिव यांनाही संदेह होतो (की हे खरे संत आहेत की भिकारी.)॥ २॥

**जोसि सोसि तव चरन नमामी। मो पर कृपा करिअ अब स्वामी॥**
**सहज प्रीति भूपति कै देखी। आपु बिषय बिस्वास बिसेषी॥**

तुम्ही जे असाल ते असा. मी तुमच्या चरणी नमस्कार करतो. हे स्वामी, आता मजवर कृपा करा.' आपल्यावरचे राजाचे सरळ प्रेम आणि आपल्याविषयीचा त्याचा विश्वास पाहून,॥ ३॥

**सब प्रकार राजहि अपनाई। बोलेउ अधिक सनेह जनाई॥**
**सुनु सतिभाउ कहउँ महिपाला। इहाँ बसत बीते बहु काला॥**

सर्व प्रकारे राजाला आपल्याला वश करून घेऊन मोठे प्रेम दाखवीत तो (कपटी तपस्वी) म्हणाला, 'हे राजा, ऐक. मी तुला खरे सांगतो की, मला येथे राहून बराच काळ लोटला.॥ ४॥

दो०—**अब लगि मोहि न मिलेउ कोउ मैं न जनावउँ काहु।**
**लोकमान्यता अनल सम कर तप कानन दाहु॥ १६१ (क)॥**

आजपर्यंत मला कोणी भेटले नाही आणि मीही कुणाला भेटत नाही. कारण जगात प्रतिष्ठा ही अग्नीप्रमाणे आहे. ती तपरूपी वन भस्म करून टाकते.'॥ १६१ (क)॥

सो०—**तुलसी देखि सुबेषु भूलहिं मूढ़ न चतुर नर।**
**सुंदर केकिहि पेखु बचन सुधा सम असन अहि॥ १६१ (ख)॥**

तुलसीदास म्हणतात की, 'सुंदर वेष पाहून मूर्खच नव्हे, तर चतुर मनुष्यसुद्धा फसतात. सुंदर मोर बघा ना! त्याचे बोल अमृतासारखे असतात आणि आहार मात्र सापाचा असतो.'॥ १६१(ख)॥

**तातें गुपुत रहउँ जग माहीं। हरि तजि किमपि प्रयोजन नाहीं॥**
**प्रभु जानत सब बिनहिं जनाएँ। कहहु कवनि सिधि लोक रिझाएँ॥**

कपट-स्वामी म्हणाला की, 'यासाठी मी जगापासून लपून राहातो. श्रीहरींना सोडून कुणाशी काहीही संबंध ठेवीत नाही. प्रभू हे तर न सांगताच सर्व जाणतात. मग सांग. जगाला प्रसन्न केल्याने कसली सिद्धी मिळणार?॥ १॥

**तुम्ह सुचि सुमति परम प्रिय मोरें। प्रीति प्रतीति मोहि पर तोरें॥**
**अब जौं तात दुरावउँ तोही। दारुन दोष घटइ अति मोही॥**

तू पवित्र व सद्बुद्धीचा आहेस, त्यामुळे तू मला फार आवडतोस आणि तुझे प्रेम व विश्वास माझ्यावर आहे. म्हणून बाबा रे! आता जर मी तुझ्यापासून काही लपवून ठेवीन, तर मला भयंकर पाप लागेल.'॥ २॥

**जिमि जिमि तापसु कथइ उदासा। तिमि तिमि नृपहि उपज बिस्वासा॥**
**देखा स्वबस कर्म मन बानी। तब बोला तापस बगध्यानी॥**

तो तपस्वी जसजशा उदासीनतेच्या गोष्टी बोलत होता, तसातसा राजाला जास्त विश्वास वाटू लागला. जेव्हा त्या बगळ्याप्रमाणे ध्यान लावणाऱ्या (कपटी) मुनीने राजाला कायावाचामनाने सर्व प्रकारे आपल्याला वश झाल्याचे पाहिले, तेव्हा तो म्हणाला,॥ ३॥

**नाम हमार एकतनु भाई। सुनि नृप बोलेउ पुनि सिरु नाई॥**
**कहहु नाम कर अरथ बखानी। मोहि सेवक अति आपन जानी॥**

'हे बंधो, आमचे नाव एकतनू आहे.' हे ऐकून राजाने मस्तक नम्र करून म्हटले, 'मला आपला अत्यंत प्रेमी सेवक समजून आपल्या नावाचा अर्थ समजावून सांगा.॥ ४॥

दो०—**आदिसृष्टि उपजी जबहिं तब उतपति भै मोरि।**
**नाम एकतनु हेतु तेहि देह न धरी बहोरि॥ १६२॥**

तो कपटी मुनी म्हणाला, 'जेव्हा सर्वप्रथम सृष्टी उत्पन्न झाली होती, तेव्हा माझी उत्पत्ती झाली होती. तेव्हापासून मी दुसरा देह धारण केलेला नाही. म्हणून माझे नाव 'एकतनू' असे आहे.॥ १६२॥

**जनि आचरजु करहु मन माहीं। सुत तप तें दुर्लभ कछु नाहीं॥**
**तपबल तें जग सृजइ बिधाता। तपबल बिष्नु भए परित्राता॥**

हे पुत्रा, मनात आश्चर्य करू नकोस. तपामुळे काहीही दुर्लभ नाही. तपानेच ब्रह्मदेव जगाची रचना करतात. तपामुळेच विष्णू हे जगाचे पालन करणारे झाले आहेत.॥ १॥

**तपबल संभु करहिं संघारा। तप तें अगम न कछु संसारा॥**
**भयउ नृपहि सुनि अति अनुरागा। कथा पुरातन कहै सो लागा॥**

तपामुळेच रुद्र संहार करतात. जगात अशी कोणतीही गोष्ट नाही की, जी तपामुळे मिळू शकणार नाही.' हे ऐकून राजाला (त्याच्याविषयी अतिशय) प्रेम वाटू लागले. तेव्हा तो तपस्वी प्राचीन कथा सांगू लागला.॥ २॥

**करम धरम इतिहास अनेका। करइ निरूपन बिरति बिबेका॥**
**उदभव पालन प्रलय कहानी। कहेसि अमित आचरज बखानी॥**

कर्म, धर्म आणि अनेक तऱ्हेचे इतिहास सांगून तो वैराग्याचे आणि ज्ञानाचे निरूपण करू लागला. सृष्टीची उत्पत्ती, पालन आणि संहार यांच्या मोठ्या आश्चर्यकारक कथा त्याने विस्ताराने सांगितल्या.॥ ३॥

**सुनि महीप तापस बस भयऊ। आपन नाम कहन तब लयऊ॥**
**कह तापस नृप जानउँ तोही। कीन्हेहु कपट लाग भल मोही॥**

त्या ऐकून राजा त्या तपस्व्याच्या पूर्णपणे अधीन झाला आणि मग तो त्याला आपले नाव सांगू लागला. तपस्वी म्हणाला, 'राजा, मी तुला जाणतो. तू कपटाने खोटे नाव सांगितलेस, ते मला आवडले.॥ ४॥

सो०—**सुनु महीस असि नीति जहँ तहँ नाम न कहहिं नृप।**
**मोहि तोहि पर अति प्रीति सोइ चतुरता बिचारि तव॥ १६३॥**

हे राजन, ऐक. नीती असे सांगते की, राजे लोक वाटेल तेथे आपले नाव सांगत नाहीत. तुझे हे चातुर्य पाहून मला तुझ्याविषयी फार प्रेम वाटू लागले आहे.॥ १६३॥

**नाम तुम्हार प्रताप दिनेसा। सत्यकेतु तव पिता नरेसा॥**
**गुर प्रसाद सब जानिअ राजा। कहिअ न आपन जानि अकाजा॥**

तुझे नाव प्रतापभानू आहे. महाराज सत्यकेतू हे तुझे वडील होते. हे राजन, गुरूंच्या कृपेमुळे मी सर्व जाणतो, परंतु त्यात आपलाच तोटा समजून मी सांगत नाही.॥ १॥

**देखि तात तव सहज सुधाई। प्रीति प्रतीति नीति निपुनाई॥**
**उपजि परी ममता मन मोरें। कहउँ कथा निज पूछे तोरें॥**

हे राजन, तुझा सहज साधेपणा, प्रेम, विश्वास आणि नीति-निपुणता पाहून माझ्या मनात तुझ्याबद्दल ममता उत्पन्न झाली आहे. म्हणून मी तू न विचारता आपली कहाणी सांगतो.॥ २॥

**अब प्रसन्न मैं संसय नाहीं। मागु जो भूप भाव मन माहीं॥**
**सुनि सुबचन भूपति हरषाना। गहि पद बिनय कीन्हि बिधि नाना॥**

आता मी खूष आहे, यात शंका बाळगू नकोस. 'हे राजन, मनात जे येईल, ते मागून घे.' हे मनमोहक बोलणे ऐकून राजाला आनंद झाला आणि मुनीच्या पाया पडून त्याने विनवणी केली. ॥ ३ ॥

**कृपासिंधु मुनि दरसन तोरें। चारि पदारथ करतल मोरें॥**
**प्रभुहि तथापि प्रसन्न बिलोकी। मागि अगम बर होउँ असोकी॥**

'हे दयासागर मुनी, तुझ्या दर्शनानेच चारी पुरुषार्थ (धर्म, अर्थ, काम, मोक्ष) माझ्या हाती आले. तरीही स्वामींना प्रसन्न पाहून मी असा दुर्लभ वर मागतो की, मी शोकरहित व्हावे. ॥ ४ ॥

**दो०—जरा मरन दुख रहित तनु समर जितै जनि कोउ।**
**एकछत्र रिपुहीन महि राज कलप सत होउ॥ १६४॥**

माझे शरीर वृद्धावस्था, मृत्यू आणि दु:खाने रहित होवो. मला युद्धात कुणीही जिंकू नये आणि पृथ्वीवर माझे शंभर कल्प एकछत्री राज्य असावे.'॥ १६४॥

**कह तापस नृप ऐसेइ होऊ। कारन एक कठिन सुनु सोऊ॥**
**कालउ तुअ पद नाइहि सीसा। एक बिप्रकुल छाड़ि महीसा॥**

तपस्वी म्हणाला, 'हे राजन, 'तथास्तु.' परंतु एक गोष्ट कठीण वाटते, तीही ऐक. हे पृथ्वीच्या स्वामी, फक्त ब्राह्मण कुलातील लोक सोडून प्रत्यक्ष काळसुद्धा तुझ्या चरणी मस्तक ठेवील. ॥ १ ॥

**तपबल बिप्र सदा बरिआरा। तिन्ह के कोप न कोउ रखवारा॥**
**जौं बिप्रन्ह बस करहु नरेसा। तौ तुअ बस बिधि बिष्नु महेसा॥**

तपामुळे ब्राह्मण नेहमी बलवान असतात. त्यांचा क्रोध झाल्यास रक्षण करणारा कोणीही नाही. हे नरपती, जर तू ब्राह्मणांना वश केलेस, तर ब्रह्मदेव, विष्णू व महेश हे सुद्धा तुझ्या अधीन होतील. ॥ २ ॥

**चल न ब्रह्मकुल सन बरिआई। सत्य कहउँ दोउ भुजा उठाई॥**
**बिप्र श्राप बिनु सुनु महिपाला। तोर नास नहिं कवनेहुँ काला॥**

ब्राह्मणांवर बळजबरी चालत नसते, हे मी दोन्ही हात उभारून सत्य सांगतो. हे राजा, ऐक. ब्राह्मणांच्या शापाशिवाय तुझा नाश कोणत्याही काळी होणार नाही.'॥ ३ ॥

**हरषेउ राउ बचन सुनि तासू। नाथ न होइ मोर अब नासू॥**
**तव प्रसाद प्रभु कृपानिधाना। मो कहुँ सर्ब काल कल्याना॥**

राजा ते बोलणे ऐकून अतिशय प्रसन्न झाला आणि म्हणाला, 'हे स्वामी, आता माझा नाश कधीही होणार नाही. हे कृपानिधान प्रभो, तुमच्या कृपेने माझे आता नित्य कल्याण होईल.'॥ ४॥

दो०—**एवमस्तु कहि कपटमुनि बोला कुटिल बहोरि।**
**मिलब हमार भुलाब निज कहहु त हमहि न खोरि॥ १६५॥**

'असेच होईल', असे म्हणून तो कुटिल मुनी म्हणाला, 'परंतु मला भेटला होतास आणि वाट चुकला होतास, ही गोष्ट जर कुणालाही सांगितलीस, तर मग (वर सफल न झाल्यास) आमचा दोष नाही.॥ १६५॥

**तातें मैं तोहि बरजउँ राजा। कहें कथा तव परम अकाजा॥**
**छठें श्रवन यह परत कहानी। नास तुम्हार सत्य मम बानी॥**

हे राजा, मी तुला एवढ्यासाठी मनाई करतो की, हा प्रसंग कोणालाही सांगितल्यास तुझे मोठे नुकसान होईल. हे माझे सत्य वचन समज.॥ १॥

**यह प्रगटें अथवा द्विजश्रापा। नास तोर सुनु भानुप्रतापा॥**
**आन उपायँ निधन तव नाहीं। जौं हरि हर कोपहिं मन माहीं॥**

हे प्रतापभानू, ऐक. ही गोष्ट जाहीर करण्याने किंवा ब्राह्मणांच्या शापाने तुझा नाश होईल, इतर कोणत्याही कारणाने नाही. अगदी ब्रह्मदेव आणि शंकर हेसुद्धा तुझ्यावर रागावले, तरी तुला मृत्यू येणार नाही.'॥ २॥

**सत्य नाथ पद गहि नृप भाषा। द्विज गुर कोप कहहु को राखा॥**
**राखइ गुर जौं कोप बिधाता। गुर बिरोध नहिं कोउ जग त्राता॥**

राजाने मुनीचे पाय धरून म्हटले, 'हे स्वामी, खरेच आहे. ब्राह्मण आणि गुरूच्या क्रोधापासून बचाव कोण बरे करणार? सांगा. जरी ब्रह्मदेव रागावले, तरी गुरू वाचवितो, पण गुरू रागावले, तर जगात कोणीही वाचविणारा नाही.॥ ३॥

**जौं न चलब हम कहे तुम्हारें। होउ नास नहिं सोच हमारें॥**
**एकहिं डर डरपत मन मोरा। प्रभु महिदेव श्राप अति घोरा॥**

जर मी तुमच्या म्हणण्याप्रमाणे वागलो नाही, तर खुशाल मला मृत्यू येवो. मला त्याची काळजी नाही. पण माझ्या मनात एकच भीती आहे. ती म्हणजे ब्राह्मणांचा शाप भयंकर असतो.॥ ४॥

दो०—**होहिं बिप्र बस कवन बिधि कहहु कृपा करि सोउ।**
**तुम्ह तजि दीनदयाल निज हितू न देखउँ कोउ॥ १६६॥**

ते ब्राह्मण कोणत्या प्रकारे वश होऊ शकतील, तेही कृपा करून मला सांगा. हे दीनदयाळू, तुम्हांला सोडून दुसऱ्या कुणालाही मी आपला हितचिंतक समजत नाही.'॥ १६६॥

**सुनु नृप बिबिध जतन जग माहीं। कष्टसाध्य पुनि होहिं कि नाहीं॥**
**अहइ एक अति सुगम उपाई। तहाँ परंतु एक कठिनाई॥**

(तपस्वी म्हणाला,) 'हे राजा, जगात अनेक उपाय आहेत, परंतु ते कष्टसाध्य आहेत आणि त्यामुळे ते सिद्ध होतील किंवा न होतील (सांगता येत नाही.) एक उपाय फार सोपा आहे, परंतु त्यातही एक अडचण आहे.॥ १॥

**मम आधीन जुगुति नृप सोई। मोर जाब तव नगर न होई॥**
**आजु लगें अरु जब तें भयऊँ। काहू के गृह ग्राम न गयऊँ॥**

हे राजा, ती युक्ती माझ्याजवळ आहे. पण तुझ्या नगरात मला जाता येणार नाही. जेव्हापासून मी उत्पन्न झालो, तेव्हापासून आजपर्यंत मी कुणाच्या घरी किंवा गावी गेलो नाही.॥ २॥

**जौं न जाउँ तव होइ अकाजू। बना आइ असमंजस आजू॥**
**सुनि महीस बोलेउ मृदु बानी। नाथ निगम असि नीति बखानी॥**

परंतु जर गेलो नाही तर तुझे काम फिसकटेल. आज मी मोठ्या पेचात सापडलो आहे.' हे ऐकून राजा मृदू स्वरात म्हणाला, 'हे नाथ, वेदांमध्ये असे सांगितले आहे की,॥ ३॥

**बड़े सनेह लघुन्ह पर करहीं। गिरि निज सिरनि सदा तृन धरहीं॥**
**जलधि अगाध मौलि बह फेनू। संतत धरनि धरत सिर रेनू॥**

मोठी माणसे लहानांच्यावर प्रेम करतातच. पर्वत आपल्या शिरावर नेहमी गवत धारण करतात, खोल समुद्र स्वतःच्या मस्तकावर फेस धारण करतात आणि धरती आपल्या डोक्यावर धूळ धारण करते.'॥ ४॥

दो०—**अस कहि गहे नरेस पद स्वामी होहु कृपाल।**
**मोहि लागि दुख सहिअ प्रभु सज्जन दीनदयाल॥ १६७॥**

असे म्हणून राजाने मुनीचे पाय धरले. (आणि म्हटले,) 'हे स्वामी, कृपा करा. तुम्ही संत आहात. दीनदयाळू आहात. म्हणून हे प्रभो, माझ्यासाठी एवढा त्रास जरूर सोसा.'॥ १६७॥

**जानि नृपहि आपन आधीना। बोला तापस कपट प्रबीना॥**
**सत्य कहउँ भूपति सुनु तोही। जग नाहिन दुर्लभ कछु मोही॥**

राजा आपल्या पूर्ण अधीन झाला आहे, हे पाहून कपटी तपस्वी म्हणाला, 'हे राजा! ऐक. मी तुला खरे सांगतो. या जगात मला काहीही कठीण नाही.॥ १॥

**अवसि काज मैं करिहउँ तोरा। मन तन बचन भगत तैं मोरा॥**
**जोग जुगुति तप मंत्र प्रभाऊ। फलइ तबहिं जब करिअ दुराऊ॥**

मी तुझे काम नक्की करीन. कारण तू कायावाचामनाने माझा भक्त झाला आहेस. परंतु योग, युक्ती आणि मंत्र यांचा प्रभाव गुप्तपणे केल्यावरच फल देतो.॥ २॥

**जौं नरेस मैं करौं रसोई। तुम्ह परुसहु मोहि जान न कोई॥**
**अन्न सो जोइ जोइ भोजन करई। सोइ सोइ तव आयसु अनुसरई॥**

हे राजा! मी जर स्वयंपाक केला व तुम्ही तो वाढला, पण मी जर कुणालाही ओळखू आलो नाही, तर मग ते अन्न जो जो खाईल, तो तो तुमचा आज्ञाधारक होईल.॥ ३॥

**पुनि तिन्ह के गृह जेवँइ जोऊ। तव बस होइ भूप सुनु सोऊ॥**
**जाइ उपाय रचहु नृप एहू। संबत भरि संकलप करेहू॥**

एवढेच नव्हे, तर त्यांच्या घरीसुद्धा जो कोणी हे भोजन करील, हे राजा, तो सुद्धा तुझ्या अधीन होईल. हे राजा, जाऊन हा उपाय कर आणि वर्षभर भोजन घालण्याचा संकल्प कर.॥ ४॥

दो०—**नित नूतन द्विज सहस सत बरेहु सहित परिवार।**
**मैं तुम्हरे संकलप लगि दिनहिं करबि जेवनार॥ १६८॥**

नित्य नव्या एक लाख ब्राह्मणांना कुटुंबासह निमंत्रित कर. मी तुझ्या संकल्पापर्यंत (वर्षभर) रोज स्वयंपाक करीन.॥ १६८॥

**एहि बिधि भूप कष्ट अति थोरें। होइहहिं सकल बिप्र बस तोरें॥**
**करिहहिं बिप्र होम मख सेवा। तेहिं प्रसंग सहजेहिं बस देवा॥**

हे राजा, अशा प्रकारे फार थोड्या श्रमाने सर्व ब्राह्मण तुला वश होतील. ब्राह्मण हवन, यज्ञ आणि सेवा-पूजा करतील, त्यामुळे देवसुद्धा सहजपणे वश होतील.॥ १॥

**और एक तोहि कहउँ लखाऊ। मैं एहि बेष न आउब काऊ॥**
**तुम्हरे उपरोहित कहुँ राया। हरि आनब मैं करि निज माया॥**

मी आणखी एक ओळख तुला सांगून ठेवतो. मी या रूपात कधीही येणार नाही. हे राजा, मी आपल्या मायेने तुझ्या पुरोहिताला इकडे पळवून आणीन.॥ २॥

**तपबल तेहि करि आपु समाना। रखिहउँ इहाँ बरष परवाना॥**
**मैं धरि तासु बेषु सुनु राजा। सब बिधि तोर सँवारब काजा॥**

तपाच्या शक्तीने त्याला स्वत:सारखा बनवून एक वर्ष येथे ठेवून घेईन आणि हे राजा, मी त्याचे रूप घेऊन सर्व प्रकारे तुझे काम पूर्ण करीन.॥ ३॥

**गै निसि बहुत सयन अब कीजे। मोहि तोहि भूप भेंट दिन तीजे॥**
**मैं तपबल तोहि तुरग समेता। पहुँचैहउँ सोवतहि निकेता॥**

हे राजा, रात्र फार झाली आहे, आता झोप. आजपासून तिसऱ्या दिवशी माझी-तुझी भेट होईल. तपोबलाने मी तुला घोड्यासह झोपेमध्ये असतानाच घरी पोहोचवीन.॥ ४॥

दो०—**मैं आउब सोइ बेषु धरि पहिचानेहु तब मोहि।**
**जब एकांत बोलाइ सब कथा सुनावौं तोहि॥ १६९॥**

मी तो पुरोहिताचा वेष घेऊन येईन. जेव्हा एकांतात बोलावून सर्व गोष्टी सांगेन, तेव्हा तू मला ओळखशील.'॥ १६९॥

**सयन कीन्ह नृप आयसु मानी। आसन जाइ बैठ छलग्यानी॥**
**श्रमित भूप निद्रा अति आई। सो किमि सोव सोच अधिकाई॥**

राजा ती आज्ञा मानून झोपी गेला आणि तो कपटी तपस्वी आसनावर जाऊन बसला. राजा थकला होता, त्याला फार गाढ झोप आली. पण तो कपटी कसा झोपणार? त्याला फार काळजी वाटत होती.॥ १॥

**कालकेतु निसिचर तहँ आवा। जेहिं सूकर होइ नृपहि भुलावा॥**
**परम मित्र तापस नृप केरा। जानइ सो अति कपट घनेरा॥**

त्याच वेळी तेथे कालकेतू नावाचा राक्षस आला. त्याने डुक्कराचे रूप घेऊन राजाची दमछाक केली होती. तो तपस्वी बनलेल्या राजाचा खास मित्र होता आणि कपट विद्येत निष्णात होता.॥ २॥

**तेहि के सत सुत अरु दस भाई। खल अति अजय देव दुखदाई॥**
**प्रथमहिं भूप समर सब मारे। बिप्र संत सुर देखि दुखारे॥**

त्याला शंभर मुले आणि दहा भाऊ होते. ते फार दुष्ट व अजिंक्य होते. देवांना दुःख देणारे होते. ब्राह्मण, संत आणि देवांना दुःखी झाल्याचे पाहून प्रतापभानूने त्या सर्वांना पूर्वीच युद्धात मारून टाकले होते.॥ ३॥

**तेहिं खल पाछिल बयरु सँभारा। तापस नृप मिलि मंत्र बिचारा॥**
**जेहिं रिपु छय सोइ रचेन्हि उपाऊ। भावी बस न जान कछु राऊ॥**

त्या दुष्टाने पूर्वीचे वैर लक्षात घेऊन कपटी तपस्वी-राजाला भेटून त्याच्याशी सल्लामसलत केली आणि शत्रूचा नाश ज्याप्रकारे होईल, तो उपाय योजला. भवितव्यतेच्या अधीन झालेला राजा (प्रतापभानू) काहीही समजू शकला नाही.॥ ४॥

दो०—**रिपु तेजसी अकेल अपि लघु करि गनिअ न ताहु।**
**अजहुँ देत दुख रबि ससिहि सिर अवसेषित राहु॥ १७०॥**

तेजस्वी शत्रू एकटा असला, तरी त्याला लहान समजू नये. पाहा, ज्याचे फक्त शिर उरले आहे, तो राहू अजूनही सूर्य-चंद्राला छळत असतो.॥ १७०॥

**तापस नृप निज सखहि निहारी। हरषि मिलेउ उठि भयउ सुखारी॥**
**मित्रहि कहि सब कथा सुनाई। जातुधान बोला सुख पाई॥**

तपस्वी-राजा आपल्या मित्राला पाहून प्रसन्न झाला. उठून तो त्याला भेटला. त्याला फार आनंद झाला होता. त्याने आपल्या मित्राला (कालकेतूला) सर्व गोष्टी सांगितल्या, तेव्हा तो राक्षस आनंदित होऊन म्हणाला, ॥ १ ॥

**अब साधेउँ रिपु सुनहु नरेसा। जौं तुम्ह कीन्ह मोर उपदेसा॥**
**परिहरि सोच रहहु तुम्ह सोई। बिनु औषध बिआधि बिधि खोई॥**

'हे राजा, जेव्हा तू माझ्या म्हणण्याप्रमाणे इतके काम केले आहेस, तर आता मी शत्रूला ताब्यात घेतलेच, असे समज. आता तू काळजी सोडून झोप. विधात्याने औषधाविना रोग बरा केला आहे. ॥ २ ॥

**कुल समेत रिपु मूल बहाई। चौथें दिवस मिलब मैं आई॥**
**तापस नृपहि बहुत परितोषी। चला महाकपटी अतिरोषी॥**

शत्रूला त्याच्या कुळासह मुळापासून उध्वस्त करून आजपासून चौथ्या दिवशी मी येऊन तुला भेटेन.' (अशा प्रकारे) तपस्वी राजाला मोठा दिलासा देऊन तो महामायावी आणि अत्यंत रागीट राक्षस तेथून निघाला. ॥ ३ ॥

**भानुप्रतापहि बाजि समेता। पहुँचाएसि छन माझ निकेता॥**
**नृपहि नारि पहिं सयन कराई। हयगृहँ बाँधेसि बाजि बनाई॥**

त्याने राजा प्रतापभानूला घोड्यासह एका क्षणात घरी पोहोचविले आणि राजाला राणीजवळ झोपवून घोड्याला पागेत नीट बांधून ठेवले. ॥ ४ ॥

दो०—**राजा के उपरोहितहि हरि लै गयउ बहोरि।**
**लै राखेसि गिरि खोह महुँ मायाँ करि मति भोरि॥ १७१॥**

नंतर तो तेथील राजाच्या पुरोहिताला उचलून घेऊन गेला. आपल्या मायेने त्याच्या बुद्धीत भ्रम उत्पन्न करून त्याने त्याला पर्वताच्या गुहेत आणून ठेवले. ॥ १७१ ॥

**आपु बिरचि उपरोहित रूपा। परेउ जाइ तेहि सेज अनूपा॥**
**जागेउ नृप अनभएँ बिहाना। देखि भवन अति अचरजु माना॥**

तो स्वतः पुरोहिताचे रूप घेऊन त्याच्या सुंदर अंथरुणावर जाऊन झोपला. राजा सकाळ होण्यापूर्वीच जागा झाला आणि आपले घर पाहून थक्क झाला. ॥ १ ॥

**मुनि महिमा मन महुँ अनुमानी। उठेउ गवँहिं जेहिं जान न रानी॥**
**कानन गयउ बाजि चढ़ि तेहीं। पुर नर नारि न जानेउ केहीं॥**

मुनीच्या महिम्याचा अंदाज येऊन राणीला कळू नये म्हणून तो हळूच उठला. नंतर त्याच घोड्यावर बसून वनात निघून गेला. नगरातील कोणाही स्त्री-पुरुषाला हे कळलेसुद्धा नाही. ॥ २ ॥

**गएँ जाम जुग भूपति आवा। घर घर उत्सव बाज बधावा॥**
**उपरोहितहि देख जब राजा। चकित बिलोक सुमिरि सोइ काजा॥**

दोन प्रहर उलटल्यावर राजा परत आला. घरोघरी उत्सव साजरा होऊ लागला आणि मंगल गाणी गाइली जाऊ लागली. जेव्हा राजाने पुरोहिताला पाहिले, तेव्हा तो आपल्या त्या कार्याची आठवण करीत आश्चर्याने पाहू लागला.॥ ३॥

**जुग सम नृपहि गए दिन तीनी। कपटी मुनि पद रह मति लीनी॥**
**समय जानि उपरोहित आवा। नृपहि मते सब कहि समुझावा॥**

राजाचे तीन दिवस जणू तीन युगांप्रमाणे गेले. त्याची बुद्धी कपटी मुनीच्या चरणी लागून राहिली होती. ठरल्यावेळी पुरोहित (बनलेला राक्षस) आला आणि राजाबरोबर त्याच्या झालेल्या गुप्त मसलतीप्रमाणे त्याने आपले विचार त्याला समजावून सांगितले.॥ ४॥

दो०—**नृप हरषेउ पहिचानि गुरु भ्रम बस रहा न चेत।**
**बरे तुरत सत सहस बर बिप्र कुटुंब समेत॥ १७२॥**

(ठरल्याप्रमाणे) गुरूला (त्या रूपात) ओळखल्यामुळे राजा आनंदित झाला. तो भ्रमित झाल्यामुळे सारासार विचार उरला नाही की, हा तपस्वी मुनी आहे की कालकेतू राक्षस. त्याने लागलीच एक लाख उत्तम ब्राह्मणांना कुटुंबासह निमंत्रण दिले.॥ १७२॥

**उपरोहित जेवनार बनाई। छरस चारि बिधि जसि श्रुति गाई॥**
**मायामय तेहिं कीन्हि रसोई। बिंजन बहु गनि सकइ न कोई॥**

कपटी पुरोहिताने वेदांत सांगितल्याप्रमाणे षड्रसपूर्ण (भक्ष्य, भोज्य, लेह्य व चोष्य असे) चार प्रकारचे भोजन बनविले. त्याने मायेने स्वयंपाक तयार केला आणि इतकी तोंडी लावणी बनविली की, त्यांची गणती करता येणार नाही.॥ १॥

**बिबिध मृगन्ह कर आमिष राँधा। तेहि महुँ बिप्र माँसु खल साँधा॥**
**भोजन कहुँ सब बिप्र बोलाए। पद पखारि सादर बैठाए॥**

अनेक प्रकारच्या पशूंचे मांस शिजविले आणि त्या दुष्टाने त्यामध्ये ब्राह्मणांचे मांस मिसळले. सर्व ब्राह्मणांना जेवायला बोलाविले आणि त्यांचे पाय धुऊन त्यांना आदराने आसनावर बसविले.॥ २॥

**परुसन जबहिं लाग महिपाला। भै अकासबानी तेहि काला॥**
**बिप्रबृंद उठि उठि गृह जाहू। है बड़ि हानि अन्न जनि खाहू॥**

राजा वाढू लागला, इतक्यात (कालकेतूने केलेली) आकाशवाणी झाली, ‘हे ब्राह्मणांनो, उठून आपापल्या घरी जा. हे अन्न खाऊ नका. हे खाल्ल्यास मोठा अनर्थ होईल.॥ ३॥

**भयउ रसोईं भूसुर माँसू। सब द्विज उठे मानि बिस्वासू॥**
**भूप बिकल मति मोहँ भुलानी। भावी बस न आव मुख बानी॥**

स्वयंपाक घरात ब्राह्मणांचे मांस शिजविले आहे.' आकाशवाणीवर विश्वास ठेवून सर्व ब्राह्मण उठले. राजा व्याकूळ झाला. त्याची बुद्धी भ्रमामुळे भुलून गेली होती. भवितव्यामुळे त्याच्या तोंडून एक शब्दही निघाला नाही.॥४॥

दो०—**बोले बिप्र सकोप तब नहिं कछु कीन्ह बिचार।**
**जाइ निसाचर होहु नृप मूढ़ सहित परिवार॥१७३॥**

तेव्हा ब्राह्मण कोणताही विचार न करता पानावरून उठून रागाने म्हणाले, 'मूर्ख राजा, तू कुटुंबासह राक्षस हो,॥१७३॥

**छत्रबंधु तैं बिप्र बोलाई। घालै लिए सहित समुदाई॥**
**ईस्वर राखा धरम हमारा। जैहसि तैं समेत परिवारा॥**

अरे नीच क्षत्रिया, तू परिवारासह ब्राह्मणांना बोलावून त्यांना तू भ्रष्ट करू इच्छित होतास. परमेश्वरानेच आमच्या धर्माचे रक्षण केले. आता तू परिवारासह नष्ट होशील.॥१॥

**संबत मध्य नास तव होऊ। जलदाता न रहिहि कुल कोऊ॥**
**नृप सुनि श्राप बिकल अति त्रासा। भै बहोरि बर गिरा अकासा॥**

एका वर्षात तुझा नाश होईल. तुझ्या कुळात पाणी देणारेही कोणी उरणार नाही.' शाप ऐकून राजा भयाने अत्यंत व्याकूळ झाला. नंतर खरी आकाशवाणी झाली.॥२॥

**बिप्रहु श्राप बिचारि न दीन्हा। नहिं अपराध भूप कछु कीन्हा॥**
**चकित बिप्र सब सुनि नभबानी। भूप गयउ जहँ भोजन खानी॥**

'हे ब्राह्मणांनो, तुम्ही विचार करून शाप दिला नाही. राजाने कोणताही अपराध केलेला नाही.' ही आकाशवाणी ऐकून सर्व ब्राह्मण चकित झाले. तेव्हा राजा स्वत: भोजन बनविले होते, त्या ठिकाणी गेला.॥३॥

**तहँ न असन नहिं बिप्र सुआरा। फिरेउ राउ मन सोच अपारा॥**
**सब प्रसंग महिसुरन्ह सुनाई। त्रसित परेउ अवनीं अकुलाई॥**

तेथे पाहिले तर स्वयंपाकही नव्हता आणि तो ब्राह्मण स्वयंपाकीही नव्हता. राजा अतिशय उद्विग्न होऊन परत आला. त्याने ब्राह्मणांना सर्व वार्ता सांगितली आणि भयभीत व व्याकूळ होऊन त्याने भूमीवर लोटांगण घातले.॥४॥

दो०—**भूपति भावी मिटइ नहिं जदपि न दूषन तोर।**
**किएँ अन्यथा होइ नहिं बिप्रश्राप अति घोर॥१७४॥**

(ब्राह्मण म्हणाले,) 'हे राजा, जरी तुझा काही दोष नसला, तरी होणारे चुकत नाही. ब्राह्मणांचा शाप हा फार भयानक असतो. तो टाळला तरी टाळता येत नाही.'॥१७४॥

**अस कहि सब महिदेव सिधाए। समाचार पुरलोगन्ह पाए॥**
**सोचहिं दूषन दैवहि देहीं। बिरचत हंस काग किय जेहीं॥**

असे म्हणून सर्व ब्राह्मण निघून गेले. नगरवासीयांनी जेव्हा हे वर्तमान ऐकले, तेव्हा ते काळजीत पडले आणि विधात्याला दोष देऊ लागले. विधात्याने हंस बनविण्याऐवजी हंसाचा कावळा करून टाकला. (अशा पुण्यात्म्या राजाला देवता बनवावयास हवे होते, तर राक्षस करून टाकले.)॥ १॥

**उपरोहितहि भवन पहुँचाई। असुर तापसहि खबरि जनाई॥**
**तेहिं खल जहँ तहँ पत्र पठाए। सजि सजि सेन भूप सब धाए॥**

(इकडे) पुरोहिताला त्याच्या घरी पोहोचविल्यावर असुर कालकेतूने कपटी तपस्व्याला सर्व वार्ता सांगितली. त्या दुष्टाने जिकडे-तिकडे पत्रे पाठविली. त्यामुळे प्रतापभानू राजाचे सर्व शत्रुराजे सेना सज्ज करून चालून आले.॥ २॥

**घेरेन्हि नगर निसान बजाई। बिबिध भाँति नित होइ लराई॥**
**जूझे सकल सुभट करि करनी। बंधु समेत परेउ नृप धरनी॥**

त्यांनी रणभेरी वाजवून नगराला वेढा घातला. सतत तऱ्हेतऱ्हेने लढाया होऊ लागल्या. प्रतापभानूचे सर्व शूर योद्धे लढत-लढत धारातीर्थी पडले. भावाबरोबर राजाही ठार झाला.॥ ३॥

**सत्यकेतु कुल कोउ नहिं बाँचा। बिप्रश्राप किमि होइ असाँचा॥**
**रिपु जिति सब नृप नगर बसाई। निज पुर गवने जय जसु पाई॥**

सत्यकेतूच्या कुळातील कोणीही वाचले नाही. ब्राह्मणांचा शाप खोटा कसा ठरणार? शत्रूला जिंकल्यावर, नगर पुन्हा वसवून सर्व राजे विजय व कीर्ती मिळवून आपापल्या देशी परतले.॥ ४॥

दो०—**भरद्वाज सुनु जाहि जब होइ बिधाता बाम।**
**धूरि मेरुसम जनक जम ताहि ब्यालसम दाम॥ १७५॥**

(याज्ञवल्क्य म्हणतात-) 'हे भरद्वाज, विधाता जेव्हा प्रतिकूल होतो, तेव्हा एखादा धूलिकण मेरुपर्वतासारखा (अवजड व चिरडून टाकणारा) होतो. प्रत्यक्ष बाप कर्दनकाळ होतो व दोरी सापाप्रमाणे (दंश करणारी) होते.॥ १७५॥

**काल पाइ मुनि सुनु सोइ राजा। भयउ निसाचर सहित समाजा॥**
**दस सिर ताहि बीस भुजदंडा। रावन नाम बीर बरिबंडा॥**

हे मुनी, ऐका. यथाकाल तोच राजा रावण नावाचा राक्षस झाला. त्याला दहा शिरे व वीस हात होते. तो प्रचंड शूर होता.॥ १॥

**भूप अनुज अरिमर्दन नामा। भयउ सो कुंभकरन बलधामा॥**
**सचिव जो रहा धरमरुचि जासू। भयउ बिमात्र बंधु लघु तासू॥**

अरिमर्दन नावाचा जो राजाचा धाकटा भाऊ होता, तो बलाढ्य कुंभकर्ण झाला. त्याचा जो धर्मरुची नावाचा मंत्री होता, तो रावणाचा सावत्र धाकटा भाऊ झाला. ॥ २ ॥

**नाम बिभीषन जेहि जग जाना। बिष्नुभगत बिग्यान निधाना॥**
**रहे जे सुत सेवक नृप केरे। भए निसाचर घोर घनेरे॥**

त्याचे नाव बिभीषण. त्याला सर्व जग जाणते. तो विष्णुभक्त व ज्ञान-विज्ञानाचे भांडार होता. राजाचे जे पुत्र व सेवक होते, ते सर्व फार भयानक राक्षस झाले. ॥ ३ ॥

**कामरूप खल जिनस अनेका। कुटिल भयंकर बिगत बिबेका॥**
**कृपा रहित हिंसक सब पापी। बरनि न जाहिं बिस्व परितापी॥**

ते सर्व राक्षस अनेक जातींचे, मनास येईल ते रूप धारण करणारे, दुष्ट, कुटिल, भयंकर, विवेकहीन, निर्दयी, पापी आणि जगाला इतकी यातना देणारे होते की, त्यांचे वर्णन करता येत नाही. ॥ ४ ॥

दो०—**उपजे जदपि पुलस्त्यकुल पावन अमल अनूप।**
**तदपि महीसुर श्राप बस भए सकल अघरूप॥ १७६॥**

जरी ते पुलस्त्य ऋषींच्या पवित्र, निर्मल आणि अनुपमेय कुळात जन्मले होते, तरी ब्राह्मणांच्या शापाने ते सर्व पापरूप झाले. ॥ १७६ ॥

**कीन्ह बिबिध तप तीनिहुँ भाई। परम उग्र नहिं बरनि सो जाई॥**
**गयउ निकट तप देखि बिधाता। मागहु बर प्रसन्न मैं ताता॥**

तिन्ही भावांनी (रावण, कुंभकर्ण, बिभीषण) अनेक प्रकारची इतकी उग्र तपस्या केली की, ती सांगता येणे शक्य नाही. त्यांचे उग्र तप पाहून ब्रह्मदेव त्यांच्याजवळ जाऊन म्हणाले-'बाबांनो, मी प्रसन्न झालो आहे. वर मागा. ॥ १ ॥

**करि बिनती पद गहि दससीसा। बोलेउ बचन सुनहु जगदीसा॥**
**हम काहू के मरहिं न मारें। बानर मनुज जाति दुइ बारें॥**

रावणाने विनयपूर्वक त्यांचे चरण धरले आणि म्हटले, 'हे जगदीश्वर, ऐका. वानर आणि मनुष्य या दोन जाती सोडून कुणीही मारले, तरी मला मरण येऊ नये.' (हा वर द्या.) ॥ २ ॥

**एवमस्तु तुम्ह बड़ तप कीन्हा। मैं ब्रह्माँ मिलि तेहि बर दीन्हा॥**
**पुनि प्रभु कुंभकरन पहिं गयऊ। तेहि बिलोकि मन बिसमय भयऊ॥**

(शिव म्हणतात-) 'मी आणि ब्रह्मदेवांनी मिळून त्याला वर दिला- ''तथास्तु''. कारण तू मोठे तप केलेले आहेस. मग ब्रह्मदेव कुंभकर्णाकडे गेले. त्याला पाहून त्यांना मोठे आश्चर्य वाटले. ॥ ३ ॥

**जौं एहिं खल नित करब अहारू। होइहि सब उजारि संसारू॥**
**सारद प्रेरि तासु मति फेरी। मागेसि नीद मास षट केरी॥**

(ब्रह्मदेवांनी विचार केला की,) हा दुष्ट नित्य आहार करू लागला तर जग ओसाड होईल. तेव्हा ब्रह्मदेवांनी सरस्वतीला प्रेरणा केली की, याची बुद्धी पालटून टाक. (त्यामुळे) त्याने एक दिवसाची जाग व सहा महिन्यांची झोप मागितली. ॥ ४ ॥

**दो०—गए बिभीषन पास पुनि कहेउ पुत्र बर मागु।**
**तेहिं मागेउ भगवंत पद कमल अमल अनुरागु॥ १७७॥**

नंतर ब्रह्मदेव बिभीषणापाशी गेले आणि म्हणाले, 'पुत्रा, वर माग.' त्याने भगवंतांच्या चरण-कमलांच्या ठायी निर्मळ प्रेम मागितले. ॥ १७७ ॥

**तिन्हहि देइ बर ब्रह्म सिधाए। हरषित ते अपने गृह आए॥**
**मय तनुजा मंदोदरि नामा। परम सुंदरी नारि ललामा॥**

त्यांना वर देऊन ब्रह्मदेव गेले आणि ते तीन भाऊ आनंदाने आपल्या घरी परतले. मय या दानवाची परम सुंदर आणि स्त्री-रत्न अशी मंदोदरी नावाची एक कन्या होती. ॥ १ ॥

**सोइ मयँ दीन्हि रावनहि आनी। होइहि जातुधानपति जानी॥**
**हरषित भयउ नारि भलि पाई। पुनि दोउ बंधु बिआहेसि जाई॥**

मय दानव तिला घेऊन आला. त्याने तिला रावणास अर्पण केले. त्याला माहीत होते की, हा (रावण) राक्षसांचा राजा होणार आहे. सुंदर व गुणी स्त्री मिळाल्यामुळे रावण प्रसन्न झाला आणि नंतर त्याने आपल्या दोन्ही भावांचा विवाह केला. ॥ २ ॥

**गिरि त्रिकूट एक सिंधु मझारी। बिधि निर्मित दुर्गम अति भारी॥**
**सोइ मय दानवँ बहुरि सँवारा। कनक रचित मनिभवन अपारा॥**

समुद्रामध्ये त्रिकूट पर्वतावर ब्रह्मदेवाने तयार केलेला एक प्रशस्त किल्ला होता. (महान मायावी व निपुण कलाकार असलेल्या) मय दानवाने तो पुन्हा सजविला. त्यामध्ये रत्ने जडविलेले सोन्याचे असंख्य महाल होते. ॥ ३ ॥

**भोगावति जसि अहिकुल बासा। अमरावति जसि सक्रनिवासा॥**
**तिन्ह तें अधिक रम्य अति बंका। जग बिख्यात नाम तेहि लंका॥**

नागकुलाला राहाण्यासाठी पाताल लोकात जशी भोगावती पुरी आहे आणि इंद्राला राहाण्यासाठी (स्वर्गलोकात) अमरावती आहे. त्यांपेक्षा अधिक सुंदर आणि अभेद्य असा तो दुर्ग होता. जगात त्याचे नाव लंका म्हणून प्रसिद्ध झाले. ॥ ४ ॥

**दो०—खाईं सिंधु गभीर अति चारिहुँ दिसि फिरि आव।**
**कनक कोट मनिखचित दृढ़ बरनि न जाइ बनाव॥ १७८ (क)॥**

त्याच्या चारी बाजूंना समुद्रातील अत्यंत खोल खंदक होते. त्या दुर्गाची रत्नांनी जडविलेली तटबंदी होती. तिच्या कलाकुसरीचे तर वर्णनही करता येणार नाही. ॥ १७८ (क) ॥

**हरि प्रेरित जेहिं कलप जोइ जातुधानपति होइ।**
**सूर प्रतापी अतुलबल दल समेत बस सोइ॥ १७८ (ख)॥**

भगवंतांच्या प्रेरणेने ज्या कल्पामध्ये जो राक्षसांचा राजा असतो, तो शूर, प्रतापी, अतुल्य बलवान होऊन आपल्या सेनेसह त्या पुरीत राहतो. ॥ १७८ (ख) ॥

**रहे तहाँ निसिचर भट भारे। ते सब सुरन्ह समर संघारे॥**
**अब तहँ रहहिं सक्र के प्रेरे। रच्छक कोटि जच्छपति केरे॥**

प्रथम तेथे मोठमोठे राक्षस योद्धे राहात होते. देवांनी त्या सर्वांना युद्धात मारून टाकले. आता इंद्राच्या प्रेरणेने कुबेराचे एक कोटी रक्षक यक्ष तेथे राहू लागले. ॥ १ ॥

**दसमुख कतहुँ खबरि असि पाई। सेन साजि गढ़ घेरेसि जाई॥**
**देखि बिकट भट बड़ि कटकाई। जच्छ जीव लै गए पराई॥**

रावणाला जेव्हा ते समजले, तेव्हा त्याने सेना सज्ज करून किल्ल्याला वेढा घातला. रावणाचे भयानक योद्धे आणि त्यांची प्रचंड सेना पाहून यक्ष प्राण घेऊन पळाले. ॥ २ ॥

**फिरि सब नगर दसानन देखा। गयउ सोच सुख भयउ बिसेषा॥**
**सुंदर सहज अगम अनुमानी। कीन्हि तहाँ रावन रजधानी॥**

मग रावणाने चहूकडे फिरून संपूर्ण नगर पाहिले. त्याची (स्थानासंबंधीची) काळजी मिटली आणि त्याला खूप आनंद झाला. ती पुरी स्वाभाविकच सुंदर आणि (परक्यांसाठी) दुर्गम आहे, असे पाहून रावणाने ती आपली राजधानी केली. ॥ ३ ॥

**जेहि जस जोग बाँटि गृह दीन्हे। सुखी सकल रजनीचर कीन्हे॥**
**एक बार कुबेर पर धावा। पुष्पक जान जीति लै आवा॥**

योग्यतेप्रमाणे येथील घरे रावणाने राक्षसांना वाटून दिली. ते खूष झाले. एकदा त्याने कुबेरावर चढाई करून त्याच्याकडून पुष्पक विमान जिंकून आणले. ॥ ४ ॥

दो०—**कौतुकहीं कैलास पुनि लीन्हेसि जाइ उठाइ।**
**मनहुँ तौलि निज बाहुबल चला बहुत सुख पाइ॥ १७९॥**

नंतर जाऊन त्याने एकदा मजेने कैलास पर्वत उचलला आणि आपल्या भुजांचे बल अजमावून तो आनंदाने तेथून परतला. ॥ १७९ ॥

**सुख संपति सुत सेन सहाई। जय प्रताप बल बुद्धि बड़ाई॥**
**नित नूतन सब बाढ़त जाई। जिमि प्रतिलाभ लोभ अधिकाई॥**

सुख, संपत्ती, पुत्र, सेना, सहायक, जय, प्रताप, बल, बुद्धी आणि महिमा हे सर्व त्याचे प्रत्येक लाभ मिळाल्यावर, लोभ वाढतो तसे नित्य वृद्धिंगत होत होते. ॥ १ ॥

**अतिबल कुंभकरन अस भ्राता। जेहि कहुँ नहिं प्रतिभट जग जाता॥**
**करइ पान सोवइ षट मासा। जागत होइ तिहूँ पुर त्रासा॥**

प्रचंड शक्ती असलेला कुंभकर्ण हा त्याचा भाऊ होता. त्याच्या जोडीचा योद्धा जगात कुठेही नव्हता. तो मदिरा पिऊन सहा सहा महिने झोपत असे. तो जागा होताच तिन्ही लोकांमध्ये खळबळ माजायची. ॥ २ ॥

**जौं दिन प्रति अहार कर सोई। बिस्व बेगि सब चौपट होई॥**
**समर धीर नहिं जाइ बखाना। तेहि सम अमित बीर बलवाना॥**

जर तो दररोज भोजन करता, तर संपूर्ण विश्व लवकरच उजाड झाले असते. तो रणधीर असा होता की, ज्याचे वर्णन करणे शक्य नाही. लंकेमध्ये त्याच्यासारखे असंख्य बलवान वीर होते. ॥ ३ ॥

**बारिदनाद जेठ सुत तासू। भट महुँ प्रथम लीक जग जासू॥**
**जेहि न होइ रन सनमुख कोई। सुरपुर नितहिं परावन होई॥**

मेघनाद रावणाचा वडील मुलगा होता, ज्याचा जगाच्या योद्ध्यांमध्ये पहिला क्रमांक होता. युद्धात त्याची बरोबरी करणारा कोणी नव्हता. स्वर्गातसुद्धा (त्याच्या भीतीमुळे) नेहमी तारांबळ उडायची. ॥ ४ ॥

दो०—**कुमुख अकंपन कुलिसरद धूमकेतु अतिकाय।**
**एक एक जग जीति सक ऐसे सुभट निकाय॥ १८०॥**

(याशिवाय) दुर्मुख, अकंपन, वज्रदंत, धूमकेतू, अतिकाय इत्यादी असे अनेक योद्धे होते. ते एक-एकटेच सर्व जगाला जिंकणारे होते. ॥ १८० ॥

**कामरूप जानहिं सब माया। सपनेहुँ जिन्ह कें धरम न दाया॥**
**दसमुख बैठ सभाँ एक बारा। देखि अमित आपन परिवारा॥**

सर्व राक्षस हवे तसे रूप घेऊ शकत होते आणि आसुरी (माया) जाणत होते. दया, धर्म हे कधी त्यांच्या स्वप्नातच येत नसत. एकदा सभेत बसलेल्या रावणाने आपला असंख्य परिवार पाहिला. ॥ १ ॥

**सुत समूह जन परिजन नाती। गनै को पार निसाचर जाती॥**
**सेन बिलोकि सहज अभिमानी। बोला बचन क्रोध मद सानी॥**

पुत्र-पौत्र, कुटुंबीय आणि सेवक अगणित होते. त्या संपूर्ण राक्षस जातीला मोजणार कोण? आपली सेना पाहून स्वभावतःच घमेंडखोर रावण रागाने व गर्वाने म्हणाला, ॥ २ ॥

**सुनहु सकल रजनीचर जूथा। हमरे बैरी बिबुध बरूथा॥**
**ते सनमुख नहिं करहिं लराई। देखि सबल रिपु जाहिं पराई॥**

'हे सर्व राक्षसगण हो! ऐका. देव हे आपले शत्रू आहेत. ते समोर येऊन युद्ध करीत नाहीत. बलाढ्य शत्रू पाहिला की, पळून जातात.॥ ३॥

**तेन्ह कर मरन एक बिधि होई। कहउँ बुझाइ सुनहु अब सोई॥**
**द्विजभोजन मख होम सराधा। सब कै जाइ करहु तुम्ह बाधा॥**

त्यांना एकाच उपायाने मारता येते. तो मी तुम्हांला सांगतो. ऐका. (त्यांना बळ देणारे) ब्राह्मणभोजन, यज्ञ, हवन आणि श्राद्ध, हे आहेत. या सर्वांमध्ये तुम्ही जाऊन विघ्न आणा.॥ ४॥

दो०—**छुधा छीन बलहीन सुर सहजेहिं मिलिहहिं आइ।**
**तब मारिहउँ कि छाड़िहउँ भली भाँति अपनाइ॥ १८१॥**

भुकेने दुर्बळ आणि अशक्त झाल्यावर देव सहजपणे शरण येतील. त्यांना मी ठार मारीन किंवा पूर्णपणे आपल्या अधीन करून सोडून देईन.'॥ १८१॥

**मेघनाद कहुँ पुनि हँकरावा। दीन्हीं सिख बलु बयरु बढ़ावा॥**
**जे सुर समर धीर बलवाना। जिन्ह कें लरिबे कर अभिमाना॥**

मग त्याने मेघनादाला बोलावले. सांगून समजावून त्याचे सामर्थ्य वाढेल व देवांविषयी शत्रुभाव वाढेल, असे प्रोत्साहन दिले. (मग तो म्हणाला,) 'हे पुत्रा, जे देव युद्धवीर आहेत, बलवान आहेत आणि ज्यांना लढण्याची खुमखुमी आहे,॥ १॥

**तिन्हहि जीति रन आनेसु बाँधी। उठि सुत पितु अनुसासन काँधी॥**
**एहि बिधि सबही अग्या दीन्ही। आपुनु चलेउ गदा कर लीन्ही॥**

त्यांना युद्धात जिंकून पकडून आण.' मुलाने उठून पित्याची आज्ञा शिरोधार्य मानली. त्याने सर्वांना आज्ञा दिली आणि तो स्वतः हातात गदा घेऊन निघाला.॥ २॥

**चलत दसानन डोलति अवनी। गर्जत गर्भ स्त्रवहिं सुर रवनी॥**
**रावन आवत सुनेउ सकोहा। देवन्ह तके मेरु गिरि खोहा॥**

रावण चालू लागला, तेव्हा त्याच्या चालण्याने पृथ्वी डळमळू लागली आणि गर्जनेमुळे देवांगनांचे गर्भपात होऊ लागले. रावण रागारागाने येत असल्याचे पाहून देवगण सुमेरू पर्वतातील गुहांमधून आसरा शोधू लागले.॥ ३॥

**दिगपालन्ह के लोक सुहाए। सूने सकल दसानन पाए॥**
**पुनि पुनि सिंघनाद करि भारी। देइ देवतन्ह गारि पचारी॥**

दिक्पालांचे जे लोक होते, ते रावणाला ओसाड पडलेले दिसले. तो वारंवार प्रचंड सिंहगर्जना करून देवांना ललकारून शिव्या देत होता. ॥ ४ ॥

**रन मद मत्त फिरइ जग धावा। प्रतिभट खोजत कतहुँ न पावा॥**
**रबि ससि पवन बरुन धनधारी। अगिनि काल जम सब अधिकारी॥**

मदाने उत्तम झालेला रावण रणामध्ये आपल्या जोडीचा योद्धा शोधत जगभर फिरला, परंतु त्याला आपल्या तोडीचा योद्धा कुठेही मिळाला नाही. सूर्य, चंद्र, वायू, वरुण, कुबेर, अग्नी, काल, यम इत्यादी सर्व अधिकारी, ॥ ५ ॥

**किंनर सिद्ध मनुज सुर नागा। हठि सबही के पंथहिं लागा॥**
**ब्रह्मसृष्टि जहँ लगि तनुधारी। दसमुख बसबर्ती नर नारी॥**

किन्नर, सिद्ध, मनुष्य, देव आणि नाग या सर्वांच्या मागे तो हट्टाने लागला. (कुणालाही त्याने शांतपणे बसू दिले नाही.) ब्रह्मदेवाच्या सृष्टीतील जितके शरीरधारी स्त्री-पुरुष होते, ते सर्व रावणाच्या अधीन झाले. ॥ ६ ॥

**आयसु करहिं सकल भयभीता। नवहिं आइ नित चरन बिनीता॥**

भयामुळे सर्वजण त्याची आज्ञा पाळत होते आणि नित्य येऊन त्याच्या पायांवर मस्तक ठेवीत होते. ॥ ७ ॥

दो०—**भुजबल बिस्व बस्य करि राखेसि कोउ न सुतंत्र।**
**मंडलीक मनि रावन राज करइ निज मंत्र॥ १८२ (क)॥**

रावणाने बाहुबलाने संपूर्ण विश्वाला आपल्या ताब्यात घेतले. कुणालाही स्वतंत्र ठेवले नाही. अशा प्रकारे मांडलिक राजांचा अधिपती सार्वभौम सम्राट असलेला रावण मन मानेल तसे राज्य करू लागला. ॥ १८२ (क) ॥

**देव जच्छ गंधर्ब नर किंनर नाग कुमारि।**
**जीति बरीं निज बाहुबल बहु सुंदर बर नारि॥ १८२ (ख)॥**

देव, यक्ष, गंधर्व, मनुष्य, किन्नर आणि नाग यांच्या कन्या व इतरही सुंदर तसेच उत्तम स्त्रिया त्याने बाहुबलाने जिंकून आणून त्यांच्याशी विवाह केला. ॥ १८२ (ख) ॥

**इंद्रजीत सन जो कछु कहेऊ। सो सब जनु पहिलेहिं करि रहेऊ॥**
**प्रथमहिं जिन्ह कहुँ आयसु दीन्हा। तिन्ह कर चरित सुनहु जो कीन्हा॥**

मेघनादाला त्याने जे सांगितले होते, ते त्याने (मेघनादाने) पूर्वीच करून टाकलेले असे. (अर्थात रावणाने सांगताच मेघनाद आज्ञा पाळण्यास जरासुद्धा वेळ लावत नसे.) ज्यासाठी त्याला पूर्वीच आज्ञा दिल्या होत्या, त्या पाळताना त्याने गाजविलेले कर्तृत्व ऐका. ॥ १ ॥

**देखत भीमरूप सब पापी। निसिचर निकर देव परितापी॥**
**करहिं उपद्रव असुर निकाया। नाना रूप धरहिं करि माया॥**

सर्व राक्षसांचे समुदाय दिसायला भयंकर, पापी आणि देवांना दु:ख देणारे होते. ते समुदाय फार उपद्रव देत व मायेने अनेक प्रकारची रूपे धरीत असत.॥ २॥

**जेहि बिधि होइ धर्म निर्मूला। सो सब करहिं बेद प्रतिकूला॥**
**जेहिं जेहिं देस धेनु द्विज पावहिं। नगर गाउँ पुर आगि लगावहिं॥**

ज्यामुळे धर्म समूळ नष्ट होईल, अशी वेदविरुद्ध सर्व कामे ते करीत. ज्या ज्या ठिकाणी गाई व ब्राह्मण दिसत, त्या नगरांना, गावांना व वस्त्यांना ते आगी लावत.॥ ३॥

**सुभ आचरन कतहुँ नहिं होई। देव बिप्र गुरु मान न कोई॥**
**नहिं हरिभगति जग्य तप ग्याना। सपनेहुँ सुनिअ न बेद पुराना॥**

त्यांच्या भयाने कुठेही शुभ आचरण (ब्राह्मण भोजन, यज्ञ, श्राद्ध इत्यादी) होत नसे. देव, ब्राह्मण, गुरू यांना कोणीही जुमानत नसे. हरिभक्ती नव्हती, यज्ञ नव्हते, तप व ज्ञान नव्हते. वेद आणि पुराणांचे नाव स्वप्नातही ऐकू येत नसे.॥ ४॥

छं०—**जप जोग बिरागा तप मख भागा श्रवन सुनइ दससीसा।**
**आपुनु उठि धावइ रहै न पावइ धरि सब घालइ खीसा॥**
**अस भ्रष्ट अचारा भा संसारा धर्म सुनिअ नहिं काना।**
**तेहि बहुबिधि त्रासइ देस निकासइ जो कह बेद पुराना॥**

जप, योग, वैराग्य, तप आणि यज्ञात देवांना भाग मिळाल्याचे कळताच, तो तत्क्षणी स्वत: धावून जात असे. तेथे मग काहीही उरत नसे. तो सर्वांना पकडून विध्वंस करीत असे. जगात असे भ्रष्ट आचरण पसरले की, धर्माचे नावही ऐकू येत नसे. जो कोणी वेद व पुराण सांगत असे, त्याला रावण त्रास देत असे व देशातून हाकलून देत असे.

सो०—**बरनि न जाइ अनीति घोर निसाचर जो करहिं।**
**हिंसा पर अति प्रीति तिन्ह के पापहि कवनि मिति॥ १८३॥**

राक्षस जे घोर अत्याचार करीत, त्यांचे वर्णनही करता येणार नाही. हिंसेबद्दलच ज्यांना प्रेम वाटे, त्यांच्या पापांबद्दल किती सांगावे?॥ १८३॥

## मासपारायण, सहावा विश्राम

**बाढ़े खल बहु चोर जुआरा। जे लंपट परधन परदारा॥**
**मानहिं मातु पिता नहिं देवा। साधुन्ह सन करवावहिं सेवा॥**

परक्याचे धन व परस्त्रीबद्दल लोभ धरणारे, दुष्ट, चोर आणि जुगारी यांची संख्या खूप वाढली. लोक, माता-पिता आणि देवांना जुमानत नव्हते आणि साधूंकडून सेवा करून घेत होते.॥ १ ॥

**जिन्ह के यह आचरन भवानी। ते जानेहु निसिचर सब प्रानी॥**
**अतिसय देखि धर्म कै ग्लानी। परम सभीत धरा अकुलानी॥**

(श्रीशिव म्हणतात-) 'हे भवानी, ज्यांचे असे आचरण असते, त्या प्राण्यांना राक्षसच समज. अशा प्रकारे धर्माविषयी लोकांची अरुची व अनास्था पाहून पृथ्वी अत्यंत भयभीत व व्याकूळ झाली.॥ २ ॥

**गिरि सरि सिंधु भार नहिं मोही। जस मोहि गरुअ एक परद्रोही॥**
**सकल धर्म देखइ बिपरीता। कहि न सकइ रावन भय भीता॥**

(ती विचार करू लागली की,) पर्वत, नद्या व समुद्र यांचे ओझे मला कधी इतके वाटले नाही, जितके एका परद्रोह्याचे वाटते. पृथ्वीला सर्व धर्म विपरीत झाल्याचे दिसत होते, परंतु रावणाच्या भीतीमुळे ती बोलू शकत नव्हती.॥ ३ ॥

**धेनु रूप धरि हृदयँ बिचारी। गई तहाँ जहँ सुर मुनि झारी॥**
**निज संताप सुनाएसि रोई। काहू तें कछु काज न होई॥**

(शेवटी) मनात विचार करून व गाईचे रूप घेऊन जेथे देव व मुनी (लपले) होते, तेथे ती गेली. पृथ्वीने रडत-रडत आपले दुःख उघड केले, परंतु कुणाकडूनही काही काम झाले नाही.॥ ४ ॥

**छं०—सुर मुनि गंधर्बा मिलि करि सर्बा गे बिरंचि के लोका।**
**सँग गोतनुधारी भूमि बिचारी परम बिकल भय सोका॥**
**ब्रह्माँ सब जाना मन अनुमाना मोर कछू न बसाई।**
**जा करि तैं दासी सो अबिनासी हमरेउ तोर सहाई॥**

तेव्हा देव, मुनी आणि गंधर्व हे सर्व मिळून ब्रह्मदेवाच्या सत्यलोकी गेले. भय आणि शोकामुळे ती अत्यंत व्याकूळ झालेली बिचारी पृथ्वीसुद्धा गायीच्या रूपात त्यांच्याबरोबर होती. ब्रह्मदेवांनी सारे ओळखले. त्यांनी विचार केला की, यात माझे काही चालणार नाही. (तेव्हा त्यांनी पृथ्वीला म्हटले,) 'ज्याची तू दासी आहेस, तोच अविनाशी तुम्हां-आम्हांला मदत करणारा आहे.'

सो०—**धरनि धरहि मन धीर कह बिरंचि हरिपद सुमिरु।**
**जानत जन की पीर प्रभु भंजिहि दारुन बिपति॥ १८४॥**

ब्रह्मदेव म्हणाले, 'हे धरणी, मनात धीर धरून श्रीहरींच्या चरणांचे स्मरण कर. प्रभू हे आपल्या सेवकांची यातना जाणतात. ते तुझ्या कठीण संकटाचा नाश करतील.'॥ १८४॥

**बैठे सुर सब करहिं बिचारा। कहँ पाइअ प्रभु करिअ पुकारा॥**
**पुर बैकुंठ जान कह कोई। कोउ कह पयनिधि बस प्रभु सोई॥**

सर्व देव बसून विचार करू लागले की, प्रभूंना शोधायचे कोठे? त्यांच्याजवळ तक्रार कुठे करायची? कोणी म्हणाले की, वैकुंठाला जाऊया, कोणी म्हणत होता की, प्रभू क्षीरसमुद्रात निवास करतात, तेथे जाऊया.॥ १॥

**जाके हृदयँ भगति जसि प्रीती। प्रभु तहँ प्रगट सदा तेहिं रीती॥**
**तेहिं समाज गिरिजा मैं रहेऊँ। अवसर पाइ बचन एक कहेऊँ॥**

ज्याच्या मनात जशी भक्ती आणि प्रीती असते, तेथे प्रभू त्याच रीतीने प्रगट होतात. हे पार्वती, त्या मंडळींमध्ये मीही होतो. संधी पाहून मी म्हणालो,॥ २॥

**हरि ब्यापक सर्बत्र समाना। प्रेम तें प्रगट होहिं मैं जाना॥**
**देस काल दिसि बिदिसिहु माहीं। कहहु सो कहाँ जहाँ प्रभु नाहीं॥**

भगवान सर्व ठिकाणी समानपणे भरलेले असतात. प्रेमामुळे ते प्रकट होतात. देश, काल, दिशा-विदिशा यांमध्ये जिथे भगवान नाही, अशी जागा कुठे आहे? सांगा बरे!॥ ३॥

**अग जगमय सब रहित बिरागी। प्रेम तें प्रभु प्रगटइ जिमि आगी॥**
**मोर बचन सब के मनमाना। साधु साधु करि ब्रह्म बखाना॥**

ते चराचरात व्याप्त असूनही सर्वांपासून अलिप्त व विरक्त आहेत. (त्यांना कशातही आसक्ती नाही.) ते प्रेमामुळे प्रकट होतात, जसा अग्नी प्रकट होतो. (अग्नी हा अव्यक्त रूपाने व्याप्त आहे. परंतु जिथे त्याच्यासाठी अरणि मंथन इत्यादी साधन केले जाते, तेथे तो प्रकट होतो. त्याप्रमाणेच सर्वत्र व्याप्त असलेले भगवानही प्रेमामुळे प्रकट होतात.) माझे बोलणे सर्वांना आवडले. ब्रह्मदेवांनी 'छान! छान!' म्हणून माझी प्रशंसा केली.॥ ४॥

दो०—**सुनि बिरंचि मन हरष तन पुलकि नयन बह नीर।**
**अस्तुति करत जोरि कर सावधान मतिधीर॥ १८५॥**

माझे म्हणणे ऐकून ब्रह्मदेवांना फार आनंद झाला. त्यांचे शरीर पुलकित झाले आणि नेत्रांतून प्रेमाश्रू वाहू लागले. तेव्हा ते धीरबुद्धीचे ब्रह्मदेव एकाग्र होऊन हात जोडून स्तुती करू लागले.॥ १८५॥

**छं०—जय जय सुरनायक जन सुखदायक प्रनतपाल भगवंता।**
**गो द्विज हितकारी जय असुरारी सिंधुसुता प्रिय कंता॥**
**पालन सुर धरनी अद्भुत करनी मरम न जानइ कोई।**
**जो सहज कृपाला दीनदयाला करउ अनुग्रह सोई॥ १॥**

'हे देवांचे स्वामी, सेवकांना सुख देणारे, शरणागतांचे रक्षण करणारे भगवन, तुमचा विजय असो, विजय असो. हे गो-ब्राह्मणांचे हित करणारे, असुरांचा विनाश करणारे, लक्ष्मीचे प्रिय स्वामी, तुमचा विजय असो. हे देव आणि पृथ्वीचे पालन करणारे, तुमची लीला अद्‌भुत आहे. तिचे रहस्य कोणीही जाणू शकत नाही. अशा प्रकारे जे स्वभावतःच कृपाळू व दीनदयाळू आहेत, तेच आम्हांवर कृपा करोत.॥

**जय जय अबिनासी सब घट बासी ब्यापक परमानंदा।**
**अबिगत गोतीतं चरित पुनीतं मायारहित मुकुंदा॥**
**जेहि लागि बिरागी अति अनुरागी बिगत मोह मुनिबृंदा।**
**निसि बासर ध्यावहिं गुनगन गावहिं जयति सच्चिदानंदा॥ २॥**

हे अविनाशी, सर्वांच्या हृदयात वसणारे, सर्वव्यापक, परम आनंदस्वरूप, अज्ञेय, इंद्रियातीत, पवित्रचरित्र, मायेने रहित मुकुंद! तुमचा विजय असो, विजय असो. (या लोकीच्या व परलोकीच्या सर्व भोगांपासून) विरक्त आणि मोहातून सर्वथा मुक्त (ज्ञानी) मुनिवृंदसुद्धा अत्यंत प्रेमाने ज्यांचे रात्रंदिवस ध्यान करतात आणि ज्यांच्या गुणांच्या समुच्चयाचे गान करतात, त्या सच्चिदानंदांचा विजय असो.॥ २॥

**जेहिं सृष्टि उपाई त्रिबिध बनाई संग सहाय न दूजा।**
**सो करउ अघारी चिंत हमारी जानिअ भगति न पूजा॥**
**जो भव भय भंजन मुनि मन रंजन गंजन बिपति बरूथा।**
**मन बच क्रम बानी छाड़ि सयानी सरन सकल सुरजूथा॥ ३॥**

ज्यांनी दुसऱ्या कुणा मित्राविना किंवा सहाय्यकाविना एकट्यानेच (किंवा स्वतःच आपणाला त्रिगुणरूप-ब्रह्मा, विष्णू, महेश बनवून किंवा कोणत्याही उपादान कारणाविना, अर्थात स्वतःच सृष्टीचे एकमात्र निमित्त व उपादान कारण बनून) तीन प्रकारची सृष्टी उत्पन्न केली, त्या पापनाशक भगवान यांनी आमची आठवण ठेवावी. आम्ही भक्ती जाणत नाही, पूजाही जाणत नाही. जे जन्म-मृत्यूच्या भयाचे नाश करणारे, मुनींच्या मनाला आनंद देणारे आणि विपत्तींच्या राशींचा नाश करणारे आहेत, त्या भगवंतांना आम्ही सर्व देवांचे समुदाय कायावाचामनाने, मखलाशी करण्याचा स्वभाव सोडून (प्रांजळपणे) शरण आलो आहोत.॥ ३॥

**सारद श्रुति सेषा रिषय असेषा जा कहुँ कोउ नहिं जाना।**
**जेहि दीन पिआरे बेद पुकारे द्रवउ सो श्रीभगवाना॥**
**भव बारिधि मंदर सब बिधि सुंदर गुनमंदिर सुखपुंजा।**
**मुनि सिद्ध सकल सुर परम भयातुर नमत नाथ पद कंजा॥ ४॥**

सरस्वती, वेद, शेष आणि सर्व ऋषी, यांपैकी कोणीही ज्यांना जाणत नाही, ज्यांना दीनजन प्रिय आहेत, असे वेद उच्चरवाने सांगतात, तेच भगवान आम्हांवर दया करोत. जे संसाररूपी समुद्राच्या मंथनासाठी मंदराचलरूप आहेत, सर्व प्रकारे सुंदर, गुणांचे धाम आणि सुखांचे राशी आहेत, असे हे नाथ! तुमच्या चरणकमली आम्ही मुनी, सिद्ध आणि सर्व देव भयाने अत्यंत व्याकूळ होऊन नमस्कार करतो.'॥ ४॥

दो०—**जानि सभय सुर भूमि सुनि बचन समेत सनेह।**
**गगनगिरा गंभीर भइ हरनि सोक संदेह॥ १८६॥**

देव आणि पृथ्वी भयभीत झाल्याचे पाहून आणि त्यांचे स्नेहयुक्त बोलणे ऐकून शोक व संदेह दूर करणारी गंभीर आकाशवाणी झाली.॥ १८६॥

**जनि डरपहु मुनि सिद्ध सुरेसा। तुम्हहि लागि धरिहउँ नर बेसा॥**
**अंसन्ह सहित मनुज अवतारा। लेहउँ दिनकर बंस उदारा॥**

'हे मुनींनो, सिद्धांनो व देवाधिदेवांनो! घाबरू नका. तुमच्यासाठी मी मनुष्यरूप धारण करीन आणि पवित्र सूर्यवंशामध्ये आपल्या अंशांसह अवतार घेईन.॥ १॥

**कस्यप अदिति महातप कीन्हा। तिन्ह कहुँ मैं पूरब बर दीन्हा॥**
**ते दसरथ कौसल्या रूपा। कोसलपुरीं प्रगट नरभूपा॥**

कश्यप आणि अदिती यांनी मोठे तप केले होते. मी पूर्वीच त्यांना वर दिलेला आहे. तेच दशरथ आणि कौसल्या यांच्या रूपाने मनुष्यांचे राजा बनून अयोध्यापुरीत प्रकट झालेले आहेत.॥ २॥

**तिन्ह कें गृह अवतरिहउँ जाई। रघुकुल तिलक सो चारिउ भाई॥**
**नारद बचन सत्य सब करिहउँ। परम सक्ति समेत अवतरिहउँ॥**

त्यांच्या घरी मी रघुकुलात श्रेष्ठ चार भावांच्या रूपाने अवतार घेईन. नारदांचे (शाप) वचन मी पूर्णपणे सत्य करीन आणि आपल्या पराशक्तीसह अवतार घेईन.॥ ३॥

**हरिहउँ सकल भूमि गरुआई। निर्भय होहु देव समुदाई॥**
**गगन ब्रह्मबानी सुनि काना। तुरत फिरे सुर हृदय जुड़ाना॥**

मी पृथ्वीचा सर्व भार हरण करीन. हे देववृंदांनो! तुम्ही निर्भय व्हा.' आकाशात झालेली ही भगवंतांची वाणी ऐकून देव लगेच परत गेले. त्यांचे मन संतुष्ट झाले.॥ ४॥

**तब ब्रह्माँ धरनिहि समुझावा। अभय भई भरोस जियँ आवा॥**

मग ब्रह्मदेवांनी पृथ्वीला समजावून सांगितले. तीसुद्धा निर्भय झाली आणि तिला धीर आला. ॥ ५ ॥

दो०—**निज लोकहि बिरंचि गे देवन्ह इहइ सिखाइ।**
**बानर तनु धरि धरि महि हरि पद सेवहु जाइ॥ १८७॥**

सर्व देवांना सांगितले की, 'वानरांचे रूप घेऊन तुम्ही पृथ्वीवर जाऊन भगवंतांच्या चरणाची सेवा करा.' असे म्हणून ब्रह्मदेव आपल्या लोकी परत गेले. ॥ १८७ ॥

**गए देव सब निज निज धामा। भूमि सहित मन कहुँ बिश्रामा॥**
**जो कछु आयसु ब्रह्माँ दीन्हा। हरषे देव बिलंब न कीन्हा॥**

सर्व देव आपापल्या लोकी गेले. पृथ्वीसह सर्वांच्या मनाला शांती लाभली. ब्रह्मदेवांनी जी आज्ञा दिली, त्यामुळे देव फार प्रसन्न झाले आणि त्यांनी (तसे करण्यास) वेळ घालविला नाही. ॥ १ ॥

**बनचर देह धरी छिति माहीं। अतुलित बल प्रताप तिन्ह पाहीं॥**
**गिरि तरु नख आयुध सब बीरा। हरि मारग चितवहिं मतिधीरा॥**

देवांनी पृथ्वीवर वानरदेह धारण केले. त्यांच्यामध्ये अपार बळ आणि पराक्रम होता. सर्वजण शूर होते. पर्वत, वृक्ष व नखे हीच त्यांची शस्त्रे होती. ते सर्व धीरबुद्धीचे (वानररूप देव) भगवंतांच्या येण्याची वाट पाहू लागले. ॥ २ ॥

**गिरि कानन जहँ तहँ भरि पूरी। रहे निज निज अनीक रचि रूरी॥**
**यह सब रुचिर चरित मैं भाषा। अब सो सुनहु जो बीचहिं राखा॥**

ते वानर पर्वतांमध्ये व जंगलामध्ये जिकडे तिकडे आपल्या चांगल्या सेना बनवून सर्वत्र पसरले. हे सर्व चरित्र मी सांगितले. आता मध्येच सोडून दिलेले चरित्र ऐका. ॥ ३ ॥

**अवधपुरीं रघुकुलमनि राऊ। बेद बिदित तेहि दसरथ नाऊँ॥**
**धरम धुरंधर गुननिधि ग्यानी। हृदयँ भगति मति सारँगपानी॥**

अयोध्यापुरीत रघुकुलशिरोमणि दशरथ नावाचा राजा झाला. त्यांचे नाव वेदांमध्येही प्रसिद्ध आहे. ते धर्मधुरंधर, गुणांचे भांडार आणि ज्ञानी होते. त्यांच्या मनात शार्ङ्गधनुष्य धारण करणाऱ्या भगवंतांची भक्ती होती आणि त्यांची बुद्धीही त्यांच्यामध्येच रमली होती. ॥ ४ ॥

दो०—**कौसल्यादि नारि प्रिय सब आचरन पुनीत।**
**पति अनुकूल प्रेम दृढ़ हरि पद कमल बिनीत॥ १८८॥**

त्यांच्या कौसल्या इत्यादी प्रिय राण्या पवित्र आचरणाच्या होत्या. त्या फार नम्र आणि पतीला अनुकूल वागणाऱ्या होत्या. श्रीहरींच्या चरणकमलांमध्ये त्यांचे निःसीम प्रेम होते. ॥ १८८ ॥

**एक बार भूपति मन माहीं । भै गलानि मोरें सुत नाहीं ॥**
**गुर गृह गयउ तुरत महिपाला । चरन लागि करि बिनय बिसाला ॥**

एकदा राजाच्या मनात अतिशय खेद झाला की, मला पुत्र नाही. राजा त्वरित गुरूंच्याकडे गेला आणि त्यांच्या चरणांना प्रणाम करून त्याने विनवणी केली. ॥ १ ॥

**निज दुख सुख सब गुरहि सुनायउ । कहि बसिष्ठ बहु बिधि समुझायउ ॥**
**धरहु धीर होइहिं सुत चारी । त्रिभुवन बिदित भगत भय हारी ॥**

राजाने आपले सारे दुःख गुरूंना सांगितले. गुरू वसिष्ठ यांनी त्यांना अनेक प्रकाराने समजावून सांगितले. (आणि म्हटले,) 'धीर धरा. तुम्हांला चार पुत्र होतील, ते तिन्ही लोकांमध्ये प्रसिद्ध आणि भक्तांचे भय हरण करणारे होतील?' ॥ २ ॥

**सृंगी रिषिहि बसिष्ठ बोलावा । पुत्रकाम सुभ जग्य करावा ॥**
**भगति सहित मुनि आहुति दीन्हें । प्रगटे अगिनि चरू कर लीन्हें ॥**

वसिष्ठांनी शृंगी ऋषींना बोलावून घेतले आणि त्यांच्याकडून पुत्रकामेष्टी यज्ञ करवून घेतला. मुनींनी भक्तिपूर्वक आहुती दिल्यावर अग्निदेव हातामध्ये पायस घेऊन प्रगट झाले. ॥ ३ ॥

**जो बसिष्ठ कछु हृदयँ बिचारा । सकल काजु भा सिद्ध तुम्हारा ॥**
**यह हबि बाँटि देहु नृप जाई । जथा जोग जेहि भाग बनाई ॥**

अग्निदेव (दशरथ राजांना) म्हणाले, 'वसिष्ठांनी मनात जे ठरवले होते, त्यानुसार तुमचे सर्व काम पूर्ण झाले. हे राजा, आता तू जाऊन हा पायस योग्य वाटेल, त्याप्रमाणे भाग करून वाटून दे.' ॥ ४ ॥

दो०—**तब अदृस्य भए पावक सकल सभहि समुझाइ ।**
**परमानंद मगन नृप हरष न हृदयँ समाइ ॥ १८९ ॥**

नंतर अग्निदेव संपूर्ण सभेला समजावून सांगून अंतर्धान पावले. राजा परमानंदात मग्न झाला. त्याच्या मनात आनंद मावत नव्हता. ॥ १८९ ॥

**तबहिं रायँ प्रिय नारि बोलाईं । कौसल्यादि तहाँ चलि आईं ॥**
**अर्ध भाग कौसल्यहि दीन्हा । उभय भाग आधे कर कीन्हा ॥**

मग राजाने आपल्या प्रिय पत्नींना बोलावून घेतले. कौसल्या इत्यादी सर्व राण्या तेथे आल्या. राजाने पायसाचा अर्धा भाग कौसल्येला दिला आणि उरलेल्या अर्ध्या भागाचे दोन भाग केले. ॥ १ ॥

**कैकेई कहँ नृप सो दयऊ। रह्यो सो उभय भाग पुनि भयऊ॥**
**कौसल्या कैकेई हाथ धरि। दीन्ह सुमित्रहि मन प्रसन्न करि॥**

त्यांपैकी एक भाग राजाने कैकेयीला दिला. उरलेल्या भागाचे दोन भाग केले आणि राजाने ते कौसल्या आणि कैकेयी यांच्या हातावर ठेवून (त्यांच्या संमतीने), त्यांचे मन प्रसन्न ठेवून सुमित्रेला दिले.॥ २॥

**एहि बिधि गर्भसहित सब नारी। भईं हृदयँ हरषित सुख भारी॥**
**जा दिन तें हरि गर्भहिं आए। सकल लोक सुख संपति छाए॥**

अशाप्रकारे सर्व राण्या गर्भवती झाल्या. त्यांना मनातून खूप आनंद झाला. त्यांना फार सुख वाटले. ज्या दिवशी श्रीहरी (आपल्या लीलेने) गर्भामध्ये आले, त्या दिवसापासून सर्व लोकांमध्ये सुख व संपत्ती पसरली.॥ ३॥

**मंदिर महँ सब राजहिं रानीं। सोभा सील तेज की खानीं॥**
**सुख जुत कछुक काल चलि गयऊ। जेहिं प्रभु प्रगट सो अवसर भयऊ॥**

शोभा, शील व तेज यांची खाण (बनलेल्या) सर्व राण्या राजमहालामध्ये शोभून दिसू लागल्या. अशाप्रकारे काही काळ सुखात गेला. प्रभूंची प्रकट होण्याची वेळ आली.॥ ४॥

दो०—**जोग लगन ग्रह बार तिथि सकल भए अनुकूल।**
**चर अरु अचर हर्षजुत राम जनम सुखमूल॥ १९०॥**

योग, लग्न, ग्रह, वार आणि तिथी सर्वच अनुकूल बनले. सर्व चराचर आनंदाने भरून गेले. कारण श्रीरामांचा जन्म सुखाचे मूळ आहे.॥ १९०॥

**नौमी तिथि मधु मास पुनीता। सुकल पच्छ अभिजित हरिप्रीता॥**
**मध्य दिवस अति सीत न घामा। पावन काल लोक बिश्रामा॥**

चैत्राचा पवित्र महिना होता, नवमी तिथी होती. शुक्लपक्ष आणि भगवंताचा प्रिय अभिजित मुहूर्त होता. दुपारची वेळ होती. फार थंडी नव्हती आणि फार ऊनही नव्हते. ती पवित्र वेळ सर्व लोकांना शांतता देणारी होती.॥ १॥

**सीतल मंद सुरभि बह बाऊ। हरषित सुर संतन मन चाऊ॥**
**बन कुसुमित गिरिगन मनिआरा। स्त्रवहिं सकल सरिताऽमृतधारा॥**

शीतल, मंद आणि सुगंधित वारा वाहात होता. देव आनंदित होते आणि संतांच्या मनामध्ये मोठा उत्साह भरला होता. वने फुललेली होती. पर्वतांचे समुदाय रत्नांनी चमचमत होते. सर्व नद्यांतून अमृताच्या धारा वाहात होत्या.॥ २॥

**सो अवसर बिरंचि जब जाना। चले सकल सुर साजि बिमाना॥**
**गगन बिमल संकुल सुर जूथा। गावहिं गुन गंधर्ब बरूथा॥**

जेव्हा ब्रह्मदेवांनी ती (भगवंतांच्या प्रकट होण्याची) वेळ जाणली, तेव्हा (त्यांच्यासह) सर्व देव विमाने सजवून निघाले. आकाश देवांच्या समुदायाने भरून गेले. गंधर्वांचे समूह गुणगान करू लागले॥ ३ ॥

**बरषहिं सुमन सुअंजुलि साजी। गहगहि गगन दुंदुभी बाजी॥**
**अस्तुति करहिं नाग मुनि देवा। बहुबिधि लावहिं निज निज सेवा॥**

आणि ओंजळीमध्ये सुंदर फुले भरून पुष्पांचा वर्षाव करू लागले. आकाशात नगारे दुमदुमू लागले. नाग, मुनी आणि देव स्तुती करू लागले आणि अनेक प्रकारे आपापल्या सेवा अर्पण करू लागले.॥ ४ ॥

दो०—**सुर समूह बिनती करि पहुँचे निज निज धाम।**
**जगनिवास प्रभु प्रगटे अखिल लोक बिश्राम॥ १९१ ॥**

सर्व लोकांना शांतता देणारे, जगदाधार प्रभू प्रगट झाले. देवांचे समुदाय प्रार्थना करून आपापल्या लोकांमध्ये गेले.॥ १९१ ॥

छं०—**भए प्रगट कृपाला दीनदयाला कौसल्या हितकारी।**
**हरषित महतारी मुनि मन हारी अद्भुत रूप बिचारी॥**
**लोचन अभिरामा तनु घनस्यामा निज आयुध भुज चारी।**
**भूषन बनमाला नयन बिसाला सोभासिंधु खरारी॥ १ ॥**

दीनांच्यावर दया करणारे, कौसल्येचे हितकारी कृपाळू प्रभू प्रकट झाले. मुनींचे मन हरण करणारे, त्यांचे अद्‌भुत रूप पाहून माता आनंदून गेली. नेत्रांना सुख देणारे मेघांसारखे त्यांचे सावळे शरीर होते. चारी हातांमध्ये आपली वैशिष्ट्यपूर्ण आयुधे होती. विशाल नेत्र होते. अशा प्रकारे सौंदर्याचे सागर भगवान श्रीराम प्रकट झाले.॥ १ ॥

**कह दुइ कर जोरी अस्तुति तोरी केहि बिधि करौं अनंता।**
**माया गुन ग्यानातीत अमाना बेद पुरान भनंता॥**
**करुना सुख सागर सब गुन आगर जेहि गावहिं श्रुति संता।**
**सो मम हित लागी जन अनुरागी भयउ प्रगट श्रीकंता॥ २ ॥**

दोन्ही हात जोडून माता कौसल्या म्हणू लागली, 'हे अनंता, मी तुमची स्तुती कशी करू? वेद आणि पुराणे म्हणतात की माया, गुण आणि ज्ञान यांच्या पलीकडील आणि परिमाणरहित तुम्ही आहात. श्रुती आणि संतजन ज्यांचे दया आणि सुखाचे सागर, सर्व गुणांचे धाम म्हणून गायन करतात, तेच भक्तांवर प्रेम करणारे लक्ष्मीपती भगवान माझ्या कल्याणासाठी प्रकट झाले आहेत.॥ २ ॥

**ब्रह्मांड निकाया निर्मित माया रोम रोम प्रति बेद कहै।**
**मम उर सो बासी यह उपहासी सुनत धीर मति थिर न रहै॥**
**उपजा जब ग्याना प्रभु मुसुकाना चरित बहुत बिधि कीन्ह चहै।**
**कहि कथा सुहाई मातु बुझाई जेहि प्रकार सुत प्रेम लहै॥ ३॥**

वेद म्हणतात की, तुमच्या प्रत्येक रोमामध्ये मायेने रचलेले ब्रह्मांडाचे समूह भरलेले आहेत. तुम्ही माझ्या उदरात राहिलात, ही हसण्यावारी नेण्याजोगी गोष्ट ऐकून विवेकी पुरुषांची बुद्धीसुद्धा अचंबित होते. जेव्हा मातेला ज्ञान झाले, तेव्हा भगवंतांनी स्मित हास्य केले. त्यांना बऱ्याच लीला करावयाच्या होत्या. म्हणून त्यांनी (पूर्व जन्मीच्या) सुंदर कथा सांगून मातेला समजावले. ज्यामुळे तिला आपल्याविषयी पुत्रप्रेम वाटावे.॥ ३॥

**माता पुनि बोली सो मति डोली तजहु तात यह रूपा।**
**कीजै सिसुलीला अति प्रियसीला यह सुख परम अनूपा॥**
**सुनि बचन सुजाना रोदन ठाना होइ बालक सुरभूपा।**
**यह चरित जे गावहिं हरिपद पावहिं ते न परहिं भवकूपा॥ ४॥**

त्याबरोबर मातेची ती (ज्ञान) बुद्धी बदलली. ती म्हणाली, ‘हे रूप सोडून आईला आवडणारी बाललीला कर? (माझ्यासाठी) ते सुख परम अनुपमेय ठरेल.’ मातेचे हे वचन ऐकताच देवाधिदेव ज्ञानस्वरूप भगवंतांनी बालरूप धारण करून रुदन सुरू केले. (तुलसीदास म्हणतात,) जे या चरित्राचे गायन करतात, त्यांना श्रीहरींचे परमपद लाभते आणि मग ते संसाररूपी अंधकूपात पडत नाहीत.॥ ४॥

दो०—**बिप्र धेनु सुर संत हित लीन्ह मनुज अवतार।**
**निज इच्छा निर्मित तनु माया गुन गो पार॥ १९२॥**

भगवंतांनी ब्राह्मण, गाई, देव आणि संत यांच्यासाठी मनुष्याचा अवतार घेतला. ते (अज्ञानमय, मलिन) माया आणि तिचे गुण (सत्त्व, रज, तम) आणि (बाह्य व आंतरिक) इंद्रियांच्या पलीकडील आहेत. त्यांचे (दिव्य) शरीर हे स्वेच्छेनेच बनले आहे. (कोणत्याही कर्मबंधनामुळे परवश होऊन त्रिगुणात्मक भौतिक पदार्थांनी बनलेले नाही.)॥ १९२॥

**सुनि सिसु रुदन परम प्रिय बानी। संभ्रम चलि आईं सब रानी॥**
**हरषित जहँ तहँ धाईं दासी। आनँद मगन सकल पुरबासी॥**

मुलाच्या रडण्याचा आनंददायी आवाज ऐकून सर्व राण्यांनी उतावीळ होऊन धाव घेतली. दासी आनंदाने इकडे-तिकडे धावू लागल्या. सर्व पुरवासी आनंदात बुडून गेले.॥ १॥

**दसरथ पुत्रजन्म सुनि काना। मानहुँ ब्रह्मानंद समाना॥**
**परम प्रेम मन पुलक सरीरा। चाहत उठन करत मति धीरा॥**

राजा दशरथ पुत्र-जन्माची वार्ता ऐकून जणू ब्रह्मानंदात बुडाले. मनात अत्यंत प्रेम उचंबळून आले, शरीर पुलकित झाले. (आनंदाने अधीर झालेल्या) बुद्धीला मोठ्या धैर्याने स्थिर करून (प्रेमाने विव्हळ झालेले शरीर सावरत) ते उठण्याचा प्रयत्न करू लागले.॥ २॥

**जाकर नाम सुनत सुभ होई। मोरें गृह आवा प्रभु सोई॥**
**परमानंद पूरि मन राजा। कहा बोलाइ बजावहु बाजा॥**

ज्यांचे नाव फक्त श्रवण केल्याने कल्याण होते, तेच प्रभू माझ्या घरी आले आहेत, (असा विचार करून) राजाचे मन परमानंदाने भरून आले. त्यांनी वादकांना बोलावून म्हटले, 'नगारे वाजवा. नगारे वाजवा.'॥ ३॥

**गुर बसिष्ठ कहँ गयउ हँकारा। आए द्विजन सहित नृपद्वारा॥**
**अनुपम बालक देखेन्हि जाई। रूप रासि गुन कहि न सिराई॥**

गुरू वसिष्ठांच्याकडे बोलावणे गेले. ते ब्राह्मणांना बरोबर घेऊन राजवाड्यात आले. त्यांनी जाऊन त्या अलौकिक बालकाला पाहिले. ते रूपाची खाण होते आणि त्याचे गुण सांगून संपणारे नव्हते.॥ ४॥

दो०—**नंदीमुख सराध करि जातकरम सब कीन्ह।**
**हाटक धेनु बसन मनि नृप बिप्रन्ह कहँ दीन्ह॥ १९३॥**

नंतर राजांनी नांदीमुख श्राद्ध करून जातकर्म-संस्कार इत्यादी सर्व केले आणि ब्राह्मणांना सुवर्ण, गाई, वस्त्रे आणि रत्नांचे दान केले.॥ १९३॥

**ध्वज पताक तोरन पुर छावा। कहि न जाइ जेहि भाँति बनावा॥**
**सुमनबृष्टि अकास तें होई। ब्रह्मानंद मगन सब लोई॥**

ध्वज, पताका आणि तोरणांनी नगर सजून गेले. ज्याप्रकारे ते सजविले होते, त्याचे वर्णन करणे अशक्य. आकाशातून फुलांचा वर्षाव होत होता, सर्व लोक ब्रह्मानंदात मग्न झाले होते.॥ १॥

**बृंद बृंद मिलि चलीं लोगाईं। सहज सिंगार किएँ उठि धाईं॥**
**कनक कलस मंगल भरि थारा। गावत पैठहिं भूप दुआरा॥**

स्त्रियांचे समूहच्या समूह निघाले. त्या स्वाभाविक शृंगार करूनच धावल्या. सोन्याचा कलश घेऊन आणि तबकांमध्ये मांगलिक द्रव्ये घेऊन त्यांनी गात-गात राजमहालात प्रवेश केला.॥ २॥

**करि आरति नेवछावरि करहीं। बार बार सिसु चरनन्हि परहीं॥**
**मागध सूत बंदिगन गायक। पावन गुन गावहिं रघुनायक॥**

त्यांनी आरती ओवाळून ओवाळण्या दिल्या आणि त्या वारंवार मुलाच्या पाया पडू लागल्या. मागध, सूत, बंदीजन आणि गवई रघुकुलाच्या स्वामींच्या पवित्र गुणांचे गायन करू लागले. ॥ ३ ॥

**सर्बस दान दीन्ह सब काहू। जेहिं पावा राखा नहिं ताहू॥**
**मृगमद चंदन कुंकुम कीचा। मची सकल बीथिन्ह बिच बीचा॥**

अयोध्येत सर्वजणांनी सर्वस्वाचे दान केले. ज्यांना ते मिळाले, त्यांनीही ते (आपल्याजवळ) ठेवले नाही. (लुटून टाकले.) (नगरातील) सर्व गल्ल्यांमध्ये कस्तुरी, चंदन आणि केशर यांचा जणू सडा पडला होता. ॥ ४ ॥

**दो०—गृह गृह बाज बधाव सुभ प्रगटे सुषमा कंद।**
**हरषवंत सब जहँ तहँ नगर नारि नर बृंद॥ १९४॥**

घरोघरी मंगल वाद्ये गुंजू लागली. शोभेचा कंद असलेले भगवान प्रकट झाले होते. नगरातील स्त्री-पुरुषांच्या झुंडी सर्वत्र आनंदमग्न होत होत्या. ॥ १९४ ॥

**कैकयसुता सुमित्रा दोऊ। सुंदर सुत जनमत भैं ओऊ॥**
**वह सुख संपति समय समाजा। कहि न सकइ सारद अहिराजा॥**

कैकेयी आणि सुमित्रा या दोघींनीही सुंदर मुलांना जन्म दिला. त्या प्रसंगीच्या सुख, संपत्ती, शुभवेळ आणि समाज यांचे वर्णन सरस्वती आणि सर्पराज शेषही करू शकणार नाहीत. ॥ १ ॥

**अवधपुरी सोहइ एहि भाँती। प्रभुहि मिलन आई जनु राती॥**
**देखि भानु जनु मन सकुचानी। तदपि बनी संध्या अनुमानी॥**

अयोध्यापुरी अशी सुशोभित झाली होती की, रात्र ही जणू प्रभूंना भेटण्यासाठी आली होती आणि सूर्याला पाहून मनातून संकोच पावत होती, तरी पण मनात विचार करीत ती जणू संध्याकाळ बनून गेली होती. ॥ २ ॥

**अगर धूप बहु जनु अँधिआरी। उड़इ अबीर मनहुँ अरुनारी॥**
**मंदिर मनि समूह जनु तारा। नृप गृह कलस सो इंदु उदारा॥**

अगुरु-धूपाचा इतका धूर पसरला की, जणू तो संध्याकाळचा अंधार वाटला आणि जो गुलाल उधळला जात होता तो तिचा लालिमा आहे. महालांवर जडविलेले रत्नांचे समूह जणू तारागण आहेत. राजमहालाचा जो (चमकणारा) कळस होता, तो जणू तेजस्वी चंद्रमा आहे. ॥ ३ ॥

**भवन बेदधुनि अति मृदु बानी। जनु खग मुखर समयँ जनु सानी॥**
**कौतुक देखि पतंग भुलाना। एक मास तेइँ जात न जाना॥**

राजभवनात अत्यंत कोमल वाणीने जो वेदध्वनी होत होता, तो जणू पक्ष्यांचा समयोचित किलबिलाट होता. हे कौतुक पाहून सूर्यसुद्धा आपली गती विसरून गेला. एक महिना केव्हा गेला, हे सूर्याला कळलेच नाही. (अर्थात त्याचा एक महिना तेथेच गेला.) ॥ ४ ॥

दो०—**मास दिवस कर दिवस भा मरम न जानइ कोइ।**
**रथ समेत रबि थाकेउ निसा कवन बिधि होइ॥ १९५॥**

एक महिन्याचा दीर्घ दिवस झाला. याचे रहस्य कुणालाच समजले नाही. सूर्य आपल्या रथासह तेथेच थांबला. मग रात्र कशी होणार?॥ १९५॥

**यह रहस्य काहूँ नहिं जाना। दिनमनि चले करत गुनगाना॥**
**देखि महोत्सव सुर मुनि नागा। चले भवन बरनत निज भागा॥**

हे रहस्य कुणालाच कळले नाही. सूर्यदेव (भगवान श्रीरामांचे) गुणगान करीत गेला. हा महोत्सव पाहून देव, मुनी आणि नाग आपल्या भाग्याची प्रशंसा करीत आपापल्या घरी गेले.॥ १॥

**औरउ एक कहउँ निज चोरी। सुनु गिरिजा अति दृढ़ मति तोरी॥**
**काकभुसुंडि संग हम दोऊ। मनुजरूप जानइ नहिं कोऊ॥**

हे पार्वती, तुझी बुद्धी (श्रीरामांच्या चरणी) पूर्ण रमलेली आहे. म्हणून मी आणखी एक गुपित तुला सांगतो ते ऐक. काकभुशुंडी आणि मी दोघेजण बरोबर होतो, परंतु आम्ही मनुष्यरूपात असल्यामुळे आम्हांस कोणी ओळखू शकले नाही.॥ २॥

**परमानंद प्रेम सुख फूले। बीथिन्ह फिरहिं मगन मन भूले॥**
**यह सुभ चरित जान पै सोई। कृपा राम कै जापर होई॥**

परम आनंद आणि प्रेम-सुखाने प्रफुल्लित झालेले आम्ही आनंदमग्न मनाने नगरीच्या गल्ल्यांमधून स्वतःला विसरून फिरत होतो. परंतु हे शुभचरित्र श्रीरामांची ज्याच्यावर कृपा असेल, तोच जाणू शकेल.॥ ३॥

**तेहि अवसर जो जेहि बिधि आवा। दीन्ह भूप जो जेहि मन भावा॥**
**गज रथ तुरग हेम गो हीरा। दीन्हे नृप नानाबिधि चीरा॥**

त्यावेळी जो जसा आला आणि ज्याला मनाला जे आवडले, ते राजांनी त्याला दिले. हत्ती, रथ, घोडे, सुवर्ण, गाई, हिरे आणि तऱ्हेतऱ्हेची वस्त्रे राजांनी वाटली.॥ ४॥

दो०—**मन संतोषे सबन्हि के जहँ तहँ देहिं असीस।**
**सकल तनय चिर जीवहुँ तुलसिदास के ईस॥ १९६॥**

राजांनी सर्वांना संतुष्ट केले. (त्यामुळे) सर्व लोक सर्वत्र आशीर्वाद देत होते की, तुलसीदासाचे स्वामी असलेले सर्व पुत्र चिरंजीव होवोत.॥ १९६॥

**कछुक दिवस बीते एहि भाँती। जात न जानिअ दिन अरु राती॥**
**नामकरन कर अवसरु जानी। भूप बोलि पठए मुनि ग्यानी॥**

अशाप्रकारे काही दिवस निघून गेले. दिवस-रात्र कसे जात होते, हेच कळत नव्हते. तेव्हा नामकरण-संस्काराची वेळ झाल्याचे पाहून राजांनी ज्ञानी मुनी वसिष्ठांना बोलावणे पाठविले. ॥ १ ॥

**करि पूजा भूपति अस भाषा । धरिअ नाम जो मुनि गुनि राखा ॥**
**इन्ह के नाम अनेक अनूपा । मैं नृप कहब स्वमति अनुरूपा ॥**

मुनींची पूजा केल्यावर राजांनी सांगितले की, 'हे मुनी, तुमच्या मनात जो विचार असेल, त्याप्रमाणे नावे ठेवा.' (मुनी म्हणाले,) 'हे राजा, यांची अनेक अनुपम नावे आहेत, तरीही मी आपल्या विचाराप्रमाणे सांगतो. ॥ २ ॥

**जो आनंद सिंधु सुखरासी । सीकर तें त्रैलोक सुपासी ॥**
**सो सुखधाम राम अस नामा । अखिल लोक दायक बिश्रामा ॥**

हा जो आनंदाचा सागर व सुखाचे भांडार आहे, ज्याच्या (आनंद सिंधूच्या) एका कणाने तिन्ही लोक सुखी होतात, त्या (तुमच्या सर्वांत मोठ्या पुत्राचे) नाव 'राम' आहे, तो सुखाचे माहेर आणि संपूर्ण लोकांना शांती देणारा आहे. ॥ ३ ॥

**बिस्व भरन पोषन कर जोई । ताकर नाम भरत अस होई ॥**
**जाके सुमिरन तें रिपु नासा । नाम सत्रुहन बेद प्रकासा ॥**

जो जगाचे भरण-पोषण करतो, त्या (तुमच्या दुसऱ्या) पुत्राचे नाव 'भरत' असेल. ज्याच्या स्मरणानेच शत्रूचा नाश होतो, त्याचे वेदांमध्ये प्रसिद्ध असलेले 'शत्रुघ्न' नाव आहे.' ॥ ४ ॥

दो०—**लच्छन धाम राम प्रिय सकल जगत आधार ।**
**गुरु बसिष्ट तेहि राखा लछिमन नाम उदार ॥ १९७ ॥**

जो शुभ लक्षणांचे धाम आहे, श्रीरामांचा आवडता आहे आणि जगाचा आधार आहे, त्याचे गुरू वसिष्ठांनी 'लक्ष्मण' असे सुंदर नाव ठेवले. ॥ १९७ ॥

**धरे नाम गुर हृदयँ बिचारी । बेद तत्व नृप तव सुत चारी ॥**
**मुनि धन जन सरबस सिव प्राना । बाल केलि रस तेहिं सुख माना ॥**

गुरूंनी विचारपूर्वक ही नावे ठेवली (आणि म्हटले) 'हे राजा, तुमचे चारी पुत्र हे वेदाचे तत्त्वस्वरूप (प्रत्यक्ष परात्पर भगवान) आहेत. जे मुनिजनांचे धन, भक्तांचे सर्वस्व आणि श्रीशंकरांचे प्राण आहेत, ते (या प्रसंगी तुम्हा लोकांच्या प्रेमापोटी) बाललीलेमध्ये सुख मानत आहेत.' ॥ १ ॥

**बारेहि ते निज हित पति जानी । लछिमन राम चरन रति मानी ॥**
**भरत सत्रुहन दूनउ भाई । प्रभु सेवक जसि प्रीति बड़ाई ॥**

लहानपणापासूनच श्रीरामांना आपले परम कल्याण करणारे स्वामी मानून लक्ष्मणाने त्यांच्या

चरणी प्रेम केले. भरत व शत्रुघ्न या दोघा भावांमध्ये स्वामी-सेवकाच्या ज्या प्रेमाची प्रशंसा होते, तशी प्रीती होती. ॥ २ ॥

**स्याम गौर सुंदर दोउ जोरी। निरखहिं छबि जननीं तृन तोरी॥**
**चारिउ सील रूप गुन धामा। तदपि अधिक सुखसागर रामा॥**

श्याम व गौर देहाच्या दोन्ही सुंदर जोड्यांचे लावण्य पाहून माता (त्यांना दृष्ट लागू नये म्हणून) मीठमोहऱ्या ओवाळून टाकत. तसे पाहाता चारीही पुत्र शील, रूप आणि गुणांचे निधान होते, तरीही सुख-सागर श्रीराम हे सर्वांत श्रेष्ठ होते. ॥ ३ ॥

**हृदयँ अनुग्रह इंदु प्रकासा। सूचत किरन मनोहर हासा॥**
**कबहुँ उछंग कबहुँ बर पलना। मातु दुलारइ कहि प्रिय ललना॥**

त्यांच्या हृदयात कृपारूपी चंद्र प्रकाशित होता. मनाला मोहून टाकणारे त्यांचे हास्य त्या कृपारूपी चंद्राच्या किरणांचे द्योतक होते. कधी मांडीवर (घेऊन) तर कधी सुंदर पाळण्यात (घालून) माता 'माझ्या लाडक्या' म्हणून त्यांना जोजवत होती. ॥ ४ ॥

दो०—**ब्यापक ब्रह्म निरंजन निर्गुन बिगत बिनोद।**
**सो अज प्रेम भगति बस कौसल्या कें गोद॥ १९८॥**

जे सर्वव्यापक, निरंजन (मायारहित), निर्गुण, विनोदरहित आणि अजन्मा ब्रह्म आहे, तेच प्रेम आणि भक्तीला वश होऊन कौसल्येच्या मांडीवर खेळत होते. ॥ १९८ ॥

**काम कोटि छबि स्याम सरीरा। नील कंज बारिद गंभीरा॥**
**अरुन चरन पंकज नख जोती। कमल दलन्हि बैठे जनु मोती॥**

त्यांच्या नील कमल किंवा पूर्ण (जल भरलेल्या) मेघासमान श्यामल शरीरामध्ये कोट्यवधी कामदेवांची शोभा आहे. लाल-लाल चरणकमलांच्या नखांची शुभ्र कांती लाल कमलांच्या पानांवर स्थिरावलेले जणू मोती वाटत होते. ॥ १ ॥

**रेख कुलिस ध्वज अंकुस सोहे। नूपुर धुनि सुनि मुनि मन मोहे॥**
**कटि किंकिनी उदर त्रय रेखा। नाभि गभीर जान जेहिं देखा॥**

(चरणतळांवर) वज्र, ध्वजा आणि अंकुश यांची चिन्हे शोभत होती. पैंजणांचा ध्वनी ऐकून मुनींचेही मन मोहित होत होते. कमरेला करदोटा आणि उदरावर तीन वळ्या होत्या. नाभीची गंभीरता ज्यांनी पाहिली आहे, तेच ती जाणत. ॥ २ ॥

**भुज बिसाल भूषन जुत भूरी। हियँ हरि नख अति सोभा रूरी॥**
**उर मनिहार पदिक की सोभा। बिप्र चरन देखत मन लोभा॥**

अनेक आभूषणांनी सुशोभित झालेल्या भुजा होत्या. हृदयावर रुळणाऱ्या वाघनखांची छटा तर आगळीच होती. छातीवर रत्नजडित हारांची शोभा विलसत असे आणि (भृगूंचे) चरणचिन्ह पाहून मन लोभून जाई. ॥ ३ ॥

**कंबु कंठ अति चिबुक सुहाई । आनन अमित मदन छबि छाई ॥**
**दुइ दुइ दसन अधर अरुनारे । नासा तिलक को बरनै पारे ॥**

कंठ शंखाप्रमाणे (चढ-उताराचा तीन रेखांनी शोभित) होता. हनुवटी सुरेख होती. मुखावर असंख्य कामदेवांचे सौंदर्य पसरलेले होते. दोन-दोन सुंदर कोवळे दात आणि लाल चुटूक ओठ होते. नाक व भालप्रदेशावरील तिलकाच्या (सौंदर्याचे) तर वर्णन कोण करू शकेल?॥ ४॥

**सुंदर श्रवन सुचारु कपोला । अति प्रिय मधुर तोतरे बोला ॥**
**चिक्कन कच कुंचित गभुआरे । बहु प्रकार रचि मातु सँवारे ॥**

त्यांचे कान व गाल फारच सुंदर होते. बोबडे बोल तर मनाला मोहवीत. जन्मापासूनच असलेले कुरळे काळेभोर केस आई वारंवार विंचरीत असे. ॥ ५ ॥

**पीत झगुलिआ तनु पहिराई । जानु पानि बिचरनि मोहि भाई ॥**
**रूप सकहिं नहिं कहि श्रुति सेषा । सो जानइ सपनेहुँ जेहिं देखा ॥**

अंगात पिवळे झबले घातले होते. त्यांचे रांगणे मला फारच आवडत होते. त्यांच्या रूपाचे वर्णन वेद आणि शेषसुद्धा करू शकणार नाहीत. ज्याने ते कधी स्वप्नात का होईना पाहिले असेल, तोच ते जाणू शकेल. ॥ ६ ॥

दो०—**सुख संदोह मोहपर ग्यान गिरा गोतीत।**
**दंपति परम प्रेम बस कर सिसुचरित पुनीत॥ १९९ ॥**

जे सुखाची खाण आहेत, मोहापलीकडचे आहेत. ज्ञान, वाणी आणि इंद्रियातीत आहेत, ते भगवान दशरथ-कौसल्या यांच्या अत्यंत प्रेमाच्या अधीन होऊन पावन बालक्रीडा करीत आहेत. ॥ १९९ ॥

**एहि बिधि राम जगत पितु माता । कोसलपुर बासिन्ह सुखदाता ॥**
**जिन्ह रघुनाथ चरन रति मानी । तिन्ह की यह गति प्रगट भवानी ॥**

अशा रीतीने सर्व जगाचे माता-पिता असणारे श्रीराम अयोध्यावासींना आनंद देत. ज्यांनी श्रीरामांच्या चरणांवर प्रेम केले असेल, त्यांनाच हे भवानी! हा आनंद प्रत्यक्ष अनुभवायला मिळतो. ॥ १ ॥

**रघुपति बिमुख जतन कर कोरी । कवन सकइ भव बंधन छोरी ॥**
**जीव चराचर बस कै राखे । सो माया प्रभु सों भय भाखे ॥**

श्रीरघुनाथांशी विन्मुख होऊन मनुष्य कोट्यवधी उपाय करो, परंतु त्याला संसार-बंधनातून कोण मुक्त करू शकेल? जिने संपूर्ण चराचर जीवांना आपल्या मुठीत ठेवले आहे, ती मायासुद्धा प्रभूंना भीत असते. ॥ २ ॥

**भृकुटि बिलास नचावइ ताही। अस प्रभु छाड़ि भजिअ कहु काही॥**
**मन क्रम बचन छाड़ि चतुराई। भजत कृपा करिहहिं रघुराई॥**

भगवंत त्या मायेला भृकुटीच्या इशाऱ्यावर नाचवत असतात. अशा प्रभूंना सोडून इतर कुणाचे भजन करावे, सांगा बरे? निष्कपट भावाने कायावाचामनाने भजताच श्रीरघुनाथ कृपा करतील.॥ ३॥

**एहि बिधि सिसुबिनोद प्रभु कीन्हा। सकल नगरबासिन्ह सुख दीन्हा॥**
**लै उछंग कबहुँक हलरावै। कबहुँ पालने घालि झुलावै॥**

अशा प्रकारे प्रभू श्रीरामचंद्रांनी बालक्रीडा केली आणि सर्व नगरवासियांना आनंद दिला. कौसल्या माता कधी त्यांना मांडीवर घेऊन हालवीत-डोलवीत असे आणि कधी पाळण्यात झोपवून झोके देत असे,॥ ४॥

दो०—**प्रेम मगन कौसल्या निसि दिन जात न जान।**
**सुत सनेह बस माता बालचरित कर गान॥ २००॥**

कौसल्या माता प्रेमात अशी बडून जाई की, दिवस-रात्र केव्हा आली व गेली, याचे तिला भान राहात नसे. पुत्राच्या स्नेहामुळे माता त्यांच्या बाल-चरित्राचे गायन करी.॥ २००॥

**एक बार जननीं अन्हवाए। करि सिंगार पलनाँ पौढ़ाए॥**
**निज कुल इष्टदेव भगवाना। पूजा हेतु कीन्ह अस्नाना॥**

एकदा मातेने श्रीरामचंद्रांना न्हाऊ घातले आणि शृंगार करून पाळण्यात झोपविले. नंतर कुलदेवतेच्या पूजेसाठी स्नान केले.॥ १॥

**करि पूजा नैबेद्य चढ़ावा। आपु गई जहँ पाक बनावा॥**
**बहुरि मातु तहवाँ चलि आई। भोजन करत देख सुत जाई॥**

पूजा करून नैवेद्य दाखविला आणि जिथे स्वयंपाक केला होता, तिथे ती गेली. पुन्हा आई (पूजेच्या ठिकाणी) परत आली, तर आपला मुलगा (कुलदेवाला दाखविलेला नैवेद्य) खात असलेला तिला दिसला.॥ २॥

**गै जननी सिसु पहिं भयभीता। देखा बाल तहाँ पुनि सूता॥**
**बहुरि आइ देखा सुत सोई। हृदयँ कंप मन धीर न होई॥**

आई (पाळण्यात झोपवला असताना इथे कुणी आणून बसविला, या गोष्टीने घाबरून) मुलाजवळ गेली. पाहते तर तेथे तो झोपलेला दिसला. मग देवघरात परत येऊन पाहिले, तर आपला मुलगा तेथे जेवत होता. तिला कापरे भरले आणि तिचे अवसान गळून गेले.॥ ३॥

**इहाँ उहाँ दुइ बालक देखा। मतिभ्रम मोर कि आन बिसेषा॥**
**देखि राम जननी अकुलानी। प्रभु हँसि दीन्ह मधुर मुसुकानी॥**

(ती विचार करू लागली की,) इथे आणि तिथे मी दोन मुले पाहिली. हा माझ्या मनाचा भ्रम आहे की काही विशेष कारण आहे. प्रभू श्रीरामचंद्रांनी मातेला घाबरून गेल्याचे पाहून मधुर हास्य केले.॥ ४॥

दो०—**देखरावा मातहि निज अद्भुत रूप अखंड।**
**रोम रोम प्रति लागे कोटि कोटि ब्रह्मंड॥ २०१॥**

मग भगवंतांनी मातेला आपले अखंड अद्‍भुत रूप दाखविले. त्याच्या एकेका रोमामध्ये कोट्यवधी ब्रह्मांडे सामावली होती.॥ २०१॥

**अगनित रबि ससि सिव चतुरानन। बहु गिरि सरित सिंधु महि कानन॥**
**काल कर्म गुन ग्यान सुभाऊ। सोउ देखा जो सुना न काऊ॥**

अगणित सूर्य, चंद्र, शिव, ब्रह्मदेव, पुष्कळसे पर्वत, नद्या, समुद्र, पृथ्वी, वने, काल, कर्म, गुण, ज्ञान आणि स्वभाव दिसले. शिवाय कधीही पाहिले किंवा ऐकलेसुद्धा नव्हते, असे पदार्थही तिने तेथे पाहिले.॥ १॥

**देखी माया सब बिधि गाढ़ी। अति सभीत जोरें कर ठाढ़ी॥**
**देखा जीव नचावइ जाही। देखी भगति जो छोरइ ताही॥**

सर्व तऱ्हेने बलवान असलेली माया पाहिली. ती (भगवंतांच्यासमोर) अत्यंत घाबरून हात जोडून उभी होती. माया नाचवीत असलेल्या जिवाला पाहिले आणि मग त्या जिवाला (मायेपासून) सोडविणाऱ्या अशा भक्तीलाही पाहिले.॥ २॥

**तन पुलकित मुख बचन न आवा। नयन मूदि चरननि सिरु नावा॥**
**बिसमयवंत देखि महतारी। भए बहुरि सिसुरूप खरारी॥**

मातेचे शरीर पुलकित झाले. तोंडातून शब्द फुटत नव्हता. तेव्हा डोळे मिटून श्रीरामचंद्रांच्या चरणी तिने मस्तक ठेवले. मातेला आश्चर्य वाटल्याचे पाहून श्रीरामांनी पुन्हा बालरूप घेतले.॥ ३॥

**अस्तुति करि न जाइ भय माना। जगत पिता मैं सुत करि जाना॥**
**हरि जननी बहु बिधि समुझाई। यह जनि कतहुँ कहसि सुनु माई॥**

मातेला स्तुतीसुद्धा करता येईना. ती घाबरली की, जगत्पिता परमात्म्याला मी पुत्र समजले. श्रीहरींनी मातेला पुष्कळ प्रकारे समजावून सांगितले की, 'हे माते, ऐक. ही गोष्ट कुणालाही सांगू नकोस.'॥ ४॥

दो०—**बार बार कौसल्या बिनय करइ कर जोरि।**
**अब जनि कबहूँ ब्यापै प्रभु मोहि माया तोरि॥ २०२॥**

कौसल्या वारंवार हात जोडून प्रार्थना करीत होती की, 'हे प्रभो, मला कधीही तुमच्या मायेने व्यापू नये.'॥ २०२॥

**बालचरित हरि बहुबिधि कीन्हा। अति अनंद दासन्ह कहँ दीन्हा॥**
**कछुक काल बीतें सब भाई। बड़े भए परिजन सुखदाई॥**

भगवंतांनी पुष्कळ प्रकारच्या बाललीला केल्या आणि आपल्या सेवकांना अत्यंत आनंद दिला. काही काळ लोटल्यावर चारीही भाऊ मोठे होऊन कुटुंबियांना सुख देऊ लागले.॥ १॥

**चूड़ाकरन कीन्ह गुरु जाई। बिप्रन्ह पुनि दछिना बहु पाई॥**
**परम मनोहर चरित अपारा। करत फिरत चारिउ सुकुमारा॥**

मग गुरुजींनी चूडाकर्म संस्कार केला. ब्राह्मणांना खूप दक्षिणा मिळाली. चारी सुंदर राजकुमार फार मनोहर अपार लीला करीत फिरत असत.॥ २॥

**मन क्रम बचन अगोचर जोई। दसरथ अजिर बिचर प्रभु सोई॥**
**भोजन करत बोल जब राजा। नहिं आवत तजि बाल समाजा॥**

जे मन, वचन व कर्म यांना अगोचर आहेत, तेच प्रभू दशरथ राजांच्या अंगणात फिरत होते. राजे जेव्हा त्यांना भोजनास बोलवत, तेव्हा ते आपल्या बाल सोबत्यांना सोडून येत नसत.॥ ३॥

**कौसल्या जब बोलन जाई। ठुमुकु ठुमुकु प्रभु चलहिं पराई॥**
**निगम नेति सिव अंत न पावा। ताहि धरै जननी हठि धावा॥**

कौसल्या माता जेव्हा बोलवायला जाई, तेव्हा प्रभू ठुमकत ठुमकत पळून जात. वेद ज्यांचे 'नेति' (हे नाही) म्हणून वर्णन करतात आणि श्रीशिवांनाही ज्यांचा थांग लागला नाही, त्यांना बळेच पकडण्यासाठी ती धावत असे.॥ ४॥

**धूसर धूरि भरें तनु आए। भूपति बिहसि गोद बैठाए॥**

अंगाला धूळ लागलेल्या स्थितीत आलेल्या त्यांना राजा हसत हसत आपल्या मांडीवर बसवी.॥ ५॥

दो०—**भोजन करत चपल चित इत उत अवसरु पाइ।**
**भाजि चले किलकत मुख दधि ओदन लपटाइ॥ २०३॥**

(पकडून आणल्यावर) श्रीराम भोजन करू लागत, परंतु चित्त चंचल असे. संधी मिळताच तोंडाला दही-भात लागलेला असतानाच किलकारी मारत ते इकडे-तिकडे पळून जात.॥ २०३॥

**बालचरित अति सरल सुहाए। सारद सेष संभु श्रुति गाए॥**
**जिन्ह कर मन इन्ह सन नहिं राता। ते जन बंचित किए बिधाता॥**

श्रीरामचंद्रांच्या फार भोळ्या आणि मनमोहक बाललीलांचे सरस्वती, शेष, शिव व वेद यांनी गायन केले आहे. या लीलांमध्ये ज्यांचे मन लागले नाही, त्यांना विधात्याने अभागी बनविले.॥ १॥

**भए कुमार जबहिं सब भ्राता। दीन्ह जनेऊ गुरु पितु माता॥**
**गुरगृहँ गए पढ़न रघुराई। अलप काल बिद्या सब आई॥**

सर्व भाऊ कुमारावस्थेस येताच, गुरू, पिता व माता, यांनी त्यांचा यज्ञोपवीत संस्कार केला. श्रीरघुनाथ (भावांसह) गुरुगृही विद्या शिकण्यास गेले आणि थोड्याच काळात त्यांना सर्व विद्या प्राप्त झाल्या.॥ २॥

**जाकी सहज स्वास श्रुति चारी। सो हरि पढ़ यह कौतुक भारी॥**
**बिद्या बिनय निपुन गुन सीला। खेलहिं खेल सकल नृप लीला॥**

चारही वेद ज्यांचा स्वाभाविक श्वास आहेत, ते भगवान विद्या शिकतात ही मोठी आश्चर्याची गोष्ट. चारी भाऊ विद्या, विनय, गुण व शील यांमध्ये मोठे निपुण होते आणि ते सर्वजण राजांचे खेळ खेळत.॥ ३॥

**करतल बान धनुष अति सोहा। देखत रूप चराचर मोहा॥**
**जिन्ह बीथिन्ह बिहरहिं सब भाई। थकित होहिं सब लोग लुगाई॥**

त्यांच्या हाती बाण व धनुष्य शोभत असत. त्यांचे रूप पाहताच चराचर मोहून जात असे. ते सर्व भाऊ ज्या ज्या ठिकाणी खेळायला जात, तेथील सर्व स्त्री-पुरुष त्यांना पाहून प्रेमाने देहभान विसरत किंवा स्तब्ध होऊन त्यांना पाहात राहात.॥ ४॥

दो०—**कोसलपुर बासी नर नारि बृद्ध अरु बाल।**
**प्रानहु ते प्रिय लागत सब कहुँ राम कृपाल॥ २०४॥**

कोसलपुरातील रहिवासी स्त्री-पुरुष, आबाल-वृद्ध सर्वांना कृपाळू रामचंद्र प्राणांहूनही प्रिय वाटत.॥ २०४॥

**बंधु सखा सँग लेहिं बोलाई। बन मृगया नित खेलहिं जाई॥**
**पावन मृग मारहिं जियँ जानी। दिन प्रति नृपहि देखावहिं आनी॥**

श्रीराम भावांना व इष्ट मित्रांना बोलावून बरोबर घेत आणि नित्य वनात शिकारीस जात. मनाला पवित्र वाटत, त्या मृगांना मारून आणून रोज राजा दशरथांना दाखवीत असत.॥ १॥

**जे मृग राम बान के मारे। ते तनु तजि सुरलोक सिधारे॥**
**अनुज सखा सँग भोजन करहीं। मातु पिता अग्या अनुसरहीं॥**

जे मृग श्रीरामांच्या बाणाने मारले जात, ते देह सोडून देवलोकी जात. श्रीराम आपले धाकटे भाऊ व मित्रांसह भोजन करीत आणि माता-पित्यांच्या आज्ञेचे पालन करीत असत.॥ २॥

**जेहि बिधि सुखी होहिं पुर लोगा। करहिं कृपानिधि सोइ संजोगा॥**
**बेद पुरान सुनहिं मन लाई। आपु कहहिं अनुजन्ह समुझाई॥**

नगरीतील लोकांना आनंद व्हावा, असेच योगायोग कृपानिधान श्रीराम जुळवून आणत असत. ते लक्षपूर्वक वेद-पुराणे ऐकत आणि मग स्वतः धाकट्या भावांना समजावून देत.॥ ३॥

**प्रातकाल उठि कै रघुनाथा। मातु पिता गुरु नावहिं माथा॥**
**आयसु मागि करहिं पुर काजा। देखि चरित हरषइ मन राजा॥**

श्रीरघुनाथ प्रात:काळी उठून माता-पिता आणि गुरू यांच्या पाया पडत आणि त्यांची आज्ञा घेऊन नगरातील कामे करीत असत. त्यांचे चरित्र पाहून महाराज दशरथ मनात खूप आनंदित होत असत.॥ ४॥

दो०—**ब्यापक अकल अनीह अज निर्गुन नाम न रूप।**
**भगत हेतु नाना बिधि करत चरित्र अनूप॥ २०५॥**

जे व्यापक, अखंड, इच्छारहित, अजन्मा व निर्गुण आहेत, तसेच ज्यांना नाव नाही, रूप नाही, तेच भगवान भक्तांसाठी नाना प्रकारच्या अलौकिक लीला करीत.॥ २०५॥

**यह सब चरित कहा मैं गाई। आगिलि कथा सुनहु मन लाई॥**
**बिस्वामित्र महामुनि ग्यानी। बसहिं बिपिन सुभ आश्रम जानी॥**

हे सर्व चरित्र मी वर्णन करून सांगितले. आता पुढील कथा लक्ष देऊन ऐका. ज्ञानी महामुनी विश्वामित्र वनामध्ये पवित्र स्थानी आश्रम करून राहात होते.॥ १॥

**जहँ जप जग्य जोग मुनि करहीं। अति मारीच सुबाहुहि डरहीं॥**
**देखत जग्य निसाचर धावहिं। करहिं उपद्रव मुनि दुख पावहिं॥**

तेथे ते जप, यज्ञ आणि योगसाधना करीत असत. परंतु मारीच व सुबाहू राक्षस यांना ते फार घाबरत असत. यज्ञ पाहताच राक्षस धावून येत व उपद्रव देत असत. त्यामुळे मुनींना फार त्रास होई.॥ २॥

**गाधितनय मन चिंता ब्यापी। हरि बिनु मरहिं न निसिचर पापी॥**
**तब मुनिबर मन कीन्ह बिचारा। प्रभु अवतरेउ हरन महि भारा॥**

गाधी-पुत्र विश्वामित्रांच्या मनात काळजी वाटत होती. हे पापी राक्षस भगवंतांच्याशिवाय

कुणाकडूनही मारले जाणार नाहीत. तेव्हा श्रेष्ठ मुनींनी मनात विचार केला की, प्रभूंनी पृथ्वीचा भार हरण करण्यासाठी अवतार घेतला आहे. ॥ ३ ॥

**एहूँ मिस देखौं पद जाई । करि बिनती आनौं दोउ भाई ॥**
**ग्यान बिराग सकल गुन अयना । सो प्रभु मैं देखब भरि नयना ॥**

तेव्हा या निमित्ताने जाऊन मी प्रभूंच्या चरणांचे दर्शन घेईन आणि विनंती करून दोन्ही भावांना येथे घेऊन येईन. अहाहा, जे ज्ञान, वैराग्य आणि सर्व गुणांचे धाम आहेत, त्या प्रभूंना मी डोळे भरून पाहीन. ॥ ४ ॥

दो०—**बहुबिधि करत मनोरथ जात लागि नहिं बार।**
**करि मज्जन सरऊ जल गए भूप दरबार ॥ २०६ ॥**

अशा प्रकारचे अनेक मनोरथ करीत त्यांना जाण्यास वेळ लागला नाही. शरयू नदीच्या जलामध्ये स्नान करून ते दशरथ राजांच्या दरबारात पोहोचले. ॥ २०६ ॥

**मुनि आगमन सुना जब राजा । मिलन गयउ लै बिप्र समाजा ॥**
**करि दंडवत मुनिहि सनमानी । निज आसन बैठारेन्हि आनी ॥**

राजांनी जेव्हा मुनींच्या आगमनाची वार्ता ऐकली, तेव्हा ते ब्राह्मण वृंदाला सोबत घेऊन त्यांना भेटण्यास गेले आणि दंडवत घालून मुनींचा सन्मान करीत त्यांना आणून त्यांनी आसनावर बसविले. ॥ १ ॥

**चरन पखारि कीन्हि अति पूजा । मो सम आजु धन्य नहिं दूजा ॥**
**बिबिध भाँति भोजन करवावा । मुनिबर हृदयँ हरष अति पावा ॥**

राजांनी त्यांचे चरण प्रक्षालन करून त्यांची चांगल्या प्रकारे पूजा केली आणि म्हटले, ‘माझ्यासारखा धन्य आज दुसरा कोणीही नाही.’ नंतर त्यांना अनेक प्रकारचे भोजन वाढले. त्यामुळे श्रेष्ठ मुनींच्या मनाला खूप संतोष झाला. ॥ २ ॥

**पुनि चरननि मेले सुत चारी । राम देखि मुनि देह बिसारी ॥**
**भए मगन देखत मुख सोभा । जनु चकोर पूरन ससि लोभा ॥**

नंतर राजांनी चारी पुत्रांना मुनींच्या चरणांवर घातले. श्रीरामचंद्रांना पाहून मुनींचे देहभान हरपले. ते श्रीरामांच्या मुखाची शोभा पाहताच असे गुंग होऊन गेले की, जणू चकोर पूर्ण चंद्रमा पाहून मोहून जातो. ॥ ३ ॥

**तब मन हरषि बचन कह राऊ । मुनि अस कृपा न कीन्हिहु काऊ ॥**
**केहि कारन आगमन तुम्हारा । कहहु सो करत न लावउँ बारा ॥**

तेव्हा राजांनी आनंदाने म्हटले, ‘हे मुनी, अशाप्रकारे (दर्शन देण्याची) कृपा तुम्ही कधी केली नाही. आज तुमचे कशासाठी शुभागमन झाले आहे? सांगा, ते पूर्ण करण्यास मी वेळ लावणार नाही.’ ॥ ४ ॥

**असुर समूह सतावहिं मोही। मैं जाचन आयउँ नृप तोही॥**
**अनुज समेत देहु रघुनाथा। निसिचर बध मैं होब सनाथा॥**

(मुनी म्हणाले,) 'हे राजा, राक्षसांचे समुदाय मला फार त्रास देतात. यासाठी मी तुमच्याकडे काही मागण्यास आलो आहे. धाकट्या भावासह श्रीरघुनाथांना माझ्याकडे सोपवा. राक्षस मारले गेल्यावर मी सुरक्षित होईन.॥५॥

दो०—**देहु भूप मन हरषित तजहु मोह अग्यान।**
**धर्म सुजस प्रभु तुम्ह कौं इन्ह कहँ अति कल्यान॥ २०७॥**

हे राजा, प्रसन्न मनाने यांना तुम्ही द्या. मोह व अज्ञान सोडून द्या. हे स्वामी, यामुळे तुम्हांला धर्म व सुकीर्ती प्राप्त होईल आणि यांचेही परम कल्याण होईल.'॥२०७॥

**सुनि राजा अति अप्रिय बानी। हृदय कंप मुख दुति कुमुलानी॥**
**चौथेंपन पायउँ सुत चारी। बिप्र बचन नहिं कहेहु बिचारी॥**

हे अत्यंत अप्रिय असे बोलणे ऐकून राजांचे मन थरारले. त्यांचा चेहरा उतरला. (ते म्हणाले,) 'हे मुने! म्हातारपणी मला चार पुत्र मिळाले आहेत. तुम्ही विचार करून बोलला नाहीत.॥१॥

**मागहु भूमि धेनु धन कोसा। सर्बस देउँ आजु सहरोसा॥**
**देह प्रान तें प्रिय कछु नाहीं। सोउ मुनि देउँ निमिष एक माहीं॥**

हे मुनी, तुम्ही पृथ्वी, गाई, धन, खजिना यांपैकी काहीही मागा. मी मोठ्या आनंदाने आपले सर्वस्व अर्पण करीन. देह आणि प्राण यांच्यापेक्षा काहीही अधिक प्रिय नसते. मी तेही एका क्षणात देईन.॥२॥

**सब सुत प्रिय मोहि प्रान कि नाईं। राम देत नहिं बनइ गोसाईं॥**
**कहँ निसिचर अति घोर कठोरा। कहँ सुंदर सुत परम किसोरा॥**

सर्व पुत्र मला प्राणांप्रमाणे प्रिय आहेत, त्यातही हे प्रभो, रामाला तर (कोणत्याही परिस्थितीत) देता येत नाही. अत्यंत भयानक राक्षस कुठे व अत्यंत किशोर अवस्थेतील (सुकुमार) माझे सुंदर पुत्र कुठे?'॥३॥

**सुनि नृप गिरा प्रेम रस सानी। हृदयँ हरष माना मुनि ग्यानी॥**
**तब बसिष्ठ बहुबिधि समुझावा। नृप संदेह नास कहँ पावा॥**

राजांची ही प्रेमपूर्ण वाणी ऐकून ज्ञानी मुनी विश्वामित्रांना फार आनंद वाटला. जेव्हा वसिष्ठांनी राजांना पुष्कळ प्रकारे समजावले, तेव्हा त्यांच्या मनातील संदेह दूर झाला.॥४॥

**अति आदर दोउ तनय बोलाए। हृदयँ लाइ बहु भाँति सिखाए॥**
**मेरे प्रान नाथ सुत दोऊ। तुम्ह मुनि पिता आन नहिं कोऊ॥**

राजा दशरथांनी मोठ्या आदराने दोन्ही पुत्रांना बोलाविले आणि त्यांना हृदयाशी धरून अनेक प्रकारे उपदेश केला. (आणि विश्वामित्रांना म्हटले,) 'हे नाथ, हे दोन्ही पुत्र माझे प्राण आहेत. हे मुनी, (आता) तुम्हीच यांचे वडील आहात. दुसरे कोणी नाही.'॥ ५॥

**दो०—सौंपे भूप रिषिहि सुत बहुबिधि देइ असीस।**
**जननी भवन गए प्रभु चले नाइ पद सीस॥ २०८ ( क )॥**

राजांनी अनेक आशीर्वाद देऊन पुत्रांना ऋषींच्या हवाली केले. मग प्रभू मातेच्या महालात गेले आणि तिच्या पाया पडून निघाले.॥ २०८ (क)॥

**सो०—पुरुषसिंह दोउ बीर हरषि चले मुनि भय हरन।**
**कृपासिंधु मतिधीर अखिल बिस्व कारन करन॥ २०८ ( ख )॥**

ते पुरुष-सिंह दोघे भाऊ (राम व लक्ष्मण) मुनींचे भय दूर करण्यासाठी आनंदाने निघाले. ते कृपासागर, धीरबुद्धी आणि संपूर्ण विश्वाच्या कारणाचेही कारण होते.॥ २०८ (ख)॥

**अरुन नयन उर बाहु बिसाला। नील जलज तनु स्याम तमाला॥**
**कटि पट पीत कसें बर भाथा। रुचिर चाप सायक दुहुँ हाथा॥**

भगवान रामांचे नेत्र कमळासारखे लालसर होते, विशाल छाती आणि आजानुबाहू होते. नीलकमल आणि तमाल वृक्षासारखे श्यामल शरीर होते, कटीला पीतांबर नेसलेले आणि सुंदर भाते बांधलेले होते. दोन्ही हातांमध्ये सुंदर धनुष्य व बाण होते.॥ १॥

**स्याम गौर सुंदर दोउ भाई। बिस्वामित्र महानिधि पाई॥**
**प्रभु ब्रह्मन्यदेव मैं जाना। मोहि निति पिता तजेउ भगवाना॥**

श्याम व गौर वर्णाचे दोन्ही भाऊ परम सुंदर होते. विश्वामित्रांना (त्यांच्या रूपाने) जणू मोठा निधी मिळाला होता. (ते विचार करू लागले,) प्रभू हे ब्राह्मणांचे भक्त आहेत, हे मला समजले. माझ्यासाठी भगवंतांनी आपल्या पित्यालाही सोडले.॥ २॥

**चले जात मुनि दीन्हि देखाई। सुनि ताड़का क्रोध करि धाई॥**
**एकहिं बान प्रान हरि लीन्हा। दीन जानि तेहि निज पद दीन्हा॥**

वाटेत जाताना मुनींनी ताडका दाखविली. शब्द ऐकताच ती रागाने धावून आली. श्रीरामांनी एकाच बाणात तिला ठार मारले व तिला शरणागत मानून निजपद (आपले दिव्य स्वरूप) दिले.॥ ३॥

**तब रिषि निज नाथहि जियँ चीन्ही। बिद्यानिधि कहुँ बिद्या दीन्ही॥**
**जाते लाग न छुधा पिपासा। अतुलित बल तनु तेज प्रकासा॥**

मग विश्वामित्र ऋषींनी प्रभूंना ते विद्येचे भांडार असल्याचे जाणूनही (लीला पूर्ण करण्यासाठी) अशी विद्या दिली की, ज्यामुळे त्यांना तहान-भूक लागणार नाही आणि त्यांच्या शरीरात अतुल बळ व तेज प्रकाशित होईल.॥ ४॥

**दो०—आयुध सर्ब समर्पि कै प्रभु निज आश्रम आनि।**
**कंद मूल फल भोजन दीन्ह भगति हित जानि॥ २०९॥**

सर्व शस्त्रास्त्रे प्रभूंना देऊन मुनी त्यांना आश्रमात घेऊन आले आणि त्यांना आपले हितकर्ते मानून भक्तिपूर्वक कंदमुळे आणि फळांचा आहार दिला. ॥ २०९ ॥

**प्रात कहा मुनि सन रघुराई। निर्भय जग्य करहु तुम्ह जाई॥**
**होम करन लागे मुनि झारी। आपु रहे मख कीं रखवारी॥**

प्रात:काळी श्रीरघुनाथांनी मुनींना म्हटले, 'तुम्ही निर्भयपणाने यज्ञ करा.'हे ऐकून सर्व मुनी हवन करू लागले. श्रीराम स्वत: यज्ञाचे रक्षण करण्यास उभे राहिले. ॥ १ ॥

**सुनि मारीच निसाचर क्रोही। लै सहाय धावा मुनिद्रोही॥**
**बिनु फर बान राम तेहि मारा। सत जोजन गा सागर पारा॥**

ही वार्ता समजताच मुनींचा शत्रू असलेला मारीच राक्षस चिडून आपल्या सोबत्यांना घेऊन धावून आला. श्रीरामांनी फाळ नसलेला बाण त्याला मारला, त्यासरशी तो शंभर योजने विस्तार असलेल्या समुद्रापलीकडे जाऊन पडला. ॥ २ ॥

**पावक सर सुबाहु पुनि मारा। अनुज निसाचर कटकु सँघारा॥**
**मारि असुर द्विज निर्भयकारी। अस्तुति करहिं देव मुनि झारी॥**

नंतर त्यांनी सुबाहूला अग्निबाण मारला. इकडे लक्ष्मणाने राक्षसांच्या सेनेचा संहार केला. अशा रीतीने श्रीरामांनी राक्षसांना मारून ब्राह्मणांना निर्भय केले. तेव्हा सर्व देव आणि मुनी त्यांची स्तुती करू लागले. ॥ ३ ॥

**तहँ पुनि कछुक दिवस रघुराया। रहे कीन्हि बिप्रन्ह पर दाया॥**
**भगति हेतु बहु कथा पुराना। कहे बिप्र जद्यपि प्रभु जाना॥**

श्रीरघुनाथांनी तेथे काही दिवस आणखी राहून ब्राह्मणांच्यावर कृपा केली. त्यांनी मोठ्या भक्ति–भावाने श्रीरामांना पुराणातील बऱ्याच कथा सांगितल्या. वास्तविक त्या सर्व श्रीरामांना माहीत होत्या. ॥ ४ ॥

**तब मुनि सादर कहा बुझाई। चरित एक प्रभु देखिअ जाई॥**
**धनुषजग्य सुनि रघुकुल नाथा। हरषि चले मुनिबर के साथा॥**

नंतर मुनींनी आदराने श्रीरामांना समजावून सांगितले की, 'हे प्रभो, माझ्याबरोबर येऊन एक कौतुक बघा.' रघुकुलाचे स्वामी श्रीरामचंद्र धनुष्ययज्ञाची वार्ता ऐकून मुनिश्रेष्ठ विश्वामित्रांच्याबरोबर आनंदाने निघाले. ॥ ५ ॥

**आश्रम एक दीख मग माहीं। खग मृग जीव जंतु तहँ नाहीं॥**
**पूछा मुनिहि सिला प्रभु देखी। सकल कथा मुनि कहा बिसेषी॥**

वाटेत एक आश्रम दिसला. तेथे पशु-पक्षी, इतकेच काय कोणताही प्राणी नव्हता. तेथे एक शिळा पाहून प्रभूंनी विचारले, तेव्हा मुनींनी सविस्तर गोष्ट सांगितली. ॥ ६ ॥

**दो०—गौतम नारि श्राप बस उपल देह धरि धीर।**
**चरन कमल रज चाहति कृपा करहु रघुबीर॥ २१०॥**

'गौतम मुनींची पत्नी अहल्या ही शापामुळे पाषाणाच्या रूपात राहून मोठ्या धैर्याने तुमच्या पदधूलीची कामना करीत आहे. हे रघुवीर, हिच्यावर कृपा करा.'॥ २१० ॥

**छं०—परसत पद पावन सोक नसावन प्रगट भई तपपुंज सही।**
**देखत रघुनायक जन सुखदायक सनमुख होइ कर जोरि रही॥**
**अति प्रेम अधीरा पुलक सरीरा मुख नहिं आवइ बचन कही।**
**अतिसय बड़भागी चरनन्हि लागी जुगल नयन जलधार बही॥ १॥**

श्रीरामांच्या पवित्र व शोकहारक चरणांचा स्पर्श होताच खरोखरच ती तपोमूर्ती अहल्या प्रकट झाली. भक्तांना सुख देणाऱ्या श्रीरामांना पाहताच ती उठून हात जोडून उभी राहिली. अत्यंत प्रभु-प्रेमामुळे ती अधीर झाली होती. तिचे शरीर पुलकित झाले. मुखातून शब्द फुटत नव्हता. अत्यंत भाग्यशालिनी अहल्येने प्रभूंच्या चरणांना कवटाळले. तिच्या दोन्ही नेत्रांतून (प्रेम व आनंदाच्या अश्रूंच्या) जल-धारा वाहू लागल्या. ॥ १ ॥

**धीरजु मन कीन्हा प्रभु कहुँ चीन्हा रघुपति कृपाँ भगति पाई।**
**अति निर्मल बानी अस्तुति ठानी ग्यानगम्य जय रघुराई॥**
**मैं नारि अपावन प्रभु जग पावन रावन रिपु जन सुखदाई।**
**राजीव बिलोचन भव भय मोचन पाहि पाहि सरनहिं आई॥ २॥**

नंतर तिने धीर धरून प्रभूंना ओळखले आणि श्रीरघुनाथांच्या कृपेने भक्ती प्राप्त केली. मग ती अत्यंत निर्मळ वाणीने त्यांची स्तुती करू लागली, 'हे ज्ञानाने जाणण्याजोगे असणाऱ्या श्रीरघुनाथा, तुमचा विजय असो. मी स्वभावतःच अपवित्र स्त्री आहे. आणि हे प्रभो, तुम्ही जगाला पवित्र करणारे, भक्तांना सुख देणारे आणि रावणाचे शत्रू आहात. हे कमलनयन, हे जन्म-मृत्यूच्या भयापासून मुक्त करणारे, मी तुम्हांला शरण आलेली आहे. माझे रक्षण करा, रक्षण करा. ॥ २ ॥

**मुनि श्राप जो दीन्हा अति भल कीन्हा परम अनुग्रह मैं माना।**
**देखेउँ भरि लोचन हरि भवमोचन इहइ लाभ संकर जाना॥**
**बिनती प्रभु मोरी मैं मति भोरी नाथ न मागउँ बर आना।**
**पद कमल परागा रस अनुरागा मम मन मधुप करै पाना॥ ३॥**

(गौतम) मुनींनी मला शाप दिला, ते चांगलेच झाले. मी त्यामुळे संसारातून मुक्त करणाऱ्या श्रीहरींना (तुम्हांला) डोळे भरून पाहू शकले, हा मी त्यांचा उपकारच मानते. या तुमच्या दर्शनास भगवान शंकर हे सर्वांत मोठा लाभ मानतात. हे प्रभो, मी भोळ्या बुद्धीची आहे. माझी एक विनंती आहे. हे नाथ, मी दुसरा कोणताही वर मागत नाही, माझा मनरूपी भ्रमर आपल्या चरणकमलरजाच्या प्रेमरूपी रसाचे सदा पान करीत राहो, एवढीच माझी इच्छा आहे. ॥ ३ ॥

**जेहिं पद सुरसरिता परम पुनीता प्रगट भई सिव सीस धरी।**
**सोई पद पंकज जेहि पूजत अज मम सिर धरेउ कृपाल हरी॥**
**एहि भाँति सिधारी गौतम नारी बार बार हरि चरन परी।**
**जो अति मन भावा सो बरु पावा गै पतिलोक अनंद भरी॥ ४॥**

ज्या चरणांतून परमपवित्र देवनदी गंगा प्रकट झाली, जिला शिवशंकरांनी आपल्या शिरावर धारण केले आणि ज्या चरणकमलांची पूजा ब्रह्मदेव करतात, तेच चरण हे कृपाळू श्रीहरी, तुम्ही माझ्या शिरावर ठेवले.' अशाप्रकारे ती स्तुती करीत वारंवार भगवंतांच्या चरणांवर लोटांगण घालीत होती. मनाला जो फार आवडत होता, तो वर मिळाल्याने गौतमपत्नी अहल्या आनंदाने पतिलोकी निघून गेली. ॥ ४ ॥

दो०—**अस प्रभु दीनबंधु हरि कारन रहित दयाल।**
**तुलसिदास सठ तेहि भजु छाड़ि कपट जंजाल॥ २११॥**

प्रभू श्रीराम हे असे दीनबंधू आणि अकारण दया करणारे आहेत. तुलसीदास म्हणतात, हे लबाड मना, तू कपट सोडून त्यांचेच भजन कर. ॥ २११ ॥

## मासपारायण, सातवा विश्राम

**चले राम लछिमन मुनि संगा। गए जहाँ जग पावनि गंगा॥**
**गाधिसूनु सब कथा सुनाई। जेहि प्रकार सुरसरि महि आई॥**

श्रीराम व लक्ष्मण (विश्वामित्र) मुनींच्या सोबत निघाले. ते जगाला पवित्र करणाऱ्या गंगेजवळ गेले. महाराज गाधीचे पुत्र विश्वामित्र यांनी देवनदी गंगा पृथ्वीवर कशी आली, याची संपूर्ण कथा सांगितली. ॥ १ ॥

**तब प्रभु रिषिन्ह समेत नहाए। बिबिध दान महिदेवन्हि पाए॥**
**हरषि चले मुनि बृंद सहाया। बेगि बिदेह नगर निअराया॥**

प्रभू श्रीरामांनी ऋषींच्यासह (गंगेमध्ये) स्नान केले. ब्राह्मणांना तऱ्हेतऱ्हेची दाने मिळाली. नंतर मुनिवृंदांसह ते आनंदाने निघाले आणि लवकरच जनकपुराजवळ पोहोचले. ॥ २ ॥

**पुर रम्यता राम जब देखी। हरषे अनुज समेत बिसेषी॥**
**बापीं कूप सरित सर नाना। सलिल सुधासम मनि सोपाना॥**

जनकपुरीची शोभा जेव्हा पाहिली, तेव्हा श्रीराम-लक्ष्मण आनंदित झाले. तेथे अनेक आड, विहिरी, नद्या व तलाव होते. त्यांमध्ये अमृतासमान मधुर जल भरले होते आणि त्यांना रत्नांच्या पायऱ्या होत्या. ॥ ३ ॥

**गुंजत मंजु मत्त रस भृंगा। कूजत कल बहुबरन बिहंगा॥**
**बरन बरन बिकसे बनजाता। त्रिबिध समीर सदा सुखदाता॥**

मकरंदाच्या रसाने धुंद होऊन भ्रमर मधुर गुंजारव करीत होते. रंगी-बेरंगी (पुष्कळ) पक्षी मधुर किलबिल करीत होते. नाना रंगांची कमळे उमललेली होती. नेहमी सर्व ऋतूंमध्ये सुख देणारा शीतल, मंद, सुगंधित वारा वाहात होता. ॥ ४ ॥

दो०—**सुमन बाटिका बाग बन बिपुल बिहंग निवास।**
**फूलत फलत सुपल्लवत सोहत पुर चहुँ पास॥ २१२॥**

पुष्पवाटिका, बागा आणि वने, यांमध्ये पुष्कळ पक्ष्यांचा निवास होता. फुलणाऱ्या-फळणाऱ्या आणि सुंदर पानांनी भरलेल्या बागा नगराच्या चोहीकडे शोभत होत्या. ॥ २१२ ॥

**बनइ न बरनत नगर निकाई। जहाँ जाइ मन तहँइँ लोभाई॥**
**चारु बजारु बिचित्र अँबारी। मनिमय बिधि जनु स्वकर सँवारी॥**

नगराच्या सौंदर्याचे वर्णन करणे कठीण. जिकडे मन जाई, तिकडे ते रमून जाई. सुंदर बाजार, रत्नजडित गच्च्या, जणू ब्रह्मदेवांनी स्वतःच्या हातांनी बनविल्या होत्या. ॥ १ ॥

**धनिक बनिक बर धनद समाना। बैठे सकल बस्तु लै नाना॥**
**चौहट सुंदर गलीं सुहाई। संतत रहहिं सुगंध सिंचाई॥**

कुबेरासारखे श्रेष्ठ धनवान व्यापारी सर्व प्रकारच्या अनेक वस्तू घेऊन (दुकानांतून) बसलेले असत. सुंदर चौक आणि सुशोभित गल्ल्या नित्य सुगंधाचे सडे घातलेल्या होत्या. ॥ २ ॥

**मंगलमय मंदिर सब केरें। चित्रित जनु रतिनाथ चितेरें॥**
**पुर नर नारि सुभग सुचि संता। धरमसील ग्यानी गुनवंता॥**

सर्वांची घरे मंगलमय असून त्यांच्यावर चित्रे रंगविलेली होती. जणू ती कामदेवरूपी चित्रकाराने चितारली होती. नगरातील सर्व स्त्री-पुरुष सुंदर, पवित्र, सरळ स्वभावाचे, धर्मात्मे, ज्ञानी व गुणवान होते. ॥ ३ ॥

**अति अनूप जहँ जनक निवासू। बिथकहिं बिबुध बिलोकि बिलासू॥**
**होत चकित चित कोट बिलोकी। सकल भुवन सोभा जनु रोकी॥**

तेथे जनक राजांचे अत्यंत अनुपमेय सुंदर निवासस्थान असून तेथील ऐश्वर्य पाहून देवसुद्धा थक्क होत. राजमहालाची तटबंदी पाहून चित्त चकित होत होते. (असे वाटे) जणू त्या तटाने सर्व लोकांची शोभा आपल्यात सामावून टाकली होती. ॥ ४ ॥

**दो०—धवल धाम मनि पुरट पट सुघटित नाना भाँति।**
**सिय निवास सुंदर सदन सोभा किमि कहि जाति॥ २१३ ॥**

देदीप्यमान महालांमध्ये अनेक प्रकारच्या सुंदर पद्धतीने बनविलेल्या रत्नजडित सोन्याच्या जरीचे पडदे लावलेले होते. सीतेच्या राहाण्याच्या सुंदर महालाच्या शोभेचे वर्णन तर काय करावे ? ॥ २१३ ॥

**सुभग द्वार सब कुलिस कपाटा । भूप भीर नट मागध भाटा॥**
**बनी बिसाल बाजि गज साला । हय गय रथ संकुल सब काला॥**

राजमहालाचे सर्व दरवाजे सुंदर होते. त्यांना चमकणाऱ्या हिऱ्यांची दारे बसवलेली होती. तेथे मांडलिक राजे, नट, मागध आणि भाट यांची गर्दी झालेली असे. घोडे आणि हत्ती यांच्यांसाठी मोठमोठ्या पागा व हत्तीखाने बनविलेले होते. ते नेहमी घोडे, हत्ती व रथांनी भरलेले असत. ॥ १ ॥

**सूर सचिव सेनप बहुतेरे । नृपगृह सरिस सदन सब केरे॥**
**पुर बाहेर सर सरित समीपा । उतरे जहँ तहँ बिपुल महीपा॥**

पुष्कळ वीर, मंत्री आणि सेनापती होते, त्या सर्वांची घरेसुद्धा राजमहालासारखीच होती. नगराबाहेर असलेल्या तलाव आणि नदीजवळ जिकडे-तिकडे पुष्कळसे राजे लोक उतरले होते. ॥ २ ॥

**देखि अनूप एक अँवराई । सब सुपास सब भाँति सुहाई॥**
**कौसिक कहेउ मोर मनु माना । इहाँ रहिअ रघुबीर सुजाना॥**

तेथील अनुपम सर्व प्रकारे शोभिवंत आमराई पाहून आणि तेथील सर्व सुखसोयी पाहून विश्वामित्र म्हणाले, 'हे प्रिय रघुवीरा, इथेच राहावे, असे मला वाटते. ॥ ३ ॥

**भलेहिं नाथ कहि कृपानिकेता । उतरे तहँ मुनिबृंद समेता॥**
**बिस्वामित्र महामुनि आए । समाचार मिथिलापति पाए॥**

कृपानिधान श्रीरामचंद्र म्हणाले की, 'मुनिवर्य! फारच छान.' असे म्हणून ते मुनींसह तेथेच राहिले. मिथिलापती जनकांना जेव्हा हे वर्तमान समजले की, महामुनी विश्वामित्र आले आहेत, ॥ ४ ॥

**दो०—संग सचिव सुचि भूरि भट भूसुर बर गुर ग्याति।**
**चले मिलन मुनिनायकहि मुदित राउ एहि भाँति॥ २१४ ॥**

तेव्हा पवित्र विचारांचे मंत्री, पुष्कळसे योद्धे, श्रेष्ठ ब्राह्मण, गुरू शतानंद आणि आपल्या जातीचे श्रेष्ठ लोक यांना बरोबर घेतले आणि मोठ्या आनंदाने राजा जनक हे मुनिश्रेष्ठ विश्वामित्रांना भेटण्यास निघाले. ॥ २१४ ॥

**कीन्ह प्रनामु चरन धरि माथा । दीन्हि असीस मुदित मुनिनाथा ॥**
**बिप्रबृंद सब सादर बंदे । जानि भाग्य बड़ राउ अनंदे ॥**

राजांनी मुनींच्या चरणी मस्तक ठेवून प्रणाम केला. मुनिश्रेष्ठ विश्वामित्रांनी प्रसन्न होऊन आशीर्वाद दिला. नंतर राजाने सर्व ब्राह्मण मंडळींना आदराने प्रणाम केला. हे आपले सद्भाग्य मानून राजा जनकांना आनंद वाटला. ॥ १ ॥

**कुसल प्रस्न कहि बारहिं बारा । बिस्वामित्र नृपहि बैठारा ॥**
**तेहि अवसर आए दोउ भाई । गए रहे देखन फुलवाई ॥**

वारंवार खुशाली विचारून विश्वामित्रांनी राजांना बसवून घेतले. त्याचवेळी राम-लक्ष्मण हे दोघे फुलबाग पाहून तेथे आले. ॥ २ ॥

**स्याम गौर मृदु बयस किसोरा । लोचन सुखद बिस्व चित चोरा ॥**
**उठे सकल जब रघुपति आए । बिस्वामित्र निकट बैठाए ॥**

सुकुमार किशोर वयाचे, श्याम व गौर वर्णाचे ते दोघे कुमार नेत्रांना सुख देणारे आणि संपूर्ण विश्वाचे चित्त आकर्षून घेणारे होते. जेव्हा श्रीरघुनाथ आले, तेव्हा सर्वजण त्यांचे रूप व तेज यांनी प्रभावित होऊन उठून उभे राहिले. विश्वामित्रांनी त्यांना आपल्याजवळ बसवून घेतले. ॥ ३ ॥

**भए सब सुखी देखि दोउ भ्राता । बारि बिलोचन पुलकित गाता ॥**
**मूरति मधुर मनोहर देखी । भयउ बिदेहु बिदेहु बिसेषी ॥**

दोघा भावांना पाहून सर्वांना आनंद झाला. सर्वांच्या डोळ्यांतून प्रेमाश्रू, आनंदाश्रू वाहू लागले. शरीरे रोमांचित झाली. श्रीरामांची मधुर मनोहर मूर्ती पाहून विदेही राजा जनक हेसुद्धा (वेगळ्या अर्थाने) विदेही (=देहभानरहित) झाले. ॥ ४ ॥

दो०—**प्रेम मगन मनु जानि नृपु करि बिबेकु धरि धीर।**
**बोलेउ मुनि पद नाइ सिरु गदगद गिरा गभीर॥ २१५ ॥**

मन प्रेमामध्ये मग्न झाल्याचे पाहून राजा जनकांनी विवेकाने स्वत:ला सावरले आणि मुनींच्या चरणी मस्तक ठेवून ते सद्गदित गंभीर वाणीने म्हणाले, ॥ २१५ ॥

**कहहु नाथ सुंदर दोउ बालक । मुनिकुल तिलक कि नृपकुलपालक ॥**
**ब्रह्म जो निगम नेति कहि गावा । उभय बेष धरि की सोइ आवा ॥**

‘हे नाथा, सांगा बरे, हे दोघे सुंदर बालक मुनिकुलाचे भूषण आहेत की कुणा राजवंशाचे

पालक आहेत? किंवा वेदांनी 'नेति' म्हणून ज्यांचे गुणगान केले आहे, ते ब्रह्मच या युगलरूपामध्ये आले आहे?॥ १ ॥

**सहज बिरागरूप मनु मोरा। थकित होत जिमि चंद चकोरा॥**
**ताते प्रभु पूछउँ सतिभाऊ। कहहु नाथ जनि करहु दुराऊ॥**

माझे मन स्वभावत:च वैराग्यशील आहे. तरीही यांना पाहून ते असे मुग्ध होत आहे की, ज्याप्रमाणे चंद्राला पाहून चकोर होतो. हे प्रभो, म्हणून मी तुम्हांला मनापासून विचारतो, हे नाथ, काहीही न लपविता सांगा.॥ २ ॥

**इन्हहि बिलोकत अति अनुरागा। बरबस ब्रह्मसुखहि मन त्यागा॥**
**कह मुनि बिहसि कहेहु नृप नीका। बचन तुम्हार न होइ अलीका॥**

यांना पाहाताच अत्यंत प्रेमवश होऊन माझ्या मनाने बळेच ब्रह्मसुखाचा त्याग केला आहे.' तेव्हा मुनी हसून म्हणाले, 'हे राजा, तुम्ही योग्यच बोललात. तुमचे वचन खोटे असू शकणार नाही.॥ ३ ॥

**ए प्रिय सबहि जहाँ लगि प्रानी। मन मुसुकाहिं रामु सुनि बानी॥**
**रघुकुल मनि दसरथ के जाए। मम हित लागि नरेस पठाए॥**

जगात जितके प्राणी आहेत, त्या सर्वांना हे प्रिय आहेत.' मुनींची ही रहस्यमय वाणी ऐकून श्रीरामांनी मनातल्या मनात स्मित केले. (जणू त्यांनी संकेत दिला की, हे रहस्य उघड करू नका.) (तेव्हा मुनी म्हणाले,) 'हे रघुकुलशिरोमणी महाराज दशरथांचे पुत्र आहेत. माझ्या कामासाठी राजाने यांना माझ्याबरोबर पाठविले आहे.॥ ४ ॥

**दो०—रामु लखनु दोउ बंधुबर रूप सील बल धाम।**
**मख राखेउ सबु साखि जगु जिते असुर संग्राम॥ २१६ ॥**

राम व लक्ष्मण नावाचे हे दोघे भाऊ रूप, शील आणि बल यांचे आगर आहेत. सर्व जगाला हे कळले आहे की, यांनीच युद्धामध्ये असुरांना जिंकून माझ्या यज्ञाचे रक्षण केले.'॥ २१६ ॥

**मुनि तव चरन देखि कह राऊ। कहि न सकउँ निज पुन्य प्रभाऊ॥**
**सुंदर स्याम गौर दोउ भ्राता। आनँदहू के आनँद दाता॥**

राजे म्हणाले, 'हे मुनिवर! तुमच्या चरणांचे दर्शन घडले, हा माझा केवढा पुण्य-प्रताप आहे, हे मी सांगू शकत नाही. हे सुंदर श्याम व गौर वर्णाचे दोघे बंधू आनंदालाही आनंद देणारे आहेत.॥ १ ॥

**इन्ह कै प्रीति परसपर पावनि। कहि न जाइ मन भाव सुहावनि॥**
**सुनहु नाथ कह मुदित बिदेहू। ब्रह्म जीव इव सहज सनेहू॥**

यांचे परस्पर-प्रेम अतिशय पवित्र व सुंदर आहे. मनाला ते खूप आवडते, परंतु बोलून

दाखविता येत नाही.' विदेह जनक आनंदाने म्हणाले, 'हे मुनिवर्य! ऐका. ब्रह्म व जीव यांच्यासारखे यांचे स्वाभाविक प्रेम आहे.'॥ २ ॥

**पुनि पुनि प्रभुहि चितव नरनाहू। पुलक गात उर अधिक उछाहू॥**
**मुनिहि प्रसंसि नाइ पद सीसू। चलेउ लवाइ नगर अवनीसू॥**

राजे वारंवार प्रभूंकडे पाहात होते. प्रेमामुळे त्यांचे शरीर पुलकित झाले होते आणि मनात उत्साह दाटला होता. मग मुनींची प्रशंसा करीत आणि त्यांच्या चरणी मस्तक ठेवून राजे त्यांना नगरामध्ये घेऊन गेले.॥ ३ ॥

**सुंदर सदनु सुखद सब काला। तहाँ बासु लै दीन्ह भुआला॥**
**करि पूजा सब बिधि सेवकाई। गयउ राउ गृह बिदा कराई॥**

सर्वकाळी (सर्व ऋतूंमध्ये) सुखदायक असणाऱ्या एका सुंदर महालात राजांनी त्यांना उतरविले. नंतर सर्व प्रकारे पूजा-सेवा करून राजांनी त्यांचा निरोप घेऊन ते आपल्या वाड्यात गेले.॥ ४ ॥

दो०—**रिषय संग रघुबंस मनि करि भोजनु बिश्रामु।**
**बैठे प्रभु भ्राता सहित दिवसु रहा भरि जामु॥ २१७॥**

रघुकुल-शिरोमणी प्रभू श्रीरामचंद्रांनी ऋषींच्या बरोबर भोजन केले, विश्रांती घेतली आणि ते लक्ष्मणासोबत बसले. त्यावेळी दिवस एक प्रहर उरला होता.॥ २१७ ॥

**लखन हृदयँ लालसा बिसेषी। जाइ जनकपुर आइअ देखी॥**
**प्रभु भय बहुरि मुनिहि सकुचाहीं। प्रगट न कहहिं मनहिं मुसुकाहीं॥**

जनकपूर पाहण्यास जावे, अशी लक्ष्मणाला प्रबळ इच्छा झाली. प्रभू श्रीरामांचे भय वाटत होते आणि मुनींच्यासमोर संकोच वाटत होता. म्हणून तो स्पष्टपणे बोलून न दाखविता तो मनातल्या मनात हसत होता.॥ १ ॥

**राम अनुज मन की गति जानी। भगत बछलता हियँ हुलसानी॥**
**परम बिनीत सकुचि मुसुकाई। बोले गुर अनुसासन पाई॥**

(अंतर्यामी) श्रीरामांनी धाकट्या भावाच्या मनातला विचार ओळखला. त्यांच्या मनात भक्तवत्सलता जागी झाली. त्यांनी गुरूंच्या आज्ञेने मोठ्या विनयपूर्वक पण काहीशा संकोचाने हसत म्हटले,॥ २ ॥

**नाथ लखनु पुरु देखन चहहीं। प्रभु सकोच डर प्रगट न कहहीं॥**
**जौं राउर आयसु मैं पावौं। नगर देखाइ तुरत लै आवौं॥**

'हे नाथ, लक्ष्मणाला नगर पाहायचे आहे. परंतु तुमच्या भीतीने व संकोचामुळे तो स्पष्टपणे बोलत नाही. जर तुमची आज्ञा असेल, तर मी त्याला नगर दाखवून लगेच घेऊन येतो.'॥ ३ ॥

**सुनि मुनीसु कह बचन सप्रीती । कस न राम तुम्ह राखहु नीती ॥**
**धरम सेतु पालक तुम्ह ताता । प्रेम बिबस सेवक सुखदाता ॥**

हे ऐकून मुनीश्वर विश्वामित्र प्रेमाने म्हणाले, 'हे राम, तुम्ही नीति-नियमांचे पालन करणार नाही, असे कसे होईल? तुम्ही धर्माचे पालन करणारे आणि प्रेमवश होऊन सेवकांना सुख देणारे आहात. ॥ ४ ॥

दो०—**जाइ देखि आवहु नगरु सुख निधान दोउ भाइ।**
**करहु सुफल सब के नयन सुंदर बदन देखाइ॥ २१८ ॥**

सुखनिधान तुम्ही दोन्ही बंधू नगर पाहून या. आपले सुंदर मुख-दर्शन देऊन सर्व नगरवासीयांचे नेत्र धन्य करा. ॥ २१८ ॥

**मुनि पद कमल बंदि दोउ भ्राता । चले लोक लोचन सुख दाता ॥**
**बालक बृंद देखि अति सोभा । लगे संग लोचन मनु लोभा ॥**

सर्व लोकांच्या नेत्रांना सुखावणारे दोन्ही भाऊ मुनींच्या चरण-कमलांना वंदन करून निघाले. (वाटेत) लहान मुलांच्या झुंडी त्यांचे अनुपम सौंदर्य पाहून त्यांच्या मागून निघाले. त्यांचे नेत्र आणि मन (त्यांना पाहून) मोहून गेले होते. ॥ १ ॥

**पीत बसन परिकर कटि भाथा । चारु चाप सर सोहत हाथा ॥**
**तन अनुहरत सुचंदन खोरी । स्यामल गौर मनोहर जोरी ॥**

(दोघा भावांनी) पीतांबर परिधान केले होते. कमरेच्या दुपट्ट्याला भाते बांधले होते. हातांमध्ये सुंदर धनुष्य-बाण शोभत होते. (श्याम व गौर वर्णांच्या) शरीरांना शोभेल अशी सुंदर चंदनाची उटी लावली होती. सावळ्या व गोऱ्या रंगाची ती सुंदर जोडी होती. ॥ २ ॥

**केहरि कंधर बाहु बिसाला । उर अति रुचिर नागमनि माला ॥**
**सुभग सोन सरसीरुह लोचन । बदन मयंक तापत्रय मोचन ॥**

त्यांची सिंहासारखी पुष्ट मान व विशाल बाहू होते. विशाल छातीवर अत्यंत सुंदर मोत्यांच्या माळा होत्या. त्यांचे सुंदर लाल कमळांसारखे नेत्र होते. त्रिविध तापांपासून मुक्त करणारे चंद्रासारखे मुख होते. ॥ ३ ॥

**कानन्हि कनक फूल छबि देहीं । चितवत चितहि चोरि जनु लेहीं ॥**
**चितवनि चारु भृकुटि बर बाँकी । तिलक रेख सोभा जनु चाँकी ॥**

कानांमध्ये सोन्याची कर्णफुले फार शोभून दिसत होती. आणि पाहता क्षणीच (पाहणाऱ्यांचे) चित्त ते जणू चोरून घेत होती. त्यांची नजर फार मनोहर आणि भुवया सुंदर कमानदार होत्या. त्यांच्या कपाळावरील तिलक इतका सुंदर होता की, जणू त्या शोभेवर उमटवलेली मोहर. ॥ ४ ॥

दो०—**रुचिर चौतनीं सुभग सिर मेचक कुंचित केस।**
**नख सिख सुंदर बंधु दोउ सोभा सकल सुदेस॥ २१९॥**

मस्तकावर सुंदर चौकोनी टोप्या होत्या. केस काळे व कुरळे होते. दोन्ही भाऊ नखशिखांत सुंदर होते आणि संपूर्ण शोभा जेथे जशी हवी तशी होती. ॥ २१९ ॥

**देखन नगरु भूपसुत आए। समाचार पुरबासिन्ह पाए॥**
**धाए धाम काम सब त्यागी। मनहुँ रंक निधि लूटन लागी॥**

नगर पाहण्यासाठी दोघे राजकुमार आले आहेत, हे वर्तमान समजताच नगरवासी घरदार व सर्व कामधाम सोडून असे धावले की, जसे दरिद्री लोक खजिना लुटण्यासाठी धावत सुटतात. ॥ १ ॥

**निरखि सहज सुंदर दोउ भाई। होहिं सुखी लोचन फल पाई॥**
**जुबतीं भवन झरोखन्हि लागीं। निरखहिं राम रूप अनुरागीं॥**

स्वभावतःच सुंदर असलेल्या दोन्ही भावांना पाहून नगरवासी लोक नेत्रांचे पारणे फिटल्याचे वाटून सुखावले. तरुण स्त्रिया घराच्या खिडक्यांना डोळे लावून प्रेमाने श्रीरामचंद्रांचे रूप न्याहाळत होत्या. ॥ २ ॥

**कहहिं परसपर बचन सप्रीती। सखि इन्ह कोटि काम छबि जीती॥**
**सुर नर असुर नाग मुनि माहीं। सोभा असि कहुँ सुनिअति नाहीं॥**

त्या आपसात मोठ्या प्रेमाने बोलत होत्या की, ‘हे सखी, यांनी तर कोट्यवधी मदनांचे सौंदर्य लुटून घेतले आहे. देव, मनुष्य, असुर, नाग आणि मुनी यांच्यामध्येही असे सौंदर्य कुणाचे असल्याचे ऐकिवात नाही. ॥ ३ ॥

**बिष्नु चारि भुज बिधि मुख चारी। बिकट बेष मुख पंच पुरारी॥**
**अपर देउ अस कोउ न आही। यह छबि सखी पटतरिअ जाही॥**

भगवान विष्णूंना चार बाहू आहेत, ब्रह्मदेवांना चार मुखे आहेत, शिवांचा भयानक वेष आहे आणि त्यांना पाच मुखे आहेत. हे सखी, किंबहुना या रूपाला उपमा देण्यासाठी कोणताच देव नाही. ॥ ४ ॥

दो०—**बय किसोर सुषमा सदन स्याम गौर सुख धाम।**
**अंग अंग पर वारिअहिं कोटि कोटि सत काम॥ २२०॥**

या किशोर अवस्थेमध्ये, हे सौंदर्याचे माहेर असलेले, सावळ्या व गोऱ्या रंगाचे किशोर हे सुखाचे निधान आहेत. यांच्या एकेका अवयवावरून शतकोटी मदनांना ओवाळून टाकावे. ॥ २२० ॥

**कहहु सखी अस को तनुधारी। जो न मोह यह रूप निहारी॥**
**कोउ सप्रेम बोली मृदु बानी। जो मैं सुना सो सुनहु सयानी॥**

हे सखी, सांग बरे, असा कोणता देहधारी आहे की, जो हे रूप पाहून मोहून जाणार नाही?' तेव्हा दुसरी एक सखी प्रेमाने व कोमल शब्दांनी म्हणाली, 'अग शहाणे, मी जे ऐकले आहे ते ऐक. ॥ १ ॥

**ए दोऊ दसरथ के ढोटा। बाल मरालन्हि के कल जोटा॥**
**मुनि कौसिक मख के रखवारे। जिन्ह रन अजिर निसाचर मारे॥**

हे दोन्ही राजकुमार महाराज दशरथांचे पुत्र आहेत. ही बाल राजहंसांची सुंदर जोडी आहे. या दोघांनी विश्वामित्रांच्या यज्ञाचे रक्षण केले आहे. यांनी युद्धक्षेत्रामध्ये राक्षसांना मारले आहे. ॥ २ ॥

**स्याम गात कल कंज बिलोचन। जो मारीच सुभुज मदु मोचन॥**
**कौसल्या सुत सो सुख खानी। नामु रामु धनु सायक पानी॥**

ज्यांचे अंग सावळे असून सुंदर कमलांसारखे नेत्र आहेत, जे मारीच व सुबाहू यांचा मद उतरून टाकणारे आहेत आणि सौंदर्याची खाण आहेत, ज्यांनी हातांमध्ये धनुष्य-बाण धारण केलेले आहेत, ते हे कौसल्येचे पुत्र होत. त्यांचे नाव राम आहे. ॥ ३ ॥

**गौर किसोर बेषु बर काछें। कर सर चाप राम के पाछें॥**
**लछिमनु नामु राम लघु भ्राता। सुनु सखि तासु सुमित्रा माता॥**

ज्यांचा रंग गोरा असून किशोर अवस्था आहे, ज्यांनी सुंदर वेश धारण केला आहे. आणि हाती धनुष्य-बाण घेऊन जे श्रीरामांच्या मागे-मागे चालत आहेत, ते रामांचे धाकटे भाऊ आहेत. त्यांचे नाव लक्ष्मण. हे सखी, त्यांची माता सुमित्रा आहे. ॥ ४ ॥

दो०—**बिप्रकाजु करि बंधु दोउ मग मुनिबधू उधारि।**
**आए देखन चापमख सुनि हरषीं सब नारि॥ २२१॥**

हे दोघे बंधू ऋषी विश्वामित्रांचे कार्य पूर्ण करून आणि वाटेमध्ये मुनी गौतमांची पत्नी अहल्या हिचा उद्धार करून येथे धनुष्य-यज्ञ पाहण्यासाठी आलेले आहेत.' हे ऐकून सर्व स्त्रियांना आनंद झाला. ॥ २२१ ॥

**देखि राम छबि कोउ एक कहई। जोगु जानकिहि यह बरु अहई॥**
**जौं सखि इन्हहि देख नरनाहू। पन परिहरि हठि करइ बिबाहू॥**

श्रीरामांचे रूप पाहून कुणी तरी आपल्या सखीला म्हणाली की, 'हा जानकीसाठी योग्य आहे. हे सखी, जर राजांनी यांना पाहिले, तर ते आपली (धनुष्ययज्ञाची) प्रतिज्ञा सोडून आग्रहाने यांच्याशीच जानकीचे लग्न लावून टाकतील.' ॥ १ ॥

**कोउ कह ए भूपति पहिचाने। मुनि समेत सादर सनमाने॥**
**सखि परंतु पनु राउ न तजई। बिधि बस हठि अबिबेकहि भजई॥**

कुणी म्हणाली की, 'राजांनी यांना ओळखले आहे आणि मुनींच्या सोबतच यांचा आदराने सन्मान केलेला आहे. परंतु हे सखी, राजे आपला पण सोडून देणार नाहीत. ते नशिबावर भरवसा ठेवून हट्टाने हा अविवेक करीत आहेत.' (आपल्या पणावर दृढ राहण्याचा मूर्खपणा सोडणार नाहीत.) ॥ २ ॥

**कोउ कह जौं भल अहइ बिधाता । सब कहँ सुनिअ उचित फलदाता ॥**
**तौ जानकिहि मिलिहि बरु एहू । नाहिन आलि इहाँ संदेहू ॥**

कोणी म्हणत होती की, 'जर विधाता न्यायी आहे आणि तो सर्वांना उचित फळ देतो, असे म्हणतात. हे सत्य असेल, तर जानकीला हाच वर लाभेल. हे सखी, यात शंका नाही. ॥ ३ ॥

**जौं बिधि बस अस बनै सँजोगू । तौ कृतकृत्य होइ सब लोगू ॥**
**सखि हमरें आरति अति तातें । कबहुँक ए आवहिं एहि नातें ॥**

जर दैवयोगाने हे जुळून आले, तर आम्ही सर्व कृतार्थ होऊन जाऊ. हे सखी, या नात्याने (जानकीपती म्हणून) हे कधी येथे येतील, (आणि आम्हांला यांचे दर्शन होईल), म्हणून मला फार आतुरता लागून राहिली आहे. ॥ ४ ॥

दो०—**नाहिं त हम कहुँ सुनहु सखि इन्ह कर दरसनु दूरि।**
**यह संघटु तब होइ जब पुन्य पुराकृत भूरि ॥ २२२ ॥**

(हा विवाह झाला नाही तर) हे सखी, आम्हांला यांचे दुर्लभ दर्शन होणार नाही. आपल्या पूर्वजन्मीचे पुण्य थोर असेल तरच हा योग घडून येईल.' ॥ २२२ ॥

**बोली अपर कहेहु सखि नीका । एहिं बिआह अति हित सबही का ॥**
**कोउ कह संकर चाप कठोरा । ए स्यामल मृदु गात किसोरा ॥**

दुसरी सखी म्हणाली, 'हे सखी, तू फार छान बोललीस. हा विवाह होण्यात सर्वांचेच मोठे कल्याण आहे.' कुणी म्हणाली, 'भगवान शंकरांचे धनुष्य मोठे अवजड आहे आणि हे सावळे राजकुमार सुकुमार बालक आहेत. ॥ १ ॥

**सबु असमंजस अहइ सयानी । यह सुनि अपर कहइ मृदु बानी ॥**
**सखि इन्ह कहँ कोउ कोउ अस कहहीं । बड़ प्रभाउ देखत लघु अहहीं ॥**

ए शहाणे! येथेच सर्व घोळ आहे.' हे ऐकून दुसरी सखी कोमलपणे म्हणाली की, 'हे सखी, यांच्याविषयी काहीजण म्हणतात की, हे जरी दिसायला लहान वाटले, तरी यांचा प्रभाव फार मोठा आहे. ॥ २ ॥

**परसि जासु पद पंकज धूरी । तरी अहल्या कृत अघ भूरी ॥**
**सो कि रहिहि बिनु सिवधनु तोरें । यह प्रतीति परिहरिअ न भोरें ॥**

ज्यांच्या चरणकमलांच्या धुळीच्या स्पर्शामुळे मोठे पाप घडलेली अहल्या तरून गेली, ते शिव-धनुष्य तोडल्याविना राहतील काय? हा विश्वास चुकूनही सोडता कामा नये. ॥ ३ ॥

**जेहिं बिरंचि रचि सीय सँवारी। तेहिं स्यामल बरु रचेउ बिचारी॥**
**तासु बचन सुनि सब हरषानीं। ऐसेइ होउ कहहिं मृदु बानीं॥**

ज्या विधात्याने मोठ्या चातुर्याने कौशल्यपूर्वक सीतेला निर्माण केले, त्यानेच विचारपूर्वक हा सावळा वरही निर्माण केला आहे.' तिचे हे बोल ऐकून सर्वजणींना आनंद झाला आणि कोमल शब्दात त्या म्हणू लागल्या की, 'असेच घडो.'॥ ४॥

दो०—**हियँ हरषहिं बरषहिं सुमन सुमुखि सुलोचनि बृंद।**
**जाहिं जहाँ जहँ बंधु दोउ तहँ तहँ परमानंद॥ २२३॥**

त्या सुंदर, कमलनेत्र स्त्रियांचे समुदाय मनातून आनंदित होऊन फुलांचा वर्षाव करू लागले. दोघे भाऊ जिथे जिथे जात होते, तिथे तिथे मोठा आनंद पसरत होता.॥ २२३॥

**पुर पूरब दिसि गे दोउ भाई। जहँ धनुमख हित भूमि बनाई॥**
**अति बिस्तार चारु गच ढारी। बिमल बेदिका रुचिर सँवारी॥**

दोघे भाऊ नगराच्या पूर्वेला गेले. तिथे धनुष्य-यज्ञासाठी रंगभूमी बनविली होती. विस्तृत असे बनविलेले पक्के अंगण होते. त्यावर सुंदर व स्वच्छ असा चबुतरा सजविलेला होता.॥ १॥

**चहुँ दिसि कंचन मंच बिसाला। रचे जहाँ बैठहिं महिपाला॥**
**तेहि पाछें समीप चहुँ पासा। अपर मंच मंडली बिलासा॥**

चोहीकडे सोन्याचे मोठमोठे चबुतरे राजांना बसण्यासाठी उभारलेले होते. त्यांच्या मागे जवळच चारी बाजूंना दुसऱ्या सज्जांचा गोलाकार वेढा शोभत होता.॥ २॥

**कछुक ऊँचि सब भाँति सुहाई। बैठहिं नगर लोग जहँ जाई॥**
**तिन्ह के निकट बिसाल सुहाए। धवल धाम बहुबरन बनाए॥**

तो काहीसा उंच होता आणि सर्व तऱ्हेने सुंदर होता. तेथे नगरातील लोक बसणार होते. त्यांच्याजवळच विशाल व सुंदर अशी बसण्याची ठिकाणे अनेक रंगांनी रंगविलेली होती.॥ ३॥

**जहँ बैठें देखहिं सब नारी। जथाजोगु निज कुल अनुहारी॥**
**पुर बालक कहि कहि मृदु बचना। सादर प्रभुहि देखावहिं रचना॥**

तेथे आपल्या कुलाच्या योग्यतेप्रमाणे सर्व स्त्रिया यथायोग्य रीतीने बसून पाहू शकणार होत्या. नगरातील मुले गोड गोड बोलून मोठ्या आदराने प्रभू रामचंद्रांना यज्ञशालेची रचना दाखवीत होती.॥ ४॥

दो०—**सब सिसु एहि मिस प्रेमबस परसि मनोहर गात।**
**तन पुलकहिं अति हरषु हियँ देखि देखि दोउ भ्रात॥ २२४॥**

सर्व मुले या निमित्ताने मोठ्या प्रेमाने श्रीरामांच्या अंगाला स्पर्श करून रोमांचित होत होती आणि दोन्ही भावांना पाहून त्यांच्या मनाला मोठा आनंद होत होता. ॥ २२४ ॥

**सिसु सब राम प्रेमबस जाने। प्रीति समेत निकेत बखाने॥**
**निज निज रुचि सब लेहिं बोलाई। सहित सनेह जाहिं दोउ भाई॥**

श्रीरामचंद्रांनी सर्व मुलांचे ते प्रेम पाहून (यज्ञभूमीच्या) स्थानांची मनापासून प्रशंसा केली. (त्यामुळे बालकांचा उत्साह, आनंद आणि प्रेम आणखी वाढले.) ते सर्वजण आपापल्या आवडीप्रमाणे त्यांना बोलवीत होते आणि प्रत्येकाच्या बोलावण्यावर दोघे भाऊ मोठ्या प्रेमाने त्यांच्याकडे जात होते. ॥ १ ॥

**राम देखावहिं अनुजहि रचना। कहि मृदु मधुर मनोहर बचना॥**
**लव निमेष महुँ भुवन निकाया। रचइ जासु अनुसासन माया॥**

कोमल, मधुर व मनोहर शब्दांनी श्रीराम आपला धाकटा भाऊ लक्ष्मण यास यज्ञशालेची रचना दाखवीत होते. ज्यांच्या आज्ञेने माया ही एका निमिषामध्ये ब्रह्मांडांचे समूह निर्माण करते. ॥ २ ॥

**भगति हेतु सोइ दीनदयाला। चितवत चकित धनुष मखसाला॥**
**कौतुक देखि चले गुरु पाहीं। जानि बिलंबु त्रास मन माहीं॥**

ते दीनांवर दया करणारे श्रीराम भक्तीमुळे धनुष्ययज्ञशाला चकित होऊन पाहात होते. अशा प्रकारे कौतुकास्पद रचना पाहून ते गुरूंजवळ परत आले. उशीर झाल्याचे वाटून त्यांच्या मनात काहीशी भीती होती. ॥ ३ ॥

**जासु त्रास डर कहुँ डर होई। भजन प्रभाउ देखावत सोई॥**
**कहि बातें मृदु मधुर सुहाईं। किए बिदा बालक बरिआईं॥**

ज्यांच्या भयामुळे भीतीलाही भय वाटते, तेच प्रभू भजनाचा प्रभाव दाखवीत होते. त्यांनी कोमल, मधुर आणि सुंदर गोष्टी सांगून मुलांना आग्रहाने निरोप दिला. ॥ ४ ॥

दो०—**सभय सप्रेम बिनीत अति सकुच सहित दोउ भाइ।**
**गुर पद पंकज नाइ सिर बैठे आयसु पाइ॥ २२५॥**

नंतर भय, प्रेम, विनय आणि मोठ्या संकोचाने दोन्ही भावांनी गुरूंच्या चरण-कमलांवर मस्तक ठेवून, त्यांच्या आज्ञेने ते बसले. ॥ २२५ ॥

**निसि प्रबेस मुनि आयसु दीन्हा। सबहीं संध्याबंदनु कीन्हा॥**
**कहत कथा इतिहास पुरानी। रुचिर रजनि जुग जाम सिरानी॥**

संध्याकाळ होताच मुनींनी आज्ञा केली, तेव्हा सर्वांनी संध्या-वंदन केले. नंतर प्राचीन कथा आणि इतिहास सांगता-सांगता सुंदर रात्रीचे दोन प्रहर निघून गेले. ॥ १ ॥

**मुनिबर सयन कीन्हि तब जाई। लगे चरन चापन दोउ भाई॥**
**जिन्ह के चरन सरोरुह लागी। करत बिबिध जप जोग बिरागी॥**

तेव्हा मुनिवर्य झोपण्यास गेले. दोन्ही भाऊ त्यांचे पाय चेपू लागले. ज्यांच्या चरण-कमलांच्या (दर्शनासाठी व स्पर्शासाठी) वैराग्यशील पुरुषसुद्धा तऱ्हेतऱ्हेचे जप व योगसाधना करतात, ॥ २ ॥

**तेइ दोउ बंधु प्रेम जनु जीते। गुर पद कमल पलोटत प्रीते॥**
**बार बार मुनि अग्या दीन्ही। रघुबर जाइ सयन तब कीन्ही॥**

तेच दोन्ही बंधू जणू प्रेमाने जिंकले गेल्यामुळे प्रेमपूर्वक गुरुजींची चरण-कमले चेपीत होते. मुनींनी जेव्हा वारंवार सांगितले, तेव्हा श्रीरघुनाथ जाऊन झोपले. ॥ ३ ॥

**चापत चरन लखनु उर लाएँ। सभय सप्रेम परम सचु पाएँ॥**
**पुनि पुनि प्रभु कह सोवहु ताता। पौढ़े धरि उर पद जलजाता॥**

श्रीरामांचे चरण हृदयी धरून भय व प्रेमाने परम सुखाचा अनुभव घेत लक्ष्मण श्रीरामांचे चरण चेपू लागले. प्रभू रामचंद्र वारंवार म्हणत होते की, 'बाबा रे, आता तू झोप.' तेव्हा लक्ष्मण त्यांचे चरणकमल हृदयी धरून पहुडला. ॥ ४ ॥

दो०—**उठे लखनु निसि बिगत सुनि अरुनसिखा धुनि कान।**
**गुर तें पहिलेहिं जगतपति जागे रामु सुजान॥ २२६॥**

पहाटे कोंबड्याचे आरवणे ऐकून लक्ष्मण उठला. जगताचे स्वामी श्रीरामचंद्रही गुरूंच्या पूर्वी उठले. ॥ २२६ ॥

**सकल सौच करि जाइ नहाए। नित्य निबाहि मुनिहि सिर नाए॥**
**समय जानि गुर आयसु पाई। लेन प्रसून चले दोउ भाई॥**

प्रातर्विधी झाल्यावर त्यांनी जाऊन स्नान केले. नंतर (संध्या-अग्निहोत्रादी) नित्यकर्म आटोपल्यावर त्यांनी मुनींच्या चरणी मस्तक ठेवले. पूजेची वेळ झाल्याचे पाहून गुरूंच्या आज्ञेने दोघे बंधू फुले आणण्यासाठी निघाले. ॥ १ ॥

**भूप बागु बर देखेउ जाई। जहँ बसंत रितु रही लोभाई॥**
**लागे बिटप मनोहर नाना। बरन बरन बर बेलि बिताना॥**

त्यांनी जाऊन राजा जनकांची बाग पाहिली. तेथे वसंत-ऋतू लुब्ध होऊन राहिला होता. मनाला मोहित करणारे अनेक वृक्ष तेथे होते. रंगी-बेरंगी सुंदर वेलींचे मंडप पसरलेले होते. ॥ २ ॥

**नव पल्लव फल सुमन सुहाए। निज संपति सुर रूख लजाए॥**
**चातक कोकिल कीर चकोरा। कूजत बिहग नटत कल मोरा॥**

नवपल्लव, फळे आणि फुले यांनी भरलेले सुंदर वृक्ष आपल्या या ऐश्वर्यामुळे कल्पवृक्षालाही लाजवत होते. चातक, कोकिळा, पोपट, चकोर इत्यादी पक्षी मधुर कूजन करीत होते आणि मोर सुंदर नृत्य करीत होते. ॥ ३ ॥

**मध्य बाग सरु सोह सुहावा। मनि सोपान बिचित्र बनावा॥**
**बिमल सलिलु सरसिज बहुरंगा। जलखग कूजत गुंजत भृंगा॥**

बागेच्या मधोमध सुंदर सरोवर शोभत होते. त्याला रत्नजडित पायऱ्या विलक्षण पद्धतीने बनविलेल्या होत्या. त्याचे जल निर्मल होते, त्यामध्ये अनेक रंगांची कमळे फुललेली होती. जलपक्षी कलरव करीत होते आणि भ्रमर गुंजारव करीत होते. ॥ ४ ॥

दो०—**बागु तड़ागु बिलोकि प्रभु हरषे बंधु समेत।**
**परम रम्य आरामु यहु जो रामहि सुख देत॥ २२७॥**

बाग व सरोवर पाहून प्रभू श्रीराम व लक्ष्मण दोघे आनंदित झाले. ती बाग खरोखरच अत्यंत रमणीय होती. कारण (जगाला सुख देणाऱ्या) श्रीरामचंद्रांनाही तिने सुख दिले. ॥ २२७ ॥

**चहुँ दिसि चितइ पूँछि मालीगन। लगे लेन दल फूल मुदित मन॥**
**तेहि अवसर सीता तहँ आई। गिरिजा पूजन जननि पठाई॥**

चोहीकडे नजर टाकून व माळ्यांना विचारून ते प्रसन्न चित्ताने पाने-फुले तोडू लागले. त्याचवेळी मातेने गिरिजेची पूजा करण्यासाठी सीतेला पाठविले होते. ती तेथे आली. ॥ १ ॥

**संग सखीं सब सुभग सयानीं। गावहिं गीत मनोहर बानीं॥**
**सर समीप गिरिजा गृह सोहा। बरनि न जाइ देखि मनु मोहा॥**

तिच्या सोबत सुंदर व चतुर सख्या होत्या. त्या मधुर वाणीने गीत गात होत्या. सरोवराजवळ गिरिजेचे मंदिर शोभून दिसत होते. त्याच्या सौंदर्याचे वर्णन करणेच कठीण. ते पाहून मन मोहून जात होते. ॥ २ ॥

**मज्जनु करि सर सखिन्ह समेता। गई मुदित मन गौरि निकेता॥**
**पूजा कीन्हि अधिक अनुरागा। निज अनुरूप सुभग बरु मागा॥**

सख्यांसह सरोवरात स्नान करून सीता प्रसन्नतेने गिरिजा-मंदिरात गेली. तिने मोठ्या प्रेमाने पूजा केली आणि आपल्याला योग्य असा सुंदर वर मिळावा, म्हणून प्रार्थना केली. ॥ ३ ॥

**एक सखी सिय संगु बिहाई। गई रही देखन फुलवाई॥**
**तेहिं दोउ बंधु बिलोके जाई। प्रेम बिबस सीता पहिं आई॥**

एक सखी सीतेला तेथे सोडून बाग पाहायला गेली. तिने त्या दोघा भावांना पाहिले व प्रेम-विव्हळ होऊन ती सीतेजवळ आली.॥ ४॥

दो०—**तासु दसा देखी सखिन्ह पुलक गात जलु नैन।**
**कहु कारनु निज हरष कर पूछहिं सब मृदु बैन॥ २२८॥**

सख्यांनी तिची दशा पाहिली. तिचे शरीर पुलकित झाले होते आणि नेत्र सजल झालेले होते. सर्वजणी कोमल स्वरांनी विचारू लागल्या की, 'तुझ्या आनंदाचे कारण काय बरे!'॥ २२८॥

**देखन बागु कुअँर दुइ आए। बय किसोर सब भाँति सुहाए॥**
**स्याम गौर किमि कहौं बखानी। गिरा अनयन नयन बिनु बानी॥**

(ती म्हणाली,) 'दोन राजकुमार बाग पाहण्यास आले आहेत. ते किशोर वयाचे असून फार सुंदर आहेत. ते सावळ्या व गोऱ्या रंगाचे आहेत. मी त्यांचे सौंदर्य कसे वर्णन करू? (कारण) वाणीला नेत्र नाहीत आणि नेत्रांना वाणी नाही.'॥ १॥

**सुनि हरषीं सब सखीं सयानी। सिय हियँ अति उतकंठा जानी॥**
**एक कहइ नृपसुत तेइ आली। सुने जे मुनि सँग आए काली॥**

हे ऐकून आणि सीतेच्या मनातही उत्कंठा दाटलेली पाहून त्या सर्व चतुर सख्याही आनंदून गेल्या. तेव्हा एक सखी म्हणाली, 'हे सखी, काल विश्वामित्र मुनींच्याबरोबर आले आहेत, असे ऐकले होते, तेच हे राजकुमार असावेत.॥ २॥

**जिन्ह निज रूप मोहनी डारी। कीन्हे स्वबस नगर नर नारी॥**
**बरनत छबि जहँ तहँ सब लोगू। अवसि देखिअहिं देखन जोगू॥**

त्यांनी आपल्या रूपाच्या मोहिनीने नगरातील स्त्री-पुरुषांना वश केले आहे. जिकडे-तिकडे सर्व लोक त्यांच्याच सौंदर्याचे वर्णन करीत आहेत. ते पाहण्याजोगे आहेत. त्यांना जरूर पाहिले पाहिजे.'॥ ३॥

**तासु बचन अति सियहि सोहाने। दरस लागि लोचन अकुलाने॥**
**चली अग्र करि प्रिय सखि सोई। प्रीति पुरातन लखइ न कोई॥**

सखीचे हे बोल सीतेला फार आवडले आणि त्यांच्या दर्शनासाठी तिचे नेत्र आसुसले. त्या प्रिय सखीला पुढे करून सीता निघाली. शाश्वत प्रेम कोणी पाहू शकत नाही.॥ ४॥

**दो०—सुमिरि सीय नारद बचन उपजी प्रीति पुनीत।**
**चकित बिलोकति सकल दिसि जनु सिसु मृगी सभीत॥ २२९॥**

नारदांचे वचन आठवून सीतेच्या मनात पवित्र प्रेम उपजले. ती चकित होऊन सगळीकडे पाहू लागली. जणू बावरलेली हरिणी इकडे-तिकडे पाहात असावी.॥ २२९॥

**कंकन किंकिनि नूपुर धुनि सुनि। कहत लखन सन रामु हृदयँ गुनि॥**
**मानहुँ मदन दुंदुभी दीन्ही। मनसा बिस्व बिजय कहँ कीन्ही॥**

कंकणे, मेखलांच्या घागऱ्या आणि नूपुरे यांचा ध्वनी कानी येताच श्रीरामचंद्रांच्या मनात विचार येऊन, त्यांनी लक्ष्मणाला म्हटले, (हा ध्वनी असा येत आहे की,) 'जणू कामदेवाने विश्व जिंकण्याचा संकल्प करून दुंदुभी वाजविल्या आहेत.'॥ १॥

**अस कहि फिरि चितए तेहि ओरा। सिय मुख ससि भए नयन चकोरा॥**
**भए बिलोचन चारु अचंचल। मनहुँ सकुचि निमि तजे दिगंचल॥**

असे म्हणून श्रीरामांनी वळून तिकडे पाहिले. सीतेचा मुख-चंद्र पाहण्यासाठी त्यांचे नेत्र चकोर बनले. त्यांचे सुंदर नेत्र स्थिरावले. (एकटक पाहू लागले.) जणू (जनकांचे पूर्वज) निमी राजाने संकोचाने (निमी हे सर्वांच्या पापण्यावर निवास करतात, असे मानले जाते. त्यांनी आपली कन्या व जावई यांचा मिलन-प्रसंग पाहणे उचित वाटले नाही, म्हणून) पापण्यांचा त्याग केला असावा. (त्यांनी पापण्यांवर राहणे सोडल्यामुळे पापण्या मिटणे थांबले.)॥ २॥

**देखि सीय सोभा सुखु पावा। हृदयँ सराहत बचनु न आवा॥**
**जनु बिरंचि सब निज निपुनाई। बिरचि बिस्व कहँ प्रगटि देखाई॥**

सीतेचे सौंदर्य पाहून श्रीराम फार आनंदित झाले. मनात त्यांनी तिच्या सौंदर्याची प्रशंसा केली. परंतु मुखातून शब्द फुटला नाही. (ते सौंदर्य असे अनुपम होते की,) जणू ब्रह्मदेवांनी आपले संपूर्ण कौशल्य साकार करून (सीतेच्या रूपाने) जगाला प्रकट करून दाखविले होते.॥ ३॥

**सुंदरता कहुँ सुंदर करई। छबिगृहँ दीपसिखा जनु बरई॥**
**सब उपमा कबि रहे जुठारी। केहिं पटतरौं बिदेहकुमारी॥**

सीतेचे सौंदर्य सौंदर्यालाही सुंदर बनविणारे होते. (असे वाटत होते की) जणू सौंदर्याच्या घरामध्ये दीप उजळला आहे. (आजवर सौंदर्य-भवनामध्ये अंधार होता, ते भवन जणू सीतेच्या सौंदर्यरूपी दीपशिखेमुळे उजळून निघाले, पूर्वीपेक्षा फार सुंदर झाले.) कवींनी सर्व उपमा उष्ट्या करून टाकल्या आहेत. तेव्हा मी जनकनंदिनी सीतेला कशाची उपमा देऊ?॥ ४॥

**दो०—सिय सोभा हियँ बरनि प्रभु आपनि दसा बिचारि।**
**बोले सुचि मन अनुज सन बचन समय अनुहारि॥ २३०॥**

(अशा प्रकारे) मनात सीतेच्या सौंदर्याची वाखाणणी करीत व आपली झालेली मोहित दशा पाहून प्रभू श्रीरामांनी पवित्र मनाने लक्ष्मणाला समयानुकूल म्हटले, ॥ २३० ॥

**तात जनकतनया यह सोई। धनुषजग्य जेहि कारन होई॥**
**पूजन गौरि सखीं लै आईं। करत प्रकासु फिरइ फुलवाईं॥**

'हे बंधू जिच्यासाठी धनुष्ययज्ञ होत आहे, तीच ही जनककन्या आहे. सख्या हिला गौरी-पूजनासाठी घेऊन आल्या आहेत. ही या फुलबागेला उजळून टाकीत वावरत आहे. ॥ १ ॥

**जासु बिलोकि अलौकिक सोभा। सहज पुनीत मोर मनु छोभा॥**
**सो सबु कारन जान बिधाता। फरकहिं सुभद अंग सुनु भ्राता॥**

तिचे अलौकिक सौंदर्य पाहून स्वभावतः पवित्र माझे मन विचलित झाले आहे. त्याचे कारण त्या विधात्यालाच ठाऊक. परंतु हे बंधू, माझी मंगलदायक उजवी अंगे स्फुरण पावू लागली आहेत. ॥ २ ॥

**रघुबंसिन्ह कर सहज सुभाऊ। मनु कुपंथ पगु धरइ न काऊ॥**
**मोहि अतिसय प्रतीति मन केरी। जेहिं सपनेहुँ परनारि न हेरी॥**

रघुवंशी लोकांचा हा सहज स्वभाव आहे की, त्यांचे मन कधी कुमार्गावर पाऊल टाकीत नाही. मला माझ्या मनाची खात्री आहे की, त्याने (जागृतीतच काय) स्वप्नातही पर-स्त्रीवर दृष्टी टाकलेली नाही. ॥ ३ ॥

**जिन्ह कै लहहिं न रिपु रन पीठी। नहिं पावहिं परतिय मनु डीठी॥**
**मंगन लहहिं न जिन्ह कै नाहीं। ते नरबर थोरे जग माहीं॥**

रणामध्ये शत्रूंना ज्यांची पाठ दिसत नाही, पर-स्त्री ज्यांचे मन आणि दृष्टी मोहून टाकू शकत नाही, आणि ज्यांच्याकडून याचकाला कधी नकार मिळत नाही, असे श्रेष्ठ पुरुष जगात फार थोडे आहेत.' ॥ ४ ॥

दो०—**करत बतकही अनुज सन मन सिय रूप लोभान।**
**मुख सरोज मकरंद छबि करइ मधुप इव पान॥ २३१ ॥**

अशा प्रकारे श्रीराम हे लक्ष्मणाशी बोलत होते, परंतु मन सीतेच्या रूपावर भाळले होते व ते सीतेच्या मुखरूपी कमलाचा सौंदर्यरूप मकरंद रस भ्रमराप्रमाणे प्राशन करीत होते. ॥ २३१ ॥

**चितवति चकित चहूँ दिसि सीता। कहँ गए नृपकिसोर मनु चिंता॥**
**जहँ बिलोक मृग सावक नैनी। जनु तहँ बरिस कमल सित श्रेनी॥**

सीता चकित होऊन चोहीकडे पाहात होती. तिला हुरहुर लागली होती की, राजकुमार कुठे

गेले असावेत? हरिणाक्षी सीतेची दृष्टी जेथे पडत होती, तेथे जणू श्वेत कमळांच्या पंक्ती फुलत होत्या. ॥ १ ॥

**लता ओट तब सखिन्ह लखाए। स्यामल गौर किसोर सुहाए॥**
**देखि रूप लोचन ललचाने। हरषे जनु निज निधि पहिचाने॥**

तेव्हा सख्यांनी सीतेला वेलींच्या आड असलेल्या सुंदर श्याम व गौर कुमारांना दाखविले. त्यांचे रूप पाहून सीतेचे नेत्र आसुसले. ते नेत्र इतके प्रसन्न झाले की, जणू त्यांना आपला हरवलेला खजिनाच सापडला. ॥ २ ॥

**थके नयन रघुपति छबि देखें। पलकन्हिहूँ परिहरीं निमेषें॥**
**अधिक सनेहँ देह भै भोरी। सरद ससिहि जनु चितव चकोरी॥**

श्रीरामांचे रूप पाहून सीतेचे नेत्र थक्क झाले. पापण्या हलणे बंद झाले. आत्यंतिक प्रेमामुळे शरीर विव्हळ झाले. जणू शरद ऋतूतील चंद्राला बेहोष होऊन चकोरी पाहात होती. ॥ ३ ॥

**लोचन मग रामहि उर आनी। दीन्हे पलक कपाट सयानी॥**
**जब सिय सखिन्ह प्रेमबस जानी। कहि न सकहिं कछु मन सकुचानी॥**

नेत्रांच्या मार्गाने श्रीरामांना हृदयात आणून जानकीने पापण्यांची दारे बंद करून घेतली. (डोळे मिटून ती ध्यान करू लागली.) सख्यांनी जेव्हा बघितले की, सीता प्रेमात मग्न झाली आहे, तेव्हा त्यांच्या मनात संकोच वाटू लागला. पण त्या काही बोलू शकत नव्हत्या. ॥ ४ ॥

दो०—**लताभवन तें प्रगट भे तेहि अवसर दोउ भाइ।**
**निकसे जनु जुग बिमल बिधु जलद पटल बिलगाइ॥ २३२॥**

त्याचवेळी दोघे भाऊ लतामंडपातून बाहेर पडले. जणू दोन निर्मल चंद्र ढगांचा पडदा सारून बाहेर आले होते. ॥ २३२ ॥

**सोभा सीवँ सुभग दोउ बीरा। नील पीत जलजाभ सरीरा॥**
**मोरपंख सिर सोहत नीके। गुच्छ बीच बिच कुसुम कली के॥**

दोघे भाऊ सौंदर्याची परिसीमा होते. त्यांच्या शरीराची कांती निळ्या व पिवळ्या कमळांसारखी होती. शिरावर सुंदर मोरपंख शोभत होते. त्यांच्यामधून फुलांच्या कळ्यांचे गुच्छ लावलेले होते. ॥ १ ॥

**भाल तिलक श्रमबिंदु सुहाए। श्रवन सुभग भूषन छबि छाए॥**
**बिकट भृकुटि कच घूघरवारे। नव सरोज लोचन रतनारे॥**

माथ्यावर तिलक व घर्मबिंदू शोभून दिसत होते. कानांतील सुंदर भूषणांची शोभा (गालांवर) झळकत होती. कमानदार भुवया व कुरळे केस होते. लाल नवकमलांप्रमाणे लालसर नेत्र होते. ॥ २ ॥

**चारु चिबुक नासिका कपोला । हास बिलास लेत मनु मोला ॥**
**मुखछबि कहि न जाइ मोहि पाहीं । जो बिलोकि बहु काम लजाहीं ॥**

हनुवटी, नाक व गाल फार सुंदर होते आणि त्यांच्या स्मित हास्याची शोभा मन मोहून टाकीत होती. त्या मुखाचे सौंदर्य वर्णन करण्यास मी समर्थ नाही. कारण ते पाहून असंख्य कामदेव लज्जित होत होते. ॥ ३ ॥

**उर मनि माल कंबु कल गीवा । काम कलभ कर भुज बलसींवा ॥**
**सुमन समेत बाम कर दोना । सावँर कुअँर सखी सुठि लोना ॥**

वक्ष:स्थळावर रत्नांच्या माळा रुळत होत्या. शंखासारखा सुंदर गळा होता. कामदेवाच्या हत्तीच्या सोंडेप्रमाणे निमुळते होत गेलेले सुकुमार बाहू होते. ते बळाचे परमसीमा होते. ज्यांच्या डाव्या हातात फुलांनी भरलेला द्रोण आहे, हे सखी, तो सावळा कुमार तर फारच सुंदर आहे.' ॥ ४ ॥

दो०—**केहरि कटि पट पीत धर सुषमा सील निधान।**
**देखि भानुकुलभूषनहि बिसरा सखिन्ह अपान॥ २३३ ॥**

सिंहासारखी (बारीक व लवचिक) कटी असणारे, पीतांबर परिधान केलेले, शोभा व शीलाचे भांडार असणारे, सूर्यकुलाचे भूषण, श्रीराम यांना पाहून सख्यासुद्धा भान हरपून गेल्या. ॥ २३३ ॥

**धरि धीरजु एक आलि सयानी । सीता सन बोली गहि पानी ॥**
**बहुरि गौरि कर ध्यान करेहू । भूपकिसोर देखि किन लेहू ॥**

एक चतुर सखी मोठ्या धीराने सीतेचा हात धरून म्हणाली, 'गिरिजादेवीचे ध्यान नंतर कर. यावेळी राजकुमाराला का पाहून घेत नाहीस?' ॥ १ ॥

**सकुचि सीयँ तब नयन उघारे । सनमुख दोउ रघुसिंघ निहारे ॥**
**नख सिख देखि राम कै सोभा । सुमिरि पिता पनु मनु अति छोभा ॥**

तेव्हा सीतेने लाजून नेत्र उघडले आणि रघुकुलातील ते दोन्ही सिंह आपल्यासमोर उभे ठाकल्याचे तिला दिसून आले. श्रीरामांची नख-शिखांत शोभा पाहून आणि नंतर आपल्या पित्याच्या पणाची आठवण येऊन तिचे मन अतिशय हेलावून गेले. ॥ २ ॥

**परबस सखिन्ह लखी जब सीता । भयउ गहरु सब कहहिं सभीता ॥**
**पुनि आउब एहि बेरिआँ काली । अस कहि मन बिहसी एक आली ॥**

सख्यांनी जेव्हा पाहिले की, सीता प्रेमात बुडाली आहे, तेव्हा त्या बावरून म्हणू लागल्या, 'फार उशीर झाला. (आता निघाले पाहिजे). उद्या पुन्हा येऊ.' असे म्हणत एक सखी मनात हसली. ॥ ३ ॥

**गूढ़ गिरा सुनि सिय सकुचानी । भयउ बिलंबु मातु भय मानी ॥**
**धरि बड़ि धीर रामु उर आने । फिरी अपनपउ पितुबस जाने ॥**

सखीचे हे गूढ बोलणे ऐकून सीता लाजली. उशीर झाला आहे, असे पाहून तिला आईची भीती वाटली. मोठ्या धैर्याने तिने श्रीरामांना आपल्या अंतःकरणात बसवून आणि (त्यांचे ध्यान करीत) आपण आपल्या पित्याच्या अधीन असल्याचे जाणून ती नाइलाजाने परत निघाली. ॥ ४ ॥

**दो०—देखन मिस मृग बिहग तरु फिरइ बहोरि बहोरि।**
**निरखि निरखि रघुबीर छबि बाढ़इ प्रीति न थोरि॥ २३४॥**

मृग, पक्षी व वृक्ष यांना पाहण्याच्या बहाण्याने सीता वारंवार वळून पाहात होती. श्रीरामांचे सौंदर्य पाहून तिचे प्रेम अधिकच उचंबळले होते. ॥ २३४ ॥

**जानि कठिन सिवचाप बिसूरति । चली राखि उर स्यामल मूरति ॥**
**प्रभु जब जात जानकी जानी । सुख सनेह सोभा गुन खानी ॥**

शिव-धनुष्य खूप जड आहे. याची आठवण झाल्यावर सीता खिन्न होऊन पण हृदयात श्रीरामांची सावळी मूर्ती धारण करून निघाली. प्रभू श्रीरामांनी जेव्हा सुख, स्नेह, शोभा व गुणांची खाण असलेल्या सीतेला जाताना पाहिले, ॥ १ ॥

**परम प्रेममय मृदु मसि कीन्ही । चारु चित्त भीतीं लिखि लीन्ही ॥**
**गई भवानी भवन बहोरी । बंदि चरन बोली कर जोरी ॥**

तेव्हा त्यांनी परम प्रेमाच्या कोमल शाईने तिचे स्वरूप आपल्या सुंदर चित्ताच्या पटलावर अंकित केले. सीता पुन्हा भवानीच्या मंदिरात गेली आणि तिच्या चरणी वंदन करून हात जोडून म्हणाली, ॥ २ ॥

**जय जय गिरिबरराज किसोरी । जय महेस मुख चंद चकोरी ॥**
**जय गजबदन षडानन माता । जगत जननि दामिनि दुति गाता ॥**

'हे श्रेष्ठ पर्वतराज हिमालयाच्या कन्ये पार्वती, तुमचा विजय असो, विजय असो. हे महादेवाच्या मुख-चंद्राकडे (एकटक पाहणाऱ्या) चकोरी, तुमचा विजय असो. हे हत्तीचे मुख असलेल्या गणेशाच्या व षण्मुख स्वामी कार्तिकेयाच्या माते, हे जगज्जननी, हे विद्युत्कांतियुक्त शरीराच्या पार्वतीदेवी, तुमचा विजय असो. ॥ ३ ॥

**नहिं तव आदि मध्य अवसाना । अमित प्रभाउ बेदु नहिं जाना ॥**
**भव भव बिभव पराभव कारिनि । बिस्व बिमोहनि स्वबस बिहारिनि ॥**

तुम्हांला आदी, मध्य व अंत नाही. तुमचा असीम प्रभाव वेदांनाही माहीत नाही. तुम्ही सृष्टीला उत्पन्न, पालन व नाश करणाऱ्या आहात. विश्वाला मोहून टाकणाऱ्या आणि स्वतंत्रपणे विहार करणाऱ्या आहात. ॥ ४ ॥

दो०—**पतिदेवता सुतीय महुँ मातु प्रथम तव रेख।**
**महिमा अमित न सकहिं कहि सहस सारदा सेष॥ २३५॥**

पतीला इष्टदेव मानणाऱ्या स्त्रियांमध्ये हे माते, तुमची प्रथम गणना आहे. तुमचा अपार महिमा हजारो सरस्वती आणि शेषनागसुद्धा सांगू शकत नाहीत. ॥ २३५ ॥

**सेवत तोहि सुलभ फल चारी। बरदायनी पुरारि पिआरी॥**
**देबि पूजि पद कमल तुम्हारे। सुर नर मुनि सब होहिं सुखारे॥**

हे भक्तांना मनोवांछित वर देणाऱ्या भवानी! तुमची सेवा केल्याने चारी पुरुषार्थ सुलभ होतात. हे देवी, तुमच्या चरणकमलांची पूजा केल्याने देव, मनुष्य व मुनी हे सर्व सुखी होतात. ॥ १ ॥

**मोर मनोरथु जानहु नीकें। बसहु सदा उर पुर सबही कें॥**
**कीन्हेउँ प्रगट न कारन तेहीं। अस कहि चरन गहे बैदेहीं॥**

माझे मनोरथ तुम्ही चांगल्या प्रकारे जाणता, कारण तुम्ही नेहमी सर्वांच्या हृदयरूपी नगरीमध्ये निवास करता. म्हणून मी ते उघड केले नाही' असे म्हणत जानकीने देवीचे चरण धरले. ॥ २ ॥

**बिनय प्रेम बस भई भवानी। खसी माल मूरति मुसुकानी॥**
**सादर सियँ प्रसादु सिर धरेऊ। बोली गौरि हरषु हियँ भरेऊ॥**

गिरिजादेवी सीतेचा विनय आणि प्रेम पाहून प्रसन्न झाली. तिच्या गळ्यातली माळ खाली पडली आणि मूर्तीने स्मित हास्य केले. सीतेने मोठ्या आदराने तो प्रसाद शिरावर धारण केला. गौरीचे मन आनंदाने भरून गेले आणि ती म्हणाली, ॥ ३ ॥

**सुनु सिय सत्य असीस हमारी। पूजिहि मन कामना तुम्हारी॥**
**नारद बचन सदा सुचि साचा। सो बरु मिलिहि जाहिं मनु राचा॥**

'हे सीते, मी मनःपूर्वक देत असलेला आशीर्वाद ऐक. तुझी मनोकामना पूर्ण होईल. नारदांचे वचन नित्य पवित्र आणि सत्य असते. ज्याच्यावर तुझे मन अनुरक्त झाले आहे, तोच वर तुला मिळेल. ॥ ४ ॥

छं०—**मनु जाहिं राचेउ मिलिहि सो बरु सहज सुंदर साँवरो।**
**करुना निधान सुजान सीलु सनेहु जानत रावरो॥**
**एहि भाँति गौरि असीस सुनि सिय सहित हियँ हरषीं अली।**
**तुलसी भवानिहि पूजि पुनि पुनि मुदित मन मंदिर चली॥**

ज्याच्यावर तुझे मन अनुरक्त झालेले आहे, तोच स्वभावतः सुंदर सावळा वर श्रीराम तुला मिळेल. तो दयेचे भांडार आहे, सर्वज्ञ आहे, तुझे शील व प्रेम जाणणारा आहे.' अशा प्रकारे

श्रीगौरीचा आशीर्वाद ऐकून जानकीसह सर्व सख्यांना मनापासून आनंद झाला. तुलसीदास म्हणतात, भवानीदेवीची वारंवार पूजा करून सीता प्रसन्न मनाने राजमहालाकडे निघाली.

**सो०—जानि गौरि अनुकूल सिय हिय हरषु न जाइ कहि।**
**मंजुल मंगल मूल बाम अंग फरकन लगे॥ २३६॥**

श्रीगौरी अनुकूल आहे, हे कळल्यामुळे सीतेच्या मनाला जो हर्ष झाला, तो अवर्णनीय होता. कल्याणाचे मूळ असलेले तिचे डावे अंग स्फुरू लागले. ॥ २३६ ॥

**हृदयँ सराहत सीय लोनाई। गुर समीप गवने दोउ भाई॥**
**राम कहा सबु कौसिक पाहीं। सरल सुभाउ छुअत छल नाहीं॥**

मनामध्ये सीतेच्या लावण्याची वाखाणणी करीत दोन्ही भाऊ गुरूंच्याजवळ आले. श्रीरामचंद्रांनी विश्वामित्रांना सर्व काही सांगून टाकले. कारण त्यांचा स्वभाव सरळ होता आणि कपट त्यांना शिवतसुद्धा नसे. ॥ १ ॥

**सुमन पाइ मुनि पूजा कीन्ही। पुनि असीस दुहु भाइन्ह दीन्ही॥**
**सुफल मनोरथ होहुँ तुम्हारे। रामु लखनु सुनि भए सुखारे॥**

फुले मिळाल्यावर मुनींनी पूजा केली. नंतर दोन्ही भावांना आशीर्वाद दिला की, ‘तुमचे मनोरथ पूर्ण होवोत.’ तो ऐकून श्रीरामलक्ष्मणांना आनंद झाला. ॥ २ ॥

**करि भोजनु मुनिबर बिग्यानी। लगे कहन कछु कथा पुरानी॥**
**बिगत दिवसु गुरु आयसु पाई। संध्या करन चले दोउ भाई॥**

ज्ञानी मुनी विश्वामित्र हे भोजनानंतर काही प्राचीन कथा सांगू लागले. एवढ्यात दिवस मावळला आणि गुरूंच्या आज्ञेने दोघे बंधू संध्या करण्यासाठी गेले. ॥ ३ ॥

**प्राची दिसि ससि उयउ सुहावा। सिय मुख सरिस देखि सुखु पावा॥**
**बहुरि बिचारु कीन्ह मन माहीं। सीय बदन सम हिमकर नाहीं॥**

इकडे पूर्व दिशेला सुंदर चंद्रमा उदय पावला. तो सीतेच्या मुखा-सारखा पाहून श्रीरामचंद्रांना आनंद झाला. नंतर त्यांच्या मनात विचार आला की, चंद्र हा काही सीतेच्या मुखासारखा नाही. ॥ ४ ॥

**दो०—जनमु सिंधु पुनि बंधु बिषु दिन मलीन सकलंक।**
**सिय मुख समता पाव किमि चंदु बापुरो रंक॥ २३७॥**

चंद्राचा जन्म खाऱ्या समुद्रात झाला आहे. त्याच समुद्रात उत्पन्न झाल्यामुळे विष याचा भाऊ आहे. दिवसा हा मलिन असतो आणि कलंकित आहे. बिचारा चंद्र सीतेच्या मुखाची बरोबरी कशी करू शकेल? ॥ २३७ ॥

**घटइ बढ़इ बिरहिनि दुखदाई। ग्रसइ राहु निज संधिहिं पाई॥**
**कोक सोकप्रद पंकज द्रोही। अवगुन बहुत चंद्रमा तोही॥**

शिवाय तो वाढतो व घटत जातो. विरहिणींना दु:ख देतो. राहू संधी मिळताच त्याला ग्रासून टाकतो, चंद्र हा चक्रवाक पक्ष्याला चक्रवाकीच्या वियोगामुळे शोक देणारा आणि सूर्यविकासी कमळांचा वैरी आहे. हे चंद्रा, तुझ्यामध्ये पुष्कळसे अवगुण आहेत.॥ १॥

**बैदेही मुख पटतर दीन्हे। होइ दोषु बड़ अनुचित कीन्हे॥**
**सिय मुखछबि बिधु ब्याज बखानी। गुर पहिं चले निसा बड़ि जानी॥**

म्हणून जानकीच्या मुखाला तुझी उपमा देण्याने मोठे अनुचित कर्म करण्याचे पाप लागेल.' अशा प्रकारे चंद्राच्या निमित्ताने सीतेच्या मुख-सौंदर्याचे वर्णन करता-करता रात्र फार झाल्याचे पाहून श्रीराम गुरुजींच्याजवळ गेले.॥ २॥

**करि मुनि चरन सरोज प्रनामा। आयसु पाइ कीन्ह बिश्रामा॥**
**बिगत निसा रघुनायक जागे। बंधु बिलोकि कहन अस लागे॥**

मुनींच्या चरण-कमलांना प्रणाम करून व आज्ञा घेऊन त्यांनी विश्रांती घेतली. रात्र संपल्यावर श्रीरघुनाथ जागे झाले आणि लक्ष्मणाला पाहून म्हणाले,॥ ३॥

**उयउ अरुन अवलोकहु ताता। पंकज कोक लोक सुखदाता॥**
**बोले लखनु जोरि जुग पानी। प्रभु प्रभाउ सूचक मृदु बानी॥**

'लक्ष्मणा, बघ. कमल, चक्रवाक व संपूर्ण जगाला सुख देणारा अरुणोदय झाला.' लक्ष्मण दोन्ही हात जोडून प्रभूंच्या प्रभावाला अनुकूल अशा कोमल वाणीने म्हणाला,॥ ४॥

दो०—**अरुनोदयँ सकुचे कुमुद उडगन जोति मलीन।**
**जिमि तुम्हार आगमन सुनि भए नृपति बलहीन॥ २३८॥**

'अरुणोदय झाल्यामुळे कुमुदिनी मिटली आणि तारागणांचा प्रकाश निस्तेज झाला. ज्याप्रमाणे तुम्ही आल्याचे समजताच सर्व राजे बलहीन व्हावे.॥ २३८॥

**नृप सब नखत करहिं उजिआरी। टारि न सकहिं चाप तम भारी॥**
**कमल कोक मधुकर खग नाना। हरषे सकल निसा अवसाना॥**

सर्व राजेरूपी तारे मंद प्रकाश देतात, परंतु ते धनुष्यरूपी महान अंधकाराला दूर करू शकत नाहीत. रात्रीचा अंत झाल्यामुळे कमल, चक्रवाक पक्षी, भ्रमर आणि नाना प्रकारचे पक्षी आनंदून गेले आहेत.॥ १॥

**ऐसेहिं प्रभु सब भगत तुम्हारे। होइहहिं टूटें धनुष सुखारे॥**
**उयउ भानु बिनु श्रम तम नासा। दुरे नखत जग तेजु प्रकासा॥**

त्याप्रमाणे हे प्रभो, धनुष्य मोडल्यावर तुमचे सर्व भक्त सुखी होतील. सूर्योदय झाला आणि अनायासे अंधार नष्ट झाला. तारे मावळले आणि जगात तेजाचा प्रकाश पडला.॥ २॥

**रबि निज उदय ब्याज रघुराया । प्रभु प्रतापु सब नृपन्ह दिखाया ॥**
**तव भुज बल महिमा उदघाटी । प्रगटी धनु बिघटन परिपाटी ॥**

हे रघुनाथ, सूर्याने आपल्या उदयाने सर्व राजांना तुमचा प्रताप दाखवून दिला आहे. तुमच्या भुजांच्या बलाचा महिमा प्रकट करण्यासाठीच धनुष्य मोडण्याचा पण लावण्यात आला आहे.'॥ ३॥

**बंधु बचन सुनि प्रभु मुसुकाने । होइ सुचि सहज पुनीत नहाने ॥**
**नित्यक्रिया करि गुरु पहिं आए । चरन सरोज सुभग सिर नाए ॥**

लक्ष्मणाचे बोल ऐकून श्रीरामांनी मंद हास्य केले. नंतर स्वभावतः च पवित्र असलेल्या श्रीरामांनी प्रातर्विधीनंतर स्नान केले आणि नित्यकर्म आटोपून ते गुरूंजवळ आले. त्यांनी गुरूंच्या पूज्य चरण-कमलांवर मस्तक ठेवले.॥ ४॥

**सतानंदु तब जनक बोलाए । कौसिक मुनि पहिं तुरत पठाए ॥**
**जनक बिनय तिन्ह आइ सुनाई । हरषे बोलि लिए दोउ भाई ॥**

एवढ्यात राजा जनकांनी शतानंदांना बोलावून विश्वामित्रांच्याकडे पाठविले. त्यांनी येऊन जनकांची विनंती निवेदन केली. विश्वामित्रांनी आनंदाने दोघा भावांना बोलाविले.॥ ५॥

दो०—**सतानंद पद बंदि प्रभु बैठे गुर पहिं जाइ।**
**चलहु तात मुनि कहेउ तब पठवा जनक बोलाइ॥ २३९॥**

शतानंदांच्या चरणांना वंदन करून प्रभू श्रीराम गुरुजींच्याजवळ बसले. तेव्हा मुनी म्हणाले, ‘वत्सांनो, चला. जनक राजांनी आपल्याला बोलावणे पाठविले आहे.॥ २३९॥

## मासपारायण, आठवा विश्राम
## नवाह्नपारायण, दुसरा विश्राम

**सीय स्वयंबरु देखिअ जाई । ईसु काहि धौं देइ बड़ाई ॥**
**लखन कहा जस भाजनु सोई । नाथ कृपा तव जापर होई ॥**

(मुनी म्हणाले,) जाऊन सीतेचे स्वयंवर पाहिले पाहिजे. बघूया, ईश्वर कुणाला सन्मान देणार आहे.’ लक्ष्मण म्हणाला, ‘हे नाथ, ज्यावर तुमची कृपा असेल, तोच सन्मानाला पात्र ठरणार.’॥ १॥

**हरषे मुनि सब सुनि बर बानी । दीन्हि असीस सबहिं सुखु मानी ॥**
**पुनि मुनिबृंद समेत कृपाला । देखन चले धनुषमख साला ॥**

ही उत्तम वाणी ऐकून सर्व मुनी प्रसन्न झाले. सर्वांनी आनंदाने आशीर्वाद दिला. नंतर मुनि-समुदायासह कृपाळू श्रीरामचंद्र धनुष्ययज्ञ-शाला पाहण्यास गेले. ॥ २ ॥

**रंगभूमि आए दोउ भाई। असि सुधि सब पुरबासिन्ह पाई॥**
**चले सकल गृह काज बिसारी। बाल जुबान जरठ नर नारी॥**

दोघे भाऊ रंगभूमीवर आले आहेत, अशी वार्ता जेव्हा नगरवासीयांना मिळाली, तेव्हा आबालवृद्ध स्त्री-पुरुष, घर आणि काम-धाम विसरून निघाले. ॥ ३ ॥

**देखी जनक भीर भै भारी। सुचि सेवक सब लिए हँकारी॥**
**तुरत सकल लोगन्ह पहिं जाहू। आसन उचित देहु सब काहू॥**

जेव्हा जनकांना दिसले की, मोठी गर्दी झाली आहे, तेव्हा त्यांनी सर्व विश्वासू सेवकांना बोलावून घेतले आणि म्हटले, 'तुम्ही ताबडतोब सर्व लोकांपाशी जा आणि सर्वांना यथायोग्य आसने द्या.' ॥ ४ ॥

दो०—**कहि मृदु बचन बिनीत तिन्ह बैठारे नर नारि।**
**उत्तम मध्यम नीच लघु निज निज थल अनुहारि॥ २४०॥**

त्या सेवकांनी गोड व नम्रपणे बोलून उत्तम, मध्यम, सामान्य अशा सर्व दर्जाच्या स्त्री-पुरुषांना त्या त्या ठिकाणी बसविले. ॥ २४० ॥

**राजकुअँर तेहि अवसर आए। मनहुँ मनोहरता तन छाए॥**
**गुन सागर नागर बर बीरा। सुंदर स्यामल गौर सरीरा॥**

त्याचवेळी राम-लक्ष्मण हे राजकुमार तेथे आले. प्रत्यक्ष मनोहरताच त्यांच्या शरीरावर पसरली होती. एकाचे शरीर सुंदर, सावळे आणि दुसऱ्याचे गोरे होते. ते गुणांचे सागर, चतुर व उत्तम वीर होते. ॥ १ ॥

**राज समाज बिराजत रूरे। उडगन महुँ जनु जुग बिधु पूरे॥**
**जिन्ह कें रही भावना जैसी। प्रभु मूरति तिन्ह देखी तैसी॥**

ते राजांच्या समाजामध्ये असे शोभून दिसत होते की, जणू तारागणांच्यामध्ये दोन पूर्ण चंद्र असावेत. ज्यांची जशी भावना होती, त्यांना प्रभूंची मूर्ती तशीच दिसली. ॥ २ ॥

**देखहिं रूप महा रनधीरा। मनहुँ बीर रसु धरें सरीरा॥**
**डरे कुटिल नृप प्रभुहि निहारी। मनहुँ भयानक मूरति भारी॥**

महान रणधीर अशा राजे लोकांना श्रीरामचंद्रांचे रूप असे दिसत होते की, जणू प्रत्यक्ष वीररस शरीर धारण करून आला असावा. ते फार भयंकर असावेत, असे वाटून दुष्ट राजे प्रभूंना पाहून घाबरले. ॥ ३ ॥

**रहे असुर छल छोनिप बेषा। तिन्ह प्रभु प्रगट काल सम देखा॥**
**पुरबासिन्ह देखे दोउ भाई। नरभूषन लोचन सुखदाई॥**

जे राक्षस कपटाने तेथे राजांच्या वेषांत बसले होते, त्यांना प्रभू प्रत्यक्ष काळा-प्रमाणे दिसले. नगरवासीयांना ते दोघे बंधू नररत्ने व नयनाल्हादक वाटले.॥ ४॥

**दो०—नारि बिलोकहिं हरषि हियँ निज निज रुचि अनुरूप।**
**जनु सोहत सिंगार धरि मूरति परम अनूप॥ २४१॥**

स्त्रिया मनात आनंदून आपापल्या आवडीप्रमाणे त्यांना पाहात होत्या. जणू शृंगार रसच परम अनुपम मूर्ती धारण करून शोभून दिसत होता.॥ २४१॥

**बिदुषन्ह प्रभु बिराटमय दीसा। बहु मुख कर पग लोचन सीसा॥**
**जनक जाति अवलोकहिं कैसें। सजन सगे प्रिय लागहिं जैसें॥**

विद्वानांना ते पुष्कळ मुखे, हात, पाय, नेत्र व शिरे असलेल्या विराट रूपात दिसले. जनकांच्या कुटुंबीयांना प्रभू जणू सख्खे स्वजन व प्रिय वाटत होते.॥ १॥

**सहित बिदेह बिलोकहिं रानी। सिसु सम प्रीति न जाति बखानी॥**
**जोगिन्ह परम तत्त्वमय भासा। सांत सुद्ध सम सहज प्रकासा॥**

जनकांसह सर्व राण्यांना ते आपल्या मुलासारखे वाटत होते. त्यांच्या प्रेमाचे वर्णन करणे कठीण आहे. योग्यांना ते शांत, शुद्ध, सम आणि स्वयंप्रकाशी परम-तत्त्वाच्या रूपात दिसले.॥ २॥

**हरिभगतन्ह देखे दोउ भ्राता। इष्टदेव इव सब सुख दाता॥**
**रामहि चितव भायँ जेहि सीया। सो सनेहु सुखु नहिं कथनीया॥**

जे हरिभक्त होते, त्यांना दोघे बंधू सर्व सुखे देणाऱ्या इष्टदेवासारखे दिसले. सीता ज्या भावनेने श्रीरामचंद्रांना पाहात होती, ते प्रेम व सुख तर सांगताच येणार नाही.॥ ३॥

**उर अनुभवति न कहि सक सोऊ। कवन प्रकार कहै कबि कोऊ॥**
**एहि बिधि रहा जाहि जस भाऊ। तेहिं तस देखेउ कोसलराऊ॥**

त्या प्रेम आणि सुखाचा ती मनातल्या मनात अनुभव घेत होती. परंतु ते ती सांगू शकत नव्हती. मग कुणी कवी ते कसे सांगू शकेल? अशा प्रकारे ज्याचा जसा भाव होता, तसेच त्याला कोसलाधीश श्रीराम दिसले.॥ ४॥

**दो०—राजत राज समाज महुँ कोसलराज किसोर।**
**सुंदर स्यामल गौर तन बिस्व बिलोचन चोर॥ २४२॥**

सुंदर सावळ्या व गोऱ्या रंगाचे आणि संपूर्ण विश्वाचे नेत्र आकर्षून घेणारे कोसलाधीश कुमार अशा प्रकारे शोभून दिसत होते.॥ २४२॥

**सहज मनोहर मूरति दोऊ। कोटि काम उपमा लघु सोऊ॥**
**सरद चंद निंदक मुख नीके। नीरज नयन भावते जी के॥**

दोन्ही मूर्ती स्वभावत: मन हरण करून घेत होत्या. कोट्यवधी कामदेवांची उपमाही त्यांच्यासाठी थिटी आहे. त्यांचे सुंदर मुख शरद पौर्णिमेच्या चंद्राला हिणवणारे होते. आणि कमलांसारखे नेत्र मनाला भुरळ पाडणारे होते. ॥ १ ॥

**चितवनि चारु मार मनु हरनी । भावति हृदय जाति नहिं बरनी ॥**
**कल कपोल श्रुति कुंडल लोला । चिबुक अधर सुंदर मृदु बोला ॥**

त्यांची सुंदर नजर कामदेवाच्या मनालाही मोहविणारी होती. ती मनाला मोहित करीत होती, पण अवर्णनीय होती. सुंदर गाल, कानांमध्ये डोलणारी कुंडले. हनुवटी व अधर सुंदर होते आणि वाणी कोमल होती. ॥ २ ॥

**कुमुदबंधु कर निंदक हाँसा । भृकुटी बिकट मनोहर नासा ॥**
**भाल बिसाल तिलक झलकाहीं । कच बिलोकि अलि अवलि लजाहीं ॥**

त्यांचे हास्य चंद्रकिरणांना तुच्छ ठरविणारे होते. कमानदार भुवया आणि नासिका मनोहर होती. विशाल भाल प्रदेशावर तिलक झळकत होता. काळ्या-कुरळ्या केसांना पाहून भ्रमरांचे थवेसुद्धा लाजत होते. ॥ ३ ॥

**पीत चौतनीं सिरन्हि सुहाईं । कुसुम कलीं बिच बीच बनाईं ॥**
**रेखें रुचिर कंबु कल गीवाँ । जनु त्रिभुवन सुषमा की सीवाँ ॥**

पिवळ्या चौकोनी टोप्या शिरांवर शोभत होत्या. टोप्यांवर मधून-मधून फुलांच्या कळ्या रंगविलेल्या होत्या. शंखासारख्या सुंदर गळ्यावर तीन मनोहर रेषा दिसत होत्या. ज्या जणू तिन्ही लोकांच्या सौंदर्याची मर्यादा दाखवीत होत्या. ॥ ४ ॥

**दो०—कुंजर मनि कंठा कलित उरन्हि तुलसिका माल।**
**बृषभ कंध केहरि ठवनि बल निधि बाहु बिसाल॥ २४३ ॥**

वक्ष:स्थलावर गजमुक्तांचे कंठे आणि तुळशीच्या माळा शोभत होत्या. त्यांचे खांदे बैलांसारखे उंच व पुष्ट होते. त्यांची उभे राहाण्याची ऐट सिंहासारखी होती आणि बाहू विशाल व शक्तीचे भांडार होते. ॥ २४३ ॥

**कटि तूनीर पीत पट बाँधें । कर सर धनुष बाम बर काँधें ॥**
**पीत जग्य उपबीत सुहाए । नख सिख मंजु महाछबि छाए ॥**

कमरेला पीतांबर कसलेला असून त्यावर भाते बांधलेले होते. उजव्या हातात बाण व डाव्या सुंदर खांद्यावर धनुष्य व पिवळे यज्ञोपवीत शोभत होते. नखशिखांत सर्व अवयव सुंदर असून त्यांच्यावर मोठी कांती झळकत होती. ॥ १ ॥

**देखि लोग सब भए सुखारे । एकटक लोचन चलत न तारे ॥**
**हरषे जनकु देखि दोउ भाई । मुनि पद कमल गहे तब जाई ॥**

त्या दोघांना पाहून सर्वजण सुखावले. सर्वांचे डोळे एकटक त्यांना पाहू लागले. डोळ्यांच्या बाहुल्यासुद्धा स्थिरावून गेल्या. राजा जनक त्या दोघा भावांना पाहून आनंदित झाले. मग त्यांनी मुनींजवळ जाऊन त्यांची चरणकमले धरली. ॥ २ ॥

**करि बिनती निज कथा सुनाई । रंग अवनि सब मुनिहि देखाई ॥**
**जहँ जहँ जाहिं कुअँर बर दोऊ । तहँ तहँ चकित चितव सबु कोऊ ॥**

त्यांनी धनुष्याच्या पणाविषयीची आपली कथा नम्रपणे सांगितली आणि मुनींना संपूर्ण रंगभूमी दाखविली. मुनींच्याबरोबर दोघे राजकुमार जेथे जेथे जात होते, तेथे तेथे सर्वजण त्यांना आश्चर्यचकित होऊन पाहात होते. ॥ ३ ॥

**निज निज रुख रामहि सबु देखा । कोउ न जान कछु मरमु बिसेषा ॥**
**भलि रचना मुनि नृप सन कहेऊ । राजाँ मुदित महासुख लहेऊ ॥**

सर्वांना वाटे की, श्रीराम आपल्याकडेच पाहात आहेत, परंतु त्यामागील रहस्य कोणी जाणू शकले नाही. मुनींनी राजाला सांगितले की, 'रंगभूमीची निर्मिती फार छान आहे.' ते ऐकून राजा जनक प्रसन्न झाले आणि त्यांना फार समाधान वाटले. ॥ ४ ॥

दो०—**सब मंचन्ह तें मंचु एक सुंदर बिसद बिसाल।**
**मुनि समेत दोउ बंधु तहँ बैठारे महिपाल ॥ २४४ ॥**

सर्व मंचांमध्ये एक मंच अधिक सुंदर, देदीप्यमान व विशाल होता. स्वतः राजांनी मुनींसह दोघा भावांना तेथे बसविले. ॥ २४४ ॥

**प्रभुहि देखि सब नृप हियँ हारे । जनु राकेस उदय भएँ तारे ॥**
**असि प्रतीति सब के मन माहीं । राम चाप तोरब सक नाहीं ॥**

ज्याप्रमाणे पूर्ण चंद्र उगवताच तारे प्रकाशहीन होतात, त्याप्रमाणे प्रभूंना पाहून जमलेले सर्व राजे मनातून निराश झाले. सर्वांची खात्री पटली की, श्रीरामचंद्रच हे शिवधनुष्य मोडणार, यात शंका नाही. ॥ १ ॥

**बिनु भंजेहुँ भव धनुषु बिसाला । मेलिहि सीय राम उर माला ॥**
**अस बिचारि गवनहु घर भाई । जसु प्रतापु बलु तेजु गवाँई ॥**

शिवांचे विशाल धनुष्य मोडले नाही, तरी सीता श्रीरामचंद्रांच्याच गळ्यात वरमाला घालील. असा विचार करून काही राजे म्हणू लागले की, 'अरे बाबांनो, असा विचार करा आणि आपली कीर्ती, प्रताप, बल व तेज यांवर पाणी सोडून आपापल्या घरी चला. ॥ २ ॥

**बिहसे अपर भूप सुनि बानी । जे अबिबेक अंध अभिमानी ॥**
**तोरेहुँ धनुषु ब्याहु अवगाहा । बिनु तोरें को कुअँरि बिआहा ॥**

दुसरे राजे जे अविवेकामुळे अंध झालेले होते आणि घमेंडखोर होते, त्यांनी हे ऐकल्यावर ते फिदीफिदी हसले. ते म्हणाले, 'धनुष्य मोडले, तरीही विवाह होणे कठीण आहे. आम्ही सहजपणे सीता हातची जाऊ देणार नाही. मग धनुष्य मोडल्याविना राजकुमारीशी लग्न कोण करू शकेल? ॥ ३ ॥

**एक बार कालउ किन होऊ। सिय हित समर जितब हम सोऊ॥**
**यह सुनि अवर महिप मुसुकाने। धरमसील हरिभगत सयाने॥**

प्रत्यक्ष काल जरी असला, तरी सीतेसाठी आम्ही त्यालाही युद्धात जिंकू.' ही घमेंडीची भाषा ऐकून धर्मात्मे, हरिभक्त आणि शहाणे असे जे दुसरे राजे होते, ते हसले. ॥ ४ ॥

सो०—**सीय बिआहबि राम गरब दूरि करि नृपन्ह के।**
**जीति को सक संग्राम दसरथ के रन बाँकुरे॥ २४५॥**

ते म्हणाले, 'राजांचा गर्व हरण करून श्रीरामचंद्रच सीतेशी विवाह करतील. युद्धाच्या बाबतीत म्हणाल तर, महाराज दशरथांच्या रणवीर पुत्रांना युद्धात कोण जिंकू शकेल? ॥ २४५ ॥

**ब्यर्थ मरहु जनि गाल बजाई। मन मोदकन्हि कि भूख बुताई॥**
**सिख हमारि सुनि परम पुनीता। जगदंबा जानहु जियँ सीता॥**

फुकट बडबड करून मरू नका. मनातल्या मांड्यांनी भूक भागते काय? आमचा निष्कपट सल्ला ऐकून सीतेला आपल्या मनात प्रत्यक्ष जगज्जननी समजा. ॥ १ ॥

**जगत पिता रघुपतिहि बिचारी। भरि लोचन छबि लेहु निहारी॥**
**सुंदर सुखद सकल गुन रासी। ए दोउ बंधु संभु उर बासी॥**

आणि श्रीरघुनाथांना जगत्पिता परमेश्वर मानून डोळे भरून त्यांचे लावण्य पाहून घ्या. अशी संधी वारंवार येत नसते. सुंदर, सुखदायक आणि समस्त गुणांची राशी असलेले हे दोन्ही भाऊ भगवान शिवांच्या हृदयात निवास करणारे आहेत. ॥ २ ॥

**सुधा समुद्र समीप बिहाई। मृगजलु निरखि मरहु कत धाई॥**
**करहु जाइ जा कहुँ जोइ भावा। हम तौ आजु जनम फलु पावा॥**

जवळ आलेल्या भगवद्‌दर्शनरूप अमृताचा समुद्र सोडून तुम्ही जगज्जननी जानकीला पत्नी म्हणून मिळविण्याचे मृगजल पाहून धावून का मरता? असो. बाबांनो, ज्याला जे योग्य वाटेल तेच करा. आम्ही तर श्रीरामांचे दर्शन घेऊन आज जन्माचे सार्थक करून घेतले आहे.' ॥ ३ ॥

**अस कहि भले भूप अनुरागे। रूप अनूप बिलोकन लागे॥**
**देखहिं सुर नभ चढ़े बिमाना। बरषहिं सुमन करहिं कल गाना॥**

असे म्हणत सज्जन राजे प्रेममग्न होऊन श्रीरामांचे अनुपम रूप पाहू लागले. देवगणसुद्धा आकाशातून विमानात बसून दर्शन घेत होते आणि सुंदर गायन करीत फुले उधळत होते.॥ ४॥

दो०—**जानि सुअवसरु सीय तब पठई जनक बोलाइ।**
**चतुर सखीं सुंदर सकल सादर चलीं लवाइ॥ २४६॥**

मग योग्य वेळी राजा जनकांनी सीतेला बोलावणे पाठविले. सर्व चतुर व सुंदर सख्या तिला आदराने घेऊन आल्या.॥ २४६॥

**सिय सोभा नहिं जाइ बखानी। जगदंबिका रूप गुन खानी॥**
**उपमा सकल मोहि लघु लागीं। प्राकृत नारि अंग अनुरागीं॥**

रूप व गुणांची खाण असलेल्या जगज्जननी जानकीच्या सौंदर्याचे वर्णन कोण करू शकेल? तिच्यासाठी मला सर्व उपमा तुच्छ वाटतात. कारण त्या लौकिक स्त्रियांच्या अंगांविषयीच्या आहेत. (त्यांचा सीतेसाठी उपयोग करणे हे जगज्जननीचा अपमान करण्यासारखे आहे.)॥ १॥

**सिय बरनिअ तेइ उपमा देई। कुकबि कहाइ अजसु को लेई॥**
**जौं पटतरिअ तीय सम सीया। जग असि जुबति कहाँ कमनीया॥**

सीतेच्या वर्णनामध्ये त्याच उपमा देऊन कोण कवी कुकवी ठरेल आणि अपकीर्तीचा भागीदार होईल? जर कुणा स्त्रीबरोबर सीतेची तुलना करायची, तर जगात अशी सुंदर स्त्री आहेच कुठे?॥ २॥

**गिरा मुखर तन अरध भवानी। रति अति दुखित अतनु पति जानी॥**
**बिष बारुनी बंधु प्रिय जेही। कहिअ रमासम किमि बैदेही॥**

देवांच्या स्त्रिया आमच्या अपेक्षेपेक्षा अधिक दिव्य व सुंदर आहेत. पण (त्यांच्यातही दोष आहेत.) सरस्वती ही फार बडबडी आहे, पार्वती अर्धांगिनी आहे. अर्धनारीनटेश्वराच्या रूपात तिचे अर्धे अंगच स्त्रीचे आहे, आणि अर्धे पुरुषाचे-शिवांचे आहे. कामदेवाची पत्नी रती ही आपला पती शरीराविना (अनंग) असल्यामुळे दु:खी असते. आणि विष व मद्य समुद्रात उत्पन्न झाल्यामुळे ते जिचे भाऊ आहेत, त्या लक्ष्मीसारखी जानकीला कसे म्हणता येईल?॥ ३॥

**जौं छबि सुधा पयोनिधि होई। परम रूपमय कच्छपु सोई॥**
**सोभा रजु मंदरु सिंगारू। मथै पानि पंकज निज मारू॥**

ज्या लक्ष्मीबद्दल वर सांगितले आहे, ती खाऱ्या समुद्रातून निघाली होती. त्या समुद्राचे मंथन करण्यासाठी भगवंतांनी अत्यंत कठोर पाठीच्या कच्छपाचे रूप घेतले होते. महाविषधारी वासुकी नागाची दोरी बनविली होती. रवीचे काम अत्यंत कठोर अशा मंदराचल पर्वताने केले आणि सर्व देवांनी व दैत्यांनी मंथन केले. ज्या लक्ष्मीला अत्यंत शोभेची खाण आणि अनुपम सुंदरी असे म्हणतात, तिला प्रकट करण्यासाठी ही सर्व असुंदर आणि स्वभावतः कठोर अशी उपकरणे होती. अशा उपकरणांमुळे प्रकट झालेली लक्ष्मी ही जानकीची बरोबरी कशी करू शकेल? या उलट, लावण्यरूपी अमृत-समुद्र असेल, परम रूपमय कच्छप असेल, सौंदर्याची दोरी असेल, शृंगार रसाचा पर्वत असेल आणि त्या रूप-लावण्याच्या समुद्राचे स्वतः कामदेवाने आपल्या करकमलांनी मंथन केले असेल, ॥ ४ ॥

**दो०—एहि बिधि उपजै लच्छि जब सुंदरता सुख मूल।**
**तदपि सकोच समेत कबि कहहिं सीय समतूल॥ २४७॥**

अशा योगायोगाने जरी सौंदर्य व सुखाची खाण असलेली लक्ष्मी उत्पन्न झाली, तरीही कवी मोठ्या संकोचानेच तिला जानकीसारखी म्हणतील. ॥ २४७ ॥

[ज्या सौंदर्याच्या समुद्राचे कामदेव मंथन करील, ते सौंदर्यही प्राकृत, लौकिक सौंदर्यच असणार. कारण कामदेव हा स्वतःसुद्धा त्रिगुणमय प्रकृतीचाच विकार आहे. म्हणून त्या सौंदर्याचे मंथन करून प्रकट झालेली लक्ष्मी सुद्धा वर सांगितलेल्या लक्ष्मीपेक्षा काहीशी अधिक सुंदर व दिव्य असली, तरीही प्राकृतच आहे, म्हणून तिच्याबरोबर जानकीची तुलना करणे हे कवींना संकोचाचेच वाटते. ज्या सौंदर्याने जानकीची दिव्यातिदिव्य परम दिव्य मूर्ती बनली आहे, ते सौंदर्य वर सांगितलेल्या सुंदरतेहून वेगळे अप्राकृत आहे. वस्तुतः लक्ष्मीचे अप्राकृत रूपसुद्धा हेच आहे. ती कामदेवाच्या मंथनामुळे उत्पन्न होऊ शकत नाही. परंतु ते जानकीचे स्वरूपच आहे, म्हणून ते तिच्याहून वेगळे नाही आणि उपमा ही तर भिन्न वस्तूची दिली जाते. याखेरीज जानकी प्रकट झाली, ती स्वतः आपल्या महिम्यामुळे. तिला प्रकट करण्यासाठी इतर कोणत्याही उपकरणाची अपेक्षा नाही. अर्थात शक्ती ही शक्तिमानाशी अभिन्न व अद्वैत असे तत्त्व आहे. म्हणून अनुपमेय आहे, हेच गूढ तात्त्विक तत्त्व भक्तशिरोमणी कवीने या अभूतोपमालंकाराने मोठ्या कौशल्याने व्यक्त केले आहे.]

**चलीं संग लै सखीं सयानी। गावत गीत मनोहर बानी॥**
**सोह नवल तनु सुंदर सारी। जगत जननि अतुलित छबि भारी॥**

चतुर सख्या सीतेला घेऊन मधुर वाणीने गात निघाल्या. सीतेच्या अलौकिक शरीरावर सुंदर साडी शोभून दिसत होती. जगज्जननीचे विलक्षण लावण्य अतुलनीय होते. ॥ १ ॥

**भूषन सकल सुदेस सुहाए। अंग अंग रचि सखिन्ह बनाए॥**
**रंगभूमि जब सिय पगु धारी। देखि रूप मोहे नर नारी॥**

सर्व आभूषणे आपापल्या जागी शोभून दिसत होती. सख्यांनी ती जानकीच्या अवयवांवर काळजीपूर्वक सजवून घातली होती. जेव्हा सीतेने रंगभूमीवर पाय ठेवला, तेव्हा तिचे दिव्य रूप पाहून सर्व स्त्री-पुरुष मोहून गेले.॥ २॥

**हरषि सुरन्ह दुंदुभीं बजाईं। बरषि प्रसून अपछरा गाईं॥**
**पानि सरोज सोह जयमाला। अवचट चितए सकल भुआला॥**

देवांनी आनंदाने दुंदुभी वाजविल्या आणि पुष्पवर्षा करीत अप्सरा नाचू लागल्या. सीतेच्या करकमलांमध्ये जयमाला शोभत होती. तिने सर्व राजांना एकाच दृष्टिक्षेपात पाहून घेतले.॥ ३॥

**सीय चकित चित रामहि चाहा। भए मोहबस सब नरनाहा॥**
**मुनि समीप देखे दोउ भाई। लगे ललकि लोचन निधि पाई॥**

सीता चकित मनाने श्रीरामांना पाहू लागली, तेव्हा सर्व राजे लोक मोहवश झाले. सीतेने मुनींच्याजवळ (बसलेल्या) दोघा भावांना पाहिले आणि तिचे नयन आपला खजिना मिळाल्याचे बघून तेथेच श्रीरामांवर स्थिरावले.॥ ४॥

दो०—**गुरजन लाज समाजु बड़ देखि सीय सकुचानि।**
**लागि बिलोकन सखिन्ह तन रघुबीरहि उर आनि॥ २४८॥**

परंतु गुरुजनांच्या लाजेने व फार मोठा जमाव पाहून सीता संकोचली. ती श्रीरामचंद्रांना आपल्या हृदयात आणून सखींच्याकडे पाहू लागली.॥ २४८॥

**राम रूपु अरु सिय छबि देखें। नर नारिन्ह परिहरीं निमेषें॥**
**सोचहिं सकल कहत सकुचाहीं। बिधि सन बिनय करहिं मन माहीं॥**

श्रीरामांचे रूप व सीतेचे लावण्य पाहून स्त्री-पुरुष एकटक तिच्याकडे पाहू लागले. सर्वजण मनात विचार करीत होते, परंतु प्रकटपणे सांगताना त्यांना संकोच वाटत होता. ते मनातल्या मनात विधात्याला विनवत होते-॥ १॥

**हरु बिधि बेगि जनक जड़ताई। मति हमारि असि देहि सुहाई॥**
**बिनु बिचार पनु तजि नरनाहू। सीय राम कर करै बिबाहू॥**

'हे विधात्या, जनकांचा वेडेपणा ताबडतोब नाहीसा करा आणि विचार न करता आपला पण सोडून देऊन सीतेचा विवाह रामांशी करावा, अशी बुद्धी त्यांना द्या.॥ २॥

**जगु भल कहिहि भाव सब काहू । हठ कीन्हें अंतहुँ उर दाहू ॥**
**एहिं लालसाँ मगन सब लोगू । बरु साँवरो जानकी जोगू ॥**

जग त्यांना चांगलेच म्हणेल, कारण ही गोष्ट सर्वांनाच पसंत आहे. पणाचा हट्ट धरल्यास शेवटी हृदयाला पश्चात्तापाचे चटके बसतील. जानकीसाठी सावळ्या रंगाचा वरच योग्य आहे, असे सर्वांनाच वाटत होते. ॥ ३ ॥

**तब बंदीजन जनक बोलाए । बिरिदावली कहत चलि आए ॥**
**कह नृपु जाइ कहहु पन मोरा । चले भाट हियँ हरषु न थोरा ॥**

मग राजा जनकांनी भाटांना बोलाविले. ते वंशाची कीर्ती गात-गात आले. राजांनी सांगितले, 'माझा पण सर्वांना जाऊन सांगा.' भाट मोठ्या आनंदाने निघाले. ॥ ४ ॥

दो०—**बोले बंदी बचन बर सुनहु सकल महिपाल।**
**पन बिदेह कर कहहिं हम भुजा उठाइ बिसाल ॥ २४९ ॥**

भाटांनी म्हटले, 'हे पृथ्वीचे पालन करणाऱ्या सर्व राजांनो, ऐका. आम्ही बाहू उभारून जनकांचा महान पण सांगतो. ॥ २४९ ॥

**नृप भुजबलु बिधु सिवधनु राहू । गरुअ कठोर बिदित सब काहू ॥**
**रावनु बानु महाभट भारे । देखि सरासन गवँहिं सिधारे ॥**

राजांच्या भुजांचे बल हे चंद्र आहे आणि शिवांचे धनुष्य राहू आहे. ते अवजड व कठोर आहे, ही गोष्ट सर्वांना ठाऊक आहे. योद्धे रावण व बाणासुरसुद्धा हे धनुष्य पाहून गप्पपणे निघून गेले. त्याला स्पर्श करण्याची सुद्धा हिम्मत त्यांना झाली नाही. ॥ १ ॥

**सोइ पुरारि कोदंडु कठोरा । राज समाज आजु जोइ तोरा ॥**
**त्रिभुवन जय समेत बैदेही । बिनहिं बिचार बरइ हठि तेही ॥**

हे भगवान शिवांचे अवजड धनुष्य आज या राजसमाजामध्ये जो कोणी मोडेल, त्याला त्रैलोक्याच्या विजयाबरोबरच जानकी कोणताही विचार न करता मनापासून वरील. ॥ २ ॥

**सुनि पन सकल भूप अभिलाषे । भटमानी अतिसय मन माखे ॥**
**परिकर बाँधि उठे अकुलाई । चले इष्टदेवन्ह सिर नाई ॥**

हा पण ऐकून सर्व राजांना उत्कंठा लागली. ज्यांना आपल्या शौर्याचा अभिमान होता, ते मनातून अधीर झाले. कमर कसून उतावळेपणे उठले व आपल्या इष्टदेवांना नमस्कार करून निघाले. ॥ ३ ॥

**तमकि ताकि तकि सिवधनु धरहीं । उठइ न कोटि भाँति बलु करहीं ॥**
**जिन्ह के कछु बिचारु मन माहीं । चाप समीप महीप न जाहीं ॥**

त्यांनी मोठ्या तावातावाने शिवधनुष्याकडे बघितले आणि लक्षपूर्वक ते पकडले. असंख्य प्रकारे जोर लावला, परंतु ते उचलले गेले नाही. ज्या राजांना काही विवेक होता, ते धनुष्याकडे फिरकले नाहीत. ॥ ४ ॥

दो०—**तमकि धरहिं धनु मूढ़ नृप उठइ न चलहिं लजाइ।**
**मनहुँ पाइ भट बाहुबलु अधिकु अधिकु गरुआइ॥ २५०॥**

ज्या मूर्ख राजांनी तावातावाने धनुष्य धरले, परंतु ते जेव्हा उचलले गेले नाही, तेव्हा ते लाजून परत गेले. जणू वीरांच्या भुजांचे बळ लाभल्यामुळे ते धनुष्य जास्तच अवजड होत होते. ॥ २५० ॥

**भूप सहस दस एकहि बारा। लगे उठावन टरइ न टारा॥**
**डगइ न संभु सरासनु कैसें। कामी बचन सती मनु जैसें॥**

मग एक हजार राजे एकाच वेळी धनुष्य उचलण्याचा प्रयत्न करू लागले. तरीही ते हलले नाही. ज्याप्रमाणे कामी पुरुषांच्या बोलण्यामुळे सतीचे मन विचलित होत नाही, त्याप्रमाणे शिवांचे ते धनुष्य हलत नव्हते. ॥ १ ॥

**सब नृप भए जोगु उपहासी। जैसें बिनु बिराग संन्यासी॥**
**कीरति बिजय बीरता भारी। चले चाप कर बरबस हारी॥**

ज्याप्रमाणे वैराग्याविना संन्यासी हास्यास्पद ठरतो, त्याप्रमाणे सर्व राजे हास्यास्पद झाले. आपली कीर्ती, विजय, अत्यंत शौर्य—हे सर्व त्या धनुष्याकडून जबरदस्तीने हिरावून घेतले गेल्यामुळे ते पराभूत होऊन निघून गेले. ॥ २ ॥

**श्रीहत भए हारि हियँ राजा। बैठे निज निज जाइ समाजा॥**
**नृपन्ह बिलोकि जनकु अकुलाने। बोले बचन रोष जनु साने॥**

राजेलोक मनातून पराजित झाल्याने निष्प्रभ झाले आणि आपापल्या गोटामध्ये जाऊन बसले. सर्व राजे अयशस्वी ठरल्याचे पाहून राजा जनक व्याकूळ झाले आणि क्रोधाने म्हणाले, ॥ ३ ॥

**दीप दीप के भूपति नाना। आए सुनि हम जो पनु ठाना॥**
**देव दनुज धरि मनुज सरीरा। बिपुल बीर आए रनधीरा॥**

‘जो पण मी ठेवला होता, तो ऐकून द्वीपद्वीपांतरातील अनेक राजे आले. देव व दैत्य हे सुद्धा मनुष्याचे शरीर धारण करून आले. आणखीही पुष्कळसे रणधीर वीर आले. ॥ ४ ॥

दो०—**कुअँरि मनोहर बिजय बड़ि कीरति अति कमनीय।**
**पावनिहार बिरंचि जनु रचेउ न धनु दमनीय॥ २५१॥**

परंतु धनुष्य मोडून मनोहर कन्या, मोठा विजय आणि उज्ज्वल कीर्ती प्राप्त करणारा जणू ब्रह्मदेवांनी कोणी निर्माणच केला नाही. ॥ २५१ ॥

**कहहु काहि यहु लाभु न भावा। काहुँ न संकर चाप चढ़ावा॥**
**रहउ चढ़ाउब तोरब भाई। तिलु भरि भूमि न सके छड़ाई॥**

हा लाभ कुणाला आवडला नसता? सांगा. परंतु कोणीही शंकरांचे धनुष्य उचलू शकला नाही. उचलणे आणि मोडणे हे तर दूरच राहिले, कुणी ते तिळभरही जमिनीपासून हलवू शकला नाही. ॥ १ ॥

**अब जनि कोउ माखै भट मानी। बीर बिहीन मही मैं जानी॥**
**तजहु आस निज निज गृह जाहू। लिखा न बिधि बैदेहि बिबाहू॥**

आता कुणी वीरतेचा अभिमान बाळगणाऱ्याने नाराज व्हायचे कारण नाही. मला तर कळून चुकले की, पृथ्वीवर वीरच नाहीत. आता आशा सोडून आपापल्या घरी जा. ब्रह्मदेवांनी सीतेचा विवाह तिच्या नशिबी लिहिलेलाच नाही. ॥ २ ॥

**सुकृतु जाइ जौं पनु परिहरऊँ। कुअँरि कुआरि रहउ का करऊँ॥**
**जौं जनतेउँ बिनु भट भुबि भाई। तौ पनु करि होतेउँ न हँसाई॥**

जर मी पण सोडला, तर पुण्य जाईल. तर आता काय करावे? कन्या कुमारीच राहील. जर मला आधी ठाऊक असते की, पृथ्वी वीरांनी रहित आहे, तर हा पण करून मी हास्यास्पद झालो नसतो.' ॥ ३ ॥

**जनक बचन सुनि सब नर नारी। देखि जानकिहि भए दुखारी॥**
**माखे लखनु कुटिल भइँ भौंहें। रदपट फरकत नयन रिसौंहें॥**

जनकांचे बोलणे ऐकून सर्व स्त्री-पुरुष जानकीकडे पाहून हळहळले. परंतु लक्ष्मण रागाने लालबुंद झाला, त्याच्या भुवया उंचावल्या, ओठ फडफडू लागले आणि डोळे रागामुळे लाल झाले. ॥ ४ ॥

दो०—**कहि न सकत रघुबीर डर लगे बचन जनु बान।**
**नाइ राम पद कमल सिरु बोले गिरा प्रमान॥ २५२॥**

श्रीरघुवीरांच्या भीतीमुळे तो काही बोलू शकला नव्हता, परंतु जनक राजांचे बोलणे त्याला बाणाप्रमाणे टोचू लागले. जेव्हा राहावले नाही तेव्हा श्रीरामचंद्रांच्या चरणकमळांवर मस्तक लववून त्याने स्पष्टपणे म्हटले, ॥ २५२ ॥

**रघुबंसिन्ह महुँ जहँ कोउ होई। तेहिं समाज अस कहइ न कोई॥**
**कही जनक जसि अनुचित बानी। बिद्यमान रघुकुलमनि जानी॥**

'जेथे रघुवंशीयांपैकी कोणीही असतो, त्या सभेत जनकांनी रघुकुलशिरोमणी श्रीराम येथे उपस्थित असताना जे शब्द उच्चारले आहेत, असे अनुचित शब्द कोणी बोलत नसते. ॥ १ ॥

**सुनहु भानुकुल पंकज भानू। कहउँ सुभाउ न कछु अभिमानू॥**
**जौं तुम्हारि अनुसासन पावौं। कंदुक इव ब्रह्मांड उठावौं॥**

हे सूर्यकुलरूपी (कमलासाठी) सूर्य असणाऱ्या श्रीरामा! ऐका. मी अभिमानाने नव्हे तर सहज म्हणून म्हणतो की, जर तुमची आज्ञा असेल तर मी ब्रह्मांडाला चेंडूप्रमाणे उचलून धरीन.॥ २॥

**काचे घट जिमि डारौं फोरी। सकउँ मेरु मूलक जिमि तोरी॥**
**तव प्रताप महिमा भगवाना। को बापुरो पिनाक पुराना॥**

आणि कच्च्या मडक्याप्रमाणे फोडून टाकीन. मी सुमेरू पर्वताला मुळीप्रमाणे उखडून टाकू शकतो. हे भगवन! तुमच्या प्रतापाच्या महिम्यापुढे हे बिचारे जीर्ण धनुष्य ते काय?॥ ३॥

**नाथ जानि अस आयसु होऊ। कौतुकु करौं बिलोकिअ सोऊ॥**
**कमल नाल जिमि चाप चढ़ावौं। जोजन सत प्रमान लै धावौं॥**

हे नाथ, असे मानून आज्ञा द्याल, तर गंमत करून दाखवितो. ती पाहा तर खरे. धनुष्याला कमळाच्या देठीप्रमाणे उचलून घेऊन शंभर योजने धावत जाईन.॥ ४॥

दो०—**तोरौं छत्रक दंड जिमि तव प्रताप बल नाथ।**
**जौं न करौं प्रभु पद सपथ कर न धरौं धनु भाथ॥ २५३॥**

हे नाथ, आपल्या प्रतापाच्या बळावर मी हे धनुष्य कुत्र्याच्या छत्रीप्रमाणे मोडून टाकीन. जर मी असे केले नाही, तर प्रभूंच्या चरणांची शपथ घेऊन सांगतो की, मग मी धनुष्य व भाता कधीही हाती धरणार नाही.'॥ २५३॥

**लखन सकोप बचन जे बोले। डगमगानि महि दिग्गज डोले॥**
**सकल लोग सब भूप डेराने। सिय हियँ हरषु जनकु सकुचाने॥**

लक्ष्मण रागाने ओरडताच पृथ्वी डळमळू लागली आणि दिग्गज हादरले. सर्व लोक आणि राजे घाबरले. सीतेला आनंद झाला आणि जनक वरमले.॥ १॥

**गुर रघुपति सब मुनि मन माहीं। मुदित भए पुनि पुनि पुलकाहीं॥**
**सयनहिं रघुपति लखनु नेवारे। प्रेम समेत निकट बैठारे॥**

गुरू विश्वामित्र, श्रीरघुनाथ व सर्व मुनी मनात आनंदले आणि वारंवार रोमांचित झाले. श्रीरघुनाथांनी खूण करून लक्ष्मणाला रोखले आणि प्रेमपूर्वक आपल्याजवळ बसवून घेतले.॥ २॥

**बिस्वामित्र समय सुभ जानी। बोले अति सनेहमय बानी॥**
**उठहु राम भंजहु भवचापा। मेटहु तात जनक परितापा॥**

शुभ वेळ आल्याचे जाणून विश्वामित्र अत्यंत प्रेमाने म्हणाले, 'हे रामा, ऊठ. शिवांचे धनुष्य मोडून टाक आणि बाळा! जनकांची चिंता दूर कर.'॥ ३॥

**सुनि गुरु बचन चरन सिरु नावा। हरषु बिषादु न कछु उर आवा॥**
**ठाढ़े भए उठि सहज सुभाएँ। ठवनि जुबा मृगराजु लजाएँ॥**

गुरु-वचन ऐकून श्रीरामांनी त्यांच्या चरणी मस्तक ठेवले. त्यांच्या मनात हर्ष नव्हता की विषाद नव्हता. ते मोठ्या ऐटीने एखाद्या तरुण सिंहालाही लाजविल्यासारखे सहजपणे उभे राहिले.॥ ४॥

दो०—**उदित उदयगिरि मंच पर रघुबर बालपतंग।**
**बिकसे संत सरोज सब हरषे लोचन भृंग॥ २५४॥**

मंचरूपी उदयाचलावर रघुनाथरूपी बाल-सूर्य उगवताच सर्व संतरूपी कमळे फुलून गेली आणि त्यांचे नेत्ररूपी भ्रमर आनंदित झाले.॥ २५४॥

**नृपन्ह केरि आसा निसि नासी। बचन नखत अवली न प्रकासी॥**
**मानी महिप कुमुद सकुचाने। कपटी भूप उलूक लुकाने॥**

राजांची आशारूपी रात्र नाहीशी झाली. त्यांच्या वचनरूपी तारांच्या समुदायाचे चमकणे बंद झाले. घमेंडी राजारूपी रात्रविकासी कमळे कोमेजली आणि कपटी राजारूपी घुबडे लपून बसली.॥ १॥

**भए बिसोक कोक मुनि देवा। बरिसहिं सुमन जनावहिं सेवा॥**
**गुर पद बंदि सहित अनुरागा। राम मुनिन्ह सन आयसु मागा॥**

मुनी व देवरूपी चक्रवाकांचे दु:ख सरले. ते फुलांचा वर्षाव करीत सेवा करू लागले. प्रेमाने गुरूंच्या चरणांना वंदन करून श्रीरामचंद्रांनी मुनींची आज्ञा मागितली.॥ २॥

**सहजहिं चले सकल जग स्वामी। मत्त मंजु बर कुंजर गामी॥**
**चलत राम सब पुर नर नारी। पुलक पूरि तन भए सुखारी॥**

संपूर्ण जगताचे स्वामी श्रीराम हे मस्त व श्रेष्ठ हत्तीच्या डौलदार चालीने निघाले. श्रीराम निघताच नगरातील सर्व स्त्री-पुरुष सुखावून गेले व रोमांचित झाले.॥ ३॥

**बंदि पितर सुर सुकृत सँभारे। जौं कछु पुन्य प्रभाउ हमारे॥**
**तौ सिवधनु मृनाल की नाईं। तोरहुँ रामु गनेस गोसाईं॥**

त्यांनी पितर व देवांना वंदन करून आपल्या पुण्याईचे स्मरण केले. ते म्हणाले, 'जर आमच्या पुण्याचा काही प्रभाव असेल, तर हे देवा गणेशा, श्रीराम हे शिव-धनुष्य कमळाच्या देठाप्रमाणे मोडून टाकू देत.'॥ ४॥

दो०—**रामहि प्रेम समेत लखि सखिन्ह समीप बोलाइ।**
**सीता मातु सनेह बस बचन कहइ बिलखाइ॥ २५५॥**

सीतेची माता श्रीरामांना वात्सल्याने पाहून व सख्यांना जवळ बोलावून प्रेमवश सद्गदित होऊन म्हणाली,॥ २५५॥

**सखि सब कौतुकु देखनिहारे। जेउ कहावत हितू हमारे॥**
**कोउ न बुझाइ कहइ गुर पाहीं। ए बालक असि हठ भलि नाहीं॥**

'हे सखी, हे जे आमचे हितचिंतक म्हणवितात, ते सर्व कौतुक पाहाणारे आहेत. यांपैकी कोणीही गुरू विश्वामित्रांना समजावून का सांगत नाहीत की, हे श्रीराम लहान आहेत. त्यांच्यासाठी असा आग्रह धरणे चांगले नव्हे.॥ १ ॥

**रावन बान छुआ नहिं चापा। हारे सकल भूप करि दापा॥**
**सो धनु राजकुअँर कर देहीं। बाल मराल कि मंदर लेहीं॥**

रावण व बाणासुर धनुष्याला स्पर्शसुद्धा करू शकले नाहीत आणि सर्व घमेंडखोर राजांनी ज्याच्यापुढे हात टेकले, तेच हे धनुष्य या सुकुमार राजकुमाराच्या हाती देत आहेत. हंसाचे पिल्लू कधी मंदराचल उचलू शकेल काय?॥ २ ॥

**भूप सयानप सकल सिरानी। सखि बिधि गति कछु जाति न जानी॥**
**बोली चतुर सखी मृदु बानी। तेजवंत लघु गनिअ न रानी॥**

ज्ञानी महाराजांचेही सर्व शहाणपण संपले आहे, असे वाटते. हे सखी, विधात्याची गती काही समजत नाही.' असे म्हणून राणी गप्प बसली. तेव्हा एक चतुर सखी कोमल वाणीने म्हणाली, 'हे राणी, जो तेजस्वी असतो त्याला कधीही लहान समजू नये.'॥ ३ ॥

**कहँ कुंभज कहँ सिंधु अपारा। सोषेउ सुजसु सकल संसारा॥**
**रबि मंडल देखत लघु लागा। उदयँ तासु तिभुवन तम भागा॥**

कुठे घटातून उत्पन्न झालेले मुनी अगस्त्य आणि कुठे अपार समुद्र. परंतु त्यांनी तो शोषून टाकला, त्यांची श्रेष्ठ कीर्ती विश्वात पसरली आहे. सूर्यमंडळ दिसायला लहान दिसते, परंतु त्याचा उदय होताच तिन्ही लोकीचा अंधकार पळून जातो.॥ ४॥

दो०—**मंत्र परम लघु जासु बस बिधि हरि हर सुर सर्ब।**
**महामत्त गजराज कहुँ बस कर अंकुस खर्ब॥ २५६॥**

ब्रह्मदेव, विष्णू, शिव व सर्व देव ज्याच्या अधीन असतात, तो मंत्र अत्यंत छोटा असतो. महान मस्तवाल गजराजाला छोटासा अंकुश ताब्यात ठेवतो.॥ २५६॥

**काम कुसुम धनु सायक लीन्हे। सकल भुवन अपने बस कीन्हे॥**
**देबि तजिअ संसउ अस जानी। भंजब धनुषु राम सुनु रानी॥**

कामदेवाने फुलांच्याच धनुष्यबाणाने सर्व लोकांना वश करून ठेवले आहे. हे देवी, हे जाणून संशय सोडून द्या. हे राणी, सांगते ते ऐका. श्रीरामचंद्र धनुष्य नक्कीच मोडतील.'॥ १॥

**सखी बचन सुनि भै परतीती। मिटा बिषादु बढ़ी अति प्रीती॥**
**तब रामहि बिलोकि बैदेही। सभय हृदयँ बिनवति जेहि तेही॥**

सखीचे वचन ऐकून राणीला विश्वास वाटू लागला. तिची विषाद मावळला आणि श्रीरामांविषयी तिच्या मनातील प्रेम अधिकच वाढले. त्याचवेळी श्रीरामांना पाहून सीता बावरलेल्या मनाने ज्या त्या देवांची विनवणी करू लागली. ॥ २ ॥

**मनहीं मन मनाव अकुलानी। होहु प्रसन्न महेस भवानी॥**
**करहु सफल आपनि सेवकाई। करि हितु हरहु चाप गरुआई॥**

ती व्याकूळ होऊन मनातल्या मनात आळवत होती की, 'हे महेश-भवानी, माझ्यावर प्रसन्न व्हा. मी जी तुमची सेवा केली आहे, तिचे मला फळ द्या आणि माझ्यावर स्नेह ठेवून धनुष्याचा जडपणा नाहीसा करा. ॥ ३ ॥

**गननायक बरदायक देवा। आजु लगें कीन्हिउँ तुअ सेवा॥**
**बार बार बिनती सुनि मोरी। करहु चाप गुरुता अति थोरी॥**

हे गणनायका, वरदायी गणेशदेवा, मी आजच्या या दिवसासाठीच तुमची सेवा केली होती. वारंवार केलेली माझी विनंती ऐकून धनुष्याचा जडपणा खूपच कमी करून टाका.' ॥ ४ ॥

दो०—**देखि देखि रघुबीर तन सुर मनाव धरि धीर।**
**भरे बिलोचन प्रेम जल पुलकावली सरीर॥ २५७॥**

श्रीरघुनाथांच्याकडे पाहात-पाहात सीता धीर धरून देवांची आळवणी करीत होती. तिच्या नेत्रांत प्रेमाश्रू भरले होते, आणि शरीर रोमांचित झाले होते. ॥ २५७ ॥

**नीकें निरखि नयन भरि सोभा। पितु पनु सुमिरि बहुरि मनु छोभा॥**
**अहह तात दारुनि हठ ठानी। समुझत नहिं कछु लाभु न हानी॥**

डोळे भरून श्रीरामांचे लावण्य पाहाताना पित्याच्या पणाची आठवण येताच सीतेचे मन क्षुब्ध झाले. ती मनात म्हणू लागली, 'अहो, माझ्या वडिलांनी मोठा कठीण पण ठेवला आहे. त्यांना त्यातील लाभ-हानी काही समजेनाशी झाली आहे. ॥ १ ॥

**सचिव सभय सिख देइ न कोई। बुध समाज बड़ अनुचित होई॥**
**कहँ धनु कुलिसहु चाहि कठोरा। कहँ स्यामल मृदुगात किसोरा॥**

मंत्री घाबरत असल्यामुळे कुणी त्यांना सल्लाही देत नाही. पंडितांच्या सभेमध्ये हे जे घडत आहे, ते अयोग्य आहे. कुठे वज्रापेक्षाही कठोर धनुष्य आणि कुठे हे कोमल शरीराचे किशोर श्यामसुंदर! ॥ २ ॥

**बिधि केहि भाँति धरौं उर धीरा। सिरस सुमन कन बेधिअ हीरा॥**
**सकल सभा कै मति भै भोरी। अब मोहि संभुचाप गति तोरी॥**

हे विधात्या, मी मनात धीर कसा धरू? शिरीषाच्या फुलातील केशराने कुठे हिरा छेदता येईल काय? सर्व सभेची बुद्धी बावचळली आहे. म्हणून हे शिव-धनुष्या, आता मला तुझाच एक आधार आहे.॥ ३॥

**निज जड़ता लोगन्ह पर डारी। होहि हरुअ रघुपतिहि निहारी॥**
**अति परिताप सीय मन माहीं। लव निमेष जुग सय सम जाहीं॥**

हे धनुष्या! तू आपला जडपणा लोकांच्यावर टाकून व श्रीरामांचे सुकुमार शरीर पाहून हलका हो.' अशा प्रकारे सीतेच्या मनाला मोठी व्यथा लागून राहिली होती. निमेषाचा एक अंश सुद्धा तिला युगासारखा वाटत होता.॥ ४॥

दो०—**प्रभुहि चितइ पुनि चितव महि राजत लोचन लोल।**
**खेलत मनसिज मीन जुग जनु बिधु मंडल डोल॥ २५८॥**

प्रभू श्रीरामचंद्रांना पाहून नंतर पृथ्वीकडे पाहणाऱ्या सीतेचे चंचल नयन असे शोभत होते की, जणू चंद्रमंडलरूपी जलपूर्ण कलशात कामदेवाच्या दोन मासोळ्या खेळत आहेत.॥ २५८॥

**गिरा अलिनि मुख पंकज रोकी। प्रगट न लाज निसा अवलोकी॥**
**लोचन जलु रह लोचन कोना। जैसें परम कृपन कर सोना॥**

सीतेच्या वाणीरूपी भ्रमरीला तिच्या मुखरूपी कमळाने कोंडून ठेवले होते. लज्जारूपी रात्र पाहून ती प्रकट होत नव्हती. ज्याप्रमाणे एखादा कंजूष कोपऱ्यातच सोने गाडून ठेवतो. त्याप्रमाणे तिच्या नेत्रांतील पाणी कोपऱ्यातच थबकले होते.॥ १॥

**सकुची ब्याकुलता बड़ि जानी। धरि धीरजु प्रतीति उर आनी॥**
**तन मन बचन मोर पनु साचा। रघुपति पद सरोज चितु राचा॥**

आपली व्याकुळता पाहून सीता लाजली आणि धीर धरून तिने मनात विश्वास बाळगला की, 'जर तन, मन आणि वचन यांनी माझा पण खरा असेल आणि श्रीरघुनाथांच्या चरणकमळी माझे चित्त खरोखरच अनुरक्त असेल,॥ २॥

**तौ भगवानु सकल उर बासी। करिहि मोहि रघुबर कै दासी॥**
**जेहि कें जेहि पर सत्य सनेहू। सो तेहि मिलइ न कछु संदेहू॥**

तर सर्वांच्या हृदयात निवास करणारे भगवंत मला रघुश्रेष्ठ श्रीरामचंद्रांची दासी

नक्कीच बनवतील. ज्याचे ज्याच्यावर खरे प्रेम असते, त्याला तो मिळतोच, यात काही शंका नाही.'॥ ३ ॥

**प्रभु तन चितइ प्रेम तन ठाना। कृपानिधान राम सबु जाना॥**
**सियहि बिलोकि तकेउ धनु कैसें। चितव गरुरु लघु ब्यालहि जैसें॥**

प्रभू श्रीरामांना पाहून सीतेच्या शरीराने प्रेमाचा निश्चय केला. कृपानिधान श्रीरामांनी हे ओळखले. त्यांनी सीतेकडे पाहून धनुष्याकडे असे बघितले की, गरूड जसा छोट्याशा सापाकडे पाहतो. ॥ ४ ॥

दो०—**लखन लखेउ रघुबंसमनि ताकेउ हर कोदंडु।**
**पुलकि गात बोले बचन चरन चापि ब्रह्मांडु॥ २५९॥**

इकडे जेव्हा लक्ष्मणाने पाहिले की, रघुकुलरत्न श्रीरामांनी शिव–धनुष्याकडे दृष्टी टाकली आहे, तेव्हा त्याचे शरीर शहारले त्याने ब्रह्मांडाला आपल्या चरणांनी दाबून म्हटले, ॥ २५९ ॥

**दिसिकुंजरहु कमठ अहि कोला। धरहु धरनि धरि धीर न डोला॥**
**रामु चहहिं संकर धनु तोरा। होहु सजग सुनि आयसु मोरा॥**

'हे दिग्गजांनो, हे कच्छपा, हे शेषा, हे वराहा! तुम्ही धैर्याने पृथ्वीला धरून ठेवा. कारण ती डळमळू नये. श्रीरामचंद्र शिवांचे धनुष्य मोडू पाहात आहेत. माझी आज्ञा समजून सर्वजण सावध राहा.'॥ १ ॥

**चाप समीप रामु जब आए। नर नारिन्ह सुर सुकृत मनाए॥**
**सब कर संसउ अरु अग्यानू। मंद महीपन्ह कर अभिमानू॥**

श्रीरामचंद्र जेव्हा धनुष्याजवळ आले, तेव्हा सर्व स्त्री–पुरुषांनी देवांची व आपल्या पुण्यांची विनवणी केली. सर्वांचा संशय आणि अज्ञान, नीच राजांचा अभिमान, ॥ २ ॥

**भृगुपति केरि गरब गरुआई। सुर मुनिबरन्ह केरि कदराई॥**
**सिय कर सोचु जनक पछितावा। रानिन्ह कर दारुन दुख दावा॥**

परशुरामाचा प्रचंड गर्व, देव व मुनींची व्याकुळता (भय), सीतेची चिंता, जनकांचा पश्चात्ताप आणि राण्यांच्या दारुण दु:खाचा दावानल, ॥ ३ ॥

**संभुचाप बड़ बोहितु पाई। चढ़े जाइ सब संगु बनाई॥**
**राम बाहुबल सिंधु अपारू। चहत पारु नहिं कोउ कड़हारू॥**

हे सर्व शिवांचे धनुष्यरूपी मोठे जहाज मिळाल्याने समूह बनवून, त्यावर आरूढ झाले. हे सर्व श्रीरामांच्या भुजांच्या बलरूपी अपार समुद्रापलीकडे जाऊ इच्छितात, परंतु कोणी नावाडी नाही. ॥ ४ ॥

**दो०—राम बिलोके लोग सब चित्र लिखे से देखि।**
**चितईं सीय कृपायतन जानी बिकल बिसेषि॥ २६०॥**

श्रीरामांनी सर्व लोकांकडे पाहिले. ते चित्राप्रमाणे स्तब्ध झालेले पाहून कृपासागर श्रीरामांनी सीतेकडे कटाक्ष टाकला आणि ती फार व्याकूळ झाल्याचे त्यांना दिसले.॥ २६०॥

**देखी बिपुल बिकल बैदेही। निमिष बिहात कलप सम तेही॥**
**तृषित बारि बिनु जो तनु त्यागा। मुएँ करइ का सुधा तड़ागा॥**

त्यांनी जानकीला फार व्याकूळ झाल्याचे पाहिले. तिचा एक-एक क्षण कल्पाप्रमाणे जात होता. तहानेने व्याकूळ झालेला माणूस पाण्याविना मेला, तर तो मेल्यावर अमृताचा तलाव मिळाला तरी काय उपयोग?॥ १॥

**का बरषा सब कृषी सुखानें। समय चुकें पुनि का पछितानें॥**
**अस जियँ जानि जानकी देखी। प्रभु पुलके लखि प्रीति बिसेषी॥**

सर्व शेती करपून गेल्यावर पाऊस आला तरी काय उपयोग? वेळ निघून गेल्यावर मग पश्चात्ताप करून काय होणार? मनात असा विचार करून श्रीरामांनी जानकीकडे पाहिले आणि तिचे उत्कट प्रेम पाहून ते पुलकित झाले.॥ २॥

**गुरहि प्रनामु मनहिं मन कीन्हा। अति लाघवँ उठाइ धनु लीन्हा॥**
**दमकेउ दामिनि जिमि जब लयऊ। पुनि नभ धनु मंडल सम भयऊ॥**

त्यांनी मनातल्या मनात गुरूंना प्रणाम केला आणि मोठ्या चपळाईने धनुष उचलले. जेव्हा त्यांनी ते हाती घेतले, तेव्हा ते धनुष्य वीजेप्रमाणे चमकले आणि मग अंतराळात वर्तुळाकार झाले.॥ ३॥

**लेत चढ़ावत खैंचत गाढ़ें। काहुँ न लखा देख सबु ठाढ़ें॥**
**तेहि छन राम मध्य धनु तोरा। भरे भुवन धुनि घोर कठोरा॥**

ते घेताना, सज्ज करताना व जोराने ओढताना कुणीच पाहिले नाही. (कारण या तिन्ही गोष्टी अतिशय वेगाने घडल्या.) सर्वांनी बघितले की श्रीराम धनुष्य ओढून उभे आहेत. त्याच क्षणी श्रीरामांनी ते मधोमध मोडले. त्या भयंकर कडकडाटाने त्रैलोक्य निनादून गेले.॥ ४॥

**छं०—भरे भुवन घोर कठोर रव रबि बाजि तजि मारगु चले।**
**चिक्करहिं दिग्गज डोल महि अहि कोल कूरुम कलमले॥**
**सुर असुर मुनि कर कान दीन्हें सकल बिकल बिचारहीं।**
**कोदंड खंडेउ राम तुलसी जयति बचन उचारहीं॥**

भयंकर कठोर आवाजाने त्रैलोक्य दणाणून गेले. सूर्याचे घोडे मार्ग सोडून धावू लागले. दिग्गज चीत्कार करू लागले. पृथ्वी डगमगू लागली. शेष, वराह व कच्छप व्याकूळ होऊन तळमळू लागले. देव, राक्षस व मुनी सर्वजण कानांवर हात ठेवून व्याकूळ होऊन विचार करू लागले. तुलसीदास म्हणतात की, सर्वांना पटले की, श्रीरामांनी धनुष्य मोडून टाकले, तेव्हा सर्वजण 'श्रीरामचंद्र की जय' असा जयजयकार करू लागले.

सो०—**संकर चापु जहाजु सागरु रघुबर बाहुबलु।**
**बूड़ सो सकल समाजु चढ़ा जो प्रथमहिं मोह बस॥ २६१॥**

शिवांचे धनुष्य जहाज आहे आणि श्रीरामचंद्रांचे बाहुबल समुद्र आहे. धनुष्य मोडल्यामुळे जो समाज मोहामुळे या जहाजावर चढला होता, तो बुडून गेला.॥ २६१॥

**प्रभु दोउ चापखंड महि डारे। देखि लोग सब भए सुखारे॥**
**कौसिकरूप पयोनिधि पावन। प्रेम बारि अवगाहु सुहावन॥**

प्रभू श्रीरामांनी धनुष्याचे दोन्ही तुकडे भूमीवर टाकून दिले. हे पाहून सर्वांना आनंद झाला. विश्वामित्ररूपी पवित्र समुद्रामध्ये प्रेमरूपी सुंदर अथांग जल भरले होते.॥ १॥

**रामरूप राकेसु निहारी। बढ़त बीचि पुलकावलि भारी॥**
**बाजे नभ गहगहे निसाना। देवबधू नाचहिं करि गाना॥**

श्रीरामरूपी पूर्ण चंद्राला पाहून विश्वामित्ररूपी समुद्रात रोमांचरूपी मोठ्या लहरी उसळू लागल्या. आकाशात अत्यंत जोराने नगारे वाजू लागले आणि अप्सरा गात गात नाचू लागल्या.॥ २॥

**ब्रह्मादिक सुर सिद्ध मुनीसा। प्रभुहि प्रसंसहिं देहिं असीसा॥**
**बरिसहिं सुमन रंग बहु माला। गावहिं किंनर गीत रसाला॥**

ब्रह्मदेव इत्यादी देव, सिद्ध, मुनीश्वर हे प्रभूंची प्रशंसा करू लागले आणि आशीर्वाद देऊ लागले. ते रंगी-बेरंगी फुले व माळ यांचा वर्षाव करू लागले. किन्नर रसाळ गायन करू लागले.॥ ३॥

**रही भुवन भरि जय जय बानी। धनुषभंग धुनि जात न जानी॥**
**मुदित कहहिं जहँ तहँ नर नारी। भंजेउ राम संभुधनु भारी॥**

संपूर्ण ब्रह्मांडात जयजयकाराचा ध्वनी दुमदुमू लागला. त्यामुळे धनुष्य-भंगाचा ध्वनी त्यात केव्हा विलीन झाला, हे कळलेच नाही. जिकडे-तिकडे स्त्री-पुरुष प्रसन्न होऊन म्हणत होते की, 'श्रीरामचंद्रांनी प्रचंड शिवधनुष्याचा भंग केला.'॥ ४॥

दो०—**बंदी मागध सूतगन बिरुद बदहिं मतिधीर।**
**करहिं निछावरि लोग सब हय गय धन मनि चीर॥ २६२॥**

धीर बुद्धीचे लोक, भाट, मागध आणि सूतजन हे श्रीरामांच्या बिरुदावलीचे वर्णन करू लागले. सर्वजण घोडे, हत्ती, धन, रत्ने आणि वस्त्रे श्रीरामांवरून ओवाळून टाकू लागले. ॥ २६२ ॥

**झाँझि मृदंग संख सहनाई । भेरि ढोल दुंदुभी सुहाई ॥**
**बाजहिं बहु बाजने सुहाए । जहँ तहँ जुबतिन्ह मंगल गाए ॥**

झांज, मृदंग, शंख, सनई, भेरी, ढोल आणि मोहक नगारे इत्यादी सुंदर वाद्ये मधुर वादन करू लागली. जिकडे-तिकडे तरुणी मंगल गीते गाऊ लागल्या. ॥ १ ॥

**सखिन्ह सहित हरषी अति रानी । सूखत धान परा जनु पानी ॥**
**जनक लहेउ सुखु सोचु बिहाई । पैरत थकें थाह जनु पाई ॥**

राणी सख्यांसह अत्यंत आनंदित झाली, जणू सुकत चाललेल्या भात पिकावर पाऊस पडल्यामुळे त्याला जीवदान मिळाले. जनक राजांची चिंता जाऊन त्यांना आनंद झाला. जणू पोहून-पोहून थकून गेलेल्या माणसाला आधार मिळाला. ॥ २ ॥

**श्रीहत भए भूप धनु टूटे । जैसें दिवस दीप छबि छूटे ॥**
**सीय सुखहि बरनिअ केहि भाँती । जनु चातकी पाइ जलु स्वाती ॥**

ज्याप्रमाणे दिवसा दिव्याची शोभा राहात नाही, त्याप्रमाणे धनुष्यभंग झाल्यामुळे जमलेले राजेलोक निस्तेज झाले. सीतेच्या सुखाला पारावार नव्हता. जणू चातक पक्षिणीला स्वातीचे जल पिण्यास लाभले. ॥ ३ ॥

**रामहि लखनु बिलोकत कैसें । ससिहि चकोर किसोरकु जैसें ॥**
**सतानंद तब आयसु दीन्हा । सीताँ गमनु राम पहिं कीन्हा ॥**

ज्याप्रमाणे चकोराचे पिल्लू चंद्राला चकित होऊन पाहात राहाते, त्याप्रमाणे लक्ष्मण श्रीरामांना पाहात होता. तेव्हा शतानंदांच्या आज्ञेने सीता श्रीरामांच्याजवळ गेली. ॥ ४ ॥

दो०—**संग सखीं सुंदर चतुर गावहिं मंगलचार ।**
**गवनी बाल मराल गति सुषमा अंग अपार ॥ २६३ ॥**

तिच्या बरोबर सुंदर व चतुर सख्या मंगल गीते गात निघाल्या आणि सीता बालहंसीच्या चालीने निघाली. तिची सर्वांगे अपार कांतीने उजळली होती. ॥ २६३ ॥

**सखिन्ह मध्य सिय सोहति कैसें । छबिगन मध्य महाछबि जैसें ॥**
**कर सरोज जयमाल सुहाई । बिस्व बिजय सोभा जेहिं छाई ॥**

सख्यांच्यामध्ये सीता अशी शोभून दिसत होती की, जणू पुष्कळशा लावण्यवतींच्या मध्ये महालावण्यवती असावी. तिच्या करकमलांमध्ये सुंदर जयमाला होती. तिच्यामध्ये विश्वविजयी शोभा सामावली होती. ॥ १ ॥

**तन सकोचु मन परम उछाहू। गूढ़ प्रेमु लखि परइ न काहू॥**
**जाइ समीप राम छबि देखी। रहि जनु कुअँरि चित्र अवरेखी॥**

सीतेचे शरीर लाजेने चूर होते, परंतु मनामध्ये परम उत्साह भरलेला होता. तिचे ते गुप्त प्रेम कुणाला कळून आले नाही. जवळ गेल्यावर श्रीरामांचे लावण्य पाहून राजकुमारी सीता चित्रासारखी तटस्थ झाली.॥ २॥

**चतुर सखीं लखि कहा बुझाई। पहिरावहु जयमाल सुहाई॥**
**सुनत जुगल कर माल उठाई। प्रेम बिबस पहिराइ न जाई॥**

चतुर सखीने तिची ही दशा पाहून समजाविले की, 'अग, ही सुंदर जयमाला त्यांना घाल ना.' हे ऐकून सीतेने दोन्ही हातांनी माला उचलली, परंतु प्रेमविवश झाल्यामुळे तिला ती घालता येईना.॥ ३॥

**सोहत जनु जुग जलज सनाला। ससिहि सभीत देत जयमाला॥**
**गावहिं छबि अवलोकि सहेली। सियँ जयमाल राम उर मेली॥**

जणू देठांसह दोन कर-कमळे चंद्राला पाहाताना बावरून जयमाला अर्पण करीत आहेत. ते रूप पाहून सख्या गाणी गाऊ लागल्या. तेव्हा सीतेने श्रीरामांच्या गळ्यात जयमाला घातली.॥ ४॥

**सो०—रघुबर उर जयमाल देखि देव बरिसहिं सुमन।**
**सकुचे सकल भुआल जनु बिलोकि रबि कुमुदगन॥ २६४॥**

श्रीरघुनाथांच्या छातीवर जयमाला रुळताना पाहून देव पुष्प-वर्षा करू लागले. इतर सर्व राजे असे निस्तेज झाले की, जणू सूर्य पाहाताच (रात्रविकासी) कुमुदांचा समूह सुकून जातो.॥ २६४॥

**पुर अरु ब्योम बाजने बाजे। खल भए मलिन साधु सब राजे॥**
**सुर किंनर नर नाग मुनीसा। जय जय जय कहि देहिं असीसा॥**

नगरामध्ये आणि आकाशामध्ये वाद्ये वाजू लागली. दुष्ट लोक उदास झाले आणि सर्व सज्जन लोक प्रसन्न झाले. देवता, किन्नर, मनुष्य, नाग आणि मुनीश्वर जयजयकार करीत आशीर्वाद देऊ लागले.॥ १॥

**नाचहिं गावहिं बिबुध बधूटीं। बार बार कुसुमांजलि छूटीं॥**
**जहँ तहँ बिप्र बेदधुनि करहीं। बंदी बिरिदावलि उच्चरहीं॥**

देवांगना नाचू-गाऊ लागल्या. त्यांच्या हातून वारंवार फुले उधळली जात होती. जिकडे-तिकडे ब्राह्मण वेदघोष करीत होते आणि भाट लोक कुलकीर्ती वर्णन करीत होते.॥ २॥

**महि पाताल नाक जसु ब्यापा। राम बरी सिय भंजेउ चापा॥**
**करहिं आरती पुर नर नारी। देहिं निछावरि बित्त बिसारी॥**

पृथ्वी, पाताळ आणि स्वर्ग या तिन्ही लोकांमध्ये कीर्ती पसरली की श्रीरामचंद्रांनी धनुष्य मोडले आणि सीतेला वरले. नगरातील स्त्री–पुरुष आरती ओवाळू लागले आणि आपली ऐपत विसरून ओवाळणी देऊ लागले.॥ ३॥

**सोहति सीय राम कै जोरी। छबि सिंगारु मनहुँ एक ठोरी॥**
**सखीं कहहिं प्रभुपद गहु सीता। करति न चरन परस अति भीता॥**

श्रीसीता–रामांची जोडी अशी शोभून दिसत होती की जणू सुंदरता आणि शृंगाररस यांचे मीलन झाले आहे. सख्या म्हणत होत्या, 'सीते, स्वामींच्या चरणांचा स्पर्श कर.' परंतु सीता फार घाबरून गेल्याने त्यांच्या चरणांना स्पर्श करत नव्हती.॥ ४॥

दो०—**गौतम तिय गति सुरति करि नहिं परसति पग पानि।**
**मन बिहसे रघुबंसमनि प्रीति अलौकिक जानि॥ २६५॥**

गौतममुनींची पत्नी अहल्या हिच्या अवस्थेची आठवण झाल्यामुळे सीता श्रीरामांच्या चरणांना स्पर्श करीत नव्हती. सीतेचे अलौकिक प्रेम पाहून रघुकुलरत्न श्रीराम मनातून हसले.॥ २६५॥

**तब सिय देखि भूप अभिलाषे। कूर कपूत मूढ़ मन माखे॥**
**उठि उठि पहिरि सनाह अभागे। जहँ तहँ गाल बजावन लागे॥**

त्यावेळी सीतेला पाहून काही राजांना हाव सुटली. ते दुष्ट, कुपुत्र आणि मूर्ख राजे मनातून फार संतापले. ते हतभागी उठून चिलखते घालून वाटेल ती बडबड करू लागले.॥ १॥

**लेहु छड़ाइ सीय कह कोऊ। धरि बाँधहु नृप बालक दोऊ॥**
**तोरें धनुषु चाड़ नहिं सरई। जीवत हमहि कुअँरि को बरई॥**

कोणी म्हणू लागला की 'सीतेला हिसकावून घ्या आणि दोन्ही राजकुमारांना पकडून कैद करा. धनुष्य मोडल्याने काही इच्छा पूर्ण होणार नाही. आम्ही जिवंत असताना राजकुमारीशी विवाह कोण करू शकेल?॥ २॥

**जौं बिदेहु कछु करै सहाई। जीतहु समर सहित दोउ भाई॥**
**साधु भूप बोले सुनि बानी। राजसमाजहि लाज लजानी॥**

जर जनक राजाने त्यांना मदत केली, तर युद्धात दोन्ही भावांसह त्यालाही जिंकू. हे बोलणे ऐकून सज्जन राजे म्हणाले, 'या निर्लज्ज राजांना पाहून लाजेलाही लाज वाटाली असावी.॥ ३॥

**बलु प्रतापु बीरता बड़ाई। नाक पिनाकहि संग सिधाई॥**
**सोइ सूरता कि अब कहुँ पाई। असि बुधि तौ बिधि मुहँ मसि लाई॥**

अरे, तुमचे बल, प्रताप, शौर्य, मोठेपण आणि स्वर्ग (प्रतिष्ठा) तर धनुष्याबरोबरच गेली. आता ही वीरता कुठून आली? अशी दुष्ट बुद्धी आहे, म्हणून तर विधात्याने तुमच्या तोंडाला काळे फासले. ॥ ४ ॥

**दो०—देखहु रामहि नयन भरि तजि इरिषा मदु कोहु।**
**लखन रोषु पावकु प्रबल जानि सलभ जनि होहु॥ २६६ ॥**

ईर्ष्या, घमेंड व राग सोडून आणि डोळे उघडून जरा श्रीरामांकडे पाहा. लक्ष्मणाचा रागही प्रचंड आग आहे, हे ओळखून त्यात पतंग बनून मरू नका. ॥ २६६ ॥

**बैनतेय बलि जिमि चह कागू। जिमि ससु चहै नाग अरि भागू॥**
**जिमि चह कुसल अकारन कोही। सब संपदा चहै सिवद्रोही॥**

ज्याप्रमाणे गरुडाचा भाग कावळ्याने घेण्याची इच्छा करावी, सिंहाचा भाग मिळविण्याची इच्छा सशाने करावी. विनाकारण क्रोध करणाऱ्याने आपल्या कल्याणाची इच्छा धरावी. शिवांशी विरोध करणाऱ्याने सर्व प्रकारच्या संपत्तीची आस धरावी. ॥ १ ॥

**लोभी लोलुप कल कीरति चहई। अकलंकता कि कामी लहई॥**
**हरि पद बिमुख परम गति चाहा। तस तुम्हार लालचु नरनाहा॥**

लोभी माणसाने कीर्तीची आशा करावी, कामी माणसाने निष्कलंकतेची आशा धरावी, तर ती त्यांना मिळेल काय? आणि ज्याप्रमाणे श्रीहरींच्या चरणांशी विन्मुख झालेल्याने परमगतीची कामना धरावी, त्याप्रमाणे हे राजांनो, सीतेसाठी तुम्हांला सुटलेली हाव व्यर्थ आहे. ॥ २ ॥

**कोलाहलु सुनि सीय सकानी। सखीं लवाइ गईं जहँ रानी॥**
**रामु सुभायँ चले गुरु पाहीं। सिय सनेहु बरनत मन माहीं॥**

हा गोंधळ ऐकून सीता साशंक झाली. तेव्हा सख्या तिला राणी सुनयनेजवळ घेऊन गेल्या. श्रीरामचंद्र मनामध्ये सीतेच्या प्रेमाची वाखाणणी करीत नेहमीच्या चालीने गुरूंच्याजवळ गेले. ॥ ३ ॥

**रानिन्ह सहित सोचबस सीया। अब धौं बिधिहि काह करनीया॥**
**भूप बचन सुनि इत उत तकहीं। लखनु राम डर बोलि न सकहीं॥**

राण्यां आणि सीताही दुष्ट राजांचे दुष्ट बोलणे ऐकून काळजीत पडली की आता विधाता काय करणार आहे, कोण जाणे! राजांची बोलणी ऐकून लक्ष्मणाने इकडे-तिकडे पाहिले, परंतु श्रीरामांच्या दडपणामुळे तो गप्प राहिला. ॥ ४ ॥

**दो०—अरुन नयन भृकुटी कुटिल चितवत नृपन्ह सकोप।**
**मनहुँ मत्त गजगन निरखि सिंघकिसोरहि चोप॥ २६७ ॥**

त्याचे डोळे लालबुंद झाले, भुवया चढल्या आणि तो क्रोधाने त्या दुष्ट राजांच्याकडे पाहू लागला. मस्तवाल हत्तींची झुंड पाहून सिंहाच्या छाव्याला चेव येतो तसा.॥ २६७॥

**खरभरु देखि बिकल पुर नारीं। सब मिलि देहिं महीपन्ह गारीं॥**
**तेहिं अवसर सुनि सिवधनु भंगा। आयउ भृगुकुल कमल पतंगा॥**

गडबड-गोंधळ झालेला पाहून जनकपुरातील स्त्रिया व्याकूळ झाल्या आणि सर्वजणी मिळून दुष्ट राजांना शिव्या देऊ लागल्या. त्याचवेळी धनुष्य मोडल्याचे ऐकून भृगुकुलरूपी कमलाचे सूर्य परशुराम तेथे आले.॥ १॥

**देखि महीप सकल सकुचाने। बाज झपट जनु लवा लुकाने॥**
**गौरि सरीर भूति भल भ्राजा। भाल बिसाल त्रिपुंड बिराजा॥**

त्यांना पाहून बाज ससाण्याने झेप घेतल्यावर जसे लावा पक्षी अंग चोरून घेतात, तसे सर्व राजे भेदरून गेले. परशुरामांच्या गोऱ्या शरीरावर भस्माचे त्रिपुंड्र शोभून दिसत होते. आणि विशाल भालावरचा त्रिपुंड्र तर उठून दिसत होता.॥ २॥

**सीस जटा ससिबदनु सुहावा। रिसबस कछुक अरुन होइ आवा॥**
**भृकुटी कुटिल नयन रिस राते। सहजहुँ चितवत मनहुँ रिसाते॥**

शिरावर जटा होत्या. सुंदर मुख क्रोधाने काहीसे लाल झाले होते. भुवया चढल्या होत्या, डोळे रागाने लाल झाले होते. ते सहजपणे पाहात होते तरी असे वाटत होते की, जणू क्रोधाने पाहात आहेत.॥ ३॥

**बृषभ कंध उर बाहु बिसाला। चारु जनेउ माल मृगछाला॥**
**कटि मुनिबसन तून दुइ बाँधें। धनु सर कर कुठारु कल काँधें॥**

बैलाप्रमाणे उंच व पुष्ट खांदे, छाती व भुजा विशाल होत्या. त्यांनी सुंदर यज्ञोपवीत धारण केलेले होते रुद्राक्ष माळ घातलेली आणि मृगजिन घेतलेले होते. कंबरेला वल्कल आणि दोन भाते बांधलेले होते. हातात धनुष्यबाण आणि खांद्यावर कुऱ्हाड घेतली होती.॥ ४॥

दो०—**सांत बेषु करनी कठिन बरनि न जाइ सरूप।**
**धरि मुनितनु जनु बीर रसु आयउ जहँ सब भूप॥ २६८॥**

वेष शांत, परंतु कृती मात्र उग्र. त्या सर्व राजांच्या सभेत वीर-रसच जणू शरीर धारण करून प्रकट झाला होता.॥ २६८॥

**देखत भृगुपति बेषु कराला। उठे सकल भय बिकल भुआला॥**
**पितु समेत कहि कहि निज नामा। लगे करन सब दंड प्रनामा॥**

परशुरामांचे ते उग्र रूप पाहून सर्व राजे भयाने व्याकूळ होऊन उठून उभे राहिले आणि आपल्या पित्याचे नाव घेत आपली ओळख देऊन दंडवत करू लागले. ॥ १ ॥

**जेहि सुभायँ चितवहिं हितु जानी। सो जानइ जनु आइ खुटानी॥**
**जनक बहोरि आइ सिरु नावा। सीय बोलाइ प्रनामु करावा॥**

त्यांनी आपुलकीने सहजपणे कोणाकडे पहिले तरी त्याला वाटे की आता आपला काळ आला. नंतर जनक राजांनी येऊन मस्तक ठेवले आणि जानकीला बोलावून प्रणाम करायला लावला. ॥ २ ॥

**आसिष दीन्हि सखीं हरषानीं। निज समाज लै गईं सयानीं॥**
**बिस्वामित्रु मिले पुनि आई। पद सरोज मेले दोउ भाई॥**

परशुरामांनी सीतेला आशीर्वाद दिला. सख्यांना आनंद झाला आणि (आता तेथे आणखी थांबणे योग्य न समजून) त्या चतुर सख्या सीतेला घेऊन आपल्या मंडळींमध्ये गेल्या. नंतर विश्वामित्र येऊन भेटले व त्यांनी दोन्ही भावांना परशुरामांच्या चरणी घातले. ॥ ३ ॥

**रामु लखनु दसरथ के ढोटा। दीन्हि असीस देखि भल जोटा॥**
**रामहि चितइ रहे थकि लोचन। रूप अपार मार मद मोचन॥**

विश्वामित्र म्हणाले, 'हे राम व लक्ष्मण राजा दशरथांचे पुत्र आहेत.' त्यांची सुंदर जोडी पाहून परशुरामांनी आशीर्वाद दिला. कामदेवाचाही अहंकार उतरविणारे श्रीरामांचे अपार लावण्य पाहून त्यांचे नेत्र थक्क झाले. ॥ ४ ॥

दो०—**बहुरि बिलोकि बिदेह सन कहहु काह अति भीर।**
**पूँछत जानि अजान जिमि ब्यापेउ कोपु सरीर॥ २६९ ॥**

नंतर सर्व पाहून व जाणूनही काहीच माहीत नसल्यासारखे त्यांनी विचारले, 'सांगा, ही मोठी गर्दी कसली जमली आहे?' हे विचारताना ते संतापले होते. ॥ २६९ ॥

**समाचार कहि जनक सुनाए। जेहि कारन महीप सब आए॥**
**सुनत बचन फिरि अनत निहारे। देखे चापखंड महि डारे॥**

राजा जनकांनी सर्व राजेलोक कशासाठी आले होते, तो वृत्तांत सांगितला. जनकांचे बोलणे ऐकून परशुरामांनी वळून दुसरीकडे पाहिले, तर धनुष्याचे तुकडे जमिनीवर पडलेले दिसले. ॥ १ ॥

**अति रिस बोले बचन कठोरा। कहु जड़ जनक धनुष कै तोरा॥**
**बेगि देखाउ मूढ़ न त आजू। उलटउँ महि जहँ लहि तव राजू॥**

अत्यंत क्रोधाने व कठोर शब्दात ते म्हणाले, 'अरे, मूर्ख जनका, धनुष्य कोणी मोडले ते सांग. मला तो तत्काळ दाखव, नाही तर मूर्खा, जितके तुझे राज्य आहे, तितकी पृथ्वी मी उलथून टाकीन.' ॥ २ ॥

**अति डरु उतरु देत नृपु नाहीं। कुटिल भूप हरषे मन माहीं॥**
**सुर मुनि नाग नगर नर नारी। सोचहिं सकल त्रास उर भारी॥**

राजा घाबरला, त्यामुळे उत्तर शकला नाही. ते पाहून दुष्ट राजे मनातून खूष झाले. देव, नाग, मुनी, आणि नगरातील स्त्री-पुरुष काळजीत पडले. सर्वांच्या मनात भयंकर भीती होती.॥ ३॥

**मन पछिताति सीय महतारी। बिधि अब सँवरी बात बिगारी॥**
**भृगुपति कर सुभाउ सुनि सीता। अरध निमेष कलप सम बीता॥**

सीतेची आई मनात पश्चात्ताप करू लागली की, 'अरेरे, विधात्याने सगळे जुळून आलेले बिघडवून टाकले.' सीता परशुरामांचा स्वभाव ऐकून सीतेला अर्धा क्षणही कल्पासारखा वाटू लागला.॥ ४॥

दो०—**सभय बिलोके लोग सब जानि जानकी भीरु।**
**हृदयँ न हरषु बिषादु कछु बोले श्रीरघुबीरु॥ २७०॥**

तेव्हा श्रीरामचंद्रांनी सर्व लोकांना भयभीत झालेले पाहून व सीतेला घाबरलेली बघून म्हटले. त्यावेळी त्यांच्या मनात हर्ष नव्हता की विषाद नव्हता.॥ २७०॥

## मासपारायण, नववा विश्राम

**नाथ संभुधनु भंजनिहारा। होइहि केउ एक दास तुम्हारा॥**
**आयसु काह कहिअ किन मोही। सुनि रिसाइ बोले मुनि कोही॥**

'हे नाथ, शिवांचे धनुष्य मोडणारा कुणी तुमचा दासच असणार. काय आज्ञा आहे? मला का नाही विचारत?' हे ऐकून क्रुद्ध मुनी रागारागाने म्हणाले.॥ १॥

**सेवकु सो जो करै सेवकाई। अरि करनी करि करिअ लराई॥**
**सुनहु राम जेहिं सिवधनु तोरा। सहसबाहु सम सो रिपु मोरा॥**

'जो सेवेचे काम करतो, तो सेवक असतो. शत्रूसारखे काम केल्यावर युद्धच केले पाहिजे. हे रामा, ऐक. ज्याने शिवांचे धनुष्य मोडून टाकले, तो सहस्रार्जुनासारखा माझा शत्रू होय.॥ २॥

**सो बिलगाउ बिहाइ समाजा। न त मारे जैहहिं सब राजा॥**
**सुनि मुनि बचन लखन मुसुकाने। बोले परसुधरहि अपमाने॥**

ज्याने हे केले आहे त्याने या समाजातून बाजूला व्हावे, नाहीतर सर्व राजे मारले जातील.' मुनींचे बोलणे ऐकून लक्ष्मणाने स्मित केले आणि परशुरामांचा अपमान करण्यासाठी तो म्हणाला.॥ ३॥

**बहु धनुहीं तोरीं लरिकाईं। कबहुँ न असि रिस कीन्हि गोसाईं॥**
**एहि धनु पर ममता केहि हेतू। सुनि रिसाइ कह भृगुकुलकेतू॥**

महाराज, लहानपणी आम्ही अशा पुष्कळ धनुकल्या मोडल्या आहेत, परंतु तेव्हा तुम्ही कधी असे रागावला नाही? या धनुष्याबद्दल तुम्हांला एवढी ममता का वाटते?' हे ऐकून भृगुवंशला ध्वजास्वरूप असलेले परशुराम तावातावाने बोलू लागले, ॥ ४ ॥

**दो०—रे नृप बालक काल बस बोलत तोहि न सँभार।**
**धनुही सम तिपुरारि धनु बिदित सकल संसार॥ २७१ ॥**

'अरे राजपुत्रा, कालाला वश झाल्यामुळे तुला बोलण्याचीसुद्धा शुद्ध उरली नाही. साऱ्या जगात प्रसिद्ध असलेले शिवांचे धनुष्य काय धनुकलीप्रमाणे आहे?' ॥ २७१ ॥

**लखन कहा हँसि हमरें जाना। सुनहु देव सब धनुष समाना॥**
**का छति लाभु जून धनु तोरें। देखा राम नयन के भोरें॥**

लक्ष्मण हसत म्हणाला, 'हे देवा, ऐका. आमच्या लेखी सर्व धनुष्ये एकसारखीच आहेत. जुने धनुष्य मोडले, त्यात हानि-लाभ कसला? श्रीरामचंद्रांना हे नवीन असल्याचे वाटले होते. ॥ १ ॥

**छुअत टूट रघुपतिहु न दोसू। मुनि बिनु काज करिअ कत रोसू॥**
**बोले चितइ परसु की ओरा। रे सठ सुनेहि सुभाउ न मोरा॥**

मग स्पर्श करताच हे मोडून गेले. यात श्रीरघुनाथांचा काय दोष? मुनी, तुम्ही विनाकारण का रागावता?' परशुरामांनी आपल्या कुऱ्हाडीकडे पाहात म्हटले, 'अरे दुष्टा, तू माझा स्वभाव ऐकलेला नाहीस? ॥ २ ॥

**बालकु बोलि बधउँ नहिं तोही। केवल मुनि जड़ जानहि मोही॥**
**बाल ब्रह्मचारी अति कोही। बिस्व बिदित छत्रियकुल द्रोही॥**

तुला मी बालक समजून मारत नाही. अरे मूर्खा, तू मला फक्त मुनी समजतोस काय? मी बालब्रह्मचारी आणि अत्यंत क्रोधी आहे. क्षत्रियकुलाचा शत्रू म्हणून मी जगात विख्यात आहे. ॥ ३ ॥

**भुजबल भूमि भूप बिनु कीन्ही। बिपुल बार महिदेवन्ह दीन्ही॥**
**सहसबाहु भुज छेदनिहारा। परसु बिलोकु महीपकुमारा॥**

आपल्या बाहुबलाने मी पृथ्वी राजारहित केली आहे आणि पुष्कळ वेळा ती ब्राह्मणांना दान दिलेली आहे. हे राजकुमारा, सहस्रबाहूच्या भुजा तोडून टाकणारी ही माझी कुऱ्हाड बघ. ॥ ४ ॥

**दो०—मातु पितहि जनि सोचबस करसि महीसकिसोर।**
**गर्भन्ह के अर्भक दलन परसु मोर अति घोर॥ २७२ ॥**

अरे राज-बालका, तू आपल्या माता-पित्यांना काळजीत पाडू नकोस. माझा परशू भयानक आहे. हा गर्भातील मुलांचाही नाश करणारा आहे.'॥ २७२॥

**बिहसि लखनु बोले मृदु बानी। अहो मुनीसु महा भटमानी॥**
**पुनि पुनि मोहि देखाव कुठारू। चहत उड़ावन फूँकि पहारू॥**

लक्ष्मण हसत-हसत कोमल वाणीने म्हणाला, 'अहो मुनीश्वर, तुम्ही स्वतःला फार मोठे योद्धे समजता. वारंवार मला परशूचा धाक दाखवित आहात. फुंकर मारून पर्वत उडवू पाहात आहात.॥ १॥

**इहाँ कुम्हड़बतिया कोउ नाहीं। जे तरजनी देखि मरि जाहीं॥**
**देखि कुठारु सरासन बाना। मैं कछु कहा सहित अभिमाना॥**

येथे कोणी बोट दाखविताच मरून जाणारे काही एखादे कच्चे फळ नाही. तुमचा परशू व धनुष्यबाण पाहूनच मी काहीशा अभिमानाने बोललो आहे.॥ २॥

**भृगुसुत समुझि जनेउ बिलोकी। जो कछु कहहु सहउँ रिस रोकी॥**
**सुर महिसुर हरिजन अरु गाई। हमरें कुल इन्ह पर न सुराई॥**

भृगुवंशी समजून व यज्ञोपवीत पाहून तुम्ही जे काही बोलत आहात, ते मी राग आवरून सहन करीत आहे. देव, ब्राह्मण, भगवंताचे भक्त आणि गाय-यांच्यावर आमच्या कुळामध्ये कुणी वीरता दाखवीत नाही.॥ ३॥

**बधें पापु अपकीरति हारें। मारतहूँ पा परिअ तुम्हारें॥**
**कोटि कुलिस सम बचनु तुम्हारा। ब्यर्थ धरहु धनु बान कुठारा॥**

कारण यांना मारल्यामुळे पाप लागते आणि यांच्याकडून पराजित झाल्यावर अपकीर्ती होते. म्हणून तुम्ही मारले, तरी तुमच्या पाया पडले पाहिजे. तुमचे एक-एक वचन कोट्यवधी वज्रांसारखे कठोर आहे. मग त्याच्यासमोर धनुष्यबाण व परशू तुम्ही विनाकारणच धारण करता.॥ ४॥

**दो०—जो बिलोकि अनुचित कहेउँ छमहु महामुनि धीर।**
**सुनि सरोष भृगुबंसमनि बोले गिरा गभीर॥ २७३॥**

ते धनुष्यबाण व परशू पाहून मी काही अनुचित बोललो असेन तर हे धीर महामुनी, क्षमा करा.' हे ऐकून भृगुवंशरत्न परशुराम क्रोधाने गंभीर वाणीने म्हणाले,॥ २७३॥

**कौसिक सुनहु मंद यहु बालकु। कुटिल कालबस निज कुल घालकु॥**
**भानु बंस राकेस कलंकू। निपट निरंकुस अबुध असंकू॥**

'हे विश्वामित्रा, ऐक. हा बालक मोठा दुष्ट बुद्धीचा व कुटिल आहे. काळाला वश होऊन हा आपल्या कुळाचा घात करू पाहात आहे. हा सूर्यवंशरूपी पूर्णचंद्राला कलंक आहे. हा मोठा उर्मट, मूर्ख व उद्धट आहे.॥ १॥

**काल कवलु होइहि छन माहीं। कहउँ पुकारि खोरि मोहि नाहीं॥**
**तुम्ह हटकहु जौं चहहु उबारा। कहि प्रतापु बलु रोषु हमारा॥**

आता या क्षणी हा मृत्यूचा घास बनेल. मी हे अगदी ओरडून सांगतो. जर याला वाचवावयाचे असेल, तर माझा प्रताप, बल आणि क्रोध हे सांगून याला अडवा.'॥ २॥

**लखन कहेउ मुनि सुजसु तुम्हारा। तुम्हहि अछत को बरनै पारा॥**
**अपने मुँह तुम्ह आपनि करनी। बार अनेक भाँति बहु बरनी॥**

लक्ष्मण म्हणाला, 'हे मुनी, तुमची कीर्ती तुम्ही असताना दुसरा कोण सांगू शकेल? तुम्ही स्वत:च्या तोंडानेच आपली कृत्ये अनेक वेळा, अनेक तऱ्हेने सांगितलेली आहेत.॥ ३॥

**नहिं संतोषु त पुनि कछु कहहू। जनि रिस रोकि दुसह दुख सहहू॥**
**बीरब्रती तुम्ह धीर अछोभा। गारी देत न पावहु सोभा॥**

एवढ्यावरही समाधान झाले नसेल तर आणखी काही सांगा. आपला राग आवरून उद्वेग सहन करू नका. तुम्ही वीरतेचे व्रत धारण करणारे, धैर्यवान आणि क्षोभरहित आहात. शिव्या देणे तुम्हांला शोभत नाही.॥ ४॥

दो०—**सूर समर करनी करहिं कहि न जनावहिं आपु।**
**बिद्यमान रन पाइ रिपु कायर कथहिं प्रतापु॥ २७४॥**

शूरवीर हे युद्धात पराक्रम करतात. तो शब्दांनी सांगून दुसऱ्याला पटवून देत नाहीत. शत्रू युद्धामध्ये आल्यावर भित्रे लोकच फुशारकी मारू लागतात.॥ २७४॥

**तुम्ह तौ कालु हाँक जनु लावा। बार बार मोहि लागि बोलावा॥**
**सुनत लखन के बचन कठोरा। परसु सुधारि धरेउ कर घोरा॥**

तुम्ही जणू काळाला हाक मारून वारंवार त्याला माझ्यासाठी बोलवीत आहात.' लक्ष्मणाचे कठोर शब्द ऐकताच परशुरामांनी आपला भयंकर परशू परजून हात उगारला. ते म्हणाले.॥ १॥

**अब जनि देइ दोसु मोहि लोगू। कटुबादी बालकु बधजोगू॥**
**बाल बिलोकि बहुत मैं बाँचा। अब यहु मरनिहार भा साँचा॥**

'आता मला कोणी दोष देऊ नका. हा खवचट बोलणारा बालक ठार मारण्याच्या योग्यतेचाच आहे. याला लहान समजून मी आतापर्यंत वाचविले, परंतु आता हा खरोखरच मरायलाच आला आहे'॥ २॥

**कौसिक कहा छमिअ अपराधू। बाल दोष गुन गनहिं न साधू॥**
**खर कुठार मैं अकरुन कोही। आगें अपराधी गुरुद्रोही॥**

विश्वामित्र म्हणाले, 'अपराधाची क्षमा असावी. साधुजन बालकांचे दोष किंवा गुण पाहात नाहीत. परशुराम म्हणाले, 'तीक्ष्ण धारेचा परशू, मी निर्दय व क्रोधी आणि हा गुरुद्रोही आणि अपराधी माझ्यासमोर.॥ ३॥

**उतर देत छोड़उँ बिनु मारें। केवल कौसिक सील तुम्हारें॥**
**न त एहि काटि कुठार कठोरें। गुरहि उरिन होतेउँ श्रम थोरें॥**

उत्तर देत आहे. तरीही मी याला न मारता सोडून देतो. विश्वामित्रा! हे फक्त तुमच्या प्रेमामुळे; नाही तर या कठोर कुठाराने कापून काढून अल्प प्रयासाने मी आपल्या शिवगुरूंच्या ऋणातून मुक्त झालो असतो.'॥ ४॥

दो०—**गाधिसूनु कह हृदयँ हँसि मुनिहि हरिअरइ सूझ।**
**अयमय खाँड़ न ऊखमय अजहुँ न बूझ अबूझ॥ २७५॥**

विश्वामित्र मनातल्या मनात हसून म्हणाले, मुनींना सर्वत्र हिरवे हिरवेच दिसत आहे. (अर्थात सर्वत्र विजयी झाल्यामुळे हे श्रीराम-लक्ष्मणांना सामान्य क्षत्रियच समजत आहेत.) परंतु हे पोलादी खांड (खड्ग) आहे. उसाच्या रसाची खांड (साखर) नाही. मुनी अजुनी अजाण आहेत. यांचा प्रभाव त्यांना समजला नाही.॥ २७५॥

**कहेउ लखन मुनि सीलु तुम्हारा। को नहिं जान बिदित संसारा॥**
**माता पितहि उरिन भए नीकें। गुर रिनु रहा सोचु बड़ जी कें॥**

लक्ष्मण म्हणाला, 'हे मुनी, तुमचे चरित्र कुणाला माहीत नाही? ते जगभर प्रसिद्ध आहे. तुम्ही माता-पित्याच्या ऋणातून चांगल्या प्रकारे मुक्त झालात. आता राहिले गुरुऋण. त्याची मनात रुखरुख लागून राहिली आहे.॥ १॥

**सो जनु हमरेहि माथे काढ़ा। दिन चलि गए ब्याज बड़ बाढ़ा॥**
**अब आनिअ ब्यवहरिआ बोली। तुरत देउँ मैं थैली खोली॥**

ते जणू आमच्या डोक्यावर ओढवले आहे. फार दिवस झालेत, त्यामुळे त्याचे व्याजही वाढले असेल. आता एखाद्या हिशोब करणाऱ्याला बोलावून घ्या, मग मी लगेच थैली उघडून ते फेडतो.॥ २॥

**सुनि कटु बचन कुठार सुधारा। हाय हाय सब सभा पुकारा॥**
**भृगुबर परसु देखावहु मोही। बिप्र बिचारि बचउँ नृपद्रोही॥**

लक्ष्मणाचे तिखट बोलणे ऐकून परशुरामांनी परशू उचलला. साऱ्या सभेमध्ये अरे बाप रे! अरे

बाप रे! असे शब्द घुमले. लक्ष्मण म्हणाला, 'हे भृगुश्रेष्ठ, तुम्ही मला परशू दाखवीत आहात? परंतु हे राजांच्या शत्रो, मी तुम्हांला ब्राह्मण समजून सोडून देतो. ॥ ३ ॥

**मिले न कबहुँ सुभट रन गाढ़े । द्विज देवता घरहि के बाढ़े ॥**
**अनुचित कहि सब लोग पुकारे । रघुपति सयनहिं लखनु नेवारे ॥**

तुम्हांला कधी रणधीर बलवान वीर भेटले नाहीत. हे ब्राह्मण देवा, तुम्ही घरातल्या घरातच मोठे आहात.' हे ऐकून 'छे! छे! भलतेच!' असे म्हणून सर्व लोक ओरडले. तेव्हा श्रीरघुनाथांनी खूण करून लक्ष्मणाला थोपविले. ॥ ४ ॥

दो०—**लखन उतर आहुति सरिस भृगुबर कोपु कृसानु।**
**बढ़त देखि जल सम बचन बोले रघुकुलभानु ॥ २७६ ॥**

लक्ष्मणाच्या बोलण्याची आहुती पडताच परशुरामांचा क्रोधरूपी अग्नी भडकत असलेला पाहून रघुकुलातील सूर्य श्रीरामचंद्रांनी जलासमान शांत वचन उच्चारले. ॥ २७६ ॥

**नाथ करहु बालक पर छोहू । सूध दूधमुख करिअ न कोहू ॥**
**जौं पै प्रभु प्रभाउ कछु जाना । तौ कि बराबरि करत अयाना ॥**

'हे नाथ, बालकावर कृपा करा. या भोळ्या व दूधपित्या मुलावर राग धरू नका. जर याला प्रभूंचा प्रभाव ठाऊक असता, तर या समज नसलेल्याने तुमची बरोबरी केली असती काय? ॥ १ ॥

**जौं लरिका कछु अचगरि करहीं । गुर पितु मातु मोद मन भरहीं ॥**
**करिअ कृपा सिसु सेवक जानी । तुम्ह सम सील धीर मुनि ग्यानी ॥**

बालकाने जरी काही खोडी केली, तरी गुरू, पिता व माता मनात आनंदून जातात. म्हणून लहान मूल आणि सेवक समजून याच्यावर कृपा करा. तुम्ही तर समदर्शी, सुशील, धीर व ज्ञानी मुनी आहात.' ॥ २ ॥

**राम बचन सुनि कछुक जुड़ाने । कहि कछु लखनु बहुरि मुसुकाने ॥**
**हँसत देखि नख सिख रिस ब्यापी । राम तोर भ्राता बड़ पापी ॥**

श्रीरामांचे बोल ऐकून परशुराम थोडेसे थंड झाले. इतक्यात लक्ष्मण काही पुटपुटत हसला. त्याचे हसणे पाहून परशुराम नखशिखांत क्रुद्ध झाले. ते म्हणाले, 'हे रामा, तुझा भाऊ मोठा पापी आहे. ॥ ३ ॥

**गौर सरीर स्याम मन माहीं । कालकूटमुख पयमुख नाहीं ॥**
**सहज टेढ़ अनुहरइ न तोही । नीचु मीचु सम देख न मोही ॥**

हा शरीराने गोरा असला तरी मनाने फार काळा आहे. हा विषमुखी आहे, दूधमुखी बाळ नव्हे. हा स्वभावानेच तिरकस आहे. तुझे अनुकरण करीत नाही. (तुझ्यासारखा शीलवान नाही). या नीचाला मी काळासारखा वाटत नाही. ॥ ४ ॥

**दो०—लखन कहेउ हँसि सुनहु मुनि क्रोधु पाप कर मूल।**
**जेहि बस जन अनुचित करहिं चरहिं बिस्व प्रतिकूल॥ २७७॥**

लक्ष्मण हसत म्हणाला, 'हे मुनी, ऐका. क्रोध हा पापाचे मूळ आहे. त्याला वश झाल्यामुळे मनुष्य अनुचित कर्म करतो. आणि जगाचे अकल्याण करतो.॥ २७७॥

**मैं तुम्हार अनुचर मुनिराया। परिहरि कोपु करिअ अब दाया॥**
**टूट चाप नहिं जुरिहि रिसाने। बैठिअ होइहिं पाय पिराने॥**

हे मुनिराज, मी तुमचा दास आहे. आता क्रोध सोडून देऊन दया करा. मोडलेले धनुष्य क्रोध केल्याने काही जोडले जाणार नाही. उभे राहून राहून पाय दुखत असतील आता बसा.॥ १॥

**जौं अति प्रिय तौ करिअ उपाई। जोरिअ कोउ बड़ गुनी बोलाई॥**
**बोलत लखनहिं जनकु डेराहीं। मष्ट करहु अनुचित भल नाहीं॥**

जर धनुष्य फारच प्रिय असेल तर काही उपाय करता येईल. एखाद्या मोठ्या गुणी कारागीराला बोलावून जोडून घेऊ.' लक्ष्मणाच्या अशा बोलण्याने जनक राजा घाबरून गेले आणि म्हणाले, 'आता पुरे, गप्प बसा. अनुचित बोलणे योग्य नव्हे.'॥ २॥

**थर थर काँपहिं पुर नर नारी। छोट कुमार खोट बड़ भारी॥**
**भृगुपति सुनि सुनि निरभय बानी। रिस तन जरइ होइ बल हानी॥**

जनकपुरीचे स्त्री-पुरुष थरथर कापू लागले आणि मनात म्हणू लागले की, 'हा छोटा कुमार फार लबाड आहे.' लक्ष्मणाचे बेधडक बोलणे ऐकून परशुरामांच्या अंगाचा तिळपापड होत होता, आणि त्यांचे बळही कमी होऊ लागले होते.॥ ३॥

**बोले रामहि देइ निहोरा। बचउँ बिचारि बंधु लघु तोरा॥**
**मनु मलीन तनु सुंदर कैसें। बिष रस भरा कनक घटु जैसें॥**

तेव्हा श्रीरामचंद्रांच्यावर मेहरबानी केल्यासारखे दाखवीत परशुराम म्हणाले, 'तुझा लहान भाऊ समजून मी याला सोडून देतो. हा मनाने वाईट आणि शरीराने गोरा आहे, जणू विषाने भरलेला सुवर्णकुंभ आहे.॥ ४॥

**दो०—सुनि लछिमन बिहसे बहुरि नयन तरेरे राम।**
**गुर समीप गवने सकुचि परिहरि बानी बाम॥ २७८॥**

हे ऐकून लक्ष्मण पुन्हा हसला. तेव्हा श्रीरामांनी डोळ्यांनी त्याला दटावले. त्यामुळे लक्ष्मण वरमला आणि उलट बोलणे सोडून देऊन गुरूंच्याजवळ गेला.॥ २७८॥

**अति बिनीत मृदु सीतल बानी। बोले रामु जोरि जुग पानी॥**
**सुनहु नाथ तुम्ह सहज सुजाना। बालक बचनु करिअ नहिं काना॥**

श्रीरामचंद्र दोन्ही हात जोडून अत्यंत नम्रतेने व कोमल, शीतल वाणीने म्हणाले, 'हे नाथ, ऐका. तुम्ही स्वभावत: ज्ञानी आहात. बालकाच्या बोलण्याकडे लक्ष देऊ नका.॥ १ ॥

**बरै बालकु एकु सुभाऊ। इन्हहि न संत बिदूषहिं काऊ॥**
**तेहिं नाहीं कछु काज बिगारा। अपराधी मैं नाथ तुम्हारा॥**

गांधील माशी आणि मुले यांचा स्वभाव सारखा असतो. संतजन त्यांना दोष देत नाहीत. शिवाय त्याने काही तुमच्या गुरूंचे धनुष्य मोडले नाही. हे नाथ, मी तुमचा अपराधी आहे.॥ २ ॥

**कृपा कोपु बधु बँधब गोसाईं। मो पर करिअ दास की नाईं॥**
**कहिअ बेगि जेहि बिधि रिस जाई। मुनिनायक सोइ करौं उपाई॥**

म्हणून हे स्वामी, कृपा, क्रोध, वध व बंधन जे काही करायचे आहे, ते दास समजून माझ्यावर करा. हे मुनिराज, तुमचा राग, कशाने दूर होईल ते सांगा. मी ते करीन.'॥ ३ ॥

**कह मुनि राम जाइ रिस कैसें। अजहुँ अनुज तव चितव अनैसें॥**
**एहि कें कंठ कुठारु न दीन्हा। तौ मैं काह कोपु करि कीन्हा॥**

मुनी म्हणाले, 'हे रामा, राग कसा जाणार? अजुनी तुझा लहान भाऊ वाकड्या नजरेने माझ्याकडे बघत आहे. याच्या मानेवर कुऱ्हाड चालविली नाही, तर क्रोध करून काय उपयोग झाला?॥ ४ ॥

दो०—**गर्भ स्त्रवहिं अवनिप रवनि सुनि कुठार गति घोर।**
**परसु अछत देखउँ जिअत बैरी भूपकिसोर॥ २७९॥**

माझ्या ज्या कुऱ्हाडीची घोर कृत्ये ऐकून राजांच्या स्त्रियांचा गर्भपात होत असे. तो परशू असतानाही मी या शत्रू राजपुत्राला अजुनी जिवंत पाहात आहे.॥ २७९ ॥

**बहइ न हाथु दहइ रिस छाती। भा कुठारु कुंठित नृपघाती॥**
**भयउ बाम बिधि फिरेउ सुभाऊ। मोरे हृदयँ कृपा कसि काऊ॥**

हात चालेनासा झाला असून क्रोधाने छाती जळत आहे. राजे लोकांचा घात करणारी ही कुऱ्हाड ही कुंठित झाली आहे. दैव प्रतिकूल झाले आहे. त्यामुळे माझा स्वभाव बदलला आहे. नाही तर माझ्या मनात अवेळी कृपा कशी आली असती?॥ १ ॥

**आजु दया दुखु दुसह सहावा। सुनि सौमित्रि बिहसि सिरु नावा॥**
**बाउ कृपा मूरति अनुकूला। बोलत बचन झरत जनु फूला॥**

आज दयेमुळे मला दुःसह यातना होत आहेत.' हे ऐकून लक्ष्मणाने हसून मस्तक नम्र केले आणि म्हटले, 'तुमचा कृपारूपी वायूही आपल्या रूपाला शोभणाराच आहे. आपण बोलत आहात, तेव्हा जणू फुलांचा वर्षाव होत आहे. ॥ २ ॥

**जौं पै कृपाँ जरिहिं मुनि गाता । क्रोध भएँ तनु राख बिधाता ॥**
**देखु जनक हठि बालकु एहू । कीन्ह चहत जड़ जमपुर गेहू ॥**

हे मुनी, जर कृपा केल्याने तुमच्या शरीराची आग होत असेल, तर मग क्रोध आला असता शरीराचे रक्षण विधाताच करू शकेल.' परशुराम म्हणाले, 'हे जनका, बघ. हा मूर्ख मुलगा हट्टाने यमपुरीत जाऊ इच्छितो. ॥ ३ ॥

**बेगि करहु किन आँखिन्ह ओटा । देखत छोट खोट नृपु ढोटा ॥**
**बिहसे लखनु कहा मन माहीं । मूदें आँखि कतहुँ कोउ नाहीं ॥**

याला ताबडतोब माझ्या नजरेपासून दूर का करीत नाहीस. हा राजपुत्र दिसतो छोटा, परंतु आहे खोटा.' लक्ष्मण हसून मनात म्हणाला, 'डोळे मिटून घेतल्यावर कुठेही काहीही नसते.' ॥ ४ ॥

**दो०—परसुरामु तब राम प्रति बोले उर अति क्रोधु।**
**संभु सरासनु तोरि सठ करसि हमार प्रबोधु॥ २८० ॥**

मग परशुराम अत्यंत क्रोधाने श्रीरामांना म्हणाले, 'अरे धूर्ता! शिवांचे धनुष्य मोडून तू उलट मलाच ज्ञान पाजतोस? ॥ २८० ॥

**बंधु कहइ कटु संमत तोरें । तू छल बिनय करसि कर जोरें ॥**
**करु परितोषु मोर संग्रामा । नाहिं त छाड़ कहाउब रामा ॥**

तुझा हा भाऊ तुझ्याच संमतीने कटू वचन बोलतोय आणि कपटाने हात जोडून विनवणी करतो आहेस. एक तर युद्ध करून माझे समाधान कर; नाही तर स्वतःला 'राम' म्हणवून घेणे सोडून दे. ॥ १ ॥

**छलु तजि करहि समरु सिवद्रोही । बंधु सहित न त मारउँ तोही ॥**
**भृगुपति बकहिं कुठार उठाएँ । मन मुसुकाहिं रामु सिर नाएँ ॥**

अरे शिवद्रोह्या! कपट सोडून माझ्याशी युद्ध कर, नाही तर भावासह तुलाही मारून टाकतो.' अशाप्रकारे परशुराम परशू उभारून बडबड करीत होते आणि श्रीराम मान खाली घालून मनात हसत होते. ॥ २ ॥

**गुनह लखन कर हम पर रोषू । कतहुँ सुधाइहु ते बड़ दोषू ॥**
**टेढ़ जानि सब बंदइ काहू । बक्र चंद्रमहि ग्रसइ न राहू ॥**

श्रीराम मनातल्या मनात म्हणत होते. अपराध लक्ष्मणाचा आणि राग माझ्यावर काढत आहेत. कधी कधी सरळपणामध्येही मोठा दोष असतो. वाकडा असणाऱ्या कुणालाही सर्वजण नमस्कार करतात. वाकड्या चंद्राला राहूसुद्धा ग्रासत नाही. ॥ ३ ॥

**राम कहेउ रिस तजिअ मुनीसा । कर कुठारु आगें यह सीसा ॥**
**जेहिं रिस जाइ करिअ सोइ स्वामी । मोहि जानिअ आपन अनुगामी ॥**

श्रीरामांनी उघडपणे म्हटले, 'हे मुनीश्वर! राग सोडून द्या. तुमच्या हाती कुऱ्हाड आहे आणि माझे शिर समोर आहे. हे स्वामी, ज्यामुळे तुमचा राग शांत होईल, ते करा. मला आपला दास समजा. ॥ ४ ॥

दो०—**प्रभुहि सेवकहि समरु कस तजहु बिप्रबर रोसु।**
**बेषु बिलोकें कहेसि कछु बालकहू नहिं दोसु ॥ २८१ ॥**

स्वामी आणि सेवक यांच्यात युद्ध कसले? राग सोडा. तुमचा वीरवेष पाहूनच हा मुलगा काही बोलला. खरे तर यात त्याचाही काही दोष नाही. ॥ २८१ ॥

**देखि कुठार बान धनु धारी । भै लरिकहि रिस बीरु बिचारी ॥**
**नामु जान पै तुम्हहि न चीन्हा । बंस सुभायँ उतरु तेहिं दीन्हा ॥**

आपल्याकडे कुऱ्हाड व धनुष्यबाण पाहून आपण वीर आहात, असे बाळ लक्ष्मणाला वाटले. त्यामुळे त्याला राग आला. तुमचे नाव त्याने ऐकले होते, पण तुम्हांला त्याने ओळखले नाही. त्यामुळे आपल्या रघुवंशाच्या स्वभावाप्रमाणे त्याने उत्तर दिले. ॥ १ ॥

**जौं तुम्ह औतेहु मुनि की नाईं । पद रज सिर सिसु धरत गोसाईं ॥**
**छमहु चूक अनजानत केरी । चहिअ बिप्र उर कृपा घनेरी ॥**

जर तुम्ही मुनीसारखे आला असता, तर या मुलाने तुमच्या चरणांची धूळ शिरोधार्य केली असती. नकळत झालेल्या चुकीबद्दल क्षमा करा. ब्राह्मणांच्या मनात मुख्यत: दया असायला हवी. ॥ २ ॥

**हमहि तुम्हहि सरिबरि कसि नाथा । कहहु न कहाँ चरन कहँ माथा ॥**
**राम मात्र लघु नाम हमारा । परसु सहित बड़ नाम तोहारा ॥**

हे नाथा, आमची-तुमची बरोबरी कसली? कुठे चरण आणि कुठे मस्तक, सांगा ना? कुठे माझे फक्त 'राम' असे छोटेसे नाव आणि कुठे तुमचे परशूसह मोठे नाव. ॥ ३ ॥

**देव एकु गुनु धनुष हमारें । नव गुन परम पुनीत तुम्हारें ॥**
**सब प्रकार हम तुम्ह सन हारे । छमहु बिप्र अपराध हमारे ॥**

हे देव, आमच्याजवळ एकच गुण युक्त (दोरी असलेले) धनुष्य आहे, आणि तुमचे तर परम पवित्र शम, दम, तप, शौच, क्षमा, सरलता, ज्ञान, विज्ञान आणि आस्तिकता हे नऊ गुण. आम्ही सर्व प्रकारे तुमच्यासमोर पराजित आहोत. हे विप्र, आमच्या अपराधांना क्षमा करा. ॥ ४ ॥

**दो०—बार बार मुनि बिप्रबर कहा राम सन राम।**
**बोले भृगुपति सरुष हसि तहूँ बंधु सम बाम॥ २८२॥**

श्रीरामांनी परशुरामांना वारंवार 'मुनि' व 'विप्रवर' असे म्हटले. तेव्हा भृगुपती परशुराम रागावून म्हणाले, 'तू सुद्धा आपल्या भावासारखा वाकडाच आहेस. ॥ २८२ ॥

**निपटहिं द्विज करि जानहि मोही। मैं जस बिप्र सुनावउँ तोही॥**
**चाप स्त्रुवा सर आहुति जानू। कोपु मोर अति घोर कृसानू॥**

तू मला निव्वळ ब्राह्मणच समजतोस? मी कसा ब्राह्मण आहे, ते सांगतो. माझे धनुष्यही स्त्रुवा, बाण ही आहुती आणि माझा क्रोध हा अत्यंत भयानक अग्नी आहे, असे समज. ॥ १ ॥

**समिधि सेन चतुरंग सुहाई। महा महीप भए पसु आई॥**
**मैं एहिं परसु काटि बलि दीन्हे। समर जग्य जप कोटिन्ह कीन्हे॥**

चतुरंगिणी सेना या समिधा आहेत. मोठमोठे राजे यज्ञातील पशू आहेत. परशूने कापून मी त्यांचा बळी दिला आहे. असे कोट्यवधी जपयुक्त रणयज्ञ मी केलेले आहेत. (अर्थात ज्याप्रमाणे मंत्रोच्चारपूर्वक 'स्वाहा' म्हणून आहुती दिली जाते, त्याप्रमाणे मी आवाहन करीत राजांचा बळी दिलेला आहे.) ॥ २ ॥

**मोर प्रभाउ बिदित नहिं तोरें। बोलसि निदरि बिप्र के भोरें॥**
**भंजेउ चापु दापु बड़ बाढ़ा। अहमिति मनहुँ जीति जगु ठाढ़ा॥**

माझा प्रभाव तुला माहीत नाही. त्यामुळे तू ब्राह्मण म्हणून माझा अनादर करीत आहेस. धनुष्य मोडलेस, त्यामुळे तुला मोठी घमेंड आली आहे. जणू जग जिंकून उभा ठाकल्याप्रमाणे तुझा अहंकार वाढलेला आहे.' ॥ ३ ॥

**राम कहा मुनि कहहु बिचारी। रिस अति बड़ि लघु चूक हमारी॥**
**छुअतहिं टूट पिनाक पुराना। मैं केहि हेतु करौं अभिमाना॥**

श्रीरामचंद्र म्हणाले, 'हे मुनी, विचार करून बोला. तुमचा क्रोध फार मोठा आहे आणि माझी चूक फार छोटी आहे. धनुष्य जीर्ण होते, हात लावताच ते मोडले. त्यात मी कशाला अभिमान धरू? ॥ ४ ॥

**दो०—जौं हम निदरहिं बिप्र बदि सत्य सुनहु भृगुनाथ।**
**तौ अस को जग सुभटु जेहि भय बस नावहिं माथ॥ २८३॥**

हे भृगुनाथ, जर आम्ही ब्राह्मण म्हणून (तुमचा) अपमान करीत असू, तर सत्य ऐका. जगात असा कोणता योद्धा आहे, ज्याच्या भयाने आम्ही त्याच्यापुढे मस्तक नमवावे? ॥ २८३ ॥

**देव दनुज भूपति भट नाना। समबल अधिक होउ बलवाना॥**
**जौं रन हमहि पचारै कोऊ। लरहिं सुखेन कालु किन होऊ॥**

देव, दैत्य, राजा किंवा पुष्कळसे योद्धे हे बळाने आमच्या बरोबरीचे असोत किंवा आमच्यापेक्षा जास्त बलवान असोत, जर कुणीही आम्हांला युद्धासाठी ललकारले, तर आम्ही आनंदाने त्याच्याशी लढू. मग तो काळ का असेना?॥ १॥

**छत्रिय तनु धरि समर सकाना। कुल कलंकु तेहिं पावँर आना॥**
**कहउँ सुभाउ न कुलहि प्रसंसी। कालहु डरहिं न रन रघुबंसी॥**

क्षत्रियशरीर धारण करून युद्धाला जो घाबरला, त्या नीच पुरुषाने आपल्या कुळाला कलंक लावला. मी हे स्वाभाविकपणे म्हणतो, कुळाची प्रशंसा म्हणून नव्हे, रघुवंशी युद्धामध्ये मृत्यूलाही घाबरत नाहीत.॥ २॥

**बिप्रबंस कै असि प्रभुताई। अभय होइ जो तुम्हहि डेराई॥**
**सुनि मृदु गूढ़ बचन रघुपति के। उघरे पटल परसुधर मति के॥**

ब्राह्मणवंशाचा असा महिमा आहे की, जो तुम्हांला घाबरतो, तो निर्भय होतो.' श्रीरघुनाथांचे कोमल व गूढ वचन ऐकून परशुरामांच्या बुद्धीवरील अज्ञानाचा पडदा दूर झाला.॥ ३॥

**राम रमापति कर धनु लेहू। खैंचहु मिटै मोर संदेहू॥**
**देत चापु आपुहिं चलि गयऊ। परसुराम मन बिसमय भयऊ॥**

परशुराम म्हणाले, 'हे राम, हे लक्ष्मीपतीचे धनुष्य हाती धरा आणि ओढा, म्हणजे माझा संशय दूर होईल.' परशुराम जेव्हा धनुष्य देऊ लागले, तेव्हा ते आपोआप श्रीरामांच्या हाती गेले. परशुरामांना मनातून आश्चर्य वाटले.॥ ४॥

दो०—**जाना राम प्रभाउ तब पुलक प्रफुल्लित गात।**
**जोरि पानि बोले बचन हृदयँ न प्रेमु अमात॥ २८४॥**

त्यांनी श्रीरामांचा प्रभाव जाणला, तेव्हा त्यांचे अंग आनंदाने रोमांचित झाले. ते हात जोडून म्हणाले. त्यांच्या हृदयात प्रेम मावत नव्हते.॥ २८४॥

**जय रघुबंस बनज बन भानू। गहन दनुज कुल दहन कृसानू॥**
**जय सुर बिप्र धेनु हितकारी। जय मद मोह कोह भ्रम हारी॥**

'हे रघुकुलरूपी कमलवनाच्या सूर्या, हे राक्षस कुलरूपी दाट जंगलाला जाळून टाकणाऱ्या अग्ने, तुमचा विजय असो. हे देव, ब्राह्मण व गाई यांचे हित करणारे, तुमचा विजय असो. हे मद, क्रोध आणि भ्रम यांचे हरण करणारे, तुमचा विजय असो.॥ १॥

**बिनय सील करुना गुन सागर। जयति बचन रचना अति नागर॥**
**सेवक सुखद सुभग सब अंगा। जय सरीर छबि कोटि अनंगा॥**

हे विनय, शील, कृपा इत्यादी गुणांचे समुद्र आणि बोलण्यात अत्यंत चतुर, तुमचा विजय असो. हे सेवकांना सुख देणारे, सर्वांगसुंदर व शरीरामध्ये कोट्यवधी कामदेवांचे लावण्य धारण करणारे, तुमचा विजय असो.॥ २॥

**करौं काह मुख एक प्रसंसा। जय महेस मन मानस हंसा॥**
**अनुचित बहुत कहेउँ अग्याता। छमहु छमामंदिर दोउ भ्राता॥**

मी एका मुखाने तुमची प्रशंसा कशी करू? हे महादेवांच्या मनरूपी मानस-सरोवरातील हंसा, तुमचा विजय असो. मी नकळत तुम्हांला पुष्कळ अनुचित बोललो. हे क्षमेचे मंदिर असलेल्या दोन्ही बंधूंनो, मला क्षमा करा.॥ ३॥

**कहि जय जय जय रघुकुलकेतू। भृगुपति गए बनहि तप हेतू॥**
**अपभयँ कुटिल महीप डेराने। जहँ तहँ कायर गवँहिं पराने॥**

हे रघुकुळाचे प्रतापस्वरूप श्रीरामचंद्र, तुमचा विजय असो, जय असो, जय असो.' असे म्हणून परशुराम तप करण्यासाठी वनात निघून गेले. परशुरामांनाही पराजित करणाऱ्या श्रीरामांचा द्वेष केल्यामुळे दुष्ट राजे विनाकारण घाबरून जाऊन हळूच इकडे-तिकडे पळून गेले.॥ ४॥

दो०—**देवन्ह दीन्हीं दुंदुभीं प्रभु पर बरषहिं फूल।**
**हरषे पुर नर नारि सब मिटी मोहमय सूल॥ २८५॥**

देवांनी नगारे वाजविले व प्रभूंच्यावर फुलांचा वर्षाव करू लागले. जनकपुरीचे सर्व स्त्री-पुरुष आनंदित झाले. त्यांचे अज्ञानामुळे उत्पन्न झालेले दुःख दूर झाले.॥ २८५॥

**अति गहगहे बाजने बाजे। सबहिं मनोहर मंगल साजे॥**
**जूथ जूथ मिलि सुमुखि सुनयनीं। करहिं गान कल कोकिलबयनीं॥**

जोरजोराने वाद्ये वाजू लागली. सर्वांनी मंगल शृंगार केला. सुंदर वदनी, सुंदर नयनी आणि कोकिळेसारखा मधुर आवाज असणाऱ्या स्त्रिया झुंडींनी जमून सुंदर गाणी गाऊ लागल्या.॥ १॥

**सुखु बिदेह कर बरनि न जाई। जन्मदरिद्र मनहुँ निधि पाई॥**
**बिगत त्रास भइ सीय सुखारी। जनु बिधु उदयँ चकोरकुमारी॥**

जनक राजांचा आनंद अवर्णनीय होता. जणू जन्माने गरीब असलेल्याला धनाचा खजिना सापडला. सीतेचे भय विरू लागले. तिला इतका आनंद झाला, जसा चंद्रोदयामुळे चकोरीला होतो.॥ २॥

**जनक कीन्ह कौसिकहि प्रनामा। प्रभु प्रसाद धनु भंजेउ रामा॥**
**मोहि कृतकृत्य कीन्ह दुहुँ भाईं। अब जो उचित सो कहिअ गोसाईं॥**

जनकराजांनी विश्वामित्रांना प्रणाम केला आणि म्हटले, 'प्रभूंच्या कृपेनेच श्रीरामचंद्रांनी धनुष्य मोडले. दोन्ही भावांनी मला कृतार्थ केले. हे स्वामी, आता योग्य असेल ते सांगा.'॥ ३॥

**कह मुनि सुनु नरनाथ प्रबीना। रहा बिबाहु चाप आधीना॥**
**टूटतहीं धनु भयउ बिबाहू। सुर नर नाग बिदित सब काहू॥**

मुनी म्हणाले, 'हे चतुर राजा, तसे पाहता विवाह हा धनुर्भंगावर अवलंबून होता. धनुष्य भंग पावताच विवाह झाला. देव, मनुष्य या सर्वांना हे माहीत आहे.॥ ४॥

दो०—**तदपि जाइ तुम्ह करहु अब जथा बंस ब्यवहारु।**
**बूझि बिप्र कुलबृद्ध गुर बेद बिदित आचारु॥ २८६॥**

तरीही तुम्ही जाऊन आपल्या कुलाचा जो आचार असेल, तो ब्राह्मणांना, कुलातील वयोवृद्धांना आणि गुरूंना विचारून तसेच वेदात सांगितल्याप्रमाणे जसा असेल, तसा करा.॥ २८६॥

**दूत अवधपुर पठवहु जाई। आनहिं नृप दसरथहि बोलाई॥**
**मुदित राउ कहि भलेहिं कृपाला। पठए दूत बोलि तेहि काला॥**

अयोध्येला दूत पाठवा. राजा दशरथांना बोलावून आणा.' राजांनी प्रसन्न होऊन म्हटले, 'हे कृपाळू, फार छान.' आणि त्याचवेळी दूतांना बोलावून अयोध्येला पाठविले.॥ १॥

**बहुरि महाजन सकल बोलाए। आइ सबन्हि सादर सिर नाए॥**
**हाट बाट मंदिर सुरबासा। नगरु सँवारहु चारिहुँ पासा॥**

नंतर महाराजांनी सर्व श्रेष्ठींना बोलाविले. सर्वांनी येऊन राजाला आदराने अभिवादन केले. राजांनी सांगितले, बाजार, रस्ते, घरे, देवालये आणि नगर यांना चोहीकडून सजवा॥ २॥

**हरषि चले निज निज गृह आए। पुनि परिचारक बोलि पठाए॥**
**रचहु बिचित्र बितान बनाई। सिर धरि बचन चले सचु पाई॥**

श्रेष्ठी प्रसन्न होऊन आपापल्या घरी आले. त्यानंतर राजांनी नोकरांना बोलावून आज्ञा दिली की, सुंदर मंडप सजवून तयार करा.' ते ऐकून सर्वांनी आज्ञा शिरसावंद्य मानून ते आनंदाने गेले.॥ ३॥

**पठए बोलि गुनी तिन्ह नाना। जे बितान बिधि कुसल सुजाना॥**
**बिधिहि बंदि तिन्ह कीन्ह अरंभा। बिरचे कनक कदलि के खंभा॥**

त्यांनी अनेक कारागिरांना बोलाविले. ते सर्व मंडप बनविण्यात वाकबदार होते. त्यांनी ब्रह्मदेवांना वंदन करून काम सुरू केले आणि प्रथमतः सोन्याच्या केळींचे खांब तयार केले.॥ ४॥

**दो०—हरित मनिन्ह के पत्र फल पदुमराग के फूल।**
**रचना देखि बिचित्र अति मनु बिरंचि कर भूल॥ २८७॥**

हिरव्यागार पाचूंची पाने व फळे बनविली. माणकांची फुले बनविली. मंडपाची अत्यंत विलक्षण रचना पाहून ब्रह्मदेवांचे मनही भुलून गेले.॥ २८७॥

**बेनु हरित मनिमय सब कीन्हे। सरल सपरब परहिं नहिं चीन्हे॥**
**कनक कलित अहिबेलि बनाई। लखि नहिं परइ सपरन सुहाई॥**

हिरव्या पाचूंपासून सरळ व गाठीचे वेळू असे बनविले की, ते खरे की पाचूचे हे ओळखून येत नव्हते. सोन्याच्या सुंदर नागवेली बनविल्या. पानांसह त्या इतक्या छान दिसत होत्या की, ओळखता येत नव्हत्या.॥ १॥

**तेहि के रचि पचि बंध बनाए। बिच बिच मुकुता दाम सुहाए॥**
**मानिक मरकत कुलिस पिरोजा। चीरि कोरि पचि रचे सरोजा॥**

त्याच नागवेलींपासून कलाकुसर करून बांधण्यासाठी दोऱ्या केल्या. मधून-मधून मोत्यांच्या सुंदर झालरी लावल्या. माणके, पाचू, हिरे आणि नीलमणी ही रत्ने कापून, कोरून आणि कलाकुसर करून त्यांपासून लाल, हिरवी, शुभ्र आणि निळ्या रंगांची कमळे बनविली गेली.॥ २॥

**किए भृंग बहुरंग बिहंगा। गुंजहिं कूजहिं पवन प्रसंगा॥**
**सुर प्रतिमा खंभन गढ़ि काढ़ीं। मंगल द्रब्य लिएँ सब ठाढ़ीं॥**

भुंगे आणि अनेक रंगांचे पक्षी बनविले. ते हवेमुळे आपोआप गुंजारव व कूजन करीत होते. खांबांवर देवांच्या मूर्ती कोरल्या होत्या. त्या सर्व मूर्ती मंगल द्रव्ये घेऊन उभ्या होत्या.॥ ३॥

**चौकें भाँति अनेक पुराईं। सिंधुर मनिमय सहज सुहाईं॥**

गजमुक्तांपासून सहज सुंदर अशा अनेक प्रकारच्या रांगोळ्या काढल्या होत्या.॥ ४॥

**दो०—सौरभ पल्लव सुभग सुठि किए नीलमनि कोरि।**
**हेम बौर मरकत घवरि लसत पाटमय डोरि॥ २८८॥**

नीलमणी कोरून अत्यंत सुंदर आंब्याची पाने बनविली होती. सोन्यापासून आंब्याचा मोहोर तयार केला होता आणि रेशमाच्या दोरीने बांधून पाचूच्या फळांचे बनविलेले गुच्छ शोभून दिसत होते.॥ २८८॥

**रचे रुचिर बर बंदनिवारे। मनहुँ मनोभवँ फंद सँवारे॥**
**मंगल कलस अनेक बनाए। ध्वज पताक पट चमर सुहाए॥**

अशी सुंदर व उत्तम तोरणे बनविली होती की, जणू कामदेवाने फासे सजवून ठेवले असावेत. अनेक मंगल-कलश, सुंदर ध्वज, पताका, पडदे आणि चवऱ्या बनविल्या होत्या.॥ १॥

**दीप मनोहर मनिमय नाना । जाइ न बरनि बिचित्र बिताना ॥**
**जेहिं मंडप दुलहिनि बैदेही । सो बरनै असि मति कबि केही ॥**

रत्नांनी बनविलेल्या सुंदर दिव्यांमुळे त्या विलक्षण मंडपाचे वर्णनच करता येणे अशक्य होते. ज्या मंडपामध्ये जानकी नवरी बनून येणार त्याचे वर्णन करू शकण्याची बुद्धी कुणा कवीमध्ये असेल ? ॥ २ ॥

**दूलहु रामु रूप गुन सागर । सो बितानु तिहुँ लोक उजागर ॥**
**जनक भवन कै सोभा जैसी । गृह गृह प्रति पुर देखिअ तैसी ॥**

ज्या मंडपामध्ये रूप व गुणांचे सागर श्रीरामचंद्र वर म्हणून असतील, तो त्रैलोक्यात प्रसिद्धच असायला हवा. जनकांच्या महालाची जशी शोभा होती, तशीच शोभा नगरातील प्रत्येक घरात दिसत होती. ॥ ३ ॥

**जेहिं तेरहुति तेहि समय निहारी । तेहि लघु लगहिं भुवन दस चारी ॥**
**जो संपदा नीच गृह सोहा । सो बिलोकि सुरनायक मोहा ॥**

त्यावेळी ज्याने मिथिला प्रदेश पाहिला, त्याला चौदा भवनही तुच्छ वाटले. जनकपुरातील दरिद्री लोकांच्या घरातही त्यावेळी जी संपत्ती शोभत होती, ती पाहून इंद्रसुद्धा मोहून जात होता. ॥ ४ ॥

दो०—**बसइ नगर जेहिं लच्छि करि कपट नारि बर बेषु।**
**तेहि पुर कै सोभा कहत सकुचहिं सारद सेषु॥ २८९ ॥**

ज्या नगरीत प्रत्यक्ष लक्ष्मीने मानवी स्त्रीचे सुंदर रूप धारण करून निवास केलेला आहे, त्या नगरीच्या शोभेचे वर्णन करण्यास सरस्वती आणि शेष हेसुद्धा संकोच करतात. ॥ २८९ ॥

**पहुँचे दूत राम पुर पावन । हरषे नगर बिलोकि सुहावन ॥**
**भूप द्वार तिन्ह खबरि जनाई । दसरथ नृप सुनि लिए बोलाई ॥**

जनकांचे दूत श्रीरामचंद्रांची पवित्र नगरी अयोध्येमध्ये पोहोचले. सुंदर नगर पाहून ते आनंदित झाले. राजद्वारावर जाऊन त्यांनी निरोप पाठविला. राजा दशरथांनी तो ऐकताच दूतांना बोलावून घेतले. ॥ १ ॥

**करि प्रनामु तिन्ह पाती दीन्ही । मुदित महीप आपु उठि लीन्ही ॥**
**बारि बिलोचन बाँचत पाती । पुलक गात आई भरि छाती ॥**

दूतांनी प्रणाम करून पत्र दिले. प्रसन्न होऊन राजांनी ते स्वतः उठून घेतले. पत्र वाचताना त्यांच्या नेत्रांमध्ये प्रेम व आनंदाचे अश्रू आले. शरीर रोमांचित झाले आणि ऊर भरून आला. ॥ २ ॥

**रामु लखनु उर कर बर चीठी। रहि गए कहत न खाटी मीठी॥**
**पुनि धरि धीर पत्रिका बाँची। हरषी सभा बात सुनि साँची॥**

हृदयामध्ये राम व लक्ष्मण आहेत, हातात सुंदर पत्र आहे. राजा ते हातात घेऊन तसेच राहिले. बरे-वाईट काहीच बोलता येईना, म्हणून स्तब्ध राहिले. नंतर धैर्य धरून त्यांनी पत्र वाचले. संपूर्ण सभा सत्य ऐकून हर्षित झाली.॥ ३॥

**खेलत रहे तहाँ सुधि पाई। आए भरतु सहित हित भाई॥**
**पूछत अति सनेहँ सकुचाई। तात कहाँ तें पाती आई॥**

भरत आपल्या मित्रांसोबत व बंधू शत्रुघ्नासोबत जेथे खेळत होते, तेथे वर्तमान समजताच येऊन पोहोचले. फार प्रेमाने संकोच वाटून त्यांनी विचारले, 'बाबा! पत्र कुठून आले आहे?॥ ४॥

दो०—**कुसल प्रानप्रिय बंधु दोउ अहहिं कहहु केहिं देस।**
**सुनि सनेह साने बचन बाची बहुरि नरेस॥ २९०॥**

आमचे प्राणप्रिय दोन्ही भाऊ खुशाल आहेत ना? ते कोणत्या देशात आहेत?' ते स्नेहपूर्ण वचन ऐकून राजांनी पुन्हा पत्र वाचले.॥ २९०॥

**सुनि पाती पुलके दोउ भ्राता। अधिक सनेहु समात न गाता॥**
**प्रीति पुनीत भरत कै देखी। सकल सभाँ सुखु लहेउ बिसेषी॥**

पत्रातील मजकूर ऐकून दोघे भाऊ रोमांचित झाले. प्रेम इतके दाटून आले होते की, मनात मावत नव्हते. भरताचे पवित्र प्रेम पाहून संपूर्ण सभा सुखावून गेली.॥ १॥

**तब नृप दूत निकट बैठारे। मधुर मनोहर बचन उचारे॥**
**भैआ कहहु कुसल दोउ बारे। तुम्ह नीकें निज नयन निहारे॥**

मग राजांनी दूतांना जवळ बसवून घेऊन मन मोहून टाकणाऱ्या मधुर शब्दांत विचारले. 'बंधूंनो, दोघे मुलगे खुशाल आहेत ना? तुम्ही त्यांना आपल्या डोळ्यांनी नीट पाहिले आहे ना?॥ २॥

**स्यामल गौर धरें धनु भाथा। बय किसोर कौसिक मुनि साथा॥**
**पहिचानहु तुम्ह कहहु सुभाऊ। प्रेम बिबस पुनि पुनि कह राऊ॥**

सावळ्या व गोऱ्या रंगाचे ते दोघे धनुष्य व भाते धारण करतात, किशोर वयाचे आहेत, विश्वामित्र मुनींच्या सोबत आहेत. तुम्ही त्यांना ओळखत आहात, तर त्यांचा स्वभाव सांगा बरे!' अशाप्रकारे प्रेमविवश होऊन महाराज दूतांना विचारू लागले.॥ ३॥

**जा दिन तें मुनि गए लवाई। तब तें आजु साँचि सुधि पाई॥**
**कहहु बिदेह कवन बिधि जाने। सुनि प्रिय बचन दूत मुसुकाने॥**

‘अरे बाबांनो, ज्या दिवसापासून मुनी त्यांना घेऊन गेले आहेत, तेव्हापासून आजच आम्हांला त्यांची वार्ता समजत आहे. जनक महाराजांनी त्यांना कसे ओळखले?’ हे प्रेमाचे बोलणे ऐकून दूतांना हसू आले.॥ ४॥

**दो०—सुनहु महीपति मुकुट मनि तुम्ह सम धन्य न कोउ।**
**रामु लखनु जिन्ह के तनय बिस्व बिभूषन दोउ॥ २९१॥**

ते म्हणाले, ‘हे राजांचे मुकुटमणी, ऐका. तुमच्यासारखा धन्य कोणी नाही. राम-लक्ष्मणांसारखे पुत्र तुम्हांला आहेत. कारण विश्वाला ललामभूत असे.॥ २९१॥

**पूछन जोगु न तनय तुम्हारे। पुरुषसिंघ तिहु पुर उजिआरे॥**
**जिन्ह के जस प्रताप कें आगे। ससि मलीन रबि सीतल लागे॥**

आपल्या पुत्रांबद्दल विचारण्याची गरजच नाही. ते पुरुषसिंह तिन्ही लोकांना प्रकाशस्वरूप आहेत. त्यांच्या कीर्तीपुढे चंद्र मलिन आणि प्रतापापुढे सूर्य शीतल वाटतो.॥ १॥

**तिन्ह कहँ कहिअ नाथ किमि चीन्हे। देखिअ रबि कि दीप कर लीन्हे॥**
**सीय स्वयंबर भूप अनेका। समिटे सुभट एक तें एका॥**

हे नाथा, तुम्ही विचारले की, त्यांना राजा जनकांनी कसे ओळखले. हातात दिवा घेऊन सूर्याला पाहावे लागते काय? सीतेच्या स्वयंवरात अनेक राजे आणि एकापेक्षा एक मोठे योद्धे एकत्र जमले होते.॥ २॥

**संभु सरासनु काहुँ न टारा। हारे सकल बीर बरिआरा॥**
**तीनि लोक महँ जे भटमानी। सभ कै सकति संभु धनु भानी॥**

परंतु भगवान शिवांचे धनुष्य कोणीही हलवू शकले नाही. सर्व बलवान हरले. तिन्ही लोकांत जे वीरतेची घमेंड बाळगणारे होते, त्या सर्वांची शक्ती शिव-धनुष्याने मोडीत काढली.॥ ३॥

**सकइ उठाइ सरासुर मेरू। सोउ हियँ हारि गयउ करि फेरू॥**
**जेहिं कौतुक सिवसैलु उठावा। सोउ तेहि सभाँ पराभउ पावा॥**

सुमेरू पर्वत उचलू शकणारा बाणासुरसुद्धा मनातून पराजित होऊन प्रदक्षिणा घालून निघून गेला. ज्याने मजेने कैलास पर्वत उचलला होता, तो रावणसुद्धा सभेमध्ये पराभूत झाला.॥ ४॥

**दो०—तहाँ राम रघुबंसमनि सुनिअ महा महिपाल।**
**भंजेउ चाप प्रयास बिनु जिमि गज पंकज नाल॥ २९२॥**

हे महाराज, ऐका. तेथे रघुवंशरत्न श्रीरामचंद्रांनी विनासायास शिव-धनुष्य असे मोडून टाकले की, ज्याप्रमाणे हत्ती कमळाचा देठ तोडून टाकतो.॥ २९२॥

**सुनि सरोष भृगुनायकु आए। बहुत भाँति तिन्ह आँखि देखाए॥**
**देखि राम बलु निज धनु दीन्हा। करि बहु बिनय गवनु बन कीन्हा॥**

धनुष्य मोडल्याचे ऐकताच परशुराम रागारागाने आले आणि त्या दोघांवर ताव काढू लागले. शेवटी त्यांनी श्रीरामांचे सामर्थ्य लक्षात येताच आपले धनुष्य त्यांना दिले व अनेक प्रकारे त्यांना विनवून स्वतः वनात गमन केले.॥ १॥

**राजन रामु अतुलबल जैसें। तेज निधान लखनु पुनि तैसें॥**
**कंपहिं भूप बिलोकत जाकें। जिमि गज हरि किसोर के ताकें॥**

हे राजन, ज्याप्रमाणे श्रीरामचंद्र अतुलनीय बलवान आहेत, तसेच तेजो निधान लक्ष्मणसुद्धा आहेत. ज्याप्रमाणे हत्ती एखाद्या सिंहाच्या छाव्याची नजर पडताच कापू लागतात, त्याप्रमाणे श्रीराम-लक्ष्मण यांनी पाहताच राजेलोक घाबरत होते.॥ २॥

**देव देखि तव बालक दोऊ। अब न आँखि तर आवत कोऊ॥**
**दूत बचन रचना प्रिय लागी। प्रेम प्रताप बीर रस पागी॥**

हे देव, तुमचे दोन्ही मुलगे पाहिल्यावर आता नजरेत दुसरे कोणी भरतच नाहीत.' प्रेम, प्रताप आणि वीर-रसाने ओथंबलेले दूतांचे वर्णन सर्वांना खूप आवडले.॥ ३॥

**सभा समेत राउ अनुरागे। दूतन्ह देन निछावरि लागे॥**
**कहि अनीति ते मूदहिं काना। धरमु बिचारि सबहिं सुखु माना॥**

ते ऐकून संपूर्ण सभा व राजा दशरथ प्रेमामध्ये बुडून गेले आणि दूतांची प्रशंसा करू लागले. ते पाहून 'आमची प्रशंसा नीतिविरुद्ध आहे' असे म्हणत दूत आपले कान बंद करू लागले. त्यांचे धर्मानुकूल आचरण पाहून सर्वांना आनंद वाटला.॥ ४॥

दो०—**तब उठि भूप बसिष्ट कहुँ दीन्हि पत्रिका जाइ।**
**कथा सुनाई गुरहि सब सादर दूत बोलाइ॥ २९३॥**

मग राजांनी उठून वसिष्ठांच्याजवळ जाऊन त्यांना पत्र दाखविले आणि आदराने जनकांच्या दूतांना बोलावून त्यांच्याकडून सर्व वृत्तांत गुरूंना सांगितला.॥ २९३॥

**सुनि बोले गुर अति सुखु पाई। पुन्य पुरुष कहुँ महि सुख छाई॥**
**जिमि सरिता सागर महुँ जाहीं। जद्यपि ताहि कामना नाहीं॥**

सर्व वृत्तांत ऐकून अत्यंत आनंदाने गुरू म्हणाले, 'पुण्यात्म्या पुरुषांकरिता पृथ्वी सुखाने भरलेली आहे. जरी समुद्राला नद्यांची अपेक्षा नसते, तरी नद्या समुद्राला भेटण्यास जातात,॥ १॥

**तिमि सुख संपति बिनहिं बोलाएँ। धरमसील पहिं जाहिं सुभाएँ॥**
**तुम्ह गुर बिप्र धेनु सुर सेबी। तसि पुनीत कौसल्या देबी॥**

त्याचप्रमाणे सुख व संपत्ती न बोलविता स्वाभाविकपणे धर्मात्म्या पुरुषांजवळ जातात. तुम्ही गुरू, ब्राह्मण, गाय आणि देव यांची सेवा करणारे आहात. तशीच कौसल्यादेवीसुद्धा पवित्र आहे. ॥ २ ॥

**सुकृती तुम्ह समान जग माहीं। भयउ न है कोउ होनेउ नाहीं॥**
**तुम्ह ते अधिक पुन्य बड़ काकें। राजन राम सरिस सुत जाकें॥**

तुमच्यासारखे पुण्यात्मे जगात कोणी झाले नाहीत, आजही नाहीत आणि पुढेही होणार नाहीत. हे राजन, ज्याला रामासारखा पुत्र आहे, त्याच्यापेक्षा अधिक पुण्यवान आणखी कोण असणार ? ॥ ३ ॥

**बीर बिनीत धरम ब्रत धारी। गुन सागर बर बालक चारी॥**
**तुम्ह कहुँ सर्ब काल कल्याना। सजहु बरात बजाइ निसाना॥**

शिवाय ज्याचे चारी पुत्र वीर, विनम्र, धर्माचे व्रत धारण करणारे आणि गुणांचे समुद्र आहेत. त्या तुमच्यासाठी सर्व काळांमध्ये कल्याणच कल्याण आहे. म्हणून दवंडी पिटून वऱ्हाड सज्ज करा. ॥ ४ ॥

दो०—**चलहु बेगि सुनि गुर बचन भलेहिं नाथ सिरु नाइ।**
**भूपति गवने भवन तब दूतन्ह बासु देवाइ॥ २९४॥**

आणि लवकर निघा.' गुरूंचे असे बोलणे ऐकून, 'हे स्वामी ! फारच छान.' असे म्हणत मस्तक नमवून आणि दूतांना निवास दाखवून राजा दशरथ महालात आले. ॥ २९४ ॥

**राजा सबु रनिवास बोलाई। जनक पत्रिका बाचि सुनाई॥**
**सुनि संदेसु सकल हरषानीं। अपर कथा सब भूप बखानीं॥**

राजांनी संपूर्ण अंतःपुर बोलावले आणि त्यांना पत्र वाचून दाखविले. वार्ता ऐकून सर्व राण्या आनंदाने फुलून गेल्या. तसेच त्यांनी दूतांच्या तोंडून ज्या गोष्टी ऐकल्या होत्या, त्या सर्व गोष्टीही राण्यांना सांगितल्या. ॥ १ ॥

**प्रेम प्रफुल्लित राजहिं रानी। मनहुँ सिखिनि सुनि बारिद बानी॥**
**मुदित असीस देहिं गुर नारीं। अति आनंद मगन महतारीं॥**

प्रेमाने प्रफुल्लित झालेल्या राण्या अशा शोभून दिसत होत्या की, जशा मेघनाद ऐकून मयूरी प्रफुल्लित होतात. वयोवृद्ध स्त्रिया प्रसन्न होऊन आशीर्वाद देऊ लागल्या. माता तर आनंदात मग्न होऊन गेल्या. ॥ २ ॥

**लेहिं परस्पर अति प्रिय पाती। हृदयँ लगाइ जुड़ावहिं छाती॥**
**राम लखन कै कीरति करनी। बारहिं बार भूपबर बरनी॥**

सर्वजणी ते अत्यंत प्रेमाचे पत्र हृदयाशी धरून स्वतःचे समाधान करून घेऊ लागल्या. राजांमधील श्रेष्ठ दशरथ यांनी श्रीराम-लक्ष्मण यांची कीर्ती व कर्तृत्व यांचे वारंवार वर्णन केले. ॥ ३ ॥

**मुनि प्रसादु कहि द्वार सिधाए। रानिन्ह तब महिदेव बोलाए॥**
**दिए दान आनंद समेता। चले बिप्रबर आसिष देता॥**

'ही सर्व मुनींची कृपा आहे', असे म्हणून ते बाहेर आले. मग राण्यांनी ब्राह्मणांना बोलाविले आणि त्यांना आनंदाने दाने दिली. श्रेष्ठ ब्राह्मण आशीर्वाद देत निघून गेले.॥ ४॥

सो०—**जाचक लिए हँकारि दीन्हि निछावरि कोटि बिधि।**
**चिरु जीवहुँ सुत चारि चक्रबर्ति दसरत्थ के॥ २९५॥**

मग भिक्षुकांना बोलावून कोट्यवधी प्रकारच्या देणग्या त्यांना दिल्या. 'चक्रवर्ती महाराज दशरथ यांचे चारी पुत्र चिरंजीव होवोत.'॥ २९५॥

**कहत चले पहिरें पट नाना। हरषि हने गहगहे निसाना॥**
**समाचार सब लोगन्ह पाए। लागे घर घर होन बधाए॥**

असे म्हणत ते अनेक प्रकारची सुंदर वस्त्रे धारण करून निघाले. नगारेवाले आनंदाने मोठ्या जोराने नगारे वाजवू लागले. सर्व लोकांना वार्ता समजली, तेव्हा घरोघरी आनंदोत्सव सुरू झाला.॥ १॥

**भुवन चारि दस भरा उछाहू। जनकसुता रघुबीर बिआहू॥**
**सुनि सुभ कथा लोग अनुरागे। मग गृह गलीं सँवारन लागे॥**

चौदाही लोक उत्साहाने भरून गेले. जानकी व रामचंद्र यांचा विवाह होणार आहे, ही शुभवार्ता ऐकून लोक प्रेममग्न झाले आणि रस्ते, घरे व गल्ल्या सजवू लागले.॥ २॥

**जद्यपि अवध सदैव सुहावनि। राम पुरी मंगलमय पावनि॥**
**तदपि प्रीति कै प्रीति सुहाई। मंगल रचना रची बनाई॥**

जरी अयोध्या ही नित्य शोभिवंत आहे, कारण ती श्रीरामांची मंगलमय पवित्र नगरी आहे, तरी प्रेमाची भरती आल्यामुळे तिला सुंदर मंगल अशी नव्याने सजविली गेली.॥ ३॥

**ध्वज पताक पट चामर चारू। छावा परम बिचित्र बजारू॥**
**कनक कलस तोरन मनि जाला। हरद दूब दधि अच्छत माला॥**

ध्वज, पताका, पडदे व सुंदर चवऱ्यांनी सगळा बाजार विलक्षण सजला होता. सोन्याचे कलश, तोरणे, मण्यांच्या झालरी, हळद, दूर्वा, अक्षता आणि माळा॥ ४॥

दो०—**मंगलमय निज निज भवन लोगन्ह रचे बनाइ।**
**बीथीं सींचीं चतुरसम चौकें चारु पुराइ॥ २९६॥**

यांनी लोकांनी आपापली घरे सजवून मंगलमय बनविली होती. गल्ल्या-गल्ल्यांत चंदन, केशर, कस्तुरी, कापूर यांपासून बनविलेल्या पदार्थांचे सडे शिंपले. दारात सुंदर रांगोळ्या काढल्या.॥ २९६॥

**जहँ तहँ जूथ जूथ मिलि भामिनि। सजि नवसप्त सकल दुति दामिनि॥**
**बिधुबदनीं मृग सावक लोचनि। निज सरूप रति मानु बिमोचनि॥**

वीजेप्रमाणे उज्ज्वल कांतीच्या चंद्रमुखी, बालमृगनयनी आणि आपल्या सुंदर रूपाने कामदेवाची पत्नी रती हिचा अभिमान नष्ट करणाऱ्या सुहासिनी स्त्रिया, सर्व प्रकारचे सोळा शृंगार करून जिकडे-तिकडे जमून,॥ १॥

**गावहिं मंगल मंजुल बानीं। सुनि कलरव कलकंठि लजानी॥**
**भूप भवन किमि जाइ बखाना। बिस्व बिमोहन रचेउ बिताना॥**

मनोहर वाणीने गीत गात होत्या. त्यांचे सुंदर स्वर ऐकून कोकिळासुद्धा लाजत होत्या. जेथे विश्वाला मोहित करणारा मंडप बनविला होता, त्या राजमहालाचे वर्णन तर काय करावे?॥ २॥

**मंगल द्रब्य मनोहर नाना। राजत बाजत बिपुल निसाना॥**
**कतहुँ बिरिद बंदी उच्चरहीं। कतहुँ बेद धुनि भूसुर करहीं॥**

अनेक प्रकारचे मनोहर मांगलिक पदार्थ शोभत होते. अनेक नगारे वाजत होते. कोठे भाट स्तुतिपाठ करीत होते तर कोठे ब्राह्मण वेदघोष करीत होते.॥ ३॥

**गावहिं सुंदरि मंगल गीता। लै लै नामु रामु अरु सीता॥**
**बहुत उछाहु भवनु अति थोरा। मानहुँ उमगि चला चहु ओरा॥**

सुंदर स्त्रिया श्रीराम व सीता यांची नावे ओवून-ओवून मंगल गीते गात होत्या. त्यांचा उत्साह फार मोठा होता आणि त्या मानाने महाल फार छोटा होता. त्यामध्ये तो सामावत नसल्यामुळे जणू चोहीकडे ओसंडत होता.॥ ४॥

दो०—**सोभा दसरथ भवन कइ को कबि बरनै पार।**
**जहाँ सकल सुर सीस मनि राम लीन्ह अवतार॥ २९७॥**

दशरथांच्या महालाची शोभा कोणता कवी वर्णू शकेल? जेथे सर्व देवाधिदेव श्रीरामचंद्रांनी अवतार घेतला होता.॥ २९७॥

**भूप भरत पुनि लिए बोलाई। हय गय स्यंदन साजहु जाई॥**
**चलहु बेगि रघुबीर बराता। सुनत पुलक पूरे दोउ भ्राता॥**

मग राजांनी भरताला बोलावून घेतले आणि म्हटले, 'जाऊन घोडे, हत्ती व रथ लवकर सज्ज कर. श्रीरामांच्या वऱ्हाडाबरोबर जायचे आहे.' हे ऐकताच दोन्ही भाऊ, भरत व शत्रुघ्न आंनदाने मोहोरून गेले.॥ १॥

**भरत सकल साहनी बोलाए। आयसु दीन्ह मुदित उठि धाए॥**
**रचि रुचि जीन तुरग तिन्ह साजे। बरन बरन बर बाजि बिराजे॥**

भरताने पागांच्या प्रमुखांना बोलावले आणि त्यांना घोडे सजविण्याची आज्ञा दिली. ते प्रमुखही प्रसन्न होऊन धावत गेले. त्यांनी मनापासून योग्य तऱ्हेने जीन घालून घोडे सजविले. रंगी बेरंगी उत्तम घोडे शोभून दिसत होते. ॥ २ ॥

**सुभग सकल सुठि चंचल करनी । अय इव जरत धरत पग धरनी ॥**
**नाना जाति न जाहिं बखाने । निदरि पवनु जनु चहत उड़ाने ॥**

सर्व घोडे फारच सुंदर व वेगवान होते. ते जमिनीवर अशा रीतीने पाय टाकीत होते की जणू धगधगत्या लोखंडावर पाय टाकीत आहेत. अनेक जातींचे घोडे होते, त्यांचे वर्णन करता येत नाही. ते वेगवान चालीने जणू हवेला मागे टाकून पळू पाहात होते. ॥ ३ ॥

**तिन्ह सब छयल भए असवारा । भरत सरिस बय राजकुमारा ॥**
**सब सुंदर सब भूषनधारी । कर सर चाप तून कटि भारी ॥**

त्या सर्व घोड्यांवर भरताचे समवयस्क देखणे राजकुमार बसले. ते सर्व सुंदर होते आणि सर्वांनी आभूषणे घातली होती. त्यांच्या हाती बाण व धनुष्य होते. कमरेला भरलेले भाते बांधलेले होते. ॥ ४ ॥

दो०—**छरे छबीले छयल सब सूर सुजान नबीन।**
**जुग पदचर असवार प्रति जे असिकला प्रबीन॥ २९८ ॥**

सर्वजण निवडक देखणे शूरवीर, चतुर व नवयुवक होते. प्रत्येक घोडेस्वाराबरोबर दोन पायदळ शिपाई होते. ते मोठे तलवारबाज होते. ॥ २९८ ॥

**बाँधें बिरद बीर रन गाढ़े । निकसि भए पुर बाहेर ठाढ़े ॥**
**फेरहिं चतुर तुरग गति नाना । हरषहिं सुनि सुनि पनव निसाना ॥**

शूराचा वेष घातलेले ते सर्व रणधीर वीर नगराबाहेर येऊन उभे राहिले. ते चतुर वीर आपल्या घोड्यांना तऱ्हेतऱ्हेच्या चालींनी फिरवत होते आणि तुताऱ्या व नगाऱ्यांच्या आवाजाने आनंदित होत होते. ॥ १ ॥

**रथ सारथिन्ह बिचित्र बनाए । ध्वज पताक मनि भूषन लाए ॥**
**चवँर चारु किंकिनि धुनि करहीं । भानु जान सोभा अपहरहीं ॥**

सारथ्यांनी ध्वजा, पताका, रत्ने व आभूषणे लावून रथ फार विलक्षण सजविले होते. त्यांमध्ये सुंदर चवऱ्या लावल्या होत्या. घंट्या सुंदर किणकिण करीत होत्या. ते रथ इतके सुंदर होते की, सूर्याच्या रथाची शोभा हरण करीत होते. ॥ २ ॥

**सावँकरन अगनित हय होते । ते तिन्ह रथन्ह सारथिन्ह जोते ॥**
**सुंदर सकल अलंकृत सोहे । जिन्हहि बिलोकत मुनि मन मोहे ॥**

असंख्य दिव्य शामकर्ण घोडे होते. त्यांना सारथ्यांनी रथांना जुंपले. सर्व घोडे दिसायला सुंदर आणि अलंकारांनी सजविलेले शोभून दिसत होते. त्यांना पाहून मुनींचे मनसुद्धा मोहून जात होते. ॥ ३ ॥

**जे जल चलहिं थलहि की नाईं । टाप न बूड़ बेग अधिकाईं ॥**
**अस्त्र सस्त्र सबु साजु बनाई । रथी सारथिन्ह लिए बोलाई ॥**

ते घोडे पाण्यावरही जमिनीप्रमाणेच चालत होते. अत्यंत वेगामुळे त्यांची टाप पाण्यात बुडत नव्हती. अस्त्र-शस्त्र आणि सर्व साजशृंगार सजवून सारथ्यांनी रथींना बोलावले. ॥ ४ ॥

**दो०—चढ़ि चढ़ि रथ बाहेर नगर लागी जुरन बरात।**
**होत सगुन सुंदर सबहि जो जेहि कारज जात॥ २९९ ॥**

रथांवर चढून वऱ्हाड नगराबाहेर येऊ लागले. कामासाठी जात असलेल्या सर्वांनाच शुभशकुन होत होते. ॥ २९९ ॥

**कलित करिबरन्हि परीं अँबारी । कहि न जाहिं जेहि भाँति सँवारीं ॥**
**चले मत्त गज घंट बिराजी । मनहुँ सुभग सावन घन राजी ॥**

श्रेष्ठ हत्तींच्यावर सुंदर अंबाऱ्या होत्या. त्या अशाप्रकारे सजविल्या होत्या की काही सांगता येत नाही. मस्त हत्ती घंट्यांनी सुशोभित होऊन चालत होते, जणू श्रावणातील सुंदर घन-समूह गर्जना करीत जात असावेत. ॥ १ ॥

**बाहन अपर अनेक बिधाना । सिबिका सुभग सुखासन जाना ॥**
**तिन्ह चढ़ि चले बिप्रबर बृंदा । जनु तनु धरें सकल श्रुति छंदा ॥**

सुंदर पालख्या, सुखासनी शिबिका आणि रथ इत्यादी इतरही अनेक प्रकारची वाहने होती. त्यांवर विद्वान ब्राह्मणांचे समूह आरूढ होऊन निघाले. जणू ते सर्व वेदांचे छंदरूप शरीर धारण करून निघाले होते.. ॥ २ ॥

**मागध सूत बंदि गुनगायक । चले जान चढ़ि जो जेहि लायक ॥**
**बेसर ऊँट बृषभ बहु जाती । चले बस्तु भरि अगनित भाँती ॥**

मागध, सूत, भाट आणि गुण-गान करणारे हे सर्वजण आपापल्या योग्यतेप्रमाणे वाहनांमध्ये बसले. अनेक जातींची खेचरे, उंट व बैल हे असंख्य प्रकारच्या वस्तू वाहून नेत होते. ॥ ३ ॥

**कोटिन्ह काँवरि चले कहारा। बिबिध बस्तु को बरनै पारा ॥**
**चले सकल सेवक समुदाई । निज निज साजु समाजु बनाई ॥**

कोट्यवधी हमाल सामानाच्या कावडी उचलून निघाले होते. त्यांमध्ये इतक्या प्रकारच्या इतक्या वस्तू होत्या की, त्यांचे वर्णन कुणाला करता येईल? सर्व सेवकांचे जत्थे आपापले गट करून निघाले. ॥ ४ ॥

**दो०—सब कें उर निर्भर हरषु पूरित पुलक सरीर।**
**कबहिं देखिबे नयन भरि रामु लखनु दोउ बीर॥ ३००॥**

सर्वांच्या मनात अपार हर्ष होता आणि शरीर पुलकित होते. सर्वांना एकच लालसा होती की, आपण राम-लक्ष्मणांना केव्हा डोळे भरून पाहू शकू ?॥ ३००॥

**गरजहिं गज घंटा धुनि घोरा। रथ रव बाजि हिंस चहु ओरा॥**
**निदरि घनहि घुर्म्मरहिं निसाना। निज पराइ कछु सुनिअ न काना॥**

हत्ती चीत्कार करीत होते, त्यांच्या घंटिकांचा तुंबळ ध्वनी होत होता. चोहीकडे रथांची घरघराट आणि घोड्यांच्या खिंकाळण्याचा आवाज येत होता. नगारे इतके मोठ्याने वाजत होते की, मेघ गर्जनाही तुच्छ वाटत होत्या. कुणालाही आपले किंवा दुसऱ्याचे बोलणे ऐकू येत नव्हते.॥ १॥

**महा भीर भूपति के द्वारें। रज होइ जाइ पषान पबारें॥**
**चढ़ी अटारिन्ह देखहिं नारीं। लिएँ आरती मंगल थारीं॥**

राजा दशरथांच्या द्वारावर एवढी गर्दी झाली होती की, तेथे दगड फेकला तर तोही चिरडून माती झाला असता. गच्च्यांवर चढलेल्या स्त्रिया मंगल-तबकांमध्ये आरत्या घेऊन पाहात होत्या.॥ २॥

**गावहिं गीत मनोहर नाना। अति आनंदु न जाइ बखाना॥**
**तब सुमंत्र दुइ स्यंदन साजी। जोते रबि हय निंदक बाजी॥**

आणि नाना प्रकारची मनोहर गीते गात होत्या. त्यांच्या आनंदाचे वर्णन करणे शक्य नाही. सुमंताने दोन रथ सजवून त्याला सूर्याच्या घोड्यांवरही मात करणारे घोडे जुंपले.॥ ३॥

**दोउ रथ रुचिर भूप पहिं आने। नहिं सारद पहिं जाहिं बखाने॥**
**राज समाजु एक रथ साजा। दूसर तेज पुंज अति भ्राजा॥**

दोन्ही सुंदर रथ सुमंताने राजा दशरथांच्याजवळ आणले. त्या रथांच्या सौंदर्याचे वर्णन सरस्वतीदेवीही करू शकली नसती. एका रथावर राजेशाही सामान सजविले होते आणि दुसरा रथ तेज:पुंज व सुंदर दिसत होता.॥ ४॥

**दो०—तेहिं रथ रुचिर बसिष्ठ कहुँ हरषि चढ़ाइ नरेसु।**
**आपु चढ़ेउ स्यंदन सुमिरि हर गुर गौरि गनेसु॥ ३०१॥**

त्या सुंदर रथावर राजांनी वसिष्ठांना आनंदाने बसवून नंतर शिव, गुरू, गौरी आणि गजाननाचे स्मरण करून महाराज स्वत: दुसऱ्या रथात बसले.॥ ३०१॥

**सहित बसिष्ठ सोह नृप कैसें। सुर गुर संग पुरंदर जैसें॥**
**करि कुल रीति बेद बिधि राऊ। देखि सबहि सब भाँति बनाऊ॥**

देवगुरू बृहस्पतीबरोबर इंद्र शोभावा, तसे वसिष्ठांबरोबर महाराज शोभत होते. वेद-विधीप्रमाणे आणि कुलाचाराप्रमाणे सर्व कृत्ये करून व सर्वांना सर्व प्रकारे सज्ज झालेले पाहिल्यावर,॥ १॥

**सुमिरि रामु गुर आयसु पाई। चले महीपति संख बजाई॥**
**हरषे बिबुध बिलोकि बराता। बरषहिं सुमन सुमंगल दाता॥**

श्रीरामांचे स्मरण करून आणि गुरूंची आज्ञा झाल्यावर पृथ्वीपती राजा दशरथांनी शंख फुंकून प्रस्थान केले. वऱ्हाड पाहून देव आनंदून गेले व मंगलदायी फुलांचा वर्षाव करू लागले.॥ २॥

**भयउ कोलाहल हय गय गाजे। ब्योम बरात बाजने बाजे॥**
**सुर नर नारि सुमंगल गाईं। सरस राग बाजहिं सहनाईं॥**

प्रचंड आवाज दुमदुमून राहिला. घोडे खिंकाळू लागले. हत्ती चीत्कार करू लागले. आकाशात व वरातीत मंगलवाद्ये वाजू लागली. अप्सरा व स्त्रिया मंगल गाणी गाऊ लागल्या आणि सुंदर रागदारीत सनया वाजू लागल्या.॥ ३॥

**घंट घंटि धुनि बरनि न जाहीं। सरव करहिं पाइक फहराहीं॥**
**करहिं बिदूषक कौतुक नाना। हास कुसल कल गान सुजाना॥**

घंटांच्या आवाजाचे तर वर्णन करणेही कठीण होते. पायी चालणारे सेवक किंवा पट्टेबाज कसरती करीत होते आणि आकाशात उंच उड्या मारीत होते. हशा पिकविण्यात वाकबगार आणि सुंदर गाणी गाण्यात चतुर विदूषक हे तऱ्हेतऱ्हेच्या गमजा करून दाखवीत होते.॥ ४॥

**दो०—तुरग नचावहिं कुअँर बर अकनि मृदंग निसान।**
**नागर नट चितवहिं चकित डगहिं न ताल बँधान॥ ३०२॥**

सुंदर राजकुमार मृदंग आणि नगाऱ्यांच्या तालावर घोड्यांना असे नाचवीत होते की, त्यांचा ताल जराही चुकत नव्हता. चतुर नटसुद्धा ते पाहून चकित होत होते.॥ ३०२॥

**बनइ न बरनत बनी बराता। होहिं सगुन सुंदर सुभदाता॥**
**चारा चाषु बाम दिसि लेई। मनहुँ सकल मंगल कहि देई॥**

वऱ्हाडाचे वर्णन करायचे म्हटले तरी कठीण आहे. सुंदर शुभदायक शकुन होत होते. चास पक्षी चारा शोधण्यास डावीकडे जात होते. जणू सर्व मंगलदायक असल्याची सूचना देत होते.॥ १॥

**दाहिन काग सुखेत सुहावा। नकुल दरसु सब काहूँ पावा॥**
**सानुकूल बह त्रिबिध बयारी। सघट सबाल आव बर नारी॥**

उजवीकडे कावळा शेतामध्ये शोभून दिसत होता. सर्वांना मुंगूसही दिसले. शीतल, मंद, सुगंधित वारे मागून पुढे वाहात होते. सुवासिनी स्त्रिया डोक्यावर भरलेले घडे आणि कडेवर मूल घेऊन येत होत्या. ॥ २ ॥

**लोवा फिरि फिरि दरसु देखावा। सुरभी सनमुख सिसुहि पिआवा॥**
**मृगमाला फिरि दाहिनि आई। मंगल गन जनु दीन्हि देखाई॥**

कोल्हे वारंवार तोंड दाखवीत होते. समोर गाई उभ्या राहून वासरांना पाजत होत्या. हरणांचे कळप डावीकडे वळून उजवीकडे येत. अशा रितीने सर्व मांगल्यांचे समूह दिसून आले. ॥ ३ ॥

**छेमकरी कह छेम बिसेषी। स्यामा बाम सुतरु पर देखी॥**
**सनमुख आयउ दधि अरु मीना। कर पुस्तक दुइ बिप्र प्रबीना॥**

पांढऱ्या शिराची घार विशेष क्षेम दर्शवीत होती. कोकिळा डाव्या बाजूच्या सुंदर वृक्षावर दिसून आली. समोरून दही, मासे आणि दोन विद्वान ब्राह्मण हाती ग्रंथ घेऊन आले. ॥ ४ ॥

दो०—**मंगलमय कल्यानमय अभिमत फल दातार।**
**जनु सब साचे होन हित भए सगुन एक बार॥ ३०३॥**

सर्व मंगलमय, कल्याणमय आणि मनोवांच्छित फळे देणारे शकुन जणू खरोखरच मंगल होणार, हे सुचवण्यासाठी एकत्र आले होते. ॥ ३०३ ॥

**मंगल सगुन सुगम सब ताकें। सगुन ब्रह्म सुंदर सुत जाकें॥**
**राम सरिस बरु दुलहिनि सीता। समधी दसरथु जनकु पुनीता॥**

प्रत्यक्ष सगुण ब्रह्म ज्याचे पुत्र, त्याला सर्व मंगलकारी शकुन सुलभ असणारच. श्रीरामचंद्रांच्यासारखा वर आणि सीतेसारखी वधू आहे, तसेच दशरथ व जनक यांच्यासारखे पवित्र व्याही आहेत, ॥ १ ॥

**सुनि अस ब्याहु सगुन सब नाचे। अब कीन्हे बिरंचि हम साँचे॥**
**एहि बिधि कीन्ह बरात पयाना। हय गय गाजहिं हने निसाना॥**

असा विवाह आहे, हे ऐकून जणू सर्व शकुन नाचू लागले आणि म्हणू लागले–‘आता ब्रह्मदेवांनी आम्हांला सार्थ करून दाखविले.’ अशाप्रकारे वऱ्हाडाने प्रस्थान केले. घोडे, हत्ती गर्जू लागले आणि नगाऱ्यांवर प्रहार होऊ लागले. ॥ २ ॥

**आवत जानि भानुकुल केतू। सरितन्हि जनक बँधाए सेतू॥**
**बीच बीच बर बास बनाए। सुरपुर सरिस संपदा छाए॥**

सूर्यवंशाची कीर्ति-पताका असलेले दशरथ येत आहेत हे समजल्यावर जनकांनी नद्यांवर पुल बांधले. वाटेमध्ये त्यांना राहाण्याची चांगली सोय केली. तेथे देवलोकीची संपदा भरली होती.॥ ३॥

**असन सयन बर बसन सुहाए। पावहिं सब निज निज मन भाए॥**
**नित नूतन सुख लखि अनुकूले। सकल बरातिन्ह मंदिर भूले॥**

आणि तेथे वऱ्हाडी मंडळींना आपापल्या आवडीचे उत्तम भोजन, बिछाने आणि वस्त्रे मिळत होती. मनाप्रमाणे नित्य नवीन सुखे पाहून सर्व वऱ्हाडी मंडळींना आपापल्या घरांचा विसर पडला.॥ ४॥

दो०—**आवत जानि बरात बर सुनि गहगहे निसान।**
**सजि गज रथ पदचर तुरग लेन चले अगवान॥ ३०४॥**

मोठ्या जोरजोराने वाजणाऱ्या नगाऱ्यांचा आवाज ऐकून आणि श्रेष्ठ वऱ्हाडी येत आहेत हे कळल्यावर त्यांचे स्वागत करण्यासाठी हत्ती, रथ, पायदळ आणि घोडे सजवून त्यांना आणण्यासाठी निघाले.॥ ३०४॥

## मासपारायण, दहावा विश्राम

**कनक कलस भरि कोपर थारा। भाजन ललित अनेक प्रकारा॥**
**भरे सुधासम सब पकवाने। नाना भाँति न जाहिं बखाने॥**

दूध, सरबत, थंडाई, पाणी इत्यादींनी भरलेले सोन्याचे कलश, अमृतासारखी तऱ्हेतऱ्हेची अवर्णनीय पक्वान्ने, भरलेल्या पराती, थाळ्या इत्यादी अनेक प्रकारची सुंदर भांडी,॥ १॥

**फल अनेक बर बस्तु सुहाईं। हरषि भेंट हित भूप पठाईं॥**
**भूषन बसन महामनि नाना। खग मृग हय गय बहु बिधि जाना॥**

उत्तम फळे आणि इतरही अनेक सुंदर वस्तू जनकराजांनी मोठ्या आनंदाने भेट म्हणून पाठविल्या. दागिने, कपडे, नाना प्रकारची मूल्यवान रत्ने, पक्षी, पशू, घोडे, हत्ती आणि अनेक प्रकारची वाहने॥ २॥

**मंगल सगुन सुगंध सुहाए। बहुत भाँति महिपाल पठाए॥**
**दधि चिउरा उपहार अपारा। भरि भरि काँवरि चले कहारा॥**

तसेच अनेक प्रकारची सुगंधित व शोभिवंत मंगलिक द्रव्ये आणि शुभशकुनी पदार्थ जनकांनी पाठविले. दही, पोहे आणि अगणित भेट वस्तू इत्यादी कावड्यांतून भरभरून घेऊन भोई निघाले.॥ ३॥

**अगवानन्ह जब दीखि बराता। उर आनंदु पुलक भर गाता॥**
**देखि बनाव सहित अगवाना। मुदित बरातिन्ह हने निसाना॥**

स्वागत करणाऱ्यांना जेव्हा वऱ्हाड दिसले, तेव्हा त्यांना आनंद झाला आणि ते रोमांचित झाले. सामोरे येणारे नटून-थटून आलेले पाहून वऱ्हाडी मंडळींनी आनंदाने नगारे वाजविले. ॥ ४ ॥

**दो०—हरषि परसपर मिलन हित कछुक चले बगमेल।**
**जनु आनंद समुद्र दुइ मिलत बिहाइ सुबेल॥ ३०५॥**

वऱ्हाडी आणि स्वागत करणारे काही लोक परस्परांना भेटण्यासाठी आनंदाने वेगाने धावले. जणू दोन समुद्र आपली मर्यादा सोडून भेटावे तसे ते एकमेकांना भेटले. ॥ ३०५ ॥

**बरषि सुमन सुर सुंदरि गावहिं। मुदित देव दुंदुभीं बजावहिं॥**
**बस्तु सकल राखीं नृप आगें। बिनय कीन्हि तिन्ह अति अनुरागें॥**

देवसुंदरी फुलांचा वर्षाव करीत गीत गात होत्या आणि देव आनंदाने नगारे वाजवीत होते. स्वागत करण्यास आलेल्या लोकांनी सर्व वस्तू दशरथांच्या समोर ठेवल्या आणि स्वीकारण्याविषयी प्रेमाने विनंती केली. ॥ १ ॥

**प्रेम समेत रायँ सबु लीन्हा। भै बकसीस जाचकन्हि दीन्हा॥**
**करि पूजा मान्यता बड़ाई। जनवासे कहुँ चले लवाई॥**

राजा दशरथांनी सर्व वस्तू प्रेमाने स्वीकारल्या. नंतर त्या बक्षीस म्हणून याचकांना दिल्या गेल्या. त्यानंतर पूजा, आदर-सत्कार आणि सन्मान करून स्वागत करणाऱ्यांनी सर्वांना जानवश्याकडे आणले. ॥ २ ॥

**बसन बिचित्र पाँवड़े परहीं। देखि धनदु धन मदु परिहरहीं॥**
**अति सुंदर दीन्हेउ जनवासा। जहँ सब कहुँ सब भाँति सुपासा॥**

तेथपर्यंत सुंदर वस्त्रांच्या पायघड्या घातल्या होत्या. त्या पाहून कुबेराचा-सुद्धा आपल्या संपत्तीचा अभिमान ओसरला. फार सुंदर जानवस घर दिले गेले होते. तेथे सर्वांसाठी सर्व तऱ्हेच्या सोयी-सुविधा होत्या. ॥ ३ ॥

**जानी सियँ बरात पुर आई। कछु निज महिमा प्रगटि जनाई॥**
**हृदयँ सुमिरि सब सिद्धि बोलाईं। भूप पहुनई करन पठाईं॥**

वऱ्हाड जनकपुरीत आल्याचे समजल्यावर सीतेने आपला थोडा महिमा प्रकट केला. तिने मनात स्मरण करून सर्व सिद्धींना बोलावून घेतले आणि त्यांना राजा दशरथांचे अतिथ्य करण्यास पाठविले. ॥ ४ ॥

**दो०—सिधि सब सिय आयसु अकनि गईं जहाँ जनवास।**
**लिएँ संपदा सकल सुख सुरपुर भोग बिलास॥ ३०६॥**

सीतेची आज्ञा होताच सर्व सिद्धी जानवास घरात सर्व संपदा, सुख व इंद्रपुरीचे भोग-विलास घेऊन गेल्या. ॥ ३०६ ॥

**निज निज बास बिलोकि बराती । सुरसुख सकल सुलभ सब भाँती ॥**
**बिभव भेद कछु कोउ न जाना । सकल जनक कर करहिं बखाना ॥**

वऱ्हाडी मंडळींनी आपापल्या राहाण्याची ठिकाणे पाहिली, तेव्हा त्यांना देवांना मिळणारी सुखे तिथे आपल्याला सुलभ असलेली दिसली. इतक्या ऐश्वर्याचे रहस्य कुणालाही समजले नाही. सर्वजण राजा जनकांचा मोठेपणा सांगत होते. ॥ १ ॥

**सिय महिमा रघुनायक जानी । हरषे हृदयँ हेतु पहिचानी ॥**
**पितु आगमनु सुनत दोउ भाई । हृदयँ न अति आनंदु अमाई ॥**

हा सर्व जानकीचा महिमा आणि तिचे प्रेम ओळखून श्रीरामचंद्रांना फार आनंद झाला. आपले वडील राजा दशरथांचे आगमन झाल्याचे ऐकून दोन्ही भावांच्या मनातील आनंद गगनात मावत नव्हता. ॥ २ ॥

**सकुचन्ह कहि न सकत गुरु पाहीं । पितु दरसन लालचु मन माहीं ॥**
**बिस्वामित्र बिनय बड़ि देखी । उपजा उर संतोषु बिसेषी ॥**

संकोचामुळे ते गुरू विश्वामित्रांना सांगू शकत नव्हते. परंतु मनात पित्याच्या दर्शनाची लालसा होती. विश्वामित्रांनी त्यांची मोठी नम्रता पाहिली, तेव्हा त्यांच्या हृदयाला समाधान वाटले. ॥ ३ ॥

**हरषि बंधु दोउ हृदयँ लगाए । पुलक अंग अंबक जल छाए ॥**
**चले जहाँ दसरथु जनवासे । मनहुँ सरोबर तकेउ पिआसे ॥**

प्रसन्न होऊन त्यांनी दोघा भावांना हृदयाशी धरले. त्यांचे शरीर पुलकित झाले आणि नेत्रांतून प्रेमाश्रू वाहू लागले. ते त्यांना घेऊन दशरथांच्याकडे गेले. जणू सरोवरच तहानलेल्याकडे निघाले होते. ॥ ४ ॥

**दो०—भूप बिलोके जबहिं मुनि आवत सुतन्ह समेत।**
**उठे हरषि सुखसिंधु महुँ चले थाह सी लेत॥ ३०७॥**

जेव्हा राजा दशरथांनी पुत्रांसह मुनी येत असल्याचे पाहिले, तेव्हा ते मोठ्या आनंदाने उठले व सुख-सागराचा थांग घेत निघाले. ॥ ३०७ ॥

**मुनिहि दंडवत कीन्ह महीसा । बार बार पद रज धरि सीसा ॥**
**कौसिक राउ लिए उर लाई । कहि असीस पूछी कुसलाई ॥**

पृथ्वीपती दशरथांनी मुनींची चरण-रज वारंवार आपल्या मस्तकाला लावली आणि त्यांना दंडवत प्रणाम केला. विश्वामित्रांनी राजाला उठवून हृदयाशी धरले आणि आशीर्वाद देऊन खुशाली विचारली. ॥ १ ॥

**पुनि दंडवत करत दोउ भाई । देखि नृपति उर सुखु न समाई ॥**
**सुत हियँ लाइ दुसह दुख मेटे । मृतक सरीर प्रान जनु भेंटे ॥**

नंतर दोघा भावांनी राजाला साष्टांग नमस्कार घातला, तेव्हा राजांना झालेला आनंद काही विचारू नका. त्यांनी दोन्ही मुलांना छातीशी कवटाळून आपले वियोगाचे दुःख दूर केले. जणू मेलेल्या शरीरात नवचैतन्य आले. ॥ २ ॥

**पुनि बसिष्ठ पद सिर तिन्ह नाए। प्रेम मुदित मुनिबर उर लाए॥**
**बिप्र बृंद बंदे दुहुँ भाई। मनभावती असीसें पाई॥**

नंतर त्यांनी वसिष्ठांच्या चरणी मस्तक ठेवले. मुनिश्रेष्ठ वसिष्ठांनी सप्रेम आनंदाने त्यांना आलिंगन दिले. दोघा बंधूंनी सर्व ब्राह्मणांना वंदन करून मनपसंत आशीर्वाद मिळविले. ॥ ३ ॥

**भरत सहानुज कीन्ह प्रनामा। लिए उठाइ लाइ उर रामा॥**
**हरषे लखन देखि दोउ भ्राता। मिले प्रेम परिपूरित गाता॥**

भरताने लहान भाऊ शत्रुघ्न याचेसह श्रीरामांना प्रणाम केला. श्रीरामांनी त्याला उचलून धरून हृदयाशी कवटाळले. लक्ष्मण दोघा भावांना पाहून आनंदित झाला आणि प्रेमाने त्यांना मिठी घातली. ॥ ४ ॥

दो०—**पुरजन परिजन जातिजन जाचक मंत्री मीत।**
**मिले जथाबिधि सबहि प्रभु परम कृपाल बिनीत॥ ३०८॥**

त्यानंतर परम कृपाळू आणि विनयी श्रीरामचंद्र अयोध्यावासीयांना, कुटुंबीयांना, ज्ञाति बांधवांना, याचकांना, मंत्र्यांना, मित्रांना अशा साऱ्यांना यथायोग्य पद्धतीने भेटले. ॥ ३०८ ॥

**रामहि देखि बरात जुड़ानी। प्रीति कि रीति न जाति बखानी॥**
**नृप समीप सोहहिं सुत चारी। जनु धन धरमादिक तनुधारी॥**

श्रीरामचंद्रांना पाहून वऱ्हाडी मंडळींना समाधान झाले. प्रेमाच्या रूपाचे वर्णन करता येत नाही. राजाचे चार पुत्र जणू धर्म, अर्थ, काम, मोक्ष हेच साकार झाल्यासारखे शोभत होते. ॥ १ ॥

**सुतन्ह समेत दसरथहि देखी। मुदित नगर नर नारि बिसेषी॥**
**सुमन बरिसि सुर हनहिं निसाना। नाकनटीं नाचहिं करि गाना॥**

पुत्रांसह राजा दशरथांना पाहून नगरातील स्त्री-पुरुष फारच आनंदित झाले होते. आकाशातून देव फुलांची उधळण करीत नगारे वाजवीत होते आणि अप्सरा गात-गात नाचत होत्या. ॥ २ ॥

**सतानंद अरु बिप्र सचिव गन। मागध सूत बिदुष बंदीजन॥**
**सहित बरात राउ सनमाना। आयसु मागि फिरे अगवाना॥**

स्वागताला आलेले शतानंद, इतर ब्राह्मण, मंत्रीगण, स्तुतिपाठक, सूत, विद्वान व भाट यांनी वऱ्हाडासह दशरथ राजांचा आदर-सत्कार केला आणि त्यांचा निरोप घेऊन परत गेले. ॥ ३ ॥

**प्रथम बरात लगन तें आई। तातें पुर प्रमोदु अधिकाई॥**
**ब्रह्मानंदु लोग सब लहहीं। बढ़हुँ दिवस निसि बिधि सन कहहीं॥**

वऱ्हाड लग्नापूर्वीच आले, आल्यामुळे जनकपुरीमध्ये आनंद पसरला होता. सर्व लोकांना जणू ब्रह्मानंद वाटत होता. ते विधात्याला विनंती करीत होते की दिवस व रात्र मोठे होवोत.॥ ४॥

दो०—**रामु सीय सोभा अवधि सुकृत अवधि दोउ राज।**
**जहँ तहँ पुरजन कहहिं अस मिलि नर नारि समाज॥ ३०९॥**

श्रीराम व सीता हे लावण्याची परिसीमा आहेत, आणि दोन्ही राजे पुण्याची. जिथे तिथे जनकपुरवासी स्त्री-पुरुष जमून असेच म्हणत होते.॥ ३०९॥

**जनक सुकृत मूरति बैदेही। दसरथ सुकृत रामु धरें देही॥**
**इन्ह सम काहुँ न सिव अवराधे। काहुँ न इन्ह समान फल लाधे॥**

'जानकी ही जनक राजांच्या सुकृताची मूर्ती होय आणि दशरथांचे सुकृत, देह धारण केलेले श्रीराम होत. या दोन्ही राजांसारखी शिवांची आराधना कुणीही केलेली नाही, आणि यांच्यासारखे फल कुणालाही लाभले नाही.॥ १॥

**इन्ह सम कोउ न भयउ जग माहीं। है नहिं कतहूँ होनेउ नाहीं॥**
**हम सब सकल सुकृत कै रासी। भए जग जनमि जनकपुर बासी॥**

त्यांच्यासारखा या जगात कोणी झाला नाही, सध्या कुठेही नाही आणि होणारही नाही. आम्ही सर्वजण संपूर्ण पुण्यांची खाण आहोत, म्हणूनच जगात जन्म घेऊन जनकपुरीचे निवासी झालो.॥ २॥

**जिन्ह जानकी राम छबि देखी। को सुकृती हम सरिस बिसेषी॥**
**पुनि देखब रघुबीर बिआहू। लेब भली बिधि लोचन लाहू॥**

आणि आपण जानकी आणि श्रीराम यांचे लावण्य पाहिले. आमच्यासारखा विशेष पुण्यात्मा कोण असणार? आणि आता आपण श्रीरघुनाथांचा विवाह-सोहळा पाहाणार आणि नेत्रांचा पुरेपूर लाभ घेणार.'॥ ३॥

**कहहिं परसपर कोकिलबयनीं। एहि बिआहँ बड़ लाभु सुनयनीं॥**
**बड़ें भाग बिधि बात बनाई। नयन अतिथि होइहहिं दोउ भाई॥**

कोकिळेप्रमाणे मधुर बोलणाऱ्या स्त्रिया आपापसात बोलत होत्या की, 'हे सुंदरनयने, या विवाहामुळे आमचा मोठा लाभ होणार आहे. आमचे भाग्य मोठे म्हणून विधात्याने सर्व जुळवून आणले. हे दोघे भाऊ आता आपल्या नेत्रांचे पाहुणे होणार.॥ ४॥

**दो०—बारहिं बार सनेह बस जनक बोलाउब सीय।**
**लेन आइहहिं बंधु दोउ कोटि काम कमनीय॥ ३१०॥**

राजा जनक हे प्रेमाने सीतेला वारंवार बोलावणार आणि कोट्यवधी कामदेवांसारखे दोघे भाऊ सीतेला घेऊन जाण्यासाठी येत राहणार.॥ ३१०॥

**बिबिध भाँति होइहि पहुनाई। प्रिय न काहि अस सासुर माई॥**
**तब तब राम लखनहि निहारी। होइहहिं सब पुर लोग सुखारी॥**

मग त्यांचा अनेक प्रकारे पाहुणचार होणार. हे सखी, असली सासुरवाडी कुणाला आवडणार नाही? त्यावेळी आम्ही सर्व नगरवासी श्रीराम-लक्ष्मणांना पाहून पाहून सुखावून जाऊ.॥ १॥

**सखि जस राम लखन कर जोटा। तैसेइ भूप संग दुइ ढोटा॥**
**स्याम गौर सब अंग सुहाए। ते सब कहहिं देखि जे आए॥**

हे सखी, श्रीराम-लक्ष्मण यांची जशी जोडी आहे, तसेच राजांच्याबरोबर आणखी दोन कुमार आहेत. एक श्यामल आणि दुसरा गौर वर्णाचा आहे. त्यांचे सर्व अवयव फार सुंदर आहेत. जे लोक पाहून आलेत, ते सर्व असेच म्हणतात.'॥ २॥

**कहा एक मैं आजु निहारे। जनु बिरंचि निज हाथ सँवारे॥**
**भरतु रामही की अनुहारी। सहसा लखि न सकहिं नर नारी॥**

एकजण म्हणाला, 'मी आजच त्यांना पाहिले. ते इतके सुंदर आहेत की जणू ब्रह्मदेवांनी त्यांना आपल्या हातांनी घडविले आहे. भरत हा श्रीरामांचेच रूप घेऊन आला आहे. स्त्री-पुरुष त्यांना सहजपणे ओळखू शकणार नाहीत.॥ ३॥

**लखनु सत्रुसूदनु एकरूपा। नख सिख ते सब अंग अनूपा॥**
**मन भावहिं मुख बरनि न जाहीं। उपमा कहुँ त्रिभुवन कोउ नाहीं॥**

लक्ष्मण व शत्रुघ्न हे दोघे एकरूप आहेत. दोघांची नखशिखांत सर्व अंगे अनुपम आहेत. मनाला फार छान वाटतात. परंतु मुखाने त्यांचे वर्णन करता येत नाही.॥ ४॥

**छं०—उपमा न कोउ कह दास तुलसी कतहुँ कबि कोबिद कहैं।**
**बल बिनय बिद्या सील सोभा सिंधु इन्ह से एइ अहैं॥**
**पुर नारि सकल पसारि अंचल बिधिहि बचन सुनावहीं।**
**ब्याहिअहुँ चारिउ भाइ एहिं पुर हम सुमंगल गावहीं॥**

तुलसीदास म्हणतात की, कवी व विद्वान असे म्हणतात की, यांच्यासाठी कुठेही कुठलीही

उपमा नाही. बल, विनय, विद्या आणि शोभेचे सागर असलेले हे, यांच्यासारखे हेच आहेत. जनकपूरच्या सर्व स्त्रिया पदर पसरून विधात्याला म्हणतात की, 'चारीही भावांचा विवाह याच नगरात होवो आणि आम्ही सर्वजणी मंगल गीते गाऊ.'॥

**सो०—कहहिं परस्पर नारि बारि बिलोचन पुलक तन।**
**सखि सबु करब पुरारि पुन्य पयोनिधि भूप दोउ॥ ३११॥**

डोळ्यांत प्रेमाश्रू आणून पुलकित शरीराने स्त्रिया आपसात म्हणत होत्या की, 'हे सखी, दोन्ही राजे पुण्याचे सागर आहेत, त्रिपुरारी शिव सर्व मनोरथ पूर्ण करतील.'॥ ३११॥

**एहि बिधि सकल मनोरथ करहीं। आनँद उमगि उमगि उर भरहीं॥**
**जे नृप सीय स्वयंबर आए। देखि बंधु सब तिन्ह सुख पाए॥**

अशाप्रकारे सर्वजणी मनोरथ करीत होत्या आणि त्यांच्या हृदयाला आनंदाची भरती येत होती. सीतेच्या स्वयंवरासाठी जे राजे आले होते, त्यांनाही चारी भाऊ पाहून आनंद वाटला.॥ १॥

**कहत राम जसु बिसद बिसाला। निज निज भवन गए महिपाला॥**
**गए बीति कछु दिन एहि भाँती। प्रमुदित पुरजन सकल बराती॥**

श्रीरामांची निर्मल व महान कीर्ती सांगत, ते राजे लोक आपल्या घरी परत गेले. अशा प्रकारे काही दिवस निघून गेले. जनकपुरवासी आणि वऱ्हाडी मंडळी सर्व मोठ्या आनंदात होते.॥ २॥

**मंगल मूल लगन दिनु आवा। हिम रितु अगहनु मासु सुहावा॥**
**ग्रह तिथि नखतु जोगु बर बारू। लगन सोधि बिधि कीन्ह बिचारू॥**

मांगल्याचे मूळ असलेला लग्नाचा दिवस आला. हेमंत ऋतू आणि शोभिवंत मार्गशीर्ष महिना होता. ग्रह, तिथी, नक्षत्र, योग व वार उत्तम होते. मुहूर्त शोधून ब्रह्मदेवांनी त्यावर विचार केला.॥ ३॥

**पठै दीन्हि नारद सन सोई। गनी जनक के गनकन्ह जोई॥**
**सुनी सकल लोगन्ह यह बाता। कहहिं जोतिषी आहिं बिधाता॥**

आणि ती मुहूर्ताची पत्रिका नारदांच्या हातून जनकांच्याकडे पाठविली. जनकांच्या ज्योतिषांनीसुद्धा तीच गणना केली होती. जेव्हा सर्व लोकांना हे कळले, तेव्हा ते म्हणू लागले की, 'येथील ज्योतिषीसुद्धा ब्रह्मदेवच आहेत.'॥ ४॥

**दो०—धेनुधूरि बेला बिमल सकल सुमंगल मूल।**
**बिप्रन्ह कहेउ बिदेह सन जानि सगुन अनुकूल॥ ३१२॥**

निर्मल व सर्व सुंदर मांगल्याचे मूळ असलेली गोरजाची पवित्र वेळ आली आणि अनुकूल शकुन होऊ लागले. हे पाहून ब्राह्मणांनी राजा जनकांना म्हटले.॥ ३१२॥

**उपरोहितहि कहेउ नरनाहा। अब बिलंब कर कारनु काहा॥**
**सतानंद तब सचिव बोलाए। मंगल सकल साजि सब ल्याए॥**

तेव्हा राजा जनकांनी पुरोहित शतानंदांना विचारले की, 'आता उशीर करण्याचे कारण काय?' तेव्हा शतानंदांनी मंत्र्यांना बोलावले. ते सर्वजण मंगलकार्याचे सर्व सामान सजवून घेऊन आले.॥ १॥

**संख निसान पनव बहु बाजे। मंगल कलस सगुन सुभ साजे॥**
**सुभग सुआसिनि गावहिं गीता। करहिं बेद धुनि बिप्र पुनीता॥**

शंख, नगारे, ढोल आणि अनेक वाद्ये वाजू लागली. मंगल कलश व शुभ शकुनाच्या दही, दुर्वा इत्यादी वस्तू सजवून ठेवल्या. सुंदर सुवासिनी स्त्रिया गीत गात होत्या आणि पवित्र ब्राह्मण वेदमंत्रांचा घोष करू लागले.॥ २॥

**लेन चले सादर एहि भाँती। गए जहाँ जनवास बराती॥**
**कोसलपति कर देखि समाजू। अति लघु लाग तिन्हहि सुरराजू॥**

सर्वजण मोठ्या आदराने वऱ्हाड आणण्यासाठी निघाले. ते जानवस घरी गेले. अयोध्यापती दशरथांचे वैभव पाहून त्यांना देवराज इंद्रसुद्धा फार तुच्छ वाटू लागला.॥ ३॥

**भयउ समउ अब धारिअ पाऊ। यह सुनि परा निसानहिं घाऊ॥**
**गुरहि पूछि करि कुल बिधि राजा। चले संग मुनि साधु समाजा॥**

त्यांनी जाऊन विनंती केली की, 'वेळ झालेली आहे, आता चलावे.' हे ऐकताच नगाऱ्यांवर टिपरी पडली. गुरू वसिष्ठांना विचारून आणि कुलाचाराप्रमाणे सर्व करून राजा दशरथ मुनी आणि साधूंचा समुदाय बरोबर घेऊन निघाले.॥ ४॥

दो०—**भाग्य बिभव अवधेस कर देखि देव ब्रह्मादि।**
**लगे सराहन सहस मुख जानि जनम निज बादि॥ ३१३॥**

ब्रह्मदेव इत्यादी देव अयोध्यापती दशरथांचे भाग्य व वैभव पाहून आपला जन्म व्यर्थ समजू लागले आणि हजारो मुखांनी त्यांची प्रशंसा करू लागले.॥ ३१३॥

**सुरन्ह सुमंगल अवसरु जाना। बरषहिं सुमन बजाइ निसाना॥**
**सिव ब्रह्मादिक बिबुध बरूथा। चढ़े बिमानन्हि नाना जूथा॥**

सुमंगल वेळ पाहून देवगण नगारे वाजवीत फुलांचा वर्षाव करू लागले. शिव, ब्रह्मदेव इत्यादी देववृंद जमावाने विमानांत चढू लागले.॥ १॥

**प्रेम पुलक तन हृदयँ उछाहू। चले बिलोकन राम बिआहू॥**
**देखि जनकपुरु सुर अनुरागे। निज निज लोक सबहिं लघु लागे॥**

ते प्रेमाने पुलकित होऊन आणि हृदय उत्साहाने भरून जाऊन श्रीरामांचा विवाह पाहण्यास निघाले. जनकपूर पाहून देव त्याच्या प्रेमात पडले व त्या सर्वांना आपापले लोक तुच्छ वाटू लागले. ॥ २ ॥

**चितवहिं चकित बिचित्र बिताना । रचना सकल अलौकिक नाना ॥**
**नगर नारि नर रूप निधाना । सुघर सुधरम सुसील सुजाना ॥**

चित्र-विचित्र मंडप व नाना प्रकारची ती सर्व अलौकिक मांडणी पाहून ते चकित झाले. नगरातील स्त्री-पुरुष रूपाचे भांडार होते, सुंदर ठेवणीचे होते, श्रेष्ठ धर्मात्मे, सुशील व सुजाण होते. ॥ ३ ॥

**तिन्हहि देखि सब सुर सुरनारीं । भए नखत जनु बिधु उजिआरीं ॥**
**बिधिहि भयउ आचरजु बिसेषी । निज करनी कछु कतहुँ न देखी ॥**

त्या लोकांना पाहून सर्व देव व देवांगना चंद्राच्या प्रकाशाने जसे तारागण निस्तेज होतात. तसे प्रभाहीन झाले. ब्रह्मदेवांना विशेष आश्चर्य वाटले, कारण त्यांना तेथे स्वतःची निर्मिती कुठे दिसली नाही. ॥ ४ ॥

दो०—**सिवँ समुझाए देव सब जनि आचरज भुलाहु ।**
**हृदयँ बिचारहु धीर धरि सिय रघुबीर बिआहु ॥ ३१४ ॥**

शिवांनी सर्व देवांना समजावून सांगितले की, 'तुम्ही आश्चर्यात पडू नका. मनात धीर धरून विचार करा की, हा भगवंतांची महामहिमामयी निजशक्ती सीता आणि अखिल ब्रह्मांडांचे परम ईश्वर प्रत्यक्ष भगवान श्रीरामचंद्र यांचा विवाह आहे. ॥ ३१४ ॥

**जिन्ह कर नामु लेत जग माहीं । सकल अमंगल मूल नसाहीं ॥**
**करतल होहिं पदारथ चारी । तेइ सिय रामु कहेउ कामारी ॥**

ज्यांचे नाव घेताच जगातील सर्व अमंगळ मुळासह नष्ट होते आणि अर्थ, धर्म, काम, मोक्ष हे पदार्थ मुठीत येतात, ते हेच जगताचे माता-पिता श्रीसीताराम आहेत,' असे शिवांनी सांगितले. ॥ १ ॥

**एहि बिधि संभु सुरन्ह समुझावा । पुनि आगें बर बसह चलावा ॥**
**देवन्ह देखे दसरथु जाता । महामोद मन पुलकित गाता ॥**

अशाप्रकारे शिवांनी सांगितले आणि मग आपल्या नंदीश्वराला पुढे घेतले. राजा दशरथ मनातून फार प्रसन्न आणि शरीराने पुलकित होऊन पुढे चालले होते, असे देवांना दिसले. ॥ २ ॥

**साधु समाज संग महिदेवा । जनु तनु धरें करहिं सुख सेवा ॥**
**सोहत साथ सुभग सुत चारी । जनु अपबरग सकल तनुधारी ॥**

त्यांच्यासोबत आनंदित साधू व ब्राह्मण मंडळी अशी दिसत होती की, जणू सर्व सुखे शरीर धारण करून त्यांची सेवा करीत आहेत. चारी सुंदर पुत्र सोबत असे शोभून दिसत होते की जणू चारही मोक्ष देह धारण करून आले आहेत. ॥ ३ ॥

**मरकत कनक बरन बर जोरी । देखि सुरन्ह भै प्रीति न थोरी ॥**
**पुनि रामहि बिलोकि हियँ हरषे । नृपहि सराहि सुमन तिन्ह बरषे ॥**

पाचूच्या वर्णाचा एक व सुवर्ण वर्णाचा दुसरा, अशी दशरथ-पुत्रांची सुंदर जोडी पाहून देवांनाही फार प्रेम वाटले. मग श्रीरामचंद्रांना पाहून ते मनापासून आनंदित झाले आणि राजांची वाखाणणी करीत त्यांनी फुले उधळली. ॥ ४ ॥

दो०—**राम रूपु नख सिख सुभग बारहिं बार निहारि।**
**पुलक गात लोचन सजल उमा समेत पुरारि ॥ ३१५ ॥**

श्रीरामचंद्राचे नखशिखांत सुंदर रूप पाहून पार्वतीसह श्रीशिवांचे शरीर पुलकित झाले आणि त्यांचे नेत्र प्रेमाश्रूंमुळे डबडबले. ॥ ३१५ ॥

**केकि कंठ दुति स्यामल अंगा । तड़ित बिनिंदक बसन सुरंगा ॥**
**ब्याह बिभूषन बिबिध बनाए । मंगल सब सब भाँति सुहाए ॥**

श्रीरामांचे शरीर मोराच्या कंठासारख्या कांतीसारखे श्यामल होते. त्यांची प्रकाशमय पीत वस्त्रे विजेलाही लाजवीत होती. सर्व मंगलरूप आणि सर्व प्रकारे सुंदर तऱ्हेतऱ्हेची विवाहाची आभूषणे शरीरावर शोभत होती. ॥ १ ॥

**सरद बिमल बिधु बदनु सुहावन । नयन नवल राजीव लजावन ॥**
**सकल अलौकिक सुंदरताई । कहि न जाइ मनहीं मन भाई ॥**

त्यांचे सुंदर मुख शरद् पौर्णिमेच्या निर्मल चंद्रासारखे आणि मनोहर नेत्र नवकमलाला लाजविणारे होते. सर्व सौंदर्य अलौकिक होते. मायिक नव्हे तर दिव्य सच्चिदानंदमय होते. ते सांगता येत नाही. मनातल्या मनातच त्याची गोडी वाटते. ॥ २ ॥

**बंधु मनोहर सोहहिं संगा । जात नचावत चपल तुरंगा ॥**
**राजकुअँर बर बाजि देखावहिं । बंस प्रसंसक बिरिद सुनावहिं ॥**

सोबत मनोहर भाऊ शोभून दिसत होते. ते चपळ घोड्यांना नाचवत चालले होते. राजकुमार घोड्यांची सुंदर चाल दाखवीत होते आणि वंशाची प्रतिष्ठा सांगणारे मागध-भाट बिरुदावली ऐकवीत होते. ॥ ३ ॥

**जेहि तुरंग पर रामु बिराजे । गति बिलोकि खगनायकु लाजे ॥**
**कहि न जाइ सब भाँति सुहावा । बाजि बेषु जनु काम बनावा ॥**

ज्या घोड्यावर श्रीराम आरूढ होते. त्याची वेगवान चाल पाहून गरुडसुद्धा लाजून चूर होत असे. त्याचे वर्णन करता येणे शक्य नाही, तो सर्व प्रकारे सुंदर होता. जणू कामदेवानेच घोड्याचा वेश धारण केला आहे. ॥ ४ ॥

**छं०—जनु बाजि बेषु बनाइ मनसिजु राम हित अति सोहई।**
**आपनें बय बल रूप गुन गति सकल भुवन बिमोहई॥**
**जगमगत जीनु जराव जोति सुमोति मनि मानिक लगे।**
**किंकिनि ललाम लगामु ललित बिलोकि सुर नर मुनि ठगे॥**

जणू श्रीरामचंद्रांच्यासाठी कामदेव घोड्याचा वेश धारण करून शोभत होता. तो आपली अवस्था, बल, रूप, गुण आणि चाल यांमुळे सर्व लोकांना मोहून टाकीत होता. सुंदर मोती, मणि-माणिक्य जडविलेले जीन प्रकाशाने झगमगत होते. त्यांचे घुंघरू लावलेले सुंदर लगाम पाहून देव, मनुष्य आणि मुनी हे सुद्धा थक्क होत होते.

**दो०—प्रभु मनसहिं लयलीन मनु चलत बाजि छबि पाव।**
**भूषित उड़गन तड़ित घनु जनु बर बरहि नचाव॥ ३१६॥**

प्रभू रामांच्या इच्छेमध्ये आपले मन विलीन करून चाललेला तो घोडा फार शोभून दिसत होता. जणू तारागण व वीज यांनी अलंकृत झालेला मेघ सुंदर मोराला नाचवीत होता. ॥ ३१६ ॥

**जेहिं बर बाजि रामु असवारा। तेहि सारदउ न बरनै पारा॥**
**संकरु राम रूप अनुरागे। नयन पंचदस अति प्रिय लागे॥**

ज्या उत्तम घोड्यावर श्रीरामचंद्र बसले होते, त्याचे वर्णन सरस्वतीही करू शकणार नाही. श्रीशंकर श्रीरामांच्या रूपावर इतके भाळून गेले होते की, त्यांना या प्रसंगी आपले पंधरा नेत्र फार आवडू लागले होते. ॥ १ ॥

**हरि हित सहित रामु जब जोहे। रमा समेत रमापति मोहे॥**
**निरखि राम छबि बिधि हरषाने। आठइ नयन जानि पछिताने॥**

भगवान विष्णूंनी जेव्हा प्रेमाने श्रीरामांना पाहिले, तेव्हा ते स्वतः श्रीलक्ष्मीपती लक्ष्मीसह मोहित झाले. श्रीरामांची शोभा पाहून ब्रह्मदेव मोठे प्रसन्न झाले. पण आपल्याला फक्त आठ डोळे आहेत, म्हणून त्यांना खेद वाटला. ॥ २ ॥

**सुर सेनप उर बहुत उछाहू। बिधि ते डेवढ़ लोचन लाहू॥**
**रामहि चितव सुरेस सुजाना। गौतम श्रापु परम हित माना॥**

देवांचे सेनापती कार्तिकस्वामी यांच्या हृदयात मोठा उत्साह दाटला होता, कारण ते ब्रह्मदेवांच्यापेक्षा दीडपट (बारा) डोळ्यांनी राम-दर्शनाचा आनंद लुटत होते. सुजाण इंद्र आपल्या

हजार डोळ्यांनी श्रीरामांना पाहात होता आणि गौतम मुनींनी दिलेला शाप आपल्यासाठी परम हितकारक मानत होता. ॥ ३ ॥

**देव सकल सुरपतिहि सिहाहीं। आजु पुरंदर सम कोउ नाहीं॥**
**मुदित देवगन रामहि देखी। नृपसमाज दुहुँ हरषु बिसेषी॥**

सर्व देव देवराज इंद्राशी ईर्ष्या करू लागले होते आणि म्हणत होते की, 'आज इंद्रासारखा भाग्यवान दुसरा कोणीही नाही.' श्रीरामचंद्रांना पाहून देवगण प्रसन्न होते आणि दोन्ही राजांच्या परिवारामध्ये आनंद पसरलेला होता. ॥ ४ ॥

छं०—**अति हरषु राजसमाज दुहु दिसि दुंदुभीं बाजहिं घनी।**
**बरषहिं सुमन सुर हरषि कहि जय जयति जय रघुकुलमनी॥**
**एहि भाँति जानि बरात आवत बाजने बहु बाजहीं।**
**रानी सुआसिनि बोलि परिछनि हेतु मंगल साजहीं॥**

दोन्हीकडच्या राज परिवारांमध्ये अत्यंत हर्ष होता आणि फार जोराने नगारे वाजत होते. देव प्रसन्न होऊन 'रघुकुलशिरोमणी श्रीरामांचा जयजयकार असो,' असे म्हणत फुले उधळत होते. अशा प्रकारे वऱ्हाड आल्याचे समजल्यावर अनेक प्रकारची वाद्ये वाजू लागली आणि राण्या सुवासिनी स्त्रियांना बोलावून वराला ओवाळण्यासाठी मंगल द्रव्ये तयार करू लागल्या.।

दो०—**सजि आरती अनेक बिधि मंगल सकल सँवारि।**
**चलीं मुदित परिछनि करन गजगामिनि बर नारि॥ ३१७॥**

अनेक प्रकारच्या आरत्या तयार करून व सर्व मंगलद्रव्ये बरोबर घेऊन गजगामिनी सुंदरी आनंदाने औक्षण करण्यासाठी निघाल्या. ॥ ३१७ ॥

**बिधुबदनीं सब सब मृगलोचनि। सब निज तन छबि रति मदु मोचनि॥**
**पहिरें बरन बरन बर चीरा। सकल बिभूषन सजें सरीरा॥**

सर्व स्त्रिया चंद्रमुखी आणि मृगनयना होत्या आणि सर्वजणी आपापल्या शरीराच्या लावण्याने रतीचा गर्व हरण करीत होत्या. त्यांनी रंगी बेरंगी सुंदर साड्या परिधान केल्या होत्या आणि शरीरावर सर्व प्रकारचे दागिने घातले होते. ॥ १ ॥

**सकल सुमंगल अंग बनाएँ। करहिं गान कलकंठि लजाएँ॥**
**कंकन किंकिनि नूपुर बाजहिं। चालि बिलोकि काम गज लाजहिं॥**

सर्व अवयवांना सुंदर मंगल उटणी लावलेल्या त्या ललना कोकिळेला लाजवीत मधुर स्वरांनी गायन करीत होत्या. त्यांची कंकणे, कमरपट्टे व नूपुरे वाजत होती. स्त्रियांची चाल पाहून कामदेवाचा हत्तीही लाजत होता. ॥ २ ॥

**बाजहिं बाजने बिबिध प्रकारा। नभ अरु नगर सुमंगलचारा॥**
**सची सारदा रमा भवानी। जे सुरतिय सुचि सहज सयानी॥**

अनेक प्रकारची वाद्ये वाजत होती. आकाश व नगर या दोन्ही स्थानी सुंदर मंगल गीते निनादित होती. इंद्राणी, सरस्वती, लक्ष्मी, पार्वती आणि स्वभावानेच पवित्र आणि ज्ञानी असलेल्या देवांगना होत्या, ॥ ३ ॥

**कपट नारि बर बेष बनाई। मिलीं सकल रनिवासहिं जाई॥**
**करहिं गान कल मंगल बानीं। हरष बिबस सब काहुँ न जानीं॥**

त्या सर्वजणी सुंदर स्त्रियांचा बहाणा करून अंतःपुरात मिसळून गेल्या आणि मनोहर वाणीने मंगलगान करू लागल्या. सर्वजण आनंदात असे बुडून गेले होते की, कुणीही त्यांना ओळखू शकले नाही. ॥ ४ ॥

छं०—**को जान केहि आनंद बस सब ब्रह्मु बर परिछन चली।**
**कल गान मधुर निसान बरषहिं सुमन सुर सोभा भली॥**
**आनंदकंदु बिलोकि दूलहु सकल हियँ हरषित भई।**
**अंभोज अंबक अंबु उमगि सुअंग पुलकावलि छई॥**

कोण कुणाला ओळखणार? आनंदाने बेभान झालेल्या त्या सर्वजणी नवरदेव बनलेल्या प्रत्यक्ष ब्रह्माला ओवाळण्यासाठी निघाल्या. मनोहर गायन चालले होते. नगारे मधुरपणे वाजत होते, देव फुले उधळत होते, फार छान शोभा होती. आनंदकंद नवरदेवाला पाहून सर्व स्त्रिया मनातून आनंदून गेल्या. कमळासारख्या नेत्रांतून त्यांचे प्रेमाश्रू उचंबळून आले आणि सुंदर अंगांवर रोमांच दाटले.

दो०—**जो सुखु भा सिय मातु मन देखि राम बर बेषु।**
**सो न सकहिं कहि कलप सत सहस सारदा सेषु॥ ३१८॥**

श्रीरामांचा वर-वेष पाहून सीतेची माता सुनयना अशी हरखून गेली की, हजारो सरस्वती व शेष हेसुद्धा शंभर कल्पांमध्ये त्याचे वर्णन करू शकणार नाहीत॥ ३१८॥

**नयन नीरु हटि मंगल जानी। परिछनि करहिं मुदित मन रानी॥**
**बेद बिहित अरु कुल आचारू। कीन्ह भली बिधि सब ब्यवहारू॥**

ती मंगलवेळ असल्याचे जाणून राण्या डोळ्यांतील पाणी आवरून प्रसन्न मनाने ओवाळू लागल्या. वेदांमध्ये सांगितलेले आणि कुलाचाराप्रमाणे असलेले सर्व व्यवहार राणीने व्यवस्थितपणे पूर्ण केले. ॥ १ ॥

**पंच सबद धुनि मंगल गाना। पट पाँवड़े परहिं बिधि नाना॥**
**करि आरती अरघु तिन्ह दीन्हा। राम गमनु मंडप तब कीन्हा॥**

तंत्री, ताल, झांज, नगारे आणि तुतारी या पाच प्रकारच्या वाद्यांचे स्वर. पंचध्वनी, वेदध्वनी, बंदीध्वनी, जयध्वनी, शंखध्वनी आणि हुलूध्वनी आणि मंगलगान चालू होते. नाना प्रकारच्या वस्त्रांच्या पायघड्या घातल्या जात होत्या. सुनयना राणीने आरती करून अर्घ्य दिले, मग श्रीरामांनी मंडपात प्रवेश केला. ॥ २ ॥

**दसरथु सहित समाज बिराजे । बिभव बिलोकि लोकपति लाजे ॥**
**समयँ समयँ सुर बरषहिं फूला । सांति पढ़हिं महिसुर अनुकूला ॥**

राजा दशरथ आपल्या मंडळींच्यासह आले. त्यांचे वैभव पाहून लोकपालही लाजले. देव वारंवार फुले उधळत होते आणि ब्राह्मण समयानुकूल शांतीपाठ करीत होते. ॥ ३ ॥

**नभ अरु नगर कोलाहल होई । आपनि पर कछु सुनइ न कोई ॥**
**एहि बिधि रामु मंडपहिं आए । अरघु देइ आसन बैठाए ॥**

आकाशात व नगरात कलकलाट चालला होता. स्वत:चे किंवा दुसऱ्याचे बोलणे कुणालाच ऐकू येत नव्हते. अशा प्रकारे श्रीरामचंद्रांनी मंडपामध्ये प्रवेश केला आणि अर्घ्य देऊन त्यांना आसनावर बसविले गेले. ॥ ४ ॥

छं०—**बैठारि आसन आरती करि निरखि बरु सुखु पावहीं।**
**मनि बसन भूषन भूरि वारहिं नारि मंगल गावहीं ॥**
**ब्रह्मादि सुरबर बिप्र बेष बनाइ कौतुक देखहीं।**
**अवलोकि रघुकुल कमल रबि छबि सुफल जीवन लेखहीं ॥**

श्रीरामांना आसनावर बसवून आरती केलेल्या नवरदेवाला पाहून स्त्रियांना खूप आनंद झाला. त्यांनी भरभरून रत्ने, वस्त्रे आणि अलंकार त्यांच्यावरून ओवाळून टाकले. त्या मंगल गीते गाऊ लागल्या. ब्रह्मदेव इत्यादी श्रेष्ठ देव ब्राह्मणाचा वेश धारण करून हे कौतुक पाहात होते. रघुकुलरूपी कमळाला प्रफुल्लित करणारे सूर्य श्रीराम यांचे रूप पाहून त्यांना आपले जीवन सफल झाल्याचे वाटत होते. ॥

दो०—**नाऊ बारी भाट नट राम निछावरि पाइ।**
**मुदित असीसहिं नाइ सिर हरषु न हृदयँ समाइ ॥ ३१९ ॥**

न्हावी, द्रोण-पत्रावळींचे विक्रेते, भाट, डोंबारी हे श्रीरामांना आलेली ओवाळणी मिळाल्याने आनंदित होऊन व मस्तक नम्र करून आशीर्वाद देत होते. त्यांच्या मनात आनंद मावत नव्हता. ॥ ३१९ ॥

**मिले जनकु दसरथु अति प्रीतीं । करि बैदिक लौकिक सब रीतीं ॥**
**मिलत महा दोउ राज बिराजे । उपमा खोजि खोजि कबि लाजे ॥**

वैदिक आणि लौकिक असे सर्व रीति-रिवाज करून राजा जनक व राजा दशरथ मोठ्या प्रेमाने परस्परांना भेटले. दोघा राजांची ती भेट फार शोभून दिसत होती. कविगण त्यांच्यासाठी शोधूनसुद्धा उपमा न मिळाल्याने लाजले. ॥ १ ॥

**लही न कतहुँ हारि हियँ मानी । इन्ह सम एइ उपमा उर आनी ॥**
**सामध देखि देव अनुरागे । सुमन बरषि जसु गावन लागे ॥**

जेव्हा कोणतीही उपमा मिळेना, तेव्हा मनातून पराजित होऊन त्यांनी मनात हीच उपमा ठरविली की, यांच्यासारखे हेच होत. व्याह्यांची भेट व परस्पर संबंध पाहून देवांना समाधान वाटले आणि त्यांनी फुले उधळून त्यांची वाखाणणी केली. ॥ २ ॥

**जगु बिरंचि उपजावा जब तें । देखे सुने ब्याह बहु तब तें ॥**
**सकल भाँति सम साजु समाजू । सम समधी देखे हम आजू ॥**

ते म्हणू लागले की, 'ब्रह्मदेवांनी जग उत्पन्न केले, तेव्हापासून आजवर आम्ही अनेक विवाह पाहिले-ऐकले आहेत, परंतु सर्व प्रकारे समान साहित्य-सामुग्री आणि बरोबरीच्या दृष्टीने असे व्याही आजच पाहिले.' ॥ ३ ॥

**देव गिरा सुनि सुंदर साँची । प्रीति अलौकिक दुहु दिसि माची ॥**
**देत पाँवड़े अरघु सुहाए । सादर जनकु मंडपहिं ल्याए ॥**

देवांची ती अलौकिक सत्य वाणी ऐकून दोन्हीकडे अलौकिक प्रेमानंद झाला. सुंदर पायघड्या आणि अर्घ्य देत जनक दशरथांना आदराने मंडपात घेऊन आले. ॥ ४ ॥

छं०—**मंडपु बिलोकि बिचित्र रचनाँ रुचिरताँ मुनि मन हरे।**
**निज पानि जनक सुजान सब कहुँ आनि सिंघासन धरे॥**
**कुल इष्ट सरिस बसिष्ट पूजे बिनय करि आसिष लही।**
**कौसिकहि पूजत परम प्रीति कि रीति तौ न परै कही॥**

मंडपाची विलक्षण रचना आणि सजावट पाहून मुनींची मनेसुद्धा मोहित झाली. ज्ञानी जनकांनी स्वतः आपल्या हातांनी आणून सर्वांना सिंहासने मांडली. त्यांनी आपल्या कुलदेवतेसारखी वसिष्ठांची पूजा केली आणि विनंती करून आशीर्वाद प्राप्त केला. विश्वामित्रांची पूजा करते वेळी तर जनकांच्या प्रेमाची रीत सांगण्याच्या पलीकडची होती. ॥

दो०—**बामदेव आदिक रिषय पूजे मुदित महीस।**
**दिए दिब्य आसन सबहि सब सन लही असीस॥ ३२०॥**

राजाने वामदेव इत्यादी ऋषींची प्रसन्न चित्ताने पूजा केली. सर्वांना दिव्य आसने दिली आणि त्यांच्याकडून आशीर्वाद घेतला. ॥ ३२० ॥

**बहुरि कीन्हि कोसलपति पूजा । जानि ईस सम भाउ न दूजा ॥**
**कीन्हि जोरि कर बिनय बड़ाई । कहि निज भाग्य बिभव बहुताई ॥**

मग त्यांनी कोशलाधीश राजा दशरथांची पूजा महादेवासमान मानून केली. त्यावेळी कोणतीही इतर भावना नव्हती. त्यानंतर त्यांच्याशी संबंध येत असल्यामुळे आपल्या भाग्याचा व वैभवाचा विस्तार होत असल्याबद्दल प्रशंसा करीत हात जोडून विनंती केली आणि त्यांचा सन्मान केला. ॥ १ ॥

**पूजे भूपति सकल बराती। समधी सम सादर सब भाँती॥**
**आसन उचित दिए सब काहू। कहौं काह मुख एक उछाहू॥**

राजा जनकांनी सर्व वऱ्हाडी मंडळींची व्याही दशरथांप्रमाणेच सर्व प्रकारे आदराने पूजन केले आणि सर्वांना यथायोग्य आसने दिली. मी एका मुखाने त्या उत्सवाचे वर्णन कसे करू? ॥ २ ॥

**सकल बरात जनक सनमानी। दान मान बिनती बर बानी॥**
**बिधि हरि हरु दिसिपति दिनराऊ। जे जानहिं रघुबीर प्रभाऊ॥**

राजा जनकांनी दान, मान-सन्मान, विनय आणि उत्तम वाणीने सर्व वऱ्हाडाचे स्वागत केले. ब्रह्मदेव, विष्णू, शिव, दिक्‌पाल आणि सूर्य हे श्रीरघुनाथांचा प्रभाव जाणत होते. ॥ ३ ॥

**कपट बिप्र बर बेष बनाएँ। कौतुक देखहिं अति सचु पाएँ॥**
**पूजे जनक देव सम जानें। दिए सुआसन बिनु पहिचानें॥**

ते ब्राह्मणांचा सुंदर वेष घेऊन मोठ्या आनंदाने ती सर्व लीला पाहात होते. जनकांनी त्यांना देवासमान मानून त्यांची पूजा केली आणि ओळख पटली नसतानाही त्यांना सुंदर आसने दिली. ॥ ४ ॥

छं०—**पहिचान को केहि जान सबहि अपान सुधि भोरी भई।**
**आनंद कंदु बिलोकि दूलहु उभय दिसि आनँदमई॥**
**सुर लखे राम सुजान पूजे मानसिक आसन दए।**
**अवलोकि सीलु सुभाउ प्रभु को बिबुध मन प्रमुदित भए॥**

कोण कुणाला ओळखणार? सर्वांची शुद्ध हरपली होती. आनंदकंद नवरदेवाला पाहून दोन्ही पक्षांकडील स्थिती आनंदमय झाली होती. सर्वज्ञ श्रीरामांनी देवांना ओळखले आणि त्यांची मानसिक पूजा करून त्यांना मानसिक आसने दिली. प्रभू श्रीरामांचा शील-स्वभाव पाहून देवगण मनातून हरखून गेले.

दो०—**रामचंद्र मुख चंद्र छबि लोचन चारु चकोर।**
**करत पान सादर सकल प्रेमु प्रमोदु न थोर॥ ३२१॥**

श्रीरामचंद्राच्या मुखरूपी चंद्राच्या सौंदर्याचे पान सर्वांचे सुंदर नेत्ररूपी चकोर आदराने करीत होते. त्याप्रसंगी प्रेम व आनंद यांची कमतरता नव्हती. ॥ ३२१ ॥

**समउ बिलोकि बसिष्ठ बोलाए। सादर सतानंदु सुनि आए॥**
**बेगि कुअँरि अब आनहु जाई। चले मुदित मुनि आयसु पाई॥**

मुहूर्ताची वेळ जवळ आलेली पाहून वसिष्ठांनी शतानंदांना आदराने बोलाविले. बोलावणे येताच ते आदराने आले. वसिष्ठ म्हणाले, 'आता जाऊन राजकुमारीला लवकर घेऊन या.' मुनींची आज्ञा झाल्यावर ते प्रसन्न मनाने निघाले.॥ १॥

**रानी सुनि उपरोहित बानी। प्रमुदित सखिन्ह समेत सयानी॥**
**बिप्र बधू कुलबृद्ध बोलाईं। करि कुलरीति सुमंगल गाईं॥**

बुद्धिमान राणी पुरोहितांचे बोलणे ऐकून सख्यांसह फार आनंदून गेली. ब्राह्मण-स्त्रिया आणि कुळातील वयोवृद्ध स्त्रिया यांना बोलावून राणीने कुलरीतीनुसार सुंदर मंगलगीते गाइली.॥ २॥

**नारि बेष जे सुर बर बामा। सकल सुभायँ सुंदरी स्यामा॥**
**तिन्हहि देखि सुखु पावहिं नारीं। बिनु पहिचानि प्रानहु ते प्यारीं॥**

श्रेष्ठ देवांगना सुंदर मानवी स्त्रियांचे रूप घेऊन आल्या होत्या. सर्व स्वभावाने सुंदर आणि षोडशीतील तरुणी होत्या. त्यांना पाहून अंत:पुरातील स्त्रियांना आनंद वाटला. ओळख नसतानाही त्या सर्वांना प्राणापेक्षाही अधिक प्रिय वाटू लागल्या.॥ ३॥

**बार बार सनमानहिं रानी। उमा रमा सारद सम जानी॥**
**सीय सँवारि समाजु बनाई। मुदित मंडपहिं चलीं लवाई॥**

त्यांना पार्वती, लक्ष्मी आणि सरस्वतीसारख्या मानून राणीने त्यांचा वारंवार सन्मान केला. अंत:पुरातील स्त्रिया व सख्या यांनी सीतेचा साज-शृंगार केला. सख्या तिला बरोबर घेऊन प्रसन्न चित्ताने मंडपाकडे निघाल्या.॥ ४॥

छं०—**चलि ल्याइ सीतहि सखीं सादर सजि सुमंगल भामिनीं।**
**नवसप्त साजे सुंदरीं सब मत्त कुंजर गामिनीं॥**
**कल गान सुनि मुनि ध्यान त्यागहिं काम कोकिल लाजहीं।**
**मंजीर नूपुर कलित कंकन ताल गति बर बाजहीं॥**

सुंदर मांगल्याचा साज चढवून अंत:पुरातील स्त्रिया व सख्या आदराने सीतेला घेऊन निघाल्या. सर्व सुंदरींनी सोळा शृंगार केले होते. त्या गजगामिनीच्या चालीने चालत होत्या. त्यांचे मनोहर गान ऐकून मुनींचेही ध्यान भंग पावे आणि कामदेवाच्या कोकिळाही लज्जित होऊन जात होत्या. नूपुर, पैंजणे आणि सुंदर कंकणे तालासुरावर फार सुंदर वाजत होती.

दो०—**सोहति बनिता बृंद महुँ सहज सुहावनि सीय।**
**छबि ललना गन मध्य जनु सुषमा तिय कमनीय॥ ३२२॥**

स्वभावतः सुंदर सीता स्त्रियांच्या मेळाव्यात अशी शोभून दिसत होती की, जणू ती लावण्यमयी ललनांच्यामध्ये प्रत्यक्ष परम मनोहर शोभारूपी स्त्री शोभत होती. ॥ ३२२ ॥

**सिय सुंदरता बरनि न जाई। लघु मति बहुत मनोहरताई॥**
**आवत दीखि बरातिन्ह सीता। रूप रासि सब भाँति पुनीता॥**

सीतेच्या सौंदर्याचे वर्णन करता येणेच कठीण. कारण बुद्धी फार अल्प आहे आणि मनोहरता फार मोठी. रूपाची खाण आणि सर्वप्रकारे पवित्र सीतेला येताना वऱ्हाडी लोकांनी पाहिले. ॥ १ ॥

**सबहि मनहिं मन किए प्रनामा। देखि राम भए पूरनकामा॥**
**हरषे दसरथ सुतन्ह समेता। कहि न जाइ उर आनँदु जेता॥**

सर्वांनी तिला मनातल्या मनात प्रणाम केला. श्रीरामचंद्रांना पाहून सर्वजण कृतकृत्य झाले. राजा दशरथ पुत्रांसह हर्षित झाले. त्यांच्या मनात कोंदलेल्या आनंदाबद्दल सांगणेच कठीण होते. ॥ २ ॥

**सुर प्रनामु करि बरिसहिं फूला। मुनि असीस धुनि मंगल मूला॥**
**गान निसान कोलाहलु भारी। प्रेम प्रमोद मगन नर नारी॥**

देव प्रणाम करून फुले उधळू लागले. सर्व मांगल्याचे मूळ असलेल्या मुनींच्या आशीर्वादांचा ध्वनी घुमत होता. गाणी आणि नगारे यांचा आवाज दुमदुमत होता. सर्व नर-नारी प्रेम आणि आनंदामध्ये मग्न झाले होते. ॥ ३ ॥

**एहि बिधि सीय मंडपहिं आई। प्रमुदित सांति पढ़हिं मुनिराई॥**
**तेहि अवसर कर बिधि ब्यवहारू। दुहुँ कुलगुर सब कीन्ह अचारू॥**

अशा प्रकारे सीता मंडपात आली. मुनिराज मोठ्या आनंदाने शांति-पाठ म्हणू लागले. त्या प्रसंगी सर्व रीती, व्यवहार व कुलाचार दोन्ही कुलगुरूंनी केले. ॥ ४ ॥

**छं०—आचारु करि गुर गौरि गनपति मुदित बिप्र पुजावहीं।**
**सुर प्रगटि पूजा लेहिं देहिं असीस अति सुखु पावहीं॥**
**मधुपर्क मंगल द्रब्य जो जेहि समय मुनि मन महुँ चहैं।**
**भरे कनक कोपर कलस सो तब लिएहिं परिचारक रहैं॥ १ ॥**

कुलाचार झाल्यावर गुरूजी प्रसन्न होऊन गौरी, गणेश आणि ब्राह्मणांची पूजा करविली. देव प्रकट होऊन पूजा ग्रहण करू लागले, आशीर्वाद देऊ लागले आणि सुखावून गेले. मधुपर्क इत्यादी कोणत्याही मांगलिक पदार्थाची मुनींना गरज भासताच सेवकगण त्याचक्षणी सोन्याच्या परातीत आणि कलशांमध्ये भरून ते पदार्थ घेऊन तयार असत. ॥ १ ॥

**कुल रीति प्रीति समेत रबि कहि देत सबु सादर कियो।**
**एहि भाँति देव पुजाइ सीतहि सुभग सिंघासनु दियो॥**
**सिय राम अवलोकनि परसपर प्रेमु काहुँ न लखि परै।**
**मन बुद्धि बर बानी अगोचर प्रगट कबि कैसें करै॥ २॥**

प्रत्यक्ष सूर्यदेव मोठ्या प्रेमाने आपल्या कुळाची रीत सांगू लागले आणि त्या रीती आदराने पूर्ण केल्या जात होत्या. अशा प्रकारे देवांची पूजा झाल्यावर मुनींनी सीतेला सुंदर सिंहासनावर बसविले. सीता व श्रीराम परस्परांकडे बघत होते, पण त्यांचे परस्पर प्रेम कुणाला दिसून येत नव्हते. जी गोष्ट श्रेष्ठ मन, बुद्धी आणि वाणी यांच्या पलीकडची आहे, ती गोष्ट कवी कसा बरे वर्णन करू शकेल?॥ २॥

दो०—**होम समय तनु धरि अनलु अति सुख आहुति लेहिं।**
**बिप्र बेष धरि बेद सब कहि बिबाह बिधि देहिं॥ ३२३॥**

हवनाचे प्रसंगी अग्निदेव शरीर धारण करून मोठ्या आनंदाने आहुती ग्रहण करू लागले आणि सर्व वेद ब्राह्मणाचा वेश धारण करून विवाहाचे विधी सांगू लागले.॥ ३२३॥

**जनक पाटमहिषी जग जानी। सीय मातु किमि जाइ बखानी॥**
**सुजसु सुकृत सुख सुंदरताई। सब समेटि बिधि रची बनाई॥**

जनकांची जगत्‌विख्यात पट्टराणी आणि सीतेची माता सुनयना हिचे वर्णन कोण कसे करू शकेल? कारण सुयश, सुकृत, सुख आणि सुंदरता यांना एकत्र करून विधात्याने तिला बनविले होते ना!॥ १॥

**समउ जानि मुनिबरन्ह बोलाईं। सुनत सुआसिनि सादर ल्याईं॥**
**जनक बाम दिसि सोह सुनयना। हिमगिरि संग बनी जनु मयना॥**

वेळ होताच मुनींनी तिला बोलाविले. मग सुवासिनी स्त्रिया तिला घेऊन आल्या. पट्टराणी सुनयना जनकांच्या डाव्या बाजूस अशी शोभून दिसत होती की, जणू हिमालयाबरोबर त्याची पट्टराणी मैना शोभावी.॥ २॥

**कनक कलस मनि कोपर रूरे। सुचि सुगंध मंगल जल पूरे॥**
**निज कर मुदित रायँ अरु रानी। धरे राम के आगें आनी॥**

पवित्र, सुगंधित आणि मंगल जलाने भरलेले सोन्याचे कलश आणि रत्नांनी भरलेल्या सुंदर पराती आपल्या हातांनी आणून राजा-राणीने श्रीरामचंद्रांच्या समोर ठेवल्या.॥ ३॥

**पढ़हिं बेद मुनि मंगल बानी। गगन सुमन झरि अवसरु जानी॥**
**बरु बिलोकि दंपति अनुरागे। पाय पुनीत पखारन लागे॥**

मुनी मंगलवाणीने वेद-पठन करीत होते. योग्य वेळ पाहून आकाशातून फुलांचा वर्षाव होऊ लागला. नवरदेवाला पाहून राजा व राणी प्रेमात मग्न झाले आणि त्यांचे पवित्र चरण धुऊ लागले.॥

छं०—**लागे पखारन पाय पंकज प्रेम तन पुलकावली।**
**नभ नगर गान निसान जय धुनि उमगि जनु चहुँ दिसि चली॥**
**जे पद सरोज मनोज अरि उर सर सदैव बिराजहीं।**
**जे सकृत सुमिरत बिमलता मन सकल कलि मल भाजहीं॥ १॥**

ते श्रीरामांच्या चरणकमलांचे प्रक्षालन करू लागले, तेव्हा प्रेमामुळे त्यांची शरीरे पुलकित झाली होती. आकाश व नगर येथे होणारे गायन, नगारे आणि जयजयकार यांचा ध्वनी जणू चारी दिशांना उसळला होता. जे चरणकमल भगवान शिवांच्या हृदयात नित्य विराजतात, ज्यांचे एकदा स्मरण करताच मन शुद्ध होते आणि कलियुगातील सर्व पापे पळून जातात,॥ १॥

**जे परसि मुनिबनिता लही गति रही जो पातकमई।**
**मकरंदु जिन्ह को संभु सिर सुचिता अवधि सुर बरनई॥**
**करि मधुप मन मुनि जोगिजन जे सेइ अभिमत गति लहैं।**
**ते पद पखारत भाग्यभाजनु जनकु जय जय सब कहैं॥ २॥**

ज्यांचा स्पर्श होताच गौतम मुनींची पत्नी पापमयी अहल्या हिला परमगती मिळाली. ज्या चरण-कमलांचा गंगा-रूप मकरंदरस शिवांच्या मस्तकावर विराजमान आहे, त्या गंगेला देव हे पवित्रतेची परिसीमा मानतात; मुनी आणि योगिजन आपल्या मन-भ्रमराला ज्या चरण-कमलांचे सेवन करवून मनोवांछित गती प्राप्त करतात, त्याच चरणांचे महाभाग्यवान जनक प्रक्षालन करीत आहेत, हे पाहून सर्वजण जयजयकार करू लागले.॥ २॥

**बर कुअँरि करतल जोरि साखोचारु दोउ कुलगुर करैं।**
**भयो पानिगहनु बिलोकि बिधि सुर मनुज मुनि आनँद भरैं॥**
**सुखमूल दूलहु देखि दंपति पुलक तन हुलस्यो हियो।**
**करि लोक बेद बिधानु कन्यादानु नृपभूषन कियो॥ ३॥**

दोन्ही कुळांचे गुरू, वर व वधू यांचे हात एकमेकांच्या हातात देऊन वेदघोष करू लागले. पाणिग्रहण झाल्याचे पाहून ब्रह्मदेवादी देव आणि मुनी आनंदित होऊन गेले. सुखाचे मूळ असलेल्या

नवरदेवाला पाहून राजा-राणी रोमांचित होऊन गेले आणि हृदय आनंदामुळे भावाकुल झाले. राजांचेही भूषण असलेल्या महाराज जनकांनी लोक व वेद यांच्या पद्धतीने कन्यादान केले. ॥ ३ ॥

**हिमवंत जिमि गिरिजा महेसहि हरिहि श्री सागर दई।**
**तिमि जनक रामहि सिय समरपी बिस्व कल कीरति नई॥**
**क्यों करै बिनय बिदेहु कियो बिदेहु मूरति सावँरीं।**
**करि होमु बिधिवत गाँठि जोरी होन लागीं भावँरीं॥ ४॥**

ज्याप्रमाणे हिमवानाने शिवांना पार्वती आणि सागराने भगवान विष्णूंना लक्ष्मी दिली, त्याचप्रमाणे जनक राजांनी श्रीरामचंद्रांना सीता अर्पण केली. त्यामुळे विश्वामध्ये सुंदर नवी कीर्ती पसरली. विदेह (जनक) विनंती कशी करणार? त्या सावळ्या मूर्तींनी त्यांना खराखुरा (शुद्ध हरपलेला) विदेह बनवून टाकले होते. विधिपूर्वक हवन करून वधू-वराची विवाह-गाठ बांधली आणि सप्तपदी सुरू झाली. ॥ ४ ॥

**दो०—जय धुनि बंदी बेद धुनि मंगल गान निसान।**
**सुनि हरषहिं बरषहिं बिबुध सुरतरु सुमन सुजान॥ ३२४॥**

जय-ध्वनी, बंदिध्वनी, वेदध्वनी, मंगल गान आणि नगाऱ्यांचा ध्वनी ऐकून ज्ञानी देवगणही हरखून गेले आणि कल्पवृक्षाची फुले उधळू लागले. ॥ ३२४ ॥

**कुअँरु कुअँरि कल भावँरि देहीं। नयन लाभु सब सादर लेहीं॥**
**जाइ न बरनि मनोहर जोरी। जो उपमा कछु कहौं सो थोरी॥**

वर व कन्या अग्नीभोवती सुंदर फेरे घालू लागल्या. सर्व लोक त्यांना आदराने नेत्रांचे पारणे फेडून घेत होते. त्या मनोहर जोडप्याचे वर्णन करता येणे कठीण. जी उपमा द्यावी, ती तोकडीच पडे. ॥ १ ॥

**राम सीय सुंदर प्रतिछाहीं। जगमगात मनि खंभन माहीं॥**
**मनहुँ मदन रति धरि बहु रूपा। देखत राम बिआहु अनूपा॥**

श्रीराम व सीता यांची सुंदर प्रतिबिंबे मणिजडित स्तंभांमधून झळकत होती. जणू कामदेव आणि रती अनेक रूपे घेऊन श्रीरामांचा अनुपम विवाह पाहात होती. ॥ २ ॥

**दरस लालसा सकुच न थोरी। प्रगटत दुरत बहोरि बहोरी॥**
**भए मगन सब देखनिहारे। जनक समान अपान बिसारे॥**

कामदेव व रती या दोघांना दर्शनाची लालसा तर होती व संकोचही फार वाटत होता. म्हणून ती जणू वारंवार प्रकट होऊन लपत होती. पाहणारे सर्वजण आनंदमग्न झाले आणि राजा जनकांप्रमाणे आपले देहभान हरवून बसले. ॥ ३ ॥

**प्रमुदित मुनिन्ह भावँरीं फेरीं। नेगसहित सब रीति निबेरीं॥**
**राम सीय सिर सेंदुर देहीं। सोभा कहि न जाति बिधि केहीं॥**

मुनींनी आनंदाने फेरे पूर्ण करविले आणि आहेर, वाणे इत्यादी रीती पूर्ण करविल्या. श्रीरामचंद्र सीतेच्या भांगामध्ये सिंदूर घालू लागले, ती शोभा तर अवर्णनीय होती.॥ ४॥

**अरुन पराग जलजु भरि नीकें। ससिहि भूष अहि लोभ अमी कें॥**
**बहुरि बसिष्ठ दीन्हि अनुसासन। बरु दुलहिनि बैठे एक आसन॥**

जणू (श्रीरामांचे) कर-कमल, सिंदूराच्या लाल परागाने भरून (श्रीरामांची सावळी भुजारूपी) साप (सीतेच्या) मुख-चंद्रातील अमृत मिळविण्याच्या लोभाने त्या चंद्राला विभूषित करीत होता. जेव्हा वसिष्ठांनी आज्ञा दिली, तेव्हा वर-वधू एका आसनावर बसले.॥ ५॥

छं०—**बैठे बरासन रामु जानकि मुदित मन दसरथु भए।**
**तनु पुलक पुनि पुनि देखि अपनें सुकृत सुरतरु फल नए॥**
**भरि भुवन रहा उछाहु राम बिबाहु भा सबहीं कहा।**
**केहि भाँति बरनि सिरात रसना एक यहु मंगलु महा॥ १॥**

श्रीराम व सीता श्रेष्ठ आसनावर बसले, ते पाहून दशरथांचे मन आनंदाने दाटून गेले. आपल्या सुकृतरूपी कल्पवृक्षाला नवे फळ आलेले पाहून त्यांचे शरीर वारंवार रोमांचित होत होते. चौदा भुवनांमध्ये उत्साह भरला होता, सर्वांनी म्हटले की, श्रीरामचंद्रांचा विवाह झाला. जीभ एकच आहे आणि सोहळा महन्मंगल आहे. अशा सोहळ्याचे वर्णन एका जिभेने कसे पूर्ण होऊ शकणार ?॥ १॥

**तब जनक पाइ बसिष्ठ आयसु ब्याह साज सँवारि कै।**
**मांडवी श्रुतकीरति उरमिला कुअँरि लईं हँकारि कै॥**
**कुसकेतु कन्या प्रथम जो गुन सील सुख सोभामई।**
**सब रीति प्रीति समेत करि सो ब्याहि नृप भरतहि दई॥ २॥**

मग वसिष्ठांची आज्ञा झाल्यावर जनकांनी विवाहाचे सामान सज्ज करून मांडवी, श्रुतकीर्ती आणि ऊर्मिला-या तिन्ही राजकुमारींना बोलावून घेतले. कुशध्वजाची मोठी कन्या मांडवी ही गुण, शील, सुख व शोभेची मूर्तीच होती. राजा जनकांनी मोठ्या प्रेमाने सर्व रीति-रिवाज पूर्ण करून तिचा विवाह भरताशी करविला.॥ २॥

**जानकी लघु भगिनी सकल सुंदरि सिरोमनि जानि कै।**
**सो तनय दीन्ही ब्याहि लखनहि सकल बिधि सनमानि कै॥**
**जेहि नामु श्रुतकीरति सुलोचनि सुमुखि सब गुन आगरी।**
**सो दई रिपुसूदनहि भूपति रूप सील उजागरी॥ ३॥**

जानकीची छोटी बहीण ऊर्मिला ही सर्व सुंदरीत श्रेष्ठ असल्याचे पाहून तिचा सर्व प्रकारे सन्मान करून लक्ष्मणाशी तिचा विवाह करून दिला. जिचे नाव श्रुतकीर्ती होते, जी सुंदरनयनी, सुंदरमुखी, सर्व गुणांची खाण आणि रूपाने व शीलाने तळपत होती, तिचा विवाह राजांनी शत्रुघ्नाशी करविला.॥ ३॥

**अनुरूप बर दुलहिनि परस्पर लखि सकुच हियँ हरषहीं।**
**सब मुदित सुंदरता सराहहिं सुमन सुर गन बरषहीं॥**
**सुंदरीं सुंदर बरन्ह सह सब एक मंडप राजहीं।**
**जनु जीव उर चारिउ अवस्था बिभुन सहित बिराजहीं॥ ४॥**

नवरे व नवऱ्या आपल्या अनुरूप जोडीला पाहून लाजत लाजत मनातून हरखत होत्या. सर्व लोक प्रसन्न होऊन त्यांच्या लावण्याची वाखाणणी करीत होते आणि देवगण फुलांचा वर्षाव करीत होते. सर्व सुंदर वधू सुंदर वरांच्यासोबत एकाच मंडपात अशा शोभून दिसत होत्या की, जणू जीवाच्या जाग्रती, स्वप्न, सुषुप्ती आणि तुरीय या अवस्था आपल्या विश्व, तैजस, प्राज्ञ व ब्रह्म या स्वामींसह विराजमान झालेल्या आहेत.॥ ४॥

**दो०—मुदित अवधपति सकल सुत बधुन्ह समेत निहारि।**
**जनु पाए महिपाल मनि क्रियन्ह सहित फल चारि॥ ३२५॥**

सर्व पुत्रांना वधूंच्यासह पाहून राजाधिराज अयोध्यापती दशरथ असे आनंदून गेले होते की, यज्ञक्रिया, श्रद्धाक्रिया, योगक्रिया आणि ज्ञानक्रिया यांच्यासह अर्थ, धर्म, काम व मोक्ष ही चारी फले त्यांना लाभली आहेत.॥ ३२५॥

**जसि रघुबीर ब्याह बिधि बरनी। सकल कुअँर ब्याहे तेहिं करनी॥**
**कहि न जाइ कछु दाइज भूरी। रहा कनक मनि मंडपु पूरी॥**

श्रीरामचंद्रांच्या विवाहाच्या विधीचे जसे वर्णन केलेले आहे, त्याच रीतीने सर्व राजकुमारांचे विवाह संपन्न झाले. आंदणाच्या वस्तू इतक्या भरपूर होत्या की, सांगता येत नाही. सर्व मंडप सोन्या-रत्नांनी भरला होता.॥ १॥

**कंबल बसन बिचित्र पटोरे। भाँति भाँति बहु मोल न थोरे॥**
**गज रथ तुरग दास अरु दासी। धेनु अलंकृत कामदुहा सी॥**

पुष्कळशी लोकरी व सुती वस्त्रे आणि तऱ्हेतऱ्हेचे सुंदर रेशमी कपडे हे सर्व बहुमूल्य होते. तसेच हत्ती, रथ, घोडे, दास-दासी आणि अलंकारांनी सजविलेल्या कामधेनूसारख्या गाई, ॥ २ ॥

**बस्तु अनेक करिअ किमि लेखा । कहि न जाइ जानहिं जिन्ह देखा ॥**
**लोकपाल अवलोकि सिहाने । लीन्ह अवधपति सबु सुखु माने ॥**

इत्यादी अनेक वस्तू होत्या. त्यांची गणना कशी करणार? त्यांचे वर्णन करणे शक्य नाही. ज्यांनी ते पाहिले त्यांनाच ते कळणार. त्या वस्तू पाहून लोकपालांनाही हेवा वाटू लागला. अयोध्यापती दशरथांनी प्रसन्न मनाने ते सर्व काही ग्रहण केले. ॥ ३ ॥

**दीन्ह जाचकन्हि जो जेहि भावा । उबरा सो जनवासेहिं आवा ॥**
**तब कर जोरि जनकु मृदु बानी । बोले सब बरात सनमानी ॥**

त्यांनी आंदण म्हणून आलेले सामान याचकांना त्यांच्या त्यांच्या इच्छेप्रमाणे देऊन टाकले. जे उरले ते जानवश्यात नेले. तेव्हा जनक हात जोडून सर्व वऱ्हाडाचा सन्मान करून कोमल वाणीने म्हणाले, ॥ ४ ॥

**छं०—सनमानि सकल बरात आदर दान बिनय बड़ाइ कै।**
**प्रमुदित महा मुनि बृंद बंदे पूजि प्रेम लड़ाइ कै॥**
**सिरु नाइ देव मनाइ सब सन कहत कर संपुट किएँ।**
**सुर साधु चाहत भाउ सिंधु कि तोष जल अंजलि दिएँ॥ १ ॥**

आदर, दान, विनय आणि मोठेपणा देत सर्व वऱ्हाडाचा सन्मान करून जनक राजांनी आनंदाने, प्रेमपूर्वक व आवडीने मुनींच्या समूहाची पूजा केली आणि वंदन केले. डोके नमवून व देवांची आळवणी करून राजा हात जोडून सर्वांना म्हणू लागले की, 'देव व साधू हे केवळ प्रेम-भाव इच्छितात. एक ओंजळभर पाणी दिल्याने समुद्र संतुष्ट होईल काय?' ॥ १ ॥

**कर जोरि जनकु बहोरि बंधु समेत कोसलराय सों।**
**बोले मनोहर बयन सानि सनेह सील सुभाय सों॥**
**संबंध राजन रावरें हम बड़े अब सब बिधि भए।**
**एहि राज साज समेत सेवक जानिबे बिनु गथ लए॥ २ ॥**

नंतर जनक आपल्या भावासह कोसलाधीश दशरथांना शील आणि सुंदर प्रेमाने भरलेल्या वाणीने मनोहर शब्दांत म्हणाले, 'हे राजन! तुमच्याशी संबंध जुळल्यामुळे आम्ही सर्व प्रकारे मोठे झालो. तुम्ही आम्हा दोघांना या राज्यासह कसली ही अपेक्षा न बाळगणारे आपले सेवक समजा. ॥ २ ॥

ए दारिका परिचारिका करि पालिबीं करुना नई।
अपराधु छमिबो बोलि पठए बहुत हौं ढीट्यो कई॥
पुनि भानुकुलभूषन सकल सनमान निधि समधी किए।
कहि जाति नहिं बिनती परस्पर प्रेम परिपूरन हिए॥ ३॥

आमच्या या मुलींना सेविका समजून, नित्य नवी दया देऊन पालन करा. मी तुम्हांला येथे बोलावून घेतले, या अवमानाबद्दल क्षमा करा.' मग सूर्यकुलाचे भूषण असलेल्या राजा दशरथांनी व्याही जनकांना इतका सन्मान दिला की, ते सन्मानाचे भांडार बनले. त्यांची परस्पर नम्रता सांगण्यापलीकडची होती. दोघांची मने प्रेमाने भरलेली होती. ॥ ३ ॥

बृंदारका गन सुमन बरिसहिं राउ जनवासेहि चले।
दुंदुभी जय धुनि बेद धुनि नभ नगर कौतूहल भले॥
तब सखीं मंगल गान करत मुनीस आयसु पाइ कै ।
दूलह दुलहिनिन्ह सहित सुंदरि चलीं कोहबर ल्याइ कै॥ ४॥

देवगण फुलांचा वर्षाव करीत होते. राजा दशरथ जानवश्याकडे निघाले. नगाऱ्यांचा ध्वनी, जयध्वनी व वेदध्वनी घुमत होते. आकाशात व नगरात आनंद पसरला होता. तेव्हा मुनीश्वरांची आज्ञा झाल्यावर सुंदरी सख्या मंगलगान करीत वधूंबरोबर वरांना घेऊन देवकाकडे निघाल्या. ॥ ४ ॥

दो०—पुनि पुनि रामहि चितव सिय सकुचति मनु सकुचै न।
हरत मनोहर मीन छबि प्रेम पिआसे नैन॥ ३२६॥

सीता श्रीरामांना वारंवार पाहताना संकोचत होती, परंतु तिचे मन मात्र संकोचत नव्हते. प्रेमाकुल झालेले तिचे नेत्र सुंदर मासोळीची सुंदरता हरण करीत होते. ॥ ३२६ ॥

## मासपारायण, अकरावा विश्राम

स्याम सरीरु सुभायँ सुहावन । सोभा कोटि मनोज लजावन॥
जावक जुत पद कमल सुहाए । मुनि मन मधुप रहत जिन्ह छाए॥

श्रीरामांचे सावळे रूप स्वभावत:च सुंदर होते. त्याची शोभा कोट्यवधी कामदेवांना लाजवीत होती. मेंदी लावलेले त्यांचे चरणकमल फार शोभून दिसत होते. मुनींचे मन-भ्रमर त्यांच्यावर गुंजी घालत असतात. ॥ १ ॥

पीत पुनीत मनोहर धोती । हरति बाल रबि दामिनि जोती॥
कल किंकिनि कटि सूत्र मनोहर । बाहु बिसाल बिभूषन सुंदर॥

पवित्र व मनोहर असे पीतांबर प्रात:कालीन सूर्याची आणि वीजेची चमक हरण करीत होते. कटीवर सुंदर घुंगरू लावलेले कटिसूत्र होते. विशाल भुजांमध्ये सुंदर आभूषणे शोभत होती. ॥ २ ॥

**पीत जनेउ महाछबि देई। कर मुद्रिका चोरि चितु लेई॥**
**सोहत ब्याह साज सब साजे। उर आयत उरभूषन राजे॥**

पिवळे यज्ञोपवीत शोभून दिसत होते. हातामधील आंगठ्या चित्त चोरून घेत होत्या. विवाहाची सर्व वेषभूषा शोभून दिसत होती. विशाल वक्ष:स्थलावर सुंदर आभूषणे शोभत होती. ॥ ३ ॥

**पिअर उपरना काखासोती। दुहुँ आँचरन्हि लगे मनि मोती॥**
**नयन कमल कल कुंडल काना। बदनु सकल सौंदर्ज निधाना॥**

पिवळे उपरणे शोभून दिसत होती. त्याच्या दोन्ही टोकांना मणी व मोती लावलेले होते. कमळासारखे सुंदर नेत्र, कानांमध्ये सुंदर कुंडले आणि मुख हे तर लावण्याची खाण होते. ॥ ४ ॥

**सुंदर भृकुटि मनोहर नासा। भाल तिलकु रुचिरता निवासा॥**
**सोहत मौरु मनोहर माथे। मंगलमय मुकुता मनि गाथे॥**

सुंदर भुवया आणि मनोहर नाक आहे. ललाटावरील तिलक तर सौंदर्याचे माहेरघर होता. मंगलमय मोती आणि रत्ने गुंफलेला व मुंडावळ्या लावलेला मुकुट शिरावर शोभत होता. ॥ ५ ॥

**छं०—गाथे महामनि मौर मंजुल अंग सब चित चोरहीं।**
**पुर नारि सुर सुंदरीं बरहि बिलोकि सब तिन तोरहीं॥**
**मनि बसन भूषन वारि आरति करहिं मंगल गावहीं।**
**सुर सुमन बरिसहिं सूत मागध बंदि सुजसु सुनावहीं॥ १ ॥**

त्या सुंदर मुकुटामध्ये बहुमूल्य रत्ने गुंफली होती. त्यांचे सर्व अवयव मन हरण करीत होते. नगरातील सर्व स्त्रिया व देवसुंदरी गवताची काडी मोडून दृष्ट काढत होत्या आणि रत्ने, वस्त्रे व दागिने त्यांच्यावरून ओवाळून टाकून आरत्या करीत होत्या आणि मंगलगान गात होत्या. देव फुले उधळत होते आणि सूत, मागध, भाट कीर्ती गात होते. ॥ १ ॥

**कोहबरहिं आने कुअँर कुअँरि सुआसिनिन्ह सुख पाइ कै।**
**अति प्रीति लौकिक रीति लागीं करन मंगल गाइ कै॥**
**लहकौरि गौरि सिखाव रामहि सीय सन सारद कहैं।**
**रनिवासु हास बिलास रस बस जन्म को फलु सब लहैं॥ २ ॥**

सुवासिनी स्त्रिया मोठ्या आनंदाने वधू-वरांना कुलदेवतेपाशी घेऊन आल्या आणि अत्यंत

प्रेमाने मंगलगीते गात-गात लौकिक रीतीप्रमाणे कुळाचार करू लागल्या. पार्वती श्रीरामांना व सरस्वती सीतेला परस्परांना घास खाऊ घालण्यास शिकवू लागल्या. सर्वांना जन्माचे सारे फळ मिळत होते. ॥ २ ॥

**निज पानि मनि महुँ देखिअति मूरति सुरूपनिधान की।**
**चालति न भुजबल्ली बिलोकनि बिरह भय बस जानकी॥**
**कौतुक बिनोद प्रमोदु प्रेमु न जाइ कहि जानहिं अलीं।**
**बर कुअँरि सुंदर सकल सखीं लवाइ जनवासेहि चलीं॥ ३॥**

आपल्या हातातील रत्नांमध्ये सुंदर रूपाचे भांडार असलेल्या श्रीरामांचे प्रतिबिंब दिसत होते. ते पाहून सीता दर्शनात विघ्न येऊ नये म्हणून आपली बाहुरूपी लता आणि दृष्टी हलू देत नव्हती. त्या प्रसंगीचे हास्य-विनोद, आणि प्रेम यांचे वर्णन करता येणे शक्य नाही. ते फक्त सख्याच जाणतात. त्यानंतर सर्व सख्या वर-वधूंना घेऊन जानवश्याकडे निघाल्या. ॥ ३ ॥

**तेहि समय सुनिअ असीस जहँ तहँ नगर नभ आनँदु महा।**
**चिरु जिअहुँ जोरीं चारु चार्‌यो मुदित मन सबहीं कहा॥**
**जोगींद्र सिद्ध मुनीस देव बिलोकि प्रभु दुंदुभि हनी।**
**चले हरषि बरषि प्रसून निज निज लोक जय जय जय भनी॥ ४॥**

त्यावेळी नगरात आणि आकाशात जिकडे पाहावे तिकडे आशीर्वादाचे शब्द ऐकू येत होते आणि मोठा आनंदी आनंद झालेला होता. सर्वजण प्रसन्न मनाने म्हणत होते की, 'ही सुंदर चारी जोडपी चिरंजीव होवोत.' योगिराज, सिद्ध, मुनीश्वर आणि देव यांनी प्रभू रामचंद्रांना पाहून दुंदुभी वाजविली आणि आनंदाने फुलांचा वर्षाव करीत 'जय हो, जय हो, जय हो' असे म्हणत ते आपापल्या लोकी निघून गेले. ॥ ४ ॥

दो०—**सहित बधूटिन्ह कुअँर सब तब आए पितु पास।**
**सोभा मंगल मोद भरि उमगेउ जनु जनवास॥ ३२७॥**

मग चारी कुमार आपापल्या वधूंसह वडिलांकडे आले. शोभा, मांगल्य आणि आनंद यांनी जानवासा ओसंडत आहे, असे वाटत होते. ॥ ३२७ ॥

**पुनि जेवनार भई बहु भाँती। पठए जनक बोलाइ बराती॥**
**परत पाँवड़े बसन अनूपा। सुतन्ह समेत गवन कियो भूपा॥**

त्यानंतर अनेक प्रकारचे पाक सिद्ध झाले. जनकांनी व्हाडी मंडळींना बोलाविले. राजा दशरथ हे पुत्रांसह गेले. बहुमोल वस्त्रांच्या पायघड्या घातल्या जात होत्या. ॥ १ ॥

**सादर सब के पाय पखारे। जथाजोगु पीढ़न्ह बैठारे॥**
**धोए जनक अवधपति चरना। सीलु सनेहु जाइ नहिं बरना॥**

आदरपूर्वक सर्वांचे पाय धुऊन योग्य स्थानी त्यांना पाटांवर बसविले. मग जनकांनी दशरथांचे पाय धुतले. त्यांचे शील आणि स्नेह यांचे वर्णन करणे कठीण आहे. ॥ २ ॥

**बहुरि राम पद पंकज धोए। जे हर हृदय कमल महुँ गोए॥**
**तीनिउ भाइ राम सम जानी। धोए चरन जनक निज पानी॥**

नंतर श्रीशिवांच्या हृदय-कमलांमध्ये गुप्तपणे जी वास करतात ती श्रीरामचंद्रांची चरण-कमले धुतली. अन्य तीन भावांनाही श्रीरामचंद्रांसमान मानून जनकांनी त्यांचे चरणही आपल्या हातांनी धुतले. ॥ ३ ॥

**आसन उचित सबहि नृप दीन्हे। बोलि सूपकारी सब लीन्हे॥**
**सादर लगे परन पनवारे। कनक कील मनि पान सँवारे॥**

राजा जनकांनी सर्वांना योग्य आसने दिली आणि वाढप्यांना बोलाविले. मोठ्या आदराने पत्रावळी घातल्या गेल्या. त्या रत्नांच्या पानांना सोन्याच्या काड्यांनी टाचून बनविलेल्या होत्या. ॥ ४ ॥

दो०—**सूपोदन सुरभी सरपि सुंदर स्वादु पुनीत।**
**छन महुँ सब कें परुसि गे चतुर सुआर बिनीत॥ ३२८॥**

चतुर व विनम्र स्वयंपाक्यांनी सुंदर, स्वादिष्ट आणि पवित्र वरणभात आणि त्यावर गाईचे तूप क्षणभरात सर्वांसमोर वाढले. ॥ ३२८ ॥

**पंच कवल करि जेवन लागे। गारि गान सुनि अति अनुरागे॥**
**भाँति अनेक परे पकवाने। सुधा सरिस नहिं जाहिं बखाने॥**

सर्व लोक 'प्राणाय स्वाहा, अपानाय स्वाहा, व्यानाय स्वाहा, उदानाय स्वाहा आणि समानाय स्वाहा' या मंत्रांचा उच्चार करीत पाच घास घेऊन भोजन करू लागले. जेवताना उणी-दुणी काढण्याचे गाणे ऐकून सर्व प्रेममग्न झाले. अनेक प्रकारची अमृतासारखी स्वादिष्ट पक्वान्ने वाढली गेली. त्यांचे वर्णन करणे कठीण. ॥ १ ॥

**परुसन लगे सुआर सुजाना। बिंजन बिबिध नाम को जाना॥**
**चारि भाँति भोजन बिधि गाई। एक एक बिधि बरनि न जाई॥**

चतुर वाढपी नाना प्रकारची तोंडी लावणी वाढू लागले, त्यांची नावे कोणास ठाऊक? चावून खायचे, चोखून खायचे, चाटून खायचे व प्यायचे असे चार प्रकारचे भोजन-पदार्थ सांगितले आहेत. त्यांतील प्रत्येकाचे इतके पदार्थ बनविले होते की, सांगता सोय नाही. ॥ २ ॥

**छरस रुचिर बिंजन बहु जाती। एक एक रस अगनित भाँती॥**
**जेवँत देहिं मधुर धुनि गारी। लै लै नाम पुरुष अरु नारी॥**

सहा रसांची अनेक प्रकारची स्वादिष्ट तोंडी लावणी होती. एक-एक रसाचे असंख्य

प्रकार बनविले होते. भोजन करताना पुरुष व स्त्रिया यांची नावे घेत घेत मधुर स्वरांनी स्त्रिया टोमणे मारीत होत्या. ॥ ३ ॥

**समय सुहावनि गारि बिराजा । हँसत राउ सुनि सहित समाजा ॥**
**एहि बिधि सबहीं भोजनु कीन्हा । आदर सहित आचमनु दीन्हा ॥**

प्रसंगानुसार चाललेले विनोद शोभून दिसत होते. ते ऐकून राजा दशरथांच्यासह सर्व मंडळी हसत होती. अशा प्रकारे सर्वांचे भोजन झाले, मग सर्वांना आदराने हात धुण्यासाठी पाणी दिले गेले. ॥ ४ ॥

दो०—**देइ पान पूजे जनक दसरथु सहित समाज।**
**जनवासेहि गवने मुदित सकल भूप सिरताज॥ ३२९ ॥**

मग पान देऊन जनकांनी परिवारासह दशरथांचे पूजन केले. सर्व राजांचे चक्रवर्ती असलेले राजा दशरथ प्रसन्न मनाने जानवश्यात गेले. ॥ ३२९ ॥

**नित नूतन मंगल पुर माहीं । निमिष सरिस दिन जामिनि जाहीं ॥**
**बड़े भोर भूपतिमनि जागे । जाचक गुन गन गावन लागे ॥**

जनकपुरामध्ये नित्य नवे मंगल प्रसंग घडत होते. दिवस व रात्र पळभरात निघून जात. भल्या सकाळी राजांचे मुकुटमणी दशरथांना जाग आली. याचक त्यांचे गुण-गान करू लागले. ॥ १ ॥

**देखि कुअँर बर बधुन्ह समेता । किमि कहि जात मोदु मन जेता ॥**
**प्रातक्रिया करि गे गुरु पाहीं । महा प्रमोदु प्रेमु मन माहीं ॥**

चारी कुमारांना सुंदर वधूंच्यासह पाहून दशरथांच्या मनात इतका आनंद झाला की, तो कशाही प्रकारे सांगता येत नाही. ते प्रातर्विधी आटोपून गुरू वसिष्ठांकडे गेले. त्यांच्या मनात महान प्रेम व आनंद भरून राहिला होता. ॥ २ ॥

**करि प्रनामु पूजा कर जोरी । बोले गिरा अमिअँ जनु बोरी ॥**
**तुम्हरी कृपाँ सुनहु मुनिराजा । भयउँ आजु मैं पूरन काजा ॥**

राजांनी प्रणाम व पूजन करून मग हात जोडून अमृतमय वाणीने म्हटले की, 'हे मुनिराज, ऐका. आपल्या कृपेमुळे आज मी पूर्णकाम झालो. ॥ ३ ॥

**अब सब बिप्र बोलाइ गोसाईं । देहु धेनु सब भाँति बनाईं ॥**
**सुनि गुर करि महिपाल बड़ाई । पुनि पठए मुनिबृंद बोलाई ॥**

हे स्वामी, आता सर्व ब्राह्मणांना बोलावून त्यांना सर्व तऱ्हेने अलंकृत गाई द्या.' हे ऐकून गुरूंनी राजाची थोरवी वर्णन केली आणि मुनिगणांना बोलावणे पाठविले. ॥ ४ ॥

दो०—**बामदेउ अरु देवरिषि बालमीकि जाबालि।**
**आए मुनिबर निकर तब कौसिकादि तपसालि॥ ३३० ॥**

मग वामदेव, देवर्षीनारद, वाल्मीकी, जाबाली, विश्वामित्र आदी तपस्वी श्रेष्ठ मुनींचे समूहच्या समूह आले. ॥ ३३० ॥

**दंड प्रनाम सबहि नृप कीन्हे । पूजि सप्रेम बरासन दीन्हे ॥**
**चारि लच्छ बर धेनु मगाईं । काम सुरभि सम सील सुहाईं ॥**

राजांनी सर्वांना दंडवत प्रणाम केला आणि त्यांना उत्तम आसने देऊन प्रेमाने त्यांचे पूजन केले. चार लाख उत्तम गाई मागविल्या, त्या सर्व कामधेनूसारख्या चांगल्या स्वभावाच्या होत्या आणि शोभिवंत होत्या. ॥ १ ॥

**सब बिधि सकल अलंकृत कीन्हीं । मुदित महिप महिदेवन्ह दीन्हीं ॥**
**करत बिनय बहु बिधि नरनाहू । लहेउँ आजु जगजीवन लाहू ॥**

त्या सर्व गाईंना सर्व प्रकारे अलंकार व वस्त्रांनी सजवून राजाने प्रसन्न मनाने ब्राह्मणांना दिल्या. यावेळी राजा मानत होता की, या जगामध्ये मी आजच जगण्याचा आनंद मिळविला. ॥ २ ॥

**पाइ असीस महीसु अनंदा । लिए बोलि पुनि जाचक बृंदा ॥**
**कनक बसन मनि हय गय स्यंदन । दिए बूझि रुचि रबिकुलनंदन ॥**

ब्राह्मणांकडून आशीर्वाद मिळाल्यावर महाराज आनंदित झाले. नंतर याचकांच्या टोळ्या बोलावल्या. त्या सर्वांना त्यांच्या आवडीप्रमाणे सोने, वस्त्रे, रत्ने, घोडे, हत्ती आणि रथ इत्यादी, जे ज्यांनी मागितले, ते त्यांना सूर्यकुलाला आनंदित करणाऱ्या राजा दशरथांनी दिले. ॥ ३ ॥

**चले पढ़त गावत गुन गाथा । जय जय जय दिनकर कुल नाथा ॥**
**एहि बिधि राम बिआह उछाहू । सकइ न बरनि सहस मुख जाहू ॥**

ते सर्वजण गुणानुवाद गात आणि 'सूर्यकुलाधिपतींचा जयजयकार असो,' असे म्हणत परत गेले. अशा प्रकारे श्रीरामचंद्रांच्या विवाहाचा उत्सव झाला. त्याचे वर्णन सहस्त्रमुखी शेषसुद्धा करू शकत नाही. ॥ ४ ॥

**दो०—बार बार कौसिक चरन सीसु नाइ कह राउ।**
**यह सबु सुखु मुनिराज तव कृपा कटाच्छ पसाउ॥ ३३१ ॥**

विश्वामित्रांच्या चरणी मस्तक ठेवीत महाराज जनक म्हणाले, 'हे मुनिराज, हे सर्व सुख तुमच्याच कृपाकटाक्षाचा प्रसाद आहे.'॥ ३३१ ॥

**जनक सनेहु सीलु करतूती । नृपु सब भाँति सराह बिभूती ॥**
**दिन उठि बिदा अवधपति मागा । राखहिं जनकु सहित अनुरागा ॥**

राजा दशरथांनी राजा जनकांच्या स्नेह, शील, कर्तृत्व आणि ऐश्वर्य यांची सर्व प्रकारे प्रशंसा केली. रोज सकाळी उठून राजा दशरथ निरोप घेण्यासाठी जात, परंतु राजा जनक त्यांना प्रेमाने ठेवून घेत. ॥ १ ॥

**नित नूतन आदरु अधिकाई। दिन प्रति सहस भाँति पहुनाई॥**
**नित नव नगर अनंद उछाहू। दसरथ गवनु सोहाइ न काहू॥**

परस्परांविषयी नित्य नवा आदर वाढत होता. प्रत्येक दिवशी हजारो प्रकारचा पाहुणचार चालला होता. नगरामध्ये नित्य नवीन आनंद आणि उत्साह असे. दशरथांनी परत जावे, हे कुणाला आवडत नव्हते. ॥ २ ॥

**बहुत दिवस बीते एहि भाँती। जनु सनेह रजु बँधे बराती॥**
**कौसिक सतानंद तब जाई। कहा बिदेह नृपहि समुझाई॥**

अशा रितीने पुष्कळ दिवस निघून गेले. जणू वऱ्हाडी प्रेमाच्या बंधनाने बांधलेले होते. तेव्हा विश्वामित्र व शतानंद यांनी जाऊन राजा जनकांना समजावून सांगितले की, ॥ ३ ॥

**अब दसरथ कहँ आयसु देहू। जद्यपि छाड़ि न सकहु सनेहू॥**
**भलेहिं नाथ कहि सचिव बोलाए। कहि जय जीव सीस तिन्ह नाए॥**

'जरी तुम्ही स्नेहापोटी सोडत नाही, तरीही आता दशरथांना जाण्याची अनुमती द्या.' 'हे मुनिवर्य! ठीक आहे', असे म्हणून जनकांनी मंत्र्यांना बोलावून घेतले. ते आले. 'जय जीव' म्हणत त्यांनी मस्तक नमविले. ॥ ४ ॥

दो०—**अवधनाथु चाहत चलन भीतर करहु जनाउ।**
**भए प्रेमबस सचिव सुनि बिप्र सभासद राउ॥ ३३२॥**

जनक म्हणाले, 'अयोध्यानाथ जाऊ इच्छितात, अंतःपुरात वार्ता द्या.' हे ऐकून मंत्री, ब्राह्मण, सभासद आणि राजा जनक हे सर्व प्रेमवश झाले होते. ॥ ३३२ ॥

**पुरबासी सुनि चलिहि बराता। बूझत बिकल परस्पर बाता॥**
**सत्य गवनु सुनि सब बिलखाने। मनहुँ साँझ सरसिज सकुचाने॥**

जनकपुरवासींना जेव्हा कळले की, वऱ्हाड जाणार आहे, तेव्हा ते व्याकूळ होऊन एक दुसऱ्याला विचारू लागले. जाणार हे खरे आहे, असे ऐकल्यावर ते सर्व उदास झाले, ज्याप्रमाणे संध्याकाळ होताच कमळे कोमेजून जातात. ॥ १ ॥

**जहँ जहँ आवत बसे बराती। तहँ तहँ सिद्ध चला बहु भाँती॥**
**बिबिध भाँति मेवा पकवाना। भोजन साजु न जाइ बखाना॥**

येते वेळी जेथे जेथे वऱ्हाडी मंडळी थांबली होती, तेथे तेथे सर्व प्रकारची शिधा-सामुग्री पाठविली गेला. अनेक प्रकारचे मेवे, पक्वान्ने आणि भोजनाची सामुग्री इतकी पाठविली की, सांगता येत नाही. ॥ २ ॥

**भरि भरि बसहँ अपार कहारा। पठईं जनक अनेक सुसारा॥**
**तुरग लाख रथ सहस पचीसा। सकल सँवारे नख अरु सीसा॥**

अगणित बैलांवर व भारवाहकांवर लादून ती सामुग्री पाठविली. त्याचबरोबर जनकांनी अनेक सुंदर पलंग पाठविले. एक लक्ष घोडे, पंचवीस हजार रथ नखशिखांत सजविलेले होते. ॥ ३ ॥

**मत्त सहस दस सिंधुर साजे। जिन्हहि देखि दिसिकुंजर लाजे॥**
**कनक बसन मनि भरि भरि जाना। महिषीं धेनु बस्तु बिधि नाना॥**

दहा हजार सजविलेले मस्त हत्ती होते. त्यांना पाहिल्यावर दिग्गजसुद्धा ओशाळत होते. गाड्यांमध्ये भरून सोने, वस्त्रे आणि रत्ने तसेच म्हशी, गाई आणि नाना प्रकारच्या वस्तू दिल्या होत्या. ॥ ४ ॥

दो०—**दाइज अमित न सकिअ कहि दीन्ह बिदेहँ बहोरि।**
**जो अवलोकत लोकपति लोक संपदा थोरि॥ ३३३॥**

अशा प्रकारे जनकांनी पुन्हा आंदण दिले. ते सांगता येत नाही. ते पाहून लोकपालांची संपत्ती तोकडी वाटत होती. ॥ ३३३ ॥

**सबु समाजु एहि भाँति बनाई। जनक अवधपुर दीन्ह पठाई॥**
**चलिहि बरात सुनत सब रानीं। बिकल मीनगन जनु लघु पानीं॥**

अशा प्रकारे सर्व सामान सज्ज करून ते राजा जनकानी अयोध्यापुरीस पाठवून दिले. वऱ्हाड जाणार हे ऐकताच सर्व राण्या थोड्याशा पाण्यात मासे तडफडतात त्याप्रमाणे व्याकूळ झाल्या. ॥ १ ॥

**पुनि पुनि सीय गोद करि लेहीं। देइ असीस सिखावनु देहीं॥**
**होएहु संतत पियहि पिआरी। चिरु अहिबात असीस हमारी॥**

त्या वारंवार सीतेला मांडीवर घेत आणि आशीर्वाद देऊन शिकवण देत की, 'तू सदैव आपल्या पतीची आवडती हो, तुझे सौभाग्य अखंड राहो, हाच आमचा आशीर्वाद आहे. ॥ २ ॥

**सासु ससुर गुर सेवा करेहू। पति रुख लखि आयसु अनुसरेहू॥**
**अति सनेह बस सखीं सयानी। नारि धरम सिखवहिं मृदु बानी॥**

सासू, सासरे आणि गुरूंची सेवा कर. पतीचा कल पाहून आज्ञा-पालन कर.' शहाण्या सख्यांनी प्रेमामुळे सीतेला कोमल वाणीने स्त्रियांचा धर्म काय, ते सांगितले. ॥ ३ ॥

**सादर सकल कुअँरि समुझाईं। रानिन्ह बार बार उर लाईं॥**
**बहुरि बहुरि भेटहिं महतारीं। कहहिं बिरंचि रचीं कत नारीं॥**

राण्यांनी मोठ्या आदराने सर्व कन्यांना स्त्रियांचा धर्म वारंवार समजावून दिला आणि त्यांना वारंवार हृदयाशी कवटाळून धरले. माता वारंवार भेटून ब्रह्मदेवांनी स्त्री-जातीला का उत्पन्न केले, ते सांगत. ॥ ४ ॥

दो०—**तेहि अवसर भाइन्ह सहित रामु भानु कुल केतु।**
**चले जनक मंदिर मुदित बिदा करावन हेतु॥ ३३४॥**

त्याचवेळी सूर्यवंशाच्या ध्वजासारखे असलेले श्रीरामचंद्र भावांसह मोठ्या आनंदाने निरोप घेण्यासाठी जनकांच्या महालाकडे निघाले. ॥ ३३४ ॥

**चारिउ भाइ सुभायँ सुहाए। नगर नारि नर देखन धाए॥**
**कोउ कह चलन चहत हहिं आजू। कीन्ह बिदेह बिदा कर साजू॥**

स्वभावत: सुंदर असलेल्या त्या चारी भावांना पाहाण्यासाठी नगरातील स्त्री-पुरुष धावले. कोणी म्हणे, 'आज हे जाणार आहेत. जनक राजांनी निरोपाचे सामान सज्ज ठेवले आहे. ॥ १ ॥

**लेहु नयन भरि रूप निहारी। प्रिय पाहुने भूप सुत चारी॥**
**को जानै केहिं सुकृत सयानी। नयन अतिथि कीन्हे बिधि आनी॥**

राजांचे चारी पुत्र असलेल्या या पाहुण्यांचे रूप डोळे भरून पाहून घ्या. हे शहाणे सखी, कोणास ठाऊक, कोणत्या पुण्यामुळे विधात्याने यांना येथे आणून आमच्या नेत्रांचे पाहुणे बनवून टाकले आहे. ॥ २ ॥

**मरनसीलु जिमि पाव पिऊषा। सुरतरु लहै जनम कर भूखा॥**
**पाव नारकी हरिपदु जैसें। इन्ह कर दरसनु हम कहँ तैसें॥**

ज्याप्रमाणे मरणाऱ्याला अमृत मिळावे, जन्माचा भुकेला असलेल्याला कल्पवृक्ष लाभावा आणि नरकात जाण्याजोग्या जिवाला भगवंताचे परमपद मिळावे, त्याप्रमाणे आमच्याकरिता यांचे दर्शन आहे. ॥ ३ ॥

**निरखि राम सोभा उर धरहू। निज मन फनि मूरति मनि करहू॥**
**एहि बिधि सबहि नयन फलु देता। गए कुअँर सब राज निकेता॥**

श्रीरामचंद्रांचे लावण्य निरखून हृदयात धारण करून घे. आपल्या मनाला साप व यांच्या स्वरूपाला मणी बनवून ठेव.' अशा प्रकारे सर्वांना नेत्रांचे साफल्य देत सर्व राजकुमार राजमहालात गेले. ॥ ४ ॥

दो०—**रूप सिंधु सब बंधु लखि हरषि उठा रनिवासु।**
**करहिं निछावरि आरती महा मुदित मन सासु॥ ३३५॥**

रूपाचे सागर असलेल्या सर्व भावांना पाहून संपूर्ण राणीवसा आनंदून गेला. सासवा फार प्रसन्न होऊन ओवाळणी टाकू लागल्या आणि आरती करू लागल्या. ॥ ३३५ ॥

**देखि राम छबि अति अनुरागीं। प्रेमबिबस पुनि पुनि पद लागीं॥**
**रही न लाज प्रीति उर छाई। सहज सनेहु बरनि किमि जाई॥**

श्रीरामांचे लावण्य पाहून त्या प्रेम-मग्न झाल्या. प्रेमवश झाल्यामुळे त्या त्यांच्या वारंवार पाया पडत होत्या. हृदयात प्रेम दाटले होते, म्हणून लज्जा राहिली नाही. त्यांच्या स्वाभाविक स्नेहाचे वर्णन कसे करता येईल? ॥ १ ॥

**भाइन्ह सहित उबटि अन्हवाए। छरस असन अति हेतु जेवाँए॥**
**बोले रामु सुअवसरु जानी। सील सनेह सकुचमय बानी॥**

त्यांनी श्रीरामांना भावांसह उटणे लावून स्नान घातले आणि मोठ्या प्रेमाने षड्‌रस भोजन वाढले. योग्य वेळ पाहून श्रीरामचंद्र शील, स्नेह आणि संकोचाने म्हणाले,॥ २॥

**राउ अवधपुर चहत सिधाए। बिदा होन हम इहाँ पठाए॥**
**मातु मुदित मन आयसु देहू। बालक जानि करब नित नेहू॥**

'महाराज अयोध्यापुरीस जाऊ इच्छितात. त्यांनी आम्हांला निरोप घेण्यासाठी पाठविले आहे. हे मातांनो, प्रसन्न मनाने आज्ञा द्या आणि आम्हांला आपली मुले मानून नेहमी स्नेह ठेवा.'॥ ३॥

**सुनत बचन बिलखेउ रनिवासू। बोलि न सकहिं प्रेमबस सासू॥**
**हृदयँ लगाइ कुअँरि सब लीन्ही। पतिन्ह सौंपि बिनती अति कीन्ही॥**

हे ऐकून अंत:पुर उदास झाले. सासवा प्रेमाधिक्यामुळे काही बोलू शकल्या नाहीत. त्यांनी सर्व कुमारींना हृदयाशी धरले व त्यांना पतींच्या हाती सोपवून पुष्कळ विनंती केली.॥ ४॥

छं०—**करि बिनय सिय रामहि समरपी जोरि कर पुनि पुनि कहै।**
**बलि जाउँ तात सुजान तुम्ह कहुँ बिदित गति सब की अहै॥**
**परिवार पुरजन मोहि राजहि प्रानप्रिय सिय जानिबी।**
**तुलसीस सीलु सनेहु लखि निज किंकरी करि मानिबी॥**

त्यांनी विनंती करून सीतेला श्रीरामचंद्रांना अर्पण केले आणि हात जोडून वारंवार सांगितले की, 'हे प्रिय, हे ज्ञानी, मी तुमच्यावरून आपल्या शरीराची कुरवंडी करते. तुम्हांला सर्वांची स्थिती माहीत आहे. परिवाराला, पुरवासीयांना, मला व राजांना सीता ही प्राणप्रिय आहे, असे समजा. हे तुलसीदासांच्या स्वामी, हिचे शील व स्नेह पाहून हिला आपली दासी माना.

सो०—**तुम्ह परिपूरन काम जान सिरोमनि भावप्रिय।**
**जन गुन गाहक राम दोष दलन करुनायतन॥ ३३६॥**

तुम्ही पूर्णकाम आहात, ज्ञानशिरोमणी आहात आणि भावप्रिय आहात. हे राम, तुम्ही भक्तांचे गुण ग्रहण करणारे, दोषांचा नाश करणारे आणि दयेचे धाम आहात.'॥ ३३६॥

**अस कहि रही चरन गहि रानी। प्रेम पंक जनु गिरा समानी॥**
**सुनि सनेहसानी बर बानी। बहुबिधि राम सासु सनमानी॥**

असे म्हणून राण्या श्रीरामांचे चरण धरून गप्प झाल्या. जणू त्यांच्या वाणी प्रेमाच्या दलदलीमध्ये रुतून गेल्या. स्नेहाने आथंबलेली ती श्रेष्ठ वाणी ऐकून श्रीरामांनी सासवांचा अनेक प्रकारे सन्मान केला.॥ १॥

**राम बिदा मागत कर जोरी। कीन्ह प्रनामु बहोरि बहोरी॥**
**पाइ असीस बहुरि सिरु नाई। भाइन्ह सहित चले रघुराई॥**

मग श्रीरामांनी हात जोडून निरोप मागत वारंवार प्रणाम केला. आशीर्वाद मिळाल्यावर पुन्हा मस्तक नमवून श्रीरघुनाथ निघाले.॥ २॥

**मंजु मधुर मूरति उर आनी। भईं सनेह सिथिल सब रानी॥**
**पुनि धीरजु धरि कुअँरि हँकारीं। बार बार भेटहिं महतारीं॥**

श्रीरामांची सुंदर मूर्ती हृदयात धारण केल्याने राण्या प्रेमामुळे शिथिल झाल्या. नंतर धैर्य धरून कन्यांना बोलावून माता वारंवार त्यांना छातीशी कवटाळू लागल्या.॥ ३॥

**पहुँचावहिं फिरि मिलहिं बहोरी। बढ़ी परस्पर प्रीति न थोरी॥**
**पुनि पुनि मिलत सखिन्ह बिलगाई। बाल बच्छ जिमि धेनु लवाई॥**

मुलींना निरोप द्यायच्या आणि त्यांना पुन्हा मिठीत घ्यायच्या. परस्परां-मध्ये प्रेम खूप वाढले होते ना! सख्यांनी वारंवार भेटणाऱ्या मातांना बाजूला केले. नुकत्याच व्यालेल्या गाईला तिच्या बछड्यापासून बाजूला केले जाते, त्याप्रमाणे.॥ ४॥

दो०—**प्रेमबिबस नर नारि सब सखिन्ह सहित रनिवासु।**
**मानहुँ कीन्ह बिदेहपुर करुनाँ बिरहँ निवासु॥ ३३७॥**

सर्व स्त्री-पुरुष आणि सख्यांसह संपूर्ण अंत:पुर सागरात डुंबत होते. जणू जनकपुरात कारुण्य आणि विरह यांनी निवास केला होता.॥ ३३७॥

**सुक सारिका जानकी ज्याए। कनक पिंजरन्हि राखि पढ़ाए॥**
**ब्याकुल कहहिं कहाँ बैदेही। सुनि धीरजु परिहरइ न केही॥**

जानकीने ज्या पोपट-मैनांना पाळून-पोसून मोठे केले होते आणि सोन्याच्या पिंजऱ्यात ठेवून त्यांना शिकविले होते, ते व्याकूळ होऊन विचारत होते, 'वैदेही कुठे आहे?' त्यांच्या बोलण्यामुळे सर्वांचाच धीर खचला.॥ १॥

**भए बिकल खग मृग एहि भाँती। मनुज दसा कैसें कहि जाती॥**
**बंधु समेत जनकु तब आए। प्रेम उमगि लोचन जल छाए॥**

जेथे पक्षी व पशू असे व्याकूळ झाले, तेथे मनुष्यांची दशा काय सांगावी? मग जनक आपल्या भावाबरोबर तेथे आले. प्रेम उचंबळून आल्याने त्यांच्या नेत्रांमध्ये अश्रू तरळले.॥ २॥

**सीय बिलोकि धीरता भागी। रहे कहावत परम बिरागी॥**
**लीन्हि रायँ उर लाइ जानकी। मिटी महामरजाद ग्यान की॥**

महाराज जनक परम वैराग्यवान मानले जात होते, परंतु सीतेला पाहाताच त्यांचा धीरही खचला. राजांनी जानकीला उराशी धरले. प्रेमामुळे ज्ञानाचा बांध फुटला. ॥ ३ ॥

**समुझावत सब सचिव सयाने। कीन्ह बिचारु न अवसर जाने॥**
**बारहिं बार सुता उर लाईं। सजि सुंदर पालकीं मगाईं॥**

सर्व मंत्री त्यांना समजावू लागले, तेव्हा राजांनी विषाद करण्याची ही वेळ नाही, असा विचार केला. वारंवार मुलींना पोटाशी धरून सुंदर सजविलेल्या पालख्या बोलावल्या. ॥ ४ ॥

दो०—**प्रेमबिबस परिवारु सबु जानि सुलगन नरेस।**
**कुअँरि चढ़ाईं पालकिन्ह सुमिरे सिद्धि गनेस॥ ३३८॥**

संपूर्ण परिवार प्रेमाने व्याकूळ झाला होता. राजांनी सुंदर मुहूर्त पाहून सिद्धींसह श्रीगणेशाचे स्मरण करून कन्यांना पालख्यांमध्ये बसविले. ॥ ३३८ ॥

**बहुबिधि भूप सुता समुझाईं। नारिधरमु कुलरीति सिखाईं॥**
**दासीं दास दिए बहुतेरे। सुचि सेवक जे प्रिय सिय केरे॥**

राजांनी मुलींची अनेक प्रकारे समजूत घालून त्यांना स्त्रीधर्म व कुळाचार शिकविले. तसेच सीतेच्या विश्वासातील तिला प्रिय असणारे अनेक दासी-दास दिले. ॥ १ ॥

**सीय चलत ब्याकुल पुरबासी। होहिं सगुन सुभ मंगल रासी॥**
**भूसुर सचिव समेत समाजा। संग चले पहुँचावन राजा॥**

सीता निघाली, तेव्हा मिथिलावासी व्याकूळ झाले. मंगल-शकुन होऊ लागले. ब्राह्मण व मंत्री यांच्या समूहासह राजा जनक त्यांना पोहोचविण्यासाठी निघाले. ॥ २ ॥

**समय बिलोकि बाजने बाजे। रथ गज बाजि बरातिन्ह साजे॥**
**दसरथ बिप्र बोलि सब लीन्हे। दान मान परिपूरन कीन्हे॥**

वेळ पाहून वाद्ये वाजू लागली. वऱ्हाडी मंडळींनी रथ, हत्ती आणि घोडे सज्ज केले. राजा दशरथांनी सर्व ब्राह्मणांना बोलावून घेतले आणि त्यांना दान देऊन सन्मानित केले. ॥ ३ ॥

**चरन सरोज धूरि धरि सीसा। मुदित महीपति पाइ असीसा॥**
**सुमिरि गजाननु कीन्ह पयाना। मंगलमूल सगुन भए नाना॥**

त्यांच्या चरण-कमलांची धूळ माथी धरून आणि आशीर्वाद प्राप्त करून राजांना आनंद वाटला आणि श्रीगणेशाचे स्मरण करून त्यांनी प्रस्थान केले. त्यावेळी अनेक मंगल शकुन झाले. ॥ ४ ॥

दो०—**सुर प्रसून बरषहिं हरषि करहिं अपछरा गान।**
**चले अवधपति अवधपुर मुदित बजाइ निसान॥ ३३९॥**

देव आनंदित होऊन फुले उधळू लागले आणि अप्सरा गाऊ लागल्या. अयोध्यापती दशरथ नगारे वाजवून आनंदाने अयोध्येला निघाले. ॥ ३३९ ॥

**नृप करि बिनय महाजन फेरे। सादर सकल मागने टेरे॥**
**भूषन बसन बाजि गज दीन्हे। प्रेम पोषि ठाढ़े सब कीन्हे॥**

राजा दशरथांनी सर्व प्रतिष्ठित मंडळींना विनंती करून परत पाठविले आणि सर्व याचकांना आदराने बोलाविले. त्यांना दागिने-कपडे, हत्ती-घोडे दिले आणि प्रेमाने वागून सर्वांना संपन्न व बलशाली केले. ॥ १ ॥

**बार बार बिरिदावलि भाषी। फिरे सकल रामहि उर राखी॥**
**बहुरि बहुरि कोसलपति कहहीं। जनकु प्रेमबस फिरै न चहहीं॥**

ते सर्व वारंवार राजांच्या कुलकीर्तीची वाखाणणी करीत श्रीरामचंद्रांना हृदयी धरून परतले. कोशलाधीश राजा दशरथ परत जाण्यासाठी वारंवार सांगत होते, परंतु राजा जनक प्रेमवश झाल्यामुळे परतू इच्छित नव्हते. ॥ २ ॥

**पुनि कह भूपति बचन सुहाए। फिरिअ महीस दूरि बड़ि आए॥**
**राउ बहोरि उतरि भए ठाढ़े। प्रेम प्रबाह बिलोचन बाढ़े॥**

मग दशरथ म्हणाले, 'हे राजन, फार दूरवर आलात, आता परत जा.' राजा दशरथ रथातून उतरून उभे राहिले. त्यांच्या नेत्रांतून प्रेमाश्रू वाहू लागले. ॥ ३ ॥

**तब बिदेह बोले कर जोरी। बचन सनेह सुधाँ जनु बोरी॥**
**करौं कवन बिधि बिनय बनाई। महाराज मोहि दीन्हि बड़ाई॥**

तेव्हा राजा जनक हात जोडून प्रेमरूपी अमृतात ओथंबलेले शब्द बोलले, 'मी आपल्याला कसे सांगू? हे महाराज, तुम्ही मला मोठी थोरवी दिली आहे.' ॥ ४ ॥

दो०—**कोसलपति समधी सजन सनमाने सब भाँति।**
**मिलनि परसपर बिनय अति प्रीति न हृदयँ समाति॥ ३४०॥**

अयोध्यानाथ दशरथांनी आपल्या व्याह्यांना सर्व प्रकारे सन्मानित केले. त्यांच्या परस्पर भेटीमध्ये अत्यंत नम्रता होती आणि हृदयात न मावणारे प्रेम होते. ॥ ३४० ॥

**मुनि मंडलिहि जनक सिरु नावा। आसिरबादु सबहि सन पावा॥**
**सादर पुनि भेंटे जामाता। रूप सील गुन निधि सब भ्राता॥**

जनकांनी मुनींच्या पुढे मस्तक नमविले आणि सर्वांचे आशीर्वाद प्राप्त केले. नंतर आदराने ते रूप, शील व गुण संपन्न आपल्या जावयांना भेटले. ॥ १ ॥

**जोरि पंकरुह पानि सुहाए। बोले बचन प्रेम जनु जाए॥**
**राम करौं केहि भाँति प्रसंसा। मुनि महेस मन मानस हंसा॥**

आणि सुंदर कर-कमल जोडून प्रेमोत्पन्न शब्द बोलले, 'हे राम, मी कशा प्रकारे तुमची स्तुती करू? तुम्ही मुनींच्या आणि महादेवांच्या मनरूपी मानस सरोवरातील हंस आहात. ॥ २ ॥

**करहिं जोग जोगी जेहि लागी। कोहु मोहु ममता मदु त्यागी॥**
**ब्यापकु ब्रह्मु अलखु अबिनासी। चिदानंदु निरगुन गुनरासी॥**

योगिजन क्रोध, मोह, ममता आणि मद यांचा त्याग करून ज्यांच्यासाठी योगसाधन करतात, जे सर्वव्यापक, ब्रह्म, अव्यक्त, अविनाशी, चिदानंद, निर्गुण आणि गुणांचे निधान आहेत. ॥ ३ ॥

**मन समेत जेहि जान न बानी। तरकि न सकहिं सकल अनुमानी॥**
**महिमा निगमु नेति कहि कहई। जो तिहुँ काल एकरस रहई॥**

मनासह वाणी ज्यांना जाणत नाही आणि सर्वजण ज्यांच्याविषयी फक्त अनुमानच करतात, कोणताही तर्क करू शकत नाहीत, ज्यांचा महिमा वेद 'नेति नेति' म्हणत वर्णन करतात आणि जे सच्चिदानंद तिन्ही कालांमध्ये एकरस, सर्वदा आणि सर्वथा निर्विकार असतात; ॥ ४ ॥

दो०—**नयन बिषय मो कहुँ भयउ सो समस्त सुख मूल।**
**सबइ लाभु जग जीव कहँ भएँ ईसु अनुकूल॥ ३४१॥**

तेच सर्व सुखांचे मूळ असलेले तुम्ही माझ्या नेत्रांना दिसू शकला. ईश्वर अनुकूल असल्यावर जगात जिवाला लाभच लाभ मिळतो. ॥ ३४१ ॥

**सबहि भाँति मोहि दीन्हि बड़ाई। निज जन जानि लीन्ह अपनाई॥**
**होहिं सहस दस सारद सेषा। करहिं कलप कोटिक भरि लेखा॥**

तुम्ही मला सर्व प्रकारे मोठेपण दिले आणि आपला समजून आपला बनविले. जरी दहा हजार सरस्वती व शेष असले आणि ते कोट्यवधी कल्पांपर्यंत गणना करीत राहिले, ॥ १ ॥

**मोर भाग्य राउर गुन गाथा। कहि न सिराहिं सुनहु रघुनाथा॥**
**मैं कछु कहउँ एक बल मोरें। तुम्ह रीझहु सनेह सुठि थोरें॥**

तरीही हे रघुनाथ, माझे सद्‌भाग्य आणि तुमच्या गुणांची कथा पूर्ण होऊ शकत नाही. मी जे काही सांगत आहे, ते फक्त एवढ्याच एका बळावर की, तुम्ही अत्यंत थोड्याशा प्रेमाने प्रसन्न होता. ॥ २ ॥

**बार बार मागउँ कर जोरें। मनु परिहरै चरन जनि भोरें॥**
**सुनि बर बचन प्रेम जनु पोषे। पूरनकाम रामु परितोषे॥**

मी वारंवार हात जोडून हे मागतो की, माझ्या मनाने चुकूनही तुमचे चरण सोडू नयेत.' जनकांची ही श्रेष्ठ प्रेमपूर्ण वचने ऐकून पूर्णकाम श्रीराम संतुष्ट झाले. ॥ ३ ॥

**करि बर बिनय ससुर सनमाने । पितु कौसिक बसिष्ठ सम जाने ॥**
**बिनती बहुरि भरत सन कीन्ही । मिलि सप्रेम पुनि आसिष दीन्ही ॥**

त्यांनी सुंदर शब्दांत विनंती करून पिता दशरथ, गुरू विश्वामित्र व कुलगुरू वसिष्ठांसमान मानून श्वशुर जनक यांचा सन्मान केला. नंतर जनकांनी भरताला तसेच सांगितले आणि प्रेमाने भेटून त्याला आशीर्वाद दिला. ॥ ४ ॥

दो०—**मिले लखन रिपुसूदनहि दीन्हि असीस महीस।**
**भए परसपर प्रेमबस फिरि फिरि नावहिं सीस॥ ३४२ ॥**

नंतर राजांनी लक्ष्मण आणि शत्रुघ्न यांना भेटून आशीर्वाद दिला. ते परस्पर प्रेमात बुडून वारंवार एकमेकांना मस्तक नमवू लागले. ॥ ३४२ ॥

**बार बार करि बिनय बड़ाई । रघुपति चले संग सब भाई ॥**
**जनक गहे कौसिक पद जाई । चरन रेनु सिर नयनन्ह लाई ॥**

राजा जनकांशी वारंवार गुजगोष्टी करीत व त्यांना मोठेपणा देत श्रीरघुनाथ सर्व भावांबरोबर निघाले. जनकांनी जाऊन विश्वामित्रांचे पाय धरले आणि त्यांचे चरण-रज आपल्या मस्तकावर घेऊन नेत्रांनाही लावले. ॥ १ ॥

**सुनु मुनीस बर दरसन तोरें । अगमु न कछु प्रतीति मन मोरें ॥**
**जो सुखु सुजसु लोकपति चहहीं । करत मनोरथ सकुचत अहहीं ॥**

ते म्हणाले, 'हे मुनीश्वर, आपले सुंदर दर्शन झाले असता, काहीही दुर्लभ नाही, अशी माझी खात्री आहे. जे सुख आणि सुकीर्ती लोकपालांना हवी असते, परंतु ती मिळणे अशक्य समजून तिचे मनोरथ करताना त्यांना संकोच वाटतो, ॥ २ ॥

**सो सुखु सुजसु सुलभ मोहि स्वामी । सब सिधि तव दरसन अनुगामी ॥**
**कीन्हि बिनय पुनि पुनि सिरु नाई । फिरे महीसु आसिषा पाई ॥**

हे स्वामी, तेच सुख आणि सुकीर्ती मला सुलभपणे मिळाली. सर्व सिद्धी तुमच्या दर्शनामागोमाग चालत येतात.' अशा प्रकारे वारंवार स्तुती केली आणि मस्तक टेकवून व त्यांचा आशीर्वाद घेऊन जनक परत गेले. ॥ ३ ॥

**चली बरात निसान बजाई । मुदित छोट बड़ सब समुदाई ॥**
**रामहि निरखि ग्राम नर नारी । पाइ नयन फलु होहिं सुखारी ॥**

डंका वाजवीत वऱ्हाड निघाले. लहान-मोठे समुदाय प्रसन्न होते. वाटेच्या गावांतील स्त्री-पुरुष श्रीरामचंद्रांना पाहून डोळ्यांचे पारणे फिटल्यामुळे आनंदित होत होते. ॥ ४ ॥

दो०—**बीच बीच बर बास करि मग लोगन्ह सुख देत।**
**अवध समीप पुनीत दिन पहुँची आइ जनेत॥ ३४३ ॥**

मधून-मधून मुक्काम करीत आणि वाटेतील लोकांना सुखावत वऱ्हाड पवित्र दिवशी अयोध्यापुरीजवळ आले. ॥ ३४३ ॥

**हने निसान पनव बर बाजे । भेरि संख धुनि हय गय गाजे ॥**
**झाँझि बिरव डिंडिमीं सुहाई । सरस राग बाजहिं सहनाई ॥**

नगारे वाजत होते. सुंदर ढोल गर्जत होते. भेरी आणि शंख जोराने वाजत होते, हत्ती-घोडे गर्जना करीत होते. झांजा तालावर वाजत होत्या. डफ सुंदर ताल धरत होते. गोड रागामध्ये सनया वाजत होत्या. ॥ १ ॥

**पुर जन आवत अकनि बराता । मुदित सकल पुलकावलि गाता ॥**
**निज निज सुंदर सदन सँवारे । हाट बाट चौहट पुर द्वारे ॥**

वऱ्हाड येत आहे, असे पाहून अयोध्येचे नगरवासी आनंदून गेले. सर्वांची शरीरे पुलकित झाली. सर्वांनी आपापल्या घरांना, बाजारांना, गल्ल्या-बोळांना, चौकांना आणि नगरद्वारांना सुंदर रितीने सजविले. ॥ २ ॥

**गलीं सकल अरगजाँ सिंचाईं । जहँ तहँ चौकें चारु पुराईं ॥**
**बना बजारु न जाइ बखाना । तोरन केतु पताक बिताना ॥**

सर्व गल्ल्यांत चंदनाचे खडे घातले गेले. सर्वत्र रांगोळ्या घातल्या गेल्या. तोरणे, ध्वज, पताका आणि मांडव यांनी बाजार असा सजून गेला की, त्याचे वर्णन येत नाही. ॥ ३ ॥

**सफल पूगफल कदलि रसाला । रोपे बकुल कदंब तमाला ॥**
**लगे सुभग तरु परसत धरनी । मनिमय आलबाल कल करनी ॥**

सुपाऱ्या, लागलेली सुपारीची झाडे, केळी, आम्रवृक्ष, बकूळ, कदंब आणि तमाल वृक्ष उभारले गेले. फळांच्या भाराने वाकलेले वृक्ष जमिनीला टेकत होते. त्यांची आळी रत्नांच्या कलाकुसरीने बनविली होती. ॥ ४ ॥

दो०—**बिबिध भाँति मंगल कलस गृह गृह रचे सँवारि।**
**सुर ब्रह्मादि सिहाहिं सब रघुबर पुरी निहारि॥ ३४४॥**

अनेक प्रकारचे मंगल कलश घरोघरी सजवून ठेवले होते. श्रीरघुनाथांची अयोध्यानगरी पाहून ब्रह्मदेव इत्यादी सर्व देव मुग्ध होत होते. ॥ ३४४ ॥

**भूप भवनु तेहि अवसर सोहा । रचना देखि मदन मनु मोहा ॥**
**मंगल सगुन मनोहरताई । रिधि सिधि सुख संपदा सुहाई ॥**

त्यावेळी राजमहाल खूप शोभून दिसत होता. त्याची रचना पाहून कामदेवाचे मनसुद्धा मोहित होत होते. मंगल शकुन, मनोहारिता, ऋद्धि-सिद्धी, सुख, सुंदर संपत्ती. ॥ १ ॥

**जनु उछाह सब सहज सुहाए। तनु धरि धरि दसरथ गृहँ छाए॥**
**देखन हेतु राम बैदेही। कहहु लालसा होहि न केही॥**

आणि सर्व प्रकारचे आनंद जणू सहजपणे सुंदर शरीर धारण करून दशरथांच्या घरी अवतरले होते. श्रीरामचंद्र आणि सीता यांच्या दर्शनाची लालसा कुणाला बरे असणार नाही?॥ २॥

**जूथ जूथ मिलि चलीं सुआसिनि। निज छबि निदरहिं मदन बिलासिनि॥**
**सकल सुमंगल सजें आरती। गावहिं जनु बहु बेष भारती॥**

सुहासिनी स्त्रिया जमावाने निघाल्या. त्या आपल्या लावण्याने कामदेवाची पत्नी रती हिलाही तुच्छ ठरवत होत्या. सर्व सुंदर मंगल द्रव्ये आणि आरती सजवून त्या गात होत्या. जणू सरस्वतीच अनेक रूपे धारण करून गात चालली होती.॥ ३॥

**भूपति भवन कोलाहलु होई। जाइ न बरनि समउ सुखु सोई॥**
**कौसल्यादि राम महतारीं। प्रेमबिबस तन दसा बिसारीं॥**

राजमहालामध्ये आनंदामुळे कलकलाट चालला होता. त्या प्रसंगाचे व सुखाचे वर्णन करता येणे अशक्य. कौसल्या इत्यादी श्रीरामांच्या सर्व माता प्रेमसागरात बुडून देहभान विसरल्या होत्या.॥ ४॥

दो०—**दिए दान बिप्रन्ह बिपुल पूजि गनेस पुरारि।**
**प्रमुदित परम दरिद्र जनु पाइ पदारथ चारि॥ ३४५॥**

मातांनी गणेश व त्रिपुरारी शिवांचे पूजन करून ब्राह्मणांना खूप दाने दिली. त्या इतक्या प्रसन्न झाल्या होत्या की, जणू अत्यंत दरिद्री माणसाला चारी प्रकारचे अन्नपदार्थ मिळावे.॥ ३४५॥

**मोद प्रमोद बिबस सब माता। चलहिं न चरन सिथिल भए गाता॥**
**राम दरस हित अति अनुरागीं। परिछनि साजु सजन सब लागीं॥**

मोठे सुख व आनंद यांमुळे सर्व मातांची गात्रे शिथिल झाली होती. त्यांचे पाय उचलत नव्हते. श्रीरामचंद्रांच्या दर्शनासाठी त्या अत्यंत प्रेमाने औक्षणाचे सामान तयार करू लागल्या.॥ १॥

**बिबिध बिधान बाजने बाजे। मंगल मुदित सुमित्राँ साजे॥**
**हरद दूब दधि पल्लव फूला। पान पूगफल मंगल मूला॥**

अनेक प्रकारची वाद्ये वाजू लागली. सुमित्रेने आनंदाने सामग्री सजविली. हळद, दुर्वा, दही, पाने, फुले, पान-सुपारी इत्यादी मंगलिक वस्तू,॥ २॥

**अच्छत अंकुर लोचन लाजा। मंजुल मंजरि तुलसि बिराजा॥**
**छुहे पुरट घट सहज सुहाए। मदन सकुन जनु नीड़ बनाए॥**

अक्षता, नवांकुर, गोरोचन, लाह्या आणि तुलसी-मंजिरी शोभून दिसत होत्या. नाना रंगांनी

चित्रित केलेले सहज सुंदर सुवर्ण कलश, असे वाटत होते की, जणू कामदेवाच्या पक्ष्यांनी आपली घरटी बनविली असावीत. ॥ ३ ॥

**सगुन सुगंध न जाहिं बखानी । मंगल सकल सजहिं सब रानी ॥**
**रचीं आरतीं बहुत बिधाना । मुदित करहिं कल मंगल गाना ॥**

शकुनाच्या सुगंधित वस्तूंचे वर्णन करणे कठीण होते. सर्व राण्या संपूर्ण मंगल साजांनी सजल्या होत्या. अनेक प्रकारच्या आरत्या बनवून आनंदाने त्या सुंदर मंगलगीते गात होत्या. ॥ ४ ॥

दो०—**कनक थार भरि मंगलन्हि कमल करन्हि लिएँ मात।**
**चलीं मुदित परिछनि करन पुलक पल्लवित गात ॥ ३४६ ॥**

सोन्याच्या तबकांमध्ये मांगलिक वस्तू भरून व आपल्या कमलासारख्या कोमल हातांमध्ये धरून माता आनंदाने औक्षण करण्यास निघाल्या. त्यांच्या गात्रांवर रोमांच आले होते. ॥ ३४६ ॥

**धूप धूम नभु मेचक भयऊ । सावन घन घमंडु जनु ठयऊ ॥**
**सुरतरु सुमन माल सुर बरषहिं । मनहुँ बलाक अवलि मनु करषहिं ॥**

धूपाच्या धुराने आकाश असे काळे झाले होते की, जणू श्रावणातील मेघ दाटून आले होते. देवगण कल्पवृक्षाच्या फुलांच्या माळांचा वर्षाव करीत होते. जणू बगळ्यांचे थवे मनाला आकर्षित करून घेत आहेत, असे वाटत होते. ॥ १ ॥

**मंजुल मनिमय बंदनिवारे । मनहुँ पाकरिपु चाप सँवारे ॥**
**प्रगटहिं दुरहिं अटन्ह पर भामिनि । चारु चपल जनु दमकहिं दामिनि ॥**

सुंदर रत्नांनी बनविलेली तोरणे अशी वाटत होती की जणू इंद्रधनुष्ये सजविली असावीत. गच्च्यांवर सुंदर आणि चपळ स्त्रिया येत-जात होत्या. जणू त्या विजा चमकल्याप्रमाणे वाटत होत्या. ॥ २ ॥

**दुंदुभि धुनि घन गरजनि घोरा । जाचक चातक दादुर मोरा ॥**
**सुर सुगंध सुचि बरषहिं बारी । सुखी सकल ससि पुर नर नारी ॥**

नगाऱ्यांचा आवाज जणू मेघांची घनघोर गर्जना वाटत होता. याचकगण, चातक, मंडूक व मोराप्रमाणे वाटत होते. देव पवित्र सुगंधरूपी जलाचा वर्षाव करीत होते. त्यामुळे शेतीप्रमाणे नगरातील स्त्री-पुरुष सुखावून गेले होते. ॥ ३ ॥

**समउ जानि गुर आयसु दीन्हा । पुर प्रबेसु रघुकुलमनि कीन्हा ॥**
**सुमिरि संभु गिरिजा गनराजा । मुदित महीपति सहित समाजा ॥**

नगर प्रवेशाची वेळ जाणून गुरू वसिष्ठांनी आज्ञा केली, तेव्हा रघुकुलशिरोमणी महाराज दशरथांनी शिव, पार्वती व गणेश यांचे स्मरण करून सर्व मंडळींसह आनंदाने नगरात प्रवेश केला. ॥ ४ ॥

दो०—**होहिं सगुन बरषहिं सुमन सुर दुंदुभीं बजाइ।**
**बिबुध बधू नाचहिं मुदित मंजुल मंगल गाइ॥ ३४७॥**

शुभ शकुन होत होते, देव दुंदुभी वाजवीत फुले उधळत होत होते. देवांगना आनंदाने सुंदर मंगलगीते गात गात नाचत होत्या.॥ ३४७॥

**मागध सूत बंदि नट नागर। गावहिं जसु तिहु लोक उजागर॥**
**जय धुनि बिमल बेद बर बानी। दस दिसि सुनिअ सुमंगल सानी॥**

मागध, सूत, भाट व चतुर नट त्रैलोक्यास प्रकाशित करणाऱ्या श्रीरामचंद्रांचे यशोगान करीत होते. जयध्वनी आणि वेदांची पवित्र, श्रेष्ठ व सुंदर मांगल्याने ओसंडलेली वाणी दाही दिशांना ऐकू येत होती. ॥१॥

**बिपुल बाजने बाजन लागे। नभ सुर नगर लोग अनुरागे॥**
**बने बराती बरनि न जाहीं। महा मुदित मन सुख न समाहीं॥**

पुष्कळशी वाद्ये वाजू लागली. आकाशातील देव आणि नगरातील लोक सर्वजण प्रेममग्न झाले होते. वऱ्हाडी मंडळी अशी नटलेली होती की, काही सांगायची सोय नाही. ते परम आनंदात होते. सुख त्यांच्या मनात मावत नव्हते.॥ २॥

**पुरबासिन्ह तब राय जोहारे। देखत रामहि भए सुखारे॥**
**करहिं निछावरि मनिगन चीरा। बारि बिलोचन पुलक सरीरा॥**

अयोध्यावासीजनांनी राजांना वंदन केले. श्रीरामांना पाहाताच ते सुखावून गेले. सर्वजण रत्ने व वस्त्रे त्यांच्यावरून ओवाळून टाकीत होते. त्यांच्या नेत्रांत प्रेमाश्रूंचा पूर दाटला होता आणि ते पुलकित झाले होते.॥ ३॥

**आरति करहिं मुदित पुर नारी। हरषहिं निरखि कुअँर बर चारी॥**
**सिबिका सुभग ओहार उघारी। देखि दुलहिनिन्ह होहिं सुखारी॥**

नगरामधील स्त्रिया आनंदित होऊन आरती करीत होत्या आणि सुंदर चारी कुमारांना पाहून हर्षित होत होत्या. पालखीचे पडदे बाजूला सारून वधूंना पाहून त्या सुखावून जात होत्या.॥ ४॥

दो०—**एहि बिधि सबही देत सुखु आए राजदुआर।**
**मुदित मातु परिछनि करहिं बधुन्ह समेत कुमार॥ ३४८॥**

अशाप्रकारे सर्वांना सुखी करून ते राजद्वारी आले. माता आनंदाने वधूंच्यासह कुमारांना औक्षण करू लागल्या.॥ ३४८॥

**करहिं आरती बारहिं बारा। प्रेमु प्रमोदु कहै को पारा॥**
**भूषन मनि पट नाना जाती। करहिं निछावरि अगनित भाँती॥**

त्या वारंवार आरती करीत होत्या. त्या प्रेम व आनंदाचे वर्णन कोण करू शकेल? अनेक प्रकारची आभूषणे, रत्ने आणि वस्त्रे व अगणित प्रकारच्या वस्तू उतरून टाकल्या जात होत्या. ॥ १ ॥

**बधुन्ह समेत देखि सुत चारी। परमानंद मगन महतारी॥**
**पुनि पुनि सीय राम छबि देखी। मुदित सफल जग जीवन लेखी॥**

वधूंच्यासह चारी पुत्रांना पाहून माता आनंदमग्न झाल्या. सीता व श्रीराम यांचे रूप-लावण्य वारंवार पाहून आपला जन्म सफल झाल्याचे त्यांना वाटत होते. त्या आनंदून गेल्या होत्या. ॥ २ ॥

**सखीं सीय मुख पुनि पुनि चाही। गान करहिं निज सुकृत सराही॥**
**बरषहिं सुमन छनहिं छन देवा। नाचहिं गावहिं लावहिं सेवा॥**

सख्या जानकीचे मुख वारंवार पाहून आपल्या पुण्याची वाखाणणी करीत गीते गात होत्या. देव क्षणाक्षणाला फुले उधळत, नाचत, गात आपापली सेवा-समर्पण करीत होते. ॥ ३ ॥

**देखि मनोहर चारिउ जोरीं। सारद उपमा सकल ढँढोरीं॥**
**देत न बनहिं निपट लघु लागीं। एकटक रहीं रूप अनुरागीं॥**

ती चारीही मनोहर जोडपी पाहून सरस्वतीने सर्व उपमा शोधल्या, पण कोणतीही उपमा देता येत नव्हती, कारण त्या सर्वच उपमा तुच्छ वाटत होत्या. तेव्हा निराश होऊन सरस्वतीसुद्धा श्रीरामांच्या रूपावर अनुरक्त होऊन एकटक त्यांना पाहात राहिली. ॥ ४ ॥

दो०—**निगम नीति कुल रीति करि अरघ पाँवड़े देत।**
**बधुन्ह सहित सुत परिछि सब चलीं लवाइ निकेत॥ ३४९ ॥**

वेद-विधी आणि कुलाचार पूर्ण झाल्यावर अर्घ्य व पायघड्या घालत माता वधूंच्यासह सर्व पुत्रांना औक्षण करून त्यांना महालात घेऊन आल्या. ॥ ३४९ ॥

**चारि सिंघासन सहज सुहाए। जनु मनोज निज हाथ बनाए॥**
**तिन्ह पर कुअँरि कुअँर बैठारे। सादर पाय पुनीत पखारे॥**

जणू कामदेवाने स्वतःच्या हाताने बनविलेली सुंदर चार सिंहासने होती. मातांनी त्यांवर राजकुमारींना व राजकुमारांना बसविले आणि मोठ्या आदराने त्यांचे पवित्र चरण धुतले. ॥ १ ॥

**धूप दीप नैबेद बेद बिधि। पूजे बर दुलहिनि मंगलनिधि॥**
**बारहिं बार आरती करहीं। ब्यजन चारु चामर सिर ढरहीं॥**

मग वेद-विधीप्रमाणे मांगल्याचे माहेर असलेले नवरदेव व वधू यांची धूप, दीप आणि नैवेद्य इत्यादींनी पूजा केली. माता वारंवार ओवाळीत होत्या आणि वधू-वरांच्या मस्तकावर मोर पंख व चवऱ्या यांनी वारा घालीत होत्या. ॥ २ ॥

**बस्तु अनेक निछावरि होहीं। भरीं प्रमोद मातु सब सोहीं॥**
**पावा परम तत्व जनु जोगीं। अमृतु लहेउ जनु संतत रोगीं॥**

अनेक वस्तू उतरून टाकल्या जात होत्या. सर्व माता आनंदाने परितृप्त झाल्यामुळे अशा शोभत होत्या की, जणू योग्याने परमतत्त्व प्राप्त केले आहे. नित्य रोगी असलेल्या मनुष्याला जणू अमृत मिळाले. ॥ ३ ॥

**जनम रंक जनु पारस पावा। अंधहि लोचन लाभु सुहावा॥**
**मूक बदन जनु सारद छाई। मानहुँ समर सूर जय पाई॥**

जन्माचा दरिद्री असलेल्या माणसाला जणू परीस लाभला. आंधळ्याला दृष्टी मिळाली. मुक्याच्या मुखामध्ये जणू सरस्वती विराजमान झाली आणि वीराने जणू युद्धात विजय मिळविला. ॥ ४ ॥

दो०—**एहि सुख ते सत कोटि गुन पावहिं मातु अनंदु।**
**भाइन्ह सहित बिआहि घर आए रघुकुलचंदु॥ ३५० (क)॥**

या सर्व सुखांहून शेकडो कोटी पट आनंद मातांना मिळाला होता. कारण रघुकुलाचे चंद्रमा श्रीरघुनाथ विवाह करून भावांसह घरी परतले होते. ॥ ३५० (क) ॥

**लोक रीति जननीं करहिं बर दुलहिनि सकुचाहिं।**
**मोदु बिनोदु बिलोकि बड़ रामु मनहिं मुसुकाहिं॥ ३५० (ख)॥**

माता लौकिक रीती करीत होत्या आणि वर-वधू लाजत होते. हा महान आनंद व विनोद पाहून श्रीरामचंद्र मनातल्या मनात हसत होते. ॥ ३५० (ख) ॥

**देव पितर पूजे बिधि नीकी। पूजीं सकल बासना जी की॥**
**सबहि बंदि मागहिं बरदाना। भाइन्ह सहित राम कल्याना॥**

मातांच्या मनातील सर्व कामना पूर्ण झाल्यामुळे देव व पितर यांचे व्यवस्थित पूजन त्यांनी केले. सर्वांना वंदन करून माता हेच वरदान मागत होत्या की, भावांसह श्रीरामांचे कल्याण होवो. ॥ १ ॥

**अंतरहित सुर आसिष देहीं। मुदित मातु अंचल भरि लेहीं॥**
**भूपति बोलि बराती लीन्हे। जान बसन मनि भूषन दीन्हे॥**

देव गुप्तपणे आकाशातून आशीर्वाद देत होते व माता आनंदाने ते पदर भरभरून घेत होत्या. नंतर राजांनी वऱ्हाडी लोकांना बोलाविले व त्यांना वाहने, वस्त्रे, रत्ने व आभूषणे दिली. ॥ २ ॥

**आयसु पाइ राखि उर रामहि। मुदित गए सब निज निज धामहि॥**
**पुर नर नारि सकल पहिराए। घर घर बाजन लगे बधाए॥**

आज्ञा मिळाल्यावर श्रीरामांना हृदयी धारण करून ते सर्व आपापल्या घरी परतले. नगरातील सर्व स्त्री-पुरुषांना राजांनी वस्त्रे-भूषणे दिली. घरोघरी अभिनंदनासाठी वाद्ये वाजू लागली. ॥ ३ ॥

**जाचक जन जाचहिं जोइ जोई। प्रमुदित राउ देहिं सोइ सोई॥**
**सेवक सकल बजनिआ नाना। पूरन किए दान सनमाना॥**

याचक जे जे मागत होते, ते ते राजा प्रसन्न मनाने देत होते. सर्व सेवकांना व वादकांना राजांनी नाना प्रकारची दाने दिली आणि त्यांचा सन्मान करून त्यांना संतुष्ट केले. ॥ ४ ॥

दो०—**देहिं असीस जोहारि सब गावहिं गुन गन गाथ।**
**तब गुर भूसुर सहित गृहँ गवनु कीन्ह नरनाथ॥ ३५१ ॥**

सर्वांनी वंदन करून आशीर्वाद दिले आणि ते गुणगान करू लागले. तेव्हा गुरू व ब्राह्मण यांच्यासमवेत राजा दशरथांनी महालामध्ये प्रवेश केला. ॥ ३५१ ॥

**जो बसिष्ट अनुसासन दीन्ही। लोक बेद बिधि सादर कीन्ही॥**
**भूसुर भीर देखि सब रानी। सादर उठीं भाग्य बड़ जानी॥**

वसिष्ठांनी ज्या ज्या प्रकारे आज्ञा दिली, त्याप्रमाणे लौकिक व वैदिक विधीनुसार राजाने आदराने सर्व केले. ब्राह्मणांची झालेली गर्दी पाहून सर्व राण्या आपले भाग्य समजत आदराने उठून उभ्या राहिल्या. ॥ १ ॥

**पाय पखारि सकल अन्हवाए। पूजि भली बिधि भूप जेवाँए॥**
**आदर दान प्रेम परिपोषे। देत असीस चले मन तोषे॥**

ब्राह्मणांचे चरण धुऊन व त्यांना स्नान घालून राजांनी व्यवस्थितपणे त्यांचे पूजन करून त्यांना भोजन दिले. आदर, दान आणि प्रेमामुळे तृप्त झालेले ते ब्राह्मण मनापासून आशीर्वाद देत गेले. ॥ २ ॥

**बहु बिधि कीन्हि गाधिसुत पूजा। नाथ मोहि सम धन्य न दूजा॥**
**कीन्हि प्रसंसा भूपति भूरी। रानिन्ह सहित लीन्हि पग धूरी॥**

राजा दशरथांनी विश्वामित्रांची अनेक प्रकारे पूजा केली आणि म्हटले, 'हे नाथ, माझ्यासारखा भाग्यवान कोणी दुसरा नाही.' राजांनी त्यांची खूप स्तुती केली आणि राण्यांच्यासह त्यांची चरण-धूली घेतली. ॥ ३ ॥

**भीतर भवन दीन्ह बर बासू। मन जोगवत रह नृपु रनिवासू॥**
**पूजे गुर पद कमल बहोरी। कीन्हि बिनय उर प्रीति न थोरी॥**

त्यांना महालामध्ये राहण्यासाठी उत्तम स्थान दिले. तेथून राजा व सर्व अंत:पुर त्यांच्या मनाप्रमाणे सर्व होते की नाही हे पाहू शकत होते. नंतर राजांनी गुरू वसिष्ठांच्या चरण कमलांची पूजा करून त्यांची स्तुती केली. तेव्हा त्यांच्या मनात खूप प्रेम होते. ॥ ४ ॥

दो०—**बधुन्ह समेत कुमार सब रानिन्ह सहित महीसु।**
**पुनि पुनि बंदत गुर चरन देत असीस मुनीसु॥ ३५२॥**

वधूंच्यासह सर्व राजकुमार व राण्या यांच्यासह राजा दशरथ गुरूंच्या चरणांनी वारंवार वंदन करीत होते आणि मुनीश्वर त्यांना आशीर्वाद देत होते.॥ ३५२॥

**बिनय कीन्हि उर अति अनुरागें। सुत संपदा राखि सब आगें॥**
**नेगु मागि मुनिनायक लीन्हा। आसिरबादु बहुत बिधि दीन्हा॥**

दशरथ राजांनी अत्यंत प्रेमपूर्ण मनाने आपले पुत्र व सर्व संपत्ती मुनी वसिष्ठांच्या समोर ठेवून त्यांचा स्वीकार करण्याची त्यांना विनंती केली, परंतु मुनिराजांनी कुलगुरू म्हणून आपली दक्षिणा तेवढी मागितली आणि अनेक आशीर्वाद दिले.॥ १॥

**उर धरि रामहि सीय समेता। हरषि कीन्ह गुर गवनु निकेता॥**
**बिप्रबधू सब भूप बोलाईं। चैल चारु भूषन पहिराईं॥**

नंतर वसिष्ठ, सीता व राम यांना आपल्या हृदयात ठेवून आनंदाने आपल्या आश्रमात गेले. राजांनी सर्व ब्राह्मण-स्त्रियांना बोलाविले आणि त्यांना सुंदर वस्त्राभूषणे दिली.॥ २॥

**बहुरि बोलाइ सुआसिनि लीन्हीं। रुचि बिचारि पहिरावनि दीन्हीं॥**
**नेगी नेग जोग सब लेहीं। रुचि अनुरूप भूपमनि देहीं॥**

मग नगरातील सर्व सुवासिनींना बोलावले आणि त्यांच्या आवडीप्रमाणे त्यांना वस्त्रे दिली. अहेर घेणारे आपला अहेर घेत होते आणि राजांचे शिरोमणी असलेले दशरथ त्यांच्या इच्छेप्रमाणे त्यांना देत होते.॥ ३॥

**प्रिय पाहुने पूज्य जे जाने। भूपति भली भाँति सनमाने॥**
**देव देखि रघुबीर बिबाहू। बरषि प्रसून प्रसंसि उछाहू॥**

जे प्रिय व पूज्य आप्तजन होते, त्यांना राजांनी चांगल्या प्रकारे सन्मानित केले. देवगण श्रीरामांचा विवाह पाहून उत्सवाची प्रशंसा करीत फुले उधळत,॥ ४॥

दो०—**चले निसान बजाइ सुर निज निज पुर सुख पाइ।**
**कहत परसपर राम जसु प्रेम न हृदयँ समाइ॥ ३५३॥**

नगारे वाजवत मोठे सुखावून आपापल्या लोकी गेले. ते परस्परांना श्रीरामांची कीर्ती सांगत होते. त्यांच्या हृदयात प्रेम मावत नव्हते.॥ ३५३॥

**सब बिधि सबहि समदि नरनाहू। रहा हृदयँ भरि पूरि उछाहू॥**
**जहँ रनिवासु तहाँ पगु धारे। सहित बहूटिन्ह कुअँर निहारे॥**

सर्वांचा सर्व प्रकारे प्रेमाने यथोचित आदर-सत्कार केल्यामुळे राजा दशरथांच्या मनात आंनद भरून गेला. ते अंत:पुरात गेले आणि त्यांनी मुलां-सुनांना पाहिले. ॥ १ ॥

**लिए गोद करि मोद समेता। को कहि सकइ भयउ सुखु जेता॥**
**बधू सप्रेम गोद बैठारीं। बार बार हियँ हरषि दुलारीं॥**

राजांनी आनंदाने मुलांना मांडीवर घेतले. त्यावेळी त्यांना जे सुख वाटले, त्याचे वर्णन कोण करू शकेल? नंतर त्यांनी सुनांना प्रेमाने मांडीवर घेतले आणि वारंवार आनंदित होऊन त्यांचे कोड-कौतुक केले. ॥ २ ॥

**देखि समाजु मुदित रनिवासू। सब कें उर अनंद कियो बासू॥**
**कहेउ भूप जिमि भयउ बिबाहू। सुनि सुनि हरषु होत सब काहू॥**

हा सोहळा पाहून अंत:पुर प्रसन्न झाले. सर्वांच्या मनात आनंद दाटला. तेव्हा राजाने विवाह कसा झाला, त्याचे वर्णन केले. ते ऐकताना सर्वांनाच आनंद झाला. ॥ ३ ॥

**जनक राज गुन सीलु बड़ाई। प्रीति रीति संपदा सुहाई॥**
**बहुबिधि भूप भाट जिमि बरनी। रानी सब प्रमुदित सुनि करनी॥**

दशरथांनी जनकांचे गुण, शील, महत्त्व, प्रेमाची रीत आणि ऐश्वर्य यांचे वर्णन एखाद्या भाटाप्रमाणे अनेक प्रकारे केले. जनकांचे कर्तृत्व ऐकून सर्व राण्या फार प्रसन्न झाल्या. ॥ ४ ॥

दो०—**सुतन्ह समेत नहाइ नृप बोलि बिप्र गुर ग्याति।**
**भोजन कीन्ह अनेक बिधि घरी पंच गइ राति॥ ३५४॥**

नंतर राजांनी व मुलांनी स्नान केले. राजांनी ब्राह्मण, गुरू व कुटुंबीयांना बोलावून त्यांच्यासह अनेक प्रकारचे भोजन केले. इतके होई तो पर्यंत पाच घटिका रात्र झाली. ॥ ३५४ ॥

**मंगलगान करहिं बर भामिनि। भै सुखमूल मनोहर जामिनि॥**
**अँचइ पान सब काहूँ पाए। स्त्रग सुगंध भूषित छबि छाए॥**

सुंदर स्त्रिया मंगलगान करीत होत्या. ती रात्र सुखाची आणि मनोहारक ठरली. सर्वांनी आचमन करून पान-विडा घेतला. फुलांच्या माळा, सुगंधी द्रव्ये इत्यादींनी विभूषित झालेले सर्वजण शोभून दिसत होते. ॥ १ ॥

**रामहि देखि रजायसु पाई। निज निज भवन चले सिर नाई॥**
**प्रेम प्रमोदु बिनोदु बड़ाई। समउ समाजु मनोहरताई॥**

श्रीरामचंद्रांना पाहून व त्यांची आज्ञा घेऊन व त्यांना नमस्कार करून सर्वजण आपापल्या घरी गेले. तेथील प्रेम, आनंद, विनोद, महत्त्व, वेळ, समुदाय आणि मनोहरता, ॥ २ ॥

**कहि न सकहिं सत सारद सेसू। बेद बिरंचि महेस गनेसू॥**
**सो मैं कहौं कवन बिधि बरनी। भूमिनागु सिर धरइ कि धरनी॥**

हे सर्व सरस्वती, शेष, वेद, ब्रह्मदेव, महादेव आणि गजानन हे सुद्धा सांगू शकणार नाहीत. मग मी ते कसे वर्णन करून सांगणार बरे? गांडूळ कधी पृथ्वीला शिरावर घेईल काय?॥ ३॥

**नृप सब भाँति सबहि सनमानी। कहि मृदु बचन बोलाईं रानी॥**
**बधू लरिकनीं पर घर आईं। राखेहु नयन पलक की नाईं॥**

राजांनी सर्वांचा सर्व प्रकारे सन्मान करून, गोड बोलून राण्यांना बोलावले आणि सांगितले की, 'सुना अजुनी लहान आहेत, परक्या घरी आल्या आहेत. डोळ्यांची काळजी पापण्या घेतात, त्याप्रमाणे त्यांची काळजी घ्या.॥ ४॥

दो०—**लरिका श्रमित उनीद बस सयन करावहु जाइ।**
**अस कहि गे बिश्रामगृहँ राम चरन चितु लाइ॥ ३५५॥**

मुले थकून गेली आहेत. त्यांना झोपेने घेरले आहे. त्यांना नेऊन झोपवा.' असे म्हणून राजा श्रीरामांच्या चरणी मन लावून आपल्या विश्रामस्थानी गेले.॥ ३५५॥

**भूप बचन सुनि सहज सुहाए। जरित कनक मनि पलँग डसाए॥**
**सुभग सुरभि पय फेन समाना। कोमल कलित सुपेतीं नाना॥**

राजांचे स्वभावत: सुंदर वचन ऐकून राण्यांनी रत्नजडित सुवर्णाचे पलंग घातले. गाद्यांवर गाईच्या दुधाच्या फेसाप्रमाणे सुंदर, कोमल व शुभ्र पलंगपोस घातले.॥ १॥

**उपबरहन बर बरनि न जाहीं। स्त्रग सुगंध मनिमंदिर माहीं॥**
**रतनदीप सुठि चारु चँदोवा। कहत न बनइ जान जेहिं जोवा॥**

सुंदर उश्यांचे तर वर्णन करता येणार नाही. रत्नजडित मंदिरांना फुलांच्या माळा व सुगंधित द्रव्यांनी सजविले होते. सुंदर रत्न-दीप व चांदवे यांची शोभा सांगवत नव्हती. ज्याने पाहिले असेल, त्यालाच ती कळेल.॥ २॥

**सेज रुचिर रचि रामु उठाए। प्रेम समेत पलँग पौढ़ाए॥**
**अग्या पुनि पुनि भाइन्ह दीन्ही। निज निज सेज सयन तिन्ह कीन्ही॥**

अशा प्रकारे सुंदर शय्या सजविल्यावर मातांनी श्रीरामांना उचलून मोठ्या प्रेमाने पलंगावर झोपविले. श्रीरामांनी भावांना वारंवार आज्ञा केली, तेव्हा तेही आपापल्या शय्येवर झोपले.॥ ३॥

**देखि स्याम मृदु मंजुल गाता। कहहिं सप्रेम बचन सब माता॥**
**मारग जात भयावनि भारी। केहि बिधि तात ताड़का मारी॥**

श्रीरामांचे सावळे-सुंदर व कोमल अवयव पाहून सर्व माता प्रेमाने म्हणू लागल्या, 'हे लाडक्या, जाताना वाटेत तुम्ही भयंकर ताडका राक्षसीला कसे मारले?॥ ४॥

**दो०—घोर निसाचर बिकट भट समर गनहिं नहिं काहु।**
**मारे सहित सहाय किमि खल मारीच सुबाहु॥ ३५६॥**

जे युद्धात कोणालाही जुमानत नसत, त्या महान योद्धे असलेल्या मारीच व सुबाहू या भयंकर दुष्ट राक्षसांना व त्यांच्या अनुयायांना तुम्ही कसे बरे मारले?॥ ३५६॥

**मुनि प्रसाद बलि तात तुम्हारी। ईस अनेक करवरें टारी॥**
**मख रखवारी करि दुहुँ भाईं। गुरु प्रसाद सब बिद्या पाईं॥**

हे बाळांनो! इडा-पीडा टळो. मुनींच्या कृपेमुळेच ईश्वराने तुमच्यावरील कित्येक संकटे दूर केली. दोघा भावांनी यज्ञाचे रक्षण करून गुरूंच्या कृपेने सर्व विद्या मिळविल्या.॥ १॥

**मुनितिय तरी लगत पग धूरी। कीरति रही भुवन भरि पूरी॥**
**कमठ पीठि पबि कूट कठोरा। नृप समाज महुँ सिव धनु तोरा॥**

चरणांच्या धुळीचा स्पर्श होताच मुनि-पत्नी अहल्या तरून गेली. जगभरात ही कीर्ती सर्वत्र पसरलेली आहे. कासवाची पाठ, वज्र व पर्वत यांच्याहून कठोर शिव-धनुष्य तुम्ही सर्व राजांच्या समोर मोडून टाकले.॥ २॥

**बिस्व बिजय जसु जानकि पाई। आए भवन ब्याहि सब भाई॥**
**सकल अमानुष करम तुम्हारे। केवल कौसिक कृपाँ सुधारे॥**

विश्व-विजयी कीर्ती आणि जानकी मिळविली आणि सर्व भावांचा विवाह करून त्यांना घेऊन घरी आलात. तुमची सर्व कृत्ये अलौकिक आहेत. ती केवळ विश्वामित्रांच्या कृपेने पूर्ण झाली.॥ ३॥

**आजु सुफल जग जनमु हमारा। देखि तात बिधुबदन तुम्हारा॥**
**जे दिन गए तुम्हहि बिनु देखें। ते बिरंचि जनि पारहिं लेखें॥**

हे लाडक्यांनो! तुमचे चंद्रमुख पाहून आज आम्ही जगात जन्म घेतल्याचे सार्थक झाले. तुम्हांला न पाहता जे दिवस गेले, ते ब्रह्मदेवांनी आमच्या आयुष्यात धरू नयेत.'॥ ४॥

**दो०—राम प्रतोषीं मातु सब कहि बिनीत बर बैन।**
**सुमिरि संभु गुर बिप्र पद किए नीदबस नैन॥ ३५७॥**

श्रीरामचंद्रांनी विनयाने गोड बोलून सर्व मातांना आनंदित केले. नंतर शिव, गुरू आणि ब्राह्मण यांचे स्मरण करून ते झोपले.॥ ३५७॥

**नीदउँ बदन सोह सुठि लोना। मनहुँ साँझ सरसीरुह सोना॥**
**घर घर करहिं जागरन नारीं। देहिं परसपर मंगल गारीं॥**

झोपेमध्येही त्यांचा अत्यंत सुंदर चेहरा असा शोभून दिसत होता की, जसे संध्याकाळच्या वेळेस लाल कमल शोभून दिसते. घरोघरी स्त्रिया जागून परस्पर मंगलमय थट्टामस्करी करीत होत्या.॥ १॥

**पुरी बिराजति राजति रजनी। रानीं कहहिं बिलोकहु सजनी॥**
**सुंदर बधुन्ह सासु लै सोईं। फनिकन्ह जनु सिरमनि उर गोईं॥**

राण्या म्हणत होत्या की, 'हे साजणी, बघ, आज रात्रीची शोभा कशी आहे. तिच्यामुळे अयोध्यापुरी विशेष शोभून दिसत आहे.' असे म्हणत सासवा सुंदर सुनांना बरोबर घेऊन झोपल्या. जणू सर्पांनी आपल्या फणांवरील मणी हृदयात लपविले होते.॥ २॥

**प्रात पुनीत काल प्रभु जागे। अरुनचूड़ बर बोलन लागे॥**
**बंदि मागधन्हि गुनगन गाए। पुरजन द्वार जोहारन आए॥**

प्रात:कालच्या पवित्र ब्राह्ममुहूर्तावर प्रभू राम जागे झाले. कोंबडे आरवू लागले. भाट व मागध गुण-गान गाऊ लागले आणि नगरातील लोक मुजरा करण्यासाठी राजद्वारावर आले.॥ ३॥

**बंदि बिप्र सुर गुर पितु माता। पाइ असीस मुदित सब भ्राता॥**
**जननिन्ह सादर बदन निहारे। भूपति संग द्वार पगु धारे॥**

ब्राह्मण, देव, गुरू, पिता आणि माता यांना वंदन करून आणि आशीर्वाद घेऊन सर्व भाऊ प्रसन्न झाले. मातांनी मोठ्या आदराने त्यांची मुखे न्याहाळली. नंतर ते राजा दशरथांच्याबरोबर द्वारावर आले.॥ ४॥

दो०—**कीन्हि सौच सब सहज सुचि सरित पुनीत नहाइ।**
**प्रातक्रिया करि तात पहिं आए चारिउ भाइ॥ ३५८॥**

स्वभावत:च पवित्र असलेल्या चारी भावांनी प्रातर्विधीनंतर पवित्र शरयू नदीत स्नान केले आणि संध्या-वंदनादी कर्मे करून ते वडिलांजवळ आले.॥ ३५८॥

## नवाह्नपारायण, तिसरा विश्राम

**भूप बिलोकि लिए उर लाई। बैठे हरषि रजायसु पाई॥**
**देखि रामु सब सभा जुड़ानी। लोचन लाभ अवधि अनुमानी॥**

राजांनी त्यांना पाहाताच हृदयीशी धरले. त्यानंतर ते आज्ञा होताच आनंदाने आसनांवर बसले. श्रीरामचंद्रांचे दर्शन करणे म्हणजे नेत्रांच्या लाभाची परिसीमा आहे, असे मानून सर्व सभा त्रिविध तापांपासून मुक्त झाली.॥ १॥

**पुनि बसिष्टु मुनि कौसिकु आए। सुभग आसनन्हि मुनि बैठाए॥**
**सुतन्ह समेत पूजि पद लागे। निरखि रामु दोउ गुर अनुरागे॥**

नंतर मुनी वसिष्ठ व विश्वामित्र आले. राजांनी त्यांना सुंदर आसनांवर विराजमान केले आणि पुत्रांसमवेत त्यांची पूजा करून त्यांच्या चरणी मस्तक ठेवले. दोन्ही गुरू श्रीरामांना पाहून प्रेम-मुग्ध झाले. ॥ २ ॥

**कहहिं बसिष्टु धरम इतिहासा। सुनहिं महीसु सहित रनिवासा॥**
**मुनि मन अगम गाधिसुत करनी। मुदित बसिष्ट बिपुल बिधि बरनी॥**

वसिष्ठ मुनी धर्माचा इतिहास सांगत होते आणि राणीवशासह राजा तो ऐकत होते. मुनींच्या मनालाही जे अगम्य आहे, ते विश्वामित्रांचे कर्तृत्व वसिष्ठांनी आनंदित होऊन अनेक प्रकारे सांगितले. ॥ ३ ॥

**बोले बामदेउ सब साँची। कीरति कलित लोक तिहुँ माची॥**
**सुनि आनंदु भयउ सब काहू। राम लखन उर अधिक उछाहू॥**

वामदेव म्हणाले, 'हे सर्व सत्य आहे. विश्वामित्रांची उज्ज्वल कीर्ती त्रैलोक्यात पसरलेली आहे.' हे ऐकून सर्वजणांना आनंद वाटला. श्रीराम व लक्ष्मण यांच्या मनाला तर विशेष आनंद झाला. ॥ ४ ॥

दो०—**मंगल मोद उछाह नित जाहिं दिवस एहि भाँति।**
**उमगी अवध अनंद भरि अधिक अधिक अधिकाति॥ ३५९॥**

नित्यच मंगल व आनंद यांनी संपन्न उत्सव होत होते. अशा प्रकारे दिवस आनंदात जात होते. अयोध्या आनंदाने परिपूर्ण होऊन ओसंडत होती. आनंद दिवसें दिवस अधिकच वाढत होता. ॥ ३५९ ॥

**सुदिन सोधि कल कंकन छोरे। मंगल मोद बिनोद न थोरे॥**
**नित नव सुखु सुर देखि सिहाहीं। अवध जन्म जाचहिं बिधि पाहीं॥**

शुभ मुहूर्तावर लग्नाची कंकणे सोडली. मांगल्य, आनंद व विनोद खूप चालला होता. अशा प्रकारे नित्य नवीन सुख पाहून देवांनाही हेवा वाटत होता आणि ते अयोध्येमध्ये जन्म मिळवा म्हणून ब्रह्मदेवांची विनवणी करीत होते. ॥ १ ॥

**बिस्वामित्रु चलन नित चहहीं। राम सप्रेम बिनय बस रहहीं॥**
**दिन दिन सयगुन भूपति भाऊ। देखि सराह महामुनिराऊ॥**

विश्वामित्र मुनी रोजच आपल्या आश्रमाला परतू इच्छित होते, परंतु श्रीरामचंद्रांच्या प्रेमामुळे व विनयामुळे राहात होते. दिवसेंदिवस राजा दशरथांचा प्रेमभाव शतपट वाढत चाललेला पाहून महामुनिराज विश्वामित्र त्यांची वाखाणणी करीत असत. ॥ २ ॥

**मागत बिदा राउ अनुरागे। सुतन्ह समेत ठाढ़ भे आगे॥**
**नाथ सकल संपदा तुम्हारी। मैं सेवकु समेत सुत नारी॥**

शेवटी विश्वामित्रांनी जेव्हा निरोप मागितला, तेव्हा राजा प्रेममग्न झाले आणि पुत्रांसमवेत त्यांच्यासमोर उभे राहून म्हणाले, 'हे नाथ, ही सर्व संपदा तुमची आहे. मी तर स्त्री-पुत्रांसह तुमचा सेवक आहे. ॥ ३ ॥

**करब सदा लरिकन्ह पर छोहू। दरसनु देत रहब मुनि मोहू॥**
**अस कहि राउ सहित सुत रानी। परेउ चरन मुख आव न बानी॥**

हे मुनी, मुलांवर नेहमी प्रेम ठेवा आणि मलाही दर्शनाचा लाभ देत राहा.' असे म्हणून पुत्र व राण्या यांच्यासह राजा दशरथांनी विश्वामित्रांच्या चरणी लोटांगण घातले. भाव-विव्हळ झाल्यामुळे त्यांच्या तोंडून शब्द फुटे ना. ॥ ४ ॥

**दीन्हि असीस बिप्र बहु भाँती। चले न प्रीति रीति कहि जाती॥**
**रामु सप्रेम संग सब भाई। आयसु पाइ फिरे पहुँचाई॥**

विश्वामित्र ऋषींनी अनेक आशीर्वाद दिले आणि ते निघाले. प्रीतीची रीत सांगता येत नाही. श्रीराम सर्व भावांना घेऊन प्रेमाने मुनींना पोहोचवून व त्यांची आज्ञा घेऊन परत आले. ॥ ५ ॥

**दो०—राम रूपु भूपति भगति ब्याहु उछाहु अनंदु।**
**जात सराहत मनहिं मन मुदित गाधिकुलचंदु॥ ३६०॥**

गाधिकुलातील चंद्रमा विश्वामित्र मोठ्या आनंदाने श्रीरामचंद्रांचे रूप-लावण्य, राजा दशरथांची भक्ती, चारी भावांचा विवाह आणि सर्वांचा आनंद-उत्साह यांची मनातल्या मनात वाखाणणी करीत जात होते. ॥ ३६० ॥

**बामदेव रघुकुल गुर ग्यानी। बहुरि गाधिसुत कथा बखानी॥**
**सुनि मुनि सुजसु मनहिं मन राऊ। बरनत आपन पुन्य प्रभाऊ॥**

वामदेव आणि रघुकुलाचे गुरू ज्ञानी वसिष्ठ हे पुन्हा एकदा विश्वामित्रांची कथा वर्णन करून सांगू लागले. मुनींचे सुयश ऐकून त्यांची कृपा लाभल्यामुळे राजांना मनोमन आपल्या पुण्याईचा प्रभाव जाणवला. ॥ १ ॥

**बहुरे लोग रजायसु भयऊ। सुतन्ह समेत नृपति गृहँ गयऊ॥**
**जहँ तहँ राम ब्याहु सबु गावा। सुजसु पुनीत लोक तिहुँ छावा॥**

आज्ञा झाल्यावर सर्व लोक परतले. राजा दशरथसुद्धा पुत्रांसह राजमहालात परतले. जिकडे-तिकडे सर्वजण श्रीरामचंद्रांच्या विवाहाची गाथा गात होते. श्रीरामचंद्रांची पवित्र सुकीर्ती त्रैलोक्यात पसरली. ॥ २ ॥

**आए ब्याहि रामु घर जब तें। बसइ अनंद अवध सब तब तें॥**
**प्रभु बिबाहँ जस भयउ उछाहू। सकहिं न बरनि गिरा अहिनाहू॥**

श्रीरामचंद्र विवाह करून घरी आल्यापासून सर्व प्रकारचा आनंद अयोध्ये-मध्ये येऊन वसत होता. प्रभू रामांच्या विवाहामध्ये जसा आनंद व उत्साह उसळला होता, त्याचे सरस्वती व सर्पराज शेष हे सुद्धा वर्णन करू शकणार नाहीत. ॥ ३ ॥

**कबिकुल जीवनु पावन जानी। राम सीय जसु मंगल खानी॥**
**तेहि ते मैं कछु कहा बखानी। करन पुनीत हेतु निज बानी॥**

श्रीरामांची कीर्ती ही कविकुलाचे जीवन पवित्र करणारी व मांगल्याची खाण समजून मी आपली वाणी पवित्र करण्यासाठी थोडीशी वर्णन करून सांगितली आहे. ॥ ४ ॥

छं०—**निज गिरा पावनि करन कारन राम जसु तुलसीं कह्यो।**
**रघुबीर चरित अपार बारिधि पारु कबि कौनें लह्यो॥**
**उपबीत ब्याह उछाह मंगल सुनि जे सादर गावहीं।**
**बैदेहि राम प्रसाद ते जन सर्बदा सुखु पावहीं॥**

स्वत:ची वाणी पवित्र करण्यासाठी तुलसीने श्रीरामांची कीर्ती वर्णन केली आहे. तसे पाहिले तर श्रीरघुनाथांचे चरित्र हा अपार समुद्र आहे. कोणता कवी तो पार करू शकेल? जे लोक श्रीरामांच्या मुंज व विवाह या मंगलमय उत्सवांचे वर्णन आदराने ऐकून गात राहातील, ते श्रीसीतारामांच्या कृपेने सदा सुख प्राप्त करतील.

सो०—**सिय रघुबीर बिबाहु जे सप्रेम गावहिं सुनहिं।**
**तिन्ह कहुँ सदा उछाहु मंगलायतन राम जसु॥ ३६१॥**

श्रीसीता व श्रीरामचंद्र यांचा विवाह-प्रसंग जे लोक प्रेमाने गातील, ऐकतील, त्यांच्याकरिता सदा उत्साह-आनंदच आहे, कारण श्रीरामचंद्रांची कीर्ती ही मांगल्याचे धाम आहे. ॥ ३६१ ॥

## मासपारायण, बारावा विश्राम

**इति श्रीमद्रामचरितमानसे सकलकलिकलुषविध्वंसने प्रथमः सोपानः समाप्तः।**

*कलियुगातील संपूर्ण पापांचा विध्वंस करणाऱ्या श्रीरामचरितमानसाचा*
*हा प्रथम सोपान समाप्त झाला.*

## ( बालकाण्ड समाप्त )

॥ श्रीगणेशाय नमः ॥

॥ श्रीजानकीवल्लभो विजयते ॥

# श्रीरामचरितमानस

## द्वितीय सोपान

# अयोध्याकाण्ड

श्लोक

**यस्याङ्के च विभाति भूधरसुता देवापगा मस्तके**
**भाले बालविधुर्गले च गरलं यस्योरसि व्यालराट्।**
**सोऽयं भूतिविभूषणः सुरवरः सर्वाधिपः सर्वदा**
**शर्वः सर्वगतः शिवः शशिनिभः श्रीशङ्करः पातु माम्॥ १ ॥**

ज्यांच्या अंकावर हिमाचलसुता पार्वती, मस्तकावर गंगा, ललाटावर बालचंद्र, कंठामध्ये हलाहल विष, वक्षःस्थलावर सर्पराज शेष सुशोभित आहे, ते भस्म-विभूषित, देवांमध्ये श्रेष्ठ, सर्वेश्वर, सर्वसंहारक, सर्वव्यापक, कल्याणरूप, चंद्रासमान शुभ्रवर्ण असलेले श्रीशंकर सदा माझे रक्षण करोत. ॥ १ ॥

**प्रसन्नतां या न गताभिषेकतस्तथा न मम्ले वनवासदुःखतः।**
**मुखाम्बुजश्री रघुनन्दनस्य मे सदास्तु सा मञ्जुलमङ्गलप्रदा॥ २ ॥**

रघुकुलाला आनंद देणाऱ्या श्रीरामचंद्रांच्या मुखारविंदाची जी शोभा राज्याभिषेकाची वार्ता ऐकून प्रसन्नही झाली नाही आणि वनवासाच्या दुःखाने खिन्नही झाली नाही, ती मला सदा सुंदर मांगल्य देणारी होवो. ॥ २ ॥

**नीलाम्बुजश्यामलकोमलाङ्गं सीतासमारोपितवामभागम्।**
**पाणौ महासायकचारुचापं नमामि रामं रघुवंशनाथम्॥ ३ ॥**

ज्यांचे अंग नील कमलासमान श्याम व कोमल आहे, सीतादेवी ज्यांच्या वामांगी विराजमान

आहे आणि ज्यांच्या हाती अमोघ बाण व सुंदर धनुष्य आहे, त्या रघुवंशाचे स्वामी श्रीरामचंद्रांना मी नमस्कार करतो. ॥ ३ ॥

**दो०—श्रीगुरु चरन सरोज रज निज मनु मुकुरु सुधारि।**
**बरनउँ रघुबर बिमल जसु जो दायकु फल चारि॥**

श्रीगुरूंच्या चरण-कमलांच्या धूलीने मनरूपी दर्पण स्वच्छ करून मी श्रीरघुनाथांच्या निर्मल कीर्तीचे वर्णन करतो. ती धर्म, अर्थ, काम, मोक्ष ही चारी फले प्राप्त करून देणारी आहे. ॥

**जब तें रामु ब्याहि घर आए। नित नव मंगल मोद बधाए॥**
**भुवन चारिदस भूधर भारी। सुकृत मेघ बरषहिं सुख बारी॥**

श्रीरामचंद्र विवाह करून घरी परतले, तेव्हापासून अयोध्येमध्ये नित्य नवीन मंगल चालले होते आणि आनंदानिमित्त अभिनंदने झडत होती. जणू चौदा लोकरूपी मोठ्या पर्वतांवर पुण्यरूपी मेघ सुखरूपी जलाचा वर्षाव करत होते. ॥ १ ॥

**रिधि सिधि संपति नदीं सुहाई। उमगि अवध अंबुधि कहुँ आई॥**
**मनिगन पुर नर नारि सुजाती। सुचि अमोल सुंदर सब भाँती॥**

ऋद्धी-सिद्धी आणि संपत्तिरूपी सुंदर नद्या दुथडी वाहात अयोध्यारूपी समुद्राला येऊन मिळत होत्या. नगरातील स्त्री-पुरुष म्हणजे बहुमोल रत्नांचे समूह होते. जे सर्व प्रकारे पवित्र, अमूल्य आणि सुंदर होते. ॥ २ ॥

**कहि न जाइ कछु नगर बिभूती। जनु एतनिअ बिरंचि करतूती॥**
**सब बिधि सब पुर लोग सुखारी। रामचंद मुख चंदु निहारी॥**

नगराचे ऐश्वर्य काही सांगणे शक्य नाही. जणू ब्रह्मदेवांच्या कलाकुसरीची ही परिसीमाच आहे, असे वाटत होते. सर्व नगरनिवासी श्रीरामचंद्रांचा मुखचंद्र पाहून सर्व प्रकारे सुखी होत होते. ॥ ३ ॥

**मुदित मातु सब सखीं सहेली। फलित बिलोकि मनोरथ बेली॥**
**राम रूपु गुन सीलु सुभाऊ। प्रमुदित होइ देखि सुनि राऊ॥**

सर्व माता व सख्या या आपल्या मनोरथरूपी वेलींना फळे आल्याचे पाहून आनंदित होत होत्या. श्रीरामांच्या रूप, गुण, शील आणि स्वभाव पाहून-ऐकून राजा दशरथ फारच आनंदित होत होते. ॥ ४ ॥

**दो०—सब कें उर अभिलाषु अस कहहिं मनाइ महेसु।**
**आप अछत जुबराज पद रामहि देउ नरेसु॥ १॥**

सर्वांच्या मनात हीच अभिलाषा होती आणि सर्वजण श्रीमहा-देवांची विनवणी करून म्हणत होते की, राजांनी आपल्या उपस्थितीतच श्रीरामचंद्रांना युवराजपद द्यावे. ॥ १ ॥

**एक समय सब सहित समाजा। राजसभाँ रघुराजु बिराजा॥**
**सकल सुकृत मूरति नरनाहू। राम सुजसु सुनि अतिहि उछाहू॥**

एका प्रसंगी रघुकुलभूषण राजा दशरथ आपल्या सर्व परिवारासह राजसभेमध्ये विराजमान झाले होते. महाराज सर्व पुण्यांची मूर्ती होते. श्रीरामांची उज्ज्वल कीर्ती ऐकून त्यांना अत्यंत आनंद वाटत होता. ॥ १ ॥

**नृप सब रहहिं कृपा अभिलाषें। लोकप करहिं प्रीति रुख राखें॥**
**तिभुवन तीनि काल जग माहीं। भूरिभाग दसरथ सम नाहीं॥**

सर्व राजे दशरथांची कृपा मिळण्याची कामना करीत आणि लोकपालसुद्धा त्यांच्या कलाप्रमाणे वागून त्यांच्यावर प्रेम करीत. तीन लोक आणि तिन्ही कालांमध्ये दशरथांसारखा महद्‌भाग्यवान कोणी नव्हता. ॥ २ ॥

**मंगलमूल रामु सुत जासू। जो कछु कहिअ थोर सबु तासू॥**
**रायँ सुभायँ मुकुरु कर लीन्हा। बदनु बिलोकि मुकुटु सम कीन्हा॥**

मांगल्याचे मूळ असलेले श्रीरामचंद्र ज्यांचे पुत्र आहेत, त्यांच्याविषयी जेवढे सांगावे तेवढे थोडेच आहे. राजांनी सहज हाती आरसा घेतला आणि त्यात पाहून आपला मुकुट व्यवस्थित केला. ॥ ३ ॥

**श्रवन समीप भए सित केसा। मनहुँ जरठपनु अस उपदेसा॥**
**नृप जुबराजु राम कहुँ देहू। जीवन जनम लाहु किन लेहू॥**

त्यांना दिसले की, आपल्या कानाजवळचे केस पांढरे झाले आहेत. जणू म्हातारपण सांगत होते की, ‘हे राजा, श्रीरामचंद्रांना युवराजपद देऊन आपले जीवन आणि जन्माचे सार्थक का करून घेत नाहीस?’ ॥ ४ ॥

दो०—**यह बिचारु उर आनि नृप सुदिनु सुअवसरु पाइ।**
**प्रेम पुलकि तन मुदित मन गुरहि सुनायउ जाइ॥ २॥**

मनात हा विचार येताच राजा दशरथांनी शुभ दिन आणि चांगला मुहूर्त पाहून मोठ्या प्रेमाने पुलकित होऊन व आनंदमग्न मनाने तो विचार गुरू वसिष्ठांना सांगितला. ॥ २ ॥

**कहइ भुआलु सुनिअ मुनिनायक। भए राम सब बिधि सब लायक॥**
**सेवक सचिव सकल पुरबासी। जे हमारे अरि मित्र उदासी॥**

महाराज म्हणाले, ‘हे मुनिराज, ऐका. श्रीरामचंद्र आता सर्व प्रकारे योग्य झाले आहेत. सेवक, मंत्री, सर्व नगरवासी आणि जे आपले शत्रू, मित्र व तटस्थ आहेत, ॥ १ ॥

**सबहि रामु प्रिय जेहि बिधि मोही । प्रभु असीस जनु तनु धरि सोही ॥**
**बिप्र सहित परिवार गोसाईं । करहिं छोहु सब रौरिहि नाईं ॥**

त्या सर्वांना श्रीरामचंद्र माझ्याप्रमाणेच प्रिय आहेत. त्यांच्या रूपाने तुमचा आशीर्वादच शरीर धारण करून शोभत आहे. हे स्वामी, सर्व ब्राह्मण व परिवार हे सर्व तुमच्या समानच त्यांच्यावर प्रेम करतात. ॥ २ ॥

**जे गुर चरन रेनु सिर धरहीं । ते जनु सकल बिभव बस करहीं ॥**
**मोहि सम यहु अनुभयउ न दूजें । सबु पायउँ रज पावनि पूजें ॥**

जे लोक गुरूंच्या चरणांची धूळ मस्तकावर धारण करतात, जणू संपूर्ण ऐश्वर्यच त्यांच्या मुठीत येते. याचा अनुभव माझ्याशिवाय दुसऱ्या कोणाला नसावा. तुमच्या पवित्र चरणरजाची पूजा करून मी सर्व काही मिळविले. ॥ ३ ॥

**अब अभिलाषु एकु मन मोरें । पूजिहि नाथ अनुग्रह तोरें ॥**
**मुनि प्रसन्न लखि सहज सनेहू । कहेउ नरेस रजायसु देहू ॥**

आता माझ्या मनात एकच अभिलाषा आहे. हे गुरुवर्य, तीसुद्धा तुमच्या कृपेनेच पूर्ण होईल.' राजांचे स्वाभाविक प्रेम पाहून मुनींनी प्रसन्न होऊन म्हटले, 'महाराज, बोला, काय इच्छा आहे? ॥ ४ ॥

दो०—**राजन राउर नामु जसु सब अभिमत दातार।**
**फल अनुगामी महिप मनि मन अभिलाषु तुम्हार ॥ ३ ॥**

हे राजन, तुमचे नाव आणि कीर्ती ही सर्व मनोवांछित वस्तू देणारी आहे. हे राजांच्या मुकुटमणी! तुमच्या मनात अभिलाषा येण्यापूर्वीच तिचे आपोआप फल मिळते.' ॥ ३ ॥

**सब बिधि गुरु प्रसन्न जियँ जानी । बोलेउ राउ रहँसि मृदु बानी ॥**
**नाथ रामु करिअहिं जुबराजू । कहिअ कृपा करि करिअ समाजू ॥**

आपले गुरू सर्व प्रकारे प्रसन्न आहेत, असे पाहून राजा आनंदाने कोमल वाणीने म्हणाले, 'हे गुरुवर्य! श्रीरामचंद्रांना युवराज करा. आज्ञा मिळाली की, तयारी करता येईल. ॥ १ ॥

**मोहि अछत यहु होइ उछाहू । लहहिं लोग सब लोचन लाहू ॥**
**प्रभु प्रसाद सिव सबइ निबाहीं । यह लालसा एक मन माहीं ॥**

मी जिवंत असताना हा आनंदोत्सव झाला, तर सर्वांच्या डोळ्यांचे पारणे फिटेल. हे प्रभू, तुमच्या कृपेमुळे भगवान शिवांनी सर्व कामना पूर्ण केल्या. केवळ ही एकच इच्छा मनात उरली आहे. ॥ २ ॥

**पुनि न सोच तनु रहउ कि जाऊ। जेहिं न होइ पाछें पछिताऊ॥**
**सुनि मुनि दसरथ बचन सुहाए। मंगल मोद मूल मन भाए॥**

ती पूर्ण झाल्यास मग काही काळजी नाही. मग देह राहो अथवा जावो. नंतर पश्चात्ताप करावा लागणार नाही.' राजा दशरथांचे मंगल व आनंदमूलक सुंदर वचन ऐकून मुनी मनातून प्रसन्न झाले. ॥ ३ ॥

**सुनु नृप जासु बिमुख पछिताहीं। जासु भजन बिनु जरनि न जाहीं॥**
**भयउ तुम्हार तनय सोइ स्वामी। रामु पुनीत प्रेम अनुगामी॥**

वसिष्ठ म्हणाले, 'हे राजा, ऐका. ज्यांना विन्मुख झाल्याने लोकांना पश्चात्ताप करावा लागतो आणि ज्यांच्या भजनाविना मनातील दु:ख दूर होत नाही, तेच सर्वलोकमहेश्वर स्वामी श्रीराम तुमचे पुत्र झालेले आहेत. ते पवित्र प्रेमामागोमाग येतात. ॥ ४ ॥

दो०—**बेगि बिलंबु न करिअ नृप साजिअ सबुइ समाजु।**
**सुदिन सुमंगलु तबहिं जब रामु होहिं जुबराजु॥ ४॥**

हे राजा, आता उशीर करू नका. लवकर सर्व साहित्य जमवा. श्रीरामचंद्र युवराज होतील, तोच शुभ आणि सुंदर मंगलमय दिवस होय.'॥ ४॥

**मुदित महीपति मंदिर आए। सेवक सचिव सुमंत्रु बोलाए॥**
**कहि जयजीव सीस तिन्ह नाए। भूप सुमंगल बचन सुनाए॥**

राजा आनंदित होऊन राजमहालात आले. त्यांनी सेवकांकडून सुमंत इत्यादी मंत्र्यांना पाचारण केले. त्यांनी ''जय जीव'' असे म्हणून अभिवादन केले. तेव्हा राजांनी श्रीरामांना युवराजपद देण्याचा सुंदर मंगलमय प्रस्ताव मांडला. ॥ १ ॥

**जौं पाँचहि मत लागै नीका। करहु हरषि हियँ रामहि टीका॥**

आणि म्हटले, 'जर तुम्हा पंचांना हा विचार योग्य वाटत असेल, तर आनंदाने तुम्ही श्रीरामचंद्रांना राजतिलक करा.'॥ २ ॥

**मंत्री मुदित सुनत प्रिय बानी। अभिमत बिरवँ परेउ जनु पानी॥**
**बिनती सचिव करहिं कर जोरी। जिअहु जगतपति बरिस करोरी॥**

हे प्रिय बोलणे ऐकताच मंत्री आनंदित झाले. जणू त्यांच्या मनोरथरूपी रोपट्यावर पाणी शिंपले गेले. त्यांनी हात जोडून म्हटले, 'हे जगत्पती, तुम्ही कोट्यवधी वर्षे जगावे. ॥ ३ ॥

**जग मंगल भल काजु बिचारा। बेगिअ नाथ न लाइअ बारा॥**
**नृपहि मोदु सुनि सचिव सुभाषा। बढ़त बौंड़ जनु लही सुसाखा॥**

तुम्ही सर्व जगाचे कल्याण करणाऱ्या शुभ कार्याचा विचार केलेला आहे. महाराज! घाई करा. उशीर लावू नका.' मंत्र्यांची सुंदर वाणी ऐकून राजांना आनंद झाला. जणू वाढत जाणाऱ्या वेलीला सुंदर फांदीचा आधार मिळाला. ॥ ४ ॥

**दो०—कहेउ भूप मुनिराज कर जोइ जोइ आयसु होइ।**
**राम राज अभिषेक हित बेगि करहु सोइ सोइ॥ ५॥**

महाराज म्हणाले, 'श्रीरामचंद्रांच्या राज्याभिषेकासाठी मुनिराज वसिष्ठांची जी जी आज्ञा असेल, ती सर्व तुम्ही त्वरित पूर्ण करा.'॥ ५ ॥

**हरषि मुनीस कहेउ मृदु बानी। आनहु सकल सुतीरथ पानी॥**
**औषध मूल फूल फल पाना। कहे नाम गनि मंगल नाना॥**

मुनिराजांनी आनंदाने व कोमल वाणीने सांगितले की, 'सर्व श्रेष्ठ तीर्थांचे जल आणा.' मग त्यांनी औषधे, मुळे, फुले, पाने इत्यादी मांगलिक वस्तूंची नावे सांगितली. ॥ १ ॥

**चामर चरम बसन बहु भाँती। रोम पाट पट अगनित जाती॥**
**मनिगन मंगल बस्तु अनेका। जो जग जोगु भूप अभिषेका॥**

चवऱ्या, मृगचर्म, अनेक प्रकारची वस्त्रे, असंख्य प्रकारची लोकरी व रेशमी वस्त्रे, रत्ने आणि राज्याभिषेकासाठी आवश्यक असणाऱ्या बऱ्याच वस्तू मागविण्याची आज्ञा दिली. ॥ २ ॥

**बेद बिदित कहि सकल बिधाना। कहेउ रचहु पुर बिबिध बिताना॥**
**सफल रसाल पूगफल केरा। रोपहु बीथिन्ह पुर चहुँ फेरा॥**

मुनींनी वेदांमध्ये सांगितलेले सर्व विधान त्यांना सांगितले, 'नगरात अनेक मंडप सजवा. फळांसह असलेले आंबे, सुपारी व केळींचे वृक्ष नगरातील गल्ल्यांतून चोहीकडे लावा. ॥ ३ ॥

**रचहु मंजु मनि चौकें चारू। कहहु बनावन बेगि बजारू॥**
**पूजहु गनपति गुर कुलदेवा। सब बिधि करहु भूमिसुर सेवा॥**

सुंदर रत्नांच्या मनोहर रांगोळ्या काढा. बाजार लगोलग सजविण्यास सांगा. श्रीगणेश, गुरू व कुलदेवता यांची पूजा करा व ब्राह्मणांचा सर्व प्रकारे सन्मान करा. ॥ ४ ॥

**दो०—ध्वज पताक तोरन कलस सजहु तुरग रथ नाग।**
**सिर धरि मुनिबर बचन सबु निज निज काजहिं लाग॥ ६॥**

ध्वज, पताका, तोरणे, कलश, घोडे, रथ व हत्ती हे सर्व सज्ज करा.' मुनिश्रेष्ठ वसिष्ठांचे सांगणे शिरोधार्य मानून सर्वजण कामाला लागले. ॥ ६ ॥

**जो मुनीस जेहि आयसु दीन्हा। सो तेहिं काजु प्रथम जनु कीन्हा॥**
**बिप्र साधु सुर पूजत राजा। करत राम हित मंगल काजा॥**

मुनीश्वरांनी ज्याला जे काम सांगितले, ते त्याने इतके पटापट केले की, जणू ते त्याने पूर्वीच करून ठेवले होते. ब्राह्मण, साधू व देव यांची पूजा राजा दशरथ करू लागले आणि श्रीरामचंद्रांच्यासाठी सर्व मंगल कार्ये करू लागले.॥ १॥

**सुनत राम अभिषेक सुहावा। बाज गहागह अवध बधावा॥**
**राम सीय तन सगुन जनाए। फरकहिं मंगल अंग सुहाए॥**

श्रीरामचंद्रांच्या राज्याभिषेकाची शुभवार्ता ऐकताच अयोध्येमध्ये मोठ्या उत्साहाने वाद्ये वाजू लागली. श्रीरामचंद्र आणि सीता यांच्या अंगांवर शुभ शकुन दिसू लागले. त्यांचे सुंदर मंगल अवयव स्फुरू लागले.॥ २॥

**पुलकि सप्रेम परसपर कहहीं। भरत आगमनु सूचक अहहीं॥**
**भए बहुत दिन अति अवसेरी। सगुन प्रतीति भेंट प्रिय केरी॥**

पुलकित होऊन दोघे मोठ्या प्रेमाने परस्पर म्हणू लागले की, 'भरत मामाच्या गावी गेला आहे, तो परत येण्याचे हे शुभ शकुन आहेत. बरेच दिवस झाले, भेटण्याची इच्छा मनात वारंवार येते. शकुनामुळे प्रिय व्यक्तीच्या भेटीचा विश्वास वाटू लागतो.॥ ३॥

**भरत सरिस प्रिय को जग माहीं। इहइ सगुन फलु दूसर नाहीं॥**
**रामहि बंधु सोच दिन राती। अंडन्हि कमठ हृदउ जेहि भाँती॥**

आणि जगात भरताशिवाय आम्हांला कोण प्रिय आहे? शकुनाचे हे फल असणार, दुसरे नाही.' श्रीरामचंद्रांच्या मनात आपल्या भरत बंधूचाच विचार रात्रंदिवस असे. ज्याप्रमाणे कासवीचे मन अंड्यात गुंतलेले असते.॥ ४॥

दो०—**एहि अवसर मंगलु परम सुनि रहँसेउ रनिवासु।**
**सोभत लखि बिधु बढ़त जनु बारिधि बीचि बिलासु॥ ७॥**

याच वेळी ही परम मंगल वार्ता ऐकून संपूर्ण अंत:पुर आनंदित झाले, ज्याप्रमाणे चंद्र वाढत असल्याचे पाहून समुद्रामध्ये लहरींचा विलास शोभून दिसू लागतो.॥ ७॥

**प्रथम जाइ जिन्ह बचन सुनाए। भूषन बसन भूरि तिन्ह पाए॥**
**प्रेम पुलकि तन मन अनुरागीं। मंगल कलस सजन सब लागीं॥**

अंत:पुरात जाऊन ज्यांनी ही वार्ता सर्वांत प्रथम सांगितली, त्यांना पुष्कळशी वस्त्राभूषणे बक्षीस म्हणून मिळाली. राण्यांचे शरीर प्रेमामुळे रोमांचित झाले आणि मन प्रेम-मग्न झाले. त्या सर्वजणी मंगल कलश सजवू लागल्या.॥ १॥

**चौकें चारु सुमित्राँ पूरी। मनिमय बिबिध भाँति अति रूरी॥**
**आनँद मगन राम महतारी। दिए दान बहु बिप्र हँकारी॥**

सुमित्रेने रत्नांच्या अनेक अत्यंत सुंदर व मनोहर रांगोळ्या काढल्या. आनंद-मग्न झालेल्या श्रीरामांच्या कौसल्या मातेने ब्राह्मणांना बोलावून पुष्कळ दाने दिली.॥ २॥

**पूजीं ग्रामदेबि सुर नागा। कहेउ बहोरि देन बलिभागा॥**
**जेहि बिधि होइ राम कल्यानू। देहु दया करि सो बरदानू॥**

तिने ग्रामदेवता, देव व नाग यांची पूजा केली आणि नवस केले. तिने सर्वांना प्रार्थना केली की, ज्यायोगे श्रीरामांचे कल्याण होईल, असे वरदान देण्याची कृपा करा.॥ ३॥

**गावहिं मंगल कोकिलबयनीं। बिधुबदनीं मृगसावकनयनीं॥**

कोकिळेसारख्या मधुर वाणीच्या, चंद्रमुखी व बालमृगनयना स्त्रिया मंगलगान करू लागल्या.॥ ४॥

दो०—**राम राज अभिषेकु सुनि हियँ हरषे नर नारि।**
**लगे सुमंगल सजन सब बिधि अनुकूल बिचारि॥ ८॥**

श्रीरामचंद्रांच्या राज्याभिषेकाची वार्ता ऐकून सर्व स्त्री-पुरुषांच्या हृदयात हर्ष झाला आणि विधाता आपणास अनुकूल आहे, असे मानून ते सर्व सुंदर मंगल-वेषभूषा करू लागले.॥ ८॥

**तब नरनाहँ बसिष्ठु बोलाए। रामधाम सिख देन पठाए॥**
**गुर आगमनु सुनत रघुनाथा। द्वार आइ पद नायउ माथा॥**

मग राजांनी वसिष्ठांना पाचारण केले आणि समयोचित उपदेश करण्यासाठी श्रीरामचंद्रांच्या महालात पाठविले. गुरूंचे आगमन होत आहे, असे ऐकताच श्रीरघुनाथांनी दरवाजावर येऊन त्यांच्या चरणी मस्तक ठेवले.॥ १॥

**सादर अरघ देइ घर आने। सोरह भाँति पूजि सनमाने॥**
**गहे चरन सिय सहित बहोरी। बोले रामु कमल कर जोरी॥**

आदराने अर्घ्य देऊन त्यांना आत नेले आणि षोडशोपचारे पूजा करून त्यांना सन्मानित केले. नंतर सीतेसह त्यांच्या पाया पडून कर-कमल जोडून श्रीराम म्हणाले,॥ २॥

**सेवक सदन स्वामि आगमनू। मंगल मूल अमंगल दमनू॥**
**तदपि उचित जनु बोलि सप्रीती। पठइअ काज नाथ असि नीती॥**

‘सेवकाच्या घरी स्वामींनी येणे, हे जरी मांगल्यांचे मूळ आहे आणि अमंगळाचा नाश करणारे

आहे, तरी हे नाथ, या दासाला प्रेमाने कामासाठी बोलाविले असते, तर ते योग्य झाले असते. नीती असेच सांगते. ॥ ३ ॥

**प्रभुता तजि प्रभु कीन्ह सनेहू। भयउ पुनीत आजु यहु गेहू॥**
**आयसु होइ सो करौं गोसाईं। सेवकु लहइ स्वामि सेवकाईं॥**

परंतु मोठेपणा विसरून व स्वत: येऊन जो स्नेह आपण प्रगट केला, त्यामुळे हे घर पवित्र झाले. गुरुमहाराज, आता जी आपली आज्ञा असेल, त्याप्रमाणे करीन. स्वामींच्या सेवेमध्येच सेवकाचा लाभ असतो.'॥ ४ ॥

दो०—**सुनि सनेह साने बचन मुनि रघुबरहि प्रसंस।**
**राम कस न तुम्ह कहहु अस हंस बंस अवतंस॥ ९॥**

श्रीरामांचे हे प्रेमपूर्ण वचन ऐकून मुनी वसिष्ठांनी श्रीरघुनाथांची प्रशंसा करीत म्हटले, 'हे राम, तुम्ही असे का बरे म्हणणार नाही? कारण तुम्ही सूर्यवंशाचे भूषण आहात.'॥ ९ ॥

**बरनि राम गुन सीलु सुभाऊ। बोले प्रेम पुलकि मुनिराऊ॥**
**भूप सजेउ अभिषेक समाजू। चाहत देन तुम्हहि जुबराजू॥**

श्रीरामचंद्रांचे गुण, शील आणि स्वभाव यांची वाखाणणी करीत मुनिराज प्रेम-पुलकित होऊन म्हणाले, 'हे श्रीराम, दशरथांनी राज्याभिषेकाची तयारी केली आहे. तुम्हांला युवराजपद देण्याची त्यांची इच्छा आहे. ॥ १ ॥

**राम करहु सब संजम आजू। जौं बिधि कुसल निबाहै काजू॥**
**गुरु सिख देइ राय पहिं गयऊ। राम हृदयँ अस बिसमउ भयऊ॥**

म्हणून हे राम, तुम्ही आज विधिपूर्वक उपवास, हवन इत्यादी करून संयमाने राहा. त्यामुळे विधाता यशस्वीपणे हे कार्य पार पाडील.' गुरुजी उपदेश करून राजा दशरथांच्याकडे गेले. श्रीरामांच्या मनात हे ऐकून या गोष्टीचे आश्चर्य वाटले की, ॥ २ ॥

**जनमे एक संग सब भाई। भोजन सयन केलि लरिकाई॥**
**करनबेध उपबीत बिआहा। संग संग सब भए उछाहा॥**

'आम्ही सर्व बंधू बरोबरच जन्मलो, आमचे खाणे-पिणे, झोपणे, लहानपणीचे खेळ, कर्णवेधन, उपनयन आणि विवाह ह्या सर्व गोष्टी बरोबरच झाल्या. ॥ ३ ॥

**बिमल बंस यहु अनुचित एकू। बंधु बिहाइ बड़ेहि अभिषेकू॥**
**प्रभु सप्रेम पछितानि सुहाई। हरउ भगत मन कै कुटिलाई॥**

परंतु या निर्मल सूर्यवंशात हीच एक गोष्ट अनुचित वाटते की, सर्व भावांना सोडून मोठ्या भावालाच राज्याभिषेक होतो.' तुलसीदास म्हणतात की, प्रभू श्रीरामचंद्रांचा हा प्रेमळ पश्चात्ताप भक्तांच्या चित्ताची कुटिलता हरण करो. ॥ ४ ॥

**दो०—तेहि अवसर आए लखन मगन प्रेम आनंद।**
**सनमाने प्रिय बचन कहि रघुकुल कैरव चंद॥ १०॥**

त्याचवेळी प्रेम व आनंदात मग्न होऊन लक्ष्मण आला. रघुकुलरूपी कुमुदाला प्रफुल्ल करणारे चंद्र श्रीराम यांनी प्रेमळ बोलून त्याचा सन्मान केला.॥ १०॥

**बाजहिं बाजने बिबिध बिधाना। पुर प्रमोदु नहिं जाइ बखाना॥**
**भरत आगमनु सकल मनावहिं। आवहुँ बेगि नयन फलु पावहिं॥**

पुष्कळ प्रकारची वाद्ये वाजत होती. नगरातील आनंदाचे वर्णन करणे अशक्य. सर्व लोक भरताचे आगमन व्हावे, अशी कामना करीत होते. 'ते सुद्धा लवकरच यावेत आणि राज्याभिषेकाचा उत्सव पाहून त्यांनी डोळ्यांचे समाधान करून घ्यावे.'॥ १॥

**हाट बाट घर गलीं अथाईं। कहहिं परसपर लोग लोगाईं॥**
**कालि लगन भलि केतिक बारा। पूजिहि बिधि अभिलाषु हमारा॥**

बाजार, रस्ते, घरे, गल्ल्या आणि कट्ट्यांवर जिकडे-तिकडे स्त्री-पुरुष आपापसात म्हणत होते की, विधाता आमची अभिलाषा पूर्ण करील तो शुभ मुहूर्त उद्या केव्हा आहे?॥ २॥

**कनक सिंघासन सीय समेता। बैठहिं रामु होइ चित चेता॥**
**सकल कहहिं कब होइहि काली। बिघन मनावहिं देव कुचाली॥**

जेव्हा श्रीरामचंद्र सीतेसह सुवर्ण सिंहासनावर विराजमान होतील, तेव्हा आमची मनोकामना पूर्ण होईल. एकीकडे सर्वजण म्हणत आहेत की, उद्याचा दिवस केव्हा उजाडणार? दुसरीकडे षड्यंत्र करणारे देव विघ्न आणू पाहत होते.॥ ३॥

**तिन्हहि सोहाइ न अवध बधावा। चोरहि चंदिनि राति न भावा॥**
**सारद बोलि बिनय सुर करहीं। बारहिं बार पाय लै परहीं॥**

चोरांना ज्याप्रमाणे चांदणे आवडत नाही, त्याप्रमाणे देवांना अयोध्येतील आनंदोत्सव आवडत नव्हते. सरस्वतीदेवीला बोलावून ते विनवणी करीत होते आणि वारंवार तिच्या पाया पडून लोटांगण घालत होते.॥ ४॥

**दो०—बिपति हमारि बिलोकि बड़ि मातु करिअ सोइ आजु।**
**रामु जाहिं बन राजु तजि होइ सकल सुरकाजु॥ ११॥**

ते म्हणत होते की, 'हे माते, आमचे संकट बघून असे काहीतरी करा की, श्रीरामचंद्र राज्य सोडून वनात जातील आणि देवांची सर्व कार्ये सिद्ध करतील.'॥ ११॥

**सुनि सुर बिनय ठाढ़ि पछिताती। भइउँ सरोज बिपिन हिमराती॥**
**देखि देव पुनि कहहिं निहोरी। मातु तोहि नहिं थोरिउ खोरी॥**

देवांची विनंती ऐकून सरस्वती उभी राहून पश्चात्ताप करीत होती की, 'अरेरे, मी कमलवनासाठी हेमंत ऋतूमधील रात्र झाले.' ती असा पश्चात्ताप करीत होती, तेव्हा देव पुन्हा विनवणी करून म्हणू लागले की, 'माते, यामध्ये तुम्हांला कोणताही दोष लागणार नाही.॥ १॥

**बिसमय हरष रहित रघुराऊ। तुम्ह जानहु सब राम प्रभाऊ॥**
**जीव करम बस सुख दुख भागी। जाइअ अवध देवहित लागी॥**

श्रीरघुनाथ हे हर्षविषादापासून अलिप्त आहेत. त्यांचा संपूर्ण प्रभाव तुम्हांला माहीत आहे. जीव हा आपल्या कर्मामुळे सुख-दुःख प्राप्त करतो. म्हणूनच देवांच्या हितासाठी तुम्ही अयोध्येला जा.'॥ २॥

**बार बार गहि चरन सँकोची। चली बिचारि बिबुध मति पोची॥**
**ऊँच निवासु नीचि करतूती। देखि न सकहिं पराइ बिभूती॥**

देवांनी वारंवार पाया पडून सांगितले, तेव्हा सरस्वतीला भीड पडली. मग ती विचार करीत निघाली की, देवांची बुद्धी किती क्षुद्र आहे. यांचा निवास उच्चस्थानी आहे, परंतु यांचे विचार क्षुद्र आहेत. यांना दुसऱ्याचे ऐश्वर्य पाहावत नाही.॥ ३॥

**आगिल काजु बिचारि बहोरी। करिहहिं चाह कुसल कबि मोरी॥**
**हरषि हृदयँ दसरथ पुर आई। जनु ग्रह दसा दुसह दुखदाई॥**

परंतु श्रीराम वनात गेल्याने राक्षसांचा वध होईल व जग सुखी होईल, या पुढील कामाचा विचार करून चतुर कवी माझी कामना पूर्ण करतील, असा विचार करून सरस्वती मनात आनंदून अयोध्येला आली. जणू ती दुःसह दुःख देणारी ग्रहदशाच आली होती.॥ ४॥

दो०—**नामु मंथरा मंदमति चेरी कैकइ केरि।**
**अजस पेटारी ताहि करि गई गिरा मति फेरि॥ १२॥**

मंथरा नावाची कैकेयीची एक मंदबुद्धीची दासी होती. तिला अपकीर्तीचा पेटारा बनवून सरस्वती तिची बुद्धी पालटून निघून गेली.॥ १२॥

**दीख मंथरा नगरु बनावा। मंजुल मंगल बाज बधावा॥**
**पूछेसि लोगन्ह काह उछाहू। राम तिलकु सुनि भा उर दाहू॥**

मंथरेला दिसले की नगर सजविले आहे. सुंदर आनंदोत्सव चालले आहेत. तिने लोकांना विचारले की, 'हा कसला उत्सव आहे?' श्रीरामचंद्रांच्या राजतिलकाची वार्ता ऐकताच तिचे मन जळफळू लागले.॥ १॥

**करइ बिचारु कुबुद्धि कुजाती। होइ अकाजु कवनि बिधि राती॥**
**देखि लागि मधु कुटिल किराती। जिमि गवँ तकइ लेउँ केहि भाँती॥**

ती दुर्बुद्धी व नीच जातीची दासी विचार करू लागली की, कशा प्रकारे हे कार्य रात्रीतल्या रात्री बिघडून टाकता येईल. ज्याप्रमाणे एखादी भिल्लीण मधाचे पोळे पाहून दबा धरून बसते की, हे कसे उपटून टाकावे?॥ २॥

**भरत मातु पहिं गइ बिलखानी। का अनमनि हसि कह हँसि रानी॥**
**ऊतरु देइ न लेइ उसासू। नारि चरित करि ढारइ आँसू॥**

ती उदास होऊन भरताची माता कैकेयी हिच्याकडे गेली. राणी कैकेयीने विचारले की, 'तू अशी उदास का?' मंथरेने काहीही उत्तर दिले नाही. फक्त मोठ्याने उसासे टाकू लागली आणि स्त्रीस्वभावानुसार अश्रू ढाळू लागली.॥ ३॥

**हँसि कह रानि गालु बड़ तोरें। दीन्ह लखन सिख अस मन मोरें॥**
**तबहुँ न बोल चेरि बड़ि पापिनि। छाड़इ स्वास कारि जनु साँपिनि॥**

राणी हसून म्हणाली की 'तुझे गाल रागाने फुगलेले आहेत. मला वाटते की, लक्ष्मणाने तुला शिक्षा केली असावी.' तरीही ती महापापी दासी काहीही बोलली नाही. ती असे दीर्घ श्वास सोडत राहिली की, जणू काळी नागीण फूत्कार टाकीत असावी.॥ ४॥

दो०—**सभय रानि कह कहसि किन कुसल रामु महिपालु।**
**लखनु भरतु रिपुदमनु सुनि भा कुबरी उर सालु॥ १३॥**

तेव्हा राणी कैकयीने घाबरून विचारले, 'अग, सांगत का नाहीस? राजा, श्रीरामचंद्र, लक्ष्मण, भरत व शत्रुघ्न हे सुखरूप तर आहेत ना?' हे ऐकून कुबड्या मंथरेच्या हृदयात फार वेदना झाली.॥ १३॥

**कत सिख देइ हमहि कोउ माई। गालु करब केहि कर बलु पाई॥**
**रामहि छाड़ि कुसल केहि आजू। जेहि जनेसु देइ जुबराजू॥**

ती म्हणू लागली, 'हे माई, मला कोण शिक्षा देणार? मी कुणाच्या जोरावर बडबड करणार? रामचंद्राला सोडून आज कोण सुखरूप आहे? कारण महाराज त्याला युवराजपद देत आहेत.॥ १॥

**भयउ कौसिलहि बिधि अति दाहिन। देखत गरब रहत उर नाहिन॥**
**देखहु कस न जाइ सब सोभा। जो अवलोकि मोर मनु छोभा॥**

कौसल्येला आज विधाता फारच अनुकूल आहे, हे पाहून तिच्या मनात गर्व मावेनासा झाला आहे. तुम्ही स्वत: जाऊन सर्व शोभा का पाहून येत नाही? त्यामुळे माझ्या मनात क्षोभ उत्पन्न झाला आहे.॥ २॥

**पूतु बिदेस न सोचु तुम्हारें। जानति हहु बस नाहु हमारें॥**
**नीद बहुत प्रिय सेज तुराई। लखहु न भूप कपट चतुराई॥**

तुमचा पुत्र परदेशी आहे आणि तुम्हांला त्याची काही काळजी नाही. राजा आपल्या मुठीत आहे, असे तुम्हांला वाटते. तुम्हांला तर गाद्या-गिरद्या व पलंगावर लोळत झोप घ्यायला फार आवडते. राजांचे कपटी चातुर्य तुम्हांला दिसत नाही.'॥ ३॥

**सुनि प्रिय बचन मलिन मनु जानी। झुकी रानि अब रहु अरगानी॥**
**पुनि अस कबहुँ कहसि घरफोरी। तब धरि जीभ कढ़ावउँ तोरी॥**

मंथरेचे बोलणे ऐकून व ती खोट्या मनाची आहे, असे समजून राणी रागावून म्हणाली, 'बस्स्. आता गप्प बैस. घरात दुफळी माजविणारी कुठली! पुन्हा कधी असे बोललीस तर तुझी जीभ हासडून टाकीन.'॥ ४॥

दो०—**काने खोरे कूबरे कुटिल कुचाली जानि।**
**तिय बिसेषि पुनि चेरि कहि भरतमातु मुसुकानि॥ १४॥**

चकण्या, लंगड्या व कुबड्यांना दुष्ट आणि वाईट चालीचे मानले पाहिजे. त्यांतही स्त्री आणि विशेषतः दासी.' असे म्हणत भरताची माता कैकेयी हिने हास्य केले.॥ १४॥

**प्रियबादिनि सिख दीन्हिउँ तोही। सपनेहुँ तो पर कोपु न मोही॥**
**सुदिनु सुमंगल दायकु सोई। तोर कहा फुर जेहि दिन होई॥**

मग म्हणाली, 'हे प्रिय वचन बोलणाऱ्या मंथरे, मी तुला शिक्षा म्हणून रागावले. तुझा मला स्वप्नातही राग येणार नाही. ज्यादिवशी तुझे म्हणणे खरे होईल, अर्थात रामाला राजतिलक होईल, तोच मंगलदायी शुभ दिवस ठरेल.॥ १॥

**जेठ स्वामि सेवक लघु भाई। यह दिनकर कुल रीति सुहाई॥**
**राम तिलकु जौं साँचेहुँ काली। देउँ मागु मन भावत आली॥**

मोठा भाऊ हा स्वामी आणि लहान भाऊ सेवक असतो. ही सूर्यवंशातील सुयोग्य रीत आहे. जर खरोखर उद्याच श्रीरामाचा राज्याभिषेक असेल, तर हे सखी, मनाला आवडेल ते माग. मी देईन.॥ २॥

**कौसल्या सम सब महतारी। रामहि सहज सुभायँ पिआरी॥**
**मो पर करहिं सनेहु बिसेषी। मैं करि प्रीति परीछा देखी॥**

रामांना सरळ स्वभावामुळे सर्व माता कौसल्येसारख्याच प्रिय आहेत. माझ्यावर तर ते विशेष प्रेम करतात. मी त्यांच्या प्रेमाची परीक्षा घेऊन पाहिली आहे.॥ ३॥

**जौं बिधि जनमु देइ करि छोहू। होहुँ राम सिय पूत पुतोहू॥**
**प्रान तें अधिक रामु प्रिय मोरें। तिन्ह कें तिलक छोभु कस तोरें॥**

जर विधात्याने मला कृपा करून पुढचा जन्म दिला, तर मला श्रीरामचंद्र पुत्र व सीता ही सून म्हणून मिळो. श्रीराम हा मला प्राणांहून अधिक प्रिय आहे. त्याच्या राजतिलकामुळे तुला क्षोभ का झाला? ॥ ४ ॥

**दो०—भरत सपथ तोहि सत्य कहु परिहरि कपट दुराउ।**
**हरष समय बिसमउ करसि कारन मोहि सुनाउ॥ १५॥**

तुला भरताची शपथ आहे. कपट सोडून खरे खरे सांग. तू आनंदाच्या प्रसंगी दुःख का करीत आहेस, याचे कारण मला सांग.'॥ १५ ॥

**एकहिं बार आस सब पूजी। अब कछु कहब जीभ करि दूजी॥**
**फोरै जोगु कपारु अभागा। भलेउ कहत दुख रउरेहि लागा॥**

मंथरा म्हणाली, 'सर्व आशा एकाच वेळी बोलण्यामुळे पूर्ण झाल्या. आता दुसरी जीभ लावून सांगते. माझे दुर्दैवी कपाळ फोडून टाकण्याजोगे आहे. चांगली गोष्ट सांगितल्यावर सुद्धा तुम्हांला दुःख वाटते. ॥ १ ॥

**कहहिं झूठि फुरि बात बनाई। ते प्रिय तुम्हहि करुइ मैं माई॥**
**हमहुँ कहबि अब ठकुरसोहाती। नाहिं त मौन रहब दिनु राती॥**

जे खऱ्या-खोट्या गोष्टी रचून सांगतात, हे माई, तेच तुम्हांला आवडतात आणि मी कडवट वाटते. आता मीसुद्धा तोंडदेखली गोष्ट बोलेन. नाहीतर दिवस-रात्र गप्प राहीन. ॥ २ ॥

**करि कुरूप बिधि परबस कीन्हा। बवा सो लुनिअ लहिअ जो दीन्हा॥**
**कोउ नृप होउ हमहि का हानी। चेरि छाड़ि अब होब कि रानी॥**

विधात्याने कुरूप बनवून मला पराधीन केले आहे. यात दुसऱ्याचा काय दोष? जे पेरले ते घेते, दिले ते मिळविते. कुणी का राजा होईना, आमचे काय जाते? दासी होण्याशिवाय तुम्ही आता राणी थोड्याच राहाणार? ॥ ३ ॥

**जारै जोगु सुभाउ हमारा। अनभल देखि न जाइ तुम्हारा॥**
**तातें कछुक बात अनुसारी। छमिअ देबि बड़ि चूक हमारी॥**

आमचा स्वभाव तर जाळण्याजोगाच आहे. कारण मला तुमचे अहित पाहावत नाही, म्हणून मी सूतोवाच केले होते. परंतु हे देवी, आमची मोठी चूक झाली, क्षमा करा.'॥ ४॥

**दो०—गूढ़ कपट प्रिय बचन सुनि तीय अधरबुधि रानि।**
**सुरमाया बस बैरिनिहि सुहृद जानि पतिआनि॥ १६॥**

स्त्री अस्थिर बुद्धीची असल्यामुळे आणि देवांच्या मायेला बळी पडल्यामुळे कैकेयी राणी ही मंथरेची कपटपूर्ण रहस्यमय वाणी ऐकून वैरीण मंथरेला आपली हितचिंतक समजून तिच्यावर विश्वास करू लागली. ॥ १६ ॥

**सादर पुनि पुनि पूँछति ओही । सबरी गान मृगी जनु मोही ॥**
**तसि मति फिरी अहइ जसि भाबी । रहसी चेरि घात जनु फाबी ॥**

वारंवार राणी आदरपूर्वक विचारत होती. भिल्लिणीच्या गाण्याने हरिणी मोहित व्हावी, तशी राणी मोहित झाली. जसे घडायचे होते, त्याप्रमाणे कैकेयीची बुद्धी फिरली. आपला डाव साधलेला पाहून मंथरा खूष झाली. ॥ १ ॥

**तुम्ह पूँछहु मैं कहत डेराऊँ । धरेहु मोर घरफोरी नाऊँ ॥**
**सजि प्रतीति बहुबिधि गढ़ि छोली । अवध साढ़साती तब बोली ॥**

'तुम्ही विचारता, परंतु सांगताना भीती वाटते. कारण तुम्ही पूर्वीच माझे नाव घरात फूट पाडणारी असे ठेवले आहे.' अशाप्रकारे घोळून घोळून आणि राणीला पूर्ण विश्वास वाटू लागल्यावर ती अयोध्येची साडेसाती असलेली मंथरा म्हणाली, ॥ २ ॥

**प्रिय सिय रामु कहा तुम्ह रानी । रामहि तुम्ह प्रिय सो फुरि बानी ॥**
**रहा प्रथम अब ते दिन बीते । समउ फिरें रिपु होहिं पिरीते ॥**

'हे राणी, तुम्ही जे म्हणालात की, मला सीता-राम प्रिय आहेत व रामांना तुम्ही, ही गोष्ट खरी आहे. परंतु ही गोष्ट पूर्वी होती. आता ते दिवस सरले. दिवस फिरले की, मित्रसुद्धा शत्रू बनतात. ॥ ३ ॥

**भानु कमल कुल पोषनिहारा । बिनु जल जारि करइ सोइ छारा ॥**
**जरि तुम्हारि चह सवति उखारी । रूँधहु करि उपाउ बर बारी ॥**

सूर्य हा कमळाच्या ताटव्याचे पालन करणारा आहे, परंतु पाण्याविना तोच सूर्य कमळांना करपून टाकतो. सवत कौसल्या ही तुम्हांला समूळ उपटून टाकू इच्छिते. म्हणून उपाय करून चांगले कुंपण घालून तिला आवर घाला. ॥ ४ ॥

दो०—**तुम्हहि न सोचु सोहाग बल निज बस जानहु राउ।**
**मन मलीन मुह मीठ नृपु राउर सरल सुभाउ ॥ १७ ॥**

तुम्हांला आपल्या सौभाग्याच्या खोट्या बळामुळे काहीच विचार उरला नाही. तुम्हांला वाटते की, राजा आपल्या मुठीत आहे. परंतु राजा हे मनाने कपटी आणि तोंडाने गोड आहेत आणि तुमचा स्वभाव सरळ आहे. ॥ १७ ॥

**चतुर गँभीर राम महतारी । बीचु पाइ निज बात सँवारी ॥**
**पठए भरतु भूप ननिअउरें । राम मातु मत जानब रउरें ॥**

रामाची आई कौसल्या ही मोठी चतुर व पत्ता लागू न देणारी आहे. तिने वेळ येताच आपले काम साधले. राजांनी भरताला आजोळी पाठविले, ते रामाच्या आईच्या सल्ल्यानेच, असे समजा. ॥ १ ॥

**सेवहिं सकल सवति मोहि नीकें । गरबित भरत मातु बल पी कें ॥**
**सालु तुम्हार कौसिलहि माई । कपट चतुर नहिं होइ जनाई ॥**

कौसल्येला असे वाटते की, सर्व सवती माझी व्यवस्थित सेवा करतात. एकटी भरताची आई पतीच्या जोरावर गर्विष्ठ असते. म्हणून हे माई, कौसल्येला तुम्ही फार खटकत आहात. परंतु ती कपट करण्यामध्ये चतुर आहे, म्हणून तिच्या मनातला भाव जाणता येत नाही. ॥ २ ॥

**राजहि तुम्ह पर प्रेमु बिसेषी । सवति सुभाउ सकइ नहिं देखी ॥**
**रचि प्रपंचु भूपहि अपनाई । राम तिलक हित लगन धराई ॥**

राजांचे तुमच्यावर खास प्रेम आहे. स्वामींचा स्वभाव माहीत असल्यामुळे कौसल्येला हे पाहावत नाही. म्हणून तिने जाळे पसरून राजाला वश करून घेतले व भरताच्या अनुपस्थितीत रामाच्या राजतिलकाचा मुहूर्त ठरवून टाकला. ॥ ३ ॥

**यह कुल उचित राम कहुँ टीका । सबहि सोहाइ मोहि सुठि नीका ॥**
**आगिलि बात समुझि डरु मोही । देउ दैउ फिरि सो फलु ओही ॥**

रामाला राजतिलक व्हावा, ही रघुकुलातील रीत योग्यच आहे आणि ती सर्वांनाच बरी वाटते. मलाही ती फार चांगली वाटते. परंतु पुढचा विचार केल्यावर मला भीती वाटते. दैव फिरून त्याचे फळ त्या कौसल्येलाच मिळो.' ॥ ४ ॥

दो०—**रचि पचि कोटिक कुटिलपन कीन्हेसि कपट प्रबोधु।**
**कहिसि कथा सत सवति कै जेहि बिधि बाढ़ बिरोधु॥ १८ ॥**

अशा प्रकारे कोट्यवधी कुटिलपणाच्या गोष्टी घोळून घोळून मंथरेने कैकेयीला उलट-सुलट सांगितले व कित्येक सवतींच्या गोष्टी विरोध वाढावा, या हेतूने रचून सांगितल्या. ॥ १८ ॥

**भावी बस प्रतीति उर आई । पूँछ रानि पुनि सपथ देवाई ॥**
**का पूँछहु तुम्ह अबहुँ न जाना । निज हित अनहित पसु पहिचाना ॥**

भवितव्याच्या अधीन झाल्यामुळे कैकेयीच्या मनात विश्वास वाटू लागला. राणी पुन्हा शपथ घालून विचारू लागली, तेव्हा मंथरा म्हणाली, 'विचारता काय? अहो, तुम्हांला अजुनी समजले नाही? आपले बरे-वाईट पशूंनासुद्धा समजते. ॥ १ ॥

**भयउ पाखु दिन सजत समाजू । तुम्ह पाई सुधि मोहि सन आजू ॥**
**खाइअ पहिरिअ राज तुम्हारें । सत्य कहें नहिं दोषु हमारें ॥**

समारंभाचे सामान गोळा करण्यात पंधरवडा गेला आणि तुम्हांला आज माझ्याकडून समजत आहे? मी तुमचे मीठ खाते, म्हणून खरे बोलण्यात मला कसलाही दोष नाही. ॥ २ ॥

**जौं असत्य कछु कहब बनाई। तौ बिधि देइहि हमहि सजाई॥**
**रामहि तिलक कालि जौं भयऊ। तुम्ह कहुँ बिपति बीजु बिधि बयऊ॥**

जर मी पदरचे खोटे सांगत असेन, तर ईश्वर मला दंड देईल. जर उद्या रामाला राजतिलक झाला, तर तुमच्यासाठी विधात्याने संकटाचे बीज पेरले, असे समजा.॥ ३॥

**रेख खँचाइ कहउँ बलु भाषी। भामिनि भइहु दूध कइ माखी॥**
**जौं सुत सहित करहु सेवकाई। तौ घर रहहु न आन उपाई॥**

मी अगदी निश्चितपणे सांगते की, राणीसाहेब! तुम्ही आता दुधात पडलेल्या माशीप्रमाणे त्याज्य झाला आहात. जर मुलासह कौसल्येची चाकरी कराल, तर घरात राहाता येईल. दुसरा कोणताही मार्ग नाही.॥ ४॥

दो०—**कद्रूँ बिनतहि दीन्ह दुखु तुम्हहि कौसिलाँ देब।**
**भरतु बंदिगृह सेइहहिं लखनु राम के नेब॥ १९॥**

कद्रूने ज्याप्रमाणे विनतेला दुःख दिले, तसे तुम्हांला कौसल्या देईल. भरत कारावास भोगेल आणि लक्ष्मण रामाचा सहकारी असेल.'॥ १९॥

**कैकयसुता सुनत कटु बानी। कहि न सकइ कछु सहमि सुखानी॥**
**तन पसेउ कदली जिमि काँपी। कुबरीं दसन जीभ तब चाँपी॥**

कैकेयी मंथरेची कटू वाणी ऐकताच घाबरून जाऊन काही बोलू शकली नाही. तिला घाम फुटला आणि ती केळीप्रमाणे थरथरू लागली. मग कुबड्या मंथरेने आपली जीभ चावली. (कदाचित हे भयंकर चित्र ऐकून कैकेयीचे हृदय बंद पडेल, अशी भीती तिला वाटली.)॥ १॥

**कहि कहि कोटिक कपट कहानी। धीरजु धरहु प्रबोधिसि रानी॥**
**फिरा करमु प्रिय लागि कुचाली। बकिहि सराहइ मानि मराली॥**

मग तिने कपटाच्या पुष्कळ गोष्टी सांगून राणीला बरेच समजाविले की, 'धीर धरा.' कैकेयीचे दैव फिरले. तिला दुष्टपणा आवडू लागला. ती बगळी मंथरेला हंसी समजून तिची तारीफ करू लागली.॥ २॥

**सुनु मंथरा बात फुरि तोरी। दहिनि आँखि नित फरकइ मोरी॥**
**दिन प्रति देखउँ राति कुसपने। कहउँ न तोहि मोह बस अपने॥**

कैकेयी म्हणाली, 'मंथरे, ऐक. तुझे म्हणणे खरे आहे. माझा उजवा डोळा सारखा फडफडत आहे. मला रोज रात्री वाईट स्वप्ने दिसतात, परंतु आपल्या अजाणतेपणाने तुला सांगत नाही, इतकेच.॥ ३॥

**काह करौं सखि सूध सुभाऊ। दाहिन बाम न जानउँ काऊ॥**

सखे, काय करू? माझा स्वभाव पडला साधा-भोळा. मला डावे-उजवे काही समजत नाही. ॥ ४॥

दो०—**अपनें चलत न आजु लगि अनभल काहुक कीन्ह।**
**केहिं अघ एकहि बार मोहि दैअँ दुसह दुखु दीन्ह॥ २०॥**

मी आजपर्यंत कधीच कुणाचे वाईट केले नाही. मग दैवाने मला एकदमच हे असह्य दुःख का दिले, कुणास ठाऊक?॥ २०॥

**नैहर जनमु भरब बरु जाई। जिअत न करबि सवति सेवकाई॥**
**अरि बस दैउ जिआवत जाही। मरनु नीक तेहि जीवन चाही॥**

हवे तर मी माहेरी जाऊन तिथेच आयुष्य घालवीन, परंतु जिवंतपणी सवतीची चाकरी करणार नाही. दैव ज्याला जिवंतपणी शत्रूच्या ताब्यात ठेवते, त्याने जगण्यापेक्षा मरणेच चांगले.'॥ १॥

**दीन बचन कह बहुबिधि रानी। सुनि कुबरीं तियमाया ठानी॥**
**अस कस कहहु मानि मन ऊना। सुखु सोहागु तुम्ह कहुँ दिन दूना॥**

राणी दीनवाणी होऊन बरेच काही बोलली. ते ऐकल्यावर कुबडीने स्त्रीचरित्र दाखविले. ती म्हणाली, 'तुम्ही मनात निराश होऊन असे का म्हणता? तुमचे सुख-सौभाग्य दिवसेंदिवस वाढत राहील. ॥ २॥

**जेहिं राउर अति अनभल ताका। सोइ पाइहि यहु फलु परिपाका॥**
**जब तें कुमत सुना मैं स्वामिनि। भूख न बासर नीद न जामिनि॥**

जिला तुमचे वाईट व्हावे, अशी इच्छा आहे, तिलाच हा परिणाम भोगावा लागेल. हे स्वामिनी, जेव्हापासून मी ही वाईट मसलत ऐकली आहे, तेव्हापासून मला दिवसा भूक लागत नाही आणि रात्री झोपही येत नाही. ॥ ३॥

**पूँछेउँ गुनिन्ह रेख तिन्ह खाँची। भरत भुआल होहिं यह साँची॥**
**भामिनि करहु त कहौं उपाऊ। है तुम्हरीं सेवा बस राऊ॥**

मी ज्योतिष्यांना विचारले, तेव्हा त्यांनी गणित मांडून सांगितले की, भरतच राजा होईल, हे सत्य आहे. हे महाराणी! तुम्ही करणार असाल, तर मी उपाय सांगते. राजा तुमच्या सेवेच्या अधीन आहेतच.'॥ ४॥

दो०—**परउँ कूप तुअ बचन पर सकउँ पूत पति त्यागि।**
**कहसि मोर दुखु देखि बड़ कस न करब हित लागि॥ २१॥**

कैकेयी म्हणाली, 'तू सांगितल्यावर मी विहिरीत उडी घेईन, पुत्र व पतींना सोडू शकेन. तू

जर माझे मोठे दु:ख पाहून काही सांगत आहेस, तर मग मी आपल्या हितासाठी ते का करणार नाही?'॥ २१ ॥

**कुबरीं करि कबुली कैकेई। कपट छुरी उर पाहन टेई॥**
**लखइ न रानि निकट दुखु कैसें। चरइ हरित तिन बलिपसु जैसें॥**

कुबडीने कैकेयीकडून सर्व प्रकारे कबूल करून घेतले आणि कपटरूपी सुरीला आपल्या पाषाणहृदयावर धार लावली. बळीचा पशू ज्याप्रमाणे हिरवे गवत अजाणपणे खात असताना मृत्यू जाणत नाही, त्याप्रमाणे कैकेयीचे झाले. तिला आपल्यावर कोसळणारे दु:ख कळले नाही.॥ १ ॥

**सुनत बात मृदु अंत कठोरी। देति मनहुँ मधु माहुर घोरी॥**
**कहइ चेरि सुधि अहइ कि नाहीं। स्वामिनि कहिहु कथा मोहि पाहीं॥**

मंथरेच्या गोष्टी ऐकायला गोड होत्या, परंतु परिणामी भयानक होत्या. ती जणू मधात कालवून विष पाजवीत होती. दासी म्हणाली, 'हे स्वामिनी, तुम्ही मला एक गोष्ट सांगितली होती, ती आठवते ना?'॥ २ ॥

**दुइ बरदान भूप सन थाती। मागहु आजु जुड़ावहु छाती॥**
**सुतहि राजु रामहि बनबासू। देहु लेहु सब सवति हुलासू॥**

तुमचे दोन वर राजांच्याजवळ अमानत ठेवलेले आहेत. आज ते राजांकडून मागून घेऊन मनाचे समाधान करून घ्या. पुत्राला राज्य आणि रामाला वनवास द्या आणि सवतीचा सर्व आनंद तुम्ही मिळवा.॥ ३ ॥

**भूपति राम सपथ जब करई। तब मागेहु जेहिं बचनु न टरई॥**
**होइ अकाजु आजु निसि बीतें। बचनु मोर प्रिय मानेहु जी तें॥**

राजा जेव्हा रामाची शपथ घेईल, तेव्हाच वर मागा. त्यामुळे दिलेले वचन टळू शकणार नाही. आजची रात्र तशीच गेली, तर काम बिघडून जाईल. माझे बोलणे मनापासून चांगले समजा.'॥ ४ ॥

दो०—**बड़ कुघातु करि पातकिनि कहेसि कोपगृहँ जाहु।**
**काजु सँवारेहु सजग सबु सहसा जनि पतिआहु॥ २२॥**

पापी मंथरेने सापळा रचून सांगितले की, 'कोप-भवनात जा. सर्व काम अत्यंत सावधगिरीने करा. राजांवर एकदम विश्वास ठेवू नका.'॥ २२ ॥

**कुबरिहि रानि प्रानप्रिय जानी। बार बार बड़ि बुद्धि बखानी॥**
**तोहि सम हित न मोर संसारा। बहे जात कइ भइसि अधारा॥**

राणीने कुबडीला प्राणाहून प्रिय समजून वारंवार तिच्या बुद्धीची वाखाणणी केली आणि

म्हणाली, 'जगात तुझ्यासारखी माझी हितकारी कोणीही नाही. मी वाहावत जात होते, तू मला आधार दिलास. ॥ १ ॥

**जौं बिधि पुरब मनोरथु काली । करौं तोहि चख पूतरि आली ॥**
**बहुबिधि चेरिहि आदरु देई । कोपभवन गवनी कैकेई ॥**

जर विधात्याने उद्या माझे मनोरथ पूर्ण केले, तर हे सखी, मी तुला डोळ्याच्या बाहुलीप्रमाणे अत्यंत आवडती मानीन.' अशाप्रकारे दासीला पुष्कळ आदर देत कैकेयी कोप-भवनात गेली. ॥ २ ॥

**बिपति बीजु बरषा रितु चेरी । भुइँ भइ कुमति कैकई केरी ॥**
**पाइ कपट जलु अंकुर जामा । बर दोउ दल दुख फल परिनामा ॥**

विपत्ती हे बी होते. दासी वर्षा-ऋतू होती. कैकेयीची कुबुद्धी मशागत केलेली जमीन होती. कपटरूपी पाणी मिळताच त्या बीजाला अंकुर फुटला. दोन्ही वर हे त्या अंकुराची दोन पाने होती आणि शेवटी याला दु:खरूपी फळ येणार होते. ॥ ३ ॥

**कोप समाजु साजि सबु सोई । राजु करत निज कुमति बिगोई ॥**
**राउर नगर कोलाहलु होई । यह कुचालि कछु जान न कोई ॥**

कैकेयी कोपाचा वेष घेऊन कोपभवनात जाऊन झोपली. ती राज्य करीत होती पण स्वत:च्या दुष्ट बुद्धीमुळे नष्ट झाली. राजमहाल व नगरामध्ये धूम-धाम चालली होती. ही दुष्ट चाल कुणालाच समजली नाही. ॥ ४ ॥

दो०—**प्रमुदित पुर नर नारि सब सजहिं सुमंगलचार।**
**एक प्रबिसहिं एक निर्गमहिं भीर भूप दरबार॥ २३ ॥**

नगरातील सर्व स्त्री-पुरुष आनंदित होऊन शुभ मंगलाचाराचे सर्व सामान सजवीत होते. कोण आत जात होता, कोणी बाहेर जात होता. धावपळ चालली होती. राजद्वारी फार गर्दी जमत होती. ॥ २३ ॥

**बाल सखा सुनि हियँ हरषाहीं । मिलि दस पाँच राम पहिं जाहीं ॥**
**प्रभु आदरहिं प्रेमु पहिचानी । पूँछहिं कुसल खेम मृदु बानी ॥**

श्रीरामचंद्रांचे बाल-मित्र राजतिलकाची वार्ता ऐकून मनातून हरखून गेले होते. ते दहा-पाचाच्या गटाने श्रीरामांच्याकडे येत होते. त्यांचे प्रेम पाहून प्रभू रामचंद्र त्यांना आदर देत होते व कोमल वाणीने त्यांची खुशाली विचारीत होते. ॥ १ ॥

**फिरहिं भवन प्रिय आयसु पाई । करत परसपर राम बड़ाई ॥**
**को रघुबीर सरिस संसारा । सीलु सनेहु निबाहनिहारा ॥**

आपला लाडका मित्र श्रीरामचंद्र यांची आज्ञा घेऊन ते परस्परांना श्रीरामांची थोरवी सांगत घरी गेले आणि म्हणाले, 'जगात श्रीरघुनाथांच्यासारखा शीलवान व स्नेह करणारा कोण आहे ?॥ २ ॥

**जेहिं जेहिं जोनि करम बस भ्रमहीं । तहँ तहँ ईसु देउ यह हमहीं ॥**
**सेवक हम स्वामी सियनाहू । होउ नात यह ओर निबाहू ॥**

परमेश्वर आम्हांला एवढेच देवो की, आम्ही आपल्या कर्माप्रमाणे भ्रमण करीत ज्या ज्या योनीत जन्मू, त्या त्या योनीत आम्ही सेवक असावे आणि सीतापती श्रीरामचंद्र आमचे स्वामी असावेत. हे नाते शेवटपर्यंत टिकून राहो.'॥ ३ ॥

**अस अभिलाषु नगर सब काहू । कैकयसुता हृदयँ अति दाहू ॥**
**को न कुसंगति पाइ नसाई । रहइ न नीच मतें चतुराई ॥**

नगरामध्ये सर्वांची हीच अभिलाषा होती, परंतु कैकेयीच्या मनात चडफडाट होत होता. कुसंगती लाभल्यावर कोण बरे अधोगतीला जाणार नाही? क्षुद्र विचारांच्या लोकांच्या सल्ल्याने वागल्यामुळे शहाणपण उरत नसते. ॥ ४ ॥

दो०—**साँझ समय सानंद नृपु गयउ कैकई गेहँ ।**
**गवनु निठुरता निकट किय जनु धरि देह सनेहँ ॥ २४ ॥**

संध्याकाळी राजा दशरथ आनंदाने कैकेयीच्या महालात गेले. जणू प्रत्यक्ष स्नेहच देह धारण करून निष्ठुरतेकडे गेला होता. ॥ २४ ॥

**कोपभवन सुनि सकुचेउ राऊ । भय बस अगहुड़ परइ न पाऊ ॥**
**सुरपति बसइ बाहँबल जाकें । नरपति सकल रहहिं रुख ताकें ॥**

कोपभवनाचे नाव ऐकताच महाराज घाबरले. भयामुळे त्यांचा पाय उचलत नव्हता. प्रत्यक्ष देवराज इंद्र ज्यांच्या बाहुबलामध्ये वसतो, आणि संपूर्ण राजे लोक ज्यांचा कल पाहून वागतात, ॥ १ ॥

**सो सुनि तिय रिस गयउ सुखाई । देखहु काम प्रताप बड़ाई ॥**
**सूल कुलिस असि अँगवनिहारे । ते रतिनाथ सुमन सर मारे ॥**

तेच महाराज दशरथ स्त्रीचा क्रोध ऐकून सुकून गेले. कामदेवाचा प्रताप आणि महिमा तर पाहा. जे त्रिशूळ, वज्र, तलवार इत्यादींचे घाव अंगावर सहज झेलत, ते रतिनाथ कामदेवाच्या पुष्पबाणाला बळी पडले. ॥ २ ॥

**सभय नरेसु प्रिया पहिं गयऊ । देखि दसा दुखु दारुन भयऊ ॥**
**भूमि सयन पटु मोट पुराना । दिए डारि तन भूषन नाना ॥**

राजा घाबरलेल्या अवस्थेत आपली लाडकी राणी कैकेयी, हिच्याजवळ गेले. तिने जुने जाडेभरडे वस्त्र नेसले होते व शरीरावरील नाना दाग-दागिने फेकून दिले होते. ॥ ३ ॥

**कुमतिहि कसि कुबेषता फाबी । अनअहिवातु सूच जनु भाबी ॥**
**जाइ निकट नृपु कह मृदु बानी । प्रानप्रिया केहि हेतु रिसानी ॥**

त्या दुर्बुद्ध कैकेयीचा तो अभद्र वेष असा वाटत होता की, जणू भावी वैधव्य सूचित होत होते. राजे तिच्याजवळ जाऊन कोमल शब्दांत तिला म्हणाले, 'हे प्राणप्रिये, कशासाठी हा रुसवा?'॥ ४॥

**छं०—केहि हेतु रानि रिसानि परसत पानि पतिहि नेवारई।**
**मानहुँ सरोष भुअंग भामिनि बिषम भाँति निहारई॥**
**दोउ बासना रसना दसन बर मरम ठाहरु देखई।**
**तुलसी नृपति भवतब्यता बस काम कौतुक लेखई॥**

हे राणी, का रागावली आहेस?' असे म्हणत राजांनी तिला हाताने स्पर्श केला, तेव्हा तिने तो झटकून टाकला आणि क्रोधित नागिणीप्रमाणे क्रूर दृष्टीने ती त्यांच्याकडे पाहू लागली. दोन वरदानांची वासना म्हणजे त्या नागिणीच्या दोन जिभा होत्या आणि दोन वर म्हणजे दात होते. ती डसण्यासाठी मर्मस्थान पाहात होती. तुलसीदास म्हणतात, राजा दशरथ भवितव्याच्या अधीन झाल्यामुळे तिचे रागावणे व हात झटकणे ही जणू कामदेवाची क्रीडाच समजत होते.

**सो०—बार बार कह राउ सुमुखि सुलोचनि पिकबचनि।**
**कारन मोहि सुनाउ गजगामिनि निज कोप कर॥ २५॥**

राजा वारंवार म्हणत होते की, 'हे सुमुखी, हे सुलोचनी, हे कोकिलवचनी, हे गजगामिनी, मला आपल्या क्रोधाचे कारण तर सांग.॥ २५॥

**अनहित तोर प्रिया केइँ कीन्हा। केहि दुइ सिर केहि जमु चह लीन्हा॥**
**कहु केहि रंकहि करौं नरेसू। कहु केहि नृपहि निकासौं देसू॥**

हे प्रिये, कुणी तुझे वाईट केले आहे? कुणाला दोन डोकी आहेत? यमराज कोणाला आपल्या लोकी घेऊन जाऊ इच्छितो? सांग, कुणा कंगालाला राजा करू की कुणा राजाला देशातून निर्वासित करू?॥ १॥

**सकउँ तोर अरि अमरउ मारी। काह कीट बपुरे नर नारी॥**
**जानसि मोर सुभाउ बरोरू। मनु तव आनन चंद चकोरू॥**

तुझा शत्रू देवही असला, तरी मी त्याला मारू शकतो. मग बिचारे किड्यामुंगीसारखे नर-नारी ते काय? हे सुंदरी, तुला माझा स्वभाव ठाऊक आहे की, माझे मन सदा तुझ्या मुखरूपी चंद्रम्यासाठी चकोर आहे.॥ २॥

**प्रिया प्रान सुत सरबसु मोरें। परिजन प्रजा सकल बस तोरें॥**
**जौं कछु कहौं कपटु करि तोही। भामिनि राम सपथ सत मोही॥**

हे प्रिये, माझी प्रजा, कुटुंबीय, सर्व संपत्ती, पुत्र इतकेच काय, माझे प्राणसुद्धा तुझ्या अधीन आहेत. हे मी तुला खोटे सांगत असेन तर हे भामिनी, मला श्रीरामाची शंभरवेळा शपथ आहे. ॥ ३ ॥

**बिहसि मागु मनभावति बाता। भूषन सजहि मनोहर गाता॥**
**घरी कुघरी समुझि जियँ देखू। बेगि प्रिया परिहरहि कुबेषू॥**

तू हसून मला मनपसंत गोष्ट माग आणि आपली मनोहर अंगे अलंकारांनी सजव. वेळ-अवेळ याचा तरी विचार कर. हे प्रिये, पटकन हा अमंगळ वेष टाकून दे.' ॥ ४ ॥

**दो०—यह सुनि मन गुनि सपथ बड़ि बिहसि उठी मतिमंद।**
**भूषन सजति बिलोकि मृगु मनहुँ किरातिनि फंद॥ २६॥**

हे ऐकून आणि मनात रामाच्या शपथेचा विचार करून मंदबुद्धीची कैकेयी हसत-हसत उठली आणि दागिने घालू लागली. जणू मृगाला पाहून एखादी भिल्लीण फासा तयार करीत होती. ॥ २६ ॥

**पुनि कह राउ सुहृद जियँ जानी। प्रेम पुलकि मृदु मंजुल बानी॥**
**भामिनि भयउ तोर मन भावा। घर घर नगर अनंद बधावा॥**

राजा दशरथाला आपल्या मनात वाटले की, कैकेयी चांगल्या मनाची आहे. ते प्रेमाने पुलकित होऊन कोमल-सुंदर वाणीने म्हणाले की, 'हे भामिनी, तुझ्या मनाजोगते झाले. नगरातील घरोघरी आनंदाची वाद्ये वाजत आहेत. ॥ १ ॥

**रामहि देउँ कालि जुबराजू। सजहि सुलोचनि मंगल साजू॥**
**दलकि उठेउ सुनि हृदउ कठोरू। जनु छुइ गयउ पाक बरतोरू॥**

मी उद्याच श्रीरामाला युवराजपद देत आहे. म्हणून हे सुनयने, मंगल शृंगार कर.' हे ऐकताच तिचे कठोर हृदय विदीर्ण होऊ लागले. जणू पिकलेल्या फोडास धक्का लागला. ॥ २ ॥

**ऐसिउ पीर बिहसि तेहिं गोई। चोर नारि जिमि प्रगटि न रोई॥**
**लखहिं न भूप कपट चतुराई। कोटि कुटिल मनि गुरू पढ़ाई॥**

ज्याप्रमाणे चोराची बायको रहस्य उघडे पडू नये, म्हणून उघडपणे रडू शकत नाही, त्याप्रमाणे कैकेयीने ते प्रचंड दुःख हसून लपविले. राजांना तिचे कपट-चातुर्य दिसले नाही. कारण तिला कोटी कुटिलांची शिरोमणी असलेल्या मंथरेने पढवून ठेवले होते. ॥ ३ ॥

**जद्यपि नीति निपुन नरनाहू। नारिचरित जलनिधि अवगाहू॥**
**कपट सनेहु बढ़ाइ बहोरी। बोली बिहसि नयन मुहु मोरी॥**

जरी राजे नीति-निपुण होते, तरी स्त्री-चरित्र हे अगाध समुद्र असते. मग ती कपटी वरवरचे प्रेम दाखवत डोळे व तोंड वळवून हसत-हसत म्हणाली, ॥ ४ ॥

**दो०—मागु मागु पै कहहु पिय कबहुँ न देहु न लेहु।**
**देन कहेहु बरदान दुइ तेउ पावत संदेहु॥ २७॥**

‘हे प्रियतम, तुम्ही माग माग असे म्हणत तर असता, परंतु कधीही काही देत-घेत नाही. दोन वर द्यायचे कबूल केले होते, पण तेही मिळण्याची मारामार.॥ २७॥

**जानेउँ मरमु राउ हँसि कहई। तुम्हहि कोहाब परम प्रिय अहई॥**
**थाती राखि न मागिहु काऊ। बिसरि गयउ मोहि भोर सुभाऊ॥**

राजांनी हसून म्हटले की, ‘आता मला तुझा अर्थ समजला. तुझे रुसणेही मला खूप आवडते. तू ती वरांची ठेव पुन्हा कधी मागितली नाहीस आणि विसरणे हा माझा स्वभाव असल्यामुळे मला तो प्रसंग आठवला नाही.॥ १॥

**झूठेहुँ हमहि दोषु जनि देहू। दुइ कै चारि मागि मकु लेहू॥**
**रघुकुल रीति सदा चलि आई। प्रान जाहुँ बरु बचनु न जाई॥**

खोटेपणाचा दोष मला देऊ नकोस. हवे तर दोनच्या ऐवजी चार वर मागून घे. प्राण गेले तरी बेहत्तर, पण दिलेले वचन मोडता कामा नये, हीच परंपरा रघुकुलात नेहमी चालत आलेली आहे.॥ २॥

**नहिं असत्य सम पातक पुंजा। गिरि सम होहिं कि कोटिक गुंजा॥**
**सत्यमूल सब सुकृत सुहाए। बेद पुरान बिदित मनु गाए॥**

असत्यासारखी पापांची रास नाही. कोट्यवधी गुंजा जमा केल्या तरी कुठे डोंगराएवढ्या होतील काय? ‘सत्य’ हेच सर्व उत्तम पुण्यांचे मूळ आहे. वेद-पुराणांत ही गोष्ट प्रसिद्ध आहे आणि मनूनेसुद्धा हेच सांगितले आहे.॥ ३॥

**तेहि पर राम सपथ करि आई। सुकृत सनेह अवधि रघुराई॥**
**बात दृढ़ाइ कुमति हँसि बोली। कुमत कुबिहग कुलह जनु खोली॥**

त्याशिवाय श्रीरामाची शपथ माझ्या तोंडून निघाली आहे. श्रीरघुनाथ माझ्या सुकृताची व स्नेहाची परिसीमा आहे.’ अशा प्रकारे राजांकडून वदवून घेऊन दुर्बुद्धी कैकेयीने वचन पक्के करून घेतले. मग तिने बहिरी ससाण्याला सोडण्यासाठी त्याच्या डोळ्यांवरची टोपी काढली.॥ ४॥

**दो०—भूप मनोरथ सुभग बनु सुख सुबिहंग समाजु।**
**भिल्लिनि जिमि छाड़न चहति बचनु भयंकरु बाजु॥ २८॥**

राजांचे मनोरथ हे सुंदर वन होते, त्यांचे सुख म्हणजे सुंदर पक्ष्यांचा थवा होता. कैकेयी त्यावर भिल्लिणीप्रमाणे आपले वचनरूपी भयंकर ससाणा सोडू पाहात होती.॥ २८॥

## मासपारायण, तेरावा विश्राम

**सुनहु प्रानप्रिय भावत जी का। देहु एक बर भरतहि टीका॥**
**मागउँ दूसर बर कर जोरी। पुरवहु नाथ मनोरथ मोरी॥**

ती म्हणाली, 'हे प्राणप्रिय, ऐका तर. माझ्या मनाला आवडणारा एक वर असा द्या की, भरताला राजतिलक करा. आणि हे नाथ, दुसरा वरसुद्धा मी हात जोडून मागते. माझे मनोरथ पूर्ण करा.॥ १॥

**तापस बेष बिसेषि उदासी। चौदह बरिस रामु बनबासी॥**
**सुनि मृदु बचन भूप हियँ सोकू। ससि कर छुअत बिकल जिमि कोकू॥**

तपस्व्यांच्या वेषात अत्यंत उदासीन भावनेने विरक्त मुनींप्रमाणे रामाने चौदा वर्षे वनात राहावे.' कैकेयीचे हे (कपटपूर्ण) विनययुक्त बोलणे ऐकून चंद्र-किरणांच्या स्पर्शाने चक्रवाक पक्षी जसा व्याकूळ होऊन जातो, त्याप्रमाणे राजांच्या हृदयात शोक पसरला.॥ २॥

**गयउ सहमि नहिं कछु कहि आवा। जनु सचान बन झपटेउ लावा॥**
**बिबरन भयउ निपट नरपालू। दामिनि हनेउ मनहुँ तरु तालू॥**

महाराजांना एकदम धक्का बसला. त्यांना काही बोलता येईना. जणू ससाण्याने लावा पक्ष्यावर हल्ला केला होता, ताडवृक्षाला विजेने होरपळून टाकले होते, तीच अवस्था राजांची झाली.॥ ३॥

**माथें हाथ मूदि दोउ लोचन। तनु धरि सोचु लाग जनु सोचन॥**
**मोर मनोरथु सुरतरु फूला। फरत करिनि जिमि हतेउ समूला॥**

डोक्याला हात लावून व डोळे बंद करून राजे पश्चात्ताप करू लागले की, जणू प्रत्यक्ष पश्चात्तापच साकार बनून पश्चात्ताप करू लागला होता. ते विचार करू लागले की, 'हाय, माझे मनोरथरूपी कल्पवृक्ष फुलला होता, परंतु त्याला फळे लागताना कैकेयीरूपी हत्तिणीने मुळासकट उपटून तो नष्ट केला.॥ ४॥

**अवध उजारि कीन्हि कैकेईं। दीन्हिसि अचल बिपति कै नेईं॥**

कैकेयीने अयोध्येला उध्वस्त करून टाकले आणि विपत्तीचा पाया घातला.॥ ५॥

दो०—**कवनें अवसर का भयउ गयउँ नारि बिस्वास।**
**जोग सिद्धि फल समय जिमि जतिहि अबिद्या नास॥ २९॥**

कोणत्या क्षणी काय झाले! ज्याप्रमाणे योगाच्या सिद्धीचे फळ मिळताना अविद्या योग्याला नष्ट करते, त्याप्रमाणे स्त्रीवर विश्वास ठेवून मी ठार झालो.'॥ २९॥

**एहि बिधि राउ मनहिं मन झाँखा। देखि कुभाँति कुमति मन माखा॥**
**भरतु कि राउर पूत न होंही। आनेहु मोल बेसाहि कि मोही॥**

अशा प्रकारे राजा मनातल्या मनात कुढत होते. राजांची ती दुर्दशा पाहून दुष्ट कैकेयी मनातून फार क्रुद्ध झाली व म्हणाली, 'भरत तुमचा पुत्र नाही काय? तुम्ही मला पैसे देऊन विकत घेतले होते काय? मी तुमची लग्नाची बायको नाही काय?॥ १॥

**जो सुनि सरु अस लाग तुम्हारें। काहे न बोलहु बचनु सँभारें॥**
**देहु उतरु अनु करहु कि नाहीं। सत्यसंध तुम्ह रघुकुल माहीं॥**

माझे बोलणे ऐकताच जणू तुम्हांला बाण लागल्यागत झाले, तर तुम्ही विचार करून का बोलला नाहीत? बोला. होय म्हणा, नाहीतर नाही म्हणा. तुम्ही रघुवंशामध्ये सत्य प्रतिज्ञा करणारे म्हणून प्रसिद्ध आहात.॥ २॥

**देन कहेहु अब जनि बरु देहू। तजहु सत्य जग अपजसु लेहू॥**
**सत्य सराहि कहेहु बरु देना। जानेहु लेइहि मागि चबेना॥**

तुम्ही वर देतो, असे म्हणाला होता. आता हवे तर नाही म्हणा. सत्याला सोडचिठ्ठी द्या आणि जगात अपकीर्ती मिळवा. सत्याची मोठी वाखाणणी करीत वर देतो, असे म्हणाला होता. मी चणे-फुटाणे मागीन, असे तुम्हांला वाटले होते काय?॥ ३॥

**सिबि दधीचि बलि जो कछु भाषा। तनु धनु तजेउ बचन पनु राखा॥**
**अति कटु बचन कहति कैकेई। मानहुँ लोन जरे पर देई॥**

शिबी, दधीची आणि बली यांनी जे म्हटले ते त्यांनी शरीर व संपदा यांचा त्याग करून पूर्ण केले.' अशाप्रकारे जखमेवर मीठ चोळल्याप्रमाणे कैकेयी अत्यंत कटू शब्द बोलत होती.॥ ४॥

**दो०—धरम धुरंधर धीर धरि नयन उघारे रायँ।**
**सिरु धुनि लीन्हि उसास असि मारेसि मोहि कुठायँ॥ ३०॥**

धर्मधुरंधर राजा दशरथांनी मोठ्या धैर्याने डोळे उघडले. डोके बडवून विलाप करीत आणि जोराने सुस्कारे टाकीत ते म्हणाले की, 'हिने माझ्या वर्मावर घाव घातला. यातून वाचणे कठीण आहे.'॥ ३०॥

**आगें दीखि जरत रिस भारी। मनहुँ रोष तरवारि उघारी॥**
**मूठि कुबुद्धि धार निठुराई। धरी कूबरीं सान बनाई॥**

जणू क्रोधरूपी नंगी तलवार उभी असावी, तशी प्रचंड क्रोधाने पेटलेली ती समोर दिसली. कुबुद्धी ही त्या तलवारीची मूठ होती, निष्ठुरता धार होती आणि त्या कुबड्या मंथरारूपी निशाण्यावर घासून ती तीक्ष्ण बनली होती.॥ १॥

**लखी महीप कराल कठोरा । सत्य कि जीवनु लेइहि मोरा॥**
**बोले राउ कठिन करि छाती । बानी सबिनय तासु सोहाती॥**

राजांनी पाहिले की, ही तलवार फारच भयानक आणि कठोर आहे. ते विचार करू लागले की, खरेच ही माझा जीव घेईल काय? त्यांनी आपले मन घट्ट करून, अत्यंत नम्रपणे कैकेयीला गोड वाटेल अशा वाणीने म्हटले,॥ २॥

**प्रिया बचन कस कहसि कुभाँती । भीर प्रतीति प्रीति करि हाँती॥**
**मोरें भरतु रामु दुइ आँखी । सत्य कहउँ करि संकरु साखी॥**

'हे प्रिये, हे भीरू, विश्वास व प्रेम नष्ट करून तू अशी दुष्ट वचने का बोलतेस? भरत व राम हे दोघे माझे दोन डोळे आहेत, हे शंकरांच्या साक्षीने मी सत्य सांगतो.॥ ३॥

**अवसि दूतु मैं पठइब प्राता । ऐहहिं बेगि सुनत दोउ भ्राता॥**
**सुदिन सोधि सबु साजु सजाई । देउँ भरत कहुँ राजु बजाई॥**

मी उद्या सकाळीच नक्की दूत पाठवितो. भरत व शत्रुघ्न हे दोघे भाऊ निरोप मिळताच लगेच येतील. चांगला दिवस शोधून मी सर्व तयारी करून, नगारे वाजवून भरताला राज्य देईन.॥ ४॥

दो०—**लोभु न रामहि राजु कर बहुत भरत पर प्रीति।**
**मैं बड़ छोट बिचारि जियँ करत रहेउँ नृपनीति॥ ३१॥**

रामाला राज्याचा लोभ नाही आणि भरतावर त्याचे फार प्रेम आहे. मीच माझ्या मनाने लहान-मोठ्याचा विचार करून राजनीतीला अनुसरून थोरल्याला राजतिलक करायला निघालो होतो.॥ ३१॥

**राम सपथ सत कहउँ सुभाऊ । राममातु कछु कहेउ न काऊ॥**
**मैं सबु कीन्ह तोहि बिनु पूँछें । तेहि तें परेउ मनोरथु छूछें॥**

मी श्रीरामाची शंभर वेळा शपथ घेऊन प्रामाणिकपणे सांगतो की, या बाबतीत कौसल्येने मला काहीही सांगितले नव्हते. मी तुला न विचारता सर्व केले, हे खरे. त्यामुळेच माझे मनोरथ व्यर्थ ठरले.॥ १॥

**रिस परिहरु अब मंगल साजू । कछु दिन गएँ भरत जुबराजू॥**
**एकहि बात मोहि दुखु लागा । बर दूसर असमंजस मागा॥**

आता राग सोडून दे आणि मंगल शृंगार कर. लवकरच भरत युवराज होईल. तू दुसरा जो वर मागितलास तो अडचणीचा आहे. त्याचे मला दु:ख वाटत आहे.॥ २॥

**अजहूँ हृदउ जरत तेहि आँचा। रिस परिहास कि साँचेहुँ साँचा॥**
**कहु तजि रोषु राम अपराधू। सबु कोउ कहइ रामु सुठि साधू॥**

त्याच्या धगीमुळे माझे हृदय जळत आहे. हे तू थट्टेने, रागाने की खरोखरच म्हणत आहेस? हा राग सोडून रामाचा काय अपराध आहे, ते तरी सांग. सर्वजण म्हणतात की, राम हा फार साधु-वृत्तीचा आहे.॥ ३॥

**तुहूँ सराहसि करसि सनेहू। अब सुनि मोहि भयउ संदेहू॥**
**जासु सुभाउ अरिहि अनुकूला। सो किमि करिहि मातु प्रतिकूला॥**

तू स्वतःसुद्धा रामाची प्रशंसा करीत होतीस आणि त्याच्यावर प्रेम करीत होतीस. आता मात्र हे ऐकून मला संशय वाटू लागला आहे. ज्याचा स्वभाव शत्रूलासुद्धा अनुकूल वाटतो, तो मातेला प्रतिकूल असे आचरण का करील?॥ ४॥

दो०—**प्रिया हास रिस परिहरहि मागु बिचारि बिबेकु।**
**जेहिं देखौं अब नयन भरि भरत राज अभिषेकु॥ ३२॥**

हे प्रिये, हा जीवघेणा विनोद व क्रोध सोडून दे आणि विवेकयुक्त विचार करून वर माग. आता मला डोळे भरून भरताचा राज्याभिषेक पाहू दे.॥ ३२॥

**जिऐ मीन बरु बारि बिहीना। मनि बिनु फनिकु जिऐ दुख दीना॥**
**कहउँ सुभाउ न छलु मन माहीं। जीवनु मोर राम बिनु नाहीं॥**

कदाचित मासोळी पाण्याविना जिवंत राहील आणि साप मण्याविना दीनवाणा बनून जिवंत राहील, परंतु मी प्रामाणिकपणे सांगतो, मनात कोणतेही कपट न ठेवता सांगतो की, माझे जीवन रामाविना नाही.॥ १॥

**समुझि देखु जियँ प्रिया प्रबीना। जीवनु राम दरस आधीना॥**
**सुनि मृदु बचन कुमति अति जरई। मनहुँ अनल आहुति घृत परई॥**

हे चतुर प्रिये, मनापासून समजून घे. माझे जीवन श्रीरामाच्या दर्शनावर अवलंबून आहे.' राजांचे हे कोमल वचन ऐकून दुर्बुद्धी कैकेयी अत्यंत जळफळत होती. जणू अग्नीमध्ये तुपाच्या आहुती पडत होत्या.॥ २॥

**कहइ करहु किन कोटि उपाया। इहाँ न लागिहि राउरि माया॥**
**देहु कि लेहु अजसु करि नाहीं। मोहि न बहुत प्रपंच सोहाहीं॥**

कैकेयी म्हणाली की, 'तुम्ही कोटी उपाय कराना का, येथे तुमचा कावेबाजपणा चालणार नाही. एक तर मी मागितले आहे ते द्या किंवा नाही म्हणून अपकीर्ती घ्या. मला उगीच भांडण-तंटा आवडत नाही.॥ ३॥

**रामु साधु तुम्ह साधु सयाने। राममातु भलि सब पहिचाने॥**
**जस कौसिलाँ मोर भल ताका। तस फलु उन्हहि देउँ करि साका॥**

राम हा साधू आहे, तुम्ही ज्ञानी साधू आहात आणि रामाची आईसुद्धा कमी साधू नाही. मी सर्वांना चांगली ओळखून आहे. कौसल्येने माझे भले होण्याची इच्छा धरली होती. आता मी सुद्धा तिला आठवण राहील, असे फळ देईन.॥ ४॥

दो०—**होत प्रातु मुनिबेष धरि जौं न रामु बन जाहिं।**
**मोर मरनु राउर अजस नृप समुझिअ मन माहिं॥ ३३॥**

सकाळ होताच मुनीचा वेष धारण करून जर राम वनास गेला नाही, तर हे राजा, पक्के लक्षात ठेवा की, माझा मृत्यू होईल व तुमची अपकीर्ती.'॥ ३३॥

**अस कहि कुटिल भई उठि ठाढ़ी। मानहुँ रोष तरंगिनि बाढ़ी॥**
**पाप पहार प्रगट भइ सोई। भरी क्रोध जल जाइ न जोई॥**

असे म्हणून कुटिल कैकेयी उठून उभी राहिली. जणू क्रोधाची नदी उफाळून आली असावी. ती पापाच्या पहाडातून निघाली होती आणि क्रोधरूपी भयंकर पाण्याने भरलेली होती. त्यामुळे तिच्याकडे पाहावत नव्हते.॥ १॥

**दोउ बर कूल कठिन हठ धारा। भवँर कूबरी बचन प्रचारा॥**
**ढाहत भूपरूप तरु मूला। चली बिपति बारिधि अनुकूला॥**

दोन वर हे त्या नदीचे दोन तट होते, कैकेयीचा हट्ट तिचा प्रचंड प्रवाह होता आणि कुबडीचे सांगणे त्यामधील भोवरे होते. ती क्रोधाची नदी राजा दशरथरूपी वृक्षाला मुळासह उपटून विपत्तिरूपी समुद्राकडे धावत होती.॥ २॥

**लखी नरेस बात फुरि साँची। तिय मिस मीचु सीस पर नाची॥**
**गहि पद बिनय कीन्ह बैठारी। जनि दिनकर कुल होसि कुठारी॥**

राजांनी जाणले की, हे सर्व सत्य आहे. स्त्रीच्या निमित्ताने माझा मृत्यूच माझ्या शिरावर नाचत आहे. राजांनी कैकेयीचे पाय धरून तिला बसविले आणि विनंती केली की, 'तू सूर्यकुलरूपी वृक्षासाठी कुऱ्हाड बनू नकोस.॥ ३॥

**मागु माथ अबहीं देउँ तोही। राम बिरहँ जनि मारसि मोही॥**
**राखु राम कहुँ जेहि तेहि भाँती। नाहिं त जरिहि जनम भरि छाती॥**

तू माझे मस्तक माग, मी ते आत्ता उतरून देतो, परंतु रामाच्या विरहाने मला मारू नकोस. कसेही करून तू रामाला ठेवून घे. नाहीतर जन्मभर तुझे हृदय जळत राहील.'॥ ४॥

दो०—**देखी ब्याधि असाध नृपु परेउ धरनि धुनि माथ।**
**कहत परम आरत बचन राम राम रघुनाथ॥ ३४॥**

राजांनी पाहिले की, रोग असाध्य आहे, तेव्हा ते अत्यंत आर्तवाणीने 'हाय राम, हाय राम, हाय रघुनाथ' असे म्हणत व डोके आपटून घेत जमिनीवर कोसळले.॥ ३४॥

**ब्याकुल राउ सिथिल सब गाता। करिनि कलपतरु मनहुँ निपाता॥**
**कंठु सूख मुख आव न बानी। जनु पाठीनु दीन बिनु पानी॥**

राजा व्याकूळ झाले होते. त्यांच्या संपूर्ण शरीरातील त्राणच गेले होते. हत्तिणीने जणू कल्पवृक्ष उपटून टाकला होता. कंठ सुकून गेला होता, तोंडातून शब्द निघत नव्हता, जणू पाण्याविना पहिना नावाची मासोळी तडफडत होती.॥ १॥

**पुनि कह कटु कठोर कैकेई। मनहुँ घाय महुँ माहुर देई॥**
**जौं अंतहुँ अस करतबु रहेऊ। मागु मागु तुम्ह केहिं बल कहेऊ॥**

कैकेयी पुन्हा कटू व कठोर बोलली. जणू जखमेवर विष चोळत होती. ती म्हणाली, 'शेवटी जर असे करायचे होते, तर तुम्ही कोणत्या जोरावर 'माग, माग,' असे म्हणत होता?॥ २॥

**दुइ कि होइ एक समय भुआला। हँसब ठठाइ फुलाउब गाला॥**
**दानि कहाउब अरु कृपनाई। होइ कि खेम कुसल रौताई॥**

हे राजा, खदखदून हसणे आणि गाल फुगविणे या दोन्ही गोष्टी एकाच वेळी होतात काय? दानीही म्हणवायचे आणि कंजूषपणाही करायचा. राजपूतपणात खुशाली कधी असते काय? लढाईत बहादुरी दाखवावी आणि कुठे प्रहारही लागायचा नाही, असे कसे घडेल?॥ ३॥

**छाड़हु बचनु कि धीरजु धरहू। जनि अबला जिमि करुना करहू॥**
**तनु तिय तनय धामु धनु धरनी। सत्यसंध कहुँ तृन सम बरनी॥**

एक तर प्रतिज्ञा सोडून द्या किंवा धीर धरा. असे अबलेप्रमाणे रडत व डोके आपटत बसू नका. सत्यव्रती पुरुषाला शरीर, स्त्री, पुत्र, घर, धन आणि पृथ्वी हे सर्व गवताच्या काडीप्रमाणे तुच्छ आहे, असे म्हटले जाते.'॥ ४॥

दो०—**मरम बचन सुनि राउ कह कहु कछु दोषु न तोर।**
**लागेउ तोहि पिसाच जिमि कालु कहावत मोर॥ ३५॥**

कैकेयीचे मर्मभेदी शब्द ऐकून राजे म्हणाले, 'तू तुला हवे ते म्हण, तुझा काही दोष नाही. माझा मृत्यू पिशाच होऊन तुझ्यात शिरला आहे. तोच तुझा बोलविता धनी आहे.॥ ३५॥

**चहत न भरत भूपतहि भोरें। बिधि बस कुमति बसी जिय तोरें॥**
**सो सबु मोर पाप परिनामू। भयउ कुठाहर जेहिं बिधि बामू॥**

भरताला चुकूनही राजपदाची इच्छा नाही. दुर्दैवाने तुझ्याच मनात दुर्बुद्धी आली आहे. हे सर्व माझ्या पापांचे फळ होय. त्यामुळे विधाता अवेळी प्रतिकूल झाला आहे. ॥ १ ॥

**सुबस बसिहि फिरि अवधसुहाई । सब गुन धाम राम प्रभुताई ॥**
**करिहहिं भाइ सकल सेवकाई । होइहि तिहुँ पुर राम बड़ाई ॥**

तू उध्वस्त केलेली ही सुंदर अयोध्या पुन्हा व्यवस्थितपणे वसेल आणि समस्त गुणांची खाण असलेल्या श्रीरामाची सत्तासुद्धा प्रस्थापित होईल. सर्व भाऊ त्याची सेवा करतील आणि त्रैलोक्यात त्याची महत्ता वाढेल. ॥ २ ॥

**तोर कलंकु मोर पछिताऊ । मुएहुँ न मिटिहि न जाइहि काऊ ॥**
**अब तोहि नीक लाग करु सोई । लोचन ओट बैठु मुहु गोई ॥**

फक्त तुझ्यावरील कलंक व माझा पश्चात्ताप मेल्यानेही नाहीसा होणार नाही. तो कशाही प्रकारे जाणार नाही. आता तुला बरे वाटेल ते कर. तोंड लपवून माझ्या डोळ्याआड बैस. मला तोंड दाखवू नकोस. ॥ ३ ॥

**जब लगि जिऔं कहउँ कर जोरी । तब लगि जनि कछु कहसि बहोरी ॥**
**फिरि पछितैहसि अंत अभागी । मारसि गाइ नहारू लागी ॥**

मी हात जोडून सांगतो की, जोपर्यंत मी जिवंत आहे, तोपर्यंत आता आणखी काही बोलू नकोस. अग अभागिनी! शेवटी तुला पश्चात्ताप करावा लागणार. कारण चमड्याची वादी बनविण्यासाठी तू गोहत्या करीत आहेस.' ॥ ४ ॥

दो०—**परेउ राउ कहि कोटि बिधि काहे करसि निदानु ।**
**कपट सयानि न कहति कछु जागति मनहुँ मसानु ॥ ३६ ॥**

राजे अनेक प्रकारे समजावून म्हणाले, 'तू हा सर्वनाश का करीत आहेस?' आणि ते जमिनीवर कोसळले. परंतु कपट करण्यात चतुर कैकेयी काही बोलली नाही. जणू ती स्मशानात मौन बसून प्रेत-मंत्र सिद्ध करीत होती. ॥ ३६ ॥

**राम राम रट बिकल भुआलू । जनु बिनु पंख बिहंग बेहालू ॥**
**हृदयँ मनाव भोरु जनि होई । रामहि जाइ कहै जनि कोई ॥**

राजा 'राम-राम' असे घोकत होते व पंख कापलेल्या पक्ष्याप्रमाणे व्याकूळ झाले होते. त्यांना वाटत होते की, सकाळ होऊ नये आणि कुणी जाऊन श्रीरामांना ही गोष्ट सांगू नये. ॥ १ ॥

**उदउ करहु जनि रबि रघुकुल गुर । अवध बिलोकि सूल होइहि उर ॥**
**भूप प्रीति कैकइ कठिनाई । उभय अवधि बिधि रची बनाई ॥**

'हे रघुकुलाचे मूळपुरुष सूर्य नारायणा, तुम्ही उद्या उगवू नका. अयोध्या व्याकूळ झालेली पाहून तुम्हांला फार दुःख होईल.' राजांचे प्रेम आणि कैकेयीची निष्ठुरता ही दोन्ही विधात्याने दोन टोकाची निर्मिली होती. ॥ २ ॥

**बिलपत नृपहि भयउ भिनुसारा। बीना बेनु संख धुनि द्वारा॥**
**पढ़हिं भाट गुन गावहिं गायक। सुनत नृपहि जनु लागहिं सायक॥**

विलाप करता करता सकाळ झाली. राजद्वारात वीणा, बासरी आणि शंख यांचे आवाज येऊ लागले. भाट बिरुदावली म्हणू लागले आणि गवई गुण-गान करू लागले. ते ऐकून राजांच्या हृदयात बाण रुतल्यासारखे वाटत होते. ॥ ३ ॥

**मंगल सकल सोहाहिं न कैसें। सहगामिनिहि बिभूषन जैसें॥**
**तेहि निसि नीद परी नहिं काहू। राम दरस लालसा उछाहू॥**

ज्याप्रमाणे पतीबरोबर सती व्हायला निघालेल्या स्त्रीला आभूषणे आवडत नाहीत, त्याप्रमाणे राजाला ही मंगलवाद्ये आवडत नव्हती. श्रीरामचंद्रांच्या दर्शनाची लालसा आणि उत्साह यांमुळे त्या रात्री कुणालाच झोप आली नाही. ॥ ४ ॥

दो०—**द्वार भीर सेवक सचिव कहहिं उदित रबि देखि।**
**जागेउ अजहुँ न अवधपति कारनु कवनु बिसेषि॥ ३७॥**

राजद्वारावर मंत्री व सेवकांची गर्दी झाली. सूर्य उगवलेला पाहून ते म्हणाले की, 'असे काय कारण घडले की, अयोध्यापती दशरथ अद्याप जागे झाले नाहीत? ॥ ३७ ॥

**पछिले पहर भूपु नित जागा। आजु हमहि बड़ अचरजु लागा॥**
**जाहु सुमंत्र जगावहु जाई। कीजिअ काजु रजायसु पाई॥**

महाराज नेहमी रात्रींच्या शेवटच्या प्रहरी जागे होत असतात. परंतु आज आम्हांला आश्चर्य वाटते. हे सुमंत्रा, तुम्ही जाऊन राजांना जागे करा. त्यांची आज्ञा मिळताच आम्ही सर्व कामाला लागू.' ॥ १ ॥

**गए सुमंत्रु तब राउर माहीं। देखि भयावन जात डेराहीं॥**
**धाइ खाइ जनु जाइ न हेरा। मानहुँ बिपति बिषाद बसेरा॥**

तेव्हा सुमंत्र राजमहालात गेले, परंतु महाल भयानक दिसू लागला, तेव्हा आत शिरताना त्यांना भय वाटू लागले. वाटत होते की, जणू कोणी भूत समोर असून ते धावत येऊन कापून खाईल. परंतु ते दिसत नव्हते. जणू विपत्ती व विषाद यांनी तेथे मुक्काम ठोकला होता. ॥ २ ॥

**पूछें कोउ न ऊतरु देई। गए जेहिं भवन भूप कैकेई॥**
**कहि जयजीव बैठ सिरु नाई। देखि भूप गति गयउ सुखाई॥**

विचारल्यावर कोणी बोलत नव्हते. सुमंत्र जेथे राजा व कैकेयी ही दोघे होती, त्या महालात शिरले. 'जय जीव' म्हणून त्यांनी मस्तक लववून अभिवादन केले व बसले. राजांची अवस्था पाहून ते गर्भगळित झाले. ॥ ३ ॥

**सोच बिकल बिबरन महि परेऊ। मानहुँ कमल मूलु परिहरेऊ॥**
**सचिउ सभीत सकइ नहिं पूँछी। बोली असुभ भरी सुभ छूँछी॥**

त्यांना दिसले की, महाराज काळजीने व्याकूळ झाले आहेत. त्यांचा चेहरा पडला आहे. एखादे कमळ मुळापासून उपटून कोमजलेल्या अवस्थेत पडलेले असावे, तसे राजे जमिनीवर पडले होते. तेव्हा अशुभपूर्ण आणि शुभाचा लवलेश नसलेल्या वाणीने कैकेयी म्हणाली, ॥ ४ ॥

दो०—**परी न राजहि नीद निसि हेतु जान जगदीसु।**
**रामु रामु रटि भोरु किय कहइ न मरमु महीसु॥ ३८॥**

'राजांना रात्रभर झोप आली नाही. कारण काय ते परमेश्वराला माहीत. यांनी 'राम राम' असे म्हणत सकाळ झाल्याचे सूचित केले, परंतु याचे रहस्य महाराज काहीही सांगत नाहीत. ॥ ३८ ॥

**आनहु रामहि बेगि बोलाई। समाचार तब पूँछेहु आई॥**
**चलेउ सुमंत्रु राय रुख जानी। लखी कुचालि कीन्हि कछु रानी॥**

तुम्ही त्वरित रामाला बोलावून आणा आणि मग खुशाली विचारा.' राजांचा कल पाहून सुमंत्र निघाले. राणीने काही दुष्ट चाल खेळली आहे, हे त्यांनी ओळखले. ॥ १ ॥

**सोच बिकल मग परइ न पाऊ। रामहि बोलि कहिहि का राऊ॥**
**उर धरि धीरजु गयउ दुआरें। पूँछहिं सकल देखि मनु मारें॥**

सुमंत्र काळजीने व्याकूळ झाले. वाटेत पाय धडपणे पडत नव्हते. ते विचार करू लागले की 'श्रीरामांना बोलावून राजे काय सांगतील?' मन घट्ट करून ते राजद्वारी आले. त्यांना उदास झालेले पाहून लोक विचारू लागले. ॥ २ ॥

**समाधानु करि सो सबही का। गयउ जहाँ दिनकर कुल टीका॥**
**राम सुमंत्रहि आवत देखा। आदरु कीन्ह पिता सम लेखा॥**

सर्व लोकांना समजावून सांगत सुमंत्र सूर्यकुलाचे तिलक श्रीरामचंद्र यांच्याकडे गेले. श्रीरामांनी सुमंत्रांना येताना पाहून पित्यासमान मानून त्यांना सन्मान दिला. ॥ ३ ॥

**निरखि बदनु कहि भूप रजाई। रघुकुलदीपहि चलेउ लेवाई॥**
**रामु कुभाँति सचिव सँग जाहीं। देखि लोग जहँ तहँ बिलखाहीं॥**

श्रीरामांच्या मुखाकडे पाहात राजांची आज्ञा सांगून सुमंत्र रघुकुलदीपक श्रीरामचंद्रांना आपल्याबरोबर घेऊन निघाले. ते सुमंत्राबरोबर लवाजम्याशिवाय जात असल्याचे पाहून जिकडे तिकडे लोक खिन्न होऊ लागले. ॥ ४ ॥

**दो०—जाइ दीख रघुबंसमनि नरपति निपट कुसाजु।**
**सहमि परेउ लखि सिंघिनिहि मनहुँ बृद्ध गजराजु॥ ३९॥**

रघुवंशमणी श्रीरामचंद्रांनी जाऊन पाहिले तर ज्याप्रमाणे सिंहिणीला पाहून एखादा म्हातारा हत्ती घाबरून पडला असावा, तसे महाराज वाईट अवस्थेत पडले होते.॥ ३९॥

**सूखहिं अधर जरइ सबु अंगू। मनहुँ दीन मनिहीन भुअंगू॥**
**सरुष समीप दीखि कैकेई। मानहुँ मीचु घरीं गनि लेई॥**

राजांचे ओठ सुकून गेले होते आणि संपूर्ण शरीर पोळून निघत होते. मण्याविना साप दुःखी व असहाय्य होतो, तसे राजे दिसत होते. जवळच रागाने जळफळत असलेल्या कैकेयीला त्यांनी पाहिले. जणू प्रत्यक्ष मृत्यूच जवळ बसून राजांच्या अंतिम काळाचे क्षण मोजत होता.॥ १॥

**करुनामय मृदु राम सुभाऊ। प्रथम दीख दुखु सुना न काऊ॥**
**तदपि धीर धरि समउ बिचारी। पूँछी मधुर बचन महतारी॥**

श्रीरामचंद्रांचा स्वभाव अत्यंत कोमल व करुणामय होता. त्यांनी आपल्या जीवनात प्रथमतःच हे दुःख पाहिले. यापूर्वी कधी त्यांनी दुःख ऐकलेसुद्धा नव्हते. तरीही प्रसंग पाहून मनात धीर धरून त्यांनी गोड शब्दांत कैकेयी मातेस विचारले,॥ २॥

**मोहि कहु मातु तात दुख कारन। करिअ जतन जेहिं होइ निवारन॥**
**सुनहु राम सबु कारनु एहू। राजहि तुम्ह पर बहुत सनेहू॥**

'हे माते, मला बाबांच्या दुःखाचे कारण सांग, म्हणजे ते दूर करण्याचा मला प्रयत्न करता येईल.' कैकेयी म्हणाली, 'हे रामा, ऐक. राजांचे तुझ्यावर अत्यंत प्रेम आहे, हेच मुख्य कारण आहे.॥ ३॥

**देन कहेन्हि मोहि दुइ बरदाना। मागेउँ जो कछु मोहि सोहाना॥**
**सो सुनि भयउ भूप उर सोचू। छाड़ि न सकहिं तुम्हार सँकोचू॥**

यांनी मला दोन वर दिले होते. मला जे बरे वाटले, ते मी मागितले. ते ऐकून राजे काळजीत पडले, कारण हे तुझा मोह सोडू शकत नाहीत.॥ ४॥

**दो०—सुत सनेहु इत बचनु उत संकट परेउ नरेसु।**
**सकहु त आयसु धरहु सिर मेटहु कठिन कलेसु॥ ४०॥**

एकीकडे पुत्र-प्रेम आणि दुसरीकडे प्रतिज्ञा. राजे याच धर्मसंकटात पडले आहेत. जर तुला शक्य असेल, तर राजांची आज्ञा शिरोधार्य मानून यांच्या कठीण यातना दूर कर.'॥ ४०॥

**निधरक बैठि कहइ कटु बानी । सुनत कठिनता अति अकुलानी ॥**
**जीभ कमान बचन सर नाना । मनहुँ महिप मृदु लच्छ समाना ॥**

कैकेयी बेधडकपणे अशी कटू वाणी बोलत होती. ती ऐकून प्रत्यक्ष निष्ठुरतासुद्धा फार व्याकूळ झाली. तिची जीभ ही धनुष्य आहे, शब्द हे पुष्कळसे बाण आहेत आणि जणू राजा हेच कोमल लक्ष्य आहे. ॥ १ ॥

**जनु कठोरपनु धरें सरीरू । सिखइ धनुषबिद्या बर बीरू ॥**
**सबु प्रसंगु रघुपतिहि सुनाई । बैठि मनहुँ तनु धरि निठुराई ॥**

या सर्व सरंजामासह जणू प्रत्यक्ष कठोरपणा उत्कृष्ट वीराचे रूप घेऊन धनुष्य-विद्या शिकत होता. श्रीरघुनाथांना सर्व हकीगत सांगून ती खाली बसली. जणू निष्ठुरता हीच देह धारण करून बसली असावी. ॥ २ ॥

**मन मुसुकाइ भानुकुल भानू । रामु सहज आनंद निधानू ॥**
**बोले बचन बिगत सब दूषन । मृदु मंजुल जनु बाग बिभूषन ॥**

सूर्यकुलाचे सूर्य, स्वभावतःच आनंदनिधान असलेले श्रीराम मनातून हसले व सर्व दूषणरहित कोमल आणि सुंदर वचन बोलले, जणू ते वाणीचे भूषणच होते. ॥ ३ ॥

**सुनु जननी सोइ सुतु बड़भागी । जो पितु मातु बचन अनुरागी ॥**
**तनय मातु पितु तोषनिहारा । दुर्लभ जननि सकल संसारा ॥**

‘हे माते, तोच पुत्र भाग्यशाली असतो, जो माता-पित्यांच्या वचनांचे पालन करतो. हे माते, आज्ञा-पालन करून माता-पित्यांना संतुष्ट करणारा पुत्र जगात दुर्लभ असतो. ॥ ४ ॥

**दो०—मुनिगन मिलनु बिसेषि बन सबहि भाँति हित मोर।**
**तेहि महँ पितु आयसु बहुरि संमत जननी तोर॥ ४१ ॥**

वनात गेल्यामुळे खास करून मुनींच्या भेटी होतील. त्यात सर्वप्रकारे माझेच कल्याण आहे. त्यातही वडिलांची आज्ञा आणि माते, तुमची संमती आहे, ॥ ४१ ॥

**भरतु प्रानप्रिय पावहिं राजू । बिधि सब बिधि मोहि सनमुख आजू ॥**
**जौं न जाउँ बन ऐसेहु काजा । प्रथम गनिअ मोहि मूढ़ समाजा ॥**

आणि प्राणप्रिय भरताला राज्य मिळेल. हे पाहून मला वाटते की, आज दैव सर्व प्रकारे मला अनुकूल आहे. जर अशा कामासाठी मी वनात गेलो नाही, तर मूर्खांमध्ये माझा क्रम पहिला येईल. ॥ १ ॥

**सेवहिं अरँडु कलपतरुत्यागी । परिहरि अमृत लेहिं बिषु मागी ॥**
**तेउ न पाइ अस समउ चुकाहीं । देखु बिचारि मातु मन माहीं ॥**

हे माते, विचार करून बघ की, जे कल्पवृक्ष सोडून एरंडाची सेवा करतात आणि अमृत टाकून विष मागतात, ते महामूर्खसुद्धा अशी संधी मिळाल्यावर ती सोडणार नाहीत. ॥ २ ॥

**अंब एक दुखु मोहि बिसेषी । निपट बिकल नरनायकु देखी ॥**
**थोरिहिं बात पितहि दुख भारी । होति प्रतीति न मोहि महतारी ॥**

आई, मला फार दुःख वाटते ते महाराजांना अत्यंत व्याकूळ झाल्याचे पाहून. एवढ्या लहानशा गोष्टीसाठी बाबांना इतके मोठे दुःख वाटावे, यावर माझा विश्वास बसत नाही. ॥ ३ ॥

**राउ धीर गुन उदधि अगाधू । भा मोहि तें कछु बड़ अपराधू ॥**
**जातें मोहि न कहत कछु राऊ । मोरि सपथ तोहि कहु सति भाऊ ॥**

कारण महाराज हे तर मोठे धैर्यशील व गुणसागर आहेत. नक्कीच माझ्याकडून एखादा मोठा अपराध घडला आहे. त्यामुळे महाराज माझ्याशी काही बोलत नाहीत. माते, तुला माझी शपथ, तू खरे खरे सांग.' ॥ ४ ॥

दो०—**सहज सरल रघुबर बचन कुमति कुटिल करि जान।**
**चलइ जोंक जल बक्रगति जद्यपि सलिलु समान॥ ४२ ॥**

रघुकुलश्रेष्ठ श्रीरामचंद्रांच्या स्वाभाविक सरळ बोलण्याला दुर्बुद्धी कैकेयी उलटच समजत होती. जरी पाणी हे समानच असते, तरी जळू त्यात वाकड्या चालीनेच चालते. ॥ ४२ ॥

**रहसी रानि राम रुख पाई । बोली कपट सनेहु जनाई ॥**
**सपथ तुम्हार भरत कै आना । हेतु न दूसर मैं कछु जाना ॥**

श्रीरामचंद्राची मनोभूमिका पाहून राणी कैकेयी आनंदित झाली आणि कपटी प्रेम दाखवीत म्हणाली, 'तुझी व भरताची शपथ. मला राजांच्या दुःखाचे दुसरे कोणतेही कारण माहीत नाही. ॥ १ ॥

**तुम्ह अपराध जोगु नहिं ताता । जननी जनक बंधु सुखदाता ॥**
**राम सत्य सबु जो कछु कहहू । तुम्ह पितु मातु बचन रत अहहू ॥**

बाळ! तू अपराध करणारा नाहीस. तू माता-पिता आणि भाऊ यांना सुख देणारा आहेस. हे रामा, तू जे काही म्हणत आहेस, ते सत्य आहे. तू माता-पित्यांच्या आज्ञेचे पालन करण्यात तत्पर आहेस. ॥ २ ॥

**पितहि बुझाइ कहहु बलि सोई । चौथेंपन जेहिं अजसु न होई ॥**
**तुम्ह सम सुअन सुकृत जेहिं दीन्हे । उचित न तासु निरादरु कीन्हे ॥**

मी तुझ्यावरून जीव ओवाळून टाकते. हीच गोष्ट तू बाबांना समजावून सांग. त्यामुळे म्हातारपणी त्यांची अपकीर्ती न होवो. ज्या पुण्याईमुळे यांना तुझ्यासारखा पुत्र लाभला, तिचा अवमान करणे योग्य नव्हे. ॥ ३ ॥

**लागहिं कुमुख बचन सुभ कैसे। मगहँ गयादिक तीरथ जैसे॥**
**रामहि मातु बचन सब भाए। जिमि सुरसरि गत सलिल सुहाए॥**

मगध देशात गया इत्यादी तीर्थे असल्याप्रमाणे कैकेयीच्या दुष्ट मुखात हे सुंदर वचन वाटत होते. श्रीरामचंद्रांना कैकेयीचे बोलणे असे चांगले वाटले की, गंगेमध्ये बरे-वाईट कोणतेही पाणी मिळाल्यावर ते पवित्र बनते.॥ ४॥

**दो०—गइ मुरुछा रामहि सुमिरि नृप फिरि करवट लीन्ह।**
**सचिव राम आगमन कहि बिनय समय सम कीन्ह॥ ४३॥**

इतक्यात राजांची मूर्च्छा दूर झाली. 'राम-राम' म्हणून ते कुशीवर वळले. मंत्र्यांनी श्रीराम आल्याची वार्ता त्यांना सांगितली.॥ ४३॥

**अवनिप अकनि रामु पगु धारे। धरि धीरजु तब नयन उघारे॥**
**सचिव सँभारि राउ बैठारे। चरन परत नृप रामु निहारे॥**

श्रीराम आल्याचे ऐकताच राजांनी धीर धरून डोळे उघडले. मंत्र्यांनी राजांना धरून बसविले. श्रीराम आपल्या पाया पडत आहेत, हे राजांनी पाहिले.॥ १॥

**लिए सनेह बिकल उर लाई। गै मनि मनहुँ फनिक फिरि पाई॥**
**रामहि चितइ रहेउ नरनाहू। चला बिलोचन बारि प्रबाहू॥**

प्रेम-विव्हळ झालेल्या राजांनी श्रीरामांना हृदयाशी धरले. जणू आपले हरविलेले रत्न सापाला पुन्हा मिळाले. राजा दशरथ श्रीरामांना पाहातच राहिले. त्यांच्या डोळ्यांतून अश्रूंचा प्रवाह वाहू लागला.॥ २॥

**सोक बिबस कछु कहै न पारा। हृदयँ लगावत बारहिं बारा॥**
**बिधिहि मनाव राउ मन माहीं। जेहिं रघुनाथ न कानन जाहीं॥**

अत्यंत शोकाकुल झाल्यामुळे राजे काही बोलू शकत नव्हते. ते वारंवार श्रीरामचंद्रांना हृदयाशी धरत होते आणि रघुनाथ वनात जाऊ नये, अशी मनात ब्रह्मदेवांची आळवणी करीत होते.॥ ३॥

**सुमिरि महेसहि कहइ निहोरी। बिनती सुनहु सदासिव मोरी॥**
**आसुतोष तुम्ह अवढर दानी। आरति हरहु दीन जनु जानी॥**

मग महादेवांचे स्मरण करून त्यांची प्रार्थना करीत ते म्हणाले, 'हे सदाशिवा, माझी विनंती ऐका. तुम्ही पटकन प्रसन्न होणारे आशुतोष आहात आणि मागेल ते देणारे आहात. म्हणून मला आपला दीन सेवक मानून माझे दुःख दूर करा.॥ ४॥

**दो०—तुम्ह प्रेरक सब के हृदयँ सो मति रामहि देहु।**
**बचनु मोर तजि रहहिं घर परिहरि सीलु सनेहु॥ ४४॥**

तुम्ही प्रेरकरूपाने सर्वांच्या हृदयात वास करता. माझे वचन मोडून आणि शील सोडून घरातच राहाण्याची बुद्धी तुम्ही श्रीरामाला द्या. ॥ ४४ ॥

**अजसु होउ जग सुजसु नसाऊ। नरक परौं बरु सुरपुरु जाऊ॥**
**सब दुख दुसह सहावहु मोही। लोचन ओट रामु जनि होंही॥**

जगात अपकीर्ती होवो किंवा सुकीर्ती नष्ट होवो. पापामुळे मी नरकात पडो किंवा स्वर्गात जावो. वाटल्यास सर्व प्रकारची दुःसह दुःखे मला सहन करायला लावा, परंतु श्रीराम माझ्या डोळ्यांआड जाऊ नये.' ॥ १ ॥

**अस मन गुनइ राउ नहिं बोला। पीपर पात सरिस मनु डोला॥**
**रघुपति पितहि प्रेमबस जानी। पुनि कछु कहिहि मातु अनुमानी॥**

राजे अशाप्रकारे मनात विचार करीत होते, बोलत नव्हते. त्यांचे मन पिंपळाच्या पानासारखे सळसळत होते. श्रीरघुनाथांनी पाहिले की वडील प्रेम-विव्हळ झाले आहेत आणि अंदाज केला की, कैकेयी आणखी काही बोलली, तर वडिलांना दुःख होईल. ॥ २ ॥

**देस काल अवसर अनुसारी। बोले बचन बिनीत बिचारी॥**
**तात कहउँ कछु करउँ ढिठाई। अनुचितु छमब जानि लरिकाई॥**

म्हणून देश, काल आणि प्रसंगानुरूप विचार करून श्रीराम नम्रपणे म्हणाले, 'हे तात, मी बोलतोय, ते धारिष्ट्य आहे. या अनौचित्याला माझे लहानपण समजून क्षमा करा. ॥ ३ ॥

**अति लघु बात लागि दुखु पावा। काहुँ न मोहि कहि प्रथम जनावा॥**
**देखि गोसाइँहि पूँछिउँ माता। सुनि प्रसंगु भए सीतल गाता॥**

या अगदी क्षुल्लक गोष्टीसाठी तुम्हांला इतके दुःख सहन करावे लागले. मला कोणी या गोष्टीचा पत्ताच लागू दिला नाही. महाराज, तुमची ही अवस्था पाहून मी मातेला विचारले. तिने सर्व प्रसंग सांगितलेला ऐकून माझे समाधान झाले. ॥ ४ ॥

दो०—**मंगल समय सनेह बस सोच परिहरिअ तात।**
**आयसु देइअ हरषि हियँ कहि पुलके प्रभु गात॥ ४५॥**

बाबा! या मंगल प्रसंगी प्रेमाने व्याकूळ होऊन काळजी करणे सोडून द्या आणि आनंदाने मला आज्ञा द्या.' हे सांगत असताना प्रभू रामांचे सर्वांग पुलकित झाले. ॥ ४५ ॥

**धन्य जनमु जगतीतल तासू। पितहि प्रमोदु चरित सुनि जासू॥**
**चारि पदारथ करतल ताकें। प्रिय पितु मातु प्रान सम जाकें॥**

नंतर ते म्हणाले, 'ज्याचे चरित्र ऐकून पित्याला मोठा आनंद होतो, त्याचा या पृथ्वीतलावरील जन्म धन्य होय. ज्याला माता-पिता प्राणांसारखे प्रिय आहेत, त्याच्या मुठीत चारी पुरुषार्थ असतात. ॥ १ ॥

**आयसु पालि जनम फलु पाई । ऐहउँ बेगिहिं होउ रजाई ॥**
**बिदा मातु सन आवउँ मागी । चलिहउँ बनहि बहुरि पग लागी ॥**

तुमच्या आज्ञेचे पालन करून आणि जन्म सफळ करून मी लवकरच परत येईन. म्हणून मला आज्ञा द्या. कौसल्या मातेचा निरोप घेऊन येतो. मग तुमच्या पाया पडून वनास जाईन.'॥ २ ॥

**अस कहि राम गवनु तब कीन्हा । भूप सोक बस उतरु न दीन्हा ॥**
**नगर ब्यापि गइ बात सुतीछी । छुअत चढ़ी जनु सब तन बीछी ॥**

असे म्हणून श्रीराम तेथून निघाले. शोकामुळे राजांनी काही उत्तर दिले नाही. ही अत्यंत अप्रिय गोष्ट नगरात एवढ्या झपाट्याने पसरली की, दंश होताच जसे विंचवाचे विष सर्व शरीरात चढते. ॥ ३ ॥

**सुनि भए बिकल सकल नर नारी । बेलि बिटप जिमि देखि दवारी ॥**
**जो जहँ सुनइ धुनइ सिरु सोई । बड़ बिषादु नहिं धीरजु होई ॥**

ही वार्ता ऐकताच दावानल पाहताच वेली आणि वृक्ष जसे कोमेजून जातात त्याप्रमाणे सर्व स्त्रीपुरुष व्याकूळ झाले. ज्या कुणाला ऐकायला मिळे, तो तिथेच डोके बडवून घेत होता. सगळीकडे विषाद पसरला. कुणाला धीर धरवेना. ॥ ४ ॥

**दो०—मुख सुखाहिं लोचन स्त्रवहिं सोकु न हृदयँ समाइ ।**
**मनहुँ करुन रस कटकई उतरी अवध बजाइ ॥ ४६ ॥**

सर्वांची तोंडे सुकून गेली, डोळ्यांतून अश्रू वाहू लागले होते आणि हृदयात दु:ख मावत नव्हते. जणू करुणरसाच्या सेनेने अयोध्येवर डंका वाजवत आक्रमण केले होते. ॥ ४६ ॥

**मिलेहि माझ बिधि बात बेगारी । जहँ तहँ देहिं कैकइहि गारी ॥**
**एहि पापिनिहि बूझि का परेऊ । छाइ भवन पर पावकु धरेऊ ॥**

सर्व जुळून आले होते. इतक्यात विधात्याने सर्व बिघडून टाकले. जिकडे-तिकडे कैकेयीला लोक शिव्या देऊ लागले. 'या पापिणीला काय अवदसा आठवली की, हिने शाकारलेल्या चांगल्या घराला आग लावली. ॥ १ ॥

**निज कर नयन काढ़ि चह दीखा । डारि सुधा बिषु चाहत चीखा ॥**
**कुटिल कठोर कुबुद्धि अभागी । भइ रघुबंस बेनु बन आगी ॥**

ही स्वत:च्या हाताने आपले डोळे फोडून डोळ्यांविना पाहू इच्छिते आणि अमृत टाकून देऊन विषाचा आस्वाद घेऊ इच्छिते. ही कठोर, कुटिल, निर्बुद्ध आणि अभागी कैकेयी रघुवंशरूपी वेळूच्या वनासाठी आग बनली. ॥ २ ॥

**पालव बैठि पेड़ एहिं काटा। सुख महुँ सोक ठाटु धरि ठाटा॥**
**सदा रामु एहि प्रान समाना। कारन कवन कुटिलपनु ठाना॥**

फांदीवर बसून हिने झाड तोडून टाकले. सुखाच्या वेळी भयंकर शोक निर्माण केला. श्रीरामचंद्र हिला नेहमी प्राणांसारखे प्रिय होते, मग हिने दुष्टपणा का केला, कळत नाही.॥ ३॥

**सत्य कहहिं कबि नारि सुभाऊ। सब बिधि अगहु अगाध दुराऊ॥**
**निज प्रतिबिंबु बरुकु गहि जाई। जानि न जाइ नारि गति भाई॥**

कवी सांगतात, ते खरेच आहे. स्त्रीचा स्वभाव हा कोणत्याही प्रकारे कळणारा नाही. तो अथांग व रहस्यमय असतो. एक वेळ स्वत:चे प्रतिबिंब पकडता येईल, परंतु स्त्रियांची चाल काही समजत नाही.॥ ४॥

दो०—**काह न पावकु जारि सक का न समुद्र समाइ।**
**का न करै अबला प्रबल केहि जग कालु न खाइ॥ ४७॥**

आग काय जाळू शकत नाही? समुद्रात काय मावत नाही? अबला म्हणवणारी प्रबळ स्त्रीजात काय करू शकत नाही? आणि जगात काळ हा कुणाला खाऊन टाकीत नाही?॥ ४७॥

**का सुनाइ बिधि काह सुनावा। का देखाइ चह काह देखावा॥**
**एक कहहिं भल भूप न कीन्हा। बरु बिचारि नहिं कुमतिहि दीन्हा॥**

विधात्याने काय ऐकवले होते आणि आता काय ऐकवीत आहे? काय दाखविले होते आणि आता काय दाखवू पाहात आहे?' एक म्हणत होता की, राजांनी काही चांगले केले नाही. दुर्बुद्धीच्या कैकेयीला विचार करून वर दिला नाही.॥ १॥

**जो हठि भयउ सकल दुख भाजनु। अबला बिबस ग्यानु गुनु गा जनु॥**
**एक धरम परमिति पहिचाने। नृपहिं दोसु नहिं देहिं सयाने॥**

ते हट्टाने कैकेयीचे वचन पूर्ण करण्यासाठी तटून बसले आणि स्वत:च सर्व दु:खांना पात्र ठरले. स्त्रीच्या अधीन झाल्यामुळे जणू त्यांचे ज्ञान व गुण नष्ट झाले. जे धर्माची मर्यादा जाणतात आणि बुद्धिमान आहेत, ते राजांना दोष देत नव्हते.॥ २॥

**सिबि दधीचि हरिचंद कहानी। एक एक सन कहहिं बखानी॥**
**एक भरत कर संमत कहहीं। एक उदास भायँ सुनि रहहीं॥**

ते शिबी, दधीची आणि हरिश्चंद्र यांची कथा वर्णन करून सांगत होते. कोणी म्हणत होता की, या प्रकारात भरताचीही संमती आहे. कोणी ऐकल्यावर उदासीन भावनेने गप्प राहात होते.॥ ३॥

**कान मूदि कर रद गहि जीहा। एक कहहिं यह बात अलीहा॥**
**सुकृत जाहिं अस कहत तुम्हारे। रामु भरत कहुँ प्रानपिआरे॥**

कोणी आपल्या हातांनी कान बंद करून आणि जीभ चावून म्हणत होते की, 'ही गोष्ट खोटी आहे. असे बोलल्यामुळे तुमचे पुण्य नष्ट होईल. भरताला श्रीराम हे प्राणांसमान प्रिय आहेत.॥ ४॥

दो०—**चंदु चवै बरु अनल कन सुधा होइ बिषतूल।**
**सपनेहुँ कबहुँ न करहिं किछु भरतु राम प्रतिकूल॥ ४८॥**

एखादे वेळी चंद्र आग ओकू लागला आणि अमृत विषासारखे झाले तरी भरत स्वप्नातही कधी श्रीरामचंद्रांच्या विरुद्ध काही करणार नाही.'॥ ४८॥

**एक बिधातहि दूषनु देहीं। सुधा देखाइ दीन्ह बिषु जेहीं॥**
**खरभरु नगर सोचु सब काहू। दुसह दाहु उर मिटा उछाहू॥**

काहीजण ब्रह्मदेवाला दोष देत होते, ज्याने अमृत दाखवून विष दिले. शहरभर खळबळ माजली. सर्वांना काळजी लागून राहिली. मनाला असह्य यातना होऊ लागल्या. आनंद, उत्साह कुठल्या कुठे नाहीसा झाला.॥ १॥

**बिप्रबधू कुलमान्य जठेरी। जे प्रिय परम कैकई केरी॥**
**लगीं देन सिख सीलु सराही। बचन बानसम लागहिं ताही॥**

ब्राह्मण-स्त्रिया, कुळातील मान्यवर वयोवृद्ध स्त्रिया आणि ज्या कैकेयीच्या फार आवडत्या होत्या, त्या सर्वजणी तिच्या शीलाची प्रशंसा करीत तिला समजावू लागल्या. परंतु त्यांचे बोलणे तिला बाणाप्रमाणे बोचत होते.॥ २॥

**भरतु न मोहि प्रिय राम समाना। सदा कहहु यहु सबु जगु जाना॥**
**करहु राम पर सहज सनेहू। केहिं अपराध आजु बनु देहू॥**

त्या म्हणत होत्या की, 'तू तर नेहमी म्हणत होतीस की श्रीरामचंद्रांइतका मला भरतही प्रिय नाही. ही गोष्ट साऱ्या जगाला माहीत आहे. श्रीरामचंद्रांवर तुझे प्रामाणिक प्रेम आहे. मग आज कोणत्या अपराधासाठी त्यांना वनवास देत आहेस?॥ ३॥

**कबहुँ न कियहु सवति आरेसू। प्रीति प्रतीति जान सबु देसू॥**
**कौसल्याँ अब काह बिगारा। तुम्ह जेहि लागि बज्र पुर पारा॥**

तू सवतींचा कधी द्वेष केला नाहीस. सर्व देश तुझे प्रेम व विश्वास जाणतो. आता कौसल्येने तुझे काय वाकडे केले आहे, म्हणून तू सर्व नगरावर वज्र टाकलेस?॥ ४॥

**दो०—सीय कि पिय सँगु परिहरिहि लखनु कि रहिहहिं धाम।**
**राजु कि भूँजब भरत पुर नृपु कि जिइहि बिनु राम॥ ४९॥**

सीता पतीची साथ सोडेल काय? आणि लक्ष्मण श्रीरामचंद्रांविना घरी राहील? भरत काय श्रीरामांविना अयोध्येचे राज्य भोगू शकेल? आणि राजा दशरथ श्रीरामांविना जिवंत राहू शकेल? सर्व उध्वस्त होईल.॥ ४९॥

**अस बिचारि उर छाड़हु कोहू। सोक कलंक कोठि जनि होहू॥**
**भरतहि अवसि देहु जुबराजू। कानन काह राम कर काजू॥**

मनात असा विचार करून राग सोडून दे. शोक व कलंकाचे घर बनू नकोस. भरताला युवराजपदावर अवश्य बसू दे, परंतु श्रीरामांचे वनात काय काम आहे?॥ १॥

**नाहिन रामु राज के भूखे। धरम धुरीन बिषय रस रूखे॥**
**गुर गृह बसहुँ रामु तजि गेहू। नृप सन अस बरु दूसर लेहू॥**

श्रीराम हे राज्याचे भुकेले नाहीत. ते धर्माची धुरा धारण करणारे व विषय-विरक्त आहेत. मनात शंका आणू नकोस. तू दुसरा वर माग की, श्रीरामांनी घर सोडून गुरूंच्या घरी राहावे.॥ २॥

**जौं नहिं लगिहहु कहें हमारे। नहिं लागिहि कछु हाथ तुम्हारे॥**
**जौं परिहास कीन्हि कछु होई। तौ कहि प्रगट जनावहु सोई॥**

जर तू आमच्या सांगण्याप्रमाणे वागली नाहीस तर तुझ्या हाती काहीही लागणार नाही. जर तू थट्टा केली असशील, तर तसे जाहीरपणे सांग.॥ ३॥

**राम सरिस सुत कानन जोगू। काह कहिहि सुनि तुम्ह कहुँ लोगू॥**
**उठहु बेगि सोइ करहु उपाई। जेहि बिधि सोकु कलंकु नसाई॥**

रामासारखा पुत्र वनात जाण्याजोगा आहे काय? हे ऐकल्यावर लोक तुला काय म्हणतील? लवकर ऊठ आणि काही उपाय कर, म्हणजे हा शोक व कलंक दूर होईल.॥ ४॥

**छं०—जेहि भाँति सोकु कलंकु जाइ उपाय करि कुल पालही।**
**हठि फेरु रामहि जात बन जनि बात दूसरि चालही॥**
**जिमि भानु बिनु दिनु प्रान बिनु तनु चंद बिनु जिमि जामिनी।**
**तिमि अवध तुलसीदास प्रभु बिनु समुझि धौं जियँ भामिनी॥**

ज्यामुळे नगरातील शोक आणि तुझ्यावरचा कलंक नाहीसा होईल, असा उपाय करून

कुलाचे रक्षण कर. वनास निघालेल्या श्रीरामांना आग्रहाने थांबव. दुसरे काही बोलू नकोस. तुलसीदास म्हणतात की, ज्याप्रमाणे सूर्याविना दिवस, प्राणांविना शरीर आणि चंद्राविना रात्र निर्जीव व शोभाहीन होते, त्याप्रमाणे श्रीरामचंद्रांविना अयोध्या होईल. हे राणी, तू आपल्या मनात या गोष्टीचा विचार तर कर.'॥

**सो०—सखिन्ह सिखावनु दीन्ह सुनत मधुर परिनाम हित।**
**तेइँ कछु कान न कीन्ह कुटिल प्रबोधी कूबरी॥५०॥**

अशा प्रकारे सख्यांनी शिकवण दिली. ती ऐकण्यास गोड व परिणामी हितकारक होती. परंतु कुटिल कुबडीने पढवून तयार केलेल्या कैकेयीने तिकडे जराही लक्ष दिले नाही.॥५०॥

**उतरु न देइ दुसह रिस रूखी। मृगिन्ह चितव जनु बाघिनि भूखी॥**
**ब्याधि असाधि जानि तिन्ह त्यागी। चलीं कहत मतिमंद अभागी॥**

कैकेयीने काही उत्तर दिले नाही. ती दुःसह क्रोधामुळे निर्लज्जपणे तशीच राहिली. भुकेली वाघीण हरिणींना पाहते, तशी ती त्यांना पाहात होती. तेव्हा सख्यांनी हा रोग असाध्य समजून सोडून दिले. सर्वजणी तिला मंदबुद्धीची दुर्दैवी म्हणत निघून गेल्या.॥१॥

**राजु करत यह दैअँ बिगोई। कीन्हेसि अस जस करइ न कोई॥**
**एहि बिधि बिलपहिं पुर नर नारीं। देहिं कुचालिहि कोटिक गारीं॥**

राज्यावर अधिकार गाजविणाऱ्या कैकेयीला दैवाने नष्ट करून टाकले. तिने जे काही केले, तसे कुणीही करणार नाही. नगरातील सर्व स्त्री-पुरुष अशा प्रकारे विलाप करीत होते आणि त्या दुष्ट चालीच्या कैकेयीला शिव्यांची लाखोली वाहात होते.॥२॥

**जरहिं बिषम जर लेहिं उसासा। कवनि राम बिनु जीवन आसा॥**
**बिपुल बियोग प्रजा अकुलानी। जनु जलचर गन सूखत पानी॥**

लोक दुःखाच्या आगीमुळे होरपळत होते. उसासे सोडत म्हणत होते की, श्रीरामचंद्रांविना जगण्याची काही आशा नाही. महान वियोगाच्या काळजीने प्रजा अशी व्याकूळ झाली होती की, जणू पाणी सुकून गेल्यावर जलचर जीवांचा समुदाय तळमळू लागतो.॥३॥

**अति बिषाद बस लोग लोगाईं। गए मातु पहिं रामु गोसाईं॥**
**मुख प्रसन्न चित चौगुन चाऊ। मिटा सोचु जनि राखै राऊ॥**

सर्व पुरुष आणि स्त्रिया अत्यंत विषादात बुडाले होते. प्रभू श्रीरामचंद्र कौसल्यामातेकडे गेले. त्यांच्या मुखावर प्रसन्नता होती आणि मनात चौपट उत्साह भरला होता. राजे आपल्याला ठेवून घेतील ही काळजी राहिली नाही. कैकेयी मातेने आज्ञा दिली आहे आणि वडिलांनी मूक संमती दिलेली आहे. ॥ ४ ॥

**दो०—नव गयंदु रघुबीर मनु राजु अलान समान।**
**छूट जानि बन गवनु सुनि उर अनंदु अधिकान॥ ५१॥**

श्रीरामचंद्रांचे मन पकडलेल्या नव्या हत्तीप्रमाणे होते आणि राजतिलक हा त्या हत्तीला बांधून टाकणाऱ्या लोखंडाच्या काटेरी बेडीप्रमाणे होता. 'वनात जायचे आहे.' हे ऐकून आपण बंधनातून मुक्त झालो, असे मानून त्यांच्या मनातील आनंद वाढला. ॥ ५१ ॥

**रघुकुलतिलक जोरि दोउ हाथा। मुदित मातु पद नायउ माथा॥**
**दीन्हि असीस लाइ उर लीन्हे। भूषन बसन निछावरि कीन्हे॥**

रघुकुलतिलक श्रीरामांनी दोन्ही हात जोडून आनंदाने कौसल्या मातेच्या चरणी मस्तक ठेवले. तिने आशीर्वाद दिला आणि हृदयाशी धरले. दागिने व वस्त्रे त्यांच्यावरून ओवाळून टाकली. ॥ १ ॥

**बार बार मुख चुंबति माता। नयन नेह जलु पुलकित गाता॥**
**गोद राखि पुनि हृदयँ लगाए। स्त्रवत प्रेमरस पयद सुहाए॥**

माता वारंवार श्रीरामांच्या मुखाचे चुंबन घेत होती. नेत्रांतून प्रेमाश्रू भरून आले होते आणि सर्वांग पुलकित झाले होते. तिने श्रीरामांना आपल्या मांडीवर घेऊन पुन्हा कवटाळले. तिच्या स्तनांतून प्रेमाधिक्यामुळे दूध वाहू लागले. ॥ २ ॥

**प्रेमु प्रमोदु न कछु कहि जाई। रंक धनद पदबी जनु पाई॥**
**सादर सुंदर बदनु निहारी। बोली मधुर बचन महतारी॥**

तिचे प्रेम व मोठा आनंद हा काही सांगता येत नव्हता. जणू कंगालाला कुबेराचे पद मिळाले होते. मोठ्या आदराने सुंदर मुख पाहात माता मधुर वाणीने म्हणाली, ॥ ३ ॥

**कहहु तात जननी बलिहारी। कबहिं लगन मुद मंगलकारी॥**
**सुकृत सील सुख सीवँ सुहाई। जनम लाभ कइ अवधि अघाई॥**

'बाळा! तुझ्यावरून जीव ओवाळून टाकते. सांग बरे, तो आनंददायक मंगल मुहूर्त केव्हा आहे? तो माझे पुण्य, शील आणि सुखाची सुंदर परिसीमा आहे आणि जन्म घेतल्याच्या लाभाची पराकाष्ठा आहे. ॥ ४ ॥

दो०—**जेहि चाहत नर नारि सब अति आरत एहि भाँति।**
**जिमि चातक चातकि तृषित बृष्टि सरद रितु स्वाति॥ ५२॥**

त्या मुहूर्ताची सर्व स्त्री-पुरुष अत्यंत आतुरतेने वाट पाहात आहेत. तहानलेले चातक आणि चातकी जशी शरदऋतूतील स्वाती नक्षत्राच्या पावसाची वाट पाहातात.॥ ५२॥

**तात जाउँ बलि बेगि नहाहू। जो मन भाव मधुर कछु खाहू॥**
**पितु समीप तब जाएहु भैआ। भइ बड़ि बार जाइ बलि मैआ॥**

'सोन्या! मी कुरवंडी करते. तू लवकर स्नान करून मनाला आवडेल ती मिठाई खाऊन घे. बाळा, मग बाबांजवळ जा. फार उशीर झाला आहे. मी औक्षण करते.'॥ १॥

**मातु बचन सुनि अति अनुकूला। जनु सनेह सुरतरु के फूला॥**
**सुख मकरंद भरे श्रियमूला। निरखि राम मनु भवँरु न भूला॥**

मातेचे अत्यंत मनोहर बोलणे जणू स्नेहरूपी कल्पवृक्षाची फुले होती. ती सुखरूपी मकरंदाने भरलेली होती आणि ती राजलक्ष्मीचे मूळ होती. अशा वचनरूपी फुलांना पाहून श्रीरामचंद्रांचा मनरूपी भ्रमर त्यांना भुलला नाही.॥ २॥

**धरम धुरीन धरम गति जानी। कहेउ मातु सन अति मृदु बानी॥**
**पिताँ दीन्ह मोहि कानन राजू। जहँ सब भाँति मोर बड़ काजू॥**

धर्मधुरीण श्रीरामचंद्रांनी धर्माची गती ओळखून आईला अत्यंत कोमल वाणीने म्हटले, 'आई! बाबांनी मला वनाचे राज्य दिले आहे. तेथे माझे सर्वप्रकारे मोठे काम पूर्ण होणार आहे.॥ ३॥

**आयसु देहि मुदित मन माता। जेहिं मुद मंगल कानन जाता॥**
**जनि सनेह बस डरपसि भोरें। आनँदु अंब अनुग्रह तोरें॥**

आई! तू प्रसन्न चित्ताने मला जाण्याची आज्ञा दे. त्यामुळे माझा वनातील प्रवास आनंद-मंगलमय होईल. माझ्यावरील प्रेमामुळे चुकूनही घाबरू नकोस. हे माते, तुझ्या कृपेने आनंदच होईल.॥ ४॥

दो०—**बरष चारिदस बिपिन बसि करि पितु बचन प्रमान।**
**आइ पाय पुनि देखिहउँ मनु जनि करसि मलान॥ ५३॥**

चौदा वर्षे वनात राहून आणि वडिलांची प्रतिज्ञा खरी करून मी परत येईन व तुझ्या चरणांचे दर्शन घेईन. तू मन दीनवाणे करून घेऊ नकोस.'॥

**बचन बिनीत मधुर रघुबर के। सर सम लगे मातु उर करके॥**
**सहमि सूखि सुनि सीतलि बानी। जिमि जवास परें पावस पानी॥**

रघुकुलातील श्रेष्ठ श्रीरामचंद्रांचे हे अत्यंत नम्र व गोड बोलणे मातेच्या हृदयाला बाणाप्रमाणे रुतु

लागले. ती शीतल वाणी ऐकून कौसल्या घाबरून अशी गर्भगळित झाली की, ज्याप्रमाणे पावसाचे पाणी पडताच जवास वाळून जाते.॥ १॥

**कहि न जाइ कछु हृदय बिषादू। मनहुँ मृगी सुनि केहरि नादू॥**
**नयन सजल तन थर थर काँपी। माजहि खाइ मीन जनु मापी॥**

तिच्या हृदयातील विषादाचे वर्णन करणे अशक्य होते. जणू सिंहाची गर्जना ऐकून हरिणी बावरून जावी. डोळ्यांत पाणी आले. शरीर थरथरू लागले. जणू मासोळी पहिल्या पावसाचा फेस खाल्ल्यामुळे बेशुद्ध झाली होती.॥ २॥

**धरि धीरजु सुत बदनु निहारी। गदगद बचन कहति महतारी॥**
**तात पितहि तुम्ह प्रान पिआरे। देखि मुदित नित चरित तुम्हारे॥**

धीर धरून व पुत्राच्या मुखाकडे पाहात सद्‌गदित वाणीने ती म्हणू लागली, 'बाळा! तू तर पित्याला प्राणांसारखा प्रिय आहेस. तुझे वागणे पाहून ते नित्य प्रसन्न असतात.॥ ३॥

**राजु देन कहुँ सुभ दिन साधा। कहेउ जान बन केहिं अपराधा॥**
**तात सुनावहु मोहि निदानू। को दिनकर कुल भयउ कृसानू॥**

तुला राज्य देण्यासाठी त्यांनीच शुभ दिवस शोधला होता. मग आता कोणत्या अपराधासाठी वनात जाण्यास सांगितले आहे? बाळा! मला कारण सांग. सूर्यवंशरूपी वनाला जाळण्यासाठी आग कोण ठरले?'॥ ४॥

दो०—**निरखि राम रुख सचिवसुत कारनु कहेउ बुझाइ।**
**सुनि प्रसंगु रहि मूक जिमि दसा बरनि नहिं जाइ॥ ५४॥**

तेव्हा रामचंद्रांचे मनोगत ओळखून मंत्र्याच्या पुत्राने सर्व कारण समजावून सांगितले. तो प्रसंग ऐकून कौसल्या मुकी होऊन गेली. तिची अवस्था काही सांगता येण्यासारखी नव्हती.॥ ५४॥

**राखि न सकइ न कहि सक जाहू। दुहूँ भाँति उर दारुन दाहू॥**
**लिखत सुधाकर गा लिखि राहू। बिधि गति बाम सदा सब काहू॥**

ती श्रीरामांना ठेवूनही घेऊ शकत नव्हती आणि वनात जाण्यास सांगूही शकत नव्हती. दोन्ही प्रकारे फार मोठा मनस्ताप होत होता. ती मनात विचार करू लागली की, 'बघा, विधात्याची चाल नेहमी सर्वांसाठी वाकडीच असते. ते लिहीत होते चंद्रमा, परंतु त्याऐवजी लिहिले गेले राहू.'॥ १॥

**धरम सनेह उभयँ मति घेरी। भइ गति साँप छुछुंदरि केरी॥**
**राखउँ सुतहि करउँ अनुरोधू। धरमु जाइ अरु बंधु बिरोधू॥**

धर्म व स्नेह दोन्हींनी कौसल्येच्या बुद्धीला घेरून टाकले. इकडे आड, तिकडे विहीर अशी तिची स्थिती झाली. साप व चिचुंद्री यांच्या गोष्टीसारखी तिची अवस्था झाली. ती विचार करू लागली की, जर मी हट्टाने मुलाला ठेवून घेतले तर धर्माला बाध येतो आणि भावांमध्ये वितुष्ट येते,॥ २॥

**कहउँ जान बन तौ बड़ि हानी । संकट सोच बिबस भइ रानी ॥**
**बहुरि समुझि तिय धरमु सयानी । रामु भरतु दोउ सुत सम जानी ॥**

आणि वनात जाण्यास सांगितले, तर फार मोठी हानी घडते. अशा प्रकारे धर्मसंकटात सापडून राणी फार काळजीत पडली. मग बुद्धिमती कौसल्येने पातिव्रत्यधर्म श्रेष्ठ जाणून आणि राम व भरत या दोन्ही पुत्रांना समान मानून, ॥ ३ ॥

**सरल सुभाउ राम महतारी । बोली बचन धीर धरि भारी ॥**
**तात जाउँ बलि कीन्हेहु नीका । पितु आयसु सब धरमक टीका ॥**

सरळ स्वभावाची श्रीरामांची माता कौसल्या हिने अत्यंत धीर धरून म्हटले, ‘हे पुत्रा! माझ्या कायेची तुझ्या धर्मनिष्ठेवरून कुरवंडी उतरावी. तू चांगले केलेस. पित्याच्या आज्ञेचे पालन करणे हेच सर्व धर्मांत श्रेष्ठ आहे. ॥ ४ ॥

**दो०—राजु देन कहि दीन्ह बनु मोहि न सो दुख लेसु।**
**तुम्ह बिनु भरतहि भूपतिहि प्रजहि प्रचंड कलेसु॥ ५५ ॥**

त्यांनी तुला राज्य देण्याचे सांगून वन दिले, याचे मला लेशमात्र दुःख नाही. दुःख एवढेच आहे की, तुझ्याविना भरताला, महाराजांना व प्रजेला फार मोठे दुःख होईल. ॥ ५५ ॥

**जौं केवल पितु आयसु ताता । तौ जनि जाहु जानि बड़ि माता ॥**
**जौं पितु मातु कहेउ बन जाना । तौ कानन सत अवध समाना ॥**

बाळ! जर फक्त पित्याची आज्ञा असेल, तर माता ही पित्यापेक्षा मोठी आहे असे मानून वनात जाऊ नकोस. परंतु माता-पिता या दोघांनी वनात जाण्यास सांगितले असेल, तर वन हे तुझ्यासाठी शेकडो अयोध्येच्या राज्यांच्या बरोबरीचे आहे. ॥ १ ॥

**पितु बनदेव मातु बनदेवी । खग मृग चरन सरोरुह सेवी ॥**
**अंतहुँ उचित नृपहि बनबासू । बय बिलोकि हियँ होइ हराँसू ॥**

वनातील देव हे तुझे पिता असतील आणि वनदेवी या माता असतील. तेथील पशु-पक्षी तुझ्या चरण-कमलांचे सेवक होतील. राजाने वृद्धावस्थेत वनवास करावा, हे योग्यच आहे. फक्त तुझी सुकुमार अवस्था पाहून मनात दुःख वाटते. ॥ २ ॥

**बड़भागी बनु अवध अभागी । जो रघुबंसतिलक तुम्ह त्यागी ॥**
**जौं सुत कहौं संग मोहि लेहू । तुम्हरे हृदयँ होइ संदेहू ॥**

हे रघुवंशाच्या तिलका, वन हे मोठे भाग्यशाली आहे आणि जिने तुझा त्याग केला ती अयोध्या अभागी होय. हे पुत्रा, जर मी तुला म्हटले की, मलाही बरोबर घेऊन चल, तर तुला संशय येईल की, आई मला या निमित्ताने थांबवू इच्छिते. ॥ ३ ॥

**पूत परम प्रिय तुम्ह सबही के । प्रान प्रान के जीवन जी के ॥**
**ते तुम्ह कहहु मातु बन जाऊँ । मैं सुनि बचन बैठि पछिताऊँ ॥**

हे पुत्रा, तू सर्वांनाच प्रिय आहेस, प्राणांचा प्राण आणि हृदयाचे जीवन आहेस. तोच तू प्राणाधार म्हणत आहेस की माते, मी वनात जातो आणि मी तुझे बोलणे ऐकून पश्चात्ताप करीत बसली आहे. ॥ ४ ॥

**दो०—यह बिचारि नहिं करउँ हठ झूठ सनेहु बढ़ाइ।**
**मानि मातु कर नात बलि सुरति बिसरि जनि जाइ॥ ५६ ॥**

असा विचार करून व खोटे प्रेम दाखवून मी काही हट्ट करीत नाही. मुला, तुझ्यावरून जीव ओवाळून टाकते. मातेचे नाते मानून मला विसरून जाऊ नकोस. ॥ ५६ ॥

**देव पितर सब तुम्हहि गोसाईं । राखहुँ पलक नयन की नाईं॥**
**अवधि अंबु प्रिय परिजन मीना । तुम्ह करुनाकर धरम धुरीना॥**

हे लाडक्या, पापण्या जशा डोळ्यांचे रक्षण करतात, त्याप्रमाणे देव व पितर तुझे रक्षण करोत. तुझ्या वनवासाचा चौदा वर्षांचा काळ हा जणू जल आहे आणि प्रियजन व कुटुंबीय मासे आहेत. तू दयेची खाण आहेस व धर्माची धुरा धारण करणारा आहेस. ॥ १ ॥

**अस बिचारि सोइ करहु उपाई । सबहि जिअत जेहिं भेंटहु आई॥**
**जाहु सुखेन बनहि बलि जाऊँ । करि अनाथ जन परिजन गाऊँ॥**

असा विचार करून आम्ही सर्वजण जिवंत असेतोपर्यंत भेटण्याचा उपाय कर. मी जीव ओवाळून सांगते, तू सेवकांना, आप्तांना व नगरवासीयांना अनाथ करून सुखाने वनात जा. ॥ २ ॥

**सब कर आजु सुकृत फल बीता । भयउ कराल कालु बिपरीता॥**
**बहुबिधि बिलपि चरन लपटानी । परम अभागिनि आपुहि जानी॥**

आज सर्वांची पुण्याई संपली. हा कठीण काळ आमच्यावर ओढवला.' अशा प्रकारे पुष्कळ विलाप करीत आणि स्वत:ला दुर्दैवी मानून माता कौसल्येने श्रीरामांचे चरण घट्ट धरले. ॥ ३ ॥

**दारुन दुसह दाहु उर ब्यापा । बरनि न जाहिं बिलाप कलापा॥**
**राम उठाइ मातु उर लाई । कहि मृदु बचन बहुरि समुझाई॥**

हृदयामध्ये भयानक असह्य दु:ख भरले होते. त्यावेळी तिने केलेल्या विलापाचे वर्णन करणे शक्य नाही. श्रीरामांनी मातेला उठवून हृदयाशी धरले आणि कोमल शब्दांनी तिची समजूत घातली. ॥ ४ ॥

**दो०—समाचार तेहि समय सुनि सीय उठी अकुलाइ।**
**जाइ सासु पद कमल जुग बंदि बैठि सिरु नाइ॥ ५७ ॥**

ही वार्ता ऐकताच सीता व्याकूळ झाली आणि सासूजवळ येऊन तिच्या चरण-कमलांना वंदन करून मान खाली घालून बसली. ॥ ५७ ॥

**दीन्हि असीस सासु मृदु बानी। अति सुकुमारि देखि अकुलानी॥**
**बैठि नमितमुख सोचति सीता। रूप रासि पति प्रेम पुनीता॥**

सासूने कोमल वाणीने तिला आशीर्वाद दिला. सीतेची अत्यंत सुकुमार अवस्था पाहून ती व्याकूळ झाली. रूपाची खाण असलेली आणि पतीवर पवित्र प्रेम करणारी सीता ही मान खाली घालून बसून विचार करीत होती.॥ १ ॥

**चलन चहत बन जीवननाथू। केहि सुकृती सन होइहि साथू॥**
**की तनु प्रान कि केवल प्राना। बिधि करतबु कछु जाइ न जाना॥**

प्राणनाथ श्रीराम वनात जाऊ इच्छितात. पाहूया, कोणत्या पुण्यवानाची त्यांना सोबत घडेल? शरीर व प्राण दोन्ही बरोबर जाणार की फक्त प्राणानेच यांची सोबत होईल? विधात्याची करणी काही कळत नाही.॥ २ ॥

**चारु चरन नख लेखति धरनी। नूपुर मुखर मधुर कबि बरनी॥**
**मनहुँ प्रेम बस बिनती करहीं। हमहि सीय पद जनि परिहरहीं॥**

सीता आपल्या सुंदर चरणांच्या नखांनी जमीन कुरतडत होती. असे करताना तिच्या नूपुरांचा मधुर ध्वनी होत होता. कवी त्याचे वर्णन असे करतो की, जणू प्रेम-वश होऊन नूपुर विनंती करीत होते की, सीतेच्या चरणांनी आम्हांला कधी सोडून देऊ नये.॥ ३ ॥

**मंजु बिलोचन मोचति बारी। बोली देखि राम महतारी॥**
**तात सुनहु सिय अति सुकुमारी। सास ससुर परिजनहि पिआरी॥**

सीतेच्या सुंदर नेत्रांतून पाणी वाहात होते. तिची दशा पाहून श्रीराम-माता कौसल्या श्रीरामांना म्हणाली, 'पुत्रा! सीता ही अत्यंत सुकुमार आहे आणि सासू, सासरे व कुटुंबीयांची आवडती आहे.॥ ४ ॥

दो०—**पिता जनक भूपाल मनि ससुर भानुकुल भानु।**
**पति रबिकुल कैरव बिपिन बिधु गुन रूप निधानु॥ ५८॥**

हिचे वडील जनक हे राजांचे शिरोमणी आहेत. सासरे सूर्यकुलाचे सूर्य आहेत आणि पती सूर्यकुलरूपी कुमुदवनास प्रफुल्लित करणारे चंद्र व गुण आणि रूपाचे भांडार आहेत.॥ ५८॥

**मैं पुनि पुत्रबधू प्रिय पाई। रूप रासि गुन सील सुहाई॥**
**नयन पुतरि करि प्रीति बढ़ाई। राखेउँ प्रान जानकिहिं लाई॥**

शिवाय रूपराशी, सुंदर गुण आणि शीलसंपन्न लाडकी सून मला लाभली आहे. मी हिला आपल्या डोळ्यांच्या बाहुलीप्रमाणे जतन करून हिच्यावर प्रेम केले आहे. माझे प्राण हिच्यामध्ये गुंतले आहेत.॥ १ ॥

**कलपबेलि जिमि बहुबिधि लाली। सींचि सनेह सलिल प्रतिपाली॥**
**फूलत फलत भयउ बिधि बामा। जानि न जाइ काह परिनामा॥**

कल्पलतेसारखे मी हिला मोठ्या लाडाने स्नेहरूपी जलाने शिंपून पाळले आहे. आता या लतेच्या फुलण्या-फळण्याचा काळ आला, तर विधाता प्रतिकूल झाला. याचा काय परिणाम होणार आहे, हे कुणास ठाऊक?॥ २॥

**पलँग पीठ तजि गोद हिंडोरा। सियँ न दीन्ह पगु अवनि कठोरा॥**
**जिअनमूरि जिमि जोगवत रहऊँ। दीप बाति नहिं टारन कहऊँ॥**

सीतेने पलंग, मांडी आणि झोपाळा सोडून कधी कठीण भूमीवर पाय ठेवला नाही. मी नेहमी संजीवनी मुळीप्रमाणे अत्यंत काळजीने हिची राखण केली. मी हिला कधी दिव्याची वात विझवायलासुद्धा सांगत नसे.॥ ३॥

**सोइ सिय चलन चहति बन साथा। आयसु काह होइ रघुनाथा॥**
**चंद किरन रस रसिक चकोरी। रबि रुख नयन सकइ किमि जोरी॥**

तीच सीता आता तुझ्याबरोबर वनात जाऊ पाहाते. हे रघुनाथा, तिला काय आज्ञा आहे? चंद्रम्याच्या किरणांतील अमृत इच्छिणारी चकोरी सूर्याकडे कसे पाहू शकेल?॥ ४॥

दो०—**करि केहरि निसिचर चरहिं दुष्ट जंतु बन भूरि।**
**बिष बाटिकाँ कि सोह सुत सुभग सजीवनि मूरि॥ ५९॥**

हत्ती, सिंह, राक्षस इत्यादी अनेक दुष्ट जीव-जंतू वनात वावरत असतात. बाळा! त्या विषाच्या वाटिकेमध्ये संजीवनीची मुळी कशी शोभून दिसेल?॥ ५९॥

**बन हित कोल किरात किसोरी। रचीं बिरंचि बिषय सुख भोरी॥**
**पाहनकृमि जिमि कठिन सुभाऊ। तिन्हहि कलेसु न कानन काऊ॥**

वनामध्ये ब्रह्मदेवाने विषयसुखाशी अपरिचित असणाऱ्या कोल व भिल्ल यांच्या मुली निर्माण केल्या आहेत. त्यांचा स्वभाव पाषाण-किड्याप्रमाणे कठोर असतो. त्यांना वनात कधी त्रास वाटत नाही.॥ १॥

**कै तापस तिय कानन जोगू। जिन्ह तप हेतु तजा सब भोगू॥**
**सिय बन बसिहि तात केहि भाँती। चित्रलिखित कपि देखि डेराती॥**

किंवा तपस्व्यांच्या स्त्रिया वनात राहण्यास योग्य आहेत. त्यांनी तपस्येसाठी सर्व भोग सोडून दिलेले असतात. हे पुत्रा, जी चित्रातील माकड पाहून घाबरते, ती सीता वनात कशी राहू शकेल?॥ २॥

**सुरसर सुभग बनज बन चारी। डाबर जोगु कि हंसकुमारी॥**
**अस बिचारि जस आयसु होई। मैं सिख देउँ जानकिहि सोई॥**

देवसरोवरातील कमलवनात संचार करणारी हंसी डबक्यात राहण्यास योग्य आहे काय? याचा विचार करून जर तुझी आज्ञा असेल, तर मग मी जानकीला तसा उपदेश देईन.'॥ ३ ॥

**जौं सिय भवन रहै कह अंबा। मोहि कहँ होइ बहुत अवलंबा॥**
**सुनि रघुबीर मातु प्रिय बानी। सील सनेह सुधाँ जनु सानी॥**

कौसल्या म्हणाली, 'जर सीता घरी राहिली, तर मला मोठा आधार होईल.' श्रीरामांनी जणू शील व स्नेहरूपी अमृताने ओथंबलेली मातेची प्रिय वाणी ऐकून॥ ४॥

दो०—**कहि प्रिय बचन बिबेकमय कीन्हि मातु परितोष।**
**लगे प्रबोधन जानकिहि प्रगटि बिपिन गुन दोष॥ ६०॥**

विवेकपूर्ण प्रिय वचन बोलून मातेचे समाधान केले. मग वनातील गुण-दोष सांगून ते सीतेला समजावीत म्हणू लागले. ॥ ६० ॥

## मासपारायण, चौदावा विश्राम

**मातु समीप कहत सकुचाहीं। बोले समउ समुझि मन माहीं॥**
**राजकुमारि सिखावनु सुनहू। आन भाँति जियँ जनि कछु गुनहू॥**

मातेसमोर सीतेला काही बोलण्यास श्रीराम संकोचत होते. परंतु मनात त्यांनी विचार केला की, हीच वेळ योग्य आहे. म्हणून ते म्हणाले, 'हे राजकुमारी, माझे म्हणणे ऐक. मनात उगाच दुसरे काही आणू नकोस. ॥ १ ॥

**आपन मोर नीक जौं चहहू। बचनु हमार मानि गृह रहहू॥**
**आयसु मोर सासु सेवकाई। सब बिधि भामिनि भवन भलाई॥**

जर तुला माझे व स्वत:चे भले व्हावे अशी इच्छा असेल, तर माझे म्हणणे मानून तू घरी राहा. हे भामिनी, त्यामुळे माझ्या आज्ञेचे पालन होईल; सासूची सेवा घडेल. घरी राहण्यात सर्व प्रकारे कल्याण आहे. ॥ २ ॥

**एहि ते अधिक धरमु नहिं दूजा। सादर सासु ससुर पद पूजा॥**
**जब जब मातु करिहि सुधि मोरी। होइहि प्रेम बिकल मति भोरी॥**

आदराने सासू-सासऱ्यांच्या चरणांची सेवा करण्याहून दुसरा कोणताही श्रेष्ठ धर्म नाही. जेव्हा जेव्हा मातेला माझी आठवण येईल आणि प्रेमाने व्याकूळ झाल्यामुळे तिला स्वत:चा विसर पडेल, ॥ ३ ॥

**तब तब तुम्ह कहि कथा पुरानी। सुंदरि समुझाएहु मृदु बानी॥**
**कहउँ सुभायँ सपथ सत मोही। सुमुखि मातु हित राखउँ तोही॥**

तेव्हा तेव्हा हे सुंदरी, तू कोमल वाणीने पूर्वीच्या कथा सांगून तिला समजव. हे सुमुखी, तुला माझी शंभर वेळा शपथ आहे. मी प्रामाणिकपणे सांगतो की, मी तुला फक्त मातेच्या सेवेसाठीच घरी ठेवतो.॥ ४॥

**दो०—गुर श्रुति संमत धरम फलु पाइअ बिनहिं कलेस।**
**हठ बस सब संकट सहे गालव नहुष नरेस॥ ६१॥**

माझी आज्ञा मानून घरी राहिल्यामुळे गुरू व वेद यांनी मान्य केलेल्या धर्माच्या आचरणाचे फळ तुला क्लेशाविना मिळेल. परंतु हट्टाने वनात आलीस, तर तुला क्लेश भोगावे लागतील. हट्टामुळे गालव मुनी, राजा नहुष इत्यादी सर्वांना फार संकटे भोगावी लागली आहेत.॥ ६१॥

**मैं पुनि करि प्रवान पितु बानी। बेगि फिरब सुनु सुमुखि सयानी॥**
**दिवस जात नहिं लागिहि बारा। सुंदरि सिखवनु सुनहु हमारा॥**

हे सुमुखी, हे बुद्धिमती, ऐक. मीसुद्धा वडिलांचे वचन पूर्ण करून लवकरच परत येईन. दिवस सरायला वेळ लागणार नाही. हे सुंदरी, माझे हे म्हणणे ऐक.॥ १॥

**जौं हठ करहु प्रेम बस बामा। तौ तुम्ह दुखु पाउब परिनामा॥**
**काननु कठिन भयंकरु भारी। घोर घामु हिम बारि बयारी॥**

हे प्रिये, जर प्रेमामुळे तू हट्ट करशील, तर परिणामी तुला दुःख भोगावे लागेल. वन फार क्लेशदायक व भयंकर आहे. तेथील ऊन, थंडी, पाऊस आणि वारे हे सर्व भयानक आहे.॥ २॥

**कुस कंटक मग काँकर नाना। चलब पयादेहिं बिनु पदत्राना॥**
**चरन कमल मृदु मंजु तुम्हारे। मारग अगम भूमिधर भारे॥**

रस्त्यात सराटे, काटे-कुटे, खडे फार असतात. त्यावरून अनवाणी पायी चालावे लागेल. तुझे चरण कमलासारखे कोमल व सुंदर आहेत आणि वाटेत मोठ-मोठे दुर्गम पर्वत आहेत.॥ ३॥

**कंदर खोह नदीं नद नारे। अगम अगाध न जाहिं निहारे॥**
**भालु बाघ बृक केहरि नागा। करहिं नाद सुनि धीरजु भागा॥**

पर्वतांमधील गुहा, दऱ्या, नद्या, आणि ओढे हे अगम्य व खोल आहेत. त्यांच्याकडे पाहावतसुद्धा नाही. अस्वले, वाघ, लांडगे, सिंह आणि हत्ती असे भयानक ओरडत असतात की, ते ऐकूनच धैर्य गळून जाते.॥ ४॥

**दो०—भूमि सयन बलकल बसन असनु कंद फल मूल।**
**ते कि सदा सब दिन मिलहिं सबुइ समय अनुकूल॥ ६२॥**

जमिनीवर झोपायचे, झाडांच्या सालींची वस्त्रे घालायची आणि कंद, मुळे, फळे खायची आणि सर्व काळ ते नेहमी मिळणार काय? सर्व काही आपापल्या कालानुरूप असेच मिळेल.॥ ६२॥

**नर अहार रजनीचर चरहीं। कपट बेष बिधि कोटिक करहीं॥**
**लागइ अति पहार कर पानी। बिपिन बिपति नहिं जाइ बखानी॥**

तेथे माणसांना खाणारे निशाचर राक्षस फिरत असतात. ते पुष्कळ प्रकारचे कपट-वेश घेतात. पर्वतातले पाणी फार बाधते. वनातील संकटे सांगता येत नाहीत.॥ १॥

**ब्याल कराल बिहग बन घोरा। निसिचर निकर नारि नर चोरा॥**
**डरपहिं धीर गहन सुधि आएँ। मृगलोचनि तुम्ह भीरु सुभाएँ॥**

वनात भीषण सर्प, भयानक पक्षी आणि स्त्री-पुरुषांचे अपहरण करणाऱ्या राक्षसांच्या झुंडीच्या झुंडी असतात. वनातील भयानकतेची आठवण येताच धैर्यवान पुरुषही घाबरून जातात. मग हे मृगलोचने, तू तर स्वभावतः घाबरून जाणारी आहेस.॥ २॥

**हंसगवनि तुम्ह नहिं बन जोगू। सुनि अपजसु मोहि देइहि लोगू॥**
**मानस सलिल सुधाँ प्रतिपाली। जिअइ कि लवन पयोधि मराली॥**

हे हंसगामिनी, तू वनात जाण्याच्या योग्यतेची नाहीस. तू वनात जाणार असे समजल्यावर लोक मला नावे ठेवतील. मानससरोवराच्या अमृतासमान पाण्यावर पोसलेली हंसी कधी खाऱ्या समुद्रात जगू शकेल काय?॥ ३॥

**नव रसाल बन बिहरनसीला। सोह कि कोकिल बिपिन करीला॥**
**रहहु भवन अस हृदयँ बिचारी। चंदबदनि दुखु कानन भारी॥**

नव्याने बहरलेल्या आमराईत विहार करणारी कोकिळा काटेरी झाडांच्या जंगलात शोभून दिसेल काय? हे चंद्रमुखी, मनात असा विचार करून तू घरीच राहा. वनात फार कष्ट असतात.॥ ४॥

दो०—**सहज सुहृद गुर स्वामि सिख जो न करइ सिर मानि।**
**सो पछिताइ अघाइ उर अवसि होइ हित हानि॥ ६३॥**

मनापासून हित चिंतिणारे गुरू व स्वामी यांचे बोलणे जो शिरोधार्य मानीत नाही, तो पश्चात्ताप पावतो आणि त्याच्या कल्याणाची हानीच होते.'॥ ६३॥

**सुनि मृदु बचन मनोहर पिय के। लोचन ललित भरे जल सिय के॥**
**सीतल सिख दाहक भइ कैसें। चकइहि सरद चंद निसि जैसें॥**

प्रियतम श्रीरामांचे कोमल व मनोहर बोलणे ऐकून सीतेचे सुंदर नेत्र पाण्याने डबडबले. चक्रवाक पक्षिणीला शरदऋतूची चांदणी जशी होरपळून काढते, त्याप्रमाणे श्रीरामांचे हे शांत बोलणे सीतेला जाळू लागले.॥ १॥

**उतरु न आव बिकल बैदेही। तजन चहत सुचि स्वामि सनेही॥**
**बरबस रोकि बिलोचन बारी। धरि धीरजु उर अवनिकुमारी॥**

जानकीला काही उत्तर देता येईना. माझ्या पवित्र व प्रेमळ स्वामींना मला सोडून जाण्याची इच्छा आहे, असे तिला वाटून ती व्याकूळ झाली. डोळ्यांतील पाणी मोठ्या कष्टाने आवरून ती पृथ्वी-कन्या सीता मन घट्ट करून,॥ २॥

**लागि सासु पग कह कर जोरी। छमबि देबि बड़ि अबिनय मोरी॥**
**दीन्हि प्रानपति मोहि सिख सोई। जेहि बिधि मोर परम हित होई॥**

सासूच्या पाया पडून व हात जोडून म्हणू लागली की, 'सासूबाई! माझ्या या धारिष्ट्याबद्दल क्षमा करा. माझे परम हित ज्यात आहे, असेच माझ्या प्राणप्रिय पतीने सांगितले आहे.॥ ३॥

**मैं पुनि समुझि दीखि मन माहीं। पिय बियोग सम दुखु जग नाहीं॥**

परंतु मी मनात विचार करून पाहिला की, पतीच्या विरहासारखे जगात कोणतेही दु:ख नाही.॥ ४॥

दो०—**प्राननाथ करुनायतन सुंदर सुखद सुजान।**
**तुम्ह बिनु रघुकुल कुमुद बिधु सुरपुर नरक समान॥ ६४॥**

हे प्राणनाथ, हे दयाधाम, हे सुंदर, हे सुखदायक, हे सज्जनशिरोमणी, हे रघुकुलरूपी कुमुदांना प्रफुल्लित करणारे चंद्रमा, तुमच्याविना मला स्वर्गसुद्धा नरकासमान आहे.॥ ६४॥

**मातु पिता भगिनी प्रिय भाई। प्रिय परिवारु सुहृद समुदाई॥**
**सासु ससुर गुर सजन सहाई। सुत सुंदर सुसील सुखदाई॥**

माता-पिता, बहीण, प्रिय भाऊ, आवडता परिवार, मित्र-मंडळी, सासू-सासरा, गुरू, स्वजन, सहाय्यक आणि सुंदर, सुशील व सुखद पुत्र,॥ १॥

**जहँ लगि नाथ नेह अरु नाते। पिय बिनु तियहि तरनिहु ते ताते॥**
**तनु धनु धामु धरनि पुर राजू। पति बिहीन सबु सोक समाजू॥**

हे नाथ, जितकी म्हणून नाती आहेत, ती सर्व पतीविना स्त्रीला सूर्याहून तापदायक आहेत. शरीर, धन, घर, पृथ्वी, नगर आणि राज्य हे सर्व स्त्रीला पतीविना शोकाचा समुदाय आहे.॥ २॥

**भोग रोगसम भूषन भारू। जम जातना सरिस संसारू॥**
**प्राननाथ तुम्ह बिनु जग माहीं। मो कहुँ सुखद कतहुँ कछु नाहीं॥**

भोग हे रोगासारखे आहेत, दागिने भाररूप आहेत, संसार हा यम-यातनेसारखा आहे. हे प्राणनाथ, तुमच्याविना मला या जगात काहीही सुखाचे नाही.॥ ३॥

**जिय बिनु देह नदी बिनु बारी। तैसिअ नाथ पुरुष बिनु नारी॥**
**नाथ सकल सुख साथ तुम्हारें। सरद बिमल बिधु बदनु निहारें॥**

ज्याप्रमाणे जिवाविना देह आणि पाण्याविना नदी असते, त्याप्रमाणे हे नाथ, पुरुषाविना स्त्री असते. हे नाथ, तुमच्यासोबत राहून तुमचे शरद पौर्णिमेच्या निर्मल चंद्रासारखे मुख पाहण्यामुळे मला सर्व सुखे आपोआप मिळतील. ॥ ४ ॥

**दो०—खग मृग परिजन नगरु बनु बलकल बिमल दुकूल।**
**नाथ साथ सुरसदन सम परनसाल सुख मूल॥ ६५ ॥**

हे नाथ, तुमच्यासोबत असताना मला पक्षी व पशू हे माझे कुटुंबीय असतील, वन हेच नगर व वृक्षांच्या साली याच निर्मळ वस्त्रे असतील आणि पर्णकुटी ही स्वर्गासारखी सुखाचे माहेर असेल. ॥ ६५ ॥

**बनदेबीं बनदेव उदारा। करिहहिं सासु ससुर सम सारा॥**
**कुस किसलय साथरी सुहाई। प्रभु सँग मंजु मनोज तुराई॥**

वनात उदार मनाच्या वनदेवी व वनदेव हे सासू-सासऱ्यांप्रमाणे माझा सांभाळ करतील, आणि कुश व पानांचा सुंदर बिछाना प्रभूंच्या संगतीमुळे कामदेवाच्या मनोहर गादीप्रमाणे वाटेल. ॥ १ ॥

**कंद मूल फल अमिअ अहारू। अवध सौध सत सरिस पहारू॥**
**छिनु छिनु प्रभु पद कमल बिलोकी। रहिहउँ मुदित दिवस जिमि कोकी॥**

कंद-मुळे व फळे ही अमृतासमान आहार असेल आणि पर्वत हेच अयोध्येमधील शेकडो राजमहालांसारखे असतील. क्षणोक्षणी प्रभूंच्या चरणकमलांना पाहून दिवसा जशी चकवी आनंदित असते, तशी मी आनंदात राहीन. ॥ २ ॥

**बन दुख नाथ कहे बहुतेरे। भय बिषाद परिताप घनेरे॥**
**प्रभु बियोग लवलेस समाना। सब मिलि होहिं न कृपानिधाना॥**

हे नाथ, तुम्ही वनातील पुष्कळशी दुःखे, बरेच भय, विषाद व दुःखे सांगितली, परंतु हे कृपानिधान, हे सर्व जरी एकत्र केले तरी प्रभू, तुमच्या वियोगाच्या दुःखापुढे लवलेशही नाहीत. ॥ ३ ॥

**अस जियँ जानि सुजान सिरोमनि। लेइअ संग मोहि छाड़िअ जनि॥**
**बिनती बहुत करौं का स्वामी। करुनामय उर अंतरजामी॥**

असा मनात विचार करून हे नाथ! मला तुमच्यासोबत घेऊन चला. येथे सोडून जाऊ नका. हे स्वामी, मी आणखी काय विनवणी करू? तुम्ही करुणामय आहात आणि सर्वांच्या मनातील जाणणारे आहात. ॥ ४ ॥

**दो०—राखिअ अवध जो अवधि लगि रहत न जनिअहिं प्रान।**
**दीनबंधु सुंदर सुखद सील सनेह निधान॥ ६६ ॥**

हे दीनबंधू, हे सुंदर, हे सुखदायक, हे शील व प्रेमाचे भांडार, जर चौदा वर्षांचा अवधी पूर्ण होईपर्यंत मला अयोध्येमध्ये ठेवाल, तर मी जिवंत राहाणार नाही, असे समजा. ॥ ६६ ॥

**मोहि मग चलत न होइहि हारी । छिनु छिनु चरन सरोज निहारी ॥**
**सबहि भाँति पिय सेवा करिहौं । मारग जनित सकल श्रम हरिहौं ॥**

क्षणोक्षणी तुमचे चरणकमल पाहात राहिल्यामुळे मला वाटेत चालताना थकवा वाटणार नाही. हे प्रियतम, मी सर्व प्रकारे तुमची सेवा करीन आणि वाट चालताना येणारा थकवा दूर करीन. ॥ १ ॥

**पाय पखारि बैठि तरु छाहीं । करिहउँ बाउ मुदित मन माहीं ॥**
**श्रम कन सहित स्याम तनु देखें । कहँ दुख समउ प्रानपति पेखें ॥**

मी तुमचे पाय धुऊन, झाडांच्या सावलीत बसून मनात प्रसन्न होऊन तुम्हांला वारा घालीन. तुमचे स्वेद-बिंदू झळकणारे श्याम शरीर पाहात प्राणप्रिय पतीचे दर्शन घेताना मला दुःखासाठी जागाच कुठे राहील ? ॥ २ ॥

**सम महि तृन तरुपल्लव डासी । पाय पलोटिहि सब निसि दासी ॥**
**बार बार मृदु मूरति जोही । लागिहि तात बयारि न मोही ॥**

सपाट जमिनीवर गवत व झाडांची पाने अंथरून ही दासी रात्रभर तुमचे पाय चेपीत राहील. वारंवार तुमची कोमल मूर्ती पाहून मला कधी उकाडा जाणवणार नाही. ॥ ३ ॥

**को प्रभु सँग मोहि चितवनिहारा । सिंघबधुहि जिमि ससक सिआरा ॥**
**मैं सुकुमारि नाथ बन जोगू । तुम्हहि उचित तप मो कहुँ भोगू ॥**

आपण सोबत असताना माझ्याकडे डोळे वर करून तरी कोण पाहाणार आहे ? ससे व कोल्हे सिंहिणीकडे कधी बघू शकत नाहीत. मी सुकुमारी आहे आणि तुम्ही वनात जाण्याजोगे आहात काय ? मग तुमच्यासाठी तेवढी तपस्या योग्य व मला विषय-भोग योग्य आहेत, असे तुम्हांला वाटते काय ? ॥ ४ ॥

दो०—**ऐसेउ बचन कठोर सुनि जौं न हृदउ बिलगान ।**
**तौ प्रभु बिषम बियोग दुख सहिहहिं पावँर प्रान ॥ ६७ ॥**

तुमचे असे कठोर बोलणे ऐकूनही माझे हृदय विदीर्ण झाले नाही, त्यावरून हे प्रभू, माझे हे क्षुद्र प्राण तुमच्या वियोगाचे दुःख सहन करू शकतील असे वाटते.' (अर्थात तुमच्या विरहात माझे प्राण राहाणार नाहीत.) ॥ ६७ ॥

**अस कहि सीय बिकल भइ भारी । बचन बियोगु न सकी सँभारी ॥**
**देखि दसा रघुपति जियँ जाना । हठि राखें नहिं राखिहि प्राना ॥**

असे म्हणून सीता फार शोकाकुल झाली. ती बोलण्यातील वियोगसुद्धा सहन करू शकली नाही. तिची अवस्था पाहून श्रीरघुनाथांनी मनात जाणले की, हिला आग्रहाने इथे ठेवल्यास हिचे प्राण वाचणार नाहीत. ॥ १ ॥

**कहेउ कृपाल भानुकुल नाथा । परिहरि सोचु चलहु बन साथा ॥**
**नहिं बिषाद कर अवसरु आजू । बेगि करहु बन गवन समाजू ॥**

तेव्हा कृपाळू सूर्यकुलाचे स्वामी श्रीरामचंद्र म्हणाले, 'काळजी करणे सोडून देऊन माझ्याबरोबर वनात चल. ही विषाद मानण्याची वेळ नाही. लगेच वनगमनाची तयारी कर.'॥ २॥

**कहि प्रिय बचन प्रिया समुझाई । लगे मातु पद आसिष पाई ॥**
**बेगि प्रजा दुख मेटब आई । जननी निठुर बिसरि जनि जाई ॥**

श्रीरामचंद्रांनी प्रिय बोलून सीतेला समजाविले. नंतर मातेचे पाय धरून आशीर्वाद घेतला. कौसल्या म्हणाली, 'मुला! लवकर परत येऊन प्रजेचे दुःख दूर कर. या निष्ठुर आईला तुझा विसर न पडो.॥ ३॥

**फिरिहि दसा बिधि बहुरि कि मोरी । देखिहउँ नयन मनोहर जोरी ॥**
**सुदिन सुघरी तात कब होइहि । जननी जिअत बदन बिधु जोइहि ॥**

हे विधात्या, माझी ही दशा कधी बदलेल काय? मी आपल्या डोळ्यांनी या मनोहर जोडप्याला पुन्हा पाहू शकेन काय? हे पुत्रा, तुझी आई जिवंतपणी तुझा मुखचंद्र पुन्हा पाहू शकेल, तो सुंदर दिवस व शुभ क्षण केव्हा येईल?॥ ४॥

दो०—**बहुरि बच्छ कहि लालु कहि रघुपति रघुबर तात।**
**कबहिं बोलाइ लगाइ हियँ हरषि निरखिहउँ गात॥ ६८॥**

बाळ! 'वत्स' म्हणून, 'लाला' म्हणून, 'रघुपती' म्हणून, ' 'रघुवर' म्हणून मी तुला पुन्हा केव्हा हृदयाशी धरीन? व आनंदाने तुला पाहू शकेन?'॥ ६८॥

**लखि सनेह कातरि महतारी । बचनु न आव बिकल भइ भारी ॥**
**राम प्रबोधु कीन्ह बिधि नाना । समउ सनेहु न जाइ बखाना ॥**

माता प्रेमाने अधीर असून इतकी व्याकूळ झाली आहे की, तिच्या तोंडातून शब्द फुटत नाही. तेव्हा श्रीरामचंद्रांनी अनेक प्रकारे मातेला समजावले. त्या प्रसंगाचे व प्रेमाचे वर्णन करणे अशक्य.॥ १॥

**तब जानकी सासु पग लागी । सुनिअ माय मैं परम अभागी ॥**
**सेवा समय दैअँ बनु दीन्हा । मोर मनोरथु सफल न कीन्हा ॥**

मग जानकी सासूच्या पाया पडून म्हणाली, 'आई ! ऐका. मी मोठी दुर्दैवी आहे. तुमची सेवा करण्याच्या वेळी देवाने मला वनवास दिला. माझे मनोरथ पूर्ण केले नाहीत.॥ २॥

**तजब छोभु जनि छाड़िअ छोहू । करमु कठिन कछु दोसु न मोहू ॥**
**सुनि सिय बचन सासु अकुलानी । दसा कवनि बिधि कहौं बखानी ॥**

तुम्ही क्षोभ सोडा, परंतु माझ्यावरील कृपा सोडू नका. कर्माची गती कठीण आहे. माझाही काही दोष नाही.' सीतेचे हे बोलणे ऐकून सासू व्याकूळ झाली. तिच्या अवस्थेचे वर्णन मी कसे करणार?'॥ ३ ॥

**बारहिं बार लाइ उर लीन्ही। धरि धीरजु सिख आसिष दीन्ही॥**
**अचल होउ अहिवातु तुम्हारा। जब लगि गंग जमुन जल धारा॥**

कौसल्येने सीतेला वारंवार हृदयाशी धरले व धीर धरून उपदेश केला, आणि आशीर्वाद दिला की, 'जोपर्यंत गंगा व यमुनेचा प्रवाह वाहात राहील, तोपर्यंत तुझे सौभाग्य अढळ राहील.'॥ ४ ॥

दो०—**सीतहि सासु असीस सिख दीन्हि अनेक प्रकार।**
**चली नाइ पद पदुम सिरु अति हित बारहिं बार॥ ६९ ॥**

सासूने सीतेला अनेक प्रकारचे आशीर्वाद व उपदेश दिले. आणि सीता मोठ्या प्रेमाने सासूच्या चरणी मस्तक ठेवून निघाली.॥ ६९ ॥

**समाचार जब लछिमन पाए। ब्याकुल बिलख बदन उठि धाए॥**
**कंप पुलक तन नयन सनीरा। गहे चरन अति प्रेम अधीरा॥**

जेव्हा लक्ष्मणाला ही बातमी समजली, तेव्हा तो व्याकूळ व उदास होऊन धावला. शरीर थरथरत होते, रोमांच आले होते आणि नेत्र अश्रूंनी भरले होते. प्रेमाने अत्यंत अधीर होऊन त्याने श्रीरामांचे चरण धरले.॥ १ ॥

**कहि न सकत कछु चितवत ठाढ़े। मीनु दीन जनु जल तें काढ़े॥**
**सोचु हृदयँ बिधि का होनिहारा। सबु सुखु सुकृतु सिरान हमारा॥**

तो काही बोलत नव्हता, उभ्या उभ्या पाहात होता. जळातून बाहेर काढल्यावर मासा जसा मलूल होतो, तसा तो दीनवाणा झाला होता. मनात विचार करीत होता की, हे विधात्या, काय होणार आहे? आमचे सर्व सुख व पुण्य संपून गेले काय?॥ २ ॥

**मो कहुँ काह कहब रघुनाथा। रखिहहिं भवन कि लेहहिं साथा॥**
**राम बिलोकि बंधु कर जोरें। देह गेह सब सन तृनु तोरें॥**

मला श्रीराम आता काय सांगतील? घरी ठेवतील की सोबत नेतील?' श्रीरामांनी लक्ष्मणाला हात जोडून उभा असलेला व घरचीच नव्हे, तर शरीराचीही सर्व नाती तोडून आलेला आहे, असे पाहिले.॥ ३ ॥

**बोले बचनु राम नय नागर। सील सनेह सरल सुख सागर॥**
**तात प्रेम बस जनि कदराहू। समुझि हृदयँ परिनाम उछाहू॥**

तेव्हा नीति-निपुण आणि शील, स्नेह, सरळपणा आणि सुखाचे सागर असलेले श्रीराम म्हणाले, 'बंधो! तू येथे राहाण्यामुळे परिणामी होणाऱ्या लाभाचा विचार मनात ठेवून तू प्रेमाने अधीर बनू नकोस.॥ ४ ॥

**दो०—मातु पिता गुरु स्वामि सिख सिर धरि करहिं सुभायँ।**
**लहेउ लाभु तिन्ह जनम कर नतरु जनमु जग जायँ॥ ७०॥**

जे लोक माता, पिता, गुरू आणि स्वामी यांचा उपदेश मन:पूर्वक शिरोधार्य मानून त्याचे पालन करतात, त्यांनीच जन्माचे सार्थक केले. नाहीतर जगात जन्म घेणे व्यर्थच आहे. ॥ ७० ॥

**अस जियँ जानि सुनहु सिख भाई। करहु मातु पितु पद सेवकाई॥**
**भवन भरतु रिपुसूदनु नाहीं। राउ बृद्ध मम दुखु मन माहीं॥**

हे बंधू, हे लक्षात आणून माझे म्हणणे ऐक व माता-पित्यांच्या चरणांची सेवा कर. भरत आणि शत्रुघ्न हे घरी नाहीत. महाराज वृद्ध आहेत आणि त्यांच्या मनात माझ्या वनगमनाचे फार दु:ख आहे. ॥ १ ॥

**मैं बन जाउँ तुम्हहि लेइ साथा। होइ सबहि बिधि अवध अनाथा॥**
**गुरु पितु मातु प्रजा परिवारू। सब कहुँ परइ दुसह दुख भारू॥**

अशा अवस्थेमध्ये मी तुला बरोबर घेऊन वनात गेलो, तर अयोध्या सर्व प्रकारे अनाथ होईल. गुरू, माता, पिता, प्रजा व परिवार या सर्वांवर दु:खाचे असह्य ओझे पडेल. ॥ २ ॥

**रहहु करहु सब कर परितोषू। नतरु तात होइहि बड़ दोषू॥**
**जासु राज प्रिय प्रजा दुखारी। सो नृपु अवसि नरक अधिकारी॥**

तेव्हा तू येथेच राहा आणि सर्वांचे समाधान कर. नाहीतर बंधो! फार मोठा दोष पदरी येईल. ज्याच्या राज्यात प्रजा दु:खी असते, तो राजा नक्कीच नरकास पात्र ठरतो. ॥ ३ ॥

**रहहु तात असि नीति बिचारी। सुनत लखनु भए ब्याकुल भारी॥**
**सिअरें बचन सूखि गए कैसें। परसत तुहिन तामरसु जैसें॥**

बंधो! या नीतीचा विचार करून तू घरीच रहा.' हे ऐकताच लक्ष्मण फार व्याकूळ झाला. दवामुळे कमळ जसे करपून जाते, त्याप्रमाणे श्रीरामांच्या शीतल वचनामुळे तो करपून गेला. ॥ ४ ॥

**दो०—उतरु न आवत प्रेम बस गहे चरन अकुलाइ।**
**नाथ दासु मैं स्वामि तुम्ह तजहु त काह बसाइ॥ ७१॥**

प्रेमामुळे लक्ष्मण काही उत्तर देऊ शकला नाही. त्याने व्याकूळ होऊन श्रीरामांचे पाय धरले आणि म्हटले, 'हे नाथ, मी दास आहे आणि तुम्ही स्वामी. म्हणून तुम्ही मला सोडून दिले, तर मी काय करणार ? ॥ ७१ ॥

**दीन्हि मोहि सिख नीकि गोसाईं। लागि अगम अपनी कदराईं॥**
**नरबर धीर धरम धुर धारी। निगम नीति कहुँ ते अधिकारी॥**

हे स्वामी, तुम्ही मला उपदेश तर फार चांगला केला, पण माझ्या असमर्थपणामुळे तो माझ्या पचनी नाही पडला. जे धीर असतात व धर्माची धुरा धारण करतात, तेच शास्त्र व नीतीचे श्रेष्ठ अधिकारी असतात.॥ १ ॥

**मैं सिसु प्रभु सनेहँ प्रतिपाला। मंदरु मेरु कि लेहिं मराला॥**
**गुर पितु मातु न जानउँ काहू। कहउँ सुभाउ नाथ पतिआहू॥**

मी तर प्रभूंच्या प्रेमामध्ये पोसले गेलेले लहान मूल आहे. हंस मंदराचल किंवा सुमेरू पर्वत कधी उचलू शकतो काय? हे नाथ, मी मनापासून सांगतो, तुम्ही विश्वास बाळगा. तुम्हांला सोडून गुरू, माता, पिता या कुणालाही मी जाणत नाही.॥ २ ॥

**जहँ लगि जगत सनेह सगाई। प्रीति प्रतीति निगम निजु गाई॥**
**मोरें सबइ एक तुम्ह स्वामी। दीनबंधु उर अंतरजामी॥**

हे प्रभू, दीनबंधू, हे अंतर्यामी, प्रत्यक्ष वेदाने सांगितले आहे की, जगात जितके म्हणून स्नेहाचे संबंध आहेत, प्रेम आणि विश्वास आहे. ते सर्व काही माझ्यासाठी तुम्हीच आहात.॥ ३ ॥

**धरम नीति उपदेसिअ ताही। कीरति भूति सुगति प्रिय जाही॥**
**मन क्रम बचन चरन रत होई। कृपासिंधु परिहरिअ कि सोई॥**

हे कृपासिंधू, ज्याला कीर्ती, ऐश्वर्य किंवा सद्गती प्रिय आहे, त्यालाच धर्म व नीतीचा उपदेश करायला हवा. परंतु जो मन, वचन व कर्माने तुमच्या चरणी प्रेम बाळगतो, त्याला सोडून देणे योग्य आहे काय?'॥ ४ ॥

दो०—**करुनासिंधु सुबंधु के सुनि मृदु बचन बिनीत।**
**समुझाए उर लाइ प्रभु जानि सनेहँ सभीत॥ ७२ ॥**

दयेचा सागर असलेल्या श्रीरामचंद्रांनी भावाचे मृदू व नम्र वचन ऐकून आणि स्नेहामुळे त्याला घाबरलेला पाहून हृदयाशी धरले व समजावले.॥ ७२ ॥

**मागहु बिदा मातु सन जाई। आवहु बेगि चलहु बन भाई॥**
**मुदित भए सुनि रघुबर बानी। भयउ लाभ बड़ गइ बड़ि हानी॥**

ते लक्ष्मणाला म्हणाले, 'बंधो! जाऊन आईचा निरोप घेऊन ये आणि लवकर वनात चल.' रघुकुलातील श्रेष्ठ श्रीरामांची वाणी ऐकून लक्ष्मण आनंदला. मनात म्हणाला, मोठे नुकसान टळले आणि मोठा फायदा झाला.॥ १ ॥

**हरषित हृदयँ मातु पहिं आए। मनहुँ अंध फिरि लोचन पाए॥**
**जाइ जननि पग नायउ माथा। मनु रघुनंदन जानकि साथा॥**

तो आनंदाने सुमित्रा मातेकडे गेला. आंधळ्याला जणू पुन्हा डोळे मिळाले. त्याने आईला नमस्कार केला. पण त्याचे मन मात्र सीतारामांच्या ठायी होते.॥ २ ॥

**पूँछे मातु मलिन मन देखी। लखन कही सब कथा बिसेषी॥**
**गई सहमि सुनि बचन कठोरा। मृगी देखि दव जनु चहु ओरा॥**

आईने उदासीनतेचे कारण विचारले, तेव्हा लक्ष्मणाने सर्व हकीगत सविस्तर सांगितली. सुमित्रा त्याचे ते कठोर बोलणे ऐकून घाबरून गेली. हरिणी ज्याप्रमाणे वनात सगळीकडे आग लागल्याचे पाहून घाबरते, तशी.॥ ३॥

**लखन लखेउ भा अनरथ आजू। एहिं सनेह बस करब अकाजू॥**
**मागत बिदा सभय सकुचाहीं। जाइ संग बिधि कहिहि कि नाहीं॥**

आता अनर्थ होणार, असे लक्ष्मणाला दिसले. त्याला वाटले की, माता आता प्रेमामुळे काम बिघडवून टाकील, म्हणून तो निरोप मागताना भीतीने संकोचत होता. मनात विचार येत होता की, 'हे विधात्या, आई श्रीरामांसोबत जायला अनुमती देईल की नाही?'॥ ४॥

दो०—**समुझि सुमित्राँ राम सिय रूपु सुसीलु सुभाउ।**
**नृप सनेहु लखि धुनेउ सिरु पापिनि दीन्ह कुदाउ॥ ७३॥**

सुमित्रेने श्रीरामाचे आणि सीतेचे सुंदर रूप, सुंदर शील आणि स्वभाव पाहून आणि त्यांच्यावरील महाराजांचे प्रेम पाहून डोके बडवून घेतले आणि म्हटले की, 'पापिणी कैकेयीने दुष्ट डाव साधला.'॥ ७३॥

**धीरजु धरेउ कुअवसर जानी। सहज सुहृद बोली मृदु बानी॥**
**तात तुम्हारि मातु बैदेही। पिता रामु सब भाँति सनेही॥**

परंतु वेळ चांगली नाही, असे पाहून तिने मन घट्ट केले आणि स्वभावतःच हित चिंतणारी सुमित्रा कोमल वाणीने लक्ष्मणाला म्हणाली, 'बाळा! जानकी तुझी माता आहे आणि सर्वप्रकारे स्नेह करणारे श्रीरामचंद्र तुझे पिता आहेत, असे समज.॥ १॥

**अवध तहाँ जहँ राम निवासू। तहँइँ दिवसु जहँ भानु प्रकासू॥**
**जौं पै सीय रामु बन जाहीं। अवध तुम्हार काजु कछु नाहीं॥**

जिथे श्रीरामांचा निवास असेल, तेथेच अयोध्या आहे. जिथे सूर्यप्रकाश असतो, तिथे दिवस असतो. जर सीता-राम वनाला खरोखर जात असतील, तर अयोध्येमध्ये तुझे काही काम नाही.॥ २॥

**गुर पितु मातु बंधु सुर साईं। सेइअहिं सकल प्रान की नाईं॥**
**रामु प्रानप्रिय जीवन जी के। स्वारथ रहित सखा सबही के॥**

गुरू, पिता, माता, बंधू, देव आणि स्वामी या सर्वांची सेवा आपल्या प्राणांसारखी केली पाहिजे. शिवाय श्रीरामचंद्र तर प्राणांहूनही प्रिय आहेत, हृदयाचे जीवन आहेत आणि सर्वांचे निःस्वार्थ सखा आहेत.॥ ३॥

**पूजनीय प्रिय परम जहाँ तें। सब मानिअहिं राम के नातें॥**
**अस जियँ जानि संग बन जाहू। लेहु तात जग जीवन लाहू॥**

जगात जितके पूजनीय व परम प्रिय लोक आहेत, ते सर्व श्रीरामांच्या संबंधामुळेच पूज्य व प्रिय मानण्यास योग्य आहेत. हे लक्षात घेऊन मुला! त्यांच्याबरोबर वनात जा आणि जीवनामध्ये जगण्याचा लाभ मिळव.॥ ४॥

**दो०—भूरि भाग भाजनु भयहु मोहि समेत बलि जाउँ।**
**जौं तुम्हरें मन छाड़ि छलु कीन्ह राम पद ठाउँ॥ ७४॥**

मी तुझ्यावरून जीव ओवाळून टाकते. हे पुत्रा, माझ्यासह तू मोठा भाग्याचा ठरलास. तुझ्या चित्ताने निष्कपटपणे श्रीरामांच्या चरणी स्थान मिळविले आहे.॥ ७४॥

**पुत्रवती जुबती जग सोई। रघुपति भगतु जासु सुतु होई॥**
**नतरु बाँझ भलि बादि बिआनी। राम बिमुख सुत तें हित जानी॥**

जगात तीच युवती खऱ्या अर्थी पुत्रवती होय, जिचा पुत्र श्रीरघुनाथांचा भक्त आहे. अन्यथा राम-विन्मुख पुत्रामुळे हित होईल, असे जिला वाटते त्यापेक्षा ती वांझ असणे चांगले. पशूप्रमाणे तिने पुत्राला प्रसवणे व्यर्थ होय.॥ १॥

**तुम्हरेहिं भाग रामु बन जाहीं। दूसर हेतु तात कछु नाहीं॥**
**सकल सुकृत कर बड़ फलु एहू। राम सीय पद सहज सनेहू॥**

तुझ्या भाग्यामुळे श्रीराम वनात जात आहेत. बाळा! दुसरे कोणतेही कारण नाही. श्रीसीतारामांच्या चरणी मनापासून प्रेम असणे, हेच संपूर्ण पुण्याचे सर्वांत मोठे फळ होय.॥ २॥

**रागु रोषु इरिषा मदु मोहू। जनि सपनेहुँ इन्ह के बस होहू॥**
**सकल प्रकार बिकार बिहाई। मन क्रम बचन करेहु सेवकाई॥**

राग, द्वेष, ईर्ष्या, मद आणि मोह यांना स्वप्नातही बळी पडू नकोस. सर्व विकारांचा त्याग करून कायावाचामनाने श्रीसीतारामांची सेवा कर.॥ ३॥

**तुम्ह कहुँ बन सब भाँति सुपासू। सँग पितु मातु रामु सिय जासू॥**
**जेहिं न रामु बन लहहिं कलेसू। सुत सोइ करेहु इहइ उपदेसू॥**

वनामध्ये तुला सर्व प्रकारे सुख आहे. तुझ्याबरोबर श्रीसीतारामरूप माता-पिता आहेत. हे पुत्रा, ज्यामुळे श्रीरामचंद्रांना वनात असताना क्लेश होणार नाहीत, असेच प्रयत्न कर, हाच माझा उपदेश आहे.॥ ४॥

**छं०—उपदेसु यहु जेहिं तात तुम्हरे राम सिय सुख पावहीं।**
**पितु मातु प्रिय परिवार पुर सुख सुरति बन बिसरावहीं॥**

**तुलसी प्रभुहि सिख देइ आयसु दीन्ह पुनि आसिष दई।**
**रति होउ अबिरल अमल सिय रघुबीर पद नित नित नई॥**

मुला! तू, वनामध्ये श्रीसीतारामांची इतकी सेवा कर की, त्या सुखामुळे त्यांना पिता, माता, प्रिय परिवार आणि येथील सुखांचे विस्मरण होवो, हाच माझा उपदेश आहे.' तुलसीदास म्हणतात की, सुमित्रेने अशा प्रकारे आपला प्रभू असलेल्या लक्ष्मणाला उपदेश करून वनास जाण्याची आज्ञा दिली. आणि आशीर्वाद दिला की, 'श्रीसीता व श्रीरघुवीर यांच्या चरणी तुझे निर्मळ व प्रगाढ प्रेम नित्य वाढत राहो.'

**सो०—मातु चरन सिरु नाइ चले तुरत संकित हृदयँ।**
**बागुर बिषम तोराइ मनहुँ भाग मृगु भाग बस॥ ७५॥**

मातेच्या चरणी मस्तक ठेवून मनातून मात्र आता कुठलेही विघ्न न येवो, म्हणून भीत भीत लक्ष्मण तेथून असा निघाला की, ज्याप्रमाणे नशिबाने एखादे हरीण कठीण जाळे तोडून पळते.॥ ७५॥

**गए लखनु जहँ जानकिनाथू। भे मन मुदित पाइ प्रिय साथू॥**
**बंदि राम सिय चरन सुहाए। चले संग नृपमंदिर आए॥**

लक्ष्मण श्रीजानकीनाथांच्याकडे गेला आणि प्रिय व्यक्तींच्या सहवासामुळे मनातून प्रसन्न झाला. श्रीराम व सीता यांच्या चरणांना वंदन करून त्यांच्याबरोबरच निघून तो राजमहालात आला.॥ १॥

**कहहिं परसपर पुर नर नारी। भलि बनाइ बिधि बात बिगारी॥**
**तन कृस मन दुखु बदन मलीने। बिकल मनहुँ माखी मधु छीने॥**

नगरातील स्त्री-पुरुष परस्पर म्हणत होते की, 'विधात्याने पार वाटोळे केले.' त्यांचे शरीर दुर्बल, मन दुःखी व मुख उदास झाले होते. मध काढून घेतल्यावर मधमाश्या व्याकूळ होतात, तसे ते व्याकूळ झाले होते.॥ २॥

**कर मीजहिं सिरु धुनि पछिताहीं। जनु बिनु पंख बिहग अकुलाहीं॥**
**भइ बड़ि भीर भूप दरबारा। बरनि न जाइ बिषादु अपारा॥**

सर्वजण हात चोळत होते आणि डोके बडवून घेत पश्चात्ताप करीत होते. राजद्वारावर मोठी गर्दी झाली होती. तेथे अपार विषाद पसरला होता. त्याचे वर्णन करणेच कठीण.॥ ३॥

**सचिवँ उठाइ राउ बैठारे। कहि प्रिय बचन रामु पगु धारे॥**
**सिय समेत दोउ तनय निहारी। ब्याकुल भयउ भूमिपति भारी॥**

‘श्रीरामचंद्र आले आहेत,’ हे गोड शब्द बोलून मंत्र्याने राजाला उठवून बसवले. सीता व दोघे पुत्र हे वनात जाण्यास तयार झाल्याचे पाहून महाराज फार व्याकूळ झाले. ॥ ४ ॥

दो०—**सीय सहित सुत सुभग दोउ देखि देखि अकुलाइ।**
**बारहिं बार सनेह बस राउ लेइ उर लाइ॥ ७६॥**

सीतेसह दोघा सुंदर मुलांना पाहून पाहून राजांना भडभडून येत होते. आणि ते प्रेमाने वारंवार त्यांना हृदयाशी धरत होते. ॥ ७६ ॥

**सकइ न बोलि बिकल नरनाहू। सोक जनित उर दारुन दाहू॥**
**नाइ सीसु पद अति अनुरागा। उठि रघुबीर बिदा तब मागा॥**

व्याकूळ झाल्यामुळे राजे बोलू शकत नव्हते. मनात शोकामुळे उत्पन्न झालेली आग होती. तेव्हा रघुकुलवीर श्रीराम यांनी अत्यंत प्रेमाने राजांच्या चरणी मस्तक ठेवले आणि जाण्यासाठी निरोप मागितला. ॥ १ ॥

**पितु असीस आयसु मोहि दीजै। हरष समय बिसमउ कत कीजै॥**
**तात किएँ प्रिय प्रेम प्रमादू। जसु जग जाइ होइ अपबादू॥**

‘बाबा! मला आशीर्वाद आणि आज्ञा द्या. आनंदाच्या या प्रसंगी शोक का करता? हे तात, प्रिय व्यक्तीच्या प्रेमामुळे प्रमाद केल्यास जगात कीर्ती नाहीशी होईल आणि निंदा होईल. ॥ २ ॥

**सुनि सनेह बस उठि नरनाहाँ। बैठारे रघुपति गहि बाहाँ॥**
**सुनहु तात तुम्ह कहुँ मुनि कहहीं। रामु चराचर नायक अहहीं॥**

हे ऐकल्यावर राजांनी प्रेमाने उठून श्रीरामांचा हात धरून त्यांना खाली बसविले आणि म्हटले, ‘पुत्रा! ऐक. मुनीलोक म्हणत असतात की, श्रीराम चराचराचे स्वामी आहेत. ॥ ३ ॥

**सुभ अरु असुभ करम अनुहारी। ईसु देइ फलु हृदयँ बिचारी॥**
**करइ जो करम पाव फल सोई। निगम नीति असि कह सबु कोई॥**

शुभ व अशुभ कर्मांचा मनात विचार करून ईश्वर फळ देतो. जो कर्म करतो त्यालाच त्याचे फळ मिळते. सर्वजण म्हणतात की, वेदात हाच नियम सांगितला आहे. ॥ ४ ॥

दो०—**औरु करै अपराधु कोउ और पाव फल भोगु।**
**अति बिचित्र भगवंत गति को जग जानै जोगु॥ ७७॥**

परंतु यावेळी उलटे घडत आहे. अपराध कुणी इतराने करावा आणि त्याचे फळ तिसऱ्या कोणी भोगावे. भगवंतांची लीला फार विचित्र आहे. ती जाणणारा जगात कोण आहे?’ ॥ ७७ ॥

**रायँ राम राखन हित लागी। बहुत उपाय किए छलु त्यागी॥**
**लखी राम रुख रहत न जाने। धरम धुरंधर धीर सयाने॥**

राजांनी अशा प्रकारे श्रीरामचंद्रांना ठेवून घेण्यासाठी निष्कपटपणे खूप प्रयत्न केले, परंतु त्यांनी धर्मधुरंधर, धीर व बुद्धिमान श्रीरामांचा एकंदर कल पाहिला. ते थांबतील असे काही त्यांना वाटले नाही.॥ १॥

**तब नृप सीय लाइ उर लीन्ही। अति हित बहुत भाँति सिख दीन्ही॥**
**कहि बन के दुख दुसह सुनाए। सासु ससुर पितु सुख समुझाए॥**

तेव्हा राजांनी सीतेला हृदयाशी धरले आणि मोठ्या प्रेमाने पुष्कळ प्रकारे समजावण्याचा प्रयत्न केला. वनातील दुःसह दुःखे वर्णन करून सांगितली. नंतर सासू, सासरे, पिता यांच्याजवळ राहण्यामधील सुख समजावून दिले.॥ २॥

**सिय मनु राम चरन अनुरागा। घरु न सुगमु बनु बिषमु न लागा॥**
**औरउ सबहिं सीय समुझाई। कहि कहि बिपिन बिपति अधिकाई॥**

परंतु सीतेचे मन श्रीरामांच्या चरणी अनुरक्त होते. म्हणून तिला घरी राहाणे आवडले नाही आणि वनही भयानक वाटले नाही. नंतर इतर सर्व लोकांनीही वनात असलेल्या संकटांचे खूप वर्णन करून सीतेला समजावले.॥ ३॥

**सचिव नारि गुर नारि सयानी। सहित सनेह कहहिं मृदु बानी॥**
**तुम्ह कहुँ तौ न दीन्ह बनबासू। करहु जो कहहिं ससुर गुर सासू॥**

मंत्री सुमंत्रांची पत्नी, गुरू वसिष्ठांची पत्नी अरुंधती आणि इतरही चतुर स्त्रियांनी प्रेमाने व कोमल वाणीने सांगितले की, 'राजांनी तुला तर वनवास दिलेला नाही. म्हणून सासरे, सासू व गुरू जे सांगतात, तसे कर.'॥ ४॥

दो०—**सिख सीतलि हित मधुर मृदु सुनि सीतहि न सोहानि।**
**सरद चंद चंदिनि लगत जनु चकई अकुलानि॥ ७८॥**

हे शीतल, हितकारक, मधुर व कोमल बोलणे ऐकून सीतेला बरे वाटले नाही. शरद ऋतूच्या चंद्राच्या चांदण्याचा स्पर्श होताच जशी चकवी व्याकूळ होते, त्याप्रमाणे सीता व्याकूळ झाली.॥ ७८॥

**सीय सकुच बस उतरु न देई। सो सुनि तमकि उठी कैकेई॥**
**मुनि पट भूषन भाजन आनी। आगें धरि बोली मृदु बानी॥**

संकोचामुळे सीतेने काही उत्तर दिले नाही, परंतु या गोष्टी ऐकून कैकेयी चडफडली. तिने मुनींची वस्त्रे, माला-मेखला ही आभूषणे आणि कमंडलू आणून श्रीरामांच्या समोर ठेवला आणि कोमलपणे म्हणाली,॥ १॥

**नृपहि प्रानप्रिय तुम्ह रघुबीरा। सील सनेह न छाड़िहि भीरा॥**
**सुकृतु सुजसु परलोकु नसाऊ। तुम्हहि जान बन कहिहि न काऊ॥**

'हे रघुवीरा, राजांना तू प्राणप्रिय आहेस. प्रेमामुळे त्यांचे मन दुर्बल बनले आहे. ते स्वभाव व प्रेम सोडणार नाहीत. पुण्य, सुंदर कीर्ती आणि परलोक नष्ट झाला, तरी ते तुला वनात जाण्यास कधीच सांगणार नाहीत.॥ २॥

**अस बिचारि सोइ करहु जो भावा। राम जननि सिख सुनि सुखु पावा॥**
**भूपहि बचन बान सम लागे। करहिं न प्रान पयान अभागे॥**

असा विचार करून तुला जे योग्य वाटेल ते कर.' कैकेयी मातेचा उपदेश ऐकून श्रीरामांना आनंद वाटला. परंतु राजांना हे बोलणे बाणाप्रमाणे बोचले. त्यांनी विचार केला की, माझे दुर्दैवी प्राण अजुनी का जात नाहीत?॥ ३॥

**लोग बिकल मुरुछित नरनाहू। काह करिअ कछु सूझ न काहू॥**
**रामु तुरत मुनि बेषु बनाई। चले जनक जननिहि सिरु नाई॥**

महाराज बेशुद्ध झाले. लोक व्याकूळ झाले. काय करावे, हे कुणाला काही सुचत नव्हते. श्रीरामांनी पटकन मुनीचा वेश धारण केला आणि माता-पित्यांना नमस्कार करून ते निघाले.॥ ४॥

दो०—**सजि बन साजु समाजु सबु बनिता बंधु समेत।**
**बंदि बिप्र गुर चरन प्रभु चले करि सबहि अचेत॥ ७९॥**

वनात उपयोगी पडणारे सर्व सामान घेऊन पत्नी सीता आणि भाऊ लक्ष्मण यांच्यासह श्रीरामचंद्र ब्राह्मण व गुरू यांच्या चरणांना वंदन करून आणि सर्वांना सुन्न करून निघाले.॥ ७९॥

**निकसि बसिष्ठ द्वार भए ठाढ़े। देखे लोग बिरह दव दाढ़े॥**
**कहि प्रिय बचन सकल समुझाए। बिप्र बृंद रघुबीर बोलाए॥**

राजमहालातून बाहेर पडल्यावर श्रीरामचंद्र वसिष्ठांच्या द्वारी जाऊन उभे राहिले. सर्व लोक वियोगाच्या अग्नीमध्ये होरपळत असल्याचे त्यांनी पाहिले. त्यांनी गोड शब्द बोलून सर्वांना समजावून सांगितले. नंतर श्रीरामांनी ब्राह्मण मंडळींना बोलाविले.॥ १॥

**गुर सन कहि बरषासन दीन्हे। आदर दान बिनय बस कीन्हे॥**
**जाचक दान मान संतोषे। मीत पुनीत प्रेम परितोषे॥**

गुरूंना सांगून त्या सर्वांना वर्षभरासाठी अन्न दिले आणि आदर, दान व विनयाने त्यांना प्रभावित केले. त्यानंतर त्यांनी याचकांना दान व मान देऊन संतुष्ट केले आणि मित्रांना पवित्र प्रेमाने प्रसन्न केले.॥ २॥

**दासीं दास बोलाइ बहोरी। गुरहि सौंपि बोले कर जोरी॥**
**सब कै सार सँभार गोसाईं। करबि जनक जननी की नाईं॥**

नंतर त्यांनी दास-दासींना बोलावून त्यांना गुरूंच्याकडे सोपवून हात जोडून म्हटले, 'हे गुरुवर्य! माता-पित्याप्रमाणे या सर्वांचा सांभाळ करीत राहा.'॥ ३ ॥

**बारहिं बार जोरि जुग पानी। कहत रामु सब सन मृदु बानी॥**
**सोइ सब भाँति मोर हितकारी। जेहि तें रहै भुआल सुखारी॥**

श्रीरामचंद्रांनी वारंवार हात जोडून सर्वांना कोमल वाणीने सांगितले की, 'ज्याच्या प्रयत्नामुळे माझे वडील सुखी होतील, तोच सर्व प्रकारे माझा हितकारक मित्र असेल.॥ ४॥

दो०—**मातु सकल मोरे बिरहँ जेहिं न होहिं दुख दीन।**
**सोइ उपाउ तुम्ह करेहु सब पुर जन परम प्रबीन॥ ८०॥**

हे चतुर पुरवासी गृहस्थांनो, माझ्या सर्व माता विरहाने दुःखी होऊ नयेत, असा तुम्ही उपाय करा.'॥ ८० ॥

**एहि बिधि राम सबहि समुझावा। गुर पद पदुम हरषि सिरु नावा॥**
**गनपति गौरि गिरीसु मनाई। चले असीस पाइ रघुराई॥**

अशा प्रकारे श्रीरामांनी सर्वांना समजावले आणि आनंदित होऊन गुरूंच्या चरणी मस्तक ठेवले. नंतर गणेश, पार्वती व कैलासपती महादेवांची प्रार्थना केली आणि त्यांचा आशीर्वाद घेऊन श्रीरघुनाथ निघाले.॥ १ ॥

**राम चलत अति भयउ बिषादू। सुनि न जाइ पुर आरत नादू॥**
**कुसगुन लंक अवध अति सोकू। हरष बिषाद बिबस सुरलोकू॥**

श्रीराम निघताच फार मोठा हलकल्लोळ माजला. नगरात उडालेला हाहाकार ऐकवत नव्हता. लंकेमध्ये वाईट शकुन होऊ लागले. अयोध्येमध्ये अत्यंत शोक पसरला आणि देवलोकी सर्वजण राक्षसांचा नाश होणार म्हणून हर्ष पावले व अयोध्यावासीयांचा शोक पाहून विषादामध्ये बुडून गेले.॥ २॥

**गइ मुरुछा तब भूपति जागे। बोलि सुमंत्रु कहन अस लागे॥**
**रामु चले बन प्रान न जाहीं। केहि सुख लागि रहत तन माहीं॥**

राजांची मूर्च्छा दूर झाली, राजे शुद्धीवर आले आणि सुमंत्राला बोलावून म्हणू लागले, 'श्रीराम वनात निघून गेले, परंतु माझे प्राण काही जात नाहीत. आता कोणते सुख मिळविण्यासाठी हे शरीरात राहिले आहेत, कोणास ठाऊक!॥ ३ ॥

**एहि तें कवन ब्यथा बलवाना। जो दुखु पाइ तजहिं तनु प्राना॥**
**पुनि धरि धीर कहइ नरनाहू। लै रथु संग सखा तुम्ह जाहू॥**

यापेक्षा अधिक मोठी व्यथा कोणती असेल बरे की, तिच्यामुळे प्राण शरीराचा त्याग करतील.' नंतर धीर धरून महाराज म्हणाले, 'मित्रा, तू रथ घेऊन श्रीरामासोबत जा.॥ ४॥

**दो०—सुठि सुकुमार कुमार दोउ जनकसुता सुकुमारि।**
**रथ चढ़ाइ देखराइ बनु फिरेहु गएँ दिन चारि॥ ८१॥**

अत्यंत सुकुमार असलेल्या दोन्ही कुमारांना आणि सुकुमारी जानकीला रथात बसवून व वन दाखवून चार दिवसांनी परत घेऊन ये.॥ ८१॥

**जौं नहिं फिरहिं धीर दोउ भाई। सत्यसंध दृढ़ब्रत रघुराई॥**
**तौ तुम्ह बिनय करेहु कर जोरी। फेरिअ प्रभु मिथिलेसकिसोरी॥**

श्रीराम प्रतिज्ञेचा पक्का व नियमांचे कठोर पालन करणारा आहे. तेव्हा जरी ते दोघे धैर्यवान भाऊ परत आले नाहीत, तर तू त्यांना हात जोडून विनंती कर की, हे प्रभो, जनककुमारी सीतेला तरी परत पाठवा.॥ १॥

**जब सिय कानन देखि डेराई। कहेहु मोरि सिख अवसरु पाई॥**
**सासु ससुर अस कहेउ सँदेसू। पुत्रि फिरिअ बन बहुत कलेसू॥**

जेव्हा सीता वन पाहून घाबरेल, तेव्हा संधी पाहून माझा निरोप तिला सांग की, 'बाळे! तू परत ये. वनात फार क्लेश होतील.' असा तुझ्या सासू-सासऱ्यांनी निरोप दिला आहे.॥ २॥

**पितुगृह कबहुँ कबहुँ ससुरारी। रहेहु जहाँ रुचि होइ तुम्हारी॥**
**एहि बिधि करेहु उपाय कदंबा। फिरइ त होइ प्रान अवलंबा॥**

'कधी माहेरी तर कधी सासरी, जिथे तुझी इच्छा असेल, तिथे राहा.' अशाप्रकारे सर्व प्रकारचे उपाय तू कर. जर सीता परत आली, तर एखादे वेळी माझ्या प्राणांना आधार मिळेल.॥ ३॥

**नाहिं त मोर मरनु परिनामा। कछु न बसाइ भएँ बिधि बामा॥**
**अस कहि मुरुछि परा महि राऊ। रामु लखनु सिय आनि देखाऊ॥**

नाही तर माझे मरणच ओढवेल. दैव प्रतिकूल झाले की, काही चालत नाही. अरेरे, राम, लक्ष्मण व सीता यांना आणून मला दाखवा.' असे म्हणून महाराज बेशुद्ध होऊन जमिनीवर पडले.॥ ४॥

**दो०—पाइ रजायसु नाइ सिरु रथु अति बेग बनाइ।**
**गयउ जहाँ बाहेर नगर सीय सहित दोउ भाइ॥ ८२॥**

राजांची आज्ञा होताच सुमंत्र त्यांना नमस्कार करून लगेच रथ जोडून नगराबाहेर गेला. तेथे सीता व राम-लक्ष्मण होते.॥ ८२॥

**तब सुमंत्र नृप बचन सुनाए। करि बिनती रथ रामु चढ़ाए॥**
**चढ़ि रथ सीय सहित दोउ भाई। चले हृदयँ अवधहि सिरु नाई॥**

तेथे पोहोचल्यावर सुमंत्राने राजांचे म्हणणे रामांना सांगितले आणि विनंती करून त्यांना रथात बसविले. सीतेसह दोघे बंधू रथात बसून मनातल्या मनात अयोध्येस प्रणाम करून निघाले. ॥ १ ॥

**चलत रामु लखि अवध अनाथा । बिकल लोग सब लागे साथा ॥**
**कृपासिंधु बहुबिधि समुझावहिं । फिरहिं प्रेम बस पुनि फिरि आवहिं ॥**

श्रीरघुनाथ जात आहेत व अयोध्येला कोणी त्राता नाही, असे पाहून सर्व लोक व्याकूळ होऊन त्यांच्याबरोबर निघाले. कृपासिंधू श्रीरामांनी त्यांना तऱ्हेतऱ्हेने समजावले. तेव्हा ते अयोध्येकडे जायला निघत, परंतु प्रेमामुळे पुन्हा परत येत. ॥ २ ॥

**लागति अवध भयावनि भारी । मानहुँ कालराति अँधिआरी ॥**
**घोर जंतु सम पुर नर नारी । डरपहिं एकहि एक निहारी ॥**

त्यांना अयोध्यापुरी फार भयानक वाटू लागली. जणू अंधकारमय कालरात्रच असावी. नगरातील स्त्री-पुरुष भयानक प्राण्यांप्रमाणे परस्परांना पाहून घाबरत होते. ॥ ३ ॥

**घर मसान परिजन जनु भूता । सुत हित मीत मनहुँ जमदूता ॥**
**बागन्ह बिटप बेलि कुम्हिलाहीं । सरित सरोबर देखि न जाहीं ॥**

घर म्हणजे स्मशान, कुटुंबीय जणू भूत-प्रेत, हितचिंतक आणि मित्र जणू यमदूताप्रमाणे वाटत होते. बागांमधील वृक्ष व वेली कोमेजू लागल्या. नदी व तलाव फार भयानक वाटत होते. त्यांच्याकडे पाहावतसुद्धा नव्हते. ॥ ४ ॥

**दो०—हय गय कोटिन्ह केलिमृग पुरपसु चातक मोर।**
**पिक रथांग सुक सारिका सारस हंस चकोर ॥ ८३ ॥**

कोट्यवधी घोडे, हत्ती, खेळण्यासाठी पाळलेली हरणे, नगरातील गाई, बैल, बकरी इत्यादी पशू, चातक, मोर, कोकिळ, चक्रवाक, पोपट, मैना, सारस, हंस, चकोर, ॥ ८३ ॥

**राम बियोग बिकल सब ठाढ़े । जहँ तहँ मनहुँ चित्र लिखि काढ़े ॥**
**नगरु सफल बनु गहबर भारी । खग मृग बिपुल सकल नर नारी ॥**

हे सर्व श्रीरघुनाथांच्या वियोगामुळे व्याकूळ होऊन चित्रात काढल्या-सारखे इकडे तिकडे स्तब्ध उभे होते. नगर जणू फळांनी भरलेले घनदाट जंगल होते. नगरवासी सर्व स्त्री-पुरुष हे पुष्कळसे पशु-पक्षी होते. ॥ १ ॥

**बिधि कैकई किरातिनि कीन्ही । जेहिं दव दुसह दसहुँ दिसि दीन्ही ॥**
**सहि न सके रघुबर बिरहागी । चले लोग सब ब्याकुल भागी ॥**

विधात्याने कैकेयीला भिल्लीण बनविले. तिने दाही दिशांना दुःसह वणवा पेटवून दिला. श्रीरामचंद्रांच्या विरहाची ही आग लोक सहन करू शकले नाहीत. सर्व लोक व्याकूळ होऊन पळून गेले. ॥ २ ॥

**सबहिं बिचारु कीन्ह मन माहीं । राम लखन सिय बिनु सुखु नाहीं ॥**
**जहाँ रामु तहँ सबुइ समाजू । बिनु रघुबीर अवध नहिं काजू ॥**

सर्वांनी मनात विचार केला की, श्रीराम, लक्ष्मण व सीता यांच्याविना सुख नाही. जिथे श्रीराम राहातील, तेथेच सर्व समाज राहील. श्रीरामचंद्रांच्याविना अयोध्येमध्ये आमचे काही काम नाही. ॥ ३ ॥

**चले साथ अस मंत्रु दृढ़ाई । सुर दुर्लभ सुख सदन बिहाई ॥**
**राम चरन पंकज प्रिय जिन्हही । बिषय भोग बस करहिं कि तिन्हही ॥**

असा पक्का विचार करून व देवांनाही दुर्लभ अशी सुखे नांदणारी घरे सोडून सर्वजण श्रीरामांच्याबरोबर निघाले. ज्यांना श्रीरामांची चरण-कमले प्रिय आहेत, त्यांना कधी विषयभोग वश करू शकतील काय? ॥ ४ ॥

दो०—**बालक बृद्ध बिहाइ गृहँ लगे लोग सब साथ।**
**तमसा तीर निवासु किय प्रथम दिवस रघुनाथ ॥ ८४ ॥**

मुले व म्हातारे-कोतारे यांना घरांत सोडून सर्व लोक श्रीरामांच्याबरोबर निघाले. पहिल्या दिवशी श्रीरघुनाथांनी तमसा नदीच्या किनाऱ्यावर निवास केला. ॥ ८४ ॥

**रघुपति प्रजा प्रेमबस देखी । सदय हृदयँ दुखु भयउ बिसेषी ॥**
**करुनामय रघुनाथ गोसाँई । बेगि पाइअहिं पीर पराई ॥**

प्रजेचे प्रेम पाहून श्रीरघुनाथांचे कृपाळू मन अतिशय द्रवले. प्रभू श्रीरघुनाथ करुणामय आहेत. दुसऱ्याची पीडा त्यांना चटकन जाणवते. ॥ १ ॥

**कहि सप्रेम मृदु बचन सुहाए । बहुबिधि राम लोग समुझाए ॥**
**किए धरम उपदेस घनेरे । लोग प्रेम बस फिरहिं न फेरे ॥**

प्रेमयुक्त कोमल व सुंदर वचने बोलून श्रीरामांनी पुष्कळ प्रकारे लोकांना समजावले आणि बराच धर्मविषयक उपदेश केला. परंतु प्रेमामुळे लोक परत पाठविले, तरी ते परतत नव्हते. ॥ २ ॥

**सीलु सनेहु छाड़ि नहिं जाई । असमंजस बस भे रघुराई ॥**
**लोग सोग श्रम बस गए सोई । कछुक देवमायाँ मति मोई ॥**

शील व स्नेह सोडता येत नाही. श्रीरघुनाथ गोंधळून गेले. शोक व थकवा यांमुळे लोक झोपी गेले आणि देवांच्या काहीशा मायेमुळे त्यांची बुद्धी मोहित झाली. ॥ ३ ॥

**जबहिं जाम जुग जामिनि बीती । राम सचिव सन कहेउ सप्रीती ॥**
**खोज मारि रथु हाँकहु ताता । आन उपायँ बनिहि नहिं बाता ॥**

दोन प्रहर रात्र झाली, तेव्हा श्रीरामचंद्रांनी प्रेमाने मंत्री सुमंत्राला सांगितले की, 'तात, चाकोऱ्या दिसून येणार नाहीत, अशा रीतीने रथ हाका. याखेरीज दुसरा उपाय नाही.'॥ ४॥

**दो०—राम लखन सिय जान चढ़ि संभु चरन सिरु नाइ।**
**सचिवँ चलायउ तुरत रथु इत उत खोज दुराइ॥ ८५॥**

शंकरांच्या चरणी मस्तक नमवून श्रीराम, लक्ष्मण व सीता हे रथावर बसले. मंत्र्याने लगेच रथ इकडे-तिकडे खुणा लपवत छपवत हाकला.॥ ८५॥

**जागे सकल लोग भएँ भोरू। गे रघुनाथ भयउ अति सोरू॥**
**रथ कर खोज कतहुँ नहिं पावहिं। राम राम कहि चहुँ दिसि धावहिं॥**

सकाळ होताच सर्व लोक जागे झाले. मोठा गोंधळ उडाला की, श्रीरघुनाथ कोठे गेले? कुठेही रथाचा पत्ता लागेना. सर्वजण 'हाय राम, हाय राम' असा पुकारा करीत चोहीकडे धावले,॥ १॥

**मनहुँ बारिनिधि बूड़ जहाजू। भयउ बिकल बड़ बनिक समाजू॥**
**एकहि एक देहिं उपदेसू। तजे राम हम जानि कलेसू॥**

जसे समुद्रात जहाज बुडाले की, व्यापारी लोक हवालदील होतात. एक दुसऱ्याला ते सांगू लागले की, आपणा सर्वांना क्लेश होतील, म्हणून श्रीरामचंद्र न सांगता निघून गेले.॥ २॥

**निंदहिं आपु सराहहिं मीना। धिग जीवनु रघुबीर बिहीना॥**
**जौं पै प्रिय बियोगु बिधि कीन्हा। तौ कस मरनु न मागें दीन्हा॥**

ते सर्व आपली निंदा करू लागले व पाण्याविना मरणाऱ्या माश्यांची प्रशंसा करू लागले. ते म्हणू लागले की, 'श्रीरामांच्याविना आपल्या जिण्याचा धिक्कार असो. विधात्याने जर प्रिय व्यक्तीचा वियोग आमच्या नशिबी ठेवला होता, तर आम्ही मागितल्यावर आम्हांला मरण का दिले नाही?॥ ३॥

**एहि बिधि करत प्रलाप कलापा। आए अवध भरे परितापा॥**
**बिषम बियोगु न जाइ बखाना। अवधि आस सब राखहिं प्राना॥**

अशा रीतीने अनेक प्रकारे प्रलाप करीत ते दुःखाने भरलेल्या अयोध्येला आले. त्यांच्या भयंकर वियोगाच्या अवस्थेचे वर्णन करणे कठीण आहे. चौदा वर्षे संपण्याची आशा करीत, ते प्राण बाळगून होते.॥ ४॥

**दो०—राम दरस हित नेम ब्रत लगे करन नर नारि।**
**मनहुँ कोक कोकी कमल दीन बिहीन तमारि॥ ८६॥**

सर्व स्त्री-पुरुष श्रीरामांच्या दर्शनासाठी नियम व व्रत करू लागले. ज्याप्रमाणे चक्रवाक जोडपे आणि कमळ हे सूर्याविना दीन होतात, त्याप्रमाणे सर्वजण दीनवाणे झाले. ॥ ८६ ॥

**सीता सचिव सहित दोउ भाई। सृंगबेरपुर पहुँचे जाई॥**
**उतरे राम देवसरि देखी। कीन्ह दंडवत हरषु बिसेषी॥**

सीता व मंत्री यांच्यासह दोघे बंधू शृंगवेरपूरला पोहोचले. तेथे गंगानदी पाहून श्रीराम रथातून उतरले आणि मोठ्या आनंदाने त्यांनी तिला दंडवत घातला. ॥ १ ॥

**लखन सचिवँ सियँ किए प्रनामा। सबहि सहित सुखु पायउ रामा॥**
**गंग सकल मुद मंगल मूला। सब सुख करनि हरनि सब सूला॥**

लक्ष्मण, सुमंत्र व सीतेनेही गंगेला प्रणाम केला. श्रीरामांसह सर्वांना गंगा पाहून सुख वाटले. गंगा ही सर्व आनंदाचे व मांगल्याचे मूळ आहे. ती सर्व सुखे देणारी व सर्व पीडा हरण करणारी आहे. ॥ २ ॥

**कहि कहि कोटिक कथा प्रसंगा। रामु बिलोकहिं गंग तरंगा॥**
**सचिवहि अनुजहि प्रियहि सुनाई। बिबुध नदी महिमा अधिकाई॥**

अनेक कथा-प्रसंग सांगत श्रीराम गंगेच्या लहरी पाहू लागले. त्यांनी सुमंत्र, लक्ष्मण व सीतेला गंगेचा महिमा सांगितला. ॥ ३ ॥

**मज्जनु कीन्ह पंथ श्रम गयऊ। सुचि जलु पिअत मुदित मन भयऊ॥**
**सुमिरत जाहि मिटइ श्रम भारू। तेहि श्रम यह लौकिक ब्यवहारू॥**

त्यानंतर सर्वांनी स्नान केले. त्यामुळे प्रवासाचा शीण नाहीसा झाला आणि पवित्र जल पिण्यामुळे त्यांचे मन प्रसन्न झाले. ज्यांच्या फक्त स्मरणाने जन्म-मरणाचे श्रम नष्ट होतात, त्या श्रीरामांना 'श्रम' झाले, असे म्हणणे हा फक्त लौकिक व्यवहार आहे. ॥ ४ ॥

दो०—**सुद्ध सच्चिदानंदमय कंद भानुकुल केतु।**
**चरित करत नर अनुहरत संसृति सागर सेतु॥ ८७॥**

त्रिगुणातीत व मायातीत दिव्य मंगलविग्रह व सच्चिदानंदस्वरूप असलेले सूर्यकुलाचे ध्वज भगवान श्रीराम हे मनुष्याप्रमाणे लीला अशी करतात की, ती संसाररूपी समुद्र तरून जाण्यासाठी सेतूसारखी आहे. ॥

**यह सुधि गुहँ निषाद जब पाई। मुदित लिए प्रिय बंधु बोलाई॥**
**लिए फल मूल भेंट भरि भारा। मिलन चलेउ हियँ हरषु अपारा॥**

जेव्हा निषादराज गुहाला श्रीरामांच्या आगमनाची वार्ता कळली, तेव्हा त्याने आनंदित होऊन आपल्या आप्तांना व बंधु-बांधवांना बोलावले आणि भेट म्हणून देण्यासाठी फळे, कंदमुळे घेऊन तो दर्शनासाठी निघाला. त्याच्या मनाला अपार आनंद झाला होता. ॥ १ ॥

**करि दंडवत भेंट धरि आगें। प्रभुहि बिलोकत अति अनुरागें॥**
**सहज सनेह बिबस रघुराई। पूँछी कुसल निकट बैठाई॥**

त्याने येऊन दंडवत केला आणि श्रीरामांच्यासमोर भेटी ठेवून मोठ्या प्रेमाने तो प्रभूंना पाहू लागला. श्रीरामांनी स्वाभाविक प्रेमाने निषादराजाला आपल्याजवळ बसवून घेऊन खुशाली विचारली. ॥ २ ॥

**नाथ कुसल पद पंकज देखें। भयउँ भागभाजन जन लेखें॥**
**देव धरनि धनु धामु तुम्हारा। मैं जनु नीचु सहित परिवारा॥**

गुह म्हणाला, 'हे नाथ, तुमच्या चरणांच्या दर्शनानेच सर्व कुशल आहे. आज माझी गणना भाग्यवान पुरुषांमध्ये होत आहे. हे देवा, माझी जमीन, धन आणि घर हे सर्व तुमचेच आहे. मी सहकुटुंब तुमचा तुच्छ सेवक आहे. ॥ ३ ॥

**कृपा करिअ पुर धारिअ पाऊ। थापिय जनु सबु लोगु सिहाऊ॥**
**कहेहु सत्य सबु सखा सुजाना। मोहि दीन्ह पितु आयसु आना॥**

आता कृपा करून माझ्या शृंगवेरपुरात येऊन या दासाची प्रतिष्ठा वाढवा. त्यामुळे सर्वजण माझ्या भाग्याची प्रशंसा करू लागतील.' श्रीराम म्हणाले, 'हे सज्जन मित्रा! तू म्हणतोस ते सर्व खरे आहे, परंतु वडिलांनी मला वेगळीच आज्ञा दिलेली आहे. ॥ ४ ॥

दो०—**बरष चारिदस बासु बन मुनि ब्रत बेषु अहारु।**
**ग्राम बासु नहिं उचित सुनि गुहहि भयउ दुखु भारु॥ ८८॥**

त्यानुसार मला चौदा वर्षे मुनिव्रत व मुनिवेष धारण करून मुनींच्यासारखा आहार करून वनात राहायचे आहे. गावामध्ये राहाणे योग्य नव्हे.' हे ऐकून गुहाला मोठे दुःख झाले. ॥ ८८ ॥

**राम लखन सिय रूप निहारी। कहहिं सप्रेम ग्राम नर नारी॥**
**ते पितु मातु कहहु सखि कैसे। जिन्ह पठए बन बालक ऐसे॥**

श्रीराम, लक्ष्मण व सीता यांची रूपे पाहून गावातील लोक प्रेमाने चर्चा करू लागले. कोणी म्हणत होता की, 'हे सखी, ज्यांनी या सुकुमार बालकांना वनात धाडले, ते माता-पिता आहेत तरी कसले?' ॥ १ ॥

**एक कहहिं भल भूपति कीन्हा। लोयन लाहु हमहि बिधि दीन्हा॥**
**तब निषादपति उर अनुमाना। तरु सिंसुपा मनोहर जाना॥**

कोणी म्हणत होता, 'राजांनी चांगले केले. या निमित्ताने ब्रह्मदेवाने आमच्या डोळ्यांचे पारणे फेडले.' निषादराजाने मनात विचार केला की, अशोक वृक्षाखाली यांना राहाण्यास योग्य जागा आहे. ॥ २ ॥

**लै रघुनाथहि ठाउँ देखावा। कहेउ राम सब भाँति सुहावा॥**
**पुरजन करि जोहारु घर आए। रघुबर संध्या करन सिधाए॥**

त्याने श्रीरघुनाथांना नेऊन ती जागा दाखविली. श्रीरामांनी ती पाहून म्हटले की, ही जागा सर्व प्रकारे छान आहे. पुरवासी लोक त्यांना वंदन करून घरी परतले आणि श्रीराम संध्या-वंदन करण्यास गेले. ॥ ३ ॥

**गुहँ सँवारि साँथरी डसाई । कुस किसलयमय मृदुल सुहाई ॥**
**सुचि फल मूल मधुर मृदु जानी । दोना भरि भरि राखेसि पानी ॥**

गुहाने यावेळी कुश व कोमल पानांची कोमल आणि सुंदर पथारी पसरली. आणि पवित्र, मधुर व कोमल अशी फळे, कंदमुळे व पाणी आणून ठेवले. ॥ ४ ॥

दो०—**सिय सुमंत्र भ्राता सहित कंद मूल फल खाइ।**
**सयन कीन्ह रघुबंसमनि पाय पलोटत भाइ॥ ८९ ॥**

सीता, सुमंत्र, लक्ष्मण यांच्यासह श्रीरामांनी कंद-मुळांचा आहार घेऊन रघुकुलमणी श्रीरामचंद्र पहुडले. लक्ष्मण त्यांचे पाय चेपू लागला. ॥ ८९ ॥

**उठे लखनु प्रभु सोवत जानी । कहि सचिवहि सोवन मृदु बानी ॥**
**कछुक दूरि सजि बान सरासन । जागन लगे बैठि बीरासन ॥**

नंतर प्रभू श्रीराम झोपले आहेत, असे पाहून लक्ष्मण उठला आणि कोमल वाणीने सुमंत्रास झोपण्यास सांगून तेथून काही अंतरावर धनुष्य-बाण सज्ज करून वीरासनात बसून पहारा देऊ लागला. ॥ १ ॥

**गुहँ बोलाइ पाहरू प्रतीती । ठावँ ठावँ राखे अति प्रीती ॥**
**आपु लखन पहिं बैठेउ जाई । कटि भाथी सर चाप चढ़ाई ॥**

गुहाने आपल्या विश्वासू पहारेकऱ्यांना बोलावून ठिकठिकाणी तैनात केले आणि आपण स्वत: भाता बांधून आणि धनुष्याला बाण लावून लक्ष्मणाजवळ जाऊन बसला. ॥ २ ॥

**सोवत प्रभुहि निहारि निषादू । भयउ प्रेम बस हृदयँ बिषादू ॥**
**तनु पुलकित जलु लोचन बहई । बचन सप्रेम लखन सन कहई ॥**

प्रभू जमिनीवर झोपले आहेत, हे पाहून प्रेमामुळे निषादराजाला वाईट वाटले. त्याचे शरीर पुलकित झाले आणि त्याच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. तो प्रेमाने लक्ष्मणाशी बोलू लागला, ॥ ३ ॥

**भूपति भवन सुभायँ सुहावा । सुरपति सदनु न पटतर पावा ॥**
**मनिमय रचित चारु चौबारे । जनु रतिपति निज हाथ सँवारे ॥**

'महाराज दशरथांचा महाल खरोखर सुंदर आहे. इंद्राचे भवनही त्याच्याबरोबरीचे नाही. तेथील सुंदर रत्नांनी बनविलेले वरचे मजले जणू कामदेवाने स्वत: आपल्या हातांनी सजविले आहेत. ॥ ४ ॥

**दो०—सुचि सुबिचित्र सुभोगमय सुमन सुगंध सुबास।**
**पलँग मंजु मनि दीप जहँ सब बिधि सकल सुपास॥ ९०॥**

ते पवित्र, मोठे विलक्षण, सुंदर भोग-पदार्थांनी भरलेले आणि फुलांनी सुगंधित आहेत. तेथे सुंदर पलंग आणि रत्न-दीप आहेत आणि सर्व प्रकारे ते आरामशीर आहेत.॥ ९०॥

**बिबिध बसन उपधान तुराईं। छीर फेन मृदु बिसद सुहाईं॥**
**तहँ सिय रामु सयन निसि करहीं। निज छबि रति मनोज मदु हरहीं॥**

तेथे अंथरण्या-पांघरण्याची वस्त्रे, गाद्या-गिरद्या आहेत. त्या दुधाच्या फेसाप्रमाणे कोमल, निर्मल व सुंदर आहेत. तेथे वरच्या माडीवर श्रीराम व सीता रात्री झोपत असत आणि आपल्या शोभेने रती व कामदेव यांचा गर्व हरण करीत असत.॥ १॥

**ते सिय रामु साथरीं सोए। श्रमित बसन बिनु जाहिं न जोए॥**
**मातु पिता परिजन पुरबासी। सखा सुसील दास अरु दासी॥**

तेच सीता आणि श्रीराम हे आज थकून गवत-काड्यांच्या पथारीवर अंथरूण-पांघरूण नसताना झोपले आहेत. अशा अवस्थेत त्यांच्याकडे पाहावत नाही. माता-पिता, कुटुंबीय, प्रजा, मित्र, चांगल्या स्वभावाचे दास व दासी,॥ २॥

**जोगवहिं जिन्हहि प्रान की नाईं। महि सोवत तेइ राम गोसाईं॥**
**पिता जनक जग बिदित प्रभाऊ। ससुर सुरेस सखा रघुराऊ॥**

हे सर्वजण ज्यांना प्राणाप्रमाणे जपतात, तेच प्रभू श्रीरामचंद्र आज जमिनीवर झोपले आहेत. जिचे पिता जगप्रसिद्ध जनक राजे आहेत आणि श्वशुर हे इंद्राचे मित्र रघुराज दशरथ आहेत,॥ ३॥

**रामचंदु पति सो बैदेही। सोवत महि बिधि बाम न केही॥**
**सिय रघुबीर कि कानन जोगू। करम प्रधान सत्य कह लोगू॥**

आणि पती श्रीरामचंद्र आहेत, तीच जानकी आज जमिनीवर झोपलेली आहे. दैव कुणाला प्रतिकूल होत नाही? सीता व श्रीरामचंद्र हे काय वनात राहण्यास योग्य आहेत? कर्म हेच मुख्य असते, असे लोक म्हणतात, तेच खरे.॥ ४॥

**दो०—कैकयनंदिनि मंदमति कठिन कुटिलपनु कीन्ह।**
**जेहिं रघुनंदन जानकिहि सुख अवसर दुखु दीन्ह॥ ९१॥**

केकयराजाची कन्या, नीच बुद्धीची कैकेयी हिने दुष्ट कारस्थान केले. त्यामुळे रघुनंदन श्रीराम आणि जानकी यांना सुखाच्या काळात दुःख दिले.॥ ९१॥

**भइ दिनकर कुल बिटप कुठारी। कुमति कीन्ह सब बिस्व दुखारी॥**
**भयउ बिषादु निषादहि भारी। राम सीय महि सयन निहारी॥**

ती कैकेयी सूर्यकुलरूपी वृक्षासाठी कुऱ्हाड बनली. त्या दुष्ट स्त्रीने संपूर्ण जगाला दुःखी केले.' श्रीराम व जानकी यांना जमिनीवर झोपलेले पाहून निषादराजास फार दुःख वाटले.॥ १॥

**बोले लखन मधुर मृदु बानी। ग्यान बिराग भगति रस सानी॥**
**काहु न कोउ सुख दुख कर दाता। निज कृत करम भोग सबु भ्राता॥**

तेव्हा लक्ष्मण ज्ञान, वैराग्य आणि भक्तिरसपूर्ण मधुर व मृदू वाणीने म्हणाला, 'हे बंधू, कोणी कोणाला सुख-दुःख देणारा नसतो. सर्वजण आपण केलेल्या कर्मांची फळे भोगत असतात.॥ २॥

**जोग बियोग भोग भल मंदा। हित अनहित मध्यम भ्रम फंदा॥**
**जनमु मरनु जहँ लगि जग जालू। संपति बिपति करमु अरु कालू॥**

संयोग-वियोग, चांगले-वाईट भोग, शत्रू, मित्र व तटस्थ हे सर्व भ्रम आहेत. जन्म-मृत्यू, संपत्ति-विपत्ती, कर्म आणि काल हे सर्व जितके म्हणून जगातील जंजाळ आहेत.॥ ३॥

**धरनि धामु धनु पुर परिवारू। सरगु नरकु जहँ लगि ब्यवहारू॥**
**देखिअ सुनिअ गुनिअ मन माहीं। मोह मूल परमारथु नाहीं॥**

जमीन, घर, धन, नगर, परिवार, स्वर्ग व नरक इत्यादी जे काही सर्व व्यवहार आहेत. जे पाहण्यात, ऐकण्यात येतात व मनात घोळतात. या सर्वांचे मूळ अज्ञान होय. परमार्थाच्या दृष्टीने हे नाहीतच.॥ ४॥

दो०—**सपनें होइ भिखारि नृपु रंकु नाकपति होइ।**
**जागें लाभु न हानि कछु तिमि प्रपंच जियँ जोइ॥ ९२॥**

ज्याप्रमाणे स्वप्नामध्ये राजा भिकारी झाला किंवा एखादा कंगाल स्वर्गाचा स्वामी इंद्र झाला, तरी जागे झाल्यावर नफा-नुकसान काहीही होत नाही, तसेच या दृश्य प्रपंचाकडे मनाने पाहिले पाहिजे.॥ ९२॥

**अस बिचारि नहिं कीजिअ रोसू। काहुहि बादि न देइअ दोसू॥**
**मोह निसाँ सबु सोवनिहारा। देखिअ सपन अनेक प्रकारा॥**

असा विचार करून क्रोध करू नये आणि कुणाला विनाकारण दोष देऊ नये. सर्व लोक मोहरूपी रात्रीमध्ये झोपणारे आहेत आणि झोपेमध्ये त्यांना अनेक प्रकारची स्वप्ने दिसतात.॥ १॥

**एहिं जग जामिनि जागहिं जोगी। परमारथी प्रपंच बियोगी॥**
**जानिअ तबहिं जीव जग जागा। जब सब बिषय बिलास बिरागा॥**

या जगरूपी रात्रीमध्ये योगी लोक जागतात. ते पारमार्थिक असून मायिक जगापासून दूर असतात. जगामध्ये जीव हा जागा आहे, असे तेव्हाच समजावे, जेव्हा त्याला संपूर्ण भोग-विलासाबद्दल वैराग्य येते. ॥ २ ॥

**होइ बिबेकु मोह भ्रम भागा। तब रघुनाथ चरन अनुरागा॥**
**सखा परम परमारथु एहू। मन क्रम बचन राम पद नेहू॥**

विवेक उत्पन्न झाल्यावर मोहरूपी भ्रम नाहीसा होतो. अज्ञान नाहीसे झाल्यावर श्रीरघुनाथांच्या चरणी प्रेम उत्पन्न होते. मित्रा! कायावाचामनाने श्रीरामांच्या चरणी प्रेम उत्पन्न होणे, हाच सर्वश्रेष्ठ परमार्थ होय. ॥ ३ ॥

**राम ब्रह्म परमारथ रूपा। अबिगत अलख अनादि अनूपा॥**
**सकल बिकार रहित गतभेदा। कहि नित नेति निरूपहिं बेदा॥**

श्रीराम परमार्थस्वरूप परब्रह्म आहेत. ते जाणता न येणारे, अदृश्य, अनादी, अनुपम, सर्व विकारांनी रहित आणि भेदशून्य आहेत. वेद त्यांचे निरूपण नित्य 'नेति-नेति' असे म्हणून करतात. ॥ ४ ॥

**दो०—भगत भूमि भूसुर सुरभि सुर हित लागि कृपाल।**
**करत चरित धरि मनुज तनु सुनत मिटहिं जग जाल॥ ९३॥**

ते कृपाळू श्रीरामचंद्र हे भक्त, पृथ्वी, ब्राह्मण, गाय आणि देव यांच्या हितासाठी मनुष्यशरीर धारण करून लीला करतात. त्या लीलांचे श्रवण केल्यामुळे जगातील मायेचे जाळे नाहीसे होते. ॥ ९३ ॥

## मासपारायण, पंधरावा विश्राम

**सखा समुझि अस परिहरि मोहू। सिय रघुबीर चरन रत होहू॥**
**कहत राम गुन भा भिनुसारा। जागे जग मंगल सुखदारा॥**

हे मित्रा, असे समजून व मोहाचा त्याग करून श्रीरामांच्या चरणी प्रेम कर.' अशा प्रकारे श्रीरामचंद्रांचे गुण गाता गाता सकाळ झाली. तेव्हा जगाचे मंगल करणारे आणि त्याला सुख देणारे श्रीराम जागे झाले. ॥ १ ॥

**सकल सौच करि राम नहावा। सुचि सुजान बट छीर मगावा॥**
**अनुज सहित सिर जटा बनाए। देखि सुमंत्र नयन जल छाए॥**

मुखमार्जनादी करून पवित्र आणि ज्ञानी श्रीरामचंद्रांनी स्नान केले. नंतर वडाचा चीक मागवला आणि लक्ष्मणासह त्या चिकाने डोक्यावर जटा बांधल्या. हे पाहून सुमंत्राचे नेत्र आसवांनी डबडबले. ॥ २ ॥

**हृदयँ दाहु अति बदन मलीना। कह कर जोरि बचन अति दीना॥**
**नाथ कहेउ अस कोसलनाथा। लै रथु जाहु राम कें साथा॥**

त्याच्या हृदयाला यातना झाल्या व मुख उदास झाले. तो हात जोडून अत्यंत दीनपणे म्हणाला, 'हे नाथ, मला कोसलनाथांनी आज्ञा दिली होती की, तू रथ घेऊन श्रीरामांबरोबर जा. ॥ ३ ॥

**बनु देखाइ सुरसरि अन्हवाई। आनेहु फेरि बेगि दोउ भाई॥**
**लखनु रामु सिय आनेहु फेरी। संसय सकल सँकोच निबेरी॥**

वन दाखवून आणि गंगा-स्नान करवून दोघा भावांना त्वरित परत आण. सर्व संशय आणि संकोच दूर करून लक्ष्मण, राम व सीता यांना वनात फिरवून आण. ॥ ४ ॥

दो०—**नृप अस कहेउ गोसाइँ जस कहइ करौं बलि सोइ।**
**करि बिनती पायन्ह परेउ दीन्ह बाल जिमि रोइ॥ ९४॥**

महाराज असे म्हणाले होते. आता हे प्रभू! तुम्ही जसे म्हणाल, तसेच करीन. मी माझा जीव तुमच्यावरून ओवाळून टाकतो.' असे म्हणून सुमंत्र श्रीरामांच्या चरणांवर पडून लहान मुलाप्रमाणे ढसाढसा रडला. ॥ ९४ ॥

**तात कृपा करि कीजिअ सोई। जातें अवध अनाथ न होई॥**
**मंत्रिहि राम उठाइ प्रबोधा। तात धरम मतु तुम्ह सबु सोधा॥**

नंतर म्हणाला, 'हे कुमार, ज्यामुळे अयोध्या अनाथ होणार नाही, असे करा.' श्रीरामांनी त्याला उठवून धीर देत समजावले. ते म्हणाले, 'हे तात, तुम्ही धर्माचे सर्व सिद्धांत जाणता. ॥ १ ॥

**सिबि दधीच हरिचंद नरेसा। सहे धरम हित कोटि कलेसा॥**
**रंतिदेव बलि भूप सुजाना। धरमु धरेउ सहि संकट नाना॥**

शिबी, दधीची, हरिश्चंद्र यांनी धर्मासाठी अनेक कष्ट सहन केले होते. बुद्धिमान राजा रंतिदेव आणि बली यांनी अनेक संकटे सहन केली, परंतु ते धर्माला चिकटून राहिले. ॥ २ ॥

**धरमु न दूसर सत्य समाना। आगम निगम पुरान बखाना॥**
**मैं सोइ धरमु सुलभ करि पावा। तजें तिहूँ पुर अपजसु छावा॥**

वेद, शास्त्र आणि पुराणे यामध्ये म्हटले आहे की, सत्यासारखा दुसरा धर्म नाही. मला तो धर्म सहजपणे मिळाला. या सत्यरूपी धर्माचा त्याग केला, तर त्रैलोक्यात अपकीर्ती पसरेल. ॥ ३ ॥

**संभावित कहुँ अपजस लाहू। मरन कोटि सम दारुन दाहू॥**
**तुम्ह सन तात बहुत का कहऊँ। दिएँ उतरु फिरि पातकु लहऊँ॥**

प्रतिष्ठित पुरुषाला अपकीर्ती ही कोट्यवधी मृत्यूंसारखी भीषण यातना देणारी आहे. हे तात, मी तुम्हांला जास्त काय सांगू? उलट उत्तर देण्यामुळेसुद्धा मी पापाचा भागीदार ठरत आहे. ॥ ४ ॥

दो०—**पितु पद गहि कहि कोटि नति बिनय करब कर जोरि।**
**चिंता कवनिहु बात कै तात करिअ जनि मोरि॥ ९५॥**

तुम्ही जाऊन तातांचे चरण धरून कोटी कोटी नमस्कार करीत हात जोडून विनंती करा की, बाबा! तुम्ही माझी कोणत्याही प्रकारची काळजी करू नका.॥ ९५॥

**तुम्ह पुनि पितुसम अति हित मोरें। बिनती करउँ तात कर जोरें॥**
**सब बिधि सोइ करतब्य तुम्हारें। दुख न पाव पितु सोच हमारें॥**

तुम्ही स्वत:सुद्धा वडिलांप्रमाणे माझे मोठे हितचिंतक आहात. म्हणून हे तात, मी हात जोडून विनंती करतो की, तुमचेही सर्वप्रकारे हेच कर्तव्य आहे की, वडिलांना आमच्या काळजीमुळे दु:ख होऊ नये.'॥ १॥

**सुनि रघुनाथ सचिव संबादू। भयउ सपरिजन बिकल निषादू॥**
**पुनि कछु लखन कही कटु बानी। प्रभु बरजे बड़ अनुचित जानी॥**

श्रीरघुनाथ आणि सुमंत्र यांचा हा संवाद ऐकून निषादराज आपल्या कुटुंबासह व्याकूळ झाला. मग लक्ष्मण काहीशा कडवटपणे बोलला, प्रभू रामचंद्रांना ते फारच अयोग्य वाटले. म्हणून त्यांनी त्याला अडवले.॥ २॥

**सकुचि राम निज सपथ देवाई। लखन सँदेसु कहिअ जनि जाई॥**
**कह सुमंत्रु पुनि भूप सँदेसू। सहि न सकिहि सिय बिपिन कलेसू॥**

श्रीरामचंद्रांनी नम्रतापूर्वक स्वत:ची शपथ घालून सुमंत्रांना सांगितले की, 'तुम्ही लक्ष्मणाचे हे बोलणे सांगू नका.' सुमंत्राने पुन्हा राजांचा निरोप सांगितला की, 'सीता वनातील क्लेश सहन करू शकणार नाही.॥ ३॥

**जेहि बिधि अवध आव फिरि सीया। सोइ रघुबरहि तुम्हहि करनीया॥**
**नतरु निपट अवलंब बिहीना। मैं न जिअब जिमि जल बिनु मीना॥**

म्हणून ती अयोध्येला परत येईल, असे तुम्ही व श्रीराम यांनी प्रयत्न करावेत. नाही तर मी अत्यंत निराधार होऊन पाण्याविना मासा जसा जगू शकत नाही, तसा जगू शकणार नाही.॥ ४॥

दो०—**मइकें ससुरें सकल सुख जबहिं जहाँ मनु मान।**
**तहँ तब रहिहि सुखेन सिय जब लगि बिपति बिहान॥ ९६॥**

सीतेच्या माहेरी व सासरी सर्व सुखे आहेत. जोपर्यंत हे संकट टळत नाही, तोपर्यंत तिला हवे, तेथे ती सुखाने राहील.॥ ९६॥

**बिनती भूप कीन्ह जेहि भाँती। आरति प्रीति न सो कहि जाती॥**
**पितु सँदेसु सुनि कृपानिधाना। सियहि दीन्ह सिख कोटि बिधाना॥**

राजांनी ज्या दीनपणे व प्रेमाने विनंती केली आहे, तो दीनपणा व प्रेम सांगण्याच्या पलीकडे आहे.' कृपानिधान श्रीरामांनी पित्याचा संदेश ऐकल्यावर सीतेला अनेक प्रकारे समजावले. ॥ १ ॥

**सासु ससुर गुर प्रिय परिवारू । फिरहु त सब कर मिटै खभारू ॥**
**सुनि पति बचन कहति बैदेही । सुनहु प्रानपति परम सनेही ॥**

ते म्हणाले, 'तू घरी परत जाशील, तर सासू, सासरे, गुरू, प्रियजन अणि कुटुंबीय या सर्वांची काळजी दूर होईल.' पतीचे बोलणे ऐकून जानकी म्हणाली, 'हे पतिराज, हे परमस्नेही, ऐका. ॥ २ ॥

**प्रभु करुनामय परम बिबेकी । तनु तजि रहति छाँह किमि छेंकी ॥**
**प्रभा जाइ कहँ भानु बिहाई । कहँ चंद्रिका चंदु तजि जाई ॥**

हे प्रभो, तुम्ही करुणामय व परमज्ञानी आहात. विचार करा की, शरीराला सोडून छाया वेगळी ठेवता येईल का? सूर्याची प्रभा सूर्याला सोडून कुठे जाणार? आणि चांदणे चंद्रास सोडून कुठे जाऊ शकेल?' ॥ ३ ॥

**पतिहि प्रेममय बिनय सुनाई । कहति सचिव सन गिरा सुहाई ॥**
**तुम्ह पितु ससुर सरिस हितकारी । उतरु देउँ फिरि अनुचित भारी ॥**

अशा प्रकारे पतीला प्रेमाची विनंती करून सीता मंत्र्याला सुंदर वाणीने म्हणाली, 'तुम्ही माझे वडील व श्वशुर यांच्याप्रमाणे हितचिंतक आहात. मी तुम्हांला उलट उत्तर देणे फार अयोग्य ठरेल. ॥ ४ ॥

**दो०—आरति बस सनमुख भइउँ बिलगु न मानब तात ।**
**आरजसुत पद कमल बिनु बादि जहाँ लगि नात ॥ ९७ ॥**

परंतु हे तात, मी आर्ततेने तुमच्याकडे बघत आहे. तुम्ही वाईट वाटून घेऊ नका. आर्यपुत्रांच्या चरण-कमलांविना जितकी नाती जगात आहेत, ती मला व्यर्थ आहेत. ॥ ९७ ॥

**पितु बैभव बिलास मैं डीठा । नृप मनि मुकुट मिलित पद पीठा ॥**
**सुखनिधान अस पितु गृह मोरें । पिय बिहीन मन भाव न भोरें ॥**

मी वडिलांचे ऐश्वर्य पाहिले आहे. त्यांच्या पाय ठेवण्याच्या चौरंगावर मोठमोठ्या राजांचे मुकुट टेकविले जातात. सर्व प्रकारच्या सुखाचे भांडार असलेले पित्याचे घरसुद्धा पतीविना माझ्या मनाला चुकूनही गोड वाटत नाही. ॥ १ ॥

**ससुर चक्कवइ कोसलराऊ । भुवन चारिदस प्रगट प्रभाऊ ॥**
**आगें होइ जेहि सुरपति लेई । अरध सिंघासन आसनु देई ॥**

माझे सासरे कोसलराज हे चक्रवर्ती सम्राट आहेत. त्यांचा प्रभाव चौदा लोकी गाजतो. इंद्रसुद्धा सामोरे येऊन त्यांचे स्वागत करतो आणि आपल्या अर्ध्या सिंहासनावर बसण्यासाठी स्थान देतो. ॥ २ ॥

**ससुर एतादृस अवध निवासू। प्रिय परिवारु मातु सम सासू॥**
**बिनु रघुपति पद पदुम परागा। मोहि केउ सपनेहुँ सुखद न लागा॥**

असे ऐश्वर्यशाली व प्रभावशाली सासरे, अयोध्या या राजधानीतील निवास, कुटुंबातील प्रिय व्यक्ती, आईसारख्या सासू यांपैकी काहीही मला श्रीरघुनाथांच्या चरणकमलांच्या धुळीविना स्वप्नातही सुखदायक वाटत नाही. ॥ ३ ॥

**अगम पंथ बनभूमि पहारा। करि केहरि सर सरित अपारा॥**
**कोल किरात कुरंग बिहंगा। मोहि सब सुखद प्रानपति संगा॥**

दुर्गम रस्ते, अरण्य, पहाडी प्रदेश, हत्ती, सिंह, अथांग तलाव व नद्या, कोल, भिल्ल, हरणे आणि पक्षी हे सर्व, प्राणप्रिय श्रीराम सोबत असल्यावर मला सुख देणारेच होतील. ॥ ४ ॥

दो०—**सासु ससुर सन मोरि हुँति बिनय करबि परि पायँ।**
**मोर सोचु जनि करिअ कछु मैं बन सुखी सुभायँ॥ ९८॥**

म्हणून सासू-सासरे यांच्या पाया पडून, माझ्यामार्फत त्यांना विनंती करा की, माझी काहीही काळजी करू नका. वनात मी मनापासून सुखी आहे. ॥ ९८ ॥

**प्राननाथ प्रिय देवर साथा। बीर धुरीन धरें धनु भाथा॥**
**नहिं मग श्रमु भ्रमु दुख मन मोरें। मोहि लगि सोचु करिअ जनि भोरें॥**

वीरांमध्ये अग्रगण्य, धनुष्य व भरलेले भाते धारण केलेले माझे प्राणनाथ आणि माझे प्रिय दीर हे सोबत आहेत. त्यामुळे मला वाटेमध्ये थकवा नाही, काळजी नाही आणि माझ्या मनात कोणतेही दुःख नाही. तुम्ही चुकूनही माझी काळजी करू नका.' ॥ १ ॥

**सुनि सुमंत्रु सिय सीतलि बानी। भयउ बिकल जनु फनि मनि हानी॥**
**नयन सूझ नहिं सुनइ न काना। कहि न सकइ कछु अति अकुलाना॥**

साप ज्याप्रमाणे आपला मणी हरवल्यावर व्याकूळ होतो, त्याप्रमाणे सीतेची शीतल वाणी ऐकून सुमंत्र व्याकूळ झाला. त्याच्या डोळ्यांना काही दिसत नव्हते, कानांना काही ऐकू येत नव्हते. त्याची इतकी व्याकूळ अवस्था झाली की, काही सांगता सोय नाही. ॥ २ ॥

**राम प्रबोधु कीन्ह बहु भाँती। तदपि होति नहिं सीतलि छाती॥**
**जतन अनेक साथ हित कीन्हे। उचित उतर रघुनंदन दीन्हे॥**

श्रीरामचंद्रांनीही त्याचे पुष्कळ प्रकारे समाधान केले. तरीही त्याचे मन शांत झाले नाही. आपल्याबरोबर परत येण्यासाठी सुमंत्राने खूप प्रयत्न केले, परंतु रघुनाथांनी त्याच्या प्रत्येक युक्तीला व तर्काला योग्य असे उत्तर दिले. ॥ ३ ॥

**मेटि जाइ नहिं राम रजाई । कठिन करमगति कछु न बसाई ॥**
**राम लखन सिय पद सिरु नाई । फिरेउ बनिक जिमि मूर गवाँई ॥**

श्रीरामांची आज्ञा डावलता येत नाही. कर्माची गती फार कठीण असते. तिच्यावर कोणताही इलाज नाही. श्रीराम, लक्ष्मण आणि सीता यांच्या चरणी मस्तक नम्र करून सुमंत्र असा परत निघाला की, एखादा व्यापारी आपले सर्व भांडवल गमावून निराशेने परत जातो. ॥ ४ ॥

**दो०—रथु हाँकेउ हय राम तन हेरि हेरि हिहिनाहिं।**
**देखि निषाद बिषादबस धुनहिं सीस पछिताहिं॥ ९९ ॥**

सुमंत्राने रथ चालू केला. घोडे श्रीरामांकडे पाहात-पाहात खिंकाळत होते. हे पाहून निषाद लोक खिन्न होऊन डोक्यावर हात मारून पश्चात्ताप करीत होते. ॥ ९९ ॥

**जासु बियोग बिकल पसु ऐसें । प्रजा मातु पितु जिइहहिं कैसें ॥**
**बरबस राम सुमंत्रु पठाए । सुरसरि तीर आपु तब आए ॥**

ज्यांच्या वियोगामुळे पशूसुद्धा अशा प्रकारे व्याकूळ झाले होते, त्यांच्या वियोगामुळे प्रजा, माता आणि पिता कसे जगणार ? श्रीरामांनी सुमंत्राला आग्रहाने परत पाठविले आणि ते गंगेच्या किनारी आले. ॥ १ ॥

**मागी नाव न केवटु आना । कहइ तुम्हार मरमु मैं जाना ॥**
**चरन कमल रज कहुँ सबु कहई । मानुष करनि मूरि कछु अहई ॥**

श्रीरामांनी नावाड्याकडे नाव मागितली, पण तो घेऊन आला नाही. तो म्हणाला की, 'मला तुमचे रहस्य समजले आहे. सर्वजण म्हणतात की, तुमच्या चरणकमलांची धूळ ही मनुष्य बनविणारी मुळी आहे. ॥ २ ॥

**छुअत सिला भइ नारि सुहाई । पाहन तें न काठ कठिनाई ॥**
**तरनिउ मुनि घरिनी होइ जाई । बाट परइ मोरि नाव उड़ाई ॥**

तिचा स्पर्श होताच पाषाणाची शिळा सुंदर स्त्री बनून गेली. माझी नाव लाकडाची आहे. लाकूड हे पाषाणापेक्षा टणक नसते. माझी नावसुद्धा तुमच्या चरण-रजामुळे एखाद्या मुनीची स्त्री बनून निघून जाईल आणि माझे दिवाळे निघेल. (मध्येच जर नाव मनुष्य झाली, तर तुम्हांला पलीकडे जाता येणार नाही व माझासुद्धा रोजगार बुडेल.) ॥ ३ ॥

**एहिं प्रतिपालउँ सबु परिवारू । नहिं जानउँ कछु अउर कबारू ॥**
**जौं प्रभु पार अवसि गा चहहू । मोहि पद पदुम पखारन कहहू ॥**

मी या नावेवरच आपल्या कुटुंबाचे पालन-पोषण करतो. दुसरा धंदा मला येत नाही. जर तुम्हांला पलीकडे जायचे असेल, तर मला तुमचे चरण-कमल धुण्याची आज्ञा द्या. ॥ ४ ॥

**छं०—पद कमल धोइ चढ़ाइ नाव न नाथ उतराई चहौं।**
**मोहि राम राउरि आन दसरथ सपथ सब साची कहौं॥**
**बरु तीर मारहुँ लखनु पै जब लगि न पाय पखारिहौं।**
**तब लगि न तुलसीदास नाथ कृपाल पारु उतारिहौं॥**

महाराज! मी चरण-कमल धुतल्यावरच तुम्हांला नावेत बसवीन. मी त्यासाठी तुमच्याकडून भाडे घेणार नाही. माझी तुम्हांला विनंती आहे आणि महाराज दशरथांची शपथ आहे की मी हे जे सांगत आहे, ते खरे-खरे सांगत आहे. लक्ष्मणाने जरी माझ्यावर शर-संधान केले, तरी जोपर्यंत मी तुमचे चरण धुणार नाही, तोपर्यंत हे तुलसीदासांचे नाथ, हे कृपाळू, मी तुम्हांला पलीकडे नेणार नाही.'

**सो०—सुनि केवट के बैन प्रेम लपेटे अटपटे।**
**बिहसे करुनाऐन चितइ जानकी लखन तन॥ १००॥**

नावाड्याचे ते प्रेमपूर्ण मजेशीर बोलणे ऐकून करुणानिधान श्रीराम हे जानकी व लक्ष्मणाकडे पाहून हसले. ॥ १०० ॥

**कृपासिंधु बोले मुसुकाई। सोइ करु जेहिं तव नाव न जाई॥**
**बेगि आनु जल पाय पखारू। होत बिलंबु उतारहि पारू॥**

कृपा-सागर श्रीरामचंद्र हसत-हसत नावाड्याला म्हणाले की, 'अरे बाबा, तुझी नाव जेणेकरून जाणार नाही, असे तू कर. लवकर पाणी आण आणि पाय धू. उशीर होत आहे, पलीकडे आम्हांला लवकर घेऊन चल.' ॥ १ ॥

**जासु नाम सुमिरत एक बारा। उतरहिं नर भवसिंधु अपारा॥**
**सोइ कृपालु केवटहि निहोरा। जेहिं जगु किय तिहु पगहु ते थोरा॥**

ज्यांच्या नावाचे एकदा स्मरण करताच मनुष्य अपार भवसागर तरून जातात, आणि ज्यांनी वामनावतारामध्ये संपूर्ण जग तीन पावलांपेक्षा छोटे करून टाकले होते, ते कृपाळू श्रीराम गंगानदी पार करण्यासाठी नावाड्याची मनधरणी करत होते. ॥ २ ॥

**पद नख निरखि देवसरि हरषी। सुनि प्रभु बचन मोहँ मति करषी॥**
**केवट राम रजायसु पावा। पानि कठवता भरि लेइ आवा॥**

प्रभूंचे हे बोलणे ऐकून गंगेची बुद्धीसुद्धा गुंग झाली. प्रत्यक्ष भगवंत असूनही नदी पार करण्यासाठी श्रीराम नावाड्याकडे याचना करीत होते. परंतु देवनदी गंगा आपले उगम-स्थान असलेली भगवंतांची पद-नखे पाहून आनंदून गेली. भगवंतांची मानव-लीला पाहून तिचा मोह दूर

झाला. या चरणांच्या स्पर्शामुळे मी धन्य होईन, असा विचार करून तिला हर्ष झाला. आज्ञा मिळताच नावाडी मोठ्या लाकडी पात्रातून पाणी भरून घेऊन आला.॥ ३॥

**अति आनंद उमगि अनुरागा। चरन सरोज पखारन लागा॥**
**बरषि सुमन सुर सकल सिहाहीं। एहि सम पुन्यपुंज कोउ नाहीं॥**

अत्यंत प्रेमाने व उत्साहाने तो भगवंतांचे चरण धुऊ लागला. हे पाहून देव फुलांचा वर्षाव करीत संतुष्ट होऊन म्हणाले की, 'याच्यासारखा पुण्यवान कोणीही नाही.'॥ ४॥

दो०—**पद पखारि जलु पान करि आपु सहित परिवार।**
**पितर पारु करि प्रभुहि पुनि मुदित गयउ लेइ पार॥ १०१॥**

नावाड्याने श्रीरामांचे चरण धुऊन व आपल्या कुटुंबीयांसह जलप्राशन करून प्रथम आपल्या पितरांना भव-सागरातून पार केले. मग मोठ्या आनंदाने प्रभूंना गंगानदीच्या पलीकडे नेले.॥ १०१॥

**उतरि ठाढ़ भए सुरसरि रेता। सीय रामु गुह लखन समेता॥**
**केवट उतरि दंडवत कीन्हा। प्रभुहि सकुच एहि नहिं कछु दीन्हा॥**

निषादराज, लक्ष्मण व सीता यांच्यासह श्रीराम नावेतून उतरून वाळूच्या किनाऱ्यावर उभे राहिले. नावाड्याने उतरून साष्टांग नमस्कार घातला. श्रीरामप्रभूंना वाटत होते की, याला आपण काहीच दिले नाही.॥ १॥

**पिय हिय की सिय जाननिहारी। मनि मुदरी मन मुदित उतारी॥**
**कहेउ कृपाल लेहि उतराई। केवट चरन गहे अकुलाई॥**

पतीचे मन ओळखणाऱ्या सीतेने आनंदाने आपली रत्नजडित अंगठी काढली. कृपाळू श्रीरामांनी नावाड्यास सांगितले की, 'नावेचे भाडे घे.' नावाड्याने व्याकूळ होऊन त्यांचे चरण धरले.॥ २॥

**नाथ आजु मैं काह न पावा। मिटे दोष दुख दारिद दावा॥**
**बहुत काल मैं कीन्हि मजूरी। आजु दीन्ह बिधि बनि भलि भूरी॥**

तो म्हणाला, 'हे नाथ, आज मला काय नाही मिळाले? माझे दोष, दुःख आणि दारिद्र्य यांची झळ आज नाहीशी झाली. मी बराच काळ मजुरी केली. आज नशिबाने फार चांगली व भरपूर मजुरी दिली आहे.॥ ३॥

**अब कछु नाथ न चाहिअ मोरें। दीनदयाल अनुग्रह तोरें॥**
**फिरती बार मोहि जो देबा। सो प्रसादु मैं सिर धरि लेबा॥**

हे नाथ, हे दीनदयाळ, तुमची कृपा लाभल्यामुळे आता काही नको. परत येताना तुम्ही जे द्याल, ते प्रसाद म्हणून मस्तकी धरीन.'॥ ४॥

दो०—**बहुत कीन्ह प्रभु लखन सियँ नहिं कछु केवटु लेइ।**
**बिदा कीन्ह करुनायतन भगति बिमल बरु देइ॥ १०२॥**

प्रभू श्रीराम, लक्ष्मण व सीता या सर्वांनी खूप आग्रह केला, परंतु त्याने काही घेतले नाही. तेव्हा करुणानिधान भगवान श्रीरामांनी त्याला निर्मल भक्तीचे वरदान देऊन निरोप दिला.॥ १०२॥

**तब मज्जनु करि रघुकुलनाथा। पूजि पारथिव नायउ माथा॥**
**सियँ सुरसरिहि कहेउ कर जोरी। मातु मनोरथ पुरउबि मोरी॥**

नंतर रघुकुलाचे स्वामी श्रीरामांनी स्नान करून पार्थिव शिवलिंगाची पूजा केली आणि शिवांना प्रणाम केला. सीतेने हात जोडून गंगेला विनविले की, 'हे माते, माझे मनोरथ पूर्ण कर.॥ १॥

**पति देवर सँग कुसल बहोरी। आइ करौं जेहिं पूजा तोरी॥**
**सुनि सिय बिनय प्रेम रस सानी। भइ तब बिमल बारि बर बानी॥**

ज्यायोगे मी पती व दीर यांच्याबरोबर सुखरूप परतून तुझी पूजा करीन.' सीतेची प्रेमरसाने ओथंबलेली विनंती ऐकून गंगेच्या निर्मल जलातून श्रेष्ठ वाणी प्रकट झाली,॥ २॥

**सुनु रघुबीर प्रिया बैदेही। तव प्रभाउ जग बिदित न केही॥**
**लोकप होहिं बिलोकत तोरें। तोहि सेवहिं सब सिधि कर जोरें॥**

'हे रघुवीरांच्या प्रियतम जानकी, तुझा प्रभाव जगात कोण जाणत नाही? तू कृपादृष्टीने पाहिलेस की, सामान्य माणूस लोकपाल बनतात. सर्व सिद्धी हात जोडून तुझी सेवा करतात.॥ ३॥

**तुम्ह जो हमहि बड़ि बिनय सुनाई। कृपा कीन्हि मोहि दीन्हि बड़ाई॥**
**तदपि देबि मैं देबि असीसा। सफल होन हित निज बागीसा॥**

तू मला प्रेमाने विनंती केलीस, ही माझ्यावर कृपाच होय. तू मला मोठेपणा दिलास. तरीही हे देवी, मी आपली वाणी सफल होण्यासाठी तुला आशीर्वाद देते.॥ ४॥

दो०—**प्राननाथ देवर सहित कुसल कोसला आइ।**
**पूजिहि सब मनकामना सुजसु रहिहि जग छाइ॥ १०३॥**

तू आपले प्राणनाथ व दीर यांच्यासह अयोध्येला सुखरूप परत येशील. तुझ्या सर्व मनोकामना पूर्ण होतील आणि तुझी उज्ज्वल कीर्ती जगात पसरेल.॥ १०३॥

**गंग बचन सुनि मंगल मूला। मुदित सीय सुरसरि अनुकूला॥**
**तब प्रभु गुहहि कहेउ घर जाहू। सुनत सूख मुखु भा उर दाहू॥**

मांगल्याचे मूळ असलेल्या गंगेचे वचन ऐकून आणि देवनदी अनुकूल आहे, असे पाहून सीतेला आनंद झाला. तेव्हा प्रभू श्रीरामचंद्रांनी गुहाला सांगितले की, 'हे बंधू, आता तू घरी जा.' हे ऐकताच त्याचा चेहरा पडला आणि मनात दुःख उसळले.॥ १॥

**दीन बचन गुह कह कर जोरी। बिनय सुनहु रघुकुलमनि मोरी॥**
**नाथ साथ रहि पंथु देखाई। करि दिन चारि चरन सेवकाई॥**

गुह हात जोडून दीनवाणीने म्हणाला, 'हे रघुकुलशिरोमणी, माझी विनंती ऐका. मी तुमच्या सोबत राहून मार्ग दाखवून व चार दिवस तुमच्या चरणांची सेवा करून-॥ २॥

**जेहिं बन जाइ रहब रघुराई। परनकुटी मैं करबि सुहाई॥**
**तब मोहि कहँ जसि देब रजाई। सोइ करिहउँ रघुबीर दोहाई॥**

हे रघुराज, ज्या वनात तुम्ही राहाल, तेथे मी सुंदर पर्णकुटी तयार करून देईन. हे रघुवीर, मी तुम्हांला प्रार्थना करतो की, मग तुम्ही जी आज्ञा कराल, त्याप्रमाणे मी करीन.'॥ ३॥

**सहज सनेह राम लखि तासू। संग लीन्ह गुह हृदयँ हुलासू॥**
**पुनि गुहँ ग्याति बोलि सब लीन्हे। करि परितोषु बिदा तब कीन्हे॥**

त्याचे ते स्वाभाविक प्रेम पाहून श्रीरामांनी त्याला आपल्या सोबत घेतले. त्यामुळे त्याला खूप आनंद झाला. मग गुहाने आपल्या जातभाईंना बोलावले आणि त्यांचे समाधान करून त्यांना निरोप दिला.॥ ४॥

दो०—**तब गनपति सिव सुमिरि प्रभु नाइ सुरसरिहि माथ।**
**सखा अनुज सिय सहित बन गवनु कीन्ह रघुनाथ॥ १०४॥**

मग श्रीरघुनाथांनी गजानन आणि शिव यांचे स्मरण करून तसेच गंगेला नमस्कार करून मित्र निषादराज, बंधू लक्ष्मण व सीता यांच्यासह ते वनात निघाले.॥ १०४॥

**तेहि दिन भयउ बिटप तर बासू। लखन सखाँ सब कीन्ह सुपासू॥**
**प्रात प्रातकृत करि रघुराई। तीरथराजु दीख प्रभु जाई॥**

त्यादिवशी त्यांनी झाडाखाली निवास केला. लक्ष्मण व गुह यांनी विश्रांतीची चांगली व्यवस्था केली. प्रभू श्रीरामचंद्रांनी प्रात:काली सर्व कर्मे आटोपून तीर्थराज प्रयागाचे दर्शन घेतले.॥ १॥

**सचिव सत्य श्रद्धा प्रिय नारी। माधव सरिस मीतु हितकारी॥**
**चारि पदारथ भरा भँडारू। पुन्य प्रदेस देस अति चारू॥**

त्या तीर्थराजाचा सत्य हा मंत्री आहे. श्रद्धा ही त्याची प्रिय पत्नी आहे आणि श्रीवेणीमाधव यांच्यासारखे हितकारक मित्र आहेत. त्याचे भांडार धर्मादी चार पदार्थांनी भरले आहे आणि पुण्यमय प्रांत हाच त्या राजाचा सुंदर देश आहे.॥ २॥

**छेत्रु अगम गढ़ु गाढ़ सुहावा। सपनेहुँ नहिं प्रतिपच्छिन्ह पावा॥**
**सेन सकल तीरथ बर बीरा। कलुष अनीक दलन रनधीरा॥**

प्रयाग क्षेत्र हे दुर्गम, मजबूत आणि सुंदर किल्ला आहे. स्वप्नातही पापरूपी शत्रू त्याला जिंकू शकत नाहीत. संपूर्ण तीर्थे हे त्याचे वीर व श्रेष्ठ सैन्य आहे. ते पापाची सेना चिरडून टाकणारे व रणधीर आहे. ॥ ३ ॥

**संगमु सिंहासनु सुठि सोहा। छत्रु अखयबटु मुनि मनु मोहा॥**
**चवँर जमुन अरु गंग तरंगा। देखि होहिं दुख दारिद भंगा॥**

गंगा, यमुना व सरस्वती यांचा संगम हाच त्याचे अत्यंत सुशोभित सिंहासन आहे. अक्षयवट हा छत्र आहे. तो मुनींच्या मनास मोहित करून टाकतो. यमुना व गंगा यांच्या लाटा या श्याम व शुभ्र चामरे आहेत. त्यांचे दर्शन होताच दुःख आणि दारिद्र्य नष्ट होते. ॥ ४ ॥

**दो०—सेवहिं सुकृती साधु सुचि पावहिं सब मनकाम।**
**बंदी बेद पुरान गन कहहिं बिमल गुन ग्राम॥ १०५॥**

पुण्यात्मे व पवित्र साधू त्याची सेवा करतात आणि त्यांचे सर्व मनोरथ पूर्ण होतात. वेद आणि पुराणांचे समूह हे भाट होत. ते त्याच्या निर्मल गुणांचे गायन करतात. ॥ १०५ ॥

**को कहि सकइ प्रयाग प्रभाऊ। कलुष पुंज कुंजर मृगराऊ॥**
**अस तीरथपति देखि सुहावा। सुख सागर रघुबर सुखु पावा॥**

पापांच्या समूहरूपी हत्तीला मारण्यासाठी सिंहरूप असलेल्या प्रयागराजाचे माहात्म्य कोण सांगू शकणार? अशा सुंदर तीर्थराजाचे दर्शन घेऊन सुख-सागर रघुकुलश्रेष्ठ श्रीरामांनासुद्धा सुख झाले. ॥ १ ॥

**कहि सिय लखनहि सखहि सुनाई। श्रीमुख तीरथराज बड़ाई॥**
**करि प्रनामु देखत बन बागा। कहत महातम अति अनुरागा॥**

त्यांनी आपल्या श्रीमुखाने सीता, लक्ष्मण व गुह यांना तीर्थराज प्रयागाचा महिमा सांगितला. त्यानंतर प्रणाम करून वने व बगीचे पाहात आणि मोठ्या प्रेमाने त्यांचे माहात्म्य सांगत- ॥ २ ॥

**एहि बिधि आइ बिलोकी बेनी। सुमिरत सकल सुमंगल देनी॥**
**मुदित नहाइ कीन्हि सिव सेवा। पूजि जथाबिधि तीरथ देवा॥**

श्रीरामांनी येऊन त्रिवेणीचे दर्शन घेतले. त्रिवेणीचे स्मरण केल्यानेच सर्व सुंदर मंगल ती देते. नंतर त्यांनी त्रिवेणीमध्ये स्नान करून भगवान शिवांची पूजा केली आणि विधिपूर्वक तीर्थदेवतांचे पूजन केले. ॥ ३ ॥

**तब प्रभु भरद्वाज पहिं आए। करत दंडवत मुनि उर लाए॥**
**मुनि मन मोद न कछु कहि जाई। ब्रह्मानंद रासि जनु पाई॥**

स्नान-पूजा इत्यादी झाल्यावर प्रभू श्रीराम भरद्वाज ऋषींकडे आले. त्यांना दंडवत घालत

असतानाच मुनींनी त्यांना हृदयाशी धरले. मुनींच्या मनाला झालेला आनंद अवर्णनीय होता. जणू त्यांना ब्रह्मानंदाचे भांडार मिळाले होते. ॥ ४ ॥

दो०—**दीन्हि असीस मुनीस उर अति अनंदु अस जानि।**
**लोचन गोचर सुकृत फल मनहुँ किए बिधि आनि॥ १०६॥**

मुनीश्वर भरद्वाजांनी आशीर्वाद दिला. आज विधात्याने सीता व लक्ष्मणासह प्रभू श्रीरामचंद्रांचे दर्शन घडविले, याचा त्यांच्या मनास आनंद झाला. जणू आपल्या संपूर्ण पुण्यांचे फल त्यांच्या डोळ्यांसमोर आणून उभे केले. ॥ १०६ ॥

**कुसल प्रस्न करि आसन दीन्हे। पूजि प्रेम परिपूरन कीन्हे॥**
**कंद मूल फल अंकुर नीके। दिए आनि मुनि मनहुँ अमी के॥**

खुशाली विचारल्यावर मुनींनी त्यांना आसन दिले, आणि प्रेमाने पूजन करून त्यांना संतुष्ट केले. नंतर जणू अमृतापासून बनविलेले चांगले कंद, मुळे, फळे व अंकुर आणून दिले. ॥ १ ॥

**सीय लखन जन सहित सुहाए। अति रुचि राम मूल फल खाए॥**
**भए बिगतश्रम रामु सुखारे। भरद्वाज मृदु बचन उचारे॥**

सीता, लक्ष्मण व सेवक गुह यांच्यासह श्रीरामांनी ती कंदमुळे व फळे मोठ्या आवडीने खाल्ली. थकवा दूर झाल्यावर श्रीरामांना समाधान वाटले. तेव्हा भरद्वाज मुनी त्यांना मृदू वाणीने म्हणाले, ॥ २ ॥

**आजु सुफल तपु तीरथ त्यागू। आजु सुफल जप जोग बिरागू॥**
**सफल सकल सुभ साधन साजू। राम तुम्हहि अवलोकत आजू॥**

‘हे राम, तुमचे दर्शन होताच आज माझे तप, तीर्थसेवन, त्याग, जप, योग आणि वैराग्य सफल झाले. तसेच आज माझ्या संपूर्ण शुभ साधनांचा समूहसुद्धा सफळ झाला. ॥ ३ ॥

**लाभ अवधि सुख अवधि न दूजी। तुम्हरें दरस आस सब पूजी॥**
**अब करि कृपा देहु बर एहू। निज पद सरसिज सहज सनेहू॥**

प्रभुदर्शन सोडल्यास लाभाची व सुखाची दुसरी काहीही परिसीमा नाही. तुमच्या दर्शनामुळे माझ्या सर्व आशा पूर्ण झाल्या. आता तुमच्या चरण-कमलांवर माझे मनापासून प्रेम जडावे, असे वरदान मला द्या. ॥ ४ ॥

दो०—**करम बचन मन छाड़ि छलु जब लगि जनु न तुम्हार।**
**तब लगि सुखु सपनेहुँ नहीं किएँ कोटि उपचार॥ १०७॥**

जोपर्यंत काया-वाचा-मनाने कपट सोडून मनुष्य तुमचा दास होत नाही, तोपर्यंत कोट्यवधी उपाय केले, तरी त्याला स्वप्नातही सुख मिळत नाही.’॥ १०७॥

**सुनि मुनि बचन रामु सकुचाने। भाव भगति आनंद अघाने॥**
**तब रघुबर मुनि सुजसु सुहावा। कोटि भाँति कहि सबहि सुनावा॥**

मुनिवर भरद्वाजांचे बोलणे ऐकून त्यांच्या भक्तिभावामुळे आनंदाने तृप्त होऊन भगवान रामचंद्र मानवी लीला म्हणून संकोच पावले. तेव्हा आपले ऐश्वर्य गुप्त ठेवून श्रीरामांनी भरद्वाज मुनींची सुंदर कीर्ती अनेक प्रकारे सर्वांना सांगितली.॥ १॥

**सो बड़ सो सब गुन गन गेहू। जेहि मुनीस तुम्ह आदर देहू॥**
**मुनि रघुबीर परसपर नवहीं। बचन अगोचर सुखु अनुभवहीं॥**

ते म्हणाले की, 'हे मुनीश्वर, ज्याला तुम्ही आदर द्याल, तोच मोठा आणि तोच सर्वगुणांचे घर होय.' अशा प्रकारे श्रीराम आणि मुनी भरद्वाज हे दोघे परस्पर विनम्र होत होते आणि अनिर्वचनीय सुखाचा अनुभव घेत होते.॥ २॥

**यह सुधि पाइ प्रयाग निवासी। बटु तापस मुनि सिद्ध उदासी॥**
**भरद्वाज आश्रम सब आए। देखन दसरथ सुअन सुहाए॥**

श्रीराम, लक्ष्मण, सीता यांच्या आगमनाची वार्ता मिळताच प्रयागवासी ब्रह्मचारी, तपस्वी, सिद्ध आणि संन्यासी हे सर्व दशरथांच्या सुंदर पुत्रांना पाहण्यासाठी भरद्वाजांच्या आश्रमात पोहोचले.॥ ३॥

**राम प्रनाम कीन्ह सब काहू। मुदित भए लहि लोयन लाहू॥**
**देहिं असीस परम सुखु पाई। फिरे सराहत सुंदरताई॥**

श्रीरामचंद्रांनी सर्वांना प्रणाम केला. नेत्रांचे पारणे फिटल्यामुळे सर्वजण आनंदित झाले आणि त्यांनी आशीर्वाद दिले. श्रीरामांच्या लावण्याची प्रशंसा करीत ते परत गेले.॥ ४॥

**दो०—राम कीन्ह बिश्राम निसि प्रात प्रयाग नहाइ।**
**चले सहित सिय लखन जन मुदित मुनिहि सिरु नाइ॥ १०८॥**

श्रीरामांनी रात्री तेथे विश्रांती घेतली आणि प्रात:काळी प्रयागराजाचे स्नान करून आणि प्रसन्न होऊन मुनींना मस्तक नमवून सीता, लक्ष्मण व गुह यांच्यासह ते पुढे निघाले.॥ १०८॥

**राम सप्रेम कहेउ मुनि पाहीं। नाथ कहिअ हम केहि मग जाहीं॥**
**मुनि मन बिहसि राम सन कहहीं। सुगम सकल मग तुम्ह कहुँ अहहीं॥**

निघताना मोठ्या प्रेमाने श्रीराम मुनींना म्हणाले, 'मुनिवर्य! आम्ही कोणत्या वाटेने जावे, ते सांगा.' मुनी मनात हसून म्हणाले की, 'तुम्हांला सर्व मार्ग सुगम आहेत.'॥ १॥

**साथ लागि मुनि सिष्य बोलाए। सुनि मन मुदित पचासक आए॥**
**सबन्हि राम पर प्रेम अपारा। सकल कहहिं मगु दीख हमारा॥**

मग त्यांच्या सोबतीसाठी मुनींनी शिष्यांना बोलावले. आपल्याला श्रीरामांच्या सोबत जायचे आहे, हे ऐकून मनात आनंदित होऊन जवळ जवळ पन्नास शिष्य आले. सर्वांचे श्रीरामांच्यावर फार प्रेम होते. सर्वजण म्हणत होते की, हा मार्ग आम्हांला माहीत आहे, आम्हांला माहीत आहे. ॥ २ ॥

**मुनि बटु चारि संग तब दीन्हे । जिन्ह बहु जनम सुकृत सब कीन्हे ॥**
**करि प्रनामु रिषि आयसु पाई । प्रमुदित हृदयँ चले रघुराई ॥**

तेव्हा मुनींनी निवडक चार ब्रह्मचाऱ्यांना त्यांच्यासोबत दिले, त्यांनी अनेक जन्मांत सुकृत केले होते. श्रीरघुनाथ प्रणाम करून आणि ऋषींची आज्ञा घेऊन मनात अतिशय आनंदित होऊन चालू लागले. ॥ ३ ॥

**ग्राम निकट जब निकसहिं जाई । देखहिं दरसु नारि नर धाई ॥**
**होहिं सनाथ जनम फलु पाई । फिरहिं दुखित मनु संग पठाई ॥**

जेव्हा ते एखाद्या गावाजवळून जायचे, तेव्हा तेथील स्त्री-पुरुष त्यांचे लावण्य पाहात राहात. ते जन्माचे फळ मिळाल्याने अनाथ असलेले सर्व सनाथ होत आणि मनाने श्रीरामांच्या बरोबर जाऊन शरीराने जाता येत नाही, म्हणून दु:खी होऊन परत फिरत होते. ॥ ४ ॥

दो०—**बिदा किए बटु बिनय करि फिरे पाइ मन काम।**
**उतरि नहाए जमुन जल जो सरीर सम स्याम॥ १०९ ॥**

त्यानंतर श्रीरामांनी विनंती करून चारी ब्रह्मचाऱ्यांना निरोप दिला. ते मनोवांछित अनन्य भक्ती मिळवून परत गेले. नंतर यमुनेमध्ये उतरून सर्वांनी स्नान केले. ते जल श्रीरामांच्या शरीरासारखेच सावळे होते. ॥

**सुनत तीरबासी नर नारी । धाए निज निज काज बिसारी ॥**
**लखन राम सिय सुंदरताई । देखि करहिं निज भाग्य बड़ाई ॥**

यमुनेच्या किनाऱ्यावर राहणारे स्त्री-पुरुष हे निषाद राजाबरोबर दोन परम सुंदर सुकुमार नवयुवक आणि एक परम सुंदर स्त्री आली आहे, हे ऐकून आपले सर्व काम विसरून धावले आणि लक्ष्मण, राम व सीता यांचे सौंदर्य पाहून आपल्या भाग्याची प्रशंसा करू लागले. ॥ १ ॥

**अति लालसा बसहिं मन माहीं । नाउँ गाउँ बूझत सकुचाहीं ॥**
**जे तिन्ह महुँ बयबिरिध सयाने । तिन्ह करि जुगुति रामु पहिचाने ॥**

त्यांच्या मनात ओळख करून घेण्याची मोठी लालसा होती. परंतु नाव-गाव विचारण्यास ते संकोचत होते. त्या लोकांमध्ये जे वयोवृद्ध व चतुर होते, त्यांनी युक्तीने श्रीरामांना ओळखले. ॥ २ ॥

**सकल कथा तिन्ह सबहि सुनाई । बनहि चले पितु आयसु पाई ॥**
**सुनि सबिषाद सकल पछिताहीं । रानी रायँ कीन्ह भल नाहीं ॥**

पित्याच्या आज्ञेने हे वनात निघाले आहेत, ही गोष्ट त्यांनी सर्व लोकांना सांगितली. ते ऐकून सर्व लोकांना दुःख वाटले. राणी व राजांनी हे चांगले केले नाही, म्हणून त्यांना वाईट वाटले. ॥ ३ ॥

**तेहि अवसर एक तापसु आवा। तेजपुंज लघुबयस सुहावा॥**
**कबि अलखित गति बेषु बिरागी। मन क्रम बचन राम अनुरागी॥**

त्याचवेळी एक तापसी तेथे आला. तो तेजःपुंज, लहान वयाचा आणि सुंदर होता. तो कवी होता पण आपला परिचय देऊ इच्छित नव्हता. तो बैराग्याच्या वेषात होता आणि मन-वचन-कर्माने श्रीरामांचा भक्त होता. ॥ ४ ॥

(हा तापसाचा प्रसंग प्रक्षिप्त असावा, असे काही टीकाकारांचे मत आहे. परंतु हा प्रसंग सर्व प्राचीन प्रतींमध्ये आहे. गोस्वामी तुलसीदास हे अनुभवी होते. हा प्रसंग आणण्याचे काय रहस्य आहे, हे समजत नाही. त्या तापसाला 'कबि अलखित गती' म्हटले आहे. कोण ते निश्चितपणे सांगता येत नाही. आमच्या मते तो तापस हा हनुमान किंवा स्वतः ध्यानस्थ तुलसीदास असावेत.)

दो०—**सजल नयन तन पुलकि निज इष्टदेउ पहिचानि।**
**परेउ दंड जिमि धरनितल दसा न जाइ बखानि॥ ११०॥**

आपल्या इष्टदेवास पाहून त्याच्या नेत्रांतून पाणी वाहू लागले. शरीर पुलकित झाले आणि त्याने पृथ्वीवर लोटांगण घातले. त्याच्या प्रेमविव्हळ दशेचे वर्णन करणे कठीण होते. ॥ ११० ॥

**राम सप्रेम पुलकि उर लावा। परम रंक जनु पारसु पावा॥**
**मनहुँ प्रेमु परमारथु दोऊ। मिलत धरें तन कह सबु कोऊ॥**

श्रीरामांनी त्याला प्रेमाने हृदयाशी धरले. त्याला इतका आनंद झाला की, महादरिद्री माणसाला परीस लाभावा. पाहणारे सर्वजण म्हणू लागले की, जणू प्रेम व परमार्थ हे दोघे साकार होऊन भेटत आहेत. ॥ १ ॥

**बहुरि लखन पायन्ह सोइ लागा। लीन्ह उठाइ उमगि अनुरागा॥**
**पुनि सिय चरन धूरि धरि सीसा। जननि जानि सिसु दीन्हि असीसा॥**

मग तो तपस्वी लक्ष्मणांच्या चरणी लागला. त्याने प्रेमभराने त्याला उठवले. नंतर त्याने सीतेची चरण-धूल आपल्या मस्तकी धारण केली. सीता मातेनेही त्याला आपले लहान मूल समजून आशीर्वाद दिला. ॥२ ॥

**कीन्ह निषाद दंडवत तेही। मिलेउ मुदित लखि राम सनेही॥**
**पिअत नयन पुट रूपु पियूषा। मुदित सुअसनु पाइ जिमि भूखा॥**

त्यानंतर निषादराजाने त्याला दंडवत घातला. श्रीरामांचा भक्त समजून तो निषादाला आनंदाने भेटला. तो तपस्वी आपल्या नेत्ररूपी द्रोणांनी श्रीरामांच्या सौंदर्याचे पान करू लागला आणि इतका

आनंदित झाला की, एखादा भुकेला माणूस सुंदर भोजन मिळाल्यावर होतो तसा.॥ ३॥

**ते पितु मातु कहहु सखि कैसे। जिन्ह पठए बन बालक ऐसे॥**
**राम लखन सिय रूपु निहारी। होहिं सनेह बिकल नर नारी॥**

इकडे गावातील स्त्रिया म्हणत होत्या की, 'हे सखी, ते माता-पिता किती निष्ठुर आहेत, ज्यांनी अशा सुंदर सुकुमार बालकांना वनात धाडले?' श्रीराम, लक्ष्मण आणि सीता यांचे रूप पाहून सर्व स्त्री-पुरुष प्रेमाने व्याकूळ होत.॥ ४॥

दो०—**तब रघुबीर अनेक बिधि सखहि सिखावनु दीन्ह।**
**राम रजायसु सीस धरि भवन गवनु तेइँ कीन्ह॥ १११॥**

मग श्रीरामचंद्रांनी मित्र गुहाला अनेक तऱ्हेने परत जाण्यासाठी समजून सांगितले. श्रीरामांची आज्ञा शिरोधार्य मानून तो घरी परतला.॥ १११॥

**पुनि सियँ राम लखन कर जोरी। जमुनहि कीन्ह प्रनामु बहोरी॥**
**चले ससीय मुदित दोउ भाई। रबितनुजा कइ करत बड़ाई॥**

सीता, राम व लक्ष्मण यांनी हात जोडून यमुनेला पुन्हा प्रणाम केला आणि सूर्यकन्या यमुनेची स्तुती करीत ते दोघे भाऊ सीतेसह प्रसन्न होऊन पुढे निघाले.॥ १॥

**पथिक अनेक मिलहिं मग जाता। कहहिं सप्रेम देखि दोउ भ्राता॥**
**राज लखन सब अंग तुम्हारें। देखि सोचु अति हृदय हमारें॥**

वाटेमध्ये जाताना त्यांना पुष्कळ यात्रेकरू भेटले. त्या दोघा भावांना पाहून ते प्रेमाने म्हणत की, 'तुमच्या अंगावरील सर्व राजचिन्हे पाहून आमच्या मनात मोठी शंका येते.॥ २॥

**मारग चलहु पयादेहि पाएँ। ज्योतिषु झूठ हमारें भाएँ॥**
**अगमु पंथु गिरि कानन भारी। तेहि महँ साथ नारि सुकुमारी॥**

अशी राजचिन्हे असताना तुम्ही पायी चालत आहात. यावरून असे वाटते की, ज्योतिषशास्त्र खोटे असले पाहिजे. दाट जंगले व मोठमोठ्या पर्वतांमधील दुर्गम रस्ते आहेत. त्याशिवाय तुमच्यासोबत नाजुक स्त्री आहे.॥ ३॥

**करि केहरि बन जाइ न जोई। हम सँग चलहिं जो आयसु होई॥**
**जाब जहाँ लगि तहँ पहुँचाई। फिरब बहोरि तुम्हहि सिरु नाई॥**

हत्ती आणि सिंह यांनी भरलेले हे भयानक वन पाहावतसुद्धा नाही. जर आज्ञा असेल, तर आम्ही सोबतीने येऊ. जिथे जायचे आहे, तेथे तुम्हांला पोहोचवून आणि प्रणाम करून आम्ही परत जाऊ.'॥ ४॥

दो०—**एहि बिधि पूँछहिं प्रेम बस पुलक गात जलु नैन।**
**कृपासिंधु फेरहिं तिन्हहि कहि बिनीत मृदु बैन॥ ११२॥**

अशा प्रकारे ते यात्रेकरू प्रेमाने पुलकित होऊन व डोळ्यांत प्रेमाश्रू आणून विचारत, परंतु कृपासिंधू श्रीरामचंद्र विनयाने मृदू बोलून त्यांना परत पाठवून देत.॥ ११२॥

**जे पुर गाँव बसहिं मग माहीं। तिन्हहि नाग सुर नगर सिहाहीं॥**
**केहि सुकृतीं केहि घरीं बसाए। धन्य पुन्यमय परम सुहाए॥**

नाग व देव हे वाटेतील गाव, वाड्या यांची प्रशंसा व हेवा करीत होते आणि लालसेने म्हणत होते की, कोणत्या पुण्यवानाने, कोणत्या शुभ क्षणी यांना बनविले असावे? कारण, हे श्रीराम आज ज्यांमधून जात आहेत, ते निवास किती धन्य व परम सुंदर झाले आहेत!॥ १॥

**जहँ जहँ राम चरन चलि जाहीं। तिन्ह समान अमरावति नाहीं॥**
**पुन्यपुंज मग निकट निवासी। तिन्हहि सराहहिं सुरपुरबासी॥**

जिथे जिथे श्रीरामांची पावले पडत होती, त्या स्थानाइतकी इंद्राची अमरावतीही पवित्र नाही. वाटेजवळ राहणारेसुद्धा पुण्यात्मे होत. स्वर्गातील देवसुद्धा त्यांची स्तुती करीत होते.॥ २॥

**जे भरि नयन बिलोकहिं रामहि। सीता लखन सहित घनस्यामहि॥**
**जे सर सरित राम अवगाहहिं। तिन्हहि देव सर सरित सराहहिं॥**

जे, डोळे भरून सीता आणि लक्ष्मणासह श्रीरामांचे दर्शन घेत होते, ज्या तलावांत व नद्यांमध्ये श्रीराम स्नान करीत, त्यांची थोरवी देवसरोवरे व देवनद्याही करीत होत्या.॥ ३॥

**जेहि तरु तर प्रभु बैठहिं जाई। करहिं कलपतरु तासु बड़ाई॥**
**परसि राम पद पदुम परागा। मानति भूमि भूरि निज भागा॥**

ज्या वृक्षाखाली प्रभू राम जाऊन बसत, त्यांची प्रशंसा कल्पवृक्षसुद्धा करी. श्रीरामचंद्रांच्या चरण-कमलांच्या धुळीचा स्पर्श होणे, हे पृथ्वी आपले सौभाग्य समजत होती.॥ ४॥

दो०—**छाँह करहिं घन बिबुधगन बरषहिं सुमन सिहाहिं।**
**देखत गिरि बन बिहग मृग रामु चले मग जाहिं॥ ११३॥**

वाटेत ढग दाटून सावली तयार करीत. देव पुष्पे उधळून तृप्त होत. श्रीराम पर्वत, वने, पशू, पक्षी यांना पाहात पाहात वाटेने जात होते.॥ ११३॥

**सीता लखन सहित रघुराई। गाँव निकट जब निकसहिं जाई॥**
**सुनि सब बाल बृद्ध नर नारी। चलहिं तुरत गृह काजु बिसारी॥**

सीता व लक्ष्मण यांचेसह श्रीराम ज्या गावाजवळून जात, तेथे त्यांचे आगमन झाल्याचे ऐकताच सर्व आबाल–वृद्ध स्त्री–पुरुष आपले घर व कामधाम विसरून लगेच त्यांना पाहण्यासाठी निघत. ॥ १ ॥

**राम लखन सिय रूप निहारी। पाइ नयन फलु होहिं सुखारी॥**
**सजल बिलोचन पुलक सरीरा। सब भए मगन देखि दोउ बीरा॥**

श्रीराम, लक्ष्मण, सीता यांचे रूप पाहून त्यांच्या डोळ्यांचे पारणे फिटे व त्यांना सुख वाटे. दोघा भावांना पाहून सर्वजण प्रेमात बुडून जात. त्यांना पाहून त्या लोकांच्या डोळ्यांत पाणी येई आणि ते पुलकित होत. ॥ २ ॥

**बरनि न जाइ दसा तिन्ह केरी। लहि जनु रंकन्ह सुरमनि ढेरी॥**
**एकन्ह एक बोलि सिख देहीं। लोचन लाहु लेहु छन एहीं॥**

त्यांच्या मन:स्थितीचे वर्णन करणे कठीण. जणू दरिद्री माणसांना चिंतामणींचा ढीग सापडला असावा. ते एक दुसऱ्याला हाका मार–मारून सांगत की, या क्षणी डोळ्यांचे पारणे फेडून घ्या. ॥ ३ ॥

**रामहि देखि एक अनुरागे। चितवत चले जाहिं सँग लागे॥**
**एक नयन मग छबि उर आनी। होहिं सिथिल तन मन बर बानी॥**

कुणी कुणी श्रीरामचंद्रांना पाहून इतके प्रेमात पडत की, त्यांना पाहात त्यांच्याबरोबर चालू लागत. कोणी डोळ्यांनी त्यांचे रूप पाहून घेत व मनात ठेवून कायावाचामनाने मुग्ध होऊन जात. ॥ ४ ॥

दो०—**एक देखि बट छाँह भलि डासि मृदुल तृन पात।**
**कहहिं गवाँइअ छिनुकु श्रमु गवनब अबहिं कि प्रात॥ ११४॥**

कोणी वडाची सावली पाहून तेथे गवत व पाने पसरून म्हणत की, थोडा वेळ येथे बसून शीण दूर करा. मग पुढे जा किंवा सकाळी जा. ॥ ११४ ॥

**एक कलस भरि आनहिं पानी। अँचइअ नाथ कहहिं मृदु बानी॥**
**सुनि प्रिय बचन प्रीति अति देखी। राम कृपाल सुसील बिसेषी॥**

कोणी घडा भरून पाणी आणी आणि गोड शब्दांत म्हणे, 'हे नाथ, घोटभर पाणी घ्या.' त्यांचे प्रेमाचे बोलणे ऐकून आणि त्यांचे अत्यंत प्रेम पाहून दयाळू व परम सुशील श्रीरामचंद्रांनी, ॥ १ ॥

**जानी श्रमित सीय मन माहीं। घरिक बिलंबु कीन्ह बट छाहीं॥**
**मुदित नारि नर देखहिं सोभा। रूप अनूप नयन मनु लोभा॥**

मनात विचार केला की, सीता थकली आहे, म्हणून त्यांनी वडाखाली थोडी विश्रांती घ्यावी. त्यावेळी स्त्री–पुरुष आनंदाने त्यांची शोभा पाहात. त्यांच्या अनुपम रूपाने लोकांचे नेत्र व मन मोहित होई. ॥ २ ॥

**एकटक सब सोहहिं चहुँ ओरा। रामचंद्र मुख चंद चकोरा॥**
**तरुन तमाल बरन तनु सोहा। देखत कोटि मदन मनु मोहा॥**

सर्वजण एकटक श्रीरामांचे चंद्रमुख चकोराप्रमाणे तन्मय होऊन पाहात. तेव्हा चोहीकडे सर्व शोभून दिसत होते. श्रीरामांचे नवीन तमाल वृक्षाच्या रंगाचे श्यामल शरीर अत्यंत शोभत होते. ते पाहून कोट्यवधी कामदेवांचे मन मोहित होऊन जाई. ॥ ३ ॥

**दामिनि बरन लखन सुठि नीके। नख सिख सुभग भावते जी के॥**
**मुनिपट कटिन्ह कसें तूनीरा। सोहहिं कर कमलनि धनु तीरा॥**

विजेसारख्या रंगाचे तेजस्वी लक्ष्मण फार चांगले वाटत होते. ते नखशिखांत सुंदर होते व मनाला फार आह्लाद देत. दोघांनी वल्कले इत्यादी वस्त्रे घातली होती आणि कमरेला भाते बांधले होते. कमलां-सारख्या त्यांच्या हातात धनुष्य-बाण शोभून दिसत होते. ॥ ४ ॥

दो०—**जटा मुकुट सीसनि सुभग उर भुज नयन बिसाल।**
**सरद परब बिधु बदन बर लसत स्वेद कन जाल॥ ११५॥**

त्यांच्या शिरांवर सुंदर जटा-जूट होते. वक्ष:स्थल, भुजा आणि नेत्र विशाल होते आणि शरद पौर्णिमेच्या चंद्रासमान सुंदर मुखांवर स्वेदबिंदूंची झळकणारी शोभा होती. ॥ ११५ ॥

**बरनि न जाइ मनोहर जोरी। सोभा बहुत थोरि मति मोरी॥**
**राम लखन सिय सुंदरताई। सब चितवहिं चित मन मति लाई॥**

त्या मनोहर जोडीचे वर्णन मला करता येणार नाही, कारण त्यांची शोभा अपार आहे आणि माझी बुद्धी अल्प आहे. श्रीराम, लक्ष्मण व सीता यांचे सौंदर्य सर्वजण मन, चित्त व बुद्धीने तन्मय होऊन पाहात होते. ॥ १ ॥

**थके नारि नर प्रेम पिआसे। मनहुँ मृगी मृग देखि दिआ से॥**
**सीय समीप ग्रामतिय जाहीं। पूँछत अति सनेहँ सकुचाहीं॥**

गावातील ते प्रेमाचे भुकेले स्त्री-पुरुष तिघांच्या सौंदर्य-माधुर्याची छटा पाहून असे थक्क होत होते की, दिवा पाहून जसे हरीण-हरिणी स्तब्ध होऊन जातात. गावातील स्त्रिया सीतेजवळ जात, परंतु अत्यंत प्रेमामुळे काही विचारताना संकोच पावत. ॥ २ ॥

**बार बार सब लागहिं पाएँ। कहहिं बचन मृदु सरल सुभाएँ॥**
**राजकुमारि बिनय हम करहीं। तिय सुभायँ कछु पूँछत डरहीं॥**

वारंवार तिच्या पाया पडत आणि सहजपणे साध्याभोळ्या भाषेत म्हणत, ‘हे राजकुमारी, आम्हांला काही विचारायचे आहे, परंतु स्त्री-स्वभावामुळे काही विचारायचे म्हटले, तर लाज वाटते. ॥ ३ ॥

**स्वामिनि अबिनय छमबि हमारी । बिलगु न मानब जानि गवाँरी ॥**
**राजकुअँर दोउ सहज सलोने । इन्ह तें लही दुति मरकत सोने ॥**

हे स्वामिनी, आमच्या धारिष्ट्याबद्दल आम्हांला क्षमा करा. आम्ही गावढळ आहोत, असे समजून वाईट वाटून घेऊ नका. हे दोन्ही राजकुमार स्वभावतः लावण्यमय आहेत. पाचूने व सुवर्णाने यांच्यापासूनच कांती मिळविली आहे. ॥ ४ ॥

दो०—**स्यामल गौर किसोर बर सुंदर सुषमा ऐन।**
**सरद सर्बरीनाथ मुखु सरद सरोरुह नैन॥ ११६ ॥**

हे श्याम व गौर वर्णाचे दोघे सुंदर किशोर अवस्थेत आहेत. दोघेही परम सुंदर व शोभेचे माहेरघर आहेत. शरदपौर्णिमेच्या चंद्राप्रमाणे यांचे मुख व शरद ऋतूतील कमळासारखे यांचे नेत्र आहेत.' ॥ ११६ ॥

## मासपारायण, सोळावा विश्राम
## नवाह्नपारायण, चौथा विश्राम

**कोटि मनोज लजावनिहारे । सुमुखि कहहु को आहिं तुम्हारे ॥**
**सुनि सनेहमय मंजुल बानी । सकुची सिय मन महुँ मुसुकानी ॥**

'हे सुमुखी, आपल्या सौंदर्याने कोट्यवधी कामदेवांना लाजविणारे हे तुमचे कोण आहेत?' त्यांची अशी प्रेममय सुंदर वाणी ऐकून सीता संकोचली आणि मनात हसली. ॥ १ ॥

**तिन्हहि बिलोकि बिलोकति धरनी । दुहुँ सकोच सकुचति बरबरनी ॥**
**सकुचि सप्रेम बाल मृग नयनी । बोली मधुर बचन पिकबयनी ॥**

उत्तम गौरवर्णाची सीता त्यांना पाहून जमिनीकडे पाहू लागली. दोन्हीकडून तिला संकोच वाटत होता. न सांगितल्यास ग्रामीण स्त्रियांना वाईट वाटण्याचा संभव होता आणि सांगायचे म्हटले तर लज्जा वाटत होती. तेव्हा मृगनयना व कोकिल कंठी सीता संकोचाने प्रेमपूर्वक मधुर वाणीने म्हणाली, ॥ २ ॥

**सहज सुभाय सुभग तन गोरे । नामु लखनु लघु देवर मोरे ॥**
**बहुरि बदनु बिधु अंचल ढाँकी । पिय तन चितइ भौंह करि बाँकी ॥**

'हे जे सरळ स्वभावाचे, सुंदर व गोरे आहेत, त्यांचे नाव लक्ष्मण. ते माझे धाकटे दीर आहेत.' नंतर सीतेने लाजून आपल्या चंद्रमुखावर पदर ओढून घेऊन आणि प्रियतम श्रीरामांकडे नजर टाकीत भुवई वर करून, ॥ ३ ॥

**खंजन मंजु तिरीछे नयननि । निज पति कहेउ तिन्हहि सियँ सयननि ॥**
**भईं मुदित सब ग्रामबधूटीं । रंकन्ह राय रासि जनु लूटीं ॥**

खंजन पक्ष्यासारख्या सुंदर नेत्रांनी तिरका कटाक्ष टाकीत सीतेने खुणेने त्यांना सांगितले की, 'हे माझे पती आहेत.' हे समजल्यावर गावच्या सर्व युवती अशा आनंदित झाल्या की, जणू कंगालांना धनाच्या राशी लुटण्यासाठी मिळाल्या. ॥ ४ ॥

दो०—**अति सप्रेम सिय पायँ परि बहुबिधि देहिं असीस।**
**सदा सोहागिनि होहु तुम्ह जब लगि महि अहि सीस॥ ११७॥**

त्या अत्यंत प्रेमाने सीतेच्या पाया पडत अनेक प्रकारे शुभकामना देऊ लागल्या की, 'जोपर्यंत शेषनागाच्या मस्तकावर पृथ्वी आहे, तोपर्यंत तुम्ही सुवासिनी राहा. ॥ ११७ ॥

**पारबती सम पतिप्रिय होहू । देबि न हम पर छाड़ब छोहू ॥**
**पुनि पुनि बिनय करिअ कर जोरी । जौं एहि मारग फिरिअ बहोरी ॥**

आणि पार्वतीप्रमाणे आपल्या पतीला प्रिय बना. हे देवी! आमच्यावर कृपा करीत राहा. आम्ही वारंवार हात जोडून विनंती करतो की, तुम्ही पुन्हा याच वाटेने परता, ॥ १ ॥

**दरसनु देब जानि निज दासी । लखीं सीयँ सब प्रेम पिआसी ॥**
**मधुर बचन कहि कहि परितोषीं । जनु कुमुदिनीं कौमुदीं पोषीं ॥**

आणि आम्हांला दासी समजून दर्शन द्या.' सीतेने पाहिले की, त्या सर्वजणी प्रेमाच्या भुकेल्या आहेत. म्हणून मधुर वाणीने समजावून तिने त्यांचे समाधान केले. जणू चांदण्याने कुमुदिनींना आपले किरण देऊन पुष्ट केले. ॥ २ ॥

**तबहिं लखन रघुबर रुख जानी । पूँछेउ मगु लोगन्हि मृदु बानी ॥**
**सुनत नारि नर भए दुखारी । पुलकित गात बिलोचन बारी ॥**

त्यावेळी श्रीरामांचे मनोगत ओळखून लक्ष्मणाने मृदू भाषेत लोकांना पुढचा मार्ग विचारला. ते ऐकून स्त्री-पुरुष दुःखी झाले. त्यांचे शरीर पुलकित झाले आणि वियोगाच्या कल्पनेने त्यांच्या डोळ्यांत अश्रू आले. ॥ ३ ॥

**मिटा मोदु मन भए मलीने । बिधि निधि दीन्ह लेत जनु छीने ॥**
**समुझि करम गति धीरजु कीन्हा । सोधि सुगम मगु तिन्ह कहि दीन्हा ॥**

त्यांचा आनंद मावळला आणि मन उदास झाले. जणू विधात्याने दिलेली संपत्ती हिरावून घेतली. कर्माची गती मानून त्यांनी मन घट्ट केले आणि नीट विचार करून सोपी वाट दाखविली. ॥ ४ ॥

दो०—**लखन जानकी सहित तब गवनु कीन्ह रघुनाथ।**
**फेरे सब प्रिय बचन कहि लिए लाइ मन साथ॥ ११८॥**

मग लक्ष्मण व जानकीसह श्रीरामांनी प्रस्थान केले आणि गोड बोलून सर्वांना परत पाठविले, परंतु त्यांची मने आपल्यासोबत घेतली. ॥ ११८ ॥

**फिरत नारि नर अति पछिताहीं । दैअहिं दोषु देहिं मन माहीं ॥**
**सहित बिषाद परसपर कहहीं । बिधि करतब उलटे सब अहहीं ॥**

परत जाताना ते स्त्री-पुरुष पश्चात्ताप करीत होते व मनातल्या मनात दैवाला दोष देत होते. ते परस्परांना दु:खाने म्हणत होते की, 'दैवाची सर्व कामे उलटीच असतात. ॥ १ ॥

**निपट निरंकुस निठुर निसंकू । जेहिं ससि कीन्ह सरुज सकलंकू ॥**
**रूख कलपतरु सागरु खारा । तेहिं पठए बन राजकुमारा ॥**

हा विधाता अत्यंत निरंकुश, निर्दय व बेडर आहे. ज्याने चंद्राला रोगी व कलंकित बनविले, कल्पवृक्षाला झाड बनविले आणि समुद्राला खारे करून ठेवले, त्यानेच या राजकुमारांना वनात धाडले. ॥ २ ॥

**जौं पै इन्हहि दीन्ह बनबासू । कीन्ह बादि बिधि भोग बिलासू ॥**
**ए बिचरहिं मग बिनु पदत्राना । रचे बादि बिधि बाहन नाना ॥**

जर विधात्याला यांना वनात पाठवायचे होते, तर त्याने भोग-विलास उगाच तयार केले. जर यांना अनवाणी चालवायचे होते, तर विधात्याने अनेक वाहने फुकटच बनवली. ॥ ३ ॥

**ए महि परहिं डासि कुस पाता । सुभग सेज कत सृजत बिधाता ॥**
**तरुबर बास इन्हहि बिधि दीन्हा । धवल धाम रचि रचि श्रमु कीन्हा ॥**

जर हे कुश व पाने अंथरून जमिनीवर पहुडतात, तर विधात्याने पलंग, अंथरूणे अशा शय्या कशाला बनविल्या ? विधात्याने जर यांना मोठमोठ्या झाडाखाली निवास दिला, तर मग उज्ज्वल महाल बनवून त्याने फुकटच कष्ट घेतले म्हणायचे. ॥ ४ ॥

दो०—**जौं ए मुनि पट धर जटिल सुंदर सुठि सुकुमार ।**
**बिबिध भाँति भूषन बसन बादि किए करतार ॥ ११९ ॥**

हे सुंदर व अत्यंत सुकुमार असूनही मुनींची वल्कले नेसतात आणि जटा धारण करतात, मग विधात्याने तऱ्हेतऱ्हेचे अलंकार व वस्त्रे उगाच बनविली. ॥ ११९ ॥

**जौं ए कंद मूल फल खाहीं । बादि सुधादि असन जग माहीं ॥**
**एक कहहिं ए सहज सुहाए । आपु प्रगट भए बिधि न बनाए ॥**

हे कंद-मुळे व फळे खातात, तर जगात अमृतादी भोजन पदार्थ व्यर्थच आहेत.' कोणी म्हणाला, 'हे स्वभावत:च सुंदर आहेत. हे स्वयंभू आहेत. ब्रह्मदेवाने बनविलेले नाहीत. ॥ १ ॥

**जहँ लगि बेद कही बिधि करनी । श्रवन नयन मन गोचर बरनी ॥**
**देखहु खोजि भुअन दस चारी । कहँ अस पुरुष कहाँ असि नारी ॥**

आमच्या डोळ्यांनी, कानांनी व मनाने अनुभवास आलेली विधात्याची करणी अशी की, वेदांत ज्यांचे वर्णन केलेले आहे, त्या चौदाही लोकांत शोधून पाहा की, असे पुरुष व स्त्रिया कुठे आहेत? यावरून सिद्ध होते की, हे तिघे विधात्याच्या चौदा लोकांपेक्षा वेगळे आहेत आणि ते स्वतःच्या महिम्याने निर्माण झालेले आहेत. ॥ २ ॥

**इन्हहि देखि बिधि मनु अनुरागा । पटतर जोग बनावै लागा ॥**
**कीन्ह बहुत श्रम ऐक न आए । तेहिं इरिषा बन आनि दुराए ॥**

यांना पाहून विधात्याचे मन मुग्ध झाले, तेव्हा तोसुद्धा यांच्या उपमेजोगे दुसरे स्त्री-पुरुष बनवू लागला. त्याने खूप श्रम घेतले, तरी कोणी त्याच्या हातून पूर्ण उतरले नाहीत. त्यामुळे ईर्ष्येने त्याने यांना जंगलात आणून दृष्टीआड केले आहे.'॥ ३ ॥

**एक कहहिं हम बहुत न जानहिं । आपुहि परम धन्य करि मानहिं ॥**
**ते पुनि पुन्यपुंज हम लेखे । जे देखहिं देखिहहिं जिन्ह देखे ॥**

कोणी म्हणतो, 'आम्हांला काही फार माहीत नाही, परंतु आम्ही स्वतःला फार धन्य समजतो की, यांचे दर्शन घडत आहे. आणि ज्यांनी यांना पाहिले, पाहात आहेत, जे पाहतील, ते सर्व पुण्यवान होत.'॥ ४ ॥

दो०—**एहि बिधि कहि कहि बचन प्रिय लेहिं नयन भरि नीर।**
**किमि चलिहहिं मारग अगम सुठि सुकुमार सरीर॥ १२० ॥**

अशा प्रकारे गोड बोलून सर्वांचे डोळे पाणावले आणि ते म्हणाले की, 'हे अत्यंत सुकुमार देहाचे अवघड वाटांतून कसे चालत जाणार?'॥ १२० ॥

**नारि सनेह बिकल बस होहीं । चकई साँझ समय जनु सोहीं ॥**
**मृदु पद कमल कठिन मगु जानी । गहबरि हृदयँ कहहिं बर बानी ॥**

स्त्रिया प्रेमामुळे व्याकूळ होत होत्या. जणू संध्याकाळी चकवी भावी वियोगाच्या दुःखाने दुःखी होत होत्या. यांच्या कोमल चरणकमलांसाठी तो मार्ग कठीण मानून त्या व्यथित अंतःकरणाने बोलू लागल्या, ॥ १ ॥

**परसत मृदुल चरन अरुनारे । सकुचति महि जिमि हृदय हमारे ॥**
**जौं जगदीस इन्हहि बनु दीन्हा । कस न सुमनमय मारगु कीन्हा ॥**

'यांच्या कोमल व लालसर पावलांच्या स्पर्शाने पृथ्वीलाही आमच्या हृदयाप्रमाणे संकोच वाटत असावा. जगदीश्वराला जर यांना वनवासच द्यायचा होता, तर सर्व रस्ते पुष्पमय का बरे बनविले नाहीत?॥ २ ॥

**जौं मागा पाइअ बिधि पाहीं। ए रखिअहिं सखि आँखिन्ह माहीं॥**
**जे नर नारि न अवसर आए। तिन्ह सिय रामु न देखन पाए॥**

जर ब्रह्मदेव मागू ते देणार असेल, तर त्याला आम्ही मागू की, यांना आमच्या डोळ्यांतच बसव.' जे स्त्री-पुरुष या प्रसंगी आले नव्हते, त्यांना सीतारामांना पाहाता आले नाही.॥ ३॥

**सुनि सुरूपु बूझहिं अकुलाई। अब लगि गए कहाँ लगि भाई॥**
**समरथ धाइ बिलोकहिं जाई। प्रमुदित फिरहिं जनमफलु पाई॥**

जे आले नव्हते, ते व्याकूळ होऊन विचारत की, आतापर्यंत ते कुठवर पोहोचले असतील? त्यात जे सशक्त होते ते धावत जाऊन त्यांचे दर्शन घेत होते आणि जन्माचे सार्थक झाले, असे समजून विशेष आनंदाने येत होते.॥ ४॥

दो०—**अबला बालक बृद्ध जन कर मीजहिं पछिताहिं।**
**होहिं प्रेमबस लोग इमि रामु जहाँ जहँ जाहिं॥ १२१॥**

गर्भवती व बाळंतिणी इत्यादी असमर्थ स्त्रिया, मुले व म्हातारे-कोतारे त्यांचे दर्शन न मिळाल्याने हात चोळत पश्चात्ताप करीत होते. अशा प्रकारे श्रीराम जेथे जेथे जात होते, तेथील लोक प्रेममग्न होत होते.॥ १२१॥

**गावँ गावँ अस होइ अनंदू। देखि भानुकुल कैरव चंदू॥**
**जे कछु समाचार सुनि पावहिं। ते नृप रानिहि दोसु लगावहिं॥**

सूर्यकुलरूपी कुमुदिनीला प्रफुल्लित करणाऱ्या चंद्रमास्वरूप असलेल्या श्रीरामांचे दर्शन घेतल्याने गावोगावी आनंद होत होता. यांना वनवास दिल्याचे ज्यांना समजत होते, ते राजा दशरथ व राणी कैकेयी यांना दोष देत होते.॥ १॥

**कहहिं एक अति भल नरनाहू। दीन्ह हमहि जोइ लोचन लाहू॥**
**कहहिं परसपर लोग लोगाईं। बातें सरल सनेह सुहाईं॥**

कोणी म्हणे, राजा फार चांगला आहे, त्यांनी यांना पाठविल्यामुळे आमच्या डोळ्यांचे पारणे फिटले.' सर्व स्त्री-पुरुष आपापसात सरळ भावाने स्नेहपूर्ण गोष्टी बोलत होते.॥ २॥

**ते पितु मातु धन्य जिन्ह जाए। धन्य सो नगरु जहाँ तें आए॥**
**धन्य सो देसु सैलु बन गाऊँ। जहँ जहँ जाहिं धन्य सोइ ठाऊँ॥**

ते म्हणत की, 'ते माता-पिता धन्य होत, ज्यांनी यांना जन्म दिला. ते नगर धन्य होय, जेथून हे आले आहेत. तो देश, पर्वत, वन आणि गावे धन्य होत आणि ती स्थाने धन्य होत, जिथे जिथे हे जात आहेत.॥ ३॥

**सुखु पायउ बिरंचि रचि तेही। ए जेहि के सब भाँति सनेही॥**
**राम लखन पथि कथा सुहाई। रही सकल मग कानन छाई॥**

ब्रह्मदेवाने त्यांना उत्पन्न करून समाधान मिळविले, ज्यांचे हे श्रीराम सर्वप्रकारे स्नेही आहेत. वाटसरू बनलेल्या श्रीराम व लक्ष्मण यांच्या सुंदर कथा सर्व मार्गांवर व जंगलात पसरल्या. ॥ ४ ॥

**दो०—एहि बिधि रघुकुल कमल रबि मग लोगन्ह सुख देत।**
**जाहिं चले देखत बिपिन सिय सौमित्रि समेत॥ १२२॥**

रघुकुलरूपी कमलाला उमलविणारे सूर्य असलेले श्रीरामचंद्र अशा प्रकारे मार्गातील लोकांना सुख देत, सीता व लक्ष्मण यांचेसह वने पाहात चालले होते. ॥ १२२ ॥

**आगें रामु लखनु बने पाछें। तापस बेष बिराजत काछें॥**
**उभय बीच सिय सोहति कैसें। ब्रह्म जीव बिच माया जैसें॥**

पुढे श्रीराम आहेत, मागे लक्ष्मण होता. तपस्व्यांचा वेष घेतलेले दोघे फार शोभून दिसत होते. दोघांच्यामध्ये सीता अशी शोभत होती की, ज्याप्रमाणे ब्रह्म व जीव यांच्यामध्ये माया असते. ॥ १ ॥

**बहुरि कहउँ छबि जसि मन बसई। जनु मधु मदन मध्य रति लसई॥**
**उपमा बहुरि कहउँ जियँ जोही। जनु बुध बिधु बिच रोहिनि सोही॥**

आता मी जसे रूप माझ्या मनात योजले आहे, ते सांगतो. जणू वसंतऋतू आणि कामदेव यांच्यामध्ये रती शोभून दिसते. मग आपल्या हृदयात शोधून उपमा सांगतो की, जणू चंद्राचा पुत्र बुध व चंद्रमा यांच्यामध्ये चंद्राची पत्नी रोहिणी शोभून दिसत आहे. ॥ २ ॥

**प्रभु पद रेख बीच बिच सीता। धरति चरन मग चलति सभीता॥**
**सीय राम पद अंक बराएँ। लखन चलहिं मगु दाहिन लाएँ॥**

प्रभू श्रीरामचंद्रांच्या भूमीवर अंकित होणाऱ्या दोन्ही चरण-चिह्नांच्या मधल्या मोकळ्या जागेत पाय ठेवीत, भगवंतांच्या चरणचिह्नांवर पाय पडू नये, म्हणून सीता सावधपणे वाटेत चालत होती. आणि लक्ष्मण हा मर्यादा पाळण्यासाठी सीता व रामचंद्र या दोघांच्या चरणचिह्नांना टाळून त्यांना उजवीकडे ठेवीत मार्गक्रमण करीत होता. ॥ ३ ॥

**राम लखन सिय प्रीति सुहाई। बचन अगोचर किमि कहि जाई॥**
**खग मृग मगन देखि छबि होहीं। लिए चोरि चित राम बटोहीं॥**

श्रीराम, लक्ष्मण व सीता यांच्या सुंदर प्रेमाचे वर्णन हा काही वाणीचा विषय नव्हे. मग ते कसे सांगता येईल? पक्षी आणि पशू हे सुद्धा त्यांना पाहून प्रेमानंदात मग्न होत होते. पथिक असलेल्या श्रीरामांनी त्यांचे चित्त चोरून घेतले होते. ॥ ४ ॥

**दो०—जिन्ह जिन्ह देखे पथिक प्रिय सिय समेत दोउ भाइ।**
**भव मगु अगमु अनंदु तेइ बिनु श्रम रहे सिराइ॥ १२३॥**

सीतेसह असलेल्या त्या प्रिय पांथस्थ भावांना ज्या ज्या लोकांनी पाहिले, त्यांनी जन्म-मृत्युरूपी संसारात भटकवणारा भयानक दुर्गम मार्ग कष्टाविना आनंदाने पार केला. ॥ १२३ ॥

**अजहुँ जासु उर सपनेहुँ काऊ। बसहुँ लखनु सिय रामु बटाऊ॥**
**राम धाम पथ पाइहि सोई। जो पथ पाव कबहुँ मुनि कोई॥**

आजही ज्यांच्या हृदयात स्वप्नामध्ये का होईना, कधी लक्ष्मण, सीता व राम हे पथिक येतात. त्यांनासुद्धा श्रीरामांच्या परमधामाचा मार्ग मिळतो. जो मार्ग कधी कोणा थोड्या मुनींनाच मिळतो. ॥ १ ॥

**तब रघुबीर श्रमित सिय जानी। देखि निकट बटु सीतल पानी॥**
**तहँ बसि कंद मूल फल खाई। प्रात नहाइ चले रघुराई॥**

श्रीरामांनी सीतेला थकलेली पाहून आणि जवळच एक वटवृक्ष आणि थंड पाणी पाहून तेथे त्या दिवशी मुक्काम केला. कंद, मुळे, फळे खाऊन, रात्रभर तेथे राहून प्रातःकाळी स्नान करून श्रीराम पुढे चालले. ॥ २ ॥

**देखत बन सर सैल सुहाए। बालमीकि आश्रम प्रभु आए॥**
**राम दीख मुनि बासु सुहावन। सुंदर गिरि काननु जलु पावन॥**

सुंदर वने, तलाव आणि पर्वत पाहात-पाहात प्रभू श्रीराम वाल्मीकींच्या आश्रमात आले. श्रीरामांनी पाहिले की, मुनींचा आश्रम फार चांगला आहे. येथे सुंदर पर्वत, वने व पवित्र पाणी आहे. ॥ ३ ॥

**सरनि सरोज बिटप बन फूले। गुंजत मंजु मधुप रस भूले॥**
**खग मृग बिपुल कोलाहल करहीं। बिरहित बैर मुदित मन चरहीं॥**

सरोवरामध्ये कमळे व वनामध्ये फुले उमललेली आहेत. मकरंद-रसामुळे धुंद झालेले भ्रमर गुंजारव करीत आहेत. पुष्कळसे पक्षी व पशू कोलाहल करीत आहेत आणि आपले वैर सोडून प्रसन्न मनाने वावरत आहेत. ॥ ४ ॥

दो०—**सुचि सुंदर आश्रमु निरखि हरषे राजिवनेन।**
**सुनि रघुबर आगमनु मुनि आगें आयउ लेन॥ १२४॥**

तो पवित्र व सुंदर आश्रम पाहून कमलनयन श्रीरामचंद्रांना हर्ष झाला. रघुश्रेष्ठ श्रीरामांचे आगमन झाल्याचे ऐकून वाल्मीकी मुनी त्यांना घेण्यासाठी सामोरे आले. ॥ १२४ ॥

**मुनि कहुँ राम दंडवत कीन्हा। आसिरबादु बिप्रबर दीन्हा॥**
**देखि राम छबि नयन जुड़ाने। करि सनमानु आश्रमहिं आने॥**

श्रीरामांनी मुनींना दंडवत प्रणाम केला. विप्रश्रेष्ठ मुनींनी त्यांना आशीर्वाद दिला. श्रीरामांचे लावण्य पाहून मुनींच्या नेत्रांना समाधान वाटले. मोठ्या सन्मानाने ते त्यांना घेऊन आश्रमात आले. ॥ १ ॥

**मुनिबर अतिथि प्रानप्रिय पाए। कंद मूल फल मधुर मगाए॥**
**सिय सौमित्रि राम फल खाए। तब मुनि आश्रम दिए सुहाए॥**

श्रेष्ठ मुनी वाल्मीकींनी प्राणप्रिय पाहुणे आल्यामुळे त्यांच्यासाठी मधुर कंद, मुळे आणि फळे मागविली. सीता, लक्ष्मण व रामचंद्रांनी फळे घेतली. मग मुनींनी त्यांना विश्रांतीसाठी सुंदर स्थान दाखविले. ॥ २ ॥

**बालमीकि मन आनँदु भारी। मंगल मूरति नयन निहारी॥**
**तब कर कमल जोरि रघुराई। बोले बचन श्रवन सुखदाई॥**

मुनी श्रीरामांच्याजवळ बसले. त्यांची मंगलमूर्ती पाहून मुनी वाल्मीकींना मनातून फार मोठा आनंद होत होता. तेव्हा श्रीराम कमलसदृश हात जोडून कानांना सुखकारक मधुर शब्द बोलले— ॥ ३ ॥

**तुम्ह त्रिकाल दरसी मुनिनाथा। बिस्व बदर जिमि तुम्हरें हाथा॥**
**अस कहि प्रभु सब कथा बखानी। जेहि जेहि भाँति दीन्ह बनु रानी॥**

‘हे मुनिनाथ, तुम्ही त्रिकालदर्शी आहात. तुमच्यासाठी संपूर्ण जग हे तळहातावर ठेवलेल्या बोरासारखे प्रत्यक्ष आहे.’ प्रभू रामचंद्रांनी नंतर कशाप्रकारे कैकेयीने वनवास दिला, ती कथा विस्ताराने सांगितली. ॥ ४ ॥

**दो०—तात बचन पुनि मातु हित भाइ भरत अस राउ।**
**मो कहुँ दरस तुम्हार प्रभु सबु मम पुन्य प्रभाउ॥ १२५॥**

आणि म्हटले, ‘हे प्रभो, पित्याच्या आज्ञेचे पालन, मातेचे हित आणि भरतासारख्या प्रेमळ व धर्मात्म्या भावाने राजा होणे आणि तुमचे दर्शन घडणे या सर्व गोष्टी माझ्या पुण्याच्या प्रभावामुळे घडल्या आहेत. ॥ १२५ ॥

**देखि पाय मुनिराय तुम्हारे। भए सुकृत सब सुफल हमारे॥**
**अब जहँ राउर आयसु होई। मुनि उदबेगु न पावै कोई॥**

हे मुनिराज, तुमच्या चरणांचे दर्शन झाल्याने आज आमचे सर्व पुण्य सफल झाले. आता आपण जेथे कोणत्याही मुनीला त्रास होणार नाही, ॥ १ ॥

**मुनि तापस जिन्ह तें दुखु लहहीं। ते नरेस बिनु पावक दहहीं॥**
**मंगल मूल बिप्र परितोषू। दहइ कोटि कुल भूसुर रोषू॥**

कारण ज्यांच्यामुळे मुनी व तपस्वी यांना त्रास होतो, ते राजे अग्नीशिवायच आपल्याच दुष्ट कर्मामुळे जळून भस्म होतात. ब्राह्मणांचा संतोष हा सर्व मांगल्याचे मूळ आहे आणि ब्राह्मणांचा क्रोध कोट्यवधी कुलांना भस्म करून टाकतो, ॥ २ ॥

**अस जियँ जानि कहिअ सोइ ठाऊँ। सिय सौमित्रि सहित जहँ जाऊँ॥**
**तहँ रचि रुचिर परन तृन साला। बासु करौं कछु काल कृपाला॥**

असा विचार करून असे स्थान सांगा की, मी, लक्ष्मण व सीता यांचेसह तेथे राहू शकेन. तेथे सुंदर पाने व गवताची कुटी बनवून हे दयाळू! काही दिवस आम्ही तेथे राहू शकू.'॥ ३॥

**सहज सरल सुनि रघुबर बानी। साधु साधु बोले मुनि ग्यानी॥**
**कस न कहहु अस रघुकुलकेतू। तुम्ह पालक संतत श्रुति सेतू॥**

श्रीरामांची सहज सरळ वाणी ऐकून ज्ञानी मुनी वाल्मीकी म्हणाले, 'धन्य, धन्य, हे रघुकुलाचे ध्वजस्वरूप, तुम्ही असे का बरे म्हणणार नाही? तुम्ही सदैव वेदांच्या मर्यादेचे पालन करता.॥ ४॥

**छं०—श्रुति सेतु पालक राम तुम्ह जगदीस माया जानकी।**
**जो सृजति जगु पालति हरति रुख पाइ कृपानिधान की॥**
**जो सहससीसु अहीसु महिधरु लखनु सचराचर धनी।**
**सुर काज धरि नरराज तनु चले दलन खल निसिचर अनी॥**

हे राम, तुम्ही वेदांच्या मर्यादेचे रक्षक असणारे जगदीश्वर आहात व तुमची स्वरूपभूत माया सीता आहे. जी कृपेचे भांडार असलेली सीतादेवी तुमचा कल पाहून जगाचे सृजन, पालन व संहार करते. जो हजार मस्तकांचा सर्पांचा स्वामी आणि शिरावर पृथ्वीला धारण करणारा आहे, तोच चराचराचा स्वामी शेष, हा लक्ष्मण आहे. देवांचे कार्य करण्यासाठी राजाचे शरीर धारण करून दुष्ट राक्षसांच्या सेनेचा नाश करण्यासाठी तुम्ही निघाला आहात.

**सो०—राम सरूप तुम्हार बचन अगोचर बुद्धिपर।**
**अबिगत अकथ अपार नेति नेति नित निगम कह॥ १२६॥**

हे राम, तुमचे स्वरूप वाणीला अगोचर, बुद्धीच्या पलीकडे, अव्यक्त, अकथनीय आणि अपार आहे. वेद नित्य 'नेति नेति' म्हणून त्याचे वर्णन करतात.॥ १२६॥

**जगु पेखन तुम्ह देखनिहारे। बिधि हरि संभु नचावनिहारे॥**
**तेउ न जानहिं मरमु तुम्हारा। औरु तुम्हहि को जाननिहारा॥**

हे राम, जगत हे दृश्य आहे आणि तुम्ही त्याचे द्रष्टे आहात. तुम्ही ब्रह्मदेव, विष्णू आणि शंकर यांनाही नाचविणारे आहात. ते सुद्धा तुमचे रहस्य जाणत नाहीत, तर दुसरा कोण तुम्हांला जाणणारा आहे?॥ १॥

**सोइ जानइ जेहि देहु जनाई। जानत तुम्हहि तुम्हइ होइ जाई॥**
**तुम्हरिहि कृपाँ तुम्हहि रघुनंदन। जानहिं भगत भगत उर चंदन॥**

तोच तुम्हांला जाणतो की, ज्याला तुम्ही जाणवून देता आणि जाणताच तो तुमचे स्वरूप बनून जातो. हे रघुनंदना, हे भक्तांचे हृदय शीतल करणाऱ्या चंदना, तुमच्या कृपेमुळेच भक्त तुम्हांला जाणू शकतात. ॥ २ ॥

**चिदानंदमय देह तुम्हारी । बिगत बिकार जान अधिकारी ॥**
**नर तनु धरेहु संत सुर काजा । कहहु करहु जस प्राकृत राजा ॥**

तुमचा देह चिदानंदमय आहे. तो प्रकृतिजन्य पंचमहाभूतांनी बनलेला व कर्मबंधनयुक्त त्रिदेहविशिष्ट मायिक नव्हे. शिवाय तो उत्पत्ति-नाश, वृद्धि-क्षय इत्यादी सर्व विकारांनी रहित आहे. हे रहस्य अधिकारी पुरुषच जाणतात. तुम्ही देव आणि संतांच्या कार्यासाठी दिव्य नर-शरीर धारण केले आहे आणि प्राकृत राजांप्रमाणे बोलत व वागत आहात. ॥ ३ ॥

**राम देखि सुनि चरित तुम्हारे । जड़ मोहहिं बुध होहिं सुखारे ॥**
**तुम्ह जो कहहु करहु सबु साँचा । जस काछिअ तस चाहिअ नाचा ॥**

हे राम, तुमचे चरित्र पाहून व ऐकून मूर्ख लोकांना मोह पडतो व ज्ञानीजन सुखी होतात. तुम्ही जे बोलता व करता, ते सर्व सत्यच असते. कारण जसे सोंग घ्यावे, तसेच नाचायलाही हवे ना! ॥ ४ ॥

दो०—**पूँछेहु मोहि कि रहौं कहँ मैं पूँछत सकुचाउँ।**
**जहँ न होहु तहँ देहु कहि तुम्हहि देखावौं ठाउँ॥ १२७॥**

तुम्ही मला विचारले की, ‘मी कुठे राहू?’ परंतु मला हे विचारताना संकोच वाटतो की, जिथे तुम्ही नाही आहात, ते स्थान तरी सांगा. मग मी तुम्हांला राहण्यासाठी स्थान दाखवितो.’॥ १२७ ॥

**सुनि मुनि बचन प्रेम रस साने । सकुचि राम मन महुँ मुसुकाने ॥**
**बालमीकि हँसि कहहिं बहोरी । बानी मधुर अमिअ रस बोरी ॥**

मुनींचे हे प्रेमरसाने भरलेले शब्द ऐकून श्रीरामांनी रहस्य उघड होईल, म्हणून संकोचाने स्मितहास्य केले. वाल्मीकी हसून अमृतरसाने ओथंबलेल्या मधुर वाणीने म्हणाले, ॥ १ ॥

**सुनहु राम अब कहउँ निकेता । जहाँ बसहु सिय लखन समेता ॥**
**जिन्ह के श्रवन समुद्र समाना । कथा तुम्हारि सुभग सरि नाना ॥**

हे प्रभो! ऐका. आता मी सांगतो, तेथे तुम्ही सीता व लक्ष्मण यांच्यासह निवास करा. ज्यांचे समुद्राप्रमाणे कान तुमच्या सुंदर कथारूपी अनेक सुंदर नद्यांनी- ॥ २ ॥

**भरहिं निरंतर होहिं न पूरे । तिन्ह के हिय तुम्ह कहुँ गृह रूरे ॥**
**लोचन चातक जिन्ह करि राखे । रहहिं दरस जलधर अभिलाषे ॥**

निरंतर भरत असतात, तरीही पूर्णपणे तृप्त होत नाहीत, ज्यांची हृदये ही सुंदर घरे आहेत आणि ज्यांनी आपले नेत्र चातक बनविले आहेत; जे तुमच्या दर्शनरूपी मेघासाठी सदा आसुसलेले असतात, ॥ ३ ॥

**निदरहिं सरित सिंधु सर भारी। रूप बिंदु जल होहिं सुखारी॥**
**तिन्ह कें हृदय सदन सुखदायक। बसहु बंधु सिय सह रघुनायक॥**

तसेच जे मोठमोठ्या नद्या, समुद्र, सरोवर यांना तुच्छ मानून तुमच्या सौंदर्यरूपी मेघाच्या एका थेंबाने सुखी होतात, हे रघुनाथ, त्या लोकांच्या हृदयरूपी सुखदायक भवनांमध्ये तुम्ही, लक्ष्मण व सीतेसह निवास करा. ॥ ४ ॥

**दो०—जसु तुम्हार मानस बिमल हंसिनि जीहा जासु।**
**मुकताहल गुन गन चुनइ राम बसहु हियँ तासु॥ १२८॥**

तुमच्या कीर्तिरूपी निर्मल मानस सरोवरामध्ये ज्याची जीभ ही हंसी बनून तुमच्या गुणसमूहरूपी मोत्यांचे सेवन करते, हे राम, तुम्ही त्यांच्या हृदयात निवास करा. ॥ १२८ ॥

**प्रभु प्रसाद सुचि सुभग सुबासा। सादर जासु लहइ नित नासा॥**
**तुम्हहि निबेदित भोजन करहीं। प्रभु प्रसाद पट भूषन धरहीं॥**

ज्यांची नासिका हे प्रभू! तुमच्या पवित्र व सुगंधित पुष्पादी सुंदर प्रसाद नित्य आदराने ग्रहण करते आणि जे तुम्हांला अर्पण करून भोजन करतात, तसेच तुमचा प्रसाद समजून वस्त्राभूषणे धारण करतात, ॥ १ ॥

**सीस नवहिं सुर गुरु द्विज देखी। प्रीति सहित करि बिनय बिसेषी॥**
**कर नित करहिं राम पद पूजा। राम भरोस हृदयँ नहिं दूजा॥**

ज्यांचे मस्तक देव, गुरू आणि ब्राह्मण यांना पाहून नम्रतेने व प्रेमाने वाकते, ज्यांचे हात नित्य हे श्रीराम, तुमच्या चरणांची पूजा करतात आणि ज्यांच्या हृदयात हे श्रीराम, तुमचाच भरवसा आहे, दुसरा नाही. ॥ २ ॥

**चरन राम तीरथ चलि जाहीं। राम बसहु तिन्ह के मन माहीं॥**
**मंत्रराजु नित जपहिं तुम्हारा। पूजहिं तुम्हहि सहित परिवारा॥**

तसेच ज्यांचे चरण श्रीराम, तुमच्या तीर्थांकडे ओढले जातात, हे राम, तुम्ही त्यांच्या मनामध्ये निवास करा. जे नित्य तुमचा मंत्रराज जपतात आणि परिवारासह तुमची पूजा करतात, ॥ ३ ॥

**तरपन होम करहिं बिधि नाना। बिप्र जेवाँइ देहिं बहु दाना॥**
**तुम्ह तें अधिक गुरहि जियँ जानी। सकल भायँ सेवहिं सनमानी॥**

जे अनेक प्रकारचे तर्पण व हवन करतात आणि ब्राह्मणांना भोजन घालून पुष्कळ दाने देतात, तसेच जे गुरूंना मनात तुमच्याहून अधिक मोठा मानून सर्वभावाने सन्मान करून त्यांची सेवा करतात,॥ ४॥

**दो०—सबु करि मागहिं एक फलु राम चरन रति होउ।**
**तिन्ह कें मन मंदिर बसहु सिय रघुनंदन दोउ॥ १२९॥**

आणि ही सर्व कर्मे करून या सर्वांचे फल म्हणून हेच मागतात की, श्रीरामांच्या चरणी आमचे प्रेम राहो. त्या लोकांच्या मन-मंदिरात सीता व रघुकुलाला आनंदित करणारे तुम्ही दोघे निवास करा.॥ १२९॥

**काम कोह मद मान न मोहा। लोभ न छोभ न राग न द्रोहा॥**
**जिन्ह कें कपट दंभ नहिं माया। तिन्ह कें हृदय बसहु रघुराया॥**

ज्यांना काम, क्रोध, मद, अभिमान आणि मोह नाही, लोभ नाही, क्षोभ नाही, प्रीति-द्वेष नाही आणि कपट, दंभ व मायाही नाही, हे रघुराज, तुम्ही त्यांच्या हृदयात निवास करा.॥ १॥

**सब के प्रिय सब के हितकारी। दुख सुख सरिस प्रसंसा गारी॥**
**कहहिं सत्य प्रिय बचन बिचारी। जागत सोवत सरन तुम्हारी॥**

जे सर्वांचे प्रिय आहेत आणि सर्वांचे हित करणारे आहेत, ज्यांना दुःख, सुख व प्रशंसा आणि निंदा हे सर्व समान वाटते, जे विचारपूर्वक सत्य व प्रिय बोलतात आणि जे जागेपणी व झोपेत तुम्हांलाच शरण आलेले असतात,॥ २॥

**तुम्हहि छाड़ि गति दूसरि नाहीं। राम बसहु तिन्ह के मन माहीं॥**
**जननी सम जानहिं परनारी। धनु पराव बिष तें बिष भारी॥**

तुम्हांला सोडून ज्यांना दुसरा कोणताही आश्रय नाही, हे रामा, तुम्ही त्यांच्या हृदयात निवास करा. जे परस्त्रीला मातेसमान मानतात आणि परक्याचे धन ज्यांना विषापेक्षाही भयंकर विष वाटते,॥ ३॥

**जे हरषहिं पर संपति देखी। दुखित होहिं पर बिपति बिसेषी॥**
**जिन्हहि राम तुम्ह प्रानपिआरे। तिन्ह के मन सुभ सदन तुम्हारे॥**

ज्यांना दुसऱ्याची संपत्ती पाहून आनंद वाटतो आणि दुसऱ्याची विपत्ती पाहून ज्यांना विशेष करून दुःख होते आणि हे राम, ज्यांना तुम्ही प्राणांसमान प्रिय आहात, त्यांचे मन तुम्हांला राहाण्याजोगे पवित्र भवन आहे.॥ ४॥

**दो०—स्वामि सखा पितु मातु गुर जिन्ह के सब तुम्ह तात।**
**मन मंदिर तिन्ह कें बसहु सीय सहित दोउ भ्रात॥ १३०॥**

हे तात, ज्यांचे स्वामी, सखा, पिता, माता आणि गुरू सर्व काही तुम्हीच आहात, त्यांच्या मनरूपी मंदिरात सीतेसह तुम्ही दोघे बंधू निवास करा. ॥ १३० ॥

**अवगुन तजि सब के गुन गहहीं। बिप्र धेनु हित संकट सहहीं॥**
**नीति निपुन जिन्ह कइ जग लीका। घर तुम्हार तिन्ह कर मनु नीका॥**

जे लोक अवगुण सोडून सर्वांचे गुण ग्रहण करतात, ब्राह्मण आणि गाय यांच्यासाठी संकटे सोसतात, नीतिनैपुण्याबद्दल जे जगात प्रमाण मानले जातात, त्यांचे सुंदर मन तुमचे घर होय. ॥ १ ॥

**गुन तुम्हार समुझइ निज दोसा। जेहि सब भाँति तुम्हार भरोसा॥**
**राम भगत प्रिय लागहिं जेही। तेहि उर बसहु सहित बैदेही॥**

जो गुण हे तुमचे आणि अवगुण हे आपले, असे समजतो, ज्याला सर्व प्रकारे तुमचाच आधार वाटतो आणि रामभक्त ज्याला प्रिय आहेत, त्याच्या हृदयात तुम्ही सीतेसह निवास करा. ॥ २ ॥

**जाति पाँति धनु धरमु बड़ाई। प्रिय परिवार सदन सुखदाई॥**
**सब तजि तुम्हहि रहइ उर लाई। तेहि के हृदयँ रहहु रघुराई॥**

जात-पात, धन, धर्म, मोठेपणा, आवडता परिवार आणि सुख देणारे घर हे सर्व सोडून जो तुम्हांलाच हृदयात धारण करतो, हे रघुनाथ, तुम्ही त्याच्या हृदयात राहा. ॥ ३ ॥

**सरगु नरकु अपबरगु समाना। जहँ तहँ देख धरें धनु बाना॥**
**करम बचन मन राउर चेरा। राम करहु तेहि कें उर डेरा॥**

ज्याच्या दृष्टीने स्वर्ग, नरक व मोक्ष हे समान आहेत; कारण ज्याला जिकडे-तिकडे धनुष्यबाण धारण केलेले तुम्हीच दिसता आणि जो कर्म, वचन व मन यांच्याद्वारे सर्वस्वी तुमचा दास आहे, हे राम, तुम्ही त्याच्या हृदयात वास करा. ॥ ४ ॥

दो०—**जाहि न चाहिअ कबहुँ कछु तुम्ह सन सहज सनेहु।**
**बसहु निरंतर तासु मन सो राउर निज गेहु॥ १३१॥**

ज्याला कधीही काहीही नको असते आणि ज्याला तुमच्याविषयी स्वाभाविक प्रेम आहे, तुम्ही त्याच्या मनात निरंतर वास करा. ते तुमचे स्वतःचे घर होय.' ॥ १३१ ॥

**एहि बिधि मुनिबर भवन देखाए। बचन सप्रेम राम मन भाए॥**
**कह मुनि सुनहु भानुकुलनायक। आश्रम कहउँ समय सुखदायक॥**

अशा प्रकारे मुनिश्रेष्ठ वाल्मीकींनी श्रीरामचंद्रांना घरे दाखविली. त्यांचे प्रेमपूर्ण शब्द ऐकून श्रीरामांच्या मनाला बरे वाटले. नंतर मुनी म्हणाले, 'हे सूर्यकुलाचे स्वामी, ऐका. आता मी या प्रसंगी तुम्हांला सुखदायक ठरणारा आश्रम सांगतो. ॥ १ ॥

**चित्रकूट गिरि करहु निवासू। तहँ तुम्हार सब भाँति सुपासू॥**
**सैलु सुहावन कानन चारू। करि केहरि मृग बिहग बिहारू॥**

तुम्ही चित्रकूट पर्वतावर निवास करा. तेथे सर्व प्रकारच्या सोयी आहेत आणि सुंदर पर्वत व वन आहे. तो पर्वत हत्ती, सिंह, हरीण व पक्ष्यांचे विहार-स्थल आहे.॥ २॥

**नदी पुनीत पुरान बखानी। अत्रिप्रिया निज तप बल आनी॥**
**सुरसरि धार नाउँ मंदाकिनि। जो सब पातक पोतक डाकिनि॥**

जिची पुराणांमध्ये प्रशंसा केली आहे, ती पवित्र नदी तेथे आहे. अत्री ऋषींची पत्नी अनसूया हिने आपल्या तपोबलाने तिला आणले आहे. ती गंगेचीच धार असून तिला मंदाकिनी असे नाव आहे. ती सर्व पापरूपी बालकांना खाऊन टाकणाऱ्या डाकिणी-सारखी आहे.॥ ३॥

**अत्रि आदि मुनिबर बहु बसहीं। करहिं जोग जप तप तन कसहीं॥**
**चलहु सफल श्रम सब कर करहू। राम देहु गौरव गिरिबरहू॥**

अत्री इत्यादी पुष्कळ श्रेष्ठ मुनी तेथे निवास करतात. ते योग, जप आणि तप यांच्याद्वारे आपले शरीर झिजवीत असतात. हे रामा, चला. त्या सर्वांचे परिश्रम सफल करा व पर्वतश्रेष्ठ चित्रकूट पर्वताला गौरव प्राप्त करून द्या.॥ ४॥

दो०—**चित्रकूट महिमा अमित कही महामुनि गाइ।**
**आइ नहाए सरित बर सिय समेत दोउ भाइ॥ १३२॥**

महामुनी वाल्मीकींनी चित्रकूट पर्वताचा अपार महिमा वर्णन करून सांगितला. तेव्हा सीतेसह दोघा भावांनी येऊन श्रेष्ठ नदी मंदाकिनीमध्ये स्नान केले.॥ १३२॥

**रघुबर कहेउ लखन भल घाटू। करहु कतहुँ अब ठाहर ठाटू॥**
**लखन दीख पय उतर करारा। चहुँ दिसि फिरेउ धनुष जिमि नारा॥**

श्रीरामचंद्र म्हणाले, 'लक्ष्मणा, फार चांगला घाट आहे. आता येथेच कुठेतरी राहाण्याची व्यवस्था कर.' तेव्हा लक्ष्मणाने पयस्विनी नदीच्या उत्तरेकडील उंच किनारा पाहिला. आणि म्हटले, 'याच्या चोहीकडे धनुष्यासारखा वळण घेतलेला ओढा आहे.॥ १॥

**नदी पनच सर सम दम दाना। सकल कलुष कलि साउज नाना॥**
**चित्रकूट जनु अचल अहेरी। चुकइ न घात मार मुठभेरी॥**

मंदाकिनी नदी त्या धनुष्याची प्रत्यंचा आहे आणि शम, दम, दान हे बाण आहेत. कलियुगातील सर्व पापे ही अनेक हिंस्त्र पशू आहेत. चित्रकूट हा जणू स्थिर शिकारी आहे. त्याचा नेम कधी चुकत नाही. तो समोरासमोर मारतो.'॥ २॥

**अस कहि लखन ठाउँ देखरावा। थलु बिलोकि रघुबर सुखु पावा॥**
**रमेउ राम मनु देवन्ह जाना। चले सहित सुर थपति प्रधाना॥**

असे म्हणून लक्ष्मणाने ते स्थान दाखविले. ते स्थान पाहून श्रीरामांना बरे वाटले. जेव्हा देवांना कळले की, येथे श्रीरामांचे मन रमले आहे, तेव्हा ते देवांचा मुख्य स्थापत्य विशारद विश्वकर्मा याला बरोबर घेऊन तेथे आले.॥ ३॥

**कोल किरात बेष सब आए। रचे परन तृन सदन सुहाए॥**
**बरनि न जाहिं मंजु दुइ साला। एक ललित लघु एक बिसाला॥**

सर्व देव कोल व भिल्लांच्या रूपाने आले आणि त्यांनी दिव्य पानांनी व गवतांनी सुंदर घरे बनविली. दोन सुंदर कुटी बनविल्या. त्यांचे वर्णन करणे शक्य नाही. त्यांमध्ये एक फार सुंदर अशी छोटीशी कुटी होती आणि दुसरी मोठी.॥ ४॥

दो०—**लखन जानकी सहित प्रभु राजत रुचिर निकेत।**
**सोह मदनु मुनि बेष जनु रति रितुराज समेत॥ १३३॥**

लक्ष्मण आणि जानकीसह प्रभू रामचंद्र सुंदर गवत-पानांच्या घरांमध्ये शोभून दिसत होते. जणू कामदेवच मुनीचा वेष धारण करून पत्नी रती व वसंत ऋतूसह शोभत होता.॥ १३३॥

## मासपारायण, सतरावा विश्राम

**अमर नाग किंनर दिसिपाला। चित्रकूट आए तेहि काला॥**
**राम प्रनामु कीन्ह सब काहू। मुदित देव लहि लोचन लाहू॥**

त्यावेळी देव, नाग, किन्नर आणि दिक्‌पाल हे चित्रकूटावर आले आणि श्रीरामांनी त्यांना प्रणाम केला. डोळ्यांचे पारणे फिटल्यामुळे देव आनंदित झाले.॥ १॥

**बरषि सुमन कह देव समाजू। नाथ सनाथ भए हम आजू॥**
**करि बिनती दुख दुसह सुनाए। हरषित निज निज सदन सिधाए॥**

फुले उधळीत देवांनी म्हटले, ‘हे नाथ, आज तुमच्या दर्शनाने आम्ही सनाथ झालो.’ त्यानंतर त्यांनी आपली असह्य दुःखे सांगितली आणि दुःखाचा नाश करण्याचे आश्वासन श्रीरामांच्याकडून मिळवून आनंदाने ते आपापल्या स्थानी निघून गेले.॥ २॥

**चित्रकूट रघुनंदनु छाए। समाचार सुनि सुनि मुनि आए॥**
**आवत देखि मुदित मुनिबृंदा। कीन्ह दंडवत रघुकुलचंदा॥**

श्रीरघुनाथ हे चित्रकूटावर राहात आहेत, ही वार्ता ऐकून पुष्कळसे मुनी आले. रघुकुलाचे चंद्र असलेल्या श्रीरामांनी आनंदित झालेल्या मुनि-मंडळींना येत असल्याचे पाहून दंडवत प्रणाम केला.॥ ३॥

**मुनि रघुबरहि लाइ उर लेहीं। सुफल होन हित आसिष देहीं॥**
**सिय सौमित्रि राम छबि देखहिं। साधन सकल सफल करि लेखहिं॥**

मुनिगणांनी श्रीरामांना हृदयाशी धरले आणि यशस्वी होण्याचा आशीर्वाद दिला. सीता, लक्ष्मण आणि श्रीराम यांचे लावण्य त्यांनी पाहिले व आपल्या सर्व साधनांचे साफल्य झाले, असे त्यांना वाटले. ॥ ४ ॥

दो०—**जथाजोग सनमानि प्रभु बिदा किए मुनिबृंद।**
**करहिं जोग जप जाग तप निज आश्रमन्हि सुछंद॥ १३४॥**

प्रभू श्रीरामांनी मुनी मंडळींचा यथायोग्य सन्मान करून त्यांना निरोप दिला. श्रीराम आल्यामुळे ते सर्व आपापल्या आश्रमांमध्ये आता निर्धास्तपणे योग, जप, यज्ञ व तप करू लागले. ॥ १३४ ॥

**यह सुधि कोल किरातन्ह पाई। हरषे जनु नव निधि घर आई॥**
**कंद मूल फल भरि भरि दोना। चले रंक जनु लूटन सोना॥**

श्रीरामांच्या आगमनाची वार्ता जेव्हा कोल व भिल्ल या लोकांना मिळाली, तेव्हा ते असे आनंदित झाले की, जणू नव निधी त्यांच्या घरी आले. ते द्रोणांमध्ये कंद, मुळे व फळे भरभरून घेऊन निघाले. जणू दरिद्री लोक सोने लुटायला निघाले होते. ॥ १ ॥

**तिन्ह महँ जिन्ह देखे दोउ भ्राता। अपर तिन्हहि पूँछहिं मगु जाता॥**
**कहत सुनत रघुबीर निकाई। आइ सबन्हि देखे रघुराई॥**

त्यांपैकी ज्यांनी दोघा भावांना पूर्वी पाहिले होते, त्यांना इतर लोक वाटेत जाताना त्यांच्याबद्दल विचारत होते. अशा प्रकारे श्रीरामांचे सौंदर्य सांगत-ऐकत सर्वांनी येऊन श्रीरामांचे दर्शन घेतले. ॥ २ ॥

**करहिं जोहारु भेंट धरि आगे। प्रभुहि बिलोकहिं अति अनुरागे॥**
**चित्र लिखे जनु जहँ तहँ ठाढ़े। पुलक सरीर नयन जल बाढ़े॥**

भेटी समोर ठेवून त्यांनी जोहार केला आणि अत्यंत प्रेमाने ते प्रभूंना पाहात राहिले. ते मुग्ध होऊन चित्राप्रमाणे उभे होते. त्यांचे शरीर पुलकित झाले होते आणि नेत्रांतून प्रेमाश्रूंची धार लागली होती. ॥ ३ ॥

**राम सनेह मगन सब जाने। कहि प्रिय बचन सकल सनमाने॥**
**प्रभुहि जोहारि बहोरि बहोरी। बचन बिनीत कहहिं कर जोरी॥**

श्रीरामांनी त्यांना प्रेम-मग्न होताना पाहून त्यांच्याशी गोड बोलत त्यांचा यथोचित सन्मान केला. ते वारंवार श्रीरामांना जोहार करीत हात जोडून म्हणाले, ॥ ४ ॥

दो०—**अब हम नाथ सनाथ सब भए देखि प्रभु पाय।**
**भाग हमारें आगमनु राउर कोसलराय॥ १३५॥**

हे प्रभू, तुमच्या चरणांचे दर्शन लाभल्यामुळे आता आम्ही सनाथ झालो. हे कोसलराज, आमचे मोठे भाग्य म्हणून तुमचे शुभागमन येथे झाले. ॥ १३५ ॥

**धन्य भूमि बन पंथ पहारा। जहँ जहँ नाथ पाउ तुम्ह धारा॥**
**धन्य बिहग मृग काननचारी। सफल जनम भए तुम्हहि निहारी॥**

हे नाथ, तुमचे चरण जेथे पडले, ते पृथ्वी, वन, मार्ग आणि पर्वत धन्य होत. तुम्हांला पाहून ज्यांचा जन्म सफल झाला, ते वनात फिरणारे पक्षी व पशू धन्य होत. ॥ १ ॥

**हम सब धन्य सहित परिवारा। दीख दरसु भरि नयन तुम्हारा॥**
**कीन्ह बासु भल ठाउँ बिचारी। इहाँ सकल रितु रहब सुखारी॥**

डोळे भरून तुमचे दर्शन घेणारे आम्ही सर्व आपल्या परिवारासह धन्य झालो आहोत. तुम्ही विचारपूर्वक मोठ्या चांगल्या ठिकाणी निवास केला आहे. येथे सर्व ऋतूंमध्ये तुम्ही सुखाने राहाल. ॥ २ ॥

**हम सब भाँति करब सेवकाई। करि केहरि अहि बाघ बराई॥**
**बन बेहड़ गिरि कंदर खोहा। सब हमार प्रभु पग पग जोहा॥**

आम्ही सर्वप्रकारे हत्ती, सिंह, सर्प व वाघ यांच्यापासून रक्षण करून सेवा करू. हे प्रभो, येथील घनदाट वने, पर्वत, गुहा आणि दऱ्या यांची आम्हांला खडान् खडा माहिती आहे. ॥ ३ ॥

**तहँ तहँ तुम्हहि अहेर खेलाउब। सर निरझर जलठाउँ देखाउब॥**
**हम सेवक परिवार समेता। नाथ न सकुचब आयसु देता॥**

आम्ही त्या स्थानी तुम्हांला शिकार खेळवू आणि तलाव, झरे आणि जलाशय दाखवू. आम्ही आमच्या कुटुंबासह तुमचे सेवक आहोत. म्हणून हे नाथ, आम्हांला आज्ञा देण्यास संकोच करू नका.' ॥ ४ ॥

दो०—**बेद बचन मुनि मन अगम ते प्रभु करुना ऐन।**
**बचन किरातन्ह के सुनत जिमि पितु बालक बैन॥ १३६॥**

जे वेदांच्या वचनांना व मुनींच्या मनाला अगम्य आहेत, ते करुणाधाम श्रीराम भिल्लांचे बोलणे ऐकत होते, ज्याप्रमाणे पिता आपल्या बालकांचे वचन कौतुकाने ऐकतो. ॥ १३६ ॥

**रामहि केवल प्रेमु पिआरा। जानि लेउ जो जाननिहारा॥**
**राम सकल बनचर तब तोषे। कहि मृदु बचन प्रेम परिपोषे॥**

श्रीरामचंद्र फक्त प्रेमाचे भुकेले आहेत. ज्याला जाणायचे असेल त्याने जाणून घ्यावे. मग श्रीरामचंद्रांनी प्रेमपूर्ण मृदू वचन बोलून त्या वनात वावरणाऱ्या सर्व लोकांना संतुष्ट केले. ॥ १ ॥

**बिदा किए सिर नाइ सिधाए। प्रभु गुन कहत सुनत घर आए॥**
**एहि बिधि सिय समेत दोउ भाई। बसहिं बिपिन सुर मुनि सुखदाई॥**

नंतर त्यांना निरोप दिला. ते सर्व मस्तक नमवून निघाले आणि प्रभूंचे गुण सांगत-ऐकत घरी आले. अशा प्रकारे देव व मुनी यांना सुख देणारे दोघे बंधू सीतेसह वनात निवास करू लागले.॥ २॥

**जब तें आइ रहे रघुनायकु। तब तें भयउ बनु मंगलदायकु॥**
**फूलहिं फलहिं बिटप बिधि नाना। मंजु बलित बर बेलि बिताना॥**

श्रीरघुनाथ वनात येऊन राहिले, तेव्हापासून वन मंगलदायक झाले. अनेक प्रकारचे वृक्ष फुलत होते व फळत होते. त्यांना बिलगलेल्या वेलींचे मंडप तयार झाले होते.॥ ३॥

**सुरतरु सरिस सुभायँ सुहाए। मनहुँ बिबुध बन परिहरि आए॥**
**गुंज मंजुतर मधुकर श्रेनी। त्रिबिध बयारि बहइ सुख देनी॥**

ते कल्पवृक्षाप्रमाणे स्वाभाविकपणे सुंदर होते. जणू ते देवांचे नंदनवन सोडून तेथे आले होते. भ्रमरांच्या पंक्ती फारच सुरेख गुंजारव करीत होत्या आणि तेथे सुखदायक शीतल, मंद, सुगंधित हवा वाहात होती.॥ ४॥

दो०—**नीलकंठ कलकंठ सुक चातक चक्क चकोर।**
**भाँति भाँति बोलहिं बिहग श्रवन सुखद चित चोर॥ १३७॥**

मोर, कोकिळा, पोपट, चातक, चक्रवाक, चकोर इत्यादी पक्षी कानांनी सुख देणारे व मन आकर्षित करणारे तऱ्हेतऱ्हेचे बोल बोलत होते.॥ १३७॥

**करि केहरि कपि कोल कुरंगा। बिगतबैर बिचरहिं सब संगा॥**
**फिरत अहेर राम छबि देखी। होहिं मुदित मृगबृंद बिसेषी॥**

हत्ती, सिंह, वानर, डुक्कर आणि हरीण हे सर्व परस्पर वैरभाव सोडून बरोबरीने वावरत होते. वनात फिरत असताना श्रीरामांचे सौंदर्य पाहून पशूंचे ते कळप विशेष आनंदित होत होते.॥ १॥

**बिबुध बिपिन जहँ लगि जग माहीं। देखि रामबनु सकल सिहाहीं॥**
**सुरसरि सरसइ दिनकर कन्या। मेकलसुता गोदावरि धन्या॥**

जगात जितकी म्हणून देवांची वने आहेत, ती सर्व श्रीरामचंद्रांचे हे वन पाहून समाधान पावत. गंगा, सरस्वती, सूर्यकुमारी यमुना, नर्मदा, गोदावरी इत्यादी धन्य नद्या,॥ २॥

**सब सर सिंधु नदीं नद नाना। मंदाकिनि कर करहिं बखाना॥**
**उदय अस्त गिरि अरु कैलासू। मंदर मेरु सकल सुरबासू॥**

सर्व तलाव, समुद्र, नद्या आणि अनेक नद हे सर्व मंदाकिनीचे माहात्म्य सांगत होते. उदयाचल, अस्ताचल, कैलास, मंदराचल आणि सुमेरू इत्यादी सर्व जे देवांचे निवासस्थान असलेले पर्वत आहेत,॥ ३॥

**सैल हिमाचल आदिक जेते । चित्रकूट जसु गावहिं तेते ॥**
**बिंधि मुदित मन सुखु न समाई । श्रम बिनु बिपुल बड़ाई पाई ॥**

आणि हिमाचल इत्यादी जितके पर्वत आहेत, ते सर्व चित्रकूटाची कीर्ती गाऊ लागले. विंध्याचल मोठा आनंदित होता, त्याच्या मनात आनंद मावत नव्हता, कारण विनासायास त्याला फार मोठे माहात्म्य प्राप्त झाले होते. ॥ ४ ॥

दो०—**चित्रकूट के बिहग मृग बेलि बिटप तृन जाति।**
**पुन्य पुंज सब धन्य अस कहहिं देव दिन राति॥ १३८ ॥**

चित्रकूटातील पक्षी, पशू, वेल, वृक्ष, तृणांकुर इत्यादी सर्व जातीचे प्राणी व वनस्पती पुण्याच्या राशी होत व धन्य होत, असे देव रात्रंदिवस म्हणत होते. ॥ १३८ ॥

**नयनवंत रघुबरहि बिलोकी । पाइ जनम फल होहिं बिसोकी ॥**
**परसि चरन रज अचर सुखारी । भए परम पद के अधिकारी ॥**

डोळे असणारे जीव श्रीरामचंद्रांना पाहून जन्माचे साफल्य लाभल्यामुळे शोकरहित होत होते. पर्वत, वृक्ष, भूमी, नदी इत्यादी अचर हे भगवंतांच्या चरण-रजाच्या स्पर्शाने सुखी झाले. तसेच ते सर्वच मोक्षाचे अधिकारी बनले. ॥ १ ॥

**सो बनु सैलु सुभायँ सुहावन । मंगलमय अति पावन पावन ॥**
**महिमा कहिअ कवनि बिधि तासू । सुखसागर जहँ कीन्ह निवासू ॥**

ते वन आणि पर्वत हे स्वाभाविकपणे सुंदर, मंगलमय आणि अत्यंत पवित्र असणाऱ्यांनाही पवित्र बनविणारे होते. जेथे सुख-सागर असलेल्या श्रीरामांनी निवास केला आहे, त्या स्थानांचा महिमा कसा सांगता येईल ? ॥ २ ॥

**पय पयोधि तजि अवध बिहाई । जहँ सिय लखनु रामु रहे आई ॥**
**कहि न सकहिं सुषमा जसि कानन । जौं सत सहस होहिं सहसानन ॥**

क्षीरसागर व अयोध्या यांचा त्याग करून सीता, लक्ष्मण आणि रामचंद्र जेथे येऊन राहिले, त्या वनाची परम शोभा अशी आहे की, हजार मुखांचे लाखो शेष असले, तरी तेही सांगू शकणार नाहीत. ॥ ३ ॥

**सो मैं बरनि कहौं बिधि केहीं । डाबर कमठ कि मंदर लेहीं ॥**
**सेवहिं लखनु करम मन बानी । जाइ न सीलु सनेहु बखानी ॥**

मग मी कसा त्याचे वर्णन करू शकेन ? तलावामधील कासव हे मंदराचलाला उचलू शकेल काय ? लक्ष्मण हा मन, वचन आणि कर्माने श्रीरामांची सेवा करीत होता. त्याचा स्वभाव व स्नेह यांचे वर्णनच करता येत नाही. ॥ ४ ॥

दो०—**छिनु छिनु लखि सिय राम पद जानि आपु पर नेहु।**
**करत न सपनेहुँ लखनु चितु बंधु मातु पितु गेहु॥ १३९ ॥**

क्षणोक्षणी श्रीसीतारामांच्या चरणांच्या दर्शनामुळे आणि स्वत:वर त्यांचा स्नेह असलेला बघून लक्ष्मणाला स्वप्नातही भाऊ, माता-पिता व घराची आठवण येत नव्हती. ॥ १३९ ॥

**राम संग सिय रहति सुखारी । पुर परिजन गृह सुरति बिसारी ॥**
**छिनु छिनु पिय बिधु बदनु निहारी । प्रमुदित मनहुँ चकोर कुमारी ॥**

श्रीरामांबरोबर सीताही अयोध्यापुरी, आप्तजन आणि घर यांची आठवण विसरून सुखी होती. क्षणोक्षणी पती श्रीरामांचे चंद्रासारखे मुख पाहून चकोरी जशी चंद्रम्याला पाहून प्रसन्न असते तशी ती अतिशय प्रसन्न होत होती. ॥ १ ॥

**नाह नेहु नित बढ़त बिलोकी । हरषित रहति दिवस जिमि कोकी ॥**
**सिय मनु राम चरन अनुरागा । अवध सहस सम बनु प्रिय लागा ॥**

स्वामींचे आपल्यावरील नित्य वाढत जाणारे प्रेम पाहून सीता अशी हर्षित होती की, ज्याप्रमाणे दिवसा चकवी असते. सीतेचे मन श्रीरामांच्या चरणी अनुरक्त असल्यामुळे तिला वन हे हजारो अयोध्यांसमान प्रिय वाटत होते. ॥ २ ॥

**परनकुटी प्रिय प्रियतम संगा । प्रिय परिवारु कुरंग बिहंगा ॥**
**सासु ससुर सम मुनितिय मुनिबर । असनु अमिअ सम कंद मूल फर ॥**

तिला प्रियतम श्रीरामांच्या सोबतीमुळे पर्णकुटी आवडत होती. पशु-पक्षी, हे प्रिय कुटुंबियांप्रमाणे वाटत होते. मुनींच्या पत्नी या सासूसारख्या, श्रेष्ठ मुनी हे सासऱ्यासारखे वाटत होते आणि कंद-मुळे व फळे यांचा आहार तिला अमृतासारखा आवडत होता. ॥ ३ ॥

**नाथ साथ साँथरी सुहाई । मयन सयन सय सम सुखदाई ॥**
**लोकप होहिं बिलोकत जासू । तेहि कि मोहि सक बिषय बिलासू ॥**

तिला स्वामींसोबत सुंदर कुश-पानांची पथारी ही शेकडो कामदेवांच्या शय्येप्रमाणे सुखकारक वाटत होती. ज्यांच्या कृपाकटाक्षामुळे जीव हे लोकपाल बनतात, त्यांना भोग-विलास कधी मोहित करू शकतील काय? ॥ ४ ॥

दो०—**सुमिरत रामहि तजहिं जन तृन सम बिषय बिलासु।**
**रामप्रिया जग जननि सिय कछु न आचरजु तासु॥ १४० ॥**

ज्या श्रीरामचंद्रांचे फक्त स्मरण केल्यामुळे भक्तजन सर्व भोग-विलास कस्पटासमान फेकून देतात, त्या श्रीरामांची प्रिय पत्नी आणि जगाची माता सीता हिच्यासाठी हा भोग-विलासाचा त्याग ही काही आश्चर्यकारक गोष्ट नाही. ॥ १४० ॥

**सीय लखन जेहि बिधि सुखु लहहीं । सोइ रघुनाथ करहिं सोइ कहहीं ॥**
**कहहिं पुरातन कथा कहानी । सुनहिं लखनु सिय अति सुखु मानी ॥**

सीता व लक्ष्मण यांना सुख मिळावे, म्हणून श्रीरघुनाथ तशाच प्रकारच्या गोष्टी करीत होते. ते त्यांना प्राचीन कथा व गोष्टी सांगत आणि सीता व लक्ष्मण त्या आनंदाने ऐकत. ॥ १ ॥

**जब जब रामु अवध सुधि करहीं। तब तब बारि बिलोचन भरहीं॥**
**सुमिरि मातु पितु परिजन भाई। भरत सनेहु सीलु सेवकाई॥**

जेव्हा जेव्हा श्रीरामांना अयोध्येची आठवण येई, तेव्हा तेव्हा त्यांच्या डोळ्यांमध्ये अश्रू दाटत. माता-पिता, कुटुंबीय, बंधू व भरताचे प्रेम, शील आणि सेवाभाव आठवून,॥ २॥

**कृपासिंधु प्रभु होहिं दुखारी। धीरजु धरहिं कुसमउ बिचारी॥**
**लखि सिय लखनु बिकल होइ जाहीं। जिमि पुरुषहि अनुसर परिछाहीं॥**

कृपासागर प्रभू श्रीरामचंद्र दुःखी होत, परंतु सद्या वेळ वाईट आहे, असे समजून धीर धरत. श्रीरामांना दुःखी झालेले पाहून सीता व लक्ष्मण हे सुद्धा व्याकूळ होऊन जात. ज्याप्रमाणे मनुष्याचे प्रतिबिंब मनुष्यासारखेच वागते, त्याप्रमाणे.॥ ३॥

**प्रिया बंधु गति लखि रघुनंदनु। धीर कृपाल भगत उर चंदनु॥**
**लगे कहन कछु कथा पुनीता। सुनि सुखु लहहिं लखनु अरु सीता॥**

मग धीर, कृपाळू आणि भक्तांचे हृदय शांत करण्यासाठी चंदनरूप बनून रघुकुलाला आनंदित करणारे श्रीराम हे प्रिय पत्नी, बंधू लक्ष्मण यांची दशा पाहून काही पवित्र कथा सांगू लागत. त्या ऐकल्याने लक्ष्मण व सीता सुखी होत.॥ ४॥

दो०—**रामु लखन सीता सहित सोहत परन निकेत।**
**जिमि बासव बस अमरपुर सची जयंत समेत॥ १४१॥**

अमरावतीत इंद्र हे शची व पुत्र जयंतासह राहातात, त्याप्रमाणे लक्ष्मण व सीता यांच्यासह श्रीराम पर्णकुटीत शोभून दिसत होते.॥ १४१॥

**जोगवहिं प्रभु सिय लखनहि कैसें। पलक बिलोचन गोलक जैसें॥**
**सेवहिं लखनु सीय रघुबीरहि। जिमि अबिबेकी पुरुष सरीरहि॥**

ज्याप्रमाणे पापण्या डोळ्यांचे रक्षण करतात, त्याप्रमाणे प्रभू श्रीराम हे सीता व लक्ष्मण यांची काळजी घेत. तर लक्ष्मण हा सीता व रामचंद्र यांची अशी सेवा करी की, ज्याप्रमाणे अज्ञानी मनुष्य शरीराची सेवा करीत असतो.॥ १॥

**एहि बिधि प्रभु बन बसहिं सुखारी। खग मृग सुर तापस हितकारी॥**
**कहेउँ राम बन गवनु सुहावा। सुनहु सुमंत्र अवध जिमि आवा॥**

पक्षी, पशू, देवता व तपस्वी यांचे हितकारी असलेले प्रभू अशा प्रकारे सुखाने वनात निवास करीत होते. (तुलसीदास म्हणतात,) मी श्रीरामांचे झालेले सुंदर वनगमन सांगितले. आता सुमंत्र अयोध्येमध्ये आला, ती कथा ऐका.॥ २॥

**फिरेउ निषादु प्रभुहि पहुँचाई। सचिव सहित रथ देखेसि आई॥**
**मंत्री बिकल बिलोकि निषादू। कहि न जाइ जस भयउ बिषादू॥**

प्रभू श्रीरामांना पोहोचवून जेव्हा निषादराज गुह परतला, तेव्हा आल्यावर त्याला सुमंत्र रथ घेऊन उभा असल्याचे दिसले. मंत्री व्याकूळ झाल्याचे पाहून निषादाला इतके दु:ख झाले की, काही सांगता येत नाही. ॥ ३ ॥

**राम राम सिय लखन पुकारी । परेउ धरनितल ब्याकुल भारी ॥**
**देखि दखिन दिसि हय हिहिनाहीं । जनु बिनु पंख बिहग अकुलाहीं ॥**

निषाद एकटाच परत आल्याचे पाहून सुमंत्र 'हे रामा, हे रामा, हे सीते, हे लक्ष्मणा' असे पुकारत फार व्याकूळ होऊन जमिनीवर पडला. रथाचे घोडे दक्षिण दिशेकडे पाहात खिंकाळत होते. पंख नसलेले पक्षी व्याकूळ होतात, त्याप्रमाणे तेसुद्धा व्याकूळ होते. ॥ ४ ॥

दो०—**नहिं तृन चरहिं न पिअहिं जलु मोचहिं लोचन बारि।**
**ब्याकुल भए निषाद सब रघुबर बाजि निहारि ॥ १४२ ॥**

ते गवत खात नव्हते, पाणी पीत नव्हते. त्यांच्या डोळ्यांतून फक्त पाणी वाहात होते. श्रीरामांच्या घोड्यांची दशा पाहून सर्व निषाद व्याकूळ झाले. ॥ १४२ ॥

**धरि धीरजु तब कहइ निषादू । अब सुमंत्र परिहरहु बिषादू ॥**
**तुम्ह पंडित परमारथ ग्याता । धरहु धीर लखि बिमुख बिधाता ॥**

तेव्हा धीर धरून निषादराज म्हणू लागला, 'हे सुमंत्र, आता खेद सोडून द्या. तुम्ही विद्वान व परमार्थ जाणणारे आहात. दैव प्रतिकूल आहे, असे समजून स्वत:ला सावरा.' ॥ १ ॥

**बिबिधि कथा कहि कहि मृदु बानी । रथ बैठारेउ बरबस आनी ॥**
**सोक सिथिल रथु सकइ न हाँकी । रघुबर बिरह पीर उर बाँकी ॥**

गोड बोलून तऱ्हेतऱ्हेच्या कथा सांगून निषादाने सुमंत्राला बळेच रथात बसविले. परंतु शोकामुळे त्याच्यामध्ये रथ हाकण्याचे त्राणही उरले नव्हते. त्याच्या मनात श्रीरामांच्या विरहाची मोठी तीव्र वेदना होती. ॥ २ ॥

**चरफराहिं मग चलहिं न घोरे । बन मृग मनहुँ आनि रथ जोरे ॥**
**अढ़ुकि परहिं फिरि हेरहिं पीछें । राम बियोगि बिकल दुख तीछें ॥**

घोडे तडफडत होते आणि वाटेवर धड चालत नव्हते. असे वाटत होते की, जंगलातले पशू आणून रथाला जोडले असावेत. श्रीरामांच्या विरहामुळे घोडे कधी ठोकर खाऊन पडत होते. कधी वळून मागे पाहात होते. दु:खाने ते फार व्याकूळ झाले होते. ॥ ३ ॥

**जो कह रामु लखनु बैदेही । हिंकरि हिंकरि हित हेरहिं तेही ॥**
**बाजि बिरह गति कहि किमि जाती । बिनु मनि फनिक बिकल जेहि भाँती ॥**

जर कुणी राम, लक्ष्मण किंवा सीता यांचे नाव घेतले तर त्याच्याकडे घोडे खिंकाळून प्रेमाने पाहात होते. घोड्यांची दशा काय वर्णावी ? ते मण्याविना व्याकूळ झालेल्या सापाप्रमाणे झाले होते. ॥ ४ ॥

दो०—**भयउ निषादु बिषादबस देखत सचिव तुरंग।**
**बोलि सुसेवक चारि तब दिए सारथी संग॥ १४३॥**

मंत्री व घोड्यांची झालेली दशा पाहून निषादराजाला विषाद वाटला. तेव्हा त्याने चार उत्तम सेवक बोलावून सारथ्यासोबत दिले.॥ १४३॥

**गुह सारथिहि फिरेउ पहुँचाई। बिरहु बिषादु बरनि नहिं जाई॥**
**चले अवध लेइ रथहि निषादा। होहिं छनहिं छन मगन बिषादा॥**

निषादराज गुह सारथी सुमंत्र याला निरोप देऊन परतला. त्याचा विरह व दुःख यांचे वर्णन करणे अशक्य. ते चौघे निषाद-रथ घेऊन अयोध्येकडे निघाले. सुमंत्र व घोडे यांना पाहून तेसुद्धा क्षणोक्षणी विषादामध्ये बुडून जात होते.॥ १॥

**सोच सुमंत्र बिकल दुख दीना। धिग जीवन रघुबीर बिहीना॥**
**रहिहि न अंतहुँ अधम सरीरू। जसु न लहेउ बिछुरत रघुबीरू॥**

व्याकूळ व दुःखाने दीन झालेला सुमंत्र विचार करीत होता की, श्रीरघुवीरांच्या विना जिण्याचा धिक्कार असो. शेवटी हे अधम शरीर राहाणार तर नाही. आत्ताच श्रीरामांचा वियोग होताच या देहाने नष्ट होऊन कीर्ती संपादन का केली नाही?॥ २॥

**भए अजस अघ भाजन प्राना। कवन हेतु नहिं करत पयाना॥**
**अहह मंद मनु अवसर चूका। अजहुँ न हृदय होत दुइ टूका॥**

हे प्राण अपकीर्ती आणि पापाचे भांडे आहेत. आता हे निघून का जात नाहीत? अरेरे, नीच मनाने चांगली संधी घालविली. अजूनही हृदय दोन तुकडे होऊन फुटून जात नाही.॥ ३॥

**मीजि हाथ सिरु धुनि पछिताई। मनहुँ कृपन धन रासि गवाँई॥**
**बिरिद बाँधि बर बीरु कहाई। चलेउ समर जनु सुभट पराई॥**

सुमंत्र हात चोळत व डोके बडवून घेत पश्चात्ताप करीत होता. जणू एखादा कंजूष माणूस धनाचा खजिना गमावून बसला होता. जणू एखादा वीराचा वेष घातलेला मोठा योद्धा आणि उत्तम शूर म्हणून मानला जात असलेला मनुष्य युद्धातून पळून निघाला होता.॥ ४॥

दो०—**बिप्र बिबेकी बेदबिद संमत साधु सुजाति।**
**जिमि धोखें मदपान कर सचिव सोच तेहि भाँति॥ १४४॥**

ज्याप्रमाणे कुणा विवेकशील, वेदसंपन्न, साधु-संमत वागणाऱ्या कुलीन ब्राह्मणाने चुकून मद्य प्यावे आणि मग पश्चात्ताप करावा, त्याप्रमाणे मंत्री पश्चात्ताप करीत होता.॥ १४४॥

**जिमि कुलीन तिय साधु सयानी । पतिदेवता करम मन बानी ॥**
**रहै करम बस परिहरि नाहू । सचिव हृदयँ तिमि दारुन दाहू ॥**

ज्याप्रमाणे एखादी कुलीन, सज्जन स्वभावाची, समजूतदार आणि मन, वचन व कर्माने पतीला देव समजणारी पतिव्रता असणाऱ्या स्त्रीला दुर्दैवाने पतीला सोडून राहावे लागावे, त्यावेळी तिच्या मनात ज्याप्रमाणे भयानक यातना होतात, त्याप्रमाणे मंत्र्याच्या मनाची अवस्था झाली होती. ॥ १ ॥

**लोचन सजल डीठि भइ थोरी । सुनइ न श्रवन बिकल मति भोरी ॥**
**सूखहिं अधर लागि मुहँ लाटी । जिउ न जाइ उर अवधि कपाटी ॥**

डोळ्यांत पाणी भरले होते, दृष्टी मंद झाली होती, कानांना काही ऐकू येत नव्हते, व्याकूळ झालेली बुद्धी भरकटत होती. ओठ सुकले होते, तोंड चिकटले होते. परंतु ही मृत्यूची लक्षणे असूनही प्राण जात नव्हते, कारण अंत:करणाला चौदा वर्षांचा अवधी संपल्यावर भगवंत पुन्हा भेटतील, या आशेचे दार लागले होते. ॥ २ ॥

**बिबरन भयउ न जाइ निहारी । मारेसि मनहुँ पिता महतारी ॥**
**हानि गलानि बिपुल मन ब्यापी । जमपुर पंथ सोच जिमि पापी ॥**

सुमंत्राचा चेहरा पडला होता, तो पाहावत नव्हता. असे वाटत होते की, त्याच्या हातून जणू आई-वडिलांची हत्या घडली असावी. त्याच्या मनात रामवियोगरूपी हानी झाल्याची मोठी वेदना होती. ज्याप्रमाणे एखादा पापी मनुष्य नरकात जाताना मार्गामध्ये काळजी करीत असतो, त्याप्रमाणे त्याची स्थिती झाली होती. ॥ ३ ॥

**बचनु न आव हृदयँ पछिताई । अवध काह मैं देखब जाई ॥**
**राम रहित रथ देखिहि जोई । सकुचिहि मोहि बिलोकत सोई ॥**

तोंडातून शब्द फुटत नव्हता. मनात काळजी होती की, अयोध्येस गेल्यावर काय दिसेल? श्रीराम नसलेला रथ जो कोणी पाहील, तो माझे तोंडही पाहाणार नाही. ॥ ४ ॥

दो०—**धाइ पूँछिहहिं मोहि जब बिकल नगर नर नारि ।**
**उतरु देब मैं सबहि तब हृदयँ बज्रु बैठारि ॥ १४५ ॥**

नगरातील सर्व व्याकूळ स्त्री-पुरुष धावत येऊन मला विचारतील, तेव्हा छातीवर दगड ठेवून सर्वांना उत्तर द्यावे लागेल. ॥ १४५ ॥

**पुछिहहिं दीन दुखित सब माता । कहब काह मैं तिन्हहि बिधाता ॥**
**पूछिहि जबहिं लखन महतारी । कहिहउँ कवन सँदेस सुखारी ॥**

जेव्हा दीन-दु:खी सर्व माता विचारू लागतील, तेव्हा हे विधात्या, मी त्यांना काय उत्तर देऊ? जेव्हा लक्ष्मणाची माता मला विचारील, तेव्हा मी तिला कोणता सुखदायक निरोप देऊ? ॥ १ ॥

**राम जननि जब आइहि धाई। सुमिरि बच्छु जिमि धेनु लवाई॥**
**पूँछत उतरु देब मैं तेही। गे बनु राम लखनु बैदेही॥**

श्रीरामांची माता नुकतीच व्यालेली गाय वासराची आठवण येताच धावत येते त्याप्रमाणे धावत येईल. तिने येऊन विचारल्यावर मला हेच उत्तर द्यावे लागणार की, श्रीराम, लक्ष्मण व सीता वनात निघून गेले.॥ २॥

**जोइ पूँछिहि तेहि ऊतरु देबा। जाइ अवध अब यहु सुखु लेबा॥**
**पूँछिहि जबहिं राउ दुख दीना। जिवनु जासु रघुनाथ अधीना॥**

जो कोणी विचारील, त्याला हेच उत्तर द्यावे लागणार. अरेरे, अयोध्येस गेल्यावर आता हेच सुख मिळण्याचे माझ्या नशिबी आहे. ज्यांचे जीवन श्रीरघुनाथांच्या दर्शनावर अवलंबून आहे, ते दुःखामुळे दीन झालेले महाराज मला विचारतील,॥ ३॥

**देहउँ उतरु कौनु मुहु लाई। आयउँ कुसल कुअँर पहुँचाई॥**
**सुनत लखन सिय राम सँदेसू। तृन जिमि तनु परिहरिहि नरेसू॥**

तेव्हा कोणत्या तोंडाने मी उत्तर देऊ की, मी राजकुमारांना सुखरूप पोहोचवून आलो. लक्ष्मण, सीता व श्रीरामांची वार्ता ऐकताच महाराज कस्पटाप्रमाणे आपले शरीर टाकून देतील.॥ ४॥

दो०—**हृदय न बिदरेउ पंक जिमि बिछुरत प्रीतमु नीरु।**
**जानत हौं मोहि दीन्ह बिधि यहु जातना सरीरु॥ १४६॥**

प्रियतम श्रीरामरूपी जलापासून दूर होताच माझे हृदय चिखला-प्रमाणे विदीर्ण झाले नाही, म्हणून वाटते की, विधात्याने मला हे 'यातना शरीर' च नरक-यातना भोगण्यासाठी दिले आहे.'॥ १४६॥

**एहि बिधि करत पंथ पछितावा। तमसा तीर तुरत रथु आवा॥**
**बिदा किए करि बिनय निषादा। फिरे पायँ परि बिकल बिषादा॥**

सुमंत्र अशा प्रकारे वाटेमध्ये पश्चात्ताप करीत होता, इतक्यात रथ तमसा नदीच्या तीरावर येऊन पोहोचला. मंत्र्याने विनंती करून सोबत आलेल्या चारी निषादांना परत पाठविले. तेही दुःखाने व्याकूळ होत सुमंत्राच्या पाया पडले.॥ १॥

**पैठत नगर सचिव सकुचाई। जनु मारेसि गुर बाँभन गाई॥**
**बैठि बिटप तर दिवसु गवाँवा। साँझ समय तब अवसरु पावा॥**

जणू काही गुरू, ब्राह्मण किंवा गाय यांची हत्या करून आल्याप्रमाणे नगरात प्रवेश करताना मंत्र्याला संकोच वाटत होता. त्याने दिवसभर एका झाडाखाली बसून घालविला. जेव्हा संध्याकाळ झाली तेव्हा संधी मिळाली.॥ २॥

**अवध प्रबेसु कीन्ह अँधिआरें। पैठ भवन रथु राखि दुआरें॥**
**जिन्ह जिन्ह समाचार सुनि पाए। भूप द्वार रथु देखन आए॥**

अंधार झाल्यावर त्याने अयोध्येमध्ये प्रवेश केला आणि दरवाज्यासमोर रथ उभा करून तो हळूच महालात गेला. ज्या लोकांना याची वार्ता लागली, ते सर्वजण रथ पाहाण्यास राजद्वारी आले.॥ ३॥

**रथु पहिचानि बिकल लखि घोरे। गरहिं गात जिमि आतप ओरे॥**
**नगर नारि नर ब्याकुल कैसें। निघटत नीर मीनगन जैसें॥**

रथ ओळखून आणि घोडे व्याकूळ झाल्याचे पाहून ज्याप्रमाणे उन्हामध्ये गारा वितळू लागतात, त्याप्रमाणे पाहणाऱ्यांचे देह गळून जात होते. जळ आटल्यावर मासे व्याकूळ होतात, तसे नगरातील स्त्री-पुरुष व्याकूळ झाले होते.॥ ४॥

दो०—**सचिव आगमनु सुनत सबु बिकल भयउ रनिवासु।**
**भवनु भयंकरु लाग तेहि मानहुँ प्रेत निवासु॥ १४७॥**

मंत्री एकटाच परत आल्याचे ऐकताच संपूर्ण अंत:पुर व्याकूळ झाले. त्यांना राजमहाल स्मशानाप्रमाणे भयंकर वाटू लागला.॥ १४७॥

**अति आरति सब पूँछहिं रानी। उतरु न आव बिकल भइ बानी॥**
**सुनइ न श्रवन नयन नहिं सूझा। कहहु कहाँ नृपु तेहि तेहि बूझा॥**

अत्यंत आर्त होऊन सर्व राण्या विचारू लागल्या, परंतु सुमंत्राला काही उत्तर देता येईना. त्याची वाणी अडखळली. त्याला कानांनी काही ऐकू येत नव्हते, की डोळ्यांनी दिसत नव्हते. जो कोणी समोर येई त्याला तो विचारी की, 'महाराज कुठे आहेत ते सांगा.'॥ १॥

**दासिन्ह दीख सचिव बिकलाई। कौसल्या गृहँ गईं लवाई॥**
**जाइ सुमंत्र दीख कस राजा। अमिअ रहित जनु चंदु बिराजा॥**

तो व्याकूळ झाल्याचे पाहून दासी त्याला कौसल्येच्या महालात घेऊन गेल्या. तेथे महाराज असे बसले होते की, जणू अमृताविना चंद्र तेजोहीन होऊन बसलेला असावा.॥ २॥

**आसन सयन बिभूषन हीना। परेउ भूमितल निपट मलीना॥**
**लेइ उसासु सोच एहि भाँती। सुरपुर तें जनु खँसेउ जजाती॥**

राजे आसन, शय्या व आभूषणे सोडून, खूप उदास होऊन जमिनीवर पडले होते. ते उसासे टाकत विचार करीत होते की, जणू ययाती स्वर्गातून पतन झाल्यामुळे काळजी करीत बसला असावा.॥ ३॥

**लेत सोच भरि छिनु छिनु छाती। जनु जरि पंख परेउ संपाती॥**
**राम राम कह राम सनेही। पुनि कह राम लखन बैदेही॥**

राजे क्षणोक्षणी मनातून काळजी करीत होते. गृध्रराज जटायूचा भाऊ संपाती पंख जळून गेल्यावर जसा पडला होता, तशी राजाची विकल दशा झाली होती. राजे वारंवार 'राम, राम', 'हे प्रिय राम' म्हणत होते. नंतर 'हे राम, हे लक्ष्मण व हे जानकी' असे म्हणू लागत.॥ ४॥

**दो०—देखि सचिवँ जय जीव कहि कीन्हेउ दंड प्रनामु।**
**सुनत उठेउ ब्याकुल नृपति कहु सुमंत्र कहँ रामु॥ १४८॥**

मंत्र्याने 'जय जीव' असे म्हणून दंडवत प्रणाम केला. ऐकताच राजाने व्याकूळ होऊन विचारले, 'सुमंत्रा, राम कुठे आहे, ते सांग.'॥ १४८॥

**भूप सुमंत्रु लीन्ह उर लाई। बूड़त कछु अधार जनु पाई॥**
**सहित सनेह निकट बैठारी। पूँछत राउ नयन भरि बारी॥**

राजांनी सुमंत्राला हृदयाशी कवटाळले. जणू बुडत्याला काडीचा आधार मिळावा. मंत्र्याला प्रेमाने जवळ बसवून व डोळ्यांत अश्रू आणून राजे विचारू लागले.॥ १॥

**राम कुसल कहु सखा सनेही। कहँ रघुनाथु लखनु बैदेही॥**
**आने फेरि कि बनहि सिधाए। सुनत सचिव लोचन जल छाए॥**

'हे माझ्या प्रेमळ मित्रा, श्रीरामाची खुशाली सांग. राम, लक्ष्मण व सीता कुठे आहेत, ते सांग. त्यांना परत आणलेस की ते वनात निघून गेले?' हे ऐकताच मंत्र्याचे नेत्र पाण्याने डबडबले.॥ २॥

**सोक बिकल पुनि पूँछ नरेसू। कहु सिय राम लखन संदेसू॥**
**राम रूप गुन सील सुभाऊ। सुमिरि सुमिरि उर सोचत राऊ॥**

शोकामुळे व्याकूळ होऊन राजे पुन्हा विचारू लागले, 'सीता, राम व लक्ष्मण यांची वार्ता तर सांग.' श्रीरामांचे रूप, गुण, शील आणि स्वभाव यांची आठवण कर करून राजे मनात शोक करू लागले.॥ ३॥

**राउ सुनाइ दीन्ह बनवासू। सुनि मन भयउ न हरषु हराँसू॥**
**सो सुत बिछुरत गए न प्राना। को पापी बड़ मोहि समाना॥**

ते म्हणाले, 'मी श्रीरामाला राजा करण्याचे सांगून वनवास दिला. ते ऐकून रामाच्या मनात हर्ष वा विषाद आला नाही. असा पुत्र सोडून गेल्यावरही माझे प्राण गेले नाहीत; मग माझ्यासारखा मोठा पापी कोण असेल?॥ ४॥

**दो०—सखा रामु सिय लखनु जहँ तहाँ मोहि पहुँचाउ।**
**नाहिं त चाहत चलन अब प्रान कहउँ सतिभाउ॥ १४९॥**

हे सख्या, श्रीराम, जानकी आणि लक्ष्मण जेथे आहेत, तेथे मलाही घेऊन चल. नाहीतर मी खरे सांगतो की, माझे प्राण आता जाऊ इच्छितात.'॥ १४९॥

**पुनि पुनि पूँछत मंत्रिहि राऊ। प्रियतम सुअन सँदेस सुनाऊ॥**
**करहि सखा सोइ बेगि उपाऊ। रामु लखनु सिय नयन देखाऊ॥**

राजे वारंवार मंत्र्याला विचारत होते, 'मला प्रियतम पुत्रांची वार्ता सांग. हे मित्रा, श्रीराम, लक्ष्मण आणि सीता हे मला माझ्या डोळ्यांनी पाहता येतील, असा उपाय ताबडतोब कर.'॥ १॥

**सचिव धीर धरि कह मृदु बानी। महाराज तुम्ह पंडित ग्यानी॥**
**बीर सुधीर धुरंधर देवा। साधु समाजु सदा तुम्ह सेवा॥**

मन घट्ट करून मंत्री कोमल वाणीने म्हणाला, 'महाराज, तुम्ही पंडित व ज्ञानी आहात. हे देवा, तुम्ही शूरवीर व उत्तम धैर्यवान पुरुषांमध्ये श्रेष्ठ आहात. तुम्ही नेहमी सत्संगाचा लाभ घेतला आहे.॥ २॥

**जनम मरन सब दुख सुख भोगा। हानि लाभु प्रिय मिलन बियोगा॥**
**काल करम बस होहिं गोसाईं। बरबस राति दिवस की नाईं॥**

जन्म-मरण, सुख-दुःखाचे भोग, हानि-लाभ, प्रियजनांचा संयोग-वियोग, हे सर्व काही, हे स्वामी! काल व कर्म यांच्या अधीन असल्यामुळे रात्र व दिवस यांच्याप्रमाणे अनिवार्यपणे येत असते.॥ ३॥

**सुख हरषहिं जड़ दुख बिलखाहीं। दोउ सम धीर धरहिं मन माहीं॥**
**धीरज धरहु बिबेकु बिचारी। छाड़िअ सोच सकल हितकारी॥**

मूर्ख लोक सुखात हर्षित होतात व दुःखात रडतात. परंतु धीर पुरुष आपल्या मनामध्ये दोन्ही गोष्टी समान असल्याचे मानतात. हे सर्वांचे रक्षक असलेले महाराज! तुम्ही विवेकपूर्ण विचार करून धैर्य धरा आणि शोक सोडून द्या.॥ ४॥

दो०—**प्रथम बासु तमसा भयउ दूसर सुरसरि तीर।**
**न्हाइ रहे जलपानु करि सिय समेत दोउ बीर॥ १५०॥**

श्रीरामांचा पहिला मुक्काम तमसा नदीच्या तटावर झाला. दुसरा गंगातटावर. सीतेसह दोन्ही बंधू त्यादिवशी स्नान करून फक्त पाणी पिऊन राहिले.॥ १५०॥

**केवट कीन्हि बहुत सेवकाई। सो जामिनि सिंगरौर गवाँई॥**
**होत प्रात बट छीरु मगावा। जटा मुकुट निज सीस बनावा॥**

निषादराजाने पुष्कळ सेवा केली. ती रात्र शृंगवेरपुरामध्ये घालविली. दुसऱ्या दिवशी सकाळ होताच वडाचा चीक मागविला व श्रीराम आणि लक्ष्मणाने आपल्या शिरावर जटाजूट तयार केले.॥ १॥

**राम सखाँ तब नाव मगाई। प्रिया चढ़ाइ चढ़े रघुराई॥**
**लखन बान धनु धरे बनाई। आपु चढ़े प्रभु आयसु पाई॥**

नंतर श्रीरामचंद्रांचे मित्र निषादराज याने नाव मागवली. प्रथम प्रिय सीतेला नावेत चढवून नंतर श्रीरघुनाथ चढले. लक्ष्मणाने धनुष्य-बाण सज्ज केले व प्रभू श्रीरामांची आज्ञा मिळताच तो नावेत चढला. ॥ २ ॥

**बिकल बिलोकि मोहि रघुबीरा । बोले मधुर बचन धरि धीरा॥**
**तात प्रनामु तात सन कहेहू । बार बार पद पंकज गहेहू॥**

मी व्याकूळ झालो, हे पाहून श्रीरामांनी मोठ्या धीराने मधुर शब्दांत म्हटले, 'हे तात, बाबांना माझा प्रणाम सांगावा आणि माझ्यातर्फे वारंवार त्यांचे चरण-कमल धरावे. ॥ ३ ॥

**करबि पायँ परि बिनय बहोरी । तात करिअ जनि चिंता मोरी॥**
**बन मग मंगल कुसल हमारें । कृपा अनुग्रह पुन्य तुम्हारें॥**

पुन्हा त्यांचे पाय धरून विनंती करावी की, ''बाबा! तुम्ही माझी काळजी करू नका. तुमच्या कृपेने आणि पुण्याईने वनात व वाटेत आमचे कल्याणच होईल. ॥ ४ ॥

**छं०—तुम्हरें अनुग्रह तात कानन जात सब सुखु पाइहौं।**
**प्रतिपालि आयसु कुसल देखन पाय पुनि फिरि आइहौं॥**
**जननीं सकल परितोषि परि परि पायँ करि बिनती घनी।**
**तुलसी करेहु सोइ जतनु जेहिं कुसली रहहिं कोसलधनी॥**

तात! तुमच्या अनुग्रहामुळे मला वनात असताना सर्व प्रकारचे सुख मिळेल. तुमच्या आज्ञेचे व्यवस्थित पालन करून तुमच्या चरणांचे दर्शन घेण्यासाठी सुखरूपपणे आम्ही परत येऊ. सर्व मातांचे पाय धरून त्यांचे समाधान करावे आणि त्यांना विनंती करावी की (तुलसीदास म्हणतात,) कोसलपती खुशाल राहतील, असा प्रयत्न तुम्ही करीत राहावे.

**सो०—गुर सन कहब सँदेसु बार बार पद पदुम गहि।**
**करब सोइ उपदेसु जेहिं न सोच मोहि अवधपति॥ १५१॥**

वारंवार चरण-कमल धरून वसिष्ठ गुरूंना निरोप सांगावा की, अयोध्यापतींनी आमची काळजी करू नये, असाच त्यांनी त्यांना उपदेश करावा. ॥ १५१ ॥

**पुरजन परिजन सकल निहोरी । तात सुनाएहु बिनती मोरी॥**
**सोइ सब भाँति मोर हितकारी । जातें रह नरनाहु सुखारी॥**

हे तात, सर्व पुरवासीयांना व कुटुंबीयांना विनंती करावी की, ज्याच्या प्रयत्नाने महाराज सुखी होतील, तोच मनुष्य सर्व प्रकारे माझा हितकारी असेल. ॥ १ ॥

**कहब सँदेसु भरत के आएँ । नीति न तजिअ राजपदु पाएँ॥**
**पालेहु प्रजहि करम मन बानी । सेएहु मातु सकल सम जानी॥**

भरत आल्यावर त्याला माझा निरोप सांगावा की, राजाचे पद मिळाल्यावर नीती सोडू नकोस. कर्म, वचन आणि मन यांनी प्रजेचे पालन कर आणि सर्व मातांना समान मानून त्यांची सेवा कर. ॥ २ ॥

**ओर निबाहेहु भायप भाई। करि पितु मातु सुजन सेवकाई॥**
**तात भाँति तेहि राखब राऊ। सोच मोर जेहिं करै न काऊ॥**

आणि हे बंधू, पिता, माता व स्वजनांची सेवा करून त्यांच्यावर शेवटपर्यंत प्रेम करावे. तसेच राजांनी कधी माझी काळजी करू नये अशा प्रकारे त्यांना सांभाळावे. ॥ ३ ॥

**लखन कहे कछु बचन कठोरा। बरजि राम पुनि मोहि निहोरा॥**
**बार बार निज सपथ देवाई। कहबि न तात लखन लरिकाई॥**

लक्ष्मण काहीसे कठोर बोलला, परंतु श्रीरामांनी त्याला आवरून मला विनंती केली आणि वारंवार स्वत:ची शपथ घालून सांगितले की, 'हे तात, लक्ष्मणाचा बालिशपणा तेथे सांगू नका.' ॥ ४ ॥

दो०—**कहि प्रनामु कछु कहन लिय सिय भइ सिथिल सनेह।**
**थकित बचन लोचन सजल पुलक पल्लवित देह॥ १५२॥**

सीता प्रणाम करून काही सांगू लागली. परंतु प्रेमाधिक्यामुळे ती अवघडून गेली. तिची वाणी रुद्ध झाली, डोळ्यांमध्ये पाणी आले आणि शरीर रोमांचित झाले. ॥ १५२ ॥

**तेहि अवसर रघुबर रुख पाई। केवट पारहि नाव चलाई॥**
**रघुकुलतिलक चले एहि भाँती। देखउँ ठाढ़ कुलिस धरि छाती॥**

त्याचवेळी श्रीरामांचा संकेत मिळताच नावाड्याने पलीकडे जाण्यासाठी नाव सोडली. अशा प्रकारे रघुवंशतिलक श्रीराम निघाले आणि मी छातीवर दगड ठेवून उभ्या उभ्या पाहात राहिलो. ॥ १ ॥

**मैं आपन किमि कहौं कलेसू। जिअत फिरेउँ लेइ राम सँदेसू॥**
**अस कहि सचिव बचन रहि गयऊ। हानि गलानि सोच बस भयऊ॥**

मी श्रीरामांचा हा निरोप घेऊन जिवंतपणे परत आलो. माझे दु:ख मी कसे सांगू?' असे म्हणत तो झालेल्या हानीच्या क्लेशामुळे व काळजीमुळे तसाच गप्प राहिला. ॥ २ ॥

**सूत बचन सुनतहिं नरनाहू। परेउ धरनि उर दारुन दाहू॥**
**तलफत बिषम मोह मन मापा। माजा मनहुँ मीन कहुँ ब्यापा॥**

सुमंत्राचे बोलणे ऐकताच राजे जमिनीवर कोसळले. त्यांच्या हृदयात आग भडकली. ते तडफडू लागले, त्यांचे मन भीषण मोहामुळे व्याकूळ झाले. जणू माशाला पहिल्या पावसाचे पाणी बाधले होते. ॥ ३ ॥

**करि बिलाप सब रोवहिं रानी । महा बिपति किमि जाइ बखानी ॥**
**सुनि बिलाप दुखहू दुखु लागा । धीरजहू कर धीरजु भागा ॥**

सर्व राण्या आक्रोश करीत रडू लागल्या. त्या महान संकटाचे वर्णन कसे करता येईल? त्या वेळचा विलाप ऐकून दु:खालाही दु:ख झाले आणि धैर्याचे धैर्यही गळून गेले. ॥ ४ ॥

दो०—**भयउ कोलाहलु अवध अति सुनि नृप राउर सोरु ।**
**बिपुल बिहग बन परेउ निसि मानहु कुलिस कठोरु ॥ १५३ ॥**

राजाच्या अंत:पुरातील रडण्याचा आवाज ऐकून अयोध्येमध्ये मोठा कोलाहल माजला. जणू पक्ष्यांच्या विशाल वनात रात्रीच्या वेळी कठोर वीज कोसळली होती. ॥ १५३ ॥

**प्रान कंठगत भयउ भुआलू । मनि बिहीन जनु ब्याकुल ब्यालू ॥**
**इंद्रीं सकल बिकल भइँ भारी । जनु सर सरसिज बनु बिनु बारी ॥**

राजाचे प्राण कंठाशी आले. जणू मण्याविना साप मरणासन्न झाला होता. सर्व इंद्रिये फार व्याकूळ झाली, पाण्याविना तलावातील कमळे कोमेजून जावीत तशी. ॥ १ ॥

**कौसल्याँ नृपु दीख मलाना । रबिकुल रबि अँथयउ जियँ जाना ॥**
**उर धरि धीर राम महतारी । बोली बचन समय अनुसारी ॥**

राजाला फार दु:खी झाल्याचे पाहून कौसल्येने जाणले की, 'आता सूर्यकुलातील सूर्य अस्ताला चालला आहे.' तेव्हा श्रीरामांची माता कौसल्या ही मन घट्ट करून प्रसंगानुरूप म्हणाली, ॥ २ ॥

**नाथ समुझि मन करिअ बिचारू । राम बियोग पयोधि अपारू ॥**
**करनधार तुम्ह अवध जहाजू । चढ़ेउ सकल प्रिय पथिक समाजू ॥**

'हे नाथ, तुम्ही मनात विचार करा की, श्रीरामांचा वियोग हा अपार समुद्र आहे. अयोध्या ही जहाज आहे आणि तुम्ही त्याचे कर्णधार आहात. सर्व प्रजा, कुटुंबीय व प्रियजन हे जहाजातील प्रवासी आहेत. ॥ ३ ॥

**धीरजु धरिअ त पाइअ पारू । नाहिं त बूड़िहि सबु परिवारू ॥**
**जौं जियँ धरिअ बिनय पिय मोरी । रामु लखनु सिय मिलहिं बहोरी ॥**

तुम्ही धीर धराल, तर सर्वजण तरून जातील. नाहीतर सर्व परिवार बुडून जाईल. हे प्रिय स्वामी, माझी विनंती मान्य कराल, तर श्रीराम, लक्ष्मण, सीता हे परत येऊन भेटतील.' ॥ ४ ॥

दो०—**प्रिया बचन मृदु सुनत नृपु चितयउ आँखि उघारि ।**
**तलफत मीन मलीन जनु सींचत सीतल बारि ॥ १५४ ॥**

प्रिय पत्नी कौसल्येचे हे मृदू बोलणे ऐकून राजांनी डोळे उघडून पाहिले. जणू तडफडणाऱ्या बिचाऱ्या मासोळीवर कुणी तरी शीतल जल शिंपडले. ॥ १५४ ॥

**धरि धीरजु उठि बैठ भुआलू। कहु सुमंत्र कहँ राम कृपालू॥**
**कहाँ लखनु कहँ रामु सनेही। कहँ प्रिय पुत्रबधू बैदेही॥**

धीर धरून राजे उठून बसले आणि म्हणाले, 'सुमंत्रा, कृपाळू श्रीराम कुठे आहे, ते सांग. लक्ष्मण कोठे आहे? स्नेही राम कोठे आहे आणि माझी लाडकी सून जानकी कोठे आहे?' ॥ १ ॥

**बिलपत राउ बिकल बहु भाँती। भइ जुग सरिस सिराति न राती॥**
**तापस अंध साप सुधि आई। कौसल्यहि सब कथा सुनाई॥**

महाराज व्याकूळ होऊन अनेक प्रकारे विलाप करीत होते. ती रात्र युगाप्रमाणे मोठी वाटत होती. सरता सरत नव्हती. राजांना श्रवणकुमाराचा पिता आंधळा तपस्वी याच्या शापाची आठवण आली. त्यांनी ती सर्व कथा कौसल्येला सांगितली. ॥ २ ॥

**भयउ बिकल बरनत इतिहासा। राम रहित धिग जीवन आसा॥**
**सो तनु राखि करब मैं काहा। जेहिं न प्रेम पनु मोर निबाहा॥**

त्या घटनेचे वर्णन करता करता राजे व्याकूळ झाले आणि म्हणू लागले की, 'श्रीरामाविना जगण्याच्या आशेचा धिक्कार असो. ज्याने आपल्या प्रेमाचा पण निभावून नेला नाही, ते शरीर ठेवून मी काय करू? ॥ ३ ॥

**हा रघुनंदन प्रान पिरीते। तुम्ह बिनु जिअत बहुत दिन बीते॥**
**हा जानकी लखन हा रघुबर। हा पितु हित चित चातक जलधर॥**

हे रघुकुलाला आनंद देणाऱ्या माझ्या प्राणप्रिय रामा, तुझ्याविना जगून बरेच दिवस झाले. हे जानकी, लक्ष्मणा, हे रघुवीरा, हे पित्याच्या चित्तरूपी चातकाचे समाधान करणाऱ्या मेघांनो,' ॥ ४ ॥

दो०—**राम राम कहि राम कहि राम राम कहि राम।**
**तनु परिहरि रघुबर बिरहँ राउ गयउ सुरधाम॥ १५५॥**

राम-राम म्हणत, पुन्हा राम म्हणत, पुन्हा राम-राम म्हणत आणि पुन्हा राम म्हणत श्रीरामांच्या विरहामुळे शरीराचा त्याग करून महाराज देवलोकी निघून गेले. ॥ १५५ ॥

**जिअन मरन फलु दसरथ पावा। अंड अनेक अमल जसु छावा॥**
**जिअत राम बिधु बदनु निहारा। राम बिरह करि मरनु सँवारा॥**

जगण्याचे व मरण्याचे फल दशरथांना मिळाले. त्यांची निर्मल कीर्ती अनेक ब्रह्मांडांमध्ये

पसरली. जिवात जीव असताना त्यांनी श्रीरामांचे चंद्रासमान मुख पाहिले आणि श्रीरामांच्या विरहाच्या निमित्ताने आपले मरण सार्थ केले. ॥ १ ॥

**सोक बिकल सब रोवहिं रानी। रूपु सीलु बलु तेजु बखानी॥**
**करहिं बिलाप अनेक प्रकारा। परहिं भूमितल बारहिं बारा॥**

सर्व राण्या शोकामुळे व्याकूळ होऊन रडू लागल्या. राजाचे रूप, शील, बल आणि तेज यांचे वर्णन करीत करीत त्या अनेक प्रकारे विलाप करीत होत्या व जमिनीवर वारंवार लोळण घेत होत्या. ॥ २ ॥

**बिलपहिं बिकल दास अरु दासी। घर घर रुदनु करहिं पुरबासी॥**
**अँथयउ आजु भानुकुल भानू। धरम अवधि गुन रूप निधानू॥**

दास-दासी व्याकूळ होऊन विलाप करीत होत्या. आणि नगरातील लोक घरोघरी रडत होते. ते म्हणत होते की, 'आज धर्माची परिसीमा, गुण व रूपाचे भांडार असलेला सूर्यकुलाचा सूर्य मावळला.' ॥ ३ ॥

**गारीं सकल कैकइहि देहीं। नयन बिहीन कीन्ह जग जेहीं॥**
**एहि बिधि बिलपत रैनि बिहानी। आए सकल महामुनि ग्यानी॥**

सर्वजण कैकेयीला शिव्या देत होते. 'तिने संपूर्ण जगाला डोळ्यांविना आंधळे करून टाकले.' अशा प्रकारे विलाप करीत रात्र निघून गेली. प्रातःकाळी सर्व मोठमोठे ज्ञानी मुनी आले. ॥ ४ ॥

दो०—**तब बसिष्ठ मुनि समय सम कहि अनेक इतिहास।**
**सोक नेवारेउ सबहि कर निज बिग्यान प्रकास॥ १५६॥**

तेव्हा वसिष्ठांनी प्रसंगानुकूल पूर्वीच्या अनेक गोष्टी सांगून आपल्या विज्ञानाच्या प्रकाशाने सर्वांचे दुःख निवारण केले. ॥ १५६ ॥

**तेल नावँ भरि नृप तनु राखा। दूत बोलाइ बहुरि अस भाषा॥**
**धावहु बेगि भरत पहिं जाहू। नृप सुधि कतहुँ कहहु जनि काहू॥**

वसिष्ठांनी दोणीमध्ये तेल भरून राजाचा देह त्यामध्ये ठेवविला. नंतर दूतांना बोलावून त्यांना सांगितले की, 'तुम्ही लवकर धावत भरताकडे जा. मात्र राजांच्या मृत्यूची वार्ता कुणालाही सांगू नका. ॥ १ ॥

**एतनेइ कहेहु भरत सन जाई। गुर बोलाइ पठयउ दोउ भाई॥**
**सुनि मुनि आयसु धावन धाए। चले बेग बर बाजि लजाए॥**

जाऊन भरताला एवढेच सांगा की, दोघा भावांना गुरुजींनी बोलावले आहे.' मुनींची आज्ञा होताच दूत दौडू लागले. ते उत्तम प्रकारच्या घोड्यांनाही आपल्या धावण्याच्या गतीने लाजवीत होते. ॥ २ ॥

**अनरथु अवध अरंभेउ जब तें। कुसगुन होहिं भरत कहुँ तब तें॥**
**देखहिं राति भयानक सपना। जागि करहिं कटु कोटि कलपना॥**

जेव्हा अयोध्येमध्ये अनर्थ सुरू झाले, तेव्हापासून भरताला अपशकुन होऊ लागले. रात्री त्याला भयंकर स्वप्ने पडत होती आणि जागे झाल्यावर मनात अनेक तऱ्हेचे वाईट वाईट विचार येत होते. ॥ ३ ॥

**बिप्र जेवाँइ देहिं दिन दाना। सिव अभिषेक करहिं बिधि नाना॥**
**मागहिं हृदयँ महेस मनाई। कुसल मातु पितु परिजन भाई॥**

अनिष्टाच्या शांतीसाठी तो दररोज ब्राह्मणांना भोजन घालून दाने देत होता. अनेक प्रकारांनी रुद्राभिषेक करीत होता. मनामध्ये श्रीमहादेवांना आळवून माता-पिता, कुटुंबीय व भाऊ यांची खुशाली मागत होता. ॥ ४ ॥

दो०—**एहि बिधि सोचत भरत मन धावन पहुँचे आइ।**
**गुर अनुसासन श्रवन सुनि चले गनेसु मनाइ॥ १५७॥**

अशा प्रकारे भरत मनात काळजी करीत होता, एवढ्यात दूत पोहोचले. गुरूंची आज्ञा ऐकताच भरत श्रीगणेशाची प्रार्थना करीत निघाला. ॥ १५७ ॥

**चले समीर बेग हय हाँके। नाघत सरित सैल बन बाँके॥**
**हृदयँ सोचु बड़ कछु न सोहाई। अस जानहिं जियँ जाउँ उड़ाई॥**

हवेच्या वेगाने धावणाऱ्या घोड्यांना दौडवीत ते बिकट नद्या, पर्वत व जंगले ओलांडत निघाले. त्यांच्या मनात मोठी काळजी वाटत होती, काही सुचत नव्हते. मनात विचार येत होता की, उडून अयोध्येला पोहोचावे. ॥ १ ॥

**एक निमेष बरष सम जाई। एहि बिधि भरत नगर निअराई॥**
**असगुन होहिं नगर पैठारा। रटहिं कुभाँति कुखेत करारा॥**

एक एक क्षण वर्षाप्रमाणे जात होता. अशाप्रकारे भरत नगराजवळ पोहोचला. नगरात प्रवेश करताना अपशकुन होऊ लागले. कावळे डावीकडे बसून कर्कशपणे काव काव करीत होते. ॥ २ ॥

**खर सिआर बोलहिं प्रतिकूला। सुनि सुनि होइ भरत मन सूला॥**
**श्रीहत सर सरिता बन बागा। नगरु बिसेषि भयावनु लागा॥**

गाढवे व कोल्हे विचित्र आवाज काढत होते. हे सर्व ऐकून भरताचे मन कासावीस झाले होते. तलाव, नद्या, वने, बगीचे हे सर्व कळाहीन झाले होते. नगर फार भयंकर वाटत होते. ॥ ३ ॥

**खग मृग हय गय जाहिं न जोए। राम बियोग कुरोग बिगोए॥**
**नगर नारि नर निपट दुखारी। मनहुँ सबन्हि सब संपति हारी॥**

श्रीरामांच्या वियोगरूपी वाईट रोगाने त्रासलेले पशु-पक्षी, हत्ती-घोडे यांना पाहावत नव्हते. नगरातील स्त्री-पुरुष अत्यंत दुःखी झालेले होते. जणू सर्वजण आपली सर्व संपत्ती गमावून बसले होते.॥ ४॥

दो०—**पुरजन मिलहिं न कहहिं कछु गवँहिं जोहारहिं जाहिं।**
**भरत कुसल पूँछि न सकहिं भय बिषाद मन माहिं॥ १५८॥**

नगरातील लोक भेटत होते, परंतु काही बोलत नव्हते. गुपचूप प्रणाम करून जात होते. भरतसुद्धा कुणाला खुशाली विचारत नव्हता. कारण त्याच्या मनात भय व विषाद भरला होता.॥ १५८॥

**हाट बाट नहिं जाइ निहारी। जनु पुर दहँ दिसि लागि दवारी॥**
**आवत सुत सुनि कैकयनंदिनि। हरषी रबिकुल जलरुह चंदिनि॥**

बाजार व रस्ते पाहावत नव्हते, जणू दाही दिशांना वणवा लागला असावा. पुत्र येत असल्याचे ऐकून सूर्यकुलरूपी कमलाला कोमेजून टाकणारे चांदणे बनलेली कैकेयी फार आनंदित झाली.॥ १॥

**सजि आरती मुदित उठि धाई। द्वारेहिं भेंटि भवन लेइ आई॥**
**भरत दुखित परिवारु निहारा। मानहुँ तुहिन बनज बनु मारा॥**

ती आरती सजवून आनंदाने धावली आणि दरवाजाजवळ भेटताच भरताला महालात घेऊन गेली. भरताला सर्व परिवार दुःखात असलेला दिसला, जणू कमल-वनाला दवाने करपून टाकावे.॥ २॥

**कैकेई हरषित एहि भाँती। मनहुँ मुदित दव लाइ किराती॥**
**सुतहि ससोच देखि मनु मारें। पूँछति नैहर कुसल हमारें॥**

एक कैकेयीच अशी आनंदित दिसत होती की, जणू जंगलाला आग लावून भिल्लिणीला आनंद वाटावा. भरताला काळजीत पडलेला व उदासवाणा पाहून ती विचारू लागली की, 'आमच्या माहेरी सर्व खुशाल आहे ना?'॥ ३॥

**सकल कुसल कहि भरत सुनाई। पूँछी निज कुल कुसल भलाई॥**
**कहु कहँ तात कहाँ सब माता। कहँ सिय राम लखन प्रिय भ्राता॥**

भरताने सर्व खुशाली सांगितली. मग आपल्या कुळाचे क्षेम विचारले. भरत म्हणाला की, 'बाबा कुठे आहेत? माझ्या सर्व माता कुठे आहेत? सीता व माझे प्रिय भाऊ राम-लक्ष्मण कुठे आहेत?'॥ ४॥

दो०—**सुनि सुत बचन सनेहमय कपट नीर भरि नैन।**
**भरत श्रवन मन सूल सम पापिनि बोली बैन॥ १५९॥**

पुत्राचे प्रेमळ उद्‌गार ऐकून नेत्रांमध्ये खोटे पाणी आणत पापिणी कैकेयी भरताच्या कानात मनाला शूळाप्रमाणे बोचणारे शब्द बोलली,॥ १५९॥

**तात बात मैं सकल सँवारी। भै मंथरा सहाय बिचारी॥**
**कछुक काज बिधि बीच बिगारेउ। भूपति सुरपति पुर पगु धारेउ॥**

'बाळा! मी सर्व गोष्टी बरोबर जमवल्या होत्या. बिचाऱ्या मंथरेने मदतही केली, परंतु विधात्याने मध्येच थोडा खोडा घातला. त्यामुळे राजा देवलोकी निघून गेले.'॥ १॥

**सुनत भरतु भए बिबस बिषादा। जनु सहमेउ करि केहरि नादा॥**
**तात तात हा तात पुकारी। परे भूमितल ब्याकुल भारी॥**

हे ऐकताच दु:खामुळे भरताची दशा दयनीय झाली, जणू सिंहाची गर्जना ऐकून हत्ती घाबरून गेला. तो 'बाबा, बाबा, अहो बाबा!' असे म्हणत अत्यंत व्याकूळ होऊन जमिनीवर पडला.॥ २॥

**चलत न देखन पायउँ तोही। तात न रामहि सौंपेहु मोही॥**
**बहुरि धीर धरि उठे सँभारी। कहु पितु मरन हेतु महतारी॥**

आणि विलाप करीत म्हणू लागला की, 'अहो बाबा! मी तुम्हांला अंतकाळी पाहूही शकलो नाही. तुम्ही मला श्रीरामांच्या हाती सोपवूनही गेला नाहीत.' मग धीर धरून तो स्वत:ला सावरत उठला आणि म्हणाला, 'आई! बाबांच्या मृत्यूचे कारण तर सांग.'॥ ३॥

**सुनि सुत बचन कहति कैकेई। मरमु पाँछि जनु माहुर देई॥**
**आदिहु तें सब आपनि करनी। कुटिल कठोर मुदित मन बरनी॥**

पुत्राचे बोलणे ऐकून कैकेयी सांगू लागली, जणू मर्मस्थानी चिरून ती त्यात विष भरत होती. कुटिल व कठोर कैकेयीने आपले सर्व कृत्य प्रारंभापासून शेवटपर्यंत प्रसन्नपणे सांगितले.॥ ४॥

दो०—**भरतहि बिसरेउ पितु मरन सुनत राम बन गौनु।**
**हेतु अपनपउ जानि जियँ थकित रहे धरि मौनु॥ १६०॥**

श्रीरामचंद्रांचे वनात जाणे ऐकून भरत पित्याचे मरण विसरून गेला आणि मनात या सर्व अनर्थाचे कारण आपण आहोत, असे समजून अवाक् व सुन्न झाला.॥ १६०॥

**बिकल बिलोकि सुतहि समुझावति। मनहुँ जरे पर लोनु लगावति॥**
**तात राउ नहिं सोचै जोगू। बिढ़इ सुकृत जसु कीन्हेउ भोगू॥**

मुलगा व्याकूळ झालेला पाहून कैकेयी त्याला समजावू लागली, जणू भाजल्या जागी मीठ चोळू लागली. ती म्हणाली, 'बाळा! राजांसाठी काळजी करण्याचे कारण नाही. त्यांनी पुण्य आणि कीर्ती मिळवून त्याचा पुरेपूर भोग घेतला आहे. ॥ १ ॥

**जीवत सकल जनम फल पाए। अंत अमरपति सदन सिधाए॥**
**अस अनुमानि सोच परिहरहू। सहित समाज राज पुर करहू॥**

जीवनामध्ये त्यांनी जन्म घेतल्याचे संपूर्ण फळ मिळविले आहे आणि शेवटी ते इंद्रलोकी गेले. असा विचार करून चिंता सोडून दे व परिवारासह अयोध्येचे राज्य कर.' ॥ २ ॥

**सुनि सुठि सहमेउ राजकुमारू। पाकें छत जनु लाग अँगारू॥**
**धीरज धरि भरि लेहिं उसासा। पापिनि सबहि भाँति कुल नासा॥**

हे ऐकून राजकुमार भरताला मोठा धक्का बसला. जणू पिकलेल्या जखमेला विस्तवाचा चटका बसला. त्याने मन घट्ट करून मोठा उसासा टाकत म्हटले की, 'पापिणी, तू सर्व तऱ्हेने कुळाचा नाश केलास. ॥ ३ ॥

**जौं पै कुरुचि रही अति तोही। जनमत काहे न मारे मोही॥**
**पेड़ काटि तैं पालउ सींचा। मीन जिअन निति बारि उलीचा॥**

जर तुझी अशी दुष्ट इच्छा होती, तर जन्म घेताच मला मारून का टाकले नाहीस? तू वृक्ष तोडून पानांना पाणी घातलेस, माशाने जिवंत राहावे, म्हणून पाणी फेकून दिलेस. माझे हित करण्याऐवजी उलट अहित केलेस. ॥ ४ ॥

दो०—**हंसबंसु दसरथु जनकु राम लखन से भाइ।**
**जननी तूँ जननी भई बिधि सन कछु न बसाइ॥ १६१॥**

मला सूर्यवंशासारखा वंश, दशरथांच्यासारखा पिता व राम-लक्ष्मणासारखे भाऊ मिळाले. परंतु हे माते, मला जन्म देणारी आई तू झालीस! काय करणार? विधात्याच्यापुढे कुणाचे काही चालत नाही. ॥ १६१ ॥

**जब तैं कुमति कुमत जियँ ठयऊ। खंड खंड होइ हृदउ न गयऊ॥**
**बर मागत मन भइ नहिं पीरा। गरि न जीह मुहँ परेउ न कीरा॥**

अग दुष्टे! जेव्हा तू हा दुष्ट विचार मनात पक्का केलास, त्यावेळीच तुझ्या हृदयाचे तुकडे तुकडे का नाही झाले? वरदान मागताना तुझ्या मनात थोडेसुद्धा दुःख झाले नाही? तुझी जीभ गळून नाही पडली? तुझ्या तोंडात किडे का नाही पडले? ॥ १ ॥

**भूपँ प्रतीति तोरि किमि कीन्ही। मरन काल बिधि मति हरि लीन्ही॥**
**बिधिहुँ न नारि हृदय गति जानी। सकल कपट अघ अवगुन खानी॥**

राजांनी तुझ्यावर विश्वास कसा ठेवला? विधात्याने त्यांची बुद्धी मरतेवेळी हरण केली होती, असे वाटते. स्त्रियांच्या मनातील चाल विधात्यालाही कळली नाही. तुझे हृदय पूर्णपणे कपट, पाप व अवगुण यांची खाण आहे.॥ २॥

**सरल सुसील धरम रत राऊ। सो किमि जानै तीय सुभाऊ॥**
**अस को जीव जंतु जग माहीं। जेहि रघुनाथ प्रानप्रिय नाहीं॥**

आणि राजा हे तर सरळ, सुशील व धर्मपरायण होते. त्यांना स्त्री-स्वभाव कसा कळणार? अग, जगात असा कोणता प्राणी आहे की, त्याला श्रीरामचंद्र प्राणांसारखे प्रिय नाहीत?॥ ३॥

**भे अति अहित रामु तेउतोही। को तू अहसि सत्य कहु मोही॥**
**जो हसि सो हसि मुहँ मसि लाई। आँखि ओट उठि बैठहि जाई॥**

ते श्रीरामही तुला वैऱ्यासारखे वाटले? तू कोण आहेस? मला खरे खरे सांग. तू जी कोण असशील, ती आता आपले तोंड काळे करून माझ्या डोळ्यांआड निघून जा कशी!॥ ४॥

**दो०—राम बिरोधी हृदय तें प्रगट कीन्ह बिधि मोहि।**
**मो समान को पातकी बादि कहउँ कछु तोहि॥ १६२॥**

विधात्याने मला श्रीरामांना विरोध करणाऱ्या तुझ्यापासून उत्पन्न केले व मला श्रीरामविरोधी ठरविले. माझ्यासारखा पापी दुसरा कोण आहे? मीच पापी आहे. मग विनाकारण मी तुला बोल का लावू?'॥ १६२॥

**सुनि सत्रुघुन मातु कुटिलाई। जरहिं गात रिस कछु न बसाई॥**
**तेहि अवसर कुबरी तहँ आई। बसन बिभूषन बिबिध बनाई॥**

मातेचा दुष्टपणा ऐकून शत्रुघ्नाचे शरीर क्रोधाने पेटले होते, परंतु त्याचे काही चालत नव्हते. त्याचवेळी तऱ्हेतऱ्हेची वस्त्रे व अलंकार यांनी नटून कुबडी मंथरा तेथे आली.॥ १॥

**लखि रिस भरेउ लखन लघु भाई। बरत अनल घृत आहुति पाई॥**
**हुमगि लात तकि कूबर मारा। परि मुह भर महि करत पुकारा॥**

तिला नटलेली पाहून लक्ष्मणाचा छोटा भाऊ शत्रुघ्न भडकला. जणू जळत्या आगीत तुपाची आहुती पडली. त्याने तिच्या कुबडावर जोराने लाथ मारली. ती ओरडत जमिनीवर तोंडघशी पडली.॥ २॥

**कूबर टूटेउ फूट कपारू। दलित दसन मुख रुधिर प्रचारू॥**
**आह दइअ मैं काह नसावा। करत नीक फलु अनइस पावा॥**

तिचे कुबड मोडले, कपाळ फुटले, दात तुटले आणि तोंडातून रक्त वाहू लागले. ती विव्हळत म्हणाली, 'अरे दैवा, चांगले करता मला वाईट फळ मिळाले. मी काय वाईट केले?'॥ ३॥

**सुनि रिपुहन लखि नख सिख खोटी। लगे घसीटन धरि धरि झोंटी॥**
**भरत दयानिधि दीन्हि छड़ाई। कौसल्या पहिं गे दोउ भाई॥**

तिचे बोलणे ऐकून आणि ती नखशिखांत दुष्ट आहे, असे पाहून शत्रुघ्न तिच्या झिंज्या धरून तिला फरफटत नेऊ लागला. तेव्हा दयाळू भरताने तिला सोडविले आणि दोघे भाऊ कौसल्या मातेकडे गेले.॥ ४॥

दो०—**मलिन बसन बिबरन बिकल कृस सरीर दुख भार।**
**कनक कलप बर बेलि बन मानहुँ हनी तुसार॥ १६३॥**

कौसल्येने मळकट कपडे घातले होते, चेहरा उतरला होता, ती व्याकूळ झालेली होती आणि दुःखाच्या भाराने तिचे शरीर सुकून गेले होते. जणू सोन्याच्या सुंदर कल्पलतेला वनात हिमपाताने करपून टाकले असावे, अशी ती दिसत होती.॥ १६३॥

**भरतहि देखि मातु उठि धाई। मुरुछित अवनि परी झइँ आई॥**
**देखत भरतु बिकल भए भारी। परे चरन तन दसा बिसारी॥**

भरताला पाहाताच माता कौसल्या उठून धावली. परंतु मूर्च्छा येऊन जमिनीवर पडली. हे पाहाताच भरत फार व्याकूळ झाला आणि देहभान विसरून त्याने तिच्या चरणी लोळण घेतली.॥ १॥

**मातु तात कहँ देहि देखाई। कहँ सिय रामु लखनु दोउ भाई॥**
**कैकइ कत जनमी जग माझा। जौं जनमि त भइ काहे न बाँझा॥**

तो म्हणाला, 'आई, बाबा कुठे आहेत? मला दाखव. सीता व माझे दोघे बंधू श्रीराम व लक्ष्मण कुठे आहेत? कैकेयीने जगात जन्म कशाला घेतला आणि जन्मली तर ती वांझ का नाही झाली?॥ २॥

**कुल कलंकु जेहिं जनमेउ मोही। अपजस भाजन प्रियजन द्रोही॥**
**को तिभुवन मोहि सरिस अभागी। गति असि तोरि मातु जेहि लागी॥**

तिने कुलाचा कलंक, अपकीर्तीचा पेटारा आणि प्रियजनांचा द्रोही बनलेल्या माझ्यासारख्या पुत्राला जन्म का दिला? त्रैलोक्यात माझ्यासारखा दुर्दैवी कोण आहे? हे माते, तिच्यामुळे तुझी ही दशा झाली.॥ ३॥

**पितु सुरपुर बन रघुबर केतू। मैं केवल सब अनरथ हेतू॥**
**धिग मोहि भयउँ बेनु बन आगी। दुसह दाह दुख दूषन भागी॥**

वडील स्वर्गात आणि श्रीराम वनात गेले. केतूसारखा मीच या सर्व अनर्थांचे कारण आहे. माझा धिक्कार असो. मी वेळूच्या वनात आगीसारखा उत्पन्न झालो आणि भीषण दाह, दुःख व दोषांचा भागीदार ठरलो.'॥ ४॥

**दो०—मातु भरत के बचन मृदु सुनि पुनि उठी सँभारि।**
**लिए उठाइ लगाइ उर लोचन मोचति बारि॥ १६४॥**

भरताचे ते दीनवाणे बोलणे ऐकून माता कौसल्या सावरून उठली. तिने भरताला उठवून छातीशी धरले आणि ती नेत्रांतून अश्रू ढाळू लागली. ॥ १६४ ॥

**सरल सुभाय मायँ हियँ लाए। अति हित मनहुँ राम फिरि आए॥**
**भेंटेउ बहुरि लखन लघु भाई। सोकु सनेहु न हृदयँ समाई॥**

सरळ स्वभावी कौसल्या मातेने मोठ्या प्रेमाने भरताला उराशी धरले, जणू श्रीरामच परत आले होते. नंतर लक्ष्मणाचा छोटा भाऊ शत्रुघ्न याला तिने छातीशी धरले. तिच्या हृदयात शोक व प्रेम मावत नव्हते. ॥ १ ॥

**देखि सुभाउ कहत सबु कोई। राम मातु अस काहे न होई॥**
**माताँ भरतु गोद बैठारे। आँसु पोंछि मृदु बचन उचारे॥**

कौसल्येचा स्वभाव पाहून सर्वजण म्हणत होते की, 'श्रीरामाच्या मातेचा स्वभाव असा का बरे असणार नाही?' कौसल्येने भरताला मांडीवर बसविले आणि अश्रू पुसून ती मृदुपणाने म्हणाली, ॥ २ ॥

**अजहुँ बच्छ बलि धीरज धरहू। कुसमउ समुझि सोक परिहरहू॥**
**जनि मानहु हियँ हानि गलानी। काल करम गति अघटित जानी॥**

'हे वत्सा, मी तुझ्यावरून जीव ओवाळून टाकते. तू अजुनी धीर धर. वाईट काळ लक्षात घेऊन शोक सोडून दे. काळ व कर्म यांची गती अटळ असते, असे मानून मनात दुःख व ग्लानी येऊ देऊ नकोस. ॥ ३ ॥

**काहुहि दोसु देहु जनि ताता। भा मोहि सब बिधि बाम बिधाता॥**
**जो एतेहुँ दुख मोहि जिआवा। अजहुँ को जानइ का तेहि भावा॥**

बाळा! कुणाला दोष देऊ नकोस. विधाता सर्व प्रकारे मला प्रतिकूल झाला आहे, इतके दुःख देऊनही त्याने मला जिवंत ठेवले आहे. कुणास ठाऊक, त्याला काय आवडत आहे? ॥ ४ ॥

**दो०—पितु आयस भूषन बसन तात तजे रघुबीर।**
**बिसमउ हरषु न हृदयँ कछु पहिरे बलकल चीर॥ १६५॥**

हे तात, पित्याच्या आज्ञेने श्रीरघुवीराने वस्त्र व आभूषणे काढून टाकली आणि वल्कले धारण केली. त्याच्या मनात जरासुद्धा विषाद किंवा हर्ष नव्हता. ॥ १६५ ॥

**मुख प्रसन्न मन रंग न रोषू। सब कर सब बिधि करि परितोषू॥**
**चले बिपिन सुनि सिय सँग लागी। रहइ न राम चरन अनुरागी॥**

त्याचे मुख प्रसन्न होते. मनात आसक्ती नव्हती की द्वेष नव्हता. सर्वांचे सर्व प्रकारे समाधान करून तो वनात गेला. हे ऐकून सीतासुद्धा त्याच्याबरोबर गेली. श्रीरामांच्या चरणांवर प्रेम असल्याने तीसुद्धा काही सांगितले तरी राहिली नाही. ॥ १ ॥

**सुनतहिं लखनु चले उठि साथा । रहहिं न जतन किए रघुनाथा ॥**
**तब रघुपति सबही सिरु नाई । चले संग सिय अरु लघु भाई ॥**

ते ऐकून लक्ष्मणसुद्धा त्याच्याबरोबर निघाला. श्रीरामांनी थांबविण्याचा खूप प्रयत्न केला, पण तो थांबला नाही. मग श्रीरघुनाथ मस्तक नमवून सीता व लक्ष्मण यांचेसह निघून गेले. ॥ २ ॥

**रामु लखनु सिय बनहि सिधाए । गइउँ न संग न प्रान पठाए ॥**
**यहु सबु भा इन्ह आँखिन्ह आगें । तउ न तजा तनु जीव अभागें ॥**

श्रीराम, लक्ष्मण व सीता वनास गेले. मी बरोबर गेले नाही आणि मी आपले प्राणही त्यांच्यामागे पाठविले नाहीत. हे सर्व माझ्या या डोळ्यांसमोर घडले. तरीही माझ्या दुर्दैवी जिवाने शरीराचा त्याग केला नाही. ॥ ३ ॥

**मोहि न लाज निज नेहु निहारी । राम सरिस सुत मैं महतारी ॥**
**जिऐ मरै भल भूपति जाना । मोर हृदय सत कुलिस समाना ॥**

रामासारख्या पुत्राची मी आई, पण स्वतःच्या प्रेमाची मला लाजही वाटत नाही. जगणे व मरणे हे राजाला चांगले कळले. माझे हृदय शेकडो वज्रांसारखे कठोर आहे.' ॥ ४ ॥

दो०—**कौसल्या के बचन सुनि भरत सहित रनिवासु ।**
**ब्याकुल बिलपत राजगृह मानहुँ सोक नेवासु ॥ १६६ ॥**

कौसल्येचे बोलणे ऐकून भरतासह सर्व अंतःपुर व्याकूळ होऊन विलाप करू लागले. राजमहाल जणू शोकाचे निवास-स्थान बनला. ॥ १६६ ॥

**बिलपहिं बिकल भरत दोउ भाई । कौसल्याँ लिए हृदयँ लगाई ॥**
**भाँति अनेक भरतु समुझाए । कहि बिबेकमय बचन सुनाए ॥**

भरत, शत्रुघ्न हे दोघे भाऊ विव्हळ होऊन विलाप करू लागले. तेव्हा कौसल्येने त्यांना हृदयाशी धरले. अनेक प्रकारे तिने भरताला समजावले आणि पुष्कळशा विवेकपूर्ण गोष्टी त्याला सांगितल्या. ॥ १ ॥

**भरतहुँ मातु सकल समुझाईं । कहि पुरान श्रुति कथा सुहाईं ॥**
**छल बिहीन सुचि सरल सुबानी । बोले भरत जोरि जुग पानी ॥**

भरताने सर्व मातांची पुराण व वेदांचे दाखले देत समजूत घातली. दोन्ही हात जोडून भरत निष्कपटपणे, निर्मळपणे आणि साधेपणाने म्हणाला. ॥ २ ॥

**जे अघ मातु पिता सुत मारें। गाइ गोठ महिसुर पुर जारें॥**
**जे अघ तिय बालक बध कीन्हें। मीत महीपति माहुर दीन्हें॥**

'माता-पिता व पुत्र यांना मारण्यामुळे जे पाप लागते, जे गोशाला आणि ब्राह्मणांचे नगर जाळण्याने लागते, जे पाप पत्नी व बालक यांची हत्या केल्याने लागते, आणि जे मित्र व राजाला विष दिल्याने लागते,॥ ३॥

**जे पातक उपपातक अहहीं। करम बचन मन भव कबि कहहीं॥**
**ते पातक मोहि होहुँ बिधाता। जौं यहु होइ मोर मत माता॥**

कर्म, वचन आणि मन यांच्याद्वारे जितकी लहान-मोठी पापे लागतात, असे कवींनी सांगितले आहे, हे विधात्या, जर या कृत्यामध्ये माझा हात असेल, तर हे माते! ही पापे मला लागोत.॥ ४॥

दो०—**जे परिहरि हरि हर चरन भजहिं भूतगन घोर।**
**तेहि कइ गति मोहि देउ बिधि जौं जननी मत मोर॥ १६७॥**

जे लोक श्रीहरी व श्रीशंकर यांना सोडून भयानक भूत-प्रेतांना भजतात, हे माते, जर यात माझी संमती असेल, तर विधात्याने त्या लोकांची गती मला द्यावी.॥ १६७॥

**बेचहिं बेदु धरमु दुहि लेहीं। पिसुन पराय पाप कहि देहीं॥**
**कपटी कुटिल कलहप्रिय क्रोधी। बेद बिदूषक बिस्व बिरोधी॥**

जे लोक वेद विकतात, धर्माचे स्वार्थापोटी शोषण करतात, जे लावालाव्या करणारे आहेत, दुसऱ्यांची पापे लोकांना सांगतात, जे कपटी, कुटिल, कलहप्रिय आणि रागीट आहेत आणि जे वेदांची निंदा करणारे व सर्व जगाचे शत्रू आहेत;॥ १॥

**लोभी लंपट लोलुपचारा। जे ताकहिं परधनु परदारा॥**
**पावौं मैं तिन्ह कै गति घोरा। जौं जननी यहु संमत मोरा॥**

जे लोभी, लंपट आणि हावरटासारखे वर्तन करणारे आहेत, जे दुसऱ्याचे धन व परस्त्रीवर डोळा ठेवतात, हे जननी, जर या कृत्यास माझी संमती असेल तर मला वरील सर्वांची भयानक गती मिळो.॥ २॥

**जे नहिं साधुसंग अनुरागे। परमारथ पथ बिमुख अभागे॥**
**जे न भजहिं हरि नरतनु पाई। जिन्हहि न हरि हर सुजसु सोहाई॥**

ज्यांना सत्संगतीविषयी प्रेम नाही, जे भाग्यहीन परमार्थ-मार्गापासून विन्मुख आहेत, जे मनुष्यदेह लाभला असतानाही श्रीहरीचे भजन करीत नाहीत, ज्यांना भगवान विष्णू व शंकर यांचे गुणगान आवडत नाही,॥ ३॥

**तजि श्रुतिपंथु बाम पथ चलहीं। बंचक बिरचि बेष जगु छलहीं॥**
**तिन्ह कै गति मोहि संकर देऊ। जननी जौं यहु जानौं भेऊ॥**

जे वेदमार्ग सोडून वाम-मार्गाने जातात, जे ठक आहेत, आणि साधूचे सोंग घेऊन जगाला फसवितात; हे माते, मला जर हे षड्यंत्र माहीत असेल, तर श्रीशंकर भगवान मला वरील लोकांची गती देवोत.'॥ ४॥

**दो०—मातु भरत के बचन सुनि साँचे सरल सुभायँ।**
**कहति राम प्रिय तात तुम्ह सदा बचन मन कायँ॥ १६८॥**

माता कौसल्या भरताचे अत्यंत खरे व सरळ बोलणे ऐकून म्हणाली, 'बाबा रे! तू मन, वचन व आचरणाने नेहमीच श्रीरामाचा आवडता आहेस.॥ १६८॥

**राम प्रानहु तें प्रान तुम्हारे। तुम्ह रघुपतिहि प्रानहु तें प्यारे॥**
**बिधु बिष चवै स्त्रवै हिमु आगी। होइ बारिचर बारि बिरागी॥**

श्रीराम तुला प्राणाहून प्रिय आहे, आणि तूसुद्धा रघुनाथाला प्राणाहून अधिक प्रिय आहेस. चंद्र विष ओकू लागला आणि हिम आगीचा वर्षाव करू लागले, जलचर जीव जलापासून विरक्त झाले,॥ १॥

**भएँ ग्यानु बरु मिटै न मोहू। तुम्ह रामहि प्रतिकूल न होहू॥**
**मत तुम्हार यहु जो जग कहहीं। सो सपनेहुँ सुख सुगति न लहहीं॥**

आणि ज्ञान प्राप्त झाल्यावरही मोह संपला नाही, तरीही तू श्रीरामचंद्राविरुद्ध कधीही जाणार नाहीस. जगामध्ये जे कोणी असे म्हणतील की, या गोष्टीमध्ये तुझी संमती आहे, त्यांना स्वप्नातही सुख व शुभ गती मिळणार नाही.'॥ २॥

**अस कहि मातु भरतु हियँ लाए। थन पय स्त्रवहिं नयन जल छाए॥**
**करत बिलाप बहुत एहि भाँती। बैठेहिं बीति गई सब राती॥**

असे म्हणून कौसल्येने भरताला हृदयाशी कवटाळले, तिच्या स्तनांतून दूध स्त्रवू लागले आणि नेत्रात प्रेमाश्रू दाटले. अशा प्रकारे पुष्कळ विलाप करीत बसल्या-बसल्या ती सारी रात्र सरली.॥ ३॥

**बामदेउ बसिष्ठ तब आए। सचिव महाजन सकल बोलाए॥**
**मुनि बहु भाँति भरत उपदेसे। कहि परमारथ बचन सुदेसे॥**

मग वामदेव व वसिष्ठ आले. त्यांनी सर्व मंत्री व प्रतिष्ठित लोकांना बोलावून घेतले. नंतर मुनी वसिष्ठांनी प्रसंगानुरूप पारमार्थिक सुंदर गोष्टी सांगून पुष्कळ प्रकारे भरताला उपदेश केला.॥ ४॥

**दो०—तात हृदयँ धीरजु धरहु करहु जो अवसर आजु।**
**उठे भरत गुर बचन सुनि करन कहेउ सबु साजु॥ १६९॥**

वसिष्ठ म्हणाले, 'हे कुमार! मनात धैर्य धर आणि आज जे करण्याची वेळ आहे, ते कर.' गुरुजींचे म्हणणे ऐकून भरत उठला आणि त्याने सर्व तयारी करण्यास सांगितले. ॥ १६९ ॥

**नृपतनु बेद बिदित अन्हवावा । परम बिचित्र बिमानु बनावा ॥**
**गहि पद भरत मातु सब राखी । रहीं रानि दरसन अभिलाषी ॥**

वेदांमध्ये सांगितलेल्या विधीप्रमाणे राजाला स्नान घातले आणि परम पवित्र असे विमान बनविले. भरताने सर्व मातांचे चरण धरून त्यांना सती होण्यापासून परावृत्त केले. त्या राण्यासुद्धा श्रीरामांच्या दर्शनाची अभिलाषा बाळगून सती गेल्या नाहीत. ॥ १ ॥

**चंदन अगर भार बहु आए । अमित अनेक सुगंध सुहाए ॥**
**सरजु तीर रचि चिता बनाई । जनु सुरपुर सोपान सुहाई ॥**

चंदन, अगुरू व इतर अनेक प्रकारच्या सुगंधी द्रव्यांचे पुष्कळ ढीग आले. शरयू नदीच्या तटावर सुंदर चिता रचली. जणू ती स्वर्गाची पायरी असावी, असे वाटत होते. ॥ २ ॥

**एहि बिधि दाह क्रिया सब कीन्ही । बिधिवत न्हाइ तिलांजुलि दीन्ही ॥**
**सोधि सुमृति सब बेद पुराना । कीन्ह भरत दसगात बिधाना ॥**

अशा प्रकारे दहन-क्रिया केली गेली आणि सर्वांनी विधिपूर्वक स्नान करून तिलांजली दिली. मग वेद, स्मृती आणि पुराणे या सर्वांच्या मताप्रमाणे भरताने पित्याचे दहा दिवसांचे कर्म केले. ॥ ३ ॥

**जहँ जस मुनिबर आयसु दीन्हा । तहँ तस सहस भाँति सबु कीन्हा ॥**
**भए बिसुद्ध दिए सब दाना । धेनु बाजि गज बाहन नाना ॥**

मुनिश्रेष्ठ वसिष्ठांनी जिथे जशी आज्ञा दिली तिथे भरताने त्याप्रमाणे अनेक प्रकारची कृत्ये केली. सुतक संपल्यावर विधिपूर्वक सर्व दाने दिली. गाई, घोडे, हत्ती इत्यादी अनेक प्रकारची वाहने, ॥ ४ ॥

दो०—**सिंघासन भूषन बसन अन्न धरनि धन धाम ।**
**दिए भरत लहि भूमिसुर भे परिपूरन काम ॥ १७० ॥**

सिंहासने, दागिने, कपडे, अन्न, पृथ्वी, धन व घरे भरताने दान केली. ब्राह्मणांना दाने देऊन त्यांच्या सर्व मनोकामना पूर्ण केल्या. ॥ १७० ॥

**पितु हित भरत कीन्हि जसि करनी । सो मुख लाख जाइ नहिं बरनी ॥**
**सुदिनु सोधि मुनिबर तब आए । सचिव महाजन सकल बोलाए ॥**

पित्यासाठी भरताने जे काही केले, त्याचे वर्णन लाख मुखांनीही करता येणे शक्य नाही. मग शुभ मुहूर्त शोधून मुनिश्रेष्ठ वसिष्ठ आले आणि त्यांनी मंत्र्यांना व श्रेष्ठींना बोलाविले. ॥ १ ॥

**बैठे राजसभाँ सब जाई। पठए बोलि भरत दोउ भाई॥**
**भरतु बसिष्ठ निकट बैठारे। नीति धरममय बचन उचारे॥**

सर्वजण राजसभेमध्ये स्थानापन्न झाले. तेव्हा वसिष्ठांनी भरत व शत्रुघ्न या दोघा भावांना बोलावणे पाठविले. वसिष्ठांनी भरताला आपल्याजवळ बसवून घेतले आणि नीतिपूर्ण व धर्मपूर्ण शब्दांत सांगितले.॥ २॥

**प्रथम कथा सब मुनिबर बरनी। कैकइ कुटिल कीन्हि जसि करनी॥**
**भूप धरमब्रतु सत्य सराहा। जेहिं तनु परिहरि प्रेमु निबाहा॥**

मुनिवर्यांनी कैकेयीने जे कुटिल कृत्य केले होते, त्याची कथा प्रारंभी सांगितली. नंतर दशरथांनी धर्म व सत्य राखण्यासाठी श्रीरामांचा त्याग केला व स्वतः देहत्याग करून रामावरील प्रेम व्यक्त केले, असे सांगितले.॥ ३॥

**कहत राम गुन सील सुभाऊ। सजल नयन पुलकेउ मुनिराऊ॥**
**बहुरि लखन सिय प्रीति बखानी। सोक सनेह मगन मुनि ग्यानी॥**

श्रीरामचंद्रांचे गुण, शील व स्वभाव यांचे वर्णन करता-करता मुनिराजांच्या नेत्रांत अश्रू आले आणि त्यांचे शरीर रोमांचित झाले. नंतर लक्ष्मण व सीता यांच्या प्रेमाची थोरवी सांगत ज्ञानी मुनी शोक व प्रेम यांमध्ये मग्न झाले.॥ ४॥

दो०—**सुनहु भरत भावी प्रबल बिलखि कहेउ मुनिनाथ।**
**हानि लाभु जीवनु मरनु जसु अपजसु बिधि हाथ॥ १७१॥**

मुनिनाथ शोकाकुल होऊन म्हणाले, 'भरता, ऐक. भवितव्यता अटळ असते. हानि-लाभ, जीवन-मरण आणि कीर्ती-अपकीर्ती या गोष्टी विधात्याच्या हाती आहेत.॥ १७१॥

**अस बिचारि केहि देइअ दोसू। ब्यरथ काहि पर कीजिअ रोसू॥**
**तात बिचारु करहु मन माहीं। सोच जोगु दसरथु नृपु नाहीं॥**

असा विचार केल्यावर दोष कुणाला द्यायचा? आणि कुणावर व्यर्थ क्रोध करायचा? कुमार! मनात विचार कर. राजा दशरथांबद्दल दुःख करणे योग्य नाही.॥ १॥

**सोचिअ बिप्र जो बेद बिहीना। तजि निज धरमु बिषय लयलीना॥**
**सोचिअ नृपति जो नीति न जाना। जेहि न प्रजा प्रिय प्रान समाना॥**

जो ब्राह्मण वेद जाणत नाही आणि आपला धर्म सोडून विषय-भोगामध्येच बुडालेला असतो, त्याच्याविषयी शोक केला पाहिजे. जो राजा नीती जाणत नाही आणि ज्याला आपली प्रजा प्राणांसमान प्रिय नाही, त्याच्याबद्दल शोक करावा.॥ २॥

**सोचिअ बयसु कृपन धनवानू । जो न अतिथि सिव भगति सुजानू ॥**
**सोचिअ सूद्रु बिप्र अवमानी । मुखर मानप्रिय ग्यान गुमानी ॥**

जो वैश्य धनवान असूनही कंजूष आहे आणि जो अतिथि-सत्कार व श्रीशिवांची भक्ती करण्यात तत्पर नसतो, त्याच्या बद्दल चिंता करावी. जो शूद्र ब्राह्मणांचा अपमान करणारा आहे, फार बड्या बाता मारणारा आहे आणि मान-मोठेपणा यांची इच्छा बाळगणारा व ज्ञानाची घमेंड बाळगणारा आहे, त्याची चिंता करावी. ॥ ३ ॥

**सोचिअ पुनि पति बंचक नारी । कुटिल कलहप्रिय इच्छाचारी ॥**
**सोचिअ बटु निज ब्रतु परिहरई । जो नहिं गुर आयसु अनुसरई ॥**

जी स्त्री पतीला फसविणारी, कुटिल, कलहप्रिय व स्वेच्छाचारिणी आहे, तिची चिंता करावी. जो ब्रह्मचारी ब्रह्मचर्य-व्रत सोडून देतो आणि गुरूच्या आज्ञेप्रमाणे वागत नाही, त्याची चिंता करावी. ॥ ४ ॥

दो०—**सोचिअ गृही जो मोह बस करइ करम पथ त्याग।**
**सोचिअ जती प्रपंच रत बिगत बिबेक बिराग॥ १७२ ॥**

जो गृहस्थ मोहामुळे कर्ममार्गाचा त्याग करतो त्याची चिंता करावी. जो संन्यासी जगाच्या प्रपंचामध्ये सापडला आहे आणि ज्ञान-वैराग्यहीन आहे, त्याची चिंता करावी. ॥ १७२ ॥

**बैखानस सोइ सोचै जोगू । तपु बिहाइ जेहि भावइ भोगू ॥**
**सोचिअ पिसुन अकारन क्रोधी । जननि जनक गुर बंधु बिरोधी ॥**

ज्या वानप्रस्थ मनुष्याला तपस्या सोडून भोग आवडतात, त्याची चिंता करण्याजोगी आहे. जो लावालावी करणारा आहे, विनाकारण क्रोध करणारा आहे, माता-पिता, गुरू, भाऊबंद यांच्याशी वैरभाव ठेवणारा आहे, त्याची चिंता करावी. ॥ १ ॥

**सब बिधि सोचिअ पर अपकारी । निज तनु पोषक निरदय भारी ॥**
**सोचनीय सबहीं बिधि सोई । जो न छाड़ि छलु हरि जन होई ॥**

जो दुसऱ्याचे अनिष्ट करतो, आपलेच शरीर पोसतो आणि फार मोठा निर्दय आहे, त्याची सर्व प्रकारे चिंता करावी. आणि जो कपट सोडून हरीचा भक्त नसतो, तोही सर्व प्रकारे चिंता करण्याजोगा होय. ॥ २ ॥

**सोचनीय नहिं कोसलराऊ । भुवन चारिदस प्रगट प्रभाऊ ॥**
**भयउ न अहइ न अब होनिहारा । भूप भरत जस पिता तुम्हारा ॥**

कोसलराज दशरथ हे चिंता करण्यासारखे नाहीत. त्यांचा प्रभाव चौदा लोकांमध्ये पसरलेला आहे. हे भरता, तुझ्या पित्यासारखा राजा झालेला नाही, आजही कोणी नाही आणि आता होणारही नाही. ॥ ३ ॥

**बिधि हरि हरु सुरपति दिसिनाथा । बरनहिं सब दसरथ गुन गाथा ॥**

ब्रह्मदेव, विष्णू, शिव, इंद्र व दिक्पाल हे सर्व दशरथांचे गुणगान करतात. ॥ ४ ॥

दो०—**कहहु तात केहि भाँति कोउ करिहि बड़ाई तासु।**
**राम लखन तुम्ह सत्रुहन सरिस सुअन सुचि जासु॥ १७३॥**

बाबा रे! ज्यांचे श्रीराम, लक्ष्मण, तू व शत्रुघ्न यांच्यासारखे पुत्र आहेत, त्यांचा महिमा कोण व कसा सांगू शकेल?॥ १७३॥

**सब प्रकार भूपति बड़भागी। बादि बिषादु करिअ तेहि लागी॥**
**यह सुनि समुझि सोचु परिहरहू। सिर धरि राज रजायसु करहू॥**

महाराज सर्व प्रकारे मोठ्या भाग्याचे होते. त्यांच्याबद्दल विषाद करणे व्यर्थ आहे. असे ऐकून व समजून घेऊन चिंता करणे सोडून दे आणि राजाची आज्ञा शिरसावंद्य मानून त्याप्रमाणे कर.॥ १॥

**रायँ राजपदु तुम्ह कहुँ दीन्हा। पिता बचनु फुर चाहिअ कीन्हा॥**
**तजे रामु जेहिं बचनहि लागी। तनु परिहरेउ राम बिरहागी॥**

राजांनी तुला राजपद दिले आहे. पित्याचे वचन तुला पाळले पाहिजे. राजांनी आपल्या वचनासाठी श्रीरामचंद्राचा त्याग केला आणि राम-विरहाच्या अग्नीमध्ये आपल्या देहाची आहुती दिली.॥ २॥

**नृपहि बचन प्रिय नहिं प्रिय प्राना। करहु तात पितु बचन प्रवाना॥**
**करहु सीस धरि भूप रजाई। हइ तुम्ह कहँ सब भाँति भलाई॥**

राजांना वचन प्रिय होते, प्राण प्रिय नव्हते. म्हणून हे कुमार! पित्याचे वचन सत्य कर. राजाची आज्ञा शिरोधार्य मानून त्याप्रमाणे वर्तन कर. त्यातच तुझे सर्व प्रकारे भले आहे.॥ ३॥

**परसुराम पितु अग्या राखी। मारी मातु लोक सब साखी॥**
**तनय जजातिहि जौबनु दयऊ। पितु अग्याँ अघ अजसु न भयऊ॥**

परशुरामांनी पित्याची आज्ञा मानली व मातेला ठार मारले. सर्वजण याचे साक्षीदार आहेत. राजा ययातीच्या पुत्राने पित्याला आपले तारुण्य दिले. पित्याची आज्ञा पालन केल्याने त्यांना पाप व अपकीर्ती मिळाली नाही.॥ ४॥

दो०—**अनुचित उचित बिचारु तजि जे पालहिं पितु बैन।**
**ते भाजन सुख सुजस के बसहिं अमरपति ऐन॥ १७४॥**

जे अनुचित व उचित यांचा विचार सोडून पित्याच्या वचनांचे पालन करतात, ते इहलोकी सुख व सुकीर्तीस पात्र ठरतात आणि शेवटी स्वर्गात निवास करतात.॥ १७४॥

**अवसि नरेस बचन फुर करहू। पालहु प्रजा सोकु परिहरहू॥**
**सुरपुर नृपु पाइहि परितोषू। तुम्ह कहुँ सुकृतु सुजसु नहिं दोषू॥**

राजांच्या वचनाचे पालन निश्चितपणे कर. शोक सोडून दे व प्रजेचे पालन कर. असे केल्याने राजांना स्वर्गात संतोष होईल आणि तुला पुण्य व सुंदर कीर्ती लाभेल. दोष लागणार नाही. ॥ १ ॥

**बेद बिदित संमत सबही का। जेहि पितु देइ सो पावइ टीका॥**
**करहु राजु परिहरहु गलानी। मानहु मोर बचन हित जानी॥**

पिता ज्याला राजतिलक देतो, त्यालाच तो मिळतो, हे वेदांमध्ये प्रसिद्ध आहे आणि स्मृति-पुराणादी सर्व शास्त्रांनी संमत केलेले आहे. म्हणून तू राज्य कर आणि उदासपण सोडून दे. माझ्या बोलण्यात हित आहे, असे समजून ते मान्य कर. ॥ २ ॥

**सुनि सुखु लहब राम बैदेहीं। अनुचित कहब न पंडित केहीं॥**
**कौसल्यादि सकल महतारीं। तेउ प्रजा सुख होहिं सुखारीं॥**

ही गोष्ट ऐकल्यावर श्रीरामचंद्र व सीता यांना समाधान मिळेल आणि कोणीही पंडित याला अयोग्य म्हणणार नाही. कौसल्या इत्यादी तुझ्या सर्व मातासुद्धा प्रजेच्या सुखामुळे सुखी होतील. ॥ ३ ॥

**परम तुम्हार राम कर जानिहि। सो सब बिधि तुम्ह सन भल मानिहि॥**
**सौंपेहु राजु राम के आएँ। सेवा करेहु सनेह सुहाएँ॥**

तुझे श्रीरामांवर श्रेष्ठ प्रेम आहे, हे जो जाणतो, तो सर्व प्रकारे तुला चांगलाच मानेल. श्रीराम परत आल्यावर त्यांना राज्य सोपवून मग त्यांची प्रेमाने सेवा कर.' ॥ ४ ॥

दो०—**कीजिअ गुर आयसु अवसि कहहिं सचिव कर जोरि।**
**रघुपति आएँ उचित जस तस तब करब बहोरि॥ १७५॥**

हात जोडून मंत्री म्हणाले, 'गुरुजींच्या आज्ञेचे अवश्य पालन करा. श्रीरघुनाथ परत आल्यावर मग जे योग्य असेल, त्याप्रमाणे करा. ॥ १७५ ॥

**कौसल्या धरि धीरजु कहई। पूत पथ्य गुर आयसु अहई॥**
**सो आदरिअ करिअ हित मानी। तजिअ बिषादु काल गति जानी॥**

कौसल्यासुद्धा धीर धरून म्हणाली, 'हे पुत्रा, गुरुजींची आज्ञा ही हिताची आहे. तिचा आदर केला पाहिजे आणि हित मानून तिचे पालन केले पाहिजे. काळाची गती समजून घेऊन विषाद सोडला पाहिजे. ॥ १ ॥

**बन रघुपति सुरपुर नरनाहू। तुम्ह एहि भाँति तात कदराहू॥**
**परिजन प्रजा सचिव सब अंबा। तुम्हही सुत सब कहँ अवलंबा॥**

श्रीरघुनाथ वनात आहे, महाराज स्वर्गात गेले आणि बाळा! तू तर असा बावरून गेला आहेस. हे पुत्रा, कुटुंब, प्रजा, मंत्री व सर्व माता या सर्वांना तूच एक आधार आहेस. ॥ २ ॥

**लखि बिधि बाम कालु कठिनाई। धीरजु धरहु मातु बलि जाई॥**
**सिर धरि गुर आयसु अनुसरहू। प्रजा पालि परिजन दुखु हरहू॥**

विधाता हा प्रतिकूल आहे आणि काळ हा कठोर आहे, असे पाहून धीर धर. मी तुझ्यावरून जीव ओवाळून टाकते. गुरूंची आज्ञा शिरोधार्य मानून त्यानुसार कार्य कर व प्रजेचे पालन करून कुटुंबीयांचे दुःख दूर कर.'॥ ३॥

**गुर के बचन सचिव अभिनंदनु। सुने भरत हिय हित जनु चंदनु॥**
**सुनी बहोरि मातु मृदु बानी। सील सनेह सरल रस सानी॥**

भरताने गुरूंचे वचन आणि मंत्र्यांचे अनुमोदन ऐकले. ते त्याच्या तप्त हृदयाला चंदनासारखे शीतल वाटले. नंतर त्याने शील, स्नेह व सरळपणाने कौसल्या मातेची वाणी ऐकली.॥ ४॥

**छं०—सानी सरल रस मातु बानी सुनि भरतु ब्याकुल भए।**
**लोचन सरोरुह स्त्रवत सींचत बिरह उर अंकुर नए॥**
**सो दसा देखत समय तेहि बिसरी सबहि सुधि देह की।**
**तुलसी सराहत सकल सादर सीवँ सहज सनेह की॥**

सरळपणाच्या रसाने भरलेली कौसल्या मातेची वाणी ऐकून भरत व्याकूळ झाला. त्याचे नेत्र-कमल अश्रू ढाळत हृदयातील विरहरूपी नवीन अंकुरांचे सिंचन करू लागले. त्याची ती दशा पाहून त्यावेळी सर्वजण देहभान हरवून बसले. तुलसीदास म्हणतात, स्वाभाविक प्रेमाची परिसीमा असलेल्या भरताची प्रशंसा सर्व लोक आदराने करू लागले.

**सो०—भरतु कमल कर जोरि धीर धुरंधर धीर धरि।**
**बचन अमिअँ जनु बोरि देत उचित उत्तर सबहि॥ १७६॥**

धैर्य-धुरीण भरत धीर धरून, कर-कमल जोडून आणि आपले वचन जणू अमृतात बुडवून सर्वांना योग्य उत्तर देऊ लागला.॥ १७६॥

## मासपारायण, अठरावा विश्राम

**मोहि उपदेसु दीन्ह गुरनीका। प्रजा सचिव संमत सबही का॥**
**मातु उचित धरि आयसु दीन्हा। अवसि सीस धरि चाहउँ कीन्हा॥**

'गुरुजींनी मला सुंदर उपदेश केला. प्रजा, मंत्री इत्यादींना हेच संमत आहे. मातेनेही जी योग्य आज्ञा दिली आहे, ती अवश्य शिरोधार्य मानून तसेच मला करायला हवे. ॥ १॥

**गुर पितु मातु स्वामि हित बानी । सुनि मन मुदित करिअ भलि जानी ॥**
**उचितकिअनुचित किएँ बिचारू । धरमु जाइ सिर पातक भारू ॥**

कारण गुरू, पिता, माता, स्वामी आणि सुहृद यांचे सांगणे प्रसन्न मनाने योग्य मानून ते केले पाहिजे. उचित-अनुचित याचा विचार केल्यास धर्म बुडतो आणि डोक्यावर पापांचा भार वाढतो. ॥ २ ॥

**तुम्ह तौ देहु सरल सिख सोई । जो आचरत मोर भल होई ॥**
**जद्यपि यह समुझत हउँ नीकें । तदपि होत परितोषु न जी कें ॥**

ज्या वागण्यामध्ये माझे भले होणार आहे, तोच सरळ उपदेश तुम्ही मला केला आहे. जरी मी ही गोष्ट योग्य प्रकारे समजत असलो, तरी माझ्या मनाचे समाधान होत नाही. ॥ ३ ॥

**अब तुम्ह बिनय मोरि सुनि लेहू । मोहि अनुहरत सिखावनु देहू ॥**
**ऊतरु देउँ छमब अपराधू । दुखित दोष गुन गनहिं न साधू ॥**

आता तुम्ही सर्वजण माझी विनंती ऐकून घ्या आणि माझ्या पात्रतेप्रमाणे मला शिकवण द्या. मी उलट उत्तर देत आहे, या अपराधाबद्दल क्षमा करा. सज्जन लोक दुःखी मनुष्याच्या दोष-गुणांचा विचार करीत नाहीत. ॥ ४ ॥

दो०—**पितु सुरपुर सिय रामु बन करन कहहु मोहि राजु।**
**एहि तें जानहु मोर हित कै आपन बड़ काजु॥ १७७ ॥**

वडील स्वर्गाला गेले आहेत, श्रीसीताराम वनात आहेत आणि तुम्ही मला राज्य करण्यासाठी सांगत आहात. यामध्ये तुम्ही माझे कल्याण समजता की, आपले एखादे मोठे कार्य होण्याची आशा करता ? ॥ १७७ ॥

**हित हमार सियपति सेवकाईं । सो हरि लीन्ह मातु कुटिलाईं ॥**
**मैं अनुमानि दीख मन माहीं । आन उपायँ मोर हित नाहीं ॥**

माझे कल्याण हे तर सीतापती श्रीरामांच्या सेवेमध्ये आहे, ते माझ्या मातेने दुष्टपणाने हिरावून घेतले. मी आपल्या मनाने खूप विचार करून पाहिला की, श्रीरामांच्या सेवेखेरीज इतर कोणत्याही उपायाने माझे कल्याण होणार नाही. ॥ १ ॥

**सोक समाजु राजु केहि लेखें । लखन राम सिय बिनु पद देखें ॥**
**बादि बसन बिनु भूषन भारू । बादि बिरति बिनु ब्रह्मबिचारू ॥**

ज्याप्रमाणे वस्त्रांविना दागिन्यांचे ओझे व्यर्थ आहे. वैराग्याविना ब्रह्मविचार व्यर्थ आहे. त्याप्रमाणे हे शोकाचा समूह असलेले राज्य श्रीरामचंद्र आणि सीता यांच्या चरणांच्या दर्शनाविना व्यर्थ होय. ॥ २ ॥

**सरुज सरीर बादि बहु भोगा। बिनु हरिभगति जायँ जप जोगा॥**
**जायँ जीव बिनु देह सुहाई। बादि मोर सबु बिनु रघुराई॥**

रोगट शरीराला नाना प्रकारचे भोग व्यर्थ आहेत. श्रीहरीच्या भक्तीविना जप व योग व्यर्थ आहे. जीवाविना सुंदर देह व्यर्थ आहे. तसेच श्रीरघुनाथांच्या विना माझे सर्व जीवन व्यर्थ आहे. ॥ ३ ॥

**जाउँ राम पहिं आयसु देहू। एकहिं आँक मोर हित एहू॥**
**मोहि नृप करि भल आपन चहहू। सोउ सनेह जड़ता बस कहहू॥**

श्रीरामांच्याजवळ जाण्याची मला आज्ञा द्या. निश्चितपणे माझे हित यातच आहे, आणि मला राजा बनवून आपले कल्याण होईल, असे तुम्हांला जे वाटते, तेसुद्धा तुम्ही प्रेमाच्या मोहामुळेच म्हणत आहात. ॥ ४ ॥

दो०—**कैकेई सुअ कुटिलमति राम बिमुख गतलाज।**
**तुम्ह चाहत सुखु मोहबस मोहि से अधम कें राज॥ १७८॥**

कैकेयीचा मुलगा, कुटिल बुद्धीचा, श्रीराम-विन्मुख झालेला आणि निर्लज्ज अशा माझ्यासारख्या अधम व्यक्तीच्या राज्यापासून तुम्ही सुख मिळण्याची इच्छा करता, तीही मोहामुळेच. ॥ १७८ ॥

**कहउँ साँचु सब सुनि पतिआहू। चाहिअ धरमसील नरनाहू॥**
**मोहि राजु हठि देइहहु जबहीं। रसा रसातल जाइहि तबहीं॥**

तुम्ही सर्वजण हे ऐकून विश्वास ठेवा की, मी सत्य सांगत आहे. धर्मशील असलेल्यानेच राजा व्हायला हवे. तुम्ही हट्टाने मला राज्य द्याल, तर त्या क्षणी ही पृथ्वी पाताळात दबली जाईल. ॥ १ ॥

**मोहि समान को पापनिवासू। जेहि लगि सीय राम बनबासू॥**
**रायँ राम कहुँ काननु दीन्हा। बिछुरत गमनु अमरपुर कीन्हा॥**

ज्याच्यामुळे सीता व श्रीराम यांना वनवास भोगावा लागला, तो माझ्यासारखा पापांचे घर कोण असेल? राजांनी रामांना वन दिले आणि त्यांच्यापासून ताटातूट होताच स्वतः स्वर्गाला गेले. ॥ २ ॥

**मैं सठु सब अनरथ कर हेतू। बैठ बात सब सुनउँ सचेतू॥**
**बिनु रघुबीर बिलोकि अबासू। रहे प्रान सहि जग उपहासू॥**

आणि सर्व अनर्थांचे कारण असलेला मी दुष्ट मात्र शुद्धीवर असून या गोष्टी ऐकत आहे. श्रीरघुनाथांच्याविना हा प्रासाद पाहूनही आणि जगाचा उपहास सहन करीतही माझे हे प्राण अजून उरले आहेत. ॥ ३ ॥

**राम पुनीत बिषय रस रूखे। लोलुप भूमि भोग के भूखे॥**
**कहँ लगि कहौं हृदय कठिनाई। निदरि कुलिसु जेहिं लही बड़ाई॥**

याचे हेच कारण असावे की, हे प्राण श्रीरामरूपी पवित्र प्रेमरसामध्ये आसक्त झालेले नाहीत. हे हावरट प्राण राज्य व भोगांचे भुकेले आहेत. माझे हृदय किती कठोर आहे, हे मी किती सांगू? त्याने वज्रालाही कठोरपणात लाजवून मोठेपणा मिळविला आहे.॥ ४॥

**दो०—कारन तें कारजु कठिन होइ दोसु नहिं मोर।**
**कुलिस अस्थि तें उपल तें लोह कराल कठोर॥ १७९॥**

कारणापेक्षा कार्य हे कठीण असते, यात माझा दोष नाही. हाडापेक्षा (त्यापासून बनलेले) वज्र व दगडापेक्षा लोखंड हे भयानक व कठोर असते.॥ १७९॥

**कैकेई भव तनु अनुरागे। पावँर प्रान अघाइ अभागे॥**
**जौं प्रिय बिरहँ प्रान प्रिय लागे। देखब सुनब बहुत अब आगे॥**

कैकेयीपासून उत्पन्न झालेल्या देहाविषयी प्रेम बाळगणारे माझे हे पामर प्राण पूर्णपणे दुर्दैवी आहेत. प्रिय श्रीरामांच्या वियोगामध्येही ज्याअर्थी मला माझे प्राण प्रिय वाटत आहेत, त्याअर्थी यापुढेही मला आणखी बरेच काही पाहात व ऐकत राहावे लागेल.॥ १॥

**लखन राम सिय कहुँ बनु दीन्हा। पठइ अमरपुर पति हित कीन्हा॥**
**लीन्ह बिधवपन अपजसु आपू। दीन्हेउ प्रजहि सोकु संतापू॥**

लक्ष्मण, श्रीराम व सीता यांना तर वन दिले, पतीला स्वर्गाला पाठवून त्याचे कल्याण केले, स्वतः वैधव्य आणि अपकीर्ती पत्करली, प्रजेला शोक आणि त्रास दिला.॥ २॥

**मोहि दीन्ह सुखु सुजसु सुराजू। कीन्ह कैकईं सब कर काजू॥**
**एहि तें मोर काह अब नीका। तेहि पर देन कहहु तुम्ह टीका॥**

आणि मला सुख, सुंदर कीर्ती आणि उत्तम राज्य दिले. कैकेयीने सर्वांचे काम पूर्ण केले. यापेक्षा चांगले आता माझ्यासाठी आणखी काय असणार? त्यावरही तुम्ही सर्व लोक मला राजतिलक करायचा असे म्हणता!॥ ३॥

**कैकइ जठर जनमि जग माहीं। यह मोहि कहँ कछु अनुचित नाहीं॥**
**मोरि बात सब बिधिहिं बनाई। प्रजा पाँच कत करहु सहाई॥**

या जगात कैकेयीच्या पोटी जन्म घेतल्यामुळे मला आता काहीही अनुचित नाही. माझे सर्व कार्य विधात्याने पूर्ण करून टाकले आहे. मग प्रजा व तुम्ही पंच लोक मला मदत का करीत आहात?॥ ४॥

**दो०—ग्रह ग्रहीत पुनि बात बस तेहि पुनि बीछी मार।**
**तेहि पिआइअ बारुनी कहहु काह उपचार॥ १८०॥**

ज्याला पिशाचाने झपाटले आहे, त्यात जो वायुरोगाने पछाडला आहे, त्यातच ज्याला विंचवाने दंश केला, आणि वरून जर मद्य पाजले, तर हा कसला उपाय म्हणायचा?॥ १८०॥

**कैकइ सुअन जोगु जग जोई। चतुर बिरंचि दीन्ह मोहि सोई॥**
**दसरथ तनय राम लघु भाई। दीन्हि मोहि बिधि बादि बड़ाई॥**

कैकेयीचा मुलगा म्हणून जगात जे काही योग्य होते, तेच चतुर विधात्याने मला दिले. परंतु 'दशरथांचा पुत्र' व 'श्रीरामांचा लहान भाऊ' होण्याचा मोठेपणा विधात्याने मला विनाकारण दिला.॥ १॥

**तुम्ह सब कहहु कढ़ावन टीका। राय रजायसु सब कहँ नीका॥**
**उतरु देउँ केहि बिधि केहि केही। कहहु सुखेन जथा रुचि जेही॥**

तुम्ही सर्वजण मला राजतिलक लावण्यास सांगत आहात. राजांची आज्ञा सर्वांनाच चांगली वाटते. मी कुणाकुणाला व कशाकशाप्रकारे उत्तर देऊ? ज्याला जे आवडते, तेच तुम्ही खुशाल सांगा.॥ २॥

**मोहि कुमातु समेत बिहाई। कहहु कहिहि के कीन्ह भलाई॥**
**मो बिनु को सचराचर माहीं। जेहि सिय रामु प्रानप्रिय नाहीं॥**

माझी दुष्ट आई कैकेयी व मी यांना सोडून आणखी कोण असे म्हणेल की, हे काम मी चांगले केले आहे? ज्याला श्रीराम हे प्राणांसमान प्रिय नाहीत, असा या चराचर जगात माझ्याशिवाय आणखी कोण आहे?॥ ३॥

**परम हानि सब कहँ बड़ लाहू। अदिनु मोर नहिं दूषन काहू॥**
**संसय सील प्रेम बस अहहू। सबुइ उचित सब जो कछु कहहू॥**

ज्यामध्ये अत्यंत हानी आहे, त्यातच सर्वांना मोठा लाभ दिसत आहे. दिवस वाईट आहेत, यात दुसऱ्या कोणाचा दोष नाही. तुम्ही सर्व जे काही म्हणत आहात, ते सर्व योग्यच आहे. कारण तुम्ही संशय, शील व प्रेमाला वश झालेले आहात.॥ ४॥

**दो०—राम मातु सुठि सरलचित मो पर प्रेमु बिसेषि।**
**कहइ सुभाय सनेह बस मोरि दीनता देखि॥ १८१॥**

कौसल्या माता फारच सरळ मनाची आहे आणि माझ्यावर तिचे खास प्रेम आहे. म्हणून माझी दैन्यावस्था पाहून ती स्वाभाविक प्रेमापोटीच असे म्हणत आहे.॥ १८१॥

**गुर बिबेक सागर जगु जाना। जिन्हहि बिस्व कर बदर समाना॥**
**मो कहँ तिलक साज सज सोऊ। भएँ बिधि बिमुख बिमुख सबु कोऊ॥**

गुरुजी ज्ञानाचे समुद्र आहेत. सर्व जग जाणते की, विश्व हे त्यांच्या तळहातावर ठेवलेल्या बोराप्रमाणे प्रत्यक्ष आहे. तेसुद्धा माझ्यासाठी राजतिलकाचा थाट मांडत आहेत. दैव प्रतिकूल झाल्यावर सर्वजण प्रतिकूल होतात, हेच खरे.॥ १॥

**परिहरि रामु सीय जग माहीं। कोउ न कहिहि मोर मत नाहीं॥**
**सो मैं सुनब सहब सुखु मानी। अंतहुँ कीच तहाँ जहँ पानी॥**

या अनर्थामध्ये माझी संमती नव्हती, असे श्रीराम व सीता यांना सोडून या जगात कोणीही म्हणणार नाही. मी अगदी सुखाने ते ऐकेन व सहन करीन. कारण जेथे पाणी असते, तेथे शेवटी चिखल हा असतोच. ॥ २ ॥

**डरु न मोहि जग कहिहि कि पोचू। परलोकहु कर नाहिन सोचू॥**
**एकइ उर बस दुसह दवारी। मोहि लगि भे सिय रामु दुखारी॥**

जग वाईट म्हणेल, याची मला भीती नाही किंवा परलोकाची मला काळजी नाही. माझ्यामुळे श्रीसीताराम दुःखी झाले, हाच एक दुःसह दावानल माझ्या हृदयात भडकलेला आहे. ॥ ३ ॥

**जीवन लाहु लखन भल पावा। सबु तजि राम चरन मनु लावा॥**
**मोर जनम रघुबर बन लागी। झूठ काह पछिताउँ अभागी॥**

ज्याने सर्व काही सोडून श्रीरामांच्या चरणी मन मग्न केले, त्या लक्ष्मणाने जीवनाचा उत्तम लाभ मिळविला. श्रीरामांना वनवास मिळावा, यासाठीच माझा जन्म झाला होता. दुर्दैवी अशा मी खोटा खोटा कशासाठी पश्चात्ताप करावा ? ॥ ४ ॥

दो०—**आपनि दारुन दीनता कहउँ सबहि सिरु नाइ।**
**देखें बिनु रघुनाथ पद जिय कै जरनि न जाइ॥ १८२॥**

मी मस्तक नम्र करून सर्वांना आपले दारुण दैन्य सांगत आहे. श्रीरामांच्या चरणांचे दर्शन घडल्याशिवाय माझ्या मनाची तगमग जाणार नाही. ॥ १८२ ॥

**आन उपाउ मोहि नहिं सूझा। को जिय कै रघुबर बिनु बूझा॥**
**एकहिं आँक इहइ मन माहीं। प्रातकाल चलिहउँ प्रभु पाहीं॥**

दुसरा कोणताही उपाय मला सुचत नाही. श्रीरामांच्याविना माझ्या मनातील गोष्ट कोण जाणू शकेल ? माझ्या मनात एकच निश्चय आहे की, उद्या सकाळी मी प्रभू रामांच्याकडे जाण्यासाठी निघेन. ॥ १ ॥

**जद्यपि मैं अनभल अपराधी। भै मोहि कारन सकल उपाधी॥**
**तदपि सरन सनमुख मोहि देखी। छमि सब करिहहिं कृपा बिसेषी॥**

जरी मी वाईट आहे आणि अपराधी आहे आणि माझ्यामुळेच हा सर्व उपद्रव घडला आहे, तरी श्रीरामांना शरण गेल्यावर ते माझे सर्व अपराध क्षमा करून माझ्यावर विशेष कृपा करतील. ॥ २ ॥

**सील सकुच सुठि सरल सुभाऊ। कृपा सनेह सदन रघुराऊ॥**
**अरिहुक अनभल कीन्ह न रामा। मैं सिसु सेवक जद्यपि बामा॥**

श्रीरघुनाथ हे सद्‌वर्तनी, संकोची, अत्यंत सरळ स्वभावाचे आणि कृपा व स्नेहाचे घर आहेत. श्रीरामांनी कधी शत्रूचेही अनिष्ट केलेले नाही. मग मी जरी कुटिल असलो, तरी त्यांचा बालक व दासच आहे. ॥ ३ ॥

**तुम्ह पै पाँच मोर भल मानी । आयसु आसिष देहु सुबानी ॥**
**जेहिं सुनि बिनय मोहि जनु जानी । आवहिं बहुरि रामु रजधानी ॥**

माझी विनंती मान्य करून व मला आपला दास मानून श्रीरामचंद्र राजधानीला परत येतील. यामध्येच माझे कल्याण आहे, असे समजून तुम्ही सर्व पंच लोकांनी मला सरळ मनाने आज्ञा व आशीर्वाद द्यावा. ॥ ४ ॥

दो०—**जद्यपि जनमु कुमातु तें मैं सठु सदा सदोस।**
**आपन जानि न त्यागिहहिं मोहि रघुबीर भरोस॥ १८३ ॥**

जरी माझा जन्म कुमातेपासून झालेला आहे आणि मी दुष्ट व सदा दोषीसुद्धा आहे, तरी श्रीराम मला आपला मानून माझा त्याग करणार नाहीत, असा मला विश्वास आहे.' ॥ १८३ ॥

**भरत बचन सब कहँ प्रिय लागे । राम सनेह सुधाँ जनु पागे ॥**
**लोग बियोग बिषम बिष दागे । मंत्र सबीज सुनत जनु जागे ॥**

भरताचे बोलणे सर्वांना आवडले. जणू ते श्रीरामांच्या प्रेमरूपी अमृतामध्ये ओथंबलेले होते. श्रीरामवियोगरूपी भीषण विषामुळे सर्व लोक पोळून निघाले होते, ते जणू भरतवचनरूप सबीज मंत्र ऐकताच सावध झाले. ॥ १ ॥

**मातु सचिव गुर पुर नर नारी । सकल सनेहँ बिकल भए भारी ॥**
**भरतहि कहहिं सराहि सराही । राम प्रेम मूरति तनु आही ॥**

माता, मंत्री, गुरू, नगरातील स्त्री-पुरुष सर्वजण श्रीरामांवरील स्नेहामुळे फारच व्याकूळ झाले. सर्वजण भरताची प्रशंसा करीत म्हणाले की, 'तुमचा देह म्हणजे श्रीरामप्रेमाची प्रत्यक्ष मूर्तीच होय. ॥ २ ॥

**तात भरत अस काहे न कहहू । प्रान समान राम प्रिय अहहू ॥**
**जो पावँरु अपनी जड़ताईं । तुम्हहि सुगाइ मातु कुटिलाईं ॥**

हे कुमार भरत, तुम्ही असे का म्हणत नाही? श्रीरामांना तुम्ही प्राण-प्रिय आहात. जो नीच माणूस स्वतःच्या मूर्खपणाने माता कैकेयीच्या दुष्टपणामुळे तुमच्यावर संशय घेईल, ॥ ३ ॥

**सो सठु कोटिक पुरुष समेता । बसिहि कलप सत नरक निकेता ॥**
**अहि अघ अवगुन नहिं मनि गहई । हरइ गरल दुख दारिद दहई ॥**

तो दुष्ट आपल्या कोट्यवधी पूर्वजांसह शंभर कल्पांपर्यंत नरकात पडेल. सापाचे विष व अवगुण हे मण्याला लागत नाहीत; उलट तो मणी विषाचे हरण करतो आणि दुःख व दारिद्र्य नष्ट करतो. ॥ ४ ॥

दो०—**अवसि चलिअ बन रामु जहँ भरत मंत्रु भल कीन्ह।**
**सोक सिंधु बूड़त सबहि तुम्ह अवलंबनु दीन्ह॥ १८४॥**

हे भरता, जेथे श्रीराम आहेत, त्या वनात अवश्य जाऊ या. तुम्ही फार चांगला विचार मांडला. शोक-समुद्रात बुडणाऱ्या सर्व लोकांना तुम्ही मोठा आधार दिला.'॥ १८४॥

**भा सब कें मन मोदु न थोरा। जनु घन धुनि सुनि चातक मोरा॥**
**चलत प्रात लखि निरनउ नीके। भरतु प्रानप्रिय भे सबही के॥**

सर्वांच्या मनाला खूप आनंद झाला. जणू मेघांची गर्जना ऐकून चातक व मोर आनंदून गेले. दुसऱ्या दिवशी सकाळी निघण्याचा चांगला निर्णय जाणून सर्वांना भरत प्राणप्रिय बनला.॥ १॥

**मुनिहि बंदि भरतहि सिरु नाई। चले सकल घर बिदा कराई॥**
**धन्य भरत जीवनु जग माहीं। सीलु सनेहु सराहत जाहीं॥**

मुनी वसिष्ठांना वंदन करून व भरतापुढे मस्तक नमवून सर्व लोक निरोप घेऊन आपापल्या घरी निघाले. 'जगामध्ये भरताचे जीवन धन्य होय.' असे म्हणत व त्याच्या स्वभावाची व स्नेहाची वाखाणणी करीत ते जात होते.॥ २॥

**कहहिं परसपर भा बड़ काजू। सकल चलै कर साजहिं साजू॥**
**जेहि राखहिं रहु घर रखवारी। सो जानइ जनु गरदनि मारी॥**

'मोठे काम झाले', असे ते एकमेकांना म्हणत होते. सर्वजण जाण्याची तयारी करू लागले. तू घरच्या रखवालीसाठी राहा, असे जर कुणाला म्हटले, तर त्याला वाटे की, जणू आपला गळाच कापला गेला.॥ ३॥

**कोउ कह रहन कहिअ नहिं काहू। को न चहइ जग जीवन लाहू॥**

काहीजण म्हणत होते की, घरात राहायला कुणालाही सांगू नका. जगात जीवनाचा लाभ कुणाला नको असतो?॥ ४॥

दो०—**जरउ सो संपति सदन सुखु सुहृद मातु पितु भाइ।**
**सनमुख होत जो राम पद करै न सहस सहाइ॥ १८५॥**

ती संपत्ती, घर, सुख, मित्र, माता-पिता, बंधू हे सर्व जर श्रीरामांच्या चरणी जाण्यास अनेक प्रकारे मदत करीत नसतील, तर ते जळून जावोत.॥ १८५॥

**घर घर साजहिं बाहन नाना। हरषु हृदयँ परभात पयाना॥**
**भरत जाइ घर कीन्ह बिचारू। नगरु बाजि गज भवन भँडारू॥**

घरोघरी लोक अनेक प्रकारची वाहने सज्ज करू लागले. सकाळी निघायचे आहे, याचा मनात मोठा आनंद होता. भरताने घरी जाऊन विचार केला की नगर, घोडे, हत्ती, महाल, खजिना इत्यादी, ॥ १ ॥

**संपति सब रघुपति कै आही । जौं बिनु जतन चलौं तजि ताही ॥**
**तौ परिनाम न मोरि भलाई । पाप सिरोमनि साइँ दोहाई ॥**

सारी संपत्ती श्रीरघुनाथांची आहे. तिच्या रक्षणाची व्यवस्था न करता ती तशीच सोडून जाणे, हे परिणामी माझ्या हिताचे नाही. कारण स्वामींचा द्रोह करणे, हे सर्व पापांचा शिरोमणी आहे. ॥ २ ॥

**करइ स्वामि हित सेवकु सोई । दूषन कोटि देइ किन कोई ॥**
**अस बिचारि सुचि सेवक बोले । जे सपनेहुँ निज धरम न डोले ॥**

कोणी कितीही वाईट म्हटले तरी जो स्वामीचे हित जपतो, तोच सेवक होय. असा विचार करून भरताने विश्वासातील सेवकांना बोलावले की, जे स्वप्नातसुद्धा आपल्या कर्तव्यापासून कधी ढळले नव्हते. ॥ ३ ॥

**कहि सबु मरमु धरमु भल भाषा । जो जेहि लायक सो तेहिं राखा ॥**
**करि सबु जतनु राखि रखवारे । राम मातु पहिं भरतु सिधारे ॥**

भरताने त्यांना सर्व रहस्य सांगून खरे कर्तव्य काय ते सांगितले. प्रत्येकाला ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे कामावर नेमले. सर्व व्यवस्था करून व रखवालदारांना ठेवून भरत राममाता कौसल्येकडे गेला. ॥ ४ ॥

दो०—**आरत जननी जानि सब भरत सनेह सुजान।**
**कहेउ बनावन पालकीं सजन सुखासन जान॥ १८६ ॥**

प्रेमाचे तत्त्व जाणणाऱ्या भरताने सर्व माता दु:खी असल्याचे पाहून त्यांच्यासाठी पालख्या व सुखदायक वाहने सज्ज करण्यास सांगितले. ॥ १८६ ॥

**चक्क चक्कि जिमि पुर नर नारी । चहत प्रात उर आरत भारी ॥**
**जागत सब निसि भयउ बिहाना । भरत बोलाए सचिव सुजाना ॥**

नगरातील स्त्री-पुरुष चकवा-चकवीप्रमाणे मनात अत्यंत आतुर होऊन प्रात:काल होण्याची वाट पाहात होते. सर्व रात्र जागता जागता सकाळ झाली. मग भरताने चतुर मंत्र्यांना बोलाविले. ॥ १ ॥

**कहेउ लेहु सबु तिलक समाजू । बनहिं देब मुनि रामहि राजू ॥**
**बेगि चलहु सुनि सचिव जोहारे । तुरत तुरग रथ नाग सँवारे ॥**

आणि म्हटले, 'राजतिलकाचे सर्व सामान घेऊन चला. वसिष्ठ मुनी वनातच श्रीरामांना राज्य देतील, घाई करा.' हे ऐकून मंत्र्यांनी वंदन केले आणि घोडे, रथ व हत्ती लगेच सज्ज केले. ॥ २ ॥

**अरुंधती अरु अगिनि समाऊ । रथ चढ़ि चले प्रथम मुनिराऊ ॥**
**बिप्र बृंद चढ़ि बाहन नाना । चले सकल तप तेज निधाना ॥**

सर्वप्रथम मुनिराज वसिष्ठ व अरुंधती अग्निहोत्राचे सर्व सामान घेऊन रथात बसून निघाले. त्यानंतर जे सर्व तपस्या व तेजाचे भांडार होते, ते ब्राह्मणांचे समूह अनेक वाहनांतून निघाले. ॥ ३ ॥

**नगर लोग सब सजि सजि जाना । चित्रकूट कहँ कीन्ह पयाना ॥**
**सिबिका सुभग न जाहिं बखानी । चढ़ि चढ़ि चलत भईं सब रानी ॥**

नगरातील सर्व लोक रथ सज्ज करून चित्रकूटाला जाण्यासाठी निघाले. ज्यांचे वर्णन करता येत नाही, अशा सुंदर पालख्यांमध्ये बसून सर्व राण्या निघाल्या. ॥ ४ ॥

दो०—**सौंपि नगर सुचि सेवकनि सादर सकल चलाइ।**
**सुमिरि राम सिय चरन तब चले भरत दोउ भाइ ॥ १८७ ॥**

विश्वासू सेवकांवर नगर-रक्षणाचे काम सोपवून आणि सर्वांना आदराने रवाना केल्यावर मग श्रीसीतारामांच्या चरणांचे स्मरण करीत भरत-शत्रुघ्न हे दोघे बंधू निघाले. ॥ १८७ ॥

**राम दरस बस सब नर नारी । जनु करि करिनि चले तकि बारी ॥**
**बन सिय रामु समुझि मन माहीं । सानुज भरत पयादेहिं जाहीं ॥**

श्रीरामांच्या दर्शनाच्या तीव्र लालसेमुळे सर्व स्त्री-पुरुष असे निघाले की, जणू तहानलेले हत्ती-हत्तीण पाणी पाहून मोठ्या वेगाने वेडे झाल्यासारखे जावेत. श्रीसीताराम सर्व सुखांचा त्याग करून वनात आहेत, या विचाराने शत्रुघ्नासह भरत पायी जात होता. ॥ १ ॥

**देखि सनेहु लोग अनुरागे । उतरि चले हय गय रथ त्यागे ॥**
**जाइ समीप राखि निज डोली । राम मातु मृदु बानी बोली ॥**

त्यांचे ते राम-प्रेम पाहून सर्व लोक घोडे, हत्ती, रथ अशी वाहने सोडून प्रेमाने पायी चालू लागले. तेव्हा कौसल्या माता भरताजवळ आपली पालखी थांबवून कोमल वाणीने म्हणाली, ॥ २ ॥

**तात चढ़हु रथ बलि महतारी । होइहि प्रिय परिवारु दुखारी ॥**
**तुम्हरें चलत चलिहि सबु लोगू । सकल सोक कृस नहिं मग जोगू ॥**

बाळा! ही माता तुझ्यावरून जीव ओवाळते. तू रथात बैस, नाहीतर सर्व आप्त-परिवार दुःखी होईल. तू पायी चालल्याने सर्वच लोक पायी चालू लागतील. शोकामुळे सर्व लोक आधीच दुबळे झाले आहेत आणि वाटही पायी चालण्याजोगी नाही. ॥ ३ ॥

**सिर धरि बचन चरन सिरु नाई। रथ चढ़ि चलत भए दोउ भाई॥**
**तमसा प्रथम दिवस करि बासू। दूसर गोमति तीर निवासू॥**

आईची आज्ञा शिरोधार्य मानून आणि तिच्या चरणी मस्तक ठेवून दोघे बंधू रथात बसून निघाले. पहिल्या दिवशी तमसा नदीच्या तीरावर मुक्काम करून दुसरा मुक्काम गोमती नदीच्या तीरावर केला. ॥ ४ ॥

दो०—**पय अहार फल असन एक निसि भोजन एक लोग।**
**करत राम हित नेम ब्रत परिहरि भूषन भोग॥ १८८॥**

कुणी फक्त दूधच पीत होते, कुणी फलाहार घेत होते आणि काही लोक रात्री एकदाच भोजन घेत होते. भूषण व भोग-विलास यांचा त्याग करून सर्व लोक श्रीरामांच्यासाठी नियम व व्रत करीत होते. ॥

**सई तीर बसि चले बिहाने। सृंगबेरपुर सब निअराने॥**
**समाचार सब सुने निषादा। हृदयँ बिचार करइ सबिषादा॥**

रात्रभर सई नदीच्या तटावर मुक्काम करून सकाळी तेथून निघाले आणि सर्वजण शृंगवेरपुराजवळ पोहोचले. निषादराजाला भरत सैन्यासह आला आहे, ही वार्ता कळली, तेव्हा तो दुःखी होऊन मनात विचार करू लागला— ॥ १ ॥

**कारन कवन भरतु बन जाहीं। है कछु कपट भाउ मन माहीं॥**
**जौं पै जियँ न होति कुटिलाई। तौ कत लीन्ह संग कटकाई॥**

कशासाठी भरत वनात निघाला आहे? त्याच्या मनात नक्की काही कपट आहे. जर मनात दुष्टता नसती, तर मग बरोबर सेना घेऊन तो का निघाला असता?॥ २ ॥

**जानहिं सानुज रामहि मारी। करउँ अकंटक राजु सुखारी॥**
**भरत न राजनीति उर आनी। तब कलंकु अब जीवन हानी॥**

लहान भाऊ लक्ष्मणासह श्रीरामांना मारून सुखाने निष्कंटक राज्य करावे, असे त्याला वाटत असेल. भरताने मनात राजनीतीचा काही विचार केलेला नाही. पूर्वी कलंकच लागला होता. आता जीवही गमवावा लागेल. ॥ ३ ॥

**सकल सुरासुर जुरहिं जुझारा। रामहि समर न जीतनिहारा॥**
**का आचरजु भरतु अस करहीं। नहिं बिष बेलि अमिअ फल फरहीं॥**

सर्व देव व दैत्यवीर जरी जमले, तरी श्रीरामांना युद्धात कोणी जिंकू शकणार नाही. तसे पाहिले तर भरत जे करीत आहे, त्यात आश्चर्य काय? विषाच्या वेलींना अमृतफळे कधी लागत नाहीत. ॥ ४ ॥

दो०—**अस बिचारि गुहँ ग्याति सन कहेउ सजग सब होहु।**
**हथवाँसहु बोरहु तरनि कीजिअ घाटारोहु॥ १८९॥**

असा विचार करून गुहाने आपल्या समाजाला सांगितले की, 'सर्व लोक सावध व्हा. नावा ताब्यात घ्या आणि बुडवून टाका. सर्व घाट अडवा. ॥ १८९ ॥

**होहु सँजोइल रोकहु घाटा। ठाटहु सकल मरै के ठाटा॥**
**सनमुख लोह भरत सन लेऊँ। जिअत न सुरसरि उतरन देऊँ॥**

शस्त्रांनी सुसज्ज होऊन घाट अडवा व सर्वजण युद्ध करण्यासाठी मरायला तयार व्हा. मी भरताशी समोरासमोर युद्ध करीन आणि जिवात जीव असेपर्यंत त्याला गंगानदी पार करू देणार नाही. ॥ १ ॥

**समर मरनु पुनि सुरसरि तीरा। राम काजु छनभंगु सरीरा॥**
**भरत भाइ नृपु मैं जन नीचू। बड़ें भाग असि पाइअ मीचू॥**

युद्धात मरण, त्यात गंगेचा तट, त्यातही श्रीरामांचे कार्य; आणि हे क्षणभंगुर शरीर नष्ट होणारच आहे. भरत हा श्रीरामांचा भाऊ आणि राजा आहे आणि मी क्षुद्र सेवक आहे. त्याच्या हातून मरण मिळणे हे तर मोठ्या भाग्याचे आहे. ॥ २ ॥

**स्वामि काज करिहउँ रन रारी। जस धवलिहउँ भुवन दस चारी॥**
**तजउँ प्रान रघुनाथ निहोरें। दुहूँ हाथ मुद मोदक मोरें॥**

मी स्वामींच्या कार्यासाठी रणामध्ये युद्ध करीन आणि चौदा लोकांमध्ये आपली कीर्ती उज्ज्वल करीन. श्रीरघुनाथांच्यासाठी प्राणांचा त्याग करीन. जिंकलो तर रामसेवक म्हणून कीर्ती मिळवीन आणि मारला गेलो तर श्रीरामांची नित्य सेवा मला मिळेल. दोन्हीकडून माझा लाभच आहे. ॥ ३ ॥

**साधु समाज न जाकर लेखा। राम भगत महुँ जासु न रेखा॥**
**जायँ जिअत जग सो महि भारू। जननी जौबन बिटप कुठारू॥**

साधूंच्या समाजात ज्याची गणना होत नाही आणि श्रीरामांच्या भक्तांत ज्याला स्थान नाही, तो या जगात पृथ्वीला भार बनून व्यर्थ जगतो. तो म्हणजे मातेच्या यौवनरूपी वृक्षाला तोडणारी कुऱ्हाडच आहे.' ॥ ४ ॥

दो०—**बिगत बिषाद निषादपति सबहि बढ़ाइ उछाहु।**
**सुमिरि राम मागेउ तुरत तरकस धनुष सनाहु॥ १९०॥**

अशा प्रकारे श्रीरामांसाठी प्राण अर्पण करण्याचा निश्चय केल्यावर निषादराजाचा विषाद नाहीसा झाला आणि सर्वांना प्रोत्साहन देऊन व श्रीरामांचे स्मरण करून त्याने बाणांचा भाता, धनुष्य आणि कवच मागविले. ॥ १९० ॥

**बेगहु भाइहु सजहु सँजोऊ। सुनि रजाइ कदराइ न कोऊ॥**
**भलेहिं नाथ सब कहहिं सहरषा। एकहिं एक बढ़ावइ करषा॥**

तो म्हणाला, ‘बंधूनो, त्वरा करा आणि सर्व सामान घेऊन सज्ज व्हा. माझी आज्ञा ऐकून मनात घाबरू नका.’ तेव्हा सर्वजण आनंदाने म्हणाले, ‘हे नाथ! फारच छान!’ आणि ते एकमेकांना उत्साह देऊ लागले. ॥ १ ॥

**चले निषाद जोहारि जोहारी। सूर सकल रन रूचइ रारी॥**
**सुमिरि राम पद पंकज पनहीं। भाथीं बाँधि चढ़ाइन्हि धनहीं॥**

निषादराजाला जोहार करून सर्व निषाद निघाले. सर्वजण शूर होते आणि युद्धाची त्यांना खुमखुमी होती. श्रीरामचंद्रांच्या चरण-कमलांच्या पादुकांचे स्मरण करून त्यांनी भाते बांधले आणि आपल्या लहान लहान धनुष्यांना दोऱ्या लावल्या. ॥ २ ॥

**अँगरी पहिरि कूँड़ि सिर धरहीं। फरसा बाँस सेल सम करहीं॥**
**एक कुसल अति ओड़न खाँड़े। कूदहिं गगन मनहुँ छिति छाँड़े॥**

त्यांनी चिलखते घालून डोक्यावर पोलादी टोप घातले आणि परशू, भाले, बरछ्या व्यवस्थित करू लागले. कोणी तलवारीचे वार थोपविण्यामध्ये अत्यंत कुशल होते. त्यांच्या मनात असा उत्साह भरला होता की, जणू जमीन सोडून ते आकाशात झेपावत आहेत. ॥ ३ ॥

**निज निज साजु समाजु बनाई। गुह राउतहि जोहारे जाई॥**
**देखि सुभट सब लायक जाने। लै लै नाम सकल सनमाने॥**

आपापले सामान व दळे बनवून त्यांनी निषादराज गुह याला जोहार केला. निषादराजाने सर्वजण सुयोग्य योद्धे आहेत, असे पाहून त्यांची नावे घेऊन त्यांचा सन्मान केला. ॥ ४ ॥

दो०—**भाइहु लावहु धोख जनि आजु काज बड़ मोहि।**
**सुनि सरोष बोले सुभट बीर अधीर न होहि॥ १९१ ॥**

तो म्हणाला, ‘बंधूंनो, मरणाला घाबरू नका. आज माझी फार मोठी कामगिरी आहे.’ हे ऐकून सर्व योद्धे मोठ्या जोषाने एक स्वरात म्हणाले, ‘हे वीरश्रेष्ठा! भिऊ नका. ॥ १९१ ॥

**राम प्रताप नाथ बल तोरे। करहिं कटकु बिनु भट बिनु घोरे॥**
**जीवत पाउ न पाछें धरहीं। रुंड मुंडमय मेदिनि करहीं॥**

हे नाथ! श्रीरामचंद्रांच्या प्रतापामुळे आणि तुमच्या बळावर आम्ही भरताच्या सेनेमधील एक एक वीर व घोडे मारून टाकू. जिवात जीव असेतोपर्यंत मागे फिरणार नाही. पृथ्वीला मुंडकी आणि धडांनी भरून टाकू.’ ॥ १ ॥

**दीख निषादनाथ भल टोलू। कहेउ बजाउ जुझाऊ ढोलू॥**
**एतना कहत छींक भइ बाँए। कहेउ सगुनिअन्ह खेत सुहाए॥**

निषादराजाने आपल्या वीरांचे उत्कृष्ट दल पाहून म्हटले, ‘लढाईचा ढोल वाजवा.’ एवढे म्हणताच डावीकडे कुणी तरी शिंकले. शकुन जाणणारे म्हणाले की, ‘जय होणार’.॥ २॥

**बूढ़ु एकु कह सगुन बिचारी। भरतहि मिलिअ न होइहि रारी॥**
**रामहि भरतु मनावन जाहीं। सगुन कहइ अस बिग्रहु नाहीं॥**

एका वयोवृद्धाने शकुनाचा विचार करून सांगितले की, ‘भरताला भेटून घ्या. त्याच्याशी युद्ध होणार नाही. भरत श्रीरामचंद्रांचे मन वळविण्यासाठी जात आहे, विरोध नाही, असे शकुन सांगतो.’॥ ३॥

**सुनि गुह कहइ नीक कह बूढ़ा। सहसा करि पछिताहिं बिमूढ़ा॥**
**भरत सुभाउ सीलु बिनु बूझें। बड़ि हित हानि जानि बिनु जूझें॥**

हे ऐकल्यावर निषादराज गुह म्हणाला, ‘म्हातारा योग्य सांगत आहे. घाईने कोणतेही काम केल्यावर मूर्ख लोकांना पश्चात्ताप करावा लागतो. भरताचा स्वभाव जाणून घेतल्याविना युद्ध करण्यामध्ये हिताची मोठी हानी होईल. ॥ ४॥

दो०—**गहहु घाट भट समिटि सब लेउँ मरम मिलि जाइ।**
**बूझि मित्र अरि मध्य गति तस तब करिहउँ आइ॥ १९२॥**

म्हणून हे वीरांनो! तुम्ही सर्वजण जमून सर्व घाट रोखून धरा. मी जाऊन भरताला भेटून त्याचा मानस जाणून घेतो. त्याच्या मनातील भाव मित्राचा आहे, शत्रूचा, की तटस्थपणाचा हे जाणून घेतल्यावर तशी व्यवस्था करू या.॥ १९२॥

**लखब सनेहु सुभायँ सुहाएँ। बैरु प्रीति नहिं दुरइँ दुराएँ॥**
**अस कहि भेंट सँजोवन लागे। कंद मूल फल खग मृग मागे॥**

त्याच्या चांगल्या स्वभावावरून त्याचे प्रेम मी ओळखेन. प्रेम आणि वैर हे लपविल्याने लपत नाहीत.’ असे म्हणून त्याने भेटीसाठी सामान गोळा केले. कंदमुळे, फळे, पक्षी व हरणे मागविली.॥ १॥

**मीन पीन पाठीन पुराने। भरि भरि भार कहारन्ह आने॥**
**मिलन साजु सजि मिलन सिधाए। मंगल मूल सगुन सुभ पाए॥**

कोळी लोकांनी जून व पुष्ट असलेल्या पहिना नावाच्या माशांचे भारे भरून आणले. भेटीचे सामान सज्ज करून गुह निघाला, तेव्हा मंगलदायक शुभशकुन झाले.॥ २॥

**देखि दूरि तें कहि निज नामू। कीन्ह मुनीसहि दंड प्रनामू॥**
**जानि रामप्रिय दीन्हि असीसा। भरतहि कहेउ बुझाइ मुनीसा॥**

निषादराजाने मुनिराज वसिष्ठांना पाहून आपले नाव सांगून लांबूनच दंडवत प्रणाम केला. मुनीश्वर वसिष्ठांनी त्याला रामाचा प्रिय समजून आशीर्वाद दिला आणि भरताला समजावून सांगितले की, ‘हा श्रीरामांचा मित्र आहे.’॥ ३॥

**राम सखा सुनि संदनु त्यागा। चले उतरि उमगत अनुरागा॥**
**गाउँ जाति गुहँ नाउँ सुनाई। कीन्ह जोहारु माथ महि लाई॥**

'हा श्रीरामांचा मित्र आहे,' एवढे ऐकताच भरत रथातून उतरला. तो रथातून उतरून प्रेमाच्या उत्साहाने त्याच्याकडे जाऊ लागला. निषादराज गुहाने आपले गाव, जात व नाव सांगून भूमीवर माथा टेकून जोहार केला.॥ ४॥

दो०—**करत दंडवत देखि तेहि भरत लीन्ह उर लाइ।**
**मनहुँ लखन सन भेंट भइ प्रेमु न हृदयँ समाइ॥ १९३॥**

तो दंडवत करीत आहे, असे पाहून भरताने त्याला उठवून मिठी मारली. त्याच्या मनात प्रेम सामावत नव्हते. जणू काही प्रत्यक्ष लक्ष्मणाची भेट झाली, असे त्याला वाटले.॥ १९३॥

**भेंटत भरतु ताहि अति प्रीती। लोग सिहाहिं प्रेम कै रीती॥**
**धन्य धन्य धुनि मंगल मूला। सुर सराहि तेहि बरिसहिं फूला॥**

भरताने मोठ्या प्रेमाने आलिंगन दिले. प्रेमाची ही रीत पाहून सर्व लोक प्रशंसा करू लागले. मांगल्याचे मूळ असलेले 'धन्य, धन्य' असे म्हणत देव त्याची स्तुती करीत फुलांचा वर्षाव करू लागले. ॥ १॥

**लोक बेद सब भाँतिहिं नीचा। जासु छाँह छुइ लेइअ सींचा॥**
**तेहि भरि अंक राम लघु भ्राता। मिलत पुलक परिपूरित गाता॥**

ते म्हणत होते की, 'ज्याला लौकिक दृष्ट्या व वेद-मताप्रमाणे नीच मानले जाते, ज्याच्या सावलीचा स्पर्श झाल्यास स्नान करावे लागते, त्याच निषादाला मिठी मारून श्रीरामचंद्रांचा भाऊ भरत हा आनंदाने व प्रेमाने रोमांचित होऊन त्याला भेटत आहे.॥ २॥

**राम राम कहि जे जमुहाहीं। तिन्हहि न पाप पुंज समुहाहीं॥**
**यह तौ राम लाइ उर लीन्हा। कुल समेत जगु पावन कीन्हा॥**

जे लोक जांभई देताना राम-राम म्हणतात, म्हणजेच, आळसामध्ये का होईना, ज्यांच्या मुखातून राम-नाम येते, त्यांच्यासमोर पापांचे समूह फिरकत नाहीत. या गुहाला तर प्रत्यक्ष श्रीरामांनी आलिंगन दिले आणि त्याला सहकुटुंब जगाला पवित्र करणारा बनवून टाकले.॥ ३॥

**करमनास जलु सुरसरि परई। तेहि को कहहु सीस नहिं धरई॥**
**उलटा नामु जपत जगु जाना। बालमीकि भए ब्रह्म समाना॥**

कर्मनाशा नदीचे पाणी गंगेला मिळते, तेव्हा ते शिरावर कोण धारण करीत नाही, सांगा बरे! मरा, मरा असे उलटे नाम जपल्याने वाल्मीकी ब्रह्मस्वरूप झाले, हे जगाला माहीत आहे.॥ ४॥

दो०—**स्वपच सबर खस जमन जड़ पावँर कोल किरात।**
**रामु कहत पावन परम होत भुवन बिख्यात॥ १९४॥**

चांडाळ, शबर, खस, यवन, कोल, किरात इत्यादी मूर्ख व क्षुद्रसुद्धा रामनाम घेतल्यामुळे अत्यंत पवित्र आणि त्रिभुवनात विख्यात होतात,॥ १९४॥

**नहि अचिरिजु जुग जुग चलि आई। केहि न दीन्हि रघुबीर बड़ाई॥**
**राम नाम महिमा सुर कहहीं। सुनि सुनि अवध लोग सुखु लहहीं॥**

यात काहीही आश्चर्य नाही. युगा-युगांतरापासून हीच रीत चालत आलेली आहे. श्रीरघुनाथांनी कुणाला मोठेपण दिले नाही?' देव अशा प्रकारे रामनामाचा महिमा सांगत होते व ते ऐकून अयोध्येचे लोक सुखावत होते.॥ १॥

**रामसखहि मिलि भरत सप्रेमा। पूँछी कुसल सुमंगल खेमा॥**
**देखि भरत कर सीलु सनेहू। भा निषाद तेहि समय बिदेहू॥**

रामांचा मित्र असलेल्या निषादराजाला प्रेमाने भेटल्यावर भरताने त्याचे क्षेमकुशल विचारले. भरताचे वर्तन व प्रेम पाहून निषाद त्याप्रसंगी देहभान विसरून विदेह झाला.॥ २॥

**सकुच सनेहु मोदु मन बाढ़ा। भरतहि चितवत एकटक ठाढ़ा॥**
**धरि धीरजु पद बंदि बहोरी। बिनय सप्रेम करत कर जोरी॥**

त्याच्या मनात संकोच, प्रेम व आनंद इतका वाढला की, तो मुग्ध होऊन भरताकडे एकटक बघत राहिला. नंतर धीर धरून त्याने पुन्हा भरताच्या चरणांना वंदन केले व प्रेमाने हात जोडून तो विनंती करू लागला.॥ ३॥

**कुसल मूल पद पंकज पेखी। मैं तिहुँ काल कुसल निज लेखी॥**
**अब प्रभु परम अनुग्रह तोरें। सहित कोटि कुल मंगल मोरें॥**

'हे प्रभो! सुखरूपतेचे मूळ असलेल्या तुमच्या चरणकमलांच्या दर्शनाने मी तिन्ही काळात सुखरूप झालो आहे, हे मी ओळखले. आता तुमच्या परम अनुग्रहामुळे कोटी-कोटी पिढ्यांसह माझे कल्याण झाले.॥ ४॥

दो०—**समुझि मोरि करतूति कुलु प्रभु महिमा जियँ जोइ।**
**जो न भजइ रघुबीर पद जग बिधि बंचित सोइ॥ १९५॥**

माझी करणी व कूळ जाणून, मी नीच जातीचा असूनही अनंतकोटी ब्रह्मांडांचे नायक असलेल्या भगवान रामचंद्रांनी माझ्यासारख्या शूद्राला आपल्या अहैतुकी कृपेने आपले मानले. या गोष्टीचा विचार करून जो मनुष्य श्रीरघुवीरांच्या चरणांचे भजन करीत नाही, तो या लोकी विधात्याकडून ठकविला गेला, असे समजावे.॥ १९५॥

**कपटी कायर कुमति कुजाती। लोक बेद बाहेर सब भाँती॥**
**राम कीन्ह आपन जबही तें। भयउँ भुवन भूषन तबही तें॥**

मी कपटी, भित्रा, कुबुद्धीचा आणि नीच जातीचा आहे. लोक व वेद या दोन्ही दृष्ट्या सर्व प्रकारे बहिष्कृत आहे; परंतु ज्या क्षणी श्रीरामचंद्रांनी मला आपलेसे केले, त्या क्षणापासून मी विश्वाचे भूषण ठरलो.'॥ १॥

**देखि प्रीति सुनि बिनय सुहाई। मिलेउ बहोरि भरत लघु भाई॥**
**कहि निषाद निज नाम सुबानीं। सादर सकल जोहारीं रानीं॥**

निषादराजाचे प्रेम पाहून व त्याचे गोड विनम्र बोलणे ऐकून भरताचा छोटा भाऊ शत्रुघ्न हा त्याला भेटला. नंतर निषादराजाने आपले नाव सांगून नम्र व मधुर वाणीने सर्व राण्यांना आदराने जोहार केला.॥ २॥

**जानि लखन सम देहिं असीसा। जिअहु सुखी सय लाख बरीसा॥**
**निरखि निषादु नगर नर नारी। भए सुखी जनु लखनु निहारी॥**

राण्यांनी त्याला लक्ष्मणासारखा मानून आशीर्वाद दिला की, 'तू लाखो वर्षे सुखाने राहा.' नगरातून आलेले स्त्री-पुरुष निषादाला पाहून असे आनंदून गेले की, जणू ते लक्ष्मणालाच पाहात होते.॥ ३॥

**कहहिं लहेउ एहिं जीवन लाहू। भेंटेउ रामभद्र भरि बाहू॥**
**सुनि निषादु निज भाग बड़ाई। प्रमुदित मन लइ चलेउ लेवाई॥**

सर्व म्हणत होते की, 'जीवनाचा लाभ यालाच मिळाला. कल्याण स्वरूप श्रीरामचंद्रांनी याला आपल्या हातांनी मिठीत घेतले.' निषाद आपल्या भाग्याचा महिमा ऐकून मनातून खूप आनंदित झाला आणि सर्वांना बरोबर घेऊन निघाला.॥ ४॥

दो०—**सनकारे सेवक सकल चले स्वामि रुख पाइ।**
**घर तरु तर सर बाग बन बास बनाएन्हि जाइ॥ १९६॥**

त्याने आपल्या सर्व सेवकांना इशारा केला. स्वामींच्या मनातले ओळखून ते निघाले आणि त्यांनी त्या लोकांना राहाण्यासाठी घरांमध्ये, वृक्षांखाली, तलावांकाठी, बागांमधून व जंगलांतून जागा तयार केल्या.॥ १९६॥

**सृंगबेरपुर भरत दीख जब। भे सनेहँ सब अंग सिथिल तब॥**
**सोहत दिएँ निषादहि लागू। जनु तनु धरें बिनय अनुरागू॥**

भरताने जेव्हा शृंगवेरपुर पाहिले, तेव्हा प्रेमामुळे तो देहभान हरपून बसला. तो निषादाच्या खांद्यावर हात ठेवून जाताना असा शोभून दिसत होता की, जणू विनय आणि प्रेम देह धारण करून आले आहेत.॥ १॥

**एहि बिधि भरत सेनु सबु संगा। दीखि जाइ जग पावनि गंगा॥**
**रामघाट कहँ कीन्ह प्रनामू। भा मनु मगनु मिले जनु रामू॥**

अशाप्रकारे संपूर्ण सेना बरोबर घेऊन भरताने जगाला पवित्र करणाऱ्या गंगा नदीचे दर्शन घेतले. जिथे श्रीरामांनी स्नान-संध्या केली होती, त्या रामघाटाला प्रणाम केला. त्याचे मन आनंदात इतके मग्न होते की, जणू त्याला प्रत्यक्ष श्रीरामांची भेट झाली.॥ २॥

**करहिं प्रनाम नगर नर नारी। मुदित ब्रह्ममय बारि निहारी॥**
**करि मज्जनु मागहिं कर जोरी। रामचंद्र पद प्रीति न थोरी॥**

नगरातील स्त्री-पुरुष प्रणाम करीत होते आणि गंगेचे ब्रह्मरूप जल पाहून आनंदित होत होते. गंगेत स्नान केल्यावर हात जोडून हाच वर मागत होते की, श्रीरामांच्या चरणीचे आमचे प्रेम कमी न होता वाढत राहो.॥ ३॥

**भरत कहेउ सुरसरि तव रेनू। सकल सुखद सेवक सुरधेनू॥**
**जोरि पानि बर मागउँ एहू। सीय राम पद सहज सनेहू॥**

भरत म्हणाला, 'हे गंगे, तुझी धूळ सर्वांना सुख देणारी व सेवकांसाठी कामधेनूच आहे. मी हात जोडून हेच वरदान मागतो की, श्रीसीतारामांच्या चरणी माझे प्रामाणिक प्रेम राहो.'॥ ४॥

दो०—**एहि बिधि मज्जनु भरतु करि गुर अनुसासन पाइ।**
**मातु नहानीं जानि सब डेरा चले लवाइ॥ १९७॥**

अशा रीतीने भरताने स्नान केले. नंतर गुरूंची आज्ञा घेऊन सर्व मातांचे स्नान उरकले आहे, असे समजल्यावर तो सैन्याचा तळ उठवून सर्वांसह निघाला.॥ १९७॥

**जहँ तहँ लोगन्ह डेरा कीन्हा। भरत सोधु सबही कर लीन्हा॥**
**सुर सेवा करि आयसु पाई। राम मातु पहिं गे दोउ भाई॥**

लोकांनी जिकडे-तिकडे मुक्काम ठोकला होता. भरताने सर्वांची व्यवस्था झाली की नाही ते पाहून घेतले. नंतर देवपूजन करून दोघे भाऊ माता कौसल्येकडे आले.॥ १॥

**चरन चाँपि कहि कहि मृदु बानी। जननीं सकल भरत सनमानी॥**
**भाइहि सौंपि मातु सेवकाई। आपु निषादहि लीन्ह बोलाई॥**

तिचे पाय चेपून व कोमल शब्द बोलून भरताने सर्व मातांविषयी आदर व्यक्त केला. त्यानंतर शत्रुघ्नाला मातांच्या सेवेचे काम देऊन त्याने निषादराजाला बोलावले.॥ २॥

**चले सखा कर सों कर जोरें। सिथिल सरीरु सनेह न थोरें॥**
**पूँछत सखहि सो ठाउँ देखाऊ। नेकु नयन मन जरनि जुड़ाऊ॥**

मित्र निषादराजाच्या हातात हात घालून भरत निघाला. भरताच्या मनात त्याच्याविषयी खूप प्रेम

होते, त्यामुळे त्याला देहभान उरले नव्हते. भरताने त्याला म्हटले की, 'ते ठिकाण मला दाखव की ज्यामुळे माझे नेत्र व मनातील तळमळ काहीशी शांत होईल, ॥ ३ ॥

**जहँ सिय रामु लखनु निसि सोए। कहत भरे जल लोचन कोए॥**
**भरत बचन सुनि भयउ बिषादू। तुरत तहाँ लइ गयउ निषादू॥**

जिथे सीता, श्रीराम व लक्ष्मण हे रात्री झोपले होते.' असे म्हणताना त्याच्या डोळ्यांच्या कडा प्रेमाश्रूंनी भरल्या. भरताचे बोलणे ऐकून निषादाला फार वाईट वाटले. तो लगेच त्याला तेथे घेऊन गेला, ॥ ४ ॥

दो०—**जहँ सिंसुपा पुनीत तर रघुबर किय बिश्रामु।**
**अति सनेहँ सादर भरत कीन्हेउ दंड प्रनामु॥ १९८॥**

जिथे पवित्र अशोक वृक्षाखाली श्रीरामांनी विश्रांती घेतली होती, भरताने त्या ठिकाणी अत्यंत प्रेमाने दंडवत घातला. ॥ १९८ ॥

**कुस साँथरी निहारि सुहाई। कीन्ह प्रनामु प्रदच्छिन जाई॥**
**चरन रेख रज आँखिन्ह लाई। बनइ न कहत प्रीति अधिकाई॥**

कुशांची तयार केलेली पथारी पाहून भरताने तिला प्रदक्षिणा घातली. श्रीरामचंद्रांच्या चरण-चिह्नांची धूळ आपल्या डोळ्यांना लावली. त्या वेळच्या त्याच्या प्रेमाचे उधाण काही वर्णन करता येत नाही. ॥ १ ॥

**कनक बिंदु दुइ चारिक देखे। राखे सीस सीय सम लेखे॥**
**सजल बिलोचन हृदयँ गलानी। कहत सखा सन बचन सुबानी॥**

तेथे सीतेच्या वस्त्रालंकारातून पडलेले दोनचार सोन्याचे कण पाहून भरताने ते सीतेसमान मानून तेथे डोके टेकले. त्याचे डोळे पाण्याने भरले होते आणि मनात खिन्नता होती. तो मित्र निषादाला मृदू वाणीने म्हणाला, ॥ २ ॥

**श्रीहत सीय बिरहँ दुतिहीना। जथा अवध नर नारि बिलीना॥**
**पिता जनक देउँ पटतर केही। करतल भोगु जोगु जग जेही॥**

'हे सुवर्णाचे कण किंवा तार हे सुद्धा सीतेच्या विरहामुळे असे शोभाहीन व कांतिहीन झाले आहेत की, जसे श्रीरामांच्या वियोगामुळे अयोध्येतील नर-नारी शोकाकुल झालेले होते. ज्या सीतेचे वडील या जगातील भोग व योग मुठीत असलेले राजा जनक आहेत, त्या जनकांना कुणाची उपमा देऊ? ॥ ३ ॥

**ससुर भानुकुल भानु भुआलू। जेहि सिहात अमरावतिपालू॥**
**प्राननाथु रघुनाथ गोसाईं। जो बड़ होत सो राम बड़ाईं॥**

जिचे सासरे सूर्यकुलाचे सूर्य राजा दशरथ आहेत, ज्यांचा हेवा अमरावतीचा स्वामी इंद्र करीत

होता, आणि प्रभू रघुनाथ जिचे प्राणनाथ आहेत, जे इतके महान आहेत की, त्यांनी दिलेल्या मोठेपणामुळेच कोणीही मोठा होतो, ॥ ४ ॥

**दो०—पति देवता सुतीय मनि सीय साँथरी देखि।**
**बिहरत हृदउ न हहरि हर पबि तें कठिन बिसेषि॥ १९९ ॥**

श्रेष्ठ पतिव्रता स्त्रियांमध्ये शिरोमणी असलेल्या श्रेष्ठ सीतेची ही पथारी पाहून माझे हृदय हाय हाय करून विदीर्ण होत नाही. यावरून भगवान शंकरा, हे माझे हृदय वज्राहून कठोर आहे. ॥ १९९ ॥

**लालन जोगु लखन लघु लोने । भे न भाइ अस अहहिं न होने ॥**
**पुरजन प्रिय पितु मातु दुलारे । सिय रघुबीरहि प्रानपिआरे ॥**

माझा लहान भाऊ लक्ष्मण फार सुंदर व लाड करण्याजोगा आहे. असा भाऊ कुणाचाही झाला नाही, सध्या नाही आणि होणारही नाही. तो लक्ष्मण अयोध्येच्या लोकांचा लाडका, माता-पित्यांचा आवडता आणि सीतारामांचा प्राणप्रिय आहे. ॥ १ ॥

**मृदु मूरति सुकुमार सुभाऊ । तात बाउ तन लाग न काऊ ॥**
**ते बन सहहिं बिपति सब भाँती । निदरे कोटि कुलिस एहिं छाती ॥**

जो कोमलमूर्ती व सुकुमार स्वभावाचा आहे. ज्याच्या शरीराला कधी गरम वारेसुद्धा लागलेले नाहीत, तो वनामध्ये सर्व प्रकारची संकटे सोशीत आहे. माझी ही छाती कोट्यवधी वज्रांपेक्षा कठोर आहे. नाहीतर ती केव्हाच फाटून गेली असती. ॥ २ ॥

**राम जनमि जगु कीन्ह उजागर । रूप सील सुख सब गुन सागर ॥**
**पुरजन परिजन गुर पितु माता । राम सुभाउ सबहि सुखदाता ॥**

श्रीरामांनी अवतार घेऊन जगाला उजळून टाकले. ते रूप, शील, सुख व सर्व गुण यांचे सागर आहेत. पुरवासी, कुटुंबीय, गुरू, माता-पिता या सर्वांना सुख देणारा श्रीरामांचा स्वभाव आहे. ॥ ३ ॥

**बैरिउ राम बड़ाई करहीं । बोलनि मिलनि बिनय मन हरहीं ॥**
**सारद कोटि कोटि सत सेषा । करि न सकहिं प्रभु गुन गन लेखा ॥**

शत्रूसुद्धा श्रीरामांची वाखाणणी करतात. ते आपल्या वागण्या-बोलण्याने, भेटण्याच्या शैलीने आणि विनयाने सर्वांचे मन मोहून टाकतात. कोट्यवधी सरस्वती व अब्जावधी शेषही प्रभू श्रीरामचंद्रांच्या गुणांच्या समूहांची गणना करू शकत नाहीत. ॥ ४ ॥

**दो०—सुखस्वरूप रघुबंसमनि मंगल मोद निधान।**
**ते सोवत कुस डासि महि बिधि गति अति बलवान॥ २०० ॥**

जे सुखस्वरूप, रघुवंश शिरोमणी, मांगल्य व आनंदाचे भांडार आहेत, ते जमिनीवर कुश पसरून झोपतात. दैवाची गती मोठी बलवान आहे, हेच खरे. ॥ २०० ॥

**राम सुना दुखु कान न काऊ। जीवनतरु जिमि जोगवइ राऊ॥**
**पलक नयन फनि मनि जेहि भाँती। जोगवहिं जननि सकल दिन राती॥**

श्रीरामचंद्रांनी आपल्या कानांनी सुद्धा कधी दु:खाचे नावही ऐकले नाही. महाराज दशरथ स्वत: जीवन-वृक्षाप्रमाणे त्यांचा सांभाळ करीत असत. ज्याप्रमाणे पापण्या डोळ्यांचा व साप आपल्या मण्याचा सांभाळ करतो, त्याप्रमाणे सर्व मातासुद्धा रात्रंदिवस त्यांचा सांभाळ करीत असत.॥ १॥

**ते अब फिरत बिपिन पदचारी। कंद मूल फल फूल अहारी॥**
**धिग कैकई अमंगल मूला। भइसि प्रान प्रियतम प्रतिकूला॥**

तेच श्रीराम आता जंगलात पायी फिरत आहेत. कंदमुळे व फळाफुलांचा आहार घेत आहेत. अमंगलाचे मूळ असलेल्या कैकेयीचा धिक्कार असो. ती स्वत:च्या प्राणप्रियतम पतीच्याही विरुद्ध गेली.॥ २॥

**मैं धिग धिग अघ उदधि अभागी। सबु उतपातु भयउ जेहि लागी॥**
**कुल कलंकु करि सृजेउ बिधाताँ। साइँदोह मोहि कीन्ह कुमाताँ॥**

पापांचा समुद्र व दुर्भागी असलेल्या माझा धिक्कार असो, धिक्कार असो. माझ्यामुळे हे सर्व उत्पात घडले. विधात्याने मला कुलाचा कलंक म्हणून उत्पन्न केले आणि कुमातेने मला स्वामिद्रोही बनवून टाकले.'॥ ३॥

**सुनि सप्रेम समुझाव निषादू। नाथ करिअ कत बादि बिषादू॥**
**राम तुम्हहि प्रिय तुम्ह प्रिय रामहि। यह निरजोसु दोसु बिधि बामहि॥**

हे ऐकून निषादराज प्रेमाने समजावत म्हणाला की, 'हे नाथ, तुम्ही विनाकारण विषाद का करीत आहात? श्रीराम तुम्हांला प्रिय आहेत आणि तुम्ही श्रीरामांना प्रिय आहात, हेच सत्य आहे. दोष आहे तो प्रतिकूल विधात्याचा आहे.॥ ४॥

छं०—**बिधि बाम की करनी कठिन जेहिं मातु कीन्ही बावरी।**
**तेहि राति पुनि पुनि करहिं प्रभु सादर सरहना रावरी॥**
**तुलसी न तुम्ह सो राम प्रीतमु कहतु हौं सौंहें किएँ।**
**परिनाम मंगल जानि अपने आनिए धीरजु हिएँ॥**

प्रतिकूल विधात्याची करणी फार कठोर आहे. त्याने माता कैकेयीला वेडी करून टाकले. त्या रात्री प्रभू श्रीरामचंद्र वारंवार मोठ्या आदराने तुमची फार वाखाणणी करीत होते. श्रीरामांना तुमच्यासारखा अत्यंत प्रिय कोणी नाही, हे मी शपथ घेऊन सांगतो. परिणामी मंगलच होईल, असे समजून तुम्ही मनात धीर धरा.

सो०—**अंतरजामी रामु सकुच सप्रेम कृपायतन।**
**चलिअ करिअ बिश्रामु यह बिचारि दृढ़ आनि मन॥ २०१॥**

श्रीरामचंद्र अंतर्यामी व संकोच, प्रेम व कृपेचे धाम आहेत, असा विचार करून व मन घट्ट करून चला आणि विश्रांती घ्या.'॥ २०१॥

**सखा बचन सुनि उर धरि धीरा। बास चले सुमिरत रघुबीरा॥**
**यह सुधि पाइ नगर नर नारी। चले बिलोकन आरत भारी॥**

मित्राचे म्हणणे ऐकून व मनात धीर धरून श्रीरामांचे स्मरण करीत भरत मुक्कामाकडे निघाला. नगरातील सर्व स्त्री-पुरुष श्रीरामांच्या वास्तव्याच्या ठिकाणाची वार्ता ऐकून आतुर होऊन ते स्थान पाहाण्यास निघाले.॥ १॥

**परदखिना करि करहिं प्रनामा। देहिं कैकइहि खोरि निकामा॥**
**भरि भरि बारि बिलोचन लेहीं। बाम बिधातहि दूषन देहीं॥**

त्यांनी त्या स्थानाला प्रदक्षिणा घालून प्रणाम केला आणि कैकेयीला खूप दोष दिला. डोळ्यांत पाणी आणून त्यांनी प्रतिकूल विधात्याला दूषण दिले.॥ २॥

**एक सराहहिं भरत सनेहू। कोउ कह नृपति निबाहेउ नेहू॥**
**निंदहिं आपु सराहि निषादहि। को कहि सकइ बिमोह बिषादहि॥**

कोणी भरताच्या प्रेमाची प्रशंसा करीत होता, तर कोणी म्हणे की, राजांनी आपले प्रेम चांगल्या प्रकारे सिद्ध केले. सर्वजण स्वतःची निंदा करीत होते व निषादराजाची प्रशंसा करीत होते. त्या वेळचे त्या लोकांचे प्रेम व दुःख यांचे वर्णन कोण करू शकेल?॥ ३॥

**एहि बिधि राति लोगु सबु जागा। भा भिनुसार गुदारा लागा॥**
**गुरहि सुनावँ चढ़ाइ सुहाईं। नईं नाव सब मातु चढ़ाईं॥**

अशा प्रकारे सर्वजण रात्रभर जागे राहिले. सकाळ होताच नावा सुरू झाल्या. सुंदर नावेवर गुरुजींना बसवून नंतर नवीन नावांवर सर्व मातांना चढविले.॥ ४॥

**दंड चारि महँ भा सबु पारा। उतरि भरत तब सबहि सँभारा॥**

चार घटकांमध्ये सर्वजण गंगेपलीकडे उतरले. तेव्हा भरताने स्वतः उतरून सर्वांची काळजी घेतली.॥ ५॥

दो०—**प्रातक्रिया करि मातु पद बंदि गुरहि सिरु नाइ।**
**आगें किए निषाद गन दीन्हेउ कटकु चलाइ॥ २०२॥**

प्रातःकालीन कर्मे उरकून भरताने मातांच्या चरणी वंदन केले आणि गुरूपुढे मस्तक नमवून निषाद लोकांना मार्ग दाखविण्यासाठी पुढे केले आणि सेनेला जाण्याची आज्ञा केली.॥ २०२॥

**कियउ निषादनाथु अगुआईं । मातु पालकीं सकल चलाईं ॥**
**साथ बोलाइ भाइ लघु दीन्हा । बिप्रन्ह सहित गवनु गुर कीन्हा ॥**

निषादराजाला पुढे करून त्याच्यामागे सर्व मातांच्या पालख्या सोडल्या. शत्रुघ्नाला बोलावून त्याला त्यांच्याबरोबर पाठविले. नंतर ब्राह्मणांसह गुरूंनी गमन केले. ॥ १ ॥

**आपु सुरसरिहि कीन्ह प्रनामू । सुमिरे लखन सहित सिय रामू ॥**
**गवने भरत पयादेहिं पाए । कोतल संग जाहिं डोरिआए ॥**

त्यानंतर भरताने गंगेला प्रणाम करून लक्ष्मणासह श्रीसीतारामांचे स्मरण केले. भरत पायीच जाऊ लागला. त्याच्यासोबत लगाम धरलेले रिकामे घोडे जात होते. ॥ २ ॥

**कहहिं सुसेवक बारहिं बारा । होइअ नाथ अस्व असवारा ॥**
**रामु पयादेहि पायँ सिधाए । हम कहँ रथ गज बाजि बनाए ॥**

चांगले सेवक भरताला सांगत होते की, 'हे नाथ, घोड्यावर स्वार व्हा.' परंतु तो उत्तर देई की 'श्रीराम तर पायीच गेले आणि आमच्यासाठी रथ, हत्ती व घोडे बनविले आहेत काय? ॥ ३ ॥

**सिर भर जाउँ उचित अस मोरा । सब तें सेवक धरमु कठोरा ॥**
**देखि भरत गति सुनि मृदु बानी । सब सेवक गन गरहिं गलानी ॥**

डोक्यावर चालत जावे, हेच मला योग्य वाटते.' सेवकाचा धर्म मोठा कठीण असतो. भरताची अवस्था पाहून व मृदू भाषा ऐकून सर्व सेवक लाजेने चूर होत होते. ॥ ४ ॥

दो०—**भरत तीसरे पहर कहँ कीन्ह प्रबेसु प्रयाग ।**
**कहत राम सिय राम सिय उमगि उमगि अनुराग ॥ २०३ ॥**

प्रेमाच्या उत्साहात 'सीताराम, सीताराम' असे म्हणत भरताने तिसऱ्या प्रहरी प्रयाग क्षेत्रात प्रवेश केला. ॥ २०३ ॥

**झलका झलकत पायन्ह कैसें । पंकज कोस ओस कन जैसें ॥**
**भरत पयादेहिं आए आजू । भयउ दुखित सुनि सकल समाजू ॥**

त्याच्या तळपायावर फोड आलेले होते, ते कमळाच्या कळीवरील दवबिंदूप्रमाणे वाटत होते. भरत आज पायीच चालत आला, हे ऐकून सर्व परिवार दुःखी झाला. ॥ १ ॥

**खबरि लीन्ह सब लोग नहाए । कीन्ह प्रनामु त्रिबेनिहिं आए ॥**
**सबिधि सितासित नीर नहाने । दिए दान महिसुर सनमाने ॥**

सर्वांनी स्नान केल्याचे समजल्यावर भरताने त्रिवेणी संगमावर जाऊन प्रणाम केला. नंतर

विधिपूर्वक गंगा-यमुनेच्या पांढऱ्या-काळ्या जलामध्ये स्नान केले आणि दान देऊन ब्राह्मणांचा सन्मान केला. ॥ २ ॥

**देखत स्यामल धवल हलोरे। पुलकि सरीर भरत कर जोरे॥**
**सकल कामप्रद तीरथराऊ। बेद बिदित जग प्रगट प्रभाऊ॥**

गंगा-यमुनेच्या त्या श्वेत-श्याम लहरी पाहून भरत पुलकित झाला आणि दोन्ही हात जोडून म्हणाला, 'हे तीर्थराज, तुम्ही सर्व कामना पूर्ण करणारे आहात. तुमचा महिमा वेदांमध्ये प्रसिद्ध आहे आणि जगात तो प्रत्यक्ष आहे. ॥ ३ ॥

**मागउँ भीख त्यागि निज धरमू। आरत काह न करइ कुकरमू॥**
**अस जियँ जानि सुजान सुदानी। सफल करहिं जग जाचक बानी॥**

मी स्वत:चा याचना न करण्याचा क्षत्रियधर्म सोडून तुमच्यासमोर भीक मागतो. आर्त झाल्यावर मनुष्य कोणते कुकर्म करीत नाही? मनात असा विचार करून सुजाण व उत्तम दानशूर, जगात याचना करणाऱ्या याचकाला मागेल ते देतात. ॥ ४ ॥

दो०—**अरथ न धरम न काम रुचि गति न चहउँ निरबान।**
**जनम जनम रति राम पद यह बरदानु न आन॥ २०४॥**

मला काही अर्थाची इच्छा नाही, धर्माची नाही, कामाची नाही आणि मोक्षाचीही नाही. जन्मोजन्मी श्रीरामांच्या चरणी माझे प्रेम राहो, एवढेच वरदान मी मागतो; दुसरे काही नाही. ॥ २०४ ॥

**जानहुँ रामु कुटिल करि मोही। लोग कहउ गुर साहिब द्रोही॥**
**सीता राम चरन रति मोरें। अनुदिन बढ़उ अनुग्रह तोरें॥**

प्रत्यक्ष श्रीराम हवे तर मला कुटिल समजोत आणि लोक मला खुशाल गुरुद्रोही व स्वामिद्रोही म्हणोत. परंतु तुमच्या कृपेने श्रीसीता-रामांच्या चरणी माझे प्रेम दिवसेंदिवस वृद्धिंगत होत राहो. ॥ १ ॥

**जलदु जनम भरि सुरति बिसारउ। जाचत जलु पबि पाहन डारउ॥**
**चातकु रटनि घटें घटि जाई। बढ़ें प्रेमु सब भाँति भलाई॥**

मेघाने हवे तर चातकाची वर्षभर दखल घेतली नाही आणि त्याने पाणी मागितल्यावर वज्र व गारा यांचा वर्षाव केला आणि चातकाची पाण्यासाठी चाललेली ओरड रोडावली, तर मेघाचीच प्रतिष्ठा जाईल. चातकाचे मेघाविषयी प्रेम वाढण्यातच त्याचा चांगुलपणा आहे. ॥ २ ॥

**कनकहिं बान चढ़इ जिमि दाहें। तिमि प्रियतम पद नेम निबाहें॥**
**भरत बचन सुनि माझ त्रिबेनी। भइ मृदु बानि सुमंगल देनी॥**

ज्याप्रमाणे सोने तापवल्यावर त्याला झळाळी येते, त्याप्रमाणे प्रियतमाच्या चरणी असलेल्या

प्रेमाचा नेम राखण्यातच प्रेमी सेवकाचा गौरव वाढतो.' भरताचे बोलणे ऐकून त्रिवेणी संगमामधून सुंदर मांगल्य देणारी कोमल वाणी प्रकटली. ॥ ३ ॥

**तात भरत तुम्ह सब बिधि साधू। राम चरन अनुराग अगाधू॥**
**बादि गलानि करहु मन माहीं। तुम्ह सम रामहि कोउ प्रिय नाहीं॥**

'हे भरता! तू पूर्णपणे साधू आहेस. श्रीरामचंद्रांच्या चरणी तुझे अथांग प्रेम आहे. तू मनात विनाकारण उदास होत आहेस. श्रीरामांना तुझ्याइतका प्रिय कोणी नाही.' ॥ ४ ॥

दो०—**तनु पुलकेउ हियँ हरषु सुनि बेनि बचन अनुकूल।**
**भरत धन्य कहि धन्य सुर हरषित बरषहिं फूल॥ २०५॥**

त्रिवेणीचे अनुकूल वचन ऐकून भरताचे शरीर पुलकित झाले. मनात हर्ष दाटला. 'भरत धन्य आहे, धन्य आहे' असे म्हणत देव आनंदाने फुले उधळू लागले. ॥ २०५ ॥

**प्रमुदित तीरथराज निवासी। बैखानस बटु गृही उदासी॥**
**कहहिं परसपर मिलि दस पाँचा। भरत सनेहु सीलु सुचि साँचा॥**

तीर्थराज प्रयागामध्ये राहाणारे वानप्रस्थी, ब्रह्मचारी, गृहस्थ आणि विरक्त संन्यासी हे सर्व आनंदित झाले आणि दहा-पाचाच्या गटाने जमून परस्पर म्हणू लागले की, 'भरताचे प्रेम व स्वभाव हे पवित्र आणि खरे आहेत.' ॥ १ ॥

**सुनत राम गुन ग्राम सुहाए। भरद्वाज मुनिबर पहिं आए॥**
**दंड प्रनामु करत मुनि देखे। मूरतिमंत भाग्य निज लेखे॥**

श्रीरामचंद्रांचे सुंदर गुण-समुच्चय ऐकत भरत भरद्वाज मुनींच्याकडे आला. तो दंडवत करीत असलेला पाहून मुनींना आपले सद्भाग्य साकार झाल्याचे वाटले. ॥ २ ॥

**धाइ उठाइ लाइ उर लीन्हे। दीन्हि असीस कृतारथ कीन्हे॥**
**आसनु दीन्ह नाइ सिरु बैठे। चहत सकुच गृहँ जनु भजि पैठे॥**

त्यांनी धावत जाऊन भरताला उठवले आणि हृदयाशी धरले. तसेच आशीर्वाद देऊन कृतार्थ केले. मुनींनी त्याला आसन दिले. भरत मस्तक खाली घालून असा बसला की, जणू पळून जाऊन संकोचाच्या घरात घुसावेसे त्याला वाटत होते. ॥ ३ ॥

**मुनि पूँछब कछु यह बड़ सोचू। बोले रिषि लखि सीलु सँकोचू॥**
**सुनहु भरत हम सब सुधि पाई। बिधि करतब पर किछु न बसाई॥**

त्याच्या मनाला काळजी वाटत होती की मुनींनी काही विचारले, तर काय उत्तर द्यावे? भरताचे वर्तन व संकोच पाहून ऋषी म्हणाले, 'भरता, आम्हांला सर्व वार्ता समजली आहे. विधात्याच्या करणीपुढे कुणाचे काही चालत नाही. ॥ ४ ॥

दो०—**तुम्ह गलानि जियँ जनि करहु समुझि मातु करतूति।**
**तात कैकइहि दोसु नहिं गई गिरा मति धूति॥ २०६॥**

मातेच्या कृत्याची आठवण करून तू मनात खेद करू नकोस. हे कुमार, कैकेयीकडे कोणताही दोष नाही. तिची बुद्धी सरस्वतीने बिघडून टाकली होती,॥ २०६॥

**यहउ कहत भल कहिहि न कोऊ। लोकु बेदु बुध संमत दोऊ॥**
**तात तुम्हार बिमल जसु गाई। पाइहि लोकउ बेदु बड़ाई॥**

म्हणून सरस्वती दोषी आहे, असे म्हणणेही बरोबर नाही. कारण तिला देवांनी प्रेरित केले. लोकमतानुसार कैकेयी दोषी आहे. लोकमत व वेदमत हे विद्वानांनाही मान्य आहे. परंतु कुमार! तुझी मात्र निर्मळ कीर्ती गाऊन लोक व वेद या दोघांनाही गौरव मिळेल.॥ १॥

**लोक बेद संमत सबु कहई। जेहि पितु देइ राजु सो लहई॥**
**राउ सत्यब्रत तुम्हहि बोलाई। देत राजु सुखु धरमु बड़ाई॥**

लोक व वेद यांना हे मान्य आहे आणि सर्वचजण असे म्हणतात की, पिता ज्याला राज्य देतो, त्यालाच ते मिळते. राजा दशरथ सत्यव्रती होते. त्यांनी तुला बोलावून राज्य दिले असते, तर सुख मिळाले असते, धर्माचे पालन झाले असते आणि मोठेपणा मिळाला असता.॥ २॥

**राम गवनु बन अनरथ मूला। जो सुनि सकल बिस्व भइ सूला॥**
**सो भावी बस रानि अयानी। करि कुचालि अंतहुँ पछितानी॥**

साऱ्या अनर्थांचे मूळ म्हणजे श्रीरामचंद्रांचे वनगमन. त्याची वार्ता ऐकून संपूर्ण जगाला दुःख झाले. ते श्रीरामांचे वनगमनसुद्धा भवितव्यामुळे घडले. आणि भवितव्याच्या अधीन झाल्यामुळे दुर्वर्तन करून कैकेयी शेवटी पश्चात्ताप पावली.॥ ३॥

**तहँउँ तुम्हार अलप अपराधू। कहै सो अधम अयान असाधू॥**
**करतेहु राजु त तुम्हहि न दोषू। रामहि होत सुनत संतोषू॥**

त्यात तुझा थोडासासुद्धा अपराध आहे, असे कोणी म्हणेल, तर तो अधम, अज्ञानी व असाधू होय. जर तू राज्य केले असतेस, तरी तुला दोष येत नव्हता. ते ऐकून श्रीरामांनाही समाधानच झाले असते.॥ ४॥

दो०—**अब अति कीन्हेहु भरत भल तुम्हहि उचित मत एहु।**
**सकल सुमंगल मूल जग रघुबर चरन सनेहु॥ २०७॥**

हे भरता, आता तर तू फार चांगले केलेस. तुझ्यासाठी हाच विचार योग्य होता. श्रीरामांच्या चरणी प्रेम असणे हेच जगात सर्व मांगल्याचे मूळ आहे.॥ २०७॥

**सो तुम्हार धनु जीवनु प्राना। भूरिभाग को तुम्हहि समाना॥**
**यह तुम्हार आचरजु न ताता। दसरथ सुअन राम प्रिय भ्राता॥**

ते श्रीरामांच्या चरणीचे प्रेम हे तर तुझे धन, जीवन व प्राण आहे. तुझ्यासारखा भाग्यशाली कोण आहे? कुमार! तुझ्यासाठी ही काही आश्चर्याची गोष्ट नाही, कारण तू दशरथांचा पुत्र व श्रीरामचंद्रांचा आवडता भाऊ आहेस. ॥ १ ॥

**सुनहु भरत रघुबर मन माहीं। पेम पात्रु तुम्ह सम कोउ नाहीं॥**
**लखन राम सीतहि अति प्रीती। निसि सब तुम्हहि सराहत बीती॥**

हे भरता, ऐक. श्रीरामचंद्रांच्या मनातही तुझ्यासारखा प्रेमापात्र दुसरा कोणीही नाही. लक्ष्मण, श्रीराम व सीता या तिघांची सर्व रात्र त्या दिवशी अत्यंत प्रेमाने तुझी प्रशंसा करण्यातच निघून गेली. ॥ २ ॥

**जाना मरमु नहात प्रयागा। मगन होहिं तुम्हरें अनुरागा॥**
**तुम्ह पर अस सनेहु रघुबर कें। सुख जीवन जग जस जड़ नर कें॥**

प्रयागराजामध्ये जेव्हा ते स्नान करीत होते, त्यावेळी मला त्यांचे रहस्य समजले. ते तुझ्या प्रेमात मग्न झाले होते. तुझ्यावर श्रीरामांचे इतके अगाध प्रेम आहे की, विषयासक्त मनुष्याचे जगातील सुखमय जीवनावर असते तसे. ॥ ३ ॥

**यह न अधिक रघुबीर बड़ाई। प्रनत कुटुंब पाल रघुराई॥**
**तुम्ह तौ भरत मोर मत एहू। धरें देह जनु राम सनेहू॥**

ही काही श्रीरघुनाथांची फार मोठी थोरवी नव्हे. कारण श्रीरघुनाथ तर शरणागताच्या संपूर्ण कुटुंबाचे पालनकर्ते आहेत. हे भरता, माझ्या मते तू तर जणू श्रीरामांचे शरीरधारी प्रेमच आहेस. ॥ ४ ॥

दो०—**तुम्ह कहँ भरत कलंक यह हम सब कहँ उपदेसु।**
**राम भगति रस सिद्धि हित भा यह समउ गनेसु॥ २०८॥**

हे भरता, तुझ्या दृष्टीने हा कलंक आहे, परंतु आम्हा सर्वांसाठी हा उपदेश आहे. श्रीरामभक्तिरूपी रसाच्या सिद्धीसाठी ही वेळ फार शुभ आहे. ॥ २०८ ॥

**नव बिधु बिमल तात जसु तोरा। रघुबर किंकर कुमुद चकोरा॥**
**उदित सदा अँथइहि कबहूँ ना। घटिहि न जग नभ दिन दिन दूना॥**

कुमारा! तुझी कीर्ती ही निर्मल नवचंद्रमा आहे आणि श्रीरामचंद्रांचे दास हे कुमुद व चकोर आहेत. चंद्रमा नेहमी कमीजास्त होत असतो. त्यामुळे कुमुद आणि चकोर यांना दुःख होते, परंतु तुझा कीर्तिरूपी चंद्रमा हा नित्य पूर्ण राहील, कधी कमी होणारच नाही. जग-रूपी आकाशात तो कधी घटणार नाही, तर दिवसेंदिवस द्विगुणित होत राहील. ॥ १ ॥

**कोक तिलोक प्रीति अति करिही। प्रभु प्रताप रबि छबिहि न हरिही॥**
**निसि दिन सुखद सदा सब काहू। ग्रसिहि न कैकइ करतबु राहू॥**

त्रैलोक्यरूपी चक्रवाक या कीर्ति-चंद्रावर अत्यंत प्रेम करील आणि श्रीरामचंद्रांचा प्रताप-सूर्य याची शोभा कधी हरण करू शकणार नाही. तुझ्या कीर्तीचा हा चंद्र रात्रंदिवस नेहमी सर्वांना सुख देत राहील. कैकेयीचा कुकर्मरूपी राहू याला कधी ग्रासणार नाही.॥ २॥

**पूरन राम सुपेम पियूषा। गुर अवमान दोष नहिं दूषा॥**
**रामभगत अब अमिअँ अघाहूँ। कीन्हेहु सुलभ सुधा बसुधाहूँ॥**

हा चंद्र श्रीरामचंद्रांच्या सुंदर प्रेमरूपी अमृताने भरलेला आहे. हा गुरूच्या अपमानरूपी दोषाने दूषित नाही. तू हा कीर्तिरूपी चंद्र निर्माण करून पृथ्वीवरही अमृत सुलभ केलेले आहेस. आता श्रीरामांचे भक्त या अमृताने तृप्त होवोत.॥ ३॥

**भूप भगीरथ सुरसरि आनी। सुमिरत सकल सुमंगल खानी॥**
**दसरथ गुन गन बरनि न जाहीं। अधिकु कहा जेहि सम जग नाहीं॥**

ज्या गंगेचे फक्त स्मरणच संपूर्ण मांगल्याची खाण आहे, ती गंगा तुझ्या पूर्वजाने भगीरथाने आणली. दशरथांच्या गुणराशींचे तर वर्णनच करता येत नाही. त्यांच्याहून श्रेष्ठ इतकेच काय, त्यांच्या बरोबरीचाही या जगात कोणी नाही.॥ ४॥

दो०—**जासु सनेह सकोच बस राम प्रगट भए आइ।**
**जे हर हिय नयननि कबहुँ निरखे नहीं अघाइ॥ २०९॥**

ज्यांच्या प्रेम व सद्‌गुणांच्या अधीन होऊन प्रत्यक्ष सच्चिदानंदघन भगवान, श्रीराम होऊन प्रकट झाले. ज्या श्रीरामांचे स्वरूप आपल्या हृदयात पाहून श्रीमहादेवही कधी तृप्त होत नाहीत.॥ २०९॥

**कीरति बिधु तुम्ह कीन्ह अनूपा। जहँ बस राम पेम मृगरूपा॥**
**तात गलानि करहु जियँ जाएँ। डरहु दरिद्रहि पारसु पाएँ॥**

परंतु यांच्याहून अधिक तू कीर्तिरूपी अनुपम चंद्र उत्पन्न केलास. या चंद्रामध्ये श्रीरामांचे प्रेम हरिणाच्या चिह्नाच्या रूपाने राहाते. भरता! तू विनाकारण मनात दुःखी होत आहेस. जणू परीस मिळूनही तू दारिद्र्याला घाबरत आहेस.॥ १॥

**सुनहु भरत हम झूठ न कहहीं। उदासीन तापस बन रहहीं॥**
**सब साधन कर सुफल सुहावा। लखन राम सिय दरसनु पावा॥**

हे भरता, ऐक. आम्ही असत्य बोलत नाही. आम्ही निष्पक्ष आहोत, तपस्वी आहोत, कुणाच्या तोंडाकडे पाहून बोलत नाही आणि निरपेक्षपणे वनात राहातो. सर्व साधनांचे उत्तम फल म्हणून आम्हांला लक्ष्मण, श्रीराम व सीता यांचे दर्शन घडले.॥ २॥

**तेहि फल कर फलु दरस तुम्हारा। सहित पयाग सुभाग हमारा॥**
**भरत धन्य तुम्ह जसु जगु जयऊ। कहि अस पेम मगन मुनि भयऊ॥**

आणि त्या तिघांच्या दर्शनाच्या महान फलाचे परम फल म्हणजे तुझे दर्शन होय. तीर्थराज प्रयागासह हे आमचे मोठे भाग्य. हे भरता, तू धन्य आहेस, तू आपल्या कीर्तीने जग जिंकले आहेस.' असे म्हणून मुनी भरताच्या प्रेमात मग्न झाले. ॥ ३ ॥

**सुनि मुनि बचन सभासद हरषे । साधु सराहि सुमन सुर बरषे ॥**
**धन्य धन्य धुनि गगन पयागा । सुनि सुनि भरतु मगन अनुरागा ॥**

भरद्वाज मुनींचे हे बोलणे ऐकून सर्व सभासद आनंदित झाले. 'उत्तम, उत्तम' म्हणत व प्रशंसा करीत देवांनी फुले उधळली. आकाशात व प्रयागराजामध्ये 'धन्य, धन्य' चा ध्वनी ऐकून भरतही प्रेम-मग्न झाला. ॥ ४ ॥

**दो०—पुलक गात हियँ रामु सिय सजल सरोरुह नैन।**
**करि प्रनामु मुनि मंडलिहि बोले गदगद बैन॥ २१० ॥**

भरताचे शरीर रोमांचित झाले. त्याच्या हृदयात श्रीसीताराम विराजमान होते आणि कमलासारखे नेत्र प्रेमाश्रूंनी भरून आले होते. तो मुनिसमुदायाला प्रणाम करून सद्‌गदित वाणीने म्हणाला, ॥ २१० ॥

**मुनि समाजु अरु तीरथराजू । साँचिहुँ सपथ अघाइ अकाजू ॥**
**एहिं थल जौं किछु कहिअ बनाई । एहि सम अधिक न अघ अधमाई ॥**

'येथे मुनिगण आहे, शिवाय तीर्थराज आहे. येथे खरी शपथ घेतली, (आणि ती पाळली नाही,) तरी मोठी हानी होते. या ठिकाणी जर काही बनवाबनवी करून सांगितले, तर त्याच्याइतके कोणतेही मोठे पाप आणि नीचपणा असणार नाही. ॥ १ ॥

**तुम्ह सर्बग्य कहउँ सतिभाऊ । उर अंतरजामी रघुराऊ ॥**
**मोहि न मातु करतब कर सोचू । नहिं दुखु जियँ जगु जानिहि पोचू ॥**

मी प्रामाणिकपणे सांगतो. तुम्ही सर्वज्ञ आहात आणि श्रीरघुनाथांच्या मनातील जाणणारे आहात. मी खोटे बोललो, तर ते तुम्हांला कळल्याशिवाय राहाणार नाही. माता कैकेयीच्या कृत्याची मला मुळीच चिंता नाही आणि जग मला नीच समजेल, या गोष्टीचेही दु:ख नाही. ॥ २ ॥

**नाहिन डरु बिगरिहि परलोकू । पितहु मरन कर मोहि न सोकू ॥**
**सुकृत सुजस भरि भुअन सुहाए । लछिमन राम सरिस सुत पाए ॥**

माझा परलोक बिघडेल, याची मला भीती नाही आणि पित्याच्या मरणाचाही शोक नाही. कारण त्यांचे पुण्य व सुकीर्ती विश्वात शोभून राहिली आहे. त्यांना श्रीराम-लक्ष्मण यांच्यासारखे पुत्र लाभले. ॥ ३ ॥

**राम बिरहँ तजि तनु छनभंगू । भूप सोच कर कवन प्रसंगू ॥**
**राम लखन सिय बिनु पग पनहीं । करि मुनि बेष फिरहिं बन बनहीं ॥**

शिवाय, ज्यांनी श्रीरामचंद्रांच्या विरहामुळे आपल्या क्षणभंगुर देहाचा त्याग केला, अशा राजांविषयी शोक का करायचा? खरे म्हणजे श्रीराम, लक्ष्मण व सीता मुनींचा वेष धारण करून अनवाणी वनात फिरत आहेत, याचे मला दु:ख आहे. ॥ ४ ॥

**दो०—अजिन बसन फल असन महि सयन डासि कुस पात।**
**बसि तरु तर नित सहत हिम आतप बरषा बात॥ २११ ॥**

ते वल्कले नेसतात, फळे खाऊन राहातात, जमिनीवर कुश व पाने पसरून त्यावर झोपतात आणि वृक्षांखाली राहून थंडी, उकाडा, वारा, पाऊस सहन करतात, ॥ २११ ॥

**एहि दुख दाहँ दहइ दिन छाती। भूख न बासर नीद न राती॥**
**एहि कुरोग कर औषधु नाहीं। सोधेउँ सकल बिस्व मन माहीं॥**

या दु:खाच्या झळीने एकसारखे माझे अंत:करण जळत आहे. मला दिवसा भूक लागत नाही की रात्री झोप येत नाही. मी मनातल्या मनात सर्व जग धुंडाळले, परंतु या रोगावर कुठेही औषध नाही. ॥ १ ॥

**मातु कुमत बढ़ई अघ मूला। तेहिं हमार हित कीन्ह बँसूला॥**
**कलि कुकाठ कर कीन्ह कुजंत्रू। गाड़ि अवधि पढ़ि कठिन कुमंत्रू॥**

आईचा कुविचार हा या पापांचा मुळचा सुतार आहे. त्याने आमच्या हिताची तासणी तयार केली. तिने कलहरूपी किडक्या लाकडापासून दुष्ट यंत्र (जमिनीत पुरायचा खुंटा) तयार केले आणि चौदा वर्षांचा काळरूपी अघोर कुमंत्र फुंकून ते यंत्र पुरून ठेवले. ॥ २ ॥

**मोहि लगि यहु कुठाटु तेहिं ठाटा। घालेसि सब जगु बारहबाटा॥**
**मिटइ कुजोगु राम फिरि आएँ। बसइ अवध नहिं आन उपाएँ॥**

त्याने माझ्यासाठी हा अमंगल थाट सजविला आणि साऱ्या जगाला छिन्न-भिन्न करून नष्ट केले. हा कुयोग श्रीरामचंद्र परत आल्यावर नष्ट होऊ शकेल. मगच अयोध्या नांदू शकेल. दुसऱ्या कोणत्याही उपायाने नाही.'॥ ३ ॥

**भरत बचन सुनि मुनि सुखु पाई। सबहिं कीन्हि बहु भाँति बड़ाई॥**
**तात करहु जनि सोचु बिसेषी। सब दुखु मिटिहि राम पग देखी॥**

भरताचे बोलणे ऐकून मुनींना आनंद वाटला. सर्वांनी भरताचा अनेक प्रकारे गौरव केला. मुनी म्हणाले, 'भरता! जास्त चिंता करू नकोस. श्रीरामचंद्रांच्या चरणांचे दर्शन होताच सर्व दु:ख नाहीसे होईल.'॥ ४ ॥

**दो०—करि प्रबोधु मुनिबर कहेउ अतिथि पेमप्रिय होहु।**
**कंद मूल फल फूल हम देहिं लेहु करि छोहु॥ २१२ ॥**

अशाप्रकारे मुनिश्रेष्ठ भरद्वाजांनी भरताचे समाधान करून म्हटले, 'आता, तुम्ही सर्वजण आमचे प्रिय पाहुणे आहात आणि कृपा करून कंद-मुळे, फळे-फुले जे आम्ही देतो, त्याचा स्वीकार करा.' ॥ २१२ ॥

**सुनि मुनि बचन भरत हियँ सोचू । भयउ कुअवसर कठिन सँकोचू ॥**
**जानि गरुइ गुर गिरा बहोरी । चरन बंदि बोले कर जोरी ॥**

मुनींचे बोलणे ऐकून भरताला काळजी वाटू लागली की, अयोग्य वेळी हा विचित्र संकोचाचा प्रसंग आला. मग तो गुरुजनांच्या म्हणण्याचा मान राखत व त्यांच्या चरणी नतमस्तक होऊन म्हणाला, ॥ १ ॥

**सिर धरि आयसु करिअ तुम्हारा । परम धरम यहु नाथ हमारा ॥**
**भरत बचन मुनिबर मन भाए । सुचि सेवक सिष निकट बोलाए ॥**

'हे नाथ, तुमची आज्ञा शिरोधार्य मानून तिचे पालन करणे, हे आमचे परम कर्तव्य आहे.' भरताचे बोलणे ऐकून मुनिश्रेष्ठांना बरे वाटले. त्यांनी आपल्या विश्वासू सेवकांना व शिष्यांना बोलावले. ॥ २ ॥

**चाहिअ कीन्हि भरत पहुनाई । कंद मूल फल आनहु जाई ॥**
**भलेहिं नाथ कहि तिन्ह सिर नाए । प्रमुदित निज निज काज सिधाए ॥**

आणि सांगितले की, 'भरताचा पाहुणचार करायला हवा. जाऊन कंदमुळे व फळे आणा.' 'ठीक आहे' असे म्हणून ते नतमस्तक झाले आणि मोठ्या आनंदाने आपल्या कामगिरीसाठी गेले. ॥ ३ ॥

**मुनिहि सोच पाहुन बड़ नेवता । तसि पूजा चाहिअ जस देवता ॥**
**सुनि रिधि सिधि अनिमादिक आईं । आयसु होइ सो करहिं गोसाईं ॥**

आपण फार मोठ्या पाहुण्याला निमंत्रण दिले, म्हणून मुनींनी विचार केला. जसा देव, तशी त्याची पूजा झाली पाहिजे. हे ऐकताच ऋद्धी व अणिमादी सिद्धी आल्या व म्हणाल्या, 'हे स्वामी, तुमची जी आज्ञा असेल, त्याप्रमाणे आम्ही करू.' ॥ ४ ॥

**दो०—राम बिरह ब्याकुल भरतु सानुज सहित समाज ।**
**पहुनाई करि हरहु श्रम कहा मुदित मुनिराज ॥ २१३ ॥**

मुनिराज प्रसन्न होऊन म्हणाले, 'श्रीरामचंद्रांच्या विरहामुळे भरत हा शत्रुघ्न व आपल्या परिवारासह व्याकूळ आहे. तेव्हा पाहुणचार करून त्यांचा श्रम-परिहार करा.' ॥ २१३ ॥

**रिधि सिधि सिर धरि मुनिबर बानी । बड़भागिनि आपुहि अनुमानी ॥**
**कहहिं परसपर सिधि समुदाई । अतुलित अतिथि राम लघु भाई ॥**

ऋद्धि-सिद्धींना मुनिराजांची आज्ञा शिरोधार्य मानण्यात धन्यता वाटली. सर्व सिद्धी आपसात म्हणू लागल्या की, 'श्रीरामचंद्रांचे लहान बंधू भरत हे असे अतिथी आहेत की, त्यांची तुलना कोणाशीही करता येणार नाही. ॥ १ ॥

**मुनि पद बंदि करिअ सोइ आजू । होइ सुखी सब राज समाजू ॥**
**अस कहि रचेउ रुचिर गृह नाना । जेहि बिलोकि बिलखाहिं बिमाना ॥**

म्हणून मुनींच्या चरणांना वंदन करून आज असे केले पाहिजे की, या सर्व राजपरिवाराला सुख लाभेल.' असे म्हणून त्यांनी पुष्कळ सुंदर घरे तयार केली, ज्यांच्यापुढे राजमहालही तुच्छ वाटावेत. ॥ २ ॥

**भोग बिभूति भूरि भरि राखे । देखत जिन्हहि अमर अभिलाषे ॥**
**दासीं दास साजु सब लीन्हें । जोगवत रहहिं मनहि मनु दीन्हें ॥**

त्या घरांमधून पुष्कळसे भोग-पदार्थ व थाटमाट करून ठेवले. ते पाहून देवांनाही हेवा वाटला. दास-दासी सर्व सामग्री घेऊन मन:पूर्वक पाहुण्यांच्या आवडीप्रमाणे करू लागल्या. ॥ ३ ॥

**सब समाजु सजि सिधि पल माहीं । जे सुख सुरपुर सपनेहुँ नाहीं ॥**
**प्रथमहिं बास दिए सब केही । सुंदर सुखद जथा रुचि जेही ॥**

जे सुखाचे सामान स्वर्गामध्ये स्वप्नातही असणार नाही, ते सर्व सिद्धींनी क्षणात भरून ठेवले. प्रथमत: त्यांनी सर्वांना त्यांच्या आवडीप्रमाणे आरामशीर निवासस्थाने दिली. ॥ ४ ॥

दो०—**बहुरि सपरिजन भरत कहुँ रिषि अस आयसु दीन्ह ।**
**बिधि बिसमय दायकु बिभव मुनिबर तपबल कीन्ह ॥ २१४ ॥**

आणि नंतर भरताला कुटुंबासह राहाण्यासाठी जागा दिल्या, कारण ऋषींनी तशी आज्ञा केली होती. (आपल्या सर्व सोबत्यांना आराम मिळावा, असे भरताला वाटत होते, हे जाणून मुनींनी प्रथम त्यांची व्यवस्था करण्यास सांगितले होते.) मुनिश्रेष्ठ भरद्वाजांनी आपल्या तपोबलाने ब्रह्मदेवांनाही थक्क करून सोडणारे वैभव भरून टाकले होते. ॥ २१४ ॥

**मुनि प्रभाउ जब भरत बिलोका । सब लघु लगे लोकपति लोका ॥**
**सुख समाजु नहिं जाइ बखानी । देखत बिरति बिसारहिं ग्यानी ॥**

मुनींचा प्रभाव जेव्हा भरताने पाहिला, तेव्हा त्याला इंद्र, वरुण, यम, कुबेर इत्यादी लोकपालांचे लोकही तुच्छ वाटले. ज्ञानी लोकसुद्धा जी सुखे पाहून वैराग्य विसरून जातात, त्या सुखसामग्रीचे वर्णन काय करावे ? ॥ १ ॥

**आसन सयन सुबसन बिताना । बन बाटिका बिहग मृग नाना ॥**
**सुरभि फूल फल अमिअ समाना । बिमल जलासय बिबिध बिधाना ॥**

आसने, शय्या, सुंदर वस्त्रे, चांदवे, वन, बागा, तऱ्हेतऱ्हेचे पक्षी व पशू, सुगंधित फुले आणि अमृतासारखी स्वादिष्ट फळे, अनेक प्रकारचे तलाव, विहिरी इत्यादी निर्मल जलाशय, ॥ २ ॥

**असन पान सुचि अमिअ अमी से । देखि लोग सकुचात जमी से ॥**
**सुर सुरभी सुरतरु सबही कें । लखि अभिलाषु सुरेस सची कें ॥**

आणि अमृतासारखे खाण्या-पिण्याचे पवित्र पदार्थ होते. ते पाहून सर्व लोक विरक्त मुनींसारखे संकोचत होते. सर्वांच्या राहण्याच्या जागी कामधेनू व कल्पवृक्ष होते. ते पाहून इंद्र व इंद्राणी यांनासुद्धा लोभ सुटला. ॥ ३ ॥

**रितु बसंत बह त्रिबिध बयारी । सब कहँ सुलभ पदारथ चारी ॥**
**स्त्रक चंदन बनितादिक भोगा । देखि हरष बिसमय बस लोगा ॥**

वसंतऋतू होता. शीतल, मंद व सुगंधित अशा तिन्ही प्रकारचे वारे वाहात होते. सर्वजणांना धर्मादी चारही पदार्थ सुलभ होते. माला, चंदन, स्त्रिया इत्यादी भोग पाहून सर्व लोकांना हर्ष व विस्मय वाटत होता. ॥ ४ ॥

दो०—**संपति चकई भरतु चक मुनि आयस खेलवार।**
**तेहि निसि आश्रम पिंजराँ राखे भा भिनुसार॥ २१५ ॥**

ती भोग-विलासाची सामग्री चकवी होती आणि भरत हा चक्रवाक. मुनींची आज्ञा हा खेळ होता, त्या खेळात त्या रात्री आश्रमरूपी पिंजऱ्यात दोघांना बंदिस्त केले होते. (चक्रवाक पक्षी व पक्षिणी यांचा रात्रीच्या वेळी संयोग होत नाही, त्याप्रमाणे मुनींच्या आज्ञेने रात्रभर भोग-पदार्थ उपलब्ध होते, परंतु भरत मनानेसुद्धा त्याला शिवला नाही.) ॥ २१५ ॥

## मासपारायण, एकोणिसावा विश्राम

**कीन्ह निमज्जनु तीरथराजा । नाइ मुनिहि सिरु सहित समाजा ॥**
**रिषि आयसु असीस सिर राखी । करि दंडवत बिनय बहु भाषी ॥**

प्रात:काळी भरताने तीर्थराजामध्ये स्नान केले आणि सर्व परिवारासह मुनींपुढे नतमस्तक होऊन त्यांची आज्ञा आणि आशीर्वाद मिळविला. नंतर त्यांना दंडवत करून नम्रतापूर्वक त्यांचा निरोप घेतला. ॥ १ ॥

**पथ गति कुसल साथ सब लीन्हें । चले चित्रकूटहिं चितु दीन्हें ॥**
**रामसखा कर दीन्हें लागू । चलत देह धरि जनु अनुरागू ॥**

त्यानंतर मार्ग माहीत असलेल्या लोकांबरोबर सर्व लोकांना घेऊन भरत चित्तामध्ये चित्रकूटाचे

ध्यान करीत निघाला. तो रामसखा गुहाच्या हातात हात घालून असा चालला होता की, जणू प्रत्यक्ष श्रीरामप्रेमच साकार झाले होते. ॥ २ ॥

**नहिं पद त्रान सीस नहिं छाया । पेमु नेमु ब्रतु धरमु अमाया ॥**
**लखन राम सिय पंथ कहानी । पूँछत सखहि कहत मृदु बानी ॥**

त्याच्या पायांत जोडे नव्हते आणि डोक्यावर छत्र नव्हते. त्याचे प्रेम, नियम, व्रत व धर्म हे निष्कपट होते. तो निषादराजाला लक्ष्मण, श्रीरामचंद्र आणि सीता यांच्या प्रवासाविषयी कोमल वाणीने विचारत होता. ॥ ३ ॥

**राम बास थल बिटप बिलोकें । उर अनुराग रहत नहिं रोकें ॥**
**देखि दसा सुर बरिसहिं फूला । भइ मृदु महि मगु मंगल मूला ॥**

श्रीरामांच्या उतरण्याच्या जागा आणि तेथील वृक्ष पाहून त्याच्या हृदयातील प्रेम आवरत नव्हते. भरताची ती दशा पाहून देव फुले उधळू लागले. पृथ्वी कोमल बनली आणि मार्ग मांगल्याचे मूळ बनला. ॥ ४ ॥

दो०—**किएँ जाहिं छाया जलद सुखद बहइ बर बात।**
**तस मगु भयउ न राम कहँ जस भा भरतहि जात॥ २१६ ॥**

मेघ सावली धरीत होते, सुखद वारा वाहात होता. भरत जात होता त्यावेळी मार्ग असा सुखदायक झाला की, तसा श्रीरामचंद्रांसाठीही झाला नव्हता. ॥ २१६ ॥

**जड़ चेतन मग जीव घनेरे । जे चितए प्रभु जिन्ह प्रभु हेरे ॥**
**ते सब भए परम पद जोगू । भरत दरस मेटा भव रोगू ॥**

वाटेत असंख्य जड-चेतन जीव होते. त्यांपैकी ज्यांना श्रीरामांनी कृपा-दृष्टीने पाहिले किंवा ज्यांनी प्रभू श्रीरामांना पाहिले, ते सर्व तत्क्षणी परमपदाचे अधिकारी झाले. परंतु आता भरताच्या दर्शनामुळे त्यांचा जन्म-मरणरूपी भव-रोगच नाहीसा झाला. ॥ १ ॥

**यह बड़ि बात भरत कइ नाहीं । सुमिरत जिनहि रामु मन माहीं ॥**
**बारक राम कहत जग जेऊ । होत तरन तारन नर तेऊ ॥**

भरताकरता ही काही फार मोठी गोष्ट नव्हती. कारण प्रत्यक्ष श्रीराम त्याचे आपल्या मनात सदा स्मरण करीत होते. जगामध्ये जे मनुष्य एकदा ‘राम’ म्हणतात, तेसुद्धा तरून जाणारे व तारून नेणारे होत असतात. ॥ २ ॥

**भरतु राम प्रिय पुनि लघु भ्राता । कस न होइ मगु मंगलदाता ॥**
**सिद्ध साधु मुनिबर अस कहहीं । भरतहि निरखि हरषु हियँ लहहीं ॥**

शिवाय, भरत हा तर श्रीरामचंद्रांचा प्रिय असा धाकटा भाऊ होता. मग त्याच्यासाठी मार्ग सुखदायक का बरे होणार नाही? असे सिद्ध, साधू आणि श्रेष्ठ मुनी म्हणत होते आणि भरताला पाहून मनातून आनंदित होत होते. ॥ ३ ॥

**देखि प्रभाउ सुरेसहि सोचू । जगु भल भलेहि पोच कहुँ पोचू ॥**
**गुर सन कहेउ करिअ प्रभु सोई । रामहि भरतहि भेट न होई ॥**

भरताचे हे प्रेम पाहून इंद्र काळजीत पडला. (आता याच्या प्रेमाला वश होऊन श्रीराम परत न जावोत व आमच्या कार्यात विघ्न न येवो, म्हणजे झाले.) जग चांगल्यासाठी चांगले व वाईटासाठी वाईट असते. इंद्राने गुरू बृहस्पतींना म्हटले की, 'हे प्रभो, श्रीरामचंद्र व भरत यांची भेट होऊ नये, असा उपाय करा. ॥ ४ ॥

दो०—**रामु सँकोची प्रेम बस भरत सपेम पयोधि।**
**बनी बात बेगरन चहति करिअ जतनु छलु सोधि॥ २१७॥**

श्रीरामचंद्र हे भिडस्त आणि प्रेमाला भुलणारे आहेत आणि भरत तर प्रेमाचा समुद्र आहे. सगळे जुळून आलेले विस्कटू पाहात आहे. म्हणून काहीतरी कपटी युक्ती शोधून यावर उपाय करा.'॥ २१७ ॥

**बचन सुनत सुरगुरु मुसुकाने । सहसनयन बिनु लोचन जाने ॥**
**मायापति सेवक सन माया । करइ त उलटि परइ सुरराया ॥**

इंद्राचे बोलणे ऐकताच देवगुरू बृहस्पतींना हसू आले. त्यांना तो हजार डोळ्यांचा (पण ज्ञान-नेत्र नसल्यामुळे) नेत्ररहित (मूर्ख) वाटला. ते म्हणाले, 'हे देवराज, मायेचे स्वामी असलेल्या श्रीराम-चंद्रांच्या सेवकावर जर कुणी माया केली, तर ती उलटून त्याच्यावरच पडते. ॥ १ ॥

**तब किछु कीन्ह राम रुख जानी । अब कुचालि करि होइहि हानी ॥**
**सुनु सुरेस रघुनाथ सुभाऊ । निज अपराध रिसाहिं न काऊ ॥**

मागील वेळी श्रीरामांचा रोख पाहूनच वनवासाला जाण्याचे कारस्थान रचले होते. परंतु यावेळी दुष्ट चाल खेळल्यास हानीच होईल. हे देवराज, श्रीरामांचा स्वभाव ऐका. ते स्वतःवर केलेल्या अपराधामुळे कधी रागावत नाहीत. ॥ २ ॥

**जो अपराधु भगत कर करई । राम रोष पावक सो जरई ॥**
**लोकहुँ बेद बिदित इतिहासा । यह महिमा जानहिं दुरबासा ॥**

परंतु कुणी त्यांच्या भक्ताचा अपराध केला, तर मात्र श्रीराम क्रोधाग्नीने भडकतात. लोक व वेद यांमध्ये ही गोष्ट प्रसिद्ध आहे. हा महिमा दुर्वासांना माहीत आहे. ॥ ३ ॥

**भरत सरिस को राम सनेही । जगु जप राम रामु जप जेही ॥**

सारे जग श्रीरामांचा जप करोत, परंतु श्रीराम स्वतः ज्याचा जप करतात, त्या भरतासारखा श्रीरामांचा भक्त कोण असणार?॥ ४ ॥

**दो०—मनहुँ न आनिअ अमरपति रघुबर भगत अकाजु।**
**अजसु लोक परलोक दुख दिन दिन सोक समाजु॥ २१८॥**

म्हणून हे देवराज, रघुकुलश्रेष्ठ श्रीरामांच्या भक्ताच्या कार्यात विघ्न आणायचे मनातसुद्धा आणू नका. असे केल्याने या लोकी अपकीर्ती आणि परलोकी दुःख मिळेल आणि शोकाची कारणे दिवसेंदिवस वाढतच जातील.॥ २१८॥

**सुनु सुरेस उपदेसु हमारा। रामहि सेवकु परम पिआरा॥**
**मानत सुखु सेवक सेवकाईं। सेवक बैर बैरु अधिकाईं॥**

हे देवराज, आमचा उपदेश ऐका. श्रीरामांना आपला सेवक अत्यंत प्रिय असतो. त्यांना आपल्या सेवकाच्या सेवेमध्ये सुख वाटते आणि सेवकाबरोबर वैर केल्यास ते फार मोठे शत्रुत्व मानतात.॥ १॥

**जद्यपि सम नहिं राग न रोषू। गहहिं न पाप पूनु गुन दोषू॥**
**करम प्रधान बिस्व करि राखा। जो जस करइ सो तस फलु चाखा॥**

जरी ते सम आहेत, त्यांच्यामध्ये आसक्ती नाही व रोषही नाही आणि ते कुणाचे पाप-पुण्य आणि गुण-दोषही ग्रहण करीत नाहीत, त्यांनी विश्वामध्ये कर्मालाच प्राधान्य दिले आहे, जो जसे कर्म करतो, त्याला तसेच फळ भोगावे लागते,॥ २॥

**तदपि करहिं सम बिषम बिहारा। भगत अभगत हृदय अनुसारा॥**
**अगुन अलेप अमान एकरस। रामु सगुन भए भगत पेम बस॥**

तथापि ते भक्त व अभक्ताच्या भावनेप्रमाणे सम व विषम व्यवहार करतात. (भक्ताला आलिंगन देतील, तर अभक्ताला ठार मारून त्याला तारून नेतील.) गुणरहित, निर्लेप, मानरहित आणि सदा एकरस असलेले भगवान श्रीराम भक्ताच्या प्रेमामुळेच सगुण झालेले आहेत.॥ ३॥

**राम सदा सेवक रुचि राखी। बेद पुरान साधु सुर साखी॥**
**अस जियँ जानि तजहु कुटिलाई। करहु भरत पद प्रीति सुहाई॥**

श्रीरामांना नेहमी आपले भक्त आवडतात. वेद, पुराणे, साधू आणि देव हे यासाठी साक्षीला आहेत. असे जाणून कपट सोडून भरताच्या चरणी मनापासून प्रेम बाळगा.॥ ४॥

**दो०—राम भगत परहित निरत पर दुख दुखी दयाल।**
**भगत सिरोमनि भरत तें जनि डरपहु सुरपाल॥ २१९॥**

हे देवराज इंद्रा, श्रीरामचंद्रांचे भक्त नेहमी दुसऱ्याचे हित करण्यात मग्न असतात. ते दुसऱ्यांच्या दुःखाने दुःखी व दयाळू असतात. त्यात भरत हा तर भक्तशिरोमणी आहे. त्याला मुळीच घाबरू नका.॥ २१९॥

**सत्यसंध प्रभु सुर हितकारी। भरत राम आयस अनुसारी॥**
**स्वारथ बिबस बिकल तुम्ह होहू। भरत दोसु नहिं राउर मोहू॥**

प्रभू श्रीरामचंद्र हे सत्यप्रतिज्ञ व देवांचे हित करणारे आहेत आणि भरत हा श्रीरामांच्या आज्ञेप्रमाणे वागणारा आहे. तुम्ही विनाकारण स्वार्थाचा विचार करून घाबरला आहात. यात भरताचा काही दोष नाही, तुमचा मोहच आहे.'॥ १॥

**सुनि सुरबर सुरगुर बर बानी। भा प्रमोदु मन मिटी गलानी॥**
**बरषि प्रसून हरषि सुरराऊ। लगे सराहन भरत सुभाऊ॥**

देवगुरू बृहस्पतींची हितकर वाणी ऐकून इंद्राला मनापासून आनंद झाला आणि त्याची चिंता नाहीशी झाली. तेव्हा आनंदाने त्याने पुष्पवर्षाव करून भरताची प्रशंसा केली.॥ २॥

**एहि बिधि भरत चले मग जाहीं। दसा देखि मुनि सिद्ध सिहाहीं॥**
**जबहिं रामु कहि लेहिं उसासा। उमगत पेमु मनहुँ चहु पासा॥**

अशा प्रकारे भरत वाटेने चालला होता. त्याची प्रेममय दशा पाहून मुनी व सिद्ध पुरुष यांनासुद्धा हेवा वाटे. भरत जेव्हा 'राम' म्हणत उसासा टाकी, तेव्हा जणू चोहीकडे प्रेम उसळे.॥ ३॥

**द्रवहिं बचन सुनि कुलिस पषाना। पुरजन पेमु न जाइ बखाना॥**
**बीच बास करि जमुनहिं आए। निरखि नीरु लोचन जल छाए॥**

भरताचे प्रेमाचे व दैन्याचे बोलणे ऐकून वज्र व पाषाणही वितळून जात. अयोध्यावासीयांच्या प्रेमाबद्दल काय सांगावे? मध्ये एकदा मुक्काम करून भरत यमुनातीरावर पोहोचला. यमुनेचे पाणी पाहून त्याच्या डोळ्यांत पाणी आले.॥ ४॥

**दो०—रघुबर बरन बिलोकि बर बारि समेत समाज।**
**होत मगन बारिधि बिरह चढ़े बिबेक जहाज॥ २२०॥**

श्रीरामांच्या सावळ्या रंगाप्रमाणे असलेले यमुनेचे श्यामल जळ पाहून भरत व सर्व परिवार प्रेमविव्हल होऊन विरहरूपी समुद्रात बुडून जात असताना ते विवेकरूपी जहाजावर चढले. (विरह-व्यथेमध्ये बुडत असताना आपण लवकर जाऊन प्रत्यक्ष दर्शन घेऊ, या विचाराने ते सर्व उत्साहित झाले.)॥ २२०॥

**जमुन तीर तेहि दिन करि बासू। भयउ समय सम सबहि सुपासू॥**
**रातिहिं घाट घाट की तरनी। आईं अगनित जाहिं न बरनी॥**

त्या दिवशी यमुनेच्या किनाऱ्यावर त्यांनी मुक्काम केला. प्रसंगानुरूप खाण्या-पिण्याची चांगली

व्यवस्था झाली. निषादराजाच्या इशाऱ्यावर रातोरात सर्व घाटांवरील असंख्य नौका तेथे आल्या होत्या. त्यांचे वर्णनही करणे कठीण. ॥ १ ॥

**प्रात पार भए एकहि खेवाँ। तोषे रामसखा की सेवाँ॥**
**चले नहाइ नदिहि सिर नाई। साथ निषादनाथ दोउ भाई॥**

सकाळी एका फेरीतच सर्व लोक पलीकडे गेले. ते सर्व श्रीरामांचा मित्र निषादराजाच्या या सेवेमुळे प्रसन्न झाले. नंतर स्नान करून व यमुना नदीपुढे नतमस्तक होऊन दोघे भाऊ निषादराजासह निघाले. ॥ २ ॥

**आगें मुनिबर बाहन आछें। राजसमाज जाइ सबु पाछें॥**
**तेहि पाछें दोउ बंधु पयादें। भूषन बसन बेष सुठि सादें॥**

पुढील चांगल्या वाहनांवर श्रेष्ठ मुनी होते. त्यांच्यामागे सर्व राज-परिवार जात होता आणि मागे दोघे बंधू सामान्य वस्त्राभूषणामध्ये पायी चालत होते. ॥ ३ ॥

**सेवक सुहृद सचिवसुत साथा। सुमिरत लखनु सीय रघुनाथा॥**
**जहँ जहँ राम बास बिश्रामा। तहँ तहँ करहिं सप्रेम प्रनामा॥**

त्यांच्यासोबत सेवक, मित्र व मंत्र्यांचे पुत्र होते. लक्ष्मण, सीता व रघुनाथ यांचे स्मरण करीत ते चालले होते. जिथे जिथे श्रीरामांनी निवास केला, विश्रांती घेतली, तेथे तेथे ते प्रेमाने प्रणाम करीत होते. ॥ ४ ॥

दो०—**मगबासी नर नारि सुनि धाम काम तजि धाइ।**
**देखि सरूप सनेह सब मुदित जनम फलु पाइ॥ २२१॥**

वाटेत राहाणारे स्त्री-पुरुष ही वार्ता ऐकताच घरदार व कामकाज सोडून धावत येत आणि त्यांचे रूप-सौंदर्य आणि प्रेम पाहून सर्वजण जन्माचे सार्थक झाल्याचे मानून आनंदित होत होते. ॥ २२१ ॥

**कहहिं सपेम एक एक पाहीं। रामु लखनु सखि होहिं कि नाहीं॥**
**बय बपु बरन रूपु सोइ आली। सीलु सनेहु सरिस सम चाली॥**

गावातील स्त्रिया एक दुसरीला प्रेमाने म्हणत की, 'सखी, हे राम-लक्ष्मण आहेत का? हे सखी, यांची अवस्था, शरीर व रंग-रूप अगदी तसेच आहे. वागणे व स्नेह त्यांच्यासारखेच आणि चालणेसुद्धा त्यांच्यासारखेच आहे. ॥ १ ॥

**बेषु न सो सखि सीय न संगा। आगें अनी चली चतुरंगा॥**
**नहिं प्रसन्न मुख मानस खेदा। सखि संदेहु होइ एहिं भेदा॥**

परंतु हे सखी, यांचा तसा मुनिवेष नाही आणि बरोबर सीताही नाही. यांच्यापुढे चतुरंग सेना चालली आहे. शिवाय यांचे मुख प्रसन्न नाही. मनातून खंत आहे. हे सखी, या फरकामुळे वेगळेपणा वाटतो.' ॥ २ ॥

**तासु तरक तियगन मन मानी। कहहिं सकल तेहि सम न सयानी॥**
**तेहि सराहि बानी फुरि पूजी। बोली मधुर बचन तिय दूजी॥**

तिचा तर्क इतर स्त्रियांना पटला. सर्वजणी म्हणत होत्या की, हिच्या-सारखी शहाणी कोणी नाही. तिची वाखाणणी करीत व 'तुझे म्हणणे खरे आहे' असे म्हणत दुसरी एकजण गोड शब्दांत म्हणाली. ॥ ३ ॥

**कहि सपेम सब कथाप्रसंगू। जेहि बिधि राम राज रस भंगू॥**
**भरतहि बहुरि सराहन लागी। सील सनेह सुभाय सुभागी॥**

श्रीरामांच्या राजतिलकाचा आनंद कसा भंग पावला, तो सर्व प्रसंग सांगून ती भाग्यवान स्त्री भरताचे वर्तन, स्नेह व स्वभाव यांची प्रशंसा करू लागली. ॥ ४ ॥

दो०—**चलत पयादें खात फल पिता दीन्ह तजि राजु।**
**जात मनावन रघुबरहि भरत सरिस को आजु॥ २२२॥**

'बघा, पित्याने दिलेले राज्य सोडून हा भरत पायी चालत आहे आणि फलाहार करीत श्रीरामांना अयोध्येला परतण्याची विनवणी करण्यास जात आहे. यांच्यासारखा दुसरा कोण (रामभक्त) आहे? ॥ २२२ ॥

**भायप भगति भरत आचरनू। कहत सुनत दुख दूषन हरनू॥**
**जो किछु कहब थोर सखि सोई। राम बंधु अस काहे न होई॥**

भरताचा बंधु-भाव, भक्ती आणि त्याचे वर्तन, याविषयी सांगणे व ऐकणे हे दोष हरण करणारे आहे. हे सखी, त्याच्याविषयी जितके सांगावे, तितके थोडेच आहे. श्रीरामांचा भाऊ असा का असणार नाही बरे? ॥ १ ॥

**हम सब सानुज भरतहि देखें। भइन्ह धन्य जुबती जन लेखें॥**
**सुनि गुन देखि दसा पछिताहीं। कैकइ जननि जोगु सुतु नाहीं॥**

शत्रुघ्नासह भरताला पाहून आज आम्ही सर्वजणी मोठ्या भाग्यवान स्त्रियांच्या पंक्तीत आलो.' अशा प्रकारे भरताचे गुण ऐकून आणि त्याची दशा पाहून स्त्रियांना वाईट वाटत होते आणि त्या म्हणत होत्या की, 'हा पुत्र कैकेयीसारख्या मातेला शोभत नाही.' ॥ २ ॥

**कोउ कह दूषनु रानिहि नाहिन। बिधि सबु कीन्ह हमहि जो दाहिन॥**
**कहँ हम लोक बेद बिधि हीनी। लघु तिय कुल करतूति मलीनी॥**

कुणी म्हणत होती की, 'यात राणीचाही दोष नाही. हे सर्व विधात्याने घडविले आहे. तो आम्हांला अनुकूल आहे, म्हणून आम्हांला यांचे दर्शन घडले. नाहीतरी कुठे आम्ही लौकिकदृष्ट्या व वैदिक दृष्ट्या मर्यादाहीन, कुल व करणी या दोन्हींमध्ये मलिन, तुच्छ स्त्रिया, ॥ ३ ॥

**बसहिं कुदेस कुगाँव कुबामा। कहँ यह दरसु पुन्य परिनामा॥**
**अस अनंदु अचिरिजु प्रति ग्रामा। जनु मरुभूमि कलपतरु जामा॥**

आम्ही वाईट प्रदेशात आणि कुग्रामांत राहातो आणि स्त्रियांमध्येसुद्धा नीच स्त्रिया आहोत, आणि कुठे हे महान पुण्यामुळे होणारे यांचे दर्शन.' असाच आनंद आणि आश्चर्य गावा-गावात लोकांना वाटत होते. जणू मरुभूमीमध्ये कल्पवृक्ष उगवला असावा. ॥ ४ ॥

**दो०—भरत दरसु देखत खुलेउ मग लोगन्ह कर भागु।**
**जनु सिंघलबासिन्ह भयउ बिधि बस सुलभ प्रयागु॥ २२३॥**

भरताचे स्वरूप पाहून वाटेत राहाणाऱ्या लोकांचे भाग्य उजळले. जणू दैवयोगाने सिंहल द्वीपातील रहिवाश्यांना तीर्थराज प्रयाग सुलभ झाले. ॥ २२३ ॥

**निज गुन सहित राम गुन गाथा। सुनत जाहिं सुमिरत रघुनाथा॥**
**तीरथ मुनि आश्रम सुरधामा। निरखि निमज्जहिं करहिं प्रनामा॥**

अशा प्रकारे आपल्या गुणांबरोबरच श्रीरामांच्या गुणांचे गायन ऐकत आणि श्रीरघुनाथांचे स्मरण करीत भरत चालला होता. वाटेत तो तीर्थ पाहून स्नान करीत होता. मुनींचे आश्रम आणि देवांची मंदिरे पाहून प्रणाम करीत होता. ॥ १ ॥

**मनहीं मन मागहिं बरु एहू। सीय राम पद पदुम सनेहू॥**
**मिलहिं किरात कोल बनबासी। बैखानस बटु जती उदासी॥**

आणि मनातल्या मनात हा वर मागत होता की, श्रीसीतारामांच्या चरण-कमलांच्या ठायी प्रेम वसो. वाटेत भिल्ल, कोल इत्यादी वनवासी आणि वानप्रस्थ, ब्रह्मचारी, संन्यासी आणि विरक्त भेटत होते. ॥ २ ॥

**करि प्रनामु पूँछहिं जेहि तेही। केहि बन लखनु रामु बैदेही॥**
**ते प्रभु समाचार सब कहहीं। भरतहि देखि जनम फलु लहहीं॥**

त्यांपैकी सर्वांना प्रणाम करून तो विचारत होता की, लक्ष्मण, श्रीराम व जानकी हे कोणत्या वनात आहेत? ते लोक प्रभू श्रीरामांची सर्व वार्ता सांगत व भरताला पाहून त्यांच्या जन्माचे सार्थक होत होते. ॥ ३ ॥

**जे जन कहहिं कुसल हम देखे। ते प्रिय राम लखन सम लेखे॥**
**एहि बिधि बूझत सबहि सुबानी। सुनत राम बनबास कहानी॥**

ते म्हणत की, 'आम्ही त्यांना सुखरूप पाहिले आहे, ते भरताला श्रीराम-लक्ष्मणांसमान प्रिय वाटत.' अशा प्रकारे भरत सुंदर वाणीने विचारत होता व श्रीरामांच्या वनवासाची कथा ऐकत जात होता. ॥ ४ ॥

**दो०—तेहि बासर बसि प्रातहीं चले सुमिरि रघुनाथ।**
**राम दरस की लालसा भरत सरिस सब साथ॥ २२४॥**

त्या दिवशी तेथेच थांबून दुसऱ्या दिवशी सकाळीच श्रीरघुनाथांचे स्मरण करून भरत निघाला. सोबत असलेल्या सर्व लोकांनाही भरतासारखीच श्रीरामांच्या दर्शनाची लालसा होती. ॥ २२४ ॥

**मंगल सगुन होहिं सब काहू। फरकहिं सुखद बिलोचन बाहू॥**
**भरतहि सहित समाज उछाहू। मिलिहहिं रामु मिटिहि दुख दाहू॥**

सर्वांना मंगलसूचक शकुन होऊ लागले. पुरुषांचे उजवे, तर स्त्रियांचे डावे नेत्र आणि भुजा स्फुरत होत्या. सर्व परिवाराबरोबरच भरताला असा उत्साह वाटत होता की, श्रीराम भेटतील आणि दु:खाची आग शांत होईल.॥ १॥

**करत मनोरथ जस जियँ जाके। जाहिं सनेह सुराँ सब छाके॥**
**सिथिल अंग पग मग डगि डोलहिं। बिहबल बचन पेम बस बोलहिं॥**

ज्याच्या मनात जसे असते, त्याप्रमाणे तो स्वत: मनोरथ करीत असतो. सर्वजण स्नेहरूपी मदिरेमुळे धुंद होऊन चालले होते. त्यांची शरीरे थकली होती, वाटेवर पाय डगमगत होते आणि प्रेमाधिक्यामुळे विव्हळ होऊन ते बोलत होते.॥ २॥

**रामसखाँ तेहि समय देखावा। सैल सिरोमनि सहज सुहावा॥**
**जासु समीप सरित पय तीरा। सीय समेत बसहिं दोउ बीरा॥**

रामांचा मित्र निषादराज याने त्याचवेळी स्वाभाविकपणे सुंदर असलेला पर्वतश्रेष्ठ कामदगिरी दाखविला. त्याच्याजवळच पयस्विनी नदीकाठी सीतेसह दोघे बंधू निवास करीत होते.॥ ३॥

**देखि करहिं सब दंड प्रनामा। कहि जय जानकि जीवन रामा॥**
**प्रेम मगन अस राजसमाजू। जनु फिरि अवध चले रघुराजू॥**

सर्व लोकांनी तो पर्वत पाहून 'जानकीजीवन श्रीरामचंद्र की जय', असे म्हणत त्याला दंडवत प्रणाम केला. राजपरिवारही प्रेमामध्ये असा मग्न झाला की, जणू श्रीरघुनाथ अयोध्येला परत निघाले आहेत.॥ ४॥

दो०—**भरत प्रेमु तेहि समय जस तस कहि सकइ न सेषु।**
**कबिहि अगम जिमि ब्रह्मसुखु अह मम मलिन जनेषु॥ २२५॥**

भरताच्या मनात त्यावेळी जे प्रेम उफाळून आले होते, त्याचे वर्णन शेषसुद्धा करू शकणार नाही. ज्याप्रमाणे अहंता आणि ममता यांमुळे मलिन झालेल्या मनुष्यांना ब्रह्मानंद अगम्य असतो, त्याप्रमाणे कवीला ते प्रेम अगम्य आहे.॥ २२५॥

**सकल सनेह सिथिल रघुबर कें। गए कोस दुइ दिनकर ढरकें॥**
**जलु थलु देखि बसे निसि बीतें। कीन्ह गवन रघुनाथ पिरीतें॥**

सर्व लोक प्रेमाने विह्वल झाल्यामुळे सूर्यास्त होईपर्यंत दोन कोसच चालू शकले आणि पाणी व निवाऱ्याची सोय पाहून रात्री तेथेच काही न खाता-पिता थांबले. रात्र सरल्यावर श्रीरघुनाथांवर प्रेम असलेला भरत पुढे निघाला.॥ १॥

**उहाँ रामु रजनी अवसेषा। जागे सीयँ सपन अस देखा॥**
**सहित समाज भरत जनु आए। नाथ बियोग ताप तन ताए॥**

तिकडे श्रीरामचंद्र रात्र अजून शिल्लक उरली असतानाच जागे झाले. त्या रात्री सीतेला स्वप्न पडले, ते ती प्रभूंना सांगू लागली की, 'सर्व परिवारासह भरत येथे येत आहे. प्रभूंच्या वियोगाग्नीमुळे त्याचे शरीर पोळून निघत आहे.॥ २॥

**सकल मलिन मन दीन दुखारी। देखीं सासु आन अनुहारी॥**
**सुनि सिय सपन भरे जल लोचन। भए सोचबस सोच बिमोचन॥**

सर्व लोक मनातून उदास, दीन व दु:खी झाले होते. सासूबाईसुद्धा वेगळ्याच दिसल्या.' सीतेचे स्वप्न ऐकून श्रीरामचंद्रांच्या नेत्रात पाणी भरून आले आणि सर्वांना चिंतेतून मुक्त करणारे प्रभू स्वत:च चिंतित झाले.॥ ३॥

**लखन सपन यह नीक न होई। कठिन कुचाह सुनाइहि कोई॥**
**अस कहि बंधु समेत नहाने। पूजि पुरारि साधु सनमाने॥**

आणि म्हणाले, 'लक्ष्मणा, हे स्वप्न काही चांगले नाही. एखादी भयप्रद वार्ता कुणीतरी येऊन सांगेल.' असे म्हणून त्यांनी भावाबरोबर स्नान केले आणि त्रिपुरारी महादेवांचे पूजन करून साधूंना सन्मानित केले.॥ ४॥

छं०—**सनमानि सुर मुनि बंदि बैठे उतर दिसि देखत भए।**
**नभ धूरि खग मृग भूरि भागे बिकल प्रभु आश्रम गए॥**
**तुलसी उठे अवलोकि कारनु काह चित सचकित रहे।**
**सब समाचार किरात कोलन्हि आइ तेहि अवसर कहे॥**

देवांचे पूजन आणि मुनींचे वंदन झाल्यावर श्रीराम बसले आणि उत्तर दिशेकडे पाहू लागले. आकाशात धुरळा पसरला होता. पुष्कळसे पक्षी आणि पशू व्याकूळ होऊन पळत प्रभूंच्या आश्रमाकडे येत होते. तुलसीदास म्हणतात की, हे पाहून श्रीराम उठून उभे राहिले आणि विचार करू लागले की, असे व्हायचे काय कारण असावे? मनात त्यांना आश्चर्य वाटत होते. त्याचवेळी कोल-भिल्लांनी येऊन सर्व बातमी सांगितली.

सो०—**सुनत सुमंगल बैन मन प्रमोद तन पुलक भर।**
**सरद सरोरुह नैन तुलसी भरे सनेह जल॥ २२६॥**

तुलसीदास म्हणतात की, ते त्यांचे मंगल बोलणे ऐकताच श्रीरामांच्या मनाला खूप आनंद झाला. शरीर पुलकित झाले आणि शरद्ऋतूमधील प्रफुल्लित कमलांसारखे त्यांचे नेत्र प्रेमाश्रूंनी भरून गेले.॥ २२६॥

**बहुरि सोचबस भे सियरवनू। कारन कवन भरत आगवनू॥**
**एक आइ अस कहा बहोरी। सेन संग चतुरंग न थोरी॥**

सीतापती श्रीरामांच्या मनात पुन्हा विचार आला की, भरताच्या येण्याचे काय कारण असावे? नंतर एकाने येऊन सांगितले की, भरताबरोबर जंगी चतुरंग सेनाही आहे.॥ १॥

**सो सुनि रामहि भा अति सोचू। इत पितु बच इत बंधु सकोचू॥**
**भरत सुभाउ समुझि मन माहीं। प्रभु चित हित थिति पावत नाहीं॥**

हे ऐकून श्रीरामांना फार काळजी वाटू लागली. एकीकडे पित्याचे वचन, तर दुसरीकडे भरताची भीड. भरताचा स्वभाव मनात जाणल्यावर प्रभू श्रीरामचंद्रांच्या मनाला कुठेही आधार दिसेना.॥ २॥

**समाधान तब भा यह जाने। भरतु कहे महुँ साधु सयाने॥**
**लखन लखेउ प्रभु हृदयँ खभारू। कहत समय सम नीति बिचारू॥**

परंतु भरत साधु-स्वभावाचा व शहाणा आहे आणि माझे म्हणणे ऐकणारा आहे. हे लक्षात आल्यावर श्रीरामांना समाधान झाले. प्रभू श्रीरामांच्या मनात चिंता आहे, असे लक्ष्मणाला दिसले, तेव्हा तो प्रसंगानुरूप आपले नीतियुक्त विचार मांडू लागला.॥ ३॥

**बिनु पूछें कछु कहउँ गोसाईं। सेवकु समयँ न ढीठ ढिठाईं॥**
**तुम्ह सर्बग्य सिरोमनि स्वामी। आपनि समुझि कहउँ अनुगामी॥**

'हे स्वामी, न विचारता मी काही सांगत आहे. प्रसंगी सेवकाने काही आगळीक केली, तरी ती आगळीक मानायची नसते. हे स्वामी, सर्वज्ञांमध्ये तुम्ही अग्रगण्य आहात. तुम्हांला सर्व कळते, तरीही मी आपल्या समजुतीप्रमाणे जे रास्त आहे, ते सांगतो,॥ ४॥

दो०—**नाथ सुहृद सुठि सरल चित सील सनेह निधान।**
**सब पर प्रीति प्रतीति जियँ जानिअ आपु समान॥ २२७॥**

हे बंधुराज! तुम्ही अकारण परम हित करणारे आहात, सरल-हृदय आणि शील व प्रेमाचे भांडार आहात. तुमचे सर्वांवर प्रेम आणि विश्वास आहे आणि मनात सर्वांना आपल्यासारखेच मानता.॥ २२७॥

**बिषई जीव पाइ प्रभुताई। मूढ़ मोह बस होहिं जनाई॥**
**भरतु नीति रत साधु सुजाना। प्रभु पद प्रेमु सकल जगु जाना॥**

परंतु मूढ व विषयी जीव सत्ता मिळाल्यावर मोहामुळे आपले खरे स्वरूप दाखवितात. भरत हा नीतिपरायण, साधू व चतुर आहे आणि प्रभू, तुमच्या चरणी त्याचे प्रेम आहे, ही गोष्ट साऱ्या जगाला माहीत आहे.॥ १॥

**तेऊ आजु राम पदु पाई। चले धरम मरजाद मेटाई॥**
**कुटिल कुबंधु कुअवसरु ताकी। जानि राम बनबास एकाकी॥**

तो भरतसुद्धा आज तुमचे सिंहासन मिळाल्यावर धर्म-मर्यादा सोडून वागत आहे. दुष्ट व खोटा भाऊ भरत वाईट वेळ आल्यावर आणि श्रीराम वनवासामध्ये एकटे आहेत, हे पाहून,॥ २॥

**करि कुमंत्रु मन साजि समाजू। आए करै अकंटक राजू॥**
**कोटि प्रकार कलपि कुटिलाई। आए दल बटोरि दोउ भाई॥**

आपल्या मनात वाईट विचार धरून व सर्व समाजाला आपल्या बाजूला घेऊन राज्य निष्कंटक करण्यासाठी येथे आला आहे. अनेक प्रकारची कारस्थाने करून, सेना जमवून दोघे बंधू आलेले आहेत.॥ ३॥

**जौं जियँ होति न कपट कुचाली। केहि सोहाति रथ बाजि गजाली॥**
**भरतहि दोसु देइ को जाएँ। जग बौराइ राज पदु पाएँ॥**

जर त्यांच्या मनात कपट नसते व दुष्ट विचार नसते, तर रथ, घोडे आणि हत्तींच्या रांगा यावेळी कुणाला बऱ्या वाटल्या असत्या काय? परंतु भरताला विनाकारण दोष कसा द्यावा? राजपद मिळाल्यावर सर्वच उन्मत्त होत असतात.॥ ४॥

दो०—**ससि गुर तिय गामी नघुषु चढ़ेउ भूमिसुर जान।**
**लोक बेद तें बिमुख भा अधम न बेन समान॥ २२८॥**

चंद्र गुरुपत्नीगामी झाला. नहुषाने ब्राह्मणांना पालखीला जुंपले आणि राजा वेन याच्याइतका नीच कोणी असणार नाही, तो लोक व वेद यांना विन्मुख झाला.॥ २२८॥

**सहसबाहु सुरनाथु त्रिसंकू। केहि न राजमद दीन्ह कलंकू॥**
**भरत कीन्ह यह उचित उपाऊ। रिपु रिन रंच न राखब काऊ॥**

सहस्रबाहू, देवराज इंद्र आणि त्रिशंकू इत्यादींपैकी कुणाला राजमदाने कलंकित केले नाही? भरताने हा योग्य उपाय योजला आहे. कारण शत्रू किंवा ऋण यांना कधी थोडेसुद्धा शिल्लक ठेवू नये.॥ १॥

**एक कीन्हि नहिं भरत भलाई। निदरे रामु जानि असहाई॥**
**समुझि परिहि सोउ आजु बिसेषी। समर सरोष राम मुखु पेखी॥**

श्रीरामांना असहाय्य समजून त्याने त्यांचा अनादर केला, ही गोष्ट भरताने चांगली केली नाही. परंतु आज युद्धात हे श्रीराम, तुमचे क्रोधित मुख पाहून त्याला ही गोष्ट चांगली कळून येईल आणि या अवमानाचे फळ त्याला मिळेल.'॥ २॥

**एतना कहत नीति रसभूला। रन रस बिटपु पुलक मिस फूला॥**
**प्रभु पद बंदि सीस रज राखी। बोले सत्य सहज बलु भाषी॥**

इतके बोलून लक्ष्मण नीती विसरला आणि त्याच्या शरीरात वीर-रस संचारला. तो प्रभू श्रीरामांना वंदन करून, त्यांची चरणधूळ मस्तकी लावून आपले सत्य व सहज बळ लक्षात आणून म्हणाला, ॥ ३ ॥

**अनुचित नाथ न मानब मोरा। भरत हमहि उपचार न थोरा॥**
**कहँ लगि सहिअ रहिअ मनु मारें। नाथ साथ धनु हाथ हमारें॥**

'हे नाथ, माझे बोलणे अनुचित मानू नका. भरताने आपणाला काही कमी डिवचले नाही. अखेर कुठवर सहन करायचे आणि मन मारायचे? जर स्वामी आमच्या सोबत आहेत आणि आमच्या हाती धनुष्य आहे, ॥ ४ ॥

दो०—**छत्रि जाति रघुकुल जनमु राम अनुग जगु जान।**
**लातहुँ मारें चढ़ति सिर नीच को धूरि समान॥ २२९॥**

मी जातीने क्षत्रिय आहे, रघुकुलातील माझा जन्म आहे आणि शिवाय मी श्रीरामांचा सेवक आहे, हे सर्व जगाला माहीत आहे. (मग सहन का करायचे?) धुळीसारखे क्षुद्र काय आहे? परंतु तीसुद्धा लाथ मारल्यावर डोक्यावर बसते.'॥ २२९॥

**उठि कर जोरि रजायसु मागा। मनहुँ बीर रस सोवत जागा॥**
**बाँधि जटा सिर कसि कटि भाथा। साजि सरासनु सायकु हाथा॥**

असे म्हणून लक्ष्मणाने उठून, हात जोडून आज्ञा मागितली. जणू तो म्हणजे जागा झालेला मूर्तिमंत वीररस होता. त्याने डोक्यावरील जटा बांधून कमरेला भाता आवळला आणि धनुष्य सज्ज करून व बाण हातात घेऊन तो म्हणाला, ॥ १ ॥

**आजु राम सेवक जसु लेऊँ। भरतहि समर सिखावन देऊँ॥**
**राम निरादर कर फलु पाई। सोवहुँ समर सेज दोउ भाई॥**

'आज मी श्रीरामांचा सेवक असण्याची कीर्ती मिळवीन आणि भरताला युद्धात धडा शिकवीन. श्रीरामांचा अनादर करणारे दोघे बंधू रण-शय्येवर झोपू देत. ॥ २ ॥

**आइ बना भल सकल समाजू। प्रगट करउँ रिस पाछिल आजू॥**
**जिमि करि निकर दलइ मृगराजू। लेइ लपेटि लवा जिमि बाजू॥**

बरे झाले, सर्व परिवार एकत्र जमलेला आहे. आज मी पूर्वीचा सर्व राग काढतो. जसा सिंह हत्तींच्या कळपाचे निर्दालन करतो आणि ससाणा लावा पक्ष्याला पकडतो; ॥ ३ ॥

**तैसेहिं भरतहि सेन समेता। सानुज निदरि निपातउँ खेता॥**
**जौं सहाय कर संकरु आई। तौ मारउँ रन राम दोहाई॥**

त्याप्रमाणे भरताला सैन्यासह व लहान भावासह तुच्छ मानून मी रणमैदानात लोळवीन. जरी प्रत्यक्ष शंकर येऊन त्यांनी त्यांना मदत केली, तरीही मी श्रीरामांची शपथ घेऊन सांगतो की, मी त्यांना युद्धात नक्की मारून टाकीन.'॥ ४॥

**दो०—अति सरोष माखे लखनु लखि सुनि सपथ प्रवान।**
**सभय लोक सब लोकपति चाहत भभरि भगान॥ २३०॥**

अत्यंत क्रोधामुळे संतापलेल्या लक्ष्मणाला पाहून आणि त्याची सत्य प्रतिज्ञा ऐकून सर्वजण भयभीत झाले आणि लोकपाल घाबरून पळू लागले.॥ २३०॥

**जगु भय मगन गगन भइ बानी। लखन बाहुबलु बिपुल बखानी॥**
**तात प्रताप प्रभाउ तुम्हारा। को कहि सकइ को जाननिहारा॥**

सर्व जग भीतीने धास्तावले. तेव्हा लक्ष्मणाच्या अपार बाहुबलाची प्रशंसा करीत आकाशवाणी झाली की, 'हे लक्ष्मणा! तुझा प्रताप व प्रभाव कोण सांगू शकेल? आणि कोण जाणू शकेल?॥ १॥

**अनुचित उचित काजु किछु होऊ। समुझि करिअ भल कह सबु कोऊ॥**
**सहसा करि पाछें पछिताहीं। कहहिं बेद बुध ते बुध नाहीं॥**

परंतु कोणतेही कार्य असो, ते उचित-अनुचित याचा खूप विचार करून करावे, म्हणजे सर्वजण त्याला चांगले म्हणतात. वेद व विद्वान म्हणतात की, जे विचार न करता घाईघाईने एखादे काम करून मागाहून पश्चात्ताप करतात, ते बुद्धिमान नव्हेत.'॥ २॥

**सुनि सुर बचन लखन सकुचाने। राम सीयँ सादर सनमाने॥**
**कही तात तुम्ह नीति सुहाई। सब तें कठिन राजमदु भाई॥**

देववाणी ऐकून लक्ष्मण ओशाळला. श्रीरामांनी व सीतेने आदरपूर्वक त्याचा सन्मान करून म्हटले की, 'वत्सा! तू फार चांगली नीती सांगितलीस. हे बंधो, राज्याचा मद हा फार कठीण मद आहे.॥ ३॥

**जो अचवँत नृप मातहिं तेई। नाहिन साधुसभा जेहिं सेई॥**
**सुनहु लखन भल भरत सरीसा। बिधि प्रपंच महँ सुना न दीसा॥**

ज्यांनी साधूंचा सत्संग केलेला नाही, तेच राजे राजमदरूपी मदिरा पिताच धुंद होऊन जातात. हे लक्ष्मणा ऐक. भरतासारखा उत्तम पुरुष ब्रह्मदेवाच्या सृष्टीमध्ये कुठे ऐकलेला नाही की पाहिलेला नाही.

**दो०—भरतहि होइ न राजमदु बिधि हरि हर पद पाइ।**
**कबहुँ कि काँजी सीकरनि छीरसिंधु बिनसाइ॥ २३१॥**

अयोध्येचे राज्य ते काय, ब्रह्मदेव, विष्णू, महादेव यांचे पद मिळाले, तरी भरताला मद होणार नाही. आंबट थेंबांनी क्षीरसमुद्र कधी नासतो का?॥ २३१॥

**तिमिरु तरुन तरनिहि मकु गिलई । गगनु मगन मकु मेघहिं मिलई ॥**
**गोपद जल बूड़हिं घटजोनी । सहज छमा बरु छाड़ै छोनी ॥**

जरी माध्यान्हीच्या सूर्याला अंधकाराने गिळून टाकले, आकाश हे मेघांमध्ये विरून गेले, गाईच्या खुराइतक्या पाण्यात अगस्त्य मुनी बुडाले आणि पृथ्वीने आपली स्वाभाविक सहनशीलता सोडून दिली, ॥ १ ॥

**मसक फूँक मकु मेरु उड़ाई । होइ न नृपमदु भरतहि भाई ॥**
**लखन तुम्हार सपथ पितु आना । सुचि सुबंधु नहिं भरत समाना ॥**

डासाच्या फुंकरीने सुमेरू उडून गेला, तरीही हे बंधो, भरताला कधी राजमद बाधू शकणार नाही. मी तुझी व बाबांची शपथ घेऊन सांगतो की, भरतासारखा पवित्र व उत्तम भाऊ जगात नाही. ॥ २ ॥

**सगुनु खीरु अवगुन जलु ताता । मिलइ रचइ परपंचु बिधाता ॥**
**भरतु हंस रबिबंस तड़ागा । जनमि कीन्ह गुन दोष बिभागा ॥**

हे बाळा! गुणरूपी दूध व अवगुणरूपी पाणी मिसळून विधाता या जगाची रचना करतो. परंतु भरताने सूर्यवंशरूपी तलावात हंसरूपाने जन्म घेऊन गुण व दोष यांना वेगवेगळे केलेले आहे. ॥ ३ ॥

**गहि गुन पय तजि अवगुन बारी । निज जस जगत कीन्हि उजिआरी ॥**
**कहत भरत गुन सीलु सुभाऊ । पेम पयोधि मगन रघुराऊ ॥**

गुणरूपी दूध घेऊन व अवगुणरूपी जल टाकून देऊन भरताने आपल्या कीर्तीने जगाला उजळून टाकले आहे.' भरताचे गुण, शील व स्वभाव हे सांगता सांगता श्रीरघुनाथ प्रेमसमुद्रात मग्न झाले. ॥ ४ ॥

दो०—**सुनि रघुबर बानी बिबुध देखि भरत पर हेतु।**
**सकल सराहत राम सो प्रभु को कृपानिकेतु॥ २३२ ॥**

श्रीरामचंद्रांची वाणी ऐकून आणि भरतावर असलेले त्यांचे प्रेम पाहून सर्व देव त्यांची स्तुती करीत म्हणू लागले की, 'श्रीरामांसारखा कृपा-धाम असलेला प्रभू दुसरा कोण आहे?॥ २३२ ॥

**जौं न होत जग जनम भरत को । सकल धरम धुर धरनि धरत को ॥**
**कबि कुल अगम भरत गुन गाथा । को जानइ तुम्ह बिनु रघुनाथा ॥**

जर जगात भरताचा जन्म झाला नसता, तर पृथ्वीवर सर्व धर्मांची धुरा कुणी धारण केली असती? हे रघुनाथ, कविकुलालाही अगम्य असलेली भरताच्या गुणांची कथा तुमच्याखेरीज दुसरा कोण जाणू शकणार?'॥ १ ॥

**लखन राम सियँ सुनि सुर बानी । अति सुखु लहेउ न जाइ बखानी ॥**
**इहाँ भरतु सब सहित सहाए । मंदाकिनीं पुनीत नहाए ॥**

लक्ष्मण, श्रीराम व सीता ही देववाणी ऐकून सुखावून गेले. त्याचे वर्णन करता येत नाही. तेथे पोहोचल्यावर भरताने सर्व मंडळींच्याबरोबर पवित्र मंदाकिनीत स्नान केले. ॥ २ ॥

**सरित समीप राखि सब लोगा । मागि मातु गुर सचिव नियोगा ॥**
**चले भरतु जहँ सिय रघुराई । साथ निषादनाथु लघु भाई ॥**

नंतर सर्वांना नदीजवळ थांबवून, माता, गुरू व मंत्री यांची आज्ञा घेऊन आणि निषादराज व शत्रुघ्नाला बरोबर घेऊन जेथे सीता व श्रीरघुनाथ होते, तिकडे भरत गेला. ॥ ३ ॥

**समुझि मातु करतब सकुचाहीं । करत कुतरक कोटि मन माहीं ॥**
**रामु लखनु सिय सुनि मम नाऊँ । उठि जनि अनत जाहिं तजि ठाऊँ ॥**

आपली माता कैकेयीच्या कृत्याची आठवण आल्यावर भरत संकोचत होता आणि मनात अनेक कुतर्क करीत होता की, माझे नाव ऐकल्यावर श्रीराम, लक्ष्मण व सीता हे येथील जागा सोडून दुसरीकडे जाऊ नयेत, म्हणजे झाले. ॥ ४ ॥

दो०—**मातु मते महुँ मानि मोहि जो कछु करहिं सो थोर।**
**अघ अवगुन छमि आदरहिं समुझि आपनी ओर॥ २३३ ॥**

मी मातेशी सहमत असल्याचे समजून, ते जे काही करतील, ते थोडेच आहे. परंतु ते आपले बिरुद व संबंध जाणून माझी पापे व अवगुण क्षमा करून माझा आदरच करतील. ॥ २३३ ॥

**जौं परिहरहिं मलिन मनु जानी । जौं सनमानहिं सेवकु मानी ॥**
**मोरें सरन रामहि की पनही । राम सुस्वामि दोसु सब जनही ॥**

हवे तर ते माझे मन दूषित समजून माझा त्याग करोत, हवे तर आपला सेवक समजून माझा सन्मान करोत, माझ्यासाठी श्रीरामांच्या पादुकाच मला शरण-स्थान आहेत. श्रीराम हे चांगले स्वामी आहेत. दोष जो आहे तो सर्व मज सेवकाचाच आहे. ॥ १ ॥

**जग जस भाजन चातक मीना । नेम पेम निज निपुन नबीना ॥**
**अस मन गुनत चले मग जाता । सकुच सनेहँ सिथिल सब गाता ॥**

जगामध्ये चातक व मासे हेच कीर्तीला पात्र आहेत. तेच नेम आणि प्रेम यांची जपणूक करण्यात निपुण आहेत. असा मनात विचार करीत भरत वाटेने निघाला होता. त्याचे शरीर संकोच व प्रेमाने मलूल झाले होते. ॥ २ ॥

**फेरति मनहुँ मातु कृत खोरी। चलत भगति बल धीरज धोरी॥**
**जब समुझत रघुनाथ सुभाऊ। तब पथ परत उताइल पाऊ॥**

मातेची दुष्टता जणू त्याला मागे ओढत होती, परंतु धैर्य धरून भरत भक्तीच्या जोरावर पुढे जात होता. जेव्हा श्रीरघुनाथांच्या स्वभावाची आठवण येई, तेव्हा वाटेवर त्याचे पाय जलद जलद पडत होते. ॥ ३ ॥

**भरत दसा तेहि अवसर कैसी। जल प्रबाहँ जल अलि गति जैसी॥**
**देखि भरत कर सोचु सनेहू। भा निषाद तेहि समयँ बिदेहू॥**

त्यावेळी भरताची दशा अशी होती, जशी पाण्याच्या प्रवाहात भोवऱ्याची असते. भरताची मनःस्थिती व प्रेम पाहून निषादराजसुद्धा देहभान विसरला. ॥ ४ ॥

दो०—**लगे होन मंगल सगुन सुनि गुनि कहत निषादु।**
**मिटिहि सोचु होइहि हरषु पुनि परिनाम बिषादु॥ २३४॥**

मंगल शकुन होऊ लागले. ते ऐकून व विचार करून निषादराज म्हणाला की, ‘चिंता दूर होईल, हर्ष होईल पण शेवटी दुःख होईल.’॥ २३४॥

**सेवक बचन सत्य सब जाने। आश्रम निकट जाइ निअराने॥**
**भरत दीख बन सैल समाजू। मुदित छुधित जनु पाइ सुनाजू॥**

भरताने गुहाचे सर्व बोलणे खरे मानले व तो आश्रमाजवळ जाऊन पोहोचला. तेथील वने व पर्वतांचे समूह पाहिले, तेव्हा भरताला इतका आनंद झाला की, जणू एखाद्या भुकेलेल्याला चविष्ट अन्न मिळावे. ॥ १ ॥

**ईति भीति जनु प्रजा दुखारी। त्रिबिध ताप पीड़ित ग्रह मारी॥**
**जाइ सुराज सुदेस सुखारी। होहिं भरत गति तेहि अनुहारी॥**

ज्याप्रमाणे ईतीच्या भीतीने दुःखी झालेली आणि त्रितापांनी व क्रूर ग्रहांनी आणि महामारींनी पिडलेली प्रजा एखाद्या उत्तम प्रदेशात व उत्तम राज्यात गेल्यावर सुखी होते, अगदी तशीच दशा भरताची झाली होती. ॥ २ ॥

(अतिवृष्टी, दुष्काळ, उंदरांचा उपद्रव, टोळधाडी, पक्षी व इतर राजांचे आक्रमण या शेतीच्या दृष्टीने अत्यंत प्रतिकूल असलेल्या उपद्रवांना ‘ईती’ असे म्हणतात.)

**राम बास बन संपति भ्राजा। सुखी प्रजा जनु पाइ सुराजा॥**
**सचिव बिरागु बिबेकु नरेसू। बिपिन सुहावन पावन देसू॥**

श्रीरामांच्या निवासामुळे वन-संपदा अशी शोभून दिसत होती की, जणू चांगला राजा मिळाल्याने प्रजा सुखी होते. शोभिवंत वन हा पवित्र देश होता आणि विवेक हा त्याचा राजा होता आणि वैराग्य हा मंत्री होता. ॥ ३ ॥

**भट जम नियम सैल रजधानी । सांति सुमति सुचि सुंदर रानी ॥**
**सकल अंग संपन्न सुराऊ । राम चरन आश्रित चित चाऊ ॥**

यम, नियम हे योद्धे होते. पर्वत ही राजधानी होती. शांती व सुबुद्धी या दोन सुंदर राण्या होत्या. विवेकरूपी श्रेष्ठ राजा हा राज्याच्या सर्व अंगांनी परिपूर्ण होता आणि श्रीरामचंद्रांच्या चरणांचा आश्रित असल्यामुळे त्याच्या मनात आनंद होता. ॥ ४ ॥

(स्वामी, अमात्य, सुहृद, कोष, राज्य, दुर्ग व सेना ही राज्याची सात अंगे होत.)

दो०—**जीति मोह महिपालु दल सहित बिबेक भुआलु।**
**करत अकंटक राजु पुरँ सुख संपदा सुकालु॥ २३५ ॥**

मोहरूपी राजाला सेनेसह जिंकून विवेकरूपी राजा निष्कंटक राज्य करीत होता. त्याच्या नगरात सुख, संपत्ती व सुकाळ भरलेला होता. ॥ २३५ ॥

**बन प्रदेस मुनि बास घनेरे । जनु पुर नगर गाउँ गन खेरे ॥**
**बिपुल बिचित्र बिहग मृग नाना । प्रजा समाजु न जाइ बखाना ॥**

वनरूपी प्रांतांमध्ये मुनींची जी पुष्कळ निवासस्थाने आहेत. तीच जणू शहरे, नगरे, गावे आणि खेड्यांचे समूह होत. पुष्कळ प्रकारचे पक्षी आणि अनेक पशू हे जणू प्रजा होत. त्यांचे वर्णन करणे कठीण. ॥ १ ॥

**खगहा करि हरि बाघ बराहा । देखि महिष बृष साजु सराहा ॥**
**बयरु बिहाइ चरहिं एक संगा । जहँ तहँ मनहुँ सेन चतुरंगा ॥**

गेंडे, हत्ती, सिंह, वाघ, डुक्कर, रेडे व बैल पाहून राजाच्या समृद्धीची प्रशंसा करीत राहावे, असे वाटे. हे सर्व प्राणी आपापसातील वैरभाव सोडून सर्वत्र बरोबरीने फिरत होते, जणू ती चतुरंग सेना होय. ॥ २ ॥

**झरना झरहिं मत्त गज गाजहिं । मनहुँ निसान बिबिधि बिधि बाजहिं ॥**
**चक चकोर चातक सुक पिक गन । कूजत मंजु मराल मुदित मन ॥**

पाण्याचे झरे वाहात होते आणि हत्ती धुंदीमध्ये चीत्कार करीत होते. ते म्हणजे तेथे अनेक प्रकारचे वाजणारे नगारे होते. चक्रवाक, चकोर, चातक, पोपट आणि कोकिळा यांचे थवे आणि सुंदर हंस प्रसन्न चित्ताने किलबिलाट करीत होते. ॥ ३ ॥

**अलिगन गावत नाचत मोरा । जनु सुराज मंगल चहु ओरा ॥**
**बेलि बिटप तृन सफल सफूला । सब समाजु मुद मंगल मूला ॥**

भ्रमरांचे थवे गुंजारव करीत होते आणि मोर नाचत होते. जणू या उत्कृष्ट राज्यात चोहीकडे मांगल्य पसरले होते. वेली, वृक्ष, तृण हे सर्व फळा-फुलांनी डवरले होते. सर्व समाज आनंदाचे व मांगल्याचे मूळ बनून गेला होता. ॥ ४ ॥

**दो०—राम सैल सोभा निरखि भरत हृदयँ अति पेमु।**
**तापस तप फलु पाइ जिमि सुखी सिरानें नेमु॥ २३६॥**

श्रीरामांच्या पर्वताची शोभा पाहून भरताच्या मनात अत्यंत प्रेम दाटून आले. तपस्वी पुरुष नियमांचे पारणे झाल्यावर तपस्येचे फळ मिळाल्याने आनंदित होतो, त्याप्रमाणे.॥ २३६॥

## मासपारायण, विसावा विश्राम
## नवाह्नपारायण, पाचवा विश्राम

**तब केवट ऊँचें चढ़ि धाई। कहेउ भरत सन भुजा उठाई॥**
**नाथ देखिअहिं बिटप बिसाला। पाकरि जंबु रसाल तमाला॥**

मग निषादराज धावत जाऊन उंच चढला आणि हात वर करून म्हणू लागला, 'हे नाथ, हे जे पिंपरी, जांभळे, आंबे व तमालाचे वृक्ष दिसत आहेत,'॥ १॥

**जिन्ह तरुबरन्ह मध्य बटु सोहा। मंजु बिसाल देखि मनु मोहा॥**
**नील सघन पल्लव फल लाला। अबिरल छाहँ सुखद सब काला॥**

ज्या श्रेष्ठ वृक्षांमध्ये एक सुंदर व विशाल वटवृक्ष शोभत आहे, ज्याला पाहून मन मोहून जाते, ज्याची पाने निळसर व दाट आहेत आणि ज्याला लाल फळे लागलेली आहेत, ज्याची दाट सावली ही सर्व ऋतूंमध्ये सुखकर असते॥ २॥

**मानहुँ तिमिर अरुनमय रासी। बिरची बिधि सँकेलि सुषमा सी॥**
**ए तरु सरित समीप गोसाँई। रघुबर परनकुटी जहँ छाई॥**

जणू ब्रह्मदेवांनी परम शोभा एकत्र करून अंधकार आणि लालिमा यांची रास रचली होती, असे हे वृक्ष नदीजवळ आहेत आणि हे राजकुमार! तेथेच श्रीरामांची पर्णकुटी आहे.॥ ३॥

**तुलसी तरुबर बिबिध सुहाए। कहुँ कहुँ सियँ कहुँ लखन लगाए॥**
**बट छायाँ बेदिका बनाई। सियँ निज पानि सरोज सुहाई॥**

तेथे तुळशीची अनेक झाडे शोभत आहेत. कुठे सीतेने तर कुठे लक्ष्मणाने ती लावलेली आहेत. याच वटवृक्षाच्या सावलीमध्ये सीतेने आपल्या कर-कमलांनी सुंदर चबुतरा बनविला आहे.॥ ४॥

**दो०—जहाँ बैठि मुनिगन सहित नित सिय रामु सुजान।**
**सुनहिं कथा इतिहास सब आगम निगम पुरान॥ २३७॥**

तेथे ज्ञानी श्रीराम मुनिवृंदांसमवेत बसून नित्य शास्त्र, वेद आणि पुराणे यांच्या कथा श्रवण करतात.'॥ २३७॥

**सखा बचन सुनि बिटप निहारी। उमगे भरत बिलोचन बारी॥**
**करत प्रनाम चले दोउ भाई। कहत प्रीति सारद सकुचाई॥**

मित्राचे बोलणे ऐकून आणि ते वृक्ष पाहून भरताच्या नेत्रांमध्ये पाणी आले. दोघे बंधू प्रणाम करीत पुढे निघाले. त्यांच्या प्रेमाचे वर्णन करण्यास सरस्वतीसुद्धा संकोच पावेल.॥ १॥

**हरषहिं निरखि राम पद अंका। मानहुँ पारसु पायउ रंका॥**
**रज सिर धरि हियँ नयनन्हि लावहिं। रघुबर मिलन सरिस सुख पावहिं॥**

श्रीरामचंद्रांची चरणचिन्हे पाहून दोघे बंधू असे आनंदित झाले की, जणू एखाद्या दरिद्री मनुष्याला परीस मिळावा. तेथील धूळ मस्तकावर धारण करून ती त्यांनी आपल्या हृदयाला आणि नेत्रांना लावली. तेव्हा तर त्यांना श्रीराम भेटल्याचाच आनंद झाला.॥ २॥

**देखि भरत गति अकथ अतीवा। प्रेम मगन मृग खग जड़ जीवा॥**
**सखहि सनेह बिबस मग भूला। कहि सुपंथ सुर बरषहिं फूला॥**

भरताची ती अत्यंत अवर्णनीय दशा पाहून वनातील पशू, पक्षी व वृक्षादी जड जीव प्रेम-मग्न झाले. अधिक प्रेम-वश झाल्यामुळे निषादराजही रस्ता चुकला. तेव्हा रस्ता दाखवून देव फुले उधळू लागले.॥ ३॥

**निरखि सिद्ध साधक अनुरागे। सहज सनेहु सराहन लागे॥**
**होत न भूतल भाउ भरत को। अचर सचर चर अचर करत को॥**

भरताच्या प्रेमाची ही दशा पाहून सिद्ध व साधक लोकसुद्धा प्रेममग्न झाले आणि त्याच्या स्वाभाविक प्रेमाची प्रशंसा करू लागले की, जर या पृथ्वीतलावर भरताचा जन्म झाला नसता, तर जडाला चेतन व चेतनाला जड कुणी केले असते? (भरताचे प्रेम पाहून जड चेतनासारखे व चेतन जडासारखे स्तब्ध झाले.)॥ ४॥

दो०—**पेम अमिअ मंदरु बिरहु भरतु पयोधि गँभीर।**
**मथि प्रगटेउ सुर साधु हित कृपासिंधु रघुबीर॥ २३८॥**

प्रेम हे अमृत आहे, विरह हा मंदराचल आहे आणि भरत हा समुद्र आहे. कृपासागर श्रीरामचंद्रांनी देव आणि साधूंच्या कल्याणासाठी स्वत: या भरतरूपी समुद्राचे विरहरूपी मंदराचलाने मंथन करून हे प्रेमरूपी अमृत प्रकट केले आहे.॥ २३८॥

**सखा समेत मनोहर जोटा। लखेउ न लखन सघन बन ओटा॥**
**भरत दीख प्रभु आश्रमु पावन। सकल सुमंगल सदनु सुहावन॥**

मित्र निषादराजासोबत येत असलेल्या या सुंदर जोडीला दाट वनाच्या आडून लक्ष्मण पाहू शकला नाही. भरताने प्रभू श्रीरामचंद्रांचा सर्व मांगल्याचे धाम, सुंदर व पवित्र असलेला आश्रम पाहिला.॥ १॥

**करत प्रबेस मिटे दुख दावा। जनु जोगीं परमारथु पावा॥**
**देखे भरत लखन प्रभु आगे। पूँछे बचन कहत अनुरागे॥**

आश्रमात प्रवेश करताच भरताचे दुःख व दाह नाहीसे झाले. जणू योग्याला परमार्थच गवसला. भरताला दिसले की, लक्ष्मण प्रभूंच्यासमोर उभा राहून विचारलेल्या प्रश्नांची प्रेमाने उत्तरे देत होता. ॥ २ ॥

**सीस जटा कटि मुनि पट बाँधें। तून कसें कर सरु धनु काँधें॥**
**बेदी पर मुनि साधु समाजू। सीय सहित राजत रघुराजू॥**

त्याच्या डोक्यावर जटा होत्या. कमरेला वल्कले नेसलेली होती आणि त्यांनाच बाणांचा भाता बांधला होता. हातात बाण व खांद्यावर धनुष्य होते. वेदीवर मुनी व साधु-समाज बसला होता आणि तेथे श्रीराम सीतेसह विराजमान होते. ॥ ३ ॥

**बलकल बसन जटिल तनु स्यामा। जनु मुनिबेष कीन्ह रति कामा॥**
**कर कमलनि धनु सायकु फेरत। जिय की जरनि हरत हँसि हेरत॥**

श्रीरामांनी वल्कले परिधान केली होती, जटा धारण केल्या होत्या व त्यांचा श्याम रंग होता. सीताराम असे वाटत होते की, जणू रतीने व कामदेवाने मुनिवेश धारण केला आहे. श्रीराम आपल्या करकमलांत धनुष्य-बाण फिरवीत होते, आणि जेव्हा ते हसत, तेव्हा पाहणाऱ्याच्या मनातील दुःख हरण होत होते व त्याला परमानंद व शांतता लाभत होती. ॥ ४ ॥

दो०—**लसत मंजु मुनि मंडली मध्य सीय रघुचंदु।**
**ग्यान सभाँ जनु तनु धरें भगति सच्चिदानंदु॥ २३९ ॥**

सुंदर मुनिमंडळींच्यामध्ये सीता व रघुकुलचंद्र श्रीरामचंद्र असे शोभून दिसत होते की, जणू ज्ञानाच्या सभेमध्ये प्रत्यक्ष भक्ती व सच्चिदानंद हेच शरीर धारण करून बसले आहेत. ॥ २३९ ॥

**सानुज सखा समेत मगन मन। बिसरे हरष सोक सुख दुख गन॥**
**पाहि नाथ कहि पाहि गोसाईं। भूतल परे लकुट की नाईं॥**

अनुज शत्रुघ्न व मित्र निषादराज यांच्यासमवेत भरताचे मन प्रेममग्न झाले होते. हर्ष, शोक, सुख-दुःख इत्यादी विसरून गेले होते. हे नाथ, रक्षण करा, हे स्वामी, रक्षण करा' असे म्हणत भरताने भूमीवर लोटांगण घातले. ॥ १ ॥

**बचन सपेम लखन पहिचाने। करत प्रनामु भरत जियँ जाने॥**
**बंधु सनेह सरस एहि ओरा। उत साहिब सेवा बस जोरा॥**

ते प्रेमपूर्ण बोलणे लक्ष्मणाने ओळखले आणि त्याने जाणले की, भरत प्रणाम करीत आहे.

लक्ष्मण श्रीरामांच्याकडे तोंड करून उभा होता. त्यामुळे तो भरताला पाहू शकला नव्हता. आता एकीकडे बंधू भरताचे सरस भ्रातृप्रेम आणि दुसरीकडे श्रीरामचंद्रांच्या सेवेची अत्यंत परवशता होती. ॥ २ ॥

**मिलि न जाइ नहिं गुदरत बनई । सुकबि लखन मन की गति भनई ॥**
**रहे राखि सेवा पर भारू । चढ़ी चंग जनु खैंच खेलारू ॥**

तो क्षणभरसुद्धा सेवा सोडून भरताला भेटू शकत नव्हता आणि त्याच्यावरील प्रेमामुळे त्याला सोडूही शकत नव्हता. लक्ष्मणाच्या मनातील या द्विधा स्थितीचे वर्णन एखादा श्रेष्ठ कवीच करू शकेल. तो सेवा हीच महत्त्वपूर्ण मानून तसाच न वळता उभा राहिला, परंतु त्याच्या मनाची दशा उंच तरंगणाऱ्या पतंगाला खेळाडू ओढतो, अशी झाली होती. ॥ ३ ॥

**कहत सप्रेम नाइ महि माथा । भरत प्रनाम करत रघुनाथा ॥**
**उठे रामु सुनि पेम अधीरा । कहुँ पट कहुँ निषंग धनु तीरा ॥**

लक्ष्मणाने प्रेमाने भूमीवर मस्तक टेकवून रामांना म्हटले, 'हे रघुनाथ, भरत प्रणाम करीत आहे.' हे ऐकताच श्रीरघुनाथ प्रेमाने इतके अधीर झाले की कुठे वस्त्र ओघळले, कुठे भाता पडला, कुठे धनुष्य तर कुठे बाण हेही त्यांना कळले नाही. ॥ ४ ॥

दो०—**बरबस लिए उठाइ उर लाए कृपानिधान।**
**भरत राम की मिलनि लखि बिसरे सबहि अपान ॥ २४० ॥**

कृपानिधान श्रीरामचंद्रानी भरताला बळेच उठवून हृदयाशी धरले. भरत व श्रीराम यांच्या भेटीची ही रीत पाहून सर्वजण देहभान विसरले. ॥ २४० ॥

**मिलनि प्रीति किमि जाइ बखानी । कबिकुल अगम करम मन बानी ॥**
**परम पेम पूरन दोउ भाई । मन बुधि चित अहमिति बिसराई ॥**

या भेटीतील प्रेम कसे वर्णन करावे ? ते कविकुलाच्या कायावाचा–मनालाही अगम्य आहे. श्रीराम व भरत हे दोघे बंधू मन, बुद्धी, चित्त आणि अहंकार विसरून परम प्रेमाने भरून गेले होते. ॥ १ ॥

**कहहु सुपेम प्रगट को करई । केहि छाया कबि मति अनुसरई ॥**
**कबिहि अरथ आखर बलु साँचा । अनुहरि ताल गतिहि नटु नाचा ॥**

सांगा, बरे, त्या श्रेष्ठ प्रेमाचे वर्णन कोण करू शकेल ? कवीची बुद्धी कुणाच्या सावलीचे अनुसरण करू शकेल ? कवीला तर अक्षर व अर्थ यांचेच खरे बळ असते. डोंबारी हा तालाच्या गतीवरच नाचत असतो. ॥ २ ॥

**अगम सनेह भरत रघुबर को । जहँ न जाइ मनु बिधि हरि हर को ॥**
**सो मैं कुमति कहौं केहि भाँती । बाज सुराग कि गाँडर ताँती ॥**

भरत व श्रीराम यांचे प्रेम अगम्य आहे. जिथे ब्रह्मदेव, विष्णू व महादेव हे मनानेही जाऊ शकत नाहीत, त्या प्रेमाचे वर्णन मी अल्प बुद्धीचा मनुष्य कसा करू शकेन? हरळीच्या दोरीने कुठे सुंदर राग वाजवता येईल काय?॥ ३ ॥

**मिलनि बिलोकि भरत रघुबर की। सुरगन सभय धकधकी धरकी॥**
**समुझाए सुरगुरु जड़ जागे। बरषि प्रसून प्रसंसन लागे॥**

भरत आणि राम यांच्या भेटण्याची रीत पाहून देव घाबरले, त्यांच्या मनातील धाकधूक वाढली. देवगुरू बृहस्पतींनी त्यांना समजावले, तेव्हा कुठे ते मूर्ख सावध झाले आणि फुले उधळून प्रशंसा करू लागले. ॥ ४ ॥

दो०—**मिलि सपेम रिपुसूदनहि केवटु भेंटेउ राम।**
**भूरि भायँ भेंटे भरत लछिमन करत प्रनाम॥ २४१ ॥**

त्यानंतर श्रीराम प्रेमाने शत्रुघ्नाला व निषादराजाला भेटले. प्रणाम करणाऱ्या लक्ष्मणाला भरत मोठ्या प्रेमाने भेटला. ॥ २४१ ॥

**भेंटेउ लखन ललकि लघु भाई। बहुरि निषादु लीन्ह उर लाई॥**
**पुनि मुनिगन दुहुँ भाइन्ह बंदे। अभिमत आसिष पाइ अनंदे॥**

मग लक्ष्मण उचंबळून येऊन शत्रुघ्नाला भेटला. त्यानंतर त्याने निषादराजाला आलिंगन दिले. मग भरत-शत्रुघ्न या दोन्ही भावांनी तेथे उपस्थित असलेल्या मुनींना प्रणाम केला आणि इच्छित आशीर्वाद मिळाल्याने ते आनंदित झाले. ॥ १ ॥

**सानुज भरत उमगि अनुरागा। धरि सिर सिय पद पदुम परागा॥**
**पुनि पुनि करत प्रनाम उठाए। सिर कर कमल परसि बैठाए॥**

भरत व शत्रुघ्न प्रेमाचे भरते येऊन सीतेच्या चरण-कमलांची धूळ मस्तकावर धारण करून तिला वारंवार प्रणाम करू लागले. सीतेने त्यांना उठवून त्यांच्या मस्तकास आपल्या करकमलांचा स्पर्श करून त्या दोघांना बसवून घेतले. ॥ २ ॥

**सीयँ असीस दीन्हि मन माहीं। मगन सनेहँ देह सुधि नाहीं॥**
**सब बिधि सानुकूल लखि सीता। भे निसोच उर अपडर बीता॥**

सीतेने मनातल्या मनात आशीर्वाद दिला. कारण ते दोघे स्नेहात मग्न होते. त्यांना देहभान राहिले नव्हते. सीता ही सर्व प्रकारे आपल्याला अनुकूल असल्याचे पाहून भरताची चिंता दूर झाली आणि त्याच्या मनातील कल्पित भय नाहीसे झाले. ॥ ३ ॥

**कोउ किछु कहइ न कोउ किछु पूँछा। प्रेम भरा मन निज गति छूँछा॥**
**तेहि अवसर केवटु धीरजु धरि। जोरि पानि बिनवत प्रनामु करि॥**

त्याप्रसंगी कोणी बोलत नव्हते की काही विचारत नव्हते. मन प्रेमाने भरून आल्यामुळे त्याची

संकल्प-विकल्प व चांचल्याची गती थांबली. त्यावेळी निषादराज धीर धरून व हात जोडून प्रणाम करीत विनंती करू लागला. ॥ ४ ॥

**दो०—नाथ साथ मुनिनाथ के मातु सकल पुर लोग।**
**सेवक सेनप सचिव सब आए बिकल बियोग॥ २४२॥**

'हे नाथ! मुनिवर्य वसिष्ठांच्याबरोबर सर्व माता, नगरवासी, सेवक, सेनापती, मंत्री हे सर्व तुमच्या वियोगाने व्याकूळ होऊन आले आहेत.'॥ २४२ ॥

**सीलसिंधु सुनि गुर आगवनू। सिय समीप राखे रिपुदवनू॥**
**चले सबेग रामु तेहि काला। धीर धरम धुर दीनदयाला॥**

गुरूंचे आगमन झाल्याचे ऐकून सद्‌गुणसमुद्र श्रीरामांनी सीतेजवळ शत्रुघ्नाला ठेवले व ते परमवीर, धर्मधुरंधर, दीनदयाळू श्रीराम तत्क्षणी लगबगीने निघाले. ॥ १ ॥

**गुरहि देखि सानुज अनुरागे। दंड प्रनाम करन प्रभु लागे॥**
**मुनिबर धाइ लिए उर लाई। प्रेम उमगि भेंटे दोउ भाई॥**

गुरूंचे दर्शन झाल्याने राम-लक्ष्मणांना प्रेमाची भरती आली आणि ते साष्टांग नमस्कार करू लागले. तेवढ्यात मुनिश्रेष्ठ वसिष्ठांनी त्यांना हृदयाशी कवटाळले आणि प्रेमाच्या भरात ते त्या दोघांना भेटले. ॥ २ ॥

**प्रेम पुलकि केवट कहि नामू। कीन्ह दूरि तें दंड प्रनामू॥**
**रामसखा रिषि बरबस भेंटा। जनु महि लुठत सनेह समेटा॥**

मग प्रेमाने पुलकित होऊन निषादराजाने आपले नाव सांगत दुरूनच वसिष्ठांना प्रणाम केला. वसिष्ठांनी तो रामाचा मित्र असल्याचे पाहून त्याला बळेच हृदयाशी धरले. जणू जमिनीवर लोळणाऱ्या प्रेमाला उचलून घेतले. ॥ ३ ॥

**रघुपति भगति सुमंगल मूला। नभ सराहि सुर बरिसहिं फूला॥**
**एहि सम निपट नीच कोउ नाहीं। बड़ बसिष्ठ सम को जग माहीं॥**

'श्रीरघुनाथांची भक्ती ही सुंदर मांगल्याचे मूळ आहे' असे म्हणत स्तुती करीत देव आकाशातून फुले उधळू लागले. ते म्हणाले, 'या जगात या गुहासारखा कनिष्ठ (जातीचा) कोणी नाही आणि वसिष्ठांच्यासारखा श्रेष्ठ कोण आहे?॥ ४ ॥

**दो०—जेहि लखि लखनहु तें अधिक मिले मुदित मुनिराउ।**
**सो सीतापति भजन को प्रगट प्रताप प्रभाउ॥ २४३॥**

तरीही निषादाला पाहून मुनिराज वसिष्ठ लक्ष्मणापेक्षा अधिक समजून त्याला आनंदाने भेटले. हा सर्व सीतापती श्रीरामचंद्रांच्या भजनाचा प्रत्यक्ष प्रताप व प्रभाव होय. ॥ २४३ ॥

**आरत लोग राम सबु जाना। करुनाकर सुजान भगवाना॥**
**जो जेहि भायँ रहा अभिलाषी। तेहि तेहि कै तसि तसि रुख राखी॥**

दयेची खाण व सर्वज्ञ असलेल्या भगवान श्रीरामांनी सर्व लोक भेटण्यासाठी व्याकूळ झाल्याचे पाहिले, तेव्हा त्यांनी ज्याला ज्या भावनेने भेटायची अभिलाषा होती, त्या सर्वांना त्यांच्या आवडीप्रमाणे॥ १॥

**सानुज मिलि पल महुँ सब काहू। कीन्ह दूरि दुखु दारुन दाहू॥**
**यह बड़ि बात राम कै नाहीं। जिमि घट कोटि एक रबि छाहीं॥**

लक्ष्मणासह एका क्षणात भेटून त्यांचे दुःख व मनातील दाह दूर केला. श्रीरामांसाठी ही गोष्ट काही कठीण नव्हती. ज्याप्रमाणे कोट्यवधी घड्यांमध्ये एकाच सूर्याचे वेगवेगळे प्रतिबिंब एकाच वेळी दिसते, त्याप्रमाणे श्रीराम सर्वांना एकदम भेटले.॥ २॥

**मिलि केवटहि उमगि अनुरागा। पुरजन सकल सराहहिं भागा॥**
**देखीं राम दुखित महतारीं। जनु सुबेलि अवलीं हिम मारीं॥**

सर्व पुरवासी प्रेमाच्या उत्साहाने निषादराजाला भेटले व त्याच्या भाग्याची प्रशंसा करू लागले. श्रीरामांनी सर्व माता दुःखी असल्याचे पाहिले. त्या जणू सुंदर लतांच्या ओळींवर हिमपात झाल्यासारख्या सुकून गेल्या होत्या.॥ ३॥

**प्रथम राम भेंटी कैकेई। सरल सुभायँ भगति मति भेई॥**
**पग परि कीन्ह प्रबोधु बहोरी। काल करम बिधि सिर धरि खोरी॥**

श्रीराम सर्वप्रथम कैकेयीला भेटले आणि सरळ स्वभावाने आणि भक्तीने त्यांनी तिच्या बुद्धीला शांत केले. मग तिच्या पाया पडून काल, कर्म व विधात्याच्या माथी सर्व दोष मारून श्रीरामांनी तिचे सांत्वन केले.॥ ४॥

**दो०—भेंटी रघुबर मातु सब करि प्रबोधु परितोषु।**
**अंब ईस आधीन जगु काहु न देइअ दोषु॥ २४४॥**

नंतर श्रीरघुनाथ सर्व मातांना भेटले. त्यांनी सर्वांना समजावून सांगितले की, 'हे मातांनो, जग हे ईश्वराच्या अधीन आहे. म्हणून कुणालाही दोष देऊ नये.'॥ २४४॥

**गुरतिय पद बंदे दुहु भाईं। सहित बिप्रतिय जे सँग आईं॥**
**गंग गौरि सम सब सनमानीं। देहिं असीस मुदित मृदु बानीं॥**

नंतर श्रीराम व लक्ष्मण यांनी भरताबरोबर आलेल्या ब्राह्मण स्त्रियांच्या व गुरुपत्नी अरुंधतीच्या चरणांना वंदन केले आणि गंगा व गौरी सारखा त्यांचा सन्मान केला. सर्वजणी आनंदाने व कोमल वाणीने आशीर्वाद देऊ लागल्या.॥ १॥

**गहि पद लगे सुमित्रा अंका। जनु भेंटी संपति अति रंका॥**
**पुनि जननी चरननि दोउ भ्राता। परे पेम ब्याकुल सब गाता॥**

मग दोघे बंधू हे सुमित्रेचे पाय धरून तिला बिलगले. जणू एखाद्या दरिद्री माणसाची संपत्तीशी भेट व्हावी. नंतर दोघा बंधूंनी कौसल्येच्या चरणी लोटांगण घातले. प्रेमामुळे त्यांचे शरीर विव्हल झाले होते. ॥ २ ॥

**अति अनुराग अंब उर लाए। नयन सनेह सलिल अन्हवाए॥**
**तेहि अवसर कर हरष बिषादू। किमि कबि कहै मूक जिमि स्वादू॥**

मातेने मोठ्या प्रेमाने त्यांना उराशी धरले आणि नेत्रांतील प्रेमाश्रूंनी त्यांना स्नान घातले. त्या प्रसंगीचा हर्ष व विषाद यांचे वर्णन कवी कसे करणार? मुक्या माणसाला पदार्थाची चव सांगता येईल काय?॥ ३ ॥

**मिलि जननिहि सानुज रघुराऊ। गुर सन कहेउ कि धारिअ पाऊ॥**
**पुरजन पाइ मुनीस नियोगू। जल थल तकि तकि उतरेउ लोगू॥**

श्रीराम व लक्ष्मण यांनी कौसल्येला भेटल्यावर गुरूंना सांगितले की, 'आश्रमात चला.' तेव्हा वसिष्ठांची आज्ञा झाल्यावर अयोध्यावासी सर्व लोक पाणी-निवाऱ्याची सोय पाहून उतरले. ॥ ४ ॥

दो०—**महिसुर मंत्री मातु गुर गने लोग लिए साथ।**
**पावन आश्रम गवनु किय भरत लखन रघुनाथ॥ २४५॥**

ब्राह्मण, मंत्री, माता, गुरू इत्यादी निवडक लोकांना घेऊन भरत, लक्ष्मण व श्रीराम हे पवित्र आश्रमाकडे निघाले. ॥ २४५ ॥

**सीय आइ मुनिबर पग लागी। उचित असीस लही मन मागी॥**
**गुरपतिनिहि मुनितियन्ह समेता। मिली पेमु कहि जाइ न जेता॥**

सीतेने येऊन मुनिश्रेष्ठ वसिष्ठांचे चरण धरले आणि मनोवांछित आशीर्वाद प्राप्त केला. नंतर ती मुनींच्या पत्नी व गुरुपत्नी अरुंधतीला भेटली. त्यांच्या मनात जे प्रेम होते, ते सांगणे कठीण. ॥ १ ॥

**बंदि बंदि पग सिय सबही के। आसिरबचन लहे प्रिय जी के॥**
**सासु सकल जब सीयँ निहारीं। मूदे नयन सहमि सुकुमारीं॥**

सीतेने सर्वांच्या चरणांना वेगवेगळे वंदन केले आणि आपल्याला मनोनुकूल असे आशीर्वाद प्राप्त केले. जेव्हा सुकुमार सीतेने आपल्या सासूंना पाहिले, तेव्हा तिने घाबरून आपले डोळे बंद करून घेतले. ॥ २ ॥

**परीं बधिक बस मनहुँ मरालीं। काह कीन्ह करतार कुचालीं॥**
**तिन्ह सिय निरखि निपट दुखु पावा। सो सबु सहिअ जो दैउ सहावा॥**

आपल्या सासूंची वाईट दशा पाहून सीतेला असे वाटले की, जणू राजहंसी शिकाऱ्याच्या

तावडीत सापडल्या आहेत. तिला वाटले की, दुष्ट विधात्याने हे काय केले? सीतेला पाहून त्यांनाही फार वाईट वाटले. त्यांनी विचार केला की, दैव जे काही सोसायला लावते, ते सोसावेच लागते. ॥ ३ ॥

**जनकसुता तब उर धरि धीरा। नील नलिन लोयन भरि नीरा॥**
**मिली सकल सासुन्ह सिय जाई। तेहि अवसर करुना महि छाई॥**

मग जानकी मन आवरून, आपल्या नीलकमलांसारख्या नेत्रांमध्ये पाणी आणून सर्व सासूंना जाऊन भेटली. त्यावेळी चहूकडे करुणरस पसरला. ॥ ४ ॥

दो०—**लागि लागि पग सबनि सिय भेंटति अति अनुराग।**
**हृदयँ असीसहिं पेम बस रहिअहु भरी सोहाग॥ २४६॥**

सीता सर्वांच्या पायी लागून अत्यंत प्रेमाने त्यांना भेटत होती आणि त्या सर्व सासवा स्नेहपूर्ण मनाने आशीर्वाद देत होत्या की, ''तुझे सौभाग्य अखंड राहो.''॥ २४६ ॥

**बिकल सनेहँ सीय सब रानीं। बैठन सबहि कहेउ गुर ग्यानीं॥**
**कहि जग गति मायिक मुनिनाथा। कहे कछुक परमारथ गाथा॥**

सीता व सर्व राण्या स्नेहामुळे व्याकूळ झाल्या होत्या. मग ज्ञानी गुरूंनी सर्वांना बसण्यास सांगितले. नंतर मुनिवर्य वसिष्ठांनी जगाची गती मायिक आहे, असे म्हणून काही पारमार्थिक गोष्टी सांगितल्या. ॥ १ ॥

**नृप कर सुरपुर गवनु सुनावा। सुनि रघुनाथ दुसह दुखु पावा॥**
**मरन हेतु निज नेहु बिचारी। भे अति बिकल धीर धुर धारी॥**

मग वसिष्ठांनी, राजा दशरथांनी स्वर्गलोकी प्रयाण केल्याचे सांगितले. ते ऐकून श्रीराम 'हाय बाबा!' असे म्हणून अत्यंत शोकाकुल झाले. आपल्यावरील प्रेमामुळे त्यांना मरण आले, या विचाराने श्रीरामचंद्र अत्यंत व्याकूळ झाले. ॥ २ ॥

**कुलिस कठोर सुनत कटु बानी। बिलपत लखन सीय सब रानी॥**
**सोक बिकल अति सकल समाजू। मानहुँ राजु अकाजेउ आजू॥**

ती वज्रासारखी कठोर व कटू वाणी ऐकून लक्ष्मण, सीता व सर्व राण्या विलाप करू लागल्या. सारा समाज शोकाने फार व्याकूळ झाला, जणू राजा नुकताच गेला असावा. ॥ ३ ॥

**मुनिबर बहुरि राम समुझाए। सहित समाज सुसरित नहाए॥**
**ब्रत निरंबु तेहि दिन प्रभु कीन्हा। मुनिहु कहें जलु काहुँ न लीन्हा॥**

नंतर वसिष्ठांनी श्रीरामांना समजावले. तेव्हा त्यांनी व सर्व समाजाने श्रेष्ठ नदी मंदाकिनीत जाऊन

स्नान केले. त्या दिवशी श्रीरामचंद्रांनी निर्जल व्रत केले. वसिष्ठ मुनींनी सांगितले, तरी त्यांनी पाणीही ग्रहण केले नाही. ॥ ४ ॥

**दो०—भोरु भएँ रघुनंदनहि जो मुनि आयसु दीन्ह।**
**श्रद्धा भगति समेत प्रभु सो सबु सादरु कीन्ह॥ २४७॥**

दुसऱ्या दिवशी सकाळ झाल्यावर श्रीरघुनाथांना वसिष्ठांनी जी जी सांगितली, ती ती सर्व धार्मिक कार्ये प्रभूंनी श्रद्धेने व भक्तीने पूर्ण केली. ॥ २४७ ॥

**करि पितु क्रिया बेद जसि बरनी। भे पुनीत पातक तम तरनी॥**
**जासु नाम पावक अघ तूला। सुमिरत सकल सुमंगल मूला॥**

वेदांमध्ये सांगितल्याप्रमाणे पित्याची क्रिया-कर्मे करून पापरूप अंधकार नष्ट करणारे सूर्यरूप श्रीरामचंद्र शुद्ध झाले. ज्यांचे नाम पापरूपी कापसाला लगेच जाळून टाकणारा अग्नी आहे आणि ज्यांचे स्मरण हे सर्व मांगल्याचे मूळ आहे, ॥ १ ॥

**सुद्ध सो भयउ साधु संमतअस। तीरथ आवाहन सुरसरि जस॥**
**सुद्ध भएँ दुइ बासर बीते। बोले गुर सन राम पिरीते॥**

ते नित्य शुद्ध, बुद्ध भगवान श्रीराम शुद्ध झाले. साधूंच्या मते त्यांनी शुद्ध होणे म्हणजे तीर्थांचे आवाहन केल्याने 'गंगा' शुद्ध होण्यासारखे आहे. शुद्ध होऊन दोन दिवस उलटल्यावर श्रीराम प्रेमाने गुरुजींना म्हणाले, ॥ २ ॥

**नाथ लोग सब निपट दुखारी। कंद मूल फल अंबु अहारी॥**
**सानुज भरतु सचिव सब माता। देखि मोहि पल जिमि जुग जाता॥**

'हे नाथ, इथे सर्वजणांना दुःख सोसावे लागत आहे. कंद, मुळे, फळे व जल यांचाच आहार आहे. शत्रुघ्नासह भरत, मंत्री व सर्व मातांना येथे पाहाताना मला एक एक क्षण युगासारखा वाटत आहे. ॥ ३ ॥

**सब समेत पुर धारिअ पाऊ। आपु इहाँ अमरावति राऊ॥**
**बहुत कहेउँ सब कियउँ ढिठाई। उचित होइ तस करिअ गोसाँई॥**

म्हणून तुम्ही सर्वांबरोबर अयोध्येला परत जा. तुम्ही येथे आहात व राजे स्वर्गात आहेत. त्यामुळे अयोध्या ओसाड झाली आहे. मी जास्त बोललो, हे माझे धारिष्ट्य आहे. हे गुरुवर्य! जे योग्य असेल तेच आपण करा.' ॥ ४ ॥

**दो०—धर्म सेतु करुनायतन कस न कहहु अस राम।**
**लोग दुखित दिन दुइ दरस देखि लहहुँ बिश्राम॥ २४८॥**

वसिष्ठ म्हणाले, 'हे राम, तुम्ही धर्माचे सेतू व दयेचे धाम आहात, मग असे का सांगणार नाही? या दुःखी दीनांना दोन दिवस तुमचे दर्शन घेऊन त्यांना शांती लाभू दे.'॥ २४८॥

**राम बचन सुनि सभय समाजू । जनु जलनिधि महुँ बिकल जहाजू॥**
**सुनि गुर गिरा सुमंगल मूला । भयउ मनहुँ मारुत अनुकूला॥**

श्रीरामांचे बोलणे ऐकून सर्व लोक घाबरले. समुद्रामध्ये जहाज हेलकावू लागते, त्याप्रमाणे. परंतु जेव्हा त्यांनी वसिष्ठांचे कल्याणमूलक बोलणे ऐकले, तेव्हा त्या जहाजाला जणू अनुकूल वारे मिळाले.॥ १॥

**पावन पयँ तिहुँ काल नहाहीं । जो बिलोकि अघ ओघ नसाहीं॥**
**मंगलमूरति लोचन भरि भरि । निरखहिं हरषि दंडवत करि करि॥**

सर्व लोक जिच्या दर्शनाने पापांच्या राशी नाहीशा होतात, अशा पवित्र पयस्विनी नदीत त्रिकाल स्नान करीत होते आणि मंगलमूर्ती श्रीरामचंद्रांना दंडवत घालून प्रणाम करून त्यांना डोळे भरून पाहात होते.॥ २॥

**राम सैल बन देखन जाहीं । जहँ सुख सकल सकल दुख नाहीं॥**
**झरना झरहिं सुधासम बारी । त्रिबिध तापहर त्रिबिध बयारी॥**

सर्वजण श्रीरामांचा कामदगिरी पर्वत व वन पाहण्यास जात. तिथे सर्व सुखे होती व सर्व दुःखांचा अभाव होता. झरे अमृतासारखे गोड पाणी घेऊन वाहात होते आणि शीतल, मंद, सुगंधित हवा आध्यात्मिक, आधिभौतिक, आधिदैविक अशा त्रितापांचे हरण करीत होती.॥ ३॥

**बिटप बेलि तृन अगनित जाती । फल प्रसून पल्लव बहु भाँती॥**
**सुंदर सिला सुखद तरु छाहीं । जाइ बरनि बन छबि केहि पाहीं॥**

तेथे असंख्य जातीचे वृक्ष, वेली व गवत होते आणि अनेक प्रकारची फळे, फुले, पाने होती. सुंदर शिळा होत्या. वृक्षांची सुखद सावली होती. त्या वनाची शोभा कोण वर्णन करू शकेल?॥ ४॥

दो०—**सरनि सरोरुह जल बिहग कूजत गुंजत भृंग।**
**बैर बिगत बिहरत बिपिन मृग बिहंग बहुरंग॥ २४९॥**

तलावांमधून कमळे उमललेली होती, पाण्यात राहणारे पक्षी कूजन करीत होते, भ्रमर गुंजारव करीत होते आणि अनेक रंगांचे पक्षी आणि पशू परस्पर वैरभाव सोडून वनात विहार करीत होते.॥ २४९॥

**कोल किरात भिल्ल बनबासी । मधु सुचि सुंदर स्वादु सुधा सी॥**
**भरि भरि परन पुटीं रचि रूरी । कंद मूल फल अंकुर जूरी॥**

कोल, किरात, भिल्ल इत्यादी वनवासी लोक सुंदर द्रोण बनवून त्यांतून अमृतासारखा स्वादिष्ट मध भरभरून आणत होते आणि कंदमुळे, फळे आणि अंकुर यांचे ढीग आणत होते. ॥ १ ॥

**सबहि देहिं करि बिनय प्रनामा । कहि कहि स्वाद भेद गुन नामा ॥**
**देहिं लोग बहु मोल न लेहीं । फेरत राम दोहाई देहीं ॥**

मग सर्वांना विनवणी व प्रणाम करून त्या वस्तूंचे निरनिराळे स्वाद, प्रकार, गुण व नावे सांग-सांगून देत. लोक त्याचे पुष्कळ मूल्य देत, परंतु ते घेत नसत. परत करीत व श्रीरामांची शपथ घालीत. ॥ २ ॥

**कहहिं सनेह मगन मृदु बानी । मानत साधु पेम पहिचानी ॥**
**तुम्ह सुकृती हम नीच निषादा । पावा दरसनु राम प्रसादा ॥**

प्रेम-मग्न होऊन ते कोमल वाणीने म्हणत, 'साधू लोक प्रेम ओळखून त्याचा मान राखतात. तुम्ही तर पुण्यात्मे आहात, आम्ही हलके निषाद आहोत. श्रीरामांच्या कृपेमुळे आम्हांला तुमचे दर्शन घडले. ॥ ३ ॥

**हमहि अगम अति दरसु तुम्हारा । जस मरु धरनि देवधुनि धारा ॥**
**राम कृपाल निषाद नेवाजा । परिजन प्रजउ चहिअ जस राजा ॥**

ज्याप्रमाणे मरुभूमीमध्ये गंगेचे दर्शन होणे दुर्लभ आहे, त्याप्रमाणे आम्हा लोकांना तुमचे दर्शन दुर्लभ आहे. पाहा, श्रीरामांनी निषादांवर कशी कृपा केली आहे. जसा राजा असतो, त्यांचा परिवार व प्रजा यांनीही तसेच असले पाहिजे, ॥ ४ ॥

दो०—**यह जियँ जानि सँकोचु तजि करिअ छोहु लखि नेहु ।**
**हमहि कृतारथ करन लगि फल तृन अंकुर लेहु ॥ २५० ॥**

असे मनात समजून, संकोच सोडून आणि आमचे प्रेम पाहून कृपा करा आणि आम्हांला कृतार्थ करण्यासाठी ही फळे, तृण व अंकुर घ्या. ॥ २५० ॥

**तुम्ह प्रिय पाहुने बन पगु धारे । सेवा जोगु न भाग हमारे ॥**
**देब काह हम तुम्हहि गोसाँई । ईंधनु पात किरात मिताई ॥**

तुम्ही प्रिय पाहुणे म्हणून वनात आला आहात. तुमची सेवा करण्याजोगे आमचे भाग्य नाही. हे स्वामी, आम्ही तुम्हांला काय देणार? भिल्लांची मैत्री फक्त सर्पण व पानांशीच असते. ॥ १ ॥

**यह हमारि अति बड़ि सेवकाई । लेहिं न बासन बसन चोराई ॥**
**हम जड़ जीव जीव गन घाती । कुटिल कुचाली कुमति कुजाती ॥**

आम्ही तुमचे कपडे, भांडी चोरत नाही, हीच आमची मोठी सेवा होय. आम्ही अज्ञानी जीव आहोत. प्राण्यांची हिंसा करणारे आहोत, कुटिल, दुष्ट चालीचे, दुर्बुद्धीचे आणि हलक्या जातीचे आहोत. ॥ २ ॥

**पाप करत निसि बासर जाहीं। नहिं पट कटि नहिं पेट अघाहीं॥**
**सपनेहुँ धरमबुद्धि कस काऊ। यह रघुनंदन दरस प्रभाऊ॥**

आमचे दिवस व रात्री हे पाप करण्यातच जातात. तरीही आमच्या कमरेला वस्त्र नाही आणि आम्ही आपले पोटही भरू शकत नाही. मग स्वप्नातही कधी धर्मबुद्धी आम्हांला कशी येणार? हा सर्व श्रीरघुनाथांच्या दर्शनाचा प्रभाव आहे. ॥ ३ ॥

**जब तें प्रभु पद पदुम निहारे। मिटे दुसह दुख दोष हमारे॥**
**बचन सुनत पुरजन अनुरागे। तिन्ह के भाग सराहन लागे॥**

प्रभूंचे चरण-कमल जेव्हापासून पाहातो, तेव्हापासून आमची असह्य दुःखे व पापे नाहीशी झाली आहेत.' वनवासींचे ते बोलणे ऐकून अयोध्येच्या लोकांचे मन प्रेमाने भरून आले आणि ते त्या वनवासींच्या भाग्याची प्रशंसा करू लागले. ॥ ४ ॥

छं०—**लागे सराहन भाग सब अनुराग बचन सुनावहीं।**
**बोलनि मिलनि सिय राम चरन सनेहु लखि सुखु पावहीं॥**
**नर नारि निदरहिं नेहु निज सुनि कोल भिल्लनि की गिरा।**
**तुलसी कृपा रघुबंसमनि की लोह लै लौका तिरा॥**

सर्वजण त्यांच्या भाग्याची प्रशंसा करू लागले व प्रेमाने बोलू लागले. वनवासींच्या बोलण्याची व भेटण्याची पद्धत व श्रीरामांच्या चरणी त्यांचे प्रेम पाहून सर्वांना सुख झाले. त्या कोल, भिल्ल लोकांचे बोलणे ऐकून सर्व स्त्री-पुरुषांना आपल्या प्रेमाचा क्षुद्रपणा वाटू लागला. तुलसीदास म्हणतात की, जणू लोखंडाने भोपळ्यांना तारून नेले. ही श्रीरामचंद्रांचीच कृपा होय. (यावरून या वनवासींची श्रीरामांवरील भक्ती अयोध्यावासींहून अधिक होती, हे दिसून येते.)

सो०—**बिहरहिं बन चहु ओर प्रतिदिन प्रमुदित लोग सब।**
**जल ज्यों दादुर मोर भए पीन पावस प्रथम॥ २५१॥**

सर्वजण दिवसेंदिवस परम आनंदित होऊन वनात चोहीकडे फिरत होते. ज्याप्रमाणे पहिला पाऊस पडल्यावर बेडूक व मोर प्रसन्न होऊन नाचू-बागडू लागतात॥ २५१ ॥

**पुर जन नारि मगन अति प्रीती। बासर जाहिं पलक सम बीती॥**
**सीय सासु प्रति बेष बनाई। सादर करइ सरिस सेवकाई॥**

त्याप्रमाणे अयोध्यापुरीतील सर्व स्त्री-पुरुष अत्यंत प्रेमात मग्न होते. त्यांचे दिवस क्षणाप्रमाणे सरत होते. जितक्या सासवा होत्या, तितकी रूपे धारण करून सीता सर्व सासूंची आदराने एकसारखीच सेवा करीत होती. ॥ १ ॥

**लखा न मरमु राम बिनु काहूँ। माया सब सिय माया माहूँ॥**
**सीयँ सासु सेवा बस कीन्हीं। तिन्ह लहि सुख सिख आसिष दीन्हीं॥**

श्रीरामचंद्रांशिवाय हे गुपित दुसऱ्या कुणाला समजले नाही. सर्व पराशक्ती महामाया या सीतेच्या मायेमध्येच वसल्या होत्या. तिने आपल्या सेवेने सासूंना वश केले. त्यांना सुख वाटले व त्यांनी उपदेश आणि आशीर्वाद दिले.॥ २॥

**लखि सिय सहित सरल दोउ भाई। कुटिल रानि पछितानि अघाई॥**
**अवनि जमहि जाचति कैकेई। महि न बीचु बिधि मीचु न देई॥**

सीता व राम-लक्ष्मण यांचा सरळ स्वभाव पाहून कुटिल राणी कैकेयीला खूप पश्चात्ताप झाला. ती पृथ्वी व यमराज यांना याचना करीत होती. पण धरणी विदीर्ण होऊन तिला सामावून घेत नव्हती व विधाता मरण देत नव्हता.॥ ३॥

**लोकहुँ बेद बिदित कबि कहहीं। राम बिमुख थलु नरक न लहहीं॥**
**यहु संसउ सब के मन माहीं। राम गवनु बिधि अवध कि नाहीं॥**

लोक व वेद यांमध्ये ही गोष्ट प्रसिद्ध आहे आणि ज्ञानीसुद्धा म्हणतात की, जे श्रीरामांशी विन्मुख असतात त्यांना नरकातही जागा मिळत नाही. सर्वांच्या मनाला अशी शंका वाटून ते म्हणत होते की, हे विधात्या! श्रीरामचंद्रांचे अयोध्येला परतणे होणार की नाही?॥ ४॥

दो०—**निसि न नीद नहिं भूख दिन भरतु बिकल सुचि सोच।**
**नीच कीच बिच मगन जस मीनहि सलिल सँकोच॥ २५२॥**

भरताला रात्री झोप येत नव्हती की दिवसा भूक लागत नव्हती. चिखलात बुडालेली मासोळी पाण्याविना जशी व्याकूळ होते, तसा भरत चिंतेत बुडून व्याकूळ झाला होता.॥ २५२॥

**कीन्हि मातु मिस काल कुचाली। ईति भीति जस पाकत साली॥**
**केहि बिधि होइ राम अभिषेकू। मोहि अवकलत उपाउ न एकू॥**

भरत विचार करीत होता की, मातेच्या निमित्ताने काळाने दुष्ट खेळी केली. ज्याप्रमाणे शेतात धान्य पिकू लागते, त्यावेळीच ईतीचे भय येते, तसे येथे झाले. आता श्रीरामचंद्रांचा राज्याभिषेक कसा व्हायचा ? मला एकही उपाय सुचत नाही. ॥ १॥

**अवसि फिरहिं गुर आयसु मानी। मुनि पुनि कहब राम रुचि जानी॥**
**मातु कहेहुँ बहुरहिं रघुराऊ। राम जननि हठ करबि कि काऊ॥**

गुरुजींची आज्ञा मानून श्रीराम नक्कीच अयोध्येला परत येतील, परंतु मुनी वसिष्ठ श्रीरामचंद्रांची आवड पाहूनच काही बोलतील. कौसल्या मातेच्या सांगण्यावर श्रीरघुनाथ परतू शकतील, परंतु श्रीरामांना जन्म देणारी कौसल्या माता कधी हट्ट धरील काय?॥ २॥

**मोहि अनुचर कर केतिक बाता । तेहि महँ कुसमउ बाम बिधाता ॥**
**जौं हठ करउँ त निपट कुकरमू । हरगिरि तें गुरु सेवक धरमू ॥**

मज सेवकाचे बोलणे ते किती? त्यात काळ असा वाईट आलेला आहे आणि विधाता प्रतिकूल आहे. मी जर हट्ट धरला, तर तो घोर अधर्म होईल, कारण सेवकाचा धर्म भगवान शिवांच्या कैलास पर्वतापेक्षा मोठा व पालन करण्यास कठीण असतो. ॥ ३ ॥

**एकउ जुगुति न मन ठहरानी । सोचत भरतहि रैनि बिहानी ॥**
**प्रात नहाइ प्रभुहि सिर नाई । बैठत पठए रिषयँ बोलाई ॥**

भरताच्या मनात एकही युक्ती येईना. विचार करण्यात रात्र संपून गेली. प्रात:काळी भरताने स्नान केले व तो प्रभू श्रीरामांच्या समोर नतमस्तक होऊन बसला होता. एवढ्यात ऋषी वसिष्ठांनी त्याला बोलावणे पाठविले. ॥ ४ ॥

**दो०—गुर पद कमल प्रनामु करि बैठे आयसु पाइ।**
**बिप्र महाजन सचिव सब जुरे सभासद आइ ॥ २५३ ॥**

भरत गुरूंच्या चरण-कमलांना प्रणाम करून आज्ञा मिळाल्यावर त्यांच्यासमोर बसला. त्यावेळी ब्राह्मण, श्रेष्ठी, मंत्री इत्यादी सर्व सभासद एकत्र जमले. ॥ २५३ ॥

**बोले मुनिबरु समय समाना । सुनहु सभासद भरत सुजाना ॥**
**धरम धुरीन भानुकुल भानू । राजा रामु स्वबस भगवानू ॥**

वसिष्ठ मुनी प्रसंगानुरूप म्हणाले, 'हे सभासदांनो, हे सुजाण भरता, ऐकून घ्या. सूर्यकुलाचे सूर्य श्रीरामचंद्र हे धर्मधुरंधर, आणि स्वतंत्र भगवान आहेत. ॥ १ ॥

**सत्यसंध पालक श्रुति सेतू । राम जनमु जग मंगल हेतू ॥**
**गुर पितु मातु बचन अनुसारी । खल दलु दलन देव हितकारी ॥**

ते सत्यप्रतिज्ञ आहेत व वेदमर्यादेचे रक्षक आहेत. श्रीरामांचा अवतारच जगाच्या कल्याणासाठी झालेला आहे. ते गुरू, पिता व माता यांच्या वचनांप्रमाणे वागणारे आहेत. ते दुष्टांचा नाश करणारे आणि देवांचे हितकारक आहेत. ॥ २ ॥

**नीति प्रीति परमारथ स्वारथु । कोउ न राम सम जान जथारथु ॥**
**बिधि हरि हरु ससि रबि दिसिपाला । माया जीव करम कुलि काला ॥**

नीती, प्रेम परमार्थ आणि स्वार्थ यांना श्रीरामांसारखा तत्त्वत: जाणणारा कोणी नाही. ब्रह्मदेव, विष्णू, महादेव, चंद्र, सूर्य, दिक्पाल, माया, जीव, सर्व कर्मे व काल, ॥ ३ ॥

**अहिप महिप जहँ लगि प्रभुताई । जोग सिद्धि निगमागम गाई ॥**
**करि बिचार जियँ देखहु नीकें । राम रजाइ सीस सबही कें ॥**

शेष, पृथ्वी व पाताळातील इतर राजे इत्यादी, जितके म्हणून लोक व लोकपाल आहेत, तसेच योगाच्या ज्या सिद्धी वेद व शास्त्रांत सांगितल्या आहेत, मनात यांचा विचार करून बघाल, तर स्पष्टपणे दिसून येईल की, श्रीरामांची आज्ञा या सर्वांच्या शिरावर आहे (अर्थात श्रीराम हेच सर्वांचे एकमात्र महेश्वर आहेत.) ॥ ४ ॥

**दो०—राखें राम रजाइ रुख हम सब कर हित होइ।**
**समुझि सयाने करहु अब सब मिलि संमत सोइ॥ २५४॥**

म्हणून श्रीरामांची आज्ञा व मनोगत राखण्यातच आपणा सर्वांचे हित आहे. आता तुम्ही बुद्धिमान लोक मिळून सर्वांना जे मान्य असेल ते करा. ॥ २५४ ॥

**सब कहुँ सुखद राम अभिषेकू । मंगल मोद मूल मग एकू॥**
**केहि बिधि अवध चलहिं रघुराऊ । कहहु समुझि सोइ करिअ उपाऊ॥**

श्रीरामांचा राज्याभिषेक हा सर्वांच्यासाठी सुखदायक आहे. मांगल्य व आनंद यांचा हा एकच मार्ग आहे. आता श्रीरघुनाथ अयोध्येला कसे येतील? विचार करून सांगा, तोच उपाय करता येईल. ॥ १ ॥

**सब सादर सुनि मुनिबर बानी । नय परमारथ स्वारथ सानी॥**
**उतरु न आव लोग भए भोरे । तब सिरु नाइ भरत कर जोरे॥**

मुनिश्रेष्ठ वसिष्ठांची नीती, परमार्थ आणि लौकिक हिताने भरलेली वाणी सर्वांनी आदराने ऐकली, परंतु कुणालाही कोणतेही उत्तर सापडत नव्हते. सर्वजण विचारशक्ती गमावून बसले होते. तेव्हा भरताने मस्तक नम्र करून हात जोडले, ॥ २ ॥

**भानुबंस भए भूप घनेरे । अधिक एक तें एक बड़ेरे॥**
**जनम हेतु सब कहँ पितु माता । करम सुभासुभ देइ बिधाता॥**

आणि म्हटले, 'सूर्यवंशामध्ये एकापेक्षा एक असे पुष्कळ श्रेष्ठ राजे होऊन गेले आहेत. सर्वांच्या जन्माचे कारण माता-पिता असतात आणि शुभ-अशुभ कर्मांचे फळ विधाता देत असतो. ॥ ३ ॥

**दलि दुख सजइ सकल कल्याना । अस असीस राउरि जगु जाना॥**
**सो गोसाइँ बिधि गति जेहिं छेंकी । सकइ को टारि टेक जो टेकी॥**

गुरुजी, हे सर्व जगाला ठाऊक आहे की, सर्व दु:खाचा नाश करून सर्व कल्याणांची मांडणी करणारा आशीर्वाद हाच एक उपाय आहे. हे स्वामी, विधात्याचे विधान थोपवणारे तुम्हीच एकमात्र आहात. तुम्ही जो निश्चय कराल, तो कोण टाळू शकेल? ॥ ४ ॥

**दो०—बूझिअ मोहि उपाउ अब सो सब मोर अभागु।**
**सुनि सनेहमय बचन गुर उर उमगा अनुरागु॥ २५५॥**

आता तुम्हीच मला उपाय विचारता, हे सर्व माझे दुर्भाग्य होय.' भरताचे प्रेममय बोलणे ऐकून गुरुजींच्या मनात प्रेम उचंबळून आले. ॥ २५५ ॥

**तात बात फुरि राम कृपाहीं। राम बिमुख सिधि सपनेहुँ नाहीं॥**
**सकुचउँ तात कहत एक बाता। अरध तजहिं बुध सरबस जाता॥**

ते म्हणाले, 'हे भरता, हे सत्य आहे, परंतु हे सर्व श्रीरामांच्या कृपेमुळेच आहे. राम-विन्मुखाला स्वप्नातही सिद्धी मिळत नाही. बाबारे, एक गोष्ट सांगताना मला संकोच वाटतो. बुद्धिमान लोक सर्वस्व गमावले जात आहे, असे पाहून अर्धे सोडून देतात. ॥ १ ॥

**तुम्ह कानन गवनहु दोउ भाई। फेरिअहिं लखन सीय रघुराई॥**
**सुनि सुबचन हरषे दोउ भ्राता। भे प्रमोद परिपूरन गाता॥**

म्हणून भरता, तू व शत्रुघ्न हे दोघे भाऊ वनाला जा आणि लक्ष्मण, सीता आणि श्रीराम यांना परत पाठवू या.' हे सुंदर बोलणे ऐकून दोघे बंधू हर्षित झाले. त्यांचे संपूर्ण शरीर परमानंदाने परिपूर्ण झाले. ॥ २ ॥

**मन प्रसन्न तन तेजु बिराजा। जनु जिय राउ रामु भए राजा॥**
**बहुत लाभ लोगन्ह लघु हानी। सम दुख सुख सब रोवहिं रानी॥**

त्यांची मने प्रसन्न झाली. शरीरामध्ये तेज उजळले. जणू काही राजा दशरथ जिवंत झाले आणि श्रीराम राजा झाले असावेत. इतर लोकांना यामध्ये जास्त लाभ व हानी कमी आहे, असे वाटले. परंतु राण्यांमध्ये दुःख-सुख सारखेच होते. कारण राम-लक्ष्मण वनात राहोत किंवा भरत-शत्रुघ्न, दोघा पुत्रांचा वियोग हा राहणारच. असे वाटून त्या सर्व रडू लागल्या. ॥ ३ ॥

**कहहिं भरतु मुनि कहा सो कीन्हे। फलु जग जीवन्ह अभिमत दीन्हे॥**
**कानन करउँ जनम भरि बासू। एहि तें अधिक न मोर सुपासू॥**

भरत बोलू लागला, 'मुनींनी जे सांगितले, ते केल्याने जगातल्या सर्व जिवांना त्यांच्या मनातील दिल्याचे फळ मिळेल. चौदा वर्षांचा अवधी काहीच नाही. मी जन्मभर वनात राहीन. मला याच्याहून मोठे सुख दुसरे काही नाही. ॥ ४ ॥

दो०—**अंतरजामी रामु सिय तुम्ह सरबग्य सुजान।**
**जौं फुर कहहु त नाथ निज कीजिअ बचनु प्रवान॥ २५६ ॥**

गुरुजी, तुम्ही श्रीराम आणि सीता यांच्या मनातील जाणणारे आहात आणि सर्वज्ञ आहात. हे गुरुवर्य, जर तुम्ही सत्य सांगत असाल, तर त्याप्रमाणे व्यवस्था करा.'॥ २५६ ॥

**भरत बचन सुनि देखि सनेहू। सभा सहित मुनि भए बिदेहू॥**
**भरत महा महिमा जलरासी। मुनि मति ठाढ़ि तीर अबला सी॥**

भरताचे बोलणे ऐकून आणि त्याचे प्रेम पाहून सर्व सभा आणि वसिष्ठ मुनी यांना देहभान उरले नाही. जणू भरताचा मोठा महिमा हा समुद्र आहे आणि मुनींची बुद्धी त्याच्या किनारी अबलेसारखी उभी आहे. ॥ १ ॥

**गा चह पार जतनु हियँ हेरा । पावति नाव न बोहितु बेरा॥**
**औरु करिहि को भरत बड़ाई । सरसी सीपि कि सिंधु समाई॥**

ती समुद्र पार करू इच्छित होती. त्यासाठी तिने उपाय शोधले. परंतु नाव, जहाज किंवा नावांचे समूह यांपैकी काहीच सापडत नव्हते. भरताचा महिमा कुणी वर्णावा? तळ्यामधील शिंपल्यामध्ये कुठे समुद्र सामावेल काय?॥ २ ॥

**भरतु मुनिहि मन भीतर भाए । सहित समाज राम पहिं आए॥**
**प्रभु प्रनामु करि दीन्ह सुआसनु । बैठे सब सुनि मुनि अनुसासनु॥**

वसिष्ठांच्या अंतरात्म्याला भरत हा फार चांगला वाटला. ते सर्वांसह श्रीरामांकडे आले. प्रभू रामचंद्रांनी प्रणाम करून गुरूंना उत्तम आसन दिले. मुनींची आज्ञा झाल्यावर सर्व खाली बसले. ॥ ३ ॥

**बोले मुनिबरु बचन बिचारी । देस काल अवसर अनुहारी॥**
**सुनहु राम सरबग्य सुजाना । धरम नीति गुन ग्यान निधाना॥**

वसिष्ठ मुनी देश, काल आणि कालानुरूप विचार करून म्हणाले, 'हे सर्वज्ञ! हे धर्म, नीती, गुण आणि ज्ञानाचे भांडार असलेल्या श्रीरामा, ऐका. ॥ ४ ॥

दो०—**सब के उर अंतर बसहु जानहु भाउ कुभाउ।**
**पुरजन जननी भरत हित होइ सो कहिअ उपाउ॥ २५७॥**

तुम्ही सर्वांच्या हृदयात निवास करता आणि सर्वांचे चांगले-वाईट भाव जाणता. तेव्हा पुरवासी, माता व भरत यांचे भले होईल, असा उपाय सांगा. ॥ २५७ ॥

**आरत कहहिं बिचारि न काऊ । सूझ जुआरिहि आपन दाऊ॥**
**सुनि मुनि बचन कहत रघुराऊ । नाथ तुम्हारेहि हाथ उपाऊ॥**

दुःखी लोक कधी विचार करून बोलत नाहीत. जुगाऱ्याला आपल्या डावाचाच विचार असतो.' मुनींचे बोलणे ऐकून श्रीरघुनाथ म्हणू लागले-'गुरुवर्य! उपाय तर तुमच्याच हाती आहे. ॥ १ ॥

**सब कर हित रुख राउरि राखें । आयसु किएँ मुदित फुर भाषें॥**
**प्रथम जो आयसु मो कहुँ होई । माथें मानि करौं सिख सोई॥**

तुमचे मनोगत राखण्यात व तुमची आज्ञा सत्य मानून प्रसन्नतेने तिचे पालन करण्यामध्येच सर्वांचे हित आहे. प्रथम मला जी आज्ञा असेल, ती मी शिरोधार्य मानून त्याप्रमाणे करीन. ॥ २ ॥

**पुनि जेहि कहँ जस कहब गोसाईं । सो सब भाँति घटिहि सेवकाईं ॥**
**कह मुनि राम सत्य तुम्ह भाषा । भरत सनेहँ बिचारु न राखा ॥**

तसेच हे स्वामी, तुम्ही ज्याला जसे सांगाल तसेच तो सर्व प्रकारे आज्ञेचे पालन करील.' वसिष्ठ मुनी म्हणू लागले, 'हे राम, तुम्ही म्हणता ते खरे आहे. परंतु भरताच्या प्रेमापुढे माझा स्वतंत्र विचार टिकू शकला नाही. ॥ ३ ॥

**तेहि तें कहउँ बहोरि बहोरी । भरत भगति बस भइ मति मोरी ॥**
**मोरें जान भरत रुचि राखी । जो कीजिअ सो सुभ सिव साखी ॥**

म्हणून मी वारंवार म्हणतो की, माझी बुद्धी भरताच्या भक्तीच्या अधीन झाली आहे. माझ्या मते भरताची आवड सांभाळून जे काही केले जाईल, भगवान शंकर साक्षीला आहेत, ते सर्व शुभच होईल. ॥ ४ ॥

दो०—**भरत बिनय सादर सुनिअ करिअ बिचारु बहोरि।**
**करब साधुमत लोकमत नृपनय निगम निचोरि॥ २५८ ॥**

प्रथम भरताची विनंती आदराने ऐकून घ्या, आणि त्यावर विचार करा. नंतर साधुमत, लोकमत, राजनीती आणि वेदांचे सार काढून त्याप्रमाणे करा.'॥ २५७ ॥

**गुर अनुरागु भरत पर देखी । राम हृदयँ आनंदु बिसेषी ॥**
**भरतहि धरम धुरंधर जानी । निज सेवक तन मानस बानी ॥**

गुरूंचे भरतावरील प्रेम पाहून श्रीरामांच्या मनास विशेष आनंद झाला. भरत हा धर्मधुरंधर व तन-मन-वचनाने आपला सेवक आहे, असे समजून, ॥ १ ॥

**बोले गुर आयस अनुकूला । बचन मंजु मृदु मंगलमूला ॥**
**नाथ सपथ पितु चरन दोहाई । भयउ न भुअन भरत सम भाई ॥**

श्रीरामचंद्र गुरूंच्या आज्ञेला अनुकूल, मनोहर, कोमल व कल्याणाचे मूळ असलेले वचन बोलले-'हे गुरुवर्य ! मी तुमची शपथ घेऊन व वडिलांच्या चरणांची आण घेऊन सत्य सांगतो की, विश्वामध्ये भरतासारखा भाऊ कोणी झालाच नाही. ॥ २ ॥

**जे गुर पद अंबुज अनुरागी । ते लोकहुँ बेदहुँ बड़भागी ॥**
**राउर जा पर अस अनुरागू । को कहि सकइ भरत कर भागू ॥**

जे लोक गुरूंच्या चरण-कमलांच्या ठायी अनुराग बाळगतात, ते लौकिक दृष्ट्या आणि वैदिक-पारमार्थिक दृष्ट्या मोठ्या भाग्याचे होत. मग ज्याच्यावर तुमच्यासारख्या गुरूंचे असे प्रेम आहे, त्या भरताच्या भाग्याची वाखाणणी कोण करू शकेल ? ॥ ३ ॥

**लखि लघु बंधु बुद्धि सकुचाई । करत बदन पर भरत बड़ाई ॥**
**भरतु कहहिं सोइ किएँ भलाई । अस कहि राम रहे अरगाई ॥**

लहान भाऊ समजून भरताच्या तोंडावर त्याची प्रशंसा करण्या-मध्ये माझ्या बुद्धीला संकोच वाटतो. तरीही मी सांगतो की, भरत जे काही सांगेल, त्याप्रमाणे करणे चांगले होय.' एवढे बोलून श्रीरामचंद्र गप्प बसले. ॥ ४ ॥

दो०—**तब मुनि बोले भरत सन सब सँकोचु तजि तात।**
**कृपासिंधु प्रिय बंधु सन कहहु हृदय कै बात॥ २५९॥**

तेव्हा मुनी भरताला म्हणाले, 'हे पुत्रा! सगळा संकोच सोडून कृपेचा सागर असलेल्या आपल्या प्रिय भावाला आपल्या मनातील विचार सांग.'॥ २५९ ॥

**सुनि मुनि बचन राम रुख पाई । गुरु साहिब अनुकूल अघाई॥**
**लखि अपनें सिर सबु छरु भारू । कहि न सकहिं कछु करहिं बिचारू॥**

मुनींचे वचन ऐकून आणि श्रीरामांचा कल पाहून, आणि ते दोघे आपल्याला अनुकूल असल्याचे पाहून, सर्व ओझे आपल्याच शिरावर आहे, असे भरताला वाटले व तो काही बोलू शकला नाही. विचार करू लागला. ॥ १ ॥

**पुलकि सरीर सभाँ भए ठाढ़े । नीरज नयन नेह जल बाढ़े॥**
**कहब मोर मुनिनाथ निबाहा । एहि तें अधिक कहौं मैं काहा॥**

पुलकित शरीराने तो सभेत उभा राहिला. कमल-नेत्रांतून प्रेमाश्रूंचा पूर आला. तो म्हणाला, 'माझे म्हणणे मुनिनाथांनी सांगून टाकले. यापेक्षा जास्त मी काय बोलू?॥ २ ॥

**मैं जानउँ निज नाथ सुभाऊ । अपराधिहु पर कोह न काऊ॥**
**मो पर कृपा सनेहु बिसेषी । खेलत खुनिस न कबहूँ देखी॥**

मी आपल्या स्वामींचा स्वभाव जाणतो. ते अपराध्यावरही कधी रागावत नाहीत. माझ्यावर तर त्यांची खास कृपा आणि प्रीती आहे.मी खेळामध्येही कधी त्यांना नाराज झालेले पाहिले नाही. ॥ ३ ॥

**सिसुपन तें परिहरेउँ न संगू । कबहुँ न कीन्ह मोर मन भंगू॥**
**मैं प्रभु कृपा रीति जियँ जोही । हारेहुँ खेल जितावहिं मोही॥**

मी लहानपणापासून त्यांची सोबत सोडली नाही व त्यांनीही माझे मन कधी दुखवले नाही. मी प्रभूंच्या कृपेची रीत चांगल्या प्रकारे पाहिली आहे. खेळात मी हरलो, तरीही प्रभू मला जिंकू देत. ॥ ४ ॥

दो०—**महूँ सनेह सकोच बस सनमुख कही न बैन।**
**दरसन तृपित न आजु लगि पेम पिआसे नैन॥ २६०॥**

मी प्रेमामुळे व संकोचामुळे कधी त्यांच्यासमोर तोंड उघडले नाही. प्रेमाचे भुकेले माझे नेत्र प्रभूंचे दर्शन घेऊन आजवर कधी तृप्त झाले नाहीत॥ २६० ॥

**बिधि न सकेउ सहि मोर दुलारा । नीच बीचु जननी मिस पारा ॥**
**यहउ कहत मोहि आजु न सोभा । अपनीं समुझि साधु सुचि को भा ॥**

परंतु विधात्याला श्रीरामांचे माझ्यावरील प्रेम सहन झाले नाही. त्याने माझ्या दुष्ट मातेच्या निमित्ताने आम्हा दोघांमध्ये अंतर निर्माण केले हे सांगणेही मला आज शोभत नाही; कारण स्वत:च्या समजुतीने कोणी साधू पवित्र झाला आहे काय ?॥ १ ॥

**मातु मंदि मैं साधु सुचाली । उर अस आनत कोटि कुचाली ॥**
**फरइ कि कोदव बालि सुसाली । मुकता प्रसव कि संबुक काली ॥**

माता दुष्ट आहे आणि मी सदाचारी व साधू आहे, असे मनात आणणे हेच कोट्यवधी दुराचारांसारखे आहे. कदन्नाचे कणीस कधी उत्तम भात उत्पन्न करील काय ? काळा शिंपला कधी मोती उत्पन्न करील काय ?॥ २ ॥

**सपनेहुँ दोसक लेसु न काहू । मोर अभाग उदधि अवगाहू ॥**
**बिनु समुझें निज अघ परिपाकू । जारिउँ जायँ जननि कहि काकू ॥**

स्वप्नातही कुणामध्येच दोषाचा लेशमात्रही नाही. माझे दुर्दैव हाच अथांग समुद्र आहे. मी आपल्या पापांचा परिणाम लक्षात न घेता मातेला कटू वचन बोलून विनाकारण दुखावले. ॥ ३ ॥

**हृदयँ हेरि हारेउँ सब ओरा । एकहि भाँति भलेहिं भल मोरा ॥**
**गुर गोसाइँ साहिब सिय रामू । लागत मोहि नीक परिनामू ॥**

मी आपल्या मनाला सर्व बाजूंनी धुंडाळून पाहिले व मी हरलो. माझ्या कल्याणाचा एकही उपाय सुचत नाही. एकाच प्रकारे निश्चिपणे माझे भले होईल. ते म्हणजे गुरुमहाराज सर्वसमर्थ आहेत आणि श्रीसीताराम माझे स्वामी आहेत. यामुळे परिणाम चांगला होईल, असे मला वाटते. ॥ ४ ॥

दो०—**साधु सभाँ गुर प्रभु निकट कहउँ सुथल सतिभाउ ।**
**प्रेम प्रपंचु कि झूठ फुर जानहिं मुनि रघुराउ ॥ २६१ ॥**

या साधूंच्या सभेमध्ये आणि गुरुजी व स्वामींच्या जवळ या पवित्र तीर्थ-स्थानात मी सत्य भावनेने सांगतो. हे प्रेम आहे की कपट ? खोटे आहे की खरे ? हे सर्वज्ञ मुनी वसिष्ठ आणि अन्तर्यामी श्रीरघुनाथ जाणतात. ॥ २६१ ॥

**भूपति मरन पेम पनु राखी । जननी कुमति जगतु सबु साखी ॥**
**देखि न जाहिं बिकल महतारीं । जरहिं दुसह जर पुर नर नारीं ॥**

प्रेमाचा पण पाळून पिताजींचे मरण ओढवणे आणि मातेची दुर्बुद्धी, यांच्या साक्षीला हे जग आहे. माता व्याकूळ आहेत, त्यांना पाहावत नाही. अयोध्यापुरीचे स्त्री-पुरुष दुःसह दुःखाने जळत आहेत. ॥ १ ॥

**महीं सकल अनरथ कर मूला । सो सुनि समुझि सहिउँ सब सूला ॥**
**सुनि बन गवनु कीन्ह रघुनाथा । करि मुनि बेष लखन सिय साथा ॥**
**बिनु पानहिन्ह पयादेहि पाएँ । संकरु साखि रहेउँ एहि घाएँ ॥**
**बहुरि निहारि निषाद सनेहू । कुलिस कठिन उर भयउ न बेहू ॥**

या सर्व अनर्थांचे मूळ मीच आहे. हे ऐकून आणि जाणून घेतल्यापासून मी सर्व दुःख भोगले आहे. श्रीरघुनाथ, लक्ष्मण आणि सीतेसोबत मुनींचा वेष धारण करून अनवाणी पायी वनात गेले, हे ऐकून भगवान शंकर साक्षीला आहेत की, हा प्रहार झेलूनही मी जिवंत राहिलो. नंतर निषादराजाचे प्रेम पाहूनही माझे हे वज्राहून कठोर हृदय विदीर्ण झाले नाही. ॥ २-३ ॥

**अब सबु आँखिन्ह देखेउँ आई । जिअत जीव जड़ सबइ सहाई ॥**
**जिन्हहि निरखि मग साँपिनि बीछी । तजहिं बिषम बिषु तामस तीछी ॥**

आता येथे आल्यावर डोळ्यांनी सर्व पाहिले. माझा हा जड जीव जिवंत राहून मला पिडणार. ज्यांना पाहिल्यावर वाटेतील सर्पीण आणि विंचू हेसुद्धा आपले विष व आपला तीव्र क्रोध सोडून देतात, ॥ ४ ॥

**दो०—तेइ रघुनंदनु लखनु सिय अनहित लागे जाहि।**
**तासु तनय तजि दुसह दुख दैउ सहावइ काहि॥ २६२ ॥**

तेच रघुनंदन, लक्ष्मण व सीता हे जिला शत्रू वाटले, त्या कैकेयीचा पुत्र असलेल्या मला सोडून दुःसह दुःख दुसऱ्या कोणाला सतावणार ?' ॥ २६२ ॥

**सुनि अति बिकल भरत बर बानी । आरति प्रीति बिनय नय सानी ॥**
**सोक मगन सब सभाँ खभारू । मनहुँ कमल बन परेउ तुसारू ॥**

अत्यंत व्याकूळ व दुःख, प्रेम, विनय आणि नीती यांनी भरलेली भरताची वाणी ऐकून सर्व लोक शोक-मग्न झाले. साऱ्या सभेत विषाद पसरला. जणू कमलवनावर हिमपात झाला. ॥ १ ॥

**कहि अनेक बिधि कथा पुरानी । भरत प्रबोधु कीन्ह मुनि ग्यानी ॥**
**बोले उचित बचन रघुनंदू । दिनकर कुल कैरव बन चंदू ॥**

तेव्हा ज्ञानी मुनी वसिष्ठांनी अनेक प्रकारच्या प्राचीन कथा सांगून भरताचे समाधान केले. नंतर सूर्यकुलरूपी कुमुदवनाला प्रफुल्ल करणारे चंद्रमा श्रीरघुनाथ योग्य प्रकारे सांगू लागले. ॥ २ ॥

**तात जायँ जियँ करहु गलानी । ईस अधीन जीव गति जानी ॥**
**तीनि काल तिभुअन मत मोरें । पुन्यसिलोक तात तर तोरें ॥**

'हे भरता! आपल्या मनात तू विनाकारण अपराधीपणा बाळगत आहेस. जीवाची गती ही ईश्वराच्या अधीन आहे, हे जाणून घे. माझ्या मते त्रिकालातील व त्रैलोक्यातील सर्व पुण्यात्मे पुरुष हे तुझ्याहून खालचे आहेत.॥ ३॥

**उर आनत तुम्ह पर कुटिलाई। जाइ लोकु परलोकु नसाई॥**
**दोसु देहिं जननिहि जड़ तेई। जिन्ह गुर साधु सभा नहिं सेई॥**

मनातही तुझ्यावर आरोप केल्यास इहलोक व परलोक हे दोन्हीही नष्ट होतील. ते मूर्ख लोकच कैकेयी मातेला दोष देतात की, ज्यांनी गुरू व साधूंचा सत्संग कधी केलेला नाही.॥ ४॥

दो०—**मिटिहहिं पाप प्रपंच सब अखिल अमंगल भार।**
**लोक सुजसु परलोक सुखु सुमिरत नामु तुम्हार॥ २६३॥**

हे भरता, तुझे नाम-स्मरण करताच सर्व पापे, अज्ञान आणि अमंगळ यांच्या राशी नष्ट होतील आणि या लोकी सुंदर कीर्ती व परलोकी सुख मिळेल.॥ २६३॥

**कहउँ सुभाउ सत्य सिव साखी। भरत भूमि रह राउरि राखी॥**
**तात कुतरक करहु जनि जाएँ। बैर पेम नहिं दुरइ दुराएँ॥**

हे भरता, मी भगवान शिवांना साक्षीला ठेवून खरे सांगतो की, ही पृथ्वी तुझ्यावरच आधारित आहे. बाबा रे! तू विनाकारण खिन्न होऊ नकोस. वैर आणि प्रेम हे लपविल्याने लपत नसते.॥ १॥

**मुनिगन निकट बिहग मृग जाहीं। बाधक बधिक बिलोकि पराहीं॥**
**हित अनहित पसु पच्छिउ जाना। मानुष तनु गुन ग्यान निधाना॥**

पशु-पक्षी हे मुनींच्याजवळ बिनधास्त जातात, परंतु शिकाऱ्याला पाहून पळून जातात. पशु-पक्षीसुद्धा मित्र कोण व शत्रू कोण हे ओळखतात, मग मनुष्यशरीर तर गुण व ज्ञानाचे भांडार आहे.॥ २॥

**तात तुम्हहि मैं जानउँ नीकें। करौं काह असमंजस जीकें॥**
**राखेउ रायँ सत्य मोहि त्यागी। तनु परिहरेउ पेम पन लागी॥**

वत्सा! मी तुला चांगला ओळखतो. काय करू? मनाची मोठी द्विधा अवस्था झाली आहे. राजांनी माझा त्याग करून सत्याचे रक्षण केले आणि माझ्या प्रेमापोटी शरीराचा त्याग केला.॥ ३॥

**तासु बचन मेटत मन सोचू। तेहि तें अधिक तुम्हार सँकोचू॥**
**ता पर गुर मोहि आयसु दीन्हा। अवसि जो कहहु चहउँ सोइ कीन्हा॥**

त्यांचे वचन खोटे पडू नये, असे मला वाटते. त्याहीपेक्षा तुझी भीड मला जास्त वाटते. शिवाय गुरुजींनी तुझ्या सांगण्याप्रमाणे वागण्याची आज्ञा केली आहे. म्हणून आता तू जे काही सांगशील, त्याप्रमाणे करण्याची माझी इच्छा आहे.॥ ४॥

दो०—**मनु प्रसन्न करि सकुच तजि कहहु करौं सोइ आजु।**
**सत्यसंध रघुबर बचन सुनि भा सुखी समाजु॥ २६४॥**

तू मन प्रसन्न ठेवून आणि संकोच सोडून जे काही सांगशील, तेच मी आज करीन.' सत्यप्रतिज्ञ रघुकुलश्रेष्ठ श्रीरामांचे वचन ऐकून सर्व समाज सुखावून गेला.॥ २६४॥

**सुर गन सहित सभय सुरराजू। सोचहिं चाहत होन अकाजू॥**
**बनत उपाउ करत कछु नाहीं। राम सरन सब गे मन माहीं॥**

देवगणांसह देवराज इंद्र घाबरून विचार करू लागला की, योजलेले कार्य बिघडू पाहात आहे. काही उपाय करता येत नाही. तेव्हा तो मनातल्या मनात श्रीरामांना शरण गेला.॥ १॥

**बहुरि बिचारि परस्पर कहहीं। रघुपति भगत भगति बस अहहीं॥**
**सुधि करि अंबरीष दुरबासा। भे सुर सुरपति निपट निरासा॥**

मग ते आपसात विचार करून म्हणू लागले की, श्रीरघुनाथ हे भक्ताच्या भक्तीला वश असतात. अंबरीष व दुर्वास यांची आठवण झाल्यावर तर देव व इंद्र फारच निराश झाले.॥ २॥

**सहे सुरन्ह बहु काल बिषादा। नरहरि किए प्रगट प्रहलादा॥**
**लगि लगि कान कहहिं धुनि माथा। अब सुर काज भरत के हाथा॥**

पूर्वी देवांनी फार काळ दुःख भोगले. भक्त प्रह्लादानेच तेव्हा भगवान नृसिंह यांना प्रकट केले. सर्व देव परस्परांच्या कानांत कुजबुजून आणि डोकी हालवून म्हणाले की, 'यावेळी देवांचे कार्य भरताच्या हाती आहे.॥ ३॥

**आन उपाउ न देखिअ देवा। मानत रामु सुसेवक सेवा॥**
**हियँ सपेम सुमिरहु सब भरतहि। निज गुन सील राम बस करतहि॥**

हे देवांनो, आणखी कोणताही उपाय दिसत नाही. श्रीराम हे आपल्या श्रेष्ठ सेवकाची सेवा मान्य करून त्याच्यावर फार प्रसन्न होतात. म्हणून आपले गुण आणि शील यांनी श्रीरामांना वश करून घेणाऱ्या भरताचे सर्वजण आपापल्या मनात प्रेमाने स्मरण करा.'॥ ४॥

दो०—**सुनि सुरमत सुरगुर कहेउ भल तुम्हार बड़ भागु।**
**सकल सुमंगल मूल जग भरत चरन अनुरागु॥ २६५॥**

देवांचे मत ऐकून देवगुरू बृहस्पती म्हणाले, 'चांगला विचार केलात. तुमचे भाग्य मोठे आहे. भरताच्या चरणांचे प्रेम हे जगात सर्व मांगल्याचे मूळ आहे.॥ २६५॥

**सीतापति सेवक सेवकाई। कामधेनु सय सरिस सुहाई॥**
**भरत भगति तुम्हरें मन आई। तजहु सोचु बिधि बात बनाई॥**

सीतानाथ श्रीरामांच्या सेवकाची सेवा ही शेकडो कामधेनूंप्रमाणे सुंदर आहे. तुमच्या मनात भरताची भक्ती आली, आता काळजी सोडा. विधात्याने सर्व जुळवून आणले. ॥ १ ॥

**देखु देवपति भरत प्रभाऊ। सहज सुभायँ बिबस रघुराऊ॥**
**मन थिर करहु देव डरु नाहीं। भरतहि जानि राम परिछाहीं॥**

हे देवराज, भरताचा प्रभाव तर बघा. श्रीरघुनाथ हे मनापासून त्याला पूर्णपणे वश झाले आहेत. हे देवांनो, भरताला श्रीरामांच्या सावलीप्रमाणे अनुकरण करणारा मानून मन शांत ठेवा. घाबरण्याचे काही कारण नाही.'॥ २ ॥

**सुनि सुरगुर सुर संमत सोचू। अंतरजामी प्रभुहि सकोचू॥**
**निज सिर भारु भरत जियँ जाना। करत कोटि बिधि उर अनुमाना॥**

बृहस्पती आणि देवांची संमती, तसेच त्यांची काळजी ऐकून अंतर्यामी श्रीरामांना संकोच वाटू लागला. तर भरताला सर्व भार आपल्याच शिरी आला, असे मनात वाटले. तो मनामध्ये असंख्य प्रकारचे अंदाज बांधू लागला. ॥ ३ ॥

**करि बिचारु मन दीन्ही ठीका। राम रजायस आपन नीका॥**
**निज पन तजि राखेउ पनु मोरा। छोहु सनेहु कीन्ह नहिं थोरा॥**

सर्व प्रकारे विचार केल्यावर शेवटी त्याने मनातल्या मनात हेच ठरविले की, श्रीरामांच्या आज्ञेमध्येच आपले कल्याण आहे. त्यांनी स्वतःची प्रतिज्ञा सोडून माझी प्रतिज्ञा राखली. हे करून त्यांनी काही कमी कृपा आणि प्रेम केलेले नाही. ॥ ४ ॥

दो०—**कीन्ह अनुग्रह अमित अति सब बिधि सीतानाथ।**
**करि प्रनामु बोले भरतु जोरि जलज जुग हाथ॥ २६६॥**

श्रीजानकीनाथांनी सर्व प्रकारे माझ्यावर अपार कृपा केलेली आहे. त्यानंतर भरताने दोन्ही कर-कमल जोडून प्रणाम केला व म्हटले, ॥ २६६ ॥

**कहौं कहावौं का अब स्वामी। कृपा अंबुनिधि अंतरजामी॥**
**गुर प्रसन्न साहिब अनुकूला। मिटी मलिन मन कलपित सूला॥**

'हे स्वामी, हे कृपासागर, हे अंतर्यामी, आता मी अधिक काय सांगू? आणि काय म्हणवून घेऊ? गुरुमहाराज प्रसन्न आणि स्वामी हे मला अनुकूल आहेत, हे पाहून माझ्या मलिन मनातील कल्पित दुःख नष्ट झाले. ॥ १ ॥

**अपडर डरेउँ न सोच समूलें। रबिहि न दोसु देव दिसि भूलें॥**
**मोर अभागु मातु कुटिलाई। बिधि गति बिषम काल कठिनाई॥**

मी उगीचच भ्यालो होतो. माझी चिंता निर्मूळ होती. दिशा विसरल्या तर त्यात हे देवा, सूर्याचा दोष नाही. माझे दुर्भाग्य, मातेची कुटिलता, विधात्याची वाकडी चाल आणि काळाचा कठोरपणा, ॥ २ ॥

**पाउ रोपि सब मिलि मोहि घाला । प्रनतपाल पन आपन पाला ॥**
**यह नइ रीति न राउरि होई । लोकहुँ बेद बिदित नहिं गोई ॥**

या सर्वांनी मिळून पाय रोवून मला नष्ट केले. परंतु शरणागताचे रक्षक असलेल्या तुम्ही आपले शरणागताच्या रक्षणाचे ब्रीद पाळून मला वाचवले. ही काही तुमची नवी रीत नाही. ही लोक व वेद यांत प्रत्यक्ष प्रकट आहे. लपून राहिलेली नाही. ॥ ३ ॥

**जगु अनभल भल एकु गोसाईं । कहिअ होइ भल कासु भलाईं ॥**
**देउ देवतरु सरिस सुभाऊ । सनमुख बिमुख न काहुहि काऊ ॥**

सारे जग वाईट करणारे असो, परंतु हे स्वामी, केवळ तुम्हीच एक भले करणारे आहात. मग सांगा की, कुणाच्या भलाईमुळे भले होईल ? हे देवा, तुमचा स्वभाव कल्पवृक्षासारखा आहे. तो कधी कुणाला अनुकूल नसतो व प्रतिकूलही नसतो. ॥ ४ ॥

दो०—**जाइ निकट पहिचानि तरु छाहँ समनि सब सोच।**
**मागत अभिमत पाव जग राउ रंकु भल पोच॥ २६७॥**

त्या कल्पवृक्षाला ओळखून कोणी त्याच्याजवळ गेला, तर त्याची केवळ सावलीच सर्व चिंता नाहीशी करणारी आहे. राजा-रंक, चांगले-वाईट, असे जगातील लोक त्या वृक्षाजवळ मागूनच मन मानेल ती वस्तू प्राप्त करतात. ॥ २६७ ॥

**लखि सब बिधि गुर स्वामि सनेहू । मिटेउ छोभु नहिं मन संदेहू ॥**
**अब करुनाकर कीजिअ सोई । जन हित प्रभु चित छोभु न होई ॥**

गुरू आणि स्वामी यांचा सर्व प्रकारे स्नेह असलेला पाहून माझा क्षोभ नाहीसा झाला. मनात कोणताही संशय उरला नाही. हे दयानिधान, आता असे करा की, त्यामुळे या दासासाठी प्रभूंच्या मनाला क्षोभ होऊ नये. ॥ १ ॥

**जो सेवकु साहिबहि सँकोची । निज हित चहइ तासु मति पोची ॥**
**सेवक हित साहिब सेवकाई । करै सकल सुख लोभ बिहाई ॥**

जो सेवक स्वामीला भीड घालून आपले भले व्हावे, असे इच्छितो, त्याची बुद्धी नीच होय. सर्व सुखे व लोभ सोडून स्वामीची सेवा करावी, यातच सेवकाचे हित आहे. ॥ २ ॥

**स्वारथु नाथ फिरें सबही का । किएँ रजाइ कोटि बिधि नीका ॥**
**यह स्वारथ परमारथ सारू । सकल सुकृत फल सुगति सिंगारू ॥**

हे नाथ, तुम्ही परत येण्यामध्ये सर्वांचाच स्वार्थ आहे आणि तुमची आज्ञा पाळण्यामध्ये कोट्यवधी प्रकारचे कल्याण आहे. हेच स्वार्थ व परमार्थ यांतील सार आहे, हेच सर्व पुण्यांचे फळ व संपूर्ण शुभ गतींचा शृंगार आहे.'॥ ३ ॥

**देव एक बिनती सुनि मोरी । उचित होइ तस करब बहोरी ॥**
**तिलक समाजु साजि सबु आना । करिअ सुफल प्रभु जौं मनु माना ॥**

हे देव! तुम्ही माझी एक विनंती ऐकून मग जे योग्य असेल ते करा. राजतिलकासाठी सर्व सामग्री तयार करून आणली आहे. प्रभूंच्या मनात असेल, तर कृपा करून तिचा उपयोग करा. ॥ ४ ॥

दो०—**सानुज पठइअ मोहि बन कीजिअ सबहि सनाथ।**
**नतरु फेरिअहिं बंधु दोउ नाथ चलौं मैं साथ॥ २६८ ॥**

लहान भाऊ शत्रुघ्नाबरोबर मला वनात पाठवा आणि तुम्ही अयोध्येला परतून सर्वांना सनाथ करा. नाहीतर हे नाथ, लक्ष्मण व शत्रुघ्न या दोघांना पाठवून द्या आणि मला तुमच्याबरोबर येऊ द्या. ॥ २६८ ॥

**नतरु जाहिं बन तीनिउ भाई । बहुरिअ सीय सहित रघुराई ॥**
**जेहि बिधि प्रभु प्रसन्न मन होई । करुना सागर कीजिअ सोई ॥**

किंवा आम्ही तिन्ही भाऊ वनात जाऊ आणि हे रघुनाथ! सीतादेवीसह आपण अयोध्येला परत जाऊ. हे दयानिधी! ज्या रीतीने आपले मन प्रसन्न होईल, ते आपण करा. ॥ १ ॥

**देवँ दीन्ह सबु मोहि अभारू । मोरें नीति न धरम बिचारू ॥**
**कहउँ बचन सब स्वारथ हेतू । रहत न आरत कें चित चेतू ॥**

हे देवा, सर्व जबाबदारी तुम्ही माझ्यावर टाकली. परंतु माझ्यामध्ये नीतीचा विचार नाही की धर्माचा नाही. मी आपल्या स्वार्थासाठी सर्व गोष्टी सांगत आहे. दु:खी मनुष्याच्या मनात विवेक राहात नाही. ॥ २ ॥

**उतरु देइ सुनि स्वामि रजाई । सो सेवकु लखि लाज लजाई ॥**
**अस मैं अवगुन उदधि अगाधू । स्वामि सनेहँ सराहत साधू ॥**

स्वामींची आज्ञा ऐकल्यावर जो उलट उत्तर देतो, अशा सेवकाला पाहून लाजेलाही लाज वाटते. मी अवगुणांचा अथांग समुद्र आहे, परंतु स्वामी, तुम्ही मला स्नेहामुळे 'साधू' म्हणून माझी वाखाणणी करता. ॥ ३ ॥

**अब कृपाल मोहि सो मत भावा । सकुच स्वामि मन जाइँ न पावा ॥**
**प्रभु पद सपथ कहउँ सति भाऊ । जग मंगल हित एक उपाऊ ॥**

हे कृपाळू, ज्यामुळे स्वामींच्या मनाला भीड न पडेल, तोच विचार मला आवडेल. प्रभूंच्या चरणांची शपथ, मी सत्य भावनेने सांगतो की, जगताच्या कल्याणाचा हाच एक उपाय आहे. ॥ ४ ॥

दो०—**प्रभु प्रसन्न मन सकुच तजि जो जेहि आयसु देब।**
**सो सिर धरि धरि करिहि सबु मिटिहि अनट अवरेब॥ २६९ ॥**

संकोच सोडून प्रसन्न मनाने जी आज्ञा प्रभू देतील, ती सर्व लोक शिरोधार्य मानतील आणि सर्व उपद्रव व चिंता मिटतील.'॥ २६९ ॥

**भरत बचन सुचि सुनि सुर हरषे । साधु सराहि सुमन सुर बरषे ॥**
**असमंजस बस अवध नेवासी । प्रमुदित मन तापस बनबासी ॥**

भरताचे पवित्र बोलणे ऐकून देव आनंदित झाले आणि 'छान, छान' अशी प्रशंसा करीत त्यांनी फुले उधळली. अयोध्यानिवासी बुचकळ्यात पडले की आता श्रीराम काय सांगतात ते पाहू या. तपस्वी आणि वनवासी लोक श्रीराम वनातच राहतील, या आशेने मनातून आनंदले. ॥ १ ॥

**चुपहिं रहे रघुनाथ सँकोची । प्रभु गति देखि सभा सब सोची ॥**
**जनक दूत तेहि अवसर आए । मुनि बसिष्ठँ सुनि बेगि बोलाए ॥**

परंतु भिडेमुळे श्रीराम गप्प राहिले. प्रभूंची ही मौन स्थिती पाहून सर्व सभा काळजीत पडली. त्या वेळी जनक राजांचे दूत आले, हे ऐकून वसिष्ठांनी त्यांना त्वरित बोलावून घेतले. ॥ २ ॥

**करि प्रनाम तिन्ह रामु निहारे । बेषु देखि भए निपट दुखारे ॥**
**दूतन्ह मुनिबर बूझी बाता । कहहु बिदेह भूप कुसलाता ॥**

त्या दूतांनी येऊन, प्रणाम करून श्रीरामचंद्रांना पाहिले. त्यांचा मुनींसारखा वेष पाहून त्यांना फार दुःख झाले. मुनिश्रेष्ठ वसिष्ठांनी दूतांना म्हटले की, 'राजा जनकांच्या खुशालीविषयी सांगा. ॥ ३ ॥

**सुनि सकुचाइ नाइ महि माथा । बोले चरबर जोरें हाथा ॥**
**बूझब राउर सादर साईं । कुसल हेतु सो भयउ गोसाईं ॥**

मुनींचे हे बोलणे ऐकून संकोचाने पृथ्वीवर मस्तक टेकवून ते श्रेष्ठ दूत हात जोडून म्हणाले, 'हे स्वामी, हे गोस्वामी, तुम्ही आदराने विचारले, याचमुळे खुशाली सिद्ध झाली. ॥ ४ ॥

दो०—**नाहिं त कोसलनाथ कें साथ कुसल गइ नाथ।**
**मिथिला अवध बिसेष तें जगु सब भयउ अनाथ॥ २७० ॥**

अन्यथा हे नाथ! क्षेम-कुशल हे सर्व कोसलनाथ दशरथांच्याबरोबर निघून गेले. तसे पाहिले तर सर्व जग हेच अनाथ झाले आहे. परंतु मिथिला आणि अयोध्या या विशेष करून अनाथ झालेल्या आहेत. ॥ २७० ॥

**कोसलपति गति सुनि जनकौरा। भे सब लोक सोकबस बौरा॥**
**जेहिं देखे तेहि समय बिदेहू। नामु सत्य अस लाग न केहू॥**

अयोध्यानाथांचा मृत्यू झाल्याचे ऐकल्यावर जनकपुरीवासी सर्व लोक शोकाकुल झाल्याने बावरून गेले. त्यावेळी विदेहींनाही शोकमग्न झालेले ज्यांनी पाहिले, त्यांच्यापैकी कुणालाही असे वाटले नाही की, त्यांचे विदेह हे नाव खरे आहे. ॥ १ ॥

**रानि कुचालि सुनत नरपालहि। सूझ न कछु जस मनि बिनु ब्यालहि॥**
**भरत राज रघुबर बनबासू। भा मिथिलेसहि हृदयँ हराँसू॥**

राणीचे दुष्टाचरण ऐकून जनक राजांना काही सुचेना, ज्याप्रमाणे मण्याविना सापाला काही सुचत नाही त्याप्रमाणे. नंतर भरताला राज्य व रामचंद्रांना वनवास दिल्याचे ऐकून मिथिलेश्वर जनकांच्या मनाला फार दुःख झाले. ॥ २ ॥

**नृप बूझे बुध सचिव समाजू। कहहु बिचारि उचित का आजू॥**
**समुझि अवध असमंजस दोऊ। चलिअ कि रहिअ न कह कछु कोऊ॥**

राजांनी विद्वानांना आणि मंत्रिमंडळाला विचारले की, आज या प्रसंगी काय करणे योग्य आहे? अयोध्येची दशा समजल्यावर आणि दोन्ही प्रकारे मनात गोंधळ झाल्याचे पाहून 'जायचे की राहायचे?' याविषयी कुणी काही सांगितले नाही. ॥ ३ ॥

**नृपहिं धीर धरि हृदयँ बिचारी। पठए अवध चतुर चर चारी॥**
**बूझि भरत सति भाउ कुभाऊ। आएहु बेगि न होइ लखाऊ॥**

जेव्हा कुणीच स्वतःचे मत सांगितले नाही, तेव्हा धैर्याने विचार करून राजाने चार चतुर गुप्तचरांना अयोध्येस पाठविले. त्यांना सांगितले की, 'तुम्ही श्रीरामांविषयी भरताला सद्‌भाव आहे की दुर्भाव आहे, याची माहिती घेऊन त्वरित परत या. पण सावध राहून कुणालाही तुमचा पत्ता लागू देऊ नका.' ॥ ४ ॥

दो०—**गए अवध चर भरत गति बूझि देखि करतूति।**
**चले चित्रकूटहि भरतु चार चले तेरहूति॥ २७१॥**

गुप्तचर अयोध्येला गेले आणि त्यांनी भरताची वागणूक व करणी पाहिली. भरत चित्रकूटाला जायला निघताच, ते मिथिला नगरीस निघाले. ॥ २७१ ॥

**दूतन्ह आइ भरत कइ करनी। जनक समाज जथामति बरनी॥**
**सुनि गुर परिजन सचिव महीपति। भे सब सोच सनेहँ बिकल अति॥**

गुप्तचरांनी परत येऊन राजा जनकांच्या सभेत भरताच्या करणीचे आपल्या बुद्धीप्रमाणे वर्णन करून सांगितले. ते ऐकून गुरू, कुटुंबीय, मंत्री आणि राजा हे सर्व जण काळजीमुळे व प्रेमामुळे अत्यंत व्याकूळ झाले. ॥ १ ॥

**धरि धीरजु करि भरत बड़ाई। लिए सुभट साहनी बोलाई॥**
**घर पुर देस राखि रखवारे। हय गय रथ बहु जान सँवारे॥**

नंतर जनकांनी धैर्याने भरताची वाखाणणी करून चांगल्या योद्ध्यांना व पागेवरील अधिकाऱ्यांना बोलावले. घर, नगर व देशात रक्षकांना ठेवून घोडे, हत्ती, रथ इत्यादी बरीच वाहने सज्ज केली. ॥ २ ॥

**दुघरी साधि चले ततकाला। किए बिश्रामु न मग महिपाला॥**
**भोरहिं आजु नहाइ प्रयागा। चले जमुन उतरन सबु लागा॥**

दोन घडींचा मुहूर्त साधून ते तत्काळ निघाले. जनकांनी वाटेत कुठेही विश्रांती घेतली नाही. आजच सकाळी प्रयागराजामध्ये स्नान करून ते निघाले आहेत. जेव्हा सर्व लोक यमुना पार करू लागले, ॥ ३ ॥

**खबरि लेन हम पठए नाथा। तिन्ह कहि अस महि नायउ माथा॥**
**साथ किरात छ सातक दीन्हे। मुनिबर तुरत बिदा चर कीन्हे॥**

हे नाथ, तेव्हा आम्हांला बातमी आणण्यासाठी पाठविले आहे.' दूतांनी असे सांगून भूमीवर मस्तक टेकविले. मुनिश्रेष्ठ वसिष्ठांनी सहा-सात भिल्लांना सोबत देऊन दूतांना त्वरित पाठविले. ॥ ४ ॥

दो०—**सुनत जनक आगवनु सबु हरषेउ अवध समाजु।**
**रघुनंदनहि सकोचु बड़ सोच बिबस सुरराजु॥ २७२॥**

जनकांचे आगमन झाल्याचे ऐकून अयोध्येतून आलेल्या लोकांना आनंद झाला. श्रीरामांना मोठा संकोच वाटू लागला आणि देवराज इंद्र तर मोठ्या काळजीत पडला. ॥ २७२ ॥

**गरइ गलानि कुटिल कैकेई। काहि कहै केहि दूषनु देई॥**
**अस मन आनि मुदित नर नारी। भयउ बहोरि रहब दिन चारी॥**

कुटिल कैकेयी मनातून पश्चात्तापामुळे पार थिजून गेली. कुणाला सांगायचे व कुणाला दोष द्यायचा? दुसरीकडे सर्व नर-नारी या कल्पनेने प्रसन्न झाले की, बरे झाले. जनक आल्यामुळे आणखी चार दिवस येथे राहाणे होईल. ॥ १ ॥

**एहि प्रकार गत बासर सोऊ। प्रात नहान लाग सबु कोऊ॥**
**करि मज्जनु पूजहिं नर नारी। गनप गौरि तिपुरारि तमारी॥**

अशा प्रकारे तो दिवस निघून गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी सर्वजण स्नान करू लागले. स्नान करून गणेश, गौरी, महादेव व भगवान सूर्य यांची सर्वांनी पूजा केली. ॥ २ ॥

**रमा रमन पद बंदि बहोरी। बिनवहिं अंजुलि अंचल जोरी॥**
**राजा रामु जानकी रानी। आनँद अवधि अवध रजधानी॥**

नंतर लक्ष्मीपती भगवान विष्णूंच्या चरणांना वंदन करून, हात जोडून, व पदर पसरून विनंती केली की, श्रीराम हे राजा व जानकी राणी होवोत. राजधानी अयोध्या ही आनंदाची परिसीमा होऊन॥ ३ ॥

**सुबस बसउ फिरि सहित समाजा । भरतहि रामु करहुँ जुबराजा॥**
**एहि सुख सुधाँ सींचि सब काहू । देव देहु जग जीवन लाहू॥**

सर्व समाज सुखाने नांदो आणि श्रीराम भरताला युवराजपद देवोत. हे देवा, या सुखरूपी अमृताचे सिंचन करून सर्वांना या जगात जगण्याचा लाभ द्या. ॥ ४ ॥

दो०—**गुर समाज भाइन्ह सहित राम राजु पुर होउ।**
**अछत राम राजा अवध मरिअ माग सबु कोउ॥ २७३॥**

गुरू, समाज आणि भावांसह श्रीरामांचे राज्य अयोध्येत असो आणि श्रीराम राजा असतानाच आम्हांला अयोध्येत मृत्यू येवो.' सर्वजण अशीच याचना करीत होते. ॥ २७३ ॥

**सुनि सनेहमय पुरजन बानी । निंदहिं जोग बिरति मुनि ग्यानी॥**
**एहि बिधि नित्यकरम करि पुरजन । रामहि करहिं प्रनाम पुलकि तन॥**

अयोध्यावासीयांची ती प्रेमळ वाणी ऐकून ज्ञानी मुनीसुद्धा आपल्या योग-साधनेची व वैराग्याची निंदा करू लागले. अयोध्यावासी अशा प्रकारे नित्यकर्म आटोपून पुलकित होऊन श्रीरामांना प्रणाम करू लागले. ॥ १ ॥

**ऊँच नीच मध्यम नर नारी । लहहिं दरसु निज निज अनुहारी॥**
**सावधान सबही सनमानहिं । सकल सराहत कृपानिधानहिं॥**

उच्च, नीच आणि मध्यम या सर्व थरांतील स्त्री-पुरुष आपापल्या भावनेप्रमाणे श्रीरामांचे दर्शन घेऊ लागले. श्रीरामांनी तत्परतेने सर्वांना सन्मान दिला आणि ते सर्व कृपानिधान श्रीरामांची प्रशंसा करू लागले. ॥ २ ॥

**लरिकाइहि तें रघुबर बानी । पालत नीति प्रीति पहिचानी॥**
**सील सकोच सिंधु रघुराऊ । सुमुख सुलोचन सरल सुभाऊ॥**

प्रेम ओळखून नीतीचे पालन करणे हा श्रीरामांचा लहानपणापासूनचा स्वभाव होता. श्रीरघुनाथ हे शील व संकोचाचा समुद्र होते. ते सर्वांना अनुकूल असणारे, सर्वांना कृपेने व प्रेमाने पाहाणारे व सरळ स्वभावाचे होते. ॥ ३ ॥

**कहत राम गुन गन अनुरागे । सब निज भाग सराहन लागे॥**
**हम सम पुन्य पुंज जग थोरे । जिन्हहि रामु जानत करि मोरे॥**

श्रीरामांचे गुण सांगताना सर्व लोक प्रेममग्न झाले, आणि जगात आमच्यासारखे पुण्याची मोठी

कमाई असणारे फारच थोडे आहेत ज्यांना श्रीराम आपले मानतात, असे म्हणून ते आपल्या भाग्याची प्रशंसा करू लागले. ॥ ४॥

**दो०—प्रेम मगन तेहि समय सब सुनि आवत मिथिलेसु।**
**सहित सभा संभ्रम उठेउ रबिकुल कमल दिनेसु॥ २७४॥**

त्यावेळी सर्व लोक प्रेम-मग्न झाले होते. एवढ्यात मिथिलापती जनक येत आहेत, असे ऐकताच सूर्यकुलरूपी कमलासाठी सूर्य असलेले श्रीरामचंद्र सभेसह आदराने त्वरित उठून उभे राहिले. ॥ २७४॥

**भाइ सचिव गुर पुरजन साथा। आगें गवनु कीन्ह रघुनाथा॥**
**गिरिबरु दीख जनकपति जबहीं। करि प्रनामु रथ त्यागेउ तबहीं॥**

श्रीरघुनाथ बंधू, मंत्री, गुरू व पुरवासी यांना घेऊन जनकांच्या स्वागतासाठी निघाले. जनकांनी पर्वतश्रेष्ठ कामदनाथाला पाहिले, तेव्हांच ते प्रणाम करून रथातून उतरले व पायी चालू लागले. ॥ १॥

**राम दरस लालसा उछाहू। पथ श्रम लेसु कलेसु न काहू॥**
**मन तहँ जहँ रघुबर बैदेही। बिनु मन तन दुख सुख सुधि केही॥**

त्यांना श्रीरामांच्या दर्शनाची लालसा व उत्साह असल्यामुळे प्रवासाचा शीण व कष्ट वाटत नव्हते. जेथे श्रीराम व जानकी आहेत, तेथे त्यांचे मन लागले होते. मनाविना शरीराच्या सुख-दुःखाची जाणीव कुणाला असते? ॥ २॥

**आवत जनकु चले एहि भाँती। सहित समाज प्रेम मति माती॥**
**आए निकट देखि अनुरागे। सादर मिलन परसपर लागे॥**

अशा अवस्थेमध्ये जनक राजा येत होते. सर्व मंडळींच्या बरोबर त्यांची बुद्धीही प्रेमात गुंग होऊन गेली होती. ते जवळ आल्याचे पाहून सर्वांच्या प्रेमाला भरते आले आणि ते आदराने परस्परांना भेटू लागले. ॥ ३॥

**लगे जनक मुनिजन पद बंदन। रिषिन्ह प्रनामु कीन्ह रघुनंदन॥**
**भाइन्ह सहित रामु मिलि राजहि। चले लवाइ समेत समाजहि॥**

जनक वसिष्ठादी मुनींच्या चरणांना वंदन करू लागले आणि श्रीरामचंद्रांनी जनकपुरीच्या शतानंदादी ऋषींना प्रणाम केला. नंतर श्रीराम भावांसह जनकांना भेटले आणि सर्वांना आपल्या आश्रमाकडे घेऊन येऊ लागले. ॥ ४॥

**दो०—आश्रम सागर सांत रस पूरन पावन पाथु।**
**सेन मनहुँ करुना सरित लिएँ जाहिं रघुनाथु॥ २७५॥**

श्रीरामांचा आश्रम शांतरसरूपी पवित्र जलाने पूर्ण भरलेला समुद्र होता. जनकांचा समाज जणू करुणरसाची नदी होती. आणि आश्रमरूपी शांतरसाच्या समुद्राला भेटायला श्रीराम तिला घेऊन निघाले होते. ॥ २७५॥

**बोरति ग्यान बिराग करारे। बचन ससोक मिलत नद नारे॥**
**सोच उसास समीर तरंगा। धीरज तट तरुबर कर भंगा॥**

या करुणा-नदीला इतका पूर आला होता की, तिने ज्ञान-वैराग्यरूपी तटांना बुडवून टाकले होते. शोकपूर्ण बोलणे म्हणजे नद्या व ओढे होते, ते या नदीस मिळत होते आणि चिंतापूर्ण दीर्घ श्वास हवेच्या झोतांनी उसळलेल्या लाटा होत्या. त्या धैर्यरूपी किनाऱ्यावरील उत्तम वृक्ष उपटून टाकीत होत्या.॥ १॥

**बिषम बिषाद तोरावति धारा। भय भ्रम भवँर अबर्त अपारा॥**
**केवट बुध बिद्या बड़ि नावा। सकहिं न खेइ ऐक नहिं आवा॥**

भयानक शोक हा या नदीतील प्रचंड प्रवाह होता. भय व भ्रम हे त्यामधील असंख्य भोवरे व चक्रे होती. विद्वान हे नावाडी होते व विद्या ही मोठी नौका होती, परंतु ते ती चालवू शकत नव्हते. कुणाला तिचा अंदाजच येत नव्हता.॥ २॥

**बनचर कोल किरात बिचारे। थके बिलोकि पथिक हियँ हारे॥**
**आश्रम उदधि मिली जब जाई। मनहुँ उठेउ अंबुधि अकुलाई॥**

वनात फिरणारे बिचारे कोल-किरात हे प्रवासी होते. ते ती नदी पाहून मनातून खचले होते. ही करुणा-नदी जेव्हा आश्रम-समुद्रास येऊन मिळाली, तेव्हा जणू तो समुद्र उसळू लागला.॥ ३॥

**सोक बिकल दोउ राज समाजा। रहा न ग्यानु न धीरजु लाजा॥**
**भूप रूप गुन सील सराही। रोवहिं सोक सिंधु अवगाही॥**

दोन्हीही राज-समाज शोकाकुल झाले होते. कुणाला ज्ञान राहिले नाही, धैर्य राहिले नाही की लज्जाही राहिली नाही. राजा दशरथ यांच्या रूप, गुण व शीलाची प्रशंसा करीत सर्वजण रुदन करीत होते आणि शोक-समुद्रात बुड्या मारीत होते.॥ ४॥

छं०—**अवगाहि सोक समुद्र सोचहिं नारि नर ब्याकुल महा।**
**दै दोष सकल सरोष बोलहिं बाम बिधि कीन्हो कहा॥**
**सुर सिद्ध तापस जोगिजन मुनि देखि दसा बिदेह की।**
**तुलसी न समरथु कोउ जो तरि सकै सरित सनेह की॥**

शोक समुद्रात बुड्या मारणारे सर्व स्त्री-पुरुष चिंतेने व्याकूळ झाले होते. ते सर्वजण विधात्याला दोष देत क्रोधाने म्हणत होते की प्रतिकूल दैवाने हे काय केले? तुलसीदास म्हणतात की, देव, सिद्ध, तपस्वी, योगी व मुनिगण यांमध्ये कोणीही असा सामर्थ्यशाली नाही की, जो त्या प्रसंगी राजा विदेहाची दशा पाहून प्रेमाची नदी पार करू शकेल.॥

**सो०—किए अमित उपदेस जहँ तहँ लोगन्ह मुनिबरन्ह।**
**धीरजु धरिअ नरेस कहेउ बसिष्ठ बिदेह सन॥ २७६॥**

जेथे तेथे श्रेष्ठ मुनींनी लोकांना असंख्य उपदेश दिले आणि वसिष्ठांनी विदेह जनकांना म्हटले की, 'तुम्ही धीर धरा.'॥ २७६॥

**जासु ग्यानु रबि भव निसि नासा। बचन किरन मुनि कमल बिकासा॥**
**तेहि कि मोह ममता निअराई। यह सिय राम सनेह बड़ाई॥**

ज्या राजा जनकांचा ज्ञानरूपी सूर्य जन्म-मरणरूपी रात्रीचा नाश करतो आणि ज्यांची वचनरूपी किरणे ही मुनिरूपी कमलांना प्रफुल्लित करतात, त्यांच्याजवळ मोह व ममता हे फिरकू शकतील काय? परंतु हा सीतारामांच्या प्रेमाचा महिमा आहे.॥ १॥

**बिषई साधक सिद्ध सयाने। त्रिबिध जीव जग बेद बखाने॥**
**राम सनेह सरस मन जासू। साधु सभाँ बड़ आदर तासू॥**

जगामध्ये विषयी, साधक व सिद्ध असे तीन प्रकारचे जीव आहेत, असे वेदांमध्ये सांगितले आहे. या तिघांमध्ये ज्याचे चित्त श्रीरामांच्या स्नेहामध्ये बुडालेले असते, त्याचाच साधूंच्या सभेत मोठा आदर होतो.॥ २॥

**सोह न राम पेम बिनु ग्यानू। करनधार बिनु जिमि जलजानू॥**
**मुनि बहुबिधि बिदेहु समुझाए। रामघाट सब लोग नहाए॥**

ज्याप्रमाणे नावाड्याविना जहाज चालत नाही, त्याप्रमाणे श्रीरामांच्या प्रेमाविना ज्ञानाला शोभा नाही. वसिष्ठांनी विदेहराज जनकांना पुष्कळ प्रकारे समजाविले. नंतर सर्व लोकांनी रामघाटावर स्नान केले.॥ ३॥

**सकल सोक संकुल नर नारी। सो बासरु बीतेउ बिनु बारी॥**
**पसु खग मृगन्ह न कीन्ह अहारू। प्रिय परिजन कर कौन बिचारू॥**

स्त्री-पुरुष सर्वजण शोकाकुल होते. त्या दिवशी भोजन ते काय, कुणी पाणीही घेतले नाही. पशु-पक्षी व हरिणांनीसुद्धा आहार घेतला नाही. मग प्रियजन व कुटुंबीयांच्याविषयी काय सांगावे?॥ ४॥

**दो०—दोउ समाज निमिराजु रघुराजु नहाने प्रात।**
**बैठे सब बट बिटप तर मन मलीन कृस गात॥ २७७॥**

निमिराज जनक आणि रघुराज रामचंद्र आणि दोन्हीकडची मंडळी यांनी दुसऱ्या दिवशी सकाळी स्नान केले आणि सर्वजण वटवृक्षाखाली जाऊन बसले. सर्वांची मने उदास व शरीरे अशक्त झाली होती.॥ २७७॥

**जे महिसुर दसरथ पुर बासी। जे मिथिलापति नगर निवासी॥**
**हंस बंस गुर जनक पुरोधा। जिन्ह जग मगु परमारथु सोधा॥**

जे अयोध्येचे राहणारे व जे मिथिलेचे राहणारे ब्राह्मण होते आणि सूर्यवंशाचे गुरू वसिष्ठ व जनकांचे पुरोहित शतानंद की ज्यांनी सांसारिक अभ्युदयाचा मार्ग व परमार्थाचा मार्ग शोधून काढला होता,॥ १॥

**लगे कहन उपदेस अनेका। सहित धरम नय बिरति बिबेका॥**
**कौसिक कहि कहि कथा पुरानीं। समुझाई सब सभा सुबानीं॥**

ते सर्वजण धर्म, नीती, वैराग्य व विवेकयुक्त अनेक विचार सांगू लागले. विश्वामित्रांनी प्राचीन कथा सर्व सभेला सुंदर वाणीमध्ये समजावून दिल्या.॥ २॥

**तब रघुनाथ कौसिकहि कहेऊ। नाथ कालि जल बिनु सबु रहेऊ॥**
**मुनि कह उचित कहत रघुराई। गयउ बीति दिन पहर अढ़ाई॥**

तेव्हा श्रीरघुनाथांनी विश्वामित्रांना म्हटले की, 'हे मुनिवर्य! काल सर्व लोक पाणीसुद्धा न पिता राहिले आहेत, म्हणून आता काही आहार घेतला पाहिजे.' विश्वामित्र म्हणाले, 'श्रीरघुनाथ योग्यच सांगत आहेत. आजही अडीच प्रहर उलटून गेले.'॥ ३॥

**रिषि रुख लखि कह तेरहुतिराजू। इहाँ उचित नहिं असन अनाजू॥**
**कहा भूप भल सबहि सोहाना। पाइ रजायसु चले नहाना॥**

विश्वामित्रांचा रोख पाहून जनक म्हणाले की, 'येथे अन्न खाणे योग्य नाही.' राजांचे सुंदर बोलणे ऐकून सर्वांच्या मनाला बरे वाटले. आज्ञा घेऊन सर्व स्नानास गेले.॥ ४॥

दो०—**तेहि अवसर फल फूल दल मूल अनेक प्रकार।**
**लइ आए बनचर बिपुल भरि भरि काँवरि भार॥ २७८॥**

त्याचवेळी अनेक प्रकारची पुष्कळ फळे, फुले, पाने, मुळे इत्यादी पदार्थांच्या कावड्या व ओझी घेऊन कोल, किरात हे वनवासी लोक आले.॥ २७८॥

**कामद भे गिरि राम प्रसादा। अवलोकत अपहरत बिषादा॥**
**सर सरिता बन भूमि बिभागा। जनु उमगत आनँद अनुरागा॥**

श्रीरामचंद्रांच्या कृपेमुळे सर्व पर्वत मनोवांछित वस्तू देणारे बनले. केवळ दर्शनानेच ते सर्व दुःखांचे हरण करीत. तेथील तलाव, नद्या, वने आणि पृथ्वीचे सर्व भाग यांमध्ये जणू आनंद व प्रेमाचा सागर उसळत होता.॥ १॥

**बेलि बिटप सब सफल सफूला । बोलत खग मृग अलि अनुकूला ॥**
**तेहि अवसर बन अधिक उछाहू । त्रिबिध समीर सुखद सब काहू ॥**

वेली आणि वृक्ष हे सर्वच फुलांनी भरून गेले. पक्षी, पशू आणि भ्रमर हे मनोहर बोल बोलू लागले. त्याप्रसंगी वनामध्ये फार उत्साह भरला होता. सर्वांना सुख देणारे शीतल, मंद व सुगंधित वारे वाहात होते. ॥ २ ॥

**जाइ न बरनि मनोहरताई । जनु महि करति जनक पहुनाई ॥**
**तब सब लोग नहाइ नहाई । राम जनक मुनि आयसु पाई ॥**
**देखि देखि तरुबर अनुरागे । जहँ तहँ पुरजन उतरन लागे ॥**
**दल फल मूल कंद बिधि नाना । पावन सुंदर सुधा समाना ॥**

वनाच्या मनोहरतेचे वर्णन करणेच कठीण होते. जणू पृथ्वी ही जनकांचा पाहुणचार करीत होती. त्यावेळी जनकपुरवासी सर्व लोक आंघोळ करून श्रीराम, जनक व मुनी यांची आज्ञा घेऊन सुंदर वृक्ष पाहात–पाहात प्रेमाने जिकडे तिकडे उतरत होते. पवित्र, सुंदर व अमृतासारखी अनेक प्रकारची पाने, फळे, मुळे व कंद ॥ ३–४ ॥

दो०—**सादर सब कहँ रामगुर पठए भरि भरि भार।**
**पूजि पितर सुर अतिथि गुर लगे करन फरहार॥ २७९ ॥**

यांची ओझी श्रीरामांचे गुरू वसिष्ठांनी सर्वांच्याकडे भरभरून आदराने पाठविली. तेव्हा ते लोक पितर, देवता, अतिथी आणि गुरू यांची पूजा करून फलाहार करू लागले. ॥ २७९ ॥

**एहि बिधि बासर बीते चारी । रामु निरखि नर नारि सुखारी ॥**
**दुहु समाज असि रुचि मन माहीं । बिनु सिय राम फिरब भल नाहीं ॥**

अशा प्रकारे काही दिवस निघून गेले. श्रीरामचंद्रांच्या दर्शनामुळे सर्व स्त्री–पुरुष सुखी होते. श्रीसीतारामांना घेतल्याविना परत जाणे चांगले नाही, अशी दोन्ही समाजांच्या मनात इच्छा होती. ॥ १ ॥

**सीता राम संग बनबासू । कोटि अमरपुर सरिस सुपासू ॥**
**परिहरि लखन रामु बैदेही । जेहि घरु भाव बाम बिधि तेही ॥**

श्रीसीतारामांच्या सोबत वनात राहणे म्हणजे कोट्यवधी देवलोकांमध्ये निवास करण्याजोगे सुखदायक होते. लक्ष्मण, श्रीराम व जानकी यांना सोडून ज्यांना आपले घर बरे वाटते, दैव त्यांच्या विरुद्ध आहे, असे समजावे. ॥ २ ॥

**दाहिन दइउ होइ जब सबही । राम समीप बसिअ बन तबही ॥**
**मंदाकिनि मज्जनु तिहु काला । राम दरसु मुद मंगल माला ॥**

जेव्हा दैव हे सर्वांना अनुकूल असेल, तेव्हाच श्रीरामांच्याजवळ वनात निवास घडू शकतो. मंदाकिनीचे त्रिकाळ स्नान, आनंद व मांगल्याची रास असलेले श्रीरामांचे दर्शन, ॥ ३ ॥

**अटनु राम गिरि बन तापस थल । असनु अमिअ सम कंद मूल फल ॥**
**सुख समेत संबत दुइ साता । पल सम होहिं न जनिअहिं जाता ॥**

श्रीरामांचा कामदनाथ पर्वत, वने व तपस्व्यांच्या स्थानांतून फिरणे आणि अमृतासमान मधुर कंद, मुळे, व फळांचे भोजन. अशा सुखसोहळ्यात चौदा वर्षे पळासारखी निघून जातील. केव्हा गेली कळणारही नाही. ॥ ४ ॥

दो०—**एहि सुख जोग न लोग सब कहहिं कहाँ अस भागु।**
**सहज सुभायँ समाज दुहु राम चरन अनुरागु॥ २८० ॥**

सर्व लोक म्हणत होते की, आम्ही या सुखांच्या योग्यतेचे नाही. आमचे एवढे भाग्य कुठचे? दोन्ही समाजांना श्रीरामांविषयी मनापासून प्रेम होते. ॥ २८० ॥

**एहि बिधि सकल मनोरथ करहीं । बचन सप्रेम सुनत मन हरहीं ॥**
**सीय मातु तेहि समय पठाईं । दासीं देखि सुअवसरु आईं ॥**

सर्वजण अशा प्रकारे मनोरथ करीत होते. त्यांचे प्रेमळ बोलणे ऐकणाऱ्यांची मने आकर्षित करून घेत होते. त्याचवेळी सीतेची माता सुनयना हिने पाठविलेल्या दासी कौसल्या इत्यादी राण्यांना भेटण्याची योग्य वेळ पाहून आल्या. ॥ १ ॥

**सावकास सुनि सब सिय सासू । आयउ जनकराज रनिवासू ॥**
**कौसल्याँ सादर सनमानी । आसन दिए समय सम आनी ॥**

सीतेच्या सर्व सासवा या वेळी मोकळ्या आहेत. हे ऐकून जनक राजांचा राणीवसा त्यांना भेटायला आला. कौसल्येने आदराने त्यांना सन्मान दिला आणि प्रसंगानुरूप आसने आणून दिली. ॥ २ ॥

**सीलु सनेहु सकल दुहु ओरा । द्रवहिं देखि सुनि कुलिस कठोरा ॥**
**पुलक सिथिल तन बारि बिलोचन । महि नख लिखन लगीं सब सोचन ॥**

दोन्ही बाजूच्या सर्वांचे वागणे आणि प्रेम पाहून आणि ऐकून कठोर वज्रसुद्धा वितळून जात होते. त्यांचे देह पुलकित व प्रेमविह्वल झाले होते. नेत्रांतून दुःखाचे व प्रेमाचे अश्रू भरले होते. सर्वजणी आपल्या पायांच्या नखांनी जमीन उकरत विचार करीत होत्या. ॥ ३ ॥

**सब सिय राम प्रीति कि सि मूरति । जनु करुना बहु बेष बिसूरति ॥**
**सीय मातु कह बिधि बुधि बाँकी । जो पय फेनु फोर पबि टाँकी ॥**

त्या सर्व श्रीसीतारामांच्या प्रेमाच्या मूर्ती होत्या. जणू प्रत्यक्ष करुणाच अनेक रूपे धारण करून स्फुंदत होत्या. सीतेची माता सुनयना म्हणाली, ‘विधात्याची बुद्धी मोठी विचित्र आहे. ती दुधाच्या फेसासारख्या कोमल वस्तूला वज्रासारख्या छिन्नीने फोडत आहे. कोमल व निर्दोष लोकांवर संकटे घालत आहे. ॥ ४ ॥

दो०—**सुनिअ सुधा देखिअहिं गरल सब करतूति कराल।**
**जहँ तहँ काक उलूक बक मानस सकृत मराल॥ २८१॥**

अमृत हे फक्त ऐकायला मिळते आणि विष सर्वत्र प्रत्यक्ष पाहायला मिळते. विधात्याची सर्व कृत्ये भयंकर आहेत. जिकडे तिकडे कावळे, घुबडे आणि बगळेच दिसतात. हंस फक्त मानससरोवरातच असतात.'॥ २८१॥

**सुनि ससोच कह देबि सुमित्रा । बिधि गति बड़ि बिपरीत बिचित्रा॥**
**जो सृजि पालइ हरइ बहोरी । बालकेलि सम बिधि मति भोरी॥**

हे ऐकून सुमित्रा दुःखाने म्हणाली की, 'विधात्याची चाल मोठी विपरीत आणि विचित्र आहे. तो सृष्टी उत्पन्न करून तिचे पालन करतो आणि मग ती नष्ट करतो. विधात्याची बुद्धी बालकांच्या खेळासारखी अविचारी आहे.'॥ १॥

**कौसल्या कह दोसु न काहू । करम बिबस दुख सुख छति लाहू॥**
**कठिन करम गति जान बिधाता । जो सुभ असुभ सकल फल दाता॥**

कौसल्या म्हणाली, 'दोष कुणाचाही नाही. दुःख-सुख, हानी-लाभ या गोष्टी कर्माच्या अधीन असतात. कर्माची गती कठीण असते आणि फक्त विधाताच ती जाणतो. तोच शुभ-अशुभ अशा सर्वांची फळे देणारा आहे.॥ २॥

**ईस रजाइ सीस सबही कें । उतपति थिति लय बिषहु अमी कें॥**
**देबि मोह बस सोचिअ बादी । बिधि प्रपंचु अस अचल अनादी॥**

ईश्वराची आज्ञा सर्वांच्याच डोक्यावर आहे. उत्पत्ती, स्थिती आणि लय व अमृत आणि विष हे सर्व त्याच्या अधीन आहेत. हे देवी, मोहाने दुःख करणे हे व्यर्थ आहे. विधात्याचा प्रपंच असाच अटळ व अनादी आहे.॥ ३॥

**भूपति जिअब मरब उर आनी । सोचिअ सखि लखि निज हित हानी॥**
**सीय मातु कह सत्य सुबानी । सुकृती अवधि अवधपति रानी॥**

महाराजांच्या मरण्या-जगण्याची गोष्ट मनात आणून आपण जी चिंता करतो, ती हे सखी, आपण आपल्या हिताची होणारी हानी पाहून स्वार्थामुळे करतो.' सीतेची माता म्हणाली, 'तुमचे म्हणणे योग्य व सत्य आहे. तुम्ही पुण्यात्म्याची परिसीमा असणाऱ्या अयोध्यापती महाराज दशरथांच्याच महाराणी आहात, मग असे का म्हणणार नाही?'॥ ४॥

दो०—**लखनु रामु सिय जाहुँ बन भल परिनाम न पोचु।**
**गहबरि हियँ कह कौसिला मोहि भरत कर सोचु॥ २८२॥**

कौसल्या दुःखी मनाने म्हणाली की, 'श्रीराम, लक्ष्मण, सीता वनात गेल्याने त्याचा परिणाम चांगलाच होईल, वाईट नाही. मला काळजी वाटते भरताची.॥ २८२॥

**ईस प्रसाद असीस तुम्हारी । सुत सुतबधू देवसरि बारी ॥**
**राम सपथ मैं कीन्हि न काऊ । सो करि कहउँ सखी सति भाऊ ॥**

ईश्वराची कृपा व तुमच्या आशीर्वादामुळे माझे चारी पुत्र व चारी सुना गंगाजलाप्रमाणे पवित्र आहेत. हे सखी, मी कधी श्रीरामाची शपथ घेतली नाही. परंतु आज मी रामाची शपथ घेऊन सत्य–भावनेने सांगते की, ॥ १ ॥

**भरत सील गुन बिनय बड़ाई । भायप भगति भरोस भलाई ॥**
**कहत सारदहु कर मति हीचे । सागर सीप कि जाहिं उलीचे ॥**

भरताचे शील, गुण, नम्रता, मोठेपणा, बंधुत्व, भक्ती, विश्वास आणि चांगुलपणा यांचे वर्णन करण्यास सरस्वती सुद्धा धजावत नाही. शिंपल्याने कधी समुद्र उपसता येईल काय? ॥ २ ॥

**जानउँ सदा भरत कुलदीपा । बार बार मोहि कहेउ महीपा ॥**
**कसें कनकु मनि पारिखि पाएँ । पुरुष परिखिअहिं समयँ सुभाएँ ॥**

मी भरताला नेहमी कुलदीपक म्हणून मानते. महाराजांनी मला वेळोवेळी असेच सांगितले होते. सोने हे कस लावल्यावर व रत्न हे पारखी मिळाल्यावरच ओळखता येते. त्याप्रमाणे पुरुषाची परीक्षा वेळ आल्यावर त्याच्या स्वभावावरून होते. ॥ ३ ॥

**अनुचित आजु कहब अस मोरा । सोक सनेहँ सयानप थोरा ॥**
**सुनि सुरसरि सम पावनि बानी । भईं सनेह बिकल सब रानी ॥**

परंतु आज मी असे म्हणणे योग्य नव्हे. शोक आणि स्नेहामध्ये शहाणपणा कमी होतो. लोक म्हणतील की, मी प्रेमामुळे भरताची वाखाणणी करीत आहे?' कौसल्येची गंगेसारखी पवित्र वाणी ऐकून सर्व राण्या प्रेमामुळे व्याकूळ झाल्या. ॥ ४ ॥

दो०—**कौसल्या कह धीर धरि सुनहु देबि मिथिलेसि।**
**को बिबेकनिधि बल्लभहि तुम्हहि सकइ उपदेसि॥ २८३ ॥**

कौसल्या धीर धरून पुन्हा म्हणाली, 'हे देवी मिथिलेश्वरी! ज्ञानाचे भांडार असलेल्या श्रीजनकांची पत्नी असलेल्या तुम्हांला कोण उपदेश करू शकेल. ॥ २८३ ॥

**रानि राय सन अवसरु पाई । अपनी भाँति कहब समुझाई ॥**
**रखिअहिं लखनु भरतु गवनहिं बन । जौं यह मत मानै महीप मन ॥**

हे राणी, सवड सापडताच तुम्ही राजांना आपल्याकडून जेवढे समजावून सांगता येईल तेवढे सांगा की, लक्ष्मणाला घरी ठेवून घ्यावे व भरताने वनात जावे. जर ही गोष्ट राजांना पटली तर, ॥ १ ॥

**तौ भल जतनु करब सुबिचारी । मोरें सोचु भरत कर भारी ॥**
**गूढ़ सनेह भरत मन माहीं । रहें नीक मोहि लागत नाहीं ॥**

चांगल्या प्रकारे विचार करून असा प्रयत्न करा. मला भरताची मोठी काळजी वाटते. भरताच्या मनात गूढ प्रेम आहे. त्याने घरी राहण्यामध्ये मला भले वाटत नाही. त्याच्या जिवाची भीती वाटते.'॥ २॥

**लखि सुभाउ सुनि सरल सुबानी । सब भइ मगन करुन रस रानी ॥**
**नभ प्रसून झरि धन्य धन्य धुनि । सिथिल सनेहँ सिद्ध जोगी मुनि ॥**

कौसल्येचा स्वभाव बघून आणि तिचा सरळपणा व उत्तम वाणी ऐकून सर्व राण्या करुणरसात बुडून गेल्या. आकाशातून पुष्पवृष्टी होऊ लागली आणि 'धन्य धन्य' ध्वनी होऊ लागला. सिद्ध, योगी अणि मुनी प्रेमामुळे गलितगात्र झाले.॥ ३॥

**सबु रनिवासु बिथकि लखि रहेऊ । तब धरि धीर सुमित्राँ कहेऊ ॥**
**देबि दंड जुग जामिनि बीती । राम मातु सुनि उठी सप्रीती ॥**

हे पाहून सारा राणीवसा निस्तब्ध झाला. तेव्हा सुमित्रेने धीर धरून म्हटले की, 'देवी, दोन घटका रात्र सरली आहे.' हे ऐकून श्रीरामांची माता उठली.॥ ४॥

दो०—**बेगि पाउ धारिअ थलहि कह सनेहँ सतिभाय।**
**हमरें तौ अब ईस गति कै मिथिलेस सहाय॥ २८४॥**

आणि सद्भावपूर्वक प्रेमाने म्हणाली, 'आता तुम्ही लवकर मुक्कामाला जा. आम्हांला आता ईश्वरच गती आहे अथवा मिथिलेश्वर जनक साहाय्य करणारे आहेत.'॥ २८४॥

**लखि सनेह सुनि बचन बिनीता । जनकप्रिया गह पाय पुनीता ॥**
**देबि उचित असि बिनय तुम्हारी । दसरथ घरिनि राम महतारी ॥**

कौसल्येचे प्रेम पाहून आणि तिचे विनम्र शब्द ऐकून जनकांच्या प्रिय पत्नीने तिचे पाय धरले आणि म्हटले, 'हे देवी, तुम्ही राजा दशरथांची राणी आणि श्रीरामांच्या माता आहात. तुमची ही नम्रता तुम्हांलाच शोभून दिसते.॥ १॥

**प्रभु अपने नीचहु आदरहीं । अगिनि धूम गिरि सिर तिनु धरहीं ॥**
**सेवकु राउ करम मन बानी । सदा सहाय महेसु भवानी ॥**

प्रभू श्रीराम आपल्या सामान्य माणसांचाही आदर ठेवतात. अग्नी हा धुराला व पर्वत हा गवताला आपल्या मस्तकी धारण करतो. आमचे राजे तर कर्म, मन, वचन यांनी तुमचे सेवक आहेत आणि श्रीमहादेव-पार्वती हे नित्य सहाय्यक आहेत.॥ २॥

**रउरे अंग जोगु जग को है । दीप सहाय कि दिनकर सोहै ॥**
**रामु जाइ बनु करि सुर काजू । अचल अवधपुर करिहहिं राजू ॥**

तुमचा सहायक होण्याजोगा जगात कोण आहे? दिवा सूर्याला मदत करण्यास गेला, तर शोभेल

काय? श्रीरामचंद्र वनात जाऊन देवांचे कार्य पार पाडतील व अयोध्येस येऊन दीर्घकाळ राज्य करतील. ॥ ३ ॥

**अमर नाग नर राम बाहुबल। सुख बसिहहिं अपनें अपनें थल॥**
**यह सब जागबलिक कहि राखा। देबि न होइ मुधा मुनि भाषा॥**

देव, नाग व मनुष्य हे सर्व श्रीरामांच्या बाहुबलावर आपापल्या लोकी सुखाने नांदतील. हे सर्व याज्ञवल्क्य मुनींनी पूर्वीच सांगून ठेवले आहे. हे देवी! मुनींचे वचन खोटे होत नाही.' ॥ ४ ॥

दो०—**अस कहि पग परि पेम अति सिय हित बिनय सुनाइ।**
**सिय समेत सियमातु तब चली सुआयसु पाइ॥ २८५॥**

असे म्हणून व प्रेमाने पाया पडून सीतेच्या मातेने सीतेला आपल्याबरोबर घेऊन जाण्याची विनंती केली व मनापासून आज्ञा मिळाल्यावर ती सीतेला घेऊन आपल्या मुक्कामी निघाली. ॥ २८५ ॥

**प्रिय परिजनहि मिली बैदेही। जो जेहि जोगु भाँति तेहि तेही॥**
**तापस बेष जानकी देखी। भा सबु बिकल बिषाद बिसेषी॥**

जानकी आपल्या प्रिय कुटुंबियांना योग्य प्रकारे भेटली. जानकीला तपस्विनीच्या वेषात पाहून सर्वजण शोकाकुल झाले. ॥ १ ॥

**जनक राम गुर आयसु पाई। चले थलहि सिय देखी आई॥**
**लीन्हि लाइ उर जनक जानकी। पाहुनि पावन पेम प्रान की॥**

राजा जनक श्रीरामांचे गुरू वसिष्ठ यांची आज्ञा घेऊन आपल्या निवासात गेले. त्यांनी सीतेला पाहिले. जनकांनी आपल्या पवित्र प्रेमाची आणि प्राणांची पाहुणी असलेल्या जानकीला हृदयाशी कवटाळले. ॥ २ ॥

**उर उमगेउ अंबुधि अनुरागू। भयउ भूप मनु मनहुँ पयागू॥**
**सिय सनेह बटु बाढ़त जोहा। ता पर राम पेम सिसु सोहा॥**

त्यांच्या मनात प्रेमाचा सागर उसळत होता. राजांचे मन हे जणू प्रयाग होते आणि त्यांनी प्रेमसागरात आदिशक्ती सीतेचा अलौकिक प्रेमरूपी अक्षयवट पल्लवित होताना पाहिला. त्या सीतेच्या प्रेमरूपी वटवृक्षावर श्रीरामांचे प्रेमरूप बालक शोभून दिसत होते. (प्रलयसागरात वटपत्रावर बाल भगवान शोभावे तसे.) ॥ ३ ॥

**चिरजीवी मुनि ग्यान बिकल जनु। बूड़त लहेउ बाल अवलंबनु॥**
**मोह मगन मति नहिं बिदेह की। महिमा सिय रघुबर सनेह की॥**

जनकांचे ज्ञानरूपी चिरंजीव मार्कंडेय मुनी व्याकूळ होऊन बुडता बुडता जणू श्रीरामरूपी बालकाचा आधार मिळाल्याने वाचले. वस्तुत: ज्ञान्यांचे शिरोमणी विदेहराजाची बुद्धी मोहात

पडली नव्हती. श्रीसीतारामांच्या प्रेमाचा हा महिमा होता. त्यामुळे त्यांच्यासारख्या ज्ञान्यांचे ज्ञानसुद्धा विरून गेले. ॥ ४ ॥

**दो०—सिय पितु मातु सनेह बस बिकल न सकी सँभारि।**
**धरनिसुताँ धीरजु धरेउ समउ सुधरमु बिचारि॥ २८६ ॥**

माता-पित्याच्या प्रेमामुळे सीता व्याकूळ झाली. ती स्वतःला सावरू शकली नाही. परंतु धैर्यवती पृथ्वीची कन्या सीता हिने वेळ व धर्म यांचा विचार करून धैर्य धारण केले. ॥ २८६ ॥

**तापस बेष जनक सिय देखी। भयउ पेमु परितोषु बिसेषी॥**
**पुत्रि पबित्र किए कुल दोऊ। सुजस धवल जगु कह सबु कोऊ॥**

सीतेला तपस्विनीच्या वेषात पाहून जनकांना फार प्रेम व समाधान वाटले. ते म्हणाले, ‘मुली, तू दोन्ही कुळांना पवित्र केलेस. तुझ्या निर्मळ कीर्तीने संपूर्ण जग उजळले आहे, असेच सर्वजण म्हणत आहेत. ॥ १ ॥

**जिति सुरसरि कीरति सरि तोरी। गवनु कीन्ह बिधि अंड करोरी॥**
**गंग अवनि थल तीनि बड़ेरे। एहिं किए साधु समाज घनेरे॥**

तुझी कीर्तिरूपी नदी गंगेलाही जिंकून एका नव्हे तर कोट्यवधी ब्रह्मांडांमधून वाहात चालली आहे. गंगेने पृथ्वीवर हरिद्वार, प्रयागराज आणि गंगासागर यांना महान तीर्थे बनविले, परंतु तुझ्या या कीर्ति-नदीने अनेक संतसमाजरूपी तीर्थस्थाने निर्माण केली.’ ॥ २ ॥

**पितु कह सत्य सनेहँ सुबानी। सीय सकुच महुँ मनहुँ समानी॥**
**पुनि पितु मातु लीन्हि उर लाई। सिख आसिष हित दीन्हि सुहाई॥**

जनकांनी प्रेमाने खरीखुरी वाणी उच्चारली, परंतु आपले मोठेपण ऐकून सीता जणू संकोचात बुडून गेली. माता-पित्यांनी तिला उराशी धरले आणि हितकारक उपदेश व आशीर्वाद दिले. ॥ ३ ॥

**कहति न सीय सकुचि मन माहीं। इहाँ बसब रजनीं भल नाहीं॥**
**लखि रुख रानि जनायउ राऊ। हृदयँ सराहत सीलु सुभाऊ॥**

सीता काही बोलू शकली नाही, परंतु मनात संकोच वाटत होता की, रात्री सासूंची सेवा सोडून येथे राहणे योग्य नाही. राणी सुनयना हिने सीतेचा रोख पाहून राजा जनकांना सांगितले. तेव्हा दोघेजण आपल्या मनात सीतेच्या शील व स्वभावाची प्रशंसा करू लागली. ॥ ४ ॥

**दो०—बार बार मिलि भेंटि सिय बिदा कीन्हि सनमानि।**
**कही समय सिर भरत गति रानि सुबानि सयानि॥ २८७॥**

राजा-राणीने वारंवार तिला भेटून व हृदयाशी धरून सन्मानाने तिला निरोप दिला. चतुर राणीने सवडीने राजांना सुंदर वाणीने भरताच्या दशेचे वर्णन करून सांगितले. ॥ २८७ ॥

**सुनि भूपाल भरत ब्यवहारू । सोन सुगंध सुधा ससि सारू ॥**
**मूदे सजल नयन पुलके तन। सुजसु सराहन लगे मुदित मन ॥**

सोन्याला सुगंध असावा, तसेच तशी चंद्रम्याचे सार असलेल्या अमृतासमान भरताची वागणूक ऐकून राजा जनकांनी प्रेम-विव्हळ होऊन प्रेमाश्रूंनी भरलेले नेत्र मिटून घेतले. जणू ते भरताच्या प्रेमामध्ये ध्यानस्थ झाले. त्यांचे शरीर पुलकित झाले आणि आनंदित होऊन ते भरताच्या सुंदर कीर्तीची प्रशंसा करू लागले. ॥ १ ॥

**सावधान सुनु सुमुखि सुलोचनि । भरत कथा भव बंध बिमोचनि ॥**
**धरम राजनय ब्रह्मबिचारू । इहाँ जथामति मोर प्रचारू ॥**

ते म्हणाले, 'हे सुमुखी, हे सुनयने, लक्षात ठेव. भरताची कथा संसार-बंधनातून मुक्त करणारी आहे. धर्म, राजनीती आणि ब्रह्मविचार या तिन्ही विषयांमध्ये माझ्या बुद्धीप्रमाणे मला कमी-जास्त गती आहे. ॥ २ ॥

**सो मति मोरि भरत महिमाही । कहै काह छलि छुअति न छाँही ॥**
**बिधि गनपति अहिपति सिव सारद । कबि कोबिद बुध बुद्धि बिसारद ॥**

ती माझी बुद्धी भरताच्या महिम्याचे वर्णन काय करणार? चुकूनही माझी बुद्धी त्याच्या सावलीलासुद्धा स्पर्श करू शकत नाही. ब्रह्मदेव, गणेश, शेष, महादेव, सरस्वती, कवी, ज्ञानी, पंडित आणि बुद्धिमान ॥ ३ ॥

**भरत चरित कीरति करतूती । धरम सील गुन बिमल बिभूती ॥**
**समुझत सुनत सुखद सब काहू । सुचि सुरसरि रुचि निदर सुधाहू ॥**

या सर्वांना भरताचे चरित्र, कीर्ती, कृती, धर्म, शील, गुण, निर्मल ऐश्वर्य हे गुण समजून घेण्याने आणि ऐकण्याने सुख देणारे आहेत आणि पावित्र्यामध्ये गंगेला आणि माधुर्यामध्ये अमृतालाही मागे टाकणारे आहेत. ॥ ४ ॥

दो०—**निरवधि गुन निरुपम पुरुषु भरतु भरत सम जानि।**
**कहिअ सुमेरु कि सेर सम कबिकुल मति सकुचानि ॥ २८८ ॥**

भरत अनंत गुणसंपन्न आणि उपमारहित पुरुष आहे. भरतासारखा भरतच आहे, असे समज. सुमेरू पर्वताला तराजूत तोलता येईल काय? म्हणून त्याला कुणा पुरुषाची उपमा देताना कवींची बुद्धीही संकोच पावते. ॥ २८८ ॥

**अगम सबहि बरनत बरबरनी । जिमि जलहीन मीन गमु धरनी ॥**
**भरत अमित महिमा सुनु रानी । जानहिं रामु न सकहिं बखानी ॥**

हे सुंदरी, भरताचा महिमा वर्णन करणे हे जलरहित पृथ्वीवर माशाने चालण्यासारखे सर्वांना अगम्य आहे. हे राणी, भरताचा अपार महिमा फक्त श्रीरामचंद्रच जाणतात, परंतु ते सुद्धा त्याचे वर्णन करू शकत नाहीत.'॥ १ ॥

**बरनि सप्रेम भरत अनुभाऊ । तिय जिय की रुचि लखि कह राऊ ॥**
**बहुरहिं लखनु भरतु बन जाहीं । सब कर भल सब के मन माहीं ॥**

अशा प्रकारे भरताच्या प्रभावाचे वर्णन प्रेमाने करून, मग पत्नीच्या मनातील इच्छा पाहून राजे म्हणाले, 'लक्ष्मणाने परत जावे व भरताने वनात जावे, यामध्ये सर्वांचे भले आहे आणि हेच सर्वांच्या मनात आहे.॥ २ ॥

**देबि परंतु भरत रघुबर की । प्रीति प्रतीति जाइ नहिं तरकी ॥**
**भरतु अवधि सनेह ममता की । जद्यपि रामु सीम समता की ॥**

परंतु हे देवी, भरत व श्रीराम यांचे प्रेम, परस्पर विश्वास, हे बुद्धी व विचारांच्या पलीकडेच आहेत. जरी श्रीराम हे समतेची परिसीमा आहेत, तरी भरत हा प्रेम व ममता यांची परिसीमा आहे. ३ ॥

**परमारथ स्वारथ सुख सारे । भरत न सपनेहुँ मनहुँ निहारे ॥**
**साधन सिद्धि राम पग नेहू । मोहि लखि परत भरत मत एहू ॥**

श्रीरामांविषयी एक अनन्य प्रेम सोडल्यास भरताने सर्व परमार्थ, स्वार्थ आणि सुख यांचेकडे स्वप्नातही चुकूनही पाहिले नाही. श्रीरामांच्या चरणीचे प्रेम हेच त्याचे साधन आहे आणि हीच त्याची सिद्धी आहे. मला भरताचा फक्त हाच एक सिद्धांत वाटतो.'॥ ४ ॥

दो०—**भोरेहुँ भरत न पेलिहहिं मनसहुँ राम रजाइ ।**
**करिअ न सोचु सनेह बस कहेउ भूप बिलखाइ ॥ २८९ ॥**

राजांनी प्रेमाने सद्‍गदित होऊन म्हटले की, 'भरत हा चुकूनही श्रीरामचंद्राची आज्ञा टाळण्याचे मनातही आणणार नाही. म्हणून प्रेमवश होऊन चिंता करू नये.॥ २८९ ॥

**राम भरत गुन गनत सप्रीती । निसि दंपतिहि पलक सम बीती ॥**
**राज समाज प्रात जुग जागे । न्हाइ न्हाइ सुर पूजन लागे ॥**

श्रीराम आणि भरत यांच्या गुणांची प्रेमाने चर्चा करता करता पति-पत्नींची रात्र क्षणाप्रमाणे सरून गेली. प्रात:काली दोन्ही राजसमाज जागे झाले आणि स्नान करून देव-पूजा करू लागले.॥ १ ॥

**गे नहाइ गुर पहिं रघुराई । बंदि चरन बोले रुख पाई ॥**
**नाथ भरतु पुरजन महतारी । सोक बिकल बनबास दुखारी ॥**

श्रीरघुनाथ स्नान करून गुरू वसिष्ठांच्याजवळ गेले. आणि त्यांच्या चरणांना वंदन करून व त्यांचा कल पाहून म्हणाले, ‘हे गुरुवर्य! भरत, अयोध्यावासी व माता हे सर्वजण शोकाने व्याकूळ आणि वनवासामुळे दु:खी आहेत. ॥ २ ॥

**सहित समाज राउ मिथिलेसू । बहुत दिवस भए सहत कलेसू ॥**
**उचित होइ सोइ कीजिअ नाथा । हित सबही कर रौरें हाथा ॥**

मिथिलापती राजा जनक हे सुद्धा आपल्या परिवारासह बरेच दिवस कष्ट सहन करीत आहेत. म्हणून हे नाथ, योग्य असेल, त्याप्रमाणे करा. तुमच्या हाती सर्वांचे हित आहे. ॥ ३ ॥

**अस कहि अति सकुचे रघुराऊ । मुनि पुलके लखि सीलु सुभाऊ ॥**
**तुम्ह बिनु राम सकल सुख साजा । नरक सरिस दुहु राज समाजा ॥**

असे म्हणून श्रीराम अत्यंत संकोचले. त्यांचे शील व स्वभाव पाहून मुनी वसिष्ठ प्रेम व आनंदाने पुलकित झाले. ते म्हणाले, ‘हे रामा! तुमच्याविना घर-दार इत्यादी सर्व सुखे दोन्हीकडच्या समाजाला नरकासारखी आहेत. ॥ ४ ॥

दो०—**प्रान प्रान के जीव के जिव सुख के सुख राम।**
**तुम्ह तजि तात सोहात गृह जिन्हहि तिन्हहि बिधि बाम ॥ २९० ॥**

हे रामा, तुम्ही प्राणांचेही प्राण, आत्म्याचेही आत्मा आणि सुखाचे सुख आहात. हे प्रभो! तुम्हांला सोडून ज्यांना घर आवडते, त्यांना विधाता प्रतिकूल असतो. ॥ २९० ॥

**सो सुखु करमु धरमु जरि जाऊ । जहँ न राम पद पंकज भाऊ ॥**
**जोगु कुजोगु ग्यानु अग्यानू । जहँ नहिं राम पेम परधानू ॥**

जेथे श्रीरामांच्या चरण-कमलांविषयी प्रेम नाही, ते सुख, कर्म आणि धर्म जळून जावोत. ज्यामध्ये श्रीरामांच्या प्रेमाला प्राधान्य नाही, तो योग कुयोग होय आणि ते ज्ञान अज्ञान होय. ॥ १ ॥

**तुम्ह बिनु दुखी सुखी तुम्ह तेहीं । तुम्ह जानहु जिय जो जेहि केहीं ॥**
**राउर आयसु सिर सबही कें । बिदित कृपालहि गति सब नीकें ॥**

तुमच्याविना सर्व दु:खी आहेत आणि जे सुखी आहेत ते तुमच्यामुळेच सुखी आहेत. कुणाच्या मनात काय आहे ते सर्व तुम्ही जाणता. तुमची आज्ञा सर्वांना शिरोधार्थ आहे. हे कृपाळू ! तुम्हांला सर्वांची स्थिती चांगली ठाऊक आहे. ॥ २ ॥

**आपु आश्रमहि धारिअ पाऊ । भयउ सनेह सिथिल मुनिराऊ ॥**
**करि प्रनामु तब रामु सिधाए । रिषि धरि धीर जनक पहिं आए ॥**

म्हणून तुम्ही आश्रमाला जा.’ इतके म्हणून मुनिराज प्रेमाने भरून गेले. मग श्रीराम प्रणाम करून निघाले आणि ऋषी वसिष्ठ मोठ्या धैर्याने जनकांच्याकडे गेले. ॥ ३ ॥

**राम बचन गुरु नृपहि सुनाए। सील सनेह सुभायँ सुहाए॥**
**महाराज अब कीजिअ सोई। सब कर धरम सहित हित होई॥**

गुरुजींनी श्रीरामचंद्रांच्या शील व स्नेहाबद्दल अत्यंत स्वाभाविकपणे जनकराजांना सांगितले आणि ते म्हणाले, 'महाराज, ज्यामध्ये सर्वांचे धर्मासह हित होईल असे करा.॥ ४॥

**दो०—ग्यान निधान सुजान सुचि धरम धीर नरपाल।**
**तुम्ह बिनु असमंजस समन को समरथ एहि काल॥ २९१॥**

हे राजन, तुम्ही ज्ञानाचे भांडार, ज्ञानी, पवित्र व धर्मामध्ये धीर आहात. या वेळी तुमच्याविना ही द्विधा स्थिती दूर करण्यास दुसरा कोण समर्थ आहे?'॥ २९१॥

**सुनि मुनि बचन जनक अनुरागे। लखि गति ग्यानु बिरागु बिरागे॥**
**सिथिल सनेहँ गुनत मन माहीं। आए इहाँ कीन्ह भल नाहीं॥**

मुनि वसिष्ठांचे बोलणे ऐकून जनक प्रेममग्न झाले. त्यांची ती दशा पाहून ज्ञान व वैराग्य यांनाही वैराग्य आले. ते प्रेमांत बुडून गेले. मनात विचार करू लागले की, 'आम्ही येथे आलो, हे काही चांगले केले नाही.॥ १॥

**रामहि रायँ कहेउ बन जाना। कीन्ह आपु प्रिय प्रेम प्रवाना॥**
**हम अब बन तें बनहि पठाई। प्रमुदित फिरब बिबेक बड़ाई॥**

राजा दशरथांनी श्रीरामांना वनात जाण्यास सांगितले आणि स्वतः प्रिय रामांच्या वियोगामध्ये प्राण सोडून आपले प्रेम सिद्ध केले. परंतु आता आम्ही यांना या वनातून आणखी दाट अशा वनात पाठवून आपल्या विवेकाचा मोठेपणा मिरवीत आनंदाने परत जायचे काय?'॥ २॥

**तापस मुनि महिसुर सुनि देखी। भए प्रेम बस बिकल बिसेषी॥**
**समउ समुझि धरि धीरजु राजा। चले भरत पहिं सहित समाजा॥**

तपस्वी, मुनी, ब्राह्मण हे सर्व ऐकून आणि पाहून प्रेमामुळे व्याकूळ झालेले आहेत. शेवटी प्रसंग पाहून राजा जनक मोठ्या धीराने आपल्या समाजासह भरताकडे गेले.॥ ३॥

**भरत आइ आगें भइ लीन्हे। अवसर सरिस सुआसन दीन्हे॥**
**तात भरत कह तेरहुति राऊ। तुम्हहि बिदित रघुबीर सुभाऊ॥**

भरताने सामोरे जाऊन त्यांचे स्वागत केले. आणि प्रसंगानुरूप चांगले आसन दिले. राजा जनक म्हणू लागले, 'हे बाळ भरत, तुला श्रीरामांचा स्वभाव ठाऊक आहे.॥ ४॥

**दो०—राम सत्यब्रत धरम रत सब कर सीलु सनेहु।**
**संकट सहत सकोच बस कहिअ जो आयसु देहु॥ २९२॥**

श्रीराम सत्यव्रती आणि धर्मपरायण आहेत. सर्वांचे मन व प्रेम राखणारे आहेत. म्हणून ते संकोचामुळे संकट सहन करीत आहेत. आता तू जी आज्ञा देशील, ती त्यांना सांगू.'॥ २९२॥

**सुनि तन पुलकि नयन भरि बारी। बोले भरतु धीर धरि भारी॥**
**प्रभु प्रिय पूज्य पिता सम आपू। कुलगुरु सम हित माय न बापू॥**

हे ऐकून भरत पुलकित होऊन आणि डोळ्यांत पाणी आणून मोठ्या धीराने म्हणाला, 'हे तात! तुम्ही आम्हांला पित्याप्रमाणे प्रिय व पूज्य आहात आणि कुलगुरू वसिष्ठ हे माता-पित्यांहून अधिक आमचे हित पाहाणारे आहेत.॥ १॥

**कौसिकादि मुनि सचिव समाजू। ग्यान अंबुनिधि आपुनु आजू॥**
**सिसु सेवकु आयसु अनुगामी। जानि मोहि सिख देइअ स्वामी॥**

विश्वामित्र इत्यादी मुनींचा समाज आहे, मंत्र्यांचा समाज आहे आणि आज ज्ञानाचे समुद्र असलेले तुम्हीसुद्धा उपस्थित आहात. हे स्वामी, मला आपला बालक, सेवक आणि आज्ञाधारक समजून योग्य सल्ला द्या.॥ २॥

**एहिं समाज थल बूझब राउर। मौन मलिन मैं बोलब बाउर॥**
**छोटे बदन कहउँ बड़ि बाता। छमब तात लखि बाम बिधाता॥**

या समाजात व पुण्य स्थानात आपणासारख्या ज्ञानी व पूज्य पुरुषाने विचारले आणि त्यावर मी गप्प बसलो, तर मला अविचारी समजले जाईल आणि मी बोलणे हे वेडेपणाचे ठरेल. तरीही मी लहान तोंडी मोठी गोष्ट सांगतो. हे तात, दैव प्रतिकूल आहे असे समजून मला क्षमा करा.॥ ३॥

**आगम निगम प्रसिद्ध पुराना। सेवाधरमु कठिन जगु जाना॥**
**स्वामि धरम स्वारथहि बिरोधू। बैरु अंध प्रेमहि न प्रबोधू॥**

वेद, शास्त्र व पुराणे यांमध्ये हे प्रसिद्ध आहे आणि जगालाही माहीत आहे की, सेवाधर्म हा मोठा कठीण आहे. स्वामिधर्म व स्वार्थ यांमध्ये विरोध आहे. दोन्ही एकाच वेळी निभावता येत नाहीत. वैर आंधळे असते आणि प्रेमाला ज्ञान नसते. मी स्वार्थाने बोललो किंवा प्रेमाने बोललो, तर दोन्ही गोष्टींमध्ये चूक होण्याची भीती आहे.॥ ४॥

दो०—**राखि राम रुख धरमु ब्रतु पराधीन मोहि जानि।**
**सब कें संमत सर्ब हित करिअ पेमु पहिचानि॥ २९३॥**

म्हणून मला पराधीन समजून श्रीरामांचा रोख, धर्म व सत्यव्रत राखून, जे सर्वांना संमत असेल व सर्वांसाठी हितकारक असेल, ते सर्वांचे प्रेम ओळखून आपणच त्याप्रमाणे करा.'॥ २९३॥

**भरत बचन सुनि देखि सुभाऊ। सहित समाज सराहत राऊ॥**
**सुगम अगम मृदु मंजु कठोरे। अरथु अमित अति आखर थोरे॥**

भरताचे बोलणे ऐकून आणि त्याचा स्वभाव पाहून सर्व समाजासह राजा जनक त्याची वाखाणणी करू लागले. भरताचे बोलणे सुगम पण अगम्य, सुंदर, कोमल पण कठोर होते. त्यात अक्षरे थोडी पण अर्थ अत्यंत अपार भरला होता. ॥ १ ॥

**ज्यों मुखु मुकुर मुकुरु निज पानी। गहि न जाइ अस अदभुत बानी॥**
**भूप भरतु मुनि सहित समाजू। गे जहँ बिबुध कुमुद द्विजराजू॥**

ज्याप्रमाणे आरशात मुख दिसते आणि आरसा हातात असूनही ते मुखाचे प्रतिबिंब पकडता येत नाही, त्याप्रमाणे भरताची अद्‍भुत वाणी हीसुद्धा पकडता येत नव्हती. आशय समजत नव्हता. कुणाला काही बोलता येईना, तेव्हा राजा जनक, भरत व मुनी वसिष्ठ सर्व समाजाबरोबर देवता-रूपी कुमुदांना प्रफुल्लित करणारे चंद्रमा श्रीराम यांच्याकडे गेले. ॥ २ ॥

**सुनि सुधि सोच बिकल सब लोगा। मनहुँ मीनगन नव जल जोगा॥**
**देवँ प्रथम कुलगुर गति देखी। निरखि बिदेह सनेह बिसेषी॥**

ही वार्ता ऐकून सर्व लोक काळजीने व्याकूळ झाले, ज्याप्रमाणे पहिल्या पावसाच्या पाण्यामुळे मासे व्याकूळ होतात. देवांनी प्रथम कुलगुरू वसिष्ठांची प्रेमविव्हळ दशा पाहिली, नंतर विदेहांचे उत्कट प्रेम पाहिले. ॥ ३ ॥

**राम भगतिमय भरतु निहारे। सुर स्वारथी हहरि हियँ हारे॥**
**सब कोउ राम पेममय पेखा। भए अलेख सोच बस लेखा॥**

आणि मग श्रीरामभक्तीने ओतप्रोत भरलेल्या भरताला पाहिले. या सर्वांना पाहून स्वार्थी देव घाबरले आणि मनातून निराश झाले. त्यांना सर्वजण श्रीराम-प्रेमामध्ये ओथंबलेले दिसून आले. त्यामुळे देव इतक्या काळजीत पडले की, सांगता सोय नाही. ॥ ४ ॥

**दो०—रामु सनेह सकोच बस कह ससोच सुरराजु।**
**रचहु प्रपंचहि पंच मिलि नाहिं त भयउ अकाजु॥ २९४॥**

इंद्र चिंतेने म्हणू लागला की, ‘श्रीरामचंद्र हे स्नेह व संकोचाच्या अधीन आहेत. म्हणून सर्वजण मिळून काही तरी माया करा, नाही तर काम बिघडेल, असे समजा.’॥ २९४॥

**सुरन्ह सुमिरि सारदा सराही। देबि देव सरनागत पाही॥**
**फेरि भरत मति करि निज माया। पालु बिबुध कुल करि छल छाया॥**

देवांनी सरस्वतीचे स्मरण करून तिची स्तुती केली आणि म्हटले की, ‘हे देवी, आम्ही देव तुझे शरणागत आहोत. आमचे रक्षण कर. आपली माया करून भरताची बुद्धी फिरव. कपट रचून देवांच्या कुलाचे रक्षण कर.’॥ १ ॥

**बिबुध बिनय सुनि देबि सयानी। बोली सुर स्वारथ जड़ जानी॥**
**मो सन कहहु भरत मति फेरू। लोचन सहस न सूझ सुमेरू॥**

देवांची विनंती ऐकून व ते स्वार्थामुळे मूर्ख झाल्याचे पाहून बुद्धिमती सरस्वती म्हणाली, 'भरताची बुद्धी पालटा असे तुम्ही मला सांगता? हजार नेत्रांनीही तुम्हांला सुमेरूसारखा पर्वत दिसत नाही?॥ २॥

**बिधि हरि हर माया बड़ि भारी। सोउ न भरत मति सकइ निहारी॥**
**सो मति मोहि कहत करु भोरी। चंदिनि कर कि चंडकर चोरी॥**

ब्रह्मदेव, विष्णू आणि महेश यांची माया मोठी प्रबळ आहे, परंतु तेसुद्धा भरताच्या बुद्धीकडे पाहू शकत नाहीत. त्या बुद्धीला भ्रमात पाडण्यास तुम्ही मला सांगता? अरे, चांदणे हे कधी प्रचंड किरणांच्या सूर्याला चोरू शकेल काय?॥ ३॥

**भरत हृदयँ सिय राम निवासू। तहँ कि तिमिर जहँ तरनि प्रकासू॥**
**अस कहि सारद गइ बिधि लोका। बिबुध बिकल निसि मानहुँ कोका॥**

भरताच्या हृदयात श्रीसीतारामांचा निवास आहे. जेथे सूर्याला प्रकाश असतो, तेथे कुठे अंधार राहू शकतो काय?' असे म्हणून सरस्वती ब्रह्मलोकी निघून गेली. रात्री चक्रवाक पक्षी जसा व्याकूळ होतो, त्याप्रमाणे देव व्याकूळ होऊन गेले.॥ ४॥

**दो०—सुर स्वारथी मलीन मन कीन्ह कुमंत्र कुठाटु।**
**रचि प्रपंच माया प्रबल भय भ्रम अरति उचाटु॥ २९५॥**

परंतु मलिन मनाच्या स्वार्थी देवांनी दुष्ट सल्लामसलत करून षड्यंत्र रचले. प्रबळ मायाजाल पसरून भय, भ्रम, अप्रीती आणि उद्वेग पसरून टाकले.॥ २९५॥

**करि कुचालि सोचत सुरराजू। भरत हाथ सबु काजु अकाजू॥**
**गए जनकु रघुनाथ समीपा। सनमाने सब रबिकुल दीपा॥**

दुष्ट चाल खेळून इंद्र विचार करू लागला की, 'काम होणे न होणे हे सर्व भरताच्या हाती आहे.' इकडे जनक, वसिष्ठ मुनी इत्यादींच्याबरोबर श्रीरामचंद्रांच्याकडे गेले. सूर्यकुलाचे दीपक श्रीरामचंद्रांनी सर्वांचा सन्मान केला.॥ १॥

**समय समाज धरम अबिरोधा। बोले तब रघुबंस पुरोधा॥**
**जनक भरत संबादु सुनाई। भरत कहाउति कही सुहाई॥**

तेव्हा रघुकुलाचे पुरोहित वसिष्ठ वेळ, समाज व धर्म यांना अनुकूल असे बोलले. त्यांनी प्रथम जनक व भरत यांच्यात झालेला संवाद सांगितला. नंतर भरताने सांगितलेल्या चांगल्या गोष्टी ऐकविल्या.॥ २॥

**तात राम जस आयसु देहू। सो सबु करै मोर मत एहू॥**
**सुनि रघुनाथ जोरि जुग पानी। बोले सत्य सरल मृदु बानी॥**

नंतर ते म्हणाले, 'हे रामा, माझ्या मते तुमची जशी आज्ञा असेल, तसेच सर्वांनी करावे.' हे ऐकून दोन्ही हात जोडून श्रीरघुनाथ सत्य, सरळ व कोमल शब्दांत म्हणाले,॥ ३॥

**बिद्यमान आपुनि मिथिलेसू। मोर कहब सब भाँति भदेसू॥**
**राउर राय रजायसु होई। राउरि सपथ सही सिर सोई॥**

'तुम्ही व मिथिलेश्वर जनक असताना मी काही बोलणे, हे अनुचित आहे. तुमची व जनक महाराजांची जी आज्ञा असेल, मी शपथेवार सांगतो की, ती सर्वांना निश्चितपणे शिरोधार्य होईल.'॥ ४॥

दो०—**राम सपथ सुनि मुनि जनकु सकुचे सभा समेत।**
**सकल बिलोकत भरत मुखु बनइ न ऊतरु देत॥ २९६॥**

श्रीरामांची शपथ ऐकून सर्व सभा, मुनी व जनक संकोचून गेले. कुणाला उत्तर देता येईना. सर्व लोक भरताच्या तोंडाकडे पाहू लागले.॥ २९६॥

**सभा सकुच बस भरत निहारी। रामबंधु धरि धीरजु भारी॥**
**कुसमउ देखि सनेहु सँभारा। बढ़त बिंधि जिमि घटज निवारा॥**

भरताने मोठ्या संकोचाने सभेकडे पाहिले. त्याने मोठा धीर धरून व वेळ वाईट असल्याचे पाहून आपले प्रेम आवरते घेतले. ज्याप्रमाणे वाढत जाणाऱ्या विंध्याचलाला अगस्त्य मुनींनी रोखले होते.॥ १॥

**सोक कनकलोचन मति छोनी। हरी बिमल गुन गन जगजोनी॥**
**भरत बिबेक बराहँ बिसाला। अनायास उधरी तेहि काला॥**

शोकरूपी हिरण्याक्षाने सर्व सभेची बुद्धिरूपी पृथ्वी हरण केली. जी गुणसमूहरूपी जगताला उत्पन्न करणारी होती. भरताच्या विवेकरूपी विशाल वराहाने शोकरूपी हिरण्याक्षाला नष्ट करून विनासायास तिचा उद्धार केला.॥ २॥

**करि प्रनामु सब कहँ कर जोरे। रामु राउ गुर साधु निहोरे॥**
**छमब आजु अति अनुचित मोरा। कहउँ बदन मृदु बचन कठोरा॥**

भरताने प्रणाम करून सर्वांना हात जोडले आणि श्रीरामचंद्र, राजा जनक, गुरू वसिष्ठ आणि साधु-संतांना विनंती करीत म्हटले, 'आज माझ्या या अत्यंत अयोग्य वर्तनाबद्दल क्षमा करा. मी लहान तोंडी उद्धटपणे बोलत आहे.'॥ ३॥

**हियँ सुमिरी सारदा सुहाई। मानस तें मुख पंकज आई॥**
**बिमल बिबेक धरम नय साली। भरत भारती मंजु मराली॥**

नंतर त्याने हृदयामध्ये सुंदर देवी सरस्वतीचे स्मरण केले. ती त्याच्या मनरूपी मानससरोवरातून मुखारविंदावर येऊन विराजित झाली. ती निर्मल विवेक, धर्म आणि नीतिपूर्ण भरताची नीरक्षीर यांचे विवेचन करणारी वाणीरूपी हंसी झाली. ॥ ४ ॥

**दो०—निरखि बिबेक बिलोचनन्हि सिथिल सनेहँ समाजु।**
**करि प्रनामु बोले भरतु सुमिरि सीय रघुराजु॥ २९७॥**

विवेकाच्या नेत्रांनी भरताने पाहिले की, सारा समाज प्रेमाने भरून गेला आहे. त्याने सर्वांना प्रणाम केला आणि सीता व रघुनाथांचे स्मरण करून म्हटले, ॥ २९७ ॥

**प्रभु पितु मातु सुहृद गुर स्वामी । पूज्य परम हित अंतरजामी ॥**
**सरल सुसाहिबु सील निधानू । प्रनतपाल सर्बग्य सुजानू ॥**

‘हे प्रभो, तुम्ही पिता, माता, मित्र, गुरू, स्वामी, पूज्य, परम हितैषी व अंतर्यामी आहात. सरल हृदयी, श्रेष्ठ स्वामी, सद्‌गुणांचे भांडार, शरणागताचे रक्षक, सर्वज्ञ, ॥ १ ॥

**समरथ सरनागत हितकारी । गुनगाहकु अवगुन अघ हारी ॥**
**स्वामि गोसाँइहि सरिस गोसाईं । मोहि समान मैं साइँ दोहाईं ॥**

समर्थ, शरणागताचे कल्याण करणारे, गुणांचा आदर करणारे आणि अवगुण व पाप यांचे हरण करणारे आहात. हे स्वामी, तुमच्यासारखे स्वामी तुम्हीच आहात आणि स्वामींचा अपराध करणारा माझ्यासारखा मीच आहे. ॥ २ ॥

**प्रभु पितु बचन मोह बस पेली । आयउँ इहाँ समाजु सकेली ॥**
**जग भल पोच ऊँच अरु नीचू । अमिअ अमरपद माहुरु मीचू ॥**

मी मोहामुळे तुमच्या व वडिलांच्या वचनांचे उल्लंघन करून आणि समाज गोळा करून येथे आलो आहे. जगामध्ये चांगले-वाईट, उच्च-नीच, अमृत व अमरपद, विष व मृत्यू इत्यादी, ॥ ३ ॥

**राम रजाइ मेट मन माहीं । देखा सुना कतहुँ कोउ नाहीं ॥**
**सो मैं सब बिधि कीन्हि ढिठाई । प्रभु मानी सनेह सेवकाई ॥**

यांपैकी असा कोणीही पाहिला किंवा ऐकला नाही की, ज्याने श्रीरामचंद्रांची आज्ञा मोडली. मी सर्व प्रकारे ते धाष्ट्‌र्य केले, परंतु प्रभूंनी तेच स्नेह व सेवा असेच मानले. ॥ ४ ॥

**दो०—कृपाँ भलाईं आपनी नाथ कीन्ह भल मोर।**
**दूषन भे भूषन सरिस सुजसु चारु चहु ओर॥ २९८॥**

हे नाथ, तुम्ही आपल्या कृपेने व चांगुलपणाने माझे चांगलेच केले. त्यामुळे माझे दोषसुद्धा भूषण ठरले. चोहीकडे माझी उत्तम कीर्ती पसरली. ॥ २९८ ॥

**राउरि रीति सुबानि बड़ाई । जगत बिदित निगमागम गाई ॥**
**कूर कुटिल खल कुमति कलंकी । नीच निसील निरीस निसंकी ॥**

हे नाथ, तुमची नीती आणि सुंदर महिमा जगात प्रसिद्ध आहे आणि त्याचे गायन वेद व शास्त्रांनी केले आहे. जे क्रूर, दुष्ट, कुबुद्धी, कलंकी, नीच, शीलरहित, नास्तिक व निर्भय आहेत;॥ १ ॥

**तेउ सुनि सरन सामुहें आए । सकृत प्रनामु किहें अपनाए ॥**
**देखि दोष कबहुँ न उर आने । सुनि गुन साधु समाज बखाने ॥**

तेही शरण येऊन समोर आल्यावर एकदा प्रणाम करताच त्यांना तुम्ही आपलेसे केले. त्या शरणागतांचे दोष कधी मनात ठेवले नाहीत आणि त्यांचे गुण ऐकून साधु–समाजात त्यांची वाखाणणी केली. ॥ २ ॥

**को साहिब सेवकहि नेवाजी । आपु समाज साज सब साजी ॥**
**निज करतूति न समुझिअ सपनें । सेवक सकुच सोचु उर अपनें ॥**

अशाप्रकारे सेवकाच्या सर्व गरजा पूर्ण करणारा व सेवकावर कृपा करणारा स्वामी कोण आहे? शिवाय स्वप्नातही आपण सेवकासाठी काही केले आहे, असे न मानता उलट सेवकाला संकोच वाटू नये, याचीच तुम्ही मनापासून काळजी घेता. ॥ ३ ॥

**सो गोसाइँ नहिं दूसर कोपी । भुजा उठाइ कहउँ पन रोपी ॥**
**पसु नाचत सुक पाठ प्रबीना । गुन गति नट पाठक आधीना ॥**

मी दोन्ही हात उभारून प्रतिज्ञापूर्वक सांगतो की, तुमच्यासारखा दुसरा कोणीही स्वामी नाही. वानर इत्यादी पशू नाच करतात, पोपट शिकविल्यावर बोलण्यात कुशल होतात, परंतु पोपटाच्या बोलण्याचा गुण आणि पशूचे नाचणे हे नाचविणाऱ्याच्या आणि शिकविणाऱ्याच्या हाती असते. ॥ ४ ॥

दो०—**यों सुधारि सनमानि जन किए साधु सिरमोर।**
**को कृपाल बिनु पालिहै बिरिदावलि बरजोर॥ २९९ ॥**

अशाप्रकारे आपल्या सेवकाची चूक सुधारून व त्याला सन्मान देऊन तुम्ही त्याला साधूंचा शिरोमणी बनविता. हे कृपाळू, तुमच्याविना आपल्या बिरुदावलीचे असे आग्रहाने पालन करणारा दुसरा कोण आहे?॥ २९९ ॥

**सोक सनेहँ कि बाल सुभाएँ । आयउँ लाइ रजायसु बाएँ ॥**
**तबहुँ कृपाल हेरि निज ओरा । सबहि भाँति भल मानेउ मोरा ॥**

मी शोकाने किंवा स्नेहाने आपल्या बालस्वभावानुसार आज्ञा न मानता निघून आलो, तरीही हे कृपाळू स्वामी, तुम्ही आपल्या स्वभावानुसार सर्व प्रकारे माझे कृत्य चांगलेच मानले. ॥ १ ॥

**देखेउँ पाय सुमंगल मूला। जानेउँ स्वामि सहज अनुकूला॥**
**बड़े समाज बिलोकेउँ भागू। बड़ीं चूक साहिब अनुरागू॥**

मी सुंदर मांगल्याचे मूळ असलेल्या तुमच्या चरणांचे दर्शन घेतले, तेव्हा स्वामी माझ्यावर स्वभावतःच अनुकूल आहेत, हे मी जाणले. माझ्याकडून एवढी मोठी चूक होऊनही स्वामींचा माझ्यावर किती लोभ आहे, हे एवढ्या मोठ्या समाजामध्ये मी स्वतःचे भाग्य असल्याचे जाणले. ॥ २ ॥

**कृपा अनुग्रहु अंगु अघाई। कीन्हि कृपानिधि सब अधिकाई॥**
**राखा मोर दुलार गोसाईं। अपनें सील सुभायँ भलाईं॥**

कृपानिधानांनी माझ्यावर संपूर्णपणे कृपा केली, अनुग्रह केला. माझी योग्यता नसतानाही हे खूपच केले. हे स्वामी, तुम्ही आपल्या शील, स्वभाव आणि चांगुलपणाने माझे प्रेम राखले. ॥ ३ ॥

**नाथ निपट मैं कीन्हि ढिठाई। स्वामि समाज सकोच बिहाई॥**
**अबिनय बिनय जथारुचि बानी। छमिहि देउ अति आरति जानी॥**

हे नाथ, स्वामी व समाज यांची भीड न बाळगता मी मन मानेल तसे बोलण्याचे धारिष्ट्य केले. हे देवा, माझी व्याकुळता जाणून तुम्ही मला क्षमा करावी. ॥ ४ ॥

दो०—**सुहृद सुजान सुसाहिबहि बहुत कहब बड़ि खोरि।**
**आयसु देइअ देव अब सबइ सुधारी मोरि॥ ३००॥**

अकारण हित करणाऱ्या सुहृद, बुद्धिमान व श्रेष्ठ स्वामींना जास्त सांगणे हा अपराध आहे. म्हणून हे देव, आता मला आज्ञा द्या. तुम्ही मला सर्वतोपरी सांभाळून घेतले. ॥ ३०० ॥

**प्रभु पद पदुम पराग दोहाई। सत्य सुकृत सुख सीवँ सुहाई॥**
**सो करि कहउँ हिए अपने की। रुचि जागत सोवत सपने की॥**

हे प्रभू, तुमच्या चरणांची धूळ ही सत्य, पुण्य व सुख यांची मोठी परिसीमा आहे. तिचे स्मरण करून मी आपल्या हृदयातील जागेपणी, झोपेत व स्वप्नातही असणारी इच्छा सांगतो. ॥ १ ॥

**सहज सनेहँ स्वामि सेवकाई। स्वारथ छल फल चारि बिहाई॥**
**अग्या सम न सुसाहिब सेवा। सो प्रसादु जन पावै देवा॥**

ती इच्छा की, कपट, स्वार्थ आणि अर्थ-कामादी चारी फले सोडून स्वाभाविक प्रेमाने स्वामींची सेवा करणे, हीच आहे आणि आज्ञापालनासारखी स्वामींची दुसरी कोणतीही श्रेष्ठ सेवा नाही. म्हणून हे देवा, आता तोच आज्ञारूप प्रसाद सेवकाला मिळावा.' ॥ २ ॥

**अस कहि प्रेम बिबस भए भारी । पुलक सरीर बिलोचन बारी ॥**
**प्रभु पद कमल गहे अकुलाई । समउ सनेहु न सो कहि जाई ॥**

असे म्हणून भरत प्रेमात मग्न झाला. त्याचे शरीर पुलकित झाले. डोळ्यांत प्रेमाश्रू दाटले. व्याकूळ होऊन त्याने प्रभू रामचंद्रांचे चरणकमल धरून ठेवले. तो प्रसंग व ते प्रेम यांचे वर्णन करता येणार नाही. ॥ ३ ॥

**कृपासिंधु सनमानि सुबानी । बैठाए समीप गहि पानी ॥**
**भरत बिनय सुनि देखि सुभाऊ । सिथिल सनेहँ सभा रघुराऊ ॥**

कृपासिंधू श्रीरामचंद्रांनी सुंदर वाणीने भरताचा मान राखून त्याचा हात धरून त्याला आपल्याजवळ बसवून घेतले. भरताची विनंती ऐकून व त्याचा स्वभाव पाहून सर्व सभा आणि श्रीरघुनाथ स्नेहामुळे स्वत:ला हरवून बसले. ॥ ४ ॥

**छं०—रघुराउ सिथिल सनेहँ साधु समाज मुनि मिथिला धनी।**
**मन महुँ सराहत भरत भायप भगति की महिमा घनी ॥**
**भरतहि प्रसंसत बिबुध बरषत सुमन मानस मलिन से।**
**तुलसी बिकल सब लोग सुनि सकुचे निसागम नलिन से ॥**

श्रीरघुनाथ, साधु-समाज, मुनी वसिष्ठ आणि मिथिलापती जनक हे स्नेहाने ओथंबून गेले. सर्वजण मनातल्या मनात भरताचे बंधु-प्रेम आणि त्याच्या भक्तीचा महिमा यांची खूप प्रशंसा करू लागले. देव नाइलाजाने भरताची प्रशंसा करून त्याच्यावर फुले उधळू लागले. तुलसीदास म्हणतात, सर्व लोक भरताचे भाषण ऐकून व्याकूळ झाले आणि ज्याप्रमाणे रात्र झाल्यावर कमळ कोमेजते, तसे म्लान झाले.

**सो०—देखि दुखारी दीन दुहु समाज नर नारि सब।**
**मघवा महा मलीन मुए मारि मंगल चहत ॥ ३०१ ॥**

दोन्ही समाजांतील सर्व स्त्री-पुरुष दीन व दु:खी झालेले पाहून महामलिन मनाचा इंद्र मेलेल्याला मारून आपले मंगल व्हावे, अशी इच्छा करीत होता. ॥ ३०१ ॥

**कपट कुचालि सीवँ सुरराजू । पर अकाज प्रिय आपन काजू ॥**
**काक समान पाकरिपु रीती । छली मलीन कतहुँ न प्रतीती ॥**

इंद्र हा कपट व वाईट चालीची परिसीमा होता. त्याला दुसऱ्याची हानी आणि आपला लाभ आवडे. इंद्राची रीत कावळ्यासारखी होती. तो कपटी आणि मलिन मनाचा होता आणि त्याचा कुठेही व कुणावरही विश्वास नव्हता. ॥ १ ॥

**प्रथम कुमत करि कपटु सँकेला । सो उचाटु सब कें सिर मेला ॥**
**सुरमायाँ सब लोग बिमोहे । राम प्रेम अतिसय न बिछोहे ॥**

प्रथम त्याने वाईट विचार करून कपट रचले. नंतर त्याने आपल्या मनातील कपटी मळमळ सर्वांच्या डोक्यात भरली आणि देवमाया टाकली. तिने सर्व लोकांना खूप मोहित करण्याचा प्रयत्न केला, परंतु त्यांचे श्रीरामांच्याबद्दलचे प्रेम पूर्णपणे नाहीसे झाले नाही. ॥ २ ॥

**भय उचाट बस मन थिर नाहीं। छन बन रुचि छन सदन सोहाहीं॥**
**दुबिध मनोगति प्रजा दुखारी। सरित सिंधु संगम जनु बारी॥**

भय व इंद्राच्या माया-प्रयोगामुळे कुणाचे मन स्थिर नव्हते. एका क्षणी त्यांना वनात राहण्याची इच्छा होई आणि दुसऱ्या क्षणी त्यांना घर बरे वाटू लागे. मनाच्या द्विधा अवस्थेमध्ये प्रजा दुःखी झाली. जसे नदी व समुद्र यांच्या संगमाचे पाणी क्षुब्ध होते, तशी प्रजेच्या मनाची स्थिती झाली. ॥ ३ ॥

**दुचित कतहुँ परितोषु न लहहीं। एक एक सन मरमु न कहहीं॥**
**लखि हियँ हँसि कह कृपानिधानू। सरिस स्वान मघवान जुबानू॥**

चित्त द्विधा झाल्यामुळे त्यांना समाधान वाटत नव्हते. शिवाय दुसऱ्याला आपल्या मनातील ही गोष्ट सांगताही येईना. कृपानिधान रामचंद्र त्यांची ही दशा पाहून मनात हसून म्हणाले, 'कुत्रा, इंद्र आणि युवक एकसारख्या स्वभावाचे असतात.' (पाणिनीने श्वन् (कुत्रा), युवन् (तरुण), मघवन् (इंद्र) या तिन्ही शब्दांची रूपे एकसारखी होतात, असे एका सूत्रात सांगितले आहे. तो संदर्भ येथे आहे.) ॥ ४ ॥

दो०—**भरतु जनकु मुनिजन सचिव साधु सचेत बिहाइ।**
**लागि देवमाया सबहि जथाजोगु जनु पाइ॥ ३०२॥**

भरत, जनक, मुनिजन, मंत्री आणि ज्ञानी साधु-संत यांना सोडून इतर सर्वांवर प्रत्येक मनुष्याच्या प्रकृती व स्थितीप्रमाणे देवमायेचा प्रभाव पडला. ॥ ३०२ ॥

**कृपासिंधु लखि लोग दुखारे। निज सनेहँ सुरपति छल भारे॥**
**सभा राउ गुर महिसुर मंत्री। भरत भगति सब कै मति जंत्री॥**

कृपासिंधू श्रीरामांनी आपल्या प्रेमाने व इंद्राच्या अनिवार मायेमुळे लोक दुःखी असल्याचे पाहिले. सभा, राजा जनक, गुरू, ब्राह्मण, मंत्री इत्यादी सर्वांना भरताच्या भक्तीने आपल्या अधीन केले.

**रामहि चितवत चित्र लिखे से। सकुचत बोलत बचन सिखे से॥**
**भरत प्रीति नति बिनय बड़ाई। सुनत सुखद बरनत कठिनाई॥**

सर्व लोक चित्राप्रमाणे स्तब्ध होऊन श्रीरामचंद्रांकडे पाहात होते. पढवल्याप्रमाणे संकोचाने बोलत होते. भरताची प्रीती, नम्रता, विनय व महिमा हे ऐकण्यास सुखद होते, परंतु त्यांचे वर्णन करणे फार कठीण. ॥ २ ॥

**जासु बिलोकि भगति लवलेसू । प्रेम मगन मुनिगन मिथिलेसू ॥**
**महिमा तासु कहै किमि तुलसी । भगति सुभायँ सुमति हियँ हुलसी ॥**

ज्याच्या भक्तीचा लवलेश पाहून मुनिगण व मिथिलेश्वर जनक हे प्रेममग्न झाले, त्या भरताचा महिमा तुलसीदास कसा सांगणार? भरताची भक्ती व सुंदर भाव पाहून कवीच्या हृदयातील सुबुद्धी विकसित होत होती. ॥ ३ ॥

**आपु छोटि महिमा बड़ि जानी । कबिकुल कानि मानि सकुचानी ॥**
**कहि न सकति गुन रुचि अधिकाई । मति गति बाल बचन की नाई ॥**

परंतु कवीची ती बुद्धी स्वतःला लहान व भरताचा महिमा मोठा समजून कविपरंपरेची मर्यादा मानून संकोच पावत होती. तिला गुणांची खूप आवड होती. परंतु ते ती सांगू शकत नव्हती. त्यामुळे बुद्धीची गती बालकांच्या बोलांप्रमाणे कुंठित झाली. ॥ ४ ॥

दो०—**भरत बिमल जसु बिमल बिधु सुमति चकोरकुमारि ।**
**उदित बिमल जन हृदय नभ एकटक रही निहारि ॥ ३०३ ॥**

भरताची निर्मल कीर्ती ही निर्मल चंद्रमा आहे आणि कवीची सुबुद्धी ही चकोरी आहे. ती भक्तांच्या हृदयरूपी निर्मल आकाशात तो चंद्रमा उगवल्याचे पाहून त्याच्याकडे एकटक पाहातच राहिली. मग वर्णन कसे करणार? ॥ ३०३ ॥

**भरत सुभाउ न सुगम निगमहूँ । लघु मति चापलता कबि छमहूँ ॥**
**कहत सुनत सति भाउ भरत को । सीय राम पद होइ न रत को ॥**

भरताच्या स्वभावाचे वर्णन वेदांनाही सुगम नाही. म्हणून माझ्या तुच्छ बुद्धीच्या चांचल्याबद्दल कविजनांनी क्षमा करावी. भरताचा स्वभाव सांगताना व ऐकताना कोण मनुष्य श्रीसीतारामांच्या चरणी अनुरक्त होणार नाही? ॥ १ ॥

**सुमिरत भरतहि प्रेमु राम को । जेहि न सुलभु तेहि सरिस बाम को ॥**
**देखि दयाल दसा सबही की । राम सुजान जानि जन जी की ॥**

भरताचे स्मरण केल्याने ज्याला श्रीरामांचे प्रेम लाभले नसेल, त्याच्यासारखा दुर्दैवी दुसरा कोण असणार? दयाळू आणि ज्ञानी श्रीरामांनी सर्वांची ती दशा आणि भक्त भरताच्या मनाची अवस्था जाणली, ॥ २ ॥

**धरम धुरीन धीर नय नागर । सत्य सनेह सील सुख सागर ॥**
**देसु कालु लखि समउ समाजू । नीति प्रीति पालक रघुराजू ॥**

आणि धर्मधुरंधर, धीर, नीति-चतुर; सत्य, स्नेह, शील आणि सुखाचे समुद्र असलेले आणि नीती-प्रीतीचे पालन करणारे श्रीरघुनाथ देश, काल, प्रसंग व समाज पाहून, ॥ ३ ॥

**बोले बचन बानि सरबसु से। हित परिनाम सुनत ससि रसु से॥**
**तात भरत तुम्ह धरम धुरीना। लोक बेद बिद प्रेम प्रबीना॥**

त्याप्रमाणे बोलू लागले. ते बोलणे जणू वाणीचे सर्वस्वच होते. परिणामी हितकारक व ऐकण्यास चंद्राच्या अमृतासारखे होते. ते म्हणाले, 'कुमार भरता, तू धर्माची धुरा धारण करणारा आहेस. लोकव्यवहार व वेद जाणणारा आहेस आणि प्रेमाचे निधान आहेस.॥ ४॥

दो०—**करम बचन मानस बिमल तुम्ह समान तुम्ह तात।**
**गुर समाज लघु बंधु गुन कुसमयँ किमि कहि जात॥ ३०४॥**

बाबा रे! कायावाचामनाने निर्मल असा तुझ्यासारखा तूच आहेस. गुरुजनांच्या समाजामध्ये आणि अशा वाईट प्रसंगी लहान भावाचे गुण कसे सांगता येतील?॥ ३०४॥

**जानहु तात तरनि कुल रीती। सत्यसंध पितु कीरति प्रीती॥**
**समउ समाजु लाज गुरजन की। उदासीन हित अनहित मन की॥**

हे वत्सा, तू सूर्यकुलाची रीत, सत्यप्रतिज्ञ पित्याची कीर्ती आणि प्रीती, प्रसंग, समाज आणि गुरुजनांची मर्यादा तसेच उदासीन, मित्र व शत्रू या सर्वांच्या मनातील जाणतोस.॥ १॥

**तुम्हहि बिदित सबही कर करमू। आपन मोर परम हित धरमू।**
**मोहि सब भाँति भरोस तुम्हारा। तदपि कहउँ अवसर अनुसारा॥**

तुला सर्व कर्तव्यांची व स्वत:च्या व माझ्या परम हितकारक धर्माची जाण आहे. जरी माझा सर्व प्रकारे तुझ्यावर विश्वास आहे, तरीही मी प्रसंगानुरूप काही सांगतो.॥ २॥

**तात तात बिनु बात हमारी। केवल गुरकुल कृपाँ सँभारी॥**
**नतरु प्रजा परिजन परिवारू। हमहि सहित सबु होत खुआरू॥**

हे बंधो! वडिलांच्या अनुपस्थितीत केवळ कुलगुरू वसिष्ठांच्या कृपेने आम्हांला सांभाळून घेतले, नाहीतर आमच्यासह प्रजा, कुटुंब, परिवार या सर्वांची वाताहत झाली असती.॥ ३॥

**जौं बिनु अवसर अथवँ दिनेसू। जग केहि कहहु न होइ कलेसू॥**
**तस उतपातु तात बिधि कीन्हा। मुनि मिथिलेस राखि सबु लीन्हा॥**

जर अवेळी सूर्याचा अस्त झाला, तर मग सांग, जगात कुणाला धक्का बसणार नाही? तशाच प्रकारचा उत्पात विधात्याने पित्याच्या अवेळी मृत्यूने घडवला आहे. परंतु पूज्य वसिष्ठांनी व मिथिलेश्वरांनी सर्वांना सांभाळले.॥ ४॥

दो०—**राज काज सब लाज पति धरम धरनि धन धाम।**
**गुर प्रभाउ पालिहि सबहि भल होइहि परिनाम॥ ३०५॥**

राज्याचे सर्व कार्य, मर्यादा, प्रतिष्ठा, धर्म, पृथ्वी, धन, घर या सर्वांचे पालन गुरुजींचा प्रभाव करील आणि परिणाम शुभ होईल.॥ ३०५॥

**सहित समाज तुम्हार हमारा । घर बन गुर प्रसाद रखवारा ॥**
**मातु पिता गुर स्वामि निदेसू । सकल धरम धरनीधर सेसू ॥**

गुरुजींचा अनुग्रह हाच घरामध्ये व वनामध्ये समाजासह तुझा व आमचा रक्षक आहे. माता, पिता, गुरू आणि स्वामींच्या आज्ञेचे पालन करणे, हे संपूर्ण धर्मरूपी पृथ्वीला धारण करणाऱ्या शेषासारखे आहे. ॥ १ ॥

**सो तुम्ह करहु करावहु मोहू । तात तरनिकुल पालक होहू ॥**
**साधक एक सकल सिधि देनी । कीरति सुगति भूतिमय बेनी ॥**

भरता! तू तेच कर, माझ्याकडून करवून घे आणि सूर्यकुलाचा रक्षक बन. साधकासाठी ही एकच आज्ञापालनरूपी साधना संपूर्ण सिद्धी देणारी आहे. ती कीर्ती, सद्‌गती आणि ऐश्वर्य यांची त्रिवेणी आहे. ॥ २ ॥

**सो बिचारि सहि संकटु भारी । करहु प्रजा परिवारु सुखारी ॥**
**बाँटी बिपति सबहिं मोहि भाई । तुम्हहि अवधि भरि बड़ि कठिनाई ॥**

याचा विचार करून, मोठे संकट सोसूनही तू प्रजेला व कुटुंबाला सुखी कर. हे बंधू, माझी विपत्ती सर्वांनी वाटून घेतली. परंतु तुला मात्र चौदा वर्षांच्या अवधीत मोठे कष्ट सोसावे लागणार आहेत. ॥ ३ ॥

**जानि तुम्हहि मृदु कहउँ कठोरा । कुसमयँ तात न अनुचित मोरा ॥**
**होहिं कुठायँ सुबंधु सहाए । ओड़िअहिं हाथ असनिहु के घाए ॥**

तू कोमल आहेस, हे माहीत असूनही मी वियोगाची कठोर गोष्ट सांगत आहे. कठीण प्रसंगी हे सांगणे माझ्या दृष्टीने अयोग्य नाही. कारण कठीण प्रसंगी थोरला भाऊच मदत करतो. वज्राचे प्रहार हातानेच अडवता येतात.' ॥ ४ ॥

दो०—**सेवक कर पद नयन से मुख सो साहिबु होइ।**
**तुलसी प्रीति कि रीति सुनि सुकबि सराहहिं सोइ ॥ ३०६ ॥**

सेवक हा हात, पाय व नेत्रांच्यासारखा आणि स्वामी हा मुखासारखा असला पाहिजे. तुलसीदास म्हणतात की, सेवक-स्वामी यांच्या प्रेमाची अशी रीत ऐकून सुकवी तिची स्तुती करतात. ॥ ३०६ ॥

**सभा सकल सुनि रघुबर बानी । प्रेम पयोधि अमिअँ जनु सानी ॥**
**सिथिल समाज सनेह समाधी । देखि दसा चुप सारद साधी ॥**

श्रीरघुनाथांची प्रेमरूपी समुद्रातील अमृताने ओथंबलेली वाणी ऐकून सर्व समाजावरील दडपण उतरले व सर्वांना प्रेमाची समाधी लागली. ही दशा पाहून सरस्वतीसुद्धा मौन झाली. ॥ १ ॥

**भरतहि भयउ परम संतोषू । सनमुख स्वामि बिमुख दुख दोषू ॥**
**मुख प्रसन्न मन मिटा बिषादू । भा जनु गूँगेहि गिरा प्रसादू ॥**

भरताला फार संतोष वाटला. स्वामी अनुकूल होताच त्याचे दुःख व दोष पळून गेले. त्याचे मुख प्रसन्न झाले आणि मनातील विषाद दूर झाला. जणू मुक्यावर सरस्वतीची कृपा झाली.॥ २॥

**कीन्ह सप्रेम प्रनामु बहोरी। बोले पानि पंकरुह जोरी॥**
**नाथ भयउ सुखु साथ गए को। लहेउँ लाहु जग जनमु भए को॥**

त्याने प्रेमाने प्रणाम केला आणि करकमल जोडून तो म्हणाला की, 'हे नाथ, मला तुमच्याबरोबर येण्याचे सुख लाभले आणि मला जगामध्ये जन्म घेण्याचा लाभही मिळाला.॥ ३॥

**अब कृपाल जस आयसु होई। करौं सीस धरि सादर सोई॥**
**सो अवलंब देव मोहि देई। अवधि पारु पावौं जेहि सेई॥**

हे कृपाळू, आता जशी आज्ञा असेल, तशी ती मी शिरोधार्य मानून आदराने पाळीन. परंतु हे देवा, तुम्ही मला असा आधार द्या की, त्याची सेवा करून मी हा काळ घालवू शकेन.॥ ४॥

दो०—**देव देव अभिषेक हित गुर अनुसासनु पाइ।**
**आनेउँ सब तीरथ सलिलु तेहि कहँ काह रजाइ॥ ३०७॥**

हे देव, तुमच्या अभिषेकासाठी मी गुरुजींच्या आज्ञेने सर्व तीर्थांतील जल घेऊन आलो आहे. त्याबद्दल काय आज्ञा आहे?॥ ३०७॥

**एकु मनोरथु बड़ मन माहीं। सभयँ सकोच जात कहि नाहीं॥**
**कहहु तात प्रभु आयसु पाई। बोले बानि सनेह सुहाई॥**

माझ्या मनात आणखी एक मोठी इच्छा आहे, परंतु भय व संकोचामुळे ती सांगवत नाही.' श्रीराम म्हणाले, 'हे बंधू, सांग.' तेव्हा प्रभूंची आज्ञा झाल्यावर भरत स्नेहपूर्ण सुंदर वाणीने म्हणाला.॥ १॥

**चित्रकूट सुचि थल तीरथ बन। खग मृग सर सरि निर्झर गिरिगन॥**
**प्रभु पद अंकित अवनि बिसेषी। आयसु होइ त आवौं देखी॥**

'आज्ञा असेल तर चित्रकूटावरील पवित्र स्थाने, तीर्थे, वन, पशु-पक्षी, तलाव, नद्या, झरे आणि पर्वतांचे समूह, विशेषतः प्रभू, तुमच्या चरणचिह्नांनी अंकित झालेली भूमी पाहून येतो.'॥ २॥

**अवसि अत्रि आयसु सिर धरहू। तात बिगतभय कानन चरहू॥**
**मुनि प्रसाद बनु मंगल दाता। पावन परम सुहावन भ्राता॥**

श्रीरघुनाथ म्हणाले, 'अवश्य. अत्री ऋषींच्या आज्ञेने ते सांगतील तसे कर आणि निर्भयपणे वनात फिरून ये. हे बंधू, अत्रिमुनींच्या प्रसादामुळे हे वन मांगल्य देणारे, परम पवित्र व अत्यंत सुंदर झाले आहे.॥ ३॥

**रिषिनायकु जहँ आयसु देहीं । राखेहु तीरथ जलु थल तेहीं ॥**
**सुनि प्रभु बचन भरत सुखु पावा । मुनि पद कमल मुदित सिरु नावा ॥**

आणि ऋषींचे प्रमुख अत्री हे आज्ञा देतील तेथे ते आणलेले तीर्थांचे जल स्थापन कर.' प्रभूंचे बोलणे ऐकून भरत सुखावला आणि आनंदित होऊन त्याने अत्रिमुनींच्या चरणी मस्तक ठेवले. ॥ ४ ॥

दो०—**भरत राम संबादु सुनि सकल सुमंगल मूल ।**
**सुर स्वारथी सराहि कुल बरषत सुरतरु फूल ॥ ३०८ ॥**

सर्व सुंदर मांगल्याचे मूळ असलेला भरत व श्रीरामांचा संवाद ऐकून स्वार्थी देव रघुकुलाची प्रशंसा करून कल्पवृक्षाची फुले उधळू लागले. ॥ ३०८ ॥

**धन्य भरत जय राम गोसाईं । कहत देव हरषत बरिआईं ॥**
**मुनि मिथिलेस सभाँ सब काहू । भरत बचन सुनि भयउ उछाहू ॥**

'भरत धन्य आहे, स्वामी श्रीरामांचा विजय असो,' असे म्हणत देव अत्यंत हर्षित होऊ लागले. भरताचे बोलणे ऐकून मुनी वसिष्ठ, मिथिलापती जनक आणि सभेतील सर्वांना आनंद झाला. ॥ १ ॥

**भरत राम गुन ग्राम सनेहू । पुलकि प्रसंसत राउ बिदेहू ॥**
**सेवक स्वामि सुभाउ सुहावन । नेमु पेमु अति पावन पावन ॥**

भरत आणि श्रीरामचंद्र यांच्या गुणांची व प्रेमाची प्रशंसा विदेहराजा जनक पुलकित होऊन करू लागले, 'सेवक व स्वामी या दोघांचा सुंदर स्वभाव आहे. या दोघांचे नियम व प्रेम हे पावित्र्यालाही अत्यंत पवित्र करणारे आहे.' ॥ २ ॥

**मति अनुसार सराहन लागे । सचिव सभासद सब अनुरागे ॥**
**सुनि सुनि राम भरत संबादू । दुहु समाज हियँ हरषु बिषादू ॥**

मंत्री आणि सभासद सर्वजण प्रेममुग्ध होऊन आपापल्या बुद्धीप्रमाणे त्या दोघांच्या प्रेमाची वाखाणणी करू लागले. श्रीरामचंद्र आणि भरत यांचा संवाद ऐकून दोन्ही समाजांच्या हृदयांमध्ये भरताचा सेवाधर्म पाहून हर्ष आणि रामवियोगाच्या कल्पनेमुळे विषाद वाटला. ॥ ३ ॥

**राम मातु दुखु सुखु सम जानी । कहि गुन राम प्रबोधीं रानी ॥**
**एक कहहिं रघुबीर बड़ाई । एक सराहत भरत भलाई ॥**

राममाता कौसल्येने दुःख व सुख समान मानून श्रीरामांचे गुण सांगत इतर राण्यांना धीर दिला. कोणी श्रीरामांच्या मोठेपणाची चर्चा करीत होते. तर कोणी भरताच्या चांगुलपणाची प्रशंसा करीत होते. ॥ ४ ॥

**दो०—अत्रि कहेउ तब भरत सन सैल समीप सुकूप।**
**राखिअ तीरथ तोय तहँ पावन अमिअ अनूप॥ ३०९॥**

मग अत्रि ऋषींनी भरताला सांगितले की, ‘या पर्वताजवळच एक विहीर आहे. ते पवित्र, अनुपम व अमृतासारखे तीर्थजल तिच्यातच स्थापन कर.’॥ ३०९॥

**भरत अत्रि अनुसासन पाई। जल भाजन सब दिए चलाई॥**
**सानुज आपु अत्रि मुनि साधू। सहित गए जहँ कूप अगाधू॥**

भरताने अत्रि-मुनींच्या आज्ञेनुसार जलाची सर्व पात्रे रवाना केली आणि शत्रुघ्न, अत्रिमुनी आणि अन्य साधु-संतांसह त्या अथांग विहिरीकडे तो गेला.॥ १॥

**पावन पाथ पुन्यथल राखा। प्रमुदित प्रेम अत्रि अस भाषा॥**
**तात अनादि सिद्ध थल एहू। लोपेउ काल बिदित नहिं केहू॥**

आणि ते पवित्र जल त्या पुण्यस्थळामध्ये ठेवले. तेव्हा अत्रि ऋषींनी प्रेमाने आनंदित होऊन म्हटले, ‘भरता, हे अनादी सिद्धस्थल आहे. काळाच्या ओघात हे लोप पावले होते, म्हणून कुणालाच ते ठाऊक नव्हते.’॥ २॥

**तब सेवकन्ह सरस थलु देखा। कीन्ह सुजल हित कूप बिसेषा॥**
**बिधिबस भयउ बिस्व उपकारू। सुगम अगम अति धरम बिचारू॥**

तेव्हा भरताच्या सेवकांनी ते जलयुक्त स्थान पाहिले आणि त्या पवित्र तीर्थांच्या जलासाठी त्या विहिरीचा चांगल्याप्रकारे जीर्णोद्धार केला. दैवयोगामुळे सर्व तीर्थे एकत्र आल्याने विश्वावर उपकार झाला. धर्माचा अत्यंत अगम्य विचार या विहिरीमुळे सुगम झाला.॥ ३॥

**भरतकूप अब कहिहहिं लोगा। अति पावन तीरथ जल जोगा॥**
**प्रेम सनेम निमज्जत प्रानी। होइहहिं बिमल करम मन बानी॥**

आता लोक याला ‘भरतकूप’ म्हणतील. तीर्थांच्या जलामुळे हा अत्यंत पवित्र झाला आहे. यात प्रेमाने नियमितपणे स्नान केल्यावर प्राणी कायावाचामनाने शुद्ध होतील.॥ ४॥

**दो०—कहत कूप महिमा सकल गए जहाँ रघुराउ।**
**अत्रि सुनायउ रघुबरहि तीरथ पुन्य प्रभाउ॥ ३१०॥**

त्या विहिरीचा महिमा सांगत सर्वजण श्रीरघुनाथांच्याकडे गेले. अत्रिमुनींनी श्रीरघुनाथांना त्या तीर्थाचा पुण्यप्रभाव सांगितला.॥ ३१०॥

**कहत धरम इतिहास सप्रीती। भयउ भोरु निसि सो सुख बीती॥**
**नित्य निबाहि भरत दोउ भाई। राम अत्रि गुर आयसु पाई॥**

प्रेमपूर्वक धर्माचा इतिहास सांगत ती रात्र सुखाने गेली. सकाळ उजाडली. भरत-शत्रुघ्न हे नित्यक्रिया आटोपून श्रीराम, अत्रिमुनी व वसिष्ठ यांची आज्ञा घेऊन,॥ १ ॥

**सहित समाज साज सब सादें। चले राम बन अटन पयादें॥**
**कोमल चरन चलत बिनु पनहीं। भइ मृदु भूमि सकुचि मन मनहीं॥**

सर्व समाजासह साधेपणाने श्रीरामांच्या वनास प्रदक्षिणा करण्यास पायी गेले. ते अनवाणी चालत आहेत, हे पाहून पृथ्वी मनातून संकोच पावून कोमल झाली.॥ २ ॥

**कुस कंटक काँकरीं कुराईं। कटुक कठोर कुबस्तु दुराईं॥**
**महि मंजुल मृदु मारग कीन्हे। बहत समीर त्रिबिध सुख लीन्हे॥**

कुश, काटे, खडे, खड्डे इत्यादी कठोर, त्रासदायक आणि वाईट वस्तू लपवून पृथ्वीने मार्ग सुंदर व कोमल बनविले. सुखदायक, शीतल, मंद, सुगंधित हवा वाहू लागली.॥ ३ ॥

**सुमन बरषि सुर घन करि छाहीं। बिटप फूलि फलि तृन मृदुताहीं॥**
**मृग बिलोकि खग बोलि सुबानी। सेवहिं सकल राम प्रिय जानी॥**

मार्गामध्ये देवांनी फुलांचा वर्षाव केला, मेघांनी सावली धरली, वृक्ष फुला-फळांनी बहरले, गवत कोमल झाले, पशू त्यांना पाहात होते आणि पक्षी सुंदर वाणीने बोलत होते. ते सर्वजण भरत हा श्रीरामांचा आवडता आहे, असे मानून त्याची सेवा करू लागले.॥ ४ ॥

दो०—**सुलभ सिद्धि सब प्राकृतहु राम कहत जमुहात।**
**राम प्रानप्रिय भरत कहुँ यह न होइ बड़ि बात॥ ३११॥**

एखादा सामान्य माणूसही आळसामुळे जांभई देताना 'राम' म्हणतो, तेव्हाही त्याला सर्व सिद्धी प्राप्त होतात, मग श्रीरामांच्या प्राण-प्रिय भरतासाठी सर्व सिद्धी मिळणे, ही काही मोठी आश्चर्याची गोष्ट नव्हती.॥ ३११ ॥

**एहि बिधि भरतु फिरत बन माहीं। नेमु प्रेमु लखि मुनि सकुचाहीं॥**
**पुन्य जलाश्रय भूमि बिभागा। खग मृग तरु तृन गिरि बन बागा॥**

अशाप्रकारे भरत वनात फिरत होता. त्याचा नेम व प्रेम पाहून मुनीसुद्धा संकोच पावत होते. पवित्र जलाची स्थाने, पृथ्वीचे वेगवेगळे भाग, पक्षी, पशू, तृण, पर्वत, वन आणि बागा,॥ १ ॥

**चारु बिचित्र पबित्र बिसेषी। बूझत भरतु दिब्य सब देखी॥**
**सुनि मन मुदित कहत रिषिराऊ। हेतु नाम गुन पुन्य प्रभाऊ॥**

सर्व विशेष रितीने सुंदर, विलक्षण, पवित्र आणि दिव्य असलेले पाहून भरताने प्रश्न विचारले आणि प्रश्न ऐकून ऋषिवर्य अत्री यांनी मनःपूर्वक सर्वांचे कारण, नाम, गुण व पुण्य-प्रभाव सांगितले.॥ २ ॥

**कतहुँ निमज्जन कतहुँ प्रनामा। कतहुँ बिलोकत मन अभिरामा॥**
**कतहुँ बैठि मुनि आयसु पाई। सुमिरत सीय सहित दोउ भाई॥**

भरत कुठे स्नान करीत होता, कुठे प्रणाम करीत होता, कुठे मनोहर स्थानांचे दर्शन घेत होता आणि कुठे अत्रींच्या आज्ञेने बसून सीतेसह श्रीराम व लक्ष्मण या दोघां बंधूचे स्मरण करीत होता. ॥ ३ ॥

**देखि सुभाउ सनेहु सुसेवा। देहिं असीस मुदित बनदेवा॥**
**फिरहिं गएँ दिनु पहर अढ़ाई। प्रभु पद कमल बिलोकहिं आई॥**

भरताचा स्वभाव, प्रेम आणि सुंदर सेवाभाव पाहून वनदेवता आनंदाने आशीर्वाद देत होत्या. अशा प्रकारे फिरत असताना अडीच प्रहर झाले, तेव्हा ते परतले आणि येऊन त्यांनी श्रीरघुनाथांच्या चरणकमलांचे दर्शन घेतले. ॥ ४ ॥

दो०—**देखे थल तीरथ सकल भरत पाँच दिन माझ।**
**कहत सुनत हरि हर सुजसु गयउ दिवसु भइ साँझ॥ ३१२॥**

भरताने पाच दिवसांत सर्व तीर्थस्थानांचे दर्शन घेतले. भगवान विष्णू व महादेव यांची कीर्ती सांगण्या-ऐकण्यामध्ये पाचवा दिवसही गेला, संध्याकाळ झाली. ॥ ३१२ ॥

**भोर न्हाइ सबु जुरा समाजू। भरत भूमिसुर तेरहुति राजू॥**
**भल दिन आजु जानि मन माहीं। रामु कृपाल कहत सकुचाहीं॥**

दुसऱ्या दिवशी सकाळी स्नान करून भरत, ब्राह्मण, राजा जनक आणि इतर समाज हे सर्व गोळा झाले. कृपाळू श्रीरामांनी मनात विचार केला की, सर्वांना निरोप देण्यास आजचा दिवस चांगला आहे. परंतु हे सांगण्यास त्यांना संकोच वाटत होता. ॥ १ ॥

**गुर नृप भरत सभा अवलोकी। सकुचि राम फिरि अवनि बिलोकी॥**
**सील सराहि सभा सब सोची। कहुँ न राम सम स्वामि सँकोची॥**

श्रीरामचंद्रांनी गुरू वसिष्ठ, राजा जनक, भरत व सर्व सभेकडे पाहिले, परंतु संकोचाने दृष्टी फिरवून ते भूमीकडे पाहू लागले. सर्व सभा त्यांच्या वागण्याची प्रशंसा करीत विचार करू लागली की, श्रीरामांच्यासारखे भिडस्त स्वामी कोठेही नाहीत. ॥ २ ॥

**भरत सुजान राम रुख देखी। उठि सप्रेम धरि धीर बिसेषी॥**
**करि दंडवत कहत कर जोरी। राखीं नाथ सकल रुचि मोरी॥**

मन ओळखणाऱ्या भरताने श्रीरामांचा रोख पाहून प्रेमाने उठून, मोठ्या धीराने दंडवत घालून हात जोडून म्हटले, ‘हे नाथ, तुम्ही माझ्या सर्व आवडी पुरवल्या. ॥ ३ ॥

**मोहि लगि सहेउ सबहिं संतापू। बहुत भाँति दुखु पावा आपू॥**
**अब गोसाइँ मोहि देउ रजाई। सेवौं अवध अवधि भरि जाई॥**

माझ्यासाठी सर्व लोकांनी दु:ख सोसले आणि तुम्हीसुद्धा अनेक प्रकारे दु:ख सहन केले. स्वामी, आता आज्ञा द्या. मी जाऊन चौदा वर्षे पूर्ण होईपर्यंत अयोध्येत राहातो. ॥ ४ ॥

**दो०—जेहिं उपाय पुनि पाय जनु देखै दीनदयाल।**
**सो सिख देइअ अवधि लगि कोसलपाल कृपाल॥ ३१३॥**

हे दीनदयाळ! हे कोसलाधीश, हे कृपाळू, ज्या उपायाने हा तुमचा दास पुन्हा तुमच्या चरणांचे दर्शन करू शकेल, असा उपदेश या अवधीसाठी मला द्या. ॥ ३१३ ॥

**पुरजन परिजन प्रजा गोसाईं। सब सुचि सरस सनेहँ सगाईं॥**
**राउर बदि भल भव दुख दाहू। प्रभु बिनु बादि परम पद लाहू॥**

हे स्वामी, तुमच्या प्रेमामुळे व संबंधामुळे अयोध्यावासी, कुटुंबीय आणि प्रजा हे सर्व पवित्र व आनंदाने युक्त आहेत. तुमच्यासाठी भवदु:खाच्या ज्वालेमध्ये जळणे हे सुद्धा चांगलेच आहे. आणि हे प्रभू, तुमच्याविना मोक्षाचा लाभसुद्धा व्यर्थ आहे. ॥ १ ॥

**स्वामि सुजानु जानि सब ही की। रुचि लालसा रहनि जन जी की॥**
**प्रनतपालु पालिहि सब काहू। देउ दुहू दिसि ओर निबाहू॥**

हे स्वामी, तुमचा स्वभाव फार चांगला आहे. सर्वांच्या हृदयातील व मज सेवकाची आवड, लालसा आणि राहाणी जाणून हे प्रणतपाल, तुम्ही सर्वांचे पालन कराल व हे देवा, दोन्ही बाजूंना शेवटपर्यंत सांभाळून न्याल. ॥ २ ॥

**अस मोहि सब बिधि भूरि भरोसो। किएँ बिचारु न सोचु खरो सो॥**
**आरति मोर नाथ कर छोहू। दुहुँ मिलि कीन्ह ढीठु हठि मोहू॥**

असा मला पूर्णपणे भरवसा आहे. विचार केल्यावर जरासुद्धा चिंता उरत नाही. माझी लीनता आणि स्वामींचे प्रेम हे दोन्ही असल्यामुळे मला मोठा धीर आला आहे. ॥ ३ ॥

**यह बड़ दोषु दूरि करि स्वामी। तजि सकोच सिखइअ अनुगामी॥**
**भरत बिनय सुनि सबहिं प्रसंसी। खीर नीर बिबरन गति हंसी॥**

हे स्वामी, हा धीटपणाचा दोष बाजूला सारून व संकोच सोडून मज सेवकाला उपदेश द्या.' दूध आणि पाणी वेगवेगळी करण्यामध्ये निपुण हंसीच्या सारखी गती असलेली भरताची विवेकपूर्ण विनंती ऐकून सर्वांनी त्याची प्रशंसा केली. ॥ ४ ॥

**दो०—दीनबंधु सुनि बंधु के बचन दीन छलहीन।**
**देस काल अवसर सरिस बोले रामु प्रबीन॥ ३१४॥**

दीनबंधू आणि परम चतुर असलेल्या बंधू भरताचे हे नम्र व निष्कपट बोलणे ऐकून देश, काल आणि प्रसंगानुसार श्रीराम म्हणाले, ॥ ३१४ ॥

**तात तुम्हारि मोरि परिजन की । चिंता गुरहि नृपहि घर बन की ॥**
**माथे पर गुर मुनि मिथिलेसू । हमहि तुम्हहि सपनेहुँ न कलेसू ॥**

हे बंधो, तुझी, माझी, परिवाराची, घरची व वनाची सर्व चिंता गुरू वसिष्ठ व महाराज जनक यांना आहे. आपल्या शिरावर गुरुजी, मुनी विश्वामित्र आणि मिथिलापती जनक यांचा वरदहस्त आहे, तोवर आम्हांला व तुला स्वप्नातही क्लेश होणार नाहीत. ॥ १ ॥

**मोर तुम्हार परम पुरुषारथु । स्वारथु सुजसु धरमु परमारथु ॥**
**पितु आयसु पालिहिं दुहु भाईं । लोक बेद भल भूप भलाईं ॥**

माझा आणि तुझा पुरुषार्थ, स्वार्थ, सुयश, धर्म व परमार्थ यातच आहे की, आपण दोघा बंधूंनी वडिलांच्या आज्ञेचे पालन करावे. राजांच्या मनाप्रमाणे वागणेच लोक व वेद दोन्ही दृष्टींनी चांगले आहे. ॥ २ ॥

**गुर पितु मातु स्वामि सिख पालें । चलेहुँ कुमग पग परहिं न खालें ॥**
**अस बिचारि सब सोच बिहाई । पालहु अवध अवधि भरि जाई ॥**

गुरू, पिता, माता आणि स्वामी यांच्या उपदेशाचे पालन केल्याने कठीण मार्गावरून चालतानाही पाय खड्ड्यात पडत नाही. असा विचार करून सर्व चिंता सोडून अयोध्येला जाऊन हा समय संपेपर्यंत त्याचे पालन कर. ॥ ३ ॥

**देसु कोसु परिजन परिवारू । गुर पद रजहिं लाग छरुभारू ॥**
**तुम्ह मुनि मातु सचिव सिख मानी । पालेहु पुहुमि प्रजा रजधानी ॥**

देश, खजिना, कुटुंब, परिवार इत्यादी सर्वांची जबाबदारी गुरुजींच्या चरण-रजावर आहे. तू मुनी वसिष्ठ, माता आणि मंत्री यांचा विचार घेऊन त्याप्रमाणे पृथ्वी, प्रजा व राजधानी यांचे फक्त पालन करीत राहा.' ॥ ४ ॥

दो०—**मुखिआ मुखु सो चाहिऐ खान पान कहुँ एक ।**
**पालइ पोषइ सकल अँग तुलसी सहित बिबेक ॥ ३१५ ॥**

तुलसीदास म्हणतात की, (श्रीराम म्हणाले) प्रमुख असणाऱ्याने मुखाप्रमाणे असले पाहिजे. तो खाता-पिताना एकटा असतो, परंतु विवेकाने सर्व अंगांचे पालन पोषण करतो. ॥ ३१५ ॥

**राजधरम सरबसु एतनोई । जिमि मन माहँ मनोरथ गोई ॥**
**बंधु प्रबोधु कीन्ह बहु भाँती । बिनु अधार मन तोषु न साँती ॥**

राजधर्माचे सारसर्वस्वही एवढेच आहे, ज्याप्रमाणे मनामध्ये मनोरथ लपलेले असतात, तसे श्रीरघुनाथांनी भरताला अनेक प्रकारे समजावून सांगितले तरी आधार मिळाल्याविना त्याच्या मनाला संतोष झाला नाही की, शांती मिळाली नाही. ॥ १ ॥

**भरत सील गुर सचिव समाजू । सकुच सनेह बिबस रघुराजू ॥**
**प्रभु करि कृपा पाँवरीं दीन्हीं । सादर भरत सीस धरि लीन्हीं ॥**

इकडे भरताचे प्रेम आणि तिकडे गुरुजन, मंत्री आणि उपस्थित समाज पाहून श्रीरघुनाथ भीड व स्नेह या कात्रीत सापडले. (भरताला प्रेमाने पादुका द्याव्यात, तर गुरू इत्यादींपुढे त्याबद्दल संकोच वाटत होता.) शेवटी भरताच्या प्रेमाला वश होऊन प्रभू रामांनी कृपा करून त्याला खडावा दिल्या आणि भरताने मोठ्या आदराने त्या डोक्यावर धारण केल्या. ॥ २ ॥

**चरनपीठ करुनानिधान के । जनु जुग जामिक प्रजा प्रान के ॥**
**संपुट भरत सनेह रतन के । आखर जुग जनु जीव जतन के ॥**

करुणानिधान श्रीरामचंद्रांच्या दोन पादुका प्रजेच्या रक्षणासाठी जणू दोन पहारेकरी होत्या. भरताच्या प्रेमरूपी रत्नासाठी जणू त्या पेट्या होत्या आणि जीवाच्या साधनासाठी जणू रामनामाची दोन अक्षरे होत्या. ॥ ३ ॥

**कुल कपाट कर कुसल करम के । बिमल नयन सेवा सुधरम के ॥**
**भरत मुदित अवलंब लहे तें । अस सुख जस सिय रामु रहे तें ॥**

त्या रघुकुलाच्या रक्षणासाठी जणू दोन दरवाजे होत्या. श्रेष्ठ कर्म करण्यासाठी दोन हातांप्रमाणे साहाय्यक होत्या, आणि सेवारूपी श्रेष्ठ धर्म सुचविणारे दोन निर्मल नेत्र होत्या. भरत ही वस्तू मिळाल्यामुळे खूप आनंदित होता. त्याला ते सुख मिळाले की, जे श्रीसीतारामांसोबत राहाण्यामुळे मिळाले असते. ॥ ४ ॥

दो०—**मागेउ बिदा प्रनामु करि राम लिए उर लाइ।**
**लोग उचाटे अमरपति कुटिल कुअवसरु पाइ॥ ३१६ ॥**

भरताने प्रणाम करून निरोप मागितला, तेव्हा श्रीरामचंद्रांनी त्याला हृदयाशी कवटाळले. इकडे कपटी इंद्राने वाईट संधी शोधून लोकांच्या मनात द्विधा मन:स्थिती उत्पन्न केली. ॥ ३१६ ॥

**सो कुचालि सब कहँ भइ नीकी । अवधि आस सम जीवनि जी की ॥**
**नतरु लखन सिय राम बियोगा । हहरि मरत सब लोग कुरोगा ॥**

त्याचे ते दुर्वर्तन सर्वांच्या हिताचे झाले. चौदा वर्षांचा अवधी पूर्ण होण्याच्या आशेसारखेच ते त्यांच्या जीवनासाठी संजीवनी झाले. नाही तर लक्ष्मण, सीता व श्रीरामांच्या वियोगरूपी दुर्धर रोगाने सर्व लोक 'हाय-हाय' करून मेले असते. ॥ १ ॥

**रामकृपाँ अवरेब सुधारी । बिबुध धारि भइ गुनद गोहारी ॥**
**भेंटत भुज भरि भाइ भरत सो । राम प्रेम रसु कहि न परत सो ॥**

श्रीरामांच्या कृपेने सर्व गुंता सुटला. देवांची सेना लुटण्यासाठी आली होती, ती हितकारक

व रक्षक बनली. श्रीरामांनी भरताला दोन्ही हातांनी कवटाळले. श्रीरामांच्या प्रेमाचा तो आनंद अवर्णनीय होता. ॥ २ ॥

**तन मन बचन उमग अनुरागा । धीर धुरंधर धीरजु त्यागा ॥**
**बारिज लोचन मोचत बारी । देखि दसा सुर सभा दुखारी ॥**

कायावाचामनात प्रेम उचंबळून आले. धैर्याची धुरा धारण करणाऱ्या श्रीरघुनाथांचासुद्धा धीर सुटला. त्यांच्या कमलसदृश नेत्रांतून प्रेमाश्रू वाहू लागले. त्यांची ही दशा पाहून देव-समाजही दुःखी झाला. ॥ ३ ॥

**मुनिगन गुर धुर धीर जनक से । ग्यान अनल मन कसें कनक से ॥**
**जे बिरंचि निरलेप उपाए । पदुम पत्र जिमि जग जल जाए ॥**

ज्यांनी आपली मने ज्ञानरूपी अग्नीमध्ये सोन्याप्रमाणे शुद्ध करून घेतली होती, ते मुनिगण, गुरू वसिष्ठ, राजा जनक यांच्या सारखे धैर्याचे मेरू, ज्यांना ब्रह्मदेवाने अलिप्त बनविले होते आणि जे जगतरूपी जलामध्ये कमल-पत्राप्रमाणे अनासक्त राहात होते. ॥ ४ ॥

**दो०—तेउ बिलोकि रघुबर भरत प्रीति अनूप अपार।**
**भए मगन मन तन बचन सहित बिराग बिचार॥ ३१७॥**

तेसुद्धा राम व भरत यांचे निरुपम अपार प्रेम पाहून वैराग्य व विवेक असतानाही कायावाचामनाने त्या प्रेमात बुडून गेले. ॥ ३१७॥

**जहाँ जनक गुर गति मति भोरी । प्राकृत प्रीति कहत बड़ि खोरी ॥**
**बरनत रघुबर भरत बियोगू । सुनि कठोर कबि जानिहि लोगू ॥**

जेथे जनक व गुरू वसिष्ठ यांच्या बुद्धीची गती कुंठित झाली, त्या दिव्य प्रेमाला लौकिक प्रेम म्हणणे चूक आहे. श्रीरामचंद्र व भरत यांच्या वियोगाचे वर्णन केलेले ऐकून लोक कवीला कठोर हृदयाचा म्हणतील. ॥ १ ॥

**सो सकोच रसु अकथ सुबानी । समउ सनेहु सुमिरि सकुचानी ॥**
**भेंटि भरतु रघुबर समुझाए । पुनि रिपुदवनु हरषि हियँ लाए ॥**

तो त्यांच्या भेटीतील प्रेम-रस अवर्णनीय आहे. म्हणून कवीची सुंदर वाणी त्या प्रसंगी त्या प्रेमाचे स्मरण करून संकोचली. भरताला भेटून झाल्यावर श्रीरघुनाथांनी त्याला समजावले. नंतर आनंदित होऊन त्यांनी शत्रुघ्नालाही आलिंगन दिले. ॥ २ ॥

**सेवक सचिव भरत रुख पाई । निज निज काज लगे सब जाई ॥**
**सुनि दारुन दुखु दुहूँ समाजा । लगे चलन के साजन साजा ॥**

सेवक व मंत्री, भरताचा इशारा मिळताच आपापल्या कामाला लागले. हे ऐकून दोन्ही समाजांमध्ये मोठे दुःख पसरले व ते निघण्याच्या तयारीला लागले. ॥ ३ ॥

**प्रभु पद पदुम बंदि दोउ भाई । चले सीस धरि राम रजाई ॥**
**मुनि तापस बनदेव निहोरी । सब सनमानि बहोरि बहोरी ॥**

प्रभूंच्या चरण-कमलांना वंदन करून व श्रीरामांची आज्ञा शिरसावन्द्य मानून भरत-शत्रुघ्न हे दोन्ही बंधू निघाले. त्यांनी मुनी, तपस्वी आणि वनदेवता या सर्वांना वारंवार आदराने विनंती केली. ॥ ४ ॥

दो०—**लखनहि भेंटि प्रनामु करि सिर धरि सिय पद धूरि।**
**चले सप्रेम असीस सुनि सकल सुमंगल मूरि॥ ३१८॥**

नंतर लक्ष्मणाला भेटून दोघांनी प्रणाम केला व सीतेच्या चरणांची धूळ मस्तकी धारण केली. सर्व मांगल्याचे मूळ असलेले तिचे आशीर्वाद कानात साठवून ते प्रेमाने निघाले. ॥ ३१८ ॥

**सानुज राम नृपहि सिर नाई । कीन्हि बहुत बिधि बिनय बड़ाई ॥**
**देव दया बस बड़ दुखु पायउ । सहित समाज काननहिं आयउ ॥**

लक्ष्मणासह श्रीरामांनी राजा जनकांना नतमस्तक होऊन पुष्कळ विनंती केली व त्यांना मोठेपणा देत म्हटले, 'हे देव, दयेमुळे तुम्ही फार कष्ट घेतले. तुम्ही परिवारासह वनात आलात. ॥ १ ॥

**पुर पगु धारिअ देइ असीसा। कीन्ह धीर धरि गवनु महीसा ॥**
**मुनि महिदेव साधु सनमाने । बिदा किए हरि हर सम जाने ॥**

आता आशीर्वाद देऊन नगराला प्रयाण करा.' हे ऐकल्यावर राजा जनकांनी धीर धरून प्रस्थान केले. नंतर श्रीरामचंद्रांनी मुनी, ब्राह्मण आणि साधूंना विष्णू व शिवासमान मानून सन्मानाने निरोप दिला. ॥ २ ॥

**सासु समीप गए दोउ भाई । फिरे बंदि पग आसिष पाई ॥**
**कौसिक बामदेव जाबाली । पुरजन परिजन सचिव सुचाली ॥**

नंतर श्रीराम-लक्ष्मण हे दोघे सासू सुनयना हिच्याजवळ गेले आणि तिच्या चरणांना वंदन करून आशीर्वाद घेऊन परतले. त्यानंतर विश्वामित्र, वामदेव, जाबाली, शुभ आचरणाचे कुटुंबीय, नगर-निवासी आणि मंत्री, ॥ ३ ॥

**जथा जोगु करि बिनय प्रनामा । बिदा किए सब सानुज रामा ॥**
**नारि पुरुष लघु मध्य बड़ेरे । सब सनमानि कृपानिधि फेरे ॥**

या सर्वांना लक्ष्मणासह श्रीरामांनी यथायोग्य विनयाने प्रणाम करून निरोप दिला. कृपानिधान श्रीरामचंद्रांनी लहान, मध्यम व मोठे या सर्व श्रेणींच्या स्त्री-पुरुषांना सन्मानपूर्वक निरोप दिला. ॥ ४ ॥

दो०—**भरत मातु पद बंदि प्रभु सुचि सनेहँ मिलि भेंटि।**
**बिदा कीन्ह सजि पालकी सकुच सोच सब मेटि॥ ३१९॥**

भरताची आई कैकेयी हिच्या चरणांना वंदन करून प्रभू श्रीरामांनी निष्कपट प्रेमाने तिला भेटून तिचा संकोच आणि काळजी दूर केली. नंतर तिला सजवलेल्या पालखीत बसवून निरोप दिला.॥ ३१९॥

**परिजन मातु पितहि मिलि सीता। फिरी प्रानप्रिय प्रेम पुनीता॥**
**करि प्रनामु भेंटीं सब सासू। प्रीति कहत कबि हियँ न हुलासू॥**

प्राणप्रिय पती श्रीरामांच्याबरोबर पवित्र प्रेम करणारी सीता माहेरच्या कुटुंबियांना तसेच माता-पित्यांना भेटून परत आली. नंतर प्रणाम करून सर्व सासूंना गळ्यात गळा घालून भेटली. त्यांच्या प्रेमाचे वर्णन करणे कवीला जमणारे नाही.॥ १॥

**सुनि सिख अभिमत आसिष पाई। रही सीय दुहु प्रीति समाई॥**
**रघुपति पटु पालकीं मगाईं। करि प्रबोधु सब मातु चढ़ाईं॥**

त्यांचा उपदेश ऐकून आणि मनाजोगा आशीर्वाद मिळवून सीता सासूंच्या व माता-पित्यांच्या प्रेमामध्ये बराच वेळ मग्न होऊन राहिली. श्रीरघुनाथांनी सुंदर पालख्या मागवून सर्व मातांचे सांत्वन करून त्यांना त्यांत बसविले.॥ २॥

**बार बार हिलि मिलि दुहु भाईं। सम सनेहँ जननीं पहुँचाईं॥**
**साजि बाजि गज बाहन नाना। भरत भूप दल कीन्ह पयाना॥**

दोन्ही भावांनी मातांना सारख्याच प्रेमाने वारंवार भेटून पोहोचविले. भरत आणि राजा जनक यांच्या सैन्यांनी घोडे, हत्ती आणि इतर वाहने सज्ज करून प्रस्थान केले.॥ ३॥

**हृदयँ रामु सिय लखन समेता। चले जाहिं सब लोग अचेता॥**
**बसह बाजि गज पसु हियँ हारें। चले जाहिं परबस मन मारें॥**

सीता, राम व लक्ष्मण यांना हृदयात बसवून सर्व लोक देहभान विसरून निघाले होते. बैल, घोडे, हत्ती इत्यादी पशू मनातून खचून, परवश होऊन व मन मारून चालले होते.॥ ४॥

दो०—**गुर गुरतिय पद बंदि प्रभु सीता लखन समेत।**
**फिरे हरष बिसमय सहित आए परन निकेत॥ ३२०॥**

गुरू वसिष्ठ आणि गुरुपत्नी अरुंधती यांच्या चरणांना वंदन करून सीता, लक्ष्मण व प्रभू श्रीराम आनंदाने व विषादाने परत पर्णकुटीत आले.॥ ३२०॥

**बिदा कीन्ह सनमानि निषादू। चलेउ हृदयँ बड़ बिरह बिषादू॥**
**कोल किरात भिल्ल बनचारी। फेरे फिरे जोहारि जोहारी॥**

नंतर निषादराजाचा सन्मान करून त्याला निरोप दिला. तो निघाला खरा, परंतु त्याच्या मनात विरहाचा फार मोठा विषाद भरला होता. मग श्रीरामांनी कोल, किरात, भिल्ल इत्यादी वनवासी लोकांना परत पाठविले. ते सर्व जोहार करीत करीत परतले.॥ १ ॥

**प्रभु सिय लखन बैठि बट छाहीं । प्रिय परिजन बियोग बिलखाहीं ॥**
**भरत सनेह सुभाउ सुबानी । प्रिया अनुज सन कहत बखानी ॥**

प्रभू श्रीराम, सीता व लक्ष्मण वटवृक्षाच्या सावलीमध्ये बसले. ते प्रियजन व परिवाराच्या वियोगाने दुःखी झाले. भरताचा स्नेह, स्वभाव व सुंदर वाणी यांची वाखाणणी करून श्रीराम प्रिय पत्नी सीता व लक्ष्मण यांना सांगू लागले. ॥ २ ॥

**प्रीति प्रतीति बचन मन करनी । श्रीमुख राम प्रेम बस बरनी ॥**
**तेहि अवसर खग मृग जल मीना । चित्रकूट चर अचर मलीना ॥**

श्रीरामचंद्रांनी प्रेमाधीन होऊन भरताच्या कायावाचामनातील प्रेम आणि विश्वास यांचे आपल्या श्रीमुखाने वर्णन केले. त्यावेळी पशुपक्षी, पाण्यातील मासे आणि चित्रकूटावरील सर्व चराचर जीव उदास झाले. ॥ ३ ॥

**बिबुध बिलोकि दसा रघुबर की । बरषि सुमन कहि गति घर घर की ॥**
**प्रभु प्रनामु करि दीन्ह भरोसो । चले मुदित मन डर न खरो सो ॥**

श्रीरघुनाथांची ही दशा पाहून देवांनी त्यांच्यावर फुले उधळली आणि आपल्या घरचे दुःख सांगितले. प्रभू श्रीरामंद्रांनी त्यांना प्रणाम करून आश्वासन दिले. मग ते प्रसन्न होऊन निघाले. आता त्यांच्या मनात जरासुद्धा भय उरले नाही. ॥ ४ ॥

दो०—**सानुज सीय समेत प्रभु राजत परन कुटीर।**
**भगति ग्यानु बैराग्य जनु सोहत धरें सरीर॥ ३२१ ॥**

लक्ष्मण व सीतेसह प्रभू रामचंद्र पर्णकुटीमध्ये असे शोभून दिसत होते की, जणू वैराग्य, भक्ती आणि ज्ञान हेच शरीर धारण करून तेथे राहात होते. ॥ ३२१ ॥

**मुनि महिसुर गुर भरत भुआलू । राम बिरहँ सबु साजु बिहालू ॥**
**प्रभु गुन ग्राम गनत मन माहीं । सब चुपचाप चले मग जाहीं ॥**

मुनी, ब्राह्मण, गुरू वसिष्ठ, भरत आणि राजा जनक हा सारा समाज श्रीरामचंद्रांच्या विरहाने विव्हळ झाला होता. प्रभूंच्या गुणसमूहांचे मनात स्मरण करीत सर्व लोक वाटेने मौन होऊन चालले होते. ॥ १ ॥

**जमुना उतरि पार सबु भयऊ । सो बासरु बिनु भोजन गयऊ ॥**
**उतरि देवसरि दूसर बासू । रामसखाँ सब कीन्ह सुपासू ॥**

पहिल्या दिवशी सर्व लोक यमुना ओलांडून पलीकडे गेले. तो दिवस भोजनाविना गेला. दुसरा मुक्काम गंगा ओलांडून पलीकडे शृंगवेरपुरास झाला. तेथे रामसखा निषादराजाने सर्व व्यवस्था चोख ठेवली होती. ॥

**सई उतरि गोमतीं नहाए । चौथें दिवस अवधपुर आए॥**
**जनकु रहे पुर बासर चारी । राज काज सब साज सँभारी॥**

नंतर त्यांनी सई पार करून गोमती नदीत स्नान केले आणि चौथ्या दिवशी सर्वजण अयोध्येला पोहोचले. जनक राजे चार दिवस अयोध्येत राहिले. तेथील राज्यकारभार, सामान-सुमान सांभाळून, ॥ ३ ॥

**सौंपि सचिव गुर भरतहि राजू । तेरहुति चले साजि सबु साजू॥**
**नगर नारि नर गुर सिख मानी । बसे सुखेन राम रजधानी॥**

तसेच मंत्री, गुरुजी आणि भरत यांच्यावर राज्य सोपवून, सर्व संपत्तीची व्यवस्था लावून मिथिलेला निघाले. अयोध्यानगरीतील स्त्री-पुरुष गुरुजींचा उपदेश मानून श्रीरामांची राजधानी अयोध्येमध्ये सुखाने राहू लागले. ॥ ४ ॥

**दो०—राम दरस लगि लोग सब करत नेम उपबास।**
**तजि तजि भूषन भोग सुख जिअत अवधि कीं आस॥ ३२२॥**

सर्व लोक श्रीरामचंद्रांच्या पुनर्दर्शनासाठी नियम व उपास करू लागले. ते भूषणे व भोग-सुख यांचा त्याग करून अवधी पूर्ण होऊन श्रीराम येण्याच्या आशेवर जगत आहेत. ॥ ३२२ ॥

**सचिव सुसेवक भरत प्रबोधे । निज निज काज पाइ सिख ओधे॥**
**पुनि सिख दीन्हि बोलि लघु भाई । सौंपी सकल मातु सेवकाई॥**

भरताने मंत्र्यांना व विश्वासू सेवकांना समजावून कार्य-प्रवण केले. तेही आज्ञा मिळाल्यावर आपापल्या कामाला लागले. भरताने शत्रुघ्नाला बोलावून उपदेश दिला आणि सर्व मातांची सेवा त्याच्यावर सोपविली. ॥ १ ॥

**भूसुर बोलि भरत कर जोरे । करि प्रनाम बय बिनय निहोरे॥**
**ऊँच नीच कारजु भल पोचू । आयसु देब न करब सँकोचू॥**

भरताने ब्राह्मणांना बोलावून हात जोडून प्रणाम केला. त्यांच्या मानाप्रमाणे विनयाने विनंती केली की, 'तुम्ही लहान-मोठे, चांगले-सामान्य जे काही काम असेल, त्यासाठी आज्ञा करा. संकोच बाळगू नका.' ॥

**परिजन पुरजन प्रजा बोलाए । समाधानु करि सुबस बसाए॥**
**सानुज गे गुर गेहँ बहोरी । करि दंडवत कहत कर जोरी॥**

भरताने नंतर परिवारातील लोकांना, नागरिकांना आणि इतर प्रजेला बोलावून, त्यांचे समाधान करून त्यांना सुखाने राहण्यास सांगितले. नंतर तो शत्रुघ्नाबरोबर गुरुजींच्या घरी गेला आणि दंडवत घालून हात जोडून म्हणाला. ॥ ३ ॥

**आयसु होइ त रहौं सनेमा । बोले मुनि तन पुलकि सपेमा॥**
**समुझब कहब करब तुम्ह जोई । धरम सारु जग होइहि सोई॥**

आपली आज्ञा घेऊन मी नियमपूर्वक राहावे असे म्हणतो. मुनी वसिष्ठ पुलकित होऊन प्रेमाने म्हणाले, 'हे भरता, तू जे काही समजतोस, करतोस व म्हणतोस, तेच या जगात धर्माचे सार असेल.' ॥ ४ ॥

**दो०—सुनि सिख पाइ असीस बड़ि गनक बोलि दिनु साधि।**
**सिंघासन प्रभु पादुका बैठारे निरुपाधि॥ ३२३॥**

हे ऐकून, आज्ञा घेऊन व मोठा आशीर्वाद मिळवून भरताने ज्योतिष्यांना बोलाविले आणि चांगला मुहूर्त पाहून प्रभूंच्या चरणपादुका निर्विघ्नपणे सिंहासनावर विराजमान केल्या. ॥ ३२३ ॥

**राम मातु गुर पद सिरु नाई। प्रभु पद पीठ रजायसु पाई॥**
**नंदिगावँ करि परन कुटीरा। कीन्ह निवासु धरम धुर धीरा॥**

नंतर श्रीरामांची माता कौसल्या आणि गुरुजींच्या चरणांना नतमस्तक होऊन व प्रभूंच्या चरणपादुकांची आज्ञा घेऊन धर्माची धुरा धारण करण्यामध्ये धैर्यशील असलेल्या भरताने नंदीग्रामात पर्णकुटी बनविली आणि तेथे तो राहू लागला. ॥ १ ॥

**जटाजूट सिर मुनिपट धारी। महि खनि कुस साँथरी सँवारी॥**
**असन बसन बासन ब्रत नेमा। करत कठिन रिषिधरम सप्रेमा॥**

शिरावर जटाजूट आणि शरीरावर वल्कले धारण करून त्याने पृथ्वी खोदून तिच्यामध्ये कुशांचे आसन घातले. भोजन, वस्त्रे, भांडी, व्रते, नियम या गोष्टींमध्ये तो ऋषींच्या कठीण धर्माचे श्रद्धापूर्वक आचरण करू लागला. ॥ २ ॥

**भूषन बसन भोग सुख भूरी। मन तन बचन तजे तिन तूरी॥**
**अवध राजु सुर राजु सिहाई। दसरथ धनु सुनि धनदु लजाई॥**

दागिने-कपडे आणि इतर अनेक प्रकारचे सुखभोग यांचा त्याने कायावाचामनाने प्रतिज्ञापूर्वक त्याग केला. ज्या अयोध्येच्या राज्याचा इंद्रालाही हेवा वाटे आणि जेथील राजा दशरथ यांच्या संपत्तीबद्दल ऐकून कुबेरही ओशाळून जात असे, ॥ ३ ॥

**तेहिं पुर बसत भरत बिनु रागा। चंचरीक जिमि चंपक बागा॥**
**रमा बिलासु राम अनुरागी। तजत बमन जिमि जन बड़भागी॥**

त्याच अयोध्यापुरीमध्ये भरत असा अनासक्त बनून निवास करीत होता की, ज्याप्रमाणे सोनचाफ्याच्या बागेत भ्रमर चाफ्याजवळ फिरकत नाही. श्रीरामचंद्रांचे प्रेमी मोठे भाग्यवान पुरुष असतात. ते लक्ष्मीच्या विलासाचा वमनाप्रमाणे त्याग करतात. ॥ ४ ॥

**दो०—राम पेम भाजन भरतु बड़े न एहिं करतूति।**
**चातक हंस सराहिअत टेंक बिबेक बिभूति॥ ३२४॥**

मग भरत हा तर प्रत्यक्ष श्रीरामचंद्रांचा आवडता होता. तो या भोगैश्वर्याच्या त्यागाच्या बळावर मोठा झाला नव्हता. (तर श्रीराम येईपर्यंत त्यागाने राहाण्याचा निग्रह व धर्माधर्मविवेक या दोन

गुणांमुळे भरत श्रेष्ठ ठरला.) पृथ्वीवरील पाणी न पिण्याचा हट्ट धरून बसलेल्या चातकाची आणि नीर-क्षीर-विवेकाची शक्ती असलेल्या हंसाचीच प्रशंसा होत असते. ॥ ३२४ ॥

**देह दिनहुँ दिन दूबरि होई । घटइ तेजु बलु मुखछबि सोई ॥**
**नित नव राम प्रेम पनु पीना । बढ़त धरम दलु मनु न मलीना ॥**

भरताचे शरीर तर दिवसेंदिवस दुबळे होत होते. पण बळ व तेज वाढत होते. मुखावरील कांतीही वाढत होती. रामप्रेमाचा निश्चय नित्य नवीन व पुष्ट होत होता. धर्मनिष्ठा वाढत होती, त्यामुळे मनात श्रीरामभक्ती दिवसेंदिवस वाढत होती. ॥ १ ॥

**जिमि जलु निघटत सरद प्रकासे । बिलसत बेतस बनज बिकासे ॥**
**सम दम संजम नियम उपासा । नखत भरत हिय बिमल अकासा ॥**

ज्याप्रमाणे शरद्ऋतूच्या येण्याने पाणी स्वच्छ होते, आकाशही स्वच्छ होते. आणि कमळे विकसित होतात. तसे शम, दम, संयम, नियम, उपवास इत्यादी भरताच्या निर्मळ हृदयरूपी आकाशातील तारागण प्रकाशित होत होते. ॥ २ ॥

**ध्रुव बिस्वासु अवधि राका सी । स्वामि सुरति सुरबीथि बिकासी ॥**
**राम पेम बिधु अचल अदोषा । सहित समाज सोह नित चोखा ॥**

त्या आकाशातील ध्रुवतारा विश्वासच होता. चौदा वर्षांच्या अवधीचे ध्यान हा पौर्णिमेचा चंद्र होता. स्वामी श्रीरामचंद्र यांची स्मृती ही आकाशगंगेप्रमाणे प्रकाशित होती. राम-प्रेम हाच नित्य राहणारा अढळ व कलंकरहित चंद्र होता. तो आपल्या समाजरूपी नक्षत्रांसह शोभत होता. ॥ ३ ॥

**भरत रहनि समुझनि करतूती । भगति बिरति गुन बिमल बिभूती ॥**
**बरनत सकल सुकबि सकुचाहीं । सेस गनेस गिरा गमु नाहीं ॥**

भरताची राहणी, समजूत, करणी, भक्ती, वैराग्य, निर्मळ गुण आणि ऐश्वर्य यांचे वर्णन करण्यास सर्व मोठमोठ्या कवींना संकोच वाटतो. कारण तेथे स्वत: शेष, गणेश व सरस्वतीसुद्धा पोहोचू शकत नाहीत. ॥ ४ ॥

**दो०—नित पूजत प्रभु पाँवरी प्रीति न हृदयँ समाति।**
**मागि मागि आयसु करत राज काज बहु भाँति॥ ३२५ ॥**

भरत प्रभूंच्या पादुकांची नित्य पूजा करी. त्याच्या हृदयात प्रेम मावत नव्हते. पादुकांची आज्ञा मागूनच तो सर्व प्रकारचा राज्यकारभार करीत असे. ॥ ३२५ ॥

**पुलक गात हियँ सिय रघुबीरू । जीह नामु जप लोचन नीरू ।**
**लखन राम सिय कानन बसहीं । भरतु भवन बसि तप तनु कसहीं ॥**

त्याचे शरीर पुलकित असे. कारण त्याच्या हृदयात श्रीसीताराम होते. जीभ राम-नाम जपत असे. नेत्रांमध्ये प्रेमाश्रू भरलले असत. लक्ष्मण, श्रीराम आणि सीता हे तर वनात निवास करतात, परंतु भरत घरात राहूनच तपाद्वारे शरीर कृश करीत होता. ॥ १ ॥

**दोउ दिसि समुझि कहत सबु लोगू । सब बिधि भरत सराहन जोगू ॥**
**सुनि ब्रत नेम साधु सकुचाहीं । देखि दसा मुनिराज लजाहीं ॥**

दोन्हीकडची स्थिती समजून आल्यावर सर्व लोक म्हणत की, 'भरत सर्वप्रकारे प्रशंसनीय आहे. त्याचे व्रत आणि नियम ऐकून साधु-संतांनाही संकोच वाटे आणि त्याची प्रेमनिष्ठा पाहून मुनिराजांनाही लज्जा वाटे. ॥ २ ॥

**परम पुनीत भरत आचरनू । मधुर मंजु मुद मंगल करनू ॥**
**हरन कठिन कलि कलुष कलेसू । महामोह निसि दलन दिनेसू ॥**

भरताचे परम पवित्र चरित्र हे मधुर, सुंदर, आनंददायक व मांगल्य करणारे आहे. कलियुगातील पापे व कठीण क्लेश यांचे हरण करणारे आहे. महामोहरूपी रात्रीचा नाश करणाऱ्या सूर्यासारखे आहे. ॥ ३ ॥

**पाप पुंज कुंजर मृगराजू । समन सकल संताप समाजू ॥**
**जन रंजन भंजन भव भारू । राम सनेह सुधाकर सारू ॥**

हे चरित्र पापसमूहरूपी हत्तींसाठी सिंह आहे. सर्व तापांच्या समुदायाचा नाश करणारे आहे. भक्तांना आनंद देणारे आहे आणि सांसारिक दु:खांचा भंग करणारे व श्रीरामप्रेमरूपी चंद्रम्यातून स्रवणारे अमृत आहे. ॥ ४ ॥

छं०—**सिय राम प्रेम पियूष पूरन होत जनमु न भरत को ।**
**मुनि मन अगम जम नियम सम दम बिषम ब्रत आचरत को ॥**
**दुख दाह दारिद दंभ दूषन सुजस मिस अपहरत को ।**
**कलिकाल तुलसी से सठन्हि हठि राम सनमुख करत को ॥**

श्रीसीतारामांच्या प्रेमरूपी अमृताने परिपूर्ण असलेल्या भरताचा जन्म जर झाला नसता तर मुनींच्या मनालाही अगम्य असलेले यम, नियम, शम, दम इत्यादी कठीण व्रताचे आचरण कुणी केले असते? दु:ख, संताप, दरिद्रता, दंभ इत्यादी दोषांचे आपल्या उत्तम कीर्तीच्या निमित्ताने कोणी हरण केले असते? आणि कलिकाळात, तुलसीदासासारख्या अभक्तांना बळेच श्रीरामांच्याकडे वळविले असते?

सो०—**भरत चरित करि नेमु तुलसी जो सादर सुनहिं ।**
**सीय राम पद पेमु अवसि होइ भव रस बिरति ॥ ३२६ ॥**

तुलसीदास म्हणतात, जे कोणी भरताचे चरित्र नियमाने आदरपूर्वक ऐकतील त्यांना निश्चितपणे श्रीसीतारामांच्या चरणी प्रेम उत्पन्न होईल आणि सांसारिक विषयरसाविषयी वैराग्य वाटू लागेल. ॥ ३२६ ॥

## मासपारायण, एकविसावा विश्राम

**इति श्रीमद्रामचरितमानसे सकलकलिकलुषविध्वंसने द्वितीयः सोपानः समाप्तः ।**

*कलियुगातील संपूर्ण पापांचा विध्वंस करणाऱ्या श्रीरामचरितमानसाचा हा दुसरा सोपान समाप्त झाला.*

## ( अयोध्याकाण्ड समाप्त )



श्रीरामाकडून ऋषींना अभयप्रदान

॥ श्रीगणेशाय नमः ॥

॥ श्रीजानकीवल्लभो विजयते ॥

# श्रीरामचरितमानस

## तृतीय सोपान

## अरण्यकाण्ड

श्लोक

**मूलं धर्मतरोर्विवेकजलधेः पूर्णेन्दुमानन्ददं**
**वैराग्याम्बुजभास्करं ह्यघघनध्वान्तापहं तापहम्।**
**मोहाम्भोधरपूगपाटनविधौ स्वःसम्भवं शङ्करं**
**वन्दे ब्रह्मकुलं कलङ्कशमनं श्रीरामभूपप्रियम्॥ १ ॥**

धर्मरूपी वृक्षाचे मूळ, विवेकरूपी समुद्राला आनंदित करणारे पूर्णचंद्र, वैराग्यरूपी कमळाला विकसित करणारे सूर्य, पापरूपी घोर अंधकार समूळ नष्ट करणारे, तिन्ही ताप हरण करणारे, मोहरूपी मेघांच्या समूहाला छिन्न-भिन्न करण्याच्या क्रियेमध्ये आकाशात उत्पन्न होणाऱ्या वाऱ्यासारखे, ब्रह्मदेवांचे आत्मज, कलंकनाशक आणि महाराज श्रीरामचंद्रांना प्रिय अशा श्रीशंकरांना मी वंदन करतो. ॥ १ ॥

**सान्द्रानन्दपयोदसौभगतनुं पीताम्बरं सुन्दरं**
**पाणौ बाणशरासनं कटिलसत्तूणीरभारं वरम्।**
**राजीवायतलोचनं धृतजटाजूटेन संशोभितं**
**सीतालक्ष्मणसंयुतं पथिगतं रामाभिरामं भजे॥ २ ॥**

ज्यांचे शरीर सजल मेघांसारखे सुंदर, श्यामल आणि आनंदघन आहे, ज्यांनी सुंदर वल्कलाचे पीतांबर धारण केले आहे, ज्यांच्या हातांमध्ये धनुष्य-बाण आहेत, ज्यांच्या कमरेला उत्तम भाते शोभून

दिसत आहेत, ज्यांचे कमलासमान विशाल नेत्र आहेत आणि ज्यांनी मस्तकावर जटाजूट धारण केला आहे, त्या अत्यंत शोभायमान श्रीसीता व लक्ष्मण यांच्यासह मार्गाने निघालेल्या आनंद देणाऱ्या श्रीरामचंद्रांना मी भजतो. ॥ २ ॥

**सो०—उमा राम गुन गूढ़ पंडित मुनि पावहिं बिरति।**
**पावहिं मोह बिमूढ़ जे हरि बिमुख न धर्म रति॥**

श्रीशंकर म्हणतात, 'हे पार्वती, श्रीरामांचे गुण गूढ आहेत. पंडित व मुनी ते जाणून वैराग्य प्राप्त करतात. परंतु जे लोक भगवंतांशी विन्मुख असतात आणि ज्यांना धर्माबद्दल प्रेम नाही, ते महामूर्ख लोक त्यांची लीला ऐकून त्यावर विश्वास ठेवत नाहीत. ॥ १ ॥

**पुर नर भरत प्रीति मैं गाई। मति अनुरूप अनूप सुहाई॥**
**अब प्रभु चरित सुनहु अति पावन। करत जे बन सुर नर मुनि भावन॥**

अयोध्या व मिथिलावासींच्या तसेच भरताच्या अनुपम आणि सुंदर प्रेमाचे गायन मी आपल्या बुद्धीप्रमाणे केले. आता देव, मनुष्य आणि मुनी यांच्या मनाला आवडणारे प्रभू श्रीरामचंद्रांचे वनात घडलेले अत्यंत पवित्र चरित्र ऐक. ॥ १ ॥

**एक बार चुनि कुसुम सुहाए। निज कर भूषन राम बनाए॥**
**सीतहि पहिराए प्रभु सादर। बैठे फटिक सिला पर सुंदर॥**

एकदा सुंदर फुले वेचून श्रीरामांनी आपल्या हातांनी तऱ्हेतऱ्हेचे अलंकार बनविले आणि सुंदर स्फटिक शिळेवर बसलेल्या प्रभूंनी मोठ्या प्रेमाने ते सीतेला घातले. ॥ २ ॥

**सुरपति सुत धरि बायस बेषा। सठ चाहत रघुपति बल देखा॥**
**जिमि पिपीलिका सागर थाहा। महा मंदमति पावन चाहा॥**

देवराज इंद्राचा नीच मूर्ख पुत्र जयंत हा कावळ्याचे रूप घेऊन श्रीरघुनाथांचे सामर्थ्य पाहू इच्छित होता, ज्याप्रमाणे निर्बुद्ध मुंगी समुद्राचा थांग पाहू इच्छिते. ॥ ३ ॥

**सीता चरन चोंच हति भागा। मूढ़ मंदमति कारन कागा॥**
**चला रुधिर रघुनायक जाना। सींक धनुष सायक संधाना॥**

तो मूर्ख व मंदबुद्धीमुळे भगवंतांच्या बळाची परीक्षा घेण्यासाठी बनलेला कावळा सीतेच्या चरणांवर चोच मारून पळाला. जेव्हा रक्त वाहू लागले, तेव्हा श्रीरामांनी ते पाहिले व धनुष्यावर बोरूचा बाण लावून सोडला. ॥ ४ ॥

**दो०—अति कृपाल रघुनायक सदा दीन पर नेह।**
**ता सन आइ कीन्ह छलु मूरख अवगुन गेह॥ १॥**

श्रीरघुनाथ हे अत्यंत कृपाळू आहेत आणि त्यांचे दीनांवर नेहमी प्रेम असते, त्यांच्याशीही अवगुणांचे घर असलेल्या त्या मूर्ख जयंताने कपट केले. ॥ १ ॥

**प्रेरित मंत्र ब्रह्मसर धावा। चला भाजि बायस भय पावा॥**
**धरि निज रूप गयउ पितु पाहीं। राम बिमुख राखा तेहि नाहीं॥**

मंत्राने प्रेरित असलेला तो ब्रह्मबाण सुसाट निघाला. कावळा घाबरून पळू लागला. तो आपले खरे रूप घेऊन इंद्राकडे गेला, परंतु श्रीरामांचा तो विरोधी असल्याचे पाहून इंद्राने त्याला जवळ केले नाही.॥ १॥

**भा निरास उपजी मन त्रासा। जथा चक्र भय रिषि दुर्बासा॥**
**ब्रह्मधाम सिवपुर सब लोका। फिरा श्रमित ब्याकुल भय सोका॥**

तेव्हा तो निराश झाला. ज्याप्रमाणे दुर्वास ऋषीला चक्र पाठीमागे लागल्यामुळे भीती वाटली, त्याप्रमाणे जयंताच्या मनाला भय वाटू लागले. तो ब्रह्मलोक, शिवलोक इत्यादी सर्व लोकांमध्ये थकून व भय-शोकाने व्याकूळ होऊन पळत निघाला.॥ २॥

**काहूँ बैठन कहा न ओही। राखि को सकइ राम कर द्रोही॥**
**मातु मृत्यु पितु समन समाना। सुधा होइ बिष सुनु हरिजाना॥**

परंतु कुणी त्याला बसायलाही सांगितले नाही. श्रीरामांच्या शत्रूला कोण जवळ करणार? काकभुशुंडी म्हणाले, 'हे गरुडा, अशा व्यक्तीला माता ही मृत्यूसारखी, पिता हा यमासारखा आणि अमृत हे विषासारखे बनते.॥ ३॥

**मित्र करइ सत रिपु कै करनी। ता कहँ बिबुधनदी बैतरनी॥**
**सब जगु ताहि अनलहु ते ताता। जो रघुबीर बिमुख सुनु भ्राता॥**

मित्र त्याच्याशी शेकडो शत्रूंप्रमाणे वागू लागतो. देवनदी गंगा ही त्याच्यासाठी यमपुरीची वैतरणी नदी बनते. हे बंधू, ऐक. जो श्रीरघुनाथांशी विन्मुख होतो, त्याला संपूर्ण जग हे अग्नीपेक्षाही अधिक होरपळवणारे होते.'॥ ४॥

**नारद देखा बिकल जयंता। लागि दया कोमल चित संता॥**
**पठवा तुरत राम पहिं ताही। कहेसि पुकारि प्रनत हित पाही॥**

नारदांनी जेव्हा व्याकूळ जयंताला पाहिले, तेव्हा त्यांना दया आली. कारण संतांचे मन मोठे कोमल असते. त्यांनी त्याची समजूत घालून त्याला तत्काळ श्रीरामांच्याकडे पाठविले. त्यांनी त्याला सांगितले की, तू श्रीरामांना जाऊन असे म्हण की, 'हे शरणागतांचे हितकारी, मला वाचवा.'॥ ५॥

**आतुर सभय गहेसि पद जाई। त्राहि त्राहि दयाल रघुराई॥**
**अतुलित बल अतुलित प्रभुताई। मैं मतिमंद जानि नहिं पाई॥**

व्याकूळ व भयभीत झालेल्या जयंताने जाऊन श्रीरामांचे पाय धरले व म्हटले, 'हे दयाळू रघुनाथा, रक्षण करा. रक्षण करा. तुमचे अतुल्य बळ व अतुल्य सत्ता माझ्या मंदबुद्धीला ओळखता आली नाही.॥

**निज कृत कर्म जनित फल पायउँ। अब प्रभु पाहि सरन तकि आयउँ॥**
**सुनि कृपाल अति आरत बानी। एकनयन करि तजा भवानी॥**

आपल्या कर्माचे फळ मला मिळाले. आता हे प्रभू, माझे रक्षण करा. मी केवळ तुमचाच आश्रय पाहून आलो आहे.' श्रीशिव म्हणतात, हे पार्वती, कृपाळू श्रीरघुनाथांनी त्याचे अत्यंत दुःखाचे बोलणे ऐकून त्याला एकाक्ष करून सोडून दिले.॥ ७॥

**सो०—कीन्ह मोह बस द्रोह जद्यपि तेहि कर बध उचित।**
**प्रभु छाड़ेउ करि छोह को कृपाल रघुबीर सम॥ २॥**

त्याने मूर्खपणाने खोडी काढली होती, म्हणून त्याचा वध करणेच योग्य होते; परंतु प्रभूंनी कृपा करून त्याला सोडून दिले. श्रीरामांच्यासारखा कृपाळू दुसरा कोण असणार?॥ २॥

**रघुपति चित्रकूट बसि नाना। चरित किए श्रुति सुधा समाना॥**
**बहुरि राम अस मन अनुमाना। होइहि भीर सबहिं मोहि जाना॥**

चित्रकूटामध्ये राहून श्रीरघुनाथांनी अनेक लीला केल्या, त्या कानांनी ऐकण्यास अमृतासारख्या गोड आहेत. काही काळानंतर श्रीरामांना वाटले की, सर्व लोकांना मी कळून आलो आहे. त्यामुळे येथे मोठी गर्दी होईल.॥ १॥

**सकल मुनिन्ह सन बिदा कराई। सीता सहित चले द्वौ भाई॥**
**अत्रि के आश्रम जब प्रभु गयऊ। सुनत महामुनि हरषित भयऊ॥**

म्हणून सर्व मुनींचा निरोप घेऊन व सीतेला बरोबर घेऊन दोघे बंधू निघाले. जेव्हा प्रभू अत्रिमुनींच्या आश्रमात आले, तेव्हा त्यांच्या आगमनाची वार्ता ऐकून महामुनींना आनंद झाला.॥ २॥

**पुलकित गात अत्रि उठि धाए। देखि रामु आतुर चलि आए॥**
**करत दंडवत मुनि उर लाए। प्रेम बारि द्वौ जन अन्हवाए॥**

त्यांचे शरीर पुलकित झाले. अत्री मुनी उठून धावत गेले. ते धावत येत असल्याचे पाहून श्रीराम आणखी वेगाने पुढे गेले. दंडवत करीत असतानाच मुनींनी श्रीरामांना उठवून हृदयाशी धरले आणि प्रेमाश्रूंनी दोघा बंधूंना न्हाऊ घातले.॥ ३॥

**देखि राम छबि नयन जुड़ाने। सादर निज आश्रम तब आने॥**
**करि पूजा कहि बचन सुहाए। दिए मूल फल प्रभु मन भाए॥**

श्रीरामांचे सौंदर्य पाहून मुनींचे नेत्र तृप्त झाले. ते त्यांना आदराने आश्रमात घेऊन आले. पूजा केल्यावर सुंदर बोलून मुनींनी मुळे-फळे दिली, ती प्रभूंना खूप आवडली.॥ ४॥

**सो०—प्रभु आसन आसीन भरि लोचन सोभा निरखि।**
**मुनिबर परम प्रबीन जोरि पानि अस्तुति करत॥ ३॥**

प्रभू आसनावर विराजमान झाले. डोळे भरून त्यांचे लावण्य पाहून ज्ञानी मुनिश्रेष्ठ हात जोडून स्तुती करू लागले. ॥ ३ ॥

**छं०—नमामि भक्त वत्सलं। कृपालु शील कोमलं।**
**भजामि ते पदांबुजं। अकामिनां स्वधामदं॥ १ ॥**

'हे भक्तवत्सल, हे कृपाळू, हे कोमल स्वभावाचे, मी तुम्हांला नमस्कार करतो. निष्काम पुरुषांना आपले परमधाम देणाऱ्या तुमच्या चरणकमलांना मी भजतो. ॥ १ ॥

**निकाम श्याम सुंदरं। भवाम्बुनाथ मंदरं।**
**प्रफुल्ल कंज लोचनं। मदादि दोष मोचनं॥ २ ॥**

तुम्ही अत्यंत सुंदर, सावळे, संसाररूपी समुद्राचे मंथन करण्यासाठी मंदराचलरूप, प्रफुल्लित कमलासमान नेत्रांचे आणि मद इत्यादी दोषांपासून मुक्त करणारे आहात. ॥ २ ॥

**प्रलंब बाहु विक्रमं। प्रभोऽप्रमेय वैभवं।**
**निषंग चाप सायकं। धरं त्रिलोक नायकं॥ ३ ॥**

हे प्रभो, तुमच्या लांब भुजांचा पराक्रम आणि तुमचे ऐश्वर्य बुद्धीपलीकडील आहे. भाते व धनुष्य-बाण धारण करणारे तुम्ही तिन्ही लोकांचे स्वामी, ॥ ३ ॥

**दिनेश वंश मंडनं। महेश चाप खंडनं।**
**मुनींद्र संत रंजनं। सुरारि वृंद भंजनं॥ ४ ॥**

सूर्यवंशाचे भूषण, महादेवांचे धनुष्य मोडणारे, मुनिराज व संतांना आनंद देणारे तसेच देवांचे शत्रू असलेल्या असुरांचे समूह नष्ट करणारे आहात. ॥ ४ ॥

**मनोज वैरि वंदितं। अजादि देव सेवितं।**
**विशुद्ध बोध विग्रहं। समस्त दूषणापहं॥ ५ ॥**

तुम्हांला कामदेवाचे शत्रू असलेले महादेव वंदन करतात. ब्रह्मदेव इत्यादी देव तुमची सेवा करतात. तुमचा विग्रह विशुद्ध ज्ञानमय असून तुम्ही संपूर्ण दोषांचा नाश करणारे आहात. ॥ ५ ॥

**नमामि इंदिरा पतिं। सुखाकरं सतां गतिं।**
**भजे सशक्ति सानुजं। शची पति प्रियानुजं॥ ६ ॥**

हे लक्ष्मीपती, हे सुखनिधान, हे सत्पुरुषांचे आश्रय, मी तुम्हांला नमस्कार करतो. हे इंद्राचे प्रिय अनुज वामनावतार, स्वरूपभूत शक्ती सीता व लक्ष्मण यांचेसह मी तुम्हांला भजतो. ॥ ६ ॥

**त्वदंघ्रि मूल ये नराः। भजंति हीन मत्सराः।**
**पतंति नो भवार्णवे। वितर्क वीचि संकुले॥ ७॥**

जे लोक मत्सररहित होऊन आपल्या चरण-कमलांची सेवा करतात, ते तर्क-वितर्करूपी तरंगांनी पूर्ण असलेल्या संसाररूपी समुद्रात पडत नाहीत.॥ ७॥

**विविक्त वासिनः सदा। भजंति मुक्तये मुदा।**
**निरस्य इंद्रियादिकं। प्रयांति ते गतिं स्वकं॥ ८॥**

जे एकांतवासी लोक मुक्तीसाठी विषयांपासून इंद्रियादींचा निग्रह करून तुम्हांला प्रेमाने भजतात, ते तुमच्या गतीला प्राप्त होतात.॥ ८॥

**तमेकमद्भुतं प्रभुं। निरीहमीश्वरं विभुं।**
**जगद्गुरुं च शाश्वतं। तुरीयमेव केवलं॥ ९॥**

जे अद्वितीय, मायिक जगाहून विलक्षण, सर्वसमर्थ, इच्छारहित, सर्वांचे स्वामी, व्यापक, जगद्‌गुरू, नित्य, तिन्ही गुणांपलीकडील आणि आपल्या स्वरूपात स्थित असलेले असे तुम्ही आहात.॥ ९॥

**भजामि भाव वल्लभं। कुयोगिनां सुदुर्लभं।**
**स्वभक्त कल्प पादपं। समं सुसेव्यमन्वहं॥ १०॥**

आणि जे भावप्रिय, विषयी पुरुषांना अत्यंत दुर्लभ, आपल्या भक्तांच्या सर्व कामना पूर्ण करणारे कल्पवृक्ष, पक्षपातरहित आणि नित्य आनंदाने सेवा करण्यास योग्य आहात, अशा तुम्हांला मी निरंतर भजतो.॥ १०॥

**अनूप रूप भूपतिं। नतोऽहमुर्विजा पतिं।**
**प्रसीद मे नमामि ते। पदाब्ज भक्ति देहि मे॥ ११॥**

हे अनुपम सुंदर, हे पृथ्वीपती, हे जानकीनाथ, मी तुम्हांला प्रणाम करतो. माझ्यावर प्रसन्न व्हा. मी तुम्हांला नमस्कार करतो. मला आपल्या चरणकमलांची भक्ती द्या.॥ ११॥

**पठंति ये स्तवं इदं। नरादरेण ते पदं।**
**व्रजंति नात्र संशयं। त्वदीय भक्ति संयुताः॥ १२॥**

जे लोक ही स्तुती आदराने म्हणतील, ते तुमच्या भक्तीने युक्त होऊन तुमच्या परमपदास प्राप्त होतील, यात शंका नाही.'॥ १२॥

दो०—**बिनती करि मुनि नाइ सिरु कह कर जोरि बहोरि।**
**चरन सरोरुह नाथ जनि कबहुँ तजै मति मोरि॥ ४॥**

मुनींनी अशी विनंती करून नतमस्तक होऊन, हात जोडून म्हटले, ‘हे नाथ, माझी बुद्धी तुमचे चरण-कमल कधी न सोडो.’॥ ४॥

**अनुसुइया के पद गहि सीता। मिली बहोरि सुसील बिनीता॥**
**रिषिपतिनी मन सुख अधिकाई। आसिष देइ निकट बैठाई॥**

नंतर परम शीलवती विनम्र सीतेने अत्रिपत्नी अनसूयेचे पाय धरून तिची भेट घेतली. ऋषि-पत्नीच्या मनास खूप आनंद झाला. तिने आशीर्वाद देऊन सीतेला जवळ बसवून घेतले.॥ १॥

**दिब्य बसन भूषन पहिराए। जे नित नूतन अमल सुहाए॥**
**कह रिषिबधू सरस मृदु बानी। नारिधर्म कछु ब्याज बखानी॥**

आणि तिने नित्य नवी, निर्मळ आणि सुंदर राहाणारी दिव्य वस्त्रे व अलंकार सीतेला घातले. नंतर ऋषि-पत्नी त्या निमित्ताने मधुर व कोमल वाणीने स्त्रियांच्या काही धर्मांचे वर्णन सांगू लागली.॥ २॥

**मातु पिता भ्राता हितकारी। मितप्रद सब सुनु राजकुमारी॥**
**अमित दानि भर्ता बयदेही। अधम सो नारि जो सेव न तेही॥**

‘हे राजकुमारी, ऐेक. माता, पिता, भाऊ हे सर्व हितकारक असतात, परंतु ते एका मर्यादेपर्यंतच सुख देणारे आहेत. परंतु हे जानकी, पती हा मोक्षरूप असीम सुख देणारा असतो. अशा पतीची जी सेवा करीत नाही, ती स्त्री अधम होय.॥ ३॥

**धीरज धर्म मित्र अरु नारी। आपद काल परिखिअहिं चारी॥**
**बृद्ध रोगबस जड़ धनहीना। अंध बधिर क्रोधी अति दीना॥**

धैर्य, धर्म, मित्र व स्त्री या चौघांची परीक्षा संकटकाळीच होत असते. वृद्ध, रोगी, मूर्ख, निर्धन, अंध, बहिरा, क्रोधी व अत्यंत दीन,॥ ४॥

**ऐसेहु पति कर किएँ अपमाना। नारि पाव जमपुर दुख नाना॥**
**एकइ धर्म एक ब्रत नेमा। कायँ बचन मन पति पद प्रेमा॥**

अशाही पतीचा अपमान केल्यास स्त्रीला यमपुरीत तऱ्हेतऱ्हेचे दुःख भोगावे लागते. शरीर, वचन आणि मनाने पतीच्या चरणी प्रेम करणे हा स्त्रीचा एकच धर्म आहे, एकच व्रत आहे आणि एकच नियम आहे.॥ ५॥

**जग पतिब्रता चारि बिधि अहहीं। बेद पुरान संत सब कहहीं॥**
**उत्तम के अस बस मन माहीं। सपनेहुँ आन पुरुष जग नाहीं॥**

जगात चार प्रकारच्या पतिव्रता असतात. वेद, पुराण व संत हे सर्व असे म्हणतात की, जगात माझा पती सोडल्यास दुसरा पुरुष माझ्या स्वप्नातही येत नाही, असा भाव उत्तम श्रेणीच्या पतिव्रतेच्या मनात असतो. ॥ ६ ॥

**मध्यम परपति देखइ कैसें। भ्राता पिता पुत्र निज जैसें॥**
**धर्म बिचारि समुझि कुल रहई। सो निकिष्ट त्रिय श्रुति अस कहई॥**

मध्यम श्रेणीची पतिव्रता दुसऱ्या पुरुषाला अवस्थेप्रमाणे आपला सख्खा भाऊ, पिता किंवा पुत्र यांच्या रूपात पाहाते. जी धर्माचा विचार करून आणि आपल्या कुळाची मर्यादा जाणून स्वत:चा (मनात असूनही) परपुरुषापासून बचाव करते, ती निकृष्ट प्रतीची पतिव्रता होय, असे वेद म्हणतात. ॥ ७ ॥

**बिनु अवसर भय तें रह जोई। जानेहु अधम नारि जग सोई॥**
**पति बंचक परपति रति करई। रौरव नरक कल्प सत परई॥**

आणि ज्या स्त्रीला व्यभिचाराची संधी मिळत नाही, किंवा जी भीतीमुळे पतिव्रता राहते, जगात त्या स्त्रीला अधम मानावे. पतीचा विश्वासघात करून जी स्त्री परपुरुषाशी रती करते, ती स्त्री तर शंभर कल्पांपर्यंत रौरव नरकात पडते. ॥ ८ ॥

**छन सुख लागि जनम सत कोटी। दुख न समुझ तेहि सम को खोटी॥**
**बिनु श्रम नारि परम गति लहई। पतिब्रत धर्म छाड़ि छल गहई॥**

क्षणभराच्या सुखासाठी कोट्यवधी जन्मामध्ये भोगावे लागणारे दु:ख जिला समजत नाही, त्या स्त्रीसारखी दुष्ट कोण असणार? जी स्त्री फसवणूक न करता पातिव्रत्य धर्म स्वीकारते, तिला विनासायास परम गती प्राप्त होते. ॥ ९ ॥

**पति प्रतिकूल जनम जहँ जाई। बिधवा होइ पाइ तरुनाई॥**

परंतु जी पतीविरुद्ध वागते, ती पुढे जेथे जन्म घेते, तेथे ती तारुण्यातच विधवा होते. ॥ १० ॥

सो०—**सहज अपावनि नारि पति सेवत सुभ गति लहइ।**
**जसु गावत श्रुति चारि अजहुँ तुलसिका हरिहि प्रिय॥ ५ (क)॥**

स्त्री जन्माने अपवित्र आहे. परंतु पतीची सेवा केल्याने ती अनायासच शुभ गती प्राप्त करते. पातिव्रत्य धर्मामुळे तुळस ही आजही भगवंतांना प्रिय आहे आणि चारी वेद तिची कीर्ती गातात. ॥ ५ (क) ॥

**सुनु सीता तव नाम सुमिरि नारि पतिब्रत करहिं।**
**तोहि प्रानप्रिय राम कहिउँ कथा संसार हित॥ ५ (ख)॥**

हे सीते, ऐक. तुझे नाव घेऊनच स्त्रिया पातिव्रत्य धर्माचे पालन करतील. तुला श्रीराम हे

प्राणांहून प्रिय आहेत. ही पातिव्रत्य धर्माची गोष्ट मी जगातील स्त्रियांच्या हितासाठी सांगितली आहे.'॥ ५(ख) ॥

**सुनि जानकी परम सुखु पावा। सादर तासु चरन सिरु नावा॥**
**तब मुनि सन कह कृपानिधाना। आयसु होइ जाउँ बन आना॥**

हे ऐकून जानकीला खूप आनंद झाला आणि तिने मोठ्या आदराने अनसूयेच्या चरणी मस्तक ठेवले. मग कृपेची खाण असलेल्या श्रीरामांनी मुनींना सांगितले की, 'आज्ञा असेल तर आता मी दुसऱ्या वनात जातो. ॥ १ ॥

**संतत मो पर कृपा करेहू। सेवक जानि तजेहु जनि नेहू॥**
**धर्म धुरंधर प्रभु कै बानी। सुनि सप्रेम बोले मुनि ग्यानी॥**

माझ्यावर निरंतर तुम्ही कृपा ठेवा आणि आपला सेवक मानून माझ्यावरील प्रेम सोडू नका.' धर्मधुरंधर प्रभू श्रीरामांचे बोलणे ऐकून ज्ञानी मुनी प्रेमाने म्हणाले, ॥ २ ॥

**जासु कृपा अज सिव सनकादी। चहत सकल परमारथ बादी॥**
**ते तुम्ह राम अकाम पिआरे। दीन बंधु मृदु बचन उचारे॥**

'हे रामा, ब्रह्मदेव, शिव व सनकादिक हे सर्व परमार्थवादी ज्यांची कृपा इच्छितात, ते निष्काम पुरुषांनाही प्रिय आणि दीनांचे बंधू असलेले भगवान तुम्हीच आहात. म्हणून असे गोड शब्द बोलत आहात. ॥ ३ ॥

**अब जानी मैं श्री चतुराई। भजी तुम्हहि सब देव बिहाई॥**
**जेहि समान अतिसय नहिं कोई। ता कर सील कस न अस होई॥**

आता मला श्रीलक्ष्मीचे चातुर्य समजले की, तिने इतर सर्व देव सोडून तुम्हांलाच का भजले ते. सर्व गोष्टींमध्ये ज्यांच्याहून फार मोठा दुसरा कोणीही नाही, त्याचे शील असे श्रेष्ठ का बरे असणार नाही ? ॥ ४ ॥

**केहि बिधि कहौं जाहु अब स्वामी। कहहु नाथ तुम्ह अंतरजामी॥**
**अस कहि प्रभु बिलोकि मुनि धीरा। लोचन जल बह पुलक सरीरा॥**

हे स्वामी, मी कसे म्हणू की 'आता जा.' हे नाथ, तुम्ही अंतर्यामी आहात, तुम्हीच सांगा.' असे म्हणून धीर मुनी प्रभूंच्याकडे पाहू लागले. मुनींच्या नेत्रांतून प्रेमाश्रू वाहू लागले आणि त्यांचे शरीर रोमांचित झाले. ॥ ५ ॥

**छं०—तन पुलक निर्भर प्रेम पूरन नयन मुख पंकज दिए।**
**मन ग्यान गुन गोतीत प्रभु मैं दीख जप तप का किए॥**
**जप जोग धर्म समूह तें नर भगति अनुपम पावई।**
**रघुबीर चरित पुनीत निसि दिन दास तुलसी गावई॥**

अत्रिमुनी अत्यंत प्रेमात मग्न होते, त्यांचे शरीर पुलकित होत होते आणि नेत्र श्रीरामांच्या मुख-कमलावर लागले होते. ते मनात विचार करीत होते की, मी असे कोणते जप-तप केले होते की, ज्याच्यामुळे मन, ज्ञान, गुण व इंद्रिये यांच्या पलीकडील प्रभूंचे दर्शन मला लाभले. जप, योग आणि धर्म-समूह यांमुळे मनुष्याला अनुपम भक्ती प्राप्त होते. अशा श्रीरघुवीरांचे पवित्र चरित्र तुलसीदास रात्रंदिवस गात आहेत. ॥ ६ ॥

**दो०—कलिमल समन दमन मन राम सुजस सुखमूल।**
**सादर सुनहिं जे तिन्ह पर राम रहहिं अनुकूल॥ ६ (क)॥**

श्रीरामचंद्रांची सुंदर कीर्ती कलियुगातील पापांचा नाश करणारी, मनाचे दमन करणारी आणि सुखाचे मूळ आहे. जे लोक ती आदराने ऐकतात, त्यांच्यावर श्रीराम प्रसन्न असतात. ॥ ६(क) ॥

**सो०—कठिन काल मल कोस धर्म न ग्यान न जोग जप।**
**परिहरि सकल भरोस रामहि भजहिं ते चतुर नर॥ ६ (ख)॥**

हा कठीण कलिकाळ पापांचा खजिना आहे. यात धर्म, ज्ञान, योग व जप योग्य प्रकारे होत नाही. म्हणून या युगात जे लोक इतर सर्वांवरचा विश्वास सोडून श्रीरामांनाच भजतात, तेच धन्य होत. ॥ ६ (ख) ॥

**मुनि पद कमल नाइ करि सीसा। चले बनहि सुर नर मुनि ईसा॥**
**आगें राम अनुज पुनि पाछें। मुनि बर बेष बने अति काछें॥**

मुनींच्या चरणी नतमस्तक होऊन देव, मनुष्य व मुनींचे स्वामी असलेले श्रीराम पुढील वनाकडे निघाले. पुढे श्रीराम, त्यांच्यामागे लक्ष्मण असे हे दोघेही मुनि-वेषामध्ये फारच शोभून दिसत होते. ॥ १ ॥

**उभय बीच श्री सोहइ कैसी। ब्रह्म जीव बिच माया जैसी॥**
**सरिता बन गिरि अवघट घाटा। पति पहिचानि देहिं बर बाटा॥**

ज्याप्रमाणे परब्रह्म व जीव यांच्यामध्ये माया असते, त्याप्रमाणे राम-लक्ष्मण यांच्यामध्ये सीता शोभत होती. नदी, वन, पर्वत आणि दुर्गम घाट हे सर्व आपल्या स्वामींना ओळखून चांगल्या प्रकारे वाट देत होते. ॥ २ ॥

**जहँ जहँ जाहिं देव रघुराया। करहिं मेघ तहँ तहँ नभ छाया॥**
**मिला असुर बिराध मग जाता। आवतहीं रघुबीर निपाता॥**

श्रीरघुनाथ जिथे जिथे जात, तिथे तिथे मेघ आकाशातून सावली धरीत होते. रस्त्यात विराध नावाचा राक्षस भेटला. समोर येताच श्रीरामांनी त्याला ठार मारले. ॥ ३ ॥

**तुरतहिं रुचिर रूप तेहिं पावा। देखि दुखी निज धाम पठावा॥**
**पुनि आए जहँ मुनि सरभंगा। सुंदर अनुज जानकी संगा॥**

श्रीरामांच्या हातून मृत्यू पावताच विराधाला दिव्य रूप प्राप्त झाले. तो दु:खी आहे, असे पाहून प्रभूंनी त्याला परमधामास पाठवून दिले. नंतर लक्ष्मण व सीता यांना घेऊन प्रभू शरभंग मुनींच्याकडे गेले. ॥ ४ ॥

**दो०—देखि राम मुख पंकज मुनिबर लोचन भृंग।**
**सादर पान करत अति धन्य जन्म सरभंग॥ ७॥**

श्रीरामचंद्रांचे मुखकमल पाहून मुनिश्रेष्ठ शरभंगांचे नेत्ररूपी भ्रमर अत्यंत आदराने त्याचे सौंदर्यपान करू लागले. शरभंगांचा जन्म धन्य होय. ॥ ७ ॥

**कह मुनि सुनु रघुबीर कृपाला। संकर मानस राजमराला॥**
**जात रहेउँ बिरंचि के धामा। सुनेउँ श्रवन बन ऐहहिं रामा॥**

मुनी म्हणाले, 'हे कृपाळू रघुवीर, हे श्रीशंकरांच्या मनरूपी मानससरोवरातील राजहंस, ऐका. मी ब्रह्मलोकी जात होतो. इतक्यात माझ्या कानी आले की, श्रीराम वनात येणार आहेत. ॥ १ ॥

**चितवत पंथ रहेउँ दिन राती। अब प्रभु देखि जुड़ानी छाती॥**
**नाथ सकल साधन मैं हीना। कीन्ही कृपा जानि जन दीना॥**

तेव्हापासून रात्रंदिवस मी तुमची वाट पाहात आहे. आज प्रभूंना पाहून मन शांत झाले. हे नाथ, मी कोणतेही साधन केलेले नाही. तरीही तुम्ही आपला दीन सेवक समजून माझ्यावर कृपा केली.

**सो कछु देव न मोहि निहोरा। निज पन राखेउ जन मन चोरा॥**
**तब लगि रहहु दीन हित लागी। जब लगि मिलौं तुम्हहि तनु त्यागी॥**

हे देवा, हा काही माझ्यावर तुमचा उपकार नाही. हे भक्ताचे हृदय चोरणारे, असे करून तुम्ही आपल्या ब्रीदाचे पालन केलेत. आता मी शरीर सोडून तुमच्या परमधामात जात नाही, तोपर्यंत या दीन सेवकाच्या कल्याणासाठी येथे थांबा.'॥ ३ ॥

**जोग जग्य जप तप ब्रत कीन्हा। प्रभु कहँ देइ भगति बर लीन्हा॥**
**एहि बिधि सर रचि मुनि सरभंगा। बैठे हृदयँ छाड़ि सब संगा॥**

योग, यज्ञ, जप, तप व व्रत इत्यादी जे काही शरभंगांनी केले होते, ते सर्व प्रभूंना अर्पण केले आणि त्याबदली भक्तीचे वरदान घेतले. अशाप्रकारे दुर्लभ भक्ती प्राप्त केल्यावर मुनी शरभंगांनी चिता रचली व मन:पूर्वक सर्व आसक्ती सोडून ते चितेवर बसले. ॥ ४ ॥

**दो०—सीता अनुज समेत प्रभु नील जलद तनु स्याम।**
**मम हियँ बसहु निरंतर सगुनरूप श्रीराम॥ ८॥**

ते म्हणाले, 'हे नील मेघाप्रमाणे श्याम शरीर असणाऱ्या सगुण रूप श्रीराम, सीता व लक्ष्मणासह तुम्ही माझ्या हृदयात निरंतर निवास करा.'॥ ८ ॥

**अस कहि जोग अगिनि तनु जारा। राम कृपाँ बैकुंठ सिधारा॥**
**ताते मुनि हरि लीन न भयऊ। प्रथमहिं भेद भगति बर लयऊ॥**

असे म्हणून शरभंगांनी योगाग्नीने आपले शरीर भस्म करून टाकले व ते श्रीरामांच्या कृपेने वैकुंठास गेले. त्यांनी भेद-भक्तीचा वर पूर्वीच घेतला होता, म्हणून ते भगवंतांमध्ये लीन झाले नाहीत.॥ १॥

**रिषि निकाय मुनिबर गति देखी। सुखी भए निज हृदयँ बिसेषी॥**
**अस्तुति करहिं सकल मुनि बृंदा। जयति प्रनत हित करुना कंदा॥**

ऋषि-समाज मुनिश्रेष्ठ शरभंगांची ती दुर्लभ गती पाहून आपल्या मनातून खूप सुखावला. सर्व मुनिवृंद श्रीरामांची स्तुती करू लागला. ते म्हणत होते, 'शरणागतहितकारी करुणाकंद प्रभूंचा विजय असो.'॥ २॥

**पुनि रघुनाथ चले बन आगे। मुनिबर बृंद बिपुल सँग लागे॥**
**अस्थि समूह देखि रघुराया। पूछी मुनिन्ह लागि अति दाया॥**

नंतर श्रीरघुनाथ पुढील वनात गेले. श्रेष्ठ मुनींची अनेक मंडळे त्यांच्याबरोबर निघाली. वाटेत एका ठिकाणी हाडांचे ढीग पाहून श्रीरामांना अतिशय दया आली. त्यांनी मुनींना विचारले,॥ ३॥

**जानतहूँ पूछिअ कस स्वामी। सबदरसी तुम्ह अंतरजामी॥**
**निसिचर निकर सकल मुनि खाए। सुनि रघुबीर नयन जल छाए॥**

मुनी म्हणाले, 'हे स्वामी, तुम्ही सर्वदर्शी आणि अंतर्यामी आहात. सर्व जाणत असतानाही आम्हांस का विचारता? राक्षसांच्या झुंडींनी सर्व मुनींना खाऊन टाकले, त्यांची ही हाडे आहेत.' हे ऐकताच श्रीरघुवीरांच्या नेत्रांमध्ये करुणेमुळे पाणी आले.॥ ४॥

दो०—**निसिचर हीन करउँ महि भुज उठाइ पन कीन्ह।**
**सकल मुनिन्ह के आश्रमन्हि जाइ जाइ सुख दीन्ह॥ ९॥**

त्यावेळी श्रीरामांनी हात उचलून प्रतिज्ञा केली की, 'मी पृथ्वीला राक्षसरहित करून टाकीन.' नंतर त्यांनी सर्व मुनींच्या आश्रमांना भेटी देऊन दर्शन व संभाषणाचे त्यांना सुख दिले.॥ ९॥

**मुनि अगस्ति कर सिष्य सुजाना। नाम सुतीछन रति भगवाना॥**
**मन क्रम बचन राम पद सेवक। सपनेहुँ आन भरोस न देवक॥**

अगस्त्य मुनींचे सुतीक्ष्ण नावाचे एक ज्ञानी शिष्य होते. त्यांना भगवंताविषयी अत्यंत प्रेम होते. ते काया-वाचा-मनाने श्रीरामांच्या चरणांचे सेवक होते. त्यांना स्वप्नातही इतर कोणत्याही देवाविषयी आदर वाटत नव्हता.॥ १॥

**प्रभु आगवनु श्रवन सुनि पावा। करत मनोरथ आतुर धावा॥**
**हे बिधि दीनबंधु रघुराया। मो से सठ पर करिहहिं दाया॥**

जेव्हा त्यांनी प्रभूंचे आगमन होत असल्याचे ऐकले, तेव्हा ते अनेक मनोरथ करीत आतुर होऊन धावत निघाले. ते मनात म्हणत होते की, 'हे विधात्या, दीनबंधू श्रीरघुनाथ माझ्यासारख्या दुष्टावरही दया करतील काय?॥ २॥

**सहित अनुज मोहि राम गोसाईं। मिलिहहिं निज सेवक की नाईं॥**
**मोरे जियँ भरोस दृढ़ नाहीं। भगति बिरति न ग्यान मन माहीं॥**

स्वामी राम हे लक्ष्मणासह मला आपल्या सेवकाप्रमाणे भेटतील काय? माझ्या मनाला याची खात्री वाटत नाही. कारण माझ्या मनात भक्ती, वैराग्य किंवा ज्ञान यांपैकी काहीही नाही.॥ ३॥

**नहिं सतसंग जोग जप जागा। नहिं दृढ़ चरन कमल अनुरागा॥**
**एक बानि करुनानिधान की। सो प्रिय जाकें गति न आन की॥**

मी कधी सत्संग, योग, जप किंवा यज्ञसुद्धा केलेला नाही; आणि प्रभूंच्या चरणी माझे दृढ प्रेमही नाही. एक मात्र खरे की, ज्याला कुणाचा आधार नाही, तो प्रभूंना प्रिय असतो. असा दयेचे भांडार असलेल्या प्रभूंचा स्वभाव आहे.

**होइहैं सुफल आजु मम लोचन। देखि बदन पंकज भव मोचन॥**
**निर्भर प्रेम मगन मुनि ग्यानी। कहि न जाइ सो दसा भवानी॥**

भगवंतांच्या या स्वभावाची आठवण येताच ते आनंदमग्न होऊन म्हणू लागले की, 'भवबंधनांतून मुक्त करणारे प्रभूंचे मुखकमल पाहून आज माझ्या डोळ्यांचे पारणे फिटेल.' शिव म्हणतात, 'हे भवानी, ज्ञानी मुनी प्रेमामध्ये पूर्णपणे निमग्न झाले. त्यांची ती दशा अवर्णनीय होती.॥ ५॥

**दिसि अरु बिदिसि पंथ नहिं सूझा। को मैं चलेउँ कहाँ नहिं बूझा॥**
**कबहुँक फिरि पाछें पुनि जाई। कबहुँक नृत्य करइ गुन गाई॥**

त्यांना दिशा किंवा रस्ता हे काहीच कळत नव्हते. आपण कोण आहोत आणि कुठे जात आहोत, हे काहीही कळत नव्हते. ते कधी मागे वळून पुन्हा पुढे चालू लागत आणि कधी प्रभूंचे गुण गात नाचू लागत.॥ ६॥

**अबिरल प्रेम भगति मुनि पाई। प्रभु देखैं तरु ओट लुकाई॥**
**अतिसय प्रीति देखि रघुबीरा। प्रगटे हृदयँ हरन भव भीरा॥**

मुनींनी प्रगाढ अशी प्रेमभक्ती प्राप्त केली होती. प्रभू श्रीराम वृक्षाआडून लपून भक्ताची ती प्रेमोन्मत्त दशा पाहात होते. मुनींचे अत्यंत प्रेम पाहून भव-भय हरण करणारे श्रीरघुनाथ मुनींच्या हृदयात प्रकट झाले.॥ ७॥

**मुनि मग माझ अचल होइ बैसा। पुलक सरीर पनस फल जैसा॥**
**तब रघुनाथ निकट चलि आए। देखि दसा निज जन मन भाए॥**

हृदयात प्रभूंचे दर्शन झाल्याने मुनी रस्त्यामध्येच स्तब्ध बसले. त्यांचे शरीर रोमांच्यांमुळे फणसासारखे काटेदार झाले. तेव्हा श्रीरघुनाथ त्यांच्याजवळ आले आणि आपल्या भक्ताची प्रेमदशा पाहून मनाने अत्यंत प्रसन्न झाले.॥ ८॥

**मुनिहि राम बहु भाँति जगावा। जाग न ध्यान जनित सुख पावा॥**
**भूप रूप तब राम दुरावा। हृदयँ चतुर्भुज रूप देखावा॥**

श्रीरामांनी त्यांना जागे करण्याचा खूप प्रयत्न केला, परंतु ते जागे झाले नाहीत, कारण त्यांना प्रभूंच्या ध्यानाचे सुख लाभत होते. तेव्हा श्रीरामांनी आपले राजरूप लपविले आणि मुनींच्या हृदयात आपले चतुर्भुजरूप प्रकट केले.॥ ९॥

**मुनि अकुलाइ उठा तब कैसें। बिकल हीन मनि फनिबर जैसें॥**
**आगें देखि राम तन स्यामा। सीता अनुज सहित सुख धामा॥**

आपले इष्ट-स्वरूप अंतर्धान होताच, जसा श्रेष्ठ मणिधर साप मण्याविना व्याकूळ होऊन जातो, तसे मुनी व्याकूळ झाले. मुनींना आपल्या डोळ्यांसमोर सीता व लक्ष्मणासह श्यामसुंदर मूर्ती असलेले सुखधाम श्रीराम दिसले.॥ १०॥

**परेउ लकुट इव चरनन्हि लागी। प्रेम मगन मुनिबर बड़भागी॥**
**भुज बिसाल गहि लिए उठाई। परम प्रीति राखे उर लाई॥**

प्रेमात मग्न झालेल्या त्या भाग्यवान श्रेष्ठ मुनींनी दंडवत करीत श्रीरामांच्या चरणी लोळण घेतली. श्रीरामांनी आपल्या विशाल भुजांनी धरून त्यांना उठवले आणि मोठ्या प्रेमाने हृदयाशी धरले.॥ ११॥

**मुनिहि मिलत अस सोह कृपाला। कनक तरुहि जनु भेंट तमाला॥**
**राम बदनु बिलोक मुनि ठाढ़ा। मानहुँ चित्र माझ लिखि काढ़ा॥**

कृपाळू श्रीरामचंद्र मुनींना भेटताना असे वाटत होते की, जणू सोन्याच्या वृक्षाला तमाल वृक्ष मिठी मारत आहे. मुनी निस्तब्ध उभे होते आणि एकटक श्रीरामांचे मुख न्याहाळत होते; जणू ते चित्र चितारून बनविले असावे.॥ १२॥

**दो०—तब मुनि हृदयँ धीर धरि गहि पद बारहिं बार।**
**निज आश्रम प्रभु आनि करि पूजा बिबिध प्रकार॥ १०॥**

मग मुनींनी मनात धीर धरून वारंवार प्रभूंच्या चरणांना स्पर्श केला. नंतर ते प्रभूंना आपल्या आश्रमात घेऊन गेले व त्यांची त्यांनी अनेक प्रकारे पूजा केली.॥ १०॥

**कह मुनि प्रभु सुनु बिनती मोरी। अस्तुति करौं कवन बिधि तोरी॥**
**महिमा अमित मोरि मति थोरी। रबि सन्मुख खद्योत अँजोरी॥**

मुनी म्हणू लागले, 'हे प्रभो, माझी विनंती ऐका. मी कशाप्रकारे तुमची स्तुती करू? तुमचा महिमा अपार आहे आणि माझी बुद्धी अल्प आहे, जणू सूर्यासमोर काजव्याचा प्रकाश. ॥ १ ॥

**श्याम तामरस दाम शरीरं। जटा मुकुट परिधन मुनिचीरं॥**
**पाणि चाप शर कटि तूणीरं। नौमि निरंतर श्रीरघुवीरं॥**

हे नीलकमलांच्या माळेसारखे सावळे शरीर असलेले, हे जटामुकुट आणि मुनींची वल्कल वस्त्रे नेसलेले, हातांमध्ये धनुष्य-बाण व कटीला भाते बांधलेले श्रीराम, मी तुम्हांला निरंतर नमस्कार करतो. ॥ २ ॥

**मोह विपिन घन दहन कृशानुः। संत सरोरुह कानन भानुः॥**
**निसिचर करि वरूथ मृगराजः। त्रातु सदा नो भव खग बाजः॥**

जे मोहरूपी दाट वनास जाळणारा अग्नी आहेत, संतरूपी कमल-वनास प्रफुल्लित करणारा सूर्य आहेत, राक्षसरूपी हत्तींच्या कळपास लोळवणारे सिंह आहेत आणि जन्ममृत्युरूपी पक्ष्याला मारणारा बहिरी ससाणा आहेत, ते प्रभू श्रीराम सदा आमचे रक्षण करोत. ॥ ३ ॥

**अरुण नयन राजीव सुवेशं। सीता नयन चकोर निशेशं॥**
**हर हृदि मानस बाल मरालं। नौमि राम उर बाहु विशालं॥**

हे लाल कमळासारखे नेत्र व सुंदर वेष धारण करणारे, सीतेच्या नेत्ररूपी चकोराचे चंद्र, श्रीशिवांच्या मानसरूप मानससरोवरातील बालहंस, विशाल हृदय व बाहू असलेले हे श्रीरामप्रभू! मी तुमची स्तुती करतो. ॥ ४ ॥

**संशय सर्प ग्रसन उरगादः। शमन सुकर्कश तर्क विषादः॥**
**भव भंजन रंजन सुर यूथः। त्रातु सदा नो कृपा वरूथः॥**

जे संशयरूप सर्पाला ग्रासणारे गरुड, जे अत्यंत कठोर तर्काने उत्पन्न होणारा विषाद नाहीसा करणारे, जे जन्ममृत्यू नाहीसा करणारे व देवसमुदायाला आनंद देणारे ते कृपानिधान श्रीराम नेहमी आमचे रक्षण करोत. ॥ ५ ॥

**निर्गुण सगुण विषम सम रूपं। ज्ञान गिरा गोतीतमनूपं॥**
**अमलमखिलमनवद्यमपारं। नौमि राम भंजन महि भारं॥**

हे निर्गुण-सगुण, विषम-समरूप, हे ज्ञान, वाणी आणि इंद्रियांना अतीत, हे अनुपम, निर्मल, दोषरहित, अनंत व पृथ्वीचा भार हरण करणारे श्रीराम, मी तुम्हांला नमस्कार करतो. ॥ ६ ॥

**भक्त कल्पपादप आरामः। तर्जन क्रोध लोभ मद कामः॥**
**अति नागर भव सागर सेतुः। त्रातु सदा दिनकर कुल केतुः॥**

जे भक्तांसाठी कल्पवृक्षांची उद्याने आहेत, क्रोध, लोभ, मद आणि काम यांना भयभीत करणारे

आहेत, अत्यंत चतुर आहेत आणि संसाररूपी समुद्र तरून जाण्यासाठी सेतुरूप आहेत, ते सूर्यकुलाचा ध्वज असणारे श्रीराम सदा माझे रक्षण करोत. ॥ ७ ॥

**अतुलित भुज प्रताप बल धामः । कलि मल विपुल विभंजन नामः ॥**
**धर्म वर्म नर्मद गुण ग्रामः । संतत शं तनोतु मम रामः ॥**

ज्यांच्या भुजांचा प्रताप अतुलनीय आहे, जे बलाचे धाम आहेत, ज्यांचे नाव कलियुगातील फार मोठ्या पापांचा नाश करणारे आहे, जे धर्मरक्षक असून ज्यांचा गुणसमूह आनंद देणारा आहे, ते श्रीराम निरंतर माझ्या कल्याणाचा विस्तार करोत. ॥ ८ ॥

**जदपि बिरज ब्यापक अबिनासी । सब के हृदयँ निरंतर बासी ॥**
**तदपि अनुज श्री सहित खरारी । बसतु मनसि मम काननचारी ॥**

जरी तुम्ही निर्मल, व्यापक, अविनाशी आणि सर्वांच्या हृदयात निरंतर निवास करणारे आहात, तरीही हे श्रीराम, लक्ष्मण आणि सीतेसह वनात फिरणारे, याच रूपात तुम्ही माझ्या हृदयात निवास करावा. ॥ ९ ॥

**जे जानहिं ते जानहुँ स्वामी । सगुन अगुन उर अंतरजामी ॥**
**जो कोसलपति राजिव नयना । करउ सो राम हृदय मम अयना ॥**

हे स्वामी, तुम्हांला जे सगुण, निर्गुण, अंतर्यामी म्हणून जाणतात, ते तसे जाणोत. माझ्या हृदयात कोसलपती कमलनयन श्रीराम या रूपातच तुम्ही निवास करावा. ॥ १० ॥

**अस अभिमान जाइ जनि भोरे । मैं सेवक रघुपति पति मोरे ॥**
**सुनि मुनि बचन राम मन भाए । बहुरि हरषि मुनिबर उर लाए ॥**

मी सेवक आहे आणि श्रीरघुनाथ माझे स्वामी आहेत, असा अभिमान चुकूनही सुटू नये.' मुनींचे वचन ऐकून श्रीराम मनातून खूप प्रसन्न झाले. तेव्हा त्यांनी आनंदाने त्या श्रेष्ठ मुनींना हृदयाशी धरले. ॥ ११ ॥

**परम प्रसन्न जानु मुनि मोही । जो बर मागहु देउँ सो तोही ॥**
**मुनि कह मैं बर कबहुँ न जाचा । समुझि न परइ झूठ का साचा ॥**

आणि म्हटले, 'हे मुनी, मी तुमच्यावर प्रसन्न झालो आहे, असे समजा. जो वर मागाल, तो मी तुम्हांला देईन.' तेव्हा सुतीक्ष्ण म्हणाले, 'मी वर तर कधी मागितलाच नाही. मला समजतच नाही की, काय खोटे व काय खरे आहे. मग काय मागू व काय नको? ॥ १२ ॥

**तुम्हहि नीक लागै रघुराई । सो मोहि देहु दास सुखदाई ॥**
**अबिरल भगति बिरति बिग्याना । होहु सकल गुन ग्यान निधाना ॥**

म्हणून हे रघुनाथ, हे दासांना सुख देणारे, जे तुम्हांला चांगले वाटेल, ते मला द्या.' श्रीरामचंद्र

म्हणाले, 'हे मुनी, तुम्ही प्रगाढ भक्ती, वैराग्य, विज्ञान आणि सर्व गुणांचे व ज्ञानाचे निधान व्हाल.'॥ १३ ॥

**प्रभु जो दीन्ह सो बरु मैं पावा। अब सो देहु मोहि जो भावा॥**

तेव्हा मुनी म्हणाले की, 'प्रभूंनी जे वरदान दिले, ते मला मिळाले. आता मला जे चांगले वाटते, ते द्या,॥ १४॥

**दो०—अनुज जानकी सहित प्रभु चाप बान धर राम।**
**मम हिय गगन इंदु इव बसहु सदा निहकाम॥ ११॥**

हे प्रभो! हे श्रीराम, लक्ष्मण व सीतेसह धनुष्य-बाण-धारी या रूपात तुम्ही माझ्या हृदयाकाशात चंद्राप्रमाणे नित्य निवास करावा.'॥ ११ ॥

**एवमस्तु करि रमानिवासा। हरषि चले कुंभज रिषि पासा॥**
**बहुत दिवस गुर दरसनु पाएँ। भए मोहि एहिं आश्रम आएँ॥**

'तथास्तु' असे म्हणून लक्ष्मीनिवास श्रीरामचंद्र आनंदाने अगस्त्य ऋषींच्याकडे निघाले. मग सुतीक्ष्ण मुनी म्हणाले, 'गुरू अगस्ती यांचे दर्शन घेऊन या आश्रमात आल्याला मला पुष्कळ दिवस झाले. ॥ १ ॥

**अब प्रभु संग जाउँ गुर पाहीं। तुम्ह कहँ नाथ निहोरा नाहीं॥**
**देखि कृपानिधि मुनि चतुराई। लिए संग बिहसे द्वौ भाई॥**

आता मीही हे प्रभू, तुमच्याबरोबर गुरुजींच्या जवळ येतो. हे नाथ, यामध्ये माझा तुमच्यावर काहीही उपकार नाही.' मुनींचे चातुर्य पाहून कृपानिधी श्रीरामांनी त्यांना आपल्यासोबत घेतले. मग दोघे बंधू हसू लागले.॥ २॥

**पंथ कहत निज भगति अनूपा। मुनि आश्रम पहुँचे सुरभूपा॥**
**तुरत सुतीछन गुर पहिं गयऊ। करि दंडवत कहत अस भयऊ॥**

वाटेत आपल्या अनुपम भक्तीचे वर्णन करीत देवांचे राजराजेश्वर श्रीराम अगस्त्य मुनींच्या आश्रमात पोहोचले. सुतीक्ष्ण त्वरित गुरू अगस्त्यांपाशी गेले आणि दंडवत करून म्हणू लागले. ॥ ३ ॥

**नाथ कोसलाधीस कुमारा। आए मिलन जगत आधारा॥**
**राम अनुज समेत बैदेही। निसि दिनु देव जपत हहु जेही॥**

'गुरुवर्य, तुम्ही रात्रंदिवस ज्यांचा जप करता ते अयोध्येचे राजे दशरथ यांचे कुमार जगदाधार श्रीरामचंद्र हे लक्ष्मण व सीता यांचे सोबत तुम्हांला भेटायला येत आहेत.॥ ४॥

**सुनत अगस्ति तुरत उठि धाए। हरि बिलोकि लोचन जल छाए॥**
**मुनि पद कमल परे द्वौ भाई। रिषि अति प्रीति लिए उर लाई॥**

हे ऐकताच अगस्त्य मुनी त्वरित उठून धावले. भगवंतांना पाहताच त्यांच्या नेत्रांतून आनंद आणि

प्रेमाचे अश्रू वाहू लागले. दोन्ही बंधूंनी मुनींच्या चरणी लोटांगण घातले. ऋषींनी उठवून मोठ्या प्रेमाने त्यांना हृदयाशी धरले. ॥ ५ ॥

**सादर कुसल पूछि मुनि ग्यानी। आसन बर बैठारे आनी॥**
**पुनि करि बहु प्रकार प्रभु पूजा। मोहि सम भाग्यवंत नहिं दूजा॥**

ज्ञानी मुनींनी आदराने क्षेम-कुशल विचारून त्यांना श्रेष्ठ आसनावर बसविले. नंतर अनेक प्रकारे प्रभूंची पूजा करून म्हटले, 'माझ्यासारखा भाग्यवान असा दुसरा कोणी नाही.' ॥ ६ ॥

**जहँ लगि रहे अपर मुनि बृंदा। हरषे सब बिलोकि सुखकंदा॥**

तेथे जितके इतर मुनिगण होते, ते सर्व आनंदकंद श्रीरामांचे दर्शन घेऊन आनंदित झाले. ॥ ७ ॥

दो०—**मुनि समूह महँ बैठे सन्मुख सब की ओर।**
**सरद इंदु तन चितवत मानहुँ निकर चकोर॥ १२॥**

मुनींच्या समाजामध्ये श्रीरामचंद्र सर्वांच्याकडे मुख करून बसले. सर्व मुनी त्यांना एकटक पाहू लागले. असे वाटत होते की, जणू चकोर पक्ष्यांचा जमाव शरत्पौर्णिमेच्या चंद्राकडे पाहात आहे. ॥ १२ ॥

**तब रघुबीर कहा मुनि पाहीं। तुम्ह सन प्रभु दुराव कछु नाहीं॥**
**तुम्ह जानहु जेहि कारन आयउँ। ताते तात न कहि समुझायउँ॥**

तेव्हा श्रीरामांनी मुनींना सांगितले की, 'हे प्रभो, तुमच्यापासून काही लपून नाही. मी ज्यासाठी आलो आहे, ते तुम्ही जाणताच. म्हणून हे मुनिवर्य! मी आपल्याला स्पष्टपणे काही सांगितले नाही. ॥ १ ॥

**अब सो मंत्र देहु प्रभु मोही। जेहि प्रकार मारौं मुनिद्रोही॥**
**मुनि मुसुकाने सुनि प्रभु बानी। पूछेहु नाथ मोहि का जानी॥**

हे मुनिवर्य! आता तुम्ही मला सल्ला द्या की, कशाप्रकारे मी मुनि-द्रोही राक्षसांना मारू?' प्रभूंची वाणी ऐकून मुनी हसले आणि म्हणाले? 'हे नाथ, तुम्ही काय म्हणून मला हा प्रश्न विचारलात? ॥ २ ॥

**तुम्हरेइँ भजन प्रभाव अघारी। जानउँ महिमा कछुक तुम्हारी॥**
**ऊमरि तरु बिसाल तव माया। फल ब्रह्मांड अनेक निकाया॥**

हे पापांचा नाश करणारे. मी जर तुमच्याच भजनाच्या प्रभावाने तुमचा काही थोडासाच महिमा जाणतो. तुमची माया ही औदुंबराच्या विशाल वृक्षासारखी आहे. अनेक ब्रह्मांडांचे समूह हे त्याचीच फळे आहेत. ॥ ३ ॥

**जीव चराचर जंतु समाना। भीतर बसहिं न जानहिं आना॥**
**ते फल भच्छक कठिन कराला। तव भयँ डरत सदा सोउ काला॥**

चराचर जीव हे उंबराच्या फळात राहणाऱ्या लहान जंतूंप्रमाणे ब्रह्मांडरूपी फळांमध्ये राहातात आणि आपल्या त्या छोट्याशा जगाशिवाय दुसरे काही त्यांना माहीत नसते. त्या फळांना खाऊन टाकणारा कराल काल आहे. तो कालसुद्धा नेहमी तुम्हांला भिऊन असतो. ॥ ४ ॥

**ते तुम्ह सकल लोकपति साईं। पूँछेहु मोहि मनुज की नाईं॥**
**यह बर मागउँ कृपानिकेता। बसहु हृदयँ श्री अनुज समेता॥**

त्या सर्व लोकपालांचे स्वामी असूनही तुम्ही मला सामान्य मनुष्याप्रमाणे प्रश्न विचारला. मी असा वर मागतो की, तुम्ही सीता व लक्ष्मण यांच्यासह माझ्या हृदयात नित्य निवास करावा. ॥ ५ ॥

**अबिरल भगति बिरति सतसंगा। चरन सरोरुह प्रीति अभंगा॥**
**जद्यपि ब्रह्म अखंड अनंता। अनुभव गम्य भजहिं जेहि संता॥**

मला प्रगाढ भक्ती, वैराग्य, सत्संग व तुमच्या चरणकमली अतूट प्रेम मिळो. जरी तुम्ही अखंड व अनंत ब्रह्म आहात, अनुभवानेच तुम्हांला जाणता येते आणि संतजन तुमचे भजन करतात, ॥ ६ ॥

**अस तव रूप बखानउँ जानउँ। फिरि फिरि सगुन ब्रह्म रति मानउँ॥**
**संतत दासन्ह देहु बड़ाई। तातें मोहि पूँछेहु रघुराई॥**

जरी मी तुमचे हे रूप जाणतो आणि त्याचे वर्णनसुद्धा करतो, तरीही पुनःपुन्हा मी सगुण ब्रह्मावरच प्रेम करतो. तुम्ही नेहमी सेवकांना मोठेपणा देता, म्हणून हे रघुनाथ, तुम्ही मला हे विचारले. ॥ ७ ॥

**है प्रभु परम मनोहर ठाऊँ। पावन पंचबटी तेहि नाऊँ॥**
**दंडक बन पुनीत प्रभु करहू। उग्र साप मुनिबर कर हरहू॥**

हे प्रभो! एक परम मनोहर व पवित्र स्थान आहे, त्याचे नाव पंचवटी. हे प्रभो, तुम्ही त्या दंडकवनातील पंचवटीस पवित्र करा आणि श्रेष्ठ गौतम ऋषींचा कठोर शाप दूर करा. ॥ ८ ॥

**बास करहु तहँ रघुकुल राया। कीजे सकल मुनिन्ह पर दाया॥**
**चले राम मुनि आयसु पाई। तुरतहिं पंचबटी निअराई॥**

हे रघुकुलाचे स्वामी! सर्व मुनींच्यावर दया करून आपण तेथेच निवास करा.' मुनींची आज्ञा मिळाल्यावर श्रीरामचंद्र तेथून निघाले आणि लवकरच पंचवटीजवळ पोहोचले. ॥ ९ ॥

दो०—गीधराज सैं भेंट भइ बहु बिधि प्रीति बढ़ाइ।
गोदावरी निकट प्रभु रहे परन गृह छाइ॥ १३॥

तेथे गृधराज जटायू याची भेट झाली. त्याच्यावर खूप प्रेम व्यक्त करून प्रभू रामचंद्र गोदावरीजवळच्या पंचवटीमध्ये पर्णकुटी बनवून राहू लागले.॥ १३॥

जब ते राम कीन्ह तहँ बासा। सुखी भए मुनि बीती त्रासा॥
गिरि बन नदीं ताल छबि छाए। दिन दिन प्रति अति होहिं सुहाए॥

श्रीराम तेथे निवास करू लागले. तेव्हापासून मुनींना आनंद झाला. त्यांची भीती दूर झाली. तेथील पर्वत, वने, नदी व तलावांना शोभा आली. ते सर्व दिवसेंदिवस अधिक शोभिवंत दिसू लागले.॥ १॥

खग मृग बृंद अनंदित रहहीं। मधुप मधुर गुंजत छबि लहहीं॥
सो बन बरनि न सक अहिराजा। जहाँ प्रगट रघुबीर बिराजा॥

पक्षी व पशू यांचे समूह आनंदित होऊन राहू लागले. भ्रमर गुंजारव करताना शोभून दिसत होते. जेथे प्रत्यक्ष श्रीराम विराजमान आहेत, त्या वनाचे वर्णन सर्पराज शेषसुद्धा करू शकणार नाही.॥ २॥

एक बार प्रभु सुख आसीना। लछिमन बचन कहे छलहीना॥
सुर नर मुनि सचराचर साईं। मैं पूछउँ निज प्रभु की नाईं॥

एकदा प्रभू सुखाने बसले होते. त्यावेळी लक्ष्मण त्यांना सहजपणाने म्हणाला, 'हे देवता, मनुष्य, मुनी व चराचराचे स्वामी, मी तुम्हांला आपला स्वामी समजून विचारतो.॥ ३॥

मोहि समुझाइ कहहु सोइ देवा। सब तजि करौं चरन रज सेवा॥
कहहु ग्यान बिराग अरु माया। कहहु सो भगति करहु जेहिं दाया॥

हे देव, मला समजावून ती गोष्ट सांगा की, ज्यायोगे सर्व काही सोडून देऊन तुमच्या चरणरजाची मी सेवा करीत राहीन. तसेच ज्ञान, वैराग्य आणि माया यांचे स्वरूप सांगा आणि ज्यामुळे तुम्ही कृपा करता, ती भक्ती मला सांगा.॥ ४॥

दो०—ईस्वर जीव भेद प्रभु सकल कहौ समुझाइ।
जातें होइ चरन रति सोक मोह भ्रम जाइ॥ १४॥

हे प्रभो, ईश्वर व जीव यांच्यातील भेदसुद्धा समजावून द्या. त्यामुळे तुमच्या चरणी मला प्रेम उत्पन्न होईल आणि माझे शोक, मोह आणि भ्रम नष्ट होतील.॥ १४॥

थोरेहि महँ सब कहउँ बुझाई। सुनहु तात मति मन चित लाई॥
मैं अरु मोर तोर तैं माया। जेहिं बस कीन्हे जीव निकाया॥

श्रीराम म्हणाले, ‘हे बंधो! मी थोडक्यातच तुला सर्व समजावून सांगतो. तू मन, चित्त आणि बुद्धी लावून ऐक. मी आणि माझे, तू आणि तुझे असे मानणे हीच माया होय. तिनेच सर्व जीवांना आपल्या ताब्यात ठेवले आहे. ॥ १ ॥

**गो गोचर जहँ लगि मन जाई। सो सब माया जानेहु भाई॥**
**तेहि कर भेद सुनहु तुम्ह सोऊ। बिद्या अपर अबिद्या दोऊ॥**

हे बंधू, इंद्रिये, विषय आणि जेथवर मन जाते, ती सर्व माया आहे, असे समज. तिचेही विद्या माया आणि अविद्या माया असे दोन भेद आहेत, ते ऐकून घे. ॥ २ ॥

**एक दुष्ट अतिसय दुखरूपा। जा बस जीव परा भवकूपा॥**
**एक रचइ जग गुन बस जाकें। प्रभु प्रेरित नहिं निज बल ताकें॥**

पहिली अविद्या माया ही दुष्ट आहे आणि अत्यंत दु:खरूप आहे. तिच्या अधीन झाल्यामुळे जीव हा संसाररूपी विहिरीत पडलेला आहे. आणि दुसरी विद्या माया. हिच्या अधीन गुण आहेत. ती जगाची निर्मिती करते. प्रभूच्याद्वारे ती प्रेरित होते. तिला स्वत:चे सामर्थ्य काहीही नाही. ॥ ३ ॥

**ग्यान मान जहँ एकउ नाहीं। देख ब्रह्म समान सब माहीं॥**
**कहिअ तात सो परम बिरागी। तृन सम सिद्धि तीनि गुन त्यागी॥**

जेथे मान इत्यादी एकही दोष नसतो आणि जो सर्वांठायी समान रूपाने ब्रह्म पाहातो, ते ज्ञान होय. हे वत्सा, ज्याने सर्व सिद्धींचा आणि तिन्ही गुणांचा कस्पटासारखा त्याग केलेला आहे, त्यालाच वैराग्यवान म्हटले पाहिजे. ॥ ४ ॥

दो०—**माया ईस न आपु कहुँ जान कहिअ सो जीव।**
**बंध मोच्छ प्रद सर्बपर माया प्रेरक सीव॥ १५॥**

जो माया, ईश्वर व आपले स्वरूप जाणत नाही, त्याला जीव म्हणावे. जो कर्म-बंधनापासून मुक्त करणारा सर्वांच्या पलीकडचा आणि मायेचा प्रेरक आहे, तो ईश्वर होय. ॥ १५ ॥

**धर्म तें बिरति जोग तें ग्याना। ग्यान मोच्छप्रद बेद बखाना॥**
**जातें बेगि द्रवउँ मैं भाई। सो मम भगति भगत सुखदाई॥**

धर्माच्या आचरणामुळे वैराग्य आणि योगामुळे ज्ञान होते आणि ज्ञान हे मोक्ष देणारे आहे, असे वेदांनी वर्णन केले. आणि हे बंधू, ज्यामुळे मी शीघ्र प्रसन्न होतो, ती माझी भक्ती आहे. ती भक्तांना सुख देणारी आहे. ॥ १ ॥

**सो सुतंत्र अवलंब न आना। तेहि आधीन ग्यान बिग्याना॥**
**भगति तात अनुपम सुखमूला। मिलइ सो संत होइँ अनुकूला॥**

ती भक्ती स्वतंत्र आहे. तिला दुसऱ्या कशाचीही गरज नसते. ज्ञान व विज्ञान हे तिच्या अधीन असतात. हे बंधो! भक्ती ही अनुपम व सुखाचे मूळ आहे आणि जेव्हा संत प्रसन्न होतात, तेव्हाच ती मिळते.॥ २॥

**भगति कि साधन कहउँ बखानी। सुगम पंथ मोहि पावहिं प्रानी॥**
**प्रथमहिं बिप्र चरन अति प्रीती। निज निज कर्म निरत श्रुति रीती॥**

आता मी भक्तीचे साधन विस्ताराने सांगतो. हा मार्ग सोपा आहे. त्यामुळे जीव मला सहजपणे प्राप्त करतो. प्रथम, ब्राह्मणांच्या चरणी अत्यंत प्रेम असावे आणि वेद-रीतीप्रमाणे आपापल्या वर्णाश्रमकर्मामध्ये रत असावे.॥ ३॥

**एहि कर फल पुनि बिषय बिरागा। तब मम धर्म उपज अनुरागा॥**
**श्रवनादिक नव भक्ति दृढ़ाहीं। मम लीला रति अति मन माहीं॥**

याचे फल म्हणून मग विषयांपासून वैराग्य येईल. वैराग्य आल्यावर माझ्या भागवत धर्माबद्दल प्रेम निर्माण होईल. तेव्हा श्रवणादी नऊ प्रकारच्या भक्ती दृढ होतील आणि मनात माझ्या लीलांविषयी अत्यंत प्रेम उत्पन्न होईल.॥ ४॥

**संत चरन पंकज अति प्रेमा। मन क्रम बचन भजन दृढ़ नेमा॥**
**गुरु पितु मातु बंधु पति देवा। सब मोहि कहँ जानै दृढ़ सेवा॥**

ज्याला संतांच्या चरणकमलांविषयी अत्यंत प्रेम असेल, मन, वचन आणि कर्म यांनी भजन करण्याचा ज्याचा नियम असेल, जो गुरू, पिता, माता, बंधू, पती आणि देव हे सर्व काही मलाच मानतो व सेवा करण्यात दृढ असतो, ॥ ५॥

**मम गुन गावत पुलक सरीरा। गदगद गिरा नयन बह नीरा॥**
**काम आदि मद दंभ न जाकें। तात निरंतर बस मैं ताकें॥**

माझे गुण गाताना ज्याचे शरीर पुलकित होते, वाणी सद्गदित होते, नेत्रांतून प्रेमाश्रूंचे जल वाहू लागते आणि काम, मद आणि दंभ इत्यादी ज्याच्यामध्ये नसतील, हे बंधू मी नेहमी त्याला वश असतो.॥ ६॥

दो०—**बचन कर्म मन मोरि गति भजनु करहिं निःकाम।**
**तिन्ह के हृदय कमल महुँ करउँ सदा बिश्राम॥ १६॥**

जो कायावाचामनाने मलाच शरण आहे आणि जो निष्काम भावाने माझे भजन करतो, त्याच्या हृदयकमलामध्ये मी नित्य विसावा घेत असतो.'॥ १६ ॥

**भगति जोग सुनि अति सुख पावा। लछिमन प्रभु चरनन्हि सिरु नावा॥**
**एहि बिधि गए कछुक दिन बीती। कहत बिराग ग्यान गुन नीती॥**

हा भक्तियोग ऐकून लक्ष्मणाला अत्यंत आनंद झाला आणि त्याने प्रभूंच्या चरणी मस्तक ठेवले. अशा प्रकारे वैराग्य, ज्ञान, गुण आणि नीती समजावून सांगत काही दिवस गेले.॥ १ ॥

**सूपनखा रावन कै बहिनी। दुष्ट हृदय दारुन जस अहिनी॥**
**पंचबटी सो गइ एक बारा। देखि बिकल भइ जुगल कुमारा॥**

शूर्पणखा नावाची रावणाची एक बहीण होती. जी नागिणीसारखी भयानक आणि दुष्ट मनाची होती. ती एकदा पंचवटीत गेली आणि दोन्ही राजकुमारांना पाहून कामासक्त झाली.॥ २ ॥

**भ्राता पिता पुत्र उरगारी। पुरुष मनोहर निरखत नारी॥**
**होइ बिकल सक मनहि न रोकी। जिमि रबिमनि द्रव रबिहि बिलोकी॥**

काकभुशुंडी म्हणतात, की 'हे गरुडा, शूर्पणखेसारखी राक्षसी, धर्मज्ञानशून्य, कामांध स्त्री मनोहर पुरुष पाहून, मग तो, भाऊ, बाप, पुत्र का असेना, बेचैन होते आणि मन आवरू शकत नाही. ज्याप्रमाणे सूर्यकांतमणी हा सूर्याला पाहाताच पाझरू लागतो.॥ ३ ॥

**रुचिर रूप धरि प्रभु पहिं जाई। बोली बचन बहुत मुसुकाई॥**
**तुम्ह सम पुरुष न मो सम नारी। यह सँजोग बिधि रचा बिचारी॥**

ती सुंदर रूप धारण करून प्रभूंच्याजवळ आली आणि मोहक हास्य करीत म्हणाली, 'तुमच्यासारखा कोणी पुरुष नाही आणि माझ्यासारखी स्त्री. विधात्याने ही आपली जोडी खूप विचार करून बनविली आहे.॥ ४ ॥

**मम अनुरूप पुरुष जग माहीं। देखेउँ खोजि लोक तिहु नाहीं॥**
**तातें अब लगि रहिउँ कुमारी। मनु माना कछु तुम्हहि निहारी॥**

मी तिन्ही लोक शोधले, परंतु माझ्याजोगा पुरुष जगात कोठेही नाही. त्यामुळे मी अजुनी कुमारी राहिले आहे. आता तुम्हांला पाहून माझे मन मोहित झाले.'॥ ५ ॥

**सीतहि चितइ कही प्रभु बाता। अहइ कुआर मोर लघु भ्राता॥**
**गइ लछिमन रिपु भगिनी जानी। प्रभु बिलोकि बोले मृदु बानी॥**

प्रभू श्रीरामचंद्र सीतेकडे पाहात म्हणाले की, 'माझा लहान भाऊ कुमार आहे' तेव्हा ती लक्ष्मणाकडे गेली. लक्ष्मणाने ती शत्रूची बहीण आहे, हे ओळखून प्रभूंकडे पाहात कोमल वाणीने थट्टेत तिला म्हटले,॥ ६ ॥

**सुंदरि सुनु मैं उन्ह कर दासा। पराधीन नहिं तोर सुपासा॥**
**प्रभु समर्थ कोसलपुर राजा। जो कछु करहिं उनहि सब छाजा॥**

'हे सुंदरी, ऐक. मी तर त्यांचा दास आहे. मी पराधीन आहे, म्हणून तुला सुख मिळणार नाही. प्रभू समर्थ आहेत, कोसलपुरचे राजे आहेत, त्यांनी काहीही केले, तरी ते त्यांना शोभते.॥ ७॥

**सेवक सुख चह मान भिखारी। ब्यसनी धन सुभ गति बिभिचारी॥**
**लोभी जसु चह चार गुमानी। नभ दुहि दूध चहत ए प्रानी॥**

सेवकाने सुखाची इच्छा करणे, भिकाऱ्याने सन्मानाची इच्छा करणे, व्यसनी माणसाने पैशाची व व्यभिचाऱ्याने शुभगतीची इच्छा करणे, लोभ्याने कीर्तीचा हव्यास धरणे आणि दूताने मानाचा हव्यास धरणे, हे सर्व आकाशाची धार काढून दूध मिळविण्यासारखे आहे.॥ ८॥

**पुनि फिरि राम निकट सो आई। प्रभु लछिमन पहिं बहुरि पठाई॥**
**लछिमन कहा तोहि सो बरई। जो तृन तोरि लाज परिहरई॥**

तेव्हा ती परत श्रीरामांच्याजवळ आली. प्रभूंनी तिला लक्ष्मणाकडे पाठविले. लक्ष्मण म्हणाला, 'जो अत्यंत निर्लज्ज असेल, तोच तुला वरील.॥ ९॥

**तब खिसिआनि राम पहिं गई। रूप भयंकर प्रगटत भई॥**
**सीतहि सभय देखि रघुराई। कहा अनुज सन सयन बुझाई॥**

मग ती चिडून श्रीरामांच्याकडे गेली आणि तिने आपले भयंकर रूप प्रकट केले. तिला पाहून सीता भयभीत झाल्याचे पाहिले, तेव्हा श्रीरघुनाथांनी लक्ष्मणाला इशारा केला.॥ १०॥

दो०—**लछिमन अति लाघवँ सो नाक कान बिनु कीन्हि।**
**ताके कर रावन कहँ मनौ चुनौती दीन्हि॥ १७॥**

लक्ष्मणाने मोठ्या चपळाईने तिचे नाक व कान कापले. जणू त्याने तिच्याद्वारे रावणाला आव्हान दिले.॥ १७॥

**नाक कान बिनु भइ बिकरारा। जनु स्रव सैल गेरु कै धारा॥**
**खर दूषन पहिं गइ बिलपाता। धिग धिग तव पौरुष बल भ्राता॥**

नाक-कानांविना ती भयंकर दिसू लागली. काळ्या पर्वतातून कावेचा प्रवाह वाहावा, तसे तिच्या शरीरातून रक्त वाहू लागले. ती विलाप करीत खर-दूषण यांच्यापाशी गेली. आणि म्हणाली, 'बंधूंनो, तुमच्या पौरुषाचा धिक्कार असो, तुमच्या सामर्थ्याचा धिक्कार असो.'॥ १॥

**तेहिं पूछा सब कहेसि बुझाई। जातुधान सुनि सेन बनाई॥**
**धाए निसिचर निकर बरूथा। जनु सपच्छ कज्जल गिरि जूथा॥**

त्यांनी विचारल्यावर तिने सर्व सांगितले. ते सर्व ऐकून राक्षसांनी सेना सज्ज केली. राक्षसांच्या झुंडीच्या झुंडी धावून गेल्या. त्या जणू पंखधारी काजळाच्या पर्वतांच्या झुंडी दिसत होत्या. ॥ २ ॥

**नाना बाहन नानाकारा। नानायुध धर घोर अपारा॥**
**सूपनखा आगें करि लीनी। असुभ रूप श्रुति नासा हीनी॥**

ते अनेक प्रकारच्या वाहनांवर बसलेले व अनेक आकारांचे होते. ते अपार होते आणि अनेक प्रकारची असंख्य भयंकर शस्त्रे त्यांनी धारण केली होती. त्यांनी नाक-कान कापलेल्या अमंगलरूपिणी शूर्पणखेस पुढे केले. ॥ ३ ॥

**असगुन अमित होहिं भयकारी। गनहिं न मृत्यु बिबस सब झारी॥**
**गर्जहिं तर्जहिं गगन उड़ाहीं। देखि कटकु भट अति हरषाहीं॥**

अगणित भयंकर अपशकुन होत होते. परंतु मृत्यूच्या तोंडी असल्यामुळे त्या सर्वांनी त्याची पर्वा केली नाही. गर्जना करीत, ललकारत आणि आकाशात ते उडत होते. सेना पाहून योद्ध्यांना फार हर्ष वाटत होता. ॥ ४ ॥

**कोउ कह जिअत धरहु द्वौ भाई। धरि मारहु तिय लेहु छड़ाई॥**
**धूरि पूरि नभ मंडल रहा। राम बोलाइ अनुज सन कहा॥**

कोणी म्हणत होता की, 'दोघा भावांना पकडा, पकडून मारून टाका आणि स्त्रीचे अपहरण करा.' आकाश धुळीने भरून गेले होते. तेव्हा श्रीरामांनी लक्ष्मणाला बोलावून सांगितले, ॥ ५ ॥

**लै जानकिहि जाहु गिरि कंदर। आवा निसिचर कटकु भयंकर॥**
**रहेहु सजग सुनि प्रभु कै बानी। चले सहित श्री सर धनु पानी॥**

'राक्षसांची भयंकर सेना आलेली आहे. जानकीला घेऊन तू पर्वताच्या गुहेमध्ये जा. सावध राहा.' प्रभू रामचंद्रांचे बोलणे ऐकून लक्ष्मण हातांमध्ये धनुष्य-बाण घेऊन सीतेसह निघाला. ॥ ६ ॥

**देखि राम रिपुदल चलि आवा। बिहसि कठिन कोदंड चढ़ावा॥**

शत्रूंची सेना जवळ आल्याचे पाहून श्रीरामांनी हसून कठीण धनुष्य सज्ज केले. ॥ ७ ॥

छं०—**कोदंड कठिन चढ़ाइ सिर जट जूट बाँधत सोह क्यों।**
**मरकत सयल पर लरत दामिनि कोटि सों जुग भुजग ज्यों॥**
**कटि कसि निषंग बिसाल भुज गहि चाप बिसिख सुधारि कै।**
**चितवत मनहुँ मृगराज प्रभु गजराज घटा निहारि कै॥**

कठीण धनुष्य सज्ज केलेले व शिरावर जटा बांधलेले प्रभू असे शोभत होते की पाचूच्या

पर्वतावर कोट्यवधी विजांबरोबर दोन साप लढत आहेत. कमरेला भाते बांधून, विशाल भुजांमध्ये धनुष्य बाण सज्ज करून प्रभू श्रीरामचंद्र राक्षसांकडे पाहात होते. जणू उन्मत्त हत्तींची झुंड पाहून सिंह त्यांना पाहात होता.

**सो०—आइ गए बगमेल धरहु धरहु धावत सुभट।**
**जथा बिलोकि अकेल बाल रबिहि घेरत दनुज॥ १८॥**

'पकडा, पकडा' असे ओरडत राक्षस योद्धे मोठ्या वेगाने धावत आले. त्यांनी श्रीरामांना चोहीकडे घेरले. ज्याप्रमाणे बालसूर्य एकटा आहे, असे पाहून मंदेह नामक दैत्यांनी त्याला घेरावे. ॥ १८ ॥

**प्रभु बिलोकि सर सकहिं न डारी। थकित भई रजनीचर धारी॥**
**सचिव बोलि बोले खर दूषन। यह कोउ नृपबालक नर भूषन॥**

सौंदर्य-माधुर्य-निधी असलेल्या श्रीरामांना पाहून राक्षसांची सेना थक्क झाली. ती त्यांच्यावर बाण सोडू शकली नाही. मंत्र्याला बोलावून खर-दूषण म्हणाले, 'हा राजकुमार कोणी मनुष्यांचा भूषण असावा. ॥ १ ॥

**नाग असुर सुर नर मुनि जेते। देखे जिते हते हम केते॥**
**हम भरि जन्म सुनहु सब भाई। देखी नहिं असि सुंदरताई॥**

जितके म्हणून नाग, असुर, देव, मनुष्य आणि मुनी आहेत, त्यांपैकी किती तरी आम्ही पाहिले आहेत. जिंकले आहेत आणि मारून टाकले आहेत. परंतु सर्व बंधूनो, आम्ही जन्मात कधी असे सौंदर्य कोठे पाहिले नाही. ॥ २ ॥

**जद्यपि भगिनी कीन्हि कुरूपा। बध लायक नहिं पुरुष अनूपा॥**
**देहु तुरत निज नारि दुराई। जीअत भवन जाहु द्वौ भाई॥**

जरी याने आमच्या बहिणीला कुरूप केले असले, तरी हा अनुपम पुरुष वध करण्याजोगा नाही. 'लपविलेली तुमची स्त्री आम्हांला ताबडतोब द्या आणि तुम्ही दोघे बंधू जिवंतपणे परत जा. ॥ ३ ॥

**मोर कहा तुम्ह ताहि सुनावहु। तासु बचन सुनि आतुर आवहु॥**
**दूतन्ह कहा राम सन जाई। सुनत राम बोले मुसुकाई॥**

असा माझा निरोप त्याला सांगा आणि त्याचे उत्तर घेऊन लगेच परत या.' दूतांनी जाऊन हा निरोप श्रीरामचंद्रांना सांगितला. तो ऐकून श्रीराम हसून म्हणाले, ॥ ४ ॥

**हम छत्री मृगया बन करहीं। तुम्ह से खल मृग खोजत फिरहीं॥**
**रिपु बलवंत देखि नहिं डरहीं। एक बार कालहु सन लरहीं॥**

'आम्ही क्षत्रिय आहोत. आम्ही वनात शिकार करतो व तुमच्या-सारख्या दुष्ट पशूंना शोधत असतो. आम्ही बलवान शत्रू पाहून घाबरत नसतो. लढाई करण्यास प्रत्यक्ष काळ आला तरी वेळ आली तर आम्ही त्याच्याशीही लढू. ॥ ५ ॥

**जद्यपि मनुज दनुज कुल घालक। मुनि पालक खल सालक बालक॥**
**जौं न होइ बल घर फिरि जाहू। समर बिमुख मैं हतउँ न काहू॥**

जरी आम्ही मनुष्य असलो, तरी दैत्यकुलाचा नाश करणारे आणि मुनींचे रक्षण करणारे आहोत. आम्ही बालक आहोत. परंतु दुष्टांना दंड देणारे आहोत. जर बळ नसेल तर परत जा. युद्धामध्ये पाठ फिरविणाऱ्याला मी मारत नाही.॥ ६॥

**रन चढ़ि करिअ कपट चतुराई। रिपु पर कृपा परम कदराई॥**
**दूतन्ह जाइ तुरत सब कहेऊ। सुनि खर दूषन उर अति दहेऊ॥**

रणामध्ये येऊन कपटकारस्थान करणे आणि शत्रूला पाठ दाखविणे, हा फार मोठा भित्रेपणा आहे' दूतांनी परतून लगेच सर्व गोष्टी सांगितल्या. त्या ऐकून खर-दूषण यांचे पित्त खवळले.॥ ७॥

छं०—**उर दहेउ कहेउ कि धरहु धाए बिकट भट रजनीचरा।**
**सर चाप तोमर सक्ति सूल कृपान परिघ परसु धरा॥**
**प्रभु कीन्हि धनुष टकोर प्रथम कठोर घोर भयावहा।**
**भए बधिर ब्याकुल जातुधान न ग्यान तेहि अवसर रहा॥**

खर-दूषण भडकले. ते म्हणाले, 'पकडा' ते ऐकून भयानक राक्षस योद्धे बाण, धनुष्य, तोमर, शक्ती, बरछी, कृपाण, परिघ आणि परशू घेऊन धावले. प्रभू श्रीरामांनी प्रथमतः धनुष्याचा कठोर, घोर व भयानक टणत्कार केला. तो ऐकताच राक्षस बहिरे व व्याकूळ झाले. त्यावेळी त्यांना शुद्ध राहिली नाही.

दो०—**सावधान होइ धाए जानि सबल आराति।**
**लागे बरषन राम पर अस्त्र सस्त्र बहुभाँति॥ १९ (क)॥**

मग ते शत्रू बलवान आहेत, असे पाहून सावध होऊन धावले आणि श्रीरामचंद्रांच्यावर अनेक प्रकारची शस्त्रास्त्रे सोडू लागले.॥ १९ (क)॥

**तिन्ह के आयुध तिल सम करि काटे रघुबीर।**
**तानि सरासन श्रवन लगि पुनि छाँड़े निज तीर॥ १९ (ख)॥**

श्रीरघुवीरांनी त्यांची शस्त्रे तिळाप्रमाणे तुकडे तुकडे करून टाकली. नंतर धनुष्य कानापर्यंत खेचून आपले बाण सोडले.॥ १९ (ख)॥

छं०—**तब चले बान कराल। फुंकरत जनु बहु ब्याल।**
**कोपेउ समर श्रीराम। चले बिसिख निसित निकाम॥ १॥**

ते भयानक बाण असे सुटले की, जणू पुष्कळ साप फूत्कार करीत जात होते. श्रीराम अत्यंत क्रुद्ध होऊन तीक्ष्ण बाण सोडू लागले. ॥ १ ॥

**अवलोकि खरतर तीर। मुरि चले निसिचर बीर।**
**भए क्रुद्ध तीनिउ भाइ। जो भागि रन ते जाइ॥ २॥**

ते अत्यंत तीक्ष्ण बाण पाहून राक्षसवीर पाठ दाखवून पळू लागले. तेव्हा खर, दूषण, त्रिशिरा हे तिन्ही भाऊ खवळून म्हणाले, 'जो युद्धातून पळेल, ॥ २ ॥

**तेहि बधब हम निज पानि। फिरे मरन मन महुँ ठानि।**
**आयुध अनेक प्रकार। सनमुख ते करहिं प्रहार॥ ३॥**

त्याला आम्ही मारून टाकू.' तेव्हा पळून जाणारे राक्षस मनात मरण्याचा निश्चय करून परत फिरले आणि समोर येऊन अनेक प्रकारच्या शस्त्रांचा श्रीरामांच्यावर प्रहार करू लागले. ॥ ३ ॥

**रिपु परम कोपे जानि। प्रभु धनुष सर संधानि।**
**छाँड़े बिपुल नाराच। लगे कटन बिकट पिसाच॥ ४॥**

शत्रू फार क्रुद्ध झाल्याचे पाहून प्रभूंनी धनुष्याला बाण लावून पुष्कळ बाण सोडले. त्यामुळे भयानक राक्षस कापले जाऊ लागले. ॥ ४ ॥

**उर सीस भुज कर चरन। जहँ तहँ लगे महि परन।**
**चिक्करत लागत बान। धर परत कुधर समान॥ ५॥**

त्यांची छाती, शिर, हात आणि पाय पृथ्वीवर इकडे-तिकडे पडू लागले. बाण लागताच ते हत्तीप्रमाणे चीत्कार करू लागले. त्यांची डोंगरासारखी धडे कापली जाऊन पडू लागली. ॥ ५ ॥

**भट कटत तन सत खंड। पुनि उठत करि पाषंड।**
**नभ उड़त बहु भुज मुंड। बिनु मौलि धावत रुंड॥ ६॥**

योद्ध्यांचे देह कापले जाऊन शेकडो तुकडे होत होते. मग ते मायेने उठून पुन्हा उभे राहात. आकाशात पुष्कळ भुजा व शिरे उडत होती आणि शिरांविना धडे पळत होती. ॥ ६ ॥

**खग कंक काक सृगाल। कटकटहिं कठिन कराल॥ ७॥**

घारी, कावळे इत्यादी पक्षी आणि कोल्हे भयंकर 'कटकट' असा आवाज करीत होते. ॥ ७ ॥

छं०—**कटकटहिं जंबुक भूत प्रेत पिसाच खर्पर संचहीं।**
**बेताल बीर कपाल ताल बजाइ जोगिनि नंचहीं॥**

**रघुबीर बान प्रचंड खंडहिं भटन्ह के उर भुज सिरा।**
**जहँ तहँ परहिं उठि लरहिं धर धरु धरु करहिं भयकर गिरा॥ १॥**

कोल्हे कटकट करीत होते. भुते, प्रेते, पिशाचे मुंडकी गोळा करीत होती. वीर-वेताळ मुंडक्यांवर ताल देत होते आणि योगिनी नाचत होत्या. श्रीरघुवीरांचे प्रचंड बाण राक्षस योद्ध्यांची वक्ष:स्थळे, भुजा व शिरांचे तुकडे-तुकडे करून टाकीत होते, त्यांची धडे जिकडे-तिकडे पडत होती. ते पुन्हा उठून लढत होते आणि 'पकडा, पकडा' असा भयंकर ओरडा करीत होते.॥ १॥

**अंतावरीं गहि उड़त गीध पिसाच कर गहि धावहीं।**
**संग्राम पुर बासी मनहुँ बहु बाल गुड़ी उड़ावहीं॥**
**मारे पछारे उर बिदारे बिपुल भट कहँरत परे।**
**अवलोकि निज दल बिकल भट तिसिरादि खर दूषन फिरे॥ २॥**

आंतड्यांचे एक टोक पकडून गिधाडे उडत होती तर त्यांचेच दुसरे टोक हाताने पकडून पिशाचे धावत होती. असे वाटत होते की, जणू युद्धरूपी नगरातील अनेक बालक पतंग उडवीत आहेत. अनेक योद्धे मारले गेले आणि खाली पडले. ज्यांचे हृदय विदीर्ण झाले होते, असे बरेचसे राक्षस खाली पडून विव्हळत होते. आपली सेना व्याकूळ झाल्याचे पाहून त्रिशिरा, खर, दूषण इत्यादी योद्धे श्रीरामांच्याकडे वळले.॥ २॥

**सर सक्ति तोमर परसु सूल कृपान एकहि बारहीं।**
**करि कोप श्रीरघुबीर पर अगनित निसाचर डारहीं॥**
**प्रभु निमिष महुँ रिपु सर निवारि पचारि डारे सायका।**
**दस दस बिसिख उर माझ मारे सकल निसिचर नायका॥ ३॥**

असंख्य राक्षस एकाच वेळी क्रोधाने बाण, शक्ती, तोमर, परशू, शूल आणि तलवार यांचा मारा श्रीरामांच्यावर करू लागले. प्रभूंनी एक क्षणात शत्रूंचे बाण तोडून टाकून, ललकार करीत त्यांच्यावर आपले बाण सोडले. सर्व राक्षस-सेनापतींच्या छातीवर दहा-दहा बाण मारले.॥

**महि परत उठि भट भिरत मरत न करत माया अति घनी।**
**सुर डरत चौदह सहस प्रेत बिलोकि एक अवध धनी॥**
**सुर मुनि सभय प्रभु देखि मायानाथ अति कौतुक कर्‍यो।**
**देखहिं परसपर राम करि संग्राम रिपुदल लरि मर्‍यो॥ ४॥**

योद्धे पृथ्वीवर पडत होते, पुन्हा उठून भिडत होते. मरत नव्हते. पुष्कळ प्रकारची मोठी

माया करीत होते. राक्षस चौदा हजार आहेत आणि श्रीराम एकटे आहेत, ते पाहून देव व मुनी भयभीत होऊन पाहात होते. त्यावेळी मायेचे स्वामी असलेल्या प्रभूंनी एक मोठे कौतुक केले. त्यामुळे शत्रूंच्या सेनेला एकमेक श्रीरामांच्या रूपात दिसू लागला आणि ते एकमेकांशीच युद्ध करीत मरून गेले. ॥ ४ ॥

**दो०—राम राम कहि तनु तजहिं पावहिं पद निर्बान।**
**करि उपाय रिपु मारे छन महुँ कृपानिधान॥ २० ( क )॥**

सर्वजण 'हाच राम आहे, याला मारा' अशा प्रकारे राम-राम म्हणत देह सोडत होते आणि त्यांना मोक्ष मिळत होता. कृपानिधान श्रीरामांनी असा उपाय करून क्षणभरात शत्रूंना मारून टाकले. ॥ २० (क) ॥

**हरषित बरषहिं सुमन सुर बाजहिं गगन निसान।**
**अस्तुति करि करि सब चले सोभित बिबिध बिमान॥ २० ( ख )॥**

देव आनंदाने फुले उधळू लागले. आकाशात नगारे वाजू लागले. मग ते सर्व स्तुती करीत अनेक विमानात बसून निघून गेले. ॥ २० (ख) ॥

**जब रघुनाथ समर रिपु जीते। सुर नर मुनि सब के भय बीते॥**
**तब लछिमन सीतहि लै आए। प्रभु पद परत हरषि उर लाए॥**

जेव्हा श्रीरामांनी शत्रूला युद्धात जिंकले आणि देव, मनुष्य आणि मुनी या सर्वांचे भय नष्ट झाले, तेव्हा लक्ष्मण सीतेला घेऊन आला. तो श्रीरामांच्या चरणी लोटांगण घालू लागला. तेवढ्यात प्रभूंनी त्याला मोठ्या आनंदाने उठवून हृदयाशी धरले. ॥ १ ॥

**सीता चितव स्याम मृदु गाता। परम प्रेम लोचन न अघाता॥**
**पंचबटीं बसि श्रीरघुनायक। करत चरित सुर मुनि सुखदायक॥**

सीता श्रीरामांच्या श्यामल व कोमल देहाकडे अत्यंत प्रेमाने पाहू लागली. तिचे नेत्र तृप्त होत नव्हते. अशाप्रकारे पंचवटीत राहून श्रीरघुनाथ देवांना व मुनींना सुख देणाऱ्या लीला करू लागले. ॥ २ ॥

**धुआँ देखि खरदूषन केरा। जाइ सुपनखाँ रावन प्रेरा॥**
**बोली बचन क्रोध करि भारी। देस कोस कै सुरति बिसारी॥**

खर-दूषण यांचा नाश झाल्याचे पाहून शूर्पणखेने जाऊन रावणाला भडकविले. ती मोठ्या क्रोधाने म्हणाली, 'तुला देशाची व खजिन्याची शुद्ध राहिली नाही. ॥ ३ ॥

**करसि पान सोवसि दिनु राती। सुधि नहिं तव सिर पर आराती॥**
**राज नीति बिनु धन बिनु धर्मा। हरिहि समर्पे बिनु सतकर्मा॥**
**बिद्या बिनु बिबेक उपजाएँ। श्रम फल पढ़ें किएँ अरु पाएँ॥**
**संग तें जती कुमंत्र ते राजा। मान ते ग्यान पान तें लाजा॥**

तू दारू पितोस आणि रात्रंदिवस पडून राहतोस. शत्रू तुझ्या डोक्यावर उभा आहे, याची तुला गंधवार्ता नाही. नीतीविना राज्य, धर्माविना धन प्राप्त केल्यामुळे आणि भगवंतांना अर्पण केल्याविना उत्तम कर्म केल्याने, तसेच विवेकाविना विद्या शिकल्याने परिणामी हाती फक्त श्रमच लागतात. विषयांच्या संगामुळे संन्यासी, वाईट सल्ल्यामुळे राजा, दुरभिमानामुळे ज्ञान, मदिरापानामुळे लाज, ॥ ४-५ ॥

**प्रीति प्रनय बिनु मद ते गुनी। नासहिं बेगि नीति अस सुनी॥**

नम्रतेविना प्रेम आणि अहंकारामुळे गुणवान पुरुष लवकरच नष्ट होतात, अशी नीती आहे, असे मी ऐकले आहे. ॥ ६ ॥

सो०—**रिपु रुज पावक पाप प्रभु अहि गनिअ न छोट करि।**
**अस कहि बिबिध बिलाप करि लागी रोदन करन॥ २१ ( क )॥**

शत्रू, रोग, अग्नी, पाप, स्वामी आणि सर्प यांना कधी लहान समजू नये.' असे म्हणून शूर्पणखा अनेक प्रकारे विलाप करू लागली. ॥ २१ (क) ॥

दो०—**सभा माझ परि ब्याकुल बहु प्रकार कह रोइ।**
**तोहि जिअत दसकंधर मोरि कि असि गति होइ॥ २१ ( ख )॥**

रावणाच्या सभेत ती व्याकूळ होऊन पडली आणि अनेक प्रकारे रडरडून म्हणू लागली की, 'अरे दशग्रीवा, तू जिवंत असताना माझी अशी दशा व्हावी काय?'॥ २१(ख)॥

**सुनत सभासद उठे अकुलाई। समुझाई गहि बाँह उठाई॥**
**कह लंकेस कहसि निज बाता। केइँ तव नासा कान निपाता॥**

शूर्पणखेचे बोलणे ऐकताच सभासद बेचैन झाले. त्यांनी शूर्पणखेचा हात धरून तिला उठवले आणि तिची समजूत घातली. लंकापती रावण म्हणाला, 'आधी तुझी हकीकत तर सांग. कुणी तुझे नाक-कान कापले?'॥ १ ॥

**अवध नृपति दसरथ के जाए। पुरुष सिंघ बन खेलन आए॥**
**समुझि परी मोहि उन्ह कै करनी। रहित निसाचर करिहहिं धरनी॥**

ती म्हणाली, 'अयोध्येचा राजा दशरथाचे पुत्र पुरुष-सिंह आहेत. वनात ते शिकार करण्यासाठी आले आहेत. मला त्यांची करणी अशी वाटली की, ते पृथ्वीला राक्षसरहित करून टाकतील. ॥ २ ॥

**जिन्ह कर भुजबल पाइ दसानन। अभय भए बिचरत मुनि कानन॥**
**देखत बालक काल समाना। परम धीर धन्वी गुन नाना॥**

त्यांच्या भुज-बळावर हे दशमुखा, मुनी लोक वनात निर्भयपणे वावरू लागले आहेत. दिसायला ते बालक आहेत, परंतु आहेत काळासारखे. ते परम धीर, श्रेष्ठ धनुर्धर आणि अनेक गुणांनी युक्त आहेत. ॥ ३ ॥

**अतुलित बल प्रताप द्वौ भ्राता। खल बध रत सुर मुनि सुखदाता॥**
**सोभा धाम राम अस नामा। तिन्ह के संग नारि एक स्यामा॥**

दोघे भाऊ बळाने व प्रतापाने अतुलनीय आहेत. ते दुष्टांचा वध करून देव व मुनींना सुख देणारे आहेत. ते शोभेचे माहेर आहेत. त्यांपैकी एकाचे नाव 'राम' आहे. त्यांच्याबरोबर एक सुंदर तरुण स्त्री आहे. ॥ ४ ॥

**रूप रासि बिधि नारि सँवारी। रति सत कोटि तासु बलिहारी॥**
**तासु अनुज काटे श्रुति नासा। सुनि तव भगिनि करहिं परिहासा॥**

विधात्याने त्या स्त्रीला रूपाची राशी बनविले आहे. ती इतकी सुंदर आहे की, शंभर कोटी रतींना तिच्यावरून ओवाळून टाकावे. रामाच्या लहान भावाने माझे नाक-कान कापून टाकले. मी तुझी बहीण आहे, हे ऐकून ते माझी चेष्टा करू लागले. ॥ ५ ॥

**खर दूषन सुनि लगे पुकारा। छन महुँ सकल कटक उन्ह मारा॥**
**खर दूषन तिसिरा कर घाता। सुनि दससीस जरे सब गाता॥**

माझी हाक ऐकून खर-दूषण मदतीला आले. परंतु एका क्षणात रामाने सर्व सेना मारून टाकली.' खर, दूषण आणि त्रिशिरा यांचा वध झाल्याचे ऐकून रावणाच्या सर्व अंगाची लाही लाही झाली. ॥ ६ ॥

दो०—**सूपनखहि समुझाइ करि बल बोलेसि बहु भाँति।**
**गयउ भवन अति सोचबस नीद परइ नहिं राति॥ २२॥**

त्याने शूर्पणखेची समजूत घालून पुष्कळ प्रकारे आपल्या बळाची प्रौढी सांगितली. परंतु मनातून तो अत्यंत चिंतित होऊन आपल्या महालात गेला. त्याला रात्रभर झोप आली नाही. ॥ २२ ॥

**सुर नर असुर नाग खग माहीं। मोरे अनुचर कहँ कोउ नाही॥**
**खर दूषन मोहि सम बलवंता। तिन्हहि को मारइ बिनु भगवंता॥**

तो मनातल्या मनात विचार करू लागला की, देव, मनुष्य, असुर, नाग आणि पक्ष्यांमध्ये कोणी असा नाही की, जो माझ्या सेवकावरही मात करू शकेल. खर-दूषण तर माझ्यासारखेच बलवान होते. त्यांना भगवंताशिवाय दुसरा कोण मारू शकेल? ॥ १ ॥

**सुर रंजन भंजन महि भारा। जौं भगवंत लीन्ह अवतारा॥**
**तौ मैं जाइ बैरु हठि करऊँ। प्रभु सर प्रान तजें भव तरऊँ॥**

देवांना आनंद देणाऱ्या व पृथ्वीचा भार हरण करणाऱ्या भगवंतानेच जर अवतार घेतला असेल, तर मी जाऊन मुद्दाम त्यांच्याशी वैर करीन आणि प्रभूंच्या बाणाने प्राण सोडून भवसागर तरून जाईन. ॥ २ ॥

**होइहि भजनु न तामस देहा। मन क्रम बचन मंत्र दृढ़ एहा॥**
**जौं नररूप भूपसुत कोऊ। हरिहउँ नारि जीति रन दोऊ॥**

या माझ्या तामस शरीराने भजन होणार नाही. म्हणून कायावाचामानाने त्यांच्याशी वैर करणे हाच माझा दृढ निश्चय आहे. आणि जर ते मनुष्यरूप असलेले कुणी राजकुमार असतील, तर मी त्या दोघांना युद्धात जिंकून त्यांच्या स्त्रीचे हरण करीन. ॥ ३ ॥

**चला अकेल जान चढ़ि तहवाँ। बस मारीच सिंधु तट जहवाँ॥**
**इहाँ राम जसि जुगुति बनाई। सुनहु उमा सो कथा सुहाई॥**

असा विचार करून रावण समुद्रतटावर जिथे मारीच राहात होता, तिथे रथात बसून एकटाच गेला. शिव म्हणतात, हे पार्वती, इथे श्रीरामचंद्रांनी काय युक्ती केली, ती सुंदर कथा ऐक. ॥ ४ ॥

दो०—**लछिमन गए बनहिं जब लेन मूल फल कंद।**
**जनकसुता सन बोले बिहसि कृपा सुख बृंद॥ २३॥**

लक्ष्मण जेव्हा कंद, मूल, फल आणण्यासाठी वनात गेला, तेव्हा एकांतात कृपा व सुखाचे निधान असलेले श्रीरामचंद्र हसून जानकीला म्हणाले. ॥ २३ ॥

**सुनहु प्रिया ब्रत रुचिर सुसीला। मैं कछु करबि ललित नरलीला॥**
**तुम्ह पावक महुँ करहु निवासा। जौ लगि करौं निसाचर नासा॥**

'हे प्रिये, हे सुंदर पातिव्रत्यधर्माचे पालन करणाऱ्या सुशीले, ऐक. मी आता काही मनोहर मनुष्य-लीला करीन. म्हणून मी राक्षसांचा नाश करीपर्यंत तू अग्नीत निवास कर.' ॥ १ ॥

**जबहिं राम सब कहा बखानी। प्रभु पद धरि हियँ अनल समानी॥**
**निज प्रतिबिंब राखि तहँ सीता। तैसइ सील रूप सुबिनीता॥**

श्रीरामांनी सर्व समजावून सांगताच सीतेने प्रभूंचे चरण हृदयात धारण करून ती अग्नीमध्ये समाविष्ट झाली. सीतेने आपलीच छायामूर्ती येथे ठेवली. ती तिच्यासारखीच शील-स्वभाव-रूपाची आणि विनम्र होती. ॥ २ ॥

**लछिमनहूँ यह मरमु न जाना। जो कछु चरित रचा भगवाना॥**
**दसमुख गयउ जहाँ मारीचा। नाइ माथ स्वारथ रत नीचा॥**

भगवंतांनी जी लीला मांडली होती, तिचे रहस्य लक्ष्मणालासुद्धा समजले नाही. स्वार्थपरायण आणि नीच रावण मारीचाकडे गेला व त्याच्यापुढे नतमस्तक झाला. ॥ ३ ॥

**नवनि नीच कै अति दुखदाई। जिमि अंकुस धनु उरग बिलाई॥**
**भयदायक खल कै प्रिय बानी। जिमि अकाल के कुसुम भवानी॥**

नीच मनुष्याने नम्रता दाखविणे हे अत्यंत दुःखदायक असते. जसे, अंकुश, धनुष्य, साप व मांजर यांचे झुकणे. हे भवानी, दुष्टाची गोड वाणीसुद्धा भय देणारी असते, ज्याप्रमाणे ऋतू नसताना फूल उमलणे, भयसूचक असते. ॥ ४ ॥

दो०—**करि पूजा मारीच तब सादर पूछी बात।**
**कवन हेतु मन ब्यग्र अति अकसर आयहु तात॥ २४॥**

मग मारीचाने रावणाचा सन्मान करून आदराने विचारले, 'हे स्वामी! तुमचे मन कशामुळे इतके बेचैन आहे आणि तुम्ही एकटेच कसे आलात?'॥ २४॥

**दसमुख सकल कथा तेहि आगें। कही सहित अभिमान अभागें॥**
**होहु कपट मृग तुम्ह छलकारी। जेहि बिधि हरि आनौं नृपनारी॥**

भाग्यहीन रावणाने सर्व कथा अभिमानाने त्याला सांगितली. आणि म्हटले, 'तू फसवणारा कपटमृग बन. त्या उपायाने मी त्या राजवधूला हरण करून आणीन.'॥ १ ॥

**तेहिं पुनि कहा सुनहु दससीसा। ते नररूप चराचर ईसा॥**
**तासों तात बयरु नहिं कीजै। मारें मरिअ जिआएँ जीजै॥**

तेव्हा मारीच म्हणाला, 'हे दशानन! ऐका. ते मनुष्यरूपातील चराचराचे ईश्वर आहेत. स्वामी! त्यांच्याशी वैर धरू नका. त्यांनी मारल्यास मरण व त्यांनी जगविल्यास जगणे असते. सर्वांचे जीवन-मरण त्यांच्या हाती आहे. ॥ २ ॥

**मुनि मख राखन गयउ कुमारा। बिनु फर सर रघुपति मोहि मारा॥**
**सत जोजन आयउँ छन माहीं। तिन्ह सन बयरु किएँ भल नाहीं॥**

हेच राजकुमार मुनी विश्वामित्रांच्या यज्ञाचे रक्षण करण्यासाठी गेले होते. त्यावेळी श्रीरघुनाथांनी फाळ नसलेला बाण मला मारला होता, त्यामुळे मी एका क्षणात शंभर योजने दूर येऊन पडलो. त्यांच्याशी वैर करण्यात कल्याण नाही. ॥ ३ ॥

**भइ मम कीट भृंग की नाई। जहँ तहँ मैं देखउँ दोउ भाई॥**
**जौं नर तात तदपि अति सूरा। तिन्हहि बिरोधि न आइहि पूरा॥**

माझी अवस्था कुंभारमाशीसारखी झालेली आहे. मला जिकडे तिकडे राम-लक्ष्मण हे दोघे भाऊच दिसतात. आणि हे राजा! जर ते मनुष्य असतील, तरीही मोठे शूरवीर आहेत. त्यांना विरोध करून यश मिळणार नाही. ॥ ४ ॥

**दो०—जेहिं ताड़का सुबाहु हति खंडेउ हर कोदंड।**
**खर दूषन तिसिरा बधेउ मनुज कि अस बरिबंड॥ २५॥**

ज्याने ताडका व सुबाहू यांना मारून शिवांचे धनुष्य मोडले आणि खर, दूषण व त्रिशिरा यांचा वध केला, असा प्रचंड बलवान कधी मनुष्य असेल काय?॥ २५॥

**जाहु भवन कुल कुसल बिचारी। सुनत जरा दीन्हिसि बहु गारी॥**
**गुरु जिमि मूढ़ करसि मम बोधा। कहु जग मोहि समान को जोधा॥**

म्हणून आपल्या कुळाच्या कल्याणाचा विचार करून परत जा.' हे ऐकून रावण रागावला आणि त्याने खूप शिव्या दिल्या. तो म्हणाला, 'अरे मूर्खा, तू एखाद्या गुरूप्रमाणे मला शिकवतोस काय? सांग बरे! जगात माझ्यासारखा योद्धा आहे कोण?'॥ १॥

**तब मारीच हृदयँ अनुमाना। नवहि बिरोधें नहिं कल्याना॥**
**सस्त्री मर्मी प्रभु सठ धनी। बैद बंदि कबि भानस गुनी॥**

तेव्हा मारीचाने मनात विचार केला की, शस्त्रधारी, रहस्य जाणणारा, समर्थ मालक, मूर्ख, श्रीमंत, वैद्य, भाट, कवी व स्वयंपाकी या नऊ व्यक्तींशी वैर करणाऱ्याचे कल्याण होत नाही.॥ २॥

**उभय भाँति देखा निज मरना। तब ताकिसि रघुनायक सरना॥**
**उतरु देत मोहि बधब अभागें। कस न मरौं रघुपति सर लागें॥**

जेव्हा मारीचाने दोन्हीकडे आपले मरण आहे, असे जाणले, तेव्हा त्याने श्रीरघुनाथांना शरण जाणे, हे चांगले असे ठरविले. त्याने विचार केला की, 'नाही' म्हणताच हा नीच रावण मला मारणार. मग श्रीरघुनाथांचा बाण लागून मी का मरू नये?॥ ३॥

**अस जियँ जानि दसानन संगा। चला राम पद प्रेम अभंगा॥**
**मन अति हरष जनाव न तेही। आजु देखिहउँ परम सनेही॥**

मनात असा विचार करून तो रावणाबरोबर निघाला. श्रीरामांच्या चरणी त्याचे अखंड प्रेम होते. त्याला मनातून आनंद वाटत होता की, आज मी आपल्या परमप्रिय श्रीरामांना पाहीन. परंतु ही आनंदाची गोष्ट त्याने रावणाला सांगितली नाही.॥ ४॥

**छं०—निज परम प्रीतम देखि लोचन सुफल करि सुख पाइहौं।**
**श्री सहित अनुज समेत कृपानिकेत पद मन लाइहौं॥**
**निर्बान दायक क्रोध जा कर भगति अबसहि बसकरी।**
**निज पानि सर संधानि सो मोहि बधिहि सुखसागर हरी॥**

तो मनात विचार करू लागला की, आपल्या परमप्रियतम श्रीरामांना पाहून नेत्रांचे पारणे फेडीन. जानकीसह व लक्ष्मणासह कृपानिधान श्रीरामांच्या चरणी मन लावीन. ज्यांचा क्रोध सुद्धा मोक्ष देणारा आहे आणि ज्यांची भक्ती स्वतंत्र अशा भगवंतांना वश करणारी आहे, अहाहा! तेच आनंदाचे सागर असलेले श्रीहरी आपल्या हातांनी बाण मारून माझा वध करणार!

**दो०—मम पाछें धर धावत धरें सरासन बान।**
**फिरि फिरि प्रभुहि बिलोकिहउँ धन्य न मो सम आन॥ २६॥**

धनुष्य-बाण धारण केलेल्या प्रभूंना मी माझ्या मागे मागे मला पकडण्यासाठी पृथ्वीवर धावताना वारंवार पाहीन. माझ्यासारखा धन्य दुसरा कोणीही नाही.॥ २६॥

**तेहि बन निकट दसानन गयऊ। तब मारीच कपटमृग भयऊ॥**
**अति बिचित्र कछु बरनि न जाई। कनक देह मनि रचित बनाई॥**

श्रीराम ज्या वनात राहात होते, त्या वनाजवळ जेव्हा रावण पोहोचला, तेव्हा मारीच वेषधारी मृग झाला. तो इतका अद्भुत होता की, त्याचे वर्णन करता येत नाही. त्याचे सोन्याचे शरीर रत्नजडित होते.॥ १॥

**सीता परम रुचिर मृग देखा। अंग अंग सुमनोहर बेषा॥**
**सुनहु देव रघुबीर कृपाला। एहि मृग कर अति सुंदर छाला॥**

सीतेने ते अत्यंत सुंदर हरण बघितले. त्याच्या अंगांची शोभा फार मनोहर होती. ती म्हणू लागली, 'हे देवा, हे कृपाळू रघुवीर, ऐका. या मृगाचे कातडे फारच सुंदर आहे.'॥ २॥

**सत्यसंध प्रभु बधि करि एही। आनहु चर्म कहति बैदेही॥**
**तब रघुपति जानत सब कारन। उठे हरषि सुर काजु सँवारन॥**

जानकी म्हणाली, 'हे सत्यप्रतिज्ञ प्रभो, याला मारून याचे कातडे आणून द्या.' तेव्हा रघुनाथ मारीच हा खोटा मृग असल्याचे जाणूनही देवांचे कार्य सिद्ध करण्यासाठी आनंदाने उठले.॥ ३॥

**मृग बिलोकि कटि परिकर बाँधा। करतल चाप रुचिर सर साँधा॥**
**प्रभु लछिमनहि कहा समुझाई। फिरत बिपिन निसिचर बहु भाई॥**

हरणाला पाहून श्रीरामांनी कंबर कसली आणि हातात धनुष्य घेऊन त्याच्यावर दिव्य बाण चढविला. मग प्रभूंनी लक्ष्मणाला समजावून सांगितले की, 'हे बंधू, वनात पुष्कळ राक्षस फिरत आहेत.॥ ४॥

**सीता केरि करेहु रखवारी। बुधि बिबेक बल समय बिचारी॥**
**प्रभुहि बिलोकि चला मृग भाजी। धाए रामु सरासन साजी॥**

तू बुद्धीने आणि विवेकाने शक्ती व वेळ-प्रसंग पाहून सीतेचे रक्षण कर.' प्रभूंना पाहून मृग पळू लागला. श्रीरामचंद्रसुद्धा धनुष्य सज्ज करून त्याच्यामागे धावले. ॥ ५ ॥

**निगम नेति सिव ध्यान न पावा। मायामृग पाछें सो धावा॥**
**कबहुँ निकट पुनि दूरि पराई। कबहुँक प्रगटइ कबहुँ छपाई॥**

वेद ज्यांच्याविषयी 'नेति नेति' असे म्हणतात आणि शिवांनाही ध्यानामध्ये ज्यांचे दर्शन घडत नाही, जे मन व वाणी यांच्या पलीकडचे आहेत, तेच श्रीराम मायेने बनलेल्या मृगामागे धावत होते. तो कधी जवळ येई, तर कधी दूर पळे. कधी प्रकट दिसे, तर कधी लपून राही. ॥ ६ ॥

**प्रगटत दुरत करत छल भूरी। एहि बिधि प्रभुहि गयउ लै दूरी॥**
**तब तकि राम कठिन सर मारा। धरनि परेउ करि घोर पुकारा॥**

अशाप्रकारे कधी दिसत तर कधी लपत अनेक प्रकारे कपट करीत तो प्रभूंना दूर घेऊन गेला. तेव्हा श्रीरामांनी नेम धरून तीक्ष्ण बाण मारला. तो लागताच तो किंचाळून खाली पडला. ॥ ७ ॥

**लछिमन कर प्रथमहिं लै नामा। पाछें सुमिरेसि मन महुँ रामा॥**
**प्रान तजत प्रगटेसि निज देहा। सुमिरेसि रामु समेत सनेहा॥**

प्रथम लक्ष्मणाचे नाव घेऊन त्याने श्रीरामांचे स्मरण केले. प्राण-त्याग करताना त्याने आपले राक्षसी रूप प्रकट केले आणि प्रेमाने श्रीरामांचे स्मरण केले. ॥ ८ ॥

**अंतर प्रेम तासु पहिचाना। मुनि दुर्लभ गति दीन्हि सुजाना॥**

सर्वज्ञ श्रीरामांनी त्याच्या मनातील प्रेम पाहून त्याला मुनींनाही दुर्लभ असलेली आपल्या परमपदाची गती दिली. ॥ ९ ॥

दो०—**बिपुल सुमन सुर बरषहिं गावहिं प्रभु गुन गाथ।**
**निज पद दीन्ह असुर कहुँ दीनबंधु रघुनाथ॥ २७॥**

देव फुले उधळत होते आणि प्रभूंची स्तुती करीत होते की, श्रीरघुनाथ असे दीनबंधू आहेत की, त्यांनी असुरालाही आपले परमपद दिले. ॥ २७ ॥

**खल बधि तुरत फिरे रघुबीरा। सोह चाप कर कटि तूनीरा॥**
**आरत गिरा सुनी जब सीता। कह लछिमन सन परम सभीता॥**

दुष्ट मारीचाला मारून श्रीरघुवीर लगेच परतले. त्यांच्या हातात धनुष्य व कमरेला भाता शोभून दिसत होता. इकडे मरताना मारीचाने 'हा लक्ष्मणा' असा आवाज काढला होता. जेव्हा सीतेने ती दु:खपूर्ण वाणी ऐकली, तेव्हा ती फार घाबरली आणि लक्ष्मणाला म्हणू लागली, ॥ १ ॥

**जाहु बेगि संकट अति भ्राता। लछिमन बिहसि कहा सुनु माता॥**
**भृकुटि बिलास सृष्टि लय होई। सपनेहुँ संकट परइ कि सोई॥**

'तू ताबडतोब जा. तुझे भाऊ संकटात आहेत.' लक्ष्मण हसून म्हणाला, 'हे माते, ज्यांच्या भृकुटीच्या नुसत्या इशाऱ्यावर संपूर्ण सृष्टीचा नाश होतो, ते श्रीराम कधी स्वप्नातही संकटात पडू शकतील काय'?॥ २॥

**मरम बचन जब सीता बोला। हरि प्रेरित लछिमन मन डोला॥**
**बन दिसि देव सौंपि सब काहू। चले जहाँ रावन ससि राहू॥**

त्यावर सीता मनाला बोचणारे बोलू लागली. तेव्हा भगवंतांच्या प्रेरणेने लक्ष्मणाचे मनही अस्थिर झाले. तो सीतेला वन-देवता व दिशा-देवतांच्या भरवशावर सोडून निघाला. रावणरूपी चंद्राला ग्रासणारे राहुरूप श्रीराम होते, तिकडे तो गेला.॥ ३॥

**सून बीच दसकंधर देखा। आवा निकट जती कें बेषा॥**
**जाकें डर सुर असुर डेराहीं। निसि न नीद दिन अन्न न खाहीं॥**

जवळ कुणी नाही, अशी संधी बघून रावण संन्यासी वेषात सीतेजवळ आला. ज्याच्या भीतीमुळे देव आणि दैत्य इतके घाबरत की, त्यांना रात्री झोप येत नसे आणि दिवसा पोटभर जेवणही जात नसे.॥ ४॥

**सो दससीस स्वान की नाईं। इत उत चितइ चला भड़िहाईं॥**
**इमि कुपंथ पग देत खगेसा। रह न तेज तन बुधि बल लेसा॥**

तोच रावण कुत्र्याप्रमाणे इकडे-तिकडे पाहात चोरी करण्यास निघाला. काकभुशुंडी म्हणतात, 'हे गरुडा, अशाप्रकारे कुमार्गावर पाऊल ठेवताच शरीरामध्ये तेज, बुद्धी व बळ यांचा लेशही उरत नाही.'॥ ५॥

**नाना बिधि करि कथा सुहाई। राजनीति भय प्रीति देखाई॥**
**कह सीता सुनु जती गोसाईं। बोलेहु बचन दुष्ट की नाईं॥**

रावणाने अनेक प्रकारच्या छान गोष्टी रचून सीतेला राजनीती, भय आणि प्रेम दाखविले. सीता म्हणाली, 'हे संन्याश्या! तू तर दुष्टासारखे बोललास.'॥ ६॥

**तब रावन निज रूप देखावा। भई सभय जब नाम सुनावा॥**
**कह सीता धरि धीरजु गाढ़ा। आइ गयउ प्रभु रहु खल ठाढ़ा॥**

तेव्हा रावणाने आपले खरे रूप दाखविले आणि जेव्हा आपले नाव सांगितले, तेव्हा सीता भयभीत झाली. तिने मोठ्या धीराने म्हटले, 'अरे दुष्टा, थांब तर खरा! प्रभू आले.'॥ ७॥

**जिमि हरिबधुहि छुद्र सस चाहा। भएसि कालबस निसिचर नाहा॥**
**सुनत बचन दससीस रिसाना। मन महुँ चरन बंदि सुख माना॥**

ज्याप्रमाणे सिंहिणीची अभिलाषा तुच्छ सशाला वाटते, त्याचप्रमाणे अरे राक्षसराज, तू माझी इच्छा धरल्याने काळाला वश झाला आहेस.' हे ऐकून रावणाला राग आला, परंतु मनात त्याने सीतेच्या चरणांना वंदन करून आनंद मानला. ॥ ८ ॥

**दो०—क्रोधवंत तब रावन लीन्हिसि रथ बैठाइ।**
**चला गगनपथ आतुर भयँ रथ हाँकि न जाइ॥ २८॥**

नंतर रागारागाने रावणाने सीतेला रथात बसविले आणि तो मोठ्या लगबगीने आकाशमार्गाने निघाला. परंतु भीतीमुळे त्याला रथ हाकता येत नव्हता. ॥ २८ ॥

**हा जग एक बीर रघुराया। केहिं अपराध बिसारेहु दाया॥**
**आरति हरन सरन सुखदायक। हा रघुकुल सरोज दिननायक॥**

सीता विलाप करू लागली की, 'हे जगातील अद्वितीय वीर रघुनाथ, कोणत्या अपराधासाठी तुम्ही माझ्यावरील दया विसरलात. हे दुःखांचे हरण करणारे, हे शरणागताला सुख देणारे, हे रघुकुलरूपी कमळाचे सूर्य, ॥ १ ॥

**हा लछिमन तुम्हार नहिं दोसा। सो फलु पायउँ कीन्हेउँ रोसा॥**
**बिबिध बिलाप करति बैदेही। भूरि कृपा प्रभु दूरि सनेही॥**

हे लक्ष्मणा, तुझा दोष नाही. मी तुझ्यावर रागावले, त्याचे फळ मला मिळाले.' जानकी अनेक प्रकारे विलाप करीत होती की, 'अरेरे, प्रभूंची कृपा फार मोठी आहे, परंतु ते प्रेमळ प्रभू फार दूर राहिले. ॥ २ ॥

**बिपति मोरि को प्रभुहि सुनावा। पुरोडास चह रासभ खावा॥**
**सीता कै बिलाप सुनि भारी। भए चराचर जीव दुखारी॥**

प्रभूंना माझी ही विपत्ती कोण सांगणार? यज्ञातील पुरोडाश गाढव खाऊ पाहात आहे.' सीतेचा विलाप ऐकून चराचर जीव दुःखी झाले. ॥ ३ ॥

**गीधराज सुनि आरत बानी। रघुकुलतिलक नारि पहिचानी॥**
**अधम निसाचर लीन्हें जाई। जिमि मलेछ बस कपिला गाई॥**

गृध्रराज जटायूने सीतेचे दुःखी बोलणे ऐकून ओळखले की, ही रघुकुलतिलक श्रीरघुनाथांची पत्नी आहे. त्याला दिसले की, कपिला गाय एखाद्या म्लेंच्छाच्या तावडीत सापडावी, तसा नीच राक्षस जबरदस्तीने तिला नेत आहे. ॥ ४ ॥

**सीते पुत्रि करसि जनि त्रासा। करिहउँ जातुधान कर नासा॥**
**धावा क्रोधवंत खग कैसें। छूटइ पबि परबत कहुँ जैसें॥**

तो म्हणाला, 'हे सीते, भिऊ नकोस. मी या राक्षसाचा नाश करतो.' असे म्हणून तो पक्षी रागारागाने धावून गेला. पर्वतावर वज्र कोसळावे तसा. ॥ ५ ॥

**रे रे दुष्ट ठाढ़ किन होही। निर्भय चलेसि न जानेहि मोही॥**
**आवत देखि कृतांत समाना। फिरि दसकंधर कर अनुमाना॥**

तो आह्वान देऊन म्हणाला, 'अरे दुष्टा, थांबत का नाहीस? निर्भयपणे निघाला आहेस. तू मला ओळखले नाहीस?' यमाप्रमाणे तो येत असल्याचे पाहून रावण वळला आणि मनात विचार करू लागला की, ॥ ६ ॥

**की मैनाक कि खगपति होई। मम बल जान सहित पति सोई॥**
**जाना जरठ जटायू एहा। मम कर तीरथ छाँड़िहि देहा॥**

हा एक तर मैनाक पर्वत आहे किंवा पक्ष्यांचा राजा गरुड. परंतु तो गरुड तर आपला स्वामी विष्णूप्रमाणे माझे बळ जाणतो. जवळ आल्यावर रावणाने ओळखले की 'हा तर म्हातारा जटायू आहे. माझ्या हातरूपी तीर्थांत हा आपले शरीर सोडील.' ॥ ७ ॥

**सुनत गीध क्रोधातुर धावा। कह सुनु रावन मोर सिखावा॥**
**तजि जानकिहि कुसल गृह जाहू। नाहिं त अस होइहि बहुबाहू॥**

हे ऐकताच जटायू रागाने मोठ्या वेगाने धावून गेला आणि म्हणाला, 'रावणा, माझे म्हणणे ऐक. जानकीला सोडून सुखरूप आपल्या घरी जा. नाहीतर अनेक भुजा असणाऱ्या, रावणा! असे होईल की, ॥ ८ ॥

**राम रोष पावक अति घोरा। होइहि सकल सलभ कुल तोरा॥**
**उतरु न देत दसानन जोधा। तबहिं गीध धावा करि क्रोधा॥**

श्रीरामांच्या अत्यंत भयानक क्रोधाग्नीमध्ये तुझा संपूर्ण वंश पतंगाप्रमाणे भस्म होईल.' वीर रावणाने काही उत्तर दिले नाही, तेव्हा तो क्रोधाने धावला. ॥ ९ ॥

**धरि कच बिरथ कीन्ह महि गिरा। सीतहि राखि गीध पुनि फिरा॥**
**चोचन्ह मारि बिदारेसि देही। दंड एक भइ मुरुछा तेही॥**

त्याने रावणाचे केस पकडून त्याला रथातून खाली खेचले. रावण पृथ्वीवर पडला. जटायूने सीतेला एका बाजूला बसविले आणि चोची मार-मारून रावणाचे शरीर विदीर्ण केले. त्याला थोडा वेळ मूर्च्छा आली. ॥ १० ॥

**तब सक्रोध निसिचर खिसिआना। काढ़ेसि परम कराल कृपाना॥**
**काटेसि पंख परा खग धरनी। सुमिरि राम करि अदभुत करनी॥**

जेव्हा चिडलेल्या रावणाने क्रोधाने अत्यंत भयानक कट्यार घेतली आणि जटायूचे पंख कापून टाकले, तेव्हा अशाप्रकारे अद्‌भुत पराक्रम गाजवून जटायू श्रीरामांच्या लीलांचे स्मरण करीत पृथ्वीवर पडला. ॥ ११ ॥

**सीतहि जान चढ़ाइ बहोरी। चला उताइल त्रास न थोरी॥**
**करति बिलाप जाति नभ सीता। ब्याध बिबस जनु मृगी सभीता॥**

सीतेला पुन्हा रथात घालून रावण लगबगीने निघाला. त्याला खूप भीती वाटत होती. सीता आकाशातून विलाप करीत जात होती. जणू व्याधाच्या जाळ्यात सापडलेली एखादी भयभीत हरिणी. ॥ १२ ॥

**गिरि पर बैठे कपिन्ह निहारी। कहि हरि नाम दीन्ह पट डारी॥**
**एहि बिधि सीतहि सो लै गयऊ। बन असोक महँ राखत भयऊ॥**

पर्वतावर बसलेल्या वानरांना पाहून सीतेने हरिनाम घेऊन आपली ओढणी खाली टाकली. अशाप्रकारे रावण सीतेला घेऊन गेला आणि तिला त्याने अशोकवनात नेऊन ठेवले. ॥ १३ ॥

दो०—**हारि परा खल बहु बिधि भय अरु प्रीति देखाइ।**
**तब असोक पादप तर राखिसि जतन कराइ॥ २९ (क)॥**

सीतेला अनेक प्रकारे भीती व प्रेम दाखवून तो दुष्ट थकला, तेव्हा त्याने तिच्या रक्षणाची व्यवस्था करून तिला अशोक वृक्षाखाली ठेवले. ॥ २९(क) ॥

## नवाह्नपारायण, सहावा विश्राम

**जेहि बिधि कपट कुरंग सँग धाइ चले श्रीराम।**
**सो छबि सीता राखि उर रटति रहति हरिनाम॥ २९ (ख)॥**

श्रीराम ज्या रूपात कपट-मृगामागे धावत गेले, ते रूप हृदयात धरून सीता रामनाम जपत होती. ॥ २९(ख) ॥

**रघुपति अनुजहि आवत देखी। बाहिज चिंता कीन्हि बिसेषी॥**
**जनकसुता परिहरिहु अकेली। आयहु तात बचन मम पेली॥**

इकडे श्रीरघुनाथ लक्ष्मणाला येत असलेला पाहून बाह्यतः आपल्याला मोठी काळजी वाटत असल्याचे दाखवून म्हणाले, 'हे बंधू, तू जानकीला एकटीला सोडलेस, आणि माझ्या आज्ञेचे उल्लंघन करून येथे आलास!॥ १ ॥

**निसिचर निकर फिरहिं बन माहीं। मम मन सीता आश्रम नाहीं॥**
**गहि पद कमल अनुज कर जोरी। कहेउ नाथ कछु मोहि न खोरी॥**

वनात राक्षसांच्या झुंडी फिरत असतात. सीता आश्रमात नसावी, असे मला वाटत आहे.' लक्ष्मणाने श्रीरामांचे चरण-कमल धरून व हात जोडून म्हटले, 'हे नाथ, यात माझा काही दोष नाही.'॥ २ ॥

**अनुज समेत गए प्रभु तहवाँ। गोदावरि तट आश्रम जहवाँ॥**
**आश्रम देखि जानकी हीना। भए बिकल जस प्राकृत दीना॥**

मग प्रभू श्रीराम लक्ष्मणासह गोदावरीच्या तटावरील आपल्या आश्रमाच्या ठिकाणी गेले. आश्रमात जानकी नसल्याचे पाहून श्रीराम सामान्य मनुष्याप्रमाणे व्याकूळ व दु:खी झाले. ॥ ३ ॥

**हा गुन खानि जानकी सीता। रूप सील ब्रत नेम पुनीता॥**
**लछिमन समुझाए बहु भाँती। पूछत चले लता तरु पाँती॥**

ते विलाप करू लागले, 'हे गुणनिधान जानकी, रूप, शील, व्रत आणि नियमांनी पवित्र असलेल्या सीते!' लक्ष्मणाने श्रीरामांना पुष्कळ समजावले, परंतु श्रीराम लता-वृक्षांच्या रांगांना विचारत निघाले. ॥ ४ ॥

**हे खग मृग हे मधुकर श्रेनी। तुम्ह देखी सीता मृगनैनी॥**
**खंजन सुक कपोत मृग मीना। मधुप निकर कोकिला प्रबीना॥**

'हे पक्ष्यांनो, हे पशूंनो, हे भ्रमरांच्या झुंडींनो, तुम्ही माझ्या मृगनयना सीतेला पाहिले काय? खंजन, पोपट, कबूतर, हरीण, मासे, भ्रमर-समूह, गायनप्रवीण कोकिळ, ॥ ५ ॥

**कुंद कली दाड़िम दामिनी। कमल सरद ससि अहिभामिनी॥**
**बरुन पास मनोज धनु हंसा। गज केहरि निज सुनत प्रसंसा॥**

कुंदकळ्या, डाळिंब, वीज, कमळ, शरदातील चंद्रमा, नागीण, वरुणाचा पाश, कामदेवांचे धनुष्य, हंस, हत्ती आणि सिंह, हे सर्वजण आज आपली प्रशंसा ऐकत होते. ॥ ६ ॥

**श्रीफल कनक कदलि हरषाहीं। नेकु न संक सकुच मन माहीं॥**
**सुनु जानकी तोहि बिनु आजू। हरषे सकल पाइ जनु राजू॥**

श्रीफळ, सुवर्ण आणि केळी आज आनंदित होत होत्या. त्यांच्या मनात जरासुद्धा शंका व संकोच नव्हता. हे जानकी, ऐक. तुझ्याविना हे सर्व आज असे आनंदात आहेत की, जणू त्यांना राज्य मिळाले आहे. (तुझ्या अंगांपुढे सर्वजण तुच्छ, अपमानित व लज्जित होते. तू नसल्यामुळे हे आपल्या शोभेच्या अभिमानाने प्रफुल्लित आहेत.) ॥ ७ ॥

**किमि सहि जात अनख तोहि पाहीं। प्रिया बेगि प्रगटसि कस नाहीं॥**
**एहि बिधि खोजत बिलपत स्वामी। मनहु महा बिरही अति कामी॥**

तुला ही त्यांची घमेंड कशी सहन होते? हे प्रिये, तू लवकर प्रकट का होत नाहीस?' अशा प्रकारे अनंत ब्रह्मांडांचे व स्वरूपशक्ती सीतेचे स्वामी श्रीराम सीतेला शोधत असा विलाप करीत होते की, जसा एखादा महाविरही आणि अत्यंत कामी पुरुष करतो. ॥ ८ ॥

**पूरनकाम राम सुख रासी। मनुजचरित कर अज अबिनासी॥**
**आगें परा गीधपति देखा। सुमिरत राम चरन जिन्ह रेखा॥**

पूर्णकाम, आनंदाची खाण, अजन्मा व अविनाशी श्रीराम मनुष्यासारखी लीला करीत होते. पुढे गेल्यावर त्यांना गृध्रपती जटायू पडलेला दिसला. तो श्रीरामांच्या ध्वज, कुलिश इत्यादी चिह्नांनी अंकित चरणांचे स्मरण करीत होता. ॥ ९ ॥

दो०—**कर सरोज सिर परसेउ कृपासिंधु रघुबीर।**
**निरखि राम छबि धाम मुख बिगत भई सब पीर॥ ३०॥**

कृपासागर श्रीरघुवीरांनी आपल्या करकमलांनी त्याच्या मस्तकाला स्पर्श केला. शोभाधाम श्रीरामचंद्रांचे परमसुंदर मुख पाहून जटायूची सर्व पीडा नाहीशी झाली.॥ ३०॥

**तब कह गीध बचन धरि धीरा। सुनहु राम भंजन भव भीरा॥**
**नाथ दसानन यह गति कीन्ही। तेहिं खल जनकसुता हरि लीन्ही॥**

मग धीर धरून त्या जटायू गिधाडाने म्हटले, 'हे जन्म-मृत्युरूप भवाच्या भयाचे नाश करणारे श्रीराम, ऐका. हे नाथ, रावणाने माझी अशी दशा केली. त्या दुष्टाने जानकीचे हरण केले आहे.॥ १॥

**लै दच्छिन दिसि गयउ गोसाईं। बिलपति अति कुररी की नाईं॥**
**दरस लागि प्रभु राखेउँ प्राना। चलन चहत अब कृपानिधाना॥**

हे स्वामी, तो तिला घेऊन दक्षिण दिशेला गेला आहे. सीता ही टिटवीप्रमाणे खूप आक्रोश करीत होती. हे प्रभो, मी तुमच्या दर्शनासाठीच प्राण राखले होते. हे कृपानिधान, आता हे प्राण जाऊ इच्छितात.'॥ २॥

**राम कहा तनु राखहु ताता। मुख मुसुकाइ कही तेहिं बाता॥**
**जा कर नाम मरत मुख आवा। अधमउ मुकुत होइ श्रुति गावा॥**

श्रीरामचंद्र म्हणाले, 'हे तात, शरीर सोडू नका.' तेव्हा त्याने हसत मुखाने म्हटले, 'मरताना ज्यांचे नाव मुखात आल्यास महान पापीसुद्धा मुक्त होतो, असे वेदांनी सांगितले आहे,॥ ३॥

**सो मम लोचन गोचर आगें। राखौं देह नाथ केहि खाँगें॥**
**जल भरि नयन कहहिं रघुराई। तात कर्म निज तें गति पाई॥**

तेच तुम्ही माझ्या डोळ्यांसमोर उभे आहात. हे नाथ, आता मी कोणती उणीव आहे, म्हणून देह राखून ठेवू?' श्रीरघुनाथ डोळ्यांत पाणी आणून म्हणाले, 'हे तात, तुम्ही स्वतःच्या श्रेष्ठ कर्मांनी दुर्लभ गती प्राप्त केली आहे.॥ ४॥

**परहित बस जिन्ह के मन माहीं। तिन्ह कहुँ जग दुर्लभ कछु नाहीं॥**
**तनु तजि तात जाहु मम धामा। देउँ काह तुम्ह पूरनकामा॥**

ज्यांच्या मनात दुसऱ्याचे हित असते, त्यांच्यासाठी या जगात काहीही दुर्लभ नाही. हे तात, आज देह सोडून तुम्ही माझ्या परमधामास जा. मी तुम्हांला काय देऊ? तुम्ही तर पूर्णकाम आहात.॥ ५॥

दो०—**सीता हरन तात जनि कहहु पिता सन जाइ।**
**जौं मैं राम त कुल सहित कहिहि दसानन आइ॥ ३१॥**

हे तात, सीतेच्या हरणाची वार्ता तुम्ही जाऊन (स्वर्गात) माझ्या वडिलांना सांगू नका. जर मी राम असेन, तर सहकुटुंब रावणच तेथे जाऊन स्वतः सांगेल.'॥ ३१॥

**गीध देह तजि धरि हरि रूपा। भूषन बहु पट पीत अनूपा॥**
**स्याम गात बिसाल भुज चारी। अस्तुति करत नयन भरि बारी॥**

जटायूने गिधाडाचा देह सोडून हरीचे रूप धारण केले आणि अनेक अनुपम, दिव्य अलंकार व दिव्य पीतांबर धारण केले. श्याम शरीर, चार विशाल भुजा आणि प्रेम व आनंदाचे अश्रू डोळ्यांत आणून तो स्तुती करू लागला.॥ १॥

**छं०—जय राम रूप अनूप निर्गुन सगुन गुन प्रेरक सही।**
**दससीस बाहु प्रचंड खंडन चंड सर मंडन मही॥**
**पाथोद गात सरोज मुख राजीव आयत लोचनं।**
**नित नौमि रामु कृपाल बाहु बिसाल भव भय मोचनं॥ १॥**

'हे राम, तुमचा विजय असो. तुमचे रूप अनुपम आहे. तुम्ही निर्गुण आहात, तसेच सगुण आहात आणि खरोखरच मायेचे प्रेरक आहात. दहा शिरांच्या रावणांच्या प्रचंड भुजांचे तुकडे तुकडे करण्यासाठी प्रचंड बाण धारण करणारे, पृथ्वीला सुशोभित करणारे, सजल मेघांसमान श्यामल शरीराचे, कमळासमान मुख असलेले आणि लाल कमळासमान विशाल नेत्रांचे, विशाल भुजांचे आणि भव-भयापासून मुक्त करणारे हे कृपाळू श्रीराम! मी तुम्हांला नित्य नमस्कार करतो.॥ १॥

**बलमप्रमेयमनादिमजमब्यक्तमेकमगोचरं।**
**गोबिंद गोपर द्वंद्वहर बिग्यानघन धरनीधरं॥**
**जे राम मंत्र जपंत संत अनंत जन मन रंजनं।**
**नित नौमि राम अकाम प्रिय कामादि खल दल गंजनं॥ २॥**

तुम्ही अपरिमित बळाचे, अनादी, अजन्मा, अव्यक्त, एक, अगोचर, वेदवाक्ये जाणणारे गोविंद, इंद्रियातीत, जन्म-मरण, सुख-दुःख, हर्ष-शोकादी द्वंद्वांचे हरण करणारे, विज्ञानस्वरूप आणि पृथ्वीचे आधार आहात. जे संत राम-मंत्राचा जप करतात, त्या अनंत भक्तांच्या मनाला आनंद देणारे आहात. त्या निष्कामजनांना प्रिय असणारे आणि काम आदी दुष्ट वृत्तींच्या समूहाचे निर्दालन करणारे, हे श्रीराम, मी तुम्हांला नित्य नमस्कार करतो.॥ २॥

**जेहि श्रुति निरंजन ब्रह्म ब्यापक बिरज अज कहि गावहीं।**
**करि ध्यान ग्यान बिराग जोग अनेक मुनि जेहि पावहीं॥**
**सो प्रगट करुना कंद सोभा बृंद अग जग मोहई।**
**मम हृदय पंकज भृंग अंग अनंग बहु छबि सोहई॥ ३॥**

निरंजन, ब्रह्म, व्यापक, निर्विकार आणि जन्मरहित म्हणून ज्यांचे श्रुती गायन करतात, मुनी ज्यांना ध्यान, ज्ञान, वैराग्य आणि योग इत्यादी अनेक साधने करून प्राप्त करतात, तेच करुणाकंद, शोभेचे समूह असलेले प्रत्यक्ष श्रीभगवान प्रकट होऊन चराचराला आज मोहित करीत आहेत. माझ्या हृदयकमलाचे भ्रमर असलेल्या त्यांच्या अंगांमध्ये अनेक कामदेवांच्या रूपाची शोभा दिसत आहे.॥ ३॥

**जो अगम सुगम सुभाव निर्मल असम सम सीतल सदा।**
**पस्यंति जं जोगी जतन करि करत मन गो बस सदा॥**
**सो राम रमा निवास संतत दास बस त्रिभुवन धनी।**
**मम उर बसउ सो समन संसृति जासु कीरति पावनी॥ ४॥**

जे अगम्य आणि सुगम आहेत, निर्मल स्वभावाचे आहेत, विषम व सम आहेत आणि सदा शीतल आहेत, मन आणि इंद्रिये यांचा नित्य संयम करून योगीजन खूप साधन केल्यावर ज्यांचे दर्शन प्राप्त करतात, ते तिन्ही लोकींचे स्वामी, रमानिवास श्रीराम निरंतर आपल्या दासांच्या अधीन असतात. ज्यांची पवित्र कीर्ती संसारचक्राचा नाश करणारी आहे. तेच प्रभू माझ्या हृदयात निवास करोत.'॥ ४॥

दो०—**अबिरल भगति मागि बर गीध गयउ हरिधाम।**
**तेहि की क्रिया जथोचित निज कर कीन्ही राम॥ ३२॥**

असे अखंड भक्तीचे वरदान मागून गृध्रराज जटायू श्रीहरींच्या परमधामाला गेला. श्रीरामचंद्रांनी त्याच्या दहनादी क्रिया योग्य प्रकारे स्वतःच्या हातांनी केल्या.॥ ३२॥

**कोमल चित अति दीनदयाला। कारन बिनु रघुनाथ कृपाला॥**
**गीध अधम खग आमिष भोगी। गति दीन्ही जो जाचत जोगी॥**

श्रीरघुनाथ अत्यंत कोमल चित्ताचे, दीनदयाळू आणि अकारण कृपाळू आहेत. जटायू हा एक क्षुद्र गिधाड आणि मांसाहारी होता. त्यालाही श्रीरामांनी योगीजनांना जी हवी असते, ती गती दिली.॥ १॥

**सुनहु उमा ते लोग अभागी। हरि तजि होहिं बिषय अनुरागी॥**
**पुनि सीतहि खोजत द्वौ भाई। चले बिलोकत बन बहुताई॥**

श्रीशिव म्हणतात, 'हे पार्वती, ऐक. जे लोक भगवंतांना सोडून विषयांवर प्रेम करतात, ते दुर्दैवी होत.' नंतर दोघे बंधू सीतेला शोधत पुढे निघाले. वाटेतील घनदाट वने पाहात ते जात होते.॥ २॥

**संकुल लता बिटप घन कानन। बहु खग मृग तहँ गज पंचानन॥**
**आवत पंथ कबंध निपाता। तेहिं सब कही साप कै बाता॥**

ते दाट वन वृक्ष-वेलींनी भरलेले होते. त्यात पुष्कळ पक्षी, मृग, हत्ती आणि सिंह राहात होते. श्रीरामांनी वाटेत आलेल्या कबंध राक्षसाला ठार मारले. त्याने आपल्या शापाची सर्व हकिगत सांगितली. ॥ ३ ॥

**दुरबासा मोहि दीन्ही सापा। प्रभु पद पेखि मिटा सो पापा॥**
**सुनु गंधर्ब कहउँ मैं तोही। मोहि न सोहाइ ब्रह्मकुल द्रोही॥**

तो म्हणाला, 'दुर्वासांनी मला शाप दिला होता. आता प्रभूंच्या चरणांच्या दर्शनाने ते पाप नाहीसे झाले.' श्रीराम म्हणाले,'हे गंधर्वा, मी सांगून ठेवतो की, ब्राह्मणकुळाचा अपराध करणारा मला आवडत नाही. ॥ ४ ॥

दो०—**मन क्रम बचन कपट तजि जो कर भूसुर सेव।**
**मोहि समेत बिरंचि सिव बस ताकें सब देव॥ ३३॥**

कायावाचामनाने ब्राह्मणांची जो निष्कपट सेवा करतो, त्याला माझ्यासह ब्रह्मदेव, शिव इत्यादी सर्व देव वश होतात. ॥ ३३ ॥

**सापत ताड़त परुष कहंता। बिप्र पूज्य अस गावहिं संता॥**
**पूजिअ बिप्र सील गुन हीना। सूद्र न गुन गन ग्यान प्रबीना॥**

शाप देणारा, मारणारा आणि कठोर बोलणारासुद्धा ब्राह्मण पूजनीय आहे, असे संत म्हणतात. शीलहीन आणि गुणहीन ब्राह्मणसुद्धा पूजनीय होय पण गुणगणांनी युक्त आणि ज्ञानात निपुण असलेला शूद्रही पूजनीय नाही.'॥ १ ॥

**कहि निज धर्म ताहि समुझावा। निज पद प्रीति देखि मन भावा॥**
**रघुपति चरन कमल सिरु नाई। गयउ गगन आपनि गति पाई॥**

श्रीरामांनी त्याला आपला भागवत धर्म समजावून सांगितला. आपल्या चरणी त्याचे प्रेम आहे, असे पाहून तो त्यांना आवडला. त्यानंतर श्रीरघुनाथांच्या चरणकमली नतमस्तक होऊन तो आपली गंधर्वाची गती प्राप्त करून आकाशात निघून गेला. ॥ २ ॥

**ताहि देइ गति राम उदारा। सबरी कें आश्रम पगु धारा॥**
**सबरी देखि राम गृहँ आए। मुनि के बचन समुझि जियँ भाए॥**

उदार श्रीराम त्याला गती देऊन शबरीच्या वनात आले. श्रीराम आपल्या घरी आल्याचे शबरीने पाहिले, तेव्हा मतंग मुनींचे वचन आठवून तिचे मन प्रसन्न झाले. ॥ ३ ॥

**सरसिज लोचन बाहु बिसाला। जटा मुकुट सिर उर बनमाला॥**
**स्याम गौर सुंदर दोउ भाई। सबरी परी चरन लपटाई॥**

कमलासारखे नेत्र व विशाल भुजा असलेल्या, शिरावर जटांचा मुकुट आणि गळ्यात वनमाला धारण केलेल्या, सुंदर, सावळ्या आणि गोऱ्या त्या दोघा बंधूंचे चरण शबरीने धरले. ॥ ४ ॥

**प्रेम मगन मुख बचन न आवा। पुनि पुनि पद सरोज सिर नावा॥**
**सादर जल लै चरन पखारे। पुनि सुंदर आसन बैठारे॥**

ती प्रेमात इतकी मगन झाली होती की, तोंडातून शब्द निघत नव्हता. वारंवार चरण-कमलांवर नतमस्तक होत होती. नंतर तिने पाणी आणून मोठ्या आदराने दोघा भावांचे चरण धुतले आणि त्यांना सुंदर आसनांवर बसविले. ॥ ५ ॥

दो०—**कंद मूल फल सुरस अति दिए राम कहुँ आनि।**
**प्रेम सहित प्रभु खाए बारंबार बखानि॥ ३४॥**

तिने अत्यंत रसाळ व स्वादिष्ट कंद-मुळे आणि फळे आणून श्रीरामांना दिली. श्रीप्रभूंनी वारंवार प्रशंसा करीत ती प्रेमाने खाल्ली. ॥ ३४ ॥

**पानि जोरि आगें भइ ठाढ़ी। प्रभुहि बिलोकि प्रीति अति बाढ़ी॥**
**केहि बिधि अस्तुति करौं तुम्हारी। अधम जाति मैं जड़मति भारी॥**

मग ती हात जोडून समोर उभी राहिली. प्रभूंना पाहून तिचे प्रेम उचंबळून आले. ती म्हणाली, 'मी कशा प्रकारे तुमची स्तुती करू? मी नीच जातीची आणि अत्यंत मंदबुद्धीची आहे. ॥ १ ॥

**अधम ते अधम अधम अति नारी। तिन्ह महँ मैं मतिमंद अघारी॥**
**कह रघुपति सुनु भामिनि बाता। मानउँ एक भगति कर नाता॥**

जे अधमांपेक्षा अधम आहेत, त्यांच्यामध्येही स्त्रिया या अत्यंत अधम आहेत. हे पापनाशना, त्यातही पुन्हा मी मंदबुद्धीची आहे.' श्रीराम म्हणाले, 'हे भामिनी, माझे ऐक. मी फक्त भक्तीला महत्त्व देतो. ॥ २ ॥

**जाति पाँति कुल धर्म बड़ाई। धन बल परिजन गुन चतुराई॥**
**भगति हीन नर सोहइ कैसा। बिनु जल बारिद देखिअ जैसा॥**

जात-पात, कुल, मोठेपणा, धन, बल, कुटुंब, गुण आणि चातुर्य हे सर्व असूनही भक्तीने रहित मनुष्य जलहीन मेघासारखा मला वाटतो. ॥ ३ ॥

**नवधा भगति कहउँ तोहि पाहीं। सावधान सुनु धरु मन माहीं॥**
**प्रथम भगति संतन्ह कर संगा। दूसरि रति मम कथा प्रसंगा॥**

मी तुला आता माझी नवविधा भक्ती सांगतो. तू लक्ष देऊन ऐक आणि मनात ठेव. पहिली भक्ती म्हणजे संतांचा संग. दुसरी भक्ती आहे माझ्या कथा-प्रसंगांबद्दल प्रेम. ॥ ४ ॥

दो०—**गुर पद पंकज सेवा तीसरि भगति अमान।**
**चौथि भगति मम गुन गन करइ कपट तजि गान॥ ३५॥**

अभिमानरहित होऊन गुरूंच्या चरणांची सेवा ही तिसरी भक्ती आणि निष्कपट भावनेने माझे गुणगान करणे ही चौथी भक्ती. ॥ ३५ ॥

**मंत्र जाप मम दृढ़ बिस्वासा। पंचम भजन सो बेद प्रकासा॥**
**छठ दम सील बिरति बहु करमा। निरत निरंतर सज्जन धरमा॥**

माझ्या राममंत्राचा जप आणि माझ्यावर दृढ विश्वास ही पाचवी भक्ती. वेदांमध्ये ही प्रसिद्ध आहे. सहावी भक्ती म्हणजे इंद्रियनिग्रह, शील, अनेक लौकिक कार्यांबद्दल वैराग्य आणि संत पुरुषांप्रमाणे आचरण करणे, हे होय. ॥ १ ॥

**सातवँ सम मोहि मय जग देखा। मोतें संत अधिक करि लेखा॥**
**आठवँ जथालाभ संतोषा। सपनेहुँ नहिं देखइ परदोषा॥**

सातवी भक्ती म्हणजे संपूर्ण जगाला समभावाने माझ्यामध्ये ओतप्रोत असलेले पाहणे आणि संतांना माझ्यापेक्षाही अधिक मानणे. आठवी भक्ती म्हणजे जे काही मिळेल, त्यात संतोष मानणे आणि स्वप्नातही कधी दुसऱ्याचे दोष न पाहणे. ॥ २ ॥

**नवम सरल सब सन छलहीना। मम भरोस हियँ हरष न दीना॥**
**नव महुँ एकउ जिन्ह कें होई। नारि पुरुष सचराचर कोई॥**

नववी भक्ती म्हणजे सरळपणा व सर्वांबरोबर कपटरहित वागणे, मनातून माझ्यावर श्रद्धा ठेवणे आणि कोणत्याही अवस्थेमध्ये हर्ष व दैन्य नसणे. या नऊंपैकी ज्याला एकही भक्ती प्राप्त असते, तो स्त्री-पुरुष, जड-चेतन कुणीही असो, ॥ ३ ॥

**सोइ अतिसय प्रिय भामिनि मोरें। सकल प्रकार भगति दृढ़ तोरें॥**
**जोगि बृंद दुरलभ गति जोई। तो कहुँ आजु सुलभ भइ सोई॥**

हे भामिनी, तोच मला प्रिय आहे आणि तुझ्यात तर सर्व भक्ती दृढ आहेत. म्हणून योग्यांनाही जी गती दुर्लभ आहे, तीच आज तुला सुलभ झाली आहे. ॥ ४ ॥

**मम दरसन फल परम अनूपा। जीव पाव निज सहज सरूपा॥**
**जनकसुता कइ सुधि भामिनी। जानहि कहु करिबरगामिनी॥**

जीव आपले सहज स्वरूप प्राप्त करतो, हेच माझ्या दर्शनाचे परम अनुपम फल आहे. बाई गं! जर तुला सुंदरी सीतेची काही बातमी असेल, तर ती आता सांग.'॥ ५ ॥

**पंपा सरहि जाहु रघुराई। तहँ होइहि सुग्रीव मिताई॥**
**सो सब कहिहि देव रघुबीरा। जानतहूँ पूछहु मतिधीरा॥**

शबरी म्हणाली, 'हे रघुनाथ, तुम्ही पंपासरोवराला जा. तेथे तुमची सुग्रीवाशी मैत्री होईल. हे देवा, हे रघुवीरा, तो सर्व परिस्थिती सांगेल. हे धीरबुद्धी श्रीराम, सर्व जाणत असतानाही तुम्ही मला विचारता आहात.'॥ ६ ॥

**बार बार प्रभु पद सिरु नाई। प्रेम सहित सब कथा सुनाई॥**

वारंवार प्रभूंच्या चरणी नतमस्तक होऊन तिने प्रेमाने आपली सर्व कथा सांगितली. ॥ ७ ॥

**छं०—कहि कथा सकल बिलोकि हरि मुख हृदयँ पद पंकज धरे।**
**तजि जोग पावक देह हरि पद लीन भइ जहँ नहिं फिरे॥**
**नर बिबिध कर्म अधर्म बहु मत सोकप्रद सब त्यागहू।**
**बिस्वास करि कह दास तुलसी राम पद अनुरागहू॥**

सर्व कथा सांगितल्यावर भगवंतांच्या मुखाचे दर्शन घेऊन, हृदयामध्ये तिने त्यांचे चरण-कमल धारण केले आणि योगाग्नीने देह-त्याग करून ती दुर्लभ हरिपदांमध्ये लीन झाली की, जेथून परत यावे लागत नाही. तुलसीदास म्हणतात की, अनेक प्रकारची कर्मे, अधर्म आणि अनेक मते ही सर्व दुःख देणारी आहेत. मनुष्यांनो, त्यांचा त्याग करा आणि विश्वासपूर्वक श्रीरामांच्या चरणी प्रेम करा.

**दो०—जाति हीन अघ जन्म महि मुक्त कीन्हि असि नारि।**
**महामंद मन सुख चहसि ऐसे प्रभुहि बिसारि॥ ३६॥**

जी शबरी हलक्या जातीत जन्मली असतानाही तिला ज्यांनी मुक्त केले, अरे महामूर्ख मना, तू अशा प्रभूंना विसरून ऐहिक सुखप्राप्तीची इच्छा करतोस?॥ ३६॥

**चले राम त्यागा बन सोऊ। अतुलित बल नर केहरि दोऊ॥**
**बिरही इव प्रभु करत बिषादा। कहत कथा अनेक संबादा॥**

श्रीरामचंद्रांनी ते वन सोडले आणि ते पुढे निघाले. दोन्ही पुरुषसिंह बंधू अतुलनीय बलवान होते. प्रभू एखाद्या विरही पुरुषाप्रमाणे विषाद करीत अनेक कथा सांगत संवाद करीत होते.॥ १॥

**लछिमन देखु बिपिन कइ सोभा। देखत केहि कर मन नहिं छोभा॥**
**नारि सहित सब खग मृग बृंदा। मानहुँ मोरि करत हहिं निंदा॥**

'हे लक्ष्मणा, जरा वनाची शोभा तर बघ. ती पाहून कुणाचे मन क्षुब्ध होणार नाही? पक्षी व पशूंचे समूह हे सर्व आपापल्या माद्यांसोबत आहेत, जणू ते माझी निंदा करीत आहेत.॥ २॥

**हमहि देखि मृग निकर पराहीं। मृगीं कहहिं तुम्ह कहँ भय नाहीं॥**
**तुम्ह आनंद करहु मृग जाए। कंचन मृग खोजन ए आए॥**

आपणाला पाहून घाबरून हरिणांचे कळप पळत आहेत, तेव्हा हरिणी त्यांना म्हणत आहेत, 'तुम्ही भिऊ नका. तुम्ही तर सामान्य हरीण आहात, म्हणून तुम्ही आनंदात राहा. हे लोक सोन्याचे हरीण शोधायला आले आहेत.'॥ ३॥

**संग लाइ करिनीं करि लेहीं। मानहुँ मोहि सिखावनु देहीं॥**
**सास्त्र सुचिंतित पुनि पुनि देखिअ। भूप सुसेवित बस नहिं लेखिअ॥**

हत्ती हत्तिणींच्या मागे असतात. ते जणू मला शिकवीत आहेत की, 'स्त्रीला कधी एकटे सोडू नये. गहनपणे चिंतन केलेली शास्त्रेही वारंवार पाहात राहिले पाहिजे. चांगल्या प्रकारे सेवा केल्यावरही राजा आपल्याला वश आहे, असे समजू नये. ॥ ४ ॥

**राखिअ नारि जदपि उर माहीं। जुबती सास्त्र नृपति बस नाहीं॥**
**देखहु तात बसंत सुहावा। प्रिया हीन मोहि भय उपजावा॥**

आणि स्त्रीला अगदी हृदयात ठेवले, तरी युवती स्त्री, शास्त्र आणि राजा कुणालाही वश होत नाहीत. हे बंधो! हा सुंदर वसंत ऋतू बघ. प्रियेविना तो माझ्या मनात भय उत्पन्न करीत आहे. ॥ ५ ॥

दो०—**बिरह बिकल बलहीन मोहि जानेसि निपट अकेल।**
**सहित बिपिन मधुकर खग मदन कीन्ह बगमेल॥ ३७ ( क )॥**

मी विरहाने व्याकूळ, बलहीन आणि अगदी एकटा झालो आहे, हे पाहून कामदेवाने वने, भ्रमर आणि पक्षी यांना घेऊन माझ्यावर हल्ला केला आहे. ॥ ३७ (क) ॥

**देखि गयउ भ्राता सहित तासु दूत सुनि बात।**
**डेरा कीन्हेउ मनहुँ तब कटकु हटकि मनजात॥ ३७ ( ख )॥**

परंतु जेव्हा त्याला दिसले की, माझ्यासोबत भाऊ आहे, मी एकटा नाही, तेव्हा ही गोष्ट ऐकल्यावर कामदेवाने जणू आपली सेना थांबवून तळ ठोकला आहे. ॥ ३७(ख) ॥

**बिटप बिसाल लता अरुझानी। बिबिध बितान दिए जनु तानी॥**
**कदलि ताल बर धुजा पताका। देखि न मोह धीर मन जाका॥**

विशाल वृक्षांना बिलगलेल्या वेली पाहून असे वाटते की, जणू नाना प्रकारचे तंबू ठोकले आहेत. केळी, ताड हे जणू सुंदर ध्वज-पताका आहेत. त्या पाहून ज्याचे मन धीट आहे, तोच मोहित होणार नाही. ॥ १ ॥

**बिबिध भाँति फूले तरु नाना। जनु बानैत बने बहु बाना॥**
**कहुँ कहुँ सुंदर बिटप सुहाए। जनु भट बिलग बिलग होइ छाए॥**

अनेक वृक्ष नाना प्रकारे फुललेले आहेत. जणू ते वेगवेगळे वेष घातलेले पुष्कळ तिरंदाज असावेत, असे वाटते. कुठे कुठे सुंदर वृक्ष शोभून दिसत आहेत. ते जणू वेगवेगळ्या ठिकाणी योद्ध्यांनी छावणी केल्याप्रमाणे वाटतात. ॥ २ ॥

**कूजत पिक मानहुँ गज माते। ढेक महोख ऊँट बिसराते॥**
**मोर चकोर कीर बर बाजी। पारावत मराल सब ताजी॥**

कोकिळ कूजन करीत आहेत, ते जणू मत्त हत्ती आहेत. तितर, लावा पक्षी जणू उंट व खेचरे आहेत. मोर, चकोर, पोपट, कबूतर आणि हंस हे सर्व जणू अरबी घोडे आहेत. ॥ ३ ॥

**तीतिर लावक पदचर जूथा। बरनि न जाइ मनोज बरूथा॥**
**रथ गिरि सिला दुंदुभीं झरना। चातक बंदी गुन गन बरना॥**

तितिर व बटेर पक्षी हे पायदळ शिपायांचे जमाव आहेत. कामदेवाची सेना अद्भुत आहे. पर्वतावरील शिळा हे रथ व पाण्याचे झरे हे नगारे आहेत. चातक हे भाट आहेत. ते बिरुदावली गात आहेत. ॥ ४ ॥

**मधुकर मुखर भेरि सहनाई। त्रिबिध बयारि बसीठीं आई॥**
**चतुरंगिनी सेन सँग लीन्हें। बिचरत सबहि चुनौती दीन्हें॥**

भ्रमरांचा गुंजारव दुंदुभी आणि सनई आहेत. शीतल, मंद आणि सुगंधित वारे जणू दूताचे काम करण्यासाठी आले आहेत. अशा प्रकारे चतुरंग सेना बरोबर घेऊन कामदेव जणू सर्वांना आव्हान देत फिरत आहे. ॥ ५ ॥

**लछिमन देखत काम अनीका। रहहिं धीर तिन्ह कै जग लीका॥**
**एहि कें एक परम बल नारी। तेहि तें उबर सुभट सोइ भारी॥**

हे लक्ष्मणा, कामदेवाची ही सेना पाहूनही जे निश्चल राहातात. त्यांनाच जगात प्रतिष्ठा मिळते. स्त्रीमध्ये या कामदेवाची मोठी शक्ती आहे. तिच्यापासून जो बचावेल, तोच मोठा योद्धा होय. ॥ ६ ॥

दो०—**तात तीनि अति प्रबल खल काम क्रोध अरु लोभ।**
**मुनि बिग्यान धाम मन करहिं निमिष महुँ छोभ॥ ३८ ( क )॥**

हे बंधो! काम, क्रोध आणि लोभ हे तिन्ही अत्यंत प्रबल व दुष्ट आहेत. ते ज्ञानसंपन्न मुनींचेही मन क्षणात क्षुब्ध करून टाकतात. ॥ ३८ (क) ॥

**लोभ कें इच्छा दंभ बल काम कें केवल नारि।**
**क्रोध कें परुष बचन बल मुनिबर कहहिं बिचारि॥ ३८ ( ख )॥**

लोभाला इच्छा व दंभाचे बळ असते, कामाला केवळ स्त्रीचे बळ असते आणि क्रोधाला कठोर वचनांचे. श्रेष्ठ मुनी विचारपूर्वक असेच सांगतात.'॥ ३८(ख) ॥

**गुनातीत सचराचर स्वामी। राम उमा सब अंतरजामी॥**
**कामिन्ह कै दीनता देखाई। धीरन्ह कें मन बिरति दृढ़ाई॥**

शिव म्हणतात, 'हे पार्वती, श्रीरामचंद्र हे त्रिगुणातीत, चराचर जगाचे स्वामी आणि सर्वांच्या मनातील जाणणारे आहेत.' त्यांनी वरील वर्णनातून कामी लोकांची लाचारी दाखवून दिली आणि विवेकी पुरुषांच्या मनातील वैराग्य दृढ केले. ॥ १ ॥

**क्रोध मनोज लोभ मद माया। छूटहिं सकल राम कीं दाया॥**
**सो नर इंद्रजाल नहिं भूला। जा पर होइ सो नट अनुकूला॥**

काम, क्रोध, लोभ, मद आणि माया हे सर्व श्रीरामांच्या दयेमुळे सुटतात. ते नटराज भगवंत ज्याच्यावर प्रसन्न होतात, तो मनुष्य मायेमुळे भटकत नाही. ॥ २ ॥

**उमा कहउँ मैं अनुभव अपना। सत हरि भजनु जगत सब सपना॥**
**पुनि प्रभु गए सरोबर तीरा। पंपा नाम सुभग गंभीरा॥**

हे उमे, मी तुला आपला अनुभव सांगतो. हरीचे भजनच सत्य आहे आणि हे संपूर्ण जग स्वप्नाप्रमाणे खोटे आहे. नंतर प्रभू श्रीराम पंपा नामक सुंदर आणि अथांग सरोवराकाठी आले. ॥ ३ ॥

**संत हृदय जस निर्मल बारी। बाँधे घाट मनोहर चारी॥**
**जहँ तहँ पिअहिं बिबिध मृग नीरा। जनु उदार गृह जाचक भीरा॥**

त्या सरोवराचे पाणी संतांच्या हृदयाप्रमाणे निर्मळ होते. त्याला बांधलेले मनोहर सुंदर चार घाट होते. तऱ्हेतऱ्हेचे पशू इकडे तिकडे पाणी पीत होते. जणू उदार दानी पुरुषांच्या घरी याचकांची गर्दी झालेली असावी. ॥ ४ ॥

दो०—**पुरइनि सघन ओट जल बेगि न पाइअ मर्म।**
**मायाछन्न न देखिऐ जैसें निर्गुन ब्रह्म॥ ३९ ( क )॥**

दाट कमल-पत्रांनी झाकलेल्या पाण्याचा लवकर पत्ता लागत नाही, ज्याप्रमाणे मायेने झाकल्यामुळे निर्गुण ब्रह्म दिसत नाही. ॥ ३९ (क) ॥

**सुखी मीन सब एकरस अति अगाध जल माहिं।**
**जथा धर्मसीलन्ह के दिन सुख संजुत जाहिं॥ ३९ ( ख )॥**

त्या सरोवराच्या अत्यंत अथांग जलामध्ये सर्व मासे सतत एकसमान सुखी राहात होते. ज्याप्रमाणे धर्मशील पुरुषांचे सर्व दिवस सुखात जातात. ॥ ३९ (ख) ॥

**बिकसे सरसिज नाना रंगा। मधुर मुखर गुंजत बहु भृंगा॥**
**बोलत जलकुक्कुट कलहंसा। प्रभु बिलोकि जनु करत प्रसंसा॥**

त्यात रंगी-बेरंगी कमळे उमललेली होती. पुष्कळ भ्रमर मधुर स्वरांनी गुंजारव करीत होते. पाणकोंबडे व राजहंस बोलत होते, जणू प्रभूंना पाहून ते त्यांची प्रशंसा करीत असावेत. ॥ १ ॥

**चक्रबाक बक खग समुदाई। देखत बनइ बरनि नहिं जाई॥**
**सुंदर खग गन गिरा सुहाई। जात पथिक जनु लेत बोलाई॥**

चक्रवाक, बगळे इत्यादी पक्ष्यांचे समुदाय पाहातच राहावे, असे अवर्णनीय वाटत होते. सुंदर पक्ष्यांची किलबिल फार गोड वाटत होती; जणू रस्त्याने जाणाऱ्या वाटसरूंना ते बोलावीत होते. ॥ २ ॥

**ताल समीप मुनिन्ह गृह छाए। चहु दिसि कानन बिटप सुहाए॥**
**चंपक बकुल कदंब तमाला। पाटल पनस परास रसाला॥**

त्या सरोवराच्याजवळ मुनींनी आश्रम बनविले होते. त्याच्या चारी बाजूंना वनातील सुंदर वृक्ष होते. चाफा, बकुळ, कदंब, तमाल, पाटल, फणस, पळस, आम्रवृक्ष इत्यादी॥ ३॥

**नव पल्लव कुसुमित तरु नाना। चंचरीक पटली कर गाना॥**
**सीतल मंद सुगंध सुभाऊ। संतत बहइ मनोहर बाऊ॥**

अनेक प्रकारचे वृक्ष नवनवीन पाने आणि सुगंधित फुलांनी भरलेले होते, त्यांवर भ्रमरांचे समूह गुंजारव करीत होते. तसेच शीतल, मंद, सुगंधित हवा नित्य वाहात होती.॥ ४॥

**कुहू कुहू कोकिल धुनि करहीं। सुनि रव सरस ध्यान मुनि टरहीं॥**

कोकिळ ‘कुहू-कुहू’ बोलत होते. त्यांचे मधुर बोल ऐकून मुनींचे ध्यानही भंग पावत होते.॥ ५॥

दो०—**फल भारन नमि बिटप सब रहे भूमि निअराइ।**
**पर उपकारी पुरुष जिमि नवहिं सुसंपति पाइ॥ ४०॥**

फळांच्या ओझ्यामुळे वृक्ष वाकून जमिनीजवळ येऊन टेकत, ज्याप्रमाणे परोपकारी पुरुष खूप संपत्ती मिळाल्यावरही विनयाने नम्र होतात.॥ ४०॥

**देखि राम अति रुचिर तलावा। मज्जनु कीन्ह परम सुख पावा॥**
**देखी सुंदर तरुबर छाया। बैठे अनुज सहित रघुराया॥**

श्रीरामांनी ते सुंदर सरोवर पाहून स्नान केले. त्यामुळे त्यांना फार समाधान वाटले. एका सुंदर व उत्तम वृक्षाची सावली पाहून श्रीराम लक्ष्मणासह तेथे बसले.॥ १॥

**तहँ पुनि सकल देव मुनि आए। अस्तुति करि निज धाम सिधाए॥**
**बैठे परम प्रसन्न कृपाला। कहत अनुज सन कथा रसाला॥**

मग तेथे सर्व देव व मुनी आले आणि श्रीरामांची स्तुती करून घरी परत गेले. कृपाळू श्रीराम अत्यंत प्रसन्न होऊन लक्ष्मणाला रसाळ कथा सांगत होते.॥ २॥

**बिरहवंत भगवंतहि देखी। नारद मन भा सोच बिसेषी॥**
**मोर साप करि अंगीकारा। सहत राम नाना दुख भारा॥**

भगवंतांना विरही अवस्थेत पाहून नारदांना मनातून विशेष दुःख झाले. त्यांनी विचार केला की, माझाच शाप स्वीकारून श्रीराम हे नाना प्रकारची दुःखे सहन करीत आहेत.॥ ३॥

**ऐसे प्रभुहि बिलोकउँ जाई। पुनि न बनिहि अस अवसरु आई॥**
**यह बिचारि नारद कर बीना। गए जहाँ प्रभु सुख आसीना॥**

अशा भक्तवत्सल प्रभूंना जाऊन पाहावे तरी. पुन्हा अशी संधी येणार नाही. असा विचार करून नारद हातात वीणा घेऊन प्रभू जेथे सुखाने बसले होते, तेथे गेले. ॥ ४॥

**गावत राम चरित मृदु बानी। प्रेम सहित बहु भाँति बखानी॥**
**करत दंडवत लिए उठाई। राखे बहुत बार उर लाई॥**

ते कोमल वाणीने व मोठ्या प्रेमाने राम-चरित्राचे वर्णन गात जात होते. ते दंडवत करीत आहेत, असे पाहून श्रीरामांनी त्यांना उठवले व हृदयाशी धरले. ॥ ५॥

**स्वागत पूँछि निकट बैठारे। लछिमन सादर चरन पखारे॥**

नंतर त्यांचे स्वागत करून व खुशाली विचारून त्यांना आपल्याजवळ बसवून घेतले. लक्ष्मणाने आदराने त्यांचे चरण धुतले. ॥ ६॥

दो०—**नाना बिधि बिनती करि प्रभु प्रसन्न जियँ जानि।**
**नारद बोले बचन तब जोरि सरोरुह पानि॥ ४१॥**

अनेक प्रकारे प्रभूंची विनवणी करून व ते प्रसन्न आहेत, असे पाहून नारद आपले कर-कमल जोडून म्हणाले, ॥ ४१॥

**सुनहु उदार सहज रघुनायक। सुंदर अगम सुगम बर दायक॥**
**देहु एक बर मागउँ स्वामी। जद्यपि जानत अंतरजामी॥**

'हे स्वभावाने उदार असलेल्या श्रीरघुनाथा, तुम्ही सुंदर, दुर्लभ व सुखदायक वर देणारे आहात. हे स्वामी, मी एक वर मागतो, तो मला द्या. अंतर्यामी असल्यामुळे तुम्ही सर्व जाणताच.'॥ १॥

**जानहु मुनि तुम्ह मोर सुभाऊ। जन सन कबहुँ कि करउँ दुराऊ॥**
**कवन बस्तु असि प्रिय मोहि लागी। जो मुनिबर न सकहु तुम्ह मागी॥**

श्रीराम म्हणाले, 'हे मुनी, तुम्ही माझा स्वभाव जाणताच. मी आपल्या भक्तांपासून काही लपवून ठेवतो काय? मला अशी कोणती गोष्ट प्रिय वाटते की, ती हे मुनिश्रेष्ठ, तुम्ही मागू शकणार नाही?॥ २॥

**जन कहुँ कछु अदेय नहिं मोरें। अस बिस्वास तजहु जनि भोरें॥**
**तब नारद बोले हरषाई। अस बर मागउँ करउँ ढिठाई॥**

भक्ताला न देण्यासारखे माझ्याकडे काही नाही, हा विश्वास चुकूनही विसरू नका.' तेव्हा हर्षित होऊन नारद म्हणाले की, 'मी असा वर मागण्याचे धाडस करीत आहे. ॥ ३॥

**जद्यपि प्रभु के नाम अनेका। श्रुति कह अधिक एक तें एका॥**
**राम सकल नामन्ह तें अधिका। होउ नाथ अघ खग गन बधिका॥**

जरी प्रभूंची अनेक नावे आहेत आणि ती सर्व एकापेक्षा एक श्रेष्ठ आहेत, असे वेद सांगतात, तरीही हे नाथ, रामनाम हे सर्व नामांहून श्रेष्ठ असावे आणि ते पापरूपी पक्ष्यांच्या समूहासाठी पारध्याप्रमाणे असावे.॥ ४॥

दो०—**राका रजनी भगति तव राम नाम सोइ सोम।**
**अपर नाम उडगन बिमल बसहुँ भगत उर ब्योम॥ ४२ ( क )॥**

तुमची भक्ती ही पौर्णिमेची रात्र आहे. आणि तिच्यात 'राम' नाम हे पूर्ण चंद्रासारखे बनून इतर सर्व नामे तारागण बनून भक्तांच्या हृदयरूपी निर्मळ आकाशात निवास करोत.'॥ ४२(क)॥

**एवमस्तु मुनि सन कहेउ कृपासिंधु रघुनाथ।**
**तब नारद मन हरष अति प्रभु पद नायउ माथ॥ ४२ ( ख )॥**

कृपासागर श्रीरघुनाथांनी मुनींना 'तथास्तु' म्हटले. तेव्हा नारद मनापासून आनंदित होऊन प्रभूंच्या चरणी नतमस्तक झाले.॥ ४२ (ख)॥

**अति प्रसन्न रघुनाथहि जानी। पुनि नारद बोले मृदु बानी॥**
**राम जबहिं प्रेरेउ निज माया। मोहेहु मोहि सुनहु रघुराया॥**

श्रीरघुनाथ अत्यंत प्रसन्न असलेले पाहून नारद पुन्हा मृदू वाणीने म्हणाले-'हे श्रीराम, हे रघुनाथ, जेव्हा तुम्ही आपल्या मायेने मला प्रेरित करून मोहित केले होते,॥ १॥

**तब बिबाह मैं चाहउँ कीन्हा। प्रभु केहि कारन करै न दीन्हा॥**
**सुनु मुनि तोहि कहउँ सहरोसा। भजहिं जे मोहि तजि सकल भरोसा॥**

तेव्हा मी विवाह करू इच्छित होतो. हे प्रभू, तुम्ही त्या वेळी मला कोणत्या कारणाने विवाह करू दिला नाहीत ?' प्रभू म्हणाले, 'हे मुनी, मी तुम्हांला अत्यंत हर्षाने सांगतो की, जे सर्व आशा व विषयविश्वास सोडून फक्त मलाच भजतात.॥ २॥

**करउँ सदा तिन्ह कै रखवारी। जिमि बालक राखइ महतारी॥**
**गह सिसु बच्छ अनल अहि धाई। तहँ राखइ जननी अरगाई॥**

त्यांचे रक्षण मी, माता जशी बालकाची काळजी घेते, तशी करतो. लहान मूल जेव्हा धावत आग किंवा साप पकडण्यास जाते, तेव्हा आई त्याला हाताने मागे ओढून वाचविते.॥ ३॥

**प्रौढ़ भएँ तेहि सुत पर माता। प्रीति करइ नहिं पाछिलि बाता॥**
**मोरें प्रौढ़ तनय सम ग्यानी। बालक सुत सम दास अमानी॥**

मूल शहाणे झाल्यावर माता त्याच्यावर प्रेम तर करते,पण ती पूर्वीची गोष्ट उरत नाही. माता त्याला वाचविण्याची काळजी करीत नाही. तो आपले रक्षण आपण करू शकतो. ज्ञानीजन हे माझे प्रौढ शहाण्या पुत्रासारखे आहेत. तुमच्यासारखा आपल्या बळाची घमेंड न बाळगणारा सेवक हा माझ्या लहान मुलासारखा आहे. ॥ ४ ॥

**जनहि मोर बल निज बल ताही । दुहु कहँ काम क्रोध रिपु आही ॥**
**यह बिचारि पंडित मोहि भजहीं । पाएहुँ ग्यान भगति नहिं तजहीं ॥**

माझ्या सेवकाला फक्त माझ्याच बळाचा आधार असतो. आणि तो ज्ञानी मनुष्य स्वतःच्या बळावर विसंबून असतो. परंतु काम-क्रोधरूपी शत्रू हे तर दोघांनाही आहेत. भक्ताच्या शत्रूला मारण्याची जबाबदारी माझी आहे, कारण तो मला शरण असल्यामुळे माझेच बळ मानतो, परंतु स्वतःचे बळ मानणाऱ्या ज्ञानी मनुष्याची जबाबदारी माझ्यावर नाही. असा विचार करून बुद्धिमान लोक मलाच भजतात. ज्ञान प्राप्त झाल्यावरही ते भक्ती सोडत नाहीत. ॥ ५ ॥

दो०—**काम क्रोध लोभादि मद प्रबल मोह कै धारि।**
**तिन्ह महँ अति दारुन दुखद मायारूपी नारि॥ ४३ ॥**

काम, क्रोध, लोभ, मद इत्यादी प्रबळ सेना आहे. यामध्ये मायारूपिणी स्त्री ही अत्यंत दारुण दुःख देणारी आहे. ॥ ४३ ॥

**सुनु मुनि कह पुरान श्रुति संता । मोह बिपिन कहुँ नारि बसंता ॥**
**जप तप नेम जलाश्रय झारी । होइ ग्रीषम सोषइ सब नारी ॥**

हे मुनि, ऐका. पुराण, वेद व संत असे म्हणतात की, मोहरूपी वनाला फुलविणारा हा वसंत ऋतू आहे. जप, तप, नियमरूपी संपूर्ण जल-स्थानांना स्त्री ही ग्रीष्म ऋतू बनून शोषून घेते. ॥ १ ॥

**काम क्रोध मद मत्सर भेका । इन्हहि हरषप्रद बरषा एका ॥**
**दुर्बासना कुमुद समुदाई । तिन्ह कहँ सरद सदा सुखदाई ॥**

काम, क्रोध, मद व मत्सर हे बेडूक आहेत. यांना वर्षा-ऋतू बनून हर्ष देणारी स्त्री हीच एकमात्र आहे. वाईट वासना या कुमूदांचे समूह आहेत. त्यांना सदैव सुख देणारी स्त्री ही शरदऋतू आहे. ॥ २ ॥

**धर्म सकल सरसीरुह बृंदा । होइ हिम तिन्हहि दहइ सुख मंदा ॥**
**पुनि ममता जवास बहुताई । पलुहइ नारि सिसिर रितु पाई ॥**

संपूर्ण धर्म हे कमलांचे ताटवे आहेत. ही विषयजन्य सुख देणारी स्त्री हिम-ऋतू होऊन त्यांना नष्ट करते. मग ममतारूपी तांबड्या धमाशाचे वन स्त्रीरूपी शिशिर-ऋतू येताच हिरवेगार बनते. ॥ ३ ॥

**पाप उलूक निकर सुखकारी। नारि निबिड़ रजनी अँधिआरी॥**
**बुधि बल सील सत्य सब मीना। बनसी सम त्रिय कहहिं प्रबीना॥**

पापरूपी घुबडांच्या समूहांना सुख देणारी स्त्री ही घोर अंधकारमय रात्र आहे. बुद्धी, बल, शील व सत्य हे सर्व मासे आहेत आणि त्यांना फसवून त्यांचा नाश करण्यासाठी स्त्री ही गळासारखी आहे, असे चतुर पुरुष म्हणतात.॥ ४॥

दो०—**अवगुन मूल सूलप्रद प्रमदा सब दुख खानि।**
**ताते कीन्ह निवारन मुनि मैं यह जियँ जानि॥ ४४॥**

तरुण स्त्री ही अवगुणांचे मूळ, पीडा देणारी आणि सर्व दु:खांची खाण आहे. म्हणून हे मुनी, मनात असा विचार करून तुम्हांला विवाह करण्यापासून मी रोखले होते.'॥ ४४॥

**सुनि रघुपति के बचन सुहाए। मुनि तन पुलक नयन भरि आए॥**
**कहहु कवन प्रभु कै असि रीती। सेवक पर ममता अरु प्रीती॥**

श्रीरघुनाथांचे हे सुंदर बोलणे ऐकून मुनींचे शरीर रोमांचित झाले आणि नेत्र प्रेमाश्रूंनी भरले. ते मनात म्हणू लागले, कोणत्या प्रभूची अशी रीत आहे की, ज्यांचे सेवकावर इतके ममत्व व प्रेम असेल ?॥ १॥

**जे न भजहिं अस प्रभु भ्रम त्यागी। ग्यान रंक नर मंद अभागी॥**
**पुनि सादर बोले मुनि नारद। सुनहु राम बिग्यान बिसारद॥**

जे मानव भ्रम सोडून अशा प्रभूंना भजत नाहीत, ते ज्ञानाने कंगाल, दुर्बुद्धीचे आणि दुर्दैवी होत. मग नारद मुनी आदराने म्हणाले, 'हे सर्वज्ञ श्रीराम, ऐका.॥ २॥

**संतन्ह के लच्छन रघुबीरा। कहहु नाथ भव भंजन भीरा॥**
**सुनु मुनि संतन्ह के गुन कहऊँ। जिन्ह ते मैं उन्ह कें बस रहऊँ॥**

हे रघुवीर, हे भव-भयाचा नाश करणारे माझे नाथ, आता कृपा करून संतांची लक्षणे सांगा.' श्रीराम म्हणाले, 'हे मुनी ऐक, मी ज्यामुळे त्यांना वश असतो, ते संतांचे गुण तुला सांगतो.॥ ३॥

**षट बिकार जित अनघ अकामा। अचल अकिंचन सुचि सुखधामा॥**
**अमित बोध अनीह मितभोगी। सत्यसार कबि कोबिद जोगी॥**

ते संत हे काम-क्रोधादी सहा विकारांना जिंकतात, ते पापरहित, कामनारहित, निश्चल, सर्वत्यागी, आतून-बाहेरून पवित्र सुखाचे धाम, असीम ज्ञानवान, इच्छारहित, मिताहारी, सत्यनिष्ठ, कवी, विद्वान, योगी, ॥ ४॥

**सावधान मानद मदहीना। धीर धर्म गति परम प्रबीना॥**

सावध, दुसऱ्यांना मान देणारे, अभिमानरहित, धैर्यवान, धर्माचे ज्ञान आणि आचरण यांमध्ये अत्यंत निपुण,॥ ५॥

दो०—**गुनागार संसार दुख रहित बिगत संदेह।**
**तजि मम चरन सरोज प्रिय तिन्ह कहुँ देह न गेह॥ ४५॥**

गुणांचे माहेर, सांसारिक दु:खांनी रहित आणि संशयापासून पूर्णत: मुक्त असतात. माझे चरण-कमल सोडून त्यांना घर, किंबहुना देहसुद्धा प्रिय नसतो.॥ ४५॥

**निज गुन श्रवन सुनत सकुचाहीं। पर गुन सुनत अधिक हरषाहीं॥**
**सम सीतल नहिं त्यागहिं नीती। सरल सुभाउ सबहि सन प्रीती॥**

आपल्या कानांनी आपले गुण ऐकताना ते ओशाळतात, दुसऱ्यांचे गुण ऐकताना त्यांना फार आनंद वाटतो. सम व शीतल असतात, न्याय कधीही सोडत नाहीत. सरळ स्वभावाचे असतात आणि सर्वांशी प्रेम बाळगतात.॥ १॥

**जप तप ब्रत दम संजम नेमा। गुरु गोबिंद बिप्र पद प्रेमा॥**
**श्रद्धा छमा मयत्री दाया। मुदिता मम पद प्रीति अमाया॥**

ते जप, तप, व्रत, दम, संयम आणि नियम यांमध्ये मग्न असतात. गुरू, गोविंद व ब्राह्मणांच्या चरणी त्यांचे प्रेम असते. तसेच त्यांच्या ठिकाणी श्रद्धा, क्षमा, मैत्री, दया, प्रसन्नता व माझ्या चरणी निष्कपट प्रेम असते.॥ २॥

**बिरति बिबेक बिनय बिग्याना। बोध जथारथ बेद पुराना॥**
**दंभ मान मद करहिं न काऊ। भूलि न देहिं कुमारग पाऊ॥**

तसेच वैराग्य, विवेक, विनय, परमात्म्याच्या तत्त्वाचे ज्ञान आणि वेद-पुराणांचे यथार्थ ज्ञान त्यांना असते. ते कधीही दंभ, अभिमान व मद बाळगत नाहीत. आणि चुकूनही वाईट मार्गावर त्यांचे पाऊल पडत नाही.॥ ३॥

**गावहिं सुनहिं सदा मम लीला। हेतु रहित परहित रत सीला॥**
**मुनि सुनु साधुन्ह के गुन जेते। कहि न सकहिं सारद श्रुति तेते॥**

नेहमी ते माझ्या लीला गातात व ऐकतात आणि अकारण दुसऱ्यांच्या कल्याणात तत्पर असतात. हे मुनी, ऐक. संतांच्या अंगी इतके गुण असतात की, त्यांचे वर्णन सरस्वती किंवा वेदही करू शकत नाहीत.॥ ४॥

**छं०—कहि सक न सारद सेष नारद सुनत पद पंकज गहे।**
**अस दीनबंधु कृपाल अपने भगत गुन निज मुख कहे॥**
**सिरु नाइ बारहिं बार चरनन्हि ब्रह्मपुर नारद गए।**
**ते धन्य तुलसीदास आस बिहाइ जे हरि रँग रँए॥**

शेष व शारदाही संतांचे गुण वर्णन करू शकत नाहीत.' हे ऐकताच नारदांनी श्रीरामांचे चरण-कमल धरले. दीनबंधू कृपाळू रामांनी अशा प्रकारे आपल्या मुखाने आपल्या भक्तांचे गुण सांगितले. तेव्हा नारद वारंवार नमस्कार करून ब्रह्मलोकी गेले. तुलसीदास म्हणतात की, सर्व आशा सोडून जे श्रीहरिचरणी रंगतात, ते धन्य होत.

**दो०—रावनारि जसु पावन गावहिं सुनहिं जे लोग।**
**राम भगति दृढ़ पावहिं बिनु बिराग जप जोग॥ ४६ (क)॥**

जे लोक श्रीराम यांचे पवित्र यश गातील व ऐकतील, ते वैराग्य, जप आणि योग यांच्या विनासुद्धा दृढ भक्ती प्राप्त करतील.॥ ४६ (क)॥

**दीप सिखा सम जुबति तन मन जनि होसि पतंग।**
**भजहि राम तजि काम मद करहि सदा सतसंग॥ ४६ (ख)॥**

युवतीचे शरीर हे दिव्याच्या ज्योतीसारखे आहे. हे मना, तू त्यावर झेपावणारा पतंग बनू नकोस. काम आणि मद सोडून श्रीरामांचे भजन व सदा सत्संग कर.॥ ४६ (ख)॥

## मासपारायण, बाविसावा विश्राम

**इति श्रीमद्रामचरितमानसे सकलकलिकलुषविध्वंसने तृतीयः सोपानः समाप्तः।**

*कलियुगाच्या संपूर्ण पापांचा विध्वंस करणाऱ्या श्रीरामचरितमानसाचा*
*हा तिसरा सोपान समाप्त झाला.*

~~○~~

**(अरण्यकाण्ड समाप्त)**




श्रीहनुमान रामलक्ष्मणाना सुग्रीवाशी मैत्रीसाठी नेत आहे

॥ श्रीगणेशाय नमः ॥

॥ श्रीजानकीवल्लभो विजयते ॥

# श्रीरामचरितमानस

## चतुर्थ सोपान

## किष्किन्धाकाण्ड

श्लोक

**कुन्देन्दीवरसुन्दरावतिबलौ विज्ञानधामावुभौ**
**शोभाढ्यौ वरधन्विनौ श्रुतिनुतौ गोविप्रवृन्दप्रियौ।**
**मायामानुषरूपिणौ रघुवरौ सद्धर्मवर्मौ हितौ**
**सीतान्वेषणतत्परौ पथिगतौ भक्तिप्रदौ तौ हि नः॥ १॥**

कंदपुष्प व नील कमल यांच्यासमान सुंदर, गोरे व सावळे, अत्यंत बलवान, सर्वज्ञ, लावण्यसंपन्न, श्रेष्ठ धनुर्धर, वेदांनी स्तुती केलेले, गोब्राह्मणांच्या समुदायाला प्रिय, मायेने मनुष्यरूप धारण केलेले, श्रेष्ठ धर्माच्या संरक्षणासाठी कवचस्वरूप, सर्वांचे हितकारी, श्रीसीतेच्या शोधाला निघालेले पांथस्थ असे रघुकुलशिरोमणी श्रीराम आणि लक्ष्मण हे दोघे बंधू आम्हांला भक्तीच प्रदान करोत. ॥ १ ॥

**ब्रह्माम्भोधिसमुद्भवं कलिमलप्रध्वंसनं चाव्ययं**
**श्रीमच्छम्भुमुखेन्दुसुन्दरवरे संशोभितं सर्वदा।**
**संसारामयभेषजं सुखकरं श्रीजानकीजीवनं**
**धन्यास्ते कृतिनः पिबन्ति सततं श्रीरामनामामृतम्॥ २॥**

जे वेदरूपी समुद्राचे मंथन केल्याने उत्पन्न झालेले व कलियुगाचे दोष पूर्णपणे नष्ट करणारे, अविनाशी, भगवान श्रीशंभूंच्या सुंदर व श्रेष्ठ मुखरूपी चंद्रामध्ये सदैव शोभणारे, जन्म-मरणरूपी

रोगाचे औषध असलेले, सर्वांना सुख देणारे आणि श्रीजानकीजीवन अशा श्रीरामनामरूपी अमृताचे जे निरंतर पान करीत असतात, ते पुण्यात्मे धन्य होत. ॥ २ ॥

**सो०—मुक्ति जन्म महि जानि ग्यान खानि अघ हानि कर।**
**जहँ बस संभु भवानि सो कासी सेइअ कस न॥**

जेथे श्रीशिवपार्वती राहातात, त्या काशीला मुक्तीचे माहेर, ज्ञानाची खाण आणि पापांचा नाश करणारी मानून तिचे सेवन का करू नये?

**जरत सकल सुर बृंद बिषम गरल जेहिं पान किय।**
**तेहि न भजसि मन मंद को कृपाल संकर सरिस॥**

ज्या भीषण हलाहल विषाने सर्व देव होरपळू लागले होते, ते स्वतः प्राशन करणाऱ्या श्रीशंकरांना, हे मना, तू का भजत नाहीस? त्यांच्यासारखा दयाळू दुसरा कोण आहे?

**आगें चले बहुरि रघुराया। रिष्यमूक पर्बत निअराया॥**
**तहँ रह सचिव सहित सुग्रीवा। आवत देखि अतुल बल सींवा॥**

श्रीरघुनाथ मग पुढे निघाले. ऋष्यमूक पर्वत जवळ आला. तेथे ऋष्यमूक पर्वतावर सुग्रीव हा मंत्र्यांसह राहात होता. अतुलनीय बलाची परिसीमा असलेले श्रीराम आणि लक्ष्मण यांना येताना पाहून॥ १ ॥

**अति सभीत कह सुनु हनुमाना। पुरुष जुगल बल रूप निधाना॥**
**धरि बटु रूप देखु तैं जाई। कहेसु जानि जियँ सयन बुझाई॥**

सुग्रीव अतिशय घाबरून म्हणाला, 'हनुमाना, ऐक. हे दोघे पुरुष बल व रूपाची खाण आहेत. तू ब्रह्मचाऱ्याचे रूप घेऊन जाऊन बघ. त्यांची खरी हकीकत जाणून घेऊन मला खूण कर. ॥ २ ॥

**पठए बालि होहिं मन मैला। भागौं तुरत तजौं यह सैला॥**
**बिप्र रूप धरि कपि तहँ गयऊ। माथ नाइ पूछत अस भयऊ॥**

जर ते मनाने दुष्ट असलेल्या वालीने पाठविले असतील, तर मी त्वरित हा पर्वत सोडून पळून जाईन.' हे ऐकून हनुमानाने ब्राह्मणाचे रूप धारण केले व तो त्यांच्याजवळ जाऊन नतमस्तक होऊन विचारू लागला. ॥ ३ ॥

**को तुम्ह स्यामल गौर सरीरा। छत्री रूप फिरहु बन बीरा॥**
**कठिन भूमि कोमल पद गामी। कवन हेतु बिचरहु बन स्वामी॥**

'हे वीरांनो, सावळ्या व गोऱ्या वर्णाचे तुम्ही कोण आहात? क्षत्रिय असूनही वनात का फिरत आहात? हे स्वामी, या कठोर भूमीवर कोमल चरणांनी चालणारे तुम्ही कशासाठी वनात फिरत आहात?॥ ४ ॥

**मृदुल मनोहर सुंदर गाता। सहत दुसह बन आतप बाता॥**
**की तुम्ह तीनि देव महँ कोऊ। नर नारायन की तुम्ह दोऊ॥**

मनाला हरण करणारी तुमची सुंदर अंगे आहेत. मग तुम्ही वनामधील दु:सह ऊन-वारे का सहन करीत आहात? तुम्ही ब्रह्मदेव, विष्णू, महेश या तीन देवांपैकी कुणी आहात की नर-नारायण आहात?॥ ५॥

दो०—**जग कारन तारन भव भंजन धरनी भार।**
**की तुम्ह अखिल भुवन पति लीन्ह मनुज अवतार॥ १॥**

अथवा तुम्ही जगाचे मूल कारण आणि संपूर्ण लोकांचे स्वामी प्रत्यक्ष भगवान आहात की, लोकांनी भवसागर पार करून जावा म्हणून आणि पृथ्वीचा भार नष्ट व्हावा म्हणून मनुष्य-रूपाने अवतार घेतला आहे?'॥ १॥

**कोसलेस दसरथ के जाए। हम पितु बचन मानि बन आए॥**
**नाम राम लछिमन दोउ भाई। संग नारि सुकुमारि सुहाई॥**

श्रीराम म्हणाले, 'आम्ही कोसलराज दशरथांचे पुत्र आहोत आणि पित्याची आज्ञा पाळण्यासाठी वनात आलो आहोत. आम्ही दोघे भाऊ असून आमची नावे राम व लक्ष्मण आहेत. आमच्यासोबत सुंदर सुकुमार अशी माझी पत्नी जानकी होती.॥ १॥

**इहाँ हरी निसिचर बैदेही। बिप्र फिरहिं हम खोजत तेही॥**
**आपन चरित कहा हम गाई। कहहु बिप्र निज कथा बुझाई॥**

येथे कोणी राक्षसाने तिचे हरण केले. हे ब्राह्मणा, आम्ही तिलाच शोधत फिरत आहोत. आम्ही आपली ओळख सांगितली. आता तुम्ही तुमचा परिचय सांगा.'॥ २॥

**प्रभु पहिचानि परेउ गहि चरना। सो सुख उमा जाइ नहिं बरना॥**
**पुलकित तन मुख आव न बचना। देखत रुचिर बेष कै रचना॥**

प्रभूंना ओळखताच हनुमानाने त्यांच्या चरणांवर लोटांगण घातले. शिव म्हणाले, 'हे पार्वती, त्याच्या आनंदाचे वर्णन काय करावे? हनुमानाचे शरीर पुलकित झाले, मुखातून शब्द फुटत नव्हता, तो प्रभूंचा सुंदर वेष पाहात होता.॥ ३॥

**पुनि धीरजु धरि अस्तुति कीन्ही। हरष हृदयँ निज नाथहि चीन्ही॥**
**मोर न्याउ मैं पूछा साईं। तुम्ह पूछहु कस नर की नाईं॥**

नंतर धीर धरून त्याने स्तुती केली. आपल्या स्वामींची ओळख पटल्याने त्याच्या हृदयात आनंद मावत नव्हता. मग हनुमान म्हणाला, 'हे स्वामी, मी जे विचारले ते बरोबर होते. (दीर्घ कालानंतर

तुम्हांला तपस्वी वेषात पाहिले शिवाय माझी वानर-बुद्धी असल्याने मी तुम्हाला ओळखू शकलो नाही.) परंतु तुम्ही मला मनुष्याप्रमाणे कसे काय विचारत आहात?॥ ४॥

**तव माया बस फिरउँ भुलाना। ता ते मैं नहिं प्रभु पहिचाना॥**

मी तुमच्या मायेमुळे तुम्हांला विसरून भटकत आहे. त्यामुळे मी आपल्या स्वामींना ओळखले नाही.॥ ५॥

दो०—**एकु मैं मंद मोहबस कुटिल हृदय अग्यान।**
**पुनि प्रभु मोहि बिसारेउ दीनबंधु भगवान॥ २॥**

एक तर मी मंद. दुसरे म्हणजे मोहान्ध. तिसरे हृदयाने कुटिल व अज्ञानी आहे. शिवाय हे दीनबंधू भगवान! तुम्हीही मला तुमचा विसर पाडलात.॥ २॥

**जदपि नाथ बहु अवगुन मोरें। सेवक प्रभुहि परै जनि भोरें॥**
**नाथ जीव तव मायाँ मोहा। सो निस्तरइ तुम्हारेहिं छोहा॥**

हे नाथ, जरी माझ्यामध्ये अनेक अवगुण असले, तरी मला तुमचा विसर पडू नये. हे नाथ, जीव तुमच्या मायेने मोहित असतात. ते तुमच्याच कृपेने मुक्त होऊ शकतात.॥ १॥

**ता पर मैं रघुबीर दोहाई। जानउँ नहिं कछु भजन उपाई॥**
**सेवक सुत पति मातु भरोसें। रहइ असोच बनइ प्रभु पोसें॥**

त्याशिवाय हे रघुवीर, मी तुमची शपथ घेऊन सांगतो की, मी भजन-साधन हे काहीही जाणत नाही. सेवक हा स्वामीच्या व पुत्र मातेच्या भरवशावर निश्चिंत असतो. त्यामुळे प्रभूला सेवकाचे पालन-पोषण करावेच लागते.'॥ २॥

**अस कहि परेउ चरन अकुलाई। निज तनु प्रगटि प्रीति उर छाई॥**
**तब रघुपति उठाइ उर लावा। निज लोचन जल सींचि जुड़ावा॥**

असे म्हणून हनुमान व्याकूळ होऊन प्रभूंच्या चरणी पडला. त्याने आपले खरे स्वरूप प्रकट केले. त्याच्या हृदयामध्ये प्रेमाचे भरते आले. तेव्हा प्रभूंनी त्याला उठवून हृदयाशी धरले आणि आपल्या प्रेमाश्रूंचा वर्षाव करून त्याला भिजविले.॥ ३॥

**सुनु कपि जियँ मानसि जनि ऊना। तैं मम प्रिय लछिमन ते दूना॥**
**समदरसी मोहि कह सब कोऊ। सेवक प्रिय अनन्यगति सोऊ॥**

प्रभू म्हणाले, 'हे हनुमाना, कष्टी होऊ नकोस. तू मला लक्ष्मणापेक्षाही अधिक प्रिय आहेस. सर्वजण मला समदर्शी म्हणतात. मला कोणी प्रिय किंवा अप्रिय नाही. परंतु मला भक्त फार आवडतो. कारण त्याला माझ्याशिवाय दुसऱ्या कुणाचा आधार नसतो.॥ ४॥

दो०—**सो अनन्य जाकें असि मति न टरइ हनुमंत।**
**मैं सेवक सचराचर रूप स्वामि भगवंत॥ ३॥**

आणि हे हनुमाना, आपण सेवक असून चराचर जग आपले स्वामी भगवान यांचे रूप आहे, अशी ज्याची बुद्धी कधी ढळत नाही, तोच अनन्य समजावा.'॥ ३॥

**देखि पवनसुत पति अनुकूला। हृदयँ हरष बीती सब सूला॥**
**नाथ सैल पर कपिपति रहई। सो सुग्रीव दास तव अहई॥**

स्वामी आपल्यावर प्रसन्न आहेत, असे पाहून पवनकुमार हनुमानाच्या मनात हर्ष दाटला आणि त्याचे सर्व दुःख नाहीसे झाले. तो म्हणाला, 'हे नाथ, या पर्वतावर वानरराज सुग्रीव राहातो. तो तुमचा दास आहे.॥ १॥

**तेहि सन नाथ मयत्री कीजे। दीन जानि तेहि अभय करीजे॥**
**सो सीता कर खोज कराइहि। जहँ तहँ मरकट कोटि पठाइहि॥**

हे नाथ, त्याच्याशी मैत्री करा आणि त्याला दीन समजून निर्भय करा. तो सर्वत्र कोट्यवधी वानरांना पाठवील व सीतेचा शोध लावेल.'॥ २॥

**एहि बिधि सकल कथा समुझाई। लिए दुऔ जन पीठि चढ़ाई॥**
**जब सुग्रीवँ राम कहुँ देखा। अतिसय जन्म धन्य करि लेखा॥**

अशाप्रकारे सर्व गोष्टी समजावून हनुमानाने श्रीराम-लक्ष्मण या दोघांना आपल्या पाठीवर घेतले. जेव्हा सुग्रीवाने श्रीरामचंद्रांना पाहिले, तेव्हा त्याला आपला जन्म अतिशय धन्य झाला, असे वाटले.॥ ३॥

**सादर मिलेउ नाइ पद माथा। भेंटेउ अनुज सहित रघुनाथा॥**
**कपि कर मन बिचार एहि रीती। करिहहिं बिधि मो सन ए प्रीती॥**

सुग्रीव श्रीरामांच्या चरणी नतमस्तक होऊन त्यांना आदराने भेटला. श्रीराम-लक्ष्मणांनी त्याला आलिंगन दिले. सुग्रीव मनात म्हणत होता, हे दैवा! हे माझ्यावर प्रेम करतील काय?॥ ४॥

दो०—**तब हनुमंत उभय दिसि की सब कथा सुनाइ।**
**पावक साखी देइ करि जोरी प्रीति दृढ़ाइ॥ ४॥**

तेव्हा हनुमानाने दोन्ही बाजूंच्या सर्व गोष्टी सांगून अग्नीला साक्षी ठेवून त्यांची मैत्री दृढ केली.॥ ४॥

**कीन्हि प्रीति कछु बीच न राखा। लछिमन राम चरित सब भाषा॥**
**कह सुग्रीव नयन भरि बारी। मिलिहि नाथ मिथिलेसकुमारी॥**

दोघांनीही मन:पूर्वक परस्परांवर प्रेम केले, काहीही अंतर ठेवले नाही. तेव्हा लक्ष्मणाने श्रीरामांची सारी हकीगत सांगितली. तेव्हा सुग्रीवाने डोळ्यांत पाणी आणून सांगितले की, 'हे नाथ, मिथिलेशकुमारी जानकी नक्की मिळेल.॥ १॥

**मंत्रिन्ह सहित इहाँ एक बारा। बैठ रहेउँ मैं करत बिचारा॥**
**गगन पंथ देखी मैं जाता। परबस परी बहुत बिलपाता॥**

मी एकदा येथे मंत्र्यांसह बसून विचारविनिमय करीत होतो, तेव्हा मी शत्रूच्या ताब्यात पडून खूप विलाप करीत असलेल्या सीतेला आकाशमार्गाने जाताना पाहिले होते.॥ २॥

**राम राम हा राम पुकारी। हमहि देखि दीन्हेउ पट डारी॥**
**मागा राम तुरत तेहिं दीन्हा। पट उर लाइ सोच अति कीन्हा॥**

आम्हांला पाहून तिने 'हे राम, हे राम' असे म्हणत उपवस्त्र टाकले होते. श्रीरामांनी ते मागितले, तेव्हा सुग्रीवाने लगेच ते दिले. ते वस्त्र हृदयाशी धरून श्रीरामचंद्रांनी फार शोक केला.॥ ३॥

**कह सुग्रीव सुनहु रघुबीरा। तजहु सोच मन आनहु धीरा॥**
**सब प्रकार करिहउँ सेवकाई। जेहि बिधि मिलिहि जानकी आई॥**

सुग्रीव म्हणाला, 'हे रघुवीर, काळजी सोडून द्या आणि धीर बाळगा. मी सर्व प्रकारे तुमची सेवा करीन. त्यामुळे जानकी येऊन तुम्हांला भेटेल.॥ ४॥

दो०—**सखा बचन सुनि हरषे कृपासिंधु बलसींव।**
**कारन कवन बसहु बन मोहि कहहु सुग्रीव॥ ५॥**

तेव्हा कृपेचे समुद्र आणि बलाची परिसीमा असणारे श्रीराम मित्र सुग्रीवाचे बोलणे ऐकून हर्षित झाले. ते म्हणाले, 'हे सुग्रीवा, तू वनात का राहातोस, ते मला सांग.'॥ ५॥

**नाथ बालि अरु मैं द्वौ भाई। प्रीति रही कछु बरनि न जाई॥**
**मयसुत मायावी तेहि नाऊँ। आवा सो प्रभु हमरें गाऊँ॥**

सुग्रीव म्हणाला, 'हे नाथ, वाली व मी दोघे भाऊ आहोत. आम्हा दोघांमध्ये अतिशय प्रेम होते. हे प्रभो, मय दानवाचा एक पुत्र होता. त्याचे नाव मायावी होते. तो एकदा आमच्या गावी आला.॥ १॥

**अर्ध राति पुर द्वार पुकारा। बाली रिपु बल सहइ न पारा॥**
**धावा बालि देखि सो भागा। मैं पुनि गयउँ बंधु सँग लागा॥**

त्याने अर्ध्या रात्री नगरद्वारावर येऊन युद्धाचे आव्हान दिले. वालीला शत्रूचे हे आव्हान सहन झाले नाही. तो धावत गेला. त्याला पाहाताच तो मायावी पळून गेला. मीसुद्धा भावासोबत गेलो.॥ २॥

**गिरिबर गुहाँ पैठ सो जाई। तब बालीं मोहि कहा बुझाई॥**
**परिखेसु मोहि एक पखवारा। नहिं आवौं तब जानेसु मारा॥**

तो मायावी एका पर्वताच्या गुहेमध्ये लपला. तेव्हा मला वालीने सांगितले की, 'तू एक पंधरवडा होईपर्यंत वाट बघ. जर मी तेवढ्या दिवसांत परत आलो नाही, तर मी मारला गेलो, असे समज.'॥ ३॥

**मास दिवस तहँ रहेउँ खरारी। निसरी रुधिर धार तहँ भारी॥**
**बालि हतेसि मोहि मारिहि आई। सिला देइ तहँ चलेउँ पराई॥**

हे श्रीराम! मी महिनाभर तेथे राहिलो. त्या गुहेतून रक्ताचा मोठा प्रवाह बाहेर आला. तेव्हा मी समजलो की, त्या मायावीने वालीला मारले. आता तो येऊन मला मारेल, म्हणून मी तेथे गुहेच्या द्वारावर मोठी शिळा लावून पळून आलो.॥ ४॥

**मंत्रिन्ह पुर देखा बिनु साईं। दीन्हेउ मोहि राज बरिआईं॥**
**बाली ताहि मारि गृह आवा। देखि मोहि जियँ भेद बढ़ावा॥**

मंत्र्यांनी नगराला राजा नाही, म्हणून मला आग्रह करून राज्य दिले. नंतर वाली त्या मायावीला मारून घरी परत आला. मला सिंहासनावर बसल्याचे पाहून त्याच्या मनात विकल्प वाढला. (त्याला वाटले की, राज्याच्या लोभाने मीच गुहेच्या तोंडावर शिळा बसवून आलो व येथे येऊन राजा बनलो.)॥ ५॥

**रिपु सम मोहि मारेसि अति भारी। हरि लीन्हेसि सर्बसु अरु नारी॥**
**ताकें भय रघुबीर कृपाला। सकल भुवन मैं फिरेउँ बिहाला॥**

त्याने मला शत्रूप्रमाणे खूप मारले आणि माझे सर्वस्व व माझी स्त्री हिरावून घेतली. हे कृपाळू रघुवीरा, त्याच्या भयामुळे मी सर्व लोकांत वाईट परिस्थितीत फिरत राहिलो.॥ ६॥

**इहाँ साप बस आवत नाहीं। तदपि सभीत रहउँ मन माहीं॥**
**सुनि सेवक दुख दीनदयाला। फरकि उठीं द्वै भुजा बिसाला॥**

तो शापामुळे येथे येत नाही, तरीही मनातून मी भयभीत असतो.' सेवकाचे दुःख ऐकून दीनांवर दया करणाऱ्या श्रीरघुनाथांच्या दोन्ही भुजा स्फुरू लागल्या.॥ ७॥

दो०—**सुनु सुग्रीव मारिहउँ बालिहि एकहिं बान।**
**ब्रह्म रुद्र सरनागत गएँ न उबरिहिं प्रान॥ ६॥**

ते म्हणाले, 'हे सुग्रीवा, ऐक. मी एकाच बाणाने वालीला मारीन. ब्रह्मदेव आणि रुद्र यांना जरी तो शरण गेला, तरी त्याचे प्राण वाचणार नाहीत.॥ ६॥

**जे न मित्र दुख होहिं दुखारी। तिन्हहि बिलोकत पातक भारी॥**
**निज दुख गिरि सम रज करि जाना। मित्रक दुख रज मेरु समाना॥**

जे लोक मित्राच्या दु:खाने दु:खी होत नाहीत, त्यांना पाहिल्यानेही मोठे पाप लागते. आपल्या पर्वतासमान दु:खाला रज:कणाप्रमाणे समजून मित्राच्या रज:कणाप्रमाणे असलेल्या दु:खाला सुमेरूप्रमाणे मानावे. ॥ १ ॥

**जिन्ह कें असि मति सहज न आई । ते सठ कत हठि करत मिताई ॥**
**कुपथ निवारि सुपंथ चलावा । गुन प्रगटै अवगुनन्हि दुरावा ॥**

ज्यांना स्वभावत:च अशी बुद्धी नसते, ते मूर्ख बळेच कुणाशीही मैत्री का करतात? त्याने मित्राला वाईट मार्गापासून चांगल्या मार्गावर आणावे व त्याचे गुण प्रकट करून अवगुण लपवावेत, हा खऱ्या मित्राचा धर्म आहे. ॥ २ ॥

**देत लेत मन संक न धरई । बल अनुमान सदा हित करई ॥**
**बिपति काल कर सतगुन नेहा । श्रुति कह संत मित्र गुन एहा ॥**

देण्या-घेण्याबद्दल मनात शंका बाळगू नये. आपल्या शक्तीप्रमाणे त्याचे नेहमी हित करावे. संकटकाळी तर शंभरपट स्नेह करावा. वेद म्हणतात की, उत्तम मित्राची ही लक्षणे आहेत. ॥ ३ ॥

**आगें कह मृदु बचन बनाई । पाछें अनहित मन कुटिलाई ॥**
**जाकर चित अहि गति सम भाई । अस कुमित्र परिहरेहिं भलाई ॥**

जो समोर कृत्रिम गोड बोलतो व माघारी निंदा करतो आणि मनात कपट ठेवतो, हे बंधो, त्याचे मन सापाच्या चालीप्रमाणे वाकडे असते. अशा कुमित्राला टाळणेच चांगले. ॥ ४ ॥

**सेवक सठ नृप कृपन कुनारी । कपटी मित्र सूल सम चारी ॥**
**सखा सोच त्यागहु बल मोरें । सब बिधि घटब काज मैं तोरें ॥**

मूर्ख सेवक, कंजूष राजा, कुलटा स्त्री आणि कपटी मित्र हे चौघे काट्याप्रमाणे दु:ख देणारे असतात. हे मित्रा! माझ्या बळावर आता तू चिंता सोडून दे. मी सर्व प्रकारे तुला मदत करीन.' ॥ ५ ॥

**कह सुग्रीव सुनहु रघुबीरा । बालि महाबल अति रनधीरा ॥**
**दुंदुभि अस्थि ताल देखराए । बिनु प्रयास रघुनाथ ढहाए ॥**

सुग्रीव म्हणाला, 'हे रघुवीर! ऐका. वाली हा अत्यंत बलवान आणि मोठा रणधीर आहे.' नंतर सुग्रीवाने रामांना दुंदुभी राक्षसाची हाडे आणि ताल वृक्ष दाखविले. श्रीरघुनाथांनी सहजासहजी ते पाडले. ॥ ६ ॥

**देखि अमित बल बाढ़ी प्रीती । बालि बधब इन्ह भइ परतीती ॥**
**बार बार नावइ पद सीसा । प्रभुहि जानि मन हरष कपीसा ॥**

श्रीरामांचे हे अपरिमित बळ पाहून सुग्रीवाला श्रीरामांविषयी वाटणारे प्रेम वाढले आणि

हे वालीचा वध नक्की करतील, असा त्याला विश्वास वाटू लागला. तो वारंवार श्रीरामांच्या चरणी नतमस्तक होऊ लागला. प्रभूंचे खरे स्वरूप कळल्याने सुग्रीव मनातून आनंदित झाला होता. ॥ ७ ॥

**उपजा ग्यान बचन तब बोला । नाथ कृपाँ मन भयउ अलोला ॥**
**सुख संपति परिवार बड़ाई । सब परिहरि करिहउँ सेवकाई ॥**

जेव्हा तो भानावर आला, तेव्हा म्हणाला, 'हे नाथ, तुमच्या कृपेमुळे माझे मन शांत झाले. सुख, संपत्ती, परिवार व मोठेपणा सोडून मी तुमचीच सेवा करीत राहीन. ॥ ८ ॥

**ए सब रामभगति के बाधक । कहहिं संत तव पद अवराधक ॥**
**सत्रु मित्र सुख दुख जग माहीं । मायाकृत परमारथ नाहीं ॥**

कारण सुख-संपत्ती इत्यादी सर्व रामभक्तीच्या विरोधी आहेत, असे संत सांगतात. जगात जितके मित्र व शत्रू आहेत आणि सुख-दुःखादी द्वंद्वे आहेत, ती सर्वच्या सर्व मायारचित असून परमार्थतः खरी नाहीत. ॥ ९ ॥

**बालि परम हित जासु प्रसादा । मिलेहु राम तुम्ह समन बिषादा ॥**
**सपनें जेहि सन होइ लराई । जागें समुझत मन सकुचाई ॥**

हे श्रीरामा! वाली हा तर माझा परम हितकारी आहे. कारण त्याच्या करणीमुळे शोकाचा नाश करणारे तुम्ही मला मिळालात आणि आता स्वप्नातही जरी त्याच्याशी लढाई झाली, तरी जागे झाल्यावर माझ्या मनाला संकोच वाटेल. ॥ १० ॥

**अब प्रभु कृपा करहु एहि भाँती । सब तजि भजनु करौं दिन राती ॥**
**सुनि बिराग संजुत कपि बानी । बोले बिहँसि रामु धनुपानी ॥**

हे श्रीराम, आता माझ्यावर अशी कृपा करा की, सर्व सोडून रात्रंदिवस मी तुमचे भजन करीत राहीन.' सुग्रीवाची ती वैराग्ययुक्त वाणी ऐकून हाती धनुष्य धारण केलेले श्रीराम हसत म्हणाले, ॥ ११ ॥

**जो कछु कहेहु सत्य सब सोई । सखा बचन मम मृषा न होई ॥**
**नट मरकट इव सबहि नचावत । रामु खगेस बेद अस गावत ॥**

'तू जे सांगितलेस ते सर्व सत्य आहे. परंतु हे मित्रा, माझे बोलणे मिथ्या नसते. वाली मारला जाईल व राज्य तुला मिळेल.' काकभुशुंडी म्हणतात, 'पक्ष्यांच्या राजा गरुडा! माकडवाल्याच्या माकडाप्रमाणे श्रीराम सर्वांना नाचवितात, असे वेद म्हणतात. ॥ १२ ॥

**लै सुग्रीव संग रघुनाथा । चले चाप सायक गहि हाथा ॥**
**तब रघुपति सुग्रीव पठावा । गर्जेसि जाइ निकट बल पावा ॥**

त्यानंतर सुग्रीवाला बरोबर घेऊन हातात धनुष्य धारण करून श्रीरघुनाथ निघाले. मग श्रीरघुनाथांनी सुग्रीवाला वालीकडे पाठविले. श्रीरामांचे बळ मिळाल्यामुळे वालीजवळ जाऊन त्याने गर्जना केली. ॥ १३ ॥

**सुनत बालि क्रोधातुर धावा। गहि कर चरन नारि समुझावा॥**
**सुनु पति जिन्हहि मिलेउ सुग्रीवा। ते द्वौ बंधु तेज बल सींवा॥**

ती ऐकताच वाली हा क्रोधाने धावून गेला. त्याची पत्नी तारा हिने त्याचे पाय धरून समजाविले की, 'हे नाथा, ऐकून घ्या. सुग्रीव ज्यांना भेटला आहे, ते दोघे भाऊ पराक्रमी व बळाची परिसीमा आहेत.॥ १४॥

**कोसलेस सुत लछिमन रामा। कालहु जीति सकहिं संग्रामा॥**

ते कोसलपती दशरथाचे पुत्र राम व लक्ष्मण युद्धामध्ये काळालाही जिंकू शकतात.'॥ १५॥

दो०—**कह बाली सुनु भीरु प्रिय समदरसी रघुनाथ।**
**जौं कदाचि मोहि मारहिं तौ पुनि होउँ सनाथ॥ ७॥**

वाली म्हणाला, 'हे घाबरट प्रिये, ऐकून ठेव. श्रीरघुनाथ हे समदर्शी आहेत. जर कदाचित त्यांनी मला मारले, तर मला परमपद मिळेल.'॥ ७॥

**अस कहि चला महा अभिमानी। तृन समान सुग्रीवहि जानी॥**
**भिरे उभौ बाली अति तर्जा। मुठिका मारि महाधुनि गर्जा॥**

असे म्हणून तो अहंकारी वाली सुग्रीवाला गवताप्रमाणे तुच्छ मानून भिडला आणि त्याला ठोसा देऊन त्याने मोठ्याने गर्जना केली.॥ १॥

**तब सुग्रीव बिकल होइ भागा। मुष्टि प्रहार बज्र सम लागा॥**
**मैं जो कहा रघुबीर कृपाला। बंधु न होइ मोर यह काला॥**

तेव्हा सुग्रीव व्याकूळ होऊन पळाला. त्याला ठोसा हा वज्रासारखा लागला. सुग्रीवाने येऊन सांगितले की, 'हे कृपाळू रघुवीर, मी तुम्हांला पूर्वीच सांगितले होते की, वाली हा माझा भाऊ नव्हे, काळ आहे.'॥ २॥

**एकरूप तुम्ह भ्राता दोऊ। तेहि भ्रम तें नहिं मारेउँ सोऊ॥**
**कर परसा सुग्रीव सरीरा। तनु भा कुलिस गई सब पीरा॥**

श्रीराम म्हणाले, 'तुम्हां भावांचे एकसारखे रूप आहे. त्यामुळे मी त्याला मारू शकलो नाही.' मग श्रीरामांनी सुग्रीवाच्या शरीराला आपल्या हाताचा स्पर्श केला, त्यामुळे त्याचे शरीर वज्रासारखे झाले आणि शरीर-पीडा नाहीशी झाली.॥ ३॥

**मेली कंठ सुमन कै माला। पठवा पुनि बल देइ बिसाला॥**
**पुनि नाना बिधि भई लराई। बिटप ओट देखहिं रघुराई॥**

मग श्रीरामांनी सुग्रीवाच्या गळ्यात फुलांची माळ घातली आणि त्याला प्रोत्साहन देऊन पाठविले. दोघांमध्ये अनेक प्रकारे युद्ध सुरू झाले. श्रीराम वृक्षाआडून ते पाहात होते.॥ ४॥

दो०—बहु छल बल सुग्रीव कर हियँ हारा भय मानि।
मारा बालि राम तब हृदय माझ सर तानि॥ ८॥

सुग्रीवाने पुष्कळ आक्रमक पवित्रे घेऊन पाहिले, परंतु शेवटी भयामुळे तो हतोत्साह झाला. तेव्हा श्रीरामांनी बाण खेचून वालीच्या छातीवर मारला. ॥ ८ ॥

परा बिकल महि सर के लागें। पुनि उठि बैठ देखि प्रभु आगें॥
स्याम गात सिर जटा बनाएँ। अरुन नयन सर चाप चढ़ाएँ॥

बाण लागताच वाली व्याकूळ होऊन खाली पडला. परंतु प्रभू रामांना पाहून तो उठून बसला. भगवंतांचे श्यामल शरीर आहे, मस्तकावर जटा आहेत. नेत्र लालसर आहेत. धनुष्य-बाण सज्ज केलेले आहेत. ॥ १ ॥

पुनि पुनि चितइ चरन चित दीन्हा। सुफल जन्म माना प्रभु चीन्हा॥
हृदयँ प्रीति मुख बचन कठोरा। बोला चितइ राम की ओरा॥

वालीने वारंवार भगवंतांच्याकडे पाहून चित्त त्यांच्या चरणी लावले. प्रभूंना ओळखल्यामुळे त्याला आपला जन्म सफळ झाल्याचे वाटले. त्याच्या मनात प्रेम होते, परंतु मुखात कठोर शब्द होते. तो श्रीरामांच्याकडे पाहात म्हणाला, ॥ २ ॥

धर्म हेतु अवतरेहु गोसाईं। मारेहु मोहि ब्याध की नाईं॥
मैं बैरी सुग्रीव पिआरा। अवगुन कवन नाथ मोहि मारा॥

'हे स्वामी, तुम्ही धर्माच्या रक्षणासाठी अवतार घेतला आहे, तर मग व्याधाप्रमाणे मला लपून का मारले? तुम्हांला मी वैरी आणि सुग्रीव प्रिय का? हे नाथ, कोणत्या दोषाकरिता तुम्ही मला मारले?' ॥ ३ ॥

अनुज बधू भगिनी सुत नारी। सुनु सठ कन्या सम ए चारी॥
इन्हहि कुदृष्टि बिलोकइ जोई। ताहि बधें कछु पाप न होई॥

श्रीराम म्हणाले, 'हे मूर्खा, ऐकून घे. लहान भावाची पत्नी, बहीण, मुलाची स्त्री आणि कन्या या चारीही सारख्या आहेत. यांच्याकडे जो वाईट नजरेने पाहातो, त्याला मारण्यात कोणतेही पाप नसते. ॥ ४ ॥

मूढ़ तोहि अतिसय अभिमाना। नारि सिखावन करसि न काना॥
मम भुज बल आश्रित तेहि जानी। मारा चहसि अधम अभिमानी॥

हे मूर्खा, तुला फार अभिमान आहे. तू आपल्या पत्नीच्या बोलण्यावर लक्ष दिले नाहीस. सुग्रीव हा माझ्या बाहुबलाचा अश्रित आहे. हे माहीत असूनही अरे अधमा, गर्विष्ठा, तू त्याला ठार मारणार होतास. ॥ ५ ॥

दो०—सुनहु राम स्वामी सन चल न चातुरी मोरि।
प्रभु अजहूँ मैं पापी अंतकाल गति तोरि॥ ९॥

वाली म्हणाला, 'हे श्रीरामा, स्वामीपुढे माझे शहाणपण चालू शकणार नाही. पण हे प्रभो, (मला सांगा,) अंतकाळी तुमचा आश्रय मिळूनही मी पापी राहिलो का?'॥ ९॥

**सुनत राम अति कोमल बानी। बालि सीस परसेउ निज पानी॥**
**अचल करौं तनु राखहु प्राना। बालि कहा सुनु कृपानिधाना॥**

वालीची ती अत्यंत मृदुवाणी ऐकून श्रीरामांनी त्याच्या मस्तकाला आपल्या हाताचा स्पर्श केला आणि म्हटले, 'मी तुझे शरीर दृढ करतो, तुझे प्राण वाचतील.' वाली म्हणाला, 'हे कृपानिधान, ऐकून घ्या.॥ १॥

**जन्म जन्म मुनि जतनु कराहीं। अंत राम कहि आवत नाहीं॥**
**जासु नाम बल संकर कासी। देत सबहि सम गति अबिनासी॥**

मुनिगण जन्मोजन्मी अनेक प्रकारचे साधन करीत असतात. तरीही अंतकाळी त्यांच्या तोंडून रामनाम येत नाही. ज्यांच्या नावाच्या बळावर शंकर हे काशीतील सर्वांना समानपणे मुक्ती देतात,॥ २॥

**मम लोचन गोचर सोइ आवा। बहुरि कि प्रभु अस बनिहि बनावा॥**

ते श्रीराम प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांसमोर आले आहेत. हे प्रभो, अशी संधी पुन्हा येईल काय?॥ ३॥

छं०—**सो नयन गोचर जासु गुन नित नेति कहि श्रुति गावहीं।**
**जिति पवन मन गो निरस करि मुनि ध्यान कबहुँक पावहीं॥**
**मोहि जानि अति अभिमान बस प्रभु कहेउ राखु सरीरही।**
**अस कवन सठ हठि काटि सुरतरु बारि करिहि बबूरही॥ १॥**

श्रुती 'नेति-नेति' म्हणून निरंतर ज्यांचे गुणगान करतात, आणि प्राण व मन जिंकून इंद्रियांना विषयांपासून विरक्त बनवून मुनिगण ध्यानामध्ये ज्यांची क्वचितच एक झलक मिळवू शकतात, तेच तुम्ही प्रभू प्रत्यक्ष माझ्यासमोर प्रकट आहात. तुम्ही मला अत्यंत अभिमानी मानून म्हटले की, 'तू शरीर सोडू नकोस. परंतु जाणूनबुजून कल्पवृक्ष तोडून बाभळीचे कुंपण कोण मूर्ख करील? (म्हणजेच मोक्ष देणाऱ्या तुम्हाला सोडून या नश्वर शरीराचे रक्षण कोण करील?)॥ १॥

**अब नाथ करि करुना बिलोकहु देहु जो बर मागऊँ।**
**जेहिं जोनि जन्मौं कर्म बस तहँ राम पद अनुरागऊँ॥**
**यह तनय मम सम बिनय बल कल्यानप्रद प्रभु लीजिऐ।**
**गहि बाँह सुर नर नाह आपन दास अंगद कीजिऐ॥ २॥**

हे नाथ, आता माझ्यावर दयादृष्टी करा आणि मी जो वर मागतो तो द्या. मी कर्मामुळे ज्या योनीत जन्म घेईन, तेथे हे श्रीरामा, तुमच्या चरणी प्रेम करीत राहावे. हे कल्याणप्रद प्रभो, हा माझा पुत्र अंगद विनय व बल या बाबतीत माझ्यासारखाच आहे. याचा स्वीकार करा आणि हे देव व मनुष्य यांचे नाथ, याचा हात धरून याला आपला दास बनवा.'॥ २ ॥

**दो०—राम चरन दृढ़ प्रीति करि बालि कीन्ह तनु त्याग।**
**सुमन माल जिमि कंठ ते गिरत न जानइ नाग॥ १०॥**

श्रीरामांच्या चरणी दृढ प्रेम ठेवून वालीने, हत्ती जसा गळ्यातील पुष्पमाला खाली पडल्याचे जाणत नाही, त्याप्रमाणे सहजपणे शरीराचा त्याग केला.॥ १०॥

**राम बालि निज धाम पठावा। नगर लोग सब ब्याकुल धावा॥**
**नाना बिधि बिलाप कर तारा। छूटे केस न देह सँभारा॥**

श्रीरामांनी वालीला आपल्या परमधामी पाठविले. नगरातील सर्व लोक व्याकूळ होऊन धावत आले. वालीची पत्नी तारा ही अनेक प्रकारे विलाप करू लागली. तिचे केस विस्कटले होते आणि तिला देहाची शुद्ध नव्हती.॥ १॥

**तारा बिकल देखि रघुराया। दीन्ह ग्यान हरि लीन्ही माया॥**
**छिति जल पावक गगन समीरा। पंच रचित अति अधम सरीरा॥**

तारा व्याकूळ झाल्याचे पाहून श्रीरघुनाथांनी तिला ज्ञान दिले व तिचे अज्ञान हरण केले. ते म्हणाले, 'पृथ्वी, जल, अग्नी, आकाश आणि वायू या पंचतत्त्वांनी हे अत्यंत तुच्छ शरीर बनलेले आहे.॥ २॥

**प्रगट सो तनु तव आगें सोवा। जीव नित्य केहि लगि तुम्ह रोवा॥**
**उपजा ग्यान चरन तब लागी। लीन्हेसि परम भगति बर मागी॥**

ते वालीचे शरीर तर तुझ्यासमोर प्रत्यक्ष झोपलेले आहे, आणि जीव हा नित्य आहे. मग तू कशासाठी रडतेस?' जेव्हा ज्ञान उत्पन्न झाले, तेव्हा ती भगवंतांच्या चरणी लागली आणि तिने परम भक्तीचा वर मागितला.॥ ३॥

**उमा दारु जोषित की नाईं। सबहि नचावत रामु गोसाईं॥**
**तब सुग्रीवहि आयसु दीन्हा। मृतक कर्म बिधिवत सब कीन्हा॥**

शिव म्हणतात, 'हे उमे, स्वामी राम सर्वांना कठपुतळीप्रमाणे नाचवीत असतात.' त्यानंतर श्रीरामांनी सुग्रीवाला आज्ञा केली आणि सुग्रीवाने विधिपूर्वक वालीचे सर्व अंत्यकर्म केले.॥ ४॥

**राम कहा अनुजहि समुझाई। राज देहु सुग्रीवहि जाई॥**
**रघुपति चरन नाइ करि माथा। चले सकल प्रेरित रघुनाथा॥**

तेव्हा श्रीरामचंद्रांनी लक्ष्मणाला समजावून म्हटले, 'तू जाऊन सुग्रीवाला राज्य दे.' श्रीरघुनाथांच्या आज्ञेने सर्व लोक श्रीरघुनाथांच्या चरणी नतमस्तक होऊन निघून गेले. ॥ ५ ॥

**दो०—लछिमन तुरत बोलाए पुरजन बिप्र समाज।**
**राजु दीन्ह सुग्रीव कहँ अंगद कहँ जुबराज॥ ११ ॥**

लक्ष्मणाने लगेच सर्व नगरवासीयांना व ब्राह्मण मंडळींना बोलावून घेतले आणि त्यांच्यासमोर सुग्रीवाला राज्य व अंगदाला युवराजपद दिले. ॥ ११ ॥

**उमा राम सम हित जग माहीं। गुरु पितु मातु बंधु प्रभु नाहीं॥**
**सुर नर मुनि सब कै यह रीती। स्वारथ लागि करहिं सब प्रीती॥**

'हे पार्वती, जगामध्ये श्रीरामांच्यासारखा अकारण हित करणारा गुरू, पिता, माता, बंधू आणि स्वामी असा दुसरा कोणी नाही. देव, मनुष्य आणि मुनी या सर्वांची रीत अशीच आहे की, स्वार्थासाठीच सर्व प्रेम करतात. ॥ १ ॥

**बालि त्रास ब्याकुल दिन राती। तन बहु ब्रन चिंताँ जर छाती॥**
**सोइ सुग्रीव कीन्ह कपिराऊ। अति कृपाल रघुबीर सुभाऊ॥**

जो सुग्रीव रात्रंदिवस वालीच्या भीतीने व्याकूळ असे, ज्याच्या शरीरावर बऱ्याच जखमा झाल्या होत्या आणि ज्याची छाती चिंतेने जळत होती, त्या सुग्रीवाला श्रीरामांनी वानरांचा राजा बनविले. श्रीरामचंद्रांचा स्वभाव अत्यंत कृपाळू आहे. ॥ २ ॥

**जानतहूँ अस प्रभु परिहरहीं। काहे न बिपति जाल नर परहीं॥**
**पुनि सुग्रीवहि लीन्ह बोलाई। बहु प्रकार नृपनीति सिखाई॥**

हे जाणूनही जे लोक अशा प्रभूला सोडून देतात, ते विपत्तींच्या जाळ्यात का अडकणार नाहीत? मग श्रीरामांनी सुग्रीवाला बोलावून घेतले आणि अनेक प्रकारे राजनीती शिकविली. ॥ ३ ॥

**कह प्रभु सुनु सुग्रीव हरीसा। पुर न जाउँ दस चारि बरीसा॥**
**गत ग्रीषम बरषा रितु आई। रहिहउँ निकट सैल पर छाई॥**

मग प्रभू म्हणाले, 'हे वानरराज सुग्रीवा, मी चौदा वर्षे कोणत्याही गावात जाणार नाही. ग्रीष्मऋतू जाऊन वर्षाऋतू आला. आता मी येथे जवळच पर्वतावर राहीन. ॥ ४ ॥

**अंगद सहित करहु तुम्ह राजू। संतत हृदयँ धरेहु मम काजू॥**
**जब सुग्रीव भवन फिरि आए। रामु प्रबरषन गिरि पर छाए॥**

अंगदासह तू राज्य कर. माझे काम नेहमी लक्षात ठेव.' त्यानंतर सुग्रीव घरी परतला, तेव्हा श्रीराम प्रवर्षण पर्वतावर जाऊन राहिले. ॥ ५ ॥

दो०—**प्रथमहिं देवन्ह गिरि गुहा राखेउ रुचिर बनाइ।**
**राम कृपानिधि कछु दिन बास करहिंगे आइ॥ १२॥**

देवांनी पूर्वीच त्या पर्वतावरची एक गुहा सज्ज करून ठेवली होती. त्यांना वाटले की, कृपेची खाण श्रीराम काही दिवस येथे येऊन राहातील.॥ १२॥

**सुंदर बन कुसुमित अति सोभा। गुंजत मधुप निकर मधु लोभा॥**
**कंद मूल फल पत्र सुहाए। भए बहुत जब ते प्रभु आए॥**

सुंदर फुललेले वन अत्यंत सुशोभित होते. मधाच्या लोभाने भ्रमरांचा समूह गुंजारव करीत होता. जेव्हापासून प्रभू आले, तेव्हापासून वनात सुंदर कंद, मुळे, फळे व पाने विपुल झाली.॥ १॥

**देखि मनोहर सैल अनूपा। रहे तहँ अनुज सहित सुरभूपा॥**
**मधुकर खग मृग तनु धरि देवा। करहिं सिद्ध मुनि प्रभु कै सेवा॥**

मनोहर आणि अनुपम पर्वत पाहून देवांचे सम्राट श्रीराम लक्ष्मणासह तेथे राहिले. देव, सिद्ध व मुनी हे भ्रमर, पक्षी आणि पशूंचे शरीर धारण करून प्रभूंची सेवा करू लागले.॥ २॥

**मंगलरूप भयउ बन तब ते। कीन्ह निवास रमापति जब ते॥**
**फटिक सिला अति सुभ्र सुहाई। सुख आसीन तहाँ द्वौ भाई॥**

जेव्हापासून रमापती श्रीरामांनी तेथे निवास केला, तेव्हापासून वन मंगलमय झाले. सुंदर स्फटिकमण्यांची एक अत्यंत सुंदर शिळा होती. तिच्यावर दोघे बंधू सुखात विराजमान होते.॥ ३॥

**कहत अनुज सन कथा अनेका। भगति बिरति नृपनीति बिबेका॥**
**बरषा काल मेघ नभ छाए। गरजत लागत परम सुहाए॥**

श्रीराम हे लक्ष्मणाला भक्ती, वैराग्य, राजनीती आणि ज्ञानाच्या अनेक कथा सांगत. पावसाळा आला. आकाशात आलेले ढग गर्जना करताना फार सुंदर दिसत होते.॥ ४॥

दो०—**लछिमन देखु मोर गन नाचत बारिद पेखि।**
**गृही बिरति रत हरष जस बिष्नुभगत कहुँ देखि॥ १३॥**

श्रीराम म्हणू लागले, 'हे लक्ष्मणा, बघ. मोरांच्या झुंडी गर्जना करणाऱ्या मेघांना पाहून नाचत आहेत, ज्याप्रमाणे वैराग्यामध्ये डुंबलेले गृहस्थही एखाद्या विष्णुभक्ताला पाहून आनंदित होतात.'॥ १३॥

**घन घमंड नभ गरजत घोरा। प्रिया हीन डरपत मन मोरा॥**
**दामिनि दमक रह न घन माहीं। खल कै प्रीति जथा थिर नाहीं॥**

आकाशात मेघ इकडे तिकडे फिरत घोर गर्जना करीत आहेत. प्रिय सीतेविना माझे मन बावरले आहे. ज्याप्रमाणे दुष्टाचे प्रेम स्थिर राहात नाही, त्याप्रमाणे विजेची चमक मेघांमध्ये थांबत नाही. ॥ १ ॥

**बरषहिं जलद भूमि निअराएँ। जथा नवहिं बुध बिद्या पाएँ॥**
**बूँद अघात सहहिं गिरि कैसें। खल के बचन संत सह जैसें॥**

मेघ पृथ्वीजवळ येऊन वर्षत आहेत, ज्याप्रमाणे विद्या मिळाल्यावर विद्वान नम्र होतात. दुष्टांचे वचन संत सहन करतात, ज्याप्रमाणे थेंबांचे आघात पर्वत सहन करतात. ॥ २ ॥

**छुद्र नदीं भरि चलीं तोराई। जस थोरेहुँ धन खल इतराई॥**
**भूमि परत भा ढाबर पानी। जनु जीवहि माया लपटानी॥**

ज्याप्रमाणे थोड्याशा पैशामुळेही दुष्ट लोक घमेंडीने वागतात, त्याप्रमाणे लहान नद्या भरून किनाऱ्यांना तुडवीत चालल्या आहेत. ज्याप्रमाणे शुद्ध जीवाला माया लिप्त करते, त्याप्रमाणे पृथ्वीवर पाणी पडताच गढूळ होते. ॥ ३ ॥

**समिटि समिटि जल भरहिं तलावा। जिमि सदगुन सज्जन पहिं आवा॥**
**सरिता जल जलनिधि महुँ जाई। होइ अचल जिमि जिव हरि पाई॥**

ज्याप्रमाणे एक-एक सद्‌गुण सज्जनाजवळ येतात, त्याप्रमाणे पाणी एकत्र होत होत तलावांमध्ये भरत आहे. ज्याप्रमाणे जीव हा श्रीहरीला प्राप्त केल्यावर येरझारीतून मुक्त होतो, त्याप्रमाणे नदीचे पाणी समुद्रात जाऊन स्थिर होते. ॥ ४ ॥

दो०—**हरित भूमि तृन संकुल समुझि परहिं नहिं पंथ।**
**जिमि पाखंड बाद तें गुप्त होहिं सदग्रंथ॥ १४॥**

ज्याप्रमाणे पाखंडी मताच्या प्रचारामुळे सद्‌ग्रंथ लुप्त होतात, त्याप्रमाणे पृथ्वी गवताने भरून गेल्यावर वाटा दिसून येत नाहीत. ॥ १४ ॥

**दादुर धुनि चहु दिसा सुहाई। बेद पढ़हिं जनु बटु समुदाई॥**
**नव पल्लव भए बिटप अनेका। साधक मन जस मिलें बिबेका॥**

चारी दिशांना बेडकांचा स्वर असा गमतीचा वाटतो की, जणू विद्यार्थ्यांचे समुदाय वेद पठन करीत आहेत. अनेक वृक्षांना नवीन पाने आली आहेत. त्यामुळे ते असे हिरवेगार आणि शोभिवंत झाले आहेत की, साधकाचे मन विवेकज्ञान प्राप्त झाल्यावर जसे होते॥ १ ॥

**अर्क जवास पात बिनु भयऊ। जस सुराज खल उद्यम गयऊ॥**
**खोजत कतहुँ मिलइ नहिं धूरी। करइ क्रोध जिमि धरमहि दूरी॥**

रुईचे झाड व धमासा यांची पाने पावसामुळे झडून गेली, ज्याप्रमाणे उत्तम राज्यात दुष्टांचे

धंदे बंद होतात. कुठे शोधूनही धूळ सापडत नाही, ज्याप्रमाणे क्रोध आल्यावर धर्माचे ज्ञान उरत नाही. ॥ २ ॥

**ससि संपन्न सोह महि कैसी। उपकारी कै संपति जैसी॥**
**निसि तम घन खद्योत बिराजा। जनु दंभिन्ह कर मिला समाजा॥**

बहरलेल्या हिरव्यागार शेतीमुळे पृथ्वी अशी शोभून दिसत आहे की, जशी उपकारी पुरुषांची संपत्ती शोभते. रात्रीच्या दाट अंधारामध्ये काजवे असे दिसत आहेत की, जणू ढोंगी लोकांचा समाज जमलेला आहे. ॥ ३ ॥

**महाबृष्टि चलि फूटि किआरीं। जिमि सुतंत्र भएँ बिगरहिं नारीं॥**
**कृषी निरावहिं चतुर किसाना। जिमि बुध तजहिं मोह मद माना॥**

भरपूर पावसामुळे शेतातील बांध फुटून निघाले आहेत, ज्याप्रमाणे स्वातंत्र्यामुळे स्त्रिया बिघडतात. शहाणे शेतकरी भांगलून गवत टाकून देत आहेत, ज्याप्रमाणे विद्वान लोक मोह, मद आणि मान यांचा त्याग करतात. ॥ ४ ॥

**देखिअत चक्रबाक खग नाहीं। कलिहि पाइ जिमि धर्म पराहीं॥**
**ऊषर बरषइ तृन नहिं जामा। जिमि हरिजन हियँ उपज न कामा॥**

चक्रवाक पक्षी दिसत नाहीत, ज्याप्रमाणे कलियुग आल्यावर धर्म पलायन करतात. जसे पडीक जमिनीवर पाऊस पडतो, परंतु तेथे गवतसुद्धा उगवत नाही, ज्याप्रमाणे हरिभक्ताच्या हृदयात कामवासना उत्पन्न होत नाही. ॥ ५ ॥

**बिबिध जंतु संकुल महि भ्राजा। प्रजा बाढ़ जिमि पाइ सुराजा॥**
**जहँ तहँ रहे पथिक थकि नाना। जिमि इंद्रिय गन उपजें ग्याना॥**

ज्याप्रमाणे सुराज्य आल्यावर प्रजेची वृद्धी होते त्याप्रमाणे पृथ्वी अनेक तऱ्हेच्या जीवांनी शोभत आहे. ज्याप्रमाणे ज्ञान उत्पन्न झाल्यावर इंद्रिये शांत होऊन विषयांकडे वळत नाहीत, त्याप्रमाणे जिकडे-तिकडे अनेक वाटसरू प्रवास सोडून देऊन आपापल्या घरी राहिले आहेत. ॥ ६ ॥

दो०—**कबहुँ प्रबल बह मारुत जहँ तहँ मेघ बिलाहिं।**
**जिमि कपूत के उपजें कुल सद्धर्म नसाहिं॥ १५ (क)॥**

कधी कधी वारे जोराने वाहातात, त्यामुळे मेघ इकडे तिकडे नाहीसे होतात. ज्याप्रमाणे कुपुत्र उत्पन्न झाल्यावर उत्तम कुलाचार नष्ट होतात. ॥ १५ (क)॥

**कबहुँ दिवस महँ निबिड़ तम कबहुँक प्रगट पतंग।**
**बिनसइ उपजइ ग्यान जिमि पाइ कुसंग सुसंग॥ १५ (ख)॥**

कधी मेघांमुळे दिवसा अंधार दाटून येतो आणि कधी सूर्य प्रकट होतो. ज्याप्रमाणे कुसंगाने ज्ञान नष्ट होते आणि सत्संग मिळाल्यावर ते पुन्हा प्रकट होते. ॥ १५(ख) ॥

**बरषा बिगत सरद रितु आई। लछिमन देखहु परम सुहाई॥**
**फूलें कास सकल महि छाई। जनु बरषाँ कृत प्रगट बुढ़ाई॥**

हे लक्ष्मणा, बघ. वर्षाकाल संपला आणि परम सुंदर शरद्ऋतू आला. फुललेल्या कास गवतामुळे संपूर्ण पृथ्वी झाकली गेली आहे. जणू वर्षाऋतूने कासरूपी पांढऱ्या केसांच्या रूपाने आपले म्हातारपण प्रकट केले आहे. ॥ १ ॥

**उदित अगस्ति पंथ जल सोषा। जिमि लोभहि सोषइ संतोषा॥**
**सरिता सर निर्मल जल सोहा। संत हृदय जस गत मद मोहा॥**

ज्याप्रमाणे संतोष हा लोभाला शोषून घेतो, त्याप्रमाणे अगस्त्य ताऱ्याने उदित होऊन मार्गावरील पाणी शोषले आहे. ज्याप्रमाणे संतांचे हृदय मद-मोहरहित निर्मल असते, त्याप्रमाणे नद्या व तलाव यांचे निर्मळ जल शोभत आहे. ॥ २ ॥

**रस रस सूख सरित सर पानी। ममता त्याग करहिं जिमि ग्यानी॥**
**जानि सरद रितु खंजन आए। पाइ समय जिमि सुकृत सुहाए॥**

नद्या व तलाव यांचे पाणी हळू हळू घटत आहे, ज्याप्रमाणे ज्ञानी पुरुष ममतेचा त्याग करतात. शरदऋतूची चाहूल लागताच खंजन पक्षी आले आहेत, ज्याप्रमाणे वेळ येताच चांगले पुण्य प्रकट होते. ॥ ३ ॥

**पंक न रेनु सोह असि धरनी। नीति निपुन नृप कै जसि करनी॥**
**जल संकोच बिकल भइँ मीना। अबुध कुटुंबी जिमि धनहीना॥**

ज्याप्रमाणे नीतिनिपुण राजाचा कारभार स्वच्छ असतो, त्याप्रमाणे चिखल व धूळ नसल्याने धरणी निर्मल बनून शोभून दिसत आहे. पाणी कमी झाल्यामुळे मासे व्याकूळ झाले आहेत, ज्याप्रमाणे विवेकशून्य गृहस्थ धनाविना व्याकूळ होतो. ॥ ४ ॥

**बिनु घन निर्मल सोह अकासा। हरिजन इव परिहरि सब आसा॥**
**कहुँ कहुँ बृष्टि सारदी थोरी। कोउ एक पाव भगति जिमि मोरी॥**

मेघांविना निर्मळ आकाश असे शोभून दिसत आहे की, ज्याप्रमाणे भगवद्भक्त सर्व आशा सोडून निर्मळ होतात. कुठे कुठे शरदऋतूचा थोडा थोडा पाऊस पडत आहे, ज्याप्रमाणे कोणी विरळाच माझी भक्ती प्राप्त करतो. ॥ ५ ॥

दो०—**चले हरषि तजि नगर नृप तापस बनिक भिखारि।**
**जिमि हरिभगति पाइ श्रम तजहिं आश्रमी चारि॥ १६॥**

शरदऋतू आल्यामुळे राजा, तपस्वी, व्यापारी आणि भिक्षुक हे विजय, तप, व्यापार आणि भिक्षुकी मिळवण्यासाठी आनंदाने नगर सोडून निघतात, त्याप्रमाणे श्रीहरीची भक्ती मिळाल्यावर चारी आश्रमांतील लोक नाना प्रकारच्या साधनांचे श्रम सोडून देतात. ॥ १६ ॥

**सुखी मीन जे नीर अगाधा । जिमि हरि सरन न एकउ बाधा ॥**
**फूलें कमल सोह सर कैसा । निर्गुन ब्रह्म सगुन भएँ जैसा ॥**

जे मासे खोल पाण्यात आहेत, ते सुखी आहेत. ज्याप्रमाणे श्रीहरीला शरण गेल्यावर एकही संकट येत नाही. कमळांनी फुललेले तलाव असे शोभत आहेत की, जसे निर्गुण ब्रह्म सगुण झाल्यावर शोभून दिसते. ॥ १ ॥

**गुंजत मधुकर मुखर अनूपा । सुंदर खग रव नाना रूपा ॥**
**चक्रबाक मन दुख निसि पेखी । जिमि दुर्जन पर संपति देखी ॥**

भ्रमर अनुपम आवाज करीत गुंजन करीत आहेत आणि पक्षी नाना प्रकारचे सुंदर कूजन करीत आहेत. रात्र झाल्याचे पाहून चक्रवाक पक्ष्याच्या मनात तसेच दुःख होते, ज्याप्रमाणे दुसऱ्याची संपत्ती पाहून दुष्टाला दुःख वाटते. ॥ २ ॥

**चातक रटत तृषा अति ओही । जिमि सुख लहइ न संकरद्रोही ॥**
**सरदातप निसि ससि अपहरई । संत दरस जिमि पातक टरई ॥**

चातक ढगाला आळवत आहे, त्याला खूप तहान लागली आहे, ज्याप्रमाणे शंकरांचा द्वेष करणाऱ्या माणसाला सुख न मिळाल्यामुळे तो दुःखी होतो. शरदऋतूचा ताप रात्री चंद्र हरण करतो, ज्याप्रमाणे संतांच्या दर्शनाने पापे नाहीशी होतात. ॥ ३ ॥

**देखि इंदु चकोर समुदाई । चितवहिं जिमि हरिजन हरि पाई ॥**
**मसक दंस बीते हिम त्रासा । जिमि द्विज द्रोह किएँ कुल नासा ॥**

चकोर पक्ष्यांचे समुदाय चंद्राला अशा प्रकारे एकटक पाहू लागतात, ज्याप्रमाणे भगवद्भक्त भगवंत भेटल्यावर निर्निमेष नेत्रांनी त्यांचे दर्शन घेतात. मच्छर, डास हे थंडीच्या भीतीने अशा प्रकारे नाहीसे झाले आहेत की, ज्याप्रमाणे ब्राह्मणांशी वैर केल्याने कुळाचा नाश होतो. ॥ ४ ॥

दो०—**भूमि जीव संकुल रहे गए सरद रितु पाइ।**
**सदगुर मिलें जाहिं जिमि संसय भ्रम समुदाइ ॥ १७ ॥**

वर्षाऋतूमुळे पृथ्वीवर जे जीव भरले होते, ते जीव शरदऋतू आल्यावर नष्ट झाले, ज्याप्रमाणे सद्गुरू लाभल्यावर संशय आणि भ्रम यांचे समूह नष्ट होतात. ॥ १७ ॥

**बरषा गत निर्मल रितु आई । सुधि न तात सीता कै पाई ॥**
**एक बार कैसेहुँ सुधि जानौं । कालहु जीति निमिष महुँ आनौं ॥**

वर्षाकाल गेला, निर्मळ शरदऋतू आला. परंतु हे बंधो! सीतेची काही वार्ता कळली नाही. एकदा का पत्ता मिळाला, तर मी काळालाही जिंकून एका क्षणात जानकीला घेऊन येईन. ॥ १ ॥

**कतहुँ रहउ जौं जीवति होई। तात जतन करि आनउँ सोई॥**
**सुग्रीवहुँ सुधि मोरि बिसारी। पावा राज कोस पुर नारी॥**

हे बंधो! कुठेही ती असो. जिवंत असेल, तर मी प्रयत्न करून तिला नक्की आणीन. राज्य, खजिना, स्त्री व राजधानी मिळाल्यामुळे सुग्रीवही मला विसरला.॥ २॥

**जेहिं सायक मारा मैं बाली। तेहिं सर हतौं मूढ़ कहँ काली॥**
**जासु कृपाँ छूटहिं मद मोहा। ता कहुँ उमा कि सपनेहुँ कोहा॥**

ज्या बाणाने मी वालीला मारले, त्याच बाणाने मी त्या मूर्खाला मारीन.' शिव म्हणतात, 'हे उमे, ज्यांच्या कृपेमुळे मद व मोह सुटतात, त्यांना स्वप्नातही कधी क्रोध येईल काय? परंतु ही तर श्रीरामांची लीला आहे.॥ ३॥

**जानहिं यह चरित्र मुनि ग्यानी। जिन्ह रघुबीर चरन रति मानी॥**
**लछिमन क्रोधवंत प्रभु जाना। धनुष चढ़ाइ गहे कर बाना॥**

ज्या ज्ञानी मुनींना श्रीरघुनाथांच्या चरणी प्रेम आहे, तेच ही लीला जाणतात, लक्ष्मणाने जेव्हा प्रभू क्रुद्ध झालेले पाहिले, तेव्हा त्याने धनुष्य सज्ज करून बाण हाती घेतला.॥ ४॥

दो०—**तब अनुजहि समुझावा रघुपति करुना सींव।**
**भय देखाइ लै आवहु तात सखा सुग्रीव॥ १८॥**

तेव्हा दयेची परिसीमा असलेल्या श्रीरघुनाथांनी लक्ष्मणाला समजावले की, 'हे वत्सा, सुग्रीव आपला मित्र आहे. म्हणून त्याला केवळ भीती दाखवून घेऊन ये.'॥ १८॥

**इहाँ पवनसुत हृदयँ बिचारा। राम काजु सुग्रीवँ बिसारा॥**
**निकट जाइ चरनन्हि सिरु नावा। चारिहु बिधि तेहि कहि समुझावा॥**

इकडे किष्किंधानगरीमध्ये पवनकुमार हनुमानाने विचार केला की, सुग्रीव श्रीरामांचे कार्य विसरून गेला आहे. त्याने सुग्रीवापाशी जाऊन चरणांवर मस्तक नमविले आणि साम, दाम, भेद, दंड या चारी प्रकारच्या नीती सांगून त्याला समजाविले.॥ १॥

**सुनि सुग्रीवँ परम भय माना। बिषयँ मोर हरि लीन्हेउ ग्याना॥**
**अब मारुतसुत दूत समूहा। पठवहु जहँ तहँ बानर जूहा॥**

हनुमानाचे बोलणे ऐकून सुग्रीवाला फार भीती वाटली. तो म्हणाला, 'विषयांनी माझे ज्ञान हरण केले. आता हे पवनपुत्रा, जिथे जिथे वानरांचे कळप आहेत, तिथे तिथे दूतांना पाठव.॥ २॥

**कहहु पाख महुँ आव न जोई। मोरें कर ता कर बध होई॥**
**तब हनुमंत बोलाए दूता। सब कर करि सनमान बहूता॥**

आणि निरोप पाठव की, एका पंधरवड्यात जो येणार नाही, त्याचा माझ्या हातून वध होईल' हनुमानाने दूतांना बोलावले आणि सर्वांचा मान राखत, ॥ ३ ॥

**भय अरु प्रीति नीति देखराई । चले सकल चरनन्हि सिर नाई ॥**
**एहि अवसर लछिमन पुर आए । क्रोध देखि जहँ तहँ कपि धाए ॥**

सर्वांना भय, प्रेम आणि नीती दाखवून दिली. सर्व वानर नतमस्तक होऊन निघाले. त्याचवेळी लक्ष्मण नगरात पोहोचला. त्याचा राग पाहून वानर जिकडे तिकडे पळाले. ॥ ४ ॥

**दो०—धनुष चढ़ाइ कहा तब जारि करउँ पुर छार।**
**ब्याकुल नगर देखि तब आयउ बालिकुमार॥ १९ ॥**

नंतर लक्ष्मणाने धनुष्य सज्ज करून म्हटले की, 'मी आताच नगराची राखरांगोळी करून टाकतो.' तेव्हा संपूर्ण नगर व्याकूळ झाल्याचे पाहून वालीपुत्र अंगद त्याच्याजवळ आला. ॥ १९ ॥

**चरन नाइ सिरु बिनती कीन्ही । लछिमन अभय बाँह तेहि दीन्ही ॥**
**क्रोधवंत लछिमन सुनि काना । कह कपीस अति भयँ अकुलाना ॥**

अंगदाने त्याच्यासमोर नतमस्तक होऊन क्षमायाचना केली. तेव्हा लक्ष्मणाने त्याला भिऊ नकोस असे म्हणून अभय दिले. सुग्रीवाने स्वतःच्या कानांनी लक्ष्मणाचे रागाचे बोलणे ऐकून भयाने खूप व्याकूळ होऊन म्हटले, ॥ १ ॥

**सुनु हनुमंत संग लै तारा । करि बिनती समुझाउ कुमारा ॥**
**तारा सहित जाइ हनुमाना । चरन बंदि प्रभु सुजस बखाना ॥**

'हे हनुमाना! ऐकून घे. तू तारेला सोबत घेऊन जा व राजकुमाराला समजावून शांत कर.' हनुमानाने तारेसह जाऊन लक्ष्मणाच्या चरणी वंदन केले व प्रभूंच्या सुंदर कीर्तीची वाखाणणी केली. ॥ २ ॥

**करि बिनती मंदिर लै आए । चरन पखारि पलँग बैठाए ॥**
**तब कपीस चरनन्हि सिरु नावा । गहि भुज लछिमन कंठ लगावा ॥**

विनंती करून ते लक्ष्मणाला महालात घेऊन आले आणि त्याचे चरण धुऊन त्याला पलंगावर बसविले. मग वानरराज सुग्रीव त्याच्या पाया पडू लागला, तेव्हा लक्ष्मणाने त्याचा हात धरून त्याला मिठी मारली. ॥ ३ ॥

**नाथ बिषय सम मद कछु नाहीं । मुनि मन मोह करइ छन माहीं ॥**
**सुनत बिनीत बचन सुख पावा । लछिमन तेहि बहु बिधि समुझावा ॥**

सुग्रीव म्हणाला, 'हे नाथ, विषयासारखा इतर कोणताही मद नाही. तो मुनींच्या मनातही एका क्षणात मोह उत्पन्न करतो. मग मी तर विषयी जीव.' सुग्रीवाचे नम्र बोलणे ऐकून लक्ष्मणाला आनंद झाला आणि त्याने सुग्रीवाला खूप समजावून धीर दिला. ॥ ४ ॥

**पवन तनय सब कथा सुनाई। जेहि बिधि गए दूत समुदाई॥**

तेवढ्यात पवनसुत हनुमानाने कशाप्रकारे सर्व दिशांना दूतांचे समूह गेले आहेत, ते सर्व सांगितले.॥ ५॥

दो०—**हरषि चले सुग्रीव तब अंगदादि कपि साथ।**
**रामानुज आगें करि आए जहँ रघुनाथ॥ २०॥**

मग अंगद इत्यादी वानरांना सोबत घेऊन आणि लक्ष्मणाला पुढे घालून सुग्रीव आनंदाने श्रीरामांच्याकडे आला.॥ २०॥

**नाइ चरन सिरु कह कर जोरी। नाथ मोहि कछु नाहिन खोरी॥**
**अतिसय प्रबल देव तव माया। छूटइ राम करहु जौं दाया॥**

श्रीरघुनाथांच्या चरणी नतमस्तक होऊन व हात जोडून सुग्रीव म्हणाला, 'हे नाथ, यात माझा काही दोष नाही. हे देव, तुमची माया ही अत्यंत प्रबळ आहे. हे राम, तुम्ही जेव्हा दया करता, तेव्हाच ती सुटते.॥ १॥

**बिषय बस्य सुर नर मुनि स्वामी। मैं पावँर पसु कपि अति कामी॥**
**नारि नयन सर जाहि न लागा। घोर क्रोध तम निसि जो जागा॥**

हे स्वामी, देव, मनुष्य आणि मुनी हे सर्व विषयांना वश असतात. मग मी तर पामर पशू आणि पशूंच्यामध्ये अत्यंत कामी वानर आहे. स्त्रीचा नयन-बाण ज्याला लागला नाही, जो भयंकर क्रोधरूपी अंधाऱ्या रात्रीही जागत असतो, जो क्रोधाने आंधळा होत नाही,॥ २॥

**लोभ पाँस जेहिं गर न बँधाया। सो नर तुम्ह समान रघुराया॥**
**यह गुन साधन तें नहिं होई। तुम्हरी कृपाँ पाव कोइ कोई॥**

आणि लोभाच्या दोरीमध्ये ज्याने आपला गळा अडकविला नाही, हे रघुनाथा, तो मनुष्य तुमच्यासमान होय, हे गुण साधनाने प्राप्त होत नाहीत. तुमच्या कृपेमुळेच एखाद्यालाच हे प्राप्त होतात.'॥ ३॥

**तब रघुपति बोले मुसुकाई। तुम्ह प्रिय मोहि भरत जिमि भाई॥**
**अब सोइ जतनु करहु मन लाई। जेहि बिधि सीता कै सुधि पाई॥**

तेव्हा रघुनाथ हसत म्हणाले, 'हे बंधू, तू मला भरतासारखा प्रिय आहेस. आता मन लावून सीतेची वार्ता काढण्याचाच उपाय कर.'॥ ४॥

दो०—**एहि बिधि होत बतकही आए बानर जूथ।**
**नाना बरन सकल दिसि देखिअ कीस बरूथ॥ २१॥**

अशाप्रकारे बोलणे चालले होते, एवढ्यात वानरांच्या झुंडी आल्या. अनेक रंगांचे वानरांचे समूह सर्व दिशांना दिसू लागले.॥ २१॥

**बानर कटक उमा मैं देखा। सो मूरुख जो करन चह लेखा॥**
**आइ राम पद नावहिं माथा। निरखि बदनु सब होहिं सनाथा॥**

शिव म्हणतात, ‘हे उमे, वानरांची ती सेना मी पाहिली होती. तिची गणती करणारा महामूर्ख होय. सर्व वानर येऊन श्रीरामांच्या चरणी मस्तक ठेवत होते, आणि त्यांच्या सौंदर्य-माधुर्य-निधी असलेल्या श्रीमुखाचे दर्शन घेऊन कृतार्थ होत होते.॥ १॥

**अस कपि एक न सेना माहीं। राम कुसल जेहि पूछी नाहीं॥**
**यह कछु नहिं प्रभु कइ अधिकाई। बिस्वरूप ब्यापक रघुराई॥**

श्रीरामांनी ज्याची खुशाली विचारली नाही, असा सेनेमध्ये एकही वानर नव्हता. त्यांच्या दृष्टीने ही काही विशेष गोष्ट नव्हती.’ कारण श्रीरघुनाथ हे विश्वरूप आणि सर्वव्यापक आहेत.॥ २॥

**ठाढ़े जहँ तहँ आयसु पाई। कह सुग्रीव सबहि समुझाई॥**
**राम काजु अरु मोर निहोरा। बानर जूथ जाहु चहुँ ओरा॥**

आज्ञा घेऊन सर्वजण जिकडे तिकडे उभे राहिले. तेव्हा सुग्रीवाने सर्वांना समजावून सांगितले की, ‘हे वानर-समूहांनो, हे श्रीरघुनाथांचे काम आहे आणि माझी तुम्हांला विनंती आहे. तुम्ही चोहीकडे जा,॥ ३॥

**जनकसुता कहुँ खोजहु जाई। मास दिवस महँ आएहु भाई॥**
**अवधि मेटि जो बिनु सुधि पाएँ। आवइ बनिहि सो मोहि मराएँ॥**

आणि जाऊन जानकीचा शोध घ्या. हे बंधूंनो, महिन्याभरात परत या. जो महिन्याभराचा काळ घालवून शोध न घेता परत येईल, त्याचा मी वध करीन.’॥ ४॥

दो०—**बचन सुनत सब बानर जहँ तहँ चले तुरंत।**
**तब सुग्रीवँ बोलाए अंगद नल हनुमंत॥ २२॥**

सुग्रीवाचे बोलणे ऐकून सर्व वानर निरनिराळ्या दिशांना गेले. तेव्हा सुग्रीवाने अंगद, नल, हनुमान इत्यादी मुख्य-मुख्य योद्‌ध्यांना बोलावून सांगितले,॥ २२॥

**सुनहु नील अंगद हनुमाना। जामवंत मतिधीर सुजाना॥**
**सकल सुभट मिलि दच्छिन जाहू। सीता सुधि पूँछेहु सब काहू॥**

‘हे स्थिर बुद्धी असणाऱ्या चतुर नीला, अंगदा, जांबुवंता आणि हनुमाना! तुम्ही सारे श्रेष्ठ योद्धे मिळून दक्षिणेकडे जा आणि भेटेल त्याला सीतेचा पत्ता विचारा.॥ १॥

**मन क्रम बचन सो जतन बिचारेहु। रामचंद्र कर काजु सँवारेहु॥**
**भानु पीठि सेइअ उर आगी। स्वामिहि सर्ब भाव छल त्यागी॥**

मन, वचन व कर्माने सीतेचा शोध घेण्याचाच उपाय करा. श्रीरामचंद्रांचे काम पुरे करा. सूर्याचे पाठीमागून व अग्नीचे समोरून सेवन करावे, परंतु स्वामींची सेवा फसवणूक न करता सर्वभावाने केली पाहिजे. ॥ २ ॥

**तजि माया सेइअ परलोका । मिटहिं सकल भवसंभव सोका ॥**
**देह धरे कर यह फलु भाई । भजिअ राम सब काम बिहाई ॥**

विषयांची ममता व आसक्ती सोडून परलोकीचे दिव्यधाम प्राप्त करण्यासाठी भगवत्सेवारूप असलेले साधन केले पाहिजे, त्यामुळे जन्म-मरणरूप भयामुळे उत्पन्न होणारे सर्व दुःख नाहीसे होईल. हे बंधूंनो, सर्व कामना सोडून श्रीरामांचे भजनच केले पाहिजे, हेच देह धारण करण्याचे फल आहे. ॥ ३ ॥

**सोइ गुनग्य सोई बड़भागी । जो रघुबीर चरन अनुरागी ॥**
**आयसु मागि चरन सिरु नाई । चले हरषि सुमिरत रघुराई ॥**

जो श्रीरघुनाथांच्या चरणांचा भक्त असतो, तो सद्‌गुण जाणणारा आणि मोठ्या भाग्याचा असतो.' मग सर्वजण आज्ञा घेऊन व चरणी मस्तक नमवून श्रीरामचंद्रांचे स्मरण करीत आनंदाने निघाले. ॥ ४ ॥

**पाछें पवन तनय सिरु नावा । जानि काज प्रभु निकट बोलावा ॥**
**परसा सीस सरोरुह पानी । करमुद्रिका दीन्हि जन जानी ॥**

सर्वांच्या शेवटी पवनसुत हनुमानाने मस्तक नमविले. कार्याचे महत्त्व लक्षात आणून प्रभूंनी त्याला जवळ बोलाविले. त्यांनी आपल्या कर-कमलांनी त्याच्या मस्तकाला स्पर्श केला आणि आपला खास सेवक समजून आपल्या हातातील अंगठी काढून त्याला दिली. ॥ ५ ॥

**बहु प्रकार सीतहि समुझाएहु । कहि बल बिरह बेगि तुम्ह आएहु ॥**
**हनुमत जन्म सुफल करि माना । चलेउ हृदयँ धरि कृपानिधाना ॥**

आणि म्हटले, 'अनेक प्रकारे सीतेला समजावून सांग आणि माझे सामर्थ्य व विरह हे तिला सांगून तू लवकर परत ये.' यामुळे हनुमानाला आपला जन्म सार्थक झाल्याचे वाटले आणि प्रभूंना हृदयामध्ये धारण करून तो निघाला. ॥ ६ ॥

**जद्यपि प्रभु जानत सब बाता । राजनीति राखत सुरत्राता ॥**

देवांचे रक्षण करणारे प्रभू सर्व गोष्टी जाणतात. परंतु ते राजनीती पाळण्यासाठी व नीतीची मर्यादा राखण्यासाठी सीतेचा शोध घेण्याकरिता वानरांना सर्वत्र पाठवीत आहेत. ॥ ७ ॥

दो०—**चले सकल बन खोजत सरिता सर गिरि खोह ।**
**राम काज लयलीन मन बिसरा तन कर छोह ॥ २३ ॥**

सर्व वानर वन, नदी, तलाव, पर्वतांवरील गुहा यांमध्ये शोधत निघाले. मन श्रीरामांच्या कार्यामध्ये मग्न होते. ते शरीराचे ममत्वही विसरले होते.॥ २३॥

**कतहुँ होइ निसिचर सैं भेंटा। प्रान लेहिं एक एक चपेटा॥**
**बहु प्रकार गिरि कानन हेरहिं। कोउ मुनि मिलइ ताहि सब घेरहिं॥**

कुठे राक्षस भेटला, तर ते एकेका थपडीने त्यांचे प्राण घेत होते. ते पर्वत व वने याठिकाणी तऱ्हेतऱ्हेने शोधत होते. कुणी मुनी भेटला, तर सीतेचा पत्ता विचारण्यासाठी त्याच्याजवळ कोंडाळे करीत होते.॥ १॥

**लागि तृषा अतिसय अकुलाने। मिलइ न जल घन गहन भुलाने॥**
**मन हनुमान कीन्ह अनुमाना। मरन चहत सब बिनु जल पाना॥**

इतक्यात तहान लागल्यामुळे सर्व व्याकूळ झाले, परंतु कुठेही पाणी मिळेना. दाट जंगलात सर्वजण भरकटले. हनुमानाला अंदाज आला की, पाणी मिळाले नाही तर सर्व मरतील.॥ २॥

**चढ़ि गिरि सिखर चहूँ दिसि देखा। भूमि बिबर एक कौतुक पेखा॥**
**चक्रबाक बक हंस उड़ाहीं। बहुतक खग प्रबिसहिं तेहि माहीं॥**

त्याने डोंगराच्या शिखरावर जाऊन चोहीकडे पाहिले, तेव्हा त्याला पृथ्वीवर एका गुहेमध्ये एक आश्चर्यजनक गोष्ट दिसली. तिच्यावर पुष्कळ चक्रवाक, बगळे आणि हंस उडत होते आणि पुष्कळ पक्षी त्या गुहेत जात होते.॥ ३॥

**गिरि ते उतरि पवनसुत आवा। सब कहुँ लै सोइ बिबर देखावा॥**
**आगें कै हनुमंतहि लीन्हा। पैठे बिबर बिलंबु न कीन्हा॥**

पवनकुमार हनुमानाने पर्वतावरून खाली उतरून सर्वांना ती गुहा दाखविली. सर्वजण हनुमानाला पुढे करून वेळ न घालविता गुहेत घुसले.॥ ४॥

दो०—**दीख जाइ उपबन बर सर बिगसित बहु कंज।**
**मंदिर एक रुचिर तहँ बैठि नारि तप पुंज॥ २४॥**

आत गेल्यावर तेथे एक उत्तम उपवन व तलाव दिसला. त्यात पुष्कळ कमळे उमललेली होती. तेथे एक सुंदर मंदिर होते व त्यात एक तपस्विनी बसली होती.॥ २४॥

**दूरि ते ताहि सबन्हि सिरु नावा। पूछें निज बृत्तांत सुनावा॥**
**तेहिं तब कहा करहु जल पाना। खाहु सुरस सुंदर फल नाना॥**

सर्वांनी दुरूनच तिला मस्तक नम्र करून नमस्कार केला. विचारल्यावर त्यांनी आपली हकिगत सांगितली. तेव्हा ती म्हणाली, 'पाणी प्या आणि तऱ्हेतऱ्हेची रसाळ फळे खा.'॥ १॥

**मज्जनु कीन्ह मधुर फल खाए। तासु निकट पुनि सब चलि आए॥**
**तेहिं सब आपनि कथा सुनाई। मैं अब जाब जहाँ रघुराई॥**

आज्ञा मिळताच सर्वांनी स्नान केले, गोड फळे खाल्ली आणि ते तिच्याकडे गेले. तेव्हा तिने आपली सर्व कथा सांगितली आणि म्हटले, 'आता मी रघुनाथांच्याकडे जाते.॥ २॥

**मूदहु नयन बिबर तजि जाहू। पैहहु सीतहि जनि पछिताहू॥**
**नयन मूदि पुनि देखहिं बीरा। ठाढ़े सकल सिंधु कें तीरा॥**

तुम्ही सर्वजण डोळे मिटा आणि गुहा सोडून बाहेर जा. तुम्हांला सीता भेटेल. निराश होऊ नका.' डोळे मिटून त्यांनी जेव्हा डोळे उघडले, तेव्हा त्या सर्व वीरांना आपण समुद्राकाठी उभे आहोत, असे दिसले.॥ ३॥

**सो पुनि गई जहाँ रघुनाथा। जाइ कमल पद नाएसि माथा॥**
**नाना भाँति बिनय तेहिं कीन्ही। अनपायनी भगति प्रभु दीन्ही॥**

ती तपस्विनी स्वत: श्रीरघुनाथांच्याकडे गेली. तिने जाऊन प्रभूंचे चरण धुतले. नतमस्तक होऊन त्यांना विनवणी केली. तेव्हा प्रभूंनी तिला आपली अढळ भक्ती दिली.॥ ४॥

दो०—**बदरीबन कहुँ सो गई प्रभु अग्या धरि सीस।**
**उर धरि राम चरन जुग जे बंदत अज ईस॥ २५॥**

तिने प्रभूंची आज्ञा शिरोधार्य मानली आणि ब्रह्मदेव व महादेव श्रीरामांच्या ज्या चरणांना वंदन करतात, ते चरण हृदयी धरून ती तपस्विनी स्वयंप्रभा बदरिकाश्रमाला गेली.॥ २५॥

**इहाँ बिचारहिं कपि मन माहीं। बीती अवधि काज कछु नाहीं॥**
**सब मिलि कहहिं परस्पर बाता। बिनु सुधि लएँ करब का भ्राता॥**

इकडे वानरगणांच्या मनात काळजी वाटत होती की, एक महिन्याचा काळ लोटला, परंतु अद्याप काम झाले नाही. ते एकमेकांशी बोलू लागले की, 'हे बंधू, आता सीतेची वार्ता कळल्याविना परत जाऊन तरी काय करणार?'॥ १॥

**कह अंगद लोचन भरि बारी। दुहुँ प्रकार भइ मृत्यु हमारी॥**
**इहाँ न सुधि सीता कै पाई। उहाँ गएँ मारिहि कपिराई॥**

अंगद डोळ्यांत पाणी आणून म्हणाला की, 'दोन्हीकडून आमचे मरण ओढवले आहे. इथे तर सीतेची गंधवार्ता नाही आणि तिथे गेल्यावर वानरराज सुग्रीव ठार करील.॥ २॥

**पिता बधे पर मारत मोही। राखा राम निहोर न ओही॥**
**पुनि पुनि अंगद कह सब पाहीं। मरन भयउ कछु संसय नाहीं॥**

त्याने माझ्या पित्याचा वध झाल्यावरच मला मारले असते. श्रीरामांनी माझे रक्षण केले, त्यात सुग्रीवाने काही उपकार केलेले नाहीत.' अंगद सर्वांना सांगत होता की, आता मरण ओढवले आहे; यात काही शंका नाही. ॥ ३ ॥

**अंगद बचन सुनत कपि बीरा। बोलि न सकहिं नयन बह नीरा॥**
**छन एक सोच मगन होइ रहे। पुनि अस बचन कहत सब भए॥**

वानरवीर अंगदाचे बोलणे ऐकून घेत होते, पण बोलत नव्हते. त्यांच्या डोळ्यांतून पाणी वाहू लागले. एका क्षणात सर्वजण काळजीत पडले. मग सर्वजण म्हणू लागले, ॥ ४ ॥

**हम सीता कै सुधि लीन्हें बिना। नहिं जैहैं जुबराज प्रबीना॥**
**अस कहि लवन सिंधु तट जाई। बैठे कपि सब दर्भ डसाई॥**

'हे सुज्ञ युवराज! आम्ही सीतेचा शोध घेतल्याशिवाय परतणार नाही.' असे म्हणून ते लवणसागराच्या तटावर प्रायोपवेशनासाठी कुश अंथरून बसले. ॥ ५ ॥

**जामवंत अंगद दुख देखी। कहीं कथा उपदेस बिसेषी॥**
**तात राम कहुँ नर जनि मानहु। निर्गुन ब्रह्म अजित अज जानहु॥**

जांबवानाने अंगदाचे दुःख पाहून खास उपदेशाच्या गोष्टी सांगितल्या. तो म्हणाला, 'बाळा! श्रीरामांना मनुष्य मानू नकोस. ते निर्गुण ब्रह्म, अजेय आणि अजन्मा आहेत, असे समज. ॥ ६ ॥

**हम सब सेवक अति बड़भागी। संतत सगुन ब्रह्म अनुरागी॥**

आपण निरंतर सगुण ब्रह्म असलेल्या श्रीरामांवर प्रेम करतो. आपण सर्व सेवक मोठे भाग्यवान आहोत. ॥ ७ ॥

दो०—**निज इच्छाँ प्रभु अवतरइ सुर महि गो द्विज लागि।**
**सगुन उपासक संग तहँ रहहिं मोच्छ सब त्यागि॥ २६॥**

देव, पृथ्वी, गाई व ब्राह्मण यांच्या हितासाठी प्रभू आपल्या इच्छेने जेथे अवतार घेतात, तेथे सगुणोपासक सर्व प्रकारचे मोक्ष सोडून त्यांच्या सेवेसाठी सोबत असतात.'॥ २६ ॥

**एहि बिधि कथा कहहिं बहुभाँती। गिरि कंदराँ सुनी संपाती॥**
**बाहेर होइ देखि बहु कीसा। मोहि अहार दीन्ह जगदीसा॥**

अशाप्रकारे जांबवान बऱ्याच गोष्टी सांगत होता. त्याचे हे बोलणे पर्वताच्या गुहेत बसलेल्या संपातीने ऐकले. बाहेर आल्यावर त्याला पुष्कळ वानर दिसले. तेव्हा तो म्हणाला, 'जगदीश्वराने घरात बसल्या बसल्या पुष्कळसा आहार माझ्यासाठी पाठवून दिला आहे. ॥ १ ॥

**आजु सबहि कहँ भच्छन करऊँ। दिन बहु चले अहार बिनु मरऊँ॥**
**कबहुँ न मिल भरि उदर अहारा। आजु दीन्हि बिधि एकहिं बारा॥**

आज मी या सर्वांना खाऊन टाकतो. बरेच दिवस मी अन्नाविना मरत होतो. पोटभर भोजन कधी मिळाले नाही. आज विधात्याने एकाच वेळी पुष्कळ भोजन दिले.'॥ २॥

**डरपे गीध बचन सुनि काना। अब भा मरन सत्य हम जाना॥**
**कपि सब उठे गीध कहँ देखी। जामवंत मन सोच बिसेषी॥**

गिधाडाचे बोलणे ऐकून सर्वजण घाबरले की, आता खरोखरच मरण आले आहे, हे आम्हांला कळले. नंतर त्या गिधाड संपातीला पाहण्यासाठी सर्व वानर थोडे उठून उभे राहिले. जांबवानाला जास्त काळजी वाटू लागली.॥ ३॥

**कह अंगद बिचारि मन माहीं। धन्य जटायू सम कोउ नाहीं॥**
**राम काज कारन तनु त्यागी। हरि पुर गयउ परम बड़भागी॥**

अंगद मनात विचार करून म्हणाला, 'अहाहा! जटायूसारखा धन्य कोणी नाही. श्रीरामांच्या कार्यासाठी त्याने देहत्याग केला. तो परम भाग्यवान भगवंतांच्या परमधामी गेला.'॥ ४॥

**सुनि खग हरष सोक जुत बानी। आवा निकट कपिन्ह भय मानी॥**
**तिन्हहि अभय करि पूछेसि जाई। कथा सकल तिन्ह ताहि सुनाई॥**

हे हर्ष व शोकयुक्त बोलणे ऐकून संपाती वानरांच्या जवळ आला. वानर घाबरून गेले. त्यांना अभय देऊन जवळ येऊन त्याने जटायूचा वृत्तांत विचारला. तेव्हा वानरांनी सर्व हकिगत त्याला सांगितली.॥ ५॥

**सुनि संपाति बंधु कै करनी। रघुपति महिमा बहुबिधि बरनी॥**

बंधू जटायूची अद्‌भुत कामगिरी ऐकून संपातीने अनेक प्रकारे श्रीरघुनाथांचा महिमा वर्णन केला.॥ ६॥

दो०—**मोहि लै जाहु सिंधुतट देउँ तिलांजलि ताहि।**
**बचन सहाइ करबि मैं पैहहु खोजहु जाहि॥ २७॥**

तो म्हणाला, 'मला समुद्रकिनारी घेऊन चला. मी जटायूला तिलांजली देतो. या सेवेबद्दल मी तुम्हांला सीतेचा ठावठिकाणा सांगून मदत करीन. जिला तुम्ही शोधत आहात, ती तुम्हांला भेटेल.'॥ २७॥

**अनुज क्रिया करि सागर तीरा। कहि निज कथा सुनहु कपि बीरा॥**
**हम द्वौ बंधु प्रथम तरुनाई। गगन गए रबि निकट उड़ाई॥**

समुद्रकिनाऱ्यावर संपातीने आपला भाऊ जटायू याचे श्राद्धादी कर्म केले आणि तो स्वत:ची हकिगत सांगू लागला, 'हे वीर वानरांनो, आम्ही दोघे भाऊ नवतारुण्यात एकदा आकाशात उडून सूर्याजवळ पोहोचलो.॥ १॥

**तेज न सहि सक सो फिरि आवा । मैं अभिमानी रबि निअरावा ॥**
**जरे पंख अति तेज अपारा । परेउँ भूमि करि घोर चिकारा ॥**

जटायू ते तेज सहन करू शकला नाही, म्हणून तो परत आला. परंतु मी गर्विष्ठ होतो, म्हणून सूर्याजवळ गेलो. सूर्याच्या अत्यंत अपार तेजामुळे माझे पंख जळून गेले. मी जोराने किंचाळून जमिनीवर पडलो. ॥ २ ॥

**मुनि एक नाम चंद्रमा ओही । लागी दया देखि करि मोही ॥**
**बहु प्रकार तेहिं ग्यान सुनावा । देहजनित अभिमान छड़ावा ॥**

तेथे चंद्रमा नावाचे एक मुनी होते. मला पाहून त्यांना दया आली. त्यांनी मला पुष्कळ ज्ञानोपदेश दिला आणि माझा देहजनित अभिमान दूर केला. ॥ ३ ॥

**त्रेताँ ब्रह्म मनुज तनु धरिही । तासु नारि निसिचर पति हरिही ॥**
**तासु खोज पठइहि प्रभु दूता । तिन्हहि मिलें तैं होब पुनीता ॥**

ते म्हणाले, 'त्रेतायुगात प्रत्यक्ष परब्रह्म मनुष्यशरीर धारण करणार आहे. त्यांच्या स्त्रीला राक्षसांचा राजा हरण करून नेईल. तिच्या शोधासाठी प्रभू दूत पाठवतील. ते दूत भेटल्यावर तू पवित्र होशील, ॥ ४ ॥

**जमिहहिं पंख करसि जनि चिंता । तिन्हहि देखाइ देहेसु तैं सीता ॥**
**मुनि कइ गिरा सत्य भइ आजू । सुनि मम बचन करहु प्रभु काजू ॥**

आणि तुला पंख फुटतील, चिंता करू नकोस. तू त्यांना सीतेचा पत्ता दे.' मुनींची वाणी आज खरी ठरली. आता माझे बोलणे ऐकून तुम्ही प्रभूंचे काम करा. ॥ ५ ॥

**गिरि त्रिकूट ऊपर बस लंका । तहँ रह रावन सहज असंका ॥**
**तहँ असोक उपबन जहँ रहई । सीता बैठि सोच रत अहई ॥**

त्रिकूट पर्वतावर लंका वसलेली आहे. तेथे स्वभावत:च निर्भय असलेला रावण राहातो. तेथे अशोक नावाचे उपवन आहे. तेथे सीता राहाते. ती यावेळी मोठ्या काळजीत बसली आहे. ॥ ६ ॥

दो०—**मैं देखउँ तुम्ह नाहीं गीधहि दृष्टि अपार ।**
**बूढ़ भयउँ न त करतेउँ कछुक सहाय तुम्हार ॥ २८ ॥**

मी तिला पाहू शकतो, तुम्ही पाहू शकणार नाही, कारण गिधाडाची नजर फार लांब जाते. काय करू? मी म्हातारा झालो आहे, नाही तर तुम्हांला थोडीशी तरी मदत नक्की केली असती. ॥ २८ ॥

**जो नाघइ सत जोजन सागर । करइ सो राम काज मति आगर ॥**
**मोहि बिलोकि धरहु मन धीरा । राम कृपाँ कस भयउ सरीरा ॥**

जो शंभर योजने- (चारशे कोस) विस्तार असलेला समुद्र उल्लंघन करू शकेल आणि बुद्धिमान असेल, तोच श्रीरामांचे कार्य पार पाडू शकेल. निराश न होता माझ्याकडे पाहून धीर धरा. बघा, श्रीरामांच्या कृपेमुळे पाहाता पाहाता माझे शरीर कसे झाले.'॥ १॥

**पापिउ जा कर नाम सुमिरहीं। अति अपार भवसागर तरहीं॥**
**तासु दूत तुम्ह तजि कदराई। राम हृदयँ धरि करहु उपाई॥**

पापीसुद्धा ज्यांचे नामस्मरण करताच अत्यंत अपार भवसागर तरून जातात, त्यांचे तुम्ही दूत आहात. म्हणून भय सोडून श्रीरामांना हृदयात ठेवून काम करा.॥ २॥

**अस कहि गरुड़ गीध जब गयऊ। तिन्ह कें मन अति बिसमय भयऊ॥**
**निज निज बल सब काहूँ भाषा। पार जाइ कर संसय राखा॥**

काकभुशुंडी म्हणतात, 'हे गरुडा, असे सांगून जेव्हा संपाती निघून गेला, तेव्हा वानरांना फार आश्चर्य वाटले. सर्वजणांनी आपापले सामर्थ्य सांगितले, परंतु सर्वांनी समुद्र उल्लंघून जाण्याविषयी संशय प्रकट केला.'॥ ३॥

**जरठ भयउँ अब कहइ रिछेसा। नहिं तन रहा प्रथम बल लेसा॥**
**जबहिं त्रिबिक्रम भए खरारी। तब मैं तरुन रहेउँ बल भारी॥**

ऋक्षराज जांबवान म्हणू लागला, 'मी आता म्हातारा झालो आहे. शरीरामध्ये पूर्वीचे बळ थोडेसुद्धा राहिले नाही. जेव्हा श्रीराम यांनी वामनावतार घेतला होता, तेव्हा मी तरुण होतो व माझ्यामध्ये पुष्कळ बळ होते.॥ ४॥

दो०—**बलि बाँधत प्रभु बाढ़ेउ सो तनु बरनि न जाइ।**
**उभय घरी महँ दीन्हीं सात प्रदच्छिन धाइ॥ २९॥**

बळीला बांधून घालताना प्रभू एवढे वाढले की, त्या शरीराचे वर्णन करता येत नाही. परंतु मी दोन घटकातच धावत धावत त्यांच्या देहाला सात प्रदक्षिणा घातल्या.'॥ २९॥

**अंगद कहइ जाउँ मैं पारा। जियँ संसय कछु फिरती बारा॥**
**जामवंत कह तुम्ह सब लायक। पठइअ किमि सबही कर नायक॥**

अंगद म्हणाला, 'मी पलीकडे जाईन, परंतु परत येता येईल की नाही, अशी मनात शंका आहे.' जांबवान म्हणाला, 'तू सर्व प्रकारे योग्य आहेस, परंतु तू सर्वांचा नेता आहेस. तुला कसे पाठविता येईल?'॥ १॥

**कहइ रीछपति सुनु हनुमाना। का चुप साधि रहेहु बलवाना॥**
**पवन तनय बल पवन समाना। बुधि बिबेक बिग्यान निधाना॥**

ऋक्षराज जांबवानाने हनुमानाला म्हटले, 'हे हनुमाना, हे बलवाना, तू का गप्प आहेस? तू पवनाचा पुत्र आहेस आणि बळामध्ये पवनासमानच आहेस. तू बुद्धी, विवेक व विज्ञानाची खाण आहेस. ॥ २ ॥

**कवन सो काज कठिन जग माहीं। जो नहिं होइ तात तुम्ह पाहीं॥**
**राम काज लगि तव अवतारा। सुनतहिं भयउ पर्बताकारा॥**

जगात असे कोणते कठीण काम आहे की, बाबा रे, जे तुझ्याकडून होऊ शकणार नाही? श्रीरामांच्या कार्यासाठीच तुझा अवतार झाला आहे.' हे ऐकताच हनुमान पर्वताच्या आकारासारखा विशाल झाला. ॥ ३ ॥

**कनक बरन तन तेज बिराजा। मानहुँ अपर गिरिन्ह कर राजा॥**
**सिंहनाद करि बारहिं बारा। लीलहिं नाघउँ जलनिधि खारा॥**

त्याचा सोन्यासारखा रंग होता. शरीरावर तेज शोभत होते, जणू दुसरा पर्वतांचा राजा सुमेरू होता. हनुमानाने वारंवार सिंहनाद करून म्हटले, 'मी या खाऱ्या समुद्राला लीलया उल्लंघून जाईन. ॥ ४ ॥

**सहित सहाय रावनहि मारी। आनउँ इहाँ त्रिकूट उपारी॥**
**जामवंत मैं पूँछउँ तोही। उचित सिखावनु दीजहु मोही॥**

मी रावणाला त्याच्या सहाय्यकांसह ठार मारून त्रिकूट पर्वत उपटून येथे घेऊन येऊ शकतो. हे जांबवाना, मी तुला विचारतो की, मला काय करायचे आहे, ते सांग.' ॥ ५ ॥

**एतना करहु तात तुम्ह जाई। सीतहि देखि कहहु सुधि आई॥**
**तब निज भुज बल राजिवनैना। कौतुक लागि संग कपि सेना॥**

जांबवान म्हणाला, 'हे हनुमंता, तू इतकेच कर की, सीतेला पाहून परत ये आणि बातमी सांग. नंतर कमलनयन श्रीराम आपल्या बाहुबलाने राक्षसांचा संहार करून सीतेला घेऊन येतील. लीला म्हणून ते वानरांची सेना बरोबर घेतील. ॥ ६ ॥

छं०—**कपि सेन संग सँघारि निसिचर रामु सीतहि आनिहैं।**
**त्रैलोक पावन सुजसु सुर मुनि नारदादि बखानिहैं॥**
**जो सुनत गावत कहत समुझत परम पद नर पावई।**
**रघुबीर पद पाथोज मधुकर दास तुलसी गावई॥**

वानरांची सेना बरोबर घेऊन, राक्षसांचा संहार करून श्रीराम सीतेला घेऊन येतील. मग देव आणि नारदादी मुनी तिन्ही लोकांना पवित्र करणाऱ्या त्यांच्या सुंदर कीर्तीचे वर्णन करतील. ते ऐकून,

गाऊन, सांगून व समजून घेऊन मनुष्य परम पद प्राप्त करतील. श्रीरघुवीरांच्या चरण-कमलांवरील भ्रमर बनून तुलसीदास ती कीर्ती गात आहे.

**दो०—भव भेषज रघुनाथ जसु सुनहिं जे नर अरु नारि।**
**तिन्ह कर सकल मनोरथ सिद्ध करहिं त्रिसिरारि॥ ३० ( क )॥**

श्रीरघुवीरांची कीर्ती ही जन्म-मरणरूप भव-रोगाची अचूक औषधी आहे. जे स्त्री-पुरुष ती ऐकतील, त्यांचे मनोरथ श्रीराम पूर्ण करतील.॥ ३० (क)॥

**सो०—नीलोत्पल तन स्याम काम कोटि सोभा अधिक।**
**सुनिअ तासु गुन ग्राम जासु नाम अघ खग बधिक॥ ३० ( ख )॥**

ज्यांचे नील कमलाप्रमाणे श्यामल शरीर आहे, ज्यांची शोभा कोट्यवधी कामदेवांहून अधिक आहे आणि ज्यांचे नाम हे पापरूपी पक्ष्यांना मारण्यासाठी पारध्यासारखे आहे, त्या श्रीरामांच्या लीलांच्या समूहांचे वर्णन ऐकावे.॥ ३०(ख)॥

## मासपारायण, तेविसावा विश्राम

*इति श्रीमद्रामचरितमानसे सकलकलिकलुषविध्वंसने चतुर्थः सोपानः समाप्तः।*

*कलियुगातील समस्त पापांचा नाश करणाऱ्या श्रीरामचरितमानसाचा*
*हा चौथा सोपान समाप्त झाला.*

∼∼○∼∼

**( किष्किन्धाकाण्ड समाप्त )**

॥ श्रीगणेशाय नमः ॥

॥ श्रीजानकीवल्लभो विजयते ॥

# श्रीरामचरितमानस

## पञ्चम सोपान

## सुन्दरकाण्ड

श्लोक

**शान्तं शाश्वतमप्रमेयमनघं निर्वाणशान्तिप्रदं**
**ब्रह्माशम्भुफणीन्द्रसेव्यमनिशं वेदान्तवेद्यं विभुम्।**
**रामाख्यं जगदीश्वरं सुरगुरुं मायामनुष्यं हरिं**
**वन्देऽहं करुणाकरं रघुवरं भूपालचूडामणिम्॥ १॥**

शांत, सनातन, अप्रमेय, निष्पाप, मोक्षरूप परमशांती देणारे, ब्रह्मदेव, महादेव व शेष यांनी निरंतर सेविलेले, वेदान्ताने जाणता येणारे, सर्वव्यापक, सर्व देवांमध्ये श्रेष्ठ असलेले, मायेमुळे मनुष्यरूपात दिसणारे, सर्व पापांचे हरण करणारे, करुणेची खाण, रघुकुळातील श्रेष्ठ व राजांमध्ये शिरोमणी असलेले आणि ज्यांना श्रीराम असे म्हटले जाते, अशा त्या जगदीश्वरांना मी वंदन करतो. ॥ १ ॥

**नान्या स्पृहा रघुपते हृदयेऽस्मदीये**
**सत्यं वदामि च भवानखिलान्तरात्मा।**
**भक्तिं प्रयच्छ रघुपुङ्गव निर्भरां मे**
**कामादिदोषरहितं कुरु मानसं च॥ २॥**

हे रघुनाथ, मी सत्य सांगतो आणि तुम्ही सर्वांचे अंतरात्मा असल्यामुळे सर्व जाणता की, माझ्या मनात कोणतीही इच्छा नाही. हे रघुकुलश्रेष्ठ, आपली प्रगाढ भक्ती मला द्या व माझे मन कामादी दोषांपासून रहित करा. ॥ २ ॥

**अतुलितबलधामं हेमशैलाभदेहं**
**दनुजवनकृशानुं ज्ञानिनामग्रगण्यम्।**
**सकलगुणनिधानं वानराणामधीशं**
**रघुपतिप्रियभक्तं वातजातं नमामि॥ ३॥**

अतुलनीय बळाचे धाम, सुमेरू सुवर्ण पर्वताप्रमाणे कांतियुक्त देहधारी, दैत्यरूप वनाचा नाश करण्यासाठी अग्निरूप, ज्ञानी पुरुषांमध्ये अग्रगण्य, सर्व गुणांचे निधान, वानरांचा स्वामी आणि श्रीरघुनाथांचा आवडता भक्त असलेल्या पवनपुत्र हनुमानाला मी नमस्कार करतो.॥ ३॥

**जामवंत के बचन सुहाए। सुनि हनुमंत हृदय अति भाए॥**
**तब लगि मोहि परिखेहु तुम्ह भाई। सहि दुख कंद मूल फल खाई॥**

जांबवंताचे सुंदर बोलणे हनुमानाला खूप आवडले. तो म्हणाला, 'मित्रा, तुम्ही सर्वजण दुःख सहन करून कंद, मुळे व फळे खाऊन माझी तोपर्यंत वाट पाहा,॥ १॥

**जब लगि आवौं सीतहि देखी। होइहि काजु मोहि हरष बिसेषी॥**
**यह कहि नाइ सबन्हि कहुँ माथा। चलेउ हरषि हियँ धरि रघुनाथा॥**

जोपर्यंत मी सीतेला पाहून परत येत नाही. हे काम निश्चितपणे होणार, कारण मला मनातून फार आनंद वाटत आहे.' असे म्हणून सर्वांना नमस्कार करीत व हृदयामध्ये प्रभू श्रीरामांना धारण करून हनुमान आनंदाने निघाला.॥ २॥

**सिंधु तीर एक भूधर सुंदर। कौतुक कूदि चढ़ेउ ता ऊपर॥**
**बार बार रघुबीर सँभारी। तरकेउ पवनतनय बल भारी॥**

समुद्रकाठी एक पर्वत होता. हनुमान मजेने उडी मारून त्यावर चढला आणि वारंवार श्रीरामांचे स्मरण करीत अत्यंत बलवान असलेल्या हनुमानाने त्या पर्वतावरून मोठ्या वेगाने उड्डाण केले.॥ ३॥

**जेहिं गिरि चरन देइ हनुमंता। चलेउ सो गा पाताल तुरंता॥**
**जिमि अमोघ रघुपति कर बाना। एही भाँति चलेउ हनुमाना॥**

हनुमानाने ज्या पर्वतावरून उडी घेतली, तो पर्वत तत्काळ खचून पाताळात गेला. ज्याप्रमाणे श्रीरामांचा अमोघ बाण वेगाने जावा, त्याप्रमाणे हनुमान वेगाने निघाला.॥ ४॥

**जलनिधि रघुपति दूत बिचारी। तैं मैनाक होहि श्रमहारी॥**

हनुमान हा रघुनाथांचा दूत आहे, असे समजून समुद्र मैनाक पर्वताला म्हणाला, 'हे मैनाका, तू याचा श्रम-परिहार कर.'॥ ५॥

दो०—**हनूमान तेहि परसा कर पुनि कीन्ह प्रनाम।**
**राम काजु कीन्हें बिनु मोहि कहाँ बिश्राम॥ १॥**

हनुमानाने त्याला स्पर्श करून प्रणाम केला आणि म्हटले, 'प्रभू श्रीरामांचे काम केल्याविना मला विश्रांती कुठली?'॥ १॥

**जात पवनसुत देवन्ह देखा। जानैं कहुँ बल बुद्धि बिसेषा॥**
**सुरसा नाम अहिन्ह कै माता। पठइन्हि आइ कही तेहिं बाता॥**

पवनकुमार जात असल्याचे देवांना दिसले. त्यांनी त्याच्या बल व बुद्धीची परीक्षा घेण्यासाठी सर्पांची आई सुरसा हिला पाठविले. ती येऊन हनुमानाला म्हणाली,॥ १॥

**आजु सुरन्ह मोहि दीन्ह अहारा। सुनत बचन कह पवनकुमारा॥**
**राम काजु करि फिरि मैं आवौं। सीता कइ सुधि प्रभुहि सुनावौं॥**

'आज देवांनी मला तुझ्या रूपाने भोजन दिले आहे.' हे ऐकून हनुमान म्हणाला, 'श्रीरामांचे कार्य पूर्ण करून मी परत येईन व सीतेची वार्ता प्रभूंना सांगेन,॥ २॥

**तब तव बदन पैठिहउँ आई। सत्य कहउँ मोहि जान दे माई॥**
**कवनेहुँ जतन देइ नहिं जाना। ग्रससि न मोहि कहेउ हनुमाना॥**

मग मी तुझ्या तोंडात शिरेन, तेव्हा तू मला खा. हे माते! सत्य सांगतो. आता मला जाऊ दे.' काही केल्या सुरसेने त्याला जाऊ दिले नाही, तेव्हा तो म्हणाला, 'मग मला खाऊन का टाकीत नाहीस?'॥ ३॥

**जोजन भरि तेहिं बदनु पसारा। कपि तनु कीन्ह दुगुन बिस्तारा॥**
**सोरह जोजन मुख तेहिं ठयऊ। तुरत पवनसुत बत्तिस भयऊ॥**

तिने आपले तोंड एक योजनाएवढे पसरले. तेव्हा हनुमंताने आपले शरीर त्याच्या दुप्पट मोठे केले. तिने सोळा योजनांएवढे मोठे तोंड पसरले, तेव्हा हनुमान तत्काळ बत्तीस योजनांएवढा मोठा झाला.॥ ४॥

**जस जस सुरसा बदनु बढ़ावा। तासु दून कपि रूप देखावा॥**
**सत जोजन तेहिं आनन कीन्हा। अति लघु रूप पवनसुत लीन्हा॥**

सुरसा आपले तोंड जसजसे मोठे करीत होती, तसतसे हनुमानही त्याच्या दुप्पट आपले रूप दाखवीत होता. जेव्हा तिने आपले तोंड शंभर योजने मोठे केले, तेव्हा हनुमानाने ताबडतोब अत्यंत छोटे रूप घेतले.॥ ५॥

**बदन पइठि पुनि बाहेर आवा। मागा बिदा ताहि सिरु नावा॥**
**मोहि सुरन्ह जेहि लागि पठावा। बुधि बल मरमु तोर मैं पावा॥**

तो तिच्या तोंडात शिरून पटकन बाहेर आला आणि त्याने नमस्कार करून निरोप मागितला. तेव्हा ती म्हणाली, 'देवांनी ज्यासाठी मला पाठविले होते, ते तुझ्या बुद्धि-सामर्थ्याचे रहस्य मला समजले.'॥ ६ ॥

**दो०—राम काजु सबु करिहहु तुम्ह बल बुद्धि निधान।**
**आसिष देइ गई सो हरषि चलेउ हनुमान॥ २ ॥**

तू बल-बुद्धीचे निधान असल्यामुळे प्रभूंचे सर्व कार्य सिद्धीस नेशील.' असा आशीर्वाद देऊन ती निघून गेली. मग हनुमान आनंदाने पुढे निघाला. ॥ २ ॥

**निसिचरि एक सिंधु महुँ रहई। करि माया नभु के खग गहई॥**
**जीव जंतु जे गगन उड़ाहीं। जल बिलोकि तिन्ह कै परिछाहीं॥**
**गहइ छाहँ सक सो न उड़ाई। एहि बिधि सदा गगनचर खाई॥**
**सोइ छल हनूमान कहँ कीन्हा। तासु कपटु कपि तुरतहिं चीन्हा॥**

समुद्रामध्ये एक राक्षसी राहात होती. आकाशात उडणाऱ्या पक्ष्यांना ती आपल्या मायावी शक्तीने पकडत असे. जे जीव-जंतू आकाशात उडत असत, त्यांची सावली ती पाण्यात पाहात असे व ती सावली पकडत असे, त्यामुळे प्राण्यांना उडता येत नसे. ते पाण्यात पडत. अशाप्रकारे ती आकाशात उडणाऱ्या प्राण्यांना खात असे. तिने तसेच कपट हनुमानाशीही केले. त्याने लगेच तिचे कपट ओळखले. ॥ १-२ ॥

**ताहि मारि मारुतसुत बीरा। बारिधि पार गयउ मतिधीरा॥**
**तहाँ जाइ देखी बन सोभा। गुंजत चंचरीक मधु लोभा॥**

धीर बुद्धीचा वीर हनुमान तिला ठार मारून समुद्रापलीकडे गेला. त्याला वनाची शोभा दिसली. तेथे मधाच्या लोभाने भ्रमर गुंजारव करीत होते. ॥ ३ ॥

**नाना तरु फल फूल सुहाए। खग मृग बृंद देखि मन भाए॥**
**सैल बिसाल देखि एक आगें। ता पर धाइ चढ़ेउ भय त्यागें॥**

त्या वनात अनेक प्रकारचे वृक्ष फळा-फुलांनी बहरलेले होते. ते फार शोभून दिसत होते. तेथील पशु-पक्ष्यांचे समूह पाहून हनुमानाचे मन प्रसन्न होऊन गेले. त्याला समोर एक विशाल पर्वत दिसला. तो निर्भयपणे उडी मारून त्या पर्वतावर चढला. ॥ ४ ॥

**उमा न कछु कपि कै अधिकाई। प्रभु प्रताप जो कालहि खाई॥**
**गिरि पर चढ़ि लंका तेहिं देखी। कहि न जाइ अति दुर्ग बिसेषी॥**

शिव म्हणतात, 'हे उमे, यामध्ये वानर हनुमानाचा काही मोठेपणा नाही. जो काळाचाही काळ आहे, त्या प्रभू रामांचा हा प्रताप होता. हनुमानाने पर्वतावर चढून लंका पाहिली. त्याने विचार केला की, हा किल्ला कल्पनेहून फारच मोठा आहे. ॥ ५ ॥

**अति उतंग जलनिधि चहु पासा। कनक कोट कर परम प्रकासा॥**

तो अत्यंत उंच होता. त्याच्या चारी बाजूंना समुद्र होता. किल्ल्याच्या सोन्याच्या तटबंदीचा मोठा प्रकाश पसरलेला होता. ॥ ६ ॥

**छं०—कनक कोट बिचित्र मनि कृत सुंदरायतना घना।**
**चउहट्ट हट्ट सुबट्ट बीथीं चारु पुर बहु बिधि बना॥**
**गज बाजि खच्चर निकर पदचर रथ बरूथन्हि को गनै।**
**बहुरूप निसिचर जूथ अतिबल सेन बरनत नहिं बनै॥ १॥**

ती चित्रविचित्र रत्नांनी जडविलेली सोन्याची तटबंदी होती. तिच्या आतल्या बाजूस सुंदर सुंदर घरे होती. तेथे चौक, बाजार, सुंदर मार्ग व गल्ली-बोळ होते. सुंदर नगर नाना प्रकारे सजविलेले होते. हत्ती, घोडे व खेचरांच्या झुंडी, तसेच पायदळ आणि रथांचे समूह यांची गणना कोण करू शकेल? अनेक रूपांमध्ये राक्षसांची सैन्यदले होती आणि त्या बलवान सेनेचे वर्णन करणेच कठीण. ॥ १ ॥

**बन बाग उपबन बाटिका सर कूप बापीं सोहहीं।**
**नर नाग सुर गंधर्ब कन्या रूप मुनि मन मोहहीं॥**
**कहुँ माल देह बिसाल सैल समान अतिबल गर्जहीं।**
**नाना अखारेन्ह भिरहिं बहुबिधि एक एकन्ह तर्जहीं॥ २॥**

वने, बागा, उपवने, फुलवाड्या, तलाव, विहिरी आणि आड शोभत होते. मनुष्यकन्या, नागकन्या, देवकन्या व गंधर्वकन्या या आपल्या सौंदर्याने मुनींच्या मनालाही भुरळ पाडणाऱ्या होत्या. कुठे पर्वतासारख्या विशाल शरीराचे बलवान मल्ल गर्जना करीत होते. ते अनेक आखाड्यांमध्ये अनेक प्रकारे एकमेकांशी भिडून आव्हान देत होते. ॥ २ ॥

**करि जतन भट कोटिन्ह बिकट तन नगर चहुँ दिसि रच्छहीं।**
**कहुँ महिष मानुष धेनु खर अज खल निसाचर भच्छहीं॥**
**एहि लागि तुलसीदास इन्ह की कथा कछु एक है कही।**
**रघुबीर सर तीरथ सरीरन्हि त्यागि गति पैहहिं सही॥ ३॥**

भयानक शरीराचे कोट्यवधी राक्षस काळजीपूर्वक नगराची चारी बाजूंनी रखवाली करीत होते. दुष्ट राक्षस कुठे म्हशी, गाई, गाढवे व बकऱ्या मारून खात होते. तुलसीदासाने हे सर्व थोडक्यात एवढ्यासाठीच सांगितले आहे की, प्रभू श्रीरामांच्या बाणरूपी तीर्थामध्ये आपला देह विसर्जित करून हे सर्वजण निश्चितपणे परमगती प्राप्त करणार आहेत. ॥ ३ ॥

**दो०—पुर रखवारे देखि बहु कपि मन कीन्ह बिचार।**
**अति लघु रूप धरौं निसि नगर करौं पइसार॥ ३॥**

नगराचे बहुसंख्य रखवालदार पाहून हनुमानाने मनात विचार केला की, आता छोटे रूप धरावे आणि रात्रीच्या वेळी नगरात प्रवेश करावा.॥ ३॥

**मसक समान रूप कपि धरी। लंकहि चलेउ सुमिरि नरहरी॥**
**नाम लंकिनी एक निसिचरी। सो कह चलेसि मोहि निंदरी॥**

हनुमान अतिशय छोटे रूप घेऊन मनुष्यलीला करणाऱ्या श्रीरामचंद्रांचे स्मरण करून लंकेला निघाला. लंकेच्या दारावर लंकिनी नावाची एक राक्षसी राहात होती. ती म्हणाली, 'माझी उपेक्षा करून मला न विचारता कुठे निघालास?॥ १॥

**जानेहि नहीं मरमु सठ मोरा। मोर अहार जहाँ लगि चोरा॥**
**मुठिका एक महा कपि हनी। रुधिर बमत धरनीं ढनमनी॥**

हे मूर्खा, तुला माझे रहस्य कुठे ठाऊक आहे? जितके चोर असतात, ते माझा आहार बनतात.' हनुमानाने तिला एक ठोसा दिला, त्यामुळे ती रक्त ओकत जमिनीवर पडली.॥ २॥

**पुनि संभारि उठी सो लंका। जोरि पानि कर बिनय ससंका॥**
**जब रावनहि ब्रह्म बर दीन्हा। चलत बिरंचि कहा मोहि चीन्हा॥**

ती लंकिनी स्वतःला सावरत पुन्हा उठली आणि भीतीने हात जोडून विनंती करू लागली. ती म्हणाली, 'ब्रह्मदेवांनी रावणाला जेव्हा वर दिला होता, तेव्हा जाताना त्यांनी मला राक्षसांच्या नाशाची खूण सांगितली होती की,॥ ३॥

**बिकल होसि तैं कपि के मारे। तब जानेसु निसिचर संघारे॥**
**तात मोर अति पुन्य बहूता। देखेउँ नयन राम कर दूता॥**

जेव्हा तू वानराने मारल्यावर व्याकूळ होशील, तेव्हा तू राक्षसांचा संहार झाला, असे समज'. मी श्रीरामचंद्रांच्या दूताला आपल्या डोळ्यांनी पाहिले, हे माझे मोठे पुण्य होय.॥ ४॥

**दो०—तात स्वर्ग अपबर्ग सुख धरिअ तुला एक अंग।**
**तूल न ताहि सकल मिलि जो सुख लव सतसंग॥ ४॥**

हे कपिराज, स्वर्ग व मोक्ष यांचे सर्व सुख एका पारड्यात घातले, तरी ते सर्व मिळून दुसऱ्या पारड्यात ठेवलेल्या क्षणभराच्या सत्संगाच्या सुखाची बरोबरी करू शकत नाही.॥ ४॥

**प्रबिसि नगर कीजे सब काजा। हृदयँ राखि कोसलपुर राजा॥**
**गरल सुधा रिपु करहिं मिताई। गोपद सिंधु अनल सितलाई॥**

तू अयोध्यापुरीचे राजा श्रीरघुनाथ यांना हृदयात धारण करून नगरामध्ये प्रवेश कर. श्रीरामांच्यामुळे विष अमृत बनते, शत्रू मैत्री करू लागतो, समुद्र गाईच्या खुरामुळे पडलेल्या किंचित खड्ड्याएवढा होतो आणि अग्नीमध्ये शीतलता येते.'॥ १॥

**गरुड़ सुमेरु रेनु सम ताही। राम कृपा करि चितवा जाही॥**
**अति लघु रूप धरेउ हनुमाना। पैठा नगर सुमिरि भगवाना॥**

काकभुशुंडी म्हणतात, 'हे गरुडा, ज्याला श्रीरामचंद्रांनी एकदा कृपा दृष्टीने पाहिले, त्याला सुमेरू पर्वत हा सुद्धा धुळिकणासारखा होतो.' नंतर हनुमानाने छोटे रूप धारण केले आणि भगवंतांचे स्मरण करून लंकेत प्रवेश केला.॥ २॥

**मंदिर मंदिर प्रति करि सोधा। देखे जहँ तहँ अगनित जोधा॥**
**गयउ दसानन मंदिर माहीं। अति बिचित्र कहि जात सो नाहीं॥**

त्याने तेथील प्रत्येक महालाचा शोध घेतला. जिकडे-तिकडे असंख्य योद्धे होते. नंतर तो रावणाच्या महालात गेला. तो इतका विलक्षण होता की, त्याचे वर्णन करणे कठीण.॥ ३॥

**सयन किएँ देखा कपि तेही। मंदिर महुँ न दीखि बैदेही॥**
**भवन एक पुनि दीख सुहावा। हरि मंदिर तहँ भिन्न बनावा॥**

हनुमानाने रावण झोपलेला पाहिला. परंतु महालात जानकी दिसली नाही. नंतर एक सुंदर महाल दिसला. तेथे भगवंतांचे एक स्वतंत्र मंदिर होते.॥ ४॥

दो०—**रामायुध अंकित गृह सोभा बरनि न जाइ।**
**नव तुलसिका बृंद तहँ देखि हरष कपिराइ॥ ५॥**

त्या महालावर श्रीरामांच्या धनुष्य-बाणाची चिन्हे अंकित होती. त्याची शोभा अवर्णनीय होती. तेथे तुळशीची नवनवीन झाडे पाहून कपिराज हनुमानाला हर्ष झाला.॥ ५॥

**लंका निसिचर निकर निवासा। इहाँ कहाँ सज्जन कर बासा॥**
**मन महुँ तरक करैं कपि लागा। तेहीं समय बिभीषनु जागा॥**

लंका ही राक्षसांच्या समाजाचे निवासस्थान आहे. येथे साधु-पुरुषाचा निवास कसा? हनुमान मनात असा विचार करीत होता, त्याचवेळी बिभीषण जागा झाला.॥ १॥

**राम राम तेहिं सुमिरन कीन्हा। हृदयँ हरष कपि सज्जन चीन्हा॥**
**एहि सन हठि करिहउँ पहिचानी। साधु ते होइ न कारज हानी॥**

त्याने राम-नाम घेतले. हनुमानाला वाटले की, हा साधू आहे. त्याला मनापासून आनंद झाला. त्याने विचार केला की, आपण याची मुद्दाम ओळख करून घेऊया. साधूमुळे कार्याची हानी होत नाही, उलट फायदाच होतो. ॥ २ ॥

**बिप्र रूप धरि बचन सुनाए। सुनत बिभीषन उठि तहँ आए॥**
**करि प्रनाम पूँछी कुसलाई। बिप्र कहहु निज कथा बुझाई॥**

ब्राह्मणाचे रूप धारण करून हनुमानाने त्याला हाक मारली. ऐकताच बिभीषण उठून बाहेर आला. प्रणाम करून त्याने क्षेम-कुशल विचारले आणि म्हटले, 'हे ब्राह्मणदेवा, आपली ओळख करून द्या. ॥ ३ ॥

**की तुम्ह हरि दासन्ह महँ कोई। मोरें हृदय प्रीति अति होई॥**
**की तुम्ह रामु दीन अनुरागी। आयहु मोहि करन बड़भागी॥**

तुम्ही हरिभक्तांपैकी कोणी आहात काय? कारण तुम्हांला पाहून माझ्या मनात खूप प्रेम उसळत आहे. अथवा तुम्ही दीनांवर प्रेम करणारे प्रत्यक्ष श्रीरामचंद्रच असून मला घरबसल्या कृतार्थ करण्यासाठी आला आहात काय?' ॥ ४ ॥

दो०—**तब हनुमंत कही सब राम कथा निज नाम।**
**सुनत जुगल तन पुलक मन मगन सुमिरि गुन ग्राम॥ ६ ॥**

तेव्हा हनुमानाने श्रीरामचंद्रांची सर्व हकिगत सांगून आपले नाव सांगितले. ऐकताच दोघांची शरीरे रोमांचित झाली आणि श्रीरामांच्या गुण-समूहांचे स्मरण करून दोघेही प्रेम व आनंदात मग्न झाले. ॥ ६ ॥

**सुनहु पवनसुत रहनि हमारी। जिमि दसनन्हि महुँ जीभ बिचारी॥**
**तात कबहुँ मोहि जानि अनाथा। करिहहिं कृपा भानुकुल नाथा॥**

बिभीषण म्हणाला, 'हे पवनपुत्रा, माझी परिस्थिती ऐकून घे. ज्याप्रमाणे दातांमध्ये बिचारी जीभ दबून राहाते, त्याप्रमाणे मी येथे राहातो. हे तात, मला अनाथ समजून सूर्यकुलाचे नाथ श्रीरामचंद्र कधी माझ्यावरही कृपा करतील काय? ॥ १ ॥

**तामस तनु कछु साधन नाहीं। प्रीति न पद सरोज मन माहीं॥**
**अब मोहि भा भरोस हनुमंता। बिनु हरिकृपा मिलहिं नहिं संता॥**

माझे हे तामसी राक्षसशरीर असल्यामुळे साधन तर काही जमत नाही आणि मनातही श्रीरामचंद्रांच्या चरणकमलांविषयी प्रेमही नाही. परंतु हे हनुमाना, श्रीरामचंद्रांची माझ्यावर कृपा आहे, असा मला आता विश्वास वाटत आहे, कारण हरीच्या कृपेविना संतांची भेट होत नाही. ॥ २ ॥

**जौं रघुबीर अनुग्रह कीन्हा। तौ तुम्ह मोहि दरसु हठि दीन्हा॥**
**सुनहु बिभीषन प्रभु कै रीती। करहिं सदा सेवक पर प्रीती॥**

श्रीरघुवीरांनी कृपा केली आहे, त्यामुळेच तुम्ही आपणहून मला दर्शन दिले.' हनुमान म्हणाला, 'हे बिभीषणा, ऐकून घे की, सेवकावर सदा प्रेम करणे ही प्रभूंची रीतच आहे. ॥ ३ ॥

**कहहु कवन मैं परम कुलीना। कपि चंचल सबहीं बिधि हीना॥**
**प्रात लेइ जो नाम हमारा। तेहि दिन ताहि न मिलै अहारा॥**

सांग बरे! मी कुठे मोठा कुलीन लागून गेलो आहे? सर्व दृष्टींनी तुच्छ असा मी चंचल वानर आहे. सकाळी-सकाळी जो आम्हा वानरांचे नाव घेतो, त्याला त्या दिवशी भोजनही मिळत नाही, (असे म्हणतात.) ॥ ४ ॥

दो०—**अस मैं अधम सखा सुनु मोहू पर रघुबीर।**
**कीन्ही कृपा सुमिरि गुन भरे बिलोचन नीर॥ ७॥**

हे सखा, मी असा अधम आहे, परंतु श्रीरामचंद्रांनी तरीही माझ्यावर कृपा केली.' भगवंतांच्या गुणांचे स्मरण करताना हनुमानाच्या डोळ्यांत प्रेमाश्रू भरले. ॥ ७ ॥

**जानतहूँ अस स्वामि बिसारी। फिरहिं ते काहे न होहिं दुखारी॥**
**एहि बिधि कहत राम गुन ग्रामा। पावा अनिर्बाच्य बिश्रामा॥**

जे लोक हे जाणत असूनही असे स्वामी असलेले श्रीरघुनाथ यांना विसरून विषयांच्यामागे भटकत फिरतात, ते का बरे दुःखी होणार नाहीत? अशा प्रकारे श्रीरामांचे गुण-गान करताना त्यांना अनिर्वचनीय परम शांती लाभली. ॥ १ ॥

**पुनि सब कथा बिभीषन कही। जेहि बिधि जनकसुता तहँ रही॥**
**तब हनुमंत कहा सुनु भ्राता। देखी चहउँ जानकी माता॥**

नंतर बिभीषणाने जानकी लंकेमध्ये कुठे राहात आहे, ती सर्व वार्ता सांगितली. तेव्हा हनुमान म्हणाला, 'हे बंधू, मला जानकी मातेला पाहायचे आहे.' ॥ २ ॥

**जुगुति बिभीषन सकल सुनाई। चलेउ पवनसुत बिदा कराई॥**
**करि सोइ रूप गयउ पुनि तहवाँ। बन असोक सीता रह जहवाँ॥**

बिभीषणाने सर्व उपाय सांगितले. मग हनुमान निरोप घेऊन तेथून निघाला. पुन्हा तेच अत्यंत छोटे रूप धरून तो अशोक वनात जेथे सीता राहात होती, तेथे गेला. ॥ ३ ॥

**देखि मनहि महुँ कीन्ह प्रनामा। बैठेहिं बीति जात निसि जामा॥**
**कृस तनु सीस जटा एक बेनी। जपति हृदयँ रघुपति गुन श्रेनी॥**

सीतेला पाहून त्याने मनातल्या मनात प्रणाम केला. बसल्या-बसल्याच तिची संपूर्ण रात्र निघून जात होती. शरीर दुर्बल झालेले होते. डोक्यावर जटांची एकच वेणी होती. ती मनात श्रीरामांच्या गुणांचे स्मरण करीत असे. ॥ ४ ॥

**दो०—निज पद नयन दिएँ मन राम पद कमल लीन।**
**परम दुखी भा पवनसुत देखि जानकी दीन॥ ८॥**

जानकीने आपले डोळे आपल्या पायाकडे लावले होते आणि मन श्रीरामांच्या चरणकमलांमध्ये मग्न होते. जानकीला दु:खी असल्याचे पाहून पवनपुत्र हनुमानाला फार वाईट वाटले.॥ ८॥

**तरु पल्लव महुँ रहा लुकाई। करइ बिचार करौं का भाई॥**
**तेहि अवसर रावनु तहँ आवा। संग नारि बहु किएँ बनावा॥**

हनुमान वृक्षांच्या पानांमध्ये लपून राहिला व विचार करू लागला की काय करू? एवढ्यात अनेक स्त्रियांना सोबत घेऊन नटून-थटून रावण तेथे आला.॥ १॥

**बहु बिधि खल सीतहि समुझावा। साम दान भय भेद देखावा॥**
**कह रावनु सुनु सुमुखि सयानी। मंदोदरी आदि सब रानी॥**

त्या दुष्टाने सीतेला अनेक प्रकारे समजाविले. साम-दान-दंड-भेद दाखविला. रावण म्हणाला, 'हे सुमुखी, हे बुद्धिमती, ऐक. मंदोदरी इत्यादी सर्व राण्यांना॥ २॥

**तव अनुचरीं करउँ पन मोरा। एक बार बिलोकु मम ओरा॥**
**तृन धरि ओट कहति बैदेही। सुमिरि अवधपति परम सनेही॥**

मी तुझ्या दासी करीन. ही माझी प्रतिज्ञा आहे. तू एकदा माझ्याकडे पाहा तरी खरी.' आपले परमप्रिय कोसलाधीश श्रीरामांचे स्मरण करून जानकी गवताच्या काडीचा आडोसा धरून म्हणू लागली,॥ ३॥

**सुनु दसमुख खद्योत प्रकासा। कबहुँ कि नलिनी करइ बिकासा॥**
**अस मन समुझु कहति जानकी। खल सुधि नहिं रघुबीर बान की॥**

'हे दशमुखा, ऐक. काजव्याच्या प्रकाशाने कमलिनी उमलते काय?' मग ती पुढे म्हणाली, 'तू स्वत:साठीसुद्धा असेच समज. अरे दुष्टा, तुला श्रीरघुवीरांच्या प्रखर बाणांची माहिती नाही.॥ ४॥

**सठ सूनें हरि आनेहि मोही। अधम निलज्ज लाज नहिं तोही॥**

अरे पाप्या, तू मला एकटी असताना हरण करून आणलेस. अरे अधमा, निर्लज्जा, तुला लाज वाटत नाही?'॥ ५॥

**दो०—आपुहि सुनि खद्योत सम रामहि भानु समान।**
**परुष बचन सुनि काढ़ि असि बोला अति खिसिआन॥ ९॥**

स्वत:ला काजव्यासारखा आणि श्रीरामांना सूर्यासारखा म्हटलेले ऐकून तसेच सीतेचे ते अपशब्द ऐकून रावण तलवार उपसून संतापून म्हणाला,॥ ९॥

**सीता तैं मम कृत अपमाना। कटिहउँ तव सिर कठिन कृपाना॥**
**नाहिं त सपदि मानु मम बानी। सुमुखि होति न त जीवन हानी॥**

'सीते, तू माझा अपमान केला आहेस. मी या धारदार कृपाणाने तुझे शिर कापून टाकतो. अजुनी माझे ऐक. हे सुमुखी, नाही तर तुला प्राण गमवावे लागतील.'॥ १॥

**स्याम सरोज दाम सम सुंदर। प्रभु भुज करि कर सम दसकंधर॥**
**सो भुज कंठ कि तव असि घोरा। सुनु सठ अस प्रवान पन मोरा॥**

सीता म्हणाली, 'हे दशग्रीवा, प्रभूंची नीलकमल-मालेसमान सुंदर व हत्तीच्या सोंडेसारखी पुष्ट असलेली भुजा माझ्या गळ्यात पडेल किंवा तुझी भयानक तलवार. हे नीचा, ऐक. हेच मी तुला सत्य सांगते.'॥ २॥

**चंद्रहास हरु मम परितापं। रघुपति बिरह अनल संजातं॥**
**सीतल निसित बहसि बर धारा। कह सीता हरु मम दुख भारा॥**

सीता म्हणाली, 'हे चंद्रहास तलवारी! श्रीरघुनाथांच्या विरहाग्नीमुळे मला झालेली पीडा तू दूर कर. हे तलवारी, तू शीतल, तीक्ष्ण आणि तिखट धार असलेली आहेस. तू माझ्या दुःखाचे ओझे हरण कर.'॥ ३॥

**सुनत बचन पुनि मारन धावा। मयतनयाँ कहि नीति बुझावा॥**
**कहेसि सकल निसिचरिन्ह बोलाई। सीतहि बहु बिधि त्रासहु जाई॥**

सीतेचे हे बोलणे ऐकून रावण मारण्यास धावला. तेव्हा मंदोदरीने त्याला नीती सांगून समजाविले. मग रावणाने सर्व राक्षसींना बोलावून सांगितले की, 'सीतेजवळ जाऊन तिला नाना तऱ्हेने भीती घाला.॥ ४॥

**मास दिवस महुँ कहा न माना। तौ मैं मारबि काढ़ि कृपाना॥**

एक महिन्यात हिने सांगितलेले ऐकले नाही, तर मी हिला तलवारीने मारून टाकीन.'॥ ५॥

दो०—**भवन गयउ दसकंधर इहाँ पिसाचिनि बृंद।**
**सीतहि त्रास देखावहिं धरहिं रूप बहु मंद॥ १०॥**

असे म्हणून रावण घरी गेला. इकडे राक्षसींच्या झुंडी अनेक भयानक रूपे धारण करून सीतेला भय दाखवू लागल्या.॥ १०॥

**त्रिजटा नाम राच्छसी एका। राम चरन रति निपुन बिबेका॥**
**सबन्हौ बोलि सुनाएसि सपना। सीतहि सेइ करहु हित अपना॥**

त्यांच्यामध्ये त्रिजटा नावाची एक राक्षसी होती. तिला श्रीरामचंद्रांच्या चरणी प्रेम होते व ती विवेकशील होती. तिने सर्वांना बोलावून आपल्याला पडलेले स्वप्न सांगून म्हटले, 'सीतेची सेवा करून स्वतःचे कल्याण करून घ्या.॥ १॥

**सपनें बानर लंका जारी। जातुधान सेना सब मारी॥**
**खर आरूढ़ नगन दससीसा। मुंडित सिर खंडित भुज बीसा॥**

स्वप्नात मला दिसले की, एका वानराने लंका जाळून टाकली. राक्षसांची सर्व सेना मारून टाकली. रावण नागडा होता आणि तो गाढवावर बसला होता. त्याच्या डोक्याचे मुंडन केलेले होते आणि त्याच्या वीसही भुजा कापलेल्या होत्या.॥ २॥

**एहि बिधि सो दच्छिन दिसि जाई। लंका मनहुँ बिभीषन पाई॥**
**नगर फिरी रघुबीर दोहाई। तब प्रभु सीता बोलि पठाई॥**

अशाप्रकारे तो दक्षिणेस यमपुरीला जात आहे आणि लंका बिभीषणाला मिळाली आहे. नगरामध्ये श्रीरामांचा डांगोरा पिटला जात आहे. मग प्रभूंनी सीतेला बोलावणे पाठविले.॥ ३॥

**यह सपना मैं कहउँ पुकारी। होइहि सत्य गएँ दिन चारी॥**
**तासु बचन सुनि ते सब डरीं। जनकसुता के चरनन्हि परीं॥**

मी खात्रीने सांगते की, हे स्वप्न चार दिवसांतच खरे होईल.' तिचे बोलणे ऐकून सर्व राक्षसी घाबरल्या आणि सीतेच्या चरणावर त्यांनी लोटांगण घातले.॥ ४॥

दो०—**जहँ तहँ गईं सकल तब सीता कर मन सोच।**
**मास दिवस बीतें मोहि मारिहि निसिचर पोच॥ ११॥**

नंतर त्या सर्व जिकडे तिकडे निघून गेल्या. सीता मनात काळजी करू लागली की, एक महिना झाल्यावर नीच राक्षस मला मारणार.॥ ११॥

**त्रिजटा सन बोलीं कर जोरी। मातु बिपति संगिनि तैं मोरी॥**
**तजौं देह करु बेगि उपाई। दुसह बिरहु अब नहिं सहि जाई॥**

सीता हात जोडून त्रिजटेला म्हणाली की, 'हे माते, तू संकटामध्ये माझी सोबतीण आहेस. मी शरीर-त्याग करू शकेन असा उपाय लवकर कर. विरह असह्य झाला आहे.॥ १॥

**आनि काठ रचु चिता बनाई। मातु अनल पुनि देहि लगाई॥**
**सत्य करहि मम प्रीति सयानी। सुनै को श्रवन सूल सम बानी॥**

लाकडे आणून चिता रच. हे माते, मग तिला आग लाव. तू सुज्ञ आहेस, तेव्हा माझ्यावरील प्रेम खरे करून दाखव. रावणाचे शूलाप्रमाणे दुःख देणारे बोलणे कानांनी कोण ऐकणार?'॥ २॥

**सुनत बचन पद गहि समुझाएसि। प्रभु प्रताप बल सुजसु सुनाएसि॥**
**निसि न अनल मिल सुनु सुकुमारी। अस कहि सो निज भवन सिधारी॥**

सीतेचे बोलणे ऐकून त्रिजटेने तिचे पाय धरून तिची समजूत घातली आणि श्रीरामांच्या प्रताप, बल आणि सुकीर्ती यांचे वर्णन केले. ती म्हणाली, 'हे सुकुमारी, ऐक. रात्रीच्या वेळी आग मिळू शकणार नाही.' असे म्हणून ती घरी गेली.॥ ३ ॥

**कह सीता बिधि भा प्रतिकूला। मिलिहि न पावक मिटिहि न सूला॥**
**देखिअत प्रगट गगन अंगारा। अवनि न आवत एकउ तारा॥**

सीता मनात म्हणू लागली, 'काय करू? विधाता प्रतिकूल झाला आहे. आग मिळणार नाही आणि दुःखही संपणार नाही. आकाशामध्ये निखारे दिसत आहेत, परंतु पृथ्वीवर एकही तारा येत नाही.॥ ४ ॥

**पावकमय ससि स्त्रवत न आगी। मानहुँ मोहि जानि हतभागी॥**
**सुनहि बिनय मम बिटप असोका। सत्य नाम करु हरु मम सोका॥**

चंद्र अग्निमय आहे, परंतु तोसुद्धा मला हतभागिनी समजून आगीचा वर्षाव करीत नाही. हे अशोक वृक्षा, माझी विनंती मान्य कर. माझा शोक हरण कर आणि आपले अशोक हे नाव सार्थ कर.॥ ५ ॥

**नूतन किसलय अनल समाना। देहि अगिनि जनि करहि निदाना॥**
**देखि परम बिरहाकुल सीता। सो छन कपिहि कलप सम बीता॥**

तुझी नवीन कोवळी पाने अग्नीसारखी आहेत. म्हणून विचार न करता मला अग्नी दे, विरह रोग वाढवून त्याची परिसीमा करू नकोस.' सीता ही विरहाने अत्यंत व्याकूळ झालेली पाहून तो क्षण हनुमानाला कल्पाप्रमाणे वाटला.॥ ६ ॥

सो०—**कपि करि हृदयँ बिचार दीन्हि मुद्रिका डारि तब।**
**जनु असोक अंगार दीन्ह हरषि उठि कर गहेउ॥ १२॥**

मग हनुमानाने मनात विचार करून सीतेसमोर श्रीरामांची अंगठी टाकली. जणू काही अशोक वृक्षाने निखारा दिला, असे समजून सीतेने आनंदाने उठून ती हातात घेतली.॥ १२ ॥

**तब देखी मुद्रिका मनोहर। राम नाम अंकित अति सुंदर॥**
**चकित चितव मुदरी पहिचानी। हरष बिषाद हृदयँ अकुलानी॥**

तेव्हा तिला रामनामाने अंकित असलेली अत्यंत सुंदर व मनोहर अंगठी दिसली. अंगठी ओळखून सीता चकित होऊन तिच्याकडे पाहू लागली आणि हर्ष व विषाद यांमुळे तिचे हृदय व्याकूळ झाले.॥ १ ॥

**जीति को सकइ अजय रघुराई। माया तें असि रचि नहिं जाई॥**
**सीता मन बिचार कर नाना। मधुर बचन बोलेउ हनुमाना॥**

ती विचार करू लागली की, 'श्रीरामचंद्र हे तर अजेय आहेत, त्यांना कोण जिंकू शकणार? आणि मायेने असली दिव्य व चिन्मय अंगठी बनविता येत नाही.' सीता मनात अनेक प्रकारे विचार करीत होती. त्याचवेळी हनुमान मधुर वाणीने,॥ २ ॥

**रामचंद्र गुन बरनैं लागा। सुनतहिं सीता कर दुख भागा॥**
**लागीं सुनैं श्रवन मन लाई। आदिहु तें सब कथा सुनाई॥**

श्रीरामचंद्रांच्या गुणांचे वर्णन करू लागला. ते ऐकताच सीतेचे दु:ख पळून गेले. ती कान व मन लावून ते ऐकू लागली. हनुमानाने सुरवातीपासून सर्व कथा ऐकविली. ॥ ३ ॥

**श्रवनामृत जेहिं कथा सुहाई। कही सो प्रगट होति किन भाई॥**
**तब हनुमंत निकट चलि गयऊ। फिरि बैठीं मन बिसमय भयऊ॥**

सीता म्हणाली, 'ज्याने माझ्या कानांसाठी अमृतरूप ही सुंदर कथा सांगितली, त्या हे बंधो, तू प्रकट का होत नाहीस?' तेव्हा हनुमान तिच्याजवळ गेला. त्याला पाहून सीता तोंड फिरवून बसली. तिच्या मनात आश्चर्य भरले होते. ॥ ४ ॥

**राम दूत मैं मातु जानकी। सत्य सपथ करुनानिधान की॥**
**यह मुद्रिका मातु मैं आनी। दीन्हि राम तुम्ह कहँ सहिदानी॥**

हनुमान म्हणाला, 'हे जानकीमाते, मी श्रीरामांचा दूत आहे. करुणानिधान श्रीरामांच्या शपथेवर सत्य सांगतो. हे माते, ही अंगठी मीच आणली आहे. श्रीरामांनी ही तुझ्यासाठी ओळखीची खूण म्हणून दिलेली आहे. ॥ ५ ॥

**नर बानरहि संग कहु कैसें। कही कथा भइ संगति जैसें॥**

सीतेने विचारले, 'नर व वानराची मैत्री कशी झाली, ते सांग.' तेव्हा हनुमानाने संपूर्ण हकिगत सांगितली. ॥ ६ ॥

दो०—**कपि के बचन सप्रेम सुनि उपजा मन बिस्वास।**
**जाना मन क्रम बचन यह कृपासिंधु कर दास॥ १३॥**

हनुमानाचे प्रेमळ बोलणे ऐकून सीतेच्या मनात विश्वास वाटू लागला. हा कायावाचामनाने कृपासागर रघुनाथांचा दास आहे, हे तिने जाणले. ॥ १३ ॥

**हरिजन जानि प्रीति अति गाढ़ी। सजल नयन पुलकावलि बाढ़ी॥**
**बूड़त बिरह जलधि हनुमाना। भयहु तात मो कहुँ जलजाना॥**

भगवंतांचा सेवक आहे, असे समजल्यावर सीतेला त्याच्याबद्दल खूप प्रेम वाटू लागले. नेत्रांमध्ये अश्रू दाटून आले आणि शरीर अत्यंत पुलकित झाले. सीता म्हणाली, 'हे वत्स हनुमाना, विरहसागरात बुडत असलेल्या मला वाचवण्यासाठी तू जहाज बनून आलास. ॥ १ ॥

**अब कहु कुसल जाउँ बलिहारी। अनुज सहित सुख भवन खरारी॥**
**कोमलचित कृपाल रघुराई। कपि केहि हेतु धरी निठुराई॥**

मी तुझ्यावरून जीव ओवाळून टाकते. आता लहान बंधू लक्ष्मणासह खर राक्षसाचे शत्रू, सुखधाम असलेल्या प्रभूंचे क्षेम-कुशल सांग. श्रीरघुनाथ हे तर कोमल हृदयाचे व कृपाळू आहेत. मग हे हनुमाना, माझ्यावरच ते काय म्हणून निष्ठुर झाले?॥ २॥

**सहज बानि सेवक सुखदायक। कबहुँक सुरति करत रघुनायक॥**
**कबहुँ नयन मम सीतल ताता। होइहहिं निरखि स्याम मृदु गाता॥**

सेवकाला सुख देणे हे त्यांचे ब्रीद आहे. ते श्रीरघुनाथ कधी माझी आठवण काढतात काय? हे तात, त्यांचे कोमल सावळे रूप पाहून माझे नेत्र कधी तृप्त होतील काय?'॥ ३॥

**बचनु न आव नयन भरे बारी। अहह नाथ हौं निपट बिसारी॥**
**देखि परम बिरहाकुल सीता। बोला कपि मृदु बचन बिनीता॥**

सीतेच्या मुखातून शब्द फुटत नव्हता. नेत्रांमध्ये विरहाचे अश्रू भरून आले. ती दुःखाने म्हणाली, 'हे नाथ, तुम्ही मला अगदीच विसरून गेलात.' सीतेला विरहाने अतिशय व्याकूळ झाल्याचे पाहून हनुमान कोमल व नम्र वाणीने म्हणाला,॥ ४॥

**मातु कुसल प्रभु अनुज समेता। तव दुख दुखी सुकृपा निकेता॥**
**जनि जननी मानहु जियँ ऊना। तुम्ह ते प्रेमु राम कें दूना॥**

'हे माते, सुंदर कृपेचे धाम असलेले प्रभू बंधू लक्ष्मणासह सुखरूप आहेत, परंतु ते तुझ्या दुःखामुळे दुःखी आहेत. हे माते, मनात दुःख करू नकोस. श्रीरामांच्या मनात तुझ्याहून दुप्पट प्रेम आहे.॥ ५॥

दो०—**रघुपति कर संदेसु अब सुनु जननी धरि धीर।**
**अस कहि कपि गदगद भयउ भरे बिलोचन नीर॥ १४॥**

हे माते, आता धीर धरून श्रीरामांचा निरोप ऐक.' असे म्हणून हनुमान प्रेमाने सद्‌गदित झाला. त्याच्या डोळ्यांत प्रेमाश्रू दाटले.॥ १४॥

**कहेउ राम बियोग तव सीता। मो कहुँ सकल भए बिपरीता॥**
**नव तरु किसलय मनहुँ कृसानू। कालनिसा सम निसि ससि भानू॥**

हनुमान म्हणाला, 'श्रीरामचंद्रांनी सांगितले आहे की, हे सीते, तुझ्या वियोगामुळे माझ्यासाठी सर्व पदार्थ प्रतिकूल झालेले आहेत. वृक्षांची नवीन कोमल पालवी जणू अग्नीसारखी, रात्र ही कालरात्रीसारखी, चंद्र सूर्यासारखा,॥ १॥

**कुबलय बिपिन कुंतबन सरिसा। बारिद तपत तेल जनु बरिसा॥**
**जे हित रहे करत तेइ पीरा। उरग स्वास सम त्रिबिध समीरा॥**

आणि कमळांची वने ही भाल्यांच्या वनासारखी झालेली आहेत. मेघ जणू उकळते तेल ओतत

आहेत. जे हितकारक होते ते आता सतावू लागले आहेत. त्रिविध हवा सापाच्या फुत्कारासारखी विषारी व गरम झाली आहे.॥ २॥

**कहेहू तें कछु दुख घटि होई। काहि कहौं यह जान न कोई॥**
**तत्व प्रेम कर मम अरु तोरा। जानत प्रिया एकु मनु मोरा॥**

मनातले दुःख सांगून टाकल्याने काहीसे कमी होते, परंतु सांगू कुणाला? माझे हे दुःख कुणी जाणत नाही. हे प्रिये, माझ्या व तुझ्या प्रेमाचे रहस्य एक माझे मनच जाणते.॥ ३॥

**सो मनु सदा रहत तोहि पाहीं। जानु प्रीति रसु एतनेहि माहीं॥**
**प्रभु संदेसु सुनत बैदेही। मगन प्रेम तन सुधि नहिं तेही॥**

आणि ते तर नेहमी तुझ्याजवळ असते. बस्स, माझ्या प्रेमाचे सार एवढ्यातच काय ते समज.' प्रभूंचा निरोप ऐकताच जानकी प्रेम-मग्न झाली. ती देहभान विसरली.॥ ४॥

**कह कपि हृदयँ धीर धरु माता। सुमिरु राम सेवक सुखदाता॥**
**उर आनहु रघुपति प्रभुताई। सुनि मम बचन तजहु कदराई॥**

हनुमान म्हणाला, 'हे माते, मनात धीर धर आणि सेवकांना सुख देणाऱ्या श्रीरामांचे स्मरण कर. श्रीरघुनाथांची प्रभुता आठव आणि माझे बोलणे ऐकून भय सोडून दे.॥ ५॥

दो०—**निसिचर निकर पतंग सम रघुपति बान कृसानु।**
**जननी हृदयँ धीर धरु जरे निसाचर जानु॥ १५॥**

राक्षसांचे समूह हे पतंग-कीटकांप्रमाणे आहेत आणि रघुनाथांचे बाण हे अग्नीसारखे आहेत. हे माते, धीर धर आणि राक्षस जळून खाक झाले, असे समज.॥ १५॥

**जौं रघुबीर होति सुधि पाई। करते नहिं बिलंबु रघुराई॥**
**राम बान रबि उएँ जानकी। तम बरूथ कहँ जातुधान की॥**

श्रीरामांना जर तुझी वार्ता कळली असती, तर त्यांनी उशीर लावला नसता. हे जानकी, रामबाणरूपी सूर्य उदित झाल्यावर राक्षस-सेनारूपी अंधकार कसा राहील?॥ १॥

**अबहिं मातु मैं जाउँ लवाई। प्रभु आयसु नहिं राम दोहाई॥**
**कछुक दिवस जननी धरु धीरा। कपिन्ह सहित अइहहिं रघुबीरा॥**

हे माते, मी तुला आत्ता येथून घेऊन जाईन, परंतु श्रीरामांची शपथ सांगतो, मला प्रभूंची तशी आज्ञा नाही. म्हणून हे माते, आणखी काही दिवस धीर धर. श्रीरामचंद्र वानरांसह येथे येतील,॥ २॥

**निसिचर मारि तोहि लै जैहहिं। तिहुँ पुर नारदादि जसु गैहहिं॥**
**हैं सुत कपि सब तुम्हहि समाना। जातुधान अति भट बलवाना॥**

आणि राक्षसांना मारून तुला घेऊन जातील. नारदादी ऋषि-मुनी तिन्ही लोकांमध्ये त्यांची कीर्ती गातील.' सीता म्हणाली, 'हे वत्सा, सर्व वानर तुझ्यासारखेच लहान-लहान असणार. राक्षस हे तर बलवान योद्धे आहेत.॥ ३॥

**मोरें हृदय परम संदेहा। सुनि कपि प्रगट कीन्हि निज देहा॥**
**कनक भूधराकार सरीरा। समर भयंकर अतिबल बीरा॥**

म्हणून माझ्या मनात मोठी शंका येते की, तुझ्यासारखे वानर राक्षसांना कसे जिंकतील?' हे ऐकून हनुमानाने आपले शरीर प्रकट केले. सुवर्ण पर्वत सुमेरूच्या आकाराचे ते अत्यंत विशाल शरीर होते. ते युद्धामध्ये शत्रूंच्या हृदयात धडकी भरणारे अत्यंत बलवान व वीर होते.॥ ४॥

**सीता मन भरोस तब भयऊ। पुनि लघु रूप पवनसुत लयऊ॥**

ते पाहून सीतेला खात्री पटली. हनुमानाने पुन्हा आपले छोटे रूप धारण केले.॥ ५॥

दो०—**सुनु माता साखामृग नहिं बल बुद्धि बिसाल।**
**प्रभु प्रताप तें गरुड़हि खाइ परम लघु ब्याल॥ १६॥**

हे माते, वानरांमध्ये बल-बुद्धी नसते, परंतु प्रभूंच्या प्रतापामुळे छोटा सर्पसुद्धा गरुडाला खाऊ शकतो.'॥ १६॥

**मन संतोष सुनत कपि बानी। भगति प्रताप तेज बल सानी॥**
**आसिष दीन्हि रामप्रिय जाना। होहु तात बल सील निधाना॥**

भक्ती, प्रताप, तेज व बलाने परिपूर्ण असलेले ते हनुमानाचे बोलणे ऐकून सीतेच्या मनाला संतोष वाटला. तिने श्रीरामांचा आवडता असल्याचे मानून हनुमानाला आशीर्वाद दिला की, 'हे वत्सा, तू बल व शीलाचे निधान होशील.॥ १॥

**अजर अमर गुननिधि सुत होहू। करहुँ बहुत रघुनायक छोहू॥**
**करहुँ कृपा प्रभु अस सुनि काना। निर्भर प्रेम मगन हनुमाना॥**

हे वत्सा, तू अजर, अमर आणि गुणांचे भांडार होशील. श्रीरघुनाथ तुझ्यावर खूप कृपा करोत.' 'प्रभू कृपा करोत', असे कानांनी ऐकताच हनुमान प्रगाढ प्रेमामध्ये मग्न झाला.॥ २॥

**बार बार नाएसि पद सीसा। बोला बचन जोरि कर कीसा॥**
**अब कृतकृत्य भयउँ मैं माता। आसिष तव अमोघ बिख्याता॥**

हनुमानाने वारंवार आपले मस्तक सीतेच्या चरणी नम्र केले आणि हात जोडून तो म्हणाला, 'हे माते, आज मी कृतार्थ झालो. तुझा आशीर्वाद सफळ होतो, ही गोष्ट प्रसिद्ध आहे.॥ ३॥

**सुनहु मातु मोहि अतिसय भूखा। लागि देखि सुंदर फल रूखा॥**
**सुनु सुत करहिं बिपिन रखवारी। परम सुभट रजनीचर भारी॥**

हे माते, येथील फळांचे वृक्ष पाहून मला फारच भूक लागली आहे.' सीता म्हणाली, 'वत्सा, फार मोठे राक्षस या वनाची रखवाली करतात.'॥ ४॥

**तिन्ह कर भय माता मोहि नाहीं। जौं तुम्ह सुख मानहु मन माहीं॥**

हनुमान म्हणाला, 'माते, तुला आनंद वाटत असेल, तर मला आज्ञा दे. मला त्यांचे मुळीच भय वाटत नाही.'॥ ५॥

दो०—**देखि बुद्धि बल निपुन कपि कहेउ जानकीं जाहु।**
**रघुपति चरन हृदयँ धरि तात मधुर फल खाहु॥ १७॥**

हनुमानाचे बुद्धी व बल यांमधील नैपुण्य पाहून जानकी म्हणाली, 'जा, बाळा!, श्रीरघुनाथांचे चरण हृदयी धरून गोड फळे खा.'॥ १७॥

**चलेउ नाइ सिरु पैठेउ बागा। फल खाएसि तरु तोरैं लागा॥**
**रहे तहाँ बहु भट रखवारे। कछु मारेसि कछु जाइ पुकारे॥**

सीतेपुढे नतमस्तक होऊन तो निघाला आणि बागेत घुसला. फळे खाल्ली आणि तो वृक्ष मोडू लागला. तेथे बरेच योद्धे रखवालदार होते. त्यांपैकी काहींना त्याने मारून टाकले आणि काहींनी जाऊन रावणाला सांगितले की,॥ १॥

**नाथ एक आवा कपि भारी। तेहिं असोक बाटिका उजारी॥**
**खाएसि फल अरु बिटप उपारे। रच्छक मर्दि मर्दि महि डारे॥**

'महाराज!, एक मोठा वानर आलेला आहे. त्याने अशोकवाटिका उध्वस्त केली. फळे खाल्ली, वृक्ष उपटले आणि रखवालदारांचे मर्दन करून त्यांना खाली पाडले.'॥ २॥

**सुनि रावन पठए भट नाना। तिन्हहि देखि गर्जेउ हनुमाना॥**
**सब रजनीचर कपि संघारे। गए पुकारत कछु अधमारे॥**

हे ऐकल्यावर रावणाने पुष्कळसे योद्धे पाठविले. त्यांना पाहून हनुमानाने गर्जना केली. त्याने सर्व राक्षसांना मारून टाकले. जे अर्धमेले झाले होते, ते ओरडत निघून गेले.॥ ३॥

**पुनि पठयउ तेहिं अच्छकुमारा। चला संग लै सुभट अपारा॥**
**आवत देखि बिटप गहि तर्जा। ताहि निपाति महाधुनि गर्जा॥**

मग रावणाने अक्षकुमाराला पाठविले. तो असंख्य बलाढ्य योद्धे घेऊन निघाला. त्याला येताना पाहून हनुमानाने हातात एक वृक्ष घेऊन त्याला आह्वान दिले आणि त्याला मारून मोठ्या जोराने गर्जना केली.॥ ४॥

दो०—**कछु मारेसि कछु मर्देसि कछु मिलएसि धरि धूरि।**
**कछु पुनि जाइ पुकारे प्रभु मर्कट बल भूरि॥ १८॥**

त्याने सेनेतील काहींना मारले, काहींना चिरडले आणि काहींना पकडून धुळीला मिळविले. काहींनी पुन्हा रावणापाशी जाऊन धावा केला की, 'हे प्रभू, वानर फार बलवान आहे.'॥ १८॥

**सुनि सुत बध लंकेस रिसाना। पठएसि मेघनाद बलवाना॥**
**मारसि जनि सुत बाँधेसु ताही। देखिअ कपिहि कहाँ कर आही॥**

पुत्राचा वध झाल्याचे ऐकून रावण क्रुद्ध झाला आणि त्याने आपला ज्येष्ठ पुत्र मेघनाद याला पाठवून दिले. तो त्याला म्हणाला, 'हे पुत्रा, त्याला न मारता बांधून घेऊन ये. त्या वानराला पाहूया तरी, तो कुठला आहे ते.'॥ १॥

**चला इंद्रजित अतुलित जोधा। बंधु निधन सुनि उपजा क्रोधा॥**
**कपि देखा दारुन भट आवा। कटकटाइ गर्जा अरु धावा॥**

इंद्राला जिंकणारा अतुलनीय योद्धा मेघनाद निघाला. आपला भाऊ मारला गेल्याचे ऐकून त्याला खूप क्रोध आला होता. हनुमानाने पाहिले की, आता भयानक योद्धा येत आहे. तेव्हा दात ओठ खाऊन त्याने गर्जना केली व तो धावून गेला.॥ २॥

**अति बिसाल तरु एक उपारा। बिरथ कीन्ह लंकेस कुमारा॥**
**रहे महाभट ताके संगा। गहि गहि कपि मर्दइ निज अंगा॥**

त्याने एक फार मोठा वृक्ष उपटून घेतला आणि त्याच्या प्रहाराने लंकेश्वर रावणाचा मुलगा मेघनाद याचा रथ मोडून त्याला खाली पाडले. त्याच्याबरोबर जे मोठमोठे योद्धे होते, त्यांना पकडून हनुमान आपल्या हातांनी बदडू लागला.॥ ३॥

**तिन्हहि निपाति ताहि सन बाजा। भिरे जुगल मानहुँ गजराजा॥**
**मुठिका मारि चढ़ा तरु जाई। ताहि एक छन मुरुछा आई॥**

त्या सर्वांना मारून मग तो मेघनादाशी लढू लागला. लढताना असे वाटत होते की, जणू दोन हत्ती भिडले आहेत. हनुमान त्याला एक ठोसा मारून वृक्षावर जाऊन बसला. मेघनादाला क्षणभर मूर्च्छा आली.॥ ४॥

**उठि बहोरि कीन्हिसि बहु माया। जीति न जाइ प्रभंजन जाया॥**

पुन्हा उठून त्याने माया सोडली, परंतु पवन-पुत्राला त्याला जिंकता आले नाही.॥ ५॥

दो०—**ब्रह्म अस्त्र तेहि साँधा कपि मन कीन्ह बिचार।**
**जौं न ब्रह्मसर मानउँ महिमा मिटइ अपार॥ १९॥**

शेवटी त्याने ब्रह्मास्त्राचा उपयोग केला. हनुमानाने मनात विचार केला की, जर मी ब्रह्मास्त्राचा मान ठेवला नाही, तर त्याचा अपार महिमा नष्ट होईल. ॥ १९ ॥

**ब्रह्मबान कपि कहुँ तेहिं मारा। परतिहुँ बार कटकु संघारा॥**
**तेहिं देखा कपि मुरुछित भयऊ। नागपास बाँधेसि लै गयऊ॥**

मेघनादाने हनुमानाला ब्रह्मबाण मारला. तो लागताच हनुमान वृक्षावरून खाली पडला. परंतु खाली पडतानाही त्याने बरीचशी सेना मारून टाकली. मेघनादाने जेव्हा पाहिले की, हनुमान मूर्च्छित झाला आहे, तेव्हा तो त्याला नागपाशाने बांधून घेऊन गेला. ॥ १ ॥

**जासु नाम जपि सुनहु भवानी। भव बंधन काटहिं नर ग्यानी॥**
**तासु दूत कि बंध तरु आवा। प्रभु कारज लगि कपिहिं बँधावा॥**

शिव म्हणतात, ‘हे भवानी, ज्यांचे नाम जपून विवेकी मनुष्य जन्म-मरणाची बंधने तोडून टाकतो, त्याचा दूत कधी बंधनात सापडेल काय? परंतु प्रभूच्या कार्यासाठी हनुमानाने स्वतःला बांधून घेतले. ॥ २ ॥

**कपि बंधन सुनि निसिचर धाए। कौतुक लागि सभाँ सब आए॥**
**दसमुख सभा दीखि कपि जाई। कहि न जाइ कछु अति प्रभुताई॥**

वानराला बांधल्याचे ऐकून राक्षस धावले, आणि गंमत पाहण्यास सर्वजण सभेत आले. हनुमानाने जाऊन रावणाची सभा पाहिली. तिचे ऐश्वर्य अवर्णनीय होते. ॥ ३ ॥

**कर जोरें सुर दिसिप बिनीता। भृकुटि बिलोकत सकल सभीता॥**
**देखि प्रताप न कपि मन संका। जिमि अहिगन महुँ गरुड़ असंका॥**

देव व दिक्पाल हात जोडून मोठ्या नम्रतेने भयभीत होऊन रावणाच्या इशाऱ्यांकडे पाहात होते. त्याचा असा प्रताप पाहूनही हनुमानाच्या मनाला जराही भीती वाटली नाही. तो सापांच्या समूहात गरुड निर्भयपणे उभा असतो, त्याप्रमाणे उभा होता. ॥ ४ ॥

दो०—**कपिहि बिलोकि दसानन बिहसा कहि दुर्बाद।**
**सुत बध सुरति कीन्हि पुनि उपजा हृदयँ बिषाद॥ २०॥**

हनुमानाला पाहताच रावणाने अपशब्द बोलून त्याचा उपहास केला. मग पुत्र-वधाची आठवण झाली, तेव्हा त्याच्या मनात विषाद उत्पन्न झाला. ॥ २० ॥

**कह लंकेस कवन तैं कीसा। केहि कें बल घालेहि बन खीसा॥**
**की धौं श्रवन सुनेहि नहिं मोही। देखउँ अति असंक सठ तोही॥**

लंकापती रावण म्हणाला, 'अरे वानरा! तू कोण आहेस? कुणाच्या जोरावर तू वन उजाड करून नष्ट केलेस? तू कधी माझे नाव व कीर्ती कानांनी ऐकली नाहीस काय? अरे नीचा! मला तर तू निर्भय दिसत आहेस. ॥ १ ॥

**मारे निसिचर केहिं अपराधा। कहु सठ तोहि न प्रान कइ बाधा॥**
**सुनु रावन ब्रह्मांड निकाया। पाइ जासु बल बिरचति माया॥**

कोणत्या अपराधाबद्दल तू राक्षसांना मारलेस? अरे मूर्खा, सांग. तुला प्राण जाण्याची भीती वाटत नाही काय?' हनुमान म्हणाला, 'अरे रावणा, ऐकून घे. ज्यांच्या जोरावर माया ही संपूर्ण ब्रह्मांडांच्या समूहांची निर्मिती करते, ॥ २ ॥

**जाकें बल बिरंचि हरि ईसा। पालत सृजत हरत दससीसा॥**
**जा बल सीस धरत सहसानन। अंडकोस समेत गिरि कानन॥**

ज्यांच्या बळाने हे दशमुखा! ब्रह्मदेव, विष्णू व महेश हे सृष्टीचे सृजन, पालन व संहार करतात, ज्यांच्या बळावर सहस्रमुखी शेष पर्वत व वनांसहित समस्त ब्रह्मांडाला शिरावर धारण करतो, ॥ ३ ॥

**धरइ जो बिबिध देह सुरत्राता। तुम्ह से सठन्ह सिखावनु दाता॥**
**हर कोदंड कठिन जेहिं भंजा। तेहि समेत नृप दल मद गंजा॥**

जे देवांच्या रक्षणासाठी नाना प्रकारचे देह धारण करतात आणि जे तुझ्यासारख्या मूर्खाला धडा शिकविणारे आहेत, ज्यांनी शिवांचे कठोर धनुष्य मोडून टाकले आणि त्यासरशी राजांच्या समाजाचा गर्व चूर्ण करून टाकला, ॥ ४ ॥

**खर दूषन त्रिसिरा अरु बाली। बधे सकल अतुलित बलसाली॥**

ज्यांनी अतुलनीय बलवान अशा खर, दूषण, त्रिशिरा व वालीला मारले, ॥ ५ ॥

दो०—**जाके बल लवलेस तें जितेहु चराचर झारि।**
**तासु दूत मैं जा करि हरि आनेहु प्रिय नारि॥ २१ ॥**

ज्यांच्या लेशमात्र बळावर तू संपूर्ण चराचर जगताला जिंकून घेतलेस आणि ज्यांच्या प्रिय पत्नीला हरण करून तू घेऊन आलास, त्यांचाच मी दूत आहे. ॥ २१ ॥

**जानउँ मैं तुम्हारि प्रभुताई। सहसबाहु सन परी लराई॥**
**समर बालि सन करि जसु पावा। सुनि कपि बचन बिहसि बिहरावा॥**

तुझी महती मला चांगली ठाऊक आहे. सहस्रबाहूशी तुझी लढाई झाली होती आणि वालीशी युद्ध करून तू कीर्ती मिळविली होतीस.' हनुमानाचे हे टोमणे ऐकून रावणाने हसून तिकडे दुर्लक्ष केले. ॥ १ ॥

**खायउँ फल प्रभु लागी भूँखा। कपि सुभाव तें तोरेउँ रूखा॥**
**सब कें देह परम प्रिय स्वामी। मारहिं मोहि कुमारग गामी॥**

हे राक्षसराजा!, मला भूक लागली होती, म्हणून मी फळे खाल्ली आणि वानराच्या स्वभावाप्रमाणे मी वृक्ष मोडले. अरे निशाचरांच्या मालका, देह हा सर्वांनाच प्रिय आहे. कुमार्गावर जाणारे दुष्ट राक्षस जेव्हा मला मारू लागले, ॥ २ ॥

**जिन्ह मोहि मारा ते मैं मारे। तेहि पर बाँधेउँ तनयँ तुम्हारे॥**
**मोहि न कछु बाँधे कइ लाजा। कीन्ह चहउँ निज प्रभु कर काजा॥**

तेव्हा मीही त्यांना मारले. मग तुझ्या पुत्राने मला बांधून घातले. परंतु बंधनात पडल्याची मला लाज वाटत नाही, कारण मी आपल्या प्रभूचे काम करू इच्छितो. ॥ ३ ॥

**बिनती करउँ जोरि कर रावन। सुनहु मान तजि मोर सिखावन॥**
**देखहु तुम्ह निज कुलहि बिचारी। भ्रम तजि भजहु भगत भय हारी॥**

हे रावणा, मी हात जोडून तुला विनंती करतो. तू अभिमान सोडून माझे म्हणणे ऐक. तू आपल्या पवित्र कुळाचा विचार करून बघ. आणि भ्रम सोडून भक्तभयहारी भगवंतांना भज. ॥ ४ ॥

**जाकें डर अति काल डेराई। जो सुर असुर चराचर खाई॥**
**तासों बयरु कबहुँ नहिं कीजै। मोरे कहें जानकी दीजै॥**

देव, राक्षस आणि संपूर्ण चराचर यांना जो खाऊन टाकतो, तो कालसुद्धा ज्यांना घाबरतो, त्यांच्याशी कदापि वैर करू नकोस आणि माझ्या सांगण्याप्रमाणे जानकीला परत देऊन टाक. ॥ ५ ॥

दो०—**प्रनतपाल रघुनायक करुना सिंधु खरारि।**
**गएँ सरन प्रभु राखिहैं तव अपराध बिसारि॥ २२॥**

श्रीरघुनाथ हे शरणागतांचे रक्षक व दयेचे समुद्र आहेत. शरण गेल्यास ते तुझा अपराध विसरून तुला आपला आश्रय देतील. ॥ २२ ॥

**राम चरन पंकज उर धरहू। लंका अचल राजु तुम्ह करहू॥**
**रिषि पुलस्ति जसु बिमल मयंका। तेहि ससि महुँ जनि होहु कलंका॥**

तू श्रीरामांचे चरण-कमल हृदयात धारण कर व लंकेचे चिरकाळ राज्य कर. पुलस्त्य ऋषींची निर्मळ कीर्ती निर्मळ चंद्रासारखी आहे. तू त्या चंद्राचा कलंक बनू नकोस. ॥ १ ॥

**राम नाम बिनु गिरा न सोहा। देखु बिचारि त्यागि मद मोहा॥**
**बसन हीन नहिं सोह सुरारी। सब भूषन भूषित बर नारी॥**

रामनामाविना वाणीला शोभा नाही. मद-मोह सोड. विचार करून बघ. हे देवांच्या शत्रू, सर्व दागिन्यांनी नटलेली स्त्रीसुद्धा कपड्यांविना असेल तर शोभून दिसत नाही.॥ २॥

**राम बिमुख संपति प्रभुताई। जाइ रही पाई बिनु पाई॥**
**सजल मूल जिन्ह सरितन्ह नाहीं। बरषि गएँ पुनि तबहिं सुखाहीं॥**

रामविमुख पुरुषाची तिन्ही काळातीत संपत्ती आणि सत्ता व्यर्थ आहे. ज्या नद्यांच्या मुळाशी जलस्त्रोत नसेल, त्या पावसाळा संपल्यावर लगेच कोरड्या पडतात.॥ ३॥

**सुनु दसकंठ कहउँ पन रोपी। बिमुख राम त्राता नहिं कोपी॥**
**संकर सहस बिष्नु अज तोही। सकहिं न राखि राम कर द्रोही॥**

हे रावणा, मी प्रतिज्ञापूर्वक सांगतो की, रामविन्मुखाचे रक्षण करणारा कोणीही नाही. हजारो शंकर, विष्णू व ब्रह्मदेव हे सुद्धा श्रीरामांचा अपराध करणाऱ्याला वाचवू शकत नाहीत.॥ ४॥

दो०—**मोहमूल बहु सूल प्रद त्यागहु तम अभिमान।**
**भजहु राम रघुनायक कृपा सिंधु भगवान॥ २३॥**

मोह हाच ज्याचे मूळ आहे, असा फार पीडा देणारा तमोरूप अभिमान तू सोडून दे आणि रघुकुलाचे स्वामी, कृपेचे समुद्र भगवान श्रीरामचंद्राचे भजन कर.'॥ २३॥

**जदपि कही कपि अति हित बानी। भगति बिबेक बिरति नय सानी॥**
**बोला बिहसि महा अभिमानी। मिला हमहि कपि गुर बड़ ग्यानी॥**

जरी हनुमानाने भक्ती, ज्ञान, वैराग्य आणि नीती यांनी परिपूर्ण खूप हितकारक गोष्टी सांगितल्या, तरीही महाअहंकारी रावण हसत टोचून म्हणाला, 'आम्हांला हा वानर मोठा ज्ञानी गुरू भेटला. ॥ १॥

**मृत्यु निकट आई खल तोही। लागेसि अधम सिखावन मोही॥**
**उलटा होइहि कह हनुमाना। मतिभ्रम तोर प्रगट मैं जाना॥**

अरे दुष्टा, तुझा मृत्यू जवळ आला आहे. अधमा! मला शिकवायला निघालास!' हनुमान म्हणाला, 'याच्या उलट होणार आहे. तुझा मृत्यू जवळ आला आहे, माझा नव्हे. हा तुझ्या बुद्धीचा भ्रम आहे, हे मी प्रत्यक्ष जाणले आहे.॥ २॥

**सुनि कपि बचन बहुत खिसिआना। बेगि न हरहु मूढ़ कर प्राना॥**
**सुनत निसाचर मारन धाए। सचिवन्ह सहित बिभीषनु आए॥**

हनुमानाचे बोलणे ऐकून रावण फार चिडला आणि म्हणाला, 'अरे, या मूर्खाचे प्राण लवकर का घेत नाही?' हे ऐकताच राक्षस त्याला मारण्यासाठी धावले. त्याचवेळी मंत्र्यांच्या समवेत बिभीषण तेथे आला.॥ ३॥

**नाइ सीस करि बिनय बहूता। नीति बिरोध न मारिअ दूता॥**
**आन दंड कछु करिअ गोसाँई। सबहीं कहा मंत्र भल भाई॥**

त्याने नतमस्तक होऊन विनयाने रावणाला सांगितले की, 'दूताला मारू नये. हे नीतीच्या विरुद्ध आहे. हे राजन, दुसरी एखादी शिक्षा करावी.' सर्व म्हणाले, 'हा सल्ला उत्तम आहे.'॥ ४॥

**सुनत बिहसि बोला दसकंधर। अंग भंग करि पठइअ बंदर॥**

हे ऐकून रावण हसून म्हणाला, 'ठीक आहे. वानराची हाडे मोडून त्याला पाठवून द्यावे.॥ ५॥

दो०—**कपि कें ममता पूँछ पर सबहि कहउँ समुझाइ।**
**तेल बोरि पट बाँधि पुनि पावक देहु लगाइ॥ २४॥**

मी सर्वांना समजावून सांगतो की, वानराचे प्रेम त्याच्या शेपटीवर असते. म्हणून तेलात कपडे बुडवून ते याच्या शेपटीला गुंडाळा आणि आग लावून द्या.॥ २४॥

**पूँछहीन बानर तहँ जाइहि। तब सठ निज नाथहि लइ आइहि॥**
**जिन्ह कै कीन्हिसि बहुत बड़ाई। देखउँ मैं तिन्ह कै प्रभुताई॥**

जेव्हा शेपटीविना हा वानर आपल्या स्वामीजवळ जाईल, तेव्हा हा मूर्ख आपल्या मालकाला घेऊन येईल. ज्याचा याने फार मोठेपणा सांगितला आहे, जरा त्याचे सामर्थ्य तर मला पाहू द्या.'॥ १॥

**बचन सुनत कपि मन मुसुकाना। भइ सहाय सारद मैं जाना॥**
**जातुधान सुनि रावन बचना। लागे रचैं मूढ़ सोइ रचना॥**

हे ऐकताच हनुमान मनात हसला. तो मनात म्हणाला, 'सरस्वती ही अशी बुद्धी देण्यास साहाय्यक झाली आहे.' रावणाचे ऐकून मूर्ख राक्षस शेपटीला आग लावण्याची तयारी करू लागले.॥ २॥

**रहा न नगर बसन घृत तेला। बाढ़ी पूँछ कीन्ह कपि खेला॥**
**कौतुक कहँ आए पुरबासी। मारहिं चरन करहिं बहु हाँसी॥**

शेपटाला गुंडाळण्यासाठी इतके कपडे व तेल लागले की नगरामध्ये कापड, तूप आणि तेल उरले नाही. हनुमानाने अशी गंमत केली की, शेपटी वाढत गेली. नगरवासी लोक मजा पाहू लागले. ते हनुमानाला लाथा मारीत होते आणि त्याची चेष्टा करीत होते.॥ ३॥

**बाजहिं ढोल देहिं सब तारी। नगर फेरि पुनि पूँछ प्रजारी॥**
**पावक जरत देखि हनुमंता। भयउ परम लघुरूप तुरंता॥**

ढोल वाजत होते, लोक टाळ्या वाजवत होते. हनुमानाला तशा अवस्थेत नगरात फिरवून मग शेपटीला आग लावून दिली. अग्नी पेटल्याचे पाहून हनुमानाने एकदम छोटे रूप घेतले. ॥ ४ ॥

**निबुकि चढ़ेउ कपि कनक अटारीं। भईं सभीत निसाचर नारीं॥**

बंधनातून मुक्त होऊन तो सोन्याच्या गच्च्यांवर चढला. त्याला पाहून राक्षसांच्या स्त्रिया घाबरून गेल्या. ॥ ५ ॥

दो०—**हरि प्रेरित तेहि अवसर चले मरुत उनचास।**
**अट्टहास करि गर्जा कपि बढ़ि लाग अकास॥ २५॥**

त्यावेळी भगवंतांच्या प्रेरणेने एकोणपन्नासही वारे वाहू लागले. हनुमानाने खदखदा हसून गर्जना केली आणि आकार वाढवून तो आकाशाला टेकला. ॥ २५ ॥

**देह बिसाल परम हरुआई। मंदिर तें मंदिर चढ़ धाई॥**
**जरइ नगर भा लोग बिहाला। झपट लपट बहु कोटि कराला॥**

देह मोठा विशाल, पण फारच चपळ होता. तो धावत-धावत एका महालावरून, दुसऱ्या महालावर चढत होता. नगर जळू लागले, लोकांचे हाल होऊ लागले. आगीच्या कोट्यवधी भयंकर ज्वाळा अंगावर येऊ लागल्या. ॥ १ ॥

**तात मातु हा सुनिअ पुकारा। एहिं अवसर को हमहि उबारा॥**
**हम जो कहा यह कपि नहिं होई। बानर रूप धरें सुर कोई॥**

'अरे बाप रे, अग आई, यावेळी आम्हांला कोण वाचवणार?' चोहीकडे असाच ओरडा ऐकू येत होता. 'आम्ही पूर्वीच सांगितले होते की, हा वानर नसून वानराचे रूप घेतलेला कुणी देव आहे. ॥ २ ॥

**साधु अवग्या कर फलु ऐसा। जरइ नगर अनाथ कर जैसा॥**
**जारा नगरु निमिष एक माहीं। एक बिभीषन कर गृह नाहीं॥**

साधूच्या अपमानाचे असेच फळ असते. नगर अनाथांच्या नगराप्रमाणे जळत आहे.' हनुमानाने एकाच क्षणात संपूर्ण नगर जाळून टाकले. फक्त बिभीषणाचे घर जाळले नाही. ॥ ३ ॥

**ता कर दूत अनल जेहिं सिरिजा। जरा न सो तेहि कारन गिरिजा॥**
**उलटि पलटि लंका सब जारी। कूदि परा पुनि सिंधु मझारी॥**

शिव म्हणतात, 'हे पार्वती, ज्यांनी अग्नी निर्माण केला, त्यांचाच दूत हनुमान आहे. म्हणून तो अग्नीमुळे भाजला नाही. हनुमानाने आलटून-पालटून सर्व लंका जाळून टाकली. मग त्याने समुद्रात उडी घेतली. ॥ ४ ॥

दो०—**पूँछ बुझाइ खोइ श्रम धरि लघु रूप बहोरि।**
**जनकसुता कें आगें ठाढ़ भयउ कर जोरि॥ २६॥**

शेपूट विझवून, श्रमपरिहार करून मग लहान रूप घेतले व हनुमान जानकीपुढे हात जोडून उभा राहिला. ॥ २६ ॥

**मातु मोहि दीजे कछु चीन्हा। जैसें रघुनायक मोहि दीन्हा॥**
**चूड़ामनि उतारि तब दयऊ। हरष समेत पवनसुत लयऊ॥**

हनुमान म्हणाला, 'हे माते, रघुनाथांनी जशी मला खूण दिली होती, तशी ओळखीची वस्तू मला दे.' तेव्हा सीतेने केसातून चूडामणी काढून दिला. हनुमानाने मोठ्या आनंदाने तो घेतला. ॥ १ ॥

**कहेहु तात अस मोर प्रनामा। सब प्रकार प्रभु पूरनकामा॥**
**दीन दयाल बिरिदु संभारी। हरहु नाथ मम संकट भारी॥**

जानकी म्हणाली, 'हे वत्सा! प्रभूंना माझा प्रणाम निवेदन कर व असे सांग की, हे प्रभू, जरी तुम्ही सर्वप्रकारे पूर्णकाम आहात, तरी दीन-दुःखी लोकांवर दया करणे हे तुमचे ब्रीद आहे. मी दीन आहे, म्हणून ते ब्रीद आठवून हे नाथ, माझ्यावरील हे मोठे संकट दूर करा. ॥ २ ॥

**तात सक्रसुत कथा सुनाएहु। बान प्रताप प्रभुहि समुझाएहु॥**
**मास दिवस महुँ नाथु न आवा। तौ पुनि मोहि जिअत नहिं पावा॥**

हनुमंता! इंद्रपुत्र जयंताची घटना सांगून प्रभूंना आपल्या बाणाच्या प्रतापाची आठवण करून दे. जर महिन्याभरात नाथ आले नाहीत, तर मग मी जिवंत सापडणार नाही. ॥ ३ ॥

**कहु कपि केहि बिधि राखौं प्राना। तुम्हहू तात कहत अब जाना॥**
**तोहि देखि सीतलि भइ छाती। पुनि मो कहुँ सोइ दिनु सो राती॥**

हे हनुमाना, मी आपला प्राण कसा ठेवू? तूही आता जातो असे म्हणतोस. तुला पाहून मनाला शांतता लाभली होती. मला आता तेच दुःखाचे दिवस व रात्र.'॥ ४॥

दो०—**जनकसुतहि समुझाइ करि बहु बिधि धीरजु दीन्ह।**
**चरन कमल सिरु नाइ कपि गवनु राम पहिं कीन्ह॥ २७॥**

हनुमानाने जानकीला समजावून धीर दिला आणि तिच्या चरण-कमलांवर नतमस्तक होऊन तो श्रीरामांच्याकडे निघाला. ॥ २७॥

**चलत महाधुनि गर्जेसि भारी। गर्भ स्त्रवहिं सुनि निसिचर नारी॥**
**नाघि सिंधु एहि पारहि आवा। सबद किलिकिला कपिन्ह सुनावा॥**

जाताना त्याने प्रचंड गर्जना केली, ती ऐकून राक्षसी गर्भगळित झाल्या. समुद्र ओलांडून तो पलीकडच्या तीरावर पोहोचला. त्याने वानरांना हर्षध्वनी ऐकविला. ॥ १ ॥

**हरषे सब बिलोकि हनुमाना। नूतन जन्म कपिन्ह तब जाना॥**
**मुख प्रसन्न तन तेज बिराजा। कीन्हेसि रामचंद्र कर काजा॥**

हनुमानाला पाहून सर्वजण हर्षभरित झाले आणि तेव्हा वानरांना जणू नवा जन्म मिळाला. हनुमानाचे मुख प्रसन्न होते आणि शरीर सतेज होते. त्यामुळे त्यांना समजले की, याने श्रीरामचंद्रांचे काम पूर्ण केले आहे. ॥ २ ॥

**मिले सकल अति भए सुखारी। तलफत मीन पाव जिमि बारी॥**
**चले हरषि रघुनायक पासा। पूँछत कहत नवल इतिहासा॥**

सर्वजण हनुमानाला भेटले आणि सर्वांना समाधान झाले, जणू तडफडणाऱ्या माशांना पाणी मिळाले. सर्वजण नवीन वृत्तांत विचारत-सांगत श्रीरघुनाथांच्याजवळ गेले. ॥ ३ ॥

**तब मधुबन भीतर सब आए। अंगद संमत मधु फल खाए॥**
**रखवारे जब बरजन लागे। मुष्टि प्रहार हनत सब भागे॥**

मग सर्वजण मधुवनात गेले आणि अंगदाच्या अनुमतीने त्या सर्वांनी मध व फळे खाल्ली. जेव्हा रखवालदार त्यांना मनाई करू लागले, तेव्हा ठोसे मारताच ते पळून गेले. ॥ ४ ॥

**दो०—जाइ पुकारे ते सब बन उजार जुबराज।**
**सुनि सुग्रीव हरष कपि करि आए प्रभु काज॥ २८॥**

सर्वांनी जाऊन ओरडून सांगितले की, अंगद मधुवन उध्वस्त करीत आहे. हे ऐकून सुग्रीवाला आनंद झाला की, वानर प्रभूंचे कार्य करून आले आहेत. ॥ २८ ॥

**जौं न होति सीता सुधि पाई। मधुबन के फल सकहिं कि खाई॥**
**एहि बिधि मन बिचार कर राजा। आइ गए कपि सहित समाजा॥**

जर सीतेची वार्ता मिळाली नसती, तर त्यांनी मधुवनातील फळे कशी खाल्ली असती? अशा प्रकारे राजा सुग्रीव मनात विचार करीत होता. एवढ्यात वानर-समूह आला. ॥ १ ॥

**आइ सबन्हि नावा पद सीसा। मिलेउ सबन्हि अति प्रेम कपीसा॥**
**पूँछी कुसल कुसल पद देखी। राम कृपाँ भा काजु बिसेषी॥**

सर्वांनी सुग्रीवाच्या चरणी मस्तक नमविले. कपिराज सुग्रीव मोठ्या प्रेमाने सर्वांना भेटला. त्याने खुशाली विचारली, तेव्हा वानरांनी सांगितले की, 'तुमच्या दर्शनाने सर्व कुशल आहे. श्रीरामांच्या कृपेमुळे कार्य यशस्वी झाले. ॥ २ ॥

**नाथ काजु कीन्हेउ हनुमाना। राखे सकल कपिन्ह के प्राना॥**
**सुनि सुग्रीव बहुरि तेहि मिलेऊ। कपिन्ह सहित रघुपति पहिं चलेऊ॥**

हे नाथ, हनुमानानेच सर्व काम पार पाडले आणि वानरांचे प्राण वाचविले.' हे ऐकून सुग्रीव हनुमानाला पुन्हा भेटला आणि सर्व वानरांसह ते श्रीरघुनाथांच्याजवळ गेले. ॥ ३ ॥

**राम कपिन्ह जब आवत देखा। किएँ काजु मन हरष बिसेषा॥**
**फटिक सिला बैठे द्वौ भाई। परे सकल कपि चरनन्हि जाई॥**

श्रीरामांनी पाहिले की, वानर काम पुरे करून येत आहेत, तेव्हा त्यांच्या मनाला खूप आनंद झाला. दोघे बंधू स्फटिकशिळेवर बसले होते. सर्व वानर त्यांच्या पाया पडले.॥ ४॥

दो०—**प्रीति सहित सब भेटे रघुपति करुना पुंज।**
**पूँछी कुसल नाथ अब कुसल देखि पद कंज॥ २९॥**

दयेची राशी असलेले श्रीरघुनाथ मोठ्या प्रेमाने सर्वांना मिठी मारून भेटले आणि त्यांनी क्षेम-कुशल विचारले. वानर म्हणाले, 'हे नाथ, तुमच्या चरण-कमलांचे दर्शन घडल्याने आता सर्व क्षेम आहे.'॥ २९॥

**जामवंत कह सुनु रघुराया। जा पर नाथ करहु तुम्ह दाया॥**
**ताहि सदा सुभ कुसल निरंतर। सुर नर मुनि प्रसन्न ता ऊपर॥**

जांबवानाने म्हटले, 'हे रघुनाथ, ऐका. हे नाथ, ज्याच्यावर तुम्ही दया करता, त्याचे कल्याण व क्षेम नित्य असते. देव, मनुष्य आणि मुनी सर्वजण त्याच्यावर प्रसन्न असतात.॥ १॥

**सोइ बिजई बिनई गुन सागर। तासु सुजसु त्रैलोक उजागर॥**
**प्रभु कीं कृपा भयउ सबु काजू। जन्म हमार सुफल भा आजू॥**

तोच विजयी, तोच विनयी आणि तोच गुणांचा समुद्र बनतो. त्याचीच उत्तम कीर्ती त्रैलोक्यात पसरते. प्रभूंच्या कृपेने सर्व कार्य झाले. आज आमचा जन्म सफळ झाला.॥ २॥

**नाथ पवनसुत कीन्हि जो करनी। सहसहुँ मुख न जाइ सो बरनी॥**
**पवनतनय के चरित सुहाए। जामवंत रघुपतिहि सुनाए॥**

हे नाथ, पवनपुत्र हनुमानाची जी कामगिरी आहे, तिचे वर्णन हजार मुखांनीही करता येणार नाही.' मग जांबुवानाने हनुमानाची उत्कृष्ट कामगिरी श्रीरघुनाथांना सांगितली.॥ ३॥

**सुनत कृपानिधि मन अति भाए। पुनि हनुमान हरषि हियँ लाए॥**
**कहहु तात केहि भाँति जानकी। रहति करति रच्छा स्वप्रान की॥**

हनुमानाची कामगिरी ऐकून कृपानिधी श्रीरामचंद्रांच्या मनाला खूप समाधान वाटले. त्यांनी आनंदाने हनुमानाला पुन्हा आलिंगन दिले आणि म्हटले, 'वत्सा, सांग. सीता कशी आहे, आणि ती आपल्या प्राणांचे रक्षण कसे करते.?॥ ४॥

दो०—**नाम पाहरू दिवस निसि ध्यान तुम्हार कपाट।**
**लोचन निज पद जंत्रित जाहिं प्रान केहिं बाट॥ ३०॥**

हनुमान म्हणाला, ‘तुमचे नाम रात्रंदिवस तिच्यावर पहारा देते आणि तुमचे ध्यान तिच्यासाठी दरवाजा आहे. ती आपले नेत्र नेहमी आपल्या चरणी लावते, ते कुलूप आहे. मग प्राण जाणार कुठल्या मार्गाने? ॥ ३० ॥

**चलत मोहि चूड़ामनि दीन्ही। रघुपति हृदयँ लाइ सोइ लीन्ही॥**
**नाथ जुगल लोचन भरि बारी। बचन कहे कछु जनककुमारी॥**

येताना मला तिने चूडामणी काढून दिला.’ तो श्रीरामांनी आपल्या हृदयी धरला. मग हनुमान म्हणाला, ‘हे नाथ, दोन्ही डोळ्यांत पाणी आणून जानकीने मला सांगितले की, ॥ १ ॥

**अनुज समेत गहेहु प्रभु चरना। दीन बंधु प्रनतारति हरना॥**
**मन क्रम बचन चरन अनुरागी। केहिं अपराध नाथ हौं त्यागी॥**

‘लक्ष्मणासह प्रभूंचे चरण धरून सांग की, तुम्ही दीनबंधू आहात. शरणागतांचे दुःख हरण करणारे आहात आणि मी कायावाचामनाने तुमच्याच चरणांवर प्रेम करते. मग हे स्वामी, तुम्ही कोणत्या कारणामुळे माझा त्याग केलात? ॥ २ ॥

**अवगुन एक मोर मैं माना। बिछुरत प्रान न कीन्ह पयाना॥**
**नाथ सो नयनन्हि को अपराधा। निसरत प्रान करहिं हठि बाधा॥**

मी आपला एक दोष नक्की मानते की, वियोग होताच माझे प्राण गेले नाहीत. परंतु हे नाथ, हा माझ्या नेत्रांचा अपराध आहे. प्राण जाण्यात ते जबरदस्तीने बाधा आणतात. ॥ ३ ॥

**बिरह अगिनि तनु तूल समीरा। स्वास जरइ छन माहिं सरीरा॥**
**नयन स्त्रवहिं जलु निज हित लागी। जरैं न पाव देह बिरहागी॥**

विरह हा अग्नी आहे, शरीर हा कापूस आहे आणि श्वास हा वारा आहे. म्हणून हे शरीर क्षणात जळू शकते. परंतु नेत्र प्रभूंच्या स्वरूपाचे दर्शन घेण्याच्या स्वार्थासाठी अश्रुजलाचा वर्षाव करतात. त्यामुळे विरहाच्या आगीने देह जळू शकत नाही. ॥ ४ ॥

**सीता कै अति बिपति बिसाला। बिनहिं कहें भलि दीनदयाला॥**

सीतेची विपत्ती फार मोठी आहे. हे दीनदयाळा! ती न सांगणेच चांगले. (सांगितली तर आपल्यालाच क्लेश होतील.) ॥ ५ ॥

दो०—**निमिष निमिष करुनानिधि जाहिं कलप सम बीति।**
**बेगि चलिअ प्रभु आनिअ भुज बल खल दल जीति॥ ३१ ॥**

हे करुणानिधान, तिचा एक एक क्षण कल्पासारखा जात आहे. म्हणून हे प्रभू, लगेच चला आणि आपल्या भुजबलाने दुष्टांचे सैन्य जिंकून सीतेला घेऊन या.’ ॥ ३१ ॥

**सुनि सीता दुख प्रभु सुख अयना। भरि आए जल राजिव नयना॥**
**बचन कायँ मन मम गति जाही। सपनेहुँ बूझिअ बिपति की ताही॥**

सीतेचे दु:ख ऐकून सुखाचे धाम असलेल्या प्रभूंचे कमलनेत्र पाण्याने डबडबले. ते म्हणाले, 'कायावाचामनाने जिला माझाच आश्रय आहे, तिला स्वप्नातही विपत्ती येऊ शकेल काय?'॥ १॥

**कह हनुमंत बिपति प्रभु सोई। जब तव सुमिरन भजन न होई॥**
**केतिक बात प्रभु जातुधान की। रिपुहि जीति आनिबी जानकी॥**

हनुमान म्हणाला, 'हे प्रभो, विपत्ती तेव्हाच येते, जेव्हा तुमचे भजन-स्मरण नसेल. हे प्रभो, राक्षसांचे ते काय? तुम्ही शत्रूला जिंकून जानकीला घेऊन याल.'॥ २॥

**सुनु कपि तोहि समान उपकारी। नहिं कोउ सुर नर मुनि तनुधारी॥**
**प्रति उपकार करौं का तोरा। सनमुख होइ न सकत मन मोरा॥**

भगवान म्हणाले, 'हे हनुमाना, ऐक. तुझ्यासारखा माझ्यावर उपकार करणारा देव, मनुष्य किंवा मुनी असा कोणीही देहधारी नाही. मी तुला या उपकाराबद्दल काय देणार? माझे मनही तुझ्यासमोर यायला धजावत नाही.॥ ३॥

**सुनु सुत तोहि उरिन मैं नाहीं। देखेउँ करि बिचार मन माहीं॥**
**पुनि पुनि कपिहि चितव सुरत्राता। लोचन नीर पुलक अति गाता॥**

हे वत्सा, मी मनात खूप विचार करून पाहिला परंतु मी तुझ्या ऋणातून मुक्त होऊ शकत नाही.' देवांचे रक्षक प्रभू वारंवार हनुमानाकडे पाहात होते. त्यांच्या नेत्रांत प्रेमाश्रू भरून आले होते आणि त्यांचे शरीर पुलकित झाले होते.॥ ४॥

दो०—**सुनि प्रभु बचन बिलोकि मुख गात हरषि हनुमंत।**
**चरन परेउ प्रेमाकुल त्राहि त्राहि भगवंत॥ ३२॥**

प्रभूंचे बोलणे ऐकून व त्यांचे प्रसन्न मुख आणि पुलकित अंग पाहून हनुमानाला आनंद झाला आणि प्रेमाने व्याकूळ होऊन तो म्हणाला, 'हे भगवन, माझे रक्षण करा, रक्षण करा.' असे म्हणत त्याने प्रभूंच्या चरणांवर लोटांगण घातले.॥ ३२॥

**बार बार प्रभु चहइ उठावा। प्रेम मगन तेहि उठब न भावा॥**
**प्रभु कर पंकज कपि कें सीसा। सुमिरि सो दसा मगन गौरीसा॥**

प्रभू त्याला वारंवार उठवू पाहात होते, परंतु प्रेमामध्ये बुडालेल्या हनुमानाला चरण सोडून उठावेसे वाटत नव्हते. प्रभूंचे कर-कमल हनुमानाच्या शिरावर होते. त्या स्थितीच्या आठवणीनेच शिव प्रेममग्न होऊन समाधिस्थ झाले.॥ १॥

**सावधान मन करि पुनि संकर। लागे कहन कथा अति सुंदर॥**
**कपि उठाइ प्रभु हृदयँ लगावा। कर गहि परम निकट बैठावा॥**

मग मन सावध करून शिवशंकर अत्यंत सुंदर गोष्ट सांगू लागले. हनुमानाला उठवून प्रभूंनी हृदयाशी धरले आणि हात धरून आपल्याजवळ बसविले.॥ २॥

**कहु कपि रावन पालित लंका। केहि बिधि दहेउ दुर्ग अति बंका॥**
**प्रभु प्रसन्न जाना हनुमाना। बोला बचन बिगत अभिमाना॥**

प्रभू म्हणाले, 'हनुमाना, सांग तर खरे, रावणाकडून सुरक्षित असलेली लंका आणि त्याचा दुर्गम दुर्ग तू कसा काय जाळलास?' प्रभू प्रसन्न आहेत, हे पाहून हनुमानाने कोणताही अभिमान न बाळगता सांगितले.॥ ३॥

**साखामृग कै बड़ि मनुसाई। साखा तें साखा पर जाई॥**
**नाघि सिंधु हाटकपुर जारा। निसिचर गन बधि बिपिन उजारा॥**

'वानराने एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर उडी मारणे, हाच त्याचा मोठा पुरुषार्थ आहे. मी समुद्र ओलांडून सोन्याचे नगर जाळले आणि राक्षसांना मारून अशोकवन उध्वस्त केले,॥ ४॥

**सो सब तव प्रताप रघुराई। नाथ न कछू मोरि प्रभुताई॥**

हे रघुनाथ, हा सर्व तुमचाच प्रताप आहे. हे नाथ, यात माझे काही मोठेपण नाही.॥ ५॥

दो०—**ता कहुँ प्रभु कछु अगम नहिं जा पर तुम्ह अनुकूल।**
**तव प्रभावँ बड़वानलहि जारि सकइ खलु तूल॥ ३३॥**

हे प्रभू, ज्याच्यावर तुम्ही प्रसन्न होता, त्याला काहीही कठीण नाही. तुमच्या प्रभावाने कापूससुद्धा वडवानलाला नक्कीच जाळू शकतो.॥ ३३॥

**नाथ भगति अति सुखदायनी। देहु कृपा करि अनपायनी॥**
**सुनि प्रभु परम सरल कपि बानी। एवमस्तु तब कहेउ भवानी॥**

हे नाथ, अत्यंत सुख देणारी आपली निश्चल भक्ती कृपा करून मला द्या.' हनुमानाचे ते सरळ बोलणे ऐकून, हे भवानी, प्रभू म्हणाले, 'तथास्तु'.॥ १॥

**उमा राम सुभाउ जेहिं जाना। ताहि भजनु तजि भाव न आना॥**
**यह संबाद जासु उर आवा। रघुपति चरन भगति सोइ पावा॥**

हे उमे, ज्याने श्रीरामांचा स्वभाव जाणला आहे, त्याला भजन सोडून दुसरी कोणतीही गोष्ट आवडत नाही. हा स्वामी-सेवकाचा संवाद ज्याच्या मनात ठसला, त्यालाच श्रीरामांच्या चरणांची भक्ती मिळाली.'॥ २॥

**सुनि प्रभु बचन कहहिं कपिबृंदा। जय जय जय कृपाल सुखकंदा॥**
**तब रघुपति कपिपतिहि बोलावा। कहा चलैं कर करहु बनावा॥**

प्रभूंचे बोलणे ऐकून वानरगण म्हणू लागले, ‘कृपाळू आनंदकंद श्रीरामांचा विजय असो, विजय असो, विजय असो.’ मग श्रीरघुनाथांनी वानरराज सुग्रीवाला बोलावून सांगितले की, ‘निघायची तयारी करा.’॥ ३॥

**अब बिलंबु केहि कारन कीजे। तुरत कपिन्ह कहुँ आयसु दीजे॥**
**कौतुक देखि सुमन बहु बरषी। नभ तें भवन चले सुर हरषी॥**

आता उशीर कशाला करायचा? वानरांना लगेच आज्ञा दे.’ भगवंतांची ही रावण-वधाच्या तयारीची लीला पाहून देव खूप फुले उधळून आणि आनंदित होऊन आकाशातून आपापल्या लोकी निघून गेले.॥ ४॥

दो०—**कपिपति बेगि बोलाए आए जूथप जूथ।**
**नाना बरन अतुल बल बानर भालु बरूथ॥ ३४॥**

वानरराज सुग्रीवाने लगेच वानरांना बोलावले. सेनापतींचे समूह आले. वानर व अस्वलांच्या झुंडी अनेक रंगांच्या होत्या आणि त्यांच्यामध्ये अतुलनीय बळ होते.॥ ३४॥

**प्रभु पद पंकज नावहिं सीसा। गर्जहिं भालु महाबल कीसा॥**
**देखी राम सकल कपि सेना। चितइ कृपा करि राजिव नैना॥**

सर्वजण प्रभूंच्या चरणकमली नतमस्तक झाले. महाबलवान अस्वले व वानर गर्जना करीत होते. श्रीरामांनी सर्व सेना पाहून आपल्या कमलनेत्रांतून तिच्यावर कृपावर्षाव केला.॥ १॥

**राम कृपा बल पाइ कपिंदा। भए पच्छजुत मनहुँ गिरिंदा॥**
**हरषि राम तब कीन्ह पयाना। सगुन भए सुंदर सुभ नाना॥**

रामकृपेचे बळ मिळाल्यामुळे श्रेष्ठ वानर जणू पंख असलेले मोठे पर्वत झाले. मग श्रीरामांनी आनंदाने प्रस्थान केले. त्यावेळी अनेक सुंदर व शुभ शकुन झाले.॥ २॥

**जासु सकल मंगलमय कीती। तासु पयान सगुन यह नीती॥**
**प्रभु पयान जाना बैदेहीं। फरकि बाम अँग जनु कहि देहीं॥**

ज्यांची कीर्ती ही सर्व मांगल्यांनी परिपूर्ण आहे, त्यांच्या प्रस्थानाच्या वेळी शकुन होणे, ही लीला आहे. प्रभूंचे प्रस्थान जानकीलाही जाणवले. तिची डावी अंगे स्फुरून सांगत होती की, श्रीराम येत आहेत.॥ ३॥

**जोइ जोइ सगुन जानकिहि होई। असगुन भयउ रावनहि सोई॥**
**चला कटकु को बरनैं पारा। गर्जहिं बानर भालु अपारा॥**

जानकीला जेव्हा शकुन होत होते, तेव्हा रावणाला अपशकुन झाले. श्रीरामांची सेना निघाली, तिचे वर्णन कोण करील? असंख्य वानर व अस्वले गर्जना करीत होती. ॥ ४ ॥

**नख आयुध गिरि पादपधारी। चले गगन महि इच्छाचारी॥**
**केहरिनाद भालु कपि करहीं। डगमगाहिं दिग्गज चिक्करहीं॥**

नखे हीच त्यांची शस्त्रे होती, ती स्वेच्छेनुसार चालणारी अस्वले व वानर पर्वत व वृक्ष उचलून आकाशातून निघाले आणि काही जमिनीवरून चालत होते. ते सिंहाप्रमाणे गर्जना करीत होते. त्यांच्या चालण्याने व गर्जनेने दिग्गज घाबरून चीत्कार करीत होते. ॥ ५ ॥

**छं०—चिक्करहिं दिग्गज डोल महि गिरि लोल सागर खरभरे।**
**मन हरष सभ गंधर्ब सुर मुनि नाग किंनर दुख टरे॥**
**कटकटहिं मर्कट बिकट भट बहु कोटि कोटिन्ह धावहीं।**
**जय राम प्रबल प्रताप कोसलनाथ गुन गन गावहीं॥ १ ॥**

दिशांचे हत्ती चीत्कार करू लागले, पृथ्वी डगमगू लागली, पर्वत कापू लागले आणि समुद्र खवळले. गंधर्व, देव, मुनी, नाग, किन्नर हे सर्वच्या सर्व मनातून आनंदित झाले की, आता आमची दुःखे टळली. अनेक कोटी भयानक वानर योद्धे दात चावत होते आणि कोट्यवधी धावत होते. 'प्रबल प्रतापी कोसलनाथ श्रीरामचंद्रांचा विजय असो,' अशा घोषणा देत ते श्रीरामांचे गुण-गान करीत होते. ॥ १ ॥

**सहि सक न भार उदार अहिपति बार बारहिं मोहई।**
**गह दसन पुनि पुनि कमठ पृष्ट कठोर सो किमि सोहई॥**
**रघुबीर रुचिर प्रयान प्रस्थिति जानि परम सुहावनी।**
**जनु कमठ खर्पर सर्पराज सो लिखत अबिचल पावनी॥ २ ॥**

परमश्रेष्ठ व महान सर्पराज शेषसुद्धा सेनेचे ओझे सहन करू शकेना. तो वारंवार घाबरून जात होता आणि पुनः पुन्हा कासवाच्या कठोर पाठीला दातांनी धरीत होता. वारंवार दात घुसवून तो कासवाच्या पाठीवर रेघा ओढीत होता. तो असा शोभत होता की, जणू श्रीरामचंद्रांची सुंदर प्रस्थानयात्रा ही फार चांगली समजून तिची पवित्र व अढळ कथा सर्पराज शेष कासवाच्या पाठीवर लिहीत होता. ॥ २ ॥

**दो०—एहि बिधि जाइ कृपानिधि उतरे सागर तीर।**
**जहँ तहँ लागे खान फल भालु बिपुल कपि बीर॥ ३५ ॥**

अशा प्रकारे कृपानिधान श्रीराम समुद्रतटावर जाऊन पोहोचले. अनेक अस्वले व वानर जिकडे-तिकडे फळे खाऊ लागले. ॥ ३५ ॥

**उहाँ निसाचर रहहिं ससंका। जब तें जारि गयउ कपि लंका॥**
**निज निज गृहँ सब करहिं बिचारा। नहिं निसिचर कुल केर उबारा॥**

तिकडे लंकेत हनुमान लंका जाळून गेला, तेव्हापासून राक्षस भयभीत झाले होते. आपापल्या घरात सर्वजण विचार करीत होते की, आता राक्षसकुळाच्या बचावाचा कोणताही उपाय नाही. ॥ १ ॥

**जासु दूत बल बरनि न जाई। तेहि आएँ पुर कवन भलाई॥**
**दूतिन्ह सन सुनि पुरजन बानी। मंदोदरी अधिक अकुलानी॥**

ज्यांच्या दूताच्या बळाचे वर्णन करणे शक्य नाही, ते श्रीराम स्वतः नगरात आल्यावर आमची काय अवस्था होणार! दूतींच्याकडून नगरवासींचे बोलणे ऐकून मंदोदरी फार व्याकूळ झाली. ॥ २ ॥

**रहसि जोरि कर पति पग लागी। बोली बचन नीति रस पागी॥**
**कंत करष हरि सन परिहरहू। मोर कहा अति हित हियँ धरहू॥**

ती एकांतात हात जोडून रावणाच्या पाया पडली आणि नीतिरसाने परिपूर्ण वाणीने म्हणाली, 'हे प्रियतम, श्रीहरींशी विरोध करणे सोडून द्या. माझे म्हणणे अत्यंत हितकारक समजून हृदयात धरा. ॥ ३ ॥

**समुझत जासु दूत कइ करनी। स्त्रवहिं गर्भ रजनीचर घरनी॥**
**तासु नारि निज सचिव बोलाई। पठवहु कंत जो चहहु भलाई॥**

ज्यांच्या दूताच्या कृत्याचा विचार करताच राक्षसांच्या स्त्रिया गर्भगळित होतात, हे प्रिय स्वामी, जर कल्याण व्हावेसे वाटत असेल, तर, आपल्या मंत्र्यांना बोलावून त्यांच्याबरोबर श्रीरामांच्या पत्नीला पाठवून द्या. ॥ ४ ॥

**तव कुल कमल बिपिन दुखदाई। सीता सीत निसा सम आई॥**
**सुनहु नाथ सीता बिनु दीन्हें। हित न तुम्हार संभु अज कीन्हें॥**

सीता ही आपल्या कुलरूपी कमलवनाला दुःख देणाऱ्या थंडीच्या रात्रीप्रमाणे झाली आहे. हे नाथ, ऐकून घ्या. सीतेला परत पाठविल्याशिवाय शंभू किंवा ब्रह्मदेवही तुमचे भले करणार नाहीत. ॥ ५ ॥

दो०—**राम बान अहि गन सरिस निकर निसाचर भेक।**
**जब लगि ग्रसत न तब लगि जतनु करहु तजि टेक॥ ३६ ॥**

श्रीरामांचे बाण हे सर्पांच्या समूहांसारखे आहेत आणि राक्षस-समूह त्यांच्यापुढे बेडकाप्रमाणे आहेत. ते जोपर्यंत यांना खाऊन टाकत नाहीत, तोपर्यंत आपला हट्ट सोडून काही उपाय करा.' ॥ ३६ ॥

**श्रवन सुनी सठ ता करि बानी। बिहसा जगत बिदित अभिमानी॥**
**सभय सुभाउ नारि कर साचा। मंगल महुँ भय मन अति काचा॥**

मूर्ख आणि जगप्रसिद्ध घमेंडखोर रावण आपल्या कानांनी मंदोदरीचे बोलणे ऐकून मोठ्याने हसून म्हणाला, 'स्त्रियांचा स्वभाव खरोखरच भित्रट असतो. तू मंगल प्रसंगीसुद्धा भीत आहेस. तुझे मन फारच हळवे आहे.॥ १॥

**जौं आवइ मर्कट कटकाई। जिअहिं बिचारे निसिचर खाई॥**
**कंपहिं लोकप जाकीं त्रासा। तासु नारि सभीत बड़ि हासा॥**

जर वानरांची सेना आली, तर बिचारे राक्षस त्यांना खाऊन आपली पोटे भरतील. लोकपालही माझ्या भयाने कापू लागतात, त्याची बायको असून तू घाबरतेस, ही मोठी हास्यास्पद गोष्ट आहे.'॥ २॥

**अस कहि बिहसि ताहि उर लाई। चलेउ सभाँ ममता अधिकाई॥**
**मंदोदरी हृदयँ कर चिंता। भयउ कंत पर बिधि बिपरीता॥**

रावणाने असे म्हणत हसून तिला हृदयाशी धरले आणि मोठे प्रेम दाखवून तो सभेला गेला. मंदोदरी मनात काळजी करू लागली की, विधाता आपल्या पतीला प्रतिकूल झालेला आहे.॥ ३॥

**बैठेउ सभाँ खबरि असि पाई। सिंधु पार सेना सब आई॥**
**बूझेसि सचिव उचित मत कहहू। ते सब हँसे मष्ट करि रहहू॥**

रावण सभेमध्ये जाऊन बसताच त्याला समजले की, शत्रूची सर्व सेना समुद्रापलीकडे आली आहे. त्याने मंत्र्यांना म्हटले की, योग्य सल्ला द्या. तेव्हा सर्वजण हसले व म्हणाले की, 'गप्प राहावे, यात सल्ला काय द्यायचा?॥ ४॥

**जितेहु सुरासुर तब श्रम नाहीं। नर बानर केहि लेखे माहीं॥**

तुम्ही देव व राक्षसांना जिंकून घेतले, तेव्हासुद्धा काही कष्ट पडले नाहीत. मग मनुष्य व वानर यांचे काय घेऊन बसलात?'॥ ५॥

दो०—**सचिव बैद गुर तीनि जौं प्रिय बोलहिं भय आस।**
**राज धर्म तन तीनि कर होइ बेगिहीं नास॥ ३७॥**

मंत्री, वैद्य व गुरू हे तिघे जर कुणी नाराज होईल या भीतीने किंवा लाभाच्या आशेने हिताची गोष्ट न सांगता प्रिय बोलले, तर ते राज्य, शरीर व धर्म या तिन्हींचा लवकरच नाश होतो.॥ ३७॥

**सोइ रावन कहुँ बनी सहाई। अस्तुति करहिं सुनाइ सुनाई॥**
**अवसर जानि बिभीषनु आवा। भ्राता चरन सीसु तेहिं नावा॥**

रावणावरही असाच प्रसंग आला. मंत्री त्याच्यासमोर स्तुती करीत होते. याचवेळी योग्य प्रसंग पाहून बिभीषण तेथे आला. त्याने मोठा भाऊ रावण याच्या चरणी मस्तक नम्र केले. ॥ १ ॥

**पुनि सिरु नाइ बैठ निज आसन। बोला बचन पाइ अनुसासन॥**
**जौ कृपाल पूँछिहु मोहि बाता। मति अनुरूप कहउँ हित ताता॥**

मग पुन्हा एकदा नतमस्तक होऊन तो आपल्या आसनावर बसला आणि आज्ञा घेऊन म्हणाला, 'हे कृपाळू, तू मला विचारलेच आहेस, म्हणून हे दादा! मी आपल्या बुद्धीनुसार तुझ्या हिताची गोष्ट सांगतो, ॥ २ ॥

**जो आपन चाहै कल्याना। सुजसु सुमति सुभ गति सुख नाना॥**
**सो परनारि लिलार गोसाईं। तजउ चउथि के चंद कि नाईं॥**

ज्या मनुष्याला आपले कल्याण, सुंदर कीर्ती, सुंदर बुद्धी, शुभगती आणि नाना प्रकारची सुखे हवी असतात, हे स्वामी, त्याने परस्त्रीच्या मुखाकडे चतुर्थीच्या चंद्राप्रमाणे अशुभ मानून पाहू नये. ॥ ३ ॥

**चौदह भुवन एक पति होई। भूतद्रोह तिष्टइ नहिं सोई॥**
**गुन सागर नागर नर जोऊ। अलप लोभ भल कहइ न कोऊ॥**

चौदा भुवनांचा एकच स्वामी असला तरी तोसुद्धा जिवांशी वैर केल्याने टिकू शकत नाही. जो मनुष्य गुणांचा समुद्र आणि चतुर आहे, परंतु त्याला थोडासा जरी लोभ असला तरी त्याला कोणी चांगले म्हणत नाहीत. ॥ ४ ॥

दो०—**काम क्रोध मद लोभ सब नाथ नरक के पंथ।**
**सब परिहरि रघुबीरहि भजहु भजहिं जेहि संत॥ ३८॥**

हे राजा, काम, क्रोध, मद, लोभ हे सर्व नरकाचे मार्ग आहेत. यांना सोडून देऊन श्रीरामचंद्रांना भज. संत त्यांनाच भजतात. ॥ ३८ ॥

**तात राम नहिं नर भूपाला। भुवनेस्वर कालहु कर काला॥**
**ब्रह्म अनामय अज भगवंता। ब्यापक अजित अनादि अनंता॥**

हे बंधो! श्रीराम मनुष्यांचे राजा नव्हेत. ते सर्व लोकांचे स्वामी आणि कालाचेही काल आहेत. ते षडैश्वर्यसंपन्न भगवान आहेत. ते विकाररहित, अजन्मा, व्यापक, अजेय, अनादी आणि अनंत ब्रह्म आहेत. ॥ १ ॥

**गो द्विज धेनु देव हितकारी। कृपासिंधु मानुष तनुधारी॥**
**जन रंजन भंजन खल ब्राता। बेद धर्म रच्छक सुनु भ्राता॥**

त्या कृपेचे समुद्र असलेल्या भगवानाने पृथ्वी, ब्राह्मण, गाई आणि देवांच्या कल्याणासाठीच

मनुष्यशरीर धारण केलेले आहे. हे बंधू, ऐकून घे. ते सेवकांना आनंद देणारे, दुष्टांच्या समूहाचा नाश करणारे आणि वेद व धर्म यांचे रक्षण करणारे आहेत. ॥ २ ॥

**ताहि बयरु तजि नाइअ माथा। प्रनतारति भंजन रघुनाथा॥**
**देहु नाथ प्रभु कहुँ बैदेही। भजहु राम बिनु हेतु सनेही॥**

त्यांच्याशी वैर सोडून त्यांच्यापुढे मस्तक नम्र कर. ते श्रीरघुनाथ शरणागतांचे दुःख नष्ट करणारे आहेत. हे नाथ, त्या सर्वेश्वर प्रभूंना जानकी देऊन टाक आणि अकारण प्रेम करणाऱ्या श्रीरामांना भज. ॥ ३ ॥

**सरन गएँ प्रभु ताहु न त्यागा। बिस्व द्रोह कृत अघ जेहि लागा॥**
**जासु नाम त्रय ताप नसावन। सोइ प्रभु प्रगट समुझु जियँ रावन॥**

ज्याला संपूर्ण जगाशी द्रोह करण्याचे पाप लागले आहे, तो प्रभूंना शरण गेल्यास ते त्याचाही त्याग करीत नाहीत. ज्यांचे नाम तिन्ही तापांचा नाश करणारे आहे, तेच प्रभू मनुष्यरूपाने प्रगट झाले आहेत. हे रावणा, मनापासून हे समजून घे. ॥ ४ ॥

**दो०—बार बार पद लागउँ बिनय करउँ दससीस।**
**परिहरि मान मोह मद भजहु कोसलाधीस॥ ३९ ( क )॥**

हे दशानना! मी वारंवार तुझ्या पाया पडतो आणि विनंती करतो की, मान, मोह व मद यांचा त्याग करून श्रीरामांचे भजन कर. ॥ ३९ (क) ॥

**मुनि पुलस्ति निज सिष्य सन कहि पठई यह बात।**
**तुरत सो मैं प्रभु सन कही पाइ सुअवसरु तात॥ ३९ ( ख )॥**

पुलस्त्य मुनींनी आपल्या शिष्याबरोबर हाच निरोप पाठविला आहे. बंधो! योग्य वेळ बघून मी ती गोष्ट तुला सांगत आहे.' ॥ ३९ (ख) ॥

**माल्यवंत अति सचिव सयाना। तासु बचन सुनि अति सुख माना॥**
**तात अनुज तव नीति बिभूषन। सो उर धरहु जो कहत बिभीषन॥**

माल्यवान नावाचा एक मोठा बुद्धिमान मंत्री होता. त्याला बिभीषणाचे बोलणे ऐकून आनंद झाला, तो म्हणाला, 'हे महाराज! तुमचे बंधू नीति-विभूषण आहेत. बिभीषण जे सांगत आहेत, ते लक्षात ठेवा.' ॥ १ ॥

**रिपु उतकरष कहत सठ दोऊ। दूरि न करहु इहाँ हइ कोऊ॥**
**माल्यवंत गृह गयउ बहोरी। कहइ बिभीषनु पुनि कर जोरी॥**

रावण म्हणाला, 'हे दोघे मूर्ख शत्रूचा महिमा सांगत आहेत. इथे कोणी आहे काय? या दोघांना येथून हाकला.' तेव्हा माल्यवान घरी गेला आणि बिभीषण हात जोडून पुन्हा बोलू लागला. ॥ २ ॥

**सुमति कुमति सब कें उर रहहीं। नाथ पुरान निगम अस कहहीं॥**
**जहाँ सुमति तहँ संपति नाना। जहाँ कुमति तहँ बिपति निदाना॥**

'हे बंधो, पुराणे व वेद असे सांगतात की, सुबुद्धी आणि कुबुद्धी सर्वांच्या मनात असते. जेथे सुबुद्धी असते, तेथे नाना प्रकारच्या संपदा असतात आणि जेथे कुबुद्धी असते, तेथे परिणामी विपत्ती असतात. ॥ ३ ॥

**तव उर कुमति बसी बिपरीता। हित अनहित मानहु रिपु प्रीता॥**
**कालराति निसिचर कुल केरी। तेहि सीता पर प्रीति घनेरी॥**

तुझ्या मनात उलटी बुद्धी आलेली आहे. म्हणून तू हिताला अहित व शत्रूला मित्र मानत आहात. जी राक्षसकुलासाठी काळरात्र आहे, त्या सीतेवर तुझे फार प्रेम आहे. ॥ ४ ॥

दो०—**तात चरन गहि मागउँ राखहु मोर दुलार।**
**सीता देहु राम कहुँ अहित न होइ तुम्हार॥ ४०॥**

हे राजन! मी तुझे पाय धरून तुझ्याकडे भीक मागतो की, तू मज भावाचा आग्रह प्रेमाने स्वीकार. श्रीरामांना सीता देऊन टाक. त्यामुळे तुझे अहित होणार नाही.' ॥ ४० ॥

**बुध पुरान श्रुति संमत बानी। कही बिभीषन नीति बखानी॥**
**सुनत दसानन उठा रिसाई। खल तोहि निकट मृत्यु अब आई॥**

बिभीषणाने पंडित, पुराण आणि वेद यांना संमत असलेली नीती वर्णन करून सांगितली, परंतु ते ऐकताच रावण खवळून म्हणाला, 'अरे, दुष्टा, आता तुझा मृत्यू जवळ आला आहे. ॥ १ ॥

**जिअसि सदा सठ मोर जिआवा। रिपु कर पच्छ मूढ़ तोहि भावा॥**
**कहसि न खल अस को जग माहीं। भुज बल जाहि जिता मैं नाहीं॥**

अरे मूर्खा, तू जिवंत आहेस, तो मी पोसल्यामुळे. हे मूर्खा, तुला शत्रूचा पक्ष चांगला वाटतो. अरे दुष्टा, जगात मी माझ्या स्वतःच्या भुजबलाने जिंकला नाही, असा कोण आहे ते सांग? ॥ २ ॥

**मम पुर बसि तपसिन्ह पर प्रीती। सठ मिलु जाइ तिन्हहि कहु नीती॥**
**अस कहि कीन्हेसि चरन प्रहारा। अनुज गहे पद बारहिं बारा॥**

माझ्या नगरात राहून तू तपस्व्यांवर प्रेम करतोस! मूर्खा, मग त्यांनाच जाऊन भेट आणि त्यांना नीती सांग.' असे म्हणून रावणाने बिभीषणाला लाथ मारली. परंतु बिभीषणाने तरीही वारंवार त्याचे पाय धरले. ॥ ३ ॥

**उमा संत कइ इहइ बड़ाई। मंद करत जो करइ भलाई॥**
**तुम्ह पितु सरिस भलेहिं मोहि मारा। रामु भजें हित नाथ तुम्हारा॥**

शिव म्हणतात, 'हे उमे, संतांचे हेच मोठेपण असते की, ते वाईट करणाऱ्याचेही भलेच करीत असतात.' बिभीषण म्हणाला, 'तू मला पित्यासमान आहेस. मला तू मारलेस, त्याचे मला वाईट वाटत नाही. परंतु हे राजा! तुझे कल्याण श्रीरामांना भजण्यातच आहे.'॥ ४॥

**सचिव संग लै नभ पथ गयऊ। सबहि सुनाइ कहत अस भयऊ॥**

असे म्हणून बिभीषण आपल्या मंत्र्यांसह आकाश-मार्गाने गेला आणि सर्वांना उद्देशून म्हणाला, ॥ ५॥

**दो०—रामु सत्यसंकल्प प्रभु सभा कालबस तोरि।**
**मैं रघुबीर सरन अब जाउँ देहु जनि खोरि॥ ४१॥**

'श्रीराम सत्यसंकल्प व सर्वसमर्थ प्रभू आहेत व हे रावणा, तुझी सभा काळाच्या दाढेत आहे. म्हणून मी श्रीरामांना शरण जातो. नंतर मला दोष देऊ नकोस.'॥ ४१॥

**अस कहि चला बिभीषनु जबहीं। आयूहीन भए सब तबहीं॥**
**साधु अवग्या तुरत भवानी। कर कल्यान अखिल कै हानी॥**

असे म्हणून बिभीषण जाताच सर्व राक्षसांचा मृत्यू निश्चित झाला. शिव म्हणतात, 'हे भवानी, साधूचा अपमान संपूर्ण कल्याणाचा तत्काळ नाश करतो.॥ १॥

**रावन जबहिं बिभीषन त्यागा। भयउ बिभव बिनु तबहिं अभागा॥**
**चलेउ हरषि रघुनायक पाहीं। करत मनोरथ बहु मन माहीं॥**

रावणाने ज्या क्षणी बिभीषणाचा त्याग केला, त्याच क्षणी तो अभागी ऐश्वर्यहीन झाला. बिभीषण आनंदामध्ये अनेक मनोरथ करीत श्रीरघुनाथांच्याकडे गेला.॥ २॥

**देखिहउँ जाइ चरन जलजाता। अरुन मृदुल सेवक सुखदाता॥**
**जे पद परसि तरी रिषिनारी। दंडक कानन पावनकारी॥**

तो विचार करीत होता की, 'मी जाऊन भगवंतांच्या कोमल व तांबूस चरण-कमलांचे दर्शन घेईन. ते सेवकांना सुख देणारे आहेत. त्या चरणांच्या स्पर्शाने ऋषिपत्नी अहल्येचा उद्धार झाला आणि ते चरण दंडकवनास पवित्र करणारे आहेत.॥ ३॥

**जे पद जनकसुताँ उर लाए। कपट कुरंग संग धर धाए॥**
**हर उर सर सरोज पद जेई। अहोभाग्य मैं देखिहउँ तेई॥**

जे चरण जानकीने आपल्या हृदयी धारण केले आहेत, जे चरण कपटमृगाच्या मागे पृथ्वीवर धावले होते आणि जी चरण-कमले साक्षात शिवांच्या हृदयरूपी सरोवरात विराजमान आहेत, तीच मी आज पाहीन. हे केवढे माझे भाग्य!॥ ४॥

**दो०—जिन्ह पायन्ह के पादुकन्हि भरतु रहे मन लाइ।**
**ते पद आजु बिलोकिहउँ इन्ह नयनन्हि अब जाइ॥ ४२॥**

ज्या चरणांच्या पादुकांमध्ये भरताने आपले मन मग्न केले आहे, अहाहा, आज जाऊन त्याच चरणांचे दर्शन मी आपल्या नेत्रांनी घेणार!॥ ४२॥

**एहि बिधि करत सप्रेम बिचारा। आयउ सपदि सिंधु एहिं पारा॥**
**कपिन्ह बिभीषनु आवत देखा। जाना कोउ रिपु दूत बिसेषा॥**

अशा प्रकारे प्रेमपूर्वक विचार करीत बिभीषण लगेच समुद्राच्या पलीकडील तीरावर पोहोचला. बिभीषण येताना पाहून वानरांना वाटले की, हा शत्रूचा कोणी खास दूत असावा.॥ १॥

**ताहि राखि कपीस पहिं आए। समाचार सब ताहि सुनाए॥**
**कह सुग्रीव सुनहु रघुराई। आवा मिलन दसानन भाई॥**

त्याला पहाऱ्यावर थांबवून ते सुग्रीवाजवळ आले आणि त्यांनी बातमी सांगितली. सुग्रीवाने श्रीरामांच्याजवळ सांगितले की, 'हे रघुनाथ, रावणाचा भाऊ तुम्हांला भेटायला आला आहे.'॥ २॥

**कह प्रभु सखा बूझिऐ काहा। कहइ कपीस सुनहु नरनाहा॥**
**जानि न जाइ निसाचर माया। कामरूप केहि कारन आया॥**

प्रभू राम म्हणाले, 'हे मित्रा, तुझा काय विचार आहे?' वानरराज सुग्रीव म्हणाला, 'हे महाराज, राक्षसांची माया समजत नाही. आपल्या इच्छेप्रमाणे रूप बदलणारा हा कशासाठी आला आहे, कुणास ठाऊक!॥ ३॥

**भेद हमार लेन सठ आवा। राखिअ बाँधि मोहि अस भावा॥**
**सखा नीति तुम्ह नीकि बिचारी। मम पन सरनागत भयहारी॥**

मला असे वाटते की, हा मूर्ख आपले रहस्य जाणून घेण्यासाठी आला आहे, म्हणून याला बांधून घालावे,' श्रीराम म्हणाले, 'हे मित्रा, तू चांगली नीती सांगितलीस. परंतु शरणागताचे भय दूर करणे, हे माझे ब्रीद आहे.'॥ ४॥

**सुनि प्रभु बचन हरष हनुमाना। सरनागत बच्छल भगवाना॥**

प्रभूंचे वचन ऐकून हनुमानाला आनंद झाला. तो मनात म्हणू लागला की, 'भगवान किती शरणागतवत्सल आहेत!'॥ ५॥

दो०—**सरनागत कहुँ जे तजहिं निज अनहित अनुमानि।**
**ते नर पावँर पापमय तिन्हहि बिलोकत हानि॥ ४३॥**

मग श्रीराम म्हणू लागले, 'जे लोक आपले अहित होईल, असे अनुमान करून शरण आलेल्याला दूर लोटतात, ते क्षुद्र होत, पापी होत. त्यांना पाहणे हेसुद्धा पाप आहे.'॥ ४३॥

**कोटि बिप्र बध लागहिं जाहू। आएँ सरन तजउँ नहिं ताहू॥**
**सनमुख होइ जीव मोहि जबहीं। जन्म कोटि अघ नासहिं तबहीं॥**

ज्याने कोट्यवधी ब्राह्मणांची हत्या केली असेल, तोही शरण आल्यास मी त्याचा त्याग करीत नाही. ज्याक्षणी जीव माझ्यासमोर येतो, त्याच क्षणी त्याचे कोट्यवधी जन्मांचे पाप नष्ट होते.॥ १॥

**पापवंत कर सहज सुभाऊ। भजनु मोर तेहि भाव न काऊ॥**
**जौं पै दुष्ट हृदय सोइ होई। मोरें सनमुख आव कि सोई॥**

माझे भजन कधीही न आवडणे, हा पापी मनुष्याचा मुळचा स्वभाव असतो. जर तो रावणाचा भाऊ खराच दुष्ट मनाचा असता, तर तो माझ्यासमोर आला असता का?॥ २॥

**निर्मल मन जन सो मोहि पावा। मोहि कपट छल छिद्र न भावा॥**
**भेद लेन पठवा दससीसा। तबहुँ न कछु भय हानि कपीसा॥**

जो मनुष्य निर्मल मनाचा असतो, तोच मला भेटतो. मला कपट, लबाडी हे आवडत नाहीत. जरी रावणाने आपले रहस्य जाणण्यासाठी त्याला पाठविले असले, तरी हे सुग्रीवा, आपल्याला कोणतेही भय किंवा नुकसान नाही.॥ ३॥

**जग महुँ सखा निसाचर जेते। लछिमनु हनइ निमिष महुँ तेते॥**
**जौं सभीत आवा सरनाईं। रखिहउँ ताहि प्रान की नाईं॥**

कारण हे मित्रा, जगात जितके म्हणून राक्षस आहेत, त्यांना एका क्षणात लक्ष्मण मारू शकतो आणि जर तो भयभीत होऊन मला शरण आला असेल, तर मी त्याला प्राणाप्रमाणे जपेन.'॥ ४॥

दो०—**उभय भाँति तेहि आनहु हँसि कह कृपानिकेत।**
**जय कृपाल कहि कपि चले अंगद हनू समेत॥ ४४॥**

कृपेचे धाम असलेले श्रीराम हसून म्हणाले, 'दोन्हीही परिस्थितींमध्ये त्याला घेऊन ये.' मग अंगद आणि हनुमान यांना सोबत घेऊन 'कृपाळू श्रीरामांचा विजय असो.' असे म्हणत सुग्रीव निघाला.॥ ४४॥

**सादर तेहि आगें करि बानर। चले जहाँ रघुपति करुनाकर॥**
**दूरिहि ते देखे द्वौ भ्राता। नयनानंद दान के दाता॥**

बिभीषणाला आदराने पुढे घालून वानर, करुणेची खाण असलेल्या श्रीरघुनाथांच्याजवळ आले. नेत्रांना आनंद देणाऱ्या दोघा बंधूंना बिभीषणाने दुरूनच पाहिले. ॥ १ ॥

**बहुरि राम छबिधाम बिलोकी। रहेउ ठटुकि एकटक पल रोकी॥**
**भुज प्रलंब कंजारुन लोचन। स्यामल गात प्रनत भय मोचन॥**

नंतर लावण्यनिधी श्रीरामांना पाहून डोळ्यांची उघडझाप विसरून-थबकून तो पाहातच राहिला. भगवंतांच्या विशाल भुजा होत्या, लाल कमलांसारखे प्रफुल्ल नेत्र होते आणि शरणागताच्या भयाचा नाश करणारे त्यांचे सावळे शरीर होते. ॥ २ ॥

**सिंघ कंध आयत उर सोहा। आनन अमित मदन मन मोहा॥**
**नयन नीर पुलकित अति गाता। मन धरि धीर कही मृदु बाता॥**

सिंहासारखे खांदे होते, विशाल वक्ष:स्थल शोभून दिसत होते. असंख्य कामदेवांच्या मनाला मोहित करणारे मुख होते. भगवंतांचे ते स्वरूप पाहून बिभीषणाच्या नेत्रात प्रेमाश्रू भरून आले आणि शरीर अत्यंत पुलकित झाले. मग मनात धीर धरून तो कोमल शब्दांमध्ये बोलू लागला- ॥ ३ ॥

**नाथ दसानन कर मैं भ्राता। निसिचर बंस जनम सुरत्राता॥**
**सहज पापप्रिय तामस देहा। जथा उलूकहि तम पर नेहा॥**

'हे नाथ, मी दशमुख रावणाचा भाऊ आहे. हे देवांचे रक्षक, माझा जन्म राक्षसकुळात झाला. माझे शरीर तामसी आहे. स्वभावत: पाप मला प्रिय आहे. ज्याप्रमाणे घुबडाला अंधकाराबद्दल सहज प्रेम असते. ॥ ४ ॥

दो०—**श्रवन सुजसु सुनि आयउँ प्रभु भंजन भव भीर।**
**त्राहि त्राहि आरति हरन सरन सुखद रघुबीर॥ ४५॥**

मी तुमची सुकीर्ती ऐकून आलो आहे की, प्रभू जन्म-मरणाचे भय दूर करणारे आहेत. हे दु:खीजनांचे दु:ख दूर करणारे आणि शरणागताला सुख देणारे श्रीरघुवीर! माझे रक्षण करा.' ॥ ४५ ॥

**अस कहि करत दंडवत देखा। तुरत उठे प्रभु हरष बिसेषा॥**
**दीन बचन सुनि प्रभु मन भावा। भुज बिसाल गहि हृदयँ लगावा॥**

असे म्हणत दंडवत करताना त्याला प्रभूंनी पाहिले मात्र आणि ते अत्यंत आनंदाने उठून उभे राहिले. बिभीषणाचे नम्र भाषण प्रभूंच्या मनाला खूप आवडले. त्यांनी आपल्या विशाल भुजांनी त्याला हृदयाशी धरले. ॥ १ ॥

**अनुज सहित मिलि ढिग बैठारी। बोले बचन भगत भयहारी॥**
**कहु लंकेस सहित परिवारा। कुसल कुठाहर बास तुम्हारा॥**

लक्ष्मणानेही त्याला आलिंगन दिल्यावर त्यांनी त्याला जवळ बसवून भक्तांचे भय दूर करणारे श्रीराम म्हणाले की, 'हे लंकेशा, परिवारासह आपले क्षेम-कुशल सांग. तुझा निवास वाईट जागी आहे, (म्हणून विचारतो.) ॥ २ ॥

**खल मंडली बसहु दिनु राती। सखा धरम निबहइ केहि भाँती॥**
**मैं जानउँ तुम्हारि सब रीती। अति नय निपुन न भाव अनीती॥**

तू रात्रंदिवस दुष्टांच्या मंडळीमध्ये राहातोस. अशा अवस्थेमध्ये हे मित्रा, तुला धर्म कसा सांभाळता येतो? मला तुझा सर्व आचार-व्यवहार माहीत आहे. तू अत्यंत नीतिनिपुण आहेस, तुला अनीती बरी वाटत नाही. ॥ ३ ॥

**बरु भल बास नरक कर ताता। दुष्ट संग जनि देइ बिधाता॥**
**अब पद देखि कुसल रघुराया। जौं तुम्ह कीन्हि जानि जन दाया॥**

बाबा रे! नरकात राहाणे चांगले; परंतु विधाता दुष्टांचा संग कधी न देवो.' बिभीषण म्हणाला, 'हे रघुनाथ, आता तुमच्या चरणांच्या दर्शनामुळे सर्व कुशल आहे. तुम्ही आपला सेवक समजून माझ्यावर दया केलीत. ॥ ४ ॥

दो०—**तब लगि कुसल न जीव कहुँ सपनेहुँ मन बिश्राम।**
**जब लगि भजत न राम कहुँ सोक धाम तजि काम॥ ४६॥**

जोपर्यंत जीव हा शोकाचे घर असणारी विषय-वासना सोडून श्रीरामांना भजत नाही, तोपर्यंत जीवाला सुख लाभत नाही आणि स्वप्नातही त्याच्या मनाला शांतता लाभत नाही. ॥ ४६ ॥

**तब लगि हृदयँ बसत खल नाना। लोभ मोह मच्छर मद माना॥**
**जब लगि उर न बसत रघुनाथा। धरें चाप सायक कटि भाथा॥**

लोभ, मोह, मत्सर, मद, मान इत्यादी अनेक दुष्ट विकार हृदयात तोपर्यंत राहात असतात, जोपर्यंत धनुष्यबाण आणि कमरेला भाता धारण केलेले श्रीरघुनाथ हृदयामध्ये निवास करीत नाहीत. ॥ १ ॥

**ममता तरुन तमी अँधिआरी। राग द्वेष उलूक सुखकारी॥**
**तब लगि बसति जीव मन माहीं। जब लगि प्रभु प्रताप रबि नाहीं॥**

ममता ही पूर्ण अंधारी रात्र आहे. ती राग-द्वेषरूपी घुबडांना सुख देणारी आहे. ती ममतारूप रात्र तोपर्यंतच जीवाच्या मनात निवास करते, जोपर्यंत प्रभू, तुमचा प्रतापरूपी सूर्य उदय पावत नाही. ॥ २ ॥

**अब मैं कुसल मिटे भय भारे। देखि राम पद कमल तुम्हारे॥**
**तुम्ह कृपाल जा पर अनुकूला। ताहि न ब्याप त्रिबिध भव सूला॥**

हे श्रीराम, तुमच्या चरणारविंदांच्या दर्शनाने आता मी सुखरूप झालो आहे. माझे मोठे भय नाहीसे झाले. हे कृपाळू, तुम्ही ज्यांना अनुकूल असता, त्याला आध्यात्मिक, आधिदैविक आणि आधिभौतिक असे तीनही प्रकारचे भवताप त्रास देत नाहीत.॥ ३॥

**मैं निसिचर अति अधम सुभाऊ। सुभ आचरनु कीन्ह नहिं काऊ॥**
**जासु रूप मुनि ध्यान न आवा। तेहिं प्रभु हरषि हृदयँ मोहि लावा॥**

मी अत्यंत नीच स्वभावाचा राक्षस आहे. मी कधी चांगले आचरण केलेले नाही. असे असूनही ज्यांचे रूप मुनींच्या ध्यानातही येत नाही, त्या प्रभूंनी स्वत: आनंदाने मला हृदयाशी धरले.॥ ४॥

दो०—**अहोभाग्य मम अमित अति राम कृपा सुख पुंज।**
**देखेउँ नयन बिरंचि सिव सेब्य जुगल पद कंज॥ ४७॥**

हे कृपा व सुखाचे निधान असलेले श्रीराम, ब्रह्मदेव व शिव हे ज्यांची सेवा करतात, त्या चरण-कमल युगलांचे मी स्वत:च्या डोळ्यांनी आज दर्शन घेतले, हे माझे फार मोठे भाग्य आहे.'॥ ४७॥

**सुनहु सखा निज कहउँ सुभाऊ। जान भुसुंडि संभु गिरिजाऊ॥**
**जौं नर होइ चराचर द्रोही। आवै सभय सरन तकि मोही॥**

श्रीराम म्हणाले, 'हे मित्रा, मी तुला माझा स्वभाव सांगतो. तो काकभुशुंडी, शिव व पार्वती यांनाही ठाऊक आहे. कुणी मनुष्य संपूर्ण जगाचा जरी द्रोही असला, तरीही तो भयभीत होऊन जर मला शरण आला,॥ १॥

**तजि मद मोह कपट छल नाना। करउँ सद्य तेहि साधु समाना॥**
**जननी जनक बंधु सुत दारा। तनु धनु भवन सुहृद परिवारा॥**

आणि मद, मोह आणि नाना प्रकारची कपट-फसवणूक त्याने सोडून दिली, तर मी फार लवकर त्याला साधूसारखा बनवितो. माता, पिता, भाऊ, पुत्र, स्त्री, शरीर, धन, घर, मित्र आणि परिवार,॥ २॥

**सब कै ममता ताग बटोरी। मम पद मनहि बाँध बरि डोरी॥**
**समदरसी इच्छा कछु नाहीं। हरष सोक भय नहिं मन माहीं॥**

जो या सर्वांच्या ममत्वरूपी धाग्यांना गुंडाळून त्या सर्वांची एक दोरी वळतो आणि त्या दोरीने आपले मन माझ्या चरणी बांधतो, जो समदर्शी आहे, ज्याला कशाची इच्छा नाही आणि ज्याच्या मनात हर्ष, शोक व भय नाही,॥ ३॥

**अस सज्जन मम उर बस कैसें। लोभी हृदयँ बसइ धनु जैसें॥**
**तुम्ह सारिखे संत प्रिय मोरें। धरउँ देह नहिं आन निहोरें॥**

असा सज्जन, लोभी माणसाच्या मनात जसे धन वसलेले असते, तसा माझ्या मनात वसलेला असतो. तुझ्यासारखे संतच मला प्रिय असतात. मी इतर कोणत्याही कारणाने देह धारण करीत नाही.॥ ४॥

दो०—**सगुन उपासक परहित निरत नीति दृढ़ नेम।**
**ते नर प्रान समान मम जिन्ह कें द्विज पद प्रेम॥ ४८॥**

जे सगुण-साकार भगवंताचे उपासक असतात, दुसऱ्याच्या हितासाठी झटतात, नीती आणि नियमांच्याबाबतीत कणखर असतात आणि ज्यांना ब्राह्मणांविषयी प्रेम आहे, ते मनुष्य मला प्राणांसारखे प्रिय असतात. ॥ ४८ ॥

**सुनु लंकेस सकल गुन तोरें। तातें तुम्ह अतिसय प्रिय मोरें॥**
**राम बचन सुनि बानर जूथा। सकल कहहिं जय कृपा बरूथा॥**

हे लंकापती, ऐक. तुझ्या अंगी वरील सर्व गुण आहेत. म्हणून तू मला अत्यंत आवडता आहेस.' श्रीरामांचे बोलणे ऐकून वानरांचे सर्व समूह म्हणू लागले की, 'कृपानिधी श्रीरामांचा विजय असो.'॥ १ ॥

**सुनत बिभीषनु प्रभु कै बानी। नहिं अघात श्रवनामृत जानी॥**
**पद अंबुज गहि बारहिं बारा। हृदयँ समात न प्रेमु अपारा॥**

प्रभूंचे बोलणे ऐकताना कानांसाठी ते अमृत समजून बिभीषण तृप्त होत नव्हता. तो वारंवार श्रीरामांचे चरण-कमल धरीत होता. त्याच्या मनात अपार प्रेम होते. इतके की, ते हृदयात मावत नव्हते. ॥ २ ॥

**सुनहु देव सचराचर स्वामी। प्रनतपाल उर अंतरजामी॥**
**उर कछु प्रथम बासना रही। प्रभु पद प्रीति सरित सो बही॥**

बिभीषण म्हणाला, 'हे देवा, हे चराचराचे स्वामी, हे शरणागताचे रक्षक, हे सर्वांच्या हृदयामधील जाणणारे, माझ्या मनात पूर्वी काही विषयवासना होती, परंतु प्रभूंच्या चरणांच्या प्रीतिरूपी नदीमध्ये ती वाहून गेली. ॥ ३ ॥

**अब कृपाल निज भगति पावनी। देहु सदा सिव मन भावनी॥**
**एवमस्तु कहि प्रभु रनधीरा। मागा तुरत सिंधु कर नीरा॥**

आता तर हे कृपाळू! शिवांच्या मनाला सदैव प्रिय वाटणारी आपली पवित्र भक्ती मला द्या.' 'तथास्तु' असे म्हणून रणधीर प्रभू श्रीरामांनी त्वरित समुद्र-जल मागविले. ॥ ४ ॥

**जदपि सखा तव इच्छा नाहीं। मोर दरसु अमोघ जग माहीं॥**
**अस कहि राम तिलक तेहि सारा। सुमन बृष्टि नभ भई अपारा॥**

आणि म्हटले, 'हे सखा, जरी तुझी इच्छा नसली, तरी जगामध्ये माझे दर्शन अमोघ आहे. ते निष्फल होत नाही.' असे म्हणून श्रीरामांनी त्याला राजतिलक केला. आकाशातून पुष्पांची अपार वृष्टी झाली. ॥ ५ ॥

दो०—**रावन क्रोध अनल निज स्वास समीर प्रचंड।**
**जरत बिभीषनु राखेउ दीन्हेउ राजु अखंड॥ ४९ ( क )॥**

रावणाचा क्रोधरूपी अग्नी बिभीषणाच्या वचनांच्या वाऱ्याने भडकला होता, त्यात जळण्यापासून बिभीषणाला श्रीरामांनी वाचविले आणि अखंड राज्य दिले. ॥ ४९ (क) ॥

**जो संपति सिव रावनहि दीन्हि दिएँ दस माथ।**
**सोइ संपदा बिभीषनहि सकुचि दीन्हि रघुनाथ॥ ४९ ( ख )॥**

रावणाने आपल्या दहा शिरांचा बळी दिल्यावर शिवांनी जी संपत्ती त्याला दिली होती, तीच संपत्ती श्रीरघुनाथांनी बिभीषणाला मोठ्या संकोचाने दिली. ॥ ४९ (ख) ॥

**अस प्रभु छाड़ि भजहिं जे आना। ते नर पसु बिनु पूँछ बिषाना॥**
**निज जन जानि ताहि अपनावा। प्रभु सुभाव कपि कुल मन भावा॥**

अशा परम कृपाळू प्रभूंना सोडून जे दुसऱ्या कुणाला भजतात, ते शिंग व शेपूट नसलेले पशू होत. आपला सेवक मानून बिभीषणाला श्रीरामांनी स्वीकारले. प्रभूंचा हा स्वभाव वानरकुलाच्या मनाला आवडला. ॥ १ ॥

**पुनि सर्बग्य सर्ब उर बासी। सर्बरूप सब रहित उदासी॥**
**बोले बचन नीति प्रतिपालक। कारन मनुज दनुज कुल घालक॥**

नंतर सर्व काही जाणणारे, सर्वांच्या हृदयात वसणारे, सर्व रूपांमध्ये प्रकट असणारे, सर्वांहून रहित, उदासीन, भक्तांवर कृपा करण्यासाठी मनुष्य बनलेले आणि राक्षस कुलाचा नाश करणारे श्रीराम नीतीचे पालन करण्यासाठी म्हणाले, ॥ २ ॥

**सुनु कपीस लंकापति बीरा। केहि बिधि तरिअ जलधि गंभीरा॥**
**संकुल मकर उरग झष जाती। अति अगाध दुस्तर सब भाँती॥**

'हे वीर वानरराज सुग्रीव व लंकापती बिभीषण, ऐका. या खोल समुद्रास कसे ओलांडायचे? अनेक प्रकारच्या मगरी, साप आणि मासे यांनी भरलेला हा अथांग सागर उल्लंघून जाण्यास फार कठीण आहे.' ॥ ३ ॥

**कह लंकेस सुनहु रघुनायक। कोटि सिंधु सोषक तव सायक॥**
**जद्यपि तदपि नीति असि गाई। बिनय करिअ सागर सन जाई॥**

बिभीषण म्हणाला, 'हे रघुनाथ, जरी आपला एक बाणसुद्धा कोट्यवधी समुद्रांना शोषून घेऊ शकतो, परंतु नीती असे सांगते की, प्रथम जाऊन समुद्राला विनंती करावी, हे योग्य. ॥ ४ ॥

**दो०—प्रभु तुम्हार कुलगुर जलधि कहिहि उपाय बिचारि।**
**बिनु प्रयास सागर तरिहि सकल भालु कपि धारि॥ ५०॥**

हे प्रभू, समुद्र तुमच्या कुळाचा पूर्वज आहे. तो विचार करून उपाय सांगेल. मग अस्वले व वानरांची सेना विनासायास समुद्रापलीकडे जाऊ शकेल.'॥ ५० ॥

**सखा कही तुम्ह नीकि उपाई। करिअ दैव जौं होइ सहाई॥**
**मंत्र न यह लछिमन मन भावा। राम बचन सुनि अति दुख पावा॥**

श्रीरामांनी म्हटले, 'हे मित्रा, तू चांगला उपाय सांगितलास. जर दैव सहाय्यक असेल, तर हाच उपाय करावा.' हा सल्ला लक्ष्मणाला आवडला नाही. श्रीरामांचे बोलणे ऐकून तर त्याला फार दुःख झाले. ॥ १ ॥

**नाथ दैव कर कवन भरोसा। सोषिअ सिंधु करिअ मन रोसा॥**
**कादर मन कहुँ एक अधारा। दैव दैव आलसी पुकारा॥**

लक्ष्मण म्हणाला, 'हे नाथा, दैवाचा काय भरवसा. मनात राग आणा आणि समुद्र सुकवून टाका. दैव हे भित्र्या मनाचे एक समाधान आहे. आळशी लोकच दैव, दैव असे म्हणत बसतात.'॥ २ ॥

**सुनत बिहसि बोले रघुबीरा। ऐसेहिं करब धरहु मन धीरा॥**
**अस कहि प्रभु अनुजहि समुझाई। सिंधु समीप गए रघुराई॥**

हे ऐकून श्रीरघुवीर हसत म्हणाले, 'असेच करू. मनात धीर धर.' असे म्हणून भावाला समजावून प्रभू रघुनाथ समुद्राजवळ गेले. ॥ ३ ॥

**प्रथम प्रनाम कीन्ह सिरु नाई। बैठे पुनि तट दर्भ डसाई॥**
**जबहिं बिभीषन प्रभु पहिं आए। पाछें रावन दूत पठाए॥**

त्यांनी प्रथमतः मस्तक नमवून समुद्राला प्रणाम केला. मग किनाऱ्यावर कुश पसरून त्यावर बसले. इकडे ज्यावेळी बिभीषण प्रभूंच्याकडे आला होता, त्याचवेळी रावणाने आपले दूत त्याच्यामागे पाठविले होते. ॥ ४ ॥

दो०—**सकल चरित तिन्ह देखे धरें कपट कपि देह।**
**प्रभु गुन हृदयँ सराहहिं सरनागत पर नेह॥ ५१ ॥**

कपटाने त्यांनी वानर-रूप धारण करून सर्व लीला पाहिल्या. ते आपल्या मनात प्रभूंच्या गुणांची व शरणागतावरील त्यांच्या प्रेमाची प्रशंसा करू लागले. ॥ ५१ ॥

**प्रगट बखानहिं राम सुभाऊ। अति सप्रेम गा बिसरि दुराऊ॥**
**रिपु के दूत कपिन्ह तब जाने। सकल बाँधि कपीस पहिं आने॥**

नंतर उघडपणेही ते मोठ्या प्रेमाने श्रीरामांच्या स्वभावाचा मोठेपणा वर्णन करू लागले. ते आपले सोंग विसरून गेले. तेव्हा वानरांना कळले की, हे शत्रूचे दूत आहेत आणि ते त्यांना बांधून सुग्रीवाकडे घेऊन आले. ॥ १ ॥

**कह सुग्रीव सुनहु सब बानर। अंग भंग करि पठवहु निसिचर॥**
**सुनि सुग्रीव बचन कपि धाए। बाँधि कटक चहु पास फिराए॥**

सुग्रीव म्हणाला, 'वानरांनो, या राक्षसांची हाडे मोडून यांना परत पाठवा.' सुग्रीवाचे बोलणे ऐकून वानर धावले. दूतांना बांधून त्यांनी सैन्यामधून त्यांची धिंड काढली.॥ २॥

**बहु प्रकार मारन कपि लागे। दीन पुकारत तदपि न त्यागे॥**
**जो हमार हर नासा काना। तेहि कोसलाधीस कै आना॥**

वानर त्यांना खूप प्रकारे मारू लागले. ते दीनवाणे होऊन ओरडत होते, तरीही वानरांनी त्यांना सोडले नाही. तेव्हा त्या दूतांनी ओरडून सांगितले की, 'जो आमचे कान-नाक कापेल, त्याला कोसलाधीश श्रीरामांची शपथ आहे.'॥ ३॥

**सुनि लछिमन सब निकट बोलाए। दया लागि हँसि तुरत छोड़ाए॥**
**रावन कर दीजहु यह पाती। लछिमन बचन बाचु कुलघाती॥**

हे ऐकताच लक्ष्मणाने सर्व वानरांना जवळ बोलावले. त्याला दया आली. त्यामुळे त्याने हसून त्या राक्षसांना लगेच सोडविले. तो त्यांना म्हणाला, 'रावणाच्या हाती ही चिठ्ठी द्या आणि सांगा की, हे कुलघातका, लक्ष्मणाचा निरोप वाच.॥ ४॥

दो०—**कहेहु मुखागर मूढ़ सन मम संदेसु उदार।**
**सीता देइ मिलहु न त आवा कालु तुम्हार॥ ५२॥**

मग त्या मूर्ख रावणाला माझा तोंडी कृपापूर्ण निरोप द्या की, सीतेला परत देऊन श्रीरामांना भेट, नाही तर तुझा काळ आला आहे, असे समज.'॥ ५२॥

**तुरत नाइ लछिमन पद माथा। चले दूत बरनत गुन गाथा॥**
**कहत राम जसु लंकाँ आए। रावन चरन सीस तिन्ह नाए॥**

लक्ष्मणाच्या पाया पडून व श्रीरामांच्या गुणांची कथा वर्णन करीत ते दूत त्वरित निघाले. श्रीरामांची कीर्ती गात ते लंकेत आले आणि त्यांनी रावणाच्या पायांवर मस्तक टेकविले.॥ १॥

**बिहसि दसानन पूँछी बाता। कहसि न सुक आपनि कुसलाता॥**
**पुनि कहु खबरि बिभीषन केरी। जाहि मृत्यु आई अति नेरी॥**

रावणाने हसून विचारले, 'अरे शुका, आपली खुशाली का सांगत नाहीस? नंतर बिभीषणाची वार्ता सांग. कारण मृत्यू अगदी त्याच्याजवळ आला आहे.॥ २॥

**करत राज लंका सठ त्यागी। होइहि जव कर कीट अभागी॥**
**पुनि कहु भालु कीस कटकाई। कठिन काल प्रेरित चलि आई॥**

लंकेत राज्य करीत असताना तो मूर्ख लंका सोडून गेला. तो अभागी आता धान्यातला किडा होईल. (नर-वानरांच्याबरोबर तोही मारला जाईल.) नंतर अस्वले व वानरांच्या सेनेची स्थिती सांग, जी कठीण काळाच्या प्रेरणेने मरण्यासाठी येथे आली आहेत. ॥ ३ ॥

**जिन्ह के जीवन कर रखवारा। भयउ मृदुल चित सिंधु बिचारा॥**
**कहु तपसिन्ह कै बात बहोरी। जिन्ह के हृदयँ त्रास अति मोरी॥**

आणि ज्यांच्या जीवनाचा रक्षक कोमल चित्ताचा बिचारा समुद्र झाला आहे. तो नसता तर आतापर्यंत राक्षसांनी त्यांना मारून टाकले असते. नंतर त्या तपस्व्यांची वार्ता सांग, ज्यांच्या मनात माझी मोठी भीती आहे. ॥ ४ ॥

दो०—**की भइ भेंट कि फिरि गए श्रवन सुजसु सुनि मोर।**
**कहसि न रिपु दल तेज बल बहुत चकित चित तोर॥ ५३ ॥**

त्यांची तुझी भेट झाली की, कानांनी नुसती त्यांची कीर्ती ऐकून आलास? शत्रु-सेनेचे तेज व बल किती आहे, ते सांगत का नाहीस? तुझे चित्त फार थक्क झालेले दिसते.'॥ ५३ ॥

**नाथ कृपा करि पूँछेहु जैसें। मानहु कहा क्रोध तजि तैसें॥**
**मिला जाइ जब अनुज तुम्हारा। जातहिं राम तिलक तेहि सारा॥**

दूत म्हणाला, 'हे नाथ, तुम्ही ज्याप्रमाणे कृपा करून विचारले, तसेच आता राग सोडून माझे म्हणणे ऐका. जेव्हा तुमचा भाऊ श्रीरामांना जाऊन भेटला, तेव्हा तो पोहोचताच श्रीरामांनी त्याला राजतिलक केला. ॥ १ ॥

**रावन दूत हमहि सुनि काना। कपिन्ह बाँधि दीन्हे दुख नाना॥**
**श्रवन नासिका काटैं लागे। राम सपथ दीन्हें हम त्यागे॥**

आम्ही रावणाचे दूत आहोत, हे ऐकून वानरांनी आम्हांला बांधून घालून फार त्रास दिला. इतकेच काय, ते आमचे नाक-कान कापायला निघाले. आम्ही रामाची शपथ घातल्यावर त्यांनी आम्हांला सोडले. ॥ २ ॥

**पूँछिहु नाथ राम कटकाई। बदन कोटि सत बरनि न जाई॥**
**नाना बरन भालु कपि धारी। बिकटानन बिसाल भयकारी॥**

हे नाथ, तुम्ही रामांच्या सेनेबद्दल विचारले, तर तिचे वर्णन कोट्यवधी मुखांनीही करता येत नाही. अनेक रंगांची अस्वले आणि वानरांची सेना आहे. ते भयंकर तोंडाचे, विशाल देहाचे आणि भयानक आहेत. ॥ ३ ॥

**जेहिं पुर दहेउ हतेउ सुत तोरा। सकल कपिन्ह महँ तेहि बलु थोरा॥**
**अमित नाम भट कठिन कराला। अमित नाग बल बिपुल बिसाला॥**

ज्याने नगर जाळले आणि आपला पुत्र अक्षकुमार याला मारले, त्या वानराचे बळ तर सर्व वानरांमध्ये कमीच आहे. असंख्य नावे असलेले खूपच कठोर आणि भयंकर योद्धे आहेत. त्यांच्यामध्ये असंख्य हत्तींचे बळ आहे आणि ते अतिशय विशाल आहेत. ॥ ४ ॥

**दो०—द्विबिद मयंद नील नल अंगद गद बिकटासि।**
**दधिमुख केहरि निसठ सठ जामवंत बलरासि॥ ५४॥**

द्विविद, मयंद, नील, नल, अंगद, गद, विकटास्य, दधिमुख, केसरी, निशठ, शठ आणि जांबवान हे सर्व बळाचे सागर आहेत. ॥ ५४ ॥

**ए कपि सब सुग्रीव समाना। इन्ह सम कोटिन्ह गनइ को नाना॥**
**राम कृपाँ अतुलित बल तिन्हहीं। तृन समान त्रैलोकहि गनहीं॥**

हे सर्व वानर बळामध्ये सुग्रीवासारखे आहेत, आणि त्यांच्यासारखे एक-दोन नव्हे, तर कोट्यवधी आहेत. त्या असंख्यांची गणती कोण करू शकणार? श्रीरामांच्या कृपेमुळे त्यांच्यामध्ये अतुल्य बळ आहे. ते तिन्ही लोकांना कस्पटाप्रमाणे तुच्छ समजतात. ॥ १ ॥

**अस मैं सुना श्रवन दसकंधर। पदुम अठारह जूथप बंदर॥**
**नाथ कटक महँ सो कपि नाहीं। जो न तुम्हहि जीतै रन माहीं॥**

हे दशग्रीव, मी ऐकले आहे की, अठरा पद्म तर वानरांचे सेनापतीच आहेत. हे नाथ, त्या सेनेमध्ये तुम्हांला युद्धात जिंकू शकणार नाही,असा एकही वानर नाही. ॥ २ ॥

**परम क्रोध मीजहिं सब हाथा। आयसु पै न देहिं रघुनाथा॥**
**सोषहिं सिंधु सहित झष ब्याला। पूरहिं न त भरि कुधर बिसाला॥**

सर्वच्या सर्व अत्यंत क्रोधाने हात चोळत बसले आहेत. परंतु श्रीरघुवीर त्यांना अजुनी आज्ञा देत नाहीत. ते म्हणतात, 'आम्ही मासे व सापांसह समुद्राला शोषून टाकू, नाही तर मोठमोठ्या पर्वतांनी समुद्राला भरून टाकू. ॥ ३ ॥

**मर्दि गर्द मिलवहिं दससीसा। ऐसेइ बचन कहहिं सब कीसा॥**
**गर्जहिं तर्जहिं सहज असंका। मानहुँ ग्रसन चहत हहिं लंका॥**

आणि रावणाला चिरडून त्याला धुळीत मिळवू' सर्व वानर असेच बोलत आहेत. सर्वजण अगदी निर्भय आहेत. ते अशा प्रकारे गर्जना करतात व धावून येतात की, लंकेला गिळून टाकू पाहात आहेत. ॥ ४ ॥

**दो०—सहज सूर कपि भालु सब पुनि सिर पर प्रभु राम।**
**रावन काल कोटि कहुँ जीति सकहिं संग्राम॥ ५५॥**

सर्व वानर व अस्वले स्वभावतःच शूर आहेत. शिवाय त्यांच्या शिरावर सर्वेश्वर प्रभू श्रीराम आहेत. हे रावणा, ते युद्धामध्ये कोट्यवधी काळांना जिंकू शकतात. ॥ ५५ ॥

**राम तेज बल बुधि बिपुलाई। सेष सहस सत सकहिं न गाई॥**
**सक सर एक सोषि सत सागर। तव भ्रातहि पूँछेउ नय नागर॥**

श्रीरामचंद्रांचे सामर्थ्य, बळ आणि बुद्धी यांच्या महतीचे गायन लाखो शेषही करू शकत नाहीत. ते एका बाणाने शेकडो समुद्र शोषून टाकू शकतात. परंतु नीतिनिपुण श्रीरामांनी तुमच्या भावाला उपाय विचारला.॥ १॥

**तासु बचन सुनि सागर पाहीं। मागत पंथ कृपा मन माहीं॥**
**सुनत बचन बिहसा दससीसा। जौं असि मति सहाय कृत कीसा॥**

त्याच्या बोलण्याप्रमाणे श्रीराम समुद्राला वाट मागत आहेत. त्यांच्या मनात कृपा भरलेली आहे, म्हणून ते त्याला शोषून टाकत नाहीत.' दूताचे बोलणे ऐकून रावण खदखदा हसला आणि म्हणाला, 'श्रीरामाला अशी बुद्धी आहे तर? म्हणूनच त्याने वानरांची मदत घेतली आहे.॥ २॥

**सहज भीरु कर बचन दृढ़ाई। सागर सन ठानी मचलाई॥**
**मूढ़ मृषा का करसि बड़ाई। रिपु बल बुद्धि थाह मैं पाई॥**

स्वभावाने भित्र्या बिभीषणाचे बोलणे खरे मानून त्याने समुद्राशी बालहट्ट करायचे ठरविले आहे. अरे मूर्खा, त्याचे खोटे मोठेपण काय सांगतोस? पुरे. शत्रू असलेल्या रामाच्या बल व बुद्धीचे रहस्य मला कळून चुकले.॥ ३॥

**सचिव सभीत बिभीषन जाकें। बिजय बिभूति कहाँ जग ताकें॥**
**सुनि खल बचन दूत रिस बाढ़ी। समय बिचारि पत्रिका काढ़ी॥**

बिभीषणासारखा भित्रा ज्याचा मंत्री असेल, त्याला जगात विजय व ऐश्वर्य कसले मिळणार?' दुष्ट रावणाचे हे बोलणे ऐकून दूताला राग आला. त्याने संधी साधून चिठ्ठी काढली.॥ ४॥

**रामानुज दीन्ही यह पाती। नाथ बचाइ जुड़ावहु छाती॥**
**बिहसि बाम कर लीन्ही रावन। सचिव बोलि सठ लाग बचावन॥**

आणि म्हटले, 'श्रीरामांचा लहान भाऊ लक्ष्मणाने ही चिठ्ठी दिली आहे.' रावणाने ती डाव्या हाताने घेतली आणि मंत्र्याला बोलावून तो मूर्ख, मंत्र्याकडून वाचून घेऊ लागला.॥ ५॥

दो०—**बातन्ह मनहि रिझाइ सठ जनि घालसि कुल खीस।**
**राम बिरोध न उबरसि सरन बिष्नु अज ईस॥ ५६ (क)॥**

चिठ्ठीत लिहिले होते, 'अरे, मूर्खा, फक्त गप्पा मारून स्वत:च्या मनाची समजूत घालून आपले कुल नष्ट-भ्रष्ट करू नकोस. श्रीरामांना विरोध करून तू ब्रह्मदेव, विष्णू व महेश यांना शरण गेलास, तरी तू वाचू शकणार नाहीस.॥ ५६ (क)॥

**की तजि मान अनुज इव प्रभु पद पंकज भृंग।**
**होहि कि राम सरानल खल कुल सहित पतंग॥ ५६ ( ख )॥**

एक तर अभिमान सोडून आपल्या लहान भाऊ बिभीषणाप्रमाणे प्रभूंच्या चरणांचा भ्रमर बन. नाही तर हे दुष्टा, श्रीरामांच्या बाणरूपी अग्नीमध्ये परिवारासह पतंग-कीटकाप्रमाणे मरून जा.'॥ ५६(ख)॥

**सुनत सभय मन मुख मुसुकाई। कहत दसानन सबहि सुनाई॥**
**भूमि परा कर गहत अकासा। लघु तापस कर बाग बिलासा॥**

चिठ्ठी ऐकताच रावण मनातून घाबरला, परंतु तोंडाने हसत तो सर्वांना म्हणू लागला-'ज्याप्रमाणे कोणी पृथ्वीवर पडून हाताने आकाश पकडण्याचा प्रयत्न करतो. तसाच हा छोटा तपस्वी प्रौढी मिरवत आहे.'॥ १॥

**कह सुक नाथ सत्य सब बानी। समुझहु छाड़ि प्रकृति अभिमानी॥**
**सुनहु बचन मम परिहरि क्रोधा। नाथ राम सन तजहु बिरोधा॥**

शुक नावाच्या दूताने म्हटले 'महाराज! अहंकारी स्वभाव सोडून, पत्रात लिहिलेल्या गोष्टी खऱ्या समजा, क्रोध सोडून माझे बोलणे ऐका. हे नाथ, श्रीरामांशी वैर सोडून द्या. ॥ २॥

**अति कोमल रघुबीर सुभाऊ। जद्यपि अखिल लोक कर राऊ॥**
**मिलत कृपा तुम्ह पर प्रभु करिही। उर अपराध न एकउ धरिही॥**

जरी रघुवीर हे संपूर्ण लोकांचे स्वामी आहेत, तरी त्यांचा स्वभाव अत्यंत कोमल आहे. भेटताच ते प्रभू तुमच्यावर कृपा करतील आणि तुमचा एकही अपराध ते मनात ठेवणार नाहीत.॥ ३॥

**जनकसुता रघुनाथहि दीजे। एतना कहा मोर प्रभु कीजे॥**
**जब तेहिं कहा देन बैदेही। चरन प्रहार कीन्ह सठ तेही॥**

प्रभूंना जानकी देऊन टाका. हे प्रभू, माझे एवढे सांगणे पूर्ण करा.' जेव्हा दूताने जानकीला परत देण्यास सांगितले, तेव्हा त्या दुष्ट रावणाने त्याला लाथ मारली.॥ ४॥

**नाइ चरन सिरु चला सो तहाँ। कृपासिंधु रघुनायक जहाँ॥**
**करि प्रनामु निज कथा सुनाई। राम कृपाँ आपनि गति पाई॥**

तो सुद्धा बिभीषणाप्रमाणे त्याच्या पाया पडून नतमस्तक होऊन कृपासागर श्रीरघुनाथांच्याकडे गेला. प्रणाम करून त्याने आपले म्हणणे सांगितले आणि श्रीरामांच्या कृपेने त्याला मुनीचे स्वरूप प्राप्त झाले.॥ ५॥

**रिषि अगस्ति कीं साप भवानी। राछस भयउ रहा मुनि ग्यानी॥**
**बंदि राम पद बारहिं बारा। मुनि निज आश्रम कहुँ पगु धारा॥**

शिव म्हणतात, 'भवानी, तो ज्ञानी मुनी होता. अगस्त्य मुनींच्या शापामुळे राक्षस झाला होता. वारंवार श्रीरामांच्या चरणांना वंदन करून तो मुनी आपल्या आश्रमाला गेला. ॥ ६ ॥

दो०—**बिनय न मानत जलधि जड़ गए तीनि दिन बीति।**
**बोले राम सकोप तब भय बिनु होइ न प्रीति॥ ५७॥**

इकडे तीन दिवस झाले, तरी जड बुद्धीच्या समुद्राने श्रीरामांची विनंती मानली नाही. तेव्हा श्रीरामांनी क्रोधाने म्हटले-'भीतीशिवाय प्रीती होत नाही. ॥ ५७ ॥

**लछिमन बान सरासन आनू। सोषौं बारिधि बिसिख कृसानू॥**
**सठ सन बिनय कुटिल सन प्रीती। सहज कृपन सन सुंदर नीती॥**

हे लक्ष्मणा, धनुष्य-बाण आण. मी अग्निबाणाने समुद्राला शोषून टाकतो. मूर्खाशी नम्रता, कुटिलाशी प्रेम, स्वभावाने कंजूष असलेल्याला उदार उपदेश, ॥ १ ॥

**ममता रत सन ग्यान कहानी। अति लोभी सन बिरति बखानी॥**
**क्रोधिहि सम कामिहि हरिकथा। ऊसर बीज बएँ फल जथा॥**

ममतेमध्ये अडकलेल्या माणसाला ज्ञानाची गोष्ट, अत्यंत लोभ्याला वैराग्याचे वर्णन, क्रोधी माणसाला शांततेची गोष्ट आणि कामी माणसाला भगवंताची कथा-यांचा परिणाम नापीक जमिनीत बी पेरल्याप्रमाणे फुकट ठरतो.'॥ २ ॥

**अस कहि रघुपति चाप चढ़ावा। यह मत लछिमन के मन भावा॥**
**संधानेउ प्रभु बिसिख कराला। उठी उदधि उर अंतर ज्वाला॥**

असे म्हणून श्रीरघुनाथांनी धनुष्य सज्ज केले. हा विचार लक्ष्मणाला फार चांगला वाटला. प्रभूंनी अग्निबाणाचा नेम धरला, त्यासरशी समुद्राच्या हृदयात अग्नीची ज्वाळा उठली. ॥ ३ ॥

**मकर उरग झष गन अकुलाने। जरत जंतु जलनिधि जब जाने॥**
**कनक थार भरि मनि गन नाना। बिप्र रूप आयउ तजि माना॥**

मगर, साप आणि मासे यांचे समूह व्याकूळ झाले. जेव्हा समुद्राने पाहिले की, जलचर जीव जळू लागले आहेत, तेव्हा तो अभिमान सोडून सोन्याच्या थाळीमध्ये अनेक रत्ने घेऊन ब्राह्मणाच्या रूपाने आला. ॥ ४ ॥

दो०—**काटेहिं पइ कदरी फरइ कोटि जतन कोउ सींच।**
**बिनय न मान खगेस सुनु डाटेहिं पइ नव नीच॥ ५८॥**

काकभुशुंडी म्हणतात, 'हे गरुडा, कोणी कितीही उपाय केले, तरी केळीचे झाड कापल्यावरच फळे देते. नीच मनुष्य नम्रता मानत नाही. शासन केल्यावरच तो वाकतो. ॥ ५८ ॥

**सभय सिंधु गहि पद प्रभु केरे। छमहु नाथ सब अवगुन मेरे॥**
**गगन समीर अनल जल धरनी। इन्ह कइ नाथ सहज जड़ करनी॥**

समुद्राने भयभीत होऊन प्रभूंचे चरण धरले आणि तो म्हणाला, 'हे नाथ, माझे सर्व दोष क्षमा करा. हे नाथ, आकाश, वायू, अग्नी, जल व पृथ्वी या सर्वांची करणी स्वभावतःच ज्ञानहीन असते. ॥ १ ॥

**तव प्रेरित मायाँ उपजाए। सृष्टि हेतु सब ग्रंथनि गाए॥**
**प्रभु आयसु जेहि कहँ जस अहई। सो तेहि भाँति रहें सुख लहई॥**

तुमच्या प्रेरणेमुळे मायेने यांना सृष्टीसाठी उत्पन्न केलेले आहे. सर्व ग्रंथांमध्ये असेच सांगितले आहे. ज्याच्यासाठी स्वामींची जशी आज्ञा असेल, तो त्याप्रमाणे राहाण्यातच सुखी असतो. ॥ २ ॥

**प्रभु भल कीन्ह मोहि सिख दीन्ही। मरजादा पुनि तुम्हरी कीन्ही॥**
**ढोल गवाँर सूद्र पसु नारी। सकल ताड़ना के अधिकारी॥**

प्रभूंनी मला शिक्षा देऊन चांगले केले, परंतु जिवांचे स्वभावसुद्धा तुम्हीच बनविले आहेत. ढोल, खेडूत, शूद्र, पशू व स्त्री हे सर्व दंडानेच वठणीवर येतात. ॥ ३ ॥

**प्रभु प्रताप मैं जाब सुखाई। उतरिहि कटकु न मोरि बड़ाई॥**
**प्रभु अग्या अपेल श्रुति गाई। करौं सो बेगि जो तुम्हहि सोहाई॥**

प्रभूंच्या प्रतापामुळे मी सुकून जाईन आणि सेना पलीकडे उतरेल, यात माझे मोठेपण नाही, तरीही प्रभूंची आज्ञा मोडता येत नाही, असे वेदांनी प्रतिपादन केले आहे. आता तुम्हांला जे बरे वाटेल, ते मी त्वरित करतो.'॥ ४ ॥

दो०—**सुनत बिनीत बचन अति कह कृपाल मुसुकाइ।**
**जेहि बिधि उतरै कपि कटकु तात सो कहहु उपाइ॥ ५९ ॥**

समुद्राची अत्यंत विनीत वचने ऐकून कृपाळू श्रीरामांनी हसून म्हटले 'बाबा रे, ज्या रीतीने वानरांची सेना पार उतरून जाईल असा उपाय सांग.'॥ ५९ ॥

**नाथ नील नल कपि द्वौ भाई। लरिकाईं रिषि आसिष पाई॥**
**तिन्ह कें परस किएँ गिरि भारे। तरिहहिं जलधि प्रताप तुम्हारे॥**

समुद्र म्हणाला, 'हे नाथ, नील व नल हे दोन वानर बंधू आहेत. त्यांना लहानपणी ऋषींचा आशीर्वाद मिळाला होता. त्यांनी स्पर्श केल्यास मोठमोठे पर्वतसुद्धा तुमच्या प्रतापाने समुद्रात तरंगू लागतील. ॥ १ ॥

**मैं पुनि उर धरि प्रभु प्रभुताई। करिहउँ बल अनुमान सहाई॥**
**एहि बिधि नाथ पयोधि बँधाइअ। जेहिं यह सुजसु लोक तिहुँ गाइअ॥**

मी प्रभूंची सत्ता ध्यानात ठेवून आपल्या बळानुसार जी शक्य होईल, ती मदत करतो. अशा प्रकारे समुद्राला बांध घाला की. त्यामुळे त्रैलोक्यामध्ये तुमची सुंदर कीर्ती गाइली जाईल. ॥ २ ॥

**एहिं सर मम उत्तर तट बासी। हतहु नाथ खल नर अघ रासी॥**
**सुनि कृपाल सागर मन पीरा। तुरतहिं हरी राम रनधीरा॥**

या बाणाने माझ्या उत्तरेकडील तटावर राहाणारे जे अत्यंत पापी व दुष्ट मनुष्य आहेत, त्यांचा वध करा.' कृपाळू आणि रणधीर रामांनी समुद्राच्या मनातील दुःख ऐकून, ते त्वरित दूर केले व त्या दुष्टांना बाणाने मारून टाकले. ॥ ३ ॥

**देखि राम बल पौरुष भारी। हरषि पयोनिधि भयउ सुखारी॥**
**सकल चरित कहि प्रभुहि सुनावा। चरन बंदि पाथोधि सिधावा॥**

श्रीरामांचा प्रचंड पराक्रम पाहून समुद्र आनंदित झाला. त्याने त्या दुष्टांची सारी हकीगत प्रभूंना सांगितली. नंतर त्यांच्या चरणांना वंदन करून समुद्र निघून गेला. ॥ ४ ॥

छं०—**निज भवन गवनेउ सिंधु श्रीरघुपतिहि यह मत भायऊ।**
**यह चरित कलि मलहर जथामति दास तुलसी गायऊ॥**
**सुख भवन संसय समन दवन बिषाद रघुपति गुन गना।**
**तजि सकल आस भरोस गावहि सुनहि संतत सठ मना॥**

समुद्र आपल्या घरी गेला. श्रीरघुनाथांना त्याचा विचार आवडला. हे चरित्र कलियुगातील पापांचे हरण करणारे आहे, आणि तुलसीदासाने आपल्या बुद्धीप्रमाणे ते गाइले आहे. श्रीरघुनाथ हे गुण-निधी, सुख-धाम, संशयाचा नाश करणारे आणि विषादाचे दमन करणारे आहेत. अरे मूर्ख मना, तू संसारातील सर्व आशा व विश्वास सोडून निरंतर त्यांचे गायन कर व त्यांचे चरित्र ऐक.

दो०—**सकल सुमंगल दायक रघुनायक गुन गान।**
**सादर सुनहिं ते तरहिं भव सिंधु बिना जलजान॥ ६० ॥**

श्रीरघुनाथांचे गुणगान हे संपूर्ण मांगल्य देणारे आहे. जे आदरपूर्वक हे ऐकतील, ते कोणत्याही जहाजाविना-साधनाविना-भवसागरातून तरून जातील. ॥ ६० ॥

## मासपारायण, चोविसावा विश्राम

**इति श्रीमद्रामचरितमानसे सकलकलिकलुषविध्वंसने पञ्चमः सोपानः समाप्तः।**

*कलियुगाच्या संपूर्ण पापांचा नाश करणाऱ्या श्रीरामचरितमानसाचा*
*हा पाचवा सोपान समाप्त झाला.*

~~○~~

**( सुन्दरकाण्ड समाप्त )**

# शरणागतवत्सलता



तुरत बिभीषन पाछें मेला। सन्मुख राम सहेउ सोइ सेला॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥

**॥ श्रीजानकीवल्लभो विजयते ॥**

# श्रीरामचरितमानस

## षष्ठ सोपान

## लङ्काकाण्ड

श्लोक

**रामं कामारिसेव्यं भवभयहरणं कालमत्तेभसिंहं**
**योगीन्द्रं ज्ञानगम्यं गुणनिधिमजितं निर्गुणं निर्विकारम्।**
**मायातीतं सुरेशं खलवधनिरतं ब्रह्मवृन्दैकदेवं**
**वन्दे कन्दावदातं सरसिजनयनं देवमुर्वीशरूपम्॥ १ ॥**

कामदेवाचे शत्रू असणाऱ्या शिवांचे आराध्य दैवत, जन्म-मृत्युरूपी भवाचे भय हरण करणारे, कालरूपी हत्तीसाठी सिंहासमान, योगीश्वर, ज्ञानाने जाणता येणारे, गुणांचे निधी, अजेय, निर्गुण, निर्विकार, मायातीत, देवांचे स्वामी, दुष्टांचा वध करण्यात तत्पर, ब्राह्मणवृंदाचे एकमात्र देव, सजल मेघासमान सुंदर श्याम, कमलसदृश नेत्रांचे, राजाच्या रूपातील परमदेव श्रीराम यांना मी वंदन करतो. ॥ १ ॥

**शङ्खेन्द्वाभमतीवसुन्दरतनुं शार्दूलचर्माम्बरं**
**कालव्यालकरालभूषणधरं गङ्गाशशाङ्कप्रियम्।**
**काशीशं कलिकल्मषौघशमनं कल्याणकल्पद्रुमं**
**नौमीड्यं गिरिजापतिं गुणनिधिं कन्दर्पहं शङ्करम्॥ २ ॥**

शंख आणि चंद्र यांच्यासारखी कांती असणारे, अत्यंत सुंदर शरीराचे, व्याघ्रांबर धारण करणारे, कालसमान भयानक सर्पांचे भूषण धारण करणारे, गंगा व चंद्र यांचे प्रेमी काशीपती, कलियुगातील पाप-समूहाचा नाश करणारे, कल्याणाचे कल्पवृक्ष, गुणांचे निधान आणि कामदेवाला भस्म करणारे, पार्वतीपती, पूज्य श्रीशंकर यांना मी नमस्कार करतो. ॥ २ ॥

**यो ददाति सतां शम्भुः कैवल्यमपि दुर्लभम्।**
**खलानां दण्डकृद्योऽसौ शङ्करः शं तनोतु मे॥ ३॥**

जे सत्पुरुषांना अत्यंत दुर्लभ अशी कैवल्यमुक्तीसुद्धा देऊन टाकतात आणि जे दुष्टांना दंड देणारे आहेत, ते कल्याणकारी श्रीशंभू माझ्या कल्याणाचा विस्तार करोत. ॥ ३ ॥

दो०—**लव निमेष परमानु जुग बरष कलप सर चंड।**
**भजसि न मन तेहि राम को कालु जासु कोदंड॥**

लव, निमेष, परमाणू, वर्ष, युग आणि कल्प हे ज्यांचे प्रचंड बाण आहेत आणि काळ हे ज्यांचे धनुष्य आहे, हे मना! तू त्या श्रीरामांचे भजन का करीत नाहीस?

सो०—**सिंधु बचन सुनि राम सचिव बोलि प्रभु अस कहेउ।**
**अब बिलंबु केहि काम करहु सेतु उतरै कटकु॥**

समुद्राचे बोलणे ऐकून प्रभू श्रीरामांनी मंत्र्यांना बोलावून घेतले आणि म्हटले, 'आता उशीर कशासाठी? सेतू तयार करा. त्यामुळे सेना पलीकडे जाऊ शकेल.'

**सुनहु भानुकुल केतु जामवंत कर जोरि कह।**
**नाथ नाम तव सेतु नर चढ़ि भव सागर तरहिं॥**

जांबवान हात जोडून म्हणाला, 'हे सूर्यकुलाचे ध्वजस्वरूप श्रीराम, ऐकून घ्या. हे नाथ, सर्वांत मोठा सेतू तर तुमचे नावच आहे. त्याचा आधार घेऊन मनुष्य संसाररूपी समुद्र पार करतो.

**यह लघु जलधि तरत कति बारा। अस सुनि पुनि कह पवनकुमारा॥**
**प्रभु प्रताप बड़वानल भारी। सोषेउ प्रथम पयोनिधि बारी॥**

मग हा लहानसा समुद्र पार करण्यास कितीसा वेळ लागेल?' हे ऐकून पवनकुमार श्रीहनुमान म्हणाला, 'प्रभूंचा प्रताप हा प्रचंड वडवानलासारखा आहे. त्याने पूर्वीच समुद्राचे पाणी शोषून घेतले आहे. ॥ १ ॥

**तव रिपु नारि रुदन जल धारा। भरेउ बहोरि भयउ तेहिं खारा॥**
**सुनि अति उकुति पवनसुत केरी। हरषे कपि रघुपति तन हेरी॥**

परंतु तुमच्या शत्रूंच्या स्त्रियांच्या अश्रूंच्या धारांनी हा पुन्हा भरला आहे आणि त्यामुळे

खारा आहे.' हनुमानाचे अलंकारपूर्ण बोलणे ऐकून श्रीरघुनाथांच्याकडे पाहात सर्व वानर आनंदित झाले. ॥ २ ॥

**जामवंत बोले दोउ भाई। नल नीलहि सब कथा सुनाई॥**
**राम प्रताप सुमिरि मन माहीं। करहु सेतु प्रयास कछु नाहीं॥**

जांबवानाने नल-नील या दोघा भावांना बोलावून सर्व सांगितले आणि म्हटले, 'मनात श्रीरामांच्या प्रतापाचे स्मरण करून सेतू बनवा. रामांच्या प्रतापामुळे काहीही कष्ट होणार नाहीत.'॥ ३ ॥

**बोलि लिए कपि निकर बहोरी। सकल सुनहु बिनती कछु मोरी॥**
**राम चरन पंकज उर धरहू। कौतुक एक भालु कपि करहू॥**

नंतर वानरांच्या समूहांना बोलावून घेतले आणि सांगितले की, 'तुम्ही सर्वजण माझी विनंती ऐका. आपल्या मनात श्रीरामांचे चरण-कमल धारण करा आणि सर्व अस्वले व वानर मिळून एक कौतुक करा.॥ ४ ॥

**धावहु मर्कट बिकट बरूथा। आनहु बिटप गिरिन्ह के जूथा॥**
**सुनि कपि भालु चले करि हूहा। जय रघुबीर प्रताप समूहा॥**

बलवान वानरांच्या समूहांनी धावत जाऊन वृक्ष व पर्वतांचे समूह उपटून आणावेत.' हे ऐकताच वानर व अस्वले हुंकार करीत आणि श्रीरघुनाथांच्या प्रतापाचा जयजयकार करीत निघाले. ॥ ५ ॥

दो०—**अति उतंग गिरि पादप लीलहिं लेहिं उठाइ।**
**आनि देहिं नल नीलहि रचहिं ते सेतु बनाइ॥ १॥**

ते उंच उंच पर्वत व वृक्ष लीलया सहजपणे उपटून घेत होते आणि नल व नील यांना आणून देत होते. ते दोघे चांगल्याप्रकारे पर्वत, वृक्ष रचून सेतू बनवू लागले.॥ १ ॥

**सैल बिसाल आनि कपि देहीं। कंदुक इव नल नील ते लेहीं॥**
**देखि सेतु अति सुंदर रचना। बिहसि कृपानिधि बोले बचना॥**

वानर मोठमोठे पर्वत आणून देत होते आणि नल-नील ते चेंडूप्रमाणे सहज घेत होते. सेतूची सुंदर रचना पाहून कृपासिंधू श्रीराम हसून म्हणाले.॥ १ ॥

**परम रम्य उत्तम यह धरनी। महिमा अमित जाइ नहिं बरनी॥**
**करिहउँ इहाँ संभु थापना। मोरे हृदयँ परम कलपना॥**

'येथील भूमी परम रमणीय व उत्तम आहे. तिचा महिमा अगाध आहे. मी येथे श्रीशंकरांची स्थापना करतो. माझ्या मनात हा महान संकल्प आहे.'॥ २ ॥

**सुनि कपीस बहु दूत पठाए। मुनिबर सकल बोलि लै आए॥**
**लिंग थापि बिधिवत करि पूजा। सिव समान प्रिय मोहि न दूजा॥**

श्रीरामांचे बोलणे ऐकून वानरराज सुग्रीवाने पुष्कळ दूत पाठविले. त्यांनी सर्व श्रेष्ठ मुनींना बोलावून आणले. शिवलिंगाची स्थापना करून विधिपूर्वक त्याची पूजा केली. मग भगवान म्हणाले, 'शिवांसारखा दुसरा कोणी मला प्रिय नाही.॥ ३॥

**सिव द्रोही मम भगत कहावा। सो नर सपनेहुँ मोहि न पावा॥**
**संकर बिमुख भगति चह मोरी। सो नारकी मूढ़ मति थोरी॥**

जो शिवांचा द्रोह करतो आणि स्वत:ला माझा भक्त म्हणवून घेतो, तो मनुष्य स्वप्नातही मला प्राप्त करू शकत नाही. शंकरांना विन्मुख होऊन जो माझी भक्ती प्राप्त करू इच्छितो, तो नरकगामी, मूर्ख आणि अल्पबुद्धीचा होय.॥ ४॥

दो०—**संकरप्रिय मम द्रोही सिव द्रोही मम दास।**
**ते नर करहिं कलप भरि घोर नरक महुँ बास॥ २॥**

ज्यांना शंकर प्रिय आहेत, परंतु जे माझे द्रोही आहेत आणि जे शिवांचे द्रोही आहेत आणि माझे दास बनू इच्छितात, ते मनुष्य कल्पापर्यंत घोर नरकात जातात.॥ २॥

**जे रामेस्वर दरसनु करिहहिं। ते तनु तजि मम लोक सिधरिहहिं॥**
**जो गंगाजलु आनि चढ़ाइहि। सो साजुज्य मुक्ति नर पाइहि॥**

जे लोक मी स्थापन केलेल्या या रामेश्वराचे दर्शन घेतील, ते शरीर सोडल्यावर माझ्या लोकी जातील आणि जो गंगाजल या रामेश्वराला अर्पण करील, तो मनुष्य सायुज्य मुक्ती प्राप्त करून माझ्यामध्ये एकरूप होईल.॥ १॥

**होइ अकाम जो छल तजि सेइहि। भगति मोरि तेहि संकर देइहि॥**
**मम कृत सेतु जो दरसनु करिही। सो बिनु श्रम भवसागर तरिही॥**

जे कपट सोडून निष्काम मनाने श्रीरामेश्वराची सेवा करतील, त्यांना शंकर माझी भक्ती देतील आणि जे मी बनविलेल्या सेतूचे दर्शन घेतील, ते विनासायास संसाररूपी समुद्र तरून जातील.'॥ २॥

**राम बचन सब के जिय भाए। मुनिबर निज निज आश्रम आए॥**
**गिरिजा रघुपति कै यह रीती। संतत करहिं प्रनत पर प्रीती॥**

श्रीरामांचे बोलणे सर्वांना मनापासून आवडले. त्यानंतर श्रेष्ठ मुनी आपल्या आश्रमाला गेले. शिव म्हणतात, 'हे पार्वती, शरणागतावर नेहमी प्रेम करणे, ही श्रीरघुनाथांची रीतच आहे.'॥ ३॥

**बाँधा सेतु नील नल नागर। राम कृपाँ जसु भयउ उजागर॥**
**बूड़हिं आनहि बोरहिं जेई। भए उपल बोहित सम तेई॥**

चतुर नल व नील यांनी सेतू बांधला. श्रीरामांच्या कृपेमुळे त्यांची उज्ज्वल कीर्ती सर्वत्र पसरली. जे पाषाण बुडतात आणि दुसऱ्यांनाही बुडवितात, तेच पाषाण जहाजाप्रमाणे स्वतः तरणारे व दुसऱ्यांना तारून नेणारे झाले. ॥ ४ ॥

**महिमा यह न जलधि कइ बरनी । पाहन गुन न कपिन्ह कइ करनी ॥**

हा काही समुद्राचा महिमा नाही, दगडांचा गुण नाही की, ही वानरांची करामत नाही. ॥ ५ ॥

दो०—**श्री रघुबीर प्रताप ते सिंधु तरे पाषान।**
**ते मतिमंद जे राम तजि भजहिं जाइ प्रभु आन॥ ३ ॥**

श्रीरघुवीरांच्या प्रतापाने पाषाणसुद्धा समुद्रावर तरले. अशा श्रीरामांना सोडून जो दुसऱ्या कुणा स्वामीकडे जाऊन त्याला भजतो, तो खरोखरच मंदबुद्धीचा होय. ॥ ३ ॥

**बाँधि सेतु अति सुदृढ़ बनावा । देखि कृपानिधि के मन भावा ॥**
**चली सेन कछु बरनि न जाई । गर्जहिं मर्कट भट समुदाई ॥**

नल-नील यांनी सेतू बांधून तो मजबूत बनविला. तो पाहून श्रीरामांना फार बरे वाटले. सेना निघाली. तिचे वर्णन करणे कठीण. योद्धे असलेल्या वानरांचे समूह गर्जना करीत होते. ॥ १ ॥

**सेतुबंध ढिग चढ़ि रघुराई । चितव कृपाल सिंधु बहुताई ॥**
**देखन कहुँ प्रभु करुना कंदा । प्रगट भए सब जलचर बृंदा ॥**

कृपाळू श्रीरघुनाथ सेतुबंधनाच्या तटावर चढून समुद्राचा विस्तार पाहू लागले. करुणानिधी प्रभूंचे दर्शन घेण्यासाठी सर्व जलचरांचे समूह पाण्याबाहेर आले. ॥ २ ॥

**मकर नक्र नाना झष ब्याला । सत जोजन तन परम बिसाला ॥**
**अइसेउ एक तिन्हहि जे खाहीं । एकन्ह कें डर तेपि डेराहीं ॥**

बऱ्याच प्रकारच्या मगरी, नक्र, मासे आणि सर्प होते. त्यांची विशाल शरीरे शंभर-शंभर योजने होती. काही असेही जंतू होते, जे त्यांनाही खाऊन टाकत. काहींच्या भीतीने तेसुद्धा घाबरत होते. ॥ ३ ॥

**प्रभुहि बिलोकहिं टरहिं न टारे । मन हरषित सब भए सुखारे ॥**
**तिन्ह कीं ओट न देखिअ बारी । मगन भए हरि रूप निहारी ॥**

ते सर्वजण वैर विसरून प्रभूंचे दर्शन घेत होते. हाकलले तरी जात नव्हते. सर्वांची मने आनंदित होती. सर्वजण सुखी झाले. त्यांच्या आच्छादनामुळे पाणी दिसत नव्हते. ते सर्व भगवंतांचे रूप पाहून आनंद-प्रेममग्न झाले होते. ॥ ४ ॥

**चला कटकु प्रभु आयसु पाई । को कहि सक कपि दल बिपुलाई ॥**

प्रभू श्रीरामांची आज्ञा झाल्यावर सेना निघाली. वानरसेना प्रचंड होती. तिची गणना कोण करणार ? ॥ ५ ॥

**दो०—सेतुबंध भइ भीर अति कपि नभ पंथ उड़ाहिं।**
**अपर जलचरन्हि ऊपर चढ़ि चढ़ि पारहि जाहिं॥ ४॥**

सेतुबंधावर मोठी गर्दी झाली. त्यामुळे काही वानर आकाश-मार्गाने उडू लागले आणि काही तर जलचर जीवांना ओलांडून पलीकडे जात होते. ॥ ४ ॥

**अस कौतुक बिलोकि द्वौ भाई। बिहँसि चले कृपाल रघुराई॥**
**सेन सहित उतरे रघुबीरा। कहि न जाइ कपि जूथप भीरा॥**

कृपाळू श्रीराम व बंधू लक्ष्मण हे कौतुक पाहात हसत निघाले. श्रीराम सेनेसह समुद्रपार गेले. वानर आणि त्यांच्या सेनापतींची गर्दी तर काही विचारू नका. ॥ १ ॥

**सिंधु पार प्रभु डेरा कीन्हा। सकल कपिन्ह कहुँ आयसु दीन्हा॥**
**खाहु जाइ फल मूल सुहाए। सुनत भालु कपि जहँ तहँ धाए॥**

प्रभूंनी समुद्र पार करून मुक्काम ठोकला आणि सर्व वानरांना आज्ञा दिली की, 'तुम्ही जाऊन चांगली फळे-मुळे खाऊन घ्या.' हे ऐकताच अस्वले व वानर इकडे-तिकडे धावत निघाले. ॥ २ ॥

**सब तरु फरे राम हित लागी। रितु अरु कुरितु काल गति त्यागी॥**
**खाहिं मधुर फल बिटप हलावहिं। लंका सन्मुख सिखर चलावहिं॥**

श्रीरामांच्या सेवेसाठी सर्व वृक्ष ऋतु-काल नसतानाही फळांनी बहरले. वानर व अस्वले गोड-गोड फळे खात होते, वृक्ष हालवीत होते आणि पर्वतांची शिखरे लंकेकडे टाकीत होते. ॥ ३ ॥

**जहँ कहुँ फिरत निसाचर पावहिं। घेरि सकल बहु नाच नचावहिं॥**
**दसनन्हि काटि नासिका काना। कहि प्रभु सुजसु देहिं तब जाना॥**

फिरत असताना कुठे एखादा राक्षस भेटला, तर सर्वजण त्याला घेरून खूप नाचवत होते आणि दातांनी त्याचे नाक-कान कापून प्रभूंची सुकीर्ती सांगून त्यांना जाऊ देत होते. ॥ ४ ॥

**जिन्ह कर नासा कान निपाता। तिन्ह रावनहि कही सब बाता॥**
**सुनत श्रवन बारिधि बंधाना। दस मुख बोलि उठा अकुलाना॥**

ज्या राक्षसांचे नाक-कान कापले होते, त्यांनी जाऊन सर्व वृत्तांत रावणाला सांगितला. समुद्रावर सेतू बांधल्याचे ऐकून रावण घाबरून दहा तोंडांनी म्हणाला, ॥ ५ ॥

दो०—**बाँध्यो बननिधि नीरनिधि जलधि सिंधु बारीस।**
**सत्य तोयनिधि कंपति उदधि पयोधि नदीस॥ ५॥**

'वननिधी, नीरनिधी, जलधी, सिंधू, वारीश, तोयनिधी, कंपती, उदधी, पयोधी, नदीश याला खरोखरच बांधले आहे?'॥ ५॥

**निज बिकलता बिचारि बहोरी। बिहँसि गयउ गृह करि भय भोरी॥**
**मंदोदरीं सुन्यो प्रभु आयो। कौतुकहीं पाथोधि बँधायो॥**

मग आपली व्याकुळता जाणून वर वर हसत, भय विसरून रावण महालात गेला. जेव्हा मंदोदरीने हे ऐकले की, प्रभू रामचंद्र आले आहेत आणि सहजासहजी समुद्राला बांध घातला आहे,॥ १॥

**कर गहि पतिहि भवन निजआनी। बोली परम मनोहर बानी॥**
**चरन नाइ सिरु अंचलु रोपा। सुनहु बचन पिय परिहरि कोपा॥**

तेव्हा ती पतीचा हात पकडून आपल्या महालात घेऊन गेली आणि मधुर वाणीने म्हणाली. ती त्याचे पाय धरून पदर पसरून म्हणाली, 'हे प्रियतम, क्रोध सोडून माझे म्हणणे ऐका.॥ २॥

**नाथ बयरु कीजे ताही सों। बुधि बल सकिअ जीति जाही सों॥**
**तुम्हहि रघुपतिहि अंतर कैसा। खलु खद्योत दिनकरहि जैसा॥**

हे नाथ, ज्याला बुद्धी व बळाने जिंकता येईल त्याच्याशीच वैर करावे. पण तुमच्यात आणि श्रीरघुनाथ यांच्यात अंतर आहे, ते काजवा व सूर्याप्रमाणे.॥ ३॥

**अति बल मधु कैटभ जेहिं मारे। महाबीर दितिसुत संघारे॥**
**जेहिं बलि बाँधि सहसभुज मारा। सोइ अवतरेउ हरन महि भारा॥**

ज्यांनी विष्णुरूपाने अत्यंत बलवान अशा मधू व कैटभ दैत्यांना मारले आणि वराह व नृसिंहरूपाने महान शूर, दितीचे पुत्र हिरण्याक्ष व हिरण्यकशिपू यांचा संहार केला, ज्यांनी वामनरूपाने बलीला बांधून टाकले आणि परशुरामरूपाने सहस्त्रबाहूला मारले, तेच भगवान पृथ्वीचा भार हरण करण्यासाठी रामरूपाने प्रकट झाले आहेत.॥ ४॥

**तासु बिरोध न कीजिअ नाथा। काल करम जिव जाकें हाथा॥**

ज्यांच्या अधीन काल, कर्म व जीव आहेत, हे नाथ, त्यांचा विरोध पत्करू नका.॥ ५॥

दो०—**रामहि सौंपि जानकी नाइ कमल पद माथ।**
**सुत कहुँ राज समर्पि बन जाइ भजिअ रघुनाथ॥ ६॥**

श्रीरामांना शरण जाऊन त्यांना जानकी समर्पण करा आणि तुम्ही पुत्राला राज्य देऊन, वनात जाऊन श्रीरामांचे भजन करा. ॥ ६ ॥

**नाथ दीनदयाल रघुराई। बाघउ सनमुख गएँ न खाई॥**
**चाहिअ करन सो सब करि बीते। तुम्ह सुर असुर चराचर जीते॥**

हे नाथ, श्रीरघुनाथ हे दीनांवर दया करणारे आहेत. शरण गेल्यावर वाघसुद्धा खात नाही. तुम्हांला जे काही करायचे होते, ते तुम्ही केलेले आहे. तुम्ही देव, राक्षस व चराचर सर्वांना जिंकले आहे. ॥ १ ॥

**संत कहहिं असि नीति दसानन। चौथेंपन जाइहि नृप कानन॥**
**तासु भजनु कीजिअ तहँ भर्ता। जो कर्ता पालक संहर्ता॥**

हे नाथ!, वृद्धापकाळी राजाने वनात जायला हवे, अशी नीती संत सांगतात. वनात तुम्ही सृष्टीची रचना, पालन व संहार करणाऱ्या श्रीरामांचे भजन करावे. ॥ २ ॥

**सोइ रघुबीर प्रनत अनुरागी। भजहु नाथ ममता सब त्यागी॥**
**मुनिबर जतनु करहिं जेहि लागी। भूप राजु तजि होहिं बिरागी॥**

हे नाथ, तुम्ही विषयांची सर्व ममता सोडून शरणागतावर प्रेम करणाऱ्या भगवंतांचे भजन करा. ज्यांच्यासाठी श्रेष्ठ मुनी साधना करतात आणि राजेसुद्धा राज्य सोडून वैरागी होतात, ॥ ३ ॥

**सोइ कोसलाधीस रघुराया। आयउ करन तोहि पर दाया॥**
**जौं पिय मानहु मोर सिखावन। सुजसु होइ तिहुँ पुर अति पावन॥**

तेच कोसलाधीश श्रीरघुनाथ तुमच्यावर दया करण्यास आले आहेत. हे प्रियतम, जर तुम्ही माझे म्हणणे मान्य कराल, तर तुमची अत्यंत पवित्र व सुंदर कीर्ती तिन्ही लोकी पसरेल.' ॥ ४ ॥

दो०—**अस कहि नयन नीर भरि गहि पद कंपित गात।**
**नाथ भजहु रघुनाथहि अचल होइ अहिवात॥ ७ ॥**

असे म्हणत नेत्रांमधून अश्रू ढाळत आणि पतीचे चरण धरून थरथरा कापत असलेल्या मंदोदरीने म्हटले, 'हे नाथ, श्रीरघुनाथांचे भजन करा. त्यामुळे माझे सौभाग्य अखंड राहील.' ॥ ७ ॥

**तब रावन मयसुता उठाई। कहै लाग खल निज प्रभुताई॥**
**सुनु तैं प्रिया बृथा भय माना। जग जोधा को मोहि समाना॥**

तेव्हा मंदोदरीला उठवून तो दुष्ट तिला आपली महती सांगू लागला, 'हे प्रिये, तू विनाकारण भीती बाळगतेस. माझ्यासारखा योद्धा जगात कोण आहे, ते सांग. ॥ १ ॥

**बरुन कुबेर पवन जम काला। भुजबल जितेउँ सकल दिगपाला॥**
**देव दनुज नर सब बस मोरें। कवन हेतु उपजा भय तोरें॥**

वरुण, कुबेर, वायू, यमराज इत्यादी दिक्पालांना व कालालाही मी आपल्या भुजबलाने जिंकले आहे. देव, दानव, मनुष्य सर्व माझ्या अधीन आहेत. मग तुला ही भीती का वाटते?'॥ २॥

**नाना बिधि तेहि कहेसि बुझाई। सभाँ बहोरि बैठ सो जाई॥**
**मंदोदरीं हृदयँ अस जाना। काल बस्य उपजा अभिमाना॥**

मंदोदरीने पुष्कळ प्रकारे समजावून सांगितले, तरी रावणाने तिचे काही ऐकले नाही. मग तो सभेत जाऊन बसला. मंदोदरीला कळून चुकले की, कालाच्या अधीन असल्यामुळे पतीला अभिमान झालेला आहे.॥ ३॥

**सभाँ आइ मंत्रिन्ह तेहिं बूझा। करब कवन बिधि रिपु सैं जूझा॥**
**कहहिं सचिव सुनु निसिचर नाहा। बार बार प्रभु पूछहु काहा॥**
**कहहु कवन भय करिअ बिचारा। नर कपि भालु अहार हमारा॥**

सभेत आल्यावर रावणाने मंत्र्यांना विचारले की, शत्रूबरोबर कशा प्रकारे युद्ध करावे? मंत्री म्हणाले, 'हे राक्षसराज! ऐका. आपण हे वारंवार काय विचारता? सांगा तरी, असे कोणते मोठे भय उत्पन्न झाले आहे की, ज्याचा विचार करावा? मनुष्य व वानर हे तर आपले भोजन आहेत.'॥ ४-५॥

दो०—**सब के बचन श्रवन सुनि कह प्रहस्त कर जोरि।**
**नीति बिरोध न करिअ प्रभु मंत्रिन्ह मति अति थोरि॥ ८॥**

सर्वांचे ऐकल्यावर रावण-पुत्र प्रहस्त हात जोडून म्हणू लागला, 'हे प्रभू, नीतीविरुद्ध काहीही करू नये. मंत्र्यांना अक्कल फारच थोडी आहे.॥ ८॥

**कहहिं सचिव सठ ठकुरसोहाती। नाथ न पूर आव एहि भाँती॥**
**बारिधि नाघि एक कपि आवा। तासु चरित मन महुँ सबु गावा॥**

हे सर्वजण खुशामत करणारे मंत्री तोंडदेखले बोलणारे आहेत. बाबा! अशा गोष्टींनी काही होणार नाही. एकच वानर समुद्र ओलांडून आला होता, त्याचे चरित्र सर्व लोक अजुनी मनातल्या मनात गात आहेत.॥ १॥

**छुधा न रही तुम्हहि तब काहू। जारत नगरु कस न धरि खाहू॥**
**सुनत नीक आगें दुख पावा। सचिवन अस मत प्रभुहि सुनावा॥**

वानर हे जर तुमचे भोजन आहे, तर मग त्यावेळी तुमच्यापैकी कुणाला भूक लागली नव्हती

काय? तो नगर जाळत होता, तेव्हा त्याला पकडून का खाल्ले नाही? या मंत्र्यांनी तुम्हांला असा सल्ला दिला आहे की, जो ऐकायला चांगला परंतु परिणामी दु:खदायक.॥ २॥

**जेहिं बारीस बँधायउ हेला। उतरेउ सेन समेत सुबेला॥**
**सो भनु मनुज खाब हम भाई। बचन कहहिं सब गाल फुलाई॥**

ज्याने सहजासहजी समुद्राला बांध घातला आणि जो सेनेसह सुवेळ पर्वतावर येऊन ठेपला आहे, तो काय मनुष्य आहे? बंधूंनो, सांगा. त्याला आम्ही काय खाऊ शकू? सांगा ना. सर्वजण वेड्याप्रमाणे वटवट करीत आहात ते.॥ ३॥

**तात बचन मम सुनु अति आदर। जनि मन गुनहु मोहि करि कादर॥**
**प्रिय बानी जे सुनहिं जे कहहीं। ऐसे नर निकाय जग अहहीं॥**

हे तात, माझे बोलणे नीट लक्ष देऊन ऐका. मला मनातून भित्रा समजू नका. जगात अशी माणसे ढिगाने आहेत की, जी गोड वाटणाऱ्या गोष्टी ऐकत व बोलत असतात.॥ ४॥

**बचन परम हित सुनत कठोरे। सुनहिं जे कहहिं ते नर प्रभु थोरे॥**
**प्रथम बसीठ पठउ सुनु नीती। सीता देइ करहु पुनि प्रीती॥**

हे प्रभो, ऐकण्यास कठोर व परिणामी परम हितकारी बोलणे, जे बोलतात व ऐकून घेतात, अशी माणसे फारच थोडी असतात. राजनीती सांगते ते ऐकून घ्या आणि त्याप्रमाणे प्रथम दूत पाठवा आणि सीतेला सोपवून श्रीरामांशी समेट करा.॥ ५॥

दो०—**नारि पाइ फिरि जाहिं जौं तौ न बढ़ाइअ रारि।**
**नाहिं त सन्मुख समर महि तात करिअ हठि मारि॥ ९॥**

जर पत्नी मिळाल्यावर ते परत जात असतील तर विनाकारण भांडण वाढवू नका. नाही तर मग हे तात, युद्धभूमीवर समोरासमोर निश्चितपणे युद्ध करा.॥ ९॥

**यह मत जौं मानहु प्रभु मोरा। उभय प्रकार सुजसु जग तोरा॥**
**सुत सन कह दसकंठ रिसाई। असि मति सठ केहिं तोहि सिखाई॥**

हे प्रभो, जर तुम्ही माझे मत मानाल तर, जगात दोन्ही प्रकारे तुमची कीर्ती होईल.’ रावण रागाने पुत्राला म्हणाला, ‘अरे मूर्खा, तुला असली बुद्धी कुणी शिकविली?॥ १॥

**अबहीं ते उर संसय होई। बेनुमूल सुत भयहु घमोई॥**
**सुनि पितु गिरा परुष अति घोरा। चला भवन कहि बचन कठोरा॥**

आतापासून तुझ्या मनात भय उत्पन्न झाले? हे पुत्रा, तू तर वेळूच्या मुळाशी लागलेली कीड झालास.’ पित्याची अत्यंत भयंकर व कठोर वाणी ऐकून प्रहस्त स्पष्टपणे असे म्हणत घरी गेला की,॥ २॥

**हित मत तोहि न लागत कैसें। काल बिबस कहुँ भेषज जैसें॥**
**संध्या समय जानि दससीसा। भवन चलेउ निरखत भुज बीसा॥**

'हिताचा सल्ला तुम्हांला मानवत नाही; ज्याप्रमाणे मरणाच्या दारी असलेल्या रोग्याला औषध आवडत नाही.' संध्याकाळ झाल्याचे पाहून रावणही आपल्या वीस भुजांकडे पाहात महालाकडे गेला. ॥ ३ ॥

**लंका सिखर उपर आगारा। अति बिचित्र तहँ होइ अखारा॥**
**बैठ जाइ तेहिं मंदिर रावन। लागे किंनर गुन गन गावन॥**

लंकेच्या शिखरावर एक अत्यंत सुंदर महाल होता. तेथे नाच-गाण्याचा अड्डा जमे. रावण त्या महालात जाऊन बसला. किन्नर त्याचे गुण-गान करू लागले. ॥ ४ ॥

**बाजहिं ताल पखाउज बीना। नृत्य करहिं अपछरा प्रबीना॥**

टाळ, मृदंग आणि वीणा ही वाद्ये वाजत होती. नृत्यात प्रवीण असलेल्या अप्सरा नाचत होत्या. ॥ ५ ॥

दो०—**सुनासीर सत सरिस सो संतत करइ बिलास।**
**परम प्रबल रिपु सीस पर तद्यपि सोच न त्रास॥ १०॥**

रावण शेकडो इंद्रांप्रमाणे नित्य भोग-विलास करीत होता. श्रीरामांसारखा अत्यंत प्रबळ शत्रू डोक्यावर होता, परंतु त्याला त्याची चिंता किंवा भीती नव्हती. ॥ १० ॥

**इहाँ सुबेल सैल रघुबीरा। उतरे सेन सहित अति भीरा॥**
**सिखर एक उतंग अति देखी। परम रम्य सम सुभ्र बिसेषी॥**

इकडे सुवेळ पर्वतावर प्रचंड सेनेसह श्रीराम उतरले. पर्वताचे एक फार उंच, परमरमणीय, सपाट व उजळ शिखर पाहून॥ १ ॥

**तहँ तरु किसलय सुमन सुहाए। लछिमन रचि निज हाथ डसाए॥**
**ता पर रुचिर मृदुल मृगछाला। तेहिं आसन आसीन कृपाला॥**

तेथे लक्ष्मणाने वृक्षांची कोमल पाने व फुले आपल्या हातांनी सजवून अंथरली. त्यावर सुंदर व कोमल मृगचर्म घातले. त्या आसनावर कृपाळू श्रीराम विराजमान झाले होते. ॥ २ ॥

**प्रभु कृत सीस कपीस उछंगा। बाम दहिन दिसि चाप निषंगा॥**
**दुहुँ कर कमल सुधारत बाना। कह लंकेस मंत्र लगि काना॥**

प्रभूंनी वानरराज सुग्रीवाच्या मांडीवर आपले डोके ठेवले होते. त्यांच्या डावीकडे धनुष्य व उजवीकडे बाणांचा भाता ठेवलेला होता. ते आपल्या दोन्ही कर-कमलांनी बाण व्यवस्थित करीत होते. बिभीषण त्यांच्याशी एकान्तात सल्लामसलत करीत होता. ॥ ३ ॥

**बड़भागी अंगद हनुमाना। चरन कमल चापत बिधि नाना॥**
**प्रभु पाछें लछिमन बीरासन। कटि निषंग कर बान सरासन॥**

परम भाग्यशाली अंगद व हनुमान अनेक प्रकारे प्रभूंची चरण-कमले चेपत होते. लक्ष्मण कमरेला भाता बांधून व हातामध्ये धनुष्यबाण घेऊन वीरासनात प्रभूंच्या मागे शोभून दिसत होता.॥ ४॥

दो०—**एहि बिधि कृपा रूप गुन धाम रामु आसीन।**
**धन्य ते नर एहिं ध्यान जे रहत सदा लयलीन॥ ११ (क)॥**

अशा प्रकारे कृपा, रूप व गुणांचे धाम असलेले श्रीराम विराजमान होते. जो मनुष्य नित्य अशा रूपाचे ध्यान करतो, तो धन्य होय.॥ ११ (क)॥

**पूरब दिसा बिलोकि प्रभु देखा उदित मयंक।**
**कहत सबहि देखहु ससिहि मृगपति सरिस असंक॥ ११ (ख)॥**

पूर्व दिशेला प्रभू श्रीरामांना चंद्र उगवलेला दिसला. तेव्हा ते सर्वांना म्हणाले, ‘चंद्राकडे पाहा तरी. कसा सिंहाप्रमाणे निर्भय आहे.॥ ११ (ख)॥

**पूरब दिसि गिरिगुहा निवासी। परम प्रताप तेज बल रासी॥**
**मत्त नाग तम कुंभ बिदारी। ससि केसरी गगन बन चारी॥**

पूर्व दिशारूपी पर्वताच्या गुहेत राहणारा, अत्यंत प्रताप, तेज व बलाची राशी असलेला हा चंद्रमारूपी सिंह अंधकाररूपी उन्मत्त हत्तीचे मस्तक विदीर्ण करून आकाशरूपी वनात निर्भयपणे विहरत आहे.॥ १॥

**बिथुरे नभ मुकुताहल तारा। निसि सुंदरी केर सिंगारा॥**
**कह प्रभु ससि महुँ मेचकताई। कहहु काह निज निज मति भाई॥**

आकाशात विखुरलेले तारे मोत्यांसारखे आहेत. ते रात्ररूपी सुंदर स्त्रीचे अलंकार आहेत.’ प्रभू मग म्हणाले, ‘बंधूंनो! चंद्रामध्ये जे काळे डाग आहेत, ते काय आहेत? हे आपापल्या बुद्धीप्रमाणे सांगा.॥ २॥

**कह सुग्रीव सुनहु रघुराई। ससि महुँ प्रगट भूमि कै झाँई॥**
**मारेउ राहु ससिहि कह कोई। उर महँ परी स्यामता सोई॥**

सुग्रीव म्हणाला, हे रामा! ऐका. चंद्रावर पृथ्वीची छाया दिसत आहे. कोणी म्हणाले, राहूने चंद्राला मारले होते, तोच काळा डाग त्याच्या छातीवर दिसत आहे.॥ ३॥

**कोउ कह जब बिधि रति मुख कीन्हा। सार भाग ससि कर हरि लीन्हा॥**
**छिद्र सो प्रगट इंदु उर माहीं। तेहि मग देखिअ नभ परिछाहीं॥**

कोणी म्हणाला, 'जेव्हा ब्रह्मदेवाने रतीचे मुख बनविले, तेव्हा त्यांनी चंद्रम्याचा सारभाग काढून घेतला, त्यामुळे रतीचे मुख सुंदर झाले, परंतु चंद्राच्या हृदयाला छिद्र पडले, ते अजुनी आहे. त्यामुळे आकाशाचा नीलिमा त्यामधून दिसतो.'॥ ४॥

**प्रभु कह गरल बंधु ससि केरा। अति प्रिय निज उर दीन्ह बसेरा॥**
**बिष संजुत कर निकर पसारी। जारत बिरहवंत नर नारी॥**

प्रभू श्रीरामचंद्र म्हणाले, 'विष हा चंद्राचा प्रिय भाऊ आहे. म्हणूनच त्याने विष आपल्या हृदयात ठेवले आहे. त्यामुळे विषयुक्त किरण-समूह पसरून तो वियोगी नर-नारींना पीडा देतो.'॥ ५॥

दो०—**कह हनुमंत सुनहु प्रभु ससि तुम्हार प्रिय दास।**
**तव मूरति बिधु उर बसति सोइ स्यामता अभास॥ १२ ( क )॥**

हनुमान म्हणाला, 'हे प्रभो, ऐका. चंद्र हा तुमचा प्रिय दास आहे. तुमची सुंदर श्याम मूर्ती त्याच्या हृदयात वसते. त्याच्या श्यामलतेची झलक चंद्रामध्ये आहे.'॥ १२ (क)॥

## नवाह्नपारायण, सातवा विश्राम

**पवन तनय के बचन सुनि बिहँसे रामु सुजान।**
**दच्छिन दिसि अवलोकि प्रभु बोले कृपानिधान॥ १२ ( ख )॥**

पवनपुत्र हनुमानाचे बोलणे ऐकून सुज्ञ श्रीराम हसले, मग दक्षिणेकडे पाहून कृपानिधान प्रभू म्हणाले,॥ १२ (ख)॥

**देखु बिभीषन दच्छिन आसा। घन घमंड दामिनी बिलासा॥**
**मधुर मधुर गरजइ घन घोरा। होइ बृष्टि जनि उपल कठोरा॥**

'हे बिभीषणा, दक्षिणेकडे बघ. मेघ कसे भरून आले आहेत आणि वीज चमकू लागली आहे. भयानक मेघ हलक्या स्वरांनी गरजत आहेत. गारांचा वर्षाव होऊ नये, म्हणजे झाले. ॥ १॥

**कहत बिभीषन सुनहु कृपाला। होइ न तड़ित न बारिद माला॥**
**लंका सिखर उपर आगारा। तहँ दसकंधर देख अखारा॥**

बिभीषण म्हणाला, 'हे कृपाळू, ही वीजही नव्हे की मेघांचा जमाव नव्हे. लंकेच्या शिखरावर एक महाल आहे. रावण तेथे नाच-गाण्याचा कार्यक्रम पाहात आहे.॥ २॥

**छत्र मेघडंबर सिर धारी। सोइ जनु जलद घटा अति कारी॥**
**मंदोदरी श्रवन ताटंका। सोइ प्रभु जनु दामिनी दमंका॥**

रावणाच्या डोक्यावर मेघडंबरी छत्र आहे. तेच जणू मेघांचा काळा जमाव आहे. मंदोदरीच्या कानांमध्ये जी कर्णफुले हलत आहेत, हे प्रभू, तीच जणू विजेची चमक आहे.॥ ३॥

**बाजहिं ताल मृदंग अनूपा। सोइ रव मधुर सुनहु सुरभूपा॥**
**प्रभु मुसुकान समुझि अभिमाना। चाप चढ़ाइ बान संधाना॥**

हे देवांचे सम्राट, ऐका. अनुपम ताल व मृदंग वाजत आहेत. तीच मधुर गर्जना होय.' रावणाचा हा अभिमान जाणल्यावर श्रीराम हसले. त्यांनी धनुष्य सज्ज करून, त्यावर बाण चढविला. ॥ ४ ॥

दो०—**छत्र मुकुट ताटंक तब हते एकहीं बान।**
**सब कें देखत महि परे मरमु न कोऊ जान॥ १३ ( क )॥**

आणि एकाच बाणात रावणाचे छत्र, मुकुट आणि मंदोदरीची कर्णफुले तोडून टाकली. सर्वांसमोरच ते जमिनीवर पडले. पण कसे पडले, याचे रहस्य कोणालाच कळले नाही. ॥ १३ (क) ॥

**अस कौतुक करि राम सर प्रबिसेउ आइ निषंग।**
**रावन सभा ससंक सब देखि महा रसभंग॥ १३ ( ख )॥**

असा चमत्कार करून श्रीरामांचा बाण परत येऊन भात्यामध्ये बसला. हा मोठा रस-भंग झाल्याचे पाहून रावणाची सारी सभा भयभीत झाली. ॥ १३ (ख) ॥

**कंप न भूमि न मरुत बिसेषा। अस्त्र सस्त्र कछु नयन न देखा॥**
**सोचहिं सब निज हृदय मझारी। असगुन भयउ भयंकर भारी॥**

भूकंप झाला नव्हता किंवा जोराचे वारे आले नव्हते. कोणतेही शस्त्र-अस्त्र डोळ्यांना दिसले नाही. मग हे छत्र-मुकुट-कर्णफुले तुटून कशी पडली? सर्वांना मनातून काळजी वाटू लागली की, हा मोठा अपशकुन झाला. ॥ १ ॥

**दसमुख देखि सभा भय पाई। बिहसि बचन कह जुगुति बनाई॥**
**सिरउ गिरे संतत सुभ जाही। मुकुट परे कस असगुन ताही॥**

सभा भयभीत झालेली पाहून रावणाने हसून युक्तीने सांगितले की, 'मुंडकी तुटून खाली पडणे, हेही ज्याला नित्य शुभ असते, त्याला मुकुट खाली पडणे हा अपशकुन कसा? ॥ २ ॥

**सयन करहु निज निज गृह जाई। गवने भवन सकल सिर नाई॥**
**मंदोदरी सोच उर बसेऊ। जब ते श्रवनपूर महि खसेऊ॥**

आपापल्या घरी जाऊन निवांत झोपा. घाबरायचे कारण नाही.' तेव्हा सर्वजण वाकून नमस्कार करून घरी गेले. जेव्हा कर्णफुले खाली पडली, तेव्हापासून मंदोदरीच्या मनाला चिंतेने घेरले. ॥ ३ ॥

**सजल नयन कह जुग कर जोरी। सुनहु प्रानपति बिनती मोरी॥**
**कंत राम बिरोध परिहरहू। जानि मनुज जनि हठ मन धरहू॥**

डोळ्यांत पाणी आणून व दोन्ही हात जोडून ती रावणाला म्हणाली, 'हे प्राणनाथ, माझी विनंती ऐका. हे प्रियतम, श्रीरामांशी वैर धरू नका. त्यांना मनुष्य समजून मनात दुराग्रह धरून राहू नका.॥४॥

दो०—**बिस्वरूप रघुबंस मनि करहु बचन बिस्वासु।**
**लोक कल्पना बेद कर अंग अंग प्रति जासु॥१४॥**

माझ्या या बोलण्यावर विश्वास ठेवा की, ते रघुकुलश्रेष्ठ श्रीरामचंद्र हे विश्वरूप आहेत. त्यांच्या अंगाअंगामध्ये लोक असल्याचे वेदांनी सांगितले आहे.॥१४॥

**पद पाताल सीस अज धामा। अपर लोक अँग अँग बिश्रामा॥**
**भृकुटि बिलास भयंकर काला। नयन दिवाकर कच घन माला॥**

पाताळ हे विश्वरूप भगवंताचे चरण आहेत. ब्रह्मलोक शिर आहे. त्यांच्या इतर अंगांमध्ये भिन्न भिन्न लोक वसतात. भयंकर काल हा त्यांच्या भुवयांचा इशारा आहे. सूर्य हा त्यांचे नेत्र आहे. आणि मेघ हे त्यांचे केस आहेत.॥१॥

**जासु घ्रान अस्विनीकुमारा। निसि अरु दिवस निमेष अपारा॥**
**श्रवन दिसा दस बेद बखानी। मारुत स्वास निगम निज बानी॥**

अश्विनीकुमार हे त्यांचे नाक आहे, रात्र व दिवस हे त्यांची अपार डोळ्यांची उघडझाप आहे. दाही दिशा हे कान आहेत, वेदांनी असेच सांगितले आहे. वायू त्यांचा श्वास आहे, आणि वेद ही त्यांची वाणी आहेत.॥२॥

**अधर लोभ जम दसन कराला। माया हास बाहु दिगपाला॥**
**आनन अनल अंबुपति जीहा। उतपति पालन प्रलय समीहा॥**

लोभ हा त्यांचे ओठ आहेत, यमराज ही त्यांची भयानक दंतपंक्ती आहे. माया हे त्यांचे हास्य आहे. दिक्पाल हे त्यांच्या भुजा आहेत. अग्नी हा मुख आहे, वरुण जीभ आहे. उत्पत्ती, पालन व प्रलय हे त्यांची क्रिया आहेत.॥३॥

**रोम राजि अष्टादस भारा। अस्थि सैल सरिता नस जारा॥**
**उदर उदधि अधगो जातना। जगमय प्रभु का बहु कलपना॥**

अठरा प्रकारच्या असंख्य वनस्पती त्यांच्या रोमावली आहेत. पर्वत हे अस्थी आहेत. नद्या या नाड्यांचे जाळे आहेत. समुद्र पोट आहे आणि उत्सर्जक इंद्रिये हे नरक आहेत. अशाप्रकारे प्रभू विश्वरूप आहेत. जास्त ऊहापोह कशाला करायचा?॥४॥

दो०—**अहंकार सिव बुद्धि अज मन ससि चित्त महान।**
**मनुज बास सचराचर रूप राम भगवान॥ १५ ( क )॥**

शिव हे ज्यांचा अहंकार आहे, ब्रह्मदेव बुद्धी आहे, चंद्र मन आहे आणि विष्णू हे त्यांचे चित्त आहे, त्या चराचररूप असलेल्या श्रीरामांनी मनुष्यरूपामध्ये निवास केला आहे.॥ १५ (क)॥

**अस बिचारि सुनु प्रानपति प्रभु सन बयरु बिहाइ।**
**प्रीति करहु रघुबीर पद मम अहिवात न जाइ॥ १५ ( ख )॥**

हे प्राणनाथ, विचार करून प्रभूंशी वैर सोडून द्या आणि श्रीरघुनाथांच्या चरणांवर प्रेम करा. त्यामुळे माझे सौभाग्य टिकेल.'॥ १५ (ख)॥

**बिहँसा नारि बचन सुनि काना। अहो मोह महिमा बलवाना॥**
**नारि सुभाउ सत्य सब कहहीं। अवगुन आठ सदा उर रहहीं॥**

पत्नीचे बोलणे ऐकून रावण खूप हसला. आणि म्हणाला, 'अग, अज्ञानाचा महिमा अगाध आहे. स्त्रीच्या हृदयात आठ अवगुण नेहमी असतात, असे जे स्त्री-स्वभावाबद्दल म्हटले जाते, ते सत्य आहे. ॥ १॥

**साहस अनृत चपलता माया। भय अबिबेक असौच अदाया॥**
**रिपु कर रूप सकल तैं गावा। अति बिसाल भय मोहि सुनावा॥**

साहस, असत्य, चंचलता, कपट, भय, मूर्खपणा, अपवित्रता आणि निर्दयपणा. तू शत्रूच्या विराट रूपाचे वर्णन केलेस आणि मला मोठे भय दाखविलेस.॥ २॥

**सो सब प्रिया सहज बस मोरें। समुझि परा प्रसाद अब तोरें॥**
**जानिउँ प्रिया तोरि चतुराई। एहि बिधि कहहु मोरि प्रभुताई॥**

हे प्रिये, हे सर्व चराचर विश्व स्वभावतः माझ्याच अधीन आहे. तुझ्यामुळे मला हे आता समजले. हे प्रिये, तुझे चातुर्य मला समजले. तू या निमित्ताने माझ्या प्रभुतेचे वर्णन करीत आहेस. ॥ ३॥

**तव बतकही गूढ़ मृगलोचनि। समुझत सुखद सुनत भय मोचनि॥**
**मंदोदरि मन महुँ अस ठयऊ। पियहि काल बस मतिभ्रम भयऊ॥**

हे मृगनयने, तुझे बोलणे गूढ आहे. समजून आल्यावर सुखद आहे आणि ऐकल्यावर भय-मुक्त करणारे आहे.' मग मंदोदरीला मनातून खात्री पटली की, कालवश झाल्यामुळे पतीला बुद्धिभ्रम झाला आहे.॥ ४॥

दो०—**एहि बिधि करत बिनोद बहु प्रात प्रगट दसकंध।**
**सहज असंक लंकपति सभाँ गयउ मद अंध॥ १६ ( क )॥**

रावण अशाप्रकारे अज्ञानामुळे अनेक विनोद करीत असतानाच सकाळ झाली. तेव्हा मूलतः निर्भय व घमेंडीने अंधळा झालेला रावण सभेत गेला. ॥ १६ (क) ॥

सो०—**फूलइ फरइ न बेत जदपि सुधा बरषहिं जलद।**
**मूरुख हृदयँ न चेत जौं गुर मिलहिं बिरंचि सम॥ १६ ( ख )॥**

मेघ जरी अमृतासारखी वर्षा करतात, तरी वेत काही फुलत-फळत नाही. त्याचप्रमाणे ब्रह्मदेवासारखा ज्ञानी गुरू जरी भेटला, तरी मूर्खाच्या हृदयात ज्ञानाचा प्रकाश पडत नाही. ॥ १६ (ख) ॥

**इहाँ प्रात जागे रघुराई। पूछा मत सब सचिव बोलाई॥**
**कहहु बेगि का करिअ उपाई। जामवंत कह पद सिरु नाई॥**

इकडे सुवेळ पर्वतावर प्रातःकाळी श्रीरघुनाथ जागे झाले आणि त्यांनी सर्व मंत्र्यांना बोलावून सल्ला विचारला की, 'लवकर सांगा की, आता कोणती गोष्ट करायला हवी?' जांबवान श्रीरामांच्या चरणी मस्तक ठेवून म्हणाला, ॥ १ ॥

**सुनु सर्बग्य सकल उर बासी। बुधि बल तेज धर्म गुन रासी॥**
**मंत्र कहउँ निज मति अनुसारा। दूत पठाइअ बालिकुमारा॥**

'हे सर्वज्ञ, हे सर्वांच्या हृदयात वसणारे, हे बुद्धी, बल, तेज, धर्म आणि गुणांची खाण असलेले, प्रभू! ऐका. मी आपल्या बुद्धीप्रमाणे सल्ला देतो की, बालिकुमार अंगदाला दूत म्हणून पाठवावे.' ॥ २ ॥

**नीक मंत्र सब के मन माना। अंगद सन कह कृपानिधाना॥**
**बालितनय बुधि बल गुन धामा। लंका जाहु तात मम कामा॥**

हा चांगला सल्ला सर्वांना पटला. कृपानिधान श्रीरामांनी अंगदाला सांगितले, 'हे बल, बुद्धी व गुणांचे धाम असलेल्या बालिपुत्रा, बाळा, तू माझ्या कामासाठी लंकेला जा. ॥ ३ ॥

**बहुत बुझाइ तुम्हहि का कहऊँ। परम चतुर मैं जानत अहऊँ॥**
**काजु हमार तासु हित होई। रिपु सन करेहु बतकही सोई॥**

तुला जास्त काय सांगू? तू अतिशय चतुर आहेस, हे मला माहीत आहे. शत्रूशी अशी बोलणी कर की, आपले काम होईल आणि त्याचेही कल्याण होईल.' ॥ ४ ॥

सो०—**प्रभु अग्या धरि सीस चरन बंदि अंगद उठेउ।**
**सोइ गुन सागर ईस राम कृपा जा पर करहु॥ १७ ( क )॥**

प्रभूंची आज्ञा शिरसावंद्य मानून आणि त्यांच्या चरणी वंदन करून अंगद उठला. तो म्हणाला, 'हे भगवान श्रीराम, तुम्ही ज्याच्यावर कृपा करता, तो गुणांचा समुद्र बनतो. ॥ १७ (क) ॥

**स्वयंसिद्ध सब काज नाथ मोहि आदरु दियउ।**
**अस बिचारि जुबराज तन पुलकित हरषित हियउ॥ १७ ( ख )॥**

स्वामींची सर्व कामे स्वत:च सिद्ध आहेत. मला आपल्या कामासाठी पाठवीत आहात, हा मला प्रभूंनी दिलेला आदर आहे.' या विचाराने युवराज अंगद मनातून आनंदित झाला आणि त्याचे शरीर पुलकित झाले.॥ १७ (ख)॥

**बंदि चरन उर धरि प्रभुताई। अंगद चलेउ सबहि सिरु नाई॥**
**प्रभु प्रताप उर सहज असंका। रन बाँकुरा बालिसुत बंका॥**

प्रभूंच्या चरणांना वंदन करून व भगवंतांची प्रभुता मनात बाळगून अंगद सर्वांना नमस्कार करून निघाला. प्रभूंचा प्रताप हृदयात असलेला रणझुंजार वीर बालिपुत्र मुळातच निर्भय होता.॥ १॥

**पुर पैठत रावन कर बेटा। खेलत रहा सो होइ गै भेटा॥**
**बातहिं बात करष बढ़ि आई। जुगल अतुल बल पुनि तरुनाई॥**

लंकेत प्रवेश करताच त्याला रावणाचा पुत्र भेटला. तो खेळत होता. एकाएकी त्यांच्यात भांडण सुरू झाले. दोघेही अतुलनीय बलवान होते आणि दोघेही तरुण होते.॥ २॥

**तेहिं अंगद कहुँ लात उठाई। गहि पद पटकेउ भूमि भवाँई॥**
**निसिचर निकर देखि भट भारी। जहँ तहँ चले न सकहिं पुकारी॥**

त्याने अंगदाला मारण्यास लाथ उगारली, तेव्हा अंगदाने त्याच्या पायाला धरून त्याला गरागरा फिरविले आणि जमिनीवर आदळले. राक्षसांचे समूह त्या बलवान योद्ध्यास पाहून जिकडे तिकडे पळून गेले. भीतीपोटी ओरडूही शकले नाहीत.॥ ३॥

**एक एक सन मरमु न कहहीं। समुझि तासु बध चुप करि रहहीं॥**
**भयउ कोलाहल नगर मझारी। आवा कपि लंका जेहिं जारी॥**

कुणीही दुसऱ्याला खरी गोष्ट सांगत नव्हता. त्या रावण-पुत्राचा वध झाला, असे पाहून सर्वजण गप्प होते. राक्षस भीतीने पळत आहेत, असे पाहून नगरामध्ये अफवा पसरली की, ज्याने लंका जाळली होती, तो वानर पुन्हा आला आहे.॥ ४॥

**अब धौं कहा करिहि करतारा। अति सभीत सब करहिं बिचारा॥**
**बिनु पूछें मगु देहिं दिखाई। जेहि बिलोक सोइ जाइ सुखाई॥**

ते खूप घाबरून विचार करू लागले की, दैव आता काय करणार कोणास ठाऊक ! न विचारताच त्यांनी अंगदाला रावणाच्या दरबाराची वाट दाखविली. अंगद ज्याला पाहात असे, तो भीतीने गळून जाई.॥ ५॥

**दो०—गयउ सभा दरबार तब सुमिरि राम पद कंज।**
**सिंह ठवनि इत उत चितव धीर बीर बल पुंज॥ १८॥**

श्रीरामचंद्रांच्या चरण-कमलांचे स्मरण करून अंगद रावणाच्या सभेच्या दारात आला. तो धीर, वीर आणि बलाची खाण असलेला अंगद सिंहासारखा ऐटीत इकडे तिकडे पाहू लागला. ॥ १८॥

**तुरत निसाचर एक पठावा। समाचार रावनहि जनावा॥**
**सुनत बिहँसि बोला दससीसा। आनहु बोलि कहाँ कर कीसा॥**

लगेच त्याने एका राक्षसाला आपण आल्याची वार्ता सांगण्यासाठी रावणाकडे पाठविले. ते ऐकताच रावण हसून म्हणाला, 'बोलावून आण. पाहू या, कोठला वानर आहे ते.'॥ १॥

**आयसु पाइ दूत बहु धाए। कपिकुंजरहि बोलि लै आए॥**
**अंगद दीख दसानन बैसें। सहित प्रान कज्जलगिरि जैसें॥**

आज्ञा होताच बरेच दूत धावले व वानरांमध्ये हत्तीसारखा असलेल्या अंगदाला बोलावून घेऊन गेले. बसलेल्या रावणाला पाहून अंगदाला वाटले की, जणू एखादा काजळाचा सजीव डोंगर असावा.॥ २॥

**भुजा बिटप सिर सृंग समाना। रोमावली लता जनु नाना॥**
**मुख नासिका नयन अरु काना। गिरि कंदरा खोह अनुमाना॥**

त्याच्या भुजा वृक्षांप्रमाणे आणि शिर पर्वताच्या शिखराप्रमाणे होते. रोमावली जणू पुष्कळशा वेलींप्रमाणे होत्या. तोंड, नाक, डोळे आणि कान हे पर्वताच्या गुहा व भगदाडासारखे होते.॥ ३॥

**गयउ सभाँ मन नेकु न मुरा। बालितनय अतिबल बाँकुरा॥**
**उठे सभासद कपि कहुँ देखी। रावन उर भा क्रोध बिसेषी॥**

अत्यंत बलवान बहादूर वीर अंगद सभेमध्ये गेला. त्याच्या मनात जरासुद्धा भीती नव्हती. अंगदाला पाहाताच सर्व सभासद उठून उभे राहिले. हे पाहून रावणाला फार राग आला.॥ ४॥

**दो०—जथा मत्त गज जूथ महुँ पंचानन चलि जाइ।**
**राम प्रताप सुमिरि मन बैठ सभाँ सिरु नाइ॥ १९॥**

ज्याप्रमाणे मस्त झालेल्या हत्तींच्या कळपात सिंह नि:शंकपणे चालत जातो, त्याप्रमाणे श्रीरामांच्या प्रतापाचे मनात स्मरण करून तो निर्भयपणे नमस्कार करून सभेत बसला. ॥ १९॥

**कह दसकंठ कवन तैं बंदर। मैं रघुबीर दूत दसकंधर॥**
**मम जनकहि तोहि रही मिताई। तव हित कारन आयउँ भाई॥**

रावण म्हणाला, 'अरे वानरा, तू कोण आहेस?' अंगद म्हणाला, 'हे दशग्रीवा, मी श्रीरघुवीरांचा दूत आहे. माझ्या पित्याची व तुमची मैत्री होती. म्हणून हे बंधू, मी तुमच्या भल्यासाठी आलो आहे. ॥ १ ॥

**उत्तम कुल पुलस्ति कर नाती। सिव बिरंचि पूजेहु बहु भाँती॥**
**बर पायहु कीन्हेहु सब काजा। जीतेहु लोकपाल सब राजा॥**

तुमचे कुल उत्तम आहे. तुम्ही पुलस्त्य ऋषींचे नातू आहात. तुम्ही शिव व ब्रह्मदेवांची अनेक प्रकारे पूजा केली आहे. त्यांच्याकडून वर मिळवून सर्व कार्ये सिद्ध केली आहेत. लोकपालांना आणि सर्व राजांना तुम्ही जिंकून घेतले आहे. ॥ २ ॥

**नृप अभिमान मोह बस किंबा। हरि आनिहु सीता जगदंबा॥**
**अब सुभ कहा सुनहु तुम्ह मोरा। सब अपराध छमिहि प्रभु तोरा॥**

राजमदामुळे किंवा मोहामुळे तुम्ही जगज्जननी सीतेला हरण करून आणले आहे. आता तुम्ही माझे हिताचे सांगणे ऐका. त्यामुळे श्रीराम तुमचे सर्व अपराध क्षमा करतील. ॥ ३ ॥

**दसन गहहु तृन कंठ कुठारी। परिजन सहित संग निज नारी॥**
**सादर जनकसुता करि आगें। एहि बिधि चलहु सकल भय त्यागें॥**

दाती तृण धरा. (म्हणजेच गाईप्रमाणे दीन होऊन जा.) गळ्यात कुऱ्हाड घाला (म्हणजेच अभिमान सोडून जा.) आणि कुटुंबियांसह आपल्या स्त्रियांना बरोबर घेऊन, आदराने जानकीला पुढे करून सर्व प्रकारचे भय सोडून चला. ॥ ४ ॥

दो०—**प्रनतपाल रघुबंसमनि त्राहि त्राहि अब मोहि।**
**आरत गिरा सुनत प्रभु अभय करैगो तोहि॥ २०॥**

आणि 'हे शरणागताचे पालन करणारे रघुवंशशिरोमणी श्रीराम, माझे रक्षण करा, रक्षण करा.' अशी आर्त प्रार्थना करा. ती आर्त हाक ऐकताच प्रभू तुमच्या सर्व अपराधांना क्षमा करतील.'॥ २० ॥

**रे कपिपोत बोलु संभारी। मूढ़ न जानेहि मोहि सुरारी॥**
**कहु निज नाम जनक कर भाई। केहि नातें मानिऐ मिताई॥**

रावण म्हणाला, 'अरे वानराच्या पोरा ! सांभाळून बोल. मूर्खा, देवांचाही शत्रू असलेल्या मला तू ओळखले नाहीस? अरे बाबा! स्वत:चे आणि आपल्या बापाचे नाव तर सांग. कोणत्या नात्याने तू मैत्री जोडलीस?'॥ १ ॥

**अंगद नाम बालि कर बेटा। तासों कबहुँ भई ही भेटा॥**
**अंगद बचन सुनत सकुचाना। रहा बालि बानर मैं जाना॥**

अंगद म्हणाला, 'माझे नाव अंगद आहे. मी बालीचा पुत्र आहे. त्यांच्याशी तुमची कधी भेट झाली होती काय?' अंगदाचे बोलणे ऐकताच रावण ओशाळून गेला. आणि म्हणाला, 'होय, मला आठवले. बाली नावाचा एक वानर होता खरा!॥ २ ॥

**अंगद तहीं बालि कर बालक। उपजेहु बंस अनल कुल घालक॥**
**गर्भ न गयहु ब्यर्थ तुम्ह जायहु। निज मुख तापस दूत कहायहु॥**

अरे अंगदा, तू त्याचा मुलगा होय? अरे कुलनाशका, तू आपल्या कुलरूपी वेळूसाठी अग्नीच ठरलास. गर्भातच नष्ट का झाला नाहीस? तू उगाच जन्माला आलास, जो आपल्याच तोंडून तपस्व्याचा दूत म्हणू लागलास!॥ ३॥

**अब कहु कुसल बालि कहँ अहई। बिहँसि बचन तब अंगद कहई॥**
**दिन दस गएँ बालि पहिं जाई। बूझेउ कुसल सखा उर लाई॥**

आता बालीची खुशाली सांग. हल्ली तो कुठे आहे?' तेव्हा अंगद हसून म्हणाला, 'दहा दिवसांनंतर स्वत:च बालीजवळ जाऊन आपल्या त्या मित्राला हृदयाशी कवटाळून त्यालाच खुशाली विचारा. ॥ ४॥

**राम बिरोध कुसल जसि होई। सो सब तोहि सुनाइहि सोई॥**
**सुनु सठ भेद होइ मन ताकें। श्रीरघुबीर हृदय नहिं जाकें॥**

श्रीरामांशी विरोध केला असता कशी खुशाली असते, ते तोच सर्व तुम्हांला सांगेल. हे मूर्खा, भेद-नीतीचा प्रभाव ज्याच्या मनात श्रीरघुवीर नसतील, त्याच्यावर पडतो.॥ ५॥

दो०—**हम कुल घालक सत्य तुम्ह कुल पालक दससीस।**
**अंधउ बधिर न अस कहहिं नयन कान तव बीस॥ २१॥**

मी तर कुलाचा नाश करणारा आहे, हे खरे, आणि रावणा, तू काय कुलाचा रक्षक आहेस? आंधळे-बहिरेसुद्धा असे म्हणणार नाहीत. तुला तर वीस डोळे आणि वीस कान आहेत. ॥ २१॥

**सिव बिरंचि सुर मुनि समुदाई। चाहत जासु चरन सेवकाई॥**
**तासु दूत होइ हम कुल बोरा। अइसिहुँ मति उर बिहर न तोरा॥**

शिव, ब्रह्मा इत्यादी देव आणि मुनि-समाज ज्यांच्या चरणांची सेवा करू इच्छितात, त्यांचा दूत बनून मी काय कुळाला बुडवणारा झालो? अरे, असे विचार मनात येऊनही तुझे हृदय विदीर्ण होत नाही?'॥ १॥

**सुनि कठोर बानी कपि केरी। कहत दसानन नयन तरेरी॥**
**खल तव कठिन बचन सब सहऊँ। नीति धर्म मैं जानत अहऊँ॥**

अंगदाचे कठोर बोलणे ऐकून रावण डोळे वटारून म्हणाला, 'अरे दुष्टा! मी तुझे सर्व टोचून बोलणे यासाठी सहन करीत आहे की, मी नीती आणि धर्म जाणतो.'॥ २॥

**कह कपि धर्मसीलता तोरी। हमहुँ सुनी कृत पर त्रिय चोरी॥**
**देखी नयन दूत रखवारी। बूड़ि न मरहु धर्म ब्रतधारी॥**

अंगद म्हणाला, 'तुझी धर्मशीलता मीही ऐकून आहे. तू पर-स्त्रीला चोरलेस आणि दूताचे रक्षण केल्याचे मी आपल्या डोळ्यांनी पाहिले आहे. अशा धर्माचे व्रत धारण करणाऱ्या तू जीव का नाही दिलास?॥ ३॥

**कान नाक बिनु भगिनि निहारी। छमा कीन्हि तुम्ह धर्म बिचारी॥**
**धर्मसीलता तव जग जागी। पावा दरसु हमहुँ बड़भागी॥**

नाक-कान कापलेल्या बहिणीला पाहून तू धर्माचा विचार करून क्षमा केली होतीस. तुझी धर्मशीलता जग-जाहीर आहे. मी खरेच भाग्यवान, म्हणून मला तुझे दर्शन झाले.'॥ ४॥

दो०—**जनि जल्पसि जड़ जंतु कपि सठ बिलोकु मम बाहु।**
**लोकपाल बल बिपुल ससि ग्रसन हेतु सब राहु॥ २२ (क)॥**

रावण म्हणाला, 'अरे मूर्ख प्राण्या, वानरा, व्यर्थ बडबड करू नकोस. अरे मूर्खा, माझ्या भुजा तर बघ. या सर्व लोकपालांच्या विशाल बलरूपी चंद्राला ग्रासणारे राहू आहेत.॥ २२ (क)॥

**पुनि नभ सर मम कर निकर कमलन्हि पर करि बास।**
**सोभत भयउ मराल इव संभु सहित कैलास॥ २२ (ख)॥**

शिवाय तू ऐकलेच असशील की, आकाशरूपी तलावामध्ये माझ्या भुजारूपी कमळांवर राहून शिवांसह कैलासपर्वत हंसासारखा शोभून दिसत होता.॥ २२(ख)॥

**तुम्हरे कटक माझ सुनु अंगद। मो सन भिरिहि कवन जोधा बद॥**
**तव प्रभु नारि बिरहँ बलहीना। अनुज तासु दुख दुखी मलीना॥**

अरे अंगदा, ऐक. तुझ्या सेनेत कोण योद्धा असा आहे की, जो माझ्याशी भिडू शकेल? तुझा स्वामी तर स्त्रीच्या वियोगामुळे दुबळा झाला आहे आणि त्याचा धाकटा भाऊ त्याच्या दु:खामुळे दु:खी व उदास आहे.॥ १॥

**तुम्ह सुग्रीव कूलद्रुम दोऊ। अनुज हमार भीरु अति सोऊ॥**
**जामवंत मंत्री अति बूढ़ा। सो कि होइ अब समरारूढ़ा॥**

तू आणि सुग्रीव हे नदीच्या दोन्ही तटावरील वृक्ष आहात. उरला माझा लहान भाऊ. तो तर फारच भित्रा. मंत्री जांबवान फार म्हातारा आहे. तो आता लढाईला कसा तयार होणार!॥ २॥

**सिल्पिकर्म जानहिं नल नीला। है कपि एक महा बलसीला॥**
**आवा प्रथम नगरु जेहिं जारा। सुनत बचन कह बालिकुमारा॥**

नल-नील हे तर कारागीर. त्यांना लढायचे काय माहीत? हां! एक वानर नक्की महाबलवान आहे, हे खरे. तो प्रथम येथे आला होता आणि त्याने लंका जाळली होती.' हे बोलणे ऐकताच अंगद म्हणाला. ॥ ३ ॥

**सत्य बचन कहु निसिचर नाहा। साँचेहुँ कीस कीन्ह पुर दाहा॥**
**रावन नगर अल्प कपि दहई। सुनि अस बचन सत्य को कहई॥**

'हे राक्षसराज, खरे सांग. खरोखरच त्या वानराने तुझे नगर जाळले होते काय? रावणासारख्या जगद्विजयी योद्ध्याचे नगर एका छोट्याशा वानराने जाळले, हे ऐकून ते खरे कोण म्हणेल? ॥ ४ ॥

**जो अति सुभट सराहेहु रावन। सो सुग्रीव केर लघु धावन॥**
**चलइ बहुत सो बीर न होई। पठवा खबरि लेन हम सोई॥**

हे रावणा, ज्याला तू मोठा योद्धा मानून प्रशंसा केलीस, तो तर सुग्रीवाचा एक छोटासा धावत जाणारा निरोप्या आहे. तो फार चालतो. तो वीर नव्हे. त्याला तर आम्ही फक्त बातमी आणण्यासाठी पाठविला होता. ॥ ५ ॥

दो०—**सत्य नगरु कपि जारेउ बिनु प्रभु आयसु पाइ।**
**फिरि न गयउ सुग्रीव पहिं तेहिं भय रहा लुकाइ॥ २३ ( क )॥**

खरोखरच त्या वानराने प्रभूंच्या आज्ञेविना तुमचे नगर जाळून टाकले काय? मला वाटले, याच भीतीमुळे तो परत आल्यावर सुग्रीवाजवळ गेला नाही आणि कुठे तरी लपला आहे. ॥ २३ (क) ॥

**सत्य कहहि दसकंठ सब मोहि न सुनि कछु कोह।**
**कोउ न हमारें कटक अस तो सन लरत जो सोह॥ २३ ( ख )॥**

हे रावणा! तू सांगतोस ते सर्व खरे आहे. ते ऐकल्यावर मला राग नाही आला. खरोखरच आमच्या सेनेमध्ये असा कोणीही नाही की, जो तुझ्याशी लढण्याच्या पात्रतेचा आहे? ॥ २३ (ख) ॥

**प्रीति बिरोध समान सन करिअ नीति असि आहि।**
**जौं मृगपति बध मेडुकन्हि भल कि कहइ कोउ ताहि॥ २३ ( ग )॥**

प्रीती व वैर बरोबरीच्याशीच केली पाहिजे, अशीच नीती आहे. सिंहाने जर बेडकांना मारले, तर त्याला कुणी शूर म्हणेल? ॥ २३ (ग) ॥

**जद्यपि लघुता राम कहुँ तोहि बधें बड़ दोष।**
**तदपि कठिन दसकंठ सुनु छत्र जाति कर रोष॥ २३ ( घ )॥**

जरी तुला मारण्यात श्रीरामांचा कमीपणा आहे आणि त्यात मोठा दोषही आहे, तरी हे रावणा, क्षत्रिय जातीचा क्रोध फार अनावर असतो.' ॥ २३ (घ) ॥

**बक्र उक्ति धनु बचन सर हृदय दहेउ रिपु कीस।**
**प्रतिउत्तर सड़सिन्ह मनहुँ काढ़त भट दससीस॥ २३ ( ङ )॥**

वक्रोक्तिरूपी धनुष्याने वचनरूपी बाण मारून अंगदाने शत्रूच्या हृदयाचा जळफळाट केला. वीर रावण ते बाण जणू प्रत्युत्तररूपी चिमट्याने काढत होता. ॥ २३(ङ) ॥

**हँसि बोलेउ दसमौलि तब कपि कर बड़ गुन एक।**
**जो प्रतिपालइ तासु हित करइ उपाय अनेक॥ २३ ( च )॥**

तेव्हा रावण हसून म्हणाला, 'वानरामध्ये एक मोठा गुण आहे की, जो त्याला पाळतो, त्याचे तो अनेक उपायांनी कल्याण करण्याचा प्रयत्न करतो. ॥ २३ (च) ॥

**धन्य कीस जो निज प्रभु काजा। जहँ तहँ नाचइ परिहरि लाजा॥**
**नाचि कूदि करि लोग रिझाई। पति हित करइ धर्म निपुनाई॥**

धन्य आहे वानराची! तो आपल्या मालकासाठी लाज सोडून कोठेही नाचतो. नाचून, उड्या मारून लोकांना खूष करून तो मालकाचे हित करतो. ही त्याची धर्म-निपुणता आहे. ॥ १ ॥

**अंगद स्वामिभक्त तव जाती। प्रभु गुन कस न कहसि एहि भाँती॥**
**मैं गुन गाहक परम सुजाना। तव कटु रटनि करउँ नहिं काना॥**

हे अंगदा! तुझी जात स्वामिभक्त आहे. (तर मग) तू आपल्या मालकाचे गुण अशा प्रकारे का बरे गाणार नाहीस? मी गुणांचा आदर करणारा आणि अत्यंत समजूनदार आहे. त्यामुळेच तुझ्या या जळजळीत बडबडीकडे लक्ष देत नाही.' ॥ २ ॥

**कह कपि तव गुन गाहकताई। सत्य पवनसुत मोहि सुनाई॥**
**बन बिधंसि सुत बधि पुर जारा। तदपि न तेहिं कछु कृत अपकारा॥**

अंगदाने म्हटले, 'तुझी खरी गुणग्राहकता तर मला हनुमानाने सांगितली होती. त्याने अशोकवनाचा विध्वंस करून, तुझ्या पुत्राला मारून, नगर जाळले होते. तरीसुद्धा (तू तुझ्या गुणग्राहकतेमुळेच समजलास की,) त्याने तुझ्यावर काहीच अपकार केला नाही. ॥ ३ ॥

**सोइ बिचारि तव प्रकृति सुहाई। दसकंधर मैं कीन्हि ढिठाई॥**
**देखेउँ आइ जो कछु कपि भाषा। तुम्हरें लाज न रोष न माखा॥**

तुझा तोच सुंदर स्वभाव विचारात घेऊन हे दशग्रीवा! मी थोडी धृष्टता केली आहे. हनुमानाने जे काही सांगितले होते, ते येथे येऊन मी प्रत्यक्षच पाहिले की, तुला लाजही नाही, क्रोधही नाही आणि चीडही नाही.' ॥ ४ ॥

**जौं असि मति पितु खाए कीसा। कहि अस बचन हँसा दससीसा॥**
**पितहि खाइ खातेउँ पुनि तोही। अबहीं समुझि परा कछु मोही॥**

रावण म्हणाला, 'अरे वानरा! तुझी अशी बुद्धी आहे, म्हणूनच तू बापाला खाऊन टाकलेस.' असे म्हणून रावण हसला. अंगद म्हणाला, 'बापाला खाल्ल्यावर तुम्हांलाही खाल्ले असते, परंतु आता लगेच माझ्या मनात वेगळीच गोष्ट आली आहे. ॥ ५ ॥

**बालि बिमल जस भाजन जानी। हतउँ न तोहि अधम अभिमानी॥**
**कहु रावन रावन जग केते। मैं निज श्रवन सुने सुनु जेते॥**

अरे नीच अभिमान्या, वालीच्या निर्मळ कीर्तीस पात्र झाल्याचे समजून मी तुला मारत नाही. आता हे सांग की, जगात किती रावण आहेत? मी जितके रावण कानांनी ऐकलेत, ते ऐक. ॥ ६ ॥

**बलिहि जितन एक गयउ पताला। राखेउ बाँधि सिसुन्ह हयसाला॥**
**खेलहिं बालक मारहिं जाई। दया लागि बलि दीन्ह छोड़ाई॥**

एक रावण तर बलीला जिंकण्यासाठी पाताळात गेला होता, तेव्हा मुलांनी त्याला पागेत बांधून घातले. मुले खेळत होती आणि जवळ जाऊन त्याला मारत होती. बळीला दया आली, तेव्हा त्याने त्याला सोडून दिले. ॥ ७ ॥

**एक बहोरि सहसभुज देखा। धाइ धरा जिमि जंतु बिसेषा॥**
**कौतुक लागि भवन लै आवा। सो पुलस्ति मुनि जाइ छोड़ावा॥**

मग सहस्रार्जुनाने एक रावण पाहिला. त्याने धावत जाऊन एखाद्या विचित्र प्राण्यासारखे समजून त्याला पकडले. मजा म्हणून तो घरी घेऊन आला, तेव्हा पुलस्त्य मुनींनी जाऊन त्याला सोडविले. ॥ ८ ॥

दो०—**एक कहत मोहि सकुच अति रहा बालि कीं काँख।**
**इन्ह महुँ रावन तैं कवन सत्य बदहि तजि माख॥ २४॥**

एका रावणाची गोष्ट सांगताना मला संकोच वाटत आहे. तो बराच वेळ बालीच्या काखेत होता. यांपैकी तू कोणता रावण? न चिडता खरेखरे सांग.' ॥ २४ ॥

**सुनु सठ सोइ रावन बलसीला। हरगिरि जान जासु भुज लीला॥**
**जान उमापति जासु सुराई। पूजेउँ जेहि सिर सुमन चढ़ाई॥**

रावण म्हणाला, 'अरे मूर्खा, मी तोच रावण आहे, ज्याच्या भुजांची करामत कैलास पर्वत जाणतो, ज्याची शूरता उमापती महादेव जाणतात, ज्यांना मी आपली शिररूपी पुष्पे अर्पण करून त्यांची पूजा केली होती. ॥ १ ॥

**सिर सरोज निज करन्हि उतारी। पूजेउँ अमित बार त्रिपुरारी॥**
**भुज बिक्रम जानहिं दिगपाला। सठ अजहूँ जिन्ह कें उर साला॥**

शिररूपी कमळे आपल्या हातांनी कापून मी अनेकदा त्रिपुरारी शिवांची पूजा केली आहे. अरे मूर्खा, माझ्या भुजांचा पराक्रम दिक्पालांना ठाऊक आहे. आजही त्यांच्या मनात तो बोचत आहे. ॥ २ ॥

**जानहिं दिग्गज उर कठिनाई। जब जब भिरउँ जाइ बरिआई॥**
**जिन्ह के दसन कराल न फूटे। उर लागत मूलक इव टूटे॥**

दिग्गज माझी छाती किती कठोर आहे, ते जाणतात. जेव्हा जेव्हा मी जोराने जाऊन त्यांना भिडलो, तेव्हा त्यांचे दात माझ्या छातीवर व्रणसुद्धा करू शकले नाहीत. उलट माझ्या छातीला ते लागताच मुळ्याप्रमाणे तुटून गेले. ॥ ३ ॥

**जासु चलत डोलति इमि धरनी। चढ़त मत्त गज जिमि लघु तरनी॥**
**सोइ रावन जग बिदित प्रतापी। सुनेहि न श्रवन अलीक प्रलापी॥**

मी चालतो तेव्हा पृथ्वी हादरते, ज्याप्रमाणे छोट्या नावेत मस्त झालेला हत्ती चढतो तेव्हा ती डगमगते. मीच तो जगप्रसिद्ध प्रतापी रावण आहे. अरे, खोटी बकबक करणाऱ्या, तू कधी आपल्या कानांनी माझ्याबद्दल ऐकले नाहीस काय? ॥ ४ ॥

दो०—**तेहि रावन कहँ लघु कहसि नर कर करसि बखान।**
**रे कपि बर्बर खर्ब खल अब जाना तव ग्यान॥ २५॥**

त्या महान प्रतापी व जगप्रसिद्ध मज रावणाला छोटा म्हणतोस? आणि माणसाला मोठा म्हणतोस? अरे दुष्टा, असभ्य व क्षुद्र माकडा, आता मला तुझे शहाणपण समजले.' ॥ २५ ॥

**सुनि अंगद सकोप कह बानी। बोलु सँभारि अधम अभिमानी॥**
**सहसबाहु भुज गहन अपारा। दहन अनल सम जासु कुठारा॥**

रावणाचे हे बोलणे ऐकून अंगद रागाने म्हणाला, 'अरे नीच गर्विष्ठा, सांभाळून बोल. ज्याचा परशू सहस्रबाहूच्या भुजारूपी अपार वनास जाळण्यासाठी अग्नीप्रमाणे होता, ॥ १ ॥

**जासु परसु सागर खर धारा। बूड़े नृप अगनित बहु बारा॥**
**तासु गर्ब जेहि देखत भागा। सो नर क्यों दससीस अभागा॥**

ज्याच्या परशुरूपी समुद्राच्या प्रचंड प्रवाहामध्ये अगणित राजे अनेक वेळा बुडून गेले, त्या परशुरामांचा गर्व ज्यांना पाहाताच गळून गेला, अरे अभागी दशमुखा! ते मनुष्य कसे असतील? ॥ २ ॥

**राम मनुज कस रे सठ बंगा। धन्वी कामु नदी पुनि गंगा॥**
**पसु सुरधेनु कल्पतरु रूखा। अन्न दान अरु रस पीयूषा॥**

अरे मूर्ख उन्मत्ता! ते श्रीरामचंद्र काय मनुष्य आहेत? कामदेव हा काय सामान्य धनुर्धारी आहे? आणि गंगा ही सामान्य नदी आहे काय? कामधेनू ही सामान्य गाय आहे काय? कल्पवृक्ष सामान्य झाड आहे काय? अन्नदान हे दान आहे काय? आणि अमृत हा रस आहे काय? ॥ ३ ॥

**बैनतेय खग अहि सहसानन। चिंतामनि पुनि उपल दसानन॥**
**सुनु मतिमंद लोक बैकुंठा। लाभ कि रघुपति भगति अकुंठा॥**

गरुड हा काय सामान्य पक्षी आहे? शेष काय साधा सर्प आहे? अरे रावणा! चिंतामणीसुद्धा साधा दगड आहे काय? अरे मूर्खा, आणखी ऐक. वैकुंठसुद्धा सामान्य लोक आहे काय? श्रीरघुनाथांची अखंड भक्ती म्हणजे साधा लाभ आहे काय?॥ ४॥

दो०—**सेन सहित तव मान मथि बन उजारि पुर जारि।**
**कस रे सठ हनुमान कपि गयउ जो तव सुत मारि॥ २६॥**

सेनेसह तुझा मान मर्दन करून, अशोकवन उध्वस्त करून आणि तुझ्या पुत्राला मारून लंका नगरी जाळून जो परत गेला, ज्याचे तू काहीही वाकडे करू शकला नाहीस, अरे दुष्टा, तो हनुमान साधा वानर आहे काय?॥ २६॥

**सुनु रावन परिहरि चतुराई। भजसि न कृपासिंधु रघुराई॥**
**जौं खल भएसि राम कर द्रोही। ब्रह्म रुद्र सक राखि न तोही॥**

अरे रावणा, आपले मोठेपण सोडून देऊन ऐक. कृपेचे समुद्र असलेल्या प्रभू श्रीरघुनाथांचे तू भजन का करीत नाहीस? अरे दुष्टा, तू श्रीरामांचा वैरी झालास, तर तुला ब्रह्मदेव व रुद्रसुद्धा वाचवू शकणार नाहीत.॥ १॥

**मूढ़ बृथा जनि मारसि गाला। राम बयर अस होइहि हाला॥**
**तव सिर निकर कपिन्ह के आगें। परिहहिं धरनि राम सर लागें॥**

हे मूढा, फुकटची घमेंड मिरवू नकोस. श्रीरामांशी वैर केल्याने तुझी स्थिती अशी होईल की, तुझी मुंडकी श्रीरामांचे बाण लागताच वानरांसमोर जमिनीवर पडतील॥ २॥

**ते तव सिर कंदुक सम नाना। खेलिहहिं भालु कीस चौगाना॥**
**जबहिं समर कोपिहि रघुनायक। छुटिहहिं अति कराल बहु सायक॥**

आणि अस्वले व वानरे तुझी ती मुंडकी चेंडूप्रमाणे उडवून चेंडूचा खेळ खेळतील. जेव्हा श्रीरघुनाथ युद्ध करतील आणि त्यांचे पुष्कळ अत्यंत तीक्ष्ण बाण सुटतील,॥ ३॥

**तब कि चलिहि अस गाल तुम्हारा। अस बिचारि भजु राम उदारा॥**
**सुनत बचन रावन परजरा। जरत महानल जनु घृत परा॥**

तेव्हा तुझी अशी वटवट चालेल? असा विचार करून कृपाळू श्रीरामांना भज.' अंगदाचे हे बोलणे ऐकून रावणाच्या अंगाची लाही लाही झाली. जणू जळणाऱ्या प्रचंड आगीमध्ये तूप पडले.॥ ४॥

दो०—**कुंभकरन अस बंधु मम सुत प्रसिद्ध सक्रारि।**
**मोर पराक्रम नहिं सुनेहि जितेउँ चराचर झारि॥ २७॥**

तो म्हणाला, 'अरे मूर्खा, कुंभकर्णासारखा माझा भाऊ आहे, इंद्राला जिंकणारा सुप्रसिद्ध मेघनाद माझा पुत्र आहे आणि माझा पराक्रम तर तू ऐकलाच नाहीस की, मी संपूर्ण चराचर जग जिंकून घेतले आहे. ॥ २७ ॥

**सठ साखामृग जोरि सहाई। बाँधा सिंधु इहइ प्रभुताई॥**
**नाघहिं खग अनेक बारीसा। सूर न होहिं ते सुनु सब कीसा॥**

अरे दुष्टा, वानरांची मदत घेऊन तुझ्या स्वामींनी समुद्राला बांध घातला. हाच काय तो त्यांचा मोठेपणा! समुद्र तर अनेक पक्षी ओलांडून जातात, परंतु त्यामुळे ते सर्व काही शूरवीर ठरत नाहीत. अरे मूर्ख माकडा, ऐक. ॥ १ ॥

**मम भुज सागर बल जल पूरा। जहँ बूड़े बहु सुर नर सूरा॥**
**बीस पयोधि अगाध अपारा। को अस बीर जो पाइहि पारा॥**

माझा एक एक भुजारूपी समुद्र बलरूपी जलाने भरलेला आहे. त्यामध्ये पुष्कळसे शूर देव व मनुष्य बुडाले आहेत. सांग, माझ्या या अथांग व अपार वीस भुजांच्या समुद्रांना ओलांडेल असा कोण शूर आहे?॥ २ ॥

**दिगपालन्ह मैं नीर भरावा। भूप सुजस खल मोहि सुनावा॥**
**जौं पै समर सुभट तव नाथा। पुनि पुनि कहसि जासु गुन गाथा॥**

अरे दुष्टा, मी दिक्पालांना पाणी भरायला लावले आणि तू एका राजाची कीर्ती मला सांगतोस? ज्याचे गुणगान तू वारंवार सांगत आहेस, तो तुझा मालक युद्धात लढणारा योद्धा आहे, ॥ ३ ॥

**तौ बसीठ पठवत केहि काजा। रिपु सन प्रीति करत नहिं लाजा॥**
**हरगिरि मथन निरखु मम बाहू। पुनि सठ कपि निज प्रभुहि सराहू॥**

तर त्याने दूत कशाला पाठवला आहे? शत्रूशी तह करताना त्याला लाज वाटत नाही? प्रथम कैलासाचे मंथन करणाऱ्या माझ्या भुजांकडे बघ. मग हे मूर्ख वानरा! आपल्या मालकाची प्रशंसा कर. ॥ ४ ॥

दो०—**सूर कवन रावन सरिस स्वकर काटि जेहिं सीस।**
**हुने अनल अति हरष बहु बार साखि गौरीस॥ २८॥**

रावणासारखा वीर आहे कोण? त्याने आपलीच शिरे तोडून अत्यंत आनंदाने अनेक वेळा अग्नीमध्ये होम केलेली आहेत. गौरीपती शिव हे या गोष्टीला साक्ष आहेत. ॥ २८ ॥

**जरत बिलोकेउँ जबहिं कपाला। बिधि के लिखे अंक निज भाला॥**
**नर कें कर आपन बध बाँची। हसेउँ जानि बिधि गिरा असाँची॥**

मस्तके जळत असताना मी आपल्या ललाटावर लिहिलेली विधात्याची अक्षरे पाहिली, तेव्हा 'मनुष्याच्या हातून माझा मृत्यू होणार' हे वाचून विधात्याची ती अक्षरे असत्य समजून मी हसलो. ॥ १ ॥

**सोउ मन समुझि त्रास नहिं मोरें। लिखा बिरंचि जरठ मति भोरें॥**
**आन बीर बल सठ मम आगें। पुनि पुनि कहसि लाज पति त्यागें॥**

ती गोष्ट समजल्यावरही माझ्या मनाला भय वाटले नाही. मला वाटते की, म्हाताऱ्या ब्रह्मदेवाने बुद्धिभ्रम झाल्यामुळे असे लिहिले आहे. अरे मूर्खा, तू लाज आणि मर्यादा सोडून माझ्यासमोर वारंवार दुसऱ्या वीराचे बल काय सांगतोस?' ॥ २ ॥

**कह अंगद सलज्ज जग माहीं। रावन तोहि समान कोउ नाहीं॥**
**लाजवंत तव सहज सुभाऊ। निज मुख निज गुन कहसि न काऊ॥**

अंगद म्हणाला, 'अरे रावणा, तुझ्यासारखा लज्जावान जगात कोणी नाही. लाज हा तर तुझा सहज स्वभाव आहे. तू आपल्या तोंडाने आपले गुण कधी सांगत नाहीस. ॥ ३ ॥

**सिर अरु सैल कथा चित रही। ताते बार बीस तैं कही॥**
**सो भुजबल राखेहु उर घाली। जीतेहु सहसबाहु बलि बाली॥**

शिरे तोडणे आणि कैलास पर्वत उचलल्याची गोष्ट तुझ्या मनात ठसली आहे. म्हणून ती तू वीस एक वेळा सांगितलीस. परंतु तू ज्या भुजांनी सहस्रबाहू व वालीला जिंकलेस, ते आपल्या भुजांचे बळ मनातून टाळलेस. ॥ ४ ॥

**सुनु मतिमंद देहि अब पूरा। काटें सीस कि होइअ सूरा॥**
**इंद्रजालि कहुँ कहिअ न बीरा। काटइ निज कर सकल सरीरा॥**

अरे मंदबुद्धीच्या, आता पुरे कर. शिर तोडल्याने कुणी शूरवीर होते काय? जादुगाराने जरी आपल्या हातांनी आपले शरीर कापले तरी, जादू करणाऱ्याला काही वीर म्हणता येत नाही. ॥ ५ ॥

**दो०—जरहिं पतंग मोह बस भार बहहिं खर बृंद।**
**ते नहिं सूर कहावहिं समुझि देखु मतिमंद॥ २९॥**

अरे मूढा!, समजून घे. पतंग कीटक मोहामुळे आगीत जळून मरतात, गाढवांचे तांडे ओझे घेऊन चालतात, परंतु तेवढ्याने त्यांना कोणी शूर म्हणत नाहीत. ॥ २९ ॥

**अब जनि बतबढ़ाव खल करही। सुनु मम बचन मान परिहरही॥**
**दसमुख मैं न बसीठीं आयउँ। अस बिचारि रघुबीर पठायउँ॥**

अरे दुष्टा, आता बडबड करू नकोस, माझे म्हणणे ऐक आणि ताठा सोडून दे. हे दशमुखा, मी दूताप्रमाणे तह करायला आलो नाही. श्रीरघुवीरांनी असा विचार करून मला पाठविले आहे की, ॥ १ ॥

**बार बार अस कहइ कृपाला। नहिं गजारि जसु बधें सृकाला॥**
**मन महुँ समुझि बचन प्रभु केरे। सहेउँ कठोर बचन सठ तेरे॥**

कृपाळू श्रीराम वारंवार असे म्हणतात की, कोल्ह्याला मारल्याने सिंहाला कीर्ती मिळत नाही. अरे मूर्खा, प्रभूंचे म्हणणे मनापासून समजून घेऊनच मी तुझे कठोर बोलणे ऐकून घेतले.॥ २॥

**नाहिं त करि मुख भंजन तोरा। लै जातेउँ सीतहि बरजोरा॥**
**जानेउँ तव बल अधम सुरारी। सूनें हरि आनिहि परनारी॥**

नाही तर तुझे तोंड तोडून सीतेला बळेच नेले असते. अरे अधमा, देवांच्या शत्रो, एकटी असताना परस्त्रीला तू चोरून आणलेस, तेव्हाच मी तुझे बळ जाणले.॥ ३॥

**तैं निसिचरपति गर्ब बहूता। मैं रघुपति सेवक कर दूता॥**
**जौं न राम अपमानहि डरऊँ। तोहि देखत अस कौतुक करऊँ॥**

तू राक्षसांचा राजा आणि मोठा अहंकारी आहेस, परंतु मी श्रीरघुनाथांचा सेवक सुग्रीव याचा सेवक आहे. तर मी यात श्रीरामांचा अपमान होईल, म्हणून घाबरत नसतो, तर तुझ्या डोळ्यांसमोर अशी फजिती केली असती की,॥ ४॥

दो०—**तोहि पटकि महि सेन हति चौपट करि तव गाउँ।**
**तव जुबतिन्ह समेत सठ जनकसुतहि लै जाउँ॥ ३०॥**

तुला जमिनीवर आपटून, तुझ्या सेनेचा संहार करून आणि तुझे गाव नष्ट भ्रष्ट करून, अरे मूर्खा! तुझ्या स्त्रियांसह जानकीला घेऊन गेलो असतो.॥ ३०॥

**जौं अस करौं तदपि न बड़ाई। मुएहि बधें नहिं कछु मनुसाई॥**
**कौल कामबस कृपिन बिमूढ़ा। अति दरिद्र अजसी अति बूढ़ा॥**

जरी मी असे केले तरीही त्यात माझा काही मोठेपणा नाही. मेलेल्याला मारण्यात काहीही बहादुरी नाही. वागमार्गी, कामी, कंजूष, अत्यंत मूढ, अत्यंत दरिद्री बदनाम आणि म्हातारा,॥ १॥

**सदा रोगबस संतत क्रोधी। बिष्नु बिमुख श्रुति संत बिरोधी॥**
**तनु पोषक निंदक अघ खानी। जीवत सव सम चौदह प्रानी॥**

नेहमी रोगी असणारा, नित्य संतापणारा, भगवान विष्णूंना विन्मुख, वेद आणि संत-विरोधी, आपलेच शरीर पोसणारा, दुसऱ्याची निंदा करणारा आणि मोठा पापी, हे चौदा प्राणी जिवंतपणीच मेल्याप्रमाणे असतात.॥ २॥

**अस बिचारि खल बधउँ न तोही। अब जनि रिस उपजावसि मोही॥**
**सुनि सकोप कह निसिचर नाथा। अधर दसन दसि मीजत हाथा॥**

अरे दुष्टा, या विचाराने मी तुला मारत नाही. आता तू माझा क्रोध वाढवू नकोस.' अंगदाचे बोलणे ऐकून राक्षसराज दात-ओठ खात, क्रुद्ध होऊन हात चोळत म्हणाला, ॥ ३ ॥

**रे कपि अधम मरन अब चहसी। छोटे बदन बात बड़ि कहसी॥**
**कटु जल्पसि जड़ कपि बल जाकें। बल प्रताप बुधि तेज न ताकें॥**

'अरे नीच माकडा, आता तुला मरायची इच्छा झाली आहे. म्हणून लहान तोंडी मोठा घास घेत आहेस. अरे मूर्ख माकडा, ज्याच्या बळावर तू कडवट बोलत आहेस, त्याच्यामध्ये बळ, प्रताप, बुद्धी व तेज हे काहीही नाही. ॥ ४ ॥

दो०—**अगुन अमान जानि तेहि दीन्ह पिता बनबास।**
**सो दुख अरु जुबती बिरह पुनि निसि दिन मम त्रास॥ ३१ ( क )॥**

तो गुणहीन आणि मानहीन आहे, असे समजूनच पित्याने त्याला वनवास दिला. त्याला स्वतःचे दुःख, त्यावर तरुण पत्नीचा विरह आणि शिवाय रात्रंदिवस माझी भीती आहे. ॥ ३१(क) ॥

**जिन्ह के बल कर गर्ब तोहि अइसे मनुज अनेक।**
**खाहिं निसाचर दिवस निसि मूढ़ समुझु तजि टेक॥ ३१ ( ख )॥**

ज्याच्या बळावर तुला गर्व आहे, अशा अनेक मनुष्यांना राक्षस रात्रंदिवस खात असतात. अरे मूढा, हट्ट सोडून विचार कर.'॥ ३१(ख) ॥

**जब तेहिं कीन्हि राम कै निंदा। क्रोधवंत अति भयउ कपिंदा॥**
**हरि हर निंदा सुनइ जो काना। होइ पाप गोघात समाना॥**

जेव्हा रावणाने श्रीरामांची निंदा केली, तेव्हा कपिश्रेष्ठ अंगद अत्यंत क्रुद्ध झाला. कारण शास्त्रे असे म्हणतात की, आपल्या कानांनी भगवान विष्णू आणि शिव यांची निंदा ऐकणे, हे गोवधाच्या पापासारखे असते. ॥ १ ॥

**कटकटान कपिकुंजर भारी। दुहु भुजदंड तमकि महि मारी॥**
**डोलत धरनि सभासद खसे। चले भाजि भय मारुत ग्रसे॥**

वानरश्रेष्ठ अंगदाने मोठ्या जोराने दात खाल्ले आणि आवेशाने आपले भुजदंड पृथ्वीवर आपटले. पृथ्वी हादरली आणि आसनांवर बसलेले सभासद पडले आणि भयरूपी भुताने ग्रस्त होऊन पळाले. ॥ २ ॥

**गिरत सँभारि उठा दसकंधर। भूतल परे मुकुट अति सुंदर॥**
**कछु तेहिं लै निज सिरन्हि सँवारे। कछु अंगद प्रभु पास पबारे॥**

रावण पडता-पडता वाचला. त्याचे अत्यंत सुंदर मुकुट जमिनीवर पडले. काही त्याने उचलून आपल्या डोक्यावर व्यवस्थित बसविले आणि अंगदाने काही उचलून प्रभू श्रीरामांच्याकडे फेकून दिले. ॥ ३ ॥

**आवत मुकुट देखि कपि भागे। दिनहीं लूक परन बिधि लागे॥**
**की रावन करि कोप चलाए। कुलिस चारि आवत अति धाए॥**

मुकुट येताना पाहून वानर पळू लागले. ते विचार करू लागले की, हे विधात्या, दिवसाही उल्कापात होऊ लागला काय? अथवा रावणाने रागारागाने चार वज्रे फेकली काय की, जी वेगाने येत आहेत?॥ ४॥

**कह प्रभु हँसि जनि हृदयँ डेराहू। लूक न असनि केतु नहिं राहू॥**
**ए किरीट दसकंधर केरे। आवत बालितनय के प्रेरे॥**

प्रभूंनी हसत म्हटले, 'घाबरू नका. या उल्का नव्हेत, वज्र नव्हे आणि केतू किंवा राहूही नव्हे. अरे बाबांनो! हे रावणाचे मुकुट आहेत. अंगदाने फेकले होते, ते येत आहेत.॥ ५॥

दो०—**तरकि पवनसुत कर गहे आनि धरे प्रभु पास।**
**कौतुक देखहिं भालु कपि दिनकर सरिस प्रकास॥ ३२ (क)॥**

हनुमानाने उडी मारून ते हातांनी पकडले आणि प्रभूंच्याजवळ आणून ठेवले. अस्वल व वानर मजा पाहू लागले. मुकुटांचा प्रकाश सूर्यासारखा होता.॥ ३२ (क)॥

**उहाँ सकोपि दसानन सब सन कहत रिसाइ।**
**धरहु कपिहि धरि मारहु सुनि अंगद मुसुकाइ॥ ३२ (ख)॥**

रावण सभेत रागाने सर्वांना म्हणाला, 'माकडाला पकडा आणि मारून टाका.' हे ऐकून अंगद हसू लागला.॥ ३२ (ख)॥

**एहि बधि बेगि सुभट सब धावहु। खाहु भालु कपि जहँ जहँ पावहु॥**
**मर्कटहीन करहु महि जाई। जिअत धरहु तापस द्वौ भाई॥**

रावण पुढे म्हणाला, 'याला मारून सर्व योद्धे त्वरित धावा आणि जिथे कुठे अस्वल व वानर दिसेल, तिथे त्याला खाऊन टाका. पृथ्वी वानररहित करा आणि जाऊन त्या दोघा तपस्व्यांना जिवंत पकडून आणा.'॥ १॥

**पुनि सकोप बोलेउ जुबराजा। गाल बजावत तोहि न लाजा॥**
**मरु गर काटि निलज कुलघाती। बल बिलोकि बिहरति नहिं छाती॥**

रावणाचे रागाने बोललेले शब्द ऐकून युवराज अंगद संतापून म्हणाला, 'बकबक करायला तुला लाज वाटत नाही? अरे निर्लज्जा, अरे कुलनाशका, गळा कापून घेऊन आत्महत्या कर. माझे बळ पाहूनही तुझी छाती विदीर्ण होत नाही काय?॥ २॥

**रे त्रिय चोर कुमारग गामी। खल मल रासि मंदमति कामी॥**
**सन्यपात जल्पसि दुर्बादा। भएसि कालबस खल मनुजादा॥**

अरे स्त्रीचोरा, अरे कुमार्गावर चालणाऱ्या, अरे दुष्टा, पापांच्या ढिगा, मंदबुद्धी आणि कामातुर तू वात झाल्याप्रमाणे कशाला भलभलते बरळत आहेस? अरे दुष्ट राक्षसा, तू काळाच्या तोंडी आहेस. ॥ ३ ॥

**याको फलु पावहिगो आगें। बानर भालु चपेटन्हि लागें॥**
**रामु मनुज बोलत असि बानी। गिरहिं न तव रसना अभिमानी॥**

नंतर जेव्हा वानर व अस्वले तुला बदडतील, तेव्हा तुला याचे फळ मिळेल. श्रीराम मनुष्य आहेत, असे म्हणताना अरे गर्विष्ठा, तुझ्या जिभा का झडल्या नाहीत? ॥ ४ ॥

**गिरिहहिं रसना संसय नाहीं। सिरन्हि समेत समर महि माहीं॥**

तुझ्या जिभा डोक्यांबरोबरच रणभूमीत पडतील, यात काही शंका नाही. ॥ ५ ॥

सो०—**सो नर क्यों दसकंध बालि बध्यो जेहिं एक सर।**
**बीसहुँ लोचन अंध धिग तव जन्म कुजाति जड़॥ ३३ (क)॥**

अरे दशकंधरा! ज्याने एकाच बाणाने वालीला मारले, तो मनुष्य कसा असेल? अरे कुजातीच्या मूर्खा! वीस डोळे असूनही तू आंधळा आहेस. तुझ्या जन्माचा धिक्कार असो. ॥ ३३(क) ॥

**तव सोनित कीं प्यास तृषित राम सायक निकर।**
**तजउँ तोहि तेहि त्रास कटु जल्पक निसिचर अधम॥ ३३ (ख)॥**

श्रीरामचंद्रांचे बाणसमूह तुझ्या रक्ताचे पिपासू आहेत. ते तहानलेले राहू नयेत, या भीतीने अरे कटू बडबड करणाऱ्या नीच राक्षसा, मी तुला सोडून देतो. ॥ ३३(ख) ॥

**मैं तव दसन तोरिबे लायक। आयसु मोहि न दीन्ह रघुनायक॥**
**असि रिस होति दसउ मुख तोरौं। लंका गहि समुद्र महँ बोरौं॥**

तुझे दात तोडायला मी समर्थ आहे, पण काय करू? श्रीरामांची मला आज्ञा नाही. मला असा क्रोध येतोय की, तुझी दाही तोंडे तोडून टाकावीत आणि तुझी लंका उचलून समुद्रात फेकून द्यावी. ॥ १ ॥

**गूलरि फल समान तव लंका। बसहु मध्य तुम्ह जंतु असंका॥**
**मैं बानर फल खात न बारा। आयसु दीन्ह न राम उदारा॥**

तुझी लंका उंबराच्या फळासारखी आहे. तुम्ही सर्व त्यातील किडे आहात आणि अज्ञानामुळे निर्भयपणे तिथे राहात आहात. मी वानर आहे. मला हे फळ खायला कितीसा वेळ लागला असता? परंतु कृपाळू श्रीरामचंद्रांनी तशी मला आज्ञा दिलेली नाही.' ॥ २ ॥

**जुगुति सुनत रावन मुसुकाई। मूढ़ सिखिहि कहँ बहुत झुठाई॥**
**बालि न कबहुँ गाल अस मारा। मिलि तपसिन्ह तैं भएसि लबारा॥**

अंगदाची युक्ती ऐकून रावण हसला आणि म्हणाला, 'अरे मूर्खा, खोटे बोलायला तू कुठून

शिकलास? बाली कधी अशा गप्पा मारत नव्हता. असे वाटते की, तपस्व्यांना भेटल्यामुळे तू लबाड झाला आहेस.'॥ ३ ॥

**साँचेहुँ मैं लबार भुज बीहा। जौं न उपारिउँ तव दस जीहा॥**
**समुझि राम प्रताप कपि कोपा। सभा माझ पन करि पद रोपा॥**

अंगद म्हणाला, 'अरे वीस भुजांच्या! जर तुझ्या दहाही जिभा मी उपटून टाकल्या नाही, तर मी खरोखर लबाड ठरेन.' श्रीरामचंद्रांचा प्रताप आठवताच अंगद क्रुद्ध झाला आणि त्याने रावणाच्या सभेत प्रतिज्ञापूर्वक जमिनीवर पाय रोवला.॥ ४ ॥

**जौं मम चरन सकसि सठ टारी। फिरहिं रामु सीता मैं हारी॥**
**सुनहु सुभट सब कह दससीसा। पद गहि धरनि पछारहु कीसा॥**

आणि तो म्हणाला, 'अरे मूर्खा, जर तू माझा पाय हलवू शकलास, तर श्रीराम परत जातील आणि मी सीतेला गमावून बसेन.' रावण म्हणाला, 'हे सर्व वीरांनो, ऐका. पाय पकडून या माकडाला खाली पाडा.'॥ ५ ॥

**इंद्रजीत आदिक बलवाना। हरषि उठे जहँ तहँ भट नाना॥**
**झपटहिं करि बल बिपुल उपाई। पद न टरइ बैठहिं सिरु नाई॥**

इंद्रजित इत्यादी अनेक योद्धे सगळीकडे आनंदित होऊन उठले. संपूर्ण बळ पणास लावून बरेच प्रयत्न करून त्यांनी पाहिले, परंतु पाय हलत नव्हता. तेव्हा मान खाली घालून ते आपापल्या जागी जाऊन बसले.॥ ६ ॥

**पुनि उठि झपटहिं सुर आराती। टरइ न कीस चरन एहि भाँती॥**
**पुरुष कुजोगी जिमि उरगारी। मोह बिटप नहिं सकहिं उपारी॥**

काकभुशुंडी म्हणतात, 'ते देवांचे शत्रू पुन्हा उठून धावून जात. परंतु हे सर्पांच्या शत्रू गरुडा, विषयी पुरुष ज्याप्रमाणे मोहरूपी वृक्ष उपटू शकत नाही, त्याप्रमाणे ते अंगदाचा पाय हलवू शकत नव्हते.॥ ७ ॥

दो०—**कोटिन्ह मेघनाद सम सुभट उठे हरषाइ।**
**झपटहिं टरै न कपि चरन पुनि बैठहिं सिर नाइ॥ ३४ ( क )॥**

बळामध्ये मेघनादासारखे जे असंख्य वीर योद्धे होते, ते आनंदाने उठले. ते वारंवार वेगाने येत होते, परंतु वानराचा पाय काही उचलत नव्हता, तेव्हा लाजेने मान खाली घालून ते बसत होते.॥ ३४ (क) ॥

**भूमि न छाँड़त कपि चरन देखत रिपु मद भाग।**
**कोटि बिघ्न ते संत कर मन जिमि नीति न त्याग॥ ३४ ( ख )॥**

ज्याप्रमाणे विघ्ने आली तरी संतांचे मन नीती सोडत नाही, त्याप्रमाणेच अंगदाचा पाय भूमीला सोडत नव्हता. हे पाहून रावणाचा गर्व नाहीसा झाला. ॥ ३४ (ख) ॥

**कपि बल देखि सकल हियँ हारे। उठा आपु कपि कें परचारे॥**
**गहत चरन कह बालिकुमारा। मम पद गहें न तोर उबारा॥**

अंगदाचे बळ पाहून सर्वजण मनातून निराश झाले. नंतर अंगदाने आव्हान दिले, तेव्हा स्वत: रावण उठला. जेव्हा तो अंगदाचा पाय धरू लागला, तेव्हा बालिकुमार अंगद म्हणाला, 'माझा पाय धरून तू वाचणार नाहीस. ॥ १ ॥

**गहसि न राम चरन सठ जाई। सुनत फिरा मन अति सकुचाई॥**
**भयउ तेजहत श्री सब गई। मध्य दिवस जिमि ससि सोहई॥**

अरे मूर्खा, तू जाऊन श्रीरामांचे चरण का धरत नाहीस?' हे ऐकून रावण ओशाळून परत गेला. त्याचे सर्व तेज नाहीसे झाले. माध्यान्हीला जसा चंद्र निस्तेज होतो, तसा तो निस्तेज झाला. ॥ २ ॥

**सिंघासन बैठेउ सिर नाई। मानहुँ संपति सकल गँवाई॥**
**जगदातमा प्रानपति रामा। तासु बिमुख किमि लह बिश्रामा॥**

तो मान खाली घालून सिंहासनावर जाऊन बसला. जणू सर्व संपत्ती त्याने गमावली होती. श्रीरामचंद्र हे संपूर्ण जगाचे आत्मा आणि प्राणांचे स्वामी आहेत. त्यांच्याशी विन्मुख राहणाऱ्याला शांतता कशी मिळणार? ॥ ३ ॥

**उमा राम की भृकुटि बिलासा। होइ बिस्व पुनि पावइ नासा॥**
**तृन ते कुलिस कुलिस तृन करई। तासु दूत पन कहु किमि टरई॥**

शिव म्हणतात, 'हे उमे, ज्या श्रीरामचंद्रांच्या भुवईच्या इशाऱ्यावर विश्व उत्पन्न होते आणि नंतर ते नाश पावते, जे तृणाला वज्र आणि वज्राला तृण बनवितात, त्यांच्या दूताची प्रतिज्ञा कशी टळेल, सांग बरे?' ॥ ४ ॥

**पुनि कपि कही नीति बिधि नाना। मान न ताहि कालु निअराना॥**
**रिपु मद मथि प्रभु सुजसु सुनायो। यह कहि चल्यो बालि नृप जायो॥**

नंतर अंगदाने अनेक प्रकारची नीती सांगितली, परंतु रावणाने मानले नाही, कारण त्याचा काळ जवळ आला होता. शत्रूचा गर्व धुळीला मिळवून अंगदाने रावणाला प्रभू श्रीरामचंद्रांची सुकीर्ती ऐकविली आणि मग तो राजा बालीचा पुत्र असे म्हणत निघाला, ॥ ५ ॥

**हतौं न खेत खेलाइ खेलाई। तोहि अबहिं का करौं बड़ाई॥**
**प्रथमहिं तासु तनय कपि मारा। सो सुनि रावन भयउ दुखारा॥**

'रणभूमीमध्ये तुला खेळवून जोपर्यंत मारीत नाही, तोपर्यंत फुशारकी कशाला मारू?' अंगदाने सभेत येण्यापूर्वीच रावणाच्या पुत्राला मारले होते, ही वार्ता ऐकून रावण दुःखी झाला. ॥ ६ ॥

**जातुधान अंगद पन देखी। भय ब्याकुल सब भए बिसेषी॥**

अंगदाची प्रतिज्ञा यशस्वी झाल्याचे पाहून सर्व राक्षस अत्यंत व्याकूळ झाले. ॥ ७ ॥

दो०—**रिपु बल धरषि हरषि कपि बालितनय बल पुंज।**
**पुलक सरीर नयन जल गहे राम पद कंज॥ ३५ ( क )॥**

शत्रूच्या बलाचे मर्दन करून, बलाची खाण असलेल्या बालिपुत्र अंगदाने आनंदाने येऊन श्रीरामांची चरणकमले धरली. त्याचे शरीर पुलकित झाले होते आणि नेत्रांमध्ये आनंदाश्रू भरले होते. ॥ ३५(क) ॥

**साँझ जानि दसकंधर भवन गयउ बिलखाइ।**
**मंदोदरीं रावनहि बहुरि कहा समुझाइ॥ ३५ ( ख )॥**

संध्याकाळ झालेली पाहून दशग्रीव उदास होऊन महालात गेला. मंदोदरीने रावणाला पुन्हा समजावून सांगितले, ॥ ३५ (ख) ॥

**कंत समुझि मन तजहु कुमतिही। सोह न समर तुम्हहि रघुपतिही॥**
**रामानुज लघु रेख खचाई। सोउ नहिं नाघेहु असि मनुसाई॥**

'हे कांत, मनात विचार करून कुबुद्धी सोडून द्या. तुमच्यात व श्रीरघुनाथांच्यात युद्ध होणे शोभत नाही. त्यांच्या लहान भावाने एक छोटीशी रेषा काढली, तीसुद्धा तुम्ही ओलांडू शकला नाही. हे आहे तुमचे पौरुष. ॥ १ ॥

**पिय तुम्ह ताहि जितब संग्रामा। जाके दूत केर यह कामा॥**
**कौतुक सिंधु नाघि तव लंका। आयउ कपि केहरी असंका॥**

हे प्रियतम, ज्यांच्या दूताचे हे कृत्य आहे, त्यांना तुम्ही संग्रामामध्ये जिंकू शकाल? सहज खेळाप्रमाणे समुद्र ओलांडून आलेला तो वानर-सिंह हनुमान तुमच्या लंकेत निर्भयपणे आला होता. ॥ २ ॥

**रखवारे हति बिपिन उजारा। देखत तोहि अच्छ तेहिं मारा॥**
**जारि सकल पुर कीन्हेसि छारा। कहाँ रहा बल गर्ब तुम्हारा॥**

रखवालदारांना मारून त्याने अशोकवन उध्वस्त केले. पाहाता-पाहाता त्याने अक्षकुमाराला ठार मारले आणि संपूर्ण नगर जाळून खाक केले. त्यावेळी तुमच्या बळाचा गर्व कुठे गेला होता? ॥ ३ ॥

**अब पति मृषा गाल जनि मारहु। मोर कहा कछु हृदयँ बिचारहु॥**
**पति रघुपतिहि नृपति जनि मानहु। अग जग नाथ अतुलबल जानहु॥**

आता हे स्वामी, खोटी घमेंड धरू नका. माझ्या म्हणण्यावर मनात काही विचार करा. हे नाथ, श्रीरघुनाथांना नुसता राजा समजू नका; तर ते चराचराचे स्वामी आणि अतुलनीय बलवान आहेत, हे लक्षात ठेवा.॥ ४॥

**बान प्रताप जान मारीचा। तासु कहा नहिं मानेहि नीचा॥**
**जनक सभाँ अगनित भूपाला। रहे तुम्हउ बल अतुल बिसाला॥**

श्रीरामांच्या बाणाचा प्रताप तर त्या मारीचाला चांगलाच माहीत होता. परंतु तुम्ही त्याचे ऐकले नाही. त्याच्या सांगण्याची अवहेलना केली. जनकाच्या सभेत अगणित राजे होते, तेथे विशाल आणि अतुलनीय बळाचे असे तुम्ही होता.॥ ५॥

**भंजि धनुष जानकी बिआही। तब संग्राम जितेहु किन ताही॥**
**सुरपति सुत जानइ बल थोरा। राखा जिअत आँखि गहि फोरा॥**

तेथे शिवधनुष्य मोडून श्रीरामांनी जानकीला वरले, तेव्हा तुम्ही त्यांना युद्धात का जिंकले नाही? इंद्रपुत्र जयंताला त्यांचे बळ काहीसे ठाऊक होते. श्रीरामांनी त्याचा फक्त एक डोळा फोडून टाकला आणि त्याला जिवंत सोडले.॥ ६॥

**सूपनखा कै गति तुम्ह देखी। तदपि हृदयँ नहिं लाज बिसेषी॥**

शूर्पणखेची दशा तर तुम्ही पाहिलीच आहे. तरीही तुमच्या मनाला श्रीरामांशी लढण्याचा विचार करताना काही लाज वाटत नाही!॥ ७॥

दो०—**बधि बिराध खर दूषनहि लीलाँ हत्यो कबंध।**
**बालि एक सर मार्‍यो तेहि जानहु दसकंध॥ ३६॥**

ज्यांनी विराध आणि खर-दूषणाला मारून लीलया कबंधालाही मारून टाकले आणि ज्यांनी बालीला एकाच बाणात मारले, हे दशानन, तुम्ही त्यांचे महत्त्व ध्यानात घ्या.॥ ३६॥

**जेहिं जलनाथ बँधायउ हेला। उतरे प्रभु दल सहित सुबेला॥**
**कारुनीक दिनकर कुल केतू। दूत पठायउ तव हित हेतू॥**

ज्यांनी सहजासहजी समुद्राला बांध घातला आणि जे प्रभू सेनेसह सुवेळ पर्वतावर उतरले, त्या सूर्यकुलाचे ध्वजस्वरूप असलेल्या करुणामय भगवंतांनी तुमच्या कल्याणासाठीच दूत पाठविला.॥ १॥

**सभा माझ जेहिं तव बल मथा। करि बरूथ महुँ मृगपति जथा॥**
**अंगद हनुमत अनुचर जाके। रन बाँकुरे बीर अति बाँके॥**

भर सभेमध्ये येऊन ज्याप्रमाणे हत्तींच्या झुंडीत येऊन सिंह त्यांना छिन्न-भिन्न करतो, त्याप्रमाणे ज्याने तुमचे बल घुसळून टाकले, तो रणामध्ये बहादूर व महान वीर असलेला अंगद आणि हनुमान हे ज्यांचे सेवक आहेत,॥ २॥

**तेहि कहँ पिय पुनि पुनि नर कहहू। मुधा मान ममता मद बहहू॥**
**अहह कंत कृत राम बिरोधा। काल बिबस मन उपज न बोधा॥**

पतिराज! त्यांना तुम्ही वारंवार मनुष्य म्हणता! तुम्ही उगाच मान, ममता आणि मद यांचे ओझे वाहात आहात. हे प्रियतम, तुम्ही श्रीरामांना विरोध केला आणि काळाच्या पूर्ण दाढेत असल्यामुळे तुमच्या मनात अजूनही ज्ञान उत्पन्न होत नाही.॥ ३॥

**काल दंड गहि काहु न मारा। हरइ धर्म बल बुद्धि बिचारा॥**
**निकट काल जेहि आवत साईं। तेहि भ्रम होइ तुम्हारिहि नाईं॥**

काल हा काठी घेऊन कुणाला मारत नाही. तो धर्म, बल, बुद्धी आणि विचार हिरावून घेतो. हे स्वामी, मरणाची वेळ जवळ आल्यावर, त्याला तुमच्यासारखाच भ्रम होत असतो.॥ ४॥

दो०—**दुइ सुत मरे दहेउ पुर अजहुँ पूर पिय देहु।**
**कृपासिंधु रघुनाथ भजि नाथ बिमल जसु लेहु॥ ३७॥**

तुमचे दोन पुत्र मारले गेले आणि नगर जळून गेले. झाले ते झाले. हे प्रियतम! अजून तरी ही चूक सुधारा. श्रीरामांशी वैर सोडून द्या आणि हे नाथ, कृपेचे समुद्र असलेल्या श्रीरघुनाथांना भजून निर्मल कीर्ती प्राप्त करा.'॥ ३७॥

**नारि बचन सुनि बिसिख समाना। सभाँ गयउ उठि होत बिहाना॥**
**बैठ जाइ सिंघासन फूली। अति अभिमान त्रास सब भूली॥**

पत्नीचे बाणासमान बोचणारे बोलणे ऐकूनही सकाळ होताच रावण सभेमध्ये गेला आणि निर्भयपणे अत्यंत गर्वाने सिंहासनावर जाऊन बसला.॥ १॥

**इहाँ राम अंगदहि बोलावा। आइ चरन पंकज सिरु नावा॥**
**अति आदर समीप बैठारी। बोले बिहँसि कृपाल खरारी॥**

इकडे सुवेळ पर्वतावर श्रीरामांनी अंगदाला बोलावले. त्याने येऊन चरण-कमलांवर मस्तक ठेवले. मोठ्या आदराने त्याला जवळ बसवून श्रीराम हसून म्हणाले,॥ २॥

**बालितनय कौतुक अति मोही। तात सत्य कहु पूछउँ तोही॥**
**रावनु जातुधान कुल टीका। भुज बल अतुल जासु जग लीका॥**

'हे बालीपुत्रा, मला मोठे कुतूहल आहे, म्हणून मी विचारीत आहे. खरे सांग. जो रावण राक्षसांच्या कुळाचा तिलक आहे आणि ज्याच्या अतुलनीय बाहुबलाचा जगभर धाक आहे,॥ ३॥

**तासु मुकुट तुम्ह चारि चलाए। कहहु तात कवनी बिधि पाए॥**
**सुनु सर्बग्य प्रनत सुखकारी। मुकुट न होहिं भूप गुन चारी॥**

त्याचे चार मुकुट तू फेकले होतेस. अंगदा, तुला ते कसे मिळाले?' अंगद म्हणाला, 'हे सर्वज्ञ, हे शरणागताला सुख देणारे, ते मुकुट नव्हते, तर ते राजाचे चार गुण होते. ॥ ४ ॥

**साम दान अरु दंड बिभेदा। नृप उर बसहिं नाथ कह बेदा॥**
**नीति धर्म के चरन सुहाए। अस जियँ जानि नाथ पहिं आए॥**

हे नाथा, वेद म्हणतात की, साम, दान, दंड, भेद हे चारी धर्मशील राजाच्या हृदयात वसतात. हे नीति-धर्म चार सुंदर चरण होत. परंतु रावणामध्ये धर्माचा अभाव आहे. असे मनात समजून ते नाथांच्याजवळ आले आहेत. ॥ ५ ॥

दो०—**धर्महीन प्रभु पद बिमुख काल बिबस दससीस।**
**तेहि परिहरि गुन आए सुनहु कोसलाधीस॥ ३८ ( क )॥**

अधर्मी, प्रभुपदाला विन्मुख, काळाच्या अधीन झालेल्या रावणाला सोडून ते चारही गुण हे कोसलाधीश! आपल्या जवळ आले.'॥ ३८(क) ॥

**परम चतुरता श्रवन सुनि बिहँसे रामु उदार।**
**समाचार पुनि सब कहे गढ़ के बालिकुमार॥ ३८ ( ख )॥**

अंगदाचे चातुर्यपूर्ण बोलणे ऐकून उदार श्रीराम हसू लागले. नंतर बालिपुत्राने लंकेच्या किल्ल्यातील सर्व वृत्तांत सांगितला. ॥ ३८(ख) ॥

**रिपु के समाचार जब पाए। राम सचिव सब निकट बोलाए॥**
**लंका बाँके चारि दुआरा। केहि बिधि लागिअ करहु बिचारा॥**

जेव्हा शत्रूची बातमी मिळाली, तेव्हा श्रीरामचंद्रांनी सर्व मंत्र्यांना बोलावून घेतले आणि म्हटले, 'लंकेला चार प्रचंड दरवाजे आहेत. त्यांच्यावर कसे आक्रमण करायचे, याचा विचार करा.'॥ १ ॥

**तब कपीस रिच्छेस बिभीषन। सुमिरि हृदयँ दिनकर कुल भूषन॥**
**करि बिचार तिन्ह मंत्र दृढ़ावा। चारि अनी कपि कटकु बनावा॥**

तेव्हा सुग्रीव, जांबवान आणि बिभीषण यांनी मनात सूर्यकुलाचे भूषण श्रीरघुनाथांचे स्मरण केले आणि विचार करून काय करायचे, ते ठरविले. वानरांच्या सेनेचे चार भाग केले. ॥ २ ॥

**जथाजोग सेनापति कीन्हे। जूथप सकल बोलि तब लीन्हे॥**
**प्रभु प्रताप कहि सब समुझाए। सुनि कपि सिंघनाद करि धाए॥**

आणि त्यांच्यासाठी यथायोग्य सेनापती नेमले. मग यूथपतींना बोलावून घेतले आणि प्रभूंचा प्रताप सर्वांना समजावून दिला. ते ऐकून वानर सिंहाप्रमाणे गर्जना करीत धावले. ॥ ३ ॥

**हरषित राम चरन सिर नावहिं। गहि गिरि सिखर बीर सब धावहिं॥**
**गर्जहिं तर्जहिं भालु कपीसा। जय रघुबीर कोसलाधीसा॥**

त्यांनी आनंदित होऊन श्रीरामांच्यासमोर नतमस्तक होऊन पर्वतांची शिखरे उचलून ते सर्व वीर धावले. ‘कोसलराज श्रीरामचंद्रांचा विजय असो,’ असे म्हणत अस्वले व वानर गर्जना करीत राक्षसांना तुच्छ मानून निघाले होते.॥ ४॥

**जानत परम दुर्ग अति लंका। प्रभु प्रताप कपि चले असंका॥**
**घटाटोप करि चहुँ दिसि घेरी। मुखहिं निसान बजावहिं भेरी॥**

लंका हा अत्यंत अजेय किल्ला आहे, हे जाणूनही वानर प्रभू श्रीरामांच्या प्रतापामुळे निर्भय होऊन निघाले. चोहीकडून घेरून आलेल्या मेघांप्रमाणे ते लंकेच्या चारी दिशांना वेढा देत तोंडाने नगारे व दुंदुभींचा आवाज काढू लागले.॥ ५॥

दो०—**जयति राम जय लछिमन जय कपीस सुग्रीव।**
**गर्जहिं सिंघनाद कपि भालु महा बल सींव॥ ३९॥**

बळाची परिसीमा असलेले ते वानर व अस्वले सिंहाप्रमाणे उच्च स्वराने ‘श्रीरामकी जय’, ‘लक्ष्मणकी जय’, ‘वानरराज सुग्रीवकी जय’, अशी गर्जना करू लागले.॥ ३९॥

**लंकाँ भयउ कोलाहल भारी। सुना दसानन अति अहँकारी॥**
**देखहु बनरन्ह केरि ढिठाई। बिहँसि निसाचर सेन बोलाई॥**

लंकेमध्ये मोठा गोंधळ माजला. अत्यंत अहंकारी रावणाने ते ऐकून म्हटले, ‘वानरांचे धारिष्ट्य तर पाहा.’ असे म्हणून हसत हसत त्याने राक्षसांची सेना बोलावली.॥ १॥

**आए कीस काल के प्रेरे। छुधावंत सब निसिचर मेरे॥**
**अस कहि अट्टहास सठ कीन्हा। गृह बैठें अहार बिधि दीन्हा॥**

तो म्हणाला, ‘वानर काळाच्या प्रेरणेने मरण्यासाठी आले आहेत, माझे सर्व राक्षस भुकेलेले आहेत. विधात्याने त्यांना घरबसल्या भोजन पाठवून दिले आहे.’ असे म्हणत तो मूर्ख खदखदा हसला.॥ २॥

**सुभट सकल चारिहुँ दिसि जाहू। धरि धरि भालु कीस सब खाहू॥**
**उमा रावनहि अस अभिमाना। जिमि टिट्टिभ खग सूत उताना॥**

आणि म्हणाला, ‘हे वीरांनो, सर्व जण चारी दिशांना जा आणि अस्वले-वानर या सर्वांना पकडून पकडून खाऊन टाका.’ श्रीशिव म्हणतात, ‘हे उमे, टिटवी पक्षी पाय वर करून झोपतो व मानतो की, त्याने जणू आकाशाला पाय लावले, असा अभिमान रावणाला झाला होता.’॥ ३॥

**चले निसाचर आयसु मागी। गहि कर भिंडिपाल बर साँगी॥**
**तोमर मुद्गर परसु प्रचंडा। सूल कृपान परिघ गिरिखंडा॥**

आज्ञा मागून हातामध्ये, उत्तम भिंदिपाल, बरछी, तोमर, मुद्गल, प्रचंड परशू, शूल, दुधारी तलवारी, परिघ आणि पर्वतांचे तुकडे घेऊन राक्षस निघाले.॥ ४॥

**जिमि अरुनोपल निकर निहारी। धावहिं सठ खग मांस अहारी॥**
**चोंच भंग दुख तिन्हहि न सूझा। तिमि धाए मनुजाद अबूझा॥**

ज्याप्रमाणे मूर्ख मांसाहारी पक्षी लाल दगडांचा ढीग पाहून त्याच्यावर तुटून पडतात आणि चोच तुटल्याच्या दु:खाकडे त्यांचे लक्ष नसते, तसेच ते समज नसलेले राक्षस धावले.॥ ५॥

दो०—**नानायुध सर चाप धर जातुधान बल बीर।**
**कोट कँगूरन्हि चढ़ि गए कोटि कोटि रनधीर॥ ४०॥**

अनेक प्रकारची शस्त्रास्त्रे, धनुष्यबाण धारण केलेले कोट्यवधी बलवान आणि रणधीर राक्षस वीर तटबंदीच्या शिखरांवर चढले.॥ ४०॥

**कोट कँगूरन्हि सोहहिं कैसे। मेरु के सृंगनि जनु घन बैसे॥**
**बाजहिं ढोल निसान जुझाऊ। सुनि धुनि होइ भटन्हि मन चाऊ॥**

ते तटबंदीच्या टोकांवर असे शोभत होते की, जणू सुमेरू पर्वतावर ढग बसले आहेत. युद्धाचे ढोल व डंके इत्यादी वाजू लागले. त्यांचा आवाज ऐकून योद्ध्यांच्या मनात चेव येत होता.॥ १॥

**बाजहिं भेरि नफीरि अपारा। सुनि कादर उर जाहिं दरारा॥**
**देखिन्ह जाइ कपिन्ह के ठट्टा। अति बिसाल तनु भालु सुभट्टा॥**

अगणित नौबती व भेरी वाजत होत्या. ते ऐकून घाबरटांच्या मनात खळगे पडत होते. त्यांनी जाऊन अत्यंत विशाल शरीराचे महान योद्धे वानर व अस्वले यांचे कळप पाहिले.॥ २॥

**धावहिं गनहिं न अवघट घाटा। पर्बत फोरि करहिं गहि बाटा॥**
**कटकटाहिं कोटिन्ह भट गर्जहिं। दसन ओठ काटहिं अति तर्जहिं॥**

अस्वले व वानर धावत होते. अवघड घाटांची त्यांना पर्वा नव्हती. पर्वतांना धरून व ते फोडून रस्ता बनवीत होते. कोट्यवधी योद्धे दात करकरवत व गर्जना करीत होते. दात-ओठ चावत होते आणि खूप चेकाळले होते.॥ ३॥

**उत रावन इत राम दोहाई। जयति जयति जय परी लराई॥**
**निसिचर सिखर समूह ढहावहिं। कूदि धरहिं कपि फेरि चलावहिं॥**

तिकडे रावणाचा तर इकडे श्रीरामांचा जयजयकार होत होता. 'जय, जय, जय' चा आवाज

होताच युद्ध सुरू झाले. राक्षस पर्वतांची शिखरे ढिगाने फेकीत होते. वानर ते उड्या मारून पकडत होते आणि परत राक्षसांच्याकडे फेकत होते. ॥ ४ ॥

**छं०—धरि कुधर खंड प्रचंड मर्कट भालु गढ़ पर डारहीं।**
**झपटहिं चरन गहि पटकि महि भजि चलत बहुरि पचारहीं॥**
**अति तरल तरुन प्रताप तरपहिं तमकि गढ़ चढ़ि चढ़ि गए।**
**कपि भालु चढ़ि मंदिरन्ह जहँ तहँ राम जसु गावत भए॥**

प्रचंड वानर व अस्वले पर्वतांचे तुकडे घेऊन किल्ल्यांवर टाकत होते. ते हल्ला करून राक्षसांचे पाय पकडून त्यांना जमिनीवर आपटून पळून जात आणि पुन्हा गर्जना करीत. फार चंचल व मोठी तेजस्वी वानर-अस्वले मोठ्या चपळाईने उड्या मारून किल्ल्यावर चढली आणि जिकडे तिकडे महालात घुसून श्रीरामांची कीर्ती गाऊ लागली.

**दो०—एकु एकु निसिचर गहि पुनि कपि चले पराइ।**
**ऊपर आपु हेठ भट गिरहिं धरनि पर आइ॥ ४१॥**

मग एकेका राक्षसाला पकडून वानर पळून जात. स्वत: वर आणि खाली राक्षस योद्धे-अशा प्रकारे ते किल्ल्यावरून जमिनीवर उड्या घेत. ॥ ४१ ॥

**राम प्रताप प्रबल कपिजूथा। मर्दहिं निसिचर सुभट बरूथा॥**
**चढ़े दुर्ग पुनि जहँ तहँ बानर। जय रघुबीर प्रताप दिवाकर॥**

श्रीरामांच्या प्रतापामुळे प्रबल वानरांच्या झुंडी राक्षस योद्ध्यांच्या अनेक समूहांना चिरडत होते. वानर पुन्हा जिकडे-तिकडे किल्ल्यांवर चढले आणि प्रतापसूर्य श्रीरघुवीरांचा जयजयकार करू लागले. ॥ १ ॥

**चले निसाचर निकर पराई। प्रबल पवन जिमि घन समुदाई॥**
**हाहाकार भयउ पुर भारी। रोवहिं बालक आतुर नारी॥**

जोराचे वारे आल्यावर ढगांचे समूह जसे विखरून जातात त्याप्रमाणे राक्षसांच्या झुंडी पळू लागल्या. लंका नगरीत मोठा हाहाकार माजला. मुले व बायका घाबरून रडू लागले. ॥ २ ॥

**सब मिलि देहिं रावनहि गारी। राज करत एहिं मृत्यु हँकारी॥**
**निज दल बिचल सुनी तेहिं काना। फेरि सुभट लंकेस रिसाना॥**

सर्वजण रावणाला शिव्या देऊ लागले की, सुखाने राज्य करीत असताना याने मृत्यूला बोलावले. जेव्हा आपली सेना विचलित झाली आहे, असे रावणाने ऐकले, तेव्हा पळत असलेल्या राक्षस-योद्ध्यांना परत पाठवून रागाने तो म्हणाला, ॥ ३ ॥

**जो रन बिमुख सुना मैं काना। सो मैं हतब कराल कृपाना॥**
**सर्बसु खाइ भोग करि नाना। समर भूमि भए बल्लभ प्राना॥**

'कोणी पाठ दाखवून पळाला, असे मला समजले, तर मी स्वत: भयानक दुधारी तलवारीने त्याला ठार मारीन. माझे सर्व काही खाल्ले, निरनिराळे भोग भोगले, आता युद्धात तुम्हांला प्राण प्रिय वाटू लागले काय?'॥ ४॥

**उग्र बचन सुनि सकल डेराने। चले क्रोध करि सुभट लजाने॥**
**सन्मुख मरन बीर कै सोभा। तब तिन्ह तजा प्रान कर लोभा॥**

रावणाचे टोचून बोलणे ऐकून सर्व राक्षस-वीर घाबरले आणि ओशाळून रागारागाने युद्धासाठी परत निघाले. युद्धात शत्रूसमोर मरण्यातच वीराची शोभा आहे, असा विचार करून त्यांनी प्राणांचा लोभ सोडून दिला.॥ ५॥

दो०—**बहु आयुध धर सुभट सब भिरहिं पचारि पचारि।**
**ब्याकुल किए भालु कपि परिघ त्रिसूलन्हि मारि॥ ४२॥**

पुष्कळशी शस्त्रास्त्रे धारण करून ते सर्व वीर आरडा-ओरडा करीत भिडू लागले. त्यांनी परिघांनी व त्रिशूळांनी मार-मारून अस्वलांना, वानरांना व्याकूळ केले.॥ ४२॥

**भय आतुर कपि भागन लागे। जद्यपि उमा जीतिहहिं आगे॥**
**कोउ कह कहँ अंगद हनुमंता। कहँ नल नील दुबिद बलवंता॥**

श्रीशिव म्हणतात, हे उमे, पुढे तेच जिंकणार असले तरी यावेळी वानर भयामुळे पळू लागले. ते म्हणू लागले, 'अंगद व हनुमान कोठे आहेत? बलवान नल-नील आणि द्विविद कोठे आहेत?'॥ १॥

**निज दल बिकल सुना हनुमाना। पच्छिम द्वार रहा बलवाना॥**
**मेघनाद तहँ करइ लराई। टूट न द्वार परम कठिनाई॥**

हनुमानाला जेव्हा कळले की, आपली सेना भयभीत झाली आहे, त्यावेळी तो बलवान पश्चिम दारात होता. तेथे त्याच्याबरोबर मेघनाद युद्ध करीत होता. ते दार मोडत नव्हते. फार मोठी अडचण झाली होती.॥ २॥

**पवनतनय मन भा अति क्रोधा। गर्जेउ प्रबल काल सम जोधा॥**
**कूदि लंक गढ़ ऊपर आवा। गहि गिरि मेघनाद कहुँ धावा॥**

तेव्हा हनुमानाला मोठा राग आला. त्या काळासारख्या योद्ध्याने मोठी गर्जना केली आणि उडी मारून तो लंकेच्या किल्ल्यावर आला आणि डोंगर घेऊन मेघनादावर धावून गेला.॥ ३॥

**भंजेउ रथ सारथी निपाता। ताहि हृदय महुँ मारेसि लाता॥**
**दुसरें सूत बिकल तेहि जाना। स्यंदन घालि तुरत गृह आना॥**

मेघनादाचा रथ मोडला. सारथ्याला मारून टाकले आणि मेघनादाच्या छातीवर लाथ मारली. मेघनाद व्याकूळ झालेला पाहून दुसरा सारथी रथात घालून त्याला लगेच घरी घेऊन गेला.॥ ४॥

**दो०—अंगद सुना पवनसुत गढ़ पर गयउ अकेल।**
**रन बाँकुरा बालिसुत तरकि चढ़ेउ कपि खेल॥ ४३॥**

इकडे अंगदाला समजले की, हनुमान किल्ल्यावर एकटाच आहे, तेव्हा रणामध्ये बहादुर बालिपुत्र सहजपणे उडी मारून किल्ल्यावर चढला.॥ ४३॥

**जुद्ध बिरुद्ध क्रुद्ध द्वौ बंदर। राम प्रताप सुमिरि उर अंतर॥**
**रावन भवन चढ़े द्वौ धाई। करहिं कोसलाधीस दोहाई॥**

युद्धामध्ये ते दोन वानर शत्रूंवर संतापले होते. हृदयामध्ये श्रीरामांच्या प्रतापाचे स्मरण करून दोघे धावून रावणाच्या महालावर चढले आणि कोसलराज श्रीरामांचा जयजयकार करू लागले.॥ १॥

**कलस सहित गहि भवनु ढहावा। देखि निसाचरपति भय पावा॥**
**नारि बृंद कर पीटहिं छाती। अब दुइ कपि आए उतपाती॥**

त्यांनी कळसासह महाल धरून पाडला. हे पाहून राक्षसराज रावण घाबरला. सर्व स्त्रिया छाती बडवून म्हणू लागल्या, 'आता उत्पात माजवणारे दोन वानर एकदम आले आहेत.'॥ २॥

**कपिलीला करि तिन्हहि डेरावहिं। रामचंद्र कर सुजसु सुनावहिं॥**
**पुनि कर गहि कंचन के खंभा। कहेन्हि करिअ उतपात अरंभा॥**

वानरलीला करून दोघे त्यांना घाबरवू लागले आणि श्रीरामांची कीर्ती ऐकवू लागले. मग सोन्याचा खांब हातांनी धरून ते म्हणाले, 'आता उत्पात सुरू करू या.'॥ ३॥

**गर्जि परे रिपु कटक मझारी। लागे मर्दै भुज बल भारी॥**
**काहुहि लात चपेटन्हि केहू। भजहु न रामहि सो फल लेहू॥**

गर्जना करीत शत्रूच्या सेनेत त्यांनी मधोमध उडी मारली आणि आपल्या प्रचंड भुजबलाने ते त्यांचे मर्दन करू लागले. कुणाला लाथ तर कुणाला थप्पड मारीत होते. आणि म्हणत होते, 'तुम्ही श्रीरामांना भजत नाही, त्याचे हे फळ भोगा.'॥ ४॥

**दो०—एक एक सों मर्दहिं तोरि चलावहिं मुंड।**
**रावन आगें परहिं ते जनु फूटहिं दधि कुंड॥ ४४॥**

एकाला धरून त्याला दुसऱ्यावर पाडून चिरडत होते आणि त्यांची मुंडकी मोडून फेकत होते. ती मुंडकी रावणासमोर जाऊन पडत होती. आणि दह्याच्या मडक्याप्रमाणे फुटत होती. ॥ ४४ ॥

**महा महा मुखिआ जे पावहिं । ते पद गहि प्रभु पास चलावहिं ॥**
**कहइ बिभीषनु तिन्ह के नामा । देहिं राम तिन्हहू निज धामा ॥**

ते ज्या मोठमोठ्या सेनापतींना पकडत होते, त्यांचे पाय धरून त्यांना श्रीरामांच्याकडे फेकत होते. बिभीषण त्यांचे नाव सांगे व श्रीराम त्यांना आपल्या परमधामास पाठवीत होते. ॥ १ ॥

**खल मनुजाद द्विजामिष भोगी । पावहिं गति जो जाचत जोगी ॥**
**उमा राम मृदुचित करुनाकर । बयर भाव सुमिरत मोहि निसिचर ॥**

ब्राह्मणांचे मांस खाणाऱ्या त्या नरभक्षी दुष्ट राक्षसांनाही तीच गती मिळे, जिची याचना करूनही योग्यांना जी गती सहजपणे मिळत नसे. श्रीशिव म्हणतात, 'हे उमे, श्रीराम हे फार कोमलहृदय व करुणेची खाण आहेत. ते विचार करीत की, वैरभावाने का होईना, ते माझे स्मरण तर करतातच ना! ॥ २ ॥

**देहिं परम गति सो जियँ जानी । अस कृपाल को कहहु भवानी ॥**
**अस प्रभु सुनि न भजहिं भ्रम त्यागी । नर मतिमंद ते परम अभागी ॥**

मनात असा विचार करून ते त्यांना परमगती देत होते. हे भवानी, असा कृपाळू कोण आहे ते सांग. प्रभूंचा असा स्वभाव जाणूनही जी माणसे भ्रम सोडून त्यांचे भजन करीत नाहीत, ती अत्यंत मंदबुद्धीची व परम अभागी होत'. ॥ ३ ॥

**अंगद अरु हनुमंत प्रबेसा । कीन्ह दुर्ग अस कह अवधेसा ॥**
**लंकाँ द्वौ कपि सोहहिं कैसें । मथहिं सिंधु दुइ मंदर जैसें ॥**

श्रीराम म्हणाले, 'अंगद व हनुमान किल्ल्यात घुसले आहेत. दोन्ही वानर लंकेत विध्वंस करताना असे शोभत आहेत की, दोन मंदराचल समुद्राचे मंथन करीत आहेत.' ॥ ४ ॥

दो०—**भुज बल रिपु दल दलमलि देखि दिवस कर अंत ।**
**कूदे जुगल बिगत श्रम आए जहँ भगवंत ॥ ४५ ॥**

बाहुबळाने शत्रु-सेनेला तुडवून व तिंबून काढून दिवस सरत आल्याचे पाहून हनुमान व अंगद या दोघांनी उड्या मारल्या व कोणतेही श्रम न झाल्यासारखे ते भगवान श्रीरामांच्याजवळ आले. ॥ ४५ ॥

**प्रभु पद कमल सीस तिन्ह नाए । देखि सुभट रघुपति मन भाए ॥**
**राम कृपा करि जुगल निहारे । भए बिगतश्रम परम सुखारे ॥**

त्यांनी प्रभूंच्या चरणी मस्तक ठेवले. त्या उत्तम योद्ध्यांना पाहून श्रीरघुनाथ खूप प्रसन्न झाले. श्रीरामांनी कृपापूर्वक दोघांना पाहिले. त्यामुळे त्यांचा थकवा तर गेलाच; उलट ते सुखावले. ॥ १ ॥

**गए जानि अंगद हनुमाना। फिरे भालु मर्कट भट नाना॥**
**जातुधान प्रदोष बल पाई। धाए करि दससीस दोहाई॥**

अंगद आणि हनुमान गेल्याचे समजल्यावर अस्वले व वानर परत आले. राक्षसांनी रात्रीच्या वेळेच्या बळाचा फायदा उठवून रावणाचा जयजयकार करीत वानरांवर हल्ला केला. ॥ २ ॥

**निसिचर अनी देखि कपि फिरे। जहँ तहँ कटकटाइ भट भिरे॥**
**द्वौ दल प्रबल पचारि पचारी। लरत सुभट नहिं मानहिं हारी॥**

राक्षसांची सेना येत आहे, असे पाहून वानर परत फिरले आणि ते जिकडे तिकडे दात खाऊन शत्रूशी भिडले. दले अतिशय बलवान होती आणि ते समान बलाचे योद्धे होते. योद्धे आरडाओरडा करीत लढत होते, कोणी हार मानायला तयार नव्हता. ॥ ३ ॥

**महाबीर निसिचर सब कारे। नाना बरन बलीमुख भारे॥**
**सबल जुगल दल समबल जोधा। कौतुक करत लरत करि क्रोधा॥**

सर्व राक्षस महान वीर व काळेकुट्ट होते. आणि वानर विशालकाय आणि अनेक रंगांचे होते. दोन्ही पक्ष बलवान होते आणि समसमान बळाचे योद्धे होते. ते क्रोधाने लढून आपले शौर्य दाखवीत होते. ॥ ४ ॥

**प्राबिट सरद पयोद घनेरे। लरत मनहुँ मारुत के प्रेरे॥**
**अनिप अकंपन अरु अतिकाया। बिचलत सेन कीन्हि इन्ह माया॥**

राक्षस व वानर युद्ध करताना असे वाटत होते की, वर्षाऋतूचे आणि शरद्‌ऋतूचे मेघ वाऱ्याने प्रेरित होऊन लढत आहेत. अनिप, अकंपन व अतिकाय या राक्षस सेनापतींनी आपली सेना विचलित झाल्याचे पाहून माया केली. ॥ ५ ॥

**भयउ निमिष महँ अति अँधिआरा। बृष्टि होइ रुधिरोपल छारा॥**

एका क्षणात अंधार झाला आणि ते रक्त, दगड व राखेचा वर्षाव करू लागले. ॥ ६ ॥

दो०—**देखि निबिड़ तम दसहुँ दिसि कपिदल भयउ खभार।**
**एकहि एक न देखई जहँ तहँ करहिं पुकार॥ ४६॥**

दाही दिशांना अत्यंत दाट अंधार पाहून वानरांच्या सेनेमध्ये खळबळ माजली. कुणी कुणाला दिसत नव्हता आणि सर्वजण जिकडे तिकडे रक्षणासाठी ओरडू लागले. ॥ ४६ ॥

**सकल मरमु रघुनायक जाना। लिए बोलि अंगद हनुमाना॥**
**समाचार सब कहि समुझाए। सुनत कोपि कपिकुंजर धाए॥**

श्रीरघुनाथांनी हे रहस्य जाणले. त्यांनी अंगद व हनुमान यांना बोलावून सर्व गोष्टी सांगितल्या. ते ऐकताच दोघे कपिश्रेष्ठ रागाने धावले. ॥ १ ॥

**पुनि कृपाल हँसि चाप चढ़ावा । पावक सायक सपदि चलावा ॥**
**भयउ प्रकास कतहुँ तम नाहीं । ग्यान उदयँ जिमि संसय जाहीं ॥**

मग कृपाळू श्रीरामांनी हसत हसत धनुष्य सज्ज करून त्यावरून तत्काळ अग्निबाण सोडला. त्यामुळे प्रकाश झाला आणि अंधार उरला नाही. ज्याप्रमाणे ज्ञानाचा उदय झाल्यावर सर्व संदेह दूर होतात. ॥ २ ॥

**भालु बलीमुख पाइ प्रकासा । धाए हरष बिगत श्रम त्रासा ॥**
**हनूमान अंगद रन गाजे । हाँक सुनत रजनीचर भाजे ॥**

अस्वले आणि वानर प्रकाश दिसताच श्रम व भय विसरून व प्रसन्न होऊन धावून गेले. हनुमान व अंगद यांनी युद्धात गर्जना केली. त्यांची हाक ऐकताच राक्षस पळून गेले. ॥ ३ ॥

**भागत भट पटकहिं धरि धरनी । करहिं भालु कपि अद्भुत करनी ॥**
**गहि पद डारहिं सागर माहीं । मकर उरग झष धरि धरि खाहीं ॥**

पळत सुटलेल्या राक्षस योद्ध्यांना अस्वले व वानर पकडून पृथ्वीवर आपटण्याची अद्भुत कामगिरी करू लागले. त्यांचे पाय पकडून ते त्यांना समुद्रात टाकून देत होते. तेथे मगरी, साप व मासे त्यांना पकडून खाऊन टाकीत होते. ॥ ४ ॥

दो०—**कछु मारे कछु घायल कछु गढ़ चढ़े पराइ ।**
**गर्जहिं भालु बलीमुख रिपु दल बल बिचलाइ ॥ ४७ ॥**

काही मारले गेले, काही घायाळ झाले आणि काही पळून गडावर चढून गेले. आपल्या बळाने शत्रुदलाला भेदरून टाकून अस्वले व वानरवीर गर्जना करू लागले. ॥ ४७ ॥

**निसा जानि कपि चारिउ अनी । आए जहाँ कोसला धनी ॥**
**राम कृपा करि चितवा सबही । भए बिगतश्रम बानर तबही ॥**

रात्र झाल्याचे पाहून वानरांच्या चारी तुकड्या कोसलपती श्रीरामांच्याकडे आल्या. श्रीरामांनी त्यांच्यावर कृपा-दृष्टी टाकताच सर्व वानरांचे श्रम दूर झाले. ॥ १ ॥

**उहाँ दसानन सचिव हँकारे । सब सन कहेसि सुभट जे मारे ॥**
**आधा कटकु कपिन्ह संघारा । कहहु बेगि का करिअ बिचारा ॥**

तिकडे लंकेत रावणाने मंत्र्यांना बोलावले आणि जे योद्धे मारले गेले होते, त्यांची माहिती सर्वांना सांगितली. तो म्हणाला, 'वानरांनी अर्ध्या सेनेचा संहार केला आहे. आता लवकर सांगा, काय उपाय करावा?' ॥ २ ॥

**माल्यवंत अति जरठ निसाचर। रावन मातु पिता मंत्री बर॥**
**बोला बचन नीति अति पावन। सुनहु तात कछु मोर सिखावन॥**

माल्यवंत नावाचा एक अत्यंत वयोवृद्ध राक्षस होता. तो रावणाचा आजोबा आणि श्रेष्ठ मंत्री होता. तो अत्यंत पवित्र नीतीने बोलला, 'बाळा! माझेहि बोलणे ऐक.॥ ३॥

**जब ते तुम्ह सीता हरि आनी। असगुन होहिं न जाहिं बखानी॥**
**बेद पुरान जासु जसु गायो। राम बिमुख काहुँ न सुख पायो॥**

जेव्हापासून तू सीतेला हरण करून आणलेस, तेव्हापासून इतके अपशकुन होत आहेत की, त्यांचे वर्णन करणेही कठीण. वेद-पुराणांनी ज्यांची कीर्ती गायिली आहे, त्या श्रीरामांशी विन्मुख झाल्यावर कुणालाही सुख लाभलेले नाही.॥ ४॥

दो०—**हिरन्याच्छ भ्राता सहित मधु कैटभ बलवान।**
**जेहिं मारे सोइ अवतरेउ कृपासिंधु भगवान॥ ४८ (क)॥**

हिरण्यकशिपू व हिरण्याक्ष आणि बलवान मधु-कैटभ यांना ज्यांनी मारले, तेच कृपासागर भगवान श्रीरामांच्या रूपाने अवतरले आहेत.॥ ४८ (क)॥

## मासपारायण, पंचविसावा विश्राम

**कालरूप खल बन दहन गुनागार घनबोध।**
**सिव बिरंचि जेहि सेवहिं तासों कवन बिरोध॥ ४८ (ख)॥**

जे कालस्वरूप आहेत, दुष्टांचे समूहरूपी वन भस्म करणारे अग्नी आहेत, गुणांचे धाम व ज्ञाननिधान आहेत, आणि शिव व ब्रह्मदेव ज्यांची सेवा करतात. त्यांच्याशी वैर कसले?॥ ४८(ख)॥

**परिहरि बयरु देहु बैदेही। भजहु कृपानिधि परम सनेही॥**
**ताके बचन बान सम लागे। करिआ मुह करि जाहि अभागे॥**

म्हणून वैर सोडून त्यांना जानकी परत दे. आणि कृपानिधान व परम स्नेही श्रीरामांचे भजन कर. रावणाला त्याचे बोलणे बाणाप्रमाणे टोचले. तो म्हणाला, 'अरे अभाग्या, तोंड काळे करून येथून निघून जा.॥ १॥

**बूढ़ भएसि न त मरतेउँ तोही। अब जनि नयन देखावसि मोही॥**
**तेहिं अपने मन अस अनुमाना। बध्यो चहत एहि कृपानिधाना॥**

तू म्हातारा आहेस, नाहीतर मी तुला ठार मारले असते. आता तू आपले तोंड दाखवू नकोस.' रावणाचे बोलणे ऐकून माल्यवानाला अंदाज आला की, कृपानिधान श्रीराम आता याला मारू इच्छितात.॥ २॥

**सो उठि गयउ कहत दुर्बादा। तब सकोप बोलेउ घननादा॥**
**कौतुक प्रात देखिअहु मोरा। करिहउँ बहुत कहौं का थोरा॥**

माल्यवान रावणाला अद्वातद्वा बोलून उठून निघून गेला. तेव्हा मेघनाद रागाने म्हणाला, 'उद्या सकाळी माझी करामत पाहा. मी बरेच काही करीन. सांगावे तेवढे थोडेच होईल.'॥ ३॥

**सुनि सुत बचन भरोसा आवा। प्रीति समेत अंक बैठावा॥**
**करत बिचार भयउ भिनुसारा। लागे कपि पुनि चहूँ दुआरा॥**

पुत्राचे बोलणे ऐकून रावणाला भरवसा वाटला. त्याने मेघनादाला प्रेमाने जवळ बसविले. विचार करता-करता सकाळ झाली. वानर पुन्हा चारी दरवाजांवर जाऊन थडकले.॥ ४॥

**कोपि कपिन्ह दुर्घट गढ़ु घेरा। नगर कोलाहलु भयउ घनेरा॥**
**बिबिधायुध धर निसिचर धाए। गढ़ ते पर्बत सिखर ढहाए॥**

वानरांनी मोठ्या क्रोधाने दुर्गम किल्ल्याला घेरले. नगरामध्ये फार गोंधळ झाला. राक्षस बऱ्याच प्रकारची शस्त्रास्त्रे घेऊन धावले आणि त्यांनी किल्ल्यावरून पर्वतांची शिखरे टाकली. ॥ ५॥

छं०—**ढाहे महीधर सिखर कोटिन्ह बिबिध बिधि गोला चले।**
**घहरात जिमि पबिपात गर्जत जनु प्रलय के बादले॥**
**मर्कट बिकट भट जुटत कटत न लटत तन जर्जर भए।**
**गहि सैल तेहि गढ़ पर चलावहिं जहँ सो तहँ निसिचर हए॥**

त्यांनी पर्वतांची कोट्यवधी शिखरे खाली टाकली. अनेक प्रकारचे गोळे मारले जाऊ लागले. ते गोळे असा गडगडाट करीत होते की जणू वज्रपातच झाला. योद्धे भिडत होते, कापले जात होते आणि जणू प्रलयकालच्या मेघांप्रमाणे गर्जना करीत होते. प्रचंड वानर योद्धे भिडत होते आणि घायाळ होत होते. त्यांचे देह जर्जर होत होते. तरीही ते हिम्मत सोडत नव्हते व पर्वत उचलून किल्ल्यावर फेकत होते. राक्षस जिथल्या तिथे मारले जात होते.

दो०—**मेघनाद सुनि श्रवन अस गढ़ु पुनि छेंका आइ।**
**उतर्‍यो बीर दुर्ग तें सन्मुख चल्यो बजाइ॥ ४९॥**

वानरांनी किल्ल्याला पुन्हा वेढा घातला आहे, असे जेव्हा मेघनादाने ऐकले, तेव्हा तो वीर किल्ल्यावरून उतरला आणि डंका वाजवून वानरांसमोर निघाला.॥ ४९॥

**कहँ कोसलाधीस द्वौ भ्राता। धन्वी सकल लोक बिख्याता॥**
**कहँ नल नील दुबिद सुग्रीवा। अंगद हनूमंत बल सींवा॥**

त्याने ओरडून विचारले की,'सर्व लोकांमध्ये प्रसिद्ध असलेले धनुर्धर कोसलाधीश दोन्ही भाऊ कुठे आहेत ? नल, नील, द्विविद, सुग्रीव आणि बळाची परिसीमा असलेले अंगद व हनुमान कुठे आहेत ?॥ १॥

**कहाँ बिभीषनु भ्राताद्रोही। आजु सबहि हठि मारउँ ओही॥**
**अस कहि कठिन बान संधाने। अतिसय क्रोध श्रवन लगि ताने॥**

भावाशी द्रोह करणारा बिभीषण कुठे आहे? आज मी सर्वांना आणि त्या दुष्टाला अवश्य मारून टाकणार' असे म्हणून त्याने धनुष्यावर तीक्ष्ण बाण लावले आणि अत्यंत क्रोधाने धनुष्य कानांपर्यंत खेचले.॥ २॥

**सर समूह सो छाड़ै लागा। जनु सपच्छ धावहिं बहु नागा॥**
**जहँ तहँ परत देखिअहिं बानर। सन्मुख होइ न सके तेहि अवसर॥**

तो बाणांचे समूह सोडू लागला. जणू अनेक पंखवाले साप धावत होते. जिकडे तिकडे वानर धराशायी होऊ लागले. त्यावेळी त्याच्यासमोर कोणीही येऊ शकला नाही.॥ ३॥

**जहँ तहँ भागि चले कपि रीछा। बिसरी सबहि जुद्ध कै ईछा॥**
**सो कपि भालु न रन महँ देखा। कीन्हेसि जेहि न प्रान अवसेषा॥**

अस्वले व वानर जिकडे तिकडे पळू लागले. ते युद्ध करण्याची इच्छा विसरून गेले. रणभूमीवर असा एकही वानर किंवा अस्वल दिसत नव्हता की, ज्याचे केवळ प्राण वाचले आहेत.॥ ४॥

दो०—**दस दस सर सब मारेसि परे भूमि कपि बीर।**
**सिंहनाद करि गर्जा मेघनाद बल धीर॥ ५०॥**

नंतर त्याने सर्वांना दहा-दहा बाण मारले, वानरवीर जमिनीवर पडले. बलवान आणि धीर असा मेघनाद सिंहाप्रमाणे नाद करून गर्जू लागला.॥ ५०॥

**देखि पवनसुत कटक बिहाला। क्रोधवंत जनु धायउ काला॥**
**महासैल एक तुरत उपारा। अति रिस मेघनाद पर डारा॥**

सर्व सेना व्याकूळ झालेली पाहून पवनसुत हनुमान रागाने प्रत्यक्ष कालाप्रमाणे धावला. त्याने त्वरित एक मोठा पर्वत उपटून तो मोठ्या रागाने मेघनादावर सोडला.॥ १॥

**आवत देखि गयउ नभ सोई। रथ सारथी तुरग सब खोई॥**
**बार बार पचार हनुमाना। निकट न आव मरमु सो जाना॥**

पर्वत येत असल्याचे पाहून मेघनाद आकाशात उडून गेला. त्याचा रथ, सारथी आणि घोडे यांचा चुराडा झाला. हनुमान वारंवार आव्हान देत होता, परंतु मेघनाद जवळ येत नव्हता. कारण हनुमानाचे सामर्थ्य त्याला कळून चुकले होते.॥ २॥

**रघुपति निकट गयउ घननादा। नाना भाँति करेसि दुर्बादा॥**
**अस्त्र सस्त्र आयुध सब डारे। कौतुकहीं प्रभु काटि निवारे॥**

तेव्हा मेघनाद श्रीरघुनाथांच्या जवळ गेला आणि त्यांना अपशब्द बोलून त्याने त्यांच्यावर शस्त्रास्त्रे फेकली. प्रभूंनी सहजगत्या ती सर्व तोडून टाकली. ॥ ३ ॥

**देखि प्रताप मूढ़ खिसिआना। करै लाग माया बिधि नाना॥**
**जिमि कोउ करै गरुड़ सैं खेला। डरपावै गहि स्वल्प सपेला॥**

श्रीरामांचा तो प्रताप पाहून तो मूर्ख ओशाळला आणि अनेक प्रकारच्या माया करू लागला. जसे एखाद्याने लहानसे सापाचे पिल्लू हातात धरून गरुडाला घाबरविण्याचा खेळ करावा. ॥ ४ ॥

दो०—**जासु प्रबल माया बस सिव बिरंचि बड़ छोट।**
**ताहि दिखावइ निसिचर निज माया मति खोट॥ ५१॥**

शिव व ब्रह्मदेवांपर्यंत सर्व लहान मोठे ज्यांच्या अत्यंत बलवान मायेच्या अधीन असतात, त्यांना तो नीच बुद्धीचा निशाचर आपली माया दाखवत होता. ॥ ५१ ॥

**नभ चढ़ि बरष बिपुल अंगारा। महि ते प्रगट होहिं जलधारा॥**
**नाना भाँति पिसाच पिसाची। मारु काटु धुनि बोलहिं नाची॥**

आकाशात उंच उडून तो पुष्कळ निखारे टाकू लागला. पृथ्वीतून पाण्याचे प्रवाह फुटू लागले. अनेक प्रकारचे पिशाच व पिशाचिनी नाचत-नाचत 'मारा, कापून काढा' असा आवाज करू लागल्या. ॥ १ ॥

**बिष्टा पूय रुधिर कच हाड़ा। बरषइ कबहुँ उपल बहु छाड़ा॥**
**बरषि धूरि कीन्हेसि अँधिआरा। सूझ न आपन हाथ पसारा॥**

मेघनाद कधी विष्ठा, पू, रक्त, केस व हाडांचा वर्षाव करीत होता, तर कधी पुष्कळ दगड टाकत होता. नंतर त्याने धूळ पसरून असा अंधार केला की, स्वतःचा पसरलेला हातही दिसत नव्हता. ॥ २ ॥

**कपि अकुलाने माया देखें। सब कर मरन बना एहि लेखें॥**
**कौतुक देखि राम मुसुकाने। भए सभीत सकल कपि जाने॥**

माया पाहून वानर बेचैन झाले. ते विचार करू लागले की, असे होत राहिले, तर सर्वांचे मरणच ओढवले. हे कौतुक पाहून श्रीराम हसले. सर्व वानर भयभीत झाल्याचे त्यांनी पाहिले. ॥ ३ ॥

**एक बान काटी सब माया। जिमि दिनकर हर तिमिर निकाया॥**
**कृपादृष्टि कपि भालु बिलोके। भए प्रबल रन रहहिं न रोके॥**

तेव्हा श्रीरामांनी ज्याप्रमाणे सूर्य अंधाराच्या समूहास हरण करतो, त्याप्रमाणे सर्व माया एकाच

बाणात मोडून काढली. त्यानंतर त्यांनी आपली कृपादृष्टी वानर-अस्वलांच्यावर टाकली, त्यासरशी ते इतके प्रबल झाले की, युद्धात थांबविल्यावरही थांबत नव्हते. ॥ ४ ॥

**दो०—आयसु मागि राम पहिं अंगदादि कपि साथ।**
**लछिमन चले क्रुद्ध होइ बान सरासन हाथ॥ ५२॥**

श्रीरामांची आज्ञा घेऊन अंगद इत्यादी वानरांबरोबर हाती धनुष्यबाण घेऊन लक्ष्मण क्रुद्ध होऊन निघाला. ॥ ५२ ॥

**छतज नयन उर बाहु बिसाला। हिमगिरि निभ तनु कछु एक लाला॥**
**इहाँ दसानन सुभट पठाए। नाना अस्त्र सस्त्र गहि धाए॥**

त्याचे डोळे लाल झालेले होते, विशाल छाती आणि विशाल भुजा होत्या. हिमालय पर्वतासारख्या उज्ज्वल गौर वर्णावर काहीशी लाली होती. इकडे रावणानेही मोठमोठे योद्धे पाठविले. तेही अनेक शस्त्रास्त्रे घेऊन धावले. ॥ १ ॥

**भूधर नख बिटपायुध धारी। धाए कपि जय राम पुकारी॥**
**भिरे सकल जोरिहि सन जोरी। इत उत जय इच्छा नहिं थोरी॥**

वानर पर्वत, नखे व वृक्षरूपी हत्यारे घेऊन 'श्रीरामचंद्रकी जय' असा जयघोष करीत धावले. वानर व राक्षस परस्पर भिडले. इकडे व तिकडे दोन्ही पक्षात विजयाची प्रबळ इच्छा होती. ॥ २ ॥

**मुठिकन्ह लातन्ह दातन्ह काटहिं। कपि जयसील मारि पुनि डाटहिं॥**
**मारु मारु धरु धरु धरु मारू। सीस तोरि गहि भुजा उपारू॥**

वानर राक्षसांना लाथा-बुक्क्या मारीत होते व दातांनी चावत होते. विजयी वानर त्यांना मार देऊन मग धाक दाखवत होते. 'मारा, मारा, पकडा, पकडा आणि पकडून ठार मारा, डोके फोडा आणि भुजा धरून उपटून टाका.' ॥ ३ ॥

**असि रव पूरि रही नव खंडा। धावहिं जहँ तहँ रुंड प्रचंडा॥**
**देखहिं कौतुक नभ सुर बृंदा। कबहुँक बिसमय कबहुँ अनंदा॥**

नऊ खंडांमध्ये असाच आवाज भरला होता. प्रचंड शिरविहीन धडे जिकडे तिकडे पळत होती. आकाशातील देव हे कौतुक पाहात होते. त्यांना कधी खेद वाटत होता, तर कधी आनंद. ॥ ४ ॥

**दो०—रुधिर गाड़ भरि भरि जम्यो ऊपर धूरि उड़ाइ।**
**जनु अँगार रासिन्ह पर मृतक धूम रह्यो छाइ॥ ५३॥**

खड्ड्यांमध्ये रक्त भरून गोठू लागले आणि त्यांच्यावर धूळ उडून पडत होती. जणू निखाऱ्यांच्या ढिगांवर राख पसरली आहे, असे ते दृश्य दिसत होते. ॥ ५३ ॥

**घायल बीर बिराजहिं कैसे। कुसुमित किंसुक के तरु जैसे॥**
**लछिमन मेघनाद द्वौ जोधा। भिरहिं परसपर करि अति क्रोधा॥**

फुललेल्या पलाश वृक्षाप्रमाणे जखमी वीर शोभत होते. लक्ष्मण आणि मेघनाद हे दोन्ही योद्धे अत्यंत क्रोधाने लढत होते.॥ १॥

**एकहि एक सकइ नहिं जीती। निसिचर छल बल करइ अनीती॥**
**क्रोधवंत तब भयउ अनंता। भंजेउ रथ सारथी तुरंता॥**

कोणी कुणाला जिंकू शकत नव्हते. मेघनाद कपटाने व अधर्माने लढत होता. तेव्हा लक्ष्मण चिडला आणि त्याने त्वरित मेघनादाचा रथ मोडून टाकला आणि त्याच्या सारथ्याचे तुकडे तुकडे करून टाकले.॥ २॥

**नाना बिधि प्रहार कर सेषा। राच्छस भयउ प्रान अवसेषा॥**
**रावन सुत निज मन अनुमाना। संकठ भयउ हरिहि मम प्राना॥**

शेषावतार लक्ष्मण मेघनादावर अनेक प्रकारे प्रहार करू लागला. त्याचे फक्त प्राण उरले. रावणपुत्र मेघनादाला अंदाज आला की, आता प्राण-संकट ओढवले आहे, हा लक्ष्मण माझे प्राण घेईल.॥ ३॥

**बीरघातिनी छाड़िसि साँगी। तेजपुंज लछिमन उर लागी॥**
**मुरुछा भई सक्ति के लागें। तब चलि गयउ निकट भय त्यागें॥**

तेव्हा त्याने वीरघातिनी शक्ती सोडली. ती तेज:पूर्ण शक्ती लक्ष्मणाच्या छातीला लागली. शक्ती लागल्यामुळे त्याला मूर्च्छा आली. तेव्हा मेघनाद भय सोडून त्याच्याजवळ गेला.॥ ४॥

दो०—**मेघनाद सम कोटि सत जोधा रहे उठाइ।**
**जगदाधार सेष किमि उठै चले खिसिआइ॥ ५४॥**

मेघनादासारखे अगणित योद्धे त्याला उचलू लागले. परंतु जगाचा आधार असलेल्या शेष-लक्ष्मणाला ते कसे उचलणार? तेव्हा ते ओशाळून निघून गेले.'॥ ५४॥

**सुनु गिरिजा क्रोधानल जासू। जारइ भुवन चारिदस आसू॥**
**सक संग्राम जीति को ताही। सेवहिं सुर नर अग जग जाही॥**

शिव म्हणतात, 'हे गिरिजे, ज्या शेषनागाच्या क्रोधाचा अग्नी चौदा भुवनांना क्षणात जाळून टाकतो आणि देव, मनुष्य आणि सर्व चराचर जीव ज्याची सेवा करतात, त्याला संग्रामामध्ये कोण जिंकू शकणार?॥ १॥

**यह कौतूहल जानइ सोई। जा पर कृपा राम कै होई॥**
**संध्या भइ फिरि द्वौ बाहनी। लगे सँभारन निज निज अनी॥**

ज्याच्यावर श्रीरामांची कृपा असेल, त्यालाच ही लीला समजू शकते. संध्याकाळ झाल्यावर दोन्हीकडच्या सेना परतल्या. सेनापती आपापल्या सेना सांभाळू लागले. ॥ २ ॥

**ब्यापक ब्रह्म अजित भुवनेस्वर। लछिमन कहाँ बूझ करुनाकर॥**
**तब लगि लै आयउ हनुमाना। अनुज देखि प्रभु अति दुख माना॥**

व्यापक, ब्रह्म, अजेय, संपूर्ण ब्रह्मांडाचे ईश्वर आणि करुणेची खाण असणारे श्रीरामचंद्र म्हणाले, 'लक्ष्मण कुठे आहे?' तोपर्यंत हनुमान त्याला घेऊन आला. छोट्या भावाला या अवस्थेत पाहून प्रभूंना दु:ख झाले. ॥ ३ ॥

**जामवंत कह बैद सुषेना। लंकाँ रहइ को पठई लेना॥**
**धरि लघु रूप गयउ हनुमंता। आनेउ भवन समेत तुरंता॥**

जांबवान म्हणाला, 'लंकेत सुषेण नावाचा वैद्य राहातो. त्याला घेऊन येण्यासाठी कुणाला पाठवावे?' तेव्हा हनुमान छोटे रूप घेऊन सुषेणाला घरासह उचलून लगेच घेऊन आला. ॥ ४ ॥

दो०—**राम पदारबिंद सिर नायउ आइ सुषेन।**
**कहा नाम गिरि औषधी जाहु पवनसुत लेन॥ ५५॥**

सुषेणाने येऊन श्रीरामांच्या चरणारविंदांवर मस्तक ठेवले. त्याने पर्वत व औषध यांचे नाव सांगितले आणि म्हटले, 'हे पवनपुत्र, औषध आणण्यास जा.' ॥ ५५ ॥

**राम चरन सरसिज उर राखी। चला प्रभंजनसुत बल भाषी॥**
**उहाँ दूत एक मरमु जनावा। रावनु कालनेमि गृह आवा॥**

श्रीरामांचे चरणकमल हृदयात धरून पवनपुत्र हनुमान 'ठीक आहे. आत्ता घेऊन येतो.' असे सांगून निघाला. तिकडे एका गुप्तहेराने रावणाला हे गुपित सांगितले, तेव्हा रावण कालनेमीच्या घरी आला. ॥ १ ॥

**दसमुख कहा मरमु तेहिं सुना। पुनि पुनि कालनेमि सिरु धुना॥**
**देखत तुम्हहि नगरु जेहिं जारा। तासु पंथ को रोकन पारा॥**

रावणाने सर्व हकिगत सांगितली. कालनेमीने ती ऐकून वारंवार आपले डोके बडवून घेतले. तो म्हणाला, 'तुझ्या डोळ्यांसमोर ज्याने नगर जाळून टाकले, त्याचा मार्ग कोण रोखू शकेल? ॥ २ ॥

**भजि रघुपति करु हित आपना। छाँड़हु नाथ मृषा जल्पना॥**
**नील कंज तनु सुंदर स्यामा। हृदयँ राखु लोचनाभिरामा॥**

श्रीरघुनाथांचे भजन करून तू आपले कल्याण करून घे. हे नाथा, व्यर्थ बडबड सोडून दे. नेत्रांना आनंद देणाऱ्या नीलकमलासारख्या सुंदर श्याम शरीराच्या श्रीरामांना आपल्या हृदयात धारण कर. ॥ ३ ॥

**मैं तैं मोर मूढ़ता त्यागू। महा मोह निसि सूतत जागू॥**
**काल ब्याल कर भच्छक जोई। सपनेहुँ समर कि जीतिअ सोई॥**

मी-तू असा भेद-भाव व ममतारूपी मूढता सोडून दे. महामोहरूपी रात्रीत तू झोपला आहेस. जागा हो. जो कालरूपी सर्पाचा भक्षक आहे, त्याला कधी स्वप्नातही युद्धात जिंकता येईल काय?'॥ ४॥

दो०—**सुनि दसकंठ रिसान अति तेहिं मन कीन्ह बिचार।**
**राम दूत कर मरौं बरु यह खल रत मल भार॥ ५६॥**

त्याचे बोलणे ऐकून रावण फार संतापला. तेव्हा कालनेमीने विचार केला की, याच्या हातून मरण्यापेक्षा श्रीरामाच्या दूताकरवी मरणे श्रेयस्कर. हा दुष्ट तर पापांच्या समूहात रत आहे.॥ ५६॥

**अस कहि चला रचिसि मग माया। सर मंदिर बर बाग बनाया॥**
**मारुतसुत देखा सुभ आश्रम। मुनिहि बूझि जल पियौं जाइ श्रम॥**

तो मनात असा विचार करून निघाला आणि वाटेत त्याने माया केली. तलाव, मंदिर आणि सुंदर बागा बनविल्या. हनुमानाने सुंदर आश्रम पाहून विचार केला की, मुनीला विचारून पाणी प्यावे, म्हणजे थकवा जाईल.॥ १॥

**राच्छस कपट बेष तहँ सोहा। मायापति दूतहि चह मोहा॥**
**जाइ पवनसुत नायउ माथा। लाग सो कहै राम गुन गाथा॥**

कालनेमी राक्षस मुनीचा कपट वेष धारण करून विराजमान झालेला होता. तो मूर्ख आपल्या मायेने मायापतींच्या दूताला मोहित करू पाहात होता. मारुतीने त्याच्याजवळ जाऊन मस्तक नम्र केले. तो श्रीरामांच्या गुणांचे वर्णन करू लागला.॥ २॥

**होत महा रन रावन रामहिं। जितिहहिं राम न संसय या महिं॥**
**इहाँ भएँ मैं देखउँ भाई। ग्यान दृष्टि बल मोहि अधिकाई॥**

तो म्हणाला, 'रावण व राम यांच्यात मोठे युद्ध सुरू आहे. राम जिंकणार यात शंका नाही. हे बंधू, मी येथून ते सर्व पाहात आहे. माझ्याकडे ज्ञान-दृष्टीचे मोठे बळ आहे.'॥ ३॥

**मागा जल तेहिं दीन्ह कमंडल। कह कपि नहिं अघाउँ थोरें जल॥**
**सर मज्जन करि आतुर आवहु। दिच्छा देउँ ग्यान जेहिं पावहु॥**

हनुमानाने त्याला पाणी मागितले. तेव्हा त्याने कमंडलू दिला. हनुमान म्हणाला, 'एवढ्या थोड्या पाण्याने मी तृप्त होणार नाही.' तेव्हा तो म्हणाला, 'तलावात स्नान करून परत ये. मग तुला मी दीक्षा देतो. त्यामुळे तुला ज्ञान प्राप्त होईल.'॥ ४॥

**दो०—सर पैठत कपि पद गहा मकरीं तब अकुलान।**
**मारी सो धरि दिब्य तनु चली गगन चढ़ि जान॥५७॥**

तलावात उतरताच एका मगरीने पटकन त्याचवेळी हनुमानाचा पाय धरला. हनुमानाने तिला मारून टाकले. तेव्हा ती दिव्य देह धारण करून विमानात बसून आकाशातून निघाली.॥५७॥

**कपि तव दरस भइउँ निष्पापा। मिटा तात मुनिबर कर सापा॥**
**मुनि न होइ यह निसिचर घोरा। मानहु सत्य बचन कपि मोरा॥**

ती म्हणाली, 'हे वानरा, तुझ्या दर्शनामुळे मी पापरहित झाले. मला श्रेष्ठ मुनींनी दिलेला शाप नाहीसा झाला. हे कपी, हा मुनी नव्हे, घोर निशाचर आहे. माझे बोलणे खरे मान.'॥१॥

**अस कहि गई अपछरा जबहीं। निसिचर निकट गयउ कपि तबहीं॥**
**कह कपि मुनि गुरदछिना लेहू। पाछें हमहि मंत्र तुम्ह देहू॥**

असे म्हणून ती अप्सरा गेली, तोच हनुमान निशाचराजवळ आला. हनुमान म्हणाला, 'हे मुनी, प्रथम गुरुदक्षिणा घ्या. नंतर मला मंत्र द्या.'॥२॥

**सिर लंगूर लपेटि पछारा। निज तनु प्रगटेसि मरती बारा॥**
**राम राम कहि छाड़ेसि प्राना। सुनि मन हरषि चलेउ हनुमाना॥**

हनुमानाने आपले शेपूट त्याच्या डोक्याला गुंडाळले आणि त्याला आपटले. मरताना त्याने आपले राक्षसी शरीर प्रकट केले. त्याने राम-राम म्हणत प्राण सोडले. त्याच्या तोंडून राम-नामाचे उच्चारण ऐकून हनुमानाला मनातून आनंद झाला व तो पुढे निघाला.॥३॥

**देखा सैल न औषध चीन्हा। सहसा कपि उपारि गिरि लीन्हा॥**
**गहि गिरि निसि नभ धावत भयऊ। अवधपुरी ऊपर कपि गयऊ॥**

त्याने वैद्यांनी सांगितलेला पर्वत पाहिला, पण औषध ओळखता येईना. तेव्हा हनुमानाने एकदम पर्वतच उपटून घेतला. पर्वत घेऊन हनुमान रात्रीच आकाशमार्गाने वेगाने निघाला आणि अयोध्यापुरीवर पोहोचला.॥४॥

**दो०—देखा भरत बिसाल अति निसिचर मन अनुमानि।**
**बिनु फर सायक मारेउ चाप श्रवन लगि तानि॥५८॥**

भरताने आकाशात अत्यंत विशालरूप पाहिले, तेव्हा त्याला वाटले की, हा एखादा राक्षस आहे. त्याने बिनफाळाचा एक बाण धनुष्य कानापर्यंत खेचून मारला.॥५८॥

**परेउ मुरुछि महि लागत सायक। सुमिरत राम राम रघुनायक॥**
**सुनि प्रिय बचन भरत तब धाए। कपि समीप अति आतुर आए॥**

बाण लागताच हनुमान 'राम-राम, रघुपती' म्हणत मूर्च्छित होऊन खाली पडला. प्रिय 'राम-नाम' ऐकताच भरत उठून धावला आणि उतावळा होऊन हनुमानाजवळ गेला. ॥ १ ॥

**बिकल बिलोकि कीस उर लावा। जागत नहिं बहु भाँति जगावा॥**
**मुख मलीन मन भए दुखारी। कहत बचन भरि लोचन बारी॥**

हनुमान व्याकूळ झाल्याचे पाहून त्याने त्याला हृदयाशी धरले. त्याला जागे करण्याचा प्रयत्न केला, परंतु तो शुद्धीवर येत नव्हता. तेव्हा भरताचे मुख उदास झाले. तो मनातून फार दुःखी झाला. डोळ्यांत पाणी आणून तो म्हणाला की, ॥ २ ॥

**जेहिं बिधि राम बिमुख मोहि कीन्हा। तेहिं पुनि यह दारुन दुख दीन्हा॥**
**जौं मोरें मन बच अरु काया। प्रीति राम पद कमल अमाया॥**

'ज्या विधात्याने मला श्रीरामांपासून दूर केले, त्यानेच पुन्हा हे दुःखही दिले, जर माझे कायावाचामनाने श्रीरामांच्या चरणकमलांवर निष्कपट प्रेम असेल, ॥ ३ ॥

**तौ कपि होउ बिगत श्रम सूला। जौं मो पर रघुपति अनुकूला॥**
**सुनत बचन उठि बैठ कपीसा। कहि जय जयति कोसलाधीसा॥**

आणि जर श्रीरघुनाथ माझ्यावर प्रसन्न असतील, तर या वानराचा अशक्तपणा व वेदना दूर होवो.' हे वाक्य ऐकताच कपिराज हनुमान 'कोसलपती श्रीरामचंद्रांचा विजय असो, विजय असो,' असे म्हणत उठून बसला. ॥ ४ ॥

**सो०—लीन्ह कपिहि उर लाइ पुलकित तनु लोचन सजल।**
**प्रीति न हृदयँ समाइ सुमिरि राम रघुकुल तिलक॥ ५९॥**

भरताने हनुमानाला हृदयाशी धरले. त्याचे शरीर पुलकित झाले आणि नेत्रांमध्ये आनंद व प्रेमाचे अश्रू दाटले. रघुकुलतिलक श्रीरामचंद्राचे स्मरण करताना भरताच्या हृदयात प्रेम मावत नव्हते. ॥ ५९ ॥

**तात कुसल कहु सुखनिधान की। सहित अनुज अरु मातु जानकी॥**
**कपि सब चरित समास बखाने। भए दुखी मन महुँ पछिताने॥**

भरत म्हणाला, 'हे तात, छोटा भाऊ लक्ष्मण आणि माता जानकीसह सुखनिधान श्रीरामांची खुशाली सांग.' हनुमानाने सर्व वृत्तांत थोडक्यात सांगितला. तो ऐकून भरताला दुःख झाले. व तो पश्चात्ताप करू लागला. ॥ १ ॥

**अहह दैव मैं कत जग जायउँ। प्रभु के एकहु काज न आयउँ॥**
**जानि कुअवसरु मन धरि धीरा। पुनि कपि सन बोले बलबीरा॥**

'हाय दैवा! मी जगात का जन्माला आलो? एकाही कामात मी प्रभूंना उपयोगी पडू शकलो नाही.' नंतर ही वेळ शोकाची नाही, हे जाणून व मनात धीर धरून पराक्रमी भरत हनुमानाला म्हणाला, ॥ २ ॥

**तात गहरु होइहि तोहि जाता। काजु नसाइहि होत प्रभाता॥**
**चढ़ु मम सायक सैल समेता। पठवौं तोहि जहँ कृपानिकेता॥**

'हे तात, तुला जायला उशीर होतोय आणि सकाळ होताच सर्वनाश होईल, म्हणून पर्वतासह तू माझ्या बाणावर चढ, मी तुला कृपाधाम श्रीरामांजवळ पाठवितो.'॥ ३ ॥

**सुनि कपि मन उपजा अभिमाना। मोरें भार चलिहि किमि बाना॥**
**राम प्रभाव बिचारि बहोरी। बंदि चरन कह कपि कर जोरी॥**

भरताचे म्हणणे ऐकून हनुमानाच्या मनात अभिमान उत्पन्न झाला की, माझ्या ओझ्याने बाण कसा जाईल? परंतु श्रीरामचंद्रांच्या प्रभावाचा विचार करून तो भरताच्या चरणकमलांना वंदन करीत हात जोडून म्हणाला, ॥ ४ ॥

**दो०—तव प्रताप उर राखि प्रभु जैहउँ नाथ तुरंत।**
**अस कहि आयसु पाइ पद बंदि चलेउ हनुमंत॥ ६० (क)॥**

'हे नाथ, हे प्रभू, मी तुझा प्रताप मनात धरून त्वरित जाईन' असे म्हणून व आज्ञा घेऊन, तसेच भरताच्या चरणांना वंदन करून हनुमान निघाला. ॥ ६० (क) ॥

**भरत बाहुबल सील गुन प्रभु पद प्रीति अपार।**
**मन महुँ जात सराहत पुनि पुनि पवनकुमार॥ ६० (ख)॥**

भरताचे बाहुबल, स्वभाव, गुण आणि प्रभु-चरणांवरील अपार प्रेम यांची मनामध्ये वारंवार प्रशंसा करीत मारुती जात होता. ॥ ६० (ख) ॥

**उहाँ राम लछिमनहि निहारी। बोले बचन मनुज अनुसारी॥**
**अर्ध राति गइ कपि नहिं आयउ। राम उठाइ अनुज उर लायउ॥**

तिकडे लंकेमध्ये लक्ष्मणाला पाहात श्रीराम सामान्य माणसाप्रमाणे बोलू लागले-'अर्धी रात्र होऊन गेली, हनुमान अद्याप आला नाही.' असे म्हणून श्रीरामांनी लक्ष्मणाला उचलून हृदयाशी धरले. ॥ १ ॥

**सकहु न दुखित देखि मोहि काऊ। बंधु सदा तव मृदुल सुभाऊ॥**
**मम हित लागि तजेहु पितु माता। सहेहु बिपिन हिम आतप बाता॥**

आणि म्हणाले की, 'हे बंधू, तू मला कधीही दु:खी पाहू शकत नव्हतास. तुझा स्वभाव नेहमीच कोमल होता. माझ्या हितासाठी तू माता-पित्याला सोडलेस आणि वनामध्ये थंडी, ऊन, वारा हे सर्व सहन केलेस. ॥ २ ॥

**सो अनुराग कहाँ अब भाई। उठहु न सुनि मम बच बिकलाई॥**
**जौं जनतेउँ बन बंधु बिछोहू। पिता बचन मनतेउँ नहिं ओहू॥**

हे बंधू, आता ते तुझे प्रेम कुठे गेले? माझे व्याकूळ बोलणे ऐकून उठत का नाहीस? जर मला ठाऊक असते की, वनात भावाचा वियोग होणार आहे, तर परम कर्तव्य असलेले पित्याचे वचनही मी मान्य केले नसते.॥ ३॥

**सुत बित नारि भवन परिवारा। होहिं जाहिं जग बारहिं बारा॥**
**अस बिचारि जियँ जागहु ताता। मिलइ न जगत सहोदर भ्राता॥**

पुत्र, धन, स्त्री, घर आणि परिवार हे जगामध्ये वारंवार मिळतात आणि जातात. परंतु जगात सख्खा भाऊ वारंवार मिळत नाही. मनात असा विचार करून हे बंधू, जागा हो.॥ ४॥

**जथा पंख बिनु खग अति दीना। मनि बिनु फनि करिबर कर हीना॥**
**अस मम जिवन बंधु बिनु तोही। जौं जड़ दैव जिआवै मोही॥**

ज्याप्रमाणे पंखाविना पक्षी, मण्याविना सर्प आणि सोंडेविना श्रेष्ठ हत्ती हे अत्यंत दीन होऊन जातात, हे बंधू, जर दुर्दैवाने मला जिवंत ठेवले, तर तुझ्याविना माझे जीवनही असेच होईल.॥ ५॥

**जैहउँ अवध कवन मुहु लाई। नारि हेतु प्रिय भाइ गँवाई॥**
**बरु अपजस सहतेउँ जग माहीं। नारि हानि बिसेष छति नाहीं॥**

पत्नीसाठी प्रिय भावाला गमावल्यावर मी कोणते तोंड घेऊन अयोध्येला जाऊ? मी जगामध्ये हवी तर बदनामी सहन केली असती की, रामामध्ये शौर्य नाही, की ज्याने पत्नी गमावली. तुझ्यापुढे पत्नीला गमावणे, हे काही विशेष नाही.॥ ६॥

**अब अपलोकु सोकु सुत तोरा। सहिहि निठुर कठोर उर मोरा॥**
**निज जननी के एक कुमारा। तात तासु तुम्ह प्रान अधारा॥**

आता हे वत्सा, माझे निष्ठुर आणि कठोर हृदय हा अपवाद आणि तुझा शोक, हे दोन्हीही सहन करीत राहील. हे वत्सा, तू आपल्या आईला माझ्यासाठी सर्वस्व सोडणारा एकमात्र पुत्र आहेस आणि तिचा प्राणाधार आहेस.॥ ७॥

**सौंपेसि मोहि तुम्हहि गहि पानी। सब बिधि सुखद परम हित जानी॥**
**उतरु काह दैहउँ तेहि जाई। उठि किन मोहि सिखावहु भाई॥**

सर्व प्रकारे सुख देणारा आणि परम हितकारी म्हणून सुमित्रा मातेने तुझा हात धरून मला सोपविले होते. आता मी जाऊन तिला काय उत्तर देऊ? हे बंधू, तू उठून मला का समजावत नाहीस?' ॥ ८॥

**बहु बिधि सोचत सोच बिमोचन। स्त्रवत सलिल राजिव दल लोचन॥**
**उमा एक अखंड रघुराई। नर गति भगत कृपाल देखाई॥**

चिंता-मुक्त करणारे श्रीराम अनेक प्रकारे स्वतःच चिंता करीत होते. कमळाच्या पाकळी प्रमाणे असलेल्या नेत्रांतून विषादाचे अश्रु-जल वाहात होते. शिव म्हणतात, 'हे उमे, श्रीरघुनाथ अद्वितीय व अखंड आहेत. भक्तांवर कृपा करणारे भगवान हे लीला करून मनुष्यासारखे वागत होते.'॥ ९ ॥

**सो०—प्रभु प्रलाप सुनि कान बिकल भए बानर निकर।**
**आइ गयउ हनुमान जिमि करुना महँ बीर रस॥ ६१ ॥**

प्रभूंनी लीला म्हणून केलेला विलाप ऐकून वानरांचे समूह व्याकूळ झाले. इतक्यात हनुमान आला. जणू करुण रसाच्या प्रसंगामध्ये वीररसाचा प्रसंग आला. ॥ ६१ ॥

**हरषि राम भेटेउ हनुमाना। अति कृतग्य प्रभु परम सुजाना॥**
**तुरत बैद तब कीन्हि उपाई। उठि बैठे लछिमन हरषाई॥**

श्रीरामांनी आनंदित होऊन हनुमानाला हृदयाशी धरले. प्रभू परम चतुर आणि अत्यंत कृतज्ञ आहेत. मग वैद्य सुषेणाने त्वरित उपाय केले. त्यामुळे लक्ष्मण प्रसन्न होऊन उठून बसला. ॥ १ ॥

**हृदयँ लाइ प्रभु भेंटेउ भ्राता। हरषे सकल भालु कपि ब्राता॥**
**कपि पुनि बैद तहाँ पहुँचावा। जेहि बिधि तबहिं ताहि लइ आवा॥**

प्रभूंनी लक्ष्मणाला हृदयाशी धरले. अस्वले व वानर यांचे समूह सर्वजण आनंदित झाले. नंतर हनुमानाने वैद्यांना पूर्वीप्रमाणेच घरी पोहोचविले. ॥ २ ॥

**यह बृत्तांत दसानन सुनेऊ। अति बिषाद पुनि पुनि सिर धुनेऊ॥**
**ब्याकुल कुंभकरन पहिं आवा। बिबिध जतन करि ताहि जगावा॥**

ही वार्ता जेव्हा रावणाने ऐकली, तेव्हा त्याने अत्यंत विषादाने वारंवार डोके बडवून घेतले. तो व्याकूळ होऊन कुंभकर्णाकडे गेला आणि अनेक उपाय करून त्याने त्याला जागे केले. ॥ ३ ॥

**जागा निसिचर देखिअ कैसा। मानहुँ कालु देह धरि बैसा॥**
**कुंभकरन बूझा कहु भाई। काहे तव मुख रहे सुखाई॥**

कुंभकर्ण जागा होऊन उठून बसला. जणू प्रत्यक्ष कालच शरीर धारण करून बसल्यासारखा तो दिसत होता. कुंभकर्णाने विचारले, 'हे बंधू, तुझे तोंड सुकून का गेले आहे, ते सांग बरे?'॥ ४ ॥

**कथा कही सब तेहिं अभिमानी। जेहि प्रकार सीता हरि आनी॥**
**तात कपिन्ह सब निसिचर मारे। महा महा जोधा संघारे॥**

त्या अहंकारी रावणाने सीतेला हरण करून आणले होते, तेव्हापासूनची सर्व कथा सांगितली. आणि म्हटले, 'हे बंधू ! वानरांनी सर्व राक्षसांना मारून टाकले. मोठमोठ्या योद्ध्यांचाही संहार केला आहे. ॥ ५ ॥

**दुर्मुख सुररिपु मनुज अहारी। भट अतिकाय अकंपन भारी॥**
**अपर महोदर आदिक बीरा। परे समर महि सब रनधीरा॥**

दुर्मुख, देवशत्रू, मनुष्यभक्षक, मोठे योद्धे, अतिकाय आणि अकंपन तसेच महोदर आणि इतर रणधीर वीर रणभूमीत मारले गेले आहेत.'॥ ६॥

दो०—**सुनि दसकंधर बचन तब कुंभकरन बिलखान।**
**जगदंबा हरि आनि अब सठ चाहत कल्यान॥ ६२॥**

तेव्हा रावणाचे वचन ऐकून कुंभकर्ण दु:खी होऊन म्हणाला, 'अरे मूर्खा, जगज्जननी जानकीला हरण करून आणलेस आणि वरून तू कल्याणाची इच्छा करतोस?॥ ६२॥

**भल न कीन्ह तैं निसिचर नाहा। अब मोहि आइ जगाएहि काहा॥**
**अजहूँ तात त्यागि अभिमाना। भजहु राम होइहि कल्याना॥**

हे राक्षसराजा, हे तू चांगले केले नाहीस. आणि आता तू येऊन मला जागे का केलेस? अरे बाबा! अजुनी तू अभिमान सोडून देऊन श्रीरामांना भज, तर कल्याण होईल.॥ १॥

**हैं दससीस मनुज रघुनायक। जाके हनूमान से पायक॥**
**अहह बंधु तैं कीन्हि खोटाई। प्रथमहिं मोहि न सुनाएहि आई॥**

हे रावणा, हनुमानासारखे ज्यांचे सेवक आहेत, ते श्रीरघुनाथ काय मनुष्य आहेत? अरेरे बंधू! तू वाईट केलेस. पूर्वीच येऊन तू मला सर्व परिस्थिती सांगितली नाहीस.॥ २॥

**कीन्हेहु प्रभु बिरोध तेहि देवक। सिव बिरंचि सुर जाके सेवक॥**
**नारद मुनि मोहि ग्यान जो कहा। कहतेउँ तोहि समय निरबहा॥**

हे राजा, शिव, ब्रह्मदेव इत्यादी देव ज्यांचे सेवक आहेत, त्या परम देव असलेल्या श्रीरामांशी तू विरोध केलास. नारद मुनींनी मला जे ज्ञान दिले होते, ते मी तुला सांगितले असते, परंतु आता वेळ निघून गेली.॥ ३॥

**अब भरि अंक भेंटु मोहि भाई। लोचन सुफल करौं मैं जाई॥**
**स्याम गात सरसीरुह लोचन। देखौं जाइ ताप त्रय मोचन॥**

हे बंधू, आता मला मिठी मारून शेवटचे भेटून घे. मी जाऊन आपल्या नेत्रांचे पारणे फेडतो आणि त्रितापापासून मुक्त करणाऱ्या श्यामशरीर, कमलनेत्र श्रीरामांचे दर्शन घेतो.'॥ ४॥

दो०—**राम रूप गुन सुमिरत मगन भयउ छन एक।**
**रावन मागेउ कोटि घट मद अरु महिष अनेक॥ ६३॥**

श्रीरामचंद्रांच्या रूप व गुणांचे स्मरण करून तो एक क्षण प्रेमात मग्न झाला. नंतर रावणाने कोट्यवधी घडे भरून मदिरा व अनेक रेडे मागविले.॥ ६३॥

**महिष खाइ करि मदिरा पाना। गर्जा बज्राघात समाना॥**
**कुंभकरन दुर्मद रन रंगा। चला दुर्ग तजि सेन न संगा॥**

रेडे खाऊन व मदिरा ढोसून कुंभकर्णाने वज्राघातासारखी गर्जना केली. मदाने मत्त होऊन उत्साहाने कुंभकर्ण किल्ला सोडून निघाला. त्याने सोबत सेनाही घेतली नाही.॥ १॥

**देखि बिभीषनु आगें आयउ। परेउ चरन निज नाम सुनायउ॥**
**अनुज उठाइ हृदयँ तेहि लायो। रघुपति भक्त जानि मन भायो॥**

त्याला पाहून बिभीषण पुढे आला आणि त्याने त्याच्या चरणांवर लोटांगण घालून स्वतःचे नाव सांगितले. कुंभकर्णाने लहान भावाला उठवून हृदयाशी धरले आणि तो श्रीरघुनाथांचा भक्त आहे, असे पाहून तो कुंभकर्णाला आवडला.॥ २॥

**तात लात रावन मोहि मारा। कहत परम हित मंत्र बिचारा॥**
**तेहिं गलानि रघुपति पहिं आयउँ। देखि दीन प्रभु के मन भायउँ॥**

बिभीषण म्हणाला, 'हे बंधो, परम हितकारी सल्ला व विचार सांगितल्यावर रावणाने मला लाथ मारली, त्या दुःखामुळे मी रघुनाथांच्या जवळ निघून आलो. दीन असलेला पाहून प्रभूंना मी आवडलो.'॥ ३॥

**सुनु सुत भयउ कालबस रावन। सो कि मान अब परम सिखावन॥**
**धन्य धन्य तैं धन्य बिभीषन। भयहु तात निसिचर कुल भूषन॥**

कुंभकर्ण म्हणाला, 'हे वत्सा, ऐक. रावण तर काळाच्या जबड्यात आहे. आता तो चांगली शिकवण कसली मानणार? हे बिभीषणा, तू धन्य आहेस, धन्य आहेस, धन्य आहेस, बाबा रे! तू राक्षसकुलाचे भूषण ठरलास.॥ ४॥

**बंधु बंस तैं कीन्ह उजागर। भजेहु राम सोभा सुख सागर॥**

हे बंधू, तू आपल्या कुलास देदीप्यमान केले आहेस. कारण शोभा आणि सुखाचे समुद्र असलेल्या श्रीरामांना तू भजलेस.॥ ५॥

दो०—**बचन कर्म मन कपट तजि भजेहु राम रनधीर।**
**जाहु न निज पर सूझ मोहि भयउँ कालबस बीर॥ ६४॥**

निष्कपटपणे कायावाचामनाने रणधीर श्रीरामांचे भजन कर. हे बंधू, माझा मृत्यू जवळ आला आहे, त्यामुळे मला आपला-परका हे सुचत नाही. म्हणून आता तू जा.'॥ ६४॥

**बंधु बचन सुनि चला बिभीषन। आयउ जहँ त्रैलोक बिभूषन॥**
**नाथ भूधराकार सरीरा। कुंभकरन आवत रनधीरा॥**

भावाचे बोलणे ऐकून बिभीषण परत गेला. आणि त्रैलोक्यभूषण श्रीरामांकडे जाऊन म्हणाला, 'हे नाथ, पर्वतासारख्या विशाल देहाचा रणधीर कुंभकर्ण येत आहे.'॥ १ ॥

**एतना कपिन्ह सुना जब काना। किलकिलाइ धाए बलवाना॥**
**लिए उठाइ बिटप अरु भूधर। कटकटाइ डारहिं ता ऊपर॥**

हे वानरांनी जेव्हा ऐकले, तेव्हा बलवान असे ते वानर किलकिलाट करीत धावले. त्यांनी वृक्ष व पर्वत उपटून घेतले आणि क्रोधाने दात वाजवीत ते कुंभकर्णावर टाकू लागले.॥ २ ॥

**कोटि कोटि गिरि सिखर प्रहारा। करहिं भालु कपि एक एक बारा॥**
**मुर्‍यो न मनु तनु टर्‍यो न टार्‍यो। जिमि गज अर्क फलनि को मार्‍यो॥**

अस्वले व वानर एकाच वेळी कोट्यवधी पर्वत-शिखरांनी त्याच्यावर प्रहार करीत होते, परंतु तो जराही विचलित झाला नाही की त्याचे शरीर हालले नाही. ज्याप्रमाणे रुईच्या झाडांची फळे मारल्याने हत्तीवर काही परिणाम होत नाही.॥ ३ ॥

**तब मारुतसुत मुठिका हन्यो। पर्‍यो धरनि ब्याकुल सिर धुन्यो॥**
**पुनि उठि तेहिं मारेउ हनुमंता। घुर्मित भूतल परेउ तुरंता॥**

मग हनुमानाने त्याला एक ठोसा मारला, त्यामुळे तो व्याकूळ होऊन जमिनीवर पडला आणि डोके बडवू लागला. नंतर पुन्हा उठून त्याने हनुमानाला मारले. त्यामुळे त्याला चक्कर आली आणि तो जमिनीवर पडला.॥ ४ ॥

**पुनि नल नीलहि अवनि पछारेसि। जहँ तहँ पटकि पटकि भट डारेसि॥**
**चली बलीमुख सेन पराई। अति भय त्रसित न कोउ समुहाई॥**

नंतर कुंभकर्णाने नल, नील यांना पृथ्वीवर आदळले आणि दुसर्‍या योद्ध्यांनाही आपटून टाकून दिले. वानरसेना पळाली. सर्व अत्यंत घाबरले होते आणि कुंभकर्णासमोर येण्यास कोणी धजावत नव्हते.॥ ५ ॥

दो०—**अंगदादि कपि मुरुछित करि समेत सुग्रीव।**
**काँख दाबि कपिराज कहुँ चला अमित बल सींव॥ ६५॥**

सुग्रीवासह अंगदादी वानरांना मूर्च्छित करून तो अपार बलाची परिसीमा असलेला कुंभकर्ण वानरराज सुग्रीवाला काखेत धरून निघाला.॥ ६५ ॥

**उमा करत रघुपति नरलीला। खेलत गरुड़ जिमि अहिगन मीला॥**
**भृकुटि भंग जो कालहि खाई। ताहि कि सोहइ ऐसि लराई॥**

शिव म्हणतात, 'हे उमे, सापांच्या झुंडीमध्ये गरुड जसा खेळत असतो, त्याप्रमाणे श्रीरघुनाथ नरलीला करीत होते. जे भुवईच्या इशाऱ्यावर कालालाही खाऊन टाकतात, त्यांना अशी लढाई शोभून दिसते का?॥ १ ॥

**जग पावनि कीरति बिस्तरिहहिं । गाइ गाइ भवनिधि नर तरिहहिं ॥**
**मुरुछा गइ मारुतसुत जागा । सुग्रीवहि तब खोजन लागा ॥**

भगवान याद्वारे जगाला पवित्र करणारी अशी कीर्ती पसरवतील की, ती गाऊन मनुष्य भवसागर तरून जातील. मूर्च्छा गेली, तेव्हा मारुती शुद्धीवर आला व तो सुग्रीवाला शोधू लागला. ॥ २ ॥

**सुग्रीवहु कै मुरुछा बीती । निबुकि गयउ तेहि मृतक प्रतीती ॥**
**काटेसि दसन नासिका काना । गरजि अकास चलेउ तेहिं जाना ॥**

सुग्रीवाची मूर्च्छा जेव्हा गेली, तेव्हा तो शवाप्रमाणे घसरून कुंभकर्णाच्या काखेतून खाली पडला. कुंभकर्णाला वाटले, तो मेला. परंतु त्याने कुंभकर्णाचे कान-नाक दातांनी तोडून टाकले आणि गर्जना करीत तो आकाशात उडाला. त्यावेळी कुंभकर्णाला त्याची जाणीव झाली. ॥ ३ ॥

**गहेउ चरन गहि भूमि पछारा । अति लाघवँ उठि पुनि तेहि मारा ॥**
**पुनि आयउ प्रभु पहिं बलवाना । जयति जयति जय कृपानिधाना ॥**

त्याने सुग्रीवाचा पाय धरून त्याला जमिनीवर आपटले. मग सुग्रीवाने चपळाईने उठून त्याला मारले. आणि तो बलवान सुग्रीव प्रभूंच्याजवळ येऊन म्हणाला, 'कृपानिधान प्रभूंचा त्रिवार विजय असो.' ॥ ४ ॥

**नाक कान काटे जियँ जानी । फिरा क्रोध करि भइ मन ग्लानी ॥**
**सहज भीम पुनि बिनु श्रुति नासा । देखत कपि दल उपजी त्रासा ॥**

कान-नाक कापले गेल्याचे जाणवल्यावर कुंभकर्णाला दुःख झाले. तो क्रोधाने परत फिरला. एक तर तो आकाराने भयंकर होता. आणि कान-नाक नसल्याने आणखीच भयंकर दिसू लागला. त्याला पाहताच वानरांची सेना घाबरून गेली. ॥ ५ ॥

**दो०—जय जय जय रघुबंस मनि धाए कपि दै हूह ।**
**एकहि बार तासु पर छाड़ेन्हि गिरि तरु जूह ॥ ६६ ॥**

'रघुवंशमणींचा विजय असो, विजय असो' असे पुकारत वानर 'हुप्प हुप्प' असे ओरडत धावले आणि सर्वांनी एकदम त्याच्यावर पर्वत व वृक्षांचे समूह टाकले. ॥ ६६ ॥

**कुंभकरन रन रंग बिरुद्धा । सन्मुख चला काल जनु क्रुद्धा ॥**
**कोटि कोटि कपि धरि धरि खाई । जनु टीड़ी गिरि गुहाँ समाई ॥**

युद्धाच्या उन्मादामध्ये कुंभकर्ण शत्रुसेनेसमोर असा चालू लागला की, रागावलेला कालच चालत येत आहे. तो कोटिकोटी वानरांना एकदम पकडून खाऊ लागला. पर्वताच्या गुहेत टोळांच्या धाडी जशा घुसतात, तसे कुंभकर्णाच्या तोंडात ते सामावू लागले. ॥ १ ॥

**कोटिन्ह गहि सरीर सन मर्दा। कोटिन्ह मीजि मिलव महि गर्दा॥**
**मुख नासा श्रवनन्हि कीं बाटा। निसरि पराहिं भालु कपि ठाटा॥**

त्याने कोट्यवधी वानरांना पकडून चुरगळून टाकले. कोट्यवधी वानरांना हातांनी कुसकरून धुळीला मिळविले. त्याच्या पोटात गेलेली अस्वले व वानर यांचे थवेच्या थवे तोंड, नाक व कान यांच्या वाटे बाहेर पडून पळू लागले.॥ २॥

**रन मद मत्त निसाचर दर्पा। बिस्व ग्रसिहि जनु एहि बिधि अर्पा॥**
**मुरे सुभट सब फिरहिं न फेरे। सूझ न नयन सुनहिं नहिं टेरे॥**

युद्धाच्या उन्मत्त दशेमध्ये राक्षस कुंभकर्ण असा गर्विष्ठ झाला की, विधात्याने त्याला जण संपूर्ण विश्व अर्पण केले आहे आणि तो त्याला खाऊन टाकेल. सर्व योद्धे पळून गेले. ते परतायचे म्हटले, तरी परत फिरत नव्हते. त्यांच्या डोळ्यांना काही दिसत नव्हते आणि हाक मारली तरी त्यांना ऐकू येत नव्हते.॥ ३॥

**कुंभकरन कपि फौज बिडारी। सुनि धाई रजनीचर धारी॥**
**देखी राम बिकल कटकाई। रिपु अनीक नाना बिधि आई॥**

कुंभकर्णाने वानर-सेनेची पांगापांग केली, हे समजताच राक्षस-सेनाही धावून आली. श्रीरामचंद्रांनी पाहिले की, आपली सेना व्याकूळ झाली आहे आणि शत्रूच्या नाना प्रकारच्या सेना आल्या आहेत. ॥ ४॥

दो०—**सुनु सुग्रीव बिभीषन अनुज सँभारेहु सैन।**
**मैं देखउँ खल बल दलहि बोले राजिवनैन॥ ६७॥**

तेव्हा कमलनयन श्रीराम म्हणाले, 'सुग्रीवा, हे बिभीषणा आणि हे लक्ष्मणा, तुम्ही सेना सांभाळा. मी या दुष्टाचे बळ आणि सेना यांना पाहून घेतो.'॥ ६७॥

**कर सारंग साजि कटि भाथा। अरि दल दलन चले रघुनाथा॥**
**प्रथम कीन्हि प्रभु धनुष टँकोरा। रिपु दल बधिर भयउ सुनि सोरा॥**

हातात शार्ङ्गधनुष्य व कमरेचा भाता सज्ज करून श्रीरघुनाथ शत्रुसेनेचे निर्दालन करण्यास निघाले. प्रभूंनी प्रथम धनुष्याचा टणत्कार केला. त्याचा भयानक आवाज ऐकताच शत्रुसेना बहिरी झाली.॥ १॥

**सत्यसंध छाँड़े सर लच्छा। कालसर्प जनु चले सपच्छा॥**
**जहँ तहँ चले बिपुल नाराचा। लगे कटन भट बिकट पिसाचा॥**

मग सत्यप्रतिज्ञ श्रीरामांनी एक लाख बाण सोडले. ते बाण असे सुटले की, जणू पंख असलेले काल-सर्प सुटले आहेत. जिकडे तिकडे पुष्कळ बाण सुटले व भयंकर राक्षस योद्धे कापले जाऊ लागले.॥ २॥

**कटहिं चरन उर सिर भुजदंडा। बहुतक बीर होहिं सत खंडा॥**
**घुर्मि घुर्मि घायल महि परहीं। उठि संभारि सुभट पुनि लरहीं॥**
**लागत बान जलद जिमि गाजहिं। बहुतक देखि कठिन सर भाजहिं॥**
**रुंड प्रचंड मुंड बिनु धावहिं। धरु धरु मारु मारु धुनि गावहिं॥**

पुष्कळ वीरांचे शेकडो तुकडे होत होते. घायाळ वीर घेरी येऊन जमिनीवर पडत. श्रेष्ठ योद्धे पुन्हा उठून लढू लागत. बाण लागताच ते ढगांच्या गडगडाटासारखे ओरडत. त्यांचे पाय, छाती, डोकी आणि भुजदंड कापले जात होते. बरेच राक्षस तीक्ष्ण बाण पाहूनच पळून गेले. शिर तुटलेली प्रचंड धडे धावत होती आणि 'पकडा, पकडा, मारा, मारा' असे म्हणत योद्धे ओरडत होते. ॥ ३-४ ॥

दो०—**छन महुँ प्रभु के सायकन्हि काटे बिकट पिसाच।**
**पुनि रघुबीर निषंग महुँ प्रबिसे सब नाराच॥ ६८॥**

प्रभूंच्या बाणांनी एका क्षणात भयानक राक्षसांना कापून काढले. मग ते सर्व बाण परतून श्रीरघुनाथांच्या भात्यात येऊन बसले. ॥ ६८ ॥

**कुंभकरन मन दीख बिचारी। हति छन माझ निसाचर धारी॥**
**भा अति क्रुद्ध महाबल बीरा। कियो मृगनायक नाद गँभीरा॥**

कुंभकर्णाने मनात विचार केला की, श्रीरामांनी एका क्षणात राक्षस-सेनेचा संहार करून टाकला. तेव्हा तो महाबली वीर अत्यंत क्रुद्ध झाला आणि त्याने गंभीर सिंहनाद केला. ॥ १ ॥

**कोपि महीधर लेइ उपारी। डारइ जहँ मर्कट भट भारी॥**
**आवत देखि सैल प्रभु भारे। सरन्हि काटि रज सम करि डारे॥**

तो रागारागाने पर्वत उपटून जिथे जिथे मोठमोठे वानर-योद्धे होते, तिथे तिथे टाकू लागला. मोठमोठे पर्वत येत असल्याचे पाहून प्रभूंनी ते बाणांनी तोडून धुळीप्रमाणे चूर चूर करून टाकले. ॥ २ ॥

**पुनि धनु तानि कोपि रघुनायक। छाँड़े अति कराल बहु सायक॥**
**तनु महुँ प्रबिसि निसरि सर जाहीं। जिमि दामिनि घन माझ समाहीं॥**

मग श्रीरघुनाथांनी अत्यंत क्रोधाने धनुष्य ओढून पुष्कळसे अत्यंत भयानक बाण सोडले. ते बाण कुंभकर्णाच्या शरीरात घुसून पाठीतून निघून जात होते. त्याला त्यांची जाणीवही होत नव्हती, ज्याप्रमाणे विजा ढगांमध्ये सामावून जातात त्याप्रमाणे. ॥ ३ ॥

**सोनित स्रवत सोह तन कारे। जनु कज्जल गिरि गेरु पनारे॥**
**बिकल बिलोकि भालु कपि धाए। बिहँसा जबहिं निकट कपि आए॥**

त्याच्या काळ्या शरीरातून रक्ताचे प्रवाह वाहात होते. काजळाच्या पर्वतातून कावेचे प्रवाह वाहावेत, असे ते शोभत होते. तो व्याकूळ झालेला पाहून अस्वले व वानर धावले. ते जवळ येताच तो हसला, ॥ ४ ॥

**दो०—महानाद करि गर्जा कोटि कोटि गहि कीस।**
**महि पटकइ गजराज इव सपथ करइ दससीस॥ ६९॥**

आणि त्याने भीषण आवाजाने गर्जना केली आणि कोट्यवधी वानरांना पकडून तो गजराजाप्रमाणे त्यांना पृथ्वीवर आपटू लागला आणि रावणाचा जयजयकार करू लागला. ॥ ६९ ॥

**भागे भालु बलीमुख जूथा। बृकु बिलोकि जिमि मेष बरूथा॥**
**चले भागि कपि भालु भवानी। बिकल पुकारत आरत बानी॥**

हे पाहून अस्वले व वानरांच्या झुंडी लांडग्याला पाहून मेंढरांचे कळप पळतात, तशा पळू लागल्या. शिव म्हणतात, 'हे भवानी, वानर व अस्वले व्याकूळ होऊन आर्त स्वराने ओरडत पळू लागले.' ॥ १ ॥

**यह निसिचर दुकाल सम अहई। कपिकुल देस परन अब चहई॥**
**कृपा बारिधर राम खरारी। पाहि पाहि प्रनतारति हारी॥**

ते म्हणू लागले, 'हा राक्षस दुष्काळाप्रमाणे आहे. तो आता वानरकुलरूपी देशात पडू पाहात आहे. हे कृपारूपी जल धारण करणाऱ्या मेघरूप श्रीराम! हे खराचे शत्रू! हे शरणागताचे दुःखहरण करणारे! रक्षण करा, रक्षण करा.' ॥ २ ॥

**सकरुन बचन सुनत भगवाना। चले सुधारि सरासन बाना॥**
**राम सेन निज पाछें घाली। चले सकोप महा बलसाली॥**

हा करुणापूर्ण धावा ऐकताच भगवान धनुष्यबाण सज्ज करून निघाले. महाबलशाली श्रीरामांनी सेनेला आपल्या पाठीमागे घेतले आणि ते एकटे क्रोधाने निघाले. ॥ ३ ॥

**खैंचि धनुष सर सत संधाने। छूटे तीर सरीर समाने॥**
**लागत सर धावा रिस भरा। कुधर डगमगत डोलति धरा॥**

त्यांनी धनुष्य ओढून शंभर बाण मारले. बाण सुटले व ते कुंभकर्णाच्या शरीरात घुसले. बाण लागताच तो रागाने धावून गेला. तो धावल्याने पर्वत डळमळू लागले आणि पृथ्वी हादरू लागली. ॥ ४ ॥

**लीन्ह एक तेहिं सैल उपाटी। रघुकुलतिलक भुजा सोइ काटी॥**
**धावा बाम बाहु गिरि धारी। प्रभु सोउ भुजा काटि महि पारी॥**

त्याने पर्वत उपटून घेतला. रघुकुलतिलक श्रीरामांनी त्याची भुजाच छाटून टाकली. तेव्हा तो डाव्या हातात पर्वत घेऊन धावला. प्रभूंनी त्याची ती भुजाही छाटून जमिनीवर पाडली. ॥ ५ ॥

**काटें भुजा सोह खल कैसा। पच्छहीन मंदर गिरि जैसा॥**
**उग्र बिलोकनि प्रभुहि बिलोका। ग्रसन चहत मानहुँ त्रैलोका॥**

भुजा कापल्या गेल्यावर तो दुष्ट पंख नसलेल्या मंदराचल पर्वताप्रमाणे शोभून दिसू लागला. त्याने उग्र दृष्टीने प्रभूंना पाहिले. जणू तो तिन्ही लोकांना गिळू पाहात होता. ॥ ६ ॥

दो०—**करि चिक्कार घोर अति धावा बदनु पसारि।**
**गगन सिद्ध सुर त्रासित हा हा हेति पुकारि॥ ७०॥**

तो मोठ्या जोराने चीत्कार करीत तोंड पसरून धावला. आकाशामध्ये सिद्ध व देव घाबरून हाहाकार करू लागले. ॥ ७० ॥

**सभय देव करुनानिधि जान्यो। श्रवन प्रजंत सरासनु तान्यो॥**
**बिसिख निकर निसिचर मुख भरेऊ। तदपि महाबल भूमि न परेऊ॥**

करुणानिधान भगवंतांनी देवांना भयभीत झाल्याचे पाहिले. तेव्हा धनुष्य कानापर्यंत खेचून राक्षसाचे तोंड बाणांच्या समूहाने भरून टाकले. तरीही तो महाबली पृथ्वीवर पडला नाही. ॥ १ ॥

**सरन्हि भरा मुख सन्मुख धावा। काल त्रोन सजीव जनु आवा॥**
**तब प्रभु कोपि तीब्र सर लीन्हा। धर ते भिन्न तासु सिर कीन्हा॥**

तोंडात बाण भरलेल्या स्थितीत तो प्रभूंच्या समोर धावून आला. जणू कालरूपी सजीव भाता चालून येत होता. तेव्हा प्रभूंनी क्रुद्ध होऊन एक तीक्ष्ण बाण घेतला आणि त्याचे शिर धडापासून वेगळे केले. ॥ २ ॥

**सो सिर परेउ दसानन आगें। बिकल भयउ जिमि फनि मनि त्यागें॥**
**धरनि धसइ धर धाव प्रचंडा। तब प्रभु काटि कीन्ह दुइ खंडा॥**

ते शिर रावणासमोर जाऊन पडले. ते पाहून रावण असा व्याकूळ झाला की, ज्याप्रमाणे मणी हरवल्यावर सर्प व्याकूळ होतो. तरीही कुंभकर्णाचे प्रचंड धड धावत होते, त्यामुळे पृथ्वी खचत होती. तेव्हा प्रभूंनी त्या धडाचे कापून दोन तुकडे केले. ॥ ३ ॥

**परे भूमि जिमि नभ तें भूधर। हेठ दाबि कपि भालु निसाचर॥**
**तासु तेज प्रभु बदन समाना। सुर मुनि सबहिं अचंभव माना॥**

वानरे, अस्वले आणि निशाचरांना खाली चिरडत ते दोन्ही तुकडे पृथ्वीवर असे पडले, जसे आकाशातून दोन पर्वत पडावेत. कुंभकर्णाचे तेज श्रीरामचंद्रांत सामावून गेले. हे पाहून देव व मुनी सर्वांनाच आश्चर्य वाटले. ॥ ४ ॥

**सुर दुंदुभीं बजावहिं हरषहिं। अस्तुति करहिं सुमन बहु बरषहिं॥**
**करि बिनती सुर सकल सिधाए। तेही समय देवरिषि आए॥**

देव नगारे वाजवत, आनंदाने स्तुती करीत फुले उधळत होते. श्रीरामांचा निरोप घेऊन देव निघून गेले. त्याच वेळी देवर्षी नारद आले. ॥ ५ ॥

**गगनोपरि हरि गुन गन गाए। रुचिर बीररस प्रभु मन भाए॥**
**बेगि हतहु खल कहि मुनि गए। राम समर महि सोभत भए॥**

आकाशातूनच त्यांनी श्रीहरींच्या सुंदर वीररसयुक्त गुणसमूहांचे गायन केले. ते प्रभूंच्या मनाला फार आवडले. नारद मुनी असे सांगून गेले की, 'आता दुष्ट रावणाला त्वरित मारा.' त्याचवेळी श्रीरामचंद्र रणभूमीवर येऊन उभे ठाकले. ॥ ६ ॥

छं०—**संग्राम भूमि बिराज रघुपति अतुल बल कोसल धनी।**
**श्रम बिंदु मुख राजीव लोचन अरुन तन सोनित कनी॥**
**भुज जुगल फेरत सर सरासन भालु कपि चहु दिसि बने।**
**कह दास तुलसी कहि न सक छबि सेष जेहि आनन घने॥**

अतुलनीय बलाचे कोसलपती श्रीरघुनाथ रणभूमीवर विराजमान झाले. मुखावर घामाचे थेंब होते, कमळासारखे त्यांचे नेत्र काहीसे लाल झाले होते. शरीरावर रक्ताचे कण होते आणि दोन्ही हातांनी ते धनुष्यबाण फिरवीत होते. चोहीकडे अस्वले व वानर शोभून दिसत होते. तुलसीदास म्हणतात की, प्रभूंच्या या सौंदर्याचे वर्णन हजार मुखांचा शेषही करू शकणार नाही.

दो०—**निसिचर अधम मलाकर ताहि दीन्ह निज धाम।**
**गिरिजा ते नर मंदमति जे न भजहिं श्रीराम॥ ७१॥**

शिव म्हणतात, 'हे गिरिजे, कुंभकर्ण हा नीच राक्षस व पापाची खाण होता, त्यालाही श्रीरामांनी आपले परमधाम दिले. अशा श्रीरामांना न भजणारे मनुष्य निश्चितपणे मंदबुद्धीचे होत. ॥ ७१ ॥

**दिन के अंत फिरीं द्वौ अनी। समर भई सुभटन्ह श्रम घनी॥**
**राम कृपाँ कपि दल बल बाढ़ा। जिमि तृन पाइ लाग अति डाढ़ा॥**

दिवस मावळल्यावर दोन्ही सेना परत गेल्या. त्या दिवशीच्या युद्धात योद्ध्यांना खूप श्रम झाले. परंतु श्रीरामांच्या कृपेने वानरसेनेचे बळ गवत मिळाल्यावर आग वाढत जाते, तसे वाढले. ॥ १ ॥

**छीजहिं निसिचर दिनु अरु राती। निज मुख कहें सुकृत जेहि भाँती॥**
**बहु बिलाप दसकंधर करई। बंधु सीस पुनि पुनि उर धरई॥**

ज्याप्रमाणे स्वतःच्या तोंडाने सांगितल्यावर पुण्य कमी होते, तसे तिकडे राक्षस रात्रंदिवस कमी होत होते. रावण खूप विलाप करीत होता. वारंवार कुंभकर्णाचे शिर हृदयाशी कवटाळत होता. ॥ २ ॥

**रोवहिं नारि हृदय हति पानी। तासु तेज बल बिपुल बखानी॥**
**मेघनाद तेहि अवसर आयउ। कहि बहु कथा पिता समुझायउ॥**

स्त्रिया कुंभकर्णाचे मोठे तेज आणि बल याची वाखाणणी करत हातांनी छाती बडवून घेत रडत होत्या, त्याचवेळी मेघनाद आला आणि त्याने बऱ्याच गोष्टी सांगून पित्याला समजावले.॥ ३॥

**देखेहु कालि मोरि मनुसाई। अबहिं बहुत का करौं बड़ाई॥**
**इष्टदेव सैं बल रथ पायउँ। सो बल तात न तोहि देखायउँ॥**

आणि म्हणाला, 'उद्या माझा पुरुषार्थ पाहा. आत्ताच स्वतःचे मोठेपण जास्त काय सांगू ? हे तात, मी आपल्या इष्टदेवतेकडून जे बळ व रथ मिळविला होता, ते अजुनी मी तुम्हांला दाखविले नाही.'॥ ४॥

**एहि बिधि जल्पत भयउ बिहाना। चहुँ दुआर लागे कपि नाना॥**
**इत कपि भालु काल सम बीरा। उत रजनीचर अति रनधीरा॥**

अशा प्रकारे तो फुशारक्या मारीत असतानाच सकाळ झाली. लंकेच्या चारी दरवाजांवर पुष्कळ वानर येऊन उभे ठाकले. इकडे कालासारखे वीर वानर व अस्वले होती, तर तिकडे अत्यंत रणधीर राक्षस.॥ ५॥

**लरहिं सुभट निज निज जय हेतू। बरनि न जाइ समर खगकेतू॥**

दोन्हीकडचे योद्धे आपापल्या विजयासाठी लढत होते. काकभुशुंडी म्हणतात, 'हे गरुडा, त्यांच्या युद्धाचे वर्णन करणे अशक्य.'॥ ६॥

दो०—**मेघनाद मायामय रथ चढ़ि गयउ अकास।**
**गर्जेउ अट्टहास करि भइ कपि कटकहि त्रास॥ ७२॥**

मेघनाद आपल्या त्या मायामय रथावर आरूढ होऊन आकाशात गेला आणि खदखदा हसून त्याने गर्जना केली. त्यामुळे वानरसेनेमध्ये भय पसरले.॥ ७२॥

**सक्ति सूल तरवारि कृपाना। अस्त्र सस्त्र कुलिसायुध नाना॥**
**डारइ परसु परिघ पाषाना। लागेउ बृष्टि करै बहु बाना॥**

तो शक्ती, शूळ, तलवार, कृपाण इत्यादी शस्त्रास्त्रे आणि वज्र इत्यादी पुष्कळ आयुधांचा मारा करू लागला. तसेच परशू, परिघ, पाषाण इत्यादी टाकत पुष्कळ बाणांचा वर्षाव करू लागला.॥ १॥

**दस दिसि रहे बान नभ छाई। मानहुँ मघा मेघ झरि लाई॥**
**धरु धरु मारु सुनिअ धुनि काना। जो मारइ तेहि कोउ न जाना॥**

आकाशात दाही दिशा बाणांनी आच्छादून गेल्या. जणू मघा नक्षत्रांच्या मेघांनी पर्जन्यवृष्टी सुरू केली होती. 'पकडा, पकडा, मारा' हे शब्द कानी पडत होते. परंतु कोण मारत होता, ते काही दिसत नव्हते.॥ २॥

**गहि गिरि तरु अकास कपि धावहिं। देखहिं तेहि न दुखित फिरि आवहिं॥**
**अवघट घाट बाट गिरि कंदर। माया बल कीन्हेसि सर पंजर॥**

वानर पर्वत व वृक्ष घेऊन आकाशात धावून जात होते, परंतु शत्रूला पाहू शकत नव्हते. त्यामुळे निराश होऊन परत येत होते. मेघनादाने आपल्या मायेने दुर्गम घाट, रस्ते आणि पर्वतातील गुहांना बाणांनी आच्छादून टाकले. ॥ ३ ॥

**जाहिं कहाँ ब्याकुल भए बंदर। सुरपति बंदि परे जनु मंदर॥**
**मारुतसुत अंगद नल नीला। कीन्हेसि बिकल सकल बलसीला॥**

आता कुठे जायचे, या विचाराने वानर व्याकूळ झाले, जणू पर्वत इंद्राच्या कैदेत पडले. मेघनादाने मारुती, अंगद, नील इत्यादी साऱ्या बलवानांना व्याकूळ करून टाकले. ॥ ४ ॥

**पुनि लछिमन सुग्रीव बिभीषन। सरन्हि मारि कीन्हेसि जर्जर तन॥**
**पुनि रघुपति सैं जूझै लागा। सर छाँड़इ होइ लागहिं नागा॥**

नंतर त्याने लक्ष्मण, सुग्रीव व बिभीषण यांना बाण मारून त्यांची शरीरे जर्जर करून टाकली. मग तो रघुनाथांशी लढू लागला. तो जे बाण सोडत होता, ते साप बनून लागत होते. ॥ ५ ॥

**ब्याल पास बस भए खरारी। स्वबस अनंत एक अबिकारी॥**
**नट इव कपट चरित कर नाना। सदा स्वतंत्र एक भगवाना॥**

जे स्वतंत्र, अनंत, एक आणि निर्विकार आहेत, ते श्रीराम हे लीलेसाठी नागपाशाच्या अधीन होऊन त्यामध्ये बद्ध झाले. श्रीरामचंद्र सदा स्वतंत्र, अद्वितीय भगवान आहेत. ते अभिनेत्याप्रमाणे अनेक प्रकारच्या लीला लोकांना दाखविण्यासाठी करीत होते. ॥ ६ ॥

**रन सोभा लगि प्रभुहिं बँधायो। नागपास देवन्ह भय पायो॥**

रणाच्या शोभेसाठी प्रभूंनी स्वत:ला नागपाशात बांधून घेतले, परंतु त्यामुळे देवांना भीती वाटू लागली. ॥ ७ ॥

दो०—**गिरिजा जासु नाम जपि मुनि काटहिं भव पास।**
**सो कि बंध तर आवइ ब्यापक बिस्व निवास॥ ७३॥**

शिव म्हणतात, 'हे गिरिजे, ज्यांचे नाम जपून मुनी जन्म-मृत्यूच्या भवाची दोरी तोडून टाकतात, ते सर्वव्यापक, विश्वाचे आधार असलेले प्रभू कधी बंधनात पडू शकतील काय? ॥ ७३ ॥

**चरित राम के सगुन भवानी। तर्कि न जाहिं बुद्धि बल बानी॥**
**अस बिचारि जे तग्य बिरागी। रामहि भजहिं तर्क सब त्यागी॥**

हे भवानी, श्रीरामांच्या या सगुण लीलांविषयी बुद्धी व तर्काने निर्णय घेता येत नाही. म्हणून विचारपूर्वक तत्त्वज्ञानी आणि विरक्त पुरुष सर्व तर्क-वितर्क सोडून श्रीरामांचे भजनच करतात. ॥ १ ॥

**ब्याकुल कटकु कीन्ह घननादा। पुनि भा प्रगट कहइ दुर्बादा॥**
**जामवंत कह खल रहु ठाढ़ा। सुनि करि ताहि क्रोध अति बाढ़ा॥**

मेघनादाने सेनेला व्याकूळ करून सोडले. पुन्हा तो प्रकट होऊन अपशब्द बोलू लागला. जेव्हा जांबवान म्हणाला, 'अरे दुष्टा, उभा राहा' तेव्हा हे ऐकून मेघनादाचा क्रोध वाढला.॥ २॥

**बूढ़ जानि सठ छाँड़ेउँ तोही। लागेसि अधम पचारै मोही॥**
**अस कहि तरल त्रिसूल चलायो। जामवंत कर गहि सोइ धायो॥**

तो म्हणाला, 'अरे मूर्खा, म्हातारा समजून मी तुला सोडले होते. अरे अधमा, आता तू मलाच आव्हान देत आहेस ?' असे म्हणून त्याने धारदार त्रिशूळ सोडला. जांबवान तोच त्रिशूळ हाताने पकडून धावला.॥ ३॥

**मारिसि मेघनाद कै छाती। परा भूमि घुर्मित सुरघाती॥**
**पुनि रिसान गहि चरन फिरायो। महि पछारि निज बल देखरायो॥**

आणि त्याने तो मेघनादाच्या छातीवर मारला. तेव्हा तो देवांचा शत्रू चक्कर येऊन पृथ्वीवर पडला. जांबवानाने पुन्हा रागारागाने त्याचे पाय पकडून त्याला गरागरा फिरवले आणि पृथ्वीवर आपटून त्याला आपले बळ दाखवून दिले.॥ ४॥

**बर प्रसाद सो मरइ न मारा। तब गहि पद लंका पर डारा॥**
**इहाँ देवरिषि गरुड़ पठायो। राम समीप सपदि सो आयो॥**

परंतु वरदानामुळे तो मारूनही मरत नव्हता. तेव्हा जांबवंताने त्याचा पाय धरून त्याला लंकेत फेकून दिले. इकडे देवर्षी नारदांनी गरुडाला पाठविले. तो त्वरित श्रीरामांच्याजवळ येऊन पोहोचला. ॥ ५॥

दो०—**खगपति सब धरि खाए माया नाग बरूथ।**
**माया बिगत भए सब हरषे बानर जूथ॥ ७४ (क)॥**

पक्षिराज गरुड येताच सर्व माया-सर्प त्याने जणू खाल्ल्यासारखे कोठे दिसेनासे झाले. मग सर्व वानरांच्या झुंडी मायेने रहित होऊन आनंदित झाल्या.॥ ७४ (क)॥

**गहि गिरि पादप उपल नख धाए कीस रिसाइ।**
**चले तमीचर बिकलतर गढ़ पर चढ़े पराइ॥ ७४ (ख)॥**

पर्वत, वृक्ष, पाषाण व नखे धारण केलेले वानर क्रुद्ध होऊन धावले. निशाचर फार व्याकूळ होऊन पळून गेले आणि किल्ल्यावर चढले.॥ ७४ (ख)॥

**मेघनाद कै मुरछा जागी। पितहि बिलोकि लाज अति लागी॥**
**तुरत गयउ गिरिबर कंदरा। करौं अजय मख अस मन धरा॥**

मेघनादाची मूर्च्छा दूर झाली, तेव्हा पित्याला पाहून तो फारच ओशाळला. तो म्हणाला, ‘मी अजेय होण्यासाठी यज्ञ करतो.’ असा निश्चय करून तो त्वरित श्रेष्ठ पर्वताच्या गुहेत गेला. ॥ १ ॥

**इहाँ बिभीषन मंत्र बिचारा । सुनहु नाथ बल अतुल उदारा ॥**
**मेघनाद मख करइ अपावन । खल मायावी देव सतावन ॥**

इकडे बिभीषणाने विचार करून श्रीरामांना सांगितले, ‘हे अतुलनीय बलवान उदार प्रभो, देवांना सतावणारा दुष्ट व मायावी मेघनाद तामसी यज्ञ करीत आहे. ॥ २ ॥

**जौं प्रभु सिद्ध होइ सो पाइहि । नाथ बेगि पुनि जीति न जाइहि ॥**
**सुनि रघुपति अतिसय सुख माना । बोले अंगदादि कपि नाना ॥**

हे प्रभो, जर हा यज्ञ पूर्ण झाला, तर हे नाथ, मग मेघनादाला लवकर जिंकणे शक्य होणार नाही.’ हे ऐकून श्रीरघुनाथांना खूप बरे वाटले आणि अंगदादी बऱ्याच वानरांना बोलावून त्यांनी सांगितले, ॥ ३ ॥

**लछिमन संग जाहु सब भाई । करहु बिधंस जग्य कर जाई ॥**
**तुम्ह लछिमन मारेहु रन ओही । देखि सभय सुर दुख अति मोही ॥**

‘हे बंधूंनो, सर्वजण लक्ष्मणासोबत जा आणि यज्ञाचा विध्वंस करा. हे लक्ष्मणा, संग्रामामध्ये तू त्याला मारून टाक. देव भयभीत झाल्याचे पाहून मला फार वाईट वाटते. ॥ ४ ॥

**मारेहु तेहि बल बुद्धि उपाई । जेहिं छीजै निसिचर सुनु भाई ॥**
**जामवंत सुग्रीव बिभीषन । सेन समेत रहेहु तीनिउ जन ॥**

हे बंधू, त्याला बलाने व युक्तीने मार. त्यामुळेच त्या निशाचराचा नाश होईल. हे जांबवाना, सुग्रीवा, बिभीषणा, तुम्ही तिघेजण सेनेसह त्याच्याबरोबर राहा.’ ॥ ५ ॥

**जब रघुबीर दीन्हि अनुसासन । कटि निषंग कसि साजि सरासन ॥**
**प्रभु प्रताप उर धरि रनधीरा । बोले घन इव गिरा गँभीरा ॥**

अशा प्रकारे जेव्हा रघुनाथांनी आज्ञा केली, तेव्हा कमरेला भाता बांधून आणि धनुष्य सज्ज करून रणधीर लक्ष्मण प्रभूंचा प्रताप हृदयी धरून मेघासारख्या गंभीर वाणीने म्हणाला, ॥ ६ ॥

**जौं तेहि आजु बधें बिनु आवौं । तौ रघुपति सेवक न कहावौं ॥**
**जौं सत संकर करहिं सहाई । तदपि हतउँ रघुबीर दोहाई ॥**

‘जर मी आज त्याला न मारता परत आलो, तर श्रीरघुनाथांचा सेवक म्हणविणार नाही. जरी शेकडो शंकरसुद्धा त्याच्या मदतीला आले, तरीही श्रीरामांची शपथ आहे की, आज मी त्याला मारीनच.’ ॥ ७ ॥

**दो०—रघुपति चरन नाइ सिरु चलेउ तुरंत अनंत।**
**अंगद नील मयंद नल संग सुभट हनुमंत॥ ७५॥**

श्रीरघुनाथांच्या चरणी नतमस्तक होऊन लक्ष्मण त्वरित निघाला. त्याच्याबरोबर अंगद, नल, नील, मैंद, हनुमान इत्यादी उत्तम योद्धे निघाले. ॥ ७५ ॥

**जाइ कपिन्ह सो देखा बैसा। आहुति देत रुधिर अरु भैंसा॥**
**कीन्ह कपिन्ह सब जग्य बिधंसा। जब न उठइ तब करहिं प्रसंसा॥**

वानरांनी जाऊन पाहिले की, मेघनाद बसून रक्त व रेड्यांची आहुती देत आहे. वानरांनी यज्ञाचा पूर्ण विध्वंस करून टाकला. तरीही जेव्हा तो उठला नाही, तेव्हा ते त्याची वक्रोक्तिपूर्ण प्रशंसा करू लागले. ॥ १ ॥

**तदपि न उठइ धरेन्हि कच जाई। लातन्हि हति हति चले पराई॥**
**लै त्रिसूल धावा कपि भागे। आए जहँ रामानुज आगे॥**

तरीही तो उठला नाही, तेव्हा त्यांनी त्याचे केस पकडले आणि त्याला लाथांनी बदडून ते पळून गेले. तेव्हा तो त्रिशूळ घेऊन धावला. वानर पळाले, ते लक्ष्मणाजवळ आले. ॥ २ ॥

**आवा परम क्रोध कर मारा। गर्ज घोर रव बारहिं बारा॥**
**कोपि मरुतसुत अंगद धाए। हति त्रिसूल उर धरनि गिराए॥**

तो अत्यंत क्रोधाने आला व वारंवार भयंकर गर्जना करू लागला. हनुमान आणि अंगद रागाने धावून गेले. मेघनादाने दोघांच्या छातीत त्रिशूळ मारून त्यांना जमिनीवर पाडले. ॥ ३ ॥

**प्रभु कहँ छाँड़ेसि सूल प्रचंडा। सर हति कृत अनंत जुग खंडा॥**
**उठि बहोरि मारुति जुबराजा। हतहिं कोपि तेहि घाउ न बाजा॥**

मग त्याने लक्ष्मणावर प्रचंड त्रिशूळ फेकला. लक्ष्मणाने बाण मारून त्रिशूळाचे दोन तुकडे करून टाकले. हनुमान व अंगद पुन्हा उठले व त्याला मारू लागले, परंतु त्याला काही लागले नाही. ॥ ४ ॥

**फिरे बीर रिपु मरइ न मारा। तब धावा करि घोर चिकारा॥**
**आवत देखि क्रुद्ध जनु काला। लछिमन छाड़े बिसिख कराला॥**

शत्रू मेघनाद हा मारूनही मरत नाही, हे पाहून वीर परतू लागले, तेव्हा तो प्रचंड चीत्कार करून धावला. क्रुद्ध काळाप्रमाणे तो येत आहे, असे पाहून लक्ष्मणाने भयंकर बाण मारले. ॥ ५ ॥

**देखेसि आवत पबि सम बाना। तुरत भयउ खल अंतरधाना॥**
**बिबिध बेष धरि करइ लराई। कबहुँक प्रगट कबहुँ दुरि जाई॥**

वज्रासारखे बाण येताना पाहून तो दुष्ट लगेच अदृश्य झाला आणि नंतर वेगवेगळी रूपे घेऊन युद्ध करू लागला. कधी तो प्रकट होई, तर कधी लपून जाई. ॥ ६ ॥

**देखि अजय रिपु डरपे कीसा। परम क्रुद्ध तब भयउ अहीसा॥**
**लछिमन मन अस मंत्र दृढ़ावा। एहि पापिहि मैं बहुत खेलावा॥**

शत्रू पराजित होत नाही, असे पाहून वानर घाबरले. तेव्हा लक्ष्मण अत्यंत क्रुद्ध झाला. लक्ष्मणाने मनात पक्का निश्चय केला की, आता या पाप्याशी खेळ फार झाला. आता याला संपविले पाहिजे. ॥ ७ ॥

**सुमिरि कोसलाधीस प्रतापा। सर संधान कीन्ह करि दापा॥**
**छाड़ा बान माझ उर लागा। मरती बार कपटु सब त्यागा॥**

कोसलपती श्रीरामांचे स्मरण करून लक्ष्मणाने वीरोचित गर्वाने बाण लावला. बाण सुटताच त्याच्या छातीत मधोमध लागला. मरताना त्याने सर्व माया सोडून दिल्या. ॥ ८ ॥

दो०—**रामानुज कहँ रामु कहँ अस कहि छाँड़ेसि प्रान।**
**धन्य धन्य तव जननी कह अंगद हनुमान॥ ७६ ॥**

'रामाचा धाकटा भाऊ लक्ष्मण कुठे आहे? राम कुठे आहे?' असे म्हणत त्याने प्राण सोडले. त्याला अंगद व हनुमान, 'तुझी माता धन्य आहे, धन्य आहे,' कारण मरताना तू श्रीराम-लक्ष्मणांचे स्मरण केलेस, असे म्हणू लागले. ॥ ७६ ॥

**बिनु प्रयास हनुमान उठायो। लंका द्वार राखि पुनि आयो॥**
**तासु मरन सुनि सुर गंधर्बा। चढ़ि बिमान आए नभ सर्बा॥**

हनुमानाने सहजपणे त्याला उचलले व लंकेच्या दारावर त्याला ठेवून तो परत आला. त्याच्या मृत्यूची वार्ता ऐकून देव, गंधर्व इत्यादी सर्वजण विमानात बसून आकाशात जमले. ॥ १ ॥

**बरषि सुमन दुंदुभीं बजावहिं। श्रीरघुनाथ बिमल जसु गावहिं॥**
**जय अनंत जय जगदाधारा। तुम्ह प्रभु सब देवन्हि निस्तारा॥**

ते फुले उधळून नगारे वाजवत होते आणि श्रीरामांची निर्मल कीर्ती गात होते. 'हे अनंता, तुझा विजय असो. हे जगदाधारा, तुझा विजय असो. हे प्रभो, तुम्ही सर्व देवांना संकटातून मुक्त केले.' ॥ २ ॥

**अस्तुति करि सुर सिद्ध सिधाए। लछिमन कृपासिंधु पहिं आए॥**
**सुत बध सुना दसानन जबहीं। मुरुछित भयउ परेउ महि तबहीं॥**

देव व सिद्ध स्तुती करून निघून गेले. मग कृपासागर श्रीरामांच्याजवळ लक्ष्मण आला. इकडे रावणाने पुत्र-वधाची वार्ता ऐकताच तो मूर्च्छित होऊन जमिनीवर पडला. ॥ ३ ॥

**मंदोदरी रुदन कर भारी। उर ताड़न बहु भाँति पुकारी॥**
**नगर लोग सब ब्याकुल सोचा। सकल कहहिं दसकंधर पोचा॥**

मंदोदरी छाती बडवून घेत आणि अनेक प्रकारे हाका मारत मोठा विलाप करू लागली. नगरातील सर्व राक्षस शोकाने व्याकूळ झाले. सर्वजण रावणाला नावे ठेवू लागले.॥ ४॥

दो०—**तब दसकंठ बिबिधि बिधि समुझाईं सब नारि।**
**नस्वर रूप जगत सब देखहु हृदयँ बिचारि॥ ७७॥**

तेव्हा रावणाने सर्व स्त्रियांना अनेक तऱ्हेने समजावले की, 'संपूर्ण जगाचे हे दृश्य रूप नाशवान आहे. मनात विचार करून बघा.'॥ ७७॥

**तिन्हहि ग्यान उपदेसा रावन। आपुन मंद कथा सुभ पावन॥**
**पर उपदेस कुसल बहुतेरे। जे आचरहिं ते नर न घनेरे॥**

रावणाने त्यांना ज्ञानाचा उपदेश केला. तो स्वतः नीच होता, परंतु त्याचे बोलणे शुभ व पवित्र होते. दुसऱ्याला उपदेश देण्यात लोक पटाईत असतात. पण उपदेशाप्रमाणे आचरणही करणारे लोक कमी असतात.॥ १॥

**निसा सिरानि भयउ भिनुसारा। लगे भालु कपि चारिहुँ द्वारा॥**
**सुभट बोलाइ दसानन बोला। रन सन्मुख जा कर मन डोला॥**

रात्र गेली, सकाळ झाली. अस्वले-वानर चारी दरवाजांवर जाऊन ठाकले. योद्ध्यांना बोलावून रावण म्हणाला, 'लढाईमध्ये शत्रूसमोर ज्याचे मन धास्तावत असेल,॥ २॥

**सो अबहीं बरु जाउ पराई। संजुग बिमुख भएँ न भलाई॥**
**निज भुज बल मैं बयरु बढ़ावा। देहउँ उतरु जो रिपु चढ़ि आवा॥**

त्याने आताच पळून जावे, हे बरे. युद्धात जाऊन पळून जाण्यात शहाणपणा नाही. मी आपल्या भुजांच्या बळावर वैर वाढविले आहे. जो शत्रू चाल करून आला आहे, त्याला मी उत्तर देईन.'॥ ३॥

**अस कहि मरुत बेग रथ साजा। बाजे सकल जुझाऊ बाजा॥**
**चले बीर सब अतुलित बली। जनु कज्जल कै आँधी चली॥**

असे म्हणून वायुगतीने चालणारा रथ त्याने सज्ज करविला. युद्धाचे नगारे वाजू लागले. सर्व अतुलनीय बलवान वीर काजळाच्या वावटळीप्रमाणे निघाले.॥ ४॥

**असगुन अमित होहिं तेहि काला। गनइ न भुज बल गर्ब बिसाला॥**

त्या प्रसंगी असंख्य अपशकुन होऊ लागले. परंतु आपल्या भुजांच्या बळाचा मोठा गर्व असल्यामुळे रावणाने तिकडे लक्ष दिले नाही.॥ ५॥

**छं०—अति गर्ब गनइ न सगुन असगुन स्त्रवहिं आयुध हाथ ते।**
**भट गिरत रथ ते बाजि गज चिक्करत भाजहिं साथ ते॥**
**गोमाय गीध कराल खर रव स्वान बोलहिं अति घने।**
**जनु कालदूत उलूक बोलहिं बचन परम भयावने॥**

अत्यंत गर्वामुळे शकुन-अपशकुनाचा विचार त्याला नव्हता. हातातून शस्त्रे खाली पडत होती. योद्धे रथांतून खाली पडत होते. घोडे, हत्ती हे बाजूला जाऊन चीत्कार करीत पळून जात होते. कोल्हे, गिधाडे, कावळे आणि गाढवे ओरडत होती. बरीच कुत्री जोरजोराने भुंकत होती. काळाचे दूत असल्याप्रमाणे घुबडे फार भयानक आवाज काढीत होती.

**दो०—ताहि कि संपति सगुन सुभ सपनेहुँ मन बिश्राम।**
**भूत द्रोह रत मोहबस राम बिमुख रति काम॥ ७८॥**

जो जिवांशी द्रोह करण्यात मग्न आहे, मोहाला वश झालेला आहे, राम-विन्मुख आहे आणि कामासक्त आहे, त्याला स्वप्नातही संपत्ती, शुभशकुन आणि मनाचे समाधान मिळू शकेल काय?॥ ७८॥

**चलेउ निसाचर कटकु अपारा। चतुरंगिनी अनी बहु धारा॥**
**बिबिधि भाँति बाहन रथ जाना। बिपुल बरन पताक ध्वज नाना॥**

राक्षसांची अपार सेना निघाली. चतुरंग सेनेच्या पुष्कळ तुकड्या होत्या. अनेक प्रकारची वाहने, रथ आणि पायदळ होते. तसेच बऱ्याच रंगांच्या अनेक पताका आणि ध्वज होते.॥ १॥

**चले मत्त गज जूथ घनेरे। प्राबिट जलद मरुत जनु प्रेरे॥**
**बरन बरन बिरदैत निकाया। समर सूर जानहिं बहु माया॥**

मत्त हत्तींच्या पुष्कळ झुंडी निघाल्या. जणू वाऱ्याने प्रेरित झालेले पावसाळ्यातील ढग असावेत. रंगी-बेरंगी पोषाख घातलेले वीरांचे समूह होते. ते युद्धामध्ये मोठे वीर होते आणि पुष्कळ प्रकारची माया जाणणारे होते.॥ २॥

**अति बिचित्र बाहिनी बिराजी। बीर बसंत सेन जनु साजी॥**
**चलत कटक दिगसिंधुर डगहीं। छुभित पयोधि कुधर डगमगहीं॥**

ती सेना अत्यंत विलक्षण शोभत होती. जणू वीर वसंतऋतूने आपल्या सेनेला सजविले होते. सेना चालू लागली, तेव्हा दिग्गज डळमळू लागले, समुद्र खवळला आणि पर्वत डगमगू लागले.॥ ३॥

**उठी रेनु रबि गयउ छपाई। मरुत थकित बसुधा अकुलाई॥**
**पनव निसान घोर रव बाजहिं। प्रलय समय के घन जनु गाजहिं॥**

धूळ इतकी उडाली की, सूर्य दिसेनासा झाला. वारा थांबला आणि पृथ्वी व्याकूळ झाली. ढोल व नगारे भयंकर आवाज करीत वाजू लागले. जणू प्रलयकाळाचे मेघ गर्जत होते. ॥ ४ ॥

**भेरि नफीरि बाज सहनाई। मारू राग सुभट सुखदाई॥**
**केहरि नाद बीर सब करहीं। निज निज बल पौरुष उच्चरहीं॥**

भेरी, तुरई आणि सनई यांमधून योद्ध्यांना सुखावणारा मारू राग वाजत होता. सर्व वीर सिंहनाद करीत होते आणि आपापल्या पराक्रमाचे वर्णन करीत होते. ॥ ५ ॥

**कहइ दसानन सुनहु सुभट्टा। मर्दहु भालु कपिन्ह के ठट्टा॥**
**हौं मारिहउँ भूप द्वौ भाई। अस कहि सन्मुख फौज रेंगाई॥**

रावण म्हणाला, 'हे उत्तम योद्ध्यांनो, ऐका. तुम्ही अस्वले आणि वानरांचे कळप चिरडून टाका आणि मी दोन्ही राजकुमारांना मारतो.' असे म्हणून त्याने आपली सेना पुढच्या बाजूला घेतली. ॥ ६ ॥

**यह सुधि सकल कपिन्ह जब पाई। धाए करि रघुबीर दोहाई॥**

जेव्हा वानरांना हे समजले, तेव्हा ते श्रीरघुवीरांचा जयजयकार करीत धावून गेले. ॥ ७ ॥

छं०—**धाए बिसाल कराल मर्कट भालु काल समान ते।**
**मानहुँ सपच्छ उड़ाहिं भूधर बृंद नाना बान ते॥**
**नख दसन सैल महाद्रुमायुध सबल संक न मानहीं।**
**जय राम रावन मत्त गज मृगराज सुजसु बखानहीं॥**

ती विशाल व काळासारखी वानर-अस्वले धावत निघाली. जणू काही पंख असलेले पर्वतांचे समूह उडत होते. ते अनेक रंगांचे होते. नखे, दात, पर्वत व मोठमोठे वृक्ष ही त्यांची शस्त्रे होती. ते मोठे बलवान होते आणि कुणाला भीत नव्हते. रावणरूपी उन्मत्त हत्तीसाठी सिंहरूप असलेल्या श्रीरामांचा जयजयकार करून ते त्यांच्या सुंदर कीर्तीचे वर्णन करीत होते.

दो०—**दुहु दिसि जय जयकार करि निज निज जोरी जानि।**
**भिरे बीर इत रामहि उत रावनहि बखानि॥ ७९॥**

दोन्ही बाजूचे योद्धे जयजयकार करीत आपापली जोडी बनवून इकडे श्रीरघुनाथांचे आणि तिकडे रावणाचे कीर्तिगान करीत परस्पर भिडले. ॥ ७९ ॥

**रावनु रथी बिरथ रघुबीरा। देखि बिभीषन भयउ अधीरा॥**
**अधिक प्रीति मन भा संदेहा। बंदि चरन कह सहित सनेहा॥**

रावण रथावर आरूढ होता आणि रघुवीर रथाविना होते, हे पाहून बिभीषण बेचैन झाला. अधिक प्रेम असल्यामुळे त्याच्या मनात शंका आली की, श्रीराम रथाविना रावणाला कसे जिंकू शकतील? श्रीरामांच्या चरणांना वंदन करून तो प्रेमाने म्हणू लागला. ॥ १ ॥

**नाथ न रथ नहिं तन पद त्राना। केहि बिधि जितब बीर बलवाना॥**
**सुनहु सखा कह कृपानिधाना। जेहिं जय होइ सो स्यंदन आना॥**

'हे नाथ, तुमच्याकडे रथ नाही, शरीराचे रक्षण करण्यासाठी कवच नाही आणि पादत्राणही नाही. मग त्या बलवान वीर रावणाला कसे जिंकता येईल?' कृपानिधान श्रीराम म्हणाले, 'हे मित्रा, ज्याच्यामुळे विजय होतो, तो रथ वेगळाच आहे.॥ २॥

**सौरज धीरज तेहि रथ चाका। सत्य सील दृढ़ ध्वजा पताका॥**
**बल बिबेक दम परहित घोरे। छमा कृपा समता रजु जोरे॥**

शौर्य व धैर्य ही त्याची चाके आहेत. सत्य व शील हे त्याचे ध्वज व पताका आहेत. बल, विवेक, संयम आणि परोपकार—हे चार त्याचे घोडे आहेत. ते क्षमा, दया आणि समतारूपी दोरीने रथाला बांधले आहेत.॥ ३॥

**ईस भजनु सारथी सुजाना। बिरति चर्म संतोष कृपाना॥**
**दान परसु बुधि सक्ति प्रचंडा। बर बिग्यान कठिन कोदंडा॥**

ईश्वरभजन हाच रथ चालविणारा सारथी आहे. वैराग्य ही ढाल आहे आणि संतोष ही तलवार आहे. दान हा परशू आहे, बुद्धी ही प्रचंड शक्ती आहे आणि श्रेष्ठ विज्ञान हे बळकट धनुष्य आहे.॥ ४॥

**अमल अचल मन त्रोन समाना। सम जम नियम सिलीमुख नाना॥**
**कवच अभेद बिप्र गुर पूजा। एहि सम बिजय उपाय न दूजा॥**

निर्मल व अचल मन हे भाते आहेत. शम, यम, नियम हे पुष्कळसे बाण आहेत. ब्राह्मण व गुरू यांचे पूजन हे अभेद्य कवच आहे. याच्याशिवाय विजयाचा दुसरा उपाय नाही.॥ ५॥

**सखा धर्ममय अस रथ जाकें। जीतन कहँ न कतहुँ रिपु ताकें॥**

हे मित्रा, असा धर्ममय रथ ज्याच्याकडे आहे. त्याला जिंकण्यासाठी कुठेही शत्रूच नाही.॥ ६॥

दो०—**महा अजय संसार रिपु जीति सकइ सो बीर।**
**जाकें अस रथ होइ दृढ़ सुनहु सखा मतिधीर॥ ८० (क)॥**

हे धीरबुद्धीच्या मित्रा, ऐकून घे. ज्याच्याजवळ असा मजबूत रथ असेल, तो वीर जन्म-मृत्युरूपी महान दुर्जय शत्रूला सुद्धा जिंकू शकतो. रावणाचे ते काय?'॥ ८०(क)॥

**सुनि प्रभु बचन बिभीषन हरषि गहे पद कंज।**
**एहि मिस मोहि उपदेसेहु राम कृपा सुख पुंज॥ ८० (ख)॥**

प्रभूंचे बोलणे ऐकून बिभीषणाने आनंदभरित होऊन त्यांची चरण-कमले धरली. तो म्हणाला, ‘हे कृपा व सुखाचे निधान श्रीराम, तुम्ही या निमित्ताने मला उपदेश केला.’॥ ८०(ख) ॥

**उत पचार दसकंधर इत अंगद हनुमान।**
**लरत निसाचर भालु कपि करि निज निज प्रभु आन॥ ८० (ग)॥**

तिकडून रावण आव्हान देत होता आणि इकडून अंगद व हनुमान. राक्षस आणि अस्वले-वानर आपापल्या स्वामींचा जयजयकार करीत लढत होते. ॥ ८० (ग) ॥

**सुर ब्रह्मादि सिद्ध मुनि नाना। देखत रन नभ चढ़े बिमाना॥**
**हमहू उमा रहे तेहिं संगा। देखत राम चरित रन रंगा॥**

ब्रह्मदेवादी देव आणि अनेक सिद्ध व मुनी विमानात बसून आकाशातून युद्ध पाहात होते. शिव म्हणतात, ‘हे उमे, मीसुद्धा त्या समाजात होतो आणि श्रीरामांच्या रणोत्सवाची लीला पाहात होतो.’॥ १ ॥

**सुभट समर रस दुहु दिसि माते। कपि जयसील राम बल ताते॥**
**एक एक सन भिरहिं पचारहिं। एकन्ह एक मर्दि महि पारहिं॥**

दोन्हीकडचे योद्धे रण-रसात मत्त होऊन गेले होते. वानरांना श्रीरामांचे बळ होते, म्हणून ते जिंकत होते. एक दुसऱ्याशी भिडत होते आणि आव्हान देत होते आणि एक दुसऱ्याला चिरडून जमिनीवर टाकत होते. ॥ २ ॥

**मारहिं काटहिं धरहिं पछारहिं। सीस तोरि सीसन्ह सन मारहिं॥**
**उदर बिदारहिं भुजा उपारहिं। गहि पद अवनि पटकि भट डारहिं॥**

ते मारत होते, कापत होते, पकडत होते, खाली पाडत होते आणि राक्षसांची शिरे तोडून त्याच मुंडक्यांनी दुसऱ्यांना मारत होते. पोट फाडत होते, भुजा उपटून टाकत होते आणि योद्ध्यांचे पाय पकडून त्यांना पृथ्वीवर आपटत होते. ॥ ३ ॥

**निसिचर भट महि गाड़हिं भालू। ऊपर ढारि देहिं बहु बालू॥**
**बीर बलीमुख जुद्ध बिरुद्धे। देखिअत बिपुल काल जनु क्रुद्धे॥**

राक्षस-योद्ध्यांना अस्वले पृथ्वीत गाडून टाकीत होती आणि वर पुष्कळ वाळू टाकीत होती. युद्धात शत्रूविरुद्ध लढणारे वीर वानर जणू पुष्कळ क्रुद्ध काळांसारखे दिसत होते. ॥ ४ ॥

**छं०—क्रुद्धे कृतांत समान कपि तन स्रवत सोनित राजहीं।**
**मर्दहिं निसाचर कटक भट बलवंत घन जिमि गाजहीं॥**
**मारहिं चपेटन्हि डाटि दातन्ह काटि लातन्ह मीजहीं।**
**चिक्करहिं मर्कट भालु छल बल करहिं जेहिं खल छीजहीं॥ १ ॥**

शरीरावरून वाहाणाऱ्या रक्तांमुळे ते क्रोधित झालेल्या काळाप्रमाणे वाटत होते. ते बलवान वीर राक्षस-सेनेतील योद्ध्यांना चिरडून टाकीत होते आणि मेघांप्रमाणे गर्जना करीत होते. रागावून थपडा मारीत होते, दातांनी चावून व लाथांनी तिंबून काढीत होते. वानर व अस्वले चीत्कार करीत होती आणि दुष्ट राक्षस नष्ट व्हावेत, म्हणून कपट-नीती व बळाचा वापर करीत होती. ॥ १ ॥

**धरि गाल फारहिं उर बिदारहिं गल अँतावरि मेलहीं।**
**प्रह्लादपति जनु बिबिध तनु धरि समर अंगन खेलहीं॥**
**धरु मारु काटु पछारु घोर गिरा गगन महि भरि रही।**
**जय राम जो तृन ते कुलिस कर कुलिस ते कर तृन सही॥ २॥**

ते राक्षसांचे गाल पकडून फाडत होते, छाती चिरून टाकत होते आणि त्यांची आतडी बाहेर काढून गळ्यात घालीत होते. प्रह्लादाचे स्वामी भगवान नृसिंहच अनेक शरीरे धारण करून युद्धाच्या मैदानात क्रीडा करीत आहेत, असे ते वानर दिसत होते. पकडा, मारा, कापून काढा, आपटा इत्यादी घोर शब्दांनी आकाश व पृथ्वी भरून गेली होती. जे खरोखर तृणाला वज्र आणि वज्राला तृण बनवून टाकतात, त्या श्रीरामचंद्रांचा विजय असो. ॥ २ ॥

दो०—**निज दल बिचलत देखेसि बीस भुजाँ दस चाप।**
**रथ चढ़ि चलेउ दसानन फिरहु फिरहु करि दाप॥ ८१॥**

आपली सेना गोंधळून गेल्याचे पाहून वीस भुजांमध्ये दहा धनुष्ये धरून रावण रथावर चढून गर्वाने 'परता, परता' असे म्हणत निघाला. ॥ ८१ ॥

**धायउ परम क्रुद्ध दसकंधर। सन्मुख चले हूह दै बंदर॥**
**गहि कर पादप उपल पहारा। डारेन्हि ता पर एकहिं बारा॥**

रावण अत्यंत क्रोधाने धावून गेला. वानर हुंकार करीत लढण्यासाठी त्याच्यासमोर गेले. त्यांनी हातांमध्ये वृक्ष, पाषाण आणि पर्वत घेऊन एकदम रावणावर टाकले. ॥ १ ॥

**लागहिं सैल बज्र तन तासू। खंड खंड होइ फूटहिं आसू॥**
**चला न अचल रहा रथ रोपी। रन दुर्मद रावन अति कोपी॥**

त्याच्या वज्रासारख्या शरीरावर पडताच पर्वत लगेच तुकडे तुकडे होऊन फुटून जात होते. अत्यंत क्रोधी रावण रथ थांबवून दृढपणे उभा राहिला. जराही हलला नाही. ॥ २ ॥

**इत उत झपटि दपटि कपि जोधा। मर्दै लाग भयउ अति क्रोधा॥**
**चले पराइ भालु कपि नाना। त्राहि त्राहि अंगद हनुमाना॥**

त्याला खूप राग आला. तो इकडे तिकडे धावून, धमकावून वानर योद्ध्यांना चिरडू लागला. अनेक वानर व अस्वले 'हे अंगदा, हे हनुमाना, रक्षण करा, रक्षण करा' असे ओरडत पळू लागले. ॥ ३ ॥

**पाहि पाहि रघुबीर गोसाईं । यह खल खाइ काल की नाईं ॥**
**तेहिं देखे कपि सकल पराने । दसहुँ चाप सायक संधाने ॥**

'हे रघुवीर, हे गोस्वामी, रक्षण करा. रक्षण करा. हा दुष्ट रावण काळाप्रमाणे आम्हांला खाऊन टाकीत आहे.' रावणाने पाहिले की, सर्व वानर पळत सुटले आहेत. तेव्हा त्याने दाही धनुष्यांनी नेम धरला. ॥ ४ ॥

छं०—**संधानि धनु सर निकर छाड़ेसि उरग जिमि उड़ि लागहीं ।**
**रहे पूरि सर धरनी गगन दिसि बिदिसि कहँ कपि भागहीं ॥**
**भयो अति कोलाहल बिकल कपि दल भालु बोलहिं आतुरे ।**
**रघुबीर करुना सिंधु आरत बंधु जन रच्छक हरे ॥**

त्याने नेम धरून बाणांचे समूह सोडले. ते बाण सर्पांप्रमाणे उडून जाऊन लागत होते. पृथ्वी-आकाश आणि दिशा-विदिशांना सर्वत्र भरून गेले होते. वानर पळणार तरी कुठे? मोठा गोंधळ उडाला. वानर-अस्वलांची सेना व्याकूळ होऊन आर्त्त स्वराने ओरडू लागली. 'हे रघुवीर, हे करुणासागर, हे पीडितांचे बंधू, हे सेवकांचे रक्षण करून त्यांचे दुःख हरण करणाऱ्या श्रीहरी! रक्षण करा.'

दो०—**निज दल बिकल देखि कटि कसि निषंग धनु हाथ ।**
**लछिमन चले क्रुद्ध होइ नाइ राम पद माथ ॥ ८२ ॥**

आपली सेना व्याकूळ झालेली पाहून कमरेला भाता बांधून आणि हातात धनुष्य घेऊन श्रीरघुनाथांच्या चरणी मस्तक ठेवून लक्ष्मण क्रोधाने निघाला. ॥ ८२ ॥

**रे खल का मारसि कपि भालू । मोहि बिलोकु तोर मैं कालू ॥**
**खोजत रहेउँ तोहि सुतघाती । आजु निपाति जुड़ावउँ छाती ॥**

लक्ष्मणाने रावणाजवळ जाऊन म्हटले, 'अरे दुष्टा, वानर-अस्वलांना काय मारतोस? मला बघ. मी तुझा काळ आहे.' रावण म्हणाला, 'अरे माझ्या पुत्राच्या मारेकऱ्या! मी तुलाच शोधत होतो. आज तुला मारून आपले हृदय शांत करीन.' ॥ १ ॥

**अस कहि छाड़ेसि बान प्रचंडा । लछिमन किए सकल सत खंडा ॥**
**कोटिन्ह आयुध रावन डारे । तिल प्रवान करि काटि निवारे ॥**

असे म्हणून रावणाने प्रचंड बाण सोडले. लक्ष्मणाने सर्वांचे शेकडो तुकडे करून टाकले. रावणाने कोट्यवधी शस्त्रास्त्रे टाकली. लक्ष्मणाने ती तिळाएवढी करून तोडून टाकली. ॥ २ ॥

**पुनि निज बानन्ह कीन्ह प्रहारा। स्यंदनु भंजि सारथी मारा॥**
**सत सत सर मारे दस भाला। गिरि सृंगन्ह जनु प्रबिसहिं ब्याला॥**

मग लक्ष्मणाने आपल्या बाणांनी त्याच्यावर प्रहार केला आणि त्याचा रथ मोडून सारथ्याला मारले. रावणाच्या दहा मस्तकांवर शंभर-शंभर बाण मारले. ते त्याच्या डोक्यात असे घुसले की, जणू पहाडाच्या शिखरांमध्ये साप प्रवेश करीत होते, असे वाटे.॥ ३॥

**पुनि सत सर मारा उर माहीं। परेउ धरनि तल सुधि कछु नाहीं॥**
**उठा प्रबल पुनि मुरुछा जागी। छाड़िसि ब्रह्म दीन्हि जो साँगी॥**

नंतर आणखी शंभर बाण त्याच्या छातीवर मारले. तो पृथ्वीवर पडला; त्याला काही शुद्ध राहिली नाही. मग मूर्च्छा दूर होताच तो प्रबळ रावण उठला आणि त्याने ब्रह्मदेवांनी दिलेली शक्ती सोडली.॥ ४॥

छं०—**सो ब्रह्म दत्त प्रचंड सक्ति अनंत उर लागी सही।**
**पर्‌यो बीर बिकल उठाव दसमुख अतुल बल महिमा रही॥**
**ब्रह्मांड भवन बिराज जाकें एक सिर जिमि रज कनी।**
**तेहि चह उठावन मूढ़ रावन जान नहिं त्रिभुअन धनी॥**

ती ब्रह्मदेवाने दिलेली प्रचंड शक्ती लक्ष्मणाच्या बरोबर छातीला लागली. त्यासरशी लक्ष्मण व्याकूळ होऊन खाली पडला. तेव्हा रावण त्याला उचलू लागला, परंतु लक्ष्मणाच्या अतुलित बळाचा महिमा अखंड होता. ज्याच्या एकाच शिरावर ब्रह्मांडरूपी भवन धुळीच्या कणाप्रमाणे विराजमान असते, त्याला तो मूर्ख रावण उचलू पाहात होता. त्याला लक्ष्मण हा तिन्ही भुवनांचा स्वामी आहे, हे ठाऊक नव्हते.

दो०—**देखि पवनसुत धायउ बोलत बचन कठोर।**
**आवत कपिहि हन्यो तेहिं मुष्टि प्रहार प्रघोर॥ ८३॥**

हे पाहून पवनपुत्र हनुमान त्याला दटावीत त्याच्यावर धावला. हनुमान येताच रावणाने त्याला अत्यंत भयंकर ठोसा मारला.॥ ८३॥

**जानु टेकि कपि भूमि न गिरा। उठा सँभारि बहुत रिस भरा॥**
**मुठिका एक ताहि कपि मारा। परेउ सैल जनु बज्र प्रहारा॥**

हनुमान गुडघे टेकून बसला. जमिनीवर पडला नाही आणि मग तोल सांभाळून रागाने उठला. हनुमानाने रावणाला एक ठोसा मारला. तेव्हा वज्राच्या माऱ्यामुळे पर्वत खाली कोसळावा, त्याप्रमाणे रावण खाली पडला.॥ १॥

**मुरुछा गै बहोरि सो जागा। कपि बल बिपुल सराहन लागा॥**
**धिग धिग मम पौरुष धिग मोही। जौं तैं जिअत रहेसि सुरद्रोही॥**

मूर्च्छा दूर झाल्यावर रावण जागा झाला आणि हनुमानाच्या मोठ्या बळाची प्रशंसा करू लागला. मग हनुमान म्हणाला, 'माझ्या पौरुषाचा धिक्कार असो आणि माझाही धिक्कार असो. कारण हे देवद्रोह्या, तू अजुनी जिवंत राहिला आहेस.'॥ २ ॥

**अस कहि लछिमन कहुँ कपि ल्यायो । देखि दसानन बिसमय पायो ॥**

**कह रघुबीर समुझु जियँ भ्राता । तुम्ह कृतांत भच्छक सुर त्राता ॥**

असे म्हणून आणि लक्ष्मणास उचलून हनुमान श्रीरघुनाथांच्याजवळ घेऊन गेला. हे पाहून रावणाला आश्चर्य वाटले. श्रीरघुवीर लक्ष्मणाला म्हणाले, 'हे बंधू, लक्षात ठेव की, तू काळाचाही भक्षक आणि देवांचा रक्षक आहेस.'॥ ३ ॥

**सुनत बचन उठि बैठ कृपाला । गई गगन सो सकति कराला ॥**

**पुनि कोदंड बान गहि धाए । रिपु सन्मुख अति आतुर आए ॥**

हे ऐकताच कृपाळू लक्ष्मण उठून बसला. ती कराल शक्ती आकाशात निघून गेली. लक्ष्मण पुन्हा धनुष्यबाण घेऊन धावला आणि लगबगीने शत्रूसमोर उभा ठाकला. ॥ ४ ॥

छं०—**आतुर बहोरि बिभंजि स्यंदन सूत हति ब्याकुल कियो।**
**गिर्‍यो धरनि दसकंधर बिकलतर बान सत बेध्यो हियो॥**
**सारथी दूसर घालि रथ तेहि तुरत लंका लै गयो।**
**रघुबीर बंधु प्रताप पुंज बहोरि प्रभु चरनन्हि नयो॥**

मग त्याने मोठ्या झपाट्याने रावणाच्या रथाचा चुराडा केला आणि सारथ्याला मारून रावणाला व्याकूळ करून सोडले. शंभर बाणांनी त्याचे हृदय वेधले गेले होते. त्यामुळे रावण अत्यंत व्याकूळ होऊन खाली पडला. तेव्हा दुसऱ्या सारथ्याने त्याला रथात घालून पटकन लंकेत नेले. प्रतापाचा समूह असलेल्या श्रीरघुवीरांचा भाऊ लक्ष्मण परत येऊन प्रभूंच्या पाया पडला.

दो०—**उहाँ दसानन जागि करि करै लाग कछु जग्य।**
**राम बिरोध बिजय चह सठ हठ बस अति अग्य॥ ८४॥**

तिकडे लंकेत रावण मूर्च्छेतून जागा झाल्यावर एक यज्ञ करू लागला. तो मूर्ख आणि अत्यंत अज्ञानी हट्टाने श्रीरामांशी वैर धरून विजय प्राप्त करू इच्छित होता. ॥ ८४ ॥

**इहाँ बिभीषन सब सुधि पाई । सपदि जाइ रघुपतिहि सुनाई ॥**

**नाथ करइ रावन एक जागा । सिद्ध भएँ नहिं मरिहि अभागा ॥**

ही वार्ता इकडे बिभीषणाला मिळाली आणि लगेच जाऊन त्याने श्रीरघुनाथांना सांगितले की, 'हे नाथ, रावण एक यज्ञ करीत आहे. तो पूर्ण झाल्यास तो अभागी सहजपणे मरणार नाही. ॥ १ ॥

**पठवहु नाथ बेगि भट बंदर। करहिं बिधंस आव दसकंधर॥**
**प्रात होत प्रभु सुभट पठाए। हनुमदादि अंगद सब धाए॥**

हे नाथ, ताबडतोब वानर योद्ध्यांना पाठवा. यज्ञाचा विध्वंस त्यांनी करावा, त्यामुळे रावण युद्धासाठी येईल. प्रात:काळ होताच प्रभूंनी वीर योद्ध्यांना पाठविले. हनुमान व अंगद इत्यादी प्रमुख वीर पुढे धावले.॥ २॥

**कौतुक कूदि चढ़े कपि लंका। पैठे रावन भवन असंका॥**
**जग्य करत जबहीं सो देखा। सकल कपिन्ह भा क्रोध बिसेषा॥**

वानर सहजगत्या उड्या मारून लंकेवर चढले आणि निर्भय रावणाच्या महालात घुसले. रावणाला यज्ञ करीत असलेला पाहून सर्व वानरांना फार राग आला.॥ ३॥

**रन ते निलज भाजि गृह आवा। इहाँ आइ बक ध्यान लगावा॥**
**अस कहि अंगद मारा लाता। चितव न सठ स्वारथ मन राता॥**

ते म्हणाले, 'अरे निलाजऱ्या, रणभूमीतून घरी पळून आलास आणि येथे येऊन बगळ्यासारखे ध्यान करीत बसला आहेस?' असे म्हणून अंगदाने लाथ मारली. परंतु त्याने तिकडे लक्ष दिले नाही. त्या दुष्टाचे मन स्वार्थामध्ये मग्न झाले होते.॥ ४॥

छं०—**नहिं चितव जब करि कोप कपि गहि दसन लातन्ह मारहीं।**
**धरि केस नारि निकारि बाहेर तेऽतिदीन पुकारहीं॥**
**तब उठेउ क्रुद्ध कृतांत सम गहि चरन बानर डारई।**
**एहि बीच कपिन्ह बिधंस कृत मख देखि मन महुँ हारई॥**

जेव्हा त्याने पाहिले नाही, तेव्हा वानर क्रोधाने त्याला दातांनी चावून लाथांनी मारू लागले. त्यांनी स्त्रियांचे केस पकडून त्यांना घराबाहेर फरफटत आणले. त्या अत्यंत दीनवाण्या होऊन रडू लागल्या. तेव्हा रावण कालासारखा क्रुद्ध होऊन उठला आणि वानरांचे पाय पकडून त्यांना आपटू लागला. एवढ्या वेळात वानरांनी यज्ञाचा विध्वंस करून टाकला. हे पाहून रावण मनातून निराश झाला.

दो०—**जग्य बिधंसि कुसल कपि आए रघुपति पास।**
**चलेउ निसाचर क्रुद्ध होइ त्यागि जिवन कै आस॥ ८५॥**

यज्ञाचा विध्वंस करून सर्व रणकुशल वानर श्रीरघुनाथांच्या पाशी आले. तेव्हा रावणाने जीवनाची आशा सोडली आणि तो क्रुद्ध होऊन निघाला.॥ ८५॥

**चलत होहिं अति असुभ भयंकर। बैठहिं गीध उड़ाइ सिरन्ह पर॥**
**भयउ कालबस काहु न माना। कहेसि बजावहु जुद्ध निसाना॥**

जाते वेळी अत्यंत अपशकुन होऊ लागले. गिधाडे उठून त्याच्या डोक्यांवर फिरू लागली. परंतु तो आता काळाच्या जबड्यात होता, त्यामुळे तो कोणताही अपशकुन मानत नव्हता. तो म्हणाला, 'युद्धाचा डंका वाजवा.'॥ १ ॥

**चली तमीचर अनी अपारा। बहु गज रथ पदाति असवारा॥**
**प्रभु सन्मुख धाए खल कैसें। सलभ समूह अनल कहँ जैसें॥**

निशाचरांची अपार सेना निघाली. त्यामध्ये पुष्कळसे हत्ती, रथ, घोडेस्वार आणि पायदळ होते. ते दुष्ट प्रभूंच्यासमोर असे धावून गेले की, ज्याप्रमाणे पतंगांचे थवे मरण्यासाठी अग्नीवर धाव घेतात. ॥ २ ॥

**इहाँ देवतन्ह अस्तुति कीन्ही। दारुन बिपति हमहि एहिं दीन्ही॥**
**अब जनि राम खेलावहु एही। अतिसय दुखित होति बैदेही॥**

इकडे देव स्तुती करू लागले की, 'हे श्रीराम, याने आम्हांला भीषण दुःख दिले आहे. आता याला खेळवत बसू नका. जानकी फारच दुःखी आहे.'॥ ३ ॥

**देव बचन सुनि प्रभु मुसुकाना। उठि रघुबीर सुधारे बाना॥**
**जटा जूट दृढ़ बाँधें माथे। सोहहिं सुमन बीच बिच गाथे॥**

देवांचे बोलणे ऐकून प्रभू हसले. मग श्रीरघुवीरांनी उठून बाण सज्ज केले. मस्तकावरील जटांचा मुकुट चांगल्याप्रकारे बांधला. त्यामध्ये अधूनमधून माळलेली फुले शोभून दिसत होती. ॥ ४ ॥

**अरुन नयन बारिद तनु स्यामा। अखिल लोक लोचनाभिरामा॥**
**कटितट परिकर कस्यो निषंगा। कर कोदंड कठिन सारंगा॥**

ते लालसर नेत्र आणि मेघासारख्या श्याम शरीराचे आणि संपूर्ण लोकांना नेत्रांचा आनंद देणारे होते. प्रभूंनी शेला कमरेला बांधला, त्यात भाता खोचला, अणि हातात कठीण शार्ङ्ग धनुष्य घेतले. ॥ ५ ॥

छं०—**सारंग कर सुंदर निषंग सिलीमुखाकर कटि कस्यो।**
**भुजदंड पीन मनोहरायत उर धरासुर पद लस्यो॥**
**कह दास तुलसी जबहिं प्रभु सर चाप कर फेरन लगे।**
**ब्रह्मांड दिग्गज कमठ अहि महि सिंधु भूधर डगमगे॥**

प्रभूंनी हातात शार्ङ्ग धनुष्य घेऊन कमरेला अक्षय बाणांचा सुंदर भाता बांधला. त्यांचे भुजदंड पुष्ट होते आणि मनोहर विशाल छातीवर भृगू ऋषींचे चरण शोभत होते. तुलसीदास म्हणतात, प्रभू धनुष्यबाण हातात घेऊन फिरवू लागताच ब्रह्मांड, दिग्गज, कूर्म, शेष, पृथ्वी, समुद्र आणि पर्वत डगमगू लागले.

दो०—**सोभा देखि हरषि सुर बरषहिं सुमन अपार।**
**जय जय जय करुनानिधि छबि बल गुन आगार॥ ८६ ॥**

भगवंतांची शोभा पाहून देव आनंदित होऊन अपार फुलांचा वर्षाव करू लागले आणि 'शोभा, शक्ती आणि गुणांचे धाम असलेल्या करुणानिधान प्रभूंचा विजय असो, विजय असो, विजय असो,' असा घोष करू लागले. ॥ ८६ ॥

**एहीं बीच निसाचर अनी। कसमसात आई अति घनी॥**
**देखि चले सन्मुख कपि भट्टा। प्रलयकाल के जनु घन घट्टा॥**

एवढ्यात निशाचरांची अत्यंत विपुल सेना युद्धाच्या आवेशात आली. ती पाहून वानर योद्धे अशा प्रकारे समोर निघाले, जसे प्रलयकालातील मेघांचे समूह. ॥ १ ॥

**बहु कृपान तरवारि चमंकहिं। जनु दहँ दिसि दामिनीं दमंकहिं॥**
**गज रथ तुरग चिकार कठोरा। गर्जहिं मनहुँ बलाहक घोरा॥**

अनेक कृपाणे आणि तलवारी चमकत होत्या. वाटे, दाही दिशांना विजा चमकत आहेत. हत्ती, घोडे भयंकर चीत्कार करीत होते. रथांचा गडगडाट चालू होता. असे वाटे की, जणू मेघ भयंकर गर्जना करीत आहेत. ॥ २ ॥

**कपि लंगूर बिपुल नभ छाए। मनहुँ इंद्रधनु उए सुहाए॥**
**उठइ धूरि मानहुँ जलधारा। बान बुंद भै बृष्टि अपारा॥**

वानरांच्या खूप शेपट्या आकाशात पसरल्या होत्या. त्या सुंदर इंद्रधनुष्य प्रकटल्याप्रमाणे शोभून दिसत होत्या. जलधारांप्रमाणे धूळ उडत होती आणि बाणरूपी थेंबांची अपार वृष्टी होत होती. ॥ ३ ॥

**दुहुँ दिसि पर्बत करहिं प्रहारा। बज्रपात जनु बारहिं बारा॥**
**रघुपति कोपि बान झरि लाई। घायल भै निसिचर समुदाई॥**

दोन्ही बाजूंचे योद्धे पर्वतांचा प्रहार करीत होते. जणू वारंवार वज्रपात होत होता. श्रीरघुनाथांनी रागाने बाणांचा वर्षाव केला. त्यामुळे राक्षसांची सेना घायाळ झाली. ॥ ४ ॥

**लागत बान बीर चिक्करहीं। घुर्मि घुर्मि जहँ तहँ महि परहीं॥**
**स्त्रवहिं सैल जनु निर्झर भारी। सोनित सरि कादर भयकारी॥**

बाण लागताच वीर चीत्कार करीत होते आणि चक्कर येऊन पृथ्वीवर अस्ताव्यस्त पडत होते. त्यांच्या शरीरांतून रक्त असे वाहात होते की, जणू पर्वतातील मोठ्या झऱ्यांतून पाणी वाहात असावे. अशा प्रकारे भित्र्यांना भीती उत्पन्न करणारी रक्ताची नदी वाहात होती. ॥ ५ ॥

**छं०—कादर भयंकर रुधिर सरिता चली परम अपावनी।**
**दोउ कूल दल रथ रेत चक्र अबर्त बहति भयावनी॥**
**जलजंतु गज पदचर तुरग खर बिबिध बाहन को गने।**
**सर सक्ति तोमर सर्प चाप तरंग चर्म कमठ घने॥**

भित्र्यांना भीती उत्पन्न करणारी अत्यंत अपवित्र अशी रक्ताची नदी वाहू लागली. दोन्ही पक्ष तिच्या दोन्ही तटांवर होते. रथ हे वाळू होते आणि त्यांची चाके नदीतील भोवरे होते. ती नदी फार भयानक होऊन वाहात होती. हत्ती, पायदळ, घोडे, गाढवे आणि इतर अनेक वाहने हे नदीतील जलजंतू होते. त्यांची गणना कोण करणार? बाण, शक्ती आणि तोमर हे सर्प होते, धनुष्ये ही नदीतील तरंग होते आणि ढाली या पुष्कळशी कासवे होत्या.

दो०—**बीर परहिं जनु तीर तरु मज्जा बहु बह फेन।**
**कादर देखि डरहिं तहँ सुभटन्ह के मन चेन॥ ८७॥**

वीर पृथ्वीवर असे पडत होते की, जणू नदीकिनाऱ्याचे वृक्ष कोसळत होते. खूपशी मज्जा वाहात होती, ती फेस होती. भित्र्यांना ते पाहून भीती वाटत होती, तर उत्तम योद्ध्यांना मनात आनंद वाटत होता. ॥ ८७॥

**मज्जहिं भूत पिसाच बेताला। प्रमथ महा झोटिंग कराला॥**
**काक कंक लै भुजा उड़ाहीं। एक ते छीनि एक लै खाहीं॥**

भूत, पिशाच आणि वेताळ, मोठमोठ्या झिंज्या असलेले भयंकर झोटिंग व शिवगण त्या नदीत स्नान करीत होते. कावळे व घारी या तुटलेल्या भुजा घेऊन उडत होते आणि एक दुसऱ्याकडून हिसकावून घेऊन खात होते. ॥ १॥

**एक कहहिं ऐसिउ सौंघाई। सठहु तुम्हार दरिद्र न जाई॥**
**कहँरत भट घायल तट गिरे। जहँ तहँ मनहुँ अर्धजल परे॥**

कोणी म्हणे, 'अरे मूर्खांनो, असले स्वस्त चिक्कार मिळते, तरीही तुमचा हावरटपणा जात नाही?' घायाळ योद्धे किनाऱ्यावर पडून विव्हळत होते. ज्याप्रमाणे मरणाऱ्या व्यक्तीला अर्ध्या पाण्यात ठेवतात, त्याप्रमाणे ते रक्तात पडले होते. ॥ २॥

**खैंचहिं गीध आँत तट भए। जनु बंसी खेलत चित दए॥**
**बहु भट बहहिं चढ़े खग जाहीं। जनु नावरि खेलहिं सरि माहीं॥**

गिधाडे आतडी ओढत होती, जणू मासेमार नदी-तटी लक्षपूर्वक काटा टाकून बसले होते. पुष्कळसे योद्धे वाहून जात होते आणि पक्षी त्यांच्यावर जाऊन बसत होते, जणू ते नदीमध्ये नौका-विहार करीत होते. ॥ ३॥

**जोगिनि भरि भरि खप्पर संचहिं। भूत पिसाच बधू नभ नंचहिं॥**
**भट कपाल करताल बजावहिं। चामुंडा नाना बिधि गावहिं॥**

योगिनी कवट्यांमध्ये रक्त जमा करीत होत्या. भूत-पिशाचांच्या बायका आकाशात नाचत होत्या. चामुंडा योद्ध्यांच्या कवट्या घेऊन वाजवीत होत्या आणि नाना प्रकारे गात होत्या. ॥ ४॥

**जंबुक निकर कटक्कट कट्टहिं। खाहिं हुआहिं अघाहिं दपट्टहिं॥**
**कोटिन्ह रुंड मुंड बिनु डोल्लहिं। सीस परे महि जय जय बोल्लहिं॥**

कोल्ह्यांचे कळप कटकट असा आवाज करीत, मुडद्यांचे लचके तोडून खात होते व कोल्हेकुई करीत होते आणि पोट भरल्यावर एकमेकांवर गुरगुरत होते. कोट्यवधी धडे शिरांविना फिरत होती आणि पृथ्वीवर पडलेली मुंडकी 'जय जय' म्हणत होती. ॥ ५ ॥

**छं०—बोल्लहिं जो जय जय मुंड रुंड प्रचंड सिर बिनु धावहीं।**
**खप्परिन्ह खग्ग अलुज्झि जुज्झहिं सुभट भटन्ह ढहावहीं॥**
**बानर निसाचर निकर मर्दहिं राम बल दर्पित भए।**
**संग्राम अंगन सुभट सोवहिं राम सर निकरन्हि हए॥**

मुंडकी जयजय बोलत होती आणि प्रचंड धडे शिराविना धावत होती. पक्षी कवट्यांसाठी परस्पर लढत व मरत होते. चांगले योद्धे दुसऱ्या योद्ध्यांना खाली पाडत होते, श्रीरामांच्या बळावर गर्व करणारे वानर राक्षसांच्या झुंडी चिरडून टाकत होते. श्रीरामांच्या बाणांच्या माऱ्याने मेलेले योद्धे रणभूमीत चिरनिद्रा घेत होते.

**दो०—रावन हृदयँ बिचारा भा निसिचर संघार।**
**मैं अकेल कपि भालु बहु माया करौं अपार॥ ८८॥**

रावणाने विचार केला की, राक्षसांचा नाश झाला आहे आणि मी एकटा उरलो आहे. वानर व अस्वले खूप आहेत, म्हणून आपण आता मोठी माया करावी. ॥ ८८ ॥

**देवन्ह प्रभुहि पयादें देखा। उपजा उर अति छोभ बिसेषा॥**
**सुरपति निज रथ तुरत पठावा। हरष सहित मातलि लै आवा॥**

देवांनी पाहिले की, श्रीरामचंद्र पायी युद्ध करीत आहेत, तेव्हा त्यांना मनातून दुःख झाले. मग इंद्राने त्वरित आपला रथ पाठविला. त्याचा सारथी मातली हा मोठ्या आनंदाने रथ घेऊन आला. ॥ १ ॥

**तेज पुंज रथ दिब्य अनूपा। हरषि चढ़े कोसलपुर भूपा॥**
**चंचल तुरग मनोहर चारी। अजर अमर मन सम गतिकारी॥**

त्या दिव्य, अनुपम आणि तेजोमय रथावर कोसलपुरीचे राजे श्रीरामचंद्र आनंदाने चढले. त्याला चार चपळ, मनोहर, अजर, अमर आणि मनाच्या वेगाने चालणारे देवलोकीचे घोडे जुंपले होते. ॥ २ ॥

**रथारूढ़ रघुनाथहि देखी। धाए कपि बलु पाइ बिसेषी॥**
**सही न जाइ कपिन्ह कै मारी। तब रावन माया बिस्तारी॥**

श्रीरघुनाथ रथावर आरूढ झालेले पाहून वानरांना अधिक बळ आले व ते धावले. वानरांचा मारा सहन होत नव्हता. तेव्हा रावणाने माया केली. ॥ ३ ॥

**सो माया रघुबीरहि बाँची। लछिमन कपिन्ह सो मानी साँची॥**
**देखी कपिन्ह निसाचर अनी। अनुज सहित बहु कोसलधनी॥**

फक्त श्रीरघुनाथांवर तिचा परिणाम झाला नाही. सर्व वानर व लक्ष्मण यांना ती माया खरी वाटली. वानरांना राक्षसांच्या सेनेमध्ये लक्ष्मणासह अनेक राम दिसू लागले. ॥ ४ ॥

**छं०—बहु राम लछिमन देखि मर्कट भालु मन अति अपडरे।**
**जनु चित्र लिखित समेत लछिमन जहँ सो तहँ चितवहिं खरे॥**
**निज सेन चकित बिलोकि हँसि सर चाप सजि कोसलधनी।**
**माया हरी हरि निमिष महुँ हरषी सकल मर्कट अनी॥**

बरेच राम-लक्ष्मण पाहून वानर व अस्वले घाबरली. मायेमुळे लक्ष्मणासह सारी सेना चित्रात रेखाटल्याप्रमाणे स्तब्ध उभी राहिल्यासारखी दिसू लागली. आपली सेना भयभीत झालेली पाहून दु:खांचे हरण करणाऱ्या भगवान श्रीहरींनी धनुष्यावर बाण चढवून क्षणात सर्व माया हरण केली. तेव्हा वानरांची सारी सेना आनंदून गेली.

**दो०—बहुरि राम सब तन चितइ बोले बचन गँभीर।**
**द्वंदजुद्ध देखहु सकल श्रमित भए अति बीर॥ ८९॥**

मग श्रीराम सर्वांकडे पाहात गंभीरपणे म्हणाले, 'हे वीरांनो, तुम्ही सर्वजण थकून गेला आहात, म्हणून आता माझे व रावणाचे द्वन्द्वयुद्ध पाहा.' ॥ ८९ ॥

**अस कहि रथ रघुनाथ चलावा। बिप्र चरन पंकज सिरु नावा॥**
**तब लंकेस क्रोध उर छावा। गर्जत तर्जत सन्मुख धावा॥**

असे म्हणून श्रीरामांनी ब्राह्मणांच्या चरणी नमन करून आपला रथ हाकला. तेव्हा रावणाच्या मनात क्रोध संचारला आणि तो गर्जना करीत व आव्हान देत समोर धावून आला. ॥ १ ॥

**जीतेहु जे भट संजुग माहीं। सुनु तापस मैं तिन्ह सम नाहीं॥**
**रावन नाम जगत जस जाना। लोकप जाकें बंदीखाना॥**

तो म्हणाला, 'अरे तपस्व्या, ऐक. तू युद्धामध्ये ज्या योद्ध्यांना जिंकलेस, त्यांच्यासारखा मी नाही. माझे नाव रावण आहे. माझी कीर्ती संपूर्ण जगाला माहीत आहे. लोकपालसुद्धा माझ्या कैदखान्यात पडलेले आहेत. ॥ २ ॥

**खर दूषन बिराध तुम्ह मारा। बधेहु ब्याध इव बालि बिचारा॥**
**निसिचर निकर सुभट संघारेहु। कुंभकरन घननादहि मारेहु॥**

तू खर, दूषण व विराध यांना मारलेस. बिचाऱ्या बालीचा व्याधाप्रमाणे वध केलास. तसेच मोठमोठ्या योद्ध्यांच्या समूहाचा संहार केलास आणि कुंभकर्ण व मेघनादालाही मारलेस. ॥ ३ ॥

**आजु बयरु सबु लेउँ निबाही। जौं रन भूप भाजि नहिं जाही॥**
**आजु करउँ खलु काल हवाले। परेहु कठिन रावन के पाले॥**

अरे राजा, जर तू युद्धातून पळून गेला नाहीस, तर आज मी सर्व वैर चुकते करीन. आज मी तुला नक्कीच काळाच्या हाती सोपवीन. अजिंक्य रावणाशी तुझा सामना आहे.'॥ ४॥

**सुनि दुर्बचन कालबस जाना। बिहँसि बचन कह कृपानिधाना॥**
**सत्य सत्य सब तव प्रभुताई। जल्पसि जनि देखाउ मनुसाई॥**

रावणाची दुर्वचने ऐकून आणि तो कालवश झाला आहे, असे समजून श्रीराम हसत म्हणाले, 'तुझा सर्व मोठेपणा तू म्हणतोस, त्याप्रमाणे खरा आहे. परंतु आता फुकटची बडबड करू नकोस. आपला पुरुषार्थ दाखव.॥ ५॥

छं०—**जनि जल्पना करि सुजसु नासहि नीति सुनहि करहि छमा।**
**संसार महँ पूरुष त्रिबिध पाटल रसाल पनस समा॥**
**एक सुमनप्रद एक सुमन फल एक फलइ केवल लागहीं।**
**एक कहहिं कहहिं करहिं अपर एक करहिं कहत न बागहीं॥**

फुकटची बडबड करून आपली सुंदर कीर्ती घालवू नकोस. क्षमा कर. तुला नीती काय ती सांगतो. जगात तीन प्रकारचे पुरुष असतात-गुलाब, आंबा आणि फणसासारखे. पहिला गुलाब हा फुले देतो, दुसरा आंबा फुले व फळे देतो आणि तिसरा फणस फक्त फळे देतो. अशा प्रकारे पुरुषांमध्ये काही बोलतात, पण करत काही नाहीत. दुसरे बोलतात आणि करतात सुद्धा आणि तिसरे फक्त करतात, परंतु बोलून दाखवीत नाहीत.'

दो०—**राम बचन सुनि बिहँसा मोहि सिखावत ग्यान।**
**बयरु करत नहिं तब डरे अब लागे प्रिय प्रान॥ ९०॥**

श्रीरामांचे बोलणे ऐकून तो मोठ्याने हसून म्हणाला, 'मला शिकवतोस? माझ्याशी वैर करताना भ्याला नाहीस आणि आता जीव प्रिय वाटू लागला?'॥ ९०॥

**कहि दुर्बचन क्रुद्ध दसकंधर। कुलिस समान लाग छाँड़ै सर॥**
**नानाकार सिलीमुख धाए। दिसि अरु बिदिसि गगन महि छाए॥**

रावण असे टोचून बोलत क्रुद्ध होऊन वज्रासारखे बाण सोडू लागला. अनेक प्रकारचे बाण धावू लागले आणि ते दिशा, विदिशा आणि आकाश व पृथ्वी सर्वत्र पसरले.॥ १॥

**पावक सर छाँड़ेउ रघुबीरा। छन महुँ जरे निसाचर तीरा॥**
**छाड़िसि तीब्र सक्ति खिसिआई। बान संग प्रभु फेरि चलाई॥**

श्रीरघुवीरांनी अग्निबाण सोडला, त्यामुळे रावणाचे सर्व बाण क्षणात भस्म झाले. तेव्हा त्याने चिडून तीव्र शक्ती सोडली, परंतु श्रीरामचंद्रांनी एका बाणासरशी ती परतून लावली.॥ २॥

**कोटिन्ह चक्र त्रिसूल पबारै। बिनु प्रयास प्रभु काटि निवारै॥**
**निफल होहिं रावन सर कैसें। खल के सकल मनोरथ जैसें॥**

तो कोट्यवधी चक्रे व त्रिशूल टाकू लागला. परंतु प्रभू ते विनायास तोडून दूर करीत होते. रावणाचे बाण दुष्ट माणसाच्या सर्व मनोरथांप्रमाणे निष्फळ होत होते.॥ ३॥

**तब सत बान सारथी मारेसि। परेउ भूमि जय राम पुकारेसि॥**
**राम कृपा करि सूत उठावा। तब प्रभु परम क्रोध कहुँ पावा॥**

तेव्हा त्याने श्रीरामाच्या सारथ्याला शंभर बाण मारले. तो 'श्रीरामांचा विजय असो.' असे म्हणत खाली पडला. श्रीरामांनी कृपा करून त्याला उठविले. तेव्हा प्रभू फार क्रोधित झाले.॥ ४॥

छं०—**भए क्रुद्ध जुद्ध बिरुद्ध रघुपति त्रोन सायक कसमसे।**
**कोदंड धुनि अति चंड सुनि मनुजाद सब मारुत ग्रसे॥**
**मंदोदरी उर कंप कंपति कमठ भू भूधर त्रसे।**
**चिक्करहिं दिग्गज दसन गहि महि देखि कौतुक सुर हँसे॥**

जेव्हा श्रीराम शत्रूविरुद्ध क्रुद्ध झाले, तेव्हा भात्यातील बाण बाहेर पडण्यासाठी चुळबुळू लागले. त्यांच्या धनुष्याचा अत्यंत प्रचंड टणत्कार ऐकून मनुष्यभक्षी सर्व राक्षस भयग्रस्त झाले. मंदोदरीच्या हृदयाचा थरकाप झाला. समुद्र, कासव, पृथ्वी आणि पर्वत घाबरले. दिग्गज पृथ्वीला दातांनी पकडून चीत्कार करू लागले. हे कौतुक पाहून देव हसू लागले.

दो०—**तानेउ चाप श्रवन लगि छाँड़े बिसिख कराल।**
**राम मारगन गन चले लहलहात जनु ब्याल॥ ९१॥**

धनुष्याला कानापर्यंत खेचून श्रीरामचंद्रांनी भयंकर बाण सोडले. श्रीरामांचे बाणसमूह असे निघाले की, जणू सर्प सळसळत जात असावेत.॥ ९१॥

**चले बान सपच्छ जनु उरगा। प्रथमहिं हतेउ सारथी तुरगा॥**
**रथ बिभंजि हति केतु पताका। गर्जा अति अंतर बल थाका॥**

बाण पंखधारी सर्पाप्रमाणे उडत होते. त्यांनी प्रथम रावणाच्या सारथ्याला आणि घोड्यांना मारले. मग रथाचा चुराडा करून ध्वजा आणि पताका खाली पाडल्या. तेव्हा रावणाने मोठ्याने गर्जना केली, परंतु आतून त्याचे बळ क्षीण झाले होते.॥ १॥

**तुरत आन रथ चढ़ि खिसिआना। अस्त्र सस्त्र छाँड़ेसि बिधि नाना॥**
**बिफल होहिं सब उद्यम ताके। जिमि परद्रोह निरत मनसा के॥**

लगेच त्याने दुसऱ्या रथावर चढून नाना प्रकारची शस्त्रास्त्रे चिडून मारली. परंतु त्याचे सर्व प्रयत्न निष्फळ होत होते. ज्याप्रमाणे परद्रोहाचा विचार करीत राहणाऱ्या माणसाचे प्रयत्न निष्फळ ठरतात. ॥ २ ॥

**तब रावन दस सूल चलावा। बाजि चारि महि मारि गिरावा॥**
**तुरग उठाइ कोपि रघुनायक। खैंचि सरासन छाँड़े सायक॥**

तेव्हा रावणाने दहा त्रिशूळ सोडले आणि श्रीरामांचे चारी घोडे खाली पाडले. घोड्यांना उठवून श्रीरामांनी क्रोधाने धनुष्य ओढून बाण सोडले. ॥ ३ ॥

**रावन सिर सरोज बनचारी। चलि रघुबीर सिलीमुख धारी॥**
**दस दस बान भाल दस मारे। निसरि गए चले रुधिर पनारे॥**

श्रीरामांचे बाण रावणाच्या शिररूपी कमलवनात फिरणाऱ्या भ्रमरावलीप्रमाणे निघाले. श्रीरामचंद्रांनी त्याच्या दाही शिरांवर दहा-दहा बाण मारले, ते आरपार गेले आणि शिरांतून रक्ताचे पाट वाहू लागले. ॥ ४ ॥

**स्रवत रुधिर धायउ बलवाना। प्रभु पुनि कृत धनु सर संधाना॥**
**तीस तीर रघुबीर पबारे। भुजन्हि समेत सीस महि पारे॥**

रक्त वाहात असतानाच बलवान रावण धावला. प्रभूंनी पुन्हा धनुष्यावर बाण लावून तीस बाण मारले आणि वीसही भुजांबरोबर दाही शिरे कापून टाकली. ॥ ५ ॥

**काटतहीं पुनि भए नबीने। राम बहोरि भुजा सिर छीने॥**
**प्रभु बहु बार बाहु सिर हए। कटत झटिति पुनि नूतन भए॥**

हात व शिरे कापली जाताच पुन्हा नव्याने उगवली. श्रीरामांनी पुन्हा भुजा व शिरे कापून टाकली. अशा प्रकारे प्रभूंनी अनेक वेळा भुजा व शिरे तोडली, परंतु तोडली जाताच ती पुन्हा नव्याने उत्पन्न झाली. ॥ ६ ॥

**पुनि पुनि प्रभु काटत भुज सीसा। अति कौतुकी कोसलाधीसा॥**
**रहे छाइ नभ सिर अरु बाहू। मानहुँ अमित केतु अरु राहू॥**

प्रभू वारंवार रावणाचे हात व शिरे कापत होते, कारण कोसलपती श्रीराम मोठे कौतुक करून दाखविणारे होते. आकाशात असंख्य केतू व राहूंप्रमाणे तुटलेल्या भुजा व मुंडकी पसरली होती. ॥ ७ ॥

**छं०—जनु राहु केतु अनेक नभ पथ स्रवत सोनित धावहीं।**
**रघुबीर तीर प्रचंड लागहिं भूमि गिरन न पावहीं॥**
**एक एक सर सिर निकर छेदे नभ उड़त इमि सोहहीं।**
**जनु कोपि दिनकर कर निकर जहँ तहँ बिधुंतुद पोहहीं॥**

जणू अनेक राहू व केतू रक्त वाहावत आकाशमार्गाने धावत होते. रघुवीरांचे प्रचंड बाण वारंवार लागत असल्यामुळे ते पृथ्वीवर पडू शकत नव्हते. एकेका बाणाने समूहाच्या समूह तुटलेली मस्तके अशी वाटत होती की, जणू सूर्यकिरणे क्रोधाने सर्वत्र राहूंना एका माळेत ओवत असावीत.

**दो०—जिमि जिमि प्रभु हर तासु सिर तिमि तिमि होहिं अपार।**
**सेवत बिषय बिबर्ध जिमि नित नित नूतन मार॥ ९२॥**

जसजसे प्रभू रावणाची डोकी कापत होते, तसतशी ती असंख्य होत होती. ज्याप्रमाणे विषयांचे सेवन केल्याने भोगांची इच्छा दिवसेंदिवस नव्याने वाढत जाते, त्याप्रमाणे.॥ ९२॥

**दसमुख देखि सिरन्ह कै बाढ़ी। बिसरा मरन भई रिस गाढ़ी॥**
**गर्जेउ मूढ़ महा अभिमानी। धायउ दसहु सरासन तानी॥**

शिरांची संख्या वाढत चाललेली पाहून रावण आपले मरण विसरून गेला आणि अत्यंत क्रुद्ध झाला. त्या महाअभिमानी मूर्खाने गर्जना केली आणि दहा धनुष्ये खेचून तो धावून गेला.॥ १॥

**समर भूमि दसकंधर कोप्यो। बरषि बान रघुपति रथ तोप्यो॥**
**दंड एक रथ देखि न परेऊ। जनु निहार महुँ दिनकर दुरेऊ॥**

रणभूमीमध्ये रावणाने अत्यंत क्रोधाने बाणांचा मारा करून श्रीरामांचा रथ झाकून टाकला. एक घटकाभर रथ दिसेनासा झाला, जणू धुक्यामध्ये सूर्य लपून गेला.॥ २॥

**हाहाकार सुरन्ह जब कीन्हा। तब प्रभु कोपि कारमुक लीन्हा॥**
**सर निवारि रिपु के सिर काटे। ते दिसि बिदिसि गगन महि पाटे॥**

जेव्हा देवांनी हाहाकार केला, तेव्हा प्रभूंनी रागाने धनुष्य उचलले आणि शत्रूचे बाण बाजूला सारून शत्रूची शिरे उडवली आणि त्यांनी दिशा, विदिशा, आकाश व पृथ्वी भरून टाकली.॥ ३॥

**काटे सिर नभ मारग धावहिं। जय जय धुनि करि भय उपजावहिं॥**
**कहँ लछिमन सुग्रीव कपीसा। कहँ रघुबीर कोसलाधीसा॥**

कापलेली शिरे आकाशात धावत होती आणि 'जय-जय' असे म्हणत भय उत्पन्न करीत होती. 'लक्ष्मण व सुग्रीव कुठे आहे? कोसलपती रघुवीर कुठे आहे?'॥ ४॥

**छं०—कहँ रामु कहि सिर निकर धाए देखि मर्कट भजि चले।**
**संधानि धनु रघुबंसमनि हँसि सरन्हि सिर बेधे भले॥**
**सिर मालिका कर कालिका गहि बृंद बृंदन्हि बहु मिलीं।**
**करि रुधिर सरि मज्जनु मनहुँ संग्राम बट पूजन चलीं॥**

'राम कुठे आहे' असे म्हणत शिरांच्या झुंडी धावत होत्या. त्यांना पाहून वानर पळून गेले. तेव्हा धनुष्य सज्ज करून रघुकुलमणी श्रीरामांनी हसत हसत बाणांनी त्या शिरांना पूर्णपणे वेधून टाकले. हातांमध्ये मुंड-माळा घेऊन कालिका अनेक सख्यांच्या झुंडीच्या झुंडी घेऊन त्या रक्ताच्या नदीमध्ये स्नान करू लागली. जणू संग्रामरूपी वटवृक्षाची पूजा करण्यास ती निघाली होती.

**दो०—पुनि दसकंठ क्रुद्ध होइ छाँड़ी सक्ति प्रचंड।**
**चली बिभीषन सन्मुख मनहुँ काल कर दंड॥ ९३॥**

नंतर रावणाने क्रुद्ध होऊन प्रचंड शक्ती सोडली. ती बिभीषणासमोर अशी निघाली की, जणू काळाचा दंड. ॥ ९३ ॥

**आवत देखि सक्ति अति घोरा। प्रनतारति भंजन पन मोरा॥**
**तुरत बिभीषन पाछें मेला। सन्मुख राम सहेउ सोइ सेला॥**

अत्यंत भयानक शक्ती येत आहे, असे श्रीरामांनी पाहिले. त्यांनी विचार केला की, शरणागताचे दु:ख दूर करणे हे माझे ब्रीद आहे. त्यांनी त्वरित बिभीषणाला पाठीशी घातले आणि समोर होऊन ती शक्ती स्वत: झेलली. ॥ १ ॥

**लागि सक्ति मुरुछा कछु भई। प्रभु कृत खेल सुरन्ह बिकलई॥**
**देखि बिभीषन प्रभु श्रम पायो। गहि कर गदा क्रुद्ध होइ धायो॥**

शक्ती लागल्यामुळे त्यांना थोडीशी मूर्च्छा आली. प्रभूंनी ही लीला करून दाखविली, परंतु देव व्याकूळ झाले. प्रभूंना त्रास झाल्याचे पाहून बिभीषण रागाने हातात गदा घेऊन धावला. ॥ २ ॥

**रे कुभाग्य सठ मंद कुबुद्धे। तैं सुर नर मुनि नाग बिरुद्धे॥**
**सादर सिव कहुँ सीस चढ़ाए। एक एक के कोटिन्ह पाए॥**

आणि म्हणाला, 'अरे अभाग्या, मूर्ख, नीच व दुर्बुद्धीच्या, तू देव, मनुष्य, मुनी, नाग या सर्वांशी वैर केलेस. तू मोठ्या आदराने शिवांना आपली शिरे अर्पण केलीस. त्यामुळे एकेकाच्या बदल्यात कोट्यवधी शिरे तुला मिळाली. ॥ ३ ॥

**तेहि कारन खल अब लगि बाँच्यो। अब तव कालु सीस पर नाच्यो॥**
**राम बिमुख सठ चहसि संपदा। अस कहि हनेसि माझ उर गदा॥**

अरे दुष्टा, त्यामुळे तू आत्तापर्यंत वाचलास. आता मृत्यू तुझ्या डोक्यावर नाचत आहे. अरे मूर्खा, तू रामविमुख होऊन तुला सुख हवे काय?' असे म्हणून बिभीषणाने रावणाच्या छातीच्या ठीक मध्यभागी गदा मारली. ॥ ४ ॥

**छं०—उर माझ गदा प्रहार घोर कठोर लागत महि पर्‍यो।**
**दस बदन सोनित स्त्रवत पुनि संभारि धायो रिस भर्‍यो॥**

**द्वौ भिरे अतिबल मल्लजुद्ध बिरुद्ध एकु एकहि हनै।**
**रघुबीर बल दर्पित बिभीषनु घालि नहिं ता कहुँ गनै॥**

छातीच्या मध्यभागी कठोर गदेचा प्रहार होताच तो पृथ्वीवर पडला. त्याच्या दाही मुखांतून रक्त वाहू लागले. स्वत:ला सावरून तो रागाने धावला. दोन्ही अत्यंत बलवान योद्धे भिडले आणि मल्लयुद्धामध्ये एक दुसऱ्याला मारू लागले. श्रीरघुवीरांच्या बळाच्या पाठिंब्यामुळे गर्वाने बिभीषणाने रावणाला कस्पटाएवढेही मानले नाही.

दो०—**उमा बिभीषनु रावनहि सन्मुख चितव कि काउ।**
**सो अब भिरत काल ज्यों श्रीरघुबीर प्रभाउ॥ ९४॥**

शिव म्हणतात, 'हे उमे, बिभीषण कधी रावणापुढे डोळे वर करून तरी पाहू शकत होता काय?' परंतु आता तोच काळाप्रमाणे त्याच्याशी भिडला होता. हा श्रीरघुवीरांचाच प्रभाव होय.॥ ९४॥

**देखा श्रमित बिभीषनु भारी। धायउ हनूमान गिरि धारी॥**
**रथ तुरंग सारथी निपाता। हृदय माझ तेहि मारेसि लाता॥**

बिभीषण फार थकला आहे, असे पाहून हनुमान पर्वत उचलून धावून गेला. त्याने त्या पर्वताने रावणाचा रथ, घोडे आणि सारथी यांचा संहार केला आणि त्याच्या छातीवर लाथ मारली.॥ १॥

**ठाढ़ रहा अति कंपित गाता। गयउ बिभीषनु जहँ जनत्राता॥**
**पुनि रावन कपि हतेउ पचारी। चलेउ गगन कपि पूँछ पसारी॥**

रावण उभा राहिला, परंतु त्याचे शरीर अत्यंत थरथरू लागले होते. बिभीषण श्रीरामांच्यापाशी गेला. मग रावणाने आव्हान देत हनुमानाला मारले. तो शेपटी पसरून आकाशात निघून गेला.॥ २॥

**गहिसि पूँछ कपि सहित उड़ाना। पुनि फिरि भिरेउ प्रबल हनुमाना॥**
**लरत अकास जुगल सम जोधा। एकहि एकु हनत करि क्रोधा॥**

रावणाने त्याची शेपटी धरली, तेव्हा हनुमान त्याला घेऊनच वर उडाला. मग मागे वळून महाबलवान हनुमान त्याच्याशी भिडला. दोघे समसमान योद्धे लढत-लढत एक दुसऱ्याला रागाने मारू लागले.॥ ३॥

**सोहहिं नभ छल बल बहु करहीं। कज्जलगिरि सुमेरु जनु लरहीं॥**
**बुधि बल निसिचर परइ न पार्‍यो। तब मारुतसुत प्रभु संभार्‍यो॥**

दोघेही बळाचा व कपटाचा वापर करीत आकाशात असे शोभून दिसत होते की, जणू काजळाचा पर्वत हा सुमेरू पर्वताशी लढत आहे. जेव्हा बुद्धि-चातुर्याने आणि बळाने राक्षस काही पडेना, तेव्हा हनुमानाने प्रभूंचे स्मरण केले.॥ ४॥

छं०—**संभारि श्रीरघुबीर धीर पचारि कपि रावनु हन्यो।**
**महि परत पुनि उठि लरत देवन्ह जुगल कहुँ जय जय भन्यो॥**
**हनुमंत संकट देखि मर्कट भालु क्रोधातुर चले।**
**रन मत्त रावन सकल सुभट प्रचंड भुज बल दलमले॥**

श्रीरघुवीरांचे स्मरण करताच धीर हनुमानाने आव्हान देऊन रावणाला मारले. ते दोघे जमिनीवर पडत होते आणि पुन्हा उठून लढत होते. देवांनी दोघांचा ‘जयजयकार’ केला. हनुमानावर संकट आलेले पाहून वानर व अस्वले क्रोधातुर होऊन धावली. परंतु युद्धाच्या मदाने मातलेल्या रावणाने सर्व योद्ध्यांना आपल्या प्रचंड बाहुबलाने तुडविले व चिरडले.

दो०—**तब रघुबीर पचारे धाए कीस प्रचंड।**
**कपि बल प्रबल देखि तेहिं कीन्ह प्रगट पाषंड॥ ९५॥**

नंतर श्रीरामचंद्रांनी हाक दिल्यावर प्रचंड वानर धावले. वानरांची प्रबळ सेना पाहून रावणाने माया केली.॥ ९५॥

**अंतरधान भयउ छन एका। पुनि प्रगटे खल रूप अनेका॥**
**रघुपति कटक भालु कपि जेते। जहँ तहँ प्रगट दसानन तेते॥**

क्षणभर तो अदृश्य झाला. नंतर त्या दुष्टाने आपली अनेक रूपे प्रकट केली. श्रीरघुनाथांच्या सेनेमध्ये जितके वानर व अस्वले होती, तितकेच रावण चोहीकडे प्रकट झाले.॥ १॥

**देखे कपिन्ह अमित दससीसा। जहँ तहँ भजे भालु अरु कीसा॥**
**भागे बानर धरहिं न धीरा। त्राहि त्राहि लछिमन रघुबीरा॥**

वानरांनी असंख्य रावण पाहिले. तेव्हा अस्वले व वानर जिकडे-तिकडे पळू लागले. वानरांचा धीर खचला. ‘हे लक्ष्मणा! हे रघुवीरा! वाचवा, वाचवा,’ म्हणत ते पळत सुटले.॥ २॥

**दहँ दिसि धावहिं कोटिन्ह रावन। गर्जहिं घोर कठोर भयावन॥**
**डरे सकल सुर चले पराई। जय कै आस तजहु अब भाई॥**

दाही दिशांना कोट्यवधी रावण धावत भयंकर गर्जना करीत होते. ते पाहून सर्व देव घाबरून म्हणू लागले की, ‘अहो, आता जयाची आशा सोडून द्या.’ असे म्हणत पळून गेले.॥ ३॥

**सब सुर जिते एक दसकंधर। अब बहु भए तकहु गिरि कंदर॥**
**रहे बिरंचि संभु मुनि ग्यानी। जिन्ह जिन्ह प्रभु महिमा कछु जानी॥**

‘एकाच रावणाने सर्व देवांना जिंकून घेतले होते, आता तर पुष्कळ रावण झाले. त्यामुळे आता

पर्वतांचा आश्रय घेऊन लपून राहा.' तेथे केवळ ब्रह्मदेव, शंभू व ज्ञानी मुनी निर्भय राहिले, कारण त्यांना प्रभूंचा महिमा माहीत होता. ॥ ४ ॥

**छं०—जाना प्रताप ते रहे निर्भय कपिन्ह रिपु माने फुरे।**
**चले बिचलि मर्कट भालु सकल कृपाल पाहि भयातुरे॥**
**हनुमंत अंगद नील नल अतिबल लरत रन बाँकुरे।**
**मर्दहिं दसानन कोटि कोटिन्ह कपट भू भट अंकुरे॥**

जे प्रभूंचा प्रताप जाणत होते, ते निर्भयपणे तेथे थांबून राहिले. वानरांना पुष्कळसे रावण खरेच वाटले. म्हणून वानर-अस्वले बेचैन होऊन 'हे कृपाळू, रक्षण करा' असे पुकारत व्याकूळ होऊन पळू लागले. अत्यंत बलवान व युद्धवीर हनुमान, अंगद, नील आणि नल हे लढत होते आणि मायारूपी भूमीतून अंकुराप्रमाणे उत्पन्न झालेल्या कोट्यवधी युद्ध करणाऱ्या रावणांना चिरडत होते.

**दो०—सुर बानर देखे बिकल हँस्यो कोसलाधीस।**
**सजि सारंग एक सर हते सकल दससीस॥ ९६ ॥**

देव व वानरांना व्याकूळ झालेले पाहून कोसलपती श्रीराम हसले आणि आपल्या शार्ङ्ग धनुष्यावर बाण चढवून सर्व मायावी रावणांना त्यांनी मारून टाकले. ॥ ९६ ॥

**प्रभु छन महुँ माया सब काटी । जिमि रबि उएँ जाहिं तम फाटी ॥**
**रावनु एकु देखि सुर हरषे । फिरे सुमन बहु प्रभु पर बरषे ॥**

प्रभूंनी क्षणभरात सर्व माया नष्ट केली. ज्याप्रमाणे सूर्य उगवताच अंधकाराचे ढीग नष्ट होतात. आता एकच रावण पाहून देवांना आनंद झाला आणि ते परत येऊन प्रभूंच्यावर फुलांचा खूप वर्षाव करू लागले. ॥ १ ॥

**भुज उठाइ रघुपति कपि फेरे । फिरे एक एकन्ह तब टेरे ॥**
**प्रभु बलु पाइ भालु कपि धाए । तरल तमकि संजुग महि आए ॥**

श्रीरघुनाथांनी हात वर करून सर्व वानरांना परत बोलावले. तेव्हा ते एक दुसऱ्याला हाका मारत परत आले. प्रभूंचे बळ मिळाल्याने अस्वले-वानर धावून गेले. लगबगीने उड्या मारत ते रणभूमीवर आले. ॥ २ ॥

**अस्तुति करत देवतन्हि देखें । भयउँ एक मैं इन्ह के लेखें ॥**
**सठहु सदा तुम्ह मोर मरायल । अस कहि कोपि गगन पर धायल ॥**

श्रीरामांची स्तुती देव करीत आहेत, हे पाहून रावणाने विचार केला की, यांना वाटते की, मी एक झालो. यांना हे माहीत नाही की, मी एकटाच पुरेसा आहे आणि म्हटले, 'अरे मूर्खांनो, तुम्ही नेहमीच माझा मार खाणारे आहात.' असे म्हणून तो रागाने आकाशात देवांवर धावून गेला. ॥ ३ ॥

**हाहाकार करत सुर भागे। खलहु जाहु कहँ मोरें आगे॥**
**देखि बिकल सुर अंगद धायो। कूदि चरन गहि भूमि गिरायो॥**

देव हाहाकार करीत पळाले. रावण म्हणाला, 'अरे दुष्टांनो, माझ्या समोरून कुठे जाणार?' देव व्याकूळ झालेले पाहून अंगद धावून गेला आणि उडी मारून त्याने रावणाचा पाय धरून त्याला पृथ्वीवर पाडले.॥ ४॥

छं०—**गहि भूमि पार्‍यो लात मार्‍यो बालिसुत प्रभु पहिं गयो।**
**संभारि उठि दसकंठ घोर कठोर रव गर्जत भयो॥**
**करि दाप चाप चढ़ाइ दस संधानि सर बहु बरषई।**
**किए सकल भट घायल भयाकुल देखि निज बल हरषई॥**

त्याला पकडून व पृथ्वीवर पाडून अंगद प्रभूंच्याजवळ आला. रावण स्वत:ला सावरून उठला आणि भयंकर कठोर आवाजाने गर्जू लागला. तो गर्वाने दाही धनुष्ये सज्ज करून व त्यावर बरेचसे बाण लावून बाणांचा वर्षाव करू लागला. त्याने सर्व योद्ध्यांना घायाळ केले व भयाने व्याकूळ करून टाकले. आपले बळ दाखवून तो आनंदित झाला.

दो०—**तब रघुपति रावन के सीस भुजा सर चाप।**
**काटे बहुत बढ़े पुनि जिमि तीरथ कर पाप॥ ९७॥**

तेव्हा श्रीरघुनाथांनी रावणाची शिरे, भुजा, बाण आणि धनुष्य मोडून टाकले. परंतु ज्याप्रमाणे तीर्थक्षेत्री केलेली पापे कित्येकपट वाढतात, त्याप्रमाणे रावणाच्या भुजा इत्यादी पुन्हा खूप वाढल्या.॥ ९७॥

**सिर भुज बाढ़ि देखि रिपु केरी। भालु कपिन्ह रिस भई घनेरी॥**
**मरत न मूढ़ कटेहुँ भुज सीसा। धाए कोपि भालु भट कीसा॥**

शत्रूची शिरे आणि भुजा वाढल्याचे पाहून अस्वले-वानर यांना खूप राग आला. 'हा मूर्ख भुजा व शिरे कापल्यावर सुद्धा मरत नाही,' असे म्हणत ते योद्धे रागाने धावून गेले.॥ १॥

**बालितनय मारुति नल नीला। बानरराज दुबिद बलसीला॥**
**बिटप महीधर करहिं प्रहारा। सोइ गिरि तरु गहि कपिन्ह सो मारा॥**

अंगद, हनुमान, नल, नील, वानरराज सुग्रीव, द्विविद इत्यादी बलवान वानर वृक्ष व पर्वतांचा त्याच्यावर मारा करू लागले. तो तेच वृक्ष व पर्वत घेऊन वानरांना मारू लागला.॥ २॥

**एक नखन्हि रिपु बपुष बिदारी। भागि चलहिं एक लातन्ह मारी॥**
**तब नल नील सिरन्हि चढ़ि गयऊ। नखन्हि लिलार बिदारत भयऊ॥**

कुणी वानर नखांनी शत्रूचे शरीर फाडून तर कुणी त्याला लाथांनी मारून पळून जात होते. तेव्हा नल व नील रावणाच्या डोक्यांवर चढले आणि नखांनी त्याचे ललाट फाडू लागले. ॥ ३ ॥

**रुधिर देखि बिषाद उर भारी । तिन्हहि धरन कहुँ भुजा पसारी ॥**
**गहे न जाहिं करन्हि पर फिरहीं । जनु जुग मधुप कमल बन चरहीं ॥**

रक्त पाहून त्याला मनातून दु:ख झाले. त्याने त्यांना पकडण्यासाठी हात पसरले, परंतु त्यांना पकडता येईना. ते त्याच्या हातांवरच फिरत होते, जणू दोन भ्रमर कमल-वनामध्ये फिरत होते. ॥ ४ ॥

**कोपि कूदि द्वौ धरेसि बहोरी । महि पटकत भजे भुजा मरोरी ॥**
**पुनि सकोप दस धनु कर लीन्हे । सरन्हि मारि घायल कपि कीन्हे ॥**

तेव्हा त्याने रागाने उडी मारून दोघांनाही पकडले. त्यांना पृथ्वीवर आपटताना ते त्याचे हात मुरगाळून पळून गेले. त्याने रागाने हातांमध्ये दहा धनुष्ये घेऊन आणि वानरांना बाण मारून घायाळ केले. ॥ ५ ॥

**हनुमदादि मुरुछित करि बंदर । पाइ प्रदोष हरष दसकंधर ॥**
**मुरुछित देखि सकल कपि बीरा । जामवंत धायउ रनधीरा ॥**

हनुमान इत्यादी सर्व वानरांना मूर्च्छित करून संध्याकाळ झाल्यामुळे रावण आनंदित झाला. सर्व वानर-वीर मूर्च्छित झाल्याचे पाहून रणधीर जांबवान धावला. ॥ ६ ॥

**संग भालु भूधर तरु धारी । मारन लगे पचारि पचारी ॥**
**भयउ क्रुद्ध रावन बलवाना । गहि पद महि पटकइ भट नाना ॥**

जांबवानासोबत जी अस्वले होती. ती पर्वत व वृक्ष घेऊन रावणाला आव्हान देऊन मारू लागली. बलवान रावण क्रुद्ध झाला. आणि पाय पकडून तो अनेक योद्ध्यांना पृथ्वीवर आपटू लागला. ॥ ७ ॥

**देखि भालुपति निज दल घाता । कोपि माझ उर मारेसि लाता ॥**

जांबवानाने आपल्या सैन्याचा संहार झालेला पाहून रागाने रावणाच्या छातीवर लाथ मारली. ॥ ८ ॥

**छं०—उर लात घात प्रचंड लागत बिकल रथ ते महि परा ।**
**गहि भालु बीसहुँ कर मनहुँ कमलन्हि बसे निसि मधुकरा ॥**
**मुरुछित बिलोकि बहोरि पद हति भालुपति प्रभु पहिं गयो ।**
**निसि जानि स्यंदन घालि तेहि तब सूत जतनु करत भयो ॥**

छातीवर लाथेचा प्रचंड आघात झाल्यामुळे रावण व्याकूळ होऊन रथावरून खाली पडला. त्याने वीसही हातांनी अस्वलांना पकडून ठेवले होते. असे वाटत होते की, जणू रात्रीच्या वेळी कमळांमध्ये भ्रमर अडकून पडले असावेत. तो मूर्च्छित झाल्याचे पाहून, पुन्हा रावणाला लाथ मारून जाम्बवान

प्रभूंच्याजवळ गेला. रात्र झाल्याचे पाहून सारथी रावणाला रथात घालून त्याला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करू लागला.

**दो०—मुरुछा बिगत भालु कपि सब आए प्रभु पास।**
**निसिचर सकल रावनहि घेरि रहे अति त्रास॥ ९८॥**

मूर्च्छा जाताच सर्व अस्वले व वानर प्रभूंच्याजवळ आले. तिकडे सर्व राक्षसांनी खूपच भयभीत होऊन रावणाला घेरले.॥ ९८॥

## मासपारायण, सव्विसावा विश्राम

**तेही निसि सीता पहिं जाई। त्रिजटा कहि सब कथा सुनाई॥**
**सिर भुज बाढ़ि सुनत रिपु केरी। सीता उर भइ त्रास घनेरी॥**

त्याच रात्री त्रिजटेने सीतेजवळ जाऊन तिला सर्व वृत्तांत सांगितला. शत्रूची शिरे व हात पुन्हा वाढतात, हे ऐकून सीतेच्या मनाला फार भीती वाटली.॥ १॥

**मुख मलीन उपजी मन चिंता। त्रिजटा सन बोली तब सीता॥**
**होइहि कहा कहसि किन माता। केहि बिधि मरिहि बिस्व दुखदाता॥**

तिचे मुख उदास झाले. मनात चिंता वाटू लागली. तेव्हा सीता त्रिजटेला म्हणाली, 'हे माते, काय होणार, ते का सांगत नाहीस? संपूर्ण विश्वाला दुःख देणारा हा रावण कसा मरणार?॥ २॥

**रघुपति सर सिर कटेहुँ न मरई। बिधि बिपरीत चरित सब करई॥**
**मोर अभाग्य जिआवत ओही। जेहिं हौं हरि पद कमल बिछोही॥**

श्रीरघुनाथांच्या बाणांनी शिर तुटल्यावरही तो मरत नाही. विधाता सर्व काही उलटे करीत आहे. खरे तर माझे दुर्भाग्यच त्याला जिवंत करीत आहे, ज्याने मला भगवानांच्या चरण-कमलांपासून वेगळे केले.॥ ३॥

**जेहिं कृत कपट कनक मृग झूठा। अजहुँ सो दैव मोहि पर रूठा॥**
**जेहिं बिधि मोहि दुख दुसह सहाए। लछिमन कहुँ कटु बचन कहाए॥**

ज्याने कपटाने खोटा सुवर्णमृग बनविला होता, तेच दैव आताही माझ्यावर रुसले आहे. ज्या विधात्याने मला दुःसह दुःख सहन करायला लावले आणि लक्ष्मणाला माझ्याकडून अपशब्द बोलायला लावले, ॥ ४॥

**रघुपति बिरह सबिष सर भारी। तकि तकि मारि बार बहु मारी॥**
**ऐसेहुँ दुख जो राख मम प्राना। सोइ बिधि ताहि जिआव न आना॥**

ज्या विधात्याने श्रीरघुनाथांच्या विरहरूपी मोठ्या विषारी बाणांनी नेम धरून मला अनेक वेळा मारले व जो आता मारत आहे आणि असा दुःखातही जो माझे प्राण वाचवीत आहे, तोच विधाता

त्या रावणाला जिवंत ठेवत आहे, दुसरे कोणी नाही. ॥ ५ ॥

**बहु बिधि कर बिलाप जानकी । करि करि सुरति कृपानिधान की ॥**
**कह त्रिजटा सुनु राजकुमारी । उर सर लागत मरइ सुरारी ॥**

कृपानिधान श्रीरामांचे स्मरण करीत करीत जानकी अनेक प्रकारे विलाप करू लागली. त्रिजटा म्हणाली, 'हे राजकुमारी, ऐक. देवांचा शत्रू रावण हा हृदयात बाण लागताच मरून जाईल. ॥ ६ ॥

**प्रभु ताते उर हतइ न तेही । एहि के हृदयँ बसति बैदेही ॥**

परंतु प्रभू त्याच्या हृदयावर बाण यासाठी मारत नाहीत की त्याच्या हृदयात तू आहेस. ॥ ७ ॥

छं०—**एहि के हृदयँ बस जानकी जानकी उर मम बास है।**
**मम उदर भुअन अनेक लागत बान सब कर नास है॥**
**सुनि बचन हरष बिषाद मन अति देखि पुनि त्रिजटाँ कहा।**
**अब मरिहि रिपु एहि बिधि सुनहि सुंदरि तजहि संसय महा॥**

हाच विचार करून ते थांबले आहेत की, याच्या हृदयात जानकीचा निवास आहे आणि जानकीच्या हृदयात माझा निवास आहे; तसेच माझ्या उदरात अनेक भुवने आहेत. म्हणून रावणाच्या हृदयाला बाण लागताच सर्व भुवनांचा नाश होईल.' हे बोलणे ऐकून सीतेच्या मनाला अत्यंत हर्ष व विषाद झालेला पाहून त्रिजटा पुन्हा म्हणाली, 'हे सुंदरी, मनातील मोठा संशय सोडून दे आणि ऐकून घे की, शत्रू कसा मरेल ते.

दो०—**काटत सिर होइहि बिकल छुटि जाइहि तव ध्यान।**
**तब रावनहि हृदय महुँ मरिहहिं रामु सुजान॥ ९९ ॥**

शिरे वारंवार तुटल्यामुळे जेव्हा तो व्याकूळ होईल आणि त्याच्या हृदयातील तुझे ध्यान सुटेल, तेव्हा अंतर्यामी श्रीराम रावणाच्या हृदयावर बाण मारतील.' ॥ ९९ ॥

**अस कहि बहुत भाँति समुझाई । पुनि त्रिजटा निज भवन सिधाई ॥**
**राम सुभाउ सुमिरि बैदेही । उपजी बिरह बिथा अति तेही ॥**

असे सांगून आणि सीतेला अनेक प्रकारे समजावून त्रिजटा आपल्या घरी गेली. श्रीरामांच्या स्वभावाचे स्मरण केल्याने जानकीला अत्यंत विरहव्यथा उत्पन्न झाली. ॥ १ ॥

**निसिहि ससिहि निंदति बहु भाँती । जुग सम भई सिराति न राती ॥**
**करति बिलाप मनहिं मन भारी । राम बिरहँ जानकी दुखारी ॥**

ती रात्रीला व चंद्राला फार दोष देऊ लागली. आणि म्हणू लागली, 'रात्र युगाप्रमाणे मोठी झाली आहे, जाता जात नाही.' जानकी श्रीरामांच्या विरहाने दु:खी होऊन मनातल्या मनात विलाप करू लागली. ॥ २ ॥

**जब अति भयउ बिरह उर दाहू। फरकेउ बाम नयन अरु बाहू॥**
**सगुन बिचारि धरी मन धीरा। अब मिलिहहिं कृपाल रघुबीरा॥**

जेव्हा विरहामुळे हृदयामध्ये अतिशय दाह होऊ लागला, तेव्हा तिचा डावा डोळा व बाहू स्फुरू लागले. हा शुभशकुन समजून तिने धीर धरला की आता कृपाळू श्रीराम नक्की भेटतील.॥ ३॥

**इहाँ अर्धनिसि रावनु जागा। निज सारथि सन खीझन लागा॥**
**सठ रनभूमि छड़ाइसि मोही। धिग धिग अधम मंदमति तोही॥**

इकडे अर्ध्या रात्री रावण मूर्च्छेतून जागा झाला आणि आपल्या सारथ्यावर रुष्ट होऊन म्हणू लागला, 'अरे मूर्खा, तू मला रणभूमीतून दूर केलेस. अरे अधमा, अरे मंदबुद्धीच्या, तुझा धिक्कार असो, धिक्कार असो.'॥ ४॥

**तेहिं पद गहि बहु बिधि समुझावा। भोरु भएँ रथ चढ़ि पुनि धावा॥**
**सुनि आगवनु दसानन केरा। कपि दल खरभर भयउ घनेरा॥**

सारथ्याने त्याचे पाय धरून अनेक प्रकारे समजावले. सकाळ होताच रावण रथात बसून पुन्हा धावला. रावण येत आहे, हे ऐकून वानरांच्या सेनेत खळबळ माजली.॥ ५॥

**जहँ तहँ भूधर बिटप उपारी। धाए कटकटाइ भट भारी॥**

ते महान वानर योद्धे इकडून तिकडून पर्वत व वृक्ष उपटून घेऊन रागाने दात खात धावून गेले.॥ ६॥

छं०—**धाए जो मर्कट बिकट भालु कराल कर भूधर धरा।**
**अति कोप करहिं प्रहार मारत भजि चले रजनीचरा॥**
**बिचलाइ दल बलवंत कीसन्ह घेरि पुनि रावनु लियो।**
**चहुँ दिसि चपेटन्हि मारि नखन्हि बिदारि तनु ब्याकुल कियो॥**

ती अक्राळ विक्राळ वानर-अस्वले हातांमध्ये पर्वत घेऊन धावली. ती अत्यंत क्रोधाने प्रहार करीत होती. त्यांनी मारल्यामुळे राक्षस पळून गेले. बलवान वानरांनी शत्रुसेनेला गडबडून टाकले आणि नंतर रावणाला वेढले. चोहीकडून थपडा मारून व नखांनी त्याचे शरीर विदीर्ण करून वानरांनी त्याला व्याकूळ करून टाकले.

दो०—**देखि महा मर्कट प्रबल रावन कीन्ह बिचार।**
**अंतरहित होइ निमिष महुँ कृत माया बिस्तार॥ १००॥**

वानर फारच प्रबळ होत आहेत, असे पाहून रावणाने विचार केला आणि अदृश्य होऊन क्षणात त्याने माया पसरली.॥ १००॥

**छं०—जब कीन्ह तेहिं पाषंड। भए प्रगट जंतु प्रचंड॥**
**बेताल भूत पिसाच। कर धरें धनु नाराच॥**

त्याने माया टाकताच भयंकर जीव प्रकट झाले. वेताळ, भूत आणि पिशाच हे हातामध्ये धनुष्यबाण घेऊन प्रकट झाले. ॥ १ ॥

**जोगिनि गहें करबाल। एक हाथ मनुज कपाल॥**
**करि सद्य सोनित पान। नाचहिं करहिं बहु गान॥**

योगिनी एका हातात तलवार आणि दुसऱ्या हातात माणसाची कवटी घेऊन ताजे रक्त पिऊन नाचू लागल्या आणि तऱ्हेतऱ्हेची गाणी गाऊ लागल्या.॥ २ ॥

**धरु मारु बोलहिं घोर। रहि पूरि धुनि चहुँ ओर॥**
**मुख बाइ धावहिं खान। तब लगे कीस परान॥**

त्या 'पकडा, मारा' इत्यादी कर्कश आवाजात बोलत होत्या. चारी दिशा या आवाजाने भरून गेल्या. त्या तोंड उघडून खाण्यासाठी धावल्या, तेव्हा वानर पळू लागले.॥ ३ ॥

**जहँ जाहिं मर्कट भागि। तहँ बरत देखहिं आगि॥**
**भए बिकल बानर भालु। पुनि लाग बरषै बालु॥**

वानर पळून जिथे जिथे जात, तिथे आग लागलेली दिसे. वानर-अस्वले व्याकूळ झाले. मग रावण वाळूचा वर्षाव करू लागला. ॥ ४ ॥

**जहँ तहँ थकित करि कीस। गर्जेउ बहुरि दससीस॥**
**लछिमन कपीस समेत। भए सकल बीर अचेत॥**

वानरांना जिकडे तिकडे दमवून रावण पुन्हा गरजला. त्यामुळे लक्ष्मण आणि सुग्रीव यांच्यासह सर्व वीर बेशुद्ध झाले.॥ ५ ॥

**हा राम हा रघुनाथ। कहि सुभट मीजहिं हाथ॥**
**एहि बिधि सकल बल तोरि। तेहिं कीन्ह कपट बहोरि॥**

'हाय राम, हाय राम' असे ओरडत श्रेष्ठ योद्धे हात चोळत बसले. अशा प्रकारे रावणाने सर्वांची दमछाक केल्यावर दुसरी माया केली.॥ ६ ॥

**प्रगटेसि बिपुल हनुमान। धाए गहे पाषान॥**
**तिन्ह रामु घेरे जाइ। चहुँ दिसि बरूथ बनाइ॥**

त्याने अनेक हनुमान प्रकट केले. ते पाषाण घेऊन धावले. त्यांनी चार तुकड्या करून श्रीरामांना घेरले.॥ ७ ॥

**मारहु धरहु जनि जाइ। कटकटहिं पूँछ उठाइ॥**
**दहँ दिसि लँगूर बिराज। तेहिं मध्य कोसलराज॥**

ते शेपूट वर करून दात कटकटत ओरडू लागले. 'मारा, पकडा, त्याला जाऊ देऊ नका.' त्याच्या शेपट्या दाही दिशांना शोभत होत्या आणि त्यामध्ये कोसलराज श्रीराम होते.॥ ८॥

**छं०—तेहिं मध्य कोसलराज सुंदर स्याम तन सोभा लही।**
**जनु इंद्रधनुष अनेक की बर बारि तुंग तमालही॥**
**प्रभु देखि हरष बिषाद उर सुर बदत जय जय जय करी।**
**रघुबीर एकहिं तीर कोपि निमेष महुँ माया हरी॥ १॥**

त्यांच्यामध्ये कोसलराज श्रीरामांचे शरीर असे शोभत होते की, जणू उंच तमाल वृक्षासाठी अनेक इंद्रधनुष्यांचे छान कुंपण बनविले असावे. प्रभूंना पाहून देव हर्ष व विषादयुक्त मनाने 'जय, जय, जय' असे म्हणू लागले. तेव्हा श्रीरघुवीरांनी क्रोधाने एकाच बाणाने एका निमिषात रावणाची सर्व माया हरण केली.॥ १॥

**माया बिगत कपि भालु हरषे बिटप गिरि गहि सब फिरे।**
**सर निकर छाड़े राम रावन बाहु सिर पुनि महि गिरे॥**
**श्रीराम रावन समर चरित अनेक कल्प जो गावहीं।**
**सत सेष सारद निगम कबि तेउ तदपि पार न पावहीं॥ २॥**

माया दूर होताच वानर-अस्वले आनंदित झाली आणि वृक्ष व पर्वत उचलून सर्व परतले. श्रीरामांनी बाणांचे समूह सोडले. त्यामुळे रावणाचे हात व मुंडकी पुन्हा तुटून पृथ्वीवर खाली पडली. श्रीराम व रावण यांच्या युद्धाचे वर्णन शेकडो शेष, सरस्वती, वेद आणि कवी अनेक कल्पांपर्यंत गात राहिले, तरीही ते संपवू शकणार नाहीत.॥ २॥

**दो०—ताके गुन गन कछु कहे जड़मति तुलसीदास।**
**जिमि निज बल अनुरूप ते माछी उड़इ अकास॥ १०१ ( क )॥**

त्याच युद्धाचे काहीसे गुणगान मंदबुद्धीच्या तुलसीदासाने केले आहे, ज्याप्रमाणे माशीसुद्धा आपल्या सामर्थ्यानुसार आकाशात उडते.॥ १०१ (क)॥

**काटे सिर भुज बार बहु मरत न भट लंकेस।**
**प्रभु क्रीड़त सुर सिद्ध मुनि ब्याकुल देखि कलेस॥ १०१ ( ख )॥**

शिरे व भुजा अनेक वेळा तोडल्या; तरीही वीर रावण मरत नव्हता. प्रभू तर क्रीडा करीत होते; परंतु मुनी, सिद्ध व देवता प्रभूंना होणारे क्लेश पाहून व्याकूळ झाले.॥ १०१ (ख)॥

**काटत बढ़हिं सीस समुदाई। जिमि प्रति लाभ लोभ अधिकाई॥**
**मरइ न रिपु श्रम भयउ बिसेषा। राम बिभीषन तन तब देखा॥**

ज्याप्रमाणे लाभ झाल्यावर लोभ वाढतो, त्याप्रमाणे रावणाची मुंडकी तोडताच ती वाढत जात होती. शत्रू मरत नव्हता आणि त्रास वाढला होता. तेव्हा श्रीरामचंद्रांनी बिभीषणाकडे पाहिले.॥ १॥

**उमा काल मर जाकीं ईछा। सो प्रभु जन कर प्रीति परीछा॥**
**सुनु सरबग्य चराचर नायक। प्रनतपाल सुर मुनि सुखदायक॥**

शिव म्हणतात, 'हे उमे, ज्यांच्या मनात इच्छा येताच कालसुद्धा मरून जातो, तेच प्रभू हे सेवकांच्या प्रेमाची परीक्षा घेत होते.' बिभीषण म्हणाला, 'हे सर्वज्ञ, हे चराचराचे स्वामी, हे शरणागताचे पालन करणारे, हे देव आणि मुनींना सुख देणारे, ऐका.॥ २॥

**नाभिकुंड पियूष बस याकें। नाथ जिअत रावनु बल ताकें॥**
**सुनत बिभीषन बचन कृपाला। हरषि गहे कर बान कराला॥**

या रावणाच्या नाभिकुंडामध्ये अमृतकलश आहे. हे नाथ, रावण त्याच्याच जोरावर जिवंत आहे.' बिभीषणाचे बोलणे ऐकताच कृपाळू श्रीरघुनाथांनी आनंदित होऊन विक्राळ बाण हाती घेतले.॥ ३॥

**असुभ होन लागे तब नाना। रोवहिं खर सृकाल बहु स्वाना॥**
**बोलहिं खग जग आरति हेतू। प्रगट भए नभ जहँ तहँ केतू॥**

त्या प्रसंगी नाना प्रकारचे अपशकुन होऊ लागले. पुष्कळ गाढवे, कोल्हे व कुत्री रडू लागली. जगात होणाऱ्या अशुभाची सूचना देण्यासाठी पक्षी कलकलाट करू लागले. आकाशात जिकडे तिकडे धूमकेतू प्रकट झाले.॥ ४॥

**दस दिसि दाह होन अति लागा। भयउ परब बिनु रबि उपरागा॥**
**मंदोदरि उर कंपति भारी। प्रतिमा स्त्रवहिं नयन मग बारी॥**

दाही दिशांमध्ये धग जाणवू लागली. योग नसताना सूर्यग्रहण होऊ लागले. मंदोदरीचे हृदय धडधडू लागले. मूर्तींच्या नेत्रांतून पाणी वाहू लागले.॥ ५॥

छं०—**प्रतिमा रुदहिं पबिपात नभ अति बात बह डोलति मही।**
**बरषहिं बलाहक रुधिर कच रज असुभ अति सक को कही॥**
**उतपात अमित बिलोकि नभ सुर बिकल बोलहिं जय जए।**
**सुर सभय जानि कृपाल रघुपति चाप सर जोरत भए॥**

मूर्ती रडू लागल्या, आकाशातून वज्रपात होऊ लागले. अत्यंत प्रचंड वारे वाहू लागले. पृथ्वीवर भूकंप होऊ लागले. मेघ रक्त, केस व धुळीचा वर्षाव करू लागले. अशा प्रकारे इतक्या अमंगल घटना घडू लागल्या की, त्यांचे वर्णन कोण करू शकेल? अपरिमित उत्पात पाहून आकाशामध्ये देव व्याकूळ होऊन जयजयकार करू लागले. देव भयभीत झाल्याचे पाहून कृपाळू श्रीरघुनाथ धनुष्यावर बाण चढवू लागले.

**दो०—खैंचि सरासन श्रवन लगि छाड़े सर एकतीस।**
**रघुनायक सायक चले मानहुँ काल फनीस॥ १०२॥**

कानांपर्यंत धनुष्य खेचून श्रीरघुनाथांनी एकतीस बाण सोडले. ते श्रीरामचंद्रांचे बाण जणू कालसर्पांप्रमाणे सुटले. ॥ १०२ ॥

**सायक एक नाभि सर सोषा। अपर लगे भुज सिर करि रोषा॥**
**लै सिर बाहु चले नाराचा। सिर भुज हीन रुंड महि नाचा॥**

एका बाणाने रावणाच्या नाभीतील अमृतकुंड शोषून टाकले. उरलेले तीस बाण अत्यंत त्वेषाने त्याच्या शिरांना व भुजांना लागले. बाण शिरे व भुजा तोडून घेऊन गेले. मग शिर व भुजाविहीन रावणाचे धड पृथ्वीवर नाचू लागले. ॥ १ ॥

**धरनि धसइ धर धाव प्रचंडा। तब सर हति प्रभु कृत दुइ खंडा॥**
**गर्जेउ मरत घोर रव भारी। कहाँ रामु रन हतौं पचारी॥**

धड प्रचंड वेगाने धावत होते, त्यामुळे धरती खचू लागली. तेव्हा प्रभूंनी बाण मारून त्याचे दोन तुकडे केले. मरताना रावण मोठ्या भयंकर आवाजाने गर्जून म्हणाला, 'राम कुठे आहे? मी त्याला आव्हान देऊन युद्धात मारीन.' ॥ २ ॥

**डोली भूमि गिरत दसकंधर। छुभित सिंधु सरि दिग्गज भूधर॥**
**धरनि परेउ द्वौ खंड बढ़ाई। चापि भालु मर्कट समुदाई॥**

रावणाचे धड पडताच पृथ्वी हादरली. समुद्र, नद्या, दिग्गज आणि पर्वत थरारले. रावणाच्या धडाचे दोन तुकडे खाली पडताना त्याने अस्वले व वानर यांच्या समुदायाला चिरडले. ॥ ३ ॥

**मंदोदरि आगें भुज सीसा। धरि सर चले जहाँ जगदीसा॥**
**प्रबिसे सब निषंग महुँ जाई। देखि सुरन्ह दुंदुभीं बजाई॥**

राम-बाण रावणाच्या भुजा व मुंडकी मंदोदरीच्यासमोर ठेवून जगदीश्वर रामांकडे परत आले. सर्व बाण भात्यात जाऊन बसले. हे पाहून देवांनी नगारे वाजविले. ॥ ४ ॥

**तासु तेज समान प्रभु आनन। हरषे देखि संभु चतुरानन॥**
**जय जय धुनि पूरी ब्रह्मंडा। जय रघुबीर प्रबल भुजदंडा॥**

रावणाचे तेज प्रभूंच्या मुखात सामावून गेले. हे पाहून शिव व ब्रह्मदेव आनंदित झाले. संपूर्ण ब्रह्मांड जय-जयकाराने भरून गेले. 'प्रबळ भुजदंड असलेल्या श्रीरघुवीरांचा विजय असो.'॥ ५॥

**बरषहिं सुमन देव मुनि बृंदा। जय कृपाल जय जयति मुकुंदा॥**

देव आणि मुनींचे समूह फुलांचा वर्षाव करीत होते आणि म्हणत होते की, 'कृपाळू रामांचा विजय असो, मुकुंदांचा विजय असो, विजय असो.॥ ६॥

छं०—**जय कृपा कंद मुकुंद द्वंद हरन सरन सुखप्रद प्रभो।**
**खल दल बिदारन परम कारन कारुनीक सदा बिभो॥**
**सुर सुमन बरषहिं हरष संकुल बाज दुंदुभि गहगही।**
**संग्राम अंगन राम अंग अनंग बहु सोभा लही॥ १॥**

हे कृपेचा वर्षाव करणारे, हे मोक्षदाते मुकुंद, हे राग-द्वेषादी द्वंद्वे हरण करणारे, हे शरणागताला सुख देणारे प्रभो, हे दुष्ट-दलाला विदीर्ण करणारे, हे कारणांचे परम कारण, हे सदा करुणा करणारे, हे सर्वव्यापक विभो, तुमचा विजय असो.' देव आनंदाने फुले उधळत होते, धडाधड नगारे वाजवीत होते. रणभूमीमध्ये श्रीरामांच्या विग्रहाला असंख्य कामदेवांची शोभा प्राप्त झाली होती.॥ १॥

**सिर जटा मुकुट प्रसून बिच बिच अति मनोहर राजहीं।**
**जनु नीलगिरि पर तड़ित पटल समेत उडुगन भ्राजहीं॥**
**भुजदंड सर कोदंड फेरत रुधिर कन तन अति बने।**
**जनु रायमुनीं तमाल पर बैठीं बिपुल सुख आपने॥ २॥**

त्यांच्या शिरावर जटांचा मुकुट होता. त्यामध्ये मधून मधून अत्यंत मनोहर पुष्पे शोभत होती. जणू निळ्या पर्वतावर विजेच्या समूहांसह नक्षत्रे शोभून दिसत होती. श्रीराम आपल्या भुजदंडांनी बाण व धनुष्य फिरवीत होते. शरीरावर रक्ताचे कण अत्यंत सुंदर वाटत होते, जणू तमालवृक्षावर पुष्कळशा लालसर चिमण्या आपल्या महान सुखात मग्न होऊन स्थिर बसल्या होत्या.॥ २॥

दो०—**कृपादृष्टि करि बृष्टि प्रभु अभय किए सुर बृंद।**
**भालु कीस सब हरषे जय सुख धाम मुकुंद॥ १०३॥**

प्रभू श्रीरामचंद्रांनी कृपा-दृष्टीचा वर्षाव करून देव-समाजाला निर्भय करून टाकले. सर्व वानर-अस्वले आनंदाने 'सुखधाम मुकुंदांचा विजय असो' अशा घोषणा देत होती.॥ १०३॥

**पति सिर देखत मंदोदरी। मुरुछित बिकल धरनि खसि परी॥**
**जुबति बृंद रोवत उठि धाईं। तेहि उठाइ रावन पहिं आईं॥**

पतीचे शिर पाहताच मंदोदरी व्याकूळ व मूर्च्छित होऊन जमिनीवर पडली. रावणाच्या इतर स्त्रिया रडत उठून धावल्या आणि तिला उठवून रावणाजवळ घेऊन आल्या. ॥ १ ॥

**पति गति देखि ते करहिं पुकारा। छूटे कच नहिं बपुष सँभारा॥**
**उर ताड़ना करहिं बिधि नाना। रोवत करहिं प्रताप बखाना॥**

पतीची दशा पाहून मंदोदरी आक्रोश करीत रडू लागली. तिचे केस मोकळे सुटले, देहाची शुद्ध नव्हती. ती वारंवार छाती बडवून घेत होती आणि रडत रडत रावणाच्या प्रतापाचे वर्णन करीत होती. ॥ २ ॥

**तव बल नाथ डोल नित धरनी। तेज हीन पावक ससि तरनी॥**
**सेष कमठ सहि सकहिं न भारा। सो तनु भूमि परेउ भरि छारा॥**

मंदोदरी म्हणत होती, 'हे नाथ, तुमच्या बळामुळे पृथ्वी नेहमी कापत असे. अग्नी, चंद्र आणि सूर्य हे तुमच्यासमोर तेजहीन होते. शेष आणि कूर्म हे सुद्धा ज्या शरीराचा भार सहन करू शकत नव्हते, तेच तुमचे शरीर अरेरे! आज धुळीने माखून पृथ्वीवर पडले आहे. ॥ ३ ॥

**बरुन कुबेर सुरेस समीरा। रन सन्मुख धरि काहुँ न धीरा॥**
**भुजबल जितेहु काल जम साईं। आजु परेहु अनाथ की नाईं॥**

वरुण, कुबेर, इंद्र आणि वायू यांपैकी कुणीही युद्धामध्ये तुमच्यासमोर धीर धरला नव्हता. हे स्वामी, तुम्ही आपल्या भुजबळावर काल आणि यमराज यांनाही जिंकले होते. तेच तुम्ही आज अनाथाप्रमाणे येथे पडला आहात. ॥ ४ ॥

**जगत बिदित तुम्हारि प्रभुताई। सुत परिजन बल बरनि न जाई॥**
**राम बिमुख अस हाल तुम्हारा। रहा न कोउ कुल रोवनिहारा॥**

तुमची सत्ता जगभरात प्रसिद्ध होती. तुमच्या पुत्रांच्या आणि कुटुंबीयांच्या शक्तीचे वर्णन करता येणार नाही. श्रीरामचंद्रांशी विन्मुख होण्यामुळे तुमची अशी दुर्दशा झाली की, आज कुलामध्ये रडणाराही कोणी उरला नाही. ॥ ५ ॥

**तव बस बिधि प्रपंच सब नाथा। सभय दिसिप नित नावहिं माथा॥**
**अब तव सिर भुज जंबुक खाहीं। राम बिमुख यह अनुचित नाहीं॥**

हे नाथ, विधात्याची संपूर्ण सृष्टी तुमच्या अधीन होती. लोकपाल नेहमी भयभीत होऊन नतमस्तक होत होते. परंतु अरेरे, आता तुमची शिरे व भुजा कोल्हे खात आहेत. रामविन्मुख होणाऱ्यासाठी असे होणे तसे अनुचितही नाही. ॥ ६ ॥

**काल बिबस पति कहा न माना। अग जग नाथु मनुज करि जाना॥**

हे पतिराज, काळाच्या पूर्णपणे अधीन झाल्यामुळे तुम्ही कुणाचे सांगणे मानले नाही आणि चराचराचे नाथ असणाऱ्या परमात्म्याला मनुष्य समजलात. ॥ ७ ॥

छं०—**जान्यो मनुज करि दनुज कानन दहन पावक हरि स्वयं।**
**जेहि नमत सिव ब्रह्मादि सुर पिय भजेहु नहिं करुनामयं॥**
**आजन्म ते परद्रोह रत पापौघमय तव तनु अयं।**
**तुम्हहू दियो निज धाम राम नमामि ब्रह्म निरामयं॥**

दैत्यरूपी वनाला जाळण्यासाठी अग्निस्वरूप असलेल्या साक्षात श्रीहरींना तुम्ही मनुष्य मानले. शिव व ब्रह्मदेव इत्यादी देव ज्यांना नमस्कार करतात, त्या करुणामय भगवानाला हे प्रियतम, तुम्ही भजले नाही. तुमचे हे शरीर जन्मत:च दुसऱ्याचा द्रोह करण्यामध्ये तत्पर आणि पापसमूह बनून राहिले. असे असूनही ज्या रागद्वेषरहित ब्रह्म असलेल्या श्रीरामांनी तुम्हांला आपले परमधाम दिले, त्यांना मी नमस्कार करते.

दो०—**अहह नाथ रघुनाथ सम कृपासिंधु नहिं आन।**
**जोगि बृंद दुर्लभ गति तोहि दीन्हि भगवान॥ १०४॥**

अरेरे, नाथ, श्रीरघुनाथांसारखा कृपेचा समुद्र दुसरा कोणी नाही, त्या भगवंतांनी योगिजनांना दुर्लभ असलेली गती तुम्हांला दिली.'॥ १०४॥

**मंदोदरी बचन सुनि काना। सुर मुनि सिद्ध सबन्हि सुख माना॥**
**अज महेस नारद सनकादी। जे मुनिबर परमारथबादी॥**

मंदोदरीचे बोलणे ऐकून देव, मुनी व सिद्ध या सर्वांना समाधान वाटले. ब्रह्मदेव, महादेव, नारद, सनकादिक आणि इतर जे परमार्थवादी श्रेष्ठ मुनी होते,॥ १॥

**भरि लोचन रघुपतिहि निहारी। प्रेम मगन सब भए सुखारी॥**
**रुदन करत देखीं सब नारी। गयउ बिभीषनु मन दुख भारी॥**

ते सर्वच श्रीरघुनाथांना डोळे भरून पाहात प्रेममग्न झाले आणि सुखी झाले. आपल्या घरच्या सर्व स्त्रियांना रडत असलेले पाहून बिभीषणाच्या मनाला फार दु:ख झाले आणि तो त्यांच्याजवळ गेला.॥ २॥

**बंधु दसा बिलोकि दुख कीन्हा। तब प्रभु अनुजहि आयसु दीन्हा॥**
**लछिमन तेहि बहु बिधि समुझायो। बहुरि बिभीषन प्रभु पहिं आयो॥**

भावाची दशा पाहून त्याने दु:ख व्यक्त केले. तेव्हा प्रभू श्रीरामांनी लक्ष्मणाला आज्ञा केली की, बिभीषणाला जाऊन धीर दे. लक्ष्मणाने जाऊन त्याला पुष्कळ प्रकारे समजाविले, तेव्हा बिभीषण प्रभूंच्याजवळ परत आला.॥ ३॥

**कृपादृष्टि प्रभु ताहि बिलोका। करहु क्रिया परिहरि सब सोका॥**
**कीन्हि क्रिया प्रभु आयसु मानी। बिधिवत देस काल जियँ जानी॥**

प्रभूंनी त्याला कृपादृष्टीने पाहिले आणि म्हटले, 'सर्व शोक सोडून रावणाचा अंत्य-संस्कार कर.' प्रभूंची आज्ञा मानून व मनात परिस्थितीचा विचार करून बिभीषणाने विधिपूर्वक सर्व अंत्यक्रिया केल्या. ॥ ४ ॥

**दो०—मंदोदरी आदि सब देइ तिलांजलि ताहि।**
**भवन गईं रघुपति गुन गन बरनत मन माहि॥ १०५॥**

मंदोदरी इत्यादी सर्व स्त्रिया रावणाला तिलांजली देऊन मनात श्रीरघुनाथांचे गुणगान करीत महालात गेल्या. ॥ १०५ ॥

**आइ बिभीषन पुनि सिरु नायो। कृपासिंधु तब अनुज बोलायो॥**
**तुम्ह कपीस अंगद नल नीला। जामवंत मारुति नयसीला॥**
**सब मिलि जाहु बिभीषन साथा। सारेहु तिलक कहेउ रघुनाथा॥**
**पिता बचन मैं नगर न आवउँ। आपु सरिस कपि अनुज पठावउँ॥**

सर्व क्रिया-कर्म केल्यानंतर बिभीषण येऊन श्रीरामांसमोर नतमस्तक झाला. तेव्हा कृपेचे समुद्र असलेल्या श्रीरामांनी लक्ष्मणाला बोलावले. श्रीरघुनाथ म्हणाले की, 'तू, वानरराज सुग्रीव, अंगद, नल, नील, जांबुवंत व मारुती हे सर्व नीति-निपुण लोक एकत्रपणे बिभीषणाबरोबर जा आणि त्याला राजतिलक करा.' नंतर बिभीषणाला उद्देशून ते म्हणाले, 'वडिलांच्या आज्ञेमुळे मी नगरात येऊ शकत नाही. परंतु माझ्यासारख्याच असलेल्या वानरांना व लहान भावाला पाठवीत आहे.' ॥ १-२ ॥

**तुरत चले कपि सुनि प्रभु बचना। कीन्ही जाइ तिलक की रचना॥**
**सादर सिंहासन बैठारी। तिलक सारि अस्तुति अनुसारी॥**

प्रभूंचे बोलणे ऐकताच वानर त्वरित निघाले आणि त्यांनी जाऊन राजतिलक करण्याची सर्व व्यवस्था केली. त्यांनी आदरपूर्वक बिभीषणाला सिंहासनावर बसवून राजतिलक केला आणि त्याची स्तुती केली. ॥ ३ ॥

**जोरि पानि सबहीं सिर नाए। सहित बिभीषन प्रभु पहिं आए॥**
**तब रघुबीर बोलि कपि लीन्हे। कहि प्रिय बचन सुखी सब कीन्हे॥**

सर्वजणांनी हात जोडून त्याच्यापुढे मस्तक नम्र केले. त्यानंतर बिभीषणासह सर्वजण प्रभूंच्याजवळ आले. मग श्रीरामांनी वानरांना बोलावून घेतले आणि गोड बोलून सर्वांना सुखावले. ॥ ४ ॥

**छं०—किए सुखी कहि बानी सुधा सम बल तुम्हारें रिपु हयो।**
**पायो बिभीषन राज तिहुँ पुर जसु तुम्हारो नित नयो॥**
**मोहि सहित सुभ कीरति तुम्हारी परम प्रीति जो गाइहैं।**
**संसार सिंधु अपार पार प्रयास बिनु नर पाइहैं॥**

भगवानांनी अमृतासमान वाणीने म्हटले की, 'तुमच्यामुळेच हा प्रबळ शत्रू मारला गेला आणि बिभीषणाला राज्य मिळाले. 'त्यामुळेच सर्वांना आनंद झाला. प्रभू पुढे म्हणाले, 'यामुळे तुमची कीर्ती तिन्ही लोकांमध्ये नित्य नवीन टिकून राहील. जे लोक माझ्यासह तुमची शुभ कीर्ती परम प्रेमाने गातील, ते विनासायास हा अपार संसार-सागर पार करू शकतील.'

**दो०—प्रभु के बचन श्रवन सुनि नहिं अघाहिं कपि पुंज।**
**बार बार सिर नावहिं गहहिं सकल पद कंज॥ १०६॥**

प्रभूंची वाणी ऐकून वानर-समूह तृप्त होत नव्हते. ते सर्व वारंवार नतमस्तक होत होते व त्यांचे चरणकमल धरीत होते.॥ १०६॥

**पुनि प्रभु बोलि लियउ हनुमाना। लंका जाहु कहेउ भगवाना॥**
**समाचार जानकिहि सुनावहु। तासु कुसल लै तुम्ह चलि आवहु॥**

नंतर प्रभूंनी हनुमानाला बोलावले. भगवान म्हणाले, 'तू लंकेत जा. जानकीला सर्व सांग आणि तिची खुशाली घेऊन ये.'॥ १॥

**तब हनुमंत नगर महुँ आए। सुनि निसिचरी निसाचर धाए॥**
**बहु प्रकार तिन्ह पूजा कीन्ही। जनकसुता देखाइ पुनि दीन्ही॥**

मग हनुमान नगरात आला. हे ऐकून राक्षस व राक्षसी त्याचा सत्कार करण्यासाठी धावल्या. त्यांनी अनेक प्रकारे हनुमानाचे स्वागत करुन जानकी कुठे आहे, ते दाखविले.॥ २॥

**दूरिहि ते प्रनाम कपि कीन्हा। रघुपति दूत जानकीं चीन्हा॥**
**कहहु तात प्रभु कृपानिकेता। कुसल अनुज कपि सेन समेता॥**

हनुमानाने सीतेला दुरूनच प्रणाम केला. जानकीने त्याला ओळखले की, हा तोच श्रीरामचंद्रांचा दूत आहे आणि विचारले की, 'वत्सा! कृपेचे धाम माझे प्रभू हे लक्ष्मण व वानरांच्या सेनेसह सुखरूप आहेत ना?'॥ ३॥

**सब बिधि कुसल कोसलाधीसा। मातु समर जीत्यो दससीसा॥**
**अबिचल राजु बिभीषन पायो। सुनि कपि बचन हरष उर छायो॥**

हनुमानाने सांगितले की, 'हे माते, कोसलपती श्रीराम पूर्णपणे सुखरूप आहेत. त्यांनी युद्धात रावणाला जिंकले आहे आणि बिभीषणाला कायमचे राज्य दिले आहे.' हनुमानाचे बोलणे ऐकून सीतेच्या मनाला हर्ष झाला.॥ ४॥

**छं०—अति हरष मन तन पुलक लोचन सजल कह पुनि पुनि रमा।**
**का देउँ तोहि त्रैलोक महुँ कपि किमपि नहिं बानी समा॥**
**सुनु मातु मैं पायो अखिल जग राजु आजु न संसयं।**
**रन जीति रिपुदल बंधु जुत पस्यामि राममनामयं॥**

जानकीच्या हृदयात अत्यंत आनंद झाला.तिचे शरीर पुलकित झाले आणि नेत्रांमध्ये आनंदाश्रू आले. ती वारंवार म्हणत होती की, 'हे हनुमाना, मी तुला काय देऊ? या वार्तेसारखे तिन्ही लोकात इतर काहीच आनंददायक नाही.' हनुमान म्हणाला, 'हे माते, ऐक. मी आज खरोखर सर्व जगाचे राज्य मिळविले आहे. कारण रणामध्ये शत्रुसेनेला जिंकूनही लक्ष्मण व श्रीरामांना निर्विकार रूपात मी पाहात आहे.'

**दो०—सुनु सुत सदगुन सकल तव हृदयँ बसहुँ हनुमंत।**
**सानुकूल कोसलपति रहहुँ समेत अनंत॥ १०७॥**

जानकी म्हणाली, 'हे पुत्रा. ऐक. सर्व सद्‍गुण तुझ्या हृदयात वसोत. आणि हे हनुमाना, लक्ष्मणासह कोसलपती प्रभू तुझ्यावर सदा प्रसन्न राहोत.॥ १०७॥

**अब सोइ जतन करहु तुम्ह ताता। देखौं नयन स्याम मृदु गाता॥**
**तब हनुमान राम पहिं जाई। जनकसुता कै कुसल सुनाई॥**

हे वत्सा, आता मी या डोळ्यांनी प्रभूंच्या कोमल शरीराचे दर्शन करू शकेन, असा उपाय कर.' तेव्हा हनुमानाने श्रीरामांच्याजवळ जाऊन जानकीच्या खुशालीची वार्ता सांगितली.॥ १॥

**सुनि संदेसु भानुकुलभूषन। बोलि लिए जुबराज बिभीषन॥**
**मारुतसुत के संग सिधावहु। सादर जनकसुतहि लै आवहु॥**

सूर्यकुलभूषण श्रीरामांनी वार्ता ऐकल्यावर युवराज अंगद व बिभीषण यांना बोलावून सांगितले की, 'हनुमानाला बरोबर घेऊन जा आणि सीतेला आदराने घेऊन या.'॥ २॥

**तुरतहिं सकल गए जहँ सीता। सेवहिं सब निसिचरीं बिनीता॥**
**बेगि बिभीषन तिन्हहि सिखायो। तिन्ह बहु बिधि मज्जन करवायो॥**

ते त्वरित सीतेकडे गेले. सर्व राक्षसी अत्यंत नम्रतेने सीतेची सेवा करीत होत्या. बिभीषणाने त्वरित त्यांना समजावून सांगितले. तेव्हा त्यांनी अनेक प्रकारे सीतेला स्नान घातले.॥ ३॥

**बहु प्रकार भूषन पहिराए। सिबिका रुचिर साजि पुनि ल्याए॥**
**ता पर हरषि चढ़ी बैदेही। सुमिरि राम सुखधाम सनेही॥**

अनेक प्रकारचे दागिने घातले व मग एक सुंदर पालखी सजवून तिला ते घेऊन आले. सीता प्रसन्न होऊन सुखाचे धाम असलेल्या प्रियतम श्रीरामांचे स्मरण करीत मोठ्या हर्षाने पालखीत बसली.॥ ४॥

**बेतपानि रच्छक चहु पासा। चले सकल मन परम हुलासा॥**
**देखन भालु कीस सब आए। रच्छक कोपि निवारन धाए॥**

चारी बाजूंना हातांत छडी घेऊन रक्षक निघाले. सर्वांच्या मनात परम उल्हास होता. सर्व अस्वले व वानर दर्शन घेण्यासाठी आले, तेव्हा रक्षक रागावून सर्वांना रोखण्यासाठी धावले.॥ ५॥

**कह रघुबीर कहा मम मानहु। सीतहि सखा पयादें आनहु॥**
**देखहुँ कपि जननी की नाईं। बिहसि कहा रघुनाथ गोसाईं॥**

श्रीरघुनाथ हसत म्हणाले, 'हे मित्रा, माझे सांगणे ऐक आणि सीतेला पायी चालत घेऊन ये. त्यामुळे वानर तिला मातेप्रमाणे पाहू शकतील.'॥ ६॥

**सुनि प्रभु बचन भालु कपि हरषे। नभ ते सुरन्ह सुमन बहु बरषे॥**
**सीता प्रथम अनल महुँ राखी। प्रगट कीन्हि चह अंतर साखी॥**

प्रभूंचे वचन ऐकून अस्वले व वानर यांना आनंद झाला. आकाशातून देवांनी फुले उधळली. सीतेचे खरे स्वरूप पूर्वी अग्नीत ठेवले होते. आता अंतर्यामी भगवान ते स्वरूप प्रकट करू इच्छित होते.॥ ७॥

दो०—**तेहि कारन करुनानिधि कहे कछुक दुर्बाद।**
**सुनत जातुधानीं सब लागीं करै बिषाद॥ १०८॥**

त्यासाठी करुणेचे भांडार असलेले श्रीराम लीलेसाठी काही कठोर बोलले. ते ऐकून सर्व राक्षसींना वाईट वाटले.॥ १०८॥

**प्रभु के बचन सीस धरि सीता। बोली मन क्रम बचन पुनीता॥**
**लछिमन होहु धरम के नेगी। पावक प्रगट करहु तुम्ह बेगी॥**

प्रभूंचे बोलणे शिरोधार्य मानून कायावाचामनाने पवित्र असलेली सीता म्हणाली, 'हे लक्ष्मणा, तू मला धर्मासाठी साहाय्य कर आणि त्वरित अग्नी तयार कर.'॥ १॥

**सुनि लछिमन सीता कै बानी। बिरह बिबेक धरम निति सानी॥**
**लोचन सजल जोरि कर दोऊ। प्रभु सन कछु कहि सकत न ओऊ॥**

सीतेचे विरह, विवेक, धर्म आणि नीतीने परिपूर्ण बोलणे ऐकून लक्ष्मणाच्या डोळ्यांत पाणी आले. तो दोन्ही हात जोडून उभा राहिला. तोसुद्धा प्रभूंना काही बोलू शकत नव्हता.॥ २॥

**देखि राम रुख लछिमन धाए। पावक प्रगटि काठ बहु लाए॥**
**पावक प्रबल देखि बैदेही। हृदयँ हरष नहिं भय कछु तेही॥**

मग श्रीरामांचा रोख पाहून लक्ष्मणाने ताबडतोब बरीचशी लाकडे आणून आग पेटवली. आग भडकल्याचे पाहून जानकीच्या मनात आनंद झाला. तिला कसलीही भीती वाटली नाही.॥ ३॥

**जौं मन बच क्रम मम उर माहीं। तजि रघुबीर आन गति नाहीं॥**
**तौ कृसानु सब कै गति जाना। मो कहुँ होउ श्रीखंड समाना॥**

सीतेने लीला करायची म्हणून म्हटले, 'जर कायावाचामनाने माझ्या हृदयात श्रीरघुनाथांना सोडून दुसऱ्या कुणाचाही विचार आला नसेल, तर सर्वांचे मनोगत जाणणारे अग्निदेव माझेही मनोगत जाणून माझ्यासाठी चंदनासमान शीतल होवोत. ॥ ४ ॥

छं०—**श्रीखंड सम पावक प्रबेस कियो सुमिरि प्रभु मैथिली।**
**जय कोसलेस महेस बंदित चरन रति अति निर्मली॥**
**प्रतिबिंब अरु लौकिक कलंक प्रचंड पावक महुँ जरे।**
**प्रभु चरित काहुँ न लखे नभ सुर सिद्ध मुनि देखहिं खरे॥ १ ॥**

प्रभू श्रीरामांचे स्मरण करून आणि ज्यांच्या चरणांचे वंदन महादेव करतात, तसेच ज्यांच्यावर सीतेचे अत्यंत शुद्ध प्रेम आहे, त्या कोसलपतींचा जयजयकार करीत जानकीने चंदनाप्रमाणे शीतल झालेल्या अग्नीमध्ये प्रवेश केला. सीतेच्या प्रतिबिंबाने बिंबरूप चितेत प्रवेश केला आणि तिचा लौकिक कलंक प्रचंड अग्नीत जळून गेला. प्रभूंची ही लीला कुणाला समजू शकली नाही. देव, सिद्ध आणि मुनी हे सर्व आकाशात उभे राहून पाहात होते. ॥ १ ॥

**धरि रूप पावक पानि गहि श्री सत्य श्रुति जग बिदित जो।**
**जिमि छीरसागर इंदिरा रामहि समर्पी आनि सो॥**
**सो राम बाम बिभाग राजति रुचिर अति सोभा भली।**
**नव नील नीरज निकट मानहुँ कनक पंकज की कली॥ २ ॥**

तेव्हा अग्नीने शरीर धारण करून वेदांमध्ये व जगामध्ये प्रसिद्ध असलेल्या खऱ्या सीतेचा हात धरून तिला श्रीरामांना समर्पित केले. ज्याप्रमाणे क्षीरसागराने भगवान विष्णूंना लक्ष्मी समर्पित केली होती. सीता श्रीरामांच्या डाव्या भागी विराजमान झाली. तेव्हा त्यांची शोभा अनुपम होती, जणू नव्या उमललेल्या निळ्या कमळाजवळ सोनेरी कमळाची कळी शोभून दिसत होती. ॥ २ ॥

दो०—**बरषहिं सुमन हरषि सुर बाजहिं गगन निसान।**
**गावहिं किंनर सुरबधू नाचहिं चढ़ीं बिमान॥ १०९ ( क )॥**

देव आनंदाने फुले उधळत होते. आकाशात दुंदुभी वाजू लागल्या. किन्नर गाऊ लागले. विमानातील अप्सरा नाचू लागल्या. ॥ १०९(क) ॥

**जनकसुता समेत प्रभु सोभा अमित अपार।**
**देखि भालु कपि हरषे जय रघुपति सुख सार॥ १०९ ( ख )॥**

जानकीसह प्रभू रामचंद्रांची अपरिमित व अपार शोभा पाहून अस्वले व वानर आनंदून गेले आणि सुख-सागर श्रीरामांचा विजय असो, असे म्हणू लागले. ॥ १०९(ख) ॥

**तब रघुपति अनुसासन पाई। मातलि चलेउ चरन सिरु नाई॥**
**आए देव सदा स्वारथी। बचन कहहिं जनु परमारथी॥**

तेव्हा श्रीरघुनाथांची आज्ञा घेऊन व त्यांच्या चरणांवर मस्तक ठेवून इंद्र आपला सारथी मातली याच्यासह निघून गेला. त्यानंतर नेहमी स्वार्थी असलेले देव आले. ते जणू परमार्थ्याप्रमाणे बोलू लागले. ॥ १ ॥

**दीन बंधु दयाल रघुराया। देव कीन्हि देवन्ह पर दाया॥**
**बिस्व द्रोह रत यह खल कामी। निज अघ गयउ कुमारगगामी॥**

'हे दीनबंधू, हे दयाळू रघुराज, हे परमदेव, तुम्ही देवांच्यावर मोठी कृपा केली. विश्वाचा द्रोह करण्यात तत्पर असलेला हा दुष्ट, कामी आणि कुमार्गी रावण स्वतःच्याच पापामुळे नष्ट झाला. ॥ २ ॥

**तुम्ह समरूप ब्रह्म अबिनासी। सदा एकरस सहज उदासी॥**
**अकल अगुन अज अनघ अनामय। अजित अमोघसक्ति करुनामय॥**

तुम्ही समरूप, ब्रह्म, अविनाशी, नित्य, एकरस, स्वभावतःच शत्रु-मित्रभावाने रहित, अखंड, निर्गुण, अजन्मा, निष्पाप, निर्विकार, अजेय, अमोघशक्तीचे आणि दयामय आहात. ॥ ३ ॥

**मीन कमठ सूकर नरहरी। बामन परसुराम बपु धरी॥**
**जब जब नाथ सुरन्ह दुखु पायो। नाना तनु धरि तुम्हइँ नसायो॥**

तुम्हीच मत्स्य, कूर्म, वराह, नृसिंह, वामन आणि परशुराम ही शरीरे धारण केली. हे नाथ, जेव्हा जेव्हा देवांना दुःख झाले, तेव्हा तेव्हा अनेक शरीरे धारण करून तुम्हीच त्यांचे दुःख दूर केले. ॥ ४ ॥

**यह खल मलिन सदा सुरद्रोही। काम लोभ मद रत अति कोही॥**
**अधम सिरोमनि तव पद पावा। यह हमरें मन बिसमय आवा॥**

हा रावण दुष्ट, मलिनहृदयी, देवांचा कायमचा शत्रू, कामी, लोभी, मदपरायण आणि अत्यंत क्रोधी होता. अशा अधर्म-शिरोमणी रावणानेही तुमचे परमपद प्राप्त केले, या गोष्टीचे आमच्या मनाला आश्चर्य वाटते. ॥ ५ ॥

**हम देवता परम अधिकारी। स्वारथ रत प्रभु भगति बिसारी॥**
**भव प्रबाहँ संतत हम परे। अब प्रभु पाहि सरन अनुसरे॥**

आम्ही देव श्रेष्ठ अधिकारी असूनही स्वार्थपरायण आहोत. तुमची भक्ती विसरून निरंतर जन्म-मृत्यूच्या चक्रात सापडलो आहोत. आता हे प्रभो, आम्ही तुम्हांला शरण आलो आहोत. आमचे रक्षण करा.' ॥ ६ ॥

दो०—**करि बिनती सुर सिद्ध सब रहे जहँ तहँ कर जोरि।**
**अति सप्रेम तन पुलकि बिधि अस्तुति करत बहोरि॥ ११०॥**

अशी विनंती करून देव आणि सिद्ध तिथेच हात जोडून उभे राहिले. तेव्हा अत्यंत प्रेमाने पुलकित होऊन ब्रह्मदेव स्तुती करू लागले. ॥ ११० ॥

**छं०—जय राम सदा सुखधाम हरे । रघुनायक सायक चाप धरे ॥**
**भव बारन दारन सिंह प्रभो । गुन सागर नागर नाथ बिभो ॥**

हे नित्य सुखधाम आणि दुःख हरण करणारे हरी, हे धनुष्यबाण धारण केलेले श्रीरघुनाथ, तुमचा विजय असो. हे प्रभो, तुम्ही भवरूपी हत्तीला विदीर्ण करणाऱ्या सिंहासमान आहात. हे नाथ, हे सर्वव्यापक, तुम्ही गुणांचे समुद्र व सज्जनशिरोमणी आहात. ॥ १ ॥

**तन काम अनेक अनूप छबी । गुन गावत सिद्ध मुनींद्र कबी ॥**
**जसु पावन रावन नाग महा । खगनाथ जथा करि कोप गहा ॥**

तुमच्या शरीराचे सौंदर्य अनेक कामदेवांसमान परंतु अनुपम सौंदर्यशाली आहे. सिद्ध, मुनीश्वर आणि कवी तुमचे गुण गात असतात. तुमची कीर्ती पवित्र आहे. तुम्ही रावणरूपी महासर्पाला क्रुद्ध होऊन गरुडाप्रमाणे पकडले. ॥ २ ॥

**जन रंजन भंजन सोक भयं । गतक्रोध सदा प्रभु बोधमयं ॥**
**अवतार उदार अपार गुनं । महि भार बिभंजन ग्यानघनं ॥**

हे प्रभो, तुम्ही सेवकांना आनंद देणारे, शोक व भय यांचा नाश करणारे, नित्य क्रोधरहित आणि नित्य ज्ञानस्वरूप आहात. तुमचा अवतार श्रेष्ठ, अपार दिव्य गुणांनी पूर्ण, पृथ्वीचा भार उतरवणारा व ज्ञानाचा समूह आहे. ॥ ३ ॥

**अज ब्यापकमेकमनादि सदा । करुनाकर राम नमामि मुदा ॥**
**रघुबंस बिभूषन दूषन हा । कृत भूप बिभीषन दीन रहा ॥**

परंतु अवतार घेऊनही तुम्ही नित्य, अजन्मा, व्यापक, अद्वितीय आणि अनादी आहात. हे करुणेची खाण असलेले श्रीराम, मी तुम्हांला मोठ्या आनंदाने नमस्कार करतो. हे रघुकुलाचे भूषण, हे दूषण राक्षसाला मारणारे आणि सर्व दोष हरण करणारे, बिभीषण दीन होता, त्याला तुम्ही लंकेचा राजा बनविले. ॥ ४ ॥

**गुन ग्यान निधान अमान अजं । नित राम नमामि बिभुं बिरजं ॥**
**भुजदंड प्रचंड प्रताप बलं । खल बृंद निकंद महा कुसलं ॥**

हे गुण आणि ज्ञानाचे भांडार, हे मानरहित, हे अजन्मा, व्यापक व मायिक विकारांनी रहित श्रीराम, मी तुम्हांला नित्य नमस्कार करतो. तुमच्या भुजदंडांचा प्रताप आणि बळ प्रचंड आहे. दुष्टसमूहाचा नाश करण्यात तुम्ही अत्यंत निपुण आहात. ॥ ५ ॥

**बिनु कारन दीन दयाल हितं । छबि धाम नमामि रमा सहितं ॥**
**भव तारन कारन काज परं । मन संभव दारुन दोष हरं ॥**

हे दीनांवर अकारण दया करणारे व त्यांचे हित करणारे आणि शोभाधाम, जानकीसह तुम्हांला मी नमस्कार करतो. तुम्ही भवसागरातून तारून नेणारे आहात. कारणरूप प्रकृती व कार्यरूप विश्व या दोहींच्या पलीकडचे आहात आणि मनात उत्पन्न होणाऱ्या भयंकर दोषांचे हरण करणारे आहात. ॥ ६ ॥

**सर चाप मनोहर त्रोन धरं। जलजारुन लोचन भूपबरं॥**
**सुख मंदिर सुंदर श्रीरमनं। मद मार मुधा ममता समनं॥**

तुम्ही मनोहर बाण, धनुष्य आणि भाता धारण करणारे आहात. लाल कमलांप्रमाणे रक्तवर्ण तुमचे नेत्र आहेत. तुम्ही राजांमध्ये श्रेष्ठ, सुखाचे मंदिर, सुंदर श्रीलक्ष्मीचे वल्लभ आणि मद, काम आणि खोट्या ममतेचा नाश करणारे आहात. ॥ ७ ॥

**अनवद्य अखंड न गोचर गो। सबरूप सदा सब होइ न गो॥**
**इति बेद बदंति न दंतकथा। रबि आतप भिन्नमभिन्न जथा॥**

तुम्ही दोषरहित आहात. अखंड आहात, तुम्ही इंद्रियांचे विषय नाहीत. सदा सर्वरूप असूनही तुम्ही कधी ते सर्व झाला नाहीत, असे वेद म्हणतात. ही काही दंतकथा नाही. ज्याप्रमाणे सूर्य आणि सूर्यप्रकाश वेगळे असूनही वेगळे नाहीत, त्याप्रमाणे तुम्हीसुद्धा संसाराहून भिन्न व अभिन्न दोन्हीही आहात. ॥ ८ ॥

**कृतकृत्य बिभो सब बानर ए। निरखंति तवानन सादर ए॥**
**धिग जीवन देव सरीर हरे। तव भक्ति बिना भव भूलि परे॥**

हे व्यापक प्रभो, हे सर्व वानर कृतार्थ झाले आहेत. ते आदराने तुमचे मुखदर्शन करीत आहेत. हे हरी, आम्हा अमरांचे जीवन आणि देव-शरीर यांचा धिक्कार असो. आम्ही तुमच्या भक्तीने रहित असून सांसारिक विषयांमध्ये गुंतून पडलो आहोत. ॥ ९ ॥

**अब दीनदयाल दया करिऐ। मति मोरि बिभेदकरी हरिऐ॥**
**जेहि ते बिपरीत क्रिया करिऐ। दुख सो सुख मानि सुखी चरिऐ॥**

हे दीनदयाळ, आता दया करा आणि भेद उत्पन्न करणारी माझी बुद्धी हरण करा. तिच्यामुळे मी विपरीत कर्म करतो आणि जे दु:ख आहे, त्यालाच सुख मानून आनंदाने फिरतो. ॥ १० ॥

**खल खंडन मंडन रम्य छमा। पद पंकज सेवित संभु उमा॥**
**नृप नायक दे बरदानमिदं। चरनांबुज प्रेमु सदा सुभदं॥**

तुम्ही दुष्टांचे खंडन करणारे आहात आणि पृथ्वीचे रमणीय अलंकार आहात. तुमच्या चरणकमलांची सेवा श्रीशिवपार्वतीकडून होते. हे राजांचे महाराज, तुमच्या चरणकमलांच्या ठायी माझे सदा अनन्य प्रेम राहो, असे वरदान मला द्या.' ॥ ११ ॥

दो०—**बिनय कीन्हि चतुरानन प्रेम पुलक अति गात।**
**सोभासिंधु बिलोकत लोचन नहीं अघात॥ १११॥**

अशा प्रकारे ब्रह्मदेवांनी अत्यंत प्रेमाने पुलकित होऊन विनंती केली. शोभेचे समुद्र असलेल्या श्रीरामांचे दर्शन घेताना त्यांचे नेत्र तृप्तच होत नव्हते.॥ १११॥

**तेहि अवसर दसरथ तहँ आए। तनय बिलोकि नयन जल छाए॥**
**अनुज सहित प्रभु बंदन कीन्हा। आसिरबाद पिताँ तब दीन्हा॥**

त्याचवेळी दशरथ तेथे अवतीर्ण झाले. पुत्र श्रीरामांना पाहून त्यांच्या नेत्रांमध्ये प्रेमाश्रू आले. राम व लक्ष्मणांनी त्यांना वंदन केले, तेव्हा पित्याने त्यांना आशीर्वाद दिला.॥ १॥

**तात सकल तव पुन्य प्रभाऊ। जीत्यों अजय निसाचर राऊ॥**
**सुनि सुत बचन प्रीति अति बाढ़ी। नयन सलिल रोमावलि ठाढ़ी॥**

श्रीराम म्हणाले, 'हे तात, हा सर्व तुमच्या पुण्याचा प्रभाव आहे. त्यामुळे मी अजेय राक्षसराजाला जिंकले.' पुत्राचे बोलणे ऐकून दशरथांच्या मनातील प्रेमाला भरती आली. नेत्रांमध्ये पाणी आले आणि ते रोमांचित झाले.॥ २॥

**रघुपति प्रथम प्रेम अनुमाना। चितइ पितहि दीन्हेउ दृढ़ ग्याना॥**
**ताते उमा मोच्छ नहिं पायो। दसरथ भेद भगति मन लायो॥**

श्रीरामांनी त्यांच्या जिवंतपणीच्या प्रेमाच्या विचाराने पित्याकडे पाहून त्यांना आपल्या स्वरूपाचे दृढ ज्ञान करून दिले. हे उमे, दशरथांनी भेद-भक्तीमध्ये मन लावले होते, त्यामुळे त्यांना मोक्ष मिळाला नव्हता.॥ ३॥

**सगुनोपासक मोच्छ न लेहीं। तिन्ह कहुँ राम भगति निज देहीं॥**
**बार बार करि प्रभुहि प्रनामा। दसरथ हरषि गए सुरधामा॥**

मायारहित सच्चिदानंद स्वरूपभूत दिव्यगुणयुक्त सगुण स्वरूपाची उपासना करणारे जे भक्त अशा प्रकारचा मोक्षही घेत नाहीत, त्यांना श्रीराम आपली भक्ती देतात. प्रभूंना मनःपूर्वक वारंवार प्रणाम करून दशरथ आनंदाने देवलोकी गेले.॥ ४॥

दो०—**अनुज जानकी सहित प्रभु कुसल कोसलाधीस।**
**सोभा देखि हरषि मन अस्तुति कर सुर ईस॥ ११२॥**

लक्ष्मण व जानकीसह परम कुशल प्रभू कोसलाधीशांची शोभा पाहून देवराज इंद्र हर्षित होऊन स्तुती करू लागला.॥ ११२॥

छं०—**जय राम सोभा धाम। दायक प्रनत बिश्राम॥**
**धृत त्रोन बर सर चाप। भुजदंड प्रबल प्रताप॥**

‘शोभेचे धाम, शरणागताला विश्राम देणारे, श्रेष्ठ भाता, धनुष्य आणि बाण धारण केलेले, प्रबल प्रतापी भुजदंड असलेले, अशा श्रीरामचंद्रांचा विजय असो. ॥ १ ॥

**जय दूषनारि खरारि । मर्दन निसाचर धारि ॥**
**यह दुष्ट मारेउ नाथ । भए देव सकल सनाथ ॥**

हे खर आणि दूषण यांचे शत्रू आणि राक्षससेनेचे मर्दन करणारे, हे प्रभू, तुमचा विजय असो. आपण या दुष्टाला मारल्यामुळे सर्व देव निर्भय झाले. ॥ २ ॥

**जय हरन धरनी भार । महिमा उदार अपार ॥**
**जय रावनारि कृपाल । किए जातुधान बिहाल ॥**

हे भूमीचा भार हरण करणारे, हे अपार श्रेष्ठ महिमा असणारे, तुमचा विजय असो. हे रावणाचे शत्रू, हे कृपाळू, तुमचा विजय असो. तुम्ही राक्षसांचा नाश केला. ॥ ३ ॥

**लंकेस अति बल गर्ब । किए बस्य सुर गंधर्ब ॥**
**मुनि सिद्ध नर खग नाग । हठि पंथ सब कें लाग ॥**

लंकापती रावणाला आपल्या बळाची घमेंड होती. त्याने देव आणि गंधर्व या सर्वांना अधीन करून ठेवले होते आणि तो मुनी, सिद्ध, मनुष्य, पक्षी आणि नाग इत्यादी सर्वांना हट्टाने सतावत होता. ॥ ४ ॥

**परद्रोह रत अति दुष्ट । पायो सो फलु पापिष्ट ॥**
**अब सुनहु दीन दयाल । राजीव नयन बिसाल ॥**

तो दुसऱ्यांचा द्रोह करण्यात पटाईत आणि अत्यंत दुष्ट होता. त्या पाप्याला तसेच फळ मिळाले. आता हे दीनांवर दया करणारे, हे कमलासमान विशाल नेत्र असणारे प्रभो ! ऐका. ॥ ५ ॥

**मोहि रहा अति अभिमान । नहिं कोउ मोहि समान ॥**
**अब देखि प्रभु पद कंज । गत मान प्रद दुख पुंज ॥**

मला अत्यंत अभिमान होता की, माझ्यासारखा कोणीही नाही; परंतु आता हे प्रभू, तुमच्या चरण-कमलांचे दर्शन घेतल्याने दुःखांचे डोंगर देणारा माझा तो अभिमान आता दूर झाला. ॥ ६ ॥

**कोउ ब्रह्म निर्गुन ध्याव । अब्यक्त जेहि श्रुति गाव ॥**
**मोहि भाव कोसल भूप । श्रीराम सगुन सरूप ॥**

कोणी निर्गुण ब्रह्माचे ध्यान करतात, त्याला वेद अव्यक्त निराकार ब्रह्म म्हणतात, परंतु हे श्रीराम, मला तर तुमचे हे सगुण कोसलराज-स्वरूपच आवडते. ॥ ७ ॥

**बैदेहि अनुज समेत । मम हृदयँ करहु निकेत ॥**
**मोहि जानिऐ निज दास । दे भक्ति रमानिवास ॥**

श्रीजानकी आणि लक्ष्मण यांच्यासह माझ्या मनात आपला निवास करा. हे रमानिवास, मला आपला दास समजा आणि आपली भक्ती द्या. ॥ ८ ॥

**छं०—दे भक्ति रमानिवास त्रास हरन सरन सुखदायकं।**
**सुख धाम राम नमामि काम अनेक छबि रघुनायकं॥**
**सुर बृंद रंजन द्वंद भंजन मनुजतनु अतुलितबलं।**
**ब्रह्मादि संकर सेब्य राम नमामि करुना कोमलं॥**

हे रमानिवास, हे शरणागताचे भय हरण करणारे आणि त्याला सर्व प्रकारचे सुख देणारे, मला आपली भक्ती द्या. हे सुखधाम, हे अनेक कामदेवांच्या सौंदर्याचे माहेरघर, रघुकुलाचे स्वामी, श्रीरामचंद्र! मी तुम्हांला नमस्कार करतो. हे देव-समाजाला आनंद देणारे, जन्म-मृत्यू आदी द्वंद्वांचा नाश करणारे, मनुष्यदेहधारी, अतुलनीय बलाचे, ब्रह्मदेव आणि शिव इत्यादींकडून सेवा घेणारे, करुणेने कोमल श्रीराम, मी तुम्हांला नमस्कार करतो.

**दो०—अब करि कृपा बिलोकि मोहि आयसु देहु कृपाल।**
**काह करौं सुनि प्रिय बचन बोले दीनदयाल॥ ११३॥**

हे कृपाळू! आता माझ्याकडे कृपादृष्टीने पाहून मला आज्ञा करा की, मी काय सेवा करू?' इंद्राचे हे गोड बोलणे ऐकून दीनदयाळ श्रीराम म्हणाले, ॥ ११३ ॥

**सुनु सुरपति कपि भालु हमारे। परे भूमि निसिचरन्हि जे मारे॥**
**मम हित लागि तजे इन्ह प्राना। सकल जिआउ सुरेस सुजाना॥**

'हे देवराज, ऐकून घे. आमच्या ज्या वानर व अस्वलांना निशाचरांनी मारून टाकल्यामुळे ते पृथ्वीवर पडलेले आहेत. यांनी माझ्यासाठी आपले प्राण वेचले आहेत. हे सुज्ञ देवराज, या सर्वांना जिवंत कर.'॥

**सुनु खगेस प्रभु कै यह बानी। अति अगाध जानहिं मुनि ग्यानी॥**
**प्रभु सक त्रिभुअन मारि जिआई। केवल सक्रहि दीन्हि बड़ाई॥**

काकभुशुंडी म्हणतात, 'हे गरुडा, ऐक. प्रभूंचे हे बोलणे अत्यंत गूढ आहे. ज्ञानी मुनीच ते जाणू शकतात. प्रभू श्रीराम त्रैलोक्यास मारून जिवंत करू शकतात. पण या प्रसंगी त्यांनी इंद्राला मोठेपणा दिला एवढेच. ॥ २ ॥

**सुधा बरषि कपि भालु जिआए। हरषि उठे सब प्रभु पहिं आए॥**
**सुधाबृष्टि भै दुहु दल ऊपर। जिए भालु कपि नहिं रजनीचर॥**

इंद्राने अमृताचा वर्षाव करून वानर व अस्वले यांना जिवंत केले. सर्व आनंदाने उठले आणि प्रभूंच्याजवळ आले. अमृताचा वर्षाव दोन्ही पक्षांवर झाला, परंतु वानर व अस्वले हीच जिवंत झाली. राक्षस नाहीत. ॥ ३ ॥

**रामाकार भए तिन्ह के मन। मुक्त भए छूटे भव बंधन॥**
**सुर अंसिक सब कपि अरु रीछा। जिए सकल रघुपति कीं ईछा॥**

कारण राक्षसांची मने मरताना रामाकार झाली होती. म्हणून ते मुक्त झाले. त्यांची भव-बंधने तुटून गेली. परंतु वानर व अस्वले तर सर्व देवांश असून भगवंतांच्या लीलेतील सहचर होते. म्हणून ते सर्व श्रीरघुनाथांच्या इच्छेने जीवित झाले.॥ ४॥

**राम सरिस को दीन हितकारी। कीन्हे मुकुत निसाचर झारी॥**
**खल मल धाम कामरत रावन। गति पाई जो मुनिबर पाव न॥**

श्रीरामांच्यासारखा दीनांचे हित करणारा कोण आहे ? त्यांनी सर्व राक्षसांना मुक्त करून टाकले. दुष्ट, पापांचे घर आणि कामी असणाऱ्या रावणालाही श्रेष्ठ मुनींनाही जी गती मिळत नाही, ती मिळाली.॥ ५॥

दो०—**सुमन बरषि सब सुर चले चढ़ि चढ़ि रुचिर बिमान।**
**देखि सुअवसर प्रभु पहिं आयउ संभु सुजान॥ ११४ (क)॥**

फुलांचा वर्षाव करून देव सुंदर विमानांत बसून परत गेले. तेव्हा सुयोग्य वेळ पाहून सर्वज्ञ शिव हे प्रभू रामचंद्रांच्या जवळ आले.॥ ११४ (क)॥

**परम प्रीति कर जोरि जुग नलिन नयन भरि बारि।**
**पुलकित तन गदगद गिराँ बिनय करत त्रिपुरारि॥ ११४ (ख)॥**

आणि परम प्रेमाने दोन्ही हात जोडून, कमलांसारख्या नेत्रांमधून अश्रू भरून, पुलकित शरीर व सद्गदित वाणीने विनंती करू लागले.॥ ११४ (ख)॥

छं०—**मामभिरक्षय रघुकुल नायक। धृत बर चाप रुचिर कर सायक॥**
**मोह महा घन पटल प्रभंजन। संसय बिपिन अनल सुर रंजन॥**

हे रघुकुलाचे स्वामी, सुंदर हातांमध्ये श्रेष्ठ धनुष्य व सुंदर बाण धारण केलेले तुम्ही माझे रक्षण करा. तुम्ही महामोहरूपी मेघसमूहाला पिटाळून लावणारे पवन आहात, संशयरूपी वनास भस्म करणारे अग्नी आहात आणि देवांना आनंद देणारे आहात.॥ १॥

**अगुन सगुन गुन मंदिर सुंदर। भ्रम तम प्रबल प्रताप दिवाकर॥**
**काम क्रोध मद गज पंचानन। बसहु निरंतर जन मन कानन॥**

तुम्ही निर्गुण, सगुण, दिव्य गुणांचे धाम आणि परम सुंदर आहात. भ्रमरूपी अंधकाराच्या नाशासाठी प्रबल प्रतापी सूर्य आहात. काम, क्रोध आणि मदरूपी हत्तींना मारण्यासाठी सिंहाप्रमाणे असणारे तुम्ही या सेवकाच्या मनरूपी वनामध्ये निरंतर निवास करा.॥ २॥

**बिषय मनोरथ पुंज कंज बन। प्रबल तुषार उदार पार मन॥**
**भव बारिधि मंदर परमं दर। बारय तारय संसृति दुस्तर॥**

विषय-कामनांच्या समूहरूपी कमलवनाच्या नाशासाठी तुम्ही प्रबळ हिमवर्षाव आहात, तुम्ही उदार व मनापलीकडचे आहात. भवसागराचे मंथन करण्यासाठी तुम्ही मंदराचल आहात. तुम्ही आमचे परम भय दूर करा व आम्हांला दुस्तर अशा संसार-सागरातून तरून न्या.॥ ३॥

**स्याम गात राजीव बिलोचन। दीन बंधु प्रनतारति मोचन॥**
**अनुज जानकी सहित निरंतर। बसहु राम नृप मम उर अंतर॥**
**मुनि रंजन महि मंडल मंडन। तुलसिदास प्रभु त्रास बिखंडन॥**

हे श्यामसुंदर-शरीर, हे कमलनयन, हे दीनबंधू, हे शरणागतांना दुःखातून मुक्त करणारे, हे राजा श्रीरामचंद्र, तुम्ही लक्ष्मण व जानकीसह माझ्या हृदयात निरंतर निवास करा. तुम्ही मुनींना आनंद देणारे, पृथ्वीमंडलाचे भूषण, तुलसीदासाचे प्रभू आणि भयाचा नाश करणारे आहात.॥ ४-५॥

दो०—**नाथ जबहिं कोसलपुरीं होइहि तिलक तुम्हार।**
**कृपासिंधु मैं आउब देखन चरित उदार॥ ११५॥**

हे नाथ, जेव्हा अयोध्यापुरीमध्ये तुमचा राजतिलक होईल, तेव्हा हे कृपासागर, मी तुमची ती उदार लीला पाहाण्यास येईन.'॥ ११५॥

**करि बिनती जब संभु सिधाए। तब प्रभु निकट बिभीषनु आए॥**
**नाइ चरन सिरु कह मृदु बानी। बिनय सुनहु प्रभु सारँगपानी॥**

जेव्हा शिव विनंती करून निघून गेले, तेव्हा बिभीषण प्रभूंजवळ आला आणि चरणी नतमस्तक होऊन कोमल वाणीने म्हणाला, 'हे शार्ङ्गधनुष्य धारण करणारे प्रभो, माझी विनंती ऐका.॥ १॥

**सकुल सदल प्रभु रावन मार्‍यो। पावन जस त्रिभुवन बिस्तार्‍यो॥**
**दीन मलीन हीन मति जाती। मो पर कृपा कीन्हि बहु भाँती॥**

तुम्ही कुलासह व सेनेसह रावणाचा वध केला. त्रिभुवनात आपली पवित्र कीर्ती पसरविली आणि मज दीन, पापी, बुद्धिहीन व जातिहीन सेवकावर अनेक प्रकारे कृपा केली.॥ २॥

**अब जन गृह पुनीत प्रभु कीजे। मज्जनु करिअ समर श्रम छीजे॥**
**देखि कोस मंदिर संपदा। देहु कृपाल कपिन्ह कहुँ मुदा॥**

आता हे प्रभू, या दासाचे घर पवित्र करा आणि तेथे येऊन स्नान करा. त्यामुळे युद्धाचा शीण नाहीसा होईल. हे कृपाळू! खजिना, महाल आणि संपत्तीचे निरीक्षण करून तिने प्रसन्नपणे वानरांचा सत्कार करा.॥ ३॥

**सब बिधि नाथ मोहि अपनाइअ। पुनि मोहि सहित अवधपुर जाइअ॥**
**सुनत बचन मृदु दीनदयाला। सजल भए द्वौ नयन बिसाला॥**

हे नाथ, मला सर्व प्रकारे आपले करून घ्या आणि हे प्रभो, मला बरोबर घेऊन अयोध्यापुरीला जा.' बिभीषणाचे हे मृदू बोलणे ऐकताच दीनदयाळ प्रभूंच्या दोन्ही विशाल नेत्रांमध्ये प्रेमाश्रू दाटले. ॥ ४ ॥

दो०—**तोर कोस गृह मोर सब सत्य बचन सुनु भ्रात।**
**भरत दसा सुमिरत मोहि निमिष कल्प सम जात॥ ११६ ( क )॥**

श्रीराम म्हणाले, 'हे बंधू, ऐक. तुझा खजिना आणि घर हे माझेच आहे ही गोष्ट खरी. परंतु भरताच्या अवस्थेची आठवण येताच मला एक एक पळ कल्पाप्रमाणे वाटतो. ॥ ११६ (क) ॥

**तापस बेष गात कृस जपत निरंतर मोहि।**
**देखौं बेगि सो जतनु करु सखा निहोरउँ तोहि॥ ११६ ( ख )॥**

तपस्वी वेषामध्ये दुर्बल शरीराने तो निरंतर माझ्या नामाचा जप करीत बसला आहे. मी त्याला लवकरात लवकर भेटू शकेन, अशी व्यवस्था कर. माझी तुला हीच विनंती आहे. ॥ ११६ (ख) ॥

**बीतें अवधि जाउँ जौं जिअत न पावउँ बीर।**
**सुमिरत अनुज प्रीति प्रभु पुनि पुनि पुलक सरीर॥ ११६ ( ग )॥**

जर वेळ चुकली, तर मी माझ्या भावाला जिवंत पाहू शकणार नाही.' लहान भाऊ भरत याच्या प्रेमाच्या आठवणीने प्रभूंचे शरीर वारंवार पुलकित होत होते. ॥ ११६ (ग) ॥

**करेहु कल्प भरि राजु तुम्ह मोहि सुमिरेहु मन माहिं।**
**पुनि मम धाम पाइहहु जहाँ संत सब जाहिं॥ ११६ ( घ )॥**

श्रीराम पुढे म्हणाले, 'हे बिभीषणा, तू कल्पापर्यंत राज्य कर आणि मनामध्ये माझे निरंतर स्मरण करीत राहा. मग जेथे सर्व संत जातात, ते परमधाम तुला मिळेल. ॥ ११६ (घ) ॥

**सुनत बिभीषन बचन राम के। हरषि गहे पद कृपाधाम के॥**
**बानर भालु सकल हरषाने। गहि प्रभु पद गुन बिमल बखाने॥**

श्रीरामचंद्रांचे बोलणे ऐकताच बिभीषणाने हर्षित होऊन कृपाधाम श्रीरामचंद्रांचे चरण धरले. सर्व वानर व अस्वले आनंदित झाली आणि प्रभूंचे पाय धरून त्यांच्या निर्मल गुणांची वाखाणणी करू लागली. ॥ १ ॥

**बहुरि बिभीषन भवन सिधायो। मनि गन बसन बिमान भरायो॥**
**लै पुष्पक प्रभु आगें राखा। हँसि करि कृपासिंधु तब भाषा॥**

नंतर बिभीषण आपल्या महालात गेला आणि त्याने रत्ने व वस्त्रे विमानात भरली. मग ते पुष्पक विमान आणून प्रभूंच्यासमोर ठेवले. तेव्हा कृपासागर श्रीराम हसून म्हणाले, ॥ २ ॥

**चढ़ि बिमान सुनु सखा बिभीषन। गगन जाइ बरषहु पट भूषन॥**
**नभ पर जाइ बिभीषन तबही। बरषि दिए मनि अंबर सबही॥**

'हे मित्रा बिभीषणा, विमानात बसून आकाशात जाऊन सर्व रत्ने व वस्त्रे उधळून टाक.' आज्ञा होताच बिभीषणाने आकाशात जाऊन सर्व रत्ने व वस्त्रे यांचा वर्षाव केला. ॥ ३ ॥

**जोइ जोइ मन भावइ सोइ लेहीं। मनि मुख मेलि डारि कपि देहीं॥**
**हँसे रामु श्री अनुज समेता। परम कौतुकी कृपा निकेता॥**

ज्याला जे आवडले, ते त्याने घेतले. वानर-अस्वले रत्ने तोंडात घालून या खाण्याच्या वस्तू नाहीत, म्हणून टाकून देत होते. ही गंमत पाहून परम विनोदी आणि कृपा-धाम श्रीराम, सीता व लक्ष्मण हसू लागले. ॥ ४ ॥

दो०—**मुनि जेहि ध्यान न पावहिं नेति नेति कह बेद।**
**कृपासिंधु सोइ कपिन्ह सन करत अनेक बिनोद॥ ११७ ( क )॥**

मुनीसुद्धा ज्यांना ध्यानामध्ये प्राप्त करू शकत नाहीत, वेद ज्यांना 'नेति नेति' असे म्हणतात, तेच कृपासागर श्रीराम वानरांबरोबर अनेक प्रकारचे विनोद करीत आहेत. ॥ ११७ (क) ॥

**उमा जोग जप दान तप नाना मख ब्रत नेम।**
**राम कृपा नहिं करहिं तसि जसि निष्केवल प्रेम॥ ११७ ( ख )॥**

श्रीशिव म्हणतात, 'हे उमे, अनेक प्रकारचे योग, जप, दान, तप, यज्ञ, व्रत आणि नियम केल्यावरही अनन्य प्रेम नसेल तर श्रीराम अशी कृपा करीत नाहीत.' ॥ ११७ (ख) ॥

**भालु कपिन्ह पट भूषन पाए। पहिरि पहिरि रघुपति पहिं आए॥**
**नाना जिनस देखि सब कीसा। पुनि पुनि हँसत कोसलाधीसा॥**

अस्वले व वानरांना कपडे व दागिने मिळाले. आणि ते घालून ते सर्व श्रीरघुनाथांच्याजवळ आले. अनेक जातींच्या वानरांना पाहून श्रीराम वारंवार हसत होते. ॥ १ ॥

**चितइ सबन्हि पर कीन्ही दाया। बोले मृदुल बचन रघुराया॥**
**तुम्हरें बल मैं रावनु मार्‍यो। तिलक बिभीषन कहँ पुनि सार्‍यो॥**

श्रीरघुनाथांनी कृपादृष्टीने पाहून सर्वांवर दया केली. मग ते कोमल स्वराने म्हणाले, 'हे बंधूंनो, तुमच्या बळावरच मी रावणाला मारले आणि बिभीषणाला राजतिलक केला. ॥ २ ॥

**निज निज गृह अब तुम्ह सब जाहू। सुमिरेहु मोहि डरपहु जनि काहू॥**
**सुनत बचन प्रेमाकुल बानर। जोरि पानि बोले सब सादर॥**

आता तुम्ही आपापल्या घरी जा. माझे स्मरण करीत राहा आणि कुणालाही भिऊ नका.' हे ऐकून सर्व वानर प्रेम-विव्हल होऊन हात जोडून आदराने म्हणाले,॥ ३॥

**प्रभु जोइ कहहु तुम्हहि सब सोहा। हमरें होत बचन सुनि मोहा॥**
**दीन जानि कपि किए सनाथा। तुम्ह त्रैलोक ईस रघुनाथा॥**

'प्रभो, तुम्ही जे म्हणता, ते सर्व तुम्हांला शोभून दिसते. परंतु तुमचे बोलणे ऐकून आम्हांला मोह होत आहे. हे रघुनाथ, तुम्ही तिन्ही लोकांचे ईश्वर आहात. आम्हा वानरांना दीन समजून तुम्ही आम्हांला कृतार्थ केले आहे.॥ ४॥

**सुनि प्रभु बचन लाज हम मरहीं। मसक कहूँ खगपति हित करहीं॥**
**देखि राम रुख बानर रीछा। प्रेम मगन नहिं गृह कै ईछा॥**

प्रभूंचे बोलणे ऐकून आम्ही लाजेने मरून जात आहोत. माशा कधी गरुडाचे हित करू शकतील का?' श्रीरामांचा रोख पाहून अस्वले व वानर प्रेम-मग्न होऊन गेले. त्यांना घरी जाण्याची इच्छा नव्हती.॥ ५॥

दो०—**प्रभु प्रेरित कपि भालु सब राम रूप उर राखि।**
**हरष बिषाद सहित चले बिनय बिबिध बिधि भाषि॥ ११८ (क)॥**

परंतु प्रभूंच्या आज्ञेमुळे सर्व वानर व अस्वले श्रीरामांचे रूप हृदयी धारण करून अनेक प्रकारे विनंती करीत हर्ष व विषादाने घरी निघाली.॥ ११८ (क)॥

**कपिपति नील रीछपति अंगद नल हनुमान।**
**सहित बिभीषन अपर जे जूथप कपि बलवान॥ ११८ (ख)॥**

वानरराज सुग्रीव, नील, जांबवान, अंगद, नल, हनुमान आणि बिभीषणासह जे बलवान वानर सेनापती होते,॥ ११८ (ख)॥

**कहि न सकहिं कछु प्रेम बस भरि भरि लोचन बारि।**
**सन्मुख चितवहिं राम तन नयन निमेष निवारि॥ ११८ (ग)॥**

ते काही बोलू शकत नव्हते. प्रेमामुळे नेत्रांमध्ये पाणी आणून एकटक बघत ते समोरून श्रीरामांच्याकडे पाहात राहिले. ॥ ११८ (ग)॥

**अतिसय प्रीति देखि रघुराई। लीन्हे सकल बिमान चढ़ाई॥**
**मन महुँ बिप्र चरन सिरु नायो। उत्तर दिसिहि बिमान चलायो॥**

श्रीरघुनाथांनी त्यांचे अत्यंत प्रेम पाहून सर्वांना विमानात बसवून घेतले. त्यानंतर मनातल्या मनात ब्राह्मणांच्या चरणी नतमस्तक होऊन ते उत्तरेकडे विमान घेऊन निघाले. ॥ १ ॥

**चलत बिमान कोलाहल होई। जय रघुबीर कहइ सबु कोई॥**
**सिंहासन अति उच्च मनोहर। श्री समेत प्रभु बैठे ता पर॥**

विमान जाताना मोठा गोंगाट चालू होता. सर्वजण श्रीरामांचा जयजयकार करीत होते. विमानामध्ये एक अत्यंत उंच मनोहर सिंहासन होते. त्यावर जानकीसोबत श्रीरामचंद्र विराजमान झाले होते. ॥ २ ॥

**राजत रामु सहित भामिनी। मेरु सृंग जनु घन दामिनी॥**
**रुचिर बिमानु चलेउ अति आतुर। कीन्ही सुमन बृष्टि हरषे सुर॥**

पत्नीसोबत श्रीराम असे शोभून दिसत होते की, जणू सुमेरू पर्वताच्या शिखरावर विजेसह सावळा मेघ असावा. सुंदर विमान वेगाने निघाले. देव हर्षित झाले आणि फुले उधळू लागले. ॥ ३ ॥

**परम सुखद चलि त्रिबिध बयारी। सागर सर सरि निर्मल बारी॥**
**सगुन होहिं सुंदर चहुँ पासा। मन प्रसन्न निर्मल नभ आसा॥**

अत्यंत सुख देणारी शीतल, मंद सुगंधित हवा वाहात होती. समुद्र, तलाव आणि नद्या यांचे जल निर्मल झाले होते. चोहीकडे सुंदर शकुन होऊ लागले. सर्वांची मने प्रसन्न होती आणि आकाश व दिशा निर्मळ होत्या. ॥ ४ ॥

**कह रघुबीर देखु रन सीता। लछिमन इहाँ हत्यो इँद्रजीता॥**
**हनूमान अंगद के मारे। रन महि परे निसाचर भारे॥**

रघुवीर म्हणाले, 'सीते, ही रणभूमी बघ. लक्ष्मणाने इथे इंद्राला जिंकणाऱ्या मेघनादाला मारले होते. हनुमान व अंगद यांनी मारलेले मोठमोठे निशाचर रणभूमीत पडले आहेत. ॥ ५ ॥

**कुंभकरन रावन द्वौ भाई। इहाँ हते सुर मुनि दुखदाई॥**

देवांना व मुनींना त्रास देणारे कुंभकर्ण व रावण हे दोघे भाऊ रणभूमीवर मारले गेले. ॥ ६ ॥

दो०—**इहाँ सेतु बाँध्यों अरु थापेउँ सिव सुख धाम।**
**सीता सहित कृपानिधि संभुहि कीन्ह प्रनाम॥ ११९ (क)॥**

मी येथे सेतू बांधविला आणि सुखधाम श्रीशिवांची स्थापना केली.' त्यानंतर कृपानिधान श्रीरामांनी सीतेसह श्रीरामेश्वर महादेवांना प्रणाम केला. ॥ ११९ (क) ॥

**जहँ जहँ कृपासिंधु बन कीन्ह बास बिश्राम।**
**सकल देखाए जानकिहि कहे सबन्हि के नाम॥ ११९ (ख)॥**

वनामध्ये जिथे जिथे करुणासागर श्रीरामचंद्रांनी निवास व विश्राम केला होता, ती सर्व स्थाने प्रभूंनी जानकीला दाखविली आणि त्या सर्वांची नावे सांगितली.॥ ११९(ख)॥

**तुरत बिमान तहाँ चलि आवा। दंडक बन जहँ परम सुहावा॥**
**कुंभजादि मुनिनायक नाना। गए रामु सब कें अस्थाना॥**

विमान परम सुंदर दंडकारण्यात लवकरच पोहोचले. तेथे अगस्त्य इत्यादी बरेचसे मुनिराज राहात होते. श्रीराम त्या सर्वांच्या स्थानांमध्ये गेले.॥ १॥

**सकल रिषिन्ह सन पाइ असीसा। चित्रकूट आए जगदीसा॥**
**तहँ करि मुनिन्ह केर संतोषा। चला बिमानु तहाँ ते चोखा॥**

सर्व ऋषींचा आशीर्वाद घेऊन जगदीश्वर श्रीराम चित्रकूटावर आले. तेथील मुनींना दर्शन देऊन त्यांनी संतुष्ट केले. नंतर विमान तेथून वेगाने निघाले.॥ २॥

**बहुरि राम जानकिहि देखाई। जमुना कलि मल हरनि सुहाई॥**
**पुनि देखी सुरसरी पुनीता। राम कहा प्रनाम करु सीता॥**

नंतर श्रीरामांनी जानकीला कलियुगातील पापांचे हरण करणाऱ्या सुंदर यमुनेचे दर्शन घडविले. मग गंगेचे दर्शन घेतले. श्रीराम म्हणाले, ‘हे सीते, यांना प्रणाम कर.॥ ३॥

**तीरथपति पुनि देखु प्रयागा। निरखत जन्म कोटि अघ भागा॥**
**देखु परम पावनि पुनि बेनी। हरनि सोक हरि लोक निसेनी॥**
**पुनि देखु अवधपुरी अति पावनि। त्रिबिध ताप भव रोग नसावनि॥**

त्यानंतर तीर्थराज प्रयागाचे दर्शन घे. त्याच्या दर्शनानेच कोट्यवधी जन्मांची पापे पळून जातात. मग परम पवित्र त्रिवेणीचे दर्शन घे. त्रिवेणी ही शोकांचे हरण करणारी व श्रीहरींच्या परमधामी पोहोचण्याची पायरी आहे. नंतर अत्यंत पवित्र अयोध्यापुरीचे दर्शन घे. ती त्रिविध तापांचा व भवरोगाचा नाश करणारी आहे.’॥ ४-५॥

दो०—**सीता सहित अवध कहुँ कीन्ह कृपाल प्रनाम।**
**सजल नयन तन पुलकित पुनि पुनि हरषित राम॥ १२० (क)॥**

असे म्हणून कृपाळू श्रीरामांनी सीतेसह अयोध्यापुरीला प्रणाम केला. पाणावलेल्या नेत्रांनी व पुलकित शरीराने श्रीराम वारंवार आनंदित होत होते.॥ १२०(क)॥

**पुनि प्रभु आइ त्रिबेनीं हरषित मज्जनु कीन्ह।**
**कपिन्ह सहित बिप्रन्ह कहुँ दान बिबिध बिधि दीन्ह॥ १२० (ख)॥**

मग प्रभूंनी त्रिवेणीमध्ये येऊन आनंदाने वानरांसह स्नान केले आणि ब्राह्मणांना अनेक प्रकारची दाने दिली.॥ १२० (ख)॥

**प्रभु हनुमंतहि कहा बुझाई। धरि बटु रूप अवधपुर जाई॥**
**भरतहि कुसल हमारि सुनाएहु। समाचार लै तुम्ह चलि आएहु॥**

त्यानंतर प्रभूंनी हनुमानाला समजावून म्हटले, 'तू ब्रह्मचाऱ्याचे रूप घेऊन अयोध्येला जा. भरताला आमची खुशाली सांग आणि त्याची वार्ता घेऊन ये.'॥ १॥

**तुरत पवनसुत गवनत भयऊ। तब प्रभु भरद्वाज पहिं गयऊ॥**
**नाना बिधि मुनि पूजा कीन्ही। अस्तुति करि पुनि आसिष दीन्ही॥**

पवनपुत्र हनुमान तत्काळ निघाला. तेव्हा प्रभू भारद्वाजांच्याकडे गेले. मुनींनी मनःपूर्वक त्यांची अनेक प्रकारे पूजा केली, स्तुती केली आणि आशीर्वाद दिला.॥ २॥

**मुनि पद बंदि जुगल कर जोरी। चढ़ि बिमान प्रभु चले बहोरी॥**
**इहाँ निषाद सुना प्रभु आए। नाव नाव कहँ लोग बोलाए॥**

दोन्ही हात जोडून व मुनींच्या चरणांना वंदन करून प्रभू विमानात बसून पुढे निघाले. इकडे जेव्हा निषादराजाने प्रभू आल्याचे ऐकले, तेव्हा त्याने 'नाव कुठे आहे? नाव कुठे आहे?' पुकारत आपल्या लोकांना बोलाविले.॥ ३॥

**सुरसरि नाघि जान तब आयो। उतरेउ तट प्रभु आयसु पायो॥**
**तब सीताँ पूजी सुरसरी। बहु प्रकार पुनि चरनन्हि परी॥**

एवढ्यात विमान गंगा पार करून आले. प्रभूंच्या आज्ञेने ते गंगाकिनारी उतरले. तेव्हा सीतेने अनेक प्रकारे गंगेची पूजा केली व तिचे चरण धरले.॥ ४॥

**दीन्हि असीस हरषि मन गंगा। सुंदरि तव अहिवात अभंगा॥**
**सुनत गुहा धायउ प्रेमाकुल। आयउ निकट परम सुख संकुल॥**

गंगेने हर्षित होऊन आशीर्वाद दिला की, 'हे सुंदरी, तुझे सौभाग्य अखंड राहो.' भगवान तटावर उतरणार, हे ऐकताच निषादराज गुह प्रेमाने विव्हल होऊन धावला. परम सुखाने तो प्रभूंच्याजवळ आला.॥ ५॥

**प्रभुहि सहित बिलोकि बैदेही। परेउ अवनि तन सुधि नहिं तेही॥**
**प्रीति परम बिलोकि रघुराई। हरषि उठाइ लियो उर लाई॥**

आणि जानकीसह प्रभूंना पाहून तो आनंदाच्या समाधीमध्ये मग्न झाल्यामुळे जमिनीवर पडला. त्याला देहभान उरले नाही. श्रीरघुनाथांनी त्याचे परम प्रेम पाहून त्याला उठवून आनंदाने हृदयाशी धरले. ॥ ६॥

**छं०—लियो हृदयँ लाइ कृपा निधान सुजान रायँ रमापती।**
**बैठारि परम समीप बूझी कुसल सो कर बीनती॥**

**अब कुसल पद पंकज बिलोकि बिरंचि संकर सेब्य जे।**
**सुख धाम पूरनकाम राम नमामि राम नमामि ते॥ १॥**

सुज्ञांचे शिरोमणी, लक्ष्मीकांत, कृपानिधान भगवानांनी त्याला हृदयाशी धरले आणि अत्यंत जवळ बसवून खुशाली विचारली. तो विनंती करू लागला की, 'ब्रह्मदेव आणि शिव तुमच्या चरणांची सेवा करतात, त्या चरणांचे दर्शन झाल्याने मी आता खुशाल आहे. हे सुखधाम, हे पूर्णकाम श्रीराम, मी तुम्हांला वारंवार नमस्कार करतो.'॥ १॥

**सब भाँति अधम निषाद सो हरि भरत ज्यों उर लाइयो।**
**मतिमंद तुलसीदास सो प्रभु मोह बस बिसराइयो॥**
**यह रावनारि चरित्र पावन राम पद रतिप्रद सदा।**
**कामादिहर बिग्यानकर सुर सिद्ध मुनि गावहिं मुदा॥ २॥**

सर्व प्रकारे नीच असलेल्या निषादाला भगवंतांनी भरताप्रमाणे आलिंगन दिले. तुलसीदास म्हणतात, 'मंदबुद्धीचा मी मोहामुळे प्रभूंना विसरलो. रावणाचे शत्रू असलेल्या श्रीरामांचे हे पवित्र करणारे चरित्र नेहमीच श्रीरामचंद्रांच्या चरणी प्रेम उत्पन्न करणारे आहे. हे कामादी विकारांना दूर करणारे व भगवत्स्वरूपाचे विशेष ज्ञान करून देणारे आहे. देव, सिद्ध व मुनी आनंदाने याचे गायन करतात.॥ २॥

दो०—**समर बिजय रघुबीर के चरित जे सुनहिं सुजान।**
**बिजय बिबेक बिभूति नित तिन्हहि देहिं भगवान॥ १२१ (क)॥**

जे सुज्ञ लोक श्रीरघुवीरांची ही समर-विजयाची लीला ऐकतात, त्यांना भगवान नित्य विजय, विवेक आणि ऐश्वर्य देतात.॥ १२१ (क)॥

**यह कलिकाल मलायतन मन करि देखु बिचार।**
**श्रीरघुनाथ नाम तजि नाहिन आन अधार॥ १२१ (ख)॥**

अरे मना, विचार करून बघ. हा कलिकाल पापांचे घर आहे. यामध्ये पापांपासून वाचण्यासाठी श्रीरघुनाथांचे नाव सोडल्यास दुसरा कोणताही आधार नाही.'॥ १२१ (ख)॥

## मासपारायण, सत्ताविसावा विश्राम

***इति श्रीमद्रामचरितमानसे सकलकलिकलुषविध्वंसने षष्ठः सोपानः समाप्तः।***

*कलियुगातील सर्व पापांचा नाश करणाऱ्या श्रीरामचरितमानसातील*
*हा सहावा सोपान समाप्त झाला.*

~~○~~

**(लङ्काकाण्ड समाप्त)**

॥ श्रीगणेशाय नमः ॥

**॥ श्रीजानकीवल्लभो विजयते ॥**

# श्रीरामचरितमानस

## सप्तम सोपान

## उत्तरकाण्ड

श्लोक

**केकीकण्ठाभनीलं सुरवरविलसद्विप्रपादाब्जचिह्नं**
**शोभाढ्यं पीतवस्त्रं सरसिजनयनं सर्वदा सुप्रसन्नम्।**
**पाणौ नाराचचापं कपिनिकरयुतं बन्धुना सेव्यमानं**
**नौमीड्यं जानकीशं रघुवरमनिशं पुष्पकारूढरामम्॥ १ ॥**

मोराच्या कंठाच्या कांतीप्रमाणे नीलवर्ण, देवांमध्ये श्रेष्ठ, भृगू ऋषीच्या चरणकमलाच्या चिह्नाने सुशोभित, सौंदर्यसंपन्न, पीतांबरधारी, कमलनेत्र, सदा अत्यंत प्रसन्न, हातात धनुष्य-बाण धारण केलेल्या, वानरसमूहाने युक्त, बंधू लक्ष्मणाद्वारे सेवित, स्तुती करण्यास योग्य, श्रीजानकीचे पती, रघुकुलश्रेष्ठ, पुष्पक विमानावर आरूढ, अशा श्रीरामचंद्रांना मी नमस्कार करतो. ॥ १ ॥

**कोसलेन्द्रपदकञ्जमञ्जुलौ कोमलावजमहेशवन्दितौ।**
**जानकीकरसरोजलालितौ चिन्तकस्य मनभृङ्गसङ्गिनौ॥ २ ॥**

ज्यांच्या सुंदर व कोमल चरणकमलांना ब्रह्मदेव व शिव वंदन करतात, श्रीजानकीची करकमले प्रेमाने ज्यांची सेवा करतात, ती अयोध्यापतींची चरणकमले चिंतन करणाऱ्याच्या मनरूपी भ्रमरांची नित्याची वसतिस्थान असतात. ॥ २ ॥

**कुन्दइन्दुदरगौरसुन्दरं अम्बिकापतिमभीष्टसिद्धिदम्।**
**कारुणीककलकञ्जलोचनं नौमि शङ्करमनङ्गमोचनम्॥ ३ ॥**

कुंद-पुष्प, चंद्र व शंखाप्रमाणे सुंदर गौरवर्णाचे, जगज्जननी पार्वतीचे पती, मनोवांछित फल देणारे, दुःखी जनांवर दया करणारे, सुंदर कमलासमान नेत्रांचे, कामदेवाच्या बाणांपासून मुक्त करणारे, भगवान श्रीशंकर यांना मी नमस्कार करतो. ॥ ३ ॥

**दो०—रहा एक दिन अवधि कर अति आरत पुर लोग।**
**जहँ तहँ सोचहिं नारि नर कृस तन राम बियोग॥**

श्रीराम परत यायला फक्त एक दिवस उरला होता. म्हणून नगरातील लोक अधीर झाले होते. श्रीरामांच्या वियोगामुळे निरुत्साही झालेले स्त्री-पुरुष सगळीकडे विचार करीत होते की, अजून श्रीराम का आले नाहीत?

**सगुन होहिं सुंदर सकल मन प्रसन्न सब केर।**
**प्रभु आगवन जनाव जनु नगर रम्य चहुँ फेर॥**

इतक्यात शुभशकुन होऊ लागले आणि सर्वांची मने प्रसन्न झाली. अयोध्यानगरही चोहीकडून सुंदर बनले. जणू ही सर्व लक्षणे प्रभूंच्या आगमनाची सूचना देत होती.

**कौसल्यादि मातु सब मन अनंद अस होइ।**
**आयउ प्रभु श्री अनुजजुत कहन चहत अब कोइ॥**

इतक्यात कोणीतरी येऊन सीता व लक्ष्मणासह प्रभू श्रीरामचंद्र आले असल्याची वार्ता जणू सांगू इच्छित आहे, असा आनंद कौसल्या इत्यादी सर्व मातांच्या मनाला वाटत होता.

**भरत नयन भुज दच्छिन फरकत बारहिं बार।**
**जानि सगुन मन हरष अति लागे करन बिचार॥**

भरताचा उजवा डोळा व उजवा हात वारंवार स्फुरू लागला होता. हा शुभशकुन समजून त्याच्या मनाला अत्यंत आनंद झाला आणि तो विचार करू लागला.

**रहेउ एक दिन अवधि अधारा। समुझत मन दुख भयउ अपारा॥**
**कारन कवन नाथ नहिं आयउ। जानि कुटिल किधौं मोहि बिसरायउ॥**

माझ्या प्राणांचा आधार असलेल्या अवधीचा एकच दिवस उरला आहे, या विचाराने भरताच्या मनाला फार दुःख झाले. माझे स्वामी अजुनी आले नाहीत, याचे काय कारण असावे? मी कपटी आहे, असे मानून प्रभू मला विसरून तर गेले नाहीत? ॥ १ ॥

**अहह धन्य लछिमन बड़भागी। राम पदारबिंदु अनुरागी॥**
**कपटी कुटिल मोहि प्रभु चीन्हा। ताते नाथ संग नहिं लीन्हा॥**

अहाहा, लक्ष्मण मोठा धन्य व भाग्यशाली आहे. तो श्रीरामचंद्रांच्या चरण-कमलांचा प्रेमी आहे, म्हणून तो त्यांच्यापासून दूर राहिला नाही. प्रभूंनी मला मात्र कपटी मानून सोबत घेतले नाही. ॥ २ ॥

**जौं करनी समुझै प्रभु मोरी । नहिं निस्तार कलप सत कोरी ॥**
**जन अवगुन प्रभु मान न काऊ । दीन बंधु अति मृदुल सुभाऊ ॥**

बरोबरच आहे. जर प्रभूंनी माझे कृत्य पाहिले तर शंभर कोटी कल्पांपर्यंत मला मुक्ती मिळणार नाही. प्रभू हे सेवकाच्या अवगुणांकडे कधी लक्ष देत नाहीत, एवढी एकच आशा आहे. ते दीनबंधू आहेत आणि अत्यंत कोमल स्वभावाचे आहेत. ॥ ३ ॥

**मोरे जियँ भरोस दृढ़ सोई । मिलिहहिं राम सगुन सुभ होई ॥**
**बीतें अवधि रहहिं जौं प्राना । अधम कवन जग मोहि समाना ॥**

म्हणून श्रीरामांची भेट होईल, असा मला पक्का विश्वास आहे. कारण मला होणारे शकुन मोठे शुभ आहेत. परंतु अवधी संपल्यावरही जर माझे प्राण उरले, तर माझ्यासारखा नीच या जगात दुसरा कोण असेल ? ॥ ४ ॥

दो०—**राम बिरह सागर महँ भरत मगन मन होत।**
**बिप्र रूप धरि पवनसुत आइ गयउ जनु पोत॥ १ ( क )॥**

श्रीरामांच्या विरह-समुद्रामध्ये भरताचे मन बुडू लागले होते. त्याचवेळी हनुमान हा ब्राह्मणाचे रूप घेऊन असा आला की, जणू बुडणाऱ्याला वाचविण्यासाठी नावच आली. ॥ १(क) ॥

**बैठे देखि कुसासन जटा मुकुट कृस गात।**
**राम राम रघुपति जपत स्त्रवत नयन जलजात॥ १ ( ख )॥**

अशक्त झालेला व जटांचा मुकुट असलेला, 'राम, राम, रघुपती', असे जपत आपल्या कमल-नेत्रांतून अश्रू ढाळत कुशाच्या आसनावर बसलेला भरत हनुमानाला दिसला. ॥ १(ख) ॥

**देखत हनूमान अति हरषेउ । पुलक गात लोचन जल बरषेउ ॥**
**मन महँ बहुत भाँति सुख मानी । बोलेउ श्रवन सुधा सम बानी ॥**

त्याला पाहाताच हनुमानाला खूप आनंद झाला. त्याचे शरीर पुलकित झाले, नेत्रांतून प्रेमाश्रू वाहू लागले. मनातून मोठा प्रसन्न होऊन तो कानांना अमृतासमान वाटणाऱ्या वाणीने भरताला म्हणाला, ॥ १ ॥

**जासु बिरहँ सोचहु दिन राती । रटहु निरंतर गुन गन पाँती ॥**
**रघुकुल तिलक सुजन सुखदाता । आयउ कुसल देव मुनि त्राता ॥**

'ज्यांच्या विरहामध्ये तुम्ही रात्रंदिवस काळजीने क्षीण होत होता आणि ज्यांच्या गुण-समूहांचे वर्णन निरंतर करीत आहात, तेच रघुकुलतिलक, सज्जनांना सुख देणारे आणि देव व मुनींचे रक्षक श्रीराम सुखरूपपणे परत आले आहेत. ॥ २ ॥

**रिपु रन जीति सुजस सुर गावत। सीता सहित अनुज प्रभु आवत॥**
**सुनत बचन बिसरे सब दूखा। तृषावंत जिमि पाइ पियूषा॥**

युद्धामध्ये शत्रूला जिंकून सीता व लक्ष्मणासोबत प्रभू येत आहेत. देवगण त्यांची सुंदर कीर्ती गात आहेत.' हे बोलणे ऐकताच भरत सर्व दु:खे विसरून गेला. तहान लागलेला माणूस अमृत मिळाल्यावर तहानेचे दु:ख विसरून जातो तसा.॥ ३॥

**को तुम्ह तात कहाँ ते आए। मोहि परम प्रिय बचन सुनाए॥**
**मारुत सुत मैं कपि हनुमाना। नामु मोर सुनु कृपानिधाना॥**

भरताने विचारले की, 'बाबा रे! तू कोण आहेस? आणि कुठून आला आहेस? तू मला अतिशय आनंद देणारे बोललास.' हनुमान म्हणाला, 'हे कृपानिधान, ऐका. मी पवनपुत्र असून जातीने वानर आहे. माझे नाव हनुमान आहे.॥ ४॥

**दीनबंधु रघुपति कर किंकर। सुनत भरत भेंटेउ उठि सादर॥**
**मिलत प्रेम नहिं हृदयँ समाता। नयन स्त्रवत जल पुलकित गाता॥**

मी दीनबंधू श्रीरघुनाथांचा दास आहे.' हे ऐकताच भरताने उठून मोठ्या आदराने हनुमानाला मिठी मारली. भेट घेताना भरताच्या मनात प्रेम मावत नव्हते. त्याच्या नेत्रांतून आनंद व प्रेमाचे अश्रू वाहू लागले आणि शरीर रोमांचित झाले.॥ ५॥

**कपि तव दरस सकल दुख बीते। मिले आजु मोहि राम पिरीते॥**
**बार बार बूझी कुसलाता। तो कहुँ देउँ काह सुनु भ्राता॥**

भरत म्हणाला, 'हे हनुमाना, तुझ्या दर्शनाने माझी सर्व दु:खे नाहीशी झाली. तुझ्या रूपाने आज मला प्रिय श्रीरामच भेटले.' भरताने वारंवार क्षेम-कुशल विचारले आणि म्हटले, 'हे बंधू, ही शुभवार्ता आणण्याबद्दल मी तुला काय देऊ?॥ ६॥

**एहि संदेस सरिस जग माहीं। करि बिचार देखेउँ कछु नाहीं॥**
**नाहिन तात उरिन मैं तोही। अब प्रभु चरित सुनावहु मोही॥**

या वार्तेच्या बदली देण्यासारखे जगात काहीही नाही. मी विचार करून पाहिले. म्हणून हे बंधो! मी तुझ्या ऋणातून मुक्त होऊ शकत नाही. आता मला प्रभूंची हकीकत सांग.'॥ ७॥

**तब हनुमंत नाइ पद माथा। कहे सकल रघुपति गुन गाथा॥**
**कहु कपि कबहुँ कृपाल गोसाईं। सुमिरहिं मोहि दास की नाईं॥**

तेव्हा हनुमानाने भरताच्या चरणांवर माथा ठेवून श्रीरघुनाथांची सर्व गुणगाथा सांगितली. भरताने विचारले, 'हे हनुमाना, कृपाळू स्वामी श्रीरामचंद्र कधी माझी आपला दास समजून आठवण काढतात काय?॥ ८॥

**छं०—निज दास ज्यों रघुबंसभूषन कबहुँ मम सुमिरन कर्‍यो।**
**सुनि भरत बचन बिनीत अति कपि पुलकि तन चरनन्हि पर्‍यो॥**
**रघुबीर निज मुख जासु गुन गन कहत अग जग नाथ जो।**
**काहे न होइ बिनीत परम पुनीत सदगुन सिंधु सो॥**

रघुवंशाचे भूषण श्रीराम कधी आपल्या सेवकाप्रमाणे मानून माझे स्मरण करतात काय?' भरताचे हे विनम्र बोलणे ऐकून हनुमानाचे अंग रोमांचित झाले व त्याने चरणांवर लोटांगण घातले. तो मनात विचार करू लागला की, चराचराचे स्वामी असलेले श्रीरघुवीर आपल्या मुखाने ज्याच्या गुणांचे वर्णन करतात, तो भरत इतका विनम्र, परमपवित्र आणि सद्‌गुणांचा समूह का बरे असणार नाही?

**दो०—राम प्रान प्रिय नाथ तुम्ह सत्य बचन मम तात।**
**पुनि पुनि मिलत भरत सुनि हरष न हृदयँ समात॥ २ (क)॥**

हनुमान म्हणाला, 'हे नाथ! श्रीरामांना तुम्ही प्राणप्रिय आहात. हे तात, हे माझे बोलणे खरे आहे.' हे ऐकल्यावर भरत वारंवार हनुमानाला मिठी मारू लागला. त्याच्या हृदयात आनंद मावत नव्हता. ॥ २ (क) ॥

**सो०—भरत चरन सिरु नाइ तुरित गयउ कपि राम पहिं।**
**कही कुसल सब जाइ हरषि चलेउ प्रभु जान चढ़ि॥ २ (ख)॥**

नंतर भरताच्या चरणी प्रणाम करून हनुमान लगेच श्रीरामांच्याकडे परत आला आणि त्याने सर्व खुशाली सांगितली. मग प्रभू आनंदाने विमानात बसून निघाले. ॥ २(ख) ॥

**हरषि भरत कोसलपुर आए। समाचार सब गुरहि सुनाए॥**
**पुनि मंदिर महँ बात जनाई। आवत नगर कुसल रघुराई॥**

इकडे भरतसुद्धा आनंदित होऊन अयोध्येत आला आणि त्याने गुरूंना सर्व सांगितले. मग राजमहालात ही वार्ता पाठविली की, श्रीरघुनाथ सुखरूपपणे अयोध्येला येत आहेत. ॥ १ ॥

**सुनत सकल जननीं उठि धाईं। कहि प्रभु कुसल भरत समुझाईं॥**
**समाचार पुरबासिन्ह पाए। नर अरु नारि हरषि सब धाए॥**

बातमी कळताच सर्व माता भरताजवळ आनंदाने धावत आल्या. भरताने प्रभूंची खुशाली सांगून सर्वांची समजूत घातली. नंतर नगरवासीयांना ही वार्ता कळताच सर्व स्त्री-पुरुष आनंदाने धावून आले. ॥ २ ॥

**दधि दुर्बा रोचन फल फूला। नव तुलसी दल मंगल मूला॥**
**भरि भरि हेम थार भामिनी। गावत चलिं सिंधुरगामिनी॥**

श्रीरामांच्या स्वागतासाठी दही, दूर्वा, गोरोचन, फळे-फुले, मांगल्याचे मूळ असलेले तुलसीदल इत्यादी वस्तू सोन्याच्या तबकांमध्ये भरभरून घेऊन गजगामिनी सुवासिनी स्त्रिया गात-गात निघाल्या. ॥ ३ ॥

**जे जैसेहिं तैसेहिं उठि धावहिं । बाल बृद्ध कहँ संग न लावहिं ॥**
**एक एकन्ह कहँ बूझहिं भाई । तुम्ह देखे दयाल रघुराई ॥**

जे जशा अवस्थेत होते, ते तशाच अवस्थेत उठून धावले. उशीर होईल म्हणून कुणी मुलांना आणि म्हाताऱ्यांना सोबत घेतले नाही. ते परस्परांना विचारीत होते की, 'अरे बाबा, तू दयाळू श्रीरामचंद्रांना पाहिलेस काय?' ॥ ४ ॥

**अवधपुरी प्रभु आवत जानी । भई सकल सोभा कै खानी ॥**
**बहइ सुहावन त्रिबिध समीरा । भइ सरजू अति निर्मल नीरा ॥**

प्रभू येत आहेत, हे पाहून अयोध्यापुरी संपूर्ण शोभेची खाण झाली. तिन्ही प्रकारची सुंदर हवा वाहू लागली. शरयू नदीचे पाणी पूर्णपणे निर्मळ झाले. ॥ ५ ॥

दो०—**हरषित गुर परिजन अनुज भूसुर बृंद समेत।**
**चले भरत मन प्रेम अति सन्मुख कृपानिकेत ॥ ३ ( क ) ॥**

गुरू वसिष्ठ, कुटुंबीय, लहान बंधू शत्रुघ्न आणि ब्रह्मवृंदासह आनंदित होऊन भरत अत्यंत प्रेमपूर्ण मनाने कृपाधाम श्रीरामांच्या स्वागतासाठी सामोरा निघाला. ॥ ३(क) ॥

**बहुतक चढ़ीं अटारिन्ह निरखहिं गगन बिमान।**
**देखि मधुर सुर हरषित करहिं सुमंगल गान ॥ ३ ( ख ) ॥**

बऱ्याच स्त्रिया गच्च्यांवर चढून आकाशात विमान पाहू लागल्या आणि ते पाहिल्यावर आनंदाने गोड स्वराने सुंदर मंगलगीते गाऊ लागल्या. ॥ ३ (ख) ॥

**राका ससि रघुपति पुर सिंधु देखि हरषान।**
**बढ़्यो कोलाहल करत जनु नारि तरंग समान ॥ ३ ( ग ) ॥**

श्रीरघुनाथ हे पौर्णिमेचे चंद्र होते, तर अयोध्या समुद्र. पूर्णचंद्राला पाहून तो समुद्र आनंदित होऊन गर्जना करीत होता आणि त्याला भरती आली होती. इकडे-तिकडे धावणाऱ्या स्त्रिया त्या समुद्रातील लाटा वाटत होत्या. ॥ ३(ग) ॥

**इहाँ भानुकुल कमल दिवाकर । कपिन्ह देखावत नगर मनोहर ॥**
**सुनु कपीस अंगद लंकेसा । पावन पुरी रुचिर यह देसा ॥**

इकडे विमानातून सूर्यकुलरूपी कमलाला प्रफुल्लित करणारे सूर्य श्रीरामचंद्र वानरांना मनोहर नगर दाखवीत होते. ते म्हणत होते, 'हे सुग्रीवा, हे अंगदा, हे लंकापती बिभीषणा, ऐका. ही नगरी पवित्र आहे आणि हा देश सुंदर आहे. ॥ १ ॥

**जद्यपि सब बैकुंठ बखाना। बेद पुरान बिदित जगु जाना॥**
**अवधपुरी सम प्रिय नहिं सोऊ। यह प्रसंग जानइ कोउ कोऊ॥**

जरी सर्वांनी वैकुंठाचा महिमा सांगितला आहे, तो वेद-पुराणांमध्ये प्रसिद्ध आहे आणि सर्व जगाला माहीत आहे, तरीसुद्धा अयोध्यापुरीइतका तो वैकुंठ मला प्रिय नाही, ही गोष्ट काही लोकच जाणतात. ॥ २ ॥

**जन्मभूमि मम पुरी सुहावनि। उत्तर दिसि बह सरजू पावनि॥**
**जा मज्जन ते बिनहिं प्रयासा। मम समीप नर पावहिं बासा॥**

ही शोभिवंत नगरी माझी जन्मभूमी आहे. हिच्या उत्तर दिशेला जीवांना पवित्र करणारी शरयू नदी वाहाते. तिच्यामध्ये स्नान केल्याने मनुष्याला विनासायास माझी सामीप्यमुक्ती मिळते. ॥ ३ ॥

**अति प्रिय मोहि इहाँ के बासी। मम धामदा पुरी सुख रासी॥**
**हरषे सब कपि सुनि प्रभु बानी। धन्य अवध जो राम बखानी॥**

येथील निवासी मला फार आवडतात. ही पुरी सुखाची खाण आणि माझे परमधाम देणारी आहे.' प्रभूंचे बोलणे ऐकून सर्व वानरांना आनंद झाला. ते म्हणू लागले की, 'ज्या अयोध्येची महती स्वत: श्रीरामांनी सांगितली, ती नक्कीच धन्य होय.' ॥ ४ ॥

**दो०—आवत देखि लोग सब कृपासिंधु भगवान।**
**नगर निकट प्रभु प्रेरेउ उतरेउ भूमि बिमान॥ ४ (क)॥**

कृपासागर भगवान श्रीरामचंद्रांनी सर्व लोक येत असल्याचे पाहिले, तेव्हा प्रभूंनी विमान नगराजवळ उतरण्याची प्रेरणा दिली. तेव्हा ते पृथ्वीवर उतरले. ॥ ४ (क) ॥

**उतरि कहेउ प्रभु पुष्पकहि तुम्ह कुबेर पहिं जाहु।**
**प्रेरित राम चलेउ सो हरषु बिरहु अति ताहु॥ ४ (ख)॥**

विमानातून उतरल्यावर प्रभूंनी पुष्पक-विमानाला कुबेराकडे परत जाण्यास सांगितले. श्रीरामांच्या आज्ञेने ते निघाले. त्याला आपल्या मालकाजवळ जाण्याचा आनंद वाटत होता, तर प्रभु श्रीरामचंद्रांपासून दूर होण्याचे अत्यंत दु:खही वाटत होते. ॥ ४ (ख) ॥

**आए भरत संग सब लोगा। कृस तन श्रीरघुबीर बियोगा॥**
**बामदेव बसिष्ट मुनिनायक। देखे प्रभु महि धरि धनु सायक॥**

भरतासोबत सर्व लोक आले. श्रीरघुवीरांच्या वियोगामुळे सर्वजण अशक्तसे झाले होते. प्रभूंनी वामदेव, वसिष्ठ इत्यादी मुनिश्रेष्ठांना पाहिले, तेव्हा त्यांनी धनुष्य-बाण जमिनीवर ठेवून, ॥ १ ॥

**धाइ धरे गुर चरन सरोरुह। अनुज सहित अति पुलक तनोरुह॥**
**भेंटि कुसल बूझी मुनिराया। हमरें कुसल तुम्हारिहिं दाया॥**

लक्ष्मणासह धावत जाऊन गुरुजींचे चरण धरले. त्यांचे रोम-रोम अत्यंत पुलकित होत होते. मुनिराज वसिष्ठांनी त्यांना आलिंगन देऊन क्षेम-कुशल विचारले. प्रभू म्हणाले, 'तुमच्या कृपेमुळेच आमचे क्षेम आहे.'॥ २॥

**सकल द्विजन्ह मिलि नायउ माथा। धर्म धुरंधर रघुकुलनाथा॥**
**गहे भरत पुनि प्रभु पद पंकज। नमत जिन्हहि सुर मुनि संकर अज॥**

धर्माची धुरा धारण करणारे रघुकुलाचे स्वामी श्रीराम यांनी सर्व ब्राह्मणांना भेटून त्यांना नमस्कार केला. मग देव, मुनी, शंकर आणि ब्रह्मदेवसुद्धा प्रभूंच्या ज्या चरणांना नमस्कार करतात, ते चरण भरताने धरले.॥ ३॥

**परे भूमि नहिं उठत उठाए। बर करि कृपासिंधु उर लाए॥**
**स्यामल गात रोम भए ठाढ़े। नव राजीव नयन जल बाढ़े॥**

भरताने जमिनीवर लोटांगण घातले. उठवूनही तो उठत नव्हता. तेव्हा कृपासिंधू श्रीरामांनी त्याला बळेच उठवून छातीशी धरले. त्यांचे सावळे शरीर रोमांचित झाले. नवकमलासमान नेत्रांतून प्रेमाश्रूंच्या धारांचा पूर आला.॥ ४॥

**छं०—राजीव लोचन स्त्रवत जल तन ललित पुलकावलि बनी।**
**अति प्रेम हृदयँ लगाइ अनुजहि मिले प्रभु त्रिभुअन धनी॥**
**प्रभु मिलत अनुजहि सोह मो पहिं जाति नहिं उपमा कही।**
**जनु प्रेम अरु सिंगार तनु धरि मिले बर सुषमा लही॥ १॥**

प्रभूंच्या कमलासमान नेत्रांतून पाणी वाहात होते. सुंदर शरीरावर पुलकावली शोभून दिसत होती. त्रैलोक्याचे स्वामी प्रभू श्रीरामांनी भरताला अत्यंत प्रेमाने हृदयाशी धरले. भावाला भेटताना प्रभू असे आनंदित झाले होते की, त्याला मी उपमा देऊ शकत नाही. जणू भक्ती व वात्सल्य हे देह धारण करून एकमेकांना भेटले व श्रेष्ठ शोभेला प्राप्त झाले.॥ १॥

**बूझत कृपानिधि कुसल भरतहि बचन बेगि न आवई।**
**सुनु सिवा सो सुख बचन मन ते भिन्न जान जो पावई॥**
**अब कुसल कौसलनाथ आरत जानि जन दरसन दियो।**
**बूड़त बिरह बारीस कृपानिधान मोहि कर गहि लियो॥ २॥**

कृपानिधान श्रीरामांनी भरताला क्षेम-कुशल विचारले. परंतु आनंदामुळे भरताच्या तोंडून शब्द फुटत नव्हता. श्रीशिव म्हणतात, 'हे पार्वती, भरताला लाभलेले ते भेटीचे सुख सांगण्याच्या

व कल्पनेच्या पलीकडील होते. ज्याला ते लाभले, तोच ते जाणतो.' भरत म्हणाला, 'हे कोसलनाथ, तुम्ही आर्त समजून या दासाला दर्शन दिले, त्यामुळे आता सर्व क्षेम आहे. विरह-समुद्रात बुडत असलेल्या मला कृपानिधानांनी हात पकडून वाचविले.'॥ २॥

**दो०—पुनि प्रभु हरषि सत्रुहन भेंटे हृदयँ लगाइ।**
**लछिमन भरत मिले तब परम प्रेम दोउ भाइ॥ ५॥**

मग प्रभू आनंदाने शत्रुघ्नाला हृदयाशी धरून भेटले. त्यानंतर लक्ष्मण व भरत हे बंधू परम प्रेमाने एकमेकांना भेटले.॥ ५॥

**भरतानुज लछिमन पुनि भेंटे। दुसह बिरह संभव दुख मेटे॥**
**सीता चरन भरत सिरु नावा। अनुज समेत परम सुख पावा॥**

त्यानंतर लक्ष्मण शत्रुघ्नाला मिठी मारून भेटला आणि अशाप्रकारे विरहामुळे उत्पन्न झालेले दुःसह दुःख नाहीसे केले. नंतर भरत व शत्रुघ्न यांनी सीतेच्या चरणी नमन केले आणि त्यांना खूप सुख लाभले.॥ १॥

**प्रभु बिलोकि हरषे पुरबासी। जनित बियोग बिपति सब नासी॥**
**प्रेमातुर सब लोग निहारी। कौतुक कीन्ह कृपाल खरारी॥**

प्रभूंना पाहून सर्व अयोध्यावासी आनंदित झाले. राम-वियोगामुळे झालेले त्यांचे सर्व दुःख नाहीसे झाले. सर्व लोक प्रेमविव्हळ व भेटण्यास आतुर असलेले पाहून श्रीरामांनी एक चमत्कार केला.॥ २॥

**अमित रूप प्रगटे तेहि काला। जथा जोग मिले सबहि कृपाला॥**
**कृपादृष्टि रघुबीर बिलोकी। किए सकल नर नारि बिसोकी॥**

त्या प्रसंगी कृपाळू श्रीराम असंख्य रूपांमध्ये प्रकट झाले आणि सर्वांशी एकाच वेळी यथायोग्य रीतीने भेटले. श्रीरघुवीरांनी कृपादृष्टीने पाहून सर्व नर-नारींचा शोक दूर केला.॥ ३॥

**छन महिं सबहि मिले भगवाना। उमा मरम यह काहुँ न जाना॥**
**एहि बिधि सबहि सुखी करि रामा। आगें चले सील गुन धामा॥**

भगवान क्षणभरात सर्वांना भेटले. हे उमे! हे रहस्य कुणालाही कळले नाही. अशा प्रकारे सौजन्य आणि गुणांचे धाम असलेले श्रीराम यांनी सर्वांना सुखी करून ते पुढे गेले.॥ ४॥

**कौसल्यादि मातु सब धाई। निरखि बच्छ जनु धेनु लवाई॥**

कौसल्या इत्यादी माता, नुकत्याच व्यालेल्या गाई आपल्या वासरांना पाहून धाव घेतात, तशा धावल्या.॥ ५॥

**छं०—जनु धेनु बालक बच्छ तजि गृहँ चरन बन परबस गईं।**
**दिन अंत पुर रुख स्त्रवत थन हुंकार करि धावत भईं॥**

**अति प्रेम प्रभु सब मातु भेटीं बचन मृदु बहुबिधि कहे।**
**गइ बिषम बिपति बियोगभव तिन्ह हरष सुख अगनित लहे॥**

जणू नव्याने व्यालेल्या गाई आपल्या छोट्या वासरांना घरी सोडून नाइलाजाने वनात गेल्या असाव्यात आणि दिवस मावळताच वासरांना भेटण्यासाठी हंबरत व स्तनांतून दूध स्त्रवत नगराकडे धावल्या असाव्यात. प्रभू अत्यंत प्रेमाने अशा सर्व मातांना भेटून अत्यंत गोड शब्दांत बोलले. वियोगामुळे आलेली भीषण विपत्ती नाहीशी झाली. भगवंतांना भेटून व त्यांचे बोलणे ऐकून त्या सर्वजणींना अपार सुख व आनंद मिळाला.

दो०—**भेटेउ तनय सुमित्राँ राम चरन रति जानि।**
**रामहि मिलत कैकई हृदयँ बहुत सकुचानि॥ ६ ( क )॥**

आपला पुत्र लक्ष्मण याचे श्रीरामांच्या चरणी असलेले प्रेम पाहून सुमित्रा त्यांना भेटली. श्रीरामांना भेटताना कैकेयीच्या मनास मात्र संकोच वाटत होता. ॥ ६ (क) ॥

**लछिमन सब मातन्ह मिलि हरषे आसिष पाइ।**
**कैकइ कहँ पुनि पुनि मिले मन कर छोभु न जाइ॥ ६ ( ख )॥**

सर्व मातांना भेटल्यामुळे व त्यांचा आशीर्वाद मिळाल्याने लक्ष्मणाला आनंद वाटला. तो कैकेयी मातेला वारंवार भेटला, परंतु त्याच्या मनातील राग गेला नव्हता. ॥ ६ (ख) ॥

**सासुन्ह सबनि मिली बैदेही। चरनन्हि लागि हरषु अति तेही॥**
**देहिं असीस बूझि कुसलाता। होइ अचल तुम्हार अहिवाता॥**

जानकी सर्व सासूंना भेटली आणि त्यांच्या पाया पडून तिला खूप आनंद झाला. सर्व सासवा तिची खुशाली विचारून आशीर्वाद देत होत्या की, 'तुझे सौभाग्य अखंड राहो.' ॥ १ ॥

**सब रघुपति मुख कमल बिलोकहिं। मंगल जानि नयन जल रोकहिं॥**
**कनक थार आरती उतारहिं। बार बार प्रभु गात निहारहिं॥**

सर्व माता श्रीरघुनाथांचे कमलासारखे मुख पाहात राहिल्या. त्यांच्या नेत्रांत प्रेमाचे अश्रू उचंबळून येत होते, परंतु हा मंगल प्रसंग मानून त्या आपले अश्रू डोळ्यांतच रोखून धरत होत्या. सोन्याच्या तबकातून आरती करीत होत्या आणि वारंवार प्रभूंचे अंग प्रेमाने पाहात होत्या. ॥ २ ॥

**नाना भाँति निछावरि करहीं। परमानंद हरष उर भरहीं॥**
**कौसल्या पुनि पुनि रघुबीरहि। चितवति कृपासिंधु रनधीरहि॥**

अनेक प्रकारच्या वस्तू ओवाळून टाकत होत्या आणि त्यांच्या मनाला परमानंद वाटत होता. कौसल्या वारंवार कृपा-सागर आणि रणधीर अशा रघुवीरांना पाहात होती. ॥ ३ ॥

**हृदयँ बिचारति बारहिं बारा। कवन भाँति लंकापति मारा॥**
**अति सुकुमार जुगल मेरे बारे। निसिचर सुभट महाबल भारे॥**

ती वारंवार मनात विचार करीत होती की, यांनी लंकापती रावणाला कसे मारले असेल? माझे हे दोन्ही पुत्र अत्यंत सुकुमार आहेत आणि राक्षस हे तर फार मोठे योद्धे आणि बलवान होते. ॥ ४ ॥

दो०—**लछिमन अरु सीता सहित प्रभुहि बिलोकति मातु।**
**परमानंद मगन मन पुनि पुनि पुलकित गातु॥ ७॥**

सर्व माता लक्ष्मण व जानकी यांच्यासह श्रीरामांना न्याहाळत होत्या. त्यांचे मन परमानंदात मग्न झाले होते आणि शरीर वारंवार पुलकित होत होते. ॥ ७ ॥

**लंकापति कपीस नल नीला। जामवंत अंगद सुभसीला॥**
**हनुमदादि सब बानर बीरा। धरे मनोहर मनुज सरीरा॥**

लंकापती बिभीषण, वानरराज सुग्रीव, नल, नील, जांबवान, अंगद व हनुमान इत्यादी सर्व उत्तम स्वभावाच्या वीर वानरांनी मनुष्यांची मनोहर रूपे धारण केली होती. ॥ १ ॥

**भरत सनेह सील ब्रत नेमा। सादर सब बरनहिं अति प्रेमा॥**
**देखि नगरबासिन्ह कै रीती। सकल सराहहिं प्रभु पद प्रीती॥**

ते सर्व भरताचे प्रेम, सुंदर स्वभाव, त्यागव्रत आणि नियमांचे आचरण पाहून अत्यंत प्रेमाने व आदराने त्याची वाखाणणी करीत होते आणि नगरवासीयांची प्रेम, शील आणि विनयपूर्ण रीत पाहून ते सर्वजण प्रभूंच्या चरणी असलेल्या त्यांच्या प्रेमाचे कौतुक करीत होते. ॥ २ ॥

**पुनि रघुपति सब सखा बोलाए। मुनि पद लागहु सकल सिखाए॥**
**गुर बसिष्ट कुलपूज्य हमारे। इन्ह की कृपाँ दनुज रन मारे॥**

नंतर श्रीरघुनाथांनी सर्व मित्रांना बोलावले आणि सर्वांना सांगितले की, 'मुनींच्या पाया पडा. हे गुरू वसिष्ठ, आमच्या संपूर्ण कुलासाठी पूज्य आहेत. यांच्या कृपेमुळेच युद्धात राक्षस मारले गेले आहेत.' ॥ ३ ॥

**ए सब सखा सुनहु मुनि मेरे। भए समर सागर कहँ बेरे॥**
**मम हित लागि जन्म इन्ह हारे। भरतहु ते मोहि अधिक पिआरे॥**

मग श्रीराम गुरूंना म्हणाले की, 'हे मुनिवर्य! हे सर्व माझे मित्र आहेत. युद्धरूपी समुद्रामध्ये यांनी माझ्यासाठी जहाजाप्रमाणे आधार दिला. माझ्यासाठी यांनी आपले प्राणसुद्धा दिले. हे भरतापेक्षाही मला जास्त प्रिय आहेत.' ॥ ४ ॥

**सुनि प्रभु बचन मगन सब भए। निमिष निमिष उपजत सुख नए॥**

प्रभूंचे बोलणे ऐकून सर्वजण प्रेम व आनंदात बुडून गेले. अशा प्रकारे त्यांना क्षणोक्षणी नवे नवे सुख वाटत होते. ॥ ५ ॥

दो०—**कौसल्या के चरनन्हि पुनि तिन्ह नायउ माथ।**
**आसिष दीन्हे हरषि तुम्ह प्रिय मम जिमि रघुनाथ॥ ८ (क)॥**

नंतर त्या सर्वांनी कौसल्येच्या चरणांवर मस्तक ठेवले. कौसल्येने आनंदाने आशीर्वाद दिले आणि म्हटले, 'तुम्ही मला रघुनाथाप्रमाणेच प्रिय आहात.'॥ ८ (क) ॥

**सुमन बृष्टि नभ संकुल भवन चले सुखकंद।**
**चढ़ी अटारिन्ह देखहिं नगर नारि नर बृंद॥ ८ ( ख )॥**

आनंदकंद श्रीराम आपल्या महालाकडे निघाले. फुलांच्या वर्षावाने आकाश भरून गेले होते. नगरातील स्त्री-पुरुषांचे जमाव गच्च्यांवर चढून त्यांचे दर्शन घेत होते. ॥ ८(ख) ॥

**कंचन कलस बिचित्र सँवारे। सबहिं धरे सजि निज निज द्वारे॥**
**बंदनवार पताका केतू। सबन्हि बनाए मंगल हेतू॥**

सोन्याचे कलश रत्नांनी अलंकृत करून व सजवून सर्व लोकांनी आपापल्या दारात ठेवले होते. सर्व लोकांनी मंगलकारक तोरणे, ध्वज आणि पताका लावल्या होत्या. ॥ १ ॥

**बीथीं सकल सुगंध सिंचाईं। गजमनि रचि बहु चौक पुराईं॥**
**नाना भाँति सुमंगल साजे। हरषि नगर निसान बहु बाजे॥**

सर्व गल्ल्यांमध्ये सुगंधी द्रव्यांचे सडे घातले होते. मोत्यांच्या अनेक रांगोळ्या काढल्या होत्या. अनेक प्रकारची सुंदर व मंगल सजावट केली होती आणि आनंद व्यक्त करणारे खूप नगारे वाजत होते. ॥ २ ॥

**जहँ तहँ नारि निछावरि करहीं। देहिं असीस हरष उर भरहीं॥**
**कंचन थार आरतीं नाना। जुबतीं सजें करहिं सुभ गाना॥**

जिकडे-तिकडे स्त्रिया वस्तू ओवाळून टाकीत होत्या आणि आनंदाने आशीर्वाद देत होत्या. बऱ्याचशा तरुण सुवासिनी सोन्याच्या तबकांमध्ये आरत्या घेऊन मंगलगीते गात होत्या. ॥ ३ ॥

**करहिं आरती आरतिहर कें। रघुकुल कमल बिपिन दिनकर कें॥**
**पुर सोभा संपति कल्याना। निगम सेष सारदा बखाना॥**

दुःख हरण करणारे आणि सूर्यकुलरूपी कमलवनाला प्रफुल्लित करणारे सूर्य श्रीराम यांना ओवाळीत होत्या. नगराची शोभा, संपत्ती व कल्याण यांचे वर्णन वेद, शेष व सरस्वती करीत होते. ॥ ४ ॥

**तेउ यह चरित देखि ठगि रहहीं। उमा तासु गुन नर किमि कहहीं॥**

परंतु तेसुद्धा भगवंतांचे हे चरित्र पाहून अवाक् होत होते. शिव म्हणतात, 'हे उमे, मग मनुष्य त्यांचे गुण कसे गाऊ शकतील बरे?'॥ ५ ॥

**दो०—नारि कुमुदिनीं अवध सर रघुपति बिरह दिनेस।**
**अस्त भएँ बिगसत भईं निरखि राम राकेस॥ ९ ( क )॥**

स्त्रिया या कुमुदिनी, अयोध्या हे सरोवर आणि श्रीरघुनाथांचा विरह हा सूर्य होता, त्यामुळे त्या कोमेजल्या होत्या. आता विरहरूपी सूर्याचा अस्त झाल्यामुळे श्रीरामरूपी पूर्णचंद्र पाहून त्या प्रफुल्लित झाल्या. ॥ ९ (क) ॥

**होहिं सगुन सुभ बिबिधि बिधि बाजहिं गगन निसान।**
**पुर नर नारि सनाथ करि भवन चले भगवान॥ ९ ( ख )॥**

अनेक प्रकारचे शुभ-शकुन होत होते. आकाशात नगारे वाजत होते. नगरामधील पुरुष व स्त्रिया यांना दर्शन देऊन कृतार्थ करीत भगवान श्रीराम महालाकडे निघाले. ॥ ९(ख) ॥

**प्रभु जानी कैकई लजानी। प्रथम तासु गृह गए भवानी॥**
**ताहि प्रबोधि बहुत सुख दीन्हा। पुनि निज भवन गवन हरि कीन्हा॥**

श्रीशिव म्हणतात, 'हे भवानी, प्रभूंना जाणवले की माता कैकेयी ओशाळून गेली आहे. म्हणून प्रथम ते तिच्या महालाकडे गेले आणि तिची समजूत घालून त्यांनी तिचे समाधान केले. नंतर श्रीहरी आपल्या महालात गेले. ॥ १ ॥

**कृपासिंधु जब मंदिर गए। पुर नर नारि सुखी सब भए॥**
**गुर बसिष्ट द्विज लिए बुलाई। आजु सुघरी सुदिन समुदाई॥**

कृपासागर श्रीराम जेव्हा आपल्या महालात गेले, तेव्हा नगरातील सर्व स्त्रीपुरुषांना आनंद झाला. गुरू वसिष्ठांनी ब्राह्मणांना बोलावून म्हटले, 'आज शुभ दिवस व शुभ मुहूर्त इत्यादी सर्व शुभ योग आहेत. ॥ २ ॥

**सब द्विज देहु हरषि अनुसासन। रामचंद्र बैठहिं सिंघासन॥**
**मुनि बसिष्ट के बचन सुहाए। सुनत सकल बिप्रन्ह अति भाए॥**

या प्रसंगी श्रीरामचंद्रांनी सिंहासनावर विराजमान व्हावे, अशी तुम्ही सर्व ब्राह्मणांनी आनंदाने आज्ञा द्यावी.' वसिष्ठ मुनींचे सुंदर बोल ऐकताच सर्व ब्राह्मणांना फार बरे वाटले. ॥ ३ ॥

**कहहिं बचन मृदु बिप्र अनेका। जग अभिराम राम अभिषेका॥**
**अब मुनिबर बिलंब नहिं कीजै। महाराज कहँ तिलक करीजै॥**

ते सर्व ब्राह्मण आनंदपूर्ण भाषेत म्हणाले, 'श्रीरामांचा राज्याभिषेक हा संपूर्ण जगाला आनंददायक आहे. हे मुनिश्रेष्ठ, आता उशीर लावू नका आणि महाराजांचा राजतिलक लवकर करा.' ॥ ४ ॥

दो०—**तब मुनि कहेउ सुमंत्र सन सुनत चलेउ हरषाइ।**
**रथ अनेक बहु बाजि गज तुरत सँवारे जाइ॥ १० ( क )॥**

तेव्हा मुनींनी सुमंत्राला सांगितले. ते ऐकताच तो आनंदाने निघाला. त्याने त्वरित जाऊन अनेक रथ, घोडे आणि हत्ती सजविले. ॥ १० (क) ॥

**जहँ तहँ धावन पठइ पुनि मंगल द्रब्य मगाइ।**

**हरष समेत बसिष्ट पद पुनि सिरु नायउ आइ॥ १० ( ख )॥**

आणि जिकडे-तिकडे सूचना देणाऱ्या दूतांना पाठवून मांगलिक वस्तू मागविल्या आणि नंतर आनंदाने येऊन तो वसिष्ठांच्या पाया पडला.॥ १० (ख)॥

## नवाह्नपारायण, आठवा विश्राम

**अवधपुरी अति रुचिर बनाई। देवन्ह सुमन बृष्टि झरि लाई॥**

**राम कहा सेवकन्ह बुलाई। प्रथम सखन्ह अन्हवावहु जाई॥**

अयोध्यापुरी फारच सुंदर सजविली गेली होती. देव पुष्पांची सतत वृष्टी करीत होते. श्रीरामचंद्रांनी सेवकांना बोलावून सांगितले की, 'तुम्ही जाऊन प्रथम माझ्या मित्रांना स्नान घाला.'॥ १ ॥

**सुनत बचन जहँ तहँ जन धाए। सुग्रीवादि तुरत अन्हवाए॥**

**पुनि करुनानिधि भरतु हँकारे। निज कर राम जटा निरुआरे॥**

भगवंतांचे बोलणे ऐकताच सेवक जिकडे-तिकडे धावत गेले व त्यांनी लगेच सुग्रीवादींना स्नान घातले. नंतर कृपानिधान श्रीरामांनी भरताला बोलावले आणि स्वत:च्या हातांनी त्याच्या जटा सोडविल्या.॥ २ ॥

**अन्हवाए प्रभु तीनिउ भाई। भगत बछल कृपाल रघुराई॥**

**भरत भाग्य प्रभु कोमलताई। सेष कोटि सत सकहिं न गाई॥**

त्यानंतर भक्तवत्सल कृपाळू प्रभू श्रीरघुनाथांनी तिन्ही भावांना स्नान घातले. भरताचे भाग्य व श्रीरामांचे वात्सल्य यांचे वर्णन अब्जावधी शेषही करू शकणार नाहीत.॥ ३ ॥

**पुनि निज जटा राम बिबराए। गुर अनुसासन मागि नहाए॥**

**करि मज्जन प्रभु भूषन साजे। अंग अनंग देखि सत लाजे॥**

नंतर श्रीरामांनी स्वत:ची जटा सोडविली आणि गुरूंची आज्ञा मागून स्नान केले. स्नान झाल्यावर प्रभूंनी अलंकार धारण केले. त्यांचे सुंदर अंग पाहून असंख्य कामदेवही लाजले.॥ ४ ॥

दो०—**सासुन्ह सादर जानकिहि मज्जन तुरत कराइ।**

**दिब्य बसन बर भूषन अँग अँग सजे बनाइ॥ ११ ( क )॥**

इकडे सासवांनी जानकीला मोठ्या प्रेमाने लगेच स्नान घालून तिच्या अंगभर दिव्य वस्त्रे आणि श्रेष्ठ अलंकार घालून तिला नटविले.॥ ११ (क)॥

**राम बाम दिसि सोभति रमा रूप गुन खानि।**

**देखि मातु सब हरषीं जन्म सुफल निज जानि॥ ११ ( ख )॥**

श्रीरामांच्या डाव्या बाजूस रूप व गुणांची खाण असलेली जानकी शोभून दिसत होती. त्यांना पाहून सर्व मातांना आपला जन्म सार्थक झाल्याचा आनंद झाला. ॥ ११ (ख) ॥

**सुनु खगेस तेहि अवसर ब्रह्मा सिव मुनि बृंद।**
**चढ़ि बिमान आए सब सुर देखन सुखकंद॥ ११ ( ग )॥**

काकभुशुंडी म्हणतात, 'हे पक्षिराज गरुड, त्याप्रसंगी ब्रह्मदेव, शिव, मुनींचा समाज व सर्व देव विमानांमध्ये बसून आनंदकंद भगवंतांचे दर्शन घेण्यासाठी आले. ॥ ११ (ग) ॥

**प्रभु बिलोकि मुनि मन अनुरागा। तुरत दिब्य सिंघासन मागा॥**
**रबि सम तेज सो बरनि न जाई। बैठे राम द्विजन्ह सिरु नाई॥**

प्रभूंना पाहून मुनी वसिष्ठांच्या हृदयात प्रेमाचे भरते आले. त्यांनी ताबडतोब दिव्य सिंहासन मागविले. ते सूर्याप्रमाणे तेजस्वी होते. त्याचे सौंदर्य अवर्णनीय होते. ब्राह्मणांसमोर नतमस्तक होऊन श्रीरामचंद्र त्याच्यावर विराजमान झाले. ॥ १ ॥

**जनकसुता समेत रघुराई। पेखि प्रहरषे मुनि समुदाई॥**
**बेद मंत्र तब द्विजन्ह उचारे। नभ सुर मुनि जय जयति पुकारे॥**

जानकीसह श्रीरामांना पाहून मुनि-समुदाय अत्यंत आनंदित झाला. मग ब्राह्मणांनी वेद-मंत्रांचा उच्चार केला. आकाशामध्ये देव व मुनी 'श्रीरामांचा विजय असो, विजय असो' अशा घोषणा करू लागले. ॥ २ ॥

**प्रथम तिलक बसिष्ट मुनि कीन्हा। पुनि सब बिप्रन्ह आयसु दीन्हा॥**
**सुत बिलोकि हरषीं महतारी। बार बार आरती उतारी॥**

सर्वप्रथम वसिष्ठ मुनींनी श्रीरामांना तिलक लावला. नंतर त्यांनी सर्व ब्राह्मणांना तिलक लावण्याची आज्ञा केली. पुत्राला राजसिंहासनारूढ झाल्याचे पाहून मातांना आनंद झाला आणि त्यांनी वारंवार आरत्या ओवाळल्या. ॥ ३ ॥

**बिप्रन्ह दान बिबिधि बिधि दीन्हे। जाचक सकल अजाचक कीन्हे॥**
**सिंघासन पर त्रिभुअन साईं। देखि सुरन्ह दुंदुभीं बजाईं॥**

त्यांनी ब्राह्मणांना अनेक प्रकारची दाने दिली व सर्व याचकांना भरपूर दान देऊन याचनारहित केले. त्रिभुवनाचे स्वामी श्रीरामचंद्र अयोध्येच्या सिंहासनावर विराजमान झाल्याचे पाहून देवांनी नगारे वाजविले. ॥ ४ ॥

**छं०—नभ दुंदुभीं बाजहिं बिपुल गंधर्ब किंनर गावहीं।**
**नाचहिं अपछरा बृंद परमानंद सुर मुनि पावहीं॥**

**भरतादि अनुज बिभीषनांगद हनुमदादि समेत ते।**
**गहें छत्र चामर ब्यजन धनु असि चर्म सक्ति बिराजते॥ १॥**

आकाशात खूप नगारे वाजत होते. गंधर्व व किन्नर गात होते. अप्सरांच्या झुंडीच्या झुंडी नृत्य करत होत्या. देव व मुनी यांना परमानंद होत होता. भरत, लक्ष्मण आणि शत्रुघ्न, बिभीषण, अंगद, हनुमान, सुग्रीव इत्यादी छत्र, चामर, पंखा, धनुष्य, तलवार, ढाल आणि शक्ती धारण करून शोभत होते. ॥ १ ॥

**श्री सहित दिनकर बंस भूषन काम बहु छबि सोहई।**
**नव अंबुधर बर गात अंबर पीत सुर मन मोहई॥**
**मुकुटांगदादि बिचित्र भूषन अंग अंगन्हि प्रति सजे।**
**अंभोज नयन बिसाल उर भुज धन्य नर निरखंति जे॥ २॥**

सीतेसह विराजमान झालेल्या, सूर्यवंशाचे विभूषण असलेल्या श्रीरामांच्या शरीरामध्ये अनेक कामदेवांचे सौंदर्य शोभून दिसत होते. नव्या जलयुक्त मेघांसमान सुंदर श्याम शरीरावरील पीतांबर देवांचेही मन मोहित करीत होते. मुकुट, बाजूबंद इत्यादी अलंकार श्रीरामांच्या अंगाअंगावर शोभत होते. कमलासमान नेत्र, विशाल वक्ष:स्थल आणि लांब भुजा असलेल्या त्यांचे दर्शन घेणारे लोक धन्य होत. ॥ २ ॥

दो०—**वह सोभा समाज सुख कहत न बनइ खगेस।**
**बरनहिं सारद सेष श्रुति सो रस जान महेस॥ १२ (क)॥**

हे गरुडा, ती शोभा, तो समाज आणि ते सुख यांचे मी वर्णन करू शकत नाही. सरस्वती, शेष व वेद त्यांचे निरंतर वर्णन करतात, परंतु त्याचा खरा आनंद श्रीमहादेवच जाणतात. ॥ १२(क) ॥

**भिन्न भिन्न अस्तुति करि गए सुर निज निज धाम।**
**बंदी बेष बेद तब आए जहँ श्रीराम॥ १२ (ख)॥**

सर्व देव वेगवेगळी स्तुती करून आपापल्या लोकी निघून गेले. तेव्हा चारी वेद हे भाटांचे रूप धारण करून श्रीरामांच्याजवळ आले. ॥ १२(ख) ॥

**प्रभु सर्बग्य कीन्ह अति आदर कृपानिधान।**
**लखेउ न काहूँ मरम कछु लगे करन गुन गान॥ १२ (ग)॥**

कृपानिधान सर्वज्ञ प्रभूंनी त्यांना ओळखून त्यांचा खूप आदर केला. याचे रहस्य कुणाला काहीही कळले नाही. वेद गुणगान करू लागले. ॥ १२ (ग) ॥

छं०—**जय सगुन निर्गुन रूप रूप अनूप भूप सिरोमने।**
**दसकंधरादि प्रचंड निसिचर प्रबल खल भुजबल हने॥**

**अवतार नर संसार भार बिभंजि दारुन दुख दहे।**
**जय प्रनतपाल दयाल प्रभु संजुक्त सक्ति नमामहे॥ १॥**

‘हे सगुण आणि निर्गुण रूप, हे अनुपम रूपलावण्ययुक्त, हे राजांचे शिरोमणी, तुमचा विजय असो. तुम्ही रावण इत्यादी प्रचंड, प्रबळ आणि दुष्ट निशाचरांना आपल्या बाहुबलाने मारून टाकले. तुम्ही मनुष्य-अवतार घेऊन पृथ्वीचा भार हरण करून तिचे भीषण दुःख दूर केले. हे दयाळू, हे शरणागतांचे रक्षण करणाऱ्या प्रभो, तुमचा विजय असो. आम्ही शक्ती सीतेसह शक्तिमान असलेल्या तुम्हांला नमस्कार करतो.॥ १॥

**तव बिषम माया बस सुरासुर नाग नर अग जग हरे।**
**भव पंथ भ्रमत अमित दिवस निसि काल कर्म गुननि भरे॥**
**जे नाथ करि करुना बिलोके त्रिबिधि दुख ते निर्बहे।**
**भव खेद छेदन दच्छ हम कहुँ रच्छ राम नमामहे॥ २॥**

हे हरी, तुमच्या दुस्तर मायेत गुंतल्यामुळे देव, राक्षस, नाग, मनुष्य आणि चर, अचर हे सर्व काल, कर्म आणि गुणांच्या अधीन होऊन रात्रंदिवस जन्म-मरणाच्या अनंत फेऱ्यांतून भटकत आहेत. हे नाथ, यांपैकी तुम्ही ज्यांना कृपादृष्टीने पाहिले, ते मायाजनित तिन्ही प्रकारच्या दुःखांमधून मुक्त झाले. जन्ममरणाचे श्रम नष्ट करण्यामध्ये कुशल असलेले हे श्रीराम, आमचे रक्षण करा. आम्ही तुम्हांला नमस्कार करतो.॥ २॥

**जे ग्यान मान बिमत्त तव भव हरनि भक्ति न आदरी।**
**ते पाइ सुर दुर्लभ पदादपि परत हम देखत हरी॥**
**बिस्वास करि सब आस परिहरि दास तव जे होइ रहे।**
**जपि नाम तव बिनु श्रम तरहिं भव नाथ सो समरामहे॥ ३॥**

ज्यांनी मिथ्या ज्ञानाच्या अभिमानाने फार उन्मत्त होऊन जन्म-मृत्यूच्या भयाचे हरण करणाऱ्या आपल्या भक्तीचा आदर केला नाही, हे हरी, देव-दुर्लभ पद प्राप्त झाल्यावरही ते त्या पदावरून पतित होताना आम्हांला दिसतात. परंतु जे सर्व आशा सोडून तुमच्यावर विश्वास ठेवून तुमचे दास बनून राहातात, ते केवळ तुमचे नामच जपत विनासायास भवसागर तरून जातात. हे नाथ, अशा तुमचे आम्ही स्मरण करतो.॥ ३॥

**जे चरन सिव अज पूज्य रज सुभ परसि मुनिपतिनी तरी।**
**नख निर्गता मुनि बंदिता त्रैलोक पावनि सुरसरी॥**

**ध्वज कुलिस अंकुस कंज जुत बन फिरत कंटक किन लहे।**
**पद कंज द्वंद मुकुंद राम रमेस नित्य भजामहे॥ ४॥**

ज्या चरणांची पूजा शिव व ब्रह्मदेव यांच्याकडून होते आणि ज्या चरणांच्या कल्याणमय धुळीच्या स्पर्शामुळे शिळा होऊन पडलेली गौतमऋषींची पत्नी अहल्याही तरून गेली, मुनींना वंद्य असलेली व त्रैलोक्यास पावन करणारी देवनदी गंगा ज्या चरणांच्या नखातून निघाली तसेच ध्वज, वज्र, अंकुश आणि कमल या चिन्हांनी युक्त असलेल्या ज्या चरणांना वनातून फिरताना काटे बोचल्यामुळे घट्टे पडले आहेत, हे मुकुंदा, हे रामा, हे रमापती, आम्ही तुमच्या त्या दोन्ही चरणांना नित्य भजतो. ॥ ४ ॥

**अब्यक्तमूलमनादि तरु त्वच चारि निगमागम भने।**
**षट कंध साखा पंच बीस अनेक पर्न सुमन घने॥**
**फल जुगल बिधि कटु मधुर बेलि अकेलि जेहि आश्रित रहे।**
**पल्लवत फूलत नवल नित संसार बिटप नमामहे॥ ५॥**

वेद-शास्त्रांनी म्हटले आहे की, ज्याचे मूळ अव्यक्त प्रकृती आहे, जो प्रवाहरूपाने अनादी आहे, ज्याला चार त्वचा आहेत, सहा खोडे आहेत, पंचवीस शाखा आणि अनेक पाने व पुष्कळ फुले आहेत, ज्याला कडू व गोड अशा दोन प्रकारची फळे लागली आहेत; ज्याच्यावर एकच वेल असून ती त्याच्याच आधारे राहाते. जिला नित्य नवीन पाने व फुले लागतात, अशा संसारवृक्षस्वरूपाने विश्वात प्रकट असलेल्या तुम्हांला आम्ही नमस्कार करतो. ॥ ५ ॥

**जे ब्रह्म अजमद्वैतमनुभवगम्य मन पर ध्यावहीं।**
**ते कहहुँ जानहुँ नाथ हम तव सगुन जस नित गावहीं॥**
**करुनायतन प्रभु सदगुनाकर देव यह बर मागहीं।**
**मन बचन कर्म बिकार तजि तव चरन हम अनुरागहीं॥ ६॥**

ब्रह्म हे जन्म नसलेले, अद्वैत, केवल अनुभवानेच जाणता येणारे आणि मनापलीकडील आहे, अशा प्रकारे जे ब्रह्माचे ध्यान करतात, ते खुशाल असे म्हणोत व ध्यान करोत; परंतु हे नाथ, आम्ही तर नित्य तुमच्या सगुण रूपाचीच कीर्ती गातो. हे करुणानिधान प्रभो, हे सद्‌गुणांची खाण, हे देवा, कायावाचामनाने विकारांचा त्याग करून तुमच्या चरणी आमचे प्रेम असावे, हाच वर आम्ही मागतो.' ॥ ६ ॥

दो०—**सब के देखत बेदन्ह बिनती कीन्हि उदार।**
**अंतर्धान भए पुनि गए ब्रह्म आगार॥ १३ (क)॥**

वेदांनी सर्वांच्यासमोर अशी उत्तम प्रार्थना केली आणि ते अंतर्धान पावून ब्रह्मलोकी गेले. ॥ १३ (क) ॥

**बैनतेय सुनु संभु तब आए जहँ रघुबीर।**
**बिनय करत गदगद गिरा पूरित पुलक सरीर॥ १३ ( ख )॥**

काकभुशुंडी म्हणतात, 'हे गरुडा, तेव्हा जेथे श्रीरघुवीर होते, तेथे शिव आले आणि सद्गदित वाणीने स्तुती करू लागले. त्यांचे शरीर पुलकित झाले होते.॥ १३ (ख)॥

**छं०—जय राम रमा रमनं समनं। भवताप भयाकुल पाहि जनं॥**
**अवधेस सुरेस रमेस बिभो। सरनागत मागत पाहि प्रभो॥**

'हे राम, हे रमारमण लक्ष्मीकांत, हे जन्ममरणाचा त्रास नष्ट करणारे, तुमचा विजय असो. जन्ममरणाच्या भयाने व्याकूळ झालेल्या या सेवकाचे रक्षण करा. हे अयोध्यापती, हे देवांचे स्वामी, हे रमापती, हे विभो, मी शरणागत होऊन हेच मागतो की, हे प्रभो, माझे रक्षण करा.॥ १॥

**दससीस बिनासन बीस भुजा। कृत दूरि महा महि भूरि रुजा॥**
**रजनीचर बृंद पतंग रहे। सर पावक तेज प्रचंड दहे॥**

दहा शिरे व वीस भुजा असलेल्या रावणाचा विनाश करून पृथ्वीचा सर्वांत मोठा रोग दूर करणाऱ्या हे श्रीरामा, राक्षससमूहरूपी जे कीटक होते, ते सर्व तुमच्या बाणरूपी अग्नीच्या प्रचंड तेजाने भस्म झाले.॥ २॥

**महि मंडल मंडन चारुतरं। धृत सायक चाप निषंग बरं॥**
**मद मोह महा ममता रजनी। तम पुंज दिवाकर तेज अनी॥**

तुम्ही पृथ्वीमंडळाचे अत्यंत सुंदर भूषण आहात. तुम्ही श्रेष्ठ बाण, धनुष्य व भाता धारण केलेले आहात. मद, मोह आणि ममतारूपी रात्रीच्या अंधकाराच्या घोर समूहाचा नाश करण्यासाठी तुम्ही सूर्याचे तेजोमय किरणसमूह आहात.॥ ३॥

**मनजात किरात निपात किए। मृग लोग कुभोग सरेन हिए॥**
**हति नाथ अनाथनि पाहि हरे। बिषया बन पावँर भूलि परे॥**

कामदेवरूपी भिल्लाने मनुष्यरूपी हरिणांच्या मनात कुभोगरूपी बाण मारून त्यांना पाडले आहे. हे नाथ, पाप-तापाचे हरण करणारे हे हरी, त्या कामाला मारून विषयरूपी वनात भटकणाऱ्या या बिचाऱ्या अनाथ जीवांचे रक्षण करा.॥ ४॥

**बहु रोग बियोगन्हि लोग हए। भवदंघ्रि निरादर के फल ए॥**
**भव सिंधु अगाध परे नर ते। पद पंकज प्रेम न जे करते॥**

लोक बऱ्याच रोगांनी व दु:खांनी त्रासले आहेत. तुमच्या चरणांचा निरादर केल्याचे हे फळ आहे. जे मनुष्य तुमच्या चरणकमलांवर प्रेम करीत नाहीत, ते अथांग भवसागरात पडतात.॥ ५॥

**अति दीन मलीन दुखी नितहीं । जिन्ह कें पद पंकज प्रीति नहीं ॥**
**अवलंब भवंत कथा जिन्ह कें । प्रिय संत अनंत सदा तिन्ह कें ॥**

ज्यांना तुमच्या चरणकमलांविषयी प्रेम नाही, ते नित्य अत्यंत दीन, उदास व दुःखी असतात आणि ज्यांना तुमच्या लीला-कथांचा आधार आहे, त्यांना संत व भगवान हे नेहमी प्रिय वाटू लागतात. ॥ ६ ॥

**नहिं राग न लोभ न मान मदा । तिन्ह कें सम बैभव वा बिपदा ॥**
**एहि ते तव सेवक होत मुदा । मुनि त्यागत जोग भरोस सदा ॥**

ज्यांच्यामध्ये आसक्ती, लोभ, मान आणि मद असत नाही, त्यांना सुख-दुःख समान वाटते. त्यामुळे मुनिजन योग-साधनेवरचा विश्वास कायमचा सोडून देऊन प्रसन्नपणे तुमचे सेवक बनतात. ॥ ७ ॥

**करि प्रेम निरंतर नेम लिएँ । पद पंकज सेवत सुद्ध हिएँ ॥**
**सम मानि निरादर आदरही । सब संत सुखी बिचरंति मही ॥**

ते सर्व संत प्रेमाने नियमपूर्वक निरंतर शुद्ध हृदयाने तुमच्या चरणकमलांची सेवा करीत राहातात आणि मान-अपमान समान मानून सुखाने पृथ्वीवर वावरतात. ॥ ८ ॥

**मुनि मानस पंकज भृंग भजे । रघुबीर महा रनधीर अजे ॥**
**तव नाम जपामि नमामि हरी । भव रोग महागद मान अरी ॥**

हे मुनींच्या मनरूपी कमलातील भ्रमर, हे महान रणधीर आणि अजेय श्रीरघुवीर, मी तुम्हांला भजतो. हे हरी, मी तुमचे नाम जपतो आणि तुम्हांला नमस्कार करतो. तुम्ही जन्म-मरणरूपी रोगाचे महान औषध व अभिमानाचे शत्रू आहात. ॥ ९ ॥

**गुन सील कृपा परमायतनं । प्रनमामि निरंतर श्रीरमनं ॥**
**रघुनंद निकंदय द्वंद्वघनं । महिपाल बिलोकय दीनजनं ॥**

तुम्ही गुण, शील आणि कृपा यांचे परम स्थान आहात. तुम्ही लक्ष्मीपती आहात. मी तुम्हांला निरंतर प्रणाम करतो. हे रघुनंदन, तुम्ही जन्म-मरण, सुख-दुःख, राग-द्वेष इत्यादी द्वंद्वांच्या समूहाचा नाश करा. हे राजन, या दीन दासावरही कृपा-कटाक्ष टाका. ॥ १० ॥

दो०—**बार बार बर मागउँ हरषि देहु श्रीरंग।**
**पद सरोज अनपायनी भगति सदा सतसंग॥ १४ ( क )॥**

मी तुम्हांला वारंवार हेच वरदान मागतो की, मला तुमच्या चरणकमलांविषयी दृढ भक्ती आणि भक्तांचा सत्संग नेहमी मिळो. हे लक्ष्मीपती, प्रसन्न होऊन मला हेच वरदान द्या.' ॥ १४ (क) ॥

**बरनि उमापति राम गुन हरषि गए कैलास।**
**तब प्रभु कपिन्ह दिवाए सब बिधि सुखप्रद बास॥ १४ ( ख )॥**

श्रीरामचंद्रांच्या गुणांचे वर्णन करून उमापती आनंदाने कैलासाला निघून गेले. तेव्हा प्रभूंनी वानरांना राहण्यास सर्व सुखसोयी असलेली घरे दिली.॥ १४ (ख)॥

**सुनु खगपति यह कथा पावनी । त्रिबिध ताप भव भय दावनी॥**
**महाराज कर सुभ अभिषेका । सुनत लहहिं नर बिरति बिबेका॥**

'हे गरुडा, ऐक. ही कथा सर्वांना पवित्र करणारी आहे. तिन्ही प्रकारच्या तापांचा आणि जन्म-मृत्यूच्या भीतीचा नाश करणारी आहे. महाराज श्रीरामचंद्र कल्याणमय राज्याभिषेकाची चरित्र-लीला निष्कामभावनेने ऐकल्याने मनुष्याला वैराग्य आणि ज्ञान प्राप्त होते.॥ १॥

**जे सकाम नर सुनहिं जे गावहिं । सुख संपति नाना बिधि पावहिं॥**
**सुर दुर्लभ सुख करि जग माहीं । अंतकाल रघुपति पुर जाहीं॥**

आणि जे मनुष्य सकाम भावनेने ती ऐकतात व गातात, त्यांना अनेक प्रकारची सुख-संपत्ती मिळते. ते जगामध्ये देवदुर्लभ सुखे भोगून शेवटी श्रीरघुनाथांच्या परम धामाला जातात.॥ २॥

**सुनहिं बिमुक्त बिरत अरु बिषई । लहहिं भगति गति संपति नई॥**
**खगपति राम कथा मैं बरनी । स्वमति बिलास त्रास दुख हरनी॥**

जे जीवन्मुक्त, विरक्त आणि विषयी लोक ही कथा ऐकतात, त्यांना क्रमशः भक्ती, मुक्ती व नित्य नवे भोग मिळतात. हे पक्षिराज गरुडा, मी आपल्या बुद्धीनुसार रामकथेचे वर्णन केले आहे. ही कथा जन्ममरणाचे भय व दुःख यांचे हरण करते.॥ ३॥

**बिरति बिबेक भगति दृढ़ करनी । मोह नदी कहँ सुंदर तरनी॥**
**नित नव मंगल कौसलपुरी । हरषित रहहिं लोग सब कुरी॥**

ही रामकथा वैराग्य, विवेक आणि भक्ती यांना दृढ करणारी आणि मोहरूपी नदी तरून जाण्यासाठी उत्तम नौका आहे. अयोध्यापुरीमध्ये नित्य नवे मंगलोत्सव होत होते. तेथे सर्व वर्गांतील लोक आनंदाने राहात होते.॥ ४॥

**नित नइ प्रीति राम पद पंकज । सब कें जिन्हहि नमत सिव मुनि अज॥**
**मंगन बहु प्रकार पहिराए । द्विजन्ह दान नाना बिधि पाए॥**

श्रीरामांच्या ज्या चरणकमलांना श्रीशिव, मुनिगण व ब्रह्मदेवही नमस्कार करतात, त्यांच्या ठिकाणी सर्वांच्या मनात नित्य नवीन प्रेम आहे. याचकांना अनेक प्रकारची वस्त्राभूषणे दिली आणि ब्राह्मणांनी नाना प्रकारची दाने घेतली.॥ ५॥

दो०—**ब्रह्मानंद मगन कपि सब कें प्रभु पद प्रीति।**
**जात न जाने दिवस तिन्ह गए मास षट बीति॥ १५॥**

सर्व वानर ब्रह्मानंदात मग्न होते. प्रभूंच्या चरणी सर्वांना प्रेम होते. त्यांना दिवस कसे गेले, हे कळलेच नाही. बघता बघता सहा महिने निघून गेले.॥ १५॥

**बिसरे गृह सपनेहुँ सुधि नाहीं। जिमि परद्रोह संत मन माहीं॥**
**तब रघुपति सब सखा बोलाए। आइ सबन्हि सादर सिरु नाए॥**

ते सर्वजण आपले घर विसरून गेले. जागेपणी नव्हे, तर स्वप्नातही त्यांना घराची आठवण होत नव्हती. ज्याप्रमाणे संतांच्या मनात परद्रोह करण्याचा विचारही कधी येत नाही, त्याप्रमाणे. तेव्हा श्रीरघुनाथांनी सर्व मित्रांना बोलावून घेतले. सर्वांनी येऊन आदराने मस्तक नमविले.॥ १॥

**परम प्रीति समीप बैठारे। भगत सुखद मृदु बचन उचारे॥**
**तुम्ह अति कीन्हि मोरि सेवकाई। मुख पर केहि बिधि करौं बड़ाई॥**

श्रीरामांनी सर्वांना मोठ्या प्रेमाने आपल्याजवळ बसवून घेतले आणि भक्तांना सुख देणाऱ्या गोड शब्दांनी सांगितले, 'तुम्ही माझी फार मोठी सेवा केलेली आहे. तुमची स्तुती तोंडावर कशी करू?॥ २॥

**ताते मोहि तुम्ह अति प्रिय लागे। मम हित लागि भवन सुख त्यागे॥**
**अनुज राज संपति बैदेही। देह गेह परिवार सनेही॥**

माझ्यासाठी तुम्ही घर व सर्व सुखांचा त्याग केला. त्यामुळे तुम्ही मला अत्यंत प्रिय वाटता. धाकटे बंधू, राज्य, संपत्ती, जानकी, स्वतःचे शरीर, घर, कुटुंब आणि मित्र॥ ३॥

**सब मम प्रिय नहिं तुम्हहि समाना। मृषा न कहउँ मोर यह बाना॥**
**सब कें प्रिय सेवक यह नीती। मोरें अधिक दास पर प्रीती॥**

हे सर्व मला प्रिय आहेत खरे, परंतु तुमच्याइतके नाहीत. मी हे खोटे सांगत नाही. हा माझा स्वभाव आहे. सेवक हे सर्वांनाच आवडतात, हा नियम आहे. परंतु दासावर माझे स्वभावतःच विशेष प्रेम आहे.॥ ४॥

दो०—**अब गृह जाहु सखा सब भजेहु मोहि दृढ़ नेम।**
**सदा सर्बगत सर्बहित जानि करेहु अति प्रेम॥ १६॥**

हे मित्रांनो, आता तुम्ही सर्वजण घरी जा आणि तेथे दृढ नियमपूर्वक मला भजत राहा. मला नेहमी सर्वव्यापक आणि सर्वांचे हित करणारा मानून माझ्यावर अत्यंत प्रेम करा.'॥ १६॥

**सुनि प्रभु बचन मगन सब भए। को हम कहाँ बिसरि तन गए॥**
**एकटक रहे जोरि कर आगे। सकहिं न कछु कहि अति अनुरागे॥**

प्रभूंचे बोलणे ऐकून सर्वजण प्रेममग्न झाले. आपण कोण आहोत आणि कुठे आहोत, हे त्यांचे देहभानही सुटले. ते प्रभूंच्यासमोर हात जोडून एकटक पाहात राहिले. अत्यंत प्रेमामुळे त्यांना बोलता येईना. ॥ १ ॥

**परम प्रेम तिन्ह कर प्रभु देखा। कहा बिबिधि बिधि ग्यान बिसेषा॥**
**प्रभु सन्मुख कछु कहन न पारहिं। पुनि पुनि चरन सरोज निहारहिं॥**

प्रभूंनी त्यांचे अत्यंत प्रेम पाहिले आणि त्यांना अनेक प्रकारे विशेष ज्ञानाचा उपदेश केला. प्रभूंच्यासमोर ते काही बोलू शकत नव्हते. ते वारंवार प्रभूंची चरणकमले पाहात होते. ॥ २ ॥

**तब प्रभु भूषन बसन मगाए। नाना रंग अनूप सुहाए॥**
**सुग्रीवहि प्रथमहिं पहिराए। बसन भरत निज हाथ बनाए॥**

मग प्रभूंनी अनेक रंगांची उत्तमोत्तम वस्त्रे व दागिने मागविले. सर्वप्रथम भरताने आपल्या हातांनी सुग्रीवाला वस्त्राभूषणे घातली. ॥ ३ ॥

**प्रभु प्रेरित लछिमन पहिराए। लंकापति रघुपति मन भाए॥**
**अंगद बैठ रहा नहिं डोला। प्रीति देखि प्रभु ताहि न बोला॥**

नंतर प्रभूंच्या प्रेरणेने लक्ष्मणाने बिभीषणाला वस्त्राभूषणे घातली. ती श्रीरघुनाथांना फार आवडली. अंगद बसूनच राहिला. तो जागेवरून हललासुद्धा नाही. त्याचे उत्कट प्रेम पाहून प्रभूंनी त्याला बोलावले नाही. ॥ ४ ॥

दो०—**जामवंत नीलादि सब पहिराए रघुनाथ।**
**हियँ धरि राम रूप सब चले नाइ पद माथ॥ १७ ( क )॥**

जांबवान आणि नील इत्यादी सर्वांना श्रीरघुनाथांनी स्वतः वस्त्राभूषणे घातली. ते सर्वजण आपल्या हृदयामध्ये श्रीरामचंद्रांचे रूप धारण करून व त्यांच्या चरणी मस्तक टेकवून निघाले. ॥ १७ (क) ॥

**तब अंगद उठि नाइ सिरु सजल नयन कर जोरि।**
**अति बिनीत बोलेउ बचन मनहुँ प्रेम रस बोरि॥ १७ ( ख )॥**

तेव्हा अंगद उठून, नतमस्तक होऊन, नेत्रांमध्ये पाणी भरून आणि हात जोडून अत्यंत विनम्रपणे व प्रेमात थबथबलेले शब्द बोलला, ॥ १७ (ख) ॥

**सुनु सर्बग्य कृपा सुख सिंधो। दीन दयाकर आरत बंधो॥**
**मरती बेर नाथ मोहि बाली। गयउ तुम्हारेहि कोंछें घाली॥**

'हे सर्वज्ञ, हे कृपा आणि सुखाचे सागर, हे दीनांवर दया करणारे, हे आर्तजनांचे बंधू, हे नाथ, ऐका. माझे वडील वाली यांनी मरताना मला तुमच्या पदरी घातले होते. ॥ १ ॥

**असरन सरन बिरदु संभारी। मोहि जनि तजहु भगत हितकारी॥**
**मोरें तुम्ह प्रभु गुर पितु माता। जाउँ कहाँ तजि पद जलजाता॥**

म्हणून हे भक्तांचे हितकारी, आपले अशरणाला शरण देण्याचे ब्रीद आठवून मला सोडू नका. माझे स्वामी, गुरू, पिता व माता—सर्व काही तुम्हीच आहात. तुमचे चरण-कमल सोडून मी कुठे जाऊ?॥ २॥

**तुम्हहि बिचारि कहहु नरनाहा। प्रभु तजि भवन काज मम काहा॥**
**बालक ग्यान बुद्धि बल हीना। राखहु सरन नाथ जन दीना॥**

हे महाराज, तुम्हीच विचार करून सांगा. हे प्रभू, तुम्हांला सोडून घरामध्ये माझे काय काम आहे? हे नाथ, या ज्ञानहीन, बुद्धिहीन आणि बलहीन बालकाला व दीन सेवकाला आपल्याच पदरी ठेवा.॥ ३॥

**नीचि टहल गृह कै सब करिहउँ। पद पंकज बिलोकि भव तरिहउँ॥**
**अस कहि चरन परेउ प्रभु पाही। अब जनि नाथ कहहु गृह जाही॥**

मी तुमच्या घरातील हलक्यातील हलकी सेवा करीन आणि तुमचे चरणकमल पाहाता पाहाता भवसागर तरून जाईन.' असे म्हणून त्याने श्रीरामांच्या चरणी लोटांगण घातले व म्हटले, 'हे प्रभो, माझे रक्षण करा. हे नाथ, आता मला घरी जाण्यास सांगू नका.'॥ ४॥

दो०—**अंगद बचन बिनीत सुनि रघुपति करुना सींव।**
**प्रभु उठाइ उर लायउ सजल नयन राजीव॥ १८ (क)॥**

अंगदाचे विनम्र बोलणे ऐकून करुणेची परिसीमा असलेल्या प्रभू श्रीरघुनाथांनी त्याला उठवून आपल्या हृदयाशी धरले. प्रभूंच्या नेत्रकमलांमध्ये प्रेमाश्रू दाटले.॥ १८ (क)॥

**निज उर माल बसन मनि बालितनय पहिराइ।**
**बिदा कीन्हि भगवान तब बहु प्रकार समुझाइ॥ १८ (ख)॥**

मग भगवंतांनी आपल्या गळ्यातील माळ, वस्त्र व रत्नजडित आभूषणे बालिपुत्र अंगदाला घालून व अनेक प्रकारे समजावून सांगून त्याला निरोप दिला.॥ १८(ख)॥

**भरत अनुज सौमित्रि समेता। पठवन चले भगत कृत चेता॥**
**अंगद हृदयँ प्रेम नहिं थोरा। फिरि फिरि चितव राम कीं ओरा॥**

अंगद या भक्ताच्या कामगिरीची आठवण ठेवून भरत, शत्रुघ्न व लक्ष्मण त्याला पोहोचवायला निघाले. अंगदाच्या मनात श्रीरामांविषयी खूपच प्रेम होते. त्यामुळे तो वारंवार वळून श्रीरामांच्याकडे पाहात होता.॥ १॥

**बार बार कर दंड प्रनामा। मन अस रहन कहहिं मोहि रामा॥**
**राम बिलोकनि बोलनि चलनी। सुमिरि सुमिरि सोचत हँसि मिलनी॥**

आणि वारंवार दंडवत घालून प्रणाम करीत होता. त्याला वाटत होते की, श्रीरामांनी मला

आपल्याजवळ राहाण्यास सांगावे. श्रीरामांच्या पाहाण्याची, बोलण्याची, चालण्याची आणि हसत भेटण्याची ढब आठवून त्याला परत जाताना दु:ख होत होते.॥ २॥

**प्रभु रुख देखि बिनय बहु भाषी। चलेउ हृदयँ पद पंकज राखी॥**
**अति आदर सब कपि पहुँचाए। भाइन्ह सहित भरत पुनि आए॥**

परंतु प्रभूंचा कल पाहून, खूप विनयाने बोलून आणि प्रभूंच्या चरण-कमली मन ठेवून तो निघाला. अत्यंत आदराने सर्व वानरांना पोहोचवून भरत भावांसह परत आला.॥ ३॥

**तब सुग्रीव चरन गहि नाना। भाँति बिनय कीन्हे हनुमाना॥**
**दिन दस करि रघुपति पद सेवा। पुनि तव चरन देखिहउँ देवा॥**

तेव्हा हनुमानाने सुग्रीवाचे पाय धरून अनेक प्रकारे विनवणी केली आणि म्हटले की, 'महाराज! काही दिवस श्रीरघुनाथांची चरणसेवा करून मग मी येऊन तुमच्या चरणांचे दर्शन करीन.'॥ ४॥

**पुन्य पुंज तुम्ह पवनकुमारा। सेवहु जाइ कृपा आगारा॥**
**अस कहि कपि सब चले तुरंता। अंगद कहइ सुनहु हनुमंता॥**

सुग्रीव म्हणाला, 'हे पवनकुमार, भगवंतांनी तुला आपल्या सेवेला ठेवून घेतले. तू पुण्याची खाण आहेस. तू जाऊन कृपानिधान श्रीरामांची सेवा कर.' सर्व वानर असे म्हणून लगेच निघाले. अंगद म्हणाला, 'हे हनुमाना, ऐक.॥ ५॥

दो०—**कहेहु दंडवत प्रभु सैं तुम्हहि कहउँ कर जोरि।**
**बार बार रघुनायकहि सुरति कराएहु मोरि॥ १९ ( क )॥**

मी तुला हात जोडून सांगतो की, प्रभूंना माझा नमस्कार सांग आणि रघुनाथांना माझी वारंवार आठवण देत राहा.'॥ १९ (क)॥

**अस कहि चलेउ बालिसुत फिरि आयउ हनुमंत।**
**तासु प्रीति प्रभु सन कही मगन भए भगवंत॥ १९ ( ख )॥**

असे म्हणून बालिपुत्र अंगद निघाला. मग हनुमान परत आला आणि अंगदाचे प्रेम त्याने प्रभूंना सांगितले. ते ऐकून भगवान प्रेममग्न झाले.॥ १९ (ख)॥

**कुलिसहु चाहि कठोर अति कोमल कुसुमहु चाहि।**
**चित्त खगेस राम कर समुझि परइ कहु काहि॥ १९ ( ग )॥**

काकभुशुंडी म्हणतात, 'हे गरुडा, श्रीरामांचे चित्त वज्राहून कठीण व फुलांहून अत्यंत कोमल आहे. ते कुणाला समजून येणार सांग बघू?॥ १९ (ग)॥

**पुनि कृपाल लियो बोलि निषादा। दीन्हे भूषन बसन प्रसादा॥**
**जाहु भवन मम सुमिरन करेहू। मन क्रम बचन धर्म अनुसरेहू॥**

नंतर कृपाळू श्रीरामांनी निषादराज गुहाला बोलावले आणि त्याला प्रसाद म्हणून वस्त्राभूषणे दिली आणि सांगितले की, 'आता तू घरी जा. तेथे माझे स्मरण करीत राहा आणि कायावाचामनाने धर्माप्रमाणे वाग. ॥ १ ॥

**तुम्ह मम सखा भरत सम भ्राता। सदा रहेहु पुर आवत जाता॥**
**बचन सुनत उपजा सुख भारी। परेउ चरन भरि लोचन बारी॥**

तू माझा मित्र आहेस आणि भरतासारखा भाऊही आहेस. अयोध्येला नेहमी येत जात राहा.' हे ऐकून त्याला फार समाधान वाटले. नेत्रांतून आनंद व प्रेमाचे अश्रू वाहू लागले. त्याने प्रभूंच्या चरणी लोटांगण घातले. ॥ २ ॥

**चरन नलिन उर धरि गृह आवा। प्रभु सुभाउ परिजनन्हि सुनावा॥**
**रघुपति चरित देखि पुरबासी। पुनि पुनि कहहिं धन्य सुखरासी॥**

नंतर भगवंतांचे चरणकमल हृदयात धारण करून तो घरी आला आणि आल्यावर त्याने आपल्या कुटुंबीयांना प्रभूंचा स्वभाव कसा आहे, ते सांगितले. श्रीरघुनाथांचे हे चरित्र पाहून अयोध्यावासी वारंवार म्हणत की, सुखाची राशी असलेले श्रीरामचंद्र धन्य होत. ॥ ३ ॥

**राम राज बैठें त्रैलोका। हरषित भए गए सब सोका॥**
**बयरु न कर काहू सन कोई। राम प्रताप बिषमता खोई॥**

श्रीरामचंद्र राज्यावर बसल्यावर तिन्ही लोकी आनंद दाटून आला. त्यांचा शोक नाहीसा झाला. कोणी कुणाशी वैर करीनासा झाला. श्रीरामचंद्रांच्या प्रतापामुळे सर्वजण अत्यंत प्रेमाने राहू लागले. ॥ ४ ॥

दो०—**बरनाश्रम निज निज धरम निरत बेद पथ लोग।**
**चलहिं सदा पावहिं सुखहि नहिं भय सोक न रोग॥ २०॥**

सर्व लोक आपापल्या वर्णाश्रमाप्रमाणे धर्माने वागत. नेहमी वेदविहित मार्गाने आचरण करून सुखी होत. त्यांना कोणत्याही गोष्टीचे भय, शोक व रोग यांचा त्रास होत नव्हता. ॥ २० ॥

**दैहिक दैविक भौतिक तापा। राम राज नहिं काहुहि ब्यापा॥**
**सब नर करहिं परस्पर प्रीती। चलहिं स्वधर्म निरत श्रुति नीती॥**

रामराज्यामध्ये त्रिविध तापांचा मागमूस नव्हता. सर्वजण परस्परांवर प्रेम करीत होते आणि वेदांमध्ये प्रतिपादित केलेल्या मर्यादेमध्ये तत्पर राहून आपापल्या धर्माचे पालन करीत होते. ॥ १ ॥

**चारिउ चरन धर्म जग माहीं। पूरि रहा सपनेहुँ अघ नाहीं॥**
**राम भगति रत नर अरु नारी। सकल परम गति के अधिकारी॥**

धर्म हा सत्य, शौच, दया आणि दान या आपल्या चारही चरणांनी युक्त होऊन राहिला होता. स्वप्नातही कुठे पाप नव्हते. सर्व स्त्रीपुरुष राम-भक्तीत तत्पर होते आणि ते सर्व परमगतीचे अधिकारी झाले होते.॥ २॥

**अल्पमृत्यु नहिं कवनिउ पीरा। सब सुंदर सब बिरुज सरीरा॥**
**नहिं दरिद्र कोउ दुखी न दीना। नहिं कोउ अबुध न लच्छन हीना॥**

अल्प वयात मृत्यू होत नव्हता की कुणाला कोणतीही पीडा नव्हती. सर्वांचे देह सुंदर व निरोगी होते. कोणीही दरिद्री नव्हता, दु:खी नव्हता आणि दीनही नव्हता. कोणीही मूर्ख नव्हता व शुभलक्षणांनी हीन नव्हता.॥ ३॥

**सब निर्दंभ धर्मरत पुनी। नर अरु नारि चतुर सब गुनी॥**
**सब गुनग्य पंडित सब ग्यानी। सब कृतग्य नहिं कपट सयानी॥**

सर्व दंभरहित होते, धर्मपरायण होते आणि पुण्यात्मे होते. सर्व स्त्री-पुरुष हे नीतिनिपुण व गुणी होते. सर्वजण गुणांचा आदर करणारे व पंडित होते आणि सर्वजण ज्ञानी होते. सर्वजणांमध्ये कृतज्ञता होती आणि कुणामध्येही लबाडी नव्हती.'॥ ४॥

**दो०—राम राज नभगेस सुनु सचराचर जग माहिं।**
**काल कर्म सुभाव गुन कृत दुख काहुहि नाहिं॥ २१॥**

काकभुशुंडी म्हणतात, 'हे गरुडा, श्रीरामांच्या राज्यात चराचराला काल, कर्म, स्वभाव आणि गुण यांपासून उत्पन्न होणारे दु:ख नव्हते.॥ २१॥

**भूमि सप्त सागर मेखला। एक भूप रघुपति कोसला॥**
**भुअन अनेक रोम प्रति जासू। यह प्रभुता कछु बहुत न तासू॥**

अयोध्येमध्ये श्रीरघुनाथ हे सात समुद्रांच्या मेखलेच्या पृथ्वीचे एकमात्र राजे होते. ज्यांच्या रोमारोमात अनेक ब्रह्मांडे समाविष्ट होती, त्यांना या सात द्वीपांच्या पृथ्वीचे राज्य म्हणजे काहीच नव्हते.॥ १॥

**सो महिमा समुझत प्रभु केरी। यह बरनत हीनता घनेरी॥**
**सोउ महिमा खगेस जिन्ह जानी। फिरि एहिं चरित तिन्हहुँ रति मानी॥**

उलट प्रभूंचा हा महिमा जाणल्यावर, ते सात समुद्रांनी वेढलेल्या सप्तद्वीपांच्या पृथ्वीचे एकमात्र सम्राट होते, असे म्हणणे म्हणजे त्यांची एक प्रकारे निंदाच होय. परंतु हे गरुडा, ज्यांनी त्यांचा हा महिमा जाणला, त्यांना सुद्धा मग या प्रभूंच्या लीलेविषयी प्रेम वाटत होते.॥ २॥

**सोउ जाने कर फल यह लीला। कहहिं महा मुनिबर दमसीला॥**
**राम राज कर सुख संपदा। बरनि न सकइ फनीस सारदा॥**

कारण तो महिमाही जाणण्याचे फल म्हणजे या लीलेचा अनुभवच होय, असे जितेंद्रिय श्रेष्ठ महामुनी म्हणतात. रामराज्यातील सुख-संपत्तीचे वर्णन शेष व सरस्वती हे सुद्धा करू शकत नाहीत. ॥ ३ ॥

**सब उदार सब पर उपकारी । बिप्र चरन सेवक नर नारी ॥**
**एकनारि ब्रत रत सब झारी । ते मन बच क्रम पति हितकारी ॥**

रामराज्यामधील सर्व स्त्रीपुरुष उदार होते, सर्वच परोपकारी होते आणि सर्वजण ब्राह्मणांच्या चरणांची सेवा करणारे होते. सर्वच पुरुष एकपत्नीव्रती होते. अशा प्रकारे स्त्रियासुद्धा कायावाचामनाने पतीचे हित करणाऱ्या होत्या. ॥ ४ ॥

दो०—**दंड जतिन्ह कर भेद जहँ नर्तक नृत्य समाज।**
**जीतहु मनहि सुनिअ अस रामचंद्र कें राज ॥ २२ ॥**

श्रीरामचंद्रांच्या राज्यात 'दंड' हा फक्त संन्याशांच्याच हातामध्ये होता. 'भेद' हा फक्त नर्तकांच्या ताल-सुरांच्या संदर्भात ऐकू येत होता. 'जिंका' हा शब्द मन जिंकण्याच्या संदर्भात ऐकू येई. ॥ २२ ॥

**फूलहिं फरहिं सदा तरु कानन । रहहिं एक सँग गज पंचानन ॥**
**खग मृग सहज बयरु बिसराई । सबन्हि परस्पर प्रीति बढ़ाई ॥**

वनांमध्ये वृक्ष नित्य फुलत व फळत होते. सिंह व हत्ती आपले जन्मजात वैर विसरून वावरत होते. सर्वच पशु-पक्षी आपले स्वाभाविक वैर विसरून गुण्यागोविंदाने राहात होते. ॥ १ ॥

**कूजहिं खग मृग नाना बृंदा । अभय चरहिं बन करहिं अनंदा ॥**
**सीतल सुरभि पवन बह मंदा । गुंजत अलि लै चलि मकरंदा ॥**

पक्षी गोड कूजन करीत होते. तऱ्हेतऱ्हेचे पशूंचे कळप वनामध्ये निर्भयपणे आनंदाने वावरत होते. शीतल, मंद व सुगंधित वारे वाहात होते. पुष्पांचा रस घेऊन भ्रमर गुंजारव करीत होते. ॥ २ ॥

**लता बिटप मागें मधु चवहीं । मनभावतो धेनु पय स्त्रवहीं ॥**
**ससि संपन्न सदा रह धरनी । त्रेताँ भइ कृतजुग कै करनी ॥**

वेली व वृक्ष हे मागणी करताच मध टपकू लागत. गाई मनासारखे दूध देत होत्या. धरती नेहमी पिकांनी भरलेली असे. त्रेतायुग असताना सत्ययुगातील स्थिती प्रकट झाली होती. ॥ ३ ॥

**प्रगटीं गिरिन्ह बिबिधि मनि खानी । जगदातमा भूप जग जानी ॥**
**सरिता सकल बहहिं बर बारी । सीतल अमल स्वाद सुखकारी ॥**

संपूर्ण जगाचे आत्मा असलेले भगवान हे जगात राज्य करीत आहेत, हे जाणून पर्वतांनी अनेक प्रकारची रत्ने प्रकट केली. सर्व नद्या श्रेष्ठ, शीतल, निर्मळ आणि सुखप्रद स्वादिष्ट जल प्रवाहित करीत होत्या. ॥ ४ ॥

**सागर निज मरजादाँ रहहीं । डारहिं रत्न तटन्हि नर लहहीं ॥**
**सरसिज संकुल सकल तड़ागा । अति प्रसन्न दस दिसा बिभागा ॥**

समुद्र आपल्या मर्यादेमध्ये राहात होते. ते आपल्या लाटांबरोबर किनाऱ्याला रत्ने टाकीत होते. ती माणसांना मिळत होती. सर्व तलाव कमळांनी फुललेले होते. दाही दिशांतील प्रदेश अत्यंत प्रसन्न होते. ॥ ५ ॥

दो०—**बिधु महि पूर मयूखन्हि रबि तप जेतनेहि काज।**
**मागें बारिद देहिं जल रामचंद्र कें राज॥ २३ ॥**

श्रीरामचंद्रांच्या राज्यात चंद्र हा आपल्या अमृतमय किरणांनी पृथ्वीला भरून टाकीत होता. जेवढी गरज असेल, तेवढीच उष्णता सूर्य देत होता. मेघ हे जेवढे हवे तेवढेच पाणी देत होते. ॥२३ ॥

**कोटिन्ह बाजिमेध प्रभु कीन्हे । दान अनेक द्विजन्ह कहँ दीन्हे ॥**
**श्रुति पथ पालक धर्म धुरंधर । गुनातीत अरु भोग पुरंदर ॥**

प्रभू श्रीरामांनी कोट्यवधी अश्वमेध यज्ञ केले आणि ब्राह्मणांना अनेक दाने दिली. श्रीरामचंद्र हे वेदमार्गाचे पालन करणारे, धर्माची धुरा वाहाणारे, त्रिगुणातीत व ऐश्वर्यामध्ये इंद्रासारखे होते. ॥ १ ॥

**पति अनुकूल सदा रह सीता । सोभा खानि सुसील बिनीता ॥**
**जानति कृपासिंधु प्रभुताई । सेवति चरन कमल मन लाई ॥**

सौंदर्याची खाण असलेली, सुशील व विनम्र सीता ही नित्य पतीला अनुकूल वागत होती. ती कृपासागर श्रीरामांचा महिमा जाणत होती. आणि मनःपूर्वक त्याच्या चरणांची सेवा करीत होती. ॥ २ ॥

**जद्यपि गृहँ सेवक सेवकिनी । बिपुल सदा सेवा बिधि गुनी ॥**
**निज कर गृह परिचरजा करई । रामचंद्र आयसु अनुसरई ॥**

जरी घरामध्ये पुष्कळ दास-दासी होत्या आणि त्या साऱ्या सेवेमध्ये निपुण होत्या, तरीही स्वामींच्या सेवेचे महत्त्व जाणणारी सीता घरची सर्व सेवा स्वतः आपल्या हातांनी करीत असे आणि श्रीरामचंद्रांच्या आज्ञेचे अनुसरण करीत असे. ॥ ३ ॥

**जेहि बिधि कृपासिंधु सुख मानइ । सोइ कर श्री सेवा बिधि जानइ ॥**
**कौसल्यादि सासु गृह माहीं । सेवइ सबन्हि मान मद नाहीं ॥**

कृपासागर श्रीरामचंद्रांना ज्यात सुख वाटे, तेच सीता करीत असे. कारण ती सेवेची पद्धत जाणणारी होती. घरामध्ये कौसल्या इत्यादी सर्व सासूंची सेवा ती करीत असे व तिला कोणत्याही गोष्टीचा अभिमान किंवा घमेंड नव्हती. ॥ ४ ॥

**उमा रमा ब्रह्मादि बंदिता । जगदंबा संततमनिंदिता ॥**

शिव म्हणतात की, 'हे उमे, जगज्जननी सीता ही ब्रह्मदेवादिक देवांना वंद्य व नित्य सर्वगुण-संपन्न होती. ॥ ५ ॥

**दो०—जासु कृपा कटाच्छु सुर चाहत चितव न सोइ।**
**राम पदारबिंद रति करति सुभावहि खोइ॥ २४॥**

जिचा कृपाकटाक्ष मिळावा, असे देवांना वाटे, परंतु जी त्यांच्याकडे ढुंकूनही पाहात नसे, तीच लक्ष्मी आपला महामहिम स्वभाव सोडून श्रीरामचंद्रांच्या चरणकमलांवर प्रेम करीत असे. ॥ २४ ॥

**सेवहिं सानकूल सब भाई । राम चरन रति अति अधिकाई ॥**
**प्रभु मुख कमल बिलोकत रहहीं । कबहुँ कृपाल हमहि कछु कहहीं ॥**

सर्व बंधू श्रीरामांना अनुकूल अशी सेवा करीत. श्रीरामांच्या ठिकाणी त्यांचे आत्यंतिक प्रेम होते. ते नेहमी प्रभूंच्या मुखकमलाकडे पाहात असत की, आम्हांलाही काही सेवा करण्यास कृपाळू प्रभूंनी सांगावे. ॥ १ ॥

**राम करहिं भ्रातन्ह पर प्रीती । नाना भाँति सिखावहिं नीती ॥**
**हरषित रहहिं नगर के लोगा । करहिं सकल सुर दुर्लभ भोगा ॥**

श्रीरामसुद्धा भावांवर प्रेम करीत असत आणि त्यांना सर्व प्रकारच्या नीतींची शिकवण देत. नगरामधील लोक आनंदित होते आणि देवदुर्लभ असे सर्व प्रकारचे भोग भोगत होते. ॥ २ ॥

**अहनिसि बिधिहि मनावत रहहीं । श्रीरघुबीर चरन रति चहहीं ॥**
**दुइ सुत सुंदर सीताँ जाए । लव कुस बेद पुरानन्ह गाए ॥**

ते रात्रंदिवस ब्रह्मदेवांना प्रार्थना करीत की, श्रीरघुवीरांच्या चरणी आपले दृढ प्रेम असावे. सीतेला लव व कुश असे दोन पुत्र झाले. त्यांचे वर्णन वेद-पुराणांमध्ये केले आहे. ॥ ३ ॥

**दोउ बिजई बिनई गुन मंदिर । हरि प्रतिबिंब मनहुँ अति सुंदर ॥**
**दुइ दुइ सुत सब भ्रातन्ह केरे । भए रूप गुन सील घनेरे ॥**

लव-कुश हे दोघेही विख्यात योद्धे, नम्र व सर्वगुण-संपन्न होते आणि असे अत्यंत सुंदर होते की, जणू श्रीरामांचे प्रतिबिंबच असावेत. सर्व भावांनाही दोन-दोन पुत्र झाले. तेही मोठे सुंदर, गुणवान व सुशील होते. ॥ ४ ॥

दो०—**ग्यान गिरा गोतीत अज माया मन गुन पार।**
**सोइ सच्चिदानंद घन कर नर चरित उदार॥ २५॥**

जे बौद्धिक ज्ञान, वाणी आणि इंद्रिये यांच्या पलीकडचे आणि अजन्मा आहेत, तसेच माया, मन व गुण यांच्या पलीकडचे आहेत, तेच सच्चिदानंद भगवान श्रेष्ठ अशी मनुष्यलीला करीत होते. ॥ २५ ॥

**प्रातकाल सरऊ करि मज्जन। बैठहिं सभाँ संग द्विज सज्जन॥**
**बेद पुरान बसिष्ट बखानहिं। सुनहिं राम जद्यपि सब जानहिं॥**

ते प्रात:काली शरयू नदीमध्ये स्नान करून ब्राह्मण व सज्जन यांच्याबरोबर सभेत बसत. वसिष्ठ मुनी, वेद व पुराणांतील कथा वर्णन करीत आणि श्रीराम जाणत असूनही त्या ऐकत असत. ॥ १ ॥

**अनुजन्ह संजुत भोजन करहीं। देखि सकल जननीं सुख भरहीं॥**
**भरत सत्रुहन दोनउ भाई। सहित पवनसुत उपबन जाई॥**

श्रीराम भावांबरोबर भोजन करीत. त्यांना पाहून सर्व माता आनंदमग्न होत. भरत आणि शत्रुघ्न हे दोन्ही भाऊ हनुमानासोबत उपवनात जाऊन, ॥ २ ॥

**बूझहिं बैठि राम गुन गाहा। कह हनुमान सुमति अवगाहा॥**
**सुनत बिमल गुन अति सुख पावहिं। बहुरि बहुरि करि बिनय कहावहिं॥**

तेथे बसून श्रीरामांच्या गुणांच्या कथा विचारत व हनुमान आपल्या कुशल बुद्धीने त्या गुणांमध्ये मग्न होऊन त्यांचे वर्णन करीत असे. श्रीरामचंद्रांचे निर्मळ गुण ऐकून दोघे बंधू अत्यंत सुखावून जात आणि विनवणी करून हनुमानाला वारंवार ते सांगायला लावत. ॥ ३ ॥

**सब कें गृह गृह होहिं पुराना। राम चरित पावन बिधि नाना॥**
**नर अरु नारि राम गुन गानहिं। करहिं दिवस निसि जात न जानहिं॥**

अयोध्येतील घरोघरी पुराणे व अनेक प्रकारच्या पवित्र श्रीरामकथांचे वाचन व श्रवण होत होते. स्त्री-पुरुष सर्वजण श्रीरामांचे गुणगान करीत होते आणि त्या आनंदामध्ये रात्र व दिवस कसा सरला, हेही समजत नव्हते. ॥ ४ ॥

दो०—**अवधपुरी बासिन्ह कर सुख संपदा समाज।**
**सहस सेष नहिं कहि सकहिं जहँ नृप राम बिराज॥ २६॥**

जेथे भगवान श्रीरामचंद्र स्वत: राजा म्हणून विराजमान होते, त्या अयोध्येमधील निवासीयांच्या सुख-संपत्तीच्या भांडाराचे वर्णन हजारो शेषसुद्धा करू शकणार नाहीत. ॥ २६ ॥

**नारदादि सनकादि मुनीसा। दरसन लागि कोसलाधीसा॥**
**दिन प्रति सकल अजोध्या आवहिं। देखि नगरु बिरागु बिसरावहिं॥**

नारदादी व सनकादी मुनीश्वर हे सर्व कोसलराज श्रीरामांच्या दर्शनासाठी दर दिवशी अयोध्येत येत आणि ती दिव्यनगरी पाहून आपले वैराग्य विसरून जात. ॥ १ ॥

**जातरूप मनि रचित अटारीं। नाना रंग रुचिर गच ढारीं॥**
**पुर चहुँ पास कोट अति सुंदर। रचे कँगूरा रंग रंग बर॥**

दिव्य सुवर्ण व रत्नांनी बनविलेल्या माड्या व गच्च्या होत्या. तेथे रत्नांच्या अनेक रंगांच्या फरशा घातलेल्या होत्या. नगराच्या चारी बाजूंना तटबंदी होती. त्यावर सुंदर रंगीबेरंगी बुरूज होते. ॥ २ ॥

**नव ग्रह निकर अनीक बनाई। जनु घेरी अमरावति आई॥**
**महि बहु रंग रचित गच काँचा। जो बिलोकि मुनिबर मन नाचा॥**

जणू नवग्रहांनी मोठी सेना घेऊन अमरावतीला वेढा घातला होता. खडकांवर अनेक रंगांच्या दिव्य रत्नांची फरशी घातली होती. ती पाहून श्रेष्ठ मुनींचे मनही नाचू लागे. ॥ ३ ॥

**धवल धाम ऊपर नभ चुंबत। कलस मनहुँ रबि ससि दुति निंदत॥**
**बहु मनि रचित झरोखा भ्राजहिं। गृह गृह प्रति मनि दीप बिराजहिं॥**

उज्ज्वल महाल आकाशाला भिडत होते. महालांवरील कळस आपल्या दिव्य प्रकाशाने जणू सूर्य व चंद्र यांच्या प्रकाशाला लाजवीत होते. महालांमध्ये अनेक रत्नांनी बनविलेले झरोके शोभून दिसत होते आणि घरोघरी रत्नदीप उजळत होते. ॥ ४ ॥

**छं०—मनि दीप राजहिं भवन भ्राजहिं देहरीं बिद्रुम रची।**
**मनि खंभ भीति बिरंचि बिरची कनक मनि मरकत खची॥**
**सुंदर मनोहर मंदिरायत अजिर रुचिर फटिक रचे।**
**प्रति द्वार द्वार कपाट पुरट बनाइ बहु बज्रन्हि खचे॥**

घरांमध्ये रत्नदीप शोभत होते. पोवळ्यांनी बनविलेले उंबरठे चमकत होते. रत्नजडित खांब होते. पाचूंनी बनविलेल्या सोन्याच्या भिंती अशा सुंदर दिसत होत्या की, जणू ब्रह्मदेवांनी खास करून त्या बनविल्या होत्या. महाल सुंदर, मनोहर व विशाल होते. त्यामध्ये सुंदर स्फटिकांची अंगणे बनविली होती. प्रत्येक सोन्याच्या दरवाजात पैलू पाडलेले हिरे जडविलेली दारे होती.

**दो०—चारु चित्रसाला गृह गृह प्रति लिखे बनाइ।**
**राम चरित जे निरख मुनि ते मन लेहिं चोराइ॥ २७॥**

घरोघरी चित्रशाळा होत्या. त्यामध्ये श्रीरामांच्या चरित्र-लीला सुंदरपणे चितारलेल्या होत्या. मुनी त्या पाहात, तेव्हा त्यांचे चित्तही त्या हरण करीत होत्या. ॥ २७ ॥

**सुमन बाटिका सबहिं लगाईं। बिबिध भाँति करि जतन बनाईं॥**
**लता ललित बहु जाति सुहाईं। फूलहिं सदा बसंत कि नाईं॥**

सर्व लोकांनी भिन्न भिन्न प्रकारच्या पुष्पवाटिका प्रयत्नपूर्वक लावल्या होत्या. त्यांमध्ये अनेक जातींच्या सुंदर व ललित लता वसंत ऋतूप्रमाणे नित्य फुललेल्या असत. ॥ १ ॥

**गुंजत मधुकर मुखर मनोहर। मारुत त्रिबिधि सदा बह सुंदर॥**
**नाना खग बालकन्हि जिआए। बोलत मधुर उड़ात सुहाए॥**

भ्रमर मनोहर गुंजारव करीत असत. नेहमी तिन्ही प्रकारची हवा वाहात असे. मुलांनी पुष्कळ पक्षी पाळले होते. ते गोड बोलत असत व उडताना सुंदर दिसत. ॥ २ ॥

**मोर हंस सारस पारावत। भवननि पर सोभा अति पावत॥**
**जहँ तहँ देखहिं निज परिछाहीं। बहु बिधि कूजहिं नृत्य कराहीं॥**

मोर, हंस, सारस आणि कबुतरे घरांवर शोभून दिसत होती. ते पक्षी मण्यांच्या भिंतीवर व छतांवर जिकडे तिकडे आपले प्रतिबिंब पाहून व त्याला दुसरा पक्षी समजून अनेक प्रकारे गोड बोलत व नृत्य करीत असत. ॥ ३ ॥

**सुक सारिका पढ़ावहिं बालक। कहहु राम रघुपति जनपालक॥**
**राज दुआर सकल बिधि चारू। बीथीं चौहट रुचिर बजारू॥**

मुले, पोपट-मैना यांना *'रघुपति राघव राजाराम। पतितपावन सीताराम'* असे शिकवीत. राजद्वार सर्व तऱ्हेने सुंदर होते. गल्ल्या, चौक व बाजार सर्व सुंदर होते. ॥ ४ ॥

छं०—**बाजार रुचिर न बनइ बरनत बस्तु बिनु गथ पाइए।**
**जहँ भूप रमानिवास तहँ की संपदा किमि गाइए॥**
**बैठे बजाज सराफ बनिक अनेक मनहुँ कुबेर ते।**
**सब सुखी सब सच्चरित सुंदर नारि नर सिसु जरठ जे॥**

सुंदर बाजार होते. त्यांचे वर्णन करता येत नाही. तेथे वस्तू मोफत मिळत. जिथे स्वत: लक्ष्मीपती राजा असेल, तेथील संपत्तीचे वर्णन काय करावे? कपड्यांचे व्यापारी, सराफ इत्यादी व्यापारी जणू अनेक कुबेर बसल्यासारखे वाटत. सर्व स्त्री, पुरुष, मुले व म्हातारे सुखी, सदाचारी आणि सुंदर होते.

दो०—**उत्तर दिसि सरजू बह निर्मल जल गंभीर।**
**बाँधे घाट मनोहर स्वल्प पंक नहिं तीर॥ २८॥**

नगराच्या उत्तरेला शरयू नदी वाहात होती. तिचे पाणी निर्मल व खोल होते. मनोहर घाट बांधले होते. किनाऱ्यावर जरासुद्धा चिखल नव्हता. ॥ २८ ॥

**दूरि फराक रुचिर सो घाटा। जहँ जल पिअहिं बाजि गज ठाटा॥**
**पनिघट परम मनोहर नाना। तहाँ न पुरुष करहिं अस्नाना॥**

काहीसा दूर वेगळा सुंदर घाट होता. तेथे घोडे व हत्ती यांच्या झुंडी पाणी पीत असत. स्त्रियांना पाणी भरण्यासाठी पुष्कळसे घाट होते. ते फार मनोहर होते. तेथे पुरुष स्नान करीत नसत.॥ १॥

**राजघाट सब बिधि सुंदर बर। मज्जहिं तहाँ बरन चारिउ नर॥**
**तीर तीर देवन्ह के मंदिर। चहुँ दिसि तिन्ह के उपबन सुंदर॥**

राजघाट सर्व तऱ्हेने सुंदर व श्रेष्ठ होता. तेथे चारी वर्णांचे पुरुष स्नान करीत. शरयू नदीकाठी देवमंदिरे होती. त्यांच्या चारी बाजूंना सुंदर बागा होत्या.॥ २॥

**कहुँ कहुँ सरिता तीर उदासी। बसहिं ग्यान रत मुनि संन्यासी॥**
**तीर तीर तुलसिका सुहाई। बृंद बृंद बहु मुनिन्ह लगाई॥**

नदीच्या किनाऱ्यावर कुठे कुठे विरक्त व ज्ञानपरायण मुनी आणि संन्यासी निवास करीत होते. शरयूच्या किनाऱ्यावर मुनींनी तुळशीच्या सुंदर बागाच्या बागा लावून ठेवल्या होत्या.॥ ३॥

**पुर सोभा कछु बरनि न जाई। बाहेर नगर परम रुचिराई॥**
**देखत पुरी अखिल अघ भागा। बन उपबन बापिका तड़ागा॥**

नगराची शोभा काही अवर्णनीय होती. नगराबाहेरही मोठे सौंदर्य होते. अयोध्यापुरीचे दर्शन करताच सर्व पापे पळून जात. तेथे वने, उपवने, आड आणि तलाव शोभत होते.॥ ४॥

छं०—**बापीं तड़ाग अनूप कूप मनोहरायत सोहहीं।**
**सोपान सुंदर नीर निर्मल देखि सुर मुनि मोहहीं॥**
**बहु रंग कंज अनेक खग कूजहिं मधुप गुंजारहीं।**
**आराम रम्य पिकादि खग रव जनु पथिक हंकारहीं॥**

अनुपम पुष्करिणी, तलाव आणि मनोहर व विशाल विहिरी शोभत होत्या. त्यांच्या रत्नजडित पायऱ्या आणि निर्मल पाणी पाहून देव व मुनीसुद्धा मोहून जात होते. तलावांमध्ये अनेक रंगांची कमळे उमललेली असत. अनेक पक्षी कूजन करीत आणि भ्रमर गुंजारव करीत. तेथील रमणीय बागा कोकिळा इत्यादी पक्ष्यांच्या गोड बोलीने जणू वाटसरूंना बोलावीत असत.

दो०—**रमानाथ जहँ राजा सो पुर बरनि कि जाइ।**
**अनिमादिक सुख संपदा रहीं अवध सब छाइ॥ २९॥**

स्वत: लक्ष्मीपती भगवान जेथे राजा होते, त्या नगराचे वर्णन काय करावे? अणिमा इत्यादी अष्टसिद्धी आणि संपूर्ण सुख-संपत्ती अयोध्येमध्ये पसरलेली होती.॥ २९॥

**जहँ तहँ नर रघुपति गुन गावहिं । बैठि परसपर इहइ सिखावहिं ॥**
**भजहु प्रनत प्रतिपालक रामहि । सोभा सील रूप गुन धामहि ॥**

जिकडे-तिकडे लोक श्रीरामचंद्रांचे गुणगान करीत आणि बसून एक दुसऱ्याला हाच उपदेश करीत की, शरणागताचे पालन करणाऱ्या श्रीरामांना भजा. शोभा, शील, रूप व गुणांची खाण असलेल्या श्रीरामचंद्रांना भजा. ॥ १ ॥

**जलज बिलोचन स्यामल गातहि । पलक नयन इव सेवक त्रातहि ॥**
**धृत सर रुचिर चाप तूनीरहि । संत कंज बन रबि रनधीरहि ॥**

कमलनयन आणि सावळे शरीर असलेल्या श्रीरामांना भजा. पापण्या ज्याप्रमाणे डोळ्यांचे रक्षण करतात, त्याप्रमाणे आपल्या सेवकांचे रक्षण करणाऱ्या रामांना भजा. सुंदर बाण, धनुष्य आणि भाता धारण करणाऱ्या रामांना भजा. संतरूपी कमलवनाला प्रफुल्लित करण्यासाठी सूर्यरूप असलेल्या रणधीर श्रीरामांना भजा. ॥ २ ॥

**काल कराल ब्याल खगराजहि । नमत राम अकाम ममता जहि ॥**
**लोभ मोह मृगजूथ किरातहि । मनसिज करि हरि जन सुखदातहि ॥**

कालरूप भयानक सर्पाचे भक्षण करणाऱ्या श्रीरामरूप गरुडाला भजा. निष्काम भावनेने प्रणाम करताच ममतेचा नाश करणाऱ्या श्रीरामांना भजा. लोभ-मोहरूपी हरिणांच्या कळपाचा नाश करणाऱ्या श्रीरामरूप किराताला भजा. कामदेवरूपी हत्तीसाठी सिंहरूप व सेवकांना सुख देणाऱ्या श्रीरामांना भजा. ॥ ३ ॥

**संसय सोक निबिड़ तम भानुहि । दनुज गहन घन दहन कृसानुहि ॥**
**जनकसुता समेत रघुबीरहि । कस न भजहु भंजन भव भीरहि ॥**

संशय व शोकरूपी घनदाट अंधकाराचा नाश करणाऱ्या श्रीरामरूप सूर्याला भजा. राक्षसरूपी घनदाट वनाला जाळून टाकणाऱ्या श्रीरामरूप अग्नीला भजा. जन्म-मृत्यूच्या भयाचा नाश करणाऱ्या श्रीसीतारामांना का भजत नाही? ॥ ४ ॥

**बहु बासना मसक हिम रासिहि । सदा एकरस अज अबिनासिहि ॥**
**मुनि रंजन भंजन महि भारहि । तुलसिदास के प्रभुहि उदारहि ॥**

अनेक वासनारूपी कीटकांचा नाश करणाऱ्या श्रीरामरूप बर्फराशीला भजा. नित्य एकरस, अजन्मा, अविनाशी श्रीरामचंद्रांना भजा. मुनींना आनंद देणाऱ्या, पृथ्वीचा भार उतरणाऱ्या आणि तुलसीदासाचे उदार स्वामी असलेल्या श्रीरामांना भजा. ॥ ५ ॥

दो०—**एहि बिधि नगर नारि नर करहिं राम गुन गान।**
**सानुकूल सब पर रहहिं संतत कृपानिधान॥ ३० ॥**

अशाप्रकारे नगरातील स्त्री-पुरुष श्रीरामांचे गुणगान करीत आणि कृपानिधान श्रीराम हे नेहमी सर्वांवर अत्यंत प्रसन्न असत. ॥ ३० ॥

**जब ते राम प्रताप खगेसा। उदित भयउ अति प्रबल दिनेसा॥**
**पूरि प्रकास रहेउ तिहुँ लोका। बहुतेन्ह सुख बहुतन मन सोका॥**

काकभुशुंडी म्हणतात, 'हे पक्षिराज गरुडा, जेव्हापासून रामप्रतापरूपी अत्यंत प्रचंड सूर्य उगवला आहे, तेव्हापासून तिन्ही लोकांत पूर्ण प्रकाश भरून राहिला आहे. त्यामुळे अनेकांना सुख तर कित्येकांच्या मनाला दु:ख झाले आहे. ॥ १ ॥

**जिन्हहि सोक ते कहउँ बखानी। प्रथम अबिद्या निसा नसानी॥**
**अघ उलूक जहँ तहाँ लुकाने। काम क्रोध कैरव सकुचाने॥**

आता ज्यांना ज्यांना शोक झाला आहे, त्यांच्याबद्दल सांगतो. सर्वत्र प्रकाश पसरल्यामुळे प्रथमत: अविद्यारूपी रात्र नष्ट झाली. पापरूपी घुबडे जिकडे-तिकडे लपली आणि काम-क्रोध-रूपी कुमुदे कोमेजली. ॥ २ ॥

**बिबिध कर्म गुन काल सुभाऊ। ए चकोर सुख लहहिं न काऊ॥**
**मत्सर मान मोह मद चोरा। इन्ह कर हुनर न कवनिहुँ ओरा॥**

तऱ्हेतऱ्हेचे बंधनकारक कर्म, गुण, काल, स्वभाव हे चकोर होत. रामप्रतापरूपी सूर्याच्या प्रकाशात त्यांना कधीच सुख मिळत नाही. मत्सर, मान, मोह आणि मदरूपी जे चोर होते, त्यांची चौर्यकला कुठे चालेनाशी झाली. ॥ ३ ॥

**धरम तड़ाग ग्यान बिग्याना। ए पंकज बिकसे बिधि नाना॥**
**सुख संतोष बिराग बिबेका। बिगत सोक ए कोक अनेका॥**

धर्मरूपी तलावात ज्ञान-विज्ञान ही अनेक प्रकारची कमळे उमलली. सुख, संतोष, वैराग्य आणि विवेक हे अनेक चक्रवाक शोकरहित झाले. ॥ ४ ॥

**दो०—यह प्रताप रबि जाकें उर जब करइ प्रकास।**
**पछिले बाढ़हिं प्रथम जे कहे ते पावहिं नास॥ ३१ ॥**

हा श्रीरामप्रतापरूपी सूर्य ज्यांच्या हृदयात जेव्हा प्रकाश पाडतो, तेव्हा ज्यांचे वर्णन पूर्वी केले आहे, ते धर्म, ज्ञान, विज्ञान, सुख, संतोष, वैराग्य आणि विवेक वाढीस लागतात आणि अविद्या, पाप, काम, क्रोध, कर्म, काल, गुण, स्वभाव इत्यादींचा नाश होतो. ॥ ३१ ॥

**भ्रातन्ह सहित रामु एक बारा। संग परम प्रिय पवनकुमारा॥**
**सुंदर उपबन देखन गए। सब तरु कुसुमित पल्लव नए॥**

एकदा बंधूंच्यासोबत श्रीरामचंद्र परम प्रिय हनुमानाला घेऊन सुंदर उपवन पाहण्यास गेले. तेथील सर्व वृक्ष फुललेले होते आणि त्यांना नवी पालवी फुटली होती. ॥ १ ॥

**जानि समय सनकादिक आए। तेज पुंज गुन सील सुहाए॥**
**ब्रह्मानंद सदा लयलीना। देखत बालक बहुकालीना॥**

योग्य संधी पाहून सनकादिक मुनी तेथे आले. ते तेजाचे पुंज, सुंदर गुण-शीलयुक्त आणि नेहमी ब्रह्मानंदात मग्न असत. दिसायला ते बालकासारखे वाटत, परंतु ते होते बऱ्याच कालापासूनचे.॥ २॥

**रूप धरें जनु चारिउ बेदा। समदरसी मुनि बिगत बिभेदा॥**
**आसा बसन ब्यसन यह तिन्हहीं। रघुपति चरित होइ तहँ सुनहीं॥**

जणू चारी वेदच बालकरूप धारण केलेले असावेत. ते मुनी समदर्शी आणि भेदरहित होते. दिशा हीच त्यांची वस्त्रे होती. जिथे श्रीरघुनाथांची चरित्र-कथा चाले, तेथे जाऊन ते ती अवश्य ऐकत. हेच त्यांचे व्यसन होते.॥ ३॥

**तहाँ रहे सनकादि भवानी। जहँ घटसंभव मुनिबर ग्यानी॥**
**राम कथा मुनिबर बहु बरनी। ग्यान जोनि पावक जिमि अरनी॥**

शिव म्हणतात, 'हे भवानी, सनकादिक मुनी जेथे ज्ञानी मुनिश्रेष्ठ अगस्त्य राहात होते, तेथून आले होते. श्रेष्ठ मुनींनी श्रीरामांच्या अनेक कथा त्यांना वर्णन करून सांगितल्या होत्या. ज्याप्रमाणे अरणी नावाच्या काष्ठापासून अग्नी उत्पन्न होतो, त्याप्रमाणे त्या कथा ज्ञान उत्पन्न करण्यास समर्थ होत्या.॥ ४॥

दो०—**देखि राम मुनि आवत हरषि दंडवत कीन्ह।**
**स्वागत पूँछि पीत पट प्रभु बैठन कहँ दीन्ह॥ ३२॥**

सनकादिक मुनी येत असल्याचे पाहून श्रीरामांनी हर्षित होऊन त्यांना दंडवत घातला आणि त्यांचे क्षेमकुशल विचारून त्यांना बसण्यासाठी आपला पीतांबर अंथरला.॥ ३२॥

**कीन्ह दंडवत तीनिउँ भाई। सहित पवनसुत सुख अधिकाई॥**
**मुनि रघुपति छबि अतुल बिलोकी। भए मगन मन सके न रोकी॥**

नंतर हनुमान व इतर तीन बंधूंनी त्यांना दंडवत घातला. सर्वांना समाधान झाले. मुनिजन श्रीरघुनाथांचे अतुलनीय लावण्य पाहून त्यामध्ये मग्न होऊन गेले. ते आपले मन आवरू शकले नाहीत.॥ १॥

**स्यामल गात सरोरुह लोचन। सुंदरता मंदिर भव मोचन॥**
**एकटक रहे निमेष न लावहिं। प्रभु कर जोरें सीस नवावहिं॥**

ते मुनी जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्त करणाऱ्या, श्यामशरीर, कमलनयन, सौंदर्याचे धाम असलेल्या श्रीरामांकडे एकटक पाहातच राहिले. पापण्या लवत नव्हत्या आणि प्रभू त्यांच्यासमोर हात जोडून नतमस्तक होते.॥ २॥

**तिन्ह कै दसा देखि रघुबीरा। स्रवत नयन जल पुलक सरीरा॥**
**कर गहि प्रभु मुनिबर बैठारे। परम मनोहर बचन उचारे॥**

मुनींची प्रेमविव्हळ दशा पाहून त्यांच्याप्रमाणेच श्रीरघुनाथांच्या नेत्रांतून प्रेमाश्रूंच्या धारा वाहू लागल्या आणि शरीर पुलकित झाले. त्यानंतर प्रभूंनी हात धरून श्रेष्ठ मुनींना विराजमान केले आणि परम मनोहर शब्दांनी ते त्यांना म्हणाले. ॥ ३ ॥

**आजु धन्य मैं सुनहु मुनीसा। तुम्हरें दरस जाहिं अघ खीसा॥**
**बड़े भाग पाइब सतसंगा। बिनहिं प्रयास होहिं भव भंगा॥**

'हे मुनीश्वरांनो, आज मी धन्य झालो. तुमच्या दर्शनाने सर्व पापे नष्ट होतात. मोठ्या भाग्याने सत्संगती लाभते. तिच्यामुळे परिश्रमाशिवायच जन्म-मृत्यूचे चक्र नष्ट होते. ॥ ४ ॥

दो०—**संत संग अपबर्ग कर कामी भव कर पंथ।**
**कहहिं संत कबि कोबिद श्रुति पुरान सदग्रंथ॥ ३३ ॥**

संत-संग हा मोक्षाचा व कामी लोकांचा संग जन्म-मृत्यूच्या बंधनात पडण्याचा मार्ग आहे. संत, कवी आणि पंडित तसेच वेद-पुराण इत्यादी सर्व सद्ग्रंथ असेच सांगतात.' ॥ ३३ ॥

**सुनि प्रभु बचन हरषि मुनि चारी। पुलकित तन अस्तुति अनुसारी॥**
**जय भगवंत अनंत अनामय। अनघ अनेक एक करुनामय॥**

प्रभूंचे वचन ऐकून चारी मुनी आनंदित होऊन, पुलकित शरीराने स्तुती करू लागले. 'हे भगवन, तुमचा विजय असो. तुम्ही अंतरहित, विकाररहित, पापरहित, अनेक रूपांमध्ये प्रकट होणारे व अद्वितीय आणि करुणामय आहात. ॥ १ ॥

**जय निर्गुन जय जय गुन सागर। सुख मंदिर सुंदर अति नागर॥**
**जय इंदिरा रमन जय भूधर। अनुपम अज अनादि सोभाकर॥**

हे निर्गुण, तुमचा विजय असो. हे गुणसागर, तुमचा विजय असो, विजय असो. तुम्ही सुखधाम, अत्यंत सुंदर आणि अत्यंत चतुर आहात. हे लक्ष्मीपती, तुमचा विजय असो. हे पृथ्वी धारण करणारे, तुमचा विजय असो. तुम्ही उपमारहित, अजन्मा, अनादी आणि शोभेची खाण आहात. ॥ २ ॥

**ग्यान निधान अमान मानप्रद। पावन सुजस पुरान बेद बद॥**
**तग्य कृतग्य अग्यता भंजन। नाम अनेक अनाम निरंजन॥**

तुम्ही ज्ञानाचे भांडार, स्वत: मानरहित आणि दुसऱ्यांना मान देणारे आहात. वेद-पुराणे आपल्या पवित्र व सुंदर यशाचे वर्णन करतात. तुम्ही तत्त्वज्ञानी आहात केलेली सेवा मान्य करणारे आणि अज्ञानाचा नाश करणारे आहात. हे मायारहित, तुमची अनंत नावे आहेत आणि तुम्हांला कोणतेही नाव नाही. तुम्ही नामातीत आहात. ॥ ३ ॥

**सर्ब सर्बगत सर्ब उरालय। बससि सदा हम कहुँ परिपालय॥**
**द्वंद बिपति भव फंद बिभंजय। हृदि बसि राम काम मद गंजय॥**

तुम्ही सर्वरूप, सर्वांमध्ये व्याप्त, आणि सर्वांच्या हृदयरूपी घरामध्ये सदा निवास करता. म्हणून तुम्ही आमचे पालन करा. राग-द्वेषादी द्वंद्वे, विपत्ती आणि जन्म-मृत्यूचे जाळे तोडून टाका. हे श्रीराम, तुम्ही आमच्या हृदयी निवास करून काम व मद यांचा नाश करा. ॥ ४ ॥

**दो०—परमानंद कृपायतन मन परिपूरन काम।**
**प्रेम भगति अनपायनी देहु हमहि श्रीराम॥ ३४॥**

तुम्ही परमानंदस्वरूप, कृपाधाम आणि मनोकामना पूर्ण करणारे आहात. हे श्रीराम, आम्हांला आपली अविचल प्रेमभक्ती द्या. ॥ ३४ ॥

**देहु भगति रघुपति अति पावनि । त्रिबिधि ताप भव दाप नसावनि॥**
**प्रनत काम सुरधेनु कलपतरु । होइ प्रसन्न दीजै प्रभु यह बरु॥**

हे रघुनाथ, तुम्ही आम्हांला आपली अत्यंत पवित्र करणारी आणि तिन्ही प्रकारचे ताप आणि जन्म-मरणाच्या क्लेशांचा नाश करणारी भक्ती द्या. हे शरणागताची कामना पूर्ण करण्यासाठी कामधेनू आणि कल्पवृक्षरूप असलेल्या प्रभो, प्रसन्न होऊन आम्हांला हाच वर द्या. ॥ १ ॥

**भव बारिधि कुंभज रघुनायक । सेवत सुलभ सकल सुख दायक॥**
**मन संभव दारुन दुख दारय । दीनबंधु समता बिस्तारय॥**

हे रघुनाथ, तुम्ही जन्म-मृत्यूरूप समुद्र शोषून घेण्यासाठी अगस्त्य मुनींप्रमाणे आहात. तुम्ही सेवा करण्यास सुलभ आहात आणि सर्व सुखे देणारे आहात. हे दीनबंधू, मनात उत्पन्न होणाऱ्या दारुण दुःखांचा नाश करा आणि आमच्यामध्ये समदृष्टीची वाढ करा. ॥ २ ॥

**आस त्रास इरिषादि निवारक । बिनय बिबेक बिरति बिस्तारक॥**
**भूप मौलि मनि मंडन धरनी । देहि भगति संसृति सरि तरनी॥**

तुम्ही विषयांची आशा, भय आणि ईर्ष्या इत्यादींचे निवारण करणारे आहात आणि विनय, विवेक व वैराग्य यांचा विस्तार करणारे आहात. हे राजांचे शिरोमणी व पृथ्वीचे भूषण असलेले श्रीराम, जन्म-मृत्यूची प्रवाहरूपी नदी तरून जाण्यासाठी नौकारूप असलेली आपली भक्ती आम्हांला द्या. ॥ ३ ॥

**मुनि मन मानस हंस निरंतर । चरन कमल बंदित अज संकर॥**
**रघुकुल केतु सेतु श्रुति रच्छक । काल करम सुभाउ गुन भच्छक॥**

हे मुनींच्या मनरूपी मानससरोवरात निरंतर निवास करणारे हंस, तुमच्या चरण-कमलांना ब्रह्मदेव व शिव वंदन करतात. तुम्ही रघुकुलाची पताका, वेदमर्यादेचे रक्षक आणि काल, कर्म, स्वभाव व गुणरूप बंधनांचे निवारक आहात. ॥ ४ ॥

**तारन तरन हरन सब दूषन । तुलसिदास प्रभु त्रिभुवन भूषन॥**

तुम्ही स्वत: तरलेले व दुसऱ्यांना तारून नेणारे आहात आणि सर्व दोषांचे हरण करणारे आहात. त्रैलोक्याचे विभूषण असलेले तुम्हीच तुलसीदासांचे स्वामी आहात.'॥ ५॥

दो०—**बार बार अस्तुति करि प्रेम सहित सिरु नाइ।**
**ब्रह्म भवन सनकादि गे अति अभीष्ट बर पाइ॥ ३५॥**

प्रेमाने वारंवार स्तुती करून आणि मस्तक लववून तसेच आपल्या मनास हवा असलेला वर प्राप्त करून सनकादिक मुनी ब्रह्मलोकी गेले.॥ ३५॥

**सनकादिक बिधि लोक सिधाए। भ्रातन्ह राम चरन सिर नाए॥**
**पूछत प्रभुहि सकल सकुचाहीं। चितवहिं सब मारुतसुत पाहीं॥**

सनकादिक मुनी ब्रह्मलोकी गेले, तेव्हा तिन्ही भावांनी श्रीरामांच्या चरणी मस्तक टेकले. सर्व प्रभूंना काही विचारताना बंधूंना संकोच वाटत होता. म्हणून सर्वजण हनुमानाकडे पाहात होते.॥ १॥

**सुनी चहहिं प्रभु मुख कै बानी। जो सुनि होइ सकल भ्रम हानी॥**
**अंतरजामी प्रभु सभ जाना। बूझत कहहु काह हनुमाना॥**

जी ऐकल्यावर सर्व भ्रमांचा नाश होतो, ती प्रभूंची वाणी ऐकण्याची त्यांना इच्छा होती. अंतर्यामी प्रभूंनी ते जाणले आणि विचारू लागले, 'हनुमाना, बोल. काय आहे?'॥ २॥

**जोरि पानि कह तब हनुमंता। सुनहु दीनदयाल भगवंता॥**
**नाथ भरत कछु पूँछन चहहीं। प्रस्न करत मन सकुचत अहहीं॥**

तेव्हा हनुमान हात जोडून म्हणाला, 'हे दीनदयाळू भगवन, ऐका. भरताला काही विचारायचे आहे, परंतु प्रश्न विचारताना संकोच वाटत आहे.'॥ ३॥

**तुम्ह जानहु कपि मोर सुभाऊ। भरतहि मोहि कछु अंतर काऊ॥**
**सुनि प्रभु बचन भरत गहे चरना। सुनहु नाथ प्रनतारति हरना॥**

भगवान म्हणाले, 'हनुमाना, तू माझा स्वभाव जाणतोसच. भरत व माझ्यात काही अंतर आहे काय?' प्रभूंचे बोलणे ऐकून भरताने त्यांचे पाय धरले आणि म्हटले, 'हे नाथ, हे शरणागताचे दु:ख हरण करणारे, ऐका.॥ ४॥

दो०—**नाथ न मोहि संदेह कछु सपनेहुँ सोक न मोह।**
**केवल कृपा तुम्हारिहि कृपानंद संदोह॥ ३६॥**

हे नाथ, मला कोणताही संशय नाही आणि स्वप्नातही शोक आणि मोह नाही. हे कृपा व आनंदाचे समूह, हे केवळ तुमच्याच कृपेचे फळ आहे.॥ ३६॥

**करउँ कृपानिधि एक ढिठाई। मैं सेवक तुम्ह जन सुखदाई॥**
**संतन्ह कै महिमा रघुराई। बहु बिधि बेद पुरानन्ह गाई॥**

तरीही हे कृपानिधान, मी तुमच्यासमोर एक धाष्ट्र्य करीत आहे. मी सेवक आहे आणि तुम्ही सेवकाला सुख देणारे आहात. म्हणून मला क्षमा करून माझ्या प्रश्नाचे उत्तर सांगून माझे समाधान करा. हे रघुनाथ, वेदपुराणांनी संतांचा महिमा खूप गायिला आहे. ॥ १ ॥

**श्रीमुख तुम्ह पुनि कीन्हि बड़ाई । तिन्ह पर प्रभुहि प्रीति अधिकाई ॥**
**सुना चहउँ प्रभु तिन्ह कर लच्छन । कृपासिंधु गुन ग्यान बिचच्छन ॥**

तुम्हीसुद्धा आपल्या श्रीमुखाने त्यांचा मोठेपणा अनेक प्रकारे सांगितला आहे. हे प्रभो, मी त्या संतांची लक्षणे ऐकू इच्छितो. तुम्ही कृपेचे सागर आणि गुण व ज्ञान यांमध्ये अत्यंत निपुण आहात. ॥ २ ॥

**संत असंत भेद बिलगाई । प्रनतपाल मोहि कहहु बुझाई ॥**
**संतन्ह के लच्छन सुनु भ्राता । अगनित श्रुति पुरान बिख्याता ॥**

हे शरणागताचे पालन करणारे, संत व असंत यांच्यातील फरक वेगवेगळा करून मला समजून द्या.' श्रीराम म्हणाले, 'हे बंधू, संतांची लक्षणे असंख्य आहेत. ती वेद व पुराणांत प्रसिद्ध आहेत. ॥ ३ ॥

**संत असंतन्हि कै असि करनी । जिमि कुठार चंदन आचरनी ॥**
**काटइ परसु मलय सुनु भाई । निज गुन देइ सुगंध बसाई ॥**

संत व असंत यांची करणी चंदन व कुऱ्हाडीप्रमाणे आहे. हे बंधू, कुऱ्हाड चंदनाला तोडते, परंतु चंदन आपल्या स्वभावानुसार आपला गुण देऊन तोडणाऱ्या कुऱ्हाडीलाही सुगंधाने सुवासित करते. ॥ ४ ॥

दो०—**ताते सुर सीसन्ह चढ़त जग बल्लभ श्रीखंड ।**
**अनल दाहि पीटत घनहिं परसु बदन यह दंड ॥ ३७ ॥**

याच गुणामुळे चंदन हे देवांच्या शिरावर विराजमान होते आणि जगात प्रिय असते. आणि कुऱ्हाडीच्या तोंडाला दंड मिळतो. तिला आगीमध्ये जाळून मग घणाने बडविले जाते. ॥ ३७ ॥

**बिषय अलंपट सील गुनाकर । पर दुख दुख सुख सुख देखे पर ॥**
**सम अभूतरिपु बिमद बिरागी । लोभामरष हरष भय त्यागी ॥**

संत हे विषय-लंपट नसतात. ते शील व सद्‌गुणांची खाण असतात. त्यांना परदुःख पाहून दुःख वाटते व परसुख पाहून सुख होते. ते सर्वाठायी व सर्वकाळी समता बाळगतात. त्यांच्या मनात कोणी त्यांचा शत्रू नसतो. ते मदरहित आणि वैराग्यवान असतात. तसेच लोभ, क्रोध, हर्ष व भय यांचा त्याग करून राहातात. ॥ १ ॥

**कोमलचित दीनन्ह पर दाया । मन बच क्रम मम भगति अमाया ॥**
**सबहि मानप्रद आपु अमानी । भरत प्रान सम मम ते प्रानी ॥**

त्यांचे मन फार कोमल असते. ते दीनांवर दया करतात आणि मन, वचन आणि कर्माने माझी विशुद्ध भक्ती करतात. सर्वांना सन्मान देतात, परंतु स्वतः मानरहित असतात. हे भरता, ते संतजन मला प्राण-प्रिय असतात. ॥ २ ॥

**बिगत काम मम नाम परायन। सांति बिरति बिनती मुदितायन॥**
**सीतलता सरलता मयत्री। द्विज पद प्रीति धर्म जनयत्री॥**

त्यांना कोणतीही कामना नसते. ते माझ्या नामस्मरणात तत्पर असतात. शांती, वैराग्य, विनय आणि प्रसन्नतेचे माहेरघर असतात. त्यांच्यामध्ये शीतलता, सरळपणा, सर्वांविषयी मित्रभाव आणि ब्राह्मणांच्या चरणी प्रेम असते. हे सर्व धर्म उत्पन्न करणारे आहे. ॥ ३ ॥

**ए सब लच्छन बसहिं जासु उर। जानेहु तात संत संतत फुर॥**
**सम दम नियम नीति नहिं डोलहिं। परुष बचन कबहूँ नहिं बोलहिं॥**

हे बंधो, ही सर्व लक्षणे ज्या हृदयात वसत असतात, त्यांना नेहमी खरा संत समजावे. जे मनाचा निग्रह, इंद्रियांचा निग्रह, नियम व नीतीपासून कधीही ढळत नाहीत आणि तोंडाने कधी कठोर बोलत नाहीत, ॥ ४ ॥

दो०—**निंदा अस्तुति उभय सम ममता मम पद कंज।**
**ते सज्जन मम प्रानप्रिय गुन मंदिर सुख पुंज॥ ३८॥**

ज्यांना निंदा आणि स्तुती दोन्हीही सारखेच असते आणि माझ्या चरण-कमलांविषयी ममता असते, ते गुणांचे धाम आणि सुखाची राशी असलेले संतजन मला प्राण-प्रिय असतात. ॥ ३८ ॥

**सुनहु असंतन्ह केर सुभाऊ। भूलेहुँ संगति करिअ न काऊ॥**
**तिन्ह कर संग सदा दुखदाई। जिमि कपिलहि घालइ हरहाई॥**

आता दुष्टांचा स्वभाव ऐक. त्या दुष्टांची कधी चुकूनही संगत करू नये. त्यांची संगती नेहमी दुःख देणारी असते. ज्याप्रमाणे नाठाळ गाय ही सरळ गाईला आपल्या संगतीने नाठाळ करते, त्याप्रमाणे दुष्टांची संगती असते. ॥ १ ॥

**खलन्ह हृदयँ अति ताप बिसेषी। जरहिं सदा पर संपति देखी॥**
**जहँ कहुँ निंदा सुनहिं पराई। हरषहिं मनहुँ परी निधि पाई॥**

दुष्टांच्या मनात फार दाह असतो. ते दुसऱ्याची संपत्ती-सुख पाहून नेहमी जळफळत असतात. ते कुठे दुसऱ्याची निंदा ऐकायला मिळाली की, आनंदित होतात, जणू त्यांना वाटते, खजिनाच मिळाला असावा. ॥ २ ॥

**काम क्रोध मद लोभ परायन। निर्दय कपटी कुटिल मलायन॥**
**बयरु अकारन सब काहू सों। जो कर हित अनहित ताहू सों॥**

ते काम, क्रोध, मद व लोभ यांचे परायण तसेच निर्दय, कपटी, कुटिल व पापांचे घर असतात. ते कारण नसताना सर्वांशीच वैर करतात. जो त्यांचे भले करतो, त्याच्याशीही वाईट वागतात. ॥ ३ ॥

**झूठइ लेना झूठइ देना। झूठइ भोजन झूठ चबेना॥**
**बोलहिं मधुर बचन जिमि मोरा। खाइ महा अहि हृदय कठोरा॥**

त्यांचे घेणेही खोटेच असते. तसेच देणेही खोटेच असते. बोलाचीच कढी व बोलाचाच भात असतो. सर्व गोष्टी खोट्याच असतात. ज्याप्रमाणे मोर गोड बोलतो, परंतु त्याचे हृदय कठोर असते. तो अत्यंत विषारी सापसुद्धा खातो, त्याप्रमाणेच हे दुष्टसुद्धा वरवर गोड बोलतात, परंतु मनाने निर्दय असतात. ॥ ४ ॥

दो०—**पर द्रोही पर दार रत पर धन पर अपबाद।**
**ते नर पाँवर पापमय देह धरें मनुजाद॥ ३९॥**

ते दुसऱ्यांशी द्रोह करतात आणि परस्त्री, परक्याचे धन आणि परक्याची निंदा यामध्येच आसक्त असतात. ते क्षुद्र आणि पापी मनुष्य नर-शरीर धारण केलेले राक्षसच होत. ॥ ३९ ॥

**लोभइ ओढ़न लोभइ डासन। सिस्नोदर पर जमपुर त्रास न॥**
**काहू की जौं सुनहिं बड़ाई। स्वास लेहिं जनु जूड़ी आई॥**

लोभ हेच त्यांचे पांघरूण व लोभच त्यांचे अंथरूण असते. ते लोभानेच वेढलेले असतात. ते पशूप्रमाणे आहार आणि मैथुनात तत्पर असतात. त्यांना यमपुरीचे भय वाटत नाही. जर कुणाची स्तुती त्यांनी ऐकली, तर चक्कर आल्याप्रमाणे ते उसासे सोडतात. ॥ १ ॥

**जब काहू कै देखहिं बिपती। सुखी भए मानहुँ जग नृपती॥**
**स्वारथ रत परिवार बिरोधी। लंपट काम लोभ अति क्रोधी॥**

आणि जर कुणावर विपत्ती कोसळली, तर त्यांना असे सुख वाटते की, जणू आपण जगाचे राजे झालो आहोत; ते स्वार्थपरायण कुटुंबीयांचे विरोधक, काम आणि लोभाने लंपट व अत्यंत रागीट असतात. ॥ २ ॥

**मातु पिता गुर बिप्र न मानहिं। आपु गए अरु घालहिं आनहिं॥**
**करहिं मोह बस द्रोह परावा। संत संग हरि कथा न भावा॥**

ते आई, वडील, गुरू, ब्राह्मण यांपैकी कोणालाही मानत नाहीत. स्वतः तर नष्ट होतातच व आपल्याबरोबर दुसऱ्याला नष्ट करतात. मोहामुळे दुसऱ्याशी द्रोह करतात. त्यांना संतांचा संग आवडत नाही आणि भगवंतांची कथाही आवडत नाही. ॥ ३ ॥

**अवगुन सिंधु मंदमति कामी। बेद बिदूषक परधन स्वामी॥**
**बिप्र द्रोह पर द्रोह बिसेषा। दंभ कपट जियँ धरें सुबेषा॥**

ते अवगुणांचे समुद्र, मंदबुद्धी, कामी, वेदांचे निंदक, आणि जबरदस्तीने परक्याचे धन लुटणारे असतात. ते दुसऱ्यांचा द्रोह तर करतातच, परंतु विशेष करून ब्राह्मणांचा द्रोह करतात. त्यांच्या हृदयात दंभ आणि कपट भरलेले असते, परंतु वरून ते सुंदर वेष धारण करतात.॥ ४॥

दो०—**ऐसे अधम मनुज खल कृतजुग त्रेताँ नाहिं।**
**द्वापर कछुक बृंद बहु होइहहिं कलिजुग माहिं॥ ४०॥**

असे नीच व दुष्ट मनुष्य सत्ययुग व त्रेतायुगात नसतात. द्वापारयुगात थोडेसे असतील आणि कलियुगात तर यांच्या झुंडीच्या झुंडी असतील.॥ ४०॥

**पर हित सरिस धर्म नहिं भाई। पर पीड़ा सम नहिं अधमाई॥**
**निर्नय सकल पुरान बेद कर। कहेउँ तात जानहिं कोबिद नर॥**

हे बंधू, परोपकारासारखा दुसरा कोणताही धर्म नाही आणि दुसऱ्याला दुःख देण्यासारखे कोणतेही पाप नाही. बाबा रे, सर्व पुराणांचा व वेदांचा हाच निर्णय आहे. तो मी तुला सांगितला. ही गोष्ट पंडित लोकांना माहीत असते.॥ १॥

**नर सरीर धरि जे पर पीरा। करहिं ते सहहिं महा भव भीरा॥**
**करहिं मोह बस नर अघ नाना। स्वारथ रत परलोक नसाना॥**

मनुष्यशरीर धारण करून, जे लोक दुसऱ्यांना दुःख देतात, त्यांना जन्म-मृत्यूची महान संकटे सहन करावी लागतात. मनुष्य मोहामुळे स्वार्थपरायण होऊन अनेक पापे करतात. त्यामुळे त्यांचा परलोक नष्ट होऊन जातो.॥ २॥

**कालरूप तिन्ह कहँ मैं भ्राता। सुभ अरु असुभ कर्म फल दाता॥**
**अस बिचारि जे परम सयाने। भजहिं मोहि संसृत दुख जाने॥**

हे बंधू, मी त्यांच्यासाठी भयंकर कालरूप आहे आणि त्यांच्या चांगल्या-वाईट कर्मांचे यथायोग्य फळ देणारा आहे. असा विचार करून जे लोक मोठे चतुर आहेत, ते संसार-प्रवाह दुःखरूप असल्याचे समजून मलाच भजतात.॥ ३॥

**त्यागहिं कर्म सुभासुभ दायक। भजहिं मोहि सुर नर मुनि नायक॥**
**संत असंतन्ह के गुन भाषे। ते न परहिं भव जिन्ह लखि राखे॥**

त्यामुळे ते शुभ व अशुभ फल देणाऱ्या कर्मांचा त्याग करून देव, मनुष्य आणि मुनींचा स्वामी असलेल्या मला भजतात. अशा प्रकारे मी संत आणि असंत यांचे गुण सांगितले. ज्या लोकांना हे गुण समजले आहेत, ते जन्म-मरणाच्या फेऱ्यात पडत नाहीत.॥ ४॥

दो०—**सुनहु तात माया कृत गुन अरु दोष अनेक।**
**गुन यह उभय न देखिअहिं देखिअ सो अबिबेक॥ ४१॥**

हे बंधो, ऐक. मायेने रचलेले अनेक गुण व दोष आहेत. त्यांची वास्तविक सत्ता नाही. ते दोन्हीही पाहूच नयेत, यामध्येच विवेक आहे. ते पाहाणे हाच अविवेक होय.'॥ ४१॥

**श्रीमुख बचन सुनत सब भाई। हरषे प्रेम न हृदयँ समाई॥**
**करहिं बिनय अति बारहिं बारा। हनूमान हियँ हरष अपारा॥**

भगवंतांच्या श्रीमुखातून हे वचन ऐकून सर्व बंधूंना आनंद झाला. त्यांच्या मनात प्रेम मावत नव्हते. ते वारंवार विनवणी करीत होते. विशेषतः हनुमानाच्या मनाला अपार आनंद झाला होता.॥ १॥

**पुनि रघुपति निज मंदिर गए। एहि बिधि चरित करत नित नए॥**
**बार बार नारद मुनि आवहिं। चरित पुनीत राम के गावहिं॥**

त्यानंतर श्रीराम आपल्या महालाकडे गेले. अशाप्रकारे ते नित्य नवीन लीला करीत होते. नारद मुनी वारंवार अयोध्येला येत असत आणि श्रीरामांचे पवित्र चरित्र गात असत.॥ २॥

**नित नव चरित देखि मुनि जाहीं। ब्रह्मलोक सब कथा कहाहीं॥**
**सुनि बिरंचि अतिसय सुख मानहिं। पुनि पुनि तात करहु गुन गानहिं॥**

मुनी येऊन नित्य नवनवीन चरित्र लीला पाहून येथून जात व ब्रह्मलोकी जाऊन सर्व कथा सांगत. ब्रह्मदेवांना ती ऐकून समाधान वाटे व ते म्हणत 'हे वत्सा! वारंवार श्रीरामांच्या गुणांचे गायन कर.'॥ ३॥

**सनकादिक नारदहि सराहहिं। जद्यपि ब्रह्म निरत मुनि आहहिं॥**
**सुनि गुन गान समाधि बिसारी। सादर सुनहिं परम अधिकारी॥**

सनकादिक मुनी नारदांची प्रशंसा करीत. जरी ते सनकादिक मुनी ब्रह्मनिष्ठ होते, तरी श्रीरामांचे गुणगान ऐकून तेसुद्धा आपली ब्रह्मसमाधी विसरून जात आणि ते आदराने ऐकत. ते रामकथा ऐकण्याचे श्रेष्ठ अधिकारी होते.॥ ४॥

दो०—**जीवनमुक्त ब्रह्मपर चरित सुनहिं तजि ध्यान।**
**जे हरि कथाँ न करहिं रति तिन्ह के हिय पाषान॥ ४२॥**

सनकादी मुनींसारखे जीवन्मुक्त आणि ब्रह्मनिष्ठ पुरुषसुद्धा ब्रह्मसमाधी सोडून श्रीरामांचे चरित्र ऐकतात. हे समजल्यावरही जे श्रीहरीच्या कथेविषयी प्रेम बाळगत नाहीत, ते खरोखर पाषाणहृदयीच होत.॥ ४२॥

**एक बार रघुनाथ बोलाए। गुर द्विज पुरबासी सब आए॥**
**बैठे गुर मुनि अरु द्विज सज्जन। बोले बचन भगत भव भंजन॥**

एकदा श्रीरघुनाथांनी बोलावल्यावर गुरू वसिष्ठ, ब्राह्मण आणि इतर सर्व नगरवासी सभेला आले. जेव्हा गुरू मुनी व इतर सर्व सज्जन यथायोग्य स्थानी बसले, तेव्हा भक्तांचे जन्म-मरण नष्ट करणारे श्रीराम म्हणाले. ॥ १ ॥

**सुनहु सकल पुरजन मम बानी। कहउँ न कछु ममता उर आनी॥**
**नहिं अनीति नहिं कछु प्रभुताई। सुनहु करहु जो तुम्हहि सोहाई॥**

'हे सर्व नगरवासींनो, माझे म्हणणे ऐकून घ्या. ही गोष्ट मी मनातील ममतेमुळे सांगत नाही. मी अनीतीची गोष्ट सांगत नाही, किंवा यात काही राजसत्तेचा संबंध नाही. म्हणून संकोच व भय सोडून लक्ष देऊन ऐका आणि मग तुम्हांला योग्य वाटेल त्याप्रमाणे करा. ॥ २ ॥

**सोइ सेवक प्रियतम मम सोई। मम अनुसासन मानै जोई॥**
**जौं अनीति कछु भाषौं भाई। तौ मोहि बरजहु भय बिसराई॥**

जो माझी आज्ञा मानतो, तोच माझा सेवक, आणि तो मला अत्यंत प्रिय होय. हे बंधूंनो, जर मी काही अनीतीचे सांगत असेन, तर निर्भयपणे मला अडवा. ॥ ३ ॥

**बड़े भाग मानुष तनु पावा। सुर दुर्लभ सब ग्रंथन्हि गावा॥**
**साधन धाम मोच्छ कर द्वारा। पाइ न जेहिं परलोक सँवारा॥**

मोठ्या भाग्याने हे मनुष्य-शरीर लाभले आहे. हे शरीर देवांनाही दुर्लभ आहे, असे सर्व ग्रंथ सांगतात. हे शरीर साधनेचे स्थान व मोक्षाचे द्वार आहे. हे मिळूनही जो आपला परलोक बनवू शकला नाही, ॥ ४ ॥

दो०—**सो परत्र दुख पावइ सिर धुनि धुनि पछिताइ।**
**कालहि कर्महि ईस्वरहि मिथ्या दोस लगाइ॥ ४३ ॥**

त्याला परलोकी दुःख मिळते व डोके बडवून घेऊन पश्चात्ताप करावा लागतो आणि तो आपला दोष न मानता कालाला, कर्माला व ईश्वराला दोष देऊ लागतो. ॥ ४३ ॥

**एहि तन कर फल बिषय न भाई। स्वर्गउ स्वल्प अंत दुखदाई॥**
**नर तनु पाइ बिषयँ मन देहीं। पलटि सुधा ते सठ बिष लेहीं॥**

हे बंधूंनो, हे शरीर प्राप्त होण्याचे फल म्हणजे विषयभोग नव्हे. या जगातील काय, स्वर्गातील भोगही फारच तुच्छ आहेत आणि शेवटी दुःख देणारे आहेत, म्हणून जे लोक मनुष्यशरीर मिळूनही आपले मन विषयांमध्ये लावतात, ते मूर्ख अमृताच्या बदली विष घेतात. ॥ १ ॥

**ताहि कबहुँ भल कहइ न कोई। गुंजा ग्रहइ परस मनि खोई॥**
**आकर चारि लच्छ चौरासी। जोनि भ्रमत यह जिव अबिनासी॥**

जो परीस टाकून गुंज घेतो, त्याला कधी कोणी शहाणा म्हणत नाही. हा अविनाशी जीव अंडज, स्वेदज, जरायुज आणि उद्भिज्ज या चार जातींच्या चौऱ्याऐंशीं लाख योनींमध्ये फिरत असतो. ॥ २ ॥

**फिरत सदा माया कर प्रेरा। काल कर्म सुभाव गुन घेरा॥**
**कबहुँक करि करुना नर देही। देत ईस बिनु हेतु सनेही॥**

मायेच्या प्रेरणेमुळे तो काल, कर्म, स्वभाव आणि गुणांना बळी पडून नेहमी भटकत असतो. विनाकारण स्नेह करणारा ईश्वर कधी तरी एखाद्या विरळ्यावर दया करून त्याला हे मनुष्यशरीर देत असतो. ॥ ३ ॥

**नर तनु भव बारिधि कहुँ बेरो। सन्मुख मरुत अनुग्रह मेरो॥**
**करनधार सदगुर दृढ़ नावा। दुर्लभ साज सुलभ करि पावा॥**

हे मनुष्यशरीर भवसागर तरून जाण्यासाठी जहाज आहे. माझी कृपा ही अनुकूल हवा आहे. सद्गुरू हा मजबूत जहाज वाहून नेणारा कर्णधार आहे. अशा प्रकारचे दुर्लभ साधन सुलभपणे भगवत्कृपेमुळे त्याला प्राप्त झाले आहे. ॥ ४ ॥

दो०—**जो न तरै भव सागर नर समाज अस पाइ।**
**सो कृत निंदक मंदमति आत्माहन गति जाइ॥ ४४॥**

जो मनुष्य असे साधन मिळूनही भवसागर तरू शकत नसेल, तर तो कृतघ्न,मंदबुद्धीचा आणि आत्महत्या करणाऱ्याची गती प्राप्त करतो. ॥ ४४ ॥

**जौं परलोक इहाँ सुख चहहू। सुनि मम बचन हृदयँ दृढ़ गहहू॥**
**सुलभ सुखद मारग यह भाई। भगति मोरि पुरान श्रुति गाई॥**

जर मनुष्याला परलोकी व या जगात, दोन्ही ठिकाणी सुखाची इच्छा असेल, तर माझे बोलणे ऐकून ते मनात दृढपणे धरून ठेवा. हे बंधूंनो, हा माझ्या भक्तीचा मार्ग सुलभ व सुखदायक आहे. पुराणांनी व वेदांनी याचेच प्रतिपादन केले आहे. ॥ १ ॥

**ग्यान अगम प्रत्यूह अनेका। साधन कठिन न मन कहुँ टेका॥**
**करत कष्ट बहु पावइ कोऊ। भक्ति हीन मोहि प्रिय नहिं सोऊ॥**

ज्ञान अगम्य आहे. ते प्राप्त करण्यामध्ये खूप विघ्ने आहेत. त्याचे साधन फार कठीण आहे आणि त्यामध्ये मनाला कोणताही आधार नसतो. पुष्कळ कष्ट केल्यावर कुणी ते मिळवूही शकेल, तरीही भक्तिरहित असल्यामुळे तो ज्ञानी मला प्रिय नसतो. ॥ २ ॥

**भक्ति सुतंत्र सकल सुख खानी। बिनु सतसंग न पावहिं प्रानी॥**
**पुन्य पुंज बिनु मिलहिं न संता। सतसंगति संसृति कर अंता॥**

भक्ती ही स्वतंत्र आहे आणि सुखांची खाण आहे. परंतु सत्संगाविना कुणालाही ती मिळत नाही. आणि पुण्याचा संचय असल्याशिवाय संत भेटत नाहीत. सत्संगती ही जन्म-मरणाचा अंत करते. ॥ ३ ॥

**पुन्य एक जग महुँ नहिं दूजा। मन क्रम बचन बिप्र पद पूजा॥**
**सानुकूल तेहि पर मुनि देवा। जो तजि कपटु करइ द्विज सेवा॥**

जगात एकच पुण्य आहे, त्याच्यासारखे दुसरे नाही. ते म्हणजे कायावाचामनाने ब्राह्मणांची सेवा करणे. जो सरळ मनाने ब्राह्मणांची सेवा करतो, त्याच्यावर मुनी व देव प्रसन्न होतात. ॥ ४॥

दो०—**औरउ एक गुपुत मत सबहि कहउँ कर जोरि।**
**संकर भजन बिना नर भगति न पावइ मोरि॥ ४५॥**

आणखी एक गुपित आहे. मी सर्वांना हात जोडून सांगतो की, शंकरांच्या भजनाविना मनुष्याला माझी भक्ती मिळत नाही. ॥ ४५ ॥

**कहहु भगति पथ कवन प्रयासा। जोग न मख जप तप उपवासा॥**
**सरल सुभाव न मन कुटिलाई। जथा लाभ संतोष सदाई॥**

भक्तिमार्गामध्ये कोणते कष्ट आहेत, सांगा बरे? यात योगाची गरज नाही. यज्ञ, जप, तप आणि उपवास यांची गरज नाही. फक्त एवढेच हवे की, सरळ स्वभाव असावा, मनात कपट नसावे आणि जे काही मिळेल, त्यात नेहमी समाधान मानावे. ॥ १ ॥

**मोर दास कहाइ नर आसा। करइ तौ कहहु कहा बिस्वासा॥**
**बहुत कहउँ का कथा बढ़ाई। एहि आचरन बस्य मैं भाई॥**

स्वतःला माझा दास म्हणवीत असतानाही जर कुणी माणसांपासून काही मिळण्यासाठी आशा धरत असेल, तर तुम्हीच सांगा की, माझ्यावर त्याचा विश्वास आहे काय? अधिक काय सांगू? हे बंधूंनो, मी अशाच आचरणाला वश होतो. ॥ २ ॥

**बैर न बिग्रह आस न त्रासा। सुखमय ताहि सदा सब आसा॥**
**अनारंभ अनिकेत अमानी। अनघ अरोष दच्छ बिग्यानी॥**

कधी कुणाशी वैर करू नये, भांडण-तंटा करू नये, कसली आशा धरू नये व भय बाळगू नये. असे करणाऱ्याला दाही दिशांना नेहमी सुख असते. जो कोणी फलाची इच्छा ठेवून कर्म करीत नाही, ज्याला आपल्या घराविषयी ममता नाही, जो मानहीन, पापहीन व क्रोधरहित असतो, जो भक्ती करण्यात निपुण व ज्ञानी असतो, ॥ ३ ॥

**प्रीति सदा सज्जन संसर्गा। तृन सम बिषय स्वर्ग अपबर्गा॥**
**भगति पच्छ हठ नहिं सठताई। दुष्ट तर्क सब दूरि बहाई॥**

ज्याला सत्संगाविषयी नेहमी प्रेम असते, ज्याच्या मनात भक्तीपुढे सर्व विषय, इतकेच काय स्वर्ग व मुक्ती हे सुद्धा कस्पटासमान असतात, जो भक्तीचा आग्रह बाळगतो, परंतु दुसऱ्याच्या मताचे खंडन करण्याचा मूर्खपणा करीत नाही आणि ज्याने सर्व कुतर्क सोडून दिले आहेत, ॥ ४ ॥

**दो०—मम गुन ग्राम नाम रत गत ममता मद मोह।**
**ता कर सुख सोइ जानइ परानंद संदोह॥ ४६॥**

जो माझ्या गुण-समूहांच्या व माझ्या नामाच्या स्मरणात तत्पर असतो, तसेच ममता, मद आणि मोह यांनी रहित असतो, त्याचे सुख ज्याला परमानंदराशिरूप परमात्मा प्राप्त झालेला असतो, त्यालाच कळते.'॥ ४६॥

**सुनत सुधासम बचन राम के। गहे सबनि पद कृपाधाम के॥**
**जननि जनक गुर बंधु हमारे। कृपा निधान प्रान ते प्यारे॥**

श्रीरामांचे अमृतासमान बोलणे ऐकून सर्वांनी कृपानिधान श्रीरामांचे चरणकमल पकडून म्हटले, 'हे कृपानिधान, तुम्हीच आमचे माता, पिता, गुरू, बंधू—सर्व काही आहात. आणि आम्हांला प्राणांहूनही प्रिय आहात.॥ १॥

**तनु धनु धाम राम हितकारी। सब बिधि तुम्ह प्रनतारति हारी॥**
**असि सिख तुम्ह बिनु देइ न कोऊ। मातु पिता स्वारथ रत ओऊ॥**

आणि हे शरणागताचे दुःख हरण करणारे श्रीराम, तुम्हीच आमचे शरीर, धन, घरदार आहात आणि सर्व प्रकारे हित करणारे आहात. तुमच्याव्यतिरिक्त अशी शिकवण कोणी देऊ शकणार नाही. माता-पिता हे हिताच्या इच्छेने शिकवण देतात, परंतु ते सुद्धा स्वार्थासाठी ते करतात.॥ २॥

**हेतु रहित जग जुग उपकारी। तुम्ह तुम्हार सेवक असुरारी॥**
**स्वारथ मीत सकल जग माहीं। सपनेहुँ प्रभु परमारथ नाहीं॥**

हे असुरांचे शत्रू, जगामध्ये निःस्वार्थ भावनेने उपकार करणारे फक्त दोघेच आहेत, एक म्हणजे तुम्ही आणि दुसरे तुमचे भक्त. उरलेले जगातील सर्वजण स्वार्थाचे मित्र आहेत. हे प्रभो, त्यांच्यामध्ये स्वप्नातही परमार्थाचा भाव नसतो.'॥ ३॥

**सब के बचन प्रेम रस साने। सुनि रघुनाथ हृदयँ हरषाने॥**
**निज निज गृह गए आयसु पाई। बरनत प्रभु बतकही सुहाई॥**

सर्वांचे प्रेमपूर्ण बोलणे ऐकून श्रीरामांच्या मनाला आनंद झाला. नंतर आज्ञा मिळाल्यावर सर्वजण प्रभूंच्या सुंदर बोलण्याची चर्चा करीत आपापल्या घरी गेले.॥ ४॥

**दो०—उमा अवधबासी नर नारि कृतारथ रूप।**
**ब्रह्म सच्चिदानंद घन रघुनायक जहँ भूप॥ ४७॥**

श्रीशिव म्हणतात, 'हे उमे, अयोध्येमध्ये राहणारे सर्व स्त्री-पुरुष हे कृतार्थ होत. तेथे प्रत्यक्ष सच्चिदानंदघन ब्रह्म असलेले श्रीरघुनाथ हे राजा होते.॥ ४७॥

**एक बार बसिष्ट मुनि आए। जहाँ राम सुखधाम सुहाए॥**
**अति आदर रघुनायक कीन्हा। पद पखारि पादोदक लीन्हा॥**

एकदा सुंदर सुखाचे धाम अशा श्रीरामांकडे वसिष्ठ मुनी आले. श्रीरघुनाथांनी त्यांचा खूप आदर-सत्कार केला व त्यांच्या चरणांचे प्रक्षालन करून चरणामृत घेतले. ॥ १ ॥

**राम सुनहु मुनि कह कर जोरी। कृपासिंधु बिनती कछु मोरी॥**
**देखि देखि आचरन तुम्हारा। होत मोह मम हृदयँ अपारा॥**

मुनी हात जोडून म्हणाले, 'हे कृपासागर श्रीराम, माझी एक विनंती ऐकून घ्या. तुमचे मनुष्योचित चरित्र पाहून माझ्या मनात मोठा संभ्रम निर्माण झाला आहे. ॥ २ ॥

**महिमा अमिति बेद नहिं जाना। मैं केहि भाँति कहउँ भगवाना॥**
**उपरोहित्य कर्म अति मंदा। बेद पुरान सुमृति कर निंदा॥**

हे भगवन, तुमच्या महिम्याला काही मर्यादा नाही. वेदही तो जाणत नाहीत, मग मी तो कसा सांगू शकेन? पुरोहिताचे कर्म फार क्षुद्र आहे. वेद, पुराणे व स्मृती सर्वच त्याची निंदा करतात. ॥ ३ ॥

**जब न लेउँ मैं तब बिधि मोही। कहा लाभ आगें सुत तोही॥**
**परमातमा ब्रह्म नर रूपा। होइहि रघुकुल भूषन भूपा॥**

जेव्हा मी सूर्यवंशाचे पौरोहित्य घ्यायला तयार नव्हतो, तेव्हा ब्रह्मदेवांनी मला सांगितले की, 'हे पुत्रा, यामुळे पुढे पुष्कळ लाभ मिळेल. या कुळात परमात्मा स्वतः प्रत्यक्ष मनुष्यरूप घेऊन रघुकुलाचे भूषण ठरणारा राजा होईल.' ॥ ४ ॥

दो०—**तब मैं हृदयँ बिचारा जोग जग्य ब्रत दान।**
**जा कहुँ करिअ सो पैहउँ धर्म न एहि सम आन॥ ४८॥**

तेव्हा मी विचार केला की, ज्याच्यासाठी योग, यज्ञ, व्रत, दान, इत्यादी केले जाते, त्याची प्राप्ती मला या कर्माने मिळेल. तेव्हा याच्यासारखा दुसरा कोणताही श्रेष्ठ धर्म नाही. ॥ ४८ ॥

**जप तप नियम जोग निज धर्मा। श्रुति संभव नाना सुभ कर्मा॥**
**ग्यान दया दम तीरथ मज्जन। जहँ लगि धर्म कहत श्रुति सज्जन॥**

जप, तप, नियम, योग, आपापले वर्णाश्रमधर्म, वेदविहित पुष्कळ शुभ कर्मे, ज्ञान, दया, इंद्रियनिग्रह, तीर्थस्नान इत्यादी जितके म्हणून धर्म वेद व संतांनी सांगितले आहेत, ते करण्याचे ॥ १ ॥

**आगम निगम पुरान अनेका। पढ़े सुने कर फल प्रभु एका॥**
**तव पद पंकज प्रीति निरंतर। सब साधन कर यह फल सुंदर॥**

तसेच हे प्रभो, अनेक तंत्र, वेद आणि पुराणे वाचण्याचे व ऐकण्याचे सर्वोत्तम फल एकच

आहे आणि या सर्व साधनांचेही हेच एक सुंदर फळ आहे की, तुमच्या चरण-कमलांवर सदा-सर्वदा प्रेम राहावे. ॥ २ ॥

**छूटइ मल कि मलहि के धोएँ । घृत कि पाव कोइ बारि बिलोएँ ॥**
**प्रेम भगति जल बिनु रघुराई । अभिअंतर मल कबहुँ न जाई ॥**

मळाने मळ धुतल्यास मळ सुटतो काय? जलाचे मंथन केल्यामुळे कुणाला तूप मिळू शकेल काय? त्याचप्रमाणे हे रघुनाथ, प्रेम-भक्तिरूप निर्मळ जळाविना अंतःकरणातील मल कधी जात नाही. ॥ ३ ॥

**सोइ सर्बग्य तग्य सोइ पंडित । सोइ गुन गृह बिग्यान अखंडित ॥**
**दच्छ सकल लच्छन जुत सोई । जाकें पद सरोज रति होई ॥**

ज्याला तुमच्या चरणकमलांविषयी प्रेम आहे, तोच सर्वज्ञ, तोच तत्त्वज्ञ आणि पंडित होय. तोच गुणांचे माहेर आणि अखंड विज्ञानवान, चतुर व सर्व लक्षणांनी युक्त होय.' ॥ ४ ॥

दो०—**नाथ एक बर मागउँ राम कृपा करि देहु ।**
**जन्म जन्म प्रभु पद कमल कबहुँ घटै जनि नेहु ॥ ४९ ॥**

हे नाथ, हे श्रीराम, मी तुम्हांला एक वर मागतो. कृपा करून तो द्या. प्रभूंच्या चरण-कमलांवर माझे प्रेम जन्म-जन्मांतरी कधीही कमी न होवो. ॥ ४९ ॥

**अस कहि मुनि बसिष्ट गृह आए । कृपासिंधु के मन अति भाए ॥**
**हनूमान भरतादिक भ्राता । संग लिए सेवक सुखदाता ॥**

असे म्हणून वसिष्ठ मुनी घरी आले. कृपासागर श्रीरामांच्या मनाला ते बोलणे आवडले. त्यानंतर सेवकांना सुख देणारे श्रीराम यांनी हनुमान व भरत इत्यादी भावांना बरोबर घेतले ॥ १ ॥

**पुनि कृपाल पुर बाहेर गए । गज रथ तुरग मगावत भए ॥**
**देखि कृपा करि सकल सराहे । दिए उचित जिन्ह जिन्ह तेइ चाहे ॥**

आणि ते नगराबाहेर गेले. तेथे त्यांनी हत्ती, रथ आणि घोडे मागविले. त्यांना पाहून कृपापूर्वक प्रभूंनी सर्वांची प्रशंसा केली आणि ज्याला ज्याला जे हवे होते, त्याला त्याला योग्य ते पाहून दिले. ॥ २ ॥

**हरन सकल श्रम प्रभु श्रम पाई । गए जहाँ सीतल अवँराई ॥**
**भरत दीन्ह निज बसन डसाई । बैठे प्रभु सेवहिं सब भाई ॥**

संसारातील सर्व कष्ट हरण करणारे प्रभू यांना हत्ती, घोडे इत्यादी वाटताना थकवा वाटू लागला. म्हणून त्याचा परिहार करण्यासाठी ते शीतल आमराईत गेले. तेथे भरताने आपले वस्त्र अंथरले. प्रभू त्यावर बसले आणि सर्व बंधू त्यांची सेवा करू लागले. ॥ ३ ॥

**मारुतसुत तब मारुत करई। पुलक बपुष लोचन जल भरई॥**
**हनूमान सम नहिं बड़भागी। नहिं कोउ राम चरन अनुरागी॥**
**गिरिजा जासु प्रीति सेवकाई। बार बार प्रभु निज मुख गाई॥**

त्यावेळी पवनपुत्र हनुमान पंख्याने वारा घालू लागला. ते करताना त्याचे शरीर पुलकित झाले आणि नेत्रांतून प्रेमाश्रू वाहू लागले. शिव म्हणतात, 'हे गिरिजे, हनुमानासारखा कोणी मोठ्या भाग्याचा नाही आणि कोणी श्रीरामांच्या चरणांचा भक्त नाही. प्रत्यक्ष प्रभूंनी त्याच्या प्रेमाची व सेवेची आपल्या मुखाने वारंवार प्रशंसा केली आहे.॥ ४-५॥

दो०—**तेहिं अवसर मुनि नारद आए करतल बीन।**
**गावन लगे राम कल कीरति सदा नबीन॥ ५०॥**

त्याच प्रसंगी नारद मुनी हातात वीणा घेऊन आले. ते श्रीरामांची सुंदर व नित्य नवीन असणारी कीर्ती गाऊ लागले.॥ ५०॥

**मामवलोकय पंकज लोचन। कृपा बिलोकनि सोच बिमोचन॥**
**नील तामरस स्याम काम अरि। हृदय कंज मकरंद मधुप हरि॥**

ते म्हणू लागले, 'कृपापूर्वक पाहाताच शोकमुक्त करणारे हे कमलनयन, माझ्याकडे कृपादृष्टीने पाहा. हे हरी, तुम्ही नीलकमलासारख्या श्यामवर्णाचे आणि कामदेवाचे शत्रू महादेवांच्या हृदयकमलातील प्रेमरस प्राशन करणारे भ्रमर आहात.॥ १॥

**जातुधान बरूथ बल भंजन। मुनि सज्जन रंजन अघ गंजन॥**
**भूसुर ससि नव बृंद बलाहक। असरन सरन दीन जन गाहक॥**

तुम्ही राक्षसांच्या सेनेचे सामर्थ्य नष्ट करणारे आहात. मुनी व संतांना आनंद देणारे आणि पापांचा नाश करणारे आहात. ब्राह्मणरूपी शेतीसाठी तुम्ही नव्या मेघांसमान आहात आणि निराधारांना आधार देणारे, तसेच दीन जनांना आपल्याजवळ घेणारे आहात.॥ २॥

**भुज बल बिपुल भार महि खंडित। खर दूषन बिराध बध पंडित॥**
**रावनारि सुखरूप भूपबर। जय दसरथ कुल कुमुद सुधाकर॥**

आपल्या बाहुबलाने पृथ्वीचा मोठा भार नष्ट करणारे, खर-दूषण आणि विराध यांचा वध करण्यात कुशल असलेले, रावणाचे शत्रू, आनंदस्वरूप, राजांमध्ये श्रेष्ठ आणि दशरथांच्या कुलरूपी कुमुदिनीसाठी चंद्रमा असणारे हे श्रीराम, तुमचा विजय असो.॥ ३॥

**सुजस पुरान बिदित निगमागम। गावत सुर मुनि संत समागम॥**
**कारुनीक ब्यलीक मद खंडन। सब बिधि कुसल कोसला मंडन॥**

तुमची सुंदर कीर्ती पुराणांमध्ये आणि तंत्रादी शास्त्रांमध्ये प्रकट झालेली आहे. देव, मुनी आणि

संतांचा समुदाय ती गातो. तुम्ही करुणा करणारे आणि खोट्या अहंकाराचा नाश करणारे, सर्व प्रकारे निपुण असे अयोध्येचे भूषणच आहात. ॥ ४ ॥

**कलि मल मथन नाम ममताहन । तुलसिदास प्रभु पाहि प्रनत जन॥**

तुमचे नाम कलियुगातील पापांना घुसळून काढणारे आणि ममतेला मारणारे आहे. हे तुलसीदासांचे प्रभू, शरणागताचे रक्षण करा.' ॥ ५ ॥

दो०—**प्रेम सहित मुनि नारद बरनि राम गुन ग्राम।**
**सोभासिंधु हृदयँ धरि गए जहाँ बिधि धाम॥ ५१ ॥**

श्रीरामांच्या गुणसमूहांचे वर्णन प्रेमपूर्वक करून नारद मुनी शोभेचे समुद्र असलेल्या प्रभूंना हृदयात धारण करून ब्रह्मलोकी निघून गेले. ॥ ५१ ॥

**गिरिजा सुनहु बिसद यह कथा । मैं सब कही मोरि मति जथा॥**
**राम चरित सत कोटि अपारा । श्रुति सारदा न बरनै पारा॥**

शिव म्हणतात, 'हे गिरिजे, ऐक. मी ही उज्ज्वल कथा आपल्या बुद्धीनुसार तशी पूर्णपणे सांगितली. श्रीरामांची चरित्रे अपार आहेत. श्रुती व शारदा यासुद्धा त्यांचे वर्णन करू शकत नाहीत. ॥ १ ॥

**राम अनंत अनंत गुनानी । जन्म कर्म अनंत नामानी॥**
**जल सीकर महि रज गनि जाहीं । रघुपति चरित न बरनि सिराहीं॥**

भगवान श्रीराम हे अनंत आहेत, त्यांचे गुण अनंत आहेत; त्यांचे जन्म, कर्मे आणि नामेही अनंत आहेत. पाण्याचे थेंब आणि पृथ्वीचे धूलिकण फार तर मोजता येतील, परंतु श्रीरघुनाथांची चरित्रे वर्णन करूनही संपत नाहीत. ॥ २ ॥

**बिमल कथा हरि पद दायनी । भगति होइ सुनि अनपायनी॥**
**उमा कहिउँ सब कथा सुहाई । जो भुसुंडि खगपतिहि सुनाई॥**

ही पवित्र कथा भगवंतांचे परमपद प्राप्त करून देणारी आहे. ही श्रवण केल्याने अविचल भक्ती प्राप्त होते. हे उमे, काकभुशुंडीनी जी कथा गरुडाला सांगितली होती, ती सर्व सुंदर कथा मी तुला सांगितली. ॥ ३ ॥

**कछुक राम गुन कहेउँ बखानी । अब का कहौं सो कहहु भवानी॥**
**सुनि सुभ कथा उमा हरषानी । बोली अति बिनीत मृदु बानी॥**

मी श्रीरामांचे काही थोडेसेच गुण वर्णन करून सांगितले आहेत. हे भवानी, मग आता सांग की, मी आणखी काय सांगू?' श्रीरामांची मंगलमय कथा ऐकून पार्वतीला आनंद झाला आणि अत्यंत विनम्र व कोमल वाणीने ती म्हणाली. ॥ ४ ॥

**धन्य धन्य मैं धन्य पुरारी । सुनेउँ राम गुन भव भय हारी॥**

'हे त्रिपुरारी, मी धन्य झाले, धन्य झाले. कारण मी जन्म-मृत्यूचे भय हरण करणाऱ्या श्रीरामांचे चरित्र ऐकले. ॥ ५ ॥

**दो०—तुम्हरी कृपाँ कृपायतन अब कृतकृत्य न मोह।**
**जानेउँ राम प्रताप प्रभु चिदानंद संदोह॥ ५२ ( क )॥**

हे कृपाधाम, आता तुमच्या कृपेमुळे मी कृतकृत्य झाले. आता मला कोणताही मोह उरला नाही. हे प्रभू, सच्चिदानंद प्रभू श्रीरामांचा प्रताप आता मला समजला. ॥ ५२ (क) ॥

**नाथ तवानन ससि स्रवत कथा सुधा रघुबीर।**
**श्रवन पुटन्हि मन पान करि नहिं अघात मतिधीर॥ ५२ ( ख )॥**

हे नाथ, तुमचा मुखरूपी चंद्रमा श्रीरघुवीरांच्या कथारूपी अमृताचा वर्षाव करतो. हे स्थिरमती, माझे मन दोन्ही कानांनी ते पिऊनही तृप्त होत नाही. ॥ ५२ (ख) ॥

**राम चरित जे सुनत अघाहीं। रस बिसेष जाना तिन्ह नाहीं॥**
**जीवनमुक्त महामुनि जेऊ। हरि गुन सुनहिं निरंतर तेऊ॥**

श्रीरामचरित्र ऐकून ऐकून जे लोक तृप्त होऊन ऐकणे बंद करतात, त्यांनी तिचा विशेष रस जाणलाच नाही. जे जीवन्मुक्त महामुनी आहेत, ते सुद्धा निरंतर भगवंतांचे गुण ऐकत असतात. ॥ १ ॥

**भव सागर चह पार जो पावा। राम कथा ता कहँ दृढ़ नावा॥**
**बिषइन्ह कहँ पुनि हरि गुन ग्रामा। श्रवन सुखद अरु मन अभिरामा॥**

ज्यांना संसार-सागर तरून जाण्याची इच्छा आहे, त्यांना तर श्रीरामकथा ही मजबूत नौकेसारखी आहे. श्रीहरीचे गुणसमूह हे तर विषयी लोकांच्याही कानांना सुख देणारे आहेत आणि मनाला आनंद देणारे आहेत. ॥ २ ॥

**श्रवनवंत अस को जग माहीं। जाहि न रघुपति चरित सोहाहीं॥**
**ते जड़ जीव निजात्मक घाती। जिन्हहि न रघुपति कथा सोहाती॥**

ज्याच्या कानांना श्रीरघुनाथांचे चरित्र आवडत नाही, असा जगात कोण आहे? ज्यांना श्रीरघुनाथांची कथा आवडत नाही, ते मूर्ख जीव आपल्या आत्म्याची हत्या करणारे आहेत. ॥ ३ ॥

**हरिचरित्र मानस तुम्ह गावा। सुनि मैं नाथ अमिति सुख पावा॥**
**तुम्ह जो कही यह कथा सुहाई। कागभसुंडि गरुड़ प्रति गाई॥**

हे नाथ, तुम्ही श्रीरामचरित्रमानसाचे जे गायन केले, ते ऐकून मला अपार समाधान झाले. तुम्ही मला म्हणालात की, ही सुंदर कथा काकभुशुंडींनी गरुडाला सांगितली होती. ॥ ४ ॥

**दो०—बिरति ग्यान बिग्यान दृढ़ राम चरन अति नेह।**
**बायस तन रघुपति भगति मोहि परम संदेह॥ ५३ ॥**

कावळ्याचे शरीर लाभूनही काकभुशुंडी वैराग्य, ज्ञान व विज्ञान यांमध्ये दृढ आहेत. त्यांचे श्रीरामांच्या चरणी अत्यंत प्रेम आहे आणि त्यांनी श्रीरामांची भक्तीही मिळविली आहे, या गोष्टीबद्दल माझ्या मनात मोठा संशय आहे. ॥ ५३ ॥

**नर सहस्त्र महँ सुनहु पुरारी । कोउ एक होइ धर्म ब्रतधारी ॥**
**धर्मसील कोटिक महँ कोई । बिषय बिमुख बिराग रत होई ॥**

हे त्रिपुरारी, हजारो मनुष्यांमध्ये कुणी एखादाच धर्माचे व्रत धारण करणारा असतो आणि कोट्यवधी धर्मात्म्यांमध्ये कुणी एखादाच विषय-विन्मुख आणि वैराग्य परायण असतो. ॥ १ ॥

**कोटि बिरक्त मध्य श्रुति कहई । सम्यक ग्यान सकृत कोउ लहई ॥**
**ग्यानवंत कोटिक महँ कोऊ । जीवनमुक्त सकृत जग सोऊ ॥**

श्रुती म्हणते की, कोट्यवधी विरक्त लोकांपैकी एखाद्यालाच यथार्थ ज्ञान प्राप्त होते. आणि कोट्यवधी ज्ञान्यांमध्ये कुणी एखादाच जीवन्मुक्त असतो. जगामध्ये असा जीवन्मुक्त कोणी विरळाच असेल. ॥ २ ॥

**तिन्ह सहस्त्र महुँ सब सुख खानी । दुर्लभ ब्रह्म लीन बिग्यानी ॥**
**धर्मसील बिरक्त अरु ग्यानी । जीवनमुक्त ब्रह्मपर प्रानी ॥**

हजारो जीवन्मुक्तांमध्ये सर्व सुखांची खाण, ब्रह्मामध्ये लीन असलेला असा विज्ञानवान पुरुष आणखीच दुर्लभ आहे. धर्मात्मा, वैराग्यवान, ज्ञानी, जीवन्मुक्त आणि ब्रह्मलीन ॥ ३ ॥

**सब ते सो दुर्लभ सुरराया । राम भगति रत गत मद माया ॥**
**सो हरिभगति काग किमि पाई । बिस्वनाथ मोहि कहहु बुझाई ॥**

या सर्वांमध्ये हे देवाधिदेव महादेव, मद व मायेने रहित आणि श्रीरामांचा भक्त असणारा प्राणी अत्यंत दुर्लभ आहे. तर मग हे विश्वनाथ, कावळ्याला अशी दुर्लभ हरिभक्ती कशी काय लाभली? मला नीट समजावून सांगा. ॥ ४ ॥

दो०—**राम परायन ग्यान रत गुनागार मति धीर।**
**नाथ कहहु केहि कारन पायउ काक सरीर ॥ ५४ ॥**

हे नाथ, मग हेही सांगा की, असे श्रीरामपरायण, ज्ञानरत, गुणधाम आणि धीरबुद्धीचे भुशुंडी यांना कावळ्याचे शरीर कशामुळे प्राप्त झाले? ॥ ५४ ॥

**यह प्रभु चरित पवित्र सुहावा । कहहु कृपाल काग कहँ पावा ॥**
**तुम्ह केहि भाँति सुना मदनारी । कहहु मोहि अति कौतुक भारी ॥**

हे कृपाळू, तसेच हे सांगा की, त्या कावळ्याला हे पवित्र व सुंदर चरित्र कुठे मिळाले? आणि हे मदनारी! हेही सांगा की, आपण हे त्यांच्याकडून कसे ऐकले? याबाबतीत मला अतिशय कुतूहल वाटत आहे. ॥ १ ॥

**गरुड़ महाग्यानी गुन रासी। हरि सेवक अति निकट निवासी॥**
**तेहिं केहि हेतु काग सन जाई। सुनी कथा मुनि निकर बिहाई॥**

गरुड हा महान ज्ञानी, सद्‌गुणांची खाण व श्रीहरींचा सेवक आणि त्यांच्या अगदी जवळ राहणारा आहे. त्याने मुनींना सोडून कावळ्यापाशी जाऊन हरिकथा कशासाठी ऐकली?॥ २॥

**कहहु कवन बिधि भा संबादा। दोउ हरिभगत काग उरगादा॥**
**गौरि गिरा सुनि सरल सुहाई। बोले सिव सादर सुख पाई॥**

तसेच हेही सांगा की, काकभुशुंडी आणि गरुड या दोन्ही हरि-भक्तांचे संभाषण कसे झाले?' पार्वतीचे हे सरळ व सुंदर बोलणे ऐकून शिवांना समाधान वाटले आणि आदराने ते म्हणाले.॥ ३॥

**धन्य सती पावन मति तोरी। रघुपति चरन प्रीति नहिं थोरी॥**
**सुनहु परम पुनीत इतिहासा। जो सुनि सकल लोक भ्रम नासा॥**

'हे सती, तू धन्य आहेस. तुझी बुद्धी अत्यंत पवित्र आहे. श्रीरघुनाथांच्या चरणी तुझे खूप प्रेम आहे. आता तो पवित्र इतिहास ऐक. तो ऐकल्याने सर्व लोकांचा भ्रम नष्ट होतो.॥ ४॥

**उपजइ राम चरन बिस्वासा। भव निधि तर नर बिनहिं प्रयासा॥**

तसेच श्रीरामांच्या चरणी विश्वास उत्पन होतो आणि मनुष्य विनासायास हा संसाररूपी समुद्र तरून जातो.॥ ५॥

दो०—**ऐसिअ प्रस्न बिहंगपति कीन्हि काग सन जाइ।**
**सो सब सादर कहिहउँ सुनहु उमा मन लाइ॥ ५५॥**

गरुडानेही जाऊन काकभुशुंडींना जवळ जवळ असेच प्रश्न विचारले होते. हे उमे, मी ते सर्व आदराने तुला सांगतो. तू लक्ष देऊन ऐक.॥ ५५॥

**मैं जिमि कथा सुनी भव मोचनि। सो प्रसंग सुनु सुमुखि सुलोचनि॥**
**प्रथम दच्छ गृह तव अवतारा। सती नाम तब रहा तुम्हारा॥**

मी ज्याप्रकारे ही जन्म-मृत्यूच्या चक्रातून मुक्त करणारी कथा ऐकली, हे सुमुखी, हे सुलोचने, तो प्रसंग ऐक. प्रथम तुझा अवतार दक्षाच्या घरी झाला होता. तेव्हा तुझे नाव सती होते.॥ १॥

**दच्छ जग्य तव भा अपमाना। तुम्ह अति क्रोध तजे तब प्राना॥**
**मम अनुचरन्ह कीन्ह मख भंगा। जानहु तुम्ह सो सकल प्रसंगा॥**

दक्षाच्या यज्ञामध्ये तुझा अपमान झाला, तेव्हा तू अत्यंत रागाने प्राण सोडले होतेस आणि मग माझ्या सेवकांनी यज्ञाचा विध्वंस केला होता. तो सर्व प्रसंग तुला ठाऊक आहे.॥ २॥

**तब अति सोच भयउ मन मोरें। दुखी भयउँ बियोग प्रिय तोरें॥**
**सुंदर बन गिरि सरित तड़ागा। कौतुक देखत फिरउँ बेरागा॥**

तेव्हा माझ्या मनाला फार खिन्नता आली आणि हे प्रिये, मी तुझ्या दुःखामुळे दुःखी झालो. मी विरक्तपणे सुंदर वन, पर्वत, नदी आणि तलावांचे दृश्य कौतुकाने पाहात फिरत होतो.॥ ३॥

**गिरि सुमेर उत्तर दिसि दूरी। नील सैल एक सुंदर भूरी॥**
**तासु कनकमय सिखर सुहाए। चारि चारु मोरे मन भाए॥**

सुमेरू पर्वताच्या उत्तर दिशेला, खूप दूर एक फारच सुंदर नील पर्वत आहे. त्याला सुंदर सुवर्णमय शिखरे आहेत. त्यांपैकी चार शिखरे माझ्या मनाला फार आवडली.॥ ४॥

**तिन्ह पर एक एक बिटप बिसाला। बट पीपर पाकरी रसाला॥**
**सैलोपरि सरि सुंदर सोहा। मनि सोपान देखि मन मोहा॥**

त्या शिखरांपैकी एकेकावर वड, पिंपळ, पिंपरी आणि आंब्याचा एकेक विशाल वृक्ष आहे. पर्वतावर एक सुंदर तलाव शोभत आहे. त्याच्या रत्नजडित पायऱ्या पाहून मन मोहून जाते.॥ ५॥

दो०—**सीतल अमल मधुर जल जलज बिपुल बहुरंग।**
**कूजत कल रव हंस गन गुंजत मंजुल भृंग॥ ५६॥**

त्याचे पाणी शीतळ, निर्मळ व गोड आहे. त्यात रंगीबेरंगी पुष्कळ कमळे उमललेली असतात. हंसपक्षी मधुर स्वराने बोलत असतात आणि भ्रमर सुंदर गुंजारव करीत असतात.॥ ५६॥

**तेहिं गिरि रुचिर बसइ खग सोई। तासु नास कल्पांत न होई॥**
**माया कृत गुन दोष अनेका। मोह मनोज आदि अबिबेका॥**

त्या सुंदर पर्वतावर तो काकभुशुंडी पक्षी राहातो. त्याचा नाश कल्पांतामध्येही होत नाही. मायारचित अनेक गुण-दोष, मोह, काम इत्यादी अविवेक,॥ १॥

**रहे ब्यापि समस्त जग माहीं। तेहि गिरि निकट कबहुँ नहिं जाहीं॥**
**तहँ बसि हरिहि भजइ जिमि कागा। सो सुनु उमा सहित अनुरागा॥**

जे जगात पसरलेले असतात, ते त्या पर्वताजवळ फिरकत सुद्धा नाहीत. तेथे राहून ते कावळा हरीला भजतो. हे उमे, ती कथा प्रेमाने ऐक.॥ २॥

**पीपर तरु तर ध्यान सो धरई। जाप जग्य पाकरि तर करई॥**
**आँब छाँह कर मानस पूजा। तजि हरि भजनु काजु नहिं दूजा॥**

तो पिंपळाच्या वृक्षाखाली ध्यान करतो. पिंपरीच्या वृक्षाखाली जप-यज्ञ करतो व आम्रवृक्षाखाली मानसिक पूजा करतो. श्रीहरींच्या भजनाशिवाय त्याला दुसरे काम नाही.॥ ३॥

**बर तर कह हरि कथा प्रसंगा। आवहिं सुनहिं अनेक बिहंगा॥**
**राम चरित बिचित्र बिधि नाना। प्रेम सहित कर सादर गाना॥**

वटवृक्षाखाली तो श्रीहरींच्या कथांचे प्रसंग सांगतो. तेथे अनेक पक्षी येतात व कथा ऐकतात. तो विलक्षण रामचरित्र अनेक प्रकारे प्रेमाने व आदराने गातो.॥ ४॥

**सुनहिं सकल मति बिमल मराला। बसहिं निरंतर जे तेहिं ताला॥**
**जब मैं जाइ सो कौतुक देखा। उर उपजा आनंद बिसेषा॥**

त्या तलावावर नित्य राहाणारे निर्मल बुद्धीचे हंस ती कथा ऐकतात. जेव्हा मी तेथे जाऊन ते दृश्य पाहिले, तेव्हा मला खूप आनंद झाला.॥ ५॥

दो०—**तब कछु काल मराल तनु धरि तहँ कीन्ह निवास।**
**सादर सुनि रघुपति गुन पुनि आयउँ कैलास॥ ५७॥**

मग मी हंसाचे रूप घेऊन तेथे काही काळ निवास केला आणि श्रीरघुनाथांचे गुण आदराने ऐकून मग कैलासाला परत आलो.॥ ५७॥

**गिरिजा कहेउँ सो सब इतिहासा। मैं जेहि समय गयउँ खग पासा॥**
**अब सो कथा सुनहु जेहि हेतू। गयउ काग पहिं खग कुल केतू॥**

हे गिरिजे, ज्यावेळी मी काकभुशुंडीच्या जवळ गेलो होतो, तो सर्व इतिहास मी तुला सांगितला. आता ज्यामुळे पक्षिकुलामध्ये श्रेष्ठ असलेला गरुड त्या कावळ्याकडे गेला, ती कथा ऐक.॥ १॥

**जब रघुनाथ कीन्हि रन क्रीड़ा। समुझत चरित होति मोहि ब्रीड़ा॥**
**इंद्रजीत कर आपु बँधायो। तब नारद मुनि गरुड़ पठायो॥**

श्रीरघुनाथांनी मेघनादाच्या हातून स्वत:ला बांधून घेऊन जी रणलीला केली, ती कथा आठवल्यावर मला लाज वाटते. त्यावेळी नारदमुनींनी गरुडाला तेथे पाठविले.॥ २॥

**बंधन काटि गयो उरगादा। उपजा हृदयँ प्रचंड बिषादा॥**
**प्रभु बंधन समुझत बहु भाँती। करत बिचार उरग आराती॥**

सर्पांचा भक्षक गरुड बंधने तोडून टाकून परत गेला, तेव्हा त्याला फार वाईट वाटले. प्रभूंचे बंधन आठवल्यावर सर्पांचा शत्रू असलेला गरुड अनेक तऱ्हेचे विचार करू लागला.॥ ३॥

**ब्यापक ब्रह्म बिरज बागीसा। माया मोह पार परमीसा॥**
**सो अवतार सुनेउँ जग माहीं। देखेउँ सो प्रभाव कछु नाहीं॥**

जे व्यापक, विकाररहित, वाणीचे पती, आणि मोह-मायेच्या पलीकडील परमेश्वर आहेत,

त्यांचाच जगात अवतार झाला आहे, असे मी ऐकले होते. परंतु त्या अवताराचा कोणताही प्रभाव मला दिसला नाही. ॥ ४ ॥

**दो०—भव बंधन ते छूटहिं नर जपि जा कर नाम।**
**खर्ब निसाचर बाँधेउ नागपास सोइ राम॥ ५८॥**

ज्यांचे नाव जपल्यामुळे मनुष्य संसाराच्या बंधनातून मुक्त होतो, त्याच रामांना एका तुच्छ राक्षसाने नाग-पाशात बांधले होते. ॥ ५८ ॥

**नाना भाँति मनहि समुझावा। प्रगट न ग्यान हृदयँ भ्रम छावा॥**
**खेद खिन्न मन तर्क बढ़ाई। भयउ मोहबस तुम्हरिहिं नाई॥**

गरुडाने अनेक प्रकारे आपल्या मनाला समजावण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याला ज्ञान झाले नाही. मनात आणखीच संशय वाढला. त्या संशयजनित दुःखाने दुःखी होऊन, मनात कुतर्क वाढल्यामुळे तो तुझ्याप्रमाणेच मोहवश झाला. ॥ १ ॥

**ब्याकुल गयउ देवरिषि पाहीं। कहेसि जो संसय निज मन माहीं॥**
**सुनि नारदहि लागि अति दाया। सुनु खग प्रबल राम कै माया॥**

व्याकूळ होऊन तो देवर्षी नारदांच्याकडे गेला आणि त्याने मनातील संशय त्यांना सांगितला. तो ऐकून नारदांना दया आली. ते म्हणाले, 'हे गरुडा, श्रीरामांची माया मोठी प्रबळ आहे. ॥ २ ॥

**जो ग्यानिन्ह कर चित अपहरई। बरिआईं बिमोह मन करई॥**
**जेहिं बहु बार नचावा मोही। सोइ ब्यापी बिहंगपति तोही॥**

ती ज्ञानी पुरुषांचे चित्त पूर्णपणे हरण करते. त्यांच्या मनातही जबरदस्तीने मोठा मोह उत्पन्न करते. तसेच तिने मलासुद्धा खूप वेळा नाचविले आहे. हे पक्षिराज, त्याच मायेने तुलाही व्यापले आहे. ॥ ३ ॥

**महामोह उपजा उर तोरें। मिटिहि न बेगि कहें खग मोरें॥**
**चतुरानन पहिं जाहु खगेसा। सोइ करेहु जेहि होइ निदेसा॥**

हे गरुडा, तुझ्या मनात मोठा मोह उत्पन्न झाला आहे. मी समजावून सांगितले, तरी तो लगेच नाहीसा होणार नाही. म्हणून हे पक्षिराज, तू ब्रह्मदेवांच्याजवळ जा. तेथे ज्या कामासाठी तुला आदेश मिळेल तेच कर ?॥ ४॥

**दो०—अस कहि चले देवरिषि करत राम गुन गान।**
**हरि माया बल बरनत पुनि पुनि परम सुजान॥ ५९॥**

असे म्हणून परम सुज्ञ देवर्षी नारद श्रीरामांचे गुणगान करीत आणि वारंवार श्रीहरीच्या मायेचे सामर्थ्य वर्णन करीत निघून गेले. ॥ ५९ ॥

**तब खगपति बिरंचि पहिं गयऊ। निज संदेह सुनावत भयऊ॥**
**सुनि बिरंचि रामहि सिरु नावा। समुझि प्रताप प्रेम अति छावा॥**

तेव्हा पक्षिराज गरुड ब्रह्मदेवांच्या जवळ गेला आणि त्याने आपला संशय त्यांना सांगितला. तो ऐकून ब्रह्मदेवांनी श्रीरामांना मनोमन प्रणाम केला आणि त्यांचा प्रताप जाणून त्यांचे मन अत्यंत प्रेमाने भरून गेले. ॥ १ ॥

**मन महुँ करइ बिचार बिधाता। माया बस कबि कोबिद ग्याता॥**
**हरि माया कर अमिति प्रभावा। बिपुल बार जेहिं मोहि नचावा॥**

ब्रह्मदेव मनात विचार करू लागले की, कवी, विद्वान आणि ज्ञानी हे सर्वच मायेच्या अधीन आहेत. भगवंतांच्या मायेचा प्रभाव अनंत आहे. त्याने मलासुद्धा अनेक वेळा नाचविले आहे. ॥ २ ॥

**अग जगमय जग मम उपराजा। नहिं आचरज मोह खगराजा॥**
**तब बोले बिधि गिरा सुहाई। जान महेस राम प्रभुताई॥**

या संपूर्ण जगाची रचना मीच केली आहे. जर मीच मायेला वश होऊन नाचू लागतो, तर मग पक्षिराज गरुडाला मोह होणे, ही काही आश्चर्याची गोष्ट नाही. तेव्हा ब्रह्मदेव सुंदर शब्दांत म्हणाले, 'श्रीरामांचा महिमा महादेवांना माहीत आहे. ॥ ३ ॥

**बैनतेय संकर पहिं जाहू। तात अनत पूछहु जनि काहू॥**
**तहँ होइहि तव संसय हानी। चलेउ बिहंग सुनत बिधि बानी॥**

हे गरुडा, तू शंकरांच्याकडे जा. बाबा रे! दुसऱ्या कुठे कुणाला विचारू नकोस. तुझ्या संशयाचा नाश तेथेच होईल.' ब्रह्मदेवांचे बोलणे ऐकताच गरुड निघाला. ॥ ४ ॥

दो०—**परमातुर बिहंगपति आयउ तब मो पास।**
**जात रहेउँ कुबेर गृह रहिहु उमा कैलास॥ ६०॥**

मोठ्या आतुरतेने तो पक्षिराज गरुड माझ्याकडे आला. हे उमे, त्यावेळी मी कुबेराकडे जात होतो आणि तू कैलासावर होतीस. ॥ ६० ॥

**तेहिं मम पद सादर सिरु नावा। पुनि आपन संदेह सुनावा॥**
**सुनि ता करि बिनती मृदु बानी। प्रेम सहित मैं कहेउँ भवानी॥**

गरुडाने आदरपूर्वक माझ्या चरणी मस्तक ठेवले आणि मला आपला संशय सांगितला. हे भवानी, त्याची विनंती व कोमल वाणी ऐकून मी प्रेमाने त्याला म्हणालो, ॥ १ ॥

**मिलेहु गरुड़ मारग महँ मोही। कवन भाँति समुझावौं तोही॥**
**तबहिं होइ सब संसय भंगा। जब बहु काल करिअ सतसंगा॥**

हे गरुडा, तू मला वाटेत भेटत आहेस. वाट चालताना मी तुला हे सर्व कसे समजावून सांगू? सर्व संशयाचा नाश दीर्घकाळ सत्संग केल्यावर होतो. ॥ २ ॥

**सुनिअ तहाँ हरिकथा सुहाई। नाना भाँति मुनिन्ह जो गाई॥**
**जेहि महुँ आदि मध्य अवसाना। प्रभु प्रतिपाद्य राम भगवाना॥**

आणि सत्संगात मुनींनी अनेक प्रकारे गायिलेली हरिकथा ऐकावी. जिच्या आरंभी, मध्ये व अंती भगवान श्रीरामचंद्रांचेच वर्णन असते. ॥ ३ ॥

**नित हरि कथा होत जहँ भाई। पठवउँ तहाँ सुनहु तुम्ह जाई॥**
**जाइहि सुनत सकल संदेहा। राम चरन होइहि अति नेहा॥**

हे बंधू, जिथे प्रत्येक दिवशी हरिकथा चालते, तिथे मी तुला पाठवतो. तू जाऊन ती ऐक. ती ऐकताच तुझा संपूर्ण संशय दूर होईल आणि तुला श्रीरामांच्या चरणी अत्यंत प्रेम उत्पन्न होईल. ॥ ४ ॥

**दो०—बिनु सतसंग न हरि कथा तेहि बिनु मोह न भाग।**
**मोह गएँ बिनु राम पद होइ न दृढ़ अनुराग॥ ६१॥**

सत्संगाशिवाय हरीची कथा ऐकायला मिळत नाही आणि तिच्याविना मोह पळून जात नाही आणि मोह गेल्याशिवाय श्रीरामचंद्राच्या चरणी दृढ प्रेम उत्पन्न होत नाही. ॥ ६१ ॥

**मिलहिं न रघुपति बिनु अनुरागा। किएँ जोग तप ग्यान बिरागा॥**
**उत्तर दिसि सुंदर गिरि नीला। तहँ रह काकभुसुंडि सुसीला॥**

आणि अशा प्रेमाशिवाय केवळ योग, तप, ज्ञान आणि वैराग्य इत्यादी असले तरी श्रीरघुनाथ मिळत नाहीत. म्हणून सत्संगासाठी असे कर. उत्तर दिशेला एक सुंदर निळा पर्वत आहे, तेथे सच्छील काकभुशुंडी राहातात. ॥ १ ॥

**राम भगति पथ परम प्रबीना। ग्यानी गुन गृह बहु कालीना॥**
**राम कथा सो कहइ निरंतर। सादर सुनहिं बिबिध बिहंगबर॥**

ते रामभक्तीच्या मार्गात मोठे प्रवीण आहेत. ते ज्ञानी आहेत, गुणसंपन्न आहेत आणि फार पुरातन आहेत. ते निरंतर श्रीरामचंद्रांची कथा सांगत असतात. तऱ्हेतऱ्हेचे श्रेष्ठ पक्षी आदराने ती ऐकतात. ॥ २ ॥

**जाइ सुनहु तहँ हरि गुन भूरी। होइहि मोह जनित दुख दूरी॥**
**मैं जब तेहि सब कहा बुझाई। चलेउ हरषि मम पद सिरु नाई॥**

तेथे जाऊन श्रीहरींचे गुण-समूह ऐक. ते ऐकल्याने मोहामुळे उत्पन्न झालेले तुझे दुःख दूर होईल.' मी जेव्हा त्याला समजावून सांगितले, तेव्हा तो माझ्या पाया पडून आनंदाने निघाला. ॥ ३ ॥

**ताते उमा न मैं समुझावा। रघुपति कृपाँ मरमु मैं पावा॥**
**होइहि कीन्ह कबहुँ अभिमाना। सो खोवै चह कृपानिधाना॥**

हे उमे, मी स्वत: त्याला यासाठी समजावून सांगितले नाही की, श्रीरघुनाथांच्या कृपेने मला त्याचे रहस्य उमगले होते. त्याला कधी तरी अभिमान उत्पन्न झाला असावा आणि कृपानिधान श्रीरामांना तो नाहीसा करायचा असावा.॥ ४॥

**कछु तेहि ते पुनि मैं नहिं राखा। समुझइ खग खगही कै भाषा॥**
**प्रभु माया बलवंत भवानी। जाहि न मोह कवन अस ग्यानी॥**

शिवाय, या कारणामुळेही मी त्याला आपल्याजवळ ठेवले नाही. ते असे की, पक्षी पक्ष्यांचीच बोली समजतात. हे भवानी, प्रभूंची माया मोठी बलवान आहे. ज्याला तिने मोहून टाकले नाही, असा कोण ज्ञानी आहे?॥ ५॥

दो०—**ग्यानी भगत सिरोमनि त्रिभुवनपति कर जान।**
**ताहि मोह माया नर पावँर करहिं गुमान॥ ६२ (क)॥**

जो ज्ञान्यांमध्ये आणि भक्तांमध्ये शिरोमणी आहे, तसेच जो त्रिभुवनपती भगवंतांचे वाहन आहे, त्या गरुडालाही मायेने मोहित केले होते. असे असूनही क्षुद्र मनुष्य मूर्खपणाने घमेंड करतात.॥ ६२ (क)॥

## मासपारायण, अठ्ठाविसावा विश्राम

**सिव बिरंचि कहुँ मोहइ को है बपुरा आन।**
**अस जियँ जानि भजहिं मुनि माया पति भगवान॥ ६२ (ख)॥**

ही माया जर शिव आणि ब्रह्मदेवांनाही मोहित करते, तर दुसरा बिचारा कोण लागून गेला आहे? मनात असे जाणून मुनिजन भगवंतांचे भजन करतात.॥ ६२(ख)॥

**गयउ गरुड़ जहँ बसइ भुसुंडा। मति अकुंठ हरि भगति अखंडा॥**
**देखि सैल प्रसन्न मन भयऊ। माया मोह सोच सब गयऊ॥**

जेथे अकुंठित बुद्धी व पूर्ण भक्ती असणारे काकभुशुंडी राहातात, तेथे गरुड गेला. तो पर्वत पाहून तो प्रसन्न झाला आणि त्याच्या दर्शनानेच त्याची सर्व माया, मोह व चिंता नाहीशी झाली.॥ १॥

**करि तड़ाग मज्जन जलपाना। बट तर गयउ हृदयँ हरषाना॥**
**बृद्ध बृद्ध बिहंग तहँ आए। सुनै राम के चरित सुहाए॥**

तलावात स्नान करून व पाणी पिऊन तो प्रसन्न मनाने वटवृक्षाखाली गेला. तेथे श्रीरामांचे सुंदर चरित्र ऐकण्यासाठी वयोवृद्ध पक्षी आले होते.॥ २॥

**कथा अरंभ करै सोइ चाहा। तेही समय गयउ खगनाहा॥**
**आवत देखि सकल खगराजा। हरषेउ बायस सहित समाजा॥**

भुशुंडी कथा सांगण्यास प्रारंभ करणार, इतक्यात पक्षिराज गरुड तेथे पोहोचला. पक्ष्यांचा राजा गरुड याला येताना पाहून काकभुशुंडीसह सर्व पक्षिसमाजाला आनंद झाला.॥ ३॥

**अति आदर खगपति कर कीन्हा। स्वागत पूछि सुआसन दीन्हा॥**
**करि पूजा समेत अनुरागा। मधुर बचन तब बोलेउ कागा॥**

त्यांनी पक्षिराज गरुडाचा खूप आदर-सत्कार केला. क्षेमकुशल विचारल्यावर बसण्यासाठी चांगले आसन दिले. मग प्रेमपूर्वक स्वागत करून काकभुशुंडी गोड शब्दांत म्हणाले,॥ ४॥

दो०—**नाथ कृतारथ भयउँ मैं तव दरसन खगराज।**
**आयसु देहु सो करौं अब प्रभु आयहु केहि काज॥ ६३ (क)॥**

'हे नाथ, हे पक्षिराज, तुमच्या दर्शनाने मी कृतार्थ झालो. तुम्ही जे सांगाल, ते मी करीन. हे प्रभो, तुम्ही कोणत्या कामासाठी आला आहात?'॥ ६३ (क)॥

**सदा कृतारथ रूप तुम्ह कह मृदु बचन खगेस।**
**जेहि कै अस्तुति सादर निज मुख कीन्हि महेस॥ ६३ (ख)॥**

पक्षिराज गरुड गोड शब्दांत म्हणाला, 'तुम्ही तर सदा कृतार्थरूप आहात. तुमचे मोठेपण स्वतः शिवांनी आदरपूर्वक आपल्या श्रीमुखाने सांगितले आहे.॥ ६३(ख)॥

**सुनहु तात जेहि कारन आयउँ। सो सब भयउ दरस तव पायउँ॥**
**देखि परम पावन तव आश्रम। गयउ मोह संसय नाना भ्रम॥**

हे तात, मी ज्यासाठी आलो होतो, ते सर्व काम येथे येताच पूर्ण झाले. शिवाय तुमचे दर्शन घडले. तुमचा पवित्र आश्रम पाहून माझा मोह, संशय आणि अनेक प्रकारचे भ्रम हे सर्व काही नाहीसे झाले.॥ १॥

**अब श्रीराम कथा अति पावनि। सदा सुखद दुख पुंज नसावनि॥**
**सादर तात सुनावहु मोही। बार बार बिनवउँ प्रभु तोही॥**

आता हे तात, मला तुम्ही श्रीरामांची अत्यंत पवित्र करणारी, नित्य सुख देणारी आणि दुःखसमूहांचा नाश करणारी कथा आदराने समजावून सांगा. मी वारंवार तुम्हांला हीच विनवणी करतो.'॥ २॥

**सुनत गरुड़ कै गिरा बिनीता। सरल सुप्रेम सुखद सुपुनीता॥**
**भयउ तासु मन परम उछाहा। लाग कहै रघुपति गुन गाहा॥**

गरुडाची विनम्र, सरळ, सुंदर, प्रेमयुक्त, सुखप्रद आणि अत्यंत पवित्र वाणी ऐकताच भुशुंडींच्या मनाला परम उत्साह वाटला आणि ते श्रीरघुनाथांच्या गुणांची कथा सांगू लागले. ॥ ३ ॥

**प्रथमहिं अति अनुराग भवानी । रामचरित सर कहेसि बखानी ॥**
**पुनि नारद कर मोह अपारा । कहेसि बहुरि रावन अवतारा ॥**

हे भवानी, प्रथम त्यांनी मोठ्या प्रेमाने रामचरितमानस सरोवराचे रूपक समजावून सांगितले. नंतर नारदांचा अपार मोह व मग रावणाचा जन्मवृत्तान्त सांगितला. ॥ ४ ॥

**प्रभु अवतार कथा पुनि गाई । तब सिसु चरित कहेसि मन लाई ॥**

त्यानंतर प्रभूंच्या अवताराची कथा वर्णन केली. मग मन:पूर्वक श्रीरामांच्या बाललीला सांगितल्या. ॥ ५ ॥

दो०—**बालचरित कहि बिबिधि बिधि मन महँ परम उछाह।**
**रिषि आगवन कहेसि पुनि श्रीरघुबीर बिबाह॥ ६४॥**

त्यांच्या मनात मोठा उत्साह भरला होता. अनेक प्रकारच्या बाललीला सांगून नंतर विश्वमित्रांचे अयोध्येमध्ये आगमन आणि श्रीरघुवीरांच्या विवाहाचे वर्णन केले. ॥ ६४ ॥

**बहुरि राम अभिषेक प्रसंगा । पुनि नृप बचन राज रस भंगा ॥**
**पुरबासिन्ह कर बिरह बिषादा । कहेसि राम लछिमन संबादा ॥**

मग श्रीरामांच्या राज्याभिषेकाचा प्रसंग, राजा दशरथांच्या वचनामुळे रसभंग होणे, नंतर नगरवासीयांचा विरह, विषाद आणि श्रीराम-लक्ष्मण यांचा झालेला संवाद सांगितला. ॥ १ ॥

**बिपिन गवन केवट अनुरागा । सुरसरि उतरि निवास प्रयागा ॥**
**बालमीक प्रभु मिलन बखाना । चित्रकूट जिमि बसे भगवाना ॥**

श्रीरामांचे वनगमन, नाविक-प्रसंग, गंगा पार करून प्रयागामध्ये निवास, वाल्मीकी आणि प्रभू श्रीरामांची भेट आणि भगवंतांनी चित्रकूटावर निवास करणे, हे सर्व काही सांगितले. ॥ २ ॥

**सचिवागवन नगर नृप मरना । भरतागवन प्रेम बहु बरना ॥**
**करि नृप क्रिया संग पुरबासी । भरत गए जहँ प्रभु सुख रासी ॥**

नंतर मंत्री सुमंत्राचे अयोध्येत येणे, राजा दशरथांचे देहावसान, भरताचे आजोळहून अयोध्येस परत येणे आणि त्याचे प्रेम या सर्वांचे बरेच वर्णन केले. राजाची अंत्येष्टी क्रिया करून नगरवासीयांसह भरत सुखनिधान प्रभू श्रीरामचंद्र यांच्याकडे गेल्याची वार्ता, ॥ ३ ॥

**पुनि रघुपति बहु बिधि समुझाए । लै पादुका अवधपुर आए ॥**
**भरत रहनि सुरपति सुत करनी । प्रभु अरु अत्रि भेंट पुनि बरनी ॥**

श्रीरघुनाथांनी भरताला अनेक प्रकारे समजावणे, ते ऐकून भरताचे पादुका घेऊन अयोध्येस परतणे, ही कथा सांगितली. भरताची नंदिग्रामामध्ये राहण्याची रीत, इंद्रपुत्र जयंताचे नीच कर्म आणि मग प्रभू श्रीरामांची मुनी अत्रींशी भेट-यांचे वर्णन केले. ॥ ४ ॥

दो०—**कहि बिराध बध जेहि बिधि देह तजी सरभंग।**
**बरनि सुतीछन प्रीति पुनि प्रभु अगस्ति सतसंग॥ ६५॥**

विराधाचा वध कसा केला, शरभंगांनी शरीरत्याग केला तो प्रसंग, नंतर सुतीक्ष्णाच्या प्रेमाचे वर्णन करून प्रभू व अगस्त्य यांच्या सत्संगाचा वृत्तांत सांगितला. ॥ ६५ ॥

**कहि दंडक बन पावनताई। गीध मइत्री पुनि तेहिं गाई॥**
**पुनि प्रभु पंचबटीं कृत बासा। भंजी सकल मुनिन्ह की त्रासा॥**

श्रीरामांनी दंडकवनास पवित्र केल्याचे सांगून मग काकभुशुंडींनी गृध्रराज जटायूशी मैत्रीचे वर्णन केले. मग कशाप्रकारे प्रभूंनी पंचवटीत निवास करून सर्व मुनींचे भय दूर केले, ॥ १ ॥

**पुनि लछिमन उपदेस अनूपा। सूपनखा जिमि कीन्हि कुरूपा॥**
**खर दूषन बध बहुरि बखाना। जिमि सब मरमु दसानन जाना॥**

आणि लक्ष्मणाला अनुपम उपदेश दिला व शूर्पणखेला कुरूप केले. खरदूषण यांचा वध आणि कशा प्रकारे रावणाला ही बातमी समजली, हे वर्णन करून सांगितले. ॥ २ ॥

**दसकंधर मारीच बतकही। जेहि बिधि भई सो सब तेहिं कही॥**
**पुनि माया सीता कर हरना। श्रीरघुबीर बिरह कछु बरना॥**

मग रावण व मारीच यांची झालेली चर्चा सांगितली. मायासीतेचे हरण व रघुवीरांच्या विरहाचे काहीसे वर्णन ऐकविले. ॥ ३ ॥

**पुनि प्रभु गीध क्रिया जिमि कीन्ही। बधि कबंध सबरिहि गति दीन्ही॥**
**बहुरि बिरह बरनत रघुबीरा। जेहि बिधि गए सरोबर तीरा॥**

नंतर प्रभूंनी गृध्र जटायूची कशाप्रकारे क्रिया केली, कबंधाला मारून शबरीला परमगती कशी दिली आणि नंतर श्रीरामांच्या विरहाचे वर्णन करीत श्रीरघुवीर पंपासरोवरावर कसे आले, ते सर्व सांगितले. ॥ ४ ॥

दो०—**प्रभु नारद संबाद कहि मारुति मिलन प्रसंग।**
**पुनि सुग्रीव मिताई बालि प्रान कर भंग॥ ६६ (क)॥**

प्रभू व नारदांचा संवाद आणि मारुतीच्या भेटीचा प्रसंग सांगून मग सुग्रीवाशी मैत्री आणि वालीच्या वधाचे वर्णन केले. ॥ ६६ (क) ॥

**कपिहि तिलक करि प्रभु कृत सैल प्रबरषन बास।**
**बरनन बर्षा सरद अरु राम रोष कपि त्रास॥ ६६ ( ख )॥**

सुग्रीवाचा राज्याभिषेक झाल्यावर प्रभूंनी प्रवर्षण पर्वतावर निवास केला त्यांचे आणि वर्षा व शरद ऋतूंचे वर्णन, श्रीरामांचा सुग्रीवावर रोष, सुग्रीवाची भीती इत्यादी प्रसंग सांगितले. ॥ ६६ (ख) ॥

**जेहि बिधि कपिपति कीस पठाए । सीता खोज सकल दिसि धाए॥**
**बिबर प्रबेस कीन्ह जेहि भाँती । कपिन्ह बहोरि मिला संपाती॥**

वानरराज सुग्रीवाने वानरांना कशाप्रकारे पाठविले, सीतेच्या शोधासाठी ते सर्व दिशांना कसे गेले, कशा प्रकारे त्यांनी गुहेत प्रवेश केला आणि मग संपाती कसा भेटला, ही कथा सांगितली. ॥ १ ॥

**सुनि सब कथा समीरकुमारा । नाघत भयउ पयोधि अपारा॥**
**लंकाँ कपि प्रबेस जिमि कीन्हा । पुनि सीतहि धीरजु जिमि दीन्हा॥**

संपातीकडून सीतेची वार्ता ऐकून पवनपुत्र हनुमान कशाप्रकारे अपार समुद्र ओलांडून गेला, नंतर हनुमानाने लंकेत प्रवेश कसा केला आणि मग सीतेला धीर कसा दिला, हे सर्व सांगितले. ॥ २ ॥

**बन उजारि रावनहि प्रबोधी । पुर दहि नाघेउ बहुरि पयोधी॥**
**आए कपि सब जहँ रघुराई । बैदेही की कुसल सुनाई॥**

अशोकवन उध्वस्त करून, रावणाला समजावून, लंका जाळून त्याने समुद्र कसा ओलांडला आणि कशाप्रकारे सर्व वानर श्रीरघुनाथांच्याजवळ आले आणि जानकीची खुशाली कशी सांगितली, ॥ ३ ॥

**सेन समेति जथा रघुबीरा । उतरे जाइ बारिनिधि तीरा॥**
**मिला बिभीषन जेहि बिधि आई । सागर निग्रह कथा सुनाई॥**

मग श्रीरघुवीर सेनेसह निघून कशाप्रकारे समुद्रतटावर उतरले आणि कशाप्रकारे बिभीषण येऊन त्यांना भेटला, हे सर्व आणि समुद्राला केलेल्या शासनाची कथा त्यांनी सांगितली. ॥ ४॥

दो०—**सेतु बाँधि कपि सेन जिमि उतरी सागर पार।**
**गयउ बसीठी बीरबर जेहि बिधि बालिकुमार॥ ६७ ( क )॥**

पूल बांधून कशाप्रकारे वानरांची सेना समुद्र पार करून गेली आणि कशाप्रकारे वालिपुत्र अंगद दूत बनून गेला, हे सर्व सांगितले. ॥ ६७ (क) ॥

**निसिचर कीस लराई बरनिसि बिबिध प्रकार।**
**कुंभकरन घननाद कर बल पौरुष संघार॥ ६७ ( ख )॥**

नंतर राक्षस व वानर यांच्यामध्ये झालेल्या युद्धाचे अनेक प्रकारे वर्णन करून सांगितले. नंतर कुंभकर्ण आणि मेघनाद यांचे बल, पुरुषार्थ व संहार यांची कथा सांगितली. ॥ ६७ (ख) ॥

**निसिचर निकर मरन बिधि नाना। रघुपति रावन समर बखाना॥**
**रावन बध मंदोदरि सोका। राज बिभीषन देव असोका॥**

नानाप्रकारच्या राक्षससमुदायांचे मरण आणि श्रीरघुनाथ व रावण यांच्या नाना तऱ्हेच्या युद्धाचे वर्णन करून सांगितले. रावणवध, मंदोदरीचा शोक, बिभीषणाचा राज्याभिषेक आणि देवांचे शोकरहित होणे, हे सर्व सांगून,॥ १॥

**सीता रघुपति मिलन बहोरी। सुरन्ह कीन्हि अस्तुति कर जोरी॥**
**पुनि पुष्पक चढ़ि कपिन्ह समेता। अवध चले प्रभु कृपा निकेता॥**

नंतर सीता व रघुनाथ यांची भेट झाल्याचे सांगितले. त्यानंतर कशा प्रकारे देवांनी हात जोडून स्तुती केली आणि मग वानरांसह पुष्पक विमानात बसून कृपाधाम प्रभू हे अयोध्येला निघाले, या सर्व गोष्टी सांगितल्या.॥ २॥

**जेहि बिधि राम नगर निज आए। बायस बिसद चरित सब गाए॥**
**कहेसि बहोरि राम अभिषेका। पुर बरनत नृपनीति अनेका॥**

श्रीरामचंद्र कशाप्रकारे आपल्या अयोध्यानगरीला आले, ते सर्व उज्ज्वल चरित्र काकभुशुंडी यांनी विस्ताराने वर्णन केले. मग त्यांनी श्रीरामांच्या राज्याभिषेकाचे वर्णन केले. शिव म्हणतात, ‘अयोध्यापुरीचे व नानाप्रकारच्या राजनीतींचे वर्णन करीत,॥ ३॥

**कथा समस्त भुसुंड बखानी। जो मैं तुम्ह सन कही भवानी॥**
**सुनि सब राम कथा खगनाहा। कहत बचन मन परम उछाहा॥**

हे भवानी, मी जी कथा तुला सांगितली होती, ती सर्व कथा भुशुंडींनी गरुडाला वर्णन करून सांगितली. सर्व रामकथा ऐकून पक्षिराज गरुडाच्या मनाला आनंद झाला व तो म्हणू लागला,॥ ४॥

**सो०—गयउ मोर संदेह सुनेउँ सकल रघुपति चरित।**
**भयउ राम पद नेह तव प्रसाद बायस तिलक॥ ६८ ( क )॥**

‘श्रीरघुनाथांचे संपूर्ण चरित्र मी ऐकले. त्यामुळे माझा संशय नाहीसा झाला. हे काकशिरोमणी, तुमच्या कृपेमुळे मला श्रीरामांच्या चरणी प्रेम वाटू लागले.’॥ ६८ (क)॥

**मोहि भयउ अति मोह प्रभु बंधन रन महुँ निरखि।**
**चिदानंद संदोह राम बिकल कारन कवन॥ ६८ ( ख )॥**

युद्धामध्ये प्रभूंना पडलेले नागपाशाचे बंधन पाहून मला फार मोह झाला होता की, श्रीराम हे तर सच्चिदानंदघन आहेत, मग ते का बरे व्याकूळ झाले आहेत?॥ ६८ (ख)॥

**देखि चरित अति नर अनुसारी। भयउ हृदयँ मम संसय भारी॥**
**सोइ भ्रम अब हित करि मैं माना। कीन्ह अनुग्रह कृपानिधाना॥**

अगदी लौकिक माणसांसारखे त्यांचे चरित्र पाहून माझ्या मनात मोठा संशय उत्पन्न झाला होता. आता मला तो भ्रमही स्वत:साठी हितकारक वाटतो. कृपानिधानांनी माझ्यावर हा मोठा अनुग्रहच केला.॥ १॥

**जो अति आतप ब्याकुल होई। तरु छाया सुख जानइ सोई॥**
**जौं नहिं होत मोह अति मोही। मिलतेउँ तात कवन बिधि तोही॥**

जो उन्हामुळे व्याकूळ होतो, त्यालाच वृक्षाच्या सावलीचे सुख समजते. हे तात, जर मला अत्यंत संशय वाटला नसता, तर मी तुम्हांला कसा भेटलो असतो?॥ २॥

**सुनतेउँ किमि हरि कथा सुहाई। अति बिचित्र बहु बिधि तुम्ह गाई॥**
**निगमागम पुरान मत एहा। कहहिं सिद्ध मुनि नहिं संदेहा॥**

आणि ही सुंदर व अत्यंत विलक्षण हरिकथा मला कशी ऐकायला मिळाली असती? वेद, शास्त्र आणि पुराणे यांचे हेच मत आहे. सिद्ध व मुनी हेही हेच सांगतात. यात काहीही संशय नाही की,॥ ३॥

**संत बिसुद्ध मिलहिं परि तेही। चितवहिं राम कृपा करि जेही॥**
**राम कृपाँ तव दरसन भयऊ। तव प्रसाद सब संसय गयऊ॥**

ज्याला श्रीराम कृपादृष्टीने पाहातात, त्यांनाच खरोखर संत भेटतात. श्रीरामांच्या कृपेमुळे मला तुमचे दर्शन घडले आणि तुमच्या कृपेने माझा संशय दूर झाला.'॥ ४॥

दो०—**सुनि बिहंगपति बानी सहित बिनय अनुराग।**
**पुलक गात लोचन सजल मन हरषेउ अति काग॥ ६९ (क)॥**

पक्षिराज गरुडाचे विनय व प्रेमपूर्ण बोलणे ऐकून काकभुशुंडी यांचे शरीर पुलकित झाले. त्यांच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले आणि ते मनातून आनंदित झाले.॥ ६९(क)॥

**श्रोता सुमति सुसील सुचि कथा रसिक हरिदास।**
**पाइ उमा अति गोप्यमपि सज्जन करहिं प्रकास॥ ६९ (ख)॥**

हे उमे, सुंदर बुद्धीचा, सुशील, पवित्र कथेचा प्रेमी आणि हरीचा सेवक श्रोता मिळाल्यामुळे सज्जन लोक अत्यंत गुप्त रहस्यही प्रकट करतात.॥ ६९ (ख)॥

**बोलेउ काकभसुंड बहोरी। नभग नाथ पर प्रीति न थोरी॥**
**सब बिधि नाथ पूज्य तुम्ह मेरे। कृपापात्र रघुनायक केरे॥**

काकभुशुंडींचे पक्षिराजावर काही कमी प्रेम नव्हते. ते म्हणाले, ‘हे नाथ, तुम्ही मला सर्व प्रकारे पूज्य आहात आणि श्रीरघुनाथांचे कृपापात्र आहात. ॥ १ ॥

**तुम्हहि न संसय मोह न माया। मो पर नाथ कीन्हि तुम्ह दाया॥**
**पठइ मोह मिस खगपति तोही। रघुपति दीन्हि बड़ाई मोही॥**

तुम्हांला संशय नाही, मोह नाही किंवा मायाही नाही. हे नाथ, तुम्ही माझ्यावर उपकार केला आहे. हे पक्षिराज, मोहाच्या निमित्ताने का होईना, श्रीरघुनाथांनी तुम्हांला येथे पाठवून मला मोठेपणा दिला आहे. ॥ २ ॥

**तुम्ह निज मोह कही खगसाईं। सो नहिं कछु आचरज गोसाईं॥**
**नारद भव बिरंचि सनकादी। जे मुनिनायक आतमबादी॥**

हे पक्ष्यांचे स्वामी, हे गोस्वामी, तुम्ही आपला संशय व्यक्त केलात, यात काहीच आश्चर्य नाही. नारद, शिव, ब्रह्मदेव आणि सनकादिक हे आत्मतत्त्वाचे मर्मज्ञ आणि त्याचा उपदेश करणारे श्रेष्ठ मुनी आहेत. ॥ ३ ॥

**मोह न अंध कीन्ह केहि केही। को जग काम नचाव न जेही॥**
**तृस्नाँ केहि न कीन्ह बौराहा। केहि कर हृदय क्रोध नहिं दाहा॥**

पण त्यांच्यापैकी कुणाकुणाला मोहाने विवेकशून्य अंध बनविले नाही? जगात असा कोण आहे की ज्याला कामाने नाचविले नाही? तृष्णेने कुणाला वेडे केले नाही? क्रोधाने कुणाच्या हृदयामध्ये दाह निर्माण केला नाही? ॥ ४ ॥

दो०—**ग्यानी तापस सूर कबि कोबिद गुन आगार।**
**केहि कै लोभ बिडंबना कीन्हि न एहिं संसार॥ ७० ( क )॥**

या जगामध्ये असा कोण ज्ञानी, तपस्वी, शूर, कवी, विद्वान आणि गुणी आहे की, ज्याची लोभाने विटंबना करून सोडली नाही? ॥ ७० (क) ॥

**श्रीमद बक्र न कीन्ह केहि प्रभुता बधिर न काहि।**
**मृगलोचनि के नैन सर को अस लाग न जाहि॥ ७० ( ख )॥**

लक्ष्मीच्या मस्तीने कुणाला कुटिल बनविले नाही? आणि सत्तेने कुणाला बहिरे केले नाही? ज्याला मृगनयना युवतीचे नेत्र-बाण लागले नाहीत, असा कोण आहे? ॥ ७० (ख) ॥

**गुन कृत सन्यपात नहिं केही। कोउ न मान मद तजेउ निबेही॥**
**जोबन ज्वर केहि नहिं बलकावा। ममता केहि कर जस न नसावा॥**

रज, तम इत्यादी गुणांमुळे कुणाला सन्निपात झाला नाही? ज्याला मान व मद यांनी सोडले नाही, असा कुणीही नाही. यौवनाच्या ज्वराने कुणाला बेभान केले नाही? ममतेने कुणाची कीर्ती नष्ट केली नाही? ॥ १ ॥

**मच्छर काहि कलंक न लावा। काहि न सोक समीर डोलावा॥**
**चिंता साँपिनि को नहिं खाया। को जग जाहि न ब्यापी माया॥**

मत्सराने कुणाला कलंकित केले नाही? शोकरूपी पवनाने कुणाला हादरून टाकले नाही? चिंतारूपी सर्पिणीने कुणाला खाऊन टाकले नाही? जगात असा कोण आहे, ज्याला मायेने व्यापले नाही?॥ २॥

**कीट मनोरथ दारु सरीरा। जेहि न लाग घुन को अस धीरा॥**
**सुत बित लोक ईषना तीनी। केहि कै मति इन्ह कृत न मलीनी॥**

मनोरथ ही कीड आहे आणि शरीर हे लाकूड. ज्याच्या शरीराला ही कीड लागली नाही, असा धैर्यशील कोण आहे? पुत्र, धन व लोकप्रतिष्ठा या तीन प्रबळ इच्छांनी कुणाची बुद्धी बिघडून टाकली नाही?॥ ३॥

**यह सब माया कर परिवारा। प्रबल अमिति को बरनै पारा॥**
**सिव चतुरानन जाहि डेराहीं। अपर जीव केहि लेखे माहीं॥**

हा सर्व मायेचा मोठा प्रबळ परिवार आहे. हा अपार आहे. त्याचे वर्णन कोण करू शकेल? शिव आणि ब्रह्मदेवसुद्धा जर त्याला घाबरतात, मग इतर जीवांची कथा ती काय?॥ ४॥

दो०—**ब्यापि रहेउ संसार महुँ माया कटक प्रचंड।**
**सेनापति कामादि भट दंभ कपट पाषंड॥ ७१ ( क )॥**

मायेची प्रचंड सेना संसारात भरून राहिली आहे. काम, क्रोध व लोभ हे तिचे सेनापती आहेत आणि दंभ, कपट आणि पाखंड हे योद्धे आहेत.॥ ७१ (क)॥

**सो दासी रघुबीर कै समुझें मिथ्या सोपि।**
**छूट न राम कृपा बिनु नाथ कहउँ पद रोपि॥ ७१ ( ख )॥**

ती माया श्रीरघुवीरांची दासी आहे. समजून घेतल्यावर ती मिथ्याच आहे, परंतु ती श्रीरामांच्या कृपेविना सुटत नाही. हे नाथ, हे मी प्रतिज्ञापूर्वक सांगतो.॥ ७१ (ख)॥

**जो माया सब जगहि नचावा। जासु चरित लखि काहुँ न पावा॥**
**सोइ प्रभु भ्रू बिलास खगराजा। नाच नटी इव सहित समाजा॥**

जी माया संपूर्ण जगाला नाचविते आणि जिचे चरित्र कुणी पाहू शकला नाही, हे खगराज गरुड, तीच माया प्रभू श्रीरामचंद्रांच्या भुवईच्या संकेतावर आपल्या परिवारासह नटीप्रमाणे नाचते.॥ १॥

**सोइ सच्चिदानंद घन रामा। अज बिग्यान रूप बल धामा॥**
**ब्यापक ब्याप्य अखंड अनंता। अखिल अमोघसक्ति भगवंता॥**

श्रीराम हेच सच्चिदानंदघन आहेत. ते अजन्मा, विज्ञानस्वरूप, रूप आणि बल यांचे धाम आहेत. सर्वव्यापक, सर्वरूप, अखंड, अनंत, संपूर्ण अमोघशक्तियुक्त आणि षड्‍गुणांनी युक्त भगवान आहेत. ॥ २ ॥

**अगुन अदभ्र गिरा गोतीता। सबदरसी अनवद्य अजीता॥**
**निर्मम निराकार निरमोहा। नित्य निरंजन सुख संदोहा॥**

ते निर्गुण, महान, वाणी आणि इंद्रिये यांच्या पलीकडचे, सर्व काही पाहाणारे, निर्दोष, अजेय, ममतारहित, निराकार, मोहरहित, नित्य, मायारहित, सुखाची खाण, ॥ ३ ॥

**प्रकृति पार प्रभु सब उर बासी। ब्रह्म निरीह बिरज अबिनासी॥**
**इहाँ मोह कर कारन नाहीं। रबि सन्मुख तम कबहुँ कि जाहीं॥**

प्रकृतीच्या पलीकडचे, सर्वसमर्थ प्रभू, सदा सर्वांच्या हृदयात वसणारे, इच्छारहित, विकाररहित, अविनाशी ब्रह्म आहेत. श्रीरामांच्याविषयी मोहाला जागाच नाही. अंधकाराचा समूह कधी सूर्यासमोर जाऊ शकेल काय? ॥ ४ ॥

**दो०—भगत हेतु भगवान प्रभु राम धरेउ तनु भूप।**
**किए चरित पावन परम प्राकृत नर अनुरूप॥ ७२ ( क )॥**

भगवान प्रभू श्रीरामचंद्रांनी भक्तांच्यासाठी राजाचे शरीर धारण केले आणि सामान्य लोकांसाठी अनेक परम पवित्र लीला केल्या. ॥ ७२ (क) ॥

**जथा अनेक बेष धरि नृत्य करइ नट कोइ।**
**सोइ सोइ भाव देखावइ आपुन होइ न सोइ॥ ७२ ( ख )॥**

ज्याप्रमाणे एखादा नट अनेक वेष धारण करून नृत्य करतो आणि वेषाप्रमाणे भाव दाखवितो, परंतु तो त्या रूपांपैकी कुणीही नसतो. ॥ ७२ (ख) ॥

**असि रघुपति लीला उरगारी। दनुज बिमोहनि जन सुखकारी॥**
**जे मति मलिन बिषयबस कामी। प्रभु पर मोह धरहिं इमि स्वामी॥**

हे गरुडा, अशीच श्रीरघुनाथांची ही लीला आहे. ती राक्षसांना विशेष मोहित करणारी व भक्तांना सुख देणारी आहे. हे स्वामी, जो मनुष्य मलिन बुद्धीचा, विषयांना वश झालेला व कामी आहे, तोच प्रभूंच्यावर अशा प्रकारे मोहाचा आरोप करीत असतो. ॥ १ ॥

**नयन दोष जा कहँ जब होई। पीत बरन ससि कहुँ कह सोई॥**
**जब जेहि दिसि भ्रम होइ खगेसा। सो कह पच्छिम उयउ दिनेसा॥**

जेव्हा एखाद्याला कावीळ इत्यादी नेत्ररोग होतो, तेव्हा त्याला चंद्र पिवळ्या रंगाचा दिसतो. हे पक्षिराज, ज्याला दिशाभ्रम होतो, तो म्हणतो की, सूर्य पश्चिमेला उगवला आहे. ॥ २ ॥

**नौकारूढ़ चलत जग देखा। अचल मोहबस आपुहि लेखा॥**
**बालक भ्रमहिं न भ्रमहिं गृहादी। कहहिं परस्पर मिथ्याबादी॥**

नावेत बसलेल्या मनुष्याला जग चालत असल्याचे दिसते आणि आपण स्थिर असल्याचे त्याला वाटते. बालक गोल गोल फिरतात, घर वगैरे काही फिरत नाही. परंतु ते एकमेकांना तू खोटारडा आहेस, असे म्हणतात.॥ ३॥

**हरि बिषइक अस मोह बिहंगा। सपनेहुँ नहिं अग्यान प्रसंगा॥**
**मायाबस मतिमंद अभागी। हृदयँ जमनिका बहुबिधि लागी॥**

हे गरुडा, श्रीहरींच्या बाबतीत मोहाची कल्पना करणे, हे असेच आहे. भगवंतांमध्ये स्वप्नातही अज्ञानाला जागा नाही. परंतु जे मायेच्या अधीन झालेले आहेत, मंदबुद्धीचे व भाग्यहीन आहेत आणि ज्यांच्या मनावर अनेक प्रकारची आच्छादने पडली आहेत,॥ ४॥

**ते सठ हठ बस संसय करहीं। निज अग्यान राम पर धरहीं॥**

ते मूर्ख हट्टाला बळी पडून संशय घेतात आणि आपले अज्ञान श्रीरामांच्यावर आरोपित करतात.॥ ५॥

दो०—**काम क्रोध मद लोभ रत गृहासक्त दुखरूप।**
**ते किमि जानहिं रघुपतिहि मूढ़ परे तम कूप॥ ७३ ( क )॥**

जे काम, क्रोध, मद व मोह यामध्ये मग्न असतात आणि दु:खरूप घरामध्ये आसक्त असतात, ते श्रीरघुनाथांना कसे जाणणार? ते मूर्ख अंधकाररूपी विहिरीत पडलेले आहेत.॥ ७३(क)॥

**निर्गुन रूप सुलभ अति सगुन जान नहिं कोइ।**
**सुगम अगम नाना चरित सुनि मुनि मन भ्रम होइ॥ ७३ ( ख )॥**

निर्गुण रूप अत्यंत सुलभ आहे. परंतु गुणातीत दिव्य सगुण रूप कुणाला समजून येत नाही. म्हणून त्या सगुण भगवंतांची अनेक प्रकारची सुगम व अगम्य चरित्रे ऐकून मुनींच्या मनालाही भ्रम होतो.॥ ७३ (ख)॥

**सुनु खगेस रघुपति प्रभुताई। कहउँ जथामति कथा सुहाई॥**
**जेहि बिधि मोह भयउ प्रभु मोही। सोउ सब कथा सुनावउँ तोही॥**

हे पक्षिराज गरुडा, श्रीरामांची महती ऐकून घे. मी आपल्या बुद्धीप्रमाणे ती सुंदर कथा तुला सांगतो. हे प्रभो, मला ज्याप्रकारे मोह झाला, ती सर्व कथाही तुला सांगतो.॥ १॥

**राम कृपा भाजन तुम्ह ताता। हरि गुन प्रीति मोहि सुखदाता॥**
**ताते नहिं कछु तुम्हहि दुरावउँ। परम रहस्य मनोहर गावउँ॥**

हे तात, तू श्रीरामांचा कृपापात्र आहेस. श्रीहरींच्या गुणाविषयी तुला प्रेम आहे. म्हणून तू मला सुख देणारा आहेस. म्हणून मी तुझ्यापासून काहीही लपवून ठेवीत नाही आणि अत्यंत रहस्याच्या गोष्टी मी तुला गाऊन ऐकवितो.॥ २॥

**सुनहु राम कर सहज सुभाऊ। जन अभिमान न राखहिं काऊ॥**
**संसृत मूल सूलप्रद नाना। सकल सोक दायक अभिमाना॥**

श्रीरामचंद्रांचा सहज स्वभाव ऐक. ते भक्तामध्ये कधीही अभिमान राहू देत नाहीत. कारण अभिमान हा जन्म-मरणरूप संसाराचे मूळ आहे आणि अनेक प्रकारचे क्लेश व सर्व शोक देणारा आहे.॥ ३॥

**ताते करहिं कृपानिधि दूरी। सेवक पर ममता अति भूरी॥**
**जिमि सिसु तन ब्रन होइ गोसाईं। मातु चिराव कठिन की नाईं॥**

म्हणून कृपानिधी श्रीराम तो दूर करतात. कारण सेवकाबद्दल त्यांना फारच ममता आहे. हे गोस्वामी, ज्याप्रमाणे मुलाच्या अंगावर फोड आला, तर आई हृदय कठोर बनवून तो फोड फोडते.॥ ४॥

दो०—**जदपि प्रथम दुख पावइ रोवइ बाल अधीर।**
**ब्याधि नास हित जननी गनति न सो सिसु पीर॥ ७४ (क)॥**

जरी मुलाला सुरवातीला फोड फोडताना दु:ख होते व तो घाबरून रडतो, तरीही रोग नाहीसा करण्यासाठी आई मुलाच्या दु:खाकडे लक्ष देत नाही. फोड फोडून टाकते.॥ ७४ (क)॥

**तिमि रघुपति निज दास कर हरहिं मान हित लागि।**
**तुलसिदास ऐसे प्रभुहि कस न भजहु भ्रम त्यागि॥ ७४ (ख)॥**

त्याचप्रमाणे श्रीरघुनाथ आपल्या दासाचा अभिमान त्याच्या कल्याणासाठी हरण करतात. तुलसीदास म्हणतात की, भ्रम सोडून अशा प्रभूंना मनुष्य का भजत नाही?॥ ७४ (ख)॥

**राम कृपा आपनि जड़ताई। कहउँ खगेस सुनहु मन लाई॥**
**जब जब राम मनुज तनु धरहीं। भक्त हेतु लीला बहु करहीं॥**

हे पक्षिराज, श्रीरामांची कृपा व माझ्या मूर्खतेची गोष्ट सांगतो. लक्ष देऊन ऐक. जेव्हा जेव्हा श्रीरामचंद्र मनुष्यशरीर धारण करतात आणि भक्तांच्या सुखासाठी अनेक लीला करतात,॥ १॥

**तब तब अवधपुरी मैं जाऊँ। बालचरित बिलोकि हरषाऊँ॥**
**जन्म महोत्सव देखउँ जाई। बरष पाँच तहँ रहउँ लोभाई॥**

तेव्हा तेव्हा मी अयोध्यापुरीत जातो आणि त्यांच्या बाललीला पाहून हर्षित होतो. तेथे जाऊन मी जन्ममहोत्सव पाहतो आणि भगवंतांच्या शिशुलीलांनी लुब्ध होऊन मी तेथे पाच वर्षे राहातो.॥ २॥

**इष्टदेव मम बालक रामा। सोभा बपुष कोटि सत कामा॥**
**निज प्रभु बदन निहारि निहारी। लोचन सुफल करउँ उरगारी॥**

बालकरूप श्रीरामचंद्र माझे इष्टदेव आहेत. त्यांच्या अंगी अब्जावधी कामदेवांची शोभा आहे. हे गरुडा, आपल्या प्रभूंचे मुख पाहात-पाहात मी डोळ्यांचे पारणे फेडतो. ॥ ३ ॥

**लघु बायस बपु धरि हरि संगा। देखउँ बालचरित बहु रंगा॥**

लहानशा कावळ्याचे शरीर धारण करून आणि भगवंतांच्या सोबत फिरून मी त्यांची विभिन्न बालचरित्रे पाहातो. ॥ ४ ॥

**दो०—लरिकाईं जहँ जहँ फिरहिं तहँ तहँ संग उड़ाउँ।**
**जूठनि परइ अजिर महँ सो उठाइ करि खाउँ॥ ७५ ( क )॥**

लहानपणी ते जेथे जेथे फिरतात, तेथे तेथे मी त्यांच्यासोबत उडत जातो आणि अंगणात त्यांचे उष्टे पडते, ते उचलून खातो. ॥ ७५ (क) ॥

**एक बार अतिसय सब चरित किए रघुबीर।**
**सुमिरत प्रभु लीला सोइ पुलकित भयउ सरीर॥ ७५ ( ख )॥**

एकदा श्रीरघुवीरांनी खूप लीला केल्या.' प्रभूंच्या त्या लीलांचे स्मरण होताच काकभुशुंडींचे शरीर प्रेमानंदामुळे पुलकित होऊन गेले. ॥ ७५ (ख) ॥

**कहइ भसुंड सुनहु खगनायक। राम चरित सेवक सुखदायक॥**
**नृप मंदिर सुंदर सब भाँती। खचित कनक मनि नाना जाती॥**

काकभुशुंडी म्हणतात, 'हे पक्षिराज, ऐक. श्रीरामांचे चरित्र सेवकांना सुख देणारे आहे. अयोध्येचा राजमहाल सर्व प्रकारे सुंदर आहे. सोन्याच्या महालात नाना प्रकारची रत्ने जडविली आहेत. ॥ १ ॥

**बरनि न जाइ रुचिर अँगनाई। जहँ खेलहिं नित चारिउ भाई॥**
**बालबिनोद करत रघुराई। बिचरत अजिर जननि सुखदाई॥**

सुंदर अंगणाचे तर वर्णन करता येत नाही. तेथे चौघे भाऊ नित्य खेळतात. एकदा मातेला सुख देणारे श्रीरघुनाथ बालविनोद करीत अंगणात फिरत होते. ॥ २ ॥

**मरकत मृदुल कलेवर स्यामा। अंग अंग प्रति छबि बहु कामा॥**
**नव राजीव अरुन मृदु चरना। पदज रुचिर नख ससि दुति हरना॥**

पाचूसारखे त्यांचे सावळे व कोमल शरीर आहे. अंगाअंगातून अनेक कामदेवांची शोभा पसरली आहे. नवीन लाल कमळासमान लाल-लाल कोमल चरण आहेत. सुंदर बोटे आहेत आणि नखे आपल्या ज्योतीने चंद्राची कांती हरण करणारी आहेत. ॥ ३ ॥

**ललित अंक कुलिसादिक चारी। नूपुर चारु मधुर रवकारी॥**
**चारु पुरट मनि रचित बनाई। कटि किंकिनि कल मुखर सुहाई॥**

पायांच्या तळव्यावर वज्रादी चार चिन्हे आहेत. चरणांमध्ये मधुर ध्वनी करणारे सुंदर नूपुर आहेत. रत्नजडित सोन्याच्या करदोट्याचा मधुरध्वनी गोड वाटत आहे. ॥ ४ ॥

**दो०—रेखा त्रय सुंदर उदर नाभी रुचिर गँभीर।**
**उर आयत भ्राजत बिबिधि बाल बिभूषन चीर॥ ७६ ॥**

उदरावर त्रिवली सुंदर दिसते. नाभी सुंदर व खोल आहे. विशाल वक्ष:स्थलावर अनेक प्रकारचे बालकांचे दागिने व वस्त्र शोभून दिसत आहे. ॥ ७६ ॥

**अरुन पानि नख करज मनोहर। बाहु बिसाल बिभूषन सुंदर॥**
**कंध बाल केहरि दर ग्रीवा। चारु चिबुक आनन छबि सींवा॥**

हातांचे लाल लाल तळवे, नखे व बोटे हे सर्व मनोहर आहेत आणि विशाल भुजांवर सुंदर आभूषणे आहेत. सिंहाच्या छाव्यासारखे खांदे आणि शंखासारखा गळा आहे. सुंदर हनुवटी आणि मुख हे लावण्याची परिसीमाच आहे. ॥ १ ॥

**कलबल बचन अधर अरुनारे। दुइ दुइ दसन बिसद बर बारे॥**
**ललित कपोल मनोहर नासा। सकल सुखद ससि कर सम हासा॥**

बोलणे बोबडे आहे. लालसर ओठ आहेत. उज्ज्वल, सुंदर व इटुकले दोन-दोन दात आहेत. सुंदर गाल, मनोहर नासिका आणि सर्व सुखे देणारे चंद्रकिरणांसारखे मधुर स्मित हास्य आहे. ॥ २ ॥

**नील कंज लोचन भव मोचन। भ्राजत भाल तिलक गोरोचन॥**
**बिकट भृकुटि सम श्रवन सुहाए। कुंचित कच मेचक छबि छाए॥**

नील कमलांसारखे नेत्र हे जन्म-मृत्यूच्या बंधनांतून सोडविणारे आहेत. ललाटावर गोरोचनाचा टिळा शोभत आहे. भुवया वक्र, कान सम आणि सुंदर आहेत. मस्तकावर काळ्या, कुरळ्या केसांची शोभा पसरली आहे. ॥ ३ ॥

**पीत झीनि झगुली तन सोही। किलकनि चितवनि भावति मोही॥**
**रूप रासि नृप अजिर बिहारी। नाचहिं निज प्रतिबिंब निहारी॥**

अंगावर पिवळे झुळझुळीत झबले शोभून दिसत आहे. त्यांची किलकारी व नजर मला फार फार आवडते. राजा दशरथांच्या अंगणी विहार करणारे व सौंदर्यसंपन्न श्रीरामचंद्र आपलेच प्रतिबिंब पाहून नाचत आहेत. ॥ ४ ॥

**मोहि सन करहिं बिबिधि बिधि क्रीड़ा। बरनत मोहि होति अति ब्रीड़ा॥**
**किलकत मोहि धरन जब धावहिं। चलउँ भागि तब पूप देखावहिं॥**

आणि माझ्याबरोबर अनेक प्रकारचे खेळ करीत आहेत. त्या चरित्राचे वर्णन करताना मला

ओशाळल्यागत होते. किलकारी मारत ते मला पकडायला धावत. मग मी पळून जाई, तेव्हा ते खाण्यासाठी मला हातातील घारी दाखवत. ॥ ५ ॥

**दो०—आवत निकट हँसहिं प्रभु भाजत रुदन कराहिं।**
**जाउँ समीप गहन पद फिरि फिरि चितइ पराहिं॥ ७७ ( क )॥**

मी जवळ आलो की, प्रभू हसत आणि मी पळून गेलो की रडत. जेव्हा मी त्यांच्या चरणांना स्पर्श करण्यासाठी जाई, तेव्हा ते वळून वळून माझ्याकडे बघत पळून जात. ॥ ७७(क) ॥

**प्राकृत सिसु इव लीला देखि भयउ मोहि मोह।**
**कवन चरित्र करत प्रभु चिदानंद संदोह॥ ७७ ( ख )॥**

सामान्य बालकासारखी त्यांची लीला पाहून मला शंका आली की, सच्चिदानंदघन प्रभू ही कसली लीला करीत आहेत? ॥ ७७(ख) ॥

**एतना मन आनत खगराया। रघुपति प्रेरित ब्यापी माया॥**
**सो माया न दुखद मोहि काहीं। आन जीव इव संसृत नाहीं॥**

हे पक्षिराज, मनात एवढी शंका येताच श्रीरघुनाथांनी प्रेरित केलेल्या मायेने माझ्यावर पकड घातली. परंतु ती माया मला दुःख देणारी झाली नाही किंवा इतर जीवांप्रमाणे संसारात टाकणारी झाली नाही. ॥ १ ॥

**नाथ इहाँ कछु कारन आना। सुनहु सो सावधान हरिजाना॥**
**ग्यान अखंड एक सीताबर। माया बस्य जीव सचराचर॥**

हे नाथ, येथे काही दुसरेच कारण आहे. हे भगवंतांचे वाहन असलेल्या गरुडा, ते लक्ष देऊन ऐक. एक सीतापती श्रीरामच अखंड ज्ञानस्वरूप आहेत आणि जड-चेतन असे सर्वच जीव हे मायेच्या अधीन होणारे आहेत. ॥ २ ॥

**जौं सब कें रह ग्यान एकरस। ईस्वर जीवहि भेद कहहु कस॥**
**माया बस्य जीव अभिमानी। ईस बस्य माया गुन खानी॥**

जर जीवांना अखंड ज्ञान असेल, तर मग सांग बरे, ईश्वर व जीव यांच्यात फरक तो काय? अभिमानी जीव मायेच्या अधीन आहेत. तर सत्त्व, रज, तम या तिन्ही गुणांची खाण असलेली माया ईश्वराच्या अधीन आहे. ॥ ३ ॥

**परबस जीव स्वबस भगवंता। जीव अनेक एक श्रीकंता॥**
**मुधा भेद जद्यपि कृत माया। बिनु हरि जाइ न कोटि उपाया॥**

जीव परतंत्र आहे आणि भगवान स्वतंत्र आहेत. जीव अनेक आहेत, मात्र श्रीपती भगवान एक

आहेत. जरी मायेने केलेला भेद असत्य आहे, तरी तो भगवंतांच्या भजनाविना कोट्यवधी उपाय केल्यानेही जाऊ शकत नाही. ॥ ४ ॥

**दो०—रामचंद्र के भजन बिनु जो चह पद निर्बान।**
**ग्यानवंत अपि सो नर पसु बिनु पूँछ बिषान॥ ७८ ( क )॥**

श्रीरामचंद्रांच्या भजनाविना ज्याला मोक्षपद हवे आहे, तो मनुष्य ज्ञानवान असूनही शेपूट व शिंगे यांच्याविना असलेला पशू आहे. ॥ ७८ (क) ॥

**राकापति षोडस उअहिं तारागन समुदाइ।**
**सकल गिरिन्ह दव लाइअ बिनु रबि राति न जाइ॥ ७८ ( ख )॥**

संपूर्ण तारागणांसह सोळा कलांनी पूर्ण चंद्र उदय पावला आणि जितके पर्वत आहेत, त्या सर्वांना दावाग्नी लावला, तरीसुद्धा सूर्याचा उदय झाल्याविना रात्र नाहीशी होत नाही. ॥ ७८ (ख) ॥

**ऐसेहिं हरि बिनु भजन खगेसा। मिटइ न जीवन्ह केर कलेसा॥**
**हरि सेवकहि न ब्याप अबिद्या। प्रभु प्रेरित ब्यापइ तेहि बिद्या॥**

हे पक्षिराज, याचप्रमाणे श्रीहरीच्या भजनाविना जीवांचे क्लेश नाहीसे होत नाहीत. श्रीहरींच्या सेवकाला अविद्या बाधत नाही. उलट प्रभूंच्या कृपेने त्याला विद्या व्यापून टाकते. ॥ १ ॥

**ताते नास न होइ दास कर। भेद भगति बाढ़इ बिहंगबर॥**
**भ्रम तें चकित राम मोहि देखा। बिहँसे सो सुनु चरित बिसेषा॥**

हे पक्षिश्रेष्ठा, म्हणूनच भगवंताच्या दासाचा नाश होत नाही, उलट भेद-भक्ती वाढते. श्रीरामांनी जेव्हा मी भ्रमामुळे चकित झाल्याचे पाहिले, तेव्हा ते हसले. ती विशेष कथा ऐक. ॥ २ ॥

**तेहि कौतुक कर मरमु न काहूँ। जाना अनुज न मातु पिताहूँ॥**
**जानु पानि धाए मोहि धरना। स्यामल गात अरुन कर चरना॥**

त्या लीलांचे मर्म कुणालाही समजले नाही. त्यांच्या लहान भावांना नाही की माता-पित्यांना नाही. श्यामशरीर आणि लाल लाल तळहात आणि लाल चरण-तळवे असलेले बालरूप श्रीराम रांगत रांगत मला पकडण्यास धावले. ॥ ३ ॥

**तब मैं भागि चलेउँ उरगारी। राम गहन कहँ भुजा पसारी॥**
**जिमि जिमि दूरि उड़ाउँ अकासा। तहँ भुज हरि देखउँ निज पासा॥**

तेव्हा गरुडा, मी पळू लागलो. श्रीरामांनी मला पकडण्यासाठी हात पुढे केला. मी जसा जसा आकाशात दूर उडत होतो, तसा तसा तेथे श्रीहरींचा हात मला आपल्या मागे असल्याचे दिसत होते. ॥ ४ ॥

**दो०—ब्रह्मलोक लगि गयउँ मैं चितयउँ पाछ उड़ात।**
**जुग अंगुल कर बीच सब राम भुजहि मोहि तात॥ ७९ ( क )॥**

मी ब्रह्मलोकात गेलो आणि उडत असताना मी मागे वळून पाहिले, तर हे तात, श्रीरामांचा हात आणि मी यांच्यात दोन बोटांचेच अंतर होते. ॥ ७९ (क) ॥

**सप्तावरन भेद करि जहाँ लगें गति मोरि।**
**गयउँ तहाँ प्रभु भुज निरखि ब्याकुल भयउँ बहोरि॥ ७९ ( ख )॥**

सात आवरणे भेदून माझी गती जिथवर होती, तिथवर मी गेलो. परंतु तेथेही प्रभूंचा हात माझ्या मागे पाहून मी व्याकूळ झालो. ॥ ७९ (ख) ॥

**मूदेउँ नयन त्रसित जब भयऊँ। पुनि चितवत कोसलपुर गयऊँ॥**
**मोहि बिलोकि राम मुसुकाहीं। बिहँसत तुरत गयउँ मुख माहीं॥**

मी भयभीत झालो, तेव्हा डोळे मिटून घेतले. मग जेव्हा डोळे उघडून पाहातो तोच मी अयोध्यापुरीत पोहोचलो होतो. मला पाहून श्रीराम मंदहास्य करू लागले. ते हसत असल्याचे पाहून मी पटकन त्यांच्या तोंडात शिरलो. ॥ १ ॥

**उदर माझ सुनु अंडज राया। देखेउँ बहु ब्रह्मांड निकाया॥**
**अति बिचित्र तहँ लोक अनेका। रचना अधिक एक ते एका॥**

हे पक्षिराज, मी त्यांच्या पोटात अनेक ब्रह्मांडांचे समूह पाहिले. त्या ब्रह्मांडांमध्ये अनेक प्रकारचे लोक होते. त्यांची रचना एकापेक्षा एक चांगली होती. ॥ २ ॥

**कोटिन्ह चतुरानन गौरीसा। अगनित उडगन रबि रजनीसा॥**
**अगनित लोकपाल जम काला। अगनित भूधर भूमि बिसाला॥**

कोट्यवधी ब्रह्मदेव आणि शिव, अगणित तारागण, सूर्य आणि चंद्र, अगणित लोकपाल, यम व काल, अगणित पर्वत व विशाल भूमी, ॥ ३ ॥

**सागर सरि सर बिपिन अपारा। नाना भाँति सृष्टि बिस्तारा॥**
**सुर मुनि सिद्ध नाग नर किंनर। चारि प्रकार जीव सचराचर॥**

असंख्य समुद्र, नद्या, तलाव आणि वने, तसेच आणखी सुद्धा नाना प्रकारच्या सृष्टीचा विस्तार दिसला. देव, मुनी, सिद्ध, नाग, मनुष्य, किन्नर आणि चार प्रकारचे जड व चेतन जीव पाहिले. ॥ ४ ॥

दो०—**जो नहिं देखा नहिं सुना जो मनहूँ न समाइ।**
**सो सब अद्भुत देखेउँ बरनि कवनि बिधि जाइ॥ ८० ( क )॥**

जे कधी पाहिले नव्हते की, ऐकले नव्हते आणि ज्याची मनात कल्पनाही करता येत नाही, अशी ती सर्व सृष्टी मी पाहिली. मग तिचे वर्णन कसे करता येईल? ॥ ८० (क) ॥

**एक एक ब्रह्मांड महुँ रहउँ बरस सत एक।**
**एहि बिधि देखत फिरउँ मैं अंड कटाह अनेक॥ ८० ( ख )॥**

मी एकेका ब्रह्मांडामध्ये शंभर शंभर वर्षे राहिलो. अशा प्रकारे अनेक ब्रह्मांडे पाहात फिरलो. ॥ ८० (ख) ॥

**लोक लोक प्रति भिन्न बिधाता। भिन्न बिष्नु सिव मनु दिसित्राता॥**
**नर गंधर्ब भूत बेताला। किंनर निसिचर पसु खग ब्याला॥**

प्रत्येक लोकात भिन्न भिन्न ब्रह्मदेव, भिन्न भिन्न विष्णू, शिव, मनू, दिक्पाल, माणसे, गंधर्व, किन्नर, भूत, वेताळ, किन्नर, राक्षस, पशू, पक्षी, सर्प, ॥ १ ॥

**देव दनुज गन नाना जाती। सकल जीव तहँ आनहि भाँती॥**
**महि सरि सागर सर गिरि नाना। सब प्रपंच तहँ आनइ आना॥**

आणि नाना जातीचे देव आणि दैत्यगण होते. सर्व जीव तेथे वेगवेगळ्याच प्रकारचे होते. अनेक पृथ्वी, नद्या, समुद्र, तलाव, पर्वत आणि सर्व सृष्टी तेथे वेगळ्याच प्रकारची होती. ॥ २ ॥

**अंडकोस प्रति प्रति निज रूपा। देखेउँ जिनस अनेक अनूपा॥**
**अवधपुरी प्रति भुवन निनारी। सरजू भिन्न भिन्न नर नारी॥**

प्रत्येक ब्रह्मांडात मी स्वत:चे रूप पाहिले आणि अनेक अनुपम वस्तू पाहिल्या. प्रत्येक भुवनात निराळीच अयोध्यापुरी, वेगळीच शरयू आणि भिन्न प्रकारचे नर-नारी होते॥ ३ ॥

**दसरथ कौसल्या सुनु ताता। बिबिध रूप भरतादिक भ्राता॥**
**प्रति ब्रह्मांड राम अवतारा। देखउँ बालबिनोद अपारा॥**

हे ताता, दशरथ, कौसल्या आणि भरतादी बंधू वेगवेगळ्या रूपांचे होते. मी प्रत्येक ब्रह्मांडामध्ये रामावतार आणि त्यांची अपार बाललीला पाहात फिरलो. ॥ ४ ॥

दो०—**भिन्न भिन्न मैं दीख सबु अति बिचित्र हरिजान।**
**अगनित भुवन फिरेउँ प्रभु राम न देखेउँ आन॥ ८१ ( क )॥**

हे हरिवाहना, मी सर्व काही भिन्न भिन्न व अत्यंत विचित्र पाहिले. मी अगणित ब्रह्मांडांतून फिरलो, परंतु प्रभू श्रीरामचंद्रांना मात्र वेगळ्या रूपात पाहिले नाही. ॥ ८१ (क) ॥

**सोइ सिसुपन सोइ सोभा सोइ कृपाल रघुबीर।**
**भुवन भुवन देखत फिरउँ प्रेरित मोह समीर॥ ८१ ( ख )॥**

सर्वत्र तेच शिशुपण, तीच शोभा आणि कृपाळू श्रीरघुवीर. अशाप्रकारे मोहरूपी वायूमुळे मी भुवना-भुवनातून हे सर्व पाहात फिरत होतो. ॥ ८१ (ख) ॥

**भ्रमत मोहि ब्रह्मांड अनेका। बीते मनहुँ कल्प सत एका॥**
**फिरत फिरत निज आश्रम आयउँ। तहँ पुनि रहि कछु काल गवाँयउँ॥**

अनेक ब्रह्मांडांतून भटकत मला शंभर कल्प झाले. फिरत-फिरत मी आपल्या आश्रमात आलो आणि तेथे काही काळ घालविला. ॥ १ ॥

**निज प्रभु जन्म अवध सुनि पायउँ । निर्भर प्रेम हरषि उठि धायउँ ॥**
**देखउँ जन्म महोत्सव जाई । जेहि बिधि प्रथम कहा मैं गाई ॥**

नंतर जेव्हा मला समजले की, आपल्या प्रभूंनी अयोध्येमध्ये जन्म घेतला आहे, तेव्हा मी मोठ्या प्रेमाने व आनंदाने तिकडे धाव घेतली. जाऊन मी तो जन्ममहोत्सव पाहिला. त्याचे वर्णन मी पूर्वी सांगितले. ॥ २ ॥

**राम उदर देखेउँ जग नाना । देखत बनइ न जाइ बखाना ॥**
**तहँ पुनि देखेउँ राम सुजाना । माया पति कृपाल भगवाना ॥**

श्रीरामचंद्रांच्या पोटात मी पुष्कळ विश्वे पाहिली. ती पाहातच राहावी, असे वाटे. त्यांचे वर्णन करता येत नाही. तेथेही मी सर्वज्ञ, मायेचे स्वामी, कृपाळू अशा भगवान श्रीरामांना पाहिले. ॥ ३ ॥

**करउँ बिचार बहोरि बहोरी । मोह कलिल ब्यापित मति मोरी ॥**
**उभय घरी महँ मैं सब देखा । भयउँ भ्रमित मन मोह बिसेषा ॥**

मी वारंवार विचार करीत होतो. माझी बुद्धी मोहरूपी चिखलाने बरबटली होती. हे सर्व मी दोनच घटकांमध्ये पाहिले. मनात विशेष मोह उत्पन्न झाल्यामुळे मी थकून गेलो. ॥ ४ ॥

दो०—**देखि कृपाल बिकल मोहि बिहँसे तब रघुबीर।**
**बिहँसतहीं मुख बाहेर आयउँ सुनु मतिधीर ॥ ८२ ( क ) ॥**

मी व्याकूळ झाल्याचे पाहून कृपाळू श्रीरघुवीर हसले. हे धीरबुद्धीच्या गरुडा, ते हसताच मी त्यांच्या तोंडातून बाहेर आलो. ॥ ८२ (क) ॥

**सोइ लरिकाई मो सन करन लगे पुनि राम।**
**कोटि भाँति समुझावउँ मनु न लहइ बिश्राम ॥ ८२ ( ख ) ॥**

श्रीरामचंद्र माझ्याबरोबर पुन्हा बालिशपणा करू लागले. मी असंख्य प्रकारे मनाची समजूत घालत होतो, परंतु चैन पडत नव्हते. ॥ ८२ (ख) ॥

**देखि चरित यह सो प्रभुताई । समुझत देह दसा बिसराई ॥**
**धरनि परेउँ मुख आव न बाता । त्राहि त्राहि आरत जन त्राता ॥**

ते बालचरित्र पाहून आणि प्रभूंच्या पोटामध्ये पाहिलेल्या त्यांच्या महतीचे स्मरण झाल्यावर माझे देहभान हरपले. आणि 'हे आर्तजनांचे रक्षक, रक्षण करा, रक्षण करा.' असे म्हणत मी भूमीवर पडलो. तोंडातून शब्द फुटत नव्हता. ॥ १ ॥

**प्रेमाकुल प्रभु मोहि बिलोकी । निज माया प्रभुता तब रोकी ॥**
**कर सरोज प्रभु मम सिर धरेऊ । दीनदयाल सकल दुख हरेऊ ॥**

त्यानंतर प्रभूंनी मला प्रेमविव्हळ झाल्याचे पाहून आपल्या मायेचा प्रभाव थांबविला. प्रभूंनी आपले कर-कमल माझ्या मस्तकावर ठेवले. दीनदयाळू प्रभूंनी माझे संपूर्ण दु:ख हरण केले. ॥ २ ॥

**कीन्ह राम मोहि बिगत बिमोहा । सेवक सुखद कृपा संदोहा ॥**
**प्रभुता प्रथम बिचारि बिचारी । मन महँ होइ हरष अति भारी ॥**

सेवकांना सुख देणारे, कृपेचे समूह असलेल्या श्रीरामांनी माझा मोह पूर्णपणे घालविला. त्यांची पूर्वीची ती प्रभुता आठवून माझ्या मनाला मोठा हर्ष झाला. ॥ ३ ॥

**भगत बछलता प्रभु कै देखी । उपजी मम उर प्रीति बिसेषी ॥**
**सजल नयन पुलकित कर जोरी । कीन्हिउँ बहु बिधि बिनय बहोरी ॥**

प्रभूंची भक्त-वत्सलता पाहून माझ्या मनात फार प्रेम निर्माण झाले. मग मी आनंदाने नेत्रांमध्ये पाणी आणून, पुलकित होऊन व हात जोडून त्यांना अनेक प्रकारे प्रार्थना केली. ॥ ४ ॥

दो०—**सुनि सप्रेम मम बानी देखि दीन निज दास।**
**बचन सुखद गंभीर मृदु बोले रमानिवास ॥ ८३ ( क ) ॥**

माझे प्रेमपूर्ण बोलणे ऐकून व आपला हा दास दीन झाल्याचे पाहून रमानिवास श्रीराम सुखदायक, गंभीर व कोमल वाणीने म्हणाले. ॥ ८३ (क) ॥

**काकभसुंडि मागु बर अति प्रसन्न मोहि जानि।**
**अनिमादिक सिधि अपर रिधि मोच्छ सकल सुख खानि ॥ ८३ ( ख ) ॥**

‘हे काकभुशुंडी, मी तुझ्यावर अत्यंत प्रसन्न झालो आहे, असे समजून तू वर माग. अणिमादी अष्ट सिद्धी, दुसऱ्या ऋद्धी आणि संपूर्ण सुखांची खाण असलेला मोक्ष, ॥ ८३ (ख) ॥

**ग्यान बिबेक बिरति बिग्याना । मुनि दुर्लभ गुन जे जग नाना ॥**
**आजु देउँ सब संसय नाहीं । मागु जो तोहि भाव मन माहीं ॥**

ज्ञान, विवेक, वैराग्य, तत्त्वज्ञान आणि जगात मुनींनाही दुर्लभ असलेले अनेक गुण, हे सर्व मी आज तुला देईन, यात शंका नाही. जे तुझ्या मनाला आवडेल ते माग.’ ॥ १ ॥

**सुनि प्रभु बचन अधिक अनुरागेउँ । मन अनुमान करन तब लागेउँ ॥**
**प्रभु कह देन सकल सुख सही । भगति आपनी देन न कही ॥**

प्रभूंचे वचन ऐकून मला प्रेमाचे अतिशय भरते आले. तेव्हा मी मनात विचार करू लागलो की, प्रभूंनी सर्व सुखे मला देतो, असे सांगितले, ही गोष्ट खरी. परंतु आपली भक्ती देण्याची गोष्ट काढली नाही. ॥ २ ॥

**भगति हीन गुन सब सुख ऐसे । लवन बिना बहु बिंजन जैसे ॥**
**भजन हीन सुख कवने काजा । अस बिचारि बोलेउँ खगराजा ॥**

ज्याप्रमाणे मिठाविना अनेक प्रकारचे भोजनपदार्थ बेचव असतात. तसे भक्तिरहित सर्व गुण आणि सर्व सुखे फिकी होत. भजनाविना सुख काय कामाचे? हे पक्षिराज, असा विचार करून मी म्हणालो, ॥ ३ ॥

**जौं प्रभु होइ प्रसन्न बर देहू। मो पर करहु कृपा अरु नेहू॥**
**मन भावत बर मागउँ स्वामी। तुम्ह उदार उर अंतरजामी॥**

'हे प्रभो, जर तुम्ही प्रसन्न होऊन मला वर देत आहात आणि माझ्यावर कृपा व स्नेह करता, तर हे स्वामी, मी आपला मनपसंत वर मागतो. तुम्ही उदार आहात आणि मनातील जाणणारे आहात. ॥ ४ ॥

**दो०—अबिरल भगति बिसुद्ध तव श्रुति पुरान जो गाव।**
**जेहि खोजत जोगीस मुनि प्रभु प्रसाद कोउ पाव॥ ८४ ( क )॥**

तुमची जी प्रगाढ व विशुद्ध भक्ती श्रुती व पुराणे गातात, योगीश्वर, मुनी जी शोधत असतात आणि प्रभूंच्या कृपेने कोणी विरळाच जी प्राप्त करून घेतो, ॥ ८४ (क) ॥

**भगत कल्पतरु प्रनत हित कृपा सिंधु सुख धाम।**
**सोइ निज भगति मोहि प्रभु देहु दया करि राम॥ ८४ ( ख )॥**

हे भक्तांना मनोवांछित फल देणारे कल्पवृक्ष, हे शरणागताचे हितकारक, हे कृपासागर, हे सुखधाम श्रीराम, दया करून मला आपली तीच भक्ती द्या.' ॥ ८४ (ख) ॥

**एवमस्तु कहि रघुकुलनायक। बोले बचन परम सुखदायक॥**
**सुनु बायस तैं सहज सयाना। काहे न मागसि अस बरदाना॥**

'तथास्तु' असे म्हणून रघुवंशाचे स्वामी व परम सुख देणारे प्रभू म्हणाले, 'हे कावळ्या, तू स्वभावतःच बुद्धिमान आहेस. मग असे वरदान का बरे मागणार नाहीस ?' ॥ १ ॥

**सब सुख खानि भगति तैं मागी। नहिं जग कोउ तोहि सम बड़भागी॥**
**जो मुनि कोटि जतन नहिं लहहीं। जे जप जोग अनल तन दहहीं॥**

तू सर्व गुणांची खाण असलेली भक्ती मागितलीस. जगामध्ये तुझ्यासारखा भाग्यशाली नाही. जे मुनी तप, योगाग्नीने आपले शरीर झिजवतात, त्यांनाही कोट्यवधी प्रयत्न करूनही जी भक्ती मिळत नाही, ॥ २ ॥

**रीझेउँ देखि तोरि चतुराई। मागेहु भगति मोहि अति भाई॥**
**सुनु बिहंग प्रसाद अब मोरें। सब सुभ गुन बसिहहिं उर तोरें॥**

तीच भक्ती तू मागितलीस. तुझ्या चातुर्यावर मी प्रसन्न झालो. ही तुझी मखलाशी मला फारच आवडली. हे पक्ष्या, ऐकून घे. माझ्या कृपेमुळे आता सर्व शुभ गुण तुझ्या हृदयात निवास करतील. ॥ ३ ॥

**भगति ग्यान बिग्यान बिरागा। जोग चरित्र रहस्य बिभागा॥**
**जानब तैं सबही कर भेदा। मम प्रसाद नहिं साधन खेदा॥**

भक्ती, ज्ञान, विज्ञान, वैराग्य, योग, माझ्या लीला आणि त्यांचे रहस्य तसेच त्यांचे विभाग– या सर्वांचे रहस्य माझ्या कृपेने तू जाणशील. तुला साधनाचे कष्ट होणार नाहीत.॥ ४॥

दो०—**माया संभव भ्रम सब अब न ब्यापिहहिं तोहि।**
**जानेसु ब्रह्म अनादि अज अगुन गुनाकर मोहि॥ ८५ ( क )॥**

मायेमुळे उत्पन्न झालेले सर्व भ्रम आता तुला बाधणार नाहीत. मी अनादी, अजन्मा, प्रकृतीच्या गुणांनी रहित आणि गुणातीत दिव्य गुणांची खाण आहे, असे जाण.॥ ८५ (क)॥

**मोहि भगत प्रिय संतत अस बिचारि सुनु काग।**
**कायँ बचन मन मम पद करेसु अचल अनुराग॥ ८५ ( ख )॥**

हे काकभुशुंडी, ऐक. मला भक्त हे निरंतर प्रिय आहेत. असा विचार करून कायावाचामनाने माझ्या चरणी अढळ प्रेम बाळग.॥ ८५ (ख)॥

**अब सुनु परम बिमल मम बानी। सत्य सुगम निगमादि बखानी॥**
**निज सिद्धांत सुनावउँ तोही। सुनु मन धरु सब तजि भजु मोही॥**

आता माझी सत्य, सुगम आणि वेदादींनी वर्णन केलेली परम निर्मळ वाणी ऐक. मी तुला 'निज सिद्धांत' सांगतो. तो ऐकून घेऊन मनात धारण कर आणि सर्व काही सोडून देऊन माझे भजन कर.॥ १॥

**मम माया संभव संसारा। जीव चराचर बिबिधि प्रकारा॥**
**सब मम प्रिय सब मम उपजाए। सब ते अधिक मनुज मोहि भाए॥**

हा संपूर्ण संसार माझ्या मायेपासून उत्पन्न झाला आहे. यामध्ये अनेक प्रकारचे चराचर जीव आहेत. ते सर्व मला प्रिय आहेत. कारण ते सर्व मीच उत्पन्न केले आहेत. परंतु मनुष्य मला सर्वांत जास्त आवडतात.॥ २॥

**तिन्ह महँ द्विज द्विज महँ श्रुतिधारी। तिन्ह महुँ निगम धरम अनुसारी॥**
**तिन्ह महँ प्रिय बिरक्त पुनि ग्यानी। ग्यानिहु ते अति प्रिय बिग्यानी॥**

त्या मनुष्यांपैकी द्विज, द्विजांमध्येही वेद कंठस्थ करणारे, त्यातही वेदोक्त धर्माप्रमाणे चालणारे आणि विरक्त द्विज मला प्रिय आहेत. या वैराग्यवान द्विजांमध्येही ज्ञानी आणि ज्ञान्यांहूनही अत्यंत प्रिय विज्ञानी आहेत.॥ ३॥

**तिन्ह ते पुनि मोहि प्रिय निज दासा। जेहि गति मोरि न दूसरि आसा॥**
**पुनि पुनि सत्य कहउँ तोहि पाहीं। मोहि सेवक सम प्रिय कोउ नाहीं॥**

विज्ञानींमध्येही माझा दास मला प्रिय आहे कारण त्याला माझाच आश्रय आहे. दुसरी कोणतीही आशा त्याला नसते. मी तुला वारंवार सत्य असलेला 'निज सिद्धांत' सांगतो की, मला माझ्या दासासारखा कोणीही प्रिय नाही. ॥ ४ ॥

**भगति हीन बिरंचि किन होई। सब जीवहु सम प्रिय मोहि सोई॥**
**भगतिवंत अति नीचउ प्रानी। मोहि प्रानप्रिय असि मम बानी॥**

भक्तिहीन ब्रह्मदेव का असेना, तो मला सर्व जीवांप्रमाणेच प्रिय आहे. परंतु भक्तिमान अत्यंत नीच असलेला प्राणी मला प्राणांसमान प्रिय आहे. ही माझी घोषणा आहे. ॥ ५ ॥

दो०—**सुचि सुसील सेवक सुमति प्रिय कहु काहि न लाग।**
**श्रुति पुरान कह नीति असि सावधान सुनु काग॥ ८६॥**

पवित्र, सुशील आणि चांगल्या बुद्धीचा सेवक कुणाला आवडत नाही, सांग बरे? वेद आणि पुराणे हाच नियम सांगतात. हे भुशुंडी, लक्ष देऊन ऐक. ॥ ८६ ॥

**एक पिता के बिपुल कुमारा। होहिं पृथक गुन सील अचारा॥**
**कोउ पंडित कोउ तापस ग्याता। कोउ धनवंत सूर कोउ दाता॥**

एका पित्याचे पुत्र वेगवेगळ्या गुणांचे, स्वभावाचे, आणि वर्तनाचे असतात. कुणी पंडित असतो, कोणी तपस्वी, कोणी ज्ञानी, कोणी धनवान, कोणी शूरवीर, आणि कोणी दानी, ॥ १ ॥

**कोउ सर्बग्य धर्मरत कोई। सब पर पितहि प्रीति सम होई॥**
**कोउ पितु भगत बचन मन कर्मा। सपनेहुँ जान न दूसर धर्मा॥**

कोणी सर्वज्ञ तर कोणी धर्मपरायण असतो. पित्याचे प्रेम या सर्वांवर सारखे असते. परंतु यांपैकी कोणी कायावाचामनाने, पित्याचाच भक्त असेल, त्याला पित्याशिवाय दुसरा विचार स्वप्नातही दिसत नसेल, ॥ २ ॥

**सो सुत प्रिय पितु प्रान समाना। जद्यपि सो सब भाँति अयाना॥**
**एहि बिधि जीव चराचर जेते। त्रिजग देव नर असुर समेते॥**

तो पुत्र पित्याला प्राणांसारखा प्रिय असतो, जरी सर्व प्रकारे तो अज्ञानी असला तरी. अशा प्रकारे तिर्यक् योनीतील पशु-पक्षी, देव, मनुष्य आणि असुरांसह जितके म्हणून चेतन व जड जीव आहेत, ॥ ३ ॥

**अखिल बिस्व यह मोर उपाया। सब पर मोहि बराबरि दाया॥**
**तिन्ह महँ जो परिहरि मद माया। भजै मोहि मन बच अरु काया॥**

या सर्वांनी भरलेले हे विश्व मीच उत्पन्न केले आहे, म्हणून सर्वांवर माझी समान दया आहे. परंतु यांपैकी जो मद व माया सोडून कायावाचामनाने मला भजतो, ॥ ४ ॥

दो०—**पुरुष नपुंसक नारि वा जीव चराचर कोइ।**
**सर्ब भाव भज कपट तजि मोहि परम प्रिय सोइ॥ ८७ ( क )॥**

तो पुरुष असो, नपुंसक असो वा स्त्री असो, अथवा चराचरातील कोणताही जीव असो, जो कोणी निष्कपटपणे सर्वभावे मला भजतो, तोच मला परम प्रिय आहे. ॥ ८७ (क) ॥

**सो०—सत्य कहउँ खग तोहि सुचि सेवक मम प्रान प्रिय।**
**अस बिचारि भजु मोहि परिहरि आस भरोस सब॥ ८७ ( ख )॥**

हे पक्ष्या, मी तुला सत्य आहे, ते सांगतो. अनन्य व निष्काम असा पवित्र सेवक मला प्राणांसमान प्रिय आहे, असा विचार करून सर्व आशा-आधार सोडून तू मलाच भज. ॥ ८७ (ख) ॥

**कबहूँ काल न ब्यापिहि तोही। सुमिरेसु भजेसु निरंतर मोही॥**
**प्रभु बचनामृत सुनि न अघाऊँ। तनु पुलकित मन अति हरषाऊँ॥**

तुझ्यावर काळाची सत्ता चालणार नाही. निरंतर माझे स्मरण व भजन करीत राहा.' प्रभूंचे वचनामृत ऐकून मी तृप्त होत नव्हतो. माझे शरीर पुलकित झाले होते आणि मनातून मी खूपच हर्षित झालो होतो. ॥ १ ॥

**सो सुख जानइ मन अरु काना। नहिं रसना पहिं जाइ बखाना॥**
**प्रभु सोभा सुख जानहिं नयना। कहि किमि सकहिं तिन्हहि नहिं बयना॥**

ते सुख मन व कान यांनाच समजत होते. जिभेने त्यांचे वर्णन करता येत नाही. प्रभूंच्या लावण्याचे सुख नेत्रच जाणतात, परंतु त्यांचे वर्णन ते कसे सांगणार? कारण नेत्रांना वाणी नाही. ॥ २ ॥

**बहु बिधि मोहि प्रबोधि सुख देई। लगे करन सिसु कौतुक तेई॥**
**सजल नयन कछु मुख करि रूखा। चितइ मातु लागी अति भूखा॥**

मला पुष्कळ प्रकारांनी व्यवस्थितपणे समजावून देऊन प्रभू पुन्हा मुलांबरोबर खेळ खेळू लागले. डोळ्यांत पाणी आणून आणि उतरलेल्या चेहऱ्याने आईकडे त्यांनी बघितले आणि आईला सुचवले की, आपल्याला फार भूक लागली आहे. ॥ ३ ॥

**देखि मातु आतुर उठि धाई। कहि मृदु बचन लिए उर लाई॥**
**गोद राखि कराव पय पाना। रघुपति चरित ललित कर गाना॥**

ते पाहून आई लगेच उठून धावली आणि शब्दांनी समजावत तिने श्रीरामांना हृदयाशी धरले. आणि ती त्यांना मांडीवर घेऊन दूध पाजू लागली. आणि श्रीरघुनाथांना त्यांच्याच लीला गाऊन दाखवू लागली. ॥ ४ ॥

**सो०—जेहि सुख लागि पुरारि असुभ बेष कृत सिव सुखद।**
**अवधपुरी नर नारि तेहि सुख महुँ संतत मगन॥ ८८ ( क )॥**

सर्वांना सुख देणाऱ्या कल्याणरूप त्रिपुरारी शिवांनी ज्या सुखासाठी विचित्र वेष धारण केला, त्या सुखामध्ये अयोध्येतील नर-नारी निरंतर निमग्न राहात. ॥ ८८ (क) ॥

**सोई सुख लवलेस जिन्ह बारक सपनेहुँ लहेउ।**
**ते नहिं गनहिं खगेस ब्रह्मसुखहि सज्जन सुमति॥ ८८ ( ख )॥**

त्या सुखाचा लवलेशसुद्धा ज्यांना एकदा स्वप्नातही प्राप्त झाला, हे पक्षिराज, ते सुंदर बुद्धीचे सज्जन पुरुष त्या सुखासमोर ब्रह्मसुखालाही तुच्छ समजतात. ॥ ८८(ख) ॥

**मैं पुनि अवध रहेउँ कछु काला। देखेउँ बालबिनोद रसाला॥**
**राम प्रसाद भगति बर पायउँ। प्रभु पद बंदि निजाश्रम आयउँ॥**

मी आणखी काही काळ अयोध्यापुरीत राहिलो आणि श्रीरामांच्या रसपूर्ण बाललीला पाहिल्या. श्रीरामांच्या कृपेने मला भक्तीचे वरदान लाभले. त्यानंतर प्रभूंच्या चरणांना वंदन करून मी आपल्या आश्रमात परत आलो. ॥ १ ॥

**तब ते मोहि न ब्यापी माया। जब ते रघुनायक अपनाया॥**
**यह सब गुप्त चरित मैं गावा। हरि मायाँ जिमि मोहि नचावा॥**

अशा प्रकारे जेव्हापासून श्रीरामांनी मला आपले मानले, तेव्हापासून मला मायेने कधीही सतावले नाही. श्रीरामांच्या मायेने मला कसे नाचविले, ते सर्व गुप्त चरित्र मी तुला सांगितले. ॥ २ ॥

**निज अनुभव अब कहउँ खगेसा। बिनु हरि भजन न जाहिं कलेसा॥**
**राम कृपा बिनु सुनु खगराई। जानि न जाइ राम प्रभुताई॥**

हे गरुडा, आता मी तुला आपला वैयक्तिक अनुभव सांगतो की, भगवंतांच्या भजनाविना क्लेश दूर होत नाहीत. तसेच श्रीरामांच्या कृपेविना श्रीरामांची महती जाणता येत नाही. ॥ ३ ॥

**जानें बिनु न होइ परतीती। बिनु परतीति होइ नहिं प्रीती॥**
**प्रीति बिना नहिं भगति दिढ़ाई। जिमि खगपति जल कै चिकनाई॥**

महती जाणल्याशिवाय त्यांच्याबद्दल विश्वास दृढ होत नाही, विश्वासाविना प्रेम उत्पन्न होत नाही. आणि ज्याप्रमाणे तेलाशिवाय केवळ पाण्याने मातीत ओलावा टिकत नाही, त्याप्रमाणे प्रेमाविना भक्ती दृढ होत नाही. ॥ ४ ॥

सो०—**बिनु गुर होइ कि ग्यान ग्यान कि होइ बिराग बिनु।**
**गावहिं बेद पुरान सुख कि लहिअ हरि भगति बिनु॥ ८९ ( क )॥**

गुरूविना कुठे ज्ञान होते काय? अथवा वैराग्याविना ज्ञान मिळू शकते काय? त्याचप्रमाणे वेद पुराणे विचारतात की, श्रीहरींच्या भक्तीविना सुख मिळू शकेल काय?॥ ८९ (क) ॥

**कोउ बिश्राम कि पाव तात सहज संतोष बिनु।**
**चलै कि जल बिनु नाव कोटि जतन पचि पचि मरिअ॥ ८९ ( ख )॥**

हे तात, स्वाभाविक संतोषाशिवाय कुणाला शांती मिळते काय? कोट्यवधी उपाय करून व जीव तोडून धडपड केली तरी कधी पाण्याविना नौका चालू शकते काय?॥ ८९ (ख)॥

**बिनु संतोष न काम नसाहीं। काम अछत सुख सपनेहुँ नाहीं॥**
**राम भजन बिनु मिटहिं कि कामा। थल बिहीन तरु कबहुँ कि जामा॥**

संतोषाविना कामनेचा नाश होत नाही, कामना असताना स्वप्नातही सुख मिळत नाही. आणि श्रीरामांच्या भजनाविना कामना कुठे नष्ट होतात काय? जमिनीविना झाड कुठे उगवू शकते काय?॥ १॥

**बिनु बिग्यान कि समता आवइ। कोउ अवकास कि नभ बिनु पावइ॥**
**श्रद्धा बिना धर्म नहिं होई। बिनु महि गंध कि पावइ कोई॥**

तत्त्वज्ञानाविना समभाव येऊ शकतो काय? आकाशाविना कुणाला पोकळी मिळू शकते काय? श्रद्धेविना धर्माचे आचरण होत नाही. पृथ्वीतत्त्वाशिवाय कुणाल गंध मिळू शकतो काय?॥ २॥

**बिनु तप तेज कि कर बिस्तारा। जल बिनु रस कि होइ संसारा॥**
**सील कि मिल बिनु बुध सेवकाई। जिमि बिनु तेज न रूप गोसाँई॥**

तपाविना तेज पसरू शकते काय? जलतत्त्वाविना जगात रस असू शकतो काय? पंडितजनांच्या सेवेविना सदाचार मिळू शकतो काय? हे गोस्वामी, तेजतत्त्वाविना रूप कधीच मिळत नाही.॥ ३॥

**निज सुख बिनु मन होइ कि थीरा। परस कि होइ बिहीन समीरा॥**
**कवनिउ सिद्धि कि बिनु बिस्वासा। बिनु हरि भजन न भव भय नासा॥**

आत्मानंदाविना मन स्थिर होऊ शकते काय? वायुतत्त्वाविना स्पर्श होऊ शकतो काय? विश्वासाविना कोणतीही सिद्धी येऊ शकते काय? अशाच प्रकारे श्रीहरींच्या भजनाविना जन्म-मृत्यूच्या भयाचा नाश होत नाही.॥ ४॥

दो०—**बिनु बिस्वास भगति नहिं तेहि बिनु द्रवहिं न रामु।**
**राम कृपा बिनु सपनेहुँ जीव न लह बिश्रामु॥ ९० (क)॥**

विश्वासाविना भक्ती येत नाही. भक्तीविना श्रीराम द्रवत नाहीत आणि श्रीरामांच्या कृपेविना जिवाला स्वप्नातही शांतता लाभत नाही.॥ ९० (क)॥

सो०—**अस बिचारि मतिधीर तजि कुतर्क संसय सकल।**
**भजहु राम रघुबीर करुनाकर सुंदर सुखद॥ ९० (ख)॥**

हे धीरबुद्धी! असा विचार करून संपूर्ण कुतर्क आणि संशय सोडून, करुणेची खाण व सुंदर सुख देणाऱ्या श्रीरामांचे भजन कर.॥ ९० (ख)॥

**निज मति सरिस नाथ मैं गाई। प्रभु प्रताप महिमा खगराई॥**
**कहेउँ न कछु करि जुगुति बिसेषी। यह सब मैं निज नयनन्हि देखी॥**

हे पक्षिराजा, हे नाथ, मी आपल्या बुद्धीनुसार प्रभूंचा प्रताप व महिमा यांचे गायन केले. मी यामध्ये कोणतीही गोष्ट अतिशयोक्तीने सांगितली नाही. सर्व आपल्या डोळ्यांनी पाहिले, ते सांगितले आहे. ॥ १ ॥

**महिमा नाम रूप गुन गाथा। सकल अमित अनंत रघुनाथा॥**
**निज निज मति मुनि हरि गुन गावहिं। निगम सेष सिव पार न पावहिं॥**

श्रीरघुनाथांचा महिमा, नाम, रूप आणि गुणांची कथा हे सर्व अपार आणि अनंत आहे. तसेच श्रीराम स्वतःही अनंत आहेत. मुनिगण आपापल्या बुद्धीप्रमाणे श्रीहरींचे गुण गातात. वेद, शेष आणि शिव यांना सुद्धा त्यांचा थांग लागत नाही. ॥ २ ॥

**तुम्हहि आदि खग मसक प्रजंता। नभ उड़ाहिं नहिं पावहिं अंता॥**
**तिमि रघुपति महिमा अवगाहा। तात कबहुँ कोउ पाव कि थाहा॥**

तुझ्यापासून लहान कीटकापर्यंत सर्व लहान-मोठे जीव आकाशात असतात, परंतु आकाशाचा थांग कोणालाही लागत नाही, त्याचप्रमाणे हे तात, श्रीरघुनाथांचा महिमा हा सुद्धा अथांग आहे. कधी कुणाला त्यांचा थांग लागू शकेल काय? ॥ ३ ॥

**रामु काम सत कोटि सुभग तन। दुर्गा कोटि अमित अरि मर्दन॥**
**सक्र कोटि सत सरिस बिलासा। नभ सत कोटि अमित अवकासा॥**

श्रीरामांचे स्वरूप हे अब्जावधी कामदेवांसमान सुंदर आहे. ते अनंत कोटी दुर्गादेवींच्या समान शत्रुनाशक आहेत. अब्जावधी इंद्रांसमान त्यांचे ऐश्वर्य आहे. अब्जावधी आकाशांसारखा त्यांच्यामध्ये अनंत अवकाश आहे. ॥ ४ ॥

दो०—**मरुत कोटि सत बिपुल बल रबि सत कोटि प्रकास।**
**ससि सत कोटि सुसीतल समन सकल भव त्रास॥ ९१ ( क )॥**

अब्जावधी वायूसमान त्यांच्यामध्ये बळ आहे. अब्जावधी सूर्यांसमान त्यांचा प्रकाश आहे. अब्जावधी चंद्रांसमान ते शीतल आहेत व संसारातील सर्व भयांचा नाश करणारे आहेत. ॥ ९१ (क) ॥

**काल कोटि सत सरिस अति दुस्तर दुर्ग दुरंत।**
**धूमकेतु सत कोटि सम दुराधरष भगवंत॥ ९१ ( ख )॥**

अब्जावधी कालांप्रमाणे ते अत्यंत दुस्तर, दुर्गम व दुरंत आहेत. ते भगवान अब्जावधी अग्नींप्रमाणे अत्यंत प्रबल आहेत. ॥ ९१ (ख) ॥

**प्रभु अगाध सत कोटि पताला। समन कोटि सत सरिस कराला॥**
**तीरथ अमित कोटि सम पावन। नाम अखिल अघ पूग नसावन॥**

अब्जावधी पाताळांसमान प्रभू हे अथांग आहेत. अब्जावधी यमराजांप्रमाणे भयानक आहेत. अनंत कोटी तीर्थांसमान ते पवित्र करणारे आहेत. त्यांचे नाम हे संपूर्ण पाप-समूहांचा नाश करणारे आहे. ॥ १ ॥

**हिमगिरि कोटि अचल रघुबीरा। सिंधु कोटि सत सम गंभीरा॥**
**कामधेनु सत कोटि समाना। सकल काम दायक भगवाना॥**

श्रीरघुवीर कोट्यवधी हिमालयांसमान अचल आहेत आणि अब्जावधी समुद्रांसमान खोल आहेत. भगवान हे अब्जावधी कामधेनूंसमान सर्व कामना पूर्ण करणारे आहेत. ॥ २ ॥

**सारद कोटि अमित चतुराई। बिधि सत कोटि सृष्टि निपुनाई॥**
**बिष्नु कोटि सम पालन कर्ता। रुद्र कोटि सत सम संहर्ता॥**

त्यांच्यामध्ये अनंत कोटी सरस्वतींच्या समान चातुर्य आहे. अब्जावधी ब्रह्मदेवांसमान त्यांच्यामध्ये सृष्टिरचनेचे कौशल्य आहे. ते कोट्यवधी विष्णूंसमान पालन करणारे आणि अब्जावधी रुद्रांसमान संहार करणारे आहेत. ॥ ३ ॥

**धनद कोटि सत सम धनवाना। माया कोटि प्रपंच निधाना॥**
**भार धरन सत कोटि अहीसा। निरवधि निरुपम प्रभु जगदीसा॥**

ते अब्जावधी कुबेरांसमान धनवान आणि कोट्यवधी मायांच्यासमान सृष्टींचे खजिने आहेत. भार उचलण्यामध्ये ते अब्जावधी शेषांसमान आहेत. फार काय सांगावे! जगदीश्वर प्रभू श्रीराम हे सर्व गोष्टींमध्ये सीमारहित व उपमारहित आहेत. ॥ ४ ॥

**छं०—निरुपम न उपमा आन राम समान रामु निगम कहै।**
**जिमि कोटि सत खद्योत सम रबि कहत अति लघुता लहै॥**
**एहि भाँति निज निज मति बिलास मुनीस हरिहि बखानहीं।**
**प्रभु भाव गाहक अति कृपाल सप्रेम सुनि सुख मानहीं॥**

श्रीराम उपमारहित आहेत. त्यांना दुसरी कोणतीही उपमा नाही. श्रीरामांसमान श्रीरामच आहेत, असे वेद म्हणतात. ज्याप्रमाणे अब्जावधी काजव्यांसमान असे म्हटल्यास सूर्याची प्रशंसा होत नाही. उलट त्याला अत्यंत क्षुद्रता प्राप्त होते, त्याची निंदा होते. त्याचप्रमाणे आपापल्या बुद्धीच्या विकासाप्रमाणे मुनीश्वर लोक श्रीहरींचे वर्णन करतात. परंतु ते भक्तांचा भावमात्र ग्रहण करणारे आणि अत्यंत कृपाळू आहेत. भक्त त्यांचे वर्णन प्रेमाने ऐकून त्यात सुख मानतात.

**दो०—रामु अमित गुन सागर थाह कि पावइ कोइ।**
**संतन्ह सन जस किछु सुनेउँ तुम्हहि सुनायउँ सोइ॥ ९२ ( क )॥**

श्रीराम हे अपार गुणांचे समुद्र आहेत. त्यांचा थांग कुणाला लागू शकेल काय? संतांकडून मी जे काही ऐकले होते, तेच मी तुला सांगितले. ॥ ९२ (क) ॥

**सो०—भाव बस्य भगवान सुख निधान करुना भवन।**
**तजि ममता मद मान भजिअ सदा सीतारवन॥ ९२ ( ख )॥**

सुखाचे भांडार, करुणाधाम भगवान हे प्रेमभावाच्या अधीन असतात. म्हणून ममता, मद आणि मान सोडून नेहमी श्रीजानकीनाथांचे भजन केले पाहिजे.'॥ ९२(ख)॥

**सुनि भुसुंडि के बचन सुहाए। हरषित खगपति पंख फुलाए॥**
**नयन नीर मन अति हरषाना। श्रीरघुपति प्रताप उर आना॥**

भुशुंडींचे सुंदर बोलणे ऐकून पक्षिराजाने आनंदाने आपले पंख फुगवले. त्याच्या नेत्रांतून प्रेमाश्रू वाहू लागले आणि मन अत्यंत आनंदित झाले. त्याने श्रीरघुनाथांचा प्रताप हृदयामध्ये धारण केला.॥ १॥

**पाछिल मोह समुझि पछिताना। ब्रह्म अनादि मनुज करि माना॥**
**पुनि पुनि काग चरन सिरु नावा। जानि राम सम प्रेम बढ़ावा॥**

आपला पूर्वीचा मोह आठवल्यामुळे त्याला पश्चात्ताप वाटू लागला की, मी अनादी ब्रह्मास मनुष्य समजलो. गरुडाने काकभुशुंडींच्या चरणांवर वारंवार मस्तक ठेवले आणि त्यांना श्रीरामांसमान मानून त्यांच्याविषयी त्याला खूप प्रेम वाटू लागले.॥ २॥

**गुर बिनु भव निधि तरइ न कोई। जौं बिरंचि संकर सम होई॥**
**संसय सर्प ग्रसेउ मोहि ताता। दुखद लहरि कुतर्क बहु ब्राता॥**

गुरूविना कोणीही भवसागर तरू शकत नाही. मग तो ब्रह्मदेव किंवा शिवांसमान का असेना. गरुड म्हणाला, 'हे तात! मला संदेहरूपी सापाचा दंश झाला होता. पुष्कळशा कुतर्करूपी दुःखाचे वेग येत होते.॥ ३॥

**तव सरूप गारुड़ि रघुनायक। मोहि जिआयउ जन सुखदायक॥**
**तव प्रसाद मम मोह नसाना। राम रहस्य अनूपम जाना॥**

तुमच्या स्वरूपरूपी गारुड्याकडून भक्तांना सुख देणाऱ्या श्रीरामचंद्रांनी मला जिवंत केले. तुमच्या कृपेमुळे माझा मोह नष्ट झाला आणि श्रीरघुनाथांचे अनुपम रहस्य मला समजले.'॥ ४॥

**दो०—ताहि प्रसंसि बिबिधि बिधि सीस नाइ कर जोरि।**
**बचन बिनीत सप्रेम मृदु बोलेउ गरुड़ बहोरि॥ ९३ ( क )॥**

काकभुशुंडींची अनेक प्रकारे प्रशंसा करून, मस्तक नमवून हात जोडून गरुड प्रेमपूर्वक विनम्र आणि कोमल शब्दांत म्हणाला,॥ ९३ (क)॥

**प्रभु अपने अबिबेक ते बूझउँ स्वामी तोहि।**
**कृपासिंधु सादर कहहु जानि दास निज मोहि॥ ९३ ( ख )॥**

'हे प्रभो, हे स्वामी, मी माझ्या अविवेकाचे कारण तुम्हांला विचारतो. हे कृपासमुद्र, मला आपला स्वत:चा सेवक समजून विचारपूर्वक माझ्या प्रश्नाचे उत्तर सांगा.॥ ९३(ख)॥

**तुम्ह सर्बग्य तग्य तम पारा। सुमति सुसील सरल आचारा॥**
**ग्यान बिरति बिग्यान निवासा। रघुनायक के तुम्ह प्रिय दासा॥**

तुम्ही सर्व काही जाणणारे आहात. तत्त्वाचे ज्ञाते आहात. मायेच्या अंधकारा-पलीकडचे आहात. उत्तम बुद्धीने युक्त आहात. सुशील सरळ आचरणाचे, ज्ञान, वैराग्य आणि विज्ञानाचे धाम आणि श्रीरघुनाथांचे प्रिय सेवक आहात.॥ १॥

**कारन कवन देह यह पाई। तात सकल मोहि कहहु बुझाई॥**
**राम चरित सर सुंदर स्वामी। पायहु कहाँ कहहु नभगामी॥**

तुम्हांला हे काकशरीर कसे मिळाले? ते तात, मला हे सर्व समजावून सांगा. हे स्वामी, हे आकाशगामी, हे सुंदर रामचरितरूपी सरोवर तुम्हांला कुठे मिळाले, ते सांगा.॥ २॥

**नाथ सुना मैं अस सिव पाहीं। महा प्रलयहुँ नास तव नाहीं॥**
**मुधा बचन नहिं ईस्वर कहई। सोउ मोरें मन संसय अहई॥**

हे नाथ, मी शिवांच्याकडून ऐकले आहे की, महाप्रलयातही तुमचा नाश होत नाही आणि शिव हे कधी मिथ्या बोलत नाहीत. माझ्या मनात तोही संशय आहे.॥ ३॥

**अग जग जीव नाग नर देवा। नाथ सकल जगु काल कलेवा॥**
**अंड कटाह अमित लय कारी। कालु सदा दुरतिक्रम भारी॥**

कारण हे नाथ, नाग, मनुष्य, देव इत्यादी चराचर जीव आणि सर्व जग हे कालाचा ग्रास आहे. असंख्य ब्रह्मांडाचा नाश करणारा काल हा नेहमीच अनिवार्य आहे.॥ ४॥

सो०—**तुम्हहि न ब्यापत काल अति कराल कारन कवन।**
**मोहि सो कहहु कृपाल ग्यान प्रभाव कि जोग बल॥ ९४ ( क )॥**

असा तो अत्यंत भयंकर काल तुमच्यावर प्रभाव टाकू शकत नाही. याचे कारण काय? हे कृपाळू, मला सांगा, हा ज्ञानाचा प्रभाव आहे की, योग-बलाचा?॥ ९४(क)॥

दो०—**प्रभु तव आश्रम आएँ मोर मोह भ्रम भाग।**
**कारन कवन सो नाथ सब कहहु सहित अनुराग॥ ९४ ( ख )॥**

हे प्रभो, तुमच्या आश्रमात येताच माझा मोह व भ्रम पळून गेला. याचे कारण काय? हे नाथ, हे सर्व मला प्रेमाने सांगा.'॥ ९४(ख)॥

**गरुड़ गिरा सुनि हरषेउ कागा। बोलेउ उमा परम अनुरागा॥**
**धन्य धन्य तव मति उरगारी। प्रस्न तुम्हारि मोहि अति प्यारी॥**

शिव म्हणतात, ‘हे उमे, गरुडाचे हे प्रश्न ऐकून काकभुशुंडी आनंदित झाले आणि मोठ्या प्रेमाने म्हणाले, ‘हे गरुडा! तुझी बुद्धी धन्य आहे, धन्य आहे. तुझे प्रश्न मला आवडले. ॥ १ ॥

**सुनि तव प्रस्न सप्रेम सुहाई। बहुत जनम कै सुधि मोहि आई॥**
**सब निज कथा कहउँ मैं गाई। तात सुनहु सादर मन लाई॥**

प्रेमाने विचारलेले तुझे सुंदर प्रश्न ऐकून मला आपल्या पुष्कळ जन्मांची आठवण आली. मी आपली कथा विस्ताराने सांगतो. हे गरुडा, ती आदराने लक्ष देऊन ऐक. ॥ २ ॥

**जप तप मख सम दम ब्रत दाना। बिरति बिबेक जोग बिग्याना॥**
**सब कर फल रघुपति पद प्रेमा। तेहि बिनु कोउ न पावइ छेमा॥**

अनेक जप, तप, यज्ञ, शम, दम, व्रत, दान, वैराग्य, विवेक, योग, विज्ञान इत्यादी सर्वांचे फळ श्रीरघुनाथांच्या चरणी प्रेम असण्यातच आहे. त्याशिवाय कुणाचे कल्याण होत नाही. ॥ ३ ॥

**एहिं तन राम भगति मैं पाई। ताते मोहि ममता अधिकाई॥**
**जेहि तें कछु निज स्वारथ होई। तेहि पर ममता कर सब कोई॥**

मी याच शरीराने श्रीरामांची भक्ती प्राप्त केली. त्यामुळे या शरीरावर माझे अधिक प्रेम आहे. ज्याच्यामुळे आपला काही स्वार्थ साधतो, त्याच्यावर सर्वजण प्रेम करतात. ॥ ४ ॥

**सो०—पन्नगारि असि नीति श्रुति संमत सज्जन कहहिं।**
**अति नीचहु सन प्रीति करिअ जानि निज परम हित॥ ९५ ( क )॥**

हे गरुडा, वेदांनी मान्य केलेली नीती ही अशी आहे आणि सज्जनसुद्धा सांगतात की, आपले परम हित जाणून अत्यंत नीच असलेल्यावरही प्रेम केले पाहिजे. ॥ ९५ (क) ॥

**पाट कीट तें होइ तेहि तें पाटंबर रुचिर।**
**कृमि पालइ सबु कोइ परम अपावन प्रान सम ॥ ९५ ( ख )॥**

किड्यापासून रेशीम तयार होते. त्यापासून सुंदर वस्त्रे बनतात, म्हणून त्या अत्यंत अपवित्र किड्यालाही सर्वजण मोठ्या प्रेमाने पाळतात. ॥ ९५ (ख) ॥

**स्वारथ साँच जीव कहुँ एहा। मन क्रम बचन राम पद नेहा॥**
**सोइ पावन सोइ सुभग सरीरा। जो तनु पाइ भजिअ रघुबीरा॥**

कायावाचामनाने श्रीरामांच्या चरणी प्रेम व्हावे, हाच जिवाचा खरा स्वार्थ आहे. जे शरीर लाभल्यावर श्रीरघुनाथांचे भजन करता येईल, तेच शरीर पवित्र व सुंदर होय. ॥ १ ॥

**राम बिमुख लहि बिधि सम देही। कबि कोबिद न प्रसंसहिं तेही॥**
**राम भगति एहिं तन उर जामी। ताते मोहि परम प्रिय स्वामी॥**

जो श्रीरामांशी विन्मुख आहे, त्याला जरी ब्रह्मदेवांसमान शरीर मिळाले, तरीही कवी व पंडित त्याची प्रशंसा करीत नाहीत. या शरीरानेच माझ्या मनात रामभक्ती उत्पन्न झाली, म्हणूनच हे स्वामी, हे शरीर मला परमप्रिय आहे. ॥ २ ॥

**तजउँ न तन निज इच्छा मरना। तन बिनु बेद भजन नहिं बरना॥**
**प्रथम मोहँ मोहि बहुत बिगोवा। राम बिमुख सुख कबहुँ न सोवा॥**

माझे मरण माझ्या स्वतःच्या इच्छेवर आहे, परंतु तरीही मी हे शरीर सोडत नाही, कारण वेदांनी सांगितले आहे की, शरीराविना भजन होऊ शकत नाही. पूर्वी मोहाने माझी मोठी दुर्दशा केली होती. श्रीरामांना विन्मुख होऊन मी कधी सुखाने झोपू शकलो नाही. ॥ ३ ॥

**नाना जनम कर्म पुनि नाना। किए जोग जप तप मख दाना॥**
**कवन जोनि जनमेउँ जहँ नाहीं। मैं खगेस भ्रमि भ्रमि जग माहीं॥**

अनेक जन्मांमध्ये मी अनेक प्रकारचे योग, जप, तप, यज्ञ आणि दान इत्यादी कर्मे केली. हे गरुडा, जगात अशी कोणती योनी आहे की, जिच्यामध्ये मी वारंवार भटकत जन्म घेतला नाही? ॥ ४ ॥

**देखेउँ करि सब करम गोसाईं। सुखी न भयउँ अबहिं की नाईं॥**
**सुधि मोहि नाथ जन्म बहु केरी। सिव प्रसाद मति मोहँ न घेरी॥**

हे गोस्वामी, मी सर्व कर्मे करून पाहिली, परंतु आता या जन्मासारखा मी कधी सुखी झालो नाही. हे नाथ, मला पुष्कळ जन्मांची आठवण आहे, कारण श्रीशिवांच्या कृपेमुळे माझ्या बुद्धीला मोहाने घेरले नाही. ॥ ५ ॥

दो०—**प्रथम जन्म के चरित अब कहउँ सुनहु बिहगेस।**
**सुनि प्रभु पद रति उपजइ जातें मिटहिं कलेस॥ ९६ ( क )॥**

हे पक्षिराज, आता मी आपल्या पहिल्या जन्माचे चरित्र सांगतो. ते ऐकल्यावर प्रभूंच्या चरणी प्रेम उत्पन्न होते आणि त्यामुळे सर्व क्लेश नष्ट होतात. ॥ ९६ (क) ॥

**पूरुब कल्प एक प्रभु जुग कलिजुग मल मूल।**
**नर अरु नारि अधर्मरत सकल निगम प्रतिकूल॥ ९६ ( ख )॥**

हे प्रभो, पूर्वीच्या एका कल्पामध्ये पापांचे मूळ असलेले कलियुग होते. त्यावेळी पुरुष व स्त्रिया हे सर्व अधर्मपरायण व वेदविरोधी होते. ॥ ९६ (ख) ॥

**तेहिं कलिजुग कोसलपुर जाई। जन्मत भयउँ सूद्र तनु पाई॥**
**सिव सेवक मन क्रम अरु बानी। आन देव निंदक अभिमानी॥**

त्या कलियुगात मी अयोध्यापुरीमध्ये जाऊन शूद्राचे शरीर प्राप्त केले. मी कायावाचामनाने शिवांचा सेवक होतो परंतु दुसऱ्या देवांची निंदा करणारा घमेंडी होतो. ॥ १ ॥

**धन मद मत्त परम बाचाला। उग्रबुद्धि उर दंभ बिसाला॥**
**जदपि रहेउँ रघुपति रजधानी। तदपि न कछु महिमा तब जानी॥**

मी धनाच्या घमेंडीने उन्मत्त, फारच बडबड करणारा व उग्र बुद्धीचा होतो. माझ्या हृदयात फार मोठा दंभ होता. जरी मी श्रीरामचंद्रांच्या राजधानीमध्ये राहात होतो, तथापि मी त्यांचा महिमा त्यावेळी काहीही जाणला नाही. ॥ २ ॥

**अब जाना मैं अवध प्रभावा। निगमागम पुरान अस गावा॥**
**कवनेहुँ जन्म अवध बस जोई। राम परायन सो परि होई॥**

आता मी अयोध्येचा प्रभाव जाणला. वेद, शास्त्र आणि पुराणांनी प्रतिपादन केले आहे की, कोणत्याही जन्मात जो कोणी अयोध्येमध्ये राहातो, तो नक्कीच श्रीरामांचा एकनिष्ठ भक्त होतो. ॥ ३ ॥

**अवध प्रभाव जान तब प्रानी। जब उर बसहिं रामु धनुपानी॥**
**सो कलिकाल कठिन उरगारी। पाप परायन सब नर नारी॥**

अयोध्येचा प्रभाव जिवाला तेव्हाच कळतो, जेव्हा हातामध्ये धनुष्य धारण करणारे श्रीराम त्याच्या हृदयात निवास करतात. हे गरुडा, तो कलिकाल मोठा कठीण होता. त्यामध्ये सर्व स्त्रीपुरुष पाप करण्यात गढून गेले होते. ॥ ४ ॥

दो०—**कलिमल ग्रसे धर्म सब लुप्त भए सदग्रंथ।**
**दंभिन्ह निज मति कल्पि करि प्रगट किए बहु पंथ॥ ९७ ( क )॥**

कलियुगातील पापांनी सर्व धर्मांना ग्रासले होते. सद्ग्रंथ लुप्त झाले होते. ढोंगी लोकांनी आपापल्या बुद्धीप्रमाणे कल्पना करून बरेचसे पंथ निर्माण केले होते. ॥ ९७ (क) ॥

**भए लोग सब मोहबस लोभ ग्रसे सुभ कर्म।**
**सुनु हरिजान ग्यान निधि कहउँ कछुक कलिधर्म॥ ९७ ( ख )॥**

सर्व लोक मोहाधीन झालेले होते. लोभाने शुभ कर्मे लुप्त केली. हे ज्ञाननिधे, हे श्रीहरींच्या वाहना, ऐकून घे. आता मी कलीचे काही धर्म सांगतो. ॥ ९७ (ख) ॥

**बरन धर्म नहिं आश्रम चारी। श्रुति बिरोध रत सब नर नारी॥**
**द्विज श्रुति बेचक भूप प्रजासन। कोउ नहिं मान निगम अनुसासन॥**

कलियुगात वर्णधर्म राहात नाही. चारी आश्रम राहात नाहीत. सर्व स्त्री-पुरुष हे वेदांचा विरोध करू लागतात. ब्राह्मण हे वेद विकणारे आणि राजे प्रजेला खाऊन टाकणारे होतात. वेदांची आज्ञा कोणीही मानत नाही. ॥ १ ॥

**मारग सोइ जा कहुँ जोइ भावा। पंडित सोइ जो गाल बजावा॥**
**मिथ्यारंभ दंभ रत जोई। ता कहुँ संत कहइ सब कोई॥**

ज्याला जो मार्ग चांगला वाटतो, तोच खरा मार्ग असे जो तो मानतो. जो बढाया मारतो तोच पंडित. जो अवडंबर माजवतो आणि जो ढोंगी असतो, त्यालाच सर्वजण संत म्हणतात. ॥ २ ॥

**सोइ सयान जो परधन हारी । जो कर दंभ सो बड़ आचारी ॥**
**जो कह झूँठ मसखरी जाना । कलिजुग सोइ गुनवंत बखाना ॥**

जो वाटेल तसा दुसऱ्याचा पैसा हडप करतो, तोच बुद्धिमान. जो ढोंगी असतो तो मोठा आचारशील. जो खोटे बोलतो आणि थट्टामस्करी करतो, तोच कलियुगात गुणवान मानला जातो. ॥ ३ ॥

**निराचार जो श्रुति पथ त्यागी । कलिजुग सोइ ग्यानी सो बिरागी ॥**
**जाकें नख अरु जटा बिसाला । सोइ तापस प्रसिद्ध कलिकाला ॥**

जो आचारहीन असतो व ज्याने वेदमार्ग सोडून दिलेला असतो, तोच कलियुगात ज्ञानी आणि तोच वैराग्यवान होय. ज्याला मोठमोठी नखे आणि लांब लांब जटा आहेत, तोच कलियुगात प्रसिद्ध तपस्वी. ॥ ४ ॥

दो०—**असुभ बेष भूषन धरें भच्छाभच्छ जे खाहिं।**
**तेइ जोगी तेइ सिद्ध नर पूज्य ते कलिजुग माहिं॥ ९८ ( क )॥**

जे अमंगळ वेष आणि अमंगळ भूषणे घालतात व भक्ष्य-अभक्ष्य सर्व खात असतात, तेच योगी, तेच सिद्ध आणि तेच मनुष्य कलियुगात पूज्य असतात. ॥ ९८(क) ॥

सो०—**जे अपकारी चार तिन्ह कर गौरव मान्य तेइ।**
**मन क्रम बचन लबार तेइ बकता कलिकाल महुँ॥ ९८ ( ख )॥**

ज्यांचे वर्तन दुसऱ्याचे अहित करणारे, त्यांचाच मोठा गौरव होतो आणि त्यांनाच सन्माननीय मानले जाते. जे कायावाचामनाने लबाड असतात, तेच कलियुगातील वक्ते मानले जातात. ॥ ९८(ख) ॥

**नारि बिबस नर सकल गोसाईं । नाचहिं नट मर्कट की नाईं ॥**
**सूद्र द्विजन्ह उपदेसहिं ग्याना । मेलि जनेऊ लेहिं कुदाना ॥**

हे गोस्वामी, सर्व पुरुष स्त्रियांच्या पूर्ण अधीन असतात आणि माकडवाल्याच्या माकडाप्रमाणे त्यांच्या तालावर नाचतात. ब्राह्मणांना शूद्र ज्ञानोपदेश करतात आणि गळ्यात जानवे घालून अयोग्य दान घेतात. ॥ १ ॥

**सब नर काम लोभ रत क्रोधी । देव बिप्र श्रुति संत बिरोधी ॥**
**गुन मंदिर सुंदर पति त्यागी । भजहिं नारि पर पुरुष अभागी ॥**

सर्व पुरुष काम आणि लोभ यांमध्ये तत्पर व क्रोधी असतात. देव, ब्राह्मण, वेद आणि संतांचे ते विरोधक होतात. दुर्दैवी स्त्रिया गुणी असलेल्या सुंदर पतीला सोडून परपुरुषाशी कुकर्म करतात. ॥ २ ॥

**सौभागिनीं बिभूषन हीना। बिधवन्ह के सिंगार नबीना॥**
**गुर सिष बधिर अंध का लेखा। एक न सुनइ एक नहिं देखा॥**

सौभाग्यवती स्त्रिया अलंकार घालत नाहीत, परंतु विधवांचे नित्य नवे शृंगार असतात. शिष्य आणि गुरू यांच्यामध्ये बहिऱ्याचे व आंधळ्याचे नाते असते. शिष्य गुरूचा उपदेश ऐकत नाही व गुरूला ज्ञान-दृष्टी नसल्यामुळे तो पाहू शकत नाही. ॥ ३ ॥

**हरइ सिष्य धन सोक न हरई। सो गुर घोर नरक महुँ परई॥**
**मातु पिता बालकन्हि बोलावहिं। उदर भरै सोइ धर्म सिखावहिं॥**

जो गुरू शिष्याचे धन हरण करतो, परंतु त्याचा शोक हरण करत नाही, तो घोर नरकात पडतो. आई-वडील मुलांना पोट भरण्याचा धर्म शिकवतात. ॥ ४ ॥

दो०—**ब्रह्म ग्यान बिनु नारि नर कहहिं न दूसरि बात।**
**कौड़ी लागि लोभ बस करहिं बिप्र गुर घात॥ ९९ (क)॥**

स्त्री-पुरुष ब्रह्मज्ञानाशिवाय दुसरे काही बोलत नसतात, परंतु लोभामुळे थोड्याशा लाभासाठी ब्राह्मण व गुरूंचीही हत्या करतात. ॥ ९९(क) ॥

**बादहिं सूद्र द्विजन्ह सन हम तुम्ह ते कछु घाटि।**
**जानइ ब्रह्म सो बिप्रबर आँखि देखावहिं डाटि॥ ९९ (ख)॥**

शूद्र हे ब्राह्मणांशी वाद-विवाद करतात आणि म्हणतात की, आम्ही तुमच्यापेक्षा कमी आहोत काय? जो ब्रह्म जाणतो तोच श्रेष्ठ ब्राह्मण, असे म्हणून ते रागावून त्यांच्यावर डोळे वटारतात. ॥ ९९(ख) ॥

**पर त्रिय लंपट कपट सयाने। मोह द्रोह ममता लपटाने॥**
**तेइ अभेदबादी ग्यानी नर। देखा मैं चरित्र कलिजुग कर॥**

जे परस्त्रीमध्ये आसक्त, कपट करण्यात चतुर व मोह, द्रोह आणि ममता यांमध्ये लिप्त असतात, तेच लोक अभेदवादी ज्ञानी मानले जातात. मी त्या कलियुगाचे चरित्र पाहिले आहे. ॥ १ ॥

**आपु गए अरु तिन्हहू घालहिं। जे कहुँ सत मारग प्रतिपालहिं॥**
**कल्प कल्प भरि एक एक नरका। परहिं जे दूषहिं श्रुति करि तरका॥**

ते स्वत: तर नष्ट झालेलेच असतात आणि जे काही लोक सन्मार्गाचे पालन करतात, त्यांनाही नष्ट करून टाकतात. जे तर्क-वितर्क करून वेदांची निंदा करतात, ते लोक कल्प कल्पभर एकेका नरकात पडतात. ॥ २ ॥

**जे बरनाधम तेलि कुम्हारा। स्वपच किरात कोल कलवारा॥**
**नारि मुई गृह संपति नासी। मूड़ मुड़ाइ होहिं संन्यासी॥**

तेली, कुंभार, चांडाळ, भिल्ल, कोल, कलाल इत्यादी जे हलक्या वर्णाचे असतात, ते बायको मेल्यावर किंवा घरची संपत्ती नष्ट झाल्यावर डोक्याचे मुंडन करून संन्यासी बनतात.॥ ३॥

**ते बिप्रन्ह सन आपु पुजावहिं। उभय लोक निज हाथ नसावहिं॥**
**बिप्र निरच्छर लोलुप कामी। निराचार सठ बृषली स्वामी॥**

ते ब्राह्मणांकडून आपली पूजा करून घेतात आणि आपल्याच हातांनी लोक-परलोक दोन्ही नष्ट करतात. ब्राह्मण अशिक्षित, लोभी, कामी, आचारहीन, मूर्ख आणि नीच जातीच्या व्यभिचारिणी स्त्रियांचे स्वामी असतात.॥ ४॥

**सूद्र करहिं जप तप ब्रत नाना। बैठि बरासन कहहिं पुराना॥**
**सब नर कल्पित करहिं अचारा। जाइ न बरनि अनीति अपारा॥**

शूद्र हे नाना प्रकारचे जप, तप आणि व्रते करीत व्यासपीठावर बसून पुराण सांगतात. सर्व माणसे मनाला वाटेल तसे आचरण करतात. त्या अपार अनीतीचे वर्णन करणेच कठीण.॥ ५॥

दो०—**भए बरन संकर कलि भिन्नसेतु सब लोग।**
**करहिं पाप पावहिं दुख भय रुज सोक बियोग॥ १०० (क)॥**

कलियुगातील सर्व लोक वर्णसंकर करणारे व मर्यादा सोडून वागणारे असतात. ते पापे करीत असल्यामुळे दु:ख, भय, रोग, शोक आणि प्रिय वस्तूचा वियोग त्यांना होतो.॥ १००(क)॥

**श्रुति संमत हरि भक्ति पथ संजुत बिरति बिबेक।**
**तेहिं न चलहिं नर मोह बस कल्पहिं पंथ अनेक॥ १०० (ख)॥**

वेदसंमत, वैराग्य व ज्ञानयुक्त असा जो हरिभक्तीचा मार्ग, त्या मार्गाने मोहामुळे माणसे जात नाहीत आणि अनेक नवनव्या संप्रदायांची कल्पना मांडतात.॥ १००(ख)॥

छं०—**बहु दाम सँवारहिं धाम जती। बिषया हरि लीन्हि न रहि बिरती॥**
**तपसी धनवंत दरिद्र गृही। कलि कौतुक तात न जात कही॥**

संन्यासी लोक बराच पैसा खर्च करून आपले मठ सजवतात. त्यांच्यामध्ये वैराग्य उरलेले नसते. त्यांचे वैराग्य विषयांनी हरण केलेले असते. तपस्वी लोक धनवान आणि गृहस्थ दरिद्री. हे तात, अशी ही कलियुगाची लीला काही अवर्णनीय आहे.॥ १॥

**कुलवंति निकारहिं नारि सती। गृह आनहिं चेरि निबेरि गती॥**
**सुत मानहिं मातु पिता तब लौं। अबलानन दीख नहीं जब लौं॥**

पुरुष हे कुलवती आणि सती असलेल्या पत्नीला घराबाहेर काढतात आणि चांगली वर्तणूक सोडून घरात दासी आणून ठेवतात. पुत्राला जोपर्यंत बायकोचा चेहरा दिसलेला नसतो, तोपर्यंतच तो आपल्या माता-पित्यांना मान देतो. ॥ २ ॥

**ससुरारि पिआरि लगी जब तें। रिपुरूप कुटुंब भए तब तें॥**
**नृप पाप परायन धर्म नहीं। करि दंड बिडंब प्रजा नितहीं॥**

सासुरवाडी आवडू लागली की, घरचे लोक शत्रू होतात. राजे लोक पाप- मग्न होतात. त्यांच्यामध्ये धर्म राहात नाही. ते प्रजेला नेहमी अपराध नसताना शिक्षा देतात आणि तिची दुर्दशा करतात. ॥ ३ ॥

**धनवंत कुलीन मलीन अपी। द्विज चिन्ह जनेउ उघार तपी॥**
**नहिं मान पुरान न बेदहि जो। हरि सेवक संत सही कलि सो॥**

धनवान लोक खालच्या जातीचे असले, तरी कुलीन मानले जातात. ब्राह्मणांमध्ये ब्राह्मण्याचे चिन्ह म्हणून फक्त जानवे उरते आणि नग्न राहणे म्हणजे तपस्वीपण मानले जाते. जे वेदांना व पुराणांना मानत नसतात, तेच लोक कलियुगात हरिभक्त आणि संत म्हणवून घेतात. ॥ ४ ॥

**कबि बृंद उदार दुनी न सुनी। गुन दूषक ब्रात न कोपि गुनी॥**
**कलि बारहिं बार दुकाल परै। बिनु अन्न दुखी सब लोग मरै॥**

कवी पुष्कळ असतात, परंतु जगात कवींना आश्रय देणारा कोणी ऐकिवात येत नाही. गुणांमध्ये दोष दाखविणारे खूप असतात, परंतु कोणीही गुणी नसतो. कलियुगात वारंवार दुष्काळ पडतो. अन्नाअभावी कित्येक लोक तडफडून मरतात. ॥ ५ ॥

दो०—**सुनु खगेस कलि कपट हठ दंभ द्वेष पाषंड।**
**मान मोह मारादि मद ब्यापि रहे ब्रह्मंड॥ १०१ ( क )॥**

हे पक्षिराज गरुडा, अशा त्या कलियुगात कपट, दुराग्रह, दंभ, द्वेष, पाखंड, मान, मोह, काम आणि मद हे संपूर्ण ब्रह्मांडात भरलेले होते. ॥ १०१ (क) ॥

**तामस धर्म करहिं नर जप तप ब्रत मख दान।**
**देव न बरषहिं धरनीं बए न जामहिं धान॥ १०१ ( ख )॥**

मनुष्य जप, तप, यज्ञ, व्रत, दान इत्यादी धर्म तामसी भावनेने करू लागले. इंद्रदेव पृथ्वीवर पाऊस पाडत नव्हता आणि पेरलेले धान्य उगवत नव्हते. ॥ १०१(ख) ॥

छं०—**अबला कच भूषन भूरि छुधा। धनहीन दुखी ममता बहुधा॥**
**सुख चाहहिं मूढ़ न धर्म रता। मति थोरि कठोरि न कोमलता॥**

स्त्रियांचे केस हेच आभूषण होते, दुसरे आभूषण उरलेच नव्हते आणि त्या नेहमी अतृप्त असत. त्या धनहीन आणि अनेक प्रकारची ममता असल्यामुळे दु:खी असत. त्या मूर्ख स्त्रियांना सुख हवे होते, परंतु धर्माबद्दल त्यांना प्रेम नसे. बुद्धी थोडीशी होती, परंतु त्या कर्कश होत्या. त्यांच्यामध्ये कोमलता नव्हती. ॥ १ ॥

**नर पीड़ित रोग न भोग कहीं। अभिमान बिरोध अकारनहीं॥**
**लघु जीवन संबतु पंच दसा। कलपांत न नास गुमानु असा॥**

मनुष्य रोगांनी त्रस्त होते. सुख कुठेच नव्हते. ते कारण नसता अभिमान व भांडण करीत. दहा-पाच वर्षांसारखे अल्प जीवन, परंतु घमेंड अशी की, जणू कल्पांत होईपर्यंत ते जगणार, त्यांचा नाश होणार नाही. ॥ २ ॥

**कलिकाल बिहाल किए मनुजा। नहिं मानत क्वौ अनुजा तनुजा॥**
**नहिं तोष बिचार न सीतलता। सब जाति कुजाति भए मगता॥**

कलिकालाने माणसाला हलाखीला पोहोचवले होते. कुणाला बहीण-मुलगी यांचाही विचार उरला नव्हता. लोकांमध्ये संतोष नव्हता, विवेक आणि शांतपणा नव्हता. लहानथोर जातींचे सर्वच लोक भीक मागणारे झाले. ॥ ३ ॥

**इरिषा परुषाच्छर लोलुपता। भरि पूरि रही समता बिगता॥**
**सब लोग बियोग बिसोक हए। बरनाश्रम धर्म अचार गए॥**

ईर्ष्या, कठोर भाषण, लोभ हे मोठ्या प्रमाणात होते. समता नव्हती. लोक वियोग व शोक यांनी युक्त होते. वर्णाश्रमधर्म नष्ट झाले. ॥ ४ ॥

**दम दान दया नहिं जानपनी। जड़ता परबंचनताति घनी॥**
**तनु पोषक नारि नरा सगरे। परनिंदक जे जग मो बगरे॥**

इंद्रियांचे दमन, दान, दया आणि शहाणपणा कुणातही उरला नाही. मूर्खपणा, दुसऱ्याला फसविणे या गोष्टी फार वाढल्या. सर्व स्त्री-पुरुष शरीराचे पालन-पोषण करण्यामध्येच मग्न असत. जगामध्ये दुसऱ्याची निंदा करणारे लोकच भरले होते. ॥ ५ ॥

दो०—**सुनु ब्यालारि काल कलि मल अवगुन आगार।**
**गुनउ बहुत कलिजुग कर बिनु प्रयास निस्तार॥ १०२ ( क )॥**

हे गरुडा, कलिकाल हा पाप व अवगुणांचे घर आहे. परंतु कलियुगात एक मोठा गुणही आहे. त्यामध्ये परिश्रमाविनाच भव-बंधनातून मुक्ती मिळते. ॥ १०२(क) ॥

**कृतजुग त्रेताँ द्वापर पूजा मख अरु जोग।**
**जो गति होइ सो कलि हरि नाम ते पावहिं लोग॥ १०२ ( ख )॥**

सत्ययुग, त्रेतायुग आणि द्वापरयुग यांमध्ये पूजा, यज्ञ आणि योग यांमुळे जी गती मिळते, तीच गती कलियुगात लोकांना फक्त भगवंतांच्या नाम-स्मरणाने प्राप्त होते. ॥ १०२(ख) ॥

**कृतजुग सब जोगी बिग्यानी । करि हरि ध्यान तरहिं भव प्रानी ॥**
**त्रेताँ बिबिध जग्य नर करहीं । प्रभुहि समर्पि कर्म भव तरहीं ॥**

सत्ययुगामध्ये सर्वजण योगी आणि ज्ञानी असतात. हरीचे ध्यान करून सर्व प्राणी भवसागर तरून जातात. त्रेतायुगात मनुष्य अनेक प्रकारचे यज्ञ करतात आणि सर्व कर्मे प्रभूंना समर्पित करून भवसागर पार करतात. ॥ १ ॥

**द्वापर करि रघुपति पद पूजा । नर भव तरहिं उपाय न दूजा ॥**
**कलिजुग केवल हरि गुन गाहा । गावत नर पावहिं भव थाहा ॥**

द्वापर युगात श्रीरघुनाथांच्या चरणांची पूजा करून मनुष्य संसारातून तरून जातो, दुसरा कोणताही उपाय नाही आणि कलियुगात तर फक्त श्रीहरींच्या गुणांचे गायन केल्यानेच मनुष्याला भवसागराचा थांग सापडतो. ॥ २ ॥

**कलिजुग जोग न जग्य न ग्याना । एक अधार राम गुन गाना ॥**
**सब भरोस तजि जो भज रामहि । प्रेम समेत गाव गुन ग्रामहि ॥**

कलियुगामध्ये योग, यज्ञ आणि ज्ञान नाहीतच. श्रीरामांचे गुणगान हाच एकमात्र आधार आहे. म्हणून सर्व आधार सोडून जो श्रीरामांना भजतो आणि प्रेमाने त्यांचे गुणगान करतो, ॥ ३ ॥

**सोइ भव तर कछु संसय नाहीं । नाम प्रताप प्रगट कलि माहीं ॥**
**कलि कर एक पुनीत प्रतापा । मानस पुन्य होहिं नहिं पापा ॥**

तोच भवसागर पार करून जातो, यात कोणताही संशय नाही. नामाचा प्रभाव कलियुगात प्रत्यक्ष आहे. कलियुगाचा एक पवित्र महिमा असा आहे की, यामध्ये मनाने केलेले सुविचार पुण्यप्रद असतात; परंतु मनात येणारे कुविचार पाप ठरत नाहीत. ॥ ४ ॥

दो०—**कलिजुग सम जुग आन नहिं जौं नर कर बिस्वास ।**
**गाइ राम गुन गन बिमल भव तर बिनहिं प्रयास ॥ १०३ ( क ) ॥**

मनुष्याने विश्वास ठेवला, तर कलियुगासमान दुसरे युग नाही. कारण या युगात श्रीरामांचे निर्मल गुणगान करीत करीत मनुष्य विनासायास संसाररूपी समुद्र तरून जातो. ॥ १०३(क) ॥

**प्रगट चारि पद धर्म के कलि महुँ एक प्रधान ।**
**जेन केन बिधि दीन्हें दान करइ कल्यान ॥ १०३ ( ख ) ॥**

सत्य, दया, तप आणि दान हे धर्माचे चार चरण प्रसिद्ध आहेत. त्यांपैकी कलियुगात दानरूपी एकच चरण मुख्य आहे. कोणत्याही प्रकारे दान दिल्यावर ते कल्याणच करते. ॥ १०३(ख) ॥

**नित जुग धर्म होहिं सब केरे। हृदयँ राम माया के प्रेरे॥**
**सुद्ध सत्व समता बिग्याना। कृत प्रभाव प्रसन्न मन जाना॥**

श्रीरामांच्या मायेने प्रेरित होऊन सर्वांच्या हृदयांमध्ये सर्वच धर्म नेहमी असतात. शुद्ध सत्त्वगुण, समता, विज्ञान आणि मन प्रसन्न असणे या गोष्टी सत्ययुगाचा प्रभाव समजाव्यात. ॥ १ ॥

**सत्व बहुत रज कछु रति कर्मा। सब बिधि सुख त्रेता कर धर्मा॥**
**बहु रज स्वल्प सत्व कछु तामस। द्वापर धर्म हरष भय मानस॥**

सत्त्वगुण अधिक असेल, थोडासा रजोगुण असेल, कर्म करण्यात प्रेम असेल आणि सर्वप्रकारे सुख असेल तर हा त्रेतायुगाचा धर्म होय. रजोगुण जास्त असेल, सत्त्वगुण फारच कमी असेल आणि काहीसा तमोगुण असेल, मनात हर्ष व भय असेल, तर हा द्वापर युगाचा धर्म होय. ॥ २ ॥

**तामस बहुत रजोगुन थोरा। कलि प्रभाव बिरोध चहुँ ओरा॥**
**बुध जुग धर्म जानि मन माहीं। तजि अधर्म रति धर्म कराहीं॥**

तमोगुण जास्त असेल, रजोगुण थोडा असेल, चोहीकडे वैर असेल, तर हा कलियुगाचा प्रभाव होय. पंडित लोक युगांचे धर्म मनात ओळखून, अधर्म सोडून धर्मावर प्रेम करतात. ॥ ३ ॥

**काल धर्म नहिं ब्यापहिं ताही। रघुपति चरन प्रीति अति जाही॥**
**नट कृत बिकट कपट खगराया। नट सेवकहि न ब्यापइ माया॥**

ज्याला श्रीरघुनाथांच्या चरणी अत्यंत प्रेम आहे, त्याच्यावर युग-धर्माचा प्रभाव पडत नाही. हे पक्षिराज, जादुगाराने केलेली जादू पाहाणाऱ्याला न कळणारी असते, परंतु त्याच्या साहाय्यकावर त्याच्या जादूचा पगडा बसत नाही. ॥ ४ ॥

दो०—**हरि माया कृत दोष गुन बिनु हरि भजन न जाहिं।**
**भजिअ राम तजि काम सब अस बिचारि मन माहिं॥ १०४ ( क )॥**

श्रीहरीच्या मायेने उत्पन्न केलेले दोष आणि गुण श्रीहरीच्या भजनाविना जात नाहीत. मनात असा विचार धरून सर्व कामना सोडून, निष्काम भावनेने श्रीरामांचे भजन केले पाहिजे. ॥ १०४(क) ॥

**तेहिं कलिकाल बरष बहु बसेउँ अवध बिहगेस।**
**परेउ दुकाल बिपति बस तब मैं गयउँ बिदेस॥ १०४ ( ख )॥**

हे पक्षिराज, त्या कलिकालामध्ये मी बरीच वर्षे अयोध्येत राहिलो. एकदा तेथे दुष्काळ पडला, तेव्हा अन्नाअभावी मी परदेशी गेलो. ॥ १०४ (ख) ॥

**गयउँ उजेनी सुनु उरगारी। दीन मलीन दरिद्र दुखारी॥**
**गएँ काल कछु संपति पाई। तहँ पुनि करउँ संभु सेवकाई॥**

हे गरुडा, मी दीन, उदास, दरिद्री आणि दु:खी बनून उज्जयनीला गेलो. काही काळ गेल्यावर व थोडी संपत्ती मिळाल्यावर मग मी तेथेच भगवान शंकरांची आराधना करू लागलो. ॥ १ ॥

**बिप्र एक बैदिक सिव पूजा। करइ सदा तेहि काजु न दूजा॥**
**परम साधु परमारथ बिंदक। संभु उपासक नहिं हरि निंदक॥**

एक ब्राह्मण वेदविधिपूर्वक श्रीशिवांची नित्य पूजा करीत होता. त्याला दुसरे काही काम नव्हते. तो श्रेष्ठ साधू व परमार्थ जाणणारा होता. तो शंभूंचा उपासक होता, परंतु श्रीहरींची निंदा करणारा नव्हता. ॥ २ ॥

**तेहि सेवउँ मैं कपट समेता। द्विज दयाल अति नीति निकेता॥**
**बाहिज नम्र देखि मोहि साईं। बिप्र पढ़ाव पुत्र की नाईं॥**

मी मनात कपट धरून त्याची सेवा करू लागलो. तो ब्राह्मण मोठा दयाळू आणि नीतिमान होता. हे स्वामी, वरून मी नम्र असल्याचे पाहून ब्राह्मण मला पुत्रासारखा मानून शिकवीत असे. ॥ ३ ॥

**संभु मंत्र मोहि द्विजबर दीन्हा। सुभ उपदेस बिबिध बिधि कीन्हा॥**
**जपउँ मंत्र सिव मंदिर जाई। हृदयँ दंभ अहमिति अधिकाई॥**

त्या ब्राह्मणश्रेष्ठाने मला शिवांचा मंत्र दिला आणि अनेक प्रकारचा चांगला उपदेश केला. मी शिव-मंदिरात जाऊन मंत्र जपत असे. माझ्या मनात दंभ व अहंकार वाढत गेला. ॥ ४ ॥

दो०—**मैं खल मल संकुल मति नीच जाति बस मोह।**
**हरिजन द्विज देखें जरउँ करउँ बिष्नु कर द्रोह॥ १०५ ( क )॥**

मी दुष्ट झालो. मी नीच जातीचा व पापमय मलिन बुद्धीचा होतो, त्यामुळे मोहवश होऊन श्रीहरींच्या भक्तांना व ब्राह्मणांना पाहून जळफळत असे आणि भगवान विष्णूंचा द्रोह करीत असे. ॥ १०५ (क) ॥

सो०—**गुर नित मोहि प्रबोध दुखित देखि आचरन मम।**
**मोहि उपजइ अति क्रोध दंभिहि नीति कि भावई॥ १०५ ( ख )॥**

माझे आचरण पाहून गुरूंना वाईट वाटे. ते मला नेहमी योग्य प्रकारे समजावत, परंतु मला समजत नसल्यामुळे उलट फार राग येई. ढोंगी माणसाला नीती कधी बरी वाटते काय? ॥ १०५(ख) ॥

**एक बार गुर लीन्ह बोलाई। मोहि नीति बहु भाँति सिखाई॥**
**सिव सेवा कर फल सुत सोई। अबिरल भगति राम पद होई॥**

एकदा गुरुजींनी मला बोलावले आणि अनेक प्रकारे परमार्थाची शिकवण दिली की, 'हे पुत्रा, शिवांच्या सेवेचे फळ हेच आहे की, श्रीरामांच्या चरणी प्रगाढ भक्ती निर्माण व्हावी. ॥ १ ॥

**रामहि भजहिं तात सिव धाता । नर पावँर कै केतिक बाता ॥**
**जासु चरन अज सिव अनुरागी । तासु द्रोहँ सुख चहसि अभागी ॥**

बाळा, श्रीरामांना शिव व ब्रह्मदेव हेसुद्धा भजतात, मग क्षुद्र मनुष्याचे ते काय? ब्रह्मदेव आणि शिव यांना ज्यांच्या चरणी प्रेम आहे, अरे अभाग्या, त्यांच्याशी द्रोह करून तुला सुख मिळेल काय?' ॥ २ ॥

**हर कहुँ हरि सेवक गुर कहेऊ । सुनि खगनाथ हृदय मम दहेऊ ॥**
**अधम जाति मैं बिद्या पाएँ । भयउँ जथा अहि दूध पिआएँ ॥**

गुरुजींनी शिव हे हरीचे सेवक असल्याचे सांगितले. ते ऐकून हे पक्षिराज, माझ्या मनाचा जळफळाट झाला. नीच जातीचा मी ही विद्या मिळाल्यावर असा झालो की, जसा दूध पाजल्यावर साप बनतो. ॥ ३ ॥

**मानी कुटिल कुभाग्य कुजाती । गुर कर द्रोह करउँ दिनु राती ॥**
**अति दयाल गुर स्वल्प न क्रोधा । पुनि पुनि मोहि सिखाव सुबोधा ॥**

अभिमानी, कुटिल, अभागी आणि क्षुद्र जातीचा मी रात्रंदिवस गुरूंचा द्रोह करू लागलो. गुरुजी अत्यंत दयाळू होते. त्यांना थोडासाही राग येत नव्हता. जरी मी द्रोह केला, तरी ते वारंवार मला उत्तम ज्ञान शिकवत. ॥ ४ ॥

**जेहि ते नीच बड़ाई पावा । सो प्रथमहिं हति ताहि नसावा ॥**
**धूम अनल संभव सुनु भाई । तेहि बुझाव घन पदवी पाई ॥**

नीच मनुष्याला ज्याच्याकडून मोठेपण लाभते, त्यालाच तो मारून त्याचा नाश करतो. हे बंधू, आगीमुळे उत्पन्न झालेला धूर मेघासारखा होऊन त्या अग्नीलाच विझवून टाकतो. ॥ ५ ॥

**रज मग परी निरादर रहई । सब कर पद प्रहार नित सहई ॥**
**मरुत उड़ाव प्रथम तेहि भरई । पुनि नृप नयन किरीटन्हि परई ॥**

धूळ ही रस्त्यामध्ये अपमानित होऊन पडलेली असते आणि नेहमी वाटेने जाणाऱ्यांच्या लाथांचा मार खाते. परंतु जेव्हा तिला वारा उडवून नेतो, तेव्हा ती सर्वांत प्रथम त्या वाऱ्यालाच व्यापून टाकते आणि मग राजांच्या डोळ्यांत व मुकुटांवर जाऊन पडते. ॥ ६ ॥

**सुनु खगपति अस समुझि प्रसंगा । बुध नहिं करहिं अधम कर संगा ॥**
**कबि कोबिद गावहिं असि नीती । खल सन कलह न भल नहिं प्रीती ॥**

हे पक्षिराजा, हे लक्षात घेऊन लोक अधम माणसाची संगती धरत नाहीत. कवी व पंडित हे अशी नीती सांगतात की, दुष्टाशी भांडण-तंटा आणि त्यांच्यावर प्रेम दोन्ही वाईटच. ॥ ७ ॥

**उदासीन नित रहिअ गोसाईं । खल परिहरिअ स्वान की नाईं ॥**
**मैं खल हृदयँ कपट कुटिलाई । गुर हित कहइ न मोहि सोहाई ॥**

हे गोस्वामी, त्यामुळे त्याच्याशी नेहमी उदासीन राहिले पाहिजे. दुष्टाला कुत्र्याप्रमाणे दुरूनच पिटाळले पाहिजे. मी दुष्ट होतो. मनात कपट भरले होते. म्हणून गुरुजी जरी हिताची गोष्ट सांगत होते, तरी मला ती बरी वाटत नव्हती. ॥ ८ ॥

दो०—**एक बार हर मंदिर जपत रहेउँ सिव नाम।**
**गुर आयउ अभिमान तें उठि नहिं कीन्ह प्रनाम॥ १०६ ( क )॥**

एके दिवशी मी शिवमंदिरात शिवनामाचा जप करीत होतो. त्यावेळी गुरुजी तेथे आले, परंतु घमेंडीमुळे मी उठून त्यांना प्रणाम केला नाही. ॥ १०६ (क) ॥

**सो दयाल नहिं कहेउ कछु उर न रोष लवलेस।**
**अति अघ गुर अपमानता सहि नहिं सके महेस॥ १०६ ( ख )॥**

गुरुजी दयाळू होते. माझा अपराध पाहूनही ते काहीच बोलले नाहीत. त्यांच्या मनात जरासुद्धा राग आला नाही. परंतु गुरूंचा अपमान हे मोठे पाप आहे. म्हणून महादेवांना ते सहन झाले नाही. ॥ १०६ (ख) ॥

**मंदिर माझ भई नभबानी । रे हतभाग्य अग्य अभिमानी ॥**
**जद्यपि तव गुर कें नहिं क्रोधा । अति कृपाल चित सम्यक बोधा ॥**

मंदिरात आकाशवाणी झाली. 'हे हतभाग्या, मूर्खा, घमेंडखोरा, जरी तुझ्या गुरूंना राग आला नाही, ते अत्यंत कृपाळू मनाचे आहेत आणि त्यांना पूर्ण व यथार्थ ज्ञान आहे, ॥ १ ॥

**तदपि साप सठ दैहउँ तोही । नीति बिरोध सोहाइ न मोही ॥**
**जौं नहिं दंड करौं खल तोरा । भ्रष्ट होइ श्रुतिमारग मोरा ॥**

तरीही हे मूर्खा, मी तुला शाप देतो. कारण सदाचार सोडून वागणे मला आवडत नाही. अरे दुष्टा, जर मी तुला शिक्षा केली नाही, तर माझा वेदमार्गच नष्ट होईल. ॥ २ ॥

**जे सठ गुर सन इरिषा करहीं । रौरव नरक कोटि जुग परहीं ॥**
**त्रिजग जोनि पुनि धरहिं सरीरा । अयुत जन्म भरि पावहिं पीरा ॥**

जे मूर्ख गुरूंशी ईर्ष्या करतात, ते कोट्यवधी युगे रौरव नरकात पडतात. मग तेथून सुटल्यावर ते पशु-पक्ष्यांचे शरीर धारण करतात आणि दहा हजार जन्मांपर्यंत दुःख भोगतात. ॥ ३ ॥

**बैठि रहेसि अजगर इव पापी । सर्प होहि खल मल मति ब्यापी ॥**
**महा बिटप कोटर महुँ जाई । रहु अधमाधम अधगति पाई ॥**

हे पाप्या, तू गुरूंसमोर अजगरासारखा बनून राहिलास. अरे दुष्टा, तुझी बुद्धी पापाने झाकलेली आहे. म्हणून तू सर्प हो. आणि हे अधमांतील अधमा, सर्पाच्या अधम योनीतील अधोगती मिळाल्यावर एखाद्या मोठ्या वृक्षाच्या ढोलीत जाऊन राहा.'॥ ४॥

**दो०—हाहाकार कीन्ह गुर दारुन सुनि सिव साप।**
**कंपित मोहि बिलोकि अति उर उपजा परिताप॥ १०७ (क)॥**

शिवांचा तो भयानक शाप ऐकून गुरुजींना खूप वाईट वाटले. मी भीतीने कापत असल्याचे पाहून त्यांच्या मनाला अतिशय दुःख झाले.॥ १०७ (क)॥

**करि दंडवत सप्रेम द्विज सिव सन्मुख कर जोरि।**
**बिनय करत गदगद स्वर समुझि घोर गति मोरि॥ १०७ (ख)॥**

तो ब्राह्मण प्रेमाने दंडवत घालून शिवांच्या समोर हात जोडून आणि माझ्या भयंकर शिक्षेचा विचार करून सद्‌गदित वाणीने शिवांची प्रार्थना करू लागला.॥ १०७ (ख)॥

**छं०—नमामीशमीशान निर्वाणरूपं। विभुं व्यापकं ब्रह्म वेदस्वरूपं॥**
**निजं निर्गुणं निर्विकल्पं निरीहं। चिदाकाशमाकाशवासं भजेऽहं॥**

'हे मोक्षस्वरूप, विभू, व्यापक, ब्रह्म व वेदस्वरूप, ईशान्य दिशेचे ईश्वर आणि सर्वांचे स्वामी हे शिव, मी तुम्हांला नमस्कार करतो. निजस्वरूपात स्थित, मायिक गुणांनी रहित, भेदरहित, इच्छारहित, चिदाकाशस्वरूप आणि आकाशरूप वस्त्र धारण करणारे हे भगवन, मी तुम्हांला भजतो.॥ १॥

**निराकारमोंकारमूलं तुरीयं। गिरा ग्यान गोतीतमीशं गिरीशं॥**
**करालं महाकाल कालं कृपालं। गुणागार संसारपारं नतोऽहं॥**

निराकार, ओंकाराचे मूळ, त्रिगुणातीत, वाणी, ज्ञान आणि इंद्रिये यांच्या पलीकडचे, कैलासपती, रुद्ररूप, महाकालाचेही काल, कृपाळू, गुणांचे धाम, संसारापलीकडचे तुम्ही परमेश्वर आहात. मी तुम्हांला नमस्कार करतो.॥ २॥

**तुषाराद्रि संकाश गौरं गभीरं। मनोभूत कोटि प्रभा श्री शरीरं॥**
**स्फुरन्मौलि कल्लोलिनी चारु गंगा। लसद्भालबालेन्दु कंठे भुजंगा॥**

जे हिमालयाप्रमाणे गौरवर्णाचे आहेत, ज्यांच्या शरीरामध्ये कोट्यवधी कामदेवांचे लावण्य आहे, ज्यांच्या शिरावर सुंदर गंगानदी विराजमान आहे, ज्यांच्या ललाटावर द्वितीयेचा चंद्र आणि गळ्यात सर्प शोभत आहे,॥ ३॥

**चलत्कुंडलं भ्रू सुनेत्रं विशालं। प्रसन्नाननं नीलकंठं दयालं॥**
**मृगाधीशचर्माम्बरं मुण्डमालं। प्रियं शंकरं सर्वनाथं भजामि॥**

ज्यांच्या कानांमध्ये कुंडले हलत आहेत. सुंदर भ्रुकुटी आणि विशाल नेत्र आहेत. जे प्रसन्नमुख, नीलकंठ आणि दयाळू आहेत, सिंहचर्माचे वस्त्र धारण केलेले, व मुंडमाला घातलेले आहात, सर्वांना प्रिय आणि सर्वांचे नाथ अशा श्रीशंकरांना मी भजतो. ॥ ४ ॥

**प्रचंडं प्रकृष्टं प्रगल्भं परेशं । अखंडं अजं भानुकोटिप्रकाशं ॥**
**त्रयः शूल निर्मूलनं शूलपाणिं । भजेऽहं भवानीपतिं भावगम्यं ॥**

रुद्ररूप, श्रेष्ठ, तेजस्वी, परमेश्वर, अखंड, अजन्मा, कोट्यवधी सूर्यांसारखे प्रकाशयुक्त, तीन प्रकारच्या दुःखांचे निर्मूलन करणारे, हातात त्रिशूल धारण केलेले, प्रेमाने प्राप्त होणारे, भवानीचे पती असलेल्या श्रीशंकरांना मी भजतो. ॥ ५ ॥

**कलातीत कल्याण कल्पान्तकारी । सदा सज्जनानन्ददाता पुरारी ॥**
**चिदानंद संदोह मोहापहारी । प्रसीद प्रसीद प्रभो मन्मथारी ॥**

कलांच्या पलीकडील, कल्याणस्वरूप, कल्पाचा अंत करणारे, सज्जनांना नेहमी आनंद देणारे, त्रिपुराचे शत्रू, सच्चिदानंदघन, मोह हरण करणारे, मनाचे मंथन करून टाकणाऱ्या कामदेवाचे शत्रू अशा हे प्रभो, प्रसन्न व्हा, प्रसन्न व्हा. ॥ ६ ॥

**न यावद् उमानाथ पादारविन्दं । भजंतीह लोके परे वा नराणां ॥**
**न तावत्सुखं शान्ति सन्तापनाशं । प्रसीद प्रभो सर्वभूताधिवासं ॥**

मनुष्य जोपर्यंत पार्वतीचे पती असलेल्या तुम्हांला भजत नाहीत, तोपर्यंत त्यांना इहलोकी व परलोकी सुख-शांती लाभत नाही आणि त्यांच्या त्रिविध तापांचा नाश होत नाही. म्हणून हे सर्व जिवांच्या हृदयामध्ये निवास करणाऱ्या प्रभो, प्रसन्न व्हा. ॥ ७ ॥

**न जानामि योगं जपं नैव पूजां । नतोऽहं सदा सर्वदा शंभु तुभ्यं ॥**
**जरा जन्म दुःखौघ तातप्यमानं । प्रभो पाहि आपन्नमामीश शंभो ॥**

मी योग जाणत नाही, जप आणि तपही जाणत नाही. हे शंभो, मी सदा सर्वदा तुम्हांलाच नमस्कार करतो. हे प्रभो, म्हातारपण आणि जन्म-मृत्यू यांच्या दुःखसमूहामध्ये होरपळणाऱ्या पण तुम्हांला शरण आलेल्या माझे दुःखापासून रक्षण करा. हे ईश्वरा, हे शंभो, मी तुम्हांला नमस्कार करतो.' ॥ ८ ॥

श्लोक—**रुद्राष्टकमिदं प्रोक्तं विप्रेण हरतोषये।**
**ये पठन्ति नरा भक्त्या तेषां शम्भुः प्रसीदति॥ ९ ॥**

भगवान रुद्रांचे हे अष्टक शंकरांना प्रसन्न करण्यासाठी ब्राह्मणाने म्हटले आहे. जो मनुष्य भक्तिपूर्वक याचे पठण करतो, त्याच्यावर भगवान शंभू प्रसन्न होतात. ॥ ९ ॥

दो०—**सुनि बिनती सर्बग्य सिव देखि बिप्र अनुरागु।**
**पुनि मंदिर नभबानी भइ द्विजबर बर मागु॥ १०८ ( क )॥**

सर्वज्ञ शिवांनी ही विनंती ऐकली आणि ब्राह्मणाचे प्रेम पाहिले. तेव्हा मंदिरात आकाशवाणी झाली की, 'हे द्विजश्रेष्ठा, वर माग.'॥ १०८ (क)॥

**जौं प्रसन्न प्रभु मो पर नाथ दीन पर नेहु।**
**निज पद भगति देइ प्रभु पुनि दूसर बर देहु॥ १०८ ( ख )॥**

ब्राह्मण म्हणाला, 'हे प्रभो, जर तुम्ही माझ्यावर प्रसन्न असाल आणि जर या दीनावर आपले प्रेम असेल, तर प्रथम आपल्या चरणांची भक्ती देऊन दुसरा वर द्या.॥ १०८(ख)॥

**तव माया बस जीव जड़ संतत फिरइ भुलान।**
**तेहि पर क्रोध न करिअ प्रभु कृपासिंधु भगवान॥ १०८ ( ग )॥**

हे प्रभो, हा अज्ञानी जीव तुमच्या मायेला बळी पडून निरंतर भटकत आहे. हे कृपासमुद्र भगवन, त्याच्यावर क्रोध करू नका.॥ १०८(ग)॥

**संकर दीनदयाल अब एहि पर होहु कृपाल।**
**साप अनुग्रह होइ जेहिं नाथ थोरेहीं काल॥ १०८ ( घ )॥**

हे दीनांवर दया करणारे कल्याणकारी शंकर, आता याच्यावर कृपा करा. ज्यामुळे हे नाथ, थोड्याच काळात याची शापातून मुक्ती व्हावी.॥ १०८(घ)॥

**एहि कर होइ परम कल्याना। सोइ करहु अब कृपानिधाना॥**
**बिप्र गिरा सुनि परहित सानी। एवमस्तु इति भइ नभबानी॥**

हे कृपानिधान, आता याचे कल्याण होईल, असेच करा.' दुसऱ्याच्या हितासाठी ब्राह्मणाचे हे बोलणे ऐकून पुन्हा आकाशवाणी झाली की, 'तथास्तु'.॥ १॥

**जदपि कीन्ह एहिं दारुन पापा। मैं पुनि दीन्हि कोप करि सापा॥**
**तदपि तुम्हारि साधुता देखी। करिहउँ एहि पर कृपा बिसेषी॥**

'जरी याने भयंकर पाप केले असले आणि मीसुद्धा रागावून याला शाप दिला असला, तरीही तुझे सौजन्य पाहून मी याच्यावर विशेष कृपा करतो.॥ २॥

**छमासील जे पर उपकारी। ते द्विज मोहि प्रिय जथा खरारी॥**
**मोर श्राप द्विज ब्यर्थ न जाइहि। जन्म सहस अवस्य यह पाइहि॥**

हे द्विजा, जे क्षमाशील आणि परोपकारी असतात, ते मला श्रीरामचंद्रांसारखे प्रिय असतात. हे द्विजा, माझा शाप खोटा ठरणार नाही. याला हजार जन्म नक्की मिळतील.॥ ३॥

**जनमत मरत दुसह दुख होई। एहि स्वल्पउ नहिं ब्यापिहि सोई॥**
**कवनेउँ जन्म मिटिहि नहिं ग्याना। सुनहि सूद्र मम बचन प्रवाना॥**

परंतु जन्मण्यामध्ये व मरण्यामध्ये जे दु:सह दु:ख असते, ते दु:ख याला होणार नाही आणि कोणत्याही जन्मात याचे ज्ञान नाहीसे होणार नाही. आता हे शूद्रा, माझे सत्य वचन ऐक.॥ ४॥

**रघुपति पुरीं जन्म तव भयऊ। पुनि तैं मम सेवाँ मन दयऊ॥**
**पुरी प्रभाव अनुग्रह मोरें। राम भगति उपजिहि उर तोरें॥**

प्रथमतः तुझा जन्म श्रीरघुनाथांच्या अयोध्यानगरीत झाला. नंतर तू माझ्या सेवेमध्ये मन लावलेस. अयोध्येच्या प्रभावामुळे आणि माझ्या कृपेने तुझ्या मनात रामभक्ती उत्पन्न होईल.॥ ५॥

**सुनु मम बचन सत्य अब भाई। हरितोषन ब्रत द्विज सेवकाई॥**
**अब जनि करहि बिप्र अपमाना। जानेसु संत अनंत समाना॥**

बाबा रे! आता माझे सत्यवचन ऐक. द्विजांची सेवासुद्धा भगवानाला प्रसन्न करणारे व्रत आहे. आता कधी ब्राह्मणाचा अपमान करू नकोस. संतांना भगवानांच्यासारखेच समज.॥ ६॥

**इंद्र कुलिस मम सूल बिसाला। कालदंड हरि चक्र कराला॥**
**जो इन्ह कर मारा नहिं मरई। बिप्र द्रोह पावक सो जरई॥**

इंद्राचे वज्र, माझा विशाल त्रिशूळ, कालाचा दंड आणि श्रीहरीचे भयंकर चक्र यांच्या प्रहारानेही जे मरत नाहीत, तेसुद्धा विप्रद्रोहरूपी अग्नीने भस्मसात होतात.॥ ७॥

**अस बिबेक राखेहु मन माहीं। तुम्ह कहँ जग दुर्लभ कछु नाहीं।**
**औरउ एक आसिषा मोरी। अप्रतिहत गति होइहि तोरी॥**

असा विवेक मनात बाळगा. मग तुझ्यासाठी जगात काहीही दुर्लभ असणार नाही. माझा आणखी एक आशीर्वाद आहे की, तुझी गती सर्वत्र अकुंठित असेल.'॥ ८॥

दो०—**सुनि सिव बचन हरषि गुर एवमस्तु इति भाषि।**
**मोहि प्रबोधि गयउ गृह संभु चरन उर राखि॥ १०९ (क)॥**

श्रीशिवांचे हे वचन ऐकून गुरुजी आनंदाने म्हणाले की, 'असेच घडो.' मग त्यांनी मला खूप समजावून देऊन आणि श्रीशिवांचे चरण हृदयात धरून ते घरी गेले.॥ १०९(क)॥

**प्रेरित काल बिंधि गिरि जाइ भयउँ मैं ब्याल।**
**पुनि प्रयास बिनु सो तनु तजेउँ गएँ कछु काल॥ १०९ (ख)॥**

कालाच्या प्रेरणेने मी विंध्याचलात जाऊन साप झालो. नंतर काही काळ गेल्यावर कोणत्याही कष्टाविना मी शरीरत्याग केला.॥ १०९(ख)॥

**जोइ तनु धरउँ तजउँ पुनि अनायास हरिजान।**
**जिमि नूतन पट पहिरइ नर परिहरइ पुरान॥ १०९ (ग)॥**

हे हरिवाहना, मी जे कोणते शरीर धारण करी, ते त्रासाविना सुखाने सोडत असे. ज्याप्रमाणे मनुष्य जुने वस्त्र टाकून नवीन वस्त्र नेसतो तसे. ॥ १०९(ग) ॥

**सिवँ राखी श्रुति नीति अरु मैं नहिं पावा क्लेस।**
**एहि बिधि धरेउँ बिबिधि तनु ग्यान न गयउ खगेस॥ १०९ (घ)॥**

श्रीशिवांनी वेद-नीतीचे रक्षण केले आणि मलाही क्लेश झाले नाहीत. अशा प्रकारे हे पक्षिराज, मी पुष्कळ शरीरे धारण केली, परंतु माझे ज्ञान गेले नाही. ॥ १०९(घ) ॥

**त्रिजग देव नर जोइ तनु धरऊँ। तहँ तहँ राम भजन अनुसरऊँ॥**
**एक सूल मोहि बिसर न काऊ। गुर कर कोमल सील सुभाऊ॥**

पशुपक्षी, देव किंवा मनुष्य असे कोणतेही शरीर मी धारण करी, त्या त्या वेळी त्या त्या शरीराने मी श्रीरामांचे भजन चालू ठेवत असे. त्यामुळे मी सुखी झालो. परंतु मनात एक बोचणी होती. गुरूंचा कोमल व सुशील स्वभाव मी कधी विसरलो नाही. त्यांचा अपमान केल्याचे दुःख मनात राहिले. ॥ १ ॥

**चरम देह द्विज कै मैं पाई। सुर दुर्लभ पुरान श्रुति गाई॥**
**खेलउँ तहूँ बालकन्ह मीला। करउँ सकल रघुनायक लीला॥**

शेवटी पुराण, वेद आणि देव हे ज्याला दुर्लभ म्हणतात, ते ब्राह्मणाचे शरीर मला मिळाले. त्यावेळी ब्राह्मण शरीरातसुद्धा मी मुलांमध्ये मिसळून श्रीरघुनाथांच्याच सर्व लीला करीत असे. ॥ २ ॥

**प्रौढ़ भएँ मोहि पिता पढ़ावा। समझउँ सुनउँ गुनउँ नहिं भावा॥**
**मन ते सकल बासना भागी। केवल राम चरन लय लागी॥**

मोठा झाल्यावर वडील मला शिकवू लागले. मला समजत असे. मी ऐकत असे व विचार करीत असे. परंतु मला शिक्षण आवडत नसे. माझ्या मनातील सर्व वासना पळून गेल्या. फक्त श्रीरामांच्या चरणांची आवड राहिली. ॥ ३ ॥

**कहु खगेस अस कवन अभागी। खरी सेव सुरधेनुहि त्यागी॥**
**प्रेम मगन मोहि कछु न सोहाई। हारेउ पिता पढ़ाइ पढ़ाई॥**

हे गरुडा, असा कोण भाग्यहीन असेल की, जो कामधेनू सोडून गाढविणीची सेवा करील? श्रीरामांच्या प्रेमात मग्न असल्यामुळे मला दुसरे काहीही बरे वाटत नसे. वडील शिकवून शिकवून थकले. ॥ ४ ॥

**भए कालबस जब पितु माता। मैं बन गयउँ भजन जनत्राता॥**
**जहँ जहँ बिपिन मुनीस्वर पावउँ। आश्रम जाइ जाइ सिरु नावउँ॥**

जेव्हा माता-पिता निवर्तले, तेव्हा मी भक्तांचे रक्षण करणाऱ्या श्रीरामांचे भजन करण्यासाठी वनात निघून गेलो. वनात जिथे जिथे मुनीश्वरांचे आश्रम दिसत, तिथे तिथे जाऊन मी त्यांना प्रणाम करी. ॥ ५ ॥

**बूझउँ तिन्हहि राम गुन गाहा। कहहिं सुनउँ हरषित खगनाहा॥**
**सुनत फिरउँ हरि गुन अनुबादा। अब्याहत गति संभु प्रसादा॥**

हे गरुडा, त्यांना मी श्रीरामांच्या गुणांच्या गोष्टी विचारी. ते सांगत व मी आनंदित होऊन ऐके. अशाप्रकारे मी सदा सर्वदा श्रीहरींच्या गुणांचे वर्णन ऐकत फिरत असे. श्रीशिवांच्या कृपेने मी मनात येईल, तिथे जाऊ शकत असे. ॥ ६ ॥

**छूटी त्रिबिधि ईषना गाढ़ी। एक लालसा उर अति बाढ़ी॥**
**राम चरन बारिज जब देखौं। तब निज जन्म सफल करि लेखौं॥**

माझ्या तीन प्रकारच्या प्रबल वासना-पुत्राची, धनाची व मानाची-नाहीशा झाल्या आणि हृदयामध्ये एकच लालसा वाढू लागली की, श्रीरामांच्या चरणांचे दर्शन घेईन, तेव्हाच आपला जन्म सफल झाला, असे समजेन. ॥ ७ ॥

**जेहि पूँछउँ सोइ मुनि अस कहई। ईस्वर सर्ब भूतमय अहई॥**
**निर्गुन मत नहिं मोहि सोहाई। सगुन ब्रह्म रति उर अधिकाई॥**

ज्यांना मी विचारी, ते मुनीसुद्धा असे सांगत की, ईश्वर सर्वभूतमय आहे. हे निर्गुण मत मला आवडत नव्हते. हृदयात सगुण ब्रह्मावरचे प्रेम वाढीस लागले. ॥ ८ ॥

दो०—**गुर के बचन सुरति करि राम चरन मनु लाग।**
**रघुपति जस गावत फिरउँ छन छन नव अनुराग॥ ११० ( क )॥**

गुरूंच्या वचनांचे स्मरण केल्याने माझे मन श्रीरामांच्या चरणी लागले. प्रत्येक क्षणी मला नवनवीन प्रेम प्राप्त होत गेले आणि मी श्रीरघुनाथांची कीर्ती गात फिरू लागलो. ॥ ११०(क) ॥

**मेरु सिखर बट छायाँ मुनि लोमस आसीन।**
**देखि चरन सिरु नायउँ बचन कहेउँ अति दीन॥ ११० ( ख )॥**

सुमेरू पर्वताच्या शिखरावर वडाच्या सावलीत लोमश मुनी बसले होते. त्यांना पाहून मी प्रणाम केला आणि अत्यंत दीनपणे म्हणालो. ॥ ११० (ख) ॥

**सुनि मम बचन बिनीत मृदु मुनि कृपाल खगराज।**
**मोहि सादर पूँछत भए द्विज आयहु केहि काज॥ ११० ( ग )॥**

हे पक्षिराज, माझे अत्यंत नम्र व कोमल बोलणे ऐकून मुनी मला आदराने विचारू लागले, 'हे ब्राह्मणा, तू कोणत्या कामासाठी येथे आला आहेस?' ॥ ११०(ग) ॥

**तब मैं कहा कृपानिधि तुम्ह सर्बग्य सुजान।**
**सगुन ब्रह्म अवराधन मोहि कहहु भगवान॥ ११० (घ)॥**

तेव्हा मी म्हणालो, 'हे कृपानिधी, तुम्ही सर्वज्ञ आहात आणि सुज्ञ आहात. हे भगवन, मला सगुण ब्रह्माच्या आराधनेची रीत सांगा.'॥ ११०(घ)॥

**तब मुनीस रघुपति गुन गाथा। कहे कछुक सादर खगनाथा॥**
**ब्रह्मग्यान रत मुनि बिग्यानी। मोहि परम अधिकारी जानी॥**

तेव्हा हे गरुडा, मुनीश्वरांनी श्रीरघुनाथांच्या गुणांच्या काही कथा आदराने मला सांगितल्या. मग ते ब्रह्मज्ञानपरायण व विज्ञानवान मुनी मला मोठा अधिकारी समजून,॥ १॥

**लागे करन ब्रह्म उपदेसा। अज अद्वैत अगुन हृदयेसा॥**
**अकल अनीह अनाम अरूपा। अनुभव गम्य अखंड अनूपा॥**

ब्रह्माविषयी उपदेश देऊ लागले की, ब्रह्म जन्मरहित, अद्वैत, निर्गुण आणि अंतर्यामी आहे. बुद्धीने कोणी त्याला मापू शकत नाही. ते इच्छारहित, नामरहित, रूपरहित, अनुभवाने जाणण्याजोगे, अखंड व उपमारहित आहे.॥ २॥

**मन गोतीत अमल अबिनासी। निर्बिकार निरवधि सुख रासी॥**
**सो तैं ताहि तोहि नहिं भेदा। बारि बीचि इव गावहिं बेदा॥**

ते मन आणि इंद्रिये यांच्या पलीकडचे, निर्मल, विनाशरहित, निर्विकार, सीमारहित आणि सुखाची खाण आहे. वेद म्हणतात की, 'तेच तू आहेस.' जल आणि जलाच्या तरंगाप्रमाणे तुझ्यात व त्याच्यात कोणताही फरक नाही.'॥ ३॥

**बिबिधि भाँति मोहि मुनि समुझावा। निर्गुन मत मम हृदयँ न आवा॥**
**पुनि मैं कहेउँ नाइ पद सीसा। सगुन उपासन कहहु मुनीसा॥**

मुनींनी मला अनेक प्रकारे समजावून सांगितले, परंतु निर्गुण मत माझ्या मनात ठसत नव्हते. मग मी मुनींच्या चरणी मस्तक नमवून म्हटले, 'हे मुनीश्वर, मला सगुण ब्रह्माच्या उपासनेसंबंधी सांगा.॥ ४॥

**राम भगति जल मम मन मीना। किमि बिलगाइ मुनीस प्रबीना॥**
**सोइ उपदेस कहहु करि दाया। निज नयनन्हि देखौं रघुराया॥**

माझे मन श्रीरामभक्तिरूपी जलातील मासोळीप्रमाणे तिच्यातच रमते. हे चतुर मुनीश्वरा, अशा अवस्थेमध्ये ते तिच्यापासून वेगळे कसे होऊ शकेल? तुम्ही दया करून मला तोच उपाय सांगा. त्यामुळे मी श्रीरघुनाथांना आपल्या डोळ्यांनी पाहू शकेन.॥ ५॥

**भरि लोचन बिलोकि अवधेसा। तब सुनिहउँ निर्गुन उपदेसा॥**
**मुनि पुनि कहि हरिकथा अनूपा। खंडि सगुन मत अगुन निरूपा॥**

प्रथम मला डोळे भरून श्रीअयोध्यानाथांना पाहू द्या. मग निर्गुणाचा उपदेश ऐकेन.' मग मुनींनी अनुपम हरिकथा सांगून सगुण मताचे खंडन करून निर्गुण मताचे निरूपण केले. ॥ ६ ॥

**तब मैं निर्गुन मत कर दूरी। सगुन निरूपउँ करि हठ भूरी॥**
**उत्तर प्रतिउत्तर मैं कीन्हा। मुनि तन भए क्रोध के चीन्हा॥**

तेव्हा मी निर्गुण मताचे खंडन करून आग्रहपूर्वक सगुणाचे निरूपण करू लागलो. मी उत्तर-प्रत्युत्तर केले. त्यामुळे मुनींच्या चेहऱ्यावर क्रोधाची चिन्हे उत्पन्न झाली. ॥ ७ ॥

**सुनु प्रभु बहुत अवग्या किएँ। उपज क्रोध ग्यानिन्ह के हिएँ॥**
**अति संघरषन जौं कर कोई। अनल प्रगट चंदन ते होई॥**

'हे गरुडा, ऐकून घे. मोठा अपमान झाल्यावर ज्ञात्याच्या हृदयामध्येही क्रोध उत्पन्न होतो. जर चंदनाचे लाकूड फार घासले, तर त्यापासूनही अग्नी प्रकट होतो.' ॥ ८ ॥

दो०—**बारंबार सकोप मुनि करइ निरूपन ग्यान।**
**मैं अपने मन बैठ तब करउँ बिबिधि अनुमान॥ १११ (क)॥**

मुनी रागारागाने वारंवार ज्ञानाचे निरूपण करू लागले. मग मी बसल्या बसल्या आपल्या मनात अनेक प्रकारची अनुमाने करू लागलो. ॥ १११(क) ॥

**क्रोध कि द्वैतबुद्धि बिनु द्वैत कि बिनु अग्यान।**
**मायाबस परिछिन्न जड़ जीव कि ईस समान॥ १११ (ख)॥**

द्वैतबुद्धीविना क्रोध कसा येईल? आणि अज्ञानाविना द्वैतबुद्धी निर्माण होऊ शकते काय? मायेच्या अधीन असलेला परिच्छिन्न जड जीव ईश्वरासमान होऊ शकेल काय? ॥ १११(ख) ॥

**कबहुँ कि दुख सब कर हित ताकें। तेहि कि दरिद्र परस मनि जाकें॥**
**परद्रोही की होहिं निसंका। कामी पुनि कि रहहिं अकलंका॥**

सर्वांचे हित व्हावे, अशी इच्छा झाल्यास कधी कुणाला दुःख होऊ शकेल काय? ज्याच्याजवळ परीस आहे, त्याच्याजवळ दारिद्र्य कसे राहू शकेल? दुसऱ्याचा द्रोह करणारे निर्भय होऊ शकतील काय? आणि कामी मनुष्य कलंकरहित राहू शकतील काय? ॥ १ ॥

**बंस कि रह द्विज अनहित कीन्हें। कर्म कि होहिं स्वरूपहि चीन्हें॥**
**काहू सुमति कि खल सँग जामी। सुभ गति पाव कि परत्रिय गामी॥**

ब्राह्मणाचे वाईट केल्याने वंश राहू शकेल काय? आत्मज्ञान झाल्यावर आसक्तिपूर्ण कर्मे होऊ शकतील काय? दुष्टांच्या संगतीमुळे कुणाला सुबुद्धी येईल काय? परस्त्रीगमन करणाऱ्या पुरुषाला उत्तम गती मिळू शकेल काय? ॥ २ ॥

**भव कि परहिं परमात्मा बिंदक। सुखी कि होहिं कबहुँ हरि निंदक॥**
**राजु कि रहइ नीति बिनु जानें। अघ कि रहहिं हरिचरित बखानें॥**

परमात्म्याला जाणणारे कधी जन्ममरणाच्या फेऱ्यात सापडू शकतील काय? भगवंतांची निंदा करणारा कधी सुखी होऊ शकेल काय? नीती न जाणता राज्य राहू शकेल काय? श्रीहरीच्या चरित्राचे वर्णन केल्यावर पाप राहू शकेल काय?॥ ३॥

**पावन जस कि पुन्य बिनु होई। बिनु अघ अजस कि पावइ कोई॥**
**लाभु कि किछु हरि भगति समाना। जेहि गावहिं श्रुति संत पुराना॥**

पुण्याविना पवित्र कीर्ती मिळू शकते काय? पापाविना कुठे कुणाला अपकीर्ती मिळते काय? जिचा महिमा वेद, संत आणि पुराणे गातात, त्या हरि-भक्तीसमान दुसरा कुठला लाभ आहे काय?॥ ४॥

**हानि कि जग एहि सम किछु भाई। भजिअ न रामहि नर तनु पाई॥**
**अघ कि पिसुनता सम कछु आना। धर्म कि दया सरिस हरिजाना॥**

हे बंधू, जगात मनुष्याचे शरीर मिळूनही श्रीरामांचे भजन केले नाही, तर या जगात यासारखी दुसरी कोणती हानी आहे? चहाडी करण्यासमान दुसरे कोणते पाप आहे? आणि हे गरुडा, दयेसमान दुसरा कोणता धर्म आहे?॥ ५॥

**एहि बिधि अमिति जुगुति मन गुनऊँ। मुनि उपदेस न सादर सुनऊँ॥**
**पुनि पुनि सगुन पच्छ मैं रोपा। तब मुनि बोलेउ बचन सकोपा॥**

अशाप्रकारे मी अगणित युक्त्यांचा विचार मनात करीत होतो आणि आदरपूर्वक मुनींचा उपदेश ऐकत नव्हतो. जेव्हा मी वारंवार सगुणाचा पक्ष मांडण्याचा प्रयत्न केला, तेव्हा मुनी क्रोधाने म्हणाले,॥ ६॥

**मूढ़ परम सिख देउँ न मानसि। उत्तर प्रतिउत्तर बहु आनसि॥**
**सत्य बचन बिस्वास न करही। बायस इव सबही ते डरही॥**

'अरे मूढा, मी तुला सर्वोत्तम शिकवण देत आहे, तरीही तू ती मानत नाहीस आणि प्रत्युत्तर देत आहेस. माझ्या सत्य बोलण्यावर विश्वास ठेवत नाहीस. कावळ्याप्रमाणे सर्वांना घाबरतोस.॥ ७॥

**सठ स्वपच्छ तव हृदयँ बिसाला। सपदि होहि पच्छी चंडाला॥**
**लीन्ह श्राप मैं सीस चढ़ाई। नहिं कछु भय न दीनता आई॥**

अरे मूर्खा, तुझ्या मनात आपल्या पक्षाचा फार मोठा हट्ट आहे, म्हणून तू लागलीच चांडाळ पक्षी कावळा हो.' मी मुनींचा शाप शिरसावंद्य मानला. त्यामुळे मला काहीही भीती वाटली नाही किंवा दैन्यही वाटले नाही.॥ ८॥

**दो०—तुरत भयउँ मैं काग तब पुनि मुनि पद सिरु नाइ।**
**सुमिरि राम रघुबंस मनि हरषित चलेउँ उड़ाइ॥ ११२ (क)॥**

मी त्याचक्षणी कावळा झालो. मग मुनींच्या चरणी नमस्कार करून आणि रघुकुलशिरोमणी श्रीरामांचे स्मरण करीत आनंदाने उडत निघालो. ॥ ११२ (क) ॥

**उमा जे राम चरन रत बिगत काम मद क्रोध।**
**निज प्रभुमय देखहिं जगत केहि सन करहिं बिरोध ॥ ११२ ( ख ) ॥**

श्रीशिव म्हणतात, 'हे उमे, श्रीरामांच्या चरणांचे जे भक्त आहेत आणि काम, अभिमान आणि क्रोधाने जे रहित आहेत, त्यांना जग हे आपल्या प्रभूंनी भरलेले आहे, असे दिसते. मग ते कुणाशी कशाला वैर करतील ?' ॥ ११२ (ख) ॥

**सुनु खगेस नहिं कछु रिषि दूषन । उर प्रेरक रघुबंस बिभूषन ॥**
**कृपासिंधु मुनि मति करि भोरी । लीन्ही प्रेम परिच्छा मोरी ॥**

काकभुशुंडी म्हणाले, हे गरुडा, यामध्ये ऋषींचा काहीही दोष नव्हता. रघुवंशविभूषण श्रीरामच सर्वांना प्रेरणा देणारे आहेत. कृपासागर प्रभूंनीच मुनींच्या बुद्धीला चकवून माझ्या प्रेमाची परीक्षा घेतली होती. ॥ १ ॥

**मन बच क्रम मोहि निज जन जाना । मुनि मति पुनि फेरी भगवाना ॥**
**रिषि मम महत सीलता देखी । राम चरन बिस्वास बिसेषी ॥**

कायावाचामनाने जेव्हा प्रभूंनी मला आपला दास असल्याचे मानले, तेव्हा भगवंतांनी मुनींची बुद्धी फिरवली. ऋषींनी माझा महान पुरुषांसारखा धैर्य, अक्रोध व विनय इत्यादींनी भरलेला स्वभाव पाहिला आणि श्रीरामांच्या चरणी दृढ विश्वास आहे, असे पाहिले, ॥ २ ॥

**अति बिसमय पुनि पुनि पछिताई । सादर मुनि मोहि लीन्ह बोलाई ॥**
**मम परितोष बिबिधि बिधि कीन्हा । हरषित राममंत्र तब दीन्हा ॥**

तेव्हा मुनींनी मोठ्या दुःखाने वारंवार पश्चात्ताप व्यक्त करीत मला आदराने बोलावले. त्यांनी अनेक प्रकारे मला संतुष्ट केले आणि मग आनंदाने मला राममंत्र दिला. ॥ ३ ॥

**बालकरूप राम कर ध्याना । कहेउ मोहि मुनि कृपानिधाना ॥**
**सुंदर सुखद मोहि अति भावा । सो प्रथमहिं मैं तुम्हहि सुनावा ॥**

कृपानिधान मुनींनी मला बालकरूप श्रीरामांच्या ध्यानाची पद्धत सांगितली. सुंदर आणि सुख देणारे ते ध्यान मला फारच आवडले. ते ध्यान मी तुला पूर्वीच ऐकविले आहे. ॥ ४ ॥

**मुनि मोहि कछुक काल तहँ राखा । रामचरितमानस तब भाषा ॥**
**सादर मोहि यह कथा सुनाई । पुनि बोले मुनि गिरा सुहाई ॥**

मुनींनी काही काळ मला तेथे आपल्याजवळ ठेवून घेतले. तेव्हा त्यांनी रामचरितमानसाचे वर्णन करून सांगितले. आदराने मला ती कथा सांगून, मग मुनी मला सुंदर वाणीने म्हणाले, ॥ ५ ॥

**रामचरित सर गुप्त सुहावा। संभु प्रसाद तात मैं पावा॥**
**तोहि निज भगत राम कर जानी। ताते मैं सब कहेउँ बखानी॥**

'वत्सा! हे सुंदर व गुप्त रामचरितमानस मला श्रीशिवांच्या कृपेने मिळाले होते. तुला श्रीरामांचा 'निज भक्त' असल्याचे पाहिले, म्हणून मी तुला संपूर्ण चरित्र विस्ताराने सांगितले.॥ ६॥

**राम भगति जिन्ह कें उर नाहीं। कबहुँ न तात कहिअ तिन्ह पाहीं॥**
**मुनि मोहि बिबिधि भाँति समुझावा। मैं सप्रेम मुनि पद सिरु नावा॥**

हे वत्सा! ज्याच्या हृदयात श्रीरामांची भक्ती नाही, त्याच्यासमोर हे चरित्र कधीही सांगू नये.' मुनींनी अनेक प्रकारे मला समजावून दिले. तेव्हा मी प्रेमाने मुनींच्या चरणी प्रणाम केला.॥ ७॥

**निज कर कमल परसि मम सीसा। हरषित आसिष दीन्ह मुनीसा॥**
**राम भगति अबिरल उर तोरें। बसिहि सदा प्रसाद अब मोरें॥**

मुनीश्वरांनी आपल्या करकमलांनी माझ्या मस्तकाला स्पर्श करून मोठ्या आनंदाने आशीर्वाद दिला की, 'आता माझ्या कृपेने तुझ्या हृदयात नेहमी प्रगाढ रामभक्ती राहील.॥ ८॥

दो०—**सदा राम प्रिय होहु तुम्ह सुभ गुन भवन अमान।**
**कामरूप इच्छामरन ग्यान बिराग निधान॥ ११३ (क)॥**

तू नेहमी श्रीरामांचा प्रिय होशील आणि कल्याणरूप गुणांचे धाम, मानरहित, इच्छेप्रमाणे रूप धारण करण्यास समर्थ, इच्छामृत्यू प्राप्त करणारा आणि ज्ञान व वैराग्याचे भांडार होशील.॥ ११३ (क)॥

**जेहिं आश्रम तुम्ह बसब पुनि सुमिरत श्रीभगवंत।**
**ब्यापिहि तहँ न अबिद्या जोजन एक प्रजंत॥ ११३ (ख)॥**

इतकेच नव्हे, तर श्रीभगवंतांचे स्मरण करीत तू ज्या आश्रमात निवास करशील, तेथे चार कोसांच्या परिसराला अविद्या व्यापू शकणार नाही.॥ ११३ (ख)॥

**काल कर्म गुन दोष सुभाऊ। कछु दुख तुम्हहि न ब्यापिहि काऊ॥**
**राम रहस्य ललित बिधि नाना। गुप्त प्रगट इतिहास पुराना॥**

काल, कर्म, गुण, दोष आणि स्वभाव यांमुळे उत्पन्न होणारे कोणतेही दुःख तुला कधीही त्रास देणार नाही. अनेक प्रकारची श्रीरामांची सुंदर रहस्ये इतिहास व पुराणांत गुप्त व प्रकट आहेत,॥ १॥

**बिनु श्रम तुम्ह जानब सब सोऊ। नित नव नेह राम पद होऊ॥**
**जो इच्छा करिहहु मन माहीं। हरि प्रसाद कछु दुर्लभ नाहीं॥**

ती सर्व तुला आपोआप मिळतील. श्रीरामांच्या चरणी तुला नित्य नवीन प्रेम होत राहो. आपल्या मनात जी कोणती इच्छा करशील, तिची पूर्तता श्रीहरींच्या कृपेने मुळीच दुर्लभ राहाणार नाही.'॥ २॥

**सुनि मुनि आसिष सुनु मतिधीरा। ब्रह्मगिरा भइ गगन गँभीरा॥**
**एवमस्तु तव बच मुनि ग्यानी। यह मम भगत कर्म मन बानी॥**

धीरबुद्धीच्या गरुडा, मुनींचा आशीर्वाद ऐकल्यावर आकाशातून गंभीर ब्रह्मवाणी झाली की, 'हे ज्ञानी मुनी, तुझे वचन सत्य होवो. कायावाचामनाने हा माझा भक्त आहे.'॥ ३॥

**सुनि नभगिरा हरष मोहि भयऊ। प्रेम मगन सब संसय गयऊ॥**
**करि बिनती मुनि आयसु पाई। पद सरोज पुनि पुनि सिरु नाई॥**

आकाशवाणी ऐकून मला खूप आनंद झाला. मी प्रेममग्न झालो आणि माझा संपूर्ण संशय नाहीसा झाला. त्यानंतर मुनींना विनंती करून, त्यांची आज्ञा घेऊन आणि त्यांच्या चरणी वारंवार मस्तक ठेवून,॥ ४॥

**हरष सहित एहिं आश्रम आयउँ। प्रभु प्रसाद दुर्लभ बर पायउँ॥**
**इहाँ बसत मोहि सुनु खग ईसा। बीते कलप सात अरु बीसा॥**

मी मोठ्या हर्षाने या आश्रमात आलो. श्रीरामांच्या कृपेने दुर्लभ वर मला मिळाला. हे पक्षिराज, मला येथे निवास करीत सत्तावीस कल्प झाले आहेत.॥ ५॥

**करउँ सदा रघुपति गुन गाना। सादर सुनहिं बिहंग सुजाना॥**
**जब जब अवधपुरीं रघुबीरा। धरहिं भगत हित मनुज सरीरा॥**

मी येथे नित्य श्रीरामांचे गुणगान करीत असतो आणि चतुर पक्षी ते आदराने ऐकतात. श्रीरघुनाथ जेव्हा जेव्हा अयोध्येमध्ये भक्तांच्या कल्याणासाठी मनुष्यशरीर धारण करतात,॥ ६॥

**तब तब जाइ राम पुर रहऊँ। सिसुलीला बिलोकि सुख लहऊँ॥**
**पुनि उर राखि राम सिसुरूपा। निज आश्रम आवउँ खगभूपा॥**

तेव्हा तेव्हा मी श्रीरामांच्या नगरीत जाऊन राहातो आणि प्रभूंच्या शिशुलीला पाहून सुख मिळवितो. मग हे पक्षिराज, श्रीरामांचे शिशुरूप हृदयामध्ये धारण करून मी आपल्या आश्रमात परत येतो.॥ ७॥

**कथा सकल मैं तुम्हहि सुनाई। काग देह जेहिं कारन पाई॥**
**कहिउँ तात सब प्रस्न तुम्हारी। राम भगति महिमा अति भारी॥**

ज्या कारणामुळे मला कावळ्याचा देह मिळाला, ती संपूर्ण कथा मी तुला सांगितली. हे तात, मी तुझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली. अहाहा! रामभक्तीचा महिमा फार मोठा आहे!॥ ८॥

**दो०—ताते यह तन मोहि प्रिय भयउ राम पद नेह।**
**निज प्रभु दरसन पायउँ गए सकल संदेह॥ ११४ ( क )॥**

मला या काकशरीरामुळे श्रीरामांच्या चरणी प्रेम मिळाले, म्हणून मला हे शरीर प्रिय आहे. या शरीरामुळे मला प्रभूंचे दर्शन घडले आणि माझे सर्व संशय नाहीसे झाले.॥ ११४(क)॥

## मासपारायण, एकोणतिसावा विश्राम

**भगति पच्छ हठ करि रहेउँ दीन्हि महारिषि साप।**
**मुनि दुर्लभ बर पायउँ देखहु भजन प्रताप॥ ११४ ( ख )॥**

मी हट्टाने भक्तीच्या पक्षावर अडून राहिलो, त्यामुळे महर्षी लोमश यांनी मला शाप दिला, परंतु त्याचा परिणाम असा झाला की, मुनींनाही दुर्लभ असलेले वरदान मला मिळाले. भक्तीचा प्रताप कसा असतो, तो बघा.॥ ११४ (ख)॥

**जे असि भगति जानि परिहरहीं। केवल ग्यान हेतु श्रम करहीं॥**
**ते जड़ कामधेनु गृहँ त्यागी। खोजत आकु फिरहिं पय लागी॥**

भक्तीचा असा महिमा जाणूनही जे लोक ती सोडून केवळ ज्ञानासाठी साधन करतात, ते मूर्ख घरी कामधेनू असताना, तिला सोडून दुधासाठी रुईचे झाड शोधत फिरतात.॥ १॥

**सुनु खगेस हरि भगति बिहाई। जे सुख चाहहिं आन उपाई॥**
**ते सठ महासिंधु बिनु तरनी। पैरि पार चाहहिं जड़ करनी॥**

हे पक्षिराज, जे लोक श्रीहरींची भक्ती सोडून दुसऱ्या उपायांनी सुख मिळवू इच्छितात, ते दुर्दैवी मूर्ख जहाजाविना पोहून जाऊन महासागर ओलांडून जाण्याची इच्छा बाळगतात.'॥ २॥

**सुनि भसुंडि के बचन भवानी। बोलेउ गरुड़ हरषि मृदु बानी॥**
**तव प्रसाद प्रभु मम उर माहीं। संसय सोक मोह भ्रम नाहीं॥**

श्रीशिव म्हणतात, 'हे भवानी, भुशुंडींचे बोलणे ऐकून गरुड आनंदाने कोमल शब्दांत म्हणाला, 'हे प्रभो, तुमच्या प्रसादामुळे माझ्या मनातील संदेह, शोक, मोह आणि भ्रम यांपैकी काहीही राहिले नाही.॥ ३॥

**सुनेउँ पुनीत राम गुन ग्रामा। तुम्हरी कृपाँ लहेउँ बिश्रामा॥**
**एक बात प्रभु पूँछउँ तोही। कहहु बुझाइ कृपानिधि मोही॥**

मी तुमच्या कृपेमुळे श्रीरामांचे पवित्र गुणसमूह ऐकले आणि शांती प्राप्त केली. हे प्रभो, आता मी तुम्हांला आणखी एक गोष्ट विचारतो. हे कृपासागर, मला ती समजावून सांगा.॥ ४॥

**कहहिं संत मुनि बेद पुराना। नहिं कछु दुर्लभ ग्यान समाना॥**
**सोइ मुनि तुम्ह सन कहेउ गोसाईं। नहिं आदरेहु भगति की नाईं॥**

संत, मुनी, वेद आणि पुराणे असे म्हणतात की, ज्ञानासमान दुर्लभ काहीही नाही. हे गोस्वामी, तेच ज्ञान मुनींनी तुम्हांला सांगितले. परंतु तुम्ही भक्तीसारखा त्याला मान दिला नाही.॥ ५॥

**ग्यानहि भगतिहि अंतर केता। सकल कहहु प्रभु कृपा निकेता॥**
**सुनि उरगारि बचन सुख माना। सादर बोलेउ काग सुजाना॥**

हे कृपेचे धाम, हे प्रभो, ज्ञान आणि भक्ती यांमध्ये किती अंतर आहे, ते मला सांगा.' गरुडाचे बोलणे ऐकून सुज्ञ काकभुशुंडी यांना समाधान वाटले आणि आदराने त्यांनी म्हटले,॥ ६॥

**भगतिहि ग्यानहि नहिं कछु भेदा। उभय हरहिं भव संभव खेदा॥**
**नाथ मुनीस कहहिं कछु अंतर। सावधान सोउ सुनु बिहंगबर॥**

'भक्ती आणि ज्ञान यांमध्ये काहीही फरक नाही. दोन्हीही संसारापासून उत्पन्न क्लेश हरण करतात. हे गरुडा! मुनीश्वर यांत थोडेसे अंतर असल्याचे सांगतात. हे पक्षिश्रेष्ठा, ते लक्ष देऊन ऐक.॥ ७॥

**ग्यान बिराग जोग बिग्याना। ए सब पुरुष सुनहु हरिजाना॥**
**पुरुष प्रताप प्रबल सब भाँती। अबला अबल सहज जड़ जाती॥**

हे हरिवाहना, ज्ञान, वैराग्य, योग , विज्ञान हे सर्व पुरुष आहेत. पुरुषाचा प्रताप सर्व तऱ्हेने प्रबळ असतो. अबला माया ही दुबळी व स्वभावतःच अज्ञानी असते.॥ ८॥

दो०—**पुरुष त्यागि सक नारिहि जो बिरक्त मति धीर।**
**न तु कामी बिषयाबस बिमुख जो पद रघुबीर॥ ११५ (क)॥**

परंतु जे वैराग्यवान आणि धीरबुद्धीचे पुरुष आहेत, तेच स्त्रीचा त्याग करू शकतात. कामी पुरुष करीत नाहीत. ते विषयांचे गुलाम असतात आणि श्रीरघुनाथांच्या चरणांपासून विन्मुख असतात.॥ ११५ (क)॥

सो०—**सोउ मुनि ग्याननिधान मृगनयनी बिधु मुख निरखि।**
**बिबस होइ हरिजान नारि बिष्नु माया प्रगट॥ ११५ (ख)॥**

ते ज्ञानाचे भांडार असलेले मुनीसुद्धा मृगनयना स्त्रीचा मुख-चंद्र पाहून लाचार होतात. हे गरुडा, प्रत्यक्ष भगवान विष्णूंची मायाच स्त्रीरूपाने प्रकट झालेली आहे.॥ ११५(ख)॥

**इहाँ न पच्छपात कछु राखउँ। बेद पुरान संत मत भाषउँ॥**
**मोह न नारि नारि कें रूपा। पन्नगारि यह रीति अनूपा॥**

हे मी काही पक्षपाताने सांगत नाही. वेद, पुराणे आणि संत यांचे मतच सांगतो. हे गरुडा, ही विलक्षण रीत आहे की, एका स्त्रीच्या रूपावर दुसरी स्त्री भाळून जात नाही. ॥ १ ॥

**माया भगति सुनहु तुम्ह दोऊ। नारि बर्ग जानइ सब कोऊ॥**
**पुनि रघुबीरहि भगति पिआरी। माया खलु नर्तकी बिचारी॥**

तू ऐकून घे. माया आणि भक्ती या दोन्ही स्त्रिया आहेत; हे सर्वांना माहीत आहे. शिवाय श्रीरघुवीरांना भक्ती प्रिय आहे. माया ही बिचारी निश्चितपणे नर्तकी आहे. ॥ २ ॥

**भगतिहि सानुकूल रघुराया। ताते तेहि डरपति अति माया॥**
**राम भगति निरुपम निरुपाधी। बसइ जासु उर सदा अबाधी॥**

श्रीरघुवीर भक्तीला विशेष अनुकूल असतात. त्यामुळे माया तिला फार घाबरून असते. ज्याच्या हृदयात उपमारहित आणि उपाधिरहित विशुद्ध रामभक्ती सदा बिनधास्त वसत असते, ॥ ३ ॥

**तेहि बिलोकि माया सकुचाई। करि न सकइ कछु निज प्रभुताई॥**
**अस बिचारि जे मुनि बिग्यानी। जाचहिं भगति सकल सुख खानी॥**

तिला पाहून माया ओशाळते. भक्तीवर ती आपला प्रभाव मुळीच पाडू शकत नाही. असा विचार करून जे ज्ञानी मुनी आहेत, तेसुद्धा सर्व सुखांची खाण असलेल्या भक्तीचीच याचना करतात. ॥ ४ ॥

दो०—**यह रहस्य रघुनाथ कर बेगि न जानइ कोइ।**
**जो जानइ रघुपति कृपाँ सपनेहुँ मोह न होइ॥ ११६ (क)॥**

श्रीरघुनाथांचे हे रहस्य कुणाला लवकर कळून येत नाही. श्रीरघुनाथांच्या कृपेने जो हे जाणतो, त्याला स्वप्नातही मोह होत नाही. ॥ ११६(क) ॥

**औरउ ग्यान भगति कर भेद सुनहु सुप्रबीन।**
**जो सुनि होइ राम पद प्रीति सदा अबिछीन॥ ११६ (ख)॥**

हे बुद्धिमान गरुडा, ज्ञान आणि भक्तीमध्ये आणखीही अंतर ऐक. ते ऐकल्यावर श्रीरामांच्या चरणी सदा अविच्छिन्न प्रेम उत्पन्न होते. ॥ ११६ (ख) ॥

**सुनहु तात यह अकथ कहानी। समुझत बनइ न जाइ बखानी॥**
**ईस्वर अंस जीव अबिनासी। चेतन अमल सहज सुख रासी॥**

हे तात, ही न सांगण्याजोगी गोष्ट ऐक. ही अनुभवानेच कळते. सांगता येत नाही. जीव हा ईश्वराचा अंश आहे. म्हणून तो अविनाशी, चेतन, निर्मल आणि स्वभावतःच सुखाची खाण आहे. ॥ १ ॥

**सो मायाबस भयउ गोसाईं। बँध्यो कीर मरकट की नाईं॥**
**जड़ चेतनहि ग्रंथि परि गई। जदपि मृषा छूटत कठिनई॥**

हे गोस्वामी, तो मायेत गुंतल्यामुळे पोपटाप्रमाणे किंवा माकडाप्रमाणे आपल्या आपणच बंदिस्त झालेला आहे. अशाप्रकारे जड आणि चेतन यांची गाठ पडली आहे. जरी ती गाठ मिथ्याच आहे, तरीही ती सुटण्यास कठीण आहे.॥ २॥

**तब ते जीव भयउ संसारी। छूट न ग्रंथि न होइ सुखारी॥**
**श्रुति पुरान बहु कहेउ उपाई। छूट न अधिक अधिक अरुझाई॥**

तेव्हापासून जीव जन्मणारा-मरणारा असा झाला आहे. आता ती गाठ सुटत नाही आणि जीव सुखी होत नाही. वेदांनी व पुराणांनी पुष्कळ उपाय सांगितले आहेत, परंतु ती गाठ काही सुटत नाही, उलट अधिकाधिक गुंतत जाते.॥ २॥

**जीव हृदयँ तम मोह बिसेषी। ग्रंथि छूट किमि परइ न देखी॥**
**अस संजोग ईस जब करई। तबहुँ कदाचित सो निरुअरई॥**

जीवाच्या हृदयामध्ये अज्ञानरूपी अंधकार विशेष रीतीने पसरलेला असतो, त्यामुळे ती गाठ दिसतच नाही. जेव्हा केव्हा परमेश्वर असा योग आणून देतो, तेव्हासुद्धा कदाचितच ती गाठ सुटू शकते.॥ ४॥

**सात्त्विक श्रद्धा धेनु सुहाई। जौं हरि कृपाँ हृदयँ बस आई॥**
**जप तप ब्रत जम नियम अपारा। जे श्रुति कह सुभ धर्म अचारा॥**

श्रीहरीच्या कृपेने जर सात्त्विक श्रद्धारूपी सुंदर गाय हृदयरूपी घरात येऊन राहिली; असंख्य जप, तप, व्रत, यम आणि नियम इत्यादी शुभ धर्म आणि आचार हे जे श्रुतींमध्ये सांगितले आहेत,॥ ५॥

**तेइ तृन हरित चरै जब गाई। भाव बच्छ सिसु पाइ पेन्हाई॥**
**नोइ निबृत्ति पात्र बिस्वासा। निर्मल मन अहीर निज दासा॥**

तेच धर्माचरणरूपी हिरवे गवत जर ती गाय चरेल आणि आस्तिक भावरूपी लहान वासराला पाहून तिला पान्हा फुटेल. सांसारिक विषयातून व प्रपंचातून निवृत्तीच्या दोरीने तिचे पाय बांधून धार काढण्याच्या विश्वासरूपी भांड्यात, निर्मल मनाचा, संयमी धार काढणारा गवळी असेल,॥ ६॥

**परम धर्ममय पय दुहि भाई। अवटै अनल अकाम बनाई॥**
**तोष मरुत तब छमाँ जुड़ावै। धृति सम जावनु देइ जमावै॥**

हे बंधू, अशाप्रकारे ताब्यात असलेल्या गाईचे परम धर्ममय दूध काढून ते निष्काम भावरूपी

अग्नीवर चांगल्याप्रकारे तापवील, नंतर क्षमा व संतोषरूपी हवेने ते थंड करील आणि धैर्य व शमरूपी विरजणाने त्याचे दही लावील, ॥ ७ ॥

**मुदिताँ मथै बिचार मथानी। दम अधार रजु सत्य सुबानी॥**
**तब मथि काढ़ि लेइ नवनीता। बिमल बिराग सुभग सुपुनीता॥**

मग प्रसन्नतारूपी डेऱ्यात तत्त्वविचाररूपी रवीने इंद्रियदमनाच्या खांबाच्या आधारे, सत्य व सुंदर वाणीरूपी दोरी लावून त्याला घुसळेल, मग त्यातून सुंदर आणि पवित्र वैराग्यरूपी लोणी काढून घेईल, ॥ ८ ॥

दो०—**जोग अगिनि करि प्रगट तब कर्म सुभासुभ लाइ।**
**बुद्धि सिरावै ग्यान घृत ममता मल जरि जाइ॥ ११७ ( क )॥**

मग योगरूपी अग्नी तयार करून त्यात सर्व शुभाशुभ कर्मरूपी इंधन घालील, तर सर्व कर्मे त्यात जळून जातील. जेव्हा वैराग्यरूपी लोण्यातील ममतारूपी मळ जळून जाईल, तेव्हा उरलेले ज्ञानरूपी तूप निश्चयात्मक बुद्धीने थंड करील, ॥ ११७ (क) ॥

**तब बिग्यानरूपिनी बुद्धि बिसद घृत पाइ।**
**चित्त दिआ भरि धरै दृढ़ समता दिअटि बनाइ॥ ११७ ( ख )॥**

नंतर विज्ञानरूप बुद्धीने ते ज्ञानरूपी निर्मल तूप मिळाल्यावर ते चित्तरूपी दिव्यात भरून समतारूपी तिवईवर तो घट्ट ठेवील. ॥ ११७ (ख) ॥

**तीनि अवस्था तीनि गुन तेहि कपास तें काढ़ि।**
**तूल तुरीय सँवारि पुनि बाती करै सुगाढ़ि॥ ११७ ( ग )॥**

जागृती, स्वप्न आणि सुषुप्ती या तीन अवस्था आणि सत्त्व, रज, तम या तीन गुणरूपी कापसातून तुरीयावस्थारूपी स्वच्छ कापूस काढून आणि नंतर तो चांगल्याप्रकारे वळून त्याची सुंदर घट्ट वात तयार करील, ॥ ११७ (ग) ॥

सो०—**एहि बिधि लेसै दीप तेज रासि बिग्यानमय।**
**जातहिं जासु समीप जरहिं मदादिक सलभ सब॥ ११७ ( घ )॥**

अशा प्रकारे तेजाची राशी असलेला विज्ञानमय दिवा लावील, ज्याच्याजवळ जाताच मद इत्यादी सर्व पतंग-कीटक जळून जातील, ॥ ११७ (घ) ॥

**सोहमस्मि इति बृत्ति अखंडा। दीप सिखा सोइ परम प्रचंडा॥**
**आतम अनुभव सुख सुप्रकासा। तब भव मूल भेद भ्रम नासा॥**

'सोऽहमस्मि' तेच ब्रह्म मी आहे. ही वृत्ती तेलाच्या धारेसारखी अखंड राहील, तीच त्या

ज्ञानदीपाची प्रचंड ज्वाळा होय. अशाप्रकारे आत्मानुभवाच्या सुखाचा सुंदर प्रकाश पसरेल, तेव्हा सर्व संसाराचे मूळ असणारा भेदरूपी भ्रम नष्ट होईल. ॥ १ ॥

**प्रबल अबिद्या कर परिवारा। मोह आदि तम मिटइ अपारा॥**
**तब सोइ बुद्धि पाइ उँजिआरा। उर गृहँ बैठि ग्रंथि निरुआरा॥**

आणि अत्यंत बलवान असलेल्या अविद्येचा परिवार असलेला अंधकार नाहीसा होईल. मग तीच विज्ञानरूपी बुद्धी आत्मानुभवाचा प्रकाश मिळाल्यावर हृदयरूपी घरात बसून ती जड-चेतनाची पडलेली गाठ सोडवते. ॥ २ ॥

**छोरन ग्रंथि पाव जौं सोई। तब यह जीव कृतारथ होई॥**
**छोरत ग्रंथि जानि खगराया। बिघ्न अनेक करइ तब माया॥**

जर ती विज्ञानरूपी बुद्धी ती गाठ सोडवू शकली, तर हा जीव कृतार्थ होईल. हे पक्षिराज गरुडा, गाठ सोडविली जात आहे, असे पाहून माया अनेक विघ्ने निर्माण करते. ॥ ३ ॥

**रिद्धि सिद्धि प्रेरइ बहु भाई। बुद्धिहि लोभ दिखावहिं आई॥**
**कल बल छल करि जाहिं समीपा। अंचल बात बुझावहिं दीपा॥**

हे बंधू, ती पुष्कळशा ऋद्धि-सिद्धींना पाठवते. त्या येऊन बुद्धीला लोभ दाखवितात आणि त्या ऋद्धि-सिद्धी कला, बल व कपट करून जवळ जाऊन आपल्या पदराच्या वाऱ्याने तो ज्ञानरूपी दीपक विझवून टाकतात. ॥ ४ ॥

**होइ बुद्धि जौं परम सयानी। तिन्ह तन चितव न अनहित जानी॥**
**जौं तेहि बिघ्न बुद्धि नहिं बाधी। तौ बहोरि सुर करहिं उपाधी॥**

जर बुद्धी ही शहाणी असेल तर त्या ऋद्धि-सिद्धी धोक्याच्या समजून त्यांच्याकडे पाहातसुद्धा नाहीत. अशाप्रकारे जर मायेच्या विघ्नांमुळे बुद्धीला बाधा झाली नाही, तर मग देव विघ्ने आणतात. ॥ ५ ॥

**इंद्री द्वार झरोखा नाना। तहँ तहँ सुर बैठे करि थाना॥**
**आवत देखहिं बिषय बयारी। ते हठि देहिं कपाट उघारी॥**

हृदयरूपी घराला इंद्रियांच्या द्वारांचे अनेक झरोके आहेत. त्या प्रत्येक झरोक्यावर देवांनी ठाण मांडले आहे. विषयरूपी हवा येत आहे, असे पाहाताच ते देव जोराने दारे उघडतात. ॥ ६ ॥

**जब सो प्रभंजन उर गृहँ जाई। तबहिं दीप बिग्यान बुझाई॥**
**ग्रंथि न छूटि मिटा सो प्रकासा। बुद्धि बिकल भइ बिषय बतासा॥**

तो जोराचा वारा हृदयरूपी घरात शिरतो, त्यासरशी तो विज्ञानरूपी दिवा विझतो. गाठ सुटत

नाही आणि आत्मानुभवाचा प्रकाश नाहीसा होतो. विषयरूपी वाऱ्यामुळे बुद्धी व्याकूळ होते. केले-सवरलेले सर्व नष्ट होते. ॥ ७ ॥

**इंद्रिन्ह सुरन्ह न ग्यान सोहाई। बिषय भोग पर प्रीति सदाई॥**
**बिषय समीर बुद्धि कृत भोरी। तेहि बिधि दीप को बार बहोरी॥**

इंद्रिये आणि त्यांचे देव यांना स्वभावतः हे चांगले वाटत नाही, कारण त्यांना विषय-भोगांविषयी नेहमी प्रेम वाटते. बुद्धीलाही विषयरूपी वाऱ्याने बावचळून टाकले की, मग पुन्हा तो ज्ञानदीप त्याचप्रकारे कोण उजळणार? ॥ ८ ॥

दो०—**तब फिरि जीव बिबिधि बिधि पावइ संसृति क्लेस।**
**हरि माया अति दुस्तर तरि न जाइ बिहगेस॥ ११८ ( क )॥**

अशाप्रकारे ज्ञानदीप विझल्यावर मग अनेक प्रकारचे जन्म-मरणादी क्लेश जिवाला भोगावे लागतात. हे पक्षिराज, माया ही फार दुस्तर आहे. ती सहजासहजी तरून जाता येत नाही. ॥ ११८ (क) ॥

**कहत कठिन समुझत कठिन साधत कठिन बिबेक।**
**होइ घुनाच्छर न्याय जौं पुनि प्रत्यूह अनेक॥ ११८ ( ख )॥**

ज्ञान हे समजावून सांगण्यास कठीण, समजण्यास कठीण आणि साध्य करण्यासही कठीण आहे. जर घुणाक्षरन्यायाने योगायोगाने कदाचित ते ज्ञान मिळाले, तरीही ते जतन करून ठेवण्यामध्ये अनेक विघ्ने आहेत. ॥ ११८(ख) ॥

**ग्यान पंथ कृपान कै धारा। परत खगेस होइ नहिं बारा॥**
**जो निर्बिघ्न पंथ निर्बहई। सो कैवल्य परम पद लहई॥**

ज्ञानाचा मार्ग हा दुधारी तलवारीच्या धारेसारखा आहे. हे पक्षिराज, या मार्गावरून अधःपतित होण्यास वेळ लागत नाही. जो या मार्गावरून निर्विघ्नपणे निभावून जातो, तोच मोक्षरूप असलेले परमपद प्राप्त करतो. ॥ १ ॥

**अति दुर्लभ कैवल्य परम पद। संत पुरान निगम आगम बद॥**
**राम भजत सोइ मुकुति गोसाईं। अनइच्छित आवइ बरिआईं॥**

संत, पुराणे, वेद आणि तंत्रादी सर्व हेच सांगतात की, कैवल्यरूप परमपद हे अत्यंत दुर्लभ आहे, परंतु हे गोस्वामी, ती अत्यंत दुर्लभ अशी मुक्ती श्रीरामांची भक्ती केल्यावर इच्छा नसताही जबरदस्तीने येते. ॥ २ ॥

**जिमि थल बिनु जल रहि न सकाई। कोटि भाँति कोउ करै उपाई॥**
**तथा मोच्छ सुख सुनु खगराई। रहि न सकइ हरि भगति बिहाई॥**

ज्याप्रमाणे कुणी कितीही उपाय केले, तरीसुद्धा जमिनीशिवाय पाणी साठून राहात नाही, तसेच हे पक्षिराज, मोक्षसुखसुद्धा श्रीहरीच्या भक्तीशिवाय राहू शकत नाही. ॥ ३ ॥

**अस बिचारि हरि भगत सयाने । मुक्ति निरादर भगति लुभाने ॥**
**भगति करत बिनु जतन प्रयासा । संसृति मूल अबिद्या नासा ॥**

असा विचार करून हरिभक्त हे भक्तीवर लुब्ध होऊन मुक्तीचा तिरस्कार करतात. भक्ती केल्याने जन्म-मृत्युरूप संसाराचे मूळ असलेली अविद्या प्रयत्न व परिश्रमाविना आपोआप अशी नष्ट होते, ॥ ४ ॥

**भोजन करिअ तृपिति हित लागी । जिमि सो असन पचवै जठरागी ॥**
**असि हरि भगति सुगम सुखदाई । को अस मूढ़ न जाहि सोहाई ॥**

ज्याप्रमाणे तृप्तीसाठी भोजन केले जाते आणि ते भोजन आपण प्रयत्न न करताही जठराग्नी आपोआप पचवून टाकतो. अशी परमसुख देणारी हरिभक्ती ही ज्याला आवडत नाही, असा मूर्ख कोण असेल ? ॥ ५ ॥

दो०—**सेवक सेब्य भाव बिनु भव न तरिअ उरगारि।**
**भजहु राम पद पंकज अस सिद्धांत बिचारि ॥ ११९ ( क ) ॥**

हे गरुडा, मी सेवक आहे आणि भगवान माझे स्वामी आहेत, या भावनेशिवाय संसाररूपी समुद्र तरून जाणे शक्य नाही. या सिद्धांताचा विचार करून श्रीरामचंद्रांच्या चरणकमलांचे भजन कर. ॥ ११९(क) ॥

**जो चेतन कहँ जड़ करइ जड़हि करइ चैतन्य।**
**अस समर्थ रघुनायकहि भजहिं जीव ते धन्य ॥ ११९ ( ख ) ॥**

जे चेतनाला जड करतात आणि जडाला चेतन करतात, अशा समर्थ श्रीरघुनाथांना जे जीव भजतात, ते धन्य होत. ॥ ११९(ख) ॥

**कहेउँ ग्यान सिद्धांत बुझाई । सुनहु भगति मनि कै प्रभुताई ॥**
**राम भगति चिंतामनि सुंदर । बसइ गरुड़ जाके उर अंतर ॥**

येथवर मी ज्ञानाचा सिद्धांत समजावून दिला. आता भक्तिरूपी रत्नाचा महिमा ऐक. श्रीरामांची भक्ती ही सुंदर चिंतामणी आहे. हे गरुडा, ही ज्याच्या हृदयात वसते, ॥ १ ॥

**परम प्रकास रूप दिन राती । नहिं कछु चहिअ दिआ घृत बाती ॥**
**मोह दरिद्र निकट नहिं आवा । लोभ बात नहिं ताहि बुझावा ॥**

तो रात्रंदिवस स्वतःच परम प्रकाशरूप असतो. त्याला दिवा, तूप आणि वात हे काहीही नको. अशाप्रकारे रत्नाचा एक तर स्वाभाविक प्रकाश असतो. शिवाय मोहरूपी दारिद्र्य जवळ फिरकत

नाही, कारण रत्न हे स्वतःच धनरूप आहे आणि तिसरे म्हणजे, लोभरूपी वारा त्या रत्नरूप दिव्याला विझवू शकत नाही. ॥ २ ॥

**प्रबल अबिद्या तम मिटि जाई । हारहिं सकल सलभ समुदाई ॥**
**खल कामादि निकट नहिं जाहीं । बसइ भगति जाके उर माहीं ॥**

त्याच्या प्रकाशाने अविद्येचा प्रबळ अंधकार नाहीसा होतो. मद इत्यादी पतंग—कीटकांचा संपूर्ण थवा पराभूत होतो. ज्याच्या हृदयात भक्ती राहाते, त्याच्याजवळ काम, क्रोध आणि लोभ इत्यादी दुष्ट येत नाहीत. ॥ ३ ॥

**गरल सुधासम अरि हित होई । तेहि मनि बिनु सुख पाव न कोई ॥**
**ब्यापहिं मानस रोग न भारी । जिन्ह के बस सब जीव दुखारी ॥**

त्याच्यासाठी विष हे अमृत आणि शत्रू हे मित्र बनतात. त्या रत्नाविना कुणालाही सुख मिळत नाही. मोठमोठ्या ज्या मानसिक रोगांमुळे सर्व जीव दुःखी होतात, ते रोग त्याला व्यापत नाहीत. ॥ ४ ॥

**राम भगति मनि उर बस जाकें । दुख लवलेस न सपनेहुँ ताकें ॥**
**चतुर सिरोमनि तेइ जग माहीं । जे मनि लागि सुजतन कराहीं ॥**

श्रीरामभक्तिरूपी रत्न ज्याच्या हृदयात असते, त्याला स्वप्नातही लेशमात्र दुःख होत नाही. जगात जे त्या भक्तिरूपी रत्नासाठी खूप प्रयत्न करतात, तेच लोक अत्यंत चतुर होत. ॥ ५ ॥

**सो मनि जदपि प्रगट जग अहई । राम कृपा बिनु नहिं कोउ लहई ॥**
**सुगम उपाय पाइबे केरे । नर हतभाग्य देहिं भटभेरे ॥**

जरी ते रत्न जगात प्रत्यक्ष आहे, तरी श्रीरामांच्या कृपेविना कुणाला ते मिळू शकत नाही. ते मिळविण्याचा उपायसुद्धा सुगम आहे, परंतु भाग्यहीन मनुष्य तो सोडून देतात. ॥ ६ ॥

**पावन पर्बत बेद पुराना । राम कथा रुचिराकर नाना ॥**
**मर्मी सज्जन सुमति कुदारी । ग्यान बिराग नयन उरगारी ॥**

वेद-पुराण हे पवित्र पर्वत आहेत. श्रीरामांच्या नाना प्रकारच्या कथा या त्या पर्वतावरील सुंदर खाणी आहेत. संत पुरुष या खाणीचे रहस्य जाणतात आणि सुंदर बुद्धी ही खोदण्यासाठी कुदळ आहे. हे गरुडा, ज्ञान आणि वैराग्य- हे दोन त्यांचे नेत्र आहेत. ॥ ७ ॥

**भाव सहित खोजइ जो प्रानी । पाव भगति मनि सब सुख खानी ॥**
**मोरें मन प्रभु अस बिस्वासा । राम ते अधिक राम कर दासा ॥**

जो जीव प्रेमाने शोधतो, त्याला सर्व सुखांची खाण असलेले हे भक्तिरूपी रत्न सापडते.

हे प्रभो, माझ्या मनात असा विश्वास आहे की, श्रीरामांचे दास हे श्रीरामांच्यापेक्षा मोठे आहेत. ॥ ८ ॥

**राम सिंधु घन सज्जन धीरा। चंदन तरु हरि संत समीरा॥**
**सब कर फल हरि भगति सुहाई। सो बिनु संत न काहूँ पाई॥**

श्रीरामचंद्र हे समुद्र आहेत, तर धीर संत पुरुष मेघ होत. श्रीहरी चंदनाचे वृक्ष आहेत, तर संत हे पवन आहेत. सर्व साधनांचे फल सुंदर हरिभक्ती हेच आहे. संतांविना कुणाला ते मिळाले नाही. ॥ ९ ॥

**असं बिचारि जोइ कर सतसंगा। राम भगति तेहि सुलभ बिहंगा॥**

असा विचार करून जो कोणी संतांची संगती करतो, हे गरुडा, त्याला श्रीरामांची भक्ती सुलभ असते. ॥ १० ॥

दो०—**ब्रह्म पयोनिधि मंदर ग्यान संत सुर आहिं।**
**कथा सुधा मथि काढ़हिं भगति मधुरता जाहिं॥ १२० (क)॥**

वेद हे समुद्र आहेत, ज्ञान हे मंदराचल आहे आणि संत हे देव आहेत. देव त्या समुद्राचे मंथन करून कथारूपी अमृत काढतात. त्यात भक्तिरूपी माधुर्य वसत असते. ॥ १२० (क) ॥

**बिरति चर्म असि ग्यान मद लोभ मोह रिपु मारि।**
**जय पाइअ सो हरि भगति देखु खगेस बिचारि॥ १२० (ख)॥**

वैराग्यरूपी ढालीने स्वतःचा बचाव करीत आणि ज्ञानरूपी तलवारीने मद, लोभ आणि मोहरूपी वैऱ्यांना मारून जी विजय मिळविते, ती हरिभक्तीच होय. हे पक्षिराजा, याचा विचार करून बघ.' ॥ १२० (ख) ॥

**पुनि सप्रेम बोलेउ खगराऊ। जौं कृपाल मोहि ऊपर भाऊ॥**
**नाथ मोहि निज सेवक जानी। सप्त प्रस्न मम कहहु बखानी॥**

पक्षिराज गरुड मग प्रेमाने म्हणाला, 'हे कृपाळू, जर तुमचे माझ्यावर प्रेम असेल, तर हे नाथ, मला आपला सेवक मानून माझ्या सात प्रश्नांची उत्तरे विस्ताराने सांगा. ॥ १ ॥

**प्रथमहिं कहहु नाथ मतिधीरा। सब ते दुर्लभ कवन सरीरा॥**
**बड़ दुख कवन कवन सुख भारी। सोउ संछेपहिं कहहु बिचारी॥**

हे नाथ, हे धीरबुद्धी, प्रथम हे सांगा की, सर्वांत दुर्लभ शरीर कोणते आहे? मग सर्वांत मोठे दुःख आणि सर्वांत मोठे सुख कोणते आहे, तेसुद्धा विचार करून थोडक्यात सांगा. ॥ २ ॥

**संत असंत मरम तुम्ह जानहु। तिन्ह कर सहज सुभाव बखानहु॥**
**कवन पुन्य श्रुति बिदित बिसाला। कहहु कवन अघ परम कराला॥**

संत आणि असंत यांचे मर्म तुम्ही जाणता, तेव्हा त्यांच्या स्वभावाचे वर्णन करा. नंतर हे सांगा की, श्रुतींमध्ये प्रसिद्ध असे सर्वांत महान पुण्य कोणते आहे आणि सर्वांत महाभयंकर पाप कोणते आहे ?॥ ३ ॥

**मानस रोग कहहु समुझाई। तुम्ह सर्बग्य कृपा अधिकाई॥**
**तात सुनहु सादर अति प्रीती। मैं संछेप कहउँ यह नीती॥**

नंतर मानसिक रोग समजावून सांगा. तुम्ही सर्वज्ञ आहात आणि माझ्यावर तुमची कृपासुद्धा फार आहे.' काकभुशुंडी म्हणाले की, 'हे तात, अत्यंत प्रेमाने व आदराने ऐक. मी ही नीती थोडक्यात सांगतो. ॥ ४ ॥

**नर तन सम नहिं कवनिउ देही। जीव चराचर जाचत तेही॥**
**नरक स्वर्ग अपबर्ग निसेनी। ग्यान बिराग भगति सुभ देनी॥**

मनुष्य-शरीरासमान कोणतेही शरीर नाही. सर्व चराचर जीव त्याचीच याचना करतात. हे मनुष्य-शरीर नरक, स्वर्ग व मोक्ष यांची पायरी आहे आणि कल्याणकारी ज्ञान, वैराग्य आणि भक्ती देणारे आहे. ॥ ५ ॥

**सो तनु धरि हरि भजहिं न जे नर। होहिं बिषय रत मंद मंद तर॥**
**काँच किरिच बदलें ते लेहीं। कर ते डारि परस मनि देहीं॥**

असे मनुष्य-शरीर प्राप्त करूनही जे लोक श्रीहरीचे भजन करीत नाहीत आणि अत्यंत नीच विषयांमध्ये अनुरक्त असतात, ते परीस आपल्या हाताने फेकून देऊन त्याच्या बदली काचेचे तुकडे घेतात. ॥ ६ ॥

**नहिं दरिद्र सम दुख जग माहीं। संत मिलन सम सुख जग नाहीं॥**
**पर उपकार बचन मन काया। संत सहज सुभाउ खगराया॥**

जगात दारिद्र्यासारखे दुःख नाही आणि संतांना भेटण्यासारखे सुख नाही आणि हे पक्षिराज, कायावाचामनाने परोपकार करणे हा संतांचा सहज स्वभाव आहे. ॥ ७ ॥

**संत सहहिं दुख पर हित लागी। पर दुख हेतु असंत अभागी॥**
**भूर्ज तरू सम संत कृपाला। पर हित निति सह बिपति बिसाला॥**

संत दुसऱ्यांच्या कल्याणासाठी दुःख सहन करतात आणि अभागी दुर्जन दुसऱ्यांना दुःख देण्यासाठी झटतात. कृपाळू संत भोजवृक्षाप्रमाणे दुसऱ्यांच्या हितासाठी मोठे संकटही सहन करतात. ॥ ८ ॥

**सन इव खल पर बंधन करई। खाल कढ़ाइ बिपति सहि मरई॥**
**खल बिनु स्वारथ पर अपकारी। अहि मूषक इव सुनु उरगारी॥**

परंतु दुष्ट लोक तागाप्रमाणे दुसऱ्यांना बांधतात आणि त्यांना बांधून टाकण्यासाठी स्वतःची चामडी सोलून घेऊन विपत्ती सहन करून मरतात. हे गरुडा, दुष्ट हे स्वार्थावाचून साप व उंदराप्रमाणे कारण नसताना दुसऱ्यांवर अपकार करतात. ॥ ९ ॥

**पर संपदा बिनासि नसाहीं । जिमि ससि हति हिम उपल बिलाहीं ॥**
**दुष्ट उदय जग आरति हेतू । जथा प्रसिद्ध अधम ग्रह केतू ॥**

ते दुसऱ्याच्या संपत्तीचा नाश करून स्वतः नष्ट होतात, ज्याप्रमाणे गारा या शेतीचा नाश करून स्वतः नष्ट होतात. दुष्टाची उन्नती ही प्रसिद्ध अधम अशा धूमकेतूच्या उदयाप्रमाणे जगाच्या दुःखासाठीच असते. ॥ १० ॥

**संत उदय संतत सुखकारी । बिस्व सुखद जिमि इंदु तमारी ॥**
**परम धर्म श्रुति बिदित अहिंसा । पर निंदा सम अघ न गरीसा ॥**

आणि संतांचा अभ्युदय हा नेहमीच सुखकर असतो, ज्याप्रमाणे चंद्र आणि सूर्याचा उदय संपूर्ण विश्वासाठी सुखदायक असतो. वेदांमध्ये अहिंसेला परमधर्म मानले आहे आणि परनिंदेसारखे मोठे पाप नाही. ॥ ११ ॥

**हर गुर निंदक दादुर होई । जन्म सहस्र पाव तन सोई ॥**
**द्विज निंदक बहु नरक भोग करि । जग जनमइ बायस सरीर धरि ॥**

शंकर व गुरू यांची निंदा करणारा मनुष्य पुढील जन्मी बेडूक होतो आणि त्याला हजार जन्म तेच बेडकाचे शरीर मिळते. ब्राह्मणांची निंदा करणारी व्यक्ती पुष्कळ जन्म नरक भोगून मग जगात कावळ्याचे शरीर घेऊन जन्म घेते. ॥ १२ ॥

**सुर श्रुति निंदक जे अभिमानी । रौरव नरक परहिं ते प्रानी ॥**
**होहिं उलूक संत निंदा रत । मोह निसा प्रिय ग्यान भानु गत ॥**

जे अभिमानी जीव देवांची व वेदांची निंदा करतात, ते रौरव नरकात पडतात. संतांची निंदा करीत राहाणारे लोक घुबड होतात. त्यांना मोहरूपी रात्र आवडते आणि ज्ञानरूपी सूर्याचा त्यांच्यासाठी अस्त झालेला असतो. ॥ १३ ॥

**सब कै निंदा जे जड़ करहीं । ते चमगादुर होइ अवतरहीं ॥**
**सुनहु तात अब मानस रोगा । जिन्ह ते दुख पावहिं सब लोगा ॥**

जे मूर्ख लोक सर्वांची निंदा करतात, ते वटवाघुळाचा जन्म घेतात. हे तात, आता मानसिक रोग ऐक. ज्यामुळे सर्व लोकांना दुःख भोगावे लागते. ॥ १४ ॥

**मोह सकल ब्याधिन्ह कर मूला । तिन्ह ते पुनि उपजहिं बहु सूला ॥**
**काम बात कफ लोभ अपारा । क्रोध पित्त नित छाती जारा ॥**

सर्व रोगांचे मूळ अज्ञान होय. या अज्ञानाच्या व्याधींनी फार यातना होतात. काम हा वात आहे, लोभ अपार कफ आहे आणि क्रोध हा पित्त आहे. तो नेहमी छाती जाळत असतो. ॥ १५ ॥

**प्रीति करहिं जौं तीनिउ भाई । उपजइ सन्यपात दुखदाई ॥**
**बिषय मनोरथ दुर्गम नाना । ते सब सूल नाम को जाना ॥**

जर वात, पित्त, कफ हे एकत्र आले तर दुःखदायक सन्निपात रोग उत्पन्न होतो. मोठ्या कष्टाने मिळणाऱ्या विषयांचे जे मनोरथ आहेत, ते सर्वच कष्टदायक रोग होत. ते अपार असल्यामुळे त्यांची नावे कोण जाणणार ? ॥ १६ ॥

**ममता दादु कंडु इरषाई । हरष बिषाद गरह बहुताई ॥**
**पर सुख देखि जरनि सोइ छई । कुष्ट दुष्टता मन कुटिलई ॥**

ममता हा गजकर्ण आहे. ईर्ष्या ही खरूज आहे. हर्ष-विषाद हे गलगंड (कंठाचा किंवा गळ्याचा रोग) इत्यादी गळ्याचे वाढलेले रोग होत. दुसऱ्याचे सुख पाहून ज्याचा जळफळाट होतो, तो क्षय होय. दुष्टता आणि मनाची कुटिलता हे कोड होय. ॥ १७ ॥

**अहंकार अति दुखद डमरुआ । दंभ कपट मद मान नेहरुआ ॥**
**तृस्ना उदरबृद्धि अति भारी । त्रिबिधि ईषना तरुन तिजारी ॥**

अहंकार अत्यंत दुःख देणारा संधिवात रोग होय. दंभ, कपट, मद आणि मान हे नारू होत. तृष्णा हा फार मोठा जलोदर रोग आहे. पुत्र, धन व मान यांच्याविषयी तीन प्रकारच्या प्रबळ इच्छा हा तीन तीन दिवसांआड येणारा ताप होय. ॥ १८ ॥

**जुग बिधि ज्वर मत्सर अबिबेका । कहँ लगि कहौं कुरोग अनेका ॥**

मत्सर व अविवेक हे दोन प्रकारचे ज्वर आहेत. अशाप्रकारे अनेक वाईट रोग आहेत. ते किती सांगू ? ॥ १९ ॥

दो०—**एक ब्याधि बस नर मरहिं ए असाधि बहु ब्याधि ।**
**पीड़हिं संतत जीव कहुँ सो किमि लहै समाधि ॥ १२१ ( क ) ॥**

एकाच रोगाला बळी पडल्यावर मनुष्य मरून जातो, मग हे तर अनेक असाध्य रोग आहेत. हे जिवाला सतत त्रास देतात. अशा परिस्थितीत मनुष्य समाधीची शांती कशी प्राप्त करू शकेल ? ॥

**नेम धर्म आचार तप ग्यान जग्य जप दान ।**
**भेषज पुनि कोटिन्ह नहिं रोग जाहिं हरिजान ॥ १२१ ( ख ) ॥**

नियम, धर्म, उत्तम आचार, तप, ज्ञान, यज्ञ, जप, दान व आणखीही कोट्यवधी औषधे आहेत. परंतु हे गरुडा, त्या औषधांनी हे रोग जात नाहीत. ॥ १२१ (ख) ॥

**एहि बिधि सकल जीव जग रोगी । सोक हरष भय प्रीति बियोगी ॥**
**मानस रोग कछुक मैं गाए । हहिं सब कें लखि बिरलेन्ह पाए ॥**

अशाप्रकारे जगातील सर्व जीव हे रोगी आहेत. ते शोक, हर्ष, भय,प्रीती आणि वियोगाच्या दु:खाने आणखीनच दु:खी होत असतात. मी या काही थोड्याच मानसिक रोगांबद्दल सांगितले आहे. हे रोग सर्वांनाच आहेत, परंतु कुणा एखाद्यालाच ते कळतात. ॥ १ ॥

**जाने ते छीजहिं कछु पापी । नास न पावहिं जन परितापी ॥**
**बिषय कुपथ्य पाइ अंकुरे । मुनिहु हृदयँ का नर बापुरे ॥**

प्राण्यांना जाळणारे हे पापी रोग जाणल्यामुळे काहीसे क्षीण नक्की होतात, पण त्यांचा नाश होत नाही. विषयरूप कुपथ्य झाल्यावर ते मुनींच्या हृदयातही उगवतात, मग बिचाऱ्या सामान्य मनुष्याचे काय ? ॥ २ ॥

**राम कृपाँ नासहिं सब रोगा । जौं एहि भाँति बनै संजोगा ॥**
**सदगुर बैद बचन बिस्वासा । संजम यह न बिषय कै आसा ॥**

जर श्रीरामांच्या कृपेने अशा प्रकारचा योग आला, तर हे सर्व रोग नष्ट होतील. सद्गुरुरूपी वैद्याच्या शब्दांवर विश्वास ठेवावा. विषयांची आशा धरू नये, हेच पथ्य असावे. ॥ ३ ॥

**रघुपति भगति सजीवन मूरी । अनूपान श्रद्धा मति पूरी ॥**
**एहि बिधि भलेहिं सो रोग नसाहीं । नाहिं त जतन कोटि नहिं जाहीं ॥**

श्रीरघुनाथांची भक्ती ही संजीवनी मुळी आहे. श्रद्धेने पूर्ण बुद्धी ही तिचे अनुपान आहे. अशाप्रकारे योग असेल, तर रोग कदाचित नष्ट होईल. नाहीतर कोट्यवधी प्रयत्नांनीही ते जात नाहीत. ॥ ४ ॥

**जानिअ तब मन बिरुज गोसाँई । जब उर बल बिराग अधिकाई ॥**
**सुमति छुधा बाढ़इ नित नई । बिषय आस दुर्बलता गई ॥**

हे गोस्वामी, मन निरोगी झाले, असे तेव्हाच समजावे, जेव्हा मनामधील वैराग्याचे बल वाढेल, उत्तम बुद्धिरूपी भूक नित्य वाढत राहील आणि विषयांच्या विषयीची आशारूपी दुर्बळता नष्ट होईल. ॥ ५ ॥

**बिमल ग्यान जल जब सो नहाई । तब रह राम भगति उर छाई ॥**
**सिव अज सुक सनकादिक नारद । जे मुनि ब्रह्म बिचार बिसारद ॥**

अशाप्रकारे सर्व रोगांपासून सुटका झाल्यावर जेव्हा मनुष्य निर्मल ज्ञानरूपी जलामध्ये स्नान करील, तेव्हा त्याच्या मनात रामभक्ती पसरेल. शिव, ब्रह्मदेव, शुकदेव, सनकादिक आणि नारद इत्यादी ब्रह्मविचारामध्ये जे अत्यंत निपुण असे मुनी आहेत, ॥ ६ ॥

**सब कर मत खगनायक एहा । करिअ राम पद पंकज नेहा ॥**
**श्रुति पुरान सब ग्रंथ कहाहीं । रघुपति भगति बिना सुख नाहीं ॥**

हे पक्षिराजा, त्या सर्वांचे हेच मत आहे की, श्रीरामांच्या चरणकमलांची भक्ती केली पाहिजे. श्रुती, पुराण आणि सर्व ग्रंथ सांगतात की, श्रीरघुनाथांच्या भक्तीविना सुख नाही. ॥ ७ ॥

**कमठ पीठ जामहिं बरु बारा। बंध्या सुत बरु काहुहि मारा॥**
**फूलहिं नभ बरु बहुबिधि फूला। जीव न लह सुख हरि प्रतिकूला॥**

कासवाच्या पाठीवर एखादे वेळी केस उगवतील, वांझेचा मुलगा एखादे वेळी कोणाला मारूनही टाकेल, आकाशात सुद्धा एखादे वेळी अनेक प्रकारची फुले उमलतील, परंतु श्रीहरींना विन्मुख होऊन जिवाला सुख कधीच मिळू शकणार नाही.॥ ८॥

**तृषा जाइ बरु मृगजल पाना। बरु जामहिं सस सीस बिषाना॥**
**अंधकारु बरु रबिहि नसावै। राम बिमुख न जीव सुख पावै॥**

मृगतृष्णेच्या पाण्याने कदाचित तहान भागली, सशाला शिंगे उगवली, अंधकाराने सूर्याचा नाश केला, अशा अशक्या गोष्टी झाल्या, तरी श्रीहरींना विन्मुख होऊन जिवाला सुख मिळू शकत नाही.॥ ९॥

**हिम ते अनल प्रगट बरु होई। बिमुख राम सुख पाव न कोई॥**

कदाचित बर्फातून आग उत्पन्न झाली, तरीही श्रीहरींना विन्मुख होऊन कुणालाही सुख मिळू शकत नाही.॥ १०॥

दो०—**बारि मथें घृत होइ बरु सिकता ते बरु तेल।**
**बिनु हरि भजन न भव तरिअ यह सिद्धांत अपेल॥ १२२ (क)॥**

पाणी घुसळल्याने कदाचित तूप उत्पन्न होईल आणि वाळू घाण्यातून काढल्यास एखादे वेळी तेल निघेल, परंतु श्रीहरींच्या भजनाशिवाय संसाररूपी सागरातून तरून जाता येणार नाही, हा अटळ सिद्धांत आहे.॥ १२२(क)॥

**मसकहि करइ बिरंचि प्रभु अजहि मसक ते हीन।**
**अस बिचारि तजि संसय रामहि भजहिं प्रबीन॥ १२२ (ख)॥**

प्रभू हे कीटकाला ब्रह्मदेव बनवू शकतात आणि ब्रह्मदेवालाही कीटकाहून क्षुद्र करू शकतात. असा विचार करून चतुर पुरुष सर्व संशय सोडून श्रीहरींचे भजन करतात.॥ १२२(ख)॥

श्लोक—**विनिश्चितं वदामि ते न अन्यथा वचांसि मे।**
**हरिं नरा भजन्ति येऽतिदुस्तरं तरन्ति ते॥ १२२ (ग)॥**

मी तुला चांगल्याप्रकारे निश्चित केलेला सिद्धांत सांगतो. माझे वचन मिथ्या नाही. जे मनुष्य श्रीहरींचे भजन करतात, ते अत्यंत दुस्तर असा संसारसागर सहजपणे पार करतात.॥ १२२(ग)॥

**कहेउँ नाथ हरि चरित अनूपा। ब्यास समास स्वमति अनुरूपा॥**
**श्रुति सिद्धांत इहइ उरगारी। राम भजिअ सब काज बिसारी॥**

हे नाथ, मी श्रीहरींचे अनुपम चरित्र आपल्या बुद्धीप्रमाणे काही ठिकाणी विस्ताराने तर काही ठिकाणी संक्षिप्तपणे सांगितले. हे गरुडा, श्रुतींचा हाच सिद्धांत आहे की, सर्व कामे सोडून देऊन श्रीरामांचे भजन केले पाहिजे. ॥ १ ॥

**प्रभु रघुपति तजि सेइअ काही । मोहि से सठ पर ममता जाही ॥**
**तुम्ह बिग्यानरूप नहिं मोहा । नाथ कीन्हि मो पर अति छोहा ॥**

ज्यांचे माझ्यासारख्या मूर्खावर सुद्धा प्रेम आहे, अशा प्रभू श्रीरामचंद्रांना सोडून इतर कुणाचे भजन करावे ? तू ज्ञानरूप आहेस. तुला मोह नाही. तू तर माझ्यावर हे विचारून मोठी कृपा केलीस. ॥ २ ॥

**पूँछिहु राम कथा अति पावनि । सुक सनकादि संभु मन भावनि ॥**
**सत संगति दुर्लभ संसारा । निमिष दंड भरि एकउ बारा ॥**

तू मला शुकदेव, सनकादिक आणि शिव यांच्या मनाला आवडणारी अतिपवित्र रामकथा विचारलीस. जगामध्ये घडीभर किंवा पळभर एकवेळ मिळणारा सत्संगही दुर्लभ आहे. ॥ ३ ॥

**देखु गरुड़ निज हृदयँ बिचारी । मैं रघुबीर भजन अधिकारी ॥**
**सकुनाधम सब भाँति अपावन । प्रभु मोहि कीन्ह बिदित जग पावन ॥**

हे गरुडा, आपल्या मनात विचार करून बघ. मी काय श्रीरामांच्या भजनास पात्र आहे? पक्ष्यांमध्ये मी सर्वांत नीच आणि सर्वप्रकारे अपवित्र आहे. परंतु असे असतानाही प्रभूंनी मला सर्व जगाला पवित्र करणारा म्हणून प्रसिद्ध केले. ॥ ४ ॥

दो०—**आजु धन्य मैं धन्य अति जद्यपि सब बिधि हीन ।**
**निज जन जानि राम मोहि संत समागम दीन ॥ १२३ ( क ) ॥**

जरी मी सर्व प्रकारे हीन आहे, तरीही मी आज धन्य आहे. अत्यंत धन्य आहे. कारण श्रीरामांनी मला ‘आपला’ मानून संत-समागम दिला. ॥ १२३ (क) ॥

**नाथ जथामति भाषेउँ राखेउँ नहिं कछु गोइ ।**
**चरित सिंधु रघुनायक थाह कि पावइ कोइ ॥ १२३ ( ख ) ॥**

हे नाथ, मी आपल्या बुद्धीप्रमाणे सांगितले, काहीही लपवून ठेवले नाही. तरीही श्रीरघुवीरांचे चरित्र समुद्रासमान आहे. त्याचा थांग कुणाला तरी लागू शकेल काय ? ॥ १२३(ख) ॥

**सुमिरि राम के गुन गन नाना । पुनि पुनि हरष भुसुंडि सुजाना ॥**
**महिमा निगम नेति करि गाई । अतुलित बल प्रताप प्रभुताई ॥**

श्रीरामचंद्रांच्या अनेक गुण-समूहांचे स्मरण करता-करता भुशुंडी वारंवार हर्षित होत होते. ज्यांचा महिमा वेदांनी ‘नेति नेति’ म्हणून गायिला आहे, ज्यांचे बल, प्रताप व सामर्थ्य अतुलनीय आहे, ॥ १ ॥

**सिव अज पूज्य चरन रघुराई। मो पर कृपा परम मृदुलाई॥**
**अस सुभाउ कहुँ सुनउँ न देखउँ। केहि खगेस रघुपति सम लेखउँ॥**

ज्या श्रीरघुनाथांचे चरण शिव व ब्रह्मदेव यांना पूज्य आहेत, त्यांची कृपा माझ्यावर झाली, ही त्यांचीच परम कोमलता आहे. कुणाचा असा कृपाळू स्वभाव असल्याचे मी ऐकले नाही की पाहिले नाही. म्हणून हे पक्षिराज, मी रघुनाथांच्यासमान कुणाला समजू?॥ २॥

**साधक सिद्ध बिमुक्त उदासी। कबि कोबिद कृतग्य संन्यासी॥**
**जोगी सूर सुतापस ग्यानी। धर्म निरत पंडित बिग्यानी॥**

साधक, सिद्ध, जीवन्मुक्त, विरक्त, कवी, विद्वान, कर्म-रहस्याचे ज्ञाते, संन्यासी, योगी, शूर, मोठे तपस्वी, ज्ञानी, धर्मपरायण, पंडित आणि ज्ञानी,॥ ३॥

**तरहिं न बिनु सेएँ मम स्वामी। राम नमामि नमामि नमामी॥**
**सरन गएँ मो से अघ रासी। होहिं सुद्ध नमामि अबिनासी॥**

यांपैकी कुणीही माझे स्वामी श्रीराम यांचे भजन केल्याविना तरून जाऊ शकत नाहीत. मी त्याच श्रीरामांना वारंवार नमस्कार करतो. त्यांना शरण गेल्यावर माझ्यासारखा पापांची राशी असलेलाही पापरहित होतो. त्या अविनाशी श्रीरामांना मी नमस्कार करतो.॥ ४॥

दो०—**जासु नाम भव भेषज हरन घोर त्रय सूल।**
**सो कृपाल मोहि तो पर सदा रहउ अनुकूल॥ १२४ (क)॥**

ज्यांचे नाम जन्म-मरणरूपी रोगाचे परिणामकारक औषध आहे आणि आधिदैविक, आधिभौतिक आणि आध्यात्मिक या तीन भयंकर दुःखाचे हरण करणारे आहे, ते कृपाळू श्रीराम माझ्यावर व तुझ्यावर नेहमी प्रसन्न राहोत.'॥ १२४(क)॥

**सुनि भुसुंडि के बचन सुभ देखि राम पद नेह।**
**बोलेउ प्रेम सहित गिरा गरुड़ बिगत संदेह॥ १२४ (ख)॥**

काकभुशुंडी यांचे मंगलमय बोलणे ऐकून व श्रीरामांच्या चरणी त्यांचे अतिशय प्रेम पाहून गरुडाचा संशय पूर्णपणे नाहीसा झाला. तो प्रेमाने म्हणाला,॥ १२४ (ख)॥

**मैं कृतकृत्य भयउँ तव बानी। सुनि रघुबीर भगति रस सानी॥**
**राम चरन नूतन रति भई। माया जनित बिपति सब गई॥**

'श्रीरघुवीरांच्या भक्तिरसात बुडालेली तुमची वाणी ऐकून मी कृतकृत्य झालो. श्रीरामांच्या चरणी मला नवीन प्रेम उत्पन्न झाले आणि मायेमुळे उत्पन्न झालेली सर्व संकटे निघून गेली.॥ १॥

**मोह जलधि बोहित तुम्ह भए। मो कहँ नाथ बिबिध सुख दए॥**
**मो पहिं होइ न प्रति उपकारा। बंदउँ तव पद बारहिं बारा॥**

मोहरूपी समुद्रात बुडत असताना मला वाचविण्यासाठी तुम्ही जहाज झालात. हे नाथ, तुम्ही मला अनेक प्रकारचे सुख दिले. माझ्याकडून या उपकाराची परतफेड होऊ शकत नाही. मी फक्त तुमच्या चरणांना वारंवार वंदनच करू शकतो.॥ २॥

**पूरन काम राम अनुरागी। तुम्ह सम तात न कोउ बड़भागी॥**
**संत बिटप सरिता गिरि धरनी। पर हित हेतु सबन्ह कै करनी॥**

तुम्ही पूर्णकाम आहात आणि श्रीरामांचे भक्त आहात. हे तात, तुमच्यासारखा मोठा भाग्यवान कुणी नाही. संत, वृक्ष, नदी, पर्वत आणि पृथ्वी या सर्वांचे कार्य दुसऱ्यांच्या हितासाठीच असते.॥ ३॥

**संत हृदय नवनीत समाना। कहा कबिन्ह परि कहै न जाना॥**
**निज परिताप द्रवइ नवनीता। पर दुख द्रवहिं संत सुपुनीता॥**

कवी असे म्हणतात की, संतांचे हृदय हे लोण्याप्रमाणे कोमल असते. परंतु त्यांना खरी गोष्ट सांगणे, जमले नाही. कारण लोणी हे स्वतःला ताप झाल्याने वितळते आणि परम पवित्र संत हे दुसऱ्याच्या तापाने विरघळतात.॥ ४॥

**जीवन जन्म सुफल मम भयऊ। तव प्रसाद संसय सब गयऊ॥**
**जानेहु सदा मोहि निज किंकर। पुनि पुनि उमा कहइ बिहंगबर॥**

माझे जीवन व जन्म सफळ झाला. तुमच्या कृपेमुळे सर्व संशय निघून गेले. तुम्ही मला नेहमी आपला दास माना.' शिव म्हणतात, 'हे उमे, पक्षिश्रेष्ठ गरुड वारंवार असे म्हणत होता.॥ ५॥

दो०—**तासु चरन सिरु नाइ करि प्रेम सहित मतिधीर।**
**गयउ गरुड़ बैकुंठ तब हृदयँ राखि रघुबीर॥ १२५ (क)॥**

भुशुंडींच्या चरणी प्रेमाने मस्तक ठेवून आणि हृदयामध्ये श्रीरघुवीरांना धारण करून धीरबुद्धीचा गरुड नंतर वैकुंठाला निघून गेला.॥ १२५(क)॥

**गिरिजा संत समागम सम न लाभ कछु आन।**
**बिनु हरि कृपा न होइ सो गावहिं बेद पुरान॥ १२५ (ख)॥**

हे गिरिजे, संत-समागमासमान दुसरा कोणताही लाभ नाही. परंतु तो संत-समागम श्रीहरींच्या कृपेशिवाय होत नाही, असे वेद-पुराणांनी सांगितले आहे.॥ १२५(ख)॥

**कहेउँ परम पुनीत इतिहासा। सुनत श्रवन छूटहिं भव पासा॥**
**प्रनत कल्पतरु करुना पुंजा। उपजइ प्रीति राम पद कंजा॥**

मी हा परम पवित्र इतिहास सांगितला. तो कानांनी ऐकताच भवपाश तुटून जातात आणि शरणागतांना मनोवांछित फल देणारे कल्पवृक्ष व दयेचे समूह असलेल्या श्रीरामांच्या चरणकमलांविषयी प्रेम उत्पन्न होते. ॥ १ ॥

**मन क्रम बचन जनित अघ जाई । सुनहिं जे कथा श्रवन मन लाई ॥**
**तीर्थाटन साधन समुदाई । जोग बिराग ग्यान निपुनाई ॥**

जे कान देऊन आणि मन लावून कथा ऐकतात, त्यांची कायावाचामनाने केलेली सर्व पापे नष्ट होतात. तीर्थयात्रा इत्यादी पुष्कळशी साधने, योग, वैराग्य, ज्ञान-निपुणता, ॥ २ ॥

**नाना कर्म धर्म ब्रत दाना । संजम दम जप तप मख नाना ॥**
**भूत दया द्विज गुर सेवकाई । बिद्या बिनय बिबेक बड़ाई ॥**

अनेक प्रकारची कर्मे, धर्म, व्रत व दान, अनेक संयम, दम, जप, तप आणि यज्ञ, प्राण्यांवर दया, ब्राह्मण व गुरूंची सेवा, विद्या, विनय, विवेक यांचे आधिक्य इत्यादी ॥ ३ ॥

**जहँ लगि साधन बेद बखानी । सब कर फल हरि भगति भवानी ॥**
**सो रघुनाथ भगति श्रुति गाई । राम कृपाँ काहूँ एक पाई ॥**

जी वेदांनी अनेक साधने सांगितली आहेत, हे भवानी, त्या सर्वांचे फल हरिभक्ती हेच आहे. हे श्रीरामांच्या कृपेने एखाद्यालाच मिळते, असे वेद सांगतात. ॥ ४ ॥

दो०—**मुनि दुर्लभ हरि भगति नर पावहिं बिनहिं प्रयास ।**
**जे यह कथा निरंतर सुनहिं मानि बिस्वास ॥ १२६ ॥**

परंतु जे मनुष्य विश्वास बाळगून ही कथा निरंतर ऐकतात, ते विनासायास मुनींना दुर्लभ अशीही हरिभक्ती प्राप्त करतात. ॥ १२६ ॥

**सोइ सर्बग्य गुनी सोइ ग्याता । सोइ महि मंडित पंडित दाता ॥**
**धर्म परायन सोइ कुल त्राता । राम चरन जा कर मन राता ॥**

ज्याचे मन श्रीरामांच्या चरणी अनुरक्त आहे, तोच सर्वज्ञ, तोच गुणी, तोच ज्ञानी, तोच पृथ्वीचे भूषण, पंडित, दानी, तोच धर्मपरायण आणि कुलाचा रक्षक होय. ॥ १ ॥

**नीति निपुन सोइ परम सयाना । श्रुति सिद्धांत नीक तेहिं जाना ॥**
**सोइ कबि कोबिद सोइ रनधीरा । जो छल छाड़ि भजइ रघुबीरा ॥**

जो कपट सोडून श्रीरामांचे भजन करतो, तोच नीतीमध्ये निपुण, तोच परम बुद्धिमान होय. त्यानेच वेदांचे सिद्धांत चांगल्याप्रकारे जाणले आहेत. तोच कवी, तोच विद्वान आणि तोच रणधीर होय. ॥ २ ॥

**धन्य देस सो जहँ सुरसरी। धन्य नारि पतिब्रत अनुसरी॥**
**धन्य सो भूपु नीति जो करई। धन्य सो द्विज निज धर्म न टरई॥**

जिथे श्रीगंगा आहे, तो देश धन्य होय, जी पतिव्रता धर्माचे पालन करते, ती स्त्री धन्य होय, जो न्याय करतो, तो राजा धन्य होय आणि जो आपल्या धर्मापासून ढळत नाही, तो ब्राह्मण धन्य होय.॥ ३॥

**सो धन धन्य प्रथम गति जाकी। धन्य पुन्य रत मति सोइ पाकी॥**
**धन्य घरी सोइ जब सतसंगा। धन्य जन्म द्विज भगति अभंगा॥**

जे दान देण्यात खर्च होते, ते धन धन्य होय. जी पुण्याकडे लागते, तीच बुद्धी धन्य व परिपक्व होय. जेव्हा सत्संग घडतो, ती घडी धन्य होय आणि ज्यामध्ये ब्राह्मणाविषयी अखंड भक्ती असते, तोच जन्म धन्य होय.॥ ४॥

दो०—**सो कुल धन्य उमा सुनु जगत पूज्य सुपुनीत।**
**श्रीरघुबीर परायन जेहिं नर उपज बिनीत॥ १२७॥**

हे उमे, ऐक. ज्या कुलात श्रीरघुवीरपरायण विनम्र पुरुष उत्पन्न होतो, ते कुल धन्य होय आणि जगासाठी ते पूज्य होय.॥ १२७॥

**मति अनुरूप कथा मैं भाषी। जद्यपि प्रथम गुप्त करि राखी॥**
**तव मन प्रीति देखि अधिकाई। तब मैं रघुपति कथा सुनाई॥**

जरी ही कथा मी पूर्वी गुप्त ठेवली होती, तरी ती मी आपल्या बुद्धीप्रमाणे तुला सांगितली. जेव्हा मी तुझ्या मनात अधिक प्रेम आहे, असे पाहिले, तेव्हाच श्रीरघुनाथांची कथा तुला सांगितली.॥ १॥

**यह न कहिअ सठही हठसीलहि। जो मन लाइ न सुन हरि लीलहि॥**
**कहिअ न लोभिहि क्रोधिहि कामिहि। जो न भजइ सचराचर स्वामिहि॥**

जे मूर्ख असतील, धूर्त स्वभावाचे असतील आणि श्रीहरींची लीला मनःपूर्वक ऐकत नसतील, त्यांना ही कथा सांगू नये. जे लोभी, क्रोधी आणि कामी हे चराचराचे स्वामी असलेल्या श्रीरामांना भजत नाहीत, त्यांना ही कथा सांगू नये.॥ २॥

**द्विज द्रोहिहि न सुनाइअ कबहूँ। सुरपति सरिस होइ नृप जबहूँ॥**
**राम कथा के तेइ अधिकारी। जिन्ह कें सत संगति अति प्यारी॥**

जरी तो देवराज इंद्रासमान ऐश्वर्यशाली राजा असला, परंतु ब्राह्मणांचा द्रोही असला, तरीही त्याला ही कथा ऐकवू नये. ज्यांना सत्संगती अत्यंत आवडते, तेच श्रीरामांच्या कथेचे अधिकारी आहेत.॥ ३॥

**गुर पद प्रीति नीति रत जेई। द्विज सेवक अधिकारी तेई॥**
**ता कहँ यह बिसेष सुखदाई। जाहि प्रानप्रिय श्रीरघुराई॥**

ज्यांना गुरूंच्या चरणी प्रेम आहे, जे नीतिपरायण आहेत आणि ब्राह्मणांचे सेवक आहेत, तेच या कथेचे अधिकारी असून त्यांनाच ही कथा सुख देते आणि तेच श्रीरघुनाथांना प्राणांसमान प्रिय असतात. ॥ ४ ॥

दो०—**राम चरन रति जो चह अथवा पद निर्बान।**
**भाव सहित सो यह कथा करउ श्रवन पुट पान॥ १२८॥**

ज्याला श्रीरामांच्या चरणी प्रेम हवे आहे किंवा मोक्षपद हवे आहे, त्याने हे कथारूपी अमृत प्रेमपूर्वक आपल्या कानरूपी द्रोणांतून प्यावे. ॥ १२८ ॥

**राम कथा गिरिजा मैं बरनी। कलि मल समनि मनोमल हरनी॥**
**संसृति रोग सजीवन मूरी। राम कथा गावहिं श्रुति सूरी॥**

हे गिरिजे, मी कलियुगातील पापांचा नाश करणाऱ्या आणि मनातील मलिनता दूर करणाऱ्या रामकथेचे वर्णन केले. ही रामकथा जन्ममरणरूपी रोगाच्या नाशासाठी संजीवनी मुळी आहे, असे वेद आणि विद्वान म्हणतात. ॥ १ ॥

**एहि महँ रुचिर सप्त सोपाना। रघुपति भगति केर पंथाना॥**
**अति हरि कृपा जाहि पर होई। पाउँ देइ एहिं मारग सोई॥**

यामध्ये सात पायऱ्या आहेत. त्या श्रीरघुनाथांची भक्ती प्राप्त करण्याचा मार्ग आहेत. ज्याच्यावर श्रीहरीची अत्यंत कृपा होते, तोच या मार्गावर पाऊल ठेवतो. ॥ २ ॥

**मन कामना सिद्धि नर पावा। जे यह कथा कपट तजि गावा॥**
**कहहिं सुनहिं अनुमोदन करहीं। ते गोपद इव भवनिधि तरहीं॥**

जे कपट न ठेवता ही कथा गातात, त्यांची मनोकामना पूर्ण होते. जे ही सांगतात, ऐकतात आणि हिची प्रशंसा करतात, ते संसाररूपी समुद्राला गाईच्या खुरामुळे झालेल्या खड्ड्याप्रमाणे सहज पार करून जातात.' ॥ ३ ॥

**सुनि सब कथा हृदय अति भाई। गिरिजा बोली गिरा सुहाई॥**
**नाथ कृपाँ मम गत संदेहा। राम चरन उपजेउ नव नेहा॥**

याज्ञवल्क्य म्हणतात, 'ही सर्व कथा ऐकून पार्वतीच्या मनाला फार आवडली. ती सुंदर वाणीने म्हणाली, 'स्वामींच्या कृपेने माझा संशय निघून गेला आणि श्रीरामांच्या चरणी मला नवीन प्रेम उत्पन्न झाले. ॥ ४ ॥

दो०—**मैं कृतकृत्य भइउँ अब तव प्रसाद बिस्वेस।**
**उपजी राम भगति दृढ़ बीते सकल कलेस॥ १२९॥**

हे विश्वनाथ, तुमच्या कृपेने आता मी कृतार्थ झाले. माझ्यामध्ये दृढ रामभक्ती उत्पन्न झाली आणि माझे सर्व क्लेश नष्ट झाले.'॥ १२९ ॥

**यह सुभ संभु उमा संबादा। सुख संपादन समन बिषादा॥**
**भव भंजन गंजन संदेहा। जन रंजन सज्जन प्रिय एहा॥**

शिव-पार्वतींचा हा कल्याणकारी संवाद सुख देणारा आणि शोकाचा नाश करणारा आहे. तो जन्म-मरणाचा अंत करणारा, संशयांचा नाश करणारा, भक्तांना आनंद देणारा आणि संत पुरुषांना प्रिय असा आहे.॥ १ ॥

**राम उपासक जे जग माहीं। एहि सम प्रिय तिन्ह कें कछु नाहीं॥**
**रघुपति कृपाँ जथामति गावा। मैं यह पावन चरित सुहावा॥**

जगामध्ये जितके म्हणून रामोपासक आहेत, त्यांना तर या रामकथेसमान काहीही प्रिय नाही. श्रीरघुनाथांच्या कृपेने मी हे सुंदर आणि पवित्र करणारे चरित्र आपल्या बुद्धीनुसार गायिले आहे.॥ २ ॥

**एहिं कलिकाल न साधन दूजा। जोग जग्य जप तप ब्रत पूजा॥**
**रामहि सुमिरिअ गाइअ रामहि। संतत सुनिअ राम गुन ग्रामहि॥**

तुलसीदास म्हणतात, 'या कलियुगात योग, यज्ञ, जप, तप, व्रत आणि पूजन इत्यादी कोणतेही दुसरे साधन नाही. बस्स. श्रीरामांचेच स्मरण, त्यांचेच गुण गाणे आणि निरंतर त्यांचेच गुणसमूह ऐकणे, एवढेच करावे.॥ ३ ॥

**जासु पतित पावन बड़ बाना। गावहिं कबि श्रुति संत पुराना॥**
**ताहि भजहि मन तजि कुटिलाई। राम भजें गति केहिं नहिं पाई॥**

पतितांना पवित्र करणे हा ज्यांचा बाणा प्रसिद्ध आहे, असे कवी, वेद, संत आणि पुराणे सांगतात, अरे मना, कुटिलता सोडून त्यांनाच भज. श्रीरामांना भजल्यामुळे कुणाला परम गती मिळाली नाही?॥ ४ ॥

छं०—**पाई न केहिं गति पतित पावन राम भजि सुनु सठ मना।**
**गनिका अजामिल ब्याध गीध गजादि खल तारे घना॥**
**आभीर जमन किरात खस स्वपचादि अति अघरूप जे।**
**कहि नाम बारक तेपि पावन होहिं राम नमामि ते॥ १॥**

अरे मूर्ख मना! ऐक. पतितांना पावन करणाऱ्या श्रीरामांना भजून कुणाला परम गती मिळाली नाही? गणिका, अजामेळ, व्याध, गिधाड, गज इत्यादी अनेक दुष्टांना त्यांनी तारले. आभीर, यवन, किरात, खस, चांडाळ इत्यादी जे अत्यंत पापरूपच आहेत, तेसुद्धा एकदा त्यांचे नाम घेऊन पवित्र होतात, त्या श्रीरामांना मी नमस्कार करतो.॥ १ ॥

**रघुबंस भूषन चरित यह नर कहहिं सुनहिं जे गावहीं।**
**कलि मल मनोमल धोइ बिनु श्रम राम धाम सिधावहीं॥**
**सत पंच चौपाईं मनोहर जानि जो नर उर धरै।**
**दारुन अबिद्या पंच जनित बिकार श्री रघुबर हरै॥ २॥**

जे मनुष्य रघुवंशाचे भूषण श्रीराम यांचे हे चरित्र सांगतात, ऐकतात आणि गातात, ते कलियुगातील पापे आणि मनाची मलिनता धुऊन टाकून, विनासायास श्रीरामांच्या परमधामास जातात. जास्त काय, जे मनुष्य या रामचरित मानसामधील पाच-सात चौपायासुद्धा मनोहर मानून हृदयामध्ये धारण करतात, त्यांचेही पाच प्रकारच्या अविद्यांमुळे उत्पन्न झालेले विकार श्रीराम हरण करून घेतात. ॥ २ ॥

**सुंदर सुजान कृपा निधान अनाथ पर कर प्रीति जो।**
**सो एक राम अकाम हित निर्बानप्रद सम आन को॥**
**जाकी कृपा लवलेस ते मतिमंद तुलसीदासहूँ।**
**पायो परम बिश्रामु राम समान प्रभु नाहीं कहूँ॥ ३॥**

परम सुंदर, सर्वज्ञ, कृपानिधान आणि अनाथांवर प्रेम करणारे, असे एक श्रीरामचंद्रच आहेत. त्यांच्यासारखा निष्काम भावनेने हित करणारा सुहृद आणि मोक्ष देणारा दुसरा कोण आहे? ज्यांच्या लेशमात्र कृपेमुळे मंदबुद्धीच्या तुलसीदासानेही परम शांती प्राप्त केली, त्या श्रीरामांच्यासमान प्रभू कुठेही नाही. ॥ ३ ॥

दो०—**मो सम दीन न दीन हित तुम्ह समान रघुबीर।**
**अस बिचारि रघुबंस मनि हरहु बिषम भव भीर॥ १३० (क)॥**

हे रघुवीर, माझ्यासारखा दीन कोणी नाही आणि तुमच्यासारखा दीनांचे हित करणारा कोणी नाही. असा विचार करून हे रघुवंशशिरोमणी, माझे जन्म-मरणाचे भयानक दुःख हरण करा. ॥ १३०(क) ॥

**कामिहि नारि पिआरि जिमि लोभिहि प्रिय जिमि दाम।**
**तिमि रघुनाथ निरंतर प्रिय लागहु मोहि राम॥ १३० (ख)॥**

ज्याप्रमाणे कामी पुरुषाला स्त्री प्रिय असते आणि लोभी मनुष्याला धन प्रिय वाटते, तसेच हे रघुनाथ, हे श्रीराम, तुम्ही मला निरंतर प्रिय वाटत राहा. ॥ १३० (ख) ॥

श्लो०—**यत्पूर्वं प्रभुणा कृतं सुकविना श्रीशम्भुना दुर्गमं**
**श्रीमद्रामपदाब्जभक्तिमनिशं प्राप्त्यै तु रामायणम्।**
**मत्वा तद्रघुनाथनामनिरतं स्वान्तस्तमःशान्तये**
**भाषाबद्धमिदं चकार तुलसीदासस्तथा मानसम्॥ १॥**

श्रेष्ठ कवी भगवान शंकरांनी प्रथम ज्या दुर्लभ मानस-रामायणाची रचना श्रीरामचंद्रांच्या चरणकमलांवर अनन्य भक्ती प्राप्त होण्यासाठी केली होती, ते मानस-रामायण श्रीरघुनाथांच्या नामामध्येच निरत आहे, हे जाणून तुलसीदासाने आपल्या अंतःकरणातील अंधकार नष्ट करण्यासाठी या 'मानसा' च्या रूपाने ते लोकभाषेत रचले.॥ १॥

**पुण्यं पापहरं सदा शिवकरं विज्ञानभक्तिप्रदं**
**मायामोहमलापहं सुविमलं प्रेमाम्बुपूरं शुभम्।**
**श्रीमद्रामचरित्रमानसमिदं भक्त्यावगाहन्ति ये**
**ते संसारपतङ्गघोरकिरणैर्दह्यन्ति नो मानवाः॥ २॥**

हे श्रीरामचरितमानस पुण्यरूप, पापांचे हरण करणारे, सदा कल्याणकारी, विज्ञान आणि भक्ती देणारे, माया, मोह आणि मल यांचा नाश करणारे, परम निर्मल प्रेमरूपी जलाने भरलेले आणि मंगलमय आहे. जे मनुष्य भक्तिपूर्वक या मानससरोवरात बुडी मारतात, त्यांना संसाररूपी सूर्याची अत्यंत प्रखर किरणे होरपळवीत नाहीत.॥ २॥

**मासपारायण, तिसावा विश्राम।**

## नवाह्नपारायण, नववा विश्राम।

*इति श्रीमद्रामचरितमानसे सकलकलिकलुषविध्वंसने सप्तमः सोपानः समाप्तः।*

*कलियुगातील सर्व पापांचा नाश करणाऱ्या श्रीरामचरितमानसमधील*
*हा सातवा सोपान समाप्त झाला.*

~~०~~

**(उत्तरकाण्ड समाप्त)**

॥ श्रीहरिः ॥

# गोस्वामी तुलसीदासांचे संक्षिप्त जीवन

प्रयागजवळ चित्रकूट जिल्ह्यात राजापूर नावाचे एक गाव आहे, तेथे आत्माराम दुबे नावाचे एक प्रतिष्ठित सरयूपारीण ब्राह्मण राहात होते. त्यांच्या पत्नीचे नाव होते हुलसी. विक्रम संवत् १५५४ च्या श्रावण शुक्ल सप्तमीच्या दिवशी अभुक्त मूळ नक्षत्रावर या भाग्यवान दांपत्याच्या घरी बारा महिने गर्भात राहिल्यावर गोस्वामी तुलसीदासांचा जन्म झाला. जन्मल्यावर बालक तुलसीदास रडले नाहीत. परंतु त्यांच्या मुखातून 'राम' हा शब्द निघाला. जन्मत: त्यांच्या तोंडात बत्तीस दात होते. त्यांची ठेवण पाच वर्षांच्या मुलासारखी होती. अशा प्रकारचे अद्‌भुत बालक पाहून पित्याला अमंगल घडण्याच्या शंकेने भीती वाटू लागली आणि तो त्याविषयी अनेक प्रकारच्या कल्पना करू लागला. माता हुलसीलाही हे पाहून काळजी वाटू लागली. तिने बालकाचे अनिष्ट होईल, या शंकेमुळे दशमी दिवशी रात्री त्या नवजात शिशूला आपल्या दासीबरोबर तिच्या सासरी पाठविले आणि दुसऱ्या दिवशी स्वत: तिने जगाचा निरोप घेतला. चुनिया नावाच्या त्या दासीने मोठ्या प्रेमाने बालकाचे पालन-पोषण केले. जेव्हा तुलसीदास जवळपास साडे पाच वर्षांचे झाले, तेव्हा चुनियाचाही मृत्यू झाला. आता तो बालक अनाथ झाला. तो दारोदार भटकू लागला. त्यावेळी जगज्जननी पार्वतीला त्या होतकरू मुलाची दया आली. ती ब्राह्मण स्त्रीचा वेष घेऊन रोज त्याच्याजवळ जाई आणि त्याला आपल्या हातांनी जेवू घाली.

इकडे भगवान शंकरांच्या प्रेरणेने रामशैलावर राहणाऱ्या श्रीअनंतानंद यांचे प्रिय शिष्य श्रीनरहर्यानंद यांनी त्या बालकाचा शोध घेतला आणि तेथे वि. संवत् १५६१ च्या माघ शुक्ल पंचमी, शुक्रवारच्या दिवशी त्याची मुंज केली. न शिकवताच त्या 'रामबोला' बालकाने गायत्री मंत्राचे उच्चारण केले. ते पाहून सर्व लोक चकित झाले. यानंतर नरहरी स्वामींनी वैष्णवांचे पाच संस्कार करून त्या रामबोलाला राममंत्राची दीक्षा दिली आणि अयोध्येमध्ये राहून ते त्याला विद्या शिकवू लागले. बालक रामबोलाची बुद्धी मोठी प्रखर होती. एकदा गुरुमुखातून आलेले जे तो ऐके, ते त्याला तोंडपाठ होत असे. काही दिवसांनंतर गुरु-शिष्य तेथून शूकरक्षेत्र (सोरों) येथे गेले. तेथे श्रीनरहरीने तुलसीदासांना रामचरित्र ऐकविले. काही दिवसांनंतर ते काशीला गेले. काशीमध्ये शेषसनातन यांच्याजवळ राहून तुलसीदासांनी पंधरा वर्षे वेद व वेदांगांचे अध्ययन केले. इकडे त्यांच्या मनात प्रपंचवासना जागी झाली आणि विद्यागुरूंची आज्ञा घेऊन ते आपल्या जन्मभूमीला आले. तेथे आल्यावर त्यांना दिसले की, त्यांच्या कुटुंबाची वाताहत झालेली आहे. त्यांनी विधिपूर्वक आपल्या पिता इत्यादींचे श्राद्ध केले आणि ते तेथेच राहून लोकांना भगवान श्रीरामांची कथा सांगू लागले.

वि. संवत् १५८३ च्या ज्येष्ठ शुक्ल त्रयोदशीला गुरुवारी भारद्वाज गोत्राच्या एका सुंदर मुलीबरोबर त्यांचा विवाह झाला आणि ते सुखाने आपल्या नवविवाहित पत्नीबरोबर नांदू लागले. एकदा त्यांची पत्नी आपल्या भावाबरोबर आपल्या माहेरी गेली. तुलसीदासही तिच्या मागोमाग तेथे गेले. तेव्हा त्यांच्या पत्नीने त्यांचा फार धिक्कार केला. ती म्हणाली, 'माझ्या या हाडा-मांसाच्या शरीराची तुम्हांला इतकी आसक्ती आहे, तिच्या निम्म्यानेही जर भगवंताबद्दल आसक्ती असती, तर तुमचा उद्धार झाला असता.'

तुलसीदासांच्या मनाला हे शब्द लागले. ते एक क्षणही तेथे थांबले नाहीत. लगेच तेथून निघाले.

तुलसीदास प्रयागला आले. तेथे त्यांनी गृहस्थाचा वेष टाकून साधूचा वेष धारण केला. नंतर तीर्थाटन करीत ते काशीला पोहोचले. मानससरोवराजवळ त्यांना काकभुशुंडींचे दर्शन झाले.

काशीमध्ये तुलसीदास रामकथा सांगू लागले. तेथे त्यांना एक दिवस एक भूत भेटले. त्याने त्यांना हनुमानाचा पत्ता सांगितला. तुलसीदासांनी हनुमानाला भेटून श्रीरघुनाथांचे दर्शन घडविण्याची विनंती केली. हनुमान म्हणाला, 'तुला चित्रकूटावर श्रीरघुनाथांचे दर्शन होईल.' मग तुलसीदास चित्रकूटाकडे गेले.

चित्रकूटाला पोहोचल्यावर रामघाटावर त्यांनी मुक्काम केला. एक दिवस ते प्रदक्षिणा घालण्यास निघाले होते. वाटेत त्यांना श्रीरामांचे दर्शन झाले. दोन फार सुंदर राजकुमार घोड्यावर बसून धनुष्य-बाण धारण करून जात असल्याचे त्यांना दिसले. तुलसीदास त्यांना पाहून मुग्ध होऊन गेले, परंतु ते त्यांना ओळखू शकले नाहीत. नंतर हनुमानाने येऊन त्यांना ते सर्व रहस्य सांगितले, तेव्हा त्यांना पश्चात्ताप वाटू लागला. हनुमानाने त्यांचे सांत्वन केले व उद्या प्रातःकाली पुन्हा दर्शन होईल, असे सांगितले.

वि. संवत् १६०७ च्या मौनी अमावास्येला बुधवारी त्यांच्यासमोर भगवान श्रीराम पुन्हा प्रकट झाले. त्यांनी बालरूपामध्ये तुलसीदासांना सांगितले की, 'बाबा, आम्हांला चंदन द्या.' इकडे हनुमानाने विचार केला की, तुलसीदासांना यावेळी तरी भ्रम होऊ नये. म्हणून त्याने पोपटाचे रूप धारण करून दोहा म्हटला की,

**चित्रकूट के घाट पर भइ संतन की भीर।**
**तुलसीदास चंदन घिसे तिलक देत रघुबीर॥**

तुलसीदास त्या अद्‌भुत बालरूपाचे लावण्य पाहून देहभान विसरले. भगवानांनी आपल्या हाताने चंदन घेऊन आपल्या व तुलसीदासांच्या मस्तकाला लावले व ते अंतर्धान पावले.

वि. संवत् १६२८ मध्ये ते हनुमानाच्या आज्ञेप्रमाणे अयोध्येकडे निघाले. त्याकाळी प्रयागामध्ये माघमेळा चालू होता. पर्वाच्या सहाव्या दिवसानंतर एका वटवृक्षाखाली त्यांना भरद्वाज व याज्ञवल्क्य मुनींचे दर्शन झाले. त्यांनी सूकर क्षेत्रामध्ये आपल्या गुरूकडून ऐकलेली तीच रामकथा तेथे त्यावेळी चालली होती. नंतर ते काशीला आले आणि तेथे प्रह्लाद घाटावर एका ब्राह्मणाच्या घरी ते राहिले. तेथे त्यांच्यामध्ये कवित्वशक्तीचे स्फुरण झाले आणि ते संस्कृतमध्ये पद्य-रचना करू लागले. परंतु ते दिवसा जितकी पद्ये रचत, ती रात्री लुप्त होत. असे रोज घडे. आठव्या दिवशी तुलसीदासांना स्वप्न पडले. भगवान शंकरांनी त्यांना आज्ञा केली की, तू आपल्या लोकभाषेत काव्य-रचना कर. तुलसीदासांना जाग येऊन उठून बसले. त्यावेळी भगवान शिव आणि पार्वती त्यांच्यासमोर प्रकट झाले. तुलसीदासांनी त्यांना साष्टांग नमस्कार घातला. शिव म्हणाले, 'तू अयोध्येला जाऊन राहा आणि लोकभाषेत काव्य-रचना कर. माझ्या आशीर्वादाने तुझे काव्य सामवेदाप्रमाणे पूज्य होईल.' असे म्हणून गौरीशंकर अंतर्धान झाले. त्यांची आज्ञा शिरोधार्य मानून तुलसीदास काशीहून अयोध्येला आले.

वि. संवत् १६३१ ला रचनेचा प्रारंभ झाला. त्या साली रामनवमीला अगदी तसाच योग होता, जसा त्रेतायुगात रामजन्मादिवशी होता. त्या दिवशी प्रातःकाली तुलसीदासांनी श्रीरामचरितमानसाची रचना प्रारंभ केली. दोन वर्षे, सात महिने आणि सव्वीस दिवसांनी ग्रंथाची समाप्ती झाली. वि. संवत् १६३३ मध्ये मार्गशीर्ष शुक्ल पक्षात रामविवाहाच्या दिवशी सातही कांडे पूर्ण झाली.

यानंतर भगवानांच्या आज्ञेने तुलसीदास काशीला आले. तेथे त्यांनी भगवान विश्वनाथ आणि अन्नपूर्णामातेला श्रीरामचरित मानस ऐकवले. ग्रंथ त्या रात्री विश्वनाथाच्या मंदिरात ठेवला होता.

सकाळी जेव्हा द्वार उघडले तेव्हा त्याच्यावर लिहिलेले दिसले—'**सत्यं शिवं सुंदरम्**' आणि त्याखाली भगवान शंकरांची सही होती. त्यावेळी तेथे उपस्थित असलेल्या लोकांनी '**सत्यं शिवं सुंदरम्**' असा आवाज ऐकला.

इकडे पंडितांनी जेव्हा हे ऐकले, तेव्हा त्यांच्या मनात ईर्ष्या उत्पन्न झाली. ते गोळा होऊन तुलसीदासांची निंदा करू लागले आणि तो ग्रंथ नष्ट करण्याचा प्रयत्न करू लागले. त्यांनी ग्रंथ चोरण्यासाठी दोन चोर पाठविले. चोरांना तेथे दिसले की, तुलसीदासांच्या कुटीजवळ दोन वीर पुरुष धनुष्यबाण घेऊन पहारा देत आहेत. ते मोठे सुंदर श्याम व गौर वर्णाचे होते. त्यांच्या दर्शनाने चोरांची बुद्धी पालटून ती शुद्ध झाली. त्या वेळेपासून त्यांनी चोरी करणे सोडून दिले. व ते भगवंतांच्या भजनास लागले. आपल्यासाठी भगवंतांना त्रास झाला, असे वाटून तुलसीदासांनी आपल्या कुटीतील सर्व सामान लुटून टाकले आणि तो ग्रंथ आपला मित्र तोडरमल यांच्याकडे ठेवला. त्यानंतर त्यांनी दुसरी प्रत लिहिली. तिच्याच आधारे दुसऱ्या नकला तयार केल्या जाऊ लागल्या. ग्रंथाचा प्रचार दिवसेंदिवस वाढू लागला.

इकडे पंडितांनी दुसरा काही उपाय न दिसल्यामुळे त्या वेळचे काशीतील महान पंडित श्रीमधुसूदन सरस्वती यांना तो ग्रंथ पाहाण्यास प्रवृत्त केले. श्रीमधुसूदन सरस्वती यांना तो पाहून खूप प्रसन्नता वाटली आणि त्याच्यावर आपली संमती लिहिली की–

**आनन्दकानने ह्यस्मिञ्जङ्गमस्तुलसीतरुः।**
**कवितामञ्जरी भाति रामभ्रमरभूषिता॥**

(या काशीरूपी आनंदवनात तुलसीदास हे चालते-फिरते तुलसीचे रोपटे आहेत. त्यांची कवितारूपी मञ्जरी फारच सुंदर आहे. तिच्यावर श्रीरामरूपी भ्रमर नेहमी घोटाळत असतात.)

एवढ्यावरही पंडितांचे समाधान झाले नाही. तेव्हा ग्रंथाची परीक्षा करण्यासाठी त्यांनी आणखी एक उपाय करण्याचे ठरविले. भगवान विश्वनाथांच्यासमोर वेद, त्याखाली शास्त्रे, शास्त्रांच्या खाली पुराणे आणि सर्वांच्याखाली रामचरितमानस ठेवले. मंदिर बंद करून ठेवले. सकाळी जेव्हा मंदिर उघडले, तेव्हा लोकांना दिसले की, रामचरितमानस हे वेदांच्या वरती ठेवलेले आहे. आता ते पंडित फार ओशाळले. त्यांनी तुलसीदासांची क्षमा मागितली आणि भक्तिभावाने त्यांचे चरणोदक घेतले.

आता तुलसीदास असिघाटावर राहू लागले. एके दिवशी रात्री कलियुग मूर्तरूप धारण करून त्यांच्याजवळ आले आणि त्यांना त्रास देऊ लागले. तेव्हा तुलसीदासांनी हनुमानाचे ध्यान केले. हनुमानाने त्यांना विनयाची पदे रचण्यास सांगितले. मग गोस्वामींनी 'विनय-पत्रिका' लिहिली आणि ती भगवंतांच्या चरणी अर्पण केली. श्रीरामांनी स्वतः तिच्यावर आपली सही केली आणि तुलसीदासांना निर्भय केले.

वि. संवत् १६८० श्रावण कृष्ण तृतीयेला शनिवारी असिघाटावर गोस्वामींनी 'राम राम' असे म्हणत शरीरत्याग केला.

(टीप- विक्रम संवत् मधून ५६ वजा केले असता इसवीसन वर्ष येते. वि.सं.चा प्रारंभ शालिवाहन शकाच्या कार्तिक शुद्ध प्रतिपदेला होतो.)

# श्रीरामशलाका प्रश्नावली

मानसच्या भक्तांना श्रीरामशलाका-प्रश्नावलीचा अधिक परिचय करून देण्याची गरज वाटत नाही. तिची महत्ता व उपयोगिता बहुतेक सर्व मानस-भक्तांना परिचित आहेच. म्हणून येथे खाली त्याचे फक्त स्वरूप देऊन त्यापासून प्रश्नोत्तर काढायची पद्धत आणि त्याचे उत्तर-फल यांचा उल्लेख केलेला आहे. श्रीरामशलाका-प्रश्नावलीचे स्वरूप असे आहे—

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सु | प्र | उ | बि | हो | मु | ग | ब | सु | नु | बि | घ | धि | इ | द |
| र | रु | फ | सि | सि | रहिं | बस | हि | मं | ल | न | ल | य | न | अं |
| सुज | सो | ग | सु | कु | म | स | ग | त | न | इ | ल | धा | बे | नो |
| त्य | र | न | कु | जो | म | रि | र | र | अ | की | हो | सं | रा | य |
| पु | सु | थ | सी | जे | इ | ग | म* | सं | क | रे | हो | स | स | नि |
| त | र | त | र | स | हुँ | ह | ब | ब | प | चि | स | हिं | स | तु |
| म | का | ा | र | र | म | मि | मी | म्हा | ा | जा | हू | हीं | ा | ा |
| ता | रा | रे | री | हृ | का | फ | खा | जू | ई | र | रा | पू | द | ल |
| नि | को | जो | गो | न | मु | जि | यँ | ने | मनि | क | ज | प | स | ल |
| हि | रा | मि | स | रि | ग | द | न्मु | ख | म | खि | जि | म | त | जं |
| सिं | ख | नु | न | को | मि | निज | र्क | ग | धु | ध | सु | का | स | र |
| गु | ब | म | अ | रि | नि | म | ल | ा | न | ढ़ | ती | न | क | भ |
| ना | पु | व | अ | ा | र | ल | ा | ए | तु | र | न | नु | वै | थ |
| सि | हुँ | सु | म्ह | रा | र | स | स | र | त | न | ख | ा | ज | ा |
| र | ा | ा | ला | धी | ा | री | ा | हू | हीं | खा | जू | ई | रा | रे |

या श्रीरामशलाका-प्रश्नावलीद्वारे कुणाला कधी आपल्या अभीष्ट प्रश्नाचे उत्तर मिळवायची इच्छा असेल, तर प्रथमतः त्या व्यक्तीने भगवान श्रीरामचंद्रांचे ध्यान करावे. त्यानंतर श्रद्धा-विश्वासपूर्वक मनाने अभीष्ट प्रश्नाचे चिंतन करीत प्रश्नावलीतील मनात येईल, त्या चौकोनावर बोट ठेवावे आणि त्या चौकोनात जे अक्षर असेल, ते वेगळ्या कोऱ्या कागदावर लिहून घ्यावे. आता ज्या चौकोनातील अक्षर लिहून ठेवले असेल, त्याच्यापुढे जावे आणि तेथून नवव्या चौकोनात जे अक्षर येईल तेही लिहून घ्यावे. अशाप्रकारे प्रत्येक नवव्या चौकोनात जे अक्षर येईल तेही क्रमाने लिहीत जावे आणि अशाप्रकारे प्रथम घेतलेल्या अक्षरापर्यंत यावे. तेथे पोहोचल्यावर एक चौपाई पूर्ण होईल. तिच्यामध्ये प्रश्नकर्त्याच्या अभीष्ट प्रश्नाचे उत्तर असेल.

येथे एवढे लक्षात ठेवावे की काही कोष्टकात 'आ' ची मात्रा (ा) आणि काही कोष्टकात दोन दोन अक्षरे आहेत. म्हणून गणना करताना मात्रा असलेले कोष्टक सोडून देऊ नये आणि दोन अक्षरांचे कोष्टक दोनदा धरू नये. जेथे मात्रा येईल, तेथे तिच्या पूर्वीच्या अक्षरापुढे ती मात्रा लिहून घ्यावी आणि दोन अक्षरांचे कोष्टक आले, तर तेथे दोन्ही अक्षरे एकदम लिहून घ्यावीत.

आता उदाहरणासाठी या रामशलाका-प्रश्नावलीपासून एखाद्या प्रश्नाचे उत्तर देणारी एक चौपाई घेऊया. वाचकांनी लक्षपूर्वक पाहावे. कुणी भगवान श्रीरामांचे ध्यान करून आपल्या प्रश्नाचे चिंतन करीत जर प्रश्नावलीतील हे चिन्ह असलेल्या 'म' च्या चौकोनावर बोट ठेवले आणि वर सांगितलेल्या क्रमाने अक्षरे मोजत व लिहीत गेले, तर उत्तर म्हणून ही चौपाई तयार होईल.

**हो इ हि सो इ जो रा म* र चि रा खा।**
**को क रि त र्क ब ढ़ा वै सा खा॥**

ही चौपाई बालकांडमध्ये शिव व पार्वती यांच्या संवादात आहे. प्रश्नकर्त्याला उत्तर म्हणून या चौपाईतील आशय शोधला पाहिजे की, कार्य होण्याची शंका आहे, तेव्हा ते भगवंतावर सोपविणे श्रेयस्कर होईल.

श्रीरामशलाका-प्रश्नावलीतून या चौपाईशिवाय आणखी आठ चौपाया तयार होतात. त्या सर्वांचे स्थान व फल यांचा उल्लेख खाली दिला जात आहे. एकूण नऊ चौपाया आहेत-

**१—सुनु सिय सत्य असीस हमारी। पूजिहि मन कामना तुम्हारी॥**

**स्थान**—ही चौपाई बालकांडमध्ये श्रीसीतेच्या गौरी-पूजनाच्या प्रसंगी आली आहे. गौरीने सीतेला आशीर्वाद दिला आहे.

**फल**—प्रश्नकर्त्याचा प्रश्न उत्तम आहे. कार्य यशस्वी होईल.

**२—प्रबिसि नगर कीजे सब काजा। हृदयँ राखि कोसलपुर राजा॥**

**स्थान**—ही चौपाई सुंदरकांडामध्ये हनुमानाने लंकेत प्रवेश करण्याच्या वेळेची आहे.

**फल**—भगवंतांचे स्मरण करून कार्याचा आरंभ करा. यश मिळेल.

**३—उघरहिं अंत न होइ निबाहू। कालनेमि जिमि रावन राहू॥**

**स्थान**—ही चौपाई बालकांडाच्या प्रारंभीच्या सत्संगाच्या वर्णनाच्या प्रसंगातील आहे.

**फल**—या कार्यात चांगुलपणा नाही. कार्यात यश मिळण्याविषयी शंका आहे.

**४—बिधि बस सुजन कुसंगत परहीं। फनि मनि सम निज गुन अनुसरहीं॥**

**स्थान**—ही चौपाईसुद्धा बालकांडाच्या प्रारंभीच्या सत्संगाच्या वर्णनाच्या प्रसंगीची आहे.

**फल**—खोटारड्या माणसांची संगत सोडा. कार्य पूर्ण होण्याविषयी शंका आहे.

**५—मुद मंगलमय संत समाजू। जो जग जंगम तीरथराजू॥**

**स्थान**—ही चौपाई बालकांडातील संत-समाजरूपी तीर्थाच्या वर्णनातील आहे.

**फल**—प्रश्न उत्तम आहे. कार्य यशस्वी होईल.

**६—गरल सुधा रिपु करहिं मिताई। गोपद सिंधु अनल सितलाई॥**

**स्थान**—ही चौपाई हनुमानाच्या लंकेत प्रवेश करण्याच्या वेळेची आहे.

**फल**—प्रश्न फार श्रेष्ठ आहे. कार्य यशस्वी होईल.

**७—बरुन कुबेर सुरेस समीरा। रन सन्मुख धरि काहुँ न धीरा॥**

**स्थान**—ही चौपाई लंकाकांडामध्ये रावणाच्या मृत्यूनंतर मंदोदरीच्या विलापाच्या प्रसंगात आहे.

**फल**—कार्य पूर्ण होण्यामध्ये शंका आहे.

**८—सुफल मनोरथ होहुँ तुम्हारे। रामु लखनु सुनि भए सुखारे॥**

**स्थान**—ही चौपाई बालकांडातील पुष्पवाटिकेतून फुले आणल्यावर विश्वामित्रांचा आशीर्वाद आहे.

**फल**—प्रश्न फार चांगला आहे. कार्य यशस्वी होईल.

अशा प्रकारे रामशलाका प्रश्नावलीतून एकूण नऊ चौपाया तयार होतात. त्यांमध्ये सर्व प्रकारच्या प्रश्नांच्या उत्तरांचा आशय आलेला आहे.

# श्रीरामायणजीकी आरती

आरति श्रीरामायनजी की।
कीरति कलित ललित सिय पी की॥

गावत ब्रह्मादिक मुनि नारद।
बालमीक बिग्यान बिसारद॥

सुक सनकादि सेष अरु सारद।
बरनि पवनसुत कीरति नीकी॥

गावत बेद पुरान अष्टदस।
छओ सास्त्र सब ग्रंथन को रस॥

मुनि जन धन संतन को सरबस।
सार अंस संमत सबही की॥

गावत संतत संभु भवानी।
अरु घटसंभव मुनि बिग्यानी॥

ब्यास आदि कबिबर्ज बखानी।
कागभुसुंडि गरुड के ही की॥

कलिमल हरनि बिषय रस फीकी।
सुभग सिंगार मुक्ति जुबती की॥

दलन रोग भव मूरि अमी की।
तात मात सब बिधि तुलसी की॥